महाराष्ट्र-सांवत्सरिक

इ. स. १९३२

महाराष्ट्र-सांवत्सरिक-मंडळ, पुणें.

किंमत तीन रुपये.

टिळक-स्मारक-मंदिर व टिळक-पर्स-फंड-ट्रस्ट यांनीं पुरस्कार केलेला ग्रन्थ

महाराष्ट्र-सांवत्सरिक

अथवा

मराठी वार्षिक ज्ञानसंग्रह

—इ. स. १९३३

संपादक

श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

शके १८५४] आवृत्ति पहिली [सन १९३३

किंमत तीन रुपये.

प्रकाशक

लक्ष्मण बळवंत भोपटकर, एम्. ए., एल्. एल्. बी.

अध्यक्ष, महाराष्ट्र–सांवत्सरिक मंडळ,

सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक

१ गणेश काशिनाथ गोखले

सेक्रेटरी श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५।९६ शनिवार पेठ, पुणें.

२ शंकर रामचंद्र दाते

लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव, पुणें.

३ गोपाळ बळवंत जोशी

आनंद छापखाना, टिळक रोड, पुणें.

इ. स. १९३३ ऑगस्ट १ ला

विज्ञान–बोध

व

इ. स. १९३४ ऑगस्ट १ ला

वाद–कोश

हे ग्रंथ प्रसिद्ध होतील.

ल. ब. भोपटकर

अध्यक्ष,

महाराष्ट्र, सांवत्सरिक मंडळ, पुणें

कैलासवासी लोकमान्य



बाळ गंगाधर टिळक

यांच्या

पुण्य स्मृतीस अर्पण.

को/

प्रास्ताविक चार शब्द

महाराष्ट्र सांवत्सरिक अथवा मराठी वार्षिक ज्ञानसंग्रह हा ग्रंथ आज प्रसिद्ध होत आहे या बद्दल आनंद वाटतो. या ग्रंथाची कल्पना सुमारें दोन वर्षांपूर्वी पुढें आली. प्रथम तिची चर्चा खाजगी रूपानें कांहीं मित्रमंडळींनीं केली. परंतु हें काम मोठे व पैशाचे असल्यामुळें, एकाद्या संस्थेकडून निदान प्रास्ताविक खर्चाकरितां अवश्य ती रक्कम मिळाल्याशिवाय, ती कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्यास प्रारंभ करता येणें शक्य नव्हते. परंतु टिळक स्मारक ट्रस्ट या संस्थेनें प्रथम ता. २ ऑगस्ट १९३१ रोजीं दोन हजार रुपये व ता.२५ऑगस्ट१९३२रोजीं आणखी दोन हजार रुपये या कार्याला मदत देण्याकरतां मंजर केले. या दुसऱ्या तारखेपर्यंत हा ग्रंथ बराच तयार झाला होता. तथापि आणखी कांहीं द्रव्यसहाय्याची अपेक्षा होती ती, ता. १ ऑगस्ट १९३२ रोजीं भरलेल्या सभेंत, टिळक पर्सफंड संस्थेच्या ट्रस्टींनीं १५०० रुपयांची मदत देण्याचे ठरवून सफल केली. त्यामुळें त्यानंतर लवकरच हा ग्रंथ पुरा करून छापावयास हातीं घेता आला, आणि तो आज छापून प्रसिद्ध होत आहे.

वर लिहिल्याप्रमाणें प्रथम टिळक स्मारकट्रस्टकडून व नंतर टिळक पर्सफंड ट्रस्टकडून मिळून साडेपांच हजार रुपयांची मदत या ग्रंथाला झाली. तरी या दोहोपैकीं कोणत्याहि संस्थेला ग्रंथ तयार करण्याचें काम आपल्या घरखातीं ठेऊन करतां येण्यासारखे नव्हते. त्या करतां एकादे स्वतंत्र संपादक-मंडळच हवे होते. तें रा. रा. लक्ष्मण बळवंत ऊर्फ आण्णासाहेब भोपटकर यांनीं रा. श्री. म. माटे यांच्या साहाय्यानें, निर्माण केले; व या उभयतांच्या देखरेखीखालीं हा सर्व ग्रंथ तयार झाला. या संपादक मंडळानें अर्थातच अनेक पदवीधरांची व तज्ज्ञ लोकांची मदत घेतली. शिवाय या विशेष कार्याकरितां म्हणून अनेक ग्रंथहि खरेदी करावे लागले. तसेच केसरी संस्थेचे ट्रस्टी यांनीं आपल्या कचेरींतील शक्य तितके संदर्भ ग्रंथ या कार्याकरितां संपादक मंडळाला कांहीं मुदतीनें दिले. सर्वसामान्यरीत्या, टिळक-स्मारक ट्रस्टचे दुय्यम चिटणीस म्हणून , रा. सदाशिव विनायक बापट यांनीं या कामी अवश्य तें काम प्रारंभापासून अखेरपर्यंत केले. अशा रीतीनें मनुष्यबळ, बुद्धिबळ व द्रव्यबळ यांच्या साहाय्यानें हा संदर्भ ग्रंथ तयार झाला.

या ग्रंथाची मूळ कल्पना होती त्यापेक्षा हल्ली तो पुष्कळच मोठा झाला आहे. याचे कारण ग्रंथातील माहिती व विवेचन पाहिले असता लक्षांत येईल. मूळ कल्पना अशी कीं,आज काल व्याख्याते व प्रचारक हे हिंडून फिरून लोकमत जागृत करतात त्या बरोबर ते सुशिक्षितहि केले जावे अशी अपेक्षा आहे. पण शिक्षणाला आधार माहिती, व फिरून माहितीला आधार म्हणजे अनेक संदर्भ ग्रंथ, सरकारी खात्यानें प्रसिद्ध केलेले ग्रंथ, खाजगी लोकांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ, वर्तमानपत्रें इत्यादि होत. या प्रत्येकांतील सर्वच माहितीचा उपयोग सर्वांना सारखाच होण्यासारखा नसतो. त्यांतील थोडथोडी टिपणें घेऊन ज्यानें त्यानें आपल्या विषयापुरती माहिती संगतवार जुळवून घ्यावी लागते. पण आधींच आमचे व्याख्याते व प्रचारक हे मध्यम स्थितीतले. अर्थात् ही सर्व ज्ञानसाधनें स्वत:जवळ बाळगण्याची ऐपत त्यांना असणें शक्य नाहीं; व तशा प्रकारचे ग्रंथसंग्रह किंवा वाचनालयेंहि आपल्याकडे अद्यापि झालेली नाहींत. म्हणून व्याख्याते व प्रचारक यांची अडचण लक्षांत घेऊन, पण ग्रंथसंग्रह किंवा वाचनालय अशा प्रकारची प्रत्यक्ष संस्था न काढतां एकादा संकीर्ण संदर्भ ग्रंथ तयार केल्यास तो थोडया खर्चात मिळू शकेल, व त्यानें व्याख्याते व प्रचारक यांचे पुष्कळच कार्य होईल.

हल्लीं प्रसिद्ध होणारा हा ग्रंथ या स्वरूपाचा पहिलाच असल्यामुळें, त्यांत पुष्कळच उणीवा राहिलेल्या असतील यांत शंका नाहीं. आणि अनेक व्याख्याते व प्रचारक या ग्रंथाचा उपयोग करून

परत संपादक मंडळाकडे आपला अनुभव व सूचना पाठवितील, तेव्हांच त्या उणीवा भरून निघतील हें उघड आहे. आणि अशा रीतीने मूळ काही कल्पनेनें ग्रंथ तयार करणे, व वाचकानी त्याचा उपयोग करून दुरुस्त्या सुचविणे, अशा प्रकारची परस्पर उपकारक क्रिया व प्रतिक्रिया होत गेल्यास, या ग्रंथाच्या नांवात सुचविल्याप्रमाणें या पुढें प्रतिवर्षीहि एकादा पुरवणीदाखल लहानसा ग्रंथ तयार करून छापणें हें शक्य होईल. परंतु अर्थात् ही गोष्ट, प्रस्तुत ग्रंथाच्या उपयोगाचा जो अनुभव येईल, त्यावरून ठरणारी आहे. या ग्रंथाचा उपयोग चांगला झाला असें निदर्शनास आल्यास, असा लहानसा पुरवणी–ग्रंथ काढण्यास हल्लीच्या संपादकमंडळास उमेद वाटेल हे उघड आहे, पण त्याविषयी कोणास बंधनकारक असें आज कांहींच म्हणतां येणार नाहीं हेहि खरें आहे.

या महाराष्ट्र सांवत्सरिकाच्या संपादकमंडळाने या ग्रंथाच्या रचनेची, छपाईची व प्रसिद्धीची सर्व तयारी केली, इतकेच नव्हे तर त्या संबंधानें सर्व प्रकारची आर्थिक जबाबदारीहि पत्करली, या गोष्टीची या कार्यास मोठीच मदत झाली असें म्हणावें लागतें. कारण या नव्या प्रकारच्या ग्रंथाच्या प्रती किती खपतील याविषयीं अनिश्चितता असतांहि, संपादक मंडळानें ग्रंथ विस्तृत करण्याची हौस बाळगली, व ग्रंथाच्या मानाने किंमत शक्य तितकी कमी ठेवावी अशीहि इच्छा त्यानी धरली. त्यामुळें, वर सांगितल्याप्रमाणें, दोन संस्थांकडून मिळून जरी सुमारें साडे पांच हजार रुपयांची मदत देणगी दाखल झाली तरी, अखेर सर्व जमा व सर्व खर्च यांचा मेळ घालता, फारशी शिल्लक उरावयाची आशा तर नाहीच, पण जमेपेक्षां खर्चच अधिक होण्याचा संभव फार; आणि उपरिनिर्दिष्ट संस्थाकडून मिळाले याहून अधिक द्रव्य साहाय्य मिळणें शक्य दिसत नव्हतें. म्हणून या स्थितीत या ग्रंथाची सर्व आर्थिक जबाबदारी मंडळाने पत्करली ही विशेष गोष्ट झाली असें म्हणावे लागते. कारण तशी जबाबदारी मंडळानें पत्करली नसती तर, साडेपांच हजार रुपयांची मदत होऊन देखील ग्रंथ छापून प्रसिद्ध कसा होतो याची चिंता राहिलीच असती. असो.

अशा रीतीनें सर्वांच्या सदिच्छेच्या सहकारितेने हा ग्रंथ आता प्रसिद्ध झाला. त्याला मागणीहि बरी आहे असे दिसते. तें खरे ठरून, सर्व आवृत्ति खपून, त्याच्या जमेंतून सर्व खर्च वजा जाऊन, जर कांहीं शिलक उरली तर अर्थातच ती 'सांवत्सरिक' या शब्दाला अनुलक्षून होणाऱ्या नवीन उपक्रमाकडे खर्च करण्यास मिळेल; व तसे घडल्यास हें कार्य स्वावलंबी व उत्पादक झाले असे यथार्थतेने म्हणतां येईल. टिळक स्मारक मंदिर संस्थेचें धोरण असें आहे कीं, लो. टिळकांच्या मतप्रसाराकरितां वेगळी रक्कम देऊन जें एक स्वतंत्र खाते ठेवले आहे, त्याच्या उत्पन्नांतून एखाद्या चांगल्या ग्रंथास मदत करावयाची. पण त्याची इतर जबाबदारी स्वतः संस्थेवर घ्यावयाची नाहीं. या धोरणाला अनुसरून, पूर्वी या संस्थेकडून 'गीता धर्ममंडळाला' तीन वर्षांत मिळून सत्तावीसशें रुपयांची मदत झाली होती. तथापि उपनिषद् रत्नप्रकाशाची मालकी गीताधर्ममंडळाकडेच ठेवण्यात आली. प्रस्तुत सांवत्सरिक ग्रंथास टिळक स्मारक मंदिरसंस्थेकडून जी मदत करण्यांत आली आहे ती वरील धोरणाला अनुसरूनच झालेली आहे. हा ग्रंथ लो. टिळकांच्या विशेष मताचे प्रतिपादन करणारा असा न मानला तरी, व्याख्याते व प्रचारक हे बहुश्रुत असावे अशीच लोकमान्यांची इच्छा होती या दृष्टीने, हा ग्रंथ त्यांची ही इच्छा सफल करणाराच होय. त्याच्या सहायाने प्रचारक व व्याख्याते याना, आपली प्रवचने व व्याख्यानेही साधार देऊन, लोकांच्या मनावर आपल्या वक्तृत्वाप्रमाणे शुद्ध ज्ञानाचाहि परिणाम घडविता यावा अशी उमेद आहे. म्हणून टिळकस्मारक–मंदिर संस्थेचा चिटणीस या नात्याने, हा पुरस्कृत ग्रंथ तयार करून प्रसिद्ध करण्याचे सर्व श्रम केल्याबद्दल, संपादकमंडळाचे मी आभार मानतो. टिळक पर्स फंड ट्रस्टचाहि एक ट्रस्टी मी असल्यामुळें त्या संस्थेतर्फेंहि मी आभार मानतो.

पुणें, ता. १।२।३३ **न. चिं. केळकर.**

निवेदन.

टिळक–स्मारक–ट्रस्टची जी कमिटी आहे तिच्या मनांत या ट्रस्टच्या द्वारें कै. लो. बाळ गंगाधर टिळक यांचें स्मारक म्हणून कांहीं राष्ट्रोपयोगी वाङमय प्रसिद्ध करीत रहावें असें आलें. त्याप्रमाणें कर्नाटक व महाराष्ट्र या दोन प्रांतांच्या आर्थिक स्थितीसंबंधानें निबंध लिहिणारास एक हजार रुपयांचें बक्षीस कमिटीनें ठेविलें व त्याप्रमाणें सदर निबंधास बक्षीस देण्यांत येऊन तो लवकरच प्रसिद्ध होणार आहे. याच हेतूस अनुसरून मराठी भाषेंत एक 'इयरबुक' करावें हीही कल्पना कमिटीस सुचली; व सन १९३१ सालीं भरलेल्या वार्षिक बैठकींत तिनें असा ग्रंथ तयार करण्याची कल्पना कायम केली. कल्पना कायम झाल्यावर तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचें काम तिनें मजकडे सोंपविलें, व मीही माझे मित्र श्री. दामोदर विश्वनाथ गोखले यांचे विचारानें ही जबाबदारी मजवर घेतली. अर्थात् प्रत्यक्ष ग्रंथ तयार करण्याचें काम मला व श्री.बाबूराव गोखले यांनाही हातीं घेतां येण्याजोगें नव्हतेंच.आणि म्हणून हें सर्व काम मी माझे स्नेही श्री.श्रीपाद महादेव माटे यांचेसह महाराष्ट्र सांवत्सरिक मंडळ नांवाचें मंडळ बनवून श्री. श्री. म. माटे यांजवर सोंपविलें. १९३२ सालच्या जानेवारीपासून या कल्पनेला मूर्तरूप देण्याच्या कामास सुरुवात झाली. व १९३३ सालच्या जानेवारीअखेर म्हणजे बरोबर एक वर्षांत हा प्रचंड ग्रंथ तयार होऊन वाचकांचे हातीं आज पडत आहे. अशा प्रकारच्या ग्रंथाची उपयुक्तता किती आहे हें इंग्रजी भाषेंत जीं निरनिराळ्या देशांचीं इयरबुकें अथवा सांवत्सरिकें प्रसिद्ध होतात त्यांच्या अवलोकनानेंच कळण्यासारखें आहे. अर्थात् अशा प्रकारचा ग्रंथ मराठी भाषेंत झाल्यास सामान्य वाचकांपासून तों अभ्यासकांपर्यंत सर्वांना त्याचा उपयोग होऊन शिवाय मराठी भाषेंत हा नवीनच उपक्रम चालू केला असें होईल असें दिसल्यानें हें काम मी हातीं घेतलें व आमचे मित्र श्री. माटे व त्यांचे सहकारी यांनीं मोठ्या ईर्षेनें त्याच्यामागें लागून प्रस्तुतचा ग्रंथ केवळ बाराच महिन्यांत तयार करून वाचकांपुढें ठेविला आहे. अगदीं नवीन गोष्ट करूं जाणारास सगळ्या कल्पना नवीनच बसवाव्या लागतात. त्या संपादक मंडळीनें आपल्या मनाशीं चांगल्या स्थिर करून करमणुकींत ज्ञानसाधन व ज्ञानसाधनांत करमणूक असें दुहेरी धोरण मनाशीं बाळगून ही अवाढव्य ग्रंथरचना कालमर्यादा मुद्दाम घालून घेऊन पुरी केलेली आहे. तिचा महाराष्ट्रीय जनतेनें पूर्ण फायदा घ्यावा अशी माझी या जनतेस विनंति आहे.

भाषावार प्रांतरचना केव्हां होईल ती होवो; नागपुरापासून,निजामशाहीचा मराठवाडा पोटांत घेऊन, गोव्याकडे जी एक निमुळती रेषा जाते तिच्या पश्चिमेकडील सर्व देश म्हणजे महाराष्ट्र ही ऐतिहासिक कल्पना इंग्रज सरकारच्या राज्यकारभाराच्या धोरणामुळें जरी संवयींतून गेली असली,तरी ती वाङमयांत पुन्हां पुन्हां उतरवून कायम करावी या हेतूनें खुद्द महाराष्ट्राच्या जोडीला मध्यप्रांत, वऱ्हाड, निजामशाहीचा मराठवाडा, व गोमन्तक हींही ग्रंथकल्पनेंत गोवून घेतलेलीं आहेत. अर्थात् महाराष्ट्राची जितकी माहिती प्रस्तुत ग्रंथांत देतां आली आहे तिच्या मानानें या भागांची आजच तितकी सुपूर्त देतां आली नाहीं. पण नांवाप्रमाणें हा वार्षिक ज्ञानसंग्रह जर प्रतिवर्षी प्रसिद्ध करण्याचा योग आला तर तेंही करतां येण्यासारखें आहे. ग्रंथाची कल्पना व तिचें मूर्त स्वरूप यांचें सामान्य दिग्दर्शन मी केलें आहे. ग्रंथाची उपयुक्तता काय आहे हें वाचकांनीं ठरवावयाचें आहे.

याच प्रसंगीं दुसरीही एक गोष्ट मला सांगावीशी वाटते कीं, सर्व गोष्टींचा जम नीट बसल्यास दरवर्षी टिळक पुण्यतिथीच्या दिवशीं एक नवा ग्रंथ लोकमान्यांचें स्मारक म्हणून प्रसिद्ध करावा असें आम्ही ठरविलें आहे. या हेतूस अनुसरून येत्या ऑगस्टच्या १ ल्या तारखेस **"विज्ञानबोध"** नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध होईल. **आधिभौतिक शास्त्रांची जी प्रगति होत आहे** तिचें ज्ञान समाजांत फैलावून द्यावें हा या ग्रंथाचा हेतु आहे. आजपर्यंत मुख्य मुख्य शास्त्रें कोठपर्यंत आलीं आहेत याची सामान्य वाचकाला सुद्धां समजेल अशी सुबोध माहिती यांत येईल; व मग दरवर्षी प्रत्येक बारा महिन्यांत त्या त्या शास्त्रांत काय काय प्रगति झाली असेल ती ग्रथित करणारें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध होत राहील. हे लेख त्या त्या शास्त्रांत पारंगत असलेल्या लोकांकडूनच लिहविले जातील. याशिवाय **"वादकोश"** या नांवाचा प्रस्तुत ग्रंथासारखाच एक मोठा ग्रंथ तयार करण्याचें काम लवकरच सुरू करावयाचें असें ठरविलें आहे. वेद, शास्त्रें, पुराणें, इतिहास, भाषा, न्याय, अर्थशास्त्र, वाङमय, कविता व मुख्य मुख्य कला व विज्ञानें यांत जे मोठमोठाले वाद म्हणून आहेत व विद्वानांची बहुतेक विद्वत्ता ज्या वादांशीं त्यांची ओळख असल्यामुळें जनतेस प्रतीत होते त्या सर्व वादांचीं उभय पक्षांचीं मतें या ग्रंथांत ग्रथित करावीं असें योजिलें आहे. अर्थात् १९३४ सालच्या ऑगस्ट महिन्यांत हा ग्रंथ पुरा करतां येईल असें वाटतें. वाचकांची उत्सुकता व साधनांची अनुकूलता याच्या बळावरच हीं कामें उरकावयाचीं आहेत. हीं दोन्ही आम्हांस पूर्णपणें लाभतील असा भरंवसा वाटतो. 'केसरी-प्रबोध', केळकर' ग्रंथ व 'महाराष्ट्र सांवत्सरिक' या तीनही ग्रंथांच्या वेळीं याच लाभ आम्हांस झाला आहे, हें आम्ही कृतज्ञताबुद्धीनें महाराष्ट्र वाचकांस कळवितों. असो. आज या वार्षिक ज्ञानसंग्रहाचा वाचकांनीं सप्रेम स्वीकार करावा व वर उल्लेखिलेलीं वाङमय कार्यें करण्यास आम्हांस प्रोत्साहन द्यावें, अशी आमची त्यांस विनंति आहे.

लक्ष्मण बळवंत भोपटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र सांवत्सरिक मंडळ.

पुणें, ता. ४।२।३३

प्रस्तावनेदाखल चार स्फुट शब्द

विषयांची संख्या, त्यांचा तपशील व विस्तार हीं इतकीं आहेत कीं त्या सर्वांची साकल्यानें चर्चा करणें अशक्य आहे. म्हणून कांहीं थोडया प्रकरणांविषयीं एकेक परिच्छेद लिहिला आहे.

महाराष्ट्र

नागपुरापासून गोव्यापर्यंत पसरलेला महाराष्ट्र हा आपला देश ही मुळांत खरी असलेली भावना इंग्रज सरकारच्या प्रांन्तविभागणीच्या पद्धतीमुळें शिथिल होत असली तर ती पुन्हा दृढ व्हावी या हेतूनें मध्यप्रांत, वऱ्हाड, निजामशाहीतील मराठवाडा, गोमांतक हे सर्व महाराष्ट्राचे अविभाज्य असे अवयव आम्ही या सांवत्सरिक–कल्पनेंत गोंवून घेतले आहेत. मुंबई इलाखा, मद्रास इलाखा, ही जी नामावली आपण पाठ करतों तिला धरून ही रचना केलेली नाहीं; तर इतिहास, भाषा, आणि धर्मपरंपरा इत्यादींनी ज्यांना एक बनविलें आहे त्यांना आपले सर्वांचें जीवित एकत्र चित्रिलेलें दिसावें अशी योजना केली आहे. हें करीत असतांना मध्यप्रांत व वऱ्हाड अथवा मराठवाडा यांचा जितका उत्तम परामर्ष आम्हास घेता यावा तितका आला नाहीं. विशेषत: सरकारी खात्यांची म्हणून जी हकीकत दिली आहे तींत खुद्द महाराष्ट्राची हकीकत जितक्या विस्तारानें दिली आहे तितकी या प्रान्तांची देतां आली नाहीं. पण प्रस्तुत योजना व 'सांवत्सरिक'–प्रकाशनाचा उपक्रम हा जर सर्व पोटप्रांतांना उपयोगाचा वाटतो असें दिसून आलें तर ही उणीव वार्षिक प्रकाशनाच्या वेळीं आम्ही हौसेनें भरून काढूं. दरम्यान आपण सर्व मराठी भाषा बोलणारे लोक ज्या रज्जूंनी एकत्र राहिलों आहों त्यांत समान अशा वाङमय–रज्जची भर आपण घालीत आहों एवढया विचारानें आम्हांस संतोष वाटतो. त्यांतल्या त्यांत सुख हें कीं, गोमन्तक प्रांताचें वर्णन अतिशय मुबलक असें आम्हांस देतां आलें आहे, आणि याचें सगळेंच्या सगळें श्रेय श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै यांनाच आहे. गोमन्तक हा प्रान्त निराळयाच लोकांच्या अमलांखालीं असल्यामुळें अगदीं बाजूस पडल्यासारखा होतो. या गोष्टीचें खुद्द गोमन्तकीय लोकांना व आपल्यालाही वाईट वाटतें. सरकार दरबार एक असले आणि हितांची गुंतागुंत झाली म्हणजे एकत्वाचा पोष होतो हें अगदीं खरें आहे; पण तें साध्य नाहीं तरी आपल्या इतर प्रयत्नांनी तो पोष आपण केला पाहिजे. महाराष्ट्रांतल्या निरनिराळया माणसांना आपल्या उत्सवाला बोलविणें, महाराष्ट्रांतील हरिदास, पुराणिक अथवा प्रतिपादक यांना मुद्दाम पाचारून नेणें, आपल्या जिवापाड अशीं मोठालीं वाङमयसंमेलनें भरविणें, महाराष्ट्रभर सुरू झालेल्या पतितपरावर्तनकार्याचा जोरानें पुरस्कार करण, अशासारख्या अनेक लहानमोठया गोष्टी आपले गोमन्तकीय बांधव मुद्दाम करतात; हेतु हा कीं, एकत्वाचा पोष जोरानें व्हावा. हें त्यांचें करणें लक्षांत घेऊन इकडील महाराष्ट्रीयांनीं सुद्धां या पोषास अनुकूल असेंच धोरण ठेवलें पाहिजे हें उघड आहे. यासाठीं गोमन्तकाच्या जीवनाची सर्व हकीकत या ग्रंथांत मुद्दामच दिली आहे. व एक सुंदर नकाशा ही जोडला आहे. त्यांचा इतिहास, भूगोल, राज्यघटना, राहणी, चालीरीति, व्यापारटापार, धर्मसमजुती, त्यांचीं मोठीं माणसें, त्यांच्या संस्था हे सर्व वाचकांना यथास्थळ सापडेल व त्याच्या वाचनानें दूरच्या वऱ्हाडी माणसालासुद्धां गोमन्तकाची उत्तम ओळख होईल व परस्परआत्मभावाची कल्पना वृद्धिंगत होईल, असा आम्हांस बळकट भरंवसा वाटतो.

परदेशचे हिंदी

देशोदेशीं गेलेल्या आपल्या हिंदी बांधवांची काय स्थिति आहे हें नक्की कळावें म्हणून एक चांगली व्यापक स्वरूपाची अशी प्रश्नावलि करून ती सुमारे ५६ देशांतील इंग्रज वकिलातीकडे आम्हीं रवाना केली. माहिती मिळवावयाची तर ती साधार असली पाहिजे व जर ती साधार असली पाहिजे तर वकिलातीशिवाय इतर कोणत्याही संस्थेवर अवलंबून राहतां येण्यासारखें नाहीं, हें ओळखून आम्हीं ती माहिती त्यांजकडून मागविली. ५६ पैकीं सुमारे २५ देशांच्या वकिलातींतून उत्तरें आलीं. ज्या वकिलातीकडून आलीं नाहींत त्या फार महत्त्वाच्या आहेत असें म्हण-

वत नाहीं. कारण त्या त्या देशांत आपलीं माणसें फारशी गेलेली असणेंही शक्य नाहीं. ज्या वकिलातींतून उत्तरें आली त्यांत सुद्धां मुद्दाम श्रम करून माहिती मिळवून धाडणाऱ्या वकिलाती फार थोड्या. ज्यांनीं धाडली त्यांचे आभारच मानावयास हवे. प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरें परिच्छेदरूपांत घालून आम्ही ती सर्व 'परदेशी हिंदी' या प्रकरणांत दिली आहेत.याच्या जोडीला इराण, कीनियां, टांगानिका इकडील महाराष्ट्रीयांनीं आमच्या विनंतीला मान दिला त्यांचेही आम्ही आभारी आहों. ही माहिती मागविण्यांत स्वकीयांची तेथील स्थिति कळावी हा हेतु होताच; पण स्वदेशांत जी तरुण लोकांची कुचंबणा होत आहे तिच्यांतून बाहेर पडावयास या हकीकतीवरून कांहीं मार्ग सांपडतो काय पहावें हा मुख्य हेतु होता. त्या दृष्टीनें पाहतां डॉ. कर्वे (कीनिया) डॉ. कानगो (इराण), श्री. खरे व श्री. केळकर (टांगानिका) यांच्या पत्रांचा थोडा तरी उपयोग होईल असें वाटतें. इंग्रज वकिलांच्या कचेरींतून आलेल्या पत्रांवरून इतकें मात्र दिसून येतें कीं, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका अशा कांहीं २।३ देशांत विद्येसाठीं जाणारे थोडेबहुत लोक सोडले तर बाकीच्या इतर देशांत जाणारे बहुतेक सर्व लोक हलक्या प्रतीचे व्यापारी म्हणून आणि मजूर म्हणूनच परदेशी जातात. बहुतेक सर्व, असें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, एकदोन ठिकाणीं बऱ्या प्रकारच्या नोकरीवर हिंदुस्थानांतील कांहीं थोडीशी माणसें गेलेलीं दिसतात. वास्तविक पाहतां ब्रिटिश बेटांत आपली हजारों माणसें आहेत व त्यांची बारीकसारीक सर्व माहिती मिळावयास हवी होती. ती मिळावी म्हणून जेथें जितकी कांहीं खटपट करावयास हवी होती तितकी सर्व आम्ही अर्थात पत्ररूपानें केली. शेवटीं अधिकृत तऱ्हेनें आम्हांस इतकेंच कळविण्यांत आलें कीं, "सर्व हिंदी लोकांची हकीकत जमा करण्याचें काम इकडे चालू झालें आहे,तें पुरें झालें म्हणजे तयार झालेली माहिती आपणांकडे पाठविण्यांत येईल" अर्थातच आमच्या या प्रकरणांत ब्रिटिश बेटांतील हिंदी लोकांची कांहींच हकीकत आम्हांस देतां आली नाहीं.

संस्थानें

जंजिरा, कोल्हापूर या महाराष्ट्रीय संस्थानांचे रिपोर्टस् पुन्हां पुन्हां मागवूनही आम्हांस मिळाले नाहींत यामुळें त्यांचा परामर्ष आम्हांस घेतां आला नाहीं. वास्तविक पहातां (दोन मोठालीं संस्थानें सोडून) प्रत्येक संस्थानाच्या वाटणीस एकदीडच पान आलें आहे. याहूनही त्यांची जास्त माहिती देतां आली असती तर आम्हांस आनंदच झाला असता. पण ग्रंथाचीं पानें हजार असूनसुद्धां विषयसंख्या मोठी असल्यामुळें संस्थानांना जास्त जागा देतां आली नाहीं. हैद्राबाद संस्थानचा ताजा रिपोर्ट मिळाला असता तर आम्हीं त्या संस्थानासंबंधानें दिलेल्या हकीकतीस जें केवळ नकारीचें रूप राहिलें आहे तें राहिलें नसतें. ग्वाल्हेर, इंदूर इत्यादि संस्थानें अर्थाच्या ओढाताणीनेंच बृहन्महाराष्ट्राची म्हणता येतील.वास्तविक पहातां तीं त्या त्या प्रांतांतील आहेत, त्यांचे राजे महाराष्ट्रीय आहेत इतकेंच काय तें. पण त्यांजकडून मागविलेले रिपोर्टस् जर आले असते तर त्यांचेही सारांश ग्रंथांत घेतले असते. बडोदें हें संस्थान गुजराथेंत असूनसुद्धां महाराष्ट्राचा तेथें मोठाच संबंध पोंचत असल्यामुळें संस्थानाच्या महत्त्वास अनुसरून थोडा विस्तृत सारांश दिला आहे.

चरित्रें

बृहन्महाराष्ट्रांतील बहुतेक ठळक ठळक व्यक्तींचीं चरित्रें दिलेलीं आहेत. ठळक कोण हें ओळखणें अर्थातच अवघड नव्हतें; पण असें झालेलें असणें शक्य आहे कीं, एकाद्या खरोखरीच्या ठळक माणसाचें नांव आम्हाला सुचलेंच नाहीं. असली एकादी निर्हेतुक चूक वगळल्यास असें म्हणतां येईल कीं, ज्यांच्या ज्यांच्या विषयीं आज लोकांत बोललें किंवा लिहिलें जातें त्यांची थोडथोडी माहिती या चरित्रावलीत सांपडेल. हा कोश मुख्यतः माहितीसाठीं आहे. कर्त्या माणसांची स्तुति व्हावी किंवा ग्रंथांत चरित्र आल्याचा गौरव त्याला प्राप्त करून द्यावा असा कांहींच हेतु नव्हता: पण पुष्कळ मंडळींनीं "ग्रंथासाठीं आपलें छोटेसें चरित्र धाडून द्या" या आमच्या विनंतीला केवळ विनय–बुद्धीनें मान दिला नाहीं. कांहींनीं केवळ अवहेलना बुद्धीनें धाडिली नाहींत. यामुळें कांहीं कांहीं माहितीतलीं नांवें वाचकांना आढळणार नाहींत. कांहींना ग्रंथ हटकून होईलच असें वाटलें नसावें,म्हणून किंवा चालढकलीवर गेलें म्हणून त्यांनीं आपलीं चरित्रें फार उशीरा धाडलीं. अर्थात् त्यांचाही अंतर्भाव करतां आला नाहीं. महाराष्ट्राच्या सर्व भागांतील मोठ्या माणसांचीं नांवें यावी असा हेतु असल्यामुळें जे लोक मोठे म्हणून इतर ठिकाणीं माहीत नाहींत पण त्या त्या विभागांत मात्र माहीत आहेत त्यांचींही चरित्रें मुद्दाम मागवून घातलेलीं आहेत.

संस्था

एकाद्या देशाची कल्पना यावयाची तर त्या देशांतील संस्थासंबंधीची कल्पना नेमकी करून घ्यावी असें जें म्हणतात तें अगदीं खरें आहे. देशांतील कर्तबगार लोक आरंभीं जरी केवळ जातीनेच काम करीत असले तरी कार्याच्या व्यापाबरोबर, आणि आधुनिक विचाराचा ओघ लक्षांत घेतां, त्यांची कर्तबगारी शेवटी संस्थारूपानेच प्रगट होते हें निस्संशय खरें आहे. ही बाब लक्षांत घेऊन बृहन्महाराष्ट्रांतील संस्थांची हकीकतही आम्ही या ग्रंथांत दिली आहे. ती वाचून राष्ट्रांतील एकंदर कर्तबगारीचा ओघ कोणीकडे वळता राहिला आहे हें वाचकांना सहज समजेल. संस्थांची विषयवारी व जिल्हेवारी केली असल्यामुळें कोणत्या ठिकाणीं कोणते विचार प्रबल आहेत याचाही चांगला उलगडा होईल. चरित्रांच्या प्रकरणाप्रमाणें याही प्रकरणाविषयीं आणखी कांहीं सांगावयास हवें. "आम्ही संस्थांच्या हकीकती देणार आहों" असेंच नुसतें वर्तमानपत्रांत जाहीर केलें असते तर संस्था या गंभीर नांवाला ज्या पात्र नाहींत अशा नाममात्र संस्थांनी सुद्धां आपापल्या हकीकती इकडे लिहून धाडल्या असत्या; आणि तारतम्य भावानें त्यांतल्या कांहींचा जर आम्ही परामर्ष घेतला नसता तर "आधी आमंत्रण दिलें कशाला" असें आम्हांस पुष्कळांनीं लिहिलें असतें; व कदाचित ज्या संस्था खरोखरीच श्रेष्ठ आहेत त्यांनीं कदाचित् आमच्या या केवळ जाहीर विनंतीचा अव्हेरही केला असता. म्हणून वर्तमानपत्रें, रिपोर्टस् इत्यादिकांच्या परिशीलनानें ज्यांचें संस्थापण आम्हांस माहीत झालें त्या सर्वांना हकीकती पाठविण्यासाठीं आम्ही पत्रें लिहिली व त्यांतील बहुतेकांनीं पाठविल्याही. ज्यांच्या हकीकती आम्हास परस्पर तयार करतां आल्या त्यांना आम्ही लिहीलेच नाहीं. कांहीं संस्थांनीं मात्र आमच्या विनंतीकडे शेवटपर्यंत दुर्लक्ष केले व अगदीं उशीरा आपल्या हकीकती पाठविल्या. त्यांचा अंतर्भाव आम्हांस करतां आला नाहीं याचा खेद वाटतो. महाराष्ट्राच्या दूरच्या भागांतील संस्थांच्या हकीकतीही माहितगाराकडून मुद्दाम मागवून दिल्या आहेत. इतकेही करून हें प्रकरण चांगलें पूर्ण झालें आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. लिहून आणविलेल्या किंवा रिपोर्टांत दिलेल्या हकीकती जशाच्या तशा देणें हें इष्ट व शक्यही नव्हतें. अर्थात जरूर तेवढें संकोच करून घेणें व पुनर्लिखित करणें हें जरूरच झाले.

आर्यसंस्कृति

'आर्यसंस्कृति' काय आहे हें या प्रकरणांत पाहिलें आहे. वास्तविक पाहतां या प्रकरणाचा जो दुय्यम मथळा –धर्मपंथ व धार्मिक मतें–हाच त्याचा खरा निदर्शक होय. कारण या प्रकरणांत हिंदु धर्मातील धार्मिक संस्कृतीचीच हकीकत दिली आहे. संस्कृति शब्दानें दर्शित होणाऱ्या ज्या इतर बाबी आहेत त्याचा विचार येथें केलेला नाहीं. समाजरचना, सांपत्तिक व्यवहाराच्या पद्धति, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांतील प्रगति, त्यांतील शोधांस अनुसरून बदलणारी जीविताचीं वळणें, वाङ्मयवृद्धि इत्यादि जी संस्कृतीची आणखी अंगें आहेत त्यांचा आम्हांस याच ठिकाणीं विचार करतां आला असता तर बरें झालें असतें. परंतु सर्वच गोष्टी एकत्र आणतां येत नाहींत हेंच खरें ठरतें. हेतु कितीही थोर असला व हौस कितीही बलवत्तर असली तरी हातीं घेतलेल्या प्रयत्नाला इतर दृष्टींनी मर्यादा या बसतातच; आणि म्हणून संस्कृति शब्दानें कळणाऱ्या वरील बाबींचा आम्हांस परामर्ष घेतां आला नाहीं.

जातिपरिचय

'जातिपरिचय' हें प्रकरण जिज्ञासूंना फार मनोरंजक व समाजाच्या अभ्यासास फार उपयोगी असें वाटेल. मुंबई सरकारनें इलाख्यांतील जाति व जमाती यांची सर्व जीवितवर्णनें तीस वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केलीं. तीं पुस्तकें आतां दुर्मिळ होत चाललेलीं आहेत. परंतु त्यांत सांठवलेली बहुमोल माहिती ही तर टिकून रहावयास हवी, इतकेंच नव्हें तर लोकांच्या सहज नजरेस येईल अशा ठिकाणीं ती आणून ठेवली पाहिजे असें कोणासही वाटेल. म्हणून या प्रकरणांत सुमारे ४०० जातींच्या चालीरीतींचा, राहणीचा तपशील कोष्टकरूपानें दिला आहे. तो सर्व वाचला म्हणजे हिंदुसमाजाच्या विविध स्वरूपाचा उत्तम बोध होतो आणि 'सामाजिक सुधारणा' या शब्दप्रयोगाचा अर्थ सर्व जातींना एकच असूं शकेल हें खरें वाटत नाहींसें होतें. या सर्व लोकांस सामाजिक दृष्टचा एकरूपता प्राप्त होणें हें किती अवघड आहे आणि हिंदुसमाज म्हणजे संस्कृतींच्या विविध रूपांचा एक भला मोठा अजबखानाच आहे असें त्यांस वाटूं लागेल. अशा या समाजांत लोकशाही सुरू व्हावयाची आहे हें पाहिलें म्हणजे तिच्या गती-

विषयीं आपण फार सावधच राहिलें पाहिजे असें वाटूं लागते.

पाश्चात्त्य राजकीय मतपंथ व समाजस्थिति

'पाश्चात्य समाजस्थिति' व 'राजकीय मतपंथ हीं प्रकरणें ग्रंथांत मुद्दामच घातलीं आहेत. समाजसत्तावाद (सोशॅलिझम्), सामुदायिक जीवनवाद (कम्यूनिझम्), शासनाभाववाद (अनार्किझम्) आणि फॅसिझम हे सध्याच्या काळीं पाश्चात्य देशांत अत्यंत प्रबल असे मतपंथ आहेत. त्यांचीं नांवें आपल्या वर्तमानपत्रांत आपण नेहमी वाचतों; परंतु त्यांच्या मूलतत्त्वाविषयीं आपणांस इतकीशी माहिती नसते. म्हणून ती येथें दिली आहे.एकाच वेळीं या चारही तत्त्वांचे पक्षपाती तिकडील देशांत प्रबल बनलेले असावे याचें मोठें आश्चर्य वाटतें. पहिले तीन वाद् हे पंथरूपानें जरी निरनिराळीं रूपें घेऊन उठले असले तरी त्यांच्या मूल स्वरूपांत कांहीं सारखवटपणा खास आहे. पण चवथा जो फॅसिझम, तो यांच्या साफ विरुद्ध असूनही इटली देशांत व आतां जर्मनींत त्याची मोठी चलती सुरूं आहे. परस्परविरोधी अशीं तत्त्वज्ञानें अगदीं शेजारीं शेजारीं उत्कर्षास पोहोचली आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणीची फलश्रुति ही सारखीच चांगली आहे असें दिसून येत आहे. बोल्शेव्हिक तत्त्वें प्रचारांत आणून लोकांना आपण जितके सुखी करतों असें रशियाचें म्हणणें तितकेंच फॅसिझम्च्या आचारानें आपल्या लोकांस मीही सुखी करतों असें इटलीचें म्हणणें. पण दोनही तत्त्वांचा जो एवढा विजय दिसत आहे तो या तत्त्वांचें स्वयंभू बल सारखेंसारखें आहे म्हणून नव्हे; तर त्यांचा प्रसार व आचार करण्याच्या पद्धति सारख्याच बलवत्तर आहेत म्हणून, असें वाटतें. दोघांचीही संघटना सारखीच मोठी म्हणून फलश्रुतिही सारखीच चांगली असें दिसतें. फलश्रुतीवरून मूलतत्त्वांचें स्वयंभू बळही सारखेंच आहे असें जर कोणी म्हणेल तर सामाजिक तत्त्ववेत्ते हें म्हणणें पत्करणार नाहींत. सामुदायिक जीवनपद्धतीचें तत्त्व अधिक मूलगामी आहे व म्हणून सदोष असूनसुद्धां तें, आगाऊच उच्छिन्न झालेल्या कल्पनांनीं मिश्रित असें जें फॅसिझम्चें तत्त्व त्यापेक्षां जास्त स्वीकार्य वाटेल असें वाटतें. पण फॅसिझमचा पराभव केल्यावरही या सामुदायिक जीवनतत्त्वाला स्वतःचेच प्रकृतिगत दोष जाणवूं लागतील;कारण मनुष्याच्या मनाचें स्वातंत्र्य, त्याची वैविध्यावरील भक्ति, व माणसांच्या बुद्धिसामर्थ्यांतील विषमता हीं या तत्त्वज्ञानाच्या चाकोरींतून पुन्हां पुन्हां बाहेर पडूं पाहतील व मनुष्ययोनींत ज्या अर्धवटांचाच नेहमी सुकाळ असतो त्यांच्या अधिकाराची छाप स्वतंत्र मतें व स्वतंत्र बुद्धि पत्करणार नाहींत. हा जसा समाजरचनेचा प्रश्न युरोपास भारून राहिला आहे, तसाच दुसरा म्हणजे स्त्री–पुरुषांच्या नात्यासंबंधाचा होय. वास्तविक पाहतां, तिकडील देशांतील या दोनही प्रश्नांचीं मुळें तेथील अर्थविचारांतूनच बाहेर पडलेलीं आहेत हें जरी खरें असलें तरी स्त्रीदास्यविमोचन हें एक बुद्धिमंतांचें तात्त्विक बंड होतें. स्त्री–पुरुषांचीं कर्तव्यक्षेत्रें अगदीं भिन्न आहेत, कारण कीं त्यांच्या शरीररचना भिन्न आहेत. पण त्या तशा असूनसुद्धां विशिष्ट कर्तव्यक्षेत्रांचीं सरमिसळ होण्यास कांहीच हरकत नाहीं असा नवा विचार बळ धरूं लागला व स्त्रियांची बुद्धिमत्ता व कर्तबगारी जों जों जास्त प्रत्ययास येऊं लागली तों तों या वादाचें केवळ बंडखोरीचें रूप जाऊन त्याला सामाजिक तत्त्वज्ञानाचा गौरव प्राप्त झाला. अर्थातच, जर स्त्री–पुरुषांच्या बरोबरीचीं व तीं तीं सामर्थ्यें स्पष्टपणें व्यक्त करते तर आर्थिकदृष्ट्या सुद्धां तिने पुरुषावर कशासाठीं अवलंबून रहावें हें ओघानेच आलें. तसेंच

साम्राज्यें माजलीं; शास्त्रशोधांनीं सुखसोयी झाल्या; लोकसंख्या जोरानें वाढूं लागल्या; यांतून आपोआपच निघालें कीं, या वाढत्या माणसांची सोय काय करावी? पृथ्वीवरचा जो प्रदेश अजून रिकामा असेल तो ताब्यांत घेऊन तेथें वस्ती करावी; लोकांच्या देशांतल्या गर्दींत आपण घुसावें व दुर्बलास हुसकून लावून चांगल्या कोष्टकांत जाऊन बसावें; व हें होईना तर प्रजाच वाढूं न देण्याचा इलाज करावा. असे मार्ग युरोपियन लोकांना सुचले. पैकीं पहिल्या दोहोंचा अंमल पुष्कळ दिवस चालूंच आहे; तिसऱ्याचा अंमल उशीरा सुरूं झाला असला तरी जोरानें होत आहे. वास्तविक पाहतां बुद्धिमंतांनीं कळून सवरून करावयाच्या या गोष्टी आहेत व अडाणी लोकांनीं त्यांचें बघून वागावयाचें असें आहे. पण बुद्धिमान लोक सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठीं ज्या गोष्टी सांगतात त्या समाजांतील वाईट लोक आपल्या फंदाकडे लावून घेतात. व त्यामुळ त्या त्या वस्तूची मूळची बौद्धिक उंची खालावते व समाजांत लफंग्या लोकांचें प्रमाण नेहमीं पुष्कळच असल्यामुळ मूळ शुद्ध कल्पना दूषित होऊन जातात. कदाचित् एक जागतिक प्रश्न सोडविण्या-

साठीं किंवा निदान एक प्रादेशिक प्रश्न सोडविण्यासाठीं शास्त्रविशारदांनीं संततिनियमन सांगितलें; पण पोराबाळांची अडगळ आपल्याला नको, कारण ती सुखस्वातंत्र्याच्या आड येते, असें मानण्याकडे पुष्कळांची प्रवृत्ति होऊं लागली. दरिद्री जोडपी आपल्या सोयीसाठीं याच प्रणालींत मुद्दाम शिरलीं. पण यामुळें कितीही गोंधळ माजले, व ते बराच काळ टिकले तरी वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्याचा एक प्रादेशिक इलाज व दारिद्र्य वाढूं न देण्याचा एक कौटुंबिक इलाज या नात्यानें संततिनियमनाची किंमत शिल्लक उरणारच. परंतु बेताल लोकांची संख्या नेहमींच जास्त असते आणि ते चांगल्या तत्त्वाचे अर्थ आपल्या प्रवृत्तीस अनुकूल असे करून घेतात; व त्यामुळें एकाद्या देशाचा सांस्कृतिक दर्जा काय हें या बहुसंख्य लोकांच्या आचारावरून ठरतें. वास्तविक पहातां उन्नत विचार प्रसविणारांनीं विचारांची जी शीग लाविली तिनें त्या त्या देशाची संस्कृतिमर्यादा ठरावी, पण वर लिहिलेल्या कारणास्तव विपरीत प्रकार होतो. प्रत्यक्ष लोकसत्तावादाचेंहीं असेंच ठरत आहे. स्वातंत्र्य, बंधुभाव व समता ही विचाराची प्रथा बुद्धिमंतांनीं चालूं केली व तिचा अंमल चालूं झाल्यावर युरोपच्या प्रतिनिधीभूत माणसांना सुद्धां वाटलें कीं, आतां नवें युग लागलें; व माणसाच्या जातीचे हाल कायमचे संपले. पण आज पहावें तों डेमॉक्रसीवरचा विश्वास युरोपखंडांत डळमळूं लागला आहे. याचें कारणही आतां सांगितलें तेंच आहे. या तीनही सोज्ज्वल तत्त्वांचे अंमल आपल्यावर चालवून घेण्यास देशांतील बहुतेक सर्व माणसें सोज्ज्वलच असावयास हवीं. पण तसें सहसा असत नाहीं यामुळें समाजांत फंदफितुरी माजून समाजाचा दर्जा खालावत जातो, व अशा स्वरूपाचा बहुसंख्य समाज त्या त्या देशाच्या संस्कृतीचा निर्णायक बनतो. यामुळें चांगलीं तत्त्वें हीन ठरतात. म्हणून युरोपांत चाललेल्या धडपडीकडे पाहिलें म्हणजे तेथील लोकांना नांवें ठेवण्याची प्रवृत्ति होते ती प्रथमदर्शनीं साहजिक असेल, पण तत्त्वशोध करतां करितां बरोबर आहे असें मात्र म्हणवत नाहीं.

कालगणना

प्रत्येक देशाच्या इतिहासांत त्या त्या समाजाचे जिणे किती जुने आहेत हें दिलेलें असते. तसेंच तेथील लोकांचे संस्कृतिविचार इतर देशांतून आले असतील तर त्यांचीही भूतकालीन कालगणना देण्याची वहिवाट इतिहासकार ठेवतात. हीच पद्धति सामान्यपणें सांवत्सरिकें रचणारांनीसुद्धां ठेवलेली असतें. आमच्या कालगणनेच्या प्रकरणांत आम्ही या कल्पनेचा थोडा विस्तार केला आहे. पृथ्वीवरील सर्व देशांतील जें कालगणन माहीत होणें सर्वांच्याच हिताचें आहे तें सर्व एकत्र करून द्यावें हा हेतु धरून आम्ही तो बराचसा तडीस नेला आहे असें आम्हांस वाटतें. देशोदेशीचे राजे, त्यांच्या राण्या या केव्हां मेल्या आणि लढाया कोठकोठें झाल्या, असले सन आम्ही जमा केले नाहींत. ज्या सनांवरून मनुष्ययोनीच्या मोठमोठाल्या हालचाली कळतील असे, व कलाकौशल्यें, शास्त्रशोध, विद्याभिवृद्धि, विवाहसंस्था इत्यादि संस्कृतिविषयक बाबतींत देशोदेशीच्या लोकांनी जी प्रगति केली आहे त्या प्रगतीच्या मार्गावरील ठळक ठळक असे होतां होईतों सर्व सन एकत्र आणले आहेत. अर्थात आम्ही ज्या ग्रंथावरून हे सन गोळा केले आहेत ते इंग्रजीतच असल्यामुळें इतर देशांतील लोक आपापल्या कालगणनेंतील ज्या विशेषांना महत्त्व देत असतील, तेच विशेष आम्हांस घेतां आले असतील असें हटकून म्हणतां यावयाचें नाहीं. तथापि उपलब्ध सनावळींचा जितका चांगला उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे तितका आम्ही घेतला आहे असें आम्हांस वाटतें. सनावळी वाचत असतांना मनाला मोठी अनुकूल आंदोलनें मिळून मनुष्ययोनीची एकात्मता हीं बुद्धीला चांगली पटते. या कालखंडांत हे लोक मोठे, त्या कालखंडांत ते लोक मोठे, आज या देशांत बुद्धीचा विलास तर उद्या त्या देशांत तोच विलास हेंही दृष्टोत्पत्तीस येऊन सृष्टीच्या कोणत्या तरी एका प्रसुप्त न्यायास अनुसरून सर्व देशांना व सर्व मानववंशांना वैभवें, सत्ता व सुखें ही प्राप्त होत आलीं आहेत असें दिसतें व त्या योगानें आपल्या सद्यःकालीन हीन स्थितीचें हीनपण मनाला कमी बोचूं लागते. हिंदू लोकांचीं साम्राज्यें ब्रह्मदेश, सयाम इकडे आठआठशें वर्षेपर्यंत चालूं होतीव सीलोनकडून सयामकडे आपली पैरवी समुद्रावरूनहि हजारो वर्षांपूर्वी चालूं होती हें पाहून आपण शूर व साहसी लोकांचे वंशज आहों ही जी अंध जाणीव, तिला डोळसपणा प्राप्त होतो व अशा प्रकारच्या वैभवशाली हिंदु लोकांना नेमकी कोणत्या कालीं व कोणच्या कारणानें अवदशा प्राप्त झाली हें पहावयास मन उद्युक्त बनतें. इतरही अनेक सूचक विचार मनांत भरतात. जे शास्त्रशोध अगदीं अलीकडे लागले आहेत असें आपण म्हणतों त्यांतले

कित्येक हजारो वर्षांपूर्वीच लागून गेलेले होते व भूतलावरील जे प्रदेश अगदीं अलीकडे माणसाच्या जातीला सांपडले असें आपण म्हणतो ते फार प्राचीन कालीं माणसांना माहीत होते हें या कालगणनेंत पाहिलें म्हणजे हीं ज्ञानें मवेंच कां कुंठित झालीं, असा विचार मनांत उद्भवतो व मग ज्ञानप्रसाराचीं व ज्ञानरक्षणाचीं जी साधनें सध्या उपलब्ध आहेत त्यांचें महत्त्व केवढें आहे हेंही मनांत भरतें. अशा एक ना दोन, कितीतरी सूक्ष्म गोष्टींची प्रतीति या वाचनानें मनाला होते. असो.

सरकारी खातीं

सरकारच्या बहुतेक सर्व खात्यांचे अहवाल आम्हीं होता होईतों तपशीलवार दिले आहेत. ज्या खात्यांच्या कारभारासंबंधानें किंवा रचनेसंबंधानें वाचकांना तात्त्विक अगर व्यावहारिक अशी माहिती जास्त पोहोचवावयास हवी असें आम्हांस वाटलें त्या खात्यासंबंधीं तशी माहिती मुबलक दिलेली आहे. चलन काय, हिंदी चलनाची प्रस्तुत स्थिति काय, सरकारची दौलत (State Finance) कोणती व ती कशी वहिवाटली जाते, बँकांचे व्यवहार कसे चालूं असतात इत्यादि प्रश्न सामान्य वाचकाला अगदीं अपरिचित असतात. अशा प्रकारच्या ज्या कांहीं उलाढाली चालूं असतात त्या आपल्याला कांहीं कळत नाहीत. पण त्याचीं फळें मात्र आपणांस भोगावीं लागतात. हें असें कां होतें हें मात्र समजत नाहीं. म्हणून त्या त्या विषयांच्या तात्त्विक पीठिका वाचकांना माहित होतील अशी व्यवस्था ठिकठिकाणीं केली आहे.

उद्योगधंद्याचें प्रकरण वाचलें म्हणजे वाचकाच्या मनाला खरोखर खिन्नता येईल. ज्या देशांतून कोटचवधि रुपयांचा अतिशय सुबक आणि कलाकुसरीचा असा माल बाहेर जात असे त्या देशांत "येथें थोडे जरीचे कांठ होतात, तेथें रेशमी कांठ होतात, येथें भांड्यांवर आकृति बरी काढतात व तेथें जाडचा भरडचा घोंगडचा बऱ्या होतात" असलीं वर्णनें आपणांस वाचावी लागणें हें मोठें दुर्भाग्य होय. नवीन कलाकुसरीचा उदय होतो आहे व म्हणून उद्योगधंद्याचीं रूपें लहान आहेत असें नव्हे, तर पूर्वीची कलाकुसर मरत मरत चालली आहे व म्हणून हे लहान लहान दिसत आहेत हें आपल्या मनावर चांगलें ठसतें. पण महाराष्ट्रीय लोकांनी त्यांतल्यात्यांत एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही की, हस्तकौशल्य, कलाकुसर हें सर्व उत्तरेकडे तरी जास्त दिसेल किंवा कर्नाटकांत उतरले असतां जास्त दिसेल; पण ज्याला 'खास महाराष्ट्र' असें म्हणण्याची वहिवाट आहे त्याला याचें फारसें वारें नाहीं. चरबट घोंगडचा आणि भल्या लठ्ठ पासोडचा काढण्यांत आपण हे घाटमाथ्यावरचे लोक खुष आहों असें दिसतें ! असो.

सर्वच सरकारी खात्यांविषयीं लिहावयाचें तर तीस पस्तीस परिच्छेद लिहावयास हवेत. एवढ्या सर्व लिखाणाचा अंतर्भाव या प्रस्तावनेंत करतां येण्यासारखा नाहीं. कारण ग्रंथाची पृष्टमर्यादा आगाऊच संपून गेली आहे. शिक्षण, आरोग्य, पोस्ट, पतपेढ्या, शेतकी, विमान विद्या, रेल्वे इत्यादि प्रकरणें वाचलीं म्हणजे एकंदरीनें पहातां सामाजिक दृष्ट्या जनतेचें पाऊल पुढें पडत आहे, असें म्हणावयास कांहींच हरकत वाटत नाहीं. हुजूर दौलत, परदेशचा व्यापार, न्याय, बँकांचे व्यवहार उद्योगधंदे इत्यादि प्रकरणें वाचलीं म्हणजे आपले आपण धनी होणें किती जरूर आहे हें पटतें.

ग्रंथाची छपाई

श्री. शंकरराव दाते, मॅनेजर लोकसंग्रह छापखाना, व श्री. गणपतराव गोखले सेक्रेटरी श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, यांनीं केली आहे. थोडी श्री. गोपाळराव जोशी मॅनेजर, आनंद प्रेस यांनीं केली आहे. श्री. दाते यांना आमच्या या कामाची किती दगदग पडली हें त्यांना व आम्हांला माहित. त्यांच्यासारख्या शांत व सालस माणसाशीं आमचा प्रसंग होता म्हणूनच सर्व कामें बिनबोभाट झालीं. तब्बल एक महिना आपल्या सर्व सहकारी मंडळीसह ते या आमच्या कामांत अहोरात्र खपले. श्री. गोखले यांनींही छपाईची गोष्ट काढतांच एकदम होकार देऊन अतिशय सुबक असें काम करून दिलें. त्यांनीं हें काम पतकरलें नसतें तर ग्रंथाचें रूप इतकें चांगलें दिसलें नसतें. श्री. जोशी व त्यांचे सहकारी श्री. गुर्जर यांनींहि मदतीची आवश्यकता आहे असें कळवितांच काम घेतले व तत्परतेनें करून दिलें. या सर्व सद्गृहस्थांचे आम्ही फार ऋणी आहों.

ग्रंथांत चार **नकाशे**, अनेक **फोटो**, व आठ **प्रमाणदर्शिका** घातल्या आहेत. नकाशे व प्रमाण–दर्शीका तयार करण्याचें काम येथील भारत प्रिंटिंग. वर्क्सचे मालक श्री. गुर्जर यांनीं किती उत्तम तऱ्हेनें बजावलें आहे याची साक्ष त्या त्या वस्तूच देतील. जितके प्रकार

तितके नकाशे, असें करावयाचे म्हटलें असतें तर तें काम अनावर झालें असतें. म्हणून अनेक भूविशेषांचा व इतरही माहितीचा संग्रह एकेका नकाशांतच करावा लागला व हें काम श्री. गुर्जर यांनीं मोठ्या मेहनतीनें व कुशलतेनें केलें आहे. फोटोग्राफचे बहुतेक ब्लॉक्स श्री. पोतनीस यांनीं तयार केले आहेत. त्यांनीही आपलें काम फार सुंदर केले आहे. चित्रशाळा, केसरीकचेरी, आर्यभूषण, समर्थ भारतप्रेस या संस्थांनीं आपल्या संग्रहीं असलेले कांहीं ब्लॉक्स आम्हांस उपयोगार्थ दिले व अनेक सद्गृहस्थांनीं ब्लॉक्स तयार करावयासाठीं आपल्या जवळचे फोटो दिले. या सर्वांचे आम्ही फार ऋणी आहों.

फोटो द्यावयाची कल्पना थोडी उशीरा निघाली. आधुनिक महाराष्ट्रांतील दिवंगत व जिवंत अशा कर्तबगार व गुणी माणसांचीं चित्रें द्यावीं असा बेत ठरला, आणि जमवाजमव करतां करतां मूळ फोटो जमवून त्यावरून ब्लॉक करतां आले ते, व कांहीं थोडे निराळ्या आकाराचें ब्लॉक इतर संस्थांकडून मिळाले ते सात पानें भरून दिले आहेत. अर्थात ज्यांचीं चित्रें द्यावयाचीं असें ठरविलें त्या सर्वांचींच देतां आलीं नाहीं. उदा:—नाना शंकरशेट, डॉ. भाऊदाजी, डॉ. आनंदीबाई जोशी, विष्णुबोवा ब्रम्हचारी, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, मोरमकर, गणेश व्यंकटेश जोशी, व क्रिकेटपटु पी. बाळू यांचीं चित्रें देतां आलीं असतीं तर बरें झालें असतें.

हा ग्रंथ तयार करतांना आम्हांस अनेक पुस्तकांचा उपयोग करून घ्यावा लागला. त्यांची याद फारच मोठी आहे. शिवाय आम्ही त्यांचा उपयोग करून घेतला आहे तो इतका अल्प व सामान्य स्वरूपाचा आहे कीं त्यांचीं नांवें दिल्यानेंच त्याचें ऋण फिटेल असें नाहीं. पण शेतकीविषयीं लिहितांना श्री. कुलकर्णी, श्री. परांजपे, रा. ब. केळकर, श्री. गर्गे, श्री. कोगेकर, श्री. देशपांडे, श्री बाळ महाजन, व हैदराबादसाठी श्री. कुळकर्णी यांच्या पुस्तकांचा फारच उपयोग झाला हें कृतज्ञताबुद्धीनें सांगावयास हवे. तथापी आमची मुख्य मदार सरकारने प्रसिद्ध केलेल्या हरतऱ्हेच्या वाङ्मयावरच आहे. ग्रंथाला प्रामाण्य येण्यास याच साहित्याचा उपयोग करून घ्यावयास हवा होता हें उघड आहे. या वाङ्मयाचा तपशीलवार उल्लेख करावयासच हवा असें नाहीं.

ज्या सन्मान्य लोकांकडून मुद्दाम लेख लिहून घेतले त्यांची व लेखांचीं नांवें:—

(१) बृहन्महाराष्ट्रांतील हवामान—श्री. रामचंद्र जनार्दन **गोखले**, बी. ए. (पान १०८—१०९) (२) गोमंतक—श्री. दत्तात्रय व्यंकटेश **पै** संपादक 'हिंदु' गोवा. (पान ११३—१५१). (३) इराण डॉ. **कानगो**, (पान १५३—१५४). ४ झांजीबार श्री. पी. बी. खरे, (पान १५५—१५७). (५) मफिया—श्री. के. आर. **केळकर**, (पान १५८ ते १५९). (६) मोंबासा—डॉ. शंकर धोंडो **कर्वे** (पान १५९—१६०). (७) महानुभाव पंथ श्री. यशवंत खुशालराव **देशपांडे**, (पान १६९ ते १७१). (८) आर्यसमाज—बॅरि. छोटेलालजी **आग्रवाल**. एम्. ए. (कॅंटब). (पान १७१—१७६) (९) बोल्शेव्हिझम्—श्री. पांडुरंग वासुदेव **गाडगीळ**. वाङ्मयविशारद (पान २४५—२५८). (१०) अबकारी खातें—प्रो. दत्तात्रय बळवंत **गोडबोले**. एम्. ए. एल्. एलॅ. एम्. (पान ३२१ ते ३२३). (११) हुजूरदौलत—प्रो. राजाराम विनायक **ओतूरकर**, एम्.ए. (पान ३५४—३८४) (१२) खुला आणि संरक्षित व्यापार—प्रो. दत्तात्रय गोपाळ **कर्वे**, एम्. ए. (पान ३८५—३९१). (१३) ग्रामपंचायत प्रसार—डॉ. बाबासाहेब **परांजपे** (पान ४२४—४२९). (१४) चलन—प्रो. दत्तात्रय गोपाळ **कर्वे**, एम्. ए. (पान ३४४—ते ४४०). (१५) हिंदी चलन—विचार—प्रो. **कोल्हटकर**, एम्.ए. (पान ४४१—४४६). (१६) हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार—प्रो. राजाराम विनायक **ओतूरकर**, एम्.ए. (पान ४५८—४७७) (१७) दर्यावर्दी पणाच्या धंद्यांत प्रवेश—श्री. श्रीधर गोपाळ **देशपांडे**, डफरीन बोट, खलाशी. (पान ४८०—४८१). (१८) न्यायखातें—श्री. श्रीपाद रामचंद्र **पाळंदे**, एम्. ए. एलएल्. बी. (पान ४९१—५०७). (१९) पिकें, भाज्या व फळें यांचे हंगाम—श्री. विष्णुपंत **फाटक**, (पान ५३१—५३२). (२०) दूधदुभतें—श्री. शंकर गणेश **नवाथे** बी. ए. (पान ५३७—४०). (२१) शेतीचीं जनावरें—श्री. शंकर गणेश **नवाथे**, बी.ए. (पान ५४४—५४७). (२२) संस्कृत विद्येची पूर्वीची शिक्षण पद्धति—महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री **पाठक**. (पान ५५९—५६२). (२३) पेढ्यांचे व्यवहार—प्रो. दत्तात्रय बळवंत **गोडबोले** एम्. ए. एल्.एल्. एम्. (पान ५९४—६०७) (२४) जर्मन खंडणी—प्रो. मनोहर रामचंद्र **पाळंदे**, एम्. ए. (पान ८९६—९०१)

(२५) वऱ्हाडचा प्रश्न—श्री. नारायणराव आमणगांवकर, संपादक 'उदय' (पान८९१–८९५) (२६) खोती—श्री. गजानन बाळकृष्ण चितळे बी. ए. एल्. एल्. बी. (पान ८८८–८९१) (२७) व्हिटॅमिन—श्री. व्ही. एन् पटवर्धन, एम्. एस्. सी. (पान सं. ३९–४४) (२८) परलोकविद्या—श्री. वि. दा. ऋषी. (पान सं. ४४–४६) (२९) मजूर वर्गाची संघटना —श्री. नानासाहेब भोंडे बी. ए. एल्एल्. बी. (पान सं. १–२) (३०) मराठी भाषा श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए. (सं. ३२–३५) (३१) हिंदुस्थानांतील भाषा—श्री. वन्सीलाल शिवदेव बिसावा बी. ए. (पान सं. ३५–३९)

मंडळास लेखन–सहाय्य केल्याबद्दल या सर्व विद्वानांचे आम्ही फार आभारी आहों.

संपादक–वर्ग

१ दत्तात्रेय बापूजी रानडे एम. ए.
२ पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे एम. ए.
३ लक्ष्मण कृष्ण गोडबोले एम. ए.
४ महादेव दत्तात्रेय राजमाचीकर बी. ए.
५ शंकर गोविंद साठे
६ वसंत हरि गोळे
७ गणेश विष्णु केतकर
८ दिगंबर विठ्ठल गाडगीळ

या मंडळींनी संपादकाच्या कामीं जी मेहेनत केली ती खरोखर बिनमोल आहे. सर्वांनींच फार दक्षतेनें व आपलेपणानें कामें केलीं व म्हणून हें अत्यन्त दगदगीचे व मेंदूस शीण आणणारें काम इतक्या जलदीनें झालें. त्यांच्या तत्परतेकडे व बौद्धिक श्रमाच्या तयारीकडे पाहिलें म्हणजे तरुण लोकांचे गट बनवून निरनिराळीं कामें कोणी शिरावर घेतलीं तर तीं खास यशस्वी होतील असें वाटूं लागते. गोडीचें सहकार्य म्हणजे काय असावें याचा नमुना या मंडळींनीं दाखविला. यामुळें किचकट कामाचीही जिकीर झाली नाहीं. व सर्वांनाच परस्परांचें साहचर्य फार सुखाचे गेलें. पण सर्व सहकाऱ्यांसंबंधानें मनांत प्रीति असून सुद्धां श्री. साठे, श्री. राजमाचीकर व श्री. गाडगीळ यांच्यासंबंधानें मला खास असें कांहीं लिहावयास हवें. हजार पानें, नकाशे, फोटो, प्रमाणदर्शिका हे सर्व छापून ध्यावयाचें व तेंही एक महिन्यांत हें फार शीण आणणारे काम आहे. त्यांतही तीन ठिकाणीं काम चालू! पण श्री. गाडगीळ यांनीं या कामांत विलक्षण दक्षता दाखविली व श्रम तर जुमानलेच नाहींत. कामांतील हुशारी व दक्षता या त्यांच्या गुणांचा फार उपयोग झाला. श्री. राजमाचीकर यांनीं हरएक प्रकारचें संपादनाचें काम केले व तें उत्तम केलें. हजारो विषय व बारीक बारीक तपशील; यामुळें बुद्धीला वर्दळ फार पडते. पण ती सर्व सहन करून शिवाय कचेरीची शिस्त, टापटीप, व कारभाराची व्यवस्था हीही त्यांनीं उत्कृष्ट ठेविली. श्री. साठे ग्रंथाच्या मूळ सूक्ष्म कल्पनेपासून तों ग्रंथ प्रसिद्धीपर्यंत प्रत्येक कामांत आणि हरएक प्रकरणांत माझ्या मदतीला आज सतत बारा महिने सदैव सज्ज आहेत. ग्रंथाच्या कल्पनेपासून तों सिद्धीपर्यंत सर्व बारीकसारीक सुद्धां तपशिलातून त्यांचे मन माझ्याबरोबरच भ्रमण करीत पुढें गेलेलें आहे. वयाच्या मानानें कामाचा फार मोठा बोजा त्यांनीं उचलिला; वेळीं अवेळीं पडेल तेव्हां कामें केलीं; कंटाळा एकदांसुद्धां केला नाहीं. पत्रव्यवहाराचें प्रचंड लिखाण तर बहुतेक त्यांच्या हातूनच झाले. त्यांच्या सहकार्याचें स्मरण मी कृतज्ञताबुद्धीनें सदैव ठेवीन.

संपादन कल्पना संपतांच 'व्यवहाराची' सुरू होते ! प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. शंकरराव जोशी यांनीं सांवत्सरिकाच्या व्यवहाराचे काम त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनें चोख बजावलें. केसरीचे मुख्य एजंट श्री. प. वि. महाजन यांनी ग्रंथविक्रीच्या कामाची व्यवस्था त्यांच्या नेहमीच्या टापटिपीनें समाधानकारक अशी केली. श्री. सदाशिवराव बापट यांनीं कच्चे छाप तपासण्याच्या कामांतील अडचण तरून जाण्यास आम्हाला फार साह्य केलें. कोणच्याही कामांत आम्हांला साह्यासाठीं सदैव तयार असणाऱ्या या मित्रांचे आम्ही फार ऋणी आहों.

श्रीपाद महादेव माटे
संपादक

अनुक्रमणिका

प्रकरण	पृष्ठें
कालगणना	१ ते ४८
इ. स. पूर्व.	१ ते १६
इ. स. पासून पुढें	१६ ते ४८
१९३२ ची रोजनिशी	४९ ते ५५
हिंदुस्थानच्या इतिहासाची रूपरेषा	५६ ते ६८
वेदकाल	५६ ते ५८
बुद्धकाल	५८ ते ६०
हिंदुधर्माचा काळ	६० ते ६३
मुसलमानांचा हिं. शीं. संबंध	६३ ते ६५
मध्यप्रांत व वऱ्हाडचा इतिहास	६५ ते ६८
हिंदुस्थानची भौगोलिक माहिती	६९ ते ११२
सीमा	६९
क्षेत्रफळ	६९
हिं. तील पर्वत	७०
" पर्वतांची शिखरें	७०
" थंड हवेचीं ठिकाणें	७०
" उष्णोदकाचे झरे	७०
" प्रमुख नद्या	७० ते ७१
" धबधबे	७१
" सरोवरें	७१
किनारा	७२
किनाऱ्या लगतचा मुलूख	७२
सिंधुगंगेचें खोरें	७२ ते ७३
पठार प्रदेश	७३ ते ७४
हिं. तील प्राणी	७४
महाराष्ट्रांतील जि. वर्णनें	७४ ते ९२
महा.च्या जिल्ह्यांतील खेडीं	९२ ते ९४
मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील जिल्ह्यांची वर्णनें	९४ ते ९६
हैद्राबाद संस्थान (मराठवाडा)	९७ ते ९८
हिं. तील पाऊसमान	९८ ते ९९
महा.च्या जिल्ह्यांतील पावसाची मासिक सरासरी-पत्रक	१०० ते १०६
हिं. तील उष्णतामान	१०७ ते १०८
बृहन्महाराष्ट्रांतील हवामान	१०८ ते ११०
हिं. तील ब्रिटिश प्रान्त व देशी संस्थानें	११० ते १११
हिं. चे राजकीय विभाग	१११
मुंबई इलाखा	१११
मध्यप्रांत व वऱ्हाड	१११ ते ११२
हिं. तील ब्रिटिशेतर राष्ट्रांची ठाणी	११२
गोमंतक	११३ ते १५१
भूप्रकृति	११३ ते ११५
भूसंस्कृति	११५ ते ११८
प्रेक्षणीय स्थळें व सृष्टिसौंदर्य	११८ ते १२१
व्युत्पत्ति	१२१ ते १२२
इतिहास	१२२ ते १३१
राज्यव्यवस्था	१३१ ते १३७
लोकस्थिति	१३७ ते १५१
उपसंहार	१५१
परदेशांतील हिंदी	१५२ ते १६१
आर्यसंस्कृति धर्मपंथ व धार्मिक मतें	१६२ ते १७६
वेद	१६२ ते १६४
बुद्धधर्म	१६४
जैनधर्म	१६५
दर्शनें	१६५ ते १६७
वारकरी पंथ	१६७
लिंगायत ऊर्फ वीरशैव	१६७
वैष्णव संप्रदाय	१६७–१६८
शैव संप्रदाय	१६७–१६८
थिऑसफी	१६८
नाथपंथ	१६८
कबीरपंथ	१६८
सत्पंथ	१६८
महानुभावपंथ	१६९ ते १७१
आर्यसमाज	१७१ ते १७६
जातिपरिचय	१७७ ते २०७
पाश्चात्य समाजस्थिति	२०८ ते २३९
आजकालचे लैंगिक विचार	२०८
लैंगिक नीतीची आवश्यकता	२०८
लैंगिक शिस्त	२०८
नवीन लैंगिक विचार	२०८ ते २०९
फराइड व लैंगिक गोष्टींचें महत्त्व	२०९ ते २१०
स्त्री व पुरुष	२१०
लिंग व क्रीडावृत्ति	२१०

स्त्रिया व लैंगिक प्रेम	२११
पाश्चात्य विवाह-संस्थेचा बोजवारा	२११ ते २१२
तात्पुरता विवाह	२१२ ते २१३
सुप्रजाजनन	२१३
दहा मुलें म्हणजे कांहीं फार नाहीं!	२१३ ते २१४
स्त्रिया व संततिनियमन	२१४
संततिनियमन कीं युद्ध	२१४ ते २१५
लोकसंख्या	२१५ ते २१८
घटस्फोटासंबंधीं मतें	२१८ ते २२१
पाश्चात्य विवाहसंस्थेची वाताहात	२२१ ते २२५
'मदर इंडिया'ला जवाब	२२५ ते २२९
ढोंगी काका	२२९ ते २३९
राजकीय मतपंथ	**२४० ते २६७**
समाजसत्तावाद (सोशालिझम्)	२४० ते २४५
बोलशेव्हिझम्	२४५ ते २५८
शासनाभाववाद	२५८ ते २५९
फॅसिझम्	२५९ ते २६७
देशी उद्योगधंदे	**२६८ ते ३०३**
मुंबई इलाख्यांतील देशी उद्योग धंदे	२६८ ते २७१
मुं. सरकारच्या औद्योगिक खात्याचें कामकाज	२७१ ते २७७
मुं. इ. तील यान्त्रिक व व औद्यो. शाळा	२७७ ते २७९
" "हस्तकौशल्याच्या धंद्याची सद्यःस्थिति	२७९ ते २८८
बृहन्महाराष्ट्रांतील कारख्यांची व मजुरांच्या संख्येची यादी	२८८ ते ३०२
हिं. तील सन १९२९ मधील उद्योगधंद्याचे सारपत्रक	३०२ ते ३०३
सहकारी पतपेढ्या	**३०४ ते ३२०**
हिंदुस्थान विषयक	३०४ ते ३०५
मुंबई इलाख्यांतील पतपेढ्या	३०५ ते ३१३
महाराष्ट्रांतील पतपेढ्या	३१३ ते ३१६
पतपेढ्यांच्या माहितीचा तक्ता	३१६ ते ३२०
अबकारी खातें	**३२१ ते ३२३**
आरोग्य खाते	**३२४ ते ३४२**
टपालखातें व तारखातें	**३४३ ते ३५३**
हुजूर दौलत	**३५४ ते ३८४**
खुला आणि संरक्षित व्यापार	**३८५ ते ३९१**
पोलीस खातें व तुरुंग	**३९२ ते ३९८**
जंगल खातें	३९९ ते ४०९
स्थानिक स्वराज्य	**४१० ते ४३३**
हिंदुस्थान विषयक	४१० ते ४२०
मुं.इलाखा सिंध विषयक	४२१ ते ४२४
ग्रामपंचायत प्रसार	४२४ ते ४२९
कोष्टकें	४३० ते ४३३
चलन	**४३४ ते ४४०**
हिंदी-चलन-विचार	**४४१ ते ४४६**
भूगर्भशास्त्र	**४४७ ते ४४८**
पुराणवस्तु संशोधन	**४४८ ते ४५०**
विमान खातें	**४५१ ते ४५४**
हवामान खातें	**४५५ ते ४५७**
हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार	**४५८ ते ४७७**
हिंदी आरमार खातें	**४७८ ते ४८२**
दर्यावर्दीपणांत प्रवेश	४८० ते ४८१
मच्छीमार	४८१ ते ४८२
बंदरे व समुद्रप्रवास	**४८३ ते ४८६**
आगबोटीच्या भाड्याचे दर	४८४
पासपोर्टचे नियम	४८६
मुंबईतील परराष्ट्रीय प्रतिनिधींची ठिकाणें	४८६
रेलवे खातें	**४८७ ते ४९०**
न्याय खातें	**४९१ ते ५०७**
सैन्य घटना व कांहीं लढाऊ जाती	**५०८ ते ५२५**
सैन्यघटना	५०८ ते ५१५
लढाऊ जाती	५१६ ते ५२५
शेतकी खातें	**५२६ ते ५५८**
शेतकी	५२६ ते ५३७
दुधदुभतें	५३७ ते ५४१
कीड जाण्यास उपाय	५४१ ते ५४३
सुधारलेलीं आऊतें	५४३ ते ५४४
शेतीचीं जनावरें	५४४ ते ५४७
पाणी कोठें लागेल	५४७ ते ५५१
दुष्काळांचे टिपण	५५१ ते ५५५
महापूर	५५५ ते ५५६
टोळधाडी	५५६ ते ५५८
शिक्षण खातें—	**५५९ ते ५९३**
संस्कृत विद्येची पूर्वीची शिक्षण पद्धति	५५९ ते ५६२
हल्लींच्या संस्कृत पाठशाळा	५६२
शिक्षण (हिंदुस्थानविषयक)	५६२ ते ५६८
विश्वभारती शांतिनिकेतन, बोलपूर	५६९ ते ५७३

हिंदू विश्व विद्यालय ५७३ ते ५७५
मराठी राज्यांतील विद्योत्तेजन ५७५ ते ५७८
मुंबई विद्यापीठ ५७८ ते ५८०
लष्करी शिक्षण . ५८० ते ५८४
ब्रि. बेटांतील उच्च शिक्षणाची सोय. ५८४ ते ५८६
शिक्षणाच्या वाढीचे तक्ते, वगैरे ५८६ ते ५९३
पेढयांचे व्यवहार ५९४ ते ६०७
विमा ६०८ ते ६१८
विम्याचे प्रकार ६०८ ते ६०९
हिंदी विमा कंपन्या ६०९ ते ६१८
खानेसुमारी १९३१ ६१९ ते ६२६
चालू उद्योग ६२७ ते ६३८
धर्मकोश ६२७ ते ६२८
प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास ६२८ ते ६२९
मध्ययुगीन चरित्रकोश ६२९ ते ६३०
मराठी वाङ्मयाचा इतिहास ६३०
महाभारत संशोधन ६३० ते ६३१
महाराष्ट्र शब्दकोश ६३१ ते ६३२
पुणें भाषाशास्त्र मंडळ ६३२ ते ६३३
शास्त्रीय उद्योग-शिक्षण संस्था ६३३
पुणें शिक्षण प्रसारक मंडळीची नवी योजना ६३४
सेवस इन्स्टिटचूट, कर्जत ६३४ ते ६३५
श्रीछत्रपति संभाजी चरित्र–कार्यालय, लिमिटेड ६३५
श्रीशिवचरित्र कार्यालय पुणें ६३५ ते ६३६
श्रीसयाजी शासनशब्द–कल्पतरू ६३६ ते ६३७
हिंदुधर्मशास्त्र संशोधन व सुधारणा मंडळ ६३७ ते ६३८
प्रचलित राज्यघटना ६३९ ते ६४८
सायमन कमिशन ६४९ ते ६६०
गोलमेज परिषद् ६६१ ते ७२०
प्रास्ताविक ६६१ ते ६६५
पहिली गोलमेज परिषद ६६५ ते ७००
दुसरी ,, ७०० ते ७१८
तिसरी गोलमेज परिषद ७१८ ते ७२०
हिंदी मतदान कमिटी ७२१ ते ७२४
करार ७२५ ते ७२९
जाति-प्रतिनिधि-प्रमाणनिर्णय ७२५
मौ. महमद अल्लीचें सूत्र व बॅ. जिनांचे १३ मुद्दे ७२६
पुणें करार ७२६ ते ७२७
अलाहाबादचा करार ७२७ ते ७२९
चरित्रें ७३० ते ७९३
संस्था ७९४ ते ८८७
उपस्थित प्रश्न ८८८ ते ९१४
खोती ८८८ ते ८९१
वऱ्हाडची दुर्धर स्थिति ८९१ ते ८९५
जर्मन खंडणी ८९६ ते ९०१
ओटावा करार ९०२ ते ९०३
कुलाबा जिल्ह्याची फाळणी ९०४
कर्नाटकाचा प्रश्न ९०४ ते ९०६
सिंधचें विभक्तीकरण ९०६ ते ९०७
मांचूरियांतील चीन–जपान–वाद. ९०७ ते ९१२
नाझीपक्ष ९१२ ते ९१४
संस्थानें ९१५ ते ९४०
संकीर्ण (यास स्वतंत्र पृष्ठें दिली आहेत) १ ते ४७
मजूरवर्गाची संघटना १ ते २
जग २ ते ३
जगांतील राज्यकर्ते ३ ते ५
जगांतील अद्भुत गोष्टी ६ ते १०
महत्त्वाचे शोध १० ते १३
महत्त्वाची वैमानिक उड्डाणें १४ ते १५
नोबेल प्राईझमेन १६ ते १८
ब्रिटिश बेट १९
कौन्सिल ऑफ स्टेट वगैरेचे सभासद २० ते ३०
अस्पृश्य लोक ३१
मराठी भाषा ३२ ते ३५
हिंदुस्थानांतील भाषा ३५ ते ३९
व्हिटॅमिन ३९ ते ४४
परलोकविद्या ४४ ते ४६
राष्ट्रीय सभेची अधिवेशनें ४७
नकाशे
१ पिकें ८१
२ गोमंतक ११३
३ रेलवे ४८९
४ जातिप्रमाण ६४९
प्रमाण–दर्शिका
१ कारकान्यांतील मजूर–संख्या २८९
२ देवीची पिछेहाट ३२९
३ प्लेगचे चढउतार ३३७
४ कर्च व वसूल यांची प्रमाणवक्रें ६१
५ साक्षरतेचें प्रमाण ५६९
६ लोकसंख्या ६१६
७ लोकसंख्या–प्रमाण ६२५
८ मतदार–प्रमाण ७२१

विषयसूची

अवकारी खातें ३२१–३२३
अमेरिका दारूबाज २३७–२३८
अलाहाबादचा करार ७२७
अलीगड मुस्लीम युनिव्हर्सिटी ५६८
अस्पृश्य लोक संकीर्ण ३१
आगबोटीचे भाडयाचे दर ४८४
आरमार खातें ४७८–४८०
आरोग्यखातें ३२४–३४२
आर्यसमाज १७१–१७६
आर्यसंस्कृति १६२–१७३
(धर्मपंथ व धार्मिक मतें)
इतिहास–गोमंतक १२२–१३१
इतिहास–दख्खनचा ६२–६५
इतिहास–बुद्धकाल ५८–६०
इतिहास–मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांताचा ६५–६८
इतिहास–वेदकाल ५६–५८
इतिहास–हिंदुधर्मकाल ६०–६२
इतिहास (हिंदुस्थानच्या
इतिहासाची रूपरेषा) ५६–६८
इतिहासाची भौतिक मांडणी २४८–२५०
इ. स. पासून पुढें १६–४८
इ. स. पूर्व १–१६
उद्योगधंदे–बृहन्महाराष्ट्रांतील
(कारखाने व मजूर) २८९–३०२
उद्योगधंदे–मुंबई इ. तील २६८–२८८
उद्योगधंदे–हिंदुस्थानांतील ३०२–३०३
उपस्थित प्रश्न ८८८–९१४
उस्मानिया विद्यापीठ ५६८
ओटावा करार ९०१–९०३
अंदाजपत्रक ३८१
इंपीरियल बँक ५९६–६००
कबीर पंथ १६८
कर देण्याचें सामर्थ्य म्हणजे काय? ३५५
करार ७२५–७२९
करार, अलाहाबाद ७२७
करार, ओटावा ९०१–९०३
करार, पुणें ७२६
कर्नाटकाचा प्रश्न ९०४–९०६
कॉमनवेल्थ विमा कम्पनी ६११
कालगणना १–४८
कीड जाण्यास उपाय ५४१–५४३
कुलाबा फाळणी ९०४
को–ऑपरेटिव्ह सोसायटच्या-तक्ता ३१७–३२०
कौन्सिल ऑफ स्टेट-सभासद संकीर्ण २०–२२
खातें अवकारी ३२१–३२३
" आरोग्य ३२४–३४२
" खानेसुमारी ६१९–६२६
" जंगल ३९९–४०९
" टपाल व तार ३४३–३५३
" न्याय ४९१–५०७
" पोलीस व तुरुंग ३९२–३९८
" रेल्वे ४८७–४९०
" विमान ४५१–४५४
" शिक्षण ५५९–५९३
" शेतकी ५२६–५५८
" संरक्षण ५०८–५१५
" हवामान ४५५–४५७
" हिंदी आरमार ४७८–४८०
खानेसुमारी (१९३१) ६१९–६२६
खोती ८८८–८९१
खंड कीं कर ३७३
गुन्ह्यांचा रिपोर्ट (१९३०) ५०५
गोमंतक ११३–१५१
गोमंतक–इतिहास १२२–१३१
गोमंतक–उपसंहार १५१
गोमंतक–प्रेक्षणीय स्थळें ११८–१२१
गोमंतक–भूप्रकृति ११३–११५
गोमंतक–भूसंस्कृति ११५–११८
गोमंतक–लोकस्थिति १३७–१५१
गोमंतक–राज्यव्यवस्था १३१–१३७
गोमंतक–व्युत्पत्ति १२१–१२२
गोलमेज परिषद ६६१–७२०
गोलमेज परिषद (पहिली) ६६१–७००
" (दुसरी) ७००–७१८
" (तिसरी) ७१८–७२०
गोलमेज परिषद–अल्पसंख्याक समाज
सबकमिटीचा रिपोर्ट ६८५
" प्रांतिक राज्यघटना " " " ६८२

" फेडरल स्ट्रक्चर " " " " ६६८
" ब्रम्हदेश " " " " ६८७
" मतदान " " " ६८८
" संरक्षण " " " ६९०
" सर्व्हिसेस् " " " ६९४
" सिंधचें विभक्तीकरण " " " ६९७
गोंडवण ९४
ग्रामपंचायत प्रसार ४२४–४२९
घटस्फोटासंबंधीं मतें २१८–२२१
चरित्रें ७३०–७९३
चलन ४३४–४४०.
चलन–विचार (हिंदी) ४४१–४४६
चालू उद्योग ६२७–६३८
जकात ३६८
जकातीचे चालू दर ४७३–४७५
जग संकीर्ण २–३
जगांतील अद्भुत गोष्टी संकीर्ण ६–१०
जगांतील राज्यकर्ते अथवा
शासनसंस्थांचे मुख्य संकीर्ण ३–५
जमिनीचा सारा ३७२–३७५
जर्मन खंडणी ८९६–९०१
जाति–प्रतिनिधी–प्रमाण–निर्णय ७२५
जैनधर्म १६५
जंगलखातें ३९९–४०९
टपालखातें ३४३–३५३
टोळधाडी ५५६–५५८
डिस्ट्रिक्ट बोर्डें ४१४, ४१८–४२०
ढोंगी काका २२९–२३९
ढोंगी काकांच्या धर्माचें मर्म २३६–२३७
तारखातें ३४३–३५३
तारेचे दर ३५२
तुरुंग ३९७–३९८
थिऑसफी १६८
दर्यावर्दीपणाच्या धंद्याचे प्रॉस्पेक्टस ४८०
दर्शनें १६५–१६७
दहा मुलें म्हणजे कांहीं फार नाहीं! २१३–२१४
दुष्काळ ५५१–५५५
दूधदुभतें ५३७–५४१
देशी उद्योगधंदे २६८–३०३
धर्मकोश ६२७
नवभारत इन्शुअरन्स कंपनी लि. ६११
नाझीपक्ष ९१२–९१४
नाथपंथ १६८
नीतिमत्तेचे गड्डे व अनीतीचे अड्डे! २३५-२३६
नोबेल प्राइझ् मेन संकीर्ण १६–१८
न्यायखातें ४९१–५०७
परदेशांतील हिंदी १५२–१६१
परराष्ट्रीय प्रतिनिधींचीं ठिकाणें ४८६
परलोकविद्या संकीर्ण ४४– ४६
पाणाडचे ५४९
पाणी कोठें लागेल? ५४७–५५१
पाश्चात्य समाजस्थिति २०८–२३९
पासपोर्टसंबंधीं नियम ४८०
पिकांची लागवड व खतें ५३०–५३७
पुणें करार ७२६
पुराण–वस्तु संशोधन ४४८–४५०
पेढ्यांचे व्यवहार ५९४–६०७
पोर्तुगीज ११९–१२०, १२५–१५१
पोलीसखातें ३९२–३९७
पंचायत ४१४
पंचायत–ग्राम–प्रसार ४२४–४२९
पोस्टाचे दर ३५२
प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास ६२८
प्राप्तीवरील कर ३६९–३७०
फॅसिझम २५९–२६७
फांशी ५०६–५०७
बालमृत्यू ३२४–३२८
बुद्धधर्म १६४
बोल्शेव्हिझम् २४५–२५८
बंदरें ४८३
बंदरांतील व्यापार ४८५
ब्रिटिश बेटें संकीर्ण १९
भाषाशास्त्रमंडळ, पुणें ६३२
भाषा–हिंदुस्थानांतील संकीर्ण ३५– ३९
भांडवलाचें केंद्रीकरण २५०
भूगर्भशास्त्र ४४७–४४८
मच्छीमार ४८१–४८२
मजूर वर्गाची संघटना संकीर्ण १–२
मतदान कमिटी (हिंदी) ७२१–७२४
मदर इंडियाला जबाब २२५–२२९
मध्यप्रांत–वऱ्हाड–इतिहास ६५–६८
मध्यप्रांत-वऱ्हाड-जिल्हयाचीं वर्णनें ९४–९६
मध्यप्रांत-वऱ्हाड-राजकीय-विभाग १११–११२
मध्यप्रांत-वऱ्हाड-शिक्षण-वाढ ५८९–५९०
मध्यप्रांत-वऱ्हाड–शिक्षणसंस्था ५९१–५९२
मध्ययुगीन चरित्रकोश ६२९
मराठी भाषा संकीर्ण ३२– ३५
मराठी वाङमयाचा इतिहास ३०
महानुभाव पंथ १६९–१७१
महापूर ५५५–५५६

महाभारत–संशोधन ६३०
महाराष्ट्र (बृहत्)–कारखाने व मजुरांची संख्या २८८–३०२
महाराष्ट्र–खेड्यांची संख्या ९२– ९४
महाराष्ट्र–जिल्हे व तालुके १११
महाराष्ट्र–जिल्ह्यांचीं वर्णनें ७४–९२
महाराष्ट्र–पतपेढ्या ३१३–३१६
महाराष्ट्र-पावसाची सरासरी-पत्रक १००–१०६
महाराष्ट्र–वाऱ्यांचा परिणाम १०९
महाराष्ट्र–शब्दकोश ६३१
महाराष्ट्र (बृहत्)–हवामान १०७–१०८
महाराष्ट्र–हवेची हिनावहता १०९–११०
माल्थसचा सिद्धांत २१६
मेस्टन करार ३५९
मांचूरिया वाद ९०७–९१२
मुंबई-परराष्ट्रीय प्रतिनिधींचीं ठिकाणें ४८६
मुंबई इलाखा–आरोग्यखातें ३२४–३४२
मुंबई इलाखा–खानेसुमारी ६२४–६२६
मुंबई इलाखा–जंगलखातें ३९९–४०९
मुंबई इलाखा-देशी उद्योगधंदे २६८–२७१
मुंबई इलाखा-पोलिसखातें व तुरुंग ३९२–३९८
मुंबई इलाखा–बालमृत्यू ३२४–३२८
मुंबई इलाखा–यांत्रिक व औद्योगिक शाळा २७८–२७९
मुंबई इलाखा–राजकीय विभाग १११
मुंबई इलाखा–शिक्षणवाढ ५८७–५८८
मुंबई इलाखा–सहकारी पतपेढ्या ३०५–३१२
मुंबई इलाखा–सांथी ३२८–३४२
मुंबई इलाखा–स्थानिक स्वराज्य ४२१–४२४
मुंबई इलाखा-हस्तकौशल्याचे धंदे २७९–२८८
मुंबई कौंसिल–सभासद संकीर्ण २७–३०
मुंबई विद्यापीठ ५७८–५८०
मुंबई विद्यापीठ–पुत्रीकृत महाविद्यालयें ५९३
मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याचें कामकाज २७१–२७७
म्युनिसिपालिटी ४१०–४२४
म्युनिसिपालिट्या–आदा व खर्च ४३०–४३३
राजकीय मतपंथ २४०–२६७
राज्यघटना (प्रचलित) ६३९–६४८
राष्ट्रीय कर्जाचें स्वरूप ३७७–३८१
राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें संकीर्ण ४७
रिझर्व्ह बँक ६००
रेल्वेखातें ४८७–४९०
रोजनिशी १९३२ सालची ४९–५५
लढाऊ जाती ५१६–५२५
लष्करी अधिकार श्रेणी ५१५
लष्करी शिक्षण ५८०–५८४
लिंग व क्रीडावृत्ति २१०
लिंगायत ऊर्फ वीरशैव पंथ १६७
लेजिस्लेटिव्ह असेंब्ली–सभासद संकीर्ण २२–२७
लेटन रिपोर्ट ३६०
लैंगिक गोष्टींचें महत्त्व,फ्राइड व २०९–२१०
लैंगिक नीतीची आवश्यकता २०८
लैंगिक प्रेम, स्त्रिया. व २११
लैंगिक विचार आजकालचे २०८
लैंगिक विचार नवीन २०८
लैंगिक शिस्त २०८
लोकसंख्या २१५–२१८
लोथियन कमिटीचा रिपोर्ट ७२१–७२४
वर्गयुद्ध २५०
वऱ्हाडची दुर्धर स्थिति ८९१–८९५
वारकरी पंथ १६७
विदर्भ ९४
विद्योत्तेजन, मराठी राज्यांतील ५७५–५७८
विमा ६०८–६१८
विमानखातें ४५१–४५४
विमा–व्हाल्युएशनचे तुलनात्मक आकडे ६१६–६१८
विम्याचे प्रकार ६०८–६०९
विवाह, तात्पुरता २१२–२१३
विवाहवृक्षाचीं मधुर फळें २३४–२३५
विवाहसंस्थेचा बोजवारा २११–२१२
विवाहसंस्थेची वाताहात,पाश्चात्य २२१–२२५
विश्वभारती शिक्षणसंस्था ५६९–५७३
वेद १६२–१६४
वेस्टर्न इंडिया विमा कंपनी ६०९
वैमानिक उड्डाणें(महत्त्वाचीं) संकीर्ण १४-१५
वैष्णव संप्रदाय १६७
व्यापार–खुला व संरक्षित ३८५–३९१
व्यापार–हिंदुस्थानचा परदेशाशीं ४५८–४७७
व्हिक्टोरिया ज्युबिली टेकनिकल इन्स्टिटयूट २७९
व्हिटामिन संकीर्ण ३९–४४
शासनाभाववाद २५८–२५९
शास्त्रीय उद्योग–शिक्षण संस्था ६३३
शिक्षण औद्योगिक ५६४
शिक्षणखातें ५५९–५९३
शिक्षण प्रसारक मंडळीची नवी योजना ६३४
शिक्षण (लष्करी) ५८०–५८४
शेतकी ५२६–५३७
शेतकीखातें ५२६–५५८

शेतीचीं जनावरें	५४४–५४७
शैव संप्रदाय	१६७
शोध–महत्त्वाचे संकीर्ण	१०–१३
शांतिनिकेतन, विश्वभारती	५६९–५७०
शांतिपाठाचें भेसूर संगीत	२३८
श्रीछत्रपति संभाजी चरित्र कार्यालय, लि.	६३५
श्रीशिवचरित्रकार्यालय, पुणें	६३५
श्रीसयाजी शासनशब्द कल्पतरु	६३६
सत्पंथ	१६८
समाजसत्तावाद (सोशालिझम्)	२४०–२४५
समुद्रप्रवास	४८३–४८६
सहकारी पतपेढ्या	३०४–३२०
" पतपेढ्या–मुंबई इलाख्यांतील	३०५-३१२
" पतपेढ्या–हिंदुस्थानविषयक	३०४-३०५
सायमन कमिशन	६४९–६६०
सुधारलेलीं आऊतें	५४३
सुप्रजाजनन	२१३
सेक्स इन्स्टिटयूट, कर्जत (कुलाबा)	६३४
सैन्य–घटना	५०८–५१५
संतति-नियमन कीं युद्ध?	२१४
संरक्षण–खर्च	५१०–५१२
संरक्षण खातें	३७६,५०८-५१५
संस्कृत विद्येची शिक्षणपद्धति	५५९–५६२
संस्था	७९४–८८७
सांथी–प्रमुख रोगांच्या	३२८–३४२
सिंधचें विभक्तीकरण	९०६–९०७
स्त्रिया व लैंगिक प्रेम	२११
स्त्रिया व संततिनियमन	२१४
स्त्री व पुरूष	२१०
स्थानिक स्वराज्य	४१०–४३३
हवामानखातें	४५५–४५७
हस्तकौशल्याचे धंदे–मुं. इ.	२७९–२८८
हिंदी आरमारखातें	४७८–४८०
हिंदी चलन विचार	४४१–४४६
हिंदी मतदान कमिटी	७२१–७२४
हिंदी विमा कंपन्या	६०९–६१८
हिंदुधर्मशास्त्र–संशोधन व सुधारणा–मंडळ	६३७
हिंदु विश्वविद्यालय	५७३
हिंदुस्थान–आयात व्यापार	४६२
हिंदुस्थान इतिहासाची रूपरेषा	५६–६८
हिंदुस्थान–उद्योगधंदे	३०२–३०३
हिंदुस्थान–उष्णतामान	१०७–१०८
हिंदुस्थान–उष्णोदकाचे झरे	७०
हिंदुस्थान–किनारा	७१
हिंदुस्थान–किनाऱ्यालगतचा मुलूख	७२
हिंदुस्थान–खानेसुमारी	६१९–६२३
हिंदुस्थान–टपालखातें व तारखातें	२४३–२५३
हिंदुस्थान–थंड हवेचीं ठिकाणें	७०
हिंदुस्थान–धबधबे	७१
हिंदुस्थान–नद्या	७०
हिंदुस्थान–निर्यात व्यापार	४६७
हिंदुस्थान–न्यायखातें	४९१–५०७
हिंदुस्थान–पठार प्रदेश	७३
हिंदुस्थान–परदेशाशीं व्यापार	४५८–४७७
हिंदुस्थान–पर्वत	७०
हिंदुस्थान–पर्वतांचीं शिखरें	७०
हिंदुस्थान–पाऊसमान	९८–१०६
हिंदुस्थान–प्रचलित राज्यघटना	६३९–६४८
हिंदुस्थान–प्राणी	७४
हिंदुस्थान–ब्रिटिशेतर राष्ट्रांचीं ठाणीं	११२
हिंदुस्थान–ब्रिटिश प्रांत व देशी संस्थानें	११०–१११
हिंदुस्थान–भाषा संकीर्ण	३५–३९
हिंदुस्थान–भौगोलिक माहिती	६९–११२
हिंदुस्थान–महाराष्ट्र	७४–९४
हिंदुस्थान–राजकीय विभाग	१११–११२
हिंदुस्थान–रेल्वेखातें	४८७–४९०
हिंदुस्थान–विमानखातें	४५१–४५४
हिंदुस्थान–शिक्षण	५६२–५८६
हिंदुस्थान–शेतकी खातें	५२६–५५८
हिंदुस्थान–सरोवरें	७१
हिंदुस्थान–सहकारी पतपेढ्या	३०४–३०५
हिंदुस्थान–सीमा	६९
हिंदुस्थान–सैन्य	५०८–५१५
हिंदुस्थान–संरक्षण खातें	५०८–५१५
हिंदुस्थान–सिंधुगंगेचें खोरें	७२–७३
हिंदुस्थान–स्थानिक स्वराज्य	४१०–४३३
हिंदुस्थान–हवामानखातें	४५५–४५७
हिंदुस्थान–क्षेत्रफळ	६९
हुजूरदौलत	३५४–३८४
हैद्राबाद संस्थान (मराठवाडा)	९७–९८
होमचार्जेस	३७६–३७७

ठळक चुकांचें शुद्धीपत्र

(कामाच्या जलदीमुळें ग्रंथामध्यें अशुद्धें पुष्कळच राहिलीं आहेत, याची आम्हांस जाणीव आहे. त्यांतील ठळक चुकांची दुरुस्ती खालीं दिली आहे).

—संपादक

पृष्ठ	कॉलम	ओळ	शुद्ध
७		५	लायकरगस
८		३८	सूर्यग्रहण
१६		१३	गणिती हेरो यानें...कोष्टक
२१		२४	५८७
२५		१०	गृहण
३४		४३	१६५८
४४		२१	ठाकूर
६८	२	१२	त्यापुढें
७०	२	१३	देवालयानजीक
७१	१	३	शरावतीचा
८९	२	२	दहा
११०	१	१४	रोगट
११३	२	५	७३° ४५'
१२१	२	२६	अन्त
१२२	१	१३	फॅर्नांद लॉपिश
१२३	१	२४	अधिसत्तेखालील
१२४	२	६	१३६६
१३४	१	२३	त्रिबुनाल
१६२	२	१	ब्राम्हणांत आहे.
१७१	१	१	तीं या पंथाची
२१४	२	४२	जपान
२५५	१	८	आपोआपपणा
२५९	१	३२	करण्यांत काय अर्थ
३०५	१	४२	३.८९ लक्ष
३२७	१	३	१ ते ६
३३३	१	३	खानदेशांत, ३ प. खानदेशांत व
३३५	२	१८	५०९४
३३६	१	४२	१/४
३४५	१	६	२८.७५ कोटी रु.
३५४	१	१	अनुक्रमणिका
३६९	२	२२	१००००
४१८	२	१८	१४.०३
४३१		४	११७५९१४
"		५	२७०७७५
४३६	१	४२	अननुभूत
४४४	१	३६	गोल्डबेसिस्
४४८	१	२६	नॅचरल गॅस
४६५	१	१२	१९२९–३०
४८१	१	१६	३ वर्षांच्या
४८८	२	६	शें. २८.०२
४९१	२	३२	प्राड्विवाक मन्त्रि
५१४	कोष्टकांतील		सन १९२८
५३९	१	२६	निघणारें दूध वीस हजार शेर आहे व बाहेरून येणारें दूध.
५५८	१	१५	सूट ८५०० रु.
५६३	१	३८	नाना शंकरशेटांच्याच
६०८	२	२३	कॉन्टिंजेंट
६१०	२	३५	५.३८
६१२	१	२७	सहसा न आढळणाऱ्या
६३५	२	३९	१९३०
६४३	२	३७	त्रि. प्रजाजन नसतील किंवा वेडे असतील
६५२	१	४०	शें. ८ व शें. २
७०८	२	४३	कॉर्पोरेशनची
७३०	२	१८	बोलपूर
७३२	१	३५	ज्योतिषग्रंथकर्ते
७३४	१	३८	१८९८
७४०	१	२४	Goal of human
७४५	१	२६	इतर टपल
७४६	१	१६	असहकारितेच्या
७५७	२	४४	Ancient
७७१	२	२३	सम्मेलन अध्यक्ष. पत्ता नागपूर.
७९१	२	३९	कोळशाच्या
८२९	२	२६	श्री. स. ब. भागवत, बी.ए. एल्एल्.बी.
९३२	१	१४	१४५८६
९३६	१	१२	स्टॅटिस्टिक्स्

संकीर्ण

३		३१	१९३१
९	१	२८	१६३१
१०	२	४	१३॥ एकर
१६	कोष्टक५		लॉर्ड रॅले

कालगणनेंतील संक्षेपाचा खुलासा

इ. स.–	इसवी सनापूर्वी
इं.–	इंग्लंड
ऋ–	ऋग्वेद
ए. ब्रि.–	एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका
एस्. एन्.	स्टोरी ऑफ नेशन्स
ए. हिं.	एन्शन्ट हिस्ट्री
ख्रि. श.	ख्रिस्ती शक
गणपती शा.–	गणपतीशास्त्री
गी. र.–	गीतारहस्य
च. को.–	चरित्र कोश
चि. –	चिंत्रावशास्त्री
द. –	दप्तरी
दत्त–	रमेशचंद्र दत्त
ध. र.–	धर्मरहस्य
ध. शा.	हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र
पु. नि.–	पुराण निरीक्षण–काळे
बु. फॅ. –	बुक् ऑफ फॅक्टस्
बेल.–	डॉ. बेलवलकर
भा. ज्यो–	भारतीय ज्योतिषशास्त्र दीक्षित.
भा. व.–	भारतवर्ष
म. उ.–	महाभारताचा उपसंहार–वैद्य
यु. हि.–	युरोपियन हिस्ट्री
रॅ.–	रॅप्सन ई. जी.
रा. का. नि.	राम–जन्म–कालनिर्णय
रॉ. ड.–	रॉबर्ट डग्लस 'चायना'
रा. स. लो.–	रामायण समावलोचन
व. मि.–	वराहमिहिर
वे. इं.–	वेदिक इंडिया
वे. का. नि.–	वेदकालनिर्णय
वेल्स–	एच्. जी. वेल्स
वै.–	वैद्य चिंतामण विनायक
श. पू.–	शालिवाहनशकापूर्वी
शि. प. सा. सं.	शिवकालीन पत्रव्यवहार–सारसंग्रह
स. पू.–	इसवीसनापूर्वी
सु.–	सुमारें.
सं. शा. ज्ञा. को.–	संगीतशास्त्र ज्ञानकोश
स्मि. व्ही. एस्–	व्हिन्सेंट स्मिथ
ह. प्र. पंडित–	हरप्रसाद शास्त्री
ह.	हचिन्सन
हि. हि. व.	हिस्टोरियन्स हिस्ट्री ऑफ दि वर्ल्ड.
हि. २ व. –	हिस्टोरियन्स हिस्ट्री ऑफ दि वर्ल्ड
ज्ञा. को. –	ज्ञानकोश

१. एकाच व्यक्तीबद्दल किंवा घटनेबद्दल कांहीं वेळां निरनिराळे सन दिलेले आहेत. तेथें त्या सनाबद्दल वाद आहे; व निरनिराळ्या पंडितांच्या मतें असलेल्या निरनिराळ्या तारखा आम्ही फक्त नमूद केल्या आहेत असें समजावयाचें.

२. इसवीसनापूर्वीच्या व नंतरच्या तारखा देतांना प्रत्येक तारखेमागें इ. पू. किंवा इ. स. असें लिहिलेले नाहीं. दर पानावरही दिलेलें नाहीं. पण सनांचा क्रम उलट आहे कीं सुलट हें पाहून तो सन इसवी सनापूर्वीचा आहे कां नंतरचा आहे हें चटकन् ठरवितां येईल.

कालगणना

२५००० इ.स.पूर्व ऋग्वेद रचना (अविनाशचंद्र दास वे.इं.) "अगस्त्य ऋषीनें कुदळीनें खणून वनस्पति व प्राणी यांचें रक्षण केलें." (ऋ.१।१७०।६) "जो मनुष्य हुषारीनें सोनें मिळवितो तो तेजस्वी लोकांत पुष्कळ दिवस जगतो." (ऋ. ८।७।१६) "माणूस चांगल्या पोलादाच्या कुऱ्हाडीला धार देतो." (ऋ.८।१।१४।९) माझ्यासाठीं त्वष्टचानें पोलादी वज्र तयार केलें." (ऋ.१०।४८।३) " न मोडणाऱ्या सुईनें पडदे शिवो व ते शिवलेले जिन्नस हजारों घाव सोसणाऱ्या सन्माननीय वीराला देवो. (ऋ. २ । ३ । २४) "विहिरी खोदतां खोदतां खाणी लागल्या व त्या खाणींत सोनें वगैरे आयत्या धातु व रत्नें मिळालीं. त्यानंतर लोखंड, पोलाद वगैरे धातु तयार करण्यांत आल्या. रत्नें वापरणाऱ्या लोकांत भारतवासीय जगांत पाहिले होत." (हिंदी शिल्पशास्त्र भाग १.कृ.वि.वझ पान.३०) 'नावेच्या योगानें समुद्र तरून गेलास' (ऋ.७।३।३।९). "जिच्या वर शिडें आहेत, जी एसपैस आहे, जी चमकणारी आहे, अखंडित आहे, जी सुख देणारी आहे, जी चांगली चालणारी आहे, जी कापलेली नाहीं, जी ईश्वरनिर्मित व चांगलीं वल्हीं असणारी आहे, जिच्यांत पाणी येत नाहीं, व जिला भोंकें पडलेलीं नाहींत अशी नाव आम्हीं मजा मारण्यासाठीं आरोहण करतो." ऋ.१०।६३।१०. "त्या शाहण्यांनीं चांगले गोल, मनाप्रमाणें चालणारे असे रथ तयार केले. ऋ. ३।७।१८. "नांगराचे फाळ आमची जमीन चांगली खोदोत; शेतकरी बैलावरोबर आनंदानें चालोत; पाऊस गोड पाण्याची वृष्टि करो; व याप्रमाणें नांगर आमचें कल्याण करोत (ऋ.४।५७।७) "नांगर जुंपा, जोड्या तयार करा, जमीन झाल्यावर तींत बीं पेरा, आनंदानें गाणीं गा, व मग धान्य पिकल्यावर त्या पिकलेल्या धान्याजवळ पोरेंबाळें जमोत" ऋ. १०।१०।३ 'खोदलेल्या विहिरींतील पाणी माझें कल्याण करो'. ऋ. ७।४९।२. "खोदून काढलेल्या विहिरींतील पाणी आमचें कल्याण करो" ऋ.१।६।४. "पाण्याच्या ठिकाणीं सर्व औषधी आहेत." ऋ. १।२३।२०.

१०,००० दक्षिण फ्रांस, माल्टा, साऊथ आफ्रिका यांत जे Cave-dwellers होते, त्यांसारखे कांहीं लोक इजिप्तमध्यें असावेत.

१००००–९००० इजि० ची पहिली संस्कृतिः उत्कृष्ट बनावटीचें मातकाम. कुंभाराचें चाक मात्र नव्हतें. तिकोनी, चौकोनी व लांबोडीं अशीं भांडीं; चकमक, दुधारी १५ इंच लांब व पाव इंच जाड अशा सुऱ्या; तांबे, अंगडें अडकावयास तांब्याची गुंडी असे. गळ्यांत मातीचे खडे घालीत व वहाणा असत.

९०००–७००० दुसरी संस्कृति इ० ६० फूट लांब जहाजांतून सफरी होत; पुतळा, चकमक, तांबे, रुपें, मग सोनें, व मग शिसें; लोखंडाचे मणी, सोन्याच्या मण्यावरोबरच गळ्यांत घालीत. प्रेताशेजारीं हत्यारें, द्रव्य धान्य इत्यादि ठेवीत; यावरून मृताला मरणोत्तर कांहीं कर्तव्य आहे अशी कल्पना होतीसें दिसतें.

६३०६ श. पू. भारतीय युद्ध (विसाजीपंत लेले)

५९००–४९५० तिसरी संस्कृति ई० सुसा येथील शोधावरून इजिप्त व मेसापोटेमिया या संस्कृति १०,००० इ. स. पू. तील सुसा येथील संस्कृतीच्या शाखा होत. लेखनकला व राजमुद्रा, शिल्प्याची मुद्रा, मंत्रिमुद्रा, खाजगी कारभारी मुद्रा, कालवाअधिकारीमुद्रा, महापूर अधिकारीमुद्रा, उत्सव चालक मुद्रा, कमळ बी गोळा करणारमुद्रा अशा सांपडतात. नाईल नदीला बंधारे घालण्याचें काम याच वेळीं चालू झालें.

५७७४ इ. स. पू. दक्षप्रजापती (पु. नि.)

५६९४ कश्यप (पु. नि.)
५०७८ भारतीय युद्ध (मोडक)
५००० *नक्षत्रें माहित होतीं (ज्ञा.को.), ग्रहांना गति होती हें मा. होतें* (ज्ञा. को.)
४९५०–३८०० चौथी संस्कृति (ई.) मुख्य गोष्ट मनोरे (Pyramids).
४५९०–२४५० केंगि, किश,गिश्वन इ. रा. घराणीं बाबिलोन मध्यें झालीं. (ज्ञा. को.)
४००० पू. *ऋग्वेदांतील कांहीं सूक्तें (वे. का. नि.)*
३८००–२५२० पांचवी संस्कृति इ. इजिप्त देश न्युबिया व सुडान जिकतो तेव्हांचें विजयगीत शिल्लक आहे. उमरावांनीं राजवाड्यांसाठीं खडक फोडून आणिले.
३७६१ *ज्यू लोकांच्या कालगणनेची सुरवात.*
३५०० इजिप्शियन लोकांनीं चित्र लिपी सोडून वर्ण लिपी घेतली. (ए. ब्रि.)
३१८० भारतीय युद्ध (वैद्य)
३१०२ *युद्धिष्ठिर शक (परंपरेनें आलेला)*
३१०२ कलि प्रारंभ (परंपरेनें आलेला)
३१०२ ते १६६२ ऋग्वेद–संहितीकरण (ध. र.)
३१०० श. पू. शतपथ–ब्राम्हण–रचना (भा. ज्यो.)
३००० पू ऋग्वेद–रचना (भा. ज्यो.)
३००० इराणांतील सुमेरियन्स, सिथियन्स व द्रविडियन्स या लोकांची वस्ती. याच वेळीं पूर्वेकडून आर्य लोक येथें आले. (ह.)
३०००–१८०० इजिप्तचे मनोरे बांधले गेले. (बु. फरॅ.)
२८५२–२७३७ Fuh-he हा चिनी राजा राज्य करतो. यानें ८ तऱ्हांच्या आकृति शोधून काढल्या व नकाशे व चित्रें काढलीं. विवाहाचे धार्मिक विधि यानें चालू केले. संगीतही शोधून काढलें. 'She'या नांवाची वीणा यानें तयार केली. Hexagram चा कल्पकच हा. Yih–King Book of changes या ग्रंथाचा कर्ता मानला जातो. याचें थडगें होन्नन यथें आहे. (रॉ. ड.)
२८०० शानसुंग (चीन) यानें शेतीचीं आऊतें केलीं. (ज्ञा. को.)
२७५० टायर शहराची स्थापना (हि. हि. व.)
२७३७–२६९७ Shin–Nug याची चीन देशीं कारकीर्द; याची राणी 'सेप्लिंगशि' इनें रेशीम कातण्याचा व विणण्याचा शोध लावला. (रॉ. ड.)
२७००–२४६६ अकरावी इजिप्शियन राजवट. या वेळच्या भिंतींवरील चित्रांवरून कांहींच्या मतें असें ठरतें कीं, त्यावेळीं कांच तयार करण्याची पद्धत माहित होती. (ए. ब्रि.)
२७००–१७०० पॅलिस्टिनवर बाबिलोनचा अंमल (ह.)
२६९७–२५९७ सम्राट Hwang–Te हा चिनी राजा. लेखनकला,ज्योतिषशास्त्र इ. च्या चिन्हांचा उपयोग यानें सुरूं केला असें मानतात. यानें आडनांवाचा प्रचार पाडला. याचा प्रधान Ts'ang–Hieh यानें लेखनकला काढली. (रॉ. ड.)
२६७० स्वायंभुव मनु; स्वायंभव मन्वांतर चालू (रा. का. नि.)
२६७०–२१५० स्वायंभुव–वंशज–राज्य (दप्तरी)
२६६६–२६२२ स्वारोच्चिष मन्वंतर, उत्तम, तामस मन्वंतर (चित्राव)
२६५४ स्वायंभुवांतील दक्ष प्रजापति (दप्तरी).
२६२२ रैवत मन्वंतर सुरू (चि.)
२६०० इक्ष्वाकु (पु. नि.)
२५५० वैवस्वत मनु (पु. नि.)
२५२६ श. पू. भारतीय युद्ध (व. मि.)
२५२६ श. पू. युधिष्ठिर शक (रा. त.)
२५१३–२४३५ Chwan–hu हा चिनी राजा. कालगणनेस सौर वर्षांतील तिसऱ्या महिन्या- पासून सुरवात होते. (रॉ. ड.)

२५००–१५६५ ६ वी संस्कृति (ई.) या काळांत सेमेटिक जमाती येथें आल्या; याच काळांत अजपाळ राजे (Shepherd Kings) झाले.
२५०० शतपथ ब्राम्हणरचना (रा. स. लो.)
२४९१ (चीन) हुआंगतीच्या कारकीर्दीत रेशीम झालें. वजनें मापें सुरू झालीं. (ज्ञा. को.)
२४८० श. पू. रामजन्मकाल (रा. स. लो.)
२४२२–२१५० चाक्षुष मन्वंतर (रा. का. नि.)
२४०० बाबिलोनियामध्यें निवाडे, जमाखर्च हे विटांवर लिहून त्याचीं पुस्तकें बांधलीं. (ए. ब्रि.)
२३५६–२२५५ शू किंग या ग्रंथाच्या प्रथम प्रकरणीं Yadu या गृहस्थानें कर्क–मकर वृत्तें, त्यांचीं स्थानें, संपात बिंदू इत्यादींवर कांहीं सामान्य लिहिणें लिहिलें आहे. (रॉ. ड.).
२३३२ तैत्तीरीय संहिता- रचना (टिळक)
२२८३ सुमारे चिनी लोकांचें पूर्वेकडे प्रयाण. (रॉ. ड.)
२२५०–२१०० अब्राहामची कारकीर्द (ह.)
२२४५ असिरियन साम्राज्याची राजधानी निनेव्हे हिची 'असुर' स्थापना करतो. (बु. फ.)
२२०० अयोध्येस मनु राज्य करतो. (हि. हि. व)
२२०६–२१५० चाक्षुषांतील दक्ष प्रजापति (ह.)
२२०५–२१९८ यूच्या कारकीर्दीत कालवे–खणती (चीन); याच्या पंडितांनीं सूर्यग्रहण आगाऊ वर्तविलें होतें (ज्ञा. को.)
२२०० युधिष्ठिर शक (करंदीकर)
२१८७–२१०० आयु (सोम पुरुरवस) (पु. नि.)
२१८० मांधातृ–जन्म (पु. नि.)
२१७७ पुरुरवस् (पु. नि.)
२१७० यौवनाश्व (पु. नि.)
२१५० वैवस्वत मन्वंतर (रा. का. नि.)
२१२७ इक्ष्वाकु (द.)
२१०२ पंचशिख (पु. नि.), निमि (पु. नि.); आयु सोमपुरुरवस् (दप्तरी); श्वेत–केतु (ध. र.); ययाति (पु. नि.)
२०५० शौनक (पु. नि.)
२०४२ ययाति (ध. र.)
२०३८ वायुपुराण (ध. र.)
२०२९ रामजन्मकाल (Sir W. I.)
२०१४ भारतीय युद्ध (करंदीकर).
२००० आर्यांचा हिंदुस्थानांत प्रवेश (हि. हि. व.)
२०००–१४०० वेदकाल. सिंधूच्या खोऱ्यांत आर्यांची वसाहत व ऋग्वेद–रचना. (दत्त)
२०००–१७५० आर्य लोकांची व मेद व पार्थियन यांची इराणांत वसाहत (ह.)
२०००–१००० भगवत्गीता (वैद्य)
१९२० युधिष्ठिर (आर्यभट्ट)
१९२०–९२० मगध राजे (S. B. H.)
१९०० मैत्र्युपनिषद (वैद्य)
१८३०–५३८ असूरियन साम्राज्य
१७६६–१४०१ Tsueu या धातूंच्या नाण्यांची चीन देशांत चलनावळ चालू (रॉ. ड.)
१७५०–८३६ Semi Mythical Peshdadian राजवंश–पर्शियन राष्ट्राचे संस्थापक. (ह.)
१७००–१६०० रामकाल (विल्फोर्ड).
१६९०–१६७८ हिरण्यकशिपु हा इंद्र होता. (द.)

१६७८–१६७४ सावर्णिमनु (ध. र.)
१६७८ वळी इंद्र झाला. (द.)
१६७८ सावर्णि मन्वंतर (ध. र.)
१६५० रजिःसोम पुरुरवस् (द.) पॅलिस्टाईनमधून जेकबनें इजिप्तमध्यें देशांतर केलें (ह.)
१६४२ मांधातृ–जन्म (द.)
१६३५–१३६५ कांचेचीं सर्वांत जुनीं भांडीं इजिप्तमध्यें तयार झालीं. (ए. ब्रि.)
१६२३–१५७१ रावणराज्य (रा. का. नि.)
१६०९ रामजन्म (रा. का. नि.)
१६००–१२०० पाणिनी–जन्मकाल (पु. नि.)
१६०० ग्रीसचें इतिहासपूर्व युग सुरू होतें.
१५८८ परशुराम–जन्म (पु. नि.)
१५८७–१५६७ सहस्रार्जुन (पु. नि.)
१५७८ श. पू. भारतीय युद्ध (टिळक, दीक्षित व पाश्चात्य ग्रंथकार)
१५७१ मोझसचा जन्म (बु. फॅ.)
१५६८ रामकाल (पु. नि.)
१५३५ पहिला अहमिश फिनीशियाचा राजा आशियावर स्वारी करतो. (हि. हि. व.)
१५३० राममृत्यु (रा. का. नि.)
१५०० फिनिशियन्स सायप्रस बेटांत उतरतात. (हि. हि. व.)
१५०० पूर्व हिंदुस्थानांत चांद्र व सौर गणना; त्यासाठीं अधिक मास; ग्रहणें छायेमुळें लागतात हें माहीत होतें. (ज्ञा. को.)
१५०० सेमेटिक उपासना राजा अमेनहोटेब यानें सुरू केली. (बु. फॅ.)
मिसर देशांत मानीत कीं, पृथ्वी चौकोनी असून चार खांबावर आहे. (ज्ञा. को.)
१५०० हिं. मूळ रहिवासी दास बनले व आर्यांचा गंगेच्या खोऱ्यांत प्रवेश (हि. हि. व.)
१५००–५०० इ. पू. भारतीयांस व्यवहारी अपूर्णांक व भूमितीचे कांहीं सिद्धांत माहीत होते. यज्ञकुंडाच्या आकृतीसाठीं भूमितीची वाढ झाली; व शुल्व सूत्र हा त्यावरील ग्रंथ झाला.
१५०० श. पू. रामायण कांहीं भाग (दीक्षित)
१५०० श. पू. रामायण : नंतरचा कांहीं भाग (दी.)
१५००–१२५० सु. या काळांत पॅलि० ईजिप्तच्या अमलाखालीं होता. (ह.)
१४९० ईजिप्तमधून Exodus झालें. (बायबल) (ह.)
१४७८ भारतीय युद्ध (र. दत्त)
१४२२ शतपथ ब्रा. (वि. ज्ञा. वि.)
१४२० आपस्तंब सूत्र (चित्राव)
१४०१ बृहद्रथ (द.)
१४०० ग्रीसच्या इतिहास–पूर्वयुगाची भरभराट
१४०० नरसिंह पुराण (ह. प्र.) गंगेच्या खोऱ्यांतील राज्यें उदयास आलीं. (हि. हि. व.)
कुरु भरत कुळांतील पहिला राजा (हि. हि. व.)
१४००–१००० महाकाव्यकाल (दत्त). आर्यांची गंगाखोऱ्यांत वसाहत (दत्त)
१४००–१२०० Lunar Lodiac ची निश्चिती. ज्योतिषशास्त्रविषयक अनुमानें, वेदसंकलन कुरुपांचालीचा उत्कर्ष (दत्त)
१४०० Tellel Amarna पत्राच्या पुराव्यावरून Palestine मध्यें हिब्रू लोक होते हें सिद्ध होतें (ह.)
१३७४ ट्राय शहराची स्थापना (बु. फॅ.)
१३५० तुतानखामेनचा मृत्यू
१३३० शीघ्रपुत्र शांति मन्वंतर (चि.)
१३३० मरु (ध. र.)

१३१५ श. पू. गोनंद (द.)
१३०० बृहद्रथ राजकुल; पहिला राजा सोमपीः शेवटचा रिपुंजय ८०० त मेला. (हि. हि. व.)
१३००–९०० झोरॅस्टर धर्मस्थापना करतो (ह.)
१३००–११०० ब्राम्हणें व आरण्यकें यांची रचना (दत्त)
१३००–१२३४ दुसरा रॅमेसस–Paraoh of the oppressiou (ह.)
१३०० पू. जोशूआ यानें कॅनन येथें वसाहत केली. (ह.)
१२९३–१२८९ व्यासजन्म (द.)
१२८९ कृष्णनिर्वाण (पु. नि.)
१२७२ भारतीय युद्ध (वल्लंडी आय्यर)
१२६९–११८१ लगध–वेदांग ज्योतिषकाल (टिळक)
१२६३ युद्धिष्ठिर (पु. नि.) भारतीय युद्ध (पु. नि.)
१२६२ परीक्षित सोमकुरुवंशीय (पु. नि.)
१२५१–११७५ कृष्ण (द.)
१२५० कुरु–पांचाल–युद्ध (दत्त)
१२३७ कंसवध (द.)
१२३१–११३५ Yih-King (Book of changes) या Fuh-he च्या ग्रंथावर Ztan-Ztang व त्याचा मुलगा ChowKing व Confucius यांचे टीकाग्रंथ (रा.ड.)
१२१० जरासंघ–मृत्यु (द.)
१२०० ग्रीसच्या इतिहासपूर्वयुगाचा ऱ्हास
१२०० च्या थोडें पूर्वी भारतीय युद्ध (हि. हि. व.)
१२०० ऋग्वेद (चि.)
१२०० Le-ke हें पुस्तक Duke of Chow यानें लिहिलें असें मानतात. (Le-ke Book of Rites) (रा. ड.)
१२०० परीक्षित गादीवर बसतो. (हि. हि. व.)
१२००–९०० पाणिनी–काल (राज.)
१२००–१००० वर्णसंस्था उत्पन्न झाली. (हि. हि. व.)
१२००–१००० कोसल, काशी, विदेह–उत्कर्ष (दत्त)
१२ वें शतक फिनिशियन लोक स्पेनला येतात व कार्दिज शहर स्थापतात; अटलांटिक सांपडतो.कथलाचा शोध; असिरिया देशचा पहिला त्रिगर्थ पिलेश्वर फिनिशियांत येतो. (हि. हि. व.)
११९७ भारतीय युद्ध (दप्तरी))
११९७ भगवद्गीता (ध. र.)
११८७ जन्मेजय (पारीक्षित) (पु. नि.)
११८४ ट्रॉय शहर पडतें. (हि. हि.व.)
११८१ गर्ग यादव–पुरोहित (पु. नि.)
११५१ भारतीय युद्ध (सीतानाथ प्रधान)
११२४ उत्तरेकडील लढाऊ लोक थेसलींतील प्रजेस हाकून देऊन तेथें वस्ती करितात. (ग्रीस) (हि.हि. व.)
११२२ इ किंग नांवाचा पहिला चिनी ग्रंथ वोनवॅंग यानें तुरुंगांत लिहिला. (ज्ञा. को.)
११२२ शतपथ ब्रा. उत्तरार्ध (वि. ज्ञा. वि.)
११२० चिनी लोकांनीं बुद्धिबळ खेळ शोध लावला. आमच्या हिंदु लोकांना हा खेळ१००० वर्षें आधीं माहीत होता असें चिनी म्हणतात. (रा. ड.)
१११० दिवाकर–मन्वंतर (चि.)
११०९ कांबोजचा पहिला चिनी उल्लेख. (ह.)
११०९–१०५० चिनी लोक कांबोजांत येतात (११०९) व त्यांचा तिबेटशीं संबंध (१०५०) (ह.)

११०४	डोरियन लोकांची स्वारी व क्रीट, ऱ्होडस व एशिया मायनर येथें त्यांच्या वसाहती (ग्रीस) (हि.हि.व.)
११०३	Duke of Isi (चीन) यानें सोनें, तांबें व रेशीम यांच्या तुकडयांचें चलन चालू केलें. (रॉ. ड.)
११०२–१०९०	शौनक (२ रा) – शतानिक पुत्र जन्मेजयाचा समकालीन (पु. नि.)
११००–१०००	उपनिषद् रचनाकाल (दत्त)
११००	वराहपुराण (पु. नि.)
१०१०–९७०	डेव्हिडची कारकीर्द (ह.)
	युफ्रे. व नाईल यांमधील प्रांतांत इस्त्रायल प्रमुख दिसतो. नाथन् हा याच काळांत झाला (डेव्हिडची कार०) (ह.)
१००१–९४७	मुह राजानें पिनल कोड प्रसिद्ध केला. (चीन) (रॉ. ड.)
१०००	तर्क प्रामाण्यप्रधान काल. वर्षाचे महिने बारा ठरविले गले. चांद्रमानाचा सौरमानाशीं मेळ बसविण्यासाठीं दर तीन वर्षांनीं एक अधिक महिना. (भा. व.)
१००० पू.	कात्यायन पारस्कर सूत्रकार. (वै.)
१०००	इजिप्त. अम्हीन यानें 'हयरॅटिक् पेपिरस' हा गणित शास्त्रावरचा सर्वांत जुना ग्रंथ लिहि.
१०००	सर्व गंगथडीभर आन्तर्व्यापार चालू (हि. हि. व.) वरच्या सिंधूंतून फिनि० लोक सोनें व चंदन नेतात. (हि. हि. व.)
१०००	डेव्हिड हा दमास्कसच्या राजापासून खंडणी घेतो.बायबलांतील सीरियाचें राज्य. (हि. हि. व.)
१०००–८००	ब्राम्हण क्षत्रियांचा झगडा.ब्रम्हतत्त्वाचा शोध.क्षत्रिय सर्वसत्ताधिकारी.ब्राह्मण स्मृतिग्रंथ लिहितात. (हि. हि. व.)
१०००–७५०	झेंदावेस्तामधील पद्यें (गाथा–कालं.) (इराण) (ह.)
१०५०–५००	मंगोलियन जाति पश्चिम चीन पठारावरून येऊन तिबेटचा कबजा घेतात. Gnya-Khri Bisapus याचा कोशल देशच्या प्रसेनजिताशीं संबंध. हा प्रसेनजित सुमारें इ. पू. ५३०–५०० पर्यंत अयोध्येस होता. (ह.)
१०००–३२०	आर्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकलें. (दत्त)
१०००–९००	तांब्याचे Hwan व कडचा हें चलन चीनमध्ये चालू होतें. (रॉ. ड.)
१०००–९००	इजि० वर्णमालेचे फिनिशियन वर्णमालेंत रूपांतर होऊन ती वर्णमाला युरोपांत पसरली असें प्रो. ब्रेस्टडचें मत. (ए. ब्रि.)
१०००	शाकटायन व्याकरणकार (बेल.)
,,	यास्क (पु. नि.)
९७०	इस्त्रायल राजा सालोमन (यू. हि.)
९६७–९३८	शुचि (द. र.)
९५०	दमास्कस स्वतंत्र होतें. (हि. हि. व.)
९५०	रामजन्म (हॅमि०)
,,	सुवर्ण मन्वंतर (रा. का. नि.)
९४०	रामजन्म (पत्रिकेवरून) (वेन्टले)
९३७ पू.	सालोमननें करवसुली पद्धत घातली. जरूशलेमची लूट (ह.)
९३७	सालोमनचा मत्यु. (ह.)
९२०–७८२	प्रद्योत (S. B. H.)
९००–८००	ब्रम्हवैवर्त पुराण (ह. प्र.)
९००	होमर : इलिअड, ओडेसी (यू.हि.)
९ वें शतक	यास्क (दत्त)
९ वें शतक	फिनिशियन लोक वर्णमाला वापरीत (ए. ब्रि.)

८८५ लायकरगस हा स्पार्टा शहराला कायदा तयार करून देतो. याच सुमारास किंवा बरेंच आधीं फिनिशियन वर्णमाला ग्रीस देशांत येते. (हि. २ व.)

८५० उत्तर हिंदुस्थानांतील अभिराज हा ब्र० देशांत उतरतो व इरावतीच्या कांठीं पहिलें हिंदू राज्य स्थापतो. (ह.)

८५० लायकरस (यू. हि.)

८२७–७८१ Sevenwang याचा प्रधान Shechow हा Techueu (The great seal characters) ही लेखन पद्धति शोधून काढतो. (रॉ. ड.)

८२६ टायरचा राजा पिग्मॉलियन याची बहीण डिडो हिनें कार्थेज शहराची स्थापना केली (बु. फॅ.)

८२५ कानराज हा आराकान प्रांतांत धंग्रावति नदीच्या कांठीं माघ नांवाचें हिंदू राज्य स्थापतो. आराकानी लोक म्हणतात कीं स. पू. २६६६ पासून आमच्याकडे हिंदू राजवंश आहे.

८१४–८१३ कार्थेजची स्थापना व अधिकाऱ्यांची निवडणुकीनें नेमणूक. (हि. हि. व.)

८०० यास्क (बेल)

८००–४०० सूत्र–पंथ (दत्त)

८००–६४० उत्तर व मध्य अरवस्तान असीरियन्स काबीज करितात. (ह.)

८००–६०० हिंदू तत्त्वज्ञानाचा उदय (हि. हि. व.)

८०० गंगा व यमुना यांच्या कांठचा प्रदेश पवित्र बनतो. (हि.हि. व.)

८०० मगध देशावर बृहद्रथाच्या मागून प्रत्योद हा जुलमी राजवंश यतो. (हि. हि. व.)

८ वें शतक पाणिनी (दत्त.)

८ वें शतक शुल्वसूत्र (Geometry) (दत्त)

८ वें ५ वें शतक कॅपेनियांतील लोकांनीं एट्रुस्कन्सपासून वर्णमाला घेतली. (ए. ब्रि.)

७९४–५१० बुद्ध काल (पु. नि.)

७८२ शिशुनाग (S. B. H.)

७७६ ग्रीसमधील पहिली ऑलिंपियन स्पर्धा सुरूं (यू. हि.)

७७३ शालमानेश्वर (३) हा असीरियाचा राजा दमास्कसावर स्वारी करतो. (हि.हि.व.)

७५३ रोमची स्थापना (ह.)

७५३–६७३ रोमन सेनेटची स्था. (ह.)

७५०–७०० आप्पिशली व्याकरणकार (बेल)

७३४ त्रिगर्थपिलेसर दमास्कसवर स्वारी करतो. तेथील राजा रेझिन मरतो. दमास्कसचें राज्य नष्ट होतें (हि. हि. व.)

७२८ बाबि. साम्राज्याचा अंत (ज्ञा. को.)

७२२ असीरियांतील जुन्या काचपात्रावर ७२२ मधील राजाचें नांव आहे. (ए. ब्रि.)

७०१ सेनॅचेरिब याची सिरियावर स्वारी (हि. हि. व.)

७००–५५० मन्द–असुर देशाचे शूद्र राजे. (पु. नि.)

७ वें शतक निनवी शहरीं विटावर लिहिलेल्या पुस्तकांची एक ग्रंथशाळा होती.

" कपिल व सांख्य तत्त्वज्ञान (दत्त)

" शाक्यांनीं कोसलसत्ता पत्करिली (एस. एन.)

" बाबि० व हिंदुस्थानच्या प. किनाऱ्यावरील बंदरें यांचा व्यापार होता. (एस. एन.)

" हिंदी लिपी जीवरून घेतली असें एकजण म्हणतो ती लेखनपद्धति या शतकांत युफ्रेटिसच्या कांठच्या लोकांत होती. हिलाच पुढें १००० वर्षांनीं ब्राह्मी हें नांव मिळालें ? (एस. एन्.)

६८३ अथेन्समधून राजसत्ता नष्ट झाली (यू. हि.)

६७८ सायडोन शहराचा नाश (हि. हि. व.)

६७६ पहिलें आलिंपिक वर्ष (ग्रीस) (हि. २ व.)

६६७ वायंझाटियम–(कान्स्टांटिनोपल) स्थापना
६६५ प्रत्योदनाच्या मागून शैशुनागवंश येतो. (हि. हि. ब.)
६६० Yamato पहिला जपानी बादशहा गादीवर बसतो. (ह.)
६५० च्या सुमारास महाकोसलच्या कारकीर्दीत कोसल साम्राज्य वैभवास पोंचलें. (एस.एन.)
६४६–६२५ Ecbatana ची स्थापना (इराण) (ह.)
६४२–३२० शिशुनाग (Smith)
६२५ फिनिशियावर शकांची स्वारी (हि. हि. ब.)
६२१ "ड्रॅकोनियन कायदेकोड" तयार झालें. (ग्रीस) (हि. २ ब.)
६११ नकाशा ही वस्तु प्रथम बनविणारा ॲनॅग्झिमँडर याचा जन्म. स्पार्टन लोक सर्व ग्रीस देश जिंकतात. (हि. २ ब.)
६१० दुसरा नीफो याच्या सांगण्यावरून फिनिशियन खलाशांनीं आफ्रिकेची प्रदक्षिणा केली. (हि. हि. ब.)
६०६ खाल्डियन साम्राज्याची स्थापना (वेल्स)
६०६ असीरियन साम्राज्याचा नाश (यू. हि.)
६०५ बाबि. फिनिशियावर आपलें वर्चस्व प्रस्था. (हि. २ ब.)
६०४ कॉन्फ्यूशियन हा चिनी तत्त्ववेत्ता. (ज्ञा. को.)
६०२ सु. गौतमस्मृति–(चि.)
६०१ सुमित्र--मृत्यु. (दप्तरी)
६०० आल्सियस् आणि सॅफो या कवींचा उदय–ग्रीस (हि. २ ब.)
६००–५५० अयोध्येस प्रसेनजित राज्य करतो. (हि. २ ब.)
६०० सु. गॉल लोकांत ग्रीकांनीं चलन सुरूं केलें व शेतकीची माहिती करून दिली. (ह.) सेगोव्हिसस व बलोव्हिसस यांनीं आपलें सैन्य स्वित्सरलँडमधून नेऊन इटलीवर स्वारी करण्याकरितां समुद्रालगतचा आल्प्स पर्वत ओलांडला. (ह.)
६०० सध्यांच्या मार्सिलेसची स्थापना.
६०० रामायण काल– (याकोबी)
वसिष्ठस्मृति (ध. र.) शतानिक स्मृति ? (पु. नि.)
६०० गौतमधर्मसूत्र (ध. रा.)
६०० उदयन (पु. नि.)
६००–४०० गौतमधर्मसूत्र (ध. शा.)
६००–५०० जैमिनी सूत्रें (पु. नि.)
६००–४०० कात्यायन वार्तिककार (वेल)
६००–३०० आपस्तंब सूत्र (ध. शा.)
६००–५०० नारद पुराणांतील पुराणांची सूचि. (पु. नि.)
६ वें शतक नाईल, युफ्रे, गंगा व पीतनदी (चीन) यावरील लोकांनीं या शतकांत जुने विचार टाकून नवीन विचारास सुरुवात केली.हें एकमेकांस न कळत घडून आलें हे विशेष. (एस. एन.)

५८६ नेबुचदनेझार यानें ज्यू लोकास बाबिलोनकडे पिटाळीत नलें.
५८५ थेल्प्सनामक ग्रीक ज्योतिष्यानें मे २५ स. पू. ५८५ या सालचें सूयर्ग्रह आधीं वर्तविलें होतें. (ज्ञा. को.)
५८५ थेल्स–वर्षाचे दिवस ३६५ हें त्यानें सांगितलें, व भूमितीचे बरेच सिद्धांत सांगितले.
५८२–५०० पायथ्यागोरस. पृथ्वीचें गोलत्व सिद्ध करणारा तत्त्वज्ञानी (ग्रीस) (ज्ञा.को.) पायथ्यागोरसचा भूमिती सिद्धांत (ज्ञा. को.) (हा सिद्धांत शुल्व सूत्रांत आहे.) यानेंच Dichtonic Scale चें प्रमाण ठरविलें. (संगीतशास्त्र ज्ञा. को.)
५८० सर्वांत जुनीं इटॅलोग्रीक नाणीं. एट्रुस्कन येथील ग्रीक तऱ्हेची चलनपद्धति (ह.)
५७४ बाबि.चा राजा नेबुशदरेझार टायर शहर हस्तगत करतो. (हि. २ ब.)

५६८ बुद्धजन्म (यू. इ.)
५६० कपिलवस्तु येथील राजा शुद्धोदन याला सिद्धार्थ हा मुलगा होतो. (हि. २ व.)
५५८–५२८ सायरस (कुरु) हा बाबि. व आ. मायनर जिंकितो. (५५०–५३९). पर्शिया जिं. (५३९–५२८) (ह.)
५५७ कपिलवस्तूजवळ बुद्धाचा जन्म? (दत्त)
५५७–४७७ गौतमबुद्ध–काळ (दत्त)
५५१ Confucious चा जन्म (चीन) (यू.हि.)
५५० पू. उपनिषदकाल (च. को.)
५५० पर्शियन साम्राज्याची स्थापना (यू. हि.)
५५० अयोध्येचा राजा प्रसेनजित–कौरवपांडव युद्धानंतरचा २३ वा राजा–अयोध्येच्या उत्तरेस श्रावस्ती येथें राज्य करतो. परीक्षिताच्या मागूनचा २५ वा पुरुष वत्स हा भरताचा राजा. (हि. २ व.)
५५०–५०० कार्थेजचें वर्चस्व सार्डि, गॉल, सिसिली यावर प्रस्था. होतें. (हि. २ व.)
५५०–५०० अग्निपुराण (पु. नि.)
५४३ सिंहराजा हा Thaton येथें Talaing हें हिंदु राज्य स्था. (ब्र.दे.) हें स. पू. ५४३ पासून इ. स.. ५७३ पर्यंत होतें (ह.)
५३८ पर्शियाचा राजा Cyrus कुरु हा बाबि. जिंकतो. (हि. २ व.)
५३८ बुद्धाचा यशोधरा हिच्याशीं विवाह. (दत्त)
५३७–४८५ बिंबिसार मगधराजा (दत्त)
५३६ फिनि. लोकांविरुद्ध कार्थेज वाल्याचें युद्ध (हि. २ व.)
५३२ सिद्धार्थ सर्वसंगपरित्याग करतो. (हि. २ व.)
५३० कार्थेज स्वतंत्र राज्य बनतें. (हि. २ व.)
५३० बिंबिसार मगध वंश स्थापतो. (स्मि.)
५३० पिथॅगोरस (ग्रीस) (हि. २व.)
५२८ बुद्ध सर्व सं. परित्याग करतो. (दत्त)
५२७ अजातशत्रूचा मत्यु (रॅप्सन))
५२७ होमरच्या कवितांचा संग्रह झाला. ग्रीस (हि. २ व.)
५२५ पर्शियानें इजिप्त जिंकिलें. (यू. हि.)
५२५ कॅंबिसेसच्या युद्धासाठीं फिनि. लोक आरमार बांधून देतात. (हि. २ व.)
५२२ वाराणशीस सिद्धार्थ आपलें मत सांगूं लागतो. लोक त्यास बुद्ध म्हणूं लागले. (हि.२व.)
५२२ बुद्धास गयेस ज्ञानप्राप्ति (दत्त) बुद्ध वाराणशीस धर्ममतस्था क. (दत्त)
५२१ बुद्ध घरीं परत येतो. (दत्त)
५२१ पहिला दयारस हा हेलेस्पांटमधून सिंधूपर्यंतचें साम्राज्य चालवितो. (वेल्स.)
५१७ बुद्धपिता शुद्धोदन याचा मत्यु. सावत्र आई व पत्नी हीं बुद्ध ध. पतकरतात. (दत्त.)
५१२ दारियस हा सिंधूच्या उजव्या कांठावरील जमाती जिंकतो. (हि. २ व.)
५१० लुक्रेशियावर बलात्कार. टार्क्विनची रोममधून हद्दपारी. (बु. फॅ.)
५०८ बुद्धपुत्र रहुल बु. ध. घेतो. (द.)
५०२ आजातशत्रू राजा व बुद्ध यांचीं मुलाखत (स्मि.)
६ वें शतक स. पू. महावीर (भट्टाचार्य)
५०० सु. ग्रीक पं. अनॅक्सॅगोरस याला शशिकलांची उपपत्ति माहीत होती. भौतिक द्रव्यांचें अविनाशित्व यानें सांगितलें. वारें सुटण्याची उपपत्ति यानें सांगितली.
५०० दारियसनें सिंधूचें खोरें जिंकलें. (V. S.)
५०० लायकीपॅास व डेमॉक्रिट. परमाणूबद्दलची प्रथम कल्पना.
५०० भरत, मंतंग इ.संगीतज्ञांचा काल
५०० पू. भविष्यपुराण (च. को.)

५०० चैत्र वैशाख इ. मास (ठरले ?) (च.. को.)
५०० मेषादि संज्ञा आल्या. (ज्ञा. को.)
५०० हनू व हिमिप्को हे कार्थेजकडे आफ्रिकेच्या प. किनाऱ्यावर वसाहतीसाठीं व अटलांटिक पहाण्यासाठीं सफर करितात. इंग्लंडचा शोध लागतो. रामायण काल (मॉ.विल्य.) (हि. २ ब.)
५००–४०० आर्यलोक दक्षिणापथ व सिलोन जि. त्यांना मोतीं व पोंवळीं सांपडतात. (हि. २ ब.)
५०० श. पू. यावेळीं सध्यांचें महाभारत (व गीता) हीं सध्यांच्या स्वरूपाचींच होतीं (दीक्षित व टि.)
५०० रोममध्यें राजसत्ता नष्ट होऊन लोकशाही आली. (यु. हि.)
५ वें शतक बुल्हरच्या मतें ५ किंवा ६ व्या शतकापर्यंत हि. त लिहिण्याची कला नव्हती. (ए. ब्रि.)
" एस्चिलस (अॅकिलीस) सोफोक्लीज् व युरीपीडिस हे नाटककार झाले. (यु. हि.)
" च्या पूर्वी पाणिनीचें जन्मस्थान गांधार प्रदेश हा ब्रा.च्या विद्येचें आगर होता. (एस.एन.)
५००–४९० कात्यायन वार्तिककार (पु. नि.)
५००–२०० बौद्धायन धर्मसूत्र (ध. शा.)
५०० तिबेटचा हिंदु.शीं संबंध सुरू होतो. (ह.)
४९६ सोफोक्लिसचा अथेन्स येथें जन्म (ग्रीस) (हि. २ ब.)
४९४ प्लीबियन्स–सामान्य लोक–तर्फे झगडणाऱ्या ट्रिब्युनेटची स्थापना (रोम) (ह.)
४९३ थेमिस्टोक्लेस हा पिरियसची मजबुती करतो. (ग्रीस) (हि. २ ब.)
४९२ पर्शियन थ्रेस व मॅसिडोनिया जिंकतात. (ग्रीस) (हि. २ ब.)
४९० मॅरॅथॉनची लढाई व पर्शियनांचा पराभव. (ग्रीस–हि. २ ब.)
४९० दारियस हा पर्शुपूर (पर्सिपालिस) बांधतो. (इराण) (ह.)
४९०–४१५ प्रोटॅगोरस यानें लिंगविचार केला. क्रियापदाचे अर्थ Moods ही ठरविले. पॉडिकरा यानें Synonyms ची व्याख्या केली. Aristotle यानें Particle हा शब्द ठरविला. (ए. ब्रि.)
४८६ प्लीबियन्सची रोममधील १ ली बैठक (यु. हि.)
४८५–४५३ अजातशत्रु (मगधराज्य) (दत्त)
४८४ हिरोडॉटसचा जन्म. इश्चिलस यास शोकपर्यवसायी नाटक लिहिल्याबद्दल पहिलें बक्षीस मिळालें.
४८३ महासंभव हा Tagaung चा नाश करतो व प्रोम शहरीं हिं. राज्य स्थापतो. (दत्त) Baung हा शूर राजा (स. पू. ४८२ ते ३७२)? (ब्र. दे.) (ह.)
४८१ झर्क्सिस हा ग्रीसच्या स्वारीची तयारी करतो. (हि. २ ब.)
४८० झर्क्सिस हा थर्मापिलीच्या खिंडींत ग्रीकांचा पराभव करतो. स्पार्टाचा राजा लिओनिडिस खिंडींत पडतो. झर्क्सिस अथेन्स घेतो. सॅलॅमिस येथील लढाई, ग्रीकांचा विजय, झर्क्सिस परत फिरतो. (हि. २ ब.)
४८० बुद्धाचा मृत्यू (हि. २ ब.) (दत्त.)
४८० थर्मापिलीची लढाई (यु. हि.)
४७९ पर्शियनांचा पूर्ण पराभव व पर्शियन आरमाराचा मोड (हि. २ ब.)
४७७ अथेन्स शहराचें गांवकुसूं दुरुस्त होतें. ग्रीस. (हि. २ ब.)
४७७ गौतमाचा मृत्यू (द.)
४७७ पहिलें बुद्धभिक्षू मंडळ (दत्त)
४७७ धर्मसूत्र कायम करण्यासाठीं व सांघिक गायनानें तें ध्यानांत रहावें म्हणून पाठ म्हणण्यासाठीं राजगृहमंडळ भरतें. (दत्त)
४७५ बुद्धमृत्यु (म. उ.)
४७४ पिंडार कवीचा उदय (ग्रीस) (हि. २ ब.)
४७० सात्रेटिसाचा जन्म (ग्रीस) (हि. २ ब.)
४७० सात्रेटिस. वादविवाद पद्धतीचा जनक. वैयक्तिक मतावर ज्ञान अवलंबून ठेवूं नये असें

यानें सांगितलें. त्याचप्रमाणें नीतीची उभारणी सत्यावर नसून वैयक्तिक मतावर झालेली असते असें यानें सांगितल्यामुळें यास देहांत शिक्षा झाली.

४६५–४२४ झोरोस्ट्रियन धर्माचा अंत (ह.)

४६५–४२४ मिथ्रेइझमचा उदय. (ह.)

४६५ झर्क्सिसचा खून

४६४ स्पार्टा येथें भयंकर धरणीकंप व गुलामांचें बंड (ग्रीस) (हि. २ व.)

४६३–४६१ पेरिक्लिसच्या हाताखालीं अथेन्स येथें लोकसत्तेचा उदय. (ग्रीस, हि. २ व.)

४६०–३६० वैद्यक शास्त्राचा जनक ग्रीक पिपोत्रोटिकस (ज्ञा. को.)

४६० डेमॉक्रिटिस यानें परमाणुवाद केला.
डाल्टन व हा यांच्या म्हणण्यांत थोडाच फरक आहे. (ज्ञा. को.)

४५० उदय राजानें पाटलीपुत्राची स्था॰ केली. (V. S.)

४५० पंडुकुलाचा अंत (हि. २ व.)

४५० हिंदु प्रवासी मध्य मयासांत येतात. (ह.)

४४७ इतिहासकार हिरोडोटस (यू. हि.)

४४५ पॅट्रिशियन्स व प्लीबियन्स यांच्यांतील विवाह कायदेशीर ठरले. (रोम) (यू. हि.)

४४३ रोममध्यें सेन्सॉरशिपची स्था. रोम. (यु. हि.)

४४२ सोफोक्लिस यानें 'अँटिगोन' हें पुस्तक तयार होतें. (ग्रीस हि. २ व.)

४३८ हिरोडोटस अथेन्स शहरीं आपला इतिहास–ग्रंथ वाचून दाखवितो.

४३२ निवडणूक–गैरवर्तन–प्रतिबंध–कायदा–(रोम, ह.)

४३१ रोममध्यें आपोलोचें पहिलें देऊळ (ह.)

४३० अथेन्स शहरीं प्लेग होतो. सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग केला म्हणून पेरिक्लिस याच्यावर खटला. (ग्रीस,हि.२ व.)

४२७ वरिष्ठ सत्तावाले लोकसत्तावाल्यांच्या विरुद्ध कट करतात. (ग्रीस; हि. २ व.) प्लेटोचा जन्म

४२२–३२२ नंद (ध. र.)

४१५ हार्मीच्या पुतळ्याचे हातपाय कोणी तोडले; हा अपशकुन मानला गेला. ग्रीस (हि.२व.)

४१२ डायोजिनिस (यू. हि.)

४०६ सैनिकास पगार मिळण्याचा पहिला उल्लेख (रोम) (ह.)

४०६ जखमी झालेल्या शिपायांस सोडवून न आणल्याबद्दल विजयी सेनापतीवर ठपका येतो व त्यास फांशी देण्यांत येतें. (ग्रीस; हि. २ व.)

४०३ कॅमिलसनें अविवाहितावर कर बसविला.–रोम (ह.)

४०३ पाटलीपुत्रानें सिंहासन नंद बळकावतो. (हि.२ व.)

४०३ अथेन्सनें जुनी ऍटिक वर्णमाला सोडून देऊन आयोनिक वर्णमाला पत्करिली. (ए.ब्रि.)

४०२ शंखस्मृति (ध. र.)

४०२ सु. बौधायन स्मृति (ध. शा.)

४०२–२०२ लिखित स्मृति (च. को.)

४०१ सायरसची स्वारी व क्विनॅक्सा येथील लढाई. झिनोफोन यानें दशसहस्त्र अनुयायांसह पलायन (Retreat) ग्रीस–(हि.२ व.)

४०० पू. भागवतकार व्यास बुद्धानंतर (ध. र.)

४०० रामायण–रचना–काल (कीथ)

४०० श. पू. बौद्धायन सूत्र (गी. र.)

४थें ते ३शतक बहुजनसमाज बु. धर्म घेतलेला असला तरी Characteristically and distinctively हिंदूच होते. (एस्. एन्.)

४०० दक्षिण अरबस्तानामध्यें अॅटिक नाण्यांच्या धर्तीवर नाणीं पडतात. (ह.)

४०० सु. गॉल लोकांची इटलीवर स्वारी. (ह.)

४थें शतक डेमोस्थिनीसचा काळ, हिपोक्रिटिस हा वैद्य, एपिक्यूरस हा तत्त्ववेत्ता, झेनो स्टोइक् फि. (ग्रीस, यू. हि.)
३९९ सॉक्रेटिस यास अथिनियनदेवता न मानल्यावद्दल देहान्त शासन.
३९८ भागवत (ध. र.)
३९८ महापद्मराज्याभिषेक. परीक्षितजन्मापासून १०५० वर्षांनीं हें घडलें (दप्तरी)
३९० गॉल लोकांनीं रोम घेतलें व जाळलें. (ह.)
३८४ ॲरिस्टॉटल्– (रसायन) पदार्थाला मूळचे गुणधर्म नसून त्यांत निरनिराळे गुण शिरून सगुण पदार्थ तयार होतात, अशी मूलतत्त्वांबद्दलची कल्पना यानें सांगितली; (मानवशास्त्र) रानटी लोकांच्या शारीरिक विशेषाकडे लक्ष. (शिक्षण) सद्‌गुणांचा विकास होण्यासाठीं बौद्धिक शिक्षणाची आवश्यकता यानें सांगितली.
३८४–३२२ ॲरिस्टॉटल् याला पृथ्वी वाटोळी हें माहीत होतें. पहिला प्राणिशास्त्रज्ञ. (ज्ञा. को.)
३८४ सु. थिओफ्रॅस्टस वनस्पतिशा.-जनक (ज्ञा. को.)
३८४ सुमित्र–मृत्यु. (पु. नि.)
३८४–३२२ ॲरिस्टॉटल् यानें 'Case' ही ठरविली. (ए. ब्रि.)
३८४–३२२ स्टोइक्सनीं Particle व Article यांत भेद केला व क्रियापदाचीं रूपें-काळ, लिंग इ. ठरविलीं. (ए. ब्रि.)
३८४–३१२ नंदकाल. (पु. नि.)
३७९ स्पार्टन लोकांच्या सत्तेची परमावधी. ग्रीस. (हि. २ व.)
३७७ दुसरें बुद्धभिक्षुमंडळ. (दत्त)
३७५ मॅनेक्मस गणितज्ञ. शिकंदराचा भूमितीचा शिक्षक. शंकुच्छेदाचा अभ्यास प्रथम यानें सुरू केला.
३७०–३२० नऊ नंद मगधराजे. (दत्त)
३६५–१४६ ब्रम्हदेश व आराकान यांत बु. ध. प्रवेश. (ह.).
३६७ श. पू. महाभारत १ लक्ष होतें. (च. को.) (शि. ले.)
३६२ बु. ध. ब्रम्हदेशांत जातो. (ह.)
३५८ गॉलसचा पराभव रोम (ह.)
३५६ अलेक्झांडर दि ग्रेटचा जन्म. ग्रीस (हि. २ व.)
३५४ डिमॉस्थनिस राजकारणांत पडतो. ग्रीस (हि.२ व.)
३५४ रोमन्सचा सॅम्नाइट्स्‌शी तह. (ह.)
३५१ डिमॉस्थनिसचें पहिलें फिलिपिक. ग्रीस (हि. २ व.)
३४७ प्लेटोचा मृत्यु. (यू. हि.)
३४० मगधदेशाचें वैभव पराकाष्ठेस पोहोंचलें. (हि.२ व.)
३३८ फिलिफ हा मॅसिडोनियाच्या वर्चस्वाखालीं ग्रीक संघ तयार करतो. (हि.२ व.)
३३८ अथेन्स यथील सार्वजनिक पैशाच्या विल्हेवाटीवर करगस (कायदे करणारा लायकरगस हा नव्हे.) याची नेमणूक. ग्रीस (हि.२ व.)
३३६ पर्यंत ईजिप्तमध्यें ३१ राजघराणीं होऊन गेलीं. (ज्ञा. को.)
३३६ अलेक्झांडर राजा होतो. (यू. हि.)
३३६–३२३ शिकंदर पशि. सा. जिंकतो पर्शुपूर जाळतो. (ह.)
३३५ ॲरिस्टॉटल्‌ची शिकवणक सुरू (यू. हि.)
३३४ अलेक्झांडर आशिया खंडांत उतरतो. ग्रीस. (हि.२ व.)
३३३ अलेक्झांडर डारियसचा पराभव करतो. ग्रीस. (हि. २ व.)
३३३ शिकंदरनें अलेक्झांड्रिया नगर वसविलें. (ह.)
३३२ अलेक्झांडर अलेक्झांडिया शहर वसवितो ग्रीस (हि. २ व.)
३३२ शिकंदर टायर शहर घेतो., ३० हजार लोक गुलाम म्हणन विकतो. टायरचा महिमा संपतो. फिनिशियन राष्ट्र नष्ट होतें (हि २ व.)

३३१ अलेक्झांडर बाबिलोनमध्यें शिरतो. ग्रीस (हि. २ ब.)
३३० पर्शियन साम्राज्याचा नाश (यु. हि.)
३२७ शिकंदर सिंधूच्या पूर्वकिनाऱ्यावर आर्यांचा पराभव करतो. (हि. २ ब.)
३२७–३०४ रोमनें कर्जाबाबतचा कायदा नरम केला. (ह.)
३२६ तक्षशिलेचा राजा शिकंदरास शरण , पोरसचा पराभव (हि. २ ब.)
३२६ कोणत्याही ऋणकोच्या हातांत बेडया घालूं नयेत असें ठरलें. रोम (ए. ब्रि.)
३२५ शिकंदर सर्व साम्राज्यांत स्वसत्ताक शहरें स्थापितो. (ह.)
३२५–३०० चाणक्याचें अर्थशास्त्र. (V. S.)
३२५ नियारकस हा हिंदी महासागराची पहाणी करितो. ग्रीस (हि. २ ब.)
३२३ अलेक्झांडरच्या राज्याची त्याच्या ३४ सेनापतींमध्यें वांटणीं. ग्रीस (हि. २ ब.)
३२४ अलेक्झांड्रिया येथील ग्रंथशाळेची स्थापना.
३२३ बाबि. येथें शिकंदरचा मृत्यु. ईजिप्तचा राजा टॉलेमी युक्लिडचा उदय (मू. हि.)
३२२–१८५ मौर्यराजे (स्मि.)
३२१–२९७ चंद्रगुप्त राज्यावर येतो. (रॅ.)
३२०–२९० चंद्रगुप्त-उदय, (हि. २ ब.). चंद्रगुप्ताची कारकीर्द, (दत्त).
३२० सुमारें. ॲरिस्टॉक्झेनर क्लॅसिकल ग्रीक संगीताचा मुख्य तज्ज्ञ (ज्ञा. को.)
३१७ चंद्रगुप्त ग्रीक सत्रपांना हांकून देतो.
३१२ चंद्रगुप्त मगधाच्या गादीवर बसतो व मौर्यवंशाची स्था. (हि. २ ब.)
३१२ सेल्युकस यास ॲन्टिपेटरकडून ॲंटिपेटरचें राज्य मिळतें. ग्रीस. (ही. २ ब.)
३१२ रोमन लोकांचें नमूद केलेलें पहिलें समुद्रपर्यटन. (ह.)
३१२–१७५ मौर्यराजे (पु. नि.)
३१२–२८१ सेल्युकस हा ग्रीक संस्कृति प्रसारितो. इराण (ह.)
३०६ काचेचे आरसे मिरवणुकींत असत. महावंश (ए. ब्रि.)
३०५ सेल्युकसचा चंद्रगुप्ताच्या हस्तें पराभव व त्याची हकालपट्टी (ह.)
३०२–१९८ टॉलेमीनें जेरुसलेमवर सबाथ दिवशीं अचानक स्वारी केली, ज्यूंनीं त्या दिवशीं लढण्याचें नाकारलें व याउपर जर पुन्हां सबाथला हल्ला आला तर लढूं असें म्हणाले. (ह.)
३०० 'ब्र. वि. महेश ' या कल्पनेचा उदय (हि.२ ब.) मेग्यास्थिनीस हा ग्रीक वकील पाटलिपुत्र येथें होता. (एस्. एन्.)
३००-इ.स.१०० याज्ञवल्क्यस्मृति (ध. २ म.)
३०० मध्ययुरोपांत जर्मन्स असल्याचा ग्रीक भूगोलांतील पहिला उल्लेख. (ह.)
३रें शतक ते इ. स. १०० पर्यंत शिलालेखांत ब्राम्हण देवळें किंवा त्यांचे देव किंवा त्यांस देणग्या यांचा कोठेंही उल्लेख नाहीं (एस्. एन्. १५१ पान)
३रें शतक मेग्या. म्हणतोः–मगध सैन्यांत शांततेच्या काळीं २ लक्ष पायदळ ३०० हत्ती, १० हजार घोडे होते. (एस्. एन्.)
२९०– २६० बिंदुसार मगध राज्य. (दत्त)
२८७ आर्किमेडिजचे शोधः—१. पाण्याची उद्धरण शक्ति; २.तरफेचा शोध; ३.Density दाढर्च ४ पाणी वर चढविण्याचा स्क्रू, (ज्ञा. को.)
२८५ टॉलेमी सोटर याचा मृत्यु.
२७५ इरास्टास्थमीस (ग्रीक) दर चौथें वर्ष ३६६ दिवसांचें सांगितलें.
२७३ अशोक राज्याभिषेक. (ओझा)
२७० सु. चंद्रगुप्ताचा मृत्यु,(एस्. एन्.)
२६८ नमूद झालेला पहिला घटस्फोट (रोम) (ह.)
२६६ दुसरा टॉलेमी (इजिप्त) व्यापार, शास्त्र, वाङ्मय व कला हीं वाढवितो. ग्रीस (हि.२ब.)
२६३ अशोक बुद्ध धर्माचा प्रसार सुरू करतो. (हि. २ ब)
२६२– २४६ हिंदु.च्या सरहद्दीवर इंडोबॅक्ट्रियन व पार्थियन साम्राज्य येतें. (ह.)

२६०– २२२ अशोक काळ, (दत्त).
२६० सु. अशोक बुद्ध धर्म स्वीकारतो. (दत्त).
२५९ अशोक मृगयाबंदी करतो. (V. S.)
२५६– २५४ मगध राज्य सौराष्ट्र (गुजरात), ओरिसा, कलिंग यांवरून गोदावरीपर्यंत पसरतें (हि.२ व.)
२५६ रोमन लोक आफ्रिकेवर स्वारी करितात. (हि.२ व.)
२५५ "सीरिया, ईजी, मॅसेडो, एपिरस या मुलुखांत व चोल व पांड्य या लोकांत व सीलोन मध्यें बुद्ध धर्माचा प्रसार मीं केला आहे." अशोक. (एन्. एन्.)
२५० ऑरिस्टॉर्कसः—सूर्यकेंद्र सिद्धांत—छायेमुळें ग्रहणें होतात. (ज्ञा. को.)
२५० सयामांत बुद्धधर्म प्रवेश. (ह.)
२४७ हॅनिबलचा जन्म. (ह.)
२४६ Chehwangte चीनचा पहिला सम्राट यानें वतनदारी काढून टाकली व तिचीं पाळेंमुळें काढून टाकण्याकरितां वैद्यकी व शेतकी यांवरचीं पुस्तकें सोडून बाकी सर्व वाङ्मय जाळण्याचा हुकूम केला. (रॉ. ड.)
२४३ हिंसाबंदीचा अशोकाचा कायदा (V. S.)
२४२ तिसरें बुद्ध भिक्षु मंडळ (दत्त)
२४० किंवा २३० आन्ध्र आरंभ (च. को.)
२३७ हॅमिल्कर स्पेनमध्यें विजय मिळवितो. (ह.)
२३६–२१९ स्पेनवर कार्थेजचें साम्राज्य (हि. २ व.)
२३५ Nacvins येथें नाटकाचे प्रथम प्रयोग रोम (ह.)
२३५ आनाम व टाँकिंग येथें चिनी येतात. (ह.)
२३४ कॅटोचा जन्म (ह.)
२२६ अशोकपुत्र शुभगसेन गादीवर बसतो. हा साची व बुद्ध गया येथें स्तंभ उभे करतो. (हि.२ व.)
२२२ (श. पू. ३००–२००) भास कवि. (गणपति शा.)
२१९–२१६ हॅनिबलच्या लढाया व जय.
२१८ हॅनिबल आल्प्स ओलांडतो. (हि. २ व.)
२१६ चिन्यांचा बुद्ध धर्माशीं परिचय (रॉ. ड.)
२१४ चेवँग्टी यानें प्रसिद्ध चिनी भिंतीचें काम सुरू केलें. (रॉ. ड.)
२१३ पुष्पमित्र—जन्म (च. को.)
२१२ ससन घराण्यांतील आर्देशीर यानें झरतुष्ट्र धर्माचें उज्जीवन केलें व अग्निपूजा व्यवस्थित सुरू केली. (ज्ञा. को.)
२११ हॅनिबल रोम शहरास भिडतो व परततो. (हि. २ व.)
२०९ चिवँगटी मरतो. (रॉ. ड.)
२०६ ते इ. स. २५ चिनी हॅन राजवटींत चिनी मातीचीं भांडीं–कला झाली. (रॉ. ड.)
२०४ सिपिओची कार्थेजवर स्वारी (हि. २ व.)
२०२ झामाची लढाई व हॅनिबलचा पराभव. (हि. २ व.)
२०० रामायणरचना काल (वेबर)
२ रे शतकापूर्वी मत्स्यपुराण (ह. प्र. पु. नि.)
इ. स. पू. २रें शतक धम्मसुत्ताच्या प्रती काश्मिरांतून चीनच्या राजाकडे गेल्या. (दत्त)
इ.स. पू. २रें किंवा १लें शतक बॅक्ट्रियन ग्रीकांची हिंदुस्थानावर स्वारी. (दत्त)
महायान व हीनयान हे बौद्धपंथ उत्पन्न झाले.
इ.स. पू. २०० ते इ.स.पू. १००हिपसिक्लस ग्रीक गणितज्ञ. बहुकोणीय संख्या व गणित श्रेढी यांबद्दल शोध.
२ रें शतक पू. चीन देशांत कागद तयार झाला. (ए. ब्रि.)
१९८–१४१ Book of Daniel लिहिलें गलें. (ह.)
१९६ फ्लॅमिनिअस ग्रीसचें स्वातंत्र्य पुकारतो.

१८४–१४८	पुष्प मित्राचा अश्वमेध आरंभ (रॅ.)
१८३	मगधांतील मौर्य राज्याचा शेवट (दत्त)
१८३–७१	मगधांत शुंग राजवट (दत्त)
१७८	मौर्य वंशाचा उच्छेद (हि. २ व.)
१७५	पुष्पमित्राच्या अश्वमेधाचा आरंभ (मु. पु. त्र. को.)
१७५	किंवा पूर्वी भृगुप्रबोध मनुस्मृति (च. को.)
१७४	रंगभूमीवरील खेळाचा खर्च सरकार करतें. रोम (ह.)
१६७	सीरियांतील अँटीओकस हा ज्यू धर्माचा उच्छेद करावयास पाहातो. ग्रीस (.२त्र.)
१६३	ग्रीक तत्त्ववेत्ते व पंडित यांचें रोमहून उच्चाटन. रोम (ह.)
१६०	हिपार्कस ग्रीक गणिती त्रिकोण मितीचा शोधक अक्षांश रेखांशाचा शोधक रोम कायदेमंडळ ज्यू लोकांचें स्वातंत्र्य कबूल करतें (ह.)
१५९	मंगोल लोकांच्या बॅक्ट्रिया वगैरे प्रांतांवर स्वाऱ्या (ज्ञा. को.)
१५९	रोम शहरीं केटस यानें ग्रीक व लॅटिन यांची तुलना यावर व्याख्यान केलें (ए. ि .)
१५३	ग्रीक राजा मिनंदर यानें हिंदुस्थानवर स्वारी केली.याचा पाटण्याचा पुष्पमित्र यानें पराभव केला. तेव्हांपासून १५०२ पर्यंत यूरोपियन चढाई झाली नाहीं. (V. S)
१५०	परमेश्वर हा चंपा येथील राज्य स्थापितो. (ह.)
१५०–१००	पतंजली महाभाष्यकार (म. उ.)
१५०–१००	वेदांतसूत्रें (म. उ.)
१४८	गुप्त वंशाचा उदय (हि. हि. व.)
१४६	रोम लोक कार्थेज नष्ट करतात. (हि. २व.)
१४६	ब्लेर यानें सिद्ध केलें कीं, ग्रीसच्या विजयापासून अलेक्झँडर. सेक्टेरस (ख्रि. श. २३५) याच्या कारकीर्दीपर्यंत स्वतंत्र माणसें व गुलाम यांचें प्रमाण ३:१ असें होतें.
१४५	(ए.ब्रि.)गर्गसंहिता (म. उ)
१४०	चीनमध्यें अपारदर्शक कांचेच्या कारखान्याचा उल्लेख (ए. ब्रि.)
१३९	पहिला रोमन बॅलट लॉ पास (ह.)
१३५	सिसिलींत गुलामांची फार मोठी बंडाळी (ह.)
१२७	बृहस्पति स्मृति (च. को.)
१२६	रोममधून परस्थांना हांकून देण्याचा कायदा (ह.)
१२५	सिथिअन लोकांची पंजाबवर स्वारी.पंजाबांतील बहुतेक सर्व प्रांत सिथिअन झाला. यांच्या द्वारेंच बुद्ध धर्म मध्य आशिया व पूर्व आशिया इकडे गेला (हि. २व.)
१२२	कार्थेज येथें पुन्हां बसाहत (हि. २व.)
१२०	वू. टेच्या कारकीर्दीत बुद्ध धर्माचा दुसरा उल्लेख Yenke पर्वत ओलांडून बुद्धाची मूर्ति चीनांत नेण्यांत आली. (रॉ. ड.)
१०६	सिसिरोचा जन्म (ह.)
१०५	रामायणकाळ (गेन्याम)
१०२	ज्यूलियस सिझरचा जन्म (ह.)
१०२	याज्ञवल्क्य स्मृति (च. को.)
१०२ पू.	अत्रि, हरित, उशनस्, अंगिरा, यम, आपस्तंभ, संवत, कात्यायन, पराशर, दक्ष, शातातप या स्मृति. (ध. र.)
१०१–७६	अग्निपुराण (ध. र.)
१००	रामायण पुनर्रचना (वैद्य)
१०० पू.	जैमिनि अश्वमेध (पु. नि.)
१००	पतंजलि–योगसूत्र
१००–५५	काण्व राजे (दप्तरी)

१०० आश्वलायन गृह्य सूत्र (म. उ.)
१०० रामायणकाल (टॉड)
९७ रोम येथें मनुष्य–बलिदानाची बंदी. (ह.)
९५ स्वांक लोक. हिंदु राज्य सयामांत स्थापन झालें व ८०० वर्षे टिकलें. (ह.)
९२ इराणचा राजा मिथिडेट्स व रोमन लोक यांचा पहिला तह. (ज्ञा. को.)
९१ रोमनांच्याविरुद्ध इटॅलियन्सनीं मतदानाचा हक्क न मिळाल्यामुळें सामाजिक युद्ध पुकारलें (ह.)
९०–२३०इ. स. चिनांचें ब्र.दे. व यून्नन येथें शान राज्य (ह.)
८९ Pasitenes हा ग्रीक शिल्पकार रोमला येतो, सर्व इटालियन नागरिकांना रोमन नागरिकांचे हक्क मिळतात. (ह.)
८८ मिथिटेट्स यानें आशिया जिंकला व रोमन लोकांची कत्तल करण्याचा हुकम दिला. (ह.)
८० ग्रीक गणिती वजनें मापें यांचें कोष्टक हेरो यानें केलें. डबल फोर्सिंग व पंप फायरएंजिन.
७३–२७ शुंग राजे जाऊन काण्व ब्राम्हण राजे आले. (स्मिथ).
७१–२६ मगधांत कण्व राजवट (दत्त)
७० व्हर्जिल–जन्म
६६ रोमन लोकांच्या इराणावर स्वाऱ्या. (ज्ञा. को.)
६५ हेरेसचा जन्म (ह.).
६४ पॉम्पे सिरिया जिंकतो. (द. हि.)
६३ स्ट्रेगो–रोम–भूगोलशास्त्रज्ञ (ज्ञा. को.)
६३ ऑगस्टस सीझरचा जन्म (ह.)
६३ हेरॉड हा येरुशालेम येथें नाटकगृह बांधतो (ह.)
६० रोममधील पहिलें ट्रायंव्हरेट; हिंदु लोक कांबोडियांत येतात. (यू. हि.)
५७ विक्रम संवत चालू, विक्रम सिथियन्स जिंकतो. (हि.२ व.)
५५ ज्यूलियस सीझर इंग्लंडवर उतरतो; र्‍हाईन नदीवर पूल बांधतो. (ह.)
४८–३२ यू. एन. ते. यानें Maou Yen-showयाच्याकडून चित्रें काढून घेतलीं (रॉ.इ.)
४६ सीझरनें पंचांगसुधारणा केली. (यू. हि.)
४४ सीझर डिक्टटर होतो व त्याचा खून. (म. हि.)
४० ऑगस्टनें गॉलसची संघटना केली. (ह.)
३१ अँटनी व क्लिओपाट्रा यांची आत्महत्या. (बु. फॅ.)
२७ रोमन रिपब्लिकचा नाश व रोमन साम्राज्याचा उदय. (यु. हि.)
२६ –इ. स.४३ मगधांत आंध्र राजवटी (दत्त)
४ येशू ख्रिस्ताचा जन्म (यु. हिं.)

इ. स. पासून पुढें

२–७८ सिथियन लोक हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापितात. कनिष्क राजकुल. (हि. हि. व.)
३ Lex Aefia Sentiaयानें कायदा केला कीं,२० वर्षांखालील मालकानें ३० वर्षांखालील गुलामांस स्वातंत्र्य देऊं नये. (ए. ब्रि.)
१०–४० इराणांतील ग्रीक संस्कृतीचा र्‍हास. (ह.)
१लें शतक यू.ची हे हिंदुस्थानवर स्वारी करतात; (द.)काचेच्या दोन थरांत सोनेंचांदीचीं पानें घालण्याची कला अलेक्झांड्रियांत निघाली. (ए. ब्रि)
१९ Lex unia Nerbana च्या नंतरही मुक्तता मिळालेल्या गुलामांचा सामाजिक दर्जा लॅटिन वसाहतवाल्यांच्या बरोबरीचा व्हावा असें ठरलें होतें तरी लोकदृष्टचा तो मरेपर्यंत गुलामच राही. (ए. ब्रि.)
२३ व ७९ यांत प्लिना हा बुद्ध भिक्षूंचीं वर्णनें देतो. (दत्त)
३० यशूस सुळावर चढविलें. (यू. हि.)

५० सेंट पॉलनें ख्रि. धर्म सुरूं केला. (यू. हि.)
५४–६८ नीरो. (द. हि.)
६० महाक्षत्रप नहपान (ग्रीक) याचें राज्य दक्षिण राजपुतान्यापासून पुण्यापर्यंत होतें?
६०—८० कंबोज वंशीयांचें सयामांत राज्य (ह.)
६२ सम्राट मिंगटे यानें बुद्ध धर्माचीं तत्त्वें माहित करून दिलीं. हिंदु प्रतिनिधी धाडून मूर्ति चित्रें, व सूत्रें आणविलीं. काशींचे मातंग या हिंदी माणसाकडून या सूत्रांचें चिनी भाषांतर करविलें. (रॉ. ड.) (दत्त)
६३ सेंट पॉलचा मृत्यु. (यू. हि.)
६४ रोममधील आग–निरो (यू. हि.)
६५ ख्रिस्त्यांचा छळ सुरूं (यू. हि.)
७८ दक्षिणेकडील शालिवाहन हा शक-लोंढा थांबवितो. येथून पुढें शक मागें पडतात. (हि.२व.
७८ काश्मीरचा यू. ची राजा कनिष्क हा शाक्य शक स्थापितो. (दत्त)
८०–८५ रोमन्सची स्कॉटलंडवर स्वारी (ह.)
९८ टॅसिटस हा जर्मिनिया हें पुस्तक लिहितो. (ह.)
९८ मेनेलॉस्क याचें नांवचा सरल व गोलीय भूमितींत सिद्धांत आहे.
१००–३०० नारदस्मृति
१००–२०० पारिपादल तामिल ग्रंथांत प्राचीन द्रविडियन संगीताच्या सात पलाई (मूर्च्छना) सांगितल्या आहेत.
२रें शतक या शतकांत गुलामांचा पुरवठा कमी होऊं लागल्यामुळें धंद्यानें मजुरी करण्याची पद्धति पूर्वीप्रमाणें पुन: अंमलांत येऊं लागली. (ए. ब्रि.)
२रें शतकपर्यंत ग्रीक वर्णमालेंत व्यवस्थितपणा, एकरूपता Uniformity नव्हती. (ए. ब्रि.)
२रें शतक वामन व कूर्म पुराण (ह. प्र.)
१०८ ब्रम्हदेशांत पागन शहर समुद्र राजा स्थापितो. (ह.)
११४ रोमन साम्राज्याचा कळस (यू. हि.)
११५–११७ रोममध्यें परस्परानुमति–घटस्फोट–बंदीकरण, नवरा नपुंसक असल्यास कोणा एकास मठप्रवेश कर्तव्य असल्यास, किंवा कोणी एक कैदेंत गेल्यास घटस्फोट–परवानगी असे :
११६ रोमन साम्राज्याचा परमोत्कर्ष (ब्रुक)
१२० कुशान वंशीय कनिष्क हा पुरुषपूर ऊर्फ पेशावर स्थापितो.
१२१ (ए. ब्रि.) स्कॉटलंडमध्यें हॅड्रियन भिंत बांधतात. (ह.)
१२४ शालिवाहन वंशांतील गौतमी–पुत्र श्रीशातकर्णी यानें महाक्षत्रपांचें राज्य नष्ट केलें. हिंदु व बुद्ध यांना सारखेंच वागवी, पण अभिमानी हिंदूचा;
१३० टॉलेमी ग्रीक Modes सुधारतो (सं. शास्त्र ज्ञा. को.)
१३१ ज्यू लोकांचें(?) बंड (यू. हि.)
१३१–२०० गेलेन शस्त्रकलानिपुण रोमन वैद्य
१३४ जस्टिनियननें परस्परानुमति–घटस्फोटास बंदी केली. (ए. ब्रि.)
१३५ पॅलिस्टिनमध्यें ज्यू लोकांच्या राष्ट्रीय संघटनेचा शेवट. (ह.)
१४० जस्टिन यानें जस्टिनियननें केलेली घटस्फोट बंदी उठविली. (ए. ब्रि.)
१४६ आराकानचा पहिला बुद्धधर्मी राजा. (ह.)
१५० काश्मिरांत कनिष्कांचें राज्य (वेल्स)
१५०–३०० शहा राजांचें सौराष्ट्रांत राज्य (दत्त)
१५० सु. टॉलेमी या ग्रीक ज्योतिष्यानें चंद्राच्या गतींत अनियमितपणा आहे असें दाखविलें (ज्ञा. को.)
१५५ गालेसुननें माकडांच्या सांगाड्यांचा अभ्यास करून शरीरशास्त्राचें ज्ञान मिळविलें.
१६६ मार्कस ऑरेलियस (१२१–१८०) याचे प्रतिनिधी टॉंकिंग आनाममध्यें येतात.
१७५ चीनमध्यें ब्लॉक प्रिंटिंग माहित होतें. (ज्ञा. को.)

१८१ नागार्जुन रसायनशास्त्रवेत्ता.
२००–३०० भासकवि (गी. र.)
२००–४०० बृहस्पति–स्मृति; जातुकर्ण्य–स्मृति (ध. शा.)
२००–५०० व्यासस्मृति. (ध. शा.)
३रें शतक रोममध्यें गुलामांचा शेतकीस उपयोग; विष्णुपुराण, वैखानससूत्र;
३रें व ४थें शतक कांबोज लोकांची हिंदुस्थानवर स्वारी. (दत्त)
३रें श. पूर्वी शिवपुराण (च. को.) गरुडपुराण (ह. प्र.)
३रें शतक बुद्ध धर्माचा सिरियांत प्रवेश (दत्त)
२०८ बादशहा सेवारस याची स्कॉटलंडवर स्वारी. (ह.)
२११–२२५ पुलोमत् (स्मिथ)
२१२–२४१ इराणांत झोरोस्ट्रियानिझमचा नाश; मिथ्रेइझमचा प्रसार; ख्रिस्ती धर्माबरोबर झगडा. (ह.)
२१२–६५१ इराणांत ससून घराण्याचें राज्य. (यू. हि.)
२४२ मणि पंथाचा इराणांत उदय (ह.)
२५० मूर राजा (उरोज) हा पांडुरंग शहराची अनामांत स्थापना करतो. (ह.)
२५० आंध्र शेवट. (पु. नि.)
२६५ यानंतर चिनांत निळ्या रंगाची चिनी मातीचीं भांडीं होऊं लागलीं. (रॉ. ड.)
२७७ इराणांत मणीला सुळी दिलें.
२९४ आर्मिनियाचा राजा ख्रिस्ती झाला. (यू. हि.)
२९५ रामायण काल (बेंटले)
३००–५०० गुप्त राजे (दत्त)
३००–१५२५ अल्केमिस्ट युग 'परीस' व 'अमृत' या दोन्हींच्या शोधाच्या प्रयत्नांत युरोपमध्यें रसायनशास्त्राचा उदय. रसायनाचा स्वतंत्र अभ्यास यापुढें झाला. हिंदुस्थानांत रसायन शास्त्राची वाढ वैद्यक शास्त्रांचें उपांग म्हणून झाली. वनस्पती पासून औषध बनविणें, धातु शुद्ध करणें, त्यांचीं भस्में करणें, मिश्र धातु तयार करणें, हें भारतवासीयांस माहीत होतें. तसेंच अनेक क्षार व आम्ल हीं त्यांस माहीत होतीं.
४थें शतक ज्यूंची पिछेहाट सुरू; फाहियानच्या लिखाणावरून दिसतें कीं, बुद्धधर्माचा ऱ्हास चीनांत होऊं लागला. (ह.) (एस्. एन्.)
४थें शतक भरताच्या काळापासून (४थें शतक) पं. शार्ङ्गदेवाच्या काळापर्यंत (सुमारें इ. स. १२५०) झालेले शास्त्रकार, बावीस श्रुति सप्रमाण आहेत या मताचे होते. (संगीतशास्त्र ज्ञा. को.) भरताच्या वेळीं 'जातिगायन' होतें (ज्ञा. को.)
४थें शतक इलियस डोनटस यानें लॅटिन व्याकरण लिहिलें. (ए. हि.)
४थें शतक सिलदिगारम या तामिळ ग्रंथांत अनेक वाद्यांचा उल्लेख आहे.
४थें व ५वें शतक कोचीन, चायना, फोर्मोसा, मंगो यांत बुध. प्रवेश. (दत्त)
३०२ इराणचा राजा होर्मज्द मेला; सरदारांनीं त्याच्या प्रौढ मुलाचा खून करून लहान मुलगा शापूर यास गादीवर बसविलें. (यू. हि.)
३१९–४९९ गुप्त (पु. नि.)
३२० लिच्छवी घराण्यांतील कुमारदेवी व चंद्रगुप्त पहिला (मौर्य नव्हे) यांचा विवाह; व त्यामुळें चंद्रगुप्त मगध राजा होतो. (गुप्त–वंश–संस्थापक)
३२०–६४७ गुप्त साम्राज्य सुवर्ण युग हें गुप्त सम्राट मोंगलांप्रमाणें दीर्घायुषी व वैभवशाली होते
३२४ रोमन बादशहा कॉन्स्टंटाईन यानें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. (यू. हि.)
३२५ आवेस्त ग्रंथ पुरा झाला. इराणांत राजानें ख्रिस्तीछळ केला; झरतुष्ट्रपंथ सोडणारांस देहांत शासन ठेविलें. (यू. हि.)
३२८ कॉन्स्टॉन्टिनोपलची स्थापना (यू. हि.)
३३० रोमन राजधानी कॉन्स्टॉन्टिनोपलला आली. (बु. फ्रॅं.)

३३० इराणांतून ख्रिस्त्यांची हकालपट्टी (ह.)
३३१ रोमचा राजा कॉन्स्ट० याचा घटस्फोटाचा कायदा
३३२ कॉन्टास्न्टिनोपलच्या कॉन्टिटयूशनच्या कायद्यांत शेतकरी हा जन्मभर शेतावर खपावा असें लिहिलेलें आढळतें (ए. ब्रि.)
३३५ समुद्रगुप्त गादीवर आला. (व्ही. एस.)
३३७ रोमन्स व शापूर यांच्यांत ख्रिस्ती व झरतुष्ट्र या धर्मांसाठीं लढाया (यू. हि.)
३५० अरबस्तानांत ख्रि. ध. प्रवेश. (ह.)
३५० जवळजवळ सर्व हिंदुस्थान समुद्रगुप्तानें जिंकलें (व्ही. एस.)
३५० च्या पुढें स्कॉटलंडवर टयूटॉनिक जमातींच्या स्वाऱ्या. (ह.)
३६८ रोमन्सची स्कॉटलंडवर शेवटची स्वारी (ह.)
३७२ कोरियांत बुद्ध धर्माचा प्रसार (दत्त)
३७२ हूणांचें युरोपाक्रमण (यू. हि.)
३७५ चंद्रगुप्त दुसरा–विक्रमादित्य गादीवर येतो. (व्ही एस्.)
३८४ सेंट अँब्रोज हा चर्चमधील संगीताचें Ambrosian tones तयार करतो (ज्ञा.)
३९४ ऑलिंपिक खेळ बंद झाले. (यू. हि.)
३९५ विक्रमादित्यानें ग्रीक क्षत्रपांचा पराभव करून त्यांस माळवा, सौराष्ट्र येथून हांकून लाविलें. (व्ही. एस्.)
३९५ रोमन साम्राज्याचें दोन तुकडे (यू. हि.)
४थें शतक शेवट पर्यंत (प्रजासत्ताकाच्या शेवटापासून) रोममध्यें प्रेतें जाळण्याची चाल होती.
४०० रोमन साम्राज्याचा नष्टांश? (ह.)
४०० पू. सध्यांचें वायुपुराण (पार्गी)
४००–६०० देवलस्मृति (ध. शा.)
५व्या शतकापूर्वी ब्रम्हपुराण; ब्रम्हांड पुराण (पु. नि.)
५वें श. कुमार घोष या हिंदी उपाध्यायाकडून ८०० उपाध्यायांच्या मदतीनें ३०० ग्रंथांचें (चिनींत) भाषांतर झालें. फाईन या बुद्ध. चिन्याची हिंदुस्थानांतील. सफर.बरेच ग्रंथ घेऊन तो समुद्रमार्गानें चीनला परत जातो.
५वें शतक सु. विष्णु पुराण; (पारगी) रोमन साम्राज्यांतील वेश्यांवरील कर रद्द करण्यांत आला. (ए. ब्रि.)
५वें शतक श्वेत हूणांची हिंदुस्थानावर स्वारी (दत्त)
४०० स्कॉटलंडमध्यें ख्रिस्ती धर्म प्रसार (यू. हि.)
४०१–४०९ सिद्धनागार्जुन म्हणून एक मोठा रसायन शास्त्रज्ञ होऊन गेला. त्याच्या चरित्राचें चिनी भाषेंत भाषांतर झालें(नागार्जुनाचा काल नक्की नाहीं.)
४०४ ग्लॅडिएटरचे खेळ बंद. (यू. हि.)
४०५ आयर्लंडमध्यें सेंट पॅट्रिकचा प्रवेश. (यू. हि.)
४०५ कोरियांतून लिहिण्याची कला जपानांत आली. (रॉ. ड.)
४०५–४११ चिनी प्रवासी फा हैं (ह.)
४१० रोमन शिपाई ब्रिटन मधून कायमचे निघाले. (ह.)
४१० ते पुढें ज्यूटस, एंगल्स व सॅक्सन्स यांच्या इंग्लंडवर स्वाऱ्या. (ह.)
४१३ सु. कुमार गुप्त याचे कारकीर्दीत कालिदास
४१५ न्यायकोर्टाच्या अभावीं जपानांत आरोपीला अधणाच्या पाण्यांत टाकीत. (ह.)
४२२ बुद्ध घोषानें हीनयान हा पंथ सयाम ब्र. देशांत आणला. (ह.)
४२५ कॉन्स्टॉन्टिनोपल येथे युनिव्हर्सिटीची स्थापना. (ह.)
४३० आंध्रांच्या दक्षिणेंतील सत्तेचा शेवट.
४३२ आयर्लंडमध्य सें. पॅट्रिकचा प्रवेश. (ह.)
४३३ नेपाळी लोकांचा महायान बुद्धधर्माशीं संबंध (ह.)

१८१ नागार्जुन रसायनशास्त्रवेत्ता.
२००–३०० भासकवि (गी. र.)
२००–४०० बृहस्पति–स्मृति; जातुकर्ण्य–स्मृति (ध. शा.)
२००–५०० व्यासस्मृति. (ध. शा.)
३रें शतक रोममध्यें गुलामांचा शेतकीस उपयोग; विष्णुपुराण, वैखानससूत्र;
३रें व ४थें शतक कांबोज लोकांची हिंदुस्थानवर स्वारी. (दत्त)
३रें श. पूर्वी शिवपुराण (च. को.) गरुडपुराण (ह. प्र.)
३रें शतक बुद्ध धर्माचा सिरियांत प्रवेश (दत्त)
२०८ बादशहा सेवारस याची स्कॉटलंडवर स्वारी. (ह.)
२११–२२५ पुलोमत् (स्मिथ)
२१२–२४१ इराणांत झोरोस्ट्रियानिझमचा नाश; मिथ्रेइझमचा प्रसार; ख्रिस्ती धर्माबरोबर झगडा. (ह.)
२१२–६५१ इराणांत ससून घराण्याचें राज्य. (यू. हि.)
२४२ मणि पंथाचा इराणांत उदय (ह.)
२५० मूर राजा (उरोज) हा पांडुरंग शहराची अनामांत स्थापना करतो. (ह.)
२५० आंध्र शेवट. (पु. नि.)
२६५ यानंतर चिनांत निळ्या रंगाची चिनी मातीचीं भांडीं होऊं लागलीं. (रॉ. ड.)
२७७ इराणांत मणीला सुळी दिलें.
२९४ आर्मिनियाचा राजा ख्रिस्ती झाला. (यू. हि.)
२९५ रामायण काल (वेंटले)
३००–५०० गुप्त राजे (दत्त)
३००–१५२५ अल्केमिस्ट युग 'परीस' व 'अमृत' या दोन्हींच्या शोधाच्या प्रयत्नांत युरोपमध्यें रसायनशास्त्राचा उदय. रसायनाचा स्वतंत्र अभ्यास यापुढें झाला. हिंदुस्थानांत रसायन शास्त्राची वाढ वैद्यक शास्त्रांचें उपांग म्हणून झाली. वनस्पती पासून औषध बनविणें, धातु शुद्ध करणें, त्यांचीं भस्में करणें, मिश्र धातु तयार करणें, हें भारतवासीयांस माहीत होतें. तसेंच अनेक क्षार व आम्ल हीं त्यांस माहीत होतीं.
४थें शतक ज्यूंची पिछेहाट सुरू; फाहियानच्या लिखाणावरून दिसतें कीं, बुद्धधर्माचा ऱ्हास चीनांत होऊं लागला. (ह.) (एस्. एन्.)
४थें शतक भरताच्या काळापासून (४थें शतक) पं. शार्ङ्गदेवाच्या काळापर्यंत (सुमारें इ. स. १२५०) झालेले शास्त्रकार, बावीस श्रुति सप्रमाण आहेत या मताचे होते. (संगीतशास्त्र ज्ञा. को.) भरताच्या वेळीं 'जातिगायन' होतें (ज्ञा. को.)
४थें शतक इलियस डोनटस यानें लॅटिन व्याकरण लिहिलें. (ए. हि.)
४थें शतक सिलदिगारम या तामिळ ग्रंथांत अनेक वाद्यांचा उल्लेख आहे.
४थें व ५वें शतक कोचीन, चायना, फोर्मोसा, मंगो यांत बुध. प्रवेश. (दत्त)
३०२ इराणचा राजा होर्मज्द मेला; सरदारांनीं त्याच्या प्रौढ मुलाचा खून करून लहान मुलगा शापूर यास गादीवर बसविलें. (यू. हि.)
३१९–४९९ गुप्त (पु. नि.)
३२० लिच्छवी घराण्यांतील कुमारदेवी व चंद्रगुप्त पहिला (मौर्य नव्हे) यांचा विवाह; व त्यामुळें चंद्रगुप्त मगध राजा होतो. (गुप्त–वंश–संस्थापक)
३२०–६४७ गुप्त साम्राज्य सुवर्ण युग हें गुप्त सम्राट मोंगलांप्रमाणें दीर्घायुषी व वैभवशाली होते
३२४ रोमन बादशहा कॉन्स्टंटाईन यानें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. (यू. हि.)
३२५ आवेस्त ग्रंथ पुरा झाला. इराणांत राजानें ख्रिस्तीछळ केला; झरतुष्ट्रपंथ सोडणारांस देहांत शासन ठेविलें. (यू. हि.)
३२८ कॉन्स्टॉन्टिनोपलची स्थापना (यू. हि.)
३३० रोमन राजधानी कॉन्स्टॉन्टिनोपलला आली. (बु. फ्रॅं.)

३३० इराणांतून ख्रिस्त्यांची हकालपट्टी (ह.)
३३१ रोमचा राजा कॉन्स्ट० याचा घटस्फोटाचा कायदा
३३२ कॉन्टास्टिनोपलच्या कॉन्टिटयूशनच्या कायद्यांत शेतकरी हा जन्मभर शेतावर खपावा असें लिहिलेलें आढळतें (ए. ब्रि.)
३३५ समुद्रगुप्त गादीवर आला. (व्ही. एस.)
३३७ रोमन्स व शापूर यांच्यांत ख्रिस्ती व झरतुष्ट्र या धर्मासाठीं लढाया (यू. हि.)
३५० अरबस्तानांत ख्रि. ध. प्रवेश. (ह.)
३५० जवळजवळ सर्व हिंदुस्थान समुद्रगुप्तानें जिंकलें (व्ही. एस.)
३५० च्या पुढें स्कॉटलंडवर टयूटॉनिक जमातींच्या स्वाऱ्या. (ह.)
३६८ रोमन्सची स्कॉटलंडवर शेवटची स्वारी (ह.)
३७२ कोरियांत बुद्ध धर्माचा प्रसार (दत्त)
३७२ हूणांचें युरोपाक्रमण (यू. हि.)
३७५ चंद्रगुप्त दुसरा–विक्रमादित्य गादीवर येतो. (व्ही एस्.)
३८४ सेंट अँब्रोज हा चर्चमधील संगीताचें Ambrosian tones तयार करतो (ज्ञा.)
३९४ ऑलिंपिक खेळ बंद झाले. (यू. हि.)
३९५ विक्रमादित्यानें ग्रीक क्षत्रपांचा पराभव करून त्यांस माळवा, सौराष्ट्र येथून हांकून लाविलें. (व्ही. एस्.)
३९५ रोमन साम्राज्याचें दोन तुकडे (यू. हि.)
४थें शतक शेवट पर्यंत (प्रजासत्ताकाच्या शेवटापासून) रोममध्यें प्रेतें जाळण्याची चाल होती.
४०० रोमन साम्राज्याचा नष्टांश? (ह.)
४०० पू. सध्यांचें वायुपुराण (पार्गी)
४००–६०० देवलस्मृति (ध. शा.)
५व्या शतकापूर्वीं ब्रम्हपुराण; ब्रम्हांड पुराण (पु. नि.)
५वें श. कुमार घोष या हिंदी उपाध्यायाकडून ८०० उपाध्यायांच्या मदतीनें ३०० ग्रंथांचें (चिनींत) भाषांतर झालें. फाईन या बुद्ध. चिन्याची हिंदुस्थानांतील. सफर.बरेच ग्रंथ घेऊन तो समुद्रमार्गानें चीनला परत जातो.
५वें शतक सु. विष्णु पुराण; (पारगी) रोमन साम्राज्यांतील वेश्यांवरील कर रद्द करण्यांत आला. (ए. ब्रि.)
५वें शतक श्वेत हूणांची हिंदुस्थानावर स्वारी (दत्त)
४०० स्कॉटलंडमध्यें ख्रिस्ती धर्म प्रसार (यू. हि.)
४०१–४०९ सिद्धनागार्जुन म्हणून एक मोठा रसायन शास्त्रज्ञ होऊन गेला. त्याच्या चरित्राचें चिनी भाषेत भाषांतर झालें (नागार्जुनाचा काल नक्की नाहीं.)
४०४ ग्लॅडिएटरचे खेळ बंद. (यू. हि.)
४०५ आयर्लंडमध्यें सेंट पॅट्रिकचा प्रवेश. (यू. हि.)
४०५ कोरियांतून लिहिण्याची कला जपानांत आली. (रॉ. ड.)
४०५–४११ चिनी प्रवासी फा हैं (ह.)
४१० रोमन शिपाई ब्रिटन मधून कायमचे निघाले. (ह.)
४१० ते पुढें ज्यूटस, एंगल्स व सॅक्सन्स यांच्या इंग्लंडवर स्वाऱ्या. (ह.)
४१३ सु. कुमार गुप्त याचे कारकीर्दीत कालिदास
४१५ न्यायकोर्टाच्या अभावीं जपानांत आरोपीला अधणाच्या पाण्यांत टाकीत. (ह.)
४२२ बुद्ध घोषानें हीनयान हा पंथ सयाम ब्र. देशांत आणला. (ह.)
४२५ कॉन्स्टॉन्टिनोपल येथे युनिव्हर्सिटीची स्थापना. (ह.)
४३० आंध्रांच्या दक्षिणेंतील सत्तेचा शेवट.
४३२ आयर्लंडमध्य सें. पॅट्रिकचा प्रवेश. (ह.)
४३३ नेपाळी लोकांचा महायान बुद्धधर्माशीं संबंध (ह.)

४३४ सुहल्लेख हा रसायनशास्त्रावरील(?) नागार्जुनाचा म्हणून म्हटलेला ग्रंथ चिनी भाषेंत भाषांतरला गेला.
४३५ कांबोजांत श्रुतवर्मा हा हिंदु राज्य स्थापितो ४३५–४९५ (ह.)
४३५ पासून तिबेटचा इति. मिळतो. (ह.)
४३८ थिडिडोसिअन कोडचा प्रसार (रोम) (ह.)
४४० Leo thegreat पहिला बडा पोप (यू. हि.)
४४५ हूण पुढारी अटिला पूर्व रोमन साम्राज्यावर स्वारी करतो. (यू. हि.)
४४९ एंगल्स व कांहीं सेक्सन्स यांनीं ब्रिटन जिकलें (एस. एन.)
४५० श्वेत हूणांच्या हिंदु. वर स्वाऱ्या (यू. हि.)
४५० सु. धर्म महाराजा भद्रवर्मा पोनागार देऊळ (आनाम) सुशोभित करतो (ह.)
४५८ मध्य आशियांतील श्वेतहूणांची धाड स्कंदगुप्त पिटून लावतो.
४६२ जपानच्या Yuriaku या राजानें रेशमाच्या किड्यांची पैदास व्हावी म्हणून राणीलासुद्धां मुडशेरी झाड लावण्याची आज्ञा केली. (ह.)
४७० श्वेतहूणांची दुसरी धाड.–यांनीं पंजाबांत कत्तल केली, गुप्त साम्राज्यावर चाल केली. येथून गुप्त साम्राज्य मोडकळीस आलें.यांचा पुढारी तोरमाण माळव्याचा राजा झाला.
४७१ रानटांच्या पूर्वेकडील सत्तेचा अस्त. (ह.)
४७६ पहिला आर्यभट याला(४७६–५३०) पृथ्वी स्वतःभोंवती फिरते हें माहीत. हिंदी ज्यो. शा.चा संस्थापक (ज्ञा. को.; दत्त)
४७६ पश्चिम रोमन साम्राज्याचा अंत
४८३–५६५ जस्टिनियनच्या काळीं प्रिस्टियन व्याकरणाचीं १८ पुस्तकें लिहिलीं. (ए.ब्रि.)
४८४ कांबोड्यांतील श्रुतिवर्मा राजा चीन देशांत प्रतिनिधी धाडतो. हा लोपपुरी येथें राज्य स्थापतो. (सयाम) (ह.)
४९६ जर्मनींतील सिकब्री जमातीचा क्लोव्हिस हा म्होरक्या ख्रिस्ती धर्म घेतो.(एस. एन.)
५०० पू. कूर्म पुराण (पु. नि.)
५०० विराहमिहिर पंचसिद्धांतिका ५००–५५० (ज्ञा. को.)
५००–५५० उज्जयिनीचा विक्रमादित्य (दत्त)
५००–५५० कालिदास वररुचि, अमरसिंह इ. (दत्त)
५००–६०० डालरिआडा स्कॉ. लोकांनीं घेतला. (ह.)
६वें शतक जस्टिनियन्च्या कारकीर्दींत कॉन्स्टॉन्टिनोपल येथें पतित स्त्रियांसाठीं अनाथालय Rescue home काढण्यांत आलें. (ए. ब्रि.)
६वें–७वें शतक आयरिश संतांनीं जर्मनींत धार्मिक प्रचार सुरूं केला. (एस. एन.)
५००–१५०० यूरोपांतील मध्यकाल. पोप व होली रोमन एंपायर(यू.हि.)मध्ययुगांत शिव्हलरीचा उदय झाल्यावर वेश्याव्यवसाय बंदीचे जोराचे प्रयत्न झाले. (ए. ब्रि.)
६वें शतक दीपंकर श्रीविज्ञान हा बंगाली ब्राह्मण हिमालय चढून तिबेटांत गेला. व तेथें त्यानें बौद्ध धर्माचा प्रसार केला. नलंद विद्यापीठाचा अध्यक्ष शीलभद्र; हुएनत्संगानें याची मुलाखत घेतली होती.
६वें शतक नेगाळांत बुद्ध धर्म प्रवेश; (दत्त) सुरवातीस ३०००हिं. लोक चिनांत होते व तेव्हां बोधिधर्म हा गृहस्थ हिंदुस्थानांतून चिनांत आला. नेस्टोरियन बैरागी चीनमधून कॉस्टॉन्टिनोपल येथें येतात. छापण्याच्या कलेचा चीनांत शोध. (रॉ.ड.)
५००–१००० उदंतपुरी व विक्रमशिला येथील विद्यापीठें भरभराटीस आली.
५०९ सेंट कोलंबॅनस याची आयर्लंडमध्यें धार्मिक कामगिरी. (ह.)
५१०–५६० उज्जयिनीचा राजा विक्रम यानें कुरूर येथील लढाईंत शक फौजांचा नायनाट केला.हि.व
५१६ आर्थर राजाचा (वेल्स) प्रताप (ह.)
५१८ वराहमिहिर–जन्म (दप्तरी)
५२० डायोनिसिअस एक्झिकस यानें ख्रिस्तीशक सुरूं केला? (यू. हि.)

५२६	थिओडॉरिक दि ग्रेट याचा मृत्यु (रोम)	(ह.)
५२७	महावीर जैन	(पु. नि.)
५२७	सम्राट जस्टिनिअन राज्यावर येतो.	(यू. हि)
५२७	लांपून ही पहिली लिओशान राजवटी सयामांत स्थापन झाली	(ह.)
५२८	मध्य हिंदुस्थानांतील यशोधर्म व नरसिंह गुप्त बलादित्य यांनीं एक होऊन तोरमाण-पुत्र मिहिरगुल याचा पराभव केला पण त्यास ठार न मारतां सन्मानानें हिंदुस्थाना-बाहेर पाठविलें; पण त्यानेंच पुढें काश्मीरचें राज्य घेऊन बौद्धांची कत्तल केली. (V. S.)	
५२९	जस्टिनियन कोड. कॉंस्टॉन्टि.चे विश्वविद्यालय जस्टिनियननें उठविलें.	(ह)
५३१	पहिला इराणचा खुश्रु. 'अवेस्तो' सटीक झाला; करांची फेरतपासणी.	(यू.हि.)
५३३	जस्टिनियन्स इस्टिटयूटस (स्मृति) (यू. हि.)	
५३९	चीनी सम्राट हरिओ येन यानें महायानांच्या मूळ ग्रंथाची अस्सल प्रत मिळविण्यासाठीं एक बुद्ध भिक्षू मगधास पाठविला. जिवितगुप्तानें परमार्थ नांवाच्या पंडितास चिनांत पाठविलें. तो तिकडेच ५६९ त मेला.	(व्ही. एस.)
५४०	चिनी व कोरियन यांची जपानांत वसाहत.	(ह.)
५४२	रोम शहरीं प्लेगची सांथ	(ह.)
५५०–६००सु.	भारवी कवि.	(दत्त)
५५१	युरोपमध्यें रेशीम–लागवड. रोमन सेनेटचा नाश	(यू .हि.)
५५१	जॉर्डन हा गॉथ्सचा इतिहास लिहितो.	(ह.)
५५२	कोरियांतून बुद्ध धर्म जपानांत जातो.	(ह.)
५६०	तुर्क नांवाचें नवीन राष्ट्र बनतें.	(यू. हि.)
५६३	सेंट कोलंबा हा स्कॉटलंडमध्यें जातो व ख्रिस्ती धर्म सुरूं करतो.	(ह.)
५६७	तुर्की टोळ्या उदय पावल्या व सगळीकडच्या हूणांचा त्यांनीं नाश केला.	(ही. एस.)
५६८–५७१	रोमची पर्शियाशीं लढाई १९ वर्षे	(ह.)
५७०	महंमदाचा जन्म	(यू. हि.)
५७०–६२०	दंडी कवि	(दत्त)
५७१	महंमदाचा जन्म	(ह.)
५७२	Sholokudaishi याचा जन्म; हा सुधारक बुद्धधर्मी होता. जपाननें याच्या कारकीर्दींत चीन संस्कृतीचा अवलंब केला.	(ह.)
५७३	पेगू (हंसावती नगरी) ब्रह्म देशांत वसली. ही ५७३–१०३० राजधानी होती.	(ह.)
५७५	महमदाचा जन्म	(स्मिथ)
५८१–६१८	चिनांत हिरव्या रंगाचीं भांडीं (चिनी मातीचीं) होऊं लागलीं. मागून निरनिराळ्या ६ रंगांचीं भांडीं होऊं लागलीं.	(रॉ. ड.)
५८८	बुद्धमूर्तिकार शिल्पी इत्यादि जपानांत येतात.	(ह.)
५९०	ग्रेगरी दि ग्रेट हा पोप झाला	
५९०–६२८	खुश्रु पर्विझ हा इराणी राजा रोमनांच्या मदतीनें गादीवर बसतो	(यू. हि.)
५९३	जुनीं पुस्तकें लाकडांवर कोरण्याचा व छापण्याचा सम्राट वॅन टीचा हुकूम (चीन) (रॉ. ड.)	
५९६	रोमन व आयरीश मिशनरी ख्रिस्ती धर्म इंग्लंडांत आणितात.	(ह.)
५९८–६५०	ब्रह्मगुप्त. ब्रह्मस्फुट सिद्धांत.	(दत्त)
७वें शतक	संगीत मकरंद या ग्रंथाचा कर्ता नारद.	(एस. बी. ई.)
७वें शतक	बृहस्पति स्मृति.	(ध. शा.)
६००	वराहमिहीर–जन्म	
६००	शशांक गुप्तानें बौद्धांच्या द्वेषानें बोधीवृक्ष उखडून जाळला. व बुद्धाच्या पादुका फोडून टाकल्या	(व्ही. एस.)

६०२ जपानी लोक चिनी पंचांग वापरूं लागले. (ह.)
६०४ महेंद्रवर्मा (५९०–६१०) सयाम. (ह.)
६०६–४७ ठाणेश्वरचा हर्षवर्धन यानें सहा वर्षांत जवळजवळ सर्व उत्तर हिंदुस्थान काबीज केलें (V. S)
६०८–४२ वातापीचा सम्राट दुसरा पुलकेशी; हर्षाचा यानें पराभव केला. इराण–दरबारी याचे वकील होते.
६१० भर्तृहरी (पु. नि.)
६१०–६५० सयामांत ईशानवर्मा राज्य वाढवितो. व्याधपूर स्थापितो.
६१०–६५० दुसरा शिलादित्य उत्तर हिंदुस्थानांत अधिपति. (दत्त)
६१०–६५० बाणभट्ट व सुबंधु
६१०–६५० भर्तृहरी व भट्टीकाव्य (दत्त)
६१० जपानची खानेसुमारी (ह.)
६१०–६५० पहिला ईशानवर्मा; ह्युएनत्संग महाचंपा येथें येतो. (अनाम) (ह.)
६१४ दुसरा खुश्रु हा पवित्र क्रूस जेरुसलेमहून टेसिफोन (बगदाद)ला घेऊन जातो. (ह.)
६१४ पर्शियन्स जेरुसालेम लुटतात. (ह)
६१६ पर्शियन्स ईजिप्त लुटतात. (ह.)
६२० Srong-tsan Ganpo६००–६६३ हा तिबेटचें साम्राज्य स्थापितो व हिमालय प्रदेश व बंगालचा बराचसा मोठा भाग जिंकतो. हें राज्य ८५० पर्यंत टिकलें (ह.)
६२०–६९० अरेबियांतील पॉल हा अत्यंत कठिण शस्त्रक्रिया आजच्यासारख्या करतो. (यू. हि.)
६२२ टँग राजवंशानें Kaiyuen T'ungpadn हें (१८८७) आजतागायत चालत असलेलें चलन सुरूं केलें. (रॉ. ड.)
६२२ महमदाचें मदिनेस पलायन. हिजरी शक (यू. हि.)
६२२ Srong-tsan I ganpo यानें तिबेटांत बुद्ध धर्म चालू केला. (ह..)
६२२–६३२ डॅगोबर्ट १ ला हा बेल्जममध्यें पहिलें ख्रिस्ती चर्च स्थापितो. (ह.)
६२८ खुश्रूचा मुलगा दुसरा कवध यानें त्याचा खून केला. पैगंबरानें जगांतील प्रसिद्ध राज्यकर्त्यांना खलितें धाडिले; प्रसिद्ध गणिती ब्रह्मगुप्त वर्तुलांकित चौकोनाच्या समोरच्या कोनांची बेरीज दोन काटकोणांबरोबर असते हा शोध लावतो.
६२९–६४५ ह्यू एन सँग हा चिनी प्रवासी कांबोजांत येतो (ह.)
६३० हॉलंडमध्यें डॅगोबर्ट हा पहिलें ख्रिस्ती देऊळ बांधतो. (ह.)
६३२ महंमदाचा मृत्यु (यू. हि.)
६३२ खिलाफतचा आरंभ ; अबूबकीर हा पहिला खलिफा होतो. (यू. हि.)
६३३ अरबांनीं इराण जिंकलें; ससून घराण्याचा शेवट (यू. हि.)
६३४ अरबांची सिरियावर स्वारी (ह.)
६३६ मुसलमानांचा पाय हिंदुस्थानांत पडतो.; सम्राट हिरॅक्लिअस सिरिया प्रांत मुसलमानांच्या हवालीं करतो. (हि.२ व.)
६३७ सॅरसिन्सनीं जेरूसलेम घेऊन तेथील देवळाचीं मशीद केलीं (यू. हि.)
६३८ ब्र. दे. तील सिंग राजा ब्रह्मी शक स्थापतो. (६३७–६६४) (ह.)
६३८ सयामांत बुद्ध धर्म पसरतो. (दत्त)
६३८ उमर यानें जेरूसलेम घेतलें.
६३८–६३९ ब्रह्मी शक सयामांत चालू होतो. (ह.)
६३९ ल्हासा शहर वसलें (ह.)
६३९–६४१ अरबांनीं ईजिप्त जिंकलें. (ह.)
६४० सत्याश्रय पुलकेशी (चालुक्य मराठा राजा) याच्या दरबारीं ह्यू एनत्संग येतो.
६४२ पासून एक शतकपर्यंत रोमन शहरीं कला, वाङ्मय यांस उतरती कळा. (ह.)

६५०–७०० कुमारीलभट्ट
६५६ महाराणी Saimei इच्या कारकीर्दींत जपानांत कालवा झाला. ३० हजार लोक कामावर होते. (ह.)
६७३ अरबांचा कॉन्स्टॉन्टिनोपलला पहिला वेढा. (यु. हि.)
६७५ बेनेडिक्ट बिशप यास इंग्लंडांत काचकाम करणारे नव्हते म्हणून फ्रान्समधून ते कसबी इंग्लंडास आणावे लागले. (ए. ब्रि.)
६८० मोहरमच्या सणाचा उदय (ह.)
६८१ Temmu बादशहानें सभाजांतील दर्जाचे पोषाख ठरविले. (जपान) (ह.)
६८५–७०५ अरबांनीं चलन पद्धति घातली. (ह.)
६८५–७१६ रोम येथें बंडाळी व त्याचा ऱ्हास. अरब लोक आफ्रिका व स्पेन जिंकतात. व आशियामायनरवर स्वारी करितात. (ह.)
६८८ शंकराचार्यांचा जन्म (गी. र.)
६९७ खलिफ अब्दुल मलिक याचा सेनापति कार्थेज उध्वस्त करतो. (हि. २ व.)
६९९ खंडकरी शेतकरी व गुलाम शेतकरी यांच्यांत फारसें अंतर नव्हतें. (रोम) (ए. ब्रि.)
७००–७५० भवभूति (दत्त)
८वें शतक कागदाचा सार्वत्रिक प्रसार (ए. ब्रि.)
७११ सॅरासिन स्पेन जिंकतात. (बु. फॅ.)
७१२ (आरब) कासम सिंध प्रांत जिंकतो. (हि. २व.)
७१२ सर्वांत जुनें जपानी पुस्तक Kojiki (प्राचीन गोष्टींचें दप्तर) हें तयार झालें. (ह.)
७१७ मुलतान शहर मुसलमान काबीज करितात. (ह.)
७१७ पारशी संजाणा बंदरांत उतरतात.
७१८ बल्गर सरदार टरबेल हा कॉन्स्टॉ. हें अरबांच्या वेढ्यांतून सोडवितो. (ह.)
७१८ अरबांचें कायमचें उच्चाटन (ह.)
७१८ मुसलमानांनीं आफ्रिकेंतून स्पेनवर स्वारी केली.
७२० सॅरॅसिन्सनीं पिरनीज ओलांडला (यू. हि.)
७२२ मुसलमान लोक वल्लभ राजवंश बुडवितात. (हि. २व.)
७२६ लिओ (रोम) मूर्तिपूजेस प्रतिबंध करतो. (ह.)
७३० बाप्पा रावळ चक्रवर्ति
७३१ कनोजचा राजा यशोवर्मा यानें चीनच्या बादशहाकडे शिष्टमंडळ पाठविलें
७३६ जपानची शिरगणति ८५ लक्ष (ह.)
७४९ आरबी साम्राज्यास उतरती कळा लागली.
७५०–११९९ पाल साम्राज्य बंगाल
७५१ अरबांनीं समरकंद शहर घेतलें, तेथें चिनी कैद्यांकडून त्यांना कागद करण्याची कला कळली. (ए. ब्रि.)
७५२ पोपच्या सार्वभौमत्वाचा आरंभ
७५३–९७३ राष्ट्रकूटांचा महाराष्ट्रावर अंमल (मालखेडच्या)
७५६ मूरिश राजधानीची स्थापना (ब्रु. फॅ. एस. एन.)
७६३ बगदादची स्थापना (ह.)
७६८–८१४ जर्मनींत चार्लसनें दोन गायनशाळा स्थापन केल्या. (एस. एन.)
७७१ शार्लमन फरांकचा राजा (यू. हि.)
७७४ जपानांत कोबा देशी हा बु. ध. मोठा संत जन्मला Airigana Synabary चा संशोध (ह.)
७८१ Se-ngal Feo येथील शिलालेखावर ख्रिस्त धर्माचीं मूलतत्त्वें दिलीं आहेत. हा शिलालेख सन १६२५ त सांपडला (चीन) (रॉ. ड.)

७८२ पूर्व रोमन साम्राज्यानें हरुन अल रशीद यास खंडणी दिली. (यू.हि.)
७८२ ख्रिस्ती धर्म घेण्यास नाकबूली दाखविल्याबद्दल जर्मनींत ४५०० सॅक्सन कैद्यांना ठार मारलें. (ह.)
७८७–८५० डेन्स लोकांचें स्कॉटवर स्वामित्त्व (ह.)
७८८–८५० शंकराचार्य (दत्त)
७९५ आयर्लंडमध्यें डेन्स येतात. (ह.)
७९७ हरुन अल रशिद आशिया मायनरवर स्वारी करतो. (ह.)
८०० होली रोमन साम्राज्याची स्थापना. पोपनें शार्लमेनला पश्चिमेचा राजा म्हणून अभिषेक केला. (यू. हि.)
८०० रोममध्यें पोप तिसरा लिओविरुद्ध बंड (एस. एन.)
८०० सु. स्कॉट. मध्यें स्कँडिनेव्हियन वसाहतीस सुरवात केली. (ह.)
९वें शतक भागवत. ९वें शतकांतील कागदावरील (अरबी) हस्तलिखितें विद्यमान आहेत.
८०२ सगोत्र व सपिंड विवाहास शार्लमेननें बंदी केली.
८००–९०० अग्निपुराण (ह. प्र.)
८०२ दुसरा जयवर्मा (८०२–८६९) सयामांतील राज्याचें पुनरुज्जीवन करतो. मोठ्या इमारती बांधतो. (ह.)
८०२–१०९० कांबोडयांतील मोठ्या इमारती. (ह.)
८११ रोममध्यें कला व वाङ्मय यांचें पुनरुज्जीवन (ह.)
८१३–३३ महमूद इब्न मुसा अलख्वारिझमी आरबी गणितज्ञ. हिंदु व ग्रीक ज्ञान मिसळून यानें 'अलशब्रवल मुक्बाल' नांवाचें बीजगणितावर पुस्तक लिहिलें. त्यावरून बीजगणितास अलजिब्रा हें नांव पडलें.
८१४ शार्लमेनचा मृत्यू (ह.)
८१८ स्कॉट. वर डॅनिश लोकांची स्वारी. (ह.)
८२० पर्शियांत ग्रीक शास्त्रांना उत्तेजन (ह.)
८२८ मुसलमानांस हांकून देऊन हिंदु सिंध देश परत घेतात. (हि.२ व.)
८२९ चंपांत बुद्ध धर्म स्थापना (ह.)
८२९–८५४ आनामांत विक्रांतवर्मा (ह.)
८५० Kosino Kauaoka यानें जपानी कलांची शाळा स्थापिली. (ह.)
८५७–८६६ कान्स्टॉन्टीनोपल विश्वविद्यालयाची पुनः स्थापना Photius गणिती Leo इ. लोक झाले. (ह.)
८६५ मध्यें महमदाचीं वचनें लिहिलेला कागद आहे. (ए. ब्रि.)
८७१ अल्फ्रेड दि ग्रेट हा इंग्लंडचा राजा होतो. (यू. हि.)
८७३ हौनेन बिन आयझॅक हा आरब वैद्य, देवी, गोवर चिकित्सक (यू. हि.)
८७५ सर्वियन लोक ख्रिस्ती होतात. (ह.)
८७८ अल्टफरेड डॅनिश राजाला पराभूत करतो. (ह.)
८८४ बॅस्टिल कोडची प्रथमावृत्ति (रोम) (ह.)
८८९–९१० स्यामचा राजा यशोवर्मन यशोदपूर पुरें करतो. (ह.)
८९५ माग्यार लोकांची हंगेरीवर स्वारी. (ह.)
दहाव्या शतकांत ज्यू लोकांच्या मताची छाप स्पेन देशांत पडूं लागली. (ह.)
१०वें शतक गर्गसंहिता (ह. प्र.)
९०१ अल्फ्रेड मृत्य (इं) (ह.)
१० व्या शतकांत चीनमध्यें छापलेलीं पुस्तकें पुष्कळ होतीं.
९०७–९१३ Samani (पर्शियांतील) वाङ्मय कुंभारकाम, व्यापार, यांचा इराणांत उदय. (ह.)
९१३–९४२ रुडगी पहिला विख्यात इराणी कवि (ह.)
९१८ आनामचा दुसरा इन्द्रवर्मा याच्या कांबोजवर स्वाऱ्या (ह.)

९१८ अरबस्थानांत रुग्णालय
९२२ रोमम यें जमिनदारापासून शेतकरी वाचा ि म्हणून कायदा. ह.)
९२९ कापथियन लोक मक्का लुटतात (ह.)
९३५ Haakon याचा नॉर्वेमध्यें ख्रि. धर्म स्थापनेंचा विफल प्रयत्न (ह.)
९४४–९६८ सयामांतील राजेंद्रवर्मा. बुद्ध धर्माची वाढ (ह.)
९६० अरब वैद्यांनीं शारीरावर लिहिलेला कागद आहे. (ए. ब्रि.)
९६०–११२७ सुग राजवटींत चिनी वाङमय भरभराटलें
पि–चिंग या लोहारानें Movable Type टाईप काढला. (रा.ड.)
९६१–९७६ Balami चें Tabari चें भाषांतर.पर्शियन भाषेंतील सर्वांत जुना ग्रंथ (ह.)
९६५ पोलंडमध्यें ख्रि. ध. ग्रहण (ह.)
९६८ Dnich Bolanh (९६८–९७५) हा आनाममध्यें Din राजवंश स्थापतो. (ह.)
९७३–१०४८ अल्बेरुणी इतिहासकार (पर्शिया) (ह.)
९७४ समरकंद येथें कागदावर लिहिलेला व्याकरणग्रंथ. (ए. ब्रि.)
९७५ महमद अबुल वीफल (बगदाद) यानें 'चंद्राची मंद व शीघ्र गति' विषयीं लिहिलें. (यू.हि.)
९७६ शेख अबुस–सय्यद पर्शियन सुफी काव्याचा जनक. (ह.)
९७६–९८९ सॅम्युएलच्या अमलाखालील नवीन बल्गेरियन स्लाव् साम्राज्य (ह.)
९७७–११७६ मुसलमानांच्या हिं. वर स्वाऱ्या (हि. २ व.)
९८०–१०३७ अरब वैद्य ऍव्हीसेन्ना म्हणतो "क्षयरोग संसर्गजन्य आहे" (यू. हि.)
९८१–१००४ Lehang हा श्रीवनवी ही चंपाची राजधानी उध्वस्त करतो. (ह.)
९८५ डेन्मार्कमध्यें ख्रिस्ती ध. प्रसार (ह.)
९८८ Vadimir I हा ख्रिस्ती होतो. रशियांत ख्रि. ध. सुरू.(ह.)
९९० बगदाद येथें कागदावर लिहिलेला काव्यग्रंथ (ए. ब्रि.)
९९३ सेंट ल्यूक याचें गॉस्पेल (ए. ब्रि.)
१००० Fujiwara no motomitsu या जपानी चित्रकारानें चित्रकलेची सुधारणा केली. (ह.)
११ वें शतक थिओफिलस या ग्रंथकारानें काचकृति लिहून ठेविली. (ए. ब्रि.)
११ व्या शतकांत चीनमध्यें सुटे टाईप छापण्याचें माहीत होतें.
१००१–१०२४ गझनीच्या महं. च्या हिं. वर स्वाऱ्या (ह.)
१००४–१००७ अजून चालू असलेला चिनी भांड्यांचा कारखाना चिनांत King Tih-chil यानें काढला. (रॉ. ड.)
१००१ जयपाल व महमूद यांची लढाई.सिंधूच्या पलीकडचा प्रांत कायमचा मुसलमान झाला.
१००८ दिल्लीच्या आनंदपालाचा पराभव
१०१० भोजराजा
१०१०–१०५२ ब्र. दे. अनिरुद्ध शांग लोकांचा पराभव करतो व हंसावतीचा (पेगू) नाश करतो. (ह.)
१०१०–१२९८ ब्रह्मदेशचें साम्राज्य (ह.)
१०१३ अल्बुकासिस हा (अरबी?) शस्त्रक्रियाग्रंथ लिहितो. (यु हि)
१०१८ कॅन्यूट राज्यारोहण (ह.)
१०२१ काबूलचें ब्राह्मणी राज्य बुडालें.
१०२५ सोरटी सोमनाथावर महमुदाची स्वारी
१०३० अल्बेरुणीचा हिंदुस्थानचा इतिहास
१०३४ डंकननें स्कॉट. एक केलें. (ह.)
१०३५–१०४७ नार्वेमध्यें ख्रि. ध. स्थापना. (ह.)
१०४०–११२३ उमरखयाम ज्योतिषी व कवि (ह.)
१०४६ पोपच्या जागेसाठीं भांडणें (यू. हि.)

१०५४ पूर्व व पश्चिम ख्रिस्त्यांत पूर्ण विरोध.
१०६६ नॉर्मन्सनीं इंग्लंड जिंकलें. (यू .हि.)
१०६७–१२०४ नरपति संगरशूर याची सिलोनकडे स्वारी. हीनयान ध. चें वर्चस्व (ब्र.दे. ह.)
१०७१ मोलासगर्डची लढाई. सेल्ज्युक तुर्कांनीं इस्लामचा पुनरुद्धार केला.
१०८६ डूम्सडेबुक पुरें झालें. (इं.) (यू.हि.)
१०९० नॉर्मन्स हे वेल्स जिंकतात. (ह.)
१०९६ पहिलें क्रूसेड धर्मयुद्ध सुरू. (यू. हि.)
१०९९ क्रूसेडर्सनीं येरुशलेम घेतलें (यू. हि.)
११०० बगदादचा अल्झानेझ याची संधिप्रकाशाची उपपत्ति (यू. हि.)
११०० टोगो येथील उपाध्याय जपानी व्यंग चित्रकलेचा पुरस्कर्ता (ह.)
११०० गीतगोविंदकर्ता जयदेव (बंगाल)
१२ व्या शतकाच्या अखेर इटालियन गणिती लिओनार्डो यानें सर्व पद्धतींत भारती गणना पद्धति श्रेष्ठ ठरविली. ती तो आरबांपासून शिकला.
१२ वें शतक ते १६ वें शतक : हिंदुस्थानांतील प्रसिद्ध संगीतज्ञः—१ भग्न, २ लोहंग, ३ दल्लू, ४ भगवान, ५ धोंडू ६ बैजू, ७ पांडचे, ८ चरजू, ९ सय्यद, निजामोद्दीनः बेलिग्रामचा राहणारा. १० नायक बक्षु. (सं. शास्त्र. ज्ञा. को.)
११००–१११० क्रूसेडर्स सर्व फिनिशियन् शहरें घेतात. (हि. २ व.)
११००–१२०० कपिलसंहिता (ह. प्र.)
१११२–११५२ सयामांत २ रा सूर्यवर्मा अंगकोरवत याचें देऊळ बांधतो. (ह.)
१११४ जर्मन इतिहासकार ओटो ऑफ फ्रीसिंग याचा जन्म (ह.)
१११४ भास्कराचार्य यांचा उदयांतर हा नवा शोध (ज्ञा. को.)
११३०–१२०० च्यु. हि यानें तत्त्वज्ञानावर अनेक प्रबंध लिहिले. (चीन) (रॉ. इ.)
११३९–११४५ श्रीजयेंद्रवर्मन २ रा. आनाम (ह.)
११४६ सेंट बर्नार्डच्या प्रेरणेनें २ रें धर्मयुद्ध
११४७ मास्कोचा पहिला उल्लेख (ह.)
११४८ दमास्कसला क्रूसेडर्सचा पराभव (यू. हि.)
११५० सालेर्नो येथील विद्यापी० स्थापना. (यू. हि.)
११५० अवट बलनी यानें चिंध्याचा केलेला कागद उल्लेखिला आहे. (ए. ब्रि.)
—या शतकमध्याच्या सुमारास मूर लोकांनीं (स्पे.) कागदाचा कारखाना काढला. त्यांच्या नाशानंतर अकुशल अशा ख्रिस्त्यांच्या हातीं तो कार० गेल्यामुळें कागद कमी प्रतीचा निघूं लागला. (ए. ब्रि.)
११५२–११६२ धरणेन्द्रवर्मा याची चंपाच्या हिंदू राजाशीं युद्ध–सुरुवात. (ह.)
११६१–१४३० आयर्लंडमध्यें नॉर्मन्स येतात. (ह.)
११६१–१४३० व्हेनेरियम आजाराच्या प्रतिबंधासाठीं लंडनमध्यें कायदे करण्यांत आले. (ए. ब्रि.)
११६२–१२०१ आठवा जयवर्मा, शेवटचा मोठा कांबोज राजा (ह.)
११६७ ऑक्सफोर्ड युनि० ची स्थापना. (यू. हि.)
११८२ ज्यू लोकांची फ्रान्समधून हकालपट्टी (यू. हि.)
११८४–१२७५ सादी कवि (ह.)
११८५ पॅरिस शहरच्या रस्त्यांत फरसबंदी (एस. एन.)
११८७ सलाउद्दीन जेरुशलेमचें राज्य बुडवितो (हि. २ व.)
११८९ तिसरें क्रूसेड (यू. हि.)
११९१ स्थानेश्वरची लढाई, शहाबुद्दीन घोरीचा पराभव.
११९३ पृथुराज मारला गेला.
११९८ रॉड्रिक आकोनॉर या शेवटच्या आयरिश राजाचा मृत्यु. (ह.)
११९८–१२१६ पोप इनोसंट (३रा) यानें वेश्येशीं विवाह करणें फार स्तुत्य असें जाहीर केलें. (ए.ब्रि.)

१११९ मध्वाचार्य (भट्टाचार्य)
११९९ मुसलमान बहार जिकतात. (हि. २ व.)
१२०० होकायंत्राचा शोध (यू. हि.)
१२ व्या शतकाच्या पूर्वार्धात " Measured Music " चें सर्वात जुने नियम देणारा निनांवी युरोपियन ग्रंथ तयार झाला. (सं. शास्त्र. ज्ञा. को.)
१२०१ ४ थें क्रूसेड (यू. हि.)
१२०३ मुसलमान बंगाल जिकतात. (हि. २ व.)
१२०३ बखत्यार खिलजीनें विक्रम–शिलाविद्यापीठ नाशिलें.
१२०४ नूतन हिब्रू वाङ्मयाचा उदय (ह.)
१२०६–१५२६ दिल्लीचें पहिलें मुसलमानी साम्राज्य
१२१० पॅरिस युनि०ची स्थापना. (यू. हि.)
१२१४–१२९२ रॉजर बेकन. ग्रंथ––(ऑपस मेजस) यांत परावर्तन, वक्रीभवन, वाह्यगोल, अन्तर्गोल यांचा विचार. दुर्बिण, चष्मा, बंदुकीची दारु हे याचे शोध. शोधक बुद्धीचा जनक. (ज्ञा.को.)
१२१५ मॅग्नाचार्टावर जॉनची सही (यू. हि.)
१२१५–१४९० ज्यू लोक तत्वज्ञानाच्या अभ्यासास चालना देतात. (ह.)
१२१५ चंगीझखानानें चीन जिंकला (बु. फॅ.)
१२२४ मंगोलियनांची रशियावर स्वारी. काल्का येथें रशियनांचा पराभव. (यू. हि.)
१२२७ चंगीझखानाचें कास्पियन समुद्रापासून पॅसिफिक महासागरापर्यंत राज्य व मृत्यु
१२२७ आटोमन तुर्कांचा उदय (यू. हि.)
१२२८ ५ वें क्रूसेड (यू. हि.)
१२३० कुतुबमिनार बांधला गेला.
१२३१ केंब्रिज युनि० ची स्था० (यू. हि.)
१२३३ स्पेनमध्यें पहिलें इन्क्विझिशन (बु. फॅ.)
१२३५–१३१२ आर्नोल्ड व रिल्हा नोन्हा या वैद्यानें रोग भौतिक कारणांनीं होतात,ईश्वरी क्षोभानें नव्हे, हें म्हटल्यावद्दल छळ. आर्नोल्डनें गुंगीचें पहिलें औषध शोधले (ज्ञा. को.) वैद्यकांत रसायनांचा प्रथम यानें उपयोग केला.
१२४१ मंगोलांची हंगेरीवर स्वारी (ह.)
१२४३ कुब्लाखानाची तिबेटवर स्वारी
१२४४ ख्रिस्त्यांच्या हातून जेरुशलेम कायमचें गेलें.
१२४७ सिंघण यादवाच्या पदरीं संगीत रत्नाकराचा कर्ता शाङ्गर्देव
१२४८ ६ वें क्रूसेड (यू. हि.)
१२४८–१२७९ ब्र. दे. नरसिंहपति याचें साम्राज्य खालावतें. चिन्यांच्या स्वाऱ्या. (ह.)
१२५०–१३२४ निजामुद्दिन औलिया गवई
१२५२ जपानांत कायाकुरा येथें तयार करून ब्रांझचा बुद्धपुतळा उभा केला. (ह.)
१२५२ पोप इनोसंट ४ था याची नास्तिक छळास मंजुरी (यू. हि.)
१२५३ Guillaume Bouchiei हा फरेंच प्रवासी तिबेटांत येणारा पहिला यूरोपीय (ह.)
१२५४ नवव्या लुईनें (फ्रान्स) वेश्यास हद्दपार करण्याचा कायदा केला. परंतू तो दोन वर्षांनीं दुरुस्त केला. (ए. ब्रि.)
१२५५–१३२४ गवई अमीर खुसरो. सतार वाद्याचा शोधक. कल्याण राग यानेंच काढला.
१२५९ तार्तारांचा पोलंडवर दुसरा हल्ला. (यू. हि.)
१२६५ सायमन डी. मॅांटफोर्ड यानें पहिली ब्रि. पार्लमेंट बोलविली. (यू. हि.)
१२६५–१३२१ डांटे इटालियन कवि (ए. ब्रि.)
१२७० ८ वें क्रूसेड. नामदेव जन्म.

१२७१ मार्कोपोलो हा चीनच्या प्रवासास निघाला. (यु. हि.)
१२७१–१३०९ रामदेवराव जाधव
१२७४ नार्वेतील पहिलें कायदे कोड (ह.)
१२७५ ज्ञानेश्वराचा जन्म
१२७६ इटलींत पहिली कागदाची गिरणी (ए. ब्रि.)
१२७९–१२९८ कुब्ला–ई–खान चीनचा सम्राट होतो. (ह.)
१२८० कुब्ला–ई–खान याची कांबोजवर व सयामवर स्वारी (ह.)
१२८०–१२९२ मार्कोपोलो हा कँबियामध्यें येतो. (ह.)
१२८८ पांड्य राजाकडे मार्कोपोलो हा व्हेनिशियन प्रवासी आला होता.
१२९० ज्ञानेश्वरी लेखन
१२९० ज्यूंची इंग्लंडमधून हद्दपारी (यू. हि.)
१२९१–१२९५ Kaikhatu हा कागदी चलन सुरूं करतो. (ह.)
१२९३ कागदावर वाटर मार्क्स प्रथम काढाल्या. (ए. ब्रि.)
१२९४ शास्त्रज्ञ रॉजर बेकनचा मृत्यु. अल्लाउद्दिनची दक्षिणेंत स्वारी
१२९५ पहिलें आयरिश पार्लमेंट (ह.)
१२९५–१३१५ मुसल० दक्षिण जिंकतात. (हि. २ व.)
१२९८ मार्कोपोलो यानें जपान हा देश युरोपियास प्रथम परिचित करून दिला. (ह.)
१२९८–१३०० सु. आनामांत मुसलमानी ध. चा प्रवेश (ह.)
१३ वें शतक दिल्लीस अल्लाउद्दिनाच्या पदरीं नायक गोपाल हा प्रसिद्ध हिंदू संगीत शास्त्रज्ञ होता. (सं. शास्त्र. ज्ञा. को.) अमीर खुश्रूही याच काळांतला. याच अमीर खुस्रूनें ख्यालाचें गाणें प्रथम सुरूं केलें. (ज्ञा. को.) याच शतकांत म्हणजे 'रत्नाकरा'च्या वेळीं 'राग–गायन' प्रचारांत आलें. (ज्ञा. को.)
१४ वें शतक रसरत्नाकर, रसेंद्रकल्पद्रुम, धातुरत्नमाला, इ. रसायन शास्त्रांवरील ग्रंथ झाले.
१४ वें शतक आरंभ. लोहचुंबकाचा नौकानयनांत प्रथम उपयोग.
१४ वें शतक मिथिला विद्यापीठ आपलें ज्ञान गुप्त ठेवण्याबद्दल यांचा कटाक्ष असे.
१४ वें शतक पद्मपुराण (च. को.)
१४ वें शतक सॅरॅसिनाच्या अमदानींत दमास्कस ई–सी,–इ–देशांत कांचेवर गिलिट करण्याची कला (ए.ब्रि.)

१४ वें किंवा १५ वें शतक 'कालवा' Locks चा शोध. (ए. ब्रि.)
१३०४–१३७४ पेट्रार्क कवि इटॅ– (ए. ब्रि.)
१३०६ ज्यूंची फ्रान्समधून पुनः हकालपट्टी. (यू. हि.)
१३०७ कायरो शहरीं वेडयांचें इस्पितळ स्थापन झालें. (स्मि.)
१३०८ ब्रिटिश पार्लमेंट ही कायदेकारी संस्था झाली. (बु. फॅ.)
१३१० दाक्षिणात्य संगीतज्ञ नायक गोपाळ-राग कदंब व ताल कुड्डुक यांचा शोधक
१३१३–१३७५ बोकॅशियो (इ.) (ए. ब्रि.) विद्येचें पुनरुज्जीवन (ए. ब्रि.)
१३१८ देवगिरीच्या राज्याचा शेवट
१३२६ बंदूक दारूचा शोध (यू. हि.)
१३२७–१३७७ इंग्लिश उमरावांना आयरिश जमातींचें म्होरकेपण मिळतें. (ह.)
१३२८ फ्रायर ओडोरिक याचा तिबेटांत प्रवेश (ह.)
१३२८ स्कॉट–स्वातंत्र्यास इंग्लंडची कबुली. (ह.)
१३३५ स्वीडनमधून गुलामगिरीचें उच्चाटन (ह.)
१३३६ विजयानगरच्या साम्राज्याची स्थापना. विद्यारण्य स्वामी.
१३४६ दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना.
१३४८ फ्रान्स व इंग्लंड यांच्यांतील शतवार्षिक युद्धास सुरुवात (यू. हि.)
१३४८ प्रेग (जर्मनी) युनि० ची स्थापना (ह.)

१३४८ इटली देशांत प्लेग (यू. हि.)
१३४९ इंग्लंडमध्यें ब्लॅक डेथ आजाराची सांथ (यू. हि.)
१३४९ जर्मनींत ब्लॅक डेथ सुरू. हा ज्यू लोकांनीं आणिला असें वाटून ख्रिस्त्यांनीं ज्यूंची कत्तल केली. (ह.)
१३४९ Bushan Code of Laws हें कायदाकोड सर्व्हियांत तयार झालें. (ह.)
१३५० शाक्य पंडितानें कुब्लाखानास बु.ध. दीक्षा दिली.त्यानें पंडितास तिबेटचा पहिला उपाध्याय – राजा केलें.
१३६४ पोलंडची राजधानी क्रॅको येथील विश्व वि० ची स्थापना (ह.)
१३६५ व्हिएन्ना विश्व वि०ची स्थापना. (ए. ब्रि.)
१३६९–१४०५ तैमूरलंग (ह.)
१३६९ धर्मसुधारक व राष्ट्रवीर हस याचा जन्म (बोहेमिया) (ह.)
१३७४ पहिला लोकनियुक्त सर्वाधिकारी 'केनेझ् लुझार' (सर्व्हिया) (ह.)
१३८० जॉन विक्लिफ हा Transubstanliation च्या तत्त्वास विरोध करतो. (यू. हि.)

१३८१ इंग्लंडमध्यें शेतकऱ्यांचें बंड.
१३८२ तार्तार लोक मॉस्को जाळतात.
१३८५–१४७० कांबोज व चंपा येथील राज्य नष्ट होतें (ह.)
१३८७ सायणाचार्यांचें वेदावरील भाष्य.
१३९१ स्पेनमध्यें ज्यूंची कत्तल. (यू. हि.)
१३९३ तुर्क लोक बल्गेरिया आपल्या साम्राज्यांत सामील करतात. (ह.)
१३९७ मॅन्युअल ख्रिसोलोरस हा फ्लोरेन्स युनि. त ग्रीक शिकविण्यास जातो. (ए. ब्रि.)
१३९८ तैमूरची हि. वर स्वारी (हि. २ व.)
१५ वें शतक कोरियन लोक धातूच्या टायपाचा उपयोग करतांना आढळतात. (रॉ. ड.)
१५ वें शतक इंग्लंडांत कागदाच्या १ रिमाला सु. ४ शिलिंग पडत. (ए. ब्रि.)
१५ वें शतक वासुदेव पंडितानें नवद्वीपास विद्यापीठ स्थापिलें. विद्यापीठास पदव्या देण्याचा अधिकार त्यावेळीं राजाकडून मिळत नसून लोकांकडून मिळे.
१५ व्या शतकाच्या पूर्वी जर्मनींत कांचेच्या खिडक्या नव्हत्या. (एस. एन.)
१५ वें शतक आरंभ–पोर्तुगालमध्यें व्यापार आणि नौकानयन यांची फारकत व नौकानयनामध्यें महत्त्वाच्या सुधारणा.
१४०३ राग तरंगिणीकार लोचन कवि
१४०३–१४२५ सम्राट् Yung-Lon यानें ५ घंटा ओतविल्या. त्यांतील सर्वांत मोठी सध्यां पेकिंग येथील देवळांत आहे. (रॉ. ड.)
१४०५ तैमूरलंगाचा मृत्यू
१४११ सेंट एँड्र्यूच्या युनि०ची स्थापना (स्कॉ०) (ह.)
१४१४–१४९२ जमी हा शेवटचा पर्शियन क्लॅसिक कवि. (ह.)
१४१५ जॉन हस् (बोहे.) यास पाखंडी म्हणून जिवंत जाळिलें. (ह.)
१४१९ पोर्तुगिजांनीं अझोर्झचा शोध लावला.
१४२७ इटालियन प्रवासी निकोलो कोंटी विजयनगरास भेट देतो.
१४३० झ्यूरिय येथील (औषधी) कारंजें बांधलें. (एस. एन.)
१४३१ जोन ऑफ आर्क ईस जाळलें. (ह.)
१४३३–१४७८ मीर खोंज हा इराणचा इतिहासकार. (ह.)
१४३३ आफ्रिकन गुलामांच्या व्यापारास सुरुवात (ह.)
१४३६ जॉन गटेन्बर्ग यानें छापखान्याच्या कलेचा जर्मनींत शोध लावला.
१४३७ ग्लासगो युनि०ची स्थापना (ह.)
१४३९ जर्मनींत फ्रॅंकफोर्ट येथें पहिल्या फायर ब्रिगेडची स्थापना (एस. एन.)

१४४० व्हिएन्ना येथें इंपिरियल लायब्ररीची स्थापना (ह.)
१४४० लॅरिन्स जॉन्झ झून यानें हार्लेम येथें छाप० चा शोध लावला.
१४४० मॉंटेझुमा (मेक्सिको) याची कारकीर्द. सुरू (ह.)
१४४५–१५२१ Josufuin Des Pre's हा पहिला पाश्चात्य कंपोजर.चिजांमध्यें नवीन स्वर-रचना बसविणारा.
१४४६–१४५० Ulugh Beg (इराण) हा ज्योतिर्विषयक कोष्टकें प्रसिद्ध करतो (ह.)
१४४७–१५७६ तिबेटच्या लामांचा उदय. (ह.)
१४४७ पोर्तुगिजांनीं केप वर्ड (Verde) व सिएरा लिओने यांचा शोध लावला.
१४४८ आसामांतील महापुरुष्य पंथाचा उत्पादक जन्मला. (भट्टाचार्य)
१४५० च्या सुमारास पं. लोचन हा राजतरंगिणीचा कर्ता झाला. तत्कालीन व तत्पूर्वीच्या स्वरांत फरक झाला होता. (संगीत शास्त्र ज्ञा. को.)
१४५० लॅरिन्स कॉस्ट यानें हार्लेम येथें धातूचे टाईप पाडले.
१४५० गटेन्वर्ग नें प्रत्यक्ष छापावयास सुरुवात केली. (ह.)
१४५३ तुर्कांनीं रामझाम घेतलें. (यू. हि.) पूर्वेकडील बायझंटाइन राज्याचा अंत
१४५७ जर्मनींत छापलेलें पहिलें पुस्तक (एस. एन.)
१४६५ टिपकागदाचा शोध (ए. ब्रि.)
१४६६ इरॅस्मसचा जन्म (ह.)
१४६९–१५३८ शिखांचा आद्यगुरु नानक
१४७३–१५४३ कोपर्निकस; यानें केंद्रसिद्धांत; ग्रहमालानुक्रम; प्रदक्षणाकाल ठरविला. (ज्ञा.को.)
१४७५ इंग्रजींत पहिलें छापील पुस्तक (यू. हि.)
१४७५–१५३४ इराणचा Khondamir हा इतिहासकार (ह.)
१४७६ रमाधिपति हा सिलोनांत हीनयान पंथ आणतो. (ह.)
१४७९ 'वल्लभ' यांचा जन्म (भट्टाचार्य)
१४८० मास्कोचा ग्रँड डचूक ३ रा इव्हान यानें मोंगल सत्ता झुगारून दिली.
१४८१ स्पेनमध्यें इन्क्विझिशनची स्था० (यू. हि.)
१४८३ लूथरचा जन्म (ह.)
१४८६ चैतन्यजन्म
१४८६ डर्टझ यानें केप ऑफ गुड होपला वळसा घातला.
१४८६ राजा मानसिंग तोमर यानें संगीत पाठशाळा काढली. मानकुतुहल नांवाचा संगीतावर ग्रंथ लिहविला. ध्रुपदाच्या पद्धतीचा प्रसार केला.
१४८७ शेतकऱ्यांना (बोहे.) Serfs बनविलें (ह.)
१४९० ब्राझिलचा शोध. (ह.)
१४९२ कोलंबसास अमेरिका खंड लागलें. (यू. हि.)
१४९३ पहिलें स्लॅव्हानिक पुस्तक छापलें (ह.)
१४९४ पॉयनिंग्ज याच्या कायद्यानें आयर्लंडचें पार्लमेंट बुडाल्यासारखें झालें. (यू. हि.)
१४९४ कोलंबसानें ५०० रेड इंडियस् स्वदेशी विकावयास धाडले. (ए. ब्रि.)
१४९५ ॲबरडीन युनि०ची स्थापना. (ह.)
१४९७ इंग्लंड व फ्रान्स उत्तर अमे०चा शोध लावतात. (ह.)
१४९८ व्हास्को द गामा हा हिंदु० त आला. (ह.)
१५ वें शतक ख्यालाचें गाणें उत्तम म्हणणारा सुलतान हुसेन शर्की (सं.शास्त्र. ज्ञा. को.)
१६ वें शतक टार्टाग्लिआ, जॉन विडमन, फेरारी (चतुर्घातात्मक समीकरण सोडविण्याची पद्धति शोधून काढणारा), जिराड, (कंसांचा प्रथम प्रयोग करणारा), नेपिअर (घातगणिताचा शोधक), ब्रिग्ज (दशांश अपूर्णांक शोधक). इत्यादि गणिती झाले.
१६ वें शतक १ रसप्रदीप, (रसायन शास्त्रावरील ग्रंथ) खनिज आंम्लांचें ऊर्ध्वपातन करण्याची कृति

आहे. २ धातुक्रिया ग्रंथ शिवपार्वती संवादानुरूप असून त्यांत गंधकाम्ल—सल्फ्यूरिक ॲसिडचा उल्लेख आहे.

१५०२ विटेन्बर्ग युनि०ची स्था० (ह.)
१५०२ पोर्तुगीज लोकांस निग्रोस गुलाम करण्याची परवानगी. (ए.ब्रि.)
१५०५ जुलै ५. आग्रा येथें धरणीकंप, इराणपर्यंत धक्के.
१५०६ कोलंबसाचा मृत्यु. (ह.)
१५०७ Sesshin प्रख्यात सृष्टिसौंदर्य जपानी चित्रकार (ह.)
१५०७ मॅकिआव्हेली (यू. हि.)
१५०८ एडिंबरो येथें छापखाना आला. (ह.)
१५१४ शिया व सुनी यांच्यांत उघड फूट (ह.)
१५१४ काशीच्या भट्ट घराण्याचा उदय. नारायण भट्टाचा जन्म
१५१६ तुर्कस्थानचा पहिला सेलिम हा सिरिया जिंकतो. (ह.)
१५१६ स्पेनच्या राजानें गुलामांच्या व्यापा० परवानगी दिली. (ए. ब्रि.)
१५१७ ईस्ट अरेबिया तुर्की राज्यांत सामील (ह.)
१५१७ लूथरनें विटेन्बर्गच्या देवळावर आपला जाहिरनामा लावला. (ह.)
१५१९ स्वित्सर्लंडांत झ्विंगला यानें लूथरच्या विरुद्ध रिफॉर्म्ड चर्च काढलें (ह.)
१५१९–१६१३ पोर्तुगीज हृचांचें पेगूस वास्तव्य. (ह.)
१५२० कोर्टीझनें मेक्सिको जिंकिला. (ह.)
१५२० सुलतान सुलेमान याचें बगदादपासून हंगेरीपर्यंत राज्य
१५२१ लूथरवर ग्रामण्य व बहिष्कार (ह.)
१५२४ शाळा बांधण्याबद्दल म्युनिसिपालिटीस व मुलें धाडण्याबद्दल पालकांस लूथरचीं पत्रें (ए. ब्रि.)
१५२६ बाबरानें दिल्लीचें सिंहासन घेतलें. (यू. हि.)
१५२६ पेरू पिझारोनें घेतलें. (ह.)
१५२६ कॅबटनें अर्जेन्टिना शोधून काढिलें. (ह.)
१५२६–१८०३ दिल्लीचें मोंगल साम्राज्य
१५२७ कॅबटनें पॅरॅग्वे शोधून काढिलें. (ह.)
१५२७ फत्तेपूर शिक्रीची लढाई; संग राण्याचा पराभव.
१५२८ जर्मनींत प्रत्येक गांवीं लॅटिन स्कूलची स्थापना. (ह.)
१५२८ पोप क्लेमंट यानें हेन्री व कॅथे—यांच्या घटस्फोटासंबंधीं चवकशी करण्यास कार्डिनल कँपेनिओ यास इंग्लंडास धाडिलें. (ह.)
१५२८–९८ एकनाथ
१५३० पिझारोनें पेरूवर स्वारी केली.
१५३०–१६११ मलकॅस्टर—मुलांना ग्रीक व लॅटिनमधून शिक्षण न देतां स्वभाषेंतून क्षिण दिलें पाहिजे असें यानें प्रतिपादिलें
१५३२ Rottmann यानें लहान मुलांना बाप्तिस्मा देण्याविरुद्ध प्रवचनें चालूं केलीं. जे(एस. एन.)
१५३५ Act of Supremacy in Eng. आठवा हेन्री हा धर्माध्यक्ष झाला. (यू.हि.)
१५३५ चिलीवर स्पॅ. ची स्वारी (ह.)
१५३५ इं. व वेल्स एक झाले. (ह.)
१५३६ इंग्लंडांत धर्ममठांचा विध्वंस (यू. हि.)
१५३९ इग्नेशस लायला यानें जेसुइट पंथाची स्थापना केली. (यू. हि.)
१५४०–४५ शेरशहा सूर
१५४२ रोममध्यें इन्क्विझिशन स्थापन झालें. (यू. हि.)
१५४२ पोर्तुगीज जहाजें जपानला येतात व पोर्तुगीजांची वसाहत सुरूं (ह.)

१५४३ डी रेव्होल्यूशनिबस हें पुस्तक प्रसिद्ध झालें. (ह.)
१५४४ गोव्यास पोर्तुगिजांनीं छापण्याची कला आणली.
१५४५ कागदावर तो केल्याचें साल वाटरमार्कमध्यें घालू लागले. (ए. ब्रि.)
१५४७ पोर्तु०मध्यें इन्क्विझि० (यू. हि.)
१५४८ रोममध्यें असायलम्ची स्थापना (स्मि.)
१५४८–१६०६ पोलिश वाङमयाचा उत्कर्ष (ह.)
१५४९ सें. फरा. झेवियर यानें जपानांत ख्रि. ध. उपदेश केला. (ह.)
१५५० रामामात्य गवई 'स्वरमेल कलानिधि' ग्रंथाचा कर्ता. या ग्रंथावरूनच कर्नाटकी संगीत पद्धतीचें ज्ञान होईल.
१५५५ जॉन राजर्स यांस इंग्लंडांत नास्तिक मतासाठीं जाळून मारलें (यू. हि.)
१५५५ रूपमती–गायिका.
१५५६ क्रॅन्मर यास जाळून मारलें. (यू. हि.)
१५५६ अकबर गादीवर आला. (हि. २ व.)
१५५८ एलिझाबेथ इंग्लंडच्या गादीवर (यू. हि.)
१५५८ ब्राझिलमध्यें फरेंच प्रॉट. आले. (ह.)
१५५८ जेना युनि०ची स्थापना. (जर्मनी) (ह.)
१५५८–१६०२ एलिझा. कारकीर्द. यांत असें ठरलें कीं, न्याय्य तऱ्हेनें झालेलीं लग्नें कोठल्याहि कारणानें मोडतां येत नाहींत. (ए. ब्रि.)
१५५९ जर्मनींत प्राथमिक शिक्ष० सार्वत्रिक सोय (ए. ब्रि.)
१५६० या म्हणजे तानसेनाच्या वेळेपासून बिलावल सप्तक प्रत्यक्ष गायनांत होतें. (सं.शास्त्र. (ज्ञा. को.)
१५६१–१६२६ बेकन. इंद्रियाच्या द्वारें अनुभवानें मिळणाऱ्या ज्ञानावरून अनुमान काढण्याची उद्‌गामी पद्धत यानें सुरूं केली.
१५६१–१५८९ संगीतसम्राट तानसेन. अकबराच्या दरबारीं होता. पुढें यानें मुसलमानी धर्म घेतला प्रथम गायनाचे वेळीं बादशहानें यास एक करोड दाम दिले–(अकबरनामा)
१५६४–१६४२ गॅलिलिओ. सूर्य स्वतः भोंवतीं फिरतो, आकाशगंगा, तारकासमूह, लंबक इ० यानें शोधले.(ज्ञा. को.)
१५६५ राक्षसतागडी (तालिकोट) ची लढाई. विजयनगरच्या साम्राज्याचा शेवट
१५६५ शेक्सपिअरची जन्मतिथी (यू. हि.)
१५६७ एलिझाबेथ अल्स्टर जप्त करते. तेथें लागवडीस आरंभ होतो. (ह.)
१५६८ ख्रिस्ती नसलेल्यांची सरसहा कत्तल. (बेल्जम) (ह.)
१५७० ब्राऊन पेपर झाला (ए. ब्रि.)
१५७१–१६१९ केप्लरचा जन्म. (ह.) ग्रहकक्षा दीर्घवर्तुलाकार असें ठरविलें.
१५७२ चितोड पडलें.
१५७५ जेकब बोहेम या तत्त्ववेत्त्याचा जन्म (जर्मनी) (ह.)
१५७७–१६४४ हॅान हेलमांट बल्जम शास्त्रज्ञ कार्बानिक आम्ल वायूचा अभ्यास.
१५७८ कॉन्स्टॉटिनोपल येथें पहिला इंग्रज. एजंट (ह.)
१५८२ अकबराचा दीने–इलाई पंथ. मुसलमानी धर्माचा तिटकारा. महंमदाचें नांव ठेवूं नये, जुन्या मशिदी नीट करूं नये, नव्या बांधूं नये, अरबी व इस्लामी कायद्याचें अध्ययन करूं नये, व अरबी लिपींत लिहूं नये, इ. हुकूम यानें सोडले.
१५८२ १३ वा ग्रेगरी पंचांगांत सुधारणा करतो. (ह.)
१५८४ एडिंबरो युनि. ची स्थापना. (ह.)
१५८७ जपानांत २ लाखाहून जास्त स्थायिक ख्रिस्ती होते. (ह.)
१५८८ स्पॅनिश अर्माडा (ह.)
१५८९ गॅलिलिओचा पिसा मनोऱ्यावरील पदार्थगतिसंबंधीचा प्रयोग (यू. हि.)

१५८९ सामुदायिक गायनाचा पहिला शास्त्री एच. शुझ याचा जन्म (ह.)
१५९१ डब्लिन येथें ट्रिनिटि. कॉलेज स्थापिलें. (ह.)
१५९२ बोहेमियांत Labyrinth of the world या ग्रंथाचा कर्ता John Emos Komeny याचा जन्म (ह.)
१५९२–१६७१ कोमेनिडस–शिक्षण देतांना मुलांच्या स्वाभाविक कलाविरुद्ध जाऊं नये असें सांगून यानें भाषा शिकविण्यास चित्रांचीं पुस्तकें प्रथम उपयोजिलीं.
१५९५ आनामांत स्पॅनिश वकील येतात. (ह.)
१५९६ अहमदनगर येथें चांदबिबीचा पराक्रम.
१५९७ रशियांत Serfdom सुरू. (यू. हि.)
१५९७ उदेपूरचा प्रख्यात राणा प्रतापसिंह याचा मृत्यू .
१५९८ नागासाकी (ज.) येथें युरोपियन. ख्रिस्ती धर्मवीरास फांशी (ह.)
१५९८–१६८१ रामदास
१६ व्या शतकांतील माळव्याचा राजा बाजबहाद्दर (हिंद्) हा प्रख्यात गवई होता. (ज्ञा.को.)
१६ व्या शतकांत वृंदावनचे प्रसिद्ध हिंदु संगीतज्ञ हरिदास बाबा व त्यांचा शिष्य सुप्रसिद्ध तानसेन (अकबर दरबार) होऊन गेले. (ज्ञा. को.)
१६०० सुमारें. पं. अहोबल यानें आपले स्वर तारेच्या लांबीनें वीणेवर सांगितले. या संगीत शास्त्रांतील महत्त्वाच्या क्रांतीनंतर श्रुति विषम आहेत हें समजलें. (सं शास्त्र. ज्ञा-को.) Peris's Enridice पहिलें पाश्चिमात्य संगीत नाटक (ऑपेरा) (ज्ञा. को.)
१६०० ईस्ट इंडिया कं. ची स्थापना (यू. हि.)
१६०० डॉ. गिल्बर्टचा मॅग्नेटिझमवरील ग्रंथ –इंग्लंड (यू. हि.)
१६०० डच ईस्ट इं. कं. ची स्थापना (यू. हि.)
१६००–१६१३ फिलिप दि ब्रिटो हा साहसी पोर्तुगीज पेगूचा राजा होतो. पण १६१३ त आवा नगरीचा महा धर्मराज हा त्याचा पराभव करून त्यास सुळीं देतो. (ह.)
१७ वें शतक डेकार्टे–(बीजभूमितीचा जनक), कव्हलिएरी (चलराशी कलनाचा अभ्यासक) पास्कल प्रसिद्ध फरेंच गणिती. चक्रभास लेखक (संभवशास्त्राचा जनक). हे गणिती झाले.
१७ वें शतक यांत थोडीशी Enamelled काच दिल्लीस तयार झाली होती. (ए.ब्रि.)
१७ वें शतक वेश्याव्यवसाय बंद करण्याचा इंग्लंडांत पुन्हां एकदां प्रयत्न झाला. (ए. ब्रि.)
१६०२ शेक्सपियरनें हॅम्लेट लिहिलें. (ह.)
१६०६ व ०७ व्हर्जिनियाची वसाहत (ह.)
१६०८ तुकाराम–जन्म
१६०८–७४ मिल्टन–जुन्या ग्रंथांतून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षां अनुभवाचें ज्ञानच खरें असें यानें आपल्या शिक्षण विषयक ग्रंथांत सांगितलें.
१६०९ केप्लर ज्योतिषग्रंथ प्रसिद्ध करितो (यू. हि.)
१६०९ गॅलिलिओ–दुर्बिणीचा शोध (ह.)
१६११ गस्टॅव्हस अडॉल्फस हा स्वीडनचा राजा झाला.बायबलचें इंग्रजी भाषांतर (यू.हि.)
१६१२ इंग्रजांची सुरतेस वखार (यू. हि.)
१६१४ नेपियर (मर्चिस्टनचा) यानें लागरिथम्स काढलें. (यू. हि.)
१६१५ सर टामस रो दिल्लीस येतो. (यू. हि.)
१६१५ फरांकफुर्ट जर्ना हें पहिलें जर्मन वर्तमानपत्र निघालें. (ह.)
१६१६ चिनांतून ख्रिस्ती मिशनऱ्यांची हकालपट्टी (रॉ. ड.)
१६१६ पंजाबांत व आग्रा येथें प्लेगचा प्रादुर्भाव. आग्रा येथें रोज १०० माणसें मरत.
१६१६ युरोपी (डच) लोकांनीं आस्ट्रेलियांत पाऊल ठेवलें. (बु. फॅ.)
१६१६ आंड्रयास लिबौ–जर्मन रसायन शास्त्रज्ञ. गंधक व पोटॅश नैट्रेट यांपासून सल्फ्यूरिक आम्ल तयार होऊं शकतें हा शोध. शिशांत पुष्कळ वेळां रुपें असतें हा शोध.

१६१७ ब्रिग्ज यानें दशांशपद्धति काढली. (यु. हि.)
१६१८ सर वाल्टर रॅले यास फांशी (यु. हि.)
१६१९ व्हर्जिनिया वसाहतींत गुलामगिरी सुरूं (यु. हि.)
१६१९ जपानांत इंग्लिश वखार चालेना म्हणून बंद. (ह.)
१६२० फ्रान्सिस बेकनचे नोव्हम ऑर्ग्यानिम् (यू. हि.)
१६२० बोहेमिया स्वातंत्र्यास मुकतो. (ह.)
१६२०–१६५५ जपानांत सरंजामी पद्धत पुरी झाली. (ह.)
१६२२ इंग्लंडांतील पहिलें वर्तमानपत्र. (यु. हि.)
१६२३ इराणांत गोंब्रुन येथें इंग्लिश व डच वखारी. (ह.)
१६२३ जेसुइटांचा तिबेटांत प्रवेश. (ह.)
१६२३ तुर्कांची मॉटनिग्रोवर स्वारी. (ह.)
१६२८ पिटिशन ऑफ राइट्स्. (इं.) (यु. हि.)
१६२८ स्काल या जर्मन जेसुइटाचा पेकिंग दरबारांत सत्कार. (रॉ. इ्)
१६२८ इंग्लंडमध्यें हार्वेचा रुधिराभिसरणाचा शोध. (यू. हि.)
१६२८–१६५५ जगन्नाथपंडित कवि व गायक शहाजहानचे दरबारीं होता.
१६३० शिवाजीराजाचा जन्म.
१६३६ हार्वर्ड युनिव्हर्सिटीची स्थापना, अमेरिका (ए. ब्रि.)
१६३७ शहाजहान निजामशाही बुडवितो.
१६३८ युरोपियनांस जपानमध्यें येण्यास बंदी. (वेल्स)
१६३९ मंडेल्स्लो हा जर्मन प्रवासी इराणच्या मार्गानें हिंदुस्थानांत येतो.
१६४२ गुरुत्वाकर्षणाचा शोधक न्यूटन. इंग्लंड. (ह.)
१६४६ लायब्झिक येथें लिब्निझचा जन्म (ज. ह.)
१६४८ वेस्टफॅलियाचा तहः अल्सेस प्रांत ऑस्ट्रियाकडून फरान्सला मिळतो. (ह.)
१६४८ स्वित्झर्लंड व नेदर्लंड यांच्या स्वातंत्र्यास झारांची कबुली. पोपच्या कल्पनेचें साम्राज्य लोपतें. (ह.)
१६४९ क्रॉम्वेलनें 'चार्लसला फाशीं दिलें. या वेळीं त्यानें मुहूर्त पाहिला होता.' (यू. हि.)
१६४९ कुराणाचें फरेंच भाषेंत भाषांतर. (स्मिथ)
१६५०–१७७५ रसायन शास्त्राच्या स्वतंत्र अभ्यासास महत्त्व. ज्या पदार्थाचें पृथक्करण करून त्याचे घटक वेगळे करतां येत नाहींत तेच पदार्थ 'मूलतत्त्व ' म्हणून समजावे ही व्याख्या सर्वमान्य झाली
१६५१ भर्तृहरीच्या शतकांचें हॉलंडमध्यें भाषांतर. युरोपांत पहिला संस्कृत ग्रंथ.
१६५४ प्रार्थनापुस्तकामध्यें बदल झाल्यामुळें चर्चमध्यें दुफळी. रशिया (ह.)
१६५४ बॉइल्स लॉ, मूलतत्त्वाची वरील व्याख्या बॉइलनें केली; परमाणुकल्पनेचा प्रारंभ रासायनिक आकर्षणाची स्पष्ट कल्पना.
१६५५ मानवशास्त्र–मनुष्याचे सांगाडयाची इतर प्राण्यांच्या सांगाडयाशीं तुलना करून अभ्यास करूं लागले.
१६५६ क्रॉम्वेल राजा होण्याचें नाकारतो. इंग्लंड (ह.)
१६५६ अथणीचा हवालदार अबदुली कली काशीक्षेत्राच्या फौजदारासः–"लिंगायत व जैन यांचा वाद पडला आहे, ब्रम्हसभा निर्णय करील तो पाठविणें." असें लिहितो
१६५७ Constantine Phaleon हा ग्रीक प्रवासी सयामला येतो. (ह.)
१६५८ औरंगजब बादशहा झाला. (यू. हि.)
११६५८ ब्रिटनमध्यें ब्रौनें यानें प्रेतदहनावर पुस्तक लिहिलें. (ए. ब्रि.)
१६५९ अवरंगजेब : " आमच्या धर्माप्रमाणें असें ठरलें आहे कीं, देवळांचा नाश करूं नये, नवीं देवळें बांधण्यास परवानगी देऊं नये" (शि. प. सा. सं.)

१६५९ शिवाजी अफझूलखानाचा वध करतो..
१६५९–१७२५ अलेस्सांड्रो स्कारलाफी (Alessandro Scarlaffi) नेपोलियन स्कूल ऑफ कंपोझर्सचा' संस्थापक. (सं. शा. ज्ञा. को.)
१६६१–१७७२ कॅांग हा प्रसिद्ध चिनी सम्राट तिबेट काबीज करतो. शब्दकोश तयार करवितो. व इ. स. पू. १२ शतकापासूनचा ज्ञानकोश तयार करवितो. हा ज्ञानकोश इंग्रजांनीं जाळला. (रॉ. ड)
१६६२ Royal Society ची इंग्लंडांत स्थापना. (यू. हि.)
१६६२ पास्कलचा मृत्यु. (यू. हि.)
१६६२ इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लसचें आज्ञापत्रः "कंपनीनें तक्रार केली कीं, कंपनीशीं कोणचाही संबंध नसतां कित्येक इंग्रज हिंदी गलबतें चालवितात, हिंदी लोकांस गलबतें बांधावयास व चालवावयास शिकवितात.......त्यांस धरून इंग्लंडांत पाठवून देणें. " (शि. का. प. सा. सं.)
१६६२ बाजीप्रभूचा रांगण्याच्या खिंडींतील पराक्रम.
१६६३ Navigation Act करून आयर्लंडनें ब्रिटिश वसाहतींशीं व्यापार करूं नये असें ठरविलें. (ह.)
१६६४ रशियांत पोस्ट खात्याची स्थापना. (ह.)
१६६४ गोव्याहून लिस्बनला पत्र "ज्या दिवशीं मुंबई बेटांत इंग्रजांचें बस्तान बसेल त्या दिवशीं हिंदुस्थानला आपण मुकलों असें समजावें. " (शि. का. प. सा. सं.)
१६६४ शहाजी राजाचा मृत्यु.
१६६६ शिवाजीला आग्रा येथें कैद व सुटका.
१६६७ हैबतराव उंब्रजच्या अधिकाऱ्यास लिहितो " अवरंगजेबानें मुसलमानांना जकातीची पूर्ण माफी दिलीअसून हिंदूंवर पूर्ववत् ठेविल्या आहेत. ख्रिस्त्यांनीं अर्ध्या द्यावयाच्या आहेत. "(शि. का. प. सा. सं.)
१६६८ मुंबईकर इंग्रज सुरतकरांसः " आमच्या मुलांना इंग्रजी शिकविण्याकरितां एकदोन मास्तर ठेवावे अशी बेटावरच्या (नेटिव) लोकांकडून मागणी आली आहे. " (शि. का.प. सा. सं.)
१६६९ औरंगजेबानें मथुरा येथील केशवदेवाचें देवालय व इतर हजारों मूर्ती भग्न करून त्यांची विटंबना केली. तेव्हां तेथें गोकुळ नांवाच्या इसमानें मोठें बंड केलें. हें बंड इतक्या मोठ्या प्रमाणावर होतें कीं, तें मोडण्याच्या कामीं ४००० सैनिक मृत्युमुखीं पडले; व त्यावेळीं त्याचा उपशम झाला तरी फिरून इ. स. १६८१,८८ व ९१ त अशा तीन वेळां त्याचा उद्भव झाला. शेवटच्या वेळीं तर बंडखोरांनीं चिडून आग्रा येथील अकबराचें थडगें उध्वस्त करून आंतील हाडकांची होळी केली.
१६६९–१८३० इंग्लंडात घटस्फोटाचा कायदा योग्य कारणास्तव पुन्हांपुन्हां पास होत राहिला. (ए.ब्रि.)
१६७१ सुरतकरांनीं–कंपनीस लिहिलें "भीमजी पारख या नांवाच्या कंपनीच्या दलालानें कांहीं ब्राम्हणी लिखाण छापण्याकरतां इंग्लंडांतून एक छापणारा बोलावून त्याचा पगार देण्याचें कबूल केलें." (शि. प. सा. सं.)
१६७२ पीटर दी ग्रेटचा जन्म. (ह.)
१६७३ मुंबईकर "आमच्या मनांत अशी उत्कट इच्छा आहे कीं, मुंबईंतील आणि शेजारच्या बेटांवरील सर्व ख्रिस्ती लोकांनीं इंग्लंडमध्येंच बनविलेल्या कापडाचीं वस्त्रें वापरावींत.(शि. प. सा. सं.)
१६७४ इंग्लंडच्या बँकेची स्थापना विल्यम पॉटरसननें केली. (यू. हि.)
१६७४ सोबेस्की हा पोलंडचा राजा झाला. (यू. हि.)
१६७४ शिवाजी महाराष्ट्राचा राजा झाला.
१६७४ मिल्टनचा मृत्यू (यू. हि.)
१६७४ फ्रेंच पाँडेचरी स्थापतात (यू. हि.)

१६७६ लॉर्ड कीपर नॉर्थ म्हणतो:–लाकडाचे सरळ व समांतर दांडे टाकावयाचे व त्यांवरून चाकें असलेल्या गाडचा न्यावयाच्या अशी ही योजना आहे. हिनें एक घोडा १२–१३ टन कोळसा सहज नेतो. हें आगगाडीविषयीं म्हटलें आहे. (ए. ब्रि.)

१६७७ शिवाजीचा दक्षिणदिग्विजय.

१६७९ हीबिअस कार्पस् ॲक्ट. (यू. हि.)

१६८० शिवाजी राजाचा मृत्यू.

१६८१–१७०७ महाराष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांत मराठे विजयी होतात.

१६८२ पेनिनसिल्व्हॅनियाची वसाहत–स्थापना. (ह.)

१६८३ अवरंगजेवाची दक्षिणेवर स्वारी.
ब्राझिलमध्यें सोन्या–हिऱ्याच्या खाणी सांपडतात. (ह.)
व्हिएन्ना येथें सोबेस्की तुर्कांचा पराभव करतो. (ह.)

१६८६ अवरंगजेब आदिलशाही बुडवितो.

१६८७ अवरंगजेब कुतुबशाही बुडवितो.

१६८९ संभाजीचा वध

१६९१ मद्रासकर इंग्रज कंपनीस लिहितात: "कर्नाटक देशच आपल्याला सर्व कापड व नाना तऱ्हेचे जिन्नस पुरवितो."(शिव. का. प. सा. सं.)

१६९३ ज्वालामुखी एटनाचा प्रस्फोट. ६०००० मेले. (बु. फॅ.)

१६९४ इंग्लंडच्या बँकेची स्थापना.

१६९४ होले व गोटिंजेन (१७३७) जुन्या ज्ञानाची पुंजी कायम ठेवणें हेंच विश्वविद्यालयाचें काम नसून नवीन ज्ञानांचें संशोधन हें त्यांचें ध्येय असलें पाहिजे असें यांनीं सांगितलें.

१६९५ इंग्लंडमध्यें मुद्रणस्वातंत्र्य. (यू. हि.)

१६९६–१६९८ आयर्लंडमध्यें लोंकर-धंदा-वाढ. पण इंग्लंडनें कायदा करून धंदा ठार केला. (ह.)

१६९८ 'आयर्लंडचें प्रकरण' हें मोलिनोचें पुस्तक पार्लमेंटनें ठराव करून जाळकांच्या हस्तें जाळलें. (ह.)

१६९८ जिंजीचा वेढा.

१७०० राजारामाचा मृत्यु.

१७०० हिंदुस्थानांतील तलम कापड इंग्लंडांत फारच खपूं लागल्यामुळें इंग्लिश पार्लमेंट कापडाच्या आयातीवर नियंत्रण घालणारा कायदा पास करतें.

१७०३ पीटर दि ग्रेटनें सेंट पिटर्सबर्ग स्थापिलें. (यू. हि.)

१७०४ इंग्लंडनें जिब्रॉल्टर घेतलें. (ह.)

१७०४ प्रशियन ब्लू हा पहिला कृत्रिम रंग तयार झाला.

१७०६–९० बेंजामिन फरँकलिन–विद्युद्रक्षक कांबीचा अमेरिकन संशोधक

१७०७ अवरंगजेबाचा मृत्यु. इंग्लंड व स्कॉटलंड ग्रेटब्रिटन बनतें.

१७०८ शाहू गादीवर बसतो.

१७०८ निजामशाहींतील नांदेड येथें गुरुगोविंदाचा मृत्यू. (भट्टाचार्य)

१७०९ ब्रह्मदेशांत इंग्रज व फरेंच यांच्या वसाहती. (ह.)

१७०९ मार्ग्रफ जर्मन रसायनज्ञ बीटरूटमधील साखरेचा शोध.

१७१२–७८ रुसो–निसर्गांतून मिळालेलें तेवढेंच शिक्षण खरें, मनुष्यानें दिलेलें शिक्षण मुलांना बिघडवितें,असें यानें 'एमिल' या ग्रंथांत सांगितलें. रुसो गरिबांना शिक्षणाची जरूर असें सांगतो.

१७१३ बाळाजी विश्वनाथ हा पेशवा होतो.

१७१७ गांवांत जेथें शाळा असेल तेथें मुलांनीं शाळेंत गेलेंच पाहिजे असें तिसरा फरेड्रिक विल्यम ठरवितो. (जर्मनी) (ए. ब्रि.)

१७१७–१७१९–१७२१ मुंबईचा गव्हर्नर बून यानें विजयदुर्गावर नवीं जहाजें बांधून पोर्तुगिजाची

मदत घेऊन हल्ला केला. पण कान्होजी आंग्रे यानें तो तिनदां मोडून काढला.
१७१९ डेफो 'रॉबिनसन क्रूसो'. लिहितो. (यु. हि.)
१७१९ बाळाजी विश्वनाथ दिल्लीस बादशहाबरोबर तह करून संभाजीची बायको येसूबाई हिजला घेऊन साताऱ्यास परत यतो. चवथाई व सरदेशमुखी या सनदा मराठ्यांना मिळतात.
१७१९–४८ सदारंग अदारंग बंधु गवई ख्याल नांवाच्या गीताचे उत्पादक. शौरी व गुलाम नबी या पतिपत्नींनीं टप्याचें गायन शोधून काढलें.
१७२० बाजीराव पेशवा होतो.
१७२१ हिंदुस्थानाच्या इंग्लंडमध्यें खपणाऱ्या तलम कापडास प्रतिबंधक असा पार्लमेंटचा दुसरा कायदा.
१७२३–९० ॲडम स्मिथ अर्थशास्त्री
१७२४ इमॅन्यूअल कांट हा जन्मतो. (जर्मन) डर व्हर्नून फटलर या साप्ताहिकाचा जन्म. (ह.)
१७२४ कांट–रुसोस विरोध करुन शिक्षणांत संयम ठेवून मुलांस योग्य संवयी लावल्या पाहिजेत असें यानें सांगितलें.
१७२४ निजामशाहीची स्थापना.
१७२६–९७ डॉक्टर जेम्स हटन भूपृष्ठ–घडामोडवेत्ता स्कॉच (ज्ञा. को.)
१७२७ जेम्स वॅटचा जन्म (ह.)
१७२८–९३ जॉन हंटर (इंग्रज शस्त्रक्रियाज्ञ.) (ज्ञा. को.)
१७२९ युरोपांत मेथॉडिस्टचा पुनरुदय (यु. हि.)
१७२९–१७८१ कामेनेस येथें लेसिंगचा जन्म (ह.)
१७२९ गुलामांच्या पद्धतीस कायदेशीर मान्यता आहे कीं नाहीं, हा प्रश्न इंग्लंड व आयर्लंड येथें उत्पन्न झाला. (ह.)
१७३१ पुणें शनिवार वाडा बांधून पुरा झाला.
१७३१–१८१० हेन्री कॅव्हेंडिश इंग्रज शास्त्रज्ञ– वायूचें संशोधन; पाण्याच्या घटकांचा **शोध.**
१७३२ जॉर्जियाची वसाहत स्थापिली. (ह.)
१७३३ धावत्या धोटचाचा जॉन केचा शोध (इंग्लंड) (यु. हि.)
१७३३ जोसेफ प्रीस्टले इंग्रज रसायनज्ञ-१७७४ त ऑक्सिजनचा शोध; हैड्रोजन क्लोराइड, अमोनिया यांचा शोध.
१७३७ बाजीरावाची दिल्लीवर स्वारी. जर्मनींत गॉटिंजन विश्वविद्यालयाची स्थापना. (ए. ब्रि.)
१७३६ लांग्राज. फार मोठा गणिती.
१७३९ वसईवर पोर्तुगीजांचा पराभव व त्यांची हकालपट्टी. नादीरशाहाची स्वारी.
१७३९ सर्विया फिरून तुर्कांच्या कह्यांत गेला. (ह.)
१७४० बाजीरावाचा मृत्यू; नानासाहेब पेशवा होतो.
१७४० फरेडरिक दी ग्रेट प्रशियाचा राजा झाला.
१७४१ ज्यूलिअस सीझरचें जर्मनींत भाषांतर. भाषांतरित झालेलें शेक्सपीअरचें पहिलें नाटक. (ह.)
१७४१ रशियाची महाराणी एलिझाबेथ गादीवर आली. (वेल्स)
१७४२–१७४८ कार्लसेल स्वीडिश शास्त्रज्ञ-श्वासोच्छ्वासास हवेंतील ऑक्सीजनची जरूर असते हा शोध लावितो.
१७४८ शाहूचा मृत्यू . शिंदे होळकर दिल्लीच्या बादशहाकडून "मोठी सनद" घेतात.
१७४९ कर्नाटकांत डुप्ले.
१७४९–१८२३ जेनर गोस्तन देवीची युक्ति काढतो (इंग्रज) (ज्ञा. को.)
१७४९–१८२७ लाप्लास तेजोमेघ उपपत्तींत सुधारणा करणारा फरेंच (ज्ञा. को.)
१७४९ वॉशिंग्टन अँड ली युनिव्हर्सिटीची. व्हर्जिनियांत. (अमेरिका.) स्थापना या शतक

मध्याच्या सुमारास लोखंडी चाकें (आगगाड्यांना) लावूं लागले. आधीं लांकडी असत. (ए. ब्रि.)

१७५१ ब्रिटिश. एन्सायक्लोपिडिया ब्रि.टॅनिकचें काम सुरू (यू. हि.)
१७५१–१७५९ इंग्लंड व फरांस यांचें उत्तर अमेरिकेंत युद्ध. (ह.)
१७५४ कोलंबिया युनि. स्थापना. (न्यूयार्क अमेरिका.) (ए. ब्रि.)
१७५५ रंगून शहराची स्थापना. (ह.)
१७५५–१८२५ प्रौस्ट. Law cf constant proportion यानें सिद्ध केला.
१७५६ पेट्रोग्राड येथें पहिलें सार्वजनिक नाटकगृह. (रशिया) (ह.)
१७५६–१७९१ मोझार्ट (Sonata Epoch) पाश्चात्य संगीतज्ञ (ज्ञा. को.)
१७५७ बॅ. फॉन स्टीन जन्म (जर्मनी); प्लासीची लढाई (ह.)
१७५८ अटकेवर भगवा झेंडा फडकतो.
१७५९ रॉबर्ट बर्न्स स्कॉच कवि. (ह.)
१७५९ पोर्तुगालमधून जेसुइटांची हकालपट्टी. (यू. हि.)
१७५९ शिलरचा जन्म; लेसिंगनें फाउस्ट प्रसिद्ध केलें. (जर्मनी) (ह.)
१७५९ वूल्फनें क्वीबेक घेतलें. (बु. फॅ.)
१७६० जेसुइटांची ब्राझीलमधून हकालपट्टी; (ह.) उदगीरची लढाई; कानडा (अमेरिका) ब्रिटिशांचा झाला. (ह.)
१७६१ पानिपतची लढाई ; सेंट सायमन फादर ऑफ सोशिआलझम
१७६२ रुसोचें 'सोशल कॉन्ट्रक्ट' (यू. हि.)
१७६३ राक्षसभुवनची लढाई; डुप्ले फरांसमध्यें अत्यंत गरिबींत मरण पावला.
१७६४ फरांसमधून जेसुइटांची हकालपट्टी (यू. हि.)
१७६४ बक्सारची लढाई
१७६४ स्पिनिंग जेनीचा शोध जेम्स हारग्रोव्हज् यानें लावला. (यू. हि.)
१७६४ डौबेटोननें मनुष्य व सस्तन प्राणी यांच्या कवटींतील मागच्या छिद्राच्या स्थानाबद्दल संशोधन करून निबंध लिहिला.
१७६५ वेश्या–नांवनोंद–सुरवात (फरांस) (ए. ब्रि.)
१७६७ जेसुइटांची स्पेनमधून हकालपट्टी.
१७६८ रॉयल अकॅडेमीची स्थापना (यू. हि.)
१७६८ रिचर्ड आर्कराइट यानें वॉटर फरेम तयार केली. (यू. हि.)
१७६९ नेपोलियनचा जन्म; जेसुइटची पॅरॅग्वेमधून हकालपट्टी (ह.)
१७६९ वॅटचें स्टीम एंजिन पेटंट–दाखल होतें. (ह.)
१७६९–१८५९ अलेक्झांडर हंबोल्ट समोष्णरेषासंशोधक. जर्मन (ज्ञा. को.)
१७६९–१८३२ जार्ज कुव्हिए शिलाप्रस्तरांतील प्राण्यवशेषांचा अभ्यासक फरेंच. (ज्ञा. को.)
१७६९–१८३९ विल्यम स्मिथ–प्रस्तरावशेष–शास्त्रसंस्थापक इंग्रज (ज्ञा. को.)
१७७० बर्कचें Thoughts on present discontents (यू. हि.;)
१७७० हेगेल व बीथोवेन हे जन्मले. (ह.)
१७७०–१८२७ बीथोव्हन (Sonata Epoch) पाश्चिमात्य संगीतज्ञ (ज्ञा. को.)
१७७१ सर वॉल्टर स्कॉट.–जन्म. (ह.)
१७७१ मराठे दिल्लीच्या बादशहाला दिल्लीच्या गादीवर आणून बसवितात.
१७७२ थोरल्या माधवरावाचा मृत्यु. मद्रासला छापण्याची कला आली.
१७७२ लॉर्ड मेन्सफील्ड यानें जाहीर केलें कीं, वसाहतींतून आलेल्या गुलामानें ब्रि. बेटांत पाय टाकतांच तो गुलामगिरींतून मुक्त समजावा. (ए. ब्रि.)
१७७२ रॉबर्ट ओवेल सोशॅलिस्ट कम्युनिस्ट.

१७७२–१८२३ डेव्हिड रिकॉर्डो अर्थशास्त्री. The balance of trade theory The Quantity theory of Money
१७७३ जेसुइट मतपंथ पोपनें नाहींसा केला (यू. हि.)
१७७३ बोस्टन बंदरांत चहाच्या पेट्या ओततात. (ह.)
१७७३–१८२९ डॉ. टॉमस–यंग प्रकाशलहरी सिद्धांत प्रतिपादक इंग्रज. (ज्ञा. को.)
१७७४ जोसेफ प्रीस्टले याचा ऑक्सिजनचा शोध (यू. हि.)
१७७४ गटेचें वेर्टर प्रसिद्ध झालें; (ह.)
१७७४ ब्रम्हो समाजाचा संस्थापक राजा राममोहन रॉय याचा जन्म.
१७७४ वॉरन हेस्टिंग्जनें जार्ज बोलम याला तिबेटांत राजकारणासाठीं पाठविलें. (ह.)
१७७४ लव्हासिए फरेंच शास्त्रज्ञ–पदार्थ गंजल्या किंवा जळाल्यामुळें तयार होणाऱ्या सर्व पदार्थांच्या वजनांची बेरीज मूळ पदार्थाच्या वजनापेक्षां जास्त असते असें यानें सिद्ध केलें.
१७७५ ब्लूमेन बाखनें मानवाच्या निरनिराळ्या कवटया अभ्यासून मानव जातीचें निरनिराळे वंश पाडिले.
१७७५ सुरतेचा तह (इंग्रज व राघोबा यांमध्यें).
१७७५–१७८३ अमेरिकेचें स्वातंत्र्य–युद्ध. (ह.)
१७७६ अमेरिकेचा स्वातंत्र्य–जाहीरनामा. (ह.)
१७७६ इं. डेव्हिडह्यूमचा मृत्यू. गिबनचा इतिहास सुरु; अडाम स्मिथचा वेल्थ ऑफ नेशन्स हा ग्रंथ (यू. हि.) सुरु 'गुलामांचा व्यापार निसर्गविरुद्ध आहे' हा ठराव हाऊस ऑफ कॉमन्समध्यें नापास झाला (ए. ब्रि.)
१७७६–१८२७ हेर्बार्ट–शिक्षण शास्त्रज्ञ, मानवशास्त्राचा विचार करून यानें शिक्षणाचें शास्त्र बनविलें. ज्ञाताकडून अज्ञाताकडे हे तत्त्व प्रतिपादिलें व पाठाच्या पायऱ्या बसविल्या.
१७७८ व्हॉल्टेअरचा मृत्यू. (यू. हि.)
१७७८–१८२९ सर हंम्प्रडेव्ही विद्युत्प्रवाहजन्य रासायनिक पृथःकरणाचा संशोधक (ज्ञा. को.)
१७७९ गॅरिकचा मृत्यू. (यू. हि.)
१७७९ स्पिनिंग म्यूलचा शोध सॅ. क्रॅम्टन यानें काढला. (यू. हि.)
१७७९ वडगांवच्या लढाईंत मराठे इंग्रजांचा पराभव करतात.
१७८० लेसिंग याचें Education of the human race हें पुस्तक प्र. (ह.)
१७८० हिंदुस्थानांत पहिलें वर्तमानपत्र हिकिज गॅझेट.
१७८०–१८३९ महाराजा रणजितसिंग.
१७८१ कांट यांचें Critique of pure reason प्रसिद्ध झालें. (ह.)
१७८२ इंग्लंडनें अमेरिकेचें स्वातंत्र्य कबूल केलें. (ह.)
१७८२ सालप्याचा तह.
१७८२–१८५२ फरोबेल-मुलांचें शिक्षण खेळांतून झालें पाहिजे असें यानें सांगून बालोद्यान शाळांचा प्रसार केला.
१७८३ फरान्समध्यें डी रवेझीर याचें पहिलें बलून उड्डाण.
१७८४ दुसरा जोसेफ हा हंगेरींत जर्मनी ही सरकारी भाषा ठरवितो. (ह.)
१७८४ अमेरिकेंत पहिलें दैनिक.
१७८६ वॉरन हेस्टिंग्जचा खटला सुरू. (ह.)
१७८७ अमेरिकेंत फेडरेशनची स्थापना. (ह.)
१७८७ स्टीम बोटीचा शोध (अमेरिका)
१७८८ शॉपेनहरचा जन्म (ह.)
१७८९ वॉशिंग्टन अमेरिकेचा पहिला अध्यक्ष (ह.)
१७८९ फरान्समध्यें राज्यक्रांति. (यू. हि.)
१७८९ कालिदासाच्या शाकुंतलाचें युरोपी भाषेंत भाषांतर. (भा. व.)
१७८९ फरेडरिक लिस्ट अर्थशास्त्रज्ञ नॅशनल सिस्टिम ऑफ पोलिटिकल एकॉनमी चा जनक.

१७९० बर्कचें Reflections on the French revolution
१७९० धुराचे दिवे. (मॅरडॉक इंग्लंड)
१७९१ जोनाथन डंकननें काशीला सं. कॉलेज काढलें.
१७९१ पेनचें Rights of man प्रसिद्ध झालें. (ह.)
१७९१–१८६७ सर मायकेल फॅरॅडे विद्युत्जनक (डायनामो) यंत्राचा शोधक इंग्रज (ज्ञा.को.)
१७९२ सर जोशा रेनॉल्डस्चा मृत्यु. (यु. हि.)
१७९२ पॅरिसच्या राज्यक्रांतीच्या वेळीं पोटगीसह घटस्फोटास इतक्या सवलती दिल्या कीं, वैवाहिक बंधनांची जवळ जवळ समाप्तीच झाली. (ए. ब्रि.)
१७९३ नेपोलियननें टुलून घेतलें. (यु. हि.)
१७९३ सोळावा लुई व राणी यांस फाशी. (ह.)
१७९५ वुल्फटोन हा अमेरिका व फरान्स येथें जातो. (ह.)
१७९५ खर्ड्याची लढाई
१७९६–१८०१ रशियांत पॉलच्या कारकीर्दींत गुलामांसंबंधीं सहानुभूतीस सुरुवात. (ए. ब्रि.)
१७९६ नेपोलियन आल्प्स ओलांडतो. (ह.)
१७९७ फरांसमध्यें असेंब्लींत प्रेतदहन पद्धतीविषयीं खल. (ए. ब्रि.)
१७९७ कास्ट आयर्न नांगर (न्यूबोल्ड अमेरिका)
१७९८ नेल्सननें फ्रेंच आरमाराचा नाईलवर पराभव केला. (ह.)
१७९८ जनरल बर्थिअर पोपला हांकून देऊन प्रजासत्ताक राज्याची स्थापना करतो. (ह.)
१७९८ माल्थसचा लोकसंख्येवर निबंध. (यू. हि.)
१७९९ नेपोलियन पहिला कॉन्सल होतो. (ह.)
१८०० नाना फडणविसांचा मृत्यु.
१८०० पिटनें आयरिश पार्लमेंट नष्ट केलें. (यू. हि.)

१८ व्या शतकांत मियां शौरी-हा टप्प्याचें गायन प्रचलित करणारा प्रसिद्ध हिंदी संगीतपटु होऊन गेला. (ज्ञा. को.)

१९ वे शतकाचे आरंभीं शिक्षण हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे हें तत्त्व मान्य होऊं लागलें.

१८०० स्वामी नारायण पंथाचा उत्पादक 'स्वामी नारायण' हा आपलें घर सोडतो. (भट्टाचार्य)
१८०० गणपत कृष्णाजी छापखानेवाले.
१८०० फॉन मोल्टके याचा जन्म. (ह.)
१९वें शतक अमेरिकेंत कुटुंबसंस्था ढासळविण्याचा विचार सुरू. (ए.ब्रि.)
१८०१ बायकोच्या व्यभिचाराबद्दल जर नवऱ्यास काडीमोड करतां येते तर नवऱ्याच्या व्यभिचाराबद्दल बायकोस ती कां मागतां येऊं नये हा प्रश्न ब्रिटिश पार्लमेंटमध्यें प्रथम निघाला. (ए. ब्रि.)
१८०२ वसईचा तह; पहिलें वाफेचें जहाज; अमिन्स तह; डेन्मार्कमध्यें गुलामगिरी बंद. ही गोष्ट करणारें हें पहिलेंच राष्ट्र. पहिला फॅक्टरी ॲक्ट (यू. हि.)
१८०३ सबंध रोल तयार करणारें कागदाचें नवें यंत्र सुरू झालें. (ए. ब्रि.)
१८०३ तिकिटें देऊन प्रवाशांची वहातूक करणारी पहिली आगगाडी वेंडस्वर्थ व क्रॉयडन यांच्या दरम्यान सुरू. (ए. ब्रि.)
१८०४ होली रोमन एंपायरचा अंत.
१८०४ नेपोलियन चक्रवर्ति होतो. नेपोलियन कोड. (ह.)
१८०४ सर्वियाचें तुर्कीविरुद्ध यशस्वी बंड (ह.)
१८०५ ट्रॅफल्गारची लढाई. ऑस्टर्लिटझची लढाई.
१८०६ हेगेलचें फेनोमेनॉलॉजी प्रसिद्ध झालें. (ह.)
१८०६ नेपोलियननें इंपिरियल युनि. स्थापन करून सर्व तऱ्हेच्या शिक्षणाचें केंद्र स्थापिलें व सरकाराकडे शिक्षणाचा कायमचा मक्ता दिला.

१८०६ जॉन स्टुअर्ट मिल याचा जन्म.
१८०६ ले प्ले, इकॉनमी सोशिएल या संस्थेचा संस्थापक व सोशल रिफार्म ग्रंथाचा कर्ता.
१८०७ जर्मनीत Sefdom चा नायनाट. (ह.)
१८०८ डाल्टनचा (इंग्रज) परमाणुवाद
१८०८ नेपोलियनननें आपला भाऊ जोसेफ यास स्पेनचा राजा केलें.
१८०९ लॅमार्क यानें उत्क्रांतितत्त्व सुरूं केलें. (यू. हि.)
१८०९ हंबोल्ट हा बर्लिन युनि. ची स्थापना करतो (ह.)
१८०९ प्रुढान फरेंच अर्थशास्त्री.
१८१० डॅनियल ऑकोनेलचा उदय. (ह.)
१८१० मिशनरी लोक मराठी पुस्तकें छापूं लागले.
१८१२ नेपोलियनची रशियावर स्वारी. (ह.)
१८१३ लिव्हिंग्स्टनचा जन्म (ह.)
१८१३ रिचर्ड वॅग्नेर व फरेड्रिक हॅबेले हे जन्मले. (ह.)
१८१४ फरेडरिक कोनिंग (जर्मन) याच्या यंत्रावर लंडन टाईम्स छा ला गेला. ताशी ११०० प्रतीं निघत.
१८१४–७६ बाकुनीन, प्रिन्स क्रोपॉटकिन, अराजकवादी.
१८१५ वॉटर्लूची लढाई. फर्स्ट कॉर्न लॉ. (यू. हि.)
१८१५ इंग्लंडमध्यें यंत्राविरुद्ध दंगे (ह.)
१८१५–१८२३ मॉलिसन व मिलने या प्रॉ. मिशनऱ्यांनीं इंग्रजी–चिनी कोश तयार केला. (रॉ.ड.)
१८१६ फरान्झ बोप या जर्मन संस्कृत पंडितानें तुलनात्मक भाषाशास्त्र चालू केलें. (ह.)
१८१६ स्टेथास्कोपचा शोध (ला एनेक फरांन्स) ?
१८१७ १७ नोव्हेंबर सोमवारीं तिसरे प्रहरीं शनिवार वाड्यावर (पुणें) इंग्रजांचें निशाण लागलें व महाराष्ट्राचें स्वातंत्र्य अस्तंगत झालें.
१८१७ रिकॉर्डोंचीं अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें (यू हि.)
१८१७ चिलिचें स्वातंत्र्य स्थापन झालें. (ह.)
१८१८–१८९५ कार्ल मार्क्स (ह.)
१८१८ बॉन युनि ची स्थापना. (ह.)
१८१९ अल्ट्रॉ मॉटनिझमची सुरवात. (यू. हि.)
१८१९ एल्फिन्स्टननें मुंबई येथें विद्यालय स्थापून विद्याप्रसार करण्याचें ठरविलें.
१८२१ नेपोलियनचा मृत्यु.
१८२१ पेरूच्या स्वातंत्र्याची स्थापना. (ह.)
१८२१ खाणींतील कामगारांसाठीं डव्हीनें संरक्षक दिवा शोधून काढला.
१८२१ नार्वेमध्यें उमरावांचे किताब रद्द होतात. (ह.)
१८२२ इक्वाडोरचें स्वातंत्र्याची स्थापना. (ह.)
१८२२–९५ लुई पाश्चूर–रोगप्रतिबंधक लसींचा फरेंच शोधक (ज्ञा. को.)
१८२३ मन्रो मताची स्थापना. (ह.)
१८२४ आर्य समाज संस्थापक दयानंद सरस्वतींचा जन्म.
१८२४–८४ केरो लक्ष्मण छत्र. महाराष्ट्रीय केरोपंती पंचांगाचे प्रवर्तक (ज्ञा. को.)
१८२५ स्टॉक्टन डार्लिंग्टन रेल्वे सुरू (यू. हि.)
१८२५ विष्णुबुवा ब्रम्हचारी जन्म; बोल्शेव्हिया स्वातंत्र्य–स्थापना
१८२५–९५ थॉमस हेन्री, हक्स्ले डार्विनच्या उपपत्तीचा पुरस्कर्ता. इंग्रज.
१८२६ जेसुइटांना फरांन्सांत परत घेतलें. (यू. हि.)
१८२७ जोतीराव फुले–जन्म.
१८२८ ब्राम्ह सभेची स्थापना. (बंगाल)
१८२८ एकट्या कलकत्त्यांत ३०९ स्त्रिया सती गेल्या.

१८२८ आधुनिक सेंद्रिय रसायनाचा आरंभ. त्याच परमाणूच्या त्याच संख्येपासून केवळ रचनाभिन्नत्वानें वेगळे पदार्थ होऊं शकतात हें बोलनें सिद्ध केलें.
१८२८ टॉलस्टॉयचा जन्म; ऑस्ट्रिया व फरान्स या देशांत आगगाडया सुरू. ग्रीस स्वतंत्र झाला. युराग्वे-स्वातंत्र्य-स्थापना (ह.)
१८२९ युनायटेड स्टेट्समध्यें रेल्वे सुरू. (यू. ए.)
१८२९ कॅथॉलिक इमॅन्सिपेशनचा कायदा.
१८२९ लोकोमोटिव्ह-स्टीफन्सनचें पहिलें रॉकेट (यू. हि.)
१८२९ फर्डिनांड लासलेचा जन्म. (ह.)
१८३० स्कॉ.मध्यें घटस्फोटाची बाब बिशपांच्या हातून काढून न्यायखात्याकडें दिली. (ए.ब्रि.)
१८३० व्हिक्टर ह्यूगो; फरान्सची राज्यक्रांति.
१८३० हिंदुस्थानांत पहिलें पोस्ट उघडलें.
१८३१ क्लोरोफॉर्मचा शोध ; कृत्रिम खतांचा शोध व उपयोग.
१८३१ मॅझिनीनें यंग इटली हें वर्तमानपत्र काढलें. (यू. हि.)
१८३२ गटे, स्कॉट, बेंथॅम ह्यांचा मृत्यू. (यू. हि.)
१८३२ पासून प्रा. शिक्षणास सुरवात. शिक्षणखातें सरकारनें हातीं घेतलें. (ए.ब्रि)
१८३३ राजा राममोहन रॉय यांचा मृत्यु. हिंदुस्थानांत सती कायद्यानें बंद.
१८३३ ब्रि. साम्राज्यांत गुलामगिरी बंद; नार्वेमध्यें लोकसत्तेची स्थापना आयर्लंडमध्यें प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था.; जॉन ब्रॅह्मसचा जन्म.ऑक्सफोर्ड चळवळ सुरू; कार्लाइलचें सारटार रिसार्टस.; (स्यूत सौतिक)
१८३४ इंग्लंडमध्यें पुअर-लॉ-ॲक्ट (यू. हि.) ट्रिडकेचा जन्म (ज.) (ह.)
१८३४-१९०७ मेंडेलिफ, नियतांतरतेचा नियम ठरविणारा रशियन (ज्ञा. को.)
१८३४ अर्नेस्ट हेकेल, विकासवाददर्शक वंशवृक्ष कर्ता. जर्मन (ज्ञा.को.)
१८३५ बल्गेरियन भाषेंतून शिक्षण देणारी पहिली शाळा सुरू. (ह.)
१८३५ जर्मनी बेल्जम यांत आगगाडी सुरू (यू. ए.); इलेक्ट्रिक टेलिग्राफि (यू.हि.)
१८३५ सोशिॲलिझम शब्दाचा प्रथम उपयोग.; रिव्हाल्व्हरचा शोध (कोल्ट अमेरिका)
१८३६ गंधकाची आगकाडी (फिलिप्स अमेरिका.)
१८३६ रशियांत आगगाडी; दादोबा पांडुरंगांचें व्याकरण
१८३७ व्हिक्टोरिआ गादीवर आली. (ह.)
१८३७ डॉ. भांडारकर-जन्म
१८३८ लंडन येथें मानववंश-शास्त्रविषयक संस्था स्थापन झाली.
१८३८ ॲन्टी कार्न लॉ लीग. (ह.)
१८३९ इटालींत रेल्वे. (यू. ए.)
१८३९ फोटोग्राफीचा शोध (डागरे व निपेसे फरान्स)
१८३९-१८९७ हेन्री जार्ज, प्रोग्रेस ॲंड पाव्हर्टी या ग्रंथाचा कर्ता.
१८४० डॉ. लोकहार्ट हा टिंगहाई (चीन) येथें इस्पितळ काढतो. (रॉ.ड.)
१८४० ब्रिटनमध्यें पेनिपोस्टेज सुरू. (य. हि.) अफूच्या प्रश्नामुळें सायनो ब्रिटन युद्ध; ओझोनचा शोध.
१८४० रेत्सिडूनें कवटयांच्या लांबीवरून लांब डोक्याचे व आंखूड डोक्याचे मानव असे भेद पाडिले.
१८४१ ब्रिटननें हॉन्गकॉन्ग घेतलें. (यू. हि.)
१८४२ बेल्जममध्यें प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेची कॉम्युन्सवर सक्ती-गरीबांना फुकट धार्मिक शिक्षण आवश्यक. (ए. ब्रि.)
१८४२ बेल्जममध्यें पाद्रयांनीं विरोध करूनहि शिक्षण बिल पास झालें. (ह.)
१८४२-१९०१ न्यायमूर्ती माधवराव रानडे.
१८४३ श्रीकृष्णानंद व्यास संगीताचार्य रागसागर; कलकत्त्याचे प्रसिद्ध गवई.

१८४३ महाराष्ट्रांतील पहिलें संगीत नाटक–विष्णुपंत भावे.
१८४४ नित्शेचा जन्म (ह.)
१८४४ डॉ. लॉकहार्ट हा शांघाय येथें इस्पितळ काढतो. (रॉ. ड.)
१८४५ ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई
१८४५ वेश्याव्यवसाय बंद करण्याचा जर्मनींत शेवटचा प्रयत्न विफळ झाला. (ए. ब्रि.)
१८४६ शिवण्याचें यंत्र (होवे अमेरिका)
१८४६ गन कॉटनचा शोध.
१८४८ जोतीराव फुले यांनी मराठे लोकांकरितां निराळी शाळा नानाच्या पेठेंत (पुणें) अस्पृश्याकरितां शाळा व अनाथ मुलांकरितां गृह स्थापिलें.
१८४८ कॅलिफोर्नियांत सोनें सांपडलें. फरान्सची राज्यक्रांति. सातारचें राज्य खालसा. स्पेनमध्यें आगगाडी. (ह.)
१८४९ ज्ञानप्रकाश सुरुं; डलहौसी पंजाब प्रांत खालसा करतो.
१८५० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म.
१८५० काव्हूर हा पीडमॉन्टचा मुख्य प्रधान (यु. हि.); जर्मनीत प्राथमिक शिक्षण फुकट सुरूं. १८८८ पर्यंत पूर्ण यशस्वी झालें नाहीं. (ए. ब्रि.)
१८५० कॅनडा व मॅक्सिको येथें रेल्वे. (यु. ए.)
१८५१ हिंदुस्थानांतील पहिली कापडाची गिरणी व पहिलें तारायंत्र
१८५१ बिस्मार्क प्रशियाचा प्रतिनिधि बनतो. (ह.)
१८५३ सिव्हि. सर्व्हिस परीक्षा सुरू झाली. (यु. ह.) स्विडनमध्यें रेल्वे.
१८५३–१८६१ नियंत्रित राजशाही पोर्तुगालांत.
१८५३ हिंदुस्थानांतील पहिली रेल्वे मुंबई ते ठाणें.
१८५४ क्रिमियन युद्ध; पोर्तुगाल, ब्राझिल, आस्ट्रे, या देशांत रेल्वे सुरू.
१८५५ स्वीडनमध्यें खुला व्यापार सुरू (ह.)
१८५६ ईजिप्तमध्यें आगगाडी सुरू. (यु. ए.)
१८५६ लो. टिळकांचा जन्म; बर्नार्ड शॉ जन्म–फेबियन सोसायटीचा प्रमुख कार्यकर्ता
१८५७ ब्रिटिश पार्लमेंटमध्यें घटस्फोटाबाबत कायदा (ए.ब्रि.) हिंदुस्थानचें स्वातंत्र्य युद्ध; मुंबई स्कूल ऑफ आर्टस् स्थापना.
१८५८ चीनशीं युरोपचा तह. ई. इं. कंपनीचा अंमल समाप्त. राणीचा जाहीरनामा. जगदीशचंद्र–जन्म
१८५९ डार्विनचे ऑरिजिन ऑफ स्पीशीज प्रसिद्ध होतें. (यु. हि.)
१८५९ इटली आस्ट्रेलियाचें जूं झुगारतो. (ह.)
१८५९ हिमयुगांतील मनुष्यानें वापरलेलीं दगडाचीं हत्यारें सांपडलीं. त्या व इतर पुराव्या-वरून मनुष्य आहे असाच पूर्वीपासून आहे हें मत अमान्य होऊं लागलें व त्याचें प्राचीनत्वहि मान्य झालें.
१८६० लिंकन अमेरिकेचा अध्यक्ष होतो. दक्षिण आफ्रि. व तुर्कस्थान येथें रेल्वे. (यु. ए.)
१८६० पं. विष्णुशर्मा भातखंडे हिंदी संगीत शास्त्रज्ञ यांचा जन्म.
१८६० रस्किननें Modern painters हा ग्रंथ प्रसिद्ध केला. (ह.)
१८६१ गुलामगिरी नष्ट करण्याचा कायदा रशियांत पास झाला. (ए.ब्रि)
१८६१ पंडित मदन मोहन मालवीय–जन्म; मशीनगन शोध. (गॅटलिंग अमेरिका);
१८६१ प्रफुल्ल चंद्र राय बंगाली रसायनशास्त्रज्ञ यांचा जन्म.
१८६१–१८६५ उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांचें युद्ध व गुलामगिरीचा अंत. (ह.)
१८६२ लासल याची Socialistie चळवळ चालू होतें. (ह.)
१८६२ जेऱ्हार्ट हॉपमनचा जन्म. (ह.)
१८६२–१८६३ कोचीन चायना यांत फरेंचांचा विजय व वर्चस्व. (ह.)
१८६३ पोलिश लोकांचें रशियाविरुद्ध बंड (ह.)

१८६३ हेकेलननें उत्क्रांतिवादाचीं तत्त्वें मनुष्यास लागूं केलीं. मँटलच्या दिव्याचा शोध
१८६४ प्रिन्स कझा यानें रुमोनियांत २ सुधारणा केल्या. १ शेतकऱ्यांची वेठ बिगारींतून मुक्तता व २देशांतील जमिनी शेतकऱ्यांस वांटून देणें. (ह.)
१८६४ संसर्गजन्य रोगप्रतिबंधक कायदा इंग्लंडमध्यें पास झाला. त्याअन्वयें वेश्यांची वैद्यकीय तपासणी करण्यांत येऊं लागली. (ए. ब्रि.)
१८६५ वेश्यांची वैद्यकीय–तपासणी–कायदा लष्करी ठाण्यापुरता हिंदु० झाला. (ए. ब्रि.)
१८६५–१८६९ ५०० लोकसंख्या असलेल्या गावांत मुलींकरितां शाळा काढलीच पाहिजे. अशी फरांन्समध्यें सक्ती सुरूं झाली. (ए. ब्रि.)
१८६५ कॉन्स्टिटयूशनसाठीं मॉस्कोच्या प्रजाजनांचा बादशहास अर्ज. (ह.)
१८६५ गुलामगिरी नष्ट. अब्रॅहॅम लिंकनचा खून (यू. हि.)
१८६६ पहिली आतलांतिक महा. तील तार (यू. हि.)
१८६६ Matrimonial causes act अन्वयें घटस्फोटानंतर अपराधी नवऱ्याकडून बायकोस पोटगी मिळवून देण्याचा अधिकार ब्रिटिश कोर्टास प्राप्त झाला. (ए.ब्रि.)
१८६६ याच सुमारास युरोपमध्यें– विशेषतः इटालीमध्यें अनेक वैद्य व रसायनशास्त्रवेत्ते प्रेतदहनपद्धतीचा पुरस्कार करूं लागले.
१८६६ या वेळेपर्यंत कागद चिंध्यांचे करीत. येथून पुढें गवत, अंबाडी वगैरे वापरूं लागले. (ए.ब्रि.)
१८६७ कार्ल मार्कस्‌चें Capital हें पुस्तक प्रसिद्ध झालें. (ह)
१८६७ हॉल (अमेरिका) यानें रेल्वे ब्लाक–सिग्नल्स तयार केले.
१८६७ डायनामाईटचा शोध नोबेल (स्वीडन) यानें लावला. हा नोबेल बक्षीसाचा दाता.
१८६८ शिक्षण व विवाह यासंबंधाची व्यवस्था ऑस्ट्रियांत पाद्रयाकडून काढून घेण्यांत आली.
१८६८ सिव्हिल सर्व्हिस परीक्षेस पहिला महाराष्ट्रीय श्रीपाद बाबाजी ठाकर.
१८६९ सुएज कालवा सुरू. याचा फर्डिनंड डी लेसेप्स हा इंजिनिअर, २ महात्मा गांधींचा जन्म.
१८७० १ फरांको-जर्मन युद्ध. २ सार्वजनिक सभा स्थापना पुणें. ३ इटलीस्वतंत्र होतो. ४ टेलिग्राफी खातें हें इंग्लंडांत सरकारी झालें. ५ चीन देशांत T'ientsin येथें खिस्त्यांची कत्तल. (रॉ. ए.)
१८७० चित्तरंजनदास जन्म.
१८७० मॉन्टेसोरी–'प्रत्येक मुलाचा स्वतंत्र विकास इंद्रियशिक्षणाच्या द्वारां करणें' हें ध्येय डोळ्यापुढें ठेवून ३ ते ५ वर्षांच्या मुलांकरितां हिनें नवीन पद्धत शोधून काढली.
१८७१ जर्मन साम्राज्यस्थापना. बिस्मार्क मुख्य प्रधान होतो. (ह.)
१८७१ ट्रेड यूनियन्स इंग्लंडमध्यें कायदेशीर ठरलें. (यू. हि.)
१८७१ सरंजामी पद्धतीचा जपानांत शेवट. युरोपीय सुधारणांचा सरसहा उपयोग.
१८७२ जपानांत रेल्वे. (यू. हि.)
१८७२ गुप्त मतदानाचा (Ballot) कायदा (यू. हि.)
१८७३ जपानांत Gregorian पंचांग वापरण्यास सुरवात. (ह.)
१८७३ शोलम्‌नें (अमेरिका) टाइपरायटरचा शोध लावला.
१८७३ सत्यशोधक समाजाची स्थापना.
१८७४ प्रेतदहनपद्धत-पुरस्कार मंडळी.,युरोपांतील १ लीच, इं. त स्थापन झाली. (ए. ब्रि.)
१८७४ प्रशियांत सक्तीच्या लष्करी नोकरीस सुरुवात. (ह.)
१८७४ पैगंबराचें चित्र काढल्याबद्दल मुसलमानांनीं पारशांस मारहाण केली.
१८७४ डॉ. भाऊदाजी यांचा मृत्यु.
१८७४ निबंधमाला सुरू.
१८७५ बलचा टलिफोनचा शोध. (अमे.)
१८७५ हिंदुस्थानसरकारनें ब्राऊनच्या नेतृत्वाखालीं ब्रम्हदेशांतून दक्षिण चीनकडे खुष्कीचा मार्ग ठरवावयास मंडळ धाडिलें. (रॉ. ड.)
१८७५ पार्नेलचा उदय. (ह.)

१८७५ आर्यसमाजाची स्थापना.
१८७६ इंग्लंडमध्यें १० व्या वर्षापर्यंत सक्तीचें शिक्षण सुरूं झालें. (ए. ब्रि.)
१८७६–१८७७ दक्षिण हिंदुस्थानांतील प्रचंड दुष्काळ. ५० लक्ष माणसें मेलीं.
१८७७ व्हिक्टोरिया हिंदु. ची सम्राज्ञी झाली.
१८७७ रुमेनिया स्वातंत्र्य पुकारतो. (ह.)
१८७७ एडिसन–टॉकिंग मशीन , इन् कँडिसंट लँम्प, (१८७८) शोध
१८७८ कुल्टुरकँपीचा आरंभ (जर्मनी) (ह.)
१८७८ थीबा राजा पदच्युत होऊन रत्नागिरीस येतो. (ह.)
१८७९ वासुदेव बळवंत फडक्यांचें बंड
१८८०–८४ रिपनच्या कारकीर्दींतच स्थानिक स्वराज्याचा पाया. (हिंदु.)
१८८० 'केसरी' पत्र सुरूं. पुणें
१८८० कृत्रिम निळीची उत्पत्ति
१८८० ग्लॅडस्टन इंग्लंडचा मुख्य प्रधान (यू. हि.)
१८८० धार्मिक पंथ नाहींसे करण्याचा फ्रान्समध्यें हुकूम. (ह.)
१८८० कोड नेपोलियनच्या आधारें रचलेलें कायदेकोड प्रसिद्ध झालें (ह.)
१८८२ इमरसनचा मृत्यू. (यू. हि.)
१८८२ फ्रान्समध्यें सक्तीचें शिक्षण सुरूं (ह.)
१८८३ इलबर्ट बिल
१८८३ आयरिश लोकांनीं इंग्लंडांत अत्याचार चालू केले. (बाँब) (ह.)
१८८४ हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना. फर्ग्युसन कॉलेज स्थापना.
१८८४ फ्रान्समध्यें Trade Unions कायदेशीर ठरतात. (ह.)
१८८५ फ्रान्स–चीन तह. हांकॉन्ग येथें फरेंच व्यापाराच्या सोयी. (रॉ. ड.)
१८८६ आयरिश होमरूलचें ग्लॅडस्टनचें पहिलें बिल (यू. हि.)
१८८६ अमेरिकेंत २५००० वर घटस्फोट (ए. ब्रि.)
१८८७ कृत्रिम साखरेची उत्पत्ति
१८८७ चीनमध्यें रेल्वे (यू. ए.)
१८८७ कील कालव्याच्या खणतीस सुरुवात (ह.)
१८८८ मिलन हा राजा सर्वियास पूर्ण लोकसत्ताक स्वरूपाची घटना देतो. (ह.)
१८८८ १८६५ सालीं लष्करी ठाण्यापुरता पास झालेला वेश्या परीक्षेचा कायदा या सालीं रद्द झाला. त्यामुळें सिफिलसची फौजेंत बेसुमार वाढ झाली. (ए . ब्रि.)
१८८८ सुधारक पत्र सुरूं पुणें (आगरकर)
१८८९ पंडिता रमाबाईचें शारदासदन
१८८९ ब्राझिल हें रिपब्लिक होतें. (ह.)
१८८९ जपानी राजाचा नवीन राज्यघटनेचा जाहिरनामा (ह.)
१८९० गुन्हेगारास पहिल्यानें विजेनें मारलें. न्यूयॉर्क–बु. फॅ.
१८९० स्कॉटलंडमध्यें फुकट प्राथ० शि. चीं व्यवस्था (ए. ब्रि.)
१८९० फरेंच चर्च प्रजासत्ताकावरील आपला विश्वास जाहीर करतें. (ह.)
१८९० संमतिवयाचा वाद
१८९१ हिंदुस्थानांत संमतिवयाचा कायदा पास झाला. (भा. व.)
१८९१ ट्रॅन्ससायबेरियन रेल्वे (ह.)
१८९२ आयर्लंडमध्यें प्राथ. शि. सक्तीचें व फुकट (ए. ब्रि.)
१८९२ दर डोईस मत असावयाच्या ऐवजीं दर कुटुंबास मात्र असावें ही पद्धत बेल्जममध्यें अस्तित्वांत आली. (ह.)
१८९३ शिकॅगोची जगज्जत्रा (ह.)
१८९३ आयरिश भाषा टिकवून धरण्यासाठीं हाइड यानें गेलिक लीग काढली. (ह.)

१८९३ ओरायन, (वेदकालनिर्णय) हा टिळकांचा ग्रंथ प्रसिद्ध.
१८९३ एडिसन, मोशन पिक्चर मशीन तयार करतो.
१८९४ दादाभाई नौरोजी इंग्लंडचे पार्लमेंटांत निवडून आले.
१८९४ चीन–जपान युद्ध. चीनचा पराभव. हंगेरींत सिव्हिल मॅरेज बिल पास होतें. (ह.)
१८९५ रॉंटजेन यांचा X किरणांचा शोध (यू. हि.)
१८९५ वायरलेस टेलिग्राफी, लोफ्रीक्वेन्सीचा शोध, प्रीस (इंग्लंड)
१८९५ आगरकर–मृत्यू
१८९६ मार्कोनीचा वायरलेस टेलिग्राफीचा (हाय फ्रीकन्सी) शोध (यू. हि.)
१८९६ नान्सेन्न हा नार्वेजियन शोधक ध्रुवशोधांतून परत येतो. (ह.)
१८९६ हिंदुस्थानांत प्लेग व भयंकर दुष्काळ
१८९६ हिंदी व्यवस्थेची पहिली विमा कं.
१८९७ टिळक यांस राजद्रोहास्तव पहिली शिक्षा
१८९७ पुण्यांत रँड साहेबाचा खून
१८९८ स्वित्सरलंड येथें रेल्वेचें राष्ट्रीकरण (ह.)
१८९८ नार्वेमध्यें वयांत आलेल्या प्रत्येकास मताधिकार (ह.)
१८९८ मॅडम क्यूरी (फ्रेंच) इचा रेडिअमचा शोध.
१८९९ बर्लिन बॅ. बगदाद रेल्वेस कायसरची पर० (ह.)
१९०० पोलिश मुलें जर्मन कॅटिकिझम म्हणेनात म्हणून त्यांस चाबूकमार. (ह.)
१९०० दुखणें व अपघात याबद्दलचा विमा. स्वित्सर्लंडमध्यें पास. (ह.)
१९०० १ र. पु. परांजपे रँगलर झाले. २ मॅक्समुल्लर मृत्यू.
१९००–१९१५ निरनिराळ्या काळचे व स्थळचे मनुष्यांच्या हाडांचे अवशेष सांपडले व त्यावरुन मानव लाखों वर्षांचा जुना व विविध ठेवणीचा होता असें सिद्ध झालें.
२० वें शतक (व १९ व्याचा उत्तरार्ध) यांत रिमन, याकोबी, क्लॅान हरमाईट, लामे, डार्बो, जोर्डन, न्यूकोंब वगैरे पाश्चात्य व रामानुजम्, रामन, गोखले, नारळीकर, राजनारायण वगैरे भारतीय गणिती झाले.
१९०१ स्वित्सर्लंड–सक्तीचें लष्करी शिक्षण सुरूं (ह.)
१९०१ ट्रान्स सायबेरियन रेल्वे पुरी (ह.)
१९०१ फ्रान्समध्यें शिक्षणाचा उद्योग धर्मसंस्थेनें करूं नये असा नियम. व्हिक्टोरिया; ज. रानडे यांचा मृत्यू.
१९०२ बोअर युद्ध संपलें (यू. हि.)
१९०२ रेडिओ सेंडिंग ॲपरेटस (स्टबल फील्ड अमेरिका)
१९०३ राइट बंधू यांचें मेकॅनिकल एरोप्लेनमधून पहिलें यशस्वी उड्डाण. (बु. फॅ.)
१९०३ हर्बर्ट स्पेन्सरचा मृत्यू.
१९०४ ब्रिटिशांची तिबेटवर स्वारी.
१९०४ रूसो–जपानी युद्ध सुरूं (यू. हि.)
१९०५ चर्च व स्टेट हीं फ्रान्सांत अलग अलग ठरलीं. (यू. हि.)
१९०५ बंगालची फाळणी, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना
१९०५ पैसाफंड संस्था रजिस्टर झाली.
१९०५ नार्वेस स्वातंत्र्य मिळतें (ह.)
१९०६ स्त्रियांस मतदान हक्क देण्याच्या चळवळीचें पुनरुज्जीवन (यू. हि.)
१९०६ इप्सेन या नाटककाराचा मृत्यू (यू. हि.)
१९०७ मृतपत्नीच्या बहिणीशीं विवाह करण्यास हरकत नाहीं असें ब्रि. पार्लमेंटनेंठरविलें. हा झगडा १८५० पासून चालू होता.
१९०७ पनामा कालवा खणती–आरंभ (ह.)
१९०७ वीरनवाली प्रकरण. लजपतराय हद्दपार झाले.

१९०७ सुरतेची राष्ट्रीय सभा

१९०७ वधुवरांचीं किमान वयें अनु. १५–१८ असलींच पाहिजेत असें फ्रान्समध्यें ठरलें.
२१ वर्षांखालील मुलांमुलींस पालकाच्या संमतीशिवाय लग्न करतां येत नाहीं असें ठरलें (ए. ब्रि.)

१९०७ आस्ट्रियांत सज्ञान पुरुषास मताधिकार. (ह.)

१९०८ पोलिश जमीनदारांच्या जमिनी काढून घेण्यांत आल्या. व सार्वजनिक सभांत पोलिश भाषा बंद झाली. जर्मनी (ह.)

१९०८ टिळकांना राजद्रोहास्तव ६ वर्षें काळेंपाणी

१९०८ डब्लिन येथें National University निघाली. (ह.)

१९०८ चर्चच्या मालमत्तेचा ताबा घेण्याबाबत बिल. फ्रान्स. (ह.)

१९०८ बल्गेरियाचा राजा फर्डिनांड हा स्वातंत्र्य पुकारतो (ह.)

१९०९ प्रिन्स ईटो जपान याचा खून (ह.)

१९०९ मोर्लेमिंटो सुधारणा

१९१० टॉल्स्टायचा मृत्यू (ह.)

१९१० फरेंचांनीं दक्षिण सूदान जिंकल्यावर साहारा वरील लमाणांच्या हातचा गुलामांचा
व्यापार बंद झाला. (ए. ब्रि.). भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापन (पुणें).

१९११ आज ऑक्सफोर्ड–इंडिया कागद सर्वोत्कृष्ट आहे. १५०० पानांचें पुस्तक एका पानावर
कित्येक महिने टांगलें तरी पान फाटत नाहीं. (ए. ब्रि.)

१९११ आयरिश होमरूल बिल पुन्हां– (ह.)

१९११ कोणतेंही बिल हाउस् ऑफ कॉमन्समध्यें ३ वेळां पास झाल्यास त्याला हॉ. लॉर्डसची
मंजुरीची जरूर नाहीं असें ठरलें. या सालीं पार्लमेंटच्या सभासदांस वेतन मिळूं लागलें.
नॉ. अमुंडसेन दक्षिण ध्रुवाचा शोध लावतो. (ह.)

१९१२ टिटॅनिका बोट बुडाली. (ह.)

१९१२ जपानांत Taisho शक चालू.

१९१२ चीनमध्यें लोकसत्तची स्थापना.

१९१३ रविंद्रनाथ टागोर यांस नोबेल प्रॉइझ मिळालें.

१९१३ नार्वेमध्यें स्त्रियांस मताधिकार. (ह.)

१९१३ वुड्रो विल्सन हा अमे०चा अध्यक्ष (ह.)

१९१३ पनामा कालवा तयार (यू. हि.)

१९१४ टिळक यांची सुटका; आर्क डयूक फर्डिनंड यांचा खून; महायुद्धास सुरुवात
दक्षिण इराणांतील तेलाच्या खाणीवर ब्रि. ताबा (ह.)

१९१५ लॉर्ड हार्डिजनें बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचा पाया घातला.

१९१५ गोपाळ कृष्ण गोखले–मृत्यू;

१९१६ लखनौ कांग्रेस करार; हिंदू विद्यापीठाची स्थापना, काशी.होमरूल लीगची स्थापना;

१९१७ पाणबुड्यांचें युद्ध सुरूं

१९१७ रशियन झारचा राज्यत्याग; लेनिनच्या आधिपत्याखालीं बोल्शेव्हिकांची रशियांत
सत्ता

१९१८ प्रे. विल्सनचे १४ मुद्दे. (बु. फॅ.)

१९१८–३२ मनुष्याच्या आनुवंशिक गुणांचें संशोधन व सुप्रजाननशास्त्रास प्रारंभ.

१९१९ व्हर्सेलिसचा तह. फॅसिझमची स्थापना.

१९२० लो. टिळकांचा मृत्यू व असहकारितेचा जन्म.

१९२० राष्ट्रसंघ–आन्तरराष्ट्रीय न्यायमंदिर.

१९२२ आयरिश फरीस्टटची स्थापना.

१९२२ मुसोलिनी इटलीचा मुख्य प्रधान झाला.

१९२३ इंग्रज सरकार अफगाणिस्थानचें स्वातंत्र्य मान्य करतें. हिंदुस्थान व अफगाणिस्थान यांचा तह. वायव्य सरहद्द निश्चित ठरली.
१९२४ इंग्लंडमध्यें मजूर पक्ष सत्ताधीश झाला.
१९२४ लेनिनचा मृत्यू.
१९२५ मोरोक्को–अवदुल करीम यानें फ्रेंचांवर चाल केली.
१९२६ स्वामी श्रद्धानंदांचा एका मुसलमानानें खून केला.
१९२६ इंग्लंडमध्यें सार्वत्रिक संप. (बु. फॅ.)
१९२७ लिंडवर्गचें अटलांटिक महासागरावरचें महाउड्डाण (बु. फॅ.)
१९२८ सोव्हिएट रशियानें ट्रास्टकीला हद्दपार केलें.
१९२८ केलॉग पॅक्ट; रशियाची पंचवार्षिक योजना सुरू
१९२८ रमण–प्रकाश शोध.
१९२८ ग्रॉफ झेपेलिन जर्मनीनें अमेरिकेस दिलें. (बु. फॅ.)
१९२९ राजे अमानुल्ला यांचा राज्यत्याग.
१९३० प्लूटो या नवव्या ग्रहाचा शोध.
१९३० मार्च–महात्मा गांधींचें दांडीस प्रयाण ; पंजाबच्या गव्हर्नरच्या खुनाचा प्रयत्न हरिकिशन यानें केला.
१९३० चंद्रशेखर व्यंकटरमण यांस प. विज्ञान शास्त्राचें नोबेल बक्षीस मिळालें.
१९३१ जानेवारी. महात्मा गांधींची येरवड्याहून सुटका, मार्च ३ गांधी–आर्यविन करार,
१९३१ प्रे. व्हूवरनें एक वर्ष कर्जतहकुबी दिली. इंग्लंडमध्यें राष्ट्रीय सरकार.

१९३२ ची रोजनिशी

जानेवारी १९३२

१–१–३२ मुंबई येथें कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा निर्णय; पिकेटिंग वगैरे कार्यक्रम निश्चित.

२–१–३२ सुभाषबाबू यांना कल्याण येथें अटक.

४–१–३२ मुंबईस महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांना अटक; (२) दिल्लीस सरकारनें चार वटहुकूम काढले; (३) पं जवाहरलाल व शेरवानी यांना शिक्षा.

६–१–३२ (१) पाटणा येथे राजेंद्रबाबू यांना अटक. (२) बनारसला महात्माजींच्या अटकेमुळें निषेधार्थ सभा व पोलिसांचा गोळीबार. ३ मुंबईस कांग्रेसचे ५ ००००रु. जप्त. (४) श्री. वल्लभभाई पटेल, डॉ. सावरकर, अवंतिकाबाई गोखले, बॅ. खेर व नरीमन यांना अटक.

७–१–३२ पुणें येथें श्री. बाळुकाका कानिटकर, श्री. अण्णासाहेब भोपटकर, श्री. दा. वि. गोखले, श्री. खाडिलकर या पुढाऱ्यांस अटक. (२) अहमदाबादेस महादेव देसाई यांना अटक.

८–१–३२ बेळगांवास श्री. गंगाधरराव देशपांडे यांना व पेण येथें श्री. रामभाऊ मंडलीक यांना अटक.

९–१–३२ नाशकास श्री. ग. वि. केतकर यांना अटक. दिल्लीस डॉ. अन्सारी यांना पकडलें. श्री. एम. एन. रॉय यांस १२ वर्षें हद्दपारी. मद्रासला श्री. राजगोपालाचारियर व श्री. सत्यमूर्ति यांना अटक.

११–१–३२ मुंबई–वर्तमानपत्रावर निर्बंध घालण्यासाठीं नोटिफिकेशन सुरू.

१२–१–३२ सौ. कस्तुरबाई यांना अटक.

१३–१–३२ (१) नागपूर येथे बॅ. अभ्यंकर यांस शिक्षा (२) व्हाईसरायांचे हस्तें सक्कर धरण उघडलें.

१६–१–३२ मुंबईस श्री. जम्नालाल बजाज व डॉ. हर्डीकर यांना अटक.

१९–१–३२ मुंबई बंदरांतून गेल्या ३॥ महिन्यांत ४० कोट रु. चें सोनें परदेशीं रवाना.

२०–१–३२ मुंबईस सेनगुप्त यांना अटक.

२१–१–३२ मुंबई फ्री प्रेसचे संपादक सदानंद यांना अटक.

२२–१–३२ (१) डॉ. र. पु. परांजपे विलायतेहून आले. (२) मुंबई येथें कांग्रसचे ४० हजार रु. जप्त.

२५–१–३२ श्रीनगरजवळ मुसलमानांचा हिंदूवर अत्याचार व खेड्यांतून लुटालूट

२७–१–३२ येरवडा तुरुंगांत श्री. अण्णासाहेब भोपटकरांवर सापामुळें भयंकर प्रसंग ओढवला होता.

२८–१–३२ पंजाब गव्हर्नरवर गोळी झाडल्याचा आरोप असलेले वीरसिंह दुर्गादास व चमणलाल यांना हायकोर्टानें निर्दोषी ठरविलें.

२९–१–३२ (१) मुंबई येथें भुलेश्वरजवळ परदेशी कापडांच्या होळ्या. त्यामुळें २१० जखमी. (२) श्री. तात्यासाहेब करंदीकर यांना पुणें येथें अटक.

३०–१–३२ यवतमाळ येथें लोकनायक बापूजी अणे यांना अटक.

फेब्रुवारी १९३२

२–२–३२ दिल्लीस देवीदास गांधी यांना अटक.

३–२–३२ कलकत्ता लिबर्टी पत्राचे संपादक श्री. सत्यरंजन यांना शिक्षा. पुणें मराठा पत्राकडून १००० रु. चा जामीन.

४–२–३२ पुणें येथें आचार्य भागवत यांना अटक.

६–२–३२ बंगालचे गव्हर्नर सर स्टॅन्ले जॅक्सन यांजवर वीणादास नांवाच्या मुलीनें गोळ्या झाडल्या.

८–२–३२ मुंबई फ्री प्रेसकडून ३००० रु. चा जामीन.

१३–२–३२ पूर्व आफ्रिका हिंदी परिषदेचे अध्यक्ष अमृतलाल शेठ यांना मुंबई येथें अटक

१५–२–३२ कलकत्ता–कु. वीणादास यांना ९ व. स. मजुरी.

१६–२–३२ कृष्णकांत मालवीय यांना अलाहाबाद येथे शिक्षा.

१८–२–३२ मुंबईस मिराबेन यांस शिक्षा

१९–२–३२नागपूर येथे श्री.रुईकरांना. अटक.

२३–२–३२ अहमदाबाद येथे नवजीवन प्रेस जप्त.

२९–२–३२ लाहोर येथें ऑ. इं. कां.कमिटीचे अध्यक्ष सरदार शार्दूलसिंग यांना शिक्षा

मार्च १९३२

(१) पुणें येथें कॉन्ट्रॅक्टर श्री. धोंडो कृष्ण साठे यांस शिक्षा (२) चितागांग शस्त्रागारावरील हल्ल्यांतील आरोपींना शिक्षा १२ जणांस जन्मठेप १६ निर्दोषी. (३) मुंबईस देवीदास गांधी यांस शिक्षा.

२–३–३२ (१) सातारा येथील श्री. रामभाऊ सोमण यांची सुटका. (२) मुंबईस मेहेरअल्ली व मुकुंद मालवीय ह्यांस शिक्षा. (३) सोलापूरचे रामभाऊ राजवाडे यांची सशर्त सुटका.

४–३–३२ पुणें श्री.अण्णासाहेब भोपटकर, श्री. हरिभाऊ तुळपुळे, श्री. गाडगीळ व श्री. बाळुकाका कानिटकर यांची सुटका; बेळगांवीं श्री. गंगाधरराव देशपांडे यांची सुटका.

५–३–३२ पुणें श्री. दा. वि. गोखले यांची सुटका.

७–३–३२ पॅरिस येथें एम. ब्रियांद यांचा मृत्यू.

८–३–३२ मद्रासमध्यें तेन्नूरगांवीं हिंदु–मुसलमान मारामारी.

९–३–३२ डी व्हॅलेरा आयर्लंडचे अध्यक्ष झाले.

१२–३–३२ (१) जमनालाल बजाज यांची पॅरोलवर सुटका. (२) सराई–औरंगाबाद (काश्मीर येथें गुंडांचा अत्याचार. व ८० मैलांचा टापू उध्वस्त. (३) सप्टेंबर १९३१ ते मार्च १९३२ पर्यंत ५ कोटींचें सोनें परदेशीं रवाना. (४) अलीपूर खटल्यांतील आरोपी नैनीं गोपाळ यास फांशीची शिक्षा

१३–३–३२ दिल्लीस मुसलमानांची मिरवणूक व त्यामुळें पोलिसांचा लाठीहल्ला.

१५–३–३२ पुणें– (१) पांचलेगांवकर महाराजांची सुटका. (२) पुणें टिळक महाविद्यालय बेकायदा ठरविलें.

१८–३–३२ मुंबई कायदेमंडळांत सक्सेशन ड्यूटी बिल नापास झालें.

२०–३–३२ (१) जातवार मतदानाचा प्रश्न ब्रिटिश सरकारनें सोडवावा असें रा. टे. कॉ. च्या कन्सल्टेटिव्ह कमिटीच्या अध्यक्षांनीं कळविलें. (२) पुणें यथील प्रो. जावडेकर यांना अटक.

२१–३–३२ (१) धारवाड येथें प्रो. दिवाका यांना शिक्षा. (२) त्रिचनापल्लीस हिंदु-मुसलमानांचा दंगा व त्यांत २२ हिंदू जखमी.

२२–३–३२ भोपाळ हिंदु प्रजापरिषदेच्या स्वागत मंडळाचे अध्यक्ष श्री.शिवनारायण वैद्य यांस दिल्लीस अटक.

२३–३–३२ (१) पुणें चित्रशाळेकडून ४०००रु चा जामीन. (२) युवक संघाचे कार्यकर्ते एस्. एम्. जोशी यांना पुन्हां अटक. (३) लाहोर येथे डॉ. सत्यपाल यांना २ वर्षें स. म.

२४–३–३२ बरेली पं. जवाहिरलाल फ्लुरसीनें आजारी.

२५–३–३२ (१) ट्रिनिदाद–मँच्यूरिया-बाबत जपानचें चढाईचें धोरण म्हणून चीननें जपानी मालावर बहिष्कार घातला. (२) पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजला सरकारचें अखेरचें पत्र व विद्यार्थ्यांच्या संख्येवर मर्यादा बसते.

२६–३–३२ पुणें इंडियन मॅथेमॅटिकल असोसिएशनचा ज्युबिली–समारंभ.

२८–३–३२ गजानन मिलचे मालक श्री. वेलणकर यांजवर सांगली येथे हल्ला. (२) मुंबई नाविक संघामधील लोकांवर २०० पठाणांचा हल्ला

३१–३–३२पंढरपूरचे वकील श्री. फणसळकर यांची शिक्षा अपिलांत कायम झाली.

एप्रिल १९३२

२–४–३२ डब्लिन–राजनिष्ठेची शपथ न घेण्याचें आयर्लंडनें ठरविलें.

३–४–३२ पुणें येथे कै.विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची अर्धशतसांवत्सरिक पुण्यतिथी.

४–४–३२ पाटणा येथें क्रांतिकारकाकडून पोलिस इन्स्पेक्टरचा खून.

६–४–३२ श्री.मुनशी यांची पॅरोलवर सुटका व पुन्हां मुंबईस अटक.

७–४–३२ (१) मुंबईस कमलादेवी चटोपाध्याय यांना अटक. (२) पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचें मराठी मोनोटाईप संशोधक श्री. शंकरराव दाते हे परदेशाहून आले. (३) नागपूर येथें श्री. लोकनायक अणे यांजवर सनदेबद्दल नोटीस

९–४–३२ पुणें, श्री.शंकरराव देव यांना शिक्षा.

१०–४–३२ बर्लिन–फॉन हिंडेनबर्ग अध्यक्ष म्हणून निवडून आले.

११–४–३२ सोलापूरचे शेट गुलाबचंद यांना २०००० रु. दंड

१२–४–३२(१)गेल्या तीन महिन्यांत महाराष्ट्रांतील सुमारें २३२ संस्था बेकायदा व १८५० लोकांना शिक्षा.(२) नाशिक येथें काळाराम सत्याग्रह सुरू.

१७–४–३२(१)मुंबईस मवाल्यांचा दंगा व गोळीबार. (२)प्रो. अण्णासाहेब कर्वे यांचा ७५वा वाढदिवस.

१९–४–३२ सोलापूरचे डॉ. अंतोळीकर यांना शिक्षा.

२०–४–३२(१)मुंबई–दादर हिंदुमुसलमान मारामारी व गोळीबार; ३१जखमी १ठार.(२) प्रसिद्ध कापूसव्यापारी गिरिधरलाल गोविंदलाल भगत यांना अटक (मुंबई)

२१–४–३२ दिल्लीस कॉं. स्वा. कमिटीचे सेक्रेटरी श्री. जे. एन्. शहाणी यांना अटक.(२) बांकुरा येथें आर्थिक मंदीमुळें ६००० खंडकऱ्यांवर खटले.

२२–४–३२ मुंबईस सरोजिनी नायडू यांना अटक.

२३–४–३२(१)पुण्यास प्रो. ओतुरकर यांना अटक; (२) दिल्ली–पं. मालवीयांना अटक (३) लंडन–मँचेस्टर गार्डियन पत्राचे संपादक स्कॉट यांचा मृत्यू.

२४–४–३२ कॉंग्रेसचें ४७ वें अधिवेशन दिल्लीस भरलें.

२५–४–३२ दिल्लीस श्री.न. वि. गाडगीळ यांस अटक व १॥ वर्षें स. मजूरी.

२८–४–३२ नायरोबी– (आफ्रिका) येथें ता. १५–४–३२ रोजी कीनिया कॉलनीचे प्रसिद्ध पुढारी श्री. हुसेन सुलेमान वीरजी यांचा मृत्यू.

३०–४–३२ कलकत्ता–मिदनापूरचे डि. मॅजिस्ट्रेट मि.आर्. डग्लस यांजवर गोळ्या.

मे १९३२

१–५–३२ कलकत्त्यास डि. मॅ. मि.डग्लस यांचा मृत्यू. सिमला लोथियन कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला,

२–५–३२(१) नवी दिल्ली–पं. मालवीयांची सुटका, (२)डॉ. जीवराज मेथा यांस मुंबई येथें शिक्षा.

३–५–३२ देशाचे दुष्मन् हें चोपडें लिहिणारे रा. जवळकर यांचा मृत्यू

४–५–३२ अलाहाबादेस बॅ.आर्. एस्. पंडित यांना शिक्षा.

५–५–३२ (१)पुणें यूथ लीगचे कार्यकर्ते श्री. गोरे यांना २ वर्षें स. मजूरी.(२) बनारस–मिर्झापूर हिंदुमुसलमान दंग्याच्या खटल्याचा निकाल.–७हिंदू फांशी, २ मुसलमान व कांहीं हिंदूंना जन्मठेप, व५० सोडले

७–५–३२ (१) प्रे. डुमे यांचा फॅसिस्टच्या गोळीनें मृत्यू.(२) ३३ कोटी रु.चें सोनें परदेशीं रवाना.

११–५–३२ अध्यक्ष अब्दुल कलम अझद यांची सुटका (दिल्ली).

१३–५–३२ दिल्ली–डॉ. किश्चलू यांची सुटका.

१४–५–३२ मुंबईस मुसलमानांचा भयंकर दंगा व गोळीबार.

१५–५–३२ मुंबई–दंग्यास भयंकर स्वरूप प्राप्त झालें.

१६–५–३२ जपानच्या मुख्य प्रधानाचा खून

१७–५–३२ मुंबई–दंग्यास जोर; एका दिवसांत २२ वेळां गोळीबार.

१८–५–३२ कलकत्ता येथें मोहरमचा दंगा व ३२ जखमी.

२०–५–३२ (१)डब्लिन राजनिष्ठेची शपथ रद्द.(२) कलकत्त्यांत बिपिन चंद्र पाल यांचा मृत्यू.

२२–५–३२ अजमीर–पोलिस कमिशनर गिब्सन यांच्या खुनाचा प्रयत्न केल्यामुळें श्री. रामचंद्र बापट यांस १३ वर्षें स. मजुरी.

२७–५–३२ मुंबईचा दंगा थांबतो.

३१–५–३२ मैमनसिंगच्या आसपास वादळ होऊन सुमारें २५ खेडीं उध्वस्त.

जून १९३२

१–६–३२ मुंबई येथें सर पुरुषोत्तमदास यांजवर गुंडांचा हल्ला.

२–६–३२ (१) सिमला येथील मतदान कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. (२) सर अब्बासअल्ली बेगचा मृत्यु.

३–६–३२ बर्लिन येथें सर दोराब टाटा यांचा मृत्यु. (२) धारवाडच्या कर्मवीर पत्राचे संपादक श्री. आर. आर. दिवाकर यांना शिक्षा. (३) अहमदाबादेजवळ ओडाका गांवीं हिंदु–मुसलमानांचा दंगा.

७–६–३२ (१) फत्तेपूर डि. जेलमधील

(राजकीय कैद्यांवर) गोळीबार. (२) व्हाइस-रॉय लॉर्ड आर्विन यांची गाडी उलटण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून हंसराज यांस कराची येथें अटक; (२)नाशिककलेक्टरनें कुंडामध्यें स्नान करण्याची अस्पृश्यांना कायद्यानें मनाई केली.

८–६–३२ नागपूर–प्रो. बेहेरे यांना राजद्रोही वाङ्मय लिहिल्याच्या आरोपावरून नोकरींतून कमी करण्यांत आलें.

९–६–३२ पुण्यास राजे लक्ष्मणराव भोसले यांचा मृत्यु.

१०–६–३२ (१)कोर्टाचा अपमान केल्याबद्दल म्यूनिच येथें हेर हिटलर यांना १०००० मार्क्स दण्ड. (२) आयर्लंडची वाटाघाट फिसकटली

१३–६–३२ डॉ. बा. शि. मुंजे यांचें विलायतेस प्रयाण.

१४–६–३२ अहमदाबाद येथें प्रांतिक परिषद भरविणाऱ्या ३०० लोकांस अटक.

१५–६–३२ (१) मुलतान इंपिरिअल बँकेंत २० लाखांची चोरी. (२) मुंबई फ्री प्रेसकडून ६००० चा जामीन. (३) पुणें वाडिया कॉलेजला मान्यता.

२४–६–३२ (१) बेळगांव येथें श्री. गंगाधरराव देशपांडे यांना अटक.(२) प्रो. सी. व्ही. रामन यांना पॅरिस युनिव्हर्सिटीकडून डॉक्टर ऑनरिस काझा. ही पदवी

२५–६–३२ या आठवड्यापर्यंत ७० कोट रु. चें सोनें रवाना.

२६–६–३२ अजंठा लेण्यांत नवीन रंगीत चित्र व १८०० वर्षांपूर्वींचा जुना लेख सांपडला.

जुलै १९३२

१–७–३२ पूर्वींच्या चार वटहुकुमांचें एकीकरण करून व्हाइसरायांनीं एक वटहुकूम काढला. त्याची अंमलबजावणी मुंबई प्रांतांत कशी होणार हें मुंबई सरकारनें जाहीर केलें.

४–७–१९३२ सौ. उमाबाई नेहरू यांची जेलमधून सुटका झाली.

५–७–३२ वांद्रे येथें महाराष्ट्र प्रांतिक परिषदेनिमित्त अध्यक्ष सौ. कृष्णाबाई फडके यांस ६ महिने स. म. व इतर ५४ जणांस ६ महिने स. म. व २५–१०० रु. दंड.

६–७–१९३२ डॉ. अन्सारी यांची सुटका झाली. लोकनायक बापूजी अणे यांची सुटका.

८–७–३२ सर तेजबहाद्दर सप्रू व बॅ. एम्. आर. जयकर यांनीं सल्लागार कमिटीचा राजीनामा दिला.

११–७–३२ पीपल्स ओन कंपनीच्या खटल्याचा निकाल लागून श्री. पी. के. अत्रे वगैरे बारा गृहस्थ निर्दोषी म्हणून सुटले.

१४–७–३२ सिंधू नदाला अतिशय पाणी आल्यामुळें सिंधमधील शायोकचा बंधारा फुटला

१५–७–३२ नागपूर तुरुंगांतून शेट गोविंद दास यांची बिनशर्त सुटका. कु. मिरा बेन (मिस. स्लेड) यांना १२ तासांत चप्रा गांव सोडून जाण्याची पोलिसानें नोटीस दिली.

१६–७–३२ पंढरपूर येथें वर्णाश्रम स्वराज्य संघ परिषद भरली. रँ.नारळीकर यांचा फर्ग्युसन कॉलेजमध्यें सन्मान.

२०–७–३२ बंगलोर सायन्स इन्स्टिटयूटच्या डायरेक्टरच्या जागीं सी. व्ही. रामन यांची नेमणूक.

२१–७–३२ पंढरपूरचे वकील श्री. फणसळणकर यांची शिक्षा व दंड कायम झाला.

२२–७–३२ अहमदाबादचे डॉ. कानुगा यांस शिक्षा.

२३–७–३२ फ्री प्रेसचा ६००० रु. चा जामीन जप्त केला. (२)श्री.दाते यांनीं तयार केलेल्या 'मोनोटाईप' यंत्राचा अ. वि. गृहांत प्रारंभ झाला.

२५–७–३२ आयर्लंडनें ब्रिटिश मालावर बसविलेल्या जकातीचा अंमल सुरू झाला.

२८–७–३२ संस्थानविषयक पोट मंडळाचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला.

२९–७–३२ डाक्का येथें पो.सु.मि.एलिसन यांवर गोळ्या झाडण्यांत आल्या. फ्री प्रेसकडून दहा हजारांचा जामीन मागण्यांत आला.

३१–७–३२मराठा पत्राचे माजी संपादक श्री. आगाशे यांच्या अध्यक्षतेखालीं सातारा जिल्हा परिषद भरली. तदनंतर श्री. आगाशे यांस अटक केली.

आगस्ट १९३२

१–८–३२ देवीदास गांधी यांची सुटका.

२–८–३२ मराठा पत्राकडून एक हजार रु. चा जामीन मागण्यांत आला.

४–८–३२ डाक्का येथें कोमिल्लाचे अ. पो. सु. मि. एलिसन यांचा मृत्यु.

५–८–३२ कलकत्त्याच्या स्टेटसमन पत्राचे

संपादक सर वाटसन यांजवर गोळ्या झाडण्यांत आल्या व अत्याचारी इसमाची आत्महत्या.

६–८–३२ बर्लिन येथें प्रसिद्ध संशोधक डॉ. इचेनग्रुएन यांनीं अग्निभक्षक कागदाचा शोध लावला. (२) श्री. आगाशे (मराठ्याचे माजी संपादक) यांना शिक्षा

८–८–३२ मुंबई येथें कु. मणिबेन कारा यांस शिक्षा.

१२–८–३२ अहमदाबाद येथें कु. मणिबेन पटेल यांना अटक.

१४–८–३२ डेहराडून हून पंडित गोविंद वल्लभपंत यांची सुटका.

१६–८–३२ सिमला येथें जातवार मतदानाच्या प्रश्नाचा निकाल जाहीर झाला. व मुख्य प्रधानांचा त्या बाबतींत खुलासा.

१८–८–३२ नागपूरचे बॅ. अभ्यंकर यांची सुटका. झुरिच येथें प्रो. पिकार्ड यांचें हवेंत दहा मैल उड्डाण.

२०–८–३२ सिमला येथें शीख पुढारी सरदार उज्वलसिंग यांचा सल्लागार कमिटीचा राजिनामा.

२२–८–३२ डाक्का येथें मि. सी. जी. ग्रॅस्बी ॲडिशनल पोलिसऑफिसर यांजवर गोळ्या. (२) मिदनापूर कोर्टांत डि.मॅ.डग्लस यांच्या खुनाबाबत प्रद्योत कुमार भट्टाचार्य यांस फांशीची शिक्षा कायम झाली.

२३–८–३२ अमृतसर येथें डॉ.किश्चूल यांस अटक.

२४–८–३२ श्री. केळकर यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त उत्सव व श्री. तात्यासाहेब केळकर यांना केळकर–ग्रंथ समर्पण

२५–८–३२ पुणें डॉ. लागू यांची सुटका.

२७–८–३२ डॉ. किश्चलू यांस २ वर्षें सक्त मजुरी. (२) पुणें, साहित्याचार्य श्री.न. चिं. केळकर यांना ३८ साहित्य संस्थांतर्फे मानपत्र.

३०–८–३२ सुभाषबाबूंना क्षयरोगाची भावना झाल्याचें कळतें.

३१–८–३२ हिं. सरकारनें जपानी मालावर जकात वाढविली त्यामुळें टोकिओ येथें भयंकर खळबळ. लँकेशायर गिरण्यांत संप.

सप्टेंबर १९३२

१–९–३२ बंगाल क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट पास झाला. नेपाळचे मुख्य प्रधान सर भीम समशेर जंगबहादूर यांचा मृत्यु.

५–९–३२ डॉ. मुंजे विलायतेहून आले. असेंब्लींत अधिवेशन सुरू.

६–९–३२ (१) खून अगर खुनाचा प्रयत्न यांस फांशी अगर जन्मठेप शिक्षा असावी. असें बिल बंगालच्या कौंसिलांत पास झालें. (२) दोन इटालियन एंजिनियरांनीं बिन धुराचा व बिन आवाजाचा तोफखाना सिद्ध केला. (३) लंडन येथें प्रसिद्ध कादंबरीकार सर गिलबर्ट पारकर यांचा मृत्यु.

९–९–३२ टोकिओ लीग इन्क्वायरीचा निकाल, मँचुरिया स्वतंत्र पण जपानी संरक्षण; चीनची नामधारी सत्ता. कलकत्ता येथें पं. शामसुंदर चक्रवर्ति यांचा मृत्यु.

१०–९–३२ श्रीमंत नानासाहेब कुरुंदवाडकर यांचा मृत्यु.

११–९–३२ मुंबईहून श्री. शिवेश्वरकर कु. लीलाबाई भट, कु. द्वारकाबाई भट, कु. कृष्णाबाई खरे व श्री. बाळ हे उच्च शिक्षणासाठीं परदेशास रवाना.

१२–९–३२ म. गांधी–मुख्यप्रधान पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला.

१४–९–३२ कार्नेल विश्वविद्यालयांतील डॉ. फरेडिक बेडेल यांचा 'डेफ–स्पीकर ' या यंत्राचा शोध.

१७–९–३२ रामानंद चतर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं बंगाल हिंदु परिषद भरली. श्री. विठ्ठलभाई पटेल अमेरिकेला दौऱ्यासाठीं लंडनहून निघाले

१९–९–३२ मुंबई फ्री प्रेसचा ६००० रु. चा जामीन जप्त.

२०–९–३२ महात्मा गांधींचें उपोषण सुरू

२२–९–३२ मुंबई कौंसिलनें कॉटन ट्रेड बिल पास केलें.

२३–९–३२ राष्ट्रसंघाच्या कौंसिलची बैठक सुरू. डी. व्हॅलेरा अध्यक्ष.

२४–९–३२ (१) पुणें येथें स्पृश्यास्पृश्यांच्या बाबतींत पुण्याचा करार. (२) दिल्लीस हिंदु महासभेचें अधिवेशन. श्री. न. चिं. केळकर अध्यक्ष– (३) आसाम-बंगाल रेल्वे युरोपियन क्लबावर अराजकांचा हल्ला.

२६–९–३२ ब्रि. सरकारची पुणें करारास मान्यता व महात्माजींचें उपोषण सुटलें.

२७–९–३२ रत्नागिरी बलवंत पत्राकडून २००० रु. चा जामीन.

२८–९–३२ नाशिक येथें श्री. भुलाभाई यांस शिक्षा. स्टेटसमेनचे संपादकांवर गोळ्या

२९–९–३२ अमृत बझार पत्रिकेचे संपादक तुषारकांत यांचा मृत्यु. (कलकत्ता) (२) पुणें येथें श्री. धुंडीराजपंत ठेंगडी यांचा मृत्यु.

३०–९–३२– पुणें–पर्वतीच्या देवळांतील सोन्याच्या मूर्तींची चोरी (२) सौ. कस्तुरबाई गांधी यांची सुटका.

आक्टोबर १९३२

१०–१०–३२ मालेगांवास हिंदु–मुसलमान तेढ व त्यामुळें दसरा वगैरे उत्सव बंद.

११–१०–३२ मद्रास–जगांतील सर्वांत वृद्ध गृहस्थ श्री. कुलंदाई स्वामीयार हे वयाच्या २४५ व्या वर्षी मरण पावले. (२) दंगे थांबविण्यासाठीं 'लाईट–मोटार पेट्रोल्स' ठेवण्याची मुंबई कौंसिलची मान्यता.

१२–१०–३२ '१९५०चें पुणें' या संस्थेची रीतसर स्थापना.

१४–१०–३२ सिमला येथें शीख मुसलमान मारामारी.

१६–१०–३२ लखनौ येथें मुसलमान परिषद व जिनांच्या १४ मागण्यांपैकीं, १३ पाहिजेत असें ठरलें.

१८–१०–३२ मुंबई कापूस व्यापाऱ्यांत तडजोड व इंग्लिश कंपन्यांवरील बहिष्कार उठला.

२०–१०–३२ (१) पुणें अ. वि. गृहाचे डॉ. एस्. व्ही. देवधर क्षयरोग चिकित्सक हे ऑस्ट्रियाहून आले. (२) फ्री प्रेस जर्नलची १०००० रु. ची जामिनकी जप्त करण्यांत आली.

२१–१०–३२ लंडन ओटावा करारास हाऊस ऑफ कॉमन्सची मान्यता.

२२–१० [illegible] जोहान्सबर्ग (आफ्रिका) येथें एक फार मोठी सोन्याची खाण सांपडली.

२५–१०–३२ एम्. एस्. एम्. रेल्वे कामगारांचा मद्रास येथें संप सुरू.

२९–१०–३२ क्रांतिकारकांस मदत केल्याबद्दल चितागांगचे हिंदु रसिहवाशांस ८०००० रुपये दण्ड.

३०–१०–३२ पाटणा–सर अलि इमाम यांचा मृत्यु.

३१–१०–३२ पाटणा कँप जेलमध्यें फेब्रुवारी ते सप्टेंबर पर्यंत २७ राजबंदी मेले.

नोव्हेंबर १९३२

१–११–३२ इटलीच्या बादशहांनीं सर अतुल चतर्जी यांना "ग्रँड ऑफिसर ऑफ दि क्राऊन ऑफ इटली" हा किताब दिला. थिऑसफिस्ट श्री. विनायक रामचंद्र सामंत यांचा पुणें येथें मृत्यु.

२–११–३२ (१) कॉं. पक्षाचे प्रतिनिधी परिषदेस नसल्यामुळें मजूर पक्षानें तिसऱ्या गोलमेज परिषदेंत भाग घेण्याचें नाकारिलें. (२) भोर, काश्मीर, कोल्हापूर व बडोदें ह्या संस्थानांनीं सरकारी देवळें धर्मशाळा वगैरे अस्पृश्यांना मोकळीं केलीं.

३–११–३२ प्रयाग येथें हिंदु, मुसलमान व शीख यांची ऐक्य परिषद सुरू.

४–११–३२ लंडन–ओटावा कराराचें ३रें वाचन ४१६ विरुद्ध ६८ मतानें पास झालें.

५–११–३२ डेक्कन मर्चंटस असोसिएशनतर्फे वर्गीकृत स्वदेशी प्रदर्शनाचा मुंबई येथें अनावरण समारंभ.

६–११–३२ ठाणें येथें कोंकण प्रांतीय पहिलें साहित्य संमेलन भरलें.

८–११–३२ पंढरपूर येथें शेतकी प्रदर्शन सुरू.

९–११–३२ (१) मि. फ्रँक्लिन रूझवेल्ट हे युनायटेट स्टेटसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. (२) मुंबई येथें पो. इ. गोळे यांचा मृत्यु

११–११–३२ गेल्या आठवड्यांत मुंबईहून ८२ लक्षांचें सोनें परदेशीं रवाना . आतांपर्यंत ९१,२६,०७२४६ रु. चें सोनें परदेशी रवाना झालें.

१७–११–३२ कै. लाला लजपतराय यांच्या पत्नी राधादेवी यांचा लाहोर येथें मृत्यु. (२) स्टेटसमनच्या संपादकावर गोळ्या झाडून खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सुनील चटर्जी यांस जन्मठेप. व श्री. रंजन यांस १० व. स. म. (३) तिसरी गोलमेज परिषद लंडन येथें सुरू झाली.

१८–११–३२ (१) पुणें येथें प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले कालवश झाले. (२) शेट गुलाबचंद हिराचंद मुंबई हायकोर्टांत निर्दोषी (३) राजशाही तुरुंगाचे सुपरिन्टेंडेंट मि. चार्लस यांजवर गोळ्या झाडण्यांत आल्या.

२०–११–३२ महाराष्ट्र १ लें कवि संमेलन पुणें येथें भरलें.

२३–११–३२ भा. स्ने. सं. मंडळातर्फे श्री. कृ. प्र. खाडीलकर यांचा ६१ वा वाढदिवस साजरा झाला.

२६–११–३२ गुरुवायूर प्रकरणाबाबत लोकमत घ्यावें असें म. गांधींनीं जाहीर केलें.

डिसेंबर १९३२

३–१२–३२ (१) डॉ. चोईतराम ह्यांस प्रयाग येथें अटक. (२) मुंबई कायदेमंडळांत जादा अधिकाराचें बिल १९ वि. ६८ मतांनीं पास झालें.

४–१२–३२ (१) पुणें येथें सनातन वैदिक धर्म परिषद पार पडली. (२) अहमदाबाद येथें गुजराथ जादा राजकीय परिषदेस आलेल्या ६० प्रतिनिधींना अटक.

५–१२–३२ पुणें येथें समाजभूषण बापूराव फुले यांचा मृत्यु.

७–१२–३२ असेंब्लीमध्यें ओटावा करार व वटहुकूम बिल पास झालें. (२) १८५७ सालच्या बंडांत कामगिरी केलेले कॅ. अँड्रयूज यांचा कलकत्ता येथें मृत्यू.

१०–१२–३२ पुणें येथें महाराष्ट्र हिंदु धर्म परिषद भरून अस्पृश्यांना देवालयप्रवेश मिळावा असा ठराव बहुमतानें पास झाला.

१५–१२–३२ अलाहाबाद ऐक्य परिषदेचें अधिवेशन भरलें.

२०–१२–३२ दे. भ. बाळुकाका कानिटकर यांस १ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा. (२) वे. विष्णुशास्त्री बापट यांचा मृत्यु.

२१–१२–३२ श्री. शंकरराव पुप्पाला व श्री. कालेवार वगैरे मंडळींची निर्दोषी म्हणून सुटका. (मुंबई)

२४-१२-३२ तिसरी गोलमेज परिषद संपली

२७–१२–३२ सरदार किबे यांचे अध्यक्षतेखालीं कोल्हापूर येथें १७ वें साहित्य संमेलन सुरूं झालें.

२८–१२–३२ (१) चित्रशाळा प्रेसची २००० रु. ची जामिनकी जप्त (२) ता.२४ रोजीं संपणाऱ्या आठवड्यांत मुंबईहून १६४९४५२९ रु.चें सोनें विदेशी गेलें. आतांपर्यंत १०३३४१५०५८ रु. किं. सोनें परदेशीं रवाना झालें. (३) मद्रासकडील पुढारी श्री. केलप्पन यांची महात्मा गांधींशीं मुलाखत व विचार विनियम. म. गांधींनीं ता, २ जानेवारी रोजीं त्यांचें सुरूं होणारें उपोषण बिन मुदत लांबणीवर टाकलें.

३१–१२–३२ पुणें नूतन मराठी विद्यालयाचा सुवर्ण महोत्सव सुरुं झाला.

हिंदुस्थानच्या इतिहासाची रूपरेषा

पंजाबांतील आर्य लोकांची माहिती आपणांस ऋग्वेदावरुन मिळते. ऋग्वेदाचा बिनचूक काल अजून ठरला नसला तरी तो इ. स. पूर्वी कांहीं हजार वर्षांपूर्वी असला पाहिजे यांत संशय नाहीं. ऋग्वेदावरून आपणांस अशी माहिती मिळते कीं, आर्य लोक सिंधूच्या काठीं आले,तेथें ते टोळचा करून राहिले. मधून मधून त्या टोळचांच्या आपआपसांत लढाया होत. कधीं या सर्व टोळचा एकत्र जमून मूळच्या काळचा रहिवाशांचा पाडाव करीत. बाप हाच कुटुंबांतील मुख्य असे. टोळीचा राजा हा त्या टोळींतील कुटुंबांचा मुख्य व धार्मिक अधिकारी असे. टोळीचा राजा लोकांकडून निवडला जात असे. स्त्रियांचा दर्जा फार मोठा असे. त्या शिकलेल्या असत; ऋग्वेदांतील कांहीं सुंदर ऋचा बायकांनीं केलेल्या आहेत. लग्न हें अत्यंत पवित्र मानलें जात असे. सती जाण्याची चाल नव्हती. ऋग्वेदांत वर्णन केलेल्या आर्यांना जवळजवळ सर्व धातु माहित होते; शेकडों धंदे त्यांना माहीत होते. ते युद्धासाठीं रथ वापरीत. ते नांगरानें जमिनीची लागवड करीत. गाय ही त्यांची सर्वांत मोठी संपत्ति होती.निष्क नांवाचें सोन्याचें नाणें ते वापरीत.त्यांना जहाजें बांधता येत असत.ते मांसाहारी होते, व "सोम" नांवाच्या वनस्पतीपासून बनविलेली दारूही ते पीत असत. हे आर्य लोक पाठीमागून आर्यांच्या दुसऱ्या टोळचा येऊं लागल्यामुळें पूर्वेकडे जाऊं लागले.व वाटेंत भेटतील त्या मूळच्या रहिवाशांना पराजित करून त्यांना गुलाम बनवून ते उत्तर हिंदुस्थानांत पूर्वेकडे पसरले. इंडो–आर्यन किंवा हिंदु लोकांनीं सबंध पंजाब काबीज केल्यावर ते हळूहळू पूर्वेकडे पसरले व त्यांनीं गंगा व यमुना या नद्यांच्या कांठीं वस्ती केली. कांहीं शतकांनंतर बिहार प्रांताच्या उत्तर भागापर्यंतचा सर्व उत्तर हिंदुस्थान हिंदूंनीं व्यापून टाकला; येथेंच हिंदूंचीं प्रबळ राज्यें जन्माला आलीं. आणि संस्कृति व ज्ञान यांची वाढ फारच झपाटचानें झाली. प्रत्येक राजास स्वतःचें कोर्ट व स्वतःची राजधानी होती. खेडचांतील लोक शतकीवर उदारनिर्वाह करीत किंवा विणकाम, सुतार काम, धातु काम, वगैरेंवर पोट भरीत. शहरांतून मुलांच्या शिक्षणासाठीं शाळा होत्या. शास्त्रीमंडळी (Priests) जुने धार्मिक आचार विचार पुढें चालवीत व शास्त्रांत नवेनवे शोध लावीत. लढाऊ वृत्तीचे लोक राज्यसंरक्षणाचें काम करीत. थोडक्यांत म्हणजे प्रत्येक राज्य हें आपापल्या परीनें अगदीं स्वतंत्र होतें. या सर्व लहान लहान राज्यांचा धर्म, त्यांची भाषा व त्यांचें वाङ्मय एकच असल्यामुळें तीं एकमेकांशीं निगडित झालीं होतीं. या काळांत उत्तर हिंदुस्थान कोणा एकाच राज्याच्या ताब्यांत कधींच नव्हता. सर्व उत्तर हिंदुस्थानभर लहानलहान राज्यें विखुरलेलीं होतीं. कधीं कधीं त्यांच्यांत तंटे बखेडे होत असत. पण बहुधा त्यांच्यांत सलोख्याची वृत्तिच आढळून येई. एका राज्यांतील विद्वानांबद्दल , शूर योध्यांबद्दल दुसऱ्या राज्यांतील लोकांस आदर वाटत असे. अशा रीतीनें हीं लहान लहान राज्यें मित्रभावानें नांदत होतीं. त्यांना आपल्या गोतावळचाखेरीज बाहेरच्या जगाची फारच थोडी माहिती असे. या लहान लहान राज्यांत पांच राज्यें महत्त्वाचीं होती. कुरु किंवा भरत हे गंगा नदीच्या वरच्या प्रवाहाच्या कांठीं रहात असत. त्यांची राजधानी हस्तिनापूर ही सोमवंशी (Lunar race) राजांची अनेक वर्षें राजधानी होती. यांच्या दक्षिणेस पांचाल राजे राज्य करीत होते. यांची राजधानी सध्याच्या कनोजपासून अगदीं थोडचा अंतरावर होती. या दोन राज्यांच्या पूर्वेस महापराक्रमी कोसल राज्य होतें. याची राजधानी अयोध्या ही होती. सूर्यवंशी राजांची राजधानी जी अयोध्या ती हीच. याच्याही पूर्वेस विदेहांचें राज्य होतें व त्यांची राजधानी मिथिला ही होती.पांचवें मोठें राज्य म्हणजे काशीचें राज्य. त्याची राजधानी काशी येथें होती.

भरत , पांचाल, कोसल व विदेह या राज्यांची हकीकत हिंदुस्थानच्या दोन इतिहासरूप महाकाव्यांत दिलेली आढळते. महाभारतांत भरत व पांचाल राजांच्या

पराक्रमाचीं वर्णनें आहेत. महा–भारतांतील कथा थोडक्यांत अशी.–भरताचा राजा पंडु हा वारल्यावर त्याचा अंध भाऊ धृतराष्ट्र हा गादीवर बसला. त्यानें स्वतःच्या शंभर पुत्रांबरोबर पंडूच्या पांच पुत्रांचेंही संगोपन केलें. पंडूचा सर्वांत थोरला मुलगा युधिष्टिर हा अतिशय धर्मभीरु व भोळा होता. दुसरा मुलगा भीम हा बलिष्ट व आडदांड होता. अर्जुन धनुर्विद्येंत प्रवीण होता. त्याखालचीं दोन मुलें नकुल व सहदेव हीं जुळीं भांवडें होतीं. धृतराष्ट्राचा वडील मुलगा दुर्योधन हा मत्सरी होता. तो आपल्या चुलत भावांचा द्वेष करी. सर्व राजपुत्रांना युद्धाचें शिक्षण देण्यांत आलें होतें. त्यानंतर एक मोठा सामना भरविण्यांत आला त्यांत अर्जुनानें धनुर्विद्येंत सर्वांवर मात केली. दुर्योधनाला अर्थातच हें सहन झालें नाहीं. त्यानें त्या पांचही भावांना ठार मारण्याचा घाट घातला. त्यांना दूर धाडण्यांत आलें व मग ते ज्या घरांत रहात होते त्या घराला आग लावण्यांत आली. परंतु त्यांतून पांडव सुरक्षितपणें बाहेर पडले व कांहीं दिवस त्यांना गुप्तपणें हिंडत राहावें लागलें. दरम्यान पांचाल देशाचा राजा द्रुपद यानें आपल्या मुलीचें स्वयंवर आरंभिलें. परंतु द्रुपदानें लावलेला पण जो जिंकील त्यालाच राजकन्येच्या पाणिग्रहणाचा अधिकार होता. पांडव स्वयंवराच्या जागीं गुप्त वेशानें आले व अर्जुनानें धनुर्विद्येंत पारंगतता दाखवून पण जिंकला. राजकन्येनें अर्जुनाला वरलें. पण आर्जुनाची द्रौपदी पांचही पांडवांची धर्मपत्नी बनली. बहुपतित्वाची ही चाल ह्या राज्यांत मूळ तिबेटांतून आली असावी असें विद्वानांचें मत आहे. पांडवांना द्रुपद राजाचें पाठबळ मिळाल्यामुळें त्यांनीं आपला गुप्त वेश टाकून दिला व उघडपणें राज्याचा वांटा मागितला. त्यामुळें भरत राज्याची विभागणी झाली. दुर्योधनानें स्वतःकडे हस्तिनापूर व गंगेच्या कांठचा मुलूख ठेवून पांडवांना यमुनेच्या कांठचा जंगलपट्टा दिला. सध्याच्या दिल्लीजवळ पांडवांनीं स्वतःची राजधानी इंद्रप्रस्थ ही बांधली. नंतर दुर्योधनानें धर्मराजास द्यूत खेळण्यास आव्हान दिलें व कपटद्यूत खेळून धर्मराजापासून सर्व राज्य हिरावून घेतलें. व पांडवांना बारा वर्षांच्या वनवासाचीं अट घातली. वनवासाचीं बारा वर्षें संपलीं. त्यानंतर दुर्योधनाच्या कराराप्रमाणें पांडवांनीं आणखी एक वर्ष विराट राज्यांत अज्ञातवासांत घालविलें व नंतर प्रकट होऊन आपलें राज्य मागितलें. दुर्योधनानें पांडवांचा राज्याचा हक्क नाकबूल केला. अर्थात पांडवांना युद्धाखेरीज दुसरा उपाय उरला नाहीं. या युद्धाचें वर्णन हाच 'महाभारत' महाकाव्याचा मुख्य विषय आहे. गुजराथेंतील द्वारकेच्या राजा कृष्ण हा पांडवांचा मित्र होता. कृष्णाची बहिण सुभद्रा हिचें अर्जुनाशीं लग्न लागलें होतें. कृष्ण अर्जुनाच्या रथाचा सारथी बनला या युद्धांत धृतराष्ट्राचे मुलगे मारले गेले. व पांडव विजयी झाले; व युधिष्ठिरानें पुढे कांहीं दिवस राज्य केल्यावर अर्जुनाच्या नातवास गादीवर बसवून पांडव हिमालयावर गेले. महाभारतांतील या गोष्टींत ऐतिहासिक सत्य कमीजास्त असलें तरी या महाकाव्यावरून तेव्हांच्या सामाजिक चालिरीती व उत्तर हिंदुस्थानची तेव्हांची राजकीय परिस्थिति ध्यानांत येते. रामायण हें दुसरें महाकाव्य होय. यांतील कथानक महाभारतांतील कथानकापूर्वी घडले आहे. दशरथ नांवाच्या कोसल देशाच्या राजाला चार मुलगे होते. सर्वांत मोठा मुलगा राम हा या महाकाव्याचा नायक होय. दुसरा मुलगा भरत; आणि लक्ष्मण व शत्रुघ्न हे जुळे भाऊ होते. विदेह देशाचा राजा जनक याची कन्या सीता ही या महाकाव्याची नायिका होय. सीतेच्या स्वयंवराच्या वेळीं जनकानें एक पण लावला. जनक राजाजवळ एक अवाढव्य धनुष्य होतें. स्वयंवरासाठीं जमलेल्या राजांपैकीं जो कोणी तें धनुष्य वांकवील त्याच्याशींच सीता लग्न करील असा त्याचा पण होता. रामानें तें धनुष्य वांकवून मोडलें. व अशा रीतीनें पण जिंकून सीतेशीं विवाह केला. दशरथाच्या मनांत रामास राज्याचा वारस करावें असें होतें. परंतु भरताची आई कैकेयी हिच्या मत्सरी स्वभावाला हें न खपून तिनें दशरथाचें मन वळवून भरताला वारस ठरवून घेतलें. व रामास वनवासास धाडलें. रामाबरोबर त्याची बायको सीता व भाऊ लक्ष्मण हींहीं वनवासास गेलीं. कांहीं दिवस ते गोदावरीच्या कांठीं राहिले. तेथें लंकेचा राजा रावण याची बहिण शूर्पणखा त्यांना भेटली व राम किंवा लक्ष्मण या दोहोंपैकीं कोणाशीं तरी लग्न करण्याची इच्छा तिनें दर्शविली. रामलक्ष्मणांनीं तिचें नाक कापून तिला हाकलून दिलें. तिनें आपला भाऊ रावण याकडे जाऊन गाऱ्हाणें गाइलें. रावणानें रागावून सीतेला फसवून तिला पळवून लंकेंत नेलें. रामलक्ष्मणांना हें

कळतांच त्यांनीं रावणाशीं युद्ध करण्याचें ठरविलें. ते दक्षिण हिंदुस्थानाकडे निघाले. दरम्यान सुग्रीव नांवाच्या राजाला त्याचा भाऊ वाली यानें पदच्युत केलें होतें व त्याची गादी बळकावली होती. राम व लक्ष्मण यांनीं सुग्रीवाला मदत करून वालीस ठार मारून त्याचें राज्य त्यास मिळवून दिलें. नंतर सुग्रीवानें आपलें सैन्य रामलक्ष्मणाच्या मदतीसाठीं तयार ठेवलें व सर्वजण लंकेकडे चालून गेले. रामानें हिंदुस्थानांतून लंकेंत जाण्यासाठीं एक मोठा पूल बांधला, आपलें सैन्य त्यावरून नेलें व राजधानीस वेढा दिला. मोठें युद्ध झालें व त्यांत रावण व त्याच्या पक्षाकडील सर्व योद्धे मारले गेले. रामानें रावणाच्या भावास लंकेच्या गादीवर बसविलें व सीतेस घेऊन तो हिंदुस्थानांत आला. तोंपर्यंत त्याच्या वनवासाची मुदत संपली असल्याकारणानें त्यानें अयोध्येंत प्रवेश केला. वरील दोन कथा या हिंदु लोकांच्या अत्यंत प्राचीन अशा इतिहासपर कथा आहेत. हें मत आतां सर्वग्राह्यच झालेलें आहे.

जातिव्यवस्था:—— वेदकालीं जी समाजव्यवस्था होती त्यांत पुढें पुढें पुष्कळच फरक पडला. धार्मिक विधि करणाऱ्या व शास्त्राभ्यास करणाऱ्या लोकांचा एक वेगळा गट झाला व त्यांना 'ब्राम्हण' ही संज्ञा मिळाली. राजे व योद्धे यांचाही एक स्वतंत्र वर्ग झाला. त्यांना 'क्षत्रिय' म्हणूं लागले. व्यापारधंद्यांत गुंतलेल्या लोकांच्या वर्गास 'वैश्य ' हें नांव मिळालें. व मूळच्या रहिवाशांना 'शूद्र' हें नांव पडलें. आर्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठीं शाळा होत्या. शूद्र लोकांना वेदाभ्यासाची आडकाठी होती. तसेंच त्यांना आर्य लोकांचे धार्मिक विधीही करतां येत नसत.

चार वेद:—हिंदु लोक वेद चार आहेत असें मानतात. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद व अथर्ववेद या चार वेदांवर विद्वानांनीं ज्या टीका लिहिल्या त्या सर्वांना 'ब्राम्हणें' म्हणतात. त्याचप्रमाणें प्रत्येक वेदांत तपश्चर्येसाठीं अरण्यांत जाणाऱ्या तापस्यांसाठीं जो भाग लिहिलेला आढळतो त्यास आरण्यकें म्हणतात. या आरण्यकांतून उपनिषदें या नांवानें प्रसिद्ध असलेली चराचर सृष्टि व्यापणाऱ्या परमात्म्याच्या स्वरूपाविषयींची माहिती आढळते. चार वेद, त्यांचीं ब्राम्हणें, आरण्यकें व उपनिषदें या सर्वांना "श्रुति" असें म्हणतात. ज्योतिषशास्त्राची प्रगति पुष्कळच झाली होती. धार्मिक विधि करण्यापूर्वीं , ती वेळ शुभदायक आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं या ज्योतिषशास्त्राचा फार उपयोग होत असे. मंत्रांचे उच्चार नीट व्हावयास हवे. अर्थातच व्याकरण व छंदःशास्त्र या शास्त्रांतही आर्य लोकांनीं पुष्कळ प्रगति केली होती. भूमितीचाही अभ्यास बराच झालेला होता. तर्कशास्त्र व नीतिशास्त्र हींही पूर्ण अवगत होतीं. आणि दशांश पद्धतिही त्यांना माहित असल्यामुळें त्यांच्या अंकगणितास शास्त्राचें रूप आलेलें होतें. हिंदूंचे धार्मिक विधि व आचारविचार यांमुळें शास्त्रप्रगतीस पुष्कळच मदत होत असे. तसेंच त्या वेळचीं बहुतेक शास्त्रें थोडया फार संबंधानें धर्माशीं निगडित झालीं होतीं. यापुढें धर्मशास्त्रविषयक व परमार्थविषयक कल्पनांची जी वाढ झाली तिचें सविस्तर वर्णन 'आर्यसंस्कृति' या प्रकरणांत दिलें आहे. यानंतरच्या कांहीं काळांत हिंदु लोक उत्तर हिंदुस्थानांतच न राहतां सबंध हिंदुस्थानभर पसरले. दक्षिण हिंदुस्थानांत त्यावेळीं जे लोक होते त्यांची संस्कृति अगदीं भिन्न होती. हिंदूंतील कांहीं विद्वानांनीं व धर्मोपदेशकांनीं दक्षिण हिंदुस्थानांत जाऊन तेथील लोकांस उपदेश करण्यास सुरुवात केली. इ. स. पूर्वीं ६व्या शतकांत सबंध हिंदुस्थानभर हिंदु धर्माचेंच प्राबल्य होतें; हिंदु संस्कृति दक्षिण हिंदुस्थानांत कशी पसरली हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. दक्षिण हिंदुस्थानांतील राजांशीं युद्ध करून त्यांना काबीज केलें असें नव्हे. दक्षिणेंतील लोकांनीं आपली भाषा, आपली संस्कृति वगैरे कांहींच सोडलें नाहीं. फक्त आर्योपदेशकांच्या शिकवणुकीमुळें त्यांनीं हिंदु धर्म स्वीकारला.

बुद्ध–काल

गौतम बुद्ध मगधांत बिंबिसार राजाच्या कारकीर्दींत सुमारें इ. स. पूर्वीं ५२० या काळीं धर्मप्रचार करीत होता. हाच बुद्ध धर्माचा संस्थापक होय. गौतम बुद्धानंतरच्या दोनशें वर्षांत बुद्धधर्म उत्तर हिंदुस्थानांत पसरला.ख्रिस्ती शकापूर्वीं ३ऱ्या शतकाच्या सुमारास मगध देशाचा राजा अशोक हा बुद्ध धर्माचा पुरस्कर्ता बनला. त्यानें ६४ हजार बुद्ध भिक्षूंना आश्रय दिला असें म्हणतात. त्यानें अनेक देवळें उभारलीं. त्याच्या साम्राज्यास मठभूमि असें नांव आहे. त्यानें पांच मार्गांनीं धर्मप्रसार केला. एक धार्मिक मंत्रिमंडळ नेमून लोकांत विश्वास निर्माण केला. दगडावर धर्मप्रसारार्थ राजाज्ञा खोदविल्या; धर्मांत मालिन्य येऊं नये म्हणून एक सरकारी खातें

निर्माण केलें. धर्मप्रसारासाठीं चोहीकडे धर्मोपदेशक पाठविले. व अधिकारी नेमून धर्मविषयक वाङमय जमविलें. अशोकाच्या या प्रयत्नांमुळें बुद्ध धर्म आशियाच्या दक्षिण भागांत पसरला. असें म्हणतात कीं, अशोकानें ६४००० मिनार उभारले. अशोकानें प्रजेच्या हिताकडे फार लक्ष दिलें. लांब सडका तयार केल्या. जागोजाग विहिरी खोदल्या व दुतर्फा झाडें लाविलीं. त्यानें सीलोनपर्यंतच्या आपल्या सर्व साम्राज्यांत सर्वांना औषधपाण्याची सोय केली. व अधिकारी नेमून स्त्रिया व मुलें यांच्या शिक्षणासाठीं बरेच प्रयत्न केले. बुद्ध धर्म प्रसारासाठीं त्यानें अगदीं रानटी प्रदेशांतहि आपले धर्मोपदेशक पाठविले. बुद्ध धर्म इतरांस अंगीकारावयास लावावयाचा तो तरवारीच्या जोरावर नव्हे तर बुद्धीला त्या धर्माचीं तत्त्वें पटवून देऊन लावावयाचा असें त्याचें धर्मप्रसाराचें धोरण होतें. बुद्ध धर्माचें धर्म प्रसारांतील हें वैशिष्टय अजूनहि कायम टिकलें आहे. अशोकानें नुसताच धर्मप्रसार केला असें नव्हे तर त्यानें बुद्धधर्माबद्दल शुद्ध मत कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यानें पाली भाषेंत बुद्ध धर्मतत्त्वांचा एक संग्रह केला आहे. तो आज २ हजार वर्षें बुद्धधर्मीयांना प्रमाणभूत होऊन बसला आहे. बुद्ध भिक्षू मंडळाच्या टोलेजंग सभा कुशान राजा कनिष्क याच्या कारकीर्दींत काश्मीर येथें भरल्या होत्या. या सभांत ५०० सभासदांनीं भाग घेतला होता. या मंडळानें बुद्धधर्मावर तीन टीका लिहिल्या.

बुद्धांचें धार्मिक वाङमय :—बुद्धाच्या मृत्यूनंतर थोडया शतकांनीं बुद्धाची शिकवण पाठांतर पद्धतीनें सीलोनपर्यंत गेली व तेथें इ. स. पूर्वी ८८ व्या वर्षी बुद्धाच्या सर्व तत्त्वांचा पाली भाषेंत ग्रंथरूपानें संग्रह करण्यांत आला. हें सर्व वाङमय तीन पुस्तकांत सांठविलेलें आहे. त्यांपैकीं पहिल्या पुस्तकांत बुद्धाच्या तोंडचीं वाक्यें दिलीं आहेत. दुसऱ्यांत बुद्ध भिक्षूंनीं आचरण्यांत आणावयाचीं कडक बंधनें सांगितलेलीं आहेत. आणि तिसऱ्यांत बुद्धाचें तत्त्वज्ञान विशद करून सांगितलें आहे. पाली भाषेंतील हें वाङमय ही दक्षिणेंतील बुद्ध धर्मीयांची अमूल्य ठेव आहे. उत्तर हिंदुस्थान, जपान, चीन, नेपाळ, तिबेट येथील बुद्ध धर्मीयांनीं बुद्धाची शिकवण निरनिराळ्या भाषांत जतन करून ठेविली आहे.

बुद्धाचीं तत्त्वें:—बुद्ध धर्माचीं तत्त्वें फक्त आर्य हिंदूंसाठीं नाहींत. तीं सर्व देशांतील सर्व लोकांसाठीं आहेत. बुद्धाचें "चार सत्यें" हें तत्त्व असें आहे कीं, आयुष्य हें हालअपेष्टांनीं भरलेलें आहे. पुनर्जन्म हें वासनेचें फळ आहे व वासनेचा पाश सुटला तर पुनर्जन्माच्या फेऱ्यांतून मुक्ति मिळते. बुद्धाची दुसरी एक शिकवण अशी आहे कीं, ईश्वरावर अढळ श्रद्धा, सचोटीची वागणूक, सात्त्विक आकांक्षा, शुद्ध रहाणी व शुद्ध विचार यांमुळेंही मुक्ति (Formal deliverence) मिळते. आत्यंतिक पवित्रपणाची कल्पना हीच बुद्धाची निर्वाण पदाची कल्पना होय. बुद्धाचीं बरींचशीं तत्त्वें हिंदु तत्त्वज्ञानांत आढळतात.

बुद्ध धर्म व वैदिक धर्मः—बुद्ध धर्म व वैदिक धर्म हे दोनही धर्म जवळजवळ हजार वर्षांहून जास्त काळ (इ. स. पू. २५०—इ. स. ८००) सारखेच प्रमाणशील होते. सध्यांचा हिंदु धर्म हें या दोन धर्मांचें मिश्रण आहे. अलेक्झांडरच्या काळापासून (इ. स. पू. ३००) ब्राम्हण धर्म अव्याहतपणें चालला आहे याला भरपूर पुरावे आहेत. अलेक्झांडरच्या स्वारीचें वर्णन करणारे इतिहासकार व त्यांचें काम पुढें चालविणारा मेगॅस्थेनिस याच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, अशोकानंतरच्या काळांत हिंदुस्थानांत जुन्या रूढ धर्माचेंच प्राबल्य होतें. शिलालेख, पुराण, कथा, संस्कृत वाङमय व नाटकें यांवरून पुढील सहा शतकांतही (इ. स. पू. २५०—इ. स. ४००) लोकांवर वैदिक धर्माचा पगडा होता असें अनुमान काढतां येतें. यानंतरच्या काळांतील स्थिति चिनी यात्रेकरू व प्रवासी यांनीं लिहून ठेवलेल्या हकीगतींवरून चांगली ध्यानांत येते. फा हिएन यानें इ. स. ३९९—४१३ या काळांत अफगाणिस्थानांतून बंगालच्या उपसागरापर्यंत प्रवास केला. त्याला ब्राम्हण उपाध्यायास बुद्ध भिक्षूंइतका मान सगळीकडे मिळतो असें आढळून आलें. तसेंच बुद्ध देवळांशेजारींच हिंदू देवांचीं मंदिरेंही त्याच्या दृष्टीस पडलीं. मध्य आशियाच्या मार्गानें हुएनत्संग हा चीनमधून हिंदुस्थानांत आला होता. त्यानें लिहून ठेवलेल्या हकीकतीवरून या दोन्हीं धर्मांची ७व्या शतकांतील स्थिति ध्यानांत येते. त्यानें इ. स. ६२९—इ. स. ६४५ पर्यंत हिंदुस्थानांत प्रवास केला. त्या काळीं आपलीं तत्त्वें लोकांत रूढ व्हावीं असा दोन्ही धर्मांचा आटोकाट प्रयत्न चालू होता. असें त्यानें लिहून ठेविलें आहे. तरीही इतर धर्म मागें पडून वैदिक धर्मच रूढ होऊं लागला होता. उत्तर हिंदुस्थानांत बुद्ध स्तूपांजवळ शंकराचीं देव-

ळेंही आढळून येत. अफगाणिस्थानांतील दहा राज्यांवर एक बुद्ध राजाच राज्य करीत होता. काश्मीरांतहि राजा व बहुतेक प्रजा बुद्ध धर्मीच होती.

बुद्ध धर्माचा ऱ्हास :—यानंतर वैदिक धर्म बलिष्ठ झाला. यास शंकराचार्य व कुमारिलभट्ट यांचे प्रयत्न कारणीभूत झाले. अर्थात बुद्ध धर्माचा हळूहळू ऱ्हास होऊं लागला.व हिंदु धर्माचा उदय झाला. ११ व्या शतकांत फक्त काश्मीर व ओरिसा येथील संस्थानें मात्र बुद्ध धर्मास चिकटून राहिलीं होतीं. मुसलमानांच्या आगमनापूर्वी प्रचलित धर्म या दृष्टीनें बुद्ध धर्म हा हिंदुस्थानांतून नष्ट झाला होता. परंतु हिंदुस्थानाबाहेर त्या धर्माची अतिशय भरभराट झाली. जगाच्या लोकसंख्येच्या शेकडा ३५ इतकी लोकसंख्या अजून आपणांस बुद्ध धर्मानुयायी म्हणविते.

हिंदु धर्मांचा काळ

युरोपियन लोकांना हिंदुस्थानसंबंधीं माहिती असलेली पहिली गोष्ट म्हणजे अलेक्झांडरची स्वारी होय? हिंदुस्थान व एशिया मायनर यांत फार प्राचीन काळापासून व्यापार चालू होता. कथील व इतर कांहीं हिंदुस्थानांतील वस्तूंचीं संस्कृत नांवें होमरला माहित होतीं. बायबलमध्यें उल्लेखिलेल्या हिंदी वस्तूंची एक लांबलचक यादी तयार झाली आहे. हिंदुस्थानविषयीं लिहिणारा पहिला ग्रीक इतिहासकार Hecataeus Miletus हा होय. (५४९–४८६इ. स. पू.) याला सिंधूच्या पूर्वेकडील हिंदुस्थानची माहिती नव्हती. इ. स. पू. ३२७ त शिकंदराबरोबर जे इतिहासकार हिंदुस्थानांत आले त्यांच्यामार्फत सिंधू नदीच्या पूर्वेकडील हिंदुस्थानची युरोपला माहिती झाली. त्यानंतर लवकरच बंगालमधील ग्रीसचा वकील मॅगेस्थेनीस यानें हिंदुस्थानांतील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें.

अलेक्झांडरची स्वारी :—इ. स. पू. ३२७ या वर्षी शिकंदरानें हिंदुस्थानांत पाय ठेवला . तो सिंधू नदी उतरून अलिकडे आला व झलम नदीवर तेथील राजा पोरस यानें त्याच्याशीं फार मोठें युद्ध केलें. त्यांत पोरसचा पराभव झाला तरी त्याचें शौर्य पाहून शिकंदरनें त्याचें राज्य त्यास परत दिलें. व त्याच्याशीं मैत्री संपादून तो अग्नेयीकडे निघाला. पण सैनिक पुढें येण्यास कबूल न झाल्यामुळें तो परत फिरला. वाळवंटांत तहानेनें त्याचें सैन्य फार व्याकूळ झालें. शेवटीं शिकंदर इराणांत परत गेला. लढायांच्या या दोन वर्षांच्या धामधुमींत शिकंदरानें पंजाब व सिंध यांमधील मुलूख जिंकले नाहींत. त्यानें अनेक राजांशीं तह केले. नवीन शहरें बसविलीं व किल्ले बांधले. शिकंदरानें परत जातांना हिमालयाच्या पायथ्यापासून तों सिंधूच्या मुखापर्यंत आपल्या सैन्याच्या तुकड्या ठिकठिकाणीं ठेवून दिल्या होत्या. त्यावरून हिंदुस्थानांत परत येण्याचा त्याचा विचार होता हें स्पष्टपणें दिसतें.

शिकंदरच्या छावणींत जे अनेक धाडसी हिंदी तरुण जमा झाले त्यांत चंद्रगुप्त मौर्य फार प्रसिद्धीस आला. पण तेथील ग्रीक अधिकाऱ्याचा त्यानें अपमान केल्यामुळें त्यास तेथून पळून जावें लागलें. त्यानें अनुयायी जमवून एक राज्य स्थापन केलें व हलके हलके तें वाढवून ग्रीक लोकांना त्याचें स्वामित्व कबूल करावयास लाविलें. शिकंदराच्या मृत्यूनंतर सेल्युकसनें चंद्रगुप्ताशीं लढाई केली व त्याच्याशीं तह करण्याचें ठरवून आपली मुलगी चंप्रद्रगुप्तास दिली; तसेंच मॅगॅस्थेनीस नांवाचा आपला वकील चंद्रगुप्ताच्या दरबारीं ठेवला. चंद्रगुप्त घराण्यानें (अशोक याच राजघराण्यांतील होता.) उत्तर हिंदुस्थानांत पूर्वेकडे धर्मसंस्थापनेचीं बीजें रोंवलीं व सेल्यूसीड (Seleucid) साम्राज्यानें उत्तर हिंदुस्थानांत पश्चिमेस हिंदी कला व शास्त्रें यांवर बराच परिणाम घडवून आणला. हिंदुस्थानांतील राजांमध्यें चंद्रगुप्त हा फार मोठा सम्राट होऊन गेला.त्यानें ग्रीक लोकांपासून जिंकून परत मिळविलेल्या मुलुखाचा चांगला बंदोबस्त ठेवला. त्याच्या सैन्यांत ६लक्ष पायदळ ३०हजार घोडेस्वार, ३६००० हत्तीवरून लढणारे लोक व २४००० रथांतून लढणारे सैनिक होते. व या सर्व सैन्याची व्यवस्था अगदीं पद्धतशीर होती. मॅगॅस्थेनिसनें लिहून ठेवलेल्या हकीकतीमुळें आपल्याला अकबराच्या कारकीर्दीपर्यंतच्या कोणत्याही राजापेक्षां चंद्रगुप्ताची माहिती अधिक विस्तृत प्रमाणांत मिळूं शकते. इ. स. पूर्वी २९७ या वर्षी त्याच्या मागून बिंदुसार गादीवर आला. त्यानें आपलें राज्य मद्रासपर्यंत वाढविलें होतें असें म्हणतात. इ. स. पू. २७२ त अशोक गादीवर आला. अशोकानें आपलें साम्राज्य

अफगाणिस्थानचा बहुतेक भाग, बलुचिस्थानचा बराचसा भाग, सिंध, काश्मीर, नेपाळ, गंगेच्या मुखापर्यंतचा बंगाल व पालार नदीपर्यंतचा दक्षिण हिंदुस्थानचा मुलूख इतकें लांबवर पसरविलें. अशोकानंतर साम्राज्यास उतरती कळा लागली. या वंशांतील शेवटचा राजा बृहद्रथ याचा त्याच्या सेनापतीनें इ. स. पू. १८४त खून केला व त्यानें शुंग राजवंशाची स्थापना केली.

शुंग, कण्व व आंध्र राजवंशः---

इ. स. पू. २ऱ्या शतकांत वायव्य हिंदुस्थानवर ३रा अँटिओकास डेमेट्रिअस, युक्रेटिडस व मिनँडर यांनीं स्वाऱ्या करून थोडा मुलूखही जिंकला. पुष्पमित्र शुंगानें मिनँडरबरोबर युद्ध करून त्याला गंगेच्या खोऱ्यांतून हांकलून दिलें. व उत्तर हिंदुस्थानवर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्यानें बुद्ध धर्माविरुद्ध प्रयत्न करून वैदिक धर्माचा पुरस्कार केला. यासाठीं त्याची कारकीर्द प्रसिद्ध आहे. शुंग घराणें ११२ वर्षें टिकलें. त्यानंतर कण्व घराणें प्रस्थापित झालें. तें इ. स. पू. २७ पर्यंत म्हणजे एकंदर ४५ वर्षें टिकलें. त्यानंतर आंध्र घराण्यांतील एका अप्रसिद्ध राजानें त्याचा पाडाव केला. इ. स. १००च्या सुमारास उत्तरेकडून तीन टोळ्या आल्या व त्यांनीं स्वाऱ्या करून माळवा, गुजराथ व काठेवाड येथें वस्ती केली. या टोळ्यांचे मुख्य स्वतःस 'क्षत्रप' म्हणवून घेत. चातुर्वर्ण्यावर यांचा विश्वास नसल्यामुळें हिंदु लोक यांचा द्वेष करीत. या दोहोंत बराच काळ झगडा चालू होता. शेवटीं इ. स. २३६ च्या सुमारास ४६० वर्षें टिकलेलें आंध्र घराणें नष्ट झालें. तें कोणत्या परिस्थितींत नष्ट झालें हें कळण्यास कांहीं पुरावा नाहीं. आंध्र घराण्याऐवजीं पश्चिम हिंदुस्थानांत क्षत्रप घराणें सुरूं झालें. या घराण्यांतील शेवटच्या राजाचा चंद्रगुप्त विक्रमादित्यानें ४थ्या शतकांत पराभव केला. मध्यंतरीं यूएची (Yue-chi) लोकांनीं वायव्य हिंदुस्थानवर स्वारी करण्याकरितां हिंदुकुश ओलांडला. या लोकांची संघटना करून कॅडफिसेस (Kadphises) यानें कुशान राजवंशाची स्थापना केली. त्यानें काबूल दरी जिंकून तेथें ग्रीक लोकांच्या सत्तावशेषाचा विध्वंस केला. याच्या मागच्या राजांनीं काशीपर्यंतचा मुलूख जिंकून वायव्य सरहद्दीवरील दिग्विजय पुरा केला. या यू एचि लोकांच्या स्वाऱ्यांमुळें उत्तरेंतील व्यापारी रस्त्यांनीं रोमन साम्राज्याशीं व्यापार करण्याचा मार्ग खुला झाला. कुशान राजवंशांत सर्वांत प्रख्यात राजा कनिष्क हा होय. पण हा राजा कोणत्या कालांत राज्य करीत होता हा एक वादग्रस्त मुद्दा आहे. पुरुषपूर (हल्लींचें पेशावर) या त्याच्या राजधानींतून त्यानें आपल्या वायव्येकडील मुलुखाचें संरक्षण केलें एवढेंच नव्हे तर काश्मीर जिंकलें व तिकडे पाटलीपुत्रावर स्वारी केली. त्यानें पार्थिअन लोकांशीं युद्ध चालविलें. व तघदुंबश पामीर (Tagh-dumbash Pamir) च्या अवघड वाटांनीं सैन्य नेऊन काशगर, यार्कंद व खोतान येथें दिग्विजय केले. लढायांमुळेंच केवळ हा इतिहासांत चमकतो असें नाहीं; अशोकाच्या खालोखाल यानें बुद्ध धर्माची जोपासना केली. काश्मीर येथील बुद्ध भिक्षू मंडळ स्थापिलें. मध्य व दक्षिण हिंदुस्थानांत येथील आंध्र राजवंश व उत्तरेकडील कुशान वंश हे दोनही वंश जवळजवळ एकाच वेळीं नष्ट झाले. (सुमारें इ. स. ३२०) चंद्रगुप्तानें गुप्त राजवंशाची स्थापना केली व अशोकानंतर सर्वांत मोठें साम्राज्य स्थापिलें. त्यानंतर २ रा चंद्रगुप्त गादीवर बसला. याच्या राजव्यवस्थेचें वर्णन चिनी प्रवासी फाहिएन यानें केलें आहे. गुप्त वंशांतील नंतरच्या राजांचा श्वेतहूणांनीं पाडाव केला. हे श्वेत हूण पर्शियांतील सत्ता उध्वस्त करून काबूलांतील कुशान राजावर चालून आले व हिंदुस्थानांत उतरले. त्यांनीं सिंध जिंकला व नर्मदेपर्यंत दक्षिणेंत आपली सत्ता वाढविली. हिंदुस्थानांतील हुणांचें वर्चस्व म्हणजे फार मोठ्या प्रमाणावर चालविलेला लूटमारीचा धंदा असल्यामुळें तें फार वेळ टिकलें नाहीं. वैतागून जाऊन मिहिरगुल व त्याचे मांडलिक राजे यांनीं हल्ला केल्यामुळें हुणांच्या सत्तेला जोराचा धक्का बसला. व श्वेतहूणांच्या मध्यवर्ति सत्तेचा तुर्कांनीं ओक्ससवर पाडाव केल्यानंतर हिंदुस्थानांतील हूण सत्ता ही कोसळून पडली. मध्यवर्ति सत्तेचा शेवट झालेला पाहून पुष्कळ हूण हिंदू बनले. व कांहीं प्रख्यात रजपूत घराण्यांचे ते पूर्वज आहेत असें म्हणतात. यानंतर मुसलमानी अंमल सुरूं होण्यापूर्वीं उत्तर हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापन करणारा शेवटचा राजा हर्ष (शिलादित्य) होय. याची कारकीर्द इ. स. ६०८–६४८ पर्यंत टिकली. याच्या कारकीर्दींतील घडामोडींची विश्वसनीय माहिती चिनी प्रवासी हुएनत्संग यानें लिहून ठेवलेल्या हकीकतीवरून मिळते. राजकवि बाण यानें 'हर्ष-चरित' नांवाचें काव्य रचिलें आहे.

त्यावरूनही पुष्कळ पुरावा मिळतो. हर्षाचें साम्राज्य हिमालयापासून नर्मदेपर्यंतचें गंगेचें सर्व खोरें, नेपाळ, माळवा, गुजराथ, सौराष्ट्र (काठेवाड) एवढें लांब पसरलेलें होतें. आसामचा राजाही त्याचा अंकित होता. परंतु हर्षाच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याचाही नाश झाला.

दख्खनचा इतिहासः—

दक्षिणेंत ६ व्या शतकाच्या मध्यकाळांत चालुक्य राजवंशाचा उदय झाला. या राजवंशांतील प्रख्यात राजा दुसरा पुलकेशी यानें हर्ष राजाचे हल्ले परतविले. याच्या दरबारीं ह्युएन–त्संग येऊन गेला होता. कांचीवरमच्या पल्लव लोकांनीं (The Pallavas) याचा पराभव केला. याचा मुलगा पहिला विक्रमादित्य यानें जरी गेलेला मुलूख पुन्हां जिंकून घेतला तरी शेवटीं सुमारें इ.स. ७५० च्या सुमारास राष्ट्रकूट लोकांनीं चालुक्य राजवंश नामशेष केला. सुमारें इ. स. ७६० या वर्षी १ल्या कृष्णराजाच्या कारकीर्दीत वेरूळ येथील कैलासाचें प्रख्यात देऊळ खोदलें गलें. चालुक्य घराण्यांतील वंशज दुसरा तैल यानें राष्ट्रकूट वंशांतील राजास पदच्युत केलें व कल्याणीचे चालुक्य या नांवाचा एक दुसरा राजवंश सुरू केला हा राजवंश सुमारें सव्वादोन शतकें टिकला. चोल राजा राजराज यानें इ. स. १००० च्या सुमारास केलेल्या स्वारीमुळें चालुक्य राज्याची फार हानि झाली. इ. स. १०७६ त विक्रम गादीवर येऊन त्यानें सुमारें पन्नास वर्षें राज्य केल्यानंतर चालुक्य राजवंशास उतरती कळा लागली. १२ व्या व १३ व्या शतकांत म्हैसूरकडे होयसळ घराणें बरेंच भरभराटीस आलें. पण इ.स. १३१० त मलीक काफरनें त्या घराण्याचा बीमोड केला. देवगिरीचे यादव हे चालुक्य राज्याच्या सरंजामी सरदारांचे वंशज होते. त्यांचाही मलीक काफरनें पराभव केला.

दक्षिण हिंदुस्थानांतील राज्यें:—

अगदीं दक्षिणेकडे तीन राज्यें होतीं. पांड्य, चोल व चेर (केर). पांड्य राज्य पदुकोटाच्या दक्षिणेस होतें. चोल हें उत्तरेस वेलोरपर्यंत पसरलेलें होतें. चेर (केर) हें थोडें पश्चिमेस होतें. यांत मलबारचा समावेश होत असे. अशोकचें केरळचें राज्य तें हेंच असें म्हणतात. हीं राज्यें अशोकाच्या वेळचीं आहेत एवढें माहीत होतें. दक्षिण हिंदुस्थानची इ. स. च्या ९व्या व १०व्या शतकापर्यंतची विश्वसनीय माहिती मिळत नाहीं.

पांड्य राज्याचा प्रथम उल्लेख इ. स. पू. ४ थ्या शतकांत आढळतो. अशोकाच्या काळीं तें राज्य स्वतंत्र होतें. ख्रिस्ती युगाच्या सुरुवातीच्या शतकांत पांड्य व चेर या राज्यांचा रोमशीं व्यापार चालू होता. ज्याच्याबद्दल कांहीं विश्वसनीय माहिती मिळू शकते असा पांड्य घराण्यांतला सर्वांत प्राचीन राजा राजसिंह (सुमारें इ. स. ९२०) हा होय. १२व्या शतकाच्या अखेरीपासून ते १६व्या शतकाच्या मध्यकाळापर्यंत या घराण्याचा इतिहास माहीत आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सीलोनचा राजा पराक्रमबाहु (सुमारें इ. स. ११७५) याच्या सिंहली सैन्याची स्वारी ही होय. चेर घराण्यासंबंधीं प्राचीन माहिती अगदींच तुटपुंजी आहे. इ. स. १३३५ पर्यंत त्रावणकोरच्या राजांची विश्वसनीय यादी मिळत नाहीं. कोचीनच्या राजांची माहिती तर यानंतर दोन शतकानंतरपासून हातीं लागते.

संस्कृत व्याकरणकार कात्यायन यानें चोल राज्याचा उल्लेख इ.स.पू. ४ थ्या शतकांत केला आहे. हें राज्यही अशोकानें स्वतंत्रच गणलें होतें चोल घराण्याचा इतिहास इ. स. ८६० पासून १३ व्या शतकाच्या मध्यकाळापर्यंत माहीत आहे. इ. स. ६४० त ह्युएन–त्संग यानें चोल देशाला भेट दिली होती. पण त्यावेळीं हा प्रदेश उजाड होता व चोल राज्यही अगदीं लहान होतें. इ. स. ९८५ त पराक्रमी राजा राजराज हा गादीवर आला व त्यानें दक्षिण हिंदुस्थानांत चक्रवर्ती सत्ता स्थापन केली. विक्रम राजानंतर (इ. स. ११२०) चोल सत्ता हळू हळू कमी होऊं लागली. व पुढें मलीक काफरनें त्या सत्तेचा विध्वंस केला.

पल्लव मंडळ (Confederacy):—

पल्लव हे संस्कृत वाङ्मयांतून व शिलालेखांत नेहमीं उल्लेखिलेल्या पह्लव (Paclava) या परदेशांतील टोळीपैकींच असावेत. म्हणून असा अंदाज बांधतां येतो कीं, हे पल्लव उत्तरेकडून आले व हलके हलके त्यांनीं मलबारांत व कारोमांडेल किनाऱ्यावर वस्ती केली. मराठ्यांप्रमाणें ते शेजारच्या अंकित राष्ट्राकडून खंडणी घेत असत असें दिसतें. शिवस्कंद वर्मन (सुमारें इ. स. १५०) हा ज्याच्याविषयीं आपणास कांहीं विश्वसनीय माहिती मिळते, असा पहिला पल्लव राजा होय. याची राजधानी कांची होती. व याचें राज्य तेलगू प्रांतांत कृष्णा नदीपर्यंत पसरलें होतें. ४थ्या शतकांत पल्लवांचें राज्य उत्तरेस गोदावरीपासून दक्षिणेस दक्षिण वेल्लस नदीपर्यंत पसरलें होतें. तें राज्य म्हैसूरवरून या समुद्रापासून त्या समुद्रा-

पर्यंत पसरलें होतें. इ. स. ६४० त ह्युएन-त्संग हा कांची राजधानीस गेला होता.त्याच्या लिहिण्यावरून त्या राज्याची सरहद्द १००० मैल होती, व राजधानीचें शहर फार भव्य असून त्याचा परीघ ५।६ मैल होता असें दिसतें. १०व्या शतकाच्या अखेरीस, दहा शतकें तग धरून राहिलेल्या या पल्लव सत्तेचा पराक्रमी चोल राजा राजराज यानें विध्वंस केला. पल्लव सरदार १७व्या शतकाच्या अखेरीपर्यंत अस्तित्वांत होते व पदुकोटचा राजा स्वतःस पूर्वीच्या राजघराण्याचा वंशज समजतो.

मुसलमानांचा हिंदुस्थानाशीं संबंधः--

हिंदुस्थानांत वैदिक धर्माकडून बुद्ध धर्माची पिछेहाट चालू असतां अरेबियांत एक नवीन धर्म जन्मण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसू लागलीं होतीं. इकडे ह्युएन-त्संग आपला प्रवास आक्रमीत असतांनाच मदीना येथें इ. स. ६३२ त इस्लाम धर्माचा संस्थापक मरण पावला. त्यानंतर केवळ ३२ वर्षांनीं मुसलमानांनीं हिंदुस्थानावर प्रथम चाल केली. पहिल्या पहिल्या लढायांत जयाचें पारडें पूर्णपणें कोणाकडेच झुकलें नाहीं. इ. स. ७११ त महमद कासीम यानें आरबी सैन्यानिशीं दमास्कसचा खलिफा १ला वलिद याच्या हुकुमावरून सिंधमधील हिंदूंवर स्वारी करून त्यांना जिंकलें. रजपुतांचें शौर्य व ब्राम्हणांची निष्ठा यामुळें पश्चिम युरोपपेक्षां हिंदुस्थानांत त्यांना जास्त प्रतिकार झाला. इ. स. ७५० त हिंदूंनीं जोरानें प्रतिकार करून मुसलमानांस हांकून लावलें. तेव्हांपासून सुमारें १५० वर्षें शांतता नांदत होती.

गझनीचा महमूदः--यानंतरची मुसलमानांची स्वारी गझनीच्या सुलतान महमद यानें केली. याचा बाप सबक्तगीन यानें इ. स. ९७७ त लाहोरच्या राजा जयपाळ याचा पराभव करून पंजाब प्रांत अंकित केला होता असें म्हणतात. सबक्तगीनाचें राज्य सध्यांच्या अफगाणिस्थानचा बहुतेक भाग व खोरासन यांवर पसरलें होतें. महमद यानें आपल्या बापाचें राज्य पश्चिमेस इराण व पूर्वेस गंगा नदी येथपर्यंत वाढविलें. त्यानें सतरा वेळां हिंदुस्थानवर स्वारी केली. इ. स. १००१ मध्यें त्यानें राजा जयपाळचा पुन्हां पराभव केला व त्यास कैद केलें. पण त्याचा मुलगा अनंगपाळ यानें लोकांत स्वातंत्र्याची प्रेरणा करून हिंदुस्थानच्या सर्व भागांतून रजपूत राजांचें सैन्य जमविलें. शेवटची निकराची लढाई पेशावर येथें झाली. तुर्की घोडेस्वारांच्या मदतीमुळें शेवटीं महमदाचा जय झाला. महमदाची सर्वांत मोठी स्वारी म्हणजे १०२५-१०२६ त त्यानें गुजराथवर केलेली स्वारी होय. या स्वारीचा उद्देश सोमनाथ येथील शिवाचें देऊळ उध्वस्त करणें हा होता. सिंधचें वाळवंट चुकविण्यासाठीं महमद अजमिरांतून आला. तों, सोमनाथाच्या देवळाच्या रक्षणासाठीं हिंदु लोक जमाव करून बसले आहेत असें त्याला दिसलें. दोन दिवस तुमुल युद्ध होऊन रजपुतांचा पराभव झाला. महमद सोमनाथाच्या देवळाच्या गाभाऱ्यांत शिरला व ब्राम्हणांच्या विनवण्यांस भीक न घालतां हातांतील गदेनें त्यानें त्या मूर्तीचा भंग केला. त्याबरोबर आंतून जडजवाहीर बाहेर पडलें. इ. स. १८३९ त अफगाणिस्थानवर ब्रिटिशांची स्वारी होईपर्यंत गझनीजवळ महमदाच्या थडग्यांत त्याची गदा व सोमनाथाचे लांकडी दरवाजे हे जपून ठेवलेले होते. महमद हा धर्मप्रसारक असून शिवाय वाङमयाचा पुरस्कर्ताहि होता. त्यानें स्थापिलेला राजवंश फार वेळ टिकला नाहीं. त्याच्यामागून एका शतकांत चवदा राजे गादीवर बसले. पण त्यांपैकीं एकानेंही नांव कमावलें नाहीं. इ. स. ११५५ त या राजवंशांतील शेवटचा राजा बहराम याचा घोरच्या अल्लाउद्दिनानें पराभव केला व गझनी शहर जमीनदोस्त केलें. परंतु त्यानें महमदाचें थडगें मात्र शाबूद ठेवलें.

बहरामचा मुलगा खुश्रू यानें लाहोर येथें पहिला मुसलमानी राजवंश स्थापन केला. गझनी वंशाचा शत्रू महमद घोरी यानें खुश्रूच्या मुलाचा पराभव केला, व हा राजवंश नष्ट झाला. (११८६).

गझनीच्या तुर्कांचा पाडाव झाल्यावर घोरचे अफगाण सत्ताधीश झाले. या घराण्याचा संस्थापक इझद-दिन-अल्-हुसेन हा होता असें म्हणतात. याचा मुलगा अल्लाउद्दिन यानेंच गझनी धुळीस मिळविली. अल्लाउद्दिनाचा पुतण्या शहाबुद्दीन किंवा महमद घोरी हा हिंदुस्थानावर स्वारी करणारा दुसरा राजा होय. इ. स. ११७५ त त्यानें मुलतान घेतलें. इ. स. ११८६ त त्यानें लाहोर घेतलें. त्यावेळीं उत्तर हिंदुस्थान कनोज व दिल्ली येथील रजपूत राजांमध्यें विभागला होता. या दोन राजांना परस्परांत लढावयास लावून महमद घोरीनें आपला कार्यभाग साधला. ११९३ त त्यानें आपला पूर्वेकडील अंमल काशीपर्यंत पसरविला. पराभूत झालेले रजपूत सध्यांच्या राजपुतान्याच्या टेकड्यांत व वाळवंटांत जमावानें राहूं लागले. इ. स. ११९९ त बखत्यार नांवाच्या त्याच्या सेनापतीनें बंगालांत शिरून नदियाच्या

शेवटच्या हिंदू राजास पदच्युत केलें. याप्रमाणें सिंधूपासून ब्रम्हपुत्रेपर्यंतचें सर्व विस्तीर्ण खोरें मुसलमानी अमलाखालीं आलें. परंतु महंमद घोरी हिंदुस्थानांत कायमचा कधींच राहिला नाहीं. तो गझनी येथें राहात असे. व जिंकलेल्या प्रांतांचा कारभार त्याचा आवडता गुलाम कुतुबुद्दीन याच्या मार्फत चाले. इ. स. १२०६ त महंमद घोरीचा खून झाला. याच्या मृत्यूबरोबर घोर व गझनी हीं दोन्ही घराणीं इतिहासांतून नाहींशीं झालीं. व दिल्ली ही मुसलमानांची हिंदुस्थानांतील राजधानी पहिल्यानेंच ठरली.

गुलाम घराणें:—महंमद घोरीच्या मृत्यूनंतर कुतुबुद्दिनानें आपलें प्रतिनिधित्व टाकून स्वत: दिल्लीचा सुलतान झाल्याचें जाहीर केलें.

हा गुलाम घराण्याचा संस्थापक होय. हें घराणें सुमारें एक शतकभर टिकलें. (इ. स. १२०६–१२८८). दिल्लीस त्यानें आपल्या विजयाचें स्मारक म्हणून 'कुतुब–मिनार' उभारला आहे. कुतुबुद्दिन हा चांगला लढवय्या व राजकारणपटु होता. पण त्याच्या मागून गादीवर आलेल्यांपैकीं कोणीही शूर नव्हता. गुलाम घराण्यामागून खिलजी घराणें गादीवर आलें.

अल्लाउद्दिन:—इ. स. १२९४ त आपला चुलता दुसरा फिरोझ याचा अमानुषपणें खून करून अल्लाउद्दिन खिलजी हा दिल्लीच्या तक्तावर बसला. हा मुसलमानांपैकीं तिसरा बलिष्ठ राजा होय. यानें मध्य हिंदुस्थानांतील भेलसा येथील बुद्ध देवळाची लूट केली होती. गादीवर बसण्यापूर्वींच अजूनपर्यंत वश न झालेल्या दक्षिणेकडील राज्यांवर यानें स्वाऱ्या केल्या होत्या. घोडेस्वारांच्या लहानशा पलटणीनिशीं दक्षिणेंत देवगिरीपर्यंत (दौलताबाद) येऊन त्यानें यादवांच्या राजधानीची लूट मारली होती. सुलतान झाल्यावर त्यानें याहीपेक्षां जास्त मोठ्या दिग्विजयाचे बेत आंखिले अलफखानाच्या हाताखालीं कांहीं सैन्य गुजराथेंत धाडलें. त्यानें अन्हलवार (पाटणा) च्या शेवटच्या रजपूत राजास हुसकावून दिलें. स्वत: सुलतान कांहीं सैन्य घेऊन राजपुतान्यांत शिरला. व तेथें आपलीं बायकापोरें घेऊन संरक्षणासाठीं रजपूत लोक चितोडच्या किल्ल्यांत होते, त्यांवर त्यानें हल्ला केला. मलीक काफर हाताखालीं थोडें सैन्य घेऊन दक्षिण हिंदुस्थानांत शिरला. लढण्याचें कसब नसलेल्या द्रविडी टोळ्यांचा त्यानें नायनाट केला व वाटेंतील प्रत्यक हिंदु देवळांतील जडजवाहीर लुटून नलें.

महंमद तघलख:—

अल्लाउद्दिन खिलजी इ. स. १३१६ त मरण पावला. त्याच्यामागून गादीवर आलेल्या राजांची एकंदर कारकीर्द पांच वर्षें टिकली. १३२१ त गियासुद्दीन तघलख यानें बंड केलें व तें यशस्वी झालें. हा गियासुद्दीन तुर्की वंशाचा होता असें म्हण त.त. हें घराणें सुमारें ७० वर्षें टिकलें. १३९८ त मुसलमानांचा चवथा मोठा राजा तैमूर यानें स्वारी केल्यावर तें राजघराणें धुळीस मिळालें. तघलखाचा मुलगा महंमद तघलख यानें इ. स. १३२५ ते १३५१ पर्यंत राज्य केलें. हा अत्यंत जुलमी राजा होता. त्यानें इराणवर स्वारी करण्याकरितां सैन्य जमविलें होतें. त्यानें चीनवर स्वारी करण्यासाठीं सैन्य रवानाही केलें होतें. पण हिमालयांतील बिकट वाटांत सर्व सैन्य नाश पावलें. दिल्ली येथील राजधानी उठवून ७०० मैल लांब दक्षिणेंत देवगिरी (किंवा दौलताबाद) ही राजधानी करण्याची विचित्र कल्पनाही त्यानें अमलांत आणली. त्याच्या कारकीर्दींत तघलख घराण्याची व दिल्लीची भरभराट झाली. त्याच्यामागून फिरोझ गादीवर बसला. तो दुबळा राजा होता. १३४७ त बहामनी घराण्याचा संस्थापक अल्लाउद्दीन याची कारकीर्द सुरूं झाली. १३९१ त जाफरखान याची गुजराथ प्रांतावर नेमणूक झाल्यापासून ते राजे स्वत:स स्वतंत्र समजूं लागले.

तैमूरलंगाची स्वारी:—१३९८ त तैमूरनें हिंदुस्थानावर स्वारी केली त्यावेळीं त्याला एकजुटीनें प्रतिकार झालाच नाहीं. तघलख घराण्याचा शेवटचा राजा महमद याचा दिल्लीजवळ पराभव होऊन, तो गुजराथेंत पळून गेला. परंतु तैमूरच्या या स्वारीचा हिंदुस्थानच्या इतिहासावर कायमचा परिणाम घडून आला नाहीं. तैमूर काबूलमार्गें समरकंदला परत गेला. आणि नंतर महमद तघलख आपल्या ओसाड राजधानींत परत आला. त्याच्यामागून सय्यद घराणें सत्ताधीश झालें. दिल्ली व भोंवतालचा कांहीं मुलूख जवळ जवळ ४० वर्षेंपर्यंत या घराण्याच्या हाताखालीं होता. बहलोल नांवाच्या लोदी टोळींतील एका अफगाणानें या सैय्यद घराण्याचा शेवट केला. बहलोलच्या मागून येणाऱ्या राजांनीं राजधानी दिल्ली येथून आग्र्यास हालविली. १५२६ त तैमूरचा वंशज बाबर यानें हिंदुस्थानवर स्वारी केली, लोदी घराण्यांतील शेवटचा राजा इब्राहीम याचा पराभव केला व मोंगल साम्राज्य स्थापिलें. तें (निदान नांवापुरतें तरी) इ. स. १८५७ पर्यंत टिकलें.




न्यायमूर्ति रानडे



विष्णुशास्त्री चिपळूणकर



जस्टिस तेलंग



आण्णासाहेब पटवर्धन



लोकमान्य टिळक




नामदार गोखले



शिवरामपंत परांजपे



हरिभाऊ आपटे



गजानन भास्कर वैद्य

विजयानगरः—दक्षिण हिंदुस्थानांत विजयानगरचें राज्य १४व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत टिकलें. हें राज्य सबंध दक्षिण हिंदुस्थानभर पसरलेलें होतें. विजयनगरचें राज्य म्हणजे झपाट्यानें पसरूं पाहणाऱ्या इस्लाम धर्माविरुद्ध हिंदुस्थानांतील धर्मानें चढविलेला जोराचा हल्ला होय. विजयनगरच्या राजांची दक्षिणेंत अबाधित सत्ता होती; व ते दक्षिणेंतील सुलतानांशीं बरोबरीच्या नात्यानें तह करीत.

बहामनी राजघराणेंः—दक्षिणेंतील पहिलें मुसलमानी राजघराणें म्हणजे १३४७ त अल्लाउद्दिनानें स्थापिलेलें बहामनी राजघराणें होय. याची राजधानी प्रथम गुलबर्गा येथें होती. पण पुढें ती बेदर येथें नेण्यांत आली. १४ व्या शतकाच्या अखेरीस बहामनी राजघराण्याचीं शकलें झालीं. व दक्षिणेंत ५ स्वतंत्र राजघराणीं झालीं. (१) आदिलशाही—या घराण्याची राजधानी विजापूर होती. इ. स. १४९० त एका तुर्कानें याची स्थापना केली. (२) कुतुबशाही—या घराण्याची राजधानी गोवळकोंडा येथें होती. १५१२ त एका तुर्की साहसी पुरुषानें याची स्थापना केली. (३) निजामशाही—राजधानी अहमदनगर. इस्लामी धर्म स्वीकारलेल्या एका ब्राह्मणानें या राजघराण्याची स्थापना केली. (४) इमादशाही—वऱ्हाडांतील राजघराणें.याची राजधानी एलिचपूर. विजयनगरच्या एका हिंदूनेंच या घराण्याची स्थापना केली. (५) बरीदशाही—राजधानी बेदर. तुर्क किंवा जार्जियन गुलाम असे दोन्ही उल्लेख ज्याच्याबद्दल आढळतात, अशा एका पुरुषानें १४९२ त या राजघराण्याची स्थापना केली. १५६५ त तालीकोट येथील लढाईंत विजयानगरच्या राजाविरुद्ध लढण्यासाठीं हीं सर्व राजघराणीं एकत्र लढलीं. विजयानगरच्या राजाचापराभव होऊन तो लढाईंत पडला; त्यानंतर विजयानगरचें राज्य मृत्युपंथीं लागलें असलें तरी मुसलमानी सत्ता फार दक्षिणेपर्यंत गेली नाहीं. विजयानगरचे नाईक व सरंजामी सरदार यांनीं आपलें स्वातंत्र्य कायम ठेवलें. दक्षिणेंचे मुख्य मुख्य पाळेगार व सध्यांचा म्हैसूरचा राजा हे यांचेच वंशज होत. दक्षिणेंतील या सुलतानांचें आपआपसांत झगडे होत असत. तरीही ते आपलें स्वातंत्र्य टिकवून होते. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धांत मोंगल बादशहा औरंगजेब यानें हीं सर्व राज्यें नष्ट केलीं.

अहमदाबाद येथें एक स्वतंत्र मुसलमानी राजघराणें अस्तित्वांत होतें. तें सुमारें दोन शतकें टिकलें (१३९१ ते १५७३). तें राजघराणें शवटीं अकबरानें नष्ट केलें. त्याचप्रमाणें बंगालही अफगाण राजांच्या अमलाखालीं होता. त्यांची राजधानी गौर होती. हे राजे बंगालवर १३३६ पासून १५७३ पर्यंत राज्य करीत होते.

विजयनगरचें राज्य बुडाल्यापासून स्वातंत्र्याची कल्पना गोदावरी व तुंगभद्रा यांच्या आसपास वावरत राहिलेली होती. शहाजी राजे यांच्या पराक्रमाचा मुख्य भर दक्षिणकडच होता. त्या तंतूंतूनच महाराष्ट्रांतील स्वातंत्र्यविषयक कल्पना बळावल्या. सतराव्या शतकाच्या शेवटीं मराठ्यांनीं आपलें स्वातंत्र्य सिद्ध केलें इतकेंच नव्हे, तर साम्राज्यविषयक कल्पनासुद्धां त्यांच्या मनांत बळ धरूं लागल्या. अठराव्या शतकांत या कल्पनेची वाढ झपाट्यानें होऊन मराठ्यांनीं मोंगल सत्तचा विध्वंस केला व दिल्लीच्या तक्तावर कोणीं बसावें किंवा न बसावें हा अधिकार कांहीं काळ तरी मराठ्यांनीं आपल्या हातीं घेतला. पूर्वेकडे कलकत्ता शहरापर्यंत, दक्षिणकडे श्रीरंगपट्टण, तंजावर येथपर्यंत व उत्तरेकडे थेट अटकेपर्यंत मराठ्यांच्या स्वाऱ्या झपाट्यानें होऊं लागल्या. याच काळीं ग्वाल्हेर, बडोदें, इंदूर, नागपूर, झांशी इत्यादि मराठी सत्तेचीं मोठमोठालीं केंद्रें उत्पन्न झालीं. आठराव्या शतकाच्या शवटीं ही मराठ्यांची सत्ता खालावूं लागली. खर्ड्याच्या लढाईनंतर मराठी सत्तेला अभिमानाचे दिवस दिसले नाहींतच.तेथून पुढील सर्व हकिकत अगदींच ताजी असल्यामुळें येथें देण्याचें कारण नाहीं.

मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांचा इतिहास

भाग १—पौराणिक कालः—

रामायण व महाभारत ह्या ग्रंथांवरून असें दिसतें कीं, नागपूर व त्यासभोंवतालचा प्रदेश हा दण्डकारण्याचा एक भाग होय. रामायणकालीं हा भाग अयोध्यच्या राज्यास जोडलेला असावा असें वाटतें, कारण राम जव्हां वनवासास गेले,त्यावेळीं ह्या भागांतील ऋषींनीं त्यांचा राजा म्हणून सत्कार केला, असें लिहिलेलें आढळतें. महाभारतांतही विदर्भ (वऱ्हाड) व कुंतलपूर हीं दोन मोठीं शहरें होतीं, असा उल्लेख आहे. विदर्भा हें नांव हल्लीं एका लहान नदीस आहे व ती केलापूरच्या पठारांत उगम पावून पैनगंगेस मिळते. कुंतलपूरचें केलापूर असें नांव झालें व तें केलापूर यवत-

माळ जिल्हयांत तालुक्याचें ठिकाण आहे. पौराणिक कालानंतर मौर्य घराणें येईपर्यंत जो काल गेला, त्या कालांतील इतिहास उपलब्ध नाहीं.

भाग २ रा—मौर्य घराणें— ख्रि. श. पू. ३२६ ते १८४ वर्षे—

अगदीं अलीकडे अशोकाच्या राजशासनाचीं आज्ञापत्रें रूपनाथ येथें सांपडलीं आहेत. अशोक हा मौर्य घराण्याचा संस्थापक जो चंद्रगुप्त मौर्य त्याचा नातू. त्याचा राज्यविस्तार जवळ जवळ सर्व हिंदुस्थानभर होता. सिरियाचा अँटिओकस, इजिप्तमधील टॉलेमि, एपिरसचा अॅलेक्झांडर वगैरे तत्कालीन मोठमोठ्या राजांना अशोकाबद्दल आदर होता. त्यानें आपल्या राज्यांत बौद्ध धर्म हा राष्ट्रधर्म म्हणून चालू केला. व त्याबद्दलचीं आज्ञापत्रें मोठमोठाले स्तंभ उभारून त्यांजवर कोरविलीं. हीं आज्ञापत्रें बहुजन समाजाची जी भाषा होती त्यामध्यें लिहिलेलीं असत. त्या जुन्या लेखांवरून असें आढळून येतें कीं, मध्यप्रांत-वऱ्हाड हा प्रांत त्यावेळीं मौर्य राजांच्या ताब्यांत होता.

भाग ३ रा—संग व आंध्र घराणें:—
(इ. स. पूर्वीं १८४ ते इ. स. २३६)

मौर्य घराण्यांतील शेवटचा राजा बृहद्रथ यचा सेनापति पुष्यमित्र यानें त्याचा खून करून राज्य बळकाविलें, व संग घराण्याची स्थापना केली. त्यांचीं नाणीं वगैरे ह्या प्रांतांत उपलब्ध नाहींत. पण मालविकाग्निमित्र ह्या नाटकावरून त्या प्रांतांत हें घराणें राज्यारूढ होतें असें वाटतें.

संग घराण्यानंतर कण्व घराणें आलें व त्यानंतर आंध्र घराणें आलें. नाशिक येथील लेण्यांत त्यांविषयीं एक मोठा शिलालेख आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं,आंध्र घराण्यांतील राजा गौतमीपुत्र शट्टकर्णी हा अनुप व विदर्भ (वऱ्हाड) ह्यावर राज्य करीत असे. अनुप हें नांव नर्मदेच्या वरील भागास असावें असें वाटतें. व ही गोष्ट चांदा जिल्हयांत सांपडलेल्या त्या काळच्या नाण्यावरून सिद्ध होते. त्या प्रांतांत जुने तीन लेख सांपडले आहेत व त्यांचा काल सुमारें ख्रि.स.१०० वर्षांपासून पुढें ३०० वर्षें असा असावा असें वाटतें. ह्यांमध्यें काय लिहिलें आहे तें समजत नाहीं. पण हीं पत्रें व नुकतींच मिळालेलीं जुनीं नाणीं वगैरेंवरून असें वाटतें कीं, ख्रिस्ती सनाच्या अगदीं आरंभींच्या काळांत हा प्रांत वैदिक धर्मी राजांच्या ताब्यांत होता.

भाग ४—इंडो-ग्रीक, कुशान व क्षत्रप घराणीं—

संग घराण्यांतील मगध देशाचा राजा पुष्यमित्र गादीवर असतांना त्याच्या मुलानें म्हणजे अग्निमित्रानें विदर्भावर स्वारी केली व तेथील राजास दूर करून त्याच्या पुतण्यास त्यानें गादीवर बसविलें. त्याच वेळीं पुष्यमित्रावर इंडो-ग्रीक राजा मीनेंद्र (Menandra) व कलिंग देशाचा राजा करवाल (Karavala) यांनीं स्वारी केली. पण पुढें त्यांचा पाडाव झाला. इंडो-ग्रीक राजांचीं कांहीं नाणीं बालाघाट येथें सांपडलीं त्यांवरून हे लोक त्या प्रांतांत असावेत असें वाटतें. इंडो-ग्रीक राजानंतर कुशान घराणें आलें व त्या घराण्यांत कनिष्क हा बलाढ्य राजा होऊन गेला. त्याच्या ताब्यांत जवळ जवळ सर्व उत्तर हिंदुस्थान होतें. त्यावेळचीं कांहीं नाणीं हर्दा (हुशंगाबाद जिल्हा) येथें सांपडलीं आहेत. गुरु घराणें व कुशान घराणें यांमध्यें किती वर्षांचा काळ लोटला त्याबद्दल ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं. फक्त त्या कालांतील क्षत्रप राजांचीं नाणीं मात्र सांपडतात. क्षत्रप घराणें हें इसवी सनाच्या अगदीं आरंभीं स्थापन झालें व त्यानें आपली सत्ता गुजराथेंत स्थापित केली. ही सत्ता मुख्यत: भौमक राजानें स्थापित केली व त्याचेनंतर झालेल्या राजांनीं आपली सत्ता जवळ जवळ सर्व पश्चिम हिंदुस्थानभर बसविली. त्यांची राजधानी उज्जयिनी होय. त्यांचा शेवटचा राजा रुद्रसेन ह्याचा इ. स. ३८८ मध्यें चंद्रगुप्त २रा ह्यानें पराभव करून तो भाग आपल्या साम्राज्यास जोडला.

भाग ५—गुप्त घराणें—

गुप्त घराण्याचा संस्थापक चंद्रगुप्त हा होय.त्याचे नंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा गादीवर आला. त्यानें उत्तर हिंदुस्थान काबीज केल्यावर दक्षिणेवर स्वारी केली. व दक्षिण कोसल (हल्लींचा छत्तीसगड प्रांत) घेतला.त्याच्या वेळचा एक ताम्रपट अरंग येथें आहे. त्याचेनंतर चंद्रगुप्त दुसरा हा गादीवर आला. त्याजविषयीं त्या प्रांतांत विशेष कांहीं सांपडत नाहीं. पण त्याच्या नांवाचीं नाणीं मात्र जबलपूर, हर्दा वगैरे ठिकाणीं सांपडतात. त्याचेनंतर या प्रांतावर राज्य करणारा राजा बुद्धगुप्त हा होय. गुप्तानंतर श्वेतहूण लोक त्या प्रांतांवर आले. त्यांचा पुढारी तोरमण यानें माळव्यांत इ. स. ५०० मध्यें आपला अंमल बसविला व ही गोष्ट सागर जिल्हयांतील एरण नांवाच्या खेड्यांत असलेल्या श्रीविष्णूच्या वराह अवताराची जी एक

तांबड्या पाषाणाची मूर्ति बसविली आहे हें तिच्या वक्षस्थलावरील शिलालेखावरून स्पष्ट होते. या घराण्याचा शेवट इ. स. ५२८ त झाला. चिनी यात्रेकरू हूएनत्संग ह्यानें इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या आरंभीं भांडक म्हणजे चांदा जिल्हा येथें बुद्ध राजे राज्य करीत होते,असा उल्लेख केलेला आढळतो. भांडक राजांच्या नंतर जे राजे आले त्यांची राजधानी शिरपूर (श्रीपुर) ही होती. ह्या घराण्यांत त्रिवरदेव हा राजा फार भाग्यशाली होता. व त्यानें स्वतःला कोसलचा राजा ही पदवी घेतली होती. बुद्ध राजांच्या नंतर राष्ट्रकूट घराणें ह्या प्रांतावर येईपर्यंत जीं घराणीं होऊन गेलीं तीं म्हणजे श्रीवर्धनपूरचे शल्यवंशी, सरभपूरचे सोमवंशी, तसेंच मौखर (Maukharis) घराणें, वाकाटक घराणें वगैरे होत. व हे लोक त्या प्रांतांत होते ही गोष्ट ठिकठिकाणीं सापडलेले त्या काळचे शिलालेख, नाणीं वगैरेंवरून सिद्ध होते. त्यानंतर राष्ट्रकूट घराणें आलें व त्याजबद्दलची अगदीं अलीकडे सांपडलेली माहिती म्हणजे अभिमन्यूची–उंदिक वटिका–देणगी ही होय. हें उंदिक वटिका गांव म्हणजे हल्लींचें हुशंगाबाद जिल्ह्यांतील पाचमारीजवळील औंतिया नांवाचें खेडें हें होय. त्या घराण्यांतील शेवटचा राजा काक्का २ रा,हा होय. त्याचा इ. स. ९७३ त चालुक्य राजा तैल (तैलप) २ रा, ह्यानें पराभव केला. व चालुक्य घराणें सुरू झालें. त्या घराण्यांत विक्रमादित्य६ वा, हा बलाढ्य राजा होऊन गेला.

ह्यांपुढील घराणें म्हणजे हैहय किंवा चेदी घराणें होय.ह्या घराण्याचे भाग दोन–१ पश्चिम चेदि ,२ पूर्व चेदि. पश्चिम चेदि घराणें इ. स. ८७५–९०० ह्याची सुरुवात ९ व्या शतकाच्या शेवटीं किंवा १०व्या शतकाच्या आरंभास झाली.हैहय या शब्दाची उत्पत्ति अहिहय (सर्पाश्व) ह्यापासूनची आहे. पण ही दंतकथा आहे. खरा मुख्य पुरुष म्हणजे कार्तवीर्य ऊर्फ सहस्रार्जुन हा होय. ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां पहिला राजा कोकलदेव हा होय. ह्यानंतरचे त्याच वंशांतील राजे व त्यांचा काल पुढीलप्रमाणें होय.

२ मुग्ध तुंग इ. स. ९००–९२५
३ युवराजदेव इ. स. ९२५–९५०.
४ लक्ष्मणराज इ. स. ९५०–९७९.
५ युवराजदेव २ रा इ. स. ९७५–१०००.
६ गांगेयदेव इ. स. १०१५–१०४०.
७ कर्णदेव इ. स. १०४०–१०८०.
८ यशकर्णदेव इ. स. १०८०–११२३.
९ गयाकर्णदेव इ. स. ११२३–११५६.
१० नरसिंहदेव इ. स. ११५६–११६०.
११ जयसिंहदेव इ. स. ११६०–११७८.
१२ विजयसिंहदेव इ. स. ११७८–११८५.

रतनपूरचें हैहय अगर पूर्वचेदि घराणें:— हें घराणें पश्चिम चेदि वंशाचीच एक शाखा होय. त्यांचा पहिला राजा जाजल्लदेव, १११४–३६; २रा रतनदेव ११३६–४०; ३ रा पृथ्विदेव ११४०–६०; ४था जाजल्लदेव२रा ११६०–६८; ५ वा रतनदेव ३ रा ११६८–८३; ६ वा पृथ्वीदेव ३ रा ११८३–९०. पृथ्वीदेवानंतरचे राजे विशेष महत्त्वाचे नव्हते. पण १६व्या शतकाच्या सुमारास त्या घराण्यांतील दोन वंशज प्रसिद्ध होते. १ वहरेंद्र- १५१९–३६ व २रा कल्याणशहा १५३६–७३.

कल्याणशहा हा अकबराचा मांडलिक झाला व त्यामुळेंच त्याचें रतनपूरचें राज्य टिकून राहिलें. पुढें १७४० त भास्कर पंतांनीं हें राज्य मराठी साम्राज्यास जोडलें.

रायपूरचें हैहय घराणें:—

पृथ्वीदेव २ रा हा राज्यावर असतांना त्याचा सेनापति जगपाळ ह्यानें पुष्कळ प्रांत जिंकले. ह्या प्रांतांतील कांहीं प्रांतांवर मूळच्या राजांस परत नेमलें. त्यांचपैकीं रायपूरचें हैहय घराणें होय.

रायपूरचें घराणें सुरू होण्याच्या बेतालाच काकैरा प्रांतांतील एका स्थानिक अधिकाऱ्यानें रायपूरच्या दक्षिण भागावर वर्चस्व राखून अंमल चालविण्यास सुरुवात केली. त्याचा काळ १०६४ ते १३२० हा होय. त्यांची वंशावळ ११९२ मध्यें जेव्हां त्याच घराण्यांतील कर्णदेव राज्य करीत होता, तेव्हां तयार झाली असें आढळतें. कर्णदेव हा शिवभक्त होता. त्यानें पुष्कळ देवळें व तळीं वगैरे बांधलीं. कर्णदेवाच्या शेवटच्या काळांत चंडेल राजपुत्र कीर्तिवर्मन यानें त्याचा पराभव केला. व त्याची राजधानी हस्तगत केली. त्याचा काल इ. स. १०८० होय. हें घराणें पुढें मुसलमानांच्या स्वाऱ्या होईपर्यंत तेथें कायम होतें.

नागपूर म्यूझियममधील लेखावरून असें आढळतें कीं, त्याचा कर्णदेवाचा भोज कुलांतील माळव्याचा राजा विक्रमादित्य ह्यानें पराभव केला. व परमार घराणें अशा रीतीनें चालू झालें. त्या घराण्याचा काल इ. स. ११०४ ते सुमारें १२६१ पर्यंत. त्यापुढील घराणीं म्हणजे बस्तार संस्थानांतील नागवंशी व काकतीय. नागवंशी घराणें व येलबुर्ग्याचें सिंदा (Sinda) घराणें यांत

साधर्म्य आहे. त्या घराण्याचा इ. स. १०२३ पर्यंतचा इतिहास विशेष प्रसिद्ध नाहीं. त्यापुढील राजा जगदेकभूषण हा मात्र प्रसिद्ध होता. त्या घराण्यांतील शेवटचा राजा जयसिंगदेव हा होय. नागवंशी घराणें जोंपर्यंत राज्यावर होतें तोंपर्यंत बस्तारचा उत्तर भाग काकैरा अधिपतींच्या ताब्यांत होता. त्यानंतर काकतीय घराणें आलें. त्यांचें मूळ ठिकाण तेलगू प्रांतांत वरंगळ हें होतें. त्यांतील मुख्य राजा अनामदेव होता, तो १४१५ त मरण पावला. त्यापुढील आठ राजांची माहिती उपलब्ध नाहीं. आठवा राजा दिक्पालदेव याजविषयीं मात्र माहिती थोडी सांपडते. हें घराणें १७७९च्या सुमारास नागपूरकर भोसल्यांच्या जवळजवळ ताब्यांत गलें. पुढें हें घराणें १९०८पर्यंत ब्रिटिश अमलाखालीं होतें,तें १९०८मध्यें तेथील अल्पवयी राजाच्या ताब्यांत दिलें व त्याचें संस्थान बनलें. त्यानंतरचें घराणें म्हणजे गौड घराणें होय. ह्याची पूर्वपीठिका अर्धवट पौराणिक व कांहीं मुसलमानी इतिहासावरून घेतलेली अशी आहे. मूळ पुरुष जात्बा (Jatba). त्या घराण्याच्या ४ शाखा झाल्या.त्या म्हणजे (१) खेर्ला, देवगड, गडमांडला व चांदा. त्यांपैकीं खेर्ला घराणें सर्वांत जुनें. तें १४३३पर्यंत होतें. त्यानंतरचें घराणें म्हणजे गडमांडला हें होय. हें अतिशय पराक्रमी व भरभराटीस पोंचलेलें होतें.ह्याचा उदयकाल त्रिपूरचें हैहय घराणें जेव्हां पराभूत झालें तेव्हांचा होय. हें राज्य नर्मदेच्या दोहों बाजूंस होतें.त्यांमधील नांव घेण्याजोगा पहिला पुरुष म्हणजे संग्रामशहा हा होय. ह्याची कारकीर्द १५ व्या शतकाच्या शेवटास सुरू झाली. तो ५२ किल्ल्यांचा मालक होता.ह्या घराण्यांतील शेवटचा राजा नरहरशहा ह्याचा १७८१ त मराठ्यांनीं पराभव केला. व अशा रीतीनें हें ३०० वर्षांचें जुनें घराणें नामशेष झालें. देवगड घराण्याचा काल १६व्या शतकाच्या शेंवटीं शेवटीं येतो. त्यांच्यांतील मोठा पुरुष म्हणज बख्त बुलंद होय. त्यानें औरंगजेबाची नोकरी पत्करली होती. ह्याचा राज्यविस्तार म्हणज हल्लींचा छिंदवाडा व बैतुल-प्रांत हे होत. नागपूर शहर त्यानें वसविलें. हें घराणें १७३९ चे सुमारास नामशेष झालें. चांदा घराण्याचा मुख्य पुरुष बल्लाळसिंग होय.तो १३ व्या शतकांत होऊन गेला. ऐने-अकबरीवरून असें दिसतें कीं १६व्या शतकाच्या उत्तरार्धांत बाबजी नांवाचा इसम त्या प्रांतावर होता. हें घराणें १७५१ मध्यें रघुजी भोसल्यानें आपल्या राज्यास जोडलें. आतां विशेष प्रसिद्ध घराणें म्हणजे बऱ्हाणपूरचें फरुकस-घराणें होय. त्यांचा संस्थापक मालिक-राजा हा होय. तो एक लष्करी मनुष्य होता. त्यानें १३७०त हें घराणें स्थापलें.ह्या घराण्यांत होऊन गेलेले कांहीं प्रसिद्ध राजे व त्यांचा काल खालीलप्रमाणें आहे.

१ राजा मालिक-१३७०-९९.
२ नाझिरखान-१३९९-१४३७
३ अदिलखान-१४३७-४१
४ महंमद शहा-१५२२-३६
५ मुबारक खान-१५३६-६६.

त्यामुळें हें घराणें १५९९ त संपुष्टांत आलें.

ह्यानंतरचा इतिहास हा सर्वश्रुतच आहे. साधारणपणें पाहिलें असतां, ह्या प्रांतावर ३ लोकांचा अंमल झाला. पहिले मोंगल, दुसरे मराठे व तिसरे इंग्रज. फक्त बऱ्हाड मात्र सुमारें १००० वर्षे बहामनी राजांच्या ताब्यांत होता. तो १५९९ त मोंगलाकडे आला. वास्तविक पाहतां ह्या प्रांतांवर मोंगलांची सत्ता नांवापुरतीच होती. व त्याच्या उत्कर्षाच्या काळांतसुद्धां त्यांनीं (मोंगलांनीं) त्या प्रांतांवर आपली सत्ता पूर्णपणें बसविण्याची खटपट केली नाहीं.व त्यांना तशी जरूरीही भासली नाहीं.त्यानंतर त्या प्रांतांवर मराठे आले व त्यांतही खरीखुरी सत्ता पेशव्यांचीच होती, नांवापुरती सत्ता मात्र भोसल्याकडे असे. त्या भोसले घराण्याचा मूळ पुरुष शिवाजीचा सेनापति मुधोजी हा होय. ह्यांमध्यें कर्तृत्ववान् व पराक्रमी पुरुष म्हणजे मुधोजीचा पणतु पहिला रघुजी भोसले हा होय.

रघुजीनें बंगाल व ओरिसा प्रांतांवर स्वाऱ्या केल्या. व तेथील राजांपासून खंडणी वसूल केली. २ऱ्या रघुजी भोसल्याचे ताब्यांत सर्व मध्यप्रांत, ओरिसा व छोटानागपूर एवढा मुलूख होता.रघुजी दुसरा १७१६ त मरण पावला. भोसले व इंग्रज ह्यांची प्रथमतः मैत्री होती. पण रघुजीच्या मुलाचा मुधोजी नांवाच्या इसमानें खून केला व आपण स्वतः राज्य बळकाविलें. त्याला ब्रिटिशांशीं तह करावा लागून तैनाती फौज पदरीं ठेवावी लागली. १८१७ त मुधोजी (आप्पासाहेब) बाजीरावास मिळाला. पण इंग्रजांनीं त्याचा पराभव केला. व २ऱ्या रघुजीच्या नातवाला राज्यावर बसविलें. हा रघुजी तिसरा १८५३ मध्यें मरण पावला व तेव्हांपासून त्या प्रांतांवर ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला.

हिंदुस्थानची भौगोलिक माहिती

सीमा---हिंदुस्थान हा आशिया खंडापासून पर्वतांच्या रांगांमुळें विलग झाला असून हिंदुस्थानाभोंवतीं तीन बाजूंनीं महासागराचा वेढा पडला आहे. उत्तरेस हिंदुस्थान व तिबेटचें पठार या दोहोंच्या मध्यें हिमालय पर्वत उभा आहे. हिमालय पर्वताची एकंदर लांबी १५०० मैल व रुंदी १५० ते २५० मैल भरेल. हिमालय ओलांडावयाचा म्हटलें म्हणजे पर्वताच्या तीन रांका ओलांडाव्या लागतात. हिंदुस्थानच्या ईशान्य सरहद्दीजवळ, हिमालयाच्या पलीकडून वाहणारी ब्रम्हपुत्रा हिमालयांतून खालीं वाट काढून मैदानी मुलुखांत शिरते. तसेंच वायव्य सरहद्दीकडे हिमालयाच्या पलीकडच्या अंगानें ५०० मैल वाहणारी सिंधू वळसा घेऊन हिमालय ओलांडून, पंजाबांतून वाहूं लागते.

हिंदुस्थानची उत्तरेकडील राजकीय सरहद्द---कांहीं ठिकाणीं पर्वतांच्या रांगेतून जाते. पूर्वभागांत ती सरहद्द हिमालयाच्या पायथ्याशीं जाऊन भिडली आहे. पश्चिम भागांत ही राजकीय सरहद्द पार डोंगरांत गेली आहे. नकाशाकडे दृष्टि फेकली तर असें दिसून येईल कीं, जेथें गंगा व यमुना या नद्यांचा उगम झाला आहे अशीं हिमालयाचीं सर्वांत उंच शिखरांपैकीं कांहीं शिखरें संयुक्त प्रांताच्या हद्दींत मोडतात. त्याच्याही पलीकडे पश्चिमच्या बाजूस राजकीय सरहद्द ही नैसर्गिक सरहद्दीच्या पुष्कळच पलीकडे ठरविण्यांत आली आहे.

वायव्य सरहद्द--- उत्तरेस तिबेटच्या पठारापासून हिंदुस्थान ज्याप्रमाणें हिमालय पर्वतामुळें विलग झाला आहे, त्याचप्रमाणें त्याच्या वायव्येस इराणच्या पठाराच्या कांहीं पर्वत-रांगा मार्ग रोखून उभ्या आहेत. ह्या पर्वत-रांगा सिंधू नदीस जवळजवळ समांतर आहेत. या पर्वत-रांगांच्या पूर्वेस "जेथपर्यंत गवत उगवतें" तेथपर्यंत हिंदुस्थानची नैसर्गिक मर्यादा धरतात. पण राजकीय सरहद्द सरकारकडून, या पर्वत-रांगांच्या पलीकडे ठरविण्यांत आली आहे. हेतू हा कीं, त्या पर्वतावरील खिंडींतून हिंदुस्थानांत येण्याचे सर्व खुष्की मार्ग रोखले जावे.

खिंडी-- वर उत्तरेकडील व वायव्येकडील हिंदुस्थानच्या ज्या डोंगराळ सीमा सांगितल्या त्यांतून जाण्यासाठीं मार्ग आहेत. हिमालयांतील मार्गांना व्यापारी दळणवळणाच्या साधनांखेरीज इतर महत्त्व मुळींच नाहीं. त्या मार्गांतून हिंदुस्थानवर स्वारी करण्यासाठीं परचक्र येणेंच शक्य नाहीं. हे मार्ग अत्यंत बिकट आहेत. नदीवर बांधलेले पूल अगदीं लहान आहेत व ते वर्षांतून कित्येक महिने बर्फाच्छादित असतात. परंतु वायव्येकडील मार्गांची तशी स्थिति नाहीं. येथील पर्वत कमी उंच आहेत. व खिंडीहि फारशा अवघड नाहींत. इराणमधून वाहात येऊन सिंधूस मिळणाऱ्या नद्यांच्या प्रवाहानजीकच हे मार्ग आहेत. काबूल नदीचें खोरें हा हिंदुस्थानांत येण्याचा मोठा राजरस्ताच होय. परंतु पेशावरपासून रस्ता थोडा निराळा आहे. तेथून तो रस्ता खैबर येथें पोहोंचतो. व तेथेंच सुप्रसिद्ध "खैबर खिंड" लागते. ही खिंड सर्व जगांत फार प्रसिद्ध आहे. सुमारें दोन हजार वर्षें, हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठीं अनेक राजांनीं या खिंडीचा उपयोग केला आहे. सध्यां येथें मोठ्या कष्टानें पेशावरपर्यंत एक लोहमार्ग केला आहे.

ईशान्येकडील सरहद्द— या बाजूस दक्षिणोत्तर पर्वतांच्या रांगा आहेत व त्या रांगांमध्यें दऱ्या आहेत. या दऱ्या व हे पर्वत यांनींच ब्रम्हदेशाचा मुलूख व्यापला आहे. येथें इरावती व सालवीन या दोन मुख्य नद्या आहेत. म्हणून ब्रह्मदेश पूर्वपश्चिम ओलांडणें फार अवघड आहे. इतर आशिया खंडापासून पर्वतांमुळें ब्रम्हदेश पूर्णपणें अलिप्त राहिला आहे. पूर्वेकडून पर्वत ओलांडून सैन्य ब्रह्मदेशांत उतरणें फार कठीण आहे. ब्रह्मदेश लोहमार्गानें हिंदुस्थानशीं किंवा इतर देशांशीं निगडित नाहीं.

क्षेत्रफळ— हिंदुस्थानची जास्तींत जास्त दक्षिणोत्तर लांबी २ हजार मैल आहे. व रुंदी १९०० मैल आहे. हिंदुस्थानचें क्षेत्रफळ सुमारें १४॥ लक्ष चौरस मैल आहे.

हिंदुस्थानांतील पर्वतः—

नांव	लांबी मैल	उंची फूट
हिमालय	१५००	२००००
काराकोरम	६००	१८०००
हिंदुकुश	६५०	१५०००
सुलैमान	३५०	७०००
हाला	२००	७०००
निलगिरी	१००	५०००
सह्याद्री	१०००	४०००
पूर्वघाट	९००	२०००
विंध्याद्री	६००	२०००
सातपुडा	५००	२०००
अरवली	३००	२०००

पर्वतांचीं शिखरें—

एवरेस्ट— हिमालय	२९००० फूट
गाडविन ऑस्टेन	२८,२५० "
कांचनगंगा— १ "	२८,१४६ "
कांचनगंगा— २	२७,८०३ "
साकालू	२७,७९० "
अबूचा पहाड—अरवली	५,५५० "
दोडाबेटा—निलगिरी	८,७६० "
मलयगिरी—सह्याद्री	६३००, "

हिंदुस्थानांतील थंड हवेचीं ठिकाणें.—

(१) उटकमंड—निलगिरीवर समुद्रसपाटीपासून ७३०० फूट उंच असून उत्तम हवा व सृष्टिशोभा यांविषयीं प्रसिद्ध आहे. (२) दार्जिलिंग, (३) नैनीताल—हिमालयांत. (४) कोडायकनाल—पळनी डोंगरावर मदुरा जिल्ह्यांत उंची ७००० फूट आहे. (५) भीमाशंकर, (६) महाबळेश्वर, (७) पांचगणी, (८) माथेरान—सह्याद्रीवर. (९) मसूरी—हिमालयाच्या पायथ्याशीं डेहराडून जिल्ह्यांत, उंची सुमारें ७००० फूट. (१०) पंचमडी—सातपुड्यावर. (११) श्रीनगर, (१२) मरी—काश्मीरप्रांतांत. (१३) येरकाड—शेरवराय डोंगरावर (द. हिंदु.). (१४) पंजाबांत हिमालयाच्या पायथ्याशीं.

हिंदुस्थानांतील उष्णोदकाचे झरे—

(१) ठाणेंजिल्ह्यांत भिवंडी तालुक्यांत वज्राबाईचें देवालय आहे. (२) सुरत जिल्ह्यांत देवकी कुंडाजवळ पुष्कळ झरे आहेत. (३) गुजराथेंत डाकूर गांवाजवळ कुसोंद्राकुंड येथील पाणी उष्ण असून खारटही आहे. (४) रत्नागिरी जिल्ह्यांत राजापुरास. (५) मोंगरी जवळ सीताकुंड. (६) गंगोत्रीजवळ. (७) सिंधदेशांत—या पाण्यांत गंधक वगैरे उष्ण द्रव्यें असतात व तें औषधी असतें. (८) उनपदेव एरंडोल रोड स्टेशनहून ४५ मैलांवर खानदेशांत. (९) राजगड डोंगर बंगाल नजीक पाटणा जिल्ह्यांत. (१०) शतळेश्वर महादेव, महिकाठ्यांत एकोरापलीकडे. (११) तुळशीरामाचें कुंड (गोडे पाण्याचें) काठेवाडांत. (१२) सर्व तीर्थ, नासिकाजवळ टाकेद गांवाजवळ.

हिंदुस्थानांतील प्रमुख नद्या—

नांव	लांबी मैल	उगम	संगम अगर मुख
सिंधू	१८००	हिमालय (कैलास)	अरबी समुद्र (सिंध)
ब्रम्हपुत्रा	१८००	हिमालय (मानस सरोवर)	बंगालच्या उपसागरास
गंगा	१५००	गंगोत्री	बंगालच्या उपसागरास
गोदावरी	९००	त्र्यंबकेश्वर	बंगालच्या उपसागरास राजमहेंद्रीजवळ
सतलज	९००	मानस सरोवर	मिठाणकोटजवळ सिंधूस
यमुना	८६०	हिमालय (जन्मोत्रीजवळ)	प्रयाग येथें गंगेस.
नर्मदा	८०१	अमरकंटक पर्वत	भडोचजवळ खंबायतचे आखातास
कृष्णा	८००	महाबळेश्वर	बंगालच्या उपसा.स मच्छलीपट्टणाजवळ
चंबळा	६५०	इंदूर संस्थान (जानपओ डोंगर)	यमुनेस (इटावाजवळ)
गोग्रा	६००	हिमालय	चपरा गांवाजवळ गंगेस
महानदी	५२०	छत्तीसगड (मध्यप्रांत)	बंगालचे उपसागरास (कटकजवळ)
कावेरी	४७०	कूर्गप्रांत	बंगालचे उपसागरास
गोमती	५००	संयुक्त प्रांत	गाजीपूरजवळ गंगेस
शोणनद	४६०	अमरकंटक पर्वत	दिनापुराजवळ गंगेस
झेलम	४५०	काश्मीर (वीरनाग नांवाच्या झर्यांतून)	त्रिमू शहराजवळ चिनाबला

नांव	लांबी मैल	उगम	संगम अगर मुख
तापी	४४०	सातपुडा (बैतुलजवळ)	खंबायतचें आखात.
तुंगभद्रा	४००	म्हैसूर सरहद्दीवर	अलमपुराजवळ कृष्णेस
मांजरा	३८७	नलदुर्ग जिल्ह्यांत	गोदावरीस
रामगंगा	३७३	हिमालय	कनोजजवळ गंगेस
पेन्नार	३५५	हिमालय	कनोजजवळ गंगेस
उत्तर पेन्नार	२४५	म्हैसूर संस्थान	बंगालचे उपसागरास
दक्षिण पेन्नार	२४५	म्हैसूर संस्थान	बंगालच्या उपसागरास
मही	३५०	माळवा	खंबायतचे आखातास
बिटवा	३६०	भोपाळजवळ	महीरपूरजवळ यमुनेस
दामोदर	३५०	तोरी परगणा (बंगाल)	हुगळीस
लुनी	३२०	अरवली पर्वत	कच्छचें आखात.
काळी (कालिंदी)	३१०	मुजफर नगर जिल्हा	कनोजजवळ गंगेस
बनास	३००	अरवली डोंगर	रामेश्वर गांवाजवळ चंबळेस
बियास	२९०	हिमालय	सतलज नदीस
पालार	२३०	म्हैसूर संस्थान	बंगालच्या उपसागरास
काळी सिंध	२२५	विंध्याद्रि (बरझिरी)	कोटा संस्थान, पिपर गांवाजवळ
पालर	२३०	म्हैसूर संस्थान खेडयाजवळ	बंगालच्या उपसागरास
कुशी	२२०	नेपाळ (सप्तकौशिक प्रदेशांत)	बंगाल्यांत पूर्णिया जिल्ह्यांत गंगेस
ताम्रपर्णी		कार्डमम पर्वत	मानारच्या आखातास
पार्वती	२२०	विंध्याद्रि	चंबळेस
साबरमती	२००	अरवली पर्वत	खंबायतचे आखातास
गंडकी	१९२	नेपाळांत धवलगिरी	पाटणा येथें गंगेस
भीमा	१७५	भीमा शंकराचा डोंगर	कृष्णा स्टेशनजवळ कृष्णेस
कपिली	१६३	आसामांत जंटिओटेंकडी	कलांग नदीला मिळते.
कर्मनाशा	१४६	बंगाल्यांत कैमूर डोंगर	गंगेस
पूर्णा	१४५	कन्नड तालुका (निजाम)	गोदावरीस
मुसा	१४४	अनंतगिरी डोंगर	वारापल्लीजवळ कृष्णेस
कर्णफुली	१२१	आसाम चितागांगचे डोंगर	बंगालचे उपसागरास
अर्कावती	१२०	म्हैसूर संस्थान	कावेरीस
क्षिप्रा	१२०	माळव्यांत विंध्याचे उत्तरेस	चंबळेस

हिंदुस्थानांतील धबधबे—

१ चेरापुंजी—खांसी डोंगराजवळ उंची १८०० फूट (आसाम); २ इरावतीचा— गिरिसप्पा गांवाजवळ उंची १००० फूट. ३ कावेरीस म्हैसूर प्रांतांत (शिवसमुद्रचा धबधबा) उंची ३००फूट ४ लालगुली धबधबा—उत्तर कानडा जिल्हा यल्लापूरजवळ उंची २५० फूट; ५ घटप्रभेचा धबधबा— गोकाकजवळ उंची १७५ फूट; ६ नर्मदेस मंडळा येथें; ७ बैकरा नदीस निलगिरी पर्वतांत; वेण्णेचा—महाबळेश्वरास.

हिंदुस्थानांतील सरोवरें —

पंपा सरोवर—कर्नाटकांत किष्किंधेजवळ; मंचर— सिंध प्रांतांत; सांबर—अजमीर प्रांतांत; दल—अजमीर प्रांतांत; वुलर व मानसबल—काश्मीर प्रांतांत; बिंदु सरोवर—सिद्धपुराजवळ; ताल—भोपाळजवळ; धेबर तलाव—उदेपूर संस्थानांत उदेपूरपासून ३० मैलांवर; पलिकत कोलेर—मद्रास इलाख्यांत; चिलका—पुरी जिल्ह्यांत; नारायण सरोवर—द्वारकेजवळ; विहार—मुंबईजवळ; तुळशी—मुंबईजवळ; पुष्कराज—अजमीरजवळ; लोणार सरोवर—वऱ्हाडांत बुलढाणा जिल्हा; पारवाल तलाव—वरंगळ जिल्हा, हैद्राबाद संस्थान; कोलेर—मद्रास इलाख्यांत; नैनीताल-संयुक्त प्रांतांत.

किनारा:—सध्यां हिंदुस्थान व ब्रम्हदेश

यांत शिरकाव होण्यासाठीं प्रवेशद्वारें म्हणजे समुद्रकिनाऱ्यावरील बंदरेंच होत. हिंदुस्थानच्या किनाऱ्यास खांचखळगे फारस नाहींत; त्यामुळें बंदरें होण्याजोगा समुद्रकिनारा फार थोडचा ठिकाणीं आहे. तसेंच, समुद्रकिनाऱ्यालगतचा समुद्र अगदीं उथळ आहे. त्यामुळें कच्छचें रण व आखात, खंबायतचें आखात, मानारची सामुद्रधुनी वगैरे ठिकाणीं सोईस्कर व्यापारी बंदरें होऊं शकत नाहींत. नदीचीं मुखें वाळूनें भरलेलीं असतात; त्यामुळें मोठचा जहाजांना नदीच्या मार्गानें आंत दूरवर मुळींच जातां येत नाहीं. याला दोन अपवाद आहेत. कलकत्ता व रंगून येथें भरतीमुळें गलबतें आंत या बंदरापर्यंत पोहोंचूं शकतात. मात्र त्यासाठीं नदींतील गाळ वारंवार काढून त्या पुरेशा खोल ठेवणें नेहमीं भाग पडतें. बाकी सर्व किनाऱ्याभर लहान लहान बंदरें आहेत. गलबतें बंदरापासून दूर उभीं राहतात व लहानलहान मचव्यांनीं बंदराचा व्यापार चालतो.

किनाऱ्यालगतचा मुलूख—(अ) खंबायतच्या आखातापासून तहत खालपर्यंत, समुद्रकिनारा व पश्चिमघाट यांजमध्यें एक अरुंद सखल जमिनीचा पट्टा पसरला आहे. या पट्टयास पश्चिम घाटावर येऊन आदळणाऱ्या मान्सूनचें सर्व पाणी मिळत असल्यामुळें, या भागांत अनेक लहान लहान नद्या पसरल्या आहेत. या पटचाच्या उत्तर भागास 'कोंकण' म्हणतात. व दक्षिण भागास मलबार म्हणतात. (आ) त्याचप्रमाणें गंगेच्या मुखाजवळील सुपीक त्रिकोणापासून तों थेट केप कामोरीनपर्यंत असाच एक अरुंद, सुपीक पट्टा आहे. हा पट्टा पश्चिम किनाऱ्यालगतच्या पट्टयापेक्षां जास्त रुंद आहे. अगदीं दक्षिणेकडे हा जास्त जास्त रुंदावत जाऊन पश्चिम घाटास भिडला आहे. या पटचांत अनेक मोठचा नद्या वाहतात. त्या आपल्याबरोबर पठारावरचें सर्व सुपीक खत धुवून आणतात. यांतील सर्वांत सुपीक प्रदेश म्हटले म्हणजे महानदी, गोदावरी, कृष्णा व कावेरी या नद्यांच्या मुखाजवळ तांदूळ पिकविणारे प्रदेश होत. दख्खनच्या पठारावर चढणें हें पश्चिम घाटापेक्षा या बाजूनें जास्त सुलभ जातें. कारण नद्यांचीं विस्तीर्ण खोरीं हीं लोहमार्गासाठीं उपयोगी पडतात. शिवाय या बाजूचे घाटहि पश्चिम घाटाइतके अवघड नाहींत. किनाऱ्यालगतचा प्रदेश डोंगराळ नसल्यामुळें आगगाडचांच्या योगानें या बाजूस वाहतूक फार जलद होते.

सिंधु गंगेचें खोरें—हें प्रख्यात खोरें सर्व उत्तर हिंदुस्थानभर पसरलेलें असून त्याची उत्तर सरहद्द खुद्द हिमालयाला आणि पूर्व आणि पश्चिम सरहद्द हिमालयाच्या फाटचांना भिडली आहे. याच्या दक्षिणेला विस्तीर्ण दख्खनचें पठार पसरलेलें आहे. अशा रीतीनें चारही बाजूंच्या उंच उंच प्रदेशांतील चिखल व गाळ, त्या त्या प्रदेशांतून वाहात येणाऱ्या नद्यांच्या द्वारां आज हजारों वर्षे खालीं येत आहे. या वाहून आलेल्या मातीनें व गाळानेंच हें सुपीक खोरें बनविलें आहे. या खोऱ्याचा पश्चिम भाग सिंधु व तिच्या उपनद्या यांच्या कांठच्या प्रदेशांनीं बनला असून तो सिंधूच्या तिकोनी मुखाशीं आरबी समुद्र, कच्छचें रण व कच्छचें आखात यांशीं संलग्न आहे. गंगा, यमुना, ब्रम्हपुत्रा व त्यांच्या शेंकडों उपनद्या यांनीं भिजत असलेल्या विस्तीर्ण प्रदेशाचा समावेश वरील खोऱ्याच्या पूर्वेकडील अर्धांत केलेला आहे. हा पूर्वार्ध गंगा व ब्रम्हपुत्रा यांच्या अवाढव्य तिकोनी मुखांशीं व बंगालच्या उपसागरास जोडलेला आहे. या खोऱ्याचा पश्चिमार्ध व पूर्वार्ध एकाद्या नकाशांत निरनिराळे दिसतील इतके स्पष्ट आहेत. सिंधु—गंगेचें खोरें हें सर्व जगांतील अत्यंत महत्वाच्या खोऱ्यांपैकीं एक आहे. शेंकडों नद्यांच्या द्वारां हजारों वर्षे खालीं वाहात आलेल्या गाळानेंच हें खोल व सुपीक जमिनीचें खोरें तयार झालें आहे. व यामुळें तें फारच सखल व पसरट बनलें आहे. गंगा व सिंधु यांच्या मुखापासून सारख्याच अंतरावरील व जलमार्गापासून १३०० मैल दूर असलेलें आग्रा शहर समुद्रसपाटीपेक्षां फक्त ५५० फूटच उंच आहे. अशा तऱ्हेच्या सखल प्रदेशांतील पसरटपणामुळें येथील नद्या अगदीं संथ वाहतात. व त्यामुळें शेतांना त्यांचें पाणी पुरविण्याचें व त्यांमधून कालवे खणण्याचें काम फार सुकर होतें. तसेंच या संथ वाहाणाऱ्या नद्यांचा जलमार्गानें चालणाऱ्या वाहतुकीला फारच उपयोग होतो. तसेंच सर्व प्रदेश जवळ जवळ एकाच पातळींत असल्यामुळें नवीन रस्ते व आगगाडचांचे मार्ग यांचीं कामें अत्यंत थोडचा पैशांत व अगदीं जलद होऊं शकतात. रेल्वेच्या नकाशांत आपण पाहिलें तर इतर कोणत्याही ठिकाणापेक्षां याच ठिकाणीं रेल्वेच्या रस्त्यांची अधिक गर्दी आपणास दिसेल. हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाचा एकतृतियांशाहून अधिक भाग ,बहुतेक मोठीं शहरें व दोन तृतियांश लोकसंख्या या खोऱ्यांत येते. या खोऱ्याच्या पश्चिम भागापेक्षां पूर्वभागाला बराच अधिक पाऊस

मिळतो. तेव्हां अर्थातच पूर्वभागांत पुष्कळ मोठमोठीं शहरें व अधिक लोकसंख्या आहे. पश्चिम भागांत एकंदरींत पाऊस कमीच पडल्यामुळें तो प्रदेश तितकासा सुपीक नाहीं. व म्हणून त्यांतील लोकसंख्याहि कमीच आहे. थर व सिंध येथील वाळवंटांनींच त्याचा बराच भाग व्यापिला आहे. सिंधु, तिच्या उपनद्या व त्यांचे कालवे यांनीं भिजविलेल्या प्रदेशापलीकडे फारशी शेती नाहीं म्हटलें तरी चालेल. सिंधु–गंगेचें खोरें व विशेषतः त्याचा पूर्वभाग हिंदुस्थानचा एक मौल्यवान अलंकार आहे. गंगेच्या कांठीं व गंगा–यमुनांच्या दुआबांत प्राचीन काळापासून मोठमोठीं साम्राज्यें होऊन गेलेलीं आहेत. हा प्रदेश पूर्वीपासूनच अत्यंत सुपीक, समृद्ध व संपन्न असा होता व आहे. आणि म्हणूनच तो प्रख्यात योद्धे व असाधारण बुद्धीचे धर्माचार्य आणि पंडित यांचें आगर बनून राहिला होता. या सर्व कारणांमुळेंच गंगा नदी अखिल भारतीयांना अत्यंत पूज्य व पवित्र वाटते. हिंदूंचें अत्यंत पवित्र व श्रेष्ठ काशी तीर्थ अर्थातच गंगाकांठीं आहे.

पठार–प्रदेशः–––(१) माळवा पठार–– अरवली व विंध्य यांच्या रांगांमधून पसरलेला भाग म्हणजे मध्यहिंदुस्थानचें किंवा माळवा पठार होय. ईशान्येकडे वाहून यमुनेला मिळणाऱ्या चंबळा वगैरे नद्यांनीं व पाटणाजवळ गंगेला मिळणाऱ्या शोण नदीमधून माळवा–पठारावरील पाणी उत्तरेकडील विस्तीर्ण खोऱ्यांत उतरतें.

(२) दक्षिणचें पठार–यानेंच पठार प्रदेशाचा बहुतेक भाग व्यापिला आहे. हें, शिरोबिंदु दक्षिणकडे असलेल्या त्रिकोणाच्या आकाराचें आहे. नर्मदा व तापी या नद्या खेरीजकरून या पठारावरील बाकी सर्व नद्या बंगालच्या उपसागरास मिळाल्या आहेत. यावरून पठाराचा पश्चिम प्रदेश पूर्वप्रदेशाहून अधिक उंच आहे हें अगदीं स्पष्ट होतें. या पठाराची पश्चिम सीमा म्हणजे सह्याद्री पर्वत होय. सह्याद्री पर्वत कँबेच्या आखातापासून तों केप–कामोरीन पर्यंत सारखा पसरला असून त्याला नाहीं म्हणावयास एकदोनच खिंडी आहेत. पूर्वघाटांनीं पठाराची पूर्वसीमा बनविली आहे. पूर्वघाट म्हणजे एक पर्वत नसून कित्येक लहान लहान पर्वतांचा समुदाय होय. याला निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं नांवें आहेत. या पर्वताच्या खिंडींतून पूर्ववाहिनी नद्या किनाऱ्याच्या अरुंद पट्टीवर उतरतात व बंगालच्या उपसागरास मिळतात. सह्याद्रि आणि पूर्वघाट निलगिरी टेकड्यांनीं जोडलेले आहेत. निलगिरीचें अत्युच्च शिखर दोदाबेटा हें असून त्याची उंची ८६४० फूट आहे. याच्याच बरोबर उत्तरेस पठाराचा सर्वांत उंच प्रदेश म्हैसूर आहे. या भागांतूनच कावेरी नदी वाहाते. दक्षिणच्या पठाराच्या उत्तरेकडील अर्धा भाग साधारणतः लहानलहान टेकड्यांनीं भरलेला असून या टेकड्या सामान्यपणें नैऋत्येकडून ईशान्येकडे अगदीं राजमहाल टेकड्यांपर्यंत जातात. नर्मदेच्या उत्तरेस विंध्य व दक्षिणेस सातपुडा पर्वत आहे. त्यानंतर महादेव व मैकल टेकड्या आणि छोटा नागपूर व ओरिसा यांतील उंच प्रदेश अशा रीतीनें ही दगडी भिंत अगदीं ईशान्य कोपऱ्यापर्यंत जाते. येथून जवळच गंगेचें खोरें व तिचीं मुखें हीं आहेत. सिंधू व गंगेच्या खोऱ्याप्रमाणें हें पठार अगदीं सऊ व सुपीक (Alluvial) गाळाचें बनलेलें नाहीं. तें अंतर्गतदाह व धरणीकंप यांनीं वर उचललेलें आहे. म्हणून तें अर्थातच कठीण दगडांचें बनलेलें असून वर एक मातीचा पातळ थर आहे. मात्र नद्यांच्या कांठचे प्रदेश नद्यांबरोबर वाहात खालीं आलेल्या गाळामुळें पुष्कळ ठिकाणीं अगदीं सुपीक बनलेले आहेत. तसेंच खोऱ्याप्रमाणें हा प्रदेश एका पातळींत नाहीं. या पठारावर उभें राहिलें असतां चारही बाजूंस टेकड्या किंवा कडे कोठेंना कोठें दिसतच असतात. लहान डोंगरांच्या रांगाच रांगा या पठारावर पसरलेल्या आहेत. यामुळें हें पठार गंगेच्या खोऱ्यासारखें सुपीक नाहीं. येथें शेतीच्या लागवडीला मुबलक जागा नाहीं. येथें कांहीं धान्यें पिकतात. अन्नोत्पादन करणारीं कांहीं पिकें येथें वाढतात. खेडीं, शहरें व लोकसंख्या हीं बेताबातानेंच आहेत. वरील कारणांमुळेंच या उंचसखल प्रदेशांत मोठमोठे रस्ते तयार करण्याचें काम मोठें बिकट होऊन बसलें आहे. हिमालयांतून निघणाऱ्या नद्यांप्रमाणें या नद्यांना बर्फाचा पुरवठा नसल्यामुळें व शिवाय पाऊस फक्त मोसमांतच पडत असल्यामुळें फार मोठ्या नद्यांखेरीज या पठारावरील बाकी सर्व नद्या उन्हाळ्यांत आटून जातात. त्यावेळीं त्यांना एकाद्या अगदीं भिकार ओढ्याचें रूप प्राप्त होतें. शिवाय त्या खडकाळ प्रदेशांतून वाहातात. यामुळें त्यांचा जलमार्ग म्हणून काडीचाहि उपयोग होत नाहीं. गोदावरीसुद्धां उन्हाळ्यांत अगदीं उथळ होते. अशा परिस्थितीमध्यें नद्यांना कालवे काढणेंहि अशक्य आहे. जमीन फार उंचसखल आहे. व कालव्यांमधून वाहण्यास पुरेसें पाणीहि नद्यांत नेहमीं शिल्लक नसतें. यामुळें पाणीपुरवठा नीट

होत नाहीं. खोल विहिरींतील किंवा खोलगट प्रदेशांतील तळ्यांत पावसाचें जमलेलें पाणी काढून तें घेतांना पुरवावें लागतें.

हिंदुस्थानांतील प्राणी--

सस्तन प्राणी--- सिंह हा प्राणी प्राचीन काळींहि उत्तर हिंदुस्थान व पंजाब येथें आढळत असे. सध्यां काठेवाडचें जंगल व खडकाळ वाळवंटवजा टेकड्या यांखेरीज इतर ठिकाणीं सिंह सहसा आढळत नाहीं. तेथें आयाळरहित अशी एक सिंहाची जात आढळते. पण ती एक स्वतंत्र जात म्हणून मान्य करावी कीं नाहीं या प्रकारचें निसर्गवेत्त्यांत अजून एकमत नाहीं. या प्रकारचे सिंह एके काळीं जवळजवळ नामशेष झाले होते. परंतु जुनागडच्या महाराजांनीं १८९० पासून त्यांची जोपासना केल्यामुळें हळूंहळूं त्यांची संख्या वाढत आहे. दणगट सिंह साधारणपणें ९--९॥ फूट लांब असतो.

वाघ---हिंदुस्थानांतील सर्व प्रदेशांत वाघ सांपडतो. वाघाची लांबी सरासरीनें ९--१० फूट असते. व वाघिणीची ८--९ फूट असते. पण १२ फूट ४इंच लांबीचा वाघहि कधीं कधीं शिकाऱ्यांना सांपडलेला आहे. शिकारीजंगलांतूनहि जमिनीची जास्त जास्त लागवड होऊं लागली म्हणून मोठाल्या (सखोल) प्रदेशांतून वाघ दिसेनासा झाला आहे. पण हिंदुस्थानांतील त्यांचें कायमचें उच्चाटन होईल असा मुळींच संभव नाहीं. सध्यां वाघाचें वास्तव्य हिमालयाच्या पायथ्याशीं गंगेच्या मुखाजवळील त्रिकोणांतील मनुष्यांची वस्ती नसलेला कांहीं मुलूख व हिंदुस्थानच्या पठारावरील मध्य निबिड अरण्यें या भागांत आहे. हरीण, काळवीट व डुक्कर हीं त्याचीं भक्ष्यें जोंपर्यंत विपुल आहेत तोंपर्यंत तो इतर जनावरांकडे सहसा वळणार नाहीं. आपल्या पिकांची नासाडी करणाऱ्या पशूंचा नाश करणारा या दृष्टीनें वाघाकडे बघण्याची पुष्कळांची प्रवृत्ति आहे.पण एकदां कां त्याला नरमांसाची चटक लागली कीं, तो काय प्रळय मांडील याचा नेम नसतो.

चित्ता--- वाघापेक्षां चित्ता हिंदुस्थानांत जास्त आढळतो. प्राणहानी व नासधूस या बाबतींत हा वाघाशीं स्पर्धा करील. याची जास्तींत जास्त लांबी ७॥ फूट असते. काळ्या रंगाची चित्त्याची जात हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकास व जाव्हा बेटांत आढळते.

हत्ती--- हिंदुस्थानच्या बऱ्याच प्रांतांतून हत्ती आढळतो. फक्त वायव्येकडील प्रदेशांत सांपडत नाहीं. हत्तीच्या आकारावरून व आफ्रिकेच्या हत्तींच्या माहितीवरून आपली अशी कल्पना होते कीं, हत्ती हा सखल व सपाट, मोकळ्या प्रदेशांत वस्ती करणारा प्राणी असावा. पण हिंदुस्थानांतील हत्ती निदान हल्लीं तरी उंच टेकड्यांवर आपलें वास्तव्य करतो. त्यांनहि हत्ती सहसा डोंगराच्या दरींत सांपडत नाहींत. ते बहुतकरून उंच जागीं, पठारावर आढळतात. हिंदुस्थानांतून हत्तींची अगदीं हकालपट्टी झाली आहे असें म्हणतां येईल. फक्त कूर्गच्या रानांत, म्हैसूर व त्रावणकोर येथील जंगलांत व ओरिसांतील कांहीं मुलुखांत हत्ती सांपडतात. हिमालय पर्वताच्या तराईत अजून हत्ती बरेच सांपडतात. परंतु हत्तींचा सर्वांत जास्त पुरवठा आसाम ते ब्रम्हदेश यांमधील डोंगरांच्या रांगींमुळें ब्रिटिश हिंदुस्थानची जी सरहद्द बनली आहे, तेथून होतो. तेथील हत्तींच्या दोन जाती आहेत. सुळे असलेला हत्ती व सुळा नसलेला हत्ती. हत्तीची सर्वांत जास्त उंची सरासरी १२ फूट असते. हत्तीची शिकार करावयाची असल्यास ती पायींच करावी लागते. व त्याच्या शरिरावर विशिष्ट जागींच बंदुकीच्या गोळीचा परिणाम होत असल्यामुळें हत्तींची शिकार फार अवघड व धोक्याची असते. सध्या हत्तींचा मक्ता सरकारकडे आहे व त्याची शिकार करण्याची मनाई आहे. हत्तींचा उपयोग लाकडाच्या व्यापारास व सरकारी वाहतुकीस होतो.

पाणघोडा--- ब्रम्हपुत्रा नदीच्या खोऱ्यांत पाणघोडे आढळतात. त्याला शिंगें असतात. व तीं मोठीं औषधी असतात. सुंदर बनांत व ब्रम्हदेशांतही पाणघोडे आढळतात.

कस्तुरी मृग--- हा फक्त तिबेटांतच आढळतो

महाराष्ट्रांतील जिल्ह्यांचीं वर्णनें

पश्चिम खानदेश

क्षेत्रफळ ५४३९ चौ. मैल. बहुतेक प्रदेश डोंगराळ आहे.फक्त तापी व तिच्या उपनद्यांच्या कांठाकांठानीं काय तो काळ्या मातीचा सपाट प्रदेश आहे. जिल्ह्यांतील अगदीं पूर्वेकडील तालुके कांहींसे पूर्वखानदेशच्या धर्तीवर आहेत. शिरपूरमधील तापीकांठचा प्रदेश फार सुपीक आहे परंतु उत्तरेकडील भाग मात्र रानटी, डोंगराळ

व भिल्ल जातीचें वसतिस्थान आहे. धुळें तालुका टेकडयांमुळें तुटक झाला आहे. खोऱ्यांमधून झाडी भरपूर आहे. शिदखेडयामधील खोरें सोडून बाकीचा प्रदेश डोंगराळ व चराईच्या उपयोगाचा आहे. सर्व जिल्हयांत शहादे तालुका फार सुपीक आहे. तेथें सर्व जमीन निर्भेळ काळी आहे. साक्री, नवापूर, तळोदें, यांतील उत्तरेकडील प्रदेश हे डोंगराळ भाग सोडून दिले म्हणजे बाकी सर्वत्र काळ्या जमिनी पसरल्या आहेत.

सरासरी पाऊस २४ इंच. एकंदर हवामान बरें असतें. जंगलप्रदेशांत व त्या आसपास मात्र दोषी, दमट व मलेरियस् अशी हवा असते. मुख्य-पीक—कापूस. एकंदर शेतीपैकीं तीस हिस्से शेतीत कापूस पिकतो. विशेषतः धुळें,शिदखेड, शिरपूर व शहादे या तालुक्यांत हेंच पीक मुख्य होय. शेंकडा २५ जमीनींतून बाजरीची पेरणी होते. त्या मानानें ज्वारीचें पीक मोठें नाहीं. सव्वा लाख एकर जमीन गव्हाकडे जाते. तीस हजार एकर जमीन तीळ व पंधरा हजार एकर भुईमुगाच्या शेंगा. माथ व कुळीथ हें पीक दुय्यम असलें तरी फार मोठें आहे. शहादे व नंदुरबार या तालुक्यांत हरभरा बराच पिकतो.

या जिल्हयांत गुरांची निपज फार चांगली होते. चराइती जमिनी मुबलक आहेत. धंदे-वाईक गुराखी वंजारी, खिलारी, भिल्ल व रज-पूत पुष्कळ आहेत. यांचा गुरांचा कळप १०० पासून २०० पर्यंत असतो. सर्वसाधारण शेतकरी देखील बरींच गुरेंढोरें बाळगतात. येथें गुरांची निपज होण्यास अनुकूल परिस्थिति असू-नहि अव्वल दर्जाचीं गुरें आढळत नाहींत. यांपेक्षां माळवा, इंदूरकडील जनावरें फार चांगलीं असतात. येथील बहुतेक जनावरें माळवी व खिलारी या दरम्यानचीं असतात. साक्री, नंदुर-बार, नवापूर, तळोदे या ठिकाणीं होणारी सोनखेरी जात विशिष्ट आहे. तीं जनावरें अतिवृष्टीहि सहन करतात.

१३६० चौ. मैल—जंगल; १३१ चौ. मैल—जळणाचें लाकूड व गवती रानें यांकरितां राखून ठेवलेलें जंगल. हें त्या खात्याच्या ताब्यांतील क्षेत्र. १७७ चौ. मैल—रेव्हेन्यू खात्याच्या ताब्यांतील चराईत जमीन. पश्चिमे-कडील जंगलांतून इमारती लाकूड उत्तम तयार होतें. सुरत व इतर ठिकाणीं या लाकडाची निर्यात खूप होते. जळणाचें लाकूड प्रतिवर्षी अधिकाधिक तयार होत आहे. गवताचीं कुरणें मुबलक आहेत. गुजराथमध्यें दुष्काळ पडला तर चाऱ्याचा पुरवठा मुख्यतः येथूनच होतो. उदा:—१९२१—२२ या वर्षी ७५ लाख पौंड गवत बिडे बांधून नवापूर येथें 'फॉडर रिझर्व' म्हणून ठेवलें होतें.

धुळयाच्या दक्षिणेकडील 'मुक्तीटँक' व पांझरा नदीचे कालवे हींच काय तीं पाटबंधारे खात्याचीं या जिल्हयांतील कामें. सन १९२५ पर्यंत 'दि लोअर पांझरा रिव्हर वर्क्स' च्या टापूंत एकंदर १३११७ एकर जमीन येत असे. हें काम पूर्ण झालें तर १२६२७ एकर जमिनीला लागवडी-करतां पाणीपुरवठा होईल असा अंदाज होता. हल्लीं किती एकरास पाणी पुरवठा होतो हें नक्की सांगतां येत नाहीं. कारण हंगामानुसार तें क्षेत्र बदलतें. परंतु १९२२—२३ सालांत अडीच हजार एकर जमिनीस पाणी पुरविलें. या जिल्हयांत १० हजारावर विहिरी पाणी पुरविण्या-करितां उपयोगांत आणल्या. शिरपूर, शहादे, साक्री व नंदुरबार तालुक्यांतील कांहीं कांहीं भाग सोडून बाकी सर्व जिल्हयांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आहे. नंदुरबार गांवांत हा तुट-वडा चांगला जाणवतो. पश्चिम भागांत पुरेसा पाणीपुरवठा आहे. या जिल्हयांत फक्त धुळें येथें हातमागावर काम करणारे विणकरी आहेत. हें काम करणाऱ्या मोमीन लोकांची संख्या मोठी आहे. हंगामापुरत्या काम करणाऱ्या जीनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज सर्व जिल्हाभर पसरल्या आहेत. येथून मुख्यतः कापसाची निर्यात होते. यांशिवाय धान्य, गळिताचीं धान्यें, लोणी, मेण व मध हीं बाहेरच्या देशांत जातात. आयातः—मसाल्याचे जिन्नस, धातु, साखर, सूत इत्यादि.

पूर्व खानदेश

क्षेत्रफळ ४४२४ चौ. मैल. पूर्व खानदेश दक्षिणदेशच्या पठारास येऊन भिडतो. जिल्हयाच्या उत्तरेकडील सरहद्दीवर सातपुडयाच्या मोठमोठ्या टेकडयांच्या रांगा आहेत. तापी नदी यांमधून गेली असून ही व गिरणा आणि पुरणा या नद्यांमुळें या प्रदेशास ओलावा आहे. रावेर, यावल व चोपडें या तालुक्यांचा उत्तर प्रदेश तुटक व डोंग-राळ आहे. व सर्वत्र दाट जंगल असल्यामुळें वस्ती फार विरळ आहे. जिल्हयाचा दक्षिणेकडील व पश्चिमेकडील प्रदेश हे डोंगराळ आहेत. परंतु तेथील डोंगर उंच व एकसारखे नाहींत आणि अगदीं उजाड व मधून मधून बारिक झुडुपें

आहेत. तापीच्या दोन्ही कांठांनीं अतीशय सुपीक जमीन एकसारखी आहे. उत्तरेकडे तापीचें खोरें (Valley) असून तेथें दाट झाडी आहे. फक्त भुसावळ तालुक्यांत मात्र या खोऱ्यांत आम्रवृक्ष दिसतात. गिरणेच्या खोऱ्याभोंवतीं निकस, तांबड्या जमिनी, कातळ व उंचसखल निरुपयोगी जमिनी पसरल्या आहेत. नदीकांठच्या जमिनी बऱ्यापैकीं आहेत. परंतु तापीच्या खोऱ्यांतील जमिनीपुढें त्या हलक्या ठरतील. जामनेर हा चढउताराचा प्रदेश असून त्याच्या मधूनमधून ओढे वहात गेले आहेत. या ओढ्यानाल्यांच्या कांठांनीं सारखीं बाभळीचीं झाडें आहेत. एकंदर हवामान निरोगी. उन्हाळ्यांत, विशेषत: तापीच्या उत्तरेस फार कडक उन्हाळा असतो. मॉन्सूनचा हंगाम संपल्यावर मलेरिया होण्याचा संभव फार. त्यांतल्या त्यांत सातपुड्या नजीकच्या खेड्यांना विशेष भीति असते.

सरासरी पाऊस २८ इंच. पावसाचें प्रमाण सतत बदलतें. उदा:-भुसावळला १८८३ मध्यें ७१ इंच पाऊस झाला, तर १८९९ सालीं ७ इंचच पडला. पूर्वखानदेशांत कापूस हें पीक मुख्य होय. या पिकानें व्याप्त जमीन ८ लक्ष एकर म्हणजे, एकंदर शतीपैकीं ४५ हिस्से इतकी आहे. शक्य तों पेरणी जूनमहिन्यांत होते.हें पीक पांढरट (Light) किंवा काळ्या जमिनींतहि होतें. ज्वारी व बाजरी या पिकांकडे प्रत्येकीं १५ हिस्से शेती आहे. ज्वारीची पेरणी करतांना मधून मधून उडीद व अंबाडी टाकतात. चाळीसगांव व अंमळनेर या तालुक्यांतून बाजरीचें महत्व जास्त आहे. इतर आसपासच्या तालुक्यांत बाजरी व ज्वारी सारख्याच महत्वाचीं आहेत. बाजरीची पेरणी ज्वारीपेक्षां उशीरां होते व ती बहुतेक निर्भेळ असते. हलक्या जमिनींतून बाजरी तयार झाली म्हणजे नंतर ती कापसास चांगली तयार होते असें म्हणतात.गहूं—लागवड ३० हजार एकर. मुख्यत: जळगांव, अंमळनेर आणि चोपडें या तालुक्यांत होतें. दुय्यम पिकें:—मूग, उडीद, तूर, माठ व कुळीथ (हुलगे) . हरबरा—अंमळनेर चोपडा, जळगांव; तीळ—अंमळनेर, चोपडा, चाळीसगांव, एरंडोल. जंवस—रबी पीक.

पूर्वखानदेशमध्यें पश्चिमखानदेशाप्रमाणें गुरांची निपज होत नाहीं. येथील शेतकरी जनावरें बाहेरून विकत आणतात.गुराढोरांचा धंदा करण्यापेक्षां कापूस पिकवून व्यापार करणें हेंच लोकांस किफायतशीर पडतें. शिवाय इतर प्रांतांतून त्यांना चांगलीं जनावरें शेतीकरितां विकत घेतां येतात. येथील सपाट सखल जमिनीवर गुरेंढोरें चांगलीं पोसलीं जात नाहींत. उत्तरेकडील सातपुड्याच्या पायथ्यानजीकचा प्रदेश, चोपडें तालुक्यांतील उत्तर प्रदेश, आणि जळगांव,पाचोरें व एदलाबाद पेटा, यांतील डोंगराळ मुलूख एवढ्या भागांत चराईचीं कुरणें आढळतात. जिल्ह्यांतील एकंदर जनावरें ६लाख; यांतील २ पंचमांश शेतीचीं जनावरें, तिसरा हिस्सा दुभतीं जनावरें, व चौथा हिस्सा वासरें.बकरीं—मेंढी सुमारें २ लाख आहेत.

सुमारें ७६४ चौ. मैल जंगल, जंगल—खात्याच्या ताब्यांत आहे. ३६ चौ. मैल गवती कुरणें रेव्हेन्यू खात्याच्या क्षेत्रांत आहेत. एकंदर जंगलाचें उत्पन्न बेताचेंच आहे. सातपुड्याच्या आसपास काय ती उत्तम वाढ होते. इमारत-लाकूड व जळण तेवढ्या जिल्ह्यापुरतें निघतें. जंगल-प्रदेशांतील गवती कुरणें फार उत्तम आहेत व पुष्कळ जनावरें तेथें पोसलीं जातात.

हरतळा टँक, म्हसवा टँक व जामदा कॅनॉलस् हीं येथील पाटबंधारे—खात्याचीं कामें. हरतळें तलाव—हा तलाव एदलाबाद गांवापासून ४ मैलांवर हरताळ या खेड्याशेजारीं आहे. बंधारा १२०० फूट लांब व ५० फूट उंच आहे. ७ चौ. मैलांपर्यंत पाणी जाऊं शकतें. (Drainge area) शेतांना पाणी पुरविण्याकरितां दोन कालवे काढले असून त्या कालव्यांना मधून मधून फाटे फोडले आहेत. प्रत्येक कालवा १ मैल लांब आहे,आणि सर्व फाटे मिळून एकंदर लांबी ५ किंवा ५॥ मैल भरेल. या तलावाचें पाणी आसपासच्या ४०० एकर जमिनीस पुरेल इतकें आहे. परंतु १९२५ पर्यंत तरी फक्त हरतळ खेड्यापुरताच याचा उपयोग होत होता. तेथील लोकांस व गुराढोरांस हा मोठाच पाणीपुरवठा आहे. नाहींतर तेथें पाणी अपुरें पडलें असतें. म्हसवें तलाव, म्हसवा टँक—पारोळें गांवच्या पश्चिमेस सुमारें तीन मैलांवर हा तलाव आहे. बंधाऱ्याची लांबी १५०० फूट व जास्तींत जास्त उंची ४४ फूट. पाण्याचा सांठा बहुतेक १ कोटी ७२ लक्ष घनफूट असतो. कालवे दोन काढले असून त्यांची प्रत्येकी लांबी ३॥ मैल आहे. ४०७५ एकर जमीन या तलावामुळें भिजूं शकेल. या तलावा भोंवतालच्या प्रदेशांत पाण्याची वाण असल्यामुळें या पाणीपुरवठ्याचा फारच उपयोग होतो. विशेषत: रबी पिकें यामुळें तरतात. तलावांतील पाण्याचा सांठा निश्चित नसल्याकारणानें ऊंस, केळीं

इ. बागाईत करतां येत नाहीं. आणि म्हणून हा तलाव एकंदरींत किफायतशीर पडत नाहीं. जामदें कालवेः--(जामदा कॅनॉल्स) हे कालवे गिरणेपासून काढले असून यांच्या टापूंत २३८९ चौ. मैल क्षेत्र येतें. जामदें गांवाजवळ गिरणानदीला हें बांधीव धरण आहे. लांबी १५३० फूट व सर्वांत जास्त उंची १८ फूट. याला दोन कालवे काढले आहेत. डावीकडच्या बंधाऱ्यावरील कालवा २७ मैल लांब आहे व त्यामुळें ३७१२२ एकर जमिनीस पाणी पुरतें. उजव्या बंधाऱ्यावरील कालवा १२ मैल लांब आहे व त्याचा टापू ९१६६ एकर आहे.हा या कालव्यांच्या अटोक्यांतील प्रदेश चाळिसगांव व पाचोरें तालुक्यांत आहे. या कालव्यांचें पाणी ५ हजार एकर जमिनीस पुरतें. म्हणजे ३१ खेड्यांचा त्यांत समावेश होतो. या जिल्ह्यांत २५ हजारांवर विहिरी शेतीच्या कामाकरितां आहेत. एरंडोल तालुका सोडून बाकी सर्व जिल्ह्यांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बरा आहे. पारोळें व एदलाबादमधील कांहीं खेड्यांतून थोडी टंचाई भासते.

कापड तयार करणें हा येथील मोठा उद्योगधंदा होय. पारोळें, एरंडोल व धरणगांव यथें हातमागाचा धंदा प्रमुख आहे. फजपूरला रंगविण्याचें काम हाच मुख्य उद्योग अहे. या जिल्ह्याची जळगांव ही व्यापार पेठ आहे. याच्या खालोखाल अंमळनेरला व्यापार चालतो. या दोन्ही शहरांत व चाळीसगांवला सूत कांतणाऱ्या व विणून कापड बनविणाऱ्या गिरण्या आहेत. जीनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज् तर प्रत्येक तालुक्यांतून व पेट्यांतून आहेत. घोंगड्या सर्वत्र तयार होतात. येथील कापसाची निर्यात फार मोठी आहे. त्या खालोखाल धान्य, गळिताचीं-धान्यें, लोणी, मेण व मध हे जिन्नस बाहेरच्या देशांत जातात. आयात-मीठ, मसाल्याचे जिन्नस, धातु, साखर,सूत इत्यादि.

नाशिक

क्षेत्रफळ५८९२ चौ. मैल. कांहीं खेडीं सोडून बाकी सर्व जिल्हा हा एक पठार प्रदेश आहे. समुद्रसपाटीपासून याची उंची १३०० ते २००० फुटांपर्यंत येईल.या जिल्ह्याचे साधारणतः तीन स्वाभाविक विभाग पडतात. १ डांग (पश्चिमपटी), २ देश,३ट्रँन्झिशन ट्रॅक्ट.डांग पटींत पेठ तालुका येतो. हा तालु.पठार प्रदेशाच्या खालीं६००फूट असल्यानें वास्तविक कोंकण पटींत मोडावयास पाहिजे. डांग प्रदेश म्हणजे उत्तरेपासून दक्षिणकडील पश्चिम भाग होय. हा सर्व डोंगराळ भाग असून मधून मधून पाण्याच्या लोंढ्यामुळें बनलेले सखल प्रदेश आहेत. टेकड्यांवर झुडुपांचीं रानें व डोंगरावर साग वृक्ष आहेत. विशेषतः पेठकडील भागांत सागाची निपज उत्तम होते. इकडील डोंगराळ भागांत गवती कुरणें मुबलक असल्यामुळें हजारों जनावरें येथें चरणीकरितां येतात. पाऊस अतोनात पडतो. व हिवाळ्यांत हवा मलेरियस् असते. पूवकडील प्रदेशास देश म्हणतात. देश म्हणजे मालेगांव, नांदगांव, येवलें, निफाड हे तालुके आणि सिन्नर व चांदवड तालुक्यांतील पूर्व भाग एवढा प्रांत येतो. हा भाग खुला व सुपीक आहे. फक्त उत्तरेकडून दक्षिणेकडे पश्चिम-घाटाची रांग आहे. बाकी सर्व डोंगर, टेकड्या पश्चिमपूर्व अशा आहेत. चांदवड डोंगराची रांग ही जिल्ह्याचा पाणलोट आहे. (Water-shed). या रांगेमुळें गिरणा व गोदावरी या नद्यांचीं खोरीं निरनिराळीं झालीं आहेत. चांदवडरांगेच्या दक्षिण बाजूकडील सर्व नद्यानाले गोदावरीस मिळतात. त्यांतील मुख्य म्हणजे दारणा, कादवा, देव, बाणगंगा, या रांगेच्या उत्तरेस गिरणा व तिची उपनदी मोसम या सुपीक खोऱ्यांतून वहात जाऊन तापी नदीस मिळतात. ट्रॅन्झिशन ट्रक्ट (मध्यपट्टी) मध्यें सिन्नर व चांदवड(देशांत समाविष्ट झालेला भाग सोडून) आणि बागलाण, कळवण, दिंडोरी व नाशिक या तालुक्यांतील कांहीं भाग, या सर्व प्रदेशाचा समावेश होतो. ज्या भागांत दुष्काळ पडण्यासारखा असतो तो सगळा देशावर आहे. सर्व दक्षिण देशांत नाशिक जिल्ह्याची हवा उत्तम समजली जाते. जिल्ह्याच्या पूर्वभागांत उन्हाळा व थंडी दोनही कडक प्रमाणांत असतात. जानेवारी महिन्यांत अतिशय थंडी असते. व एप्रिल महिन्यांत कडक उन्हाळा असतो. इतर वेळीं सर्व वर्षभर पश्चिमेकडील व नैऋत्येकडील (दक्षिण-पश्चिम) वाऱ्यामुळें हवा समशीतोष्ण असते.

पावसाचें प्रमाण सर्वत्र सारखें नाहीं. नाशिक शहरांत सरासरी ३० इंच पाऊस पडतो, तर इगतपुरीला १३० इंच पडतो. पेठ तालुक्यांत मुबलक पाऊस पडतो. तेथील सरासरी ८५ इंच आहे. इतरत्र १८ इंचापासून (सटाणें-बागलाण ता.) ३० इंचापर्यंत (दिंडोरी) पाऊस असतो. पाऊस मुख्यतः नैऋत्येकडील वाऱ्याबरोबर येतो. मान्सूनला सुरुवात जूनमध्यें होते; आक्टोबरच्या सुरवातीस मोसम संपतो. फेब्रुवारी ते एप्रील,

या काळांत पाऊस अगदींच क्वचित् पडतो. डांग प्रदेश–तांदूळ व नाचणी हें येथील मुख्य उत्पन्न आहे. नाचणी, साव व खुरासणी हीं पिकें क्रमवार होतात. तिसऱ्या वर्षांतील पिकांची कापणी झाली म्हणजे कित्येक वर्षें जमीन पडून राहाते. पेठ तालुक्यांत शेती अगदींच थोडी आहे. या जिल्ह्यांत बाजरीचें पीक फार मोठें असून इतर सर्व धान्यांच्या पेरणीकडे, एकूण खर्च होणाऱ्या जमिनीपेक्षां जास्त जमीन खर्ची पडते. ज्वारीचें पीक त्या मानानें कोठेंहि मुख्य नाहीं. यावरून नाशिक जिल्हा पहिल्या पावसावर अवलंबून असतो, हें स्पष्ट आहे. बाजरी पेरतांना मधून मधून कडदण टाकलेलें असतें. बहुतेक गहूं देशावर तयार होतो. गळिताचीं धान्यें अनेक प्रकारचीं तयार होतात. जवस, तीळ, भुईमूग हीं फार महत्त्वाचीं पिकें आहेत. शिवाय करडई, कारळें इ. दुय्यम पिकें आहेतच. कापसाचें पीक मुख्यतः देशावरील आहे. या पिकाकडे लोकांचें लक्ष्य दिवसानुदिवस जास्त जाऊं लागलें आहे. पेठ तालुका सोडून ऊंस सर्वत्र तयार होतो. नेहमींच्या परिस्थितींत ८ लक्ष एकर जमीन बाजरी, सुमारें १॥ लक्ष एकर गहूं व तितकेच एकर ज्वारी, ६० ते ७० हजार एकर तांदूळ; सुमारें ८० हजार एकर कारळें (Nigger Seed), सुमारें १५ हजार एकर तीळ आणि जवस, भुईमूग व करडई प्रत्येकीं सुमारें १० हजार एकरांवर जमीन. असा १९२५ पर्यंतचा एकंदर शेतीचा आढावा आहे. जिल्ह्यांतील जमिनीच्या चार तऱ्हा आहेत. १ नदीकांठीं तांबडट काळी जमीन, २ त्यानंतर वरच्या भागांत काळसर जमीन, ३ घाटानजीकच्या उंच जमिनीवर तपकिरी रंगावर, कडक, परंतु उथळ (Shallow) अशी माती आहे. या जमिनी उच्च प्रतीच्या आणि ४ साधारण तपकिरी किंवा तांबडया जमिनी. यामधून बहुशः दगडधोंडें पडलेले असतात व यांत चुनखडी मिसळलेली सांपडते.

पश्चिम बाजूस बागलाण तालुक्यांत चरण्यास उत्तम कुरणें असल्यामुळें तेथें उत्तम प्रतीच्या गुरांची निपज होते. सोनखेरी जनावर तिकडेच आहे. इगतपुरी व सिन्नर या तालुक्यांत डोंगरी जनावरांची निपज होते. येथें धंदेवाईक गुराखी याच जातीचीं जोपासना करतात. ही जात फार उपयोगी आहे. पूर्व भागामध्यें विशेषतः नांदगांव, यांतील उत्तर भागांत, दक्षिण देशांतील गुरांच्या जातीपैकीं अनेक जाती बऱ्यापैकीं तयार होतात. यांतील कांहीं गुरें माळवी जातीवर असतात.

३ चौ. मैल गवत व जळण यांकरितां राखीव जंगल धरून एकंदर १०७५ चौ. मैल जंगल जंगलखात्याच्या ताब्यांत आहे; १६२ चौ. मैल रेव्हेन्यूखात्याकडे आहे. यापैकीं १६० चौ. मैल गवती कुरणें असून बाकी २ चौ. मैल जळण व चारा यांकरितां राखून टेवलें आहे. हा हिशेब १९२५ पर्यंतचा आहे. येथील जंगलाचे स्पष्ट दोन भाग पडतात. पेठ व दिंडोरी आणि नाशिक यांतील कांहीं भागांतील जंगल फार दाट व उंच आहे. यांत इमारतीचें लाकूड उत्तम निघतें. तीस हिशांहून जास्त साग तयार होतो. कळवण, बागलाण वगैरे भागांत बऱ्यापैकीं साग तयार होतो, परंतु बरेंचसें लाकूड बाजारपेठेंत खपत नाहीं. मालेगांव, नांदगांव, चांदवड व सिन्नर या तालुक्यांतील जंगल म्हणजे झुडपी रानें व निवडुंग होत. मधून मधून अंजन सांपडतें. ज्या जंगलांतून लाकूड तयार होत नाहीं तेथें गुरेंढोरें चरण्यास परवानगी मिळते. जवळ जवळ ३। लाख गुरें येथें चरतात.

या जिल्ह्यांतील पाटबंधारे खात्याचीं कामें–गिरणालेफ्ट बँक कॅनॉल, कादवा रिव्हर वर्क्स, आणि परसूळ टँक. गिरणा लेफ्ट बँक कॅनॉल:– नाशिकच्या उत्तरेस ४० मैलांवर तांबट व गिरणा या नद्यांच्या संगमानजीक हा तलाव आहे. पाण्याचा सांठा चंकापूर येथें आहे, व कालव्याची लांबी १९ मैल आहे. बंधाऱ्याची उंची १४० फूट. रिझरव्हॉयरमधील पाणी पूर्ण असलें म्हणजे बंधाऱ्यापासून एक फुटावरच असतें, व यावेळीं सांठा १६२ कोटी ४० लक्ष घन फूट असतो. हें काम १९०९ मध्यें संपलें व खर्च सुमारें २० लक्ष रु. झाला. यामुळें २५२०० एकर शेतीस पाणी लागल व त्यांपैकीं प्रतिवर्षी ८५००एकर जमीन भिजत असावी, असें अनुमान आहे. कादवा रिव्हर वर्क्स––तीन लहान कालवे आहेत; त्यांची एकंदर लांबी २५ मैल भरते. वागहाड येथें एक सांठा बांधला आहे. त्याला एक मातीचा बंधारा असून त्याची उंची ९६ फूट आहे. तलावांत ६०६ घनफूट पाणी राहूं शकतें. परसूल टँक:––मालेगांवच्या नैर्ऋत्येस सुमारें १५ मैलांवर परसूल नदीवर एक मातीचा बंधारा बांधला आहे. यांत १२४॥ घन फूट पाणी साठतें. गोदावरीला बांधलेल्या धरणाची माहिती नगर जिल्ह्याच्या वर्णनांत यते. चांदवड, सिन्नर आणि निफाड या तालुक्यांत

तलाव बांधलेले आहेत. २५ हजारांवर विहिरी शेतीला पाणी पुरविण्याकरितां उपयोगांत येतात. नाशिक, दिंडोरी, निफाड, व सिन्नर या तालुक्यांतील पूर्वेकडील खेड्यांतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा दिवसानुदिवस कमी पडत आहे. मालेगांव तालुक्यांतील खेडीं गिरणा व मोसम या नद्यांच्या कांठीं असल्यामुळें पाण्याचा भरपूर पुरवठा आहे. इतर तालुक्यांतून उन्हाळ्यांत फार पंचाईत पडते. चांदवड, नांदगांव या तालुक्यांत पाऊस कमी पडला म्हणजे पाण्याचा तुटवडा भासतो.बागलाण तालुक्यांत पुरवठा बहुतेक भरपूर असतो.कालवण व पेठ यांमध्यें उन्हाळ्यांत पाणी अपुरें पडतें.येवलें तालुक्यांत व विशेषतः येवलें गांवांत तर पाणी अगदीं थोडें आहे.

तांबे-पितळेचीं भांडीं व उपकरणीं तयार करण्याच्या कामीं सुमारें ५ हजार लोक आहेत. हल्लीं हें काम पूर्वीप्रमाणें अप्रतिम बनत नाहीं. कापसाचे जिनिंग व प्रेसिंग करणाऱ्या बऱ्याच गिरण्या आहेत. येवलें, मालेगांव व सिन्नर या हातमागावरील कामाच्या पेठा मोठ्या आहेत. निर्यात माल---धान्य, गळिताचीं धान्यें, कापड (रेशमी व सुती), तांबें, पितळ व चांदीचीं भांडीं व उपकरणीं आणि बागाईत पिकांपैकीं द्राक्षें, कांदे, लसूण, विड्याचीं पानें. आयात माल—कच्चें रेशीम, कापसाचें सूत, तांबें व पितळ, साखर, मीठ व कांच, कागद, आगपेट्या इ.

अहमदनगर

क्षेत्रफळ—६६२९ चौ. मैल. पूर्वेकडे जामखेड महाल या भोंवतीं निजामचें राज्य असून तें आंत शिरत नगर शहरापासून दहा मैलांवर येऊन ठेपलें आहे. हा भाग सोडून बाकी सर्व जिल्हा हा एक गट असून संस्थानांच्या किंवा शेजारच्या इतर जिल्ह्यांच्या सरहद्दीमुळें याची सरहद्द कोठेंहि वेडीवाकडी बनलेली नाहीं.जिल्ह्याच्या पश्चिम सरहद्दीवर सह्याद्रीची रांग आहे. या पर्वताच्या तीन मोठ्या शाखा पूर्वेकडे गेल्या आहेत. हे डोंगरफाटे जिल्ह्याच्या पोटांत शिरले असून, त्यांच्या मधील खोऱ्यांतून प्रवरा व मुळा या नद्या वहात आहेत. घोडनदी ही जिल्ह्याची नैर्ऋत्येकडील सरहद्द आहे. मुळेच्या उजव्या कांठापासून घोडनदीपर्यंतची जमीन सारखी चढत गेली आहे व मधून मधून डोंगरही आहेत. पूर्व सरहद्दीच्या मध्यावर डोंगर फार उंच आहेत. हा भाग सोडून पश्चिम घाटापासून पूर्वेकडे सर्व मुलूख सपाट होत गेला आहे. मख्य नदी—गोदावरी; उत्तरेकडे व ईशान्येकडे मिळून ही ४० मैलांची जिल्ह्याची सरहद्दच आहे. पश्चिम घाटांतून प्रवरा व मुळा या पूर्वेकडे वहात येतां येतां यांचा संगम होतो. व पुढें प्रवरा नदी गोदावरीस मिळते. यानंतर २५ मैल वहात गेल्यावर गोदावरीस ढोरा (३५ मैल) नदी मिळते. दक्षिण प्रदेशांत सीना व घोड या दोन भीमेच्या उपनद्या वाहातात. या दोनहि नद्या पश्चिमघाटांत उगम पावतात. घोडनदीमुळें नगर व पुणें या जिल्ह्यांची विभागणी झाली आहे. या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर सुमारें ३५ मैलपर्यंत भीमा वाहात जाते. या जिल्ह्याच्या भूपृष्ठाचे दोन वर्ग पाडतां येतात. १ देश (सपाट जमीन), व २ डांग (डोंगराळ प्रदेश). डांग-डोंगराळ प्रदेश फारसा मोठा नाहीं. हा भाग म्हणजे बहुतेक अकोलें तालुक्याचा पश्चिम भाग होय.येथें सह्याद्रीची अती उंच शिखरें आहेत देश—या प्रदेशांत अनेक तऱ्हा आहेत. गोदावरीच्या खोऱ्यांत कोपरगांव, राहुरी, नेवासें, व शेवगांव यांतील मळीच्या (Alluvial)सुपीक जमिनी येतात. यांत गहूं ,कापूस, इ. पिकें उत्तम होतात. दक्षिणेकडेहि अशाच मळीच्या परंतु जरा कमी प्रतीच्या भीमेच्या खोऱ्यांतील जमिनी आहेत. या श्रीगोंदे व कर्जत तालुक्यांत येतात. या दोन खोऱ्यांमधील प्रदेशांत हरतऱ्हेचे उजाड डोंगर व लागवडीस लायक दरींखोरीं आढळतात. हा सर्व भाग म्हणजे संगमनेर, पारनेर, नगर हे तालुके व जामखेड महाल.

डांग प्रदेशांतील खेड्यांत (पश्चिम अकोला ता.) अतिशय पाऊस पडतो (२०० इंच). परंतु देशावर मात्र तसें नाहीं. प्रत्यक्ष अकोला गांवांत फक्त २१ इंच पाऊस पडतो. डांग भागांत पाऊस नक्की परंतु अधिक पडतो; त्यामुळें तांदूळ व डोंगरी चणे या पलीकडे तेथें कांहीं पिकत नाहीं. जामखेड महाल हा नगर जिल्ह्याचा उत्तम भाग होय. कारण येथें पाऊस वेळचेवेळीं व प्रमाणांत पडतो. श्रीगोंदे व कर्जत तालुक्यांत पाऊस अगदीं अनिश्चित आहे. गोदावरीच्या खोऱ्यांतहि तीच स्थिति आहे. जिल्ह्याच्या मध्यभागांत मात्र त्या मानानें पावसाचें प्रमाण व वेळ काळ ठीक आहे. डोंगराळ प्रदेशांत पाऊस जूनपासून सुरू होतो व आक्टोबरच्या सुरवातीस संपतो. देशांवर नियमित पाऊस जुलैपासून पडतो. येथें नैर्ऋत्येकडील मॉन्सून वारे

तर येतातच पण याशिवाय ईशान्येकडील वारे वहात येतात. त्यामुळें पावसाळा जरा उशिरां संपतो. एकंदर हवामान फारच समाधानकारक असतें. हिवाळ्यांत हवा कोरडी व तरतरी आणणारी असते. फेब्रुवारी ते मेपर्यंत मात्र तापदायक उष्मा होतो. मॉन्सूनच्या हंगामांत वातावरण समशीतोष्ण असतें. जिल्हयांतील जमिनीचे मुख्यत: तीन वर्ग पडतील. १ काळी २ तांबडी व ३ बरड आणि पांढरी.या तीन जातींचे आणखी कित्येक पोटविभाग आहेत. त्यांना निरनिराळ्या ठिकाणीं वेगवेगळीं नांवें आहेत. पश्चिम अकोल्यांतील डोंगराळ भागांत तांबडी माती आहे. उतारावर ही माती खोलपर्यंत आहे. येथें उत्तम झाडें तयार होतात.प्रवरेच्या कांठांवरील अकोला, व संगमनेरमधील देशभागांत जमिनी फार सुपीक आहेत. जसजसें डोंगराळ प्रदेशाकडे जावें तसतसा हा सुपीकपणा कमी होत जातो. कोपरगांव तालुक्यांतील जमिनींत माती बऱ्याच खोलीपर्यंत आहे. गोदावरीच्या आसपास अशा सुपीक जमिनी सर्वत्र पसरल्या आहेत. राहुरी तालुक्यांत जमिनी काळ्या, खोल व सुपीक आणि नदीजवळ शाडूच्या (Clayey) आहेत. नेवासें, शेवगांव यांमधील जमिनी बऱ्या आहेत. आणि नांगरट चांगली झाली तर येथें उत्तम पिकें होतात. परंतु येथें जमिनींचे अनेक प्रकार आहेत. जिल्हयाचा दक्षिण भाग म्हणजे नगर, पारनेर, श्रीगोंदे व कर्जत तालुके. या प्रांतांतून डोंगराच्या आडव्या रांगा गेल्या आहेत. पश्चिमेकडील पठारप्रदेशांत माती खोलवर आहे. या भागांत सुपीक खोरीं व थोड्या चांगल्या प्रतीच्या सपाट जमिनी आहेत. बहुतेक सपाट जमीन निकस व उथळ आहे. त्यांत ज्वारी, नाचणीसारखीं धान्यें तयार होतात. आग्नयेकडील जामखेड पेटयांतील जमिनी ठिसूळ (Light) व नांगरण्यास सोप्या आहेत. बाजरी हें देशावरील मुख्य पीक आहे. पाऊस उशिरां आल्यामुळें बाजरीची पेरणी झाली नाहीं. तर ज्वारी पेरतात. बाजरीपेक्षां ज्वारीकडे बरीच जास्त जमीन खर्च होते. या दोन धान्यांची पेरणी करतांना मधून मधून तूर, करडई इ. धान्यें टाकलेलीं असतात. गव्हाचें पीक हें कोरड्या हवेंत तयार होतें. पारनेर तालुक्यांत बक्षी गहू उत्तम होतो. इतरत्र नासूं नये म्हणून हलका तांबडा गहूं (Rust Proof) पेरतात. पाणी-पुरवठा असल्यास बाजरीनें पीक काढल्यानंतर गहूं तयार करतात. डांग (डोंगराळ) प्रदेशांत तांदूळ पिकतो. करडईचें पीक फार मोठ आहे.गळिताच्या धान्यांत तेंच पीक पहिलें आहे. तीळ, जवस, कारळे थोडेबहुत निघतात. शेवगांव व नेवासें या तालुक्यांत कापूस तयार होतो. हें हंगामाच्या सुरवातीचें पीक आहे (early Crop). पाणी पुरवठ्याची तरतूद झाल्याकारणानें उसाच्या पिकाची गेल्या वीस वर्षांत सहापट वाढ झाली. ८ ते १० लक्ष एकर जमीन ज्वारी व बाजरी; १ लाख एकर गहूं विशेषत: कोपरगांव व नंतर नेवासें आणि कोपरगांव; १५ हजार एकर तांदूळ-अकोला. १। लाख एकर करडई-पश्चिम अकोला सोडून सर्वत्र; २ लक्ष एकर कापूस. १० हजार एकर ऊंस-८० हिस्से जमीन कोपरगांव तालुक्यांतील.

एकंदर जंगलापैकीं सरासरी निम्मीं जंगल अकोले व संगमनेर तालुक्यांत आहे. मध्यभागांत मात्र अव्वल दर्जाचे सागवृक्ष आहेत.शिवाय धावडा, खैर इ.झाडीं मधून मधून वाढविली जाते.पश्चिमेकडील जंगल सतत हिरवेंगार असतें. अंजन, जांभूळ, बेहेडा, ऐन आणि करवंद हीं त्या जंगलांतील मुख्य झाडी होय. अकोले तालुक्यांत कांहीं डांगी जातीचीं उत्तम जनावरें आहेत. संगमनेरमध्यें म्हसवड खिल्लारी जनावरांची निपज होते. या दोनहि तालुक्यांत स्वभावत: गवती कुरणें मुबलक आहेत. याशिवाय जिल्हयांत इतरत्र गुरेंढोरें पाळण्याकडे कोणाची प्रवृत्ति नाहीं. कारण या भागांत दुष्काळ पडण्याचा संभव फार व तसें झालें म्हणजे हा गुराख्याचा धंदा बुडीत यावयाचा. यापेक्षां लोकांना कापसाचें पीक काढणें सोईचें वाटतें.

गोदावरीचे कालवे-मध्यदक्षिण देशांत दुष्काळापासून बचाव होण्याकरितां केलेला हा पहिलाच प्रयत्न होय. कालवे काढण्याचें काम १९०६ पासून १९१६ पर्यंत चालूं होतें. एकंदर खर्च १ कोट रुपयांवर आला. गोदावरी कॅनॉल सिस्टीममध्यें खालील तीन कामें येतात. (१) दारणा नदीवर लेक बील नांवाचा पाण्याचा सांठा आहे. त्यांत ८८१ कोटी ८० लक्ष घनफूट पाणी राहूं शकतें, (२) नांदूर मध्यमेश्वरला एक धरण, (३) दोन कालवे एकंदर लांबी ११७ मैल. या कालव्यांमुळें बरीच जमीन भिजते. उसाचें पीक सालोसाल वाढत आहे. प्रवरा रिव्हर वर्क्स-१ भंडारा येथें प्रवरेवर लेक आर्थर हिल नांवाचा पाण्याचा सांठा. २ ओझार येथें एक धरण व ३ दोन कालवे एकूण लांबी ८१ मैल. या कालव्यांचें काम १९०७ ते १९०८ मध्यें सुरूं होऊन मागेंच पुरें झालें आहे. खर्च अजमासें १॥ कोट रुपय आला. बंधाऱ्याची

पुणें व
, धातू,
जिन्नस.

भोर
धरला
आहे.
घाट)
ा नद्या
ायव्ये-
ीकडून
ायणें.
चाच्या
ंगराळ
र्पट्टी
आहेत.
ाश्वतीं
मध्य-
.आणि
क पिकें
त सुर-
ागतो.
येकडून
अखेर
पूर्व-
ां.कधीं.
ोटाचा
सानच
र,खेडे,
भागांत
योग्य
ंदापूर
आहे.
डतो.
कांहीं
घाटा-
दमट
कारक
ामान
येतात.
मध्य-
कडक
किंवा

तर येतातच प
वहात येतात. त
संपतो. एकंदर
असतें. हिवाळचा
णारी असते. फेब्र
उष्मा होतो.
समशीतोष्ण अ
ख्यतः तीन वर्ग
बरड आणि पांढ
त्येक पोटविभा
ठिकाणीं वेगवेग
ल्यांतील डोंगरा
उतारावर ही म
झाडें तयार होत
व संगमनेरमधील
आहेत. जसजसें
हा सुपीकपणा
तालुक्यांतील ज
आहे. गोदावरीच
सर्वत्र पसरल्या
काळ्या, खोल
शाडूच्या (Cla
मधील जमिनी व
झाली तर येथे
जमिनींचे अनेक
भाग म्हणजे न
तालुके. या प्रां
गेल्या आहेत. प
खोलवर आहे.
चांगल्या प्रतीच
सपाट जमीन नि
नाचणीसारखीं
कडील जामखे
(Light)
बाजरी हें देश
उशिरां आल्या
तर ज्वारी पेरत
जास्त जमीन स
करतांना मधून
लेलीं असतात.
तयार होतें. पा
होतो. इतरत्र न
(Rust Pr
असल्यास बाज
करतात. डांग (

उंची २७० फूट, लांबी १६०० फूट. यामुळें १८२९७६एकर जमीन भिजते.दरसाल ७५००० एकर जमीन भिजते. याशिवाय जिल्हयांत तीन तलाव आहेत. त्यांतील पाण्याचा सांठा प्रति-वर्षी पडणाऱ्या पावसावर अवलंबून असतो. भातवडी तलाव–नगरपासून १२ मैलांवर मेहेकरी नदीवर हा तलाव आहे. सांठा–९ कोटी ३० लक्ष घनफूट. कालवा व इतर नाले मिळून एकूण लांबी सुमारें १० मैल. ८०० एकर जमीन भिजते. खुंटेफळ तलाव–हा तलाव शेवगांव नजीक आहे. काम १९२२ सालीं संपलें. सुमारें ४ लक्ष रु. खर्च झाला. यामुळें ५०० एकर जमीन लाग-वडीस आली आहे. विसापूर तलाव–श्रीगोंदे तालु-क्यांत विसापूर येथें हा तलाव आहे. १३१४३ एकर जमिनीस पाणी मिळू शकतें. ११३ कोटी ६० लक्ष घनफूट पाण्याचा सांठा आहे. शेतीकरितां बऱ्याच विहिरींचा उपयोग करतात. बहुतेक तळीं अकोले तालुक्यांत आहेत. पाऊस कमी झाला म्हणजे या पाटबंधाऱ्याच्या कामाचा उपयोगहि कमी होतो. कर्जत तालुका, जामखेड महाल, पाथर्डीपेटयाचा दक्षिण भाग, पारनेर व राहुरी तालुक्यांतील डोंगराळ भाग, अकोल्यांतील डोंग-राळ खेडीं व संगमनेरमधील पठारप्रदेश–विशेषतः दक्षिण बाजूचा, या सर्व ठिकाणीं पिण्याच्या पाण्याचा तुटवडा चांगलाच भासतो.

जिल्हयांतील मुख्य गांवें–नगर, संगमनेर, भिंगार, पाथर्डी, राहुरी, वांबोरी आणि बेलापूर. लोहारकाम, सुतारकाम, वगैरे धंदे सर्वत्र आहेत. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं अशा तऱ्हेचे कारखाने बरेच चालविले आहेत.पण दुष्काळ पडला असतां शेतकरी लोकांनीं तेथें जाऊं म्हटलें तर कांहीं उपयोग होत नाहीं. नगर, शेवगांव, पाथर्डी येथें कांहीं जिनिंग व प्रेसिंगच्या गिरण्या आहेत. परंतु त्या सतत वर्षभर चालू नसतात. संगमनेर, भिंगार व पाथर्डी येथें वीणकाम मोठ्या प्रमाणावर चालू असतें. परंतु या धंद्यांत फक्त साळी, कोष्टी व मोमिन या जातीचे लोक गुंतलेले आहेत.राहुरीला मुसंब्याच्या बागा पुष्कळ आहेत, व तेथें बऱ्याच लोकांना काम मिळतें. वांबोरी व बेलापूर या धान्याच्या पेठा आहेत, परंतु यामुळें दुष्काळांत कांहीं देखील मदत होत नाहीं. बेला-पूरच्या साखरेच्या गिरणीमुळें मात्र भोंवतालच्या खेड्यांतील लोकांना कामें मिळतात. हा जिल्हा संपूर्ण शेतींत गुंतला असल्यामुळें निवळ उद्योग-धंद्याचें असें एकही शहर नाहीं.

निर्यात–गळिताचीं धान्यें व हरभरा. पुणें व मुंबई येथें जातो. आयात– पत्रे (लोखंडी), धातू, मीठ, रेशीम व कापड व इतर किरकोळ जिन्नस.

पुणें

क्षेत्रफळ–५३५७ चौ.मैल.पश्चिमेकडील भोर संस्थानचा मुलूख पुणें जिल्हयाच्या हद्दींत धरला जातो.जिल्हयाची पश्चिम पट्टी डोंगराळ आहे. पश्चिम सरहद्दीवर सह्याद्री (पश्चिम घाट) च्या रांगा आहेत. येथून भीमेस मिळणाऱ्या नद्या उगम पावतात.भीमा नदी या जिल्हयांत वायव्ये-पासून आग्नेयीकडे वहात जाते. तिला डावीकडून वेळ आणि घोड व उजवीकडून भीमा, इन्द्रायणी, मुळा आणि निरा या नद्या मिळतात. जिल्हयाच्या पश्चिम पट्टीस मावळ म्हणतात.हा भाग डोंगराळ असल्यामुळें येथें अतिशय पाऊस पडतो.पूर्वपट्टी म्हणजे देश होय. येथील जमिनी चांगल्या आहेत. परंतु पाण्याच्या टंचाईमुळें पिकांची शाश्वती नसते. या दोन भागांच्या मधील प्रदेशास मध्य-पट्टी म्हणतात. येथें पाऊस चांगला पडतो.आणि जमिनी उत्तम असल्यामुळें एकामागून एक पिकें काढतां येतात. मावळांत जूनमध्यें पावसास सुर-वात होते. हळू हळू पाऊस पूर्व दिशेस येऊं लागतो. मॉन्सून सप्टेंबरमध्यें संपतो. व नंतर ईशान्येकडून पाऊस येऊं लागतो. हा पाऊस नोव्हेंबर अखेर पर्यंत असतो. ईशान्येकडील पावसामुळें पूर्व-पट्टींतील मुलुखांत अखेरची धान्यपेरणी होते.कधीं कधीं या बाजूस डिसेंबर महिन्यांतहि मोठमोठ्या पावसाच्या सरी येतात.परंतु त्यांपासून नुकसानच होतें.पावसाचें प्रमाण सर्वत्र सारखें नाहीं.जुन्नर,खेडे, हवेली व मावळ या तालुक्यांतील पश्चिम भागांत पाऊस मुबलक पडतो. मध्यपट्टींत पाऊस योग्य प्रमाणांत होतो. पूर्वेकडील भीमथडी व इंदापूर तालुक्यांत मात्र तो अगदीं अनियमित आहे. घाटांत लोणावळें येथें १६५ इंच पाऊस पडतो. पुणें शहरांत सरासरी ३० इंच व पूर्वेकडील कांहीं ठिकाणीं तर तो २० इंचावर होत नाहीं. घाटा-नजीकच्या मुलखांतील हवा पावसाळ्यांत दमट व रोगकारक असते. उन्हाळ्यांत मात्र सुखकारक असते. समुद्रावरील थंड वाऱ्यामुळें उष्णतामान कमी राहातें. हे वारे प्रत्यक्ष पुण्यापर्यंत येतात. पूर्वेकडे हवामान निरोगी परंतु उष्ण असतें. मध्य-पट्टींत पश्चिम वारे वहात येतात. त्यामुळें कडक उन्हाळा पडत नाहीं व हिवाळा हुषारी किंवा तकवा आणतो.

समुद्रसपाटीपासून हा प्रदेश उंच आहे जिल्ह्यांतील जमिनीचे तीन प्रकार आहेत. १ काळी, २ तांबडी, व ३ वरड. कांहीं ठिकाणीं निरनिराळ्या जमिनीचें एकमेकांत मिश्रण झालें आहे.मधून मधून वाळू, चुना इत्यादींची मातींत मिसळ आढळते. पश्चिम पट्टींतील जमिनी पूर्वपट्टीतील जमिनीपेक्षां निकस आहेत. काळ्या जमिनी बहुतेक सपाट पूर्वपट्टींत आहेत.त्या नद्यानाल्यांच्या कांठांकांठांनीं पसरल्या आहेत. या जमिनींत ओलावा चांगला धरतो. त्यामुळें रबी पिकें उत्तम येतात. तांबडमातीच्या जमिनींत खरीपाचीं पिकें निघतात. तांबड जमिनी पश्चिम पट्टींतच आढळतात. हीं माती घट्ट व कठीण असल्यामुळें यांत नांगर खोल फिरवावा लागतो. पठार प्रदेशांतील उंचवट्यावर व इतर उतरंडीवर वरड माती आहे. या जमिनींत चिकणाई कमी असते. यांत डोंगरी धान्य व कडदण पिकतें. मावळांत तांदूळ व हलक्या प्रकारची बाजरी, ज्वारी इ. धान्यें पिकतात. तांदूळाचें पीक निघाल्यानंतर गहूं, वाटाणे, हरबरा, मसूर, इ. धान्यांची परणी होते. यथील गहूं हलक्या प्रतीचा परंतु पांढरा व मऊ असतो.खुरसाणी Nigger Seed हें गळिताचें धान्य बरेंच पिकतें. थोडाबहुत ऊसही तयार होतो. देशावर ज्वारी, बाजरी, करडई हीं पिकें उत्तम होतात. उसाचें अर्धेअधिक पीक भिमथडी तालुक्यांत आहे. गहूं व कापूस यांची लागवड कालव्याच्या पाण्यामुळें होऊं लागली आहे. मध्यपट्टींत हरतऱ्हेचीं पिकें आहेत. बाजरी, कारळे, काळे तीळ, व भुईमूग हीं मुख्य पिकें; गव्हाची लागवड मोठी आहे. हवेली तालुक्यांत उसाचें पीक मोटें आहे. खेड व जुन्नर तालुक्यांत बागाईत बरेंच असून तेथील बटाटयाचें उत्पन्न फार प्रसिद्ध आहे. पुण्याच्या आसपास बागाईत मुबलक आहे. यांत अंजीर, पपई, पेरू व नारिंगें इ. फळें तयार होतात. फक्त इंदापूर तालुक्यांतच कापूस पिकतो. बागाइतांतील भाजीपाला तळेगांव स्टेशनावरून मुंबईस रवाना होतो. ज्वारी–८–१० लक्ष एकर; बाजरी–५ लक्ष एकर; तांदूळ–१ लक्ष एकर; गहूं–५० हजार एकर; हरबरा–५० हजार एकर;

गळिताच्या धान्यांत काळ्या तिळाचें पीक सर्वांत जास्त आहे.त्याकडे १ लक्ष एकर जमीन लागवडीस आहे. प्रत्येकीं १० हजार एकर जमीन कापूस व ऊंस या पिकांकडे आहे.

या जिल्ह्यांत जनावरांच्या दहा एक जाती आहेत. त्यांत पश्चिम खानदेशांतील खिल्लारी जातच सर्वांत चांगली आहे. सिंध, कच्छ, गुजराथ या ठिकाणांहून आणलेल्या म्हशी सर्वत्र आढळतात. म्हशींचा उपयोग शेतीकडेही करतात. दुधाचा पुरवठा बराचसा गायींमुळें होतो. घोडे, गाढवें व शेळ्या, मेंढ्या खेड्यांपाड्यांतून सर्वत्र आहेत. ५७२ चौ. मैल जंगल.–त्यापासून जळण, कोळसा व किरकोळ लांकूड एवढेंच उत्पन्न आहे. पुण्याच्या आसपास गवती कुरणें मुबलक व उत्तम आहेत. फक्त पश्चिम पट्टींत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बरा आहे. मध्यपट्टी पूर्ण निर्जल आहे. नदीकांठच्या खेड्यांतून व तलाव आणि कालवे असलेल्या गांवांतून पाणीपुरवठा सतत असतो. इतरत्र फेब्रुवारी अखेरपर्यंत सर्व कांहीं ठीक असतें परंतु तेव्हांपासून सर्व उन्हाळा फार कठीण जातो. याकरितां दर वर्षीच्या अंदाजपत्रकांत पाणीपुरवठ्याकरितां कांहीं रक्कम दिलेली असते.

पुणें जिल्ह्यांत उद्योगधंदे बरेच आहेत. कापड विणण्याच्या धंद्यांत सुमारें २२६२४ लोक गुंतले आहेत. रेशमी लुगडीं व पगड्या आणि पितळेचीं व चांदीचीं भांडीं व उपकरणीं हे पुण्यांत तयार होणारे जिन्नस सर्वत्र प्रसिद्ध आहेत. हातमागावर बरेच लोक काम करतात. कारखाने व गिरण्या–तळेगांवचा कांचखाकारना, मुंढव्याची कागदाची गिरणी, खंडाळ्याजवळ कुणें येथील सतरंज्याचा कारखाना, मळवलीचा रविवर्मा प्रेस व फुरसुंगी आणि बारामती येथील साखरेच्या गिरण्या. जिल्ह्यांतील व्यापारधंदा मोठा नाहीं.

निर्यात:––धान्य, गूळ, भाजीपाला, फळफळावळ, सुती व रेशमी कापड व पितळी भांडीं.

आयात:––तांदूळ, गहूं, मीठ व तांबें–पितळ्याचे पत्रे.

पाटबंधारे खात्याचीं कामें–१निरा कॅनॉल, २ शेटफळ तलाव, ३ मुठा कॅनॉल व ४ माटोबा तलाव याशिवाय कासुर्डी, शिरसूफळ व बादलवाडी येथें तलाव आहेतच.पहिले दोन तलाव बारामती तालुक्यांत आहेत.बादलवाडी तलाव इंदापूर तालुक्यांत आहे. वेळवंडी नदीस भाटघरचा तलाव आहे. मुठा नदीस खडकवासल्याचा तलाव आहे.

सोलापूर

क्षेत्रफळ---४५५६ चौ. मैल. दुष्काळ पडला असतां जिल्हयाभोंवतालच्या संस्थानीं मुलुखामुळें संकटनिवारण करण्यास फार त्रास पडतो.

या जिल्हयांत डोंगराळ भाग फार नाहीं. जो आहे तो बार्शीच्या उत्तरेस माढें गांवाच्या पश्चिमेस आणि माळशिरस व करमाळें यांच्या नैऋत्येस. बहुतेक सर्व माळरान आहे. मुख्यनदी–भीमा तिच्या उपनद्या–माण, निरा व सिना.या सर्व नद्या आग्नेयीकडे वहात जातात. फक्त माण नदी मात्र ईशानीकडे वहात जाते. याशिवाय जिल्हयांत बरेच ओढे व नाले आहेत. मार्चपासून जून महिन्यापर्यंत हवा फार उष्ण असते. हिवाळयांत नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत पूर्वेकडील व ईशान्येकडील वारे वहात येत असल्यामुळें हवा स्वच्छ असते. मार्चपासून मे महिन्यापर्यंतचा काळ सोडला असतां एकंदर हवामान आरोग्यकारक आहे.

पाऊस---सरासरी २५ इंच. पाऊस बहुतेक अपुराच पडतो. एकंदर अनिश्चितता फार. पावसाळा थोडा असतो. जिल्हयांतील लोक नैऋतीकडील मॉन्सूनपेक्षां ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांत वाहणाऱ्या ईशानीकडील मॉन्सून वाऱ्यावर विसंबून असतात. बार्शीजवळ बालघाट असल्यामुळें तेथें पाऊस २९ इंच पडतो. माढें व करमाळें येथें अनुक्रमें २६ व २३ इंच पाऊस पडतो. परंतु तो सर्वत्र सारखा पडत नाहीं. सांगोलें व माळशिरस हे दोन तालुके सोडून बाकी सर्व जिल्हा रबीच्या पिकांवर अवलंबून असतो.

जिल्हयांतील जमिनी तीन प्रकारच्या आहेत. काळ्या, करडया व तांबडया. बार्शी तालुका सोडून बहुतेक सर्वत्र तांबडया व करडया जमिनी आहेत. त्या तालुक्यांत मात्र सर्वत्र काळ्या जमिनी दिसतात. क्वचित् ठिकाणीं खडबडीत करडया जमिनी आहेत. नदीकांठांनीं व मोठया ओढयांच्या कांठांनीं काळीं माती पसरलेली आहे. उंचवटयावरील जमिनी उथळ असल्यामुळें त्यांचा शेतीपेक्षां चराईकडेच जास्त उपयोग होतो.खोऱ्यांतील जमिनींतून उत्तम पिकें निपजतात.

मुख्य पीक---ज्वारी. फक्त माळशिरस व सांगोलें या तालुक्यांत बाजरीचें पीक मुख्य आहे. गव्हाचें पीक मोठें आहे. परंतु दाणा कमी प्रतीचा निघतो. कापसाची लागवड अनिश्चित असली तरी पुष्कळ असते. गळिताच्या धान्याची पेरणी ज्वारीच्या शेतांतून करितात.

ज्वारी---१५ लक्ष एकर, बाजरी---२ लक्ष एकर, कापूस---५०–६० हजार एकर, गहूं---२५–३० हजार एकर, भुईमूग---सुमारें ५० ह. एकर, जवस---१५ हजार एकर, तीळ---५ हजार एकर.

येथील जनावरांच्या दोन जाती आहेत. खिल्लारी व देशी. खिल्लारी जनावर उत्तम समजलें जातें. देशी जनावर सर्वत्र आढळतें. दक्षिणेकडील तालुक्यांतील कोरडया सपाट जमिनीवर शेळयामेंढयांची निपज चांगली होते.बेलदार लोक गाढवें बाळगतात आणि वडारी लोक डुकरें पाळतात.कडबा हा जनावरांचा मुख्य चारा होय.शिवाय जनावरें चारण्याकरितां गवती कुरणें सर्वत्र आहेत. धान्यांचीं कणसें तोडून खालील चारा गंजी करून सांठवतात. दुष्काळ पडला असतां धान्याप्रमाणें दाणावैरणीचा प्रश्नहि प्रामुख्यानें पुढें येतो.राखून ठेवलेलें जंगल असें या जिल्हयांत बिलकूल नाहीं. थोडींबहुत गवती कुरणें रेव्हेन्यू डिपार्टमेंटच्या ताब्यांत आहेत. उंचवटयावरील उथळ जमिनी झाडांच्या वाढीस पोषक नाहींत. जंगल तुटक तुटक आहे. कांहीं जंगल अगदीं ईशान्येकडे बार्शी व निजाम प्रांतामधील डोंगरपट्टींत आहे. व कांहीं माळशिरस व सांगोलें या तालुक्यांच्या दक्षिणेस अगदीं नैऋत्येकडील डोंगरटेकडयांवर आहे.येथील जंगलाचे दोन भाग पडतात. झुडुपें व बाभूळ. डोंगराळ भागांत झुडुपें होतात व बाभूळ सर्वत्र आढळते. एकंदरींत जंगलाचें उत्पन्न फार थोडें आहे. गवत व जळण याचा जिल्हयापुरता पुरवठा असतो.

बार्शी तालुक्याखेरीज बाकी सर्व जिल्हयास दुष्काळाची फार भीति असते. एकरुक, अष्टी, कोरेगांव, पाथरी व वाडशिवणें या ठिकाणच्या तलावांपासून फिरविलेल्या पाटांमुळें पाऊस पडला नाहीं तरी पाणीपुरवटा होतो. म्हसवड तलावाच्या कालव्यामुळें पंढरपूर व सांगोलें या तालुक्यांतील कांहीं भागांस पाणीपुरवठा होतो.हे सर्व कालवे व तलाव मिळून सुमारें साडेचार हजार चौ.मैल क्षेत्रापैकीं फक्त शंभरएक एकर चौ.मैल जमिनीस काय तो पाणीपुरवटा होतो. निरेच्या उजव्या बाजूच्या कालव्यामुळें मात्र सांगोलें व माळशिरस या तालुक्यांतील बऱ्याचशा भागास पाणी मिळतें. पिण्याचें पाणी–जिल्हयांत पावसाचें सरासरी प्रमाण बरें असलें तरी पाऊस वेळचे-

वेळीं पडत नाहींव तो पाणी पुरवठ्यास अपुराच होतो. माळशिरस,करमाळें या तालुक्यांत पाण्याचा तुटवडा जारीनें भासतो. एकादे वर्षी जरी पाऊस पडला नाहीं तरी पाणी पुरवठ्याकरितां नद्या व ओढे यांच्या कांठांशीं हेळ खणतात. पिण्याच्या पाण्याकरितां सर्वत्र खेड्यापाड्यांतून विहिरी खणलेल्या आहेत. भीमा व सीना या नद्यांच्या कांठावरील प्रदेशांत मात्र पाणी मुबलक असतें. तलावांतून सांठलेल्या पाण्याचा उपयोग शेतीकडे व पिण्याकडेही होतो. सोलापूर, बार्शी व पंढरपूर या शहरांतून प्रत्येकीं वॉटर वर्क्स असल्यामुळें पाणी पुरवठा बरा असतो. जिल्ह्याच्या पश्चिम भागांतील गैरसोय निरा राईट बँक—कॅनॉल मुळें दूर झाली आहे.

उपजीविकेचें मुख्य साधन —शेती. सोलापूर व बार्शी येथें कापसाचा व सुताचा मोठा व्यापार चालतो. इलाख्यांतील व्यापारी ठाण्यांत सोलापूर शहर तिसरें आहे. येथील कापसाच्या गिरण्या प्रसिद्ध आहेत. बार्शी, कुर्डुवाडी, व करमाळें येथें जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज आहेत. त्या हंगामी असून कापसाच्या पिकावर अवलंबून असतात. बार्शी येथें दोन कापसाच्या गिरण्या आहेत. सोलापूर, वळसंग व टिकेकरवाडी या ठिकाणीं हातमागाचा धंदा चालू आहे.

निर्यात—कापूस, तेल, गळिताचीं धान्यें, तूप, हळद व कापड.आयात—मीठ, सूत, पोतीं, लोखंडी जिन्नस इ. जिल्ह्यांतील व्यापाराचीं मुख्य ठाणीं—सोलापूर, बार्शी व पंढरपूर.

सातारा

क्षेत्रफळ—४९१० चौ. मैल.

जिल्ह्याच्या वायव्येकडील कोपऱ्यांत महाबळेश्वर आहे. तेथील उंची समुद्रसपाटीपासून ४७१७ फूट आहे. तेथून दोन डोंगरफाटे निघतात. एक सह्याद्रीची रांग, दक्षिणेकडे ६० मैलपर्यंत गेली आहे. व दुसरी महादेव डोंगराची रांग प्रथम पूर्वेकडे व नंतर आग्नेयीकडे पसरली आहे. या डोंगरांचे अनेक फाटे सर्व जिल्हाभर दिसतात. यामुळें येथें उत्तम खोरीं आहेत. व या डोंगरांतील दऱ्याखोऱ्यांतून वहात जाणारे ओढे नाले पुढें कृष्णेस मिळतात. बहुतेक सर्व डोंगरप्रदेश उजाड आहे. महाबळेश्वर व कोयनेचें खोरें येथें मात्र झाडी दिसते. या जिल्ह्यांत दोन मोठीं खोरीं आहेत. पैकीं कृष्णेचें खोरें फार मोठें आहे. भीमेच्या खोऱ्याचा कांहीं भाग या जिल्ह्यांत येतो. भीमेला मिळणाऱ्या निरा व माण या नद्या उत्तर व ईशान्य या भागांतून वहात जातात. बाकी सर्व जिल्ह्यांत कृष्णा व तिच्या उपनद्या यांचा पसारा आहे. कृष्णेच्या एकंदर ८०० मैल प्रवाहापैकीं १५० मैल प्रवाह या जिल्ह्यांत येतो. देशावरील इतर कांहीं जिल्ह्यांप्रमाणें या जिल्ह्याचे तीन भाग पडतात. पश्चिमेकडील डोंगराळ व दमट प्रदेशास डोंगरी म्हणतात. यांत मुख्यतः वाई, जावली व पाटण हे तालुके मोडतात. जिल्ह्याच्या पूर्व भागास देश हें नांव आहे. देशांत माण, खटाव, खानापूर, व तासगांव हे तालुके येतात. हा प्रदेश किंचित् उंच व डोंगराळ असून येथील जमिनी अव्वल दर्जाच्या नाहींत.

इतर जिल्ह्यांप्रमाणें येथेंही पावसाचा तुटवडा पडण्याचा संभव असतो. डोंगरी व देश यांमधील प्रदेशांस मध्यपट्टी म्हणतात. मध्यपट्टी सर्वत्र सपाट असून तिच्यांतील जमिनी फार सुपीक आहेत. येथील विहिरी व नद्यानाले यांपासून पाणीपुरवठा भरपूर होतो. तलाव, कालवे, इ. कामें उभारण्यास हा प्रदेश फार चांगला आहे. डोंगरी व मध्यपट्टी मिळून सुमारें १४०० चौ. मैल मुलूख आहे. देश भागांत जवळजवळ २००० चौ. मैल क्षेत्र आहे. जमिनी शेताच्या उपयोगाच्या नसून चराईत आहेत. एप्रिल ते मेपर्यंत पूर्व पट्टींत उन्हाळा फार कडक असतो. घाटाच्या आसपास मात्र हवा थंड असते. नैर्ऋत्येकडील मॉन्सून वारे वाहूं लागले म्हणजे हवा सर्वत्र चांगली असते. पावसाळा जून महिन्यांत सुरू होतो. जुलै महिन्यांत अतिशय पाऊस पडतो. सप्टेंबरअखेर हस्ताचा पाऊस पडतो. तो ईशान्येकडील वाऱ्यामुळें आलेला असतो. ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत मधून मधून पाऊस पडतो. डोंगरी मुलखांत पावसाचें प्रमाण सर्वत्र सारखें नाहीं. (वाई ३० इंच, सातारा ४० इंच, घाटमाथ्यावर २५० इंच) मध्यपट्टींत सुमारें ३० इंच पाऊस पडतो. देशावर २०—२५ इंच इतकें पावसाचें प्रमाण आहे. दक्षिणेकडे त्यांतल्या त्यांत चांगला पडतो. दक्षिण देशावरील इतर देशभागापेक्षां सातारा जिल्ह्यांतील देश मुलुखांत पाऊस चांगला पडतो.

या जिल्ह्यांतील जमिनी तीन प्रकारच्या आहेत. तांबड्या, काळ्या व पांढरट (Light). काळ्या जमिनी नद्या व नाले यांच्या कांठाकांठांनीं आढळतात. कृष्णेच्या खोऱ्यांत अशा सुपीक जमिनी लांबवर पसरल्या आहेत. तेथें बागाईत फार उत्तम होतें. 'माळरान' व 'मुरुम माळ' ह्या पांढरट

जमिनी पूर्वपट्टींतील डोंगर पायथ्याशीं आहेत. या जमिनींतील माती कठीण व दगडासारखी असते. सह्याद्रींतून निघणाऱ्या ओढ्यांच्या मुखांशीं असलेल्या दऱ्याखोऱ्यांतून तांबडी माती आहे. येथें भाताचें पीक चांगलें होतें.

डोंगरी प्रदेश, तांदूळ व कडधान्यें:--डोंगर भागावरील जमिनी बिलकूल कसदार नाहींत. त्यांत कांहीं वर्षें पेरणी करितात. व नंतर बरींच वर्षें त्या जमिनी तशाच पडून असतात. देशावर बाजरीचें व ज्वारीचें पीक फार मोठें आहे. तासगांव व वाळवें तालुक्यांत कापूस पिकतो. या जिल्ह्यांतील कृष्णेचें खोरें व इतर उपनद्यांचीं खोरीं हा सर्व दक्षिण देशांतील फार सुपीक प्रदेश आहे. ज्वारी ६ लक्ष एकर; बाजरी ४ लक्ष एकर; तांदूळ,गहूं व रागी प्रत्येकीं ४०–५० हजार एकर; हरबरा ७० हजार एकर; तूर ४० हजार एकर; भुईमूग–(१९२२–२३सालीं) १लक्ष एकर; (हें वाढतें पीक आहे.) कापूस १५–२० हजार एकर; ऊस व तंबाखू–प्रत्येकीं १० हजार एकर.

जिल्ह्याच्या पश्चिम पट्टींत जंगल असल्यामुळें कांहीं गुराढोरांची निपज होते. परंतु ती विशेष महत्त्वाची नाहीं. माण तालुक्यांतील म्हसवड येथें खिल्लारी जात व कृष्णेच्या खोऱ्यांतील जनावरें फार प्रख्यात आहेत. शेतकरी लोक हीं जनावरें बाळगतात. व त्यांची पैदास करतात. येथें जीं चांगल्या दर्जाचीं गुरें तयार होतात तीं केवळ येथें मुबलक गवती कुरणें आहेत म्हणून नव्हे तर येथील गुरेंढोरें बाळगणारा शेतकरी वर्ग जनावरांची जोपासना फार कुशलतेनें करतो म्हणून

५१७ चौ. मैल जंगल व ६ चौ. मैल चारा व जळण याकरितां राखींव, एवढें क्षेत्र जंगल खात्याच्या ताब्यांत आहे. याशिवाय १८८ चौ. मैल गवती कुरण रेव्हेन्यू डिपार्टमेंटच्या ताब्यांत आहे. एकसारखें जंगल असें काय तें सह्याद्रीवर आहे.बाकी जंगलभाग जिल्ह्यांत तुटक तुटक पसरलेला आहे. जंगलांतील इमारती लाकूड बहुतेक तोडून नेलें असल्यामुळें त्यापासून फारसें उत्पन्न हल्लीं होत नाहीं.

या जिल्ह्यांत पाटबंधारे खात्यामार्फत बरींच कामें झालेलीं आहेत. परंतु एकादे वर्षी पाऊसच जर कमी पडला तर या 'इरिगेशन वर्क्स' वर पूर्णपणें अवलंबून राहतां येत नाहीं. येथील म्हसवड तलाव फार मोठा आहे. त्यामुळें सोलापूर जिल्ह्यास फायदा होतो. सातारा जिल्ह्यास त्याचा कांहीं उपयोग नाहीं. याशिवाय कृष्णेचा कालवा,रेवडीचा कालवा,अपर माण रिव्हर वर्क्स, येरळा रिव्हर वर्क्स,चिखलीचा कालवा व मायणी तलाव इत्यादि पाटबंधारे आहेत. देशावर विहिरी पुष्कळ आहेत. पूर्वभागाखेरीज इतरत्र पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पुरेसा असतो. पूर्वभागांत पाणी तुटवडा भासूं लागला म्हणजे सरकारच्या व लोकल बोर्डाच्या मदतीनें विहिरी खोल करणें व हेळ खणणें इत्यादि कामें सुरूं होतात.

दुष्काळ पडला असतां हटकून मोलमजुरी मिळेल असें एकही उद्योगधंद्याचें ठिकाण या जिल्ह्यांत नाहीं. हात मागाचा धंदा बरेच ठिकाणीं चालू आहे. ओगलेवाडीचा कांच-कारखाना, बहादुर नांगराचा कारखाना आणि किर्लोस्करवाडी येथील 'किर्लोस्कर ब्रदर्स आयर्न वर्क्स' प्रसिद्ध आहेत. निर्यात--ज्वारी, बाजरी, गळिताचीं धान्यें, घोंगड्या, मिरची, गूळ व कापूस. आयात–कापड, मीठ, व इतर जिन्नस.

बेळगांव

क्षेत्रफळ--४६१४ चौ. मैल.

या जिल्ह्यांतील प्रदेश व भोंवतालचा संस्थानी मुलूख यांचा एकमेकांत फार मिलाफ झालेला आहे. खुद्द या जिल्ह्यांतहि संस्थानी मुलूख बराच आहे. जिल्ह्याच्या नैर्ऋत्येस गोंवा प्रांताचा भाग दिसतो. जिल्ह्यांतील प्रदेश सर्वत्र सपाट असून पूर्वेकडे विजापूर जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत सखल होत गेला आहे. पश्चिमेस व दक्षिणेस असलेल्या सह्याद्रीच्या डोंगरालगतचा प्रदेश हाच काय तो जिल्ह्यांतील उंच भाग. जिल्ह्याचा उत्तर भाग व पूर्व भाग हा एकसारखा खुला व सुपीक आहे. दक्षिणेकडे मात्र डोंगर फाटयांमुळें जमिनीचे तुकडे पडले असून, कांहीं ठिकाणीं दाट जंगल पसरलें आहे. उत्तर भागांतून कृष्णा नदी वहात जाते. मध्यपट्टींतून घटप्रभा नदी वहात जाते. आणि दक्षिण भागांतून मलप्रभा नदी वहात जाते.पश्चिम घाटांत उगम पावल्यापासून बंगालच्या उपसागरास मिळेपर्यंत,या सर्व नद्यांचा ओघ सारखा पूर्वेकडे आहे. येथील हवा आरोग्यकारक आहे. उन्हाळ्यांत देखील येथील हवा थंड असते.

घाटाच्या आसपास पाऊस फार पडतो. पूर्वेकडे पाऊस मधून मधून पडत असला तरी, तो पुरेसा होतो.खुद्द बेळगांवास सरासरी ५०इंच पाऊस पडतो.पूर्वपट्टींत२५इंच पडतो. तर पश्चिम टोंकावरील चांदगड येथें सुमारें १०३ इंच पाऊस पडतो.

जिल्ह्यांत तांबड्या व काळ्या अशा दोन प्रकारच्या जमिनी आहेत. तांबड्या जमिनी मुख्यतः पश्चिम सरहद्दीवर आढळतात. या जमिनी निकस व खडबडीत असतात. परंतु या भागांत पाऊस मुबलक होतो. यामुळें खरीपाचीं पिकें बरीं होतात. सपाट व सखल प्रदेशांवर सर्वत्र काळ्या जमिनीच आहेत. या जमिनी कापूस, कडधान्यें, गहूं व हरबरा या पिकांस उत्तम समजतात. विशेषतः गोकाक तालुक्यांतील जमिनी फारच सुपीक आहेत. ईशान्येकडे डोण नदीच्या कांठीं चिखलट मातीच्या (Loamy plains) अशा सुपीक जमिनी आहेत. कृष्णेच्या खोऱ्यांतील काळ्या जमिनीची खोली सगळीकडे सारखीच नसते. चिकोडी, गोकाक व पारसगड या तालुक्यांतील जमिनींना पुष्कळ पावसाची जरूरी नसते. परंतु त्या जमिनींत वारंवार खतें घातलीं नाहीं तर पिकें चांगलीं निघत नाहींत. येथें गळिताचीं धान्यें व मसाल्याचे पदार्थ यांची लागवड चांगली होते. मुख्य पीक–ज्वारी सुमारें ६॥ लक्ष एकर. (विशेषतः अथणी, गोकाक, पारसगड, चिकोडी, व संपगांव या तालुक्यांत), बाजरी––१ लक्ष एकर (गोकाक, अथणी, पारसगड व चिकोडी हे तालुके), तांदूळ–अर्धा लक्ष एकर (विशेषतः नैऋत्य भागांत); गहूं––१।लक्ष एकर (पारसगड), कापूस–२ लक्ष एकर (पारसगड, अथणी, गोकाक), चिकोडी तालुक्यांत ऊंस, फळें व भाजीपाला यांचें बागाईत फार मोठी आहे तंबाखू––४० हजार एकर. (चिकोडी)

येथें चांगल्या जनावरांची पैदास होत नाहीं. खानापूर व बेळगांव येथील जंगलभागांतून धनगर गुरेंढोरें पाळतात. अव्वल दर्जाचे बैल म्हैसूर व काठेवाड या देशांतून आणलेले असतात. खुद्द या जिल्ह्यांतील नागडी जातीचे जनावरांपैकीं नागडी म्हैस फार चांगली असते.

जंगल––७००चौ. मैल. या जिल्ह्यांतील जंगलाचा फार उपयोग होतो. इमारती लांकूड, जळण, इत्यादि गोष्टी जिल्ह्यापुरत्या पुरवून शिवाय इतरत्र, कोळसा, बांबू व चंदन, इमारती लांकूड पाठविलें जातें. खानापूर तालुक्यांतील राखीव जळणांतून मद्रास सदर्न मराठा रेल्वेला व आणखी कित्येक गिरण्यांना जळण पुरविलें जातें. जंगल कामावर बरेच मजूर खपत असतात. व दुष्काळाचे वेळीं चारा कापणें व जळण तोडणें या कामांवर पुष्कळ लोक गुंतवितां येतात.

या जिल्ह्यांतील गोकाकचा कालवा फार मोठा आहे. यामुळें १८००० एकर जमिनीस पाणी पुरवितां येतें. गडीकेरी तलावामुळें सुमारें ५०० एकर जमीन भिजवितां येते. लहानसहान तलाव एकंदर ४००० वर आहेत, परंतु कित्येकांत पाणी जवळजवळ नसतेंच. चिकोडी तालुक्यांत प्रत्येक ५७ एकर शेतीला व हुकेरी तालुक्यांत प्रत्येक ४५ एकर शेतीला एक एक मोटेची विहीर, याप्रमाणें विहिरी आहेत. परंतु पाऊस झाला नाहीं म्हणजे सर्वत्र पाण्याचा तुटवडा भासूं लागतो. अथणी तालुक्यांत मात्र इतरत्र पाण्याचा दुष्काळ असला तरी कृष्णेला भरपूर पाणी असतें व त्यामुळें तिच्या भोंवतालच्या जमिनींतील पिकें चांगलीं येतात. पिण्याचें पाणी––पश्चिम भागांत नद्या व विहिरी यांमध्यें चांगलें पाणी पुरेसें असतें. पूर्व भागांत मात्र विहिरींतील पाणी मचूळ असतें, व झरे तळ्यांतही खालीं फार खोलवर असतात. उन्हाळ्यांत कृष्णेशिवाय इतर सर्व नद्या अगदीं आटतात. व त्या लहान ओढ्यांप्रमाणें दिसूं लागतात. यामुळें पाण्याचा तुटवडा जारीनें भासतो.

मुख्य धंदा शेती. हातमागावर काम करणारे लोक या जिल्ह्यांत पुष्कळ आहेत. रंग देणें व कातडीं कमाविणें हे धंदे सर्वत्र चालू आहेत. गोकाक येथें मुलांचीं खेळणीं तयार होतात. बेळगांव हें चांदी-सोन्याचे कामाबद्दल व तांब्यापितळेचीं भांडीं व उपकरणीं यांकरितां प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यांत लाखेचे जिन्नस व बांगड्या तयार होतात येथें कापड व रेशीम यांचा मोठा व्यापार चालतो. निर्गत––तांदूळ, तंबाखू आणि कापूस. आयात–कापड, रेशीम, मीठ, धान्य इ.

विजापूर

क्षेत्रफळः––५६६९ चौ. मैल.

या जिल्ह्याला पूर्वी कळदगी असें नांव होतें. परंतु १८८५ मध्यें जिल्ह्याचें मुख्य ठाणें विजापूर येथें नेल्यापासून याला विजापूर जिल्हा हें नांव मिळालें. जिल्हा सलग असून क्वचित् ठिकाणीं संस्थानी मुलुख आढळतो. डोण नदीच्या उत्तरेकडील प्रदेश म्हणजे उत्तरपट्टी, डोण नदी व कृष्णा नदी यांमधील प्रदेश म्हणजे मध्यपट्टी व कृष्णेच्या दक्षिणेकडील म्हणजे दक्षिणपट्टी असे या जिल्ह्याचे तीन विभाग पडतात. उत्तर पट्टींत सर्वत्र पठार व उजाड प्रदेश आहे. येथील खोऱ्यांमधून शेती होते. पठार प्रदेशावरील सर्व जमिनी उथळ असून नदीच्या खोऱ्यांतून कसदार जमिनी आहेत. तेथें मोटेच्या विहिरी

खणणें फार सोपें जातें.मध्यपट्टींत अतिशय सुपीक असें डोण नदीचें खोरें आहे. या ठिकाणीं लांब-वर काळ्या जमिनी पसरल्या आहेत. दक्षिण-पट्टींत कृष्णा कांठच्या मळीच्या जमिनी दिसतात. या पट्टींतून दोन डोंगरटेकड्यांच्या रांगा गेल्या आहेत. बागलकोट तालुक्याचा पूर्वभाग, हनगुंड तालुक्याचा ईशान्यभाग आणि बदामी डोंगराच्या दक्षिणेकडील मलप्रभेचें अरुंद खोरें, हे फार सुपीक प्रदेश आहेत. जिल्ह्यांत नद्या व ओढेनाले भरपूर आहेत. मुख्य नद्या—भीमा, डोण, कृष्णा, घटप्रभा व मलप्रभा. डोण नदीचें पाणी इतकें खारें आहे कीं, तें पिववत नाहीं.येथील हवा कोरडी व आरो-ग्यकारक असते. बदामी तालुक्यांत मात्र बारीक-सारीक झुडुपें व भाजीपाला असल्यामुळें तेथील हवा तितकीशी चांगली नाहीं. मार्च ते एप्रिल या महिन्यांत उन्हाळा फार कडक असतो.

पाऊस सर्वत्र सारखा पडत नाहीं.व अनिश्चितता फार असते. नैर्ऋत्येकडील व ईशान्येकडील पाव-साळी वारे वहात येतात. त्यामुळें पावसाळा जूनमध्यें सुरू होतो तो नोव्हेंबरमध्यें संपतो. ऑगस्ट, सप्टेंबर व आक्टोबर या महिन्यांत पावसाचें प्रमा-ण अतोनात वाढतें. ईशान्येकडील वारे कांहीं वेळां वहात नाहींत व त्यामुळें पुढील पाऊस पडत नाहीं. कांहीं वेळेस नैर्ऋत्येकडील वाऱ्यांच्या मदतीस ईशान्येकडील वारे वाहूं लागतात. क्वचित्काळीं ईशान्येकडील मॉन्सून सह्याद्रीपर्यंत पोहोचतो. व त्या वेळीं डिसेंबर, जानेवारीव फेब्रुवारी या महिन्यांत देखील पाऊस पडतो.

पिकें—उत्तर पट्टींत बाजरी,ज्वारी, गहूं, का-पूस, तीळ, जवस व करडई. मध्यपट्टींत—गहूं, ज्वारी, जवस व करडई. येथें कापसाचें पीक फार मोठें आहे.दक्षिणपट्टी--गहूं, ज्वारी व कापूस. १९२५ सालचे अंदाजी आंकडे--ज्वारी—१६ लक्ष एकर जमीन, गहूं—२॥ ते ३ लक्ष एकर--बाजरी अर्धा लक्ष ते १लक्ष एकर. तांदूळ:---अडीच लक्ष एकर. (हें पीक विशेष मह-त्वाचें नाहीं). तूर —३० ते ४० हजार एकर. हरभरा—५० हजार एकर. मूग, उडीद, माठ व कुळीथ या कडदणांचें पीकही बरेंच आहे. करडई १ लक्ष एकर. जवस—७० हजार एकर. कापूस—३ लक्ष एकर, (या जिल्ह्यांत या पिकाचें फार महत्त्व आहे.). ऊंस फार थोडा पिकतो.

येथें गवती कुरणें पुरेशीं असून हवामानहि जना वरांची पैदास होण्यास योग्य असेंच आहे. खुद्द येथील जनावरें बाळगण्यापेक्षां बाहेरून जनावरें आणणें याकडे लोकांचा ओढा फार आहे. बंगलोर, बेल्लरी इत्यादि ठिकाणांहून बैल आणतात. येथें म्हशी व शेळ्यामेंढ्या यांच्या निरनिराळ्या जाती दृष्टीस पडतात. या जिल्ह्यांत घोड्यांची पैदास चांगली होत नाहीं. परंतु इंडी, सिंदगी इ. तालुक्यांत कण-खर तट्टें आढळतात.

सुमारें २४८ चौ.मैल जंगलक्षेत्र आहे. जिल्ह्यांतील जळण भागविण्यापुरतेंच जंगलाचें उत्पन्न आहे.जमिनी मुरुमाच्या असल्या-मुळें पाऊस पुरेसा झाला तरच जनावरांना चारा निघतो. दुष्काळ पडला असतां जनावरें विकावीं लागतात. किंवा बाहेरून कडबा आणणें जरूर होतें.दुष्काळांत राखीव गवती कुरणें सार्वजनिक उपयोगाकरितां सरकार खुलीं करतें.

या जिल्ह्यांत मोठमोठे पाटबंधारे नाहींत. त्यांतल्या त्यांत मुचकुंडीच्या तलावाचा बराच उपयोग होतो. या तलावांतील पाण्याचा उपयोग रयतलोक १९२२ पासून करूं लागले आहेत. रबी पिकांना व बागाईतीला यांतील पाणी नेलेलें आहे. बदामी तालुक्यांतील केंदूर तलावाच्या बांधाची दुरुस्ती झाल्यामुळें बागाईतीची वाढ झाली आहे. नदीकांटच्या प्रदेशांतून पिण्याच्या पाण्याचा पुरवटा भरपूर आहे. इतरत्र उन्हाळ्यांत पाण्याचा तुटवडा भासतो.जिल्ह्यांतील मुख्य उद्योगधंदे:—कापसाच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज्,विणणें,व खाणी खणणें, इलकल व बागलकोट येथें लुगडीं विणून तयार होतात. गुलेदगुड,अमीनगड,गुडुर इत्यादि ठिकाणीं खण,कांबळें,घोंगड्या,ओबडधोबड कापड व जुन्या-तऱ्हेच्या बांगड्या हे जिन्नस तयार होतात. खाणी खणण्याचें काम विशेषतः बदामी तालुक्यांत चालतें. गुडुर येथें तांबे—पितळेचीं भांडीं तयार होतात.

निर्यात—सुती व रेशमी कापड, घोंगड्या, सूत व तांब्याचीं भांडीं. आयात—तांदूळ, नारळ, मीठ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ, काकवी व इतर किर-कोळ जिन्नस.

धारवाड

क्षेत्रफळ—४६०२ चौ. मैल.उत्तर टोंकापासून दक्षिण टोंकापर्यंत जास्तींत जास्त लांबी ११६ मैल; व जास्तींत जास्त रुंदी ७७ मैल. धारवाड जिल्ह्याचे तीन भाग पडतात. देश, मळद, व या दोहोंमधील मध्यपट्टी. देश—या भागांत रोण, नवलगुंद व गदग हे तालुके येतात. एकंदर मुलूख १७०० चौ. मैल म्हणजे जिल्ह्याच्या तिसऱ्या हिश्शापेक्षां जरा

जास्तच आहे. हा प्रदेश सर्वत्र मोकळा व खुला आहे. येथें अवर्षणाचा संभव फार असतो. पाऊस व्यवस्थित पडला तर ज्वारी, कापूस, गहूं व गळिताचीं धान्यें हीं पिकें चांगलीं होतात. मळद—या पश्चिमेकडील डोंगराळ जंगल प्रदेशांत दरवर्षी भरपूर पाऊस पडतो. तांदूळ हें मुख्य पीक आहे. याशिवाय नाचणी व ज्वारी हीं धान्यें चांगलीं पिकतात. या प्रदेशाचें आकारमान जवळजवळ देशाइतकेंच आहे. गवती कुरणें सर्वत्र मुबलक आहेत.

पाण्याचा सांठा करण्यास सोईस्कर जागा फार आहेत व दक्षिणेकडे सर्वत्र तलाव दृष्टीस पडतात. मध्यपट्टी—एकंदर मुलूख सुमारें १२०० चौ. मैल आहे. देश व मळद या दोन प्रदेशांतील विशेषांचा येथें मिलाफ झालेला आहे. या भागांत तांबडट मळींच्या जमिनी आहेत. यामधून कापसाच्या पिकास योग्य अशा जमिनींच्या पट्टया गेलेल्या आहेत. या जमिनी देशावरील काळ्या जमिनीपेक्षां भुसभुशीत, व मळद भागांतील तांबड्या जमिनीपेक्षां दमट व ओलसर अशा आहेत. ज्या भागांत पाऊस मुबलक आहे तेथें तांदूळ पिकतो. धारवाड जिल्हा हा फार उंचावर असल्यामुळें येथें मोठ्या नद्या नाहींत. मुख्य नद्या सात; त्यांपैकीं मलप्रभा, बेन्निहाला, तुंगभद्रा, वरदा, धर्मा व कुमुदवती या नद्या पूर्ववाहिन्या आहेत. त्या बंगालच्या उपसागरास मिळतात, आणि बेडतीनुल्हा ऊर्फ गंगवल्ली हीं नदी पश्चिमेकडे वहात जाऊन अरबी समुद्रास मिळते. बेन्निहाला या नदीचें पाणी मचूळ आहे व ती लवकर कोरडी पडते. यांपैकीं फक्त धर्मानदीला हंगाल तालुक्यांत पाटबंधारे बांधलेले आहेत. पूर्वेकडील उजाड प्रदेश व पश्चिमेकडील भातखाचरें यांमधील उंचवटयाच्या प्रदेशांत हवा निरोगी व आल्हादकारक असते. हिवाळ्यांत पश्चिम भागांतील हवा अतिशय रोगकारक असते.

पूर्वभागांत हवामान बहुतेक कोरडें व निरोगी आहे. धारवाड जिल्ह्यांत पावसाळा जून ते डिसेंबरपर्यंत असतो. येथें नैर्ऋत्येकडील व ईशान्येकडील असे दोनही पावसाळी वारे वहात येतात. इलाख्यांतील इतर कोठल्याहि जिल्ह्यांपेक्षां या जिल्ह्याला दोनहीं मॉन्सूनस् पासून अधिक फायदा होतो. जिल्ह्यांतील जमिनी तीन प्रकारच्या आहेत. तांबड्या, काळ्या व चिखलट. तांबड्या जमिनी मध्यपट्टींत आहेत. त्या डोंगर, टेकड्या व दगड फुटून त्यांचें पीठ होऊन तयार झालेल्या असतात व म्हणून उथळ असतात. बहुतेक काळ्या जमिनी देशपट्टींत आहेत. या जमिनींत कापूस होतो म्हणून यांना कापसाच्या जमिनी असेंही म्हणतात. तपकिरी चिखलट जमिनी बहुतेक पश्चिम भागांत सांपडतात. या जमिनींची खोली फार कमी असते. काळ्या जमिनींत वर्षाकांठीं एकदां नांगर फिरवला म्हणजे पुरे होतो व त्यांत खत तर अगदीं क्वचितच टाकतात. तांबड्या जमिनींची नांगरणी वर्षांतून तीनचारदां होते व त्यांत मधून मधून खतहि टाकावें लागतें.

जिल्ह्यांतील मुख्य पीक ज्वारी. ६ ते ७ लक्ष एकर ज्वारीची पेरणी सर्वत्र होते. फक्त कलघटगी, हंगाल व कोड या तालुक्यांत मात्र तांदुळाचें पीक मोठें आहे. पश्चिम भागांतील तालुक्यांत सवा लाख ते दीड लाख एकर जमीन भाताच्या पिकाकडे आहे. यांतील निम्या शेतीस पाटबंधाऱ्याचें पाणी आहे. गहूं—३॥ लक्ष एकर. (उत्तर भागांतील तालुक्यांतून होतो) तूर व हरभरा—प्रत्येकीं ४० ते ५० हजार एकर. (मूग व कुळीथ हीं कडदणेंहि तयार होतात.) कापूस ४ ते ५ लक्ष एकर. (उत्तरेकडील व पूर्वेकडील काळ्या जमिनींत तयार होतो). जवस—५० हजार एकर. (गळिताच्या धान्याकडे असलेल्या जमिनीपैकीं अर्धीअधिक जमीन या पिकाकडे आहे). तीळ ७ हजार एकर. एरंडाचें बीं ५ हजार एकर. ऊंस व मिरची यांची लागवड पुष्कळ होते. नैर्ऋत्य भागांत सुपारीची व नारळीची बागाईत आहे.

या जिल्ह्यांत विशिष्ट अशा जनावरांच्या जाती नाहींत. गुरांची पैदास करण्यापेक्षां परदेशी जनावरें आणून त्यांची जोपासना करणें येथील लोकांस सोईचें पडतें. गवत व कडबा मुबलक मिळतो. गवती कुरणें राखून ठेवण्याऐवजीं लोकांना त्या जागीं शेती करणें फायद्याचें पडतें.

२०८ चौ. मैल क्षेत्र जंगलखात्याच्या ताब्यांत आहे. धारवाड, कलघटगी व हंगळ या तालुक्यांतील जंगलभागांचें उत्पन्न चांगलें आहे. जंगलाच्या उत्पन्नांतून फक्त जिल्ह्याच्या जळण, वांसे वगैरेच्या गरजा भागतात. बाहेरील प्रांतांत कांहींहि माल जात नाहीं. बहुतेक जंगल प्रदेशांत मोठीं झाडें तयार होत नाहींत. सर्वत्र लहान लहान झुडुपें दिसतात. येथील जनावरांस पुरण्याइतका चारा जंगल भागांतून निघतो. दुष्काळ पडला असतां इतरत्र धाडण्याइतका चारा येथें तयार

होत नाहीं. या जिल्हयांत चंदनाचीं झाडें बरींच आहेत. मळद भागांत सरासरी ३४ इंच पाऊस होतो. मध्यपट्टींत सरासरी ३०इंच पाऊस पडतो. व देशभागांत २५ इंचाहूनहीं कमीं असतो.

पाटबंधारे–धर्मेचा कालवा; आणि दंबळ, मेडलेरी, गदग व असुडी हे चार तलाव. या तलावांमुळें १०० ते ८०० एकर जमीन भिजते. या तलावांतील पाणीपुरवठा तेथील पावसावर अवलंबून असतो. यांशिवाय लहान सहान पाटबंधारे तीनएक हजार आहेत. त्यांतील बहुतेक कोड व हंगळ या तालुक्यांत आहेत. मोटेच्या विहिरी पांच हजारांवर असून निम्या अधिक वरील दोन तालुक्यांत दृष्टीस पडतात. उत्तरेकडे व पूर्वेकडे दुष्काळ पडण्याचा संभव फार असला तरी तेथें पाटबंधारे बांधण्यास किंवा विहिरी खणण्यास अनुकूल अशी परिस्थिति मुळीच नाहीं. पिण्याचें पाणी:––सर्वत्र विहिरी व तलाव यांतील पाणी उपयोगांत आणतात. उन्हाळ्यांत कांहीं तलाव व विहिरी आटतात, आणि मग लोकांना खेड्यांपासून दूरवर असलेल्या नद्यानाल्यांचा आश्रय घ्यावा लागतो.

रेशमी व सुती कापड विणणें व दागिने आणि इतर नित्योपयोगी जिन्नस तयार करणें, हे या जिल्हयांतील मुख्य उद्योगधंदे आहेत. नवलगुंद येथें उत्तम सतरंज्या तयार होतात. हुबळी, गदग येथील लुगडीं व खण फार प्रसिद्ध आहेत. धारवाड येथें कांचेच्या बांगड्या बनवितात. जिल्हयांत सर्वत्र विणकरी लोकांचीं ठाणीं आहेत. एकंदर लोकसंख्येपैकीं साठ हिस्से लोक कापड तयार करण्याच्या धंद्यांत गुंतलेले असतात. या मोठ्या धंद्यामुळेंच येथील रहिवाशांना मोलमजुरी मिळते. हुबळी व गदग ही मुख्य व्यापारी ठाणीं आहेत. हुबळी येथें मोठी 'रेल्वे वर्क्स' आहेत.निर्यात-कापूस. जिल्हयांतील भागांतून ज्वारीचा व्यापार बराच चालतो. आयात–परदेशी वस्तू, नारळ, काकवी व सुपारी हे जिन्नस कर्नाटक व म्हैसूर या भागांतून येतात.

ठाणें

क्षेत्रफळ––३५७६ चौ. मैल (यांत मुंबई उपनगर जिल्हयाचा समावेश होतो). जिल्हयाच्या पूर्वेस सह्याद्री पर्वताची रांग आहे. व पश्चिमेस अरबी समुद्र आहे. मुंबई उपनगर जिल्हा–– (Bombay Suburban District) ठाणें जिल्हयांतील साष्टी बेटाचा दक्षिण भाग १९२० मध्यें वेगळा केला, व त्याला वरील नांव दिलें. या जिल्हयांत दोन तालुके आहेत. मुंबई शहराच्या भोंवतीं जीं उपनगरें झालीं आहेत त्यांची वाढ व्यवस्थित होण्याकरितां हा जिल्हा वेगळा केला. क्षेत्रफळ–१५३ चौ. मैल.ठाणें जिल्हा म्हणजे बहुतेक सखलपट्टी असून मधून मधून डोंगर टेकड्या गेलेल्या आहेत. त्यांची उंची १०० पासून २५०० फुटांपर्यंत असते. पूर्वेकडील व ईशान्येकडील प्रदेश उंच असून तेथें झाडी बरीच आहे; शेती मात्र तुरळक आहे. समुद्रकिनाऱ्याच्या लगत जमीन सखल असून सुपीक आहे. वैतरणा नदी जिल्हयाच्या मध्यभागांतून पूर्वपश्चिम गेली आहे. तिचा उत्तरेकडील समुद्रकिनारा सारखा सपाट असून डोंगर--टेकड्याही मागें हटलेल्या आहेत. तेव्हां डहाणू येथील दलदलीचा प्रदेश सोडून जसजसें उत्तरेस जावें तसतसें कोंकणाऐवजीं गुजराथी वळण दिसूं लागतें. व भाषादेखील मराठीच्या जागीं गुजराथी ऐकूं येते. सर्व किनाऱ्यालगत जमीन फार सुपीक असल्यामुळें आसपासच्या खेड्यांतून वस्ती फार दाट आहे. ईशान्येकडे सर्वत्र जंगल असून खोऱ्यांतून थोडीबहुत शेती आहे. खेड्यांतील वस्ती रानटी आहे. समुद्रालगतच्या प्रदेशांत सर्वत्र भातखाचरें आहेत.

या जिल्हयांत खारट दलदलीच्या जमिनी फार आहेत. हळूहळू या जमिनी शेतीच्या उपयोगास आणण्याचा प्रयत्न चालू आहे. मुख्य नद्या––वैतरणी व उल्हास–वसईची खाडी,साष्टी बेट व ठाणें जिल्हा यांमधून गेली आहे.पश्चिम घाट ही जिल्हयाची स्वाभाविक सरहद्द आहे. याशिवाय साष्टीबेटांतील दक्षिणोत्तर डोंगरांची रांग, दमण येथील रांग, व वैतरणी आणि वसईची खाडी यामध्यें दक्षिणोत्तर असलेली डोंगरांची रांग, इत्यादि डोंगरटेकड्या आहेत.

कमींतकमी सहा महिने तरी हवा दमट असते. एकंदर जिल्हयांतील हवा निरोगी नाहीं. उन्हाळ्यांत समुद्राकडून वारे वाहात येतात त्यामुळें उष्मा फार होत नाहीं. समुद्रकिनारा सोडून इतरत्र आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत हवा मलेरियस असते. हिंवाळा असा फार थोडा असतो. पाऊस अतिशय पडतो व तो सर्व नैऋत्येकडील मान्सूनचा असतो. वसईच्या उत्तरेस सर्व किनाऱ्यालगत सरासरी ६६ इंच पाऊस पडतो. इतरत्र सुमारें १०० इंच पाऊस होतो. पाऊस खूप पडत असला तरी पावसाळा असा थोडाच असतो.

वरेच वेळां पाऊस खूप पडून शेतीचें नुकसान होतें. जमिनी दोन तऱ्हेच्या आहेत. गोडच्या व खाऱ्या. गोडच्या जमिनी तांबड्या किंवा काळ्या असतात. काळ्या जमिनींत तांदूळ पिकतो. तांबड्या जमिनीस माळवरकस असें म्हणतात. त्या पठारावर किंवा डोंगराच्या उतरणीवर असतात. यांत नाचणी वगैरे हलकीं धान्यें होतात. ७० हिस्से शेती तांदुळाकडे आहे. नागली, वरी इत्यादि डोंगरी धान्यें येथें पिकतात. कारळे व तीळ हीं पिकें तांदूळ तयार झाल्यानंतर होतात. माहिम व वसई या तालुक्यांत बागाईत फार आहे. केळीं व आंबे यांचें उत्पन्न मोठें आहे. जिल्हयांतील अर्धीअधिक जमीन शेतीस निरुपयोगी आहे.

बहुतेक भागांत जंगल दिसतें. वडाळा व शहापूर यांच्या पूर्वेस मोखाडा येथें काय ती जनावरांची पैदास होते. जिल्हयांत एकंदर १४१७ चौ. मैल जंगलक्षेत्र आहे. यापैकीं १०३६ चौ. मैल निव्वळ जंगल असून बाकीचें ३७९ चौ. मैल राखीव जंगल व गवतीं कुरणें, आणि २ चौ. मैल जळण व चारा याकरितां राखीव क्षेत्र एवढें रान रेव्हेन्यू खात्याच्या ताब्यांत आहे. जंगल उत्पन्नापैकीं २५ हिस्से साग व २४ हिस्से ऐना यांचें उत्पन्न असतें. यांशिवाय खैर, शिसवी व बांबू हीं झाडें तयार होतात. येथील जंगलांतील झाडी तर चांगली आहेच; परंतु या जिल्हयांतून दोन रेल्वेरस्ते गेले असल्यामुळें व बंदरें असल्यामुळें इलाख्यांतील इतर कोठल्याहि जिल्हयापेक्षां येथील जंगलाचें उत्पन्न जास्त आहे. दरवर्षी सरासरी ६७५०एकर जंगलाची तोड होते. याशिवाय येथील रयतेसहि गुरें चारणें, वाळकें जळण गोळा करणें वगैरे सवलती दिल्या आहेत. जंगलाची जोपासना व वाढ नवीन रोपें लावून व कुंपण वगैरे घालून केलेली आहे.

येथें मोठमोठाले पाटबंधारे नाहींत. बहुतेक तलाव फार लहान आहेत. सुमारें ५००० मोटेच्या विहिरी आहेत. त्या बहुतेक वसई, माहीम, डहाणू व साष्टी आणि इतर कांहीं किनाऱ्यालगतच्या तालुक्यांत आहेत. मार्चअखेरपर्यंत जिल्हयांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पुरेसा असतो. बहुतेक ठिकाणीं उन्हाळ्यांत पाण्याची टंचाई असते. मासे धरणें हा येथील मुख्य धंदा आहे. मुंबई शहराला माशांचा पुरवठा येथून होतो. भिवंडी येथें हातमागाचा धंदा मोठा आहे; व मुंबई शहरामुळें कांहीं गिरण्या येथें निघाल्या आहेत. अंबरनाथ येथें गिरण्या व कारखाने आहेत. ठाणें येथें एक वूलनमिल आहे. यंत्राच्या साहाय्यानें तांदूळ सडणें हा एक हंगामी धंदा आहे. निर्यात–तांदूळ, मीठ, लांकूड, चुना, वाळू, केळीं, सुपारी व खारवलेले मासे. आयात–सुती कापड, धान्य, तंबाखू, साखर व काकवी.

कुलाबा

क्षेत्रफळ : ७१६७ चौ. मैल. या जिल्हयाच्या पूर्वेस सह्याद्रि पर्वताची रांग असून पश्चिमेस अरबी समुद्र आहे. हा जिल्हा म्हणजे उंचसखल जमिनीची अरुंद अशी पट्टी आहे. रुंदी १५ ते ३० मैल आहे. लांबी ठाणें व मुंबई बंदरापासून महाबळेश्वर डोंगराच्या पायथ्यापर्यंत आहे, म्हणजे सुमारें ७५ मैल भरेल. सर्वत्र डोंगरफाटे पूर्वेकडून पश्चिमेकडे गेलेले दिसतात. कांहीं थोड्या लहान नद्या घाटांत उगम पावून पश्चिमेकडे समुद्रास मिळतात. त्यांपैकीं उल्हास, पातालगंगा, अंबा, कुंडलिका, मंदाद व सावित्री या मुख्य होत.

या जिल्हयांत आक्टोबर व नोव्हेंबर या दोन महिन्यांत दमट हवा असते. अलिबागच्या आसपास समुद्राकडून येणारे वारे सतत वाहात असतात. महाड तालुक्यांत मात्र समुद्राकडील वारे बिलकूल येत नाहींत. आणि येथें हवामानांत फेरबदल फार जलद होतो. उन्हाळ्यांत कर्जत तालुक्यांत उष्मा फार होतो. या जिल्हयांत उन्हाळा व हिवाळा यांपेक्षां पावसाळाच लोकांना चांगला मानवतो.

समुद्रकिनाऱ्यालगत पाऊस सरासरी ९० इंच पडतो. जसजसें घाटाकडे जावें तसतसें पावसाचें प्रमाण वाढत जातें. घाटाच्या आसपास सुमारें १३० इंच पाऊस होतो.

कुलाबा जिल्हयांतील मळीच्या जमिनी फार सुपीक आहेत. त्यांतील माती तांबडी, पिवळी किंवा काळी असते. तिन्ही तऱ्हा सारख्याच कसदार असतात. काळ्या जमिनींत तांदुळाचें पीक उत्तम तयार होतें. डोंगरटेकड्यांच्या उतरणीवर कुरुंदाच्या (Laterite) जमिनी आहेत. त्यांत वरी, नाचणी, उडीद, तीळ इत्यादि धान्यें पिकतात. परंतु या जमिनी उथळ असल्यामुळें एकदां पीक काढल्यानंतर कांहीं वर्षें पडून असतात. नागोठणा, रोहा व मंदाद या खाड्यांच्या कांठांनीं ओलसर व चिखलट जमिनी आहेत. दासगांवपासून पश्चिमेकडे सावित्रीच्या कांठांकांठांनीं दहा मैलपर्यंत अशाच प्रकारच्या

जमिनी आहेत. येथें गोडया पाण्याचा चांगला पुरवठा झाला तर उत्तम पीक येईल. ज्या जमिनींत खाडीचें पाणी पूर आला असतां वहात येतें त्या जमिनींना खारपट जमिनी म्हणतात. समुद्रकांठच्या जमिनी बागाईतीस फार चांगल्या असतात. ६५ हिस्से जमिनींत तांदूळ पिकतो. इतर पिकें—नाचणी, वरी, हरिक, वाल, तूर, कारळें व तीळ. समुद्रकांठच्या प्रदेशांत सर्वत्र नारळीचीं झाडें दिसतात.

जिल्ह्यांत पाटबंधारे कोठेंही नाहींत. फक्त अलिबाग तालुक्यांत मोटेच्या विहिरी आहेत. खारपट प्रदेशांत गोड पाण्याचा तुटवडा जारीनें भासतो. दक्षिणेंतील तालुक्यांत उन्हाळ्यांत पाणीपुरवठा पुरेसा नसतो. इतरत्र पिण्याच्या पाण्याचा पुरवठा भरपूर आहे.

येथील मोठया व्यापाऱ्यांनीं व खोतांनीं गुजराथी बैल आणलेले आहेत. बाकी सर्वत्र खुद्द याच जिल्ह्यांतील जनावरें आहेत. शेळ्या व तट्टें दक्षिण देशांतून इकडे आणतात.

४१७ चौ. मैल जंगलक्षेत्र व ४ चौ. मैल जळण व चारा याकरितां राखीव एवढें क्षेत्र जंगलखात्याच्या ताब्यांत आहे. यांशिवाय १०२ चौ. मैल गवती कुरण रेव्हेन्यू खात्याच्या ताब्यांत आहे. या जिल्ह्याला मुंबई फार जवळ असल्यामुळें येथील जंगल फार महत्त्वाचें आहे. यापूर्वीच बरेंच जंगलतुटून उजाड झालें आहे. सह्याद्रीच्या उतरणीवरील जंगलाचें हवामानदृष्टया फार महत्त्व आहे. येथें सागवान फारसें नाहीं.

मासे पकडणें व भातसडणें हे या जिल्ह्यांतले मुख्य धंदे आहेत. येथील बराचसा पुरुषवर्ग मुंबईतील गिरण्या व इतरउद्योगधंदे यांमध्यें मजूर म्हणून काम करतो. कांहीं लोक खोबऱ्याचें व तिळाचें तेल काढणें, सुंभ तयार करणें, इत्यादि उद्योग करितात. व्यापारधंद्यांचीं मुख्य ठाणीं—पेण, पनवेल, कर्जत, नागोठणा, रेवदंडा, रोहा, गोरेगांव व महाड. निर्यात—तांदूळ, मीठ, जळणाचें लाकूड, गवत, इमारतीचें लाकूड, भाजीपाला, फळें व खारवलेले मासे. आयात—पितळेचीं भांडीं, (पुणें व नाशिकहून), धान्य, कापडचोपड, तेल, लोणी, हळद, साखर व काकवी.

रत्नागिरी

क्षेत्रफळः—सुमारें ४ हजार चौ. मैल. पूर्वपट्टीवर सह्याद्रीची रांग व पश्चिमेस अरबी समुद्र आहे. हा जिल्हा उंचसखल व ओबडधोबड असा आहे. समुद्र किनाऱ्यालगत उंच पठार प्रदेश आहे. किनाऱ्यापासून आंतवर खाडया व नद्या गेल्या आहेत. या नद्या व खाडया यांच्या कांठावर उत्तम बंदरें असून त्यांच्या भोंवतालच्या जमिनी म्हणजेच काय तो जिल्ह्यांतील सुपीक प्रदेश होय. किनाऱ्यापासून दहाएक मैल आंत सर्व प्रदेश खुला व मोकळा आहे. परंतु थोडें पूर्वेकड गेलें कीं, सह्याद्रीच्या डोंगरटेकडया दिसूं लागतात. पश्चिम घाट ही एकसारखी जिल्ह्याची सरहद्दच आहे. हा डोंगर—पट्टा, समुद्रकिनाऱ्यापासून ३० ते ४० मैल आंत समांतर गेलेला आहे. उंची दोनपासून तीनहजारापर्यंत व क्वचित ठिकाणीं ४००० फूट इतकी आहे. मुख्य नद्या—सावित्री किंवा बाणकोट. ही जिल्ह्याची उत्तर सरहद्दच आहे. वाशिष्ठी ही सावित्रीच्या दक्षिणेस ३० मैल अंतरावरून समांतर वाहात जाते. ही या जिल्ह्यांतील मोठी व महत्त्वाची नदी आहे. शास्त्री नदी प्रचीतगडापाशीं उगम पावून जयगडनजीक समुद्रास मिळते. यांशिवाय मुचकुंदी, वाघोटणा, देवगड, अर्जी, कालगली, कागळी इ० नद्या आहेतच. या नद्यांचीं लांबी फार कमी आहे. सर्व नद्या पूर्वपश्चिम आहेत. नद्या लहान असल्या तरी जिल्ह्यांत त्यांचें फार महत्त्व आहे. समुद्रापासून आंत केव्हांहि दहाबारा मैलपर्यंत पडाव जाऊं शकतात, व गलबतें नांगरण्यास फार सोईस्कर जागा या नद्यांच्या कांठीं असल्यामुळें, यांचें व्यापारदृष्टया फार महत्त्व आहे. हल्लीं घाटाच्या बाजूनीं आगगाडींनीं नेआण व वाहतूक सुरूं झाली असल्यामुळें येथील बंदराचें महत्त्व कमी झालें आहे. हल्लीं खाडया होरत असल्यामुळें येथील व्यापार कमी झाला आहे. हवा दमट असली तरी निरोगी आहे.

पाऊस नियमित व मुबलक पडतो. जून ते ऑगस्ट पावसाचा भर असतो व आक्टोबरअखेर पर्यंतही पावसाळा चालू असतो. किनाऱ्यालगत ८० पासून १०५ इंच इतका पाऊस पडतो. आंतील प्रदेशांत १४० इंचाहूनहि जास्त पाऊस पडतो. व घाटांत तर अतिवृष्टीच होते. रत्नागिरी जिल्ह्यांत चार प्रकारच्या जमिनी आहेत. (१) भाताच्या (२) बागायतीच्या (३) मळीच्या किंवा रबी पिकाच्या व (४) वरकस. भाताच्या जमिनींतहि आणखी पांच प्रकार आहेत. त्यांपैकीं खोऱ्यांमधील तळाच्या मळीच्या जमिनी या सर्वांत सुपीक होत. बागायत जमिनीच्या दोन तऱ्हा आहेत. आगरी व डोंगरी. आगरी जमिनींत ताड, नारळ, पोफळ हीं झाडें होतात. मळीच्या म्हणजे रबी पिकें होतात.

त्या जमिनी नद्यांच्या कांठांकांठांनीं आहेत. त्यांत कडधान्यें,ऊंस व ताग होतो. वरकस जमिनी उंचावर असतात.त्या निकस असल्यामुळें त्यांत नाचणी, वरी व हरीक हीं पिकें होतात. यांत सतत तीनचार वर्षें पेरणी झाली म्हणजे नंतर कांहीं वर्षें त्या पडून असतात. तांदूळ, नाचणी व वरी हीं धान्यें या जिल्हयांतील मुख्य पिकें होत. यांशिवाय कुळीथ, उडीद व वाल हीं येथील मुख्य कडधान्यें होत.गळिताच्या धान्यांपैकीं फक्त कारळेंच येथें होतात.ताग किंवा सण याची लागवड बरीच होते. ऊंस,सुपारी व मिरची हीं किरकोळ पिकें आहेत.

येथील गवत व चारा कसदार नसल्यामुळें जनावरांची वाढ चांगली होत नाहीं. बाहेरून आणलेलीं जनावरें देखील लवकर खंगतात. म्हशी (जाफराबाद) दक्षिण काठेवाड येथून आणतात.

येथें पाटबंधारे बांधून पाणीपुरवठा करण्याची जरूरी भासत नाहीं. शेतीं करितां थोडयाबहुत मोटेच्या विहिरी आहेत. त्यांचा उपयोगदेखील नद्यांमधून कांहीं मर्यादेपर्यंत समुद्राचें खारट पाणी येतें, म्हणून करावा लागतो. मालवण, रत्नागिरी व वेंगुर्लें या तालुक्यांत कांहीं लहान तलाव आहेत. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सर्वत्र नेहमीं पुरेसा असतो.

या जिल्हयांत वस्ती फार दाट आहे. येथील कित्येक लोक मुंबईंत मोलमजुरीकरितां जातात. व पावसाळयाच्या सुरुवातीस परत येतात. रत्नागिरी जिल्हयांतील दाट वस्ती हें एक मुंबई शहराची वाढ होण्यास मुख्य कारण आहे.

शेती हा येथील मुख्य धंदा होय. कांहीं ठिकाणीं जाडीभरडीं लुगडीं व कांवळीं तयार होतात रत्नागिरी येथील उद्योगशाळेंत जडावाचें फर्निचर उत्तम तयार होतें. मासे पकडणें व खारवणें हाहि एक या जिल्हयांतील मुख्य धंदा आहे. विजयदुर्ग येथें ॲल्युमिनिअमचे दागदागिने व मालवण येथें टाकांचीं टोकें तयार होतात, मालवणच्या आसपास मंगलोरी कौलें बनवितात. गलबतावर व बोटीवर येथील लोक खलाशी, सारंग व लास्कर म्हणून कामें करतात. पडाव व होडया बांधण्याचा उद्योगधंदा बरा चालतो. येथील शेतीच्या बाबतींत खोती वतनें हें फार मोठें प्रकरण आहे.

महाराष्ट्राच्या तेरा जिल्ह्यांतील खेडयांची तालुकेवार संख्या--

प्रथम तालुका, नंतर सरकारी खेडीं, लावून दिलेलीं खेडीं व एकूण खेडीं याप्रमाणें आंकडे अनुक्रमानें दिले आहेत.

(१) जिल्हा पश्चिम खानदेश.

धुळें	१८७	२	१८९
साक्री	१६१	२	१६३
नंदुरबार	१६३	११	१७४
नवापूर	१३०	७	१३७
तळोदें	२९१	१०	३०१
शहादें	१८५	९	१९४
शिरपूर	१६२	०	१६२
सिंदखेड	१६६	२	१६८

(२) जिल्हा पूर्व खानदेश

जळगांव	११०	१	१११
चाळीसगांव	१२९	१४	१४३
पाचोरें	१४७	४	१५१
भडगांव	६३	५	६८
एरंडोल	१८६	०	१८६
चोपडें	१३१	३	१३४
अंमळनेर	१८८	०	१८८
पारोळें	१३७	४	१४१
जामनेर	१७१	२६	१९७
भुसावळ	१२६	४	१३०
एदलाबाद	१११	३	११४
यावल	१११	०	१११
रावेर	१२७	२	१२९

(३) जिल्हा नाशीक

नाशीक	११०	२७	१३७
इगतपुरी	१२४	७	१३१
सिन्नर	९९	५	१०४
निफाड	१०६	१५	१२१
येवलें	१०१	१९	१२०
नांदगांव	८८	५	९३
मालेगांव	१४५	८	१५३
बागलाण	१४१	२०	१६१
कळवण	१७०	२३	१९३
चांदोर	१०२	७	१०९
दिंडोरी	१२१	७	१२८
पेठ	२२६	१९	२४५

(४) जिल्हा अहमदनगर

अहमदनगर	१०४	१७	१२१

पारनेर	१०४	१३	११७
श्रीगोंदे	७९	७	८६
कर्जत	७२	१०	८२
जामखेड	४७	१२	५९
शेवगांव	१२४	२६	१५०
पाथर्डी	६२	८	७०
नेवासें	११४	२६	१४०
राहुरी	११२	४	११६
कोपरगांव	१२२	३	१२५
संगमनेर	१४४	८	१५२
अकोला	१५३	४	१५७

(५) जिल्हा पुणें

हवेली	१०३	५४	१५७
मुळशी	८१	४	८५
मावळ	१४२	२६	१६८
खेड	१३०	४८	१७८
आंबेगांव	६५	१	६६
जुन्नर	१५७	६	१६३
शिरूर	६३	१६	७९
पुरंदर	६९	२३	९२
भिमथडी	६८	११	७९
दौंड	४६	४	५०
इंदापूर	८१	५	८६

(६) जिल्हा सोलापूर

सोलापूर	१४८	४	१५२
बार्शी	११८	५	१२३
माढें	८५	४	८९
करमाळें	११२	११	१२३
पंढरपूर	७८	८	८६
सांगोले	७१	६	७७
माळशिरस	५७	१२	६९

(७) जिल्हा सातारा

सातारा	१११	४१	१५२
कोरेगांव	५९	१५	७४
वांई	९०	३४	१२४
जावली	१८६	७०	२५६
पाटण	११७	८८	२०५
कऱ्हाड	७४	२९	१०३
वाळवें	९८	४२	१४०
माण	७२	६	७८
खटाव	५६	३१	८७
खानापूर	६९	२१	९०
तासगांव	३७	१२	४९

(८) जिल्हा बेळगांव

बेळगांव	१३३	७०	२०३
खानापूर	२२४	१६	२४०
संपगांव	१३९	१	१४०
पारसगड	१११	२१	१३२
गोकाक	८६	३४	१२०
चिकोडी	६६	३३	९९
हुक्केरी	९१	२४	११५
अथणी	६४	१९	८३

(९) जिल्हा विजापूर

विजापूर	९२	१०	१०२
इंडी	१११	११	१२२
सिंदगी	१३६	१४	१५०
बागेवाडी	११२	९	१२१
मुद्देबिहाळ	१२४	३०	१५४
बागलकोट	१४०	३४	१७४
बदामी	१५०	३२	१८२
हुनगुंद	१४८	२१	१६९

(१०) जिल्हा धारवाड

धारवाड	१३२	३१	१६३
हुबळी	८५	७	९२
कलघटगी	१११	१९	१३०
बंकापूर	१४८	१५	१६३
हनगळ	१४२	३२	१७४
कोड	१७९	१०	१८९
राणिबेन्नूर	११७	१२	१२९
करजगी	१३०	६	१३६
गदग	९३	१३	१०६
नवलगुंद	८८	८	९६
रोण	५५	३१	८६

(११) जिल्हा ठाणें.

साळशेटी			
कल्याण	२७०	१४	२८४
मुरबाड	१६९	४	१७३
शहापूर	१९५	८	२०३
भिवंडी	१९९	६	२०५
वसई	८४	५	८९
वाडें	२१३	२२	२३५
माहीम	१९०	३	१९३
डहाणू	२१२	०	२१२
उंबरगांव			

(१२) जिल्हा कुलावा

अलिबाग	१९८	७	२०५
पनवेल	२४१	३३	२७४
उरण			
कर्जत	२७६	१२	२८८

पेण	२०३	२३	२२६
रोहें	१४९	३	१५२
माणगांव	२२६	५	२३१
महाड	२४८	३	२५१
(१३) जिल्हा रत्नागिरी			
रत्नागिरी	१४६	६	१५२
मालवण	६५	५	७०
देवगड	१२३	६	१२९
राजापूर	१५८	२६	१८४
संगमेश्वर	१७९	१३	१९२
चिपळूण	२०७	५	२१२
खेड	१४३	४	१४७
दापोली	२४७	३	२५०
वेंगुर्लें			

जिल्ह्याचें नांव	तालुक्यांची संख्या	एकूण खेडीं
१ प. खानदेश	८	१४८८
२ पू. खानदेश	१३	१८०३
३ नाशिक	१२	१६९५
४ अहमदनगर	१२	१३७५
५ पुणें	११	१२०३
६ सोलापूर	७	७१९
७ सातारा	११	१३५८
८ बेळगांव	८	११३२
९ विजापूर	८	११७४
१० धारवाड	११	१४६४
११ ठाणें	१०	१५९४
१२ कुलाबा	८	१६२७
१३ रत्नागिरी	९	१३३६

मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील जिल्ह्यांचीं वर्णनें

प्रास्ताविक:— प्राचीन काळीं मध्यप्रांतास 'गोंडवण' व वऱ्हाडास 'विदर्भ' अशीं नांवें होतीं.

सीमा:— उत्तरेस मध्यहिंदुस्थान एजन्सी; पूर्वेस बहार ओरीसा प्रांत; दक्षिणेस निजामाचें राज्य व पश्चिमेस मुंबई इलाख्यापैकीं खानदेश.

क्षेत्रफळ:— मध्यप्रांताची दक्षिणोत्तर रुंदी ६५० मैल व पूर्वपश्चिम लांबी ७५० मैल आहे. संस्थानें धरून मध्यप्रांताचें क्षेत्रफळ १ लक्ष १२ हजार चौ. मैल आहे. मध्यप्रांतवऱ्हाडची लोकसंख्या सुमारें १५९ लक्ष आहे. दर चौ. मलांत साधारणपणें १२१ लोक आहेत. देशी संस्थानांचें क्षेत्रफळ २९ हजार चौ. मैल असून लोकसंख्या २१ लाख आहे.

राज्यव्यवस्थेकरितां सरकारनें या प्रांताचे पांच भाग केले आहेत. त्या प्रत्येकास कमिशनरी म्हणतात. १ वऱ्हाड, २ नागपूर, ३ नर्मदा, ४ जबलपूर व ५ छत्तिसगड. या प्रत्येक कमिशनरींत पुढीलप्रमाणें जिल्हे आहेत.

वऱ्हाड:— उमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ. नागपूर:— नागपूर, वर्धा, चांदा, भंडारा व बालाघाट. नर्मदा:— हुशंगाबाद, नरसिंगपूर, नेमाड, बैतुल व छिंदवाडा. जबलपूर:— जबलपूर, सागर, दमो व शिवणी.

छत्तिसगड:— रायपूर, द्रुग व बिलासपूर.

वऱ्हाड कमिशनरी:— क्षेत्रफळ १७७६६ चौ. मैल. लोकसंख्या २६८०६२२ असून लोकसंख्येचें प्रमाण दर चौ. मैलीं १४९ आहे. या प्रांतांत उत्तरेकडे सातपुड्याचे फांटे पूर्वपश्चिम पसरले असून दक्षिण भागांत अजिंठा पर्वताचे फांटे पूर्वपश्चिम पसरले आहेत. नद्या:— तापी, पूर्णा, पैनगंगा व वर्धा. सरोवरें:— येथील बुलढाणा जिल्ह्यांत लोणार हें खाऱ्या पाण्याचें सरोवर आहे. काप व कायर येथें पैनगंगेच्या कांठीं ऊन पाण्याचे झरे आहेत. हवा उष्ण असून पाऊस सरासरी ३५ इंच पडतो. चिखलदरा, नरनाळा, बुलढाणा व यवतमाळ हीं थंड हवेचीं ठिकाणें आहेत. खनिजें:— दगडी कोळसा, लोखंड व मऊ काळे दगड. पिकें:— कापूस ज्वारी तूर, गहूं व तांदूळ. भाषा:— मराठी व उर्दू. उद्योगधंदे व कारखाने:—मुख्य धंदा शेतीचा असून कापड विणण्याचा धंदा कांहीं लोक करतात. अकोला व बडनेरा येथें कापडाच्या गिरण्या असून उमरावती, धामणगांव व शेगांव येथें तेलाच्या गिरण्या आहेत. कापसांतील सरकी काढण्याचे व गठ्ठे बांधण्याचे कारखाने सर्वत्र आहेत. या प्रांतांत ४ जिल्हे व २२तालुके आहेत.

(१) उमरावती:— उमरावती, मोर्शी, चांदूर, एलिचपूर दर्यापूर व मेळघाट.

(२) अकोला:— अकोला, मूर्तिजापूर, आकोट, बाळापूर, वाशीम व मंगरूळ.

(३) बुलढाणा:— चिखली, खामगांव, मलकापूर, जळगांव व मेहेकर.

(४) यवतमाळ:— यवतमाळ, केळापूर, वणी, पुसद, व दारव्हा.

नागपूर कमिशनरीः– क्षेत्रफळ २३५११ चौ.मैल. लोकसंख्या ३१,५९,३२२ आहे. लोकवस्ती दर मैलांत १३४ आहे. पर्वतः– सातपुडा व त्याचे दक्षिणेकडील फांटे; रामटेक व सालाई टेकडी हे आहेत. नद्याः– वर्धा, वैनगंगा, कन्हान पेंच, नाग, गोदावरी,प्राणहिता व इंद्रावती. पाऊसः– ईशान्य भागांत सरासयी ५५ इंच व पश्चिमभागीं सरासरी ४० इंच. हवाः– उत्तरभागांतील हवा थंड असून मध्यभागीं वर्धा व नागपूर जिल्हयांत आरोग्यकारक आहे. चांदा, भंडारा व बालाघाट जिल्हयांतील तांदुळाच्या भागांत पावसाळ्यामध्यें मलेरियाची व कॉलन्याची सांथ उद्भवते. पाटबंधारेः– नागपूर, भंडारा व चांदा जिल्हयांत लहान लहान पुष्कळ तलाव आहेत. त्यांत रामसागर, नवेगांव शिवनदीबंध व शिरेगांव येथील तलाव मोठे आहेत. या सर्वांतून पाट काढून पाणी शेताला दिल्यामुळें तांदूळ व ऊंस हीं पिकें जास्त प्रमाणांत होतात. पिकेंः– कापूस, ज्वारी, तांदूळ, कोदो व कुटकी. जंगलः– उत्तर, पूर्व व दक्षिण भागांत राखलेलें दाट जंगल आहे. त्यांतून दरसाल साग व बांबू वगैरे इमारती लाकूड मिळतें. प्राणीः– वाघ चित्ता, अस्वल, रानहेले, सांबर, बारशिंगें, रोही व जंगली कुत्रे. खनिजेंः– दगडी कोळसा, अभ्रक; वैनगंगा व इंद्रावती यांच्या पात्रांत सोनें, मँगेनीज तांबें व लोखंड. भाषाः– बालाघाट जिल्हयांत हिंदी व इतर जिल्हयांत मराठी भाषा. या भागांत पांच जिल्हे असून १९ तालुके आहेत. (१) नागपूरः– नागपूर, रामटेक, उमरखेड, काटवल, सावनेर. (२) वर्धाः– वर्धा, हिंगणघाट, आर्वी. (३) चांदाः– चांदा, वरोडा, ब्रम्हपुरी, गडचिरोली, सिरोंच्या. (४) भंडाराः– भंडारा, गोंद्या, साकोली, (५) बालाघाटः– बालाघाट, बैहचर, वारशिवनी.

कारखानेः– कापडाच्या गिरण्या, तांब्यापितळेचीं भांडीं तयार करण्याचे कारखाने व गोंदिया येथें कांच कारखाना आहे.

नर्मदा कमिशनरीः– क्षेत्रफळ १८३२२ चौ. मैल. लोकसंख्या १६२९०८६; दर चौरस मैलांत ८९ लोक राहतात. उत्तरेकडील सखल भागाची समुद्रसपाटीपासून उंची १५०० फूट व दक्षिणेकडील भागाची उंची ३७८९ फूट आहे. पर्वतः– महादेवाचे डोंगर व खामला. नद्याः– नर्मदा, तापी, दुधी, तवा, वर्धा, कन्हान व पेंच. हवा थंड व आरोग्यकारक आहे. पंचमडी हें थंड हवेचें ठिकाण आहे. पाऊसः– किमान ३२ इंच व सरासरी ५० इंच पडतो. पिकेंः– गहूं,कापूस, ज्वारी, हरभरा व गळिताचीं धान्यें. या भागांत सातपुडा पर्वत असल्यामुळें राखीव जंगल फार आहे. त्यांत साग, तिवस, धावडा, हळदा व बांबू हीं इमारती लाकडाचीं झाडें आहेत. बैतुल व छिंदवाडा जिल्हयांत तिखाडीच्या (रोशा) गवतापासून वरेंच तेल काढतात. प्राणीः– वाघ चित्ते, अस्वल, सांबर, नीलगाई, रानहेले व बारशिंग. पाळीव जनावरेंः– बैल, म्हैस, घोडा, उंट, मेंढ्या, व शेळ्या. या भागांतील बैल मोठे, पांढरे किंवा कबरे, मजबूत व चलाख असतात. विशेषतः नेमाडी बैलांपेक्षां छिंदवाडा व बैतुल जिल्हयांतील पहाडी बैल मजबूत व काटक असतात. खनिजेंः– दगडी कोळसा, लोखंड, तांबें तांबडा व पांढरा इमारती दगड. किल्लेः– असीरगड, पुनासा व बागरा. भाषाः– बुंदेली व माळवी भाषेचा अपभ्रंश अशी हिंदी भाषा. शिवाय मराठी, गोंडी, नेमाडी व गुजराथी. या भागांत पांच जिल्हे असून १५ तालुके आहेत. (१) हुशंगाबादः– हुशंगाबाद, हर्दा, शिवनी, सोहागपूर, (२) नरसिंगपूरः– नरसिंगपूर, गादरवाडा. (३) नेमाडः– खांडवा, बऱ्हाणपूर, हरसूद. (४) बैतूलः–बैतूल, मुलताई,भैंसदेही. (५) छिंदवाडाः–छिंदवाडा, सौंसर, अमरवाडा. नरसिंगपूर जिल्हयांत बागसपूर येथें संगमरवरी दगडाची खाण आहे. नेमाड जिल्हयांतील जैनाबाद येथें देशी कागदाचा कारखाना आहे.

मक्राई संस्थानः—राजा रजगोंड जातीचा असून त्याचे कुटुंबाचे खर्चास वार्षिक वेतन मिळतें. राज्यकारभार सरकारनें नेमलेला दिवाण पहातो. उत्पन्न ६२ हजार रुपये असून, लोकसंख्या ५२८१७ आहे.

जबलपूर कमिशनरीः—क्षेत्रफळ १८९५० चौ. मैल. लोकसंख्या २१८७४२४ आहे. दर चौ. मैलांत ११५ लोक राहातात. पर्वतः–विंध्याद्री व सातपुडा यांचे फांटे. नद्याः–नर्मदा, सोन, सोनार व वैनगंगा. हवा समशीतोष्ण आहे.मंडला जिल्हयांत हिवाळ्यांत कडक थंडी पडून कित्येक वेळां बर्फ पडतें, व पावसाळ्यांत तापाचा आजार उत्पन्न होतो. जबलपूर व मांडला या जिल्हयांतील जमीन सुपीक आहे. त्यांत गहूं फार पिकतो व लोक फार सधन आहेत. पाटबंधारेः—दमो, जबलपूर, शिवनी या जिल्हयांत लहानमोठे ११०० तलाव आहेत. त्यांच्या पाटांचें पाणी तांदूळ व बागायती

पिकांना दिलें जातें. पाऊसः—५०–५९ इंच. पिकेंः—गहूं, तीळ, जवस, हरभरे, कापूस, ताग, तांदूळ, कोदो व कुटकी. येथें रयतवारी व मालगुजारी या दोन्ही पद्धती चालू आहेत. भाषाः—बुंदेली भाषेचा अपभ्रंश हिंदी भाषा, उर्दू, मराटी व गोंडी. प्राणीः—रानहेले, बारशिंगे, सांबर, नीलगाई, वाघ, चित्ते, अस्वल, जंगली कुत्रे, व ठिपक्यांचीं हरणें. शिवनी जिल्ह्यांत जनावरांच्या उत्पत्तीची काळजी घेण्याविषयीं गवळी व कौलार लोक नांवाजलेले आहेत. ते वऱ्हाड व नागपूर भागांत उत्तम जनावरें विकावयास नेतात. खनिजेंः—लोखंड, सोनें, कोळसा, अभ्रक व खडू. कारखानेः—कापड विणण्याचे, मातीचीं भांडीं करण्याचे, व कांचेचे यांत्रिक कारखाने आहेत. या भागांत पांच जिल्हे असून १५ तहशिली आहेत. १ जबलपूरः—जबलपूर, मुरवाडा, सिहोरा, पाटण. २ सागरः—सागर, खुरई, रेहेली, बांडा. ३ दमोः—दमो, हट्टा. ४ मंडलाः—मंडला, दिंडोरी, निवास. ५ शिवनीः—सिवनी, लखनादौन.

छत्तिसगड कमिशनरीः—क्षेत्रफळ २१२४० चौ. मैल. लोकसंख्या ३२७१४१०आहे. दर चौ. मैलांत १५४ प्रमाणें लोक राहातात. या भागाचे उत्तरेकडे व पश्चिमेकडे सातपुडा पर्वताचे अमरकंटक, मैकल व सालाई टेंकडी हे फांटे आहेत. दक्षिण बाजूनें पूर्वघाट नांवाच्या पहाडाच्या टेंकड्या आहेत. कांहीं भागांची उंची समुद्रसपाटीपासून ३५०० फूट आहे. येथील लोकांची भाषा, पोषाख व स्वभाव अगदीं जुनेच आहेत. लोक छत्तिसगडी भाषा बोलतात. यांच्या जुन्या चालीरीती अजून कायम आहेत. नद्या व पाटबंधारेः—महानदी, शिवनाथ, तंदुला, व जोक या नद्या मुख्य असून लहानमोठे दहा हजार तलाव आहेत. महानदीपासून व तलावांपासून शेतीस पाणी देण्याकरितां पाट काढले आहेत. हवा उष्ण असून पाऊस सरासरी ५० इंच पडतो. विहीरींच्या व तळ्यांच्या पाण्यामुळें नेहेमीं कॉलरा, ताप व देवी हे रोग उद्भवतात. या प्रदेशांत रक्तपितीचे रोगी फार आहेत. पिकेंः—तांदूळ, गहूं, कोदो, ऊंस, तीळ, जवस, मोहरी, लाख, आरारूट चारोळी व गोंद. जमिनदारीचे भागांत रेशमाचे किडे फार आहेत. रेशमापासून कपडे विणण्याचा धंदा खेडेगांवांतून चालतो. प्राणीः—रानटी हत्ती, वाघ, चित्ते, रानहेले, लांडगे, कुत्रे व हरणें. शेतीच्या कामीं रेड्यांचा उपयोग करीत असल्यामुळें बैलांची काळजी घेण्यांत येत नाहीं. खनिजेंः—लोखंड, कोळसा, तांबें, शिसें, अभ्रक व गेरू. नद्यांच्या पात्रांतील रेतीपासून थोडें सोनें काढतात. जातीः—चमराज, गोंड, अहीर (गवळी), कुर्मीज व कावार. छत्तिसगड येथें पदार्थसंग्रहालय, महारोग्यांकरितां दवाखाना, तेलाची गिरणी, व राजकुमार कॉलेज आहे. धंदेः—रेशमी व सुती कापड विणणें, कातडीं कमावणें वगैरे. यांत तीन जिल्हे व अकरा तालुके आहेत. १रायपूरः—रायपूर, बलोदाबाजार, धमतरी, महासमंध. २द्रुगः—द्रुग, बिमितारा, संजारी. ३बिलासपूरः—बिलासपूर , मुंगेली, जांजगीर, कटघोडा. संस्थानेंः—छत्तिसगडप्रांतांत लहानमोठीं चौदा मांडलिक संस्थानें आहेत. जमीन तांबडी व पिवळसर असल्यामुळें तांदूळ, नाचणी,बरी,वगैरे पिकें होतात. लोकांचा मुख्य धंदा गुरें चारणें हा असून लोक रानटी व अडाणी आहेत. कमिशनरचे हाताखालीं पोलिटिकल एजंट आहे. त्याच्या सल्ल्यानें संस्थानिक आपला राज्यकारभार करतात. पोलिटिकल एजंटाचें मुख्य ठिकाण रायपूर हें आहे.

१बस्तर संस्थानः—चंद्रवंशीय रजपूत राजा,जंगलांत इमारती लांकूड, लाख, मेण, मध, चामडीं व शिंगें वगैरे जिन्नस उत्पन्न होतात. लोक रेशमी किड्यांची उत्पत्ति करितात. क्षेत्रफळ १३०६२ चौ. मैल. लोकसंख्या ४६४४३७ असून उत्पन्न चार लाख रुपये आहे. जातीः—माडी, भद्रा, गडबा, तेलंग व मुरी. नद्याः—इंद्रावती व तेल. चित्रकूट येथें इंद्रावतीचा धबधबा आहे.

२कांकेर संस्थानः—राजा रजपुत क्षेत्रफळ१४२९ चौ. मैल. लोकसंख्या १२५१७२; उत्पन्न १५६ हजार रुपये.

३ सारंगढ संस्थानः—राजा राजगोंडजातीचा. क्षेत्रफळ ५४० चौ. मैल लोकसंख्या ११७८०३

४ रायगड संस्थानः—क्षेत्रफळ १४८६ चौ. मैल. लोकसंख्या २४१६१९. उत्पन्न दीड लाख रुपये.

५ राजनांदगांव संस्थानः—राजे महंतलाल सर्वेश्वरदास हे बैरागी जातीचे असून त्यांना राजबहादूर हा किताब आहे. क्षेत्रफळ ८७१ चौ. मैल लोकसंख्या १४७९१९; उत्पन्न चार लाख रुपये.

६ खैरागड संस्थानः—२२४ तलावांपासून पाट काढून शेतीला पाणी दिलें जातें. क्षेत्रफळ ९३१ चौ. मैल. लोकसंख्या १२४७७०; लोक—लोधी, अहीर, गोंड व चांभार.

७ छुइखदान संस्थान—क्षेत्रफळ १५४ चौ. मैल; लोकसंख्या २६१५१; उत्पन्न ७३ हजार रुपये.

८ कवर्धा संस्थानः—क्षेत्रफळ ७८९ चौ. मैल. लोकसंख्या ६११००; उत्पन्न ११० हजार रुपये.

९ चंगभाकर संस्थानः—क्षेत्रफळ ९०४ चौ. मैल लोकसंख्या २०८९८; उत्पन्न तेरा हजार

१० कोरिया संस्थानः—क्षेत्रफळ १६३१ चौ. मैल. लोकसंख्या ७९,१९९; उत्पन्न १८॥ हजार रुपये.

११ सरगुंजा संस्थानः—क्षेत्रफळ ६०८९ चौ. मैल. लोकसंख्या ३७८२२६; उत्पन्न १। लाख रुपये. रानटी प्राणी बरेच आढळतात.

१२ जशपुर संस्थानः—क्षेत्रफळ १९४८ चौ. मैल लोकसंख्या १५४१६०; उत्पन्न १। लाख रुपये.

१३ उदेपूर संस्थान :—क्षेत्रफळ १०५२ चौ. मैल. लोकसंख्या ७१३२६; उत्पन्न १ लक्ष रु.

१४ सक्ती संस्थानः—तांदूळ व इमारती लाकूड यांचें उत्पन्न बरेंच आहे.

हैद्राबाद संस्थान (मराठवाडा)

हैद्राबाद संस्थानांतील ज्या प्रदेशांतील लोक मराठी भाषा बोलतात त्या प्रदेशास मराठवाडा असें म्हणतात. ह्यांत १ औरंगाबाद २ बीड, ३ परभणी, ४ नांदेड, व ५ उस्मानाबाद हे जिल्हे आणि गुलबर्गा, बेदर, निजामाबाद व अदिलाबाद ह्या जिल्ह्यांत बराच भाग येतो. मराठी भाषा बोलणारांची संख्या ३३,९४,८५८ आहे.

औरंगाबाद जिल्हा

सीमा—पूर्वेस परभणी जिल्हा व वऱ्हाड प्रांत पश्चिमेस अहमदनगर व नाशिक, दक्षिणेस गोदावरी नदी व उत्तरेस अजिंठ्याचे डोंगर आहेत. क्षेत्रफळ—अकरा हजार चौ. मैल.लोकसंख्या सुमारें ९,३७,९२५; या जिल्ह्यांत दिवाणीचे आठ तालुके असून सरफखासचे दोन आहेत. दहा तालुके मिळून १४९७ गांवें आहेत.

पिकेंः—गोदावरीच्या कांठचा प्रदेश सपाट असून जमीन काळी व सुपीक आहे. तींत कापूस, तूर, हरबरा, मूग, उडीद, जवस, तीळ, बाजरी हीं पिकें चांगलीं येतात. पूर्वभागांत ऊंस, कापूस व तीळ हीं पिकें येतात. डोंगर—अजिंठा कन्नड, वेरूळ, व सातारा.नद्या—गोदावरी,प्रवरा, शिवनदी, पूर्णा. तलाव—रोजा, वेरूळ,दौलताबाद, औरंगाबाद, व जालन्याचा मोती तलाव, जंगलें कन्नड तालुक्यांत व जालन्याच्या उत्तर भागांत लहानमोठीं जंगलें आहेत. त्यांत वाघ लांडगे वगैरे हिंस्र प्राणी असतात. पाऊस तीस ते पस्तीस इंच पडतो. हवा समशीतोष्ण आहे. कारखाने—औरंगाबाद येथें एक कापडाची गिरणी असून कापूस वठण्याच्या गिरण्या सर्वत्र आहेत. औरंगाबाद येथें उस्मानिया कॉलेज, मराठी ट्रेनिंग कॉलेज व आर्टस्कूल आहे. वेरूळ येथील लेणीं प्रसिद्ध आहेत.

बीड जिल्हा

क्षेत्रफळ ६२५० चौ. मैल. लोकसंख्या ६३०६३७; दिवाणीचे पांच व सरफखासचा एक असे सहा तालुके आहेत. गांवें ८५५ आहेत. पाऊस सरासरी ३५ इंच . हवा समशीतोष्ण व आरोग्यकारक. बालाघाट डोंगराची ओळ जिल्हाभर पसरली आहे. नद्या—गोदावरी, सिंदफणा, मांजरा, सीना. तलाव—धारुर, अंबाजोगाई,सिरसाले, व तलवाडा. पिकें—ज्वारी, गहूं,बाजरी,हरबरा,तूर,भुईमूग,कापूस व फळफळावळ. गिरण्या—कापूस वठण्याच्या गिरण्या बऱ्याच आहेत. प्रसिद्ध जोगाबाईचे आंबे हें देवीचें स्थान याच जिल्ह्यांत आहे.

परभणी जिल्हा

क्षेत्रफळ—४८४९ चौ. मैल. लोकसंख्या—८३४४५६; तालुके सात असून खेडीं १३३६ आहेत. पर्वत—सह्याद्रीचा फांटा उत्तर बाजूनें पसरला आहे. नद्या—गोदावरी, पूर्णा, कसुरा, कपुरा, पिंपळगड, कयाधू, हसना, व गळती. तलाव—हिंगोली, औंढा, बसमतनगर, मोंगांव. पाऊस—सरासरी तीस इंच हवा समशीतोष्ण. उत्तरेकडील डोंगरांत इमारती लांकूड मिळतें. पिकें—ज्वारी, कापूस, जवस, गहूं, बाजरी, ऊंस व लाख. गिरण्या—कापूस वठण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या गिरण्या बऱ्याच आहेत. प्रसिद्ध ठिकाणें परभणी, पाथरी, अष्टी, कळमनूरी वगैरे.

नांदेड जिल्हा

क्षेत्रफळ सुमारें चार हजार चौ. मैल आहे. लोकसंख्या—७२९४८१ आहे. तालुके सहा असून गांवें १०६४ आहेत. हवा साधारण उष्ण आहे. पाऊस सरासरी ३५ इंच सह्याद्रि पर्वताच्या व बालाघाटाच्या ओळी या जिल्ह्यांत पसरल्या आहेत. नद्या—गोदावरी, मन्याड, आबना व मांजरा. तलाव—या जिल्ह्यांत तलाव फार आहेत. त्यांपैकीं बिलोली, देगलूर, कंदाहार, शहापूर, तळेगांव, सिंदी आणि म्हैसा हे तलाव मोठे आहेत.

जंगलें--म्हैसा,नांदेड, हदगांव यांचे पहाडांत इमारती लांकडाचीं जंगलें आहेत. पिकें--जमीन काळी व सुपीक असून त्यांत ज्वारी, गहूं, ऊंस व कापूस हे जिन्नस पिकतात. प्रसिद्ध ठिकाणें--नांदेड येथें शीख लोकांचा दहावा गुरु गोविंद याची समाधि आहे. उमरी येथें कापसाचा मोठा व्यापार चालतो.

उस्मानाबाद जिल्हा

क्षेत्रफळ--३९७१ चौ. मैल. लोकसंख्या--६८४१५९ आहे. तालुके सात असून गांवें ५७० आहेत. डोंगर--बालाघाटपर्वताची ओळ या जिल्ह्यांत पसरली आहे. नद्या--मांजरा, सीना. तलाव--लहानलहान तलाव बरेच आहेत. किल्ले--नळदुर्ग, परंडा व औसा. पाऊस--सरासरी ३५ इंच. पिकें जमीन काळी व क्वचित तांबडी आहे. तीत भुइमूग, ज्वारी, हरबरा, तूर व कापूस हीं पिकें पिकतात. प्रसिद्ध ठिकाणें--श्रीक्षेत्र तुळजापूर येथें श्री तुळजादेवीचें स्थान आहे. नळदुर्ग हा प्रेक्षणीय किल्ला आहे. लातूर ही व्यापाराची मोठी पेठ आहे.

हिंदुस्थानांतील पाऊसमान

हिंदुस्थानांतील सर्वांत जास्त पाऊस म्हणजे ४००-४५० इंच इतका चेरापुंजी (आसाम प्रांत) येथें पडतो व सर्वांत कमी म्हणजे साधारणत: ७ इंच पाऊस कराची (सिंध) येथें पडतो. खालील कोष्टकावरून पाऊसमानाबद्दल जास्त कल्पना येईल.

प्रांत	गांव	जून-सप्टें. इं.सें.	आक्टो.-डिसें. इं.सें.	जाने-मे इं.सें.	वार्षिक सरासरी इंच	वर्षांतून पावसाळी दि.
आसाम	धुव्री	६८-५४	४-४०	२३-५८	९६-५२	१०२
	शिवसागर	५९-०८	६-८७	३०-२४	९६-९	११२
	चेरापुंजी	३२०-३२	२३-०८	८७-७५	४३१-२५	१६७
बंगाल	हावरा	४३-५२	४-७३	९-८५	५८-१०	६५
	दिनाजपूर	५३-९९	४-४७	११-३७	६९-८०	७१
	दार्जिलिंग	९९-०८	५-९१	१५-९४	१२०-०३	१२६
	डाका	४८-६४	५-४७	१९-३१	७३-४२	१००
	मैमनसिंग	६४-६९	६-११	२१-२६	९२-०६	१०६
बिहार	पाटणा	२९-९७	२-९७	३-७	४६-६४	४८
	रांची	४४-८१	३-०५	६-०१	५३-८७	७७
चंपारान (मोत हरी)		४४-३२	३-१४	५-२२	५२-६८	५७
आग्रा व अयोध्या	डेहराडून	७३-३०	२-१३	८-२३	८३-६६	८४
	मीरत	२६-१२	१-०७	३-५३	३०-७३	२८
	पिलिभित	४५-२२	१-७२	४-४६	५१-४०	४३
	कानपूर	२८-७१	१-६२	१-९५	३२-२८	३१
पंजाब	हिसार	१२-६०	-६३	२-०६	१५-८३	१७
	अंबाला	२५-४२	१-०२	५-२२	३१-६६	३६
	कंग्रा	६०-८३	२-०७	११-१५	७४-०५	६९
	लाहोर	१३-२४	०-७५	३-८७	१७-८६	१६
	सियालकोट	२३-२४	१-१५	७-७२	३२-११	३०
	लायलपूर	६-८९	०-२६	२-६७	९-८२	१३
वायव्य सरहद्द	पेशावर	४-२६	१-१३	७-३५	१२-७४	१९
	डेराखान	५-०२	०-५१	३-३३	८-८६	११
रजपुताना	अजमेर	१८-५१	०-७५	१-३२	२०-२८	३०
मध्य हिंदुस्थान	इंदूर	३०-१८	१-५१	१-००	३२-६९	४५
सिंध	कराची	५-७२	०-३०	१-६७	७-६९	५

		जून--सप्टें. इं.सें.	आक्टो.--डिसें. इं.सें.	जाने–मे इं.सें.	वार्षिक सरासरी इंच	वर्षांतून पावसाळी दि.
मध्यप्रांत	अकोला	२६-३५	२-८२	१-५४	३०-७१	२०
	नागपूर	४१-०२	२-९२	२-६०	४६-६०	४०
मद्रास	मच्छलिपट्टण	२२-९७	१३-७३	२-६०	३९-३०	४९
	मद्रास	१५-३२	२९-६८	४-१७	४९-१७	५४
	त्रिचनापल्ली	११-२६	१५-२२	६-२१	३२-६९	६०
	मंगलोर	१११-५१	१०-७४	७-८५	१३०-१०	१२०
	कोइमतूर	५-८४	११-०१	५-२१	२२-०६	४८
	बेल्लारी	१०-५६	५-९०	३-०७	१९-५३	२४

		पावसाळा जून ते सप्टें.	हिंवाळा आक्टो. ते डिसें.	उन्हाळा जाने. ते मे	एकूण
गुजराथ					
	भडोच	३७-३८	१-७१	०-६०	३९-६९
	डेहेज	२४-४५	२-०४	०-७१	२७-२०
	खेडा	३१-३३	०-९२	०-६०	३२-८५
	मातर	२७-२०	०-८१	०-४८	२८-४९
	गोध्रा	३६-८८	१-१२	०-७८	३८-७८
	दोहाद	२६-३९	१-४०	१-००	२८-७९
	जंबुघोडा	४२-२१	१-३०	०-८२	४४-३२
	अहमदाबाद	२७-६५	०-७१	०-६४	२९-००
	मोडासा	३१-८५	०-७४	०-९८	३३-५७
	खारा घोडा	१७-७२	०-७६	०-४९	१८-९७
संस्थानें--	कोल्हापूर	३१-१८	६-४२	३-६१	४२-२१
	गारगोटी	५२-९३	५-८१	४-००	६२-७४
	मुधोळ	१-९७	५-३०	३-३४	११-६१
	सावंतवाडी	१३६-९९	७-८१	२-९०	१४७-७०
	सावनूर	१५-४६	६-७३	४-१८	२६-२७
	जत.	१५-४८	४-७९	२-६१	२२-८८
	फलटण	३३-३९	४-१५	१-०८	१९-४२
	भोर	२९-३२	३-९३	१-५२	३४-७८
	अक्कलकोट	२१-२२	४-१५	२-२०	२७-५७
	बडोदा	३३-०६	१-०४	०-६३	३४-७३
	सचीन	३८-७२	१-९५	०-५२	४१-१९
	खंबायत	२६-३४	०-९९	०-५३	२७-८६
	राजकोट	२४-२०	०-९१	०-७३	२५-८४
	पोरबंदर	१८-६५	०-६७	०-३१	१९-६३
	भावनगर	२३-८६	१-२५	०-७०	२५-८१
	भुच	१२-५७	०-६६	०-४९	१३-७२
कारवारजिल्हा	कारवार	१०६-७३	७-३९	४-१९	११८-२१
	अंकोला	११६-८०	८-५८	३-७९	११९-१७
	कुमठा.	१२५-५४	१०-७८	४-३९	१४०-७१
	होनावर	१२३-७३	९-८४	४-२८	१३७-८५
	सिद्दापूर	९७-७४	८-७३	४-०३	११०-५०
	शिरसी	८५-४८	७-१२	४-०९	९६०-६९
	हल्याळ	३३-७८	६-९७	५-२९	४५-९४

महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतील पावसाची मासिक सरासरी दाखविणारें पत्रक.

	जाने.		फेब्रु.		मार्च		एप्रिल		मे		जून		जुलै		ऑगस्ट		सप्टेंबर		ऑक्टो.		नोव्हें.		डिसें.		एकूण	
पश्चिम खानदेश	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट
धुळें	०	२४	०	११	०	५	०	७	०	३०	५	१२	५	४०	३	७६	५	२	१	५२	०	७२	०	२३	२२	५४
साक्री (पिंपळनेर)	०	२१	०	८	०	५	०	८	०	४६	४	३	५	२०	२	५०	३	५४	१	४७	०	५८	०	५	१८	२५
पिंपळनेर	०	२४	०	६	०	९	०	६	०	५५	४	२६	६	५२	३	६७	३	४५	१	४१	०	६०	०	३	२०	९४
आव्हा	०	३९	०	९	०	९	०	१४	०	५६	९	३	२२	८९	१८	६१	८	८८	१	९६	०	४८	०	१	६३	१३
नंदुरबार	०	२८	०	७	०	४	०	४	०	३५	४	३५	७	७५	४	८६	४	९	१	११	०	५४	०	५	२३	४९
नवापूर	०	२६	०	१२	०	३	०	१	०	३७	६	४१	१५	६९	१०	४१	५	९१	१	३६	०	३६	०	४	४१	०
तळोदें	०	२८	०	११	०	३	०	४	०	३८	५	८५	१०	२७	६	४२	४	१६	०	८५	०	३३	०	१२	२८	८१
शहादें	०	३५	०	५	०	३	०	८	०	४१	५	१४	८	१०	४	९६	४	१४	१	१	०	३०	०	३	२४	५६
शिरपूर	०	१८	०	१४	०	७	०	५	०	३०	४	३४	७	७५	४	८३	३	७०	०	९९	०	६०	०	६	२२	८४
शिंदखेड	०	२१	०	१८	०	४	०	११	०	१९	४	७१	५	९८	३	५५	३	९०	१	१०	०	६९	०	८	२०	४८
पूर्व खानदेश																										
जळगांव	०	३४	०	९	०	१२	०	१४	०	३८	४	८३	९	४३	६	३९	५	६१	१	१२	०	५३	०	१२	२९	६
चाळिसगांव	०	२६	०	११	०	१७	०	१८	०	५७	५	६	६	४५	४	७९	६	९७	१	४६	०	६१	०	१६	२६	७५
पाचोरा	०	२४	०	७	०	१२	०	१७	०	५८	६	८	७	४०	६	६	६	६६	१	३८	०	५८	०	२१	२९	५६
भडगांव	०	३३	०	११	०	१०	०	६	०	४९	५	४९	७	५३	५	५९	६	३६	१	३३	०	६५	०	२०	२८	३५
एरंडोल	०	२४	०	१९	०	४	०	६	०	४३	५	२३	८	५	६	६२	५	३०	१	१९	०	५८	०	१०	२८	३
चोपडें	०	२७	०	१४	०	६	०	१०	०	५९	४	८९	८	३१	५	५०	५	२२	०	९१	०	५५	०	११	२६	६५
अंमळनेर	०	२३	०	१७	०	८	०	७	०	३६	४	७९	७	४३	४	६२	४	८३	१	२१	०	५३	०	१३	२४	४५
पारोळें	०	२४	०	१५	०	११	०	५	०	६०	५	८५	७	४३	६	२	५	२१	१	१४	०	६०	०	१२	२७	५२
जामनेर	०	३५	०	९	०	१९	०	९	०	५०	५	८७	७	८८	६	८६	५	४०	१	३०	०	५८	०	३३	२९	४४
भुसावळ	०	३१	०	१७	०	१६	०	१३	०	५४	५	३२	८	७५	५	९६	५	३३	१	१८	०	५८	०	१९	२८	६२
एदलाबाद	०	३६	०	१५	०	१५	०	६	०	३५	४	५४	७	४५	५	४९	५	५	१	२७	०	३६	०	१९	२५	४२
यावल	०	३६	०	२१	०	१२	०	१०	०	६५	४	७७	८	२६	५	६१	५	३५	०	९३	०	४६	०	१०	२६	९२
रावेर	०	४१	०	२४	०	१६	०	१२	०	३३	५	२९	६	६५	५	२२	४	८५	१	१५	०	६०	०	३३	२५	५५

नाशिक जिल्हा																											
नाशिक	०	१०	०	४	०	३	०	१८	०	९२	५	५७	८	६७	५	९	५	९३	२	८१	०	४६	०	१८	२९	९८
त्रिंबकेश्वर	०	१३	०	१८	०	४	०	१४	०	८८	१३	४०	३५	१५	२६	७२	११	५५	३	३२	०	६३	०	६	९२	२०
इगतपुरी	०	११	०	५	०	१	०	१६	०	९०	२०	५२	४९	७४	३६	२३	१६	५९	३	७५	०	६०	०	१५	१२८	८१
सिन्नर	०	१०	०	४	०	३	०	२०	०	८८	४	२०	५	३६	३	४७	४	९५	२	५३	०	५६	०	२०	२२	५२
निफाड	०	८	०	१	०	२	०	७	०	८९	४	३९	४	७३	३	६	५	६३	१	९४	०	६०	०	१७	२१	५९
पिंपळगांव	०	९	०	३	०	६	०	११	०	९३	४	९२	६	०	३	६१	५	२	१	९९	०	४८	०	१३	२३	३७
येवलें	०	१६	०	७	०	५	०	१०	०	७९	४	६३	४	२५	३	३	५	६६	१	७९	०	८५	०	२४	२१	६२
नांदगांव	०	२२	०	६	०	६	०	१०	०	७५	५	३८	४	६४	३	५७	६	९४	१	९९	०	९०	०	२१	२४	८२
मालेगांव	०	२१	०	७	०	६	०	१०	०	८९	४	३५	४	६१	३	११	५	८१	१	९०	०	६१	०	१९	२१	९१
सटाणें	०	१६	०	७	०	४	०	९	०	७४	३	९४	४	३३	२	३४	३	९१	१	३५	०	६८	०	८	१७	७३
कळवण	०	१२	०	७	०	५	०	१३	१	१३	४	९०	७	४१	४	६४	५	५२	२	४१	०	६८	०	१४	२७	२०
चांदोर	०	१४	०	६	०	८	०	१०	१	३३	५	१०	६	१९	४	११	६	२	२	२२	०	८२	०	२१	२६	३८
दिंडोरी	०	११	०	४	०	५	०	१४	०	८१	५	६३	८	९४	५	८८	५	३५	२	३३	०	६३	०	१५	३०	६
पेठ	०	१२	०	९	०	१	०	२	०	७४	११	७९	३२	२	२५	९५	११	१	२	४९	०	४५	०	५	८४	७४
अहमदनगर जिल्हा																											
अहमदनगर	०	१७	०	१३	०	१०	०	२३	०	९२	४	५७	३	६१	२	७७	६	८४	२	७८	०	८३	०	५५	२३	५०
पारनेर	०	२०	०	९	०	१०	०	२६	१	१६	४	६५	३	६७	२	७६	६	२२	२	८८	०	८१	०	३०	२३	१०
श्रीगोंदें	०	१५	०	५	०	७	०	२४	०	९७	३	५६	२	३९	२	४	५	७२	२	७६	०	९३	०	४५	१९	३३
कर्जत	०	११	०	९	०	११	०	२८	०	८९	४	६	२	६३	२	८३	६	१९	२	३५	०	८१	०	५३	२०	८८
मिरजगांव	०	२०	०	९	०	११	०	२८	१	११	४	९४	३	६४	२	५६	५	७२	१	९४	०	९०	०	९	२१	५८
जामखेड	०	२२	०	१६	०	१८	०	३७	०	८८	४	९२	४	३५	३	७४	७	२८	२	४	०	८८	०	४४	२५	४६
शेवगांव	०	१९	०	१४	०	१४	०	२२	०	७०	५	२३	४	७९	३	६७	६	४६	२	४७	०	८९	०	४३	२५	३३
पाथर्डी	०	४३	०	२९	०	२७	०	२७	०	५६	४	५०	३	९२	३	४६	८	४५	२	६३	०	७१	०	८३	२६	३२
नेवासें	०	२२	०	८	०	१५	०	११	०	७२	४	८६	३	८४	३	८	६	३९	२	३३	०	६१	०	४१	२२	८०
राहुरी	०	१८	०	१२	०	८	०	२८	०	८५	४	७२	३	४३	१	९५	५	३०	१	९५	०	६१	०	२१	१९	६८
कोपरगांव	०	१७	०	८	०	५	०	९	०	७१	४	०	३	४६	२	४३	५	१८	१	८५	०	८६	०	२५	१९	१३
संगमनेर	०	१९	०	५	०	३	०	२१	०	७६	३	७९	३	५५	२	६	५	१५	२	४४	०	६८	०	२०	१९	११
अकोला	०	९	०	३	०	४	०	२८	०	९१	४	५९	५	७०	३	९	४	३२	२	१२	०	५९	०	१५	२१	९१

	जाने.		फेब्रु.		मार्च		एप्रिल		मे		जून		जुलै		ऑगस्ट		सप्टेंबर		आक्टो.		नोव्हे.		डिसें.		एकूण	
	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट
पुणें जिल्हा																										
पुणें	०	९	०	५	०	५	०	६०	१	४२	५	३५	७	२०	३	६८	५	७	४	१	१	११	०	२३	२८	८६
पौड	०	४	०	४	०	४	०	३९	०	७९	९	९५	२३	५७	१४	१०	६	४३	३	२१	०	८८	०	१४	५९	५९
वडगांव	०	३	०	४	०	३	०	३४	०	७६	७	२२	१४	५१	९	३९	५	५७	२	५४	०	६२	०	१५	४१	१९
लोणावळें	०	६	०	३	०	३	०	२४	०	९९	२७	६७	६६	४१	४६	९२	१९	४४	३	९३	०	८७	०	१४	१६६	७४
खेड	०	७	०	७	०	७	०	३६	१	५	४	९३	६	५०	३	५०	४	७०	३	१९	०	७०	०	१३	२५	२७
आळंदी	०	६	०	४	०	५	०	३९	०	९२	४	६९	५	५३	२	९९	४	३६	२	६५	०	८०	०	१०	२२	५८
घोडें	०	८	०	५	०	५	०	३८	०	९३	५	३६	८	५५	४	८३	४	४१	२	७९	०	८८	०	१३	२८	४४
जुन्नर	०	१०	०	११	०	४	०	३०	०	८४	५	२९	८	६५	५	१२	४	७५	२	७८	०	९७	०	२१	२९	१६
घोडनदी.	०	१३	०	९	०	९	०	२७	१	१३	४	५६	३	३	१	७१	६	३०	२	५४	०	८९	०	२२	२०	९६
तळेगांव	०	११	०	१३	०	७	०	४१	१	१९	४	४४	३	८०	२	२७	४	९२	२	३३	०	९१	०	२०	२०	७८
सासवड	०	४	०	८	०	९	०	५४	१	१८	४	१३	४	९३	२	३९	४	२८	३	३३	०	९७	०	२४	२२	२०
जेजुरी	०	११	०	८	०	१०	०	३९	१	२६	३	६७	३	४९	१	६१	४	८	३	२४	१	४	०	४२	१९	४९
बारामती	०	१८	०	६	०	११	०	५४	१	५२	३	७५	२	२९	२	२	५	८२	३	२०	०	९३	०	४२	२०	८४
दौंड	०	१४	०	८	०	९	०	३२	१	११	३	५४	२	७७	१	७३	५	२२	२	१७	०	८०	०	२६	१८	२३
इंदापूर	०	१४	०	९	०	११	०	३६	१	१४	३	५६	२	७४	२	५१	६	४६	३	३६	०	९९	०	५४	२२	०
सोलापूर जिल्हा																										
सोलापूर	०	१५	०	७	०	२०	०	४६	१	५	४	६७	४	२०	४	५४	७	७१	३	२	१	५	०	४६	२८	५५
बार्शी	०	१३	०	१०	०	२०	०	३९	०	९९	५	५	४	६४	४	७६	८	२६	२	९८	०	८८	०	५०	२८	८८
माढें	०	२१	०	११	०	१४	०	४१	०	९२	४	५२	३	५९	३	९४	७	८४	३	१६	०	७६	०	४०	२६	०
करमाळें	०	१२	०	१०	०	२०	०	२९	०	९८	४	६	३	१३	३	३	६	९२	२	७१	०	९४	०	३७	२२	८५
पंढरपूर	०	१२	०	१०	०	१०	०	५२	०	९१	४	१२	३	१४	३	७१	७	३६	३	७६	०	९१	०	३३	२५	८
सांगोलें	०	११	०	५	०	१५	०	४०	१	२३	३	४५	२	२४	२	७८	६	५३	३	२४	१	१४	०	३३	२१	६५
माळशिरस	०	१६	०	१४	०	१०	०	४३	१	१६	२	७५	२	७८	२	३	६	२६	३	१	०	९०	०	४६	२०	१८
अकलूज	०	१९	०	३	०	३	०	३०	०	९६	२	८५	२	२१	२	१३	५	३७	२	७	०	९०	०	५५	१७	५९

सातारा जिल्हा																										
सातारा	०	९	०	८	०	१४	०	७३	१	६२	६	८०	१३	५१	७	५१	४	२५	३	४३	१	२७	०	३२	३१	७५
कोरेगांव	०	१५	०	७	०	१२	०	८२	१	५१	४	४९	७	५४	४	१९	४	७६	३	१७	०	९७	०	२२	२८	१
वांई	०	१२	०	४	०	१७	०	७८	१	२२	५	२१	८	३४	४	७७	४	३९	३	२७	१	२३	०	१६	२९	७२
खंडाळें	०	२५	०	६	०	७	०	५७	१	१६	३	४२	४	२७	२	५३	४	३३	३	१९	०	९१	०	१७	२०	८१
पांचगणी	०	१३	०	१०	०	९	१	३०	१	७३	११	६	२१	१	१३	३४	६	७९	३	९२	१	५७	०	२३	६१	२७
मेढें	०	९	०	१२	०	६	१	८	१	३६	१४	१३	२८	९९	१६	३३	५	५८	३	२९	१	१९	०	२३	७२	४५
मालकमपेठ	०	१४	०	८	०	१३	१	३४	१	९२	४६	२२	१०४	७९	७४	९१	२८	३५	६	०	१	५१	०	२८	२६५	६७
पाटण	०	८	०	६	०	१९	०	७५	०	२७	११	८	२६	६२	१५	५७	५	४०	३	९५	१	२८	०	२६	६६	५१
कऱ्हाड	०	१५	०	६	०	१९	०	७०	१	९०	४	७७	७	७१	४	७८	३	८२	४	७	१	२४	०	३०	२९	६९
इस्लामपूर	०	१७	०	११	०	१८	०	९८	१	५७	४	१२	५	५५	३	५१	३	८८	३	४५	१	१२	०	३६	२५	०
शिराळें	०	८	०	५	०	१५	०	९५	१	८४	५	९०	११	३३	६	३८	४	३	४	१४	१	२०	०	२०	३६	२५
दहिवडी	०	१६	०	१०	०	११	०	६१	१	४२	३	५	२	३२	१	६३	५	३४	२	९९	०	९३	०	३७	१९	३
म्हसवड	०	१७	०	७	०	१४	०	७०	१	१८	२	८०	२	२२	१	७३	६	२२	३	६	०	९४	०	३५	१९	५८
वडूज	०	१९	०	१२	०	१४	०	५९	१	६०	३	५५	३	८	२	१३	५	३७	३	१४	०	६०	०	४१	२०	९२
पुसेसावळी	०	१४	०	९	०	२१	०	६८	१	६४	४	०	५	६५	३	८०	४	६७	३	४८	०	८०	०	३६	२५	५२
विटें	०	१४	०	११	०	११	०	८१	१	५७	३	३४	३	८९	२	७७	५	१९	३	३५	०	८२	०	२८	२२	३८
तासगांव	०	१८	०	६	०	२०	१	५	१	९०	३	७६	४	७२	३	८	४	९९	३	८७	१	३२	०	३१	२५	४४
बेळगांव जिल्हा																										
बेळगांव	०	१३	०	४	०	३२	१	६६	२	७१	८	११	१६	३४	९	३९	५	६	४	७८	१	६४	०	३७	५०	५५
चांदगड	०	१३	०	५	०	३३	१	४५	१	८७	२१	७८	४२	१०	२२	१७	७	२०	४	८०	१	५३	०	४४	१०३	८५
खानापूर	०	७	०	६	०	३२	१	५७	२	२९	१२	७९	२४	९७	१३	६२	४	३१	४	१३	१	५१	०	३८	६६	२
संपगांव	०	५	०	३	०	२८	१	६२	२	८१	४	४४	५	३४	३	६७	४	१४	४	८६	१	४८	०	४०	२९	१२
सौंन्दत्ति	०	८	०	६	०	२६	१	२९	२	३४	२	९६	३	२५	२	६९	५	११	४	२	१	८१	०	३०	२४	१७
मुरगुड	०	११	०	४	०	२९	१	३८	२	५३	४	१	४	४	२	९६	४	७६	३	९१	१	४६	०	४२	२५	९१
गोकाक	०	१२	०	३	०	३६	१	४७	२	३८	३	४१	२	९१	२	६१	३	९४	५	११	१	६७	०	३६	२४	३७
चिकोडी	०	८	०	८	०	३१	१	६९	२	२७	३	८६	५	४७	३	६४	४	२२	५	१२	१	४४	०	३२	२८	५०
हुक्केरी	०	६	०	१०	०	४३	१	६६	२	४९	३	८३	४	७६	३	९	४	९	३	९४	१	३८	०	५०	२६	३३
अथणी	०	१२	०	३	०	१४	१	२९	२	३३	३	१३	२	८५	२	८०	५	५८	४	१६	१	२१	०	२९	२३	९३

	जने.		फेब्रु.		मार्च		एप्रिल		मे		जून		जुलै		ऑगस्ट		सप्टेंबर		आक्टो.		नोव्हे.		डिसें.		एकूण	
	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट
विजापूर जिल्हा																										
विजापूर	०	९	०	६	०	२२	०	८०	१	३१	३	३७	२	५१	२	८८	६	३३	३	८८	१	५२	०	३१	२३	२८
इन्डी	०	८	०	१०	०	२१	०	६३	०	९२	३	७५	२	९८	३	९८	७	४	३	६१	१	२७	०	३८	२४	९५
सिंदगी	०	१७	०	११	०	३८	०	७७	१	०	३	८२	३	२१	३	९६	६	४१	३	४७	१	३३	०	४४	२५	७
बागेवाडी	०	८	०	१४	०	३०	१	३	१	३४	३	३८	२	८६	३	३६	६	५४	३	८१	१	१८	०	४३	२४	४५
मुद्दे बिहाळ	०	३	०	१२	०	१८	०	९२	१	६४	३	२१	२	९५	३	८२	७	१५	४	२१	१	३९	०	२१	२५	८३
बागलकोट	०	३	०	९	०	२०	०	९३	१	७८	२	९६	२	७९	२	३६	५	९३	३	२५	१	४७	०	२६	२२	५
बिळगी	०	७	०	५	०	२७	०	८६	१	७८	३	६	२	१८	२	२६	६	९	३	२२	१	३५	०	३०	२१	४९
बदामी	०	२	०	९	०	२२	०	९४	२	९	२	६३	२	५०	२	९३	६	७८	३	७५	१	६१	०	३४	२३	९०
हुनगंद	०	८	०	५	०	२६	०	८४	१	७१	२	५०	२	९०	३	२५	६	१६	३	४८	१	६५	०	३१	२३	१९
इलकल	०	६	०	५	०	२४	१	३	१	८७	२	४६	२	८१	३	१२	६	३९	३	७९	१	९२	०	३८	२४	१२
धारवाड जिल्हा																										
धारवाड	०	७	०	३	०	२९	१	७४	३	९	४	५८	६	५२	४	५७	४	४१	५	२८	१	८२	०	४८	३२	८८
हुबळी	०	९	०	२	०	२५	१	६८	२	७६	३	८४	४	३२	३	३१	३	९४	४	९७	१	५५	०	३३	२७	६
कलघटगी	०	९	०	२	०	२३	१	७७	२	७१	५	७४	८	१	५	४८	३	७५	४	९९	१	५९	०	२६	३४	६४
शिग्गांव	०	१७	०	३	०	२१	१	२७	२	२४	३	९६	५	४४	३	५४	३	५	४	५	१	४१	०	४१	२५	७८
हनगळ	०	८	०	५	०	१६	१	२७	२	६७	६	१८	१०	१३	५	५०	२	८८	४	५२	१	८५	०	३४	३५	६३
हिरेकेरूर	०	५	०	१०	०	१२	१	४८	२	१५	४	५	६	८२	३	७८	३	११	४	६५	१	९२	०	६०	२८	९१
राणीबेन्नूर	०	११	०	५	०	२०	१	३२	२	७४	२	९३	३	५७	२	८३	३	५८	४	५२	१	९३	०	५१	२४	२९
हवेरी	०	१६	०	४	०	१४	१	६२	२	८७	४	२७	५	४६	३	९२	३	८०	४	७६	१	८०	०	५३	२९	३७
गदग	०	७	०	५	०	२५	१	४०	२	५१	२	६५	२	७८	३	३९	५	८५	४	२७	१	५१	०	४१	२५	१४
मैदरगी	०	१६	०	४	०	१२	०	७७	२	४३	२	३०	१	८७	२	१२	४	१७	३	८९	१	७२	०	२५	१९	८४
नवलगुंद	०	४	०	३	०	१७	१	३६	२	६०	२	७४	२	५९	३	३	५	८६	४	९४	१	४०	०	४०	२५	१६
नरगुंद	०	१०	०	१२	०	१८	१	४४	२	३८	२	२३	२	३५	२	७२	५	१७	४	७२	१	२७	०	२८	२२	१६
रोण	०	४	०	८	०	१५	०	९०	२	१७	३	४४	२	५३	३	७४	६	१	४	१६	१	४५	०	४०	२५	७

रत्नागिरी. जिल्हा

रत्नागिरी	०	[illegible]	०			८	०	७	१	३४	२८	१९	३२	२९	१८	४५	११	६५	३	५२	०	९२	०	८	९६	६९
वेंगुर्ला	०	८	०	४	०	२	०	२६	२	४९	३२	३९	३४	२०	१८	३१	९	९१	४	१०	१	१५	०	२४	१०३	१९
मालवण	०	५	०	८	०	०	०	१९	२	१८	२५	५०	२८	१३	१३	९९	१०	२९	३	२२	१	१०	०	१४	८४	८७
देवगड	०	१०	०	२	०	०	०	११	१	८१	२५	५८	२५	८७	१५	२१	११	११	३	७२	१	१८	०	१०	८८	८१
राजापूर	०	१०	०	२	०	१	०	१४	१	६९	३४	२३	४५	८१	२७	१२	१३	६०	५	२२	१	३३	०	१२	२९	३९
देवरूख	०	१५	०	६	०	५	०	३६	१	७८	३२	४३	५३	२४	३२	७९	१६	२९	६	२५	१	३८	०	१९	१४८	९७
चिपळूण	०	९	०	५	०	३	०	३५	१	५२	३०	७२	५२	२	३१	९१	१६	९८	५	७४	१	२०	०	१५	१४०	७८
गुहागर	०	७	०	५	०	०	०	१५	१	५४	२६	२२	३२	८९	१८	२१	११	४२	२	७६	०	६९	०	७	११४	७
खेड	०	२५	०	३	०	२	०	२६	१	१०	३१	३०	४९	६२	२९	२०	१६	२८	५	३२	१	१७	०	१३	१३४	६८
दापोली	०	६	०	३	०	२	०	३४	१	३३	३३	४८	४८	१५	२९	६६	१४	६३	३	१५	०	६९	०	१२	१३१	६६
मंदनगड	०	६	०	२	०	२	०	६४	१	६	३४	७	५९	७१	३६	२२	१५	२२	३	५५	०	९१	०	८	१५१	५६

कुलाबा जिल्हा

अलिबाग	०	८	०	४	०	३	०	१०	०	८३	२२	७८	२८	६८	१६	७५	१२	१७	२	६०	०	३९	०	४	८५	२९
पनवेल	०	१०	०	७	०	२	०	९	०	६८	२०	६२	४२	७१	२७	१७	१४	१३	३	७६	०	४८	०	४	१०९	८७
उरण	०	११	०	१७	०	८	०	९	०	५८	२०	१०	२८	९९	१९	३६	११	७०	२	१९	०	२६	०	२	८३	६५
कर्जत	०	८	०	४	०	७	०	१४	०	७३	२२	१४	४८	६४	३४	५४	१६	७३	४	५१	०	५९	०	९	१२८	३०
माथेरान	०	८	०	६	०	३	०	९	१	१२	३५	३०	८१	२१	५८	८	२६	९	६	९	०	९१	०	६	२०९	१२
खालापूर	०	९	०	५	०	०	०	८	०	८०	२२	८	४५	६८	३१	८३	१७	२२	४	८१	०	७०	०	५	१२३	३९
पेण	०	९	०	४	०	३	०	९	०	६१	२३	२५	४०	६५	२८	२५	१५	८९	३	८०	०	६५	०	५	११३	३०
नागोठणें	०	३	०	९	०	०	०	२	०	६५	२५	७२	३९	७३	२५	४६	१३	३०	३	५७	०	६६	०	०	१०९	२३
रोहें	०	६	०	४	०	३	०	१४	०	७५	२६	५१	४४	८६	२८	३२	१४	४९	५	२४	०	८३	०	५	१२१	३२
माणगांव	०	४	०	३	०	१	०	३४	०	८७	२६	११	४५	६८	२९	९१	१६	६१	४	१०	०	७६	०	९	१२४	५५
महाड	०	५	०	४	०	२	०	४२	१	२	२७	९	४८	८९	३१	२२	१६	०	४	२१	०	९८	०	१०	१३०	४

ठाणें जिल्हा	जाने.		फेब्रु.		मार्च		एप्रिल		मे		जून		जुलै		ऑगस्ट		सप्टेंबर		आक्टो.		नोव्हें.		डिसें.		एकूण.	
	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट	इंच	सेंट
ठाणें	०	२०	०	४	०	९	०	२	०	९३	२१	७५	३६	२३	२२	१५	१२	६८	३	७	०	३८	०	५	९७	५९
मुंबई	०	८	०	५	०	६	०	२	०	६९	२०	५८	२७	२६	१६	९७	११	८३	२	४३	०	३६	०	५	७९	३८
कुर्ला	०	१७	०	७	०	५	०	१३	०	७६	१९	७०	२९	९३	१८	५९	११	७३	२	४३	०	२९	०	२	८३	८७
कल्याण	०	२१	०	१०	०	४	०	१	०	५३	१९	२४	३७	३३	२३	८३	११	७७	३	२८	०	३३	०	७	९६	७४
मुरबाड	०	१२	०	६	०	३	०	१२	०	६९	१५	५०	३६	६१	२७	०	१३	८७	३	३९	०	५२	०	२	९७	९३
शहापूर	०	१२	०	६	०	४	०	५	०	८१	१८	४२	४१	१०	२६	६१	१३	२०	३	६४	०	३८	०	११	१०४	५४
मोखाडें	०	८	०	६	०	५	०	४	०	६९	१४	८४	३६	९०	२६	६७	११	७६	३	८२	०	६१	०	३	९५	५५
भिवंडी	०	२०	०	६	०	६	०	०	०	७७	२१	१८	३९	४२	२४	१४	१३	२१	३	४३	०	३९	०	७	१०२	९३
वसई	०	१३	०	६	०	३	०	१	०	६०	१८	२९	२६	९९	१५	६३	११	१०	२	६३	०	१८	०	६	७५	७१
वाडें	०	१५	०	४	०	३	०	३	०	५७	१६	५२	३४	६८	२५	३४	११	३८	३	१६	०	२७	०	४	९२	२१
माहीम	०	१०	०	३	०	५	०	१	०	६७	१४	१४	२१	८०	१३	३८	९	४७	२	३	०	३४	०	५	६२	७
डहाणू	०	९	०	४	०	२	०	०	०	४४	१४	३७	२६	१७	१४	४४	९	९३	१	९७	०	२७	०	३	६७	७७
उंबरगांव	०	१०	०	८	०	३	०	०	०	३१	१३	१४	२३	८५	१३	५६	९	३०	१	५९	०	२७	०	३	६२	२६

हिंदुस्थानांतील उष्णतामान

(डिग्री फँरनहीट)

प्रांत	ठिकाण	सरा.कमाल उष्णता	सरा.किमान उष्णता	सरा.उष्ण.	कमाल उष्णता व महिना	किमान उष्णता व महिना
आसाम	धुब्री	८२.९	६७.९	७५.४	९७.७ मार्च	४९.२जाने.
	शिबसागर	८१.५	६५.८	७३.६	९५.४ मे	४३.२जाने.
बंगाल	हावरा	९०.०	७०.५	८०.२	१०४.६ मे	४९.४ जाने.
	दिनाजपूर	८६.३	६६.७	७६.५	१०३.३ एप्रिल	४१.२जाने.
	मैमनसिंग	८६.३	६८.६	७७.४	९८.९ एप्रिल	४८.५ जाने.
बिहार	पाटणा	८७.६	६८.६	७८.१	१०९.९ मे	४४.५ डिसें.
	रांची	८४.४	६५.५	७४.९	१०७.१ मे	४४.२डिसेंबर
आग्रा व अयोध्या	कानपूर	९०.१	६६.२	७८.१	११४.८ मे	४०.९ जाने.
पंजाब	हिसार	९०.१			११६.० जून	३७.३ डिसें.
	अंबाला	८७.६	६२.७	७५.१	११५.६ जून	३५.० डिसें.
	लाहोर	९०.२	६१.७	७५.९	११७.५ जून	३१.२ डिसें.
	सियालकोट	८७.५	६२.८	७५.१	११३.८ जुलै	३३.९ जाने.
वायव्य सरहद्द	पेशावर	८५.३	५९.३	७२.३	११९.७ जुलै	२९.९ डिसें.
	डेराखान	९०.०	६२.४	७६.२	११९.२ जून	३२.६ जाने.
राजपुताना	अजमेर	८८.८	६५.०	७६.९	११०.५ मे	३७.७ जाने.
मध्य हिंदुस्थान	इंदूर	८८.१	६३.७	७५.९	११०.१ मे	४२.१ फेब्रु.
मध्यप्रांत	अकोला	९३.०	६७.२	८०.१	११४.० मे	४४.५ डिसें.
	नागपूर	९२.१	६८.८	८०.४	११४.७ जून	४४.१ डिसें.
मद्रास	मच्छलिपट्टण	९०.५	७४.५	८२.५	१११.३ मे	६२.२ डिसें.
	मद्रास	९१.०	७४.८	८२.९		
	त्रिचनापल्ली	९४.३	७४.२	८४.२	१०५.५ मे	६४.४ डिसें.
	मंगलोर	८७.४	७४.३	८०.८	९५.० मे	६८.१ जाने
	कोईमतूर	९०.०	६९.७	७९.८	१०२.१ एप्रिल	५८.३ जाने.
	बेल्लारी	९३.३	७०.९	८२.१	१०७.१ एप्रिल	५३.७ डिसें.
मुंबई	राजकोट	९३.०	६६.०	७९.०	१११.९० मे	४३.९ जाने.
	भूज	९१.२	६८.६	७९.९	११०.० मे	४२.७ डिसें.
	अहमदाबाद	९५.५	७९.०		१४४.० मे	४९.० जाने
	सुरत	९१.५	६६.२		१०९.० मे	४९.० जाने.
	खेडा	९४.५	६८.२		११४.० मे	४८.० जाने.
	ठाणें	८६.३	७७.१		९८.० मे	६१.० जाने.
	रत्नागिरी	८७.१	७३.३		१०४.० मार्च	५८.० जाने.
	अलिबाग	८६.३	७३.३		९५.० मार्च	६३.० जाने.
	कारवार	८६.९	७२.७		९४.० मार्च	६१.० जाने.
	पुणें	९०.१	६३.२		१०९.० मार्च	४२.० जाने.
	सातारा	९०.१	७६.६		१०८.० एप्रिल	६२.० जाने.
	सोलापूर	९२.७	६७.९		११०.० मे	५०.० जाने.
	नासिक	८९.४	६६.२		१०९.० मे	४४.० जाने.
	नगर	९१.०	६३.३		१०९.० मे	४४.० जाने.
	जळगांव	९१.०	६९.२		११२.० मे	५२.० जाने.
	धुळें	९४.७	६५.०		१०७.० मे	४२.२ जाने.

	(डिग्री फॅरनहीट)	सरा. कमाल उष्णता	सरा.किमन उष्णता	सरा.उष्ण.	कमाल उष्णता व महिना	किमान उष्णता व महिना
	धारवाड	८४.१	६८.२		९८.० मे	६१.० जाने.
	बेळगांव	८५.०	६३.७		१०२.० मे	५३.० जाने.
	विजापूर	९०.२	६६.९		१०८.० मे	५०.० जाने.
सिंध	हैद्राबाद	९३.५	६८.७		११४.० मे	४२.० जाने.
	कराची	८४.१	७१.४		९९.० मे	५१.० जाने.
	लारखाना	८७.४	७१.१		११२.० मे	४०.० जून
	जाकोबाबाद	९२.७	६७.४		१२१.० मे	३४.० जून
	सक्कर	९५.६	६९.७		११४.० मे	३६.० जून

मध्यप्रांत व मराठवाडा यांतील जिल्ह्यांचे सरासरी पाऊसमान त्या त्या प्रांतांतील जिल्ह्यांच्या वर्णनांत दिलें आहे.

बृहन्महाराष्टांतील हवामान---

बृहन्महाराष्ट्रांत हवामानाचे भिन्न प्रकार अतिशय नसले तरी अनेक आहेत. "देवा पाऊस पुरें कर" म्हणून महाबळेश्वरचेच काय परंतु मुंबईचे लोकही काकुळतीस येऊन देवाची प्रार्थना करतात तेव्हां 'पावसाचा थेंब केव्हां दृष्टीस पडेल' म्हणून सोलापूर पंढरपूरकडील शेतकरी चातकाप्रमाणें पर्जन्य राजाची मार्गप्रतीक्षा करीत असतात. व जेव्हां वऱ्हाडांतील लोक रात्रीं वारा वाजतांही माळवदावर पडून उघडयानें तळमळत व ह्या कुशीवरून त्या कुशीवर लोळत असतात तेव्हां सह्याद्रीच्या माथ्यावरील प्रदेशांत राहणारे लोक गरम पांघरूण घेऊन निजलेले असतात. इतका फरक बृहन्महाराष्ट्राच्या भिन्न भागांत आहे. कोणत्याही प्रदेशांतील हवामान नियमित करणारीं मुख्य कारणें अक्षांश, उंची, समुद्रसानिध्य, त्या प्रदेशांतून वाहणारे वारे व जमिनीचें स्वरूप हीं होत. यांचा परिणाम बृहन्महाराष्ट्राच्या हवामानावर काय झाला आहे हें पाहूं.

अक्षांश---विषुववृत्तापासून जों जों दूर जावें तों तों सूर्यकिरणांचा तिरपेपणा वाढत असल्यामुळें उत्तर गोलार्धांत दक्षिणेकडून उत्तरेकडे जातांना उष्णमान एकंदरीनें कमी होतें. म्हणून बृहन्महाराष्ट्रांत दक्षिणेकडीलपेक्षां उत्तरेकडील भागांत उष्णमानाची सरासरी थोडी (एक दोन अंश) कमी आहे. (आकृति पहा.) उंची--सारख्या अक्षांशावर असणाऱ्या प्रदेशांत वार्षिक उष्णमान सामन्यतः सारखें असावयाचें; पण त्यांत देशाच्या समुद्रसपाटीपासूनच्या कमजास्त उंचीप्रमाणें फरक होतो. सामान्यतः ३०० फूट उंचीस उष्णतामान एक अंश कमी होतें. म्हणून बृहन्महाराष्ट्रांत कोंकणापेक्षां वऱ्हाडची, त्यापेक्षां देश या विभागांतील दक्षिणोत्तर मध्यपट्टीची व त्यापेक्षां नाशिक, पुणें, सातारा ह्या जिल्ह्यांची उंची जास्त असल्यामुळें या भागांतील हवेचें उष्णतामान क्रमानें थोडथोडें कमी असल्याचें आढळून येतें. सह्याद्रीच्या माथ्याची उंची २।३ हजार फूट असल्यानें माथ्यावरील प्रदेशांत हवेचें सरासरी उष्णतामान इतर ठिकाणांहून सुमारें १० अंश कमी कमी असतें. म्हणूनच थंड हवेचीं ठिकाणें या भागांत विशेष आहेत. सह्याद्रि व याचे फाटयांतील थंड हवेचीं ठिकाणें महाबळेश्वर, पुरंदर, सिंहगड, माथेरान, पन्हाळा, हरिश्चंद्रगड, वणी, भिमाशंकर व त्र्यंबकेश्वर.

हवामान नियमित करणारीं जीं कारणें आहेत त्यांपैकीं बहुतेकांमुळें पडणारा फरक क्रमाक्रमानें होतो,. परंतु उंची या कारणामुळें फरक कधीं कधीं एकदम व अर्थात् पुष्कळ होतो. सिंहगड, महाबळेश्वर या ठिकाणीं थंड हवा असतांना त्याच वेळीं केवळ दहा पंधरा मैलांवर असणाऱ्या पुणें, वांई, या ठिकाणीं लोक उकाडयानें हुश हुश करीत असतात. वऱ्हाडांतही अकोला उमरावती येथील लोक उन्हाळयानें बेजार झाले असतां चिखलदऱ्याच्या (३॥ हजार फूट उंचीच्या) प्रदेशांतील लोक थंड हवेचा उपभोग घेत असतात. वऱ्हाडांत बुलढाणा मेहकर हीं ठिकाणें अकोल्यापासून फार लांब नाहींत. पण तेथील हवा त्या प्रदेशाच्या उंचीमुळें उन्हाळयांत १०।५ अंशांनीं कमी उष्ण, साधारणपणें पुण्याप्रमाणें असते.

समुद्रसांनिध्य--दोन ठिकाणांच्या वार्षिक अथवा

सरासरी उष्णतामानांत फारसा फरक नसला तरी तेथील हिवाळ्यांतील व उन्हाळ्यांतील उष्णतामानांत फरक कमजास्त असतो. हा फरक पुढील दृष्टांतानें स्पष्ट करतां येईल. समजा एक (कायमची नौकरी असलेला) कारकून व एक दुकानदार या दोघांची वार्षिक प्राप्ती सारखीच सुमारें पांचशें रुपये आहे. या प्रत्येकाची रोजची प्राप्ति गणिताप्रमाणें सुमारें दीड रुपाया पडते. परंतु तीमध्यें असा फरक असतो कीं, कारकुनाच्या रोजच्या प्राप्तींत चढउतार बहुतेक नसतो. पण दुकानदारास एकाद्या दिवशीं चार आठ आणे मिळतात. तर सणाच्या किंवा लग्नमुंजीच्या दिवसांत एक दिवशीं १०।५ रुपये मिळतात. अशाच प्रकारचा फरक वार्षिक उष्णतामान सारखें असणाऱ्याही दोन ठिकाणांच्या हवामानांत पडतो. हें कारण समुद्रसानिध्य हें होय. सूर्यामुळें जमीन लवकर तापते. व सूर्यप्रकाशाभावीं (रात्रीं) ती लवकर थंड होते. पण पाण्याची अर्थात् समुद्राची स्थिति तशी नाहीं. समुद्र लवकर तापत नाहीं व लवकर गार होत नाहीं. म्हणून समुद्राजवळची जमीन समुद्राच्या परिणामामुळें दुपारीं किंवा उन्हाळ्यांत फार तापत नाहीं. व रात्रीं किंवा हिवाळ्यांत फार गार होत नाहीं. म्हणून समुद्रापासून जों जों दूर जावें तों तों तिच्यांत पहाटेचें आणि दुपारचें, तसेंच हिवाळ्यांतील आणि उन्हाळ्यांतील उष्णतामान यांत फरक जास्त पडतो. या बृहन्महाराष्ट्रांत पूर्वेकडे व उत्तरेकडे जातांना समुद्रसपाटीपासून आपण दूर जातों म्हणून तिकडे उन्हाळ्यांतील उष्णतामान जास्त आढळून येतें. ईशान्येकडील भाग समुद्रापासून फार दूर म्हणून त्यांत हा फरक सर्वांत जास्त आढळून येतो. (आकृति पहा) त्याच्या अगदीं उलट स्थिति समुद्रकांटच्या ठिकाणीं आहे. तेथें विशेष थंडी नाहीं व उन्हाळाही नाहीं. व वऱ्हाड नागपूरकडील उन्हाळ्यांतील स्थितीची पुण्याकडील माणसास कल्पनाही होण्यासारखी नाहीं. तिकडे उन्हाळ्यांत भिंती इतक्या तापतात कीं, सर्व ढेकूण मरून जातात. उन्हाळ्यांत मड यांतील थंडगार पाणी वारंवार प्यावें लागतें व तें बाधत नाहीं. एवढेंच नव्हे तर तें न प्यालें तरच उन्हाळा बाधतो.तेथें तान्ह्या मुलासही उन्हाळ्यांत थंड पाणी पाजावें लागतें.

वाऱ्याचा परिणाम

पर्जन्यमान :—पर्जन्य पाण्याच्या वाफेपासून पडत असल्यामुळें तो मुख्यतः समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यावर अवलंबून असतो. एकादा प्रदेश समुद्रावरील वाफ घेऊन येणाऱ्या वाऱ्यांच्या मार्गांत जों जों दूर तों तों त्यांत पाऊस कमी पडतो. म्हणून बृहन्महाराष्ट्रांत जों जों पूर्वेकडे व उत्तरेकडे जावें तों तों पावसाचें मान सामान्यतः कमी होतें असें आढळून येईल. समुद्रावरील वारे सामान्यतः विवक्षित कालीं येतात. पैकीं अरबीसमुद्रावरून येणारे नैर्ऋत्येकडील मान्सून वारे एप्रिल ते सप्टेंबर पर्यंत सर्व बृहन्महाराष्ट्रांतून वाहतात. म्हणून या दिवसांत त्यांपासून पाऊस मिळतो. बंगालच्या उपसागरास वरून येणारे वारे याच दिवसांत बृहन्महाराष्ट्राच्या अगदीं पूर्वेकडील भागांतही जातात. म्हणून त्यास या दोन्ही वाऱ्यांपासून पाऊस मिळतो. या भागांत जास्त पाऊस पडण्याचें कारण हेंच होय. एकंदर वार्षिक उष्णतामान लक्षांत न घेतां जेथें उन्हाळा जास्त असतो तेथील हवेस उष्ण म्हणण्याची बऱ्याच लोकांची चाल आहे. व उष्ण हवेंत पाऊस कमी पडतो अशी चुकीची समजूत बऱ्याच लोकांची आहे. पण वऱ्हाड नागपूर भागांत देशाच्या मध्यभागापेक्षां उन्हाळा जास्त असूनही पाऊस जास्त पडतो. यावरून ही समजूत बरोबर नाहीं असें दिसून येईल. थंड हवेंत पाऊस जास्त ही समजूतही बरोबर नाहीं. कोंकणांतील हवा देशावरच्या हवेपेक्षां एकंदरीनें किंचित उष्ण आहे. तरी तेथें पाऊस जास्त पडतो. बंगालच्या उपसागरावरून येणारे ईशान्येकडील मान्सून वारे आक्टोबर ते मार्चपर्यंत वाहतात. यांबरोबर पाऊस नैर्ऋत्येकडील मान्सून वाऱ्यांइतका येत नाहीं. या (बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या) वाऱ्यांच्या मार्गांत बृहन्महाराष्ट्राचा पूर्वभाग आधीं येतो. म्हणून त्यांत या वाऱ्यापासून पाऊस जास्त पडतो. व तो पश्चिमेकडे कमी होत जातो. अर्थात् या वाऱ्यांपासून कोंकणास पाऊस फारच थोडा मिळतो. मधला प्रदेश (सोलापूर जिल्हा, नगर जिल्ह्याचा पूर्वभाग वगैरे) दोन्हीं मान्सून वाऱ्यांना दूर म्हणून त्यास कधीं कधीं दोन्हीं मान्सून वाऱ्यांपासून पुरेसा पाऊस मिळत नाहीं. म्हणून या प्रदेशांत दुष्काळाचे प्रसंग वारंवार येतात.

हवेची हितावहता

हवा पावसाळ्यांत दमट असते तेव्हां पचन

मंद असतें असा आपणास अनुभव आहे. यावरून फार दमट हवा आरोग्यास हितावह नाहीं असें समजून येते. वृहन्महाराष्ट्रांत पश्चिमेकडून पूर्वेकडे जातांना समुद्रापासूनचें अंतर वाढत असल्यामुळे हवेचा कोरडेपणा वाढत जातो. म्हणून सामान्यतः आरोग्याच्या व विशेषतः अन्नपचनाच्या दृष्टीनें पूर्वेकडील हवा जास्त निरोगी आहे. कोंकणांत पावसाळ्चा दिवसांत हवेच्या दमटपणामुळेंच अपचनासंबंधीं विकार जास्त प्रमाणांत असतात.

ज्या खोलगट किंवा जास्त सपाट प्रदेशांतून पाण्याचा निकाल लवकर होत नाहीं. व ज्यांत बागायत किंवा झाडी विशेष असते अशा प्रदेशांत ओल व झाडपाल्याचें कुजणें यांमुळे हवा रोगीट असते. असे प्रदेश कोंकणांतील ठाणें जिल्हा व सह्याद्रींतीलच्या खोलगट प्रदेश उदा० नाशिक जिल्ह्यांतील पेठ तालुका, खानदेशांतील नवापूर, व सातारा जिल्ह्यांतील पाटण तालुका हे होत. या प्रदेशांत हिंवतापाचा विकार विशेष असतो. पावसाळ्याच्या अखेर ओल, आणि उन्ह ह्यांमुळे झाडपाल्याचें कुजणें या दोन कारणांमुळ सर्वच प्रदेशांतील हवा रोगट होत असते. दिवाळीच्या सुमारास हिंवतापाचा आजार विशेष असतो याचें हेंच कारण आहे. प्रदेशास उतार चांगला असला म्हणजे तेथील घाण पावसाच्या पाण्याबरोबर पूणपणें वाहून जाते. म्हणून या नैसर्गिक स्वच्छतेच्या दृष्टीनें देशाची पश्चिम पट्टी व कोंकणांतील रत्नागिरी जिल्हा यांमध्ये नैसर्गिक स्वच्छता जास्त आहे. फार उष्णतेचा परिणाम आरोग्यावर अनिष्ट होतो. म्हणून वऱ्हाड नागपूरकडील लोकांचें आरोग्य पश्चिमार्धांतील लोकांइतकें चांगलें नाहीं. ज्या लोकांस उष्ण हवेची फारशी संवय नाहीं त्यांच्यावर वऱ्हाडांतील कडक उन्हाळ्याचा अनिष्ट परिणाम जास्त होतो. म्हणून असें दिसून येतें कीं, कोंकण अथवा देशाची पश्चिम पट्टी यांतील जे लोक वऱ्हाड नागपूरकडे उद्योगधंद्यांसाठीं जाऊन राहातात त्यांस वार्धक्य कांहींसें लवकर येतें. दक्षिणेस बेळगांवांपासून उत्तरेस नाशिकपर्यंत देशाचा जो भाग आहे त्यांतील हवा कोंकणासारखी दमट नाहीं. व खानदेश व वऱ्हाड यांसारखी उन्हाळ्यांत फार उष्ण नाहीं. शिवाय ह्या प्रदेशांत उतार चांगला असल्यानें त्यांतील घाण पावसाच्या पाण्यानें दर वर्षीं धुवून जाते; म्हणून हा भाग हवामानाच्या दृष्टीनें सर्व बृहन्महाराष्ट्रांत उत्तम होय. या भागांत राहणाऱ्या मराठ्यांच्या जोमदारपणाचें एक कारण श्रम केल्याशिवाय न पिकणारी जमीन, कोटकपणा उत्पन्न करणारी थंडी व निःसत्त्व करून टाकणाऱ्या उन्हाळ्यांतील फार उष्ण हवेचा अभाव हेंच असावें.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश प्रांत व देशी संस्थानें

१ ब्रिटिश प्रांत	क्षेत्रफळ चौ.मैल	लोकसंख्या १९३१
अजमीर–मारवाड	२७११	५६०५६७
अंदमान व निकोबार	३१४३	२९४६३
आसाम	५३०१५	८६२२२५१
बलुचिस्तान	५४२२८	४६३५०८
बंगाल	७६८४३	५०११४००२
बहार	४२३६०	२५६५०११७
ओरिसा	१३७३६	५३००३९८
छोटा–नागपूर	२७०६५	६६३९०४१
मुंबई इलाखा	१२३६२१	२११०२१२६
मुंबई	७७०३५	१७१६६००९
सिंध	४६५०६	३५९३३०४
एडन	८०	५०८०९
ब्रम्हदेश	२३३७०७	१४६५२२७२
मध्यप्रांत–वऱ्हाड	९९८७६	१५४७२६२८
मध्यप्रांत	८२१०९	१२०२८८६३
वऱ्हाड	१७७६७	३४४३७६५
कूर्ग	१५८२	१६३०८९
दिल्ली	५९३	६३६८२७
मद्रास	१४२२६०	४६७३१८५०
वायव्य स. प्रांत	१३४१९	२४२३३८०
पंजाब	९९८४६	२३५८०५२०
संयुक्त प्रांत	१०६२९५	४८४२३२६४
आग्रा	८२१३७	३५६२८१८४
अयोध्या	२४१५८	१२७९५०८०
एकूण	१०९४३००	२७०६१२१६२

२ देशी संस्थानें हिंदुस्थानांतील

दे. संस्थानें व एजन्सीं	क्षेत्रफळ चौ.मै.	लोकसंख्या ११९३
आसाम सं. (मणिपूर)	८४५६	४४६०८४
बलुचिस्थान सं.	८०४१०	४०३७१९
बडोदें सं.	८१३५	२४४२९२४
बंगाल संस्थान	५४२३	९७२२९१
बहार-ओरिसा सं.	२८५५६	४६४२६६३
मुंबई सं. पश्चि. हिंदु. एजन्सीज धरून	५९५६०	४३७७४५५

मध्य हिं. ए.	५२३१७	६६१५२०४
मध्यप्रांत संस्थानें	३२०८१	२४७८५१९
ग्वाल्हेर संस्थान	२६३८२	३५२०७०८
हैद्राबाद संस्थान	८२६९८	१४३९५४९३
काश्मीर संस्थान	८९८०७	३६४५३३९
मद्रास सं. एजन्सी	१०६४४	६७४८१०७
कोचीन	१३६१	१२०४२३५
त्रावणकोर	७५९४	५०९०४६२
म्हैसूर संस्थान	२९४६९	६५५४५७३
वाय. सर. प्रांत		
एज. व ट्रायबल एरिया	२५५००	२२५९३०५
पंजाब संस्थानें	३०७४२	४९०९५३७
राजपुताना एजन्सी	१२९०५८	११२२३७०८
प.हिं.स्टे.ए. (सिकिम)	२८१८	३९९७२९०
संयु. प्रां. संस्थानें	२२१८	१२०५६०८
एकंदर संस्थानें	७११०३२	८०८३८५२७
एकंदर प्रांत	१०९४३००	२७०६१२१६२
एकंदर हिंदुस्थान	१८०५३३२	३५१४५०६८९

हिंदुस्थान देशाचे राजकीय विभाग

मुख्य राजकीय विभाग---१मुंबई, २ बंगाल, ३ संयुक्त प्रांत, ४ मद्रास, ५ पंजाब, ६ बहार व ओरिसा, ७ मध्यप्रांत व वऱ्हाड, ८ आसाम, ९ ब्रम्हदेश, १० दिल्ली, ११ वायव्य सरहद्दी-वरील प्रांत, १२ अजमीर–मारवाड, १३ कूर्ग, १४ अंदमान व निकोबार बेटें.शिवाय देशी संस्थानें.

मुंबई इलाखा

सिंधमधील जिल्हेः---हैद्राबाद, नबाबशाह, कराची, लारखाना, सक्कर, थर व पारकर

गुजराथेतील जिल्हेः---अहमदाबाद, भडोच, खेडा. पंचमहाल, सुरत,
(उमरकोट)–अप्पर सिंध फ्रॉन्टियर,

संस्थानें एकंदर ३७५. पैकीं, मोठीं---कच्छ कोल्हापूर, बडोदें, पालनपूर, जुनागड, भावनगर, नवानगर, ईदर, राजपिपळा, गोंडळ, इ.

महाराष्ट्रांतील जिल्हे व तालुकेः– (१)ठाणेंः– वसई,भिवंडी,डहाणू, उंबरगांव, कल्याण, माहीम, मुरबाड, साष्टी, शहापूर, मोरवाडा, (पेटा) वाडें. (२)अहमदनगरः–अकोला, कर्जत, जामखेड, कोपरगांव, नगर, नेवासे, पारनेर, राहुरी, संगमेनर, शेवगांव, पाथर्डी, श्रीगोंदें. (३) पूर्व खानदेशः–अमळनेर, पारोळा, भुसावळ, एदलाबाद, चाळीसगांव, चोपडें, एरंडोल, जळगांव, जामनेर, पाचोरा, भडगांव, रावेर, यावल; (४) पश्चिम खानदेशः–धुळें, नंदुरबार, नवापूर, पिंपळनेर, शहादा, शिर-पूर, शिंदखेड, तळोदें; (५) नाशिकः–चांदोर, दिंडोरी, इगतपुरी,केळवण, मालेगांव, नांदगांव, नाशिक निफाड, पेठ, सटाणें, सिन्नर, येवलें. (६) पुणेंः–भिमथडी, दौंड (पेटा), हवेली, मुळशी (पेटा), इंदापूर, जुन्नर, खेड आंबेगांव, मावळ, पुरंदर, शिरूर (घोडनदी); (७) सातारा:–जावळी, मालकम पेठ (पेटा) कऱ्हाड, खानापूर, खटाव, कोरेगांव, माण पाटण, सातारा, तासगांव, वाई, खंडाळा (पेटा). वाळवें, शिराळें (पेटा). (८) सोलापूर– बार्शी, करमाळें, माढे, माळशिरस, पंढरपूर, सांगोलें, सोलापूर. (९) बेळगांवः–अथणी, बेळगांव, चांदगड (पेटा), चिकोडी, हुकेरी (पेटा), गोकाक, खानापूर, परसगड, मुरगोड (पेटा), संपगांव. (१०) विजापूरः–बदामी, बागलकोट, बिळगी, बागेवाडी, विजापूर, हुगगुंद, इंडी, मुद्दे बिहाळ, सिंदगी,. (११) धारवाडः– बंकापूर, धारवाड, गदग, मुंदरर्गी (पेटा), हनगल, हुबळी, कलघटगी, करजगी, कोड, नवलकुंद, नरगुंद (पेटा), राणि बेन्नूर, रोण. (१२) कारवार–अंकोला, होनावर, भटाकल, (पेटा), कारवार, कुमठा, सिद्धपूर, सिरसि, हल्ल्याळ, सुपें (पेटा), यल्लापूर, मुंडगोड (पेटा), (१३) कुलाबाः–अलिबाग, कर्जत, खालापूर (पेटा), महाड, माणगांव, पनवेल, उरण (पेटा), नागोठणें, (पेटा), पेण, रोहे., (१४) रत्नागिरीः– चिपळूण, गुहागर (पेटा), दापोली, मांडणगड (पेटा), देवगड, खेड, मालवण, राजापूर, रत्नागिरी, संगमेश्वर वेंगुर्लें.

मध्यप्रांत आणि वऱ्हाड

राजकीय विभागः---१ वऱ्हाड, २ नागपूर, ३ नर्मदा, ४ जबलपूर, व ५छत्तीसगड.या प्रत्येकास कमिशनरी म्हणतात.

वऱ्हाड कमिशनरी

(१) उमरावतीः– उमरावती, मोर्शी, चांदूर, एलिचपूर, दर्यापूर, मेळघाट. (२) आकोलाः– आकोला, मूर्तिजापूर, आकोट, बाळापूर, वाशीम, मंगरूळ. (३) बुलढाणाः---चिखली, खामगांव, मलकापूर, जळगांव, मेहेकर. (४) यवतमाळः--- यवतमाळ, केळापूर, वणी, पुसद, दारव्हा,

नागपूर कमिशनरी

(१) नागपूरः—नागपूर, रामटेक, उमरखेड, काटवाल, सावनेर,. (२) वर्धाः– वर्धा, हिंगणघाट, आर्वी. (३) चांदाः— चांदा, वरोडा, ब्रम्हपुरी, गडचिरोली, सिरोंच्या. (४) भंडाराः– भंडारा, गोंदिया, साकोली. (५) बालाघाटः— बालाघाट, वैहर, वारशिवनी,

नर्मदा कमिशनरी

(१)हुशंगाबादः– हुशंगाबाद, हर्दा, शिवनी, सोहागपूर,. (२) नरसिंगपूरः— नरसिंगपूर, गादरवाडा. (३) नेमाडः– खांडवा, बऱ्हाणपूर, हरसूद. (४) बैतुलः— बैतुल, मुलताई, भैसदेही. (५)छिंदवाडाः–छिंदवाडा, सौंसर, अमरवाडा

जबलपूर कमिशनरी

(१)जबलपूरः—जबलपूर, मुरवाडा, सिहोरा, पाटण.(२) सागरः— सागर, खुरई, रेहेली, बांडा. (३) दमोः—दमो, हट्टा. (४)मंडलाः– मंडला, दिंडोरी, निवास. (५) सिवनीः–सिवनी, लखनादौन,

छत्तीसगड कमिशनरी

(१) रायपूरः— रायपूर, बलोदा बाजार, धमतेरी, महासमंध. (२) द्रुगः—द्रुग, विमितारा, संजारी. (३) विलासपूरः— बिलासपूर, मुंगेरी, जांजगीर, कटघोडा.

हैद्राबाद संस्थान (मराठवाडा)

ह्यांत १ औरंगाबाद, २ बीड, ३ परभणी ४ नांदेड व ५ उस्मानाबाद हे जिल्हे आहेत. आणि गुलबर्गा, बीदर, निजामाबाद व आदिलाबाद, ह्या जिल्ह्यांचा बराच भाग येतो. मराठी भाषा बोलणारांची संख्या ३३९४८५८ आहे.

(१) औरंगाबादः— औरंगाबाद, गंगापूर, विजापूर, पैठण, अंबड, जालना, भोकरदन, कन्नड, खुलताबा, सिल्लोर. (२) बीडः—बीड, अष्टी, गेवराई, मांजलगांव, मोमिनाबाद, पाटोदा. (३) परभणीः— परभणी, पाथरी, जितूर, हिंगोली, कलमनूर, बसमतनगर, पालम. (४) नांदेडः— नांदेड, हदगांव, मुधोळ, बिलोली, देगलूर, कंदाहार (मुखेड). (५)उस्मानाबादः– तुळजापूर, लातूर, उस्मानाबाद, परांडा, कळंब, वासुलखास, वेवळी.

हिंदुस्थानांतील ब्रिटिशेतर राष्टांचीं ठाणीं

हिंदुस्थानांतील पोर्तुगीज सरकारच्या ताब्यांतील मुलूख फक्त मुंबई इलाख्यांतच आहे. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील गोवा प्रांत, खंबायतच्या आखाताच्या मुखाशीं असलेला दमण प्रांत व काठेवाडच्या दक्षिण किनाऱ्यावरील दीव बेट यांचा यांत समावेश होतो.


गोवा—या प्रांताची माहिती पुढे गोमंतक प्रकरणांत आली आहे.

दमणः—क्षेत्रफळ ८२ चौ. मैल; लोकसंख्या ४८६१४ आहे. त्यांपैकीं ख्रिश्चन १७५१ आहेत. इ. स. १५३१ सालीं पोर्तुगीजांनीं दमण शहर लुटलें. व १५५८ त काबीज केलें. दमण प्रांतांतील जमीन ओलसर व सुपीक आहे. पिकें–तांदूळ, गहूं व बटाटे. सागाचीं दाट अरण्यें आहेत. सरकारच्या उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबी–जमीन महसूल, जंगल, देशांतील मालावरील जकात व आयात जकात या आहेत.

दीवः—हें सुरक्षित बंदर असून येथून इराणशीं व अरबस्थानशीं व्यापार चालतो. बेटाची लांबी सात मैल व रुंदी दोन मैल. लोकसंख्या–१३८४४ असून त्यापैकीं २२८ ख्रिश्चन आहेत.

फरेंचांचीं ठाणीं

हिंदुस्थानांत फरेंचांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशाचे पांच भाग आहेत. एकंदर क्षेत्रफळ २०३ चौ. मैल असून लोकसंख्या २८८५४६ आहे. पॉन्डेचरी हें फरेंचांचें मुख्य ठाणें असून १६९७ पासून ती त्यांच्याकडे आहे. बंगालचे सुप्रसिद्ध योगी अरविंद घोष हे आज कित्येक वर्षें याच शहरीं योगसाधन करीत राहिले आहेत. याशिवाय कालिकत, माही व चंद्रनगर हीं फरेंचांचीं चार ठाणीं आहेत.



भारत प्रिंटिंग वर्क्स, पूना नं. २

गोमंतक

विषय

१ भूप्रकृतिः—
सीमा, क्षेत्रफळ, विभाग, डोंगर, घाट, जलवर्णन, बेटें, तळीं, हवामाप, वनस्पति जंगल, मीठ, प्राणी इ०

२ भूसंस्कृतिः—
बंदरें व शहरें, जलमार्ग, कालवे, रेल्वे, सडका, एरोड्रोम इ०

३ प्रेक्षणीय स्थळें व सृष्टिसौंदर्यः—
जुनें गोवें व झेव्हियर–शव–प्रदर्शन, देवस्थानें, दुधसागर, चन्द्रनाथ, सिद्धनाथ, नार्वे, इ० ठिकाणावरून दिसणारे रम्य देखावे.

४ व्युत्पत्तिः

५ इतिहासः—
पोर्तुगीज–पूर्व, पोर्तुगीजकालीन धर्मच्छलाचे अनन्वित प्रकार, इंग्रजांचा गोमंतकाभिलाष, धर्मवेडाला उतारा इ.

६ राज्यव्यवस्थाः—
निरनिराळीं खातीं, मुलकी कारभार, न्यायव्यवस्था, शेतकी, पतपेढी, सेव्हिंग बँक, सरकारः–सल्लागार मंडळ, म्युनिसिपालिट्या, ग्राममंडळ, सरकारी जमाखर्च इ०

७ लोकस्थितिः—
लोकसंख्या, राजकीय स्थिति : इंग्रजी व पोर्तुगीज वासाहतिक कारभारांतील फरक (Assimilation व Domination) कास्तीसु, मिश्तीसु–कानारी व इयेतीय्युश, स्वायत्तता इ. धार्मिक व सामाजिक : मुसलमान, ख्रिश्चन आणि हिंदु समाज व त्यांतील जाति, धर्मपीठें. ब्राह्मण–अब्राह्मण वाद, अस्पृश्यता, शुद्धि,शैक्षणिक व वाङमयिक सरकारी व लोकांच्या शाळा, साक्षरतेचें प्रमाण, नियतकालिकें,ग्रंथकार व लेखक, इ.आर्थिक स्थितिः करपद्धति, ग्रामसंस्था, आयात–निर्यात, लॉटऱ्या इ०

८ उपसंहारः

भूप्रकृति

१ स्थान, सीमा व क्षेत्रफळः—'गोमंतक' 'गोवें' किंवा 'गोवा' या नांवानें ज्या भभागाला सध्यां संबोधतात, तो १४°५३'३०" व १५°४८ अंशावरचीं उत्तर अक्षवृत्तें आणि ७३°४५' व ७४°२४' अंशावरचीं पूर्व रेखावृत्तें (ग्रीनवीच) यांच्यामध्यें सामावलेला आहे. त्याच्या सीमा—पूर्वेस सह्याद्रि, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेस सावंतवाडी संस्थानची दक्षिण सीमा 'तेरेखोल' संज्ञक नदी आणि दक्षिणेस कारवार जिल्हा याप्रमाणें आहेत. या प्रदेशाचा आकार विषमभुज चौकोनासारखा असून तो ईशान्य–नैऋत्य कर्णरेषेनें 'सह्य' पर्वताकडून समुद्रकिनाऱ्यावर कलता ठेवल्याप्रमाणें भासतो. त्याची दक्षिणोत्तर कमाल लांबी ६३ व पूर्वपश्चिम कमाल रुंदी ३६ इंग्लिश मैल असली तरी क्षेत्रफळ अवघें १२२५ चौरस मैल भरतें.

२ विभागः—राज्यकारभाराच्या सोयीसाठीं हा प्रदेश ११ तालुक्यांत विभागला आहे. त्यांपैकीं सत्तरी व सांगें हे दोन सह्याद्रीच्या पायथ्यास उत्तरेकडून दक्षिणेच्या रोखानें पसरून असून 'पेडणें' 'बारदेश' 'तिसवाडी' 'मुरगांव' व 'सासष्टी' हे पांच त्याच रोखानें समुद्रकिनाऱ्यास बिलगून आहेत. 'काणकोण' हा सर्वांत दक्षिणेकडचा तालुका पूर्वेकडून सह्याद्रीस व पश्चिमेकडून समुद्रास भिडलेला आहे. 'केपें' हा काणकोणच्या उत्तरेस सांगें व सासष्टी यांच्या मध्यास असला तरी त्याचा लहानसा चिंचोळा भाग समुद्रपरिमार्जित आहे. उत्तरभागीं सत्तरी आणि बारदेश–तिसवाडी यांच्या दरम्यान 'सांखळी' तालुका असून 'फोंडें' हा एकंदर गोमंतकाचा मध्यवर्ति तालुका आहे.

३ डोंगरः—या प्रदेशाचा ईशान्येकडचा भाग म्हणजे सत्तरी तालुका डोंगराळ आहे. आणि त्यांत 'शशक–दुर्ग' किंवा सों–सोगड' हें समुद्रसपाटीपासून ४ हजारापेक्षां अधिक फूट उंच असलेलें, साऱ्या गोव्यांतलें अत्युच्च शिखर आहे. 'क्षत्रियांची माऊली' 'वागेरी' व 'मोलेंगड' या अनुक्रमें

३९००, २३६० व २१५० फूट उंचीच्या टेंकड्यांही याच तालुक्यांत आहेत. सांगेच्या पूर्व भागांतील 'दुधसागर' किंवा 'वलंग' डोंगराची उंची १९०० फूट आहे. तथापि प्रसिद्धीच्या दृष्टीनें 'सिद्धनाथ' व 'चंद्रनाथ' हेच डोंगर प्रमुख होत. पहिला फोंडें तालुक्यांतील 'बोरी' व दुसरा सासष्टींतील 'पारोडें' गांवांत असून दोहोंवर चढण्यास साधारण सोईस्कर असे फत्तर–पथ आहेत. त्यांच्या उंच्या अनुक्रमें १३४५ व ११४० फूट आहेत. सिद्धनाथ हा गोमंतकाचा मध्यबिंदु मानला तर चालण्याजोगें आहे. चंद्रनाथावर मराठ्यांच्या मालकीचीं चंद्रेश्वर–भूतनाथाचीं प्राचीन देवालयें असून त्यांच्या सेवकगणांचीं कित्येक घरेंहि आहेत. हा डोंगर 'पर्वत' याच नांवानें विशेष परिचित आहे. या आणि केपें तालुक्यांतील छोटयामोठ्या 'मोरपिर्ले' उंचवटयाभोंवतींचा प्रदेश चढउताराचा व दऱ्याखोऱ्यांनीं युक्त असा आहे. बाकी प्रदेश सामान्यतः सपाट आहे. समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागांतील पांढरसर माती सोडली तर इतरत्र माती तांबडसर आहे.

४ घाटः—गोमंतकांतून ब्रिटिश हद्दींत जातां येतां येणारे निसर्गनिर्मित असे 'घाट' किंवा पर्वतमार्ग बरेच आहेत. त्यांत सत्तरीच्या उत्तरेकडील 'रामघाट' 'प्रवरघाट' व 'अणेघाट' आणि पूर्वेकडील केळघाट, त्याचप्रमाणें सांगेच्या पूर्वेकडील तिनई, दिघी, कुंडल व दोकरणें हे घाट महत्त्वाचे होत. आगगाडया व बोटी चालूं लागण्यापूर्वी देशावरील बहुतेक मालाची आयात–निर्यात बैलांवर गोण्या घालून याच पायरस्त्यांतून होत असे व थोडीशी अद्याप होत आहे.

५ जलवर्णनः—गोमंतकांतील सर्व तालुके, सरितासंपन्न नसले तरी सरितास्पर्शी आहेत. गोमंतकाची अर्थात् पेडणें तालुक्याचीही उत्तरसीमा 'तेरेखोल' संज्ञक नदी आहे, हें मागें आलेंच आहे. पेडणेंची दक्षिण सीमा व सांखळीं बारदेशची उत्तर सीमा कोलवालच्या नदीनें बनली आहे. प्रायः समांतर अशा या उभय नद्यांचा उगम सावंतवाडी संस्थानांतील अनुक्रमें बांदें व मणेरी या गांवाजवळच्या सह्याद्रीच्या भागांत होतो व त्या ईशान्य नैऋत्य दिशेनें वाहात आरबी समुद्रास मिळतात. बेतूलखाडी किंवा मिठाची नदी ही सासष्टींतील वरेण्य म्हणजे वेर्णें गांवांत उगम पावते व उत्तर दक्षिण गतीनें सबंध तालुका आक्रमून केपें तालुक्यांत बेतूल गांवाजवळ आरबी समुद्रास मिळते. या तिन्ही नद्यांची लांबी १२–१२ मैल धरतां येते. काणकोणच्या दक्षिणार्धांत तळपदी व गालजीबाग अशा दोन समांतर प्रायः पूर्वपश्चिमवाहिनी लहानशा नद्या आहेत. पण सर्व दृष्टींनीं वर्णनीय नद्या म्हणजे गोमती किंवा मांडवी आणि अघनाशिनी, आगशी अगर जुवारी याच दोन होत. पहिलीचा उगम दूधसागर डोंगरांतल्या भीमगडाजवळ आणि दुसरीचा त्याच्या दक्षिणेस दिघी घाटाजवळ होतो. उभयतांचीं पात्रें मुखांच्या किंचित आधीपर्यंत जवळ जवळ समांतर असून तेथपर्यंत प्रवाहांची गति साधारणतः आग्नेयीकडून वायव्येकडे आहे. उभयतांची लांबी ३५–३५ मैलांवर धरणारे लोक आहेत. पण तिसांत कमी कोणीच मानीत नाहीं. उभयतांचे पूर्वप्रवाह सांगेचे तीन भाग पाडतात, मध्यप्रवाह फोंडें तालुका पोटांत घेऊन कुंभारजुवेच्या कालव्याच्या किंवा मडकईच्या नदीच्या रूपानें परस्परांच्या खांद्यावर हात ठेवतात आणि उत्तरप्रवाह 'गोमंत द्वीपाचे' अथवा गोवा बेटाचे अनुक्रमें उत्तर दक्षिण कांठ भिजवून त्याच्या पश्चिमेस समुद्राच्या सान्निध्यांत एकमेकांच्या तोंडांत तोंड घालतात. अघनाशिनीस 'कुंडल' घाटांत उगम पावणारी 'कुशावती' नदी तिच्या डाव्या कांठानें मिळते. आणि, 'महादायी' व 'वाळवंट' या अनुक्रमें रामघाट व केळघाट ओलांडणाऱ्या नद्या मांडवींत उजव्या किनाऱ्यानें आपलें पाणी ओततात. या पांच नद्यांचा अप्रत्यक्ष किंवा पर्यायसंगम साखळी तालुक्यांतील 'नार्वे' गांवाजवळ झाला आहे असें मानतात. आणि त्याला 'पंचगंगा' हें नांव देऊन भाविक लोक मुख्यतः श्रीकृष्णाष्टमीच्या दिवशीं तेथें तीर्थस्नान करतात.

६. मांडवीला उत्तरप्रवाहाजवळ कित्येक वळणदार फाटे फुटले असून मांडवी–जुवारीच्या या सुंदर सरिताजलानें गोमंतद्वीपाप्रमाणें 'दीपावती' 'वादीवाडी' 'चूडामणी' अथवा 'चोडण' 'जुळें' 'खोरजुळें' 'कुलालद्वीप' अगर 'कुंभारजुळें' आद्य करून ११ बेटांच्या द्वीपसमूहाला वेष्टिलेलें आहे. गोमंतद्वीपाची पूर्वपश्चिम लांबी ९ व दक्षिणोत्तर रुंदी ६ मैल असून परिघ २५ मैल आहे. या बेटांत ३० वाडचा किंवा छोटीं गांवें असल्यावरून त्याला 'तिसवाडी बेट' असें संबोधण्यांत येतें.

७. गोमंतकांत नांव घेण्यासारखीं विस्तीर्ण तळीं नाहींत. तथापि तिसवाडींत 'चिंबल' गांवचें तळें उंचवटयावर असून पाणी पेय असल्यानें आणि 'करमळी' गांवचें तळें बरेंच मोठें असल्यानें उल्लेख

नीय आहेत. "चुकला फकीर मशीदींत" या अर्थाची "हरवलें गुरूं करमळीच्या नळयांत" ही म्हणही गोवाभर प्रचलित आहे.

८. हवामानः—हा प्रदेश समुद्राच्या कांठचा असल्यानें त्याची हवा साधारण उष्ण व सम आहे. किमान–कमाल उष्णतामानाचे आंकडे अनुक्रमें ६९ व ९१ अंश (फारेन्हैट) आहेत. किमान उष्णता डिसेंबरांत आणि कमाल मेंत असते. जूनच्या मध्यापासून आक्टोबरच्या मध्यापर्यंत चार महिने पाऊस पडतो. तथापि त्याचा भर असा पहिल्या अडीच महिन्यांतच असतो. सरासरीनें प्रतिवर्षी ११० इंच पाऊस होतो. सरासरी उष्णतामान जें ८० तेंच पावसाळयांत सामान्यतः आढळतें. पण कधीं कधीं ऑगस्ट–सप्टेंबरांत ९० अंशावरही पारा चढतो. हवा ओलसर असल्यानें उकाडा फार होत नसला तरी उन्हाळयांत घाम फार येतो व या काळांत लोक थोडयाशा श्रमानेंही थकून जातात.

९. वनस्पतिः—नारळ, सुपारी, आंबा, काजू, फणस, पपनस, अननस, केळें, पेरू, जांभूळ, भिरंड, नारिंग इत्यादि वृक्षफळें, काकडी, कलिंगड, चिबूड इत्यादि वेलफळें, तांदूळ, कुळीद, उडीद, तीळ, तूर, नाचणा, वरी, पाखल इत्यादि कडधान्यें; कांदा, लसूण, सुरण, रताळें, मुळे इत्यादि कंद; भेंडे, दोडकीं, वाळू, गोळ इत्यादि भाजीपाले, जाई, जुई, मोगरा, नागचाफा, कुडचांफा, भुईचाफा, सोनचांफा, इत्यादि चंपक, पारिजातक वगैरे सुवासिक फुलें यांचें पीक गोमांतकांत पुष्कळ येतें. तथापि स्थानिक लोकांच्या वापरास पुरें पडून परत्र विक्रीस पाठवतां येण्याइतकें विपुल पीक प्रथमोच्चारित ७–८ फळांचेंच काय तें आधिक्यानुक्रमानें असतें. जें फळ गोमांतकांत पिकतें त्याची रुचींत तोड करणारें तेंच फळ जगांत अन्यत्र सांपडणें क्वचितच शक्य असतें. तिसवाडींतील 'मालकॉराद'–अपभ्रष्ट 'माणखूर' –म्हणजे 'अपक्व–रंगीत' आंबे हे तर जगप्रसिद्ध आहेतच. बारदेशांतील मइडें गांवचीं 'मैंडोळी' केळीं हींही अप्रतिमच ठरतील. उसाची लागवडही गोव्यांत होते. पण त्यापासून निपजणारा गूळ फार थोडा असतो.

१०. समुद्र–किनाऱ्यालगतचा भाग सोडला तर गोव्याच्या इतर भागीं मधून मधून झाडी सांपडते. तथापि सरकारनें जंगल हें 'अभिधान' दिलें आहे त्याचें एकंदर क्षेत्रफळ शंभरावर चौरस मैल असून त्यांतील वृक्षसंख्या एका कोटीच्या वर आहे. त्यांत शिसा, साइल, बाभूळ, जांभळ, फणस, वगैरे, रानफणस, ओटंब इत्यादि कठीण व दीर्घजीवी इमारती लांकड देणारे आणि नागा, आसण; किनळ, सद्र, नागचाफा इत्यादि, तक्तपोशी, फरेंच भिंती वगैरेंनाच फक्त उपयोगी पडणारें लाकूड देणारे वृक्ष आहेत. परंतु त्यांची उत्पत्ति स्थानिक वापरास पुरण्याइतकी देखील होत नाहीं म्हंटलें तरी चालेल.

११. गोव्यांतील समुद्रांत व नद्यांत मीठ पुष्कळ सांपडतें आणि खाणींतून अशुद्ध लोखंड किंवा मांगानेज काढण्यांत येतें. हे दोन्ही जिन्नस बऱ्याच मोठ्या प्रमाणांत युरोपांत निर्गत होत असतात.

१२. प्राणीः—गोमंतकांत वाघ, चित्ते, गवे, अस्वलें व रानडुकरें हीं हिंस्र श्वापदें बरींच आढळतात. गाई, म्हशी, बकरीं, घोडे, इत्यादि पाळीव जनावरें जरी पुष्कळ दिसतात तरी त्यांची उत्पत्ति व स्थिति हीं येथें स्पृहणीय नाहींत. 'घरडुकर' हा प्राणी येथें बरा बळावतो. व ख्रिश्चन लोक गोमांसाइतकाच त्याच्याही मांसाचा उत्तम खाद्य म्हणून उपयोग करतात. भंग्याचें काम हा प्राणी उत्तम करीत असल्यानें गांवांत स्वच्छता राहण्याच्या दृष्टीनें तो उपयुक्त झाला आहे. कोंबडीं व बदकें यांची निपजही येथें चांगली होते. विषारी सर्प जंगलांत पुष्कळ असतात. पण कोंकणच्या इतर भागांप्रमाणें त्यांचा किंवा इतर जिवाणूंचा उपद्रव गोमंतकांत होत नसतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. खेडयांतून माकड व कांहीं जातीचे किडे हे भाती–शेतीचें बरेंच नुकसान करितात.

भूसंस्कृति

१३. बंदरें व शहरेंः—गोमंतकांतील मुख्य बंदर म्हणजे मुरगांव किंवा मार्मगोवा. तें आरबी समुद्रांतील मुरगांवच्या आखातांत जुवारी नदीच्या मुखाजवळ असून मलबार किनाऱ्यावरील चांगल्या बंदरांपैकीं एक आहे. केवढीही मोठी आगबोट थेट धक्क्यास टेकावी इतकी पाण्याची खोली आहे. धक्याची लांबी ८॥ शें फुटांहून अधिक असल्यानें ४।५ मोठाल्या आगबोटी त्याला एकदम लागूं शकतात. माल व प्रवासी घेऊन मुंबई ते मंगळूर व उलट आणि मुंबई, पूर्व आफ्रिकेंतील दरबान व उलट फेऱ्या करणाऱ्या आगबोटी काय त्या या बंदरास नियमितपणें लागत असतात. पहिल्या फेऱ्या बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन आणि दुसऱ्या ब्रिटिश स्टी. ने. कंपनी करीत असते. पहिल्या आठवडयांतून दोनदोनदां व दुसऱ्या, महिन्यांतून एकेकदां होत असतात. अनियमितपणें **फेऱ्या**

करणाऱ्या परराष्ट्रीय मालाच्या आगबोटींचा आंकडा या ४।५ वर्षांत १७५ पर्यंत येऊं लागला आहे. सन १९३१ सालीं येरझारा केलेल्या आगबोटींत ११५ इंग्लिश, १९ जर्मन, १६ इटालियन, ५ अमेरिकन, ३ जपान व बाकी इतर युरोपियन राष्ट्रांतल्या होत्या. पोर्तुगीज आगबोट एकादे-वर्षीं एकाददुसरी असते. याच वर्षीं या आगबोटींतून सुमारें १। लक्ष टन वजनाचा माल आला व ३॥। टनांचा परदेशीं गेला.या मालांत गोव्यापेक्षां ब्रिटिश हिंदुस्थानांतून मुरगांवला रेल्वेनें आला-गेलेला मालच विशेष असतो. या बंदराजवळच 'वास्कोडगामा' नांवाचें मुरगांव तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. गोव्यांतील रेल्वेचें मुख्य ठिकाण किंवा कार्यालय याच्याच दरम्यान आहे. तेथें 'बर्मा ऑईल' व 'स्टँडर्ड ऑईल' कंपन्यांचे केरोसिनचे डबे तयार करण्याचे कारखाने आहेत. रेल्वेचें एक हायस्कूलही आहे. ब्रिटिश सरकारचा गोव्यांतला वकीलही तेथेंच राहातो. इत्यादि कारणांमुळें तें ठिकाण भरभराटींत असल्यानें सरकारनें त्याला सन १९१९ पासून कायदेशीर रीत्या 'शहरा' च्या दर्जास चढविलें असून नगर-रचनेचें काम एका स्वतंत्र मंडळाकडे सोपविलें आहे. तथापि अद्याप त्याची स्थिर लोकवस्ती ५ हजारांवर गेलेली नाहीं.

१४. नवीन गोवें किंवा पणजी:— हें गोव्यांतील दुसरें बंदर असून पोर्तुगीज हिंदुस्थानची (पुढें राज्यव्यवस्था पहा) राजधानी आहे. हें शहर गोवा बेटाच्या वायव्येस समुद्राजवळ मांडवी नदीच्या डाव्या कांठावर वसलें आहे. बंदराची खोली सुकतीच्या वेळीं २० फूट असते. बॉ. स्टी. ने. आणि 'आमची आगबोट' या दोन कंपन्यांच्या आगबोटी प्रवासी व किरकोळ व्यापारी जिनसा घेऊन मुंबई ते पणजी व उलट फेऱ्या करीत असतात. पहिलीच्या आगबोटी दररोज एकदां व दुसरीच्या आठवड्यांतून दोनदां येरझारा करीत असतात. पण जून ते ऑगस्ट या तिमाहींत बंदराच्या तोंडावर वाळूचे ढीग जमत असल्यानें व वादळही उद्भवत असल्यानें आगबोटींची रहदारी बंद असते. शहराची स्थायी लोकवस्ती १० हजारांजवळ असून तेथें विद्युत्प्रकाश, सिनेमा इत्यादि आधुनिक सुखसोई अंमलांत आलेल्या आहेत. आज शहरांत राजवाडा, न्यायालय, बागेनें युक्त म्युनिसिपल-गृह, 'लिसेव सेंत्राल' नांवाची पाठशाळा, मिझॅर कोर्दीचें कार्यालय, ख्रिस्ती धर्माधिकाऱ्याचा बंगला, वैद्यक पाठशाळा व रुग्णालय इत्यादि एकमजली व दुमजली टुमदार इमारती असल्यानें आणि एका बाजूस पठार व दुसऱ्या बाजूस किनारा असल्यानें हें छोटें शहर सुंदर दिसतें. हल्लीं ज्याला 'जुनें गोवें' म्हणतात त्याला पूर्वीं नुसतें 'गोवें' म्हणत. व तेंच गोमंतकाची राजधानी असे. त्यावेळीं पणजी म्हणजे कोळी लोकांचा एक वाडा होता. तेथील किल्ला मात्र गोवें शहराच्या दृष्टीनें महत्त्वाचा होता. पण १८ व्या शतकाच्या मध्यास शहरांत दोषी तापाची साथ उद्भवली व ती कित्येक वर्षें तशीच चालू राहिली. तेव्हां राजधानी हळूहळू हलवून सन १८०३ त पणजीस आणिली. त्या वेळेपासून मूळच्या गोव्यास 'जुनें गोवें' व 'पणजी' स नवीन गोवें अशीं नांवें प्रचारांत आलीं. त्या दोन्ही बंदरांत परप्रांतांतून उतरणाऱ्या लोकांची जशी जकातविषयक तपासणी होते तशीच आरोग्यविषयकही होत असते. वापराच्या सामानसुमानास जंतुनाशक धूर द्यावा लागतो व सांसर्गिक रोगग्रस्त मनुष्यास आठवडाभर क्वारंटाइनमध्यें राहावें लागतें. ही तपासणी भयंकर असते अशी भलती कंडी परत्र पसरलेली असते. पण तींत सत्यांश क्वचितच असतो.

१५. कायद्याच्या दृष्टीनें ज्यांना शहरें म्हणण्यांत येतें तीं उपरिवर्णित दोनच होत. 'मडगांव' व 'म्हापसें' यांना सरकार 'उपनगरें' म्हणून संबोधतें. पण सरकारी वरिष्ठाधिकाऱ्यांच्या वास्तव्याचा मुद्दा सोडला तर अन्य दृष्टीनीं तीं नवीन गोव्याहून फारशीं कमी महत्त्वाचीं नाहींत. उलट 'कुडचडें' किंवा 'सांवर्डें' याला सरकारनें सन १९१९ पासून उपनगराचा दर्जा दिला आहे. पण तें त्या नांवास अद्याप पात्र झालेलें नाहीं.

१६. मडगांव किंवा 'मटग्राम' अथवा 'मारगांव' हें सासष्टी तालुक्याच्या मध्यास असून त्याचें मुख्य ठिकाण आहे. त्याची स्थिर लोकवस्ती पणजीहून किंचित् अधिक म्हणजे १० हजारांवर आहे. 'मिठाची नदी' या गांवास भेदून जाते. पण असलेलें बंदर फार लहान आहे. परंतु रेल्वेचें स्टेशन असल्यामुळें आजला हें व्यापारी दृष्ट्या गोव्यांतील प्रमुख स्थळ बनलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बंगला पद्धतीच्या सुंदर इमारती, ख्रिस्ती लोकांची 'ओस्पीसियु' संज्ञक अनाथ साहाय्यक संस्था व तिचीं रुग्णालयें, ७ हजारांजवळ ग्रंथसंग्रह असणारें सारस्वत ब्राह्मण समाजाचें वाचनालय, तीन शाखांत मिळून ५०० विद्यार्थ्यांचें मराठी प्राथमिक शिक्षण करणारें

मठग्रामस्थ हिंदु सभेचें श्री दामोदर विद्यालय व भुवन नांवाचें थिएटर इत्यादींमुळें आणि गांवांतील हिंदु लोकांच्या सार्वजनिक कामाच्या हौशीमुळें हें शहर आज परठिकाणीं विशेष परिचित झालें आहे.

१७. म्हापसें:—हें बारदेश तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथें रेल्वे नाहीं. आणि मांडवीच्या एका फाटयावर जें बंदर आहे तेंही विशेषसें सोईस्कर नाहीं. तथापि तेथें व्यापारी घडामोड बरीच असते. लोकवस्ती ८ हजारांजवळ असून शहर प्रेक्षणीय आहे.

१८. कुडचडें:— हें रेल्वे स्टेशन असून जुवारी नदीवरील डाव्या कांठचें गांव आहे. बंदरास धक्का बांधला असून पणजीच्या फेरी बोटी दैनिक येरझारा करीत असतात. याची रचना करण्याचें काम मुरगांव–शहर सुधारणा–मंडळाकडेच सोपवण्यांत आलेलें आहे. लोकवस्ती १॥ हजारावर.

१९. बेतूल:—हें मुरगांव बंदराच्या दक्षिणेस मिठाच्या नदीच्या डाव्या कांठीं आणि शापोरा हें नवीन गोव्याच्या उत्तरेस कोलवालच्या नदीच्या डाव्याच कांठीं, अशीं, आणखी समुद्रकिनाऱ्यालगतचीं बंदरें आहेत. त्यांची खोली १८ फुटांच्या वर आहे. पण तेथें आगबोटी लावण्याच्या सोई झाल्या नाहींत व झाल्या तरी परराष्ट्रीय व्यापारी हालचालीच्या दृष्टीनें त्या फायदेशीर व्हावयाच्या नाहींत. तथापि शिडाचीं मोठीं जहाजें तेथें वरवा करूं शकतात.

२०. आंतर्प्रान्तीय जलमार्ग:— भूप्रकृति व मनुष्यकृत संस्कार यांहींकरून बनलेले, लहानमोठ्या नावा चालवतां येण्याजोगे जे जलमार्ग गोव्यांतील एकंदर नद्यांत मिळून सांपडतात त्यांची लांबी १२५ मैल भरते. स्थूल मानानें सांगावयाचें तर एकंदर जलमार्गाचे दोन चतुर्थांश मांडवी व तिचे फाटे, एक चतुर्थांश जुवारी आणि राहिला एक चतुर्थांश इतर सर्व नद्या या प्रमाणांत आढळतात. या मार्गांनीं होड्या व शिडाचीं जहाजें प्रसंगोपात्त ये-जा करतातच. पण नियमित वेळीं व नियमित स्थळीं येणाऱ्याजाणाऱ्या वाफेच्या छोट्या बोटी (किंवा व्हापोर) सरकारनें ठेवलेल्या आहेत. त्यांचें मध्यवर्ति ठिकाण पणजी आहे. तेथून त्या, पणजी—पिळगांव—वळवई, पणजी—कुडचडें, पणजी–हळदोणें व पणजी–मुरगांव या चार फेऱ्या उलट सुलट करीत असतात. पहिल्या तीन फेऱ्या रोजीं एकेकदां वर्षभर होतात. चौथी रोजीं दोनदोनदां होते, पण ती पावसाळ्यांत बंद असते. या शिवाय दर तासास एकदां पणजी–वगैरेंच्या सफरीही होत असतात. त्या तिसवाडी व बारदेशतालुके जोडणाऱ्या तरीच्या फेऱ्याच समजणें युक्त होईल.

२१. कालवे:— बारदेशांतील थिवीं गांवाजवळ कोलवालच्या नदीस बांध लावून एक व केपें तालुक्यांतील कुसमण गांवाजवळ कुशावती नदीस बांध घालून दुसरा याप्रमाणें दोन कालवेही गोमंतकांत काढलेले आहेत. पण ते वाहतुकक्षम नसून केवळ शेतीस उपयोगी पडणारे आहेत. त्यांना अनुक्रमें 'थिवींचा' व 'पारोडेंचा' अशीं नांवें आहेत. मागें उल्लेखिलेल्या चिंबलच्या तळ्यापासूनही एक भूमिगत कालवा काढून त्यानें पणजी शहरास पेय पाण्याचा पुरवठा केला आहे.

२२. लोहमार्ग किंवा रेल्वे:—गोव्यांत रेल्वेचा एकच फाटा असून तो त्याच्या मध्यभागांतून साधारण मानानें पूर्व–पश्चिम दिशेनें मोठमोठीं वळणें घेऊन 'लोंढा' जंक्शनपासून मुरगांव बंदरापर्यंत गेलेला आहे. रस्ता 'मीटर–गेज' आहे. गोव्याच्या पूर्वसीमेपासून ६॥ मैल अंतरावर असलेलें 'दूधसागर' हें त्या फाटयाचें पहिलें गोमंतकीय स्टेशन होय. पुढें, सोनावळी, कुळें, कालें, कुडचडें, चांदर, मडगांव, माजोर्डा, कांसावली, दाभोळी, वास्को व मुरगांव बंदर याप्रमाणें ११ व एकंदर १२ स्टेशनें आहेत. लोंढा व दूधसागर यांच्यामध्यें असणाऱ्या कॅसलरॉक स्टेशनावर ब्रिटिश, आणि कुळें स्टेशनवर पोर्तुगीज सरकारचीं जकात नाकीं आहेत. कुळें स्टेशनवर मुरगांव व पणजी बंदरासारखीं जकातविषयक तपासणीप्रमाणें आरोग्यविषयक तपासणीही होत असते. कुळें ते कॅसलरॉक रस्ता १०।१२ बोगदे पोखरून व ३।४ लहानसे पण बऱ्याच उंचीवर असणारे पूल बांधून काढलेला आहे. गोव्यांतून रोज सकाळीं एक मेल व संध्याकाळीं एक मिक्स्ड गाडी जात असते; आणि सकाळीं एक मिक्स्ड व संध्याकाळीं एक मेल गोव्यांत येत असते. मुरगांव बंदरची सुधारणा केली व तें आगगाडीच्या रस्त्यानें ब्रिटिश हिंदुस्थानांतील व्यापारी पेठांशीं निगडित केलें तर गोमंतकाची सांपत्तिक सुधारणा होईल व मुंबई शहराशीं स्पर्धा करणारें एक शहर पोर्तुगीज साम्राज्यांतही असल्याचा अभिमान वाहतां येईल अशा विचारानें पोर्तुगाल सरकारनें इंग्लंडांतील भांडवलवाल्यांस हीं कामें हातांत घेण्यास सुचविलें. त्याप्रमाणें त्यांनीं W.I.P. म्हणजे 'पश्चिम हिंदुस्थान पोर्तुगीज रेल्वे' आणि 'सदर्न मराठा रेल्वे'

अशा दोन कंपन्या स्थापना केल्या; पहिलीनें गोव्यांत व दुसरीनें ब्रिटिश हद्दींत रेल्वे बांधाव्या असें ठरलें. तदनुसार पहिलीनें १ कोटी ८ लक्ष रुपयांचें भांडवल उभारून सन १८८०साली कामास प्रारंभ केला. पण भांडवल अपुरें पडून तें आणखी सुमारें ।।। कोटी रुपयांनीं वाढवावें लागलें आणि १८८० सालीं मुरगांव बंदर व संकल्पित रेल्वे हीं बांधून पुरी केलीं.सुरवातीस दोन्हींचें उत्पन्न पोर्तुगीज सरकार घेई व कंपनीस ठरलेलें व्याज देई. पण ब्रिटिश हिंदुस्थानांतील मद्रास रेल्वे कंपनीनें वाहतुकीचे दर कमी केल्यामुळें प. हिं. पो. रेल्वेचें उत्पन्न व्याज फेडण्याइतकें देखील येईनासें झालें. आणि सदर्न मराठा कंपनीसही फायदा राहिनासा झाला. तेव्हां तिन्ही कंपन्या 'मद्रास व सदर्न मराठा रेल्वे' या नांवानें एकत्रित करण्याची कल्पना निघाली. व ही सन १९०२ सालीं अंमलांतही आली.त्या वेळेपासून पोर्तुगीज रेल्वेचें व मुरगांव बंदरचें उत्पन्न या एकत्रित कंपनीनें, पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं, परस्पर वसूल करावें आणि पोर्तुगाल सरकारनें द्यावयाचें व्याज वजा करून शिल्लक उरणारी रक्कम त्याच्या हवालीं करावी असें ठरलें. तथापि १९२६ सालापर्यंत व्याजाची फेड होण्यास जरूर तितकें उत्पन्न येऊं शकलें नाहीं. त्याच्या पुढल्या वर्षीं मात्र व्याजाचे १०।। लाख व वसुलीदेखरेखीचा खर्चवेंच वजा करून अर्धलाख रुपयांजवळ नफा राहिला व तदनंतर तो वाढत जात आहे.

२३. सडका:––गोव्यांतील मुख्य सडकांचे दोन वर्ग पडतात. सरकारी व म्युनिसिपल. पहिल्या वर्गांतील सडकांची लांबी २०० मैलांच्या जवळ असून दुसऱ्यांतल्यांची ३५० मैलांच्या वर आहे. गोमंतकाच्या पश्चिम भागांतून समुद्रकिनाऱ्याशीं प्रायः समांतर राहून पेडणेच्या उत्तरेपासून काणकोणच्या दक्षिणेपर्यंत जाणारी सडक ही प्रमुख असून बाकी बहुतेक सडका म्हणजे तिला फुटलेले फाटे होत, अशी कल्पना केल्यास चालेल. ही सडक उत्तरदक्षिण दिशेनें आक्रमित असतां कोलवाळची, मांडवी, जुवारी, तळपदी आणि गालजिबागची अशा ५ नद्या तरींनीं ओलांडाव्या लागतात. मांडवीवरील तरीसाठी फेरीबोटी असून त्या तासीं एकेकदां जात येत असतात. ही सडक आक्रमण करतांना पेडणें, म्हापसें,पणजी, मडगांव व नगर्से हे अनुक्रमें पेडणें, बारदेश, तिसवाडी, सासष्टी व काणकोण या तालुक्यांचे कसबे लागत असतात.

२४. या सडकेला बारदेशच्या उत्तर भागांतील कुंचेली गांवाजवळ १ला फाटा फुटला असून तो पश्चिम–पूर्व रोखानें डिचोली, सांखळी व वाळपई या मोठ्या गांवावरून थेट केळघाटाला जातो. तिचा २ रा मोठा फाटा म्हणजे पणजींतून फुटलेला.तो गोवा बेटाच्या उत्तर भागांतून पश्चिम-पूर्व दिशेनेंच तिनई घाटावरून ब्रिटिश हद्दींत जातो. वाटेंत जुनें गोवें व फोंडें हीं प्रेक्षणीय स्थळें लागतात. भाणस्तार, खांडेपार, कुळें येथें पूल बांधून हा रस्ता तरींच्या त्रासापासून मुक्त करण्यांत आला असल्यानें व त्यावरून मोटारींच्या नियमित दैनिक येरझारा चालू झाल्या असल्यानें,आगगाडी व आगबोट या ब्रिटिश हद्दींतून गोव्यांत यावयाच्या दोन मोठ्या भर रहदारीच्या मार्गांप्रमाणें मोटारीचा हा तिसरा रहदारीचा मार्ग बनला आहे. ३ रा फाटा मडगांवहून फुटला आहे. तो दक्षिणोत्तर दिशेनें बोरीच्या पुलानें जाऊन वरील मोटारमार्गाला फोंडें गांवाजवळ मिळतो. ४ था फाटाही मडगांवहून फुटला असून तो वायव्य–ईशान्य दिशेनें केपें कसब्याला जातो; तेथून तो केपेंच्या पुलावरून सांगें कसब्याला जातो. ५ वा फाटा नगर्से कसब्याजवळून निघतो व नैऋत्य ईशान्य दिशेनें जाऊन मडगांव केपेंच्या रस्त्याला मिळतो. या सर्व सरकारी व त्यांत साधणाऱ्या इतर म्युनिसिपल रस्त्यांवरून मोटारींची रहदारी चालू असून तूर्तास त्यांचा आंकडा ५०० च्यावर पोंचला आहे.

२५.एरोड्रोम–मुरगांव बंदराजवळ एक विस्तृत डोंगरसपाटी आहे. तेथें विमानें उतरून घेण्याची सोय करण्यांत आली असून तीं ठेवण्यासाठीं घराचीही व्यवस्था झाली आहे. गोव्यांत पहिलें विमान १९ नोव्हेंबर १९३० बुधवार रोजीं आलें. तें जर्मन कारागिरीचें होतें. पण वैमानिक पोर्तुगीज होते. त्याचें नांव (Marao) (वैमानिकांच्या जिल्हयांतील एक पर्वत) असें असून सरकारनें सार्वजनिक वर्गणी काढून विकत घेऊन येथेंच ठेविलें आहे. त्यांत वैमानिकांसह दोघांना बसतां येतें. दर पाव तासास ५ रुपये दर घेऊन त्यांत उड्डाणेच्छूला बसण्याची व्यवस्था आहे. मात्र उड्डाणाचा दिवस अगोदर निश्चित करावा लागतो.

प्रेक्षणीय स्थळें व सृष्टिसौन्दर्य

२६.पणजी, मुरगाव, मडगांव इत्यादि प्रेक्षणीय स्थळांची माहिती मागें आलीच आहे. इतरांची संक्षेपतः खालीं देण्यांत येत आहे.

(१) जुनें गोवें:—हें मांडवी नदीच्या डाव्या कांठचें बंदर १५व्या शतकाच्या चतुर्थ चरणापासून फार मोठें शहर बनलें होतें. कारण प्रथम देवगिरीचे यादव आणि नंतर विजयनगरचें राज्य व मोंगल सुलतान यांच्या कारकीर्दींत तें गोव्याची राजधानी होतें.त्या काळीं 'गोवें' या अभिधानाखालीं येणारा प्रदेशही आतांच्यापेक्षां पुष्कळ विस्तीर्ण होता. (पुढें इतिहास पाहा.) पोर्तुगीज लोक आल्यावेळचीं शहरची लोकवस्ती ४।५ लाखांच्या दरम्यान होती. त्या काळीं सर्व युरोपियन राष्ट्रांत पोर्तुगाल अधिक भरभराटलेला होता. अर्थात् त्याची राजधानी जें लिस्बन तें सर्व युरोपियन शहरांत अधिक वैभवसंपन्न होतें. तथापि तें देखील गोव्याहून हिणकस ठरे. असें Quem Viu Goa Nao Tem Que Ver Lisboa म्हणजे "ज्यानें पाहिलें 'गोअ त्यानें पाहूं नय लिस्बोअ' अशा अर्थाची जी म्हण आहे तिच्यावरून दिसून येतें. येथें राज्य कमावण्याची पोर्तुगीज लोकांची हाव जी बळावली त्याचें एक कारणहि गोवें शहराचें वैभवच होय. तें पोर्तुगीजांनीं सन १५१० मध्यें काबीज केल्यावर त्याच्या मूल संपन्नतेंत भरच पडत राहिली हें जरी खरें, तरी थोडयाच काळांत, मुख्यतः १५६५ त विजयनगरचें साम्राज्य नष्ट होऊन त्याच्याशीं चाललेला प्रचंड व्यापार बुडाल्यामुळें व नंतर त्यांनीं प्रजाजनांवर केलेल्या अनन्वित धार्मिक जुलुमांमुळें, (पुढें इतिहास पहा) तिला ओहोटी लागली. तथापि १८ व्या शतकाच्या मध्यपर्यंत त्यांनीं हचाचें महत्त्व कसेंबसें राखून ठेवलें. परंतु दुर्दैवानें या समयास तेथें दोषी तापाची भयंकर सांथ उद्‌भवली व ती कित्येक वर्षें जीव धरून राहिली. त्यामुळें १८ व्या शतकाच्या अंत्य चरणांत कांहीं वडे अधिकारी पणजीस राहूं लागले व सन १८०३ मध्यें सर्व राजधानी पणजीस नेण्यांत आली. आज जुनें गोवें हें बंदर गाळानें पुरलें आहे व गांव मृतप्राय झालें आहे. पण शहराभोंवतालच्या अवाढव्य तटाच्या भिंती, रुंद रुंद रस्त्यांची व्यवस्थित आंखणी, मोठमोठ्या इमल्यांचे चबुतरे वगैरेंचे जे अवशेष दिसून येतात ते आणि पोर्तुगीज पावलीश्तांनीं बांधलेले टोलेजंग व कलाकौशल्ययुक्त Conventos म्हणजे मठ आणि भव्य वाडे हे अद्याप त्याच्या वैभवाची उत्तम साक्ष देतात. बंदरांत उतरतांक्षणींच समोरच्या प्रवेशद्वारावर Areo Bosvicereis म्हणचे 'राजप्रतिनिधींची कमान' दिसून येतें.तिच्या मध्यास आफोंसु दॅ आलवुकर्कचें चित्र कोरलें असून तें व कमानीचा झोंक हीं प्रेक्षणीय आहेत.आंत गेल्यावर रोमच्या 'सेंट पीटर पॅलेस'च्या धर्तीवर बांधलेला 'सां कायतातु' मठ लागतो. त्यांत आजवरच्या राजप्रतिनिधींच्या उभ्या मनुष्यदेहाएवढचा रंगीत तसबिरा ठवल्या आहेत. 'सॅ पात्रियाकाल' हें मुख्य देवालय व त्याच्या बुरुजावरील मोठी घंटा हीं पाहाण्याजोगीं आहेत. 'सांफ्रांसीश्कु' नांव असलेल्या मठांत अनेक जुन्या मूर्ति आढळून येतात. पण खुद्द सेंट झेव्हियरचें शव मात्र 'बों झेजस' नांवाच्या मठांत राखून ठेवलेलें आहे. हें शव चार शतकांनंतरही न कुजतां सडतां अगदीं शाबूत आहे अशी भाविकांची समजत आहे. तें ज्या पेटींत घातलेलें असतें ती वर सांगितलेल्या मठांत टांगून ठेवलेली असते. अलीकडे सामान्यतः दर दहा दहा वर्षांनीं या पेटींतल्या अविच्छिन्न शवाचें प्रदर्शन मांडलें जात असतें. आणि त्याचें दर्शन घेण्यास जगांतील भाविक ख्रिस्ती व हिंदुस्थानांतील अन्यधर्मीयही तांडचा–तांडयांनीं लोटत असतात. प्रदर्शनास रोमहून पोपसाहेबांची अनुज्ञा आणावी लागते. सेंट झेव्हियर अद्यापहि चमत्कार दाखवितो व असाध्य रोग देखील बरे करतो असें अनेक लोक मानतात. गोवा सरकार, हंगामी व्यापारी व भोंदू यांना हें शवप्रदर्शन म्हणज द्रव्यसंपादनाची पर्वणी होय असें वाटतें व त्यामुळें दहां वर्षांपेक्षां कमी कालावधीनेंही तें भरविलें जातें. त्याच्या प्रेक्षकांचा आंकडा लाखांनीं मोजण्या एवढा होत असतो व भरलेली जत्रा पहात असतां गोवें शहर जुन्या काळीं कसें असावें याची थोडीशी कल्पना करतां यते. प्रदर्शन बहुशः डिसेंबरांत महिनाभर भरविलें जात असल्यानें नाताळच्या सुटीचा फायदा घेऊन दूरदूरच्या सरकारी कामदारांसही हजर राहाणें कठीण जात नाहीं. उपरिर्वणित ४।५ भव्य इमारतीच काय त्या आज मितीस शाबद राखलेल्या आहेत. पण 'राजप्रतिनिधि–प्रासाद' 'धर्मसमीक्षण सभागृह' दारूगोळ्याचें कोठार, वगरेंचे जे अवशष दिसून यतात त्यांवरून त्यांच्या प्रचंडपणाची कल्पना करतां येते. सुरक्षित असलेले मठ व वाडे तत्कालीन वास्तुविद्या, चित्रकला व खोदनकौशल्य यांच्या दृष्टीनें निःसंशय प्रक्षणीय आहेत.

(२). देवस्थानें:—पोर्तुगीजांनीं हिंदुस्थानांत मुलुखगिरी करण्याची सुरुवात १६ व्या शतकाच्या प्रारंभास केली खरी. पण जवळ जवळ दोन शतकें तसवाडी, बारदेश व मुरगांवसह सासष्टी या

तीन तालुक्यांतील आणखी सलंग प्रदेश त्यांच्या हातीं लागूं शकला नाहीं आणि हा जो लागला तेथें त्यांनीं नुसतें ऐकलें तरी देह कंपायमान करून सोडणारे, जे राक्षसी अत्याचार सतत २।२।। शें वर्षे केले त्यामुळें तो स्मशानवत् बनण्याच्या बेतास आला. (पुढें इतिहास पहा) या समयास सध्यांचा फोंडें तालुका, काहीं लोक समजतात त्याप्रमाणें इमोडी, सौंदेंचे सदाशिवराव राजे यांच्या सत्तेखालीं नसून आदिलशाहाच्या ताब्यांतच होता व तो पोर्तुगीजांच्या हातांत गेलेल्या तिन्ही तालुक्यांस संलग्न होता. त्यामुळें हिंदु लोकांनीं आदिलशाहीचा आसरा घेतला व जें काय हातीं सांपडलें तें काखेंत मारून देवांच्या प्रतिमा–लिंगासह ते फोंडें तालुक्यांत रहावयास गेले. आदिलशाहींतील गोमंतकीय हिंदु अधिकाऱ्यांनीं धीर व प्रोत्साहन दिल्यावरून तेथें घरांप्रमाणेंच आपलीं देवळेंही त्यांनीं उभीं केलीं. त्यांचा आंकडा आज ३० वर जात आहे. त्यामुळें फोंडें म्हणजे 'देवस्थानांचा प्रदेश' होऊन बसला आहे. मूळ भूमीच निसर्गरमणीय व जलमय,शांत. ठिकठिकाणीं छोटचा पण टुमदार व शोभिवंत देवालयांची उभारणी झाल्यामुळें प्रकृतिसौंदर्यांत संस्कृति सौन्दर्याची भर पडून ह्याची प्रेक्षणीयता दुणावली आहे. सर्व देवालयांची रचना सामान्यतः समान धर्तीची पण नयनमनोहर आहे. त्यांतल्यात्यांत सांगण्यासारखें विशेष म्हणजे श्रीमंगेशाचा घुमट, म्हाडदोळच्या श्रीमहाळसेचा सभामंडप, बांदोडयांतील श्रीमहालक्ष्मीचा चौक व श्रीनागेशाची तळी, कवळें येथील श्रीशांतादुर्गेचा दीपस्तंभ व शिरोडें येथील श्रीकामाक्षीचें स्थळ हे वाखाणणीचे विषय झाले आहेत. बहुतेक देवस्थानांतून अग्रशाळा बांधून महाजनांची व भजकांचीं राहण्यानिजण्याची सोय करण्यांत आलेली आहे. तथापि श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा या दोन संपत्तिमान देवालयांच्या अग्रशाळा 'मोठाल्या' म्हणण्याजोग्या आहेत. गोमंतकीय देवस्थानांतील स्वच्छता व टापटीप हीं हिंदुस्थानांत इतरत्र क्वचितच आढळून येतात असें अनेक प्रवासी सांगतात. फोंडें कसब्यांतून बांदोडें–म्हाडदोळला जातांना वाटेंत 'फर्मागुडी' नांवाचा छोटासा उंचवटा लागतो. त्यावरून दिसणारें दृश्य स्वतःच रम्य असतें. पण तें पहातांना कित्येक देवालयांचे शोभिवंत कळसही नजरेंत भरत असल्यानें आणि सकाळ संध्याकाळ सनईचौघडयांचे मधुर आलाप कानांत पडत असल्यानें या समयास–व विशेषतः नवरात्रांच्या दिवसांत तेथें पोंचणाऱ्या मनुष्यास नयनाल्हादाप्रमाणें श्रवणानंदाचें सुखही एकसमयावच्छेदें घेतां येत असतें!

२७. निसर्गशोभाः—गोमंतकाला 'महाराष्ट्राचें काश्मीर' अशी जी गौरवास्पद उपमा अनेक महाराष्ट्रीय प्रवासी देत आहेत त्यावरून हा सर्वच प्रदेश रमणीय आहे हें कळून येतेंच. तथापि त्यांतल्यात्यांत विशेष उठावदार किंवा मनावर खोल परिणाम करणारे जे देखावे आहेत त्यांचेंच तेवढें वर्णन व तेंही संक्षेपतः येथें देणें शक्य आहे. त्यांतले दोन म्हणजे दोन्ही मुख्य प्रवेशद्वारांवरचे होत. घाटमाथ्यावरून आगगाडीनें प्रवेश करतांना दुधसागरच्या आसपास पोंचल्यावर गोमंतकाची तरुण वनश्री, पाहुण्यास पाहून आनंदित होत्साती जणूं काय अल्लडपणानें स्वैर नाचूं लागली आहे असाच भास होत असतो. नभ व नग यांच्या संयोगरेषेनें आवळून धरून एकीकडे अस्मानी तर दुसरीकडे आरक्तपीत रंगाचा किनाऱ्याचा हिरवागार मखमाली गालिचा एकाद्या अँपिथिएटरवर जोरानें भिरकावून द्यावा त्यासारखी या वनराजीची उठवण असून दुधसागराच्या वळणदार प्रवाहप्लुति या त्या हिरव्या गालिच्यावर शुभ्ररंगी नक्षी वेलबुटीप्रमाणें शोभत असतात. उलट आगबोटीनें आंत शिरतांना एका बाजूस निळसर रंगाचा गंभीर व उदात्त सागर तर दुसऱ्या बाजूस तांबडसर रंगाच्या शुद्ध खादी कापडावर उभ्या ठेवलेल्या छत्रचामरांप्रमाणें नारिकेल व आम्रवृक्षांच्या कुठें पोपटी तर कुठें काळसर हिरव्या वर्णाच्या, लांबलांब समांतर पंक्ति सामोऱ्या असतात. मधून मधून वाऱ्याच्या झुळकेबरोबर नारळी वृक्षाच्या झावळ्या करीत असलेला जो घोष कर्णरंध्रांत शिरतो तो कोकीलकजनाप्रमाणेंच मंजूळ व चित्तवृत्ति उल्हसित करणारा असतो. हे उभय देखावे बहुधा नेहमीच सारखे असतात असें म्हटलें तर चालण्याजोगें आहे.

२८. तिसरा आल्हादकारक देखावा म्हणजे नार्वे तीर्थाकडे जातांना दिसणारा. त्या बाजूला जावयाची फेरी बोट पणजीहून बहुतकरून संध्याकाळच्या ४।। ला निघते. ती अर्ध्या तासाचें अंतर तोडते न तोडते तोंच मांडवी नदीला फुटलेले तीन फाटे एकदम दृष्टिपथांत येतात. पुढें बोट मधल्या म्हणजे नार्वेच्या (नैसर्गिक) कालव्यांत शिरून तितकीच वाट चालल्यावर डाव्या बाजूस 'चुडामणी' व उजव्या बाजूस 'दीपवती' हीं बेटें दिसूं लागतात.

लगेच बोट या बेटांमधन जात असतां समोर तिसरें 'वाशी' बेट आणि त्याला पोटांत घेण्यासाठीं त्याच सरितामातेनें स्वतःला पाडलेल्या दोन भेगा नजरेंत भरतात. ह्या व्यवस्थित रचनेकडे लक्ष दिलें असतां ती नैसर्गिक आहे कीं कृत्रिम आहे असा प्रश्न डोकावूं लागतो. आणि ती निसर्गसिद्धच आहे असें उत्तर मिळालें म्हणजे विश्वनिर्मात्याच्या कौशल्याविषयींचें मनांतील कुतूहल वृद्धिंगत होत असतें. या समयास अस्मानी शालू परिधान केलेली यौवनसंपन्न संध्यादेवी द्वीपकिनाऱ्यावरील हिरव्या वृक्षप्रणालीचा उठावदार कशिदा केलेल्या जल-परिवर्तित सूर्यकिरणांच्या सप्तरंगी रेशमी आसनावरुन उठून डौलानें मिरवीत मिरवीत जल-क्रीडेस जात आहे कीं काय असें वाटावयास लागतें!

२९. तथापि डोळ्यांची तहानभूक पूर्णांशानें शमविणारीं दृश्यें म्हणजे श्रीचंद्रेश्वर देवळाच्या घुमटावरुन व श्रीसिद्धनाथ डोंगराच्या शिखरावरुन दिसतात तींच होत. दोन्ही ठिकाणावरुन दिसणारे देखावे जवळ जवळ एकसारखेच असतात. फरक एवढाच कीं, चंद्रेश्वरावरून आगगाडी व आगबोटी दोन्ही दिसूं शकतात तर सिद्धनाथावरुन आगबोटीच काय त्या दिसूं शकतात. या देखाव्यांची हुबेहूब तर सोडाच पण सदृश अशीही प्रतिमा मनश्चक्षूंसमोर उभी करणारी उपमाच दुर्मिळ. काळ वेळ कोणतीही असो; पण साधारणतः आश्विनाचा किंवा चैत्राचा महिना आणि सकाळचे ६ ते ९ चा किंवा संध्याकाळचे ४ ते ७ चा समय असणें विशेष उपकारक. एके बाजूस धीरगंभीर समुद्र, दुसरे बाजूस गगनचुंबित सह्याद्रीची शिखरमालिका, समोर समांतर नद्यांचे गजगतीनें चालणारे प्रवाह, पुढें मांडवी जुवारीचें सुंदर सरिताजाल, तांबड्या जमिनीवर नारळी-पोफळींचे झुबकेबाज हिरवेगार बाग, त्यांत मधून मधून खळखळ वाहणारे शुभ्र उदकाचे झरे, सभोंवतीं पिकल्या शेतांचे सुवर्णरंगी मळे, कुठें कुठें फलपुष्पान्वित वृक्ष-वेलींचे बगीचे आणि वरून क्षितिजरेषेनें मर्यादलेला आकाशाचा घुमट इत्यादींचा छानदार संगम एकसमयावच्छेदें दृष्टींत भरूं लागला म्हणजे असलीं दृश्यें निर्माण करणाऱ्या परमेश्वराबद्दल तोंडांतून जसे धन्यवाद निघूं लागतात तद्वतच तीं पहाण्यास मनुष्यास सहस्राक्ष न बनवितां फक्त दोनच डोळे दिले याद्दल मनांत त्याचा किंचित् रागहि आल्याशिवाय रहात नाहीं !

व्युत्पत्ति

३० 'गोमंतक' हा शब्द बरेच जण 'गोमांतक' असा वापरतात. व त्याची दोन तीन प्रकारें व्युत्पत्ति लावू पाहतात. परशुरामानें पृथ्वी म्हणजे आर्यावर्त निःक्षत्रिय करुन ब्राम्हणांस दान दिल्यावर दिलेल्या भूमींत वास्तव्य करणें अनुचित वाटून तो सह्याद्रीच्या पश्चिम उतरणीवर आला व तेथून बाण मारुन त्यानें समुद्राच्या पोटांतून 'शूर्पारक' म्हणजे सुपाच्या आकाराचा प्रदेश बाहेर काढला. 'गौ' म्हणजे बाण; 'मा' म्हणजे मार. जेथें त्या माराचा अंत झाला तो गौमांत व 'क' हा लडिवाळपणाचा द्योतक किंवा स्वार्थक असा प्रत्यय अशी एक व्युत्पत्ति आहे. व तिच्यावरुन कैकजण गोव्याला परशुराम क्षेत्र असें लक्षणेनें संबोधतात. पण एक तर बाणानें समुद्राच्या पोटांतून भूमि हिसकावून काढणें ही कल्पना कल्पनाच मानावी लागते. व शिवाय महाभारतांत परशुराम क्षेत्रासच शूर्पारक म्हटलेलें असून तें हल्लींच्या ठाणें जिल्ह्यांत धरलें पाहिजे, असें श्री. चिंतामणराव वैद्यप्रभृति विद्वानांचें मत आहे. महाभारतादि संस्कृत ग्रंथांत 'गोमान्त' हें रूप न आढळतां 'गोमन्त' हेंच आढळतें. हाही मुद्दा लक्षांत घेतला पाहिजे. अर्थात् परशुरामानें बाण मारून भूमि उत्पन्न केली ही गोष्ट काव्यार्थानें जरी मान्य केली तरी ती भमि गोमंतक नव्हे आणि म्हणून गौ–मा–अन्न–कची ही व्युत्पत्ति व त्याला परशुराम क्षेत्र म्हणण्याची चालही अग्राह्य होय हें उघड आहे.

३१ कै. वि. का. राजवाडे यांनीं गोम–अन्नक अशी व्युत्पत्ति भारत–इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३३ च्या अहवालाच्या पृष्ट १५० वर दाखविली आहे. परंतु हा 'गोम' कोण, 'अन्नक' कोण, अन्नकानें गोमाचा वध केव्हां व कशास केला आणि या परस्पर शत्रूंचीं नांवें एकत्रित होऊन संयुक्त नांव प्रदेशाला पडण्यास त्यांची योग्यता काय होती वगैरेंचें विवरण कै. राजवाड्यांनीं केलेलें नाहीं. व करतां येईल असें अद्याप वाटत नाहीं म्हणून हीही व्युत्पत्ति त्याज्यच वाटते.

३२ तिसरी व्युत्पत्ति श्री. वामन रघुनाथ वर्दे वालावलीकर ऊर्फ शणै गोंयबाब मु॥ मुंबई या सूक्ष्मदृष्टि व सत्यप्रिय गोमंतकीय इतिहास संशोधकांनीं दिलेली. त्यांच्या मतें 'गो' म्हणजे गाय किंवा गुरू आणि मन्त म्हणजे युक्त. अर्थात् गुरांनीं भरलेला प्रदेश म्हणजे गोमन्त होय. सौंदर्य, प्रियत्व किंवा लघुत्व दाखविण्याकरितां नामाला 'क' हा

तद्धित प्रत्यय जोडण्याचा प्रघात संस्कृतांत आहे. उ. पुत्र–पुत्रक. गोव्याच्या शेजारीं असलेल्या अपरान्त व कर्णाट या प्रादेशिक नांवांनाही हा 'क' प्रत्यय लागून त्यांचीं अपरान्त क व कर्णाटक अशीं रूपें बनलेलीं आहेत. हें विद्वानांना ज्ञात आहेच. वास्तविक कोंकणपट्टी ही गुरांच्या संरक्षण–संवर्धनाला फारशी अनुरूप अशी भूमि नव्हे. तथापि त्यांतल्या त्यांत गोमंतकाचा भाग त्यांना अधिक पोषक आहे आणि त्यांची निपज व वाढ ही तेथें कोंकणाच्या इतर भागापेक्षां अधिक होत असतात हें पाहूनच प्राचीन काळीं तिकडे पोंचलेल्या आर्यांनीं त्याला गोमन्त हें मधुर नांव दिलें असावें. फॅर्नां व लॉपिश द कास्तांजेद या पोर्तुगीज इतिहासकारानें १५५२ सालीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतहि गोव्यांत कोंबडीं, बकरीं व म्हशी यांच्याबरोबर गुरेंही पुष्कळ आहेत, असें लिहिलें आहे. यावरून शणै गोंयबाब यांची व्युत्पत्ति स्वीकारणीय आहे असें वाटतें व म्हणून 'गोभान्तक' हा शब्द न वापरतां 'गोमन्तक' हाच वापरणें युक्त दिसतें.

३३.गोमंतकाला गोंवा किंवा गोवें असेंही म्हणतात हें प्रसिद्धच आहे. किंबहुना त्याचीं हीं शेवटचीं दोनच नांवें अधिक परिचित आहेत. त्याचें निरुक्त असें सांगण्यांत येतें कीं, प्राचीन काळीं येथें 'गोप' लोकांचें राज्य होतें. व ज्याला आज थोरलें गोवें म्हणतात तेथें त्यांची राजधानी होती. पुढें ११ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास जयकेशी कदंबानेंही हीच आपली राजधानी केली होती असें मशारनिल्हे श्री. बालावलीकर यांचें मत आहे. हें जुन्या गोव्यापासून जवळच आहे. पण आज तेथें राजधानीचे कांहींही अवशेष अर्थातच सांपडत नाहींत. गोपांची राजधानी म्हणून त्याला 'गोपत्तन' 'गोपकपट्टण' किंवा 'गोपपुरी' म्हणत. त्यांतील 'प'चा 'व' होऊन गोवपुरी किंवा पुरी हें स्थितिदर्शक सामान्यनाम असल्यानें तें गळून नुसतें 'गोंव' असें रूप बनलें. आणि त्यांतील अन्त्य ऱ्हस्व स्वर कांहींकडून दीर्घत्व पावून व अन्यत्राकडून एकारांत होऊन गोवा किंवा गोवें हे शब्द रूढ झाले. ही व्युत्पत्ति कोणास ग्राह्य वाटो वा न वाटो, इतकें मात्र निःसंशय कीं, गोवा किंवा गोअ हें कित्येक लोक मानतात त्याप्रमाणें पोर्तुगीजांनीं अपभ्रष्ट केलेलें गोमन्तक शब्दाचें रूप नव्हे.कारण विजयनगरच्या दुसऱ्या हरिहर रायाच्या सन १३९१ सालांतील ताम्रपटांत "गोवाभिधां कौंकण राजधानीम्" असा उल्लेख सांपडतो. त्यावरून गोवा हा शब्द पोर्तुगीजांच्या आगमनापूर्वी दोन अडीच शतकें तरी प्रचारांत होता हें उघड दिसतें.

इतिहास

३४ पोर्तुगीज पूर्व–उत्तरेस दमणगंगा व दक्षिणेस गंगावलि या नद्यांच्या मध्यें समाविष्ट होणाऱ्या सह्याद्रि व आरबी समुद्र यांच्यामधल्या पटटीला 'कोंकण' म्हणत असल्याचें सर्वश्रुतच आहे. या कोंकणपट्टीचे हल्लींच्या कुलाबा जिल्ह्यांतल्या कुंडलिका नदीचे जे दोन भाग पडतात त्यांतील उत्तरेकडच्यास उत्तर कोंकण व दक्षिणेकडच्यास दक्षिण कोंकण अशा संज्ञा देतात. उत्तर कोंकणास १४०० गांवांचें कोंकण असें सन १०९४ तल्या एका ताम्रपटांत आणि दक्षिण कोंकणास ९०० गांवांचें कोंकण असें शिवचित्त कदंबकालीन सन ११६० च्या एका कानडी शिलालेखांत म्हटलें आहे. प्राचीन काळीं उत्तर कोंकणांत 'शूर्पारक' 'सोपारा' किंवा हल्लींचें 'सुपारें' आणि दक्षिण कोंकणांत गोंवा हीं शहरें फार कीर्तिमान होतीं. त्यामुळें सबंध दक्षिण कोंकणास गोवें किंवा गोमन्त याच नांवांनीं संबोधीत असें दिसतें. 'गोवाभिधां कौंकण राजधानीम्' असा उल्लेख १३९१ तील एका ताम्रपटांत सांपडत असल्याचें वर सांगितलेंच आहे. पोर्तुगीज लोक आल्यावेळीं गोव्यांत किंचित् फेरफारानें तेवढा मुलूख सामावत होता, यांत शंका नाहीं. कारण धाकटें गोवें येथील किल्ल्यांत ता. ३० एप्रिल १५५५ रोजीं विजापूरचा आदिलशाही राजपुत्र अबदुल्ला व पोर्तुगीज व्हाईसरॉय पेद्रु दॆ मास्कारेंज यांच्यामध्यें जो करार झाला त्यांत गोवेंच्या अधिसत्तेखालीं हा बहुतेक सर्व मुलूख येत असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

३५. प्राचीन काळीं गोव्यांत सामावणारा मुलूख जसा आजच्याहून मोठा होता तद्वतच त्यांतील कित्येक तालुक्यांच्या किंवा महालांच्या मर्यादा व संज्ञाही भिन्न होत्या. आजच्या सांखळी तालुक्याच्या उत्तर भागास 'भतग्राम',फोंडें तालुक्याला 'अंत्रूज' व काणकोणास 'शिवेश्वर महाल' म्हणत असत. आज सांगें व केंपें या दोन तालुक्यांत अंतर्भूत होणाऱ्या प्रदेशाचे 'हेमाडबारशें' 'अष्टाग्रहार' 'काकोडें' 'चंद्रवाडी' व 'बाल्ली' असें पांच महाल धरीत व त्या सर्वांना मिळून 'पंचमहाल' किंवा 'जांबावलि' महाल असें नांव देत. आणि आज सासष्टींत मोडणारा तारोडें गांव चंद्रवाडींत गणीत.

३६. उपरिवर्णित दक्षिण कोंकणांत किंवा 'बृहद्गोमन्तकांत' इ. सनाच्या ८ व्या शतकाच्या मध्यापासून १५१०त पोर्तुगीजांनीं घेईपर्यंत शिलाहार कदंब, देवगिरीचे यादव, दिल्लीचे सुलतान बहामनी सुलतान, विजयनगरचे राय आणि पुनः बहामनी सुलतान व मग विजापूरचे आदिलशहा यांची अधिसत्ता चालत होती. या सर्व राजवंशांच्या कारकीर्दीत दक्षिण कोंकणाची राजधानी आतांच्या गोमंतकाच्या आवारांत, कांहीं काळ 'बलिपत्तन' म्हणजे हल्लींचें वाळ्ळी, कांहीं काळ चंद्रपुरी म्हणजे हल्लींचें चांदर आणि नंतर तिसवाडी बेटांतील थोरलें गोवें, धाकटें गोवें व जुनें गोवें येथें होती असें श्री. वामनराव वालावलीकर या उपरोच्चारित इतिहासज्ञाचें मत आहे. (पहा. "गोंयकारांची गोंयाभायली वसणूक" पैलें खंड) विजयनगरचे कोंकणांतील प्रतिहस्त म्हणजे सुभेदार किंवा गव्हर्नर गोवें शहरांतच राहात असत. आणि तें पोर्तुगीजानीं घेतलें नसतें तर यूसफ आदिलशहाच्या मनांत विजापूर सोडून गोवेंच आपल्या सर्व राज्याची राजधानी करण्याचें मनांत होतें. असें पोर्तुगीज बखरकारांनीं लिहून ठेविलें आहे. गोव्याचें महत्त्व जरी एवढें आहे तरी पोर्तुगिजांनीं घेण्यापूर्वीचा त्याचा इतिहास त्यावर राज्य केलेल्या राजवंशांच्या किंवा त्याच्या अधिसत्तेखालीं समग्र भूभागांच्या इतिहासाहून निराळा काढून लिहिणें फारच किचकटीचें काम आहे असें वाटतें.

३७. तथापि असें म्हणतां येण्यासारखें आहे कीं, शिलाहारानंतर इ. सनाच्या ११ व्या शतकापासून गोव्याची सत्ता जी कदंब वंशाच्या हातांत गेली ती देवगिरीचा महापराक्रमी राजा सिंघण याच्या कारकीर्दीपर्यंत राहिली होती. इ.स.१२१७ च्या सुमारास सिंघणानें कदंबाचें राज्य जिंकलें. त्याचा मायिदेव नांवाचा सरदार फारच हुषार होता, व सिंघणाला सम्राटपदाला पोंचविण्याला त्याचेंच पराक्रम पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले होते. पण हा मूळ गोमंतकीय असल्यानें आणि तेथील कदंब राजांचा चहाताहि असल्यानें सिंघणाचें हें कृत्य त्याला आवडलें नाहीं. तेव्हां तो त्याच्यापासून फुटून कदंबाची सत्ता पुनः स्थापित करण्याच्या प्रयत्नास लागला व एका तपावरच्या खटपटीनंतर यशस्वी झाला. १२३० च्या सुमारास त्यानें विष्णुचित्त कदंबाचा नातू त्रिभुवन मल्ल याला गोव्याच्या गादीवर बसविलें व स्वतः प्रधानपदावर आरूढ झाला. पण तो नंतर लगेच वारल्यामुळें सिंघणाचा सरदार बिचण यानें त्रिभुवन मल्लाला पदभ्रष्ट केलें. त्या वेळेपासून १२४७ पर्यंत गोवें यादवांच्या सत्तेंत प्रत्यक्ष राहिलें. परंतु याच वर्षी सिंघणाचा मृत्यू घडल्यानें त्रिभुवनमल्लाचा जांवई कामदेव यानें आपला मेहुणा २ रा षष्ठदेव कदंब याला गोव्याची गादी मिळवून दिली. तथापि थोडयाच अवधींत कदंब वंशाच्या सत्तेस जोराचा धक्का बसला. तो दुसरा षष्ठदेव जिवंत असतां बसला कीं वारल्यावर बसला हें निश्चित समजत नाहीं. पण तो सिंघणाचा नातू महादेवराव यादव याच्याकडून व १२७० च्या सुमारास असावा असें दिसतें. तथापि महादेवराव तदनंतर थोडयाच वर्षांनीं निधन पावला आणि त्याचा पुतण्या रामदेवराव यादव देवगिरीच्या सिंहासनावर आला. तेव्हां त्यानें गोंव्याचें राज्य कदंब वंशाच्या ताब्यांत दिलें. ही गोष्ट नक्की केव्हां घडली तें सांगणें कठीण. पण ती १२७७ च्या पूर्वीं असली पाहिजे यांत शंका नाहीं. पुढें सन १२९४ सालीं अल्लाउद्दीन खिलजीनें दक्षिण हिंदुस्थानावर स्वारी केली आणि नंतर १३१२ पर्यंतच्या कालांत आपला क्रूर सरदार मलिक कफर यास त्याच कार्याकरितां ४ खेपा पाठविलें. या पांचहि भयंकर हल्ल्यांचा परिणाम गोंव्यावरहि झाला असला पाहिजे. पण त्याची सत्ता मात्र अल्लाउद्दीन बळकावूं शकला नाहीं असें दिसतें. तथापि १३१६त त्याचा मृत्यू घडल्यानंतर दिल्लीच्या तक्तावर आलेला त्याचा मुलगा मुबारक खिलजी यानें रामदेवराव यादवाचा जावई हरपाळदेव यास १३१८ त दिल्लीस नेऊन कातडें सोलवन मारविलें. व यादवांचा पुरा उच्छेद करून दक्षिण हिंदुस्थान जिंकण्याचें कार्य आरंभिलें. तेव्हां त्यानें गोंवेंही काबीज केलें असावें. कारण मुबारकानें १३१९ त ऐनुल्मुल्क मुलतानी नांवाच्या सरदारास दक्षिणेची राज्यव्यवस्था चालविण्यास नेमलें होतें. व त्याच्या आधिपत्याखालीं मलिक तुघ्लिघ नांवाचा सरदार गोव्याचा कारभार पाहात होता असें फेरिस्त्यानें नमूद केलेलें आहे. पण खिलजी सत्तेंत गोवें एकदोन वर्षांपेक्षां अधिक काळ राहिलेलें दिसत नाहीं. कारण याच सुमारास मुबारकचा खून त्याचा सरदार जो खुश्रू त्यानें केला होता आणि तो व गाजी मलिक तघ्लख यांच्यामध्यें दिल्लीच्या सिंहासनासंबंधीं भयंकर भांडणें चाललीं होतीं. त्यांत जरी गाजीबेग तघ्लख यशस्वी झाला आणि ग्यासुद्दीन तघ्लक नांवानें १३२० मध्यें दिल्लीच्या तक्तावर बसला तरी उत्तर हिंदुस्थानची घडी नीट बसवतांनाच त्याच्या

नाकीं नव येऊं लागले. आणि या संधीचा फायदा घेऊन दक्षिणेंतील राजे स्वतंत्र होऊं पाहूं लागले. खुश्रु–तघ्लकांच्या भांडणाच्या वेळीं गोव्याचा कारभारी मलिक तुक्लिक हा दिल्लीस गेला होता व खुश्रूच्या वतीनें लढ्यांतहि उतरला होता. पण त्यांतच त्याचा वध झाल्यानें गोव्याचा कदंब-वंशीय राजा सोयिदेव याला आपलें डोकें पुन: वर काढण्यास सापडलें आणि १३२१ ते १३५१पर्यंत च्या ३० वर्षांत त्यानें राज्यकारभार चालविलाही.

३८. दरम्यान ग्यासुद्दीन तघ्लक मरण पावून त्याचा मुलगा महमद तघ्लक हा १३२५त दिल्ली-पति झाला आणि दक्षिणेंत राज्य करण्याच्या इराद्यानें १३३२ त वरंगळ घेऊन राजधानी देव-गिरीस नेण्याचा बेत करूं लागला. पण तो साधला नाहीं. इतकेंच नव्हे तर दक्षिणेंतील कार-भार पहाण्यासाठीं त्यानें नेमलेला सरदार हसन जाफरखान यानें सन १३४७ त कुलबर्गा येथें स्वतंत्र बहामनी राज्याची स्थापना केली. याच समयास म्हणजे १३३५ सालीं विजयनगरच्या हिंदु साम्राज्याची स्थापना झाली होती आणि या उभयतांची सत्ता व परस्परांमधील स्पर्धा यांची वाढ समवयानेंच होत चालली होती. १३५१ त महंमद तघ्लक मरण पावून त्याचा चुलतभाऊ फिरोजशहा याला सरदारांनीं तक्त-नशीन बनवलें होतें. त्याचे मुलगे व नातू हे आप-सांत भांडूं लागले होते आणि ही परिस्थितीही बहामनी व विजयनगर या उभयं साम्राज्यास सत्तावृद्धीच्या दृष्टीनें अनुकूल अशी होती. तिचा फायदा घेऊन हसन जाफरखानानें १३५२ त गोव्याच्या कदंबाचें राज्य बळकावलें, व हिंदूंचा छळ मांडला. हसन जाफरखानानंतर त्याचा मुलगा पहिला महमदशहा हा जेव्हां गादीवर आला तेव्हां म्हणजे १३५८ पासूनच्या ७।८ वर्षांत हचा छळास फारच ऊत आलेला असावा. सध्यां साखळी तालुक्यांतील नावें गांवांत असणारा सप्त-कोटीश्वर हा मुळांत समोर नदीपलीकडे अस-णाऱ्या दिवाडी बेटांतला. त्या देवाची मूर्ति देवळां-तून उपटून एका शेतांत चिखलाच्या बांधास लावल्याचा उल्लेख सांपडतो. हा प्रकार याच कालावधींतला असावा. १३५२ सालापासून कदंब वंश सत्ताच्युत झाला खरा. पण गोवें मात्र १४ वर्षांपेक्षां जास्त काळ मुसलमानी अमलांत राहिलें नाहीं. कारण विजयनगरच्या सिंहासनावर पहिल्या हरिहराच्या मागून पहिला बुक्कराय आरूढ झाला होता. त्याचा माधव नांवाचा मंत्री फार शूर होता. विद्यारण्य माधवाचार्य व माधव मंत्री हे दोन पुरुष निरनिराळे आहेत असें कांहीं इतिहासज्ञांचें मत आहे. पण तें खरें खोटें कांहीं असलें तरी इतकें निश्चित कीं, माधव मंत्र्यानें बहामनी सुलतानाच्या गोव्यांतील सरदारावर हल्ला करून तें सन १३५६ मध्यें विजयनगरच्या साम्राज्यास जोडून टाकलें आणि दिवाडीचा सप्त-कोटीश्वर व जुनें गोवें येथील तीर्थ यांचा उद्धार केला. त्याच्या स्मरणार्थ सदर तीर्थाला 'माधव' तीर्थ हेंच नांव देण्यांत आलें. पुढें १४७० पर्यंत १०४ वर्षे गोवें विजयनगरच्या साम्राज्यांत सुखा-समाधानानें नांदलें व फार भरभराटीस आलें. या काळांतील त्याची राजधानी त्या वेळचें नुसतें गोवें व आतांचें जुनें गोवें येथें होती. या शहराच्या वैभवाचें संक्षिप्त वर्णन मागें दिलेंच आहे. पण बहामनी राज्याचा सुप्रसिद्ध प्रधान महमद गवान यानें १४७० मध्यें विजयनगरच्या अमराजी नांवाच्या प्रतिहस्ताचा पराभव करून जिंकून घेतलें. तेव्हां कुलबर्गा येथें आठवडाभर विजयो-त्सव चालला होता, यावरूनहि त्याचें महत्त्व ताडतां येतें. बहामनी राज्याच्या या द्वितीय सत्ता-कालांत गोव्यांतील हिंदूंचा विशेषसा धार्मिक छळ झाला नसावा. पण ते त्या सत्तेंत फार काल राहूं-ही शकले नाहींत. १४८६ च्या सुमारास बहादूर खिलजी नांवाच्या तेथील एका उन्मत्त सरदारानें बहामनी राज्याविरुद्ध बंड उभारून गोव्याच्या सुभेदाराला पदच्युत केलें. व आपण गोव्याचा स्वतंत्र राजा असल्याबद्दल द्वाही फिरविली. पण बहामनी राजानें बंड मोडून बहादूर खिलजीचा वध केला व नव्या दमाचा सुभेदार नेमला. परंतु तो दोन वर्षांच्या आंतच मरण पावल्यामुळें त्याची जागा त्याच्या मुलाला मिळाली. याच समयास बहामनी राज्य मोडकळीस येऊन १४८९ सालीं युसुफ आदिलशहानें विजापुरास स्वतंत्र राज्याची मेढ रोवली होती व जो तो बहामनी सरदार स्वतंत्र होऊं पहात होता. गोव्याच्या तरुण सुभेदारानेंही हाच कित्ता गिरवूं पाहिला. पण आदिलशहाचें बळ वाढतें असल्यानें स्वतंत्र राज्य न उभारतां त्यानें आपण विजापुरचा अंकित असल्याबद्दलची कबुली दिली आणि अशा रीतीनें विशेष आयास न पडतां युसुफ आदिल-शहास सन १४९८ मध्यें गोव्याच्या वैभवसंपन्न राज्याचा लाभ झाला. आदिलशाहींत हिंदूंचा धार्मिक छळ तर झाला नाहींच. उलट, बहुतेक सर्व राज्यकारभार हिंदूंच्याच तंत्रानें चालत होता.

असें सिद्ध करणारे पुरावेच विशेष सांपडतात. पोर्तुगीजांनीं धर्मच्छल मांडल्यावेळीं हिंदूनीं आपलीं देवालयें तिच्याच आसन्यास नेली हें मागें सांगितलेंच आहे,पण इतिहासाचें सत्यामत पोर्तुगीज ग्रंथकारांच्या अशुद्ध ओंजळींतून न पितां स्वतःच्या तोंडानें व शुद्ध करून प्यालें पाहिजे. पण जो मुसलमानाकडून झाला नाहीं तो किंबहुना त्याच्याहून शतपट अधिक अमानुष छळ ख्रिस्ती लोकांकडून व्हावयाचा होता आणि याचसाठीं एका तपाच्या आंतच गोवें आदिलशाहीकडून पोर्तुगिजांच्या तावडींत पडलें किंवा हिंदूनींच तें नेऊन पाडिलें!

३९. पोर्तुगीज कालीनः–गोवें आदिलशाहींत समाविष्ट होणें आणि पोर्तुगिज लोक दर्यामार्गें हिंदुस्थानास पोंचणें ह्या दोन घटना एकसमयावच्छेदें घडल्या. ता. २० मे १४९८ हा हिंदुस्थानच्या जलमार्ग–शोधाचा दिवस म्हणून मानला जातो. कारण जितका धाडशी,तितकाच कपटपटु पोर्तुगीज दर्यावर्दी व्हास्कू द गामा हा १०महिन्यांच्या जलपर्यटनानंतर सदर दिवशीं कालिकत बंदरास पहिल्यांदा पोंचला. पोर्तुगिजांचे हिंदुस्थानांत येण्याचे उद्देश दोन. एक इजिप्तच्या सुलतानाच्या ताब्यांत गेलेला पूर्वेकडील व्यापार आपल्या ताब्यांत घेण्याचा व दुसरा आपले युरोपांतील प्रमुख शत्रु जे 'मूर' त्यांना सांपडतील तिकडे सतावण्याचा. त्यामुळें व्हास्कू द–गामा १४९९ च्या सेप्टेंबरांत सुरक्षितपणें लिस्बनला पोंचल्यानंतर पेंद्रू आलव्हारिश काब्राल हा मोठें आरमार घेऊन आला. व कालिकत येथें त्यानें एक वखार स्थापन केली. पण ती तेथील राजानें नष्ट केल्यामुळें त्यानें कोचीन येथें दुसरी स्थापिली. व तेथून कित्येक तारवें भरून मसाल्याचे जिन्नस घेऊन तो पोर्तुगालला गेला. हे जिन्नस युरोपांत ६० पट किंमतीला विकले गेले. तेव्हां व्यापारद्वारां द्रव्यसंपादनाची हाव सुटून पोर्तुगीज लोक तारवांवर तारवें भरून हिंदुस्थानांत येऊं लागले. कालिकतचा राजा झामोरीन याची खोड मोडण्यासाठीं व्हास्कू द गामा १५०२ मध्यें पुनः हिंदुस्थानास आला. त्याच्या पुढच्या वर्षीं आफोंसु द आलबूकर्क हाही आला. पण त्याच्याकडे तांबडा समुद्र कह्यांत आणण्याचें काम मुख्यतः सोंपविलेलें होतें. आणि त्यानें व तदनंतर आलेल्या दर्यावर्द्यांनीं १०।१५ वर्षांच्या आंतच इजिप्तच्या सुलतानानें पाठवलेल्या मोठ्या आरमाराचा पराभव करून इराणी आखातापासून जपानी समुद्रापर्यंतच्या जलप्रदेशावर आपला दरारा बसविलाही होता. मलबार व क्यारोमांडल या दोन्ही हिंदी किनाऱ्यावरहि कित्येक नाक्यांचीं ठिकाणें त्यांनीं हस्तगत केलीं होतीं.

४०. विजयनगराकडून गोव्यासारखें समृद्ध शहर व प्रदेश हीं आदिलशहाच्या ताब्यांत गेलीं होतीं. आणि १४४० त तेथील राजघराण्याची क्रांति झाली होती. तरी या समयासही या साम्राज्याची भरभराट चालली होती व मुसलमानांस त्यांच्याकडून सारखा मार बसत असे. 'हिंदुराय सुरत्राण' म्हणजे 'हिंदु राजा सुलतान' ही जी पदवी तेथील राजांना देण्यांत येत असे तिच्यावरून त्यांनीं मुसलमानास पाजलेल्या पाण्याची चांगली कल्पना यते. जमिनीप्रमाणें समुद्रावरहि मुसलमानांना हात दाखवला पाहिजे म्हणून विजयनगरच्या राजानें आरमार निर्मून तें 'तिमय्या' किंवा 'तिमोज' नांवाच्या सरदाराच्या आधिपत्याखालीं दिलें होतें. हा जसा शर तसा धूर्तहि होता. गोवें काबीज केलें तर गेलेल्या प्रदेशाचा पुनर्लाभ तर होईलच, पण गोव्याच्या बंदरांत होत असलेला प्रचंड व्यापार विजयनगरच्या हातीं येऊन मुसलमानांसही चांगलाच हात दाखवितां येईल असें तिमय्यास व त्याचा गोमंतकीय सहकारी म्हाळ पै यांना वाटलें. पण गोव्यावर हल्ला चढवावयाचा तर आरमाराचें बळ भरपूर पाहिजे, हें ते जाणून होते. आणि पोर्तुगिजांच्या या बाबतींतल्या वर्चस्वाची जाणीवही त्यांना होती. त्यामुळें स्वतः हल्ला न करितां तो पोर्तुगीजांकडून करवावा असा बेत रचून गोवें घेण्याची कल्पना ते आल्मीडा प्रभृति सरदारांच्या मनांत रिघवूं लागले. पोर्तुगीजांचा मूरावर म्हणजे मुसलमानांवर तर डोळा होताच. पण देशज मुत्सद्दी व लढवय्ये यांच्या मदतीची जरुरीही त्यांना नव्हती असें नाहीं. तेव्हां उभयतांचें सूत जमण्यास उशीर लागला नाहीं. हें स्वाभाविकच झालें. पण हिंदुस्थानांत असलेल्या सर्व पोर्तुगीज दर्यावर्द्यांत बुद्धिमत्ता, धोरण, धाडस इत्यादि गुणांनीं श्रेष्ठ असलेला आल्बुकर्क हा पोर्तुगालास गेला होता. तो १५०८त परत आला. तेव्हां लगेच तिमय्यानें दोनदां गांठ घेऊन त्याला गोवें शहराच्या सर्व खाणाखुणा शिकविल्या आणि हल्ल्याचा क्रमदेखील पढविला. १५१० च्या फेब्रुवारींत युसुफ आदिलशहा बोलघाटावर शत्रुशीं लढत असतां मरण पावून त्याचा अननुभवी मुलगा इस्माईल हा गादीवर आला होता. अर्थात् हीच संधि हल्ल्याला अनुकूल असेंही तिमय्यानें आल्बुकर्कला सांगितलें असावें. या

वेळेस युसफ गुर्गी नांवाचा सरदार गोव्याचा कारभार पहात असे. त्याच्या अधिकारसीमेंत उणेंपुरें सगळेंचदक्षिणकोंकणहोतें हें मागें सांगितलेंच आहे.

४०. याप्रमाणें तयारी झाल्यावर ता. २९ फेब्रुवारी रोजीं आल्बुकर्कनें पणजीचा किल्ला सर केला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं गोवें शहरावर मोर्चा फिरविला. पोर्तुगीजांच्या हल्ल्याची चाहूल लागतांच गुर्गी पळून गेला होता. त्यामुळें पोर्तुगीजांस रक्तपात न करितां गोवें काबीज करतां आलें! मात्र तिसवाडी आणि मुरगांवसह सासष्टी व बारदेश या तीन महालांशिवाय गोव्याच्या इतर भागांत पोर्तुगीज आपली सत्ता प्रस्थापित करूं शकले नाहींत. थोडीशी स्थिरस्थावर होतांच आल्बुकर्कनें दवंडी पिटवून लोकांस असें आश्वासन दिलें कीं, सर्वांच्या परंपरागत हक्कांचें संरक्षण केलें जाईल. त्याचप्रमाणें त्यानें कांहीं करही कमी केले आणि ते वसूल करण्याचा मक्ता तिमय्याकडे सुमारें २५ हजार रुपयांस सोंपविला. एका बाजूस क्रूस असलेलीं सोनें, रुपें व तांबें यांचीं नाणींही त्यानें पाडलीं होतीं असें पोर्तुगीज इतिहासकारांनीं नमूद केलेलें आहे. पण इस्माईल आदिलशहानें आल्बुकर्कला स्वस्थ बसूं दिलें नाहीं. १५१० च्याच २० मेला तो मोठ्या सैन्यासह गोव्यावर चाल करून आला व त्यानें पोर्तुगीजांना हुसकावून लावलें. तथापि आल्बुकर्क पक्का होता. तो कांहीं दिवस कानानूरला जाऊन राहिला. आणि तेथून ताज्या दमाचें सैन्य घेऊन येऊन त्याच सालाच्या ता. २५ नोव्हेंबर रोजीं त्यानें गोव्यावर हल्ला चढवला. हा हल्ला फारच भयंकर झाला व त्यांत आदिलशहाचा पराभव होऊन गोवा बेट पोर्तुगिजांच्या हातीं कायमचें पडलें! सासष्टी व बारदेश हे महाल मात्र ते या खेपेस जिंकूं शकले नाहींत.पुढें १५११, १५१६ व १५२० या सालांत इस्माईल आदिलशहानें गोवें घेण्याचे जोरदार प्रयत्न केले. पण ते सर्व फसले, इतकेंच नव्हे तर १५२० च्या स्वारींत आदिलशहाला सासष्टी, बारदेश व अंत्रूज हे महाल पोर्तुगिजांच्या हवालीं करावे लागले. पुढें १५३४त तो मरण पावला. (ग्रँट डफ १५५४ हें साल इस्मायल आदिलशहाचें मृत्यचें म्हणून देतो पण तें चुकीचें आहे.) तेव्हां त्याचे मुलगे मल्लू व इब्राहीम यांच्यामध्यें गादीबद्दल भांडणें लागलीं. मल्लू थोरला बंधु असल्यानें तो गादीवर चढलाच आणि या प्रसंगीं उगवत्या सूर्यास नमस्कार करणें बरें असें वाटून पोर्तुगिजांनीं त्याचाच पक्ष उचलला. पण त्याला पदच्युत करून लगेच गादी बळकावणाऱ्या इब्राहिमानें आपल्या आझादखान नांवाच्या सरदारामार्फत उपर्युक्त तीनही महाल त्याच सालीं हिसकावून घेऊन मल्लूला मदत दिल्याबद्दल पोर्तुगिजांचें पारिपत्य केलें.पण त्यांची आक्रम–शक्ति दमणारी नसल्यानें त्यांनीं इतरत्र मुलूखगिरी करण्याचें काम तसेंच चालूं ठेवलें. गोव्याच्या दक्षिणेस अंजनीद्वीप, कानानूर, कोचीन इत्यादि ठिकाणें त्यांनीं आधींच बळकाविलीं होतीं. त्यांत उत्तरेकडचीं मुंबई, ठाणें, साष्टी, वसई, दमण, सुरत, दीव इत्यादि बेटें व नाकीं जिंकून महत्वाची भर घातली. मलबारप्रमाणेंच कॅारोमांडेल किनारा आणि सिलोन बेट यांतील नाक्याच्या जागाही त्यांनीं कह्यांत आणल्या होत्या. आणि सारा हिंदुस्थान घशांत घेण्याच्या बेतांत ते आले होते.

धर्मच्छळ:—तथापि याच वर्षी म्हणजे १५३४ सालीं पोर्तुगिजांच्या वैभवक्षयाच्या अंतस्थ कारणाचा उगम झाला. हें कारण म्हणजे स्वधर्मप्रसार व तत्पोषक म्हणून परधर्मच्छल यांची दुर्दम्य बुद्धि. या बुद्धीनें सतत २५० वर्षें जो हैदोस हिंदुस्थानांत, अर्थात् गोव्यांत,घातला त्याचें यथातथ्य वर्णन करणें मूर्तिमंत क्रौर्यालाहि अशक्यच होईल! बिचारे तिमय्या व म्हाळ पै यांची अपेक्षा निदान आशा अशी कीं, पोर्तुगीज गोंवें घेतील आणि फार तर अधिसत्तेपुरतें स्वामित्व हातीं ठेवून प्रत्यक्ष कारभार हिंदूंच्याच हातीं ठेवतील. पण गोंवें आपल्या स्वाधीन करण्यास कारणीभूत हिंदूच झाले याचें स्मरण ठेवून जो कदाचित् कृतज्ञ राहिला असता तो आफोंसु द आल्बुकर्क १५१५ तच निधन पावला. गामा १५२४ त तिसऱ्यांदा हिंदुस्थानांत येऊन अल्पकाल राज्यप्रतिनिधिपद भोगून परत स्वदेशास गेला. पोर्तुगालच्या सिंहासनावर अत्यंत धर्मवेडा राजा तिसरा दों जुवांव अधिष्ठित झाला आणि हिंदुस्थानावर ज्यांना व्हॉइसरॉय म्हणून पाठवावयाचें तेही बहुतेक त्याच कोटीचे असूं लागले. आणि म्हणूनच उपर्युक्त सालीं गोव्यांत ख्रिस्ती धर्माधिकाऱ्याची बिशपची गादी स्थापन होऊन पडली. १५४१ च्या ३० जूनला असा हुकूम निघाला कीं, " इतका काळ सैतानाच्या जबड्यांत असलेल्या या हिंदुस्थानाची व त्यांतील लोकांची आमच्या मायबाप देवाला आठवण झाली असून त्यानें आम्हांस तिसवाडींतील एकूण एक धर्मालयें जमीनदोस्त करण्याची आज्ञा फर्माविली

आहे." या हुकुमान्वयें सहा महिन्यांच्या आंतच एकूण एक देऊळ व मशिद पाडण्यांत येऊन गोवें शहरांत मोठीं व शहराबाहेर छोटीं ख्रिस्त–मंदिरें उभारण्यांत आलीं. आणि हिंदु देवळांचें सर्व उत्पन्न त्यांना बहाल करण्यांत आलें असल्याचा कबुलीजबाब व तोही राजीखुषीनें ग्रामस्थांकडून त्याच सालीं लिहून घेण्यांत आला. सन १५४२ सालीं ख्रिस्त धर्मप्रसारक सेंट सेव्हियर याचें आगमन झालें आणि सक्तीच्या धर्मांतरास प्रारंभ झाला. तेव्हां हिंदु लोक सासष्टी बारदेशांत पळून जाऊं लागले. पण दुर्दैवानें थोडयाच अवधींत तेही महाल पोर्तुगिजांनीं आपल्या राज्यास जोडले. पुढें १५५७ त आदिलशाही सरदारांनीं आणि १५७० त अली अदिलशहा व निजाम यांच्या संयुक्त सैन्यानें तें काबीज करण्यासाठीं स्वाऱ्या केल्या. पण त्यांत त्यांना अपयश आल्यामुळें वरील दोन्ही महाल १५४३ सालांत जे पोर्तुगिजांच्या हातांत पडले ते कायम राहिले असेंच समजलें पाहिजे. तेव्हां देवधर्माच्या कार्याकरितां म्हणून मुरगांवसह सासष्टी जेसुइटांच्या आणि बारदेश सेंट झेव्हियरच्या फासिस्कनांच्या हवालीं करण्यांत आले. तेव्हां धर्मांतराचें क्षेत्र जसें वाढलें तशींच त्यांचीं साधनें व त्याबद्दलचा उत्साह हींही वृद्धिंगत झालीं. १५४८ त धर्माधिकाऱ्यानें पाखंडयाचे धर्मग्रंथ गोळा करून जाळून टाकले. १५५७ त धर्मप्रसाराच्या उपायांची योजना आंखण्यासाठीं पाद्र्यांची पहिली धर्म-परिषद भरली व त्याच वर्षीं हिंदूंना सर्व सरकारी नोकऱ्यांतून हुसकून लावण्यांत आलें. १५५९ त असा कायदा जाहीर झाला कीं, मयत हिंदूंची विधवा व त्यांचीं मुलें ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास नाकबूल होतील तर त्यांचा वारसा हक्क नाशाबीद धरून मृताचे जे नातलग ख्रिस्ती होतील त्यांना त्यांची मालमत्ता विभागून द्यावी, बेवारशी मृत हिंदूची संपत्ति सरकारजमा करावी आणि पोरक्या मुलांमुलींना सक्तीनें ख्रिस्ती धर्मदीक्षा द्यावी. १५६०च्या जून महिन्यांत सुवर्णकारांवर हल्ला आला. धातूच्या मूर्ति घडवण्याचें काम त्यांच्याकडून होत असल्यानें त्यांनीं ताबडतोब निघून जावें, न पेक्षां त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यांत येईल व मालमत्ता नसलेल्यांना कैदेंत ठेवलें जाईल असें बजावण्यांत आलें. या वेळेपर्यंत वैयक्तिक स्वरूपाचीं धर्मांतरें तेवढीं होत होतीं. पण याच वर्षाच्या अखेरीस सासष्टींतील चारशेंवर लोकांना पकडून आणून "पवित्र श्रद्धा" अभिधानक गोव्यांतील ख्रिस्तालयांत त्यांना सामुदायिक बाप्तिस्मा देण्यांत आला. ज्याचें नांव घेतांच अंग रोमांचित होतें त्या Inquisition ची किंवा धर्मसमीक्षण सभेची किंवा 'पवित्र कामा'ची स्थापनाही याच वर्षीं झाली. कोंकणी बोलींत कोणत्याही भयंकर, दुष्ट किंवा अनिष्ट कृत्यास किंवा कर्त्यास 'व्हडला' हा 'थोरला' या अर्थाचा शब्द व्याजस्तुतीनें लावला जातो. 'सर्पास' बायका 'व्हडला' म्हणतात तेंही याच अर्थानें होय. या पवित्र गृहास तत्कालीन हिंदूंनीं 'व्हडलें घर' ही संज्ञा दिली होती. यावरून त्याच्या राक्षसी व त्रिषारी कर्तबगारीची कल्पना थोडक्यांत आणून देतां येते. हें समीक्षणगृह स्थापन होतांच मूळ अनर्थाला ऊत येऊं लागला. त्यामुळें लोक घरेंदारें सोडून फोंडें आदि मुसलमानी व हिंदु मुलुखांत जाऊं लागले; आळींच्या आळी निर्जन बनल्या; शेतें–भातें ओस पडलीं, शहरावर मृत कळा आली. पण पूर्वींच हातासलेल्या अपरंपार संपत्तीचा मद चढल्यामुळें आणि कडव्या धर्मप्रसारकांनीं भलभलत्या रीतीनें अधिकाऱ्यांस चटवून भुलवून टाकल्यामुळें सुरुवातीस ते या दुःस्थितीची परवा करीनातसे झाले. इतकेंच काय पण दुसरा मोठा सांघिक बाप्तिस्माहि त्यांनीं घडवून आणला. दिवाडी बेटांतील दीडहजारावर लोक पकडून आणले. "त्यांना एका पाद्रीनें ख्रिस्ती धर्माचा चांगुलपणा व श्रेष्ठत्व–सांगणाऱ्याची भाषा पोर्तुगीज तर ऐकणाऱ्यांची कानडी–कोंकणी असतांना समजावून सांगितलें आणि असें बजावलें कीं, कोणीही आपल्या खुषीविरुद्ध हा धर्म स्वीकारतां कामा नये; ज्याची इच्छा नसेल त्यानें बेधडक निघून जावें; सभोंवार असणाऱ्या संगीनींची कदर त्यानें लवमात्र करूं नये; अखेरीस पाद्रीनें प्रश्न केला "आमचा हा पवित्र ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यास स्वतःच्या राजीखुषीनें न आलेला कोणी आहे काय?" तेव्हां एकाच स्वरांत उत्तर गर्जलें "नाहीं नाहीं, आम्ही सर्व केवळ स्वखुषीनें ख्रिस्ती होण्यास आलों आहों " ! ! ! या कहरानंतर व्यापार–उदीम, शेतीभाती, इत्यादि पार बसून साऱ्या गोवा बेटावर प्रेतकळा आली. तेव्हां १५६१ सालीं हिंदूंना तेथें परत येण्याबद्दल विनवण्या सुरूं झाल्या; घरें बांधण्यास, व्यापार करण्यास शेतें लावण्यास मोकळीक मिळेल आणि सर्व कांहीं सुरक्षित राहील असें आश्वासन देण्यांत आलें. पण धर्माधिकाऱ्यांनीं पोर्तुगालहून दोन वर्षांच्या आंतच उलट हुकूम आणून हें आश्वा-

सन मागें घेण्यास व्हाइसरॉयांना भाग पाडलें. तेव्हां खुद्द राजा आपल्या तंत्रानें वागणारा आहे, हें कळून चुकल्यामुळें पाद्रीशाहीच्या धुमाकुळास पुनः उकळी फुटली. दुर्दैवानें याच समयास म्हणजे १५६५ त बहामनी राज्याच्या पांचही तुकड्यांनीं एकत्रित होऊन राक्षसगडच्या रणांगणावर विजय-नगरचें 'अविस्मरणीय' हिंदु साम्राज्य 'नष्टस्मृति' करून टाकलें. त्यामुळें हिंदूस आतां जवळपासही बळवान असा त्राता कोणीच राहिला नाहीं हें लक्षांत येऊन या उकळीस अधिक जोर आला असावा. कारण १५६६ त तिसवाडींतील हिंदु लोकांचे ग्राम–संस्थांतील हक्क हिरावून घेण्यांत आले. आणि अत्याचारांची शीग जी गोवा व त्याच्या लगतच्या एकदोन बेटांपुरती होती ती सासष्टी बारदेशांपर्यंत पसरूं लागली. १५६७ त रायतूर येथील किल्लेदारानें लोटलींतील श्रीरामनाथ देवालयाला आग लावून तें भस्मसात् करून टाकलें. महाजनांनीं न्यायकचेरीकडे तक्रार केली व न्यायाधीश न्यायप्रिय असल्यानें त्यानें देऊळ स्वतःच्या खर्चानें बांधून देण्याचा हुकूम किल्लेदारावर बजावला. पण त्यानें व्हाइसरॉयांकडून त्याची अंमलबजावणी तर रद्द करविलीच पण उलट सासष्टींतील सांपडेल तें देऊळ पाडून टाकण्याची मुभा मिळविली. त्याप्रमाणें किल्लेदारानें पाद्रीचें सैन्य घेऊन त्याच वर्षीं एका रात्रीच्या आंत २८० देवळांचा फडशा उडवला. १५६९त बारदेशांतील देवळाची तीच गत करण्यांत येऊन त्याचें उत्पन्न ख्रिस्तालयांना देण्यांत आलें. १५७५ त २ री धर्मपरिषद भरली व तिच्या शिफारशीवरून हिंदूंनीं कोणत्याही प्रकारच्या वाहनाचा उपयोग करूं नये, असा सरकारी हुकूम जाहीर झाला. याच परिषदेंत धर्मप्रसारकांनीं देशी भाषा शिकणें जरूर असल्याचा ठराव झाला होता, अर्थात् त्या वेळेपर्यंत त्यांच्यांत देशी भाषा जाणणारे क्वचितच होते असें उघड दिसून येतें. याच वर्षीं सासष्टींतील कुंकल्ली गांवच्या श्रीशांतादुर्गेच्या उत्सवास बंदी करण्यांत आली. तेव्हां तेथील हिंदु खवळले व हुकूम घेऊन जाणाऱ्यांचा त्यांनीं खून पाडला. ही बातमी लागल्यावर धर्मप्रसारकांचें सशस्त्र भिरें तेथें गेलें आणि तेथील व असोलणें येथील देवळांचा तर त्यांनीं विध्वंस केलाच. पण जवळपासचीं घरेंदारें व शेतीभाती हीदेखील उध्वस्त करून टाकलीं. आणि भरींत भर म्हणून गाईंचा वध करून गर्भागारासह देवालयाचें सर्व आवार त्यांच्या रक्तानें माखून काढलें. १५८५ त तिसरी धर्मपरिषद भरली आणि १५८७ त हिंदूंना जानवें वापरण्यास व लग्नसमारंभ करण्यास बंदी झाली. तेव्हां ते परमुलुखांत जाऊन लग्नें उरकून घेऊं लागले. सबब बाहेर जाणाऱ्यांवर डोईपट्टी बसविण्यांत आली. १५९२ त भरलेल्या चौथ्या धर्मपरिषदेच्या शिफारशीवरून नव ख्रिस्त्यांनीं हिंदु नापिकांकडून दाढी–हजामत करवणें व हिंदु इसम नोकरीस ठेवणें गुन्हे मानण्यांत येऊं लागलें. यामुळें अर्थातच अनेक हिंदु देशोधडीस लागले खरे. परंतु १६व्या शतकाच्या अखेरीपर्यंत वीस हजार हिंदु गोवें शहरांत राहिले होते !

४१. १७ व्या शतकाच्या पूर्वार्धांत हिंदुस्थानच्या दर्याकिनाऱ्यावर डच व इंग्रज यांची तर अंतरभागीं दिल्लीपति मोगलांचीं आक्रमणें जोरावत होतीं आणि उत्तरार्धांत फ्रेंच व मराठे यांच्या सत्ता बळावत होत्या. तशांत आपल्या अघोर पापचरणांनीं पोर्तुगीजांनीं स्वतःचें नांव बद्द व तिरस्करणीय करून ठेवलें होतें. या अंतर्बहिर्करणांनीं १७ वें शतक त्यांना, 'कमावलेलें साम्राज्य गमावणारें शतक' म्हणूनच दुःस्मरणीय होऊन राहिलें. १६०३ मध्यें डच लोकांनीं गोव्याला वेढा घातला आणि तो उठवून लावण्यास पोर्तुगीजांस त्यांच्याशीं महिनाभर झुंजावें लागलें. १६१० त मुसलमानांच्या मदतीनें त्यांनीं पुनः हल्ला केला व तोही परतवतांना पोर्तुगीजांस भारी श्रम पडले. १६४३ त त्यांनीं मुरगांव बंदरावर तोफा डागल्या आणि याही खेपेस जरी पोर्तुगीजांपुढें त्यांना गोव्यांत हार खावी लागली तरी मलाका, कोचीन, कानानूर, वगैरे ठिकाणें त्यांनीं पोर्तुगीजांकडून हिरावून घेतलींच. पोर्तुगालचा राजा ४था दों जुवांव याच्या दॉन कातारीन ब्रागांस नांवाच्या मुलीशीं इंग्लंडचा राजा २ रा चार्लस यानें विवाह केला-त्याबद्दल आंदण म्हणून मुंबई बेट इंग्रजांना द्यावें लागलें. १६८३ त संभाजी महाराजांनीं एकाचवेळीं सासष्टी व बारदेश या महालांवर हल्ला केला आणि तो इतका जोरदार कीं, त्यांच्याकडून पोर्तुगीज सत्ता धुळीस मिळवली जाण्याचाही योग दिसला होता. पण दुर्दैवानें तो साधला नाहीं. कारण, याच वेळीं मोंगल मराठी मुलुखांत शिरले आणि महाराजांना पोर्तुगीजांकडचा मोर्चा त्यांच्यावर वळवावा लागला. मराठ्यांच्या हल्ल्याचा जोर पाहून फोंड्यास त्यांच्यावर चालून गेलेला कोंदि द आलव्होर हा सेनापति पळून जुन्या गोव्या-

ला गेला आणि त्यानें उद्वेगानें राजदंड सेंट झेवियरच्या शवाच्या हातांत दिला. पण, संभाजी महाराज जे मागें फिरले ते वर सांगितलेल्या कारणामुळें नसून सेंट साहेबांनीं चमत्कार करून त्यांना पिटाळल्यामुळें होय, अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली. गोव्याच्या व्हाइसरॉयानें अधिकारसूत्रें धारण करतांना सेंट झेवियरच्या हातांतून राजदंड घेण्याचा जो प्रघात अद्यापही चालू आहे तो त्या वेळेपासूनच पडलेला आहे. रिपब्लिक झाल्यानंतर आलेल्या प्रथमच्या कांहीं गव्हर्नरांनीं मात्र हा रिवाज पाळला नव्हता. तथापि इतक्या कैचींत सांपडले असतांना देखील पोर्तुगीजांची छलबुद्धि मावळली नाहीं. १६८४ त असा कायदा जाहीर झाला कीं, पोर्तुगीज मुलुखांत वास्तव्य असणाऱ्या यच्चयावत् प्रजाजनांनीं तीन वर्षांच्या आंत पोर्तुगीज भाषेंतूनच बोललें पाहिजे आणि सर्व करार–मदारही त्याच भाषेंत झाले पाहिजेत. या मुदतीउपर जो कोणी देशी भाषा बोललेला किंवा तींत करार लिहिणारा आढळेल त्याला वाटेल ती शिक्षा फर्माविली जाईल. सन १६८६ त मोगलांनीं विजापुरची आदिलशाही व गोवळकोंडयाची कुतुबशाही खालसा केली आणि १६८९ त संभाजी महाराजांचा वध झाला तेव्हां एकंदरींत सर्वत्र धामधूमच चालली असल्यानें दक्षिण कोंकणाच्या कांहीं भागावर मराठ्यांची व कांहीं भागावर मोंगलांची अधिसत्ता जरी स्थापित होऊं लागली होती तरी तीं नांवापुरतीं असून खरे राजे त्या त्या प्रदेशांवरील सरदारच होऊन बसले होते आणि ते पोर्तुगीजांना वारंवार उपद्रवही देत. अशा वेळीं प्रजेस संतुष्ट ठेवणें कर्तव्य होतें. पण त्यांचें धर्मवेडाचें भूत इतकें चिवट होतें कीं, तें १७ व्या शतकाच्या अखेरीसही गाडलें गेलें नाहीं. इतकेंच काय, पण त्याला चेतवण्यास गोऱ्या पाद्र्यांबरोबर काळ्या बाटग्यांचा गोतावळाही आतां मिळूं लागला होता. त्यांच्या जोरावर सरकारनें १७०५ सालीं हिंदूंच्या शेंडीवर सुमारें ८ रुपये कर बसविला आणि १७१५ त सर्व हिंदूंनीं पाद्रींच्या प्रवचनास हजर राहिलेंच पाहिजे असा कायदा पुकारण्यांत आला. तो न पाळणाऱ्यांच्या घरांत शिरून त्यांना बायकामुलांसह प्रवचनास बळजबरीनें ओढन आणण्याचा अधिकारही या कायद्यानें पाद्रीशाहीस मिळाला होता. आणि यापूर्वींही असलेल्या तत्सम दुसऱ्या अधिकाराचा उपयोग तिच्यांतील विषयपिपासू नराधमांनीं अत्यंत हृदयद्रावक प्रकारांनीं केला. ज्या बाया त्यांना वश झाल्या त्या तर भ्रष्टच. पण ज्या त्यांच्या कामवासनेला सहजीं बळी पडत नसत त्यांना प्रथम धर्ममठांत डांबून ठेवावें आणि बलात्कारानें विषयेच्छा भागवल्यावर 'ख्रिस्तधर्म–विरोधक' म्हणून नंतर त्यांना जिवंत जाळून टाकावें येथपर्यंत त्यांची मजल जात असे!!! पोर्तुगीजांच्या अत्याचाराची प्रस्तुतची सर्व माहिती नवीन गोव्याच्या हायकोर्टाचे परलोकवासी मुख्य न्यायाधीश आंतानियु फ्लोरियानु दें नोरोंज यांनीं त्याच हायकोर्टाचे न्यायाधीश असतां लिहिलेल्या व गोंवा सरकारनें स्वतःच्या छापखान्यांत छापून स्वतःच्या खर्चानें सन १९२२ सालीं प्रसिद्ध केलेल्या "गोमंतकीय हिंदु व पोर्तुगीज रिपब्लिक" या ग्रंथाच्या जें भाषांतर मडगांवच्या हिंदु साप्ताहिकांत १९२५ सालीं प्रसिद्ध झालें होतें त्यावरून घेतलेली आहे. अर्थात् ती सर्व सप्रमाण व सरकारमान्यही आहे यांत शंका नाहीं.

४२. या अनर्थामुळें पोर्तुगीज मुलुखांतून उरले सुरलेले हिंदु लोक झुंडयाझुंडयांनीं परत्र जाऊं लागले. मुंबई पोर्तुगीजांकडून इंग्रजांकडे गेल्यावर थोडयाच वर्षांत तिची भरभराट होऊं लागली होती आणि या वेळेस तर तेथें व्यापार बऱ्याच मोठ्या प्रमाणांत झाला होता. परागंदा गोमंतकीय व्यापाऱ्यांनीं तेथेंही आपलें बिऱ्हाड थाटलें होतें व ते उत्कर्षास पावत होते. ही स्थिति अवलोकन करून तत्कालीन व्हाइसरायांनीं पोर्तुगालास लिहिलें कीं, हिंदु लोकांना जर चांगल्या रीतीनें वागविलें नाहीं तर पोर्तुगीज मुलूख स्मशानवत् होऊन ते इंग्रजांचा आश्रय घेतील. याच सुमारास म्हणजे १७३९ त व्यंकटराव घोरपडे यांनीं सासष्टीवर व वाडकर भोसल्यांनीं बारदेशवर चाल केली. पण विशेषतः नव ख्रिस्त्यांच्या मदतीमुळें पोर्तुगिजांनीं त्यांचा पराभव केला. तथापि त्याच सालीं चिमाजी आप्पानें वसई येथें त्यांना दे माय धरणी ठाय करून त्यांचें तें बेट व उत्तर कोंकणांतील दमणखेरीज इतर सर्व ठाणीं मराठी राज्यास जोडलीं. तेव्हांपासून पोर्तुगिजांच्या अत्याचारास आळा पडत चालला. तथापि धर्मवेडाची जागा भाषावेडानें घेतली आणि आजमितीस पहिलें भूत जरी निष्क्रिय झालेलें आहे तरी हें दुसरें मात्र पुरें गाडलें गेलेलें नाहीं. सन १७४५ त तें खुद्द नव ख्रिस्त्यांच्याच मानगुटी बसलें. म्हणजे असें कीं, "ज्या वधुवरांना पोर्तुगीज बोलतां येत नाहीं त्यांना आपला विवाहच लावतां येणार नाहीं"

असा दंडक घातला गेला. तिकडे १७६१ त पानिपतच्या संग्रामांतील अपयशानें मराठी सत्ता दिङ्मूढ झाली आणि लगच नानासाहेब पेशवेही मृत्युमुखीं पडले. हीं संधि पोर्तुगिजांस डोकें वर काढण्यास थोडीशी अनुकूल झाली. आणि ते शेजारच्या छोटया राजांशीं कुरापती काढावयास लागले. आणि त्यांनीं १७६३ त मराठ्यांकडून अत्रूज महाल काबीज केला, आणि सौंधेचे संस्थानिक इमोडी सदाशिवराव यांना वार्षिक खण्डणी देण्याच्या करारानें त्यांच्याकडून शिवेश्वर व पंचमहाल हे तालुके हस्तगत केले. १७७४ त हिंदूंना सर्व पोर्तुगीज मुलुखांत सुखानें राहतां येईल असें जाहीर करण्यांत आलें. १७८१सालीं सावंतवाडीचे भोसले यांच्याकडून भतग्राम महाल जिंकून घेतला आणि १७८२ त वाडीचे खेमसावंत यांचा पराभव करून भतग्राम महाल पोर्तुगीज मुलुखास जोडला. पेडणें महाल हाही वाडकर भोसल्यांचाच. हे भोसले व कोल्हापुरचे भोसले यांच्यामध्यें लागलेल्या भांडणांत पोर्तुगिजांनीं वाडकरांस मदत केली होती. तिचा मोबदला म्हणून १७८१ सालीं तो त्यांना भोसवटयास दिला होता. पण पुढें वांधें निघून १७८८ साली पोर्तुगिजांनीं तो आपल्या सत्तेंत कायमचा समाविष्ट केला. यानंतर मात्र पोर्तुगिजांस हिंदुस्थानांत आणखी कमाई करतां आली नाहीं. त्यांच्या जिंकीचा जो संक्षिप्त इतिहास वर दिला आहे त्याच्यावरून तिसवाडी, बार्देश मुरगावसह सासष्टी हे तालुके यांनीं १६व्या शतकाच्या पूर्वार्धांत आणिइतर आठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत काबीज केले हें समजून येतें. बिनकमाईचा दोन शतकांचा हा दीर्घ कालखंड हिशेबी धरून त्यांनीं पहिल्या तिहींनीं बनणाऱ्या प्रदेशास जुन्या काबिजादि व नंतरच्यांनीं बनणाऱ्यांस नव्या काबिजादि अशा संज्ञा दिल्या.

४३. इंग्रजांचा अभिलाषः—सन १७८९मध्यें जगप्रसिद्ध फरेंच राज्यक्रांति झाली आणि ४।५ वर्षांच्या आंतच हिंदुस्थानांतून फरेंच सत्तेचीं पाळेंमुळें खणून काढण्याचें ध्येय डोळ्यासमोर ठेवलेला मार्क्विस ऑफ वेलस्ली हा ब्रिटिश हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल म्हणून आला. त्याच्या मनांत हिंदुस्थानांतल्या इतर सर्व सत्तांप्रमाणें पोर्तुगीज सत्ताही नष्ट करावी असें आलें व त्यानें कर्नल सर विल्यम क्लार्क याला सन १७९८मध्यें गोव्याकडे पाठवून दिलें. फरेंचांच्या हल्ल्याविरुद्ध तुमचें संरक्षण करण्यासाठीं आपण आलों आहों असा वहाणा करून त्यानें मांडवी नदीच्या डाव्या काठावरील ताळगांवच्या भूशिरावरचा किंवा काबूचा राजवाडा व उजव्या कांठावरचा आग्वाद येथील किल्ला हे कबज्यांत घेतले आणि पोर्तुगीज गव्हर्नरानें संरक्षणाची जरूरी नसल्याचें लिहून कळविलें असतांही तो तळ देऊन कित्येक दिवस राहिला. इतक्यांत युरोपांत आमिया येथें इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें तह झाल्याची वार्ता आली. तेव्हां फरेंचाविरुद्ध संरक्षणाची सबब लंगडी पडून त्याला नाखुषीनें गोव्यांतून पाय काढावा लागला. तथापि १८०२ मध्यें कांहीं ब्रिटिश सैन्य तोफखान्यासहित गोव्यांत पुनः आलें. पण याच वर्षी वेलस्ली शिंदे—भोसल्यांशीं लासवाडीस झालेल्या युद्धाच्या तयारींत गुंतला असल्यानें त्यानें गोव्यांत सैन्य ठेवण्यापलीकडे हालचाल केली नाहीं. तदनंतर आलेले कार्नवालिस व बार्लो या गव्हर्नरांचा डोळाही गोव्यावरून व विशेषतः मुरगांव बंदरावरून निघालेला नव्हता. सबब त्यांनीं तें सैन्य गोव्यांतून उठवलें नाहीं. पण तदनंतर आलेला पहिला लॉर्ड मिंटो या गव्हर्नरानें हिंदुस्थानावर नेपोलियनची धाड येऊं नये म्हणून ज्याप्रमाणें इराण—अफगाणिस्थानाशीं सख्य केलें त्याचप्रमाणें पोर्तुगिजांचेंहि मन दुखवूं नये म्हणून १८१३ च्या सुमारास त्यानें गोव्यांतून सर्व ब्रिटिश सैन्य काढून घेतलें. पुढें १८१८ त पेशवाई नष्ट झाली व ब्रिटिश लोक बहुतेक हिंदुस्थानचे सम्राट बनले. पण मुरगांवसारख्या बंदरावरची त्यांची नजर कशी बाजूस सरावी? तेव्हां ब्रिटिशांविरुद्ध बंड उभारलेल्या वाडकर सावंतास आश्रय दिल्याच्या निमित्तानें मुंबई सरकारनें क्याप्टन आर्थरला १८४२ त लढाऊ जहाजांनिशीं गोंव्याकडे पाठविलें. त्यानें पणजीच्या राजवाड्यावर तोफा रोखून आश्रित सावंतास आपल्या ताब्यांत देण्याची मागणी केली. पण तत्कालीन पोर्तुगीज व्हाईसराय धूर्त व स्वाभिमानी होता. त्यानें आंतरराष्ट्रीय कायदा दाखवून आणि सावंतासंबंधीं मध्यस्थी करून त्याला परत पाठविलें..

४४. धर्मवेडाला उताराः—तिकडे पोर्तुगालांत एकमुखी राजसत्तेला आळा घालण्याचे यशस्वी प्रयत्न चालले होते आणि मिशनऱ्यांच्या दुष्कृत्यांचा सर्वांसच वीट आला होता. त्यामुळें १८१२ मध्यें गोव्याच्या 'धर्मसमीक्षण' सभेचें उच्चाटण झालें. १८२६ त पोर्तुगालांत पार्लमेंट स्थापन झालें. व गोव्याच्या राज्यकारभारावरहि

किंचितसें लोकनियंत्रण होऊं लागलें. तथापि या समयासहि सुमारें १० हजार पाद्री गोव्यांत होते. त्यांना कह्यांत ठेवण्याविषयीं पोर्तुगालहून व्हाईसरायांना पुनः पुनः सूचना देण्यांत येत होत्या. तथापि सूर्यापेक्षां त्यानें तापवलेल्या वाळूची प्रखरता जशी अधिक तापदायक तसेंच पोर्तुगालच्या गोऱ्या पाद्र्यांपेक्षां देशी काळे पाद्रीच आतां हिंदूंना अधिक त्रासदायक होऊन राहिले होते. आणि राजकारणी मुत्सद्यांचें धर्मवेड जरी निवळलें होतें तरी बिशपसाहेबांचें जागृतच होतें. त्यांनीं १८३० मध्यें जुन्या काबिजादींत हिंदु देवालयें बांधण्यास प्रतिबंध केल्याचा हुकूम आणून घेतला. १७७५ च्या सुमारास गोव्यांतील ख्रिस्त्यांना पोर्तुगालच्या ख्रिस्त्यांइतकाच राजकीय दर्जा दिला गेला होता. आणि त्याचें प्रत्यंतर म्हणून पुढें १८३५ त बॅर्नार्दु पॅरिश द सिल्व्ह नांवाच्या हिंदी ख्रिस्ती गृहस्थाची त्यांनीं पोर्तुगीज हिंदुस्थानचे व्हाईसराय म्हणून नेमणूकहि केली होती. पण नेटिव्ह ख्रिस्ती विरुद्ध लुझो इंडियन ख्रिस्ती असें स्वरूप या नेमणुकीला येऊन लुझो इंडियनांनीं त्याला पदच्युत करून कैदेंत टाकवलें. पुढें सत्तरी तालुक्यांत अनेक बंडें झालीं. त्यांत १८९५ त दादा राणे यांच्या आधिपत्याखालीं जें झालें तें मोडण्यासाठीं तत्कालीन पोर्तुगालच्या राजाचे बंधु दो आफोंसु हे गोव्यास आले होते व कांहीं काळ व्हाइसरायांच्या जागेवरहि राहिले होते.त्या वेळीं त्यांचें स्वागत ख्रिश्चनाप्रमाणेंच हिंदूंनीदेखील केलें व त्यांनींही गोड गोड आश्वासनें दिलीं. तथापि येथील सरकारी अधिकारी ख्रिस्ति धर्माधिकाऱ्याच्या परधर्मद्वेष्टया लहरींना बळीं पडण्याची परंपरा पुरी तुटली नव्हतीच. २०व्या शतकाच्या सुरुवातीसही हिंदूंना त्याच्याकडून हरेक प्रकारचे उपद्रव व अपमान भोगावे लागत. कुठें हिंदू देवालयासमोर ख्रिस्ती प्रेतयात्रा मुद्दाम उभ्या कर, तर कुठें देवळाच्या मध्यभागीं ख्रिस्तमंदीर उभार; श्रीचंद्रेश्वर देवालयाची पारोडें गांवांत येणारी परंपरागत पालखी हमरस्ता सोडून तेथील ख्रिस्त मंदिराच्या मागून आड वाटेनेंच नेली पाहिजे असा हट्ट सरकार विसाव्या शतकांत १९१० पर्यंतहि घेऊन बसलें होतें! पण इतक्यांत म्हणजे १९०८ मध्यें पोर्तुगालचा राजा दों कार्लुश लोकसत्तेच्या पुरस्कर्त्यांकडून मारला गेला आणि १९१० त पोर्तुगीज प्राजक स्थापन झालें. तेव्हां कायद्यानें सर्व धर्मीयांस सारखें संरक्षण देण्यांत आलें. १९१७ पासून स्थानिक लोकांना राज्यकारभाराचे कांहीं हक्कही बहाल करण्यांत आले आणि त्यामुळें धार्मिक छळ किंवा अपमान सोसण्याची अघोर शिक्षा जी हिंदूंना जवळ जवळ चार शतकेंपर्यंत भोगावी लागली ती रद्द झाली! तथापि त्यांच्या संस्कृतीच्या अनेक अंगांना जो मान व जें संरक्षण मिळणें न्याय्य आहे तें त्यांना अद्यापहि मिळूं लागलेलें नाहीं!

राज्यव्यवस्था

४५. सामान्यः—गोव्याप्रमाणें पोर्तुगालच्या अधिसत्तेंत कारवारच्या पश्चिमेस अंजनीद्वीप किंवा आंजेदीव, तेरेखोल नदीच्या उजव्या कांठीं तेरेखोल किल्ला, खंबायतच्या आखातांत दमण, व त्याच्या वायव्येस काठेवाडांत दीव बेट हे हिंदुस्थानांतील आणखी चार लहानसे प्रदेश आहेत. पहिल्या दोहोंत लोकवस्ती नाहींच म्हटलें तरी चालेल. दुसऱ्या दोहोंचें क्षेत्रफळ अनुक्रमें १२५ व १३ चौरस मैल असून लोकसंख्या ४८॥ व १४ हजार आहे. या पांचहि प्रदेशांस मिळून 'पोर्तुगीज हिंदुस्थान' असें भपकेबाज नांव देण्यांत येतें.त्याच्या राज्यकारभारासाठीं व्यवस्थाविषयक, लष्करी, नाविक व न्याय अशीं चार जातींचीं खातीं ठेवलेलीं आहेत. व्यवस्थाविषयक खात्यांत मुलकी, आरोग्य, जमाबंदी, जकात, बांधकाम, शेतकी व जंगल, जमीनमोजणी व खनिज, तार—टपाल, आणि रेल्वे व बंदर अशीं ९ अंतर्व्यवस्थाविषयक खातीं व एक बहिर्व्यवस्थाविषयक खातें असून त्या नवांतल्या शेवटच्या तिहींस 'तज्ज्ञ' खातीं अशी संज्ञा आहे. शिक्षण व अबकारी यांचीं स्वतंत्र खातीं नाहींत. तर तीं अनुक्रमें मुलकी व जमाबंदी खात्यांचीं पोटखातीं मानण्यांत येतात.

४६. मुलकी व्यवस्थाः—मुलकी कारभारासाठीं पोर्तुगीज हिंदुस्थानचे गोवा, दमण व दीव, असे तीन जिल्हे करून गोवा जिल्हा सुरुवातीच्या दुसऱ्या छेदकांत सांगितल्याप्रमाणें ११ तालुक्यांत विभागला आहे. पूर्वीं मुरगांव सासष्टींतच समाविष्ट होत असल्यानें जिल्हे १० च होत असत. पण १९१७ पासून तो निराळा करण्यांत आला आहे.सहासष्ट गांवचा प्रदेश म्हणून सासष्टी हें नांव सदर महालास पडलें होतें. पण त्यांतील १६ गांवें मुरगांवांत घातलीं गेल्यानें सासष्टी नांवाची अन्वर्थकता नष्ट झाली आहे. तालुक्याचे भाग पाडून प्रत्येकाला 'फरेगेझीय' असें नांव देण्यांत आलें आहे. त्यांत विस्तार व लोकसंख्या

यांच्या मानानें एक किंवा अधिक गांवांचा समावेश होत असतो. गोव्यांतील एकंदर फरेगेझींची संख्या १६६ असून गांवांची ४४० आहे. प्रत्येक जिल्ह्यावर गव्हर्नर किंवा सुभेदार , तालुक्यावर आदमिनिस्त्रादोर किंवा मामलेदार आणि फरेगेझीवर रेजेदर किंवा पाटील या नांवाचे मुलकी कारभार पहाणारे अधिकारी असतात. गोव्याच्या गव्हर्नराची सत्ता कांहीं बाबतींत दमण व दीव येथील गव्हर्नरावर चालते म्हणून त्याला गव्हर्नर जनरल असा हुद्दा असतो. गव्हर्नर जनरलला जरी विशेषतः दिवाणी कारभाराचा वरिष्ठाधिकार असतो तरी लष्करी खात्याचा मुख्याधिकारीहि तोच मानला जातो.

पोर्तुगालच्या अधिसत्तेंत हिंदुस्थानांतल्या उपरिवर्णित प्रदेशाशिवाय आशिया खंडांत चिनी समुद्रामध्यें माकाव व तिमोर या दोन आणि आफ्रिका खंडांत आंगॉल, मोसांबिक इत्यादि ५ मिळून एकंदरींत आणखी ७ प्रदेश आहेत. या आठही प्रदेशांत पोर्तुगीज लोकांची वस्ती जरी तुटकच असली तरी कायद्यानें त्यांना 'कॉलॉनियश' म्हणजे वसाहती असेंच संबोधलें जातें आणि या आठही वसाहती खुद्द पोर्तुगाल आणि त्याच्या लगतची आसोरिश व मादैर हीं बेटें यांना समुच्चयानें 'पोर्तुगीज साम्राज्य' असें म्हटलें जातें. आंगॉल हीं खुद्द पोर्तुगालच्या १६ पट मोठी असून मोसांबिक ९ पट आहे. आणि त्यामुळें पोर्तुगाल जरी एरव्हीं डबघाईस आलेलें असलें तरी अजूनहि तें ग्रेटब्रिटन व फ्रान्स यांच्यानंतर तिसरें वासाहतिक साम्राज्य मानलें जातें. त्याच्या सर्व वसाहतींच्या राज्यकारभारावर देखरेख करण्याकरितां पोर्तुगालच्या प्रधान मंडळांत एक खास प्रधान असतो आणि या वसाहतमंत्र्याला सल्लामसलत देण्यासाठीं 'वासाहतिक वरिष्ठ मंडळ' नांवाचें त्या त्या वसाहतीच्या तर्फेनें म्हणून स्वतः प्रधान मंडळानें नेमलेल्या सभासदांचें एक मंडळ असतें.

४७. गव्हर्नर जनरलची नेमणूक पोर्तुगी जरिपब्लिकचा अध्यक्ष वसाहत मंत्र्याच्या शिफारशीवरून आणि प्रधान मंडळाच्या संमतीनें करीत असतो. जिल्ह्यांतील गव्हर्नरांच्या नेमणुका वसाहत–मंत्री वासाहतिक वरिष्ठ मंडळाच्या सल्ल्यानें करीत असतो. मामलेदारांच्या नेमणुका गव्हर्नर जनरल आपल्या विश्वासांतल्या लायक नागरिकांतून करतो व मामलेदाराच्या शिफारशीवरून पाटीलही तोच नमतो. गव्हर्नरांच्या नेमणुका मुदतबंदीच्या–सध्यां चार चार वर्ष कालावधीच्या–असतात. पण त्या वाढवितांही येतात. आणि मामलेदार, पाटलांच्या नेमणुका गव्हर्नर जनरलच्या मर्जीनुरूप कमी अधिक कालाच्या होऊं शकतात. बाकी खात्यांतल्या बहुतेक सर्व वरिष्ठ—कनिष्ठ कामदारांच्या नेमणुका तहाहयातीच्या असतात. या तहाहयात नोकरांच्या "वसाहत सामान्य" व "वसाहत विशिष्ट" अशा दोन प्रकारच्या चौकटी असतात. (Quadros). पहिलींत सर्व खात्यांचे मुख्याधिकारी लष्करी व दर्यावर्दी अमलदार, न्याय खात्यांतील वरिष्ठ वर्गाचे कामदार आणि वरिष्ठ विशिष्ट व दुय्यम शिक्षणाचे अध्यापक इत्यादींचा समावेश होतो. यांच्या नेमणुका वसाहतमंत्री करीत असतो आणि वसाहतविशिष्ट चौकटींतील कामदारांच्या नेमणुका गव्हर्नर जनरलकडून होत असतात.

४८ मुलकी व्यवस्था खात्याकडे शांतता व सुव्यवस्था, शिक्षण, व्यापार–उदीम, ग्रामसंस्था, देवालयें, अनाथसहाय्यक व इतर सार्वजनिक संस्था, जनन-मरण–विवाहादिकांची नोंद, सरकारी छापखाना व वाचनालय, "बोलेती सरकारी ओफिसियाल" नांवाच्या द्विसाप्ताहिक पत्राची प्रसिद्धी वगैरे संबंधींचीं कामें सोंपविलेलीं असतात. या खात्याच्या मुख्याधिकाऱ्याला जनरल सेक्रेटरी असेंही संबोधतात.

४९. न्यायखातें:—न्यायव्यवस्थेसाठीं गोव्याचे ५ तुकडे पाडून प्रत्येकाला 'कॉमार्क' असें नांव दिलेलें आहे. तिसवाडी कॉमार्कांत तिसवाडी व फोंडें, बारदेश कामार्कांत बारदेश व पेडणें, सासष्टी कॉमार्कांत सासष्टी व मुरगांव, डिचोली कॉमार्कांत सांखळी व सत्तरी आणि केपें कॉमार्कांत केपें, सांगें व काणकोण याप्रमाणें तालुक्यांचा अंतर्भाव होतो. ही विभागणी ठोकळ मानाची आहे. कारण कांहीं गांवें अशीं आहेत कीं, मुलकी व्यवस्थेच्या दृष्टीनें तीं एका तालुक्यांत मोडतात तर न्यायव्यवस्थेसाठीं तीं भिन्न कॉमार्कांत धरलीं जातात. तिसवाडी व सासष्टी हीं कॉमार्कें मोठ्या लोकवस्तीचीं असल्यानें फोंडें व मुरगांव येथें केक 'ज्युलगाद' किंवा सबजज्जकोर्ट ठेवलेलें आहे. कॉमार्कें व ज्युलगाद यांचे भाग करून प्रत्येकाला फरेगेझीय हेंच नांव देण्यांत आलें आहे. हीं एकंदरींत ११२ आहेत. प्रत्येक कॉमार्कावर एकेक न्यायाधीश किंवा जज्ज आणि एकेक सरकारी अखत्याराचा किंवा पब्लिक प्रॉसि-

क्युटरचा प्रतिनिधि असतो. ज्युल्गादावर एकेक सबजज्ज व एकेक सरकारी अखत्याराचा प्रतिनिधि असतो. फरेगेझीवर एकेक 'जुइज पोपुलार' व त्याचा एक कारकून असतो. जज्ज व सबजज्ज आणि कॉमार्कांतील सरकारी अखत्याराचे प्रतिनिधि हे पोर्तुगालांतील विश्वविद्यालयाचे कायदेशास्त्रशाखेचे विशारद किंवा बॅर–ॲट–लॉ असावे लागतात व त्यांच्या नेमणुका वसाहतमंत्र्याच्या हातांतील असतात. जुलूगादांतील सरकारी अखत्याराचे प्रतिनिधि स्थानिक वकील होऊं शकतात. जुइज पोपुलार व त्यांचे कारकून हे कोणीही साक्षर नागरिक असले तरी चालतात. यांच्या नेमणुका विवक्षित मुदतीपुरत्या व निर्वेतन असतात. आणि त्या जागांसाठीं लायक नागरिकांचीं नांवें म्युनिसिपालिटचांना कॉमार्कांच्या न्यायाधीशाकडे सुचवितां येतात.

५०. या सर्व न्यायकचेऱ्यांची वरिष्ठ कचेरी म्हणजे रॅलासांव किंवा हायकोर्ट नवीन गोवें यथें असतें. गोव्याप्रमाणें दमण व दीव आणि माका व तिमोर येथील कॉमार्कांवरहि याच हायकोर्टाची हुकमत चालत असते. त्यांत ५ न्यायाधीश असतात. व त्यांतून एकाची अध्यक्ष म्हणून नेमणूक केली जाते. हायकोर्टांत एक पब्लिक प्रॉसिक्युटर असतो. त्याला 'प्रोकुरादोर द रॅपब्लिक' म्हणजे लोकसत्ता सरकारचा अखत्यार असें नांव असतें. हा गव्हर्नर जनरलचा कायद्याचा सल्लागार असतो. व हायकोर्टासमोर सरकारच्या हितसंबंधांना जपण्याचें कामहि त्याच्याचकडे असतें. हे सहाही अधिकारी अर्थात्च 'कायदेशास्त्रविशारद' पदवीधर असावे लागतात.

५१. कॉमार्कांच्या न्यायाधीशाचा निकाल दीडशें रुपयांपर्यंतच्या आणि हायकोर्टाचा दीड हजारापर्यंतच्या दाव्याच्या बाबतींत अखेरचा समजला जातो. कॉमार्कांतील निकालावर हायकोर्टाकडे अपील चालतें आणि याच्या निकालावर तें करावयाचें असतां लिस्बनच्या सुप्रीम कोर्टाकडे करावें लागतें. दिवाणीप्रमाणेंच फौजदारी व व्यापारी खटले याच कोर्टांतून चालतात. त्या त्या जातींच्या खटल्यासाठीं निरनिराळीं कोर्टें गोव्यांत नसतात.

५२. नागरिकांच्या दस्तऐवजाच्या नोंदीचें काम कॉमार्कांतील सरकारी अखत्याराच्या प्रतिनिधीकडे दिलेलें असतें. आणि खरेदीविक्री किंवा गहाण, कबूलायत खतें, मृत्युपत्रें, प्रॉमिसरी नोटांचे व्यवहार, कंपन्यांचे करार, वगैरेच्या नोंदणीसाठीं प्रत्येक कॉमार्कांत जरूरीप्रमाणें एक किंवा दोन 'ताबेलियांव' म्हणजे पब्लिक नॉटरी नेमलेले असतात. त्यांना पगार असा नसतो. तर ज्यांचें काम असेल त्यांच्याकडून कामाच्या जातीप्रमाणें ठरल्या प्रमाणांत पैसे घेण्याचा त्याला अधिकार असतो. या कामदारावर कॉमार्काच्या न्यायाधिशाची देखरेख असते. न्याय व अंमलबजावणी या खात्यांची पूर्ण फारकत करण्यांत आलेली आहे.

५३. इतर खातीं:—प्रजेच्या आरोग्यविषयक व्यवस्थेसाठीं प्रत्येक तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं एकेक आणि कुळें स्टेशन व सासष्टींतील वेल्ली गांव येथें एकेक याप्रमाणें एकंदर १३ डॉक्टरांची आरोग्य खात्याचे प्रतिनिधि म्हणून नेमणूक केलेली असते. या खात्याचा मुख्याधिकारी हा नवीन गोव्याच्या सरकारी वैद्यक पाठशाळेचा मुख्याध्यापक व रुग्णालयाचा वरिष्ठ असतो. बांधकाम आणि रेल्वे व बंदर या खात्यांचे मुख्याधिकारी युरोपियन विश्वविद्यालयाचे स्थापत्यशास्त्र व यंत्रशास्त्रविशारद असावे लागतात. शेतकी व जंगल खात्यांतर्फे पण स्वतंत्र रूपाची अशी 'शेतकी–पतपेढी' सन १९२४ पासून उभारली असून तिच्यांतून शेतकऱ्यांस फक्त बींबियाणें, खतें व आऊतें विकत घेण्यासाठीं ५ पासून ८ पर्यंत टक्के व्याजानें जमीनीवर किंवा तारणावर १ पासून १० वर्षांच्या मुदतीसाठीं जरूर तितकी रक्कम कर्जाऊ घेतां येते. शेतकी पतपेढीच्या सुमारें ५० पोटकचेऱ्या ठिकठिकाणीं उघडण्यांत आलेल्या आहेत. तार–टपाल खात्यानें १९१६ पासून सेव्हिंग बँक किंवा द्रव्यसंग्राहक पतपेढी काढली आहे. तींत कोणालाही ४ आण्यांपासून ५००० रुपयांपर्यंत ठेवी ठेवतां येतात व जरूर लागेल त्याप्रमाणें ८ आण्यांहून कमी नाहीं इतकी रक्कम पाहिजे तेव्हां घेतां येते. ठेव ठेवल्यापासून ३० दिवसांनंतर ३ टक्यांप्रमाणें ठेवीदारास व्याज देण्यांत येतें व तें त्यानें न घेतल्यास प्रतिवर्षाच्या जानेवारीपासून मुद्दलांत जमा करून त्यावरहि व्याज आकारलें जातें.या खात्यामार्फत टेलिफोन व रेडियो यांचीही तुरळक व्यवस्था झाली आहे. बहिर्व्यवस्था खात्याकडे वसाहतमंत्री, परराष्ट्रीय सरकारें आणि पोर्तुगाल व इतर राष्ट्रें यांच्या वसाहतींचीं सरकारें व वकिलाती यांच्याशीं संबंध येणाऱ्या व्यवहाराची निरवानिवर सोंपविलेली असते. या खात्याचा वरिष्ठाधिकारी बहुधा लष्करी अंमलदार असतो

व त्याला चीफ ऑफ कॅबिनेट असा हुद्दा असतो. लष्करी व्यवस्थेसाठीं गोमंतकाचे ३ मुख्य व ९ पोटविभाग केलेले आहेत. पोलीस खात्याचा समावेशही यांतच होत असतो. आणि त्यांत घोडदळ व पायदळ पलटणी असतात. राखीव सैन्याची एक तुकडी राजधानींत आणि एक तुकडी सत्तरी तालुक्याचें मुख्य ठिकाण जें वाळपई तेथें असते. या खात्यांत एकंदर सुमारें पावणेदोन हजार लहान मोठे सैनिक असून त्यांत ६२ अंमलदार किंवा ऑफिसर आहेत. अंमलदारांत युरोपियन व युरेशियन लोकांचा भरणा आहे. लहानमोठ्या बंदरांवर आणि त्यांत येणाऱ्या नावा अगर बोटी यांवर देखरेख करण्याचें काम नाविक खात्याकडे असतें. पणजीस एक छोटीशी वेधशाळा आहे. तिचें कामही याच खात्यामार्फत केलें जातें. सरकारी फेरी बोटीची व्यवस्था पूर्वी हेंच खातें पाही. पण १९२५ पासून त्याची देखरेख व जमाखर्च हीं स्वतंत्र करण्यांत आलीं असून सदर व्यवस्था एका खाजगी कंपनीकडे सोपविण्याचे बेतही सरकार मधून मधून करीत असतें. या उभय खात्यांतून असणारे दिवाणी कामदार सोडून इतर सर्व लहान मोठ्या सैनिकांवरचे खटले चालविण्यासाठीं त्यांचें खास 'त्रिबुताल–मिलितार ' असतें.

५४. सरकार–सल्लागार–मंडळः— स्थानिक राज्यकारभारविषयक कायदेकानू करण्यासाठीं वरील नांवाचें एक मंडळ असतें. त्याचा अध्यक्ष गव्हर्नर जनरल असून प्रो कुरादोर द रॅपब्लिक आणि मुलकी व्यवस्था,बांधकाम व जमाबंदी या खात्यांचे वरिष्ठाधिकारी हे ४अधिकारतः, आणि गव्हर्नर जनरलनें नेमलेले ५ बिगर कामदार नागरिक व प्रजेनें निवडलेले ५ प्रतिनिधि याप्रमाणें त्याचे एकंदर १४ सभासद असतात. अधिकारतः असणारे ४ सभासद तेवढे सरकारी म्हटले जातात आणि सरकारनिर्मित व प्रजानियुक्त १० सभासदांना 'बिनसरकारी' ही संज्ञा देण्यांत येते. मंडळाला एक उपाध्यक्ष असतो व त्याची निवड गव्हर्नर जनरल सरकारी सभासदांतून एकेका वर्षासाठीं करितो. ही निवड कायम होण्यास वसाहतमंत्र्याची मंजुरी लागते. लोकनियुक्त ५ प्रतिनिधींपैकीं एक दमण व दीव या जिल्ह्यातर्फेचा, एक नव्या काबिजादींतील सातही तालुक्यांतर्फेचा व तीन जुन्या काबिजादींतील चारही तालुक्यांतर्फेचे असतात आणि ते त्या त्या विभागांतील मतदारांकडून निवडून घेतले जातात. मतदारांचा अधिकार वयांत आलेल्या व पोर्तुगीज भाषा लिहितांवाचतां येणाऱ्या पोर्तुगीज नागरिकांस तेवढा; पण वर्ण–धर्म जात्यतीतपणें आहे. मतदारांच्या याद्या म्युनिसिपालिटचांकडून प्रतिवर्षी तयार केल्या जातात व निवडणुकांच्या प्रसंगीं योग्य अवधीपूर्वी त्या मतनोंदणीच्या ठिकाणावर रवाना करण्यांत येतात. मतदारसंघ संयुक्त असून राखीव जागा मुळींच नाहींत. बिनसरकारी सभासदांना वेतन किंवा भत्ताही नसतो. पण राजधानीबाहेर वास्तव्य असणाऱ्यांना प्रवासखर्च देण्यांत येतो. चौदाही सभासदांना बदली सभासद असतात. व ते मुख्यावरोबर नेमले किंवा निवडले जातात. या मुख्य किंवा बदली सभासदांनीं प्रतिनिधित्वासाठीं उमेदवारी दाखविलीच पाहिजे असा निर्बंध नाहीं. बिनसरकारी सभासदांच्या निवडणुका अगर नेमणुका दोन –दोन वर्षांच्या कालावधीनें होत असतात. मंडळाच्या साधारण बैठकांच्या श्रेणी जानेवारी ते फेब्रुवारी व जुलै–ते ऑगस्ट याप्रमाणें प्रतिवर्षी दोन–दोन होत असतात. आणि बैठका पणजीच्या राजवाड्यांत सामान्यतः आठवड्यांतून दोनदां भरत असतात. याशिवाय जरूर लागेल तेव्हां असाधारण बैठका बोलावण्याचा अधिकारही गव्हर्नर जनरलास आहे.न्याय, लष्कर व नाविक हीं खातीं आणि पोर्तुगाल व इतर राष्ट्रें किंवा त्यांच्या वसाहती यांच्याशीं संबंध येणाऱ्या प्रश्नांचा निकाल लावणें किंवा तत्संबंधीं कायदे करणें हीं कामें मध्यवर्ति म्हणजे पोर्तुगाल सरकारकडे राखून ठेवण्यांत आलीं असून केवळ पोर्तुगीज हिंदुस्थानशीं निगडित असणाऱ्या बाबींपुरते कायदे करण्याचें काम काय तें 'सरकार सल्लागार मंडळाकडे सोंपविलें' आहे. आणि पुनः त्यांतीलही कांहीं बाबींवर तेवढें त्याला आपलें निर्णयिक मत देतां येतें व इतरांवर फक्त अभिप्राय व्यक्त करूनच थांबावें लागतें. अंमलबजावणीची अंतिम सत्ता वसाहतमंत्र्याच्याच हातीं असते. म्हणजे स. स. मंडळानें पास केलेले ठराव किंवा कायदे त्याला तहकूब, दुरुस्त किंवा रद्दही करतां येतात. स्थानिक सरकारला ज्या बाबींवर निर्णयिक मत देतां येते त्या बाबींसंबंधीं गव्हर्नर जनरल व स. स. मंडळाचें बहुमत यांच्यांतच मतभेद झाला तर तिचा निकालही वसाहतमंत्रीच 'वासाहतिक वरिष्ठ मंडळाचा'सल्ला घेऊन लावीत असतो. सरकार सल्लागार मंडळापुढें ठराव किंवा बिलें सादर करण्याचें व कोणत्याही प्रश्नासंबंधीं सरकारतर्फेचा खुलासा करण्याचें काम सामान्यतः

गव्हर्नर जनरलच करीत असतो. लोकनियुक्त सभासदांना लेखी व तोंडी अर्ज करून जरूर ती माहिती मागवितां येते. पण यांना फक्त असेच ठराव किंवा कायद्याचे मसुदे मंडळापुढें मांडतां येतात कीं,ज्याच्यामुळें खर्चाचा बोजा उत्पन्न होत नाहीं. सरकार सल्लागार मंडळाचें पोर्तुगीज नांव Conselho Do Go verno असें आहे.

५५. खास विभागः–(Seccao Especial do C.G.) स.स.मंडळाच्या सभासदांपैकीं प्रोकुरादोर द रेंपूब्लिक, आणि एक सरकारनियुक्त व दोन लोकनियुक्त सभासद अशा ४ जणांचा एक 'खास विभाग ' असतो. व स.स. मंडळानें आंखून दिलेल्या धोरणानुसार नियमावली तयार करण्यासारखीं अंमलबजावणीच्या स्वरूपाचीं कामें त्यांच्याकडे देण्यांत आलेलीं असतात. या खास विभागाचे अध्यक्षही गव्हर्नर जनरलच असून त्यांना दोन्ही ठिकाणीं निर्णायक मत देण्याचा (Veto) अधिकार असतो.

५६.जिल्हा मंडळः–(Conselho De Districto)गव्हर्नर जनरलच्या दिमतीस सल्लागार मंडळ असतें तर गव्हर्नरच्या दिमतीस जिल्हामंडळ असतें. तिसवाडी कॉमार्कातील सरकारी अखत्याराचा प्रतिनिधि; आरोग्य, बांधकाम व जमाबंदी या खात्याचे दुय्यम मुख्याधिकारी; तिसवाडी म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष; सरकारमान्य असे व्यापारी व उद्यमीय संघ, जमिनदार व शेतकरी संघ, जास्तींत जास्त कर भरणारे ६० नागरिक आणि सरकार सल्लागार मंडळ यांनीं निवडून दिलेला एकेक प्रतिनिधि असे ९ जण या मंडळाचे सभासद असतात आणि गव्हर्नर जनरलनें नेमलेला कोणत्या तरी एका खात्याचा मुख्याधिकारी हा त्याचा १० वा सभासद अध्यक्ष असतो. दमण व दीव येथील गव्हर्नरांच्या दिमतीसही अशींच जिल्हामंडळें असतात. पण त्यांची घटना भिन्न असते. स.स. मंडळानें केलेल्या कायदेकानूंची अंमलबजावणी आपापल्या जिल्ह्याचापुरती योग्य प्रकारें कशी करावी यासंबंधीं गव्हर्नर जनरलला सल्ला देणें, आणि म्युनिसिपालट्या, ग्राममंडळें आणि धार्मिक,शैक्षणिक व दीन सहाय्यक सार्वजनिक संस्था यांचे कारभार व जमाखर्च आणि जिल्ह्यांतील बांधकामादिकांचे करार यांच्या कायदेशीरपणाबद्दल निर्णय देणें हीं या मंडळाचीं मुख्य कामें होत. या मंडळाच्या बहुमताचा गव्हर्नराशीं एकाद्या बाबतींत मतभेद झाला तर ती बाब गव्हर्नर जनरलकडे सोंपविली जाते.आणि तो स. स. मंडळाच्या खास विभागाचा सल्ला घेऊन तिचा अखेरचा निकाल लावीत असतो.

५७. "त्रिबुनाल आदमिनीशआतीव्हु,फिश्काल इ दश् कॉन्तश्" या नांवाचें न्यायालयाच्या स्वरूपाचें एक मंडळ असतें. त्यांत नवीन गोव्याच्या हायकोर्टाचे पांचही न्यायाधीश, गव्हर्नर जनरलनें प्रतिवर्षीं नेमलेला एकाद्या अंतर्व्यवस्थाविषयक खात्याचाच वरिष्ठाधिकारी,आणि सरकार सल्लागार मंडळानें दर दोन वर्षांनीं निवडलेला आपल्यां तला एक प्रतिनिधि असे सात कायम सभासद असतात. जिल्हामंडळ, म्युनिसिपालट्या व ग्राममंडळें यांच्यासाठीं झालेल्या निवडणुका; सार्वजनिक संस्थांचीं कृत्यें; सरकारी कचेऱ्यांचे लोकांशीं किंवा कंपन्यांशीं झालेले करार; गव्हर्नर जनरल खेरीज मुलकी व्यवस्था खात्यांतील इतर कोणत्याही वरिष्ठाधिकाऱ्यांचीं कृत्यें यांच्यासंबंधीं लोकांच्या किंवा सरकारी कामदारांच्या तक्रारी असल्या तर त्यांचा निर्णय लावणें आणि गव्हर्नर जनरलनें काढलेल्या फर्मानांत एखादी खर्चाची बाब असली तर खर्चाऊ रक्कम कायदेशीर आहे कीं नाहीं यासंबंधीं अभिप्राय देणें हीं मुख्य कामें या मंडळाकडे देण्यांत आलेलीं आहेत. मंडळापुढें आलेली बाब जकातखात्याशीं संबंध येणारी असली तर त्याचा मुख्याधिकारी आणि जमाबंदीशीं संबंध यणारी असतां त्याचा मुख्याधिकारी या मंडळावर आठवा सभासद म्हणून बसतो.प्रोकुरादोर द रेंपूब्लिक हाच या मंडळापुढेंही सरकारची बाजू मांडणारा असतो. या मंडळाच्या निकालाविरुद्ध अपील करावयाचें असतां तें पोर्तुगालांत "वासाहतिक वरिष्ठ मंडळा"कडे करावें लागतें.

५८म्युनिसिपालिटचाCamara Municipal खास तालुक्यांतील लोकांच्या,रस्ते, प्रकाश, पाणी, मंडया, शिक्षण इ. संबंधींच्या सुखसोयी करण्यासाठीं 'काम्र मुनिसिपल ' म्हणजे म्युनिसिपालिटी असते. म्हणून तिला 'नगरपालिका' ही संस्कृत संज्ञा न देतां, द्यावयाची तर, 'महालपालिका'ही द्यावी लागेल. यावरील कामासाठीं जो पैसा पाहिजे तो उत्पन्न करण्याकरितां लोक सरकारास जो प्रत्यक्ष कर देतात त्यावर ५० टक्केपर्यंत जादा कर बसवून तो लोकांकडून वसूल करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटचांस देण्यांत आला आहे. याशिवाय आपल्या स्थलसीमेंत येणाऱ्या जाणाऱ्या मालावर जकात बसविणें; करमणुकीचीं साधनें, दुकानें, फेरीवाले, गुत्ते, छापखाने,वाहतुकीचीं तरी,

गाड्या, मोटारी, वगैरे साधनें, यांवर कर बसविणें, वेठ, बिगारी वसूल करणें वगैरे अधिकारही त्यांना आहेत. जुन्या काबिजादींतील म्हणजे तिसवाडी, बारदेश व सासष्टी तालुक्यांतील म्युनिसिपालिटयांत नऊ नऊ आणि नव्या काबिजादींतल्यांत तीन तीन सभासद असतात. मुरगांव तालुक्यांत म्युनिसिपालिटीचे अधिकार व कर्तव्यें तूर्त तेथील 'इंप्रूव्हमेंट ट्रस्ट' म्हणजे शहर सुधारणामंडळाकडे सोपविण्यांत आलीं आहेत. सत्तरी तालुक्यांतील म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष तेवढे सरकारनियुक्त म्हणजे तेथील मामलेदार असून तिचे दोन व बाकी सर्व तालुक्यांतले अध्यक्षांसह सर्व सभासद लोकांनीं निवडून दिलेले असतात. मात्र ते गांव, धंदा, वर्ग अगर अन्य एकाद्या दृष्टीनें बनवलेल्या गटांतर्फेचे असत नाहींत, तर सर्व मतदारांनीं समुदायशः एकाच संयुक्त यादीनें निवडलेले असतात. सरकार सल्लागार मंडळाप्रमाणेंच म्युनिसिपल सभासद निवडण्याचा मताधिकार पोर्तुगीज लिहितां–वाचतां येणाऱ्या सज्ञान नागरिकांस तेवढाच देण्यांत आलेला आहे. अशा मतदारांची एकंदर गोमंतकांतली संख्या १५ हजारांच्या आंतबाहेर आहे. म्युनिसिपालिटयांच्या निवडणुका त्रैवार्षिक असून त्यांच्या अध्यक्षोपाध्यक्षांच्या प्रतिवार्षिक असतात; व त्या निवडून आलेल्या सभासदांकडून वर्षारंभींच्या बैठकींत केल्या जातात. म्युनिसिपल सभा सामान्यतः आठवड्यास एकदां भरत असतात. व त्यांना तालुक्याचा मामलेदार हजर राहतो. पण त्याला सभेंत मताधिकार किंवा वाचाधिकारही नसतो. सर्व सभासदांना बदली सभासद असतात व ते मुख्यांच्या बरोबरच निवडले जातात. या मुख्य किंवा बदली सभासदांनीं स्वतःची उमेदवारी न दाखविली तरी मतांची आवश्यक संख्या मिळाली असतां व ते नालायक नसतां त्यांना आपली जागा व तीही निर्वेतन असतां, स्वीकारावीच लागते. आजारादि बलवत्तर कारण सिद्ध झालें असलें तर अर्थातच त्याला ती नाकारतां येते. म्युनिसिपल उत्पन्नापैकीं वेठबिगारीचें उत्पन्न वाहतुकीच्या साधनांची दुरुस्ती, सुधारणा व वाढ यांच्यावरच खर्च करावें लागतें व म्हणून त्याला 'खास उत्पन्न' व इतरांना 'सामान्य उत्पन्न' अशीं नांवें दिलेलीं असतात. म्युनिसिपालिटचा जरी लोकनियुक्त असतात तरी कर्ज काढावयाचें असतां, व सरकारसाऱ्यामागें जादा कर बसवावयाचा असतां त्यांना स. स. मंडळाच्या खास विभागाची परवानगी तर घ्यावी लागतेच. पण अनेक क्षुल्लक बाबतींतही गव्हर्नर जनरलच्या पसंतीवर अवलंबून रहावें लागतें. कारभारांतील अव्यवस्थितपणाच्या, सरकारची अवज्ञा केल्याच्या वगैरे कायदेशीरपणाच्या मुद्यांवर सरकारला म्युनिसिपालटचा रद्द करतां येतात. मात्र या कामीं सरकार सल्लागार मंडळाची आगाऊ मंजुरी मिळावी लागते व सहा महिन्यांपेक्षां अधिक काल सरकारनिर्मित लोकांच्या हातांत कारभार ठेवतां येत नसल्यानें त्या मुदतीच्या आंत नव्या निवडणुका करून घेणें प्राप्त असतें. सन १९३१ सालीं म्युनिसिपालिटयांचीं वट उत्पन्नें ठोकळ आंकड्यांनीं, तिसवाडी एक लक्ष, बारदेश १ लक्ष ४७ हजार, सासष्टी ७४ हजार, पेडणें १५ हजार, सांखळी १४ हजार, सत्तरी ७॥ हजार, फोंडें २६ हजार, सांगें १६ हजार, केपें १३॥ हजार व काणकोण १२॥ हजार रुपये याप्रमाणें होतीं.

५९. ग्राममंडळः–– (Junta Local) तालुक्याच्या बाबतींत जीं कामें म्युनिसिपालिटीनें करावयाचीं असतात तींच एका गांवांत अगर त्यांच्या गटांत करण्याकरितां तेथें 'ग्राममंडळ' नांवाची संस्था असूं शकते. तिला पोर्तुगीजांत 'झ्यूत लॉकाल' असें अभिधान दिलें जातें. तें अशाच गांवांत किंवा गांवगटांत अस्तित्वांत आणतां येतें कीं, जेथले कमींत कमी २० नागरिक मतदार म्हणून नोंदले गेले आहेत व जेथें म्युनिसिपल कचेरी नाहीं. तिचे सभासद तीन असतात व ते सर्वसामान्यतः लोकनियुक्त असतात. मतदारांची संख्या विसांहून अधिक पण तिसांहून कमी असणाऱ्या गांवांत सरकारी पोर्तुगीज प्राथमिक शाळा असली तर तिचा शिक्षक, ग्राममंडळाचा अध्यक्ष होऊं शकतो. तिघांही सभासदांना बदली सभासद असतात आणि त्यांना व मुख्यांनाही निर्वेतनच काम करावें लागतें. त्यांना आपल्या सत्तासीमेंत येणाऱ्या भागांतील लोकांकडून वेठ बिगारीचा कर तेवढा घेतां येतो, इतर कसलाही येत नाहीं. म्युनिसिपालिटयांना किंवा सरकारला त्यांना द्रव्यसाहाय्य करतां येतें व तें मागण्याचा त्यांना हक्क आहे. आजमितीस ठोकळपणें जुन्या काबिजादींत ६० व नव्या काबिजादींत फक्त २० ग्राममंडळें आस्तित्वांत आलीं आहेत. ग्रामपंचायती किंवा ग्रामसंस्था यांच्यांहून या ग्राममंडळाचें काम पूर्णपणें भिन्न स्वरूपाचें असतें हें उघड आहे.

६०. सरकारचें उत्पन्न व खर्चः–– खास **गोमंतकाच्या सरकारी जमाखर्चाचें कलमवार**

आंकडे काढणें शक्य नाहीं. एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानचें, सन १९३१--३२ या आर्थिक वर्षासाठीं अंदाजलेलें वट उत्पन्न ६० लाख रुपये असून अंदाजी नियमित खर्च ४१॥ लाख आहे. अर्थात् सुमारें १८॥ लक्ष रुपये वर्षाकांठीं शिल्लक पडणार असल्यानें ते सरकारनें देशसुधारणेच्या कामीं विनियोगण्याचें ठरवलें आहे. जमिनीवरील सारा ५४९४००,लोकांनीं व्याजीं लावलेल्या रकमांवरील कर १११४००, गोव्यांतून बाहेर पडणाऱ्या दर इसमामागें १० आणे प्रमाणें घेतली जाणारी डोईपटी ४३६००, इतर सर्व प्रत्यक्ष कर१५७५००, आयात जकात१९७१४००,निर्यात जकात६२९०० व इतर सर्व अप्रत्यक्ष कर ५८६६००, अबकारी ८८०००० इतर सर्व उद्यमीय कर ७३८००, तार टपाल १७८३००, जंगली लाकडाची विक्री ८१४००, सरकारी खाजगी शेतवाडी ९७८००, इत्यादि उत्पन्नांपैकीं आंकडे,लोकस्थितीच्या अभ्यासासाठीं महत्त्वाचे असून त्याच दृष्टीनें खर्चापैकीं पुढील आंकडे लक्षांत घेण्यासारखे आहेत.प्राथमिक शिक्षण २३८ हजार,दुय्यम शिक्षण २१२ हजार, विशिष्ट शिक्षण ६७ हजार, ख्रिस्ती धर्मखातें ६० हजार, इतर मुलकी व्यवस्था १५६० हजार लष्कर–खुष्की ९ लक्ष व दर्यावर्दी ८७ हजार, कर्जावरील व्याज २५० हजार, पेन्शनें ७३८ हजार, सार्वजनिक आरोग्य २९५ हजार, न्यायव्यवस्था ३१४ हजार इ.

६१. गव्हर्नर जनरलला एकंदरींत ३९ हजार आणि दमण व दीव येथील गव्हर्नरांना सुमारें १०॥ हजार रुपये वार्षिक तनखा मिळतो. निरनिराळ्या खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांना ६ पासून १४ हजार रुपयांपर्यंत वार्षिक पगार असतो.

लोकस्थिति

६२. लोकसंख्या:---गोमंतकाची आजमितीस लोकसंख्या, कांहीं शेंकडयांकडे दुर्लक्ष करून, ठोकळ आंकडयानें ५ लक्ष आहे. त्यांत २० जणांनीं आपण धर्मरहित म्हणजे कोणताच धर्म आचरीत नाहीं म्हणून नोंद करविली असून १७० जणांचा धर्म अज्ञानामुळें नोंदतां आलेला नाहीं. १० पार्शी, ४० जैन व ५० प्रॉटेस्टंटपंथी ख्रिस्ती असे तुरळक धर्मीयांचे आंकडे आहेत. इस्लाम धर्मीयांची संख्या ५॥। हजारांच्या ऐसपैस आहे. या सर्व आंकडयांची ठोकळ बेरीज जी सहा हजार ती पांच लाखांतून बाद करतां उरणाऱ्या लोकांत २४७ हजार कॅथोलिक पंथी ख्रिश्चन व तितकेच हिंदु आहेत. १९२१ सालच्या खानेसुमारींत कॅथोलिकांची संख्या हिंदूंच्याहून सुमारें २० हजारांनीं जास्ती असल्याचें निर्दिष्ट आहे. पण चालू वर्षपंचकांत सुमारें १० हजार ख्रिश्चन गावडयांनीं हिंदूधर्मांत विधिपूर्वक पुनरागमन केलें असल्यानें कॅथोलिकांच्या संख्येंत घट पडून तितकीच हिंदूंच्यांत भर पडली आणि त्यामुळें हिंदू व कॅथोलिक यांची संख्या वरीलप्रमाणें निमानिम झाली.

६३. राजकीय:---पोर्तुगीज व इंग्रज यांच्या वासाहतिक राज्यकारभाराच्या धोरणांत मूलतःच फरक आहे. आपल्या ताब्यांत आलेल्या प्रदेशांतील लोकांना नमवावें व त्यांचें सर्व बाजूंनीं द्रव्यशोषण जळूप्रमाणें करावें हें इंग्रजांचें आद्य तत्त्व, तर केवळ संपत्तीनें समाधान न मानतां स्वसंस्कृतिसंवर्धनही करावें हें पोर्तुगीजांचें ब्रीद. 'तुमच्या संस्कृतीचें संवर्धन तुम्ही पाहिजे तितकें करा, आम्हांस द्रव्यापहारास मात्र अडचण करूं नका म्हणजे झालें असें इंग्रज म्हणणार, तर, 'एक वेळ द्रव्य न मिळालें तरी चालेल, पण तुम्ही पोर्तुगीज मात्र बना' असें पोर्तुगीज बजावणार. इंग्रजांप्रमाणें पोर्तुगीजही हिंदुस्थानांत प्रथम मत्तेकरतांच आले. पण इंग्रज मत्तेकरतां सत्ता पाहिजे यासाठीं ती कमावण्यापर्यंतच जाऊन थांबले; तर पोर्तुगीज तेवढयावर न विसंबतां पुढें गेले व सत्तेकरितां आत्मीयता पाहिजे म्हणून तिचा प्रसारही करूं लागले. हिंदी लोकांच्या अंगांत एकदां का पोर्तुगीज आचारविचार, रीतिभाति, खाणें–लेणें, भाषा–वाङ्मय इत्यादि भिनलीं कीं, पोर्तुगीजांच्या हातच्या व्यापाराला तर कायम गिऱ्हाईक मिळालेंच. पण धार्मिक, सामाजिक व भाषिक एकात्मतेमुळें त्यांचें राष्ट्रप्रेमही हिंदुस्थानाऐवजीं पोर्तुगालवर खिळलेंच म्हणून समजावें, असें गोमंतकजेत्या अलबुकर्कचें मत ठरून गेलें होतें. गोमंतकांतील ख्रिस्ती धर्म–प्रसाराच्या मुळाशीं पाद्री लोकांचें धर्मवेड होतें हें तर खरेंच. पण वेडाच्या वृक्षाला मुत्सद्यांकडून जें भरपूर खतपाणी मिळालें त्याचें कारण वरील विचारसरणीच होय हेंहीं खोटें नव्हे. स्वतः आलबुकर्कनें ख्रिस्ती धर्मप्रसारास साह्य मुळींच केलें नाहीं आणि तो तें करता कीं नाहीं याचीहि वानवाच आहे. पण त्यानें देखील हिंदी स्त्री–पुरुषांचे विवाह पोर्तुगीज पुरुष–स्त्रियांशीं लावून देण्याची प्रथा पाडून ती सार्वत्रिक होण्याबद्दल प्रयत्न केलेच. हिंदुस्थानांत प्रति–पोर्तुगाल निर्मावा अशी त्याची आकांक्षा होती. इंग्रजांनीं सरकारी रीत्या जसा धर्मप्रसार केला नाहीं तसाच हाही

प्रकार केला नाहीं. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत फैलावण्यास इतर कारणांप्रमाणेंच त्यांची परधर्मसहिष्णुता कारणीभूत झाली आणि पोर्तुगीजांचें हिंदुस्थानांतील राज्य आटण्यास इतर कारणांप्रमाणेंच त्यांचा परधर्मद्वेष कारण झाला ही गोष्ट सर्वसंमत होय. राज्यविस्ताराच्या दृष्टीनें पोर्तुगीजांचें धोरण फसलें, इंग्रजांचें साधलें ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. पण कमावलेलें राज्य चिरस्थाई राखण्याच्या दृष्टीनें इंग्रजांचें फसूं घातलें असून पोर्तुगीजांचें साधून गेलें आहे, असें ब्रिटिश हिंदुस्थान व गोमंतक यांच्या राजकीय जीवनाकडे पाहून म्हणावेंसें वाटतें. पोर्तुगीज व इंग्रज यांच्या वासाहतिक राज्यपद्धतींत हा जो फरक आहे त्याचें कारण त्या त्या लोकांच्या स्वभावांतच असेल, किंवा ते ज्या कालांत स्वदेशांहून दिग्विजयास निघूं लागले त्या कालांत युरोपांत झालेल्या विचारक्रांत्यांतही असेल. पोर्तुगीज लोक युरोपांतील पुनरुज्जीवनापूर्वी (Renascence) म्हणजे स्वतः रानटी स्थितींत किंवा क्रूर मनोवृत्तींत असतांना हिंदुस्थानास पोंचले व इंग्रज लोक पुनरुज्जीवनानंतर स्वतःची सुधारणा सुरू झाल्यावर आले; पण कारण कांहींही असलें तरी इतकें निश्चित कीं, इंग्रजांचें धोरण Subjugation चें किंवा Domination चें तर पोर्तुगीजांचें Assimilation चें असून तें आज या घटकेपर्यंतही सौम्य मार्गांनीं, तसेंच चालत आलें आहे. लोकांना ख्रिस्ती करून त्यांचीं नांवें जशीं बदललीं तशींच अनेक गांवांचीं मूळ हिंदी नांवें रद्द करून त्यांच्यावर पोर्तुगीज नांवांचें लेणेंही त्यांनीं चढविलें.

६४. या धोरणामुळें जे गोमंतकीय लोक ख्रिस्ती झाले, त्यांना पोर्तुगीजांनीं एक शतकभर अगदीं समानतेनेंच वागवलें इतकेंच काय पण धर्मांतरास तयार नसलेल्यांची मालमत्ता बहाल करून त्यांना श्रीमंतही बनविलें. शिवाय घेतलेला मुलख स्वसत्तेंत स्थिर करावयाचा तर देशांतील कांहीं जणांचें तरी पाठबळ हवें असतेंच कीं नाहीं? त्यासाठींही पोर्तुगीजांना धर्मांतरितांस किंवा ख्रिस्तीकृतांस स्वसमान लेखणें जरूर होतेंच. परंतु पुढें एका बाजूनें गोव्यांत आलेल्या पोर्तुगीजांची संख्या बरीच फुगली. तर दुसऱ्या बाजूनें ख्रिस्तीकृत हिंदी लोकांच्या आकांक्षाही वाढत चालल्या. ख्रिस्तीकृतांत ब्राह्मण अर्थात् बुद्धिजीवी वर्गाचाही भरणा होताच. ते सरकारी नोकऱ्यादि बाबतींत युरोपियनांचे प्रतिस्पर्धी बनले. १७व्या शतकाच्या उत्तरार्धापासून प्रजेमध्यें चार किंवा पांच वर्ग आणि त्यांचे परस्पर प्रतिस्पर्धि असे दोन तट स्पष्ट दिसून येऊं लागले. जे पोर्तुगीज लोक सरकारी अधिकारी म्हणून येत व कांहीं कालानंतर परत स्वदेशास जात, त्यांना 'रैनॉइश' म्हणजे राज्यकर्ते, जे पोर्तुगीज येथेंच स्थानिक होऊन रहात व सरकारी नोकऱ्यांवर इतरांआधीं स्वतःचा हक्क शाबीद होतो असें मानीत त्यांना 'कास्तीसु' किंवा तज्जातीय, जे अनुलोम किंवा प्रतिलोम विवाहानें पोर्तुगीजांपासून जनन पावले त्यांना 'मिस्तीसु' किंवा मिश्रित, जे हिंदू ख्रिस्ती बनले त्यांना 'कानारी' म्हणजे 'कानडी'; (या समयास गोव्यांत कानडी भाषेचा व मुख्यतः लिपीचा प्रसार बराच होता). आणि जे हिंदु 'निर्लज्जपणें' स्वभूमींत राहिले त्यांना, 'ज्येतीय्युश' म्हणजे जंगली अशा संज्ञा पडल्या. पैकीं बिचारे हिंदु! त्यांना रहाण्यापुरतें भूक्षेत्र राहिलें तरी स्वर्ग मिळाल्याप्रमाणें झालें, त्यांना स्पर्धाक्षेत्र कुठचें आलें आहे? राहिले जे चार वर्ग, त्यांतून राज्यकर्ते व त्यांचे जातभाई झाले एका बाजूला आणि कानडी व मिश्रित गेले दुसऱ्या बाजूस. या दोन तटांतला झगडा अर्थातच मुख्यतः सरकारी नोकऱ्यांसाठीं, खऱ्या राजकीय हक्कासाठीं नव्हता. एका बाजूनें हा कलह उतास येत होता तर दुसऱ्या बाजूनें पोर्तुगीज लोकांनीं हस्तगत केलेलीं ठाणीं इतर युरोपियन व मराठे जिंकीत चालले होते. तिकडे पोर्तुगालांतही धर्मवेडाचे दुष्परिणाम लक्षांत येऊन जेसुईट लोकांना हद्दपार करण्याची लाट उसळली होती. तेव्हां हिंदी ख्रिस्त्यांनाही दुखवणें म्हणजे उरलेंसुरलें राज्य गमावण्यास सहाय्य करण्यासारखेंच होय असें वाटून तत्कालीन पोर्तुगीज प्रधानमंत्री मार्केझ द पँबाल यानें १७७५ च्या सुमारास ख्रिस्तीकृत किंवा 'कानारी' आणि जेते यांच्यामधला राजकीय भेदच पार दूर सारण्याचें महत्कार्य तडीस नेलें. मात्र, अर्थातच, हे समान हक्क हिंदूंना देण्यांत आलेले नव्हते. तथापि कायद्यानें समानता प्रस्थापित झाली तरी जित व जेते ख्रिश्चन हा भेद कोणाच्याच मनांतून नष्ट झालेला नव्हता. पण १८२६ सालीं पोर्तुगालांत एकमुखी राज्यसत्तेवर पार्लमेंटचें नियंत्रण बसलें. आणि त्याच सालच्या सनदेंत वसाहतींना स्वतःतर्फेचे पार्लमेंटरी प्रतिनिधि निवडून पाठवण्याचा हक्क मिळाला. गोव्याच्या वाट्याला प्रथम तीन प्रतिनिधि आले. पण नव्या काबिजादींत बहुतेक सारी हिंदूंचीच वस्ती असल्यानें निवडणुकींत भाग

घेण्याचा अधिकार फक्त जुन्या काबिजादींना तेवढा मिळाला होता, ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. नव्या काबिजादींना, अर्थात् पोर्तुगीज लिहितां वाचतां येणाऱ्या सज्ञान हिंदूंना, तो १८४५ सालीं देण्यांत आला आणि सन १८५३ सालीं प्रतिनिधींची संख्या तिन्हींची चार करण्यांत आली. पण फिरंग्यांना फिरफिरून रंग फिरवण्याची जन्मजात खोड असल्यानें १८६३ त ही संख्या चारांवरून एकदम दोन्हींवर उतरविली. आणि १८७२ त दोहोंवरून पुनः तिहींवर चढवून १८९५ त एकदम एकावर आणून सोडली. या बहुतेक निवडणुकींत बहुधा हिंदी ख्रिस्तीच निवडून येत व ते पोर्तुगीज पार्लमेंटांत आपल्या बुद्धिमत्तेनें चांगलीच छाप पाडीत. १८३५ मध्यें बॅर्नार्दु पॅरिश द सील्व्ह या गृहस्थाला पोर्तुगीज हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल म्हणून नेमण्यांत आलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. हा गृहस्थ प्रथम पार्लमेंटचा प्रतिनिधि म्हणूनच गोव्यांतून गेला होता. पोर्तुगालच्या प्रधानमंडळांत व पोर्तुगालच्या परराष्ट्रांतील वकिलातींतही ह्यांच्यांतील कांहीं गृहस्थांनीं स्थान मिळविलें. ख्रिस्तीकृत हिंदी लोकांचा हा उत्कर्ष प्रथम त्यांच्यांशीं मिळून मिसळून वागणाऱ्या 'मिश्रितां'च्या डोळ्यांत खुपूं लागला आणि गोव्यांत स्थाईक होऊन रहाण्यासाठीं येणाऱ्या पोर्तुगीजांची संख्या इतकी घटली कीं, ते स्पर्धाक्षेत्रांत निर्माल्यवतच झाले. तेव्हां मिश्रितांच्या मत्सरानें ख्रिस्तीकृतांविरुद्ध राज्यकर्त्यांचें मन कलुषित करण्याचे हरप्रयत्न झाले. आणि कातडीच्या रंगानें हे स्वसम म्हणून राज्यकर्त्यांनीं त्यांना जवळ केलें. व्हाइसराय बर्नार्दु पॅरिश द सिल्व्ह यांना पदच्युत करविलें तें त्यांनींच. कानारी--मिश्तिसूंची ही स्पर्धा १८ व्या शतकाच्या उत्तरचरणापर्यंत जवळजवळ ६० वर्षे जोरदारपणें चालली. मिश्तिसूंचा मुख्य भरणा लष्करांत असे. १८७० च्या सुमारास सरकारनें सैनिकांचे पगार व संख्या यांची कपात करण्याचें ठरविलें.तेव्हां या लोकांनीं त्याविरुद्ध बंड पुकारलें. पण साम, दाम, दंड, भेदानें तें पार मोडून टाकून नंतर सरकारनें आपला लष्कर कपातीचा हेतु तडीस नेलाच. त्या वेळेपासून या वर्गाची स्थिति अशी कांहीं खालावत गेली कीं, आजमितीस ती अनुकंपनीय होऊन बसली आहे. अर्थात् ख्रिस्तीकृतांना कोणीच प्रतिस्पर्धी राहिला नसल्यामुळें अभिजात वर्ग तोच होऊन बसला. हिंदूंना १८४५ पासून राजकीय अस्तित्व आलें होतें. व तज्जन्य मतदानाचाही हक्क मिळाला होता. पण या समयास स्थिति अशी झाली कीं., खुद्द अस्सल पोर्तुगीजांचा द्वेष जितका निवाला तितकाच धर्मांतरित नकली पोर्तुगीजांचा हिंदुद्वेष प्रखर बनला. त्यामुळें हिंदूंना त्यांनीं राजकीय क्षेत्रांतच काय पण अन्य कोणत्याही क्षेत्रांत देखील डोकें वर काढूं दिलें नाहीं. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं सुद्धां हिंदूंचा धार्मिक छळ कोणत्या प्रकारें झाला हें मागें ' इतिहास' प्रकरणाच्या अखेरीस सांगितलेंच आहे. अन्य क्षेत्रांतल्या छळाची कल्पना येण्यासाठीं सन १९०७ सालांत हिंदूंना सरकारी शिक्षक होण्याची मनाई करण्यांत आली होती, ही एक गोष्ट सांगितली तरी पुरे पडणारी आहे. पण याच वेळेस एकीकडे हिंदुस्थानांत बंगाली फाळणीच्या उठलेल्या जोरदार लाटा गोमंतकीय हिंदूपर्यंत मराठी वर्तमानपत्रांच्या द्वारा पोंचत होता तर दुसरीकडे पोर्तुगालांत राजकुटुंबांचा जरूर तर नाश देखील करून प्रजासत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न चालले होते. सुदैवानें या प्रयत्नास यश आलें व तारीख ५ ऑक्टोबर १९१० रोजीं पोर्तुगीज रिपब्लिकची ध्वजा पोर्तुगालप्रमाणेंच त्याच्या अधिसत्तेखालीं असलेल्या गोव्यादि प्रदेशांवरही फडकली.

६५. रिपब्लिक स्थापन होतांच हिंदूंना धार्मिक स्वातंत्र्य मिळालें. आणि पोर्तुगीजांचें Assimilation चें धोरण कायम ठेवून जे राजकीय हक्क त्यांना देतां येणें शक्य होतें तेही मिळाले यांत शंका नाहीं. पोर्तुगालच्या पार्लमेंटांत प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क गोव्याला आधींच मिळाला होता. रिपब्लिकनंतर त्यांची संख्या एकाची दोन झाली. आणि त्यांपैकीं एकाला खुद्द सिनेटमध्यें बसण्याचा अधिकारही देण्यांत आला. धर्मस्वातंत्र्याच्या लाभामुळें हिंदूंत अतिशयच उत्साह संचारला होता आणि ख्रिश्चनांमध्यें तितकीच विषण्णता दिसूं लागली होती. ब्रिटिश हिंदूंतील चळवळीमुळेंही हिंदू लोकांचा आळस झडत होता. या उभय कारणांनीं पार्लमेंटच्या प्रतिनिधींच्या निवडणुकींत त्यांनीं मोठ्याच उमेदीनें भाग घेतला आणि सरकारची सहानुभूतिही त्यांनाच मिळाल्यानें ख्रिश्चनांनीं पाठबळ दिलेला दैवी प्रतिनिधि अशयस्वी होऊन हिंदूंनीं पुरस्कारलेला 'सैतानी ' प्रतिनिधि निवडून आला. तेव्हां हिंदूंचा आनंद तोच ख्रिश्चनांचा खेद असे उद्‌गार कट्टर ख्रिश्चन जाहीर रीतीनें लिहून व बोलून काढूं लागले. पण त्या वेळेपासून हिंदूंचा राजकारणांतील दर्जा जो उंच्चावत गेला तो आज-

तागायत सरळ वाट चालत आहे. या वर्गकलहाची किंवा धर्मवार राजकीय पक्षांची थोडी विस्तृत हकीगत देण्याचा उद्देश हा कीं, गोमंतकांतील हिंदूंना आपला उत्कर्ष साधून घेण्याला वाव मिळूं लागल्याला अजून पाव शतकही भरत नाहीं, हें महाराष्ट्रीय वाचकांच्या लक्षांत यावें.

६६. रिपब्लिकच्या स्थापनेनंतर पोर्तुगाल सरकारनें धर्म व राजकारण, जीं तावत्कालपर्यंत एकमेकांत गुंतून चालत होतीं त्यांची, फारकत केली. पण लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही कीं, हा फारकतीचा कायदा गोव्यांत मात्र अंमलबजावणींत पडला नाहीं. तथापि वसाहतींना आर्थिक व व्यवस्थाविषयक बाबतींत स्वातंत्र्य देण्यांत येईल असें जें त्या सरकारनें आश्वासन दिलें होतें तें चारपांच वर्षांच्या आंत गोव्यांत अंशतः अंमलांत आलें. पोर्तुगीज हिंदुस्थानची स्वराज्यसनद पहिल्यांदा १९१७ सालीं जाहीर झाली. या सनदेनें पोर्तुगीज हिंदुस्थानचा राज्यकारभार हांकण्याकरतां एक 'सरकार सल्लागार मंडळ' Conselho Do Governo निर्माण केलें. या मंडळाचे अध्यक्ष गव्हर्नर जनरल असावे आणि त्यांनीं नेमलेले ९ सरकारी अधिकारी व लोकांनीं निवडलेले१०प्रतिनिधि मिळून २० सभासद असावे. आणि १ जुलै१९१८ पासून तें अस्तित्वांत यावें असें पोर्तुगाल सरकारनें फर्माविलें. आणि तदनुसार सदर सालच्या मार्चमध्यें निवडणुकाही उरकून घेण्यांत आल्या. पण याच समयास रिपब्लिक अमदानींतले पहिले व लोकप्रिय गव्हर्नर जनरल दी कौसेस द कॉशन हे आपल्या ७ वर्षांच्या कारकीर्दीनंतर पोर्तुगालास गेले आणि त्यांच्या जागीं जे. कॅ. फरैतश रिवैस आले त्यांना हिंदुस्थान स्वराज्याच्या दृष्टीनें हिरवा म्हणजे कच्चा वाटला. आणि योगायोगाची गोष्ट अशी कीं, ज्या दिवशीं स. स. मंडळाचा अनावरण समारंभ व्हावयाचा त्याच दिवशीं "दुसऱ्या हुकुमापर्यंत तो अमलांत ठेवावा" असा साम्राज्य सरकारकडून हुकूम येऊन थडकला. स्वराज्याचा हा अगदीं तोंडापर्यंत आलेला घास अशा आकस्मिक प्रकारें हिसकावून घेण्यांत आल्यानें लोकांचा फार विरस झाला. व त्यांनीं थोडे हातपायही हालवले. पण गव्हर्नरसाहेब खमंग पडल्यानें त्यांनीं अध्यक्षांसह १० सरकारी अधिकारी व ६ लोकनियुक्त सभासद याप्रमाणें स. स. मंडळाची घटना पोर्तुगाल सरकारकडून निश्चित करून घेऊन ता. ८ जानेवारी १९१९रोजीं त्याची प्रस्थापनाही करून टाकली. पण लोकांची चळवळ चालूच राहिल्यानें पोर्तुगाल सरकारनें मे महिन्यांत कॅ. रिवैस याना अधिकारसूत्रें कॅ. वॉल्डेल मॉन यांच्या स्वाधीन करून तावडतोब पोर्तुगालास रवाना होण्याबद्दल आज्ञा सोडली.आणि कॅ.मॉन यांना असें फर्माविलें कीं, १९१८ च्या मार्चमध्यें झालेल्या स. स. मंडळाच्या निवडणुका कायदेशीर समजून ता. १ जुलै १९१९ पासून त्याच्या बैठका चालू कराव्या. अर्थातच याप्रमाणें सर्व व्यवस्था केली गेली. पण वर्षाच्या आंतच ती बदलून सरकारनें अध्यक्ष गव्हर्नर जनरलसह ७ सरकारी व ११ लोकनियुक्त याप्रमाणें मंडळाचे सभासद असावे आणि त्याला स. स. मंडळ न म्हणतां 'कायदेमंडळ' (Conselho Legislativo) असें संबोधावें असा हुकूम सोडला. ही व्यवस्था १९२० च्या नोव्हेंबरांत अमलांत आली व१९२६ पर्यंत चालली. या वर्षी पोर्तुगालांतील लष्करबहाद्दरांनीं पार्लमेंट मोडून टाकून सर्वाधिकारी (Ditadura) सरकार प्रस्थापित केलें आणि या सरकारनें 'कायदेमंडळाला' खो देऊन मागें राज्यव्यवस्था सदराखालीं सांगितलेलें तूर्त चालू असलेलें सरकार सल्लागार मंडळ अंमलांत आणलें. याशिवाय सर्वाधिकारी सरकारनें वसाहतींचा पार्लमेंटरी प्रतिनिधि निवडण्याचा हक्क काढून घेऊन त्याऐवजीं 'वासाहतिक वरिष्ठ मंडळ' प्रतिनिधि निवडण्याचा हक्क त्यांना प्रथम दिला. आणि एक निवडणूक होऊन गेल्यावर १९२८ सालीं तोही हिराऊन घेतला. अर्थात् आजमितीस गोवें स्वायत्ततेच्या दृष्टीनें उत्कर्षाभिमुख असण्याच्या ऐवजीं अपकर्षाभिमुख होऊन राहिलें आहे. हें उघड आहे. शासनशास्त्रांत ज्यांना 'मूलभूत हक्क' म्हणतात ते सारे पोर्तुगालांतल्याप्रमाणें गोव्यांतल्या प्रजाजनांसही आहेत.पण त्याचा वापर 'खास कायद्यांनीं' इतका नियंत्रित करण्यांत आला आहे कीं, 'मूलभूत हक्क' हे शब्द कधीं कधीं हास्यास्पदही वाटूं लागतात.

६७. धार्मिक व सामाजिक—गोव्यांत मुसलमान समाज अल्पसंख्य तर आहेच. पण इतर दृष्टींनींही तो खालावलेला आहे. गोवें मुसलमानी सत्तेखालीं एकंदरींत सुमारें ५६–५७ वर्षें राहिलेलें आणि तेंही सातत्यानें असें शवटचीं ४० वर्षें. पण या कालांत मुसलमानांना, एकीकडून विजयनगरचा आणि दुसरीकडून पोर्तुगीजांचा मृदंगाप्रमाणें मार खावा लागत असल्यानें त्यांना गोव्यांत स्वसंस्कृतिवर्धनाचे व तिच्या चिरं-

तनाचे उपायच फारसे योजतां आले नाहींत. त्यामुळें, फोंड्यासारख्या ठिकाणचीं सफा मशिदीसारखीं तुरळक वगळल्यास, मुसलमानी संस्कृतीचें पूर्ववैभव दर्शविणारीं लक्षणें किंवा अवशिष्ट चिन्हें गोव्यांत ज्याप्रमाणें विरळाच सांपडतात त्याप्रमाणें परंपरागत वजनदार अशीं इस्लामी घराणींही क्वचितच आढळतात. फोंडें येथील 'काजींचीं' आणि इतरत्रांचीं चार–दोन कुटुंबें प्राचीन काळीं वैभवशाली असावीं यांत शंका नाहीं. पण आज तींही समाधानकारक स्थितींत आढळतात असें म्हणवत नाहीं. पोर्तुगीज लोकांनीं जुन्या काबिजादीं जिंकून धर्मछलाला प्रारंभ करतांच तेथील बहुतेक मुसलमानांनीं स्वधर्मीय राज्यांत पोबारा केला आणि नव्या काबिजादींत हिंदूंचीच सत्ता जारी असल्यानें तेथें वास्तव्य करणें त्यांना सुरक्षित वाटलें नाहीं. आजमित्तीस त्यांची जी ५।६ हजार लोकवस्ती आहे तीही एकत्रित नाहीं, तर अनेक ठिकाणीं पांगून आहे. त्यामुळें उत्कर्षास जरूर ती संघटना आणि संघटनाजन्य शिक्षणादिकांच्या स्वतंत्र सोई उत्पन्न करणें त्यांना अशक्यप्राय होऊन राहिलें आहे. त्यांनीं दाढीप्रमाणेंच आपली उर्दू किंवा हिंदुस्थानी भाषा घरगुती बोलण्यांत अजूनही जिवंत ठेवली आहे आणि जे कोणी शिक्षण घेऊं इच्छितात ते प्रथम आरबी लिपीही शिकत असतात. पण सार्वजनिक आणि दीर्घजीवी अशी एकही शाळा त्यांना अद्याप उभारतां आलेली नाहीं. १९२४ सालीं गोव्यांत व्हाष्कुद गामाचें चतु:शत सांवत्सरिक श्राद्ध मोठ्या समारंभानें घालण्याची पोर्तुगीज सरकारनें प्रजेवर खुषीची सक्ती केली. ती हिंदूंनीं पाहिजे तितकी मानली नाहीं आणि मुसलमानांनीं मानली. त्यामुळें प्रसन्न होऊन १९२५ सालापासून नवीन गोवें येथील एका उर्दू शाळेला सरकार थोडी मदत देत आहे. पण सरकारला एरव्हीं परभाषांना साह्य करणें हें अद्याप पातकच वाटत असल्यानें ही तात्पुरत्या कृतज्ञ बुद्धीमुळें मिळूं लागलेली मदत केव्हां कोणत्या सबबीवर बंद केली जाईल याचा नेम नाहीं. तात्पर्य एवढेंच कीं, मुसलमान समाजाला स्वभाषेंतील शिक्षणप्रसाराचीं साधनें निर्माण करतां येणें अशक्य आहे. पण राजभाषेंत व मराठींत प्रवीण होण्याचीं साधनें त्यांना उपलब्ध असतां त्यांचाही त्यांनीं फारसा उपयोग करून घेतलेला नाहीं. वकील, डॉक्टर, पदवीधर लेखक किंवा वक्ता, त्यांच्यांत एकदेखील सांपडणें कठीण. यामुळें त्यांचा दर्जा वर चढूं शकलेला नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतून येऊन राहिलेले वीस पंचवीस धनिक मुसलमान व मूळचे कित्येक जमीनमालक वगळले तर गाडीवान, निरोपे, वसूलदार, मुकादम, इत्यादींचे व्यवसाय करणारेच त्यांच्यांत विशेष आढळतात. अशा रीतीनें, सामाजिक, शैक्षणिक व सांपत्तिक सुस्थिति नसल्यामुळें गोव्यांतील सार्वजनिक स्वरूपाच्या कोणत्याच हालचालींत त्यांची मातब्बरी कोणीच बाळगीत नाहीं. तथापि अलीकडे विशेषत: ब्रिटिश हिंदुस्थानांतून रोज वाढत्या संख्येनें येऊन रहाणाऱ्या धर्मबांधवांच्या संसर्गानें त्यांच्यांत स्वाभिमानाची व स्वोत्कर्षाची इच्छा उत्पन्न झालेली असून ती कित्येक ठिकाणीं व कित्येक प्रसंगीं व्यक्तही होऊं लागली आहे.

६८. गोव्यांतील ख्रिस्ती समाजास सरकारचें कसें साह्य मिळत राहिलें तें मागें सांगितलेंच आहे. या साह्यामुळें ते पोर्तुगाल व त्याच्या वसाहती यांच्या सरकारांत मुख्याधिकाऱ्यांपर्यंत तर चढूं शकलेच–पण ख्रिस्तधर्म स्वीकाराबरोबरच हिंदु असतांनाचीं सामाजिक बंधनें तुटल्यामुळें ते परदेशांतही व्यापारादि सर्व क्षेत्रांत उदयास आले. पोर्तुगीज भाषेप्रमाणेंच त्यांनीं इंग्रजी भाषेंतही प्रावीण्य संपादिलें आणि खुद्द इंग्लंडमध्यें लॉर्डशिप कमावण्यापासून तों बोटींवरील बटलर वेटरचीं कामें सांभाळण्यापर्यंत सर्व पेशे त्यांनीं पत्करले. जगांत एकही शहर असें सांपडणें कठीण कीं, जेथें कोणत्या ना कोणत्या पेशाचा एकतरी गोमंतकीय ख्रिश्चन नाहीं. मुंबईसारख्या ठिकाणीं तर त्यांची एक वसाहतच झाली असून तेथील युनिव्हर्सिटींत, म्युनिसिपालिटी, सरकारी कचेऱ्या, खाजगी कंपन्या आणि स्वतंत्र धंदे यांत त्यांनीं आपला शिरकाव करून घेतला आहे. खुद्द गोव्यांत इतके ख्रिश्चन वकील व डॉक्टर आहेत कीं त्यांच्या संख्येची जणू काय अशिल–आजाऱ्यांच्या संख्येशीं स्पर्धाच चालली आहे! त्यांची स्थानविशिष्ट धार्मिक संघटना ही जागतिक संघटनेचीच अंशभागी असल्यानें उत्तम प्रकारची आहे. रोमच्या पोपच्या अधिपत्याखालीं गोव्यांत एक 'आर्च बिशप' असतो. त्याची सत्ता पूर्वीं सबंध आशिया खंडांतील ख्रिश्चनांवर चालत असे. पण पोर्तुगीजांच्या राज्यनाशाबरोबरच या आर्चबिशपची सत्ताही संपुष्टांत येत चालली आणि आज ती पोर्तुगीज, हिंदुस्थान, माकाल, व तिमोर या पोर्तुगीज वसाहती आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील मलबार किनाऱ्यावरील ठिकाणें येथील क्याथोलिकांपुरती मर्या-

दित झाली आहे. या आर्चबिशपची नेमणूक पोप साहेब करतात. पण त्यांना तिच्यासाठीं पोर्तुगाल सरकारची संमति घ्यावी लागते व तो पोर्तुगालचाच नागरिक असावा लागतो. हा आर्चबिशप व त्याच्या हाताखालचे सर्व मठ व ख्रिस्तमंदिरें यांच्यांतील पाद्रींचें लटांबर पूर्वी गोवा–सरकारलाच पोसावें लागत असे. पण अलीकडे तो बहुतेक खर्च पोर्तुगाल सरकार सोशीत असून गोवा सरकार वर्षाकाठीं साठ हजार रुपयेच काय ते ख्रिस्तीधर्म खात्यावर खर्चीत असतें. याप्रमाणें गोमंतकीय ख्रिस्ती समाज बाह्यतः म्हणजे सांपत्तिक दृष्टया जरी भरभराटलेला आहे तरी अंतस्ततः तो सुस्थितींत आहे असें म्हणणें बरेंच धाडसाचे होईल. हिंदुधर्मत्यागानंतर त्यांच्यांतील जातींची संख्या पुष्कळच आटली. पण ब्राह्मण, 'चारडे', गावडे, कुणबी, शूद्र, अतिशूद्र इत्यादि जाति चार शतकांनंतरही त्यांच्यांत अस्तित्वांत असून या जातिजातींमधील भांडणें सुशिक्षित वर्गांत देखील आजतागायत चाललेलीं दिसतात. त्यांच्यातील पहिल्या दोन जातींमध्यें अन्नव्यवहार जरी सर्रास होतो तरी बाकीच्यांत बरींच बंधनें मानण्यांत येतात. लग्नव्यवहार सर्वांमध्येंच आपापल्या जातीबाहेर बहुधा होत नाहींत असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. हिंदु जातिसंस्था किती चिवट आहे, याचें हें एक चांगलें प्रत्यंतर होय. हुंडयाची चाल व प्रमाण त्यांच्यांत हिंदूपेक्षांही अधिक जाचक झालेलीं आहेत. त्यामुळें वृद्धाकुमारिकांचा प्रश्न हिंदूंतील बालविधवांच्या प्रश्नाइतकाच बिकट झाला आहे. मुली यावज्जीव अविवाहितच राहिल्या तरी त्यांच्यांत धर्मदृष्टया दोष मानीत नाहींत. पण नैतिक दृष्टीचा दोष त्यांच्याकडून घडणें स्वाभाविक असतें. इतकेंच काय पण तो हटकून घडण्यास अनुकूल अशीच त्यांची एकंदर परिस्थिति असते असें म्हणतां येईल. घरांतील पुरुषवर्ग परठिकाणीं किंवा गांवांतच पण बहुधा कामानिमित्त घराबाहेर असावयाचा व कांहीं कुलीन घराणीं वगळलीं असतां इतरांच्या वयस्क बायका शेतीभातीवर राहाण्यास किंवा बाजारहाट करण्यास जावयाच्या आणि तरुण मुलांमुलींस एकत्र नाचण्यागाण्यास किंवा हिंडण्याफिरण्यास मोकळीक असावयाची. यामुळें कौमार्य भ्रष्ट युवयुवतींची संख्या आणि तद्भव भ्रूणहत्यादि गुन्हे यांची संख्या अनुपेक्षणीय आहे. विवाहाचा मार्ग धड अनुनयाचा, म्हणजे केवळ वधुवर–संमत असा नाहीं आणि धड पालकसंमत असाही नाहीं. युरोपियनांप्रमाणें केवळ प्रेमविवाहाचा मार्ग भरपूर रुंदावला असता किंवा हिंदूप्रमाणें युवक–युवतींच्या स्वच्छंद सहवासाचा प्रघात शिष्टसंमत ठरला नसता तर वरीलसारख्या गुन्ह्यांना बराच आळा पडला असता. कुमारीप्रमाणें विवाहित स्त्रियांतही बरेंच पातित्य आढळून येतें. कारण, द्रव्यसंपादनार्थ, देशपर्यटनास जाणारे पतिराज पुष्कळच असतात. युरोपियन संस्कृति अंगांत पूर्णांशानें जिरत नाहीं आणि हिंदु संस्कृति पुरी सुटत नाहीं, अशा कैचींत अडकल्यामुळें पहिलींतील गुणांपेक्षां अधिक दोष त्यांच्यांत शिरले आणि दुसरींतील दोषांपेक्षां अधिक गुण त्यांच्यांतून बाहेर पडले, असें त्यांच्या अंतस्थ स्थितीचें बारकाईनें निरीक्षण केलें असतां दिसून येतें. सुशिक्षितांच्या आंगावर बाहेरून युरोपियन पोषाख चढला पण आंतली लंगोटी सुटली नाहीं; ते देवळांऐवजीं चर्चमध्यें जाऊं लागले, पण हिंदुधर्मत्यागापूर्वी ज्या कुलदेवतांना भजत त्यांना नवस–नैवेद्य देण्याचें सर्वस्वीं थांबवूं धजले नाहींत. देवांकडून कौल–प्रसाद मिळविणें हाही प्रघात अनेकांकडून चालू आहे. विवाहापूर्वी वधूंना साडीचोळीचा हिंदु पेहेराव करून व फुलें माळून नातलगांना भेटविण्याची चाल, ज्यांच्या बायकांनींही लुगडीं सोडून लहंगे पतकरलें अशा लोकांत अद्याप जारी आहे. पाद्री–शिक्षकांनीं नवख्रिस्तांना सारखेंच साक्षर करून सर्वांना नवसुधारणेच्या समान भूमिकेवर आणून सोडण्यासाठीं कसून प्रयत्न केले. पण ब्राह्मणवैश्यादि वर्ग जे मुळांत हिंदु असतांना सुधृत होते तेच नेमके नवसुधारणेंतही पुढारलेले दिसले. तात्पर्य, ख्रिस्तीधर्म व युरोपियन संस्कृति यांचीं जीं कलमें पोर्तुगीजांनीं केलीं तीं मूळ हिंदु संस्कृतीचें झाड जातीनें चिवट व कठीण असल्यानें पाहिजे तसा जीव धरूं शकलीं नाहींत. दोन गोष्टी मात्र गोमंतकीय ख्रिश्चन समाजांतून पार नष्ट झाल्या. त्या म्हणजे देशी भाषा आणि हिंदी राष्ट्र. मराठी शिकणारा किंवा जाणणारा गोमंतकस्थ ख्रिस्ती ही चीज पतिव्रता वेश्येइतकीच दुर्मिळ व कौतुकास्पद! गोमंतकीय हिंदू मराठी भाषेच्या प्रसारार्थ जे प्रयत्न करतात त्यांच्या माथ्यावर पोर्तुगीज राष्ट्र उलथून पाडण्याच्या हेतूंचा आरोपही लादण्यास ते कमी करीत नाहींत. यावरून वरील उपमेची समर्पकता कळून येईल. गोमंतक एक वेळ पूर्ण स्वतंत्र झाला तरी चालेल. पणें त्यानें अखिल हिंदुस्थानाशी राजकीय एकात्मता पावतां कामा नये असें हे लोक आग्रहपूर्वक

प्रतिपादतात. मराठे व पोर्तुगीज यांच्यामधील लढायांसंबंधीं लिहितां–बोलतांना पहिल्यांना अनुलक्षून 'शत्रु' व दुसऱ्यांना उद्देशून 'आम्ही' अशी शब्दयोजना ते मोठ्या अभिमानानें करतात. आणि कमालीच्या आश्चर्याची व तितक्याच खेदाची गोष्ट ही कीं, पोर्तुगीजांशीं आपण जणु-काय सायुज्यताच पावलों आहों अशा आविर्भावानें खुद्द गोमंतकाला म्हणजे आपल्या खऱ्या मातृभूमीला "आमच्या पोर्तुगालाची वसाहत" म्हणून संबोधण्यास देखील त्यांना सत्याची, स्वत्वाची, मनाची किंवा जनाचीही लाज वाटत नाहीं. अशा रीतीनें पोर्तुगाल ही त्यांची राष्ट्र-देवता बनून गेली आहे खरी. पण ही देवता ६।७ हजार मैलांच्या अंतरावर राहिली असल्यानें तिच्यासाठीं करावयाचें असें त्यांनीं कांहींएक शिल्लक उरलेलें नाहीं.आणि जिच्यासाठीं पुष्कळच करावयाचें आहे तिला त्यांनीं मातृपदावरून ढकलून दासीच्या स्थानीं बसवलें आहे! आणि राष्ट्रीय कर्तव्याप्रमाणें सामाजिक, नैतिक किंवा शैक्षणिक बाबतींतही पोर्तुगीज लोकांहून भिन्न असें ध्येय त्यांच्या डोळ्यांपुढें राहिलेलें नसल्यानें, कांहीं दीनसाहाय्यक किंबहुना धर्मप्रसार व नृत्यगान-प्रवर्तक संस्थांशिवाय अन्य कोणत्याही स्वरूपाची संघटना किंवा संस्था त्यांच्यामध्यें एकही निघालेली नाहीं. 'राजकीय' नांव असलेले पण वस्तुतः आर्थिक स्वरूपाचे पक्षोपपक्ष त्यांच्यांत दिसून येतात. पण एकतर त्यांना उच्च असें ध्येय मुळीं नसतेंच आणि शिवाय संघटनाशून्यतेमुळें ते अल्प-जीवीच उतरतात. सारांश, गोमंतकस्थ कॅथोलिक समाज हा हिंदी किंवा मराठी या दृष्टीनें मृतवतच नसून उलट हिंदी राष्ट्रीयत्वाला व महाराष्ट्रीय संस्कृतीला मारक बनून राहिला आहे. परंतु आज-घडीस खुद्द पोर्तुगीज लोकच त्यांचा तेजोभंग करावयास लागले असल्यानें त्यांची प्रवृत्ति आत्म-ज्ञानाकडे हळुहळू झुकूं लागली आहे.

६९. हिंदु समाजांतील जातींपैकीं बहुतेक सर्व जाती गोमंतकांतील हिंदु समाजामध्यें आहेत. पंचद्राविडांतर्गत कऱ्हाडे ब्राह्मणांत मोडणारे 'पद्ये' व 'भट्टप्रभु' हे दोन इतरत्र नसणारे पोटभेद गोमंतकांत आहेत. हे पोटभेद अगदीं अलीकडचे व धार्मिक स्वरूपाचें बलवत्तर कारण न घडतां पडलेले असल्यानें त्यांनीं आपापसांत रोटीबेटी व्यवहार करण्यास कसलीच हरकत नाहीं असा निकाल श्रीसंकेश्वर मठाच्या जगद्गुरूंनीं दोन-वर्षांमागें देऊन टाकला आहे. चित्पावन ब्राह्मणांची वस्ती फार थोडी. ब्राह्मणांत बहुसंख्य वर्ग म्हणजे गौड–सारस्वतांचा. त्यांच्यांत वैष्णव व स्मार्त या दोन्ही संप्रदायाचे लोक असून पहिल्यांतील सासष्टकर व बारदेशकर, आणि दुसऱ्यांतील शेणवी, कुडाळदेशकर व पेडणेकर या पोट-भेदांचेच लोक काय ते गोव्यांत विशेष प्रमाणांत आहेत. 'शेणवीपैकीं' व 'भालावलीकर' या पोट-भेदांचे लोक नाहींतच म्हटलें तरी चालेल. सासष्ट-कर व बारदेशकर या वैष्णवांतर्गत उभय पोट-भेदांचे एक आणि स्मार्तपैकीं शेणव्यांचे एक अशा दोन धर्मगुरुंचे मठ गोव्यांत अनुक्रमें काणकोण तालुक्यांतील 'वर्तगाळ' आणि फोंडें तालुक्यांतील 'कवळें' या गांवांत आहेत. या उभय मठांचा शिष्यवर्ग ब्रिटिश हिंदुस्थानांतही बराच पसरला आहे. प्रत्येक मठाचें वार्षिक नियमित उत्पन्न (अर्थात् पाद्यपूजेच्या बाहेरचें) २५ ते ३० हजार रुपयांच्या दरम्यान आहे. स्वतःच्या अनुयायांमधील धार्मिक संघटनेच्या व स्वपंथतत्त्व-ज्ञान किंवा स्वमतप्रसाराच्या दृष्टीनें या मठांची कार्यपद्धति हिंदूंतील इतरत्रच्या धर्ममठांसारखीच आहे. धर्मगुरू जेव्हां संचारार्थ यावे आणि पाद्य-पूजा करावी लागावी तेव्हांच त्यांचें अस्तित्व सामान्य लोकांना भासमान होतें. एरव्हीं, पुरो-हितवर्ग, किंवा ज्याला विशेष कारणपरत्वें विशेष प्रकारचें प्रायश्चित्त करावें लागतें अशी व्यक्ति एवढ्यांनाच धर्मगुरूंची जाणीव भासत असते. सारस्वतेतर बाकी सर्व हिंदु संकेश्वर पीठाचे अनुयायी आहेत. सदर पीठानें दोन–तीन वर्षांमागें कवळें येथें एक धर्ममंदिर उभारून श्रीमच्छंकरा-चार्यांच्या पादुकांची स्थापना केली आहे. गोव्यांतील हिंदु समाजांत ब्राह्मणापेक्षां ब्राह्मणेतरांची संख्या पुष्कळच अधिक असून ब्राह्मणांमध्यें सार-स्वत बहुसंख्य आहेत. आणि संपत्ति, शिक्षण, व्यापार, सरकारी नोकऱ्या–अर्थातच ख्रिश्चन वगळून इत्यादि बाबतींत ह्याच वर्गाचें वर्चस्व आहे. त्यांतल्या त्यांत ५।६ तरुणांनीं पोर्तुगालास जाऊन उच्च शिक्षण संपादन केलें असून ते आफ्रिकेंतील पोर्तुगीज वसाहतींत व गोव्यांत सरकारी वरिष्ठ जाग्यांवर नेमले गेले आहेत.

७०. गोव्यांतील हिंदु समाजाला कसल्या दिव्यांतून पार पडावें लागलें आणि आज त्याची कोणत्या वृत्तीच्या ख्रिश्चन समाजाशीं गांठ पडली आहे तें मागें सांगितलेंच आहे. या समाजाच्या आक्रमणाला बगल देऊन हिंदु समाजानें जसें आपल्या स्वत्वाचें रक्षण केलें तसेंच त्याच्या बाह्य

वैभवाच्या मोहाला बळी न पडतांही केलें आहे. ज्यांना सामान्यतः 'सामाजिक' सुधारणा असें मानण्यांत येतें. त्या प्रौढ–प्रेम, विधवा–विवाहादि चाली ख्रिश्चन समाजांत रूढ झाल्याला शतकांनीं मोजण्याइतका काल लोटला. पण इतक्या दीर्घावधीचें साहचर्य असूनही गोमंतकीय हिंदु समाजानें त्या त्यांच्यापासून न उचलतां, हिंदुस्थानांतील समाजाकडून पुरस्कारिल्या गेल्यावरच अनुकरण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट गोमंतकीय हिंदु समाज अखिल हिंदुस्थानांतील हिंदु समाजाशीं आपलें एकात्म न कळतही कसें मान्य करतो त्याचें उत्तम प्रत्यंतर होय. सामाजिक सुधारणेची हिंदुस्थानांत व विशेषतः महाराष्ट्रांत जी चळवळ झाली तिच्या लाटा गोव्यांत अनेक मार्गांनीं पोंचल्या आणि अनेक रूपांनीं त्यांचे प्रतिध्वनि उमटले. संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद, वैश्य परिषद, दैवज्ञ ब्राह्मण परिषद, भट्टप्रभु–ऐक्य परिषद, क्षत्रियभंडारी परिषद, हराळे–चर्मकार परिषद वगैरे पोटभेदैक्य पुरस्कर्त्या व शिक्षण–संघटनाप्रसारक, त्या त्या जातींपुरत्या मर्यादित पण स्थलदृष्ट्या सर्वव्यापक संस्थांचीं अधिवेशनें गोव्यांत यशस्वी रीतीनें पार पडलीं आहेत. सुशिक्षित वर्गांत मुलांमुलींची विवाहवयोमर्यादा अनुक्रमें २० ते २५ व १३ ते १७ वर्षांवर आलेली आहे. गोमंतकीय सारस्वत ब्राह्मणांत विधवा-विवाह होण्यासही सुरुवात झाली आहे. तथापि, सामाजिक सुधारणेस पुष्कळच वाव आहे यांत शंका नाहीं.

७१. पोर्तुगीज सरकार हिंदु समाजाचें राष्ट्रीयत्व व भाषा यांच्या दृष्टीनें स्वतंत्र अस्तित्वच कबूल करीत नाहीं. आणि तो तें कबूल करून घेण्यास पाहूं लागेल तर सरकार त्याचे राजकीय हक्क काढून घेण्यास पाहिल्याशिवाय रहाणार नाहीं. हिंदु संस्कृतीच्या इतर अनेक अंगांवरही त्याची वक्रदृष्टि आहेच. उदाहरणार्थ हिंदी संगीत, आर्यवैद्यक, हिंदुस्थानचा इतिहास, संस्कृत भाषा इत्यादींना सरकारी शिक्षणांत तर स्थान नाहींच. पण आर्यवैद्यकावर व विशेषतः वैद्यांवर अत्यंत जाचक, अनिष्ट, अपमानकारक व एका दृष्टीनें हास्यास्पद असे निर्बंध घातले आहेत. आणि सामाजिक व धार्मिक बाबतींतही हिंदु समाज आत्मसात् करतां येईल तर आपल्यास फार समाधान होईल. असें सरकार अद्यापहि अनेक अप्रत्यक्ष मार्गांनीं सांगत आहे. हिंदु समाजासाठीं हिंदु कायदा मान्य करण्याची बुद्धि सरकारनें कधींच दाखविली नाहीं; तर उलट त्याच्यावर "कोड नेपोलियन"चाच अंमल चालवला आहे. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट अशी कीं, दत्तक देणें–घेणें, मुलींची किमान विवाहवयोमर्यादा ख्रिश्चनांस जी १६वर्षांची आवश्यक मानली आहे ती हिंदूस १३ वर्षांची मानणें, इत्यादि सवलती कायद्यानें हिंदूंस दिल्या आहेत. कोड नेपोलियनच्या अंमलामुळें गोमंतकांतील स्त्रिया या आपल्या आईबापांच्या खऱ्याखुऱ्या म्हणजे वारसदार मुली आणि नवऱ्यांच्या मालमत्तेच्याही यथार्थ अर्धांगी झाल्या आहेत. आणि त्यामुळें गोमंतकांतील स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा ब्रिटिश हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या दर्जाहून बराच वर चढला आहे. अर्थात् अन्नवस्त्राच्या बाबतींत त्या सुखी असण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे यांत शंका नाहीं. ही दायविभागाच्या बाबतींतलीच काय पण विवाहवयोमर्यादेंत वाढ, जरठकुमारी विवाहास प्रतिबंध इत्यादिसंबंधींच्या सुधारणाही गोमंतकीय हिंदु समाजाला हव्याच होत्या. पण त्या, प्रथम 'हिंदु कायद्याचें' स्वतंत्र अस्तित्व कबूल करून आणि मग त्यांत त्यांचा समावेश करून अंमलांत आल्या पाहिजे होत्या. साखर कोणाचीही खाल्ली तरी गोडच लागणार. पण ती आपली आपल्या परंपरागत कालानुरूप प्रगत हक्काची म्हणून खाल्ली असतां जिव्हेप्रमाणें मनही संतुष्ट होतें यांत काय शंका? धार्मिक विधीपूर्वी कायद्याचा विधी उरकला नाहीं तर हिंदूही ख्रिश्चनाप्रमाणेंच गुन्हेगार ठरतात ही तर त्यांच्यावर धार्मिक व व्यावहारिक दृष्ट्या आपत्तीच होय. या आपत्तीमुळें अनेक हिंदु ब्रिटिश हिंदुस्थानांत जाऊन विवाहविधि उरकून घेत असतात. तथापि, पोर्तुगीज सरकारचें 'आत्मसात' करण्याचें धोरण लक्षांत घेतलें म्हणजे हिंदूंना स्वधर्मांतील अनेक आचार पाळतां येतात हीच खैरात समजली पाहिजे.

७२. गोमंतकांत ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद क्वचितच उद्भवतो आणि उद्भवला तरी महाराष्ट्रांतल्या इतकें उग्र स्वरूप त्याला येत नाहीं. अस्पृश्यताही महाराष्ट्रांतल्या इतकी कडक नाहीं, निदान कडक भासत नाहीं. अस्पृश्य वर्ग आधींच लहानसा, तशांत तो बहुतेक निरक्षर; गोव्यांत पाण्याचें वैपुल्य असल्यानें सार्वजनिक तळीं किंवा हौद यांच्यावर पाणी घेण्याची जरूरी पडण्यासारखी परिस्थिति नाहीं. आणि सरकारी किंवा निमसरकारी सार्वजनिक जागांवर अस्पृश्यांना कायद्यानेंच बंदी करतां येत नाहीं. गोव्यांत स्पृश्य

वर्ग एकंदरींत अस्पृश्यांशीं तितक्या कडवेपणानें वागत नाहीं ही गोष्टही कबूल केली पाहिजे. यामुळें आणि पोर्तुगीज सरकारनें जातवार मतदारसंघ, जातिसंख्या प्रमाणांत नोकऱ्या, असलीं खुळें न उभारल्यामुळें ब्राह्मण– ब्राह्मणेतर वादाप्रमाणेंच स्पृश्यास्पृश्य वादही येथें फारसा उपद्रवकारक झालेला नाहीं. अस्पृश्यांना देवळांत मात्र अद्याप बंदीच आहे. तथापि स्पृश्यांच्या सार्वजनिक शाळांतून त्यांच्या मुलांना शिक्षणार्थ बसण्यास आडकाठी तर क्वचितच असते.पण उलट त्यांनीं शाळांत यावें व स्पृश्यांच्या मुलांशीं अभेदभावानें बसावें असे प्रयत्न हेतु-पुरःसर व यशस्वी रीतीनें कांहीं पुढाऱ्यांनीं करून अस्पृश्योद्धाराच्या कार्याचा पायंडाही घातला आहे.

७३. गोमंतकांत झालेली शुद्धीची चळवळ तर प्रसिद्धच आहे. या बाबतींत केवळ सत्यकथनार्थ सांगावयाची गोष्ट म्हणजे ही चळवळ अनुकरणात्मक किंवा हिंदुस्थानची नक्कल नसून अस्सल आहे. पोर्तुगीजांच्या धर्मकहराला ऊत आला होता अशा वेळीं म्हणजे सोळाव्या शतकाच्या अखेरीस, ख्रिस्तीकृत हिंदूंस शुद्ध करून घेण्याचे प्रयत्न खुद्द जुन्या गोव्यांत झाले होते. आणि त्यासाठीं जे सुलभ विधि योजिले होते त्यांत 'माधव' तीर्थांत स्नान करण्याचा एक होता. याचा सुगावा जेव्हां पोर्तुगीजांस लागला तेव्हां त्यांनीं तें तीर्थ भ्रष्ट केलें व त्या भोंवतीं कडेकोट बंदोबस्त केला.व पोर्तुगीजांनीं गोव्यांत जें ख्रिस्तीकरण केलें तें पुष्कळ लोक समजतात त्याप्रमाणें, घरांवर मांस-खंडें फेकणें किंवा विहीरींत हाडें अगर शितें टाकणें असल्या क्षुल्लक उपायांनीं सहजासहजीं झालेलें नाहीं. तसें असतें तर त्यांना मागें सांगितलेले जालीम उपाय सतत अंमलांत आणीत रहाण्याचें कारणच पडलें नसतें. हिंदूंनीं त्या प्रसंगीं शक्य तो प्रतिकार केला व प्रसंगीं सर्वस्वत्याग करून पळहीं काढला ही गोष्ट जितकी खरी तितकीच ख्रिस्तीकृतांस शुद्ध करून घेण्याची उपाययोजना केली हीही गोष्ट खरी आहे. शुद्धिकृतांस मूळ जातींत घेतलें जात असे कीं काय तें समजण्याइतका त्या काळचा बारीक इतिहास सांपडत नाहीं. पण जातींत नसलें तर नसलें परंतु निदान निराळ्या जातींत पण हिंदु धर्मांत घेण्यासाठीं हिंदूंनीं व ताज्या ख्रिस्तीकृतांनीं प्रयत्न केल्याचे पुरावे सांपडतात. या प्रयत्नास त्या वेळीं चांगलेसें यश आलें नाहीं हें अगदीं स्वाभाविकच झालें. पण शुद्धिकरणाच्या विचाराची परंपरा तुटली नाहीं. परंतु १९१०त रिपब्लिक होईपर्यंत गोमंतकीय हिंदूंची कोणत्या जातीच्या खटांशीं गांठ पडली होती तें लक्षांत घेतलें म्हणजे ही विचारपरंपरा आचारांत कां उतरली नाहीं हें सहज कळून येतें. रिपब्लिकच्यानंतरही हिंदूंच्या बाबतींत ख्रिस्ती जनतेचा दृष्टिकोन बदलला नव्हता आणि सरकारची वृत्ति निवळली आहे असा विश्वासही हिंदूंस उत्पन्न झाला नव्हता. त्यामुळें त्यांना शुद्धीसारखें कार्य हातांत घेणें दुर्घटच वाटत होतें.जे लोक शुद्ध झाले त्यांचे हिंदु आचारविचार समूळ तुटलेले नव्हते आणि त्यांची रहाणी व परस्परव्यवहार हीं संघटित स्वरूपाचीं होतीं हें या शुद्धीचें प्रमुख कारण होय. आणि वर जी विचारपरंपरा सांगतली तिचा परिणाम शुद्धीकृतांना देवालयें खुलीं करण्याची बुद्धि जुन्या मतांच्या लोकांनाही होण्यांत व ख्रिश्चन जमिनदारांनीं आपापल्या भूमींतून हांकलून लावलें तर शुद्धीकृतांना स्वतःची जागा राहण्यास व प्रेतविधीसाठीं देण्यास हिंदु जमीनदारांची सिद्धता दिसण्यांत झाला हें तिचें तदनंतरचें कारण होय. सेनापति मासानु द आमोरी या वयोवृद्ध, पोक्त, सुस्वभावी व नौकरशाहीवर जबरदस्त छाप असणाऱ्या गव्हर्नरांची कारकीर्द हीही या शुद्धीला अनुकूल झाली. बाकी सगळ्यांचे सगळे प्रयत्न निमित्तमात्र होत. गोव्यांतील हिंदूकरणास केवळ धार्मिक अगर सामाजिक महत्त्व नाहीं. तर त्याच्या शिवाय राष्ट्रीय व भाषीय महत्त्वही आहे. गोव्यांतला ख्रिश्चन म्हटला कीं, कांहीं अपवाद सोडून, तो आपला पितृदेश पोर्तुगाल व मातृभाषा पोर्तुगीज मानतो व त्याप्रमाणें त्यांची पूजाअर्चाही करतो. तोच हिंदु बनला तर स्वतःची मातृभूमि हिंदुस्थान व मायभाषा मराठी समजेल आणि त्या उभयतांच्या सेवेस तत्पर राहील हें सांगावयास नकोच. आणि म्हणूनच इतरत्रच्या हिंदूकरणापेक्षां गोमंतकांतील हिंदूकरण महाराष्ट्रीयांस अधिक महत्त्वाचें वाटलें पाहिजे. शुद्धीकृतांची संख्या अंदाजीं १० हजार होईल.

७४. शैक्षणिक व वाङ्मयिकः—गोमंतकांतील सार्वत्रिक भाषा किंवा बोली कोंकणी होय. येथील द्रवीड ब्राह्मण व मुसलमान इतरांशीं याच बोलींत व्यवहारतात. पण आपापसांत पहिले 'कोंकणी–स्वराची' मराठी व दुसरे हिंदुस्थानी बोलत असतात.कांहीं ख्रिश्चनांनीं विशेषतःख्रिस्ती ब्राह्मणांनीं पोर्तुगीज व इंग्रजी भाषा घरांत बोलण्याचा प्रघात अंगांत भिनवला आहे. पण भावना अत्युत्कृष्ट होणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगीं युरोपियन भाषां-

चीं हीं कृत्रिम आयाळें स्वाभाविकपणें गळून पडून जन्मभापचे फवारे उडतांना पाहिले म्हणजे दुःखद प्रसंगीं त्यांची कींव येते व सुखद प्रसंगीं हंसें सुटतें. घरांत व बाहेर मराठी बोलणाऱ्या महाराष्ट्रीयांची व पोर्तुगीज बोलणाऱ्या युरोपियनांची संख्या कांहीं शेकड्यांपेक्षां अधिक भरणार नाहीं. त्यांच्या खालोखाल कानडी व गुजराथी बोलणाऱ्यांचे क्रमांक लागतील. गोव्यांतील सर्व हिंदु आपलें लेखनवाचन मराठींतून करीत असतात. कांहीं ख्रिश्चन तें रोमन लिपी व कोंकणी भाषा यांच्या द्वारें तर कांहीं पोर्तुगीज व इंग्रजी या भाषांतून करीत असतात. मुसलमानांत आरबी लिपी वापरण्याचा प्रघात आहे. पण त्यांतले कित्येक जण देवनागरीचा उपयोगहि करीत असतात. गोव्याची राज्यकारभाराची भाषा पोर्तुगीज असल्यानें तिचें शिक्षण घेणारे सर्व धर्मीयांत सांपडतात.

७५. लोकांच्या शिक्षणासाठीं सरकारनें नवीन गोवें येथें एक वैद्यक पाठशाळा, एक औषधसिद्धि शाळा, (Curso de Farmrcia) व एक नार्मल किंवा अध्यापक शाळा हीं तीन विशिष्ट शिक्षणाचीं आणि 'लिसेव सेंत्रल' नांवाचें एक दुय्यम शिक्षणाचें अशीं चार विद्यालयें ठेविलीं आहेत. हयांचे अभ्यासक्रम अनुक्रमें ५, ३, ३ व ७ वर्षांचे आहेत. वैद्यक पाठशाळेस जोडून रुग्णशुश्रूषा व सुईणपण यांचें शिक्षण देणारे वर्गही आहेत. 'गृहशिक्षण देणारी Escola Nacional Desexo Feminins म्हणजे "स्त्रीलिंगाची राष्ट्रीय शाळा" ही सरकारनें तेथें उघडली आहे. लिवसेचें तीनतीन वर्षांचें शिक्षण देणाऱ्या शाखा मडगांव व म्हापसें येथें ठेवल्या आहेत. त्यांना लिसेव म्युनिसिपल असें नांव आहे. पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या सरकारी शाळा गोव्यांत एकंदरींत ९० असून त्यांतल्या २० नवीन काबिजादींत आहेत. याशिवाय मराठी पोर्तुगीज संज्ञक दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या ७ शाळाही सरकारनें नव्या काबिजादींत ठेविल्या आहेत. अभ्यासक्रमाच्या दृष्टीनें साफ निरुपयोगी अशा व धर्मरत चालणाऱ्या या ७ शाळांशिवाय सरकारनें इतर सर्व शाळांत गोव्याच्या जीविताची मुख्य भाषा जी मराठी ती बहिष्कृत मानली आहे. लिसेवांत पोर्तुगीजशिवाय फ्रेंच, इंग्रजी व लॅटिन या भाषा सक्तीनें शिकाव्या लागतात. इंग्रजीऐवजीं जर्मन भाषा शिकावयाची असली तर तशीही सोय सरकारनें केलेली आहे. पण मराठी व संस्कृत या भाषांचे दोन दोन वर्षांचे अभ्यासक्रम आंखून त्यांची एक संयुक्त 'खुर्ची' लिसेवांत ठेविली आहे. पण त्याचें शिक्षण ऐच्छिक केलें असल्यानें व मराठी संस्कृत भाषांचें ज्ञान एकादुसऱ्याच सरकारी नोकरीस आवश्यक मानलेलें असल्यानें त्या खुर्चीसमोर विद्यार्थ्यांसाठीं बाकें ठेवण्याची यातायात जवळ जवळ पूर्णांशानें चुकलेली आहे. उपर्युल्लिखित स्त्रीलिंगाच्या राष्ट्रीय शाळांतहि सर्व शिक्षण युरोपियन भाषांमधूनच दिलें जात असल्यानें तेथें एकाही हिंदू मुलीचा शिरकाव झाला नाहीं. सुईणकाम व रुग्णपरिचर्या यांचें शिक्षणही केवळ पोर्तुगिजींतून तेवढें देण्यांत येत असतें. सर्व शाळांतून जीं पुस्तकें लावण्यांत येतात तीं बहुतेक सर्वच पोर्तुगीज लेखकांनीं तयार करून पोर्तुगालांत छापलेलीं असतात. अर्थात् त्यांत गोमंतक किंवा हिंदुस्थान यासंबंधीं प्रादेशिक माहिती मुळींच असत नाहीं. हिंदुस्थानच्या किंवा खुद्द गोमंतकच्या इतिहासाचाही शिरकाव अभ्यासक्रमांत मुळींच झालेला नसतो. सर्व कांहीं पोर्तुगालचें! या प्रकारामुळें रोज एकदां तरीं स्नान बिनचूक करणाऱ्या विद्यार्थ्यांना आठवड्यांतून निदान दोनदां अवश्य स्नान करावें हा आरोग्यशास्त्रांतला नियम घोंकण्याचा विलक्षण प्रसंग बिचाऱ्यांवर येऊन ते गोंधळून जातात! पण हें सारें Assimilation च्या धोरणास जुळणारेंच नव्हे काय? अलीकडे विशिष्ट शिक्षणाच्या तीनही शाळांत मिळून सुमारें १५०; दुय्यम शिक्षणाच्या तिहींत सुमारें ८००; प्राथमिक पोर्तुगीज शाळांत सुमारें ६५०० व सातही मराठी पोर्तुगीज शाळांत सुमारें १०० याप्रमाणें विद्यार्थ्यांची संख्या असते. दुय्यम व विशिष्ट शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचा आंकडा १०० हून फारसा मोठा नाहीं. त्यांत हिंदू विद्यार्थिनी एकही नसते. एकंदर विद्यार्थ्यांत ठोकळ मानानें हिंदु एक चतुर्थांशाहून अधिक नसतात. तथापि यावरून एकंदर हिंदु विद्यार्थ्यांची संख्या कॅथोलिकांहून कमी आहे असें मात्र नव्हे. कारण खाजगी मराठी शाळांतून शिक्षण घेणाऱ्या हिंदु विद्यार्थ्यांचा आंकडा त्यांत धरलेला नाहीं. गोव्यांत आजमितीस जवळ जवळ दोनशें मराठी शाळा हिंदु लोकांनीं केवळ स्वावलंबनाच्या पायावर चालवलेल्या असून त्या सर्वांत ५ हजार मुलगे व २ हजार मुली मिळून सुमारें ७ हजार मुलें शिक्षण घेत आहेत. मात्र हें शिक्षण मराठी चार

इयत्तांपलीकडे देणाऱ्या शाळा पांच सातच आहेत. लोकांनीं चालवलेलीं २५।३० इंग्रजी हायस्कुलें असून त्यांपैकीं पांचसहांना मुंबई युनिव्हर्सिटीनें मान्यताही दिलेली आहे.या शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४ हजारांच्या आसपास आहे. यावरून इंग्रजी शिक्षणाचा प्रसार गोमंतकांत किती आहे हें कळून येईल. पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाच्या निदान तीन इयत्ता ज्यानें पुऱ्या केलेल्या नाहींत अशा विद्यार्थ्याला इंग्रजी ५ व्या इयत्तेंत बसण्यास सरकारनें प्रतिबंध केला असल्यानें इंग्रजी शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची बरीच कुचंबणा होत असते. संस्कृत शिक्षणाची सोय मात्र गोव्यांत कुठेंहीं नाहीं. या इंग्रजी हायस्कुलांत देखील दुय्यम भाषा म्हणून संस्कृत शिकविण्याची स्थिर व्यवस्था नसते. कारण त्यांचे चालक बव्हंशीं ख्रिश्चन लोकच असतात. व हिंदु विद्यार्थ्यांत संस्कृत घेणाऱ्यांची संख्याहीं फारशी नसते. त्यामुळें अल्पसा पुरोहित वर्ग वगळला तर संस्कृत जाणणारे लोक विरळाच सांपडतात. पाद्री वर्ग तयार करणारी एक सेमिनरी सासष्टींतील रायतूर गांवीं असून तिचा अभ्यासक्रम ७ वर्षांचा आहे. तींत सुमारें ७।८ शें विद्यार्थी असतात.

७६. गोव्यांत साक्षरतेचें प्रमाण शेंकडा १२ असून साक्षर पुरुषांचें एकंदर पुरुषसंख्येशीं १७ व साक्षर स्त्रियांचें स्त्रीसंख्येशीं ७ आहे. धर्मवार प्रमाण पाहातां ३ साक्षर कॅथोलिकांस २ साक्षर हिंदु पडतात असें सरकारी खानेसुमारीवरून दिसून येतें. तथापि तींत केवळ मराठी जाणणाऱ्या पुष्कळ हिंदु लोकांची गणना निरक्षरांत करण्यांत आलेली आहे.आणि दुसरी गोष्ट अशी कीं, परभाषेंतील साक्षरता ही खरी साक्षरता नसते.पोर्तुगीज लिहितां वाचतां येतें तो साक्षर अशी सरकारी व्याख्या आहे. परंतु पोर्तुगीज ही गोमंतकीय लोकांची जन्मभाषा नसल्यानें नुसत्या रोमन लिपिज्ञानानें भाषाज्ञान होऊं शकत नाहीं.उलट हिंदूंना मराठी भाषेचें ज्ञान जन्मजातच असल्यानें केवळ लिपीचीं ओळख झाली तरी त्यांचें भाषाज्ञान दृढ व वृद्धिंगत होऊं शकतें. या दृष्टीनें पाहतां गोव्यांतील ख्रिश्चन पेक्षां हिंदूंतच साक्षरतेचें प्रमाण अधिक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. गोमंतकांतील साक्षर ख्रिश्चनांची बहुसंख्या आपल्या रोमन लिपिज्ञानाचा उपयोग पोर्तुगीज किंवा इंग्रजीं भाषेच्या ज्ञानवृद्धीसाठीं न करितां कोंकणी बोलींतील घरगुती पत्रलेखनासाठीं करीत असते. सदर पत्रांची वाक्यरचना किंवा पदक्रम मात्र पोर्तुगीज भाषेंतील पदक्रमासारखा असतो. अक्षरज्ञानास स्वभावतःच असमर्थ म्हणून सात वर्षें वयाखालील मुलांची वट्ट संख्या एकंदर लोकसंख्या वजा केली तर वरील प्रमाणदर्शक आंकडे दीडपट करून धरतां येतील.

७७. खाजगी मराठी शाळांप्रमाणेंच गोमंतकांतील हिंदूंनीं सार्वजनिक मोफत वाचनालयें चालवलेलीं आहेत. त्यांत अर्थातच मराठी पुस्तकांचा भरणाच मोठ्या प्रमाणांत असतो. तदनंतर पोर्तुगीज पुस्तकसंख्येचा क्रम लागतो. आजमितीस २५–३० वाचनालयें तरी गोव्यांत सांपडतील. ह्यांमध्यें मडगांव येथील सारस्वत ब्राम्हण समाजाचें वाचनालय अग्रगण्य आहे. त्यांत ७ हजारांच्या जवळ पुस्तकसंग्रह असून तदनंतर पणजीच्या श्रीसरस्वति मंदिरांत सुमारें ४ हजार आहे. ख्रिश्चन समाजांत एकही नांव घेण्याजोगें वाचनालय सांपडणें कठीण. नवीन गोव्याचें सरकारी वाचनालय मात्र पोर्तुगीज ग्रंथांच्या दृष्टीनें बरेंच समृद्ध आहे. मराठी व इतर भाषांतील पुस्तकसंग्रहहीं त्यांत आहे. पण तो तुटपुंजाच होय.

७८. गोव्यांत मुद्रणकलेचा प्रवेश १६ व्या शतकाच्या मध्यास जेसुइटाकडून झाला आणि Oltrama (झागरोत्तर प्रदेश) हें पहिलें खाजगी पोर्तुगीज साप्ताहिक पत्र १८५९ सालीं मडगांव येथें निघालें. १९०५ सालापासून तें अर्धसाप्ताहिक झालें व तेव्हांपासून आजतागायत तसेंच चाललें आहे. मराठींतील पहिलें साप्ताहिक वर्तमानपत्र कै. बाळशास्त्री जांभेकर यांनीं मुंबई येथें १८३७ सालीं 'दिग्दर्शन' या नांवानें काढलें आणि तदनंतर अवघ्या ३५ वर्षांनीं गोव्यांतील पहिलें नियतकालिक जन्मास आलें. त्याचें नांव 'देशसुधारणेच्छु' असें होतें. ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. १८७२ पासून ७७ पर्यंत तें मासिक होतें. पुढें साप्ताहिक झालें आणि मराठी प्रमाणेंच त्यांत पोर्तुगीज मजकूरहि येऊं लागला. पण नंतर तें दीडदोन वर्षांतच बंद पडलें. तेव्हांपासून आजतागायत १५–१६ मासिकें व १०–१२ शुद्ध मराठी किंवा मराठी–पोर्तुगीज साप्ताहिकें गोव्यांत 'उत्पद्यन्ते विलीयन्ते' झालीं.एक 'भारत' हें मराठी–पोर्तुगीज साप्ताहिक मात्र आज दीड तपावर अखंड चाललें आहे. 'सुबोध' हें १९३१ पासून निघालेलें मासिकही सध्यां चालू आहे. मृत मासिकांत 'सत्संग' व 'प्राचीप्रभा' आणि साप्ताहिकांत 'हिंदु' हीं गोव्याप्रमाणें

इतर महाराष्ट्रांतहि फार प्रसिद्धीस आलीं. गोव्याचें आकुंचित क्षेत्र, त्यांत पुनः फक्त निम्मी प्रजाच मराठी मातृभाषा मानणारी, आणि महाराष्ट्रीयांची गोमंतकाविषयीं उपेक्षावृद्धि हीच येथें मराठी नियतकालिकें अल्पजीवी होण्याचीं प्रमुख कारणें होत. अखिल हिंदुस्थानास व्यापणाऱ्या प्रश्नांची चर्चा गोव्यांतील मराठी वाचक महाराष्ट्रीय वर्तमानपत्रांतून करतात. अर्थात् तीं त्यांना गोमंतकीय वर्तमानपत्रांतून वाचावयास नको असते. म्हणून गोमंतकीय वृत्तपत्रांनीं केवळ स्थानिक प्रश्नांची चर्चा केली तर तिचें महत्त्व महाराष्ट्रीय वाचकांना एका दृष्टीनें सकारणपणें वाटत नाहीं. अशा कुचंबणींत गोव्यांत मराठी वृत्तपत्रें टिकावीं कशीं? पोर्तुगीज वृत्तपत्रांचें वाचकक्षेत्र ख्रिश्चनाप्रमाणेंच हिंदूंतहि असतें. आणि त्यामुळें आज पणजींत ३ दैनिकें, मडगांवांत २ साप्ताहिकें आणि इतर ठिकाणीं ४।५ साप्ताहिकें बराच काल चाललेलीं आढळतात. हीं सारीं ख्रिश्चनांनींच चालविलेलीं असतात हें निराळें सांगावयास नकोच. नाहीं म्हणावयास पणजी येथें १९२८ पासून निघणारें 'प्रकाश' नांवाचें एक पोर्तुगीज अर्धसाप्ताहिक तेवढें हिंदूंच्या मालकीचें आहे.

७९. भर्तृहरीच्या 'शतकत्रयीचें' समश्लोकी भाषांतर करणारे तुकाराम बाबा वरदे, जाडे संस्कृत पंडित व मयूर कविकृत मराठी मंत्रभागवताची संस्कृत टीका करून उलटा संप्रदाय पाडूं पाहणारे महेश्वर बाबा सुखटणकर, गोविंद नारायण माडगांवकर, डॉ. भाऊ दाजी लाड, माधव व अनंत चंद्रोबा डुकले बंधु इत्यादि गोमंतकीय कवि व ग्रंथकार महाराष्ट्रीयांच्या परिचयाचे आहेत. तथापि त्यांना बहुधा अज्ञात असणारे कित्येक महाराष्ट्र भाषासेवक येथें होऊन गेले आहेत. कै. सखाराम नारायण वाघ व कै. सूर्याजी आनंदराव देशपांडे यांचीं नांवें दाखवितां येतील. कै. वाघ यांनीं १८१९ च्या सुमारास, म्हणजे सुप्रसिद्ध दादोबा पांडुरंगांच्या २०–२५ वर्षें आधीं, मराठी भाषेचें विस्तृत व्याकरण पोर्तुगीज भाषेंतून लिहिलें होतें. पैकीं व्याकरण पुढें कै. देशपांडे यांनीं सुधारून व वाढवून सरकारकडून प्रसिद्ध करविलें. या पुस्तकाचीं ३०० वर पृष्ठें आहेत. त्यावरून त्याच्या विस्ताराची कल्पना येईल. श्री. देशपांडे यांनीं एक मराठी–पोर्तुगीज कोश तयार करून त्याचाहि 'थ' अक्षरापर्यंत एक भाग सरकारकडून १८८० च्या सुमारास छापून घेतला. छापील व न छापील भागांत मिळून ५३ हजारांवर शब्दसंग्रह आहे असें समजतें. या दोघांनाहि दुभाषांचें व मराठी भाषेच्या अध्यापकाचें काम करण्यास सरकारनें नेमलें होतें. त्यामुळें सदर ग्रंथप्रकाशनास ते त्यांचें साहाय्य मिळवूं शकले.

८०. जे सध्यां फारसें लेखन करीत नाहींत पण तरुणपणांत ज्यांचा बराच लौकिक झाला आणि ज्ञान व प्रतिपादनशैली यांच्या दृष्टीनें ज्यांचें लेखन आजही वाचनीय वाटतें अशा विद्यमान लेखकांत वे. रामचंद्र वामन नाईक, करंडेशास्त्री, भि. रामचंद्र पांडुरंग वैद्य, श्री. शांबा कृष्णाजी सू. सरदेसाई इत्यादींचें नांव उल्लेखनीय आहे. पहिले दोघे अनुक्रमें 'सत्संग' व 'प्राचीप्रभा' या मासिकांचे चालक होते आणि श्री. सरदेसाई हे गोव्यांत १९३० सालीं भरलेल्या १५ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष निवडले गेले होते. ज्यांची लेखणी बहुशः कांहीं ना कांहीं वाचनीय वाङ्मय प्रसवत असते अशा तरुण पिढींतील लेखक व कवि वर्गांत श्री. सुब्राव रा. सावंत, यशवंत सू. सरदेसाई, बा. वा. सांवर्डेकर, लक्ष्मण श्री. सू. सरदेसाई, दामोदर अच्युत कारे, महाबळेश्वरकर, स. प्र. सरदेसाई, व्यंकटेश विष्णु वैद्य, बाळकृष्ण भगवंत बोरकर, विनायक स. सुखटणकर, अनंत का. प्रियोळकर इत्यादींचा नामनिर्देश अवश्य करण्यासारखा आहे. पोर्तुगीज भाषेंत बऱ्यांतले लेखक म्हणून श्री. गोविंद पुंडलिक हेगडे देसाई, संपादक भारत, यांच्याशिवाय अन्य हिंदु गृहस्थाची फारशी प्रसिद्धी झालेली नाहीं.

८१. आर्थिकः––गोमंतकांतील मुख्य अन्न तांदूळ आहे. तांदुळाच्या खालोखाल वापरण्यांत येणारे पदार्थ म्हणजे पांढरपेशा लोकांत गहूं आणि कुणबाऊंत नाचणें व पाखळ हे होत. तांदळाचे वायंगण व सर्द असे दोन वार्षिक हंगाम असतात. आणि ते अनुक्रमें चैत्र व आश्विन महिन्यांत होतात. पण गोव्यांत होणाऱ्या तांदळाचें एकंदर पीक लोकांच्या वापरास फार तर ७ महिने पुरण्याइतकें होत असतें. इतर महत्त्वाचीं वनस्पतिज पिकें म्हणजे नारळ, आंबे, काजू व सुपारी यांचींच काय तीं होत. नारळाचे प्रतिवर्षी चार हंगाम किंवा पाडे होत असतात. आंब्याचा हंगाम चैत्रपासून ज्येष्ठापर्यंत तीन महिने असतो. सुपारी व काजू यांचे हंगाम एकेकच असतात. आणि ते अनुक्रमें कार्तिक व माघ–फाल्गुनांत होतात. नारळ नग ४ कोटी, आंबे १ कोटी, काजू व गर

मण ३० हजार व सुपारी २५ हजार याप्रमाणें त्यांच्या निर्गतीचे सरासरी ठोकळ आंकडे असतात.

८२. गोव्यांतील जुन्या व नव्या काबिजादींचा इतिहास जसा निराळा तसे त्यांचे आर्थिक प्रश्नही कित्येकांशीं भिन्न आहेत. नव्या काबिजादी सामान्यतः पहाडी व उतरणीच्या तर जुन्या काबिजादी सपाटीच्या व नद्यांच्या उत्तर प्रवाहांनीं युक्त. यामुळें पहिल्यांतल्या जमिनी निम्याहून अधिक लागवडीस न आलेल्या तर दुसऱ्यांतल्या बहुतेक सगळ्या लागवडीस आलेल्या. नव्या काबिजादींचें क्षेत्रफळ एक हजार मलांच्या जवळ तर जुन्या काबिजादींचें अडीचशांपेक्षां अधिक. पण पहिल्यांतली लोकवस्ती २ लक्ष तर दुसऱ्यांतली ३ लक्ष. नव्या काबिजादींत लोकवस्तीचें प्रमाण चौरस मैलीं २०० तर जुन्या काबिजादींत तें त्याच्या सहापट, पहिल्यांत झाडी व वाहतुकीच्या साधनांचा अभाव यामुळें सामान्यतः रोगट तर दुसऱ्या उत्तम आरोग्यावह. अर्थात् पहिल्यांतले लोकहि दुसऱ्यांतल्यापेक्षां बरेच कमी श्रम–साहस–क्षम. जुन्या काबिजादींत मजुरीचे दर देखील नव्या काबिजादींतल्यापेक्षां सरासरीनें दुपटीजवळ असतात. आजघडीस जुन्या काबिजादींत हे पुरुषी १० ते १६ आणे व बायकांस ५ ते ८ आण्यापर्यंत कामाच्या जातीप्रमाणें आहेत. नव्या काबिजादींत रस्ते, शाळा, टपाल, वैद्यकीय साहाय्य, यांची चांगलीशी सोय नसल्यानें सुशिक्षित लोक तेथें राहण्यास कबूल नसतात. त्यामुळें तेथील लोकांची राहणी व घरबांधणी जुन्या काबिजादींतल्या लोकांहून सामान्यतः ओंगळ असते. उभय भागांतला हा फरक पाहून कित्येकजण अशी उपपत्ति बसवितात कीं, जुन्या काबिजादी युरोपियनांच्या हातांत, नव्या काबिजादींपेक्षां दोनशें वर्षें अधिक राहिल्यानें त्या सुधारल्या आहेत. व या मागासल्या. पण त्यांच्यामध्यें वर सांगितलेला जो नैसर्गिक फरक आहे तोच त्यांच्या सुधारणेंतल्या फरकास खरोखर कारणीभूत आहे. पोर्तुगीज येण्यापूर्वींदेखील जुन्या काबिजादी नव्या काबिजादींपेक्षां अधिक सुधारलेल्या होत्या. हा इतिहास उपरिनिर्दिष्ट उपपत्तिवाले लक्षांतच घेत नाहींत. पोर्तुगिजांच्या आगमनानंतर व तींहीं ख्रिस्तीकरणामुळें जुन्या काबिजादींतल्या लोकांत सुधारणेची महत्त्वाची बाब जी शिरली ती म्हणजे परदेशगमनाची होय.

८३. गोव्यांतील आयातनिर्यातीचे शेवटच्या पांच वर्षांच्या सरासरीचे ठोकळ आंकडे अनुक्रमें १॥ कोटी व ३६ लक्ष आहेत. अर्थात् (एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानांत नव्हे) निर्गतीपेक्षां १कोटी १४ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची आयात जास्ती होत असते. किंवा निर्गतीपेक्षां आयात चौपटीहून किंचित अधिकच असते. आयातींत तांदूळ व भात ३८, सर्व प्रकारचें कापड २३, साखर–गूळ १०, तंबाखू–सिगारेट ५, गहूं व पीठ ५, मोटारी व तत्संबंधींचें सामानसुमान ४, पेट्रोल ४, कडधान्यें ३, परदेशी औषधें २॥, पोर्तुगीज दारू १।, याप्रमाणें लाख रुपये किंमतीचे जिन्नस मुख्य असतात. ही आयात मुख्यतः म्हणजे सुमारें ९० लक्ष रुपयांची, मुंबई बंदरामार्फत होत असते. तदनंतर रंगून बंदराचा नंबर लागतो. परस्पर परराष्ट्रीय बंदरामार्फत येणाऱ्या मालाची किंमत ३०–३५ लक्ष रुपयांच्या दरम्यान असावी. निर्यातींत नारळ–खोबरें १८, मांसळी ४, आंबे ३।॥, मीठ ३।, सुपारी ३ व काजूगर २॥ याप्रमाणें लक्ष रुपये किंमतीचे पदार्थ मुख्य असतात. हा व इतर बहुतेक निर्गत माल ब्रिटिश हिंदुस्थानांतच खपत असतो.

८४. आयात–निर्गतींतील हें भयंकर खिंडार, गोव्यांतून विशेषतः ब्रिटिश हिंदुस्थान आणि आफ्रिका व इतर परदेश यांत गेलेले गोमंतकीय व मुख्यतः ख्रिश्चन लोक जी कमाई करतात तिनें आणि तिकडेच येथील लॉटऱ्यांचा जो खप होतो त्यानें भरून निघत असतें. उदरनिर्वाहानिमित्त गोव्यांत आलेल्या परराज्यांतील मुख्यतः ब्रिटिश हिंदुस्थानांतील नागरिकांची संख्या सुमारें ११ हजार आहे, तर उलट गोव्यांतून एका ब्रिटिश हिंदुस्थानांत व विशेषतः मुंबई शहरांत व्यवसायानिमित्त वास्तव्य ठेवणाऱ्या पोर्तुगीज नागरिकांची संख्या ६० हजारावर असून आफ्रिकेंत व इतरत्र जाणाऱ्यांची १०–१२ हजार तरी असावी या लोकांचा मुख्य गुण हा कीं, ते गोमंतकाला बहुधा विसरतच नाहींत. कांहीं झालें तरी घर गोव्यांत असावें व बायकामुलेंही क्वचितच सोबत ठेवावीं असा त्यांचा क्रम असतो. त्यामुळें जवळचे वर्ष दोन वर्षांनीं आणि दूरचे पांचसहा वर्षांनीं आपल्या स्वप्रांताचें दर्शन घेत असतात आणि कुटुंबीय मंडळी बहुधा घरींच असल्यानें पैसे तर महिनामहाल रवाना करीत असतात. गोव्यांत नवीन गोवें येथें 'मिझॉरकॉर्दिय' नांवाची, मडगांव येथें 'ओशीसियु' नांवाची आणि म्हापसें येथें 'आझीलु दें मिलाग्रिश' नांवाची अशा तीन लॉटऱ्यांच्या संस्था आहेत. या वस्तुतः दीनसहाय्यक

संस्था आहेत. आणि तिघांचींही रुग्णालयें असून ख्रिश्चन अनाथांस त्यांची सांपत्तिक मदतही मिळत असते. पण सध्यां त्यांचें धार्मिक महत्त्व कमी झालें असून आर्थिक महत्त्व वाढलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पहिल्या दोन्हींच्या सोडती किंवा लॉटऱ्या बारमहा निघत असतात. तर 'आझीलच्या ' वर्षांतून एकदांच निघतात. पहिल्या दोन्ही वर्षांतून एक रुपया किंमतीच्या २६।२६ बावन्न लक्ष आणि तिसरी २॥ लक्ष रुपयांच्या सोडती विक्रीस काढितात. सर्वांचें पहिलें बक्षीस सामान्यत: ८ हजारांचें असतें. पण एकाच नंबराच्या पांच पांच सोडती असल्यानें तें ४० हजारांचें होऊं शकतें. या आणि इतर किरकोळ बक्षिसांची रक्कम वगळून पहिल्या दोहोंना ७॥–७॥ लक्ष आणि तिसरीला ७५ हजार रुपये वर्षाकाठीं केवळ लॉटऱ्यांवर कमावतां येतात. त्यांचे कायमनिधि अनुक्रमें १६, १३ व १ लक्ष रुपयांचे असून वार्षिक सर्व खर्चवेंच वजा जातां त्यांना अनुक्रमें ३॥, २॥, व -।- लाख रुपये प्रतिवर्षी शिल्लक राहूं शकतात! या लॉटऱ्यांचा मुख्य खप ब्रिटिश हिंदुस्थानांत व आफ्रिकेंत होत असतो.

८५. या संस्था व परदेशगमन कॅथोलिक गोमंतकाच्या आयात–निर्गतींतील तूट भरून तेवढी काढतात, असें नव्हे तर बाजारांत नाणेंही खेळवतात. त्यामुळें व्यापारी व्याजाचा दर ९ टक्के असला तरी लांब मुदतीच्या व्याजाचा दर ८पासून फार तर ९ पर्यंतच असतो. गोव्यांत पोर्तुगालांतल्या नॅशनल बँकेची एक शाखा नवीन गोवें आणि उपशाखा मुरगांव व मडगांव येथें आहेत. पण त्या चालूं ठवीवर व्याज देत नसल्यानें गोमंतकीय धनिक लोक व संस्था ब्रिटिश बँकेंतूनच आपल्या ठवी ठवूं लागले आहेत. त्यामुळें व अन्य जागतिक कारणांनींही गोव्यांत नाण्याची व विशेषत: चलनी धातूची चणचण भासू लागली आहे. गोव्याची व्यापारी देवघेव बव्हंशी ब्रिटिश हिंदुस्थानशीं होत असल्यानें ब्रिटिश चलनांचा बटाव शेंकडा ६ पासून १२–१४ आण्यापर्यंत उतरत चढत असतो.

८६. आधीं हिंदूंची संपत्ति हिरावून ती ख्रिश्चनास दिली, नंतर परदेशगमनामुळें ते पुष्कळ द्रव्य मिळवूं शकले आणि ख्रिस्तीकरण जें झालें तें निसर्गत:च सुपीक असणाऱ्या जुन्या कबिजादींत असल्यानें ही नैसर्गिक मदतही ख्रिश्चनास मिळाली. त्यामुळें आज ते हिंदूपेक्षां पुष्कळच अधिक सधन आहेत. हें धर्मवार प्रमाण स्थानविभागास लावून सांगावयाचें तर जुन्या काबिजादी नव्या काबिजादींपेक्षां सधन आहेत असें सांगावें लागतें. कारण ३ लक्ष लोकवस्तीच्या जुन्या काबिजादींत फक्त ६५ हजार हिंदू आहेत तर दोन लक्ष लोकवस्तीच्या नव्या काबिजादींत फक्त ३५ हजार कॅथोलिक आहेत. तथापि नव्या काय जुन्या काय दोन्ही काबिजादींत बहुतेक सगळा व्यापार मात्र हिंदूंच्याच हातीं आहे. ख्रिश्चनांत व्यापारी पेशा नाहीं असें नव्हे. कां तर त्यांनीं आफ्रिकेसारख्या ठिकाणीं मोठाल्या व्यापारी उलाढाली केल्या व करीत आहेत. पण गोव्यांत व्यापाराची मुख्य भाषा जी मराठी तिचा त्यांनीं अव्हेर केला असल्यानें युरोपियन भाषांतून होणारा गोव्यांतला दारूचा व पोर्तुगीज पुस्तकांचा व्यापार काय तो त्यांच्याकड उरला आहे. ख्रिस्ती लोकांत सुबत्ता नांदत असून त्यांच्यांत भिक्षेकऱ्यांचा वर्ग मोठा आहे. आणि हिंदु साधारण गरिबींतच दिवस कंठीत असले तरी एकही हिंदु भिकारी गोव्यांत दिसत नाहीं ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. क्वचित् जे कांहीं हिंदु भिक्षेकरी दिसतात ते परप्रांतांतून आलेले असतात. ख्रिश्चनांत भिक्षेकऱ्यांचा वर्ग उत्पन्न होण्याचें मुख्य कारण त्यांच्यांत आपण व आपलीं बायकापोरें यांच्यापलीकडे न पाहण्यांत असभ्यता किंवा निर्दयता आहे असें वाटण्याची त्यांची हिंदु बुद्धि युरोपियन संस्कृतीनें भ्रष्ट केली हें होय.

८७. गोव्यांत उद्योगधंदे उर्जितावस्थेस आलेले नाहींत व सध्यांच्या राजकीय स्थितींत येणेंही अशक्य दिसतें. कारण मोठमोठे कारखाने निघावयाचे तर त्यांतून निघणाऱ्या मालाला बाजारही मोठा असावा लागतो. गोव्याचें क्षेत्र स्वत: आकुंचित म्हणून ब्रिटिश हिंदुस्थानच्या बाजाराला माल पाठवावा म्हटलें तर पोर्तुगीज व इंग्लिश अशीं दोन सरकारें निर्गत–आयात जकात घेण्यास टपून बसलेलीं असतात! तथापि लांकडी सामान, सोन्या–रुप्याचे दागिने, मातीचीं भांडीं, बूट वगैरे तयार करण्याचे आणि शिलाईदिकांचे घरगुती धंदे येथें उत्तम चालले असून गोव्यांतील या कामांच्या कौशल्याची तारीफ युरोपांतही होत असते.

८८ गोव्यांत 'इन्कमटॅक्स' किंवा उत्पन्नावरील कर बसवण्यांत आलेला नाहीं. आणि जमिनीवरील कर आकारण्याची व तो वसूल करण्याची पद्धतही बरी आहे. प्रत्येक तालुक्यांत एक जमीनधारातपासक मंडळ असतें. तालुक्याचा मामलेदार

दार, म्युनिसिपालिटीनें निवडून दिलेले दोन प्रतिनिधि, सरकारी वकिलाचा प्रतिनिधि व जमाबंदी खात्याचा तालुक्यांतील मुख्याधिकारी असे पांच जण त्याचे सभासद असून पहिला अध्यक्षाचें व दुसरा चिटणिसाचें काम करतो. हें मंडळ दोन माहितगार नेमून जमिनीच्या उत्पन्नावरून साधारण शेंकडा १२ टक्केप्रमाणें कराची आकारणी करतें. तिच्याविरुद्ध खातेदाराची तक्रार असल्यास त्यानें निवडलेला एक, जमाबंदी खात्यानें निवडलेला एक व न्याय कचेरीनें निवडलेला एक अशा तीन जणांचें लवाद मंडळ तिचा निकाल करतें. न्यायालयानें नेमलेला प्रतिनिधी हा या मंडळांत सरपंच असतो. आकारलेल्या कराची वीस वीस वर्षांनीं सार्वत्रिक फेरतपासणी होत असते. मंगलेल्या वर्षाचा कर जानेवारी व मे या महिन्यांत दोन हप्त्यांनीं भरतां येतो. न्यायखात्यांत खटला भरून त्याकडून निकाल मिळविल्याशिवाय थकलेल्या कराबद्दल सरकारला कुळाची जमीन लिलावांत काढतां येत नाहीं.

८९. मोठमोटे कारखाने नसल्यामुळें संपत्तीची वांटणी फारशी विषम झालेली नाहीं.अर्थात् एक वर्ग अधिकाधिक संपन्न होत जावा आणि दुसरा कंगाल बनत जावा अशी स्थिति गोव्यांत नाहीं. स्वतःची जागा नसल्यामुळें फूटपाथावर झोंपणारे किंवा बांबूच्या तट्टयाच्या झोंपडयांतून राहणारे विरळाच सांपडावयाचे. भिक्षेकरी झाला तरी आगामी दोन दिवसांना जरूर तितका दाणागोटा त्याच्यापाशीं असतो असें म्हणतां येईल. या गोष्टीचें प्रमुख कारण म्हणजे 'ग्रामसंस्था'. या संस्था फारच पुरातन काळापासून हिंदुस्थानांत चालत आल्या होत्या. ब्रिटिश हिंदुस्थानांत त्या सरकारनें बुडवल्या असाव्या. पण गोव्यांत पोर्तुगीज सरकारनें त्या जिवंत ठेवल्या आहेत.पडीत जमिनी लागवडीस आणाव्या व उत्पन्नाचा हिस्सा आपल्या वंशजास परंपरेनें मिळत जावा हा त्यांचा हेतु. वसवलेल्या गांवांचें क्षेत्रफळ निरनिराळें असलें तरी सर्व ग्रामसंस्थांची रचना सामान्यतः एकाच पद्धतीची असे. एक पाटील, एक कुळकर्णी, एक पुरोहित, एक शिक्षक, एक सुतार, एक लोहार एक परीट, एक सोनार, एक पंडित किंवा वैद्य, एक न्हावी, एक चांभार, व एक महार असे बारा बलुते प्रत्येक गांवांत अवश्य असत. लागवडीवर गांवांतील लोकांची समाईक मालकी होती.बारा बलुत्यांनीं आपापलें काम फुकट करावें व दर हंगाम्याच्या वेळीं ठराविक धान्य, नारळ व इतर पदार्थ घेऊन जावे. याशिवाय देवस्थानासाठींही कांहीं उत्पन्न काढून ठेवण्यांत येई.आणि तें सर्व देऊन टाकल्यावर जें शिल्लक उरे तें मालकामध्यें विभागून दिलें जाई. मालकांचे प्रकार दोन.एक जणकार व दुसरा भागीदार.ग्रामसंस्था स्थापन करण्याच्या कामीं ज्यांनीं सर्वस्वानें भाग घेतला त्यांचे वंशज जणकार व ज्यांनीं केवळ भांडवलासाठीं पैसे पुरविले ते भागीदार. पहिल्यांच्या सर्व वंशजांना म्हणजे मुलगे, कुमारी व विधवा यांना सामान्येंकरून १८ वर्षांचें वय झालें कीं, 'जण' मिळू शकतो. दुसऱ्यांनीं आपल्या भांडवलावर प्रमाणशः पडलेला वांटा तेवढा घेऊन जावा. अगदीं आज घडीसही या ग्रामसंस्था थोडयाशा फेरफारांनीं मूळ स्वरूपांतच चाललेल्या आहेत. या ग्रामसंस्थांना 'छोटीं प्राजकें' असें कौतुकास्पद नांव अनेक विद्वानांनीं दिलें आहे. गोमंतक–जेत्या आल्बुकर्कास तर त्याची रचना व कारभार पाहून फारच आश्चर्य वाटलें. हिंदु व मुसलमान राजांनीं त्यांच्या अंतस्थ कारभारांत कधींच हात घातला नाहीं. ग्रामसंस्था खुषीनें देत असलेला 'खुषीव्रत' नांवाचा अंदाजीं एक षष्ठांशाएवढा कर तेवढा त्यांनीं घ्यावा. पण पोर्तुगीज सरकारनें त्यांचें स्वातंत्र्य पुष्कळच कमी केलें आहे. आज जुन्या काबिजादींत ११२ व नव्या काबिजादींत १०० ग्रामसंस्था असून त्यांतील कित्येकांचें वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपर्यंतही जात असते.

उपसंहार

९०. आतांपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून गोमंतकीय हिंदूंचे धार्मिक, सामाजिक व वाङ्मयात्मक संबंध महाराष्ट्राशीं कसे निगडित आहेत तें तर वाचकांस कळून येईलच. पण त्याच बरोबर आर्थिक दृष्टीनेंही केवळ हिंदूंचाच नव्हे तर त्यांच्यासह ख्रिश्चन व मुसलमानांचा किंवा एकंदर गोमंतकाचा महाराष्ट्राशीं आयवय–अवयवी भाव कसा आहे तेंदेखील कळून येईल अशी अपेक्षा आहे. परमेश्वर करो आणि उभयतांभोवतालचीं कृत्रिम आवरणें दूर होऊन तीं सर्वांशीं एकजीव होवोत!

———०———

परदेशांतील हिंदी

--परदेशांतील ब्रिटिश वकिलातींकडून किंवा इतर जबाबदार गृहस्थांकडून आलेली माहिती.

(१) **अफगाणिस्थान**—सेक्रेटरी, ब्रिटिश लेगेशन, काबूल यांजकडून आलेली माहिती—येथें असलेले हिंदी लोक सावकारी, दुकानदारी वगैरे धंद्यांत गुंतलेले असतात. त्यांनीं स्वतंत्र फर्म्स व कंपन्या चालविल्या असून हिंदी माल ते खपवितात. कांहीं लोक कारकून, मालखपवे व व्यवस्थापक असतात. मोठ्या व्यापाराची अफगाणिस्थानांत चांगली ख्याति आहे. अफगाणिस्थानांत बरेच हिंदी लोक स्थायिक झाले आहेत, कांहींनीं अफगाण राष्ट्रीयत्व पतकरलें आहे अशा लोकांना तेथील नागरिकत्वाचे हक्क आहेत. स्थायिक होणारे लोक मुख्यतः हिंदु, शीख व मुसलमान असून वायव्य सरहद्दप्रांत, सिंध व पंजाब वगैरे प्रांतांतील असतात. ते व्यापार, शेतकी वगैरे धंदे करतात. जे स्थायिक होत नाहींत ते म्हातारपणीं बहुधा हिंदुस्थानास परत जातात. निवळ मजुरी करण्यासाठीं येथें हिंदी लोक मुळींच येत नाहींत.

(२) **आस्ट्रिया**—ब्रिटिश कॉन्सुलेट व्हिएन्ना-मधून, जरूर ती माहिती पुरवितां येत नाहीं असें कळविण्यांत आलें.

(३) **आस्ट्रेलिया**:—येथें असणारे हिंदी लोक वसाहती करून एकत्र राहत नाहींत. ते सर्व ऑस्ट्रेलियांत पसरलेले आहेत. हिंदी लोकांची संख्या सुमारें ३००० असेल. येथें व्यापार करणाऱ्यापैकीं कांहींच्या स्वतंत्र फर्म्स असून, ते हिंदी माल येथें आणवून विकतात. कांहीं हिंदी लोक स्टोअरकीपर, कापडाचे व्यापारी, शेतकरी किंवा फेरीवाले आहेत. व्यापारी लोकांपैकीं कांहींना व्यापारी जगांत थोडी मान्यता आहे. येथें हिंदी लोकांच्या कायम वसाहती नाहींत. क्वीन्सलँड व वेस्टर्न ऑस्ट्रेलिआखेरीज इतर संस्थानांत निवडणुकीच्या मतासुद्धां तेथील रहिवाशांचे हक्क हिंदी लोकांना आहेत. नवीन हिंदी लोकांना जुन्या लोकांबद्दल फक्त कांहीं दिवस तेथें राहतां येतें. शिक्षणाकरितां गेलीं कांहीं वर्षे हिंदी विद्यार्थी येत नाहींत. परंतु योग्य लायकी असल्यास त्यांना येथील विद्यालयांत प्रवेश मिळतो. व्हाइट ऑस्ट्रेलिया पॉलिसीप्रमाणें हिंदी मजुरांना जातिनिर्बंधामुळें येथें येण्यास मज्जाव करण्यांत आला आहे.

(४) **इंडोचायना**:—ब्रिटिश कान्सुलेट सायगांव यांजकडून आलेली माहिती. येथें असलेल्या हिंदी लोकांची संख्या सात ते आठ हजार असावी असें वाटतें. येथें असणारे हिंदी व्यापारी कापड, मौजेचे हरतऱ्हेचे जिन्नस विकतात. कांहीं सावकार आहेत. व्यापारी बहुतेक चेटियर व मुसलमान असतात. लहान व्यापारी मद्रासकडचे असतात; कांहीं कापडाचे व्यापारी सिंधकडचे आहेत. येथें हिंदी लोकांच्या कांहीं स्वतंत्र फर्म्स आहेत, कांहींच्या हिंदुस्थानांतील कंपन्यांच्या शाखा आहेत, कांहीं हिंदी युरोपियन कंपन्यांतून कामावर आहेत व कांहीं हिंदी फर्म्समध्यें नोकरीस असतात. हिंदुस्थानांतील अगदीं थोडा माल येथें विकावयास येतो. बाजारांत हिंदी व्यापाऱ्यांना अगदीं थोडी मान्यता आहे. येथें हिंदी लोकांच्या कायम वसाहती नाहींत. मजुरी करण्यासाठीं येणाऱ्या लोकांत दक्षिण हिंदुस्थानांतील लोक गुराख्याचा व गवळ्याचा धंदा करतात व उत्तर हिंदुस्थानांतील लोक पहारेकरी म्हणून येतात. १९३१ सालीं येथें ६०६ हिंदी लोक (पैकीं ५९० पुरुष व १६ स्त्रिया) येथें आले; व १२८९ येथून गेले. १९३० सालीं ८९५ हिंदी लोक (पैकीं ८८१ पुरुष व १४ स्त्रिया) येथें आले व ११४३ येथून गेले. मजुरांना आपलें पोट भरतां येतें इतकी मजुरी मिळते. बहुतेक मजूर काम असेल तेवढ्यापुरते येतात. काम असेल त्याप्रमाणें त्यांना मूळ रहिवाशासारखे हक्क आहेत. येथें मजुरी (अगर नोकरी) साटीं येणाऱ्यांत हिंदु बहुसंख्याक असतात. पहारेकऱ्यांची नोकरी करणारांना दरमहा ३० पिआस्टर्स (९० रु.) मिळतात.

(५) **इंग्लंड व उत्तर आयर्लंड**—हाय कमिशनर ऑफ इंडियाचे कचेरींतून आलेली माहिती. ह्या दोन्ही देशांत हिंदी लोकांच्या कायम वसाहती नाहींत. हिंदी मजुरांची संख्या जमेस धरण्यासारखी नाहीं. हिंदी व्यापाऱ्यांची व रहिवाशांची माहिती 'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स

इन ग्रेट ब्रिटन' ही संस्था एकत्र करून पुस्तकरूपानें प्र सिद्ध करण्याच्या विचारांत आहे.

(६) इटली—(ब्रिटिश कान्सुलेट, रोम) हिंदी रहिवाशांबद्दल मागविलेली माहिती उपलब्ध नाहीं.

(७) इराक—हायकमिशनर कचेरींतून आलेली माहिती–इराकमध्यें सुमारें १०० दुकानें हिंदी व्यापाऱ्यांचीं असावींत. हिंदी व्यापारी जनरल मर्चंट्स, आयात निर्यातीचे कमिशन एजंट व किरकोळ विक्री करणारे आहेत.पुष्कळ व्यापाऱ्यांची स्थानिक व्यापाऱ्यांशीं भागिदारी आहे. कांहीं हिंदी लोक दुकानांतील मदतनीसाची किंवा कारकुनी वगैरे नोकऱ्या करतात. हिंदी व्यापारी हिंदी माल मागवून विकतात. येथील हिंदी व्यापाऱ्यांना बाजारांत मान्यता नाहीं. इराकमध्यें हिंदी मुसलमानांचीं कांहीं कुटुंबें पवित्र शहरांच्या आसपास स्थायिक झालेलीं आहेत. ह्यांपैकीं कांहीं कुटुंबें १८५७च्या बंडापासून वसाहत करून राहिलीं आहेत. हे मुसलमान लोक मुख्यतः संयुक्तप्रांत व पंजाबांतील असतात व त्यांची संख्या सुमारें १००० आहे. वसाहतवाल्यांपैकीं कांहीं धार्मिक व्यवसाय करतात. कांहींना हिं. सरकारकडून पेन्शन मिळतें. कांहीं दुकानदारी करतात. ह्या वसाहतवाल्यांना तेथील नागरिकत्वाचे हक्क नाहींत. वसाहतवाले मुसलमान जातीचे आहेत. इराकमध्यें धर्मशास्त्राचा अभ्यास करणारे सुमारें १०० विद्यार्थी नाजाफमध्यें आहेत. ते उत्तर हिंदुस्थानांतून येतात. पासपोर्ट–निर्बंधामुळें मजुरी व नोकरी करितां थोडे हिंदी लोक येतात. सुमारें २५० कामगार बंदरें, गोद्या, आगगाड्या व ब्रिटिश फर्म्समध्यें कामावर आहेत. निवळ मजुरीसाठीं येथें कोणी हिंदी लोक येत नाहींत. हिंदी मजूर लोकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. हिंदी लोक यांत्रिक कारागीर किंवा कारकून असतात. खात्रीलायक नोकरी असल्यास हिंदी लोकांना आपलें पोट भरतां येतें. त्यांना दरमहा १०० रु' मिळतात. हे लोक हिंदु, मुसलमान व ख्रिश्चन तीन्ही जातीचे असतात.

(८)इराण(अ)–ब्रिटिश लेगेशन तेहरान येथून. येथें व्यापार धंदा,नोकरी (मोटार-हांके, यांत्रिक कामगार) वगैरेमध्यें गुंतलेल्या हिंदी लोकांची संख्या सुमारें १००० आहे. इराणी कंपनीच्या कायद्याप्रमाणें कांहीं नवीन कंपन्या तेथें हिंदी लोक स्थापन करीत आहेत. बहुतेक हिंदी लोक व्यवस्थापक, कारकून किंवा माल खपविणारे असतात. हिंदी व्यापारी हिंदी मालाशिवाय इतर देशाचाहि माल विकतात. बाजारांत येथील हिंदी व्यापाऱ्यांना अल्प प्रमाणांत मान्यता मिळाली आहे. इराणच्या पूर्वभागांत बरेच शीख लोक राहतात. माझंदरानमध्यें कुर्रम जातीचे सुमारें ३०० लोक राहतात. ते अतिशय गरीब असून शेतकी व खाटकाचा धंदा करतात. ह्या वसाहती बहुतेक महायुद्धानंतरच्या काळांतील आहेत. कांहीं ५० वर्षांपासूनहि आहेत. हे वसाहतवाले पंजाबांतील व कुर्रमदरींतील आहेत. त्यांची एकंदर संख्या सुमारें सहाशेंपर्यंत असावी. मजुरांना ४ ते १५ रायल (म्हणजे २ ते ८ आणे) मिळतात. परदेशीय म्हणून त्यांजवर कांहीं निर्बंध नाहींत. बहुतेक वसाहतवाले मुसलमान असतात. विशिष्ट कराराशिवाय–इराण सरकारच्या खात्यांतून परदेशीयांना नोकरी करितां येत नाहीं. मजुरी करून पोट भरण्यासाठीं अगदीं थोडे हिंदी लोक इराणांत जातात. ते शतकी व इतर हरहुन्नरी धंद्यांत मजुरी करतात. पत्नी या नात्याखेरीज इराणांत स्त्रिया जात नाहींत व त्याही क्वचित्. हिंदी वसाहतवाले व्यापार व शेतकी करतात. इराणी कायद्याप्रमाणें परदेशीयांना स्थावर मालमत्तेचें मालक बनतां येतें. त्यांना मताधिकाराशिवाय इराणांतील रहिवाशाप्रमाणें सर्व अधिकार आहेत. वसाहतवाले हिंदू व मुसलमान असतात. नव्या वसाहतवाल्यांची संख्या सिस्तान प्रांतांत वाढत आहे. सिस्तानमधील हिंदी व्यापारी म्हातारपणीं स्वदेशीं परत जातात. कुर्रमी लोक मात्र इराणांतच राहतात, वाढतात व मरतात, व त्यांची प्रजा इराणांतच जन्मल्यामुळें इराणी रयत बनतात.

इराणः-(आ) (डॉ.कानगो यांनीं दिलेली माहिती)

इराणांत हिंदुस्थानचे लोक अदमासें सन १९१२ पासून जाऊं लागले. महायुद्धानंतर जाण रांची संख्या नोकरी व व्यापार या कारणांनीं वाढली. तिकडे जाणाऱ्यांत सर्वांत जास्त ख्रिस्ती व त्या खालोखाल मुसलमान व हिंदु आहेत. हिंदुस्थानांतील गोवा, पंजाब, सिंध, गुजराथ, काठेवाड या प्रांतांतील लोक व कोंकणांतील मुसलमान हे विशेषतः जातात. तेलाच्या खाणीचा मक्ता असणारी इंग्रज कंपनी सन १९०१ सालीं स्थापन झाली. तिचें भांडवल बारा कोटी पौंडांवर आहे. नफा कंपनी घेते. नोकर लोक हिंदी व इराणी आहेत. इराणच्या अटी नफा वगैरेबद्दल आहेत. कंपनीला ब्रिटिश सरकारचें संरक्षण कौंसिलतर्फें असतें. हिंदी लोकांना करारान्वयें जेवढ्या सव-

लती मिळतात तेवढ्याच. शिवाय फॉरिनर्स म्हणून कंपनी त्यांच्याकडे विशेष लक्ष देतें. परंतु हिंदी लोक हे ब्रिटिश साम्राज्यांतील म्हणून त्यांना कांहीं विशेष सवलती नाहींत. इकडून जाणाऱ्या हिंदी लोकांत नोकर पेशाचेच फार आहेत. मजूर वर्ग म्हणजे Skilled Labour यांत हिंदी लोक आहेत. हिंदी लोकांपैकीं सुमारें शंभर व्यापारी आहेत. सर्व व्यापारी हिंदु धर्मीयच आहेत.ते गुजराथी व सिंध प्रांतांतील असतात. नोकर वर्गांत मात्र गोवा, पंजाब व कोकण इकडील लोक आहेत. आपल्या इकडील तरुण लोकांस इराणांत कायम होणें असेल तर इराणी प्रजाजन (Subject) होऊनच झाले पाहिजे. धंद्याच्या दृष्टीनें फारच कुचंबणा आहे. पण त्यांतल्या त्यांत डॉक्टर, फोटो आर्टिस्ट व लोणी, चीज व फळफळावळ डब्यांत भरण्याचा धंदा करणारे यांना थोडा वाव आहे. इराणांतील पैसा बाहेर जाऊं न देण्याचें धोरण इराण सरकारनें अवलंबिल्यामुळें पैशाचा परदेशाशीं व्यवहार जवळ जवळ बंद आहे.व्यापारी लोकांना परदेशचा विवक्षित माल आणणें झाल्यास त्यांनीं त्याच किंमतीचा इराणचा माल पाठवून त्याच्या मोबदला दुसरा माल मागवावा. इराणचे सोन्याचें नाणें अगर सोनें परदेशीं नेण्यास बंदी आहे. इराणचा पैसा एक्सचेंज करून परदेशीं नेण्यास इंपिरिअल बँक ऑफ पर्शिया कबूल होत नाहीं. त्यामुळें हल्लीं परदेशी लोकांची कुचंबणा होत आहे. अशा रीतीनें एक्सचेंज्च बंद झाल्यानें इराणचें नाणें परदेशीं नेणार कसें? देशी धंद्यांना इराण सरकारनें जकातीचें फार मोठें संरक्षण दिलें आहे. जकाती शेंकड्यानें वाढविल्यामुळें परदेशी माल अत्यंत महाग पडतो. अर्थात् इराणांतील देशी मालाचाच खप झपाट्यानें होत आहे. तसेंच या देशी मालाशीं परदेशी मालाची चढाओढ करणें अशक्य होऊन बसल्यामुळें जाड्या भरड्या देशी मालाचाहि खप अतोनात होतो. इराणांतील उद्योगधंद्यांची सध्यां चलती असून इराणचा व्यापार वाढत आहे. व नवीन उद्योगधंदे निघत आहेत. उदाहरणार्थ, सिगरेट, होजिअरी, कापड, साबण इत्यादि धंदे गेल्या सहा वर्षांतच सुरू होऊन ते आज चांगल्या स्थितींत आहेत. साधारणतः दक्षिण इराणांत नोकर पेशाचे हिंदी असून थोडे व्यापारी आहेत. उत्तर भागांत थोडे हिंदी व्यापारी असून नोकर वर्ग नसावेसें वाटतें. इराणांतील मुसलमान दुसऱ्याच्या धर्माबद्दल आज तरी उदासीन दिसतात. त्यांच्यांत कडवेपणा मुळींच नाहीं. तरुण पिढीहि धर्माबद्दल उदासीनच आहे. ज्याला त्याला आपापल्या धर्माप्रमाणें बिनधोक वागतां येतें. इराणांत मशिदी फार थोड्या दिसतात. पण ज्या आहेत त्यांपुढून वाद्यें वाजत जातात (मिलटरीचा बँड, मुलांचा शाळेचा बँड,लग्नाचा नाच इ०इ०) बेहेरिन् बेटें अद्याप वादांत आहेत.आज त्याबेटांचा ताबा इंग्रज सरकारकडे आहे.इराण सरकार म्हणते,"तीं बेटें आमचीं आहेत व इंग्रज लोकांनीं तीं उगीच दाबलीं आहेत." इराण सरकार एवढेंच बोलून गप्प बसलें नसून तीं बेटें इंग्लिशांजवळ परत मागत आहे. हा वाद राष्ट्रसंघाकडे गेला आहे. त्या बेटांचा लोभ उभय पक्षांना असण्याचें कारण तेथील मोतीं सर्व मोत्यांत अत्यंत उत्तम व मौल्यवान् असतात.

(९) **क्यूबा**–हवाना येथील ब्रिटिश कॉन्सुलला असलेल्या माहितीवरून–क्यूबामध्यें सुमारें १०० हिंदी लोक आहेत. त्यांपैकीं बरेच युनायटेड स्टेटसच्या आरमारी खात्याच्या वर्कशॉपमध्यें आहेत. थोडे शेतावर मजुरी करतात. कांहीं लोक व्यापारी आहेत.

(१०) **ग्रीस**–येथील ब्रिटिश कॉन्सुलेटमधून आलेल्या माहितीवरून कळतें कीं, ग्रीसमध्यें हिंदी लोक अगदीं थोडे असले पाहिजेत.

(११) **जपान**—टोकियोहून ब्रि. कान्सुलेटमधून आलेली माहिती–टोकियोमध्यें रजिस्टर केलेल्या हिंदी रहिवाशांची संख्या १६ आहे. पैकीं ३मुसलमान,६ हिंदू,६ ब्रह्मी व १ मलबारी इसम आहे. ह्या लोकांपैकीं कांहीं शिक्षक,कांहीं विद्यार्थी व कांहीं व्यापारी आहेत. ह्यांपैकीं कोणीही तेथें कायम वसाहत करणारे नाहींत.

(१२) **जर्मनी**:—हँबर्ग येथील हिंदुस्थान सरकारच्या ट्रेड कमिशनरच्या कचेरींतून आलेली माहिती—जर्मनींत असलेल्या हिंदी रहिवाशांबद्दल एकत्रित माहिती नाहीं. तथापि सदर ट्रेड कमिशनरना माहीत असलेले हँबर्गमध्यें ६।७ हिंदी व्यापारी आहेत. ते मुख्यतः हिंदुस्थान व जर्मनीमध्यें आयातनिर्यातीचा व्यापार करतात. हँबर्गमधील हिंदी व्यापाऱ्यांच्या स्वतंत्र फर्म्स असून त्यांपैकीं एक हिंदुस्थानांतील एका मोठ्या निर्यातीच्या व्यापाऱ्याचा प्रतिनिधी आहे. त्यांना माहीत असलेल्या दोन विद्यार्थ्यांपैकीं एक डॉक्टरीचें व दुसरा इंजिनियरिंगचें शिक्षण घेत आहे. ह्या-

शिवाय बर्लिनमध्यें व जर्मनींत इतरत्र बरेच हिंदी विद्यार्थी आहेत.

(१३) जावा–(बटेव्हिया मुख्य ब्रिटिश वकिलातीमधून आलेली माहिती.)

जावामध्यें व्यापार धंद्यांत गुंतलेल्या हिंदी लोकांची संख्या २७७५ आहे. सन १९३० च्या खानेसुमारीप्रमाणें जावामध्यें एकंदर हिंदी लोक २८५८ पुरुष व ९७० स्त्रिया मिळून ३८२८ होते. व्यापारी लोक चहा व साखर यांची निर्यात आणि घाऊक व किरकोळ प्रमाणांत कापडाची विक्री करतात. हिंदी व्यापाऱ्यांच्या कांहीं स्वतंत्र फर्म्स आहेत. हिंदी रहिवाशांपैकीं शेंकडा ६५ लोक हिंदी फर्म्समध्यें मॅनेजर, कारकून, विक्रेते वगैरे नोकऱ्या करतात. पूर्वी हिंदी व्यापारी बराच हिंदी माल येथें खपवीत. परंतु जपानी मालाच्या स्वस्ताईमुळें आतां बाजारांत जिकडे तिकडे जपानी मालच जास्त विकला जातो. येथील हिंदी व्यापाऱ्यांना बाजारांत मान्यता आहे. हिंदी लोक येथें कायम रहिवासी होत नाहींत. म्हातारपणीं बहुधा ते स्वदेशी परत जातात. व आपला उद्योगधंदा आपल्या पसंतीच्या (स्वदेशिय) लोकांच्या हवालीं करतात. येथें जमिनीची मालकी परदेशीयांना मिळूं शकत नाहीं. इतर हक्क तद्देशियांप्रमाणें हिंदी लोकांना आहेत. येथील हिंदी लोक हिंदु व मुसलमान धर्माचे असतात. येथील हिंदी लोकांत पुरुषांचें स्त्रियांस प्रमाण ३:१ आहे. हिंदी लोकांची सांपत्तिक स्थिति बरी आहे. परदेशीय म्हणून अगर काळागोरा म्हणून हिंदी लोकांवर येथें कोणत्याही प्रकारें निर्बंध नाहींत.

(१४) **झांजीबार** (पूर्व आफ्रिका):— (पी. बी. खरे झांजीबार यांजकडून) येथें फारच थोडे दक्षिणी लोक आहेत. येथें सन १९२१ सालीं 'महाराष्ट्रीय क्लब' स्थापन झाला होता; पण सन १९२८ च्या सुमारास तो बंद झाला. टांगानिका ही पूर्व आफ्रिकेंतील जर्मनांची वसाहत गेल्या महायुद्धानंतर व्हर्सेलीसच्या तहान्वयें इंग्लिशांना मिळाली. याची राजधानी दारेसलाम आहे.या ठिकाणीं हल्लीं महाराष्ट्रीयांची बरीच वस्ती आहे. मुंबईहून जाणाऱ्या आगबोटी सन १९२८ पर्यंत दारेसलाम बंदर करीत नसत. त्यामुळें मुंबईहून येऊन दारेसलामला जाणारे व दारेसलामहून मुंबईकडे जाणारे लोक यांना झांझीबार येथें अगोदर उतरावें लागे. यामुळें झांझीबार यथें महाराष्ट्रीयांची जा–ये बरीच वाढली. आगबोट मिळण्याकरितां त्यांना तेथें कांहीं दिवस राहावें लागे. म्हणून त्यांच्या सोयीसाठीं महाराष्ट्रीय क्लब स्थापन झाला होता. क्लबानें एक घर भाड्यानें घेऊन त्यांची उतरण्याची सोय केली होती. वार्षिक खर्च अदमासें ५०० रु. येत असे. प्रत्येकास वर्षाची वर्गणी रु. १५ द्यावी लागे. मुंबईहून आफ्रिकेस जाणाऱ्या आगबोटी दारेसलाम बंदर करूं लागल्यापासून क्लबाची आवश्यकताच उरली नाहीं.

प्राचीन काळीं झांझीबार हें एक अरब सुलतानाचें स्वतंत्र राज्य होतें. मस्कतच्या राजघराण्याची एक शाखा इकडे आली व सय्यद सैफ नांवाच्या सुलतानानें याची स्थापना केली. हल्लीं हा ब्रिटिश संरक्षित मुलूख आहे. जरी गादीवर आरब सुलतान आहे तरी सर्व सत्ता ब्रिटिश रेसिडेंटच्या हातीं आहे. नवव्या शतकाच्या आरंभीं हिंदी व्यापारी झांझीबार येथें प्रथम आले. त्यांत कच्छचे भाटिये येऊन चांगले सुस्थित झाल्यावर त्यांच्या मागून बोहरी, खोजा, लोहाणा, वाणीया (जैन) जातीचे व्यापारी आले. तेव्हांपासून हिंदी लोक सर्व पूर्वआफ्रिकेभर पसरले पूर्व आफ्रिकेंतील हिंदी लोकसंख्येपैकीं दर दोनशांत एक या प्रमाणांत म्हणजे शेंकडा एक द्वितीयांश दक्षिणी आहेत. त्यांचा विशेष भरणा पूर्व आफ्रिकेंतील युगांडा, कीनिया, टांगानिका, व झांझीबार या भागांत आहे. दक्षिणी लोकांची सर्वांत जास्त वस्ती टांगानिका प्रांतांत व त्याची राजधानी दारेसलाम शहर येथें आहे. बहुतेक दक्षिणी सरकारी नोकर असून थोडे खाजगी नोकर आहेत. टांगानिका प्रांतांत पुष्कळ दक्षिणी असिस्टंट सर्जनच्या हुद्यावर आहेत. मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र धंदा करणारे मात्र अगदींच विरळा! क्वचित् एकाद्यानें आपल्या धंद्यांत नांव कमाविलेलें आहे. उदाहरणार्थ, बॅ. व्ही. बी. फडके यांनीं कीनियाची राजधानी नैरोबी येथें आपल्या धंद्यांत चांगलेंच यश मिळविलें आहे. शिवाय कीनिया सरकारच्या एक्झिक्यटिव्ह कौन्सिलचे ते कित्येक वर्षे एकटे एक सरकारनियुक्त हिंदी सभासद होते. त्याचप्रमाणें बॅ. एम्. पी. चितळे यांनीं टांगा व दारे–सलाम येथें ॲडव्होकेट म्हणून कीर्ति मिळविली असून ते टांगानिका सरकारच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या सरकारनियुक्त अनऑफिशियल सभासदांपैकीं एक आहेत.

हिंदी लोकांना विरोध करण्याची शक्ति दिवसें दिवस बळावत आहे. कीनिया व टांगानिका या

भागांत तर ही भावना फारच तीव्र स्वरूपांत दिसून यते. कारण येथील बहुतेक अधिकारी दक्षिण आफ्रिकेंतून आलेले असल्यामुळें ते येतांना ही प्रवृत्ति आपल्यावरोबर घेऊन येतात व तिचा फैलाव करतात. हिंदी लोक युरोपियनांच्या अगोदर फार वर्षे आफ्रिकेंत जाऊन सुस्थित झालेले आहेत. पण त्यांनीं राजकीय सत्ता संपादन करण्याकडे आपला कल कधींहि दाखविला नाहीं. जातीजातींतील संबंध एकंदरींत सलोख्याचे आहेत. परंतु हिंदुस्थानांत जातीजातींतील वैमनस्याची लाट उसळली म्हणजे तिचा पडसाद इकडे केव्हां केव्हां उठतो. खोजा व बोहरी यांची वस्ती इकडे झाल्याला कित्येक पिढ्या होऊन गेल्यामुळें ते हिंदुस्थानाला परदेश व आफ्रिकेला आपलें घर समजतात व तेथील लोकांशीं ते अगदीं एकजीव झाले आहेत. हिंदी लोकांपैकीं कित्येक जाती आफ्रिकन बनल्या असून त्यांचे लग्नसंबंध इकडेच होतात. येथील मूळ रहिवाशांची 'किसवाहिली भाषा' ते आपली घरगुती भाषा म्हणून वापरतात. कांहीं उदाहरणें अशीं आढळतात कीं, स्वतःच्या मुलांना त्यांची स्वतःची गुजराथी भाषा शिकविण्याकरितां शिक्षकाची योजना केलेली असते.खोजा व बोहरी लोकांप्रमाणें कायम वस्ती केलेले फारसे हिंदु नाहींत. हिंदूंच्या संख्येच्या मानानें त्यांचीं लग्नें वगैरे इकडे अल्पच होतात.

इकडील हिंदी लोकांत मद्यपानाचें प्राबल्य दिसून येतें. दक्षिणी लोक या बाबतींत फारच पुढें गेले आहेत. या भागांत गोवॅनीज एक हजार असून पाशीं सुमारें अडीचशें आहेत. त्यांपैकीं बहुतेक सरकारी नोकर आहेत. युरोपियनांप्रमाणें त्यांनाहि मद्यपानाची दुष्ट संवय जडलेली आहे. गुजराथी, कच्छी, काठेवाडी व बोहरी लोकांना ही संवय जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल.

राजकीय सत्ता संपादण्याकडे हिंदी लोकांचा कल नसल्यामुळें त्यांच्यावर कोणाचें तरी वर्चस्व असलेलें नेहमीं दिसून येतें. युरोपियनांनीं मात्र आफ्रिकाखंड आपापसांत वांटून घेतलें आहे. जिकडे पहावें तिकडे युरोपियन प्रमुख व हिंदी दुय्यम असा देखावा दिसतो. आणि असें असूनहि इकडे नवीन येणाऱ्या हिंदी लोकांना बंदी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. व यापूर्वी वसाहत केलेल्या हिंदी लोकांना हांकून देण्याचा विचार चालू आहे. कीनिया वसाहतींतील निरोगी प्रदेश युरोपियन लोकांकरितां कायद्यानें राखून ठेवलेला आहे. मोंबासा शहराच्या विशिष्ट भागांत हिंदी लोकांना राहण्याची मनाई आहे. सदर भागांत त्यांच्या मालकीचे बंगले असल्यास त्यांना त्यांत राहतां येत नाहीं; फार तर आपल्या कचेऱ्या तेथें ठेवाव्या! त्यांना आपले बंगले भाड्यानेंच द्यावयाचे असल्यास फक्त युरोपियनांनाच द्यावे असा निर्बंध आहे. हिंदी लोकांना या भागांत नोकरी मिळणें आतां दुरापास्त आहे. धंदेवाईक लोकांना थोडा अवसर आहे; पण त्या मार्गांतहि दिवसानुदिवस अडचणी वाढतच आहेत. युरोपियन लोक देशांतील खनिज संपत्ति मिळविण्याकरितां धाडसी कृत्यें करतात,तर उलट हिंदी लोक शेती व आयात-निर्यातीचा व्यापार याबाहेर आपली दृष्टि केव्हांहि फेंकीत नाहींत. कीनिया वसाहतींत नुकतीच एक सोन्याची खाण सांपडली. पण तेंहि क्षेत्र युरोपियनांनीं ताबडतोब हस्तगत केलें हिंदी व्यापारी लोक बहुधा मध्यम स्थितींतील असतात; व मध्यम स्थितींतला व्यापारहि बहुतेक त्यांच्याच ताब्यांत आहे. पण त्यांची कळ युरोपियन बँकांच्या हातांत असते, व जहाजांची वहातूकहि युरोपियनांच्याच ताब्यांत आहे. ही परतंत्रता हिंदी मनुष्याला फार जाणवते. दक्षिणी लोक धंद्यांत कोठेंच दिसावयाचे नाहींत! जो कांहीं थोडा व्यापार हिंदी लोकांच्या ताब्यांत आहे तो चालविणारे बोहरी, खोजा, भाटिया, लोहाना व वाणी जातीचे लोकच मुख्यत्वें आहेत. अगदीं अलीकडे कांहीं हिंदी गृहस्थांनीं धंद्यांत, आपली आश्चर्यकारक प्रगति केली आहे. पण अशीं उदाहरणें व्यक्तिविषयक आहेत. समाईक पद्धतीचें हिंदी लोकांना अगदीं वावडें आहे. हल्लींच्या चढाओढीच्या व्यापारी युगांत, युरोपियन, अमेरिकन व जपानी लोकांशीं जर टक्कर द्यावयाची असेल तर हिंदी लोकांनीं समाईक पद्धतीनें भांडवल उभारून कंपन्या काढणें जरूर आहे. धंद्याच्या व्यवहारांत जितका प्रामाणिकपणा दिसावयास पाहिजे तितका हिंदी लोकांकडून दाखविला जात नाहीं; आणि याच कारणामुळें हिंदी लोक हें साहस करीत नसावेत. युरोपियनांपेक्षां हिंदी लोकांची राहणी फारच काटकसरीची असते. पण हा त्यांचा गुण नसून दोष आहे असा डांगोरा युरोपियन लोक पिटीत असतात. कारण व्यापाराच्या कांहीं शाखा अशा आहेत कीं, हिंदी लोकांच्या काटकसरी स्वभावामुळें त्या शाखांत चढाओढ करणें युरोपियनांना शक्य नसतें. हिंदी व युरोपियन यांतील तंट्याचें हेंच मूळ कारण आहे.

टीपः—दारेसलामच्या 'मराठा मंडळा'नें एक सायक्लोस्टाईलवर काढलेलें लहान मराठी वर्त-

मानपत्र नुकतेंच चालू केलें आहे. वार्षिक वर्गणी दोन शिलिंग आहे. वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं दोन शिलिंगाची पोस्टल ऑर्डर पाठवावी. पत्र मासिक असून नांव 'मराठा मित्र' आहे. पत्ताः– चिटणीस, मराठा मंडळ Post Box नं.२०४ दारेसलाम (टांगानिका टेरिटरी, पूर्व आफ्रिका).

(१५) **टर्की–तुर्कस्थानः**––कॉन्स्टँटिनोपल येथील ब्रि. कॉन्सल जनरलकडून–टर्कीमध्यें व्यापार करीत असलेले दोन हिंदी व्यापारी आहेत. त्यांच्या स्वतंत्र फर्म्स नाहींत. ते हिंदी माल नेऊन विकीत नाहींत. टर्कीमध्यें कायम वसाहत केलेले हिंदी लोक नाहींत. येथें शिक्षणाकरितां हिंदी विद्यार्थी येत नाहींत; तसेंच मजुरी करण्यासाठींही हिंदी लोक येथें येत नाहींत.

(१६) **डेन्मार्क**–ब्रि. कान्सुलेट, कोपनहेगेन––डेन्मार्कमध्यें फारच थोडे हिंदी लोक राहतात. व्यापार करणारे किंवा इतर उद्योगांत गुंतलेले असे हिंदी लोक येथें नाहींत. थोडे हिंदी विद्यार्थी कांहीं दिवस अभ्यासासाठीं येथें येतात. शिक्षणसंस्थांतून त्यांना सहसा मज्जाव होत नाहीं. साधारणतः परदेशीयांना डेन्मार्कमध्यें कामधंदा सुरू करण्यापूर्वी तेथील अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते.

(१७) **न्यूझीलंड**–वेलिंग्टन येथील हिज मॅजेस्टीच्या ट्रेड कमिशनरकडून–ता. ३१–३–३१ रोजीं न्यूझीलंडमध्यें रहिवासी असलेल्या हिंदी लोकांची संख्या १६६ होती. दरवर्षी साधारणतः १८० हिंदी लोक न्यूझीलंडमध्यें येतात. व १५० लोक येथून जातात. बरेचसे हिंदी लोक फळविक्रीचा धंदा करितात.

(१८) **पॅलेस्टाईन** सरकारच्या जेरुसलेम येथील चीफ सेक्रेटरीच्या कचेरींतून–हिंदुस्थानांतून येथें आलेल्या हिंदी लोकांची संख्या क्षुल्लक आहे. १९२७ ते १९३२ या अवधींत हिंदुस्थानांतून आलेल्या व येथें रजिस्टर झालेल्या हिंदी लोकांची संख्या ७० होती. त्यांपैकीं ४५ज्यू, १४ मुसलमान व ११ ख्रिस्ती होते. ह्यांशिवाय पुष्कळ हिंदी लोक (मुख्यतः मुसलमान) पासपोर्टचे निर्बंध चुकवून पॅलेस्टाईनमध्यें प्रवेश करतात. हे लोक मुख्यतः सैन्यांतील शिपी, न्हावी वगैरे धंदे करतात. परदेशीय अगर काळा व गोरा म्हणून ह्या लोकांवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध नाहींत.

(१९) **पोर्तुगाल**–ब्रि.कॉन्सुलेट, लिस्बनमधून कळविण्यांत येतें कीं, येथें हिंदी रहिवासी असल्याचें माहीत नाहीं.

(२०) **फिलिपाईन्स** ब्रिटिश कॉन्सुलेट जनरल, मॅनिला यांजकडून आलेली माहितीः-फिलिपाईन बेटांत व्यापार-धंद्यांत गुंतलेल्या लोकांची संख्या नेमकी किती आहे हें सांगतां येणें अशक्य आहे. अदमासें २००–३०० लोक यांत गुंतलेले असावेत. हे लोक पूर्वेकडील निरनिराळ्या प्रकारचा माल परदेशांतून आणून त्याचा किरकोळ विक्रीचा व्यापार करितात. येथें असलेल्या मुख्य मुख्य हिंदी फर्म्स म्हणजे हैद्राबाद (सिंध) येथील फर्म्सच्या शाखा आहेत. हैद्राबादच्या फर्म्सचे येथें असलेल्या प्रतिनिधींखेरीज व्यापारांत गुंतलेले सर्व हिंदी लोक, मॅनेजर, कारकून किंवा विक्रेते (sales–men) अशा हुद्यांवर आहेत. व्यापारांत गुंतलेले हिंदी लोक विक्रीसाठीं हिंदुस्थानांत तयार झालेलीं नक्षीदार पितळेचीं भांडीं, हस्तिदंताचें खोदकाम, रग्ज, शाल इत्यादि जिनसा येथें आणतात. मॅनिला गांवीं एस कोल्टा म्हणून जो व्यापाराचा मुख्य रस्ता आहे. तेथें कित्येक नांवाजलेलीं हिंदी दुकानें आहेत. वर उल्लेखिलेल्या हैद्राबाद फर्म्स या 'बॉम्बे मर्चंट्स् असोसिएशन' नांवाच्या संस्थेच्या सभासद आहेत. फिलिपाईन बेटांत हिंदी लोकांच्या स्वतंत्र वसाहती नाहींत. परंतु येथें कांहीं हिंदी लोकांनीं कायमचें वास्तव्य केलें आहे. फिलिपाईन्समध्यें हिंदी लोक कधींपासून स्थाईक होऊं लागले हें सांगणें कठीण आहे. १७६२ मध्यें मॅनिला काबीज करण्यांत ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदी सैनिकांनीं भाग घेतला होता. त्यांपैकीं कांहीं सैनिक युद्ध संपल्यावर येथेंच कायमची वस्ती करून राहिले असा समज आहे. या शतकाच्या आरंभापासून हिंदी लोक थोडथोडे पण सारखे येतच आहेत. येथें जे हिंदी लोक आहेत ते कोणत्या प्रांतांतून येतात हें ठरवावयाचें म्हणजे त्या लोकांचे तीन मुख्य विभाग पडतात–(१) हिंदू लोक सिंधमधून, (२) पंजाबमधून शीख, (३) व पंजाबमधून मुसलमान. शेवटच्या दोन विभागांतील लोकांत, पतियाळासारख्या संस्थानांतून आलेल्या लोकांचाही समावेश होतो. येथें कायम वस्ती करून राहिलेल्या हिंदी लोकांची नक्की संख्या सांगणें कठिण आहे. १९१८त फिलिपाईन बेटाची जी खानेसुमारी झाली त्यांत हिंदी लोकांचा स्वतंत्र उल्लेख नाहीं. ती संख्या सुमारें १००० ते १२०० असावी. सिंधमधून आलेले हिंदी लोक बहुधा कसल्या तरी

किरकोळ व्यापारांत गुंतलेले असतात. पंजाबांतून आलेले हिंदी किरकोळ व्यापार करितात. किंवा फेरीवाल्याचा धंदा करितात. किंवा पहारेकरी म्हणून कुठें तरी नोकरी पत्करितात. ज्या हिंदी लोकांना फिलिपाईन बेटांत कायदेशीर रीतीनें प्रवेश मिळाला आहे त्यांना इतर सर्व परदेशी रहिवाशांप्रमाणें हक्क असतात; आणि नागरिकत्वाचा हक्क,इतर देशांप्रमाणेंच, फक्त नागरिकांना म्हणजे जे संयुक्त अमेरिकेचे मांडलीक (Owe allegience) आहेत तेवढ्यांनाच फक्त आहे. हिंदु, मुसलमान व शीख यांची वेगवेगळाली संख्या देतां येणें शक्य नाहीं. येणाऱ्या व जाणाऱ्या हिंदी लोकांची संख्या हळू हळू वाढतच आहे हें खालील आकड्यांवरून दिसून येईलः—

वर्ष	येथें आले	येथून गेले
१९२६	८८	३१
१९२७	११८	४२
१९२८	१४९	५२
१९२९	१२६	६६

पुष्कळ हिंदी लोक म्हातारपणीं हिंदुस्थानांत परत जातात परंतु कांहीं हिंदी लोक (फिलिपाईनमध्यें कायम राहतातसें दिसतें.) शिक्षणासाठीं फिलिपाईन्सला हिंदी लोक कोणींच येत नाहीं असें म्हटलें तरी चालेल; येथील शिक्षणसंस्थांच्या बाबतींत त्यांना कांहींच आडकाठी नाहीं. परदेशगमनाच्या कायद्यान्वयें आशियाखंडाच्या देशांतील लोकांना, मजूर या नात्यानें प्रवेश करितां येत नाहीं. हे परदेशगमनाचे कायदे,संयुक्त अमेरिकेच्या कायद्यांसारखेच आहेत. येथील हिंदी लोकसंख्येंत पुरुष व स्त्रिया यांचें काय प्रमाण आहे याबद्दलचे आकडे उपलब्ध नाहींत. परंतु येथें येणाऱ्या हिंदी लोकांपैकीं शेंकडा ९० लोक पुरुष असतात अशी समजूत आहे. जें सामान्यतः आढळून येतें त्यावरून असें म्हणतां येईल कीं, फिलिपाईन बेटांतील हिंदी लोक सुखानें राहतात आणि त्यांपैकीं पुष्कळ हिंदी लोक पैसा सांठवूं शकतात हें सर्वांना माहीत आहे. हिंदी मजुराचें महिना अजमासें किती उत्पन्न आहे हें नक्की सांगतां येत नाहीं; परंतु असें वाटतें कीं, ज्यांचें उत्पन्न महिना ३०००० पेसॉस (सुमारें ५० रु.) हून कमी आहे असे फारच थोडे हिंदी लोक सांपडतील. फिलिपाईन्समधील हिंदी हिंदु, मुसलमान अगर शीख असतात. त्यांची वेगवेगळाली संख्या नक्की सांगतां येत नाहीं; परंतु शीख व मुसलमान यांची संख्या एकंदर हिंदी लोकांच्या दोन तृतीयांश असावी.

(२१) **बल्गेरिया**—सोफिआहून ब्रि. कॉन्सुलेटमधून बल्गारिआंत हिंदी रहिवासी नसल्याबद्दल कळविण्यांत आलें आहे.

(२२) **मफिया**:—श्री. के. आर. केळकर C o कस्टम्स् दारेसलाम, टांगानिका पूर्व आफ्रिका यांचें पत्र.)

"१९२९ मध्यें इकडे कस्टमखात्यांतील नोकर म्हणून माझी मफिया नांवाचे बेटावर बदली झाली. व सबंध ३॥ वर्षांची ट्रीप तेथेंच काढावी लागली. मफिया हें बेट टांगानिकाची राजधानी दारेसलाम यापासून १२० मैलांवर आहे. तेथें हल्लीं जावयाचें म्हणजे दारेसलाम अथवा झांझिबार येथें उतरून गलबतानें अथवा 'अझानिया' अगर 'अस्कारी' या बोटींतून जावें लागतें. बाहेरील प्रवाशांस समुद्रांत असलेला हा बेटांचा समूह दुरूनच पाहून आल्हाद वाटतो. हिरवीं गार अशीं नारळाचीं झाडें पाहून जणूं काय जमिनीवर हिरवी शाल पसरली आहे असा भास होतो. मुख्य बेटाची लांबी अदमासें २० मैल असून सरासरी रुंदी सात मैल आहे. अशा या टापूंत ७००० लोकांची वस्ती आहे. त्यांचा धर्म इस्लाम आहे. या लोकांतून जो मक्केस जाऊन येईल त्यास "हाजी" ही सन्मानाची पदवी प्राप्त होते. त्या ठिकाणीं १००।१२५ हिंदी लोकांची वस्ती आहे. ते सर्व इस्माइली खोजे आहेत. या लोकांचा व्यापार म्हणजे तत्रस्थ लोकांकडून खोबरें वा नारळ विकत घेऊन त्या बदला त्यांस सामान्य गरजेच्या वस्तू देणें हाच होय. तेव्हां या बेटाची आयात म्हणजे सामान्य गरजेच्या वस्तू जसें:-तंबाखू, तांदूळ, ज्वारी, मुहोगो, आगपेटचा, रॉकेल तेल, साखर वगैरे; व निर्गत म्हणजे खोबरें, बेचडीएअर,थोडें फार तीळ ही होय. येथें 'स्वाहिलाळलेले' असे पुष्कळ अरब, बलुच, शिराझी, सोमाली वगैरे लोक आढळतात. 'स्वाहिलाळलेले' म्हणण्याचें कारण असें कीं, 'नॉन नेटिव्ह' 'पोल टॅक्स' निघतांच उपरिनिर्दिष्ट जातीचे म्हणवणाऱ्या बहुतेक लोकांनीं आपणांस 'स्वाहिली' समजावें असें कबूल केलें. येथील एतद्देशीय हा साधारणपणें धष्टपुष्ट आहे. पण अतिशय आळशी आहे. घरांतील धान्य, अंगांतील पांढरी कफनी, डोक्यावरील पांढरी टोपी, व हातांतील काठी यांस धक्का लागत नाहीं तों पर्यंत तो काम करणार नाहीं. त्याचें हातीं १–२ शिलिंग

द्या म्हणजे तो उद्यांची बेगमी न करितां त्याच दिवशीं निरनिराळ्या अनिष्ट व्यसनांत उडवून टाकील. त्यास खावयास भात, मासे, व कडधान्यें असलें म्हणजे झालें. भाताऐवजीं ज्वारी, मुहोगो, रताळीं यांचा ते उपयोग करितात. त्यांच्यांत शिक्षणप्रसार अगदींच कमी आहे. तरी त्यांमध्यें बौद्धिक सामर्थ्याचा अभाव नाहीं. आणि येत्या ५० वर्षांत त्यांमध्यें राष्ट्र व तद्विषयक कल्पना निर्माण होतील असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. पण सध्यां जोंपर्यंत टांगानिका 'मँडेटेड टेरिटरी' आहे तोंपर्यंत हिंदी लोकांनीं भांडवल जमवून कंपन्या काढून, सामुदायिक मिळकत खरेदी करून बिनधोक स्थायिक व्हावें. मिळकत मात्र पुष्कळ खरेदी करावी व सध्यां व्यापाराच्या मंदीचे दिवसांत मिळकती स्वस्त मिळण्याचा संभव आहे. यासंबंधीं पत्र व्यवहार Director of Agriculture Dar-es-Salam tanganyika Territoryयांशीं करावा.

त्यांचे खात्याचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध होत असतो. तो जिज्ञासू माणसांनीं मागवून जास्त माहिती मिळवावी. सध्यां टांगानिका केनियाचे धोरणावर जात आहे. टांगानिकांतील धंदे बाल्यावस्थेंत आहेत. आणि केनियांतील धंदे त्या मानानें पुढारलेले आहेत. व सर्वांस समान कायदे झाल्यास त्याचा फायदा केनियास मिळणार आहे."

(२३) **मोंबास** (पूर्व-आफ्रिका-डॉ. शंकर धोंडो कर्वे यांचें पत्रः--) "सध्या मुंबासास दक्षिणी चार, पांचच कुटुंबें असल्याकारणानें येथें पूर्वी असलेला क्लब मोडून आज जवळ जवळ दोन तीन वर्षें झालीं. बाकी माहिती मला जेवढी देतां येणें शक्य आहे, तेवढी थोडक्यांत देत आहें तरी तिचा आपणांस उपयोग झाल्यास करावा.

मुंबासा हें पूर्व आफिरकेचें मुख्य बंदर आहे. व केन्या व युगांडा व टांगानिकाच्या कांहीं भागाचें हें मुख्य बंदर आहे. येथें मोठमोठ्या बोटी धक्क्याला लागूं शकतात व मालाच्या वाहतुकीच्या दृष्टया उत्तम सोयी आहेत. तसेंच येथें एतद्देशीय काळे स्वाहिली लोक, अरब लोक (हे येथें तीन चार शतकांच्या पूर्वी आलेले आहेत व झांझिबारच्या सुलतानच्या आधिपत्याखालीं होते.), हिंदी व युरोपिअन अशी वस्ती आहे.हिंदी अजमासें १०,००० असून यांत मुख्यत्वें, गुजराथी व्यापारी व कारकून वर्ग,त्याचप्रमाणें सुतार, लोहार, गवंडी वगैरे मजूर वर्ग, थोडे बहुत पंजाबी.यांतही त्याचप्रमाणें वर्गदारी आहेत. हे येथें ब्रिटिश राज्यसुरवातीनंतर आलेले आहे. याशिवाय या प्रांतांत ३-४ पिढ्या राहिलेले आगाखानी व इतर खोजे, बोहोरे व अगदीं थोडे गुजराथी; व त्याचप्रमाणें कच्छी व इतर थोडे लोक आहेत. कांहीं मुसलमान नावाडी येथें पूर्वी नावा (मोठ्या होड्या) अरबस्थान व हिंदुस्थानांतून आणीत असत. पण हल्लीं तो व्यापार जवळ जवळ बसल्यामुळें या जातीची मंडळी येथें बरीच आहेत व त्यांची सध्यां स्थिति वाईट आहे, व जवळ जवळ एतद्देशीय लोकांप्रमाणेंच ते राहतात. एतद्देशीय लोकांत बहुतेक मुसलमान (यांची संख्या साधारण ४०००) झालेले व ब्रिटिश राज्य झाल्यानंतर ख्रिश्चन झालेले आहेत. अशी स्थिति मुंबासाची आहे; परंतु किनारा सोडल्यानंतर वरती २५-३० मैलांच्या टापूनंतरचे एतद्देशीय अजून बरेचसे भुतांखेतांवर विश्वास ठेवणारे आहेत. परंतु यांतही आतां मिशनरी काम करीत आहेत. अरबांनीं आंत प्रवेश केला नव्हता तो गेल्या २५-३० वर्षांतच ब्रिटिशांनीं रेलवे घालून केला आहे. पूर्वीं झांझिबार हें या प्रांताचें मुख्य बंदर होतें. परंतु हल्लीं तो व्यापार बराचसा मुंबासा येथें आला आहे.

येथें २५-३० वर्षांपूर्वीं पुष्कळसा गुलामांचा व्यापार चालूं होता पण तो हल्लीं बंद केला आहे. सध्यां मुंबासा काय किंवा इतर वरचीं शहरें काय; अगदीं आपल्या तिकडच्या प्रमाणें जीविताची व मालमत्तेची शाश्वती आहे. वरच्या भागांत म्हणजे येथून ५०-६० मैलांवर रानटी जनावरें आहेत, पण तेथें पाणी फार कमी असल्याकारणानें वस्ती जवळ जवळ नाहीं म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत बी. बी. सी. आय. लाईनवर रतलाम व भरतपूर यांच्यामध्यें ज्या प्रकारचा प्रदेश, तशा तऱ्हेचा प्रदेश, येथें मुंबासा नैरोबी यांचे दरम्यान जवळ जवळ १५०-२०० मैल आहे व त्यानंतर चांगली लागवड करण्यासारखा प्रदेश आहे. मुंबासाच्या किनाऱ्या लगतचा १५-२० मैलांपर्यंतचा प्रदेश चांगला सुपीक आहे व कोंकणांत होणारे सर्व जिन्नस या भागांत फारशी मेहनत न करतां होऊं शकतात.

येथें आहार अगदीं आपले तिकडीलप्रमाणें करतां व ठेवतां येतो. येथें हवा मुंबई व कोंकणपटीप्रमाणेंच आहे; परंतु (वस्ती किनारा सोडून जसजसें जावेंतसें) नैरोबीकडे उंची जास्त म्हणजे ५०००फूट असल्याकारणानें माथेरान, पांचगणी-

प्रमाणें अतिशय थंड हवा आहे. पूर्वीं येथें पगार चांगले मिळत—म्हणजे कारकून वर्गाला १०० ते ५०० शिलिंग पर्यंत, म्ह० ७५ ते ३५० रुपयांपर्यंत पगार असे. पण हल्लीं अगदीं खालावलेली स्थिति आहे. व नवीन कोणालाहि नोकरी मिळणें जवळ जवळ अशक्यच आहे. काळा गोरा यांचेमध्यें साऊथ आफ्रिकेहून कमी पण हिंदुस्थानपेक्षां जास्त फरक आहे; सहजच येथें गोरे, हिंदी व काळे असे तीन सरळ पक्ष होतात व या तिहींतहि तशी वागणूक प्रत्येकाचे हिशेबाप्रमाणें होते. परंतु मध्यम वर्गांतील हिंदी माणसाला येथें फरक भासत नाहीं. उच्च वर्गाचे हिंदी माणसाला येथें जरूर त्रास होतो. आतां दुसरी गोष्ट म्हणजे कितीहि हुशार मनुष्य असला तरी त्याला कारकुनाची जागा कधींहि मिळत नाहीं, त्यामुळें हुशार मनुष्य येथें लवकरच कंटाळतो. व्यापारी येथें पुष्कळ गुजराथी, बोहोरे व खोजे आहेत त्यामुळें आपले लोकांना व्यापारांत शिरणें जरा कठीणच जाईल. परंतु जर कोणी स्वतःचे पैसे घेऊन येईल व माहिती असेल तर व्यापारांत नांव काढणें येथें तितकें कठीण नाहीं. त्याचप्रमाणें येथें जमीन सुपीक व स्वस्त व मुबलक मिळते तेव्हां मेहनती मनुष्याला थोडेसे पैसे आणल्यास त्याला शतीमध्यें तेथल्यापेक्षां पुष्कळच जास्त मिळकत होईल. पण स्वतःचा पैसा, शेतीची माहिती व आवड आणि एकलकोंडें राहण्याची संवय पाहिजे. कारण येथें शेतीच्या ठिकाणीं फारशी वसाहत नसल्याकारणानें एकटें राहावें लागतें; साधारणपणें येथें नोकरीच्या निमित्तानें येणें म्हणजे अगदीं मूर्खपणा आहे.

येथें राहणी महाग म्हणजे हिंदुस्थानच्या तिप्पट महाग आहे, म्हणजे पुण्याच्या तिप्पट व मुंबईच्या दुप्पट म्हटलें तरी चालेल. त्यामुळें जर नोकरी लवकर मिळाली नाहीं तर मनुष्य अगदीं तीन चार महिन्यांत जेरीस येतो. त्याचप्रमाणें येथें येतांना, प्रत्येक नव्या उतारूकडून सरकार ३०० शि. डिपाझिट आगाऊ बोटीवर चढतांना घेतें व सहा महिन्यांत नोकरी न मिळाल्यास त्या पैशांतून परत पाठविण्याची व्यवस्था केली जाते; तरी गरीब मनुष्यानें येथें नोकरीच्या आशेनें यऊं नये; मग अकारण पश्चात्ताप पावण्याची वळ येते.

नैरोबी व त्यापुढील केन्याचा प्रांत उंच व हवाशीर आहे. तेथें युरोपिअनकृत लागवड व त्यांची वस्ती आहे त्यांत मुख्य चहा व कॉफीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते; तसेंच मका व किसूमूच्या बाजूला उंसाचे उत्तम मळेही आहेत व तेथें साखरेचे कारखाने आहेत; तरी पण हल्लीं सर्व बाजूंनीं हलाखीच आहे."

(२४) **मेक्सिको**—मुंबईच्या हिज मॅजेस्टीच्या ट्रेड कमिशनरच्या कचेरींतून——मेक्सिकोमध्यें रहिवासी असलेले हिंदी लोक मुख्यतः शेतकरी आहेत असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून कळतें. तसेंच एकंदर हिंदी लोकांबद्दल एकत्रित केलेली माहिती नाहीं. मेक्सिकोच्या उत्तर संस्थानांतील कांहीं भागांत थोडे हिंदी रहिवासी कायम वसाहत केलेले आहेत. त्यांना मेक्सिकोमधील इतर परदेशीयांप्रमाणें सर्व हक्क आहेत. येथील शिक्षणसंस्थांतून परदेशीयांना प्रवेश मिळण्यास आडकाठी नाहीं. देशांतर करणाऱ्या मजुरांना येथें येण्यास बंदी केली आहे. तसेंच वर्णानुसार निर्बंध परदेशीयांकरितां केलेले नाहींत. परंतु त्यांच्या हालचालींवर निर्बंध असलेले नियम आहेत.

(२५) **मोरोक्को**—राबाट (Rabat) येथील ब्रि. कॉन्सुलेट जनरलमधून—मोरोक्कोमध्यें फरेंच, स्पॅनिश व आंतरराष्ट्रीय टापूंत कांहीं हिंदी लोक आहेत. फरेंच टापूंत असलेल्यांची संख्या सुमारें १०० असावी. ते लहान व्यापारी असून बहुधा हिंदी मालाचा व्यापार करितात. म्हातारपणीं ते हिंदुस्थानांत परत जातात, येथें स्थायिक होत नाहींत. तेथील परदेशी व ब्रिटिश रहिवाशांप्रमाणेंच हिंदी लोकांना तेथें हक्क आहेत.

(२६) **युगांडा**——एंटेबे येथील चीफ सेक्रेटरीच्या कचेरींतून हिंदी लोकांविषयीं मागविलेली माहिती पुरवितां येणें शक्य नाहीं असें कळविण्यांत आलें आहे.

(२७) **युनायटेड स्टेटस**:—न्यूयार्क—येथील ब्रि. कॉन्सलनें 'दि ब्रिटिश लायब्ररी ऑफ इन्फर्मेशन' मधून युनायटेड स्टेटसमधील हिंदी लोकांबद्दल माहिती पाठविण्यास लिहिलें होतें त्याप्रमाणें त्या लायब्ररींतून आलेली माहिती खालीं दिली आहे युनायटेड स्टेट्स्पैकीं कॅलिफोर्निया संस्थानांत २००० व इतरत्र ६०० असे सुमारें २६०० हिंदी लोक येथें कायम वसाहती करून राहिले आहेत. ह्यांपैकीं शीख व हिंदु सुमारें २१०० आहेत व बाकीचे मुसलमान आहेत. हे वसाहतवाले सन १९०० ते १९१०चे दरम्यान आलेले असावेत. कारण १९०० सालच्या खानेसुमारींत एकहि हिंदी असल्याचें नमूद केलेलें नाहीं, व १९१०च्या खानेसुमारींत येथें १९४८ हिंदी लोक असल्या-

बद्दल दाखला आहे. ह्या हिंदी लोकांपैकीं हिंदु व शीख लोक पंजाबांतील जालंदर व होशियारपूर जिल्ह्यांतील आहेत; व मुसलमान अटक व कॅम्पबेलपूर जिल्ह्यांतील आहेत.

ह्यांपैकीं मजुरीवर पोट भरणारे लोक ठिकठिकाणीं फळबागांतून व तांदूळ व कापूस वगैरेच्या शेतांतून कामें करितात .व्यापार करणारे मुख्यतः हिंदी लोकांच्या वसाहतींतच लहान प्रमाणांत व्यापार करतात. येथें स्टेट युनिव्हर्सिटींत व स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटींत कांहीं हिंदी विद्यार्थी आहेत.त्यांना द्रव्योत्पादक धंदे करतां येत नाहींत.पण त्यांनीं आपला विद्यार्थी दर्जा सोडल्यास त्यांना देशाबाहेर हांकलून देण्यांत येतें.

हिंदी लोकांना युनायटेड स्टेटस्च्या सुप्रीम कोर्टच्या १९२३ सालच्या भगतसिंग थिंद यांजविरुद्ध दिलेल्या निकालाप्रमाणें तेथील नागरिकत्वाचे हक्क मिळत नाहींत. तसेंच १९१३च्या परस्थांच्या कॅलिफोर्नियाच्या कायद्याप्रमाणें हिंदी रहिवाशांना जमिनी विकत घेतां येत नाहींत, अगर खंडानें व इतर कोणत्याहि रीतीनें जमीनीचा ताबा मिळत नाहीं. १९१७ सालीं परदेशीयांच्या प्रवेशाबद्दल केलेल्या कायद्याप्रमाणें नवीन हिंदी लोकांना येथें वसाहत करावयास येणें शक्य नाहीं. परंतु कांहीं हिंदी लोक ह्या कायद्याचें उल्लंघन करून मेक्सिकोच्या सरहद्दीवरून इकडे येतात. पण सांपडल्यास त्यांना हा देश सोडणें भाग पडेल. तसेंच येथें रहिवासी असलेले कांहीं हिंदी लोक म्हातारपणीं हिंदुस्थानास परत जातात, व येथील आपली मालमत्ता अमेरिकन लोकांना ती विकतात अगर आपल्या तेथें असलेल्या हिंदी बांधवांना ती देतात.

(२८) **सयाम**:—ब्रिटिश कॉन्सुलेट-जनरल, बँगकॉक यांजकडून आलेली माहिती —सयामांत व्यापारांत गुंतलेल्या हिंदी लोकांची नक्की संख्या सांगतां येणार नाहीं. परंतु ती कांहीं हजार असावी. हे हिंदी लोक कापड व गुरेंढोरें यांचा व्यापार किंवा आयात निर्यात करण्यांत गुंतलेले असतात अगर फेरीवाल्याचा धंदा करितात. येथील हिंदी लोकांनीं येथें स्वतंत्र कंपन्या व फर्म्स उघडल्या आहेत; आणि कांहीं हिंदी लोक मॅनेजर, कारकून किंवा विक्रेते (Salesman) या नात्यानें कामें करीत आहेत. कांहीं व्यापारी लोक हिंदुस्थानांत तयार झालेला माल इकडे आणून विकतात; आणि कांहीं व्यापाऱ्यांनीं व्यापारी जगांत मोठें मानाचें स्थानहि मिळविलें आहे. बऱ्याच जणांनीं सयाममध्यें आपलें बरेंचसें किंवा सर्व आयुष्य घालविलें आहे.परंतु त्यावरून त्यांनीं येथें कायम वसाहती स्थापन केल्या आहेत असें म्हणणें म्हणजे विपर्यास केल्यासारखें होईल. सयामला येणारे हिंदी लोक हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतून येतात. येथील हिंदी लोकांची वसाहत केलेले हिंदी लोक व वसाहत न केलेले हिंदी लोक अशी विभागणी करणें फार कठीण आहे.

हिंदुस्थान व सयाम या दोन देशांत लोकांची सारखी 'ये जा' सुरू आहे. सयामचे जे मूळचे रहिवासी आहेत त्यांना व हिंदी लोकांना मिळणारे हक्क जवळजवळ सारखेच आहेत. जवळ जवळ म्हणण्याचें कारण कीं, परकीयांना (उदाहरणार्थ) नवीन राज्यघटनेप्रमाणें मतदानाचा हक्क नाहीं. येथील हिंदी लोक हिंदु धर्म, इस्लामधर्म आणि ख्रिस्ती धर्म या तीनहि धर्मांतील आहेत. परंतु ख्रिस्ती लोकांची संख्या अर्थातच हिंदु व मुसलमान यांच्या संख्येहून पुष्कळच थोडी आहे. सयाममध्यें शिक्षणासाठीं कोणीहि लोक येत नाहींत. सयाममध्यें मजुरी करून पोट भरण्यासाठीं बरेच हिंदी लोक जमतात. परंतु त्यांची संख्या नेमकी सांगतां येत नाहीं. अशा मजुरांची संख्या विशेष लक्षांत यण्याजोगी कांहीं वाढत नाहीं. हे लोक बहुधा पहारेकरी म्हणून नोकरीला राहतात. सयाममध्यें राहणाऱ्या हिंदी लोकसंख्येंत स्त्रियांच्या संख्येचें पुरुषांच्या संख्येशीं काय प्रमाण आहे हें नक्की माहीत नाहीं. परंतु तें प्रमाण अगदींच अल्प आहे. येथील बहुतेक मजूर स्वतःचा चरितार्थ चांगल्या प्रकारें चालवितात व थोडा फार पैसाहि राखून ठेवण्याजोगी त्यांची स्थिति आहे. परकीय लोक या नात्यानें हिंदी लोकांच्या हालचालींवर कांहीं नियंत्रण नाहीं किंवा 'काळा, गोरा' हा वादही येथें नाहीं, परंतु इतर परकीयांप्रमाणेंच त्यांना परदेशगमनाचे कायदे पाळावे लागतात. मजुरांचें मासिक उत्पन्न सुमारें १५ टिकल्स ते ३० टिकल्स (Ticals) असतें. मजुरी करणारे हिंदी बहुधा हिंदु आणि मुसलमान आहेत.

टीप—हिंदु लोकांत शीखांचा समावेश होतो.

(२९) **सायरा** लिओग ब्रि.पश्चिम आफ्रिका, ३० हॉलंड, व ३१ हंगेरी या देशांतील वकिलातींतून माहिती मिळाली नाहीं.

आर्यसंस्कृति

धर्मपंथ व धार्मिक मतें

वेदः——हिंदूंचे अगदीं प्राचीन धर्मग्रंथ म्हणजे वेद होत. वेदांमध्यें ऋग्वेद हा सर्वांत जुना आहे. ऋग्वेद हा एक व एका कालखंडांत रचलेला ग्रंथ नाहीं. ऋग्वेद हा एक स्तोत्रांचा समूह आहे. अनेक कर्त्यांनीं अगदीं भिन्न काळी केलेलीं सूक्तें यांत एकत्र केलेलीं आहेत. म्हणूनच यास संहिता (एकत्र केलेलें) असें म्हणतात. यांतील सर्वांत अर्वाचीन सूक्तें इ. स. पू. ४५०० च्या अलीकडचीं नाहींत. सनातन मत असें आहे कीं, वेदग्रंथ हे परमेश्वराचीं निश्वसितें असून तीं जगताच्या आरंभींच झालीं आहेत, वेद मानवी कृति नाहींत.

चारी वेदांच्या संहितांच्या निरनिराळ्या शाखा आहेत. ऋग्वेदाची शाकल नांवाची एकच शाखा उपलब्ध आहे. हिचीं दहा मंडलें असून त्यांत एकंदर १०२८ सूक्तें आहेत. हिंदूंच्या प्रत्येक कृतीला श्रुतीचा आधार देण्याची पद्धत असल्यामुळें श्रुतिग्रंथांत म्हणजे वेदांत विधिनिषेध सांगितले आहेत असा सामान्य समज असतो. पण तो चूक आहे. धर्म,नीति या क्षेत्रांत कसें आचरण करावें याबद्दल वेदांत प्रत्यक्ष असें कांहींच सांगितलेलें नाहीं. वेदामध्यें (१) पाऊस, वीज, ऊन्ह इ. नैसर्गिक घटनांचें काव्यमय वर्णन(२) या घटनांच्या अधिष्ठात्री देवता ज्या इंद्र, वरुण, अग्नि, मरुत् इ. त्या देवतांचीं स्तोत्रें, यज्ञासाठीं उपयोगी पडणारीं सूक्तें, लग्न, अंत्यविधियासाठीं रचलेलीं सूक्तें,विश्वाची उत्पत्ति, आदि, अंत यांचा विचार करणारीं सूक्तें, पुरुरवा उर्वशी यासारखीं मौजेचीं आख्यानें,कांहीं विशिष्ट हेतु साधण्यासाठीं रचलेलीं मांत्रिकीं सूक्तें, यज्ञ करविणाऱ्या राजांच्या औदार्याचें वर्णन करणारीं सूक्तें, अशीं सूत्रें येतात.

ऋग्वेदानंतरचें स्थान यजुर्वेदाचें. निरनिराळ्या यज्ञासाठीं आवश्यक असे मंत्र, प्रार्थना व विधि यांत दिलेले आहेत.पण तैत्तिरीय संहितेंत 'ब्राह्मणा' सारखा कांहीं भागही आहे. म्हणजे हे मंत्र व प्रार्थना कोणत्या वेळीं व कशा वापरावयाच्या यांचें वर्णन व उपयोग–विचार यांत केलेला आहे. वाजसनेयींतील केवळ मंत्रविवरण, शतपथ ब्राह्मणांत यजुर्वेदांतील प्रार्थना, व मंत्र पद्यांत तसेच गद्यांतही आहेत. व या गद्य मंत्रानाच यजू अशी संज्ञा आहे. यजुर्वेदांतील पुष्कळशा ऋचा ऋग्वेदांतील ऋचांमध्यें फरक करूनच घेतलेल्या आहेत. सामवेद उद्गात्याचें गानपुस्तक तसाच यजुर्वेद म्हणजे अध्वर्यूचें कर्मदर्शक पुस्तक आहे.यजुर्वेदाच्या दोन मुख्य संहिता आहेत. कृष्णयजुर्वेदसंहिता व शुक्लयजुर्वेदसंहिता. पहिलीस तैत्तिरीय व दुसरीस वाजसनेयी अशीही नांवें आहेत. यजुर्वेदाच्या १०१ शाखा आहेत असें पतंजलीनें म्हटलें आहे. यज्ञकर्मांतल्या मंत्रांतील थोडयाफार फरकानें या निराळ्या शाखा उत्पन्न झाल्या.आतांपर्यंत यजुर्वेदाच्या पांच संहिता उपलब्ध आहेत. काठक, कपिष्टल–कठ, मैत्रायणी व तैत्तिरीय या कृष्णयजुर्वेदाच्या व वाजसनेयी ही शुक्लजुर्वेदाची.यांपैकीं तैत्तिरीय व वाजसनेयी या मुख्य. कारण बाकीच्या यांचेच पाठभेद आहेत. तैत्तिरीय संहितेंत ७ कांडें व ४४ प्रपाठकें आहेत. वाजसनेयी संहितेचे ४० अध्याय आहेत.तैत्तिरीय संहितेंत चातुर्मास्य होत्र, अग्निहोम, राजसूय, पुरुषमेध, सोमयाग या यज्ञांचें व संवत्सर सत्र, नक्षत्रसत्र या सत्रांचें म्हणजे अनेक दिवस चालणाऱ्या यज्ञांचें वर्णन आहे.वाजसनेयीमध्यें अश्वमेध वाजपेय, अग्निहवन इत्यादींचें वर्णन आहे.

सामवेदांत गायनासाठीं एकत्र केलेल्या, बहुतेक ऋग्वेदांतून घेतलेल्या, अशा १५४९ ऋचा आहेत. वरील वेदाप्रमाणेंच पाठभेदानें याच्याही हजार शाखा झाल्या होत्या असें म्हणतात. पण सध्यां राणायनीय व कौथुम या दोनच उपलब्ध आहेत. सामवेदांतल्या ऋचा विविध रागांत गायिल्या जात. व त्या रागामध्येंच अद्भूत जादू आहे असें समजत. चौथा अथर्व वेद हा अर्वाचीन असून जुन्या काळीं वेदवाङमयांत याचा अंतर्भावच नव्हता. त्रयी विद्या असेंच म्हणत. यांतील मंत्राचा यज्ञक्रियेशीं कांहीं संबंध नाहीं. 'जारण मारणा'साठींच या मंत्रांचा मुख्यतः विनियोग असे. अथर्वांगिरस् हें अथर्व वेदाचें जुनें नांव. अथर्वन्चा अर्थ अग्नीचा

उपासक. पण पुढें मांत्रिक असा त्या शब्दास अर्थ आला. या वेदांत दोन प्रकारचे मंत्र आहेत. अथर्वन् मंत्र व आंगिरस मंत्र. अथर्वन् मंत्र रोगनिवारण करणारे, समृद्धि, शांति देणारे असे आहेत. पण आंगिरस हे दुसऱ्याचा नाश करण्यासाठीं, कुणास वश करण्यासाठीं अशा कामासाठीं वापरले जातात. त्यामुळें एकाकाळीं राजाच्या पदरीं अथर्ववेदाचे पुरोहित आवश्यक होऊन त्यावरच त्यांची सर्व भिस्त असे. यज्ञामध्यें ब्रह्मा हा अथर्ववेदी असतो.

अथर्ववेदाचीं वीस कांडें आहेत.त्यांत ७३१ सूक्तें व सहा हजार ऋचा आहेत. त्यांतील विसावेकांड मागूनचें आहे. तें अक्षरशः ऋग्वेदांतून घेतलें आहे. बाकीपैकीं एक सप्तमांश भाग ऋग्वेदांतलाच आहे. पहिल्या तेरा कांडांत जारणमारणाचे मंत्र आहेत. १४ वें कांड विवाहमंत्राचें आहे.पंधरावें व सोळावें पुष्कळसें गद्यरूप आहे.

श्रौत वाङ्मयाचा दुसरा मोठा भाग म्हणजे ब्राह्मणें.ब्राह्मण शब्दाचा अर्थ यज्ञकर्मांतील एकाद्या मुद्यावरील विद्वान् याज्ञिकांचें विवेचन असा आहे. ब्राह्मणग्रंथांत मुख्यत्वेंकरून यज्ञक्रियांचें वर्णन आहे. अमुक मंत्र अमुक क्रियेच्या वेळीं म्हणावे असें यांत सांगून केव्हां केव्हां त्याबद्दल टीकात्मक विवरणही केलेलें असतें. निरनिराळे संस्कार, विधी, मंत्र यांचे व त्यांच्या सामर्थ्यांचेंही वर्णन यांत मधून मधून येतें. कांहीं मुद्यांवर निरनिराळीं मतेंही नमूद केलेलीं असतात. यज्ञकर्मांतील विश्रांतीच्या वेळीं म्हणावयाच्या गाथाही ब्राह्मणांत येतात. पण हे सर्व विषय यज्ञक्रियेच्या संदर्भातच येतात.

प्रत्येक वेदाला त्याचीं स्वतंत्र ब्राह्मणें आहेत. ऐतरेय हें ऋग्वेदाचें, शतपथ हें शुक्ल यजुर्वेदाचें, तैत्तिरीय हें कृष्ण यजुर्वेदाचें, गोपथ हें अथर्ववेदाचें, ताण्ड्य महाब्राह्मण हें सामवेदाचें. याशिवाय प्रत्येक वेदास आणखीही ब्राह्मणें आहेत. ब्राह्मणांच्या उत्तर भागांतून प्रसिद्ध अशा उपनिषदांचा समावेश झालेला आढळतो. शतपथ ब्राह्मणाच्या शेवटच्या कांडाचे पहिले सहा अध्याय म्हणजेच बृहदारण्यक उपनिषद् होय.

सर्व ब्राह्मणांतून यज्ञविधीचेंच वर्णन असतें हें खरें. पण ऋग्वेदाच्या ब्राह्मणांत होत्यानें करावयाच्या क्रियांचें, यजुर्वेदाच्या ब्राह्मणांत अध्वर्यूनें करावयाच्या क्रियांचें वर्णन आहे. त्यांत थोडा फरक आहे. ब्राह्मण ग्रंथांतून किंवा त्यांचे परिशिष्ट म्हणून त्यास जोडलेला असा आरण्यक नांवाचा भाग आहे. यांत यज्ञकर्माचें विवेचन मुळींच नसून, यज्ञांचा तात्विक अर्थ काय, त्यांतील गूढविद्या यांचें विवेचन येतें. बहुतेक सर्व ब्राह्मणांच्या उत्तर भागास आरण्यकें म्हणतात.या आरण्यकांत ज्याठिकाणीं ब्रह्माचें–आत्म्याचें विवेचन येईल त्याला उपनिषद् अशी संज्ञा देतात. पण उपनिषद् व आरण्यक यांत फारसा फरक नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं,शतपथ ब्राह्मणाच्या एका कांडांतील भागालाच बृहदारण्यक उपनिषद् असें म्हणतात. प्रत्येक वेदाचीं ब्राह्मणें जशीं निराळीं तशींच त्यांचीं उपनिषदें व आरण्यकेंही निराळीं. ऋग्वेदाचीं ऐतरेय व कौषितकी उपनिषदें, कृष्णयजुर्वेदाचीं तैत्तिरीय व श्वेताश्वेतरोपनिषदें, शुक्लचें बृहदारण्यक इ.

तत्त्वज्ञान हा उपनिषदांचा मुख्य विषय आहे. जीव, जगत्, परमेश्वर यांचें अस्तित्व, माया, इत्यादींचा यांत विचार केलेला आहे. यांत ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य,तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य व बृहदारण्यक हीं दहा मुख्य समजलीं जातात. असें शंकराचार्य म्हणतात. सर्व जगामध्यें एकच ब्रह्म नांवाचें महातत्त्व भरून राहिलें आहे. तें अनादि, अमर व ज्ञानमय आहे. जीव हें त्याचेंच मर्यादित रूप आहे. मायेमुळें या मर्यादा भासतात. त्या मूळ तत्त्वांत मिळून जाणें हें जीवाचें अंतिम आहे–असें वेदांत मत. या सर्वांत वेदांत मतच प्रतिपादिलेलें आहे. आर्यांचे व्याप व त्याबरोबर धार्मिक आचारविचार फार वाढले. या सर्व आचारविचारांच्या नियमांचा थोडक्यांत संग्रह करण्यासाठीं म्हणन सूत्र वाङ्मय निर्माण झालें.सूत्रें मुख्यतः तीन प्रकारचीं. श्रौतसूत्रें,धर्मसूत्रें व गृहच सूत्रें.या तीहींना मिळून कल्पसूत्रें असें म्हणतात. श्रौतसूत्रांमध्यें यज्ञक्रियेचें वर्णन थोडक्यांत पण ब्राह्मणापेक्षां फार व्यवस्थितपणें केलेलें आहे. मोठमोठ्या व सार्वजनिक यज्ञांचें वर्णन श्रौतसूत्रांत येतें. प्रत्येक वेदाचीं श्रौतसूत्रें निराळीं आहेत. ऋग्वेद– आश्वलायन व सांख्यायन. कृष्णयजुर्वेद–बौधायन भारद्वाज, आपस्तंभ व हिरण्यकेशी; शुक्लयजुर्वेद–कात्यायन; सामवेद–मासक लाट्यायन. द्रात्यायन धर्मसूत्रांत व्यवहारधर्माचें विवेचन आहे. नागरिकांचीं कर्तव्यें, नीति इ. विषय यांत येतात. यांच्याच आधारानें पुढें स्मृति रचल्या गेल्या. (धर्मसूत्रें) ऋग्वेदाचें वसिष्ठ धर्मसूत्र सामवेदाचे गौतमधर्मसूत्र व कृष्णयजुर्वेदाचें बौधायन व आपस्तंब धर्मसूत्र असें आहे. गृहचसूत्रांत गृहस्थानें आपल्या घरीं करावयाच्या यज्ञांची माहिती आहे. पाकयज्ञ, पंचमहायज्ञ व उपनयनविवाहादि सोळा संस्कारांची यांत माहिती आहे. श्राद्ध, अंत्यविधि

यांचीही यांत सूत्रें आहेत. याशिवाय घर बांधणें, मधुपर्क, गुरांची निगा यासारख्या बारीक सारीक गोष्टींचीही सूत्रें यांत येतात. ऋग्वेदाचें आश्वलायन, सांख्यायन गृह्यसूत्र, सामवेद–गोभिलगृह्यसूत्र, शुक्लयजुर्वेदाचें पारस्कर गृह्यसूत्र यावरून प्रत्येक वेदाला श्रौत, गृह्य व धर्मसूत्रें ही आहेत. पण त्यांपैकीं बरींच आज उपलब्ध नाहींत. याशिवाय शुल्वसूत्रें म्हणून एक सूत्रांचा प्रकार आहे. त्यांत यज्ञांचीं स्थंडिलें, वेदीयांचीं मोजमापें, विटाचे आकार यासंबंधीं नियम आहेत. जुन्या भारतीयांच्या भूमितीच्या ज्ञानासंबंधीं यावरून माहिती मिळते. व्याकरण, न्याय, मीमांसा वेदान्त इ. विषयांवरही सूत्रें झालीं आहेत. पण मुख्य म्हणजे कल्पसूत्रेंच होत. वेद, ब्राह्मणें, उपनिषदें, व सूत्रें हें वैदिक वाङ्मय होय. यापुढील वाङ्मयाला स्मृतिवाङ्मय असें म्हणतात. यांत मनुयाज्ञवल्क्यांचा व्यवहारधर्म येतोच; पण, रामायण महाभारत हे ग्रंथही येतात. स्मृति वाङ्मयांतील आद्यग्रंथ म्हणजे महाभारत. रामायण या ग्रंथाचें संस्करण इ. पू. पहिल्या शतकांत झालें. मूळ ग्रंथाचा नक्की काल सांगतां येत नाहीं. वाल्मिकी हा त्याचा कर्ता असून त्याची आजची श्लोकसंख्या २४००० आहे. रामायणांत रामचरित्राचें वर्णन आहे. नीतिमत्ता व विशेषत: कुटुंबसंस्थेचें महत्त्व यांत पराकाष्ठेस पोंचलेलें दिसतें. आजचा महाभारत ग्रंथ सगळाच्या सगळा व्यासांच्या हातून उतरलेला नाहीं. हल्लींच्या महाभारताची श्लोकसंख्या जवळ जवळ एक लक्ष आहे. पण व्यासांचें लिखाण अदमासें दहा हजार श्लोकांचें असून त्यास जय असें नांव होतें. कौरव पांडवांच्या युद्धाचें वर्णन एवढाच त्याचा विषय होता. यानंतर व्यासशिष्य वैशंपायन यानें कौरवपांडवांच्या समग्र इतिहासाची यांत भर घालून हा ग्रंथ २४ हजार श्लोकांपर्यंत वाढविला व त्यास भारत असें नांव दिलें. महाभारताचीं हीं पहिलीं दोन संस्करणें इ. पू. २५०० च्या सुमारास झालीं असावीं. याबद्दल मतभेद फार आहे. तिसरें संस्करण सौतीच्या हातचें असून तें इ.स.पूर्वी २५०च्या पुष्कळ पूर्वी झालें असावें. अनेक उपाख्यानें, धर्म, राजकारण यावरील व्याख्यानें यांची भर सौतीनें घातली व त्यानें दिलेल्या स्वरूपासच महाभारत असें नांव आहे. यानंतर या ग्रंथांत भर पडलेली नाहीं. महाभारतांत नाहीं असा एकही विषय नाहीं अशी त्याच्या कर्त्याची प्रतिज्ञा आहे. व त्याकाळीं तरी ती खरी होती. महाभारत हा त्या काळचा ज्ञानकोशच आहे. हिंदूंच्या जीवनावर महाभारताइतकी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाची छाप नाहीं. गीतेचा यांतच समावेश होत असून त्या ग्रंथास आज वेदापेक्षांही जास्त मान आहे. अत्यंत प्राचीन अशा मानवी जीविताचें इतकें विपुल वर्णन जगांतील इतर कोणत्याही ग्रंथांत नाहीं.

पुराणांची गणना अर्थातच धार्मिक वाङ्मयांत आहे. मानण्यापुरता आजच्या हिंदुधर्माचा आधार श्रुति हा असला तरी त्याचा खरा उभ्दव पुराणांतूनच झाला आहे. पुराणें अगदीं प्राचीन असून त्यांचा उगम वेदब्राह्मणांतच आहे. तथापि पुराणांचें आजचें स्वरूप अगदीं अर्वाचीन आहे यांत शंका नाहीं. पुराणांत जगदुत्पत्तीबद्दल जुन्या दंतकथा, संत, देव, योद्धे यांचे पराक्रम, प्रसिद्ध राजकुलांच्या वंशावली व बहुविध धर्मनीति यावर प्रवचनें हे विषय येतात. पुराणांत अनेक अवांतर गोष्टी घुसडल्या गेल्यामुळें तीं प्रथम अगदीं अविश्वसनीय ठरलीं. पण अलीकडच्या संशोधनावरून त्यांत सत्य, ऐतिहासिक माहितीही पुष्कळ सांपडते असें सिद्ध झालें आहे. पुराणांचें हल्लीचे स्वरूप इ. स. ३०० नंतरच त्यांस प्राप्त झालें असावें असें वैद्यांचें मत आहे. पुराणांत भोळपणा व वेडसरपणा फारच भरला असून धर्मशास्त्रनिर्णयास आधार म्हणून तीं घेतलीं गेल्यामुळें आमचें फार नुकसान झालें आहे असेंही ते म्हणतात. एकंदर पुराणें अठरा असून तीं सर्व महाभारत कर्त्या व्यासांनींच रचलीं असा जुना समज आहे.

बुद्धधर्म.

हिंदूंमध्यें यज्ञयागाचें, सोवळचाचें, वर्णांच्या उच्चनीचतेचें स्तोम फार झालें, तेव्हां त्यांस प्रतिक्रिया म्हणून बुद्धधर्म निर्माण झाला. याचा संस्थापक गौतम हा इ. पू. ५५० मध्यें जन्मला. वेद यज्ञयाग व चातुर्वर्ण्य बुद्ध मुळींच मानीत नाहीं. त्याचप्रमाणें आत्मा व मोक्ष हेही त्यास अमान्य आहेत. तो पुनर्जन्म मानतो. वासना सर्व दु:खांचें मूळ आहे, वासनेमुळेंच पुनर्जन्म येतो म्हणून वासना नाहींशी करून निर्वाणपद मिळविणें हें मानवाचें अंतिम होय असें बुद्धानें प्रतिपादिलें. सर्वं दुखं, सर्वं क्षणिकं, सर्वं शून्यम् असा त्याचा सिद्धान्त आहे. बुद्धाचा कौटुंबिक व व्यावहारिक नीत्युपदेश हा हिंदूप्र-माणेंच आहे; त्यांत फरक नाहीं. बुद्धाच्या शिष्यांचे सौत्रांतिक, वैभाविक, योगाचार, व माध्यमिक असे चार पंथ झाले. नंतर हीनयान व महायान असे

आणखी दोन भेद झाले. आज चीन, जपान, ब्रह्मदेश या देशांत बौद्धधर्म आहे.

जैनधर्म.

उदय बुद्ध-धर्माबरोबरच झाला.त्याचा मुख्य संस्थापक महावीर हा इ. स. पूर्वी सहाव्या शतकांत होऊन गेला.पणबुद्ध जसे बुद्धापूर्वी तेवीस बुद्ध होऊन गेले असें मानतात त्याचप्रमाणें जैन हेही महावीरापूर्वी तेवीस तीर्थंकर होऊन गेले असें मानून ऋषभ हा वेदांतील ऋषि पहिला तीर्थंकर मानतात. आपला धर्म वैदिक धर्माइतकाच किंवा त्याहूनही जुना आहे असें ते समजतात. अहिंसा व संन्यासधर्म या बाबतींत यांचें बौद्धांशीं साम्य आहे. वास्तविक अहिंसेचा मूळ उगम छांदोग्य उपनिषदांतच आहे. पण बौद्धांनीं ती विशेष जोरानें प्रतिपादिली व जैनांनीं तिची केवळ पराकाष्ठा केली. इ. पू. ४ थ्या शतकांत जैनामध्यें श्वेतांबर—म्हणजे पांढरें वस्त्र नेसणारे व दिगंबर—मुळींच वस्त्र **न** घेणारे, असे दोन पंथ पडले. अहिंसा व संन्यास धर्म हे दोन मुद्दे सोडून दिले तर बौद्ध व जैन यांत पुष्कळ विरोध आहे. जैन हे जीव म्हणजे आत्मा मानतात. प्रत्येक चराचर वस्तूंत आत्मा आहे. या अर्हतांच्या सर्व सिद्धान्तांत मूलभूत सिद्धांत म्हणजे 'स्याद्वाद' होय. सापेक्षतेनें एकाच पदार्थाच्या ठायीं अस्तित्व व नास्तित्व, नित्यत्व व अनित्यत्व असे धर्म संभवतात असें त्यांचें म्हणणें आहे. आत्मा, कर्मे व सृष्टि हीं नित्य आहेत असें ते मानतात. परमेश्वराचें अस्तित्व मानीत नाहींत.

हिंदूंचा पारमार्थिक धर्म जसा वेद,पुराणें यांवर आधारलेला आहे तसात्यांचा ऐहिक धर्म **स्मृतिप्रणीत** आहे. आद्य स्मृति म्हणजे मनुस्मृति होय. ही इ.स.पूर्वी १ल्या शतकांत मानवधर्म सूत्रांवरून तयार झाली.स्मृति म्हणजे कायद्याचे ग्रंथ हें खरें. पण त्यांत सृष्टीची उत्पत्ति, ब्राम्हणाचें श्रेष्ठत्व वगैरे विषयही येतात. शिवाय केवळ उपदेश म्हणूनही कित्येक गोष्टी सांगितलेल्या असतात. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णांचीं कर्तव्यें संस्कार, आचार, विवाहास योग्य वधूवर, त्यांचें वय, याही गोष्टींचें विवेचन स्मृतींत येतें. या खेरीज स्मृतींत येणारा मोठा व महत्त्वाचा विषय म्हणजे चार आश्रम. आश्रमसंस्था हीं उपनिषत्कालीं निर्माण होत होती. व पुढें धर्मसूत्रकालांत व स्मृतिकालांत ती चांगलीं परिणत झाली. मनुस्मृतीपेक्षां याज्ञवल्क्य स्मृतीची मांडणी व्यवस्थित आहे. ही इ. स. च्या ४ थ्या ५ व्या शतकांत झाली. महाराष्ट्रांतील याज्ञवल्क्य स्मृति व त्यावरील विज्ञानेश्वरानें ११ व्या शतकांत लिहिलेली मिताक्षरा टीका यांचा अनुसार सध्यां होतो. हल्लींचा हिंदू लॉ या टीकेचा बराच आधार घेऊन चालतो. कायद्यांतील कलमाप्रमाणेंच त्यावरील टीका व न्यायाधीशांचे निकाल बंधनकारक असतात. तसेंच स्मृतींच्या बाबतींतही आहे. मूळ स्मृति व त्यावरील टीका हीं सारखीच बंधनकारक आहेत.

दर्शनें:—पांडित्याच्या क्षेत्रांत दर्शनांना अजूनही जरी फार मान असला तरी प्रत्यक्ष जीवितावर छाप पाडणारें असें त्यांपैकीं एकच दर्शन आहे. व तें म्हणजे उत्तर मीमांसा ऊर्फ वेदांत. मुख्य दर्शनें एकंदर सहा आहेत. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व व उत्तरमीमांसा. यांचे काळ अजून नक्की ठरवितां आलेले नाहींत. तथापि हीं सर्व इ. स. पू. २०० ते इ. स. २०० एवढ्या अवधींत झालीं. दर्शनें झालीं याचा अर्थ त्यांतील विचार प्रथमच या काळीं उद्भवले असा नाहीं तर ग्रंथरूपानें त्यांची मांडणी अधिकारी व्यक्तीनें या काळीं केली. दर्शन म्हणजे परमार्थाचें विवेचन करणारा ग्रंथ, किंवा परमार्थ—ज्ञान. या अर्थानें वरील सहाखेरीज आणखीही अनेक दर्शनें आहेत. चार्वाक, बौद्ध,अर्हत, शांकर, अशीं हीं दर्शनें आहेत. यांच्या कर्त्यांनीं परमार्थ—प्राप्तीसंबंधीं स्वतंत्र मतें मांडलीं असल्यामुळें त्यांच्या ग्रंथास दर्शन हें नांव मिळालें. हा संसार दुःखमय असून त्यांतून सुटण्याचा मार्ग सांगणें हाच सर्व दर्शनांचा मुख्य विषय आहे. सुटण्याचे किंवा मोक्षाचे मार्ग अत्यंत भिन्न आहेत हें खरें. पण बंधन कशाचें आहे याबद्दल सर्वांचें एकमत आहे.

(१) न्याय दर्शन हें सर्वांत अर्वाचीन दर्शन होय. न्याय व वैशेषिक यांत इतरांपेक्षां साम्य जास्त आहे. या दोहींमध्यें अनुमान कसें काढावें या एकाच विषयाचा मुख्यतः उहापोह केलेला आहे. असें आहे तर याचा परमार्थ ज्ञानाशीं संबंध काय असा प्रश्न उद्भवतो. त्याचें उत्तर असें. सद्वस्तूचें जें ज्ञान व्हावयाचें तें यथार्थ असलें पाहिजे. तें यथार्थ असावयास ज्ञानप्राप्तीचीं साधनें निर्दोष असलीं पाहिजेत. या निर्दोष साधनांच्या विचारांतच अनुमानाचा विचार करावा लागतो. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान व शब्द या चार प्रमाणांचाही त्यासाठींच विचार करावा लागतो. वास्तविक ज्ञानप्राप्तीच्या या साधनांचा प्रत्येक दर्शनांत थोडाफार विचार केलेलाच आहे.

न्याय व वैशेषिक या दर्शनांत त्यांचा सांगोपांग विचार केलेला आहे. व शवटीं त्या विचारसरणीनें ज्ञेय विषयांचा विचार केला असतां मोक्ष मिळतो असें सांगितलें आहे. तर्काच्या बाबतींत उहापोह केल्यानंतर वैशेषिकांनीं तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील आपलीं स्वतंत्र मतेंही सांगितलीं आहेतच. न्याय दर्शनाचा कर्ता गौतम हा होय. यानें तर्काला मूलभूत असे सोळा पदार्थ सांगितले आहेत. १ प्रतिज्ञा, २ हेतु, ३ दृष्टांत, ४ उपनय व ५ निगमन अशीं अनुमानाचीं पांच अंगें यानें सांगितलीं आहेत. या अनुमान पद्धतींत व्याप्तीला फार महत्त्व आहे. अनुमानाचा तोच मुख्य आधार आहे. या व्याप्तीच्या कल्पनेंतूनच पुढें कार्यकारण भावाचा उदय झाला. जिथें धूम तिथें वन्हि असतोच असें म्हणणें म्हणजे धूमाच्या ठायीं वन्हीची व्याप्ति आहे असें म्हणण्यासारखें आहे. इतर दर्शनें कोणच्याही कार्याचीं समवायी किंवा उपादान कारण व निमित्त कारण अशीं दोन कारणें मानतात. न्याय दर्शनांत आणखी तिसरें असमवायि कारण मानलें आहे. तंतु हें पटाचें समवायी व विणणारा, माग वगैरे निमित्त कारण. याशिवाय तंतूची जाडी, रंग हीं असमवायी कारणें आहेत असें न्यायदर्शन मानतें.

(२) वैशेषिक दर्शनाचा कर्ता कणाद होय. जगांतील सर्व पदार्थांचे यानें सहा वर्ग केले. त्यांत 'विशेष' हा एक स्वतंत्र पदार्थ मानिला आहे. म्हणून त्याच्या दर्शनास वैशेषिक असें म्हणतात. द्रव्य, गुण, कर्म, सामान्य व समवाय हे बाकीचे पदार्थ होत. मागूनच्या वैशेषिक पंडितांनीं अभाव हा सातवा पदार्थ मानला आहे. याशिवाय सुप्रसिद्ध परमाणुवाद कणादानेंच उद्भविला आहे. द्रव्याचे भाग केल्यास ते परमाणू पर्यंत होतील. परमाणू हा सूक्ष्मतम भाग होय. परमाणु हे इंद्रियगोचर, स्वतंत्र व नित्य असून त्यांना जाति नाहीं. प्रारंभीं न्याय व वैशेषिक या दोघांनाही ईश्वरास्तित्व मान्य नव्हतें. पण पुढच्या लोकांनीं तें मान्य केलें. तरीपण प्रकृतीला कोणी जनक आहे हें त्यास मान्य नाहीं.

(३) सांख्य दर्शनाचा आद्य प्रणेता कपिल मुनि होय. हा उपनिषत्कालाच्याही पूर्वी होऊन गेला. प्रकृति व पुरुष हीं दोन अनादि तत्त्वें सांख्य मानतात; परमेश्वर मानीत नाहींत. प्रकृति जड आहे. पुरुष चेतन आहे. त्याच्या संयोगानें ती विश्वाची उभारणी करूं शकते. प्रकृति व पुरुष याशिवाय आणखी तेवीस गौण तत्त्वें सांख्य मानतात. प्रत्येक बाबतींत ते निश्चित संख्या सांगतात म्हणून त्यांस सांख्य नांव मिळालें. सांख्यांचा महत्त्वाचा सिद्धांत म्हणजे सत्कार्यवादाचा होय. कोणचीही सत् वस्तू असत् वस्तूपासून उत्पन्न होणें शक्य नाहीं असें त्यांनीं सांगितलें. सांख्य निरीश्वर असले तरी त्यास वेद प्रमाण आहेत. म्हणून त्यास सनातन धर्मांत स्थान मिळालें.

(४) वेदांत म्हणजे वेदाचा शेवटचा भाग म्हणजेच उपनिषद. वेदांतमताचा मुख्य आधार उपनिषदेंच होत. पण त्याची सुव्यस्थित व सूत्रबद्ध रचना करणारा म्हणजे बादरायण होय. हा इ. स. पू. १५० च्या सुमारास होऊन गेला (वैद्य). आज प्रस्थानत्रयींत बादरायणाच्या वेदांतसूत्राचा समावेश होतो. शंकराचार्यांनीं याच्यावरच भाष्य लिहून त्याचा अद्वैतपर अर्थ लावला आहे. याच सूत्रांच्या आधारानें द्वैत विशिष्ट द्वैत हींहीं मतें इतर आचार्यांनीं प्रस्थापिलीं आहेत. पण आज शांकरमत मान्य आहे. ब्रह्म हें जगताचें उपादान व निमित्तकारण असून तें निर्गुण व चिद्रूप आहे. आत्मा हा शाश्वत असून तो ब्रह्माचाच अंश आहे. मायेमुळें तो निराळा भासतो. ब्रह्माचें ज्ञान होणें म्हणजेच मोक्ष होय असें वेदान्त मत आहे.

५ सांख्याप्रमाणेंच योग—विचारही फार जुने आहेत. त्यांचा पहिला ग्रंथकार व प्रणेता पतंजलि होय. हा इ. स. पू. १५० च्या सुमारास झाला (वैद्य). योग म्हणजे चित्तवृत्तीचा निरोध. यामुळेंच समाधि शक्य होते. यासाठीं प्रथम शरीरशुद्धि झाली पाहिजे. या शरीरशुद्धीकरतां हठयोगांत अनेक आसनें सांगितलीं आहेत. शरीर ताब्यांत आणण्यासाठींच मुख्यतः हठयोगाचा जन्म आहे. सहज समाधि अवस्था म्हणजे राजयोग. राजयोग व हठयोग हे योगाचेच दोन भेद होत. सांख्यांचीं २५ तत्त्वें योगास मान्य आहेत. पण शिवाय परमेश्वर हें सव्विसावें तत्त्वहि ते मानतात यामुळें त्यास सेश्वर सांख्य असेंही म्हणतात.

(६) पूर्व मीमांसा. मीमांसा शब्दाचा मूळ अर्थ जिज्ञासा असा आहे. पण चर्चा, उहापोह याहीं अर्थीं तो वापरतात. वाच्यार्थ हा असला तरी वेदवचनांचा सत्य अर्थ निश्चित करणें यासाठींच हें दर्शन जन्मास आलें. मीमांसेवरील सर्वांत जुना प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे जैमिनीचीं मीमांसासूत्रें होत. या सूत्रांवर शबरानें भाष्य लिहिलें व त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं प्रभाकर व कुमारील भट्ट असे दोन मोठे पुरस्कर्ते मीमांसेस लाभले. मीमांसा वेदांना

अपौरुषेय व अनादि मानते व कोणत्याही वादांत वेद—प्रमाण समजते. मीमांसकांच्या मतें जग हें अनादि व स्वयंभू आहे. आत्म्याचें अस्तित्व त्यास मान्य आहे. शरीरांतील धर्माधर्म नाहींसे करून टाकणें म्हणजच मोक्ष होय असें ते म्हणतात. मीमांसेनें सत्य निर्णयासाठीं जी पद्धत आंखली ती फारच शास्त्रशुद्ध असून सर्वमान्य आहे.

वरील सहा दर्शनांप्रमाणेंच आणखीही अनेक दर्शनें आहेत व परमार्थाबद्दल निरनिराळीं मतें त्यांत सांगितलीं आहेत. त्यांतील (७) चार्वाक दर्शन हें नास्तिकांचें होय. यास परमेश्वर, आत्मा, परलोक पुनर्जन्म यापैकीं कांहींच मान्य नाहीं. चार द्रव्यें एकत्र होऊन जीव निर्माण होतो. तें स्वतंत्र तत्त्व नाहीं. जगांतील सुखें दुःखमिश्रित आहेत हें खरें; पण सुज्ञांनीं त्यांतील सुखाचाच भाग घेऊन दुःख टाळावें. दुःखभयानें सुख टाकील तो पशूच होय. कर्मसंचित हें खोटेंच आहे. गरीब श्रीमंत हे भेद स्वभावेंकरून झाले आहेत. त्यास कारणें नाहींत. वेद, अग्निहोत्र, यज्ञ हीं सर्व लुच्च्या लोकांचीं पोट भरण्याचीं साधनें आहेत. ऐहिक सुख हेंच ध्येय आहे. दुसरें सर्व फोल आहे असें चार्वाकाचें मत आहे. **पांचरात्र** (इ.स.पू. ५००–वैद्य) प्रणेता नारद, देवता विष्णु, तत्त्वें: वासुदेवपरमेश्वर, संकर्षण जीव, प्रद्युम्नमन, अनिरुद्धअहंकार. रामानुजाचार्य व मध्वाचार्य यांनीं हेंच मत चालविलें.

पाशुपत—महाभारतापेक्षां जुनें. पशुपति शंकर मुख्य देवता.

वारकरी पंथः—हा महाराष्ट्रांत असून वैदिक धर्मांतीलच आहे. वारकरी म्हणजे दरवर्षी आषाढ—कार्तिक शुद्ध एकादशीस पंढरपुरास वारी घालणारा. यांस तुळशीची माळ आवश्यक असल्यामुळें माळकरी पंथ असेंही म्हणतात. भागवत ग्रंथांतील श्रीकृष्ण परमात्म्याचें जें बालरूप तें यांचें उपास्य असल्यामुळें यास भागवतधर्म असेंही नांव आहे. विठ्ठल, पांडुरंग, हीं त्या बालकृष्णाचींच नांवें होत. पांडुरंगाचा अवतार पुंडलीकासाठींच झालेला आहे. पांडुरंगाची पूजा ज्ञानेश्वराच्या पूर्वींही बरींच वर्षें चालू होती. त्यावरून या पंथाचा उद्भव ज्ञानेश्वरापूर्वीं दोन तीन शतकें झाला असावा (दांडकर), ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे यांतील प्रमुख संत होत. भक्तिमार्ग हा ज्ञानमार्गापेक्षां श्रेष्ठ व सर्वांना सुलभ आहे. परमेश्वराच्या पायाशीं वर्णभेद नाहीं. एरव्हीं व्यवहारांत चातुर्वर्ण्य आवश्यक आहे, व मूर्तिपूजा अद्वैताशीं कोणत्याही प्रकारें विरोधी नाहीं इ. यांची मतें आहेत.

लिंगायत ऊर्फ वीरशैवः—या पंथाचा उदय द्रविड लोकांत झाला. पण त्यांत येण्यास सर्वांना मोकळीक होती. सध्यां लिंगायतांचा विशेष भरणा विजापूर, धारवाड, बेळगांव, मद्रास, हैद्राबाद, म्हैसूर या प्रांतांत आहे. त्याचा मुख्य संस्थापक बसव हा बाराव्या शतकांत झाला. कांहींच्या मतें हा पंथ फार प्राचीन असून बसवानें त्यांत फक्त सुधारणा केली. ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व सहन न झाल्यानें बसवानें हा पंथ निर्माण केला. चातुर्वर्ण्य व जातिभेद मोडणें हा त्याचा हेतू होता. पुनर्जन्म, कर्मवाद तो मानीत नाहीं. शिव हें त्यांचें मुख्य आराध्यदैवत असून त्याची खूण म्हणून प्रत्येकानें गळ्यांत लिंग धारण केलेंच पाहिजे असा नियम आहे. आज पुन्हां लिंगायत बेटिबंद जाति होऊन बसली आहे.

वैष्णव संप्रदायः—विष्णू देवतेला निरनिराळ्या स्वरूपांत भजणारा हा संप्रदाय असल्यामुळें यास वैष्णव संप्रदाय म्हणतात. याच्या जोडीचा दुसरा शैवसंप्रदाय आहे. हिंदुधर्मीयांत हेच दोन मोठे पंथ असून त्यांत बहुतेक सर्व हिंदु येतात. वैष्णव संप्रदाय हा मूळ भक्तिप्रधान एकेश्वरी धर्म होय. उपनिषदांच्या नंतर जी मोठी धर्म सुधारणेची चळवळ झाली त्यांतून हा पंथ निघाला. पांचरात्र, भागवत, नारायणधर्म, वासुदेव भक्तिसंप्रदाय इ. अनेक संप्रदाय एकत्र होऊन हा पंथ निघाला आहे. राधाकृष्णाच्या पूजेची व शृंगार विलासाची यांत मागून भर पडली. आठव्या शतकांत शंकराचार्यांनीं अद्वैत मत स्थापिल्यामुळें यांच्या मतांस मोठाच धक्का बसला. पण पुढें रामानुजाचार्य, मध्वाचार्य, निंबार्क, चैतन्य यांनीं या संप्रदायाचें पुनरुज्जीवन केलें. रामानंद, नामदेव यांनीं यांचेंच स्वरूप थोडें पालटून देशी भाषेंत रामभक्ति व विठ्ठलभक्ति सुरूं केली. वैष्णव व शैव या पंथांचा मारामाऱ्या होण्यापर्यंत विरोध आहे.

शैवसंप्रदायः—वैष्णवसंप्रदायाप्रमाणेंच हा फार मोठा संप्रदाय असून याचाही उगम फार प्राचीन आहे. वेदांतील रुद्रदेवता एका उपनिषदांत सर्वश्रेष्ठ मानली आहे. विष्णु पुराणांत शिव ही अनार्य देवता आहे असें म्हटलें आहे! पण पुढें तिचा ब्राह्मणी धर्मांत समावेश करून घेतला गेल्यामुळें तिला मंगल रूप प्राप्त झालें. व त्रैमूर्तींतील एक स्थान तिला मिळालें. दक्षिण हिंदुस्थानांत शैवमत फार मान्य आहे. शाळुंका व लिंग हीं जगां-

तील आद्य पुरुष प्रकृतींची स्मारकें आहेत. बंगाल्यांत शक्तिपूजा फार असून दक्षिणेंत लिंगपूजा आहे. काश्मीरांत स्पन्दशास्त्रपंथ व प्रत्यभिज्ञापंथ असे शैव संप्रदायाचे दान पोटभेद आहेत. कर्नाटकांतील लिंगायत पंथ प्रसिद्धच आहे. तामीळ प्रांतांत शैवांचें विपुल वाङ्मय सांपडतें. तिरुज्ञान संबंदर हा त्यांच्यांतील मोठा आचार्य होता.

थिऑसफी:—या शब्दाचा मूळ अर्थ ईश्वरविषयक ज्ञान असा आहे. या पंथांत नवीन तत्त्व असें कांहीं नाहीं. पण जुनेच सिद्धान्त ज्या पद्धतीनें एकत्रित केले गेले ती पद्धत नवी आहे. कोणच्याही धर्माचें आरंभीचें उज्वल स्वरूप नाहीसें होऊन पुढें त्यांत अंधश्रद्धा शिरलेली दिसते. माणसांचें विचारस्वातंत्र्य ते धर्म हिरावून घेतात. तसें होऊं नये व स्वतंत्र विचारांच्या धर्मप्रेमी सत्यजिज्ञासू लोकांचा एक संघ असावा या हेतूनें हा पंथ स्थापिला गेला. १८७५ सालीं न्यूयॉर्क येथें कर्नल अॅलकॉट व मॅडम ब्लॅव्हाटस्की यांनीं थिऑसफीकल सोसायटी स्थापन केली. व नंतर जगभर हिंडून आपल्या मताचा प्रसार करून अनेक सोसायट्या स्थापन केल्या. आज मद्रासेजवळचें अड्यार हें त्यांचें आद्यपीठ असून त्यांचे ३९७७३ अनुयायी आहेत. (सन १९२३). हिंदुस्थानांत ३१६ शाखा असून ५०१६ अनुयायी आहेत. थिऑसफिस्टानें अमुक एका गोष्टीवर श्रद्धा ठेवलीच पाहिजे असें नाहीं. तरीपण त्यांचीं स्वतःचीं म्हणून कांहीं तत्त्वें आहेत. तत्त्वविचारजन्य ज्ञानापेक्षां अनुभवजन्य ज्ञानाला ते जास्त किंमत देतात. व त्याअन्वयें कांहीं एका विशिष्ट संशोधनपद्धतीचा अवलंब करून मागला जन्म, मरणोत्तर स्थिति, सप्तलोक वगैरेसंबंधीं माहिती आपण मिळविली आहे असें थिऑसफिस्टांस वाटतें. ही संशोधनपद्धति भौतिक शास्त्रांतील संशोधन पद्धतीइतकीच विश्वसनीय आहे असें ते म्हणतात. आपल्या सूर्यमालेंत दृश्य व अदृश्य असे अनेक गोल आहेत व त्यांतील प्रत्येक गोलावर जीव क्रमानें पण अनेकवार जातो. सध्यां पृथ्वीवर असलेले अनेक जीव मंगळावर होते व येथें त्यांचा पूर्ण विकास झाला म्हणजे पृथ्वी लयास जाऊन त्यांना बुधावर नेण्यांत येईल असें त्यांच्यांतील संशोधक म्हणतात. सर्व गुणांची पूर्णावस्था होणें म्हणजेच मुक्ति होय. मुक्तांचें व्यक्तित्व नाहीसें झालेलें नसतें. अशा जीवन्मुक्तांचा पृथ्वीवर एक संघ आहे व तेथून तो सर्व जगाचा योगक्षेम चालवितो. सनत्कुमार हा या संघाचा अध्यक्ष असून मनु, बोधिसत्व, महाचोहण वगैरे इतर अधिकारी आहेत. प्रेम व बंधुभाव वाढविणें हीच या पंथाची शिकवण असून अभेदबुद्धि हा नीतीचा पाया आहे असें ते समजतात.

नाथ पंथ:—आदिनाथ हा या पंथाचा संस्थापक. कांहींच्या मतें आदिनाथ म्हणजे शंकरच होय. शंकरानें प्रथम पार्वतीस उपदेश केला. तो शेजारीं माशाच्या पोटांत असलेल्या मत्स्येन्द्रानें ऐकला. व त्यानेंच पुढें या पंथाचा प्रसार केला. ज्ञानेश्वर हा या पंथाचाच अनुयायी होता. मत्स्येन्द्राप्रमाणेंच जालंधरानेंही या पंथाचा प्रसार केला. हा पंथ शैव असून यांत जातिबंधनें शिथिल आहेत. यांचा हटयोग व मंत्रतंत्र यावर विशेष भरंवसा आहे. यांच्यांत स्त्रियांनाही उपदेश देत व त्यांना पुष्कळ वेळां उदोनाथ, गुप्तनाथ अशीं नांवें देत. यांना किमया येते अशी लौकिक समजूत आहे. यांनाच कानफाटे असें नांव आहे.

कबीरपंथ:—याचा संस्थापक कबीर हा १५ व्या शतकांत होऊन गेला. हा जातीनें मुसलमान साळी होता. पण हिंदीधर्ममताकडे याचा कल असे. रामानंद यांस त्यानें गुरू केलें असून राम हें त्याचें दैवत होतें. पण तो मुसलमान व हिंदू या दोन्ही धर्मांना सारख्याच शिव्या देतो. वेदांत, चातुर्वर्ण्य, संन्यास, उपासतापास, सुंता हीं त्यास मुळींच मान्य नव्हतीं. कबीर हा द्वैत मताचा असून भक्तिमार्गी होता. हिंदू व मुसलमान मिळून त्याचे दहालक्ष अनुयायी आहेत. हिंदू अनुयायांचें मुख्यस्थान काशीस असून मुसलमानांचें महगर येथें आहे. तेथें त्यांचे महंत असतात. नवीनांस त्या पंथांत येणें असल्यास मोठा दीक्षाविधि सांगितलेला आहे. यांच्यांतही जातिभेद दिसून येतो. कबीरपंथी ब्राह्मण माळ घालून शिवाय जानवें घालतात. स्त्रिया सुद्धां माळ घालतात.

सत्पंथ:—महाराष्ट्रांत खानदेशांत, सत्पंथी लोक बरेच आहेत. इ. स. १४४९ सालीं इमामशहा नांवाचा एक साधु इराणांतून इकडे आला. तो या पंथाचा प्रवर्तक होय. अहमदाबादेजवळ गीरमाथा गांवीं तो असे. पिराणा येथें हल्लीं त्याची मुख्य गादी आहे. इमामशहाच्या शिष्यांत ब्राह्मण, वाणी, लेवा व कडवा कुणबी हेच मुख्यतः आहेत. त्यांत मुसलमान मुळींच नाहींत. गीता, रामायण, उपनिषदें हे ग्रंथ सत्पंथी पवित्र मानतात. व त्यावरून इमामशहानीं उपदेश केला असें समजतात. पिराणा गांवीं बावांचा दरसाल उरूस भरतो तेव्हां हजारों हिंदू यात्रेस येतात.

महानुभाव पंथ

या पंथाचा प्रारंभ बाराव्या शतकांत महाराष्ट्रांत झाला. हल्लीं याचा प्रसार महाराष्ट्र, गुजराथ, मध्य हिंदुस्थान, पंजाब व काश्मीरपर्यंत झाला आहे. काबूल येथेंही या पंथाचे लोक आहेत. संन्यासवृत्तीनें राहणारे लोक स्वतःस महानुभाव म्हणवितात.परंतु चातुर्वर्ण्यांतील बरेच लोक महानुभाव पंथाचे अनुयायी आहेत. पण ते आपल्या जातींतच मोडत असल्यामुळें महानुभाव पंथाची लोकसंख्या निश्चितपणें सांगतां येत नाहीं.

महानुभाव पंथ वैदिक सनातन धर्माची एक शाखा आहे. जैन धर्म वास्तविक वैदिक धर्माचीच एक शाखा आहे.पण जैनी लोक वैदिक धर्मापेक्षांही जैन धर्म प्राचीन असल्याचें समजतात. बौद्ध धर्म, लिंगायत पंथ हे वैदिक धर्मापासून निघाले आहेत. पण ते वेदांचें प्रामाण्य मानीत नाहींत. महानुभाव लोकांना वेदांचें प्रामाण्य मान्य आहे. कै. चांदोरकर, प्रो. दांडेकर, प्रो. पेंडसे इत्यादि लेखक या पंथास अवैदिक समजतात. पंथीयेतर महाराष्ट्र समाजांत अशीच कल्पना रूढ आहे. तथापि महानुभावांचे लीला चरित्रादि चरित्रग्रंथ, ऋद्धिपुर्खनादि ग्रंथ व इतर महानुभावीय ग्रंथ वाचले असतां, जागजागीं वेदांच्या श्रेष्ठत्वाबद्दल उल्लेख आढळून येतात. त्यावरून या पंथास वेदांचें प्रामाण्य मान्य आहे असें दिसून येतें. वेदोपनिषदांचा सार जी भगवत्‌गीता तो या पंथाचा पवित्र ग्रंथ आहे. या एकाच गोष्टीवरून या पंथास अवैदिक म्हणतां येणार नाहीं. हा पंथ वैदिक असल्याबद्दल शृंगेरी मठाचे शंकराचार्य श्री विद्यारण्य भारती यांचें शके १७०७ मधील आज्ञापत्र आणि करवीर मठाचे शंकराचार्य श्री विद्याशंकर भारती यांचें इ. स. १९१३ मधील आज्ञापत्र आहे. महानुभावांचे ग्रंथ जसजसे प्रकाशित होतील तसतसें या पंथाचें वैदिकत्व निदर्शनास येईल. वैदिक सनातन धर्मास आद्य श्री शंकराचार्यांनीं चालना दिल्यानंतर ज्ञानोत्तर मुक्तीचें तत्त्व प्रस्थापित झालें. त्यामुळें चातुर्वर्ण्यातील उच्चवर्णीयांनाच तें साध्य असल्यामुळें उच्च जातींनाच तो मार्ग खुला होता. वैदिक ग्रंथभांडाराच्या किल्ल्या त्यांच्याच स्वाधान होत्या. आचार्यांनंतर ३.४ शतकांनीं रामानुजाचार्यांनीं भक्ति मार्गाला चालना दिली. त्यामुळें इतर वर्णीयांना व जातींना मोक्ष प्राप्तीचा मार्ग खुला केला. परंतु दहाव्या अकराव्या शतकांत जातींची विभिन्नता इतकी असह्य झाली कीं, जातीविरुद्ध बंड म्हणून श्री बसवाचार्यांनीं शिवोपासक लिंगायत पंथ स्थापन केला. वेदांचें अप्रामाण्य आणि जातींचा विध्वंस हीं दोन तत्त्वें या पंथांत प्रमुख होतीं.कर्नाटकांत व महाराष्ट्रांत या पंथाचा प्रसार झाला. पण या पंथाचा बहुजन समाजावर पगडा बसला नाहीं. बाराव्या शतकांत श्रीचक्रधरानें महानुभाव पंथ स्थापित केला. वेदांचें प्रामाण्य कायम ठेवून चारहीं वर्णांच्या स्त्री-पुरुषांना संन्यासाच्या द्वारें ज्ञानोत्तर आणि भक्तियुक्त मोक्ष मार्ग या पंथानें खुला केला. या पंथास श्रीदत्तात्रय आणि श्रीकृष्ण या पौराणिक अवतारांची भक्ति प्रधान आहे. श्रीचक्रधरानें संन्यासदीक्षा घेतल्यानंतर शके ११८५ पासून व्यवस्थित असें पंथप्रचाराचें कार्य केलें. तथापि शके ११९४चे सुमारास श्री चक्रधर बदरिकाश्रमीं गेल्यावर त्यांचा पट्ट शिष्य नागदेवाचार्य यांनींच महाराष्ट्रांत या पंथाचा प्रसार करून या पंथास व्यवस्थित स्वरूप आणिलें.नागदेवाचार्यांचे ५०० शिष्य होते. या पंथाची स्थापना झाल्यानंतर २०।२५ वर्षांच्या आंतच श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं भक्तिप्रधान अशा भागवत धर्माच्या तत्वास चालना दिली. या भागवत धर्मानें चातुर्वर्ण्य कायम ठेवून अस्पृश्य वर्गापासून ब्राम्हण वर्गापर्यंतच्या सर्व जातींतील स्त्री पुरुषांना भक्तिमार्गानें मोक्षप्राप्तीचा मार्ग खुला करून दिला. या भागवत धर्मानें पंढरपूरचा श्री विठल हें केंद्र ठरविलें. जाती कायम ठेवून जातीजातींमधील विभिन्नतेचा तीव्रपणा बराच नष्ट केला. या भागवत धर्माचा महाराष्ट्रांत प्रसार झाला असून आजही त्याचें सर्व व्यापी स्वरूप दिसून येतें.मोक्ष-प्राप्तीकरितां स्त्रीपुरुषांना संन्यासाची आवश्यकता सांगणाऱ्या महानुभाव पंथाच्या प्रसार-कार्यांत,संसारांत राहून भक्तिमार्गानें मोक्ष-प्राप्ति मिळवितां येते असें प्रतिपादन करणाऱ्या भागवत धर्माची अडचण उत्पन्न झाली असण्याचा संभव आहे.

महानुभाव पंथाचा मूळ संस्थापक श्रीचक्रधर हा होय. परंतु चक्रधरास ज्ञानप्राप्ति ऋद्धिपूरच्या श्री गोविंद प्रभूपासून झाली. श्रीगोविंद प्रभूला ज्ञानप्राप्ति द्वारावतीकार श्रीचक्रपाणी ऊर्फ चांगदेव राऊळ यांजपासून झाली,आणि श्रीचक्रपाणी यांना माहूर येथें सिंहाद्रि पर्वतावर श्रीदत्तात्रय प्रभू—पासून व्याघ्रवेषानें ज्ञानप्राप्ति झाली. महानुभाव पंथांत श्रीदत्तात्रय, श्रीकृष्ण, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभू, आणि श्रीचक्रधर हे अवतार मान-

तात. पैकीं पहिले दोन अवतार पुराणप्रसिद्ध आहेत. या पांचही अवतारांचीं चरित्रें शके १२०७ ते १२२३ च्या दरम्यान महींद्रभट्टानें प्राचीन मराठीमध्यें लिहिलीं. देवगिरीच्या राजवटींत दिल्लीच्या सुलतानाची धाड आली, तेव्हां कवीश्वर व्यास हे कोंकणांत गेले. तेथें चोरांनीं त्यांना लुटलें,त्यांत ती चरित्राची पोथी नष्ट झाली. या मूळ पोथीवरुन श्रीचक्रधरांच्या अनेक शिष्य प्रशिष्यांनीं चरित्रें घोकलीं होतीं. त्यावरुन या चरित्रग्रंथाचे अनेक पाठ झाले, त्यांत तेरा पाठ प्रमुख आहे.हीं चरित्रें संभाषणानुरुप आहेत.भिन्नभिन्न पाठांत लीळांच्या संख्येंत व अनुक्रमांत फरक आहे. आम्हीं भीष्माचार्य पाठावरुन हीं चरित्रें वाचलीं. श्रीचक्रपाणी मूळचे फलटणचे कऱ्हाडे ब्राम्हणाचे पुत्र, फलटणहून माहूरला गेले, तेथून ज्ञानप्राप्तीनंतर द्वारावतीस गेले.तेथें जीर्णोद्धार केल्यावर त्यांनीं देहत्याग केला. श्रीगोविंदप्रभू हे ऋद्धिपूरजवळील एका काटसुरा नांवाच्या खेड्याच्या काण्व ब्राम्हणाचे पुत्र. यांनीं ऋद्धिपुरांत जीवोद्धार करुन शके १२०७ मध्यें देहत्याग केला. श्रीचक्रधर हे भडोचचा ब्राम्हण प्रधान विशाळदेव यांचे पुत्र. यांनीं गृहत्याग केल्यानंतर ऋद्धिपुरास ज्ञानप्राप्ति केली.नंतर महाराष्ट्रांत पंथप्रसार व जीवोद्धार करुन शके ११९४ मध्यें बदरीकेदार येथें प्रयाण केलें. श्रीचक्रधरानंतर नागदेवाचार्यांनीं पंथप्रसाराचें कार्य केलें. तृतीय आचार्य परशराम बास यांच्या काळीं महानुभाव पंथाचे तेरा अध्याय झाले व आज हे तेरा अध्याय विद्यमान आहेत.

महानुभाव पंथ हा द्वैत मतानुयायी आहे. ईश्वर, देवता, जीव आणि प्रपंच हीं४ मूळ तत्त्वें मानतात. जीव मायावश देह धारण करतो. व बऱ्यावाईट कर्मांचीं फळें भोगतो. देवता—भक्तीनें जीव देवतालोकांस जातो. कर्माचें फळ भोगल्यावर परत येतो. पण संन्यासवृत्तीनें ईश्वराची भक्ति केल्यास जीव मुक्त होतो म्हणून या पंथांत देवतादिकांची भक्ति वर्ज्य, आणि परमेश्वरभक्ति ग्राह्य सांगितली आहे. श्रीचक्रधराच्या वचनांचा सूत्रपाठ आनेराज व्यासानें केला आहे. त्यांत हें पंथाचें तत्वज्ञान विशद केलें आहे.

या पंथाचें वाङमय फार समृद्ध आहे. शके ११९५ पासूनचे अगदीं गेल्या शतकापर्यंतचे महानुभावी यांनीं लिहिलेले अनेक विषयांवरील ग्रंथ आहेत. पंथाबाहेर आपले ग्रंथ दाखवावयाचे नाहींत या वृत्तीनें ते आजवर इतरांना गुप्त होते. पण आतां महंत दत्तलक्ष राजांसारख्या उदारमतवादी महंतांच्या कृपेनें आणि कै. राजवाडे, भावे, इत्यादिकांच्या परिश्रमानें ते ग्रंथ उजेडांत येऊं लागले आहेत. शारदाश्रम यवतमाळ या संस्थेचें या संबंधाचें कार्य महाराष्ट्रास श्रुतच आहे. आज मराठी भाषेच्या विद्वानांचें लक्ष या वाङमयाकडे लागल्यामुळें नागपूर आणि मुंबई विश्वविद्यालयांतही या वाङमयाचा प्रवेश झाला आहे. प्राचीन मराठी वाङमयांत या ग्रंथांनीं अपूर्व भर पडली असून मराठी भाषेच्य इतिहासास या वाङमयाचा फार उपयोग होईल असें तज्ज्ञांचें मत आहे. महानुभाव वाङमयाची कल्पना यावी म्हणून महाराष्ट्र सारस्वत आणि महानुभावीय मराठी वाङमय हे ग्रंथ अवश्य वाचावे.

महानुभाव पंथासंबंधानें महाराष्ट्रांत निदान एकनाथ काळापासून बरेच गैरसमज आहेत. परंतु आनंदाची गोष्ट कीं, ते आतां नष्ट होत चालले आहेत. त्याला विशेष कारणें म्हणजे त्यांच्या ग्रंथाचें प्रसिद्धीकरण आणि पंथांतील लोकांचें इतर महाराष्ट्रीयांशीं वाढतें दळणवळण हीं होत. महानुभाव पंथीयांनीं आपल्या पंथाची उन्नति करण्याकरितां महानुभाव धर्मोन्नति परिषद काढली असून,निरनिराळ्या भागांत परिषदेचीं अधिवेशनें होत असून, समाजोन्नतीचे प्रयत्न होत असतात. पंजाबांतहि महाधर्म—प्रतिनिधी—सभा पंजाब या नांवाची संस्था महानुभावीयांनीं काढिली आहे. त्या सभेच्या द्वारां समाजोन्नति घडवून वाङमयप्रकाशनाचेंहि कार्य तत्रस्थ महानुभावियांनीं चालविलें आहे. व लीलाचरित्रांवरुन श्रीचक्रधर-चरित्र म्हणून गेल्या वर्षीं एक मोठा ग्रंथ हिंदीमध्यें अमृतसर येथें प्रकाशित केला आहे. या पंथाचा पंजाबांत १५ व्या शतकांत प्रथम प्रवेश झाला. परंतु आज तिकडे बराच प्रसार झाला आहे. पंजाबांत मोठमोठ्या शहरीं महानुभावांचे मठ असून महंत अधिष्ठित आहेत. त्यांचा गृहस्थाश्रमी अनुयायीवर्ग बराच मोठा असून सुस्थितींत आहे. या पंथास तिकडे जयकृष्णी पंथ म्हणतात.

महाराष्ट्रांत मोठमोठ्या शहरीं महानुभावांचे मठ आहेत. त्यांची नोंद अथवा महानुभावीयांची गणति यासंबंधानें अद्याप कोणी प्रयत्न केला नाहीं या पंथांतील स्त्री—पुरुष बहुधा साक्षर असतात. संन्यास वृत्तीनें राहणारे भिक्षावृत्तीवर योगक्षेम चालवितात. सूत्रपाठ आणि भगवद्गीता यांचा पाठ या पंथांत सर्वसाधारण आहे.महाराष्ट्रांतच काय

पंथाचीं पवित्र स्थानें आहेत.त्यांत फलटण, माहूर ऋधिपूर हीं स्थानें प्रमुख आहेत. स्थानपोथी म्हणून प्राचीन गद्यग्रंथ आहे. त्यांत तीर्थस्नानांचें वर्णन आहे. तीर्थमालिका नांवाच्या छोटया ग्रंथांत या तीर्थस्नानांचा उल्लेख आहे. पुण्यास गणेश पेठेंत श्रीकृष्णमंदिर म्हणून महानुभावीयांचा मठ आहे. तेथील अधिपति गोविंदराजजी यांनीं ज्ञान-सिंह नांवाचें मासिक समाजोन्नति आणि वाङमय यांच्या वृद्धीकरितां काढलें होतें. तीन वर्षे चालवून शेवटीं आश्रयाभावी त्यांना तें बंद करावें लागलें. श्री गोविंदराजजी यांनीं या पंथाची मासिकांच्या द्वारां उत्कृष्ट सेवा केली आहे. महानुभाव समाज साक्षर आहे. तथापि इंग्रजी शिक्षणाचा प्रसार त्यांच्यामध्यें व्हावा तसा झाला नाहीं. संस्कृत शिक्षणाकरितां हरिपूर, हजारा, पंजाब येथें या पंथीयांनीं संस्कृत पाठशाळा काढली असून, तेथें पंजाब विश्वविद्यालयाच्या शास्त्री परिक्षेपर्यंतचें शिक्षण देण्यांत येतें. भुसावळ येथें स. मुरलीधर शास्त्री यांनीं पंथीयांकरितांच एक शाळा याच वर्षी काढली असून तेथें धार्मिक व व्यावहारिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. सध्यां १० मुलेंच शिकत आहेत. व महानुभावी यांच्या दातृत्वावरच ती संस्था चालविण्याचा चालकांचा हेतु आहे. दिवसेंदिवस महानुभाव पंथीयांचें पाऊल उन्नतीच्या मार्गावर पडत आहे. त्यांच्या ग्रंथप्रकाशनानें हा पंथही हिंदुधर्माचा महाराष्ट्रांतील एक महत्त्वाचा घटकावयव आहे, असें निदर्शनास येण्याची उमेद आहे.

आर्यसमाज

शास्त्र आणि मानवी ज्ञान यांच्या प्रगती-बरोबर प्रत्येक हिंदुमात्राला एका गोष्टीविषयीं नेहमींच काळजी लागून राहिली आहे. धर्म-शास्त्राचा आधार वगळला तर मूर्तिपूजा आणि जन्मावरून जात ठरविण्याचें तत्त्व या दोहोंचें समर्थन कसें करावयाचें हा प्रश्न चांगलाच महत्त्वाचा होऊन बसला आहे. आणि म्हणूनच, हिंदुत्वाचें विद्यापीठ व धर्मपीठ म्हणून विख्यात असलेल्या वाराणशी नगरींतील १७ नोव्हेंबर १८६९ ची महत्त्वाची संध्याकाळ, आर्यसमाजाची स्थापना करणाऱ्या स्वामी दयानंद सरस्वतींना तितकीशी म्हणजे अपेक्षेप्रमाणें फलदायक झाली नाहीं, याबद्दल कित्येक हिंदू लोक अजूनही हळहळतात. त्या दिवशीं बनारसच्या महाराजांच्या अध्यक्षतेखालीं धार्मिक विषयांवर वादविवाद चालविण्यांत आला, आणि अखेरीस सनातनी लोकांना केवळ नांवाला कां होईना, पण जय मिळाला. एकंदर वादविवाद चार तास चालू होता, आणि सर्व महत्त्वाच्या मुद्यांवर जय जरी स्वामींकडेच दिसत होता तरी वेदांतील एका ऋचेंत आलेल्या 'पुराणें' या शद्वाची उकल करून दाखविण्यास स्वामींना केवळ दोनच मिनिटांचा अवधि देऊन प्रतिपक्षियांनीं वादविवादाचा डाव जिंकला.आधुनिक वादविवाद शास्त्राचे मर्मज्ञ अशा तऱ्हेच्या दिसावयास मोठया, पण केवळ नाममात्र जयाला खात्रीनें काडीचेंही महत्त्व देणार नाहींत. आणि असल्या पदाजयानें किंवा जयानेंही धर्माचा भविष्यकाळ कधींही ठरविला जात नाहीं. असें आर्यसमाजाचें म्हणणें आहे.

धार्मिक वादविवादानें एक गोष्ट मात्र चांगलीच सिद्ध झाली, आणि ती म्हणजे दयानंदांची गाढी विद्वत्ता. वादविवादाच्या आखाडयांत स्वमींच्या बाजूचें असे ते स्वतः एकटेच उभे होते, व अशा स्थितींतही सनातनी लोकांनीं जमवून आणलेल्या कैक रथीमहारथींशी त्यांनीं चांगलेच दोन हात केले. शंकराचार्यांच्या वेळेपासून वैदिक ज्ञानावर इतका अधिकार असणारे आचार्य,स्वामी दयानंदांशिवाय दुसरे कोणीच झाले नाहींत. असें समाज समजतो.

आपल्यावर ईश्वराची विशष कृपा असल्याचें ढोंग स्वामींनीं कधींच केलें नाहीं.तसेंच मला असा दृष्टांत झाला, किंवा मी एक नवीन धर्म स्थापणार आहें असें ते बोलल्याचेंही कुठें नमूद नाहीं.ते अगदीं खरोखरीचे संन्याशी आणि हिंदुत्वाला प्राक्कालीन कीर्ति प्राप्त करून देण्याकरितां झटणारे एक अत्यंत विद्वान् पुरुष होते. दयानंद जरी अवतारी पुरुष नव्हते, तरी त्यांच्या थोरपणाचीं पूर्वचिन्हें बालवयांतच त्यांच्या ठिकाणीं दृग्गोचर झालीं. दयानंदांचे वडिल शंकराचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांनीं १८३८ सालच्या शिवरात्रीच्या दिवशीं उपवास करण्याबद्दल दयानंदांना निक्षून सांगितलें. दयानंद शंकराच्या मूर्तिसमोर बसून प्रार्थना करीत असतांना एक उंदीर देवाच्या अंगावर चढला व तेथें त्यानें फराळ करण्यास सुरुवात केली. वरील गोष्ट दयानंदांनीं केलेल्या मूर्तिपूजा तत्त्वाच्या विध्वंसनाच्या लढाईचा इषाराच ठरली. आपल्या मुलामध्यें संन्यस्त वृत्ति जोरावत चाललेली पहातांच दयानंदांच्या वडिलांनीं लग्नाची धोंड त्यांच्या गळयांत अडकविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण अर्थातच त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. एका प्रसंगां

तून ते कसेबसे निभावले, पण दुसऱ्या तसल्याच प्रसंगाची कुणकुण लागतांच दयानंदांनीं घरांतून कायमचाच पोबारा केला.

वेदांचा अभ्यास आधींच उत्तम रीतीनें झालेला असल्यामुळें, सन १८४५ पासून १८६० पर्यंत पंधरा वर्षें दयानंद ज्ञानाच्या शोधांत साऱ्या हिंदुस्थानभर भटकत होते. नंतर ते हिमालयांत गेले व तेथें संन्याशी व सिद्ध पुरुष यांच्या गांठी घेऊन त्यांनीं योगशास्त्राचा अभ्यास केला. लहान वयांतच संन्यासाच्या अगदीं वरच्या पायरीपर्यंत त्यांची प्रगति झाली. वयाला ३० वर्षें पुरीं झाल्या-नंतर मथुरा येथें दयानंदांची आपल्या गुरुजींशीं म्हणजे वीरजानंद सरस्वतींशीं गांठ पडली. वीरजा-नंद सरस्वती डोळ्यांनीं पूर्ण अंध होते. पण यांनींच दयानंदांचें शिक्षण पूर्णत्वाला नेलें. नंतर दयानंदांनीं स्वतंत्रपणें आपल्या तत्त्वांची शिकवण सुरू केली. आणि जिकडे तिकडे मोठी खळबळ उडवून दिली, कित्येक वेळां त्यांच्या जिवालाही अपाय करण्याचे यत्न झाले, पण आपल्या कार्यापासून दयानंद तिळमात्रही ढळले नाहींत. तत्त्वप्रचार सुरू केल्या-पासून सहाव्या वर्षी ते काशीला गेले व वर सांगि-तल्याप्रमाणें तेथें त्यांनीं सनातनी हिंदूंशीं दोन हात केले. जर त्या वादविवादांत दयानंदांना संपूर्ण विजय मिळाला असता तर हिंदुधर्म हल्लीं अगदीं निराळ्याच परिस्थितींत दिसला असता.

काशीच्या वादविवादानंतर ते कलकत्त्याला गेले, तेथें त्यांनीं ब्राह्मो समाजाला मिळावें म्हणून शिक-स्तीचे प्रयत्न झाले, पण त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कांहीं झालें तरी वेदप्रामाण्य व आत्म्याचें संक्रमण यांवरील स्वामींचा अढळ विश्वास थोडाही लटपटला नाहीं. या वेळेपर्यंत दयानंद उपदेशाचें काम संस्कृतांतून करीत, पण कलकत्त्याला गेल्या-वर केशव चंद्र सेन यांच्या सांगण्यावरून ते हिंदीं-तच उपदेश करूं लागले.

मुंबईला १८७५ सालीं पहिल्या आर्य समाजाची स्थापना झाली. व त्यानंतर दोन वर्षांनीं लाहोर येथें समाजाला चिर-स्थायी स्वरूप प्राप्त झालें. सन १८७७ पासून १८८३ पर्यंत स्वामींनीं धर्मप्रसाराचें व शिकवि-ण्याचें काम केलें. उदयपूरचे महाराज व जोधपूरचे महाराणा प्रतापसिंह यांनीं स्वामींचें शिष्यत्व पत्करलें. यानंतर जोधपूरच्या महाराजांच्या मुसल-मान रखेलीनें विष घातल्यामुळें स्वामींना भयं-कर आजार झाला, व त्या आजारांतच १८८३ सालीं अजमीर येथें स्वामींनीं इहलोकची यात्रा संपविली.

वर सांगितल्याप्रमाणें वेदप्रामाण्य हें दया-नंदांच्या शिकवणुकींतलें मूलभूत तत्त्व होतें. वेदांना ते प्रत्यक्ष परमेश्वराचींच वचनें समजत. व वेदांच्या जाज्वल्य अभिमानामुळें वेदविरुद्ध अशा कोण-त्याही गोष्टीला ते काडीचीही किंमत देत नसत. शास्त्रें म्हणून दयानंद फक्त पुढें दिलेल्या २१ ग्रंथांना मान देत. चार वेद, चार उपवेद, सहा वेदाङ्गें, बारा उपनिषदें, शारीरिक सूत्र, कात्यायन सूत्रें, योगभाष्य, वाकोवाक्य, मनुस्मृति, व महाभारत. सहा दर्शनें व अठरा पुराणें यांना ते मानीत नसत. दर्शनें व पुराणें यांमध्यें वेदांचा उल्लेखही नाहीं व शिवाय त्यांत वेदविरुद्ध अशा कित्येक गोष्टी आहेत, आणि म्हणून तीं खोटीं आहेत, असें त्यांचें म्हणणें होतें.

मूर्तिपूजा पापकारक आहे, म्हणून ती अजिबात झुगारून द्यावी हें दयानंदांच्या उपदेशांतील एक सारभूत तत्त्व होतें. अवतारांची कल्पना ईश्वर त्वाच्या कल्पनेशीं विसंगत असल्यामुळें त्यांना मान्य नाहीं.

निरनिराळ्या जाती म्हणजे जन्मावरून नव्हे, तर धंद्यावरून पडलेले समाजाचे विभाग आहेत असें ते समजत. या विषयासंबंधीं बोलतांना हिंदु-धर्मांतील एका अत्यंत वाईट गोष्टीच्या मुळावरच त्यांनीं घाव घातला. त्यांच्या दूरदूरच्या व विस्तृत प्रवासांत सामाजिक आणि राजकीय बाबतींतील ब्राह्मणांचें दांडगें वर्चस्व पाहून ते थक्कच झाले. ब्राह्मणांचें सर्वशक्तिमत्व, आणि ईश्वराशीं मध्यस्थी करण्याचा केवळ त्यांचाच म्हणून समजला गेलेला हक्क या दोन गोष्टींबद्दल त्यांनीं तीव्र नापसंति दर्शविली. केवळ ब्राह्मण कुळांत जन्म झाला म्हणून तो माणूस ब्राह्मणच ठरला पाहिजे असें मुळींच नाहीं असें त्यांचें मत होतें व वेदांचा आधार घेऊन त्यांनीं हें मत सिद्ध करून दाखविलें. पण दयानंदांची सर्वांत मोठी अशी जर कोणती कामगिरी असेल तर ती हीच कीं, त्यांनीं वेदज्ञानाचा घोष प्रत्येकाच्या कानापर्यंत पोंच-विला; मग तो ब्राह्मण असो, शूद्र असो, हिंदू असो किंवा अहिंदू असो. इ. स. १८७० पर्यंत हिंदुस्थानांत वेद म्हणजे सर्वसाधारण समाजाला एक कोडेंच होतें. कोणालाही ते वाचतां येण्यासारखे नव्हते व हिंदू अहिंदूंच्या जाहीर सभांतून आधार म्हणून वेदांचा उपयोग जवळ जवळ कधींच होत

नसे. आणि ही गोष्ट आश्चर्यकारक वाटत असली तरी ती कोणालाही नाकबूल करतां यावयाची नाहीं.

दयानंदांच्या जन्मापूर्वीच्या पंधराशें वर्षांत फक्त एकच मनुष्य वेदांचा अर्थ लावण्यास धजला. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. तथापि दयानंदांना वेदांचा अर्थ स्वतंत्र रीतीनेंच लावावयाचा होता. आणि हल्लीं कित्येक भाषांतून वेदांचीं जीं भाषांतरें झालीं आहेत त्यांचें बरेंचसें श्रेय स्वामी दयानंदांनाच आहे. दयानंदांनीं केलेल्या वेदांच्या भाषांतरामुळें ते 'दिलदार ठरण्यापेक्षां अधिक चतुर' ठरोत, किंवा कसेंही असो, पण इतकें मात्र खरें कीं, वेदांवरील अंधःकाराचें दाट आवरण दूर करून दयानंदांनीं मनुष्य जातीला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे.

जन्मावरूनच जात ठरण्याच्या तत्त्वामुळें जुन्या कल्पनेंतील हिंदुत्वाचा हळूहळू ऱ्हास होत आहे. कोणत्याही देशांतील, जातींतील किंवा वर्णांतील माणसांसाठीं दयानंदांनीं हिंदुत्वाचे दरवाजे सताड उघडून टाकले. हिंदुत्वाच्या इतिहासामध्यें अशा तऱ्हेची ही पहिलीच क्रांति झाली. आणि इतके दिवस अंगांत खिळलेली मर्यादित वृत्ति सोडून हिंदु धर्म सर्व मनुष्य जातीचा धर्म होण्यास लायक ठरला. यामुळें परधर्मीयालाही हिंदु करून घेणें शक्य झालें. व हिंदु धर्माचा प्रसार करणाऱ्या संस्था भरभराटीस आल्या वर दिलेले व इतर कांहीं किरकोळ अपवाद सोडले तर आर्य समाज व हिंदु धर्म यांमध्यें कांहींही फरक नाहीं. हिंदु धर्माचीं तत्वें शक्यतोंवर न सोडतां नवीन धर्म जागतिक होण्यास लायक करावयाचा हा आर्य समाजाचा मुख्य उद्देश होता.

कांहीं तत्वें व सिद्धांत एवढाच जर आर्य समाज याचा अर्थ असता तर त्याच्याकडे कुणीही लक्ष दिलें नसतें. हिंदु धर्मांतील सर्व देवत्व इतकें विशाल आहे कीं, न जाणो कदाचित् ख्रिस्त आणि महंमद यांनाही त्यांत स्थान मिळेल. हिंदु धर्माचा हा विलक्षण लवचिकपणा खरोखरीच आश्चर्य करण्यासारखा आहे. मागें झालेला किंवा पुढें होणारा कोणताहि धर्मसंस्थापक असो हिंदु धर्मांत त्याचा समावेश सहज होण्यासारखा, असतो. कारण एकाद्या हिंदूची कोणत्याहि धर्मसंस्थापकावर जरी श्रद्धा असली तरी तात्त्विक दृष्टीनें त्याचा जीवनक्रम एकाच ठशाचा असतो. म्हणून आर्यसमाजानें लोकांच्या जीवनक्रमांत घडवून आणलेली क्रांति आणि निरनिराळ्या क्षेत्रांत केलेली विधायक कामगिरी यांमुळें समाजाकडे विशेष लक्ष देणें आपणांस भाग पडतें. आर्य समाज अत्यंत कार्यतत्पर असून लढाऊ वृत्तीचा आहे हें आपण नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. मात्र ही लढाई म्हणजे अज्ञान, अंधश्रद्धा व पाप यांवरील चढाई होय हें विसरतां कामा नये. हिंदु जीवनाच्या प्रत्येक शाखमध्यें आर्य समाजानें महत्वाची कामगिरी केलेली असून, आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून शेवटीं हिंदु धर्मांतील कट्टया सनातनी लोकांनाही आर्य समाजाचीं मतें कबूल करण्यास लावावयाचें हें त्याचें ध्यय आहे.

शिक्षणाच्या प्रांतांतील आर्य समाजी लोकांचा स्वार्थत्याग आणि दुर्दम उत्साह लाहोर येथील दयानंद अँग्लो व्हर्नाक्युलर कॉलेजच्या रूपानें साक्षात् उभा आहे. या कॉलेजांतील सर्व आचार्य स्वार्थत्यागी हिंदी लोक असून पंजाबच्या विश्वविद्यालयांतून दर वर्षी ऑनर्स घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांपैकीं बरेचसे पदवीधर याच कॉलेजांतील असतात. हरद्वार येथील 'गुरुकुल—कांग्री' ही दुसरी एक संस्था असून तेथें वैदिक पद्धतीनें शिक्षण देण्यांत येतें. या लहानशा संस्थेंतहि आधुनिक शास्त्रीय शिक्षणाला भरपूर वाव असल्यामुळें ती विशेष प्रसिद्ध झाली आहे. आर्यसमाजी लोकांनीं चालविलेलीं गुरुकुलें, कन्या गुरुकुलें, शाळा व कॉलेजें सर्व उत्तर हिंदुस्थानभर पसरलीं आहेत. वर सांगितलेल्या दोन संस्थांशीं अनुक्रमें लाला हंसराज व स्वामी श्रद्धानंद यांचीं नांवें कायमचीं निगडित झालेलीं आहेत. जालंदर येथील लाला देवराज यांनीं स्थापन केलेलें कन्यामहाविद्यालय हें स्त्रियांचें कॉलेज सध्यां भरभराटींत असून तेथील व्यवस्था गुरुकुल कांग्री या संस्थेच्या धर्तीवर ठेवण्यांत आली आहे. थोडक्यांत बोलावयाचें तर सरकार वगळल्यास इतर कोणत्याहि संस्थेपेक्षां किंवा संघापेक्षां आर्य समाजाची शिक्षणविषयक कामगिरी फारच मोठी आहे.

समाजसेवा आणि परोपकार याही बाबतींतील आर्य समाजाची कामगिरी प्रशंसनीयच आहे. अनाथ बालकें व विधवा यांचें संरक्षण व पोषण करण्याकरितां आर्यसमाजी लोकांनीं अनेक संस्था उघडून त्या आजवर चालवून दाखविल्या आहेत. १८९७–९८; १८९९–१९०० व १९०७–१९०८ या सालीं पडलेल्या दुष्काळांत आर्य समाजानें आपत्तीविरुद्ध झगडण्याची व अनाथांना मदत कर-

ण्याची पराकाष्ठा करून दाखविली. शुद्धिकरण आणि मागासलेल्या वर्गांची उन्नति हीं आर्य समाजाच्या चळवळीचीं दोन महत्त्वाचीं अंगें आहेत.

हिंदु धर्मीयांत फोंफावत चाललेला धर्मांतराचा विषवृक्ष आर्य समाजानें समूळ खणून काढला. आणि त्याहीपेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे त्यानें परधर्मांत गेलेल्या हजारों हिंदूंना परत हिंदु धर्मांत घेतलें.मलबार प्रांतांत स्वामी श्रद्धानंदजींनीं बजावलेली महत्वाची कामगिरी हिंदु समाजास अजूनही विसरला नसेल. आर्य समाजानें परधर्मांत गेलेल्या हिंदु लोकांनाच केवळ शुद्ध करून घेतलें असें नाहीं तर मुसलमान, व ख्रिश्चन लोक यांनाहीं हिंदु धर्माची दीक्षा दिली. मागासलेल्या वर्गाचें राजकीय दृष्ट्या काय महत्त्व आहे याचा आर्य-समाजानें झटकन कयास बांधला व त्यांना द्विजाचे अधिकार देऊन हिंदु धर्माचा मागासलेल्या वर्गां-वरील हक्क जाहीर रीतीनें स्पष्ट केला. आर्य समाजी लोक मागासलेल्या वर्गांतील लोकांवर प्रथम यज्ञोपवीताचा संस्कार करितात. व मग त्यांच्याशीं रोटी व बेटी व्यवहारही सुरू करतात. काश्मिरांत सुमारें१०,००० मागासलेल्या लोकांना शुद्ध करून घेऊन आर्यसमाजाची दीक्षा दे-ण्यांत आली. सियालकोट येथेंही अशा तऱ्हेच्या ३६,००० लोकांना दीक्षा देण्यांत आली. हुशारपूरलाहि कित्येक हजार लोक आर्यसमाजाचे अनुयायी बनले व निरनिराळ्या प्रांतांतून अशा तऱ्हेचें कार्य नेहमीं सुरूं ठेवण्यांत आलें आहे.

आर्य समाजाच्या भरीव व विधायक काम-गिरीमुळें ख्रिस्ती मिशनरी रागानें नुसते जळूं लागले. आर्य समाज सव्यसाची आहे. सनातनी हिंदूंप्रमाणें तो नुसता स्वसंरक्षणांतच गढलेला नसतो. तर वेळप्रसंग पाहून प्रतिपक्षावर चढाई करण्यासहि तो टपलेला असतो.ख्रिश्चन धर्मतत्त्वां-नीं हिंदु धर्मावर केलेल्या आक्रमणास समा-जानें पक्का पायबंद घातला आणि शिवाय आप-ल्या धर्माच्या प्रसाराकरितां ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं केलेल्या महत्त्वाच्या कार्याचा पार बोजवारा उड-वून दिला. एका बाजूला आर्य समाज व दुसऱ्या बाजूला सरकार आणि मिश-नरी यांच्यामध्यें झालेल्या झगड्यांचें खरें स्वरूप जाणावयाचें असेल तर दयानंद सरस्वतींच्या जन्माच्या वेळीं मिशनऱ्यांचें केवढें प्रस्थ माजलें होतें तें प्रथम पाहिलें पाहिजे.

सन १८२४ पासून १८४५ पर्यंत मिशनऱ्यांनीं सबंध हिंदुस्थानभर ख्रिस्ती धर्मतत्त्वांचें जाळें पसरलें व तें बरेंच पक्कें केलें याबद्दल इतिहास स्पष्ट साक्ष देतो. सबंध देशभर मिशनऱ्यांच्या शाळा, कॉलिजें व संस्था यांचा नुसता सुळसुळाट झाला होता. सबंध हिंदुस्थान ख्रिस्तमय करून टाकावयाचें हा मिशनऱ्यांचा कावा होता; आणि इंग्रजी भाषेचा प्रसार ही त्याची नुसती प्रस्ता-वना होती. पाश्चिमात्य विद्वानांचे ग्रंथ वाचून जेवढें पदरीं पडेल तेवढ्या संस्कृतच्या तुटपुंजा ज्ञानाच्या जोरावर हिंदुत्व आणि हिंदु संस्कृति यांचा नायनाट करण्याचा घाट मिशनऱ्यांनीं घातला होता. अशा परिस्थितींतच हिंदी मनावर हीन-त्वाचा खोटाच आरोप केला गेला व त्याचे कु-परिणाम हिंदुस्थान अजूनहि भोगीत आहे. हिंदु-स्थान अशा बिकट व अडचणीच्या परिस्थितींत असतां राजा राम मोहन राय यांचें हिंदुस्थानला फार साहाय्य झालें. त्यावेळीं एका बाजूला मिश-नरी लोक व दुसऱ्या बाजूला राजा राम मोहन राय यांचे कट्टे हिंदु धर्माभिमानी अनुयायी यांच्यामध्यें वादविवाद आणि भांडणें यांचा नुसता कहर माजून राहिला होता. राजा राम मोहन राय यांनीं ख्रिस्ती धर्माची दीक्षा घ्यावी म्हणून मिश-नऱ्यांनीं अगदीं जंग जंग पछाडले; पण फुकट. राजा यांनीं असें म्हटलें आहे कीं, "हिंदु धर्मांतील ईश्वरवाद ख्रिस्ती धर्मांतील ईश्वरवादाहून अधिक चांगला नाहीं असें जरी मानलें तरी तो त्याच्या इतका चांगला तर खासच आहे."

ब्राम्हो समाजाचा बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे हिंदु-त्वाच्या हीनतेची जवळजवळ कबुलीच होती. कारण या पंथाच्या पुढारीपणाचीं सूत्रें इंग्रजी-अन्न व इंग्रजी विचार यांवर पोसलेल्या लोकांच्या हातीं गेलीं. ब्राम्हो समाज व ख्रिश्चन धर्म-तत्त्वें यांमध्यें एक अगदीं पातळ पडदाच काय तो राहिला होता. खरें बोलावयाचें तर ख्रिश्चन धर्मतत्त्वांची उसळती लाट परतविण्याची कुव-तच ब्राम्हो समाजांत नव्हती. तेव्हां दयानंदांनीं ज्यावेळीं धर्मक्षेत्रांत पाऊल टाकलें त्यावेळीं इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानचा तात्पुरता कां होईना पण बौद्धिक व मानसिक पराभव केल्यामुळें फार मोठी क्रांति झाली होती. अशा रीतीनें दयानंद जेव्हां प्रत्यक्ष लोकांच्या नजरेसमोर आले तेव्हां आपल्यावरील हीनतेचा खोटाच आरोप ऐकून हिंदु मनाला चांगलाच जोराचा धक्का बसला होता. त्यावेळीं हिंदु धर्माची स्थिति इतकी केवि-लवाणी झाली होती कीं, हिंदुत्व कोणतें व अहिंदु-त्व कोणतें याबद्दलच जनता साशंक झाली होती.

नवीनच सुरू झालेलें आधुनिक शास्त्रांचें शिक्षण व बुद्धिप्रामाण्यवाद यांमुळें योग्य मार्गदर्शकाच्या अभावीं हिंदु मनाला हिंदु धर्म म्हणजे एक चक्रव्यूहच वाटूं लागला. एकीकडे हिंदुत्व असें विस्कळीत झालें होतें तर दुसऱ्या बाजूला आपलें तुटपुंजेंच कां होईना पण सुटसुटीत व ठरीव ज्ञान शास्त्रीय पद्धतीनें नीट जुळवून मिशनरी लोक सज्ज उभे होते.

दयानंदांच्या मनांत असो वा नसो पण त्यांनीं मिशनऱ्यांना चांगलाच हात दाखविला. मिशनऱ्यांचा धुव्वा उडवावयाचा तर पहिलें काम हें होतें कीं, वैदिक धर्म ख्रिश्चन धर्मापेक्षां खात्रीनें अधिक चांगला आहे हें सिद्ध करावयाचें हें सिद्ध करतांना आपल्या ज्ञानाच्या झंझावातानें हिंदु मनावरील खोटचा हीनत्वाचे काळे ढग दयानंदांनीं पार उधळून लाविले. आणि हिंदु मनाला पूर्वीप्रमाणें खंबीर व तेजस्वी बनविलें. दयानंदांच्या प्रयत्नांमुळें हिंदु जातीचा स्वाभिमान खडबडून जागा झाला.व तिला आपल्या उच्च संस्कृतीच्या वारशाची जोरदार आठवण झाली. वरील गोष्टी करतांना दयानंदांनीं कोणत्याही सारग्राही पद्धतीचा अवलंब केला नाहीं. त्यांनीं कोणतीही सारग्राही तत्त्वज्ञान पद्धति स्थापिलेली नाहीं. बाकी त्यांनीं असें केलें नाहीं तेंच चांगलें झालें. कारण अश तऱ्हेचा कोणताहि धर्म कधीं भरभराटीस आलेला नाहीं. दयानंदांनीं आपले विचार लोकांच्या बुद्धीला नऊन भिडविले व त्यांतच त्यांनीं केलेल्या हिंदु धर्माच्या सेवेचें सर्व रहस्य आहे. आर्य समाजाची उन्नति मुंगीच्या पावलानें झालेली नसून गरुडाच्या भराऱ्यांनीं झालेली आहे. व याला कारण झालेले दयानंद सरस्वती म्हणजे कोणी गूढवादी नव्हते, किंवा धर्मसंस्थापकही नव्हते. तर बौद्धिक वातावरणांत अतुल पराक्रम करणारे ते एक असाधारण पुरुष होते.

हिंदु धर्मासंबंधीच्या संशयांचा व भ्रामक समजुतींचा उच्छेद करून दयानंदांनीं हिंदुत्व म्हणजे काय व अहिंदुत्व म्हणजे काय हें जगाला स्पष्ट करून दाखविलें. बुद्धोत्तर कालापासून हिंदु धर्मांत शिरलेल्या नाशकारी कल्पना दयानंदांनीं समूळ उखडून काढल्या. दयानंदांनीं सर्वांत विशेष जें कांहीं केलें तें हें कीं' हिंदुत्वावर वेळीं अवेळीं हल्ले करणाऱ्या परधर्मीयांना पुरतें नामोहरम करूनही जी जिवंतच राहील अशी एक जोरदार शक्ति त्यांनीं हिंदुस्थानांत निर्माण केली. आर्य समाजाची एकंदर व्यवस्था एखाद्या फेडरल राज्यघटनेप्रमाणें आहे. प्रत्येक आर्य समाज हा एक स्वयंपूर्ण घटकच होय. प्रत्येक घटकाचें कार्य व कार्यपद्धति हीं ठरलेलीं असून तीं नेहमीं चालू असतात. आचारपद्धति व धर्मसंबंधीं इतर नियम ठरलेले असून त्याप्रमाणेंच वागावें लागतें. आठवड्याचा कार्यक्रम आणि सभासदत्वाचे नियम कायमचे बांधून दिलेले आहेत. शिवाय कार्यकरी मंडळें व प्रांतिक सभा असतात. आर्य समाजाच्या एकंदर व्यवस्थेवर सर्वांत वरिष्ठ म्हणून अखिल भारतीय असेंब्ली ही सभा अधिकार चालविते. आर्य समाजाची घटना व कारभार सर्वांगपूर्ण उत्कृष्ट आहे असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

आतां फक्त आर्य समाजाचा राजकीय दृष्टचा विचार करावयाचा राहिला. थोडक्यांत बोलावयाचें तर आपलें सरकार आर्य समाजाकडे पाहून पहिल्यापासूनच नाक मुरडीत असतें. समाजाबद्दल सरकार नेहमीं कुढत असतें. लंडन टाइम्सचे तेव्हांचे बातमीदार सर व्हॅलेंटाईन चिरोल हे १९०७–१० सालीं हिंदुस्थानांत होते. व त्यांनीं त्यावेळीं हिंदुस्थानवर किंवा त्यांच्याच शब्दांत बोलावयाचें तर 'हिंदु समाजांतील खळबळाटावर, बरेच लेख लिहिले आहेत. सर साहेबांना योग्य विशेषण लावावयाचें असेल तर असें म्हणतां येईल कीं, ते एक धूर्त 'निरीक्षक' होते. आणि "हिंदु धर्माची सुधारणा करणें हा दयानंदांच्या शिकवणुकीचा वरवर दिसणारा उद्देश असला तरी त्यांच्या मताप्रमाणें आपली छाप पाडून हिंदुत्व डळमळीत करूं पाहणाऱ्या परकीयांना तोंड देण्याकरितां हिंदूंना जोरदार व प्रखर बनविणें हें तिचें अंतिम ध्येय होय." हें साहेब मजकुरांचें विधान तर अगदीं पावणेसोळा आणे बरोबर आहे. दयानंदांना स्वतःला काय पाहिजे होतें तें कदाचित निराळेंही असेल. पण त्यांच्या शिकवणुकीचा व चळवळीचा परिणाम चिरोल साहेबांनीं म्हटल्यासारखा झाला इतकें मात्र खरें.

सरकारचें लक्ष आर्य समाजाच्या कार्याकडे वेधविण्याचें महत्पुण्य कोणी झाला तरी मिशनऱ्यांच्याच पदरांत टाकील. ईस्ट इंडिया कंपनीच्या आरंभीं आरंभींच्या राज्यकारभारांत या ख्रिश्चन मिशनऱ्यांचें चागलेंच फावत असे. ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. हल्लींसुद्धां व्हाइसराय, गव्हर्नर आणि त्या त्या प्रांतांचे मुख्य धर्माधिकारी ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या बाबतींत जितकी व जशी

तत्परता दाखवितात त्याप्रमाणें मिशनरी लोकांचे बाटवाबाटवीचे उद्योग नेहमीं सुरूं असतात. देश व काल यांना अनुसरून ही चळवळ लहान मोठी असते. लाला लजपतरायांसारखे कसलेले राजकीय पुढारी आर्यसमाजाचेहिपुढारी असले तरी तेवढ्यानें आर्य समाजाचें कार्य म्हणजे कांहीं राजकीय चळवळ ठरत नाहीं. किंवा रावळपिंडीच्या दंग्यांतील कांहीं पुढारी व गोरक्षणी चळवळ करणारे म्हणून आरोप केलेले कांहीं लोक आर्य समाजी होते यावरूनही तसें सिद्ध होत नाहीं.त्यांतील खरी गोम अशी आहे कीं, हिंदूंचा कोणताहि जोमदार युयुत्सु संघ सरकारला अनिष्ट दिसावयाचाच. आणि म्हणूनच सरकारनें आर्यसमाजाला बळजोरीनेंच राजकीय संस्था बनवून समाजाच्या कार्यावर करडी नजर लाऊन ठेविली आहे. आतां

सनातनी हिंदु व आर्य समाज यांच्यामधील समेट व त्याचे परिणाम यांच्याबद्दल विचार करावयाचा.या समेटाचें बहुतेक श्रेय प्रख्यात आर्य समाजी स्वामी श्रद्धानंदजी यांनाच आहे.या सख्यभावांतील मुख्य अंतर्भूत तत्व हें कीं, हिंदु धर्माचें संरक्षण व वाढ करावयाची ती दोघांनीं एकजुटीनें करावयाची आहे. हिंदु धर्माच्या शत्रूंचा निःपात दोघांनीं एक होऊनच केला पाहिजे. समेटामध्यें विरोधी मतांपेक्षां उभयपक्षीं संमत असलेल्या मतांवरच भर देण्याची पद्धत अवलंबिली आहे. कदाचित् अशीही भीति वाटत आहे कीं, या मैत्रीमुळें आर्यसमाजांतील युद्धौत्सुक्य नाहींसें होईल व तसें झाल्यास त्यांच्यांतील रसरशीत चैतन्य नाहींसें होईल. व त्याचबरोबर ते आपल्या पाणीदारपणालाही मुकतील पण त्याबरोबरच सनातनी हिंदुत्वांमध्येंही दयानंदाच्या वेळेपासून मोठमोठे महत्त्वाचे फरक होत असून या सुधारणेमुळें सनातनी हिंदुत्व, समाजाचीं तत्त्वें व पद्धति यांच्यांशीं अधिकाधिक मिळतें होत आहे. या गोष्टींकडेही आपलें दुर्लक्ष होतां कामा नये.

हिंदुत्वाचा भविष्य काल आणि आर्य समाजाचा भविष्यकाल हे एकमेकांशीं अत्यंत निगडित राहाणार.यापुढें इस्लामी किंवा ख्रिश्चन धर्म जर हिंदु धर्मावर चढाई करूं लागतील तर उलट त्यांनाच जोराची थप्पड मिळेल यांत काडीमात्र संशय नाहीं. अत्यंत पुढारलेले हिंदु विचार म्हणजेच आर्य समाज असें म्हणतां येईल. व यांतच समाजाचें खरें वैशिष्टच आहे. आर्य समाजाची महति व योग्यता हिंदू लोकांना अधिकाधिक कळत आहे हें भाग्यच म्हटलें पाहिजे.

जातिपरिचय

मुंबई सरकारनें इलाख्यांतील सर्व जातींची माहिती देणारीं पुस्तकें बरेच वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलीं आहेत. परंतु तीं उत्तरोत्तर दुर्मिळ होत चाललीं आहेत. जातिसंस्थेच्या अभ्यासाला त्यांचा फार उपयोग आहे, म्हणून महाराष्ट्रांतील सुमारें ४०० जातींची सर्व तऱ्हेची माहिती सारांशरूपानें त्यावरून घेऊन ती कोष्टकरूपानें खालीं दिली आहे. कोष्टकांत ठिकठिकाणीं कांहीं खुणा केल्या आहेत. त्या खुणांचे अर्थ पुढें दिलेल्या छोटया सूचीवरून ध्यानांत येतील. लोकसंख्या १९०० सालची आहे.

† प्रथम पत्नी वांझ असतांना बहुपत्नीत्व.

|| विधवा अपत्यहीन असल्यास विधवाविवाह.

§ काडीमोड केलेल्या स्त्रीस प्रथमपतीच्या ह्यातींत विवाह करितां येत नाहीं.

\+ ब्रम्हचाऱ्यास विधवेशीं विवाह करितां येत नाहीं.

× विधवेनें मृतपतीच्या भावाशींच विवाह केला पाहिजे.

$ कनिष्ठ जातीच्या पुरुषाशीं व्यभिचार केला तरच काडीमोड.

¶ प्रथमपत्नीच्या अनुमोदनानें बहुपत्नीत्व.

—जाति

जातीचें नांव.	लोकसंख्या.	प्रांत.	मूळ प्रांत.	मुळ कोण?
अगास	२५२२६	द. महाराष्ट्र	द. हिंदुस्थान	
अगेर	२४०७	कर्नाटक		द्रविडी
अग्री : शुद्ध	२१११७६	ठाणें, कुलाबा, जंजिरा		कोळी: विल्सन व मॅकिन्टॉश
––दास अग्री व उरप अग्री	यांच्या चा	ली वरीलप्रमाणेंच आ	हेत.	
अतार	३४९	धारवाड, सातारा.		
अत्तेवक्कल		कर्नाटक		
अराधी	४५	खानदेश, पुणें इत्यादि		
अलकारी	३१३	खानदेश, नाशिक इ.	उ. हिंदुस्थान	रजपूत
अलितकार	१३६	खानदेश, पुणें इ.	नगर (मारवाड)	मारवाडी
अहिर	१०४८९४	खानदेश, कच्छ इ.	उ. हिंदुस्थान	नाग
इल्गार		विजापूर, बेळगांव		
उप्पार	२९३५१	विजापूर, बेळगांव	म्हैसूर	
ओड	९४०९६	मुंबई इलाखा	माळवा	क्षत्रिय
ओतारी	१२९०	महाराष्ट्र व कोंकण		
कच्छी	३८५	पुणें, रेवाकांठ, बेळ. इ.	उत्तर हिंदुस्थान.	

परिचय—

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नित्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
२	बाल	होय	होय	होय लि. §	होय	धोबी	मांस	
०	बाल	होय	हो.+	हो. §	नाहीं	मीठ करणें वगैरे	मांस	
२	दोन्ही	हो	हो	हो	हो	मुख्य शेती; मीठकरणें इ.	मांस	
						सुगंधी		
						मजुरी	मांस	
					दे. ब्रा.	भिक्षा		
२	दोन्ही	हो	हो	हो	हो	नोकरी व मजूरी	मांस	
०		हो	हो +	नाहीं	होय	कातडें कमावणें, शेती	मांस	
५	दोन्ही	हो.	हो.	नाहीं	होय	सुतार व शेतकरी	मांस	हो.
३?					हो	ताडी काढणें	मांस	
३	हो	हो	हो +	हो	हो	गवंडी	मांस	
४		होय	हो. + कांहीं	होय	होय	जमिनी खणणें, दगड फोडणें.	मांस	
	बाल	होय	हो.+	होय	होय दे. ब्रा.	ओतकाम	मांस	
४	बाल	होय	हो.+	होय	होय	फळें विकणें	मांस	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
कच्छिया	१७३२०	गुजराथ द. संस्थानें	उ. हिंदुस्थान	कणबी व कोळी शेतकरी.
कणबी (गुजराथी शेतकरी)	९२४९२१	गुजराथ		गुजर
कंजारी		पुणें, सातारा, बेळगांव		
कव्वलीगार	७५७५३	कर्नाटक		बेल्लारी (मद्रास)
करेववकल		कारवार, होनावर, अंकोला इ.		
कलावंत	२०१२	कारवार, रत्नागिरी	विजयानगर.	
कसबीण	१४४(?)	ठाणें, रत्नागिरी		
कसाई (खाटिक)	८८६०	मुंबई इलाखा		
कहार	११८२	महाराष्ट्र, सुरत, सिंध इ.	बुंदेलखंड	
कांचगार	१९८	कारवार	गोवा	
काचारी (कासार)	३९५	पुणें, सातारा इ.		
काटारी	३०२ (मुस. काटारी)	काठेवाड, गुजराथ		
काट्टै (परदेशी चांभार)	१३४(?)	अहमदनगर, नाशिक, पुणें इ.		
काठी	२१६०१	जेतपूर, काठेवाडच्या आसपास.	अशियामायनर	
कातकरी	७५७१०	पश्चिमघाट		भिल्ल
कापडी	९०९			
कामळी	११५६	ठाणें	काठेवाड	कांब रजपूरत
कामाठी	४७९०	मुंबई, कर्नाटक इ.	हैद्रा. (द.) मद्रास	
कायस्थ	२२४६	गुजराथ		

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नित्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
६	बाल	हो	हो	हो	हो	भाजीपाला पिकविणें व विकणें	शा.	
७	बाल.	हो	हो	हो	हो	शेती	शा.	
२	दोन्ही		हो	ना.		भिक्षा, चोरी	मां.	
१५	दोन्ही	हो	हो	हो		विणणें, चुना करणें कच्छमारी	मां.	
		हो	हो			शेती	मां.	
६					हो	नाचणें, गाणें	मां.	
						वेश्यावृत्ति		
		हो			हो	मांस विकणें जनावरें कापणें	मां.	
०	बाल	हो	हो	हो	उत्तर हिंदु ब्राह्मण	मच्छीमार	मां.	
	बाल		ना.		हरीक ब्रा.	तांबे–पितळेचीं भांडीं बनविणें		
२						बांगडया विकणें	शा.	
						लाकडांतील कोरीव काम		
९	बाल	हो	हो		उत्तर हिंदु ब्राम्हण	जोडे, खोगीर तयार करणें	मां.	
	प्रौढ	हो	हो	हो	मोध ब्राह्मण	जमिनदारी, नोकरी	मां.	
५			हो	हो		लहान चोऱ्या करणें शेतांत मजूरी भिक्षा मागणें	मां.	
			हो		गुजराथी ब्रा.	शेती करणें, ताडी काढणें मजुरी करणें	मां.	
१२ गु. ३	बाल	हो	ना.	ना.		कारकुनी करणें	शा.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
कालै	२६१९	मुंबई इलाखा	उत्तर हिंदु.	कालवार
कांसार	१५५५४	गुजराथ काठेवाड. कच्छ	पावागड	
किराड	१५२	पुणें	संयुक्त प्रांत	
किलीकेट	९००सुमारें			
कुंचीवक्कल	९६७	धारवाड	हैस्सूर, मद्रास	द्रवीड
कुडावक्कल	२१२०९	दक्षिण महाराष्ट्र	कुर्ग	
कुणबी (मराठा)	२० लक्षावर एकं. कुणबी	मुंबई इलाखा		
कुणबी काळे		खानापूर		
कुणबी : कोंकणी		रत्नागिरी, कुलाबा		
कुणबी खानदेश		खानदेश		
कुणबी तान्हेर		ठाणें	चाली	मराठा कुणब्या· प्रमाणें
कुंभार कानडा		कारवार		
कुंभार (मराठा)	२३९२६५ एकं. कुंभार	मुंबई इलाखा		
कुंभार कोंकणी				मराठा
कुंभार गुजराथी				
कुंभार परदेशी				
कुमारपैक	९११०	(कारवार फक्त)	कुलबर्गा	
कुरुब	२२६३७०	कर्नाटक व कारवार		
कुळामा	३७	बेळगांव	चाली	

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढकीं बाळ?	बहुपत्नित्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाका?	अभिसरण
						दारू काढणें व विकणें		
४			ना.	ना.	श्रीमाळी ब्रा.	तांबे–पितळेची भांडीं बनविणें	शा.	
						किरकोळ व्यापार		
	दोन्ही	हो	हो		नाहीं	भटकत भिक्षा मागणें	मां.	
	दोन्ही	ना.	ना.	हो§	हो	म्हशी बाळगणें व विकणें	मां.	
२	बाल	हो	ना.	ना.	हो	शेतकी	शा.	
	बाल	हो	हो	हो	हो	शेतकी	मां.	
	दो.		हो	ना			मां.	
	दो.		हो	ना ?	हो.		मां.	
सु. ६							मां.	
	बाल	हो	हो		हविक ब्राह्मण		मां.	
२३	बाल	हो	हो +				मां.	
			हो+	हो	हो	मातीचीं भांडीं व कौलें करणें	मां.	
७	दो.	हो	हो	बहु § हो			शा. (?)	
अनेक	दो.	हो	हो	ना.	हो (कनोजा)		मां.	
	बाल	हो†	हो	ना.			मां.	
						शेतकी,गाड्या हांकणें		
२	दोन्ही	हो	हो	हो$ कार.			मां.	
कुण	ब्यां	प्रमाणें			हो	मेंढ्या पाळणें लोंकर विणणें शेतीं	मां.	
						शेतकी		

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण?
कैकाडी	७५९५	महाराष्ट्र व कर्नाटक	तेलंगण	
कोंकणा	७२६७८	सुरत, धरमपूर इ.	कोंकण	
कोटेगार	१२४	कारवार, बेळगांव		
कोट्टे वक्कल	२००० वर	सह्याद्री, कारवार	चाली हळवक्की	वक्कलां
कोरव	१९३६४	बेळगांव, धारवाड		
कोलघा	५८४९	सुरतेच्या जवळ		
कोळी (गुजराथ)	१७१४१०७ एकंदर	नक्की कांहींच	माहिती	नाहीं
कोळी ढोर		उत्तर कोंकण		
कोळी महादेव		सह्याद्रि		
कोळी मल्हार		महाराष्ट्र		चाली महादेव कोळ्यां प्रमाणें
कोळी सोन		उत्तर कोंकण		
कोल्हाटी	४६११	कारवार, कुलाबा, ठाणें इ.		
खत्री (मराठा)	३८५७४ एकंदर	मुंबई इ.		क्षत्रिय
खराडी		काठेवाड		
खवा	२५२१७	गुजराथ काठेवाड कच्छ इ.		जयपूर मारवाड वगैरे राजवंश
खान्त	१३४२३	गीरगांवें (जनागड सं. काठेवाड)		भटीरजपूत
खारक	५८९७	काठेवाड, अहमदाबाद	गरियाधर	वैश्य
खारवा (खारवी)	३६०३६	समुद्रकांठ मुंबई इ.		
खालपा	९५७०	भडोच, सुरत, ग्वाकाठ		
खेत्री (च्छेत्री, मुस्तिगार	१५३९०	बेळगांव, विजापूर		
खोजा	५२३६७ [१९११सा]			

बेटोबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
९	दोन्ही	हो	हो	हो	हो	बुरडाचा धंदा चोऱ्या त्यादि	मां.	
	प्रौढ	हो	हो		ना.	मजुरी व शेती		
	बा.	हो	हो			मृतास पुरणें, रस्ते झाडणें	मां.	
	प्रमाणें.	हो	हो ¶			मजुरी		
७	दोन्हीं	हो	हो	ना.		शिकार,चोऱ्या,भविष्य सांगणें गाणें व.	मां.	
		हो	हो		ना.	लांकडें तोडणें,नोकरी इत्यादि		
					ना.			
	बाल	हो	हो	हो	अलीकडे ना.		मां.	
	प्रौ.		हो	हो		मासेमार	मां.	
९	दोन्हीं	हो	हो+	ना.		भीक मागणें, वेश्यावृत्ति करणें	मां.	
पुष्क.	बाल	होय	होय	होय	होय	विणणें	मां.	
				ना		लांकडी नक्षीकाम		
	दोन्ही	होय	हो.+	होय		शेती मजुरी खाजगी नोकरी	मां.	
	प्रौढ	हो	हो.×	होय		शेती व शतावरमजुरी	मां.	
०	बाल	होय	होय	हो	अवदिच व नालावडी ब्राम्हण	शेती करणें	शा.	
८	दोन्ही	होय¶	होय	होय	होय	खलाशी, मीठ करणें बांबूकौलें वबांबूकाम	मां.	
६	बाल	हो	हो	हो	गारुड, कलातिया ब्राम्हण	कातडे कमावणें व जोडे करणें	मां.	
२	दोन्ही	हो	हो		दे. ओस्थम ब्रा.	शेती करणें गाडी हाकणें	मां.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण ?
गवळी	४६२९०	महाराष्ट्र कर्नाटक		
गवंडी कानडी				
गवंडी गुजराथी		गुजराथ व पुणें	चाली	गुजराथेंतील
गवंडी जिरे		पंढरपूर, सोलापूर		मराठी कुणबी
गवंडी (मराठा)	२२१०५ एकंदर	मुंबई इलाखा		
गवंडी मुसलमान		गुजराथ, खानदेश		हिंदू (हे हिंदू सण
गवंडी सागर		सोलापूर	(चाली कुण	ब्यांप्रमाणें)
गाणिग	२५०२	कर्नाटक, कारवार		
गाद्री	१३३७	अहमदाबाद,भडोच इ.		
गांध्रप	९९	दक्षिण गुजराथ		
गांधारिया	४६८	भडोच,सुरत,बडोदा.		
गाबित	२४२३३	रत्नागिरी,कारवार इ.	गोवें	खार्वी
गामवक्कल-गामगौडा	१२४०१	कारवार जिल्हा		
गारुडी (मोदीकार, मदारी)	२५४८	गुजराथ महाराष्ट्र, कारवार		
गावडा	सु.१२३७०	रत्नागिरी,कारवार इ.		
गुडीगार	३५९	कारवार जिल्हा		
गुरव (शैव)	१०८८८७ एकंदर	मुंबई इलाखा (गुजरा. खेरीज)		
गुरव कडू		चाली कुणब्यां	प्रमाणें	
गुरव कोंकणी		चाली कोंकणी	मराठ्याप्रमाणें	
गुरव लिंगायत				
गुरव जैन		चाली सामान्यतः	ब्राह्मणांप्रमाणें	
गोंगडीकार	६९	कारवार	म्हैसूर	

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
१७	बाल	हो	हो +लिं.	होलिं फक्त	हो	दूधविकणें शेती,मजु.	मां. (शा. लिं)	
	बाल	हो	हो		हो		मां.	
इतर	का रा	गी र	जातीं	प्र मा	णें		मां.	
२		हो	हो		देशस्थ ब्राह्मण		मां.	
५ एकं		हो मरा.	हो मरा.		हो मराठा	दगड-मातीकाम घरें बांधणें.	मां.	
पा	ळतात	व	हिंदू	देवना	भजतात)			
२	बाल				देशस्थ ब्रा.		मां.	
९			हो	हो	हवीक ब्रा. (कारवार)	तेल तयार करणें	मां. वैष्णवेतर	
०	प्रौढ	हो	हो	हो	हो शेळचा	पाळणें शेती, मजुरी.	शा.	
चा	ली ब्रा	ह्मणांप्र	माणें			वाद्यें वाजविणें	मां	
	बाल	हो	हो	हो	सारस्वत ब्रा.	कौलें बनविणें,दोर करणें	मां.	
०	दोन्ही	हो	हो	हो	चित्पा.कऱ्हाडा.	खलाशी,मच्छीमारी इ	मां.	
	बाल	हो	हो+	हो§		लांकडें तोडणें. शेती मजुरी	मां.	
		हो	हो		हो	जादू,भिक्षा,साप-खेळ		
०	बाल	हो	हो+	हो	चित्पा.कऱ्हा.ब्रा.	शेती व मीठ करणें	मां.	
	बाल	हो	ना	हो	हवीक ब्रा.	रंगविणें,कोरीव काम	मां.	
	बाल	हो†	हो‖	हो	हो	गुरवाचा,फुलें विकणें.	शा.	
					हो	सनई वाजविणें गुरव इ.	मां.	
३	बाल	हो		हो	नाहीं	गुरवाखेरीज ज्योतिष शेती.	शा.	
							शा.	
						शेती		

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण?
गोंड	५४२	सुरत, नाशिक	संयुक्त प्रांत	
गोंधळी	११६८२	गुज.खेरीज सर्व मुंबई इलाखा		
गोपाळ	३५०४	खानदेश, नाशिक		
(गोला राणा)	१६१६७	गुजराथ, काठेवाड		
गोळ (गोल)	७२१४सु.	धारवाड,विजापूर रत्नागिरी		
घाडशी	१६६१	महाराष्ट्र		
घाडी	१५९२	कारवार जिल्हा		
घांची	३५८२८	गुजराथ		
घिसाडी	३२५५	महाराष्ट्र,कर्नाटक		
चामथा	१९०	काठेवाड		
चांभार	१६१३२१	महाराष्ट्र, कर्नाटक		
चारण	३२८५२	गुजराथ.कच्छ,सिंध, काठेवाड		
चित्रकाठी	७५७	नाशिक जिल्हा		
चोध्र	३०९७२	सुरतप्रांत,अहमदाबाद		
छप्परबंद	१०३	पुणें , सातारा		
जाट	२२३०	मुंबई,महाराष्ट्र,गुज.	पंजाब	
जिनगार	३०७७	महाराष्ट्र,खानदेश इ.		क्षत्रिय (?)
जैन	५३६११६	गुज. कर्ना.महाराष्ट्र		
जोगतीण	२३	पुणें, सातारा	एक धर्मपंथ;	सर्व जातीचे
जोगी	१०९७४	मुंबई इलाखा		
जोशी (बुंडबुडकी)	३४७१६	महाराष्ट्र,कर्नाटक इ.		

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
८	बाल	हो	हो	हो	हो	गोंधळ,नाच करणें भिक्षा	मां.	
४	प्रौढ	हो	हो	हो	देशस्थ ब्रा.	कसरत, डोंबारी खळ व गाई पाळणें	मां.	
	बाल	हो	हो	ना.	हो		मां.	
६	दोन्ही	हो	हो	हो	हो	औषधें विकणें, नारू काढणें तुंबडी, भिक्षा	मां.	
२	बाल	हो	हो+	हो	हो	गाणें बजावणें वाजंत्री	मां.	
०	बाल	हो	हो+	ना.	हवीग जोशीब्रा.	शेती व मजुरी करणें	मां.	
९	बाल	हो	हो	हो	हो	तेल काढणें भाजीफळें धान्यें इ. विकणें	मां.	
०	दोन्ही	हो	हो+	ना.	हो	लोखंडी वस्तू नाल, धावा करणें	मां.	
			हो			नाचणें, जातीं तयार करणें		
६ म.	बाल	हो†	हो	हो	हो	कातडें कमा.रंगविणें	मां.	
२का.	,,	हो	हो+	हो		व त्याच्या वस्तू बन.		
	दोन्ही	हो¶	दोन्ही	दोन्ही	हो	वंशवृक्षठेवणें,पोवाडे सावकारी, चराई.	मां.	
०	दोन्ही	हो	हो+	हो	हो	चित्रें दाख.त्यांच्याकथा सांगणें, मजुरी	मां.	
९	प्रौढ	हो	हो	हो	ना.	शती करणें, लाकडें कापणें व रोजमजूरी	मां.	
	दोन्ही		हो		उत्तर हिंदु. ब्रा.	शाकारणें व छप्पर क.	मां.	
२	बाल	हो	महा. हो	हो	हो	खोगिरें, लांकडीखेळणी करणें इ.	मां.	
२	बाल		हो			व्यापार,नोकरी,भिक्षा	शा.	
लोक	ते आ	पापल्या पाळता	जाती त	च्या	चालिरीती	भिक्षा		
			हो			भिक्षा,क्वचित् शेती इ		
२	बाल	हो	हो	हो	हो	भटके,भिकारी ज्यो.	मां.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
जोहारी (जव्हेरी)	८४६	खानदेश,पुणें इ.	उत्तर हिंदुस्था.	
झारेकरी	३४	महाराष्ट्र, गुजराथ		
ठाकर		रत्नागिरी,सावंतवाडी		
ठाकूर	१२२०१९	ठाणें,कुलाबा,नाशिक		रजपूत कांहीं अंशीं
ढोर	१९०८९	खानदेश,सातारा कोल्हापूर		
तकारी (वाघरी)	६५२	खानदेश,नाशिक, सोलापूर, अह.नगर,	तेलंगण कर्नाटक	
तांबट	२२७५५	महाराष्ट्र, कोंकण		
तांबोळी	३८०७	खानदेश, सातारा इ.		
तारु	१२८८	अहमदनगर,नाशिक		मराठे
तिगळा	११४४	बेळगांव,धारवाड इ.	म्हैसूर	
तिरमाळी	२१२६	खानदेश, नाशिक, सोलापूर		तेलगू
तिरगार	१४१७	खेडा, पंचमहाल रेवा इ.		
तुरी	३१९५	खेडा,पालनपूर काठेवाड		
तेली	९०१६०	महाराष्ट्र, कोंकण		मराठा
थोरी	३२८	पंचमहाल, रेवा		अंशतः रजपूत
दर्जी	७३०८३	कच्छ, काठेवाड इ.		रजपूत, क्षत्रिय
दुबळा	१००७७५	भडोच,सुरत, ठाणें इ.		
देपाल	६०३	कच्छ, काठेवाड इ.		
देवांग(हाटकारसाळी)	२४४४५	मुंबई इलाखा		
धनगर (गावडा)	४६७६२२	महाराष्ट्र		
भेड	२७१५९७	गुजराथ		
				मूळचे रहिवासी

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
३	दोन्ही	हो	हो	हो	कनो. देशस्थ ब्रा	जवाहिऱ्याचा, भिक्षा	मां.	
	दोन्ही	हो	हो	हो	हो	सोनाराच्या राखेंतून सोनें चांदी काढणें देवळापुढें खेळ, भिक्षा	मां.	
२	प्रौढ.	हो	हो	हो	हो	शेती	मां.	
८	दो.	हो	हो	हो	हो	कातडी काम, मजुरी	मां.	
२	दोन्ही		हो	हो	हो	जात्याचे दगड फोडणें	मां.	
		हो	हो+	ना.	हो	बहुतेक तांबट; क्वचि कारकून, वकील वगैरे	मां.	
३	दोन्ही	हो	हो	हो	हो	पानतंबाखू विकणें	मां.	
०	बाल	हो	हो+	हो	हो	नाविकाचा, मजुरी	मां.	
	दोन्ही	हो	हो+	हो	हो	शेती व बागाईत	मां.	
	बाल	हो	हो		तेलंग, देशस्थ ब्रा	भिक्षा, जानवी करणें	मां.	
	बाल	हो	हो	हो	ना.	शेतांत मजुरी	मां.	
	बाल		हो	हो	ना.	शेतकाम वगैरे	मां.	
१४	बाल	हो	हो	हो	हो	तेलीपणा शेती इ.	मां.	
	प्रौढ		हो	सातारा	ना.	बाजा तयार करणें		
८	बाल	हो	हो	हो	औदिच, व मोद ब्रा.	शिंपी	शा.	
	दोन्ही		हो	हो	हो	शेती व मजुरी	मां.	
०	बाल	हो	हो+	ना.	सारस्वत ब्रा.	घरगुती नोकर, दुकानदार पाथरवट		
३३	दोन्ही	हो	हो	हो	देशस्थ ब्रा.	विणकरी	मां.	
२३	बाल	हो†	हो	हो	हो	धनगराचा, घोंगड्या करणें	मां.	
१३	बाल			हो	ना	झाडणें, नोकरी इ.	मां.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
धोदिया	९४३८१	सुरत, ठाणें इ.		
धोबी	५६१२१	गुजराथ संस्थाने इ.		
नंदीवाले	२१८	पुणें सातारा इ.		
नाईकडा	५९१६१	सुरत, रेवाकाठा		कोळी
नाट	५८४	मारवाड		
नाडोर	६००५	कारवार		
नायर	६५	कारवार	मद्रास	
निलारी (रंगारी)	१६१५१	महाराष्ट्र, खानदेश		
न्हावी (मराठा)	२२४७६१ एकंदर	मुंबई इलाखा		मराठा? (सव
न्हावी कानडी				
न्हावी कोंकणी		चाली भंडाऱ्याप्रमाणें (सामान्यत:)		
न्हावी खानदेशी		चाली खानदेशांतील	समान दर्जाच्या	(२) इतर
न्हावी गुजराथी		चाली कुणब्यां	प्रमाणें	
पगी	१२७	कारवार	गोवा	खारवी
पटवेकरी	६१६४	धारवाड, (विशेष) महाराष्ट्र		
पठाण	१७०५३२	मुंबई इलाखा	चाली अफगाण	सामान्यत:
पडती	३५१०	कारवार, कुमठा, शिरशी इ.	गोवा	
पडियार	३०२	कारवार		
पढारिया		अहमदाबाद तालुका		
परदेशी	मुख्यत:संयु	क्त प्रांतांतील	लोक; उत्तरेक	डून इकडे आले
परीट (मराठा)	१४९६२ एकंदर	महाराष्ट्र, कोंकण		मराठे

बेटीबंद पोटजाती	कन्या विवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय !	धंदा	आहार मांस कीं, शाक ?	अभिसरण
०	दोन्ही	हो	हो	हो	ना.	मजुरी, शेती करणें	मां.	
०	बाल	हो	हो	हो	हो	कपडे धुणें	मां.	
						भिक्षा.		
०	प्रौढ	हो	हो	हो	ना.	लांकूडतोडे व मजूर	मां.	
			हो			कसरत करणें.		
२	बाल	हो	हो+	हो§	हविग ब्रा.	शेतकाम	मां.	
						शेतकरी		
२	बाल	हो	हो	हो	देशस्थ ब्राह्मण	रंग देणें विणणें	मां	
चाली	म रा	ठ्या	प्र मा	णें)		हजामत,नखें कापणें	मां.	
	बाल	हो	हो	ना.	हविग ब्रा.		मां.	
जा	ती प्र	मा	णें					
५			हो	हो	हो			
	बाल	हो	हो		कर्नाटक ब्रा.	नाविक शेती, ई	मां.	
			हो			दागिने पटवणें,विणणें	मां	
मु स	ल मा	ना	प्र मा	णें.		व्याजबट्टा, सैनिक इ.	मां.	
२	बाल	हो	हो+	ना.	हो	मीठ करणें, मजुरी	मां.	
						मुख्यतः वेश्यावृत्ति	मां.	
			हो			गवत कापणें	मां.	
त्यां	च्या अनौ	र	स	संत	तीसही परदेशी	म्हणतात. कच्छी		
२	बाल		हो+	हो	हो	न्हावी वगैरेंचा पोट-विभाग कपडे धुणें	मां.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
पवया (हिजडे)	१३८	अहमदाबाद, कच्छ इ.		
पांचकळशी	मु. ८०००	मुंबई, अलिबाग तालुका		क्षत्रिय
पांचाल (आचारी)	६०४८९	कर्नाटक वगैरे		
पात्रडाव		धारवाड-कानडी	नर्तकी व वेश्या.	चाली व धर्म कला
पाथरवट	१९४९	महाराष्ट्र, कर्नाटक		
पारधी (शिकारी)	१२२१४	खानदेश, कच्छ, विजापूर		वेगवेगळया जातीं तून आलेले
पांगुळ	५१०	खानदेश नाशिक इ.	चाली मराठा	कुणब्याप्रमाणें
पिंजारी (हिंदू)	२३६५१ एकंदर	खानदेश		
पिल्ले	१५३	बेळगांव, धारवाड	तामिळ प्रांतां	तील वेल्हाळांत
पेंढारी (हिंदू)	३३४७ एकंदर	नाशिक, खानदेश		
पोमल	१३१	भडोच, सुरत इ.		
प्रभु (परभू चां. कायस्थ)	२६०६० एकंदर			क्षत्रिय
प्रभू ध्रव		पुणें शहर चाली	पाठारे प्रभू	जातीप्रमाणें
प्रभू पाठारे				क्षत्रिय
फुडगी	१०३५	माहीम, वसई ता.		जिप्सी (युरोप)
बन्दी	७९२०	कारवार कुमठा इ.	(बहुतेक स्त्रिया	वेश्या असल्या
बाकड	४४२	अंकोला कारवार		
बागडी	१३२४	कोल्हापूर, सातारा		
बाजनिया	६८६९	अहमदाबाद, खेडा-पालनपूर		
बांधारा	१०५३	गुजराथ, कच्छ		

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
						भिक्षा	मां.	
	बाल	हो	हो	ना.		कारकुनी इतर नोकऱ्या		
	बाल		ना.	ना.	हो		शा.	
	वंताप्र	माणें				वेश्यावृत्ति व नृत्य- वगैरे		
	बाल	हो	हो			पाथरवटाचा	मां.	
६	दोन्ही	हो	हो	हो	हो	पक्षी जनावरें पकडणें, मारणें व चोऱ्या.	मां.	
						भटके, भिकारी		
	दोन्ही	हो	हो	ना.	हो	पिंजणें, मजुरी, शेती	मां.	
पिल्ले	ही	पदवी		आहे				
	प्रौढ	हो	हो+	हो	हो	लहानसहान धंदे, मजुरी बुरुडकाम	मां	
	बाल	हो	हो	ना.	हो	कारकुनी वगैरे	गां.	
					देशस्थ ब्राह्मण			
	प्रौढ		ना.	ना.	हो	बहुतेक कारकून इ.	गां.	
२	प्रौढ	हो	हो		हो (पळशीकर ब्रा.)	गुरें राखणें शेती इ.	गां.	
मुळें	लग्नें	फार	थो	डी)	कर्ना. ब्रा.	वेश्यावृत्ति, नोकरी	मां.	खालून वर
७	बाल	हो	हो	हो	हविक ब्राह्मण	शेतकी इ.	गां.	
०	दोन्ही	हो	हो	हो	हो	मच्छीमार, घोंगडया विणणें, भिक्षा	ा.	
२	दोन्ही	ना.	हो	हो		बजावणें, नाचणें इ.	गां.	
०	बाल	हो	हो	ना.	हो	रंग देणें,तंबाखू विकणें	शा.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
बावरिया	५०३१	काठेवाड		
बारी (पानवाले)	६६९६(?)	खानदेश, ठाणें इ		
बालसंतोषी	३६	चाली कुणब्याप्रमाणें		
बावचा	९०६	खेडा, काठेवाड इ.		
बुट्टाल	६७	कारवार (फक्त)		
बुरुड (मराठा)	१९०५५	मुंबई इलाखा		
बेने इस्रायल	एकंदर १०८६४	मुंबई, कुलाबा, ठाणें		
बेरड	१७७०८२	बेळगांव, धारवाड इ.		
बोगार (कासार)	(यांची	संख्या बहुतेक कासा	रांत समाविष्ट	आहे. हे जैन
बोहरा	११८३०७	सुरत, मुंबई इ.		
ब्रह्मक्षत्री	३३०७	भडोच, कच्छ इ.	पंजाब	ब्राह्मण
ब्राह्मण	१०५२९७८	मुंबई इलाखा		
ब्राह्मण अभीर		खानदेश, राजपुताना इ		रजपूत
ब्राह्मण हुसेनी		अहमदनगर	अर्धवट मुसल	मान झालेले
ब्राह्मण कऱ्हाडा	३२४२६	सातारा, पुणें, कुलाबा	कऱ्हाड (सातारा)	
ब्राह्मण काण्व		पुणें, कोल्हापूर	शुक्ल यजुर्वेदी	शाखेचे आहेत
ब्राह्मण कास्त	३५(?)	पुणें, नाशिक इ.		
ब्राह्मण क्रमवंत (किरवंत)	१६२	कुलाबा, रत्नागिरी		
ब्राह्मण खिस्ती		अहमदनगर, पैठण	चाली देशस्थ	ब्राह्मणांप्रमाणें
ब्राह्मण (गुजराथी)	१५० वर	पोटजाती (बेटी	बंद) असून त्यांचे	आचार सामा

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नित्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
	बाल	हो	हो	हो	झंखाराब्रा. (?)	जमिनदारी	मां.	
३	बाल	हो	हो	हो		पानें विकणें मजुरी	मां.	
						भटके भिकारी		
	बाल	हो	हो	हो		मोतद्दारी, गवत कापणें	मां.	
	बाल	हो	हो		ना.	टोपल्या करणें, मजुरी	मां.	
२	बाल	हो	हो	हो	हो	बुरडकाम	मां.	
२	प्रौढ	हो		हो कमी		शेती, सुतारकी	मां.	
६	बाल	हो	हो	हो	हो	चोऱ्या, शेती इ.	मां.	
असू	न त्या	प्र मा	णें	त्यां	च्या चा ली आहेत.	बांगड्या विकणें इ.		
६			ना.	ना.	सारस्वत ब्रा.	कारकुनी नोकरी वकिली इ.	मां.	
						अहिरांचे भटजी		
ब्रा	ह्म ण					भिक्षा मागणें इ.		
	दोन्ही	हो	ना.	ना.	हो	भटजी, शेतकी, वकील	शा.	
					हो	बडवे, भटजी इ.	शा.	
					हो	शेती, नोकरी इ.	शा.	
					हो	शेती, सावकारी, भटकी	शा.	
						मुख्यतः सावकारी	शा.	
न्यतः	दक्षिणी	ब्रा	ह्म	णां	प्रमाणें आहेत.		शा.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण
ब्रा. गोवर्धन	५४१७	खान्देश,ठाणें,सातारा		देशस्थ
ब्राह्मण चित्पावन	११३६०५	महाराष्ट्र	रत्नागिरी	
ब्राह्मण जावळे	१३२४	रत्नागिरी	इतर चाली	चित्पावनां
ब्रा. तिरगुळ (त्रिगर्थ)	१९०५	पुणें, सोलापूर	चाली देशस्था	प्रमाणें
ब्राह्मण देशस्थ	१५५३०५	महाराष्ट्र, कर्नाटक		
ब्राह्मण देवरुखा	९०४७	कुलाबा, रत्नागिरी	देवरुख (संगमे.)	चाली देशस्थां
ब्राह्मण पळशीकर	४७८	ठाणें	पळसावली कल्याण	
ब्राह्मण सहवासी		सातारा,कोल्हापूर मिरज	चाली वैष्णव	देशस्थांप्रमाणें
ब्रा.सारस्वत-शेणवी	७६४२२	रत्नागिरी,कारवार इ		
भडभुंजा	१७५२	गुजराथ, महाराष्ट्र	उत्तर हिंदुस्थान	कायस्थ
भराडी	४३५३	पुणें,नगर,ठाणें,खानदे		
भर्थरी (नाथ)	५४६	गुजराथ, पालनपूर		
भर्वाड (गाडरिया)	९५८३२	गुजराथ	मेवाड	
भवाइया	५६१७	उत्तर गुजराथ		
भाट	३१८८२	गुजराथ, महाराष्ट्र		
भाटिया	२८३३२	कच्छ,काठेवाड, मुंबई	लाहोर, मुलतान	
भामटा (उचलिया, धंटी चोर)	२८८६	पुणें,खानदेश,बेळगांव		
भावसार	३०७६१	गुजराथ,पुणें,कर्नाटक	मुंगीपैठण (मराठा)	गुजर
भावीण (देवळी नाईक–नायकिण	१२९७९	रत्नागिरी, कारवार		मराठा,भंडारी
भिल्ल	५५९९३०	गुजराथ, खानदेश	अबू वअशीरगड	डोंगराळ प्रांत
भिस्ती (पखाली)	२३१२	गुजराथ,संस्थानें		
भोई	५७९०४	मुंबई इलाखा		

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
		हो	हो	ना	हो	शेती,सावकारी	शा.	
	दोन्ही प्रमाणें	हो	ना.	ना.	हो	वकील,डॉक्टर,भटजी बँकर इ.	शा.	
						शेती, पाणके इ.		
						शेती, सावकारी	शा.	
२	दोन्ही प्रमाणें	हो	ना.	ना.	हो	कोंकणस्थाप्रमाणेंच	शा.	
						शेती व नोकरी इ.	शा.	
		हो	ना.	ना.	हो	वैद्य, ज्योतिष, इ.	शा.	
						भटजी, वकील इ.	शा.	
१३	दोन्ही	हो	ना.	ना.	हो	जमीनदार,वकील इ.	मासे	
३	बाल	हो	हो	ना.	हो	धान्य चणे भाजणें व विकणें	मां.	
३	दोन्ही	हो	हो	हो	हो	भिक्षा मागणें,गोंधळी	मां.	
०	बाल	हो	हो	हो	हो	भिक्षा मागणें,सारंगीवाले	शा.	
			हो×	हो		शेळ्यामेंढ्या,जनावरें पाळणें,दूध,लोंकर वि.	दोन्ही	
२			हो	हो	औदिच ब्रा.	नाटक करणें. मजुरी	शा.	
१३गु ३ म.	बाल	हो	हो	हो	हो	भिक्षा मागणें, शेती व	मां.	वरून खालीं
२	बाल	हो	ना.	ना.	पोकर्ण ब्रा.	व्यापार,पेढी चालविणें	शा.	वरून खालीं
	बाल	हो	हो	हो	ना.	चोरी, सावकारी जमिनदारी करणें	मां.	
२	बाल	हो	हो+	ना.	हो	रंगविणें (कापड) छापणें.		
			हो		हो	देवळांतील कामें,शिंग वाजविणें, वेश्यावृत्ति	मां.	
	प्रौढ	हो	हो	हो		शेती, मजुरी व पहारे	मां.	
	बाल	हो	हो	हो	कयातीय ब्रा.	चामड्याच्या पिशवींतून पाणी नेणें	मां.	
३ मरा.	बाल	हो† मराठा	हो‖ मरा.	हो मरा.	देशस्थ ब्राह्मण मराठा	मच्छीमारी,दुकानदारी	मां.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण?
भोपे (भुते)	८०	पुणें,सातारा,रत्नागिरी		मराठा व दे.ब्रा.
भोरपी (बहुरुपी)	६४१	महाराष्ट्र, कर्नाटक अहमदाबाद,सुरत	मराठा कुणबी	लोकांप्रमाणें
भंगी	८१०९४	मुंबई इलाखा	कांहीं सं. प्रांत	
भंडारी (भावगुण)	१६८६६७	मुंबई इलाखा		
भांड	१४९	काठेवाड	मारवाड	
मच्छी (तांडेल)	३७९८७	भडोच, ठाणें सुरत		
मराठा	३६५०५०४?	महाराष्ट्र		क्षत्रिय
महार	९५३२१२	मुं.इ.म.भाषा बो.प्रां.		मूळचे रहिवासी (अतिशूद्र)
महीया	१९४४	सोराठे (काठेवाड)		
मानभाव(महानुभाव)	२२७१६	महाराष्ट्र, वऱ्हाड		
माळी	२९०९७२	महाराष्ट्र, उत्तर गुजराथ		
मुकरी	५०८२	कारवार		
मुदलीयार	८३७	पुणें,बेळगांव,इ.	मद्रास	वेल्हाळ
मुरळ्या व वाघे	२२९(?)	महाराष्ट्र		
मे	६६	कच्छ		
मेघवाल	३३६९७	कच्छ		
मेमन	९७११४	मुख्यतः गुजराथ	इतर चाली	भुसलमानां
मेर	२४१३७	मुख्यतः काठेवाड	(इतर चाली	रजपुतां–
मैराळ	१२३	पुणें (चाली कुणब्यां	प्रमाणें)	
मोगेर	४५०२	होनावर, कुमठा तालुका		

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
म रा	ठा जा	ती प्र	मा णें			भिक्षा		
					हो	जनावरे पाळणें व विकणें व भटके नट	मां.	
६	प्रौढ	हो	हो+	हो	ना.	झाडूकाम, वेताच्या पाट्या करणें	मां.	
८	दोन्ही	हो	हो+	हो	को. दे. कऱ्हाडा कर्नाटक ब्रा.	व्यापार व कंत्राटी कामें, ताडी विकणें.	मां.	
			हो			भिक्षा मागणें		
१०	दोन्ही	हो	हो	हो	ना.	मच्छीमारी करणें खलाशी होड्या भा.देणें	मां.	
	(मूळा	वरून	पहा-	वें).				
५३	दोन्ही	हो	हो	हो	क्वचित् हो	खेडेगांवांतील सरकारी नोकरी व कामें	मां.	
७	बाल	हो	हो	हो		शेती,शेतावर मजूरी करणें	मां.	
						भिक्षा मागणें,मठ स्थापून उत्पन्न मिळ.		
१३		हो	हो	हो	हो	शेती,बागाईत करणें	मां.	
मरा. ०	दोन्ही	हो	हो	हो§	हविग ब्राह्मण	चुना करणें, शेतावर मजुरी.	मां.	
३	(इतर	चा	ली	म रा	टा कुण. प्रमाणें	भिक्षा, वे यावृत्ति		
						शिकार करणें, चटया विणणें		
४	प्रौढ	हो	हो× ३ पो.	हो	मातंग	मृत जनावरांची कातडी लाकड विक्री.	मां.	
	प्रमाणें					व्यापार	मां.	
	प्रमाणें		हो					
						भिक्षा		
३	बाल	हो	हो		गौड सारस्वत	मासेमारी, व्यापार	मां.	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळकोण
मोची	१२८२७२	गुजराथ		
मोमीन (दक्षिणी)	२१५६८	मुंबई इलाखा		कोष्टी, साळी
मांग (माडिग)	एकंदर २५०५७३	महाराष्ट्र, कर्नाटक	मूळचेरहिवासी	
मांगेला (धीवर, मांडेल)	११५३८	ठाणेजिल्हा, भडोच सुरतचे आसपास		
याकलार	१२०	बेळगांव, धारवाड	मद्रास	
रचेवार	९५९	अहमदनगर, खानदेश धारवाड	म्हैसूर	
रजपूत	३८६८९६	गुजराथ, काठेवाड (मुंबई इलाखा)		क्षत्रिय
रड्डी	८२८५८	विजापूर, धारवाड बेळगांव दक्षिण महा	म्हैसूर, मद्रास	हिंदू (नामज)
रबारी	१०८७१५	कच्छ, काठेवाड, गुज.	सिंध, बलु. मार.	रजपूत
राइकरी	७८	भिवंडी तालुका, ठाणें	उत्तर कोंकण	
रामोशी	६०५५५	पुणें, सातारा, नगर		
रावत	३६०	गुज. खेरीज मुंबई इ. अहमदाबाद, काठेवाड	साबळी-इदर सं	ठाकोर, रजपूत
रावळ (रावलीया इ. रौल	३९९१६	गुज. कर्नाटक, महारा. कोंकण		
लमाणी (वंजारी)	१३३३४९	मुंबई इलाखा		रजपूत, मराठा
लाखेरी	३७७	गुजराथेंतील संस्थानें	मारवाड	मारवाडी वाणी
लाड	३१७५	अमदा. पुणें जिल्हा बेळगांव, विजा. धार.		गुजराथी
लाडक		कच्छ, जामनगर सं. काठेवाड	नगर, समोई, सिं.	रजपूत ?
लिगायत	१४२२२९३	बेळ. धार. विजा. द. म.	रहिवासी द. हिं.	द्रवीड
लोढा (लोढी)	१५८५	अहमदाबाद पालनपूर काठेवा.	लुधिआना, बुं. खं	ठाकूर
लोणारी	१९२२२	खानदेश, नाशिक, पुणें सातारा इ.		मराठा
लोहाणा (लवाणा, लुआणा	५६२२६१	सिंध, गुजराथ, कच्छ	मुलतान	लमानी

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
३	बाल	हो¶ +	हो	हो	हो	कातडीकाम, वगैरे	मां.	
(सा	मान्य	तः मुस	लमा	न	चाली	विणणें		
						दोर करणें, विकणें		
२५	दोन्ही	हो	हो	हो	हो	तोडणें,विकणें निरो-ग्या भिक्षा इ.	मां.	
	बाल	हो	हो	ना.	पटशे ब्राह्मण	मच्छीमारी,मजुरी समुद्र काठचे धंदे		
						शेती व बागाईत करणें	मां.	
						नाडे भोरपी, डोंबारी कसरत करणें		
	दोन्ही	हो	ना.		हो	जमीनदार,तालुकेदार व सैन्यांत नोकरीं	मां.	वरून खालीं
७	बाल	हो	हो+	हो	हो	शेती,सावकारी धान्य विकणें	शा.	
६का. १३क	बाल	हो	हो	हो	औदिच सोम्वा. राजगोर ब्रा. ना.	लोंकर व लोणी विक. शेळ्या मेंढ्या पाळणें मच्छीमारी,भाजी-पाला करणें	मां.	
५	बाल	हो	हो+	हो	देशस्थ ब्रा.	पहारेकरी,चोरी क-रणें जमिनदारी,साव	मां.	
			हो	हो	हो	घोडे विकणें,वाढवणें, गाडी हांकणें	मां.	
७गु. ३कर्ना.	दोन्ही		हो	हो		भिक्षा मागणें,भाट पोवाडे करणें, शेती	मां.	
२० म.का	दोन्ही	हो	हो	हो. कांही	कांहीं करतात	वाहतुक करणें जनाव रांचा धंदा, शेती	दो-न्ही	
२	बाल	हो	हो	हो	हो	मजुरी,लाखेच्या बांगड्या	दो.	
७	दोन्ही	हो सूर्यवं.	हो	हो	हो	शेळ्या मारणें,मांस विकणें सुगंधी–सू.ला	मां.	
२	प्रौढ		हो	हो		जमीनदारी, शेतकी		
३	दोन्ही	हो†	हो	हो		शेतकी,सावकारी व्यापार,सर. नोकरी	शा.	
३	बाल	हो	हो	ना.	उत्तर हिंदु. ब्रा.	गाडी हांकणें,शेती करणें, सावकारी	मां.	
	बाल	हो†?	हो+	हो	हो	मीठ,सीमेंट,कोळसा तयार करणें, शेती	मां.	
	बाल गुजराथ	हो	हो+	ना.	गुजराथ सार.ब्रा	हुंडी, व पेढीवाले व्यापारी,धान्यवाले,नोक	शा. गुज	

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळ कोण ?
लोहार	११५६२२	मुंबई इलाखा		
बल्हार	९८५	दक्षिणमराठा संस्थानें पुणें, धारवाड		कुणबी लोकां-प्रमाणें
वाघरी	५९८५६	अहमदाबाद,काठेवाड खेडा, गुजराथ प्रांत	राजपूताना	
वाघेर	२१९८	काठेवाड, नवानगर		
वाडी	७३४	काठेवाड		कोळी
वाणिया (वाणी)	३५२१३८	मुंबई इलाखा		वैश्य
वारळी	१५१६९३	ठाणें,नाशिक,खानदेश सुरत, जव्हार		मूळचे रहिवासी
वासुदेव	५७१	महाराष्ट्र.		
वांझा	३८८४	काठेवाड		
वितोलाण	४१३	सुरत एजन्सी		
वीर	११९	पुणें		
वेल्हाळ	२२	पुणें	मद्रास	
वैटी	२७६६	ठाणें जिल्हा	चौल (कुलाबा)	
वेदू	११०३	पुणें जिल्हा.नाशिक	हैद्राबाद	धनगर ?
शिंपी	७७०२५	महाराष्ट्र, कर्नाटक		
शेरोगार		कारवार जिल्हा	गोवा	कोंकणी मराठा
शेख	९६७८५७	मुंबई इलाखा		
सनगर	७११८	सातारा,सोलापूर, पुणें इ.		
सय्यद		मुंबई इलाखा		
सरवडे	९८९	रत्नागिरी तालुका		
सराणिया		काठेवाड व आसपास		

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय?	धंदा	आहार मांस कीं शाक?	अभिसरण
५	बाल मराठा	हो मराठा	हो म.+	हो	देशस्थ ब्रा.	शेतीचीं हत्यारें दुरुस्ती व तयार करणें मजुरी करणें, वाजंत्री	मां.	
१०	प्रौढ	हो	हो	हो	औदिच ब्रा.	भाजीपाला, फळें विकणें, पिकविणें, म.	मां.	
	प्रौढ	हो	हो	हो	राजगोर ब्रा.	मच्छीमारी करणें नावांडी		
			हो			भटके गारुडी व बुरुड		
४०गु ८ म.	बाल	हो	ना.	ना.	हो	व्यापार करणें	मां.	
४	दोन्ही	हो	हो	हो	ना.	शेती व सरकारी नोकरी (पोलिस इ.)	मां.	
२		हो	हो		देशस्थ ब्रा.	भिक्षा मागणें	मां.	
	बाल	हो	हो	हो	औदिच ब्रा.	विणकाम, सुतारकाम	शा.	
०	दोन्ही	हो	हो	हो	ना.	बुरुडकाम व मजूरी	मां.	
	बाल	हो	हो		हो	भिक्षा मागणें	मां.	
						लिहिणें		
०	दोन्ही	हो	हो+	ना.	पळशीकर ब्रा.	मच्छीमारी करणें खलाशी	मां.	
३	प्रौढ	हो	हो	हो	ना.	वनस्पति व औषधें विकणें?	मां.	
१८	बाल	हो	हो	हो	हो	कपडे शिवणें, कापड विकणें		
	बाल		ना.		हवीक ब्राह्मण	शेती करणें	मां.	
						निरनिराळे धंदे		
०	दोन्ही		हो		हो	घोंगड्या व रग विणणें निरनिराळे धंदे	मां.	
	दोन्ही				दे. ब्रा.	भटकत भिक्षा मागणें	मां.	
			हो×	हो		तरवारी पाजळणें		

जातीचें नांव	लोकसंख्या	प्रांत	मूळ प्रांत	मूळप्रांत
सरोडी दकोजी	३६	कुलाबा	वऱ्हाड	
सलाट	४२२७	गुजराथ ता.व संस्था.		
सहदेव जोशी-		पुणें, अहमदनगर		
सागर	११३०५	काठेवाड,अहमदाबाद	गंगेचे खोरें भिल वाडा	
साठवार	३९५८८	काठेवाड,गुजराथ कच्छ		रजपूत
सातारकर	१०१	कारवार	सातारी-गोवा	कोंकणी कुणबी
सारेकरी	५६	माणगांव,महाड तालुके कुलाबा जि.		
सिद्दी	१२८४८	गुजराथ, कारवार	पूर्व आफ्रिका	
सिंधवा (शेणवा)	२१७०	खेडा ता. पालनपूर		
सुतार	२१११८३	मुंबई इलाखा		मराठा कुणबी
सुदीर (शूद्र)	१६२६	कारवार,येलापूर, हल्ल्याळ	कोल्हापूर	
सुप्पलीग (देवडिग)	७९६	कारवार जिल्हा		देवळांतील नो.
सुलेर		धारवाड जिल्हा		
सोनार	११६४७८	महाराष्ट्र,कर्नाटक कारवार		
सोनी	७९०१६	गुजराथ,काठेवा.कच्छ	वाणी,गुजर, कासार	
हनबार (कृष्णगोळ)	२३९१७	बेळगांव,विजापूर द. महा		
हरकंत्र	६०९२	कारवार जिल्हा		
हळवक्क। वक्कल- (गावडा)	२०ते३० हजार	कारवार जिल्हा	म्हैसूर ?	
हलेपैक	५१९३०	कारवार जिल्हा	विजयानगर	
हल्लेर	२०७९	कारवार जिल्हा	तिरुपाटी-उ.अ.	
हसलार (हुलसवार)	२२७७	सिर्सी व होनावर ता.	शिमोगा म्हैसूर	
हाटी	२२३१	सोराठ (काठेवाड)	जुनागड संस्था.	सिसोदिया रज.
हेलव	१०८८	कर्नाटक,कारवार जि.	कल्याण निजाम	लिंगायत
होलाय (होलार,)	१०६४६५	कर्नाटक,पुणें,सातारा	म्हैसूर	दक्षिण हिं.रानटी

बेटीबंद पोटजाती	कन्याविवाह प्रौढ कीं बाल?	बहुपत्नीत्व	पुनर्विवाह	काडीमोड	ब्राह्मणसंस्कार करतो काय ?	धंदा	आहार मांस कीं शाक ?	अभिसरण
३	बाल		हो	ना.	औदिच व सोम्पार ब्रा.	भविष्य,ज्योतिष सां. दगड कातणें व इतर दगडी काम करणें	शा.	
			हो			भिक्षा मागणें,	मां.	
	बाल	हो	हो	हो	वाज खेडवळ ब्रा.	ज्योतिष वर्तविणें	शा.	
	बाल		हो	हो	औदिच मोध,श्रीमाळी ब्रा.	रोजगारी करणें, शेती दगड कांतणें शेती करणें,विटा पाडणें इ.	मां.	
	बाल	हो	हो		कऱ्हाडा ब्रा.	शेती व मजूरी करणें घरकाम नोकरी कर. मजुरी करणें	मां.	
	प्रौढ		हो		हाविक ब्रा.	शेतावर व इतर मजु.	मां.	
०	बाल	हो	हो	हो	नाहीं	चटया करणें	मां.	
३ म.सु.	बाल	हो	दोन्ही	हो	हो (म. सु.)	सुतारकाम	शा.	
	दोन्ही	हो†	हो	ना.	औदिच व मो.ब्रा हविग,कऱ्हाडे व चित्पावन	शेती व घरगुती नो.	मां.	
२	बाल	हो†	ना.‖	हो§	हाविक ब्राह्मण	वाजंत्री, शेती करणें	मां.	
						वेश्या ..	मां.	
१२	बाल	हो	हो	हो	त्याच जाती.ब्रा	सोन्याचांदीचे दा. क.	मां.	
१२	बाल	हो	हो	हो	औदिच,सार.ब्रा श्रीमाळी ब्रा.	सोन्याचांदीचे दागि.	शा.	
४	बाल	हो	हो	हो	देशस्थ ब्रा.	शेती करणें	मां.	
	बाल	हो	हो+		हवीग कर्ना.ब्रा.	मासे धरणें व विकणें होडया वल्हवणें	मां.	
०	दोन्ही	हो	हो+	हो§	ना.	शेती करणें व मजुरी	मां.	
२	बाल	हो	हो+	हो§	कर्नाटक सवलापूरी ब्रा.	ताडी काढणें, शेती व मजुरी खणणें खाणी	मां.	
०	बाल	हो	हो+	हो	क्वचित कर्ना.ब्रा	वाजंत्री वाजविणें	मां.	आहे
२		हो	हो		ना.	शेतांत व बागाईतींत	मां.	
	बाल	हो	हो	हो	हो	वतनदारी, शेती कर.	मां.	
०	बाल	हो	हो	ना.		भिक्षा मागणें,शेती म.	मां.?	
१७	बाल	हो	हो	हो	ना.	मेलेलीं जनावरें, नेणें	मां.	

पाश्चात्य समाजस्थिति

बरेंवाईट लैंगिक विचारः विवाहसंस्थेची धुळधाण.

२०व्या शतकापर्यंत लैंगिक विषयाविषयीं उघडउघड चर्चा होत नसे. १९ व्या शतकामध्यें या विषयासंबंधीं लोक बोलूं लागले. प्रत्यक्ष भाषा त्यावेळीं बोलली जात नसे.पण मनुष्याच्या शरीराचा अभ्यास तेव्हांपासून सुरू झाला व त्यामुळें लैंगिक विषयाकडे लोक पाहूं लागले. हॅवलॉक एलिस, फ्राइड, बर्ट्रंड रसेल या समाजशास्त्र, मानसशास्त्र व तत्त्वज्ञान वगैरे शास्त्रांत पारंगत अशा लेखकांनीं या विषयाला जोराची चालना दिली. परंतु असलें सर्व लेखन शास्त्र म्हणून लिहिलें गेलें.सामान्य-वाचकाला व समाजांतील सामान्य व्यक्तीला त्या-पासून विशेषसा फायदा झाला नाहीं. त्यासाठीं जे. एफ. मॅक्डर्मट यांनीं निरनिराळ्या लेखकांचे विचार "आजकालचे लैंगिक प्रश्न" (The sex Problem in Modern society) या पुस्तकांत एकत्रित केले आहेत. पाश्चात्य लेख-कांचीं या विषयासंबंधीं मतें आपणांस कळावीत म्हणन त्यांच्या कांहीं लेखांचा सूत्ररूप सारांश या ठिकाणीं दिला आहे.

लैंगिक नीतीची आवश्यकता

कार्ल मार्क्स यांच्या म्हणण्याप्रमाणें समाज हा सर्वस्वी आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतो. समाजाची उभारणी लैंगिक अथवा कौटुं-बिक पायावर झालेली असते असें फ्राइड म्हणतो. पण हीं दोन्हीं मतें एकांगी आहेत. दोघेही आपआ-पल्यापरी बरोबर आहेत. समाजांत या दोन्ही गोष्टींची गुंतागुंत झालेली दिसते. अमुक आधीं व अमुक मागून असें म्हणतां येणार नाहीं. समाजाची लैंगिक नीति तीन गोष्टींनीं नियमित असते. (१) प्रत्यक्ष कायद्यानें. उ. ह. एक–पति–पत्नी-बद्दलचा कायदा. (२) लोक काय म्हणतील ही भीती. (३) व्यक्तीची सारासार बुद्धी. लैंगिक नीतीचा परिणाम प्रथम व्यक्तीवर, नंतर जोडप्यावर, कुटुंबावर, राष्ट्रावर व शेवटीं मानव जातीवर होत असतो. या बाबतींत कालपरत्वें व स्थलपरत्वें निरनिराळे भेद व संस्था आढळ-तात. त्यांचें अवलोकन करून मला असें वाटतें कीं, पूर्वी कांहीं बाबतींत विनाकारण बंधनें होतीं. सध्यांसुद्धां पुष्कळशा सुधारलेल्या राष्ट्रांतून तीं आहेत. आजच्या शास्त्रीय प्रगतीला अनुसरून आपण पूर्वीच्या भ्रामक कल्पना सोडून दिल्या पाहिजेत व नव्या कल्पनांसंबंधीं विचार केला पाहिजे.

बर्ट्रंड रसेल

लैंगिक शिस्त

लैंगिक प्रश्नासंबंधीं अमेरिकेंत सध्यां खळ-बळ माजून राहिली आहे. हा संक्रमण काळ आहे. मानवशास्त्रज्ञ जुन्या माणसांच्या ज्या गोष्टी नव्यानें सांगतात त्यांचाहि हा थोडासा परिणाम आहे. परंतु जुन्या काळीं संपूर्ण लैंगिक स्वातंत्र्य होतें ही समजूत चुकीची आहे. प्रेम व पावित्र्य या गोष्टी फार पुरातन आहेत. लैंगिक संबंध म्हणजे 'पाप' अशी समजूत आपल्याकडे नुकती होती. तिला फार दिवस झाले नाहींत. त्या कल्पने-विरुद्ध आपण बंड करीत आहोंत.पण त्या निशाणा-खालीं आपण वाटेल त्या गोष्टीवर हल्ला चढ-वीत आहोंत. संपूर्ण स्वातंत्र्य प्रेमाला थोडें बाध-कच आहे. सध्यांचे लैंगिक व्यभिचार स्त्रीपुरुषांना जवळ आणण्याऐवजीं दूरच लोटीत आहेत. समानलिंगसंभोग हें याचेंच द्योतक आहे. मनःस्थिति इतकी पालटली आहे कीं, नवराबाय-कोनें एकमेकांकडून शुद्ध आचरणाची अपेक्षा करणें हें पातकच होऊन बसलें आहे. युरोप व अमेरिका यांमध्यें साम्य फक्त वरवर आहे. अमेरिका नव्या मनःस्थितींतील नवे प्रयोग करून पहाण्यांत गुंग आहे. अमेरिका युरोपचा अंध शिष्य कधींच बनणार नाहीं. बऱ्याचशा प्रयोगाअंतीं अमेरिका खास ताळ्यावर येईल.

एडवर्ड सॅपर

नवीन लैंगिक विचार

इतक्या दिवस लैंगिक भावना फार गंभीर व कडक असत. त्याविषयीं भय, शोक, दुःख वगैरे गोष्टी उत्पन्न होऊन माणूस भेदरलेला असे.

आतां ते दिवस गेले. आतां लैंगिक भावना आनंदमय झाल्या आहेत. या क्रांतीचें कारण काय? मनुष्यस्वभावाला तीच तीच गोष्ट कंटाळवाणी वाटते हें एक कारण; व मनुष्य नाविन्यप्रिय आहे हें दुसरें कारण; राजकीय, सामाजिक व लैंगिक फरक जे घडतात ते सर्व ह्याच कारणामुळें. पण ही नवीन लैंगिक भावना स्पष्ट व शहाणपणाची आहे. मनुष्यानें या भावनेचा नसता बागुलबोवा करून ठेवला होता. एक करमणुकीचें साधन यापलीकडे या गोष्टीला कांहीं महत्त्व नाहीं.दिवसानुदिवस या नवीन मताचे अनुयायी वाढत आहेत. मनुष्य विचारशील बनल्यावर ही गोष्ट व्हायचीच आणि पुरुष बदलले कीं, स्त्रिया बदलावयाच्याच.पुरुषाचेंच उदाहरण घ्या. त्यांच्या मेंदूमधून लैंगिक संभोगाची स्मृति किती लवकर नाहींशी होते. तो ती गोष्ट किती लवकर विसरतो.उपभोगलेली स्त्री पुन्हां त्याला नवीनच वाटते. पुरुषाच्या विस्मृतीवर तर स्त्रियांचें पावित्र्य अवलंबून असतें. लैंगिक गोष्टी जर महत्त्वाच्या असत्या तर माणसाच्या मनावर त्यांचा परिणाम इतका पुसट कसा असता? —जार्ज जीन नॅथन

फ्राइड व लैंगिक गोष्टींचें महत्त्व

फ्राइडच्या लैंगिक संशोधनानें व लेखनानें मानसशास्त्राचें एक नवीन दालन खुलें झालें आहे. इतकीं वर्षें लैंगिक गोष्टीसंबंधीं बडया तत्त्वज्ञान्यांनीं, वैद्यांनीं व विचारी लेखकांनीं जगाला अंधःकारांत डांबून ठेवलें होतें. याचें कारण उघड आहे. सत्य हें अपूर्ण, ओबडधोबड अतएव कटु असतें. आणि मनुष्य पूर्ण, रेखीव व गोड गोड गोष्टींसाठीं हपापलेला असतो. म्हणून माणसाला सत्य सांगून टाकण्यापेक्षां त्याला खूष करण्याकडे आजपर्यंतची प्रवृत्ति असे. पण फ्राइडनें मानसशास्त्राला माणसाळविलें. थापेबाजी सोडून देऊन त्यानें प्रथम नग्न सत्य चवाठ्यावर आणलें. फ्राइडमुळें आपण जोरकस, प्रामाणिक व शहाणे झालों. लाजाळू नीतिशास्त्राच्या तडाख्यांतून फ्राइडनें आपल्याला सोडविलें. त्याच्यामुळें आपण कामवासनेला घाबरेनासे झालों.

असामान्य लैंगिक कृत्यांबद्दलची आपली भीति कमी झाली. शाळांतून, कॉलेजांतून, सैन्यांतून तुरुंगांतून, मंदिरांतून जी समानसंभोग प्रवृत्ति दिसून येते त्यामुळें आतां आपणांस विशेष असें कांहीं वाटत नाहीं. विवाह प्रजेसाठीं नसून मजेसाठीं आहे ही गोष्ट आपणांस पटत चालली आहे. आतां प्रजोत्पादनाचें पवित्र कार्य करण्यासाठीं होणारे विवाह संपले. 'लैंगिक उपभोग म्हणजे एक कर्तव्यकर्म' ही कल्पना आतां आटपली, लैंगिक उपभोग म्हणजे चैन ही कल्पना आतां बळावली. प्रयोगादाखल विवाह, प्रेमस्वातंत्र्य, व्यभिचार, घटस्फोट, समानसंभोग वगैरे गोष्टींनीं आतां पूर्वीच्या नीतीला पदच्युत केलें असून नव्या लिंगनीतीची उभारणी या नव्या नव्या असामान्य गोष्टींवर होत आहे.स्त्रियांना लैंगिक सृष्टींत आतां समान हक्क मिळाला आहे व त्याचा त्या पूर्ण फायदा करून घेत आहेत. लाजलज्जा त्यांनीं आतां अर्थात् गुंडाळून ठेवली आहे. निर्लज्जपणा तर आतां नव्या नीतीचा आत्मा झाला आहे. पण यांत काय बिघडलें? सुधारणेच्या गप्पा मारण्यांत अर्थ नाहीं. नसते नियम करून समाजाला जखडून टाकणें यापेक्षां सुधारणा व संस्कृती वगैरे पोकळ गोष्टींना महत्त्व नाहीं. आतां दांभिक नीतीचे दिवस संपले व थापेबाजांचे प्रवचनाचे दिवसही गेले. मोठालीं नांवें देऊन शिष्ट लोकांनीं लहानांना बागुलबोवा दाखवावयाचा हीच आजवरची संस्कृति. असल्या सुधारणेची हड्डी नरम करायला एकादा फ्रॉइडच पाहिजे होता. आणि फ्रॉइडनें तें कार्य उत्कृष्ट रीतीनें केलें. आपली लैंगिक रग जिरल्यामुळें तरुणांची नीति ढासळेल म्हणून त्यांची काळजी करणाऱ्या वयातीत आजोबांना फ्रॉइडनें चांगलीच थप्पड मारली. सध्यांची जॅझ नीती (नाच तमाशा नीति) हीच खरी लैंगिक नीति. कामवासनेची तृप्ति मन मानेल त्या मार्गानें करणें हेंच केव्हांही इष्ट. फ्रॉइडमुळें लैंगिक गोष्टीभोंवतालचे पडदे दूर झाले. स्त्री हलके हलके वस्त्रहीन झाल्यामुळें पुरुषाला लैंगिक जादूचा फार उलगडा झाला. संततिनियमनाची चलती झाली. आयुष्यांतील उद्वेग कमी होऊन त्यांत जास्त मजा वाटं लागली. समानसंभोग आतां जास्त प्रमाणावर मान्यता मिळवत आहे. वयांत आल्याबरोबर स्त्री–पुरुषांना लैंगिकसुख मिळालें पाहिजे. वासना कुजल्यावर मागाहून विवाह काय उपयोग? व वासनेला असामान्य वाटणाऱ्या गोष्टींत वाव मिळाल्यास त्यांत वावगें काय आहे? प्रेम म्हणून म्हणतात त्यांत काम हाच मुख्य. फ्रॉइडनें हें दाखवून दिलें आहे. वैवाहिक प्रेम व वैषयिक अथवा लैंगिक प्रेम यांत फार फरक आहे. वैवाहिक प्रेम म्हणजे दया. व खरें प्रेम म्हणजे लैंगिक प्रेम.'मेरी स्टोप्सनें (Marie stopes) आमच्या "वैवाहिक प्रेम" या पुस्तकांत नसत्या

गोष्टींना महत्व दिलें आहे. निष्ठा, स्वार्थत्याग, दाक्षिण्य, दया वगैरे गोष्टी म्हणजे खरें प्रेम नव्हे. असल्या गोष्टी कां कामवासनेला तिचें खाद्य देऊं शकणार? विवाहसंस्था आतां पोकळ बनली आहे. पूर्वीच्या काळीं नवराबायकोचें नातें असें सोवळें असे कीं, एकमेकांवर प्रेम असणेंसुद्धां तेव्हां त्या पवित्र गोष्टीला विटाळ करूं शके. पण नव्या बदललेल्या परिस्थितींत बायको वेश्ये- इतकी निर्लज्ज असायला पाहिजे व स्त्रिया ही गोष्ट झपाट्यानें करत आहेत, कारण त्यांना लिंगमहत्त्व कळत चाललें आहे. यामुळेंच विवाह- संस्था टिकूं शकेल. व या सर्व गोष्टी फ्रॉइडमुळें शक्य झाल्या आहेत. हें आपण विसरतां कामा नये.

——एस्. डी. स्माल हामसन

स्त्री व पुरुष

आपण जिकडे तिकडे पुरुषांचा वरचढपणा पाहतों. त्याला इतिहासांत आधार सांपडत नाहीं. एका काळीं स्त्रीचा वरचष्मा असल्याचें इति- हासांत नमूद आहे. पुरुषानें भांडून आपला स्वार्थ साधला आहे. पुरुषाची चढाई व स्त्रियांची ढिलाई या दोन गोष्टी इतिहासांत बरोबर घडलेल्या आढळतात. लहान मुलाला बापाचा अधिकार लहानपणापासून दिसत असतो. आणि मोठा झाल्यावर तो बापाचाच कित्ता गिरवतो. पुरुषाचें श्रेष्ठत्व लहानपणापासून त्याच्या मनावर बिंब- लेलें असतें. वाङ्मयांत तो ह्याच गोष्टी वाचतो. मुलींच्या मनावर लहानपणापासून त्यांचा कम- कुवतपणा बिंबवला जातो. पुढें त्या शिकल्या सव- रल्या कीं त्या "पुरषी" बनतात किंवा आयुष्यांत कांहीं अर्थ नाहीं अशी समजूत करून घेतात. मुला- मुलींना एकत्र शिक्षण दिल्यास हा भेद थोडा कमी होईल. मात्र सहशिक्षणाच्या वेळीं त्यांच्या मनांत स्पर्धा उत्पन्न न होतां सहकार्य प्रवृत्ति उत्पन्न झाली पाहिजे.

——आल्फरेड अॅडलर

लिंग व क्रीडावृत्ति

लैंगिक गोष्टींचें महत्त्व प्रजोत्पादनापलीकडे नाहीं ही समजूत चुकीची आहे. लैंगिक क्रीडा व त्यायोगें होणारा आनंद या गोष्टी जास्त मह- त्त्वाच्या आहेत. क्रीडा तीन प्रकारची असते. (१) आयुष्याला उपयोगी पडणारी क्रीडा. (२) कलेसाठीं उपयोगी पडणारी क्रीडा. (३) खेळ- णाऱ्याला संतोषविणारी क्रीडा. लैंगिक क्रीडावृत्ति ही तिसऱ्या प्रकारची असते. मन व शरीर या दोघांवरहि या वृत्तीचा परिणाम होतो. या वृत्तीचा अवलंब केल्याशिवाय माणसाला सुख लागणार नाहीं. प्रेमाला दुर्गुण दुराचार अवश्य आहेत आणि लैंगिक क्रीडावृत्ति म्हणजे विषयलालसा, असा समज कोणी करून घेऊं नये. नवरा बायकोशीं प्रजोत्पा- दनासाठीं फक्त आपण एकत्र आहोंत अशा भाव- नेनें वागतो. तो तिच्याशीं निष्ठ असतो, तिला खुष ठेवतो. पण हें खरें प्रेम नाहीं. बायकोची स्थिति तर एकाद्या यंत्रासारखी असते. तिला स्वतःची बुद्धि, प्रेम वगैरे कांहींच नसतें. बऱ्याच मुलांची पोक्त अशी आई झाल्यानंतर सुद्धां ती बिचारी शाळेंतील कुमारीइतकीच अज्ञ रहाते. कारण लैंगिक संबंधांत तिला क्रीडावृत्तीचा कधींच अनु- भव मिळालेला नसतो. व अशा स्थितींत म्हातार- पणीं अशा स्त्रीला लैंगिक चाळे सुचल्याचीं उदा- हरणें सांपडतात. एका चांगल्या घराण्यांतील सुशिक्षित, सुसंस्कृत, सुरेख (वगैरे) मुलीचें अशाच एका चांगल्या तरुणाशीं लग्न झालें. जोडा अगदीं चांगला शोभला! आई- बापांना धन्य वाटलें. पुढें १–२ मुलेंबाळें झालीं. तरीसुद्धां अजून नवऱ्यानें बायकोवर प्रेम असें कधींच केलेलें नव्हतें. तो आपल्या परीनें तिला खुष ठेवण्यासाठीं झटत होता. पण तिला खरें, लैंगिक क्रीडामय सुख त्यानें कधींच लाभूं दिलें नव्हतें. पुढें तो कामानिमित्त परगावीं गेल्यावर बायकोची त्याच्या मित्राशीं गट्टी जमली व पुढें .... (आपल्याला तूर्त इतकें पुरे आहे). या दुर्दैवाचें कारण लैंगिक क्रीडावृत्तीचा अभाव हें होय. बायकांच्या मनांत ती वृत्ति एकादे- वेळीं उशीरां जागृत होऊन त्या व्यभिचारी बन- तात. तेंच लैंगिक क्रीडावृत्ति नवराबायकोच्या अंगांत असेल तर त्या दोघांचा फायदा होईल, त्यांना खरें विवाहसुख लाभेल व समाजांत नैतिक शांतता नांदेल. यासाठीं आज पिढ्यान्‌पिढ्या रक्तांत बाणलेल्या जुन्या समजुती आपण काढून टाकल्या पाहिजेत. विवाहवृक्षावरील ही जुन्या चालीरीतींचीं बांडगुळें या आतांच्या बदललेल्या परिस्थितींत आपण काढून टाकलीं पाहिजेत; नाहींतर वृक्षाचा नाश होईल. मानसिक खळ- बळीला दडपून टाकण्यापेक्षां तिला योग्य वळणानें वाट करून दिल्यास केव्हांहि ठीक असतें. लैंगिक क्रीडावृत्तीला आयुष्यांत मनुष्यानें पूर्ण वाव दिलाच पाहिजे.

——हॅवलॉक एलिस

स्त्रिया व लैंगिक प्रेम

लैंगिक संवेदनेला दाबून टाकण्याचा धार्मिक शिक्षणानें आजवर फार प्रयत्न केला. प[रंतु] त्यामुळें व रूढ नीतीमुळें खऱ्या लैंगिक प्रेमाचा आस्वाद आजवर स्त्री–पुरुषांना चाखतां आला नाहीं. सर्व आयुष्यभर ज्या स्त्रीबरोबर रखडण्याची तयारी असेल अशाच स्त्रीशीं पुरुषानें संबंध ठेवण्याचें शिक्षण आजपर्यंत त्याला मिळालें. लैंगिक सुखलालसा व मुलें व्हावींत ही इच्छा, या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. ख्रिश्चन राष्ट्रांनीं आजवर भलत्या गोष्टींना महत्त्व देऊन नसत्या संस्था निर्माण करून ठेवल्या आहेत. समाजाच्या उभारणींत खऱ्या लैंगिक प्रेमाला कधींच स्थान दिलें गेलेलें नाहीं. ख्रिस्ती धर्म नवराबायकोच्या हाडामासाच्या एकीकरणाची भाषा मात्र बोलतो पण बाकी सगळ्या गोष्टी त्याविरुद्ध शिकवतो !

लैंगिक संभोग अश्लील मुळींच नाहीं. स्त्रियांच्या बद्दल ज्या कोत्या समजुती पुरुषांनीं आजवर करून घेतल्या आहेत त्याचा हा सर्व परिणाम आहे. लैंगिक भूक किती लोकांची उपाशी राहिल्यामुळें नाश करते याची अजन कल्पनाच आपल्याला येत नाहीं. याला कारण सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा लैंगिक गोष्टींशीं जोडलेला निकटचा पण तितकाच चुकीचा संबंध. होणाऱ्या मुलांच्या संगोपनाचा आणि लैंगिक गोष्टींचा काय म्हणून संबंध जोडला जावा?

त्याचप्रमाणें पावित्र्य आजपर्यंत स्त्रियांच्याकडूनच अपेक्षित असे. कारण जिकडे तिकडे नीतीचे नेते पुरुष असत. गेल्या शतकांतील लेखक व विचारी पुरुष स्त्रियांच्याबद्दल भलत्याच समजुती करून घेऊन लिहीत असत. आतां स्त्रियांनीं पुढें सरसावलें पाहिजे. व नव्या पद्धतीनें समाजशकट पुढें दामटला पाहिज.

–डोरा रसेल

विवाहसंस्थेचा बोजवारा

जगांत विवाहसंस्थेबद्दल जितके वेडगळ विचार लिहिले गेले आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही विषयावर लिहिले गेले नसतील असें बर्नार्ड शॉचें मत आहे. विवाहनीति खरोखर इतक्या निरनिराळ्या गोष्टींवर व परिस्थितीवर अवलंबून असते कीं, शहाण्यानें या विषयावर ठाम असें मत देण्याचा प्रयत्नच करूं नये. अगदीं पुरातन काळापासून कुटुंबसंस्थेला फार महत्त्व आहे. व विवाहसंस्था दांपत्याच्या "मजेसाठीं नसून" होणाऱ्या "प्रजेसाठीं आहे" अशी पूर्वींपासून समजूत आहे. कांहीं पक्ष्यांच्या व पशूंच्या रहाणीवरून शास्त्रज्ञांनीं ही गोष्ट नमूद करून ठेवली आहे. विवाह जोडप्यासाठीं नसून मनुष्यजातीसाठीं असतो ही गोष्ट पूर्वीच्या लोकांना पटून त्यांनीं विवाहसंस्था अनेक नियमांनीं जखडून टाकली. परंतु सामाजिक, आर्थिक स्थित्यंतरांबरोबरच विवाहसंस्थेंतहि फरक होत गेले. पुढें पुढें तर पैसा आधीं, पत्नी मागून अशी परिस्थिति आली. आतां या नवीन यंत्रमय जगतांत सर्वच जुन्या संस्थांचीं चाकें खिळखिळीं होऊन सैरावैरा फिरूं लागलीं आहेत. स्त्रिया असंतुष्ट, पुरुष उद्विग्न व समाज नादान, अशी परिस्थिति झाली आहे. विवाहसंस्थेचें कौटुंबिक स्वरूप संपून आतां त्या संस्थेकडे फक्त लैंगिक दृष्टचा पाहण्याची प्रवृत्ति माजली आहे. त्यागवृत्ति नामशेष होऊन लोक स्वार्थांध बनले आहेत. 'विवाह म्हणजे लैंगिक लग्न' अशी आतां व्याख्या बनली आहे. या नव्या रोपट्याला आर्थिक झऱ्याचें पाणी लागतें. तो एकदां आटला कीं, पुरुषाला पश्चात्ताप होतो व बायको "प्रिन्स ऑफ वेल्स"च्या मागें लागते. प्रेमाचें युद्धांत रूपांतर होऊन रात्रीं एक दोन घटका या युद्धांत तात्पुरता तह होतो ! शेवटीं एकंदरींत हें गाडें काडीमोडीच्या खडकावर धडकी मारतें. रोगाचें वर्णन करणें सोपें असतें, पण औषध सांगणें कठीण असतें. विवाहसंस्थेला लागलेल्या या रोगावर औषधयोजना कोणती? काडीमोड बंद करणें हा मार्ग फार जालीम आहे. संस्थेला तो चांगला आहे पण व्यक्तींना वाईट आहे. काडीमोडीच्या विरुद्ध गोष्ट म्हणजे स्वैर प्रेम. व या नवीन तत्त्वाचा सध्यां फार जोराचा पुरस्कार चालू आहे. सध्याचा काळ संक्रमणाचा असल्यानें त्रासदायक आहे. कांहीं वर्षांनीं सर्व गोष्टी ठीक होतील. सध्यां स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य अपूर्ण आहे, त्यामुळें त्यांना सामाजिक स्वातंत्र्य पूर्ण मिळालेलें नाहीं. पण तात्पुरतें औषध म्हणून बेन लिंडसे यांचे "प्रयोग विवाह" अंमलांत आल्यास ठीक होईल. कारण या गोष्टी चालल्या आहेतच. परंतु या नवीन संस्थेमध्यें स्त्रियांना पुरुषांइतका दर्जा दिला जाणार असल्यानें ती संस्था लोकांना विशेष संमत नाहीं. खरोखर या प्रयोगानें विवाहांना उत्तेजन मिळेल. सध्यां विवाह लैंगिक वयाप्रमाणें होत नसून आर्थिक वयावर अवलंबून आहेत. पण लिंडसे साहेबांच्या संस्थेनें स्वाभाविक वयाप्रमाणें विवाह होऊं शकतील व त्यामुळें वेश्यांची संख्या कमी होऊन घाणेरडे रोगहि

बरेचसे जातील. कारण लैंगिक वयापासून आर्थिक वयापर्यंतच्या काळांत तरुण लोक तिष्ठत खास बसत नाहींत. विवाहाचा दिल्ली दरवाजा त्यांना खुला नसला तरी इतर चोर दरवाजे सताड उघडे असतात! लवकर विवाह घडल्यास फार फायदे होतील. आइबापांनीं कांहीं वर्षांची तरतूद करून ठरवावी. पुढें तीच गोष्ट त्यांचा मुलगा त्यांच्या नातवाच्या बाबतींत करील. अशा रीतीनें तें ऋण फेडलें जाईल. एके काळीं बाप इतके उदार होते. लिंग व विवाह यांची फारकत करण्यापेक्षां विवाह व संतती यांची कांहीं दिवस फारकत करण्यास हरकत नाहीं. संततीनियमन कांहीं काळ अमलांत आणण्यास हरकत नाहीं. या शिवाय काडी-मोडसंस्था पाहिजेच. विवाहापूर्वी प्रयोगविवाह ज्याप्रमाणें लिंडसे सुचवितात त्याप्रमाणें काडी-मोडीपूर्वी प्रयोगकाडीमोड कांहीं दिवस करून पहावी. या सूचनांचा परिणाम काय होईल हें आम्ही नक्की सांगू शकत नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, शेवटीं एक पतिपत्नीसंस्थाच श्रेष्ठ ठरणार आणि संततीशिवाय विवाहाला पूर्णत्व कधींच येणार नाहीं. कारण नित्शे म्हणतो त्याप्रमाणें (Neetzsche) "स्त्री हें एक कोडें असून मूल हें त्या कोडयाचें उत्तर आहे" व इतिहास आपणास या सर्व गोष्टी जोरानें सांगत आहे.

-विल डचरंट

तात्पुरता विवाह

"तात्पुरता विवाह" अमलांत येण्यासाठीं एकाद्या नव्या कायद्याची आवश्यकता नाहीं. कारण संततिनियमन व केवळ नवराबायकोची खुषी म्हणून काडीमोड या दोन गोष्टी कायद्यानें अशक्य असल्या तरी चालू आहेतच कीं नाहीं? सध्यांचे हे विवाहविषयक कायदे चमत्कारिक आहेत. कारण गोरगरिबांना व अशिक्षितांना ज्या गोष्टींची जरूरी आहे अशा गोष्टी (संततिनियमन वगैरे) ठाऊक नसतात व कायद्यानें त्या त्यांना जाणून घेतां येत नाहींत. हे असले नादान कायदे सुधारले तर तात्पुरत्या विवाहसंस्थेसाठीं नवीन कायदा नको. मी या तीन सुधारणा सुचवीत आहें. (१) संततिनियमनप्रतिबंधक कायदे बंद करावेत. (२) काडीमोडसंबंधीं कायद्यांत सुधारणा करण्यांत यावी. आणि (३) काडीमोडी नंतरच्या आर्थिक व्यवस्थेसंबंधीं कांहीं नवे नियम करण्यांत यावेत. या तीन सुधारणा घडून आणल्यास हल्लीच्या बेकायदेशीर तात्पुरत्या विवाहाला कायदेशीर स्थैर्य येईल. व पुढें विनासंततिविवाह व कौटुंबिक–विवाह अशा दोन संस्था रहातील. या सुधारणची समाजास अत्यंत जरूरी आहे. सध्यांच्या काडीमोडीच्या कायद्यानें खरें बोलणाऱ्यापेक्षां खोटें बोलणाऱ्यालाच फायदा होतो! याला दोन उपाय आहेत. (१) मुलें नसतील तर काडीमोड सुकर असावी. (२) पोटगीसंबंधीं नियम असा न ठरवितां ती न्यायाधिशानें ठरवावी. डेन्व्हरमध्यें एक काडीमोड झाली. नवरा ४० वर्षांचा होता, बायको २८ वर्षांची होती. नवऱ्याला २०० डॉलर पगार होता. बायकोला १५० डॉलरची नोकरी होती. बायकोनें नवऱ्यावर पैशासाठीं फिर्याद लावली. कोर्टानें बायकोला दरमहा ७५ डॉलर नवऱ्यानें द्यावेत असें ठरविलें व फिर्यादीचा खर्चहि नवऱ्यावर लादला! म्हणजे नवऱ्याची प्राप्ती महिना १२५ डॉलर तर बायकोची महिना २२० डॉलर प्राप्ती झाली. हे कायदे बदलावयास नकोत का ? नसत्या संततिनियमनानें तात्पुरत्या विवाहाचें काम होणार नाहीं. त्याचप्रमाणें तात्पुरत्या विवाहासाठीं वेगळा कायदा करण्यांत सुद्धां अर्थ नाहीं. त्याचप्रमाणें वर सुचविलेल्या सुधारणा झाल्या म्हणजे संपलें असें नाहीं. त्यामुळें "विवाहास तयार" अशा सर्व स्त्रीपुरुषांची वैद्यकीय तपासणी करून मगच त्यांना विवाहास परवाना देण्याची सुधारणा केली पाहिजे. त्यायोगें घाणेरड्या रोगांचा फैलाव होणार नाहीं. त्यांची आर्थिक परिस्थिति पाहून मगच त्यांना विवाहास परवानगी देण्यांत यावी. तात्पुरत्या विवाहानें व संततिनियमनानें मनुष्यजात नाहींशी होईलशी भीति कित्येकांना वाटते. पण त्यांना मनुष्यस्वभाव कळत नाहीं. माणूस स्वाभाविक संततिप्रिय आहे ही गोष्ट ते विसरतात. पण ज्यांना मुलें नको आहेत त्यांच्यावर तीं लादून मनुष्यजात टिकायची असेल तरी ती नष्ट होणेंच इष्ट. तात्पुरत्या विवाहावर आणखी असा एक आक्षेप आहे कीं, त्यामुळें संततिनियमन वाढेल व विवाहाचा मूळ उद्देश बाजूलाच राहील. पण मी माझ्या अनुभवावरून सांगतों कीं, संततिनियमनानें मुलें होणारच नाहींत ही कल्पना चूक आहे. मनुष्य संततिप्रिय आहे हें कधींहि विसरतां कामा नये. आणि लादलेल्या मुलांचें संगोपन करण्यापेक्षां स्वेच्छेनें झालेल्या मुलांचें लालन पालनच जास्त हौसेनें होईल. दुसरा असा आक्षेप आहे कीं, तात्पुरत्या विवाहानें विवाह कायम असावा असें वाटनासें होईल. पण याला उत्तर असें आहे कीं, विवाह ज्यांना नको आहे त्यांना तो सध्यांहि मोडतां येतोच आहे. शिवाय मनुष्यस्व-

भावावर संगतीचा परिणाम होऊन त्याचे मानसिक व शारीरिक लागेबांधे सहसा तुटत नाहींत. तिसरा आक्षेप असा कीं, "जीझसला" कायम विवाह आवडतो पण जीझसनें जुन्या घाणेरड्या गोष्टींचा नाश करून नव्या संस्था निर्माण केल्या. म्हणजे तो आपल्या काळचा सुधारकच होता. मग त्याचा कित्ता आपण कां गिरवूं नये? बायबलचा शब्दशः अर्थ करण्यापेक्षां त्यांतील तत्त्वांचा अवलंब करणेंच इष्ट. सध्यां जगाची मानवसंख्या अतोनात वाढली आहे यांत शंकाच नाहीं. उपासमार होऊन माणसें रहायला जागा नसल्यानें मारून टाकण्याचा प्रसंग कालांतरानें येईल. यासाठीं संततिनियमन हाच राजमार्ग आहे. मानवजात नाश पावेल ही भीति वेडपणाची आहे. तात्पुरत्या विवाहानंतर कायम विवाह ही पद्धत अमलांत आली म्हणजे विवाहसंस्था जास्त बळकट होईल. चर्चमधल्या ५ मिनिटांत उरकून टाकण्यांत येत असलेल्या झटपट विवाहापेक्षां ही नवीन विवाहपद्धत केव्हांही चांगली आहे. व हा विवाह कधीं कोणामध्यें आपणावर लादला गेला असल्याची भावना राहूं देणार नाहीं. या नवीन सुधारणेनें जुन्या विवाहसंस्थेस बळकटीच येणार आहे. तिचा नाश होणार नाहीं. कुटुंबसंस्थेस यामुळें फायदा होणार आहे. व शेवटीं एकंदर समाजावर या नवीन उपक्रमाचा चांगलाच परिणाम होईल यात शंका नाहीं.

—(बेन लिंडसे)

सुप्रजाजनन

सुप्रजाजनन शास्त्राचे सर्वच परिणाम अजून नीट सांगतां येण्याजोगे नसले तरी कांहीं गोष्टी मात्र नक्की आहेत. चांगलीं माणसें निपजून मानवजातीची उत्क्रांति करावयाची हें ठीक आहे; पण चांगुलपणा कसा ठरावयाचा? शारीरिक, मानसिक, कला, नवीन गोष्टी करणें, वगैरे निरनिराळ्या रीतीनें माणूस चांगला असेल. व ह्या गोष्टी एके ठिकाणीं आढळत नाहींत. सध्यां आपण सौंदर्यापेक्षां बुद्धि श्रेष्ठ मानतों. मग यांतील कोणत्या दृष्टीनें सुप्रजाजन करावयाचे ? जीवशास्त्रापेक्षां संस्कृति श्रेष्ठ नाहीं कां? मग या नवीन शास्त्रांत संस्कृति कशी कायम राखावयाची? एकूण काय, कीं आपले नमुने ठरल्याशिवाय आपण या शास्त्राच्या दृष्टीनें कांहीं करूं शकत नाहीं. शिवाय सामाजिक गोष्टी महत्त्वाच्या आहेत; त्यासाठीं हें शास्त्र काय करूं शकणार? तेव्हां सध्यां केवळ ध्येय यापेक्षां या शास्त्राला जास्त मान देण्यांत अर्थ नाहीं. कारण सामाजिक स्थिति बदलल्याशिवाय या गोष्टी शक्य नाहींत. माणूस सुखी होण्यासाठीं दुःखाचा नाश हें शास्त्र करूं वघणार. पण खरें सुख दुःखाशिवाय नाहीं याची वाट काय? हें शास्त्र एकदम एक असाधारण मनुष्यजात निर्माण करील वगैरे नुसत्या गप्पा आहेत. हें शस्त्र चालविणाऱ्यालाच एकादेवेळीं यापासून दगा होण्याचा संभव आहे.

—(फरॅन्ज् बोअस)

दहा मुलें म्हणजे कांहीं फार नाहींं!

मी एक बाळबोध बाई आहें. याबद्दल लोक माझी कींव करतात. माझें घर मुलांबाळांनीं गजबजलें असून त्यांत आणखीहि भर पडणार आहे. सध्यां मी दहाजणांची आई आहें. या माझ्या पलटणीसह मी समाजावर हल्ले चढविते, त्यावेळीं लोकांच्या मनांत निरनिराळे विकार उत्पन्न होतात व मला गंमत वाटते. कित्येक जण मला एक फसलेली बाई ठरवितात. कित्येक मला स्त्रीजातीची द्रोही ठरवितात! पण मला मात्र माझ्या कुटुंबाचा अभिमान आहे. मला डॉ. मेरी स्टोप्स् माहीत आहे. मॅर्गरेट सँगर हें नांव सुद्धां मीं एकलें आहे. सँगरचें पुस्तक (Motherhood in bondage) मीं वाचलें आहे. अगदीं घाणेरडें पुस्तक आहे. तक्रारखोर स्त्रियांचीं पत्रें त्यांत छापलीं आहेत; व मुलाबाळांमुळें आयांवर ओढविणाऱ्या दुःखाचें भयाण चित्र त्यांत रेखाटलें आहे. मी सँगरला खालील पत्र लिहिण्याच्या विचारांत होतें.

प्रिय सँगरबाई—मला ३८वें वर्ष चालू आहे.पंधरा वर्षांपूर्वीं माझें लग्न झालें.मला या अवधींत १० मुलें झालीं आहेत. व आणखी दहा यापुढें व्हावींत असें मला वाटतें.माझे पती विवाहाच्या वेळेस महिना ४० डॉलर मिळवीत असत. १० वर्षांत ते महिना २५० पर्यंत मिळवूं लागले. माझीं घरकामें मीच करते. आम्हीं कित्येक वर्षांत नाटक सिनेमा वगैरे पाहिलें नाहीं. ४ वर्षांपूर्वीं माझ्या पतीची नोकरी सुटली. पण मुलें मात्र एका मागून एक व्यवस्थित जन्माला येत आहेत. धाकटा सहा महिन्यांचा मुलगा जन्मला त्यावेळीं माझे पति आजारी होते. मुलगा गुटगुटीत आहे. हें पत्र लिहितांना मुलांनीं काय कल्लोळ चालविला आहे! या पत्रांतील सर्व खरें असलें तरी मला त्याबद्दल मुळींच वाईट वाटत नाहीं. सध्यां संततीनियमनाचा कटाक्ष मोठ्या कुटुंबावर दिसतो आहे.

माझा संततिनियमनाचा मुळींच संबंध नाहीं हें उघड आहे. पण माझ्या त्यासंबंधीं कांहीं कल्पना आहेत. माझ्या १० मुलांच्या योगें मी संततिनियमनाला जाहीर आव्हान देत आहें. ज्या आयांना मुलें नको आहेत, फार मुलें नको आहेत, अशांना संततिनियमन ठीक आहे. पण त्याच्याबद्दल एवढा आरडाओरडा कशासाठीं? सँगर बाईंनीं कांहीं वायकांचीं पत्रें छापलीं आहेत आणि सर्व मनुष्य जातीसंबंधीं अनुमानें काढलीं आहेत ! संततिनियमन हा व्यक्तीचा प्रश्न आहे. त्याबाबतींत दुसऱ्यांनीं उठाठेव करूं नये. थोडीं मुलें असतील तर कुटुंबाला टीक असतें. व त्यामुळें (१) संस्कृतीवर (२) प्रकृतीवर (३) बुद्धीवर (४) पैशावर (५) घराण्यावर चांगला परिणाम होतो असें म्हणतात. पण त्या नुसत्या गप्पा आहेत. शिवाय या संततिनियमनानें समाजांतील चांगल्या घराण्यांची वाढ खुंटते. व वाईट लोक वाढतच रहातात. अर्थात् मुलें आईबापांना "चैन" करूं देत नाहींत एवढें मात्र खरें. काडीमोडसुद्धां त्यांच्यामुळें कठीण होते. याबद्दल संततिनियमन असेल तर इलाज नाहीं. तसें स्पष्ट म्हणावें म्हणजे झालें उगाच मोठ्या गोष्टी बोलूं नयेत.

—मार्जोरी वेल्स

स्त्रिया व संततिनियमन

मिसेस वेल्सचें लिखाण वाचल्यामुळें मला थोड्या गोष्टी लिहिणें भाग आहे. तिला १० मुलें आहेत. म्हणून तिचें शहाणपण वाढलें असें नाहीं. संततिनियमन व मुलांचा जन्म वगैरे गोष्टी खाजगी आहेत असें वेल्सप्रमाणें मला वाटत नाहीं. अर्थात् मला तीनच मुलें असल्यामुळें दहा दहा गर्भधारणेमुळें मिळालेल्या वेल्सच्या शिक्षणाइतकें त्या बाबतींत माझें शिक्षण नाहीं. त्यामुळें शहाण्या लोकांनीं लिहिलेल्या गोष्टी मूर्खपणाच्या आहेत असें मला म्हणतां येत नाहीं. असंख्य बाळंतिणी मरत असतांना मी डोळ्यावर कातडें कसें ओढून घेऊं? मुलाचा जन्म ही गोष्ट अगदीं खाजगी आहे असें मला वाटत नाहीं. माझ्या सारखेंच प्रे. व्हून्व्हर यांचेंहि मत आहे. वेल्स म्हणते कीं "आम्ही सुखी आहोंत म्हणून आम्ही नसत्या उठाठेवी करत नाहीं" पण हा स्वार्थ आहे. उद्यां वेल्सच्या १० मुलांच्या शाळेंत त्यांच्या शेजारीं घाणेरडीं मुलें बसलीं व त्यामुळें वेल्सचीहि मुलें बिघडलीं म्हणजे मग? आणि असल्या घाणेरड्या जन्मायला नको असलेल्या मुलांच्याकरतां काढलेल्या संस्थांच्यासाठीं कर म्हणून वेल्सचे पैसे जाऊं लागले म्हणजे मग? आपली चांगली जात नाश पावेल ही वेल्सची भीति वृथा आहे. शहाणे लोक त्याची काळजी घेत आहेत. मी ११ भावंडांतली एक आहे. वेल्सला १० मुलें असतील, पण मुलांच्या वतीनें बोलण्याचा मला जास्त अधिकार आहे. मला असें वाटतें कीं पैसा नसतांना मुलाचा जन्म हा त्या नव्या मुलाच्या बाबतींत अन्याय आहे, गुन्हा आहे.

—मॅर्गरेट सँगर

संततिनियमन कीं युद्ध?

हा प्रश्न सध्यां जगापुढें आ वासून उभा आहे. इटली, जर्मनी, जपान वगैरे राष्ट्रें आणखी देश मिळवूं पहात आहेत; कारण त्याची लोकसंख्या वाढत आहे. जपान म्हणतो "आमच्या सारखे रहाल तर अडीच अब्ज लोक पृथ्वीवर नांदूं शकतील;" अमेरिकेसारखे रहाल तर फक्त १ अब्ज लोकच पृथ्वीवर राहतील" यासाठीं जपान अमेरिकेला काटकसरीचा उपदेश करीत आहे. त्याला उलट प्रश्न असा कीं, "चिनी किंवा हिंदी लोकांसारखे रहाल तर पृथ्वीवर ३॥ अब्ज लोकांना जागा आहे, मग जपानी लोक त्यांच्या सारखे रहाण्यास तयार आहेत कां?" एके काळीं चीन, जपान, हिंदुस्थान वगैरे देशांतून बेताचे लोक होते आतां त्यांची संख्या वाढली तर दोष कोणाचा? आतां त्यांनीं जास्त जागची मागणी कां करावी? अंथरूण पाहून त्यांनीं पाय कां पसरले नाहींत? अजून त्यांना नवीन प्रान्त द्या; तो पहातां पहातां माणसांनीं भरून टाकतील! तेव्हां लोकसंख्येची अशी विभागणी करण्याची गोष्ट बोलूंच नये. इटली, जपान, चीन व हिंदुस्थान यांची लोकसंख्यची हद्द उलटली आहे. आतां अमेरिकेच्या, कानडाच्या व आस्ट्रेलियाच्या रिकाम्या जागेवर त्यांचा डोळा आहे. पण त्या त्यांना कां मिळाव्यात? त्यांनीं आपली तजवीज आपल्या हद्दींत करून घ्यावी. हद्दीप्रमाणें संख्या करावी; संख्या वाढवून हद्द वाढविण्याची आशा बाळगूं नये. हे लोक म्हणतात कीं, गोऱ्या लोकांनीं अमेरिका, आफ्रिका व ऑस्ट्रलिया बळकावून आपली सोय केली आहे व आतां न्यायाच्या गोष्टी बोलत आहेत. पण तसें बोलण्याचा त्यांना अधिकार नाहीं. हिंदुस्थान व चीन हीं राष्ट्रें ३००० वर्षांपूर्वीं सुसंस्कृत होतीं; जमाव २५०० वर्षांपूर्वीं सुधारलेले होते, तेव्हां त्यांनीं कां नाहीं आपल्या वसाहती केल्या? त्यांचा त्यावेळीं कोणी हात कां धरला होता? एतावता काय कीं हें भांडण संपणार नाहीं. व या भांडणां-

तच युद्धाचा जन्म होणार! माल्थसनें या गोष्टीचा पूर्ण विचार केला त्यावेळीं लोकांनीं त्याची टवाळी केली! पण आतां गाडें उलटलें! आतां युद्ध कीं संततिनियमन असा प्रश्न आला तेव्हां धावें दणाणलें! संततीनियमन नैतिक दृष्टया वाईट आहे असें म्हणतात. कबूल आहे; पण युद्ध काय चांगलें आहे? दोन वाईटांतलें एक आपल्याला पत्करलेंच पाहिजे. इकडे आड व तिकडे विहीर आहे खरी; पण जाग्यावर उभें रहाणें आतां अशक्य आहे. आई जेऊं घालीना व बाप भीक मागूं देईना अशी स्थिति मानव जातीची झाली आहे. तेव्हां आतां मार्ग एकच संततिनियमन किंवा लढाई!

—हेन्री नॉर्टन

लोकसंख्या

१८ व्या शतकांत कांहीं देशांत खानेसुमारी सुरूं झाली. तत्पूर्वीं कर चांगले बसवितां यावे म्हणून किंवा सैन्यांत भरती किती होईल असा अदमास बांधतां यावा म्हणून कांहीं विशिष्ट जातींतील पुरुषांची मोजणी होई. एरवीं लोकांची मोजणी म्हणजे कांहीं तरी भयंकर अनर्थावह गोष्ट आहे असें माणसांना वाटे. खुद्द इंग्लंडमध्यें पहिली खानेसुमारी १८०१मध्यें झाली. आज ठोकळ मानानें जगाची लोकसंख्या १७० कोटी आहे. व मागील कांहीं गणती पाहिल्या तर दरसाल ही लोकसंख्या दीडदोन कोटींनीं वाढत आहे असें दिसून येतें. बहुतेक सर्व देशांतील लोकसंख्या थोडचाबहुत प्रमाणांत वाढतच आहे. गेल्या शतकांत ही वाढ विशेषच डोळचांत भरण्याजोगी झाली आहे. इंग्लंडची संख्या १०६६ सालीं सुमारें १५ लक्ष होती. १८०१ सालीं ८८ लक्ष होती. पण १९२१ सालीं ती ३ कोटी ७८ लक्ष झाली. गेल्या शतकांत जगांतल्या बहुतेक सर्व देशांत वाढीचें प्रमाण जास्त दिसत असल्यामुळें व त्या मागें गणती करण्याची पद्धत चालू नसल्यामुळें 'वाढत जाणें' हाच लोकसंख्येचा सामान्य धर्म असावा, व कमी होणें हें अपवादात्मक असावें असें पुष्कळांस वाटतें. पण एका निराळचाच व अप्रत्यक्ष साधनाच्या मदतीनें मागील काळाचें परीक्षण केल्यास हा समज बरोबर नाहीं असें दिसून येतें.

मागील काळची लोकसंख्या व वाढ त्यावेळच्या गणतीच्या अभावीं जरी आपणांस माहीत नसली तरी आज रानटी अवस्थेंत असलेल्या लोकांच्या चालीरीती, पूर्वजांच्या राहणीसंबंधीं पुराणवस्तु शोधकांनीं दिलेली माहिती इ. अप्रत्यक्ष साधनांच्या मदतीनें आपणांस कांहीं अदमास बांधतां येतील.

आजच्या रानटी लोकांच्या (Primitive) जीवनाचा अभ्यास करणारे सांगतात कीं,त्यांच्यांत नवीन प्रजा फारच कमी प्रमाणांत वाढते. त्याचें कारण असें कीं, जवळ जवळ प्रत्येक जातीत गर्भपात, बालहत्या व क्वचित संयमही मोठ्या प्रमाणावर चालू असतो. जगांतल्या कोणत्याही भागांत पाहिलें तरी त्या लोकांत या पद्धति अजूनहि सांपडतात किंवा बालहत्त्या,दुष्काळ किंवा इतर कांहीं आपत्तीच्या वेळींच करतात असें नाहीं. ही कायमचीच पद्धत आहे. व तिला विरोध झाल्यास त्या जमाती खवळून जातात. विषम संख्येचीं मुलें ठेवून सम मुलें मारून टाकावीं, अमुक एका संख्येवर मुलें असणें वाईट; तशीं झाल्यास वरचीं मारून टाकावीं हे व असले नियम त्यांच्यांत कडकपणें पाळतात. दुष्काळ, साथीचे रोग व नित्याच्या लढाया यामुळें यांची लोकसंख्या घटत असावी असा सामान्य समज आहे. पण त्यांतहि अर्थ नाहीं. अन्नाच्या अभावी मृत्युमुखीं पडल्याचीं उदाहरणें त्यांच्यांत फार कमी आहेत. रोगराई आपल्या मानानें एक शतांशही त्यांच्यांत नाहीं. व लढाया किंवा मारामाऱ्या नित्य चालू असल्या तरी सुधारलेल्या लढायांत जो भयंकर संहार होतो, त्या मानानें त्यांच्यांत मुळींच होत नाहीं म्हटलें तरी चालेल. लग्न उशीरां करणें किंवा कायमचें ब्रह्मचर्य पाळणें याहि गोष्टी ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराआधीं क्वचितच पाळल्या जात. मनुष्याची प्रजनन शक्ति किती विलक्षण आहे हें आतां सर्वांस माहीत आहेच. कोणच्याहि अडचणी आल्या नाहींत असें क्षणभर धरलें तर एकाच जोडप्याची संतती व त्यांचेच पुढचे वंशज यांची संख्या २००० वर्षांत १७० कोटी होईल. म्हणजे एकच जोडपें जगांत विद्यमान असलेली सर्व प्रजा २००० वर्षांत निर्माण करूं शकेल. वरील सर्व गोष्टी एकदम लक्षांत घेतल्या तर काय दिसतें ? दुष्काळ, लढाई, रोग, ब्रह्मचर्य किंवा उशीरां लग्न यांपैकीं कोणचेंच कारण रानटी लोकांची संख्यावाढ खुंटवील इतकें प्रबळ नव्हतें. असें असूनही त्यांची लोकसंख्या वर दिलेल्या प्रजनन–शक्तीच्या मानानें जशी वाढावयास पाहिजे तशी मुळींच वाढत नव्हती. यावरून सध्यांच्या रानटी स्थितींतल्या लोकांत गर्भपात, बालहत्या इ. संख्यावाढीस प्रतिबंधक

अशा ज्या चाली दिसून येतात त्याच फार मोठ्या प्रमाणांत आपल्या पूर्वजांमध्येंही चालू असाव्यात असा तर्क निघतो.

आतां आपणांस ज्या सुखसोयी आहेत त्या आपल्या इतिहासपूर्वकालीन पूर्वजांस नव्हत्या हें खरें. व सुधारलेल्या स्थितींत संख्यावारीचें प्रमाण पुष्कळच जास्त असतें हेंही खरें. तरी आपल्या-पेक्षां त्यांचें प्रमाण पुष्कळच कमी धरूनही त्यांची लोकसंख्या जितकी वाढावयास पाहिजे होती असें दिसतें तितकी मुळींच वाढलेली नाहीं. म्हणून लोकसंख्येचें नियमन करण्यासाठीं त्यांनीं उपायां-चेंच अवलंबन केलें असावें या तर्कासच पुष्टी मिळते. ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर युरोपांत गर्भपात व बालहत्या बेकायदेशीर ठरल्या. पण उशीरां लग्न करणें व अजिबात ब्रह्मचर्य पाळणें या चालीं-च्या प्रसारामुळें लोकसंख्यच्या वाढीस पायबंद घालण्यांत आला. प्रतिबंधाचे हे मानवी उपाय मागल्याइतके यशस्वी नव्हते. पण उलट या काळांत निसर्गाचीं संहाराचीं हत्यारें जास्त तिखट झालीं. शस्त्रास्त्रांच्या वाढीमुळें लढाईंत प्राण-हानी फार होऊं लागली. माणसें दाट वस्ती करूं लागल्यामुळें रोग बळावले. व राहणीचा दर्जा वाढल्यामुळें दुष्काळ जास्त जाणवूं लागला. वरील विवेचनाचा इत्यर्थ असा कीं, गेलीं एकदोन शतकें सोडलीं तर इतिहासपूर्वकाली व ऐतिहासिक का-लींहि लोकसंख्येची वाढ फार अल्प प्रमाणांतच होत असे. निसर्गाच्या संहारक उपायावरोबरच माणसांनींही लोकसंख्येच्या नियमनासाठीं बुद्धि-पुरःसर प्रयत्न केल्याचें दिसून येतें.

—कार सांडर्स

माल्थसचा सिध्दांतः—

संख्यावाढीच्या या प्रश्नास प्रथम माल्थसनें १७९८ सालीं चालना दिली. त्याच्या म्हणण्याचा सारांश असाः—"धान्यपिकाऊ जमिनीचें क्षेत्र मर्यादित आहे. त्यामुळें जन्माला यणारी प्रत्येक नवी व्यक्ति कष्ट करूनही जुन्या व्यक्तीइतकें सरासरी अन्न क्वचितव निर्माण करूं शकते. आहे त्या जमिनीपासूनच जीवनोपयोगी असे जास्त पदार्थ निर्माण करणें शक्य आहे. पण या पदार्थांची वाढ जास्तींत जास्त म्हणज गणितश्रेढीनें होते. तर लोकसंख्येची वाढ सारखी भूमितिश्रेढीनें होत असते. तेव्हां अन्न नेहमींच कमी पडणार म्हणून जगांतल्या सर्व काळीं व स्थळीं माणसें लोकसंख्यची वाढ अप्रतिबंध होऊं देत नाहींत." माल्थसचें, अन्न व संख्या यांच्या वाढीचें गणितभूमितिश्रढीचें प्रमाण जरी चुकीचें असलें तरी संख्यावाढीपेक्षां अन्नवाढ कमी हें मात्र खरें आहे. असें कां होतें तें पाहूं. सध्यां एक एकरांत खंडी धान्य पिकतें असें धरूं. आतां सध्यांच्या दुप्पट कष्ट व दुप्पट भांडवल, या योगानें त्याच जमिनींत २ खंडी धान्य पिकेल हें खरें. तिप्पट कष्टानें तिप्पट पिकेल हेंहि खरें. पण या पटीच्या वाढीला मर्यादा आहे. दसपट कष्टानें अन्न दसपट निघेल हें शक्य नाहीं. कांहीं एका पटीच्या वर अन्नाची वाढ कष्टाच्या प्रमाणांत होत नाहीं, व पुढें पुढें ती जवळ जवळ बंद होते. या सिद्धान्तालाच अर्थ-शास्त्री लॉ ऑफ् डिमिनिशिंग रिटर्नस असें म्हण-तात. अन्नाच्या वाढीला असा निसर्गानेंच बंध घातल्यामुळें त्या अन्नावर जगणाऱ्या लोकांच्या संख्येला बंध असावा हें क्रमप्राप्तच आहे. कोणच्याहि देशाचा एका विवक्षित काळाचा विचार केला व लोकांच्या राहाणीचा दर्जा अमुक एक असावा असें धरलें तर त्या काळीं उत्पन्न होणाऱ्या अन्नाच्या मा-नानें लोकसंख्या किती असावी हेंहि ठरवितां येईल. या संख्येहून जास्त संख्या झाली तर दर डोई उत्पन्न कमी होऊन राहणीचा दर्जा कमी होईल. संख्या कमी झाली तर दर्जा वाढेल. या विवक्षित मध्यम संख्येस आपण इष्ट संख्या असें म्हणूं. नवे शास्त्रीय शोध, दळणवळणाचीं नवीं साधनें, शेतीचीं नवीं आउतें, खतें, यांनीं अन्न वाढलें कीं त्यावर लोकही जास्त जगूं शकतील, व मग आपली इष्ट संख्याही वाढेल. परदेशीं वसाहतीस जाणें, परदेशाशीं देव-घेव करून म्हणजे कापड, यंत्रें वगैरे अन्नेतर पदार्थ परदेशीं नेऊन त्याबद्दल अन्न आणणें, याचेही इष्ट संख्येवर परिणाम होतात. पण कांहीं असलें तरी कोणच्याही एका विवक्षित काळाचा विचार केला तर लोकसंख्येची वाढ एका विवक्षित मर्यादे-पलीकडे न जाऊं देणें यासाठीं प्रयत्न होणें जरू-रच आहे. रहाणीचा दर्जा कायम राखणें त्या-शिवाय शक्य नाहीं. जगाच्या आजच्या लोक-संख्येचें वाढीचें प्रमाण व लवकरच होणारा अन्नाचा तुटवडा यामुळें कांहीं विचारी लोक आजच निराश झाले आहेत. त्याबद्दल आपण थोडा विचार करूं.

जगाची आजची लोकसंख्या १७० कोटी आहे. म्हणजे गेल्या शतकांत वाढ दुपटीनें झाली आहे. सध्यां वाढीचें प्रमाण शेंकडा १·१६ इतकें आहे. सरासरी शेकडां १ वाढ धरली तर पुढील पन्नास वर्षांत जगाची लोकसंख्या २७९ कोटी होईल. १०० वर्षांत ४५९ कोटी होईल व ५०० वर्षांत २४६११ कोटी होईल. पृथ्वीवर जास्तींत जास्त १३००

कोटी एकर जमीन लागवडीस आणतां येईल. तज्ज्ञांच्या मतानें एवढ्या जमिनीवर ५२० कोटी माणसांचें पोषण होऊं शकेल. वरील हिशेबानें पुढील शंभर सवाशें वर्षांतच पृथ्वीची उत्पादन शक्ति माणसाच्या पोषणास अपुरी पडेल. वरील विचार डोळ्यांसमोर आला म्हणजे पुढें सर्व अंधारच दिसतो. पण हें इतकेंसें खरें नाहीं. कारण गेल्या शतकांत औद्योगिक क्रांति व तज्जन्य सुखसोयी अमर्यादच वाढल्या. त्यामुळें लोकसंख्याहि भरमसाट वाढली. तशीच ती पुढें वाढत जाईल हें खरें नाहीं.आतां त्याच प्रमाणांत वाढली नाहीं. वाढीचें प्रमाण जरी पुष्कळ कमी झालें तरीसुद्धां जगापुढें पंचाईत आहे हें खरें; पण त्यानें निराश होण्याचें कारण नाहीं. लोकसंख्येच्या वाढीला वाटेल तसा व वाटेल तेव्हां पायबंद घालणें हें मनुष्याच्या अगदीं पूर्ण स्वाधीन आहे. आपण जो मागचा इतिहास पाहिला त्यावरून सर्व ज्ञात कालीं माणसांनीं लोकसंख्यवर नियंत्रण ठेवलें होतें हें दिसून यतें. असें नियंत्रण ठवणें प्रगतीच्या दृष्टीनें फार आवश्यक आहे. आपण हें नियंत्रण ठेवलें नाहीं तर सृष्टी आपलीं दुष्काळ,रोग,लढाया इ. हत्यारें उपसून तो प्रश्न स्वतः सोडविते.आपण बंधन घालणें किंवा निसर्गानें घालणें या दोन्हीही गोष्टी वाईटच आहेत असें कोणास वाटेल. पण त्यास इलाज नाहीं. असें असल्यामुळें त्यांतल्या-त्यांत कमी वाईट व आपल्या हातांतले असे उपाय आपण स्वीकारावे हेंच शहाणपणाचें ठरेल. सारांश आपली राहाणी एका विशिष्ट दर्जाची ठवावयाची, पोटाच्या प्रश्नाच्यावर थोडें तरी डोकें काढावयाचें व परिस्थितीचे गुलाम व्हावयाचें नाहीं, अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं संततिनियमन हें अवश्य केलेंच पाहिजे. प्रथमतः १८२० सालीं फ्रॅन्सिस प्लेस व इतर कांहीं उपयुक्ततावादी लोक यांनीं संततिनियमनाचा पुरस्कार केला पण पुढें १८७६ सालापर्यंत त्या चळवळीला फारसा जोर आला नाहीं. त्या सालीं संततिनियमनाचा पुरस्कार करणारें एक पुस्तक विकल्याबद्दल एका गृहस्थाला दंड झाला. त्यामुळें बेझंट व ब्रॅडला यांनीं तो प्रश्न हातीं घेतला व मुद्दाम त्या पुस्तकाच्या प्रती छापवून त्या विकण्यास सुरवात केली. त्यांच्यावर खटला झाला पण त्यामुळेंच संततिनियमनाचा कल्पनातीत प्रसार झाला. १८७५–७६ सालापासून इंग्लंडमध्यें जननसंख्या कमी झाली आहे. दर शंभर माणसांमागें ३७·५६ मूलें जन्मत असत तीं १९२१ सालीं २३·०३ जन्मूं लागलीं. विवाहित लोकांमध्यें खाजगी रीत्या आम्हीं चवकशी केली त्यावरून आम्हांस असें म्हणतां यतें कीं,जननसंख्या कमी होण्यास संततिनियमन हेंच बव्हंशीं कारण आहे. खानसुमारीच्या आंकड्यांवरून पाहिलें तरी सुशिक्षित लोकांतच जननसंख्या घटल्याचें दिसून यतें. नवीन कल्पना व नवीन पद्धति हेच लोक प्रथम अंमलांत आणतात. संख्या कमी पडण्याचें कांहीं जीवनशास्त्रीय कारण असतें तर त्याचा परिणाम सर्वांवरच झाला असता. संतति–नियमनाच्या प्रसाराबरोबरच जननसंख्या घटूं लागली यावरूनही हेंच अनुमान खरें वाटतें. आपल्या लोकसंख्यच्या वाढीला मर्यादा घालणें हें आवश्यक आहे असें एकदां ठरलें म्हणज संतति–नियमनाचीं नवीन साधनें वापरणें यासारखा चांगला उपाय दुसरा नाहीं. गर्भपात, बालहत्या यांसारखीं हीं साधनें भयंकर नाहींत. कांहींच्या मतें आजचीं उपलब्ध साधनें प्रकृतीस अपायकारक आहेत. पण तो प्रश्न महत्वाचा नाहीं. कारण विज्ञान इतकें झपाट्यानें वाढत आहे कीं, थोड्याच दिवसांत अगदीं सुलभ व उत्तम साधनें आपणांस मिळतील याबद्दल शंकाच नाहीं. संततिनियमनाच्या या साधनांचा दुहेरी उपयोग होतो. लोकसंख्येच्या वाढीस वाटेल तसा आळा घालतां येईल हें तर खरेंच, पण तसें नको असलें तर ती संख्या वाढविणें हेंही या नव्या साधनांनीं शक्य आहे. हें म्हणणें चमत्कारिक वाटेल पण पुढील विवेचन व आंकडे यांववरून तें स्पष्ट होईल. नियमनाच्या साधनांच्या अभावीं बहुतेक सर्व स्त्रियांना मुलें फार लवकर लवकर होतात. तसें झाल्यामुळें आईचें दूध त्यांना पुरेसें मिळत नाहीं व बापाचाही प्रपंच वाढल्यामुळें त्यांची तिकडूनही हेळसांड होते, व अशा रीतीनें जास्त मुलें जन्मास आलीं तरी जास्त मृत्युमुखीं पडतात व शेवटीं उरवा कमी येतो. आईच्या प्रकृतीची भयंकर खराबी होते ती निराळीच. दर दोन वर्षांनीं झालेल्या १० मुलांपैकीं जितकीं जगतात त्यांपेक्षां ४ वर्षांनीं झालेल्यांपकीं जास्त जगतात. शिवाय त्यांना भरपूर पोषण मिळाल्यामुळें तीं जास्त सशक्तही असतात.

पुढील तक्ता पहा.

सन	इंग्लंड वेल्स			हिंदुस्थान-ब्रि.		
	जनन-प्रमाण	मृत्यू-प्रमाण	उरवा	जन-प्रमा	मृत्यू-प्रमा	उरवा
१९१०	२५	१३	१२	४०	३३	७
१९११	२४	१४·५	९·५	३९	३२	७
१९१२	२४	१३	११	३९	३०	९
१९१३	२४	१४	१०	३९	२९	१०
१९१४	२४	१४	१०	४०	३०	१०

या तक्त्यावरून दिसून येईल कीं इंग्लंडमध्यें जननप्रमाण कमी झालें तरी त्याबरोबरच मृत्यू प्रमाणहि कमी झाल्यामुळें शेवटीं शिल्लक मुलें जास्त राहिलीं. उलट हिंदुस्थानांत जननप्रमाण जास्त असूनही मृत्यू जास्त असल्यामुळें शेवटीं शिल्लक कमीच राहते. यांवरून ध्यानांत येईल कीं, संततिनियमनाच्या नव्या साधनांनीं लोकसंख्या वाढविणें शक्य आहे इतकेंच नव्हे तर ती प्रजा जास्त सुदृढही निपजवितां येईल. लोकसंख्येच्या प्रश्नाबरोबरच राष्ट्रांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न आजकाल गुंतून बसला आहे. इतर संस्कृतीचा दर्जा सारखा असल्यास जास्त लोकसंख्या ही राष्ट्राजवळ असलेली फारच मोठी शक्ति आहे. ती ज्याजवळ जास्त तें राष्ट्र प्रबल हें उघडच आहे. आजच्या स्थितींत अमेरिका, रशिया इत्यादि राष्ट्रांना स्वतःच्या देशांतच वाढत्या लोकसंख्येचा समावेश करण्यास वाव आहे. पण त्याची सध्यांची संख्याच पुष्कळ असल्यामुळें या वाढत्या संख्येचें शेजारच्या राष्ट्रांना फार भय वाटतें. इंग्लंडसारखीं कांहीं राष्ट्रें फार संपन्न आहेत. त्यांची लोकसंख्या सपाटयानें वाढत आहे. या संख्येचें काय करावें हा त्या राष्ट्रांपुढें मोठाच प्रश्न आहे. जगांत इराण, आफ्रिका, चीन यांसारखीं कांहीं राष्ट्रें अशीं आहेत कीं, त्यांची सृष्टिसंपत्ति मुबलक आहे पण तेथील सरकारें दुर्बल आहेत. त्यामुळें युरोपमधील ज्यांची लोकसंख्या फाजील आहे तीं राष्ट्रें वरील दुर्बल राष्ट्रांत कायम वसाहत करूं पाहातात व पुढें त्यावरून भांडणें होऊन लढाईपर्यंत पाळी यते. वाढत्या लोकसंख्यचा विचार न करावा तर स्वदेशांत संपत्ति व माणसें यांचें प्रमाण बिघडतें आणि राहणीचा दर्जा कमी होतो, व त्यामुळेंही राष्ट्राचें सामर्थ्य कमी होतें. बरें; संतति–नियमन करावें तर संख्या कमी होऊन तिकडूनही नुकसान. अशा पेचांत सर्व राष्ट्रांनीं एकत्र होऊन विचार करावा तर तेंही शक्य नाहीं. कारण कांहीं राष्ट्रांच्या पुढें हा प्रश्न आज मुळींच नाहीं. तेव्हां सध्यां कांहीं राष्ट्रांना हा लोकसंख्यचा प्रश्न मोठा बिकट होऊन बसला आहे.

घटस्फोटासंबंधीं मतें

'काडीमोड' या प्रश्नासंबंधींच्या जगप्रसिद्ध आठ ग्रंथकर्त्यांचीं मतें:—

बर्ट्रांड रसेलः— काडीमोडीचे कायदे व चाली विविध आहेत. रोमन कॅथॉलिक चर्च काडीमोडीच्या सर्वस्वीं विरुद्ध आहे. सोव्हिएट रशियांत पतिपत्नीपकीं एकाचा जरी काडीमोडीचा अर्ज आला तरी त्याला संमति मिळते स्कँडिनेव्हियांत परस्परसंमतीनें काडीमोड करण्यास परवानगी आहे. ब्रिटनमध्यें व्यभिचार या एकाच सबबीवर काडीमोड करतां येते. न्यूयार्क स्टेटचे कायदे ब्रिटन सारखच. साऊथ कॅरोलिनामध्यें काडीमोड मानलीच जात नाहीं. नवाडामध्यें स्कँडिनेव्हियाइतकेंच काडीमोडीचे बाबतींत स्वातंत्र्य आहे.

"माझ्या मतानें केवळ व्यभिचार हें काडीमोडीचें कारण मानण्यांत येऊं नये... परस्परसंमति हें सर्वसामान्य कारण असलें पाहिजे. ब्रिटन व न्यूयॉर्क स्टेटचा कायदा म्हणतो कीं, दोन्ही पक्षांची संमति असली तरी काडीमोड देतां येत नाहीं. पण हें मूर्खपणाचें आहे. परस्परसंमतीच्या सुलभ अटीनें काडीमोड बोकाळेल अशी भीति वाटण्यास मुळींच आधार नाहीं. स्वीडनमध्यें अमेरिकेपेक्षां काडीमोडीचें प्रमाण पुष्कळ कमी आहे... वेड, गुन्हा, डिप्सोमॅनिया अशा विशेष बाबींत काडीमोड न देणें म्हणजे नवरा, बायको व मुलें यांच्यावर असह्य अत्याचार होय... हे निष्कारण हाल सोसणें धर्माज्ञेला अनुसरून आहे असें मानणारे पाषाणहृदयी होत. कायद्यानें मानलेलीं काडीमोडीचीं कारणें स्कँडिनेव्हियाप्रमाणें सुलभ व सुकर असावीं. असें जरी माझें मत आहे तरी खाजगी नतिक आचरणाच्या दृष्टीनें आईबापांनीं अनिर्वाह्य कारणें सोडून इतर वेळीं काडीमोडीचा प्रसंग शक्य तोंवर टाळावा. आईबापांमध्यें आपल्या मुलांच्या जबाबदारीची जाणीव अधिकाधिक झाली पाहिजे... आईबापांमधील फारकत किंवा तेढ यामुळें मुलांच्या भावनाशील कोमल मनाला जबर धक्का बसतो. पण ही वयक्तिक सदसद्विवेकबुद्धीची बाब आहे. केवळ कायद्याच्या अंकुशानें स्त्रीपुरुषांना अंगीं नसलेल्या पावित्र्याचें ढोंग

करावयास लावणें यांत मुळींच कोणाचेंहि हित नाहीं. सारांश, मुलेंच नसलेल्या जोडप्याला, दोहोंपैकीं एकाच्या विनंतीवरून काडीमोड देण्यांत यावी. मुलें असलीं तर परस्परसंमति हेंच साधारण कारण मानण्यांत यावें. वेड, घोर गुन्हा, दारूबाजी, व इतर रोग याहि सबबींवर काडीमोड द्यावी. केवळ जारकर्म हें काडीमोडीचें कारण असूं नये... इंग्रजी भाषा प्रचलित असलेल्या देशांत दीर्घकालपर्यंत आहे हीच स्थिति राहील.

फॅनी हर्स्ट:— जारकर्म, असमान–शीलत्व, अत्याचार, इत्यादि कारणांनीं वैवाहिक बंधनें ढिलीं झालीं असतां परस्पर–अविश्वास, द्वेष यांवर उभारलेल्या प्रपंचामध्यें मुलांचा कोंडमारा करणें ही कल्पना असह्य आहे. कांहीं झालें तरी काडीमोडीची चाल हा घाणेरडा, किळसवाणा, सामाजिक रोग आहे. पण त्या रोगाचें इतर रोगां-प्रमाणें सशास्त्र अध्ययन करून निदान ठरविणें अगत्याचें आहे.

एच. जी. वेल्स:— काडीमोडीविषयीं लिहिण्याचें मीं आतांपर्यंत टाळलें त्याचें कारण मला काडीमोडीचा विचारच सहन होत नाहीं. आधुनिक समाजांत विवाहसंस्थेला निष्कारण भलतेंच महत्त्व देण्यांत येतें. या अव्यवस्थित विवाहसंस्थेचाच काडीमोड हा एक घाणेरडा परिणाम आहे. वयांत आलेल्या मनुष्याचें (स्त्री अगर पुरुष) वैवाहिक वर्तन जोंपर्यंत सर्व समाजाचे हिताचे आड येत नाहीं, तोंपर्यंत त्यांत दुसऱ्यानें लक्ष घालण्याचें कांहीं कारण नाहीं. पण जर तें सामाजिक हिताचे आड येत असेल तरच समाजानें त्यांत लक्ष घालणें वाजवी होय. आधुनिक युगांत मुलांचें कल्याण हेंच वैवाहिक बंधन टिकविण्यास आधारादाखल समजतां येईल. इतर सबबी भावनात्मक किंवा गूढ होत. विवाह संस्थेचें मूळ जर आपण मानवसमाजाच्या पहिल्या पहिल्या अवस्थेंत शोधूं लागलों तर असें दिसून येईल कीं, विवाहसंस्था ही रानटी अवस्थेंतील लोकांचे परस्परांविषयीं द्वेष, असूया, मत्सर यांचा प्रतिकार करण्याकरितांच निर्माण झाली. पण लग्नसंस्था ही कुटुंबाचें रक्षण करण्याकरितां निर्माण झाली आहे, ह्या सिद्धांताला इतिहास अगर आधुनिक चाल यांपैकीं कोणचाच आधार नाहीं. माझ्या मतानें सत्ताधिकाऱ्यांनीं लोकांना एकत्र राहण्यास किंवा निराळें राहण्यास लावण्याचे भानगडींत पडूंच नये. लैंगिक संबंधाचे बाबतींत खरेदीविक्री किंवा देवाणघेवाण करणेंहि योग्य नाहीं. पण मूल हें आईबापांमधील जिवंत व कायद्यानें न निखळणारा दुवा होय, व त्याची काळजी घेण्यास, जोपासना करण्यास व त्याचे भावी हिताकडे पाहण्यास आईबापांवर वैयक्तिक व संयुक्त जबाबदारी आहे. मग त्या आईबापांचे दुसरे संबंध कांहींहि असोत. हें एक प्रकारें पुरवणीलग्नच होय. मी एकपत्नीत्वाच्या चालीवर घाला घालीत आहें असें तुम्हांस वाटेल, पण तसें कांहीं नाहीं. एकपत्नित्व कायद्याचे जोरावर टिकलें नसून सर्वसाधारण समाजाला, एका पुरुषाचें एकाच स्त्रीबरोबर संसार करणें हें स्वाभाविक व सोयीचें वाटतें म्हणून.

लग्न झाल्यानंतर जर एकादे जोडप्यास आढळून आलें कीं, आपलें पटत नाहीं, व एकत्र राहणें सुखावह होणार नाहीं, तर त्यावर तोडगा काडीमोड नव्हे. त्या जोडप्यानें एकादे त्रयस्थाची मदत घेऊन आपले विवाहसंबंधाची पुनर्घटना करावी व वैवाहिक बंधनाचा दर्जा व प्रकार ठरवावा. प्रचलित विवाहाची व काडीमोडीची चाल खुळेपणाची आहे. आधीं वैवाहिक बंधनाची गांठ करकचून आवळून घ्यावयाची व नंतर त्या बंधनांतून मुक्तता करून घेण्याकरितां गुंतागुंतीचे नियमावलीची पळवाट ठेवावयाची. इतकें सव्यापसव्य हवें कशाला. काडीमोडीविषयीं म्हणाल तर मी आधुनिक दृष्टीला भावनाप्रधान व जुन्या मताचा वाटेन. दोन माणसांनीं एकत्र यावें, तेंहि अनपेक्षित नव्हे तर जाणूनबुजून, कांहीं काळपर्यंत त्यांनीं सख्यत्वाच्या नात्यानें जगांत वावरावें, एकमेकांकरितां स्वार्थत्यागपूर्वक झटावें, एकत्र हंसावें, एकमेकांस आनंदित करावें, आणि शेवटीं एकमेकाचें तोंड न पाहण्याची इच्छा धरावी, हें मला असंभवनीय वाटतें.

थिओडोर ड्रीसर:— हल्लीं रशियामध्यें विवाह लावणें म्हणजे स्त्रीपुरुषांची कायमची गांठ घालून देणें ही समजूत पार बदलली आहे. नुसती इच्छा दर्शविली कीं, काडीमोड दिली जाते. कम्युनिस्टांच्या मतें वैवाहिक जीवनाविषयीं एक अस्तिपक्ष व दुसरा नास्तिपक्ष आहे. दोन माणसें विवाहसंबंध चालवूं शकतील किंवा चालवूं शकणार नाहींत. नवराबायकोस एकमेकांस सोडचिठी देण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. मूल झालेलें असलें तर त्याच्या जन्मापासून त्याच्या जोपासनेची, अन्नवस्त्राची, शारीरिक व बौद्धिक उन्नतीची काळजी घेण्यास राष्ट्रीय सरकार तयार असतें. मग आईबाप त्याबद्दल मोबदला देवो अगर न देवो

कम्युनिस्टांचीं प्रेम, विवाह, व काडीमोड यांविषयींचीं मतें इतरांच्याहून जास्त बुद्धिगम्य आहेत.

वॉरिक डी पिंगः-- लग्नसंस्थेचें दिवाळें वाजलें आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. हल्लीं असाच काळ आलेला आहे कीं, लोकांनीं निरनिराळ्या बाजूंनीं शंका काढाव्यात, प्रश्नोपप्रश्न उपस्थित करावेत व शेवटीं या दिव्यांतून तावून, सुलाखून विवाहसंबंधाची उत्कृष्ट कल्पना बाहेर पडावी. यामुळें हा संबंध जास्ती निरपेक्षपणाचा, व समजूतदारपणाचा होईल. ज्यांची विवाहस्वातंत्र्याविषयीं ओरड आहे व जे विवाहसंबंध हा मोठा थोरला बंधारा आहे असें समजतात त्यांना हें कळत नाहीं कीं, जीं नियंत्रणें पूर्वजांनीं घालून दिलीं आहेत, तींच, विवाह म्हणजे केवळ कामवासना तृप्त करण्याचें साधन ह्या खुळ्या कल्पनेचें उच्चाटन करून संसार सुखमय करतात. ज्यांचें वैवाहिक जीवन सुखमय झालें आहे, ते मोडकळलेल्या विवाहाकडे करुणपूर्ण दृष्टीनें पाहतील, व एकदम काडीमोडीच्या जालीम उपायाला संमति देणार नाहींत. पण ज्यांना भिन्न स्वभावामुळें, भिन्न मनोरचनेमुळें संसार असार वाटू लागला आहे. त्यांचें काय? त्यांना उत्तर हेंच कीं, लग्न करण्याचा उद्देश चिरंतन सहवास व संतति हा आहे. तो सिद्धीस जाण्याकरितां स्त्रीपुरुषांनीं पटत नसून सुद्धां थोडी कळ सोसली पाहिजे. अधीर होऊन इतर पुरुषाची किंवा स्त्रीची अपेक्षा करण्याचा मोह आंवरला पाहिजे. पण ज्यांना विवाहामुळें सुखदायक सहवास मिळत नसेल व संततीला सुख मिळत नसेल, त्यांना आम्ही विवाहसौख्य भोगणारे लोक काडीमोडीची मुभा देऊं. केवळ क्वचित घडणाऱ्या जारकर्माबद्दल काडीमोड देऊं नये.पण नियमित मादक पदार्थांचें सेवन, वेड, सूडबुद्धि याबद्दल काडीमोड द्यावी. पण ती देण्यापूर्वीं तीन वर्षें वाट पाहावीं व जर नंतरसुद्धां काडीमोड पाहिजे असेल तर द्यावी.

रेबेका वेस्टः-- काडीमोडीची आवश्यकता--ज्यांना संतति आहे, अशा विवाहित दांपत्याला काडीमोडीची परवानगी देणें मोठें धोक्याचें आहे. मुलांची नीट वाढ व्हावयास घरांत आईबापांचे वास्तव्याची किती आवश्यकता आहे, हें आधुनिक मानसशास्त्रांतील संशोधनानें आतां कळू लागलें आहे. अशा आईबापांनीं जर केवळ पटत नाहीं म्हणून काडीमोड केली तर ह्या फारकतीपासून त्यांना सुख न होतां उलटें तीव्र असंतुष्टपणाचें शुक्लकाष्ठ त्यांचें मागें लागतें, इतकेंच नव्हे तर तें पुढील पिढ्यांनाहि भोंवतें. ज्यांना संतति नाहीं अशा दांपत्याची काडीमोड समाजाच्या दृष्टीनें मुळींच महत्त्वाची नाहीं. व्यभिचार, दारूबाजी, जाच, (शारीरिक व मानसिक) या बाबतींत तरी काडीमोड असावी. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा समाजाची कामवासनेविषयींची दृष्टि जेथें काडीमोडीस परवानगी नाहीं, तेथें कोती व खुळेपणाची असते. कौमार्याचा किंवा पातिव्रत्याचा भंग करणाऱ्या पुरुषाला काडीमोडीचा कायदा नसलेल्या देशांत आपलें पापकर्म चालू ठवण्यास कल्पनातीत मोकळीक सांपडते. शिवाय अशा देशांत वेश्याव्यवसायही जोरांत चालतो. कारण तेथें वेश्यागमन हें विवाहांतील असें कामवासनेच्या तृप्तीचें साधन मानलें जातें, व वेश्यांचा धंदा हलकटपणाचा समजाला जातो. जगांत महत्त्वाची गोष्ट कोणची असेल तर ती लोकांची कामवासनेविषयीं दयायुक्त दृष्टि हीच होय. काडीमोडीचा कायदा हेंच सांगतो कीं, जर स्त्री--पुरुषांनीं विवाहसंबंध योग्य तऱ्हेनें पाळले नाहींत, तर त्यांना विवाहसुखाला आंचवलें पाहिजे. हा कायदा म्हणजे समाजाचें स्त्री--पुरुषांच्या कामवासनेवरील नियंत्रण होय.

अमेरिकेमध्यें काडीमोड फार मोठ्या प्रमाणांत होते. याचें कारण एक तर वैवाहिक जीवनाची अस्थिरता; देशाच्या आर्थिक परिस्थितीमुळें नवऱ्यास बायकोला सोडून हजारों मैल दूर जावें लागतें. शिवाय, शहरची कौटुंबिक राहाणी, पक्ष्यांच्या घरट्या इतक्या आकुंचित अशा गगनचुंबी इमारतीमधील खोल्यांत तरुण स्त्री पुरुषांनीं राहावयाचें, ह्याचा त्यांचे दांपत्यप्रेमावर किती ताण पडत असेल बरें? पण इग्लंडमध्यें अशी स्थिति नाहीं. फार थोडे लोक काडीमोड करतात व प्रचलित काडीमोडीचे कायदे सूज्ञ लोकांना आपलें वैवाहिक जीवनांत जास्त स्थिरता कशी आणतां येईल याचा विचार करण्यासच प्रवृत्त करतात.

ॲन्ड्रि मोरिआः-- काडीमोडी विरुद्ध पहिला आक्षेप धर्माच्या दृष्टीनें येतो. कॅथोलिक लोक विवाह हा धार्मिक विधी आहे व तो पोपच्या परवानगीशिवाय मोडतां येत नाहीं असें मानतात. दुसरा आक्षेप, मानसशास्त्राच्या दृष्टीनें काडीमोडीची पळवाट सुलभ करून चालणार नाहीं. जर काडीमोडीमध्यें कालाचा व्यय फार होईल, व बरेंच सव्यापसव्य करावें लागेल अशी दांपत्याची खात्री झाली तर तें दांपत्य शक्य तोंवर आपसांतील वितुष्ट व तेढ कमी करण्याचा प्रयत्न

करील. नाहींतर सरकारी अधिकाऱ्यांपुढें कांहीं शब्द उच्चारून तावडतोब काडीमोड मिळते असें त्याला समजलें कीं तें पहिलें भांडण झाल्याबरोबर वाट न पाहातां, काडीमोड मागूं लागेल. म्हणून काडीमोड देण्यापूर्वी विधिनियमांचीं इतकीं दिव्यें ठेवावीं कीं, त्या दिव्यांतून पार पडणाऱ्या दांपत्याला खरोखर काडीमोडीची किती आवश्यकता वाटत आहे हें सिद्ध होईल.पण परस्परांच्या संमतीनें दिलेली सोडचिठी हीं इतर प्रकारच्या काडीमोडीपेक्षां जास्ती भीतिप्रद आहे असें मला वाटत नाहीं. मनुष्यानें निर्माण केलेल्या सर्व संस्था ह्या उत्क्रांतावस्थेंत आहेत. मग विवाह संस्थाच त्याला अपवाद कशी असेल? फरांन्समध्यें विवाह तीन तत्त्वांवर उभारलेला आहे. एकतर धर्मकल्पना, दुसरें स्त्रियांचें शारीरिक दौर्बल्य व आर्थिक पारतंत्र्य व तिसरें, मुलांचें कौटुंबिक शिक्षण, ह्या गोष्टी विचारांत घेऊन मला असें वाटतें कीं, फरान्समधील काडीमोडीचे प्रचलित कायदे असलेल्या परिस्थितीला धरूनच केलेले आहेत, व ते बदलण्याची किंवा सुधारण्याची आवश्यकता नाहीं.

लिऑन फ्यूश वॉंजर :—स्त्री–पुरुषांमध्यें स्वाभाविक प्रेम वसत असेल तर त्यांच्या एकत्र सहवासाला कांहींतरी आधार आहे. पण तो संबंध जन्मभर टिकविण्याच्या अटीवरच जर त्याला कायदेशीरपणाचे शिक्कामोर्तब व्हावयाचें असेल तर हा सरकारचा जुलूमच म्हणावयाचा. मोठमोठ्या सुधारलेल्या शहरांत राहणाऱ्या लोकांना काडीमोडीमध्यें कांहींच विचित्र वाटत नाहीं. त्यांना असें वाटतें कीं, जर इतके स्त्रीपुरुष विवाहसंबंधाला विटतात, तर तो त्या स्त्री–पुरुषांचा दोष नसून विवाह–संस्थेचाच दोष आहे. लग्न हें दोन माणसांमधील एक आर्थिक करार आहे असें जर सरकार मानूं लागेल तर आज जे विवाहसंस्थेवर घाणेरडे आक्षेप येतात, ते मुळींच यणार नाहींत, व काडीमोड जो इतका बिकट प्रश्न वाटतो तोहि वाटणार नाहीं. काडीमोड व नीति यांचा संबंध नाहीं असें कळल्यावर काडीमोडीचा एवढा बाऊ वाटणारच नाहीं. या लग्नाच्या करारामध्यें असेंही कलम असावें कीं, नवराबायकोपैकीं एकानें जरी इच्छा दर्शविली तरी त्या करारावरून मुक्तता व्हावी, व फारकत मिळावी. भावी संततीच्या शिक्षणाकरितां लागणाऱ्या खर्चापैकीं एकाद्या दांपत्यानें किती भार उचलावा हेंही अगोदर ठरवून करारांत नमूद केलें पाहिजे. मुलांचे शिक्षणाची जबाबदारी सरकारवरच सोपवावी. विवाहसंबंध हा एक गूढ धार्मिक विधि आहे असें जोंपर्यंत कायदेपंडित मानतील, व त्यांस पक्षपातीपणाच्या कराराचें स्वरूप देणार नाहींत तोंपर्यंत काडीमोडीचे कायदे आध्यात्मिक अवनतीला कारणीभूत होतील.

पाश्चात्य विवाह संस्थेची वाताहात.

(कॅलव्हर्टन यांचें मत)

जगांतील बहुतेक विवाहसंस्थांमध्यें पुरुषांचें प्राबल्य ज.स्त दिसून येतें. थोडे अपवाद सोडून दिल्यास इतिहास आपणांस हेंच सांगतो. पण पाश्चात्य देशांतील पुरुषांची सद्दी आतां सरली आहे. स्त्रियांना राजकीय मताधिकार मिळाल्यामुळें पुरुषांचा स्त्रियांवरील अधिकार अगदीं ढिला पडला. सध्यां स्त्रियांची मानसिक व नैतिक उत्क्रांति झाल्याचें दिसून यत आहे. शरीरसौंदर्याच्या त्यांच्या कल्पना बदलल्या, त्यांचे झगे आखूड झाले, त्यांच्या केशकलापाला कात्री लागली, पण ह्या बाह्य गोष्टीबरोबर मनही बदलत आहे. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था यांची झालेली वाताहात व तरुणांची चाललेली बंडखोरी या गोष्टी पाश्चात्य संस्कृतीचें दिवाळें वाजविल्याशिवाय राहणार नाहींत. दिवाळें पूर्वीच वाजलें आहे, आतां तें शिक्कामोर्तब होऊन चवाठ्यावर येत आहे असें जरी म्हटलें तरी चालेल!

महायुद्धाच्या पूर्वीपासून या गोष्टी घाटत होत्या, मनांतून खळबळ चालू होती व महायुद्धाची ठिणगी पडतांच हा वणवा पेटून पाश्चात्य संस्कृतीची दिवाळी साजरी झाली–होळी पेटली! होळीनंतर धुळवडच पाहिजे,व ती अमेरिकेंत "जॅझ" या नवीन उपक्रमाच्या द्वारें होत आहे. जॅझ हा एक बाजा,नाच, तमाशा वगैरे गोष्टी एकत्र आणून होत असलेला करमणुकीचा प्रकार आहे. आतां हा प्रकार युरोपमध्यें शिरला आहे. "जॅझ" बाजा हें मनांत चाललेल्या खळबळीचें बाह्य द्योतक आहे. आजकाल पाश्चात्य देशांतून विवाहसंस्थेची टवाळी होत आहे. शृङ्गारचेष्टा व उन्मादक कार्यक्रम यांची वाढ होत आहे. पुरुष–स्त्री असा भेद आतां राहिला नाहीं. आजची पाश्चात्य पोर आपल्या मनांवरील संस्कृतीचें दडपण नाहींसें झाल्याबरोबर शरीरावरील झग्याचें झांकणसुद्धां झुगारून देऊं लागली आहे. पूर्वीं पावलेंसुद्धां दाखविणें जेथें स्त्रियांना प्रशस्त वाटत नसे, तेथें आतां गुढग्यांचें प्रदर्शन करण्यांत कांहींच गैरशिस्त वाटेनासें झालें आहे. वाङ्मयांतूनसुद्धां ही क्रांति चालूं आहे. पाश्चात्य घरांत आतां घरपण कांहींच राहिलेलें नाहीं. घर

म्हणजे आतां फक्त जेवणाची व मरणाची जागा बनलें आहे. "घरासारखें अन्य ठिकाण नाहीं" याबद्दल पाश्चात्य लोक आतां निराळ्याच अर्थानें देवाचे आभार मानीत आहेत! महायुद्ध हें या सगळ्याचें निमित्तमात्र कारण. पाश्चात्य संस्कृतीची कुजलेली फांदी महायुद्धाच्या कावळ्याची वाट पाहात होती इतकेंच!

महायुद्धाच्या शिपाईगडयांना खुष करण्यासाठीं पॅरिसमधील स्त्रिया वाटेल त्या गोष्टी करत असत! पॅरिस शहर हें अश्लीलतेचें आगर बनलें होतें! महायुद्धामुळें बिथरलेलीं मनें तहाच्या एका चुटकीसरशीं ताळ्यावर कशीं येणार! महायुद्धामुळें सोन्यासारख्या पाश्चात्य जुन्या संस्था आटोपल्या व नव्या विटयांचें नवें राज्य सुरूं झालें. कोणत्याही गोष्टीबद्दल आस्था बाळगावयाची नाहीं, व कशावरहि विश्वास ठेवावयाचा नाहीं हा या नव्या राज्यांतील पहिला नियम आहे. पूर्वीच्या गोष्टींमध्यें कांहीं वाईट नव्हतें असें नाहीं. पण तेव्हां मनाची नसल्यास जनाची तरी लाज वाटत असे. पूर्वीं वेश्याच फक्त व्यभिचारी असत. पण आतां चांगल्या पाश्चात्य कुलीन स्त्रियाच त्यांचें काम करीत आहेत. १०० वर्षांपूर्वीं अमेरिकेंत एका बागेंत एका मुलीचा एक सुंदर पुतळा उभा केला होता. पण तिचा झगा किंचित आखूड होता. त्या कारागिरानें तिच्या पायाचे घोटे उघडेच ठेवले होते. लगेच अमेरिकन स्त्रिया खवळल्या! व त्यांनीं मोठी चळवळ करून त्या पुतळ्याचे घोटे झांकून टाकले. १०० वर्षांनंतर अमेरिकन तरुणीचे सजीव पुतळे आपल्या शरीराचा कोणकोणता भाग दाखवितात, व त्यांची नीति घोट्यापासून किती वर सरकली आहे व मानेच्या किती खालीं उतरली आहे याचें वेगळें वर्णन करण्याची जरूरी नाहीं. त्या बागेंतील पुतळ्याचें शरीर जितपत उघडें होतें तितपत तरी आपलें शरीर आजच्या अमेरिकन तरुणी झांकतात कीं नाहीं कोण जाणे! महायुद्ध वरील उत्क्रांतीला निमित्त मात्रझालें. पण पाश्चात्य संस्कृतीला कीड लागण्यास औद्योगिक उत्क्रांतीपासूनच सुरुवात झाली होती. यांत्रिक व औद्योगिक परिस्थितीमुळें स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य लाभलें व त्यामुळें नीति ढांसळली. प्रत्येक क्षेत्रांतून स्त्रिया घुसल्या व घर ओस पडलें. घरांतील गृहिणी बाजारांत जाऊं लागल्यावर घराचें अरण्य बनलें यांत नवल तें काय? संस्कृतीची एकदां गाडी अनीतीच्या उतारावर लागतांच मग तिला खीळ घालतां घालतां व स्त्रियांचीं "नग्न वक्षःस्थळें" झांकून टाकतां टाकतां पुरुषांना पुरेवाट झाली आहे. सध्यांच्या संस्कृतीला ध्येय असें राहिलेंच नाहीं.

या गिधाडी संस्कृतीची मुख्य धाड विवाहसंस्थेवर पडली, व सध्यां या संस्थेचे अस्थिमात्र अवशेष राहिले आहेत. सध्यांच्या या मोडकळीस आलेल्या विवाहसंस्थेची उभारणी आर्थिक पायावर झालेली आहे. धार्मिक भाग फार थोडा आहे. 'एक पत्नी व एक पति' याचा अर्थ एका वेळेस एक पति व एक पत्नि असा होऊं लागला आहे. व या अर्थानें वाटेल त्या व्यभिचाराला विवाहच म्हणतां येईल. घटस्फोटामुळें तर विवाहसंस्था अगदींच खिळखिळी झाली आहे. घटस्फोटासंबंधीं थोडे आंकडे खालीं दिले आहेत.

(१) हॉलंडः—या देशांत सध्यां दर हजार विवाहांमध्यें १४ घटस्फोट होतात.

(२) स्वीडनः—

सन	विवाह	घटस्फोट
१८९९	१०००	७
१९०४	१०००	८४
१९०९	१०००	९७

(३) अमेरिका (यु. स्टे.)

सन	लोकसंख्या	लोकसंख्येची वाढ	दर लाखी घटस्फोटाची वाढ
१८७०	३८६०००००	...	....
१८८०	५०००००००	७९·४	३९
१८९०	६३००००००	७०·२	५३
१९००	७६००००००	६७·६	७३

अमेरिकेंत १८८७ सालीं १७ विवाहांच्या मागें १ घटस्फोट असें प्रमाण होतें तें १९२४ सालीं ६ विवाहांच्या मागें १ असें वाढलें आहे.

९४५६२५ घटस्फोटांपैकीं ६६२४७६ बायकांच्या अर्जावरून झाले. मुलें झालीं तरी घटस्फोट होतात. ५७४ घटस्फोटांची तपासणी केली असतां त्यांत शेंकडा फक्त ३·४८ इतक्या घटस्फोटित युग्मांना मुलें नव्हतीं. बाकी सगळ्यांना होतीं. घटस्फोट सर्व पाश्चात्य राष्ट्रांमधून सारखे वाढत आहेत, व सध्यांच्या विवाहसंस्थेची हलाखीची स्थिति पाश्चात्य वाङमयांमधून आपणांस पदोपदीं दृष्टीस पडते. प्रो. जे. बी. वॉटसन म्हणतात कीं, सध्यांची विवाहसंस्था ५० वर्षांनंतर पार लयास जाणार. या असल्या धामधुमीच्या काळांत अमेरिकेमध्यें एक नवीनच नीति निर्माण झाली आहे. त्यामुळें

विवाहापूर्वीच्या शृङ्गारचेष्टा आतां स्त्रियासुद्धां उपभोगूं लागल्या आहेत. कारखान्यांतून कामें करणाऱ्या पोरींवर कुणाचाच ताबा नसल्यासारखें झालें आहे. तरुणांमध्यें शृङ्गारचेष्टा इतक्या माजल्या आहेत कीं, 'सर्व विश्वविद्यालयांनीं मिळून एक शृङ्गारसंस्था' काढावी अशी हि कांहीं उल्लू तरुण जाहीर सूचना करीत आहेत. न्यायाधीश लिंडसे यांचें कोर्ट म्हणजे या असल्या तरुणांचीं मनें तपासण्याची प्रयोगशाळाच असल्यामुळें त्यांच्या सुप्रसिद्ध लिखाणांमधून आपणांस या शृङ्गारचेष्टांचा कितपत व कुठपर्यंत फैलाव झाला आहे याची थोडीशी कल्पना येईल. बाप नीतिशास्त्रावर प्रवचनें देत असतांना त्याची मुलगी अनीतीच्या सरोवरांत पोहत असल्याचीं उदाहरणें आहेत. लिंडसे साहेब सरळ कबूल करीत आहेत कीं, शेंकडा २५ पर्यंत तरुणतरुणींच्या शृङ्गारचेष्टांची मजल प्रत्यक्ष संभोगापर्यंत जाते. शेंकडा १० तरी मुली या अनीतीच्या जाळ्यांत गुरफटल्या जातात. डॉ. कॅथेराइन डेव्हिस या बाईंनीं गोळा केलेली माहिती पहा. तिनें १००० स्त्रियांना प्रश्नपत्रिका पाठविल्या. १००० पैकीं ३७५ स्त्रियांनीं विवाहापूर्वीं आपल्या भावी पतीशीं शृङ्गारचेष्टा उपभोगल्या होत्या. २०८ स्त्रियांनीं विवाहापूर्वींच चुंबनाची माधुरी चाखली होती. ३८९ स्त्रिया विवाहापूर्वीं निष्कलंक होत्या. ७१ स्त्रियांनीं 'विवाहापूर्वींच लग्नसोहळा' उरकून टाकला होता. या ७१ पैकीं १६ जणींनीं आपण विवाहापूर्वींच्या लग्नशृंङ्गारांत एकपतिव्रत पाळत नसल्याचें कबूल केलें आहे. या १६ जणींपकीं १० जणींना संततिनियमनशास्त्र अवगत होतें. यापैकींच ६ जणी पदवीधर होत्या! एक एम. ए. होती व एक एम. डी. होती. यांपैकीं ९३ स्त्रियांनीं गर्भपाताचा मार्ग अंगिकारला होता. एकीनें ८ वेळां गर्भपात केला होता. १६३ जणींनीं समानसंभोग उपभोगला होता! ३८१ जणींनीं स्वयंमैथुनाचा कार्यक्रम स्वीकारला होता. ही झाली १९२१–२२ सालची तपासणी. १९३१–३२ सालीं रतिमदनाच्या जोडीनें कुठवर मजल मारली असेल याची कल्पना यावरून यईलच.

आतां तरुणांची एक तपासणी पाहूं. २६ तरुणांची तोंडी तपासणी घेण्यांत आली. प्रश्न व त्यांचीं 'होय' 'नाहीं' उत्तरें पहा. अर्थात् हे सामान्य तरुण होते, छचोर नव्हते.

प्रश्न	होय	नाहीं
१ आपण शृंगारचेष्टा केल्या आहेत का ?	२६	०
२ आपण ५ पेक्षां जास्त स्त्रियांशीं या चेष्टा केल्या आहेत कां	२४	२
३ आपण दारू प्यायला आहांत कां	१७	०
४ आपण वेश्येकड गला होता कां?	६	२०
५ आपण स्त्रियांशीं लैंगिक उपभोग घेतला आहे का ?	७	१९
६ आपण ५ पेक्षां जास्त स्त्रियांशीं संबंध ठेवला कां ?	५	२१
७ आपण परस्त्रीशीं व्यभिचार केला का ?	३	२३
८ आपण आठवड्यांतून २ पेक्षां जास्त वेळां मुष्टिमथुन केलें आहे का ?	१५	११

आणखी एक तपासणी वाचा. डॉ. पेक व डॉ. वेल्स यांनीं १०० पदवीधरांची माहिती गोळा केली आहे. ३७ जणांनीं विवाहापूर्वीं लग्न अनुभवलें होतें. या ३७ जणांपैकीं २४ जणांनीं २० वर्षांच्या आंत असतांनाच अनुभव घेतला होता ! या २४ तील ८ बहाद्दरांनीं १६ वर्षांची मर्यादाही गांठली नव्हती!

सध्यां संततिनियमनसाहित्याच्या सुलभतेनें 'विवाह संततीसाठीं नसून गमतीसाठीं आहे' (Marriage is not for procreation but recreation) हें तत्त्व प्रत्यक्ष आचरण्यांत आणण्याचें काम अगदींच सोपें झालें आहे. बाळाचें बारसें आतां बाराव्यासारखें साजरें करण्याची वेळ येत चालली आहे. मूल होण्यासाठीं देवाला नवस करण्याऐवजीं आतां मूल होऊं नये म्हणून संततिनियमनतज्ज्ञांचे पाय धरले जात आहेत. मूल होण्यासाठीं नवस करावयाचे दिवस जाऊन आतां मूल न होण्यासाठीं संततिनियमन करण्याचे दिवस आले आहेत. अमेरिकेंत संततिनियमन पद्धतीची जाहीर माहिती पुरविणें कायद्यानें संमत नाहीं. पण ही एक कागदी बात आहे. प्रत्यक्ष स्थिति वेगळी आहे. संततिनियमनाची पद्धत माहीत नसलेला एकसुद्धां आधुनिक तरुण अमेरिकेंत नाहीं. डॉ. डेव्हिसनीं १००० स्त्रियांना संततिनियमनाबाबत प्रश्न विचारले असतां काय उत्तरें मिळालीं तीं पहा. १००० पैकीं ७३० स्त्रिया प्रत्यक्ष संततिनियमन आचरणांत आणीत होत्या.

७८ स्त्रियांना संततिनियमनाचा मार्ग पसंत नव्हता. (अर्थात त्यांना संततिनियमन ठाऊक होतेंच.) म्हणजे शेंकडा ८० स्त्रियांना संततिनियमनाची माहिती आहे व शेंकडा ७३ तर प्रत्यक्ष संततिनियमन करीत आहेत!

एकटया बाल्टिमोर शहरांत वार्षिक २२५०००० संततिनियमनाचीं आयुधें राजरोस खपत आहेत. चोरटा व्यवहार वेगळाच. किराणा भुसार माल मिळणाऱ्या दुकानांपासून तर पावरोटीवाल्यांच्या दुकानापर्यंत सर्वत्र हीं आयुधें विकत मिळतात. बाल्टिमोर शहरांत तर कित्येक तरुणांचा हीं आयुधें विकणें हा पोटापाण्याचा धंदाच होऊन बसला आहे! असे २०० लोक तरी आपली उपजीविका यावर करीत आहेत! ही बाल्टिमोर शहराची महायुद्धापूर्वीची स्थिति. महायुद्धानंतर वरील सर्व गोष्टींची तिप्पट तरी झाली असली पाहिजे. इतकें असूनहि डॉक्टरांना अमेरिकेंत परीक्षेसाठीं हा विषय नेमलेला नाहीं. न्यूयार्कमधील एका मेडिकल स्कूलमध्यें एक प्रोफेसर या विषयावर मुलांना भीतभीत थोडी माहिती सांगतांना त्यांनीं मुलींना वर्गाबाहेर जाण्यास सांगितलें. बिचाऱ्याला माहीत नाहीं कीं बाहेर घालवून दिलेल्या मुलींपैकीं शेंकडा ८० मुलींना त्याचें पूर्ण निसंतान करण्याइतकी या विषयाची माहिती होती ! ! विवाहापूर्वीं तरुण मंडळींना लैंगिक शिक्षण द्यावें कीं न द्यावें असा ६९ डॉक्टरांना प्रश्न केला असतां त्यापैकीं २५ डॉक्टरांनीं 'द्यावें' असें मत दिलें. पण ४४ डॉक्टरांनीं ' देऊं मये' असें ठासून सांगितलें ! यावरून अमेरिकेंतील डॉक्टर लोक किती नादान व बाहृच जगांत चाललेल्या गोष्टींविषयीं किती अंध आहेत याची कल्पना येईल. बाल्टिमोर शहरांतील संततिनिरोधनसाहित्य विकत घेणाऱ्यांपैकीं शेंकडा ५० लोक अविवाहित होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

विवाहसंस्थेचा असा बोजवारा झाल्यानंतर आतां त्यांतून मार्ग काढण्याचे प्रयत्न अमेरिकेंत चालू आहेत, व इतर पाश्चात्य राष्ट्रांतूनहि त्यांचा बोलबाला होत आहे. पापपुण्याच्या कल्पनेचा तिकडे बायबलच्या बाहेर सर्वत्र अस्त झाला आहे. विवाहसंस्थेभोंवतालचा धार्मिक डोलारा आतां पूर्ण ढासळला असून लैंगिक चैन या नग्नसत्यापेक्षां या संस्थेला तिकडे जास्त किंमत राहिलेली नाहीं. तेव्हां या असल्या नंग्या लैंगिक परिस्थितींतून पळवाट म्हणून बेन लिंडसेसारख्या विद्वानांनीं "दोस्तीच्या विवाहा"ची संस्था अमलांत आणण्याबद्दल खटपट चालविली आहे. ' दोस्तीचा विवाह ' (companionate Marriage) म्हणजे 'तात्पुरती लैंगिक दोस्ती'. ही संस्था कायद्याला अद्याप संमत नसली तरी कायद्याला धाब्यावर बसविण्यास चटावलेल्या अमेरिकन तरुणांनीं तिचा पुरस्कार फार मोठ्या प्रमाणावर चालविलेला आहे. एवीतेवीं चाललेल्या या बेकायदेशीर चोरट्या प्रकाराला कायदेशीर म्हणा असें लिंडसे साहेबांचें म्हणणें आहे. विवाहापूर्वीच लैंगिक दोस्ती जुळविणाऱ्या या जोडप्यांना लैंगिक शिक्षण देण्यासाठीं सरकारी सोय व्हावी असें लिंडसेसाहेब सुचवितात. ही तात्पुरती लैंगिक दोस्ती यशस्वी ठरल्यास मग त्या जोडप्यांनीं विवाहशृङ्खला आपल्या गळ्यांत अडकवून घ्यावी अशी हीं नवीन योजना आहे. या तात्पुरत्या लैंगिक देवघेवीच्या सक्रिय वाटाघाटी चालू असतां संततीची उपाधि मध्येंच धोका देईल म्हणून सरकारनें उभय पक्षाला संत-तिनियमनाची संपूर्ण माहिती पुरवावी अशी सूचना करण्यासहि लिंडसे साहेब चुकले नाहींत. थोडक्यांत म्हणजे लढाईच्या वेळीं जशी बिन मालकीची जागा (No man's land) असते तशी या अमेरिकन लैंगिक युद्धप्रसंगीं 'बिनसंततीची जागा' (No child's land) राखण्यासाठीं व तिला कायदेशीर स्वरूप देण्यासाठीं लिंडसेसाहेबांची योजना आहे. तिला बरें वाईट म्हणण्याचें हें ठिकाण नाहीं व आपणांस तूर्त जरूरहि नाहीं. मात्र अमेरिकेंत विवाहसंस्था पूर्ण ढासळली आहे व परिस्थिति बिकट झाली आहे यांत शंकाच नाहीं. उदाहरणार्थ सुमारें १००० सुशिक्षित अविवाहित स्त्रियांची डॉ. डेव्हिस या बाईनें केलेली ही छाननी पहा. यावरून खास कळून येईल कीं, लिंडसे साहेबांनीं सुचविलेल्या व्यावहारिक योजनेमध्यें बरेचसें नैतिक नसलें तरी व्यावहारिक तथ्य आहे.

डॉ. डेव्हिस बाईनीं तपासलेल्या सुमारें १००० स्त्रियांचे हे उद्योग पहा. किती स्त्रियांनी किती लैंगिक अत्याचार केले होते याचे हे आंकडे आहेत.

स्वयंमैथुन ३९६; सामान्य पुरुष–संबंध १२; समान लिंगसंभोग ४३; समान लिंगसंभोग व स्वयंमैथुन दोन्ही ११५; स्वयंमैथुन व पुरुषसंबंध दोन्ही ६७; पुरुषसंबंध व समानलिंग

संभोग दोन्ही ६१; पुरुषसंबंध, समानलिंगसंभोग व स्वयंमैथुन तिन्ही २५; यांपैकीं कांहीं नाहीं २८८; उत्तरें देण्याचें नाकारलें ५३.या सर्व स्त्रिया सामान्य सुशिक्षित व २० पासून ७० वर्षांपर्यंतच्या आहेत ! पाश्चात्य राष्ट्रांमधून आजकाल वेश्यांना आपला धंदा नीट चालत नाहीं अशी खात्री वाटत चालली आहे. पण वेश्यांच्या पोटावर कुलीन स्त्रियांनीं पाय आणला आहे. कुलीन स्त्रिया आपली विषयवासना पूर्ण करण्यास समर्थ असतांना वेश्यांसारख्या हलकट स्त्रियांकडे जायला पाश्चात्य पुरुष कांहीं खुळे नाहींत! डॉ. पेक व डॉ. वेल्स यांनीं बऱ्याच पुरुषांची तपासणी केली. सर्व पुरुष लैंगिक अत्याचारांचे भोक्ते होते. त्यांना प्रश्न असा केला होता कीं, आपण आपली वासना कुठें तृप्त केलीत अथवा करतां? उत्तरांची शेंकडेवारी पहा.

(१) वेश्यांच्याकडे मुळींच नाहीं.—२१.%
(२) वेश्यांच्याकडे फक्त एकचतुर्थांश%—४॥%
(३) " " एकद्वितीयांश%—३%
(४) " " तीनचतुर्थांश%—२॥%
(५) " सदा ४॥%

याचा सरळ अर्थ असा कीं, पाश्चात्य देशांतील विशेषतः अमेरिकेंतील सर्वसाधारण घरें म्हणजे वेश्यांचीं घरें असण्याचा पुष्कळ संभव आहे.

बालपणींच मातृपदाचा लाभ किंवा आपत्ति येणाऱ्या स्त्रियासुद्धां मिस मेयोच्या देशांत थोडच्या नाहींत. मुक्तिफौजेनें 'सुटका' केलेल्या अविवाहित मातांपैकीं शेंकडा ४२ जणी १६ वर्षांच्या आंत असल्याचें नमूद आहे. हजारों बेकायदेशीर मुलें प्रतिवर्षीं जन्माला येत आहेत. बोस्टन शहरांत २३ मुलांमध्यें १ मूल बेकायदेशीर असतें. बोस्टन शहरांत १९१४ सालीं २१०८ बेकायदेशीर मुलें जन्मलीं. एकटचा बाल्टिमोर शहरांत असल्या मुलांच्या हितार्थ झटणाऱ्या २४ संस्था आहेत. शिकागोमध्यें प्रतिवर्षीं १००० मुलें बेवारशी मरून जात आहेत. असल्या मुलांसाठीं पांजरपोळांसारख्या संस्था स्थापन झाल्या आहेत. या गोष्टी म्हणजे पाश्चात्य विवाहसंस्थेच्या नीतिमत्तेबद्दल ग्वाही देणारें एक नीतिमापक यंत्रच आहेत.

या सर्व गोष्टींच्या बुडाशीं औद्योगिक उत्क्रांति आहे.आर्थिक परिस्थितीवर राष्ट्राची नैतिक प्रगति अवलंबून असते. विशेषतः विवाहसंस्था व पैसा यांचा निकटचा संबंध आहे. पाश्चात्य देशांपैकीं सर्व देशांतून अशा रीतीनें जुन्या विवाहसंस्थेचा बोजवारा झाला आहे व अजून नवी कोणची संस्था अमलांत आणावयाची याबद्दल कांहींच सुचेनासें झालें आहे. अशा मधल्या स्थितींत हीं राष्ट्रें आणखीं बरींच वर्षें खिचपत पडणार. याला रशिया मात्र अपवाद आहे. त्या ठिकाणीं मात्र त्यांनीं अनेक संस्थांची स्थापना केली असून त्यासाठीं त्यांची अविश्रांत खटपट चालली आहे. गेल्या महायुद्धाचा तडाखा रशियाइतका कोणालाच बसला नाहीं. महायुद्धानंतर रशियांत बंडाळी झाली, यादवी झाली, क्रांति झाली व या सर्वांवर मात म्हणून मोठा दुष्काळ पडला! या सर्व गोष्टी शिरावर संभाळून आजचा रशिया म्हणज जगाची सामाजिक व आर्थिक प्रयोगशाळा बनून राहिला आहे. स्त्रियांना रशियाइतकें स्वातंत्र्य अन्य राष्ट्रांत नाहीं. विवाहानंतरहि रशियन स्त्रिया स्वतंत्र असतात. काडीमोडीच्या बाबतींत स्त्रियांना पुरुषांइतकेच हक्क आहेत. बकायदेशीर मुलें रशियांत जन्मास यतच नाहींत. कारण मुलांच्या जन्मापूर्वीं त्यांच्या आईबापांचा विवाह झालेला नसला तरी चालतें.लैंगिक शिक्षणाची सोय रशियांत फार चांगली आहे. सहज मोडतां येण्याजोगे कायदे रशियानें आतां ठवले नाहींत. अर्थात अमलांत आणीत असलेल्या सर्वच गोष्टी अनुकरणीय आहेत असें नाहीं. पण आंतून सडलेल्या, अस्थिमात्र शिल्लक राहिलेल्या, नादान बनलेल्या, विवाहसंस्थांना इतर पाश्चात्य राष्ट्राप्रमाणें रशियानें पोकळ दिमाखानें कवटाळन तरी धरलेलें नाहीं. धडाडीनें पुढें पाऊल टाकणाऱ्या आजच्या रशियाकड सर्व जग शिव्या देत देत कां होईना पण आशाळभूतपणानें पाहात आहे!

मदर इंडियाला जबाब

मिस् मेयो इनें आपल्या 'मदर इंडिया' या पुस्तकांत केलेल्या कुत्सित विधानांना लालालजपतराय यांनीं आपल्या 'अन हॅपी इंडिया' या ग्रंथांत जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांच्या आधारें—

लैंगिक अधःपात हाच हिंदुस्थानच्या सर्व अधःपाताला मूळ कारण आहे असें मिस् मेयोनें म्हटलें आहे. पण मेयोबाईच्या मातृभूमींत काय स्थिति आहे आपण पाहूं.

डेनव्हर हें गांव तीन लक्ष वस्तीचें आहे. तेथील सुप्रसिद्ध जज्ज लिंडसे यांनीं पुढील हकीकत दिली आहे. '१९२०–२१ मध्यें १४ ते १७ दरम्यानच्या ७६९ मुली व्यभिचार करून सल्ला मागण्यासाठीं मजकडे आल्या. त्यांतील प्रत्येक मुलगी बिकट

पेचांत सांपडल्यामुळेंच मजकडे आली होती. त्यांतून निसटलेल्या मुलींचा विचार केला तर व्यभिचारी मुलींची संख्या २००० पर्यंत जाते. हा तर्क नाहीं. शोधाअंतीं माझी खात्री झाली आहे. कारण कित्येक गर्भपात करतात, कित्येकींना गर्भ राहातच नाहीं. कित्येक आणखी कांहीं उपाय करतात. ३१३ मुलींपैकीं २६५ मुली ११ ते १२ च्या दरम्यान वयांत आल्या होत्या असें मला आढळलें.'

पूर्वजर्मनीबद्दल हॅवलाक एलिस म्हणतोः– १६ वर्षांवरील मुलगी अक्षत असेल असा पुष्कळांना भरंवसा नसतो. हानोवर संस्थानांत तर लग्नापूर्वी संबंध नाहीं असें एकही उदाहरण नाहीं. थोडक्यांत म्हणजे सर्व टयुटानिक प्रांतांत अनिर्बंध स्वैर व्यभिचार हा नियमच होऊन बसला आहे.

प्रो. बर्नो मेयरः––निम्यापेक्षां जास्त स्त्री–पुरुषांचा बेकायदेशीर संबंध असतो.

पॉल ब्यूरोः––निरनिराळ्या स्त्री–पुरुषांच्या गांठी घालून देणाऱ्या संस्था पॅरिसमध्यें स्थापन झाल्या असून त्यांचा कारभार अगदीं राजरोस चालतो. कित्येक ठिकाणीं स्त्रिया जुगारांत मांडल्या जातात. जिच्या नांवाचें तिकीट पुरुष जिंकील ती त्याला मिळते.

मार्चंटः––लंडनमध्यें गोऱ्या मुलींच्या व्यापारावर हजारो लोक श्रीमंत झाले आहेत. पार्लमेंटला त्यांत शेवटीं लक्ष घालावें लागलें. १९१३ सालीं सरकारनें मुलींना उपदेशपर असें एक पत्रक काढून वाटलें. त्यांतील सूचना पाहण्याजोग्या आहेत. "मुलींनीं ट्राम, दुकान, स्टेशन वगैरे जागीं नवख्या माणसाशीं शब्दसुद्धां बोलूं नये. त्याला रस्ता विचारूं नये. रविवारच्या शाळा व बायबलचे वर्ग यांचा शोध केल्यावांचून जाऊं नये. रस्त्यांत घेरी येऊन पडणाऱ्या स्त्रीला मदत करूं नये. कारण ती कुंटीण असण्याचा संभव असतो. आपल्या नातेवाईकांना अपघात झाल्याचें कोणी परका सांगावयास आला तर त्यावर विश्वास ठेवूं नये. इ. इ." या देशापासून आम्हीं नीति शिकावी असें मेयोबाईचें म्हणणें आहे.

ब्लॅशकोः––वेश्याव्यवसाय हा सर्व जगांत सर्वकाळीं होता. पण कारखानदारी, बेकारी वगैरे कारणांनीं गेल्या शतकांत त्या धंद्याची जी कल्पनातीत वाढ झाली तिला मानवी इतिहासांत तुलनाच नाहीं.

उपदंशादि रोग हिंदुस्थानांत फारच पसरले आहेत असें मेयोबाई म्हणतात. कांहीं इस्पितळांतील उदाहरणांखेरीज तिनें कोठलाही आधार या विधानासाठीं दिला नाहीं. आतां पाश्चात्य देशांची काय स्थिति आहे तें पाहूं.

ब्लॉचः––सन १९०० मधील आंकड्यांवरून असें दिसतें कीं, प्रशियांत एक लक्ष लोक या रोगांनीं पछाडलेले असून त्यांची संख्या वर्षानुवर्ष घटत नाहीं. तीस वयानंतर पहिलेंच लग्न करणाऱ्या प्रत्येक माणसाला गनोरिया झालेला असतो. कोपनहेगनच्या हिशाबावरून दिसतें कीं २० ते ३० वयाच्या दरम्यान शकडा २० माणसांना हा रोग असतो. पण हें प्रमाण अगदीं कमी आहे. दक्षिण इटली, ग्रीस, तुर्कस्थान, रशिया व इग्लंड या देशांत हें प्रमाण चढत्या क्रमानें आहे.

हॅवलाक एलिसः––(मेडिकल सोसायटीची कमिटी न्यूयॉर्क यांच्या रिपोर्टावरून) न्यूयार्क शहरांत दरसाल २॥ लक्ष लोकांना उपदंश रोग होतो. न्यूयॉर्कचे एक डर्मिटॉलॉजिस्टः-उच्च कुळांतील तरुणांपकीं एक तृतीयांश लोकांना उपदंश रोग झालेला असतो. सर्व मोठमोठ्या विद्यापीठांत दर सहामाहीला शेंकडा २५ विद्यार्थ्यांना हा रोग होतो.

जर्मनींत दरसाल ८ लक्ष लोकांना हा रोग होतो. सर्व युरोपच्या सैन्यांत ब्रिटिश सैन्यांमध्यें या रोगाचें प्रमाण फार आहे.

एच्. सी. फरेन्चः––हिंदुस्थानांत हिंदी सैनिकांपेक्षां इंग्रजी सैनिकांत उपदंशाचें प्रमाण दसपटीनें जास्त आहे.

डग्लस व्हाईटः––(रॉयल कमिशनपुढें साक्ष १९१४) नुसत्या लंडनमध्यें दरसाल १। लक्ष नव्या लोकांना व युनायटेड किंग्डममध्यें ८ लक्ष नव्या लोकांना हा रोग होतो.

मिस् ख्रिस्टाबेल पांखर्स्टः––सर्व हिशेब ध्यनांत घेतां शेंकडा ७५ लोकांना हा रोग केव्हांना केव्हां तरी झालेला असतो.

प्रो. लॅकासंजीवः––लियान शहराची वस्ती ५॥ लक्ष आहे. तेथें दरसाल १०००० गर्भपात होतात. फ्रान्समध्यें दरसाल २॥ लक्ष होतात.

एम् ब्यूरोः––संततिनियमन, गर्भपात, मोफत इस्पितळें या सर्व सोयी असूनही बालहत्त्या युरोपांत वाढत आहे. १९१८ सालीं एका स्त्रीनें मूल बुडवून मारलें, एकीनें भिंतीवर आपटून व तिसरीनें जीभ हासडून व कपाळ चेचून मारलें. या तिन्ही स्त्रिया निर्दोषी म्हणून कोर्टानें सोडून दिल्या. उपदंशादि विकार, लहान मुलींशीं

संभोग केला तर बरे होतात अशी युरोपांत समजूत आहे. त्यामुळें बापांनीं आपल्या २।४ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याचीं उदाहरणें ब्रिटिश कमिटीनें नमूद केलीं आहेत. या समजुतीमुळें इंग्लंडमध्यें १ ते ५ वयाच्या मुलींनाही हे रोग जडलेले आढळून येतात. 'हिंदुस्थानांत मुलावर होणारे अत्याचार मला वाचवत नाहींत' असें म्हणणाऱ्या चर्चिल साहेबांनीं कॅबिनेटमध्यें स्वतः पुढेंच आलेल्या या रिपोर्टाकडे एकदां नजर टाकावी.

हिंदुस्थानांत येणारे अँग्लोइंडियन नोकर फार सज्जन असतात व तेच खरे हिंदभूचे हितचिंतक होत असें मेयोबाई म्हणतात. बार्बारा विंगफील्ड स्ट्रॅटफोर्ड नांवाच्या इंग्रज बाईनें त्यांच्याबद्दल पुढील माहिती दिली आहे. 'पृथ्वीच्या पाठीवर यांच्या इतके रानटी लोक कोणीच नसतील. यांच्यांतील पन्नास वर्षांच्या आंतील प्रत्येक बाईला दर महिन्याला एक नवा तरुण मनुष्य हवा असतो सर्वांत मौजेची गोष्ट ही कीं महायुद्धाचे वेळीं मायदेशचे लोक घोर चिंतेंत असतांना हिंदुस्थानांत अँग्लोइंडियनांचे नाचरंग तमाशे अगदीं बेफाम चालू होते.' हिंदुस्थानांतील अस्पृश्यांबद्दल बाईंना फारच वाईट वाटतें. अस्पृश्यता असेपर्यंत हिंदी लोक स्वराज्याला लायक नाहींत असें त्यांस वाटतें. अमेरिकन बाईनें तरी हा आरोप करावयाचा नव्हता. त्यांच्या देशांत निग्रोंची स्थिति पुढीलप्रमाणें आहे.

१८६५च्या आधीं निग्रोंना ज्या भयंकर अमानुष तऱ्हेनें वागवीत असत तिला हिंदुस्थानांतच काय पण जगांतही तोड नाहीं. पुढें गुलामगिरी नष्ट झाली पण ती फक्त कागदपत्रांत. प्रत्यक्षव्यवहारांत रतिभरही कमी नाहीं. ६५ सालच्याच अखेरीस गुलामांना सक्तीनें काम करावयास लावण्याबद्दलचे 'व्हेग्रन्सी' कायदे पास झाले. दारिद्र्य, काम करणें याबद्दल जवळ जवळ प्रत्येक संस्थानांत असे कायदे केले आहेत कीं, निग्रोचें आस्तित्व हाच गुन्हा ठरावा.दक्षिणभागांत निग्रोंना एकही राजकीय हक्क नाहीं. व उत्तर भागांतही मताधिकारास आवश्यक असें उत्पन्न ठरविण्यांत इतकी लबाडी केली आहे कीं, गरीब गोरा नेमका त्यांतून सुटून निग्रो मात्र मतास मुकतो.

१९१० मध्यें ५२ पैकीं २६ संस्थानांनीं निग्रो गौर विवाह बेकायदेशीर ठरवून त्यास दहा वर्षांपर्यंत शिक्षा ठेवली. 'जिम को कायद्या'अन्वयें कोणच्याही वाहनांत निग्रोंना गोऱ्याशेजारीं बसतां येत नाहीं. गोऱ्यांच्या शाळा, नाटकगृहें, स्मशान इत्यादि स्थळीं दक्षिणेंत कायद्यानें व उत्तरेंत रूढीनेंच निग्रोंना मज्जाव आहे. अमेरिकेंतील निग्रोंचें 'लिंचिंग' जिवंत जाळून मारणें हें जगांतल्या कोणत्याही संस्कृतीला कालिमा आणील केवळ संशयावरून गांवकरी जमतात; निग्रोला धरतात व मौजेनें हंसत खेळत निग्रोला भाजून, ठेंचून भोंसकून मारतात. त्याची चौकशी नाहीं. यांना शिक्षा नाहीं. कांहीं संस्थानांच्या गव्हर्नरांनीं तर असें स्वच्छ सांगितलें कीं, निग्रोला जाळणाऱ्या लोकांना शिक्षा द्यावी असें ठरलें तर आम्ही राजीनामे देऊन त्या जाळणाऱ्या लोकांचा पुढाकार घेऊं. अजूनसुद्धां दरसाल ६० ते ९० निग्रो जाळले जातात. त्यांतील कांहींचे गुन्हे अगदीं क्षुल्लक असतात व कांहींवर खोटेच आरोप असतात. निग्रो स्त्रिया व अंगावर पिणारीं मुलें यांनाही टांगून किंवा ठेंचून मारल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत व अशा समारंभांत गांवच्या गोऱ्या स्त्रियाही हौसेनें भाग घेतात. कित्येक वेळां इस्पितळांत पडलेल्या निग्रोलाही गांवकऱ्यांनीं ओढून नेलें आहे. व त्याच्याही पेक्षां जास्त म्हणजे कोर्टाकडन शिक्षा झालेल्या व त्यामुळें तुरुंगांत असलेल्या निग्रोलाही बाहेर काढन केव्हां केव्हां गांवकरी टांगून जाळतात. अमेरिकेंतील सर्व वंशांच्या पुरुषांच्या विकारास निग्रो स्त्रीला बळी पडावें लागतें. त्यामुळें निग्रोमध्यें प्रत्येक मानवी वंशाच्या रक्ताचें मिश्रण आहे. हें अमेरिकेबद्दल झालें. त्यांचेच युरोपी भाईबंद आफ्रिकेंत काय करीत आहेत तें जरा पाहूं.

एक अमेरिकन मिशनरी मॉरेल म्हणतोः—उत्तर कांगो प्रांतांतले रबराचे मळे म्हणजे माणसांचे कसाईखाने आहेत. तेथलें रबर मानवी रक्तांत बुचकळलेलें आहे. इकेलेंबाते मांटुबा या प्रांतांत तर सरकारनें सैतानी अत्याचार केले. हजारो स्त्री–पुरुषांचा संहार करून कॅप्टन रॉम यानें आपल्या बागेस शोभा देण्यासाठीं २१ मुंडकीं आणन ठेवलीं. तेथील जमाती नष्ट होण्यासाठीं आणखी एक आसुरी उपाय युरोपी लोकांनीं केला उपदंशादि विकाराचे युरोपी सैनिक आणून त्यांच्याकडून तेथील हजारो स्त्रियांवर बलात्कार करविला, व अशा रीतीनें त्या भयंकर रोगांचा प्रसार त्या जातींत करून दिला.

रा. कँबेल:—कित्येक ठिकाणीं सूडाच्या भयंकर भावनेनें या युरोपी सेनापतींनीं मुंडकी कापून नेल्यानंतर मागाहून मुद्दाम सैन्य पाठवून त्या प्रेतांचे हात कापून नेले. व कांहींनीं त्यांचीं लिंगें कापून आणून गांवच्या कुंपणावरून टांगून दिलीं

तद्देशीयांच्या हिताचे संरक्षक म्हणून हेच युरोपी लोक जगभर मिरवितात व त्यांच्या संरक्षणाखालीं हिंदुस्थानची भरभराट होणार आहे असें मेयोबाईचें म्हणणें आहे.

हिंदुमुसलमानांच्या भांडणांचें वर्णन करून मेयोबाईनीं त्यासाठीं हिंदी लोक स्वराज्याला नालायक आहेत असें सांगितलें आहे. पण ब्रिटिश अधिकारी दोघांनाही सारख्याच भावानें वागवितात असेंही त्यांनीं विधान केलें आहे. पण प्रत्यक्ष येथील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या लेखणींतूनच निघालेले उतारे खालीं दिले आहेत. त्यावरून हिंदुमुसलमानांच्या भांडणास कोण जबाबदार आहे तें दिसून येईल.

१८५७ ले. कर्नल जॉन कुक:—"हिंदुस्थानांतील भिन्नधर्म व भिन्नवंश यांच्यांतील वैमनस्य नेतां येईल तितक्या विकोपाला नेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्यांत ऐक्य करण्याचा प्रयत्न कधींही करूं नये. डी. व्हाइड एट इंपीरा' फोडा व झोडा हेंच हिंदुस्थान सरकारचें धोरण नेहमीं असावें.

१८५९ लॉर्ड एलिफन्स्टोन:—डी. हाइड एट् इंपीरा' हें रोमन लोकांचें धोरण होतें. तेंच आपलें असणें जरूर आहे"

सर जॉन स्टँची:—"हिंदुस्थानांतील भिन्न धर्मांतील शत्रुत्व हें आपलें मोठेंच बळ आहे" ब्रिटिश अमदानीच्या पहिल्या ३०–४० वर्षांत फोडा व झोडा या नीतीचें स्वरूप सध्यांच्या अगदीं उलट होतें. त्यावेळीं मुसलमान हे सरकारचे शत्रु होते. म्हणून 'मुसलमानांना निर्दाळलें पाहिजे' हा त्या वेळचा कानमंत्र होता. आतां त्याच्या उलट आहे.

१८४२ लॉर्ड एलेनबरो:—ड्यूक ऑफ वेलिंग्टन यास—"आपल्याला अफगाणिस्थानांत अपयश यावें अशी मुसलमानांची इतकी उत्कट इच्छा असेल याबर मीं विश्वासही ठेवला नसता. पण प्रत्यक्ष पाहतां आपल्यावर सर्वस्वीं अवलंबून असलेल्या मुसलमानांतही ती इच्छा प्रबळ होती. उलट हिंदूंना आनंद झाला. तेव्हां $\frac{१}{१०}$ लोकांचें शत्रुत्व असतांना बाकीच्या $\frac{९}{१०}$ लोकांचें म्हणजे हिंदूंचें पाठबळ मिळवून ठेवलें नाहीं तर मूर्खपणाच होईल."

१८५८ थॉमस हॅरिंग्टन:— (सारांश) बंडाचे खरे सूत्रधार हिंदु असणें शक्य नाहीं. तें मुसलमानांचेंच कारस्थान होतें. मुसलमान कधींही राजनिष्ठ होऊं शकणार नाहींत. कारण विधर्मी राजा मान्य करणें कुराणान्वयें पाप आहे. आपल्या धर्मोपदेशकांना मुसलमानांचीं मनें वळवून त्यांना वाटवितां येत नाहीं. हिन्दूमध्यें त्यांना लवकर यश येतें. तेव्हां हिंदूंना आपलेसें करणें श्रेयस्कर आहे.

आज हें पारडें उलटलें आहे. सुमारें १८८० सालापासूनच हें उलटत आहे. व वंगभंगाच्या वेळेपर्यंत मुसलमानांचें शत्रुरूप जाऊन ती जात सरकारची 'आवडती राणी' (सर फुलर) होऊन बसली. हंटर साहेबांनीं मुसलमानांच्या प्रश्नाचा १८८० च्या सुमारास नव्यानें विचार केला, व थॉमसच्या विरुद्ध त्यानें निकाल दिला. कधींही राजनिष्ठ न होणारे मुसलमान राजनिष्ठ होऊन 'आवडती राणी' झाले. या परिवर्तनासंबंधींचे पुढील उतारे बोधक आहेत.

महंमदअल्ली १९२३:—"मोर्लेमिंटो सुधारणा घाटत होत्या त्या वेळीं मुसलमानांच्या मागण्या सरकारपुढें मांडण्यासाठीं त्यांचें एक शिष्टमंडळ व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांजकडे गेलें होतें. पण आतां सांगावयास हरकत नाहीं कीं हें शिष्टमंडळ हुकमी होतें. गेलेलें नव्हतें बोलावलेलें होतें"

लॉर्ड मोर्ले—"मिंटो यांस (मोर्ले आठवणी) "मुसलमानांच्या प्रश्नांत मी फिरून लक्ष घालूं इच्छित नाहीं. मुसलमानांच्या जादा मागण्यासंबंधींचें तुम्हींच पहिलें भाषण केलें व हा ससा उठवलांत याची आपण कृपा करून आठवण ठेवावी.

रम्से मॅक्डोनाल्ड:— 'हिंदुस्थान सरकार अधम कारस्थानें करीत आहे. ब्रिटिश अधिकारी मुसलमानांना फूस देतात. व मुसलमानांना जास्त सवलती देऊन हिंदुमुसलमानांत कलह लावून देतात."

लॉर्ड ऑलीव्हियर (माजी भारतमंत्री):— "हिन्दूमधील राष्ट्रीय वृत्तीस तोंड देण्यासाठीं मुसलमानांना ब्रिटिश अधिकारी जास्त सवलती देतात हे कधींच नाकबूल करतां येणार नाहीं."

हिंदी प्रजेची दैन्यावस्था

संपत्ति व कर देण्याची शक्ति

The wealth and Taxable capacity of India 1924

अजमास कोणाचा	वर्ष	प्रत्येक माणशी उत्पन्न
दादाभाई नौरोजी	१८७०	२० रु.
बेअरिंग बारबूर	१८८२	२७
डिग्बी	१८९८–९९	१८.९
लॉर्ड कर्झन	१९००	३०

डिग्बी	१९००	१७.४
फिंडले शिरास	१९११	५०
सर बी. ए. सर्मा	१९११	८६
प्रो. शहा	१९२१–२२	४६

१९२२–२३ मध्यें २४०००००० पैकीं २३८२४२ लोक फक्त इन्कमूटॅक्स देत होते. यावरूनही हिंदी प्रजची कंगाल स्थिति ध्या गांत येईल. मिस् मेयोला हिंदुस्थानमध्यें सगळीकडे सुबत्ताच दिसत आहे. तिनें आर्थिक स्थिति समजून घेण्यापूर्वीं दादाभाई नौरोजी, रानडे, जोशी व वाच्छा यांचे ग्रंथ वाचण्याचें दूरच राहो, ऐकलेलेहि दिसत नाहींत. हिंदुस्थानचा पैसा परदेशांत कसा जात आहे तें पाहूं. लष्करावर किती खर्च होतो तो पहा.

हिंदुस्थानांत उत्पन्नाच्या ६३.८ टक्के खर्च लष्करावर होतो,तोच युनायटेड किंग्डममध्यें५३.७ होतो, ऑस्ट्रेलियामध्यें ४८.३, कानडामध्यें २४.२ साउथ आफ्रिकेंत ५.२, स्पेनमध्यें १७.६, फ्रान्समध्यें २०, इटलीमध्यें १७.३, अमेरिकेमध्यें ३८.२ जपानमध्यें ४९ टक्के.

हिंदुस्थान कोणचा व किती कच्चा माल ब्रिटनला पुरवितें.

ताग–सगळ्यांत जास्त हिंदुस्थानांतून इंग्लंडला जातो.

लोंकर–सगळीच लोंकर ब्रिटनला जाते.

गहूं–बहुतेक गहूं ब्रिटनला जातो.

चहा–दोनतृतीयांशपेक्षां जास्त ब्रिटनला जातो

कातडें व कमावलेलें कातडें–ब्रिटनलाच जातें. यावरून ग्रेटब्रिटनला हिंदुस्थानपासून मुळींच फायदा नाहीं हें विधान (मिस् मेयोचें) किती बरोबर आहे तें कळून येईल.

वरिष्ठ अधिकाऱ्यांना पब्लिक सर्व्हिसला भरभक्कम पगार देऊन हिंदुस्थानांतून किती पैसा ओढला जातो पहा. पगार, डयूटीअलाऊन्स,लोकल अलाउन्स घरभाडें, प्रवास-भत्ता, व इतर भत्ता–मिळून लष्करी सर्व्हिसमध्यें १९१३–१४ मध्यें रु. १३४५५४००० खर्च झाले तर १९२२–२३ मध्यें रु.२६९९७२००० खर्च झाला व सिव्हिल सर्व्हिसमध्यें १९१३–१४ त रु. ६७५१२००० व १९२२–२३ मध्यें १३७५२२००० रु. नुसत्या पगारावारी गेले.

एकंदर पैसा हिंदुस्थानबाहेर किती जातो.

होम चाजस कोटी रुपये.	५००००
परदेशच्या भांडवलावर व्याज	६०·००
परदेशी कंपन्यांना मालाच्या व माणसांच्या वहातुकीबद्दल	४१·६३
बँकिंग कमिशन	१५·००
परदेशी व्यापाऱ्यांचा हिंदुस्थानांतील फायदा	५३·२५
	२१९.८८

१९२३–२४ मध्यें व्यापारांत बाकी १५० १५० कोटी राहिली. पण १७८ कोटी देणें होतें. म्हणजे हिंदुस्थान ३० कोटी परदेशचें देणें दरवर्षी लागतो.

ढोंगी काका

प्रास्ताविकः–मिस मेयो या गौरकाय कुमारीनें लिहिलेलें कुप्रसिद्ध पुस्तक दोन वर्षेपर्यंत आपली गटार–उपस सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून उधळून देत होतें.'भारतमाता' (Mother India) हें गोंडस व साळसूद नांव देऊन त्या पुस्तकांतून आपली गिधाडवृत्ति मेयोबाईनें जगभर मिरविली. पण दुसऱ्यांच्या जखमांकडे लोचटपणें पाहाणाऱ्या या अमेरिकन जळवेला आपल्या आसपास कसल्या अमृताचे झरे वहात आहेत याची झणझणीत जाणीव करून देण्यासाठीं जे थोडेफार प्रयत्न झाले त्यांपैकीं मिस मेयोच्या कुत्सित, अंतःकरणापर्यंत पोहोंचणारा असा प्रयत्न लाहोरच्या श्री. कन्हय्यालाल गौबा यांचा ठरला. श्री. गौबा यांनीं किती उत्कृष्ट कामगिरी केली आहे याची साक्ष त्यांच्या पुस्तकाचा गुबगुबीत खपच देईल. या पुस्तकाच्या आतांपर्यंत १५–२० आवृत्त्या निघाल्या.मिस मेयोच्या मायभमींतही या पुस्तकाचा बोलाबाला होऊन राहिला आहे. या पुस्तकाचें नांव "ढोंगी काका" (Uucle Sham) अमेरिकन माणसाला व कधींकधीं अमेरिकेच्या अध्यक्षाला "सॅम काका" (Uncle Sham) म्हणतात. त्या सॅमचें ढोंग, त्याच्या बढाया, त्याची आढचता, त्याची शिरजोरी, त्याच्या मजोर संस्कृतीची दिवाळखोरी मिस मेयोपेक्षांही नागव्या लेखणीनें श्री. गौबा यांनीं चवाठ्यावर खेंचली आहे. मिस मेयोचें पुस्तक जसें हिंदुस्थानचें शब्दचित्र तसेंच "ढोंगी काका" अमेरिकेचें शब्दचित्र! आपण गटारउपशीचा डाव खेळत आहोंत हयाची जाणीव श्री. गौबा यांना होती म्हणूनच आपल्या पुस्तकाची पहिली छापील प्रत त्यांनीं मेयोबाईंना नजर केली व त्यावर लिहिलें. "एका मोरीवाल्याकडन दुसऱ्या मोरीवालीकडे" !

श्री. गौबा यांच्या मतें "ढोंगी काका" हें पुस्तक

पवित्र बायबलच्या नव्या आवृत्तीला प्रस्तावना म्हणून शोभल. आपलें पुस्तक पाहून "आपण आपल्या दोघांच्या पुस्तकांची होळी करूं" असें मिस मेयो म्हणेल असें श्री. गौबा यांना वाटलें होतें. पण मिस मेयोला अजून हिंदी विधवांकडून शाबासकी मिळवावयाची आहे. तसेंच मलासुद्धां जीझस ख्राइस्टकडून पाठ थोपटून घ्यायची आहे असें श्री. गौबा यांनीं आपल्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. श्री. गौबा यांनीं "ढोंगी काकांचीं" बिंगें अमेरिकेंतील लोकांकडून बाहेर काढविलीं आहेत. प्रत्येक ढोंग आकडयांनीं व उताऱ्यांनीं तावून सुलाखून व मटन मार्केटांतील कातडी सोललेल्या बकऱ्यासारखें जगाच्या चावडीवर उलटें टांगलें आहे. या कार्याबद्दल श्री. गौबा यांची नामदार श्रीनिवासशास्त्रींनींसुद्धां पाठ थोपटली आहे.

श्री. गौबा यांच्या पुस्तकांतील अमेरिकेच्या संस्कृती (?) संबंधीं कांहीं माहिती आम्ही मराठी वाचकांसाठीं देत आहोंत. ज्या देशांत सोन्याच्या तुकडयाची किंमत बापजाद्यांनीं भजलेल्या देवापेक्षांही जास्त झाली आहे, ज्या देशाच्या चारित्र्यावर सोन्याचा मुलामा दिल्यामुळें तें चकाकत आहे, ज्या देशांतील प्रार्थनामंदिरें म्हणजे जाहिरातींचीं ठिकाणें बनलीं आहेत, चावटपणा हे जेथें धर्मगुरूंचे धंदे बनले आहेत, ज्या ठिकाणीं मुलामुलींना लैंगिक भावनांशिवाय अन्य भावना नाहींत, विवाह संस्था म्हणजे निवळ फसवेगिरी जेथें झाली आहे, अशा पण अखिल जगताला सुधारावयास निघालेल्या देशाच्या संस्कृतीची मोजदाद श्री. गौबा यांनीं अमेरिकेच्याच मापानें केली आहे. कोठें कमीजास्त वाटत असेल तर तो गुन्हा माप घेणाऱ्याचा नसून मापाचा आहे.

अमेरिकेंतील राजकीय परिस्थिति (दाम करी काम) पाहूं. अमेरिकन लोकसत्तेच्या अध्यक्षपदासाठीं धडपडणारा उमेदवार कसल्या उद्दाम वल्गना करतो आहे पहा—"अमेरिकेचें कर्णमधुर राष्ट्रगीत इतर भेसूर राष्ट्रगीतांचे आवाज दडपून टाकणार! राज्यकारभाराचे धडे घ्यायला बाल्डविनसाहेबांना अमेरिकेंत यावें लागणार! पॉइंक्वारेसाहेबांचा पगार यापुढें डॉलरमध्यें मिळणार! मुसोलिनीला आपण आपल्या गुप्त पोलीसखात्याचा प्रधान बनविणार. सॅम काका यापुढें लोकसत्तेचा बाप होणार; सॅम् काका कांहीं दिवसांनीं जगाच्या एकच एक लोकसत्तेचा अध्यक्ष होणार! लढाई नष्ट होणार! शांतता नांदणार!...."

जरा न्यूयॉर्क शहरांतील गगनचुंबी इमारती बघा, धामधुमींची रहदारी पहा, वर्तमानपत्रें विकणाऱ्यांच्या आरोळ्या ऐका, डोक्यावरून व पायाखालून धांवणाऱ्या आगगाडयांची गति ध्यानांत घ्या, दुकानांच्या मोठाल्या तावदानांतून मांडलेल्या भपकेदार वस्तूंकडे दृष्टी टाका, रात्रीची रोषनाई पहा, म्हणजे सॅम काकाचा जबाब तुमच्या ध्यानांत येईल. हा सर्व कशाचा प्रताप? त्या सर्वसत्ताधारी डॉलरचा! तोच अमेरिकेचा देव! अमेरिकेच्या आयुष्याचीं, धंद्याचीं, शेजारधर्माचीं, स्त्रीविषयक कल्पनांचीं, धर्माचीं, राजकारणाचीं, समाजाचीं, सर्व सूत्रें हा बडा देव हालवितो! डॉलर काय करूं शकत नाहीं? डॉलर सर्व कांहीं करूं शकतो! कायदे करतो, कायदे मोडतो, कायद्याच्या कचाटयांतून सोडवितो, आयुष्य सुखवितो, विवाह जुळवितो—तोडतो, इतकेंच काय पण डॉलर माणसाला वाटेल तें करण्याला मुभा देतो, बायका विकत घेतो, बायका पळवितो, आणखी वाटेल तीं पापें पचवितो! हा देव निरनिराळ्या मार्गांनीं वश होतो! जमिनींतून खणन काढतां येतो, बँका फोडून लुटतां येतो, दुराचरणानें साध्य होतो; खोटया कंपन्या काढून हस्तगत करतां येतो; नाना तऱ्हेनें गिळंकृत करतां येतो व तितक्याच तऱ्हांनीं पचवितां येतो! डॉलरसाठीं मुलगा बापाच्या मानेवर सुरी ठेवतो, बहिण भावाला विष घालते, भाऊ बहिणीला विकून टाकतो. आईबाप लेंकरांचे गळे कापतात, एतावता सद्सद्विकेक बुद्धीला घाण वाटणारीं कृष्णकृत्यें डॉलर मोठया कौशल्यानें धुऊन टाकतो!

लोकसत्ता अशी डॉलरसत्ता बनल्यानें लोकसत्तेची कल्पना आतां कांहीं लोकांना नुसती एक वेडगळ व मनोरंजक कल्पना वाटूं लागली आहे. लोकांचे प्रतिनिधि अमेरिकेंत वार्षिक १५००० रुपये पगार खातात. सध्यांचें अमेरिकेचें राजकारण म्हणजे शिष्ट, प्रतिष्ठित, संभावित, दुढ्ढे लोकांचें राजकारण. लोकांची सत्ता आतां सोद्यांची सत्ता बनली आहे. खरा पुढारी लोकांना मार्गदर्शक असतो. पण हे पेंढारी लोकांना गुरांसारखे वळवीत आहेत! (हें प्रसिडेंट रुझल्वेट यांचें मत आहे.) सत्ताधारी लोकपक्षाचें सरकार सध्यां असलेल्या जुलमी सुलतानशाहींत रूपांतर पावत आहे. नादान लोकांच्या हातांत राजसत्ता हटकून नांदत

आहे. अमेरिकेच्या प्रधानमंडळांत व फिलाडेल्फियामधील एकाद्या दरोडेखोरांच्या टोळींत फारच थोडें अंतर आहे. प्रेसिडेंट वुड्रलसननें स्वतः कबूल केलें आहे कीं, राज्यकारभार वॉल स्ट्रीटच्या (पैशाच्या घडामोडी होतात त्या रस्त्याच्या) धोरणानें चालतो. अमेरिकेच्या अध्यक्षाला मान तुकवन तेथून मिळालेले हुकूम पाळावे लागतात! लोकांच्या पैशावर वाटेल तसा हात मारला जातो. १९२० मध्यें व्हॅर्मांट गव्हर्नरसाहेब (एच्. एफ्. गॅहॅम) यांना पैशाची अफरातफर केल्यामुळें ८ वर्षें कैदेची शिक्षा झाली. इलिऑनिसचे गव्हर्नर स्मॉल व त्यांचे दुय्यम यांनीं ५,३५०००डॉलरवर डल्ला मारला; यांनीं आपल्या कामासाठीं एक खोटी नामधारी बँकच स्थापन केली होती! ओक्लॅहामाच्या गव्हर्नरसाहेबांना २५००० डॉलरची लांच खाल्याबद्दल कैद करण्यांत आलें होतें. हीं झालीं बडया लोकांचीं कारस्थानें. यांवरून हाताखालच्या लोकांचा अंदाज येईलच. मॅसॅच्युसेट्समध्यें कित्येक न्यायाधीशांना व वकिलांना पैसे खाल्याबद्दल पकडण्यांत आलें आहे. सिनेटर बोऱ्हा आपल्या एका भाषणांत काय म्हणतात पहा– "डकाइत लोकांच्या कृष्णकृत्यापुढें राज्यकारभाराचा टिकाव लागणें कठिण आहे. लोकांचे पैसे गिळंकृत करण्याचा प्रश्न लोकसत्तेइतकाच महत्त्वाचा आहे. रिपब्लिकन पक्ष, व डेमॉक्रॅटिक पक्ष, दोन्ही सारखेच. डेमॉक्रॅटिक पक्षाचा कारभार शिकारी कुत्र्याच्या दांतांसारखा स्वच्छ आहे असें म्हणतात. लांडगा व कोल्हा यांत जास्त चांगला कोणाला म्हणतां येणार?

आतां न्यायदान कसें चालतें तें पहा. वॉशिंग्टन पोस्ट नामक वर्तमानपत्र म्हणतें." १० अपराध्यांतून एकादा सांपडतो. ५ सांपडलेल्यांतील एकाद्यावरच आरोप शाबीत होतो. अशा गुन्हा शाबीत झालेल्या ३० बदमाशांपैकीं एकाद्यालाच शिक्षा होते" याचा सरळ अर्थ असा आहे कीं, १५०० लोकांनीं गुन्हे केले तरी त्यांतील एकादा सांपडतो व १४९९ सरळ मोकाट सुटतात! (लिंडबर्गच्या मुलाबद्दल हकीगत लक्षांत असेलच.) आणखी एक नमुना पहा. "१९२६ मध्यें इलिऑनिस संस्थानांत १२५४३ आरोपींपैकीं १०५६८ ना शिक्षेशिवाय सोडून देण्यांत आलें."

अशा रीतीनें अमेरिकेंतील राजकारणच लुलें आहे. पैसा सर्व काम करतो आहे. तरी अमेरिकन लोक आम्ही लोकसत्तेचे जनक, आमची लोकसत्ता नमुनदार, अशा बढाया मारीत आहेत. आतां प्रजेची स्थिति कशी काय आहे तें पाहूं. व्यक्तिस्वातंत्र्य, अल्पसंख्यांकांना संरक्षण, धंदेस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, वगैरे लांब लांब बाता तर सारख्या कानांवर आदळतात. परंतु, अमेरिकेच्या इतकें कायद्याला धाब्यावर बसविणारें, स्वातंत्र्याला पायाखालीं तुडविणारें, लोकांच्या जीवितास धोका असणारें अन्य राष्ट्र नाहीं! कांहीं संस्थानें, (उ. ऑरिजअन, टेक्सस, कोलोरॅडो, इंडिआना, कॅन्स्स्, सुसिआना) सरळ बंडखोर बदमाषांच्या हातांत गेलीं आहेत. या बाबतींत क्यू क्लक्स क्लॅन (Ku Kles Klan) अथवा के. के. के. नावांनें प्रसिद्ध असलेल्या एका संस्थेची माहिती करून घेतली पाहिजे. १८६५ च्या यादवीनंतर लगेच गोऱ्या तरुण–तरुणींनीं ही टोळी स्थापन केली. नंतर ही एक बडी गुप्त पोलीससंस्थाच झाली. या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे कोटल्याही बाबतींत व कुठेंहि काळ्या इसमाचा (निग्रोचा) शिरकाव करूं द्यायचा नाहीं. १९२३ सालीं या संस्थेचे १५ लक्ष सभासद होते. कॅथोलिक लोकांचा द्वेष, ज्यू लोकांचा द्वेष, आणि निग्रो लोकांचा द्वेष या तिरंगी पायावर ही प्रचंड संस्था निर्माण झाली. कित्येक संस्थानांचा राज्यकारभार या बडया टोळीनें हस्तगत केला! अनन्वित, अमानुष, व रानटी कृत्यें या लोकांनीं ठिकठिकाणीं केलीं. निग्रो लोकांची चाबकाचा मार देऊन चामडी लोळविली व त्यांना मरणोन्मुख अवस्थेंत रस्त्यांत सोडून दिलें. एका मुलाला झाडाच्या फांद्यांनीं झोडपून त्याची पाठ सोलली. एका निग्रो बाईला मार देऊन तिला उघडी टाकून दिल्यामुळें तिला न्युमोनिया झाला. अशीं कित्येक उदाहरणें आहेत. अंगावर शहारे आणणारी ही हकीगत वाचा. ओरमन येथें एका निग्रो बाईला तिच्या १४ वर्षांच्या मुलासह पळविलें. तिला एका पुलावर टांगलें व तिच्यावर जबरी संभोग केला. तसेंच एका आजारी माणसाला अंथरुणावरून ओढून नेऊन त्याला जिवंत जाळण्यांत आलें. जळतांना तो पळून जाईल म्हणून वारंवार त्याला जाळांत ढकललें जात होतें. आणि या बाबतींत पकडलेले सर्व आरोपी निर्दोषी म्हणून सुटले! दोन निग्रोंना टेलिग्राफच्या खांबाना बांधून त्यांच्यावर गॅसोलिन ओतून त्यांना जाळण्यांत आलें. दक्षिण कॅरोलिनामध्यें न्यायाधिशांनीं ४ आरोपींपैकीं २ स्त्रियांना निर्दोषी ठरविलें व २ पुरुषांनाहि ठरविलें असतें पण त्याच रात्रीं लोकांनीं तुरुंगांतून त्या चौघां आरोपींना पळविलें व गोळी-

घालून ठार केलें ! इतकीं अनन्वित कृत्यें चाललीं असतां सॅमकाका थंड असतात. "आरोपींचा पाठलाग करणें हा एकप्रकारचा अमेरिकन पोलिसांना खेळ वाटतो" असें एक वर्तमानपत्रकार म्हणतात. चांगला खेळ आहे !

एक अमेरिकन ग्रंथकार लिहितोः—

"तुमच्याशीं बोलणारा चांगला सभ्य माणूस (अर्थात् अमेरिकन) खुनी असल्याचा संभव असतो. मोठाले अधिकारी, न्यायाधीशसुद्धां खुनी व त्यांचे साथीदार असूं शकतील." अमेरिकेंत जीवित किती धोक्याचें आहे याचा अंदाज वरील गोष्टींवरून यईल.

निग्रो लोक यांच्या स्थितीची थोडीशी कल्पना वाचकांना आली असेलच. पण अमेरिकेच्या लोकसत्तेवर हा एक मोठा कलंक कसा आहे याचा आतां थोडा विचार करूं. अमेरिकेच्या या सामाजिक प्रश्नाचा निकाल करण्याच्या थोडचा नमुनेदार सूचना पाहूं. १ कोटी २० लक्ष निग्रो लोकांना आफ्रिकेंत सोडून द्यावेत अशी एक सूचना आहे! कांहीं जास्त विचारी लोक या गोष्टीला खर्च फार लागेल म्हणनच कीं काय या लोकांचा नायनाट करावा असें सुचवितात. निग्रो लोकांना त्यांच्या मर्जीविरुद्ध पकडून अमेरिकेंत नेलें. आणि त्यांना गुलाम म्हणून कित्येक वर्षें वागविलें. तेव्हां ही निग्रो काळी आपत्ति अमेरिकेनें आपणहूनच आपणांवर ओढून आणली आहे! निग्रो माणस हा बुद्धीनें गोऱ्या माणसाइतकाच तीक्ष्ण असतो ही आतां शिक्कामोर्तब झालेली गोष्ट आहे. तरी केवळ रंगामुळें त्यांचा अजून सर्वत्र द्वेष केला जातो. महायुद्धामध्यें अमेरिकेसाठीं मोठा पराक्रम करून आलेल्या निग्रोला तो काळा म्हणून मारण्यासाठीं लोक टपून बसल्याचें उदाहरण आहे ! आणि महायुद्ध कशासाठीं ? तर जगांतील अन्याय, वर्णभेद, छळ दूर करण्यासाठीं ! गांजलेल्या लहान राष्ट्रांना आपत्तींतून सोडविण्यासाठीं ! लोकसत्तेसाठीं ! स्वातंत्र्यासाठीं ! विश्वबंधुत्वाच्या भव्य इमारतीचा उद्घाटन समारंभ करून सर्व जगांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं ! ! पण प्रत्यक्ष पाहावें तर युद्धाचीं चागलीं ध्येयें जाऊन शांततेचीं नासकीं ध्येयें पुढें आलीं. तरवारीच्या ऐवजीं केसांनीं गळे कापावयास सुरवात झाली. व आंतरराष्ट्रीय परिषद म्हणजे एक पोकळ व नादान वादसभा ठरली!

प्रेसिडेंट वुइल्सन इकडे जगांत शांतता प्रस्थापित करीत होते त्यावेळीं त्यांच्या देशांत एक निग्रो भर रस्त्यांत भाजला जात होता ! पांच निग्रो बायकांचीं कातडीं सोलण्यांत येत होतीं ! !

लैंगिक बाबतींत नेमलेल्या चौकशी मंडळानें कुठल्याहि लैंगिक गुन्ह्यांच्या बाबतींत निग्रोपेक्षां गोरा माणूसच जास्त दुराचारी असतो असा निकाल दिला आहे! एका ठिकाणीं निग्रो लोकांनीं गोऱ्या बाईवर अत्याचार केल्यावरून दंगा झाला. चौकशीअंतीं ज्या माणसाची ती बायको होती असा गवगवा झाला होता तो अविवाहित असल्याचें कळल्यावर ती बाईसुद्धां कल्पनेंतलीच ठरली. असेच कित्येक आरोप निग्रोवर लादून त्यांची जनावरांसारखी शिकार करण्यांत येते ! ! १९१३ सालीं एका निग्रोनें एका गोऱ्या वस्तींत एक घर घेतलें असतां तें घर बॉम्ब मारून उध्वस्त करण्यांत आलें. १९२० सालीं अशाच एका कारणासाठीं दिवसाढवळचां ५ वेळां बॉम्बचा मारा करण्यांत आला ! ! इतकें करूनहि गुन्हेगार फरारीच ! !

कायदा व व्यक्तिस्वातंत्र्यः—एका निग्रो आरोपीच्या बाबतींत एका ज्यूररनें "निर्दोषी" असें मत दिल्यामुळें लोकांनीं कोर्टांतून त्याला बाहेर खेचलें, चाबकानें झोडपलें आणि चिखलानें माखलें. नंतर त्या ज्यूररनें "दोषी" असें मत दिलें! आहे कां नाहीं व्यक्तिस्वातंत्र्य ! ! ह्याला म्हणतात न्यायदान! ! अमेरिकेचे कायदे और आहेत. त्यामुळें लोकांच्या खाजगी बाबतींत वाटेल ती ढवळाढवळ करतां येते. शिवाय अपराध व शिक्षा यांत प्रमाण नाहीं. चोरीबद्दल ६० वर्षें तुरुंग पाहावा लागतो तर खुनी माणूस साध्या कैदेवर सुटतो ! पैशाची अफरातफर केल्यामुळें गव्हर्नर ग्रॅहॅम यांना ८ वर्षें कैदेची शिक्षा झाली. पण त्याची पहिल्याच दिवशीं सुटका झाली. पण "कुलिज सहज नशिबानें कसातरी अध्यक्ष झाला" असें म्हणणाऱ्या इसमाला २०० दिवस तुरुंगवास घडला. एका संस्थानांत उत्क्रांति तत्त्व शाळेंत मुलांना शिकविण्याची बंदी आहे. कॅन्सस संस्थानांत मुलांनीं शाळेंत कांहीं विवक्षित गोष्ट म्हणण्याचें नाकारल्यास त्यांच्या आईबापांना चाबकाखालीं झोडपण्याला कायद्याची मुभा आहे. अमेरिकेंत प्रेमाला दोन मदतनीस आहेत. एक पसा व दुसरा पोलीस. यांच्या मदतीनें वाटेल त्यानें वाटेल तसें प्रेम करावें. पण त्यांची मदत नसेल तर मात्र कठीण ! उदाहरणार्थ, एका मुलीला "तिचें पाऊल वांकडें पडण्याचा संभव होता" याबद्दल पकडण्यांत आलें

होतें. संततिनियमनाची माहिती पसरविणें हा गुन्हा आहे. पण ज्यांना त्याची जरूरी आहे अशा गरिबांच्या बाबतींत! त्यामुळें गर्भपात वगैरे प्रकार फार झाले आहेत. नुसती राज्यकारभारावर टीका करणें हा सुद्धां जिथें गुन्हा आहे त्या न्यूयॉर्कसंबंधीं एक अमेरिकन संपादक काय लिहितो पहा. "सबंध स्पेनमध्यें नाहींत इतक्या वेश्या एकट्या न्यूयॉर्क शहरांत आहेत! न्यूयॉर्क हें सैतानाचें शहर आहे. चांगल्या वर्तनाची एकही बाई न्ययॉर्कमध्यें सांपडणार नाहीं. कित्येक संस्थानांत कायदा झुगारून राजरोस दारू विकली जाते. व्हर्जिनिया संस्थानांत खाणींतील मजूर संप करूं लागल्यास त्यांना गोळी घालून ठार करण्यांत येतें, व त्यांच्या बायकापोरांसहि ठेंचून काढण्यांत येतें ! ! "पण काय करावें; कायदा नाहीं" असें कोठल्याहि माणसाला म्हणावें लागत नाहीं. सगळ कायदे आहेत आणि सगळे मोडतां येतात. कशाच्या जोरावर तें आपण पाहिलेंच. व्यक्तिस्वातंत्र्याचे नमुने वर दिलेच आहेत. अमेरिकेंतील स्वातंत्र्याचा पुतळा प्रसिद्धच आहे. त्याबद्दल एक अमेरिकन काय म्हणतो पहा, "खरें सांगावयाचें म्हणजे तो पुतळा एक ढोंग आहे, गप्प आहे, आणि गोंडस नांव देऊन त्याला उगाच आमच्या बंदरावर उभा केला आहे."

कुमारी अमेरिका (The virgin) अगदीं आजकालची ताजी अमेरिकन रति (Eve) मदनासारखी (Adam) बनत चालली आहे. अमेरिकेंतील आजकालची पुरुषी पोरगी ऑफिसांत जाते, पगार मिळविते, सिगारेट ओढते, केशकर्तनालयांत जाते, व रात्रौ सुखाच्या शोधार्थ गल्लोगल्लीं भटकते! तिच्यासाठीं वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून निघतात. परंतु अशा बिडीवाल्या, बनेल, अर्धनग्न कुमारीबद्दल अमेरिकेंतहि तिटकाराच वाटतो. या कुमारी अमेरिकेचीं चित्रें कुठल्याहि अमेरिकन मासिकांत पहावयास सांपडतील. तिच्या (लिप्–स्टिक) ओष्ट्रकांडीच्या पिशवींतच तुम्हांला संततिनियमनाचें, साहित्य सांपडेल. ती जाईल तिथें तिला आशक आढळेल, तिचें शरीर वाटेल त्या गोष्टीसाठीं सदैव तयार असेल. अमेरिकेंत संमतिवयाचा कायदा आहे. पण संमतिवय ही एक कायद्यांतील पोकळ गोष्ट आहे. वासनावय मात्र जीवनशास्त्रांतील सत्य आहे. संमतिवयाच्या कितीतरी आधीं वासनावय येतें. १४ वर्षांचा अमेरिकन मुलगा क्रीडांगणावर उड्या मारत असतो. पण १२ वर्षांची अमेरिकन मुलगी निराळ्याच खेळांत दंग असते ! अमेरिकन मुलें फार लवकर वयांत यतात. कुमारी अमेरिकेच्या ४थ्या ५व्या वर्षीच तिला लैंगिक गोष्टी समजूं लागतात. १२व्या वर्षीं उमजूं लागतात व १६व्या वर्षापर्यंत सर्व झालेलें असतें व २५व्या वर्षीं ती ४–५ पोरांची आई होऊन ३०व्या वर्षीं कुचकामाची ठरते ! डेन्व्हर संबंधीं प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांवरून असें दिसून येतें कीं शेंकडा १९ मुली ११ वर्षांच्या होण्यापूर्वीच वयांत येतात व शेंकडा ९१ मुली १३ वर्षें पूर्ण होण्यापूर्वीच बाया बनतात ! यामुळें मोठमोठाल्या घराण्यांतील मुलांमध्यें भयंकर लैंगिक घोटाळे माजलेले असतात. सहशिक्षणामुळें तर शृंगार कमालीचा वाढला आहे. विद्यार्थ्यांच्या बाबतींत "कॅरोहिना" मासिकानें प्रश्नपत्रिकेवरून आंकडे जमविले.त्यावरुन काय कळलें पहा. प्रत्येक इसमाचा सहा स्त्रियांशीं संबंध असतो, शेंकडा ८७ मुलींचें कौमार्य भंगलेलें असतें!

शृंगारचेष्टांसाठीं विद्यार्थीवर्गाच्या सफरी निघतात व फारच थोड्या शाळकरी मुली चांगल्या निघतात. जज्ज लिंडसे म्हणतात कीं, शेंकडा ४५ शाळेंतील मुली शाळा सोडण्यापूर्वीं संभोगभुक्त असतात. अमेरिकेंत नवरीमुलगी वेदीपुढें येण्यापूर्वींच पुढच्या गोष्टींच्या बाबतींत अनुभवलेली असते. १८ वर्षांची अमेरिकन मुलगी वेश्येलासुद्धां तिच्या धंद्यांत मागें टाकील इतकी पुढें गेलेली असते. आतां शाळकरी पोरांची स्थिति पहा, एका अमेरिकन ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, "शंभरांतील ९९ मुलें मुष्टिमैथुन करतात व १०० वा विद्यार्थी खोटें बोलणारा असतो" समानलिंगशृंगार मोठ्या प्रमाणांत चालला असतो. आणि त्याचे परिणाम फार घातुक होतात. धार्मिक शाळासुद्धां याला अपवाद नाहींत. एका शाळेंतील ४९ चांगल्या घराण्यांतील मुलांना चालकांना वरील अपराधाबद्दल हाकलून द्यावें लागलें. मुलींच्या बाबतींतहि असल्या शृंगारचेष्टा वाढतच आहेत. याला धर्मोपदेशक सुद्धां सामील असतात. कुटुंबपद्धतीचा अमेरिकेंत व रशियांत नायनाट झाला आहे. रशियामध्यें त्याला आर्थिक कारणें आहेत, पण अमेरिकेंतील कारणें लैंगिक आहेत. पण रशियाविरुद्ध जगांत केवढी ओरड चालली आहे. वर डेन्व्हर शहराबद्दल म्हटलें आहे तें सर्व अमेरिकेला लागू आहे. रशियाला रानटी म्हणावयाचें तर अमेरिकेच्या तात्पुरत्या विवाहपद्धतीला काय नांव द्यावयाचें? आजकाल

तर अमेरिकेंत विवाह फारच सोपा झाला आहे. एक एक अंथरूण, इच्छा व वकीलाच्या अंगावर फकण्यासाठीं थोडे डॉलर असले कीं नवरा बायको तयार! पाळण्याच्या दोरीप्रमाणेंच शृंगाराची दोरीसुद्धां अमेरिकेंत मुलींच्या हातीं आहे. शृंगाराच्या पाळण्याच्या कोलांटचा त्यांच्या कसरतीवर अवलंबून असतात. गर्भधारणा ही एक अविवाहित शृंगारसफरीमध्यें येणारी आपत्ति आहे. न्यायमूर्ति लिंडसे यांच्या आंकडयांवरून या आपत्तीमुळें १५,००,००० प्रेमी युग्में प्रतिवर्षी ठेचाळतात. अर्थात् ही आपत्ति प्रतिवर्षी शेंकडा ५युग्मांवर कोसळते. म्हणजे या सफरीवर दरवर्षी ३,५०,००,००० युग्में म्हणजे ७,००,००,००० प्रवासी निघालेले असतात. शृंगारसागरांतील दुसरी आपत्ति म्हणजे उपदंशादि विकार. अमेरिकेंत रोज ५०,००,००० लोक वेश्यांकडे जातात. आणि शेंकडा ८९ वेश्यांना उपदंशादि विकार झालेले असतात. त्यामुळें गरमी, परमा वगैरे रोग इतके बुजबुजले आहेत कीं,त्या रोगांना आतां "कोल्ड" म्हणजे थंडीताप हें नांव मिळालें आहे. नशीब त्या रोगांचें !

विवाहवृक्षाचीं मधुर फळें!

अमेरिकेंत लैंगिक अत्याचार इतके बुजबुजले आहेत, लैंगिक अनुभव इतके वाढले आहेत तरी विवाहांचें प्रमाण कमी होत असून काडीमोड वाढत आहे. "देवांनीं ज्यांना जोडलें त्यांना कोणीं माणसानें तोडूं नये" असें देवदूताचा दूत ओरडून बजावीत असला तरी ही मोडतोड फार मोठ्या प्रमाणांत चालली आहे ! विवाहांतील देव सध्यां अमेरिकेंत पुराणांतल्या वांग्यासारखा बनला आहे ! व या वांग्याच्या भरीतावर पोरासोरापासून थोरामोठ्यापर्यंत सर्व अमेरिकन सुसंस्कृत लोक यथेच्छ ताव मारत आहेत. लोकांच्या विवाहसंस्थवर टीका करणाऱ्या या ढोंगी काकांनीं स्वतःच्या पोटावर हात फिरवावा व आपल्याला कसल्या ढेंकरा येत आहेत याची जरा विचारपूस करावी..

अमेरिकेंत विवाहवृक्षाचें बीज कसें रोवलें जातें याचें विस्तृत वर्णन करण्याचें प्रयोजन नाहीं. अमेरिकेच्या एकंदर लैंगिक उन्नतीवरून त्याचा अंदाज वाचकांना येईलच. आतां या विवाहवृक्षाची वाढ होऊन कोणतीं मधुर फळें सॅम काकांना चाखायला मिळतात पाहूं या. अमेरिकन विवाह वृक्षावर किती प्रकारचीं कलमें बांधलीं जातात याचें थोडक्यांत दिग्दर्शन आम्हीं येथवर लिहिलेल्या मजकुरावरून सूज्ञ वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. विवाहवृक्ष फोफावल्यावर त्याला चार प्रकारचे घसघशीत आंबे लटकलेले पाहून सॅमकाका मिटक्या मारतात. हीं चार वेगवेगळीं फळें म्हणजे (१) नवरा बायकोंचें विभक्तीकरण, (२) काडीमोड, (३) उपदंशादि विकार, व (४) नपुंसकत्व. विभक्तीकरण कशासाठीं? तर नवरा—बायकोशीं पशुवृत्तीनें वागतो म्हणून. पण ही गोष्ट ५०० पैकीं एकाद्याच्या बाबतींत खरी असते व बाकीचीं विभक्तीकरणें फक्त पैसा उकळण्यासाठीं असतात असें जज्ज लिंडसे स्पष्ट लिहितात. अमेरिकन बायकांना पैसे मिळविण्याचा हा एक जवळचा मार्ग आहे. विभक्तीकरणानंतरच्या पोटगीबद्दल एका अमेरिकन मासिकांत काय लिहिलें आहे पहा. "ही पोटगी म्हणजे नवऱ्याची आंतडी पिळवटून त्यांतून पैसा काढण्याचें एक साधन आहे. शिवाय नवऱ्याच्या अब्रूचा प्रश्न असल्यानें असे प्रश्न सहसा कोर्टापुढें येत नाहींत. कोर्टांत आल्यास नवऱ्याच्या उत्पन्नाच्या एक तृतीयांश हिस्सा बायकोला मिळतो व नवऱ्याच्या उत्पन्नाचा अंदाज बायकोनें करावयाचा असतो. नवऱ्यानें पैसा न दिल्यास त्याला तुरुंग खला असतो." आतां दुसऱ्या मधुर फळाचा म्हणजे काडीमोड संस्थेचा विचार करूं. काडीमोडीसाठीं खरडलेल्या अर्जाच्या बंदुका हातांत धरून सौभाग्यवती 'अमेरिके'च्या टोळचा कानाकोपऱ्यांतून हिंडत असतात व नवरा सबंध जिवंत असून गंगाभागीरथी बनणें या गोष्टींत कांहीं विशेष आहे असें तिकडे वाटत नाहीं! अमेरिकन बायका नव्या मोटारीचा व नव्या नवऱ्याचा हिशेब एकाच वहींत मांडून ठेवतात. दोन मुलें असतांना नवऱ्याला तिसरें पाहिजे होतें व बायकोला नको होतें म्हणून काडीमोड ! बायकोला नवरा 'तूं नुसती चैन करतेस' एवढें म्हणाला म्हणून काडीमोड ! बायकोची इच्छा असतांना नवऱ्यानें तिचें चुंबन घतलें नाहीं म्हणून काडीमोड ! जज्ज लिंडसे म्हणतात "डेन्व्हर मध्यें१९२२ सालीं लग्नाच्या इतक्या काडीमोडी झाल्या कीं, लग्नाच्या दोन परवानग्यांबरोबर काडीमोडीची एक फिर्याद झाली, व सर्व अमेरिकेच्या बाबतींतहि असेंच प्रमाण आहे." हे आंकड पहा.

संस्थान अथवा शहर	विवाह	काडी मोड
अटलांटा	३३५०	१८४५
लॉस् एंजल्स्	१६६०५	७८८२
कॅन्सस	४८२१	२४००

डन्व्हर (अदमासें)	३०००	१५००
क्लीव्हलंड	१०१३२	५२५६

"याशिवाय कोर्टापुढें न येतां विभक्तीकरण व काडीमोडी होत असतातच, व त्यामुळें जितके विवाह तितकेच विवाहभंग असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं" असें लिंडसे साहेब नमूद करतात. अर्थात् वकिलांची पोळी सदैव पिकलेली असते. एक तरुण जोडपें कोर्टापुढें एक मूल घेऊन आलें. अर्थात् त्या जोडप्याच्या शृंगारचेष्टांचा मूल जन्मल्यामुळें असा शोकपर्यवसायी शेवट झाला होता! तो तरुण आधुनिक तत्त्वज्ञानाच्या मुद्यावर विश्वामित्रासारखा तोंड झाकून मुलाकडे ढुंकूनहि पाहाण्यास तयार नव्हता, व ती विसाव्या शतकांतली अमेरिकन मेनका त्या विश्वामित्राच्या अंगावर ती शकुंतलेची आपत्ती झुगारून देण्यास हपापली होती! ढोंगी काका अशा किती शकुंतला प्रतिवर्षी कण्वमुनींचा आव आणून पचवितात कोण जाण ! मानव विवाहसंस्था व पशूंची विवाहसंस्था यांत आतां अमेरिकेंत फारच थोडें अंतर राहिलें असल्याचें कांहीं लोक प्रांजळपणें कबूल करत आहेत. वर सांगितलेली शकुंतलारूप आपत्ती येऊं नये म्हणन हुशार अमेरिकन पोरी आपल्या बरोबर सदैव संततिनियमनसाहित्य तयार ठेवतात. कारण एखादे वेळीं पुरुष जर तें विसरला तर विनाकारण संध्याकाळ वाया जाते ! गर्भपाताचे गुन्हे तर इतके वाढले आहेत कीं, त्यांना आतां 'अमेरिकन गुन्हे' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे! याचें सरळ कारण आर्थिक परिस्थिति नसून बर्नार मॅकफेडन म्हणतो त्याप्रमाणें स्वार्थी व बेजबाबदार विषयलालसा हें आहे. आतां उपदंशादि रोगराईंची पाहाणी करण्याची घाणेरडी तसदी आम्ही वाचकांना देत आहों. शेंकडा ९० माणसें अमेरिकेंत या रोगांनीं मृत्युमुखीं पडत आहेत. शिकॅगो शहराचे आरोग्याधिकारी म्हणतात कीं, ह्या रोगांचा फैलाव गाजावाजा न होतां वाढत आहे. यापेक्षां देवीची साथ किंवा क्षयरोग पुरवला. निम्याहून जास्त अमेरिकन तरुण सध्यां या रोगांनीं गांजलेले आहेत. ह्या रोगाचा फैलाव वेश्यांपेक्षांही चांगल्या कुलीन म्हणवून घेणाऱ्या मुलीच जास्त करत आहेत. दरवर्षी २५ लाख लोक गरमीवर औषधोपचार करून घेतात. याशिवाय औषधावांचून खोकला घालविणारे असतात ते निराळेच. डॉक्टर व उपाध्य या अनर्थापुढें काय करावें म्हणन धाय मोकलून रडत आहेत. आनुवंशिक गरमीमुळें दरवर्षी ४०००० मृत्यु अमेरिकेंत होत आहेत. दुसऱ्या कोणत्याही रोगानें इतकीं माणसें तेथें मरत नाहींत. गरमी झालेले ५० लाख लोक अमेरिकेंत असतील असें कांहीं सांगतात. कांहीं म्हणतात कीं, शेंकडा २० लोक या रोगानें उघड पीडित असे आहेत. शेंकडा ९० पर्यंत लोकांना ३० वर्षें वयापर्यंत परमा झालेला आहे आणि १० लाख कुलीन स्त्रिया या रोगांनीं ग्रस्त आहेत. वेश्यांची संख्या वेगळीच. ज्याला असला रोग झालेला नाहीं तो पुरुषच नव्हे असें अमेरिकन तरुण आतां बरळूं लागले आहेत! ! याला म्हणतात समयज्ञता व प्रसंगावधान. अगदीं कमी आंकडे धरून चाललें तरी अमेरिकेंतील शेंकडा ९० लोक या रोगांनीं पीडित आहेत. व हे रोगच वांझपणा व नपुंसकत्व यांचें कारण आहेत. अमेरिकेचें जन्मप्रमाण ५ चे ऐवजीं २·६ पर्यंत खालीं घसरलें आहे. याशिवाय गुप्तपणें अनेक पत्निव्रत कित्येक अमेरिकन चालवीत आहेत. याची ग्वाही एक प्रसिद्ध (फिजिकल कल्चर) मासिकच देत आहे.

वरील सर्व गोष्टी काय सांगतात? अमेरिकन विवाहवृक्ष हा एक विषवृक्ष झाल्याचें नाहीं कां त्या सांगत? याला दोन कारणें आहेत. (१) अमेरिकन लोक आतां अनीतिमान व बेजबाबदार झाले आहेत, व (२) वर्णसंकरामुळें विषयलालसा अफाट वाढली आहे. या विवाहवृक्षाचीं मधुर फळें खाऊन ढोंगी काकांचें पोट तुडुंब भरल्यावर त्यांना ढेकर आली व पोट फुटायच्या बेतांत आलें म्हणजे तरी ते आपण कशावर ताव मारीत आहोंत हें डोळे उघडून पाहोत म्हणजे झालें.

नीतिमत्तेचे गड्डे व अनीतीचे अड्डे !

स्वत: पांघरलेल्या कपड्यांची पारदर्शक मच्छरदाणी बनली तरी त्याची फिकीर न बाळगतां दुसऱ्यांच्या कपड्यांचें छिद्रान्वेषण करण्याची ढोंगी काकांना चटकच लागली आहे. स्वत: उपदंशादि आळ्यांनीं बुजबुजले असतांना देखील दुसऱ्या देशांच्या नीतीवर शिंतोडे उडविणाऱ्या प्रवृत्तीला काय नांव द्यावें कोणास ठाऊक? आपण एशू ख्रिस्ताचे भक्त म्हणवून घेऊन सर्व राष्ट्रांतून कोटचवधि बायबलामृताच्या बाटल्यांची ढोंगी काका उदार दिलानें खैरात करीत आहेत. अमेरिकन प्रार्थनामंदिरांत शेंकडा ७७ लोक जातात पण शेंकडा ९० रोगग्रस्त लोक काय या शेंकडा २३ तले असतात? पण दुसऱ्यांच्या

विवाहसंस्थांची टिंगल करणाऱ्या या ढोंगी काकांची स्वतःची विवाहसंस्था कसल्या किडचांनीं किडलेली आहे हें आपण पाहिलेंच आहे.

नीतीची अव्याहत उत्क्रांति होत असल्यानें आतां ढोंगी काकांनीं वेश्या या शब्दाची व्याख्यासुद्धां बदलली आहे! अमेरिकेंत ५ लाख वेश्या असल्याचें तिकडलेच ग्रंथकार लिहितात व वेश्यागमन करणारे लोक अमेरिकेंत ३॥ कोटीपर्यंत खास आहेत. १ डॉलरपासून १००० डॉलरपर्यंत दरांच्या दरम्यान सर्व परिस्थितींतील गिऱ्हाइकें या वेश्यांना लाभतात. अंग रगडण्यासाठीं निर्माण झालेलीं चंपीगृहें वेश्यांनीं भरलेलीं असतात. सौंदर्यगृहें (Beauty Parlors) म्हणजे दारूचे गुत्ते व विषयसुखाचीं आगरें असतात. असल्या अनीतीची १४व्या लुईलासुद्धां किळस वाटली असती असें एक अमेरिकन ग्रंथकार सरळ कबूल करीत आहेत. अमेरिकन विश्वविद्यालयांनीं नेमलेल्या पुस्तकांतून सुद्धां असल्या घाणेरड्या विषयांनाच प्राधान्य दिलें असतें असें तिकडील लोकच म्हणतात. कांहीं वर्तमानपत्रें असल्या विषयलालसेची सोय असलेल्या ठिकाणांच्या जाहिराती राजरोस छापतात. अमेरिकन वेश्यांचा धंदा पिढिजात नसतो. त्या साधारण आपला धंदा ६ वर्षें करतात व निम्याहून अधिक वेश्या घरकाम करणाऱ्या मोलकरणी व दाया असतात. व बाकीच्या निरनिराळे धंदे करणाऱ्या असतात. शेंकडा ६७ वेश्या १८ व्या वर्षापूर्वीच धंद्यांत मग्न असतात. याशिवाय अगदीं लहान मुलींच्या बाबतींत अपराध करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. "एकटचा बाल्टिमोर शहरांत एका वर्षांत बारा वर्षांआंतील मुलींवर १००० अत्याचार झाले आणि या अपराधाबद्दल साधारण तीन महिने तुरुंगवास अशी शिक्षा दिली गेली" असें डॉ. हूकर यांचें म्हणणें आहे. बेन लिंडसे यांनीं चौकशी केलेल्या ३१३ मुलींपैकीं २८५ मुली १३ वें वर्ष लागण्यापूर्वी ऋतुस्नात झाल्या होत्या! तरुण अमेरिकनांची दृष्टि आतां वेश्यांवरून उडून शाळेंतील मुलींकडे वळली आहे! ७६९ मुलींच्या बाबत लिंडसे यांनीं चौकशी केली तर त्यांच्या बाबतींत २००० हून जास्त लोक अपराधी असल्याचें त्यांना आढळून आलें!

प्रतिवर्षीं अमेरिकेंत २॥ लाख गर्भपात घडतात आणि हजारों बेकायदेशीर मुलें जन्माला येतात! विषयलालसेचे अत्याचार दरवर्षी ४५ लाख स्त्रिया करतात. अर्थात् तितकेच पुरुषहि धरले पाहिजेत. "एकटचा न्ययॉर्क शहरांत एक तृतीयांश विवाहित माणसें विवाहबंधन झुगारून अत्याचारांत दंग असतात"! असें एका बाईनें लिहिलें आहे.डॉ.मारो म्हणतात कीं,उपदंशादि रोग खालच्या लोकांपेक्षां वरच्या शिष्ट लोकांमध्येंच जास्त आहेत.

ढोंगी काकांच्या धर्माचें मर्म—-आपल्या धर्माची जाहिरात अमेरिकन काकांच्या इतकी कोणीच देत नसेल. २०० वर्तमानपत्रांच्या साहाय्यानें कांहीं अमेरिकन धर्ममार्तंडांनीं एक प्रश्नपत्रिका तयार करून ती लोकांकडे पाठविली होती. १,२५,००० लोकांनीं उत्तरें पाठविलीं. त्यांतील शेंकडा ९१ लोकांनीं ईश्वराच्या अस्तित्वावरील आपला विश्वास कबूल केला. परंतु शेंकडा ७७ लोकच चर्चमध्यें प्रार्थनेसाठीं जात असत. आणि शेंकडा फक्त ४२ लोकांच्या घरांत प्रार्थनेची व्यवस्था असते. तरीसुद्धां या माहितीच्या आधारावर "अमेरिकेचा देवावर विश्वास आहे" अशी बोंबाबोंब जगभर ढोंगी काकांनीं केली. जणूं कांहीं देवाचें अमेरिकन लोकांच्या भक्तीवांचून कांहीं कार्य नडलेंच होतें! पण धर्म प्रत्यक्ष आचरणांत किती आणला जातो हें आपणांस पाहिलें पाहिजे.बायबल काय बोलतें? "तूं माझ्याशिवाय अन्य देव मानूं नकोस." पण ढोंगी काका आपल्या देशाला देवापेक्षां मोठा मानतात! प्रेसिडेंट कलीज स्वतः म्हणतात कीं, "अमेरिका आधीं, देव मागाहून." एक धर्मोपदेशक "मी आधीं ख्रिश्चन व मग अमेरिकन आहें" असें व्याख्यानांत बोलतांच त्याची हुर्रेवडी झाली व त्याला खालीं बसावें लागलें! अमेरिकेंत प्रत्येक सेंटवर (एक नाणें) "आम्ही देवावर विश्वास ठेवतों" असें छापलेलें असतें. १०० सेंटचा एक डॉलर होतो. पण डॉलरवर तसें कांहीं छापलेलें नाहीं! दमडीपेक्षां देव जास्त आहे पण "महात्मा डॉलर"पेक्षां मात्र नाहीं!

१९१९ सालीं लढाई संपल्यानंतर एक वक्ता पाद्रचांच्या सभेंत "शत्रूवर दया करा" असा बायबलमधील उपदेश करीत असतांना त्या बायबलभक्तपरायणांनीं त्याला त्याची टिंगल करीत खालीं बसवलें! बायबल काय बोलतें? "चोरी करूं नकोस" पण एक न्यायाधीश काय लिहितात पहा. "भावी नागरिक निर्माण करण्यासाठीं झटणाऱ्या कित्येक चांगल्या शाळेंतील चांगलीं मुलें चोरीच्या आरोपावरून माझ्यापुढें आणलीं

जातात. बरोबर आहे! "बाप तसा बेटा ! बाप सरकारी तिजोरीवर डल्ला मारणार त्याचा सवाई बेटा आपल्या आसपास पुढील आयुष्य-क्रमाचे प्राथमिक धडे लहानपणापासूनच कां नाहीं गिरविणार?"

बायबल काय बोलतें? "दुसऱ्याचा जीव घेऊं नकोस" पण अमेरिकेंत नुसत्या डेट्रॉइटमध्येंच सगळ्या इंग्लंडमध्यें होत नाहींत इतके खून होतात! शिकॅगो शहर तर अशी शेखी मिरवितें कीं, जगांतल्या कुठल्याही शहरापेक्षां आमच्या इथें जास्त खून होतात! आणि के. के. के. संस्था काय करते त्याबद्दल मागें लिहिलेंच आहे. ती संस्था खूनहि करते व त्या कार्यास धर्मोपदेशकहि हातभार लावतात!

बायबल काय बोलतें? "तूं दुराचार करूं नकोस." मग लग्न लागल्यापासून दोन वर्षांच्या आंत निम्या युग्मांचे घटस्फोट कां होतात? दुराचार व लैंगिक अत्याचार पोरापासून थोरांपर्यंत, कसे माजले आहेत तें आपण पाहिलेंच आहे. एका बाईनें एका पाठोपाठ दुसरा असे तेरा नवरे केल्याची बातमी वर्तमानपत्रें मोठ्या टाइपांत छापतात!

याशिवाय "दास करी काम" हें तत्त्व आतां धर्मांतहि घुसलें आहे. येशूचा मंत्र थोडक्या पैशांत कानांत ओतला जाण्याच्या जाहिराती आतां धर्मोपदेशक वर्तमानपत्रांतून छापावयास देत असतात

उदाहरणार्थ ही जाहिरात वाचा:—

"सालोमन हा अगदीं सहाबारी फटाकडा होता! या पुराणांतील रंगेल गडयाइतक्या बायका व ठेवलेल्या बाया तुम्हांला झेपतील का? रेव्हरंड बी. जी. हॉज या रविवारीं या विषयावर व्याख्यान देतील" आपण अवश्य यावें.

यासारख्या कित्यक जाहिराती दररोज वर्तमानपत्रांतून फडकत असतात! इतकें असूनहि शेंकडा ७७ लोकच चर्चमध्यें जातात! सॅमकाकांच्या उद्योगप्रियतेची, धडाडीची, कल्पकतेची कोणीही स्तुतिच करील! पण सॅमकाकांच्या नीतीला व कुमारी अमेरिकेच्या छिनालपणाला जर बायबलमध्यें आधार असतील तर तें बायबल जितक्या लवकर जाहीर रीतीनें जाळलें जाईल तितकें बरें!

कोनी बेटांत होणारे करमणुकीचे खेळ कोणाहि माणसाला लाजवितील. एका मिनिटांत तीस बायकांचे झगे हवेनें वर उडत असून त्या एकापुढून एक तुमच्या डोळ्यासमोरून जातांना दिसतात! पण या जाहीर रीतीनें होणाऱ्या किळसवाण्या करमणुकींचें आणखी वर्णन नको!

दारूबाज अमेरिका—

होय! अमेरिकेंत दारूबंदी आहे! पण ती फक्त कागदावर! अमेरिकेंत दारूबंदीसाठीं १९२५ सालापर्यंत ६ कोटी ३० लक्ष डॉलर खर्च करून चळवळ केली. दारूच्याविरुद्ध प्रसिद्ध झालेल्या कागदांची मोजदाद केल्यास ते प्रत्येकीं ५०० पानांच्या १ कोटी १५ लक्ष पुस्तकांच्या इतके भरतात! मोठ्यांचें सगळेंच मोठें! पाद्र्यांच्या आणि स्त्रियांच्या मदतीनें या मद्यपानबंदीच्या चळवळीस एकदांचें यश आलें. पण लगेच या बंदीविरुद्ध चळवळ सुरूं झाली. थोडक्याच अवधींत ४६ संस्थानांनीं या बंदीचे बंद ढिले करून घेतले. फक्त दोनच संस्थानांनीं ही बंदी जशीच्या तशी पाळली! दारूबंदीमुळें अमेरिकेंत दोन तट पडले. एक "ओल्या" लोकांचा व दुसरा "कोरड्या" लोकांचा.ओले लोक कोरड्या लोकांवर कोरडे ओढूं लागले व मग कोरड्या लोकांना ओल्या लोकांच्या दारूबाजीकडे पाहून स्वतःच्या अश्रूंनीं स्वतःचे गाल ओले करून घेण्यापलीकडे कांहींच करतां येईनासें झालें!!

वस्तुस्थिति पाहिली तर चार गोष्टी ठळक दिसून येतात! (१) लोक दारूबंदी असूनसुद्धां दारू पीत आहेत. (२) दारूबंदीचा कायदा योग्य रीतीनें अमलांत येत नाहीं. (३) गुन्हेगारांची संख्या वाढत आहे. (४) दारूबाजीमुळें मृत्यू पावणाऱ्यांची संख्या सारखी फुगत आहे. दारूबंदीविरुद्ध मोहीम सर्वत्र सर्व मार्गांनीं चालली आहे. वर्तमानपत्रांचे रकाने भरत आहेत. निरनिराळ्या संस्था ठराव करीत आहेत. यावरून लोकमताचा प्रवाह दारूच्या पिपांकडे वहात असतांना सरळ दिसत आहे. १९२२ मध्यें "लिटररी डायजेस्ट" नामक नियतकालिकानें या विषयावर मतें मागितलीं. ३,५४,७४० लोकांनीं दारूबंदी असावी असें मत दिलें व ५,५०,३६४लोकांनीं कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत आपली दारूबाजी जाहीर केली! यानंतर १९२८सालीं ४०० वर्तमानपत्रांनीं मिळून याच विषयावर मतें मागितलीं. त्यावेळीं ६,८७,३७६ लोकांनीं दारूबंदीस अनुकूल मत दिलें. पण३७,०५,०९२ लोकांनीं प्रतिकूल मत दिलें. यावरून लोकमत दिसून येतें.

चोरटी दारूबाजी इतकी बोकाळली आहे

कीं इंग्रज व फरेंच लोकांच्यापेक्षां अमेरिका दारूबंदीचा कायदा असूनसुद्धां पुढारलेली आहे. एका दारूबाजानें सरळ कबूल केलें आहे कीं, "जी दारू फरान्समध्यें सुद्धां मिळत नाहीं तिची लज्जत अमेरिकेंत मला चाखायला मिळते! दारूबंदीचा कायदा असूनसुद्धां मिळते याबद्दल मला सॅमकाकांचा फार अभिमान वाटतो." ढोंगी काकांना मिळालेला हा घरचा "ओला आहेर" खरोखर अपूर्व आहे. बायका-पुरुषांचे खिसे नाचांच्या वेळेला दारूच्या बाटल्यांमुळें जड झालेले असतात. खिशांतल्या मदिरेला संभाळत बाहुपाशांतल्या मदिराक्षीला नाचवितांना ढोंगी काकांना कितीतरी श्रम पडतात! न्यूयॉर्कच्या पूर्वभागांत तर राजरोस मद्यपान चालतें. डॉ. नॉरिस लिहितात कीं, "दारूबंदीच्या पूर्वींचे दारूबाज आपलें मदिराव्रत अजूनहि अखंड चालवीत आहेत." चोरटी दारूबाजी तर आंटोक्याबाहेर गली आहे. उलट घाणेरडी दारू पिऊन लोक मृत्युमुखीं पडत आहेत. शाळकरी मुलांमुलींचे घोळके दारू पिऊन लोळतांना दृष्टीस पडत आहेत. खडेगांवांतून सुद्धां दारूबाजी जोरांत चालूं आहे. दारूचे कारखाने पूर्वीपेक्षां आतां जास्त झाले आहेत. दारूबंदीपूर्वी फक्त ४०० कारखाने होते. पण १९२० नंतर पावणेदोन लाख कारखाने पकडून जप्त करण्यांत आले! कोटयावधि गॅलन दारू ढोंगी काका, दारूबंदीचा कायदा पास करून जगांत डौलानें मिरविणारे काका, रोज घशाखालीं ओतीत आहेत. दारूमुळें मृत्युसंख्या कशी वाढत आहे पहा. खालील आंकडे न्यूयॉर्क शहराचे आहेत.

साल	रोगी	मृत्यु
१९१८	३७४१	२५२
१९१९	३५४०	१७६
१९२०	३३२५	९८
१९२१	३८६२	११९
१९२२	६८००	२७४
१९२३	९३४२	४२९
१९२४	१०३९८	५१३
१९२५	१०३६१	६८२
१९२६		७५०

कशी आहे ढोंगी काकांची दारूबंदी!

या दारूबंदीमुळें व त्यामुळें माजलेल्या चोरटया व घाणेरडया दारूविक्रीमुळें ही मृत्युसंख्या अशी वाढत आहे. एक न्यूयॉर्कचे न्यायाधीश या प्रकाराला "खून" अशी संज्ञा देऊन त्याची जबाबदारी सरकारवर टाकीत आहेत. दुसरे एक गृहस्थ लिहितात कीं, "असली दारूबंदी म्हणजे पशुवृत्तीचें द्योतक आहे" तिसरे एक गृहस्थ कबूल करतात कीं,असला प्रकार २०व्या शतकांतील अमेरिकेपेक्षां १७व्या शतकांतील रशियाला शोभतो. छोटया गुन्हेगारांमध्यें दारूबाजीच आढळून येत आहे, व ती वाढत्या प्रमाणांत आहे. एकंदरींत दारूबंदीमुळें दारूबाजी व तिचे दुष्परिणाम वाढले आहेत. दारूबाजांना पकडणारे शिपाईगडी, दारूबाजांच्या गुन्हयांची चौकशी करणारे पंच हे स्वतः दारूबाज असल्याचें आढळून येतें.

अमेरिकेच्या सद्यःस्थितीच्या इतिहासांत, (Current History मध्यें) दारूबंदीचा प्रयोग अयशस्वी ठरल्याचें स्पष्ट नमूद करण्यांत येऊन, बारा कोटी लोकांचे हितसंबंध असलेली कोणतीही गोष्ट लोकमत विरुद्ध असतांना करतां येणें अशक्य असल्याचें लिहिलें आहे.

शांतिपाठाचें भेसूर संगीत-

२७ ऑगस्ट १९२८ रोजीं जगभर शांतता प्रस्थापित करणाऱ्या केलॉग पॅक्टवर सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या सह्या होऊन जगांत शांतिपाठाच्या कानठळ्या बसविणाऱ्या आरोळ्या कोनाकोपऱ्यांतून दुमदुमल्या. जगानें कूलीजसाहेबांना दंडवत घातलें! येशू ख्रिस्तानें बिचाऱ्यानें फक्त माणसांमध्यें एकी व शांति असावी असें प्रतिपादिलें पण "सवाई येशू ख्रिस्त मिस्टर केलॉग" यानें राष्ट्रांमध्यें शांतता व एकी प्रस्थापित झाल्याची गर्जना केली!

पण या शांतिसागराच्या पोटांत कसली खळबळ चालली आहे हें सर्वांना माहीत आहे! जगांतील सर्व राष्ट्रें कसल्या उद्योगांत दंग आहेत हेंही सर्व लोक ओळखतात! प्रत्यक्ष ढोंगी काका तरी फिलिपाइन्स बेटावरील आपला हक्क घालविण्यास कोठें तयार आहेत? १९१६ ते १९२१ पर्यंत ढोंगी काकांनीं २००० "हैतिअन" लोकांची केलेली कत्तल अजून लोकांच्या लक्षांत आहे! व ती गोष्ट वाईट झाली असें म्हणणाऱ्या इसमाला अंधार कोठडींत डांबून टाकल्याचेंहि लोक जाणतात! नायकाराग्वामध्यें त्यांनीं काय केलें तें अजून लोकांच्या पुढें आहे. केलॉग पॅक्टमध्यें या गोष्टी टाळल्या आहेत. त्याचप्रमाणें इजिप्त-इंग्लंड, फ्रान्स-मोरोक्को, इटली-अल्बेनिया, वगैरे गोष्टींचा अंतर्भाव नाहीं! त्याचप्रमाणें संरक्षणासाठीं युद्ध करण्यास, तें युद्ध अंतर-

राष्ट्रीय धोरणान्वयें असल्यास परवानगी आहेच. शांततेचे हे पोवाडे त्यांच्यामागें दडून राहिलेलीं कृष्णकृत्यें कशीं झांकून टाकणार! शांततेच्या गप्पा मारतां मारतां १९२७ त अमेरिकेनें आपलें "नेव्हल टनेज" दीडपटीनें वाढविलें. लष्करी खर्च सारखा वाढत आहे. या गोष्टी जगाला दिसत असतांना शांततेच्या गप्पा ढोंगी काका कशा पचविणार ?

उपसंहारः—ढोंगी काकांचें अंतरंग या ठिकाणीं खुलें केलें आहे. जगाला शहाणपणा शिकविणाऱ्या या गुरुजींच्या सैतानी लीला चवाठ्यावर आणल्या आहेत. लोकांच्या नीतिमत्तेची टवाळी करणाऱ्या राष्ट्राची नीति किती निर्लज्ज आहे याचीहि थोडीशी छाननी वर झालीच आहे. श्री. कन्हय्यालाल गौबा यांनीं अमेरिकेची घाणेरडी बाजू जगापुढें मांडली. अमेरिकेच्या चांगल्या गोष्टींना चांगलें म्हणावयाला त्यांची सदैव तयारी आहे.

राजकीय मतपंथ

समाजसत्तावाद (सोशालिझम)

१९२४ सालीं डॅन ग्रिफिल्स यानें 'सोशालिझम म्हणजे काय' याचें स्पष्टीकरण करणाऱ्या २६३ व्याख्यांचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यावरून सोशालिझमची निश्चित अशी एक व्याख्या ठरविणें कसें अशक्य आहे हें दिसेल. सोशालिझम हें तत्त्व आहे, मत आहे, पद्धति आहे, घटना आहे, समाजरचना आहे, तत्त्वज्ञान आहे, चळवळ आहे, जीवन प्रकार आहे, मागणी आहे, ध्येय आहे उत्कर्ष-सोपान आहे, कार्यक्रम आहे, इत्यादि विविध प्रकारच्या कल्पना त्या २६३ व्याख्यांमध्यें अनुस्यूत झालेल्या दिसतील. इतर व्याख्या सोडून दिल्या तरी खालीं दिलेल्या कांहीं सूचक मतांवरून आपणांस समाजसत्तावादाच्या आधारभूत तत्त्वांची ओळख होईल.

(१) व्हॅन्डरव्हिल म्हणतो 'भांडवलशाहीचें समाजसत्तेंत रूपांतर करण्याकरितां लागणारी जी राजकीय सत्ता ती जिंकण्याकरतां उभारलेली जी कामगारांची घटना ती म्हणजेच सोशालिझम.'

(२) सोशल डेमोक्रॅटिक फेडरेशनचें मुखपत्र जस्टिस म्हणतें 'मालाची निपज (Production विल्हेवाट (Destribution) व देवघेव (Exchange) यांच्या साधनांचें राष्ट्रीकरण म्हणजेच सोशालिझम्. '

(३) ब्रूस ग्लेझियर म्हणतो "जमीन व भांडवल यांवर सार्वजनिक मालकी असणें हाच सोशालिझमचा आर्थिक पाया होय."

(४) रॉबर्ट बॅचफर्ड म्हणतो 'सोशालिझमच्या कार्यक्रमांत मुख्यत: एक मागणी आहे, ती ही कीं, जमीन व मालाच्या पैदाशीची इतर सर्व साधन-सामुग्री ही सार्वजनिक मालमत्ता व्हावी व तिच्यावर लोकांचेच हिताकरितां लोकांचा ताबा असावा,

(५) बर्ट्रंड रसेल म्हणतो 'जमीन व भांडवल यांवर सार्वजनिक मालकी असावी या मतामध्यें सोशालिझमचें बीज आहे. '

(६) मॉरिस हिलकी म्हणतो 'चढाओढीच्या धंद्यांत व मजुरीच्या पद्धतींत अनर्थाचें मूळ आहे हें जाणून मालाची पैदास सहकार्याचे तत्त्वावर ज्यायोगें होईल अशा तऱ्हेनें हल्लींच्या प्रचलित आर्थिक पद्धतीमध्यें फरक करून, पुनर्घटना करणें हें सोशालिझमचें तत्त्व आहे.'

(७) डॉ. शाफल म्हणतो 'सोशालिझमच्या चळवळीचा खरा हेतु हा आहे कीं, खाजगी भांडवलशाही नष्ट करून सार्वजनिक भांडवलशाही प्रस्थापित करणें म्हणजे खाजगी धंदेवाल्यांच्या चढाओढीनें नियंत्रित केलेली जी मालाच्या पैदाशीची पद्धति, त्याऐवजीं पैदाशीच्या साधनांवर सार्वजनिक मालकी ठेवून राष्ट्रांतील मजुरांची एकमुखी संघटना ज्यायोगें होईल अशी मालाच्या पैदाशीची पद्धति सुरू करणें (Method of production) 'खाजगी व एकमेकांत चढाओढ लावणाऱ्या भांडवलाचें संघटित सार्वजनिक भांडवलांत रूपांतर करणें यांतच सोशालिझमचें सारसर्वस्व आहे. '

सोशालिझमचीं सहा प्रमुख अंगें--

वर दिलेल्या व्याख्यांवरून खालीं दिलेल्या सहा तत्त्वांचा प्रचार करणें हें सोशालिझमचें ध्येय आहे असें दिसून येईल. (१) व्यक्ति व समाज यांमध्यें समाजाचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करणें. (२) मानवी परिस्थितींतील चढउतारामध्यें सारखेपणा आणणें (विषमता काढून टाकणें) (३) भांडवलवाल्याला पदच्युत करणें. (४) जमीनदारीचें उच्चाटन करणें. (५) खाजगी धंद्याचे उच्चाटन करणें (Enterprise) (६) चढाओढ नाहींशी करणें.

ह्यांपैकीं पहिलें तत्त्व घेऊं. (१) सोशालिझम समाजसत्तावाद हा व्यक्तीपेक्षां समाज श्रेष्ठ आहे असें म्हणतो, व्यक्तिस्वार्थापेक्षां समुदायहिताला जास्त मानतो, सर्व मानवजाति ही संघटित आहे, व परस्परावलंबि आहे, व्यक्तीच्या प्रत्येक कर्माचे परिणाम समाजावर होतात, व सर्व परिणामांना सामाजिक कारणें असतात, राष्ट्र हें अनेकावयवी पुरुषाचें विराट स्वरूप आहे, राष्ट्र ही एक संघटना आहे व त्यांतील जनतेनें बंधुभावाची जाणीव ठेविली पाहिजे असें म्हणतो. जनतेच्या सेवेची व निस्वार्थीपणाची कल्पना ज्या सोशालिझममध्यें निगडित आहे त्यालाच ऑगस्ट कांटनें मानवधर्म असें म्हटलें आहे. समाजा-

चे कल्याणाकरितां वैयक्तिक पारतंत्र्य सोसलें पाहिजे, वैयक्तिक स्वार्थाला रजा दिली पाहिजे.

(२) मानवी स्थितीमधील श्रेष्ठ– कनिष्ठपणा नाहींसा करण्यांत सोशालिझमला गरिबांची स्थिति सुधारावयाची आहे. समाजांत असमान स्थिति असणें मग ती वैयक्तिक सामर्थ्याच्या तफावतीमुळें म्हणा, अगर सामाजिक परिस्थितिमुळें म्हणा हें केव्हांही शोचनीय आहे. कांहीं थोडचा धनाढ्य लोकांनीं ऐषआरामांत व चैनींत रहावयाचें व इतर हजारों लोकांनीं पैशाच्या व रिकामपणाच्या अत्यंताभावामुळें निकृष्ट स्थितींत जीवनक्रम रेटावयाचा, हें योग्य नव्हे. पैशांतच सर्व सत्ता सांठविलेली आहे. अशी सत्ता थोडचा भांडवलवाल्यांच्या हातीं असणें धोक्याचें आहे. आर्थिक दृष्टचा, राजकीय दृष्टचा,व नैतिक दृष्टयाहि संपत्तीची समान विभागणी असणें जसें निद्य तसेंच बहुसंख्य सर्वसामान्य जनतेची परिस्थिति सुधारणें हें अभिनंदनीय होय. समानता हें सोशालिझमचें मुख्य तत्त्व आहे. आर्थिक बाबतींत ही समानता असणें किंवा असमानता कमी कमी करीत आणणें हें सोशालिझमचें मुख्य ध्येय आहे. सोशालिझम रस्त्यावरील खडी दाबणाऱ्या रुळाप्रमाणें खडबडीतपणा व उंचसखलपणा काढून टाकून समाजामध्यें सारखेपणा उत्पन्न करतो. रॉबर्ट फ्लिट म्हणतो 'दिवसभर अतिशय काबाडकष्ट करून त्याबद्दल अत्यल्प वेतन मिळणाऱ्या कामकऱ्यांच्या कल्याणाचे इच्छेंतच सोशालिझमचें मूळ आहे. पण निकृष्ट वर्गाची उन्नति करणें म्हणजे कामकऱ्यांचें वर्चस्व प्रस्थापित करणें नव्हे, किंवा उच्चवर्ग व मध्यमवर्ग यांचें उच्चाटन करणें नव्हे. या बाबतींत सोशालिझमचा व बोल्शेविझमचा मतभेद आहे. एकाचा मार्ग सनदशीर ! तर दुसऱ्याचा मार्ग क्रांतिकारक.

(३) भांडवलशाहीचें उच्चाटन. खाजगी मालमत्तेचें, भांडवलाचें सार्वजनिक मालमत्तेंत रूपांतर करणें हा सोशालिझमचा आर्थिक हेतु आहे. व्हँडरव्हेल्ड म्हणतो 'मालाच्या पैदाशीच्या, वाटणीच्या व देवघेवीच्या साधनावर सार्वजनिक हक्क प्रस्थापित करणें हा सोशालिझमचा अंतिम हेतु आहे. फ्रेड हेंडरसन म्हणतो, 'खाजगी भांडवलशाहीच्या संस्थेवर आघात करून भांडवलवाल्यांच्या वर्गाचें उच्चाटन करणें हें आम्हा सोशालिस्टांचें कर्तव्य आहे, कारण या वर्गाच्या अंगाला कस न लागतां किंवा बुद्धीवर ताण न पडतां, सार्वजनिक साधनसामुग्रीच्या बळावरच हा वर्ग पोसला जाऊन पुष्ट होतो.' (The case for socialism) ब्रेल्स्फोर्ड म्हणतो कीं (Socialism for to-day) भांडवल हें खाजगी मालकांच्या हातांतून काढून त्यावर सार्वजनिक हक्क प्रस्थापित केला पाहिजे. सोशालिस्टांचें 'भांडवला'विरुद्ध बंड नाहीं, 'भांडवलवाल्यांविरुद्ध व भांडवलशाहीविरुद्ध' बंड आहे. भांडवलाचें महत्त्व मालाच्या पैदाशीला व धंद्याच्या वाढीला किती आहे हें सोशालिस्ट जाणतो. पण कॅपिटॅलिझमच्या तो सर्वस्वी विरुद्ध आहे. हल्लीं प्रचलित असलेल्या भांडवलशाहीच्या पद्धतीनें असें काय मोठें लोकांचें कल्याण केलें आहे? उलट अकल्याणच केलें आहे. बहुसंख्य लोकांच्या अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजा ही पद्धति भागवूं शकत नाहीं, म्हणून कित्येकांची उपासमार होत आहे.असंख्य लोक आपला जीवनक्रम असंतुष्टपणें कंठीत आहेत. जे कांहींच काबाडकष्ट करीत नाहींत ते या अनिष्ट पद्धतीमुळें गबर होत आहेत, व वाढत्या हक्कदारीमुळें (Monopolies) अशा गबर लोकांची सत्ता वाढून ते गरिबांना राबवून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेत आहेत. तेव्हां भांडवलशाही ही पिळून काढण्याची पद्धति आहे व तिची जास्त वाढ झाल्यास अनर्थ होईल. हल्लींच्या पद्धतींत धंद्यांना स्वार्थी स्वरूप आलें आहे. व सामाजिक जबाबदारी,व सामाजिक संघटना यांचा लोप झाला आहे. प्रथम वैयक्तिक भांडवलवाल्यांचें हित मग सर्व समाजाचें हित ही स्वार्थी दृष्टि भांडवलशाहीनें उत्पन्न केली आहे.त्यामुळें भांडवलवाल्यांचें हित (समाजहिताच्या) राष्ट्रहिताच्या पदोपदीं आड आलें आहे. अशा या अनर्थकारी पद्धतीचें सोशालिस्टांना उच्चाटन करावयाचें आहे. त्यांना भांडवलाची मात्र गरज आहे. पण भांडवलावर व्याज देण्याची व घेण्याची पद्धति त्यांस संमत नाहीं. कारण हें लोकांच्या श्रमानेंच उत्पन्न झालें आहे. शिवाय तें खाजगी भांडवलवाल्यांना अतिशय फलदायी झालें आहे. भांडवलवाल्यांच्या नफेबाजीमध्यें ह्या व्याजबट्ट्याचा फारच मोठा भाग आहे. सिडने वेब म्हणतो कीं, भांडवलवाले हे समाजाच्या रक्तशोषक जळवाच होत. कारण ते आपल्या बांधवांच्या काबाडकष्टाच्या रूपानें त्याचेपासून आपल्या भांडवलावरील व्याज उकळीत असतात. सोशालिस्टांना खाजगी भांडवलवाल्यांचें अस्तित्व नको आहे. स्वतःच्या उदरंभरणार्थ लागणाऱ्या पैशाव्यतिरिक्त कोणापाशीं

भांडवल असतां कामा नये. मग हल्लीं ज्याचेपाशीं खाजगी भांडवल आहे, त्यांचें काय करावयाचें? त्यांचेकडून भांडवल काढून घ्यावयाचें, व यावद्दल त्यांना भरपाई म्हणून द्यावयाची नाहीं. कारण हा सगळा पैसा भांडवलवाल्यांनीं तरी आणला कसा? समाजाचेच जीवावर. मग समाजाला तो परत घेण्याचा हक्क कां असूं नये? अशा तऱ्हेची सोशालिस्टांची विचारसरणी आहे. कारखाने, खाणी, रेल्वे, जहाजें, वखारी, दुकानें इत्यादिकांमध्यें गुंतलेलें खाजगी भांडवल त्या त्या मालकांचा फायदा करणारें आहे. त्यामध्यें समाजाचा कांहींच फायदा नाहीं. अतएव ही भांडवलशाही गर्हणीय आहे असें सोशालिस्ट म्हणतो. भांडवलशाहीची पद्धत वाईट आहे असें गृहीत धरलें तरी सोशालिझमची पद्धत कां चांगली हा प्रश्न उरतोच. सोशालिस्ट म्हणतात कीं, खाजगी फायदा हा शब्दच कोशांतून काढून टाकावयाचा. म्हणजे मजूर वर्गाच्या मनावरचें मोठें दडपण नाहींसें होईल. शिवाय त्यांचे जिवावर पुष्ट होणारे भांडवलवालेच गेल्यावर मजुरांना श्रमहि त्या मानानें कमी करावे लागतील.शिवाय सहकार्याचेच तत्त्वाची त्यांना जाणीव होऊन विशिष्ट धंद्यामध्यें नफ्यातोटचाला सर्व सारखच भागीदार आहों ही जाणीव जोमानें काम करण्यास त्यांस चेतना देईल. सोशालिझम वर्गयुद्धाचा व मजूर व मालकांचे लढयांचा प्रवर्तक नसून दोघांनाहि वर ओढणारी ती अचाट शक्ति आहे. सोशालिझम वर्गकलह पेटवीत नसून, त्याला नवीन सामाजिक संघटनेनें विझविण्याचा प्रयत्न करितो. हल्लीं मजुरांवर व धंद्यांवर भांडवलाचें वर्चस्व आहे, तें कमी करून उलट भांडवलावरच मजुरांचें व धंद्यांचें वर्चस्व प्रस्थापित करणें हा सोशालिझमचा हेतु आहे.

(४) जमिनदारीचें (स्थावर मिळकतीचें) उच्चाटन. भांडवलवाल्याला आपलें भांडवल उभारावयास थोडे तरी श्रम पडले असतील. पण जमिनदाराला जमीनजुमला स्थावर मिळकत निसर्गाची देणगी म्हणूनच जणू काय प्राप्त झाली आहे. व त्या जमिनीवर भाडें अगर खंड जो घेणार त्यावद्दल त्या जमिनदारानें अंगमेहनत अशी कांहींच केलेली नसते.जमीन ही सार्वजनिक मालकीची ईश्वराची एक देणगी आहे. कोणी श्रम करून जमीन उत्पन्न करूं शकणार नाहीं' असें ब्लॅच फोर्ड म्हणतो. सोशालिझमचे असलाखालीं एका इंचभर जमिनीच्या तुकडयावरसुद्धां कोणाही नागरिकाला मालकी हक्क सांगतां येणार नाहीं. लहान–मोठया जमिनदारांकडून तो हक्क काढून घेऊन, भाडयाची पद्धत बंद होईल. सर्व जमीन सार्वजनिक मालकीची झाल्यावर प्रत्येकाला सार्वजनिक जबाबदारीची जाणीव होईल. भाडें व खंड ही सार्वजनिक खजिन्यांत जाईल. या रेंटच्या पद्धतीमुळेंच खाजगी जमीनदार सत्ताधीश होऊन शेतकऱ्यांना फुकट राबवून त्यांच्यापासून फायदा करून घेण्याचें साधन त्यांना मिळालें.या भाडयाचा सार्वजनिक हिताकडे विनियोग झाला पाहिजे. सर्व जमीन राष्ट्राच्या मालकीची केल्यानें व प्रत्येक खेडयानें सहकारी तत्त्वावर आपापल्या जमिनीची मशागत केल्यानें शेतकी फार फायदेशीर होईल. जमीन करारानें देणें किंवा खंडानें देणें ह्यावर समाजसत्ता असावी म्हणजे मालकीहक्कापासून होणारे अनर्थ टळतील. पण रशियाप्रमाणें सर्व जमीन जप्त करावी असें सोशालिझमचें मत नाहीं.या क्रांतिकारक मार्गानें न जातां सनदशीर मार्ग स्वीकारावा असें त्यांचें मत आहे. शेतकऱ्यांची संघटना करूनच समाज जास्त पुष्ट होईल. खाजगी मालमत्ताच नाहींशी करणें हें सोशालिझमचें ध्येय नव्हे. व्यक्तिवैशिष्टच हें स्वतःच्या मालकीच्या वस्तूमुळेंच प्रतीत होतें हें सोशालिझम जाणतो.आर्थिक दृष्टचा सोशालिझमची अशी एक पद्धत आहे कीं, जीमुळें मजूरांची पिळणूक बंद होईल.या हेतूच्या अनुरोधानेंच खाजगी मालमत्ता किती असावी,कोणच्या प्रकारची असावी वगैरे प्रश्न सोडवावयाचे आहेत. कांहीं कांहीं प्रकारची मालमत्ता सार्वजनिक केल्याशिवाय सर्वसामान्य लोकांना (जमीन किंवा मालमत्ता नसलेल्या) दीन दशेंतून डोकें वर काढतां येणार नाहीं.

(५) खाजगी उद्योगधंद्यास बंदी, मालाची आयात–निर्यात, निपज, माल तयार करण्याचीं साधनें, खाणी, जमीन, कारखाने, या सर्वांवर समाजाचे कल्याणाकरितां सार्वजनिक हक्क प्रस्थापित करणें हें सोशालिझमचें ध्येय आहे मग व्यापार–धंद्यापासून वैयक्तिक फायदा करणें अगदींच अशक्य होईल, मजुरीची पद्धतीही बंद पडेल. पण सोशालिस्ट हा उत्क्रांतीचा भोक्ता असल्यामुळें तो प्रत्येक पाऊल काळजीपूर्वकच टाकतो. तत्त्वें जरी योग्य असलीं, तरी तीं सरसहा एकदम लागू केल्यास अनर्थ घोटाळे होतील हें सोशालिस्ट जाणतो. म्हणूनच त्याचें असें म्हणणें आहे कीं, आधीं सर्वांत जास्त जाचक होणारे जे काटे ते काढून टाकावे. मोठे भांडवलवाले, मोठे

जमीनदार, मोठ्या प्रमाणांत होणारा खाजगी व्यापार यांची आधीं निरवानिरव करून मग इतर कमी प्रमाणांत सार्वजनिक हितास बाधक होणाऱ्या गोष्टींस हात घालावा. रेल्वे, जहाजें, खाणी, कारखाने, बँका, इन्शुअरन्स कंपन्या, यांवर आधी समाजसत्ता प्रस्थापित करावी. समाजाच्या धारणेला आधारभूत जे उद्योगधंदे त्यांचें आधीं राष्ट्रीकरण करावें. औद्योगिक संघटना हा सोशालिस्टांच्या कार्यक्रमापैकीं महत्त्वाचा कार्यक्रम आहे. या औद्योगिक संघटनेंत, मोठमोठ्या, व्यापाऱ्यांची अर्थशास्त्रज्ञांची, आंकडेविशारदांची मदत घेऊन परदेशचा व्यापार, देशी व्यापार, इतर आर्थिक चळवळी, चलनाचा भाव यांवर राष्ट्रीय सरकार नियंत्रण ठेवील.

(६) चढाओढीस बंदी—स्थानिक, राष्ट्रीय, व आंतरराष्ट्रीय गोष्टींमध्यें चढाओढीच्या ऐवजीं सहकार्याचे तत्त्वानें वागणें हें सोशालिझमचें ध्येय आहे. सहकार्याचें तत्त्व अमलांत आल्यास वैयक्तिक जीवनार्थ कलह बंद पडेल. पण चढाओढ बंद करणें म्हणजे ऐतखाऊंची संख्या वाढवणें नव्हे. मालाची पैदास जोरांत व नीट होण्यास चढाओढ हवी, पण ती मर्यादित असावी, आर्थिक दृष्टया समाजाचे हितास बाधक होऊं नये. ही प्रचलित असलेली चढाओढ बाधक होणारी आहे. उदाहरणार्थ, अ, ब क हे एकमेकाशीं चढाओढ करूं लागले, मालाला मागणी येईल या भरंवशावरच मालाची अतोनात पैदास करूं लागले व त्याकरितां जास्त मजूर लावले. व हे मजूर कुठचे? तर इतर धंद्यांतले, अगर इतर कारखानदारांचे. तात्विक दृष्टया मालाची पैदास कशाकरतां? तर लोकांना अन्नवस्त्र मिळण्याकरितां पण हल्लीं पहावें तो मालाची चढाओढीनें इतकी पैदास झाली आहे कीं, बाजारांत माल तुंबून आहे. व अशा रीतीनें व्यापाराच्या नाड्या आंखडल्या आहेत. म्हणूनच औद्योगिक दुर्दशा झाली आहे, व उपासमार वाढत आहे. एकमेकाशीं चढाओढ करून एकमेकाला मारक होणाऱ्या धंद्याची स्थिति पहा आणि सुसंघटित व बिनचढाओढीचीं पोष्टांतील कार्डपाकिटें तिकिटें यांच्या विक्रीची पद्धति पहा! यावरून चढाओढीची पद्धत किती घातक आहे हें दिसून येईल. म्हणूनच सोशालिझमला ही पद्धत बंद पाडून सहकार्याचे तत्त्वावर उद्योगधंद्याची संघटना करावयाची आहे.

आतांपर्यंत आपण सोशालिझमचें वैशिष्ट्य दाखविणाऱ्या सहा गोष्टींचें विवरण केलें. त्यावरून असें दिसून येईल. कीं, राजकीय क्षेत्रांत व्यक्तीपेक्षां समाजाला श्रेष्ठ स्थान दिलें जातें. सामाजिक गरजांपुढें वैयक्तिक अडीअडचणी कनिष्ठ समजल्या जातात. सामाजिक क्षेत्रांत निकृष्ट व हतभागी लोकांना सुस्थितींत, संपन्नावस्थेंत आणण्याचा प्रयत्न करून परिस्थितीमधील उंचसखलपणा भरून काढावयाचा. व आर्थिक क्षेत्रांत व्यापाराचीं सर्व साधनें हस्तगत करून, जमिनीवरील खाजगी मालकीहक्क काढून टाकून खाजगी उद्योगधंदे व त्यांमधील चढाओढ बंद करून भांडवलशाही समूळ नष्ट करावयाची, व समाजसत्ता प्रस्थापित करावयाची.

आतां सोशालिझम इतर चळवळींहून कसा भिन्न आहे हें पाहूं. सोशालिझम म्हणजे नास्तिकवाद नव्हे; जडवाद (Materialism) नव्हे, प्रजासत्ताक राज्यपद्धति (Republicanism) नव्हे. कोठें कोठें यांचा सोशालिझमशीं थोडाफार संबंध आला असला तरी सोशालिझमच्या तत्त्वामध्यें त्यांचा अंतर्भाव होत नाहीं.

कांहीं सोशालिस्टांच्या मतें सोशालिझम व कलेक्टिव्हिझम या दोहोंमध्यें भेद नाहीं. बर्नार्ड शॉ म्हणतो, स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत ज्या ज्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्या त्या गोष्टी सोशालिझममध्येंहि येतात. सोशालिझम हा सामाजिक, सहकारी चळवळीचाच विस्तार होय. सिडने वेब म्हणतो कीं, स्थानिक स्वराज्याचा राजकीय क्षेत्रांबरोबर औद्योगिक क्षेत्रांत विस्तार म्हणजेच सोशालिझम. रस्ते, पूल, शाळा, पाणीपुरवठा, कोर्टें, पोस्ट व तार ऑफिस, टेलिफोन, निवडणुकी, इत्यादि जे स्थानिक सरकारचे ताब्यांतील विषय ते सोशालिझममध्यें अंतर्भूत होतात. विशेषतः फेबिअनपंथी लोक सोशालिझम व कलेक्टिव्हिझममध्यें भेद मानीत नाहींत. पण कलेक्टिव्हिझममध्यें वर जीं सहा तत्त्वें सांगितलीं तीं येत नाहींत. केवळ सार्वजनिक चळवळीच्या क्षेत्राचा विस्तार म्हणजे सोशालिझम नव्हे. समाजसत्तेखालीं एकादी गोष्ट अमलांत आणणें पण त्यावरोबरच खाजगी चळवळ बंद करणें, या दोन्ही गोष्टी सोशालिझममध्यें येतात. डॉ. शाफल म्हणतो 'औद्योगिक व सामाजिक चळवळीवर व सार्वजनिक देखरेखीची पद्धत म्हणजे सोशालिझम नव्हे. कलेक्टिव्हिझम ही भांडवलशाहीमध्यें व्यापार सुव्यवस्थित रीतीनें करण्याची पद्धति होय.

सोशालिझमव शासनाभाववाद (Anarchism) यांमध्यें भेद आहे.व तो राजकीय आहे. सोशालिझमला सरकारची शासनसंस्था पाहिज आहे.तर अराजकांना सरकारकारभार नको आहे. शिवाय अराजकांना मानवी स्वभावांत सगळें चांगलेंच दिसतें. समवृत्तीवरच त्यांचा विश्वास. सोशालिस्ट यावर भर न देतां, मानवी स्वभावाच्या संगतिप्रियतेवर, समाजप्रियतेवर भर देतो.

सोशालिझम ही कम्युनिझमची प्राथमिक अवस्था होय.पण दोहोंचीं तत्वें सारखींच; तपशिलांत मात्र फरक. (१) मालाचे पैदाशीच्या क्षेत्रांत जमीन व भांडवल या रूपानें असणाऱ्या खाजगी मालमत्तेवरील मालकी काढून घ्यावी, पण गिऱ्हाइकीचे–विक्रीचेव स्तुंवर खाजगी मालकी असूं द्यावी, हें सोशालिझमचें मत. तर कम्युनिझमला खाजगी मालकीचें अजीबात उच्चाटन करावयाचें आहे. सर्व मालमत्ता ही राष्ट्राची मालमत्ता आहे हें कम्युनिझमचें मत, तर व्यापाराच्या साधनावरच राष्ट्राची मालकी प्रस्थापित करावी हें सोशालिझमचें मत. (२) संपत्तीच्या वाटणीचे बाबतींत, सोशालिझम प्रत्येकाला त्याच्या समाजसेवेच्या मानानें मोबदला देऊं इच्छितो, तर कम्युनिझम प्रत्येकाला, त्याच्या गरजेप्रमाणें, उदरपोषणाचा मानवी हक्क म्हणून मोबदला देऊं इच्छितो. त्याची कर्तबगारी, अगर जनसेवा तो लक्षांत घेत नाहीं. (३)देवघेवीच्या बाबतींत, सोशालिझमला व्यवहाराकरतां पैशाची जरूर भासते तर ती कम्युनिझमला भासत नाहीं. नाणीं, इतर चलन, रोखी, उधारी हे मालाची देवघेव सुलभ करणारे प्रकार कम्युनिझमला नको आहेत. मॅक्डोनल्ड म्हणतो ‘ सोशालिझमला विनिमय-साधन पाहिजे आहे.मग तें स्टर्लिंग पौंडांत असो नाहींतर लेबर नोटांत असो. सोशालिझमला वैयक्तिक उत्पन्नाची कल्पना पसंत आहे. पण कम्युनिझम वैयक्तिक गरजा भागण्यास पुरेसें एकंदर किती लागेल ह्याचाच फक्त विचार करतो. प्रत्येकजण राष्ट्राकरितां आपली सर्वशक्ति वेचील व त्याबद्दल त्याला मजुरी न मिळतां अन्नवस्त्रास पुरेसें मिळेल असें कम्युनिझमचें मत आहे. हे तीन आर्थिक क्षेत्रांतील मतभेद झाले. राजकीय क्षेत्रांतसुद्धां या दोन पंथांमध्यें चवथा भेद आहे.(४)सरकार ही शाश्वत सनातनसंस्था आहे असें सोशालिझम मानतो, फेबियनपंथी तर असें म्हणतात कीं, त्यांच्या ग्रहमंडळांतला सरकार हा सूर्य होय. कम्युनिस्ट म्हणतात, सरकार ही संक्रमण कालांतील तात्पुरती संस्था आहे. व ती जितक्या लवकर नाहींशी होईल तितकें चांगलें. सरकार हे वर्गसत्तेस कारणीभूत होत असल्यामुळें कम्युनिस्ट सरकार नको असें म्हणतात. (५) या दोन पंथांमध्यें एक सामाजिक मतभेदहि आहे. मानवी स्थितीमध्यें समता आणणें हें जरी सोशालिझमचें एक तत्त्व आहे तरी दर्जा, अधिकार, उत्पन्न, या बाबतींत (कांहीं एक, मर्यादेपर्यंत) दर्जा, भदाभद सोशालिझमला मान्य आहे. कम्युनिझमला समतेचें तत्त्व कडकपणानें अंमलांत आणावयाचें आहे. म्हणूनच कम्युनिस्टामध्यें शिस्त, सक्ती, ही विशेष दिसून येते. (६) शेवटचा एक भेद या दोन पंथांमध्यें आहे तो हा कीं, दोघांच्या मनोवृत्तींत भेद आहे. एकाला उत्क्रांतीनें जावयाचें आहे तर दुसऱ्याला क्रांतीच्या मार्गानें जावयाचें आहे,एकाला सनदशीर पार्लमेंटरी राजकीय चळवळीनें संयुक्त संघटना घडवून आणावयाची आहे तर दुसऱ्याला राजकीय सत्ता बळकावून तिच्या जोरावर घडवून आणावयाची आहे. सोशालिझम शांततावादी आहे तर कम्युनिझम युद्धप्रिय आहे. सोशालिझमला समाजसत्ता हवी आहे, तर कम्युनिझमला मजूरतंत्री राज्य पाहिजे आहे. बहुसंख्याक मजूरवर्गाच्या मतांचा उपयोग करुन सत्तारूढ होऊन राज्यकारभाराचीं सर्व यंत्रें–पार्लमेंट, कॅबिनेट, सिव्हिलसर्व्हिस, लष्कर, आरमार, पोलीस इत्यादि ताब्यांत घेऊन नंतर कायदेमंडळ, मंत्रिमंडळ, न्यायकोर्टें यांच्याद्वारें भांडवलशाहीचें समूळ उच्चाटन करणें व बहुसंख्याकांचें वर्चस्व स्थापणें हा सोशालिस्टांचा हेतु आहे. तर कम्युनिझमला हें सर्व एकदम क्रांतीनें घडवून आणावयाचें आहे.

आपण हें पाहिलें कीं,सोशालिझम व कलेक्टिव्हिझम हे विजातीय आहेत. तर सोशालिझम व कम्युनिझम हे सजातीय आहेत.फक्त कांहीं अंशांचाच त्यांच्यामध्यें फरक आहे. कलेक्टिव्हिझम हें सोशालिझमकडे नेणाऱ्या अनेक मार्गांपैकीं एक आहे, तर कम्युनिझम म्हणजे सोशालिझमची परिणतावस्था. सोशालिझमला ओळखण्याचीं सहा तत्वें वर दिलीं आहेत. त्यावरुन असें दिसेल कीं, राजकीय बाबतींत समाजाला व्यक्तीपेक्षां श्रेष्ठ ठरवणें, सामाजिक बाबतींत लहानथोर, श्रेष्ठ कनिष्ठ हा भेद काढून समता प्रस्थापित करणें. व आर्थिक बाबतींत भांडवलशाही, मालकशाही, यांचें उच्चाटन करणें, ह्या तीन सोशालिझमच्या

ओळखीच्या खुणा आहेत.हल्लीं ह्यांपैकीं आर्थिक तत्त्वांनाच महत्त्व दिलें जात आहे व कम्युनिस्टहि याच तत्त्वांवर सर्व भर देत आहेत.

सोशॅलिझमचें कार्य

(१) सोशालिझमनें प्रचलित, सामाजिक व आर्थिक पद्धतीमधील दोष ठळकपणें दाखविले आहेत. एकीकडे अलोट श्रीमंती, तर दुसरीकडे बहुसंख्य लोकांची उपासमार, पैशाची असमान विभागणी, मोठमोठ्या शहरांतून दिसणारी मजुरांची दन्यावस्था, उद्योगधंद्यांतील भयंकर चढाओढ, व त्यामुळें होणारी नुकसानी, मजुरांची परतंत्रता, हीं हल्लींच्या समाजांतील व्यंगें लोकांचे नजरेस आणण्याची कामगिरी सोशालिझमनें केली आहे.

(२) परिस्थिति मनुष्याचें चारित्र्य व विधिलिखित ठरविते ह्या गोष्टीवर सोशालिझमनें भर दिला आहे.हल्लींच्या अचाट आर्थिक चळवळीमध्यें अंतर्राष्ट्रीय राजकीय व आर्थिक व्यवहारामुळें मजूरवर्ग हवालदील झाला आहे, प्रचंड आर्थिक पद्धतीला तो बळी पडला आहे. व त्याचें रक्षण करणें समाजाचें कर्तव्य आहे. याची जाणीव सोशालिझमनें करून दिली.

(३) समाजांत ऐक्याची, संघटनेची जाणीव उत्पन्न करून लोकस्थितीचा प्रश्न सोडविण्याची उत्कंठा लोकांत उत्पन्न केली. निकृष्ट वर्गाविषयीं अनुकंपा, जुलमी सत्तेचा परिहार व समाजसेवेची आवश्यकता सोशालिझमनें पटवून दिली.

(४) महत्त्वाच्या व आवश्यक सामाजिक सुधारणांना सोशालिझम चालना देतो.

(५) हल्लींच्या सरकार कल्पनेची सोशालिझमनें वाढ करून एक प्रकारचें महत्त्व प्राप्त करून दिलें आहे. राज्य हें पूर्ण जीवनाचें साधन आहे. या कल्पनेमुळें समाजसंघटनेस, व समाजकल्याणास सोशालिझमनें लोकांना प्रवृत्त केलें आहे. राज्य म्हणजे कांहीं समाजांतील लोकांव्यतिरिक्त शक्ति नव्हे. राज्य म्हणजे संघटित समाजच. व ही संघटना वाढत जाऊन सर्व सामाजिक चळवळींचे आक्रमण करील ही कल्पना किती उदात्त आहे! सोशालिझमच्या चळवळीचा इतिहास पाहिला तर असें दिसून येईल कीं सोशालिझम हा एक प्रवाह आहे ती एक प्रवृत्ति आहे व वेळोवेळीं तिचें रंगरूप बदलत आलें आहे. ध्येय एकच असलें तरी तें ध्येय गाठणारा मार्ग वळणें घेत घेत आला आहे.सोशालिझमच्या तत्त्वांपैकीं गेल्या शतकामध्यें वेळोवेळीं एकावर किंवा अनेकांवर भर दिलेला आपणांस दिसून येईल. सोशालिझममध्येंसुद्धां देशोदेशीं उपपंथ निर्माणझाले असें इतिहासावरून दिसून येईल.फ्रान्समध्यें सेंट सायमन व फोरिअर, इंग्लंडमध्यें, रॉबर्ट ओवेन व चार्टिस्ट चळवळ, जर्मनीमध्यें, मार्क्स व एंजेल्स, तसेंच, लासेलची जर्मनींतील सोशालिस्ट चळवळ अशा तऱ्हेनें वेळोवेळीं सोशालिझमचा प्रसार होतांनाच फरक पडत गेले आहेत. आर्थिक सत्ता हेंच सोशालिस्ट संघटनेचें ध्येय आहे. समाजानें आर्थिक सत्तेचें नियंत्रण करून समाजाची उन्नति केली पाहिजे. सोशालिझमचें ध्येय केवळ यांत्रिक पूर्णता व आर्थिक संघटना नसून, जीवनक्रमाची सुधारणा हें आहे. म्हणूनच या चळवळीला धर्म, नीति, कला, साहित्य यांनी प्रेरणा केली आहे.

बोल्शेव्हिझम्

रशियांतील सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीची परिषद १९०२–३ सालीं ब्रुसेल्स व लंडन येथें भरली होती. तेथें जहाल व मवाळ असे दोन पक्ष पडून जहाल पक्षास बहुमत मिळालें. त्यावरून या पक्षास बोल्शेव्हिकी म्हणजे बहुमतवाला पक्ष व मवाळ पक्षास 'मेन्शेव्हिकी' म्हणजे अल्पमतवाला पक्ष असें नांव मिळालें. या दोनहि पक्षांची चळवळ कमी अधिक प्रमाणांत पुढें चालू होतीच. १९१७च्या ऑक्टोबरमध्यें बोल्शेव्हिक पक्षानें राज्यक्रांति करून रशियांत मजुरांची सत्ता स्थापन केली, तेव्हांपासून आतांपावेतों रशियांत या सरकारची सत्ताच कायम आहे. बोल्शेव्हिक पक्षानें राज्यक्रांति केली म्हणून रशियन सरकारास 'बोलशव्हिक' सरकार असेंहि म्हणतात. आणि या सरकारचीं जीं राजकीय व आर्थिक तत्त्वें आहेत त्यास मूळ पक्षाच्या नांवावरून 'बोल्शेव्हिझम्' असें नांव रूढ झालें आहे.

बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक हे दोनहि पक्ष ज्या मूळ सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतून निघाले तो मूळ पक्ष कार्ल मार्क्स (१८१८–१८८३) या जर्मन समाजसत्तावाद्याचा अनुयायी होता. एशू ख्रिस्तानंतर जगाच्या इतिहासांत आपल्या तत्त्वज्ञानानें व विचारसरणीनें प्रचंड उलथापालथ करणारा मार्क्सएवढा दुसरा महापुरुष झालाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

१९१४ सालीं महायुद्ध सुरू होईपर्यंत मार्क्सच्या मतांचें कोणास फारसें महत्त्व वाटलें नव्हतें. पुढें युद्ध चालू असतां रशियांत बोल्शेव्हिकांनीं राज्यक्रांति केली व झारशाही आणि धनिक वर्ग यांना धुळीस मिळवून मार्क्सच्या शिकवणीनुसार कामगारांचें राज्य स्थापन केलें. बाकीच्या जगांतहि युद्धानंतर जिकडेतिकडे कामगार वर्गांत असंतोष माजला असून रशियांतील कामगारांच्या अपूर्व विजयामुळें व रशियांतील कामगारांच्या वाढत्या वैभवामुळें जगांत इतरत्र कामगारांचा आत्मविश्वास व जूट वाढत आहे. आणि म्हणून आतां जगांत सर्वत्र कमी अधिक प्रमाणांत समाजक्रांति होणार व मार्क्सच्या मताप्रमाणें कामगारांचें वर्चस्व होणार असा राज्यकर्त्यांना व धनिकांना धाक, आणि मार्क्सच्या अनुयायांना विश्वास वाटूं लागला आहे. कार्ल मार्क्स याचें तत्त्वज्ञान हेंच बोल्शेव्हिझमचें सार असल्यामुळें 'बोल्शेव्हिझम' म्हणजे काय, हें समजून घेण्याकरितां मार्क्सची एकंदर शिकवण व तिची उपपत्ति काय आहे हें येथें प्रथम पाहूं.

अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्यें संपत्तीच्या उत्पादनाच्या कामीं यंत्राचा उपयोग होऊं लागला. यामुळें थोड्या वेळांत, थोड्या श्रमांत, मोठ्या प्रमाणावर माल निर्माण होऊं लागला. याचा एक मोठा परिणाम असा झाला कीं,लहान लहान प्राचीन हत्यारांच्या साहाय्यानें अतिश्रमानें खेड्यापाड्यांतून माल निर्माण करणारे कारागीर हे यंत्राबरोबरच्या चढाओढींत मागें पडले. जुन्या तऱ्हेनें चाललेला धंदा परवडत नाहीं असें पाहून त्यांनीं धन्दे व खेडीं सोडलीं आणि यंत्राचे मालक जे कारखानदार त्यांच्या कारखान्यांत नोकरी मिळवून ते यंत्राच्या साहाय्यानें कारखानदाराचा माल निर्माण करूं लागले. यांत्रिक उत्पादनास मनुष्यबळ कमी लागत असल्यामुळें जितक्या कारागिरांचे धंदे बुडाले, तितक्या सगळ्यांना कांहीं काम एकदम मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां मजुरामजुरांत काम मिळविण्याविषयीं चढाओढ सुरू झाली व याचा फायदा घेऊन कारखानदारांनीं कमींत कमी मजुरी देऊन जास्तींत जास्त वेळ काम मजुरांकडून पिळून घेण्यास सुरुवात केली. यामुळें अल्पसंख्य कारखानदारांची संपत्ति समुद्रास भरती यावी त्याप्रमाणें वाढूं लागली व बहुसंख्य मजूर वर्गांत दारिद्र्य व बेकारी यांची परमावधि झाली. आणि एकाच राष्ट्रांत श्रीमंत व गरीब अशा या दोन वर्गांत एवढा तीव्र भेद उत्पन्न झाला कीं, डिझरायली यानें 'दोन राष्ट्रें' (Sybil or two nations) या कादंबरींत वर्णिल्याप्रमाणें एकाच राष्ट्रांत धनिकांचें राष्ट्र व दरिद्र्यांचें राष्ट्र अशीं दोन विरोधी राष्ट्रेंच यंत्रप्रधान देशांत उत्पन्न होऊं लागलीं.

इंग्लंडांत अठराव्या शतकाच्या शेवटीं जशी औद्योगिक क्रांति झाली तशी त्या शतकाच्या शेवटीं फ्रान्समध्यें राजकीय व सामाजिक क्रांति झाली. राजे, सरदार, जमिनदार व पुरोहित या सर्वांच्या जुलमाखालीं फ्रेंच प्रजा भरडून निघाली होती. म्हणून देशांतील ही सर्व जुलमशाही नाहींशी करून पूर्ण प्रजासत्ताक राज्य आणि पूर्ण सामाजिक समता व स्वातंत्र्य स्थापण्याच्या उद्देशानें फ्रेंच लोकांनीं राजासुद्धां सर्व वरिष्ठ वर्ग यांचा पाडाव करून प्रजासत्ताक स्थापन केलें. पुढें परचक्र व अंतःकलह यांपासून प्रजासत्ताकाचें रक्षण करण्याकरितां नेपोलियन या कॉर्सिकन तरुणास फ्रेंच लोकांनीं सेनापति केलें. कुंपणानेंच शेत खावें त्याप्रमाणें या पराक्रमी पुरुषानें प्रजासत्ताकाचें रक्षण करतां करतां अखेर तें स्वतःच बुडवून आपणांसच राज्याभिषेक करवून घेतला. नेपोलियननंतर प्रजासत्ता व राजसत्ता यांचा आलटून पालटून खेळ साठ वर्षें चालला होता. अखेर १८७० नंतर फरान्समध्यें जें प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें तें मात्र आजतागायत कायम आहे.

नेपोलियननें राज्यसत्तेचा पुनरुद्धार केला तरी सरदार, जमिनदार व पुरोहित यांची सत्ता मात्र जी एकदां गेली ती गेलीच. इंग्लंडांतील औद्योगिक क्रांति व फरान्समधील सामाजिक क्रांति यांच्या जोड परिणामानें एकंदर समाजव्यवस्थेचें जुनें स्वरूप पार बदलून गेलें. औद्योगिक क्रांतीनें लहान लहान धंदे करणारे बहुविध कारागीर कारखान्यांच्या काहिलींत वितळून एकजात मजूर बनले. तसेंच सामाजिक क्रांतीनें सरदार, जमिनदार, पुरोहित वगैरे वर्गांचें वर्चस्व मोडून काढून देशांत राजा असो वा नसो, खरी राज्यसत्ता धनिक कारखानदार अथवा भांडवलवाले यांच्या हातीं एकत्रित झाली. आणि जुन्या समाजांतील अनेक भिन्न भिन्न वर्गांची गर्दी मोडून एका बाजूस धनिक अल्पसंख्य भांडवलवाले व दुसऱ्या बाजूस दरिद्री बहुसंख्य मजूर वर्ग हे दोनच वर्ग समाजांत प्रामुख्यानें शिल्लक राहिले. कारखानदारांनीं दिलें तरच काम आणि अन्नवस्त्र, न दिलें तर बेकारी व उपासमार; अशी मजुरांची स्थिति झाल्यामुळें

कारखानदारांनीं मजुरांच्या या अडलेल्या अवस्थेचा फायदा घेऊन त्यांना गुलामाप्रमाणें राबविण्यास सुरवात केली. यामुळें वाढणारें बहुसंख्य समाजाचें दारिद्र्य व हलाखी नाहींशी करण्याकडे अनेक सज्जनांचें साहजिकच लक्ष वेधलें. अनेकांनीं अनेक मार्ग सुचविले. कांहींनीं यंत्रेंच मोडून टाकून पुन्हां पूर्वीच्या हत्यारी कारागिरीचा मार्ग सुचविला. कोणी कारखानदारांनीं मन मोठें करून नफ्याची हाव कमी धरावी आणि मजुरास औदार्यानें व प्रेमानें वागवावें अशी कल्पना मांडिली. हे थोर मनाचे प्रचारक नुसते उपदेश करूनच थांबले नाहींत. अशा सज्जनांपैकीं रॉबर्ट ओवेन (१७७१–१८५८) या उदार पुरुषानें इतरांस उदाहरण घालून देण्याकरितां आपल्या उदार तत्त्वांची बजावणी करण्यासाठीं एक वसाहतच निर्माण केली. रॉबर्ट ओवेन याचा मँचेस्टर येथें सूत काढण्याचा धंदा होता. त्यानें सूत काढण्याचे बाबतींत अनेक सुधारणा करून लवकरच आपला धंदा भरभराटीस आणला. मजुरांना कारखानदार वाईट रीतीनें वागवीत असल्यामुळें मानव जातीबद्दलच्या दयेनें ओवेनचें अंतःकरण कळवळलें. व मजुरांच्या हलाखीमुळें त्यांची कार्यक्षमताही कमी प्रतीची राहून संपत्तीची उत्पत्ति कमी होते व अखेर कारखानदारांचेंहि नुकसान होतें असें त्यास आढळून आलें. म्हणून मजुरांची स्थिति कशी असावी, मजूर व मालक यांचे संबंध कसे राहावे याचा नमुना घालून देण्याकरितां त्यानें 'न्यू लानार्क' नांवाची एक वसाहत स्वतः स्थापन केली. येथें एकंदर दोन हजार कामगार होते. इ. स. १८०० पासून १८२८ पर्यंत ही वसाहत चांगलीच भरभराटली. ओवेन यानें कामाचे तास कमी केले, व कारखान्यांत स्वच्छता व आरोग्यकारक परिस्थिति निर्माण केली. लहान मुलांना कामावर लावण्याचें बंद केलें, कामगारांना कामाचें शिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविली, मंदीच्या वेळीं बेकारी वाढे, त्यावेळीं बेकारवेतन चालू केलें; मजुरांच्या मुलांना शाळा घालून दिल्या; आणि अशा प्रकारें औद्योगिक वसाहतीचा एक सर्वोत्कृष्ट नमुना त्यानें जगापुढें मांडला. ओवेन हा जसा कर्तबगार कारखानदार आणि त्याहूनहि अधिक कर्ता समाजसुधारक होता, तसाच तो उत्कृष्ट लेखकहि होता. आपल्या प्रयोगाचे फायदे लेखनद्वारां लोकांपुढें मांडून 'सामान्यजनता अव्यवस्थित व अदूरदर्शी असल्यामुळें त्यांची आपत्ति वाढते' या आरोपाचें त्यानें त्वेषानें व साधार खंडण केलें. माणूस हा सुसंस्कार व सुशिक्षण यांनीं हवा तेवढा चांगला बनवितां येतो या मताचा त्यानें 'न्यू लानार्क'चें उदाहरण दाखवून मोठ्या अभिनिवेशानें पुरस्कार केला. ओवेनच्याच प्रयत्नानें १८१९ त इंग्लंडांत कारखान्यांवर नियंत्रण घालणारा कायदा पास झाला. 'नऊ वर्षांखालील मुलांना कामावर घेऊं नये आणि कामाचे तास दररोज बाराहून अधिक असूं नयेत' असें या कायद्यानें ठरविलें. केवळ हें नियंत्रण लक्षांत घेतलें तरी त्यावेळची मजूरांची स्थिति किती भयंकर होती हें सहज लक्षांत येतें. ओवेनच्या न्यू लानार्कचा त्यावेळीं पुष्कळच बोलबाला झाला. रशियाचा झार पहिला निकोलस व व्हिक्टोरिया राणीचा बाप ड्यूक ऑफ केंट यांनीं सदर वसाहतीस भेट देऊन समाधान व्यक्त केलें. पण गरीबांच्या श्रमावर गबर होण्यास चटावलेले इतर कारखानदार या कर्त्या सुधारकाचा द्वेष करूं लागले. ते ओवेनचा पाडाव करण्याच्या संधीची वाटच पाहात होते. ती संधि ओवेनच्या धार्मिक मतांनीं त्यास मिळवून दिली. समाजसुधारक हा सर्व देशांत प्रचलित धर्ममतांवर हल्ला चढवीत असतो, असें आढळून येतें. ओवेन यानेंहि आपल्या लेखनांत ख्रिस्ती धर्ममतांवर सडकून टीका केली. याचा फायदा घेऊन इतर भांडवलवाल्यांनीं हा धर्मभ्रष्ट नास्तिक आहे असें पिकवून त्यास व त्याच्या मतास लोकांत अप्रिय केलें. ओवेनचे सुधारणेचे प्रयत्न चालूच होते. अमेरिकेंत न्यू हार्मनी येथें आणखी एक वसाहत स्थापण्याकरितां त्यानें 'न्यू लानार्क' आपल्या भागीदारांना विकून टाकून आपलें सर्व भांडवल अमेरिकेंत घातलें. ओवेननंतर कारखानदारांनीं परोपकारी बुद्धीनें मजुरांची स्थिति सुधारावी ही परंपरा कोणींहि पुढें न चालविल्यामुळें ओवेनचा पंथ बाल्यावस्थेंतच नामशेष झाला.

'वरिष्ठ वर्गाच्या अनुदार बुद्धीनें समाजाची दुःस्थिति वाढते. वरिष्ठ वर्ग अंतःकरण उदार करील तर समाजाची आपोआप उन्नति होईल' हें ओवेनचें मत त्याच्या पंथाचें वशिष्टच होय. समाजसुधारणेस ऐतिहासिक परंपरेची जरूरी या पंथास भासली नाहीं. केवळ कल्पनेंतून उत्तम समाजव्यवस्थेचा नमुना निर्माण करण्याचा या पंथाचा प्रयत्न होता, म्हणून या पंथास युटोपिस्ट (Utopist) म्हणजे कल्पनावादी असें म्हटलें जातें. ओवेन, सेंट सायमन्, फोरीयर या व इतर प्रत्येक कल्पनावाद्याची उत्कृष्ट समाजाची कल्पना थोडथोडी वेगळी होती. तरीपण एतिहासिक पर-

परेची उपेक्षा ही सर्वांस साधारण होती. म्हणूनच त्यांना अपयश आलें. पण यंत्रयुगांत समाजाचें रूप पालटून बहुसंख्य समाजास आपत्ति प्राप्त झाली, तीकडे या कल्पनावाद्यांनीं विचारी लोकांचें लक्ष वेधलें, ही त्यांची कामगिरी फार मोठी आहे. "हीं माणसें फार भविष्यदर्शी होतीं. आम्ही पुढीलांनीं ज्यास शास्त्रीय स्वरूप दिलें अशा बहुतेक कल्पना आम्हांस कल्पनावाद्यांनींच शिकविल्या" असें एंजल्स यानें म्हटलें आहे. या दृष्टीनें पाहतां मार्क्स व एंजल्स यांनीं पुढें ज्या समाजसत्तावादाचा शास्त्रशुद्ध पद्धतीनें पुरस्कार केला त्याचे उत्पादक ओवेन इत्यादि कल्पनावादी हेच होत यांत शंका नाहीं. मार्क्स व एंजल्स यांनीं ज्याचा पुरस्कार केला तो शास्त्रशुद्ध समाजसत्तावाद Scientific Socialism or Communism हाच बोल्शव्हिझमचा पाया अथवा गाभा आहे. बोल्शेव्हिक पुढारी व तत्त्ववेत्ता लेनिन यानें मार्क्स नंतर घडलेली भांडवलशाहीची वाढ व प्रत्यक्ष राज्यक्रांतीच्या वेळचीं धोरणें या दृष्टीनें मार्क्सच्या तत्त्वांत भर घातली असली तरी बोल्शेव्हिझम् (अथवा 'लेनिनिझम्') हा विशिष्ट स्वरूपाचा 'मार्क्सिझम्' च आहे असें बोल्शेव्हिक पुढारी प्रतिपादित असतात. उदा. स्टॅलिन म्हणतो:—"लेनिनिझम् म्हणजे साम्राज्यशाही व मजुरांनीं केलेली राज्यक्रांति या काळास लागू पडणारा मार्क्सिझम्च होय. अथवा अधिक नेमकें बोलावयाचें म्हणजे लेनिनिझम् हें सामान्यत: मजुरांच्या राज्यक्रांतीचें तत्त्वज्ञान व धोरण होय; विशेषत: मजुरांच्या मुखत्यारीचें (Dectatorship of the prolatariat) तत्त्वज्ञान आणि धोरण होय."

मार्क्सची एकंदरविचार सरणी बर्ट्रंड रसेल यांच्या मतें तीन तत्त्वांत अंतर्भूत झाली आहे. (१) इतिहासाची भौतिक दृष्टीनें मांडणी (Materialistic interpretation of history;) (२) भांडवलाच्या केन्द्रीकरणाचा सिद्धांत (Law of the Concentration of capital) (३) वर्गयुद्ध (Class-war) हीं तीं तीन तत्त्वें होत.

इतिहासाची भौतिक मांडणी:—

मनुष्यसमाजाचें अमुक एकावेळीं जें कोणतेही स्वरूप असेल तें त्या समाजाच्या भौतिक म्हणजे मुख्यत: आर्थिक परिस्थितीनें घडविलेलें असतें. आर्थिक हिताहिताचा विचार करून मनुष्य समाजव्यवस्था निर्मीत आला आहे असें नव्हे; पण विशेष प्रकारच्या आर्थिक परिस्थितीनें माणसाच्या न कळत त्याचा स्वभाव व मतें बनविलेलीं असतात. आणि मग राज्यघटना, कायदे, धर्मविचार व तत्त्वज्ञान या सर्वांत या स्वभावाचें व मतांचें प्रतिबिंब पडतें. चिकण माती निरनिराळ्या साच्यांत घातली कीं, तिचे निरनिराळे आकार बनतात त्या प्रमाणें एक आर्थिक परिस्थिति बदलली व नवी आली कीं, समाजाची जुनी घडी मोडून नवी घडी निर्माण होते. लहान लहान हत्यारांनीं सृष्टीशीं बहुसंख्य समाजानें अहर्निश झगडूनहि फार थोडी संपत्ति निर्माण होई त्याकाळीं भांडवलवालावर्ग निर्माण होणें शक्यच नव्हतें. बहुसंख्य समाजास ज्ञानवर्धनाचीं साधनें व फुरसत नव्हती. त्यांच्या मूर्खपणाचा फायदा घेऊन धर्मपुरोहित हे त्यास परमेश्वरी शिक्षेचा धाक घालून वरिष्ठ वर्गाकरितां त्यांनीं रावलें पाहिजे असें प्रतिपादीत. मूळ ख्रिस्तीधर्म कसाही असो, पुरोहितांची शिकवण समाजांतील बहुसंख्यास हीन स्थितींतहि समाधानी ठेवण्यास कारण झाली आहे. बहुसंख्यांच्या श्रमावर सुखोपभोग घेणारे सरदार, राजे व पुरोहित यांनाच राज्याधिकार असून कायदा हा फक्त त्यांचेंच रक्षण करी. ज्याचीं त्याचीं दुष्कृत्येंच ज्याच्या त्याच्या हीन स्थितीस कारण होत आणि सर्व प्रकारच्या ऐहिक आपत्ती अखेर न्यायनिर्णयाच्या दिवशीं (Judgment day) थडग्यांतून सर्व आत्म्यांना आवाहन होईल आणि सार्वत्रिक क्षमा होईल त्यावेळीं नाहींशा होणाऱ्या आहेत. या तत्त्वज्ञानानें, लहान मुलांस अफू चारून थोपटून निजवावें त्याप्रमाणें बहुसंख्य समाजास हालअपेष्टांतहि एकप्रकारें समाधानांत ठेवलें जाई. आर्थिक उत्पादनाचा प्रकार पालटला तशी ही समाजव्यवस्थाहि पालटली. आर्थिक उत्पादनाचे कामीं लहान लहान हत्यारें मागें पडून यंत्रांचा उपयोग होऊं लागला तसतसें यंत्र फार किंमतीचें असल्यानें गरीबांस तें मालकीचें बापरणें अशक्य म्हणून भांडवलवाला वर्ग पुढें आला. यंत्रावर काम करणाऱ्या मजुरांचीं शहरें वाढलीं, व्यापारानें दळणवळण वाढलें; यांत्रिक उत्पादनास मजुरांची बौद्धिक उन्नति अवश्य झाली, छापखान्यानें ज्ञानप्रसाराचीं साधनें वाढलीं. थंडी, वारा, पाऊस, अवर्षण, उन्हाळा, भूकंप या सृष्टिक्रमाच्या चक्रांत अहर्निश सांपडून मनानें सृष्टीचा गुलाम बनलेला व अदृष्टावर भरंवसा ठवणारा मनुष्य यांत्रिक युगांत सृष्टीवर यांत्रिक साधनांनीं प्रभुत्व

गाजवूं लागला. यामुळें तो भौतिकवादी, बुद्धिवादी स्वातंत्र्यवादी बनूं लागला. आणि राजे, सरदार व पुरोहित यांच्या प्रभुत्वाची जुनी समाजव्यवस्था उधळली गेली, व भांडवलशाहीचा उदय झाला. या भांडवलशाहींतून पुढें जी आणखी एक मोठी क्रांति व्हावयाची आहे तिचा खुलासा याच क्रमानें मार्क्स करतो. राजे, सरदार व पुरोहित यांची जागा आतां भांडवलवाल्यांनीं पटकावली. बहुसंख्य समाजास काम मिळविण्यासाठीं यंत्रवाल्यांच्या लगामीं लागावें लागल्यामुळें भांडवलवाला हा समाजांत प्रमुख झाला. राज्यसंस्थांत लोकशाहीची वाढ झाली तरी भांडवलवाल्यांच्या लगामीं असलेले मजूर त्यांच्या बाजूनें मतें देऊं लागले. अर्थात् कायदे भांडवल वाल्यास अनुकूल असे होऊं लागले लोकमत बनविण्याचीं साधनें भांडवलवाल्यांच्या हातीं गेलीं व मतस्वातंत्र्याची या मार्गानें गळचेपीच झाली. पण मार्क्सच्या मतें आर्थिक उत्पादनाच्या यांत्रिक युगांत भांडवलवाल्यांचें हें प्रभुत्व कायम राहणारें नाहीं.ज्या कारणांनीं भांडवलशाहीच्या प्राथमिक अवस्थेंत राजे, सरदार व पुरोहित उलथून पडले तींच कारणें यापुढें अधिक बलिष्ठ होऊन भांडवलवाल्यांना उलथून पाडतील व अखेर कामगारशाही स्थापन होईल. तो क्रम असा:—"खाजगी व्यक्तींच्या हातीं भांडवल एकवटणें हें भांडवलवाल्यांच्या प्रभुत्वास अवश्य आहे. भांडवल वाढण्यास नक्त मजुरीवर काम करणारे मजूर हवे असतात. मजुरांत चढाओढ असली म्हणजे मजुरी कमी कमी होऊन भांडवल वाढत जातें. भांडवलवाले एकदां 'यंत्रारूढ' झाले म्हणजे त्यांची इच्छा असो वा नसो त्यांना यांत्रिक उत्पादनाची अफाट वाढ करावीच लागते. औद्योगिक उत्कर्ष होऊं लागला कीं, यंत्रवाल्यांच्या तावडींत सांपडलेल्या मजुरांची आपसांतील चढाओढीनें हलाखी वाढतच जाते. फुटीनें व आपसांतील चढाओढीनें आपली हलाखी वाढली; पण औद्योगिक उत्कर्ष आपल्याच हातांनीं घडविला आहे हें मजुरांस हळूं हळूं कळून येऊं लागून त्यांच्यांत ऐक्य व क्रांतिकारक मतांचा फैलाव होऊं लागतो. आणि अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर संपत्ति निर्माण करूं लागल्यानें मजुरांतील चढाओढीच्या ज्या आधारावर भांडवलवाल्यांस मजुरांच्या श्रमाचें फळ खिशांत टाकतां येतें, तो त्यांचा आधारच निसटून जाऊं लागतो. अशा प्रकारें भांडवलवाला संपत्ति वाढवूं लागला कीं, त्यायोगें आपल्याच हातांनीं आपलें थडगें बांधीत असतो. म्हणून औद्योगिक उत्कर्ष फार झाला कीं, भांडवलवाल्यांचा पाडाव व मजुरांचा विजय या दोनहि गोष्टी अपरिहार्य आहेत." (Communist manifesto च्या आधारें).आर्थिक उत्पादनाचा प्रकार बदलला, त्यामुळेंच समाजव्यवस्था पूर्वी बदलली व पुढेंहि बदलणार असा मार्क्सचा अखेर निष्कर्ष आहे.

भांडवलवाल्यांचा पाडाव झाला म्हणजे अखेर त्यांत सर्व मानव जातीचें कल्याण आहे असें मार्क्स सांगतोच. पण त्याच्या प्रतिपादनाचा मुख्य रोख कामगारांचा विजय अखेर होणारच होणार असा ऐतिहासिक सिद्धांत अथवा नियति सांगण्याकडे आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सर्व इतिहासाकडेच मार्क्स अशा नियतीच्या दृष्टीनें पाहतो. आर्थिक उत्पादनाची परिस्थिति ही मानवी जीवनाचा एकपरी साचा आहे. या साच्याप्रमाणें मानवी समाज घडविला जात असतो. आर्थिक उत्पादनाच्या परिस्थितींतील पालटाच्या अनुरोधानें मानवी समाजांतील पालट होत असतो. याच क्रमांत गुलामगिरी नष्ट झाली. पुढें सरदार, पुरोहित, राजे, भूदास या सर्वांनीं घटित अशी समाजव्यवस्था मोडून भांडवलशाही स्थापन झाली. भांडवलशाही ही संक्रमण कालांतील समाजव्यवस्था—अथवा अव्यवस्था—आहे. हीही अखेर मोडून मजूरशाही स्थापन होणार.हेंसर्व इष्टच होतें व आहे. पण इष्टानिष्ट कांहीं असो, हें कोणासच टाळतां यणार नाहीं असा मार्क्सचा आशय आहे. या विचारसरणीमुळें ओवेनप्रमाणें भांडवलवाले दुष्ट आहेत, ते मजुरांना क्रूरपणें वागवितात, त्यांनीं उदार व्हावें म्हणजे समाज सुखी व संपन्न होईल असें मार्क्स म्हणत नाहीं. ओवेन इत्यादि कल्पनावादी व्यक्तींच्या भलेबाईटपणावर सामाजिक भवितव्य रचितात. व्यक्ति चांगली वागेल तर समाजाचें कल्याण होईल हें चित्र कल्पनेंत रम्य आहे पण मार्क्सच्या मतें ऐतिहासिक घटनाशास्त्रास धरून नाहीं. म्हणून ओवेन इत्यादींना मार्क्स व त्याचे अनुयायी यांनीं कल्पनावादी (Utopist) असें नांव दिलें आहे आणि या जुन्या कल्पनावादी सोशालिस्टांपासून आपलें वैशिष्टच व श्रेष्ठत्व दाखविण्याकरितां मार्क्स हा आपल्या पंथास शास्त्रशुद्ध म्हणजे सायंटिफिक सोशॅलिझम म्हणतो. या मताप्रमाणें भांडवलवाले एकंदरींत दुष्ट असले तरी दुष्ट होणें हा त्यांचा कांहीं गुन्हा नव्हे. मार्क्स असें दर्शवितो कीं, जोंपर्यंत भांडवल व

जमीन हीं कांहीं थोडया भांडवलवाल्यांच्या हातीं आहेत व अर्थात् एकंदर बहुसंख्यांना रोजगार देणें न देणें हें भांडवलवाल्यांच्या हातींच राहणार, तोंपर्यंत भांडवलवाल्यांनीं क्रूरपणानें व स्वार्थ बुद्धीनें वागणें हें अपरिहार्यच आहे. तो समाजव्यवस्थेचाच दोष आहे. भांडवलवाल्यांचा हा जुलूम कायमच चालत राहील असें नाहीं. त्या जुलुमामुळेंच त्यास प्रतिपक्षी उत्पन्न होत आहेत. मजूर जुलुमास त्रासले म्हणजे एक होऊन त्याचा शेवट करतीलच करतील.

या नियतिक्रमाशीं जुळणारीं अशींच मार्क्सचीं पुढील दोन तत्त्वेंहि आहेत.

भांडवलाचें केंद्रीकरण:—लहानलहान हत्यारांहून यंत्र हें फारच अधिक खर्चाचें, यामुळें थोडया श्रीमंत लोकांनाच तें घेणें शक्य होतें तसेंच यंत्रोत्पन्न संपत्ति ही परिमाणानें फार अधिक व किंमतीनें फार स्वस्त; यामुळें लहान धंदेवाल्याचे धंदे यंत्राशीं चढाओढींत बुडून जाऊन तो भांडवलवाल्यांवर रोजगाराकरितां अवलंबून राहतो. यंत्रास मजूर कमी लागत असल्यामुळें मजुरांत कामगारी मिळविण्याची चढाओढ लागून मजुरी कमी कमी होत जाते व भांडवलवाल्यांचा नफा अर्थातच वाढत जातो. हा वाढता नफा पुनः पुनः भांडवलांत पडत जाऊन पुनः पुनः मोठे मोठे नवीन धंदे निर्माण होत राहतात.यांत अधिकाधिक मजुरांची गरज लागत असली तरी एका बाजूनें मजुरांचे वंशहि वाढत असतात, आणि मजुरांची गरज कमी व्हावी या दृष्टीनें रोजरोज नव्या नव्या यंत्रांचा शोध लावण्यांत येत असून मजुरांच्या गरजेपेक्षां त्यांची संख्या नहमींच अधिक राहिल्यामुळें मजुरांच्या जीवनास जरूर इतकीच मजुरी राहण्याकडे मजुरीचा कल असतो आणि भांडवल मात्र नदीस नदी मिळविल्याप्रमाणें थोडया भांडवलवाल्यांच्या हातीं अधिकाधिक सांचत जातें. पुढें भांडवलवाल्यांत चढाओढ होऊन जें नुकसान होतें तें टाळण्याकरितां त्यांच्यांत जूट होते. ('ट्रस्ट' निर्माण होतील अथवा मोठे भांडवलवाले प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करुन त्यांचे धंदे आपल्यांत सामील करतील, व यांत लहान भांडवलवाले मागें पडून मोठ्या भांडवलवाल्यांच्या हातीं सर्व भांडवल एकवटेल हें मार्क्सनंतर घडलेलें भविष्यहि मार्क्सला दिसलें होतें असें बर्ट्रँड रसेल म्हणतात. शेतींत यंत्रांचा उपयोग होऊं लागल्यावर कारखानदार देशाप्रमाणें शेतीप्रधान देशांतहि सर्व शेती थोडया भांडवलवाल्यांच्या हातीं येईल व बहुसंख्य शेतकरी मजूर होतील हेंही मार्क्सनें त्यावेळींच ताडलें होतें.) यामुळें भांडवलवाले भांडवलानें अधिकाधिक गबर होऊन समाजांतील सर्व संपत्ति थोडया जागेंत एकवटेल, असें मार्क्सचें मत आहे.

वर्गयुद्ध:—वर्गयुद्ध हें मार्क्सचें तिसरें तत्त्व होय. ओवेन इत्यादि परोपकारी लोक कारखानदार व मजूर यांचे हितसंबंध एक आहेत हें ओळखून कारखानदारांनीं उदार मन करावें असें प्रतिपादीत. मार्क्स म्हणे हें ऐतिहासिक घटनेसच विसंगत आहे. तो म्हणतो " मानव जातीचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास हा सारा या वर्गकलहाचा इतिहासच आहे. स्वतंत्र नागरिक विरुद्ध गुलाम, रोमन सरदार (Patrician) रुद्ध रोमन सामान्य लोक (Plebeian), जहागिरदार (baron) विरुद्ध भूदास (serf). थोडक्यांत सांगायचें म्हणजे जुलमी आणि जुलुमग्रस्त यांमधील तीव्र विरोध सनातन आहे. कधीं उघड तर कधीं प्रच्छन्नपणें यांचें युद्ध कायमचें चाललेलें आहे. इतिहासांत प्रथम प्रथम वर्ग पुष्कळ असत. पण हल्लींच्या म्हणजे भांडवलशाहीच्या काळीं दिवसानुदिवस इतर वर्ग वितळून जाऊन सर्व समाजाचे दोनच वर्ग–भांडवलवाला व मजूर–असे बनत चालले आहेत.–(Communist manifesto)

यामुळें मजुरांनीं भांडवलवाल्यांचा पाडाव केल्यावर वर्गभेद कायमचे नाहींसे होऊन अखिल मानव जातीच्या खऱ्या उत्कर्षाच्या इतिहासास सुरवात होईल असें मार्क्सनें सांगितलें आहे.

मार्क्सच्या या तत्त्वज्ञानापासून जे एक दोन उपसिद्धांत त्यानेंच काढले आहेत तेहि हें तत्त्वज्ञान समजण्यास उपयुक्त आहेत. ज्या देशांत प्रचंड कारखाने उत्पन्न होतील तेथें मजूर हे भांडवलवाल्यांच्या कैचींत सांपडून उद्योगधंद्यांची भरभराट होत राहिली तरी मजुरांची हलाखी वाढतच जाणार. कारण कारखानदार व मजूर यांत अंगभूत हितविरोध असल्यानें एकाचें कल्याण वाढत जाईल तसें दुसऱ्याचें अकल्याण दुणावेल असें मार्क्सचें मत होतें. अर्थातच ज्या देशांत औद्योगिक उत्कर्ष होत जाईल तेथेंच मजुरांची हलाखी वाढत जाऊन मजुरांत ऐक्य होईल आणि मजूरलोक कारखानदारांविरुद्ध युद्ध पुकारून भांडवलवाल्यांचा पाडाव करतील असें त्यानें अनुमान काढलें, व तदनुसार इंग्लंड देश औद्यो-

गिक वभवांत मार्क्सच्या वेळीं अग्रेसर असल्यानें प्रथम इंग्लंडांत ही क्रांति होईल असा मार्क्सनें अंदाज बांधला होता.

यांत्रिक उत्पादन जेथें जेथें सुरूं होईल तेथें तेथें भांडवलवाला व मजूर असा वर्गभेद माजत जाऊन कामगारांची हलाखी वाढत जाणार,हा सर्वदेशीय सिद्धांत असल्यामुळें, मार्क्स म्हणतो, मजुरास स्वदेश असा नाहींच. राज्यसत्ता काबीज करण्याकरितां त्यांना अखेर स्वदेशीय भांडवलवाल्यांशीं झगडलें पाहिजे, या दृष्टीनें मजूर चळवळीस एकदेशीय स्वरूप येतें खरें; पणत्याचा अर्थ एका देशांतील मजुरांचे परदेशीय मजूर शत्रु असतात असें नव्हे. यंत्रयुगांत मजुरांचीं दुःखें सर्वत्र एकसारखींच असून सर्व देशांतील भांडवलवाले हे सर्व मजुरांचे सारखेच शत्रु आहेत. म्हणून "जगांतील मजुरांनों, एक व्हा" अशी मार्क्सनें सर्व मजुरांस हांक दिली आहे.

मजुरांनीं भांडवलवाल्यांचा पाडाव केल्यावर मजुरांनीं भांडवलवाल्यांची मालमत्ता हिसकावून घेऊन त्यांना मजूर बनवावयाचें असें मार्क्सनें प्रतिपादिलें आहे. मालकी हक्काचा हा जो उच्छेद करावयाचा त्याचा एक सूक्ष्म भेद मार्क्सनें काढला आहे. स्वतःचें शरीर, मन झिजवून व्यक्तिस्वातंत्र्य मिळविण्याइतकी मिळकत ज्यानें मिळविली असेल त्याची तीहि घ्यावयाची असें नाहीं. मार्क्स म्हणतो कीं, भांडवलशाहींत असा लहान मिळकतवाला स्वतंत्र वर्ग शिल्लकच राहात नाहीं. कारण भांडवलवाल्यांशीं चढाओढींत लहान जमीनदार, लहान कारखानदार यांच्या इस्टेटी प्रचंड भांडवलवाल्यांच्या घशांत उतरून हे लहान लहान मालक (Petty bourgeois) अखेर मजूरच बनतात. भांडवलशाहींत नऊदशांश लोकांस खाजगी मालकी हक्क राहातच नाहीं. अर्थात् ज्या मालकी हक्काचा उच्छेद करावयाचा ती फक्त एक दशांश लोकसंख्येची असते, व ही बाकीच्या नऊ–दशांशापासून हिरावून घेतलेली असल्यामुळें ती नऊ दशांशांनीं सक्तीनें परत घेणें यांत, मार्क्सच्या मतें, अन्याय तो काय?

मजुरांनीं राज्यसत्ता काबीज केल्यावर जुन्या भांडवलवाल्यांनीं पुनः आपला पराभव करूं नये म्हणून त्यांचे राजकीय मतदानाचे हक्कहि लुबाडून घ्यावयाचे आणि राज्ययंत्रच सर्वस्वीं मजूरतंत्र ठेवावयाचें असें मार्क्सचें सांगणें आहे. मजुरांनीं अशा प्रकारें मुखत्यारी पत्करल्यावर जुने संस्कार नष्ट होऊन वर्गभेदशून्य समाज स्थापन होईल असा शिक्षणक्रम या मजूर राज्यानें अंमलांत आणावयाचा आहे. राज्य ही जुलूम करणारीच संस्था आहे असें मार्क्सचें मत असल्यामुळें पूर्वीं भांडवली राज्यांत मजुरांवर जुलूम झाला तसा आतां मजूर राज्यांत भांडवलवाल्या वर्गावर होईल हें मार्क्स कबूल करतो. पण मजूर राज्याच्या सामर्थ्यानें भांडवलशाही व शिकवणीनें वर्गभेदमूलक मनोवृत्ति नाहींशी होऊन समाजांत सर्वत्र वर्गभेद नाहींसे झाले, लोकमत वर्गभेदास पूर्ण प्रतिकूल झालें म्हणजे जुलूम करणारी राज्यसंस्था आपोआप नाहींशी (Wither away) होईल व व्यक्तिमात्रास स्वातंत्र्य प्राप्त होऊन समाज हा एक प्रचंड परस्पर सहकारी संस्था होईल, अशी मार्क्सची विचारसरणी आहे. अनार्किझम अथवा अराजक याचा अर्थ बेबंदशाही, रक्तपात, असा सामान्यतः समजतात. पण मार्क्सपंथीय वाङ्मयांत अराजक म्हणजे राज्यहीन समाजसुव्यवस्था असा अर्थ समजावयाचा. मार्क्सच्या काळीं बकुनिन या रशियन क्रांतिकारकाचाहि अराजक पंथ अस्तित्वांत होता; पण मार्क्स व बकुनिन यांच्या पंथांत साधनांचा असलेला फरक फारच महत्त्वाचा आहे. मजुरांनीं एकजूट होऊन भांडवलवाल्यांचें राज्य जिंकावें, तेथें आपलें राज्य स्थापावें आणि सत्ताबलानें व शिक्षणानें समाजांतून व लोकांच्या मनोवृत्तींतून भांडवलशाहीचा बीमोड करून वर्गभेद अत्यंत निर्मूल करावा म्हणजेच अराजक स्थापन होईल. हा मार्क्सच्या साधनांचा तपशील बकुनिन यास पसंत नव्हता. भांडवलशाहींतील आर्थिक विरोधामुळें भांडवलशाल्यांच्या हातीं सत्ता व संपत्ति एकवटते आणि यामुळें बहुसंख्य समाजाची आपत्ति वाढते ही राजकीय जुलमाची आर्थिक उपपत्ति बकुनिन यास पटत नव्हती. जथें राज्य तेथें जुलूम, राज्य मेलें कीं जुलूम मेला, आर्थिक घटनेचा यांत कांहीं संबंध नाहीं, असें त्याचें मत होतें. म्हणून राजकीय सत्ताधिकाऱ्यांविरुद्ध गुप्त कट व बंड करून प्रचलित राज्य मोडलें कीं जुलमहीन अराजकता आपोआप उत्पन्न होते असें त्यानें प्रतिपादिलें. वर्गभेद आहेत तोंवर बलिष्ठ वर्गाचे हातीं राज्य राहणारच; वर्गभेद नाहींसे करून अराजक स्थापण्याकरितां संधिकालांत जें मजुरांचें राज्य स्थापावें असें मार्क्स म्हणतो तेंहि बकुनिनला नको होतें. उलट विचारक्रांति करून मजुरांचें बंड उभारल्याशिवाय व मजुरांनीं राज्य जिंकून तें चालविल्या-

शिवाय केवळ गुप्त कटांनीं व खुनांनीं राज्यसंस्था नष्ट होईल हें मार्क्सनें कधींच मान्य केलें नाहीं. म्हणून मार्क्स व बकुनिन या दोन्हीही अराजकवाद्यांत आजन्म तीव्र विरोधच राहिला. ध्येय एकच असलें तरी साधनभेदानें दोन पंथांत केवढा तीव्र विरोध राहूं शकतो याचें हें फार ठळक असें उदाहरण आहे. बकुनिन याचें अराजक ध्येय पुढें क्रोपॉट्किन्, टॉलस्टॉय, वर्कमन् या लेखकांनीं प्रतिपादिलें आहे. पण त्यांना अत्याचार पसंत नसून या प्रत्येकांतहि थोडथोडा मतभेद आहे.

युरोपीय महायुद्धानंतर ज्या तत्त्वज्ञानानें रशियांतील जुनी राज्यसंस्था व समाजव्यवस्था उलथून पाडून अगदीं नवा प्रपंच मांडला व आतां सर्व जगालाहि जें भेडसावीत आहे त्या बोल्शेव्हिझमचें वरील मार्क्सपंथीय तत्त्वज्ञान हें सारभूत आहे. भांडवलशाहीचा उदय होऊन जुनी समाजव्यवस्था मोडली त्याच क्रमानें भांडवलशाहीचा अतिरेक झाला कीं भांडवलशाही मोडून मजूरशाही येणार; तोंपर्यंत कलह व क्रांति थांबणार नाहीं हें मार्क्सचें अनुमान आरंभापासूनच खरें होऊं लागलें होतें. १७८९त फरान्सांत राज्यक्रांति झाल्यापासून युरोपियन समाजास आजवर एक दिवसहि स्वस्थता मिळालेली नाहीं. त्यापूर्वीं अस्वस्थता असली तरी तीं राजा–राजांतील भांडणें असत. पण आतां सरकार व प्रजा यांचे कलह सुरू झाले व सरकारें भांडवलवाल्यांनीं जिंकल्यावर भांडवलवाला विरुद्ध मजूर असें या लढ्यास स्वरूप आलें आहे. १७८९नंतर खुद्द फ्रान्सांत एका शतकांत तीन क्रांत्या झाल्या. १८४८ त तर युरोपांतील बहुतेक प्रमुख देशांत लोकक्षोभ इतका तीव्रपणें प्रकट झाला कीं, १८४८ हें क्रांतिसंवत्सर म्हणून इतिहासांत प्रसिद्धी पावलें आहे. १७८९नंतर थोड्याच काळांत 'कल्पनावाद्यांनीं' भांडवलशाहीचे दोष दाखवून वाभाडे काढण्यास सुरुवात केली. त्याचा इतका भयंकर परिणाम झाला कीं, १८४० नंतर 'युरोपास कम्युमिझमच्या भुतानें पछाडलें' असें मार्क्स म्हणतो. आणि १८४८च्या असंतोषांत सर्वत्र याच भुताची छाया पडली होती असें इतिहासज्ञांचें मत आहे.

कल्पनावाद्यांच्या विचारसरणींतील दोष घालवून टाकून मार्क्स व एंजल्स यांनीं समाजसत्तावादास शास्त्रीय स्वरूप दिलें. त्यांनीं १८४७–४८ सालीं जो 'कम्युनिस्टांचा जाहिरनामा' लिहून प्रसिद्ध केला तो कम्युनिझमचें शास्त्र व कार्यक्रम यांचा प्रतिपादक या दृष्टीनें इतिहासांत अजरामर झाला आहे. पुढें भांडवलशाहीची जसजशी वाढ होऊं लागली तसतशी मार्क्सच्या विचारसरणींतील सशास्त्रता लोकांस पटत जाऊन त्याच्या पंथाचें बळ वाढूं लागलें. कम्युनिस्ट जाहिरनाम्यांतील मतेंच अधिक आधार देऊन व विवरण करून मार्क्सनें 'कॅपिटल' (भांडवल) या त्रिखंडात्मक ग्रंथांत अत्यंत विद्वत्तापूर्ण रीतीनें मांडिलीं आहेत .यांतील पहिला खंड विशेष महत्त्वाचा असून तो एकटाच एक हजार पृष्ठें भरतो. गेल्या पाऊणशें वर्षांत कोणत्याहि एका ग्रंथानें इतिहासावर एवढी छाप ठेवलेली नाहीं. मार्क्स तत्त्ववेत्ता होता, तसा तो चळवळ्याही होता. १८६४सालीं कम्युनिझमच्या प्रसारार्थ फरेंच व इंग्लिश मजुरांच्या प्रयत्नानें लंडनमध्यें आंतरराष्ट्रीय मजूर संघ (International Working men's Association) स्थापन झाला, तेव्हां त्याच्या साह्यानें मतप्रचारास पद्धतशीर स्वरूप देण्याचा मार्क्सनें प्रयत्न केला. या संघाच्या युरोपांत निरनिराळ्या शहरीं चारपांच परिषदा भरून मतप्रसार पुष्कळ झाला. या संघांत बकुनिनहि होता, पण बकुनिन व मार्क्स यांच्यांत पुढें कलह होऊन १८७२त अखेर हा संघहि मोडला.हा संघ 'फर्स्ट इंटर नॅशनल' या नांवानें प्रसिद्ध आहे. १८८३ सालीं मार्क्सहि मृत्यु पावला. यामुळें त्याच्या पंथास पुढें थोडी उतरती कळा लागली.

या उतारास मुख्य कारण असें आहे कीं, जिकडे तिकडे भांडवलशाहीस यश येऊन मजुरांची स्थितिहि भांडवलवाल्यांच्या वाढत्या वैभवाबरोबर सुधारत चालल्यामुळें मजुरांत वर्गकलहाची तेढ कमी कमी होत गेली. भांडवलवाल्यांचें वैभव वाढत गेलें तसतसें भांडवलवाल्या राष्ट्रांनीं मागासलेले प्रदेश आपल्या राजकीय अथवा आर्थिक वर्चस्वाखालीं आणले. या प्रदेशांत संपत्ति व व्यापार आणि उद्योग वाढविण्यास इतकें विपुल क्षेत्र मिळालें कीं, औद्योगिक राष्ट्रांत भांडवलवाल्यांनीं व मजुरांनीं न भांडतां सहकार्य केलें तर मागासलेल्या राष्ट्रांची लूट अधिक किफायतकर होईल ही गोष्ट मजूर व भांडवलवाल्यांनाहि पटत चालली. इग्लंडांत जमीनदार वर्गाला नवीन उदय पावणाऱ्या भांडवलवाल्या वर्गाचा मत्सर वाटून त्यांनीं भांडवलवाल्यांस मागें खेंचण्याकरितां मजुरांची बाजू घेतली. मजुरांत जूट होऊन औद्योगिक संपांची

भीति व उद्योगधंद्यांत अडथळा उत्पन्न झाल्यामुळें मजुरांची स्थिति सुधारणें सर्व पुढारलेल्या देशांतील राज्यकर्त्यांनीं आपल्या शिरावर घेतलें, यामुळें मार्क्सला वाटली तशी तीव्र तेढ मजूर व भांडवलवाल्यांत पुढील काळीं उत्पन्न झाली नाहीं.

मार्क्स १८८३त मेल्यावर पुढील वर्षी पुनः 'दुसरा आंतरराष्ट्रीय मजूरसंघ' स्थापण्यांत आला खरा. पण त्याचे संस्थापक व पुढारी हे मार्क्सप्रमाणें क्रांतिकारक मताचे नसून विकासवादी होते. यामुळें क्रांतिकारक मताची आणखी पीछेहाट झाली. निरनिराळ्या राष्ट्रांराष्ट्रांतून जीं युद्धें होतात, त्यांत मजुरांनीं स्वदेशीय भांडवलवाल्यांच्या बाजूनें लढूं नये. कारण मजुरांस जगांतील सर्व भांडवलवाले सारखेच शत्रु आहेत हें मार्क्सचें एक महत्त्वाचें मत होतें. या मतानुसार 'द्वितीय आंतरराष्ट्रीय मजूर संघा'नें बेसल येथें परिषद भरल्यावेळीं ठरावहि केला होता. पण १९१४ सालीं महायुद्ध सुरूं होतांच हा ठराव मजूर पुढाऱ्यांनीं झुगारून देऊन सर्व देशांतील मजूर व मजुरांचे पुढारी आपापल्या सरकारची बाजू घेऊन परकीय मजूर बांधवांचें रक्त सांडूं लागले. अशा प्रकारें मार्क्सचा पंथ लोपणार असें उघड दिसूं लागलें होतें. पण कालाच्या उदरांत वेगळीच विधिघटना जन्म घेत होती.

काळजीनें मशागत करून ज्या भूमींत बीज पेरलें तेथें तें होरपळून जावें आणि जें बीज वाऱ्यानें उडून येऊन खडकावर पडलें तेथें तें जोमानें मूळ धरून अंकुरावें अशी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची स्थिति मार्क्सनंतर झाली. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या उद्योगप्रधान राष्ट्रांत सोशॅलिझम प्रथम येईल असें त्याचें मूळचें मत. त्यानें औद्योगिक (मुख्यतः इंग्लंड) राष्ट्रांत भांडवलशाहीमुळें कोणती परिस्थिति निर्माण होत आहे व तेथें तिचा परिपाक कसा होईल हें 'भांडवल' ग्रंथांत प्रतिपादिलें. तथापि वर सांगितल्याप्रमाणें उद्योगप्रधान राष्ट्रांत याच्या तत्त्वज्ञानाचें बीज रुजलें नाहीं. उलट रशियासारख्या मागासलेल्या राष्ट्रांत त्याच्या तत्त्वज्ञानाचें बीज रुजलें जाऊन आज त्याचा एवढा प्रचंड वृक्ष बनला आहे कीं, तेथील अठरा कोटी लोकसंख्या या वृक्षाच्या विशाल छायेंत आपला संसार थाटीत असून, आपत्तींत होरपळणाऱ्या कोटचवधि परदेशीयांना तसल्या छायेचा लोभ सुटला आहे.

मार्क्स ज्या सालीं मृत्यु पावला त्या १८८३ सालींच रशियांत त्याच्या अनुयायांनीं 'सोशल डेमोक्रॅटिक पक्ष' स्थापन केला. यावेळीं अजून रशियांत यांत्रिक-औद्योगिक-क्रांति झालेली नव्हती.यामुळें या नव्या पंथास फारसे अनुयायी मिळाले नाहींत. पण जीं कांहीं थोडीं तरुण माणसें या पंथास येऊन मिळत होतीं त्यांच्यांत विचारविनिमय होऊं लागून नवविचारास हळूहळूं मूर्त स्वरूप येऊं लागलें. यापुढें जर्मन, फ्रेंच व ब्रिटिश भांडवल झपाटचानें येऊं लागून उद्योगधंद्यांची वाढ होऊं लागली. आणि त्याबरोबरच मजूर वर्गाचीही मास्को व सेंटपीटर्सबर्ग येथें वाढ होऊन समाजसत्तावादाचा प्रसार करण्यासाठीं मार्क्सपंथीयास योग्य भूमिका मिळत गेली. पण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचें कार्य वाढत चाललें तसतसें त्यांच्यांत पक्षभेदहि माजूं लागले.मजुरांनीं कामाचे तास कमी करवून घेऊन मजूरी वाढवून घ्यावी व फक्त आपली उन्नति करावी, झारशाहीचा पाडाव करून राजकीय सत्ता काबीज करण्याच्या खटाटोपांत सध्यांच त्यांनीं पडूं नये असें एका पक्षाचें मत होतें. याविरुद्ध असलेला पक्ष मजुरांची आर्थिक स्थिति सुधारली पाहिजे हें कबूल करीत असला तरी राजकीय सत्ता काबीज करण्यावर आपले सर्व प्रयत्न नेहमींच एकवटीत राहिलें पाहिजे असें त्याचें मत होतें. या जहाल मताचा पुढारी हाच सुप्रसिद्ध निकोलाय लेनिन होय. १९०२ मध्यें सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची ब्रुसेल्स येथें कॉन्फरन्स भरली, पण पोलिसांनीं ती हुसकून लावल्यामुळें कॉन्फरन्स लंडनमध्यें पुढें चालूं झाली. हींत अखेर लेनिनच्या जहाल पक्षास बहुमत मिळालें. म्हणून या पक्षास 'बहुमतवाला' अथवा 'बोल्शेव्हिक' पक्ष हें नांव मिळालें. व विरुद्ध पक्षास 'अल्पमतवाला 'म्हणजे 'मेन्शेव्हिक' हें नांव मिळालें. या पक्षाचीं म्हणजे लेनिनचीं जीं तत्त्वें त्यांना साकल्यानें 'बोल्शेव्हिझम्' असें म्हणतात. सतत महायुद्धापर्यंत या पक्षाची संघटना इतकी व्यवस्थित व जोमानें चालूं होती कीं, महायुद्धाचे आरंभीं युरोपांतील कोणत्याहि देशांत मार्क्सचे मतानुसार कम्युनिस्ट क्रांति करण्यास सज्ज होऊन प्रसंगास टपून बसलेला व इतका सुसंघटित कोणताहि पक्ष नव्हता. १९१४ सालीं महायुद्ध सुरूं झाल्यानंतर रशियाचा पहिल्यापासून अतोनात विध्वंस झाला. आणि झारच्या जुलुमास कंटाळून १९१७ च्या फेब्रुवारींत 'अल्पमतवाल्यांनीं' क्रांति केली व झारला पदच्युत

केलें. पण युद्ध बंद केल्यास संयुक्त राष्ट्रें आपणांवर हल्ला करितील या भयानें हें नवीन सरकार युद्ध थांबविण्यास तयार होईना. या क्रांतींतील केरेन्स्की व इतर पुढारी समाजसत्तावादी होते. तरी आपलीं मतें अमलांत आणण्याचें त्यांस धैर्य होईना. युद्ध थांबविण्याचें धैर्य या सरकारास नव्हतें, तसेंच भांडवलवाल्यांची मालमत्ता हिसकून घेऊन मजुरांचें राज्य स्थापण्यास आपण पुरेसे समर्थ आहों असेंहि त्यांना वाटेना. यामुळें मजूर व सैनिक या सरकारवर असंतुष्ट झाले. जमीनदारांच्या जुलुमाखालीं शेतकरी भरडले जात होते.त्यांना जमिनदारांच्या जमिनी आपणांस मिळतील अशा स्वरूपाची राज्यक्रांति पाहिजे होती. पण केरेन्सीच्या सरकारास हेंहि धारिष्ट होईना. यामुळें या नव्या सरकाराविरुद्ध असंतोष एकसारखा पसरत होता. अशा स्थितींत लेनिन व ट्रॉट्स्की यांच्या बोल्शेव्हिक पक्षानें मजूर व सैनिक यांच्या साहयानें दुसरी राज्यक्रांति करून रशियाचें राज्य मजुरांच्या हातीं दिलें आणि अशा रीतीनें मार्क्सला सुधारलेल्या राष्ट्रांत कल्पनेंत दिसलेली मजुरांची सत्ता मार्क्सच्या मृत्यूनंतर पस्तीस वर्षांनीं रशियासारख्या मागसलेल्या देशांत प्रत्यक्ष सृष्टींत अवतरली. या नव्या सरकारनें जर्मनीशीं युद्ध थांबविलें. भांडवलवाल्यांच्या इस्टेटी सरकारजमा केल्या. त्यांचे मतदानाचे हक्क काढून घेतले, आणि मोठमोठ्या जमिनदारांच्या जमिनीहि काढून घेऊन त्या शेतकऱ्यांना देऊन टाकल्या. यांत ज्यांचें नुकसान झालें त्यास भरपाईहि कांहीं दिली नाहीं. तसेंच पूर्वीच्या अमदानींत परकीय राष्ट्रांनीं जें कर्ज रशियन सरकारास दिलें तें कर्जहि या नवीन सरकारनें साफ बुडविलें. अंतर्गत यादवी, बाहेरील राष्ट्रांनीं घातलेला उघड बहिष्कार व गुप्त विघ्नें यांनीं या नवीन बोल्शेव्हिक राज्यास अनेक संकटें आलीं. पण लेनिन व त्याचे पराक्रमी अनुयायी यांनीं आज पंधरा वर्षें सर्व संकटांशीं मोठ्या शौर्यानें झुंजून मार्क्सच्या तत्त्वानुसार नवीन समाजव्यवस्था स्थापिली, वाढविली व आज जगास थक्क करून सोडलें आहे. ज्या बोल्शेव्हिझमच्या बळावर ही क्रांति झाली व होत आहे तिचें सार मार्क्सचें तत्त्वज्ञान हेंच होय हें वर सांगितलें.मार्क्सच्या तत्त्वज्ञानांत बोल्शेव्हिझमनें कोणती भर घातली हें आतां पाहावयाचें.

औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या राष्ट्रांत भांडवलवाले व मजूर यांजमध्यें तेढ वाढत जाऊन मजर राज्यक्रांति करतील हें मार्क्सचें अनुमान इतिहासानें सदोष ठरविलें. फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी या राष्ट्रांत अशी तेढ वाढली नाहींच, पण भांडवलशाहीचें साम्राज्य जगांतील मागासलेल्या देशांवर विस्तारलें, याचा भांडवलवाल्यांना जसजसा फायदा झाला तसतसा मजूरांनींहि संघटना करून व सरकारला आणि कारखानदारांना भाग पाडून त्या फायद्यांतला वाढता वाटा मिळविला व आपली स्थिति सुधारली. आणि स्वदेशीय भांडवलवाल्यांना अधिक नफा झाल्यास आपणांस थोडा तरी वाटा मिळूं शकतो या अनुभवामुळें वर्गद्वेषाची वाढ न होऊन क्रांतीऐवजीं विकासानें प्रगति करण्याकडे औद्योगिक राष्ट्रांतील मजुरांचा कल होऊं लागला. लेनिननें या घटनेची मीमांसा करून मार्क्सची कल्पना दुरुस्त केली आहे. त्याच्या मतें भांडवलशाहीची वाढ होऊन एका भांडवली पुढारलेल्या राष्ट्राचें वर्चस्व मागसलेल्या इतर राष्ट्रांत वाढूं लागलें म्हणजे निरनिराळ्या तीन युद्धभूमिका निर्माण होतात. पहिली पुढारलेल्या भांडवली राष्ट्रांत. येथें मजूर व भांडवलवाले यांत तेढ कमी असली तरी वर्गद्वेष मुळींच नसतो असें नाहीं. पण भांडवलवाल्यांचें रक्षक असें जें सरकार तें बलिष्ट असतें. आणि मजुरांच्या असंतोषाची धार बोथट झाल्यानें क्रांतीस अनुकल परिस्थिति नसते. दुसरी युद्धभमिका जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांराष्ट्रांत कच्च्या मालाचे मागासलेले प्रदेश काबीज करण्याची स्पर्धा चालते ती; यामुळें गेल्या महायुद्धांसारखीं आंतरराष्ट्रीय युद्धें होतात. त्यांत यशस्वी व पराभूत राष्ट्रांतहि राजसत्ता कमकुवत होत जाऊन मजुरांत जागृति व क्रांतिप्रेम वाढत जातें आणि क्रांतीस अनुकल काल येतो. तिसरी युद्धभमिका साम्राज्यकर्ते व साम्राज्यांकित राष्ट्रें या दोघांतील वैर. साम्राज्यांकित राष्ट्रांची साम्राज्यकर्ते जी आर्थिक लूट करीत असतात तिचा प्रतिकार करून अंकित राष्ट्रें स्वतंत्र होतात. यामुळें साम्राज्यकर्त्यांच्या वैभवास ओहोटी लागून मजुरांचा तोटा होऊं लागतो व तेथें क्रांतीस अनुकल संधि येते. अशा प्रकारें जेथें व ज्यावेळीं राज्यसत्ता अधिकांत अधिक निर्बल असेल तेथें क्रांति होण्याचा संभव सर्वांत जास्त असतो.मग औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या राष्ट्रांत राज्यसत्ता मजबूत असल्यामुळें क्रांति होणें असंभाव्य ठरेल, तर मागासलेल्या देशांत राज्यसंस्था दुर्बल असल्यास तेथें मजुरांना राज्य जिंकण्यास अनुकूलता असेल,असें लेनिनचें मत आहे. याच न्यायानें रशियासारख्या मागसलेल्या देशांत

युद्धांत मार खाऊन जर्जर झालेल्या राज्यकर्त्यांस उलथून पाडून रशियन मजूरांनीं क्रांति केली

मार्क्सच्या एकंदर लिहिण्यांत ऐतिहासिक दृष्टि विशेष असून परिस्थितीच्या चाकोरींतून क्रांतीचा रथ आपोआप कसा मुक्कामास चाललेला आहे. हें त्यानें मोठ्या मेहनतीनें व पुनः पुनः प्रतिपादिलें आहे. हा जो'आपोआपणा'वर (Spontaneity) मार्क्सनें विशेष भर दिला त्यामुळें त्याच्या अनुयायांत कांहींजण परिस्थितीवर विशेष भर देणारे निघाले. मजुरांनीं आपली परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न अनेक चळवळींनीं चालविला असतां "स्वाभाविकपणें चळवळी कोणती दिशा घेतात हें नीट पहात राहावें" व चळवळींत क्रांतीचीं स्पष्ट लक्षणें दिसल्याशिवाय पुढाऱ्यांनीं क्रांतीच्या वाटेस जाऊं नये असें या पक्षाचें मत होतें. लेनिनचा भर या 'आपोआप'पणापेक्षां मनुष्यकर्तृत्वावर विशेष आहे.चळवळीचा मुख्य घटक मजूरवर्ग तर खराच, पण धंदेवाईक क्रांतिकारक कम्युनिस्ट यांनी आपला पक्ष बनवून व मजुरांचें पुढारपण स्वीकारुन मजुरांच्या प्रत्येक चळवळीची लगाम एकसारखी क्रांतीकडे खेचीत राहिलें पाहिजे असा त्याचा ठाम सिद्धांत आहे. लेनिननें सामान्य मजूर वर्गावर शिस्तीचीं विशेष बंधनें ठेविलीं नाहींत. पण कम्युनिस्ट पक्षाची संघटना अगदीं कडक लष्करी शिस्तीनें बांधलेली आहे. पक्षसंघटनेस, मतभेदास अथवा क्रियास्वातंत्र्यास अणुमात्र वाव नाहीं. या कडकपणामुळें पक्षांतील व्यक्तीच्या मनाची कुचंबणा सहजच होते. पण रणांगणावर लढत असणाऱ्या सैनिकाप्रमाणें या पक्षास नेहमीं लढाऊवृत्तीनें राहावें लागत असल्यानें पक्षाचे यशास हा कडकपणा उपकारकच होतो. या कडक शिस्तीच्या पक्षसंघटनेसंबंधीं लेनिन म्हणतो:—"या घनघोर यादवीच्या काळांत कम्युनिस्ट पक्षांतील सत्ता जर केंद्रीभूत असेल, जवळ जवळ लष्करी शिस्तीइतकी कडक पोलादी शिस्त पक्षांत असेल, मध्यवर्ती चालक मंडळावर कम्युनिस्ट पक्षांतील सभासदांचा संपूर्ण विश्वास असेल आणि या मध्यवर्ती मंडळास व्यापक सत्ता व सर्वाधिकार असतील तरच कम्युनिस्ट पक्षास आपले हेतु सिद्ध करून दाखवितां येतील." ('आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट मजूर संघांत प्रवेश मिळण्यासंबंधींच्या अटी' या लेखांतील स्टॅलिननें घेतलेला उतारा). १९१७ सालीं बोल्शेव्हिकांना क्रांतिकार्यांत जें यश आलें त्यास या कडक शिस्तीच्या कम्युनिस्ट पक्षाचें पुढारपणच विशेष कारण झालें. आणि आजहि रशियांतील राज्याचें एकंदर नेतृत्व या कम्युनिस्ट पक्षाचे हातीं आहे. मार्क्सनें मजूर चळवळींतून क्रांति कशी 'आपोआप' बाहेर येते हें सांगण्यावर भर दिला. लेनिननें कम्युनिस्ट पक्षानें मजूर चळवळीची लगाम हातीं घेऊन त्यास क्रांतिकडे जोरानें खेचीत नेलें पाहिजे तरच क्रांति होईल असें प्रतिपादिलें. व या पक्षाचें क्रियासामर्थ्य वाढविण्याकरितां पक्षघटकास कडक शिस्तीच्या धारेवर धरिलें आणि परिस्थितीपेक्षां मनुष्यकर्तृत्वाची प्रतिष्ठा वाढविली, हा लेनिनच्या तत्त्वाचा अथवा बोल्शव्हिझम्‌चा विशेष होय.

क्रमविकासी म्हणजे सुधारणावादी (Reformist) आणि क्रांतिकारक (Revolutionary)या दोन मतांत प्रत्येक राष्ट्रांत तीव्र वैरभाव आहे.पण लेनिननें या दोन्हीहि पद्धतींचा आपल्या कार्याच्या दृष्टीनें जो उपयोग करून घेतला तेंहि बोल्शेव्हिझमचें एक वैशिष्टच आहे. सोशॅलिस्ट क्रांतिकारकांतहि मार्क्सच्या 'आपोआप'पणावर भर देणारा जो पक्ष रशियांत होता तो पक्ष क्रांतीस हात घालण्यापूर्वी क्रांतीस अनुकूल अशी भौतिक परिस्थिति उत्पन्न झाली कीं नाहीं, बहुसंख्य लोकमताचा क्रांतीस पाठिंबा मिळेल कीं नाहीं व सोशॅलिस्टांनीं राज्य जिंकल्यावर नवीन पद्धतीची जी समाजव्यवस्था उभी करावयाची तिचें सर्व साहित्य म्हणजे सोशॅलिस्ट मताचे निरनिराळ्या विषयांतील हजारों निष्णात (Experts) तयार झाले आहेत कीं नाहीं हें पाहण्याची खबरदारी घेतली पाहिजे असें म्हणे. पण सोशॅलिस्ट समाजाच्या स्थापनेच्या पूर्वतयारीची क्रांतीचे कामीं लेनिनला विशेष गरज वाटली नाहीं. त्याचा मुख्य भर कम्युनिस्ट पक्षाचें निष्ठाबळ, मजरवर्गाचा पाठिंबा आणि राज्यकर्त्यांचें दौर्बल्य यांवर आहे. लेनिन म्हणतो, "समजा कीं, महायुद्ध उद्‌भवलें अथवा शेतकऱ्यांत असंतोष वाढला, तर अशा परिस्थितींत मजूर वर्ग जरी अल्पसंख्य असला तरी त्यास कष्ट करून पोट भरणारा शेतकरी वगैरे बहुसंख्य समाज आपल्या भोंवतीं सहज जमवितां येईल; अशा परिस्थितींत मजुरांनीं राज्यसत्ता काबीज करण्यास कां संकोच करावा ?" सोशॅलिस्ट समाजघटनेसाठीं ज्या तज्ज्ञ व बुद्धिमानांची गरज लागणार त्यासंबंधीं लेनिन सांगतो. "आधीं राज्य जिंकून मजुरांच्या उत्कर्षास अनुकूल वातावरण निर्माण करूं, म्हणजे मग त्यांच्यांतूनच तज्ज्ञ

आणि बुद्धिमान माणसें निर्माण करण्यास कंबर बांधून प्रयत्न करतां येईल." अशी क्रांति केल्यावर लेनिन विकासवादाचा आश्रय घेण्यास कसा तयार आहे पहा. मजुरांनीं राज्य जिंकल्यावर जमिनदार व भांडवलवाले यांच्या इस्टेटी हिरावून घेणें हें कम्युनिस्टांचें एक प्रमुख कर्तव्य असतें. पण या बाबतींत लेनिन मजूर सरकारचें बलाबल पाहून हळहळू प्रगति करावी व प्रसंगीं प्रतिपक्षापुढें कांहीं काळ नमतेंही घ्यावें असें सुचवितो. क्रांतीच्या मार्गानें साम्राज्यशाही उलथून पाडून मजुरांनीं राज्यसत्ता काबीज केल्यावर कांहीं परिस्थितींत मजूरांना क्रांतीचे मार्ग सोडणें भाग पडेलहि व मग क्रमविकासाची कास धरावी लागेल...कदाचित् मजूरेतर वर्गाचा विरोध कमी व्हावा आणि मजूर सरकारास आपलें सिंहासन स्थिर करण्यास संधि मिळावी याकरितां मजूरेतर वर्गास सवलती द्याव्या लागतील. पण या पद्धतीनें मजूर सरकारचें बळ वाढणार असल्यामुळें तिचा अवलंब केला पाहिजे असें स्टॅलिननें लेनिनिझमचें विवरण करतांना म्हटलें आहे. याच पद्धतीनें रशियांत बोल्शेव्हिकांनीं १९१७ सालीं क्रांति करून राज्य जिंकल्यावर प्रथम कांहीं जमिनदारांच्या जमिनी काढून घेऊन शेतकऱ्यास दिल्या खऱ्या.तथापि कम्युनिस्ट तत्त्वाप्रमाणें सर्व जमिनी अजीबात खाजगी मालकींतून काढून घेऊन मजूर सरकारनें आपणाकडे घ्यावयास पाहिजेत. पण आजच शेतकऱ्यांचा असंतोष व विरोध पत्करणें बरें नव्हे असें लेनिननें ठरविलें आणि १९२२ सालीं 'नवें आर्थिक धोरण' (New Economic policy) आंखून मालकीच्या जमिनी जप्त करण्याचा कार्यक्रम तहकूब केला व मजूर राज्यास शेतकऱ्यांचें पाठबळ मिळविलें. पुढें १९२८ नंतर मजूर सरकारास आत्मविश्वास वाटूं लागल्यावर हल्लीं स्टॅलिनच्या अमदानींत 'नवें आर्थिक धोरण' बंद होऊन जमिनी सरकारजमा करण्याचें धोरण जारी झालें आहे.

धर्मासंबंधीं बोल्शेव्हिकांइतकें नास्तिक राज्य पृथ्वीतलावर दुसरें नाहीं. रशियांतील धर्मपुरोहित, धर्मसंस्था, ख्रिस्तमंदिरें यांचीं वतनें खालसा झालीं असून धर्माचें जुनें वर्चस्व कमी व्हावें याकरितां जुनीं प्रतिष्ठित देवालयें, धर्मपीठें नवीन सरकारनें पार जमिनदोस्त करून टाकिलीं. व्यक्तिमात्रास धर्मस्वातंत्र्य कायदेशीरपणें असलें तरी शेंकडो भल्याबुऱ्या मार्गांनीं धर्मबीज उखडून टाकण्याचे प्रयत्न चालू आहेत. मुलांचें शिक्षण आईबापांचे हातीं नसून सरकारचे हातीं असल्यामुळें 'धर्म ही अफू आहे, धर्मानें मानसिक गुलामगिरी वाढते' हें कम्युनिस्ट मत शाळांतून मोठ्या आग्रहानें पढविलें जातें. यामुळें, कांहीं वृद्ध माणसें अजूनहि धर्मोपासना करतांना दिसतात तरी,एकंदर समाजाच्या दृष्टीनें धर्मोपासना हा उपहासाचा व निंद्य विषय होऊन बसला आहे.

सर्व जगांत बोल्शेव्हिकांच्या ज्या उद्योगानें दहशत उत्पन्न केली आहे तो म्हणजे रशियाचा वाढता आर्थिक उत्कर्ष होय. या उत्कर्षास रशियाचें विशेष प्रकारचें आर्थिक धोरण हेंच मुख्य कारण आहे. १९२८ अखेर 'नवें आर्थिक धोरण' सोडल्यानंतर बोल्शेव्हिक सरकारनें जमिनी खालसा करण्याचा सपाटा चालविला. अशाप्रकारें सरकारच्या अमलाखालीं आलेल्या जमिनी व कारखाने यांचा उत्कर्ष करण्याकरितां एक पांच वर्षांची योजना आंखली गेली. भांडवलशाहीच्या राष्ट्रांत खाजगी मालकीचें प्रस्थ मोठें असल्यामुळें एकंदर राष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षाची योजना आंखणें अशक्य असतें. सर्व राष्ट्रांत भांडवलशाहीचा संहार करून खाजगी मालकीचे ठिकाणीं सर्वत्र सरकारी मालकी स्थापन करणें ही बोल्शेव्हिकांनीं अद्वितीय गोष्ट केली आहे. यामुळें एकादा खाजगी कारखानदार ज्याप्रमाणें आपल्या धंद्याच्या उत्कर्षाची योजना आखूं शकतो त्याप्रमाणें रशियन सरकारनें सर्व राष्ट्राच्या सर्वांगीण आर्थिक उत्कर्षाची पंचवार्षिक योजना आंखली. देशांतील बँकांचा व्यवहार आणि आयात-निर्यात हींही सरकारनें आपल्या हातीं ठेविल्यानें खाजगी चढाओढीमुळें युरोपीय देशांत उत्पन्न होतात तसले कोणत्याही प्रकारचे आर्थिक घोटाळे रशियाच्या मार्गांत येऊं शकत नाहींत. निव्वळ आर्थिक क्षेत्रांतच हीं योजना आंखलेली नसून एकंदर सर्व रशियन समाजाची संस्कृति, आरोग्य व कार्यक्षमता वाढविण्याचे कामींहि योजना आंखल्या आहेत. या सर्व योजना १९२९ ते १९३३ या कालांत पार पडावयाच्या, त्या १९३२ अखेरच पार पडत आल्या असें तज्ज्ञांचें मत आहे. हा प्रचंड कार्यक्रम पार पडण्याकरितां बोल्शेव्हिक सरकारनें परदेशांतून निरनिराळ्या विषयांतील लक्षावधि तज्ज्ञ व विद्वान लोक आणविले असून त्यांच्या साह्यानें मजुरांतून तज्ज्ञ तयार करावयाचे व तज्ज्ञांचे बाबतींत रशिया स्वयंपूर्ण करावयाचा हें सरकारचें धोरण आहे. उद्योगधंद्यांची

एवढी प्रचंड वाढ झाली आहे कीं, रशियांत बेकारी थोडीहि नाहीं. देशांत यंत्रसामुग्री वगैरे बाहेरून आणावी लागते ती निर्यात मालाच्या मोबदल्यांत आणली जाते. हा निर्यात माल सालोसाल इतका वाढूं लागला आहे कीं,जगांतील इतर राष्ट्रांना त्याची चांगलीच दहशत वसूं लागली आहे. आणि इतकें असून मजुरांचा ५ तासांचा कामाचा दिवस व ५ दिवसांचा आठवडा केलेला आहे. व यादर आठवड्यांत एक सुटी ठेविली आहे. करमणुकीचीं व आरोग्याचीं साधनें समाजांतील प्रत्येकास सुलभ झालीं आहेत, आणि लहान मुलांचें शिक्षण आणि आर्थिक जबाबदारी हीं सरकारनें पत्करलीं आहेत. समाजांत संपत्तिसाधनें म्हणजे भांडवल व जमिन हीं खाजगी मालकीतून काढून मजुरांनीं सामुदायिक रीतीनें आपल्या हातीं घ्यावीं व त्यांचा सर्व समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें अंमल करावा हें मार्क्सचें तत्त्व बोल्शेव्हिकांनीं अमलांत आणण्याचा प्रयत्न मोठ्या यशस्वी रीतीनें केला असून 'सार्वराष्ट्रीय सर्वांगीण पूर्वयोजना' ही त्या यशाची गुरुकिल्ली आहे. राज्यसंस्था ही एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर जुलूम करण्याची संस्था आहे, असें बोल्शेव्हिकांचें उघड मत असल्यामुळें सरकारविरुद्ध मतप्रचार करणारांस अथवा 'आंखीव योजनेंत' व्यभिचार करणाऱ्यास फार कडक म्हणजे पुष्कळदां देहांत शिक्षाही होतात. झारशाहींत शिक्षण घेतलेला सुशिक्षित वर्ग कम्युनिझमला विरोधी असल्यानें आजवर कम्युनिस्ट सरकारकडून त्यांचा फार छळ झाला व उत्कर्षाच्या सर्व मार्गांपासून त्यास आजवर दूर ठेवण्यांत आलें होतें. पण अलीकडे सरकारचें हें धोरण बदललें असून उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत महत्त्वाचीं कामें या सुशिक्षितांवर सोंपविण्यांत येऊं लागलीं आहेत. या मजूर सरकारचें अखेर ध्येय वर्गभेद नाहींसे करून व राज्यसंस्था मोडून टाकून सहकारी अराजक समाज स्थापणें हें असल्यामुळें मजूर राज्याच्या अखेरपर्यंत या संक्रमणकालांत राजकीय दडपशाहीचा अंमल करणार असें बोल्शेव्हिक राज्यकर्ते स्वच्छ सांगतात, आणि हा संक्रमण काल किती दीर्घ असेल हें कल्पनेनेंहि सांगतां येणार नाहीं हेंही लेनिननें निर्भीडपणें सांगितलें आहे.यामुळें राजकीय मतस्वातंत्र्यास मात्र रशियांत कायमचेंच गाडून टाकलेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

फक्त रशियांतच कम्युनिस्ट राज्य स्थापून बोल्शेव्हिकांना स्वस्थ बसवत नाहीं. कारण कम्युनिझम हें आंतरराष्ट्रीय तत्त्व आहे असें मार्क्स व लेनिन या उभयतांचेंही मत होतें. जगांतील सर्व राष्ट्रांत अशी कम्युनिस्ट क्रांति घडवून आणण्यासाठीं 'तिसरा कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय मजूर संघ' मॉस्को येथें स्थापन झालेला असून उघड वा गुप्त मार्गांनीं याचे जागतिक क्रांतीचे प्रयत्न चालूं आहेत. एकाद्या राष्ट्रास कम्युनिझम निर्माण करावयाचा नसून केवळ राजकीय मोक्षच तूर्त हवा असला तरी या संघाची त्या राष्ट्रास मदत मिळते. गेल्या महायुद्धानंतर तुर्कस्थान व चीन या दोन मोठ्या राष्ट्रांस राजकीय मोक्ष मिळवून देण्याचे कामीं या 'आंतरराष्ट्रीय मजूर संघानें' बहुमोल मदत केली आहे. व या मुक्त झालेल्या राष्ट्रांत कम्युनिझम निर्माण करण्याचे प्रयत्नही हा संघ सतत विरोधाशीं झगडूनही चालू ठेवितो. मात्र अजून दुसऱ्या एकाद्या देशांत कम्युनिझम् स्थापण्याचे कामीं या संघास यश आलेलें नाहीं.

बोल्शेव्हिझमची सामान्य रूपरेखा येथें संपली. शेवटीं एकदोन पारिभाषिक शब्दांचा खुलासा करून आटोपतें घेतों. मार्क्स, लेनिन व इतर कम्युनिस्ट यांच्या व यांच्या विरोधकांच्या वाङ्मयांत 'कम्युनिस्ट' 'सोशॅलिस्ट' वगैरे शब्द आणि तत्सम व तत्भव शब्द निरनिराळ्या अर्थानें पुष्कळदां वापरण्यांत येतात. 'बोल्शेव्हिक' शब्दाची उपपत्ति वर दिलीच आहे. 'दुसऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर संघाचे' पुढारी विकासवादी होते. त्यांस 'सोशॅलिस्ट' म्हटलें जातें व त्या संदर्भानें 'सोशॅलिस्ट' म्हणजे विकासवादी अथवा सुधारणावादी असा शब्दप्रयोग आढळतो. त्याशीं विरोध दाखविण्याकरितां रशियन बोल्शेव्हिक आपणांस 'कम्युनिस्ट' म्हणवितात.पण हे शब्दार्थ पक्के व कायम नव्हत. कारण इंग्लंडांत चर्चिल वगैरे कॉन्झर्वेटिव्ह लोक सोशॅलिस्ट हेहि क्रांतिकारकच आहेत असें मानितात. आणि रशियन बोल्शेव्हिक सरकारचें संपूर्ण नांवहि 'यूनियन ऑफ सोशॅलिस्ट सोव्हियट रिपब्लिक्स' असेंच आहे. कम्युनिझम म्हणजे अराजकवाद.मार्क्स व बकुनिन दोघेही अखेर अराजकवादीच असल्यामुळें दोघेंहि 'कम्युनिस्ट' म्हणूनच संबोधिले गेले. पण अराजकांपूर्वी मजूर राज्य स्थापण्याचें मार्क्सचें जें मत त्या मतास 'कम्युनिस्ट' शब्द लावण्यांत येऊं लागला. तेव्हां बकुनिननंतर अलेक्झांडर बर्कमन या शांतिवादी अराजकानें आपल्या पंथास 'अनार्किस्ट कम्युनिझम्' म्हणजे 'संक्रमणकाळचें मजुरांचें राज्य नको म्हणणारा अराजक पंथ' असें नांव दिलें आहे.

सारांश 'सोशॅलिस्ट' 'कम्युनिस्ट' वगैरे या शब्दांच्या धात्वर्थावर न विसंबतां अभ्यासकांनीं निरनिराळा ऐतिहासिक संदर्भ पाहून शब्दार्थ जाणावा.

शासनाभाववाद

समाजाची सध्यांची घडी आमूलाग्र बदलून अगदीं निराळ्याच तत्त्वावर ती फिरुन वसविली पाहिजे असें सांगणारे अनेक पंथ आज आहेत. त्यांपैकींच अनार्किझम (शासनाभाववाद) हा एक आहे.

'सरकार, हें समाजांतील सर्व विषमता, दुःखें यांचें मूळ आहे व कोणच्याही प्रकारची शासनसंस्था जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत समाजाला सुख, शांतता लाभणार नाहीं' असें या पंथाचें मत आहे. याच्या समर्थनार्थ त्यांनीं पुढील विवेचन केलें आहे. समाजांत जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे हक्क सारखे आहेत. एका व्यक्तीनें दुसरीवर निर्बंध घालणें म्हणजे या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करण्यासारखें आहे. अशी पायमल्ली करणारी सर्वांत मोठी संस्था म्हणजे सरकार होय. तेव्हां तीं नष्ट झाल्यावाचून समाजाचा खरा उत्कर्ष होणार नाहीं. कोणचेंही कृत्य करण्यास व्यक्तीला अनिर्बंध स्वातंत्र्य असणें हें अनार्किझमचें—अराजकवादाचें ब्रीदवाक्य आहे. सरकारशिवाय समाज चालेल कसा अशी यावर शंका येईल. समाजासाठीं सरकार काय करतें तें पाहूं. गुन्हेगारांचा तपास व चौकशी करून त्यास तुरुंगांत घालणें आणि सैन्य व आरमार बाळगून परराष्ट्रांशीं लढाया करणें हीं सरकारचीं मुख्य कामें आहेत असें आपण समजतों. व तीं कोणीतरी केल्याशिवाय समाजांत शांतता नांदणार नाहीं. असें आपणांस वाटतें. पण अराजकवाद्यांचें म्हणणें असें कीं, ज्या कारणामुळें वरील कामें करण्याची जरूर पडते तींच नाहींशीं करून टाकणें हा शांततेला अगदीं सोपा उपाय आहे. विषमता, श्रेष्ठ कनिष्ठ भाव व तज्जन्य दारिद्र्य हें सर्व गुन्ह्यांचें मूळ आहे. लोक गुन्हे करतात ते भाकरीसाठींच व राष्ट्रें लढाया करतात त्याही पण भाकरीसाठींच. तेव्हां हा श्रेष्ठकनिष्ठ भाव काढून टाकून सर्वांना सारखी भाकरी—म्हणजे ज्याच्या त्याच्या जरूरीप्रमाणें ज्याला त्याला भाकरी—दिली कीं भांडणाचें मूळच उपटल्यासारखें होईल. अर्थातच तीं भांडणें मिटविणें हेंच ज्याचें मुख्य काम त्या सरकारची मग मुळींच जरूर नाहीं. कांहीं लोकांना हें पटत नाहीं. भाकरीचा प्रश्न सुटला तरी माणसें कलह करतील असें त्यांस वाटतें. पण हा गैरसमज आहे. सध्यांची समाजरचनाच इतकी दुष्ट आहे कीं, तिच्यामुळें मनुष्याबद्दल—सृष्टीच्या या सर्वांगसुंदर अपत्याबद्दल आपलें अगदीं विकृत मत झालें आहे. सध्याचे निर्बंध, विषमता व तज्जन्य सर्व अनर्थपरंपरा नाहींशा झाल्या तर मानवाचा मूळ स्वभाव फार उदात्त आहे असें दिसून यईल. समाजाच्या त्या उत्तम अवस्थेंतही क्वचित् अत्याचारी लोक भेटतील. पण कलहप्रियता हें त्याचें कारण नसून कांहींतरी मानसिक वा शारीरिक विकृति हेंच त्याचें कारण असणार. त्याचें निवारण करण्यास वैद्यक खातें अगदी समर्थ होईल. सर्वांना पूर्ण स्वातंत्र्य व सारखी संधि हीं अराजकवादाचीं मूल तत्त्वें आहेत. त्याअन्वयें त्यांच्या भावी समाजाची रूपरेखा अशी होईल. अन्नवस्त्रादि जीवनाला आवश्यक वस्तूवर सर्व समाजाची सत्ता राहील. मक्ता, खाजगी मालमत्ता हीं अजिबात नष्ट होतील व सर्व कार्यें परस्परांच्या सहकार्यानें होतील.कोणी महत्त्वाचें काम करतो,कोणी हलके काम करतो तेव्हां त्यांस त्या प्रमाणांत मोबदला मिळावा असें कोणी म्हणतात. पण ही कल्पनाच भ्रामक आहे. कोणीही मनुष्य अगदीं एकटा असा एकही काम करूं शकत नाहीं. एकादा शेतकरी कांहीं एकर जमीन एकटाच पिकवितो असें आपणांस दिसतें. पण त्याचा नांगर, फाळ, खतें. इ. तयार करण्यास इतर शंभर कामगारांची त्यास मदत झालेली असते. म्हणजे ती जमीन पिकविण्याचें श्रेय या सर्वांना दिलें पाहिजे. कोणी म्हणेल कीं फाळ, नांगर, खतें यांचे पैसे त्या शेतकऱ्यानें त्या त्या कामगारांना देऊन टाकल्यावर मग त्यानें जमीन पिकविण्याचें सर्व श्रेय घेण्यास काय हरकत आहे ? पण 'कोणाही कामगाराच्या कामाची किंमत पैशानें मोजणें हेंच सर्व अनर्थाचें मूळ आहे' असें अराजकवादी म्हणतात. वस्तूचें खरें मोल (value) व किंमत (price) यांत फरक आहे. शेरभर तांदूळ घेऊं. बाजारांत आज त्यांस पांच आणे पडतील उद्यां दोन आणे पडतील. ही झाली त्यांची किंमत. ही अनेक कारणानें बदलत असते. पण शेरभर तांदूळ मला जो जीवनरस देतील त्यांत कधीं फरक पडणार नाहीं हें त्यांचें खरें मोल आहे. वस्तूची बाजारांतली किंमत अगदीं अनिश्चित असते व तिच्या चढउताराला तिचा कामगार मुळींच जबाबदार नसतो. म्हणून किंमतीप्रमाणें त्याला मोबदला देणें अन्यायाचें होईल. मोलाप्रमाणें मोबदला द्यावा म्हणावें तर तें अशक्य आहे. कारण कोणच्याही वस्तूचें निश्चित मोल असें कोणालाच ठरवितां येणार नाहीं. म्हणून

एकाद्या कामाबद्दलच्या श्रेयाची विभागणी आपणांस करतांच येणार नाहीं. तेव्हां सर्व समाजालाच अप्रत्यक्षपणें प्रत्येक कामाचें श्रेय देणें युक्त आहे. वास्तविक महत्त्वाचें व हलकें काम असा फरक पुष्कळ वेळां मुळांत खरा नसतो. परिस्थितीमुळें आपणांस तसें वाटतें. भंगी, झाडू व डॉक्टर यांच्या कामाच्या योग्यतेंत कांहीं फरक नाहीं. डॉक्टर आपणांस रोगापासून बचावतो. तर भंगी आपणांस रोग होऊंच नये म्हणून खटपट करतात. समाज एकाला २०० रु. पगार देतो व दुसऱ्याला २रु. देतो. म्हणून आपणही त्यांच्या योग्यतेंत फरक करतों. दोघांनाही २०० रु. दिल्यानंतर आपली ही कोती दृष्टि नाहींशी होईल. भंग्याचें काम घाणेरडें म्हणून त्यास नाक मुरडण्याचें कारण नाहीं. महारोगाचें ऑपरेशन कमी घाण आहे काय? तेव्हां वस्तुतः अमुक काम श्रेष्ठ व अमुक हलकें हा भेदच भ्रामक आहे. सर्व कामें सारख्या दर्जाचीं आहेत. अर्थात् श्रेयविभागणी व सुखविभागणीही सारखीच झाली पाहिजे. सारखी सुखविभागणी याचा थोडा खुलासा करूं. 'सारखी' म्हणण्यांत 'जरूरीप्रमाणें' असा अर्थ आहे. पहिलवानाला व अशक्ताला दोघांनाही शेरभरच तांदूळ द्यावे असें म्हणणें वेडेपणाचें आहे. पहिलवानाला दोन शेर लागले तर त्यास दिलेच पाहिजेत. सारांश आपण आज कुटुंबांत जसे राहातों म्हणजे पन्नास रुपये मिळविणाऱ्यास जास्त तूप, पंचवीस मिळविणाऱ्यास कमी तूप असा भेद करीत नाहीं ज्याला जसें लागेल तसें घेतों—तसेंच अनार्किझममध्यें सर्व समाजानें राहावयाचें आहे. निसर्गानेंच अशक्त—सशक्त, बुद्धिमान—मंद, असा भेद केला आहे तेव्हां आपण 'समता' म्हणून ओरड करण्यांत अर्थ आहे असें कोणी म्हणतात. पण अनार्किस्ट म्हणतात निसर्गानें आधींच निर्माण केलेल्या विषमतेंत भर घालणें हें वेडेपणाचें होईल. ती विषमता नाहींशी करणें हेंच आपलें श्रेष्ठ कर्तव्य होय. सुखविभागणी सर्वांना सारखी झाली तर कांहीं आळशी लोक याचा फायदा घेऊन अंगचोरपणा करतील असें कोणास वाटेल. पण अराजकवाल्यांच्या मतें तें चूक आहे. कोणीही मनुष्य जसा स्वभावतः गुन्हेगार नसतो परिस्थिति त्यास गुन्हेगार बनविते त्याचप्रमाणें कोणीही मनुष्य स्वभावतः आळशी नसतो. अमुक एक काम करणें एकाद्यास अप्रिय असतें. त्याचें मन तिकडे लागत नाहीं म्हणून त्याला आळस येतो. ज्याच्या त्याच्या कलाप्रमाणें त्याला काम दिलें तर माणसाला कधींही आळस येणार नाहीं. व मग तो अंगचोरपणा करणार नाहीं. कारण काम ही त्याला आनंदाचीच गोष्ट होऊन बसेल. काम कितीही प्रिय असलें तरी पोटानें सक्ति केल्यावांचून सगळीं माणसें दहा दहा तास काम करणें शक्य नाहीं हें म्हणणें खरें आहे. पण अनार्किझममध्यें दहा तास काम करणें कधींच जरूर वाटणार नाहीं. लढाया, तुरुंग, न्याय, शासन, इ. अनवश्यक कामांत हजारों लोक सध्यां गुंतले आहेत. ते सर्व मोकळे झाले व सर्वांनीं सारखें काम करावयाचें ठरविलें तर सुसंस्कृत जीवनाला जरूर त्या गोष्टी अर्वाचीन सर्व सुखसोयींसह निर्माण करण्यास प्रत्येक माणसाला फार तर तीन तास काम करावें लागेल. अर्थात् इतक्या कामाबद्दल कोणीच कुरकुरणार नाहीं. मक्ता, खाजगी मालमत्ता, वगैरे गोष्टी नाहींशा झाल्यामुळें स्पर्धा नाहींशी होईल. किंमतीप्रमाणें मोबदला ही व्यवस्था नाहींशी केल्यामुळें 'फायदा' मारणें व त्यामुळें भांडवल घालणें या कल्पना नष्ट होतील. अन्नवस्त्र सर्वांना भरपूर मिळाल्यामुळें असंतोष नाहींसा होईल. व मग गुन्हे घडणार नाहींत. व सरकार नाहींसें झाल्यामुळें कोणावरही जुलूमजबरदस्ती होणार नाहीं. अशा रीतीनें अराजक वादाचा अंगिकार केला तर सर्वत्र सुबत्ता व शांतता नांदेल.

फॅसिझम

या शब्दाची उत्पत्तिः—प्राचीन रोमन साम्राज्याचे वेळीं रोमन मॅजिस्ट्रेटाबरोबर असणारा अधिकारी राजसत्तेचें द्योतक चिन्ह म्हणून (Fasces) एक परशु व काठ्यांची जुडी जवळ बाळगीत असे. हेंच चिन्ह इटालींतील फॅसिस्टांनीं अंगिकारिलें आहे. व इटलींतील राजसत्तेचेंही हें चिन्ह बरेचसें द्योतक आहे. हें चिन्ह दोन गोष्टींचें निदर्शक आहे. सुसंघटित समाजाला राज्यसत्तेची किती आवश्यकता व किती महत्त्व आहे हें परशु दाखवितो. व ऐक्यांतच सर्व बळ साठविलें आहे, हा बोध काठ्यांच्या जुडीपासून होतो. अशा रीतीनें सत्ता व सहकार्य ह्या दोहोंची समाजस्थैर्याला किती आवश्यकता आहे हाच ह्या चिन्हांचा संकेत आहे. जास्तींत जास्त सामुदायिक सुख साधण्याची धमक असणारी राज्यसत्ता व व्यक्तित्वाची धमक, स्वार्थी कल्पनेस फांटा देऊन समाजाचे घटक या दृष्टीनें विचार करण्याची व या तऱ्हेनें एकोपा वाढविण्याची धमक असलेले राष्ट्रांतील नागरिक या दोन गोष्टींनीं बनलेली जी समाजसत्ताक राज्यपद्धति त्याचेंच (Fasces)

परशु व काठ्यांची जुडी हें रोमन साम्राज्याच्या वेळीं चिन्ह होतें. व फॅसिझम या आधुनिक इटालींतील पंथाचेंहि तेंच चिन्ह आहे. सत्ता व सहकार्य या दोन तत्त्वांवरच फॅसिस्ट चळवळीचें अधिष्ठान आहे.

फॅसिझम म्हणजे काय ?

फॅसिझम्‌ची ज्या दोन तत्त्वांवर उभारणी केलेली आहे त्यांचा राजकारण व समाज यांच्याशीं निकट संबंध असल्यामुळें अशी समजूत होण्याचा संभव आहे कीं, फॅसिझम ही केवळ राजकीय व सामाजिक घटना आहे. पण ती चुकीची आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत फॅसिस्ट पंथानें जी कर्तबगारी दाखविली तिचा जास्त गाजावाजा झालेला आहे; पण फॅसिस्ट चळवळीचें नक्की धोरण काय ह्याचा व्हावा तितका उलगडा झालेला नाहीं. मुसोलिनीच्या सत्तेखालीं पुष्कळच राजकीय व सामाजिक क्रांति झालेली आहे. नवीन राज्यघटना, खाजगी व्यापारी संस्था व सहकार्याच्या तत्त्वावर चाललेल्या संस्था (Syndical & Corporative institutions) नवीन पीनल कोड, व वृत्तप्रसारावर निर्बंध घालणारे कायदे, तसेंच प्रसूति-गृहें व बालकमंदिरें इत्यादि सुधारणा या फॅसिस्टांच्या प्रवृत्तीच्या द्योतक आहेत इतकेंच. फॅसिस्ट मनोवृत्ति हाच फॅसिझमचा आत्मा; हेंच फॅसिझमचें सार होय. जशी फॅसिझम ही राजकीय किंवा सामाजिक पद्धतीची घटना नव्हे, तसाच तो नवीन धर्म नव्हे, किंवा नवीन तत्त्वज्ञानही नव्हे. ही एक बौद्धिक चळवळ आहे. (Movement of ideas). आज जगांत आपणास काय परिस्थिति दृष्टीस पडते? जिकडे तिकडे मानसिक अस्वस्थता व जीवनकलहामुळें शारीरिक अस्वस्थता पसरलेली आहे. संस्थांना स्थैर्य म्हणावें तर तेंहि नाहीं, संस्था लयास जात आहेत. धर्मग्लानि बोकाळल्यामुळें मानवी मनाचा आधारच सुटून गेला आहे. राष्ट्र राष्ट्राविरुद्ध, मजूर भांडवलवाल्याविरुद्ध, एक व्यक्ति दुसरीविरुद्ध तुटून पडत आहेत. व बळी तो कान पिळी हाच न्याय वावरतांना दिसतो आहे. ह्या जागतिक अतिक्रमणाविरुद्ध फॅसिझम ही प्रतिक्रियारूप चळवळ आहे. धकाधकीच्या मामल्याविरुद्ध हें बंड आहे. प्राचीन आणि अर्वाचीन परस्परविरुद्ध ध्येयांचा उदा०—तत्त्व आणि व्यवहार, स्वातंत्र्य व कायदा, धर्म व विज्ञान, यांचा ज्यांत योग्य समन्वय घातलेला आहे अशा नवीनच जागतिक संस्कृतीची हळूहळू उभारणी करणें हें फॅसिझमचें ध्येय आहे. आधुनिक काळावर जड वादाचा (Materialism) इतका जबर पगडा बसला आहे कीं, असंख्य लोकांना आतां विश्वास तरी कशावर ठेवावा हेंच समजेनासें झालें आहे. ज्यांनीं रूढीला झुगारून दिलें आहे, ते उघड उघड अहंवादी, (देशाभिमानी) बनले आहेत. व बाकीचे आपल्या भाविक पूर्वजांच्या अस्तिक बुद्धीचा जो . कांहीं थोडा फार अंश त्यांच्यांत उतरला आहे, त्यावर जीव धरून आहेत. विपण्णतेच्या या दलदलींतून बाहेर पडण्याचे चोहोंकडे प्रयत्न चाललेले आहेत. नवीन श्रद्धायुग सुरू होण्याचा रंग दिसत आहे. व फॅसिस्ट पंथ त्याच युगाचा प्रवर्तक आहे. फॅसिझमनें जडवादाविरुद्ध बंड पुकारलें आहे. सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाची घडामोड करणारा कोणीतरी एक दैविक गुणातीत नियंता आहे असें फॅसिस्ट मानतो. अतिमानुष गोष्टीवर त्याचा विश्वास आहे व नवीन पिढ्या या भाविक श्रद्धायुक्त वातावरणांतच वाढतील व जड वादाच्या नास्तिक्याच्या विषाची बाधा त्यांना होणार नाहीं अशी काळजी घेण्याचा त्यानें निश्चय केलेला आहे. हल्लींच्या सार्वत्रिक अंदाधुंदींतून जर बाहेर पडावयाचें असेल तर नवीन श्रद्धावान् पिढी निर्माण केली पाहिजे हा फॅसिझमचा निश्चय आहे. असें जरी आहे तरी फॅसिझमनें नवयुगाकडे पाठ फिरविलेली नाहीं. पाखंडी मतांचा फैलाव हा होणारच. व त्यांत जरी अगदीं एकांतिक विचारसरणी असली तरी थोडेंबहुत सत्य हें असतेंच. उदाहरणार्थ— मार्क्स हा पक्का जडवादी व बोल्शेव्हिकांच्या तत्त्वांचा गाभा म्हणजे जडवादच. पण ही भौतिक दृष्टि एकांतिक व गौण होय असें फॅसिस्ट समजतो व अध्यात्मदृष्टि ही जरी तो मूलभत प्रधान मानतो तरी मानवी जीवनावर भौतिक परिस्थितीचा परिणाम होतच नाहीं असें मात्र त्याचें मत नाहीं. फॅसिझमचा दृष्टिकोण संघटनात्मक आहे. आधुनिक युगांत प्रचलित असलेल्या तत्त्वांतून जीं चांगलीं आहेत, त्यांचें जतन करणें जरूर आहे असें फॅसिस्टाला वाटतें. पण भौतिक वादाच्या आणि देहवादाच्या चिखलांत रुतलेल्या संस्कृतीला जर बाहेर काढावयाचें असेल तर मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टि आध्यात्मिक द्वैती, परमोच्च झाली पाहिजे. तर नवीन सांस्कृतिक संघटना (Synthesis) उदयास येईल असें फॅसिझमला वाटतें. ईश्वराविषयीं आस्ति-

क्य बुद्धीचा फैलाव करणें हें फॅसिस्ट चळवळीचें मूल तत्त्व आहे. कर्ताहर्ता जगाचा नियामक असा एक परमेश्वर आहे व सृष्ट पदार्थांचे उत्पत्तीचे व वाढीचे जे नियम त्यांनी अर्थात अशा नैतिक, बौद्धिक कायद्यानुसार ईश्वर मानवी जीवनाचें नियमन करतो, ही जी जीवनाकडे पाहाण्याची आध्यात्मिक दृष्टि ती इटलींतील नवीन पिढ्यांत जितकी जितकी उतरेल तितका तितका फॅसिझमचा जास्त फैलाव होईल. धर्मयुद्ध करणाऱ्यांची जी ध्येयाकरतां प्राण देण्याची निष्ठा ती सर्वांचे अंगीं बाणली तर हल्लींची आर्थिक व सामाजिक स्थिति सुधारेल, सौंदर्यप्रीति वाढेल, स्वभावकाठिण्य अंगीं येईल व मृत्यु, हाल, दारिद्र्य हीं जीं मानवीं जीवनाचीं न टळणारीं संकटें त्यांची धार आध्यात्मिक बलानें बरीच बोथट होईल असा फॅसिझमचा विश्वास आहे. तेव्हां फॅसिझमचें ध्येय आधुनिक युगाचीं व प्राचीन युगाचीं जीं ध्येयें त्यांचा समन्वय करून जागतिक संस्कृतीची हळूहळू उभारणी करणें. हें होय पण ही उभारणी आध्यात्मिकतेच्याच पायावर झाली पाहिजे, व या दृष्टीनेंच आधुनिक संस्कृतीचें प्राचीन संस्कृतीवर कलम चढविलें पाहिजे. अशा रीतीनें फॅसिझम परंपराप्रिय आहे, व प्रगतिप्रियही आहे.

फॅसिझमची मनोभूमिका

फॅसिझमला जशी मनोभूमिका पाहिजे आहे तशीच इटलींतील शेतकऱ्यांची आहे. व इटलींत शेतकऱ्यांचीच लोकसंख्या जास्त. यांनाच जेव्हां संयुक्त इटलीच्या भरभराटीला आपणहि अंशभाग आहों अशी जाणीव झाली, तेव्हां त्यांची परंपराप्रियता, त्यांची आध्यात्मिक दृष्टि, त्यांची आस्तिक्यबुद्धि यांच्या महत्त्वाचा पारा वर चढूं लागला. हींच फॅसिझमच्या उदयाचीं चिन्हें होत. फॅसिझमच्या बीजाला योग्य भूमि मिळाल्यावर तें झपाट्यानें वाढण्यास विलंब लागला नाहीं. इटलींतील या शेतकरी वर्गाची मनोरचना एकदां समजली कीं, फॅसिझमची मनोभूमिका समजण्यास सुलभ होईल. इटलींतील शेतकरी ईश्वराला श्रद्धायुक्त अंतःकरणानें भजतो व सृष्टींतील घडामोडी केवळ प्राणिशास्त्रांतील नियमान्वयें चाललेल्या आहेत असें त्यास वाटत नाहीं. फॅसिस्टांच्या विस्तृत शैक्षणिक कार्यक्रमांत इटलींतील शेतकऱ्याच्या ज्या स्वभावविशेषावर विशेष भर दिला आहे ते हे:— तो वृत्तीनें शांत, मेहनती व मितव्ययी असून शिस्त पाळणारा व वरिष्ठाच्या हुकुमाला मान वांकवणारा असा आहे. त्याचें हृदय भक्ति व आदरानें ओथंबलेलें असतें. एकत्र कुटुंबपद्धतीची त्याला फार आवड आहे. शेतकरी वर्गापैकीं पुरुष हे पौरुषसंपन्न, धडधाकट, लढाऊ वृत्तीचे, निर्भय पण उदार असे आहेत. व स्त्रिया कोमल अंतःकरणाच्या, दयाशील, मातृपदाची आवड असणाऱ्या व कौटुंबिक वृत्तीच्या अशा आहेत. शेतकरी धार्मिक असल्यामुळें जरी त्यांचा उपाध्याय या वर्गाशीं बराच संबंध येत असला तरी, त्या वर्गाच्या आधीन तो नाहीं, व उपाध्यायाकडून कमीजास्त गांजणूक जुलूम होऊं लागला, व केवळ धार्मिक बाबींव्यतिरिक्त इतर गोष्टींत तो ढवळाढवळ करूं लागला तर तें इटालियन शेतकरी सहन करणार नाहीं. त्याला जसा कुलाभिमान आहे तशीच मालकीहक्काची जाणीवहि Proprietory instinct आहे. मग त्याच्या मालकीची जमीन असो अगर ह्याचेकडे खंडानें लावलेली जमीन असो. पण तो भांडवलशाहीचा शत्रु आहे. तो जें पिकवतो तें (विकण्या) फायद्याकरितां नसून कुटुंबपोषणार्थच पिकवतो. व जर थोडेंफार विकलेंच तर तें इतर कौटुंबिक गरजा भागविण्याकरितां. अशा तऱ्हेनें भावाच्या चढउताराचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नाहीं. कांहीं प्रांतांत जरी तो निरक्षर असला तरी त्याला व्यवहारज्ञान व उपजतबुद्धि मोठ्या प्रमाणांत असते. हे जे इटालियन शेतकऱ्याच्या अंगचे गुण ते देशांतील प्रत्येक व्यक्तीचे अंगीं कसे बाणतील इकडे फॅसिझमचें सारें लक्ष वेधलें आहे. यथार्थतादृष्टि (Realism) वस्तुवादी वस्तुस्थितीकडे डोळेझांक न करणें) व ध्येयासक्ति (Idealism ध्येयवादी) हे परस्परविरुद्ध वाटणारे गुण इटालियनांत समतोल प्रमाणांत विशेष आढळून येतात. जीवनविषयक प्रश्न सोडविण्याकरितां कशा तऱ्हेच्या मनोवृत्तीवर फॅसिस्ट विशेष भर देतात याचें हें उत्तम उदाहरण आहे. बौद्धिक काथ्याकूट, व तात्त्विक चर्चा करून हे प्रश्न सोडवावयाचे नसून अंतस्फूर्तीच्या मदतीनें परस्परविरोधी प्रश्नांचा (मेळ) समन्वय घालून जीवनसंगीतांत एकतानता उत्पन्न करणें हें फॅसिस्टांचे मुख्य तत्त्व आहे. अशा तऱ्हेनें मुख्यतः अखंड जीवनाची कलाच (The art of integral living) फॅसिझम आपणांस शिकवितो. प्रत्येक मनुष्य परस्परविरोधी गुणांचें व हेतूंचें अव्यवस्थित रूप आहे. त्यांत सुसंगतता, सुसंबद्धता आणावयाची असेल

तर परस्परविरोधी गुणांचा मेळ घातला पाहिजे आणि समाजांत जर एकोप्यानें रहावयाचें असेल तर सामाजिक स्थितीशीं मेळ घातला पाहिजे. म्हणजे आपलें अंतर्जीवन व बहिर्जीवन यांचें आपल्याशीं संयोजन (समीकरण) केलें पाहिजे. ह्याकरतां सौंदर्यक्षमता वाढविली पाहिजे. तार्किक व तत्त्वविवेचनात्मक पद्धतीला प्राधान्य देतां कामा नये. अंतस्फूर्तीवरच जास्त भर दिला पाहिजे व परस्परविरोधी अनुमानांचा मेळ घालून समतोल वृत्तीची जोपासना केली पाहिजे. हें समानचित्तवृत्तित्व स्त्री–पुरुषांचे अंगांत बाणलें पाहिजे असा फॅसिस्टांचा निश्चय आहे, व तें इटालियन शेतकऱ्यांत दिसून येतें. इटलींत फॅसिस्टांचा हल्लीचा पुढारी मुसोलिनी याचा जन्म शेतकऱ्याचे कुळांत झाला. व त्यालाहि या गुणाचे बाबतींत प्रतिनिधीभूत मानतां येईल. तो ज्या धोरणानें हल्लीं राजकारण करतो आहे, त्यांतसुद्धां शेतकऱ्याचे स्वभावगुणच तो प्रकट करीत आहे व नवीन संस्कृति जमिनीलगत, व समुद्रालगत राहिल्यामुळें उत्पन्न झालेल्या या गुणांवरच उभारली जावी म्हणून त्या संस्कृतीला खेड्यापाड्यांच्याच वळणावर नेण्याचा त्याचा निश्चय आहे. पूर्ण समतोल वृत्तीचीं माणसें निर्माण करण्याच्या फॅसिस्टांच्या ध्येयपूर्तीला केवळ इटालियन शेतकऱ्यांची धार्मिक वृत्ति, अंतस्फूर्ति व इतर गुण एवढ्यानेंच भागणार नाहीं. शेतकऱ्याचें राहणीविचारसरणीची मुसोलिनीला आवड असली तरी सुधारलेल्या शहराच्या राहणींतीलही चांगलें तेवढें घेण्याचीहि त्याला अपेक्षा आहे. सभ्य वागणूक, नागरिकत्वाची जास्त जाणीव, साहस करण्याची, धडाडी दाखविण्याची शारीरिक व बौद्धिक प्रवृत्ति, खेळाडू वृत्ति, निःपक्षपातीपणा इत्यादि जे शहरवासियांचे गुण तेहि शेतकऱ्यांचे कणखर गुणांना पुरवणीदाखल घेतले पाहिजेत असें फॅसिस्टाचें मत आहे. सारांश फॅसिस्टानें जीवनक्रमाचें विवक्षित ध्येय पुढें ठेवलेलें आहे. सत्यासत्यतेचे प्रश्न हे प्रत्यक्ष प्रमाणानें सोडवावयाचे असतात, व त्यांचा वर्तनक्रमाशीं मुख्य संबंध असतो. समाजाची उन्नति विशिष्ट जीवनक्रमावर अवलंबून असते. जड वादाचा, आपण जितका जास्त त्याग करूं, सौंदर्यक्षमता जितकी वाढवूं, धार्मिक वृत्तीची व सामाजिक ऐक्याच्या लालसेची जोपासना, पोषण करून समाजाची (Individualistic Spirit) सहकार्याचे तत्त्वावर पुनर्घटना करूं व अशा तऱ्हेनें देशाभिमानाला, अहंवृत्तीला जितका आळा घालूं, संस्कृतीला जितकी खेड्यापाड्यांचे वळणावर नेऊं तितका जीवनक्रम सुधारेल व सामाजिक व आर्थिक कूट प्रश्न जलद सुटतील. हें जर घडून आलें तर युरोपचें सामाजिक एकीकरण होण्यास व ग्रीक आणि रोमन या दोन परंपरांच्या संमिश्रणांतून, एक नवीन व जिवंत संघटनात्मक संस्कृतीचा (Synthetic civilization) उदय होण्यास वेळ लागणार नाहीं. असा फॅसिस्टांचा आत्मविश्वास आहे.

राजनीतीचीं तत्त्वें

फॅसिझम लोकशाहीच्या उदार तत्त्वाच्या विरुद्ध असून समाजांतील निवडक अशा महाजनांनीं राज्यकारभार चालवण्याचें तत्त्वच फॅसिझमला मान्य आहे. पण राष्ट्राचें कांहींच अंग राज्यकारभारांत असूं नये किंवा राज्यकारभार विशिष्ट पक्षांकडन चालावा ही कल्पना फॅसिझमला पसंत नाहीं. सर्व राष्ट्र राजसत्तेशीं एकरूप व्हावें ह्यावर तर फॅसिझमचा भर आहे. लोकशाहीच्या तत्त्वाचा फॅसिझमनें जरी अंगिकार केला नाहीं तरी लोकांनीं राजसत्तेंत कांहींच भाग घेऊं नये असें फॅसिझमला वाटत नाहीं. पण त्याचें एवढेंच म्हणणें आहे कीं जशी लोकांमध्यें नैतिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव, सामाजिक व आर्थिक घटनेचें ज्ञान व अनुभव, इत्यादि राजकारणास आवश्यक अशा गुणांची वाढ होऊन त्यांचीं राजकारण करण्याची पात्रता वाढेल, तसतशा त्यांना जास्त महत्त्वाच्या अधिकाराच्या जागा मागण्याचा हक्क येईल. स्वातंत्र्य म्हणजे नियंत्रणाचा अभाव नव्हे, किंवा स्वच्छंदानें वागण्याचा व काल कंठण्याचा हक्क नव्हे. स्वातंत्र्याचा खरा तात्त्विक अर्थ पापात्मक बंधनावस्थेंतून मुक्तता असा आहे. म्हणून ज्या प्रमाणांत नैतिक तत्त्वांचें प्राबल्य लोकांचें हृदयावर असेल, ज्या मानानें त्यांचें बाह्य स्थितीचें ज्ञान असेल, किंवा जशी घडामोडीची क्षणोक्षणीं बदलणारी बाह्य स्थिति असेल त्यावरच लोकांचें स्वातंत्र्यसौख्य अवलंबून आहे. मुसोलिनीचे म्हणण्याप्रमाणें युद्धकाळचें स्वातंत्र्य निराळें, शांततेच्या काळांतलें निराळें, क्रांतियुगांतलें निराळें, सुकाळांतलें एक प्रकारचें, तर दुष्काळांतलें स्वातंत्र्य दुसऱ्याच प्रकारचें असे स्वातंत्र्यास्वातंत्र्यांत सुद्धां देशकालवर्तमानपरत्वें भेद होतात. तेव्हां राज्यकारभारांत भाग घेतां येणें न येणें किंवा कमीजास्त घेतां येणें हें सर्वस्वीं लोकांच्या पात्रतेवरच

अवलंबून आहे. पण त्यांतसुद्धां कांहीं विशिष्ट लोकांचे अंगीं जास्त पात्रता असूं शकेल व त्यांना जास्त जबाबदारीच्या व अधिकाराच्या जागा मिळणें अपरिहार्य आहे. अशा रीतीनें प्रथम एक सर्वाधिष्ठित वरिष्ठ अधिकारी, व त्याचे खालीं पात्रतेनुरूप जबाबदारीच्या जागांवर पायरी-पायरीनें चढणारे दुय्यम अधिकारी, हीच उत्तम प्रकारची राजघटना होऊं शकते. त्याचा असा अर्थ नव्हे कीं, एकच माणसास अनियंत्रित सत्ता द्यावयाची. उलट या पद्धतींत अधिकार अनेक लोकांत कमीअधिक प्रमाणांत विभागला जाऊन समतोलपणा येतो. एवढेंच कीं, अधिकारपात्रता ही शारीरिक, बौद्धिक, मानसिक गुणप्रकर्षावरच अवलंबून आहे. व गुण हे कांहीं सर्वांचे ठिकाणीं सारख्याच प्रमाणांत असूं शकत नाहींत. म्हणून फॅसिस्टांचें राज्यशास्त्राचें ध्येय "हुकूम, शिस्त व अधिकार" या त्रयीवर जें अधिष्ठित झालें आहे तें वस्तुस्थितीला धरूनच आहे.गुणांनीं जे श्रेष्ठ त्यांनीं-च राज्यशकट चालवावा असें फॅसिझमचें तत्त्व आहे. ह्या नवीन राजकीय दृष्टीप्रमाणें फॅसिस्टांची सामाजिक रचनेची दृष्टिहि अभिनव आहे. समाज ज्यायोगें सुखी होईल अशाच तऱ्हेनें समाजाची पुनर्घटना करण्याचा फॅसिस्टांचा प्रयत्न आहे. संघात्मक जीवनाचे तत्त्वावर राष्ट्राची रचना कर-ण्याकरितां त्यांनीं अशी पद्धत अंमलांत आणली आहे कीं, एका बाजूला कुटुंब, मजूरसंघ (Trade-union) औद्योगिक संघ (Industrial Corporation) राष्ट्रीय सल्लामंडळ (The national corporative Council) व दुसऱ्या बाजूला, स्थानिक, प्रांतिक व राष्ट्रीय सरकार (Administration) व या दोन्हींच्यावर व दोहोंना निगडित करणारें वरिष्ठ अधिकार मंडळ (Powerful Executive) ह्या पद्धतीच्या यशस्वितेबद्दल शंकाच नको. या समाजाचे व राज्ययंत्राचे पुनर्घटनेबरोबरच फॅसिस्ट लोकांना शिक्षण देण्याचेंहि प्रयत्न चालू आहेत. पण तें शिक्षण केवळ ज्ञानदान म्हणून नव्हे; लोकांचा वर्तनक्रम सुधारावा, त्यांना अंतस्फूर्तीनें कर्तव्याकर्तव्य ओळखतां यावें, व सामाजिक व नैतिक जबाबदारीची जाणीव उत्पन्न व्हावी म्हणून राष्ट्रीय व धार्मिक चळवळीचे देशप्रेम व धर्म हे जे दोन आधार तेहि फॅसिस्ट हालवून बळकट करीत आहेत. सार्वजनिक हिताला बाधक जे दुर्गुण त्यांचा नायनाट करणें एवढ्यावरच न थांबतां सद्गुणांचें बीजारोपण करण्याचेंहि ध्येय फॅसिस्टांनीं आपल्यापुढें ठेवलें आहे. पण त्याकरतां वरिष्ठ अधिकार-मंडळाची जरूरी आहेच. व त्यांत योग्य माणसांचीच निवड झाली पाहिजे, म्हणून राज्यकारभार गुणांनीं वरिष्ठ अशाच महाजनांचे हातीं पाहिजे. सारांश नैतिक कायदा प्रत्येकजण पाळतो. त्याला स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यालाच संघटनात्मक उपायांनीं जास्त प्रसिद्धी देणें व जास्त चांगल्या तऱ्हेनें पाळला जाईल अशी निवडक व योग्य अशा अधिकारी मंडळाकडून व्यवस्था करणें हा फॅसिझमचा हेतु आहे. फॅसिझमची अशीहि घोषणा आहे कीं, परमेश्वर हा सर्वाधिष्ठित राज्यकर्ता आहे, व राष्ट्र हें त्या ईश्वराच्या प्रतिनिधीचें लौकिक स्वरूप असून, प्रजापालनाची जबाबदारी ईश्वरानें राष्ट्रावर सोपविली आहे. हाच फॅसिस्टांच्या नैतिक राजनीतीचा अर्थ आहे. राष्ट्राला नैतिक जबाबदारी आहे. राष्ट्रपुरुषाच्या स्थानाला व संघ-टनात्मक शक्तीला जें जें बाधक होईल त्याचा नायनाट करणें राष्ट्रधुरीणांचें कर्तव्य आहे. समाज-द्रोही, राजद्रोही, अनैतिक व अधार्मिक चळवळी दडपून टाकणें ही फॅसिस्टांच्या मतें नैतिक जबाबदारी होय. धर्माविषयीं फॅसिस्टांचा दृष्टि-कोण असा स्वाभाविक असून, नीतिधर्माच्या कल्प-नांचें रक्षण व पोषण करणें हें राष्ट्राचें काम आहे व जो आचार, जो धर्म, युक्तीस धरून नसेल व केवल साक्षात्कारावर अवलंबून असेल, त्याला दडपून टाकणें फॅसिस्ट आपलें कर्तव्य समजतो. धार्मिक-शिक्षण देणें हेंही फॅसिझमच्या मतें महत्त्वाचें आहे. इटली कॅथॉलिक पंथी असल्यामुळें, धर्माचे बाब-तींत राष्ट्राचे मार्गांत विशेष अडथळा आला नाहीं. व राष्ट्र व कॅथॉलिक धर्मगुरु (पोप) यांचेमध्यें जो १९२९ सालीं करार झाला त्या-प्रमाणेंच राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या मर्यादा कायम झाल्या आहेत. एवढें मात्र आहे कीं, धार्मिक सत्तेचें स्वातंत्र्य व साम्राज्य मान्य करून सुद्धां राजसत्तेला वाटलें कीं, आपल्या नैतिक हक्कावर व जबाबदारीवर धाड आली आहे, तर तो हक्क बजावण्याचें, व ती जबाबदारी संभाळण्याचें स्वातंत्र्य राजसत्ता हातचें मुळींच गमावणार नाहीं.

फॅसिझमचीं आर्थिक मूलतत्त्वें

फॅसिझम भांडवलशाहीचा विरोधी आहे तसाच समाजसत्तावादाचाहि विरोधी आहे. सोशालिझमचें जें उद्योगधंद्याचें राष्ट्रीय करणाचें ध्येय तें केवळ ध्येयच होय. त्यांत व्यव-हार्य असें कांहीं नाहीं असें फॅसिझमला वाटतें.

मध्यांचें व्यक्ति वातंत्र्याचें तत्त्व तार्किक अनुमान पद्धतीनेंच फळ आहे. भांडवलशाही ही प्रत्यक्ष अवस्था सोशालिझम व व्यक्तिस्वातंत्र्य या दोन काल्पनिक टोकांच्या मध्यें आहे. भांडवलशाहीचा एक परिणाम असा झाला आहे कीं आर्थिक दृष्टचा पुष्कळ लोकांना थोडचा लोकांवर अवलंबून रहावें लागतें. सोशालिझमच्या युगांत सर्वांनाच एका व्यक्तीवर म्हणजे राष्ट्रावर अवलंबून रहावें लागेल.म्हणजे सोशालिझम ही कॅपिटॅलिझमच्या पद्धतीची परिणतिच होय. निर्भेळ समाजसत्ता ही अव्यवहार्य कल्पना आहे. मजुरांची, कामकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारणें हें एकच ध्येय सोशालिस्टांचे डोळचापुढें नाहीं. खाजगी भांडवलावर उभारलेल्या उद्योगधंद्यांत होणारी भयंकर नुकसानी कायमची थांबविणें हेंहि सोशालिस्टांचें ध्येय आहे.जेथें अतोनात पैसा आहे तेथें मालाची पैदासही प्रमाणाबाहेर होते.व मागणीपेक्षां पुरवठा जास्त होतो.बाजारांत मालाचा जाणून बुजून तुटवडा उत्पन्न करुन व राहिलेल्याच्या किंमती प्रमाणाबाहेर वाढवून कांहीं थोडे लोक आपला स्वार्थ साधून घेतात असेंहि दृष्टीस पडतें. कधीं कधीं प्रथम अंगावर घेतलेल्या जोखमीच्या मानानें भांडवलवाल्यांना प्रमाणाबाहेर फायदा झालेला दृष्टीस पडतो. एकादा नवीन यांत्रिक किंवा इतर शोध लागला कीं, त्याचें पेटंट घेऊन एवढी जबरदस्त हक्कदारी उत्पन्न केली जाते कीं, सरकारलाही त्यांत ढवळाढवळ करतां येत नाहीं व ज्यानें पेटंट घेतलें त्या भांडवलवाल्याला वाटेल ती किंमत लावतां येते, इतकेंच काय पण नवीन शोधसुद्धां पैशाच्या बळावर दडपून टाकतां येतात. शेअर बाजारांत, पैसे गुंतविणारे व दलाल हे भावाचा विलक्षण चढउतार करतात. व आपला फायदा करून घेतात. मालाची पदास करण्यास काय खर्च झाला ह्यावर मालाची किंमत ठरविली न जातां,मागणी व पुरवठा या तत्त्वांवर ठरविली जाते व अशा तऱ्हेनें मूळ किंमतीच्या कितीतरी पट किंमत वाढलेली दिसते. कधीं कधीं या भांडवलशाहीच्या युगांत असाहि चमत्कार दृष्टीस पडतो कीं,सर्व साधारण माणसाला नेहमीं लागणारे जिनसांची पैदास करण्याची अतिशय निकड आहे. व त्यांतच भांडवल घालणें योग्य आहे. असें दिसत असतांनासुद्धां भांडवलवाले केवळ नाना तऱ्हेच्या चैनीच्या जिनसा तयार करण्यांतच भांडवल गुंतवितात व त्या मालाची मागणी कृत्रिम रीत्या लोकांत उत्पन्न करितात. कधीं-कधीं खाजगी भांडवलवाले आपला प्रांत दरिद्री आहे. तेथें भांडवल गुंतविलें तर तितका फायदा होणार नाहीं. (मग आपल्या प्रांतांतल्या समाजाचा कांहींही फायदा होवो.) म्हणून इतर प्रांतांत भांडवल गुंतवितात.भांडवलशाहीचा असा परिणाम झाला आहे कीं,पैसा सगळा शोकी व आळशी लोकांच्या हातीं जाऊन ते वाटेल तशी चैन करतात व आपली जबाबदारी पार झुगारून देतात. मग देशसेवा, समाजसेवा त्यांना मुळींच आठवत नाहींत. गहाणदारी व व्याजबट्टासुद्धां राष्ट्रहिताच्या आड येत असतां चालूंच आहे कारण व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व अजून प्रचारांत असून राष्ट्रांतील प्रत्येक माणसाच्या फायद्याची बेरीज म्हणजेच सर्व राष्ट्राचा फायदा असेंच लोकांस वाटत आहे. अशा तऱ्हेनें कॅपिटॅलिस्ट पद्धतीमुळें किती जुलम व अन्याय चालू आहे ह्याची सोशालिझमला जशी चीड आलेली आहे, तशीच फॅसिझमलाही आलेली आहे. व फॅसिझमनें आणखीही या भांडवलशाहींत कित्येक दोष दाखविले आहेत. फायद्याकरितां मालाची पैदास, लोकांची मागणी आहे म्हणून नव्हे, हेंच तत्त्व अमलांत आणलेलें दिसत आहे. ज्या गांवाहून मासे, खवा, फळभाज्या, इत्यादि मालाची पैदास होते, त्या गांवाच्या लोकांना ते जिन्नस दुर्मिळ होतात व शहरांत जाऊन न खपल्यामुळें परत शिळे होऊन नासून आले कीं,मग गांवच्या लोकांना मिळावयाचे. असा चमत्कार दृष्टीसपडतो.फॅसिस्टांना हेंही दृष्टीस पडत आहे कीं, शेतकऱ्यांची शेती सोडून मजूरी करण्याकडे प्रवृत्ति वाढूं लागली आहे. व त्यामुळें खेडीं ओस पडूं लागलीं आहेत. शहराची वस्ती दाट होऊं लागली आहे. व त्याबरोबर शहराचे आरोग्यालाही धक्का बसला आहे. मजूर वर्गाची स्थिति सुद्धां खालावून त्याला आपलें कर्तृत्व दाखविण्यास जागाच नाहीं व त्याच्या गुणांचा असा लोप झाल्यामुळें तेथें दुर्गुणांनीं ठाणें दिलेलें दृष्टीस पडतें. व्यसनांनीं आर्थिक स्वातंत्र्य लयास गेलें आहे, व मजुरी व विश्रांति हीं आपल्या मताप्रमाणें विभागण्याची मुभा मजुराला राहिलेली नाहीं. म्हणून फॅसिझम ह्या सर्व अरिष्टांचें मूळ जी भांडवलशाही ती कशी नष्ट होईल याचा विचार करीत आहे. या भांडवलशाहीनें जनतेचा मानसिक व शारीरिक ऱ्हास होऊन संस्कृतिच रसातळाला जाईल.अशी फॅसिझमला भीति वाटत आहे.

आतां फॅसिझमनें कोणते उपाय सुचविले आहेत हें

पाहूं.प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं,व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व फॅसिझमला मुळींच मान्य नाहीं.राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या फायद्याची गोळाबेरीज केली असतां ती सर्व राष्ट्राच्या फायद्याइतकी होत नाहीं. शिवाय केवळ अर्थशास्त्रानें भागणार नाहीं,त्याला समाजशास्त्राची जोड देऊन एक नवीनच संघटनात्मक शास्त्र तयार केलें पाहिजे असें फॅसिझमला वाटतें. नैतिक कायद्याला सोडण्यास फॅसिस्ट तयार नाहीं. नैतिक नियम हाच खरा मार्गदर्शी आहे असें फॅसिस्टास वाटतें. म्हणून फॅसिझमचें पहिलें तत्त्व हें कीं, व्यक्तीचें बाह्य जीवन हें त्याच्या नैतिक जीवनाचें (तो ज्या नैतिक प्रमाणांना मान देतो त्यांचें) प्रतिबिंब आहे. म्हणून सदोष आर्थिक परिस्थितींतून मुक्त व्हावयाचें असेल तर त्या पद्धतीचें मूळ जो सदोष नैतिक दृष्टिकोण तो बदलला पाहिजे. ह्याला योग्य उपाय म्हणजे नैतिक श्रेष्ठतेचें शिक्षण देणें. ह्यापुढची पायरी म्हणजे फॅसिस्टांप्रमाणें स्वतःकरितां स्थावर मिळकत करण्याची संधि मिळणें हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. जमीनजुमला करण्याचा हक्क व तो वंशपरंपरा वारसांना देण्याचा हक्क हे दोन फॅसिस्ट आर्थिक परिस्थितीचे आधारस्तंभ आहेत. म्हणून खाजगी मालकीला विशेषतः मजुराशिवाय चालणाऱ्या लहान उद्योगधंद्याच्या मालकीला ज्या रीतीनें उत्तेजन मिळेल तें करण्यास फॅसिझम तयार झाला आहे. इटलीमध्यें असे जमीनदार व भागीदार पुष्कळच आहेत. शेतकीजमीन असणारे शेतकरी, स्वतःचें दुकान असलेले लहान लहान दुकानदार, लहान पण स्वतंत्र व्यापारी, स्वतःचीं हत्यारें असणारे कामगार, कारागीर, हा जो वर्ग त्यालाच इटलींत फॅसिझम विशेष मान देतो. इटलींतील प्रत्येक खेडें म्हणजे स्वतंत्र शेतकरी, दुकानदार व कारागीर यांची एक वसाहत होय. व दोन खेड्यांमध्यें मोठा जमीनजुमला असणाऱ्या जमीनदाराची जमीन अर्धेलीनें लावणाऱ्या शेतकऱ्यांची दुसऱ्याच प्रकारची सहकारी घटना दृष्टीस पडते. इटलींतील शेतकरी खाऊनपिऊन सुखी दिसतात, व मजुरांपेक्षां ते निःसंशय गुणांनीं श्रेष्ठ वाटतात. व हा वर्ग सर्व इटलीभर वाढावा अशी सरकारची खटपट चालू आहे. फॅसिस्टांच्या सहकारी चळवळीमध्यें हा वर्ग इतका बळकट झाला आहे कीं, औद्योगिक उत्कर्ष (Industrialism) व व्यापार यांच्याशीं टक्कर देण्यास तो डरणार नाहीं. शहरांतील शिक्षणाचीं व करमणुकीचीं साधनें व आर्थिक सवलती खेड्यांतील लोकांना मिळण्याची तरतूद फॅसिस्ट करीत आहेत. खेड्यापाड्यांची सुधारणा करण्याचें फॅसिस्टांनीं मनावर घेतलेलें आहे. आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाहापुरतें मिळविणाऱ्या या वर्गाबरोबरच सहकार्याचे तत्त्वावर मालाची पैदास करणाऱ्याच्या वरही फॅसिझमची कृपादृष्टि आहे. एकमेकांशीं सहकार्य करून भांडवल उभारून एकाच तऱ्हेचा धंदा करून हे लोक नफा आपापसांत वांटून घेतात. हेसुद्धां स्वतंत्र शेतकऱ्याइतकेच स्वतंत्र आहेत. व ह्यांना सरकार उत्तेजन देत आहे. ह्याशिवाय वकील, डॉक्टर, चित्रकार, उपाध्याय, इंजिनियर, वगैरे धंदेवाईक लोकांचा तिसरा एक वर्ग आहे. ह्या तिन्ही वर्गांची उन्नति होऊन राष्ट्राचीही भरभराट व्हावी अशी फॅसिझमची इच्छा आहे. (शिवाय एक कामगारांचा वर्ग आहे. हे कामगार जी कांहीं मालाची पैदास करतात ती फक्त उदरपोषणार्थ. फायद्याकरितां नव्हे). आपण मोठ्या भांडवलवाल्यांकडे वळलों कीं खाजगी मिळकतीच्या हक्काला पुरवणी जोडण्याची जरूरी भासूं लागते. व ती फॅसिझमनें जोडलेली आहे. कोणच्याही तऱ्हेची मिळकत असो, ती Public trust म्हणून समजली जाईल. हें फॅसिस्टांच्या आर्थिक धोरणाचें एक मूलतत्त्व आहे. सार्वजनिक हिताला जें बाधक होईल तें करण्याचा कोणासहि हक्क नाहीं. स्वतःचें हित व नफानुकसानी सार्वजनिक नफानुकसानीशीं मिळती घेतली पाहिजे. तेव्हां कितीही मोठें भांडवल झालें तरी तें राष्ट्राच्या हिताला धोक्याचें न होईल अशाच तऱ्हेनें त्याचा विनियोग केला पाहिजे. याशिवाय फॅसिस्टांचें दुसरें एक तत्त्व आहे. तें हें कीं, एकजिनसी राष्ट्रीय संपत्ति जास्तींत जास्त एवढ्याच प्रमाणांत वाढवितां येईल कीं, त्यामुळें सुसंघटित समाजरचनेचा समाजस्वास्थ्याचा बिघाड होणार नाहीं. राष्ट्रांत मजूरवर्ग हा राहणारच. ह्या वर्गाचें (Proletariat) आर्थिक जीवन सर्वस्वीं दुसऱ्यावर अवलंबून असतें.त्यांना योग्य काम देणें,कामकऱ्यांच्या जाहीरनाम्याच्या रूपानें त्यांना विशिष्ट हक्क देणें, आपलें जें हित तेंच आपण जेथें काम करतों त्या उद्योगधंद्याचें हित व आपण कामकरी म्हणजे राष्ट्राचे सैनिक आहों हा विश्वास त्यांच्या मनांत उत्पन्न करणें त्यांना आपली उन्नति करून घेण्याची संधि वारंवार देणें, व शेवटीं मालक व मजूर

यांचेमध्यें सामाजिक दळणवळण वाढविणें व स्नेहभाव उत्पन्न करणें अशा तऱ्हेनेंच या मजूर-वर्गाची उन्नति करतां येईल. मजूर व मालक यांच्यामधील परस्परांविषयीं गैरसमजुतीनें झालेला वियोग, वितुष्ट व जातिवैमनस्य नाहींसें करण्याकरितां समाजाची सहकार्याचे तत्त्वावर पुनर्घटना करण्याचें फॅसिझमनें योजिलें आहे. अशी पुनर्घटना केल्यानें सरकारलाही सार्वजनिक हिताला बाधक होणाऱ्या जातीच्या अभिमानाला व व्यापारधंद्यांतील वैयक्तिक स्वार्थाला आळा घालणें सोपें जाईल. व मालकी हक्क म्हणजे सार्वजनिक ट्रस्ट आहे हें तत्त्व प्रचलित करतां येईल. मालाची पैदास, आयात निर्यात हीं समाजसत्तेखालीं आणावयाचीं असतील तर, सोशालिस्टाप्रमाणें त्यांचें राष्ट्रीकरण केल्यानें भागणार नाहीं. सरकारचा त्यावरील ताबा कडक पाहिजे व तो ताबा सरकारचे प्रतिनिधि व खाजगी उद्योगधंदेवाल्यांचे प्रतिनिधि यांच्यामधील सहकार्यानेंच चालला पाहिजे. ह्या सहकारी पद्धतींतून कोणीही व्यापारी, उद्योग–धंदेवाला, भांडवलवाला निसटतां कामा नये. या तत्त्वावरच फॅसिस्ट सरकारनें समाजाला सहकारी संस्थेचें रूप देण्याचें ठरविलें आहे. या योगानेंच सर्व प्रश्न हळू हळू जसजसा जास्त अनुभव येईल तसतसे सुटतील अशी फॅसिस्टांची खात्री आहे.

प्रत्येक उद्योगधंद्यांतील लोक संघाच्या द्वारें एकत्र येऊन त्यांना सार्वजनिक हिताचीं कामें करण्यास संधि मिळते. गैरसमजुती नाहींशा होतात. मजुरांची स्थितिही मालकाशीं गोडी झाल्यामुळें सुधारते. मालकाला मजुराविषयींची जबाबदारी टाळतां येत नाहीं व सर्वाधिष्ठित सत्ता सरकारची असल्यामुळें, मालक व मजूर यांच्यामध्यें राष्ट्रीय वृत्तीची वाढ होते, व आपला धंदा राष्ट्राचे हिताकरितां आहे अशी मनोवृत्ति होते. मालक–मजुरांचे तंट्यांत राष्ट्राचें नुकसान होऊं देतां कामा नये असें फॅसिझमला वाटतें म्हणूनच न्यायदानांत सुद्धां सरकारनें आपलें वर्चस्व ठेवलें आहे.

इटालियन फॅसिस्टांची राज्यघटनाः— इटलीमध्यें राजसत्तात्मक राज्यपद्धति चालू आहे व ती बळकट करण्याचा फॅसिस्टांचा विचार आहे. हल्लीं मुसोलिनीसारख्या कर्तबगार व्यक्तीपुढें राजाचें तेज फिकें पडतें ही गोष्ट खरी आहे. पण मुसोलिनीसुद्धां स्वतः, राजाचा मान रहावा, व जनतेमध्यें त्याच्याविषयीं आदर रहावा अशी खटपट करीत आहे. राजा जरी राज्यपदावर असला तरी त्याला सत्ता मुळींच नाहीं. जो बहुसंख्याक वरचढ पक्ष असेल त्यांतून एका सभासदाला मुख्य प्रधान नेमणें एवढाच एक त्याचा हक्क आहे.

फॅसिझमनें पक्षघटित पाक्षिक राजकारणाला फांटा दिलेला आहे. तरी फॅसिझम हा अजून एक बहुसंख्याक पक्षच आहे. फॅसिस्टचे दोन अर्थ होतील. एक ज्याला फॅसिझमचीं तत्त्वें मान्य आहेत व फॅसिस्ट मनोभूमिका आहे तो; व इटालीमधील हल्लींचा अधिकारारूढ क्रांतिकारक पक्षाचा सन्मान्य सभासद हा दुसरा. सर्व देश अजून फॅसिस्ट पंथाचा झाला नाहीं. पण तो करण्याचा फॅसिस्टांचा निश्चय आहे.

हल्लींचें ग्रँड फॅसिस्ट कौन्सिल हें फॅसिस्ट पक्षाचें आहे. राष्ट्रीय नाहीं. अजून बरेच देशभक्तीनें प्रेरित झालेले लोकसुद्धां फॅसिस्ट पंथीं झालेले नाहींत. ह्या कौन्सिलचा सभासद फॅसिस्ट पक्षाचाच असला पाहिजे फॅसिस्ट राज्यघटनेमध्यें प्रथम एक नामधारी राजा असतो. त्याला सत्ता मुळींच नसते, व तो ज्या मुख्य प्रधानाला हक्कानें निवडतो, तोच प्रधान त्याच्या नांवानें राज्यकारभार पाहतो. नंतर एक तीस सभासदांचें कौन्सिल असतें, व हे सभासद निरनिराळ्या शैक्षणिक व औद्योगिक संस्थांतर्फे निवडलेले व राजकारणकुशल असतात. यांतूनच राजा मुख्य प्रधान निवडतो. मुख्य प्रधान हा निरनिराळ्या खात्यांच्या प्रधानांचा मुख्य असतो. तोच हे प्रधान निवडतो. वरिष्ठ कार्यकारी मंडळाला समांतर असें पूर्वीं वर्णन केलेलें राष्ट्राचें कॉर्पोरेटिव्ह ऑर्गनायझेशन असतें. ह्याला कनिष्ठ कार्यकारी मंडळ म्हणतां येईल. ह्या दोन कार्यकारी मंडळांच्या हातांतच राज्यकारभाराचीं 'सर्व सूत्रें' असतात. पण तीं सर्वशक्तिमान नसून, त्यांची सत्ता सनदशीर उपायांनीं नियंत्रित केलेली आहे. जे कायदे इतर सर्वसामान्य नागरिकांना तेच या कार्यकारी मंडळाला असतात. सिनेट व चेंबर ऑफ डेप्युटीज् हे कायदेमंडळाचे दोन भाग होत ह्यांनाच कायदे करण्याचा अधिकार असतो. राजपुत्र व निरनिराळ्या धंद्यांत कीर्ति मिळविलेले ४० वर्षांवरील लोक ह्यांची सीनेटमध्यें नेमणूक जनतेच्या सेवेचें बक्षिस म्हणून केली जाते. चेंबर ऑफ डेप्यूटीज्मध्यें मजूर, भांडवलवाले, शैक्षणिकव सार्वजनिक हिताच्या संस्थांनीं निवडलेले प्रतिनिधि असतात. या दोन गृहांच्याच्या संमतीनेंच नवीन कायदे केले जातात व अमलांत येतात.

त्यांना कार्यकारी मंडळावर टीका करतां येईल, दुरुस्त्या सुचवितां येतील, पण त्यांना तें मंडळ बरखास्त करतां येणार नाहीं.ज्या कायद्यांनीं राज्य-घटनेंतच फेरफार होत असेल असे कायदे करण्यास ग्रँड फॅसिस्ट कौन्सिलची संमति लागते. ही फॅसिस्टांची राज्यघटना, त्यांच्या विशिष्ट तत्त्वाचेंच प्रतिबिंब होय. ही घटना म्हणजे सर्व राष्ट्राचीच संघटना होय. प्रत्येक व्यक्ति कोणत्याना कोणत्या प्रकारानें हें राज्ययंत्र चाल-विण्यांत भाग घेते. ह्या राज्यघटनेची पिरा-मिडशीं तुलना करतां येईल. पिरॅमिड जसा रुंद पायावर उभारलेला असतो व त्याच्या सर्व बाजू एका टोकांत संलग्न होतात. त्याचप्रमाणें ह्या राज्यघटनेंत वर सर्वसत्ताधीश कार्यकारीमंडळ व त्याखालीं उत्तरोत्तर कमी अधि-कार असलेलीं अधिकारमंडळें असतात.

फॅसिझमवरील आक्षेप

मुसोलिनीच्या अमदानींत व्यक्तिस्वातंत्र्य अगदीं मर्यादित झालेलें आहे असा एक आक्षेप आहे. पण तो फॅसिझमला बाधक नाहीं. इटलींतील राजकारणी लोकांनाच त्यांचेकडील परिस्थितीचें योग्य ज्ञान असणार. इटली हें क्रांतीच्या धगींतून अजून बाहेर पडलें नाहीं. तेव्हां व्यक्तिस्वातंत्र्य या संक्रमणकाळांत किती द्यावयाचें हें तेथील सरकार-नेंच ठरवावयाचें आहे. उदाहरणार्थ इटलींत मुद्रण-स्वातंत्र्यावर नियंत्रण घालणारे कायदे झालेले आहेत. ते मोडले तर फिर्याद होऊन, शिक्षा होते. पण हे कायदे नैमित्तिक कारणाकरतांच केलेले आहेत. विद्यमान परिस्थितींत मुद्रणस्वातंत्र्य मर्या-दित करणें अवश्य आहे. व ह्या कडक अंमलबजा-वणीनें वर्तमानपत्रें निःसत्त्व, निर्जीव झालीं आहेत हेंहि फॅसिझम जाणतो. पण क्रांतियुगांत हें अपरि-हार्य आहे. येथें तत्त्वांचा प्रश्न येत नसून हा व्याव-हारिक नैमित्तिक राजकारणकुशलतेचा प्रश्न आहे. जसें स्वातंत्र्याविषयीं तसेंच परमतसहिष्णुते-संबंधीं व धार्मिक मतासंबंधीं. सहिष्णुता म्हणजे बेफिकिरपणा, उदासीन वृत्ति नव्हे असें फॅसिझम्ला वाटतें.

फॅसिझम्ला जें हल्लीं इटलींत महत्त्व आलेलें आहे तें इटलींत राष्ट्रीय वृत्तीचा उदय झाल्यामुळेंच. फॅसिझम् व स्वदेशाभिमान या दोन मनोवृत्ति आहेत. व हल्लीं इटलीमध्यें या दोन्ही एकमेकांत मिसळून गेलेल्या आहेत. घटनेंसुद्धां बदलत्या परिस्थितीला योग्य असे फेर-फार करणें अवश्य आहे, आधुनिक संस्कृति, संस्कार यांना भिऊन चालणार नाहीं, असें फॅसिझमला वाटतें. हल्लीं इटलीच्या परिस्थितीमध्यें आपणांस इटलींत निरनिराळ्या मताचे लोक आहेत तेहि आपणास फॅसिस्ट म्हणवितात. शिवाय स्वार्था-करितां या चळवळींत पडलेले, आणि फॅसिझम कशाशीं खातात हें न समजणारे पण अंतःकरणां-तील उमाळ्याला कृतीच्या रूपानें उत्तर देणारे अशिक्षित लोकहि फॅसिस्ट चळवळींत पडलेले आढळून येतात. अशा रीतीनें हा सांवळा गोंधळ आहे असें वाटेल.पण प्रत्येक नवीन चळवळीचें असेंच आहे. प्रथम लोक अंतस्फूर्तीनें चळवळींत पडतात. त्या चळवळीवर वादविवाद चर्चा होते, तत्त्वबोध बाहेर येतो, या तत्त्वांना अनुसरून कृति करणारे पुन्हां नवीन लोक येतात. अशा रीतीनें चळवळीचा ओघ वहात असतो. व शेवटीं एखादा कर्तबगार मनुष्य अवतरतो. परिस्थितीशीं झगडून आपला पगडा बसवतो व त्या चळवळीला योग्य चालना देतो. अशाच रीतीनें फॅसिझमच्या चळवळीला मुसोलिनीसारखा कर्तबगार पुढारी लाभला व म्हणूनच चळवळ भराभर फोंफावत आहे. त्यानें फॅसिझमला योग्य वळण लावलें आहे. या नाहीं त्या कारणानें पुष्कळ लोक मुसोलिनीच्या विरुद्ध आहेत. तो कोणाच्या स्वार्थाच्या आड येतो, कोणाच्या स्वातंत्र्याच्या आड येतो, कोणाला त्याचा हेवा तिटकारा वाटतो. पण ही कोती दृष्टि टाकून जर निःपक्षपातीपणानें विचार केला तर फॅसिस्ट पुढाऱ्यांची कर्तबगारी नीट पारखतां येईल व फॅसिझमची भविष्यरेषा दांडगी आहे असें दिसेल.

देशी उद्योगधंदे

१ मुंबई इलाख्यांतील देशी उद्योगधंदे

मुंबई इलाख्यांतील बहुतेक उद्योगधंद्यांना व्यापारमंदीची झळ कमी अधिक प्रमाणांत लागलीच. मालाच्या किंमती उतरल्यामुळें बहुतेक कारखान्यांची प्राप्ती कमी होऊन नुकसानीच पदरांत पडली. बऱ्याचशा धंद्यांत परदेशी मालाची आयात मोठ्या प्रमाणांत होत असल्यामुळें तिची जागा भरून काढण्याकरितां हातपाय हालविण्यास देशी उद्योगधंद्यांना पुष्कळ वाव आहे.

कापड—मुंबईमध्यें कापडाच्या ९१ गिरण्या आहेत. त्यांपैकीं २७ गिरण्या नुकसानींत चालल्या. सोलापूर येथील ४ गिरण्यांनीं मात्र ६ पूर्णांक एक द्वितीयांश लाख रुपयांचा नफा जाहीर केला. खानदेशमधील एका गिरणीनेंही नफा जाहीर केला. अहमदाबाद येथें ६१ गिरण्या आहेत. त्यांपैकीं कांहीं तोटच्यांत चालल्या असल्या तरी सर्वांना मिळन ४८ लाख रु. वर नफा झाला. मात्र कांहीं गिरण्यांना मुदलावर व्याजहि सुटलें नाहीं. आयात मालावर शें. २५ जादा जकात बसविल्यामुळें कापड धंद्याला एवढी तरी बरी स्थिति लाभली. १९३० सालीं इलाख्यांत गिरण्यांची संख्या २२० असून त्यांत काम करणाऱ्या मजुरांचा आकडा २,९२,४८८होता. पण हेच आंकडे १९३१ सालीं खालीं उतरून २१८ व२,९०,३५७ झाले.

लोकर:—इलाख्यांत लोकरीच्या फक्त दोनच गिरण्या चालू होत्या. १९२० सालीं त्यांची संख्या ५होती, ती १९२९सालीं तिहींवर उतरली; आणि त्याच वर्षाच्या अखेरीस एकीनें दिवाळें काढलें. १९३० पेक्षां १९३१ सालीं मालाची पैदास शें. ४ नें वाढली. पण त्याची किंमत शेंकडा ३१ नें कमी झाली आणि ती फक्त२२,११,१५९रु.आली. लोकरीच्या आयातीला झपाट्यानें उतार लागला. १९२९ सालीं तिची किंमत १ कोटी ७३लक्ष होती. तीच १९३० सालीं सुमारें ७५ लाख झाली. पण १९३१ सालीं ८७ लाखावर गेली.

होजिअरी:—सुमारें १३लाख रुपयांचा माल १९३० सालीं तयार झाला. १९२९ सालीं १६ लाख रुपयांचा होजिअरीचा माल तयार झाला होता. त्या दोन वर्षांतील आयात अनुक्रमें २२ लाख व ४१ लाख रु. होती. या धंद्याची वाढ होण्याला पुष्कळ वाव आहे.

गॅस मँटल्स:—याचे दोन नवीन कारखाने निघाले असून त्याची स्थिति समाधानकारक आहे. गॅस मॅन्ट्ल्स्चा सबंध हिंदुस्थानांतील आयातीचा आकडा १९२९–३० सालीं ८.४१ लक्ष रुपये व १९३१–३२ सालीं ३.९३ लक्ष रु. आहे; म्हणून या धंद्याला चांगलाच वाव आहे.

रासायनिक पदार्थ:—सबंध इलाख्यांत रासायनिक द्रव्यें तयार करणारे तीन मोठ कारखाने आहेत. त्यांना हें वर्ष वाईट गेलें व दोघांना तर प्रत्यक्ष नुकसानच आलें. १ आक्टोबर १९३१ पासून रासायनिक द्रव्यांच्या आयातीवर हिंदुस्थान सरकारनें जकात वाढविली आहे. तेलें, दंतमंजनें, डोक्याला लावण्याचे वास, सुगंधी अत्तरें इत्यादि पदार्थांची निपज झपाट्यानें वाढत आहे.

साखर:—साखरेच्या दोन गिरण्या इलाख्यांत चालू होत्या. साखरेच्या आयातीवर जादा जकात बसविल्यामळें दोनही गिरण्यांचा संसार सुखानें चालला होता. एका गिरणींत २३ लक्ष २७ हजार रु. किंमतीची ६,९८५ टन साखर तयार करण्यांत आली, आणि तिला ६ टक्के डिव्हिडंड देतां आलें. दुसरा कारखाना लहान असून त्यांतून फक्त ३०० टन साखर निघाली. याशिवाय पुण्याजवळ ३ लक्ष रु. भांडवलावर एक "स्वदेशी शुगर कंपनी" निघणार होती. १९३० सालीं साखरेची आयात ४,४४,७६६ टन म्हणजे ५ कोटी ८ लाख रुपये किंमतीची होती. ती १९३१ सालीं २,४२,२४७ टनांवर व २ कोटी ५८ लक्ष रु. वर उतरली. देशी साखरेला काबीज करण्याला मोठी बाजारपेठ मोकळी आहे.

आगपेट्या:—इलाख्यांत आगपेट्यांचे एकंदर १५ कारखाने होते. त्यांतील २ संस्थानांत होते. पूर्वीच्या कारखान्यांपैकीं एकाला कुलप लागलें. आणि दुसऱ्यानें दक्षिण हैद्राबादकडे कूच केलें.

पण एक नवा कारखानाहि स्थापण्यांत आला. सर्व कारखान्यांत मिळन ६८ लाख रु. भांडवल खेळत होतें व ५ हजार लोक काम करीत होते. सुमारें ८८ लाख ग्रोस आगपेटचा या कारखान्यांतून तयार होऊं शकतात. तरीहि परदेशांतून सुमारें एक लाख ग्रोस आगपेटचा इलाख्यांत आल्या व जवळ जवळ एक लाख रुपये परदेशाला गेले.

कागदः—कागदाच्या तीन गिरण्या चालू होत्या. पकीं एक गिरणी कामाच्या टंचाई-मुळें मार्च १९३१ पासून बंद होती. सर्व गिरण्यांत मिळून ६२८ माणसें काम करीत होतीं, आणि तीं १० लाख २३ हजार रु. किंमतीचा २६९० टन कागद तयार करीत होतीं. तथापि परदेशांतून सुमारें ४० हजार टन कागद येथें आला आणि त्यामुळें १ कोटीवर रुपये स्वदेशाला मुकले. कागदाच्या गिरण्यांनीं यावर्षी प्रथमच डिव्हिडंड दिलें.

कांचः—रजिस्टर झालेला कारखाना एक असून रजिस्टर न झालेले तीन होते. त्यांतील कामगारांची संख्या ५०० होती. त्यांतल्या मालाची किंमत फक्त तीन पूर्णांक एक द्वितीयांश लाख रु. असून आयात कांचमाल त्याच्यापेक्षां सुमारें २० पट होता, आणि किंमत ६८ लाख रु. वर होती. अहमदाबाद येथील कारखान्यानें सोडावॉटरच्या बाटल्या बनविण्यास सुरुवात केलेली आहे. बांगड्यांचा एक कारखाना कांदिविली येथें चालू होता. त्यांत ३६ लाख बांगड्यांच्या जोड्या तयार होत, आणि त्यांची किंमत २ लक्ष ६० हजार रुपये होती. पण, परदेशाहून यणाऱ्या बांगड्यांची संख्या मोठी होती. सबंध हिंदुस्थानांत ३४ पूर्णांक एक द्वितीयांश लाख रु. किंमतीच्या बांगड्या आल्या. त्यांपैकीं सुमारें २४ लाख रु. च्या बांगड्या मुंबई आणि कराची याच बंदरांनीं घेतल्या. स्वदेशी बांगड्यांना पुष्कळच गिऱ्हाईक मिळण्यासारखें आहे.

तेलाच्या गिरण्याः— १९३०–३१ सालीं तेलाच्या गिरण्या एकंदर दहा होत्या, पण त्यांतील एकीचें दिवाळें वाजल्यामुळें १९३१–३२ सालीं नऊच गिरण्या सुरू होत्या. वरील रजिस्टर केलेल्या नऊ गिरण्यांशिवाय आणखी लहान लहान ११३ गिरण्या इलाख्यांत आहेत. एकंदरींत या धंद्यालाही हें वर्ष चांगलें गेलें नाहीं.

वनस्पतिजन्य तूपः—या तुपाच्या पैदाशीकरतां एका विशिष्ट रोपटचाची लागवड करण्यासाठीं मुंबईंत एक प्रचंड आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन झाली आहे. लागवड तयार झाली असून लवकरच प्रयोग सुरू करण्यांत येतील. सबंध हिंदुस्थानांत १९२९–३० सालीं या तुपाची आयात १६०५६ टन व १९३१–३२ सालीं ५८४२.४५ टन झाली. घटलेली आयात व सध्यां चाललेले लागवडीचे व पैदाशीचे प्रयत्न यांवरून नवीन लोकांना किंवा संस्थांनाही या धंद्यांत सध्यां तरी वाव मिळणार नाहीं.

साबणः—रजिस्टर्ड कंपनी एक असून ३४ रजिस्टर न केलेल्या होत्या आणि लहान लहान कारखाने तर पुष्कळ ठिकाणीं चालू होते. हल्लीं हिंदुस्थानांतील ३१४ कारखान्यांत तयार होणारा कपड्याचा व अंगाचाही साबण परदेशी साबणाइतकाच उत्तम असतो. १९२९–३० सालीं साबणाची आयात ४५ लक्ष रुपयांची व १९३१–३२ सालीं सुमारें ४० लाख रुपयांची झाली. हा धंदा पुष्कळच वाढवितां येण्यासारखा आहे.

इंजिनियरिंगः—सध्यां ३२ रजिस्टर्ड एंजिनियरिंग कंपन्या असून लहानमोठ्या सर्व कंपन्यांची संख्या सुमारें १४३ आहे. बहुतेक कंपन्यांतून सामान्यतः दुरुस्तीचें काम चालतें. नुकत्याच मुंबई येथें भरलेल्या प्रदर्शनांत ठेवलेले हिंदुस्थानांत तयार झालेले विणकामाच्या यंत्राचे सुटे भाग खरोखरीच चांगले साधले होते, व म्हणून या धंद्याची भरभराट होईल अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. तरीसुद्धां गेलें वर्ष या धंद्याला वाईटच गेलें.

कलाबतूचें व जरतारी कामः— सोनें व रुपें यांच्या भावांतील विलक्षण चढउतार या धंद्याला फार भोंवला.

सिगारेटः—पूर्वीच्या ५ कारखान्यांना नव्या ६ कारखान्यांची जोड मिळाली. त्यांत ४०० माणसें काम करीत होतीं. या ११ कारखान्यांनीं १६ पूर्णांक एक द्वितीयांश लाख रु. च्या सिगारेट तयार केल्या. तरीही परदेशी सिगारेटींनीं ५० लक्ष रुपये परदेशीं नेले. सिगारेटचा मध्यम दर्जाचा कारखाना काढण्यास सुमारें २ लक्ष २० हजार रु. खर्च येतो, त्यांपैकीं ६० हजार रुपये यंत्रांना द्यावे लागतात.

घड्याळें:—मुंबईस दोन व पुण्यास एक असे तीन कारखाने चालू होते. पैकीं मुंबई येथील विजेच्या घड्याळांच्या कारखान्यानें आपलीं घड्याळें संस्था व संस्थानें यांना पुरविलीं, व तीं उत्तम काम देत आहेत. तेथील दुसऱ्या इंडियन क्लॉक कंपनीनें मनोरी घडाळें (Tower–

Clocks) बनविलीं. पुण्याच्या 'हिंदुस्थान क्लॉक्' कंपनीनें संयुक्तप्रांत सरकारची मागणी स्वीकारिली.

विणकामः—हा धंदा बैठा धंदा म्हणून महत्त्वाचा आहे. १ लाख हातमाग चालू होते व त्यावर ४ पूर्णांक एक द्वितीयांश कोटी रु. चें कापड निघालें. विणकऱ्यांकरतां एक व शेतकऱ्यांकरतां एक अशा दोन प्रकारच्या विणकामाच्या शाळा चालू असून त्यांची संख्या अनुक्रमें ७ व ? अशी होती. लोकरीच्या विणकामाचें प्रदर्शन दाखवून कांबळी विणण्यांत कशी सुधारणा करतां येईल हें शेतकऱ्यांना शिकविण्यांत आलें. त्यांच्यासाठीं एक सुधारलेला चरका तयार करण्यांत आला. त्याच्यावर एका तासांत १९८८ वार लोकर कातली जाते, आणि कातणाऱ्याचे दोनही हात मोकळे राहातात. त्याची किंमत रु. १० आहे. तथापि त्याचें स्वागत व्हावें तसें झालें नाहीं. पुणें येथें जून १९३० पासून सरकारी विणकामाची शाळा चालू आहे.

नवीन उद्योगधंदे

खोटीं मोत्यें व कांचेचे मणीः—मुंबईंत खोटीं मोत्यें व कांचेचे मणी तयार करण्याकरितां नुकताच एक कारखाना उघडण्यांत आला. कारखान्याचें काम एप्रिल १९३१ मध्यें सुरूं झालें व थोडयाच दिवसांत त्याच प्रकारच्या जपानी मालाला तोंड देतां येईल इतकी प्रगति कारखान्यानें केली. १९२९-३० सालीं ३१ लक्ष रुपयांचीं व १९३१-३२ सालीं ९लक्ष रुपयांचीं खोटीं मोत्यें व कांचेचे मणी बाहेर देशांतून हिंदुस्थानांत आले.

कार्बन पेपर्स, टाइपरायटर रिबन्स व स्टँप पॅडसः—या मालाला देशांत सर्वत्र चांगली मागणी आहे व म्हणून हा माल तयार करणारा एक कारखाना कराची येथें नुक्ताच उघडण्यांत आला. हा कारखाना जर्मनींत शिकून आलेल्या एका हिंदी तज्ज्ञानें चालविला आहे. मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यांत वापरला जाणारा कार्बन पेपर या कारखान्यांतलाच असतो.

पिकर्सः—(धोटा उचलणारी चामड्याची बाहुली). म्हशी व रेडे यांच्या कच्च्या कातडयापासून चामडयाचे पिकर्स तयार करण्याचा एक नवीन कारखाना धारावी (माहीम) येथें उघडण्यांत आला. या पिकर्सचा उपयोग कापसाच्या गिरणींत होत असून या कारखान्यांत तयार होणारे पिकर्स परदेशी पिकर्सइतकेच उत्तम व टिकाऊ असतात. मुंबई व अहमदाबाद येथील कैक गिरण्या हल्लीं धारावीचेच पिकर्स वापरतात.

केशियनः—(दुग्धज,दुग्धवीर्य) महायुद्धाच्या वेळेपासूनच खेडा जिल्ह्यांतील लहान लहान डेऱ्यांनीं केशियन तयार करण्यास सुरुवात केली होती. सध्यां सबंध मुंबई इलाख्यांत खेडा जिल्हा हें केशियनचें केंद्र बनलें असून येथें हल्लीं बऱ्याच मोठ्या प्रमाणावर केशियन तयार करण्यांत येतें. परदेशीं पाठविण्यांत येणाऱ्या केशियन पैकीं शेंकडा ९० केशियन एकटा जर्मनी घेतो.

स्प्लिट (विभक्त) पुलीजः—डब्ल्यू. आय. स्प्लिट् पुलीज् (कप्पी) तयार करण्याकरतां मुंबईला नुकताच एक नवीन कारखाना उघडण्यांत आला. येथें तयार होणाऱ्या पुलीज् ८ इंच व्यासापासून ९६ इंच व्यासापर्यंतच्या असतात. परदेशाहून येणाऱ्या कोणत्याही पुलीजपेक्षां आमच्या पुलीज शें. २४ स्वस्त असतात असें कारखानदारांचें म्हणणें असून, गुणांमध्यें या पुलीज् परदेशी मालाच्या तोडीस तोड आहेत.

भांडवलाची नवीन गुंतवः—यंदाचें वर्ष व्यापाराच्या दृष्टीनें जरी सर्वांना बरेंच वाईट गेलें तरी या वर्षी मुंबई इलाख्यांत पुष्कळच नवीन कंपन्या व कारखानेही निघण्याचें नवकी ठरून भांडवल जमत आहे. पुढें दिलेल्या कोष्टकावरून नवीन कारखाने व त्यांचें भांडवल यांची उत्तम कल्पना येईल.

कारखान्याचें अगर कंपनीचें नांव.	अधिकृत भांडवल. आंकडे लाख रुपयांचे.
१. तिजोऱ्या व गल्ल्याच्या पेट्या (Cashboxes) यांचा कारखाना	८
२. एंजिनियरिंग कंपन्या (७)	६.१५
३. सिगारेटचा कारखाना	२.१२५
४. सिनेमा कंपन्या (५)	१८
५. आगपेटयांचा कारखाना	१.०
६. रसायन कंपन्या (५)	४.८
७. मोटार वर्क्स (८)	१८.२५
८. क्लॉक कंपनी	०.५
९. रंगाचा कारखाना	०.७५
१०. वनस्पतिजन्य पदार्थांचा कारखाना	१०.०
११. साखरेच्या कंपन्या (४)	३४.०
१२. रबराच्या पदार्थांचा कारखाना	०.२
१३. कॉटन् जिनिंग ॲण्ड वीव्हिंग कंपनीज् (२)	१८.०

नांव	अधिकृत भांडवल आंकडे लाख रुपयांचे
१४. इलेक्ट्रिक् कंपन्या (५)	१३.७
१५. कापसाच्या गिरण्या (९)	८५.२५
१६. हील्डस् व रीडस् (कापड विणण्याच्या फण्या) यांचा कारखाना	१.५
१७. तेलाची गिरणी	२.०
एकूण रुपये	२,२४,२२,५००

या वर्षी ६४ नवीन कारखाने, गिरण्या अगर कंपन्या निघाल्या किंवा पूर्वीच्यांतच पुरेशी वाढ होऊन त्या 'इंडियन फॅक्टरीज ॲक्ट' खालीं आल्या. त्यांतील मुख्य पुढीलप्रमाणें:—७ जिनिंग् फॅक्टरीज्; ५ टेक्स्टाइल मिल्स्; ५ वीव्हिंग फॅक्टरीज्; ६ गुळाचे कारखाने; ४ मेटल् वर्क्स; २ तेलाच्या गिरण्या; ४ डाइंग फॅक्टरीज् आणि आगकाड्या, गॅस मँटल्, सिगारेट्, वगैरेंचा एक एक कारखाना. या वर्षी एक इलेक्ट्रिक कंपनी, ५ कॉटन् मिल्स्, एक एंजिनियरिंग वर्क्स, २ आइस् कंपनीज्, एक तेलाची गिरणी व दगड, काँक्रीट वगैरे तयार करणारी एक फॅक्टरी, इतक्या कारखान्यांचीं दिवाळीं वाजलीं. या सर्व कारखान्यांचें प्रत्यक्ष जमलेलें एकंदर भांडवल ७२.६ लाख रुपये होतें.

मुम्बई-सरकारच्या औद्योगिक खात्याचें कामकाजः—भाग (१) मोठे (Organized) उद्योगधंदे. (१) **चालू उद्योगधंद्यांत सुधारणा. खऱ्या कलाबतूचें कामः**—यंदा या खात्याच्या एंजिनिअरानें कलाबतूला मुलामा देणें, ती गुंडाळणें व वाळविणें या कामाकरितां एका नवीन यंत्राची योजना तयार केली व त्याप्रमाणें तें यंत्र एका एंजिनिअरिंग फर्मकडून तयार करून घेण्यांत आलें. यंत्र तयार झाल्यावर सुरत व पुणें या दोन ठिकाणीं त्या यंत्रावर कसें काम करावयाचें याचें सप्रयोग शिक्षण देण्यांत आलें. या नवीन यंत्रामुळें, यंत्रावर काम करणाऱ्या माणसाला कलाबतूचें ऊष्णतामान, विजेचा प्रवाह, गुंडाळण्याची गति व वाळविणें या सर्व गोष्टी आपल्या मर्जीनुरूप कमीजास्त करतां येतात. खात्याच्या यंत्रासारखीच नवीन १४ यंत्रें सुरतेच्या कारखान्यांकरितां तेथें तयार करण्यांत आलीं.

सरडाइन (एक प्रकारचा मासा). **तेलः**—मजली (Majali) येथून माशाच्या तेलाच्या एका कारखान्याकडून दहा पौंड सरडाइन तेल प्रयोगाकरितां मागविण्यांत आलें. या तेलाचा रंग आणि वास काढून टाकण्याकरतां कित्येक प्रयोग करण्यांत आले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मात्र एवढें दिसून आलें कीं, तेल काढण्याच्या पद्धतींतच जर सुधारणा केली तर त्याचा रंग व वास काढून टाकणें बरेंच सोपें जाईल. पुढें काम चालू आहे.

नॅचरल सोडाः—मुंबई इलाख्यांत अशुद्ध स्थितींत असलेला सोडा पुष्कळ ठिकाणीं सांपडतो. अशा अशुद्ध सोड्याचे कित्येक नमुने ठिकठिकाणाहून मागविण्यांत आले. प्रयोगानंतर असें आढळून आलें कीं, या सांपडलेल्या सोड्यांत सोडियम कार्बोनेट, सोडियम् बाय कार्बोनेट, कॉमन सॉल्ट किंवा सोडियम् क्लोराइड् व सोडियम सल्फेट इतके पदार्थ असतात. यांत कधीं कधीं टांकणखाराचे अवशेषही सांपडतात. यांत अशुद्ध सोड्यांतून कार्बोनेट व बायकार्बोनेट निरनिराळे काढण्यासाठीं प्रयोग सुरू आहेत. या प्रयोगांना हवेंत जितकी अधिक उष्णता असेल तितकी चांगली असें आढळून आलें आहे. हे प्रयोग यशस्वी झाल्यास प्रांतिज येथील साबणाच्या कारखान्याचा फार मोठा फायदा होईल.

(२) **नवीन उद्योगधंद्यांविषयीं प्रयत्न.—कृत्रिम चरबीः**—टक्स्टाइल गिरण्यांमधून परदेशाहून यणाऱ्या जनावरांच्या चरबीचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होतो. या चरबीसारखी वनस्पतिजन्य चरबी तयार करण्याचे प्रयत्न सुरू होते. निरनिराळ्या प्रकारच्या प्रयोगांनीं असें सिद्ध झालें आहे कीं, अशा प्रकारची वनस्पतिजन्य चरबी तयार करणें अगदीं शक्य आहे. वनस्पतिजन्य चरबीचे कित्येक नमुने तयार करून ते वापरूनही पाहण्यांत आले.

अर्क किंवा उडून जाणारीं तेलेंः—(Essential or Volatile Oils) उटणें, अत्तरें, सुगंधी तेलें वगैरे तयार करण्याकरितां परदेशाहून हिंदुस्थानांत दरवर्षी १०–१२ लाख रुपयांचीं तेलें येतात. तेव्हां परदेशाहून आपल्याकडे येणाऱ्या तेलांपैकीं कोणतें तेल येथें तयार करतां येईल याविषयीं विचार, प्रयत्न, व प्रयोगही झाले; नंतर पेपरमिंट तेल तयार करण्याची शक्यता दिसून आली. डहाणूजवळ पेपरमिंटच्या रोपट्याच्या मोठमोठ्या बागा आहेत. विचारांतीं असें वाटतें कीं, पेपरमिंटच्या तेलाची लहान प्रमाणावर म्हणजे इलाख्यापुरती

निपज केली तरी ती फायदेशीर होऊं शकेल. एक्स्ट्रॉ स्ट्रॅंग, टूथपेस्ट, खोकल्याच्या वड्या, अँटीफ्लॉजेस्टाइन वगैरे जिन्नस आपल्याकडे हल्लीं बरेच तयार होत असल्यामुळें पेपरमिंटाच्या तेलाला चांगली मागणी राहील.

स्ट्रॉ बोर्डस:—स्ट्रॉ बोर्डस, कार्ड बोर्डस् पेस्ट बोर्डस् वगैरेला सारखी वाढती मागणी आहे. तेव्हां हे बोर्डस् तयार करण्याकरितां कोणत्या प्रकारचीं गवतें अधिक उपयोगी पडतील यासंबंधीं प्रयोग सुरूं आहेत. सध्यां भात्याण गवताचा (Rice-Straw) प्रयोग चालू आहे. हे बोर्डस् ज्यापासून तयार करावयाचे त्या लगद्याचें ऊष्णतामान व त्यावरील दाब हीं किती ठेवावीं हें ठरविण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

(३) टॅरिफ बोर्डाशीं सहकार्य:—**कागद**—१९२५ सालीं हिं. सरकारनें बांबूपासून कागद तयार करण्याच्या धंद्याला संरक्षण दिलें.तें संरक्षण यापुढें चालू ठेवावें किंवा नाहीं याबद्दल टॅरिफ बोर्ड रिपोर्ट लिहिणार होतें. मुंबई इलाख्यांतील कागदाच्या धंद्यासंबंधीं एक अहवाल तयार करून तो या खात्यानें टॅरिफ बोर्डाला सादर केला. टॅरिफ बोर्डाच्या सूचनेप्रमाणें हिंदु.सरकारनें या धंद्याला आणखी ७ वर्षें संरक्षण दिलें आहे.

कांच:—कांचेच्या धंद्याला संरक्षण देण्याच्या बाबतींतही टॅरिफ बोर्डाला रिपोर्ट लिहावयाचा होता. त्या कामाकरितां आक्टोबर १९३१ मध्यें बोर्ड मुंबईला आलें. या खात्यानें बोर्डाला या व इतर इलाख्यांतीलहि कांचेच्या धंद्याची माहिती दिली व या इलाख्यांतील महत्त्वाचे कांचकारखाने पाहून तेथील माहिती मिळविण्याच्या कामीं मदत दिली. खात्यानें या इलाख्यांतील कांचेच्या धंद्याची माहिती जमवून ती बोर्डाकडे पाठविली व बांगड्या, खोटीं मोत्यें, कांचेचे मणी, ग्लोब, चिमण्या इत्यादि वस्तूंच्या व्यापारी संरक्षणाकरतां शिफारस केली.

(४)नवीन उद्योगधंद्यांची शक्यता व अंदाजपत्रकें—निरनिराळ्या उद्योगधंद्यांसंबंधीं ६४ लोकांनीं किंवा संस्थांनीं सरकारांत चौकशी केली. प्रत्येकाला प्रथम अंदाजपत्रकाचा सारांश व विशेष चौकशीनंतर संपूर्ण अंदाजपत्रक पाठविण्यांत आलें. अशीं एकंदर ४५ अंदाजपत्रकें पाठविलीं गेलीं. त्यांपैकीं १४ एनव्हेलप्सकरतां, ७ रोगबीजनाशकांकरता, ५ ब्लँको करतां, ५ बुटाच्या लेसेसकरतां व १४ इतर उद्योगधंद्यांकरतां पाठविलीं. तसेंच तयार केलेलीं सर्व संपूर्ण अंदाजपत्रकें 'कराची इंडियन मर्चंटस् अॅसोसिएशन' व 'बायर्स अँड शिपर्स चेंबर' या कराचीच्या दोन संस्थांना पाठविण्यांत आलीं. तसेंच 'इंडियन मर्चंटस् चेंबर', 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' व 'डेक्कन मर्चंटस् असोसिएशन, बाँबे' या संस्थांनाही अंदाजपत्रकांचे सारांश पाठविण्यांत आले. हेतु हा कीं, त्यामुळें व्यापाऱ्यांनीं संपूर्ण अंदाजपत्रकें मुद्दाम मागवावींत. वर सांगितलेलीं अंदाजपत्रकें तयार करून बराच काल लोटला आहे व यंत्रसामुग्रीच्या किंमतींतही बेसुमार वाढ झाली आहे. म्हणून सर्व अंदाजपत्रकें तपासून पुन्हां नवीन तयार करण्यांत आलीं, तसेंच, पुढील अंदाजपत्रकें अगदीं नवीनच तयार करण्यांत आलीं. (१) आंबाडीचें सूत (२) सिगारेट्सची निपज, (३) फळें टिकविण्याची (Cold-Storage) यंत्रसामुग्री (४) लाकडाचा कारखाना, (५) रेशीम पिंजण्याचा व विणण्याचा कारखाना. वर लिहिलेल्या पांचांपैकीं पहिल्या चार कारखान्यांना अनुक्रमें रु. १२,७००; २,२०,०००; २४,१००; व ८,६०० इतका खर्च येईल. याशिवाय शिसपेन्सिली, विजेचे दिवे, बटणें, छत्र्या इत्यादीं उद्योगधंद्यांचीं अंदाजपत्रकें तयार होत आहेत.

(५) उद्योगधंद्यांतील प्रत्यक्ष अडचणी दूर करणें व सल्ला देणें. या बाबतींत खात्यानें पुढें दिलेलें कार्य करून व्यापारी व्यक्ति व संस्था यांना मदत केली. (१) मुंबईंतील एका गृहस्थांना थोरियम् नायट्रेट, मॅग्नेशियम् नायट्रेट, कॅलशिअम् नायट्रेट इत्यादि रासायनिक द्रव्यें कच्च्या पदार्थापासून कशीं तयार करावयाचीं याची सप्रयोग माहिती देण्यांत आली. (२) मुंबईंतील एक गृहस्थ तांदळाच्या कणीपासून फलशर्करा तयार करण्याच्या प्रयत्नांत होते. कणीपासून फलशर्करा (Glucose) तयार करणें अशक्य आहे असें कळवून स्टार्चपासून ती कशी तयार करावयाची याची त्यांना सर्व माहिती पुरविण्यांत आली. (३) एका स्थानिक कारखान्याला एक्स्ट्रॉ स्ट्रॅंग वगैरे तयार करण्याच्या बाबतींत बऱ्याच अडचणी येत होत्या. खात्याच्या रसायनशास्त्रज्ञानें कारखान्याला भेट देऊन तेथील व्यवस्था आणि यंत्रसामुग्री यांत पुष्कळ सुधारणा सुचविल्या.आतां नवीन यंत्र सामुग्री आणल्यावर तो कारखाना उत्तम चालला आहे. (४) सुगंधी तेलें व सौंदर्यसाधनें तयार करणाऱ्या मुंबईंतील एका कारखानदाराला एखाद्या पदार्थाचा पांढरा रंग व स्निग्धता (Emulsion) कायम कशी ठेवावयाची या-

बद्दल माहिती देण्यांत आली. (५) मुंबईंतील एक रसायनशास्त्रज्ञ परदेशांतून येणाऱ्या अॅल्युमीनियम् हायड्रोक्साइड् व अॅसेटिक अॅसिड यांपासून अॅल्युमीनियम् अॅसीलेट तयार करीत व म्हणून तें त्यांना फार महाग पडे. खात्याकडून मिळालेल्या सल्ल्यामुळें त्यांना आपलें अॅल्युमीनियम् अॅसिलेट स्वस्त विकतां येतें. (६) सोनें गाळण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या एका गृहस्थांना कॉपर नायट्रेटच्या मिश्रणांतून तांबें बाजूला कसें काढावयाचें याची माहिती पाहिजे होती. ही माहिती त्यांना सप्रयोग देण्यांत आली. (७) मुंबईंतील एका तेलाच्या गिरणीच्या रसायनशास्त्रज्ञांना भुइमुगाचें तेल पांढरें करण्याला कोणते पदार्थ वापरावयाचे व ते कोठें मिळतात याची संपूर्ण माहिती पुरविण्यांत आली. (८) साबण तयार करणाऱ्या एका कारखान्याला निरनिराळें उष्णतामान असतां साबणाच्या वड्या कशा तयार करावयाच्या त्याची युक्ति व माहिती पुरविण्यांत आली. (९) खडूच्या कांड्या तयार करणाऱ्या एका कारखान्याला टेलर्स चॉक (शिंपी वापरतो तो खडू) व प्लॅस्टर ऑफ पॅरिस हे जिन्नस कसे तयार करावयाचे याबद्दल सर्व माहिती पुरविली. (१०) लिहिण्याची शाई तयार करणाऱ्या एका कारखानदाराला मोठ्या प्रमाणावर शाई कशी गाळावयाची आणि तिचा पातळपणा व टिकाऊपणा कसा वाढवावयाचा याची संपूर्ण माहिती देण्यांत आली. (११) एका तेलाच्या गिरणीला तेलाचा रंग कसा काढून टाकावयाचा याची माहिती पुरविण्यांत आली. (१२) मुंबई व सुरत येथील एका कारखान्याला शर्करावगुंठित गोळ्या कशा तयार करावयाच्या आणि गोड पेयांचा रंग काढून कसा टाकावयाचा याची माहिती देण्यांत आली. (१३) बेळगांव जिल्ह्यांतील चिकोडी येथील एका गृहस्थांना शीत पद्धतीनें (Cold process) उत्तम साबण कसा तयार करावयाचा याची माहिती दिली. (१४) मुंबईंतील एका गृहस्थांना 'क्लोराइन वॉटर' तयार करण्याच्या बाबतींत बऱ्याच अडचणी येत होत्या. पण या खात्यानें वेळोवेळीं केलेल्या मदतीमुळें ते गृहस्थ आपलें 'क्लोराइन' वॉटर हल्लीं बाजारांत विकावयासहि पाठवितात. (१५) पुण्यांतील दोन गृहस्थांना पोस्ट ऑफिसें व रेलवे यांमध्यें जी लाख वापरतात ती कशी तयार करावयाची याविषयीं माहिती देण्यांत आली.

(६) सर्वसामान्य मदत

रेल्वेकडून भाड्याच्या सवलती मिळवून देण्याबद्दल पुष्कळ कारखान्यांकडून अर्ज आले. चौकशीनंतर जरूर त्या सर्व कारखान्यांबद्दल रेल्वेकडे शिफारस करण्यांत आली. मुंबईंत एका कारखान्यांत नवीनच तयार झालेल्या १४ इंची कानशींची शेफील्ड येथील तेवढ्याच कानशींबरोबर परीक्षा घेण्यांत येऊन कोणत्या सुधारणा करावयास पाहिजेत तें कारखान्याला कळविण्यांत आलें. शेतीविषयक हत्यारें तयार करणाऱ्या एका कारखान्यांत तयार झालेल्या पुष्कळ वस्तू व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें तपासून त्यावरील अभिप्राय व खात्याच्या एंजिनियरच्या सूचना त्या कारखान्याला कळविण्यांत आल्या. तसेंच मुंबईंतील एका गृहस्थांनीं पाठविलेलें टेक्स्टाइल तेल तपासून, निकाल त्या गृहस्थांना कळविण्यांत आला. या खात्याच्या खटपटीमुळें एक्साइज कमिशनकडून, साबणाच्या धंद्याकरतां वापरण्यांत येणाऱ्या एका विशिष्ट डिनेचर्ड स्पिरिटवरील जकात बरीच उतरविण्यांत आली आहे. पारदर्शक साबण तयार करण्याकरतां या स्पिरिटचा फार उपयोग होत असून पुष्कळ कारखान्यांना उतरवलेल्या जकातीचा चांगला फायदा मिळत आहे.

(७) व्यापारी व औद्योगिक माहितीचा पुरवठाः— नेहमींप्रमाणें परदेशाहून हिंदी कारखानदारांबरोबर व्यापारी संबंध जोडण्याकरतां आलेलीं पत्रें 'डिरेक्टर जनरल् ऑफ कमर्शिअल इंटेलिजन्स अँड स्टॅटिस्टिक्स्, कलकत्ता' यांच्याकडे व ब्रिटिश कारखानदारांबरोबर व्यापारी संबंध जोडण्याकरतां आलेलीं हिंदी कारखानदारांची किंवा व्यापाऱ्यांचीं पत्रें 'एच्. एम्. ट्रेड्कमिशनर, मुंबई' यांच्याकडे पाठविण्यांत आलीं. एकंदर आलेल्या पत्रांचे पुढीलप्रमाणें विभाग पाडतां येतील. (१) कोष्टकवजा, कच्च्या किंवा पक्क्या मालाच्या आयातीचे किंवा निर्यातीचे आंकडे. (२) कच्चा माल कशापासून होतो त्या पदार्थांचीं व कच्च्या मालाचा व्यापार करणाऱ्यांचीं नांवें. (३) निरनिराळ्या वस्तू तयार करणाऱ्या हिंदी कारखानदारांचीं नांवें. (४) निरनिराळ्या कारखान्यांची वास्तविक स्थिति. (५) सर्वसामान्य.

(८) खाणी व खनिजें

खाणींकरतां लायसेन्स वगैरे मागण्या-

साठीं यंदा एकंदर आठ अर्ज आले. त्यांपकीं ५ अशुद्ध मँगॅनीज करतां, २ अशुद्ध क्रोमकरतां, १ ॲसबेस् टॉसकरतां व १ टाल्क (सोपस्टोन) करतां होता. या वर्षांतील नॉन्-ॲक्ट-माइन खालील महत्त्वाचें खनिज म्हणजे 'कपडे छाट करण्याची खारी माती' (Fuller's Earth) होय. सिंधप्रांतांतील हैद्राबाद जिल्ह्यांतून रु. १०,४५२-१३-०ची असली माती बाहेर काढण्यांत आली. 'दी तैबपूर बॉक्साइट माइन्' ही खाण बंद झाली. मँगॅनीजचे पांच कारखाने चालविण्यांत आले व त्यांतून इ. स. १९३१ अखेर २,११,७९२ रु. किंमतीचें ३२,६५८ टन मँगॅनीझ बाहेर काढण्यांत आलें. पूर्वींच्या वर्षाच्या मानानें या वर्षी निपज शें. २४·७५ या प्रमाणांत व किंमत शें. ४३·४३ या प्रमाणांत कमी झाली. जगांतील मँगॅनीझचा व्यापार अत्यंत खालावल्याचेच हे परिणाम होत. खनिजें, त्यांच्या निपजीच्या जागा व त्यांचे कारखाने यांच्यासंबंधीं लोकांकडून व खुद्द मुंबई सरकारकडूनही या खात्याला पुष्कळ माहिती विचारण्यांत आली व ती सर्व खात्यानें पुरविली.

(९) मासेमारी व उद्योगधंद्यांना आर्थिक मदतः—मासेमारी या विभागाला या वर्षाकरतां फक्त ५०० रुपयच मिळाले होते. ते, 'कलेक्टर ऑफ कस्टम्स्, कराची' यांच्या नेतृत्वाखालीं सिंधमध्यें खर्च करण्यांत आले. उद्योगधंद्यांना आर्थिक मदत मिळावी म्हणून यंदा एकंदर तीन अर्ज आले. पैकीं दोन कारखान्यांबद्दल माहिती मिळविण्याचें काम चालू आहे. एकाची माहिती मिळाल्यावर मागितलेली मदत फारच अधिक आहे असें आढळून आल्यावरून ती देण्याचें नाकारण्यांत आलें.

भाग (२) घरगुती उद्योगधंदेः—मुंबई इलाख्यांत एकंदर १००,००० वर हातमाग असून ते दरसाल सुमारें ४॥ कोटी रुपयांचें कापड तयार करतात. तेव्हां घरगुती धंद्यांपैकीं या अत्यंत महत्त्वाच्या धंद्यावर खात्यानें आपलें लक्ष एकत्रित केलें आहे. हातानें विणणें, रंगविणें, खडी काढणें इत्यादि बाबतींत सुधारलेल्या पद्धतींचा लोकांत अधिकाधिक प्रचार करण्यांत आला. कलाकुसरीच्या पदार्थांच्या विक्रीसंबंधानें गेल्या वर्षी चालले या वाटाघाटी अजूनही चालूच आहेत. याच्या संबंधींचा अहवाल खात्यानें प्रसिद्ध केला आहे. खात्यानें या वर्षीं विशेषतः तीन गोष्टींबद्दल चौकशी केली. (१) हातमागवाल्यांची स्थिति, (२) कांचेच्या बांगड्याचा धंदा घरगुती करण्याची शक्यता. (३) गुजराथेंतील साबणाचा देशी धंदा.

१ सुधारलेल्या पद्धतींचा प्रसार—हातमागः—विणकामाच्या दोन प्रकारच्या शाळा चालविण्यांत आल्या. (१) धंदेवाईक विणकऱ्यांकरितां व (२) शेतकऱ्यांकरतां. पहिल्या प्रकारच्या शाळांतील शिक्षणक्रम एक वर्षाचा असून तेथें उंची साड्या, धोतरें, कोटाचें व सदऱ्याचें कापड विणण्याचें शिक्षण देण्यांत आलें. दुसऱ्या शाळांचा शिक्षणक्रम ६ महिन्यांचाच असून तेथें खादी, चादरी, धोतरें इत्यादिकांचें शिक्षण देण्यांत आलें. या शाळांची संख्या अनुक्रमें ७ व २ अशी होती. या शाळा अर्थातच फिरत्या असतात. म्हणजे एका गांवांत बरेच लोक शिकविले म्हणजे शाळा दुसऱ्या गांवीं जाते. पहिल्या प्रकारच्या म्हणजे विणकऱ्यांच्या शाळा खालील आठ ठिकाणीं चालविण्यांत आल्या, लक्ष्कुंडी, धरणगांव, नाशिक, भिंगार, सुरत, अन्नामा, हाला, नसारपूर. दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे केवळ शेतकऱ्यांकरितां चालविलेल्या शाळा धारवाड जिल्ह्यांत बल्गानूर व अण्णीगेरी आणि भडोच जिल्ह्यांत अमलेश्वर व निकोरा अशा चार ठिकाणीं चालविण्यांत आल्या.

वर सांगितलेल्या शाळांशिवाय हातमागाचीं यंत्रें, त्यांचे भाग, विणण्याची पद्धति इत्यादि गोष्टी धंदेवाईक विणकऱ्यांना नीट समजावून सांगण्याकरितां खात्याकडून पाठविलेले तज्ज्ञ इलाखाभर शिक्षण देत होते. अशा तऱ्हेच्या शिकविण्याला 'डेमॉन्स्ट्रेशन्' असें म्हणतात. प्रत्येक डेमॉन्स्ट्रेशनमध्यें धांवत्या धोटयाचे दोन माग वापरले जात. एकावर सरकारी तज्ज्ञ स्वतः काम करी व दुसऱ्यावर विणकरी शिकत असे. अशा तऱ्हेच्या पद्धतीनें धारवाड, विजापूर, बेळगांव, पूर्व खानदेश, सोलापूर, सातारा, खेडा, सुरत, भडोच, लारखाना, व सक्कर या जिल्ह्यांतून एकंदर एकोणीस खेड्यांना शिक्षण देण्यांत आलें. भडोच येथील डेमॉन्स्ट्रेशननें विशेषतः विणकर स्त्रियांना शिक्षण दिलें.

२ झोंपड्यांतून ताणा करणें व खळ लावणें यांचें शिक्षणः—विद्यार्थ्यांना ताणा करणें व खळ लावणें यांचें प्राथमिक शिक्षण सुधारलेल्या पद्धतीनें व यंत्रांवरून देण्याकरितां प्रयोगादाखल चार विणकर शाळा सुरू ठेवून त्या प्रत्येकींत खळीच्या प्रयोगाचें सामान व यंत्रही ठेवलें होतें.

अशा प्रकारचें शिक्षण धुळें, अहमदनगर व संगमनेर येथें देण्यांत आलें. धुळें व अहमदनगर येथें असतां खात्याकडील तज्ज्ञांच्या देखरेखीखालील खळ देण्याचे एकंदर तीन जोड तयार करण्यांत येऊन ते स्थानिक संस्थांना देण्यांत आले.

३ लोंकरीच्या विणकामाचें डेमॉन्स्ट्रेशनः—या इलाख्यांत अशा तऱ्हेचें हें एकच डेमॉन्स्ट्रेशन आहे. कुरुबार, धनगर वगैरे लोकांना सुधारलेल्या काटकसरीच्या पद्धतीनें कांबळीं कशीं तयार करावयाचीं याचें शिक्षण देणें हें त्यांचें काम आहे.

या वर्षी लोंकरीच्या विणकामांत सुधारलेली लोंकर पिंजण्याची धनुकली व लोंकरीचें सूत काढण्याचें पायानें फिरविण्याचें चाक या दोन फार महत्त्वाच्या सुधारणा झाल्या. नवीन धनुकलीनें पूर्वीच्या धनुकलीच्या जवळ जवळ तिप्पट काम होतें. शिवाय पिंजणाऱ्याच्या बोटांना मुळींच त्रास होत नाहीं. यामुळें या धनुकलीचा प्रसार पिंजारी लोकांत फार होत आहे. पायानें फिरवावयाच्या नवीन चाकाची किंमत रु. १० आहे, पण त्या मानानें त्याचा उपयोगही मोठा आहे. हें चाक वापरल्यामुळें सूत काढणाऱ्याचे दोन्ही हात अगदीं मोकळे राहतात व त्यामुळें सुताचा एकसारखेपणा त्याला कायम ठेवतां येतो.हातचरक्यापेक्षां या चाकावर सुताची निपज बरीच जलद होते. म्हणजे एकाच प्रकारच्या लोंकरीचें हातचरक्यावर एका तासांत १०९० यार्ड व या चाकावर १९८८ यार्ड सूत निघालें. या चाकाचे उपयोग खात्याच्या तज्ज्ञांनीं लोकांना पटवून दिल्यामुळें त्याचा प्रसार फार जलदीनें होत आहे. लोंकरीचें विणकाम शिकविणाऱ्या डेमॉन्स्ट्रेटरला सुधारलेल्या पद्धतीनें लोंकर कशी रंगवावयाची याचें शिक्षण देण्यांत आलें व त्यामुळें या डेमॉन्स्ट्रेटरकडून विणकर लोक आतां विणणें, रंगविणें हीं दोनही कामें शिकतात. या डेमॉन्स्ट्रेशननें बेळगांव जिल्ह्यांतील बेंचिमार्डी येथें शिक्षण दिलें. निरनिराळ्या ठिकाणाहून परीक्षेकरतां आलेल्या दोन प्रकारच्या लोंकरीची कांबळी विणून तीं या खात्यानें 'दी लाइव्ह स्टॉक एक्सपर्ट टु गव्हर्मेंट' यांच्याकडे पाठविली. ते सध्यां लोंकरीच्या तपासणीचें काम करीत आहेत. 'कर्नाटक कुरुबार संघ' ही कुरुबार लोकांचें हिताहित पाहणारी त्यांची प्रांतिक प्रातिनिधिक संस्था आहे असें कळल्यावर खात्यानें संघामार्फत डॉ. नागन गौडा एम्. एस्सी. पीएच्. डी. यांच्या अध्यक्षतेखालीं मार्च १९३२ मध्यें गदग येथें सर्व कुरुबार लोकांची एक सभा बोलाविली. तेथें खात्याच्या तज्ज्ञांनीं सुधारलेल्या पद्धतीनें लोंकर पिंजणें, कातणें व विणणें याची सप्रयोग माहिती दिली. नवीन फायदेशीर पद्धतीच्या प्रसाराच्या दृष्टीनें या सभेचा फार उपयोग झाला.

४हातमागांत सुधारणाः—थोडक्या श्रमांत व कमी खर्चांत तयार होऊन बाजारांत विकतां येईल असा माल विणकरांनीं तयार करावा म्हणून हातमागामध्यें सुधारणा करण्याचे उद्योग सुरूच होते. 'बीम सिस्टिम' प्रथम मध्यविभागांत सुरू करण्यांत आली व तेथें तिचें स्वागतच झालें. विणकरांच्या शाळांनींही या पद्धतीचा प्रसार चालविला आहे. या वर्षी धरणगांव,यावल,अण्णिगेरी येथें अनुक्रमें १७,१४ व ३ बीम्स वापरण्यांत येऊं लागलीं. लवकरच ही पद्धत सार्वत्रिक होईल. अजूनपर्यंत सर्व विणकर लोक लाकडाची साधी 'डॉबी' (Dobby) वापरीत. या डॉबीची किंमत ३ ते १० रुपयापर्यंत असे व तिच्या साहाय्यानें कोणतेंही एकच डिझाइन तयार करतां येई.पण आतां,धरणगांवच्या विणकरांच्या शाळेचे हेडमास्तर श्री. आर. एन्. वर्दे यांनीं ४० रुपये किंमतीची एक नवीन यांत्रिक डॉबी तयार केली आहे. या डॉबीची किंमत जास्त असली तरी तिच्या साहाय्यानें १०० पिक्स (Picks) पर्यंतचें कोणतेंही डिझाइन तयार करतां येतें. ही नवीन डॉबी तयार झाल्यावर व तिचे उपयोग समजावून दिल्यावर दोन महिन्यांच्या आंतच ३ डॉबी विकल्या गेल्या. थोडक्याच दिवसांत तिला बरीच मागणी यावी असा तर्क आहे.

५रंगकामाचें शिक्षणः—रंगारी, छापणारे, विणणारे व इतर लोक यांना शिकविण्याकरतां व माहिती देण्याकरतां दोन डेमॉन्स्ट्रेशन्स चालू होतीं.एक खुद्द इलाख्यांत व दुसरें सिंधमध्यें. पहिल्या डेमॉन्स्ट्रेशननें धारवाड, गदग व राणीबेन्नूर या ठिकाणीं व दुसऱ्यानें तांदो—अल्हयार, हाला व हैद्राबाद या ठिकाणीं शिक्षणाचें कार्य केलें. हें शिक्षण देण्याच्या आधीं गदगच्या बाजूला रंगविण्याचा धंदा कांहीं ठराविक ५।६ लोकांच्याच हातीं गेला होता व त्यांनासुद्धां अगदीं ढोबळ रंगाखेरीज विशेष कौशल्य असें माहित नव्हतें. पुष्कळ लोकांनीं रंगाचें शिक्षण घेतलें, नवीन रंगशाळा उघडल्या, रंगाचें उंची काम होऊं लागलें व पुष्कळ विणकरी स्वतःच कापड रंगवूं लागले. सिंधमध्यें हाला हें ठिकाण विणकामाचें एक फार मोठें केंद्र आहे; तेथें व त्या प्रांतांत इतर ठिकाणीं डेमॉन्स्ट्रे-

शनला कल्पनेबाहेर यश आलें, रंगकाम करणाऱ्या शेंकडों संस्था अस्तित्वांत आल्या आणि रंगाच्या जुन्या व्यापाऱ्यांना व कारखानदारांनाही जोराची चालना मिळाली.

६ **'गव्हर्नमेंट हँड वीव्हिंग इन्स्टिटयूट, पुणें**:—या संस्थेनें जून १९३० मध्यें आपलें काम नियमितपणें सुरूं केलें. या ठिकाणीं दोन अभ्यासक्रम आहेत. (१) उच्च व (२) सामान्य किंवा हस्तव्यवसायाचा. पहिला अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून या वर्गांत दरवर्षी इंग्रजी सहावी किंवा त्याहून अधिक शिकलेल्या सुमारें १५ मुलांना प्रवेश मिळतो. विणकर मुलांना अर्थातच अधिक पसंत केलें जातें. या वर्गांत विणण्याच्या कलेची संपूर्ण शास्त्रीय माहिती सप्रयोग शिकविण्यांत येते. दुसऱ्या वर्गांत दरवर्षी १५ सामान्य विद्यार्थी घेतात. लिहितां वाचतां येणाऱ्यांना अधिक पसंती मिळते. या वर्गाचा अभ्यासक्रम एक वर्षाचा असून शिक्षण मातृभाषेंतून मिळतें. या संस्थेंत शिकण्याकरतां पैचीही फी नाहीं.

सर्वसामान्य कार्य:—(१) कुलाबा जिल्ह्यांतील एका गृहस्थांना वरील संस्थेमधल्या तज्ज्ञांच्या देखरेखीखालीं दोन हातमाग—डॉबी तयार करून देण्यांत आल्या. (२) पुण्याच्या 'एंप्सन् वर्कशॉप्स् अँड टेक्निकल स्कूल'च्या सुपरिंटेंडेंटना माग बसविण्याच्या व इतर बाबतींत पुष्कळ मदत देण्यांत आली. (३) ठाणें जिल्ह्यांतील जव्हार संस्थानांतील एका मनुष्याला संस्थानच्या दिवाणांच्या विनंतीवरून धरणगांव येथें हातमाग चालविण्याचें संपूर्ण शिक्षण देण्यांत आलें. आतां तो मनुष्य संस्थानांत एक शाळा चालविणार आहे.

७ **हातमागवाल्यांच्या स्थितीची चौकशी**:—ही चौकशी उत्तर, मध्य व दक्षिण-विभाग आणि सिंध यांमध्यें गेल्या वर्षाप्रमाणेंच पुढें चालविण्यांत आली. १९२८ सालापासून हातमागावर काम करणाऱ्यांच्या मजरीचें प्रमाण सारखें घटत आहे. १९२७ सालाच्या मानानें १९२८ सालीं शेंकडा १६, १९३० सालीं शें. ५० व १९३१ सालीं शें. ६० असें मजुरीचें प्रमाण घसरगुंडी करीत आहे. हातमागाच्या कापडाचें मुख्य गिऱ्हाईक जें शेतकरी त्यांनींच आपली खरेदी कमी केल्यामुळें व गिरण्यांच्या चढाओढीमुळें हातमागवाल्यांना चांगलाच धक्का बसला आहे. कारखान्याच्या तत्त्वावर सर्व मागवाल्यांचें एकीकरण व संघटना घडवून आणण्याकरितां खातें योग्य माणसें तयार करीत आहे. पुण्याच्या हँड वीव्हिंग इन्स्टिटयूटनें या बाबतींत महत्त्वाचें कार्य चालविलें आहे. विणण्याच्या पद्धतींत नवीन सुधारणा करण्याशिवाय डिझाइन्स् करणें, कापड विणणें, बाहेरगांवाहून माल आणणें, खळ देणें, माल योग्य ठिकाणीं विकणें, कारखाने काढणें, इत्यादि गोष्टीही विणकर वर्गास शिकविणें जरूर असून त्याकरितां एका टेक्स्टाइल एक्स्पर्टची जरूरी आहे. पण पैशाच्या टंचाईमुळें हा प्रश्न सध्यां लांबणीवर टाकण्यांत आला आहे.

८ **कांचेच्या बांगड्यांचा धंदा**—घरगुती स्वरूपांत अधिक फायदेशीर ठरेल असें वाटतें. केलेल्या चौकशीवरून असें आढळून आलें कीं, पांचशें माणसें कामावर ठेवून दरसाल अडीच लाख रुपयांच्या बांगड्या तयार करणाऱ्या कांदिवलीच्या प्रचंड कारखान्याशिवाय बांगड्या करण्याचा घरगुती धंदाही पुष्कळ ठिकाणीं चालू आहे. ठाणें, खेडा, पूर्वखानदेश, पुणें, धारवाड व बेळगांव या सर्व जिल्ह्यांत मिळून एकंदर २८० माणसें या धंद्यांत गुंतलेलीं असून तीं दरवर्षी सुमारें ७९,००० रुपयांच्या बांगड्या तयार करतात. खेडेगांवांत तयार झालेल्या बांगड्या कारखान्यांतील बांगड्यांपेक्षां अर्थातच कमी प्रतीच्या असतात. परदेशाहून १९३१–३२ सालीं एकट्या मुंबई इलाख्यांत आलेल्या बांगड्यांची किंमत २४ लाख रुपये होती. यावरून या धंद्याला अजून किती वाव आहे याची कल्पना येईल. परदेशांतही बांगड्यांचा धंदा घरगुती म्हणूनच चालतो. तसाच तो या इलाख्यांतहि घरगुती व सार्वत्रिक व्हावा म्हणून एका कांचकारखान्याच्या मदतीनें खात्यानें जोराचे प्रयत्न चालविले आहेत.

गुजराथेंतील साबणाचा देशी धंदा:—गुजराथेंत प्रांतीज व कापडवंज या ठिकाणीं तेथेंच आसपास सांपडणाऱ्या कच्च्या मालापासून धुण्याचा साबण तयार करण्याचे पुष्कळ प्रसिद्ध कारखाने आहेत. सर्व कच्चा माल हिंदुस्थानांतलाच असल्यामुळें या ठिकाणीं तयार होणारा साबण शेंकडा १०० स्वदेशी असून शिवाय तो इतर कारखान्यांच्या साबणापेक्षां स्वस्तही पडतो. या ठिकाणीं दरवर्षी सुमारें २ लाख रुपयांचा साबण तयार होतो. यंदा खात्यानें केलेल्या चौकशीवरून या कारखान्याची साबण तयार करण्याची पद्धति फार जुनी, त्रासदायक व खर्चाची आहे असें दिसून आलें. आतां नव्या यांत्रिक पद्धतीचा अवलंब केल्यावर याच कारखान्यांतून सध्यांच्या दुप्पट म्हणजे सुमारें ४लाख रुपयांचा साबण दरवर्षी बाहेर पडेल. नच-

रल् सोड्यापासून सोडा वेगळा काढण्याकरितां चाललेले खात्याचे प्रयत्न 'चालू उद्योग धंद्यास मदत' या सदरांत दिले आहेत.

९ यांत्रिक व औद्योगिक शिक्षणः—१ एप्रिल १९३१ पासून यांत्रिक व औद्योगिक शिक्षणावरील ताबा 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्' यांजकडून काढून तो 'डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज्' यांजकडे देण्यांत आला. खात्यानें या बाबतींत जें कार्य केलें त्याची पुढीलप्रमाणें विभागणी करतां येईल. (१) कमिटी ऑफ डिरेक्शन फॉर टेक्निकल एज्युकेशन'च्या अहवालांतील सूचना प्रत्यक्ष अमलांत आणणें, (२) 'व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल् इन्स्टिटयूट'ला द्यावयाची वार्षिक ग्रँट नक्की ठरविणें व इन्स्टिटयूटच्या कारभारांत मदत करणें, (३) 'आर. सी. टेक्निकल् इन्स्टिटयूट, अहमदाबाद' व 'टेक्निकल् स्कूल आवा (Ahwa)' या संस्थांच्या कारभारावर सरकारी अधिकार चालविणें, (४) यांत्रिक शिक्षणाकरितां शिष्यवृत्त्या देणें. (५) सर्वसामान्य.

खात्याचें इतर कामः—(१) किर्लोस्करवाडीच्या 'दी इंडस्ट्रियल केमिकल् वर्क्स'मध्यें म्हैसूर संस्थानांतून 'मेथॅनॉल्' (Methanol) मागविण्यांत येई व त्यापासून 'फॉर्मल डीहाइड्' (Formal dehyde) तयार होत असे. जानेवारी १९३२ मध्यें स्थानिक अबकारी अधिकाऱ्यांनीं हा कारखाना बंद करून त्यावर मोहोर केली. कारखान्यानें या खात्याच्या मध्यस्थीनें कारखाना उघडण्याची परवानगी देण्याबद्दल एक्साइज कमिशनरला अर्ज केला. खात्यानें जरूर ती सर्व माहिती कमिशनरला पुरविली व पुष्कळ उपयुक्त सूचनाही केल्या. कमिशनरची परवानगी मिळाल्यावर आतां तो कारखाना पुन्हां सुरू झाला आहे. (२) मुंबई इलाख्यांतील वृक्षांचीं फळें व फुलें यांपासून काढलेल्या तेलाचे व पेंडीचे काय उपयोग करतां येतात या विषयीं इलाख्याच्या जंगलसंरक्षणाच्या प्रमुखांना (Chief conservator of Forests) सर्व माहिती देण्यांत आली (३) 'दी सुपरिंटेंडेंट गव्हर्नमेंट प्रिंटिंग ॲण्ड स्टेशनरी,' मुंबई यांनीं या खात्याकड परीक्षेकरितां तीन प्रकारच्या शायांचे नमुने पाठविले. खात्यांतील औद्योगिक रसायनशास्त्रज्ञाकडून शायांची निरनिराळ्या दृष्टीनें कसून तपासणी करण्यांत आली व सुपरिंटेंडेंटकडे त्याबद्दल रिपोर्ट केला. हे सर्व देशी शायांचे नमुने होते, (४) याच सुपरिंटेंडेंटनीं पाठविलेल्या, तुरुंगांत तयार झालेल्या चाकूंची परीक्षा घेऊन ते उत्तम असल्याबद्दल त्यांना कळविण्यांत आलें. तसेंच एकप्रकारचें कापड तपासून त्याबद्दलही रिपोर्ट करण्यांत आला. (५) 'दी सुपरिंटेंडेंट गव्हर्नमेंट प्रिंटिंग ॲण्ड स्टेशनरी' यांच्या कचेरींत शिल्लक असलेल्या मालाची तपासणी अचानकपणें करण्याचें काम या खात्याकडे सोंपविण्यांत आलें होतें. तदनुसार सुपरिंटेंडेंट यांनीं पाठविलेल्या सीलबंद नमुन्यांप्रमाणें अचानकपणें सर्व माल तपासून सविस्तर अहवाल पाठविण्यांत आला.

मुम्बई इलाख्यांतील सरकारी मान्यता मिळालेल्या यांत्रिक व औद्योगिक शाळा

(१) स्थानिक संस्थांनीं चालविलेल्या व औद्योगिक खात्याकडून मदत मिळत असलेल्या शाळा :—

	१९३१–३२ सालीं दिलेली ग्रँट: वार्षिक ग्रँट रु.	या वर्षीपुरती रु. आ.
१ म्युनिसिपल टेक्निकल स्कूल, जाकोबाबाद.	१,८२०	
२ एफ्. एस्. पारेख टक्निकल इन्स्टिटयूट, सुरत.	६,०००	१,८५५–८
३ व्ही. जे. म्युनिसिपल टेक्निकल् स्कूल, पुणें.	२,०३२	९६२–०
४ लोकल् बोर्ड इंडस्ट्रियल स्कूल, सातारा.	१,२८२	
५ रॉबर्टसन् स्कूल ऑफ इंडस्ट्री, पंढरपूर.	९३०	
६ एडवर्ड सातवे, टेक्निकल स्कूल, धुळें.	४,०३७	१,४०४–०
७ स्कल ऑफ इंडस्ट्री, रत्नागिरी.	६,९१५	

(२) खाजगी संस्थांनीं चालविलेल्या व औद्योगिक खात्याकडून मदत मिळणाऱ्या शाळा :—

८ व्ही. जे. टेक्निकल् इन्स्टिटयूट, सक्कर.	२,२१३	३९२–८
९ नडियाद इंडस्ट्रियल् इन्स्टिटयूट, नडियाद.		
१० सॅल्व्हेशन् आर्मी बॉईज वीव्हिंग स्कूल, आनन्द.	४९५	१०१–०
११ आय्. पी. मिशन् इंडस्ट्रियल् स्कूल, बोरसद.	१,२३२	
१२ व्होकेशनल् ट्रेनिंग स्कूल, अंकलेश्वर,	८५२	३१–१४
१३ महाजन होम इंडस्ट्रियल स्कूल, सुरत.	९६०	
१४ ए. आर. सूनावाला इंडस्ट्रियल स्कूल, बोर्डी.	७६४	
१५ सी. बी. मिशन बॉईज इंडस्ट्रियल स्कूल, पालघर.	४६६	
१६ एस्पसन वर्कशाप्स अँड टेक्निकल् स्कूल, पुणें.	१,०७६	८६–०
१७ सर डी. एम्. पेटीट इंडस्ट्रियल स्कूल, शिरुर.	१,१६९	
१८ एस्. पी. जी. मिशन इंडस्ट्रियल स्कूल, अहमदनगर.	१,८४६	४८०–०
१९ सर डी. एम्. पेटीट इंडस्ट्रियल स्कूल, अहमदनगर.	९१६	
२० एस.ए. बॉईज इंडस्ट्रियल स्कूल, अहमदनगर.	६४६	
२१ सेंट बारनाबस इंडस्ट्रियल स्कूल, मनमाड.	१,३०४	
२२ मेकॅनिकल् एंजिनियरिंग स्कूल, नाशिक.	८१०	
२३ के. ई. एस्. टोपीवाला इंडस्ट्रियल स्कूल, अलिबाग	१,७६३	
२४ अमेरिकन मिशन् स्कूल फॉर दी ब्लाइंड, मुंबई.	९८५	
२५ डी. सी. मिशन् इंडस्ट्रियल स्कूल, मुंबई.	५७५	
२६ टेक्स्टाइल टेक्निकल स्कूल, परेळ, मुंबई.	८४०	
२७ एस्. ए. विलिंग्डन बॉईज होम, मुंबई.	९५०	९३–८
२८ डी. एन्. पुअर बॉईज सेमिनरी इंडस्ट्रियल स्कूल, मुंबई.	८८०	
एकूण	४३,७५८	५,४०६–६

(३) **फक्त सरकारी मान्यता मिळालेल्या शाळा**:—(अ) स्थानिक संस्थांनीं चालविलेल्या, पण सरकारी ग्रँट न मिळणाऱ्या शाळा २९ म्युनिसिपल टेक्निकल् स्कूल, सोलापूर (ब) खाजगी संस्थांनीं चालविलेल्या, पण सरकारी ग्रँट न मिळणाऱ्या शाळा:—

३० अनाथ विद्यार्थीगृह इंडस्ट्रियल स्कूल, अहमदनगर,

३१ जाधव कॉलेज् टेलरिंग अ‍ॅण्ड कटिंग, पुणें,

३२ आर. सी. मिशन् आनंद प्रेस इंडस्ट्रियल् स्कूल, आनंद.

३३ अमेरिकन् वेसलियन् मिशन इंडस्ट्रियल् स्कूल, संजाण.

३४ दी एस्.एल्. पांडे इंडस्ट्रियल् स्कूल, माथेरान,

३५ताबलिजे तालिम अंजुमान इस्लाम वीव्हिंग क्लास, पाथर्डी.

३६पंढरपूर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीज् वायरमेन्स क्लास, पंढरपूर. (क) अल्पवयी गुन्हेगारांकरितां व गुन्हेगार जातींकरितां काढलेल्या सरकारी शाळा. या शाळांना ग्रँट मिळत नाहीं.

३७ येरवडा रेफर्मेटरी स्कूल, येरवडा.

३८डेव्हिड ससून इंडस्ट्रियल् अ‍ॅण्ड रिफॉर्मेटरी इन्स्टिटयूट, मुंबई.

३९ इंडस्ट्रियल् सेटल्मेंट स्कूल, सोलापूर.

४० इंडस्ट्रियल् सेटल्मेंट स्कूल, विजापूर.

४१ इंडस्ट्रियलसेटल्मेंट स्कूल, हुबळी.

४२ इंडस्ट्रियल् सेटलमेंट स्कूल, गदग.

(४) मुंबई इलाख्याच्या औद्योगिक खात्याच्या डायरेक्टरच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असलेल्या **सरकारी यांत्रिक शाळा**.:—

४३ दी. आर. सी. टेक्निकल् इन्स्टिटयूट, अहमदाबाद.

४४ दी गव्हर्नमेंट टेक्निकल् स्कूल, आवा, (Dangs)

व्हिक्टोरिया जुबिली टेकनिकल इन्स्टिटयूट मुम्बई:— मुंबई इलाख्यांतील टेक्निकल् इन्स्टिटयूटमध्यें सर्वांत प्रमुख अशी ही संस्था असून, हिंदुस्थानांत उत्कृष्ट ठरलेल्या ज्या कांहीं टेक्निकल् इन्स्टिटयूटस् आहेत त्यांत हिची गणना होते. विश्वविद्यालयांतील पदवी संपादन करण्यास जितकें शिक्षण लागतें तितकें शिक्षण देण्यांत येतें. येथील पदवी मात्र निराळी असते. या संस्थेची व्यवस्था एका बोर्डाकडे असते. या बोर्डांतील सर्व म्हणजे ७ सभासद व चेअरमन् सरकारनें नेमलेले असतात. या बोर्डांत औद्योगिक खात्याच्या डायरेक्टराचा समावेश केला जातो. या संस्थेंतील शिक्षणक्रम ४ वर्षांचा असून अभ्यासाकरितां खालील पैकीं कोणताही विषय घेतां येतो. (१) मेकॅनिकल् इंजिनिअरिंग (२) इलेक्ट्रिकल् इंजिनिअरिंग (३) टेक्स्टाइल् मॅन्युफॅक्चर (४) टेक्निकल् अँड अप्लाइड केमिस्ट्री. (५) सॅनिटरी इंजिनिअरिंग अँड प्लंबिंग. १९३१ सालीं प्राथमिक परीक्षा घेऊन ५५० विद्यार्थ्यांपैकीं २०१ विद्यार्थ्यांना संस्थेंत प्रवेश देण्यांत आला. या वर्षी संस्थेनें २,५५,४८० रुपये खर्च केले व त्यांतील १,२५,००० रुपये सरकारनें दिले.

२ मुंबई इलाख्यांतील हस्तकौशल्याच्या धंद्यांची सद्य:स्थिति:— इसवी सन १९२६मध्यें मुंबई सरकारनें इलाख्यांतील हस्तव्यवसायाच्या धंद्यांची पाहणी करण्यासाठीं मुंबईच्या म्युझिअममधील एक अधिकारी मि. फर्नांडिस यांस मुद्दाम नेमलें होतें. त्यांनीं पाहणी करुन केलेल्या रिपोर्टाचा गोषवारा खालीं दिला आहे. :—

मुंबई इलाख्यांत मुख्यत: खालील हस्तव्यवसाय व कलाकुसरीचे धंदे चालू आहेत. (१) बिछायती, जाजमें, गालिचे वगैरे विणणें. (२) चिटें छापणें, चिटाचें कापड तयार करणें. (३) हातमागावर रेशमी कापड विणणें. (४) हातमागावर कापसाचें व लोंकरीचें कापड विणणें. (५) सोन्याची व चांदीची जरतार काढणें. (६) किनारी जरीकांठ, नवार व कलाबतूचें कापड विणणें. (७) कशिद्याचें व वेलबुटीचें जरतारी व रेशमी काम. (८) किनखाप तयार करणें. (९) लाखकाम. (१०) चिनीमातीचीं भांडीं, कौलें, फरशी तयार करणें. (११) दागिने घडविणें. (१२) चंदनाचें कोरीव काम. (१३) हस्तिदंतावरील खोदकाम. (१४) जडावाचें काम (१५) शिल्पकला. (१६) धातूंचीं भांडीं वगैरे करणें. (१७) गव्याच्या शिंगावरील नक्षीचें काम इत्यादि.

मि. फर्नांडिस यांनीं सुरत, अहमदाबाद वगैरे ठिकाणीं पाहणी केल्यावर खानदेश, नाशिक, पुणें वगैरे मराठी जिल्ह्यांतील कारागिरांची व त्यांच्या धंद्याची स्थिति अवलोकन केली व नंतर मुंबई, सिंधप्रांत, संस्थानें व दक्षिण महाराष्ट्र, कानडा वगैरे प्रांत ते हिंडले. मुंबईखेरीज बहुतेक सर्व ठिकाणीं कारागीर लोकांची स्थिति फार हलाखीची असून कलेचा योग्य मोबदला यंत्रावर तयार झालेल्या हलक्या मालामुळें त्यांना मिळत नाहीं. तसेंच कारागीर लोकांत वंशपरंपरेनें चालत आलेल्या कलेंत सुधारणा करण्याची तयारी नसते. बहुतेक कारागीर निरक्षर व सावकारावर अवलंबून असतात. सावकारानें कच्चा माल पुरवावा व थोडया मजुरींत उत्तम काम करवून घेऊन पुष्कळ फायदा घ्यावा अशी बहुतेक धंद्यांची स्थिति आहे. तसेंच खऱ्या कलावंताला कलेच्या दृष्टीनें प्रोत्साहन देऊन पुढें येऊं देणें हें व्यापारी धोरणाच्या विरुद्ध असल्यानें सर्व कलाकुसरीचे धंदे हळूहळू नाश पावत आहेत. म्हणून सदर धंद्यांची व तद्वारां कारागीर लोकांची स्थिति सुधारण्याकरितां सरकारनें खालीं दिल्याप्रमाणें व्यवस्था करावी अशी सूचना आहे.

(१) प्रांतांतील मुख्य शहरीं चित्रकला धंद्याच्या दृष्टीनें शिकविण्याच्या शाळा काढाव्यात व त्यांत देशी तऱ्हेची चित्रकला (आकृति, नमुने वगैरे) शिकविण्यांत यावी.

(२) कारागिरांनीं तयार केलेल्या मालाची प्रसिद्धी व निरनिराळ्या आकृतींचे नमुने कसे करावेत वगैरेसाठीं एक कला मासिक चालवावें.

(३) रंगकाम कसें करावें हें रंगारी लोकांस सुशिक्षित रंगाऱ्याकडून प्रत्यक्ष दाखवावें.

(४) रेशीम, कापूस, जर वगैरे कच्चा माल कारागिरांना योग्य दरानें पुरविण्यासाठीं ठिकठिकाणीं त्या त्या मालांचे डेपो सरकारतर्फे उघडावे.

(५) उद्योगधंद्यांच्या शाळा काढून व शिक्षणसंस्थांतून कला-वर्ग काढून कारागिरांच्या मुलांना त्यांच्या धंद्यांचें शिक्षण द्यावें.

(६) कारागिरांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं (व कर्जबाजारीपणा नाहींसा होण्यासाठीं) प्रत्येक धंद्यांतील लोकांनीं सहकारी मंडळी स्थापावी व त्या त्या धंद्याचे सर्व व्यवहार अशा मंडळीतर्फे चालावेत.

(७) रेशमाचे धंद्यांत चिनी व जपानी रेशीम बरेंच वापरलें जातें व त्यामुळें त्या देशांत बराच पैसा दरसाल जातो. ह्याकरितां नाशिक, हुबळी, धारवाड वगैरे ठिकाणीं रेशमाची निपज करण्याकरितां सरकारनें प्रोत्साहन द्यावें व मदत करावी.

(८) जरतारीचा धंदा चांगला चालण्यासाठीं परदेशांतून येणाऱ्या नकली जरतारीवर आयात कर वाढवावा.

(९) हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं होणाऱ्या कलाकुसरीच्या व हस्तव्यवसायाच्या जिनसांचीं पदार्थसंग्रहालयें स्थापावींत.

(१०) मुंबईच्या रे आर्ट वर्कशॉपमध्यें सध्यां न शिकविण्यांत येणारे व्यवसाय म्हणजे तलम वस्त्रें विणणें, लाख—काम, व चंदनावरील कोरीव काम वगैरे शिकविण्याचे वर्ग काढावे व सदर वर्कशॉपमध्यें प्रत्येक धंद्याचे कला—शिक्षक तयार करवावेत.

(११) कारागिरांनीं तयार केलेल्या मालाचा लवकर खप होण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्याचे गांवीं ब्यूरो उघडावेत. ब्यूरोतर्फे तयार माल खरेदी करणें व विकणें आणि कच्चा माल कारागिरांना पुरविणें वगैरे व्यवहार व्हावेत. मुंबईसारख्या मोठ्या व्यापाराच्या ठिकाणीं प्रत्येक जिल्हा—ब्यूरोमधून उत्तम माल मागवून विक्रीसाठीं ठेवावा.

हस्तव्यवसायाची माहिती

१ कलाबतूचें जरतारी व रेशमी काम——ह्यांत हातानें केलेलें सर्व प्रकारचें विणकाम येतें. उपजीविकेचा धंदा म्हणून नव्हे तर फुरसुतीच्या वेळांत हें काम घरोघरीं थोड्या फार प्रमाणांत होतें. गुजराथेंत व सिंधमध्यें पुष्कळ स्त्रिया विणकामांत गुंतलेल्या असतात. रेशमी अथवा सुती पातळांचे काठांवर व मध्यें, पोलक्यांवर व लहान मुलांचे कपड्यावर जरतारी किंवा रेशमी काम विणून शोभा आणणें हा ह्या कामाचा उद्देश होय. कांहीं ठिकाणीं पडद्यांवर, उशांचे अभ्र्यावर व टेबल—क्लॉथवर असलें काम करण्यांत येतें. घरोघरीं केलेल्या कामाशिवाय धंदा म्हणन करणाऱ्या लोकांची संख्या सबंध इलाख्यांत अदमासें ५०००० आहे. माल येथें व परदेशींही जातो. ह्या धंद्यांतील लोकांची स्थिति बरी आहे. पुरुष कामकऱ्याला अदमासें एक रुपया रोज मिळतो व स्त्रीला ८ ते १० आणे रोज पडतो. उत्तम कामकऱ्याला २ रु. रोज मिळूं शकतो. महाराष्ट्रांत कलाबतूचें विणकाम घरोघरीं केलेल्या कामाशिवाय धंदा म्हणन थोड्या प्रमाणांत होतें. मुंबईस श्रीमंत गिऱ्हाईक पुष्कळ असल्यानें हें काम बऱ्याच प्रमाणावर धंदा या दृष्टीनें चालतें. गुजराथेंत सुरत व अहमदाबाद येथें व सिंधमध्यें खैरपूर संस्थानांत व पुष्कळ शहरांतून कलाबतूच्या कामावर बरेच लोक आपली उपजीविका करतात व कलेच्या दृष्टीनें त्या प्रांतांतील काम नांवाजण्यासारखें होतें. सुरत शहरांत व जिल्ह्यांत सुमारें २५० कारखाने असून कारागीर १०००० पर्यंत आहेत. शिवाय घरोघरीं सुखवस्तु कुटुंबांतील स्त्रिया विणकाम करतातच. ह्या कामाकरितां लागणारें निरनिराळ्या रंगाचें रेशीम, जरतारी वगैरे माल तेथेंच तयार होतो. मखमल मात्र मुंबईहून मागवितात. मखमलीच्या किनारीवर तऱ्हेतऱ्हेचीं फुलें व पानें वगैरे विणकाम करण्यांत येतें. अहमदाबादेंत सुमारें २०० कारागीर आहेत त्यांना रोज १॥ ते २ रुपये मिळतात. शिवाय प्रत्येक घरीं हें काम होतें. व्यापाऱ्यांवर अवलंबून असल्यामुळें चांगल्या कामाचा योग्य मोबदला कारागिरांना मिळत नाहीं. सिंधमध्यें ठाणा बुलाखान येथें मुसलमान स्त्रिया टोप्यांवरील कलाबतूचें विणकाम फार सुंदर करतात. कोत्री येथें शर्ट, पायजमे, जाकिटें वगैरे विणकाम चांगलें होतें. हैदराबाद (सिंध) येथील चढाव व खोगरावर कलाबतूचें काम प्रेक्षणीय असतें. बहुतेक सुंदर काम स्त्रियाच करितात. येथील कारागिरांची स्थिति समाधानकारक आहे. कमरअलीखान येथें बुटावरील कलाबतूचें नक्षीकाम बऱ्यापैकीं होतें. हिंदी संस्थानांपैकीं खैरपूर (सिंध) संस्थानांत टोप्यांवर व चपलांवर उत्कृष्ट कलाबतूचें काम होतें. तसेंच खंबायत संस्थानांत बोहरी स्त्रिया उत्तम काम करतात.

२ कशिदा व नकशी काम:——कशिद्याचें काम बहुतेक घरीं स्त्रिया करतात. धंदेवाईक लोक धारवाड, बेळगांव, मुरगोड, कित्तूर वगैरे ठिकाणीं व सिंधमध्यें आहेत. कशिदा हातरुमालांवर, शेल्यांवर, पगड्यांवर व पडद्यांवर रेशमानें अगर रंगीत सुतानें रंग खुलवून करतात. नक्षीकाम व कशिदाकाम हें साधारण किंमतीच्या वस्त्रावर काढतात.

३ कापड (हातमागावर) विणणें:——
(अ) सुती कापड—कापूस होणाऱ्या प्रांतांत विशेषतः गुजराथेंत व महाराष्ट्रांतील सोलापूर, कर्नाटक व खानदेश प्रांतांत हातमागावर सुती कापड विणण्याचे अनेक कारखाने बहुतेक शहरांतून आहेत. ह्यांशिवाय प्रत्येक खेडेगांवांत (निदान पंचक्रोशींत) हातमागावर कापड गरजेपुरतें जाडें-

भरडें कां होईना तयार होतें.सुती कापडाचे प्रकारः- धोतरें, पंचे, टॉवेल, लुगडीं, पातळें, चादरी, शर्टिंग, खण वगैरे होत. विजापूर जिल्हा हा लुगडीं व खणाकरितां प्रसिद्ध आहे. सोलापुरांत पुष्कळ माल होतो, पण वापरावयाला व दिसायला सुंदर माल होत नाहीं म्हटलें तरी चालेल. मुंबई व अहमदाबाद येथेंही अशीच स्थिति आहे. सुरतेचा माल चांगला असतो.भडोच येथें रजया चांगल्या होतात. हातमागावर जीवित अवलंबून असलेल्यांची संख्या मुंबई इलाख्यांत ८ लाख आहे. हातमागावरील कापड वापरण्यास बळकट असल्यामुळें पुष्कळ लोक वापरतात. म्हणून ह्या धंद्यांतील लोकांची हलाखी नाहींशी करण्यास त्यांना सुधारलेले हातमाग वापरावयास लावलें पाहिजे व आधुनिक तऱ्हेनें कापड रंगविणें वगैरे कला शिकविल्या पाहिजेत. तसेंच सावकारांचे त्रासांतून सुटण्याकरितां सहकारी पतपेढ्यांची सोय केली पाहिजे.

पूर्व खानदेशांत पारोळें, वरणगांव वगैरे ठिकाणीं पुष्कळ हातमाग आहेत. काम साधारण प्रतीचें होतें. बहुतेक वीणकर लुगडीं, जाडेंभरडें कापड वगैरे माल काढतात.

नाशिक जिल्ह्यांत येवलें येथें पागोटीं, खण, लुगडीं वगैरे माल पुष्कळ तयार होतो. माल चांगला असतो व लवकर खपतो. परंतु विणकर लोक सावकारावर व व्यापाऱ्यावर अवलंबून असल्यामुळें त्यांची आर्थिक स्थिति असावी तितकी चांगली नाहीं. एरव्हीं धंद्याला तेजी आहे. नाशिक येथें हातमागावर हलक्या प्रकारचीं लुगडीं तयार होतात.

पुणें येथें लुगडीं व पातळें हातमागावर तयार होतात. तीं साधारण प्रतीचीं असतात. विणकरांची स्थिति वाईट आहे.

विजापूर जिल्ह्यांत बागलकोट, इलकल व गुळेदगुड येथील लुगडीं, पातळें, खण वगैरे माल चांगल्या प्रतीचा तयार होतो. एकंदर हातमागांची संख्या ८ हजारापर्यंत असून २० हजार लोक ह्या कामांत गुंतलेले आहेत. सदर ठिकाणच्या मालाची उत्तमपणाबद्दल ख्याति असून माल सर्वत्र खपतो. गुळेदगुड येथील विणकरांची स्थिति वाईट असून मारवाड्याकडून कर्ज काढलेले शेंकडा ५०।६० विणकर आहेत. गुडुर व गुळेदगुड येथें चोळ्यांचे खण फार चांगल्या तऱ्हेचे होतात.

सोलापूर जिल्ह्यांत हा एक मोठा धंदा आहे. हातमागांची संख्या ६००० आहे. व विणकर वगैरे लोक २०००० चे वर आहेत. सोलापूरशिवाय बार्शी, करमाळें, सांगोलें येथें लुगडीं तयार होतात. माल पुष्कळ होतो. परंतु गिरण्यांतून तशा प्रकारचा माल होऊं लागल्यामुळें हातमागांचा धंदा लवकरच बसेल अशी भीति वाटते.

सातारा जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं लुगडीं व धोतरें वगैरे माल साधारण प्रतीचा तयार होतो.

अहमदनगर जिल्ह्यांत कोष्टी लोक बऱ्यापैकीं माल काढतात.

बेळगांव जिल्ह्यांत कासबाग येथें लुगडीं, पातळें, उपरणीं, धोतरें व खण तयार होतात.

धारवाडांत नवलगुंद येथें सतरंज्या चांगल्या प्रतीच्या होतात. तसेंच कांहीं ठिकाणीं लुगडीं,खण, पातळें व धोतरें वगैरे माल तयार होतो. हुबळींत सुमारें ३००० मागावर लुगडीं व खण तयार होतात. येथील विणकरांपैकीं शें. ८० कर्जबाजारी आहेत. येथील माल चांगला असतो. सुरतेंत हातमागावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या दहा ते पंधरा हजार आहे. विणकऱ्यांची स्थिति फार हलाखीची असून हातमागावरच ते पूर्ण अवलंबून असल्यामुळें मिळेल त्या मजुरीनें कसेंतरी काम केलें जातें. तऱ्हेतऱ्हेच्या कांठांचीं व पदरांचीं लुगडीं पातळें वगैरे माल येथें चांगला होतो. तसेंच चोळ्यांचें कापड व कांठ वगैरे माल होतो. भडोच येथें लुगडीं व दुलया चांगल्या प्रकारच्या तयार होतात. अहमदाबाद येथें सुती लुगडीं वगैरे माल होतो. कराची जिल्ह्यांत ठठ्ठा येथें गुरबी, मश्रू, खेस, सफा वगैरे तऱ्हेचा माल चांगला होतो व त्याचा खप तेथें चांगला आहे. आजरक नांवाचें कापड पलंगपोसाकरितां व एरव्हीं पांघरण्याकरितां उपयोगी पडतें. त्याशिवाय दुलयाकरितां कापड, टेबलकव्हर्स व सुशी वगैरे कापड बरेंच होतें.

हैदराबाद (सिंध) जिल्ह्यांत माटली व नसरपूर येथें आजरक, खेस, सुशी वगैरे प्रकारचें कापड चांगलें तयार होतें.लारखान्यांत साधारण प्रतीचें कापड विणलें जातें. संस्थानांपैकीं कुरुंदवाड येथें थोडें काम बरें होतें.

(आ) **रेशमी कापड विणणें**-नाशिक जिल्ह्यांत येवलें येथें पीतांबर, पैठण्या, रेशमी लुगडीं, पागोटीं, खण वगैरे माल पुष्कळ व चांगला तयार होतो. त्या धंद्यांत ४।५ हजार लोक गुंतलेले असून त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली नाहीं. येथील विणकरांचें काम चांगलें होतें. ते कष्टाळु आहेत. परंतु पुष्कळांना सावकाराचें देणें आहे. येथील माल नामांकित असून महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं खपतो.

पुणें येथें पीतांबर, पैठण्या, शालू, रेशमी लुगडीं व निरनिराळ्या तऱ्हेचा माल हातमागावर होतो. यथें व येवल्यासही वरील प्रकारच्या मालावर जरीचें नक्षीकाम फार सुंदर होतें. याशिवाय रेशमी कद, शेले वगैरे माल होतो. बागलकोट व हुबळी येथें रेशमी लुगडीं व खण वगैरे माल बराच होतो. ह्याशिवाय महाराष्ट्रांतील बहुतेक जिल्ह्यांतून थोडा फार माल स्थानिक गरजेपुरता होतो. कुरुंदवाड (धा.पाती) येथें रेशमी लुगडीं, पीतांबर, उपरणीं वगैरे माल होतो. सुरत येथें रेशमी लुगडीं, लुगड्यांचे पदर, चोळ्यांचे रेशमी कांठ, चोळ्यांकरितां रेशमी कापड, शर्टिंग, कोटाकरितां व विजारीकरितां कापड वगैरे तऱ्हेचा माल पुष्कळ व चांगला होतो.येथील रेशमी मालहि सर्वत्र प्रसिद्ध असून त्याला चांगला खप आहे. एकंदर सुती व रेशमी मिळून विणकरांची संख्या १०००० असेल. येथें निरनिराळ्या तऱ्हेचा माल होत असल्यानें तो सिंगापूर, आफ्रिका, ब्रह्मदेश, अरबस्तान, इराण व क्वचित् युरोपमध्येंही जातो.

अहमदाबाद येथेंही चोळ्यांचें रेशमी कापड व कांठ, रेशमी लुगडीं वगैरे माल बरा व पुष्कळ होतो. येथें रेशीम बहुतेक चिनी, जपानी अथवा विलायती वापरतात. येथील विणकरही व्यापाऱ्यांवर अवलंबून असल्यामुळें, गरीब असतात. जुन्या तऱ्हेच्या हातमागावर वाकून व नेहमीं अस्वच्छ, कोंदट जागेंत काम करीत असल्यानें विणकर लोक रोगट दिसतात. सिंधमध्यें ठठा, नासरपूर, शिकारपूर, खैरपूर, राणीपूर, लुकमान वगैरे ठिकाणीं सिंधी व मुसलमान लोकांना लागणारा रेशमी व जरी चा माल चांगल्या प्रतीचा तयार होतो साधारणत: जरीचें नक्षीकाम करण्यासाठीं पुष्कळ रेशमी कापड वापरलें जातें. नासरपूर येथील खेस नांवाचें रेशमी–जरतारी कापड फार खपतें.

खैरपूर व खंबायत या संस्थानांत रेशमी कापड चांगलें होतें. खंबायतची रेशमी लुगडीं सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

(इ) **मिश्र–रेशमी व सुती कापड विणणें** रेशमी कापड जेथें जेथें विणलें जातें तेथें तेथें मिश्र कापड तयार होतें. मध्यम स्थितींतल्या लोकांना निवळ रेशमी कापड घेणें परवडत नाहीं. त्यांचेकरितां व सुती कापडाला किनारी, कांठ, पदर वगैरेकरितां रेशमी व सुती माल तयार होतो.

(ई) **लोंकरीचें कापड विणणें**:—मराठी जिल्ह्यांत लोंकरीचें चांगल्या प्रतीचें कापड होत नाहीं. फलटण संस्थानांत घोंगड्या बऱ्यापैकीं तयार होतात. तसेंच ठिकठिकाणीं घोंगड्या, ब्लँकेटस् वगैरे माल थोडाफार होतो. गिरणीच्या मालामुळें हातमागावरील मालाला गरीब लोकांशिवाय इतर लोकांत फारसें महत्त्व नाहीं.

(४) **किनखाप विणणें**:—हिंदुस्थानांत हातमागावर तयार होणाऱ्या अतिशय भारी मालापैकीं किनखापाचें कापड हें एक उत्कृष्ट व जगभर प्रसिद्ध आहे. सुरतेंत हें कापड चांगल्या प्रतीचें व कलेच्या दृष्टीनें व किंमतीनें उत्तम तयार होतें. अहमदाबाद, पुणें व सिंधमध्येंही किनखाप तयार होतें. सुरतेंत सुमारें ३०० लोक किनखापाचें काम करतात. परदेशी दिखाऊ व नकली किनखापामुळें ह्या धंद्याला व कलेला धक्का बसेल अशी भीति वाटते. श्रम व कला यांच्या दृष्टीनें किनखाप विणणाऱ्यांना दाम फारच कमी. रोजीं १२ आणे ते १ रुपया मिळतो. निरनिराळ्या रंगाच्या रेशमी कापडावर नक्षी, वेलबुट्या, देवादिकांचीं चित्रें, फळें, पानें, फुलें वगैरे फार सुंदर रीतीनें काढण्यांत येतात. पूर्वी देशी तऱ्हेनें रंग देत असत ते आकर्षक व उठावदार दिसत. हल्लीं परदेशी रंग वापरतात ते भडक दिसतात. किनखापाचें कापड दर वारीं ५ ते ७५ रु. किंमतीचें असतें. मालाला मागणी नसल्यानें धंद्याला तेजी नाहीं. ह्या धंद्याच्या उर्जितावस्थेस सरकारनें अवश्य मदत केली पाहिजे.

पुणें येथें एक कारखाना चांगला चालला आहे. किनखापांत रेशीम व जर (सोन्याची व चांदीची फार उत्तम तऱ्हेनें विणलेली असते व त्यांत वेलबुटी, फुलें वगैरें विणलेलीं असतात. एकंदर विणकाम फारच सूक्ष्म व सुंदर असतें. किनखापावर जरीचें काम केलेलें कापड, टोप्या, चोळ्या वगैरेकरितां वापरतात.

सुरत–ह्या धंद्यांत सुमारें ३०० लोक आहेत. त्यांना रोज १२ आणे ते १ रुपया मिळतो. कलेच्या व कष्टाच्या मानानें मजूरी अगदींच कमी आहे. कारागिरांची स्थिति निकृष्ट आहे. त्यांना कच्चा माल पुरविणारे व परत तयार माल त्यांचेकडून विकत घेणारे व्यापारी यांना मात्र पुष्कळ फायदा मिळवितां येतो. येथील कामाच्या उत्कृष्टतेची खात्री वर्णन करून देतां येणार नाहीं. कारण काम करीत असतांना व तयार झाल्यावर पाहणें यावरून ती कला किती उच्च दर्जाची आहे तें. कळतें पूर्वी देशी वनस्पतिजन्य रंग वापरीत असत परंतु हल्लीं विलायतेहून आलेले कृत्रिम रंग वापरतात. देशी रंग दिसायला सुंदर व पक्के असत. विलायती

रंगामुळें कारागिरांचे श्रम कमी झाले आहेत; परंतु ते रंग भडक व फारसे टिकाऊ नसतात. किनखाप दरवारीं ८ रु. किमतीपासून असते. मुंबईच्या म्युझिअममध्यें देशी रंगानें रंगविलेल्या ३०० वर्षांपूर्वीची किनखाप ठेवली आहे. त्यावरून पाहतां पूर्वीपेक्षां हल्लीचें काम निकृष्ट प्रतीचें होतें.व हल्लीं विलायती तऱ्हेच्या आकृती, नमुने वगैरे पाहून त्याप्रमाणें कारागीर श्रम कमी करतात कारण काम पुष्कळ झालें पाहिजे व तें शक्य तितक्या कमी वेळांत झालें पाहिजे तरच लोकांना परवडणाऱ्या किंमतींत तें विकतां येईल. शिवाय परदेशी मालाची स्पर्धा आहेच.

अहमदाबाद येथें सुमारें २०० कुटुंबें किनखाप तयार करणारांचीं आहेत. कारागिरांची स्थिति वाईट आहे. काम मिळाल्यास बरें,नाहीं तर स्वस्थ बसावें लागतें. दररोज आठदहा तास काम करून मजुरी फक्त १२ आणे ते रुपया मिळते. पूर्वी त्यांची स्थिति बरी होती. रेशीम चिनी, जपानी किंवा बंगलोरी, काश्मीरी वापरतात. जरतार तेथेंच तयार करतात, किंवा सुरतेहून मागवितात. येथेंही सुरतेप्रमाणेंच काम चांगलें होतें. कामाच्या मानानें योग्य मोबदला व्यापाऱ्यांच्या मध्यस्थीमुळें (स्वार्थामुळें) मिळत नाहीं. सरकारनें कारागिरांना मदत न केल्यास त्यांचा धंदा अजिबात बसेल व जगभर नांवाजलेली हिंदुस्थानची एक उत्कृष्ट कला नाहींशी होईल. तेव्हां सरकारनें कारागिरांना कच्चा माल योग्य दरानें पुरवून, तयार माल खपविण्याची व्यवस्था करवून उत्कृष्ट मालाची निपज करवून व कारागिरांना परतफेडीच्या बोलीनें कमी दरानें कर्जाऊ रकमा देऊन सदर धंदा उर्जितावस्थेस आणण्याची व्यवस्था करावी. (अशी सूचना आहे).

ठठा (सिंध) येथेंही किनखापाचें काम थोडें पण बरें होतें.

(५) किनारी–जरीकाठ–खण–कांठ **वगैरे विणणें**–सुरत, अहमदाबाद, हुबळी व मुंबई येथें रेशमी जरीकांठाचें काम होतें. सिंधमध्यें नवार पुष्कळ तयार होतें. किनारीवरील नक्षीकाम साटीन व वेल्वेट कापडावर व रेशमी फितीवरही करतात. सुरत येथील किनारीचीं हिंदुस्थानभर ख्याति आहे. किनारी ८ आण्यापासून ४ रु. वारापर्यंत मिळतात. या मालाला फार खप आहे. सुरत येथें हलका माल वापरूनही काम पुष्कळ होतें परंतु अहमदाबाद येथें भारी व खऱ्या जरतारीचा माल बहुधा करतात.

सुरत–येथें पुष्कळ माल तयार होतो. अर्धा ते तीन इंच रुंद माल तयार होतो. येथें कारागिरांची संख्या २००० पर्यंत आहे. हल्लीं श्रीमंत लोकांकरितां खऱ्या जरीचा भारी मालही येथें तयार होऊं लागला आहे. माल चांगला व पुष्कळ होतो व सर्व देशभर खपतो.काम मेहनतीचें असल्यामुळें वेळ फार लागतो.कारागिरांना रोज १० आणे मिळतात. आधुनिक तऱ्हेचे माग वापरल्यास माल पुष्कळ तयार होऊन स्वस्त पडेल व कारागिरांची स्थिति सुधारून धंद्याला तेजी येईल.

मुंबई येथें विणलेली व कशिदा काढलेली असे दोन्हीं प्रकारचे कांठ, किनारी, फिती वगैरे माल पुष्कळ तऱ्हेवा तयार होतो व त्याला मागणीही असल्यानें लवकर खपतो. अहमदाबाद येथेंही पुष्कळ तऱ्हेचा माल तयार होतो. कारागिरांची संख्या सुमारें ५०० आहे. रेशीम देशी व परदेशी दोन्ही वापरतात व जरतार सुरतेची अथवा स्थानिक तयार झालेली वापरतात. कामकऱ्यांना श्रमाचे मानानें मजूरी कमी मिळते.

हुबळी–रेशमी व जरीकांठ माल रेशमी लुगड्यांकरितां व चोळ्यांकरितां उत्तम प्रतीचा येथें तयार होतो. येथील मालाची बरीच प्रसिद्धी आहे.

(६) **खडे बसविणें**:—हिरे–माणकें वगैरे कोंदणांत बसविण्याची कला मुख्यतः खंबायत व मुंबई येथें आहे. परदेशी मालाच्या स्पर्धेमुळें खंबायतची कला दिवसेंदिवस नाहींशी होत आहे. कारागीरलोक मुंबईसारख्या मोठ्या शहरीं जाऊं लागले आहेत. नीलमणी, हिरे, माणकें, पाचू, काचमणी. मोतीं वगैरे सर्व प्रकारचें काम तेथें होतें.परंतु पूर्वीसारखें उत्कृष्ट दर्जाचें काम हल्लीं पहावयास मिळत नाहीं. खंबायत येथें सुमारें पांचशें लोक हें काम करतात. त्यांना रोज दहा ते बारा आणे मजुरी मिळते.येथें पॉलिशचें, कृत्रिम रत्नांचें, गोमेदाचें वगैरे सर्व कामें होतात. माल सर्व हिंदुस्थानभर व परदेशींही खपतो. सर्व प्रकारचे दागिन्यांत वापरल्या जाणाऱ्या खड्यांचें काम येथें होतें.

(७) **गालिचे–बिछायती वगैरे विणणें**:—परदेशी व देशी, यंत्रावर तयार झालेल्या हलक्या व नकली मालामुळें हातमागावर तयार होणाऱ्या मालाला तेजी व महत्व पूर्वीइतकें राहिलें नाहीं. तरी परदेशांत सुद्धां अजून माल खपतो. बिछायतीचे पुष्कळ प्रकार जाजमें, सतरंज्या, झोरे, गालिचे व फरासी वगैरे आहेत. हिंदुस्थानांतील बहुतेक मोठ्या तुरुंगांतून सुती बिछाइतींची पैदास कैद्यांकडून करवून घेतात. तसेंच महाराष्ट्रांतही

कांहीं ठिकाणीं जाडाभरडा माल निघतो. उत्कृष्ट तऱ्हेचा माल सुरत, सिंधप्रांत, अहमदाबाद, खैरपूर संस्थान वगैरे ठिकाणीं होतो.

सुरत येथील हिंदु अनाथालयांतील मुलांकडून करवून घेतलेले गालिचे उत्कृष्ट प्रतीचे असतात. त्यांची ख्याति इंग्लंडांतील राजघराण्यांत व यरोपांतही झाली आहे. तेथें मागणीप्रमाणें पाहिजे तसा माल तयार करून देतात. सदर संस्था केवळ श्रीमंत दयाळू लोकांचे आश्रयाखालीं चालली आहे. सरकारनें तेथील कामाचा उत्कृष्टपणा पाहून तिला मदत केली पाहिजे. लोंकर स्वतःच रंगवून तिचे गालिचे विणतात. मालाला लोकाश्रय नसल्यानें धंदा मुळींच चालत नाहीं. अहमदाबाद येथें सरस्वती कार्पेट फॅक्टरींत हातमागावर मागणीप्रमाणें माल तयार होतो. कच्चा माल लोंकर जयपूरहून व सूत अहमदाबादेहूनच मिळतें. तयार माल मुंबईस व उ. हिंदुस्थानांत खपतो. तयार माल २ रु. चौरस फूट प्रमाणें विकतात. येथील कामकऱ्यांची स्थिति बरी आहे. मजुरी रोज रुपया प्रमाणें मिळतें.

नवलगुंद (धारवाड जिल्हा) येथें उत्तम बिछायती तयार होतात. मालाची प्रसिद्धी झाल्यास येथें धंदा चांगला चालेल. मुंबईस रे आर्ट वर्कशापमध्यें गालिचे तयार करण्यास शिकवीत असत. तो वर्ग हल्लीं बंद आहे. तेथें देशी रंग तयार करून वापरीत असत. येथील काम सुंदर व उच्च प्रतीचें होत असे. सिंधमध्यें खैरपूर संस्थानांत उमान या गांवीं फराशी (नांवाच्या बिछायती) चांगल्या तऱ्हेच्या तयार होतात. तसेंच बलुच, हिंद, ठाणा, बुलाखान (कराची जिल्हा), जोई, काशमोर, जाकोबाबाद व थरपारकरमधील कांहीं खेड्यांतून फरासी विणल्या जातात. फरासी या कमी प्रतीच्या गालिच्यासारख्या असतात. सिंधमध्यें बलुची स्त्रिया बहुतेक हें काम करतात. रंग व आकृति यांतील उत्कृष्टपणाबद्दल ह्या गालिचेवजा बैठकी तिकडे फार प्रसिद्ध आहेत व सर्वत्र वापरल्या जातात. फरासींचा उपयोग पांघरण्यास करतात. ह्याशिवाय सिंधमध्यें बुबक येथील गालिचे फार प्रसिद्ध आहेत.बहुतेक अमीर व जमिनदार लोकांच्या घरांत चांगल्या प्रतीचे बुबक गालिचे सांपडतात. बुबक येथील गालिचांप्रमाणें सिंधमध्यें दुसरीकडे कोठेंही गालिचे तयार होत नाहींत. बनिया लोक अगोदर पैसे देऊन ऑर्डर देतात व माल तयार करवून घेतात. कारागिरांची स्थिति बरी आहे.

(८) **चिटें छापणें, चिटाचें कापड तयार करणें** (Calico Printing)-चिटें छापण्याचें काम कापडावर लाकडी कोरीव छापानें करण्यांत येतें. कापड रंगविणें व चिटें छापणें हे दोन धंदे हिंदुस्थानांत सर्वत्र केले जातात. मुंबई इलाख्यांत, खानदेश, धारवाड, नाशिक हे जिल्हे व गुजराथ व सिंधप्रांत यांत हे धंदे प्रामुख्यानें चालतात. पैकीं सिंधमध्यें हें काम उत्तम प्रतीचें होतें. महाराष्ट्रांतील लोकांत छापलेल्या कापडापैकीं नक्षी अगर आकृति विणलेलें कापड जास्त वापरलें जातें. त्यामुळें चिटें छापण्याची कला इकडे फारशी वाढलेली नाहीं. कापड स्वच्छ धुतल्यानंतर अगोदर कांठ रंगवितात. व त्यावरील छापाचें काम करितात.नंतर मध्यभागीं काम करितात. ह्यावरील छापण्याचें काम करणारे लोक हुषार असून बिनचूक, नाजूक व सुंदर काम करण्याबद्दल त्यांची प्रसिद्धि आहे. साधें, रंगीत किंवा सोनेरी (वर्खाचीं) फुलें व किनारी वगैरे पातळावर छापण्यांत येतें. मुंबईस व महाराष्ट्रांतही अशा खडी काढलेल्या कापडास फार मागणी असते. जातीपरत्वें व देशपरत्वें निरनिराळ्या तऱ्हेचीं चिटें छापण्याचे प्रकार आहेत. सिंधी मुसलमानांस आजरक नांवाचें चिटाचें कापड फार आवडतें. अहमदाबादेस "बांधणी" तऱ्हेचें काम अति सुंदर होतें. हें काम फार कुशलतेचें असून बोटांच्या नखांनीं करावें लागतें. (Calico Printing) चा धंदा बहुतेक ठिकाणीं चांगला चालला आहे. माल हिंदुस्थानांत सर्वत्र खपतो. मुंबई इलाख्यांत या धंद्यांत अजमासें ३०००० लोक गुंतलेले आहेत. रंग देशी व परदेशी दोन्ही वापरले जातात. कारागिरांची स्थिति बरी आहे.

अहमदाबाद येथें हें काम बरेंच चालतें. कारागिरांची संख्या सुमारें ८०००पर्यंत आहे. हें काम घरगुती धंदा या दृष्टीनें केलें जातें. लाकडी छाप तेथेंच तयार होतात. रंग (बहुतेक जर्मन) मुंबईहून मागवितात. कारागिरास रोज १ते१॥रु. मिळतो. या धंद्यांत फार लोक आहेत व मालही पुष्कळ तयार होतो. सरकारनें डिझाइन्स सुधारण्याकरितां तज्ज्ञ नेमून धंदा सुधारावा म्हणजे उत्तम प्रतीचा माल तयार होईल.

सुरतेस हें काम थोड्या प्रमाणांत होतें. सिंधमध्यें तांडो अल्लाहयार, आराजी, शिकारपूर वगैरे ठिकाणीं आजरक, बक्श, रुसी वगैरे तऱ्हेचें कापड चांगल्या प्रतीचें छापलें जातें.

(९) **चंदनाचें कोरीव काम:**— लांकडावर कोरल्याशिवाय, लाकडाच्या पातळ फळ्या काढणें, निरनिराळ्या वस्तु करणें वगैरे धंदे या सदरांत येतात. नक्षीकाम व कोरीव काम करण्यास हस्तिदंताचे खालोखाल चंदनाचें लाकूड उत्तम होय. कानडा जिल्ह्यांतील गुडीगर लोक हें काम करण्यांत फार कुशल आहेत. शिरसी, कुमठें, होनावर, सिद्दापूर, बिळगी वगैरे ठिकाणीं हें काम होतें. ह्याशिवाय सुरत व अहमदाबाद येथेंही होतें. धंद्याच्या दृष्टीनें चंदनाच्या कोरीव कामाला फारसें महत्त्व नाहीं. कला म्हणूनच त्याच्याकडे पाहिलें पाहिजे. चंदनाच्या लाकडाच्या पुढील वस्तु तयार करतात. फण्या, डब्या, हळदकुंकवाच्या पेटया, दागिन्यांच्या पेटया, पंखे, लहान मूर्ति, देव्हारे, खेळणीं, हत्ती, सिंह वगैरे प्राणी, बुद्धिबळें, हातांत धरावयाच्या काठ्या वगैरे. शिवाय युरोपिअन लोकांकरितां पत्त्याचे डावांकरितां झांकणें, दौती, पेनरॅक्स्, एन्व्हलपच्या पेटया, वगैरे वस्तू तयार होतात. याशिवाय बारीक सुतासारखे धागे तयार करून देवादिकांकरितां चामरें करतात. गुडीगर लोक आपल्या जातीबाहेर हें काम शिकवीत नाहींत त्यामुळें कलेचा प्रसार होण्याऐवजीं ती नाश पावण्याचा जास्त संभव आहे. गुडीगर लोक आळशी व व्यसनी असतात. त्यांच्यांत कुशल कारागीर थोडे आहेत.

कानडा जिल्हा:—चंदनाच्या कोरीव कामांत पौराणिक प्रसंगांचीं चित्रें चांगलीं होतात. येथील काम कलेच्या दृष्टीनें अतिशय सुंदर व नाजुक असतें. हल्लीं हें काम करणारे ६०।७०लोक आहेत. यांत्रिक स्वस्त मालामुळें हातानें तयार केलेल्या मालास गिऱ्हाईक थोडें आहे. तसेंच कारागीर निरक्षर व अडाणी असल्यानें मालाची प्रसिद्धी नाहीं. कारागिरांना रोज १ ते १। रु. पडतो. कारागिराच्या मुलांना ड्रॉइंग व कोरण्याची कला आधुनिक पद्धतीनें व यंत्रांनीं शिकविण्याकरितां येथें शाळा काढल्यास धंदा पुढें बरा चालेल. शिवाय मालाचें प्रसिद्धीकरण करून विक्रीची सोय केली पाहिजे.

सुरत:—येथील काम फार उत्तम होतें. येथें हें काम कुशलतेनें करणारे २० कारागीर आहेत. येथें तयार झालेल्या पेटयांची व कोरीव चित्रांची प्रसिद्धी युरोपांतसुद्धां आहे. बहुतेक इंग्रज अधिकारी येथील कलेचा नमुना म्हणून मुद्दाम चित्रें व डब्या वगैरे माल तयार करवून घेतात. हा धंदा करणाऱ्यांना पेटीगार म्हणतात. त्यांत हिंदु, मुसलमान, पारशी, वगैरे सर्व जातींचे लोक आहेत. निरनिराळे जिन्नस ठेवण्याकरितां लहानमोठ्या पेटया करून त्यावर उत्कृष्ट नक्षीकाम, पौराणिक चित्रें, फुलें वगैरे करण्यांत येतें. कुशल कारागिरास रोज २ ते ३ रु. मिळतात. माल तेथेंच व मुंबईस खपतो.

(१०) **चिनीमातीचीं नक्षीचीं भांडीं, कौलें वगैरे तयार करणें:**—साध्या मातीचीं व हलकीं भांडीं सर्वत्र तयार होतात. परंतु चांगल्या मातीचीं, रंगीत, भाजलेलीं व चांगल्या आकाराचीं भांडीं कोल्हापूर, रत्नागिरी, अहमदाबाद, भडोच, सिंध व कानडा या प्रांतांत विशेष होतात. आपल्याकडे भाजतांना धूर कोंडून भांडीं काळीं करतात. गुजराथेंत काळा रंग देतात. सिंधमध्यें हाला, नासरपूर, खरपूर व मुंबईत भांड्यांना ग्लेज करितात. पुण्यांत देवादिकांच्या मूर्ति वगैरे करतात. रोजच्या उपयोगांत असणाऱ्या खुजे वगैरे भांड्याशिवाय फरश्या व कौलें वगैरे जिन्नस शोभेचे व साधे तयार होतात. ह्या धंद्यांतील लोक निरक्षर व अडाणी असल्यानें धंदा चांगला चालविण्याकरितां त्यांना ह्या कलेचें शिक्षण देणें अत्यंत इष्ट आहे. नक्षीचें व कलेचें मातीच्या भांड्यांचें काम मुख्यत: सिंधमध्यें होतें. मारवाडी व मुसलमान कुंभार व कुंभारणी कित्येक ठिकाणीं फार कुशलतेचें काम करितात.

महाराष्ट्र (येवलें जि. नाशिक) येथें एक मातीच्या मूर्ति करणारा उत्तम कारागीर आहे व त्याचा धंदा बरा चालला आहे.

पुणें येथें गणपती वगैरे मूर्ति चांगल्या प्रतीच्या तयार होतात.

अहमदाबाद येथें ४००।५०० लोक मातीचीं भांडीं, खुजे, पेले, देवांच्या मूर्ति, फळें व जनावरें वगैरे तयार करितात. कुशल कारागीर सुमारें ५० आहेत त्यांना रोज १२ आणे मिळतात. इतरांना ४ ते ८ आणे मिळतात.

सिंध—कराची येथें खुजे पेले वगैरे माल चांगल्या प्रतीचा तयार होतो.

लारखाना जिल्हा—हाला या गांवीं फरशा, कौलें उत्कृष्ट प्रतीचीं तयार होतात. सुमारें ५० कारागीर आहेत. प्रत्येकीं रोज १ ते ३ रु. पर्यंत मिळतो. नासरपूर येथील कारागिरांची स्थिति साधारण आहे. परंतु माल नक्षीचा व इतर फार चांगला होतो. शेहरान येथें हुक्के, खुजे, वगैरे माल व त्यावरील नक्षीकाम—वेलबुटी, फुलपांखरें—उत्तम होतें. कामाचे मानानें मोबदला कमी अशी

स्थिति आहे. कारागीर गरीब स्थितींत आहेत. भांड्याशिवाय येथें शोभिवंत फरश्या वगैरे माल तयार होतो. शिकारपूर, आरोरी येथेंही उत्तम माल तयार होतो.

(११) जरतारी काम:—सोन्याची व चांदीची जरतार काढणें. सोनें किंवा चांदी वितळून त्याची अतिशय बारीक तार केल्यावर ती रेशमाचे अगर सुताचे भोंवती गुंडाळली म्हणजे जरतार तयार होते. ह्या धंद्यांत निवळ सोन्याच्या तारेपेक्षां चांदीच्या तारेस सोनेरी पाणी देण्याचें काम पुष्कळ चालतें. सुरत व मुंबई येथें चांदीची तार पुष्कळ तयार होते. पुणें व येवलें येथें सोन्याची तार तयार होते व वापरली जाते.

पुणें येथें ७१८ कारखाने बारीक तार काढणारे असून साधारण तार काढण्याचे ४१५ कारखाने आहेत. कारागिरांची संख्या सवाशें आहे. मजुरी रोज आठ आण्यांपासून सवा रुपयापर्यंत मिळते. सोनें व चांदी मुंबईहून मागवितात अगर येथेंच घेतात. परदेशी परेंच माल चांगल्या पॉलिशमुळें बराच खपतो येथील तयार माल दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं खपतो.

मुंबई—पायधुणी, भेंडीबाजार, भुलेश्वर वगैरे भागांत ह्या धंद्याचे कारखाने आहेत. कारागीर सर्व जातीचे आहेत. चढाओढीमुळें निवळ सोन्याची अगर चांदीची जर न काढतां मिश्र कमी दर्जाची जर येथें पुष्कळ तयार होते. जरतारीचा उपयोग लुगड्यांचे व चोळ्यांचे कांठाकरितां, किनखापाचे व भारी कशिद्याचे कामाकरितां व रेशमी वस्त्रांना जास्त शोभा आणण्याकरितां होतो.

सुरत—कारागिरांची संख्या वीस हजारांपर्यंत असेल. तार तयार करणाऱ्यांना बारा आणे ते सवा रुपयापर्यंत मजुरी मिळते. गौरी गोल्ड अँड सिल्व्हर वर्क्समध्यें देशी व युरोपियन पद्धतीनें उत्तम माल तयार होतो. पुष्कळ कारखान्यांतून विजेच्या साहाय्यानें काम चालतें. टिकल्या, जरतार वगैरे प्रकारचा सोन्याचांदीचा माल सुरतेंत दरसाल सुमारें एक कोटी रुपयांचा तयार होतो. अहमदाबाद येथेंही पुष्कळ जरतार तयार होते.

(१२) दागदागिने घडविणें, जडावाचें काम वगैरे— बहुतेक लहानमोठ्या शहरांतून दागिनें घडविणारे लोक असतात. प्रांतपरत्वें दागिन्यांचे प्रकार आहेत व कुशल कारागीरही आहेत. सोन्याचांदीचे दागिने निरनिराळ्या तऱ्हेनें करण्यांत येतात. सर्व इलाख्यांत अदमासें ५०००० कारागीर आहेत. खऱ्या सोन्याची व चांदीची परीक्षा साधारण मनुष्याला करतां येत नसल्यानें कारागीर लोक लबाडी करूं शकतात. ह्या धंद्यांतील लोकांची स्थिति चांगली असते. कलावंत लोक साधारणपणें थोडेच असतात. तरी कांहीं ठिकाणीं हवें तसें काम करून मिळतें. पुणें येथें बहुतेक सर्व प्रकारचें चांदीच्या लहान भांड्यापासून तों मोत्यांचे दागिने बांधण्यापर्यंत काम चांगल्या प्रतीचें होतें.

नाशिक येथें सुमारें १००० सोनार आहेत. चांदीचीं तबकें, गुलाबदाण्या, अत्तरदाण्या वगैरे माल उत्कृष्टप्रतीचा तयार होतो व मालाला महाराष्ट्रांत बरीच मागणी असते.

कोल्हापूर येथील दागिन्यांची व इतर तयार मालाची प्रसिद्धी बरीच आहे. येथें कांहीं उत्तम कारागीर आहेत. कारागिरांना १ रु. पासून ४ रु. पर्यंत कलेच्या मानानें रोज पडतो.

सुरत येथें सोनारांचीं घरें सुमारें ७०० आहेत. धंदा चांगला चालतो. रोज एक ते दीड रु. मिळतो. मागणीप्रमाणें माल तयार करून मिळतो. बहुतेक सर्व तऱ्हेचे दागिने तयार होतात. शिवाय अत्तरदाण्या, पानदाण्या, फुलदाण्या, गुलाबदाण्या, मूर्ति वगैरे तयार होतात. भडोच येथें कांहीं कुशल कारागीर आहेत. अहमदाबाद येथें सुमारें १५०० कारागीर आहेत व दागिने गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांकरिता तयार करण्यांत येतात. नथा, कुड्या, सोन्याच्या बांगड्या वगैरे माल चांगला तयार होतो. कारागिरास रोज दोन रु. मिळतो. येथें चांदीचे हुक्के चांगले तयार होतात. जडावाचें काम सुरत येथें उत्तम प्रतीचें होतें. नानी वावडी येथें गुडगुड्यांवर चांदीच्या नक्षीचें काम फार चांगलें होतें.

सिंध हैदराबाद येथें सुमारें १००० कारागीर आहेत. कारागिरांना रोज ३ रु. पर्यंत मिळतात. सिंधी स्त्रियांचे सर्व प्रकारचे दागिने येथें तयार होतात. शिवाय सिंधप्रांतांतील खडे बसविणारे कारागीर सर्व प्रसिद्ध आहेत.

(१३) धातूचीं भांडीं वगैरे घडविणें:— पुणें येथें सुमारें २०० लहान दुकानांतून भांडीं, कुलपें, बिजागरी, दागिन्यांचे डबे, पुजेचें सामान, फुलदाण्या वगैरे माल पितळेचा, तांब्याचा तयार होतो. कारागिरांना रोज बारा आणे मिळतो. गुजराथ फॅक्टरींत टिफिन कॅरीअर, बादल्या, कपबशा वगैरे माल तयार होतो. पितळ परदेशी वापरण्यांत येतें. याशिवाय तांब्याचे हंडे, पाणी तापविण्याचे बंब, घागरी वगैरे माल तयार होतो.

नाशिक येथील तांब्यापितळेचीं भांडीं सर्व महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. येथें सुमारें ५०० लोक हें काम करतात. येथें पातेलीं, तपेलीं, कढया, पराती, हंडे, चौपाळे, तबकें, तांबे, फुलपात्रें, समया वगैरे पुष्कळ तऱ्हेचा माल उत्तम तऱ्हेचा तयार होतो. नक्षीचा मालही बराच तयार होतो. कारागिरांना रोज बारा आणे ते दीड रु. मिळतो. बागलकोट येथें लोखंडाचीं कुलपें चांगलीं तयार रहोतात. सोलापूर येथें लोखंडाच्या पत्र्याचा आधुनिक पद्धतीचीं टेवलें, पलंग, खुर्च्या, पाळणें, शेल्फें, वगैरे माल तयार होतो. मालाला खप चांगला असून कामकऱ्यांची स्थिति बरी आहे. हुवळी येथें तांब्यापितळेचीं घरगुती भांडीं वगैरे माल तयार करणारे सुमारें चार हजार लोक आहेत. त्यांची स्थिति बरी असून रोज कामाप्रमाणें बारा आणे ते दीड रुपया मिळतो. येथें नक्षीचीं तबकें फार उत्तम तयार होतात.

कोंकणांत विजयदुर्ग (रत्नागिरी जि.) येथें अल्युमिनिअमच्या बांगड्या व वटणें वगैरे माल तयार होतो. ॲल्युमिनिअम मुंबईहून मागविण्यांत येतें. येथें हा धंदा चांगला आहे. वाडी (कोकणांत) येथें लोखंडाचे उत्कृष्ट अडकित्ते व कुलपें तयार होतात. औंध (जि.सातारा) येथेंही पुष्कळ तऱ्हेचा घरगुती उपयोगाचा माल तयार होतो.

सिंध–लारखाना जिल्ह्यांत जुनीजा, कमर-अलीखान, येथें पोलादाच्या कुऱ्हाडी चांगल्या होतात.सक्कर जिल्ह्यांत खारीपूर, डाहारकी येथें पितळेचे हुक्के, नक्षीचे दागिन्यांचे डबे वगैरे माल तयार होतो.

(१४) लाकडाचें कोरीव काम फर्निचर वगैरे- इमारतीच्या तुळया,खांब वगैरेवरील कोरीव काम महाराष्ट्रांत (पूर्वी केलेलें) कांहीं ठिकाणीं उत्कृष्ट आहे. उत्कृष्ट नक्षीकाम–कानडा जिल्ह्यांत, मुंबईंत, सुरतेंत व अहमदाबादेंत होतें. कानडा-जिल्ह्यांत कोरीव कामास योग्य असें शिसवी, साग वगैरे उत्तम लाकूड पुष्कळ आहे. त्यामुळें येथें पुष्कळ ठिकाणीं हा धंदा बरा चालतो.

पुणें–येथें सुमारें २००० सुतार आहेत. पैकीं ५० लोक ऑफीस फर्निचर, खिडक्यांचीं तावदानें वगैरे माल बरा करतात. वीस जण उत्तम कोरीव नक्षीकाम करणारे आहेत. कामाप्रमाणें रोज १ रु. ते ३ रु. मिळूं शकतो.

गोकाक (बेळगांव जि.) येथें लांकडाच्या कोरीव मनुष्याकृति, देवादिकांच्या मूर्ति, पशु, फळें वगैरे माल सुबक व रंगीत तयार होतो. रंग विलायती वापरतात. माल चांगल्या प्रतीचा असल्यानें त्या प्रांतांत त्याला खप बरा आहे.

कानडा जिल्ह्यांत शिसवी, साग, पांगारा वगैरे लांकूड मुबलक आहे. शिसवीच्या मजबूत लाकडाचें सर्व प्रकारचें फर्निचर, व कोरीव कामही उत्तम करण्यांत येतें. सागाच्या लाकडाचा घराच्या तुळया, दारें व खिडक्या वगैरेकडे उपयोग होतो. भिवडी नांवाचें लाकूड हलकें असून त्यावर कोरीव काम चांगलें करतां येतें. त्याचीं बाशिंगें, फळें, फुलें, वगैरे माल करण्यांत येतो. पोलक वुडचीं रंगीत खेळणीं तयार करण्यांत येतात. कोंकणांत रत्नागिरी येथें कारवारहून सागाचें लांकूड आणून नांवा बांधण्याचें काम होतें. येथें हा धंदा बरा चालत आहे व वाढण्यासारखा आहे. सुतारांना रोज १ ते ३ रु. कामाप्रमाणें मिळतात. नांवा बांधण्याची कला शिकविण्याची शाळा येथें उघडण्यांत आल्यास बरें होईल.

सुरत येथील कोरीव काम सुबक व प्रेक्षणीय होतें. येथें सुमारें २५० लोक कुशल सुतार आहेत. कोरीव नक्षीकाम केलेले लाकडाचे पडदे, फोटो-फ्रेम्स्, खुर्च्या, कपाटें व इमारतीस शोभा आणणारे कोरीव नक्षीचे खांब व तुळया वगैरे मालाबद्दल सुरतेच्या सुतारांची प्रसिद्धी आहे. कामाप्रमाणें मजूरी १ रु. ते ४ रु. पर्यंत मिळते. हल्लीं पुरेसें काम नसल्यानें सुरतेचे लोक मुंबईसारख्या मोठ्या शहरीं जाऊं लागले आहेत.

बलसाड (सुरत जिल्हा) येथेंही उत्कृष्ट प्रतीचें कोरीव व साधें फर्निचर व लाकडाचें इतर काम तयार होतें. येथील धंदा चांगला चालला आहे.

अहमदाबाद येथें चिटें छापण्याचे लाकडी छाप पुष्कळ तयार होतात. शिवाय इतर प्रेक्षणीय कोरीव कामही होतें.

खस (धंधुका तालुका) येथें तुळशीच्या लाकडाचे मणी पुष्कळ व चांगले तयार होतात.

पंचमहालांत दोहद गांवीं लांकडी खेळणीं तयार होतात. लिमडी (पंचमहाल) येथें बांबूचे पंखे चांगले होतात. खानदेशांत पारोळें, बोरवाड येथें बैलगाड्या, छकडे, पालख्या, देवादिकांच्या मूर्ति वगैरे माल बरा होतो. सावंतवाडी येथें रंगीत खेळणीं, पक्षी, पशु, देवांच्या मूर्ति वगैरे माल फार सुंदर तयार होतो.

(१५) लाखकाम–गोकाक, सावंतवाडी व सिंध येथें लाखकाम उत्तम होतें. नाशिक, पुणें व मुंबई,अहमदाबाद येथेंही साधारण प्रतीचें काम होतें लांकडाचीं निरनिराळीं खेळणीं, फर्निचरचे दर्शनी

भाग, चौरंग, पलंगाचे भाग, पाळणे वगैरे माल अगदीं गुळगुळीत करण्यांत येऊन नक्षीकाम वगैरे कोरून झाल्यावर लाखेचे निरनिराळे रंग त्यावर लावण्यांत येतात. लांकूड व लाख दोन्ही देशीच वापरण्यांत येतात.कारागिरांची स्थिति बरी आहे. साधारण रोज १ ते १॥ रु. मिळतो. मालाला प्रसिद्धी नसल्यानें धंद्याला तेजी नाहीं. गोकाक व सावंतवाडी येथील माल परप्रांतांतही बराच खपतो नाशिक येथें साधारण प्रतीचे पाळणे, पलंग व खेळणीं वगैरे माल तयार होतो.

बागलकोट येथें पाळणे चांगल्या प्रतीचे होतात. गोकाक येथें खेळणीं,फळें वगैरे माल उत्कृष्ट प्रतीचा तयार होतो. मालाची प्रसिद्धी पुष्कळ आहे. सावंतवाडी येथेंही पुष्कळ तऱ्हेचा माल चांगला होतो. सिंधमध्यें खानोटे, खाकारी, लारखाना येथें वर सांगितलेला माल सिंधी पद्धतीचा चांगल्या प्रतीचा तयार होतो.

(१६) **वेंतकाम**—इलाख्यांतील बहुतेक तुरुंगातून, मुंबईंत, (मागणीप्रमाणें व बाहेर गांवाहून तयार माल येतो) व राजपिंपळा संस्थानांत होतें. राजपिंपळ्यांत खुर्च्या वगैरे फार उत्तम व मजबूत होतात किं. प्र. ८ रु.

(१७) **शिंगाचें नक्षीकाम**—रत्नागिरी जिल्ह्यांत विजयदुर्ग येथें हें काम उत्कृष्ट व प्रेक्षणीय होतें. फुलदाण्या व चंबूवर नक्षीचें काम गव्याच्या शिंगावर कोरून करतात. कोंकणांत गवे पुष्कळ आहेत.व कुशल कारागीर आहेत. परंतु मालाला मागणी नसल्यानें धंदा बसत चालला आहे. १९२४ च्या वेंबले येथील प्रदर्शनांत अमेरिकेंत येथून प्रेक्षणीय माल पाठविण्यांत आला होता.

(१८) **शिल्पकला**—बहुतेक शहरांतून इमारतीस लागणाऱ्या दगडाचें काम करणारे पाथरवट असतात. बागलकोट (विजापूर जिल्हा) येथें कांहीं कुशल पाथरवट नक्षीचें व इतर काम सुंदर करतात. साकेगांव (पूर्व खानदेश) येथें एक कारागीर देवतांच्या मूर्ती वगैरे चांगल्या प्रतीच्या घडवितो. कोल्हापूर येथेंही कांहीं उत्तम पाथरवट आहेत. सुरत येथील पाथरवट साधारण प्रतीचें काम करतात. अहमदाबाद येथेंही कांहीं उत्तम कारागीर आहेत, ते देवादिकांच्या मूर्ति इमारतीचें दगडकाम वगैरे चांगलें करतात. परंतु पूर्वींसारखें काम आतां होत नाहीं.

(१९) **हस्तीदंतावरील कोरीव काम**—अतिशय बारीक व सुंदर नक्षीकाम हस्तिदंताइतकें उत्तम दुसऱ्या कशावरही करतां येत नाहीं. हिंदुस्थानांतील हस्तिदंतापेक्षां आफ्रिकेंतील हस्तिदंत कोरीव कामास चांगलें व टिकाऊ असतें. त्यामुळें चांगले कारागीर बहुधा आफ्रिकेंतील हस्तिदंत विशेषेंकरून वापरतात. सदर नक्षीकाम करण्यास फार कौशल्य लागतें.हस्तिदंताच्या फण्या,चाकूच्या मुठी, देवादिकांच्या कोरीव मूर्ति, बिलिअर्डचे चेंडू, हार्मोनियमच्या पट्या, पिआनोच्या खुंट्या व पट्या, बांगड्या वगैरे जिन्नस तयार करण्यांत येतात. सुरत येथें प्रसिद्ध पुरुषांच्या मूर्ति कोरल्या जातात. येथें सुमारें ५० कारागीर आहेत. ते कासवाच्या पाठीचें व हस्तिदंताचें बटणें, बांगड्या, आंगठ्या, छत्र्यांच्या मुठी व इतर-नक्षीकाम करतात. कच्चा माल बहुतेक मुंबईहून मागविण्यांत येतो.

अहमदाबाद येथें सुमारें ५० कारागीर तपकिरीच्या डब्या, बुद्धिबळें फांसे वगैरे तयार करतात. धंदा साधारण चालतो. विलायती सेल्युलाइडचे जिन्नस स्वस्त विकले जात असल्यानें दिवसेंदिवस हस्तिदंताच्या जिनसांना (महागाईमुळें) मागणी कमी आहे. पुण्यास थोडे कारागीर आहेत. ते बहुतेक फण्या करतात. त्यांचा धंदा बरा चालला आहे. सिंधमध्यें कांहीं ठिकाणीं बांगड्या वगैरे साधा माल पुष्कळ होतो. परंतु परदेशी कचकड्याच्या मालामुळें तोही धंदा बसत चालला आहे.

(२०) **चामड्याचें काम**- सोलापूर,कोल्हापूर संस्थान, मुंबई व सिंधप्रांत येथें बरेंच चालतें.

(२१) **कांचकाम**—तळेगांव व ओगलेवाडी येथें कांचकामाचे कारखाने आहेत. त्यांत विशेष हस्तकौशल्याचें काम थोडें होतें.

---

(३) बृहन्महाराष्ट्रांतील कारखान्यांची व त्यांत काम करणाऱ्या मजुरांच्या संख्येची यादी--

बृहन्महाराष्ट्रांतील निरनिराळे कारखाने व त्यांत खपणाऱ्या मजुरांची संख्या हीं जिल्हावार पुढें दिलीं आहेत.व अखिल भारतांतील कारखान्यांची व त्यांतील मजुरांची ठोकळ महासंख्याही दिली आहे. आंकडे १९२९ मधील आहेत.

१ विणकामाचे कारखाने(Textiles)

कापसाचें सूत काढणें व कापड विणणें.

कारखान्यांतील कामगार-संख्या



प्रत्येक ओळीच्या शेवटी दिलेली संख्या हीं त्या त्या प्रकारच्या एकंदर कारखान्यांत मिळून रोज कामावर असलेल्या कामगारांची होय.

बेळगांव	
गोकाक मिल्स नं. १ व २, गोकाक फॉल्स	२७४१
मुंबई बेट	
ॲलेक्झांड्रा मिल्स	१३७३
अपोलो मिल नं. १ व २	८७०
अपोलो मिल नं. ३	४७१
असुर वीरजी मिल्स	१८६८
ॲटलस मिल्स	१०८३
ब्रॅडबेरी मिल्स	१५३९
बॉम्बे कॉटन मॅन्युफॅक्चरिंग कं.	१४६५
बॉम्बे इंडस्ट्रियल मिल्स	१०५९
बोमनजी पेटिट मिल्स	२०१६
बॉम्बे डाइंग ॲन्ड मॅन्यु. कं. (स्प्रिग मिल)	४१९५
बॉम्बे डाइंग अँड मॅन्यु.कं. (टेक्स्टाइल मि.)	२७२७
सेंचरी मिल्स कं. लिमिटेड	२५९०
क्रसेंट मिल्स	१३८२
क्राउन स्पिनिंग ॲन्ड मॅन्यु. कं. लि.	१२७८
करीमभाई मिल्स	६३४
कुलाबा लँड अँड मिल्स	१६३०
डेव्हिड मिल नं. १ व २	२८१४
डॉन मिल्स	१४१०
दिनशा पेटिट मिल्स	२११७
इब्राहिमभाई पावने मिल्स	१५८९
ई. डी. ससून मिल्स	१२१५
एडवर्ड ससून मिल्स	१२१४
एलफिन्स्टन स्पि. अँड विव्हिंग मिल्स	१४१६
फाजलभाई मिल्स	१८८२
फिन्ले मिल्स	१५७४
फरामजी पेटिट स्पिनिंग अँड मॅन्यु. कं.	१८८८
गोल्ड मोहर मिल्स	१६८९
हिंदुस्थान स्पि. अँड वी. मिल्स	१८०५
इंपिरियल मिल्स	१२४१
इंडियन मॅन्यु. मिल्स	१८५८
जकब ससून मिल्स	२७७२
जाम मिल्स कं. नं. १ व २	२२९४
जमशेट मिल्स	१२७४
जहांगिर वाडिया मिल्स	४७६
ज्युबिलीं मिल्स	९८५
कस्तूरचंद मिल्स	१६२९
किलाचंद मिल्स	१०५६
खटाव मकनजी मिल्स	२७५०
कोहिनूर मिल नं. १ व २	२४८०
माधवजी धरमसी मिल्स	२२४९
महंमदभाई मिल्स	१३३०
मॅन्चेस्टर मिल्स	७१७
माणेकजी पेटिट मिल्स	४४४८
मेयर ससून मिल्स	१२९९
मून मिल	१३२३
मोरारजी गाकुळदास मिल्स नं. १ व नं. २	२९८६
म्हैसूर मिल नं. २	३७०
न्यू सिटी ऑफ बॉम्बे मिल्स	१७४८
न्यू चायना मिल्स	८२५
न्यू ग्रेट ईस्टर्न मिल्स	१९९३
न्यू कैसर-इ-हिंद मिल्स	१९२५
पर्ल मिल्स	१९२७
फोनिक्स मिल्स	२०२३
प्रभात मिल्स	९८०
प्रल्हाद मिल्स	१५६२
प्रीमियर मिल्स	७८०
राचेल ससून मिल्स	११७८
रुबी मिल्स	१०६५
सर शापूरजी भरूचा मिल्स कं. (कनॉट)	१६७०
सर शापूरजी भरूचा मिल्स कं. एंप्रेस मिल्स १.	८१८
सर शापूरजी भरूचा मि. कं. एंप्रस मि. नं. २	७५९
ससून स्पिनिंग अँड वीव्हिंग कं.	२३०४
सत्य मिल्स	१२५१
सिंप्लेक्स मिल्स	२१५८
स्टँडर्ड मिल्स	१८८७
श्री लक्ष्मी मिल्स (शेवरी कॉटन)	२९०
स्वान मिल्स	११६५
टाटा मिल्स लिमिटेड	३३३८
टोयो पोडर कॉटन मिल्स	९७२
यूनिअन मिल्स	१३५२
व्हिक्टोरिया मिल्स	१०७१
वेस्टर्न इंडिया स्पि. अँड मॅन्यु. कं. लिमि.	१५२१
झेनिथ मिल्स	१६६६
बॉम्बे सबर्बन	
कुर्ला स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल	१५०३
स्वदेशी मिल्स नं. १ व नं. २	४०५०
हॅटर्सले मिल्स	२५४
सातारा	
फडके टेक्स्टाइल अँड इंडस्ट्रियल वर्क्स	८६
धारवाड	
भारत स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल नं. १–२.	२२८५
नारायणदास चुनीलाल मिल्स लि.	३८८
सोलापूर	
नरसिंगीरजी मॅन्यु. कं. लि.	३५०६
जाम श्री रणजीतसिंगजी स्पि. अँड वी. कं.	१३२०
विष्णु कॉटन मिल्स	३५१८

लक्ष्मी कॉटन मिल्स	३०६९
सोलापूर स्पि. अँड वी. मिल नं. १, २ व ३	७६३६
बार्शी स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल	६४०
जयशंकर मिल्स	३९८
लोकमान्य मिल्स	२२३
टिकेकर टेक्स्टाइल मिल्स	७१

पूर्व खानदेश

भगीरथ स्पि. अँड वी. मिल्स, जळगांव	४८४
खानदेश मिल्स, जळगांव	१५३९
प्रताप मिल्स, अमळनेर नं. १ व २	२३०८
लक्ष्मीनारायण मिल्स, चाळिसगांव	७९४

पश्चिम खानदेश

न्यू प्रताप मिल्स लि. धुळें	१३९०

पुणें

राजा बहादूर मोतीलाल पूना मिल्स	४३२

मध्यप्रांत व वऱ्हाड नागपूर

एम्प्रेस मिल्स नं. १, २, ३ व ५	६७७९
मॉडेल मिल्स लिमिटेड	३१००

वर्धा

पुलगांव टेक्स्टा. मिल्स कं. लि. पुलगांव	९३६
आर.एस्. रेकचंद मोहता मिल्स, हिंगणघाट	१४२४
आर. बी. बन्सीलाल अबीरचंद स्पि. अँड वी. मिल, हिंगणघाट	१५३०

जबलपूर

राजा गोकुळदास मिल्स लि.	८५६

निमार

बऱ्हाणपूर ताप्ती मिल्स लि. बऱ्हाणपूर	१५८१

अकोला

सावत्राम रामप्रसाद मिल्स, लि.	७७७
अकोला कॉटन मिल्स, लि.	१२४३

उमरावती

बेरार मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. २ मिल्स	१२१६
विदर्भ मिल्स बेरार, लि. एलिचपूर	४६३

राजनंदगांव

बेंगॉल नागपूर कॉटन मिल्स कं. लि.	२०८१

हैद्राबाद दक्षिण—हैद्राबाद शहर

दि. ब. रामगोपाळ मिल्स, लिमिटेड	६०२
महबूबशाही गुलबर्गा मिल्स कंपनी लि.	१३३४
औरंगाबाद मि. लि. औरंगाबाद	६७५
उस्मानशाही मिल्स, लि. नांदेड	१३४०

मुम्बई संस्थानें

श्रीशाहू छत्रपति मिल्स, शाहुपुरी कोल्हा.	८००
गजानन वीव्हिंग मिल्स सांगली	१५०
सरस्वती मिल सांगली	३४

होजिअरी

बॉम्बे होजिअरी वर्क्स मुंबई बेट	१०७
ईस्टर्न होजिअरी वर्क्स मुंबई बेट	२५
गोवर्धन होजिअरी वर्क्स मुंबई सबर्बन	५२

रेशमाच्या गिरण्या

मुम्बई बेट

ससून एँड अलायन्स सिल्क मिल	७२२
छोई सिल्क मिल्स	३३५

लोंकरीच्या गिरण्या

बॉम्बे वुलन मिल्स	४८०
इंडियन वुलन मिल्स	७२५

ठाणें

रेमंड वुलन मिल ..	८०९

विविध

मुम्बई बेट

फाजलभाई मिल्स सेंट्रल स्टँपिंग अँड बेलिंग डिपार्टमेंट	८८
कोर्टाल्डस (इंडिया) लि. (ऑर्टि. सिल्क)	६४
बॉम्बे फ्लॅट क्लोदिंग डिपार्टमेंट	४३

मुम्बई संस्थानें

कोल्हापूर

व्यंकटेश रंगतंतु मिल्स, इचलकरंजी.	६५

सांगली

श्री बसवेश्वर वीव्हिंग मिल	४०
चन्नागिरप्पा विरप्पा मुंडगणूर मिल	२५
शंकर लक्ष्मण तोवाकी हँडलूम फॅक्टरी, रबकावी	२०
नागेश पांडुरंग वीव्हिंग फॅक्टरी, रबकावी.	२२
मल्लाप्पा बैलूर्स फरॉक् फॅक्टरी	२३

हैद्राबाद दक्षिण

हैद्राबाद शहर

अंजुमान-इ-खादीमल मुसलमीन क्लॉथ वी.	२०
प्रायमरी इंडस्ट्रियल स्कूल, क्लॉथ वी.	६०
वेंकट किस्तिया, क्लॉथ वीव्हिंग	३००
हिज् ए. हायनेस दि निजामस् सिटी सेंट्रल जेल फॅक्टरी	९६

गुलबर्गा

मल्लिया फरांगी, सिल्क अँड कॉटन सारीज वीव्हिंग	५०

रामण्णा मुरजी, सिल्क अँड कॉटन सा. वी. ७५
जोगी भामप्पा, सिल्क अँड कॉ. सारीज वी. २५
श्रांपा फरंगी सिल्क अँड कॉ. सारीज वी. ३०
लालन साहेब सिल्क अँड कॉ. सारीज वी. ३०
धोत्री सदाप्पा जोगी, सिल्क अँड कॉटन सारीज वीव्हिंग ७५
सदाप्पा जोगी, सिल्क अँड कॉ. सारीज वी. ७५
इमामुद्दीन साहेब जोगी, सिल्क अँड कॉटन ७५
अब्दुल करीम साकरी मॅन्यु फॅ. टसेल्स् ४००
महंमदखाजा मेहतरस् टसेल्स् मेकिंग ५०
अब्दुल रझाक साकरी टसेल्स मेकिंग ५०
पीरमहंमद अब्दुल गफूर टसेल्स मेकिंग ४००
गुलबर्गा सेंट्रल जेल फॅक्टरी १५१
वुइमेन्स वर्कशॉप, अलेक्झांड्रिया रोड शिकंदराबाद २२

२ इंजिनियरी (Engineering)

कोचबिल्डिंग अँड मोटारकार रिपेअरिंग—

मुंबई बेट

ए. हायलंड लि. ९२
जी. मॅकेंझी अँड को. ५५
जनरल मोटर्स (इंडिया), लि. १०००
ट्रॅग्युलर मोटार वर्क्स ३२
नॅशनल मोटर्स लि. ३७
स्विस एंजिनीअरिंग कं. लि. ४०
मिस्त्री लल्लुभाई अँड को. ३०
इंटर नॅशनल मोटार कं. २९
अॅक्मी मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. १३४
व्हिक्टरी मोटार वर्क्स २०
वूल्स्ली मोटर्स लि. ४०
ऑटोमोबाइल कं. लि. ८०
फरेंच मोटर कं. लि. ७१
ब्रिटिश ऑटो रिपेअर्स कं. लि. १४०
पी. बी. प्रेस अँड सन्स, लि. ६८
स्टँडर्ड मोटारकार कं. ५०
बॉम्बे सायकल अँड मोटार एजन्सी ११०
टी. आर. प्रॅट, लि. ६०
फोर्ड ऑटोमोबाइल (इंडिया), लि. ८०
बॉम्बे गॅरेज १०२
डेक्कन मोटार सर्व्हिस, लि. पुणें. ६३

मध्यप्रांत व वऱ्हाड

बॉम्बे गॅरेज वर्कशॉप नागपूर २५
सी. पी. एंजिनिअरिंग कं. लि. नागपूर ७५
नागपूर ऑटोमोबाइल जनरल इंजिनिअरिंग कंपनी लि. नागपूर ५६

कोल्हापूर आणि एस.एम.सी. एजन्सीज

श्रीलक्ष्मीबाई मोटार सर्व्हिस कं. शाहूपुरी कोल्हापूर २५
हनुमान मोटार सर्व्हिस कोल्हापूर ३०

हैद्राबाद (दक्षिण)

दाबू भांजी मोटर रिपेअरिंग फॅक्टरी हैद्राबाद शहर २०

शिकंदराबाद

बॉम्बे सायकल्स अँड मोटर एजन्सी, मोटरवर्क्स, जेम्स स्ट्रीट ७०
हेंड्रिक्स मोटर रिपेअर शॉप, सेंट मेरीज रोड २१
ए. एच्. बंगाली, ऑटोमोबाइल इंजिनीअर्स, बोलाराम रोड २१

शिकंदराबाद कॅन्टोन्मेंट

बॉम्बे सायकल आणि मोटार एजन्सी, जेम्स स्ट्रीट ७३
पेज अँड को., मोटरवर्क्स, जेम्सस्ट्रीट २०
हेन्रिक अँड को. मोटर वर्क्स, सेंट मरीज रोड २५
ऑटोगॅरेज मोटर वर्क्स बोलाराम रोड २०

गोदी Dock Yard

मुंबई बेट

रॉयल इंडियन मरीन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डॉकयार्ड १३८५
आंध्र वर्कशॉप मुंबई २५
ग्रीव्हज कॉटन अँड कोज इले. वर्कशॉप मुंबई ४९

हैद्राबाद (दक्षिण)

हैद्राबाद शहर
हैद्राबाद इलेक्ट्रिसिटी डिपार्टमेंट ५३०

मुम्बई बेट

टाटा हायड्रो—इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कं. ३५
आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कं. ४३

कुलाबा

आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कं. भिवपुरी ७१
टाटा पॉवर हाउस, भिरा ४५
टाटा पॉवर हाउस, खोपवली ६८

पुणें

पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. ज् पॉवर हाउस ८७

सोलापूर

सोलापूर मिल्स, टाउन इलेक्ट्रिक डिपार्टमेंट ३९

ठाणें

जी. आय्. पी. रेल्वे पॉवर हाउस	१३१

हैद्राबाद (दक्षिण)

हैद्राबाद इलेक्ट्रिक सप्लाय कं.	४२

मध्यप्रांत व वऱ्हाड

इलेक्ट्रिक सप्लाय वर्क्स वर्धा	६९
इ लेक्ट्रिक पॉवर हाउस जबलपूर	१४१
नागपूर इलेक्ट्रिकल् लाइट अँड पॉवर हाउस नागपूर	४३

कोल्हापूर आणि एस.एम.सी.एजन्सीः-

इलेक्ट्रिक पॉवर हाउस कोल्हापूर	५०

जनरल इंजिनीअरिंग

मुम्बई बेट

वॅकवे रेक्लमेशन वर्कशॉप	३९
टर्नर होअर अँड को.	६४
कार्नॅक आयर्न वर्क्स	१०७
माहिमकर अँड को.	३०
प्रीमिअर बीआरइंजिनिअरिंग कं.	५०
व्होलकार्ट ब्रदर्स फ्रिजिडायर असेंब्लींग प्लँट	२८
एम्. के. चिवर अँड सन्स	४२
गोल्डे प्रॉडक्ट्स् कं.	४०
बॉम्बे म्युनिसिपल वर्कशॉप	३६४
भगत अँड सन्स	३०
बॉम्बे पोर्ट ट्रस्ट वर्कशॉप	१३०६
बॉम्बे पोर्टट्रस्ट डॉकयार्ड वर्कशॉप	४४
मार्सलंड प्राइस अँड कं., लि.	७९
भायखळा आयर्न वर्क्स	८६७
नेसबिट रोड आयर्न वर्क्स	४२१
नसरवानजी रुस्तुमजी आयर्न वर्क्स	२३
गार्लिक अँड को.	२४६
एडवर्ड आयर्न वर्क्स	२५
मथुरादास मिल्स इंजिनीयरिंग वर्क्स	१६०
कनॉट आयर्न वर्क्स	५४
जयंत आयर्न वर्क्स	
पालनजी एदलजी अँड सन्स	२०
पारेख अँड प्रभु (खेतवाडी बॅकरोड)	२५
शपारिया आयर्न अँड स्टील वर्क्स	२५
ओरिएंटल आयर्न वर्क्स	३८
डिफेन्स वर्क्स	३३५

मुम्बई सबर्बन

ब्रेथवेट अँड कोज वर्क्स, मुलुंद	६५०

ठाणें

गणेश आयर्न वर्क्स	४०

अहमदनगर

अहमदनगर इंजिनीअरिंग अँड मोटर वर्क्स	२१

सातारा

कूपर इंजिनिअरिंग वर्क्स	१६३

पुणें

पी. डब्ल्यु. डी. गव्हर्मेंट सेंट्रल वर्कशॉप, दापोडी	११०
अॅग्रिकल्चरल इंजिनीअर्स वर्कशॉप अँड एक्सपेरिमेंटल वेल	४५
श्रीभास्करानंद फॅक्टरी, पुणें	२३
इंपीरियल क्लॉक मॅन्यु. कं.	४८

नाशिक

न्यू इंडियन मशीन वर्क्स	२२

कुलाबा

टाटा पॉवर कं..ज् टेंपररी वर्कशॉप	२१

पूर्वखानदेश

लक्ष्मीनारायण आयर्न वर्कशॉप,चाळिसगांव	४०
राम आयर्न वर्क्स, पाचोरा	२७

मध्यप्रांत व वऱ्हाड

नागपूर

पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट वर्कशॉप	१४०
पंडित अँड सन्स आयर्न वर्क्स	३१

चांदा

बल्लारपूर कोलिअरी वर्कशॉप	४२

हैद्राबाद (दक्षिण) संस्थान

हैद्राबाद शहर

एच्. ई. एच्. दि निजाम्स् वर्कशॉप डिपार्टमेंट	३८४
एच्. ई. एच्. दि निजाम्स् उस्मानिया सेंट्रल टेक्निकल इन्स्टिटयूट मॅन्यु-फॅक्चरिंग वर्कशॉप	९७
एच्. ई. एच्. दि निजाम्स् उस्मानिया सेंट्रल टेक्निकल इन्स्टिटयूट	२८०

केरोसीन टिनिंग अॅन्ड पॅकिंग

मुम्बई बेट

स्टँडर्ड ऑइल कं.	२५४
बर्मा शेल ऑइल स्टोअरेज इन्स्टॉलेशन नं. १ व २	९९४
बर्माशेल ऑइल टँक स्टोअरेज कं.	३१६
इंडो बर्मा पेट्रोलियम कं.	५९

मेटल स्टॅम्पिंग

मुम्बई बेट

ए. एस्. देसाईज् मेटल स्टॅंपिंग वर्क्स	३००
पॉप्युलर मेटल वर्क्स	२१६
जगजीवनदास नरोत्तमदास मेटल फॅक्टरी	३०
जगजीवनदास नरोत्तमदास मेटल फॅक्टरी नं. २	२०
स्टॅंडर्ड ॲल्युमिनिअम अँड ब्रास वर्क्स, लि.	३७
वूलव्हर हॅम्प्टन वर्क्स कं. लि.	१६७
डन ॲल्युमिनिअम फॅक्टरी	३३५
ओरिएंटल मेटल प्रेसिंग वर्क्स	४५
बॉम्बे मेटल प्रेस फॅक्टरी	३३
बॉम्बे ॲल्युमिनिअम फॅक्टरी	४४
पितांबरदास लल्लुभाई ॲल्युमिनिअम फॅक्टरी	६२
बॉम्बे ब्रास अँड मेटल वर्क्स	४०
आनंदीबाई बाबाजी तारकर मेटल फॅक्टरी	१२५
न्यू ब्रास मेटल फॅक्टरी	८०
क्राउन ॲल्युमिनिअम वर्क्स	२२५
पंजाब ॲल्युमिनिअम अँड ब्रास मेटल वर्क्स	८८
गुलाबचंद मेटल वर्क्स	

रत्नागिरी

आर. एस्. वैद्य ॲल्यु. फॅक्टरी	२५

पुणें

गुजराथ मेटल वर्क्स	१६३
मारुतीराव बाबाजी ब्रास मेटल फॅक्टरी	३१

सोलापूर

शिवाजी मेटल वर्क्स कं. लि. टिकेकरवाडी	२०

कोल्हापूर आणि एस.एस. सी. एजन्सी

कोल्हापूर

पोतदार्स मेटल वर्क्स, पेटा शिरोळ, जयसिंगपूर	५०
चौगुले मेटल वर्क्स, पेटा शिरोळ, जयसिंगपूर	४०

हैद्राबाद संस्थान शिकंदराबाद कॅन्टोन्मेंट

शेख महमद अँड को., मेटल वर्क्स, रीअर रोड (२)	४२

रेल्वे वर्कशॉप्स्

मध्यप्रांत व वऱ्हाड

जी. आय. पी. रेल्वे वर्कशॉप, बिना	२५
बी. एन्. रेल्वे वर्कशॉप, नागपूर	८७०
जी. आय. पी. रेल्वे वर्कशॉप, जबलपूर	२८
बी. एन्. रेल्वे वर्कशॉप, बिलासपूर	२७

मुम्बई बेट

बी. बी. अँड सी. आय. रेल्वे इलेक्ट्रिक कार शेड	१९४
बी. बी. अँड सी. आय्. रेल्वे वर्कशॉप	१८३
बी. बी. अँड सी. आय्. रेल्वे कं. सिग्नलिंग अँड इंजिनियरिंग वर्कशॉप	७९
बी. बी. अँड सी. आय. रेल्वे एंजिन शेड	७१
बी. बी. अँड सी. आय्. रेल्वे कॅरेज अँड वॅगन अँड लोको. वर्क्स (२)	५७३२
जी. आय. पी. रेल्वे मेकॅनिकल वर्कशॉप, माटुंगा	४३८५
जी. आय. पी. रेल्वे मेकॅनिकल वर्क. परेळ	४१५३
जी. आय. पी. रेल्वे ट्रॅन्सपोर्टेशन कॅरेज अँड वॅगन वर्कशॉप	१८५
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड	४११

नाशिक

जी. आय्. पी. सेंट्रल इंजिनीअरिंग वर्क्स अँड गरडर वर्क्स, मनमाड (२)	८३३
जी. आय्. पी. सेंट्रल इंजि.वर्क्स इगतपुरी	२०७
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड, इगतपुरी	४०
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड, नंदगांव	७४

पूर्वखानदेश

जी. आय्. पी. रेल्वे वर्क्स, भुसावळ	३५०
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड भुसावळ	४८४
जी. आय्. पी. रेल्वे रेसिडेंट इंजिनीअर्स वर्कशॉप, भुसावळ	४१२

पुणें

जी. आय्. पी. रेल्वे वर्कशॉप, लोनावळा	२७
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड, दौंड	२००
एम्. अँड एस्. एम्. रेल्वे रनिंगशेड, घोरपडी	१४०
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड, लोनावळा	२७

सोलापूर

जी. आय्. पी. रेल्वे रेसिडेंट इंजिनीअर्स वर्कशॉप	१५६
बार्शी लाइट रेल्वे वर्कशॉप, कुर्डुवाडी	२४५
जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड	१९६

ठाणें

जी. आय्. पी. रेल्वे रनिंग शेड	
जी. आय्. पी. रेल्वे इलेक्ट्रिक लोकोशेड	१०८
जी. आय्. पी. रेल्वे स्लीपर चेअरिंग अँड अडझायिंग शॉप	१०६

धारवाड

एम्. अँड एस्. एम्. रेल्वे, ट्रेन लाइटिंग

डेपो, हुबळी १००
एम्. अँड एस्. एम्. रेलवे वर्कशॉप हुबळी ३२५३
एम्. अँड एस्.एम्. रेलवे रनिंग शेड, हुबळी २३०
एम्. अँड एस्. एम्. रेलवे रनिंग शेड, गदग १५७

मुम्बई सबर्बन

जी. आय. पी. रेलवेमेन कार शेड
बी. बी. अँड सी. आय. रेलवे रनिंग शेड ५५

हैद्राबाद दक्षिण

स्टेट रेलवे लोको. अँड कॅरेज वर्कशॉप्स लालगुडा २८२०

नौका बांधणें व दुरुस्ती

मुम्बई बेट

माझगांव डॉक १९७०
बॉम्बे स्टीम नॅव्हिगेशन कं. वर्कशाप ३५३

पोलादी ट्रंका, कुलपें, सुऱ्या, कातऱ्या वगैरे

गोद्रेज अँड बॉईस मॅन्यु. कं. मुंबई ५००
त्रिभुवनदास सखाराम सेफ मॅन्यु. कं.

हैद्राबाद संस्थान

शिकंदराबाद

एच्. जे. जिनवाला अँड को., आयर्न चेस्ट अँड कॅबिनेट मेकर, जेम्स स्ट्रीट ३१
खाजामिया अॅन्ड सन आयर्न चेस्ट अॅन्ड वुडवर्क, जेम्स स्ट्रीट ३५
नारायणदास अँड गणेशदास, आयर्न चेस्ट अॅन्ड वुडवर्क, जेम्स स्ट्रीट. २४

ट्रॅमवे वर्क्स

मुम्बई बेट

बी. ई. एस्. अॅन्ड कंपनीज वर्कशाप ४६०

विविध

मुसाजी वलीभाई बकेट फॅक्टरी मुम्बई ५०
नायट्रोजन इंडिया, लिमिटेड ,, २३
क्राउन बकेट फॅक्टरी ,, ३५
पॅविल्स सर्जिकल इन्स्ट्रुमेंट फॅक्टरी ,, ६०
लॉरेन्स अॅन्ड मेयो लि. ,, २३
ई. आयर्स अॅन्ड को. ,, ७५
बॉम्बे टेलिफोन कं. ,, ४४

कोल्हापूर आणि एस. एम. सी. संस्थानें

गणेश कलागृह मिरज सीनियर २१

हैद्राबाद संस्थान

रियाझ इस्लाम फॅक्टरी हैद्राबाद ५३
इंडस्ट्रिअल स्कूल औरंगाबाद १५०

३ खनिजें व धातु ओतकामाचे कारखाने

मुंबई बेट

सुखनदास दामोदरदास ब्रदर्स, ब्रास फॅक्टरी २५
कॉरोनेशन आयर्न वर्क्स ३०
पायोनियर आयर्न फाउंड्री २६
रिपन रोड आयर्न वर्क्स २७
आर्ट मेटल वर्क्स ८०
कनॉट आयर्न फाउन्ड्री ६५
एम्प्रेस आयर्न अॅन्ड ब्रास वर्क्स १२५
उमायर फाउन्ड्री ६५

पुणें

पूना आयडियल मेकॅनिकल वर्क्स, २३

हैद्राबाद संस्थान

शिकंदराबाद

डी. वाय. किस्तिया अॅन्ड सन्स, ब्लॅक स्मिथ नागण्णा, देविडी २५
शेख महंमद, ब्लॅक स्मिथ, रीअर रोड २५

शिकंदराबाद कॅन्टोन्मेंट

शेख महंमद, आयर्न फाउन्ड्री, वगैरे, रीअर रोड २५

पेट्रोल शुद्ध करण्याचे कारखाने (Petroleum Refineries)

शिकंदराबाद

बर्मा शेल पेट्रोल डेपो, न्यू भोई गुडा २१

विविध

दांडेकर ब्रदर्स सांगली ११०
नवाब मेधी अल्लीखान हैद्राबाद शहर ७५
नरसिंहल्लू असेसरीज फॅक्टरी २०

खाद्यपेय व तंबाखू बेकरी बिस्किटें व कन्फेक्शनरी

मुम्बई बेट

ग्रेट इंडियन कन्फेक्शनरी कं. ३०
क्राऊन बिस्किट फॅक्टरी ८६
ब्रिटिश कन्फेक्शनरी कं. ५२
ब्रिटानिया बिस्किट फॅक्टरी ९०
डी. डी. रायटर अॅन्ड को. ४५

हैद्राबाद संस्थान

शिकंदराबाद

मॉन्ट गॉमेरी हॉटेल, ऑक्सफर्ड स्ट्रीट २०
महंमद याकूब, २रा पानबझार २५

दारू गाळण्याचे कारखाने व कलालभट्ट्या
(Breweries and Distilleries)

मध्यप्रांत व वऱ्हाड

काटनी डिस्टिलरी, काटनी, जबलपूर १२६
गव्हर्नमेंट डिस्टिलरी, बैतूल २२
गव्हर्नमेंट डिस्टिलरी, अकोला २०

मुम्बई प्रांत

गव्हर्नमेंट सेंट्रल डिस्टिलरी, नाशिकरोड नाशिक २५

हैद्राबाद संस्थान

सेंट्रल डिस्टिलरी, हैद्राबाद शहर ७७
नथू परसाद डिस्टिलरी, हैद्राबाद शहर २३
डिस्टिलरी कं., निर्मळ, अदिलाबाद २५
राजा ऑफ वनपार्थी अँड को., महबूबनगर ३०

काफीचे कारखाने

मुम्बई बेट

पोलसन्स कॉफी अँड बटर वर्क्स, मुंबईबेट १२०

(Dairy Produce)

मुम्बई बेट

ब्रिटिश एक्स्प्रेस डेअरी, मुंबई बेट ४५

पिठाच्या गिरण्या

मुम्बई बेट

प्रिन्स ऑफ वेल्स फ्लोअर मिल्स ३८
कासमभाई फ्लोअर मिल्स २०
बॉइस फ्लोअर अँड स्पाइस मिल ३२
इंपीरियल फ्लोअर मिल्स ४१
न्यू. यूनिअन फ्लोअर मिल ११९
डंकन रोड फ्लोअर मिल ३१
वॉलेस फ्लोअर मिल (ए) ११७
वॉलेस फ्लोअर मिल्स सीवडी (२) १८५

हैद्राबाद संस्थान

गुलबर्गा

देवाज एस्. ओ. भिनाजी फ्लोअर अँड सीड क्रशिंग मिल, यादगीर ५०
शेखहुसेन अहमद फ्लोअर अँड राइस मिल, यादगीर २५
मिर्झा इकबल अलीबेग फ्लोअर अँड सीडक्रशिंग मिल, यादगीर २५
जिन अँड फ्लोअर अँड सीडस् क्रशिंग मिल, यादगीर २५
हाजी अल्लीसाहेब फ्लोअर अँड राईस मिल, यादगीर तालुका २०

बर्फ व कार्बानिक ॲसिडयुक्त पेयें
(Ice and Aerated Waters)

मुम्बई बेट

मूर अँड को. ३६
पर्शियन अँड को. ३५
जुबिली एरेटेड वॉटर फॅक्टरी ३२
क्लब सोडा वॉटर फॅक्टरी २४
लाइट फूट रेफ्रिजरेशन कं. ची आइस फॅक्टरी ९५
नोबल अँड सन्स ४२
ड्यूक अँड सन्स नं. १ व २ १०९
कात्रक अँड को. ३५
रॉजर्स अँड को. ४२

मध्यप्रांत व वऱ्हाड

जॉर्ज आइस फॅक्टरी नागपूर २०

हैद्राबाद संस्थान

स्पेन्सर अँड को. शिकंदराबाद ३५
अल्लादिन अँड सन्स " ३६
ए. मैसाना अँड सन्स " २५

तांदुळाच्या गिरण्या (Rice Mills)

मध्यप्रांत व वऱ्हाड

बिलासपूर

श्रीमहावीर राइस मिल, अक्कलतारा ८९
श्री. गोविंद राइस मिल, नैला ४३
श्री. रामचंद्र राइस मिल, बरद्वार १३८
श्रीसत्यनारायण राइस मिल, नैला ६१
हैत्राम घनश्यामदास राइस मिल, बरद्वार १३४
रामजसमल नवारंगराई राइस मिल ३०
श्रीसत्यनारायण राइस मिल, अक्कलतारा १६०
श्रीशंकर राइस मिल, नैला ६०
श्रीकृष्ण राइस मिल नैला ५२
गणेश राइस अँड ऑइल मिल्स, गोंदिया २९
दत्त ब्रदर्स राइस अँड फ्लोअर मिल, नेवरा रायपूर ६५

हैद्राबाद संस्थान

गुलबर्गा

महमद युसफशेठ अँड को. राइस मिल, तांडूर ५०
अगनर बीरप्पा अँड सय्यद कासीम मिल, अगनूर २५
रामचंदर मिर्झामिल राइस मि. अदिलाबाद ७७

साखरेचे कारखाने

बेलापूर कं. लि. हरिगांव अहमदनगर ३३०

तंबाखू

मुम्बई सबर्बन

एस्. मार्स अँड को. सांताक्रूझ ४२
क्राऊन टोबॅको कं. वांद्रा ४०

नाशिक

डी. मॅक्रोपोल कं. ५४

हैद्राबाद (दक्षिण)

वझीद सुलतान अॅन्ड सन्स २२५

कोल्हापूर

इंडियन लीफ टोबॅको कं., शाहूपुरी २५०

वॉटरवर्क्स

नागपूर गुळवाडा वॉटरवर्क्स नागपूर २३
पूना वॉटरवर्क्स पुणें ७१

विविध

(ग्रेन डेपो)

मुम्बई बेट

व्होलकार्ट ब्रदर्स सीड्स् क्लीनिंग प्लँट
"ए" "बी" (२) ४२०

गुळाचे कारखाने

अहमदनगर

हणमंतराव गणपतराव गिरमे गुरफॅक्टरी, जेवर ३९
महादेवराव कुशाबा मोटे गुरफॅक्टरी मणजर २६
दत्तात्रय बाबाजी मोटे गुरफॅक्टरी बेलापूर रोड
रघुनाथ बळवंत गुरफॅक्टरी यारवी २८
रघुनाथ सोपानराव इनामके गुरफॅक्टरी, वलदगांव २४
गणपत येसू गिरमे गुरफॅक्टरी, पुणतांबे २४.
राजाराम भगवंत गुरफॅक्टरी, बेलापूर रोड २८
दत्तात्रय जगन्नाथ गिरमे गुरफॅक्टरी, बेलापूर रोड २३
मारुती रामजी बोरावके शुगरकेन फॅक्टरी, राहतें ३०
सोपानराव बाबाजी मेहेत्रे गुरफॅक्टरी, देराडू, चांदवड २६
रघुनाथ बळवंत फडके गुरफॅक्टरी, कोपरगांव २८
विनायक दादाजी पाटील गुरफॅक्टरी, गुहा ३०
शंकर भाऊ राऊत गुरफॅक्टरी, महेगांव ३८
रघोजी मारुति अँड कंपनीज् गुरफॅक्टरी पडेगांव २८
रामनारायण परशराम गुरफॅक्टरी हंडेवाडी
महादेव कृष्णाजी गुरफॅक्टरी बेलापूर रोड
पिर्ता कोंडाजी चांभार गुरफॅक्टरी बेलापूर रोड
चंद्रभान रूपचंद गुरफॅक्टरी बेलापूर रोड
शंकर बाबाजी कोद्रे गुरफॅक्टरी, कोकरफार्म वडाळा
धोंडीबा कोंडाजी चांभार गुरफॅक्टरी वलदगांव
शंकर दत्तात्रय रासकर गुरफॅक्टरी पाटरा

डाळ–मिल

कोल्हापूर

शिरगांवकर ब्रदर्स ग्राउन्डनट क्रशिंग अँड ऑइल मिल शाहूपुरी १००
कोरेगांवकर ग्राउन्डनट्स् क्रशिंग, जिनिंग अँड ऑइल मिल, शाहूपुरी ३५
जयसिंग मिल ४०
सुंदराजी देवजी ग्राउन्डनट क्रशिंग फॅक्टरी, शाहूपुरी २०
शांताप्पा दादा हरवदे ग्राउन्डनट फॅक्टरी पेटा शिरोळ, जयसिंगपूर २०

विडीचे कारखाने

(यंत्रसहाय्याशिवाय चालणारे)

हैद्राबाद संस्थान

हैद्राबाद शहर

शेख अमीरुद्दीन जंटलमेन फॅक्टरी २४०
युरोपियन फॅक्टरी ५०
सय्यद गफूरसाहेब अँड को. २०
अबदुल्ला अँड को. ५०
शेख हसन अहमद अँड को. ६०
हसन शरीफ अँड को. ३०
शेख हुसेन अँड को. ४०
सय्यद इमामद्दीन अँड को. ३८

गुलबर्गा

अबदुल करीम अँड शेख दाऊद २००
नबीसाहेब पवनवाला अँड को. १५०
सय्यद हुसेन नियामथगड अँड को. ४०
महमद हुसेन अँड को. ७००
सय्यद पीर पादशा साहेब ४००
अबदुल रसूल नैकल अँड को. ५०
कल्लुर हसनसाहेब अँड को. ४०
अबदुल्ला साहेब अँड को. ५०
अबदुल गफर अँड को. ७५

शिकंदराबाद

ई. पी. कुमेरवेल्लू, शुब्रिक स्ट्रीट ४०
नीलम बालिया, बुर्गुचेट्टी बझार ४५
अबदुल सलाम माफलबंडा ३०
हुसेन शरिफ, घासमुंडी २५
वेंकटशन्, माफलबंडा ३०
हुसेन शरीफ, पिकेट २०

५ रासायनिक द्रव्यें व रंग

हाडें व खतें

हरियाली बोन क्रशिंग फॅक्टरी मुंबई सबर्बन १४०

ठाणा बोन मिल, ठाणें ८५

हैद्राबाद संस्थान हैद्राबाद शहर

सी. अब्दुल अझीझ अँड को. ७१

बोन फॅक्टरी, लखीमपूर ५०

रासायनिक द्रव्यें (Chemicals)

रॉली हिल केमिकल वर्क्स, मुंबई बेट १२९

मुंबई सबर्बन

धरमसी मोरारजी केमिकल वर्क्स ७२

डाइंग आणि ब्लीचिंग

मुम्बई बेट

अब्दुल हुसेन अल्लीभाई यार्न ग्लेझिंग फॅक्टरी

बॉम्बे बर्मा डायवर्क्स ९६

सेंचरी मिल्स डायवर्क्स ५७

मोरारजी गोकुळदास मिल्स डायवर्क्स ३११

अदमल्ली अल्लीभाई यार्न ग्लेझिंग फॅक्टरी

दौलतराम डाइंग अँड ब्लीचिंग वर्क्स ८३

बॉम्बे टर्की रेड डायवर्क्स २६

अहमदभाई डाइंग कं. २०

जमनादास डाइंग अँड ब्लीचिंग वर्क्स ४५

जपान सिल्क फिनिशिंग मिल ४५

स्टँडर्ड मिल्स ब्लीच अँड डायवर्क्स ८९

माणेकजी पेटिट मिल्स ब्लीच अँड डाय कं. १८४

इंडियन ब्लीचिंग डाइंग अँड प्रिंटिंग कं. ३०३

बॉम्बे डाइंग अँड मॅन्यु. कंपनीज् डायवर्क्स ३७१

माधवजी धरमसी डाय अँड ब्लीच वर्क्स ३३६

टाटा मिल्स डायवर्क्स २२३

ई. डी. ससून टर्की रोड डायवर्क्स ४२३

खटाव मकनजी मिल डायवर्क्स २३६

बॉम्बे युनियन डायवर्क्स २६२

एम्पायर डाइंग अँड मॅन्यु. कं. ४७

मुम्बई सबर्बन

इब्राहीम हाजी अरब डायवर्क्स ६०

इस्लाम डाइंग फॅक्टरी ४०

सोलापूर

सोलापूर मिल्स न्यू डायहाउस ६८

मध्यप्रांत व वऱ्हाड—नागपूर

हाजी हसन दादाज् डायवर्क्स ३२

एम्प्रेस मिल्स डाय अँड ब्लीच वर्क्स नं. ४ ६०४

मॉडेल मिल्स लि. डाय अँड ब्लीच वर्क्स १०७

वर्धा

रा. ब. बन्सीलाल अबीरचंद मिल (डाइंग अँड ब्लीचिंग डिपार्टमेंट), हिंगणघाट ५५

गॅसचे कारखाने [Gas Works)

बी. एन्. रेल्वे गॅस फॅक्टरी गोंदिया २४

जी. आय. पी. रेल्वे गॅसवर्क्स, मुंबई बेट २९

बॉम्बे गॅस कं. मुंबई बेट ४६४

बी. बी. अँड सी. आय. रेल्वे गॅसहाउस मुंबईबेट २३

पूर्व खानदेश

जी. आय. पी. रेल्वे गॅसवर्क्स, भुसावळ २४

धारवाड

एम्. अँड एस्. एम्. रेल्वे गॅसशेड हुबळी ३८

आगपेट्यांचे कारखाने (Matches)

मुम्बई सबर्बन

कुर्ला मॅच वर्क्स ३३९

बॉम्बे मॅच वर्क्स, कुर्ला ११०५

सांताक्रूझ मॅच वर्क्स ७००

वेस्टर्न इंडिया मॅच फॅक्टरी १४१४

स्वदेशी मॅच फॅक्टरी १००

अंधेरी मॅच फॅक्टरी ८५१

नॅशनल मॅच वर्क्स २८५

बोरिवली मॅच फॅक्टरी ३८०

ठाणा

ठाणा मॅच फॅक्टरी ३१९

मध्यप्रांत व वऱ्हाड

लक्ष्मी मॅच फॅक्टरी, बिलासपूर २८

हौसा मॅच फॅक्टरी, कोटा ५६

अमृत मॅच फॅक्टरी १५२

तेलाच्या गिरण्या

मुंबई बेट

कल्याणजी मूळजी ऑइल मिल

हाजी वली महमद उमरभाई ऑइल मिल नं. १ ५८

हाजी वली महमद उमरभाई ऑइल मिल नं. २ ३०

एलिफंट ऑइल मिल ९३

हाजी वली महमद उमरभाई ऑइल मिल नं. ३ ५१

गोद्रेज ऑइल अँड सोप फॅक्टरी २०

हरुन उस्मान ऑइल मिल ३४

जान महमद ऑइल मिल

धारवाड

फकीरप्पा अभेगिरी अँड सोमप्पा

कालासन्नावर ऑइल मिल, गदग ७०

पूर्व खानदेश

महमद हुसेन ऑइल मिल चाळिसगांव ६५
खानदेश लक्ष्मीविलास ऑइल मिल, जळगांव २३
महंमद हुसेन ऑइल मिल जळगांव ७५
श्रीकृष्ण ऑइल मिल, जळगांव
जमनादास रणछोडदास न्यू ऑइल मिल, जळगांव ६५
ब्रिजराम देद्रज ऑइल मिल धरणगांव २७
गोवर्धनदास जयदेव ऑइल मिल चाळिसगांव २०
चुनिलाल शिवसा ऑइल मिल पाचोरा ४५
मदन मोहन ऑइल मिल्स भुसावळ ८०
हाजी खन्नू ऑइल मिल भुसावळ २६

पश्चिम खानदेश

विजराम देद्रज ऑइल मिल धुळें ७१
पोपालाल शेवचंद अँड कंपनीज् ऑइल मिल, धुळें ७०
गुलाबचंद काळूराम अँड कंपनीज् ऑइल मिल,धुळें ३८
सुरजमल शंकरलाल अँड कंपनीज् ऑइल मिल, धुळें ७३
नंदुरबार ऑइल मिल्स नंदुरबार ३२
ओंकार कणीराम ऑइल मिल धुळें ३६
जीवनराम हुकमीचंद ऑइल मिल धुळें २१
ग्यानीराम ब्रिजलाल ऑइल मिल, धुळें ३५
नंदराम धरमल ऑइल मिल, दोंदैचा ५३
डाह्याभाई अँड जमशेटजी ऑइल मिल अँड जिन, नंदुरबार १८०

बेळगांव

माणिकबाग ऑइल मिल, बेळगांव ६७

विजापूर

विजापूर महालक्ष्मी कं. ऑ. मिल, विजापूर २०
मालेगांव ऑइल मिल, **नाशिक** ३०

मध्यप्रांत व वऱ्हाड

न्यू मुफासिल कं., लि. नागपूर ५२
शेवलाल कुंजीलाल ऑइल मिल, अकोला ३५
श्री लक्ष्मी ऑइल मिल कं. लि. " १००

उमरावती

न्यू मुफासिल ऑइल मिल कं. लि. उमरावती ३९
राणजी कानाव ऑइलमिल, उमरावती ३४
कानाव धामणगांव ऑइल मिल, धामणगांव ३५
श्रीगणेश ऑइल मिल, **चांदा** २०

बिलासपूर

इस्लानिया ऑइल अँड राइस मिल, चंपा ५८
न्यू मोफ्यूसिल कं.ज् ऑइल मिल वर्धा ३५

छिंदवाडा

न्यू म्युफासिल कं. लि. ऑइल मिल पांढूर्णा ६०

रायपूर

विजराज ऑइल अँड राइस मिल, नेवापूजा ३१
सरस्वती ऑइल मिल गोदिहरी २०
हाजी लतीफ हाजी दाऊद ऑइल मिल ४२

निमार

अकबर ऑइल मिल्स, ब-हाणपूर ५४

बुलढाणा

राजा गोकुळदास दि. ब. जयरामदास ऑइल मिल मलकापूर ३०
न्यू मोफ्यूसिल कंपनीज् ऑइल मिल शेगांव ३५
नाथमल मोतीलाल ऑइल मिल मलकापूर ८१

मुंबई संस्थानें:--

वेंकटेश ऑइल मिल, सांगली ५७
बालाजी फॅक्टरी, सांगली ५७

हैद्राबाद संस्थान--गुलबर्गा

वेंकटेश्वर ईरभद्राप्पा ऑइल मिल्स यादगी २५

रंग (Paints मुंबई बेट)

गहागन पेंट अँड व्हार्निश कं. ६५

मध्यप्रांत व वऱ्हाड-- जबलपूर

ऑलफर्टस पेन्ट्स अँड प्रॉडक्ट्स् लि. पेंटवर्क्स, काटनी १००
रानडेज् पेंट वर्क्स, वर्धा २५

साबण:--

बॉम्बे सोप फॅक्टरी, मुंबई बेट ६०
गोद्रेज सोप कं., मुंबई बेट ६५

संकीर्ण

औषधी आरखाने

मुंबई बेट

इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज् लि. १०५
झंडू फार्मास्यूटिकल वर्क्स ११३
केंप अँड कं. ३२
नॅशनल अनिलिन अँड केमिकल कं. ४५
सरदार कार्बानिक गॅस वर्क्स १४५
लाइट् फ्रूटरेफ्रिज रेशन कंपनीज् ऑक्सिजन गॅस फॅक्टरी ६३

कुलाबा

श्रीधूतपापेश्वर आरोग्यमंदिर, ३३

सुगंधशाळा

दातेज् परफ्यूमरी फॅक्टरी, पुणें	२१

Colour mixing Factory

आर. जे. मिस्त्री अँड कंपनी, मुंबई	२७

६ कागद व छपाई

कागदाच्या गिरण्या

रे पेपर मिल, मुंढवा–पुणें	३८८
गिरगांव पेपर मिल, मुंबई बेट	७५
डी. पदमजी पेपर मिल, मुंबई बेट	८९

हैद्राबाद संस्थानः—

पेपर मॅन्यु. कं. कागदीपुरा औरंगाबाद	१२१

प्रिंटिंग बुकबाइंडिंग वगैरे––

मध्यप्रांत व वऱ्हाड

महाराष्ट्र प्रेस नागपूर	२७
सी. पी. गव्हर्मेंट प्रिंटिंग प्रेस	२९७
नागपूर फाइन आर्टस् लिथो वर्क्स	५०
शिवराज फाइन आर्टस् लिथो वर्क्स	६८
ऑल इंडिया रिपोर्टर्स प्रेस	६२
मिशन प्रिंटिंग प्रेस, जबलपूर	२७
महेश्वर प्रिंटिंग प्रेस उमरावती	४३

मुंबई बेटः––

प्रीमिअर ऑफसेट वर्क्स	
गव्हर्मेंट सेंट्रल वर्क्स	६१३
जी. आय. पी. रेलवे प्रिंटिंग आफिस	११०
कर्नाटक प्रिंटिंग प्रेस	८२
श्री करुणेश लिथो प्रेस	३१
अजिंक्य प्रिंटिंग प्रेस	४१
इलाइट प्रिंटिंग प्रेस	६६
ज्ञानसागर लिथो प्रेस	७५
श्रीलक्ष्मी नारायण प्रिंटिंग प्रेस	४०
सूना प्रिंटिंग प्रेस	३२
फाइन आर्टस प्रिंटिंग प्रेस	२३
के. एन. सेलर प्रेस	
बी. बी. एन्ड सी. आय. रेल्वे कं. प्रिंटिंग प्रेस	४१
समशेर प्रिंटिंग प्रेस	५०
श्रद्धानंद प्रिंटिंग प्रेस	
इन्दुप्रकाश प्रिंटिंग प्रेस	४०
दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस	५६
श्री वेंकटेश्वर प्रिंटिंग प्रेस	१७०
करुणोदय लिथो प्रेस	३५
निर्णय सागर प्रेस अँड जावजी दादाजी टाईप फॅक्टरी	२५५
बॉम्बे क्रानिकल प्रेस	६८
ब्रिटिश इंडिया प्रेस	४९५
सांज वर्तमान प्रेस	११०
जाम-इ-जमशेट प्रिंटिंग प्रेस	११०
कमर्शिअल प्रिंटिंग प्रेस	११०
कैसर -इ-हिंद प्रिंटिंग प्रेस	२३
जगदीश्वर टाईप एन्ड लिथो प्रेस	४३
थॅकर एन्ड कंपनीज प्रेस	७०
लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग प्रेस	४५
बॉम्बे समाचार प्रिंटिंग प्रेस	७०
एक्झॅमिनर प्रेस	११२
गुजराथी प्रिंटिंग प्रेस	२५
रॅली ब्रदर्स प्रिंटिंग प्रेस	२४
आर्मी अँन्ड नेव्ही को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स लि. प्रिंटिंग प्रेस	६४
खिलाफत प्रिंटिंग प्रेस	२०
बोल्टन फाइन आर्टस लिथो प्रेस	११५
ॲथिनियन प्रिंटिंग प्रेस	३०
बॉम्बे वैभव प्रेस	१०८
ट्युटोरिअल प्रिंटिंग प्रेस	६५
इंडियन डेलीमेल प्रेस	१५०
कॅक्सटन प्रिंटिंग प्रेस	१७०
टाइम्स ऑफ इंडिया प्रेस	११५०
करीम लिथो प्रेस	९१
महमदी प्रिंटिंग प्रेस	८४
ॲडव्होकेट ऑफ इंडिया प्रेस	१४१
तत्त्वविवेचक प्रेस	५५
लक्ष्मी वेंकटेश्वर प्रेस **ठाणें**	५३

नाशिकः––

सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस, नाशिक रोड, नाशिक	४७२
करन्सी नोटस प्रेस, नाशिक	३२०

मुंबई सबर्बनः––

रवि वैभव फाइन आर्टस लिथो प्रेस, घाटकूपर	५८
रविउदय विजय फा. आर्ट लि. प्रे. घाटकूपर	१२६

पूर्व खानदेशः––

बाबजी स्टीम प्रिंटिंग प्रेस, जळगांव,	२०

पुणेंः––

आर्यभूषण अँड ज्ञानप्रकाश प्रेस	१९३
हनुमान प्रेस	५६
श्री गणेश प्रिंटिंग प्रेस	८४
रविवर्मा फाइन आर्टस् लिथो प्रेस, मळवली	५८
रमाबाई मुक्ति मिशन प्रेस, केडगांव	२५
डेक्कन प्रिंटिंग प्रेस, पूना	३०
भारत प्रिंटिंग प्रेस, पूना	२५
चित्रशाळा प्रेस, पूना	१८३
स्कॉटिश मिशन इंडस्ट्रीज प्रेस	६८

केसरी प्रेस २०
ओरिएंटल वॉचमन पब्लिशिंग असोसिएशन ३६
विजय प्रेस ४०
राजगुरु एंड कंपनीज प्रेस ३४
समर्थ भारत प्रिंटिंग प्रेस २०
लोकसंग्रह प्रेस ३०
येरवडा प्रिझन प्रेस, येरवडा २२७
गव्हर्मेंट फोटो झिंको आफिस पूना १८०

हैद्राबाद संस्थानः--

हैद्राबाद शहरः--

गव्हर्मेंट स्टँप डिपार्टमेंट ७०
गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस ५९७
एच्.ई.एच्.दि निजाम्स् उस्मानिया यु. प्रेस २५

शिकंदराबादः--

जोरवार मल्ल मोतीलाल प्रि.प्रेस,वालरामरोड ५०
बी.व्ही.आर.बाल रेड्डी प्रि.प्रेस, पार्कलेन ३८
टी. रामकिस्तिया प्रिंटिंग प्रेस,पार्कलेन २१

टाईप फाउन्ड्रीः--Type Foundry

मुंबईबेटः--

बॉम्बे लेटर फाउन्ड्री
न्यू आनन्द सागर टाइप फाउन्ड्री ३५
गुजराथी टाइप फाउन्ड्री ५४
किकाभाई हरिवल्लभदास टाइप फाउन्ड्री २०

७ लांकूड,दगड व कांच यासंबंधीं कारखाने (Processes relating to wood, stone and Glass)

विटा व कौलें

एलिफंट ग्लेझ्ड टाइल्स फॅक्टरी, मुंबई बेट २२०
स्वस्तिक फ्लोअरिंग टाइल्स फॅक्टरी,मुंबई ११५
पायोनियर क्ले ॲन्ड इंडस्ट्रियल वर्क्स, खानापूर, बेळगांव ५२

कुलाबा

भारत फ्लोअरिंग टाइल्स कं.पोरबंदर, १५५

हैद्राबाद संस्थान

दादाबाई मिल्स फॉर इं. टाइल्स, हैद्राबाद ३०
बंगलोर टाइल्स मॅन्यु. कं. हैद्राबाद १००

सुतारकाम व कॅबिनेट मेकिंग

मुम्बई

इ. विंब्रिज ॲन्ड कं. मुंबई ७०
जॉन रॉबर्टस ॲन्ड कं. मुंबई ९८
टक्स्टाइल वुडन मॅन्यु. कं. मुंबई २५

हैद्राबाद संस्थान

शिकंदराबाद

खाजा मियान एन्ड सन्स, जेम्स स्ट्रीट ३५
एस्. महंमदअली ॲन्ड सन्स, ऑक्सफर्ड स्ट्रीट ३१
एच्. जे. जिनवाला, जेम्स स्ट्रीट २५
रार्जालिंगम ॲन्ड ब्रदर्स,डव्हिटन बझार बोलाराम ४०

शिकंदराबाद कॅन्टोन्मेंट

एस्. महंमद अल्ली, जेम्स स्ट्रीट २२

सीमेंट, चुना व भांडीं (Cement, Lime and Potteries)

मध्यप्रांत व वऱ्हाड

जबलपूर

युनायटेड सीमेंट कं. ऑफ इंडिया लि. मेहगांव ३६१
काटनी सीमेंट इंडस्ट्रियल कं., लि., काटनी ६३४
सी. पी. पोर्टलंड सीमेंट फॅक्टरी, कैमूर ८३०
बर्न ॲन्ड कं.ज् पॉटरी वर्क्स ६३४
परफेक्ट पॉटरी वर्क्स ५४४
काटनी सीमेंट इं. कं. लि. पॉटरी वर्क्स,काटनी १५१

हैद्राबाद संस्थान

शहाबाद सीमेंट कं.,शहाबाद गुलबर्गा १३५५

कांच Glass

मध्यप्रांत व वऱ्हाड

नागपूर ग्लास वर्क्स, नागपूर ७७
पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव, पुणें १५४
नॅशनल ग्लास वर्क्स, मुम्बई ५७

हैदराबाद संस्थान

डेक्कन ग्लास वर्क्स लि. हैद्राबाद शहर १००

इमारती लाकूड कापण्याच्या गिरण्या (Saw Mills)

मुंबई बेट

मॅकेंझीज् लि. ५२८
छोटाणी सॉ मिल (शेवरी सॉ मिल) ४०
पायोनिअर सॉ मिल ४८
सुंदरदास सॉ मिल ८५
गव्हर्मेंट सॉ मिल, हस्ते, नासिक २८

मध्यप्रांत व वऱ्हाड

गव्हर्मेंट सॉ मिल, अल्लापल्ली, चांदा ५९
राजा गोकुळदास सॉ मिल, जुबली, जबलपूर ११०

किरकोळ सेरेमिक संकीर्ण (Miscellaneous ceramic)

इंडियन ह्यूम पाइप फॅक्टरी, सोलापूर ९५

मुंबई बेट

व्होल्कार्ट ब्रदर्स इंजिनिअरिंग गोडाऊन २८
मॉसन व्हर्नन अॅन्ड को. लि. ८०

(Stone Crushing Factory)

मुंबई बेट

म्युनिसिपल स्टोन क्रशिंग प्लॅन्ट, वरळी ४८
म्युनिसिपल स्टोन क्रशिंग कं. शेवरी ६२
बॉम्ब इंप्रूव्हमेंट ट्रस्ट स्टोन क्रशिंग प्लेंट (नवरोजी हिल) ४१
बॉम्बे इंप्रूव्हमेंट स्टोन क्रशिंग प्लॅंट (वडाळा) ५२
बॉम्बे इंप्रूव्ह.ट्रस्ट स्टोन क. प्लेंट (भोईवाडा) ३७
बॉम्बे म्यु. नवरोजी हिल स्टोन क्र. प्लेंट २६
एस.डी.प्रभावळकर्स फॅक्टरी मॅकेंझीज लि. ५७
ठाकुरदास गंगादास स्टोन क्र. फॅ., ठाणें ३८

(Extraction of Timber & firewood etc.)

बोट्स मॅन्युफॅक्चरिंग कं. कोल्हापुर २५

कातडीं, कमावलेलीं कातडीं यासंबंधीं कारखाने.

अहमदनगर

डायाभाई वेलजी लेदर फॅक्टरी, ५२

हैद्राबाद संस्थान

वॅट्स् ब्रदर्स ऑक्सफर्ड स्ट्रीट,शिकंदराबाद २०

Tanneries

वेस्टर्न इंडिया टेनरीज् लि. मुंबई बेट २४८

हैद्राबाद संस्थान

हैद्राबाद शहर

एस्. नहनय मियान आणि कं., लेदर टॅनिंग फॅक्टरी (२) ४९५
सी. अबदुल अझीझ् आणि कं. लेदर टॅनिंग फॅक्टरी, हैद्राबाद ११५
पी. मुनिरुद्दीन आणि कं. लि. टॅनिंग फॅ. ४९
चुनिदास देवकांतिजा आणि कं. ले. टॅ. फॅ. १०५
दाऊदयारजंग लेदर टॅनिंग फॅक्टरी ४०

९. सरकी काढणें व कापसाचे गठ्ठे बांधणें

	कारखान्यांची संख्या	कामगारांची रोजची सरासरी संख्या
मुंबई	१३	६२६
बेळगांव	२३	१३२७
अहमदनगर	२८	११७४
पूर्व खानदेश	१५३	१०६६२
पश्चिम खानदेश	५५	४९३९
नाशिक	१८	१५१९
सोलापूर	२६	१४३९
विजापूर	३७	३७९७
धारवाड	७९	३७३७
पुणें	३	२०८
मध्यप्रांत व वऱ्हाड		
वर्धा	२९	३४७५
नागपूर	३२	२७४७
चांदा	८	५९१
छिंदवाडा	४	२३६
उमरावती	५४	६९१९
अकोला	६१	६३४२
बुलढाणा	६८	६०७५
यवतमाळ	४५	५७७४
सागर	१	२१
हैद्राबाद संस्थान		
औरंगाबाद	३५	२७३१
नांदेड	३८	३५१७
परभणी	३९	३२३६
उस्मानाबाद	१२	११४५
गुलबर्गा	२१	१२२२
बीड	९	६०२
इतर संस्थानें		
मिरज (थोरली पाती)	१	५८
सुधोळ	३	१९३
मिरज (धाकटी पाती)	२	७४
जमखंडी	४	२१७
सांगली	४	२४१
कुरुंदवाड	१	५०
कोल्हापूर	५	१५५
रामदुर्ग	२	५०

१० संकीर्ण (चारा)

मध्यप्रांत व वऱ्हाड

मिलिटरी ग्रास फार्म, सागर ६३

हैद्राबाद संस्थान

मिलिटरी ग्रास फार्म, विकाराबाद, गुलबर्गा

जवाहिरी जडावकाम

कोल्हापूर

रामचंद्र गणेश कुंलकर्णी, फॅक्टरी हुपारी २०
वामन कृष्ण पोतदार फॅक्टरी, हुपारी २०
श्रीधर मल्हार नवले फॅक्टरी, हुपारी २०
श्रीधर देवेंद्र नाकील फॅक्टरी, हुपारी २०

धोबीखाने

व्हिक्टोरिया लॉन्ड्रीज मुंबई बेट	७४
डायमंड ज्युबिली वॉशिंग कं.,मुंबई	५१
ताजमहाल हॉटेल लॉन्ड्री, मुंबई बेट	४३

टांकसाळी Mints

हिज् मॅजेस्टीज मिंट, मुंबई बेट	४६७
हैद्राबाद संस्थान	
एच्.ई.एच्.दि निजामस मिंट,हैद्राबाद शहर	१२१

Ordnance Factories

किरकी ऑर्सनल, खडकी, पुणें	४२१
गव्हर्मेंट ॲम्युनिशन फॅक्टरी, खडकी, पुणें	४५१८
मध्यप्रांत व वऱ्हाड	
गन कॅरेज फॅक्टरी, जबलपूर	२५८८

Stores Works

गव्हर्मेंट मेडिकल स्टोअर डेपो, मुंबई बेट	३९

Telegraph Works.

जी. आय. पी. रेलवे टेलि. वर्क्स मुंबई बेट	२६१

इतर

एस्. बोस ॲन्ड को. मुंबई	३२
बॉम्बे म्यु. लव्हग्रोव्ह पंपिंग ॲन्ड कॉम्प्रे.स्टे.	१२३
बॉम्बे म्यु. ॲस्फॉल्ट प्लेंट	६१
अकबर अल्ली अगरबत्ती फॅक्टरी, सोलापूर	२०

सिनेमा फिल्म कारखाने

मुंबई बेट

कोहिनूर युनाइटेड आर्टिस्टस	२०
श्री जगदीश फिल्म कं.	२०
श्री. कृष्ण फीलम कं.	२०
शारदा फीलम कं.	१४२
श्री रणजीत फीलम कं.	२०
महाराष्ट्र फीलम कं. कोल्हापूर	२००
प्रभात फीलम कं. कोल्हापूर	७५

हिंदुस्थानांतील सन १९२९ या सालांतील उद्योगधंदे दाखविणारें सारपत्रक

१ विणकामाचे कारखानेः—

	संख्या	कामगार
कापड		
कापसाचें सूत काढणें,	५	१५३५
कापड विणणें वगैरे	३४१	३८७१५८
होजिअरी Hosiery	३९	२९४६
तागाच्या गिरण्या	९६	३४८९८२
रेशमाच्या गिरण्या	१९	४९८०
लोंकरीच्या शाली व गालिचे तयार करणें	११	३०४५
लोंकरीच्या गिरण्या	१६	७३९१
इतर	४३	३३७९
	५७०	७५९४१६

२ इंजिनिअरीः—

कोच बिल्डिंग अँड मोटार–कार रिपेअरिंग	९८	८५३२
डॉक यार्डस	११	६६७०
विद्युत् इंजिनिअरी	४४	७००४
इलेक्ट्रिकल् जनरेटिंग अँड ट्रान्सफॉर्मिंग स्टेशन्स	५२	७३६८
जनरल, इंजिनिअरिंग	२७२	४९२९४
केरोसीनचे डबे भरणें व पॅक करणें	२९	१०,९९१
मेटल स्टॅम्पिंग	३५	४२८३
रेलवे वर्क शॉपस्	१४७	१,४२,०४८
शिपबिल्डिंग अँड एंजिनिय.	१९	२४४३४
पोलादी ट्रंका, घडचाळें, सुऱ्या काऱ्या वगैरे	९	८८७
ट्रॅमवे वर्क्स	८	२७५२
इतर	३१	२८६३
एकूण	७५५	२६७१२६

३ खनिजें व धातुः—

ओतकाम	५३	३६५०
आयर्न अँड स्टील स्मेल्टींग अँड स्टील रोलिंग मिलस	६	३६५९०
कॉपर स्मेल्टींग अँड कॉपर रोलिंग मिलस	१	५२८
लेड स्मेल्टिंग अँड लेड रोलिंग मिलस्	६	४३४७
अभ्रक कारखाने (मिका वर्क्स)	२	१६५
पेट्रोलिअम रिफाइनरीज् (इन्क्ल्यूडिंग ऑइल पंपिंग स्टेशन्स)	१३	१२०७८
इतर	३७	२८८८
	११८	६०२४६

४ खाद्यपेय व तंबाखूः-

बिस्किटें तयार करणाऱ्या भट्या, बेकरीज् व कन्फेक्शनरी	१९	१३७६

दारू गाळण्याचे कारखाने	३७	२७४०
कॉफी तयार करण्याचे कारखाने	१६	३४६६
डअरी प्रोड्यूस	४	२२१
पिठाच्या गिरण्या	७९	६०५४
आइस अँड एरेटेड वाटर्स	५१	२८९२
भाताच्या गिरण्या	१३२०	७३८९६
साखरेचे कारखाने	४४	१५०६९
चहाचे कारखाने	८८५	६२३३९
तंबाखूचे कारखाने	१८	१०७१३
वॉटर पम्पिंग स्टेशन्स	२५	२८७६
इतर	२००	७६५४
	२६९८	१,८९,२९६

५ रासायनिक द्रव्यें, रंग वगैरे

हाडें व खतें	२३	३८५०
रासायनिक द्रव्यें	१३	३१८६
डाईंग अँड ब्लीचिंग	३७	५५३०
गॅस तयार करण्याचे कारखाने	१७	१९६१
नीळ	२०	१२४९
लाख	२२	२१२१
काडयाच्या पेटया	४८	१७०१०
तेलाच्या गिरण्या	२४३	१४१७३
रंग (पेन्ट्स्)	९	१६२८
साबण	१०	८४२
टरपेंटिन व रोसीन	४	१८९६
इतर	२३	२६८०
	४६९	५६१२६

६ कागद व छपाई:—

कागदाच्या गिरण्या	८	५७४२
कागदाचा रांधा	२	११०९
छापणें, बुकें बांधणें वगैरे	३६३	४०६४४
इतर	६	२६५
	३७९	४७७६०

७ लाकूड, दगड, कांच संबंधींचे कारखाने

विटा, कौले, कार्पेटिंग अँड ब्लॉक मेकिंग	१२५	१४६३४
सुतारकाम	३७	४०९१
सीमेंट, चुना, मातीकाम	३०	११३५९
कांच कारखाने	२०	२६०४
चिरकामाच्या गिरण्या		
सॉ मिल्स	१९१	१७६०२
स्टोन ड्रेसिंग	१७	६०४८
इतर	३७	१५०८०
	४५७	७१४१८

८ कातडीं स्किन्स अँड हाइड्स्

कमावलेलें कातडें व शूज	१४	३००६
टॅनरीज्	४५	४९१५
इतर	१८	१५६०
एकूण	७७	९४८१

९ कापसाची सरकी काढणें व गठ्ठे बांधणें

जिनिंग व बेलिंग	२७२२	१९१३७८
तागाचे गठ्ठे बांधणें	११६	३७२८७
इतर	१४	४८१
एकूण	२८५२	२,२९,१४६

१० इतर:—

ब्रशेस	२	३४४
फॉंडर	१०	४१८
ग्रेनक्रशिंग	४	२७८
ग्रामोफोन रेकॉर्डस्	१	१०१३
ज्युएलरी वर्कशॉप्स्	११	७७१
लॉन्ड्रीज्	७	४२५
टांकसाळी	३	१४१४
ऑर्डनन्स फॅक्टरीज्	२४	२२१९३
रीड्स् अँड कोम्स्	३	१६१
रिपेअर्स वगैरे	३	११८
रोपवर्क्स	४१	१८५३२
रबर गुड्स्	१२	२२१४
सॅपर्स अँड माइनर्स वर्कशॉप	१	४५
स्टोअर्स वर्क्स	२	१५२
टेलिग्राफ वर्क्स	२	१२८७
इतर	४७	३४८०
एकूण	१७३	५२८४५
महासंख्या	८५४८	१७,४२,८६०

सहकारी पतपेढ्या

सहकारी पतपेढ्या. (हिंदुस्थानविषयक) हिंदुस्थानांतील गरीब रयतेची स्थिति सुधारण्याकरितां आजपर्यंत जे अनेक उपक्रम सुरू केले त्यांपैकींच सहकारी पतपेढ्या हा एक होय. याचा उपयोग मुख्यत्वेंकरून खेडेगांवांतील लोकांना व्हावयाचा व तो तसा होतही आहे.गेल्या२० वर्षांत पतपेढ्यांच्या संख्येंत जी एकसारखी भर पडत गेली आहे त्यावरून हा उपक्रम पूर्णपणें यशस्वी झाला व प्रधानपद पावला असें म्हणावयास हरकत नाहीं.

हिंदुस्थानांत ही चळवळ साधारणतः २४ वर्षांपूर्वी सुरू झाली. १९०८–१९०९ मध्यें, म्हणजे या चळवळीच्या बाल्यावस्थेच्या कालांत सर्व देशांत मिळून सहकारी पेढ्यांची एकंदर संख्या १५०० च्या आंतच होती. तीच १९२९–३० पर्यंत (ब्रिटिश हिंदुस्थानांत ८८६९३ व हिंदी संस्थानांत १५४९४) एकूण १०४१८५ पर्यंत चढली; आणि या संस्थांचें एकूण खेळतें भांडवल सुमारें ९० कोटी रुपये भरलें. प्राथमिक पेढ्यांतील सभासदांची एकंदर संख्या (ब्रिटिश हिंदुस्थानांत ३५८३७०६, हिंदी संस्थानांत ५९८१९८) एकूण ४१८१९०४ होती, म्हणजे लोकसंख्येशीं दरहजारास सुमारें १५ सभासद असें प्रमाण पडतें. गेलीं २३ वर्षें संस्थांची व सभासदांची संख्या आणि खेळत्या भांडवलाची रक्कम यांची एकसारखी सतत वाढच होत आहे.

या सहकारी चळवळीची मूळ कल्पना अशी कीं, अल्पभाग जमा करावयास लावून काटकसर करण्यास प्रोत्साहन देणें, अनामत रकमा घेणें व विशिष्ट कार्याकरितां सभासदांना सक्तीनें वर्गणी द्यावयास लावणें. या तत्त्वाखालीं ज्या हरतऱ्हेच्या संस्था येतात त्यांतील काहीं येणेंप्रमाणें:—मध्यवर्ती व प्रांतिक पेढ्या आणि बँकिंग यूनियन्स, देखरेख करणारे आणि हमी घेणारे संघ, रि–इन्शुअरन्स सोसायटीज्, आणि शेतीविषयक व बिनशेतीविषयक संस्था (पेढ्या). अलीकडे शेतीविषयक बिनपतीच्या पेढ्यांची वाढ फार झपाट्यानें होत आहे. त्यांचा कार्यव्याप मोठा असतो. त्यांत खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो. शेतांत उत्पन्न होणारे सर्व पदार्थ सरसहा विकण्याची सोय करणें, औतें व खतें बनविणें व विकणें, पाटबंधाऱ्यांचीं कामें चालू ठेवणें, जमिनीच्या तुकड्यांचें एकीकरण करणें, (गट करणें),दवाखाने व शाळा उघडणें, रस्ते सुस्थितींत ठेवणें व नवीन तयार करणें आणि शेतकीच्या नव्या सुधारलेल्या साधनांचा व पद्धतींचा प्रसार करणेंकरितां शेतकी खात्यास मदत करणें.

१९३०–३१ हें साल आर्थिक दृष्ट्या सार्वत्रिक हलाखीचें गेलें, त्यामुळें सहकारी चळवळीची वाढ व्हावी तशी झाली नाहीं. तरीपण दिवसानुदिवस या कार्याची प्रगतीच होत आहे हें स्पष्ट दिसतें. या चळवळीचा फैलाव सर्व देशभर झाला असून खेड्यापाड्यांतील लोकांना यामुळें चांगला हातभार मिळतो. १९३०–३१ सालीं मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीची प्रगति साधारण बरी झाली. आतां सिंधमधील महापुरामुळें व एकंदर किंमती उतरल्यामुळें तत्पूर्वीच्या सालाबरहुकूम वाढ झाली नाहीं ही गोष्ट निराळी. त्यांतूनही याच वर्षीं गैरव्यवस्थित संस्था वगळून सुस्थिति व सुव्यवस्था निर्माण करावयाची असें या खात्यानें (सरकारी) ठरविल्यामुळें थोडीबहुत वाढ खुंटलीच. सर्व तऱ्हेच्या संस्था जमेस धरतां एकंदर संख्या ५७३४ भरली, म्हणजे २६२ नीं वाढली, व त्यांतील सभासदसंख्या ५७५६१६ झाली म्हणजे २६९८२ नीं वाढली. खेळतें भांडवल एकूण सुमारें १२८१ लक्ष रु. म्हणजे वाढ–८९॥लक्ष रु. एकंदर मालकीचें भांडवल ७९५लक्ष रु.म्हणजे वाढ ७३लक्ष रु. राखून ठेवलेले फंड (Reserve funds) ही रक्कम ९३ लक्ष रुपये भरली. शेतीविषयक पतपेढ्यांची वाढ सर्वांगीण झाली. त्यांची एकूण संख्या ४५२६–वाढ–२०९; त्यांतील सभासदसंख्या २६५३२५. वाढ–२५६७;अनधिकृत बाकी मात्र शेंकडा ३० होती ती शे. ३१ वर गेली.म्हणजे एकूण ९८ लक्ष रु. झाली. याचें मुख्य कारण शेतकऱ्यांची हलाखीची आर्थिक स्थिति हें होतें. परंतु ही बाकी थकावयास कांहीं ठिकाणीं विशेषतः

गुजराथमध्यें राजकीय घडामोडी हेंही एक कारण जमेस धरलें पाहिजे. या पतपेढ्यांपैकीं १६३१ संस्थांमधून बाकी येणें कांहींही नव्हतें आणि५७५ मधून शेंकडा १० हूनही कमी बाकी येणें होती. शेतीविषयक विनपतीच्या पेढ्यांची संख्या२५३ झाली म्हणजे दोहोंनीं वाढली. साधारणतः या संस्था सुव्यवस्थित चालू होत्या.त्यांतल्यात्यांत कापूस विक्रय करणाऱ्या पेढ्या भरभराटींत होत्या. पांच क्रयविक्रय करणारे संघ लोकोपयोगी कामें करीत होते व सहकारी डेअरीज् मधूनही सुधारणा दिसून येत होती. बिन्शेतीविषयक पेढ्या ७७६ होत्या त्या ८३१ झाल्या आणि त्यांची सभासदांची संख्या १,९८,११७वरून २,१९,०१६ वर गेली. यापैकीं अधिक संस्था पतपेढ्या होत्या. इलाख्यांतील शहरांतील पेढ्यांची वाढ चालूच होती. ५०००० रु. वर खेळतें भांडवल असलेल्या अशा शहरांतील पेढ्या ७० होत्या त्या ७६ झाल्या. बहुतेक सर्व तालुक्याच्या ठिकाणीं आणि वऱ्याचशा मोठ्या खेडेगांवांतून हल्लीं एक एक अर्बन बँक आहे. कंझुमर्स सोसायटी अथवा गिऱ्हाइक–संघ यांची प्रगती अगदींच थोडी झाली व उत्पादक संघाची संख्या तर २७ वरून २१ वर आली. विणकऱ्यांच्या पेढ्यांची (Weavers Societies) पुढचीं चिन्हेंहीं आशादायी नव्हती. हाऊसिंग सोसायटीज् मात्र ५६ होत्या त्या ५७ झाल्या. प्रांतिक सहकारी (Provincial Co-operative Bank) पेढी सुस्थितींत होती. तिचें खेळतें भांडवल १८४ लक्ष रु. वरून उतरलें तें १५६ लक्ष रु. वर आलें. याचें मुख्य कारण म्हणजे 'सहकारी संस्थांना जमीन सुधारण्याकरितां कर्ज (Loan) काढावयाचें (Co-operative Societies Land Improvement loan rules नियमाखालीं जे लांब मुदतीचे कर्ज काढले होतें त्याची फेड केली हें होय. परंतु मागील येणें (Over-dues) ३० लक्ष रु. होतें तें कमी करून २३ लक्ष रु.वर आणलें. मध्यवर्ती पेढ्या तत्पूर्वीच्या सालाइतक्याच म्हणजे १९ च होत्या. त्यांची सभासदसंख्या १२१०५ होती ती १२९७६ झाली व त्यांचें खेळतें भांडवल २६५ लक्ष रु. वरून २८४ वर गेलें. रिझर्व फंड रक्कम ४ लक्ष रु. होती ती ५.८९ लक्ष रु. झाली.नफ्याचें प्रमाण मात्र उतरलें. नफ्याची रक्कम ३ लक्ष रुपये होती ते ३.५५ लक्ष इतकी हटली. परंतु मागील बाकीची शेकडेवारी १९ होती ती १४ झाली म्हणजे उतरली. मुंबई प्रांतिक सहकारी संस्था (The Bombay Provincial Co-operative Institute) नित्याप्रमाणें लोकोपयोगी कामें करीत असते आणि वर्षाअखेर तिची सभासदसंख्या ५७५५ होती.

---

२ **सहकारी पतपेढ्या** (मुंबई इलाख्यांतील)–(सहकारी मंडळींच्या कामाचा वार्षिक आढावा ३१ मार्च १९३१ अखेर) हा २७ वा वार्षिक अहवाल आहे. सरकारी अधिकारी–रजिस्ट्रार,पर्सनल असिस्टंट, सहा असिस्टंट रजिस्ट्रारस् व स्पेशल ऑडिटर्स यांशिवाय कारकून वर्ग व हिशेब तपासनीस, ऑर्गनायझर्स वगैरे बरीच मंडळी कामावर असतात. खेरीज हंगामी नोकर वर्ग म्हणून एक असतोच. उदा. रिकव्हरी ऑफिसर्स. १९३० ते ३१ या वर्षांत एकंदर वसुली७४५६८–२–३ रु. झाली. डेप्युटी रजिस्ट्रार नेमण्यास सरकारांतून मागेंच परवानगी मिळाली आहे. परंतु पैशाच्या ओढाताणीमुळें खुद्द नेमणूक अजूनही झालेली नाहीं. त्यामुळें नवीन रजिस्ट्रेशन फारच थोडें होतें. कारण त्यावर योग्य लक्ष ठेवण्यास व त्यांची तपासणी करण्यास पुरे पडेल असा अधिकारी असणें अवश्य आहे. या वर्षीं १३९ ऑनररी ऑर्गनायझर्स होते. (१) डिव्हिजनल (गुजराथमध्यें) ५६ जिल्हानिहाय, ८२ तालुकानिहाय. इतर मदतनीस. सर चुनीलाल मेथा, चेअरमन प्रॉव्हिन्शिअल बँक व प्रेसिडेंट ऑफ इन्स्टिटयूट; प्रो. व्ही. जी. काळे, व्हाइस प्रेसिडेंट ऑफ इन्स्टिटयूट; व एक्स मेंबर बॉम्बे प्रॉ. इ. बँ.कमिटी; व्ही. एल्. मेथा; मॅनेजिंग डायरेक्टर ऑफ दि बॉ. प्रॉ. बँक; हे लोक सहकारी चळवळीचे पुरस्कर्ते आहेत. यांशिवाय आणखी कित्येक लोक आपापल्यापरी हातभार लावतात.

यावर्षीं सहकारी चळवळीवर सार्वजनिक फंडांतून (Public Fund) निव्वळ खर्च झाला तो एकूण ५,७१,५७१ रु. या वर्षीं-पर्यंत सहकारी संस्थांची हिशेब तपासणी सरकार फुकट करीत असे. फक्त ज्यांचें खेळतें भांडवल ५०,००० रु. हून जास्त आहे, अशा सेंट्रल व अर्बन बँकस्. आणि सर्व हाऊसिंग सोसायटीज् यांनाच काय ती 'ऑडिट फी' पडत असे. परंतु डिसेंबर १९३० च्या सरकारी नियमान्वयें इतर सर्व संस्थांवरही कांहीं ठरीव प्रमाणांत ऑडिट फी लादण्यांत आली. याची अंमलबजावणी एप्रील

१९३१ पासून सुरू झाली. या नियमानुसार जी रक्कम गोळा होईल त्यांपैकीं २५००० रु. दरसाल तपासणीच्या खर्चाचा कांहीं हिस्सा म्हणून सरकारला द्यावीं. व सुपरवायझिंग एजन्सीना हल्लीं मदत म्हणून सरकारांतून जी ग्रँट मिळते त्याऐवजीं प्रतिवर्षी २५००० रु. वजा जातां जी शिल्लक राहील तितकी ग्रँट मिळावी. नियमानुसार सुमारें ६००० संस्थांना प्रत्येकी सूचना धाडणें व त्यांच्या देवघेवीवर लक्ष ठेवणें हें एक नवीनच काम आतां उद्‌भवलें आहे व त्याकरितां कारकून वर्गांत नवीन भरती करणें अपरिहार्य आहे.

साधारणत: शेतीचा हंगाम फारसा चांगला गेला नाहीं असें म्हणावें लागतें. मुंबई भागांतील ठाणें जिल्ह्यांत पाऊस वेळेवर झाला व पिकेंही भरपूर आलीं. नाशिक जिल्ह्यांत पाऊस वेळेवर आला व सर्वत्र पडला; परंतु तो अतोनात झाला. मालेगांव, नांदगांव,येवलें या तालुक्यांतील कापसाचें पीक फार थोडें आलें, त्यामुळें बाकी येणें फार राहिली.मागणी हटली व किंमती उतरल्या. यामुळें नांदगांव तालुक्यास तर हें वर्ष फार जाणवलें. पूर्व खानदेशमध्यें पिकांची स्थिति सप्टेंबरमधील पाऊसामुळें सुधारली. जामनेर व भुसावळ या तालुक्यांतील कांहीं भागांत वाघुर, गिरणा व तापी या नद्यांच्या पुरामुळें घरादाराचें व शेतीचें चांगलेंच नुकसान झालें. पश्चिम खानदेशांत, धुळें व सिंदखेडा हे तालुके सोडून, बाकी सर्वत्र खरिपाचीं पिकें चांगलीं होतीं. रबीचा हंगाम मात्र, साक्री तालुका सोडतां, सर्वत्र वाईट गेला. मध्यभागांत म्हणजे सोलापूर, नगर व पुणें या जिल्ह्यांत खरिपाचीं पिकें सर्वत्र ढांसळली. रबीचा हंगामही समाधानकारक गेला नाहीं. त्यांतही ज्वारी, कापूस, भुईमूग, व गूळ यांच्या किंमती उतरल्यामुळें एकंदर परिस्थिति फार चिंताजनक झाली.

बेळगांव विभागांत (म्हणजे बेळगांव, सातारा, कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांत) एकंदर हंगाम ठीक गेला. दक्षिण विभागांत (म्हणजे धारवाड विजापूर व कारवार या जिल्ह्यांत) कांहीं ठिकाणीं पाऊस अवेळीं आला,तर कोठें अपुरा व कोठें अतोनात पडला. त्यांतच मालाच्या किंमती उतरल्यामुळें, कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यांचा पेरणी वगैरेचा खर्चही बाहेर पडला नाहीं. या वर्षी शेतकी विषयक व बिन शेतकीविषयक पेढ्यांच्या संख्येंत विशेष भर पडली. शेतकी विषयक पेढ्यांची सभासदसंख्या ४०००नीं कमी झाली. याचें कारण म्हणजे खानदेशमधील तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनचें सभासद कमी झाले. तेथील शेतकऱ्यांना केवळ वार्षिक वर्गणी देणेंही शक्य नव्हते. खेळत्या भांडवलांत १ कोटी १० लक्ष रुपयांची भर पडली व एकूण १४ कोटी रु. झाले. रिझर्व फंडांतही बरीच भर पडली, व एकूण फंड एक कोटीवर थोडासा भरला. या आकड्यांवरून सहकारी चळवळीचा प्रांतांतील आर्थिक परिस्थितीशीं कसा निकट संबंध आहे हें ध्यानांत येईल.

पाचोरें, भडोच व धारवाड या ठिकाणीं एक एक लँड मॉर्टगेज बँक आहे. या वर्षी एकंदर २.७४ लक्ष रु. लोकांना कांहीं मुदतीवर दिले. पश्चिम खानदेश व सातारा, या जिल्ह्यांत बॉ. प्रॉ. कॉ. बँकेनें कांहीं लोकांस कर्ज दिलें. इलाख्यांत ५०००० रु. वर खेळतें भांडवल असलेल्या अशा ८२ अर्बन बँका आहेत.याच धर्तीवर प्रत्येक साधारण शहराला एक 'पीपल्स बँक' असावीं असें या चळवळीचें धोरण आहे. ज्या विभागांत बहुतेक सर्वत्र सहकारी पेढ्या दिसून येतात तेथें सुपरवायझिंग यूनियन्स निघाल्या आहेत यामुळें सर्व पेढ्यांची व्यवस्थेशीर तपासणी होते. सरकार सरसकट सर्व संस्थांकडून हिशेब तपासणीची फी घेणार व तें काम बहुतेक जिल्हावार होईल. असें झालें म्हणजे या सुपरवाइझिंग यूनियनची आर्थिक स्थिति व कारभार सुव्यवस्थित होईल. हल्लींचे बँक इन्स्पेक्टरचे कामापैकीं बराच भाग या युनियन्स उरकतील व मग फिनान्सिंग एजन्सीज कडून या यूनियन्सना थोडीबहुत मदत मिळेल.

शेतकी विषयक पेढ्या—'एकीकरण' हें सरकारचें मुख्य धोरण होतें. या तत्त्वानुसार मोडकळीस आलेल्या व खंगलेल्या संस्था मोडून टाकल्या व हें धोरण अजूनही चालू ठेवले आहे. या धोरणानुसार मुंबई व ठाणें येथील तपासणी पुरी झाली. खानदेशमध्यें २५ पेढ्या नवीन निघाल्या. इतर विभागांतील पेढ्यांची परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न चालू होता. ॲग्रिकल्चरल नॉन क्रेडिट सोसायटींच्या संख्येंत वाढ करण्यापूर्वी त्या पेढ्यांची व्यवस्था पहाण्याकरितां आणखी जबाबदार लोक सरकारी नोकरींत घ्यावयास हवेत. शेतकी विषयक पतपेढ्या – वाईटपेढ्या वगळावयाच्या असें धोरण असूनही यावर्षी पेढ्यांची संख्या १२४ नीं वाढली. पेढ्यांची एकंदर संख्या ४६५० होती व सभासदसंख्या २,६८,२८४ होती. सर्व पेढ्यांत शेअर भांडवल असलेंच पाहिजे व जुन्या पेढ्यांतही ही पद्धत सुरू झाली पाहिजे

असें नवीन धोरण आहे. यामुळें व जागतिक मंदीमुळें मेंबरस् डिपॉझिटस्मध्यें भर न पडतां उलट मूळ रक्कमहीं हटली.

ठाणें जिल्ह्यांत २० पेढ्या नवीन निर्माण झाल्या. नाशिक जिल्ह्यांतील परिस्थिति जरा खेदजनक आहे. याचें मुख्य कारण गैरव्यवस्था होय. खानदेशमध्यें ८२८ पेढ्या आहेत. मालाच्या किंमती उतरल्यामुळें येथील लोकांकडील बाकी फार फुगली. मध्यविभागांत नवीन पेढ्या अशा सातच निघाल्या. नगर जिल्ह्यांत विसापूरचा कालवा उघडल्यामुळें व प्रांतिक बँकेच्या मदतीनें दहा नवीन पेढ्या स्थापन झाल्या. बेळगांव विभागांतील संख्येंत ४६ नवीन पेढ्यांची भर पडली. पैकीं ३० पेढ्या फक्त सातारा जिल्ह्यांतच निघाल्या. बेळगांव जिल्ह्यांत १६ नवीन पेढ्या स्थापन झाल्या. कुलाबा जिल्ह्यांतील स्थिति बरी आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत मात्र या चळवळीचा व्हावा तसा प्रसार होत नाहीं. दक्षिण विभागांत एकंदर ७३४ पेढ्या आहेत. धारवाड जिल्ह्यांत सर्व मोठ्या खेड्यांतून पेढ्या निघाल्या आहेत. कारवारांत मात्र ग्रुप सोसायटीज् स्थापणें अवश्य आहे. कारण येथील कित्येक खेडीं अगदींच लहान आहेत. सुपरवाइझिंग यूनियन्समुळें सर्व पेढ्यांची आर्थिक परिस्थिति नीट संभाळली जाते. व त्यांच्या कारभाराचीही योग्य तपासणी होते. व्यापारी मंदी व मालाच्या किंमती उतरल्यामुळें सर्वत्र पैशाची ओढाताण झाली. यामुळें बाकी येणें वाढली. नाशिक जिल्ह्यांतील पेढ्यांची तपासणी असिस्टंट रजिस्ट्रार व मॅनेजिंग डायरेक्टर ऑफ बॅं. को. ऑ. बँक यांनीं मिळून केली. येथील पेढ्यांची बरीवाईट स्थिति डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँकेच्या कार्यक्षमतेवर सर्वस्वी अवलंबून आहे. मध्य विभागांतील खरीप व रबी हीं दोनही पिकें बुडाल्यामुळें येथील परिस्थिति चांगली नव्हती. बेळगांव विभाग व दक्षिण विभाग या दोनही प्रांतांत बाकी वसुली चांगली झाली नाहीं.

कॅनॉल सोसायटीजः-या तीन ठिकाणीं विभागलेल्या आहेत. १ नीरा, २ गोदावरी व ३ प्रवरा. या पेढ्यांची स्थिति फार चिंताजनक आहे. ज्या लोकांना पूर्वीं कर्ज दिलें तें वसूल व्हावें म्हणून त्यांनाच आणखी मदत दिली. अशा तऱ्हेनें हा आंकडा फार फुगला. नीरा कॅनॉल सोसायटीज्ची स्थितीच काय ती साधारण बरी आहे. शेतकी विषयक पेढ्यांची अ, ब, क, ड, अशी वर्गवारीं पाडलेली आहे व हल्लीं याची अंमलबजावणी कडक होते. फंडाच्या अभावी तीनही लँडमॉर्टगेज बँक्सना आपलें काम बंद ठेवावें लागलें. याशिवाय सातारा व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांना बॉं. प्रॉ. को. ऑ. बँकेनें मोठ्या मुदतीनें पैसे कर्जाऊ दिले आहेत. पश्चिम खानदेशमध्यें भिल्ल लोकांच्या १२ सहकारी पतपेढ्या आहेत. जिल्ह्यांतील एकंदर लोकसंख्येपैकीं एक तृतीयांश भिल्ल लोक असूनही यांच्या पेढ्या इतक्या थोड्या असण्याचें कारण म्हणजे हे लोक निरक्षर असतात व पेढ्यांची व्यवस्था पाहाण्यास योग्य लोक मिळत नाहींत हें होय. पंचमहाल येथें अशा पेढ्या ९३ आहेत. या इलाख्यांत हरिजनांकरितां व रानटी जमातीकरतां अशा एकंदर ६४ पेढ्या आहेत. याशिवाय या लोकांना इतर खेड्यांतील पेढ्यांचे सभासद होतां येतेंच. व अशा जातवार पेढ्यांपेक्षां एकत्रित पेढ्यांतच यांची व्यवस्था नीट होते. तगाई लोनस् ३५ पेढ्यांना देण्याकरितां म्हणून एकंदर ६५०५० रु. कर्ज वाटलें. त्याचा उपयोग ५५ सभासदांना झाला. यांतील २२२५० रुपये सेंट्रल बँकातर्फें दिलें.

ॲग्रिकल्चरल नॉन क्रेडिट सोसायटीजः— अशा पेढ्यांची व्यवस्था पाहाण्यास लायक लोकांची फार जरूर भासते व खेड्यापाड्यांतून तर त्यांचा अभाव असतो. अस्तित्वांत असलेल्या पेढ्यांचें कामकाज व्यवस्थित चालूं आहे. या पेढ्या अनेक तऱ्हेच्या असतात.

कॉटन सेल सोसायटीजः— कापूस विक्री करणाऱ्या पेढ्याः—शेतकीविषयक बिन्पतीच्या पेढ्यांपैकीं या प्रमुख होत. यांची संख्या २४ आहे. इतर जिन्नस विक्री करणाऱ्या पेढ्या एकंदर ३० आहेत. गूळ—१, हवेली ता. गूळ सेल सोसायटी पुणें, तंबाखू —१, निपाणी टोबॅको सेल सोसायटी , जि. बेळगांव, मिरची—२ , धारवाड जिल्ह्यांत १ व ठाणें जिल्ह्यांत १ तारापूर चिंचणी चिली सेल सोसायटी. कांदा—१. निफाड ता. ओनियन सेल सोसा. (जि. नाशिक) आंबा—१, रत्नागिरी मँगोसेल सोसायटी. (पॅडी) साळ ५ . सुपारी—२कुमठा एरेकानट सेल सोसा. व सिरशी रोटगारस् सेल सोसा. इतर —१७, पैकीं दहा पेढ्या सिंधमध्यें आहेत, तीन गुजराथेंत व बाकीच्या चार म्हणजे पंढरपूर सेल सोसायटी, वार्शी सेल सोसायटी व बेळगांव जिल्ह्यांतील संकळेश्वर सेल सोसायटी. कृष्णा कॅनॉल सेल सोसायटीचें काम काज बंद असल्यामुळें ती संस्था नामशेष झाल्यासारखी आहे.

परचेस ॲन्ड सेल युनियन्स–खरेदी विक्री संघ एकंदर सहा आहेत. खानदेश २, मध्यभाग २, नाशिक जिल्हा १, बेळगांव विभाग एक. यांपैकीं नांव घेण्यासारखे संघ म्हणजे खालील होत. जळगांव तालुका युनियन (ईस्ट खानदेश डिस्ट्रिक्ट परचेस् अँड सेल युनियन), निरा कॅनॉल प. अॅ. से. यू. (जि. पुणें); कुरुडवाडी प. अॅ. से. यू. (जि. सोलापूर); मालेगांव प. अॅ. से. यू. (जि. नाशिक); वारणाव्हॅली प. अॅ. से. यू. (जि. सातारा).

मॅन्यूअर सोसायटीज-खत पुरविणाऱ्या संस्था एकंदर ११ आहेत.मागील वर्षी या १४ होत्या.हेंच काम हल्लीं तालुका डेव्हलपमेंट ॲसोसिएशन्स व प. अॅ.से .यूनियन्स करूं लागल्यामुळें खुद्द अशा संस्थांची गरज वाटेनाशी झाली. या ११ संस्थांनीं एकंदर ३, ८६,३३४ पौंड खत विकलें व ११४५ रु.फायदा काढला. याशिवाय मशिनरी अँड इंप्लिमेंट सोसायटीज् (हवेली तालुका म. अँड इं. सोसा.जि.पुणें) पावर पंप अँड जिनिंग सोसायटीज्, डॅम कन्स्ट्रक्शन सोसायटीज्, लॅंड इंप्रुव्हमेंट सोसायटीज्, फेन्सिंग सोसायटीज्, सुपरवाइझिंग यूनियन फॉर फेन्सिंग सोसायटीज्, कॅटल ब्रीडिंग सोसायटीज, कॅटल इन्शुअरन्स सोसायटीज्, अशा प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. कॅटल ब्रीडिंग सोसायटीज् एकंदर १६ आहेत. पैकीं दोन ठाणें जिल्ह्यांत, दोन बेळगांव विभागांत व १२दक्षिण विभागांत आहेत. या संस्थांची प्रगति साधारण आहे.

कोऑपरेटीव्ह डेअरीज–सुरत,धुळें, सालवण, बेळगांव, हुबळी, व बागलकोट येथें प्रत्येकीं एक अशा एकंदर सहा डेअरीज या इलाख्यांत आहेत.

तालुका डेव्हलपमेंट ॲसोसिएशन–या संस्था ठिकठिकाणीं शेतकी प्रदर्शनें भरवून नवीन बियाणीं, खतें, शेतकी उपयोगी हत्यारें वगैरेंचा प्रचार करतात व शेतकी संशोधनखात्याचे अनुभव शेतकऱ्यांस कळवितात. इलाख्यांत एकंदर ८१ ॲसोसिएशन्स आहेत. खानदेशमध्यें १७, मुंबई विभागांत ७, मध्य विभागांत ५ व बेळगांव विभागांत १९, दक्षिण विभागांत १२; उत्तर विभागांत ४ व सिंधमध्यें १५ अशी त्यांची विभागणी आहे. सरकारनें नवीन रजिस्टर होणाऱ्या ॲसोसिएशनस्ना ग्रँट देणें हा जुना क्रम जर तसाच चालू ठेवला असता तर वरील संख्येंत नवीन भर पडली असती.

यूनियन्सः–यांत दोन प्रकार असतात. गॅरंटीइंग यूनियन्स् व सुपरवाईझिंग युनियन्स. गॅरंटिइंग यूनियन्स १९१६ सालीं सुरू झाल्या. यांच्या जामिनकीवरच इतर भागीदार संस्थांना पैसे पुरविणाऱ्या एजन्सीमधून द्रव्यसहाय्य होत असे. हल्लीं अशा संस्थांचें सुपरवाइझिंग यूनियन्समध्यें रूपांतर होत आहे.या सुपरवाइझिंग युनियन्स स्वतःवर कोठल्याही प्रकारची जबाबदारी न घेतां, भागीदार संस्थांना माहिती पुरविणें, त्यांची तपासणी करणें व त्यांना योग्य सल्ला देणें हेंच काय तें काम करितात. साल अखेर (१९३१ मार्च अखेर) युनियन्सची संख्या १०८ होती. गतवर्षी ही संख्या १०१ होती. मुंबई विभाग९सुपरवाईझिंग युनियन्स व १ गॅरंटिइंग यूनियन, एकूण १०'खानदेश विभाग–८ सुपरवाइझिंग यूनियन्स पैकीं २ पश्चिम खानदेशमध्यें व ६ पूर्वखानदेशमध्यें–मध्यविभाग १५ सुपरवाइझिंग यूनियन्स. या विभागांतील ४६८ संस्थांपैकीं ४३७ संस्था कोठल्यातरी यूनियनच्या भागीदार झाल्या आहेत. दक्षिण विभागः–२० सुपरवाइझिंग यूनियन्स व ८ गॅरंटिइंग यूनियन्स.बेळगांव विभाग–१७ सुपरवाइझिंग यूनियन्स ७ बेळगांव जिल्ह्यांत ९ सातारा जिल्ह्यांत, व १ कुलाबा जिल्ह्यांत अशी त्यांची विभागणी आहे.रत्नागिरी जिल्ह्यांत दोन तीन तालुक्यांतील संस्था एकेका युनियनच्या कार्यक्षेत्रांत घेतल्या तरच अशा यूनियन्स तेथें चालू शकतील. सर्व शेतकीविषयक पेढ्या जागोजागच्या सुपरवाइझिंग यूनियन्सला जोडल्या जाव्या म्हणून एक सारखी खटपट चालू आहे. त्यामुळें सर्व सहकारी पेढ्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं येतात.

दि प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह बँकः–बोर्ड१५ डायरेक्टर्स, ७ शेअर वाल्यांचे प्रतिनिधी, ३ सेंट्रल बँकेचे,२ अर्बन बँकेचे व ३ पुत्रीकृत केलेल्या शेतकीविषयक पेढ्यांचे); मॅनेजिंग डायरेक्टर मि. व्ही. एल्. मेथा. बोर्डाचे चेअरमन सर चुनीलाल व्ही. मेथा. भांडवल लांब मुदतीचें व काढतां न येणारें ३०,४६,१७१ रु. भांडवल थोड्या मुदतीचें व काढतां येणारें १,२५,१४,६२९. भांडवल सर्व शेअर्सचे मिळून (संस्था व माणशी) १२,९६, ९००. या वर्षांत या पेढीच्या भागाचा (शेअर) बाजारभाव सरासरी प्रत्येकीं ५५ रु. होता.निवळ फायदा ९२,१०६ रु. झाला. गतवर्षींचा फायदा व या वर्षींचा फायदा मिळून १,१५,७०० रु. डेव्हिडंड म्हणून वाटण्यास पेढीजवळ होते. पेढींतील एकूण ठेव१,१८,२५,०९९ रु.होती.याच वर्षी पेढीनें कॅश सर्टिफिकेट्सची पद्धत स्वीकारली. त्यांत तीन तऱ्हा आहेत. १० रु. १०० व १००० रु. व्याजाचा दर साधारणतः ५। आहे. यामागें या-

वर्षी फक्त ३१,०९८ रु. रक्कमच उभारली. या पेढीच्या शाखांशीं कित्येक संस्था 'चालूं खातें' ठेवतात अशा संस्थांची संख्या ९०८ होती. या पेढीच्या बंगाल, मध्यप्रांत व मद्रास येथील सहकारी पेढ्यांतून कांहीं ठेवी आहेत. कांहीं रक्कम गव्हर्मेंट सिक्यूरिटींज्मध्यें गुंतविलेली आहे. बँकर्स क्लिअरिंग हाऊस, मुंबई यामध्यें या पेढीला प्रवेश मिळाला आहे. या वर्षी मुख्य कचेरींतील 'चालूं खात्याचा 'देवघेवीचा व्यवहार ५.०४ लक्ष रु. पर्यंत गेला होता.

या पेढीनें एकंदर ११ सेंट्रल बँकस् व २८ अर्बन बँकस् यांना गव्हर्मेंट सिक्यूरिटीज् वगैरे तारण ठेवून पैसे दिले व देवघेवीचा व्यवहार ठेवला. पैकीं दोन अर्बन बँकस्ना शेतीची निपज तारण ठेवून १,००,५८५ रु. आगाऊ दिले. परंतु, असा व्यवहार रजिस्ट्रार व बँक यांच्या संमतीशिवाय करतां येत नाहीं.त्याचप्रमाणें ज्या अर्बन बँक्स् त्या त्या ठिकाणच्या डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँकस्नीं पुत्रीकृत केल्या असतील, त्यांच्याशीं या पेढीस सेंट्रलबँकच्या पूर्व परवानगी शिवाय व्यवहार करतां येत नाहीं. परंतु त्या अर्बन बँकेच्या ठेवींचा मात्र स्वीकार केव्हांही करतां येतो.या पेढीच्या लँड मॉर्टगेज डिपार्टमेंटला या सालपर्यंत एकंदर १०,३८४ रु.तोटा आला. लांब मुदतीचें कर्जः–एकंदर ६,६४,८५४रु.जो मनुष्य कर्ज काढील त्याच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करून कर्ज दिलें जातें. ज्या संस्थेमार्फत तो कर्जदार आला असेल त्या संस्थेवर विशेष जबाबदारी रहाणार नाहीं. शेतीची निपज तारण ठेवून एकंदर ८ संस्थांना व १११ कुळांना रकमा दिल्या.या वर्षी बाजारांत मंदाई दिसून आल्यामुळें हा व्यवहार बऱ्याच कमी प्रमाणावर झाला. शिवाय वास्तविक हें काम अर्बन बँक किंवा खरेदी–विक्री करणाऱ्या संस्थांचें असल्यामुळें या प्रांतिक पेढीनें विशेष परिस्थिति असल्याविना प्रत्यक्ष कुळांना कर्ज देऊं नये असें ठरलें होतें. पेढीनें अनेक प्रकारें दिलेलें कर्ज–९४,८५,२३३ रु. होतें वसुली–२५,१०,४३८ रु. प्राथमिक संस्थांना दिलेल्या रकमा–४०,०३,६६४. चांदी व सोनें तारण ठेवून पैसे देण्याचा व्यवहार करण्यास एकंदर ७ शाखांना परवानगी दिली. ६६ लोकांना एकूण १०,७६१ रु. दिले. शेतीच्या मालाचा क्रयविक्रय करणें–हा व्यवहार पेढीच्या शाखांमार्फत किंवा त्यांस जोडलेल्या ठिकठिकाणच्या दुकानांमार्फत होतो. अशीं दुकानें बेलापूर, अकलूज व कोपरगांव येथें आहेत. हल्लीं क्रय–विक्रय करणाऱ्या युनियन्स व सेल एजन्सीज् निघूं लागल्यामुळें पेढीचा हा व्यवहार हटत चालला आहे.या व्यतिरिक्त क्रय–विक्रय करणाऱ्या यूनियन्सना ही पेढी मदत करतेच. या पेढीच्या एकंदर ३० शाखा आहेत. पश्चिम खानदेश जिल्हा ७, पूर्व खानदेश जिल्हा १, नाशिक जिल्हा ४,अहमदनगर जिल्हा ४, पंचमहाल जिल्हा २, पुणें जिल्हा २, सातारा जिल्हा ६, अहमदाबाद जिल्हा १, सोलापूर जिल्हा १, ठाणें जिल्हा २. एकूण ३०. बारामती व निरा येथील शाखा सोडून बाकी प्रत्येक शाखेला एक सल्लागार कमिटी जोडली आहे. २८ शाखांचा व्यवहार किफायतशीर आहे. या शाखांमुळें शहराबाहेरील लोकांस बँकांचा फायदा घेतां येतो व त्यांना बँकेचे व्यवहार समजूं लागतात. याशिवाय अशा शाखा सुरूं झाल्या म्हणजे त्या गांवच्या आजूबाजूस नवीन सहकारी संस्था निघूं लागतात व अस्तित्वांत असलेल्या संस्थांची सुधारणा होऊं लागते.

तपासणीः–तपासणी–खात्यांत वरिष्ठ इन्स्पेक्टर केवळ ७ आहेत. यांशिवाय ३७ असि. इन्स्पे. आहेत. त्यांपैकीं २० इन्स्पेक्टर्स एजंटही आहेत. हे इन्स्पेक्टर जागोजागच्या संस्थांना मदत करतात व सहकारी चळवळीचा प्रसार करतात.

या पेढीच्या कार्यक्षेत्रांत एकंदर २९ यूनियन्स् येतात. या प्रॉव्हिन्शियल बँकेची व्यवस्था म्हणजे सहकारी संस्थेचा एक आदर्शभूत नमुना आहे.

डिस्ट्रिक्ट सेंट्रल बँक्स––इलाख्यांत एकंदर १९ डि. सें. बँकस् आहेत. खानदेशमधील ईस्ट खानदेश डि. सें. को–ऑ. बँकेची सर्वसाधारण व्यवस्था ठीक आहे. मुंबई विभागांतील नाशिक डि. सें. को–ऑ. बँकमध्यें सव गैरव्यवस्था झाली होती.ती सुधारण्याकरितां स्पेशल ऑडिटरची मदत दिली आहे. मध्य विभागांत, पुणें, सोलापूर व बार्शी अशा तीन ठिकाणीं सें. बँ. आहेत.दिवसानुदिवस या पेढ्यांची प्रगतीच होत आहे.पूना डि.सें.को–ऑ.बँकेच्या ६ शाखा व ६ पोट शाखा आणि या पोटशाखांना जोडलेलीं अशीं ९ गोडाऊन्स आहेत. बेळगांव विभागांत बेळगांव डि. सें. को–बँक हीच काय ती एक सेंट्रल बँक आहे. दक्षिण विभागांतील विजापूर डि.सें.को–ऑ. बँकेची सार्वत्रिक मंदाई असतांही यावर्षी प्रगतीच दिसून येते. या पेढीची बागलकोट येथें एक शाखा आहे. कर्नाटक सेंट्रल बँक व शिरशी येथील कॅनरा सेंट्रल बँक या विभागांतच मोडतात. कॅनरा सें. बँकेच्या कुमठा व कारवार अशा दोन ठिकाणीं

शाखा आहेत. या वर्षीं अशा मध्यवर्ती पेढ्यांची बैठक भरली नव्हती. परंतु वर्षाअखेर ही बैठक मुंबई येथें झाली. त्यावेळीं या कॉन्फरन्सची काय-मची घटना आखून तयार केली व इलाख्यांतील सर्व सेंट्रल व अर्बन बँकस्‌ची संघटना व्हावी म्हणून त्या धोरणानें सूचना करण्याकरितां सर चुनीलाल व्ही.मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमली.

बिगर शेतकी पतपेढ्याः--अशा पेढ्या ६१५ आहेत. ५०,०००रु. वर खेळतें भांडवल असलेल्या अर्बन बँ. ८२ आहेत. या पेढ्यांचें व अशा इतर संस्थांचें काम फार समा-धानकारकरीत्या चाललें आहे. जागतिक मंदीमुळें या पेढ्यांची येणें बाकी फार राहिली आहे.

मुंबई विभागांत अर्बन बँकस्‌ व सोसायटीज्‌ यांच्या सभासदसंख्येंत यंदा ७५०० ची भर पडली. मालकीचें भांडवल एकूण १३६ लक्ष रु. आहे. खानदेश विभागांत ३ पेढ्या होत्या; त्या या सालीं ३२झाल्या असून एकूण मालकीचें भांड-वल २०.३ लक्ष रु. आहे. धुळें, अंमळनेर येथील गिरणी –कामगारांच्या संस्था व 'भुसावळ पीपल्स बँक' यांची व्यवस्था सर्वोत्तम होती.मध्य-विभागांतील पेढ्या व संस्था यांची संख्या ७२ आहे. मंदाई असतांहि नगर जिल्हयांत बाकी येणें (Overdues) गतवर्षापेक्षां कमी होती. इतरत्र ही बाकी फुगतच राहिली. पंढरपूर अर्बन बँक,पीपल्स बँक,या पेढ्यांतील Overdues अतो-नात वाढलें. असें असतांहि सर्व विभागांत पंढरपूर अर्बन बँकेची व्यवस्था नांवाजण्याजोगी होती.

बेळगांव विभाग–या विभागांत बेळगांव पायोनियर अर्बन बँक हीच काय ती सर्व अर्बन बँकेंत मोठी होय. गोकाक अर्बन बँकेचें धोरण प्रगतिपर असून तिचा कारभार फार व्यवस्थेशीर चालतो. खानापूर अर्बन बँकेची बाकी येणें फार आहे. रत्नागिरी येथें तीन थ्रिफ्ट सोसा-यटीज्‌ आहेत. दक्षिण विभागांत अशा पेढ्या व संस्था एकंदर ९६ आहेत. सदर्न मराठा को–ऑपरेटिव्ह बँक ही येथील सर्वांत मोठी पीपल्स बँक होय. हिचें खेळतें भांडवल १२ लक्ष रु. वर आहे. हुबळी अर्बन बँकेचा कारभार ठीकठाक आहे. धारवाड अर्बन बँक ही येथील पेढ्यांत तिसरी असली तरी हिच्या कारभारांत गाफिलपणा दिसून येतो.

महाराष्ट्र व दक्षिण विभाग यांमधील पेढ्यांची व्यवस्थेशीर तपासणी होणें फार जरूर आहे. पंढरपूर येथ महाराष्ट्र अर्बन बँकस्‌ कान्फरन्स भरली होती. व तेथें सर्व पेढ्यांची संघटना करण्याकरितां डिव्हिजनल फेडरेशन ऑफ अर्बन बँकस्‌ स्थापन करावी असें ठरलें. त्याप्रमाणें धारवाड येथें भर-लेल्या सदर्न डिव्हिजन कॉन्फरन्समध्येंही असाच ठराव पास झाला. असें केलें असतां विभागांतील ठिकठिकाणच्या पेढ्या व संस्था यांचें संघटन होतें. व या चळवळीचा प्रसार वाढत जातो,असा गुजराथ अर्बन बँकस्‌–यूनियनचा अनुभव आहे.

बेटर अशा लिव्हिंग सोसायटीजः-–संस्था इलाख्यांत आठ आहेत. पैकीं सहा संस्थांनीं अजून कामास सुरुवात केली नाहीं. रत्नागिरी येथील कऱ्हाडे ब्राह्मण बेटर लिव्हिंग सोसायटीचें त्या जिल्हयांतील कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबांची आख-बंद माहिती जमविण्याचें काम चालू आहे. सुरत येथील संस्था, पुनर्विवाह करणें, जन्म, मृत्यू, लग्न इत्यादींच्या विधींचा खर्च कमी करणें, वगैरे मतप्रसार करीत आहे. आज कित्येक वर्षें को–ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीची वाण या इलाख्यांत भासत होती. ती आतां बाँबे प्रॉव्हिन्शि-इन्शुअरन्स सोसायटी स्थापन झाल्यापासून दूर झाली आहे. या संस्थेचे कामास १९३० सप्टेंबर पासून सुरवात झाली. आयुष्याचा विमा उतरणें गरीब लोकांस शक्य व्हावें व विम्याचा फायदा त्यांसहि घेतां यावा म्हणून ही संस्था काढली आहे. येथें १५० पासून २००० रु. पर्यंत विमा उतरतां येतो.

ग्राहकांची चळवळ
Consumer's Movement

(१) स्टोअर्स सोसायटीज्‌:-– या उपक्रमाची पिछेहाटच होत आहे. मुख्य कारण शिक्षणाचा अभाव होय. शिवाय लोकांचें उत्पन्न ठराविक नसल्यामुळें त्यांची बरीचशी मदार उधा-रीवर असते. व्यापारी, अशिक्षित गिऱ्हाईकास कसे फसवितात हें लोकांना समजत नाहीं. या कार-णांनीं अशा संस्थांचे सभासद नेहमीं संस्थेच्या स्टोअरमधून माल न घेतां बाहेरून घेऊं लागले. शिवाय त्यांना या चळवळीची मूल-भूत तत्त्वेंहि नीटशीं पटलेलीं नव्हती. स्टोअरमधून माल कमी खपूं लागला व त्यांच्या व्यवस्थेंतही बिघाड दिसूं लागला; यामुळें ही चळ-वळ पुढें रेटण्यास कोणी तयार होत नाहीं. मुंबई-साऊथ इंडियन कन्झ्युमर्स स्टोअर्स मुंबई हें एक या इलाख्यांतील सुव्यवस्थित चाललेलें स्टोअर आहे.

इ.१९३० विक्री ८३,१०९ रु. व फायदा ४६७७रु. झाला. यावर्षी 'गुजराथ लेडीज् सहकारी भांडार' नवीन निघालें आहे. येथें महिना २००० रु. ची उलाढाल होते. भांडारांत देशी कापड व खादी मिळते. सर्व व्यवस्था सुशिक्षित गुजराथी स्त्रियांच्या हातीं आहे. टेलिग्राफ को-ऑ. कॉन्झुमर्स सोसायटीनें एकंदर ८५,९२३ रु. ची उलाढाल केली व ४५५१ रु. फायदा काढला. दक्षिण-विभागांत कारवार कॉन्झुमरस् सोसायटी व करजगी टीचर्स स्टोअर्स यांचा जम ठीक बसला आहे.या व्यतिरिक्त इलाख्यांत हॉस्टेल सोसायटीज् व कॉलेज स्टोअर्स वगैरे संस्था सहकारी तत्त्वावर चालू आहेत. बी.बी.अँड सी.आय्.रेल्वे स्टोअर्समध्यें १,६०,००० पर्यंत उलाढाल झाली.गव्हर्मेंट हाऊस स्टोअरला धान्याचा भाव अचानक उतरल्यामुळें फार नुकसान झालें, कारण महागाईंत घेतलेलें धान्य उतरलेल्या भावांत काढावें लागलें.

घरें बांधणाऱ्या संस्थाः--(Housing soeieties) ग्राहक चळवळीपैकीं हाच मार्ग काय तो यशस्वी झाला आहे. या संस्था एकंदर ७९ आहेत, व त्या मुख्यतः कराची, अहमदाबाद व मुम्बई येथें आहेत. मुंबईविभाग संस्थांची संख्या २३. असून ८ खुद्द मुंबईंत व १५ उपनगरें व ठाणें जिल्हा त्यांत आहेत. खानदेशमध्यें दोन घरें बांधणाऱ्या संस्था आहेत. प्रत्यक्ष बांधण्याचें काम कोणींच सुरूं केलेलें नाहीं. मध्यविभाग पुणें ३, नगर जिल्हा १ व सोलापूर जिल्हा १. डेक्कन जिमखाना सोसा. पुणें-फायदा २४२५ रु. एकंदर २१ इमारती बांधल्या. सारस्वत हाऊसिंग सोसायटी पुणें-एकंदर १६ घरें बांधली. पूना मिडलक्लास हाऊसिंग सोसायटी याच वर्षी रजिस्टर झाली. सभासद १११, शेअर भांडवल१६८४८रु.व ठेवी१७,६१६प्रत्यक्ष कामास अजून सुरवात झाली नाहीं. दक्षिण विभागांत ५ संस्था आहेत. पैकीं फक्त दोनच काम करतात. सारस्वत हाऊसिंग सोसायटी, धारवाड-एकंदर ४६ बिल्डिंग्ज् बांधल्या.रड्डी हाऊसिंग सोसायटी, धारवाड-एकंदर १३ बिल्डिंग्ज् बांधल्या. सहकारी चळवळीच्या या क्षेत्रांत मुंबई इलाखा इतर इलाख्यांपेक्षां पुढें आहे. हाऊस रीकन्स्ट्रक्शन सोसायटीज् अशा संस्था गुजराथमध्यें २५ आहेत. सिंध हैद्राबादजिल्ह्यांतही २५ संस्था आहेत.

उत्पादकांची चळवळ (प्रोडयूसरस् मुव्हमेंट):--(१) सर्वसाधारण उत्पादकांच्या संस्था १९२९-३०मध्यें२१होत्या.१९३०-३१मध्यें अशा संस्था १८ च होत्या. यांची सर्व बाजूंनीं पिछेहाट च होत होती, व सर्व संस्थांना वर्षाअखेर तोटाच दिसून आला.

मुंबई विभाग--मनोरंजन सहकारी मंडळाचे कार्यकर्ते रा. जी. एस्. कदम हे वारल्यामुळें त्या संस्थेचें फार नुकसान झालें. बेळगांव विभाग-सातारा कॉपर अँड ब्रास इंडस्ट्री सोसायटीनें १०,७६७ रु. किंमतीचा माल काढला. परंतु एकंदर वार्षिक कारभारांत १७४४ रु. निव्वळ तोटा आला. पुणें विभाग-महाराष्ट्र इंडस्ट्रिल सोसायटीनें विशेष कांहीं काम केलें नाहीं. फार थोडे सभासद संस्थेचा फायदा घेतात. आर्यक्षत्रिय सोसायटीनें या वर्षांत कांहींच काम केलें नाहीं. दक्षिण विभाग-धारवाड शूमेकर्स सोसायटीची अंतर्व्यवस्था फार चांगली आहे. १२,५८३ रु. किंमतीचा कच्चा माल सोसायटीनें विकला व एकूण १४७४ रु. फायदा काढला. या विभागांत विणकऱ्यांच्या संस्था सोडतां एकंदर ७ संस्था आहेत. (२) वीणकऱ्यांच्या संस्था (वीव्हरस् सोसायटी):-गतवर्षीपेक्षां या संस्थाची संख्याही तीहींनीं कमीच झाली. एकूण संस्था या वर्षी ५२ होत्या.सभासद२२८५; खेळतें भांडवल२,६७,७०८ रु. विक्री १,९९,९४० रु. फायदा ३४८६ रु. झाला मालाच्या किंमती उतरल्यामुळें या संस्थांचा पाय यंदा जरा मागेंच आला. मुंबई विभागः-नाशिक जिल्हयांत दोन धनगरांच्या संस्था आहेत. दोहोंत मिळून फक्त ४९ सभासद आहेत व खेळतें भांडवल फक्त ८००० रु. आहे. यांचा कार्यविस्तार फार संकुचित असल्यामुळें एकंदर व्यवहार फारसा किफायतशीर होत नाहीं. भिवंडी येथील मोमीन विणकऱ्यांच्या करितां ठाणें डिस्ट्रिक्ट सोसायटी नांवाची संस्था आहे. तिचे सभासद ९९ आहेत व खेळतें भांडवल ९२०० रु. आहे. यंदा ४४,००० रु. ची उलाढाल झाली. खानदेश विभागांत अशा संस्था चार आहेत. मध्य विभाग-पुणें येथील जरतार सोसायटी आपला व्यवहार महाराष्ट्र इंडस्ट्रियल एजन्सीमार्फत चालविते. सोसायटी एजन्सीच्या सभासदांपैकीं एक आहे. सोलापूर जिल्हयांतील सांगोला वीव्हरस् सोसायटीची चालू सालची विक्री ६४९९ रु. झाली. सोलापूर वीव्हर्स अर्बन सोसायटीचा सोलापूर सेंट्रल वीव्हरस्यूनियन मध्यें समावेश झाला. अहमदनगर जिल्हयांतील पाथर्डी वीव्हरस् सोसायटी ही या विभागांतील आदर्शभूत संस्था होय. यंदा एकंदर विक्री ७,७७२ रु. झाली. बेळगांव विभागांत एकंदर विणकरांच्या

संस्था १२ आहेत. येथेंही विणकऱ्यांची स्थिति बिकटच होती. दक्षिण विभागांतही अशा संस्थांची संख्या १२ आहे. एकूण विक्री ६०७१६ रु. व एकूण फायदा ९२४ रु. झाला.अशा संस्था गुजराथमध्यें तीन, व सिंधमध्यें सहा आहेत.

दि बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटः–– इन्स्टिटयूटचे सभासद सालअखेर ६१२५ होते. पैकीं ५२०७ संस्था व ९१८ व्यती होत्या. संस्था–सदस्य–संख्येंत ३५२ चीं भर पडली व व्यक्तिनिष्ठ सभासदसंख्या अठरांनीं वाढली. सिंध, गुजराथ, मुंबई, महाराष्ट्र आणि कर्नाटक या विभागांत प्रत्येकीं एक एक इंन्स्टिटयूशन सुरूं करावी व अशा तऱ्हेनें या इन्स्टिटयूटचा कारभार चालवावा असें संस्थेच्या कोन्सिलनें ठरविलें आहे. कार्यकारी मंडळ (एक्झिक्यूटिव्ह कमिटी) कमिटीच्या या वर्षांत एकंदर सात बैठकीं झाल्या. वार्षिक सर्वसाधारण सभेंत १९३०–३१ करितां सर चुनीलाल व्ही. मेथा यांची प्रेसिडेंटच्या जागेवर पुर्ननिवडणूक झाली. प्रो. व्ही. जी. काळे यांची व्हाईस प्रेसिडेंट म्हणून निवडणूक झाली. इन्स्टिटयूटला सरकारांतून ३०,००० रु. ग्रँट मिळते. परंतु सरकारनें कॉन्फरन्स ग्रँट ४००० रु. देणें बंद केलें.याचें कारण सरकारची आर्थिक ओढाताण हें होय. इन्स्टिटयूटच्या शाखांना कांहीं जिल्हा लोकलबोर्डें व म्युनिसिपालिटीकडून मिळून एकंदर १५९५ रु. मदत मिळाली.

बॉम्बे को–ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्टच्या ४२ व्या कलमान्वयें या वर्षीं एकंदर २६१ संस्थांनीं मदत मिळण्याकरितां (Donations) अर्ज केले. एकंदर २७,३०० रु. या वर्षीं वाटले. गतवर्षीं २८,८०० रु. २४० संस्थांनीं दिले. इन्स्टिटयूटनें प्रचारकार्याकरितां मुंबई व सिंध येथें डिव्हिजनल प्रॉपोगंडा ऑफिसर्स नेमले आहेत. त्याप्रमाणें गेलीं दोन वर्षें ही संस्था जिल्हा शाखांनीं नेमलेल्या 'प्रोपोगंडा ऑफिसर्स' च्या पगारार्करितां प्रत्येकीं दरमहा २५ रु. मदत करते. इन्स्टिटयूटच्या शाखांचें काम सर्वत्र ठीक चाललें आहे. बॉम्बे डिव्हिजनल ब्रँचचे व्यक्तिनिष्ठ सभासद २०४ आहेत. गुजराथमधील शाखेचे सभासद २४० आहेत. तिचा नंबर पहिला असून मुंबई शाखेचा दुसरा लागेल. इंटर नॅशनल को–ऑपरेटिव्ह ॲलायन्स व ऑल इंडिया को–ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट ॲसोसिएशन या दोनही संस्थांची ही इन्स्टिटयूट सभासद आहे. सेंट्रल एज्युकेशन बोर्ड पुणें व धारवाड येथील को–ऑपरेटिव्ह स्कूल्स चालूं ठेविलीं आहेत. 'दि बॉम्बे को–ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली' व 'दि सहकारी मित्र' ह्या दोनहि नियतकालिकांचें प्रकाशन मुख्य कचेरींतूनच होत असतें. सरकारनें कॉन्फरन्स ग्रँट देणें बंद केलें असल्यामुळें प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स भरविणें शक्य होत नाहीं. या वर्षांत एकंदर १२,७२८ नवीन फिर्यादी पंचाईतीकरतां दाखल झाल्या. गतवर्षीपैकीं ५८२९ फिर्यादींचा निकाल व्हावयाचा होता. म्हणून एकुण फिर्यादींची संख्या १८,५५७ होती.पैकीं १३४१५ फिर्यादींचा निकाल लागला, बाकीच्या ५१४२ फिर्यादी शिलकींत आहेत. वर्षाच्या सुरवातीस कर्जफेडीकरतां संस्था गुंडाळावयास हव्यात अशा संस्था ४८१ होत्या. या वर्षांत १११ संस्था साफ बंद केल्या व ५७ संस्थांचा संपूर्ण लिलाव करुन देण्याघेण्याचा व्यवहार आटपून टाकला.वर्षाअखेर देण्याघेण्याचा फडशा पाडावयास हवा अशा संस्था ५३५ होत्या. या संस्थांची मालमिळकत एकंदर २२,७६,७८२ रु. किंमतीची होती. व देणें २०,२४,५६४ रु.होतें. देणें निवारुन शिल्लक रकमेची विल्हेवाट लाविली ती येणें प्रमाणें:–शिक्षणाकरितां २६६३ रु., सार्वजनिक उपयोगाकरितां २१९१ रु.,धर्मदाय खातें ६९३ रु. इन्स्टिटयूटला देणगी १७७ रु., सुपरवाइझिंग यूनियन्सकरितां १९४४६ रु. डिस्ट्रिक्ट बोर्डसच्या हवालीं केले. एकूण. २५१७० रु.,डिस्ट्रिक्ट बोर्डस् कडे यावर्षीं वर उल्लेखिल्याप्रमाणें १९४४६ रु. दिले. गतवर्षीही असेच १९००० रु. दिले होते. हा फंड दिवसनुदिवस वाढतच आहे. त्याचा विनिमय त्या त्या जिल्ह्यांमध्यें सहकारी चळवळीचा प्रसार करण्याकडे होईल. को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टच्या कलम ५९ (२) संबंधीं कांहीं वादग्रस्त प्रश्न नुकताच निघाला आहे. त्या बाबतींत कायदेशीर मत मिळावें म्हणून सरकारकडे विचारणा केली आहे.

फौजदारी गुन्हेः––या वर्षांत २७ फिर्यादीं दाखल केल्या, यांत गुंतलेली रक्कम एकूण ३१२२८ रु. होती. २७ फिर्यादींपैकीं १० शाबित झाल्या, ४ निर्दोषी ठरल्या व एकामध्यें रक्कम वसूल केली व गुन्हेगारांस सोडून दिलें. १२ फिर्यादींचा निकाल अजून लागावयाचा आहे. इलाख्यांत शाळा–विद्यार्थ्यांच्या–संस्था एकंदर ६३५ आहेत.

मुंबई विभाग–९७, उत्तर विभाग ९४, मध्यविभाग ३४१, दक्षिण विभाग ३७, सिंध ६९. या

संस्थांचे बहुतेक सर्व सभासद मायनॉरस् म्हणजे कायदेशीर रीत्यां वयांत न आलेले असे असतात, म्हणून त्या संस्था को-ऑपरेटीव्ह सोसायटीज् अॅक्टान्वयें रजिस्टर केलेल्या नाहींत. तरी पण यामुळें होतकरू विद्यार्थ्यांच्या मनावर सहकारी चळवळीचा चांगला परिणाम होतो.

महाराष्ट्रांतील पतपेढया

सेंट्रल बँका

१ दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
२ दि बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
३ दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
४ दि ईस्ट खानदेश डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
५ दि नाशिक डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि
६ दि पूना डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि,
७ दि कर्नाटक डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
८ दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
९ दि विजापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह, बँक, लि.
१० दि कानडा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक.

अर्बन बँका

११ जी. आय. पी. रेल्वे एम्प्लॉयीज् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
१२ जॅक्सन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी. ऑफ दि बी. बी. अँड सी. आय. रेल्वे
१३ चांद्रसेनिय कायस्थ प्रभू को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
१४ कॉसमस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, पुणें.
१५ ईस्ट खानदेश गव्हर्नमेंट सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
१६ धारवाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक.
१७ सदर्न मराठा को-ऑपरेटिव्ह बँक,धारवाड
१८ बटेगिरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक.
१९ हुबळी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
२० बेळगांव पायोनियर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
२१ रड्डी कम्युनल को-ऑपरेटिव्ह बँक
२२ सिरसी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
२३ कुमठें अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
२४ कारवार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
२५ शामराव विठ्ठल को-ऑपरेटिव्ह बँक
२६ पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
२७ सालसेट कॅथॉलिक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
२८ भावसार क्षत्रिय को-ऑपरेटिव्ह कमिशन एजन्सी
२९ नामदेव को-ऑपरेटिव्ह एजन्सी, मुंबई
३० पोस्टल एम्प्लॉयीज् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, मुंबई
३१ धुळें अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
३२ प्रताप मिलहँडस् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
३३ कित्तूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
३४ खानापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
३५ सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी,
३६ होनावर हव्याक को-ऑपरेटिव्ह बँक
३७ गदग को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक
३८ कल्याण पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक
३९ अंकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
४० बॉम्बे सिटी पोलिस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
४१ नामदेव को-ऑपरेटिव्ह बँक, सातारा
४२ गोकाक को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक
४३ होनावर को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक
४४ ब्याडगी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक
४५ वेस्ट खानदेश गव्हर्मेंट सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
४६ नाशिक गव्हर्मेंट सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
४७ पीपल्स इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह बँक भिवंडी.
४८ माजगांव डॉक्स एम्प्लॉयीज् को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
४९ अहमदनगर रेव्हेन्यू अँड रजिस्ट्रेशन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
५० अहमदनगर व्हर्नाक्युलर टीचर्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी

५१ मिलिटरी अकौंटस् नं. १ को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, पुणें.
५२ पंढरपूर पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक
५३ अमळनेर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक
५४ भुसावळ पीपल्स को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक
५५ विजापूर डिस्ट्रिक्ट गव्हर्मेंट ऑफिशिअल्स को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
५६ मर्कंटाईल अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक
५७ नगर डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक
५८ मुंबई दक्षिणी ब्राह्मण को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी,
५९ बॉम्बे पोर्ट ट्रस्ट एम्प्लॉयीज् को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
६० गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस एम्प्लॉयीज् को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, लि.
६१ जैन विद्योत्तेजक सहकारी मंडळ
६२ देवरुखे ब्राह्मण को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
६३ लल्लुभाई शामळदास को–ऑपरेटिव्ह बँक मुंबई
६४ झोरॅस्ट्रियन को–ऑपरेटिव्ह बँक, मुंबई
६५ विजापूर श्रीसिद्धेश्वर को–ऑपरेटिव्ह बँक
६६ पूना मर्चंटस् को–ऑपरेटिव्ह बँक
६७ अहमदनगर पोस्टल डिव्हिजन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
६८ कऱ्हाड अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक
६९ धारवाड रेव्हेन्यू अँड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटल् को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.
७० ज्यूईश को– क्रेडिट सोसायटी, मुंबई
७१ धारवाड तालुका टीचर्स को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
७२ गोवा फ्रॉन्टियर सॉल्ट डिपार्टमेंट एम्प्लॉयीज् को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
७३ गुलेदगुड इंडस्ट्रिअल को–ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक
७४ इस्लामपूर पीपल्स को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी
७५ सारस्वत को–ऑपरेटिव्ह बँकिंग सोसायटी
७६ इंदापूर पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक
७७ पार्डी पिपल्स को–ऑपरेटिव्ह बँक

शेतकीविषयक सोसायट्या

(वर्ग १ ला, क्रेडिट अन्‌लिमिटेड)

		सोसायटीची संख्या
१	ठाणें	१३२
२	अहमदनगर	१३१
३	पूर्व खानदेश	५३८
४	पश्चिम खानदेश	२८९
५	नाशिक	२५६
६	पुणें	१७९
७	सातारा	२७१
८	सोलापूर	१५६
९	बेळगांव	२०१
१०	विजापूर	१७३
११	धारवाड	४६७
१२	कारवार	९२
१३	कुलाबा	५९
१४	रत्नागिरी	४३
		२९८७

(वर्ग १ ला क्रेडिट लिमिटेड)

१	पूर्व खानदेश	१
२	सोलापूर	२
३	धारवाड	१
४	कारवार	१
		५

(वर्ग २ रा क्रयविक्रय अन्‌लिमिटेड.)

१	इस्ट खानदेश	२
२	नाशिक	१
३	पुणें	१
४	धारवाड	१
		५

(वर्ग २ रा लिमिटेड क्रयविक्रय)

१	ठाणें	४
२	अहमदनगर	३
३	पूर्व खानदेश	१
४	पश्चिम खानदेश	१
५	नाशिक	४
६	पुणें	१
७	सातारा	६
८	सोलापूर	३
९	विजापूर	१
१०	धारवाड	१०
११	बेळगांव	१
१२	कारवार	१
		३६

(वर्ग ३ रा, निपज, अन्‌लिमिटेड)

१	ठाणें	२
२	धारवाड	११
३	बेळगांव	२
४	कारवार	१
		१६

(वर्ग ४ था, निपज व विकणें अन्‌लिमिटेड)

१	पश्चिम खानदेश	१
२	रत्नागिरी	१
	एकूण	२

(वर्ग ४ था, निपज व विकणें, लिमिटेड)

१	पूर्व खानदेश	२
२	पश्चिम खानदेश	१
३	पुणें	२
४	सोलापूर	३
५	सातारा	२
६	बेळगांव	६
७	रत्नागिरी	१
८	कुलाबा	२
९	धारवाड	१०
१०	विजापूर	३
११	कारवार	३
		१५

(वर्ग ५ वा, इतर तऱ्हा, अन्‌लिमिटेड)

१	पश्चिम खानदेश	१
२	ठाणें	१
३	धारवाड	१०
४	कारवार	४
		१६

(वर्ग ५ वा, इतर तऱ्हा लिमिटेड)

१	ठाणें	५
२	पूर्व खानदेश	१०
३	पश्चिम खानदेश	७
४	नाशिक	५
५	पुणें	४
६	सोलापूर	२
७	सातारा	१०
८	बेळगांव	६
९	रत्नागिरी	५
१०	कुलाबा	१
११	धारवाड	८
१२	विजापूर	३
१३	कारवार	२
		६८

बिगर शेतकी सोसायटया

(वर्ग १ ला, क्रेडिट अन्‌लिमिटेड)

		सोसायटयांची संख्या
१	मुंबई	१
२	कुलाबा	१
३	रत्नागिरी	२
४	अहमदनगर	२
५	पुणें	२
६	सातारा	३
७	सोलापूर	३
८	कारवार	४
		१८

(वर्ग १ ला, क्रेडिट लिमिटेड)

१	मुंबई	१८०
२	ठाणें	२९
३	कुलाबा	७
४	रत्नागिरी	१४
५	अहमदगनर	१४
६	पूर्व खानदेश	१७
७	पश्चिम खानदेश	१५
८	नाशिक	१५
९	पुणें	३३
१०	सातारा	१७
११	सोलापूर	१८
१२	विजापूर	२८
१३	धारवाड	४९
१४	बेळगांव	२८
१५	कारवार	१५
		४७९

(वर्ग २ रा, क्रयविक्रय लिमिटेड)

१	मुंबई	१३
२	ठाणें	५
३	रत्नागिरी	१
४	पूर्व खानदेश	१
५	नाशिक	१
६	सोलापूर	१
७	धारवाड	३
८	कारवार	१
		२६

(वर्ग ३ रा, निपज, विक्रय, अन्‌लिमिटेड)

१	रत्नागिरी	५
२	अहमदनगर	२
३	पुणें	१
४	सातारा	२
५	सोलापूर	४
६	विजापूर	१
७	पूर्व खानदेश	५
८	पश्चिम खानदेश	३
९	नाशिक	४
१०	धारवाड	९
११	बेळगांव	५
		४१

(वर्ग ३ रा, निपज, विक्रय, लिमिटेड)

१	मुंबई	१
२	अहमदनगर	१
३	पुणें	३
४	सातारा	१
५	सोलापूर	१
६	धारवाड	५
७	बेळगांव	१
८	कारवार	४
		१७

(वर्ग ४ था, इन्शुअरन्स लिमिटेड)

१	मुंबई	१
		१

(वर्ग ५ वा, इतर तऱ्हा लिमिटेड)

१	मुंबई	१६
२	ठाणें	१५
३	रत्नागिरी	१
४	अहमदनगर	१
५	पूर्व खानदेश	२
६	पश्चिम खानदेश	२
७	नाशिक	३
८	पुणें	४
९	सातारा	१
१०	सोलापूर	२
११	धारवाड	९
		५६

यूनियन्स (१९३०–३१)

		युनियनची संख्या
१	ठाणें	३
२	पूर्व खानदेश	६
३	पश्चिम खानदेश	२
४	नाशिक	७
५	अहमदनगर	४
६	पुणें	५
७	सातारा	९
८	सोलापूर	६
९	विजापूर	४
१०	धारवाड	२३
११	बेळगांव	७
१२	कारवार	१
१३	कुलाबा	१
		७८

को-ऑपरेटिव्ह सोसायट्या, त्यांमधील सभासदांची संख्या, व त्यांची सांपत्तिक स्थिति दाखविणारा तक्ता

प्रांत व सोसायटीचा प्रकार		वर्षा अखेरची सोसायट्यांची संख्या	सभासदांची संख्या	Working Capital (खेळतें भांडवल)						सभासदांना व इतर सोसायट्यांना दिलेलें कर्ज
				खाजगी लोकांकडून, इतर सोसायट्यांतून व बँकेकडून काढलेलें कर्ज	शेअर कॅपिटल	सभासदांनीं ठेवलेली अनामत रक्कम	संस्थानी मदत	रिझर्व	एकूण	
मद्रास	मध्यवर्ती	४८२	२८९३१	७१४०३३६८	६२५३९२१			४१४१५८७	८१८१८८७६	४२७६९७४१
,,	शेतकीसंबंधीं	१३१०६	७१७६१५	५२१७२४९०	८४७५६३२	१०१६६५९	१२८०९५८	४७६४५२६	६७७१०२६५	२६०८००६४
,,	इतर	१६४९	२५९६९३	११६६७३३४	८५४८२४२	६७८५४५६	२३२७४३७	२१२०३२७	३१४४८७९६	२१५४९३७८
मुंबई	मध्यवर्ती	१२१	१५४३२	३७८६८३६२	४३७४३८१		६६६३६	११३२६८६	४३४४२०६५	७८०४४३३४
,,	शेतकीसंबंधीं	४७८२	३४३९७०	२४४०९३७८	२७७६३१०	७७३६७४६	१३९५४९	५९४४४८६	४१००६४६९	२५०३३८८४
,,	इतर	८३१	२१९११६	८२०२९९८	९३८१९६१	१९६५४९७६	४१४७४१४	२३०२९७९	४३६९००५८	३४०६४६८९
बंगाल	मध्यवर्ती	१२०	२४१७१	५४०९३३८१	६७४५६२९			३१३६०९२	६३९७५१०२	४५३८२०३६
,,	शेतकीसंबंधीं	२०४३६	५१२४२५	३८८३२४६२	५८५५८२६	१९७०९०२	४४६६४	८५४३९९३	५५२४७८४७	१७७७५२८८
,,	इतर	१९१३	१९५३२४	१३५५६६३६	६३३८१४५	५९४५१६२	२८४४२	१८१९३७०	२७६८७७५५	२३१४७४५१
संयुक्त प्रांत	मध्यवर्ती	७२	१०७६७	५७६४९२८	२३०३४६८		१४७००	१२२१६७४	९३०४७७०	३२७७०४९
,,	शेतकीसंबंधीं	५१८४	१२१८७१	५२७७७३५	२३२०९८१	१२०३६१		२२९४४०२	१००१३४७९	३९८२०९६
,,	इतर	२८३	२६७३०	३९६८६३	९१२०११	७५४२१३		२२५७४८	२२८८८३५	२०७३१२५
पंजाब	मध्यवर्ती	११९	४८४१६	७७८५१६६४	५४१७२८०		३३४८४४०	३२९३३१६	८९९१०७००	५२१२०७६७
,,	शेतकी संबंधीं	१७२२२	५४०३३८	५१२०८१९१	९९८५६९६	३३३७३१४	५०११७	१६४४७६२७	८१०२८९४५	२९७९६१०३
,,	इतर	२९५२	१०४६०३	५७८०२५१	२७३७३३०	२२७५६१०	४०३	३७४५४६०	१४५३९०५४	८६०३८२६
ब्रह्मदेश	मध्यवर्ती	४६७	४९३३	३२८०७२०	१२०४१९०			६३८४८२	५१२३३९२	३३२३१०५
,,	शेतकीसंबंधीं	२५६७	५८८२६	५९७३०७३	२९१०८२२	८२५३७४	४१२३५२	५९२८२५९	१६०४९८८०	५९५०८०३
,,	इतर	१८८	२९२११	७५२१५७	४६७३३६९	४०७५४६	४६६८८	६०३१३७	६४८२८९७	५८६६४९५

प्रांत व सोसायटीचा प्रकार	वर्षा अखेरची सोसायटयांची संख्या	सभासदांची संख्या	Working Capital (खेळतें भांडवल) खाजगी लोकांकडून, इतर सोसायटयांतून व बँकेकडून काढलेलें कर्ज	शेअर कॅपिटल	सभासदांनीं ठेवलेली अनामत रक्कम	संस्थानी मदत	रिझर्व	एकूण	सभासदांना व इतर सोसायटयांना दिलेलें कर्ज
बहार ओरिसा मध्यवर्ती	२६४	२२८८४	२५६३११८७	२९०९७७८		३४४४०	१६५३९१९	३०२२९३२४	६८८१५३२
,, शेतकी संबंधी	८७१५	२३६३९३	१९१११६१६	१५०६६२६	५९७६९०	२६४३८	३०५१७८४	२४२९४१५४	४४२०१५४
,, इतर	३३८	२४८३५	१३७९४५३	९९३३१७	९३८४४९	९५२५	३५९९५०	३६८६६९४	२२६९७६६
मध्यप्रांत–वऱ्हाड मध्यवर्ती	५५	६०२१६	२८८५३६२३	२५९०२८२		·८७९	३२५८३४७	३४७०३२३१	११८५४३९५
,, शेतकी संबंधी	३९८७	६१५२५	१३८१४९८०	२१७३२३	२८८२७६	२९९६	३०५१७५९	१७३७५३३४	६२११२८७
,, इतर	९५	१८३८७	६०८२९८	६५६२४१	३०८५६४		९७७५७	१६७०८६०	१७६०६०५
आसाम मध्यवर्ती	१६	१६४६	१८६४८५२	२६११४७		१७५००	१००४९२	२२४३९११	४९५८५१
,, शेतकीसंबंधीं	१२९५	५२८९६	१९०९४१९	१५६२१६	२४६४५९	१४४९७	६०४२३१	२९३०८२२	७०६४४९
,, इतर	७९	१३२७१	९२५४६०	३५७७५३	५२५४८९	७०५००	१४९५३३	२०२८७३५	७३१३४५
वायव्य सरहद्दप्रांत मध्यवर्ती	१	१५०	३२१३४०	१७८५०			२७०४	३४१८९४	२०६५२८
,, शेतकीसंबंधीं	१५२	४१२२	२८१५६७	४३६६३	१६५३		१३१५५	३४००३८	२६३३७२
,, इतर	१३	१५५३	५२६८६	१००३०१	४७८४८		७६७४	२०८५०९	२६३१६६
अजमीर–मेरवाडा मध्यवर्ती	९	१७२०	१५५६८८०	२१५१५०			२७३४८९	२०४५५१९	१२६३२३७
,, शेतकीसंबंधीं	५३१	११४९१	८८५०६८	२६९८९४	२१०१२		५१३९४१	१६८९९१५	३१३५६७
,, इतर	९७	७१११	२७३३३८	१८०३९४	२६०१०९		१३०७३२	८४४५७३	४५६१४६
कूर्ग मध्यवर्ती	१४	४८३	२१६४७२	२३१६०		४००	६०९०	२४६१२२	१२७४५०
,, शेतकीसंबंधीं	२२९	११५५८	२३८०९४	१६५११७	१९३८०६	७२०५	१११०६९	६२०८५३	२४४०४२
,, इतर	२१	२१९२	३२७२०	७२५९९	८४००		१६५६४	१३०२८३	१३७४४१
दिल्ली मध्यप्रांत	१	४९२	१२२०९२३	८४४००			६५४९३	१३७०८१६	२४८७७४
,, शेतकीसंबंधीं	२२०	५३८३	६२०९६९	९६७१९	२५३२		११५५३१	८३५७५१	९१६११

प्रांत व सोसायटीचा प्रकार	वर्षा अखेरची सोसायटयांची संख्या	सभासदांची संख्या	Working Capital (खेळतें भांडवल)						सभासदांना व इतर सोसायटयांना दिलेलें कर्ज
			खाजगी लोकांकडून इतर सोसायटयांतून व बँकेकडून काढलेलें कर्ज	झेअर कॅपिटल	सभासदांनीं ठेवलेली अनामत रक्कम	संस्थानी मदत	रिझर्व	एकूण	
इतर	५०	१८६४	४८७५६	४९३६२	१०७७२३		३६८१	२०९५२२	१९८१०२
हैद्राबाद व अॅडमिनिस्टर्ड एरिआ फक्त 'इतर'	१७	५४०३	२७५८	१५७५२५६	२७७९८८	३०००	२०७९२	४६२०६३	३६९९२७
एकूण – मध्यवर्ती	१७४१	२२०२४१	३०९९२७७००	३२४२०६३६		३४८३०९५	१८९२४३७१	३६४७५५८०२	२४५९९४७९९
— शेतकीसंबंधीं	७८४२६	२६७४४१३	२१४७३५०४२	३४७८०८२५	१६१८४३४६	१९७८७७६	५१४६४७६३	३१९१४३७५२	१२०८६८७२०
— इतर	८५२६	९०९२९३	४३६७९७०८	३५१६४२८०	३८२९७५३३	६६३३४०९	११६०३७०४	१३५३७८६३४	१०१४९१४६२
एकूण १९२९–३०	८८६९३	३८०३९४७	५६८३४२४५०	१०२३६५७४१	५४४८१८७९	१२०९५२८०	८११९२८३८	८१९२७८१८८	४६८३५४९८१
संस्थानें—									
हैद्राबाद–मध्यवर्ति	३१	४३४८	६८२६५१४	१३२८४९८		२१८८०७	३७४७६८	८७४८५८७	२४३०९७२
,, –शेतकीसंबंधीं	१७५०	३७४९७	३९८५९९७	१५८९९४९	५५०९५०	१६६४८	१४६८२४६	७६११७९०	१०३०४४४
,, –इतर	३५५	१५०६१	५८२०५४	१३५५५२५	१६८९८०	८७७३२	२१६१३७	२४१०४२८	१६०३८३१
म्हैसूर –मध्यवर्ति	१६	३२३५	३७५२३२८	५७१३५०			३७४१२७	४६९७८०५	१२७२६१६
,, –शेतकीसंबंधीं	१६८६	६५९१५	२१५१००५	१२६१४१४	२४००५५	१६८०६५	७७०३९०	४५९०९२१	२१८३७७९
,, –इतर	४००	५७३४१	१४३३१२५	२८८०७०४	२१२५५१६	९८५२०	१०९८१६७	७६३६०३२	६९३१७१४
बडोदें –मध्यवर्ति	८	१३२६	१५०७६७४	२५७७७७		२०२३३७	११०७७७	२०७८५६५	४४९८८०
,, शेतकीसंबंधीं	८७४	२७४८९	२३०६७३१	६८०५६	४५८४१६	१२६५९४	७०९२०७	३६६९००४	९८९६७७
,, इतर	१६३	१०३९५	३९९५११	२०५१३०	३६८७१६	३५२५३१	६७२२३	१३९३१११	६५६००५
भोपाळ मध्यवर्ति	३५	२७२०	१४३०९६	७२३२२		३७४७२०	३०५६३५	८९५७७३	२०४५२३
,, शेतकीसंबंधीं	१११४	१९८३७	७९१२३३	५४९२८	७५७	३९६९१	४०९७५२	१२९६३६१	२१०३६४
,, इतर	२६	४६७	१०६१६	१३७३	१८	४९७	५८२१	१८३२५	३८५०

प्रांत व सोसायटीचे प्रकार	वर्षा अखेरची सोयायटचांची संख्या	सभासदांची संख्या	Working Capital (खेळतें भांडवल) खाजगी लीकांकडून, इतर सोसायटचांतून व बँकेकडून काढलेलें कर्ज	शेअर कॅपिटल	सभासदांनीं ठेवलेली अनामत रक्कम	संस्थानी मदत	रिझर्व	एकूण	सभासदांना व इतर सोसायटचांना दिलेलें कर्ज
ग्वाल्हेर मध्यवर्ति	आ.मि.न	७०८७	१६४०७०१	७११००९		३५६५१०५	५७४११०	६४९०९२५	१५७९४५१
,, शेतकीसंबंधीं	३८२०	६७८८९	५१०	७१४७८८	१३७४६६		११४९३३८	२००२१०२	१५७८५१२
,, इतर	४४	८३५		२२९३७	३९६८		३२१५४	५९०५९	६४२४५
इंदूर मध्यवर्ति	५	१७०५	१५३९६२३	१७४३७५		२०८८३१	२२७०२५	२१४९८५४	३८४९८०
,, शेतकीसंबंधीं	३८७	७४८७	१२३३८६९		६५०९६	७२९	९१०४५६	२२१०१५०	४२११९७
,, इतर	४०	३६३७	७८९५१	१३०७७१	३९६३११		५२५२०	६२८५५३	३७९९४०
काश्मीर मध्यवर्ति	१४	३२४६	२३५३१२४	४१३०४८		४८४६९०	१९१२४८	३४४२११०	१२५४४४८
,, शेतकीसंबंधीं	२४३८	४५६०२	२१३३४०५	१७१५५१७	१०४२५		१०८३८७७	४९४३२२४	९७५८६०
,, इतर	२९४	५८२८	३७६५९२	१०९५३०	८३६६		६०११६	५५४६०४	३२७२०६
त्रावणकोर–मध्यवर्ति	२९	३५०१	१०७७०९४	८७२९०		११६९६९	५२४६०	१३३३८१३	५०६२३९
,, –शेतकीसंबंधीं	१४२८	१६३३५३	४९३४१५	२०३०८४५	२६३५८९		३३१३३९	३१११९६८	१९३४०७८
,, –इतर	३२७	४८३६७	५८५७६४	९६४३३६	२६३८०६		१००८१४	१९२११२०	१४४९२१९
कोचीन –मध्यवर्ति	१	११५	५०४७३८	४४७४७		२५०००	५५१६३	६२९६४८	१७३१९७
,, –शेतकीसंबंधीं	१२८	११७६१	३५२२८२	५०४३५	१८१२२०		१४१६३२	७२५५६९	५२५०४६
,, –इतर	८१	९४३७	२८५२६७	१७९१५१	१०८१११	९२५	७०१८४	६४३६३८	५८५४९४
एकूण –मध्यवर्ति	१३९	२७२८३	१९३४४८९२	३६६०४१६		५१९६४५९	२२६५३१३	३०४६७०८०	८२५६३०६
,, –शेतकीसंबंधीं	१३६२५	४४६८३०	१३४४८४४७	७४८५९३२	१९०७९७४	३५१७२७	६९७४२१७	३०१६८२९७	९८४८९५७
,, –इतर	१७३०	१५१३६८	३७५१८८०	५८४९४५७	३४१३७९२	५४०२०५	१७१०३३६	१५२६५६७०	१२००१५०४
एकूण १९२९–३०	१५४९४	६२५४८१	३६५४५२१९	१६९९५८०५	५३२१७६६	६०८८३९१	१०९४९८६६	७५९०१०४७	३०१०६७६७

अबकारी खातें

अबकारी म्हणजे मादक द्रव्यासंबंधीचें. ब्रिटिश हिंदुस्थानांत सरकारचीं उत्पन्नाचीं जीं प्रमुख खातीं आहेत त्यांत अबकारी खात्याचा नंबर बराच वर लागतो. व प्रांतिक सरकारचे उत्पनाचे बाबतींत तर शेतसाऱ्याचे खालोखाल अबकारीचेंच उत्पन्न येतें. या खात्यांत (१) दारू गाळणें व दारू–विक्री (२) गांजा, भांग, चरस, माजूम वगैरे पदार्थांची विक्री, व (३) अफू तयार करणें व विकणें. या तीन बाबींचा प्रामुख्यानें समावेश होतो. प्रजेच्या मादक द्रव्यें घेण्याच्या व्यसनांकडे सरकारनें उत्पन्नाच्या दृष्टीनें बघण्याचा प्रघात प्रथम ब्रिटिश अमलापासूनच हिंदुस्थानांत सुरू झाला. महाभारत कालीं दारूच्या उपयोगावर सरकारची सक्त नजर असे. व दारूचीं दुकानें घालण्याचीहि बंदी असे. कौटिलीय अर्थशास्त्रावरून असें दिसतें कीं, मौर्य काळीं मादक पदार्थांचे विक्रीवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठीं सरकार अधिकारी नेमीत असे. मोंगल कालासंबंधीं आपणास निश्चित फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु औरंगजेबानें दारूचा खप कमी होण्यासाठीं पुष्कळ खटपट केल्याचें नमूद आहे. मराठे शाहींत दारूपासून सरकारला उत्पन्न फारच थोडें असून तें सालीना दहा हजार रुपयांवर कधींच गेलें नाहीं. दारूबाजास तेव्हां कडक शिक्षा ठेवली असून हें व्यसन नाहींसें करण्याची सरकारची खटपट असे. त्या काळीं दारू मुख्यतः लागे ती फिरंगी, किरिस्ताव, गोरे वगैरे सरकारी नोकरींत असत त्यांसाठीं ; व ती अल्प प्रमाणांत तयार करण्यासाठीं भट्टी लावण्याची सरकार परवानगी देत असे. १८०० सालीं बलसाडचा पार्शी दोराबजी याला मोहाचीं फुलें तयार करण्याचा मक्ता अवघा ५० रुपयांस देण्यांत आला. पेशवाईचे अखेरीस एल्फिन्स्टन याला महाराष्ट्रांत या व्यसनाचा पूर्ण अभाव दिसून आला. व म्हणूनच त्यानें मुंबई इलाख्यांतील अबकारी खातें अजिबात बंद करावें अशी सूचना केली होती.

प्रत्येक दुकानच्या विक्रीच्या मानानें सालीना कांहीं रक्कम आगाऊ घेऊन परदेशी दारू विक्रीचे परवाने देण्यांत येतात. देशी दारू विक्रीसाठीं मक्ते देण्याचे बाबतींत प्रमुख असे दोन मार्ग आहेत. (१) आऊट स्टिल सिस्टिम (ठिकठिकाणीं भट्टचा ठेवण्याची पद्धति.) या पद्धतीमध्यें दारू तयार करण्याचा व विकण्याचा हक्क लिलावानें देण्यांत येतो. (२) सेंट्रल डिस्टिलरी सिस्टीम (मध्यवर्ति भट्टीची पद्धति) या पद्धतीमध्यें दारू एका मध्यवर्ति ठिकाणीं तयार करण्यांत येऊन ती कर घेऊन बाहेर विक्रीस नेऊं देण्यांत येते. पूर्वीं 'आऊट स्टिल सिस्टिम' ही पुष्कळ ठिकाणीं प्रचारांत असे. परंतु अलीकडे तिचेऐवजीं 'सेंट्रल स्टिल सिस्टिम' ही बऱ्याच ठिकाणीं सुरूं करण्यांत आलेली आहे. १९०५–६ सालीं भरलेल्या अबकारी कमिटीनें कांहीं शिफारशी केल्या होत्या. त्यांपैकीं ताबडतोब अंमलांत आणलेली एक सुधारणा म्हणजे पूर्वींच्या पद्धतीऐवजीं मक्त्याची पद्धत सुरू करणें. या पद्धतीप्रमाणें निरनिराळ्या जिल्ह्यांसाठीं दारू गाळण्याचा हक्क मक्त्यानें दिला जातो. व विक्री करण्याचा हक्क दुसऱ्याच माणसास दिला जातो. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या दारूंत वेगवेगळ्या प्रकारच्या देशी दारूचाच भरणा अधिक असतो. मुंबई व मद्रास इलाख्यांत ताडाच्या किंवा माडाच्या रसापासून तयार होणाऱ्या दारूस ताडी किंवा माडी म्हणतात. ताड व माड या झाडांवर कर घेण्यांत येतो. व शिवाय तयार झालेल्या दारूवरहि कर घेतात. १९१४ सालचे महायुद्धापासून येथें ब्रांडी, व्हिस्की, रम, बीर वगैरे युरोपियन दारू तयार होऊं लागली आहे. तिचे कारखाने पंजाबांत व बडोदा येथें आहेत.

दारूवर कर घेण्याचे बाबतींत नुसतीच उत्पन्नाची दृष्टी ठेवणें हें लोकहिताचें दृष्टीनें अत्यंत अनिष्ट आहे. दारूबाजी हें एक भयंकर व्यसन आहे. व तें फैलावणें ही राष्ट्रीय आपत्ति आहे. हें ओळखून सरकारनें सर्व सुधारलेल्या युरोपियन राष्ट्रांप्रमाणें दारूचे धंद्यावर नियंत्रण ठेविलें पाहिजे. व दारूबाजास दारू घेणें परवडणार नाहीं असा जबर कर

(Prohibitive duty) ठेवला पाहिजे. परंतु सरकारनें पानस्वातंत्र्याचें नसतें स्तोम माजवून व दारूवर जबर कर ठेवल्यास लोक चोरून दारू गाळूं लागतील, अशी लंगडी सबब पुढें करून आपलें अबकारी खात्याचें उत्पन्न वाढविण्याचा सपाटा चालविला आहे. या खात्याचें उत्पन्न १८६१–६२ सालीं १॥। कोटी होतें. तें १९२४–२५ सालीं १९॥ कोटींवर आलें या एकाच गोष्टीवरून सरकारचें धोरण व्यक्त होईल. अबकारीचें उत्पन्न इतकें वाढवून व त्याबद्दलचें आपलें धोरण नक्की ठरवून १९२० सालचे सुधारणांपासून हें खातें सरकारनें उत्पन्नाचें खातें म्हणून दिवाणांच्या स्वाधीन केलें आहे. हेतु हा कीं, शिक्षणादि राष्ट्रसंवर्धक खातीं चालविण्यास व त्यांची वाढ करण्यास दिवाणांना हें उत्पन्न तर लागावेंच पण यांतही आणखी भर घालण्याची जरूरी भासावी.

दारूबाजीचें दुष्ट व्यसन हटवलेंच पाहिजे ही जाणीव जनतेस १८४९ सालापासूनच झालेली असून त्यासालीं पुण्यास 'मद्यप्राशन विनाशक' मंडळी स्थापन झाली. व सुसंघटित प्रयत्न सुरू झाले. परंतु त्याचा विशेष उपयोग न होतां हें व्यसन फैलावत राहिलें. त्यानंतर १९०७ सालीं पुण्यास मद्यपान निषेधक सभेची स्थापना होऊन पुन्हां जोराचा प्रयत्न झाल्यामुळें सरकारनें स्थानिक कमेटयांची स्थापना केली. पण या कमेटयांत बिनसरकारी अवघे दोनच सभासद असत. व कलेक्टर तिचा अध्यक्ष असे. कमिटीच्या सभाहि क्वचित्‌च भरत. व तिचे म्हणण्यास शिफारशीपेक्षां जास्त मान देण्यांत येत नसे. या कमेटया निरुपयोगी ठरल्यामुळें जनतेनें आपलें काम पुढें चालूं ठेवलें व यांतूनच १९०७–८ सालीं पुण्यास पिकेटिंगची अगर निरोधनाची चळवळ सुरू झाली. व ती राष्ट्रभर पसरली व तेव्हांपासून दारूबाजी हटवणें तर दूरच राहिलें परंतु जनतेची ही चळवळ हाणून पाडण्यांतच सरकार आपली सर्व शक्ति खर्च करूं लागलें. १९२१ सालचे असहकारितेपासून पिकेटिंगला पुन्हां जोर आला. व कौन्सिलें, म्युनिसिपालटया, लोकल बोर्डें यांतूनही दारू बंदीचे प्रश्नांवर विचार सुरू होऊन सरकार व जनता यांतील तो झगडा अद्याप सुरूच आहे. या जनतेच्या प्रयत्नांस संघटित स्वरूप येण्यासाठीं १९२६ सालीं दिल्ली येथें 'प्रोहिबिशन लीग ऑफ इंडिया' या नांवाची संस्था स्थापन झाली आहे. १९०७–८ सालीं जनतेनें सरकारास केलेल्या सूचनांत Local option ची म्हणजे स्थानिक संमतीची सूचना विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. या तत्त्वाप्रमाणें विशिष्ट शहरांत अगर गांवांत दुकानें कोठें व किती उघडावयाचीं हें केवळ त्या शहरांतील अगर गांवांतील लोकमतावरून ठरवावयाचें. या तत्त्वास युरोपियन राष्ट्रांतही मान्यता मिळाली आहे. पण येथील सरकारास लोकमत म्हणजे काय हेंच माहीत नसल्यामुळें ही सूचना धुडकावून लावली गेली. व अद्यापही गुत्ते कोठें व किती असावे हें जिल्हाधिकारीच ठरवितो.

मुंबई सरकारनें १९२१ मध्यें नेमलेल्या अबकारी कमेटीनें १९२२ मध्यें अशा शिफारशी केल्या कीं, (१) सार्वजनिक सुटचांचे दिवशीं गुत्ते बंद व्हावे. (२) सर्व देशी गुत्त्यांवर ६० अंडर प्रुफचीच दारू विकण्यांत यावी. (३) दारू गुत्त्याचे बाहेर नेण्याची बंदी असावी. (४) अबकारी कमेटीचे सभासदांस गुत्ते तपासण्याचा हक्क असावा. (५) दारू पिण्यास येणाऱ्या लोकांस उपदेश करण्यासाठीं सरकारनें उपदेशक ठेवावे. (६) गुत्ते उघडण्याची वेळ सकाळीं ६॥ आहे ती संध्याकाळीं ४ करण्यांत यावी. व बंद करण्याची वेळ पहिल्या सहामाहींत रात्रीं ७ व दुसऱ्या सहामाहींत ती ७॥ करण्यांत यावी. या शिफारशीस मूर्त स्वरूप येण्यासाठीं श्री. सप्तर्षी यांनीं ठराव मांडला व तो उपसूचनेसह पास झाला कीं, दरसाल शेंकडा ५ प्रमाणें कमी करून वीस वर्षांचे अवधींत पूर्ण दारूबंदी अंमलांत आणावी. परंतु या ठरावाचीसुद्धां अमलबजावणी होत नसून त्यावद्दल ना. जाधव हे अबकारीचे दिवाण असतां त्यांचा निषेध करण्याचा ठरावही झाला होता. (१९२९)

मुंबई सरकारचे अबकारी खात्याचें उत्पन्नः—

सन	रु. हजार
१९२१–२२	३४२६९
१९२४–२५	४४२९८
१९२९–३०	४०७८९
१९३०–३१	३०४३५
१९३१–३२	३१४७६
१९३२–३२	अंदाज ३३५७९

गांजा भांग व चरसः— या अमली पदार्थांचा हिंदुस्थानांत बराच खप आहे. या संबंधीं सरकारी निर्बंध पुढीलप्रमाणें आहेत. (१) या झाडांची लागवड सरकारी देखरेखीखालीं होते.

(२) किती लागवड करावयाची हें ठरविण्याचा हक्क सरकारचा आहे. (३) माल तयार झाल्यावर सरकारी गोदामांतच सांठविला पाहिजे. (४) मालाचे वजनाप्रमाणें जकात; (५) फुटकळ विक्रीसाठीं परवाने देण्याची जरूरी (६) खाजगी माणसास स्वतःचे घरांत हे पदार्थ किती ठेवतां येतात याची मर्यादा.

(३) अफू:–बंगाल, अयोध्या, राजपुताना, पंजाब व मध्यप्रांत या भागांत पिकते. पैकीं बंगाली अफूची लागवड खुद्द ब्रिटिश सरकारचेच ताब्यांत आहे. सामान्यत: दर एकरीं १०–१२ शेर अफू पिकते. व तिची किंमत सुमारें १०० रुपये होते. एतद्देशीय संस्थानेंहीं अफूचे लागवडीचे बाबतींत ब्रिटिश सरकारप्रमाणेंच नियंत्रण चालतात. व आपल्या संस्थानांतून बाहेर जाणाऱ्या अफूवर जकात घेतात. व त्या अफूवर हिंदुस्थान सरकारहि जकात घेतें. अफूवरील करापासून होणाऱ्या कराचे दोन भाग करतां येतील. (१) हिंदुस्थानांत खपते तिच्यावरील कर (२) परदेशांत अफू जाते तिच्यावरील. हिंदी लोकांना चिनी लोकांप्रमाणें अफू ओढण्याचें (Smoking) फारसें व्यसन नाहीं. येथील अफूचे व्यसनी लोक अफूच्या लहान लहान गोळ्या करून खातात. व कांहीं ठिकाणीं समारंभप्रसंगीं ती पाण्यांत घालून पितात. याप्रमाणें अफू घेणें हें शरिरास अफू ओढण्यापेक्षां फार कमी हानिकारक आहे. हिंदुस्थानांत अफूच्या खपासंबंधीं अशी पद्धत आहे कीं, प्रथम सरकारी गुदामांतून मक्तेदारांना अफू विकण्यांत येते. व किरकोळ विक्रीसाठीं दुकानांचे वार्षिक जाहीर लिलांव होतात. व त्यासाठीं दुकानदारास मक्ता घ्यावा लागतो. कांहीं खाजगी क्लबमधून वगैरे अफू ओढण्याचा प्रघात असल्यास त्यास कायद्यानें बंदी करण्याचा सरकारचा विचार चालू आहे. परदेशी जाणाऱ्या अफूपैकीं बहुतेक भाग चीन देशीं जात असे. चीनमध्येंहि सुमारें वीस ते तीस हजार पेटचा (एक पेटी ६० शेरांची) अफू तयार होते. त्या देशांत अफू ओढण्याचें अत्यंत व्यसन पसरलेलें असल्यामुळें हिंदुस्थानांतील अफू कित्येक शतकांपासून चीनमध्यें जात असे. मोंगल राजांनीं बिहारमधील अफूच्या लागवडीचा व विकण्याचा मक्ता आपल्या ताब्यांतच ठेवलेला होता. हा मक्ता मोंगल राजांपासून प्लासीच्या लढाईंत (१७५७) ब्रिटिशांनीं आपल्याकडे घेतला. पण हळूं हळूं चिनी राष्ट्रास या व्यसनाचे दुष्परिणाम जाणवूं लागल्यामुळें चीन सरकारनें १८२९ सालीं अफूची स्वदेशांत बंदी केली. त्या बंदीमुळें गोऱ्या व्यापाऱ्यांचें नुकसान होऊं लागल्यानें चीन व इंग्लंड यांच्या दरम्यान युद्ध झालें. व १८५८ च्या तहानें इंग्लंडनें चीनला अफूचा व्यापार पूर्ववत् चालू ठेवण्यास भाग पाडलें. १८८० मध्यें हिंदुस्थान सरकारच्या एकंदर उत्पन्नांपैकीं १४ टक्के अफूचें उत्पन्न होतें. अलीकडे चीननें आपल्या देशांतील अफूचें व्यसन कमी होण्यासाठीं पुन्हां पुष्कळ प्रयत्न केले. व त्यांत अमेरिकेनें लक्ष घातल्यामुळें अफूचा व्यापार कमी होण्यासाठीं पुष्कळशा आंतरराष्ट्रीय परिषदा भरल्या. याच सुमारास इंग्लंडमध्येंही अफूच्या व्यापाराविरुद्ध लोकमत तयार होऊन १९०७ सालीं हिंदुस्थान सरकारनें चीनमध्यें होणारी अफूची निर्गत कमी करण्याचें ठरविलें. त्यासाठीं १९०८ मध्यें करार करून ६७००० पेटयांपैकीं दरसाल ५१०० पेटया कमी पाठविण्याचें ठरलें. लोकमताकडे लक्ष देऊन हिंदी सरकारनें पुन्हां १९११ सालीं करार केला व चिनी सरकारनें स्वदेशांतील अफूची वाढ बंद केल्यास १९१७ सालीं हिंदुस्थान सरकारनें चीनशीं असलेला अफूचा सर्व व्यापार बंद करावा असें ठरलें. परंतु पुढें १९२३ सालापासून चीनला अफू पाठविणें बंद झालें. त्यानंतर १९२६ सालीं ठराव करून हिंदुस्थान सरकारनें असें ठरविलें कीं, पूर्वेकडील जपान, सयाम वगैरे देशांस जाणारी अफूसुद्धां दरसाल १० टक्के प्रमाणें कमी करून १९३५ सालीं तो व्यापार अजिबात बंद करण्यांत यावा. त्याच सालापासून कलकत्त्यास होत असलेल्या अफूच्या लिलावांची पद्धत बंद करून आतां हिंदुस्थान सरकारच स्वतः परदेशास अफूची विक्री करतें. हिंदुस्थान सरकारकडून याप्रमाणें अफू विकत घेण्यापूर्वी प्रत्येक देशास ('लीग ऑफ नेशन्सनें') ठरवल्याप्रमाणें अफूची आयात आपल्या देशांत होऊं देण्यास आपली संमति असल्याबद्दल एक सर्टिफिकेट दाखल करावें लागतें.

हिंदुस्थान सरकारचें अफूचें उत्पन्न:—

१९२१–२२		१२७२०
१९२४–२५		१४४१९
१९२८–२९		२७१६४
१९२९–३०		२५५२८
१९३०–३१		१७८९१
१९३१–३२	अंदाज	११७०७
१९३२–३३	,,	६१०१

आरोग्य खातें

मुंबई इलाख्याचा आरोग्य खात्याचा ६७ वा वार्षिक अहवाल:—(स. १९३० इ.) (टीप:—जन्ममृत्यू प्रमाण १९२१ चे खानेसुमारी वरून ठरविलें आहे.)

इलाख्याची एकूण लोकसंख्या १९,१९५,०८२ व क्षेत्रफळ १२२,५७८ चौ. मैल आहे. १९२१ सालीं सिंधसुद्धां हीच लोकसंख्या १९,१६५,६१४ इतकी होती. (सरासरी १ चौ. मैल : १२६ लो. सं.) इलाख्याचे नोंदणीचे दृष्टीनें ५ भाग पाडले आहेत. व त्यांमध्यें २८ जिल्हे (मुंबई शहरसुद्धां),२५३ तालुके व महाल,१०६ Town Circles, व Cantonments (परगणे, लष्कर)ही आहेत. एडन व बडोदाCantonments हींसुद्धां त्यांसच जोडलीं आहेत.

स्थानिक–संस्था व अधिकारी वर्ग:—

(अ) १५५ स्थानिक स्व. संस्था (म्युनिसि.) २७ जिल्हा लोकल बोर्डें, २२२ तालुका लोकल बोर्डें , ५७९ आरोग्यमंडळें व ग्राम पंचायती, २७ नोंदीव भाग (Notified areas)(आ) १६ म्यु. मेडिकल ऑफिसर्स ऑफ हेल्थ ८८ म्युनिसिपल सॅनिटरी इन्स्पेक्टर्स; ३ डिस्ट्रिक्ट मेडिकल ऑफिसर्स ऑफ हेल्थ.

याप्रमाणें एकूण १०७ लोक १२२,५७८ चौ. मैलांचें आरोग्य पहातात. (म्हणजे ११४५ चौ. मैलास १ मनुष्य) एकूण अधिकारी वर्ग तुटपुंजाच आहे.

जन्मः– १९३०–७१६,९५२ जन्मनोंद. १९२९–७३३,५२० जन्मनोंद. जन्म सरासरी(दर हजारीं):–१९३०–३७·४१, १९२९–३८·२७. १९२८–३८·१७ १९२१ व १९३१ सालामधील लोकसंख्येवरून पहातां, ही सरासरी १९३० सालीं वाढावयास पाहिजे होती. पण उलटपक्षीं ती कमीच झालेली आढळते, याचीं कारणें. मध्यभाग:–प्लेग व कॉलरा. गुजराथ:– कायदेभंग, सिंध:–पूर व आर्थिक परिस्थिति. सातारा जिल्हा–प्लेग व कॉलरा; नगर जिल्हा–कॉलरा; रत्नागिरी जिल्हा–रेल्वे संप, कायदेभंग, व्यापारमंदी व मुंबईच्या कांहीं गिरण्या बंद झाल्या. एकूण कायदेभंगाचे चळवळीचा जन्मनोंदणीवर बराच परिणाम झालेला आहे. सिंधमधील नोंदणी फारच सदोष आहे. पण ती थोडी थोडी सुधारत आहे.

मृत्यू:–१९३०-५६६,००३,१९२९-५८५,०४६ सरासरी ४·६ एक चौ. मैलास. या इलाख्याचे बाल–मृत्यूचें प्रमाण १८७·१४ आहे. म्हणजे इतर इलाख्याहून जास्त नाहीं.यंदा देवीचे साथीनें बरेच मृत्यू झाले. देवी फैलावणार असें भाकीत करून व देवी टोंचूनही विशेष प्रतिबंध झाला नाहीं. दक्षिण भागाशिवाय प्लेगचा त्रास विशेष झाला नाहीं. कॉलऱ्याचें प्रमाण वाढतें आहे. मध्यभागास जास्त त्रास झाला. पंचवार्षिक सरासरीपेक्षां तापाचें प्रमाण जास्तच आहे.

मागील वर्षाचे जन्म व सरासरी दर हजारीं

वर्ष	जननसंख्या	जननाचें प्रमाण
१९०१–१९१०	६१७७३६	३३·४२
१९११	७०५०९०	३६·००
१९१२	६८४८९०	३४·९७
१९१३	६८४८०३	३४·९६
१९१४	७३३०७६	३७·४३
१९१५	७२६७८०	३७·१०
१९१६	७०४६७२	३५·९८
१९१७	६९९८२३	३५·७३
१९१८	६१९२२४	३१·६१
१९१९	५४६४६०	२७·९०
१९२०	५९३१७५	३०·२८
१९२१	६२४६४०	३२·५९
१९२२	६२०७७०	३२·३९
१९२३	६८१९१०	३५·५८
१९२४	६६२३२१	३५·६०
१९२५	६६४३८४	३४·६६
१९२६	७१०१३५	३७·०५
१९२७	७०६२८५	३६·८५
१९२८	७३१६४७	३८·१७
१९२९	७३३५२०	३८·२७
१९३०	७१६९५२	३७·४१

तीन भागांत जन्मप्रमाण कमी आहे. सिंध १०,८७२. मध्यभाग–७०८३. गुजराथ–२,७७५.

पुढील ठिकाणीं वाढतें प्रमाण आहे.

पश्चिम भाग–१,६५०. दक्षिण भाग–१,३७३. मुंबई शहर–१,१३९. कायदेभंगाचे चळवळीमुळें गुजराथमध्यें पुष्कळ पाटलांनीं राजिनामे दिले. व त्यामुळें जन्म-मृत्यूंची नोंद झालीच नाहीं. कांहीं ठिकाणीं लोकांचे असहकारामुळें पाटलांनीं कोरे कागदच कचेरींत पाठविले. मध्यभाग जन्मनोंद-१९३०–१९४,०२०. १९२९–२०१,१०३. यावरून ७,०८३ इतके जन्म १९२९ पेक्षां कमी झाले. पांच जिल्ह्यांपैकीं पुणें व सोलापूर यांमध्यें प्रमाण वाढतें आहे. पण नगर, सातारा व रत्नागिरींत हें प्रमाण कमी झालें आहे. तें अनुक्रमें १,९४५ किंवा शें. ५; १,८९०किंवा शें४ व ४,७०८किंवा शें१२ इतकें कमी झालें आहे. याचीं अनुक्रमें कारणें.– पटकी; पटकी व प्लेग ; व देशांतर हीं होत. खेड्यांतील जन्माचें प्रमाण ४३·०८ व शहराचें २९·२० असें आहे.

पश्चिमभागः–१९३०–१८०,४९० : ४५·३० १९२९–१७८,८४० : ४४·८९ कुलाबा व ठाणें जिल्ह्यांशिवाय प्रमाण वाढतें आहे. दक्षिण भागः– १९३०–१३१,२५८. १९२९ १२९,८८५. एकूण १,३७३ नें वाढ आहे. जन्माची जातवारीः—३७२,२०५ पुरुष, ३४४,७४७ स्त्रिया एकूण ७१६,९५२. (१९·४२ व १७·९९ सरासरी). मृत्यूः–१९२९ सालापेक्षां जरी मृत्यूचें प्रमाण कमी असलें तरी पंचवार्षिक सरासरीपेक्षां तें जास्तच आहे. ताप व प्लेगनें मृत्यू कमी आहेत. पण कॉलरा व देवीनें मृत्यू बरेच वाढले आहेत.एकूण १९३०-५,६६,००३ १९२९-५,८५,०४६.पंचवार्षिक प्रमाण५,२०,३३०

मागील वर्षांच्या मृत्यूसंख्या

वर्ष	मृत्यू
१९०१–१९१० (सरासरी)	६३९,४८३
१९११–१९१५ ,,	५३९,८३६
१९१६	६५२,५८४
१९१७	७९८,४०६
१९१८	१,७२४,०७४
१९१९	६३७,१७०
१९२०	५१६,२९६
१९२१	४९८,३५०
१९२२	४५२,५८१
१९२३	४९६,२४४
१९२४	५२९,५७६
१९२५	४५३,५६३
१९२६	५४७,०६४
१९२७	४९२,८९१
१९२८	५२२,८८५
१९२९	५८५,०४६
१९३०	५६६,००३

निरनिराळ्या भागांतील मृत्यूः–सिंध— २७,११५ नें कमी, दक्षिण भाग–१३,३०२ नें कमी, पश्चिम भाग–१०,५४१ नें जास्त, मध्यभाग–४,९०८ नें जास्त, गुजराथ–४,८९६ नें जास्त, मुंबई शहर–१,०२९नें जास्त.

. सर्वांत खालील जिल्ह्यांत मृत्यूचें प्रमाण जास्त होतें:—पश्चिम खानदेश (४१·९९), पू. खानदेश (४०·७३), भडोच (४०·२६), सोलापूर (३९·९०), नाशिक (३५·०९) (सातारा (३५·०८) नगर (३५·०३) अहमदाबाद (३३·३५), पुणें (३२·३६), विजापूर (३२·३६), खेडा (३१·३९), सुरत (३१·०५), पंचमहाल (३०·८६), कुलाबा (३०·७०).

प्रमुख शहरांचे जन्ममृत्यू—(१) मुंबई लोकसंख्याः–११,४८,८१५; १९३०–२५,०४६ जन्म (२१·८० प्रमाण), १९२९–२३,९०७ जन्म (२०·८१). मृत्यूः–१९३०–२७,३३५. १९२९ २६,३०६. बाल–मृत्यूः–७,४७२. कारणें–देवी, दमा रोग इत्यादि. पटकीनें ४०, प्लेगनें २० व इन्फ्लुएंझानें ७५.

पुणें:—लोकसंख्या–१३३,१२२. जन्म— १९३०–५,४०६ (४०·६१) १९२९–४,७८० (३५·९१) मृत्यू–१९३०–६,२११ (४६·८०). बालमृत्यू–१,८९७ १९२९–५,४५० (४०·९४) कारणें दमा देवी, ताप, रोग इत्यादि. विषमानें ९४, न्युमोनियानें ६२१, क्षयानें ४८१ मृत्यू झाले.

सोलापूर लोकवस्ती–११९,३४७. जन्म— १९३०–५,०९२ (४२·६६). १९२९–५,२५५ (४४·०३). मृत्यू—१९२९–४,५९८ (३८·५३) १९३०–५,३७६ (४५·०५) बालमृत्यूचें प्रमाण २२८·७३वरून२१२·१०वर आलें.मृत्यूचीं कारणें–कॉलरा, ताप व इतर. कांजिण्यानें ३३४मृत्यू झाले. जन्म मृत्यूचेंप्रमाणःइलाख्यांत मृत्यूपेक्षां१,५०,९४९ जन्म जास्त झाले. मृत्यूची जातवारीः–२९,१,५१९ पुरुष (२९·०१) २,७४,४८४ स्त्रिया (३०·११). हेंच प्रमाण २९ सालीं अनुक्रमें २९·८३ व ३१·२९ होतें. बालमृत्यू–१ वर्षाचे खालील मृत्यू १३४, १७० झाले. (१८७·१४). १९२९ सालीं ते १३८·६०२ (१८८·९५) इतके होते. प्रमाण १९३०–१९४·७८ मुलगे. १७८·८९, मुली; १९२९– १९६·४५ मुलगे. १८०·८७ मुली.

१९३० सालांतील बालमृत्यू व त्यांची गेल्या कांहीं वर्षांतील बाल-मृत्युसंख्येशीं तुलना

वर्ष	बारा महिन्यांच्या आंतील मृत्यू मुलगे	मुली	एकूण	नोंदविलेली जनन संख्या मुलगे	मुली	एकूण	बालमृत्यूचें जनन संख्येशीं दर हजारीं प्रमाण मुलगे	मुली	एकूण	बालमृत्यूचें एकंदर मृत्यु संख्येशीं शें. प्रमाण
१९३०	७२४९७	६१६७३	१३४१७०	३७२२०५	३४४७४७	७१६९५२	१९४·७८	१७८·८९	१८७·१४	२४·०६
१९२९	७४७९३	६३८०९	१३८६०२	३७९८१७	३५१९९७	७३१८१४	१९६·९२	१८१·२७	१८९·३९	२३·६९
१९२८	७१६११	६०३०२	१३१९१३	३८०१५९	३५१४८८	७३१६४७	१८८·३७	१७१·५६	१८०·३०	२५·२३
१९२७	६१५६४	५२४४५	११४००९	३६६६९४	३३९५९१	७०६२८५	१६७·८९	१५४·४३	१६१·४२	२३·१३
१९२६	७५०३०	६३१८३	१३८२१३	३६८८२३	३४१३१२	७१०१३५	२०३·४३	१८५·१२	१९४·६३	२५·२५
१९२५	५८०८३	४९५५१	१०७६३४	३४६३७३	३१८०११	६६४३८४	१६७·६९	१५५·८१	१६२·०१	२३·७३
१९२४	७०४८९	५९९५०	१३०४३९	३५३६३१	३२७६९०	६८१३२१	१९८·७७	१८२·९५	१९१·१७	२४·६३
१९२३	५९२२८	४९६८४	१०८९१२	३५४८९०	३२७०२०	६८१९१०	१६६·८९	१५१·९३	१५९·७६	२१·९५
१९२२	५७१३०	४७८४१	१०४९७१	३२३६३१	२९७१३९	६२०७७०	१७६·५३	१६१·०१	१६९·१०	२३·१९
१९२१	६०२३१	५१०२३	१११२५४	३२५७५१	२९८८८९	६२४६४०	१८४·९०	१७०·७१	१७८·११	२२·३२
१९२०	५९२३६	४९४४०	१०८६७६	३०९४६३	२८३७१२	५९३१७५	१९१·४२	१७४·२६	१८३·२१	१९·३६
१९१९	५८९५०	५१३९८	११०३४८	२८५१९५	२६१२६५	५४६४६०	२०६·७०	१९६·७३	२०१·९३	१७·३२
१९१८	९४५५३	८३१२४	१७७६७७	३२२५४६	२९६६७८	६१९२२४	२९३·१४	२८०·१७	२८६·९३	१०·३२
१९१७	७९९८४	७१६४९	१५१६३३	३६३४६०	३३६३६२	६९९८२२	२२०·०६	२१३·०१	२१६·६७	१८·९९
१९१६	७५३२८	६५३०४	१४०६३२	३६५०५७	३३९६१५	७०४६७२	२०६·३४	१९२·२९	१९९·५७	२१·५८
१९१५	६७४४०	५७५६९	१२५००९	३७६९३०	३४९८५०	७२६७८०	१७८·९२	१६४·५५	१७२·००	२४·४३

बालमृत्यूंची वर्गवारी:–१९३०एक महिन्याखालील ४९,३०६ (३६·७५). २७,२८३ एक आठवड्याखालील. २२,०२३ एक आठवड्यावरील ४ १ ते ६ महिन्यांमधील ५०,३६७ (३७·५४), ६ ते १२ महिने ३७,४९७ (२५·७१).

बालमृत्यू सन १९३०

प्रांत	शेंकडा मृत्यु. संख्येंत	नोंदविलेल्या जन्माचे हजारीं प्र.	एक महिन्याचे आंतील	एक ते ६ म.	६ ते १२ म.
पश्चिमभाग	२५·९३	१९८·१४	३६·७४	३८·०४	२५·२२
मध्यभाग	२२·६६	१७७·११	३६·०२	४०·३५	२३·६३
दक्षिण भाग	२१·८७	१५५·५०	४४·४६	३५·११	२०·४३
गुजराथ	२६·६०	२२०·३५	३०·३५	३९·२३	३०·४२
सिंध	१७·६६	१४९·४८	४१·९५	३३·०५	२५·००
मुंबई शहर	२७·३३	२९८·३३	३३·९७	२९·२०	३६·८३
मुम्बई इलाखा	२४·०६	१८७·१४	३६·७५	३७·५४	२५·७१

एकूण असें दिसून येतें कीं, सिंध व दक्षिणभागांमध्यें पहिल्या महिन्यांत बरेच बालमृत्यू झाले. ह्या व गुजराथ, पश्चिम व मध्यभागांत १–६ महिन्यांत बालमृत्यू जास्त झाले. मुंबई शहराशिवाय सर्व इलाख्यांत ६–१२ महिन्यांत फारच कमी मृत्यू घडले.

शहरें व खेडीं यांतील बालमृत्यूंची तुलनात्मक हजारीं सरासरी—

	१९३०	१९२९
शहरें	२५६·४३	२६१·५०
खेडीं	१७३·१९	१७५·९१

पुढील प्रमुख शहरांत बालमृत्यूचें हजारीं प्रमाण बरेंच जास्त आहे:—डाकूर (४३२), पंढरपूर (४२१), बार्शी (४०७), सातारा (३८०) सुरत (३७०) विरमगांव (३६६), अहमदाबाद (३५६), पुणें (३५०), नडियाद (३०८), नाशिक (२९२), शिकारपूर (२७९), भुसावळ (२६१), ठाणें (२५७), कुर्ला (२४८), गोध्रा (२४५), जळ- गांव (२४३), लारखाना (२३६), हैदराबाद (२२९), सोलापूर (२१२), सक्कर (२०८), भडोच (२००), कराची (१९३), धुळें (१८७), आणि बेळगांव (१८५).

दक्षिण भागांतील आरोग्यखात्याचे असिस्टंट डायरेक्टर लिहितात :—बालमृत्यू कमी होण्यासाठीं या भागांत ११ म्यु. नीं एकूण १५ पास झालेल्या सुइणी नेमल्या. त्यांनीं गरोदर स्त्रियांना आरोग्याविषयीं वगैरे बरीच माहिती दिली. धारवाड रेडक्रॉस सो. नें ८ सुइणी नेमून त्यांना तालुक्याचे दवाखान्यांत कामास ठेविलें. सौंदत्ती, बेलहोंगल, नरगुंद इ. ६ म्यु. नीं ठेविलेल्या सुइणींनीं दवाखान्यांतून व स्त्रियांचे विभागांतून कामें केलीं. दक्षिणभागांत २२ सुइणींनीं ७१३ बाळंतपणें केलीं. २९ सालीं २४ सुइणींनीं ७१० केलीं होतीं. धारवाड जिल्ह्यांतील खेडेगांवांतून २ बालसप्ताह केले. बेळगांव, कुमठा इ. ठिकाणीं मॅजिक लॅंटर्नचीं व्याख्यानें झालीं व देवी, प्लेग बद्दलची माहिती सांगितली.

मुंबई म्युनिसिपालिटी:—मुंबई शहरांत एक वर्षाचे आंत ७,५०६ मुलें मेलीं म्हणजे २९ सालापेक्षां २८१ जास्त मेलीं. मृत्यूचीं कारणें:–५,३२० किंवा शे. ७१ फुप्फुसाचे रोग अशक्तता व अकालीं जन्म. ३५० अतिसार व विषम. १४३ मलेरिया, हिवताप आणि पाळीचा ताप. ७३ इतर ताप ६२६ फेपरें, देवी व कांजिण्या यानीं ४४९ व४१मृत्यु झाले.

निरनिराळ्या प्रमुख जातींतील बालमृत्यू (१) हिंदू ३१५ व निकृष्ट हिंदू ३२१ (२) मुसलमान–२९१ (३) पारशी–९९, (४) ज्यू–१०८, (५) हिंदी ख्रिस्ती:–२८३, (६) अँग्लो इंडियन्स १८० (७) युरोपियन्स ५३.

मुंबईशहरांत बालमृत्यू टाळण्याचीं योजलेली साधनें:– (१) म्युनिसिपल सुइणी घरोघर जाऊन स्त्रियांना भेटतात, रोगी शोधून काढतात, मुलांना देवी टोचल्या आहेत कां नाहीं हें पहातात, मुलांचें आरोग्य पहातात व त्या

विषयीं माहिती देतात. (२) बाळंत स्त्रीची शुश्रूषा (३) सूतिकागृहें. (४) बाळंतपणांतील साधनें व सुखसोयी पुरविणें. (५) बालसंगोपन गृहें दुधाचा पुरवठा. करणें इ. इ.

बालमृत्यूची कारणपरंपराः—

१९३० सालांतील एकंदर मृत्युसंख्या, त्याचें लोकसंख्येशीं दर हजारीं प्रमाण, मृत्यूचीं कारणें, १९२९ मधील आकडयांशीं त्याची तुलना व मागील ५ वर्षांतील सरासरी आंकडे.

कारण	१९३० संख्या	१९३० प्रमाण	१९२९ संख्या	१९२९ प्रमाण	मागील पांच वर्षां.सरा. संख्या	मागील पांच वर्षां.सरा. प्रमाण
कॉलरा	१५१४२	·७९	९०८४	·४७	८४५०	·४४
देवी	२१३४१	१·११	१०६३५	·५६	६१११	·३२
प्लेग	५०२६	·२६	१८०१४	·९४	११६२४	·६१
ताप	२२३२७४	११·६५	२४६४२८	१२·८६	२०९११२	१०·९१
अमांश व हगवण	२६५३६	१·३९	२५१०८	१·३१	२५७४५	१·३४
फुप्फुसाचे रोग	९९६७८	५·२०	९९८९६	५·२१	९४२७४	४·९२
अपघात	७६४५	·४०	८२७७	·४३	७९०७	·४१
इतर कारणें	१६७३६१	८·७३	१६७६०४	८·७५	१५७१०७	८·२०
सर्व कारणें मिळून	५६६००३	२९·५३	५८५०४६	३०·५३	५२०३३०	२७·१५

वरील कोष्टकावरून असें दिसेल कीं, प्लेग ताप व अपघात यांनीं कमी मृत्यू झाले.पण कॉलरा, देवी, आणि हागवण यांनीं गुदस्तापेक्षां जास्त मृत्यू झाले. दम्याचे रोगानें होणाऱ्या मृत्यूंत कांहीं बदल नाहीं. पंचवार्षिक सरासरीशीं तुलना केली असतां, प्लेगाशिवाय इतर सर्व रोगांमुळें मृत्यूचें प्रमाण वाढतेंच असल्याचें आढळेल.

प्रमुख रोगांच्या साथींचा वृत्तांत


सामान्य वर्णनः—कॉलरा व देवी यांच्या साथी सोडून दिल्या तर इलाखाभर गुदस्तापेक्षां रोगराईचा त्रास बराच कमी होता. कॉलऱ्यानें एकूण १५१४२ व देवीनें २१३४१ मृत्यू झाले. त्यामुळें गुदस्ताची (१९२९) अनुक्रमें ·४७ व ·५६ ही सरासरी जाऊन त्याऐवजीं ·७९ व १·११ ही सरासरी पडली. तरीपण इलाख्याची एकूण सरासरी३०·५३वरून२९·५३वर गेली; याचें मुख्य कारण म्हणजे ताप व प्लेग यांच्या मृत्यूच्यानोंदणींत झालेली सुधारणा हेंच होय. फुप्फुसाचे विकार व इतर रोग यांनीं होणाऱ्या मृत्यूंत यंदा कांहींचफरक पडला नाहीं.अमांश व अतिसार ह्या विकाराचा प्रादुर्भाव जास्तच झाला (१·३१ वरून १·३९). १९१८ सालीं एन्फ्लुएंझाची सांथ जोरावली. तेव्हांपासून १९२२ पर्यंत इलाख्याचें आरोग्य-मान सुधारण्याचे मार्गावर होतें. १९२२ सालची मृत्यू-सरासरी २३·६१ ही आहे. पण तेव्हांपासून आरोग्यमान खालावून सरासरी सारखी वाढतच आहे. हें खालील आंकडयांवरून कळेल– १९२३–२५·८९; १९२४–२७·६३; १९२५–२३·६६; १९२६–२८·५५; १९२७–२५·७१; १९२८–२७·२८; १९२९–३०·५३; व १९३० २९·५३. सिंधशिवाय सर्व ठिकाणीं कॉलरा व प्लेगचा त्रास फार झाला. गुजराथ,पश्चिम व मध्यभाग ह्यांत देवीची सांथ भयंकरच होती.सिंध व दक्षिणभागांत ती थोडी सौम्य स्वरूपाची होती.

१९२५–२९ च्या पंचवार्षिक आंकडयांशीं तुलना केली असतां खालील कांहीं सदरांशिवाय सर्वप्रकारचे रोगानें झालेले मृत्यु वाढलेलेच दिसतात. प्लेग, (·६१:·२६), ताप(१०·९१:११·६५) फुप्फुसाचे रोग (४·९२:५·२०) इतर रोग (८·२० :८·७३), हगवण (१·३४:१·३९), (कॉलरा) (·४४ : ·७९)व देवी (·३२ : ·१११) साधारणतः जून महिन्यांत रोगराई कमी होती पण ऑगस्ट, सप्टेंबर व आक्टोबर महिन्यांत ताप प्लेग, कॉलरा व हगवण या रोगांचा त्रास फार होता. वर्षारंभीं ताप, देवी व प्लेग यांचा प्रादुर्भाव होताच.

तापः—तापामुळें २९ सालापेक्षां जरी यंदा कमी मृत्यू झाले, तरी पंचवार्षिक सरासरीपेक्षां मृत्यू–संख्या जास्त आहे. १९२९–२४६,४२८; १९३०–२२३,२७४; मागील पांच वर्षांची सरासरीः– २०९,११२.

मुंबई इलाख्यांतील १९०१ ते ३० पर्यंत तापानें मेलेल्यांची संख्या व त्याचें प्रत्येक मैलीं प्रमाणः–

१८६८ ते १९३० पर्यंत
खालसा मुलखांतील देवीच्या साथीची पिछेहाट



वर्ष	मृत्युसंख्या	प्रत्येकमैलीं प्र.
१९०१–१०सरा	२५८४९७	१४·००
१९११–१५सरा	२४७९२६	१२·६६
१९१६	२६२४०१	१३·४०
१९१७	२९८९१९	१५·२६
*१९१८	१२८४०१३	६५·५५
१९१९	२७४४५९	१४·०३
१९२०	२६६०९२	१३·५८
१९२१	२२६१००	११·८०
१९२२	१९७८८८	१०·२३
१९२३	१९६२३१	१०·२४
१९२४	२१४५६३	११·२०
१९२५	१८३७६४	९·६९
१९२६	२२२४६६	११·६१
१९२७	१८६५४३	९·७३
१९२८	२०६३५६	१०·७७
१९२९	२४६४२८	१२·८६
१९३०	२२३२७४	११·६५

सिंध (१९,१५५); दक्षिण भाग (७,०८२), मध्यभाग (५७५) इतके मृत्यू झाले.म्हणजे नेहमी-पेक्षां कमी मृत्यू झाले; पण गुजराथ (१८१२) व पश्चिमभाग (१८०५) इतके तापामुळें मृत्यू १९२९ पेक्षां जास्त झाले. महाराष्ट्रांतील खालील ठिकाणीं मृत्यूप्रमाण जास्त पडलें. पूर्वखानदेश (१८·५८), प. खानदेश (१७·५०); सोलापूर (१४·७३),नाशिक(१४·१६)सातारा(१२·६१) विजापूर(१२·३६)पुणें(१२·०७). खेडेगांवांतील मृत्यूचें प्रमाण (१२·६८) गांवांतील मृत्यूचे प्रमाणापेक्षां (७·४१) बरेंच जास्त आहे. निरनिराळ्या तापामुळे होणारे मृत्यु:—

मलेरिआमुळें मृत्यू:—१९३०–२१,११९ (१·१०); १९२९–३०,८५१ (१·६१); १९२९ सालापेक्षां सर्व विभागांतून हींवतापानें मृत्यूचें प्रमाण कमी आहे. नेहमींप्रमाणें शहरांपेक्षां (·८३) खेड्यांतून (१·१७) हींवताप जास्तच आहे. खालील जिल्ह्यांतील खेड्यांतून हींवताप जास्त आढळतो:–पुणें(४·३२); नाशिक(२·८४) नगर (२·७४); प. खानदेश (१·७२), ठाणें (१·६८). प्रतिबंधक उपाय:–खेडोखेडीं उपचारासाठीं ४२ स. अ.सर्जन्स नेमले. त्यांनीं एकूण ३,०६६ खेड्यांतून ५३,११० हींवतापाचे; २८,१२३ इतर रोगांचे रोगी पाहिले. २२,९७८ तपासलेल्या मुलांपैकीं ९,५२३ मुलांच्या पांथऱ्या वाढलेल्या आढळून आल्या. दक्षिण भागांत ६४५ खेड्यांतून ७,९६७ हींवतापाचे रोगी निघाले. व २,४६८ पांथरी वाढलेलीं मुलें सांपडलीं.

मध्यभागांत २६७ खेड्यांतून ५,६६९ हींवतापाचे रोगी निघाले. इस्पितळें दवाखाने यांमध्यें ६४,६०१ हींवतापाचे रोगी आले. यावरून मध्यविभागांत हींव–ताप किती जोरांत आहे हें दिसतें. सर्वांत जास्त रोगी (२३,८२०) पुणें जिल्ह्यांतून, नंतर सातारा (१४,९९७), रत्नागिरी (१०,८४४), नगर (९,५५६) व सोलापूर (५,३८४). पश्चिम विभागांत ९६४ खेडीं तपासलीं. हींवतापाच्या १६,२१८ रोग्यांची शुश्रूषा केली. ३,७५६ मुलांची पांथरी वाढलेली होती. १०९ शाळा तपासल्या.

क्विनाइनचा पुरवठा:—यंदाचे वर्षी सरकारनें (१) ३८००० रु. क्विनाईनच्या पुरवठ्यासाठीं मंजूर केले. (२) ३१०२५ रु.क्विनीन पोस्ट–ऑफिसांतून विकण्याकरितां व (३) रु. ९,७५० क्विनीन स्वस्त दरांत देण्याकरितां मंजूर केले.शिक्षण खात्यानें शाळेंतील मुलांना क्विनीन वाटलें. शिवाय देवी डॉक्टर व आरोग्यखात्यांतील अधिकारी, यानीं १२,९८५रु. चे क्विनीन वांटले २९,७३०रु. किंमतीचें क्विनीन पोस्टांतून विक्रीसाठीं वाटलें गेलें. पूर्व खानदेश, प. खानदेश, नाशिक, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी, इ. ठिकाणचे कलेक्टर क्विनीनच्या परिणामाविषयीं प्रशंसा करतात. खेड्यांतून क्विनाइनची मागणी वाढत आहे. यावरून त्याचा वाढता उपयोग दिसून येत आहे.

विषम ज्वर:—मृत्यू–१९३०–५,६५८
१९२९–२,८६९

पश्चिम भागांत ३,०७८; दक्षिण १,२९९, मध्यभाग ६२२, सिंध ४५० व गुजराथ ३१ इतके रोगी मेले. हेच गुदस्तां अनुक्रमें ३९७; १,५६८; ४५३; २५७; व ३३ होते. पुणें शहरांत ९४ मृत्यू झाले. खालील जिल्ह्यामधीलच्या खेड्यांतून जास्त मृत्यू झाले. पश्चिम खानदेश (१,१३९), ठाणें (८७६), पूर्व खानदेश (२२४)

कांजिण्या:—मृत्यू १९३०–४९,१९. १९२९ ८,८५३. गुजराथ १,४५९; मध्यविभाग १,३५६ दक्षिण ९५०; पश्चिम भाग ९१४, व सिंध १०६

उलटणारा ताप व काळा आजार: यानें कांहीं मृत्यू झाले नाहींत.

इन्फ्लुएंझा:—कोणत्याही वर्षापेक्षां यंदा अगदींच थोडे लोक (१८३) या रोगानें दगावले. त्यापैकीं एकट्या मुंबई शहरांतच ७५ मृत्यू झाले.

* इन्फ्लुएंझाची सांथ.

खुलासेवार कोष्टक

सन	एकूण मृत्यू	सन	एकूणमृत्यू
१९१८	१,०४१,४८१	१९२५	१९२
१९१९	३९,७८६	१९२६	३६२
१९२०	१६,६९०	१९२७	२६७
१९२१	३,६७९	१९२८	२२८
१९२२	१,२२२	१९२९	२८०
१९२३	९९१	१९३०	१८३
१९२४	५७८		

निरनिराळ्या विभागांतून खालील प्रमाणें मृत्यू झाले. पश्चिम भाग ४३, दक्षिण ४०, गुजराथ १३, मध्यविभाग ६ व सिंध ६, १९२९ सालचे आंकडे अनुक्रमें १४, १२८, ६०, ४, व १२ होत.

पश्चिम विभाग	लागले	मेले
(१) प. खानदेश जिल्हा	१५९	३२
(२) ठाणें	७	५
(३) मुंबई सबर्बन	१	१
(४) कुलाबा	१८	५

दक्षिणभाग:–४० मृत्यूंपैकीं ३० खेडेगांवांतील होते. मध्यविभाग–नगर १. सातारा १. खेडेगांवें ४ एकूण ६.

फुप्फुसाचे रोग:—

मृत्यू:–१९३०–९९,६७८ (५·२०) १९२९–९९,८९६ (५·२१) पंचवार्षिक सरासरी—९४,२७४ (४·९२). यावरून असें दिसतें कीं, २९ सालापेक्षां यंदा फुप्फुसाच्यारोगानें जास्त मृत्यू झाले नाहींत. खेडेगांवातील मृत्यूच्या प्रमाणापेक्षां (४·४८) शहरांतील मृत्यूप्रमाण (८·१६) जास्त आहे. गुजराथेंत सर्वांत जास्त म्हणजे २४,५५६; नंतर पश्चिम भाग २३८९७, मध्यविभाग २१,५२३; दक्षिणविभाग ११,३४२; व सिंध ७,२४९असें मृत्यू झाले. १९२९ चे आंकडे ,अनुक्रमें २६,१५९; २१,५७३; २१,६६०; १२,१७६ व ७,३५५ असे होते. मुंबई शहरांत ११,१११ यंदां व १०,९७३ गुदस्तां मृत्यू झाले. महाराष्ट्रांतील पुढील जिल्ह्यांतून मृत्यूचें प्रमाण जास्त पडलें. नाशिक (७·१६); कुलाबा (७·००); नगर (६·७४); ठाणें (६·४१); पुणें (५·९०); पू. खानदेश (४·७७); प. खानदेश (५·४०); मुंबई सबर्बन (५१·१६) व सोलापूर (४·१८).खालील शहरांतून मृत्यूप्रमाण जास्त आहे; याचें कारण बहुधा शहरची कोंदट वस्ती हेंच होय. अहमदाबाद (१४·१५); सुरत (१२·६७); हैद्राबाद (११·८५); नगर (११·२१); कराची (११·०८); पुणें (१०·७१) नाशिक (१०·५१); पंढरपूर (१०·४३); पनवेल (९·४०); येवला (८·२६); जुन्नर (८·२८) गदग (८·२४) व कल्याण (७·७९).

क्षयरोग:—हींवतापाच्या खालोखाल जर कशामुळें जास्त मृत्यू होत असतील तर ते क्षयरोगानें होत. ही फक्त हिंदुस्थानांतीलच ओरड नसून सर्व जगाची आहे. प्रमुख देशांचे यावरील आंकडे बघून राष्ट्रसंघाच्या आरोग्यखात्यानें असें अनुमान काढलें आहे कीं, जगांतील एकूण मृत्यूपैकीं १० टक्के मृत्यू क्षयानें घडतात! यंदा मुंबई इलाख्यांत क्षयानें २२,२८३ मृत्यू झाले. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या शेंकडा १·१६इतकें प्रमाण पडतें. पूर्वी क्षय झालेला मनुष्य म्हणजे मृत्यूचा बंदिवानच असें समजण्यांत येई व त्यास त्याचे कुटुंबास एकंदरीनें फार त्रास होत असे. पण हल्लींच्या शास्त्रप्रगतीमुळें ती भीति मोडून क्षयरोगाची नोंद व्यवस्थितपणें होऊं लागली आहे. क्षयानें मृत्यू १९३० सालीं २२,२८३ व प्रमाण (१.१६). १९२९ सालीं २२,३९३ प्रमाण (१.१७). पश्चिम भागांत ६,९६९; मध्यविभागांत ५,६६८; गुजराथ ४,१७१; दक्षिणेंत २,७५६ व सिंधमध्यें १,२७९ इतके मृत्यू झाले. २९ सालीं हेच आंकडे अनुक्रमें ६,५६६; ५,६०५; ४,६४१; २,८४१ व १,२९२ असे होते. मुंबई शहरांत यंदा १,४४० व गुदस्ता १,४४८ मृत्यू झाले. त्याचें प्रमाण अनुक्रमें १·२५ व १·२६ असें पडतें.

शहरांतील मृत्युप्रमाण १९३० सालीं १·७३ व २९ सालीं १·८० असें आहे. खालील शहरांतील प्रमाण जास्त आहे. धरणगांव (४·३८); (४·३६) पनवेल (४·२९); चाळिसगांव (४·००), बेळगांव (३·९८); चिपळूण (३·६४); पुणें शहर (३·६२); जुन्नर (३·३९); अहमदाबाद (३·१६); नगर (२·७६); सातारा; (२·७६) कराची (२·७२); सुरत (२·६१); व गोकर्ण (२·०२). खेड्यांतील मृत्यूप्रमाण यंदा १·०२ व २९ सालींही १·०२ असें आहे. खालील ठिकाणच्या खेड्यांतून प्रमाण जास्त आहे. कुलाबा (३·७५); ठाणें (२·३९); रत्नागिरी (१·८९) खेडा (१·७५) व मुंबई सबर्बन (१·५२).नाशिक शहरांतील क्षयरोग वाढत्या प्रमाणावर आहे; व हा रोग मुंबई व मध्यप्रांतांतून येणाऱ्या लोकांमुळें फलावतो यासंबंधीं नाशिक म्यु. चा जोरानें विचार चालू आहे.

खेड्यांतील वस्तींत क्षयाचें जास्त प्रमाण

कोंकण विभागांत दिसून येतें.याचें कारण मुंबईचें सान्निध्य हेंच होय. वरील म्हणणें रत्नागिरी, ठाणें व कानडी जिल्हे येथील आंकडे पाहिले असतां ध्यानांत येईल. क्षयाचे प्रतिबंधासाठीं हैद्राबादेंत मॅ. लॅटर्नद्वारां व्याख्यानें दिलीं; कराचीच्या क्षयप्रतिबंधक दवाखान्यांत उत्तम काम झालें. व नगरच्या म्यु. पालिटीस मध्यविभागाच्या आरोग्यखात्याच्या अधिकाऱ्यांनीं सूचना केल्या.

न्युमोनियाः—मृत्यू १९३०—२२,३६३. १९२९ २२,१६३.सिंधमध्यें सर्वांत जास्त म्हणजे ४,८१५; गुजराथ ४,६१०; पश्चिमभाग ३,६५९; मध्य-विभाग १,२९४ व दक्षिणविभागांत २९५ मृत्यू झाले. १९२९ सालीं हे आंकडे अनुक्रमें ५,०५८; ४,५१९; ३,२१८; १,५८१ व २८९ असे होते. मुंबई शहरांत यंदा ७,६९० व १९२९ सालीं ७,४९८ मृत्यू झाले. मृत्यूप्रमाण—शहरें:—१९३० ३·५६; १९२९—३·७८ खेडीं १९३०—·५९ १९२९—·५२. पुढील प्रमुख शहरांतून मृत्यू प्रमाण जास्त आहेः—हैद्राबाद (७·५७); उमरकोट (६·४३); सुरत (६·२८); कराची (५·८०); नाशिक (५·२२); नगर (४·८६); पुणें शहर (४·६७); वसई (३·७६); नडियाद (३·५४); पनवेल (३·०२); सक्कर (२·७५); ठाणें (२·४९); लोणावळें (२·७८)! भिवंडी (२·४६); विरमगांव (२·३६); व धुळें (२·२७) मुंबई शहराचें मृत्यूप्रमाण १९३०—६·६९; १९२९ ६·५३.

महामारी

कॉलऱ्यानें झालेले मृत्यूः—१९३०—१५,१४२ (·७९) १९२९—९,०८४. (·४७) पंचवार्षिक सरासरी—८,४५० (·४४). आजपर्यंत १९२५ व २६ सालांत कॉलऱ्यानें फारच कमी मृत्यू झाले. ते अनुक्रमें ५७ व ७३ होत. यंदा खेडेगांव व उपनगरें यांचें मृत्यूप्रमाण अनुक्रमें. ९१ व .३१ असें पडतें.

रोगांची विभागणी—इलाख्यांत मुंबई सबर्बन, कानडी प्रांत व भडोच जिल्हा वगळून बाकी सर्व ठिकाणीं कॉलऱ्याची सांथ होती.खालील ठिकाणीं तर ती विशेष होतीः—सातारा मृत्यू (३,८००); सोलापूर (२,४९७); पूर्व खानदेश (१,५८९) पुणें (१,३९९); विजापूर (१,३७३); नाशिक (१,२८५); प. खानदेश (९३४); नगर (९४१); बेळगांव (५९३); व पंचमहाल (२३९). मुंबई शहरांत गुदस्ता ८ मृत्यू पण यंदा ४० झाले. ही साथ एकूण १६३ टापूंतील २,०१२ खेड्यांमध्यें पसरली होती सप्टेंबर तर सांथीचा जोर विशेष होऊन ४,९६४ मृत्यू झाले.

मध्यविभागः—यंदा ८,६९२ मृत्यू झाले. पण गुदस्ता ते फक्त ४५होते.सातारा जिल्हा (३,८००) सोलापूर (२,४९७) व सर्वांत कमी पुणें व नगर अनुक्रमें १,३९९ व ४१; रत्नागिरी जिल्ह्यांत फक्त ५५ मृत्यू झाले. प्रथमतः पंढरपुरास कॉलरा ३ जुलै ३० रोजीं उद्भवला. तेथें २ रोगी, एक यवतमाळचा व दुसरा निजामचे राज्यांतला असे होते. व याच महिन्यांत रत्नागिरी खेरीज करून सर्व जिल्ह्यांत रोग फैलावला. या जिल्ह्यांतील सांथीस दोन कारणें सांपडतात (१) निजामच्या हद्दींतील रोगी व (२) पंढरपूरहून आषाढी यात्रेनंतर परत फिरलेले वारकरी. खेडीं व शहरें मिळून १,१८६ ठिकाणचे ११,२८ रोगी मरण पावले. ही सांथ जुलैमध्यें उद्भवून तिचा सप्टेंबर-मध्यें अगदीं कळस झाला व पुढें ती ओसरली.

सातारा जिल्ह्यांत १८जुलै ३० रोजीं पहिला रोगी कऱ्हाड तालुक्यांतील सावदें या खेड्यांत सांपडला. रोग कसा फैलावलाः—जुलै—कऱ्हाड, वाळवें, पाटण व शिराळें पेटा यांमधील खेडीं. ऑगस्ट—सातारा, तासगांव,खानपूर,माण व कोरे-गांव तालुक्यांतील खेडीं व कऱ्हाड, अष्टें व इस्लाम-पूर हीं गांवें. सप्टेंबर—खटाव तालुका, सातारा व वांई हीं गांवें. आक्टोबर—वांई व जावळी तालुके. एकूण १,३४१ खेडीं व शहरें यांपैकीं ४३३ खेडीं व ५ गांवें कॉलऱ्यानें पछाडलीं. ५ गांवांपैकीं वांईंत सर्वांत जास्त म्हणजे ४१ मृत्यू व ४३३ खेड्यां-पैकीं जास्त मसूर येथें ८५ मृत्यू झाले. एकूण ४३३ खेड्यांपैकीं १३७ खेड्यांचा पाणीपुरवठा नदींतून व २९६ चा विहीरी व तळीं यांतच होता. सातारा जिल्हा लोकल बोर्डानें कॉलरा प्रतिबंधक उपाय २ महिने उशिर म्हणजे २९ सप्टेंबर ३० पासून अमलांत आणले. व त्यामुळें सांथ आंवरता आली नाहीं. या जिल्ह्यांत एकूण ७,८५६ लागले व ३,८०० रोगी मेले. (प्रमाण ३·७१).

. सोलापूर जिल्हाः—वर सांगितल्याप्रमाणें ३ जुलै१९३० रोजीं पंढरपूर येथें २रोगी आढळले. ३ च्या ३ गांवे व ७ टापूंतील खेडीं २८५,इतक्या ठिकाणीं हा रोग फैलावला.५,८०६ रोगी लागून, २४,९७ मेले.जुलै महिन्यांतच पंढरपूर, मेढे, बार्शी, सोलापूर व करमाळें तालुक्यांत व सप्टेंबरांत सांगोलें व माळशिरस तालुक्यांत रोग फैलावला. सप्टेंबरांत ९९९ मृत्यू झाले. सोलापूर शहरीं ३०१

व पंढरपुरांत ७१ मृत्यू झाले. सोलापुरास पंढरपुराहून व पंढरपुरास निजामचें राज्य व यवतमाळ येथून रोग आला. सांथींतील २८२ खेड्यांपैकीं ११९ नदींतून व १६३ विहिरींतून पाणी घेत.

पुणें जिल्हा:– १,१५७ खेडीं व गांवांपैकीं २०८ ठिकाणीं सांथ फैलावली. एकूण २९३१ रोगी लागले व १,३९९ मेले. मृत्युप्रमाण १·४२ पडतें. जून अखेरपर्यंत जिल्ह्यांत रोगाचा मागमूसहीं नव्हता. पण १७ जुलै ३० रोजीं आळंदीस रोगी सांपडला. तो पंढरपुराहून परत आलेला वारकरी होता. रोग कसा फैलावला:– जुलै–हवेली तालुका व खेड तालुक्यांतील कांहीं शहरें. ऑगस्ट-आंबेगांव, दौंड, मुळशी व शिरूर पेटे, पुरंदर, मावळ व पुणें शहर तालुके. सप्टेंबर-इंदापूर; आक्टोबर–भिमथडी; नोव्हेंबर–जुन्नर. हवेली तालुक्यांत सर्वांत जास्त म्हणजे ६९३ लागले व ३५५ मेले. तसेंच इंदापूर तालुक्यांत ४३७ लागले व १९१ मरण पावले. पुणें शहरांत ३० मृत्यू झाले. व खेड्यांपैकीं हडपसर येथें ५० झाले. सांथींतील २१५ खेड्यांपैकीं १११ नदींतून व १०४ तळीं व विहिरींतून पाणी घेत.

अहमदनगर जिल्हा:–२,३१७ लागले व ९४१ रोगी मेले. प्रथमत: १० जुलै १९३० रोजीं रोग उद्‌भवला. मृत्यूप्रमाण १·३०. पहिला रोगी नेवासें तालुक्यांतील मोलुंजी या ठिकाणीं आढळला.तो निजामचे राज्यांतील होता. कोपरगांव तालुक्यांत सर्वांत जास्त लोक मेले. सांथींतील २३७ खेड्यांपैकीं १२६ तळीं व विहिरीचें व १११ नदीचें पाणी घेत.

रत्नागिरी जिल्हा:—एकूण मृत्यू ५५ झाले. ९ नोव्हेंबर १९३० रोजीं रोगउद्‌भवला. प्रथमत: ८ खेडीं व मालवणगांवींच फक्त रोग होता. खेड तालुक्यांत नोव्हेंबरांत ४४रोगी मेले. डिसेंबरांत मंडनगड पेट्यांतील एका खेड्यांत ९ लोक मेले.

मध्यविभागांत योजलेले प्रतिबंधक उपाय:— ११ डॉक्टर लोक नेमले. नगर, पुणें, व सातारा जिल्ह्यांसाठीं प्रत्येकीं ३ व सोलापूर जिल्ह्यांत २ एकूण ५८,६२८ कॉलरा–प्रतिबंधक इनॉक्युलेशन्स केलीं. त्यासाठीं मुद्दाम निराळे लोक नेमले होते.

पश्चिम भाग:–मृत्यू १९३०–४,०१०(१·०१) १९२९-१,३५२(·६५). रोग कसा फैलावत गेला?

जानेवारी–जळगांव, अमळनेर व पू. खानदेश मधील खेडीं; साक्री तालका; व बागलाण तालुका. फेब्रुवारी–नाशिक शहर. मार्च–धुळें व भिवंडी-जवळील खेडीं. एप्रिल–दिंडोरी तालुका. (मे व जून मध्यें येथें कॉलरा नव्हता.) आक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर–कुलाबा जिल्हा. जुलै ते डिसेंबर पूर्व व प. खानदेश; व नाशिक ठाणें जिल्हे. पारोळे तालुक्यांतील बहादरपूर येथें ४ जुलै ३० रोजीं पहिला रोगी आढळला. तो निजामचे राज्यांतून आलेला असावा.

पूर्व खानदेश–कॉलरा एकूण २०३ खेडीं व शहरें यांमध्यें पसरला; व १,५८९ लोक मेले. या प्रदेशांत जुलै ते डिसेंबर हा रोग होता. पश्चिम खानदेशांत १३७ खेडीं व शहरांत हा रोग पसरून ९३४ लोक मेले. येथेंही जुलै ते डिसेंबर या महिन्यांत हा रोग होता. नवापूर तालुक्यांत सर्वांत जास्त म्हणजे २८८ रोगी मेले. धुळें, शिंदखेड, शहादें व शिरपूर येथेंही पण संहार बराच झाला. पहिला रोगी बारवाणी संस्थानांतून आला होता. नाशिक जिल्ह्यांत १६९ खेडीं व शहरें यांमधून रोग फैलावला, व एकूण मृत्यू १,२८५ झाले. सर्वांत जास्त म्हणजे नाशिक तालुक्यांत २८७, सिन्नर ता. २०२,इगतपुरी ता. २१० व नांदगांव तालुका १६२ याप्रमाणें लोक मेले. नाशिक जिल्ह्यांतील भगूर, वणी व मनमाड या ठिकाणाहून रोग फैलावला. भगूर शेजारचीं शहरें दारणा नदींतून पाणी घेत; तें पाणी बहुतेक दूषित झालेलें असावें. ठाणें जिल्ह्यांत १६ खेड्यांत रोग पसरून ६०लोक मेले.कुलाबा जिल्ह्यांत ४खेड्यांचे व एक शहरचा टापू याप्रमाणें २७ खेड्यांतून हा रोग होता. तेथें २२६ लोक लागून त्यांतील १४२ मेले. मुख्यत: हा रोग महाड व पनवेल तालुक्यांतच होता. खालापूर पेट्यांतील सरसाण गांवीं एक रोगी १४आक्टो.१९३०रोजीं सांपडला. पोलादपूर येथें ३० आक्टो. रोजीं कांहीं रोगी आढळले. पुष्कळसे रोगी इकडून तिकडे प्रवास करणाऱ्या महार मंडळींतून सांपडले.

प्रतिबंधक उपाय:–कॉलरा उद्‌भवण्याचे जे दिवस असतात त्याचे बरेच अगोदर स्थानिक संस्थांना त्यावरील प्रतिबंधक उपायांची माहिती पाठविली होती. व कॉलऱ्याचे औषधाची व्यवस्थित मोजदाद केली होती. कॉलरा उद्‌भवल्याचें कळल्याबरोबर ठिकठिकाणीं औषध–पाण्याची व्यवस्था केली. पूर्व व पश्चिम खानदेश, व नाशिक जिल्हा लो. बोर्डांनीं सांथींसाठीं खर्चाची व्यवस्था करून असि. डॉ. ऑफ प. हेल्थ यांना ठिकठिकाणीं डॉक्टर्स नेमण्याची परवानगी दिली व त्याप्रमाणें ते नेमलेही पण गेले. देवी डॉक्टर्सना पोटॅश पर-

मँगनेटच्या गोळ्यांनीं पाणी शुद्ध करण्यास सांगितलें. शाळा मास्तरांचीही थोडीशी मदत घेतली.यंदा ५ पूर्व खानदेशांत व ३ नाशिक येथें असे एकूण ११ डॉक्टर्स पश्चिमभागांत नेमले. कॉलरा प्रतिबंधक इंजक्शनें एकूण ४२,६९८ केलीं. डॉक्टर्स व इतरांनीं मिळून १,६३५ रोग्यांची शुश्रूषा केली.

दक्षिणभागः–८एप्रिल १९३०पर्यंत ह्या बाजूस रोग नव्हता पण या सुमारास बेळगांव जिल्ह्यांत दोन रोगी आढळले. दक्षिणभागांत एकूण २,१०६ मृत्यू झाले. गुदस्ता फक्त २४ मृत्यू होते. नुसत्या विजापूर तालुक्यांतच १,३७३ मृत्यू झाले. सप्टें-बरच्या शेवटच्या आठवड्यांत सांथ जोरांत होती व तेवढ्या वेळांत ४७६ लोक लागले व १७३ मरण पावले. एकूण मृत्युसंख्येपैकीं १,९५२ मृत्यू खेड्यांतून व फक्त १५४ शहरांतून झाले.

कॉलऱ्याचा उद्भव प्रथम बेट्टिगिरी येथें होऊन तेथून तो बऱ्याच म्हणजे नागसमुद्र, नर्सापूर, अन्निगेरी, सावडी इ. ठिकाणीं पसरला. ठिक–ठिकाणच्या विहिरींचें पाणी शुद्ध केलें व त्यामुळें १७ सप्टेंबर ३० पर्यंत बहुतेक सांथ ओसरलीच. गदग–बेट्टिगरी गांव व तालुक्यांत एकूण ८२–३९ मृत्यू झाले. बेळगांव जिल्ह्यांत ८ एप्रिल ३० रोजीं पहिला रोगी सांपडला. रोग असलेल्या ३०खेड्यां-पैकीं १९ खेड्यांचें पाणी कृष्णा नदीचें होतें. या तालुक्यांत ३१५ मृत्यू झाले. याचे खालोखाल चिकोडी तालुक्याचा क्रम लागतो. इतर ठिका-णच्या रोगाचे कारणांत दूषित नदीचें पाणी, पंढ-रीचे वारकरी व कोल्हापुराहून आलेले कांहीं रोगी हीं कारणें प्रमुख आहेत. बेळगांव जिल्ह्यांत ५९३ मृत्यू झाले. विजापूर जिल्ह्यांत सोलापूर जिल्हा, कुरुंदवाड व अक्कलकोट संस्थानें, व निजा-मचा प्रदेश या ठिकाणाहून रोगाची साथ आली. कृष्णा व घटप्रभा नद्यांमुळें रोग बराच फैलावला. मृत्यू १,३७३ झाले. दक्षिण भागांत ६ डॉक्टर्स नेमले. ३१,५०० इनॉक्युलेशन्स केलीं.

गुजराथ –कॉलऱ्यानें २९४ मृत्यू झाले. व त्यांतील २३९ नुसत्या पंचमहाल जिल्ह्यांत झाले. भडोच जिल्ह्यांत कॉलरा मुळींच नव्हता. दो द गांवीं ४६ मृत्यू झाले. सुरत जिल्ह्यांतील मांडवी व परडी या तालुक्यांत अनुक्रमें ६ व १२ मृत्यू झाले. खेडेगांवांतून हा रोग फैलावला नाहीं. बोर-सद गांवीं ३१ मृत्यू झाले. दोहद तालुक्यांत कॉल-ऱ्यासाठीं एक डॉक्टर मद्दाम नेमले होते. त्या जि-ल्ह्यांत १,२१० व सुरत जिल्ह्यांत ६१ कॉलरा प्रतिबंधक इनॉक्युलेशन्स् केलीं. ६०५ रोग्यांची शुश्रूषा केली. सिंधमध्यें कॉलऱ्याचा साथ नव्हता.

इनॉक्युलेशन्स्–यासाठीं २९ डॉक्टर्स नेमिले. ११ पश्चिमभाग, ११ मध्यविभाग; ६ दक्षिण-विभाग व १ गुजराथ.

खालीलप्रमाणें एकूण १३४,०९७ लोकांस कॉलरा इनॉक्युलेशन्स् केलीं:–५८,६२८ मध्य-विभाग, ४२,६९८ पश्चिमभाग, ३१,५०० दक्षिण भाग, १,२७१ गुजराथ भाग.

कॉलरा सांथीबद्दल झालेला खर्चः—कॉल-ऱ्याची सांथ उद्भवूं नये म्हणून सरकारनें ५००० रु. मंजूर केले. त्यांपैकीं ३,२६८ रु. खर्च झाले. याशिवाय प्लेग, कॉलरा व इतर सांथीविरुद्ध म्हणून ३४,०४० रु. मिळाले. त्यांपैकीं डॉक्टरांचा पगार, प्रवास खर्च इ. साठीं १५,०४७ रु. व इंजक्शनच्या लस खरेदीसाठीं १९,००० रु. खर्च झाले.

हगवण व आमांश

मृत्यू १९३०–२६,५३६, पैकीं १३,७९२पुरुष, १२,७४४ स्त्रिया. प्रमाण (१·३९). १९२९–२५,१०८ (१·३१) पंचवार्षिक–२५,७४५ (१·३४) कॉलऱ्याची सांथ जेव्हां चालू असते, तेव्हां हगवण या सदराखालील आंकडे थोडेसे मोठे दिसतात.कारण पुष्कळ वेळां,विशेषतः खेड्यां-तून कॉलऱ्याचें निदान हगवण असें चुकीनें केलें जातें. मागील कांहीं वर्षांचे आंकडे:–

१९०१–१९१०	५२,९१९	१९२४	२८,९२६
१९११–१५	३९,४५५	१९२५	२०,६४३
१९१६–२०	३४,१५६	१९२६	३४,१५८
१९२१	२६,७९९	१९२७	२५,४४७
१९२२	२१,११८	१९२८	२३,३७१
१९२३	२२,२३८	१९२९	२५,१०८
		१९३०	२६,५३६

मध्यविभाग ८,९०७, पश्चिमविभाग ६,४४४; दक्षिण ६,३३९; गुजराथ २,५४८; सिंध ८४६; मुंबई शहर १,४५२; पुढील प्रमुख शहरांतील मृत्यूप्रमाण जास्त आहे. सोलापूर (४·४१), रत्नागिरी (३·३४); बोरसद (३·३०); बारा-मती (३·१९); पंढरपूर (३·०६); नगर (२·८४); मालेगांव (२·७०); बेळगांव (२·६०) गोकाक (२·५०); सुरत (२·४६); जळगांव (२·४०).

आमांशः–मृत्यू १९३०–४०२४ (·२१) मृत्यु-प्रमाण १९२९–३'९६७ (·२१) मृत्युप्रमाण. बोरसद (२·८१); रत्नागिरी (२·७४),

कुर्ला (२·५३); व कारवार (१·४०) येथील प्रमाण सर्वांत जास्त आहे.

हगवण–मृत्यू १९३०–२२५१२ (१·१७) प्रमाण १९२९–२१,१४१ (१·१०) प्रमाण.

खालील शहरांतून हगवणीनें झालेल्या मृत्यूचें प्रमाण जास्त आहे.सोलापूर (४·३६), पंढरपूर (२·८२); मालेगांव (२·६६); बेळगांव (२·४९); गोकाक (२·४०); जळगांव (२·३६) नगर (२·३३); पुणें शहर (२·३३) सुरत (२·११); व कराची (१·८९).

प्लेग

१९२९ सालापेक्षां यंदा प्लेगचा उपद्रव बराच कमी झाला. किंबहुना १९२१ व १९२७ हीं वर्षें सोडलीं असतां, १९३० सालाइतके प्लेगनें कमी मृत्यू मुंबई इलाख्यांत कधींच झाले नाहींत. पुढील कांहीं मुख्य मुख्य आंकडे लक्षांत घेण्याजोगे आहेत.:–

१९०३	१८१,२६९	१९१९	९६२६
१९०४	२२३,९५७	१९२०	१३,८५७
१९०७	९३,६०९	१९२१	४,६७२
१९०८	२७३४५,	१९२३	३३,७४१
१९११	१००,३९९	१९२६	९,८६६
१९१४	२०,०६०	१९२७	४,०७६
१९१७	१६२,८७४	१९२९	१८,०१४
१९१८	७९,४७८	१९३०	५,०२६

धारवाड जिल्हा म्हणजे प्लेगचा कळसच होता. तेथें २,०६४ मृत्यू झाले,त्याचे खालोखाल बेळगांव १२,२०.पुढील कांहीं ठिकाणींसुद्धां प्लेग जोरांतच होता. सातारा (४६७); विजापूर (३६८); रत्नागिरी (२०९); सोलापूर (१९०); पुणें (११४) व ठाणें (१६५). पूर्व पश्चिम खानदेश व कुलाबा हे प्लेगपासून अलिप्त होते.

दक्षिणभाग––१९३०–३,७६३ (१·१८) प्रमाण. १९२९ –९,५४९ (३·००). खेड्यांतील मृत्यूप्रमाण (१·२३) शहरांतील प्रमाणापेक्षां (·७९) जास्त होते. धारवाड व बेळगांव जिल्ह्यांत प्लेगचा वर्षभर कहर झाला. जानेवारींत तर फारच झाला. सर्वांचे सहकार्यानें टोंचण्याचें काम जोरांत चाललें होतें. व लोकही आपखुषीनें येऊन भराभर टोंचून घेत.उंदीर पकडण्याचेंही काम जोरांत व व्यवस्थित चालू होतें. प्लेगनें त्रास पोहोंचलेल्या प्रदेशांत व आजूबाजूस त्यावरील प्रतिबंधक उपायांच्या छापील पत्रिका वाटल्या; व कांहीं ठिकाणीं मॅजिक लॅंटर्नद्वारां व्याख्यानें दिलीं. त्याचप्रमाणें प्लेगचा फैलाव होऊं नये म्हणून निपाणी, अथणी, शिरगांव, व बंकापूर येथील बाजार गांवाबाहेर नेले. एकूण ८९,०९८ लोकांनीं टोंचून घेतले. धारवाड ४९,५९३; बेळगांव १८,८४४ विजापूर १३,१२८; व कानडा ७,५३३. ब्याडगी व बागलकोट येथील खाजगी डॉक्टरांनीं फारच मदत केली. याशिवाय यंदा फक्त धारवाड जिल्ह्यांसाठीं २ जादा इनॉक्युलेटर्स नेमले. निरनिराळ्या ठिकाणीं मिळून १२२,१२० उंदीर मारले. बेळगांव व जिपूर या गांवांतून बेरियम कार्बोनेट विषाच्या गोळ्या उपयोगांत आणल्या, त्यामुळें तेथें अनुक्रमें फक्त ३ व २ असे मृत्यू झाले.

मध्यविभागः––मृत्यू १९३०–९९२ (·२१) १९२९–६,७४६ (१·४६). ९९२ मृत्यूंची विभागणी येणेप्रमाणें. सातारा जिल्हा ४६७; रत्नागिरी जिल्हा. २०९; सोलापूर जिल्हा १९०; पुणें जिल्हा ११४; नगर जिल्हा १२. जानेवारींत फारच जास्त म्हणजे ३७० मृत्यू झाले. ५,८६८ खेड्यांपैकीं फक्त ११४ खेड्यांतून प्लेग फैलावला. सातारा जिल्ह्यांत खुद्द जावळी तालुका,सातारा, कऱ्हाड, व इस्लामपूर हीं गांवें प्लेगपासून अलिप्त होतीं. खेड्यांपैकीं शिराळें, व पाटण येथें सांथीचा जोर होता. प्लेगमध्यें साधारणतः पुरुषापेक्षां स्त्रिया जास्त दगावतात असा अनुभव आहे. सोलापूर जिल्ह्यांत बार्शी गांवीं जास्त मृत्यू झाले (१९० पैकीं १३०). रत्नागिरी जिल्ह्यामध्यें खेड्यांपैकीं दापोली तालुक्यांत जास्त (३४) मृत्यू झाले. चिपळूण येथें ११५ मृत्यू झाले. पुणें जिल्ह्यांपैकीं पुरंदर, भिमथडी व इंदापूर या टापूंमध्यें सांथ जोरांत होती. एकूण ११४ मृत्यूपैकीं ८८ मृत्यू एकट्या बारामती गावांत झाले. या विभागांत १६,८८२ लोकांस टोचलें. रत्नागिरी खेरीजकरून ७ जादा इनॉक्युलेटर्स नेमिले होते. याशिवाय प्रतिबंधक उपाय जोरांत चालूंच होते. ८ गांवांत मिळून १,५२,८२२ उंदीर पकडले. यांपैकीं ६३,२४१ नुसत्या सोलापूर शहरीं पकडले.

पश्चिम भागः––मृत्यू १९३०–२०७, १९२९ १,५९७ पैकीं ठाणें जिल्ह्यांत १६५, नाशिक ३२, व मुंबई सबर्बन १०. जून व नोव्हेंबर खरीज सबंध वर्षभर ठाणेंजिल्ह्यांत प्लेग होता. फक्त ११८६ लोकांस टोंचलें. ठाणें ६५६; नाशिक २४२; मुंबई (स.) २८८. मालेगांव व धुळें म्यु. नीं अनुक्रमें १३,१५२ व २९,६२१ उंदीर पकडले.

गुजराथ–या प्रांतांत फक्त सुरत जिल्ह्यांतच

प्लेग होता, व त्यामुळें ४४ मृत्यू झाले. प्रतिबंधक उपाय चालूच होते. १,७५५ इनॉक्यु. केलीं.

सिंध—गुदस्ता प्रमाणेंच यंदाही येथें प्लेग नव्हता यंदा निरनिराळ्या ठिकाणीं मिळून १,३३,१११ उंदीर पकडले. मुंबई शहरांत ५,९९,२९२ उंदीर पकडले. त्यांपैकीं ६९१ प्लेगनें लागलेले होते.सर्व इलाख्यांत यंदा १४,५,३४९ इनॉ. केलीं. त्यांपैकीं १,०९,४०० ब्रिटिश हिंदुस्थान, ३५,९४९ संस्थानें. निरनिराळ्या जिल्ह्यांतून पुढीलप्रमाणें इनॉक्यु-लेशन्स् केलीं. ४९,५९३ धारवाड; १८,८४४ बेळगांव; १३,१२८ विजापूर; ७,५३३ कानडा; ६,२७३ सोलापूर; ४,५५२ रत्नागिरी; ३,२२२ पुणें; २,३७७ सातारा; १,७५५ सुरत; ६५६ ठाणें; ४५८ नगर; २८८ मुंबई उपनगर; व २४२ नाशिक जिल्हा.

देवी (Small Pox):—१९२९ पेक्षां १९३० सालची सांथ फारच जोराची होय, हें पुढील आंकड्यांवरून सहज कळून येईल:— मृत्यू—१९३०—२१,३४१ (१·११) मृत्य-प्रमाण १९२९—१०,६३५ (·५६).शहरांतील मृत्यूप्रमाण (१·८०) खेड्यांपेक्षां (·९५) बरेंच जास्त होतें. मागील कांहीं वर्षांचे आंकडे पुढें दिले आहेत.

१९०१—१९१०	४,९६२	१९२५	५,६४४
१९११—१९२०	५,०७४	१९२६	३,९२२
१९२१	१,७७१	१९२७	५,०९१
१९२२	१,१७०	१९२८	५,२६५
१९२३	२,८११	१९२९	१०,६३५
१९२४	११,१५१	१९३०	२१,३४१

सिंधशिवाय इलाख्यांतील सर्व जिल्ह्यांतून देवी जोरांत होत्या. त्यांतल्या त्यांत गुदस्ताप्रमाणें यंदाहि पश्चिमभागांत जोराची सांथ होती. पू. व प. खानदेशांत मिळून ५,६२८ मृत्यू झाले. गुज-राथमध्येंही सांथ जोराची होती. पुणें (१·४०); नगर (.५१); सातारा (·४८); सोलापूर (·४०) विजापूर (·५२) बेळगांव (·४०); या ठिकाणींही मृत्यू—प्रमाण जास्तच होतें. मुंबईशहरांत गुदस्ता-पेक्षां (१·१२६) यंदा (१·६७१) मृत्यू अधिक झाले. खालील प्रमुख ठिकाणीं मृत्यू—प्रमाण जास्त पडलें:—एरंडोल (८·७२); पुणें शहर (६·५९); भडोच (६·१७); अमदाबाद—लष्कर (५·१६); मालेगांव (४·५४७); अहमदाबाद (३·१३); धुळें (२·९९); हैद्राबाद (२·४९).देवीनें झा-लेल्या मृत्यूपैकीं (२१,३४१). ६७३३ मृत्यू एक वर्षाखालील व १०,८४९ मृत्यू १—१० वर्षांचीं मुलें होतीं. शें. ९५ मृत्यू पहिल्या सहामाहींत झाले.

मृत्यू कोठें व किती झाले तेः— पश्चिमभाग ९,९४३; गुजराथ ५,०९४; मध्यविभाग २,९०८; दक्षिण भाग १,२१६; सिंध ५०९; गुदस्ता हेच आंकडे अनुक्रमें ५,१४४; १,१७१; १५९५; ८५२ व ७४७ होते.

पश्चिम भागः—मृत्यू १९३०—९,९४३ पैकीं ३,३३४ एक वर्षाखालील. १९२९—५,१४४. नुसत्या फेब्रुवारींतच २,८२४ मृत्यू झाले. देवी काढण्याचें काम जोरांत चालू केलें. ४१ नवीन देवी काढणारे नेमिले. व मॅ. लॅंटर्नद्वारां व्याख्यानें देण्यांत आलीं. व त्यामुळें लोकांनीं पुन्हां देवी काढून घेतल्या. लहानपणीं एकदां देवी काढल्या कीं जन्मभर भीती नाहीं अशी लोकांची खोटी समजूत झालेली दिसते. इतके प्रयत्न केले तरी गेल्या वर्षापेक्षां यंदाची सांथ दुप्पट जोरांत उद्-भवली. पण हें प्रयत्नही जर थांबवले असते तर कहरच उडाला असता.

गुजराथः—मृत्यू १९३०—५,०३४ पैकीं १,७७० एक वर्षाखालील मुलें. १९२९—१,१७१. रोगास सुरवात डिसेंबरांत होऊन फेब्रुवारींत कळस झाला. (१,४३० मृत्यू). भडोचचें मृत्यप्रमाण (३·००) सर्वांत जास्त, व पंचमहालचें (१.०७) सर्वांत कमी होतें. देवी टोंचण्याचीं वगैरे कामें जोरानें चालू केलीं व नवीन देवीडॉक्टर नेमिले.

मध्यविभागः—मृत्यू १९३०—२,९०८ पैकीं, ७९४ एक वर्षाखालील मुलें. १९२९—१,५९५. पहिल्या सहामाहींत २,६१७ व दुसऱ्या सहामाहींत फक्त २९१मृत्यू झाले. फेब्रुवारींत (६८२) जास्त मृत्यू झाले. देवी काढण्याचे काम जून अखेर चालू होतें.

दक्षिणविभागः—मृत्यू १९३०—१,२१६पैकीं ३३१ एक वर्षाखालील मुलें. १९२९—८५२. मार्च महि-न्यांत (२१०) जास्त मृत्यू झाले; व आक्टोबरमध्यें (२१) फार कमी झाले. एकूण ६२ टापूं पैकीं ५४ ठिकाणीं देवी फैलावल्या.सर्व ठिकाणांपेक्षां विजापूर जिल्ह्यांत (३९१ मृत्यू) फार लोक मरण पावले. बेळगांव जिल्ह्यांत ३७९; व धारवाड जिल्ह्यांत ३०६ मृत्यू झाले. कर्नाटकांत सर्वांत कमी (१४०) मृत्यू झाले. निरनिराळ्या ठिकाणीं जादा देवी-डॉक्टर नेमले, व कांहीं ठिकाणीं रोगप्रतिबंधक मंडळें स्थापून प्रतिबंधक उपाय जोरानें अमलांत आणलें.

सिंधः—मृत्यू १९३०—५०९पैकीं५६ एक वर्षा-खालील मुलें. १९२९—७४७. कराची शहरांत ७९ मृत्यू झाले.हैद्राबाद येथें १८१ मृत्यू झाले. म्यु.

नें सर्व प्रतिबंधक उपाय योजले; शाळांमधून देवी न काढलेल्या मुलांस देवी काढल्या.

इलाख्यांतील कोणत्या हॉस्पिटलमध्यें किती रोगी होते. :–सर्व हॉस्पिटलमधून यंदा ४३८ व गुदस्ता ३२२ रोगी होते. पैकीं अनुक्रमें २१० व १५३ रोग्यांना देवी काढल्या होत्या. यंदा ४३८ पकीं १७५ रोगी देवी न काढलेले होते. पुण्याच्या सांसर्गिक रोग इस्पितळांत सर्वांत जास्त (२२७) रोगी होते; नंतर कराचीं एपिडेमिक डीसीझेस हॉस्पिटल येथें ५९ रोगी होते.

अपघातः—मृत्यू १९३०–७,६४५. ४,३०७ पुरुष व ३,३३८ स्त्रिया. १९२९–८,२७७. पंचवार्षिक ७,९०७. मागील ३० वर्षांचे आंकडे पाहिले असतां ते ६,८७९ व ८,२७७ यांचेमधील आहेत.

सर्पदंशानेंमृत्यूः—१९३०–१,३६९. १९२९–१,५१४. सर्वांत जास्त मृत्यू रत्नागिरी-जिल्ह्यांत (२५३) झाले. नंतर ठाणें (१७३); सातारा १०२; थर व पारकर ७३; प. खानदेश ५२; अमदाबाद ५२, कुलाबा ५१; हैद्राबाद ५० व नाशिक ४८. दक्षिण भागांत सर्पदंशानें १२२ मृत्यू झाले. एकूण ९७ मृत्यूंची चौकशी केली. पैकीं ३१ मृत्यू नागदंशामुळें (Cobra) १–१३ तासांच्या अवधींत झाले. गुजराथेंत १६२ मृत्यूं-पैकीं ५७ "'Krait' दंशानें; व २१ नाग (Cobra) दंशानें "Krai't' नें ३० तासां-पर्यंत व नागानें १८ तासापर्यंत मरण लांबलें.

श्वानदंशानें मृत्यूः–१९३०–१४३. १९२९–१६६. सातारा १२; सोलापूर ११; नाशिक १०; पू. खानदेश १०; बागलकोट ५; हैद्राबाद ५; अहमदाबाद ४. व सोलापूर शहरांत ६.

खूनः—दक्षिण भागांत ११८ खून झाले. बेळ-गांव ५७; धारवाड ३३; विजापूर २६; कर्नाटक २. आत्महत्याः– मृत्यू १९३० –६०५ ३४२ पुरुष २६३ स्त्रिया. १९२९–६३३ पैकीं ३६४ पुरुष व २६९ स्त्रिया.

इतर कारणांमुळें मृत्यूः—या सदरांत साधारणतः खालील गोष्टींमुळें झालेले मृत्यु येतात. अशक्तता, वार्धक्य, संधिवात इ. व रजिस्ट्रारचे चुकीनें इतर सदरांत भरावयाचे राहिले असे मृत्यु. एकूण मृत्यूंपैकीं 'इतर कारणें' या सदराखालीं ⅔ मृत्यु येतात. व ही संख्या साधारणपणें स्थिरच असते. या आंकड्यांवरून एकंदर जनतेचें आरोग्य-मान अनुमानतां येतें.

मृत्यू १९३०–८३,५२५ पुरुष, ८३,८३६ स्त्रिया, एकूण १,६७,३६१. १९२९– एकूण १६७,६०४.


बाळंतपणाचे वेळीं आलेले मृत्युः–१९३०–४,६०१, १९२९–४,९८७. यांपैकीं पश्चिम, मध्य, दक्षिण, गुजराथ व सिंध विभागांत अनुक्रमें ८४७; ९९५; १००७; ५८१ व ९८५ मृत्यू झाले. मुंबई शहरांत १८६ मृत्यू झाले. या संबंधानें सर्व इलाख्याचें सरासरी प्रमाण पाहिलें तर यंदा १५६ सुखरूप बाळंतपणांस १ बाईचा मृत्यु असें प्रमाण पडलें. शहरचें प्रमाण खेड्यापेक्षां पुष्कळच जास्त भरलें. निरनिराळ्या विभागांतील मृत्यूंचें प्रमाण सिंध ७० बाळंतपणें : १ आईचा मृत्यु; दक्षिण भाग (१३०:१); मध्य-विभाग (१९५:१); गुजराथ (१००:१) पश्चिम भाग (२१३:१); मध्यविभाग–सातारा शहरांत हें प्रमाण फारच जास्त पडतें (२५:१). बार्शी गांवीं बालजन्मानें एकही मृत्यू झाला नाहीं. पुणें शहर व सोलापूर येथील प्रमाण फारच वाढत चाललें आहे. अनुक्रमें (१०:१) व (९१:१) खालील कांहीं जिल्ह्यांचें प्रमाण जास्त आहे.– नाशिक (१०५:१); रत्नागिरी (१२०:१); बेळगांव (१५३:१); ठाणें (१६३:१); सोलापूर (१७२:१); धारवाड (१८१:१); कुलाबा (१८७:१); विजापूर (२२३:१); इलाख्याशीं तुलना केली असतां सिंधमध्यें बालजन्मापासून फार मृत्यू येतात. लारखाना (१६:१); सक्कर (२६:१); हैद्राबाद (८६:१); कराची (१२७:१). खालील कांहीं शहरांत बालजन्मा-मुळें मृत्यूचें प्रमाण जास्त आहे. सातारा (१:२५); मालेगांव (३७:१); नाशिक (४०:१); रत्नागिरी (४२:१); पंढरपूर (५०:१); अमदाबाद (५५:१); भडोच (६२:१); सुरत (७६:१ नगर (८७:१); सोलापूर (९१:१); पुणें शहर (११०:१).


देवी काढणेंः—

प्रत्येक विभागांतील प्रत्येक जिल्ह्यांवर सन १९१० सालाप्रमाणें देवी काढण्याबाबत त्या त्या लोकल बोर्डाचीच हुकमत चालूं होती.

(नवीन) देवी टोंचणेंः— १९३०–३१ मध्यें ५९४,६११ लोकांनीं नवीन देवी काढल्या. १९२९ मध्यें ६६२,०१८ लो. नवीन देवी काढल्या. यावरून ६७,४०७ इतका ,आंकडा घटल्याचें दिसतें. दक्षिणभाग व सिंध याखेरीज सर्व ठिकाणीं यंदा कमी लोकांनीं देवी काढून घेतल्या. एकूण ५९४,६११ मुलांना प्रथमतः देवी काढल्या. पैकीं ५३१, ९९१ किंवा शे.८९·४९ इतक्यांच्या

१८९६ ते १९३० पर्यंत खालसांतील
प्लेगचे चढउतार.





देवी चांगल्या निघाल्या व १,०५२ किंवा १८ च्या चांगल्या निघाल्या नाहींत. १८१ मुलांना पहिल्या देवी नीट निघाल्या नाहींत म्हणून पुन्हां काढल्या. वय व लिंगः—१ वर्षाचे आंत ४१२,१५५ किंवा ७०·९९. १ ते ६ वर्षे १४८२६६ किंवा २४·९३. मुलगे ३१०१२७. मुली २८४,४८४. प्रमाण १०९·०१ : १००.जन्माचें प्रमाण १०७.९६: १०० असें आहे.

पुन्हां देवी काढणें:—१९३०—३३१,३४४ यांपैकीं शें. २९·३४ देवी नीट काढल्या गेल्या. ४७·५१ चेंकाय झालें हेंकळलें नाहीं.१९२९—४८२,२६७.

कराची येथील यात्रेकरूंना देवी काढणें:— यासाठीं एक पुरुष व एक स्त्री कराची येथें नेमिली. एप्रिल व डिसेंबर १९३० ते मार्च १९३१ पर्यंत ४,५५८ यात्रेकरूंना देवी काढल्या. पैकीं ३,५४२ पुरुष व १,०१६ स्त्रिया होत्या. एकूण खर्च ९०५ रु. ९ आ. १ पै. आला, व तो सरकारांतून मिळाला.

संस्थानांतील देवी काढण्याचें कामः—

प्रथम देवी काढल्याः—१९३०—३१:१२७,१७६ १९२९—३०:१२५,५५८.

पुन्हां देवी काढल्याः—१९३०—२८,२९७. १९२९—३२,९११. यावरून असें दिसतें कीं, १९३०—३१ मध्यें संस्थानें व ब्रि. हिंदुस्थान मिळून ७२१,७८७ लोकांना प्रथमच व ३५९,६४१ लोकांना पुन्हं देवीकाढल्या.

देवीनें आलेले मृत्युः—

एकूण १४,०४८ मृत्यु झाले. त्यांपैकीं पूर्व व पश्चिम खानदेशांत मृत्यू फारच झाले.

देवी काढण्याची खटपटः—यंदा हें काम जानेवारी १९३० मध्येंच चालूं केलें. शाळेतील मुलें, पोलिस लाइन्स् व यात्रा येथें शक्य तितके लवकर व व्यवस्थित काम पार पाडलें.

लस —सर्व इलाख्याभर बेळगांवच्या कारखान्यांत झालेलीच लस वापरली.

देवी काढणेबाबत खर्च :—१९३०—रु. ६,५७,६४१. १९२९— रु. ६,४३,१४७. यंदा पश्चिम भागासाठीं एक कायमचे Assist. Director of public health नेमले. व इतरांची पगारवाढ केली, म्हणून खर्च जास्त झाला. यावरून असें दिसतें कीं, एका मनुष्यास नीट देवी काढण्याबाबत रु. १—०—९—इतका खर्च आला. १९२९ सालीं रु. ०—१५—५ इतका खर्च आला.

बेळगांव येथील लस काढण्याचा कारखाना

सर्व भागांतून देवी काढण्याचें काम जोरानें चालू असल्यामुळें यंदाही बरीच लस तयार करावी लागली.. १९३०—१,४१४,०९०,भाग, यांपैकीं १,०९८,४९१ इतके भाग उपयोगांत आले. १९२९—१,८२०,२३०,भाग बडोदा, कोठा, झालवार, काठेवाड, पालनपूर, मही काठा एजन्सीज्या व इतर ठिकाणींही लस पुरविली. मुलकी व लष्करी डॉक्टरांनां सुद्धां लस पुरविली.

वासरें:—वर्षाच्या सुरवातीस १६४ वांसरे होती. पुढें ७२६ वासरे व ४ गाढवें भाडयाने घेतलीं पैकीं वर्षाचे शेवटीं ९३ वासरें व २ गाढवे शिल्लक होती. २४ वांसरांची लस वापरण्यास अयोग्य होती.

गुरांचा रोगः—ज्या ठिकाणाहून वासरें मिळतात तेथें Rinder Pest नांवाचा रोग सबंध वर्षभर होता. त्याचे प्रतिरोधक उपाय बरेच केले.

साधनें:—थंड हवेची खोली बांधण्यासाठीं यंदाचे सालीं सरकारनें २१,००० रु. मंजूर केले.

एकंदर खर्चः—१९३०—रु. ७३,१६३—११—३. १९२९—रु. ८३,१९४—१४—१० यावरून यंदा १०,०३१—३—७ रु. इतका कमी खर्च आला. याचें कारण म्हणजे कमी लस तयार केली. लस विकून व देणग्या मिळून ७७,८११—१०—३ इतके रु. जमले म्हणजे ४,६४७—१५ इतका फायदा झाला. सक्तीनें देवी काढणें—मुंबई, एडन, अहमदाबाद, पुणें, नगर, खडकी, हैद्राबाद, बेळगांव, देवळाली इ. गांवें सोडल्यास १७ ठिकाणीं सक्तीचा कायदा चालू केला. यासाठीं एकूण ३७६ खटले केले; पैकीं कराची गांवींच ३१० खटले झाले. ठिकठिकाणीं सक्तीच्या देवी टोंचणें सुरूं व्हावें म्हणून म्यु. ना विनंति करण्यांत आली. १ जुलै ते ३०सप्टेंबर १९३० पावेतों देवी डॉक्टर तयार करण्यासाठीं क्लास काढला होता. त्यामध्यें २२ विद्यार्थी आले व सर्व पास झाले. याशिवाय आणखी २ देवी काढणारे व ३ उमेदवार देवी डॉक्टर पश्चिम भागासाठीं नेमले. गुजराथेंत एक मागासलेल्या जातीचा हिंदू उमेदवार ठेवला. व मध्यभाग व सिंध भागांत एक मुसलमान उमेदवार ठेवला. दक्षिण भागांत एका मसलमानास कामावर नेमले.

आरोग्य संस्था व त्यांचीं कामें Sanitary Works:—

म्युनिसिपालिटया:—एकूण म्यु. १५५ आहेत. व त्यांच्या ताब्यांत २,६७८,५४२ लोकसंख्या

आहे. यंदा ४४५,२४,१२२ रु. वसूल झाले; त्या पैकीं शें. ३६·६९ किंवा १,६३,३६,५४८ रु. कराचे रूपानें वसूल झाले. म्हणजे दरमाणशीं ६ रु. १ आ. कराची सरासरी पडतें. हें प्रमाण सर्वांत जास्त कराचीस (रु. १५–७–०) व कमी बेटवाड (प. खानदेश) (१४आ.)येथें आहे.खालील प्रमुख म्यु. चीं उत्पन्नें व करांचे आंकडे (दरमाणशीं) ध्यानांत घेण्याजोगे आहेत.

	उ.रु.	क.रु		उ.र.	क.र.
मुंबई	२५	२२	पुणें	१४	८
कराची	१८	१५	सुरत	९	७
अहमदाबाद	१३	९	सोला.	९	६

सर्व युरोपमध्यें आरोग्यासाठीं दरमाणशीं सरासरीनें रु. ३ खर्च केला जातो. कराची म्यु. मध्यें हा खर्च रु. ५ होतो. इलाख्यांतील एकूण १५५ म्यु. पैकीं १२२ ठिकाणीं देवी, ३३ ठिकाणीं प्लेग, ६० ठिकाणीं कॉलरा व ८ ठिकाणीं इन्फ्लुएंझाचा असे रोग फैलावले. १९३० सालचे जन्म–मृत्यूचे निरनिराळ्या म्यु. मधील आंकडेः––

प्रांत	म्यु.पाल. संख्या	लोकसंख्येशीं जनन संख्येचें दर हजारीं प्रमाण	लोकसंख्येशीं मृत्यूचे दर हजारीं प्रमाण कॉलरा–	देवी––	प्लेग–	इन्फ्ल्युएंझा–	सर्व कारणें
अहमदाबाद	८	४९·६६		·४४		·०१	४६·२२
खेडा	८	४२·८४	·३४	३·३१		·०२	३९·११
पंचमहाल	२	३५·८५	१·०५	२·७२			२८·९०
भडोच	३	४६·१८		५·८८			३५·६५
सुरत	३	४१·१२		५·०९	·०१		४०·४९
ठाणें	४	२२·३८	·०८	२·१४	·६६	·०२	२३·४२
पूर्व खानदेश	१२	३३·५७	·६३	२·६९			२८·१९
पश्चिम खानदेश	७	४७·९८	१·६९	३·९९		·०१	३७·५७
नाशिक	९	२६·०५	१·२७	१·४१	·०२		२७·५२
अहमदनगर	२	३८·४५	·५२	·२८		·०२	२५·१३
पुणें	११	३५·००	·४८	४·७७	·४५		३९·७१
सातारा	१२	२५·३८	१·६७	·५१	·०२		२६·०४
सोलापूर	५	४०·६२	२·२५	·४०	·२२		४५·३४
बेळगांव	६	३१·२७	·३०	·५४	१·२२	·०१	२६·३१
धारवाड	९	३५·६७	·५२	·२७	·९३		२७·४३
विजापूर	४	३९·२१	·३९	१·०४	१·५०	·०१	३५·८८
कारवार	८	२९·२४		·०८	१·५६		२७·१२
कुलाबा	७	२२·९५	·२५	·३०			१८·४३
रत्नागिरी	४	२५·३७	·०३	·२४	२·०५		२१·५९
कराची	५	५०·८३		·३७		·०३	२८·१८
हैद्राबाद	६	३४·५२		१·९०			२७·१३
लारखाना	५	२८·७२		·०५			२७·३६
थर व पारकर	२	१७·९५		·२०			२०·३७
नबावशहा	२	२८·३८					१६·२५
सक्कर	५	२६·५६		·०३			३०·९८
अपर सिंध फ्रँटि.	१	१०·५९					१९·२१
मुंबई उपनगरें	४	२४·७५		·१७	·०८	·०२	२०·७२

ठिकठिकाणच्या असिस्टंट डायरेक्टर्सनीं म्यु. ना आरोग्यविषयक बऱ्याच सूचना केल्या. त्याप्रमाणें पुष्कळ म्यु. नीं निरनिराळीं कामें केलीं. कामें खालील तऱ्हेचीं होतीं. मुताऱ्या बांधणें, पाणी स्वच्छ ठेवणें, नवीन तऱ्हेचीं गटारें करणें; घाणे-रड्या वस्तींतून स्वच्छता राखणें, कचरा लवकर बाहेर काढणें इत्यादि.

म्यु. मधील आरोग्य खातीं:–कराची, हैद्राबाद, अहमदाबाद, सुरत, पुणें, सोलापूर, या ठिकाणचे हेल्थ ऑफिसर्स चांगल्या तऱ्हेचे पदवीधर (Qualified) आहेत. शिवाय भडोच, वांद्रें, नगर व विजापूर येथील हेल्थ ऑफिसरही पदवीधर आहेत.

४६ गांवांतून खालीलप्रमाणें सॅनिटरी इन्स्पे-क्टर्स नेमले:—अहमदाबाद१५, पुणें ८, सोलापूर ७, सुरत ७, कराची ३, सक्कर ३ नाशिक, विजा-पूर, बेळगांव, हुबळी, गदग, नगर इ. ठिकाणीं प्रत्येकीं २, व बाकीच्या ठिकाणीं प्रत्येकीं १.

जिल्हा व तालुका लोकल बोर्डस्:—

जिल्हा २७व २२२ तालुका लो.बो.चें उत्पन्न एकूण १,६२,८३,९५७ रु. झालें. म्हणजे उत्पन्न व कर अनुक्रमें दरडोई १८– व ।–।; उत्पन्नापैकीं २९८६,२३४ रु. रस्तादुरुस्ती व९,२०,५१७ रु. आरोग्य खात्या-कडे खर्च केले. निरनिराळ्या विभागांतील रस्ता दुरुस्ती व पूल बांधणें यासाठीं सरकारनें डि. लो. बोर्डस्च्या ताब्यांत खालील प्रमाणें रकमा दिल्या. उत्तर भाग–३,३१,५००,रु. मध्यविभाग–५,४०,५०० रु. यामध्येंच मुंबई सबर्बनचा समा-वेश होतो. दक्षिण भाग–३,३७,५००. सिंध—३,४०,५००. अहमदाबाद डि. लो. बो. अहमदा-बाद धोलका रस्त्यावरील पूल पुन्हा बांधण्यासाठीं मुद्दाम ५०,००० रु. दिले.

खालील विभागांत पाणीपुरवठ्यासाठीं सर-कारनें पैसे दिले:— उत्तर विभाग ८५००० रु. मध्यविभाग ६०,००० रु. यांतच मुंबई उपनगरां चा समावेश होतो. दक्षिणविभाग ६१,००० रु. सिंध विभाग ३६,००० रु. सरकारजवळ शिल्लक ५,०००. रु. वरील रकमांतून आणखी पैसे घालून विहिरी, तळी, व हौद बांधण्यांत आले.

नोटिफाईड एरिआज्:—असे भाग एकूण २७ आहेत त्यांमधील वस्ती १०४,९४४ व शेतसारा उत्पन्न ४,२३,८५१ रु. आहे. म्हणजे माणशीं ११। आणे उत्पन्न येतें.

आरोग्य मंडळें व गांवपंचायतीः—ही दोन्ही मिळून ५७५ संस्था होत्या.

पुष्कळ ठिकाणीं अ. डायरेक्टर्सनीं जाऊन तपासणी केली व सूचनाही केल्या. बहुतेक ठिकाणीं लोकोपयोगीं कामें कसोशीनें चालू आहेत.

पब्लिक हेल्थ खात्याच्या प्रयोग शाळा:—

पुणें:–ही शाळा डॉ. एफ्. बॅरेटो D.P.H. यांचे ताब्यांत होती. येथें पुणें (कॅंटो. व शहर), पाषाण व होळकर पूल येथील दररोजचा पाणी पुरवठा तपासला जातो. याशिवाय म्युनिसिपालिटचा, रेल्वे, सरकारी संस्था, संस्थानें व खाजगीसंस्था कडून पाण्याचे नमुने तपासण्यासाठीं येत. त्यांतील मुख्य मुख्य खालीं देत आहों:—(१) पूना वॉटर वर्क्सकडील नमुने:–

कालव्याच्या पाण्याचे २६४; फिल्टर पाण्याचे २७७; निवळलेल्या पाण्याचे १४४; तुरटीमिश्रित पाण्याचे १३०; व शुद्धपाण्याचे ३७७.

(२) पुणें शहर म्यु. कडून २६४ कालव्याचें पाणी, २८० क्लोरीनमिश्रीत नळीचे पाणी, याशिवाय २,७८८ नमुने क्लोरिनचें व २८१, तुरटीचे प्रमाण किती आहे, हें तपासण्या-साठीं आले होते.

पुण्यांतील पाण्याचें शुद्धीकरण (क्लोरिनेशन):-कॅन्टोन्मेंट वॉ. सप्लायमध्यें सरासरीनें पाण्याच्या दर दशलक्ष भागास ०·२९५ भाग क्लोरीन असें प्रमाण आहे.

पुणें शहरचें पाणी शुद्ध करण्यास फिल्टर नाहीं. फक्त क्लोरीन टाकूनच पाणी शुद्ध केलें जातें गुदस्तापेक्षां यंदा पाणी जास्त शुद्ध होतें. दशलक्ष भाग पाण्यास ०·४२७ भाग क्लोरीन असें प्रमाण आहे.

उत्सव व यात्रा:–पंढरपूर:—यंदाची एकादशी ६ जुलै ३० रोजीं होती. नेहमीप्रमाणें सर्व तरतूद ठेवली होती. शिवाय जी. आय.पी. रेल्वे व सोला-पूर सि. सर्जन यांचीही मदत झाली. पंढरपुरास ६ डॉक्टर्स व २० मेडिकल विद्यार्थी नेमले. स्टेशना-वर येणारे जाणारे यात्रेकरू तपासले. सांथीचे रोग तपासण्यासाठीं ३ डॉक्टर्स व १२ विद्यार्थी नेमले होते. याशिवाय शौचकूप, पाणी व अन्न य. विषयींची शक्य ती सर्व काळजी घेतली.

आळंदी:–यंदाची कार्तिकी एकादशी १६ नोव्हें-बर ३० रोजीं होती. मध्य भागच्या अ. डायरेक्टरनें जाऊन सूचना केल्या. कॉलरा अजिबात नव्हता.

नाशिक व त्रिंबक:—निवृत्ति यात्रेला २०,००० यात्रेकरू आले. आरोग्य न बिघडण्यासाठीं सर्व

तऱ्हेची व्यवस्था केली होती. इंद्रकुंड व कुशावर्त येथील पाणी शुद्ध केलें. जानेवारी, फेब्रुवारी, मे व जुलै मध्यें कुशावर्त तळें मोकळें करून स्वच्छ केलें. नाशकास खालीलप्रमाणें मृत्यू झाले. कॉलरा ३०, देवी ४७, प्लेग ३. त्रिंबक येथें कॉलरा १, देवी २. याशिवाय सौंदत्ती–यल्लामा, यमनूर, अष्टदशा, शुक्लतीर्थ, डाकोर, शाहबाज इत्यादि ठिकाणच्या यात्रा झाल्या. तेथेंही वरीलप्रमाणें आरोग्य राखण्यासाठीं तरतूद केली होती.

आरोग्य मंडळें:–इलाख्यांत अशीं एकूण १७ मंडळें आहेत. त्यांतील खालील प्रमुख आहेत.:– (१) कराची हेल्थ असोसिएशन याचेतर्फे भेरूमल ठाकूरदास सूतिकागृह चालविलें आहे. येथें यंदा १,०५३ बाळंतीणी आल्या. याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. (२) रेडक्रॉस व हेल्थ सोसायटी हैद्राबाद यांचेही स्त्रिया व मुलें यांचे संगोपनाचें काम चालू आहे. (३) हमीदअल्ली रेडक्रास प्रसूतिगृह, लारखाना येथें यंदा १५४ बाळंतपणें केलीं. येथें स्त्रियांचें इतर रोगांवरही उपचार केले जातात. (४) सुरत सॅनिटरी असोसिएशन यांनीं म्यु. च्या सहकार्यानें चांगलें काम केलें. सदीप व सिनेमा इत्यादि प्रकारानें व्याख्यानें दिलीं. (५) अहमदाबाद सॅनि. असो. शहराचे निरनिराळ्या भागांत एकूण ५४ सदीप व्याख्यानें दिलीं. (६) पनवेल मॅटर्निटी व इन्फंट वेलफेअर लीग यांनीं एक सूतिकागृह चालविलें आहे. यंदा १०७ बाळंतपणें केलीं. (७) कुलाबा मॅटर्निटी हॉस्पि. व नर्सिंग होम यांनीं १,०८४ स्त्रिया, ६५६ मुलें यांना उपचार केले. व १३१ बाळंतपणें पार पाडलीं. (८) मॅटर्निटी चाइल्ड वेल्फेअर सेंटर तारापूर हें डॉ. आर. ए. बर्वे यांचे देखरेखीखालीं आहे. ३४० औट डोअर व ३५ इन डोअर रोगी आले. त्यांत ९वर शस्त्रक्रिया केली. (९) जळगांव आरोग्य मंडळ–देवी व कॉलरा प्रतिबंधक उपायांच्या जाहीराती वाटल्या. व १०० मुलांची वैद्यकीय तपासणी केली. (१०) रेडक्रॉस सोसायटी, बेळगांव शाखा, यांनीं एकमोठें काम चालविलें आहे. घरोघर जाऊन रोग्यांची शुश्रुषा केली जा ते याप्रमाणें १,३२३, रोग्यांना पाहिलें. याशिवाय सदीप व्याख्यानेंही दिलीं जातात. (११) दि लेडी विल्सन व्हिलेज मॅ. असोसिएशन पुणें:–या संस्थेनें निरनिराळ्या ठिकाणीं बरेंच काम केलें. पुणें, धारवाड, प. खानदेश, पूर्व खानदेश, सोलापूर या जिल्हयांतून सुशिक्षित दाया तयार केल्या.

आरोग्य व बालसप्ताह:––सिंध विभाग.–– या भागांत सक्कर जि.लो.बोर्डतर्फे मिरपूर मथेलो येथें ११व १२ फेब्रुवारी १९३० रोजीं बालसप्ताह साजरा केला. सप्ताहांत एकूण १२० मुलें आलीं होतीं. त्यांना आरोग्यमान पाहुन बक्षिसें दिलीं.

गुजराथ विभाग:––ता. १२।१३ मार्च रोजीं १९३० तलोद व त्याच महिन्याच्या १६।१७ स वरेजा येथें सप्ताह साजरा केला. यासाठीं अहमदाबाद डि. लो. बो.नें १५० रु. ची मदत केली. भडोच सॅनिटरी ॲसोसिएशननें शाळांतून व दवाखान्यांतून आरोग्याची माहिती देण्याकरितां प्रदर्शनें भरविलीं. यांनींच शुक्लतीर्थ यात्रेंतसुद्धां आरोग्य प्रदर्शन भरविलें भडोच गांवीं ५।१३ ऑगस्ट १९३० या वेळीं आरोग्य प्रदर्शन भरविलें होतें. मध्यविभाग पुणें जिल्हयांतील खेड, शिवापूर खेडयांतून श्री. गो. कृ. देवधर व शारंगपाणी यांचे श्रमानें सिनेमा चित्रपट दाखविले इंडियन मिलिटरी हॉस्पिटल, खडकी येथेंही शिपाई, मुलें व स्त्रिया यांचेसाठीं आरोग्य विषयक सिनेमा चित्रपट दाखविला.

पश्चिम भाग:––नाशिक येथें ता. ८।१४ डिसेंबर १९३० यावेळीं शेतकी प्रदर्शनांतच आरोग्य प्रदर्शन भरविलें होतें. हें काम बॉम्बे प्रे. बेबी ॲन्ड हेल्थ वीक असो.व अ. डायरे. ऑ. हेल्थ (पश्चिमभाग) यांचे सहकार्यानें झालें. पुणें सेवासदन सोसायटीच्या नर्सेस व लेडी डॉक्टर यांनीं मुलांचे आरोग्य व बाळंतपण या विषयीं माहिती सांगितली. येथें शेतकऱ्यांची बरीच गर्दी होत असे. महाड येथें डिसेंबर १९३० मध्यें बाल सप्ताह साजरा केला.

दक्षिण भाग–या भागांत दोन बाल व आरोग्य सप्ताह साजरे केले. १७ ते १९ डिसेंबर १९३० या आठवडयांत चिक्केडची येथें व ९–१८ आक्टो. १९३० या आठवडयांत शेलवाडी येथें.

कामगार लोकांचें आरोग्य,––ॲ. डायरे. ऑ. हेल्थ यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन कारखाने पाहिले.

सिंध विभाग:––जाकोबाबाद व शिकारपूर येथील भात व पीठ यांच्या गिरण्या.

गुजराथ:–विरमगांव येथील चंद्रोदय स्पिनिंग अँडवीव्हिंग मिल पाहिली व बऱ्याच सूचना केल्या.

पश्चिमभाग:–– चाळिसगांव, पाचोरें व खोपोली येथील कारखाने तपासले.

दक्षिण भाग:–हुबळीच्या दोन गिरण्या पाहून जरूर त्या सूचना केल्या.

बंदरें व त्यांचें आरोग्य

मुंबई–१९३० सालामध्यें सर्वतऱ्हेची मिळून ८४५ जहाजें व त्यांतील खलाशी व उतारू मिळून १,८१६६५ माणसें तपासलीं. ५७,६७७ लोकांचे कपडे व अंथरुणें शुद्ध केलीं. याशिवाय ९,१५६ मजूरांचीआरोग्य तपासणी केली.

कराची––यंदा कोणतीही सांथ फैलावली नाहीं, त्यामुळें एकूण आरोग्यमान चांगलें होतें. या ठिकाणीं विमानाचें दळण वळण वाढत आहे.

एडनः––१,६९० जहाजांना आरोग्य व स्वच्छता नीट असल्याचे दाखले दिले. जहाजांतून देवीचे व २ कांजण्याचे रोगी उतरले. येथून यंदा यात्रेची १५ जहाजें गेलीं.

ग्रंथिक सन्निपात अथवा प्लेग

बेळगांव जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांतून १८७४ व १८७५ मध्यें उंदरांचा सुळसुळाट झाला होता. त्यामुळें ज्वारीच्या पिकाचें नुकसान झालें. परंतु १८७८–८० या मुदतींतील प्लेगपुढें वरील प्लेग अगदीं किरकोळ ठरतो. १८७८ च्या आक्टोबर महिन्यांत बेळगांवमध्यें प्रथम प्लेगला सुरवात झाली. नंतर तो दक्षिण देशांत पसरला. १८७९ डिसेंबरमध्यें प्लेग बेसुमार झाला ही स्थिति मार्च १८८० पर्यंत चालू होती. प्लेग हा काळ्या मातीच्या प्रदेशांतच फक्त होतो. काळ्या जमिनींतून उंदीर पुष्कळ असतात; परंतु मान्सूनचा पहिला पाऊस झाला म्हणजे जमीन फुगते किंवा उमलते व आंतील उंदीर गुदमरून मरतात. त्यामुळें उंदरांची वाढ खुंटते. तेव्हां १८७८ मध्यें सुरवातीस मुबलक पाऊस झाला नाहीं म्हणून उंदरांची संख्या वाढली असा तर्क आहे. १८७६ व ७७ मध्यें ज्या भागांत दुष्काळ झाला होता तेथेंच हा प्लेग उद्भवला. कारण तेथील जमिनी दोन वर्षें नांगरल्याविना पडून होत्या. शिवाय दुसरा असाही निष्कर्ष निघाला आहे कीं शेतांवरील पिकांतून काढून जमिनींत सांठा करून ठेवलेलें धान्य संपुष्टांत आलें. त्यामुळें उंदरांना जमिनीवर अन्न धुंडाळणें भाग पडलें. तेथें चराईच्या रानांतून निर्धास्तपणें त्यांना हिंडतां फिरतां आलें.त्यांची निपज व वाढ होण्यास योग्य व अनुकूल असा हंगाम प्राप्त झाला. १८७९ मध्यें अखेरीअखेरीस अतिवृष्टि झाली व हिवाळाही नेहमींपेक्षां लवकर आला. यामुळें प्लेगला आळा बसला. मेलेल्या उंदरांच्या पाठीवर तांबडी गोचीडी सांपडत असे. त्यामुळेंही कदाचित् उंदरांचा नाश जलद झाला असेल. १८७८ मध्यें मान्सून संपल्याबरोबर पुष्कळ उंदीर दिसूं लागले. नोव्हेंबर महिन्यांत प्रथमतः ते सोलापूर मध्यें नजरेस आले व हळू हळू सर्व कर्नाटक व दक्षिणदेश त्यांनीं ग्रासला. १८७८ मध्यें हिवाळी पिकें व १८७९ मध्यें पहिलींच पिकें उंदरांनीं पोखरण्यास व कुरतडण्यास सुरवात केली. पेरलेलें बियाणें ते खाऊं लागले, त्यामुळें एकंदर नासधूस फार झाली. तीनतीनदां पेरणी केली तरी कांहीं निष्पन्न झालें नाहीं. १८७९ सालअखेर उंदीर एकदम कमी होऊं लागले. आणि अल्पावधींत एकाएकीं अचानक आले तसे नाहींसें झाले. मार्च १८८० अखेर उंदरांची संख्या नेहमींच्या सरासरीवर येऊन ठेपली. लोकांच्या चमत्कारीक धार्मिक भावनेमुळें प्लेग निष्कारण फोंफावला. सार्वजनिक समज अशी होती कीं, दुष्काळांत अन्नान्न करीत प्राण सोडलेल्या लोकांचे आत्मे उंदराच्या जन्मास येतात व ते पेरलेलीं बियाणीं खातात. तसें झालें म्हणजे बीं उमलून रोपटें निपजण्याची पाळी येतच नाहीं. शेतकरी लोकांनीं प्लेग हटवण्याकरितां कांहीं केलें नाहीं. वडार लोकांनीं मात्र उंदीर पकडण्यांत चांगलें कसब दाखवलें, व बक्षिसें मिळविलीं. महार, मांग व मुसलमान यांना जरूरीमुळें वडाऱ्याप्रमाणें उंदीर पकडण्याचें प्रयत्न करावे लागले. परंतु त्यांना ते चांगले साधले नाहीं. जुलै १८७९ मध्यें सरकारनें १०० उंदीर मारणारांस एक रुपया याप्रमाणें पैसे वाटण्याचें ठरवलें. सरकारी कचेरींत एकंदर १ कोटी, ६० लक्ष उंदरांच्या शेपट्या बक्षिसाच्या आशेनें येऊन पडल्या. उंदीर मारण्याकरतां अनेक उपाय योजण्यांत आले फॉस्फरस पेस्ट–बॉल्स, ब्रम्ही उंदराचा सापळा, धुरी देणें, ॲस्फिक्सिएटर्स, सल्फर–स्विब्स् असे अनेक प्रकार योजून पाहिले. परंतु उंदरांची रहाणी माहीत असलेल्या लोकांकडून त्यांचीं भुयारें उकरून काढणें, हाच उपाय त्यांतल्या त्यांत फायदेशीर पडला. या सर्व कृत्रिम उपायांमुळें उंदरांची संख्या कमी झाली असेल; परंतु केवळ तेवढ्यानेंच प्लेगला आळा बसला असें म्हणतां येणार नाहीं. कारण जेथें असे कांहींच प्रयत्न झाले नव्हते (उदा. अक्कलकोट सं.) तेथें व मुबलक प्रयत्न झाले तेथेंही (उ. त्याशेजारील सोलापूर जिल्ह्यांतील तालुका) एकाच वेळीं उंदीर नाहींसे झाले.

खालीं दिलेल्या तीन जाती सर्वांत अधिक घातक आहेत असें डॉ. फेअर बँक (अमेरिकन मिशन, नगर)यांचें म्हणणें आहे. (१)हरण उंदीर

(इंडियन जेरबोआ रॅट, ॲन्टिलोप रॅट) यांच्या माद्यास एका वेळेस वीस पिलें होतात. एवढी मोठी निपज हेंच प्लेगमध्यें उंदराची संख्या बेसुमार वाढण्याचें कारण होय.

(२) कोक (वडारी लोक म्हणतात)—इंडियन मोल—रॅट. हे उंदीर एकएकटे रहातात व मोठीं विवरें पोखरतात. यांचा धान्याचा साठा फार मोठा असतो.

(३) मोठ्या कानाचे शेतातील उंदीर (वडार यांना मेताड म्हणतात). हा उंदीर फार उपद्रवकारक आहे परंतु यांची वस्तीची जागा तितकीशीं बिनधोक नसल्यामुळें इतर जातींपेक्षां यांचा नाश करणें सोपें जातें.

सरकार दप्तरीं असलेलें प्लेगचे टिपण.

१८७४ बेळगांव—अथणी व गोकाक तालुके.
१८७५ बेळगांव—सपगांव व पारसगड तालुके.

१८७७ पुणें—दुष्काळ कामावरील लोकांना ९४१३० रु. रोजगार वाटला.

१८७८ नगर व पुणें—दुष्काळ कामावरील लोकांस रोजमुरा एकंदर५१२०रु.दिला.देशावरील काळ्या जमिनींतील कापणीं केलेलीं पिकें पाऊण हिस्सा कमी झालीं. सोलापूर येथील रबी पिकें कापणीस तयार होण्यापूर्वीच उंदरांनीं खाल्लीं. सूट १३५९०रु. सातारा—रबी पिकें खाल्लीं गेलीं, परंतु धान्य बरें निघालें. दुष्काळ कामावरील लोकांचा एकंदर रोजमुरा १००० रु. झाला. विजापूर रबी पिकें खाल्लीं गेलीं, परंतु धान्य बरें निघालें. दुष्काळ कामावरील लोकांस १४७० रु. वाटले. बक्षिस खातें खर्च १५७० रु. बेळगांव—अथणी, गोकाक, पारसगड आणि चिकोडी. धारवाड काळ्या मातीचा प्रदेश, हिवाळीं पिकें दगावलीं.

१८७९ नगर—श्रीगोंदे कर्जत, आणि पारनेर या भागांत उंदरांचा विशेष उपद्रव झाला. बक्षिसादाखल १६६२० रु. खर्ची पडले. ११८७६० रु. सूट दिली.

पुणें—मोठ्या कानाच्या उंदरापासून अतिशय उपद्रव झाला. बक्षिसादाखल ३७४० रु. व दुष्काळ कामावरील रोजमजुरी २२८० रु. असा एकंदर खर्च झाला. सोलापूर—सर्व जिल्हा ग्रासला गेला. पहिल्या पेरणीपैकीं (८ वा हिस्सा) जमिनींतील पेरणीच काय तीं तगून राहिली बक्षिस खातें खर्च १२८६० रु. सूट ८८४८० रु.

सातारा—या जिल्ह्यांत सुरवातीस उंदरांनीं बराच त्रास दिला परंतु पुढें पाऊस पडल्या कारणानें उंदीर नाहीसे झाले. (पळून गेले किंवा मेले)

विजापूर—सुरवातीच्या व अखेरीच्या मिळून अर्ध्यां अधिक पिकांची तर नासधूस झालीच. अशी नासाडी सर्व वर्षभर चालू होती. बक्षिसें वाटण्यांत ४०३७० रु. खर्च झाले. हा जिल्हा फार दुष्काळग्रस्त झालेला होता. तेव्हां दुष्काळकामें उघडण्याची व तगाई रकमा देण्याची जरूर भासली दुष्काळ कामावरील लोकांस एकंदर मजुरी ४८९०रु.दिली. बेळगांव दक्षिण देशांपेक्षां येथें उंदरांची संख्या कमी होती. बक्षिस खर्च २२७० रु. धारवाड—प्लेगमुळें पुष्कळ हानी झाली. बक्षिस खर्च ९५८४० रु. पिकें तरली.

१८९२—९३—कर्नाटक दक्षिण देश. १८७८ मध्यें बेळगांव जिल्ह्यांतील पूर्वेकडील तालुक्यांत प्रथम उंदीर दिसू लागले. व या वेळेसही तेथूनच सुरवात झाली. परंतु त्यांचा फैलाव फार न झाल्यामुळें सरकारच्या विशेष मदतीची जरूर भासली नाहीं. हरएक उपायांनीं उंदीर पकडण्याचें काम चालू होतें.परंतु आयत्या वेळीं पाऊस पडल्यामुळें प्लेग तसाच चालू राहिला. त्यांत आणखी जिकडे तिकडे गोचीड होऊन भरच पडली. या सर्वांचा कर्नाटकमध्यें विशेष त्रास झाला.

१९००—०१—खानदेश. उंदीर मारण्याकरितां हरएक प्रयत्न झाले. पाणीपुरवठा भरपूर होता त्या प्रांतांतून उंदराच्या बिळांतून पाणी सोडलें. दोन विषारी मिश्रणें देखील चालवून पाहिलीं. सुरवातीस त्यांचा उपयोग झाला. परंतु पुढें उंदीर तसलीं मिश्रणें टाळूं लागले. शंभर उंदीर मारणारास एक रुपया मिळेल असें सरकारनें जाहीर केलें होतें. असेच आणखी कांहीं उपाय झाले. उंदरांमुळें पिकांची नासाडी पुष्कळच झाली.

१९०१—१९०२—खानदेश, नाशिक, सातारा. उंदरांचा उपद्रव बराच जाणवला. १९०२—०३ पश्चिम खानदेश—नंदुरबार तालुक्यांत हा प्लेग इतका भयंकर झाला कीं उंदरांनीं सर्व पिकें खालीं व त्यामुळेंसरकारला वसूलांत सूट द्यावीच लागली.

शिरपूर तालुक्यांत थोडाबहुत असाच प्रकार झाला. विशेषतः गव्हाचें पीक बुडालें

१९११—१२ धारवाड, गदग, नवलगुंद आणि रोण या तालुक्यांत प्लेग झाला. १०० उंदीर मारणारांस दोन रुपये याप्रमाणें १७५० रु. वाटले.

१९२०—२१ पश्चिम खानदेश. खरीप पेरे व कापूस यांचेंच काय तें नुकसान झालें.

टपाल व तारखातें

(हिंदुस्थानांतील टपाल व तार खातें. १९३०-३१ चा वार्षिक अहवाल),

टपाल खातें:--या सालाचे अखेरीस या खात्यांत ११५२०५ अधिकारी होते. पोस्ट ऑफिसें २४१७५ होतीं, व मेल लाइन १६९५५८ मैल लांब होती. या वर्षी १२९·९७ कोटि वस्तु (Articles) पोस्टांतून पाठविल्या गेल्या. त्यांपैकीं ५·४कोटि वस्तु रजिस्टर केलेल्या होत्या. पोस्टाचे कामाकरितां ६·३ कोटी रुपये किंमतीचीं तिकिटें विकलीं गेलीं. ८६·४८ कोटि रुपयांच्या ३·९ कोटींवर मनी ऑर्डरींची देवघेव झाली. पोस्टखात्यानें व्यापाऱ्यांकरितां व व्ही. पी. केलेल्या वस्तूंवर २४·७ कोटी रुपये वसूल करून दिले. १३८·७५ कोटी रुपये किंमतीच्या इन्शुअर केलेल्या पांच दशलक्ष वस्तू पोष्टांतून गेल्या. ठिकठिकाणच्या पार्सलावर व पत्रांवर मिळून ६·६ दशलक्ष रुपये कस्टमड्यूटी गोळा झाली. इंडियन मिलिटरी पेन्शनरांना १·६ कोटी रुपये पेन्शनची रक्कम पोष्टामार्फत देण्यांत आली. १४०९१ पौंड कोयनेल (Quinine) लोकांना विकण्यांत आलें. ता. ३१ मार्च १९३१ रोजीं सेव्हिंग्ज बँकेंत २४७७६१३ खातीं (Accounts) होते. व त्यांवर ३७ कोटि रुपये शिल्लक होतें.आणि १४·८६ कोटि रुपयांच्या ७९०५८ पोस्टल लाइफ इन्शुअरन्स पॉलिसीज् होत्या.

महत्त्वाच्या गोष्टी:--पत्रांची मेल सर्व्हिस येमेनपर्यंत वाढविली आणि इन्शुअर्ड बॉक्स सर्व्हिस पोर्तुगीज हिंदुस्थान स्ट्रेट्स् सेटलमेंट्स् व मलाया संयुक्त संस्थानें या देशांशीं सुरू केली. आयरिश पोस्टल ऑर्डर्सचे पैसे देण्याची व्यवस्था केली. पर्शियाशीं असलेली व्ही. पी. ची पद्धत तहकूब केली. इंडोयुरोपियन टेलिग्राफ कंपनीच्या लाइनीवरून गेलेला जमिनीवरील युरोपचा तारेचा मार्ग ज्याला 'इंडोरूट' म्हणतात तो ता. १ मार्च १९३१ पासून बंद केला.

पत्रांचा जलद बटवडा:--पोस्ट-ऑफिसापासून दूर असणाऱ्या गांवीं साधीं पत्रें व पोस्टकार्डें त्वरित मिळण्याची सोय ता. १ आक्टोबर १९३० पासून सुरूं केली, नेहमीच्या टपालखर्चाशिवाय दोन आण्यांचीं तिकिटें जास्त लाविलीं पाहिजेत.

विमान मार्ग:--कराची ते लंडन हा मार्ग चालू होता. कराचीस एकंदर ५१ विमानें आलीं व ५२ विमानें कराचीहून लंडनला टपाल घेऊन गेलीं. कराचीस आलेल्या टपालाचें वजन ४१७१५ पौंड, व गेलेल्या टपालाचें वजन ३९३४७ पौंड होतें. विमानमार्गानें पश्चिमेकडील देशांत गेलेल्या वस्तूंची संख्या १००६२०० होती. एकदां वापरलेलीं पोस्टाचीं तिकिटें पुन्हां पोस्टाचे कामाकरितां वापरलीं जातात. ही चोरी १६ नॉनगॅझेटेड अधिकाऱ्यांनीं हुडकून काढली याबद्दल व आणखी ९३ अधिकाऱ्यांनीं चांगलें काम केल्याबद्दल त्यांना एकूण ३३२६ रु. चीं बक्षिसें देण्यांत आलीं.

पोस्ट ऑफिसांच्या संख्येंत वाढ:--सन १९२०-२१ सालीं, पोस्ट ऑफिसें १९४९९ व पेटचा ४९८१८ होत्या. सन १९२५-२६ सालीं हा आंकडा २०१०८ व ५२६६५ झाला. आणि १९३०-३१ सालीं त्यांत वाढ होऊन आफिसें २४१७५ व पेटचा ६३५०३ झाल्या.

शहर भागांतील व खेडेगांवांतील पोस्ट ऑफिसें व पेटचा--

वर्ष	पोस्ट आफिसें शहरें	पोस्ट आफिसें खेडीं	पेटचा शहरें	पेटचा खेडीं
१९२९-३०	४९९२	१८८८९	१८१४६	४५०२९
१९३०-३१	४९८३	१९१९२	१८५४६	४४९५७

या सालीं शाळामास्तर व इतर एजंट यांच्या ताब्यांत असलेल्या पोस्टऑफिसांची संख्या १६९१२ होती. खात्यांतील पोस्टमनांची संख्या ३१३५४ होती; त्यांपैकीं ८९०७ खेडेगांवांतील (Village-Postmen) होते.या सालीं ४७४ ऑफिसें प्रयोगादाखल नवीन उघडण्यांत आलीं. पूर्वीचीं २५८ वर्षारंभीं होतींच.यांपैकीं ४१३ कायम केलीं, २१३ बंद केलीं व १०६ अजून प्रयोगावस्थेंतच आहेत.

पोस्टल लाइनमध्यें वाढ:--पोस्टल लाइनची लांबी सन १९२०-२१ सालीं १५७३०१ मैल, व १९२५-२६ सालीं १५८६९४ मैल होती ती १९३०-३१ सालीं १६९५५८ मैल झाली.

सन १९२०–२१ पासूनच्या पोस्ट खात्याच्या कारभाराचें सिंहावलोकन

पोस्टल आर्टिकलांची वर्गवारी	१९२०–२१	१९२५–२६	१९३०–३१
पत्रें–रजिष्टर न केलेलीं पेड पत्रें	५५२४१७४६३	४८५५६५१५७	४८५९४८७२१
अनपेड पत्रें	२८५८५८८६	२१४५०६८६	१८४४२२७७
रजिस्टर पत्रें व पॅकेटस् (इन्शुअर्ड व व्हीं. पी. धरून)	३१२१०२३८	३५६८८५८०	३९७४५७१५
पोस्टकार्डें	६३०४०१४३२	५५०६४८३०७	५४०७७९६९८
रजिस्टर वर्तमानपत्रें	७०३०३७७२	७७३५३०१६	८४१९२५१६
रजिस्टर न केलेलीं साधीं पॅंकेट्स्	६२३४७६५५	८६८३२०१४	११४०१९८४७
एकूण	१३७५२६६४४६	१२५७५३७७६०	१२८३१२८७७४
पार्सलें—			
रजिस्टर्ड पार्सलें (इन्शुअर्ड व व्हीं. पी. धरून)	१०२९८९६८	१४१६०२५२	१४४१४५२७
रजिस्टर न केलेलीं पार्सलें	३८१२०६८	१३०७५६०	२१४९०५०
एकूण	१४१११०३६	१५४६७८१२	१६५६३५७७
महासंख्या	१३८९३७७४८२	१२७३००५५७२	१२९९६९२३५१

मोटार मेल सर्व्हिसः—१९२०–२१ सालीं २५२८ मैल व ६८८३॥ मैल १९२५–२६ सालीं होती ती सन १९३०–३१ सालीं १६१९७ मैल झाली.

रेल्वे सर्व्हिस व स्टीमर सर्व्हिस

वर्ष	रेल्वे सर्व्हिस	स्टीमर सर्व्हिस
११२०–२१	३५५३६ मैल	१७९५९ मैल
११२५–२६	३७९२८ ,,	१८२५२ ,,
१९३०–३१	४१२४५ ,,	१७६६५ ,,

रेल्वे व मोटर सर्व्हिसमध्यें वाढ झाल्यामुळें स्टीमर सर्व्हिसची वाढ खुंटली.

रद्द पत्रांच्या कचेरीचें कामकाजः— (Work of Dead letter–Offices) यावर्षी ठिकठिकाणीं कचेरीत एकंदर ८८३०२०१ वस्तू आल्या. गेल्या सालीं हा आंकडा ९५२६४७७ होता. यांत मनीऑर्डरीचा समावेश नाहीं. यांपैकीं शेंकडा ३९·२ आर्टिकलें मालकांकडे रवाना केलीं ५२·३ पाठविणाराकडे परत केलीं व शें. ८·५ वस्तूंचा बटवडा करतां आला नाहीं.या कचेरीतून मालकांकडे अगर पाठविणाराकडे धाडलेल्या वस्तूंपैकीं फक्त शें. १·७८ परत आल्या ! शेवटीं रद्द ठरलेल्या वस्तूंची संख्या ८९७००० होती. सर्व पोस्ट ऑफिसांतून बाहेर गेलेल्या वस्तूंशीं यांचें दहा हजारी सात प्रमाण पडतें.बंगाल, मुंबई व मद्रास या भागांत मुळींच पत्ता न लिहितां रोज सरासरी ११९ वस्तु टपालांत पडत असत. यांपैकीं पुष्कळांतून पैसे अगर महत्त्वाचे कागदपत्रहि आढळून येत. डेडलेटर ऑफिसाने उघडून पाहिलेल्या आर्टिकलांतून चेक हुंड्या, करन्सी, नोटा एक्स्चेंज बिलें, नाणीं आणि सुमारें ६·४४ लाख रुपये किंमतीची इतर मिळकत आढळून आली. यांपैकीं निम्मेहून अधिक वस्तू मालकांकडे रवाना केल्या अगर पाठविणारांकडे परत केल्या.

परदेशचा पत्रव्यवहारः— निरनिराळ्या देशांत हिंदुस्थानांतून गेलेलीं आर्टिकलें व परदेशांतून हिंदुस्थानांत आलेलीं आर्टिकलें यांचा गतसालचा व या सालचा अंदाजी आंकडा खालील कोष्टकांवरून दिसून येईलः—

देश	पत्रें व पोस्टकार्डें		वर्तमानपत्रें, बुकपॅकेटस् वगैरे	
	१९२९–३०	१९३०–३१	१९२९–३०	१९३०–३१
ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंड या देशांत पाठविलेलीं	१८४९२७६०	१७५६५८५३	३२८१९९३	२८७१०६३
इतर देशांत पाठविलेलीं	१६९८६६८४	१४९९२५१०	९७५०३५१	९२१९४१८
ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंड या देशांतून आलेलीं	१०६५७११४	९११८९४१	८४९७०७३	७५५१७१३
इतर देशांतून आलेलीं	१४४१९७८२	१४४३५८२४	१९८९११३७	१७८५७१६४

परदेशच्या पत्रव्यवहाराचें सन १९२०–२१ पासूनचें सिंहावलोकन

	१९२०–२१	१९२५–२६	१९३०–३१
हिंदुस्थानांतून रवाना ग्रेटब्रिटन व उत्तर आ.मध्यें.			
पत्रें व पोस्टकार्डें	११६०१३११	१२८७७७८७	१७५६५८५३
वर्तमानपत्रें, बुकपॅकेटे व नमुने	१३४३१८६	२०३२२१७	२८७१०६३
इतर देशांत रवाना झालेलीं--			
पत्रें व पोस्टकार्डें	११३६१९९८	१४४७३२१२	१४९९२५१०
वर्तमानपत्रें,बुकपॅकेटें व नमुने	५१५०७५१	७३४५८९७	९२१९४१८
ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंड या देशांतून हिंदुस्थानांत आलेलीं--			
पत्रें व पोस्टकार्डें	१३२८४१८०	९१६६५६०	९११८९४१
वर्तमानपत्रें बुकपॅकेटें व नमुने	८८६१००८	११८९७६००	७५५१७१३
इतर देशांहून आलेलीं पत्रें व पोस्टकार्डें	९०३२४८८	११९८४१८०	१४४३५८२४
वर्तमानपत्रें, बुकपॅकेटें व नमुने	८४२०६४१	१३४०४१३१	१७८५७१६४

इन्शुअर्ड आणि व्ही. पी. पोस्ट

एकंदर १३८॥। कोटी रु. किमतीचीं ५२०९०७३ पत्रें व पार्सलें पोस्टांतून गेलीं.गेल्या सालापेक्षां संख्येनें ४६४७४४ अथवा शें. ८·२ व किंमतीनें २१ कोटी अथवा शें. १३·२ कमी गेलीं. इन्शुअरन्स फी १९ लाख रुपये वसूल झाली. गेल्या सालीं २१॥। लाख रुपये वसूल झाली होती.

सन १९२०–२१ पासून पोस्टाच्या तिकिटांच्या खपांचा आढावा.

	१९२०–२१	१९२५–२६	१९३०–३१	सन १९३०–३१ शीं तुलना करतां शें.वाढ+अगर–तूट १९२०–२१	१९२५–२
ऑर्डिनरी पोस्टेज	रु.	रु.	रु.		
स्टॅंप्स् वगैरे	६६४१९६३६	७६५७९३६८	७४९६७३००	+१२·८७	– २·११
सर्व्हिस पोस्टेज					
स्टॅंप्स् वगैरे	९००७२२४	८६८१९३७	९९७२२७१	+ १०·७१	+१४·८६

व्ही पी. चा. व्यवहारः--पोस्टांतून पाठविलेल्या व्ही. पी. आर्टिकलांची संख्या ११९८२६९० होती. हीच संख्या गेल्या सालीं १३१५७३३१ होती. या आर्टिकलांवर वसूल करावयाची रक्कम यासालीं २४ पूर्णांक दोन तृतीयांश कोटि रु. व गेल्या सालीं २८·७५ रु. होती यंदा १४ टक्के मंदाई होती. एकटया कलकत्ता शहरांतून २ पूर्णांक दोन तृतीयांश दशलक्ष व्ही. पी. आर्टिकलें रवाना झालीं, व तेथील व्यापाऱ्यांकरितां त्या आर्टिकलवर पोस्टानें ६। कोटी रु. वसूल करून दिले. मुंबई शहरांतून १·३ दशलक्ष व्ही पी. आर्टिकलें रवाना झालीं. पाठविणारांचे तीन कोटींवर रुपये पोस्टानें उभे केले.

मनीऑर्डरी –एकंदर ८६॥ कोटी रुपयांच्या ३९ दशलक्षांवर मनीऑर्डरी देशांत व परदेशांत पाठविल्या गेल्या. गेल्या सालीं हीच संख्या अनु-

क्रमें ९४ कोटि रु. ४०॥ दशलक्ष होती. मनीऑर्डर कमिशन ११२ लाख रुपयांवर पोस्टाला मिळालें.

पोस्टखात्याचीं इतर कामें.—गव्हर्मेंट सिक्यूरिटींची देवघेव-पोस्टामार्फत गव्हर्मेंट सिक्यूरिटीमध्यें गुंतविलेली रक्कम पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

गव्हर्नमेंट सिक्युरिटी (नॉमिनल व्हॅल्यू)

	खरेदी	विक्री	ठेवीदारांच्या वतीनें पोस्ट व टेलिग्राफ खात्याच्या अकाउंटंट जनरलच्या ताव्यांत.
	रु.	रु.	रु.
	९००९०००	१६०२०००	५७८४३३२५
वाढ (+) अगर तूट(–)	–१५३२०००	+३२४३७५	+४६७७६२५
सन १९२९–३० सालच्या आंकड्याप्रमाणें वाढीचें अगर तुटीचें शेंकडा प्रमाण	–१४·५३	+२५·३९	+८·८०

सन १९२०–२१ सालापासून सेव्हिंग बँकेच्या व्यवहारांत झालेली वाढ.

	१९२०–२१	१९२५–२६	१९३०–३१	स.१९३०–३१ सालांतील वाढीचें(+)अगर तुटीचें(–)शें. प्रमाण १९२०–२१	२५–२६
मुख्य बँका	२५६	२५५	२५६	...	+·३९
दुय्यम बँका	१०४५७	१०९०७	१२५९०	+२०·४०	+१५·४३
खातीं (Accounts)					
गतसालचे अखेरीस	१७६०४४२	२१६४४७३	२३०४९०४	+३०·९३	+६·४९
चालूं वर्षी उघडलेलीं	३२२९९४	३८०८३७	४७३८९३	+४६·७२	+२४·४४
,, वंद झालेलीं	२०५४७९	२२७९२०	३०११८४	+४६·५८	+३२·१४
चालू वर्षाचेअखेरी	१८७७९५७	२३१७३९०	२४७७६१३	+३१·९३	+·९१
		रु.	रु.		
मागील शिल्लक	२१३४८४६२८ (अ)	२५६३९४९०७ (ब)	३७१२६६२०७ (क)	+७३·९१	+४४·८०
ठेवी (Deposits)	२१५६३५६४४	२१६८७६५६३	२७८२२८९२९	+२८·४९	+२८·२९
व्याज	६२१९७३९	७३९९०१४	१०४४३४४८	+६७·९१	+४१·१५
एकूण	४३६२४००११ (अ)	४८०६७०४८४ (ब)	६५९९३८५८४ (क)	+५१·२८	+३७·३०
काढलेली रक्कम	२०७६१८२९५	२०८३५५७१९	२८९७८७०९	+३९·५२	+३९·०४
वर्षअखेर शिल्लक	२२८६२१७१६	२७२३१४७६४	३७०२५९८७४	+६१·९५	+३५·९७
ठेव ठेवणाराची सरासरी शिल्लक	१२१·७३	११७·५०	१४९·४४	+२२·७६	+२७·१८

टीपः– (अ) एका पोस्ट ऑफिसांतून दुसऱ्या पोस्ट ऑफिसांत बदललेल्या खात्यांवरील शिल्लक रु. ३४२७०२४५–१४–१ धरून (ब) २६४०७३७४ रु. २ आ. ६ पै. धरून (खुलासा सदरप्रमाणें) (क) ३४५८५६६३ रु. ७ आणे धरून (खुलासा सदरप्रमाणें).

पोस्ट ऑफीस कॅश सर्टिफिकिटें:—१० रु. च्या कॅश सर्टिफिकिटाकरितां ७ रु. १२ आ. भरावे लागत असत; ते कमी करून ७ रु. ८ आ.या सालीं केले. व याच प्रमाणांत पुढील संख्यांचे भरावे लागणारे पैसे कमी केले. कॅश सर्टिफिकिटांत गुंतलेली रक्कम गेल्या सालीं ७१६ लक्ष रुपये होती. तीच या सालीं ११७८ लक्ष रुपये झाली; म्हणजे ६४·५ टक्के वाढ झाली. यापैकीं ९७९ पूर्णांक एक चतुर्थांश लक्ष रुपये १००० रुपये किंमतीच्या सर्टिफिकिटांत गुंतविलेले आहेत. कॅश सर्टिफिकिटांची पद्धत प्रथम सन १९१७–१८ सालीं सुरू केली. सर्टिफिकिटांच्या देवघेवीच्या व्यवहारांत सन १९२०–२१ सालांपासून कशी वाढ होत गेली हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

	१९२०–२१ रुपये	१९२५–२६ रुपये	१९३०–३१ रुपये
कॅश सर्टिफिकिटांत गुंतविलेली एकूण रक्कम	५१८७२६२	९५५५६३५८	११७८२७४१६
भरलेल्या रकमेच्या सर्टिफिकिटाच्या किंमतीची (Nominal value) रक्कम.	६७ लक्ष	१२७४ लक्ष	१५५९·७५लक्ष
सर्टिफिकिटांच्या विल्हेवाटीच्यावेळीं (on the Discharge) पैसे गुंतविणाऱ्यांना व्याजासह दिलेली रक्कम	१६६४३२७९	१८६६१५०८	९९४८९४६२
सर्टिफिकिटांच्या विल्हेवाटीच्या वेळीं दिलेलें व्याज	१६८५५८३	१५९३६५४	१५९१३२८१

पोस्ट ऑफीस इन्शुअरन्स फंडः—यासालीं एकंदर १५०३८२३१ रुपयांच्या ९७१० लाइफ इन्शुअरन्स व एन्डाउटमेंट ॲशुअरन्स पॉलिसीज् देण्यांत आल्या. या वर्षी दहा स्त्रियांनीं विमे उतरले. या वर्षाचे अखेरीस विमेदार स्त्रिया १२२ होत्या. पोस्ट ऑफीस इन्शुअरन्स फंडांत १९२०–२१ पासून कशी वाढ होत गेली हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

	ता. ३१मार्च १९२१ पर्यंत	ता. ३१ मार्च १९२६ पर्यंत	ता. ३१ मार्च १९३१ पर्यंत
आयुष्याच्या विम्यांची संख्या	४७२८०	६९९१८	१०८३२९
विम्यांच्या हप्त्यांची रक्कम रुपये	२४०७७७४७	३८६४०५१२	६४२९९०६०
इन्शुअर सची रक्कम	६६४८९५४९	११८०८४७५६	१८८७०३०८४
विमेदारांच्या वारसाना दिलेली रक्कम (Amcunt of claims met)	१३०९३७५३	२१४८४५००	३५०५२५५३

मिठावरील कराचा वसूलः–सेंट्रल सर्कल मधील २२ पोस्ट ऑफिसांनीं मिठावरील कराचा वसूल घेणारे एजंट म्हणून काम केलें.या वर्षी ११५८२० रु. किंमतीच्या ७९४२८ मण मिठाचा धंदा करण्यांत आला. त्यांत पोस्टाला १६४ रु. कमिशन मिळालें.

कोयनेलची विक्रीः–
या वर्षी १४०९१ पौंड २१०३ग्रेन कोयनेल खपलें गेल्या सालापेक्षां हा खप ५·१७ टक्के कमी आहे. पोस्ट ऑफीसच्या एजन्सीमार्फत पंजाब व वायव्य सरहद्द प्रांतांतील १३२८९० इंडियन आर्मी पेन्शनरांनीं एकंदर १६०१६५०१ रु. पेन्शनची रक्कम घेतली. या कामांत पोस्टाला २६०२६८ रु. कमिशन मिळालें. गेल्या सालीं कमिशनची रक्कम ११८३०० रु. होती.या सालीं वाढ होण्याचें कारण ता. १ एप्रिल १९३० पासून कमिशनचा दर शेंकडा १२ आणे होता, तो शेंकडा एक रुपया दहा आणे केला. वयोवृद्ध व अधु अशांच्या आणि स्त्री पेन्शनरांच्या सोयीसाठीं या सालीं आणखी तीस पोस्ट ऑफिसांना इंडियन मिलिटरी पेन्शनचें काम करण्याचा अधिकार देण्यांत आला.

पोस्टल अधिकाऱ्यांकडून घडलेले गुन्हेः—या वर्षी ३३९ पोस्टल अधिकाऱ्यांनीं फौजदारी गुन्हे केले. त्यांपैकीं २२४ अधिकाऱ्यांवर फौजदारी

कोर्टांत चौकशी होऊन गुन्ह्याची शाबिती झाली. व बाकीच्यांना खात्यानें शिक्षा दिली. या सर्व खटल्यांत ९२७३९ रु. नुकसान झालें, पण नंतर ३६५४४ रु. वसूल झाले. तसेंच ३३६ अधिकाऱ्यांना कामावरून दूर केलें.

टपालाच्या पिशव्यांवर भरस्त्यांत पडलेले दरोडे:—यावर्षी एकंदर बावीस दरोडे पडले. त्यांपैकीं १८ ब्रिटिश हिंदुस्थानांत आणि ४ संस्थान हद्दींत. या दरोड्यांमुळें २१२२८ रु. खात्याचें नुकसान झालें.त्यांपैकीं सुमारें १६००० रुपये नुकसान बंगाल व आसाम सर्कलमध्यें पडलेल्या अकरा दरोड्यांमुळें झालें. वरील दरोड्याचे वेळीं टपालाचे शिपाई व पांच 'रनर' जखमी झाले व दोन रनर ठार झाले.

समारोप:—पोस्ट ऑफीसच्या कामाची सांपत्तिक स्थिति:— यावर्षी जमा ७५०९१३७१ रु. खर्च ८१३००५८३ रु. तूट ६२०९२१२ रुपये सन १९२९–३० सालीं २१४७३३३ रुपये तूट आली होती.

सहकारी पतपेढ्या:—पोस्टल पतपेढ्यांनीं गेल्या दहा वर्षांत सहकारी चळवळीच्या कार्यांत जी प्रगति केली ती पुढील कोष्टकांत दाखविली आहे.

	१९२०–२१	१९२५–२६	१९३०–३१
पेढ्यांची संख्या	२५	३७	४३
सभासदांची संख्या	८४३१	२६५६८	५०५४४
भरलेलें भांडवल (अंदाजी) रुपये	३ लाख	८॥ लाख	२०॥ लाख
कर्ज दिलेल्या सभासदांची संख्या	२५००	१२०००	२०९०६
कर्जाची रक्कम (अंदाजी) रु.	३॥ लाख	२३ लाख	४५॥ लाख

तारखातें:—यावर्षी पैसे घेऊन तारा स्वीकारण्याकरितां (Paid Traffic) १०५४० तार ऑफिसें उघडीं होतीं. यांत तारखात्याची १०४, पोस्ट आणि तार अशीं जोड ऑफिसें ४२९७, रेलवेचीं ऑफिसें ६१११,कॅनॉल ऑफिसें ११ व रेडिओ ऑफिसें १७ होतीं. शिवाय लोकांच्या तारा स्वीकारून त्या पोस्टानें नजीकच्या तार ऑफिसांत पाठविण्याचा हक्क ९६३५ पोस्ट ऑफिसांना दिला होता. या पोस्ट ऑफिसांतून ८७१६३ तारा पाठविल्या गेल्या, सन १९२० २१ सालीं रेडिओ ऑफिसें धरून खात्याचीं ऑफिसें १८४ होतीं, तीं १९२५–२६ त १६३ झालीं व १९३०–३१ सालीं तर हा आंकडा १२१ वर उतरला. याचें कारण यांतील पुष्कळ ऑफिसें पोस्ट व तार अशीं संयुक्त करण्यांत आलीं. या वर्षाचे अखेरीस जमिनीवरील तारेचा मार्ग १०५३८६ मैल लांब होता. त्याकरितां ४९०९५२ मैल लांबीची तार (Wire) उपयोगांत आणलेली होती. समुद्रांतून गेलेला तारेचा मार्ग (Cable) ११५९ मैल लांब होता. व त्यांतील कंडक्टरांची लांबी (Conductor) ८२५०९ मैल होती. १२०५२६ मैल लांबीचीं तार तांब्याची व ब्रॉंझ धातूची होती; यापैकीं खात्याच्या कामाकरतां ३९५७४ मैल, ट्रंक टेलिफोन करतां २१६८० मैल, इतर टेलिफोन करतां ७८४८ मैल आणि रेलवे करतां ५१४२४ मैल होती. केबल पैकीं ४७३ मैल (९१८७ मैल कंडक्टर्स) टेलिग्राफ सर्कीट (Circuit) करतां, आणि ६८६ मैल (७३३२२ मैल कंडक्टर्स) टेलिफोन सर्कीट करतां होते. यावर्षी पोस्टाचीं व तारेचीं संयुक्त ऑफिसें ४२९७ होतीं. त्यांत ४६०६ कारकून तारेचें काम करीत होते. सर्व्हिस मेसेजेस खेरीज करून या जोड ऑफिसांतून १२२३४४७६ रु. किंमतीच्या ११३८२५२० तारा पाठविल्या गेल्या. गेल्या सालापेक्षां हा आंकडा शें. ५ नीं कमी आहे. या ऑफिसांतून गेल्यासालीं ९८६२६१९ तारांचा बटवडा करण्यांत आला. पण हा आंकडा या सालीं खालीं घसरून ९६२८७७८ वर आला. निरनिराळ्या फर्मकडून व व्यक्तींकडून डिपॉझिट अकाउन्ट सिस्टिमप्रमाणें तारखात्यानें स्वीकारलेल्या तारांची संख्या पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

वर्ष	डिपॉ.अकाउंटची संख्या	अकाउंट प्र. चार्ज के.तारा
१९२६–२७	५९०	१२१८२३२
१९२७–२८	६१७	१३०९३९२
१९२८–२९	६५४	१२९०४८८
१९२९–३०	६५६	१२६६८२२
१९३०–३१	६९९	११६४८६०

फोनोग्रॅम सिस्टीम:—ह्या पद्धतींत हळूहळू प्रगति होत आहे. या वर्षी टेलिफोनच्या मालकांकडून (Subscribers) दुसऱ्या गांवीं

रवाना करण्याकरितां ५१७१७ तारा स्वीकारण्यांत आल्या; व टेलिग्राफ ऑफिसांतून टेलिफोनच्या मालकांना ४३८८४ तारा टेलिफोन मधून कळविण्यांत आल्या.

तारेच्या चोऱ्या (Theft of wire)-- सिंध व बलुचिस्थान वगळून बाकीच्या सर्कलमध्यें या प्रकारच्या चोऱ्या चालूच होत्या. बहुधा तांब्याच्या वायरची चोरी फार होते.या वर्षी मुंबई सर्कल मध्यें चोरीचें प्रमाण फारच वाढलें. यावर्षी चोरीला गेलेल्या एकंदर वायरची किंमत ९२६८ रु. होती. विशेष चोऱ्या होणाऱ्या भागांत 'कॉपर-वेल्ड वायर' उपयोगांत आणण्याचें सुरूं केलें आहे. त्यामुळें या वर्षी चोरीचें प्रमाण एकंदरींत कमी झालें. कारण गेल्या सालीं १८६४६ रु. किंमतीची तार चोरीस गेली होती.

देशांतील मार्ग:--टेलिग्राफ लाइनवर घडलेल्या गुन्हयांपैकीं निश्चित छडा लावलेल्या गुन्हयांची संख्या पुढील तीन वर्षांच्या तुलनात्मक कोष्टकांवरून दिसून येईल.

वर्ष	छडा लावलेल्या गुन्हयांची संख्या.	छडा लावलेल्या गुन्हयांचे एकंदर गुन्हयांशीं शेंकडा प्रमाण.	गुन्हयाचा छडा लावण्यास लागलेला सरासरी वेळ(तास)	दर शंभर मैलीं छडा लावलेल्या गुन्हयांची संख्या लाइन	वायर
१९२८–२९	१९९१२	७२·२७	१४·५०	२०·६९	४·५६
१९२९–३०	२०००९	७२·५३	१४·१२	२०·६१	४·५१
१९३०–३१	२१६७०	७३·५५	१४·५६	२२·०२	४·८३

परदेशचा मार्ग:–पश्चिमेकडील देशांशीं पुढील तीन मार्गांनीं दळण वळण चालूं होतें. (१) ईस्टर्न टेलिग्राफ केबल कंपनीज रूट व्हाया सुवेझ. (२) इंडियन रेडिओ टेलिग्राफ कंपनीज बीम वायरलेस रूट आणि (३) इंडोयुरोपियन ओव्हरलंड रूट. यांपैकीं तिसरा मार्ग १ मार्च १९३१ पासून कायमचा बंद करण्यांत आला. गेलीं बासष्ट वर्षें हा मार्ग हिंदुस्थान व इंग्लंड यांस जोडलेला होता. ऑस्ट्रेलियाशीं केबलचा मार्ग बिनहरकत चालूं होता. चीन देशाशीं भामोवरून व सयामशीं मोलमेनवरून दळणवळण चालूं होतें. हिंदुस्थानच्या हद्दींत व बाहेर जमिनीवरील तारा तुटून अनेकवेळां अडथळे उत्पन्न झाले.

तारखात्याच्या१९२०–२१पासूनच्या कारभाराचें सिंहावलोकन:-खात्याच्या सर्व लाईनीवरून एकंदर १९८९३१६२ तारा सन १९२०–२१ सालीं पाठविल्या गेल्या. हा आंकडा १९२५–२६ सालीं घसरून १८७७७५६३ वर आला व १९३०–३१ सालीं तर १८१२४३४६ वर उतरला. तारांच्या संख्येंत तूट येण्याचें कारण सार्वत्रिक असणारी व्यापारमंदीच होय. स. १९२०–२१ पासूनचें देशांतील तारांच्या संख्येचें तुलनात्मक कोष्टक:–

वर्ष	पाठविलेल्या तारा
१९२०–२१	१६२९८५१७
१९२५–२६	१५९१५०३०
१९३०–३१	१५३५५१०७

सन १९२०–२१ पासून परदेशांत पाठविलेल्या तारांची संख्या दाखविणारें कोष्टक.

वर्ष	पाठविलेल्या तारा
१९२०–२१	२७५६२६४
१९२५–२६	२८५३१४८
१९३०–३१	२७६०२७२

गेल्या दहा वर्षांत परदेशच्या खाजगी तारांच्या दरांत पुढील महत्त्वाचे फेरफार केले. (१) १ मार्च १९२० पासून हिंदुस्थान ते युनायटेड किंग्डम खाजगी तारेचा दर, शब्दाला एक रुपया चार आणे होता तो कमी करून फक्त एक रुपया करण्यांत आला. पण नंतर १ नवंबर १९२० पासून एक रुपया दोन आणे झाला व १ एप्रिल १९२१ पासून १ रुपया ४ आण्यांवर पूर्वीप्रमाणें आला आहे. (२) हिंदुस्थान अगर ब्रह्मदेश ते सयाम खाजगी तारेचा दर शब्दाला सात आणे होता. तो १ एप्रिल १९२१ पासून ९ आणे करण्यांत आला (३) ता. १ आक्टोबर १९२३ पासून हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन यांमध्यें एक चतुर्थांश दरानें 'डेली लेटर टेलिग्राम' स्वीकारण्याची पद्धत सुरूं केली. १ डिसेंबर १९२४ पासून या पद्धतीचें क्षेत्र वाढवून ब्रिटिशांच्या ताब्यांतील प्रदेश व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें या देशाशीं व या वर्षी लिथुआनिया, हेजाझ व पेंबा बेट यांजबरोबर ही पद्धत सुरूं केली. (४) रुपयाची हुंडणावळीची किंमत स्थिर झाल्यामुळें ता. १ जुलई १९२७ पासून परदेशचा

तारेचा दर कमी करतां आला. वरील तारखें- पासून हिंदुस्थान ते ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंड तारेचा दर (व्हाया ईस्टर्न रूट), दर शब्दास एक रुपया दोन आणे कायम करण्यांत आला. मुंबई ते लंडन बीम सर्व्हिस चालू झाल्यामुळें, ईस्टर्न टेलिग्राफ केबल कंपनीनें ग्रेटब्रिटन व उत्तर आय- र्लंडला जाणाऱ्या तारेचा दर कमी करून तो ता. १ सप्टेंबर १९२७ पासून दर शब्दास एक रुपया केला. हिंदुस्थान ते ग्रेटब्रिटन व उत्तर आयर्लंड केबल रूटनें साध्या तारेचा दर शब्दास एक रुपया होता तो वायरलेसनें शब्दास १२ काणे कायम करण्यांत आला. (५) १ सप्टेंबर १९२७ पासून हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांमध्यें व हिंदुस्थान व ग्रेट- ब्रिटन व उत्तर आयर्लंड यांमध्यें वीक–अँड–लेटर टेलिग्राम सर्व्हिस सरळ भाषेंत दर शब्दास तीन आणे या दरानें ईस्टर्न रूट वरून सुरू केली. व बीमसर्व्हिसवरून दर शब्दास अडीच आणे दर ठेविला; मात्र दर तारेंत कमींतकमी वीस शब्द असले पाहिजेत.

टेलिफोनचा मार्ग

सन १९२५–२६ पासून टेलिफोनच्या दळण वळणांत कशी वाढ होत गेली हें पुढील कोष्टकांत दाखविलें आहे.

	१९२५–२६	१९३०–३१
खात्याकडील एक्स्चेंजेस	२५०	२९६
,, कनेक्शनस्	१५९२६	२१९७५
लायसेन्सड् टेलिफोन कंपनीचे–		
एक्सचेंजेस	२०	२४
कनेक्शनस्	२८१८९	३४९१९
टेलिफोन लाइन	५८९९ मैल	७१९६ मैल
वायर	९७०१७ मैल	११४२३० मैल

तारखात्याला यावर्षी टेलिफोन कनेक्शनच्या भाडचाबद्दल ४०८६२१९रु. ट्रंक व कॉल फीबद्दल ११८४८०९ रु. मिळाले. हेच आंकडे गेल्यासालीं अनुक्रमें ३९६०५३१ रु. व ११०१००८ रु. होते.

लायसेन्सड् टेलिफोन कंपन्यांना मिळालेला वसूल व द्यावी लागलेली स्वामित्वाची रक्कम (रॉयल्टी) पुढें दिली आहे.

वर्ष	वसूल	रॉयल्टी
१९२९–३०	७६४९५०२	३८३१६५
१९३०–३१	७४८६९१३	३६८२९६

यावर्षी इंग्लंडांतून आणलेल्या टेलिग्राफ स्टोअ- र्सची किंमत १३५८४४ रु. होती. हा आंकडा गेल्या सालच्या ५५५१८३ रु. पेक्षां पुष्कळच कमी आहे. उलट हिंदुस्थानांत खरेदी केलेल्या स्टोअ- र्सची किंमत १९२९–३० सालीं २४७८५६२ रु. होती.ती यावर्षी ४४३१११३ रु. झाली. म्हणजे वाढली.

टेलिग्राफ वर्कशॉप

गेल्या वर्षी व यावर्षी वर्कशॉपमध्यें जीं कामें (Works)पुरीं झालीं त्यांच्या किंमतीचें तुल- नात्मक कोष्टक पुढें दिलें आहे.

	१९२९–३०	१९३०–३१	वाढ(+)अगर अगर तूट(–)
	रु.	रु.	रु.
कस्ट्रक्शन स्टोअर्स	१३१३१५३	१५४७३४३	+२३४१९०
नवीं हत्यारें (Instruments)	२७४३६६	३७५२५२	+१००८८६
दुरुस्त केलेलीं हत्यारें	२४४००९	२०७०५८	–३६९५१
इतर कामें (बॅटरी, झिंक्स् वगैरे	३२५४३९	२७२५१०	–५२९२९
एकूण	२१५६९६७	२४०२१६३	+२४५१९६

बिनतारी ध्वनिवाहक (Wireless Telegraphy: पंचवार्षिक वृत्तांतः—प्रथम सन १९२७ च्या जुलै महिन्यांत इंडियन रेडिओ टेलिग्राफ कंपनीनें हिंदुस्थानांत सरकारचा परवाना घेऊन हिंदुस्थानांत व इंग्लंड यांमध्यें 'शॉर्ट वेव्ह कमर्शिअल वायरलेस टेलिग्राफ सर्व्हिस' सुरूं केली. या सर्व्हिसच्या स्थापनेपासून सहाच महिन्यांत तिला रोज २००० वर तारा मिळूं लागल्या.

ब्रॉड कास्टिंगः—इंडियन ब्रॉड कास्टिंग कंपनीने हिंदुस्थान सरकारचा परवाना घेऊन १९२७ च्या जुलई महिन्यांत आपलीं ऑपरेशन्स सुरूं केलीं. तिचीं मुंबई व कलकत्ता अशीं दोन स्टेशनें होतीं. परंतु तिच्या वसुलापेक्षां खर्चच फार होऊं लागल्यामुळें सन १९३० च्या आरंभीं तिनें दिवाळें काढलें. त्याच वर्षाच्या मार्च महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें तिचीं स्टेशनें विकत घेऊन मार्च १९३१ पर्यंत सर्व्हिस चालूं ठेवली होती. एअर सर्व्हिसच्या जरूरीकरतां एक शॉर्ट वेव्ह सेट खरेदी करून कराची येथें बसविला आहे. कलकत्ता, मद्रास, व रंगून येथें खात्यानें बनविलेले लहान सेट्स् बसविलें आहेत. यामुळें हिंदुस्थान ते ब्रह्मदेश, सीलोन व बँकॉक इकडे जाणाऱ्या तारांचा उठाव फार जलद होण्यास मदत झाली. सन १९२४ सालीं मद्रास व रंगून यांमध्यें हायस्पीड वायरलेस सर्कीटची स्थापना करण्यांत आली. दक्षिण हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांमधील नेहमींचा तारेचा व्यवहार करण्यास या सर्कीटनें सुरुवात केली. टेलिफोन व टेलिग्राफ खात्याची या सालची सांपत्तिक स्थिति पुढील कोष्टकांवरून दिसून येईल.

टेलिग्राफः—

	१९३०–३१	१९२९–३०
जमा	रु. २६७६७२५८	
खर्च	३२८९३९९२	
तूट	६१२६७३४	३५२०९४२ रु.
रेडिओ टेलिग्राफ	रु.	
जमा	२९४०८६	
खर्च	१११२७०४	
तूट	८१८६१८	६८५६९७ रु.
टेलिफोन		
जमा	रु. ५६३३३३९	५४३९१४२ रु.
खर्च	५८२८०८३	५३२९७०१
तूट	१९४७४४	१०९४४१ (नफा)

टेलिग्राफ को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीज्ः—टेलिग्राफ सहकारी पतपेढ्या, आग्रा, बेळगांव, मुंबई, कलकत्ता, कराची, लाहोर मद्रास आणि रंगून येथें असून त्यांच्या कामांत प्रगति होत आहे. गेल्या सालीं सभासदांची संख्या ४८२५ होती. त्यांत वाढ होऊन ती या सालीं ५१४४ झाली.

अधिकारीः—टेलिग्राफ खात्यांत ३१ मार्च १९३१ रोजीं १३२३९८ अधिकारी होते. ही संख्या गेल्या सालीं १३११९७ होती.

Capital Outlay of the Department सन १९३०–३१ चे अखेरीस ही रकम १५२२३६१२१ रु. होती. त्यांपैकीं सन १९३०–३१ या एका वर्षांत नव्या मिळकतीवरील कॅपिटल आउटले ६७५६६९७ रु. होतें. त्यांत १३१३०५८७७ रु. पोस्टाच्या इमारती व मेलव्हॅनकरितां, ३५२८२४३ रु. टेलिग्राफ इमारती, केबलस लाइनस् व उपकरणीं यांकरितां, ८८५७७३ रु. रेडिओ इमारती, मास्टस् व एरियलस् करतां, आणि १०३६८००रु. टेलिफोन इमारती, लाइन्स व उपकरणीं याकरतां होते.

३१ मार्च १९३१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षांतील हिंदुस्थानांतील पोस्ट व तार खात्यांचा जमाखर्च

३१ मार्च १९३१ अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षांतील हिंदुस्थानांतील पोस्ट व तार खात्यांचा

	जमाखर्च			
	जमा (रु.)	खर्च (रु.)	नफा रु.	तोटा (रु.)
पोस्ट ऑफीस	७५०११३७१	८१३००५८३		
टेलिग्राफ	२६७६७२५८	३२८९३९९२		
रेडिओ	२९४०८३	१११२७०४		
टेलिफोन	५६३३३३९	५८२८०८३		
एकूण.	१०७७८३०५४	१२११३४३३२		१३३४३३०८

इंडिया केवलची अद्‌भुत्‌ कथा

(ता. २३ मार्च १९३१ च्या लंडन येथील इंग्लिशमन पत्रांतील उतारा.)

इंडो युरोपियन टेलिग्राफ कंपनीचा 'इंडोरूट' ता. १ मार्च १९३१ पासून बंद करण्यांत आला. कारण बिनतारी ध्वनिवाहक यंत्रासारख्या अनेक सुधारणा अस्तित्वांत आल्यामुळें या हिंदुस्थान व युरोपमधील तारेच्या मार्गाची आवश्यकता कमी झाली. या रूटचा इतिहास म्हणजे दळणवळणाच्या मार्गांच्या इतिहासाचाच मोठा काल होय. तेहेरान व लंडन यांमध्यें टेलिग्राफ लाइन सुरू करण्याकरितां इंडोयुरोपियन टेलिग्राफ कंपनी सन १८६८ सालीं स्थापन झाली. हिंदुस्थान ते युरोप ही पहिलीच टेलिग्राफ सर्व्हिस असल्यामुळें हिची फार लवकर भरभराट झाली. सन १८७१ सालीं इराणच्या आखातांतून गेलेल्या सामुद्रीय तारांच्या मार्गाची व्यवस्था पहाणारे इंडोयुरोपियन टेलिग्राफ खातें मुंबई सरकारकडून काढून हिंदुस्थान सरकारनें आपल्या हातीं घेतलें. व नंतर इंडिया ऑफिसच्या ताब्यांत दिलें. सन १९०१ सालीं गल्फ केबलस् नव्या घालणें अगर थेट पर्शियांतून जमिनीवरील तारांचा मार्ग सुव्यवस्थित चालू करणें अगत्याचें झालें. म्हणून इराण सरकारनें केरमान, येज्द, काशान व तेहरान वरून कराची ते युरोप लँड लाईन घालण्याची परवानगी दिली. ही लाइन घालण्याचें काम चालू असतांना इंडो–युरोपियन कंपनीच्या अधिकारी वर्गाला अनेक संकटांशीं झगडावें लागलें. इराणच्या पठारावरून वाहणाऱ्या बर्फाच्या वावटळीपासून 'लाइन गार्डा'चें संरक्षण करणें व तेथील धर्मवेडचा लोकांची समजूत घालून त्यांस शांत करणें हीं दोन मुख्य कामें त्यांना करावीं लागलीं. असें करतांना कांहींचे खून झाले व कांहीं तेथील हवा न मानवल्यामुळें मरण पावले. मेजर ओ. सेंट जॉन तर सन १८६७ सालीं काझेरून व बुशायर मधील पिरीझान खिंडींत सिंहाच्या तावडींतून थोडक्यांत बचावला. सर्व स्थिरस्थावर होऊन लाइनीचा व्यवहार सुरक्षितपणें चालू होत आहे तोंच महायुद्ध सुरू झालें. यामुळें पुष्कळ नव्याच आपत्ति उद्‌भवल्या. लाइनीचे बरेच विभाग शत्रूच्या ताब्यांत गेले तरी दुसऱ्या मार्गांनीं दळणवळण तेथील अधिकाऱ्यांनीं मोठ्या शिताफीनें चालूं ठेवलें. वॉर सर्व्हिसवर बरीच मंडळी गेल्यामुळें तेथील अधिकारीवर्गच जरी दुबळा झाला होता तरी मेसापोटेमियांतील सैन्य व हिंदुस्थान यामधील संबंध त्यानें तुटूं दिला नाहीं. एम्डेनजहाजानें हिंदुस्थानच्या किनाऱ्यालगतच्या समुद्रांतून धुमाकूळ घातल्यावर त्यानें कोकोज बेटावरील ईस्टर्न केबल स्टेशनचा नाश करण्याकरितां एक बोट पाठवून दिली. तेथील बिनतारी यंत्राची सामुग्री जर्मनींच्या दृष्टीआड अगोदरच केली होती! पण वायरलेस एरियलस् लांबवितांना निराळीच युक्ति योजावी लागली. एरियल्स् हे टेनिसचीं जाळीं अडकविलेले टेनिसकोर्टावरील खांब आहेत अशी जर्मानांची समजूत करून ते सोडून देण्याबद्दल त्यांचे मन वळविण्यांत आलें. पुढें याच एरियल्स्च्या साहाय्यानें आस्ट्रेलियन क्रूझरला एम्डेनची वर्दी देण्यांत आली. व त्याप्रमाणें क्रूझरनें हल्ला करून एम्डेनला जलसमाधी दिली. इंडोयुरोपियन कंपनीच्या अधिकाऱ्यांचा शत्रूशीं अगदीं निकट संबंध आला होता. प्रसिद्ध जर्मन प्रचारक वॉसमस हा जर्मनीच्या पक्षाला इराणला आणण्याचा प्रयत्न करीत होता. व त्याची प्रचार करण्याची पद्धति ठराविक नव्हती. तो या रूटच्या आसपास गनिमी काव्याच्या लढाई प्रमाणें अनेक उलाढाली करीत असे. कंपनीचे पुष्कळ अधिकारी त्याच्या हातांत सांपडले; आणि त्यांपैकीं मि. पेटिग्रचू शत्रूच्या कैदेंतच आहराम येथें मरण पावला ! व मि. विट्‌कुजेल शिराझ् एथें आपली जागा लढवीत असतां कामास आला.

खात्यावरील मुख्य अधिकारीः––सर ह्यूबर्ट सॅम्स् केटी, सी. आय. ई., आय. सी. एस्. डायरेक्टर जनरल.

पोस्टाचे व तारेचे दर

पोस्टकार्डें:––एकेरी पाऊण आणा, दुहेरी (रिप्लाय) दीड आणा.

पत्रें:––पाकिटास अडीच तोळ्यांपर्यंत ०१०३ आणा, पुढें प्रत्यक अडीच तोळ्यास अगर त्याचे भागास सव्वा आणा. पोस्टाचें पाकिट घेतल्यास ०१०४.

बुकपोस्ट व सँपल पोस्टः––प्रत्येक पांच तोळ्यास अगर त्याचे भागास अर्धा आणा.

नोंदलेलीं वर्तमानपत्रें:––आठ तोळेपर्यंत पाव आणा, वीस तोळेपर्यंत अर्धा आणा, पुढें प्रत्येक वीस तोळ्यास अगर त्याचे भागास अर्धा आणा.

पार्सलें:––(हंशील आगाऊ भरलेंच पाहिजे) वीस तोळेपर्यंत दोन आणे, चाळीस तोळपर्यंत चार आणे, पुढ (८०० तोळेपर्यंत) प्रत्येक चाळीस तोळ्यास अगर त्याचे भागास चार आणे.) (४४०

तोळ्यांच्या पुढील पार्सलें रजिस्टर केलींच पाहि-जेत.)

रजिस्टर फी:—प्रत्येक नगास वाजवी हंशिला-शिवाय तीन आणे. मालकास पोंचल्याची पावती हवी असल्यास एक आणा जास्त पडतो.

रजिस्टर पाकिटें:—लहान ०४०९ आणे. मध्यम ०५०३ आणे, मोठें ०५०६ आणे.

विमा उतरण्याची फी:—(वाजवी हंशील व रजिस्टर फीशिवाय) शंभर रुपयास अगर त्याचे भागास तीन आणे. १५० रु.पर्यंत ०४, २०० रु. पर्यंत ०५, पुढें १००० पर्यंत प्रत्येक शंभरास अगर त्याचे भागास ०२, १००० चे पुढें प्रत्येक शंभरास अगर त्याचे भागास ०१.

मनीआर्डर व व्ही. पी. कमिशन:—दहा रुपये-पर्यंत दोन आणे, पंचवीस रुपयेपर्यंत चार आणे, पुढील प्रत्येक पंचविसांपैकीं दहारुपयांच्या भागास दोन आणे. दहाच्या वरील पंचवीस रुपयांच्या भागास चार आणे, (प्रत्येक व्ही. पी. रजिस्टर केली पाहिजे) पोर्तुगीज गोवा व सिलोन येथें मनीऑर्डरीस नहमीच्या दीडपट हंशील पडतें)

पोस्टांत पत्रें व रजिस्टर न केलेलीं पार्सलें दिल्याबद्दलचा दाखला:—कार्डें, पाकिटें अगर बुकपोस्ट व वर्तमानपत्रें यांपैकीं कोणतेंही तीन-पर्यंत अर्धा आणा. अनरजिस्टर पार्सलें तीनपर्यंत अर्धा आणा.

तार करणें:—साधी (ऑर्डिनरी) पत्ता धरून बारा शब्दापर्यंत १३ आणे, पुढें प्रत्येक शब्दास एक आणा, जरूरीची (एक्सप्रेस) पत्ता धरून बारा शब्दांपर्यंत १०१० रुपया. पुढें प्रत्येक शब्दास दोन आणे. ऑफिस बंद असल्यास लेट फी म्हणून प्रत्येक ऑफिसचा १ रु. पडतो.

तारेनें मनिऑर्डर करणें:—वाजवी मनिआर्डर कमिशनशिवाय अधिक दोन आणे व तारेचें हंशील भरल्यास तारेनें मनिआर्डर होते.

पत्राचा ताबडतोब बटवडा व्हावयास हवा असल्यास त्यास वाजवी हंशिलापेक्षां अधिक दोन आण्यांचें तिकिट लावल्यास ज्या गांवीं तार ऑफिस आहे त्या गांवीं सदर पत्र जादा शिपायाबरोबर बटवडा करण्यांत यतें.

पोस्टाबद्दल तक्रार करणें असल्यास सदर पत्रास वाजवी लागणारें हंशील लावलें पाहिजे असा १९३२ सालपासून नवीन नियम करण्यांत आला

परदेशी पोस्ट, एअरमेल व तार यांचे दर—

परदेशाहून मुंबईस दर शुक्रवारीं डाकेची बोट येते. व दर शनिवारीं मुंबईहून पोस्ट घेऊन जाते.

पोस्टक.र्डें:—आंतरराष्ट्रीय पोस्टकार्ड,एकेरी ०२ आण्यास एक व दुहेरी ०४ आण्यास एक अशीं मिळतात. नेहमींच्या कार्डांसही इतकें हंशील लावलें असतां तीं चालतात. इंग्लंड, अमेरिका, इ. चें पोस्टेज एकच आहे.

पत्रें:—अडीच तोळ्यांपर्यंत साडेतीन आणे. पुढें प्रत्येक औंसास अगर त्याचे भागास दीड आणा ग्रेटब्रिटन, आयर्लंड, इंग्लिश वसाहती व ईजिप्त या ठकाणीं अडीच तोळेपर्यंत ०२०६ आणे पड-तात आणि यापेक्षां जास्त एक औंस अगर त्याचे भागास ०२ आण. सिलोन व पोर्तुगीज गोवें येथें नेहमींच्या हंशिलांत कार्डें व पाकिटें जातात.

बुकपोस्ट व सॅंपल पोस्ट:—प्रत्येक पांच तोळ्यांस अगर त्याचे भागास ००९ आणा.

पार्सलें:—(हंशील आगाऊ भरलेंच पाहिजे. निराळी रजिस्टर फी लागत नाहीं). तीन आणे जास्त दिल्यास पोचल्याची पावती मिळते.प्रत्येक देशाचे दर निरनिराळे आहेत.

रजिस्टर फी:—प्रत्येक नगास पाकिट अगर कार्डांसही वाजवी हंशील सोडून मालकास पोंच-ल्याची पावती हवी असल्यास ०३जास्त पडतात.

म. ऑ. व व्ही. पी. कमिशन:—साधारणपणें ४० पौंडांपर्यंत रक्कम म. ऑ. नें पाठवितां येते. १ पौंडापर्यंत ०४ आणे, २ पौंडापर्यंत ७ आणे, तीन पौंडापर्यंत १० आणे, ४ पौंडापर्यंत १३ आणे, ५ पौंडापर्यंत १ रु. याच दराचे प्रमाणांत पुढील वाढ होते. इंग्लंडशिवाय इतर मोठ्या देशांत तारेनें म. ऑ. करतां येत नाहींत.

परदेशी तार:—ही तार ६ प्रकारांनीं करतां येते. अर्जंट तारेस नेहमींच्या तिप्पट दर पडतो. सगळ्यांत स्वस्त तार २० शब्दांची असते.तिला केबल D.L.T.म्हणतात.प्रत्येक देशाचे अंतरावर दर अवलंबून आहेत. इंग्लंडमध्यें तार करावयाची असल्यास २० शब्दांच्याD.L.T.तारेस ५रु.पुढें प्रत्येक शब्दास ०७०६ पडतात.

एअरमेल:—याशिवाय पुष्कळ देशांत इंग्लंड-जर्मनीस एअरमेलनें पत्रें रवाना होतात. या पत्रांना वाजवी हंशिलाशिवाय प्रत्येक अर्धा औंस अगर त्याचे भागास ०६ आणे दर पडतो. एअरमेलचीं तिकिटें मिळतात, पण नेहमींचीं तिकिटें लावलीं तरी चालतात. इंग्लंडला अर्ध्या औंसास एकूण आठ आणे व १ औंसास चौदा आणे पडतात. अमे-रिकेस अर्ध्या औंसास एकूण ९ आणे व एका औंसास पंधरा आणे पडतात.

हुजूर दौलत

अनुक्रमणिका

१. तात्त्विक विवेचन:–

(१) विषयाचें स्वरूप. (२) करदानाचें सामर्थ्य म्हणजे काय ? (३) करवसुलीची मर्यादा (४) निष्कर्ष.

२. हिंदुस्थानची हुजूर दौलत : ऐतिहासिक:–

(५) राज्यकारभाराचें ध्येय. (६) लॉर्ड मेयोची सुधारणा (७) प्रांतिक सरकारचे वाढते अधिकार. (८) सोयीची सवलत (९) सनदशीर हक्कास सुरुवात. (१०) प्रांतिक सरकारचें स्वातंत्र्य. (११) जमाखर्चाची अडचण (१२) मेस्टन करार. (१३) मेस्टन करारांतील दोष.

३. हिंदुस्थानची हुजूर दौलत : आजचे प्रश्न:-

(१४) लेटन रिपोर्ट (१५) आजच्या गरजा. (१६) तात्त्विक निर्दोष योजना. (१७) लेटन यांची योजना. (१८) लेटन योजनेचे गुणदोष.

४. सांपत्तिक स्थितीचें सिंहावलोकन.कोष्टकें:-

(१९) वरिष्ठ सरकारचा दशवार्षिक जमाखर्च. (२०) सर्व प्रांतिक सरकारचा दश वा. जमाखर्च. (२१) मुंबई सरकारचा दश वा. जमाखर्च. (२२) मध्यप्रांत सरकारचा दश वा.जमा.ख. (२३) वरिष्ठ व प्रांतिक सरकारांचा कलमवार वसूल. (२४) वरिष्ठ व प्रांतिक सरकारांचा कलमवार खर्च. (२५) प्रांतिक (मुंबई व मध्यप्रांत) जमेचें कलमवार स्वरूप. (२६) प्रांतिक खर्चाचें कलमवार स्वरूप.

५. आयव्ययाच्या बाबींचें विस्तारानें परीक्षण–

(२७) जकात. (२८) प्राप्तीवरील कर. (२९) मीठ. (३०) अफू. (३१) रेल्वे. (३२) इ.स. १९२४ ची फारकत. (३३) रेल्वेचे दर. (३४) जमिनीचा सारा, तोडरमल्लाची योजना. (३५) कायम धाऱ्याची पद्धत. (३६) सारावसुलीच्या पद्धति. (३७) मुंबई इलाख्यांतील पद्धत. (३८) खंड कीं कर? (३९) साऱ्याची आकारणी. (४०) जमाबंदी म्हणजे काय? (४१) सुधारणेची दीक्षा. (४२) अबकारी . (४३) जंगल. (४४) कालवे. (४५) संरक्षण. (४६) होमचार्जेस.

६. राष्ट्रीय कर्जाचें स्वरूप:––

(४७) तात्त्विक. (४८) राष्ट्रीय कर्जाचे अपाय. (४९) हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जाची वाढ. (५०) कर्जाचें आजचें स्वरूप. (५१) उत्पादक व अनुत्पादक कर्ज. (५२) परदेशच्या कर्जाची जरूरी. (५३) आडमाप सवलत. (५४) कर्जवाढ कां झाली? (५५) राष्ट्रीय सभेची कर्जकमिटी. (५६) एका आक्षेपाचें निरसन.

७. हुजूर दौलतीची व्यवस्था:––

(५७) अंदाजपत्रक. (५८) अंदाजपत्रकाबद्दल सूचना. (५९) अंदाजपत्रकावरील चर्चा. (६०) मंजूर रकमेचा खर्च.

८. कराचा बोजा:––

(६१) दर माणशीं कर. (६२) कराचा बोजा.

९. हुजूर दौलतीबाबतचे आजचे प्रश्न:–

(६३) गोलमेज कमिटचा. (६४) ताबडतोब आवश्यक सुधारणा.

हुजूर दौलत (Public finance)

१ तात्त्विक विवेचन

१. विषयाचें स्वरूप:–– अंथरूण पाहून पाय पसरावे अशी आपल्यामध्यें म्हण आहे. तिचा अर्थ असा कीं, आपला आदा पाहून खर्च करावा, व सामान्य व्यवहारांत मनुष्य तसें करतोही. पण सामान्य मनुष्याच्या व्यवहारांत लागू पडणारा नियम सरकारच्या जमाखर्चाच्या व्यवस्थेंत पाळला जात नाहीं. सरकार आपलें उत्पन्न किती आहे हें पाहून त्याप्रमाणें खर्च मर्यादित करीत नाहीं तर स्वत:ची जरूर पाहून त्याप्रमाणें प्रजेवर कर बसवून किंवा अन्य

मार्गानें पैसा उत्पन्न करतें. अर्थातच सरकारला देखील कर बसवून वाटेल तेवढा पैसा उत्पन्न करतां येत नाहीं. त्यालाही लोकांच्या कर देण्याच्या शक्तीची मर्यादा आहेच. परंतु सामान्यतः एवढें खरें कीं, सामान्य मनुष्य आदा पाहून खर्च करतो. सरकार किती खर्च लागेल हें पाहून आदा उत्पन्न करतें. सरकारच्या खर्चाचें तोंड वाढलेलें असल्यामुळें सरकारास नुसते कर बसवून आपला खर्च भागवितां येत नाहीं. अशा वेळीं जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं सरकार नानाप्रकारच्या युक्त्या योजतें. देशांत व परदेशांत कर्ज काढणें, कागदी चलनाचा प्रसार करणें, प्रत्यक्ष कर बसवून न भागलें तर जिनसांच्या आयात-निर्यातीवर अप्रत्यक्ष कर वसविणें, जिनसांचे मक्ते देणें इत्यादि अनेक प्रकारचे फडणीसाच्या कुशल बुद्धीला सुचतील असे मार्ग सुधारलेल्या देशांतील सरकार शोधून काढतें. हेतु हा कीं, लोकांना ओझें तर वाटूं नये पण सरकारचें तर काम साधावें. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, प्रत्यक्ष कर बसविण्याखेरीजचे दुसरे उपाय हे कर बसविण्याचे नुसते आडवळणाचे मार्ग आहेत, दुसरें कांहीं नाहीं. आज कर्ज काढलें तरी उद्यां तें कर बसवून परत केलें पाहिजे. चलनी नोटांचें चलन फुगविलें तर किंमती वाढतील व लोकांचें ऐन उत्पन्न कमी होईल; म्हणजे लोकांवर अप्रत्यक्ष कर बसलाच. मक्ते दिले तरी मक्त्यांमुळें सरकारला येणारें उत्पन्न हें मक्त्याच्या पदार्थाची किंमत वाढल्यामुळें सरकारला मिळूं शकतें. एकूण प्रजेनें मिळविलेल्या संपत्तीच्या वाटचांत सरकारनें त्यांना वाटेल त्या रूपानें भागीदारी करावी. याखेरीज सरकारचें काम भागत नाहीं. हें तत्त्व साधें पण मूलभूत व महत्त्वाचें आहे. वार्षिक अंदाजपत्रकांत फडणीस कित्येक वेळां आकड्यांच्या गौडबंगालांत कराचा खरा बोजा किती हें नीटसें दाखवीत नाहींत. किंबहुना त्या गौडबंगालांत स्वतःही गुरफटून जातात. परंतु सरकारनें आपले खर्च भागविण्यासाठीं विविध प्रकारानें पैसा उत्पन्न केला तरी शेवटीं सरकारला तो लोकांवर बसविलेल्या करांतूनच द्यावा लागणार हें विसरून चालावयाचें नाहीं.

(२) कर देण्याचें सामर्थ्य म्हणजे काय ?– शेवटीं सरकारचा सर्व खर्च रयतेनें दिलेल्या करांतूनच भागणार हें समजल्यावर लोकांची कर देण्याची मर्यादा तीच सरकारची खर्च करण्याची मर्यादा होय हें उघड झालें. ही मर्यादा म्हणजे कांहीं ठराविक असते असें नाहीं. तिची कमीअधिक वाढ होते. व सरकारच्या धोरणानें तिच्यावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होऊं शकतो. उदाहरणार्थ–कराचा बोजा विशेषतः खालच्या मजूर वर्गावर विशेष पडेल व श्रीमंत लोक त्यांतून निसटतील तर मजुरांना तें ओझें असह्य होईल व त्यांना तोंडच्या भाकरींतील अर्धा घास सरकारला कर म्हणून द्यावा लागेल. या योगानें त्यांची धनोत्पादक शक्ति कमी होईल व शेवटीं आडांतच नाहीं तर पोहोऱ्यांत कोठून येणार? या न्यायानें सरकारला तितका कर मिळणें जड जाईल. याच्या उलट कराचा बोजा विशेष श्रीमंतांवर पडून त्या कराच्या उत्पन्नांतून नुसते बड्या ऑफिसरांचे पगार भागण्याऐवजीं जर गरीबांच्या सुखसोईची वाढ झाली तर त्यामुळें त्यांचें संपत्तीच्या उत्पादनाचें सामर्थ्य वाढीस लागेल. सांगण्याचा मुद्दा हा कीं, करदानाचें सामर्थ्य ही ठराविक ठशाची रेखीव गोष्ट नव्हे. तरीपण करदानाचें सामर्थ्य ही शब्दयोजना वरील विधानांवरून वाटते तितकी संदिग्ध नाहीं. देशांत संपत्तीचें उत्पादन होत असतां त्याचवेळीं सर्व लहान थोर तिचा उपभोगही घेत असतात. व उत्पादन व उपभोग यांची वजावट नेहमीं चालूं असते. या वजावटींतून संपत्तीच्या उत्पादनास साह्यभूत होणारें भांडवल बाजूस काढलें पाहिजे. ह्या भांडवलाची नित्य झीज होत असते. म्हणून ती भरून काढणारा फंड बाजूस काढला पाहिजे. हें भांडवल नुसतें कायम राहून चालणार नाहीं. समाजाच्या वाढत्या व्यापाप्रमाणें त्यांत कमी अधिक भर पडली पाहिजे. लोकसंख्या वाढत असते. तेव्हां ह्यांत व्यक्तींनीं उत्पादन केलेल्या संपत्तीचा नवी प्रजाही जुन्या प्रजप्रेमाणें उपभोग घेते, त्यांच्यासाठीं एक वाटा बाजूस काढला पाहिजे. तसेंच एकाद्या देशांत लोकांच्या राहणीचा दर्जा मानवी जीवनास असलेल्या किमान आवश्यकतेपेक्षां नीच असला तर तो वाढीस लागणें जरूर आहे. गरीबीनें खंगलेल्या देशाच्या सरकारनें आपल्या कराच्या बोजानें प्रजा अधिक गरीब झाली नाहीं एवढेंच सिद्ध करून भागणार नाहीं. तर त्यांची गरीबी कमी होण्याची त्यांना संधि मिळेल इतका पैसा सरकारनें त्यांच्या जवळ राहूं दिला पाहिजे. ह्या सर्व गोष्टींची वजावाट करून राहील तें करदानाचें सामर्थ्य होय. सारांश संपत्तीचें उत्पादन–(विद्यमान व्यक्तींनीं घेतलेला संपत्तीचा उपभोग+भांडवलाची झीज भरून काढ-

णारा वाटा+अधिक वाढलेल्या लोकसंख्येनें घेतलेला संपत्तीचा उपभोग+राहणीचा नीच दर्जा क्रमशः वाढीस लागण्यासाठीं राहिलेला वांटा.)=करदानाचें सामर्थ्य असें समीकरण बसतें.

(६) कर–वसुलीची मर्यादाः–– करदानाचें सामर्थ्य अमुक इतकें आहे. हें ठरलें तरी सरकारनें किती वसुली करावी हें तेवढ्यानें निश्चित होत नाहीं. पूर्वीं सरकार लोकांचें संरक्षण करण्यापलीकडे लक्ष देत नव्हतें. तेव्हां सैन्य व आरमार, पोलिस, न्याय कचेऱ्या, कायदेकानू करणें हींच काय तीं महत्त्वाचीं सरकारी खातीं असत. परंतु सरकारनें प्रजेसाठीं काय करावें, त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यांत कितपत हात घालावा याबद्दलच्या कल्पनांत बदल होत आहे. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर व्यक्तिस्वातंत्र्याचा हव्यास इतका वाढला कीं, प्रजेच्या व्यवहारांत कमींत कमी ढवळाढवळ करणें हें जणूं काय उत्कृष्ट राज्यपद्धतीचें निकषच होऊन बसलें. पुढें जॉन स्टुअर्ट मिलच्या काळांत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर 'पुष्कळांचें पुष्कळ सुख' साध्य करण्यासाठीं व्यक्तिस्वातंत्र्यास जरूर त्या मर्यादा घातल्या पाहिजेत असें वाटूं लागलें. यापुढील काळांत समाजाची सर्वांगीण उन्नति व्हावयास व्यक्तीचे फुटकळ यत्न उपयोगी पडत नाहींत. कित्येक वेळां त्यांचा एकमेकांविरुद्ध संक्षेप जातो, कित्येक वेळां एक व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह प्रबळ होऊन बहुजनसमाजास भारी होतात व आपल्या स्वार्थापायीं समाजास हेलकावे देतात. सारांश, समाजाचें सामुदायिक जीवन निर्वेध व निरामय होण्यास त्या समाजाचें बरेंवाईट पाहण्याचें काम एकाद्या समष्टिरूप संस्थेकडे दिलें पाहिजे, ही भावना दिवसेंदिवस प्रबळ होऊं लागली व त्यांतूनच समाजसत्तावादाच्या कल्पनेचा उदय झाला ह्या कल्पनांचे बारीक सारीक भेद ह्या पुस्तकांत इतरत्र दिले आहेत. (राजकीय मतपंथ प्रकरण पहा) प्रस्तुतचा मुद्दा असा कीं, ही समष्टिरूप संस्था म्हणजे सरकार इतकें ठरल्यावर या सरकारचा व्याप समाजाचें अंतर्बाह्य जीवन सुखावह करण्याइतका मोठा होईल व मग आगगाड्या,तारायंत्रें, शिक्षण, आरामाच्या सोई, इस्पितळें, काय हवें नको तें सर्व सरकारास करावें लागेल, व सरकारच्या खर्चाचें तोंड मोठें होईल. सरकार प्रजेच्या विश्वासास पात्र असेल तर प्रजेकडून बरीच करवसुली करून सरकारनें निरनिराळीं कामें करण्यास हरकत नाहीं. पण सरकार जर प्रजेच्या विश्वासास पात्र नसेल तर मोठ्या ध्येयाचा उच्चार करूनही त्या नांवाखालीं केलेली करवसुली जुलूम-जबरदस्ती ठरेल. सारांश, एकादें सरकार प्रजेच्या विश्वासास पात्र आहे कीं नाहीं, तें परकीय आहे कीं स्वकीय आहे, तें नियंत्रित आहे कीं अनियंत्रित आहे, व्यक्तिस्वातंत्र्यवादी समाजावर राज्य करतें कीं समाजसत्तावादी समाजाचा कारभार पाहातें, या सर्व गोष्टींवर सरकारच्या कर-वसुलीची मर्यादा अवलंबून राहील.

(४) निष्कर्षः–वरील विवेचनावरून ध्यानांत येईल कीं, हुजूर दौलतीचें (Public finance) शास्त्र हें गणितासारखें रेखीव शास्त्र नाहीं. सरकारास ४ कोट रुपये अधिक लागले तर सरकारी फडणीसानें करांच्या दरांच्या तक्त्यावर नुसतें तांबड्या पेन्सिलीनें कराचा दर त्या प्रमाणांत वाढवून चालणार नाहीं. त्याचे दूरवरचे परिणाम काय होतील तें पाहिलें पाहिजे. मिठावरील कर दर मणास १। रुपयाऐवजीं २॥रु. केला तर उत्पन्न दुप्पट वाढेल. पण त्याचा गोरगरीबांवर भलताच परिणाम होईल. सालोसाल येणारी तूट भरून काढण्यास आयात मालावरील जकातीचे दर वाढविल्यास कदाचित आयात संपुष्टांत येऊन दर वाढलेले असतांहि उत्पन्न वाढणार नाहीं. दोन देशांत कराचा बोजा दर माणशीं सारखाच असूनही एका राष्ट्रांत तो सुखसंवर्धक, तर दुसऱ्यांत तो अन्यायमूलक व दुःखकारक होईल. केव्हां केव्हां एकीकडे जकातीचें उत्पन्न सालोसाल वाढूनही उद्योगधंद्यांचें पुरेसें संरक्षण झालें नाहीं असें दृश्य पहावयास सांपडेल. सारांश हुजूर दौलतीचें शास्त्र हें सामाजिक शास्त्र आहे. करवाढीचे किंवा कर कमी केल्याचे परिणाम, अंदाज–पत्रकाच्या तक्त्यांत दाखवितां येतात, त्यापेक्षां फार दूरवर पोहोंचतात. म्हणून सरकारी फडणवीसांनीं आपल्या हातांतील अंदाजपत्रकांचा तक्ता हा निर्जीव कागदाचा कपटा म्हणून न समजतां राष्ट्राच्या विविध जीवन क्रमावर अनेक स्फुट व अस्फुट मार्गांनीं इष्टअनिष्ट परिणाम घडवून आणणारा जिवंत जादूगार आहे, त्याचा जपूनच उपयोग केला पाहिजे हें पक्कें लक्षांत ठेवावें.

(२) ऐतिहासिक

(५) राज्यकारभाराचें ध्येयः—हिंदुस्थानांत कंपनी सरकारचें राज्य प्रथम स्थापन झालें तेव्हां कंपनीचा राज्यकारभार करण्याचा

हेतु उघड उघड व्यापारी स्वरूपाचा होता. देशाचें उत्पन्न उणे देशाचा खर्चनफा हें समीकरण उघड वा प्रच्छन्न तऱ्हेनें कंपनी उपयोगांत आणी. कंपनीच्या डायरेक्टरांना मिळणारा डिव्हिडंड इ. स. १८३३ त १०॥ टक्के असावा असें नियमित झालें व ह्या हिशेबानें दरसाल ६३ लक्ष पौंडांची रक्कम डिव्हिडंड रूपानें हिंदुस्थानच्या तिजोरींतून जाई. ही स्थिति इ. स. १८५८ पर्यंत चालंच होती. या वर्षी कंपनीचा शेवट झाल्यावर ब्रिटिश सरकारकडे हीं राज्यकारभाराचीं सूत्रें आलीं. त्यावेळीं तत्कालीन राज्यकर्त्यांच्या मनावर कांहींसें व्यक्तिस्वातंत्र्य व थोडेंबहुत पुष्कळांचें पुष्कळ सुख या कल्पनांचा पगडा होता. निव्वळ अंतर्बाह्य संरक्षण, न्यायदान व कायदेकानू करणें ह्या कोणत्याही सरकारच्या प्राथमिक कर्तव्याची त्यांना विशेष जाणीव होती. व शिक्षण, दळणवळण, आरोग्यादींचीं, सुखसंवर्धनाचीं साधनें आपण प्रजेस पुरविलीं तर त्यांतच, निव्वळ हडेलहप्पी सरकारहून विशेष असें आपलें सुधारलेंपण आहे असें त्यांस वाटत होतें. विलायतेंतील सुखसोयींचीं साधनें येथें आणण्यांत एकीकडे आपला माल खपविण्याचा व्यापारी हेतु, दुसरीकडे या साधनांचा लष्करच्या हालचालीस कसा उपयोग होईल ही दुसरी बाजू व या सुखसोयींच्या साधनांची पूर्ण संवय लागल्यावर साहजिकच प्रजेंत जडत जाणारें परावलंबित्व याची तत्कालीन सरकारास जाणीव नव्हती असें नाहीं. परंतु सुखसंवर्धनाचीं साधनें पुरविण्याचा निर्भेळ हेतु लक्षांत घेतला, तरी तत्कालीन सरकारांस समाजाचा सामुदायिक जीवनक्रम उद्यावर नजर देऊन अमूक एका दृष्टीनें आंखला पाहिजे याची दूरतः कल्पनाही नव्हती. हीच गोष्ट उदाहरणानें स्पष्ट करावयाची तर असें म्हणतां येईल कीं, उद्याच्या हिंदुस्थानचा जगाच्या शर्यतींत टिकाव लागावयाचा तर आर्थिक दृष्टया अमूक उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे, सामाजिक दृष्टया समाजांतील इतक्या दोषांची सक्तीनें हकालपट्टी झाली पाहिजे असा कांहीं कार्यक्रम किंवा असें कांहीं ध्येय तत्कालीन सरकारच्या डोळ्यांपुढें नव्हतें. सारांश, सरकार अगदींच हडेलहप्पी नसलें तरी त्या प्रकारच्या ध्येयापासून इष्ट दिशेनें फारसें दूर गेलेलें नव्हतें.

(६) लॉर्ड मेयोची सुधारणाः– हडेलहप्पी ध्येयापासून फारसें दूर न गेलेल्या सरकारास एकतंत्री कारभार सोयीचा वाटतो. म्हणून कंपनी सरकारकडून ब्रिटिश सरकारकडे हिंदुस्थानचा राज्यकारभार आला तेव्हां हुजूर दौलतीचा कारभार पूर्णपणें एकतंत्री होता. म्हणजे वरिष्ठ हिंदुस्थान सरकार हें आपल्या सर्व मुंबई, मद्रास आदिकरून प्रांतिक सरकारांस आपल्या मुनिमाप्रमाणें वागवी. ह्या मुनिमांनीं ठिकठिकाणचा वसूल गोळा करून त्याचा भरणा वरिष्ठ सरकारकडे करावा व सालोसाल आपणास हवा तो पैसा खर्चासाठीं मागून घ्यावा अशी पद्धत असे. ह्या पद्धतींत अनेक दोष होते. एकतर प्रांतिक सरकारांना वसूल गोळा करण्यांत कांहीं आकर्षण नसे. वसूल कमी येवो वा जास्ती येवो. तो गोळा करतांना कमी खर्च येवो वा अधिक येवो त्याच्या बऱ्या–वाइटाचे ते धनी नव्हते. तसेंच वर्षाच्या आरंभीं खर्चासाठीं एकवार घेतलेली रक्कम वर्षाअखेर खर्चून टाकावी असें त्यांस वाटे. कारण शिल्लक राहिल्यास ती पुनः हिंदुस्थान सरकारकडे जमा होई व ती पुनः फिरून मिळल कीं नाहीं याची शाश्वती नसे. खेरीज ह्या पद्धतींत आणखी एक दोष असा कीं, वर्षाच्या प्रारंभीं प्रत्येक प्रांतिक सरकारास आपल्या गरजांचें गाणें वरिष्ठ सरकारपुढें गावें लागें. व जो तें चढत्या सुरांत गाऊन आपल्या गाण्याला गाऱ्हाण्याचें स्वरूप देऊन आकांडतांडवाचा आविर्भाव आणी, त्यास साहजिकच अधिक वाटा मिळे. प्रतिष्ठित इभ्रतदार प्रांतिक सरकारास तर हें वार्षिक रडगाणें गाण्याचा मनस्वी कंटाळा वाटत असे. अशा स्थितींत खऱ्या अब्रूदार गरजवंत सरकारचे हाल होत. ही स्थिति इ. स. १८७० पर्यंत चालली. त्या वर्षी लॉर्ड मेयोनें प्रांतिक सरकारास दरसाल ठराविक रक्कम देऊन त्यांच्याकडे कांहीं खात्यांच्या खर्चाची व्यवस्था दिली. ही ठराविक रक्कम सर्व प्रांतिक सरकारास मिळून ४६८८७११ पौंड (१पौं=१०रु.) इतकी होती. व त्यांतून प्रांतिक सरकारास पोलिस, तुरुंग, शिक्षण, वैद्यक वगैरे खात्यांचा खर्च संभाळावा लागे. ह्या कराराची दर पांच वर्षांनीं फेरतपासणी व्हावी असें ठरलें. ह्या व्यवस्थेसंबंधीं सर रमेशचंद्र दत्त आपल्या India Under Victorian Age ह्या पुस्तकांत म्हणतात. ह्या करारावद्दल समाधान मानण्याजोगी बाब इतकीच कीं, दरसाल ओरड होऊं देण्यापेक्षां पंचवार्षिक ओरड बरी.

(७) प्रांतिक सरकारचे वाढते अधिकार– पुढें इ. स. १८७७ सालीं प्रांतिक सरकारास कांहीं खात्यांच्या वसुलांत वाटा मिळाला. तीं

खातीं अबकारी, स्टांप, न्याय व कायदा हीं होत. हचा खात्यांच्या खर्चाची व्यवस्थाही प्रांतिक सरकारकडेच होती. इ. स. १८८२ सालीं हचा जमाखर्चाच्या वाटणींत बरेच महत्त्वाचे फरफार झाले. पूर्वीची प्रांतिक सरकारास ठराविक रक्कम देण्याची पद्धत मागें पडली व सर्व खात्यांचे सर्वस्वी प्रांतिक, सर्वस्वी वरिष्ठ, व प्रांतिक आणि वरिष्ठ यांच्यामध्यें विभागलेलीं असे तीन विभाग करण्यांत आले. ही व्यवस्था लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत झाली हें खरें, परंतु हचा व्यवस्थेचें श्रेय तत्कालीन फडणवीस सर जॉन स्ट्रॅची यांजकडे आहे. या वेळेपासून दर पांच वर्षांनीं म्हणजे इ. स. १८८२, '८७, '९२, '९७ या सालीं या पद्धतीची फेरतपासणी झाली.परंतु त्यांत एकादें खातें इकडचें तिकडे करण्यापलीकडे विशेष फरक झाला नाहीं. इ. स. १८९७ सालीं कायदा,तुरुंग, पोलिस, शिक्षण, वैद्यक, किनाऱ्याची वाहतूक, कालवे, सरकारी इमारती, स्टेशनरी हीं खातीं पूर्ण प्रांतिक म्हणजे त्यांचें उत्पन्न व खर्च हचावर अधिकार प्रांतिक सरकारचा होता. स्टँप, जंगल, दस्तैवज नोंदणी हचा खात्यांचा सर्व खर्च प्रांतिक सरकारचा, परंतु उत्पन्नांत वरिष्ठ सरकारनें तीनचतुर्थांश उत्पन्न घ्यावें, व प्रांतिक सरकारनें एकचतुर्थांश घ्यावें असें ठरलें. व अबकारी आणि जमिनीचा सारा हचा खात्यांत खर्च प्रांतिक सरकारचा व उत्पन्नाची विभागणी उभय सरकारांत समप्रमाण व्हावयाची होती. हचानंतरच्या कालांत ही व्यवस्था अगदीं रुळल्याप्रमाणें झाली. म्हणून ती इ. स. १९०४ मध्यें जवळजवळ मुक्रर केली. व इ. स. १९१२ त ती कायमची म्हणून मुक्रर केली. व इ. स. १९२० मध्यें घटनेंत मूलभूत फेरफार होऊन तींत बदल करावा लागला नसता तर ही व्यवस्था अशीच किती तरी दिवस चालली असती.

(८) सोयीची सवलतः– येथपर्यंत प्रांतिक सरकारचा संसार कसकसा थाटत गेला तें सांगितलें. परंतु हचा संसाराला स्वतंत्र संसार म्हणतां येणार नाहीं. दहा माणसांच्या मोठ्या घरांत कांहीं भागाची देखरेख तात्पुरती एकाद्या वयांत आलेल्या मुलाकडे तोडून द्यावी त्यापैकींच हा प्रकार होता. प्रांतिक सरकारास आपल्या जबाबदारीवर कर बसविण्याचा अधिकार नव्हता. स्वतंत्रपणें कर्ज काढतां येत नव्हतें. त्यांची वार्षिक अंदाजपत्रकें आगाऊ वरिष्ठ सरकारच्या फडणविसाच्या नजरेखालून जात. खेरीज वरिष्ठ सरकारचे हिशेबतपासनीस प्रांतिक सरकारच्या झाडून सर्व खात्यांची बारकाईनें तपासणी करीत तें निराळेंच. सारांश, सर्वस्वीं एकतंत्री जमाखर्चाचा व्यवहार अवजड होतो. तेव्हां ही झालेली विभागणी केवळ सोयीस्कर म्हणून झालेली होती. यांत प्रांतिक सरकारच्या सनदशीर हक्कांचा (Constitutional Privilege) कांहीं एक प्रश्न नव्हता. सोय (Convenience) जाणून रूढि (Convention) पडली व रूढि कांहीं काळ टिकून राहिली इतकेंच.

(९) सनदशीर हक्कांस सुरवातः–– इ. स. १९२० सालीं यांत बदल झाला. जबाबदारीचें तोंड विलायत सरकारकडून हिंदी कायदेमंडळाकडे फिरवावयाचें असें ठरल्यानें जुन्या पद्धति व जुनीं वळणें बदलावीं लागलीं. प्रथमतः स्वराज्याचा प्रयोग प्रांतिक सरकारांच्या कारभारांत व त्यांतही त्यांतल्या एका लहानशा विभागांत करावयाचा असें ठरलें. वरिष्ठ सरकार पूर्णपणें अनियंत्रित राहिलें, तरी प्रांतिक सरकार कायदेमंडळास आज अर्धवट व उद्यां पूर्ण जबाबदार व्हावयाचें असें असल्यानें दोन सरकारची वाटचाल निराळ्या धोरणाची झाली.अशा स्थितींत वरिष्ठ व प्रांतिक सरकारांनीं कांहीं खात्यांचें उत्पन्न विभागून घ्यावें ही जुनी योजना टिकून राहाणें शक्य नव्हतें. कारण उत्पन्न विभागावयाचें म्हटलें तर जबाबदारीही विभागली जाणार; मग प्रांतिक सरकारास आपल्यापुरती सुटसुटीत निराळी व्यवस्था करितां येणार नाहीं.तेव्हां हें उत्पन्नविभागणीचें तत्त्व काढून टाकलें व कांहीं खातीं सर्वस्वी वरिष्ठ व बाकीचीं सर्वस्वी प्रांतिक अशी योजना करण्यांत आली. इ. स. १९२० पासून रक्षण,परराष्ट्रीय व्यवहार, संस्थानें,जकात, प्राप्तीवरील व मिठावरील कर, रेल्वे, पोस्ट व तारायंत्रें, हिशेब व हिशेब तपासणी, व्यापार, उद्योगधंदे, मजूर हीं खातीं वरिष्ठ सरकारकडे आहेत.खेरीज वरिष्ठ सरकारचे गृहमंत्री व कायदेमंत्री आपापलीं कामें करतात व आरोग्य, शिक्षण, व शेतकी हचा खात्यांवरील सर्वसामान्य देखरेख वरिष्ठ सरकारनें करावी म्हणून तें खातें एका कार्यकारी मंत्र्याकडे दिलें आहे. बाकीचीं खातीं म्हणजे मुख्यतः जमीनमहसूल, पोलिस, तुरुंग, न्यायखातें प्रांतिक सरकारचे कायदे, कालवे, दुष्काळ-निवारण, दस्तऐवज–नोंदणी, जंगल, सहकारी खातें, स्थानिक स्वराज्य, वैद्यक, आरोग्य

पब्लिक वर्क्स खातें, अबकारी, व शिक्षण इत्यादि यांची व्यवस्था पूर्णपणें प्रांतिक सरकारकडे आली.

(१०) प्रांतिक सरकारचें स्वातंत्र्यः—या व्यवस्थेनें प्रांतिक सरकारचें निराळें बिऱ्हाड थाटलें असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रांतिक सरकारच्या वर दिलेल्या खात्यांच्या यादींत सहकारी खात्यापर्यंतची याद राखीव खात्यांची आहे. व पुढली याद सोंपीव खात्यांची आहे. सोंपीव खात्यांचा संसार आपला आपण पाहण्याचा सनदशीर हक्क प्रांतिक सरकारास मिळाला. त्यांत फक्त स्टेशनरी विकत घणें व सनदी नोकरांच्या हक्कांची जपणूक करणें, प्रांताप्रांतांत काहीं खात्यांच्या व्यवस्थेबद्दल भांडण उपस्थित झाल्यास तें मिटविणें,सोंपीव खात्यांच्या कारभारामुळें राखीव खात्यांना किंवा वरिष्ठ खात्यांना उपसर्ग पोहोंचूं लागल्यास तो नाहींसा करणें या ठराविक बाबींखेरीज वरिष्ठ सरकारनें प्रांतिक सोंपीव खात्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करावयाची नाहीं असें ठरलें. राखीव खात्याच्या कारभारांतही जोंपर्यंत प्रांतिक सरकार व प्रांतिक कायदेमंडळ एकविचारें चालतील तोंपर्यंत वरिष्ठ सरकार त्यांच्या कारभारांत हात घालणार नाहीं अशी रूढि पाळील असें आश्वासन मिळालें. मात्र कोणतीही ५० लाख किंवा त्याहून अधिक खर्चाची नवी योजना अंगावर घेतांना प्रांतिक सरकारनें वरिष्ठ सरकारची संमति विचारली पाहिजे. याखेरीज प्रांतिक सरकारास जरूर तर कांहीं नवे कर बसविण्याची परवानगी मिळाली. उदाहरणार्थ—करमणुकीवर कर,शेतीच्या जमिनीचा बिगरशेती कामास उपयोग करण्याबद्दल पट्टी, वारसा, जाहिराती, चैनीचे पदार्थ, व जुगारी यांवरील कर हे प्रांतिक सरकारनें लागतील तसे बसवावे. व आपलें उत्पन्न वाढवावें. प्रांतिक सरकारास दुष्काळनिवारणार्थ किंवा एकादें कायमचें उत्पन्न वाढविणारी भरीव योजना करण्यासाठीं किंवा जुनें कर्ज फेडण्यासाठीं कर्ज काढावेंसें वाटल्यास अधिकार मिळाला व आपलें अंदाजपत्रक स्वतंत्रपणें तयार करून तें आपापल्या कायदेमंडळापुढें ठेवून पास करून घेण्याचा अधिकारही प्राप्त झाला.

(११) जमाखर्चाची अडचणः—अशा रीतीनें प्रांतिक सरकारांनीं आपापलीं उत्पन्नाचीं व खर्चाचीं खातीं तोडून घेऊन वरिष्ठ सरकारपासून आपला संसार वेगळा थाटला खरा,पण त्यांत एक भानगड झाली. वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकारें या दोघांत झालेल्या खात्यांच्या विभागणींत वरिष्ठ सरकारांस खर्चाच्या जबाबदारीच्या मानानें उत्पन्न कमी पडूं लागलें. नेमका हिशेब करतां ९८३ लक्ष रुपये कमी पडतात असें आढळून आलें. ही रक्कम कोठला तरी कर वाढवून मिळविणें त्या वेळीं म्हणजे इ.स. १९२०सालीं अशक्य होतें. कारण सर्वत्र कराची वरीच वाढ झाली होती. व ज्याअर्थी ९८३ लक्षांची तूट, ही खरोखरीची तूट नसून केवळ दोन सरकारांत उत्पन्न झालेल्या वाटणीमुळें निघालेली आहे,त्याअर्थी एकास जितकी तूट आली तितका दुसऱ्यास फायदा झाला असलाच पाहिजे व ही तूट फायद्यांतूनच भरून निघाली पाहिजे, अशी विचारसरणी रूढ झाली. ही ९८३ लक्ष रुपयांची दरसालची पट्टी कोणत्या प्रमाणांत प्रांतिक सरकारावर बसवावी ह्याचा विचार मेस्टन कमिटीनें केला व त्या कमिटीनें दिलेल्या निर्णयास 'मेस्टन करार' म्हणतात

(१२) मेस्टन करारः—ह्या मेस्टन करारानें हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवहारांत उभय सरकारांत जितके घोटाळे व कलागती झाल्या तितक्या दुसऱ्या कोणत्याही करारानें बहुधा झाल्या नसतील. दरसाल वरिष्ठ व प्रांतिक सरकारांत हिसकाहिसकी होऊन शेवटीं इ. स. १९२८–२९ पासून हा मेस्टन करार रद्द झाला असल्यानें आतां या प्रकरणास नुसतें ऐतिहासिक महत्त्व उरलें आहे.९८३ लक्ष रुपयांची वांटणी प्रत्येक प्रांताच्या कर देण्याच्या सामर्थ्यावर ठरवावयाची. पण कर देण्याचें सामर्थ्य किती याचा अंदाज करण्यास पुरेसा प्रत्यक्ष पुरावा नाहीं, म्हणून जकातीचें उत्पन्न प्राप्तीवरील कर अशासारख्या अप्रत्यक्ष पुराव्याच्या साहाय्यानें करदानाचें सामर्थ्य ढोबळ तऱ्हेनें मापावयाचें असें ठरलें व त्याप्रमाणें हिशेबही झाला. पण तो हिशेब व प्रांतिक सरकारचा चालू जमाखर्च ह्यांची तुलना करतांच निदान कांहीं प्रांतांना तरी हा बोजा आज झेपणार नाहीं, असें आढळून आलें. मग असें ठरलें कीं, तूर्त सुरुवातीस ही पट्टी नव्या विभागणीमुळें प्रत्येक प्रांतिक सरकाराचें खर्च करण्याचें सामर्थ्य ज्या प्रमाणांत वाढलें त्या प्रमाणांत बसवावी व शेवटीं ती सारख्या प्रमाणांत वाढवीत किंवा कमी करीत सात वर्षांत करदानाचें सामर्थ्य असेल त्या प्रमाणावर आणून ठेवावी. स्पष्टीकरणार्थ दोन उदाहरणें देतों—मुंबई प्रांताची पट्टी प्रारंभीं ५६ लाख; ती शेवटीं १३५ लाखांपर्यंत जावयाची व मद्रासवरील पट्टी प्रारंभीं ३४८ लाख होती ती शेवटीं

जवळजवळ १७४ लाखापर्यंत कमी होणार होती. ही योजना पुढें पार्लमेंटच्या जॉइंट सिलेक्ट कमिटीनें थोडी बदलली. कोणत्याही कारणानें प्रारंभीं बसविलेल्या पट्टीपेक्षां पुढें पट्टी वाढवू नये, ज्या प्रांतांची कमी व्हावयाची असेल त्यांची कमी करावी व त्यामुळें तूट येईलच ती हिंदुस्थान सरकारनें काटकसरीनें भरून काढावी. याप्रमाणें योजना मुक्रर होऊन तिचा अंमल होऊं लागल्यावर दरसाल एकीकडे हिंदुस्थान सरकारच्या अंदाज-पत्रकांत भयंकर तूट, दुसरीकडे प्रांतिक सरकारांचीही तीच स्थिति, अशा स्थितींत प्रांतिक सरकार खंडणी देण्यास नाखूष व हिंदुस्थान सरकार ती घेण्यास टपलेलें असा प्रकार आढळून आला. सरकार कधीं या, तर कधीं त्या, प्रांतास खंडणीची सूट देऊं लागलें व यामुळें असेंब्लींतील प्रांताप्रांतांच्या प्रतिनिधींत वैमनस्य वाढूं लागलें. शेवटीं इ. स. १९२८ सालीं हिंदुस्थान सरकारच्या फडणविसांनीं ही खंडणी नाहींशी केली आहे असें जाहीर केलें. तेव्हां सर्वांस हायसें वाटलें.


(१३) मेस्टन करारांतील दोषः—मेस्टन करारांतील मुख्य दोष असा कीं, त्या करारानें प्रांताप्रांताच्या भिन्न भिन्न गरजा लक्षांत न घेतां सर्वांस एक नियम लावण्याचा हट्ट धरला हा होय. तसेंच प्रारंभीं खात्यांची विभागणी होऊन जमीनमहसूल प्रांताकडे व प्राप्तीवरील कर वरिष्ठ सरकारकडे अशी वांटणी झाली. तेव्हां शेतीच्या दृष्टीनें गरीब, परंतु उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें श्रीमंत अशा प्रांतांस जो अन्याय झाला तोही लक्षांत घेतला गेला नाहीं. शिवाय ही योजना गुंतागुंतीची होती, व इतकी गुंतागुंतीची योजना पतकरून शेवटीं सातव्या वर्षीं जें करदानाचें सामर्थ्य प्रमाणभूत समजावयाचें, तें प्रत्यक्ष पुराव्यावर बसविलेलें नव्हे तर अप्रत्यक्ष पुराव्यावर अंदाजलेलें होय. मग हें अंदाजी प्रमाण साध्य करण्याची आटापीट करण्यांत काय फायदा होता? पण शेवटीं मेस्टन करार रद्द झाला तो त्यांत शेवटीं सांगितलेल्या अंदाजीपणाचा दोष होता म्हणून नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारांत प्रांतिक सरकारास एकीकडे वाढत्या गरजा व ठरीव उत्पन्न यांची तोंडमिळवणी करतां येईना हें होय. मेस्टन करारास आतां ऐतिहासिक महत्त्व उरलें हें वर सांगितलेंच आहे. पण त्यापासून एवढा बरीक बोध घेतला पाहिजे तो असा कीं, भरपूर पुराव्याच्या अभावीं कोणतीही गुंतागुंतीची आर्थिक योजना करण्यांत हशील नाहीं व संक्रमणकालांत पुढील सर्व बनावाची आपणास योग्य कल्पना येणारी नसल्यानें फार दूरच्या कालापर्यंत पुढील सरकारचे हातपाय बांधणारी योजना सहसा अंगावर घेऊं नये.

(३) आजचे प्रश्न


(१४) लेटन रिपोर्टः—इ. स. १९२६ अखेर त सायमन कमिशनची नेमणूक झाली व त्याबरोबरच वरिष्ठ व प्रांतिक सरकारच्या आर्थिक व्यवहारांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं सर वॉल्टर लेटन यांची नेमणूक झाली. सायमन कमिशननें आपला रिपोर्ट प्रसिद्ध करतांना दुसऱ्या भागांत सर वॉल्टर लेटन यांचा रिपोर्टही जोडला आहे. व सध्यां या प्रश्नावर सर वॉल्टर लेटन यांचा रिपोर्ट प्रमाणभूत समजला जातो.

(१५) आजच्या गरजाः—सर वॉल्टर यांनीं उद्यांची हिंदुस्थानची राज्यघटना ही संयुक्त पद्धतीची (Federal) होणार हें गृहीत धरून रिपोर्ट लिहिलेला आहे. सध्याच्या वरिष्ठ व प्रांतिक सरकारांच्या आर्थिक विभागणींत सर वॉल्टर यांच्या मतें जे दोष आहेत ते पुढीलप्रमाणें होत.—१. प्रांतिक सरकारचीं खर्चाचीं खातीं वाढत्या तोंडाचीं आहेत. परंतु त्यांच्या गरजा भागविण्यासाठीं त्यांच्या उत्पन्नाच्या खात्यांकडे पहावें तों त्यांत वाढ करण्यास फारसा वाव नाहीं. उदाहरणार्थ शिक्षण, आरोग्य यांसारख्या खर्चाच्या खात्यांची वाढती गरज भागविण्यास प्रांतिक सरकारजवळ जीं ठोकळ दोन साधनें आहेत त्यांपैकीं जमिनीवरील सारा ठराविक मुदतीपूर्वी वाढवितां येत नाहीं. व दारूचें उत्पन्न वाढविण्याची सोयच नाहीं. २. या खात्यांची सोय कशीतरी भागविलीच पाहिजे, कारण तीं राष्ट्रसंवर्धक आहेत. ३. सध्यांच्या योजनेंत सर्व प्रांतास एक पद्धत लागू करावयाची असें ठरल्यानें कांहीं कांहीं प्रांतांना अन्याय झाला. कांहीं प्रांत (उदा०—पंजाब, मद्रास) कृषिप्रधान असतात तर कांहीं (उदा०—बंगाल, मुंबई) व्यापारप्रधान असतात. अशा स्थितींत जमीन—महसुलाची बाब प्रांतिक व प्राप्तीवरील कर वरिष्ठ सरकारचा अशी वांटणी केल्यानें व्यापारप्रधान प्रांतांस ती गैरसोयीची व त्यांच्या गरजा लक्षांत न घेणारी झाली. तसेंच शेतीची स्थिति सामान्यतः हलाखीची असल्यानें शेतसाऱ्यापासून उत्पन्न वाढावयास जागा नाहीं. पैसा दृष्टीस पडतो तो मुख्यतः व्यापारांत किंवा उद्योगधंद्यांत. परंतु प्रांतांना व्यापार किंवा उद्योगधंद्यांवर कर बसविण्यास मोकळीक नाहीं. हे दोष कसे नाहींसे करावे, राष्ट्रसंवर्धक प्रांतिक खात्यांना वाढत्या

इ. स. १९२९-३० सालीं वरिष्ठ व प्रांतिक सरकार या सर्वांनीं मिळून २,२६,२१,९९,००० रुपये खर्च केले ते कोण-कोणत्या कलमावर किती प्रमाणांत खर्च केले हें खालील प्रमाणचक्रावरून स्पष्ट होईल.



इ. स. १९२९-३० सालीं वरिष्ठ व प्रांतिक सरकार या सर्वांचा मिळून झालेला २,२७,२६,४८,००० रुपये वसूल कोण कोणत्या बाबी पासून कोणकोणत्या प्रमाणांत झाला तें खालील प्रमाण-चक्रावरून स्पष्ट होईल.



उत्पन्नाचा वाटा कसा मिळवून द्यावा हा सर वॉल्टर यांच्यापुढें प्रश्न होता. सदरहू सर वॉल्टर यांनीं ठोकळ हिशेब करून अंदाज केला आहे कीं, सालीना ४०–५० कोट रुपयांची वाढती गरज भागवावयास हवी आहे.

(१६) तात्त्विक योजना:—यासाठीं उत्तम योजना म्हटली म्हणजे वरिष्ठ व प्रांतिक खात्यांची पुनः अशी विभागणी करावी कीं, वरिष्ठ सरकारच्या गरजा वरिष्ठ सरकारच्या उत्पन्नांतून भागाव्या. व प्रांतिक खात्यांच्या गरजा प्रांतिक खात्याच्या उत्पन्नांतून आणाव्या पण ही योजना नमुनेदार असली तरी सद्यःस्थितींत व्यवहार्य नाहीं. म्हणून नमुनेदार योजनेपेक्षां व्यवहार्य योजनेचाच आपणांस विचार कर्तव्य आहे. ह्या योजनेनेंही दरसालची ४०–५० कोटींची वाढती गरज भागेल असें नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या हल्लींच्या लष्कर वगैरे बाबींवरील खर्चाच्या प्रमाणाला कात्री लावल्याखेरीज कसल्याही कागदी रेखीव योजनेनें हा प्रश्न सुटावयाचा नाहीं, असा इषारा सर वॉल्टर यांनीं प्रारंभींच देऊन ठेविला आहे.व त्यानंतर त्यांनीं जी योजना मांडली आहे ती थोडक्यांत अशी:—

(१७) लेटन यांच्या सूचना:—सध्याच्या प्रांतिक व वरिष्ठ सरकारच्या उत्पन्नाचे ठोकळमानानें पुढीलप्रमाणें चार भाग करावे. १. प्रांतिक सरकारनें मिळविलेला व प्रांतिक सरकारनें खर्च केलेला वसूल; २. वरिष्ठ सरकारनें जमा केलेला व खर्च केलेला वसूल; ३. वरिष्ठ सरकारनें जमा करून प्रांतवार वसुलीच्या प्रमाणांत वाटून द्यावयाचा वसूल; ४ वरिष्ठ सरकारनें जमा करून तो प्रांतिक सरकारची गंगाजळी म्हणून ठेवावयाचा व लोकसंख्येच्या प्रमाणावर प्रांतिक सरकारांना द्यावयाचा. ही योजना पुढील पद्धतीनें अंमलांत आणावी.

(अ) परदेशी दारूच्या आयातीवरील जकातीचा दर शेंकडा ३० इतका मर्यादित करावा व प्रांतिक सरकारांना वाटल्यास त्यांनीं आणखी स्थानिक जकात (Excise) बसवावी. या योगानें वरिष्ठ सरकारचें १॥ कोट रुपयांचें नुकसान होईल. (आ) व्यापारी दस्तऐवजासाठीं लागणाऱ्या स्टांपांचें उत्पन्न प्रांतिक सरकारांना मिळतें, तें वरिष्ठ सरकारांस मिळावें. या योगानें कलम (अ) मुळें झालेलें १॥ कोटीचें नुकसान भरून येईल. (इ) एतद्देशीय रहिवाशांच्या प्राप्तीवरील करांपैकीं निम्मा कर प्रांतिक सरकारांना प्रांतवार वसुलीच्या प्रमाणांत द्यावा. या योगानें प्रांतांना ४॥ कोटी ते ६ कोट रुपये मिळतील. (ई) मिठावरील कर प्रांतांना लोकसंख्येच्या प्रमाणांत वाटून द्यावा. या योगानें प्रांतांना ५॥। कोट रुपये मिळतील. या योजनेखेरीज सरकारला पुढील योजनेप्रमाणें आपलें उत्पन्न वाढवितां येईल. व खर्चांत काटकसर करतां येईल. (१) शेतकीच्या उत्पन्नावर प्राप्तीचा कर बसविणें (२)प्राप्तीवरील करांतील किमान प्राप्तीची मर्यादा कमी करणें व भारी प्राप्तीवरील कराचा दर आणखी चढविणें. (३) वारसा कर बसविणें. (४) सिगारेट व काड्याच्या पेट्यावरील कर वाढविणें. (५) मालाच्या वाहतुकीवर करपट्टी बसविणें (Tax on goods in transit) इत्यादि उपायांनीं सरकारला आपलें उत्पन्न वाढवितां येईल. खर्चाच्या बाबतींत मुख्य काटकसर लष्करी खर्चांत केली पाहिजे. रिट्रेंचमेंट कमिटीनें लष्करावरील खर्च ५० कोटींपर्यंत ताबडतोब आणून ठेवण्याची शिफारस केली होती. ती अमलांत आली पाहिजे. परंतु तें सर्व दूर राहून लष्करी खर्च इ. स. १९२८–२९ च्या बजेटांत ५५ कोटींचा धरलेला आहे. या बाबतींत हिंदुस्थानच्या लष्करी खर्चांत गेल्या १५ वर्षांत किती वाढ होत आहे तें पुढील कोष्टकावरून कळेल.

(आंकडे दशलक्ष पौंडांचे)

	१९१३	१९२८	शेंकडा वाढ
ग्रेटब्रिटन	७७.२	११५	४८.९
हिंदुस्थान	२२	४४	१००
वसाहती	९	१२	३३
एकंदर	१०८.२	१७१	५८.३

सध्यांच्या लष्करी खर्चांत निदान ३ कोटींची बचत केली पाहिजे. तसेंच सनदी नोकरांना दिलेल्या पगारापायीं ठोकळ ८८ कोटींपैकीं ठोकळ ११ कोट रुपये खर्च होतात. हा खर्च कमी केला पाहिजे. विशेषतः ह्या नोकरांचें हिंदीकरण होत जाईल तसतसे पगार कमी करण्यास हरकत नाहीं व सध्यां युरोपियन व हिंदी लोकांना पगाराचे दर भिन्न नसावेत म्हणून पगाराचें प्रमाण सरसहा कमी करून ब्रिटिश कामगारांना भत्ता अधिक वाढवावा. याप्रमाणें एका बाजूनें उत्पन्न वाढवून दुसऱ्या बाजूनें काटकसर केल्यास व त्याबरोबरच वरिष्ठ व प्रांतिक सरकारांच्या उत्पन्नाची वर

प्रथम सांगितल्याप्रमाणें वांटणी केल्यास वरिष्ठ व प्रांतिक सरकारांच्या उत्पन्नांचीं अंगें पुढीलप्रमाणें होतीलः––

वरिष्ठ सरकारचें उत्पन्न

(१) प्राप्तीवरील कर (प्रांतांना दिलेला रहिवाशांवरील कराचा -।।- हिस्सा वजा करून) भारी प्राप्तीवरील जादा कर (Supertax) (२) जकाती (३) व्यापारी दस्तऐवजाचा स्टँप (४) रेल्वे उत्पन्न (५) वरिष्ठ सरकारच्या ताब्यांतील पोस्ट, टेलिग्राफ चलनी नाणें यासारख्या कार्यांतून झालेलें उत्पन्न; हें सर्व उत्पन्न वरिष्ठ सरकारनें उत्पन्न करून खर्च करावयाचें आहे. आतां प्रांतिक सरकारना कोणकोणतें उत्पन्न मिळेल तें पाहूं.

(१) प्रांतिक सरकारांनीं वसूल करून स्वतःच खर्च करावयाचें उत्पन्न. (त्यांत व्यापारी दस्तऐवजाचें उत्पन्न वजा होईल).यांतच परदेशी दारूवर स्थानिक कर व मालाची ये-जा होत असतां त्यावर बसविलेला कर(Terminal Taxes) ह्यांचा समावेश होईल.

(२)वरिष्ठ सरकारनें गोळा करून प्रांतांना वसुलीच्या प्रमाणांत दिलेला प्राप्तीवरील कराचा अर्धा हिस्सा. यांतच शेतीच्या प्राप्तीवरील कराच्या अर्ध्या हिश्शाचा अंतर्भाव होतो.

(३) वरिष्ठ सरकारनें गोळा करून त्यांची गंगाजळी करावयाची व ती प्रांतानिहाय लोकसंख्येच्या प्रमाणांत वांटावयाची. यांत मीठ, दारू, सिगारेट, काड्याच्या पेट्या यांवरील स्थानिक कराचें उत्पन्न येतें.

कलम (३) मध्यें सांगितलेल्या गंगाजळीची व्यवस्था सर्व प्रांतांचें एक प्रांतिक दौलत मंडळ (Provincial Financial Council) नेमून त्याजकडे असावी. त्यांत कमीजास्त फरक सुचवावयाचा तो प्रांतिक सरकारच्या फडणविसांनीं सुचवावा. व तो वरिष्ठ कायदेमंडळापुढें मांडून पास करून घ्यावा. वरिष्ठ सरकारच्या फडणविसांनीं त्यांत ढवळाढवळ करूं नये म्हणजे प्रांतिक सरकारच्या स्वायत्ततेस होतां होईतों बाध येणार नाहीं.

(१८) लेटन यांच्या योजनेचे गुणदोष––

याप्रमाणें सर वॉल्टर लेटन यांची योजना काय आहे तें सांगून झाल्यावर त्यांतील गुणदोषाची चर्चा करूं.

(१) प्रस्तुतच्या योजनेंत सर वॉल्टर यांनीं फाजील आशावादीपणा दाखविला आहे असें प्रो. वेरी म्हणतात तें खरें वाटत नाहीं. कारण वर सांगितलेल्या योजनेंत सर वॉल्टर यांनाही पुढील दहा वर्षांत आणखी ४० ते ५० कोट रुपये मिळतील असें वाटत नाहीं, परंतु आजच्या प्रांतिक सरकारच्या कुचंबणुकीला त्यांनीं तोंड फोडलें आहे यांत शंका नाहीं. (२) सर वॉल्टर यांनीं ही योजना अधिक खोलांत जाऊन विस्तृत आंकडेवार मांडली नाहीं त्यामुळें त्यांनीं केलेले ढोबळ अंदाज हे कितपत खरेखोटे ठरतील तें सांगवत नाहीं, हा आक्षेप खरा आहे. (३) शेतीच्या उत्पन्नास प्राप्तीवरील कराचा नियम लावितां येणार नाहीं, सरकार या बातींत करारबद्ध आहे, हे करार कसे मोडावे हा प्रश्नच आहे; तसेंच शेतीच्या भारी उत्पन्नावर जर प्राप्तीवरील कर बसवावयाचा तर हलक्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कराप्रमाणें सूट कां नको? हे आक्षेप विचारांत घेण्यासारखे आहे. (४) काड्यांच्या पेट्यांवर स्थानिक कर बसविल्यास तो उत्पादक ठरणार नाहीं. लोक काड्या जपून वापरतील. विड्या पिणारे चैनी व नेफिकीर लोक जरी या बाबतींत बेपर्वा राहिले तरी त्यांचें प्रमाण एकंदर लोकसंख्येशीं अत्यल्प आहे. (५) कांहीं कर लोकसंख्येच्या प्रमाणावर प्रांतांना वांटून द्यावयाचे आहेत. लोकसंख्येचें प्रमाण विरळ लोकसंख्येच्या दरिद्री प्रांताला जाचक होईल. दाट लोकवस्तीच्या श्रीमंत प्रांताला अधिक फायदेशीर आहे. मिळून कांहीं प्रांतांना अन्याय तर कांहींना फाजील सवलत असला प्रकार होईल. (६) सर वॉल्टर यांनीं ह्या आर्थिक प्रश्नाचा विचार करतांना नुसतें उत्पन्न कसें वाढेल इकडे पाहिलें, परंतु नवी घटना होतांना आज वर्षानुवर्षें ज्या कराबद्दल ओरड आहे त्या मिठासारख्या पदार्थावरील जाचक कर काढून टाकण्याची कांहींच योजना सुचविली नाहीं. (७) खेरीज संयुक्त राष्ट्रांत आर्थिक वांटणीची पद्धत पाहिल्यास वरिष्ठ सरकार प्राप्तीवरील करांत कधींच वांटेकरी होत नाहीं. हा कर वरिष्ठ सरकारनें गोळा करावयाचा व प्रांतवार वसुलीच्या प्रमाणांत सर्वच्या सर्व देऊन टाकावयाचा असतो. व प्रांतिक दौलत मंडळानेंच त्यांत कमीजास्त फरक सुचवावयाचा असतो. असें न केल्यास आणखी एक घटनचा दोष उत्पन्न होतो, तो हा कीं, प्रांतिक सरकारच्या स्वायत्ततेस त्यामुळें बाध येतो. सर वॉल्टर यांची योजना या आक्षेपांतून सुटत नाहीं.

पण असें असलें तरी सर वॉल्टर यांनीं हा प्रश्न

धसाला लावला आहे यांत शंका नाहीं. यामुळें प्रांताप्रांतांत असलेले अन्याय दूर होण्याचा कांहीं मार्ग निघेल. हे अन्याय किती ढोबळ आहेत तें पुढील कोष्टकावरून कळेल.

प्रांतांचें उत्पन्न. (आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.)

	१९२१–२२	१९२८–२९	शेकडा वाढ	लोक सं. दशलक्ष	दर माणशी प्रांतिक कर
मद्रास	११४६ मेस्टन पट्टी वजा करून	१७५३	५३	४२	४.१८
बहार ओरिसा	४४३	५७८	३०	३४	१.८
पंजाब	७१०	१११६	५७	२०.७	५.५४
मुंबई	१३११	१५२२	१६	१९.३	८.२९

वरील कोष्टकावरून प्रांतानिहाय दर माणशीं करांत केवढा फरक आहे तें कळून येईल. सारांश १. प्रांतानिहाय करपट्टीची विषमता नाहींशी झाली पाहिजे २.संयुक्तराज्यपद्धति यशस्वी व्हावी म्हणून प्रांतिक स्वायत्ततेस बाध येतां कामा नये. ३. पुढील दहाबारा वर्षांत शिक्षण, उद्योगधंद्याची वाढ, आरोग्यसंवर्धक यांसारख्या राष्ट्रसंवर्धक खात्यांची भूक भागविण्यास अवश्य तो पैसा मिळाला पाहिजे.४ मिठावरील करासारखे अन्याय-मूलक कर दूर झाले पाहिजेत. ५. लष्कर, सनदी नोकर यांच्यासारख्या बाबींवरील खर्चास कात्री लावली पाहिजे. ६. अशा प्रकारचे प्रश्न देशापुढें आहेत व त्यावर सर्वजण प्रसंगीं बोलतही असत. परंतु त्यांच्या विचारास सर वाल्टर लेटन यांच्या योजनेनें निश्चित कार्यक्रमाच्या दृष्टीनें तोंड लागलें आहे. सर वाल्टर यांची योजना हा या कार्य-क्रमाचा प्रारंभ आहे, शेवट नव्हे, हें लक्षांत ठेवून त्यांत कसकशा दुरुस्त्या करतां येतील तें पाहणें हें भविष्य काळांतील काम आहे.

हुजूर दौलतीची आकडेवार माहिती

(१९) वरिष्ठ सरकारचा दशवार्षिक जमाखर्च

(आंकडे हजार रुपयांचे आहेत.)

हिंदुस्थान (वरिष्ठ) सरकार

साल	वसूल	खर्च	वाढ(+)किंवा तूट(–)
१९२१–२२	११५२१५०	१४२८६५२	– २७६५०२
१९२२–२३	१२१४१२९	१३६४३०५	– १५०१७६
१९२३–२४	१३२७८६४	१३०३९६४	+ २३९००
१९२४–२५	१३७५३१८	१३१८४९२	+ ५६८२६
१९२५–२६	१३३१७३०	१२९८६१२	+ ३३११८
❀१९२६–२७	१३१६५४६	१३१६५४६	
❀१९२७–२८	१२७२२७८	१२७२२७८	
*१९२८–२९	१२८९७०२	१२९२८५६	– ३१५४
१९२९–३०	१३२६८५५	१३२४१७१	+ २६८४

*ह्या वर्षीं खरी तूट १०५६८८८८ इतकी होती. परंतु ७४१४८८६ इतके रुपये रेव्हेन्यू रिझर्व फंडांतून भरण्यांत आले.

❀ ह्या वर्षीं आलेली वाढ कर्जवाढ होऊं नये यासाठीं उपयोगांत घेतली.

(२०) सर्व प्रांतिक सरकारांचा मिळून दशवार्षिक जमाखर्च

१९२१–२२	७०४३०३	७९१६२५	−	८७३२२
१९२२–२३	७५७३८५	७७२३३८	−	१४९५३
१९२३–२४	७८८५०९	७६०९२८	+	२७५८१
१९२४–२५	८१२८१८	७८४०७०	+	२८७४८
१९२५–२६	८७५१२०	८५८९५२	+	१६१६७
१९२६–२७	८६४३१६	९०१७२३	−	३७४०७
१९२७–२८	९३२९५४	९१५०४३	+	१७९११
१९२८–२९	९१४८७५	९२९१३८	−	१४२६३
१९२९–३०	९४५७९३	९३८०२७	+	७७६६
१९३०–३१	८३०८०८	९४२४८८	−	१११६८०

(२१) मुंबई सरकारचा द. वा. जमाखर्च.

१९२१–२२	१३१०७२	१५०१९२	−	१९१२०
१९२२–२३	१४१७१९	१३५३१७	+	६४०२
१९२३–२४	१४५२८२	१४२३४४	+	२९३७
१९२४–२५	१४९९१७	१४७२५६	+	२६६०
१९२५–२६	१५२४१८	१६१५५१	−	९१३३
१९२६–२७	१४५८०६	१६२३६७	−	१६५६०
१९२७–२८	१५३४४८	१५६३२५	−	२८७७
१९२८–२९	१५२१७४	१५५५५९	−	३३८५
१९२९–३०	१५९१५२	१५८०७९	+	१०७२

(२२) मध्यप्रांत सरकारचा द. वा. जमाखर्च.

१९२१–२२	४७१८८	४९५४०	−	२३५२
१९२२–२३	५१५३३	४८९५७	+	२५७६
१९२३–२४	५१७११	४९४४२	+	२२६९
१९२४–२५	५२५३४	४८८२५	+	३७०८
१९२५–२६	५३५१४	५३२६२	+	२५२
१९२६–२७	५०७०२	५७४३८	−	६७३५
१९२७–२८	५३९७६	५३७६६	+	२०९
१९२८–२९	५३५८७	५५५०१	−	१९१३
१९२९–३०	५२८२३	५४२४६	−	१४२३

(२३) इ. स. १९२९–३० सालांतील वरिष्ठ व प्रांतिक सरकारांचा कलमवार वसूल.

नांव	वरिष्ठ	प्रांतिक
जकात	५१२७६६	
प्राप्तीवरील कर	१६७०६०	३५७३
मीठ	६७६४६	
अफू	३०४०९	
जमिनीचा सारा	३८१६	३३०८९३
स्थानिक जकात (excise)	५४७४	१९८६४८
स्टँप्स	२७४९	१३८४९१
जंगल	३१२८	५८१२२
नोंदणी	१६६	१३५३६

नांव	वरिष्ठ	प्रांतिक
संस्थानापासून खंडण्या	७२२३	
प्रांतांना खास परवानगी दि. कर		४०५५
एकंदर	८००४३७	७४७३१८
रेल्वे	३७१६४२	३०३
कालवे	९९६	७८६३६
पोस्ट–तारायंत्र	१४९	
व्याज	४४०६०	२४३५५
मुलकी कारभार		
न्याय	३११	१०३३५
तुरुंग	४३६	५८०१
पोलिस	४६०	६०५७
बंदरें	२३३४	२९७
दीपगृह	१३५०	
शिक्षण	२१५	८९३४
वैद्यक	३३७	५३०८
आरोग्य	३७४	२६६५
शेतकी	२२५७	४०९७
उद्योगधंदे	३६	२१११
विविध	१९५२	१५५१
भांडारखातें (Stores Dept.)	१५९३	
एकंदर	११६५५	४७१५६
चलन व टांकसाळ	२७३६८	
सरकारी बांधकाम	२२६५	१०५६८
विविध	९५६२	२७४६४
लष्करी खातें	३९८०८	
प्रांतिक खंडण्या	३	–३
अनपेक्षित extra–ordinary	१८८९४	९९८५
सर्व एकंदर	१३२६८३९	९४५७८२

(२४) वरिष्ठ व प्रांतिक सरकारचा कलमवार खर्च (इ. स. १९२९–३०.)

नांव	वरिष्ठ	प्रांतिक
जकात	९७५१	
प्राप्तीवरील कर	७१८४	
मीठ	१२६९६	
अफू	४८८१	
जमिनसारा	१०९०	४१५५९
स्थानिक जकात	१६६६	२०२५२
स्टँप	८९	२९९१

नांव	वरिष्ट	प्रांतिक
जंगल	३४६०	३१२९२
नोंदणी	२९	७६२७
प्रांतांना खास परवानगी दिलेला करवसुली बावत खर्च		३९
एकंदर रोकड खर्च	४०८४६	१०३७६०
निरनिराळ्या खात्यांत भांडवल पोटीं खर्ची टाकलेला वसूल	५१३	२७२१
रेल्वे व्याज वगैरे	३१०४५६	७२
रेल्वे बांधण्यास भांडवलपोटीं वसूल	.....	....
कालवे	२८४०	५७९७१
कालवे बांधण्यास भांडवल पोटीं	१५७	१४९७
पोस्ट तारायंत्र व्याजपोटीं	७१३०	
पोस्ट तारायंत्र भांडवल पोटीं	११३८	
राष्ट्रीय कर्जाचें व्याज (यांत रेल्वे कालवे पोस्ट, जंगल, वगैरे ठिकाणीं गुंतविलेल्या भांडवलावरील व्याज धरलें नाहीं. कारण तें निरनिराळें दाखविलेंच आहे).	१६५८६७	२७९८६

मुलकी कारभार

राज्यकारभारावरील देखरेख खर्च (General administration)	२२४७९	११६८६३
हिशवतपासणी	१०१६४	
न्याय	१५२६	५७८२६
तुरुंग	४१६४	२४३६७
पोलिस	७६२४	१२३१५८
बंदरें	२५३७	१६०३
दीपगृहें	१३८७	
धर्मखातें	३१६२	
राजकीय	१६१९१	
सरहद्दीवरील पहारा	२६९३४	
शास्त्रीय खातीं	९३५८	६३१
शिक्षण	५२४६	१३०६२९
वैद्यक	३२३२	४०६३१
आरोग्य	२१००	२०२३०
शेतकी	४६०५	२६१८०
उद्योगधंदा	२८१	९०५४
आकाशमार्ग	१९९१	
विविध	१५४५	४१२०
भांडार खातें	२०५६	
मुलकी कारभार एकंदर	१२६५७२	५५५२९२

मुलकी खात्यावर भांडवलखातीं खर्च करून वसूल–पोटीं घातलेली रक्कम		८७
टांकसाळ	७४२०	
सरकारी बांधकाम	२५८२७	११४८३९
बांधकामावरील भांडवली खर्च		१५८९
विविध	४४१४५	६८४५०
विविधवर भांडवली खर्च	४१९	३७२५
लष्कर	५९०८०८	
अनपेक्षित (Extra-ordinary)	६	२७
सर्व एकंदर खर्च	१३२४१४४	९३८०१८

(२५) प्रांतिक जमेचें कलमवार स्वरूप इ. स. १९२९–३०

नांव	वसूल मुंबई	वसूल मध्यप्रांत
प्राप्तीवरील कर		२७४
जमिनीचा सारा	४७९६३	२०४९९
स्थानिक जकात ...	४०७८९	१२४४५
स्टांप	१७७१५	६७१८
जंगल	७९७५	५९९७
नोंदणी	१२३३	७००
प्रांतिक तक्तेबंद कर(Sheduled taxes)	२०१२	
	११७६८७	४६६३३
कालवे	४६८०	२६
व्याज	१४५८६	२८६
राज्यकारभाराची देखरेख	८२५१	२२६५
रेल्वे	....	..,.
सरकारी बांधकाम·	५२९३	५०४
विविध	८२९३	३०२२
प्रांतिक व वरिष्ठ सरकारची रोकडीनें हिशेबजुळणी	–४	...
अनपेक्षित	३५६	३४
प्रांतिक खंडणी	....	...
वसूलाच्या गंगाजळींतून उपसा	....	...
हिंदुस्थानांत एकंदर वसूल	१५९१४६	५२७४४
हुंडणावळीनें इंग्लंडमधून आलेला	११	६
एकंदर वसूल	१५९१५७	५२७५०

(२६) प्रांतिक खर्चाचें कलमवार स्वरूप १९२९–३०.

नांव	मुंबई	मध्यप्रांत
प्राप्तीवरील कर	....	....
जमिनीचा सारा	६६०८	२८९१
स्थानिक कर	४४२५	११४३

नांव	मुंबई	मध्यप्रांत
स्टांप	२६५	१६९
जंगल	४३२७	३८६४
नोंदणी	६६४	२२२
प्रांतिक तक्तेबंद कर	२१	
	१६३१०	८२८९
भांडवलखातीं जंगल वगैरे बाबीवर खर्ची पडलेला वसूल	२२२	११२
रेल्वे	...	...
कालवे	११२२४	२९५९
व्याज	२१३७३	–१२६
राज्यकारभार देखरेख	८२६१०	२७०५१
सरकारी बांधकाम	१४०२६	८१६८
विविध	८२६३	५६४०
अनपेक्षित	...	...
हिंदुस्थानांतील एकंदर खर्च	१५४०२८	५२२१९
हुंडणावळीनें झालेला इंग्लं. खर्च	४०५२	२१५४
एकंदर खर्च.	१५८०८०	५४३७३

वर दिलेल्या कोष्टकावरून गेल्या दहा वर्षांतील हिंदुस्थान (वरिष्ठ) सरकारची स्थिति, प्रांतिक सरकारांची स्थिति,मुंबई व मध्यप्रांत यांची आर्थिक स्थिति इ. स. १९२९–३० या वर्षांत हिंदुस्थान सरकारचा वसूल व खर्च, इ. स. १९२९–३० सालांतील मुंबई व मध्यप्रांत सरकारचा वसूल व खर्च यांची माहिती मिळेल.आतां वसुलाच्या व खर्चाच्या ठोकळ बाबीसंबंधीं त्रोटक माहिती देणें जरूर आहे.

(५) आयव्ययाच्या बाबीचें विस्तारानें परीक्षण

(२७) जकातः–हिंदुस्थान सरकारास सर्वांत जास्त वसूल कोणत्या एका बाबीपासून मिळत असेल तर तो जकातीपासून होय. लढाईपूर्वी हिंदुस्थानांत खुल्या व्यापाराचें धोरण असल्यामुळें जकातीच्या वसुलाचें उत्पन्न अगदीं थोडें होतें. इ. स. १९१३–१४ त ११ कोटीपासून ते १९२९–३० त ५१ कोटींपर्यंत या उत्पन्नाची वाढ झाली आहे. लढाईच्या काळांत पैशांची टंचाई उत्पन्न झाल्यामुळें करवसुलीचे नानाविध मार्ग शोधावे लागले. व हिंदुस्थान सरकारास परदेशांहून येणाऱ्या मालावर जकात बसवावी लागली. पुरेसा वसूल मिळण्यासाठीं १९२२–२३ सालीं आयात मालावर शेंकडा १५ टक्के जकात बसविली गेली. याप्रमाणें जकात बसविणें अनिर्वाह्यच झाल्यावर पुढील सालीं हिंदुस्थानांत उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं संरक्षक जकातीचें धोरण कसें असलांत आणावें याचा विचार करण्यासाठीं सर इब्राहिम रहिमतुल्ला यांच्या अध्यक्षतेखालीं फिस्कल कमिशनची नेमणक झाली व त्यां कमिशननें आवश्यक तेवढया (Discriminating) संरक्षणाची शिफारस केली. तेव्हांपासून जकातीच्या वसुलांत झपाट्यानें वाढ झाली. गेल्या दहा वर्षांत संरक्षक जकातीचा इतिहास पाहिला तर संरक्षक जकातीमुळें हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न वाढलें. असलें तरी त्या त्या धंद्यांना विश्वास वाटून पाय रोवून बसण्याइतका त्याचा उपयोग झाला नाहीं. हिंदुस्थान सरकारचें संरक्षणाबाबत काटेतोल धोरण, चलनी नाण्यांबाबतचें धोरण, परकी व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानांतच आपलें प्रस्थ बसवून या सर्वांचा घेतलेला फायदा इत्यादि अनेक कारणें याच्या बुडाशीं आहेत. पण तें असो. सध्यां जकातीचें उत्पन्न एकसारखें फुगत चाललें आहेत.जकात ही अप्रत्यक्ष कराची बाब होय. अप्रत्यक्ष कर हे गरीबांस जाचक होतात. ते वसूल करण्यास खर्च फार होतो, लोकांवर पडलेल्या बोजाच्या मानानें

त्यांचें उत्पन्नहि फार होत नाहीं व केव्हां केव्हां तर दर वाढवूनहि उत्पन्न वाढलें नाहीं असा अनुभव येतो. हल्लीं तीच स्थिति आहे. ही गोष्ट लक्षांत घतां सुधारलेल्या देशाचें सरकार आपल्या उत्पन्नाबाबत अप्रत्यक्ष करापेक्षां प्रत्यक्ष करावर अवलंबून राहण्याचा यत्न करतें. हिंदुस्थानांत ज्या वेळीं करवसुलींत आमूलाग्र सुधारणा करावी लागेल त्या वेळीं या अप्रत्यक्ष कराच्या अस्थिर उत्पन्नाच्या बाबीस दुय्यम स्थान द्यावें लागल. संरक्षक जकात हा बहुजन समाजानें उद्योगधंद्याच्या स्थापनेसाठीं केलेला स्वार्थत्याग होय. जथें उद्योगधंद्याच्या स्थापनेचें फळ पदरांत पडत नाहीं तेथें जकातीचें उत्पन्न ५० कोटींपर्यंत आहे ही गोष्ट फारशी अभिमान बाळगण्याजोगी आहे असें कोणीच म्हणणार नाहीं.

जकातीच्या धोरणासंबंधीं आणखी एक लक्षांत घेण्याजोगा प्रश्न म्हणजे ब्रिटिश मालास मिळत असलेली सवलत होय. इ. स. १९३०-३१ च्या अंदाजपत्रकांत वसूल उत्पन्नासाठीं आयात मालावरील जकातीचा दर शेंकडा ११वरून शेंकडा १५ पर्यंत वाढविला असतां ब्रिटिशेतर परदेशी मालावर आणखी ५ टक्के जकात लादावयाचें ठरलें. सर्वंच मालावर १५ ऐवजीं २० टक्के जकात कां बसवूं नये याचें कारण असें सांगण्यांत आलें कीं, ब्रिटिश कापडाची आयात व हिंदी गिरण्यांचें कापड यांत चढाओढ नाहीं. खरी चढाओढ आहे ती हिंदी कापड व ब्रिटिशेतर देशांतून येणारें कापड यांत आहे. या ब्रिटिश मालास सवलत देण्याच्या धोरणास असेंब्लीनें विरोध केला. तेव्हां तडजोड म्हणून करड्या रंगाच्या ब्रिटिश कापडावरहि १५ च्या एवजीं २० टक्के जकात बसविण्यांत आली. इ. स. १९३२ च्या ऑगस्ट महिन्यांत ओटावा येथें साम्राज्याच्या प्रतिनिधींची परिषद झाली. व त्यांत साम्राज्यांत उत्पन्न झालेल्या मालास परस्पर घटकांनीं सवलत द्यावी असें ठरलें. हिंदुस्थाननें ब्रिटिश मालास कशा रीतीनें सवलत द्यावी याचें बिल यऊन तें पास झाले. असेंब्लीपुढें अशा रीतीनें स्वतःच्या देशाच्या वसुलाचें नुकसान करण्याचें किंवा परदेशाहून येणाऱ्या पदार्थांच्या किमतीवाढविण्याचें धोरण असेंब्लींत बहुधा मान्य होणार नाहीं. १९३२च्या डिसेंबरांत अशी अपेक्षा होती ती खोटी ठरली. (इ. स. १९३१-३२ च्या बजेटांत शेंकडा १५ ह्या सर्वसामान्य दरांत ५ टक्के जादा वाढावा करण्यांत आला आहे.)

(२८) प्राप्तीवरील करः--ह्या कराचें उत्पन्न सालीना सरासरी १६ ते १८ कोटी रुपये आहे. ह्यांत फारशी वाढ झाली नाहीं परंतु सध्यां किंमतीचें प्रमाण उतरतें असतांना तें टिकन राहिलें आहे हेंच विशेष होय. वरिष्ठ सरकारास मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबींपैकीं जकातीचा नंबर पहिला तर प्राप्तीवरील कराचा दुसरा नंबर येईल. प्राप्तीवरील कर हा प्रत्यक्ष कर होय. करदानाचें सामर्थ्य नसलेल्यांस ह्या करापासून मुक्त करतां यतें. हा कर गोळा करण्याचा खर्च थोडा असतो, अधिक श्रीमंतांपासून तो भारी दरानें घेतां येतो. प्रत्यक्ष उत्पन्नांत कपात झाल्यामुळें कर देणारा इसम तो देत असल्याबद्दल व तो घेणाऱ्या सरकारच्या धोरणाबद्दल जागरूक असतो. ह्या सर्व कारणांमुळें प्राप्तीवरील कर हा सुधारलेल्या देशांत उत्पन्नाचें महत्त्वाचें अंग होऊन बसला आहे. व नीट गोळा केल्यास तो अर्थशास्त्राच्या दृष्टीनें निर्दोषहि आहे. प्राप्तीवरील कराचे दर इ. स. १९३२ सालीं असेंब्लीच्या विरोधास न जुमानतां पुढीलप्रमाणें पास झाले.

वार्षिक	दर रुपयास
२००० ते ५००० पर्यंत	६ पै
५००० ते १००००० पर्यंत	९ पै
१०००० ते १५००० पर्यंत	१२ पै
१५००० ते २०००० पर्यंत	१६ पै
२०००० ते ३०००० पर्यंत	१९ पै
३०००० ते ४०००० पर्यंत	२३ पै
४०००० ते १ लाखापर्यंत	२५ पै
१ लाख ते त्याहून कितीही वर	२६ पै

कंपनीच्या उत्पन्नावर मग तें कितीही असो दर रुपयास २६ पै; याखेरीज जादा प्राप्तीवरील भारी कर पुढीलप्रमाणें आहेतः--कंपनीच्या५०००० रु.वरील उत्पन्नावर ५०००० रु. वरच्या दर रु.स १आणा हिंदु.अविभक्त कुटुंबास ५०००० रु.वरच्या पहिल्या २५००० रु. वर सुपरटॅक्स नाहीं. दुसऱ्या २५००० रु. वर दर रु. स १ आणा १ पै; सर्वसाधारण मनुष्याचे किंवा संस्थेचे बाबतींतः-- ३०००० रु. पासून ५००००. पर्यंत तीस हजार रुपयावरच्या रकमेस दर रु. स ९ पै. ५०००० रु. वरीलपहिल्या ५०००० रु. दर रु.स १ आणा ३पै यानंतर दुसऱ्या ५०००० रुपयापासून सर्वांस (हिंदु अविभक्त कुटुंब धरूनहि) पुढील प्रमाणें सारखेच दर आहेत.

१	दुसऱ्या ५०००० रुपयांवर	दर	रु.स		१आ.९पै
२	तिसऱ्या	"	"	"	२आ.३ पै
३	पुढल्या	"	"	"	२आ.९पै
४	"	"	"	"	३आ.३पै
५	"	"	"	"	३आ.९पै
६	"	"	"	"	४आ.३पै
७	"	"	"	"	"४आ.९
८	"	"	"	"	५आ.३पै
९	"	"	"	"	५आ.९पै
१०	पुढल्या कितीही	"	"		६आ.३पै

प्राप्तीवरील करांत पुढील सुधारणा होणें अवश्य आहे. रु. २००० ची किमान मर्यादा ही हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीच्या मानानें बरीच उंच आहे. ती १००० रु.पर्यंत आणून ठेवल्यास हरकत नाहीं. इ. स. १९३१–३२ च्या पुरवणी अंदाजपत्रकांत (म्हणजे सप्टेंबर १९३१त असेंब्लीपुढें मांडलेल्या अंदाजपत्रकांत) तो आकस्मिक समारंभाचा उपाय म्हणून आणून ठेवलाच आहे. (१००० ते २००० उत्पन्नावर रु. स ४ पै कर) या प्राप्तीवरील करांत शेतीच्या उत्पन्नाचा समावेश केला पाहिजे. भारी उत्पन्नावरील दरांत वाढ करण्यास थोडीबहुत जागा आहे. अशा प्रकारची टीका इतके दिवस केली जात असे. परंतु इ. स. १९३१–३२ च्या अंदाजपत्रकांत आतां इतकी वाढ झाली आहे कीं, ती टीका प्राप्तीवरील करास लागूं नाहीं.

सायमन कमिशनच्या रिपोर्टांत असेंब्लीच्या एकंदर मतदारांची संख्या ११२८३३१ सांगितली आहे. यांत ७५ रु. वर सारा भरणारे व रु.२००० च्या प्राप्तीवरील कर भरणारे लोक आहेत.यावरुन हिंदुस्थानच्या गरीबीची कल्पना येते.

(२९) मीठः—हया करापासून वरिष्ठ सरकारास सालीना ६ ते ६॥ कोट रुपये उत्पन्न येतें. म्हणजे हा कर लहानापासून थोरांपर्यंत व श्रीमंतापासून गरीबांपर्यंत माणशीं ३ आणे वसूल करतो असें म्हणावयास हरकत नाहीं. लोकमताच्या रोषास सदैव पात्र झालेला असा दुसरा कोणताही कर नाहीं. हा कर इ. स. १९०३ पर्यंत दर मणीं २॥ रुपये असे,तेव्हांपासून कमी होत होत इ. स. १९१६ त मणीं १ रु ४ आ. झाला व मधून मधून फरक झाला तरी सामान्यतः तोच दर कायम असतो. मीठावरील कर कमी होऊन मीठ स्वस्त झालें तसतसें अधिक खपूं लागलें; हयावरुन मीठ महाग झाल्यास त्याचा व्यय कमी करण्याची आवश्यकता भासते इतकी या देशांतील जनता गरीब आहे हें सहजच सिद्ध होतें. व सरकारनें आपल्या उत्पन्नासाठीं प्रजेचें मीठ तोडावें हें बरें नव्हे असें लोकांस वाटतें. मीठ हा पदार्थ आरोग्यवर्धक आहे. गोरगरिबांना तो आवश्यक आहे म्हणून यावरील कर कोणी टाळूं शकत नाहीं. साखर महागल्यास लोक साखर खाणार नाहींत,तांदूळ महागल्यास लोक बाजरी खातील, पण मीठ महागल्यास तें न खातां दुसरें कांहीं तसलेंच स्वस्त आवश्यक व आरोग्यकारक खाण्याजोगें कांहीं नाहीं. मिठावरील कराचा भार गरीबावर जड पडतो. श्रीमंतास तो हलका जातो. कारण दोघांनीहि मीठ जवळ जवळ सारखेंच खाल्लें तरी आपल्या प्राप्तीचा जो हिस्सा गरीबास मिठाकारणें खर्च करावा लागतो तितका श्रीमंतास लागत नाहीं. समुद्रकिनाऱ्यावर मीठागराशेजारीं राहणाऱ्या लोकांना तर शेजारीं फुकट मिळणाऱ्या पदार्थास दिडक्या मोजाव्या लागतात हें कसेंसेंच वाटतें. प्रजेपैकीं सर्वांनाच कांहींना कांहीं करभार द्यावा लागावा हें तत्त्व कबूल केल्यास मीठावरील कर हें एकच साधन आहे असें सरकारचें मीठावरील कराच्या समर्थनार्थ म्हणणें आहे. तूर्त ही तात्त्विक चर्चा बाजस ठेवून इतकेंच म्हणतां येईल कीं, मीठावरील प्रस्तुतचा मणी १–४ कर आणखी कमी करुन जर मीठाचा खप वाढवितां येईल तर तें आवश्यक आहे. मीठावर फार तर ८ आ. मण कर ठेवावा, असें डॉ. परांजपे यांनीं Taxation Inquiry Committee च्या रिपोर्टांत सुचविलें आहे. (पॅरा १६८) डॉक्टर साहेबांची सूचना मान्य झाल्यास सरकारचाही हेतु साधेल व मीठही स्वस्त होईल.

(३०) अफूः—अफूचें उत्पन्न हल्लीं सालीना ३ कोटींचें असतें. एके काळीं अफूचें उत्पन्न८कोटी रुपयांचें होतें. व सर्व उत्पन्नांत त्याचा दुसरा नंबर होता. हिंदुस्थानांत पिकलेली पुष्कळ अफू चीनकडे रवाना होई. परंतु इ. स. १९०७ मध्यें भारत मंत्र्याच्या वजनामुळें चीनकडे होणारी निर्यात कमी करावी लागली. चीनांत अफूचें व्यसन पुष्कळ होतें व आहे. शेजारच्या राष्ट्राच्या व्यसनाचा फायदा घेऊन आपण नफेबाजी करणें बरें नव्हे ही विचारसरणी या निर्बंधाच्या मुळाशीं होती. हिंदुस्थाननें चीनला अफू पाठवूं नये व चीननें अफूची पैदास करूं नये असें ठरलें होतें. भारतमंत्र्याच्या आग्रहावरुन हिंदुस्थान सरकारनें अफूची निर्यात कमी केली. व इ. स. १९१४पासून

सरकारतर्फे चीनकडे जाणारी अफू बंद झाली. पण चीननें अफूची पैदास केली नाहीं असें मात्र घडलें नाहीं. हिंदुस्थानांत दारूच्या खपामुळें होणारें दारूचें उत्पन्न सरकार घेत असतां चीनच्या अफूबाजीच्या व्यसनापासून हिंदुस्थान सरकारनें उत्पन्न कां मिळवूं नये हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. हल्लीं अफूच्या निर्यातीवर राष्ट्रसंघाचें बंधन बसलें आहे. व इ. स. १९३५ पर्यंत खाजगी मार्गानें परदेशी पाठविली जाणारी अफूची निर्यात ही बंद करण्याचें हिंदुस्थान सरकारनें वचन दिलें आहे. तेव्हां आहे हेंही उत्पन्न लवकरच घटेल असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

(३१) रेल्वे:—रेल्वे प्रथम इ. स. १८५३त सुरू झाली, पण रेल्वेचें सदर उत्पन्नाच्या बाजूला इ. स. १९०० सालापासूनच घालतां येऊं लागलें. तत्पूर्वी रेल्वेमुळें बजेटावर किती धाड येईल याचा कांहींच अंदाज नसे. व हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक पावसाच्या चिन्हांवर व रेल्वेच्या कमजास्त धक्क्यावर सालोसाल मागें पुढें होत असे. इ. स. १९०० पासून सरकारास रेल्वेपासून उत्पन्न येऊं लागलें व तेव्हांपासून रेल्वेची झपाट्यानें वाढ झाली.

इ. स. १८६९	९८९१ मैल
इ. स. १९००	२४७१३ मैल
इ. स. १९३१	४२२८१ मैल

वरील आंकड्यांवरून रेल्वेच्या वाढीची कल्पना येईल. रेल्वे सुरू झाली तेव्हां रेल्वेचा कारभार कंपनीकडे द्यावा व तिच्या नफ्या-तोटचाचा जिम्मा आपण घेऊन त्या कंपनीला अमुक उत्पन्न मिळेलच असें आश्वासन द्यावें असें सरकारी धोरण होतें. परंतु या धोरणानें उधळपट्टीला उत्तेजन मिळालें. इ. स. १८६९ त हें जुनें धोरण बदलून सरकारनें स्वतःच रेल्वेची वाढ करावयाचें ठरविलें. पण रेल्वेची पुरेशी वाढ होईना. तेव्हां इ. स. १८८० पासून फिरून रेल्वे व्यवस्था कंपन्यांकडे द्यावी, पण कंपनीला पूर्वीसारख्या फाजील सवलती देऊं नयेत असें धोरण सुरू झालें. इ. स. १९०० पासून सरकारनें व संस्थानांनीं रेल्वेची वाढ करण्याचें अंगावर घेतलें. व हेंच धोरण पुढें चालू राहिलें. रेल्वेची व्यवस्था कंपनीकडे असावी कीं सरकारकडे असावी याबद्दलचा वाद अर्थशास्त्रज्ञ भांडत असतात. पुष्कळ वेळां या वादाचा निकाल परिस्थितीवर असतो. हिंदुस्थानांत तूर्त रेल्वेची व्यवस्था हातीं घेण्यास देशी कंपन्या पुढें येत नाहींत. व सरकारच्या जमाखर्चावर कायदेमंडळाचा पहारा आहे हें लक्षांत घेऊन सामान्य लोकमत आज रेल्वेची व्यवस्था सरकारकडे असावी या बाजूचें आहे. इ. स. १९२१ सालीं बसलेल्या ऑक्वर्थ कमिटीनें याच बाजूनें आपलें मत दिलें आहे.

(३२) इ. स. १९२४ ची फारकत:—दिवसेंदिवस रेल्वेचा व्याप वाढूं लागला. सरकारच्या ताब्यांतील रेल्वेचें उत्पन्न हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नाशीं स्पर्धा करण्याइतकें मोठें झालें व खर्चही त्याच प्रमाणावर वाढला. इ. स. १९२९ ते ३० मध्यें सरकारी रेल्वेचें ठोक उत्पन्न १०१ कोट रुपये, व खर्च ६६ कोट रुपये होता. यामुळें रेल्वे हें दुसरें राज्यच बनलें. हिंदुस्थानसरकार व त्यांच्या रेल्वे या दोन्हींचे वसूल व खर्च एकत्र केल्यास एकंदर जमेचा व खर्चाचा आकडा फुगून दिसूं लागला. पण फुगण्याचें एक राहो. सरकारची काटकसर रेल्वेला भोवूं लागली. व रेल्वेच्या उलथापालथीमुळें सरकारी हिशेबांतील स्थैर्य नाहींसें झालें. तेव्हां ही अव्यवस्था काढून टाकावी व रेल्वेला निर्बंध आपली वाढ करतां यावी व हिंदुस्थान सरकारास अविच्छिन्न उत्पन्न यावें या हेतूनें वर सांगितलेल्या आक्वर्थ कमिटीनें शिफारस केली कीं, हिं. सरकार व रेल्वे यांचीं अंदाजपत्रकें व हिशेब वेगवेगळे करावेत. व दोघांचा परस्परसंबंध पुढीलप्रमाणें असावा. (१) रेल्वेखात्यानें सरकारला, रेल्वेंत आदल्या वर्षीं गुंतविलेल्या भांडवलावर शेंकडा १ या प्रमाणांत वाटा द्यावा. अखेरीस झालेल्या नफ्याचा एक पंचमांश हिस्सा सरकारचा. नंतरही जो नफा राहील त्यांपैकीं ३ कोटी रु. रेल्वे रिझर्वफंडाकडे जातील व राहिलेल्याचा एक तृतीयांश सरकारकडे येईल. लष्करी हद्दींतील रेल्वेमुळें जें नुकसान होतें तें सरकारनें सोसावें. एखाद्या सालीं रेल्वेला तूट आली तरी रेल्वेनें भांडवलावर शेंकडा १ ही रक्कम सरकारला दिलीच पाहिजे मग ती पुढें दिली तरी चालेल. अशा प्रसंगीं नफ्याचा एक पंचमांश वगैरे देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. ही व्यवस्था मान्य झाल्यावर ती ५ वर्षे बदलूं नये.

उदाहरणादाखल १९२४-२५ चे आकडे देतों.

	कोट रु.
१९२३-२४ च्या भांडवलावर शेंकडा १	५·४
नफ्याचा एक पंचमांश	·९

३ कोटीचा रेल्वे रिझर्व देऊन उरलेल्याचा एक तृतीयांश	.१·६७
यातून वजा	७·९७
लष्करी रेल्वेवरील नुकसान	१·२१
	६·७६

ही सरकारी तिजोरीस प्रत्यक्ष मिळालेली रक्कम होय.

वरील ठराव असेंब्लींत २०सप्टेंबर १९२४ रोजीं पास झाला व इ. स. १९२९ त पुनः जवळ जवळ त्याच तत्त्वावर फिरुन पंचवार्षिक करार झाला आहे. इ. स. १९३० मध्यें रेल्वेंत एकंदर ८५६.१३ कोट रुपये भांडवल गुंतलें आहे. त्यासालीं सर्व रेल्वेचें उत्पन्न ११६.०८ कोट रुपये व खर्च ७५·४९ कोट रुपये होता. सरसालांत रेल्वेनें एकंदर ६३ कोट ४० लाख लोकांनीं प्रवास केला. त्यांत पहिल्या वर्गाचे ८ लाख उतारू व दुसऱ्या वर्गाचे अदमासें ९० लाख उतारू होते.

(३३) रेल्वेचे दरः—रेल्वेत अगोदर फारच भांडवल गुंतलेलें असल्यानें नेहमी जेवढी वाहतूक वाढेल तेवढी बरीच, हें रेल्वेचें मुख्य धोरण असतें. कारण वाहतुक कमी झाल्यानें रेल्वेचा बुडित खर्च कमी होऊं शकत नाहीं. व बुडित खर्चाच्या मानानें चालूं खर्च थोडा असतो. तसेंच अमूक एक जिन्नस नेण्यास नेमका खर्च किती झाला हें ठरविणें फार कठीण असतें. अशा स्थितींत आकाराच्या किंवा वजनाच्या किंवा मैलांच्या ठराविक प्रमाणावर सगळीकडे एकच नियम लागूं करतां येत नाहीं. म्हणून रेल्वेचे दर ठरवितांना जीं तत्त्वें पाळलीं जातात तीं पुढें देतों.

१ वाहतूक घटेल असा दर ठेवूं नये. कारण अधिक वाहतूक असेल तर रेल्वेचा धंदा अधिक फायदेशीर होईल.

२ अमूक एक जिन्नस नेण्यासाठीं लागणारा विशेष खर्च भागणार नाहीं इतका वाहतुकीचा दर कमी कधींही नसावा.

३ म्हणून वाहतूक घटूं न देतां सोसवेल तेवढा भारी दर आकारण्यास हरकत नाहीं. (Charge what the traffic can bear).

(३४) जमिनीचा साराः—तोडरमल्लाची योजनाः—उत्पन्नाच्या बाबतींत हल्लीं जकातीच्या खालोखाल व एकेकाळीं पहिल्या प्रतीचें उत्पन्न सरकारास येण्याची बाजू म्हणज जमिनीचा सारा ही होय. इ. स. १९२९–३० सालीं साऱ्याचें उत्पन्न ३३ कोट रुपये होतें. व गेल्या दहा बारा-वर्षांत कमजास्त फरकानें तें तितकेंच आहे. हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशांत जमिनीच्या साऱ्याचें महत्त्व किती आहे तें सांगणें नकोच. इतिहासाला माहीत आहे त्या काळापासून हिंदुस्थानांत जमिनीच्या साऱ्याचें उत्पन्न ही राज्याच्या वसुलाची प्रमुख बाब गणली गेली आहे. राजाला उत्पन्नाचा एक षष्ठांश भाग द्यावा असें प्राचीन ग्रंथांत सांगितलें तें बहुधा जमिनीच्या उत्पन्नाचा एक षष्ठांश होय. याप्रमाणें होईल त्या उत्पन्नाचा ठराविक भाग देण्याची पद्धत पुष्कळ वर्षें रूढ झाल्यावर देशांत नाण्यानें व्यवहार होऊं लागले. व देशांतील सरकारास जमिनीच्या साऱ्यापासून येणारें उत्पन्न निश्चित असावें असें वाटूं लागलें. पण येईल त्या उत्पन्नाचा एक षष्ठांश किंवा एक चतुर्थांश असा, कोणता कां होईना, भाग वसूल म्हणून ठरविला म्हणजे निश्चितपणा येऊं शकत नाहीं; कारण दरसाल कमी जास्त पिकणार व त्याचा एक षष्ठांश किंवा एक चतुर्थांश कमजास्त होणार हें उघड आहे. सारांश हा निश्चितपणा उत्पन्न करण्यासाठीं जमिनीची पहाणी करून कांहीं तरी सरासरी ठरविणें जरूर झालें. जमिनीची पहाणी करावी, वर्गवारी ठरवावी, उत्पन्नाचा अंदाज बांधावा, दुकाळसुकाळाचीं वर्षें ध्यानांत घ्यावीं व त्यांची सरासरी काढावी व त्याचा ठराविक हिस्सा हा सरकारचा भाग होय अशी पद्धत घालून द्यावी, हें काम मुसलमानी अंमलांत व्यवस्थित रीतीनें प्रथम राजा तोडरमल्लानें केलें. त्यानें दुकाळसुकाळांची सालोसाल नोंद ठेवून असें ठरविलें कीं, जमिनीच्या उत्पन्नाची १९वर्षांची सरासरी घ्यावी. व ह्या सरासरीचा एक तृतीयांश हा सरकारचा भाग होय. दर दहा वर्षांनीं ह्याची तपासणी करावी. आजच्या काळांत तोडरमल्लानें सांगितलेला उत्पन्नाचा हिस्सा सर्वांस फार मोठा आहे असें वाटेल यांत शंका नाहीं. पण तेवढ्यावरून पूर्वीं कराचें ओझें हल्लींच्या मानानें जबर होतें असें मानण्याचें कारण नाहीं, कारण आजच्याप्रमाणें दुसरे अनेकविध कर त्या काळीं अस्तित्वांत नव्हते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

(३५) कायमधाऱ्याची पद्धतः— या तोडरमल्लाच्या पद्धतीस पुढील काळांत अनेक फाटे फुटले. नवीं राज्यें निर्माण होत व त्यांचे बादशहा आप्तस्वकीयास खूष ठेवण्यासाठीं जहागिरी व जमिनदाऱ्या देत. पुनः नवें राज्य आलें कीं, त्याचे बादशहा नव्या जहागिरी

निर्माण करीत व जुन्या जहागिरदारांना वतनदार कुळांचा दर्जा प्राप्त होई. अशा रीतीनें सरकार व प्रत्यक्ष जमीन करणारें कुळ यांच्यामध्यें इनामदार,जमिनदार, वतनदार,कुळ, शेतकरी व मोलाचा मजूर असे अनेक थर कालांतरानें उत्पन्न झाले. व इ. स. १७९२त लॉर्ड कॉर्नवॉलिस ज्यावेळीं बंगाल्यांत ह्या प्रश्नांत मन घालूं लागला त्यावेळीं त्याच्या नजरेस तोडरमल्लानें घालून दिलेल्या पद्धतीचें शुद्ध स्वरूप पहावयास न सांपडतां त्याच्या जागीं अराजकांत उत्पन्न झालेली अव्यवस्था व हरएक प्रकारची हक्कदारी पहावयास सांपडली. ह्या कटकटींत आणखी खोलांत पडावयास नको म्हणून त्यानें कायमधाऱ्याची जमिनदारी पद्धत बंगाल्यांत अस्तित्वांत आणली. ही पद्धत चांगली कीं वाईट ह्याबद्दल विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत मोठा कडाक्याचा वाद चाले व प्रसिद्ध विद्वान सर रमेशचंद्र दत्त हे कायमधाऱ्याच्या पद्धतीचे कट्टे पुरस्कर्ते असत. आज हें वादाचें वादळ मागें पडलें आहे. व सरकारचें उत्पन्न पुढें अनंत काळपर्यंत कायम स्वरूपांत बांधून टाकण्यास आतां कोणी तयार होणार नाहीं. आज बहुतेकांचें जमिनदारी असो वा नसो, वसुलाचा कायमपणा नसावा या बाबतींत एकमत आहे.जमिनदारी असावी किंवा नसावी हा प्रश्न सध्यांतरी केवळ तात्त्विक आहे कारण जमिनदारी नसेल तेथें ती उत्पन्न करावी असें कोणाचेंच मत नाहीं व असेल तेथें ती काढून घ्यावी हें मत केवळ क्रांतिकारक आहे.

(३६) सारावसुलीच्या पद्धतिः—हिंदुस्थानांत जमिनीच्या साऱ्याच्या पद्धति कोणकोणत्या आहेत ह्याचें विस्तृत विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे. पण त्यांची वर्गवारी थोडक्यांत पुढील पद्धतीनें करतां येईल.

जमिनदारी—नियतकालिक धाऱ्याची.

रयतवारी—कायमधाऱ्याची

पैकीं कायम जमिनदारी बंगाल्यांत आहे.कायमरयतवारी कोठेंच नाहीं. तात्पुरती नियतकालिक रयतवारी मुंबई मद्रास प्रांतांत आहे. नियतकालिक जमिनदारीचे अनेक प्रकार आहेत. अयोध्येंत बंगालप्रमाणें प्रत्यक्ष जमिनदार आहेत. व सरकार ठराविक वर्षांनीं सरकारास आपल्या जमिनीचा किती सारा द्यावयाचा तें ठरवितें. पंजाबांत महालवारी म्हणून याचाच एक प्रकार आहे. त्यांत एका खेड्यांतील जमीन एका मोठ्या कुटुंबांतील पुरुषाकडे असते. त्या कुटुंबांतील वडील घराण्यांतील वडील मनुष्य हा त्या खेड्याचा पाटील. सरकार त्या पाटलाशीं साऱ्यासंबंधीं करारमदार करतें. मध्यप्रांतांत खेड्याचा पाटील हा पूर्वजांनीं कर्तबगारीनें मिळविलेल्या त्या पाटिलकीचा हक्कदार असतो. त्याला काढून टाकतां येत नाहीं.सरकारला साऱ्याचे सर्व करार त्याच्याशीं करावे लागतात. त्याला मालगुजार असें म्हणतात.

(३७) मुंबई इलाख्यांतील पद्धतः—मुंबई इलाख्यांतील जमिनीच्या साऱ्याची पद्धत अंमळ विस्तारानें सांगितली पाहिजे. वास्तविक पद्धत अशी कीं, जमिनीच्या वसुलाचा अंदाज बांधून त्यांतील निव्वळ उत्पन्नाचा कांहीं ठराविक हिस्सा हा सरकारी सारा असावा. पण मुंबई इलाख्यांत पद्धत भिन्न आहे. पूर्वीं येत असलेलें उत्पन्न जमेस धरावयाचें व नवीन सारा ठरवितांना मध्यंतरीच्या काळांत किंमतींत काय कमजास्त फेरफार झाले, भरभराटीचीं व अवनतीचीं ठळक चिन्हें कोणतीं तें लक्षांत घेऊन,पूर्वी एका जिल्ह्यांत किंवा ठराविक भागास जें उत्पन्न येत असेल त्यांत शेंकडा किती वाढ किंवा घट करावयाची तें ठरवावयाचें.समजा, एका जिल्ह्याचें साऱ्याचें उत्पन्न इ. स. १९०५ सालीं ५ लक्ष रुपये आहे व इ. स. १९३० सालीं त्यांत २० टक्के वाढ करावयाचें ठरलें तर त्या जिल्ह्यापासून ६ लक्ष रुपये घ्यावेत असा हिशेब येतो. हे ६ लक्ष रुपये जमिनीचा मगदूर लक्षांत घेऊन त्यावर त्यांची विभागणी करावयाची. सर्व जमिनींची सर्वे नंबरमध्यें विभागणी झालेली असल्यानें दर सर्वे नंबरच्या साऱ्यांत किती वाढ होईल तें ठरवावयाचें व त्यावरून प्रत्येक कुळाच्या साऱ्याची आकारणी करावयाची. निव्वळ उत्पन्नाच्या ठराविक हिश्शाचें गणित फक्त दर जमिनीच्या वाटचास आलेला हिस्सा पडताळून पहाण्यापुरतें उपयोगांत आणावयाचें अशी पद्धत आहे.

(३८) खंड कीं करः—जमिनीचासारा हा कर आहे कीं खंड आहे त्याबद्दलचा वाद बऱ्याच जोरानें केव्हां केव्हां रंगांत येत असतो. Taxation Inquiry Committee नें ह्या प्रश्नाचा बराच खल केला आहे. महाराष्ट्रापुरतें ह्या प्रश्नाचें उत्तर ऐतिहासिक पुराव्यानें देतां येईल. महाराष्ट्रांत मिराशी व उपरी असे शेतकऱ्याचे दोन वर्ग असत. त्यांत मिरासदारांची संख्या बरीच मोठी असून बहुतेक जमिनीची मालकी त्यांजकडे होती.उपरी हे जमीन कसणारे व मिराशी हे जमिनीचे मालक होत.व त्या मालकीच्या जमिनीवर मराठे राज्यकर्ते जें काय घेत तो करच होता, मराठ्यांच्या नंतर आलेल्या ईस्ट इंडिया कंप-

नीला व ब्रिटिश राज्याला पूर्वीच्या राज्याचे हक्क प्राप्त झाले हें कबूल केलें तर आजचे ब्रिटिश राज्यकर्ते हे जमिनीवर मालकी सांगू शकत नाहींत. खेरीज जमिनीच्या मालकीचीं कांहीं चिन्हें सांगतां येतील तीं अशीं कीं, जमिन ही इतर कोणत्याही मालकीच्या जिनसांप्रमाणें बक्षिस, विकत किंवा गहाण देतां येते. तसेंच जमिनीचा सारा हा खंड म्हणून मानावयाचा असा आग्रह असेल तर खंडासंबंधींचीं सर्व तत्त्वें सारा गोळा करण्याच्या पद्धतींत पाळलीं गेलीं पाहिजेत. खंड म्हणजे खर्चवेच वजा जाऊन जें काय राहील तें. मग कांहीं उत्तम जमीनीवर पुष्कळ शिल्लक उरेल व कांहींवर कांहींच उरणार नाहीं. अशा स्थितींत जेथें कांहीं उरणार नाहीं तेथें कांहीं सारा असतां कामा नये, व खंडांचें हें 'शिलकी' स्वरूप लक्षांत घऊन सारा गोळा करावयाचा तो जमिनीच्या उत्पन्नाचा शिलकी वाटा म्हणून गोळा केला पाहिजे, पहिला वाटा नव्हे. पण हल्लीं साऱ्याचा बोजा नाहीं अशी इंचभरदेखील शेतकीची जमीन नाहीं व साऱ्याचा बोजा हा शिलकी बोजा नसून पहिला बोजा आहे. तेव्हां जमिनीचा सारा हा खंड नव्हे हें सरकारच आपल्या नियमांनीं वदवीत आहे. आतां सरकारला इतर कराप्रमाणें सारा वाटेल त्या वेळीं कमजास्त करतां येत नाहीं, सरकार या बाबतींत रयतेशीं करारबद्ध आहे हें खरें, पण तेवढ्यावरून सारा हा कर नसून खंड आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण पुष्कळ ठिकाणीं अशी एकदम वाढ करणें हें कदाचित शक्यही नसेल. जमिनीचा सारा हा कर नसून खंडच आहे असा आग्रह धरणारांचें आणखी म्हणणें असें कीं, पूर्वीं काय असेल तें असो पण हल्लीं सारा बसविला गेल्यावर जमिनी मूळ मालकांकडून दुसऱ्यास विकल्या गेल्या. तेव्हां विक्रीच्या किंमतींत साऱ्याच्या बोजाची वजावट झाली. उदाहरणार्थ मूळ ५० रुपये उत्पन्न येणाऱ्या जमिनीची किंमत २००० रु. असली व तीवर ५ रु. सारा बसला तर निव्वळ उत्पन्न ४५ रु. च होईल व विक्रीची किंमत २००० न ठरतां १८०० च होईल. अशा स्थितींत १८०० रुपये जमिन घेणारावर जमिनीच्या साऱ्याचा बोजा बसूं शकत नाहीं, म्हणून तो कर नसून खंडच आहे. पण हें तत्त्व स्वीकारल्यास एकट्या जमिनीच्या साऱ्यालाच काय पण घरपट्टीला व प्रत्येक बाबीला तें लावून दाखवून तो कर नसून खंड आहे हें सिद्ध करतां येईल. सारांश, जमिनीचा सारा हा खंड आहे असा आग्रह धरणारांचा पक्ष बराच लंगडा आहे.

(३९) साऱ्याची आकारणी:—पण जमिनीचा सारा हा खंड असो वा कर असो, बोजा बसावयाचा तो शेतकऱ्यावरच होय. तेव्हां तो कोणत्या तत्त्वावर बसवावा हा प्रश्न खरा महत्त्वाचा होय. जमिनीचा सारा हा (१) घाऊक उत्पन्नाच्या प्रमाणांत किंवा (२) विक्रीच्या किंमतीवर किंवा (३) खंडाच्या आकारणीवर (४) निव्वळ उत्पन्नावर किंवा (५) निव्वळ नफ्यावर आकारतां येईल. पूर्वीं (तोडरमल्लाच्या काळीं) घाऊक उत्पन्नावर कर आकारीत असत. पण ती पद्धत उघड उघड सदोष आहे. कारण दोन भिन्न मगदुराच्या जमिनींचें घाऊक उत्पन्न कमी मगदुराच्या जमिनीस अधिक खतपाणी घालून सारखें काढून देतां येईल. पण तेवढ्यावरून दोन्ही जमीनींवर साऱ्याची एकच आकारणी करणें चुकीचें होईल. तसेंच विक्रीची किंमत सारा ठरविण्यास आधारभूत घेणें बरोबर नाहीं. कारण एकाद्या वस्तूची किंमत तिच्यापासून येणाऱ्या निव्वळ उत्पन्नाप्रमाणेंच तिजसंबंधाच्या आवडीनिवडीवर अवलंबून रहाते. सारा ठरविण्यास तिसरा आधार खंडाचा. सरकार आज त्याचाच आधार घेतें, व खंडाच्या शेकडा ५० हून सारा अधिक असावा असें सरकारी धोरण असल्याचें सांगण्यांत येतें. तें व्यवहारांत कितपत उतरतें हा प्रश्न अलाहिदा आहे. पण सारा ठरविण्यास खंड हा आधार बरोबर नाहीं. जमिन थोडी व खंडानें मागतेकरी पुष्कळ असले तर ते लोक खंडाची रक्कम चढवून जमीन खंडानें घेतील. अशा स्थितींत खंडाची रक्कम वास्तविक असावयास पाहिजे त्यापेक्षां फुगेल. म्हणून सारा ठरविण्यास खंडाचा आधार चुकीचा आहे. निव्वळ उत्पन्न हा पाया बराच निर्दोष आहे. निव्वळ उत्पन्न—घाऊक उत्पन्न -प्रत्यक्ष लागलेला खर्च. पण शास्त्रीयदृष्ट्या त्याहूनही निर्दोष तत्व निव्वळ नफ्याचें आहे. जमीन करणारा मनुष्य हा त्या जमिनीचा मालक आहे व्यवस्थापक आहे व कसणारा मजूर आहे. तेव्हां ह्या तीन दर्जाचा मोबदला त्यास मिळाला पाहिजे. निव्वळ नफा=घाऊक उत्पन्न—प्रत्यक्ष खर्च व व्यवस्थापक म्हणून लागलेला खर्च ह्याला इंग्रजींत Annual value असें नांव आहे. जमिनीचा सारा Annual valueच्या एकद्वितीयांश पेक्षां अधिक मोठा केव्हांही असूं नये असें मत Taxation Inquiry Committee नें दिलेलें आहे.

(४०) जमाबंदी म्हणजे काय?:—हल्लीं

जमाबंदी करणें ह्या शब्दाला नेमका अर्थ आहे. जमिनीची पहाणी करून तिची कसवार वर्गवारी करणें, प्रत्येकाच्या मालकीच्या एकर गुंठ्यांची मोजदाद करून आखणी करणें, सरकारी साऱ्याची रक्कम ठरविणें व हक्क नोंदणीचें पत्रक तयार करणें ह्यास जमाबंदी म्हणतात. ह्या सर्वांस खर्च व वेळ फार लागतो. व जमिनीसंबंधीच्या हक्कदारीचा बारीकसारीक तपशील एरव्हीं न्यायकोर्टांत अनेक प्रकारानें उपयोगास येतो ही गोष्ट त्याच्या बाजूनें सांगण्यासारखी नसती तर जमिनीचा सारा गोळा करण्यासाठीं उत्पन्नाच्या मानानें फार खर्च येतो असें म्हणावें लागलें असतें.

(४१) सुधारणेची दिशाः---आज जमिन-महसुलाच्या पद्धतींत कोणकोणत्या सुधारणा व्हावयास पाहिजेत त्याचा आपण संक्षपानें विचार करूं. (१) जमिनीच्या साऱ्याचीं आकारणी सर्वत्र निव्वळ नफ्याचे तत्त्वावर व्हावयास पाहिजे. आज ती तशी नाहीं. (२) जमिनीच्या उत्पन्नास प्राप्तीवरील कराचें तत्त्व लागू करावें. म्हणजे भारी उत्पन्नावर वाढत्या दरानें सारा घेतां येईल व कमी उत्पन्नावर सूट देतां येईल. (३) साऱ्याची वाढ करतांना रयतेच्या प्रतिनिधींशीं सहकार्य करण्यांत येत नाहीं; सरकारी अधिकारी तें ठरवितात, हें बरोबर नाहीं. सारावाढ करतांना जिल्हानिहाय सल्लामसलत देण्यास एक रयतेच्या प्रतिनिधींचें बोर्ड असावें व त्याची सल्ला बंधनकारक असावी. (४) शेवटीं सर्व सारावाढीच्या किंवा आणेवारीच्या तक्रारी जिल्हाधिकाऱ्यापुढें फैसल्यास न येतां त्याचीही चौकशी इतर दिवाणी दाव्यांप्रमाणें दिवाणी कोर्टांत व्हावी. ह्या चार ठोकळ सुधारणा सुचवितां येतील. खेरीज इ. स. १९०१ सालीं लॉर्ड कर्झन व सर रमेशचंद्र दत्त यांच्यांत झालेल्या वादांत लॉर्ड कर्झन यांनीं कबूल केलेली पण अद्याप अमलांत न आलेली सुधारणा म्हणजे साऱ्याची सर्व वाढ एकाच हप्त्यांत न होतां ती हप्त्याहप्त्यानें व्हावी. व तात्विक दृष्टचा एकाद्या जमिनीवर जादा कर बसविणें न्याय्य असलें पण कुळ तो देण्यास असमर्थ असलें तर केवळ तात्विक हिशेबावर भिस्त ठवण्यापेक्षां कुळाच्या मगदुराकडे पहावें, व सारावाढ करूं नये. ह्याही सुधारणा अमलांत येणें जरूर आहे. असो. जमिनीच्या साऱ्याचा प्रश्न हा हिंदुस्थानांतील रयतेपैकीं शेकडा ७९ लोकांच्या हिताहिताचा प्रश्न होय. हें लक्षांत ठेऊन त्यासंबंधीचें धोरण लोकमतास जबाबदार व अर्थशास्त्र्यांच्या सर्वसंमत तत्त्वास धरून होईल तितकें तें करणें हें अत्यंत आवश्यक आहे व या दृष्टीनें त्यांत अगदीं आमूलाग्र सुधारणा करण्यासही जागा आहे.

(४२) अबकारीः---ह्या बाबीपासून मुंबई सरकारास सालीना सरासरीनें ४ कोट रुपये उत्पन्न येतें. व हिंदुस्थानांत एकंदर उत्पन्न १९ कोटीवर आहे. दारूचा खप दिवसेंदिवस कमी करावा असें सरकारी धोरण जाहीर झालें असतांही गेल्या दहा वर्षांत हा ४ कोटीचा आंकडा कमी झालेला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सरकारची गेल्या दहा वर्षांतील पैशाबाबतची ओढाताण हें याच्या बुडाशीं मुख्य कारण आहे. दर साल ४ कोटी रुपये बुडाल्यास ते दुसरीकडून कसे उत्पन्न करावे ह्या विचारानें व ते दुसरीकडून उत्पन्न झाले तरी हातचे ४ कोटी रुपये घालविण्याचें सरकारच्या जिवावर येत असल्यानें 'दारूचा खप कमी करावा' हें धोरण निव्वळ कागदोपत्रीं उरतें. हें लक्षांत घेतलें म्हणजे अकबरानें जिझिया कर टाकाच्या फटकाऱ्यानें बंद करण्याचें खरें महत्त्व लक्षांत येतें. कर अन्यायी असला तरी तो सोडतांना रोजचें संस्थान चालविणाऱ्यास फार अडचणी वाटतात.

(४३) जंगलः---ह्याचें उत्पन्न सर्व हिंदुस्थानांत तीन कोटींहून अधिक नाहीं. उत्पन्न वाढविण्यासारखें असून ह्या बाबतींत सरकारनें 'गवादन्यां स्थितस्य सारमेयस्य' धोरण चालविलें आहे. एकंदर एकर जमिनीपैकीं शेकडा २२ टक्के जमिन जंगलांत गुंतलेली आहे. याचा नीट उपयोग केल्यास सरकारास उत्पन्न व अनेक धंद्यांना कच्चा माल मिळेल. व देशांत उद्योगधंद्यांची वाढ होईल. पण या बाबतींत सरकारचें धोरण, आहे तेवढ्याचें रक्षण करण्यापलीकडे अधिक प्रागतिक नाहीं.

(४४) कालवेः---ह्या बाबीपासून सरकारास सरासरी ५ ते ६ कोट रुपये मिळतात. कालव्यांवर एकंदर भांडवल १३० कोट रुपये खर्च झालें आहे. त्यावर सरासरीनें ५ टक्क्यांपेक्षां कमी व्याज सुटत नाहीं. इ. स. १९२९-३० सालीं एकंदर वसूल १२·९ कोटी होता. खर्च ५·९ कोटी झाला. व भांडवलावर ५·४ टक्के व्याज सुटलें. हिंदुस्थानांत कालव्यांची लांबी ७५००० मैल आहे. साधारणतः बाजारभावाचें व्याज सुटेल तेथें कालव्याची वाढ करावी असें सरकारी धोरण आहे. तें बदलून त्याऐवजीं दुष्काळी भागांत बाजारभावाइतकें व्याज न सुटलें तरी कालव्याची वाढ केली पाहिजे. व निव्वळ पाव-

साऱ्या भरंवशावर बसलेल्या शेतकऱ्यांना त्या अनिश्चितपणांतून मुक्त केलें पाहिजे.

वरिष्ठ व प्रांतिक सरकारास मिळणाऱ्या **वसुलांच्या** बाबींचा विचार केल्यावर आपण **खर्चाच्या** बाबींकडे वळूं.

(४५) संरक्षणः—ह्यांत सर्वांत मोठी बाब म्हणजे अर्थातच संरक्षण खातें होय. इ. स. १९२९–३० सालच्या २२६ कोट रुपये वसुलापैकीं, लष्करी खात्यानें ५९ कोट रुपये घेतले. म्हणजे शेकडा २६ टक्के खर्च लष्करापायीं गेला. ग्रेटब्रिटनचा एकंदर खर्च १९३०–३१ सालीं ७९९१७०००० पौंड होता त्यांत संरक्षणासाठीं ११०५२४००० पौंड खर्च झाले. म्हणजे एकंदर खर्चाशीं संरक्षणासाठीं झालेल्या खर्चाचें प्रमाण शेकडा १४ हून अधिक येत नाहीं. हिंदुस्थानच्या निःशस्त्र प्रजेचें संरक्षण करावयास, हिंदुस्थानच्या तीनही बाजूनें समुद्र व एका बाजूनें जमीन असतांना व जमिनीच्या बाजूला पर्वताच्या ओळीचें स्वाभाविक संरक्षण असतांना एवढा खर्च कां लागतो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. युरोपियन शिपायांचें प्रमाण मुंबई मद्रासकडे १:३ व बंगाल्यांत १:२ असें आहे. एका युरोपियन शिपायास सालीना २५०० रुपये सरासरीनें खर्च यतो, व हिंदी शिपायास ६५० रुपये येतो, असें एशर कमिटीनें आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे.संरक्षक धोरण सोडून चढाईचें धोरण ठेविल्यानें अधिक खर्च होतो. अॅबिसीनिया, मेसापोटेमिया, अफगाणिस्थान, चीन इत्यादि लागेल त्या ठिकाणीं साम्राज्याच्या संरक्षणासाठीं हिंदुस्थानांतील सैन्य फेकतां यावें यासाठीं एवढें मोठें सैन्य ठेवण्यांत येतें. अशा वेळीं धाडलेल्या सैन्याचा खर्च हिंदुस्थानास सोसावा लागतो. हिंदुस्थानास किनाऱ्याच्या संरक्षणासाठीं आरमाराचा खर्च ब्रिटिश आरमारास द्यावा लागत नाहीं, त्याच्या मोबदल्यांत हें जादा सैन्य ठेवण्यांत येतें असें कित्येक वेळां म्हणणें आहे. परंतु हिंदुस्थानाप्रमाणें आस्ट्रेलियासही ब्रिटिश आरमाराचा फायदा होत असून ऑस्ट्रेलियाकडून आरमाराच्या खर्चासाठीं फारशी रक्कम घेतली जात नाहीं. व त्याच्या मोदबल्यांत लष्करही पोसावें लागत नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानांत सेनापती हाच कार्यकारी मंडळाचा सभासद आहे. त्यामुळें हिंदुस्थानांतील लष्कराची व्यवस्था व धोरण दोन्ही त्याच्या तंत्रानें चालतात. वास्तविक एका स्वतंत्र कार्यकारी मंत्र्याकडे लष्करी धोरणाचें काम द्यावयास हवें. व सेनापतीला कार्यकारी मंडळांत जागा देऊं नये, अशी सुधारणा करावयास हवी. म्हणजे हिंदुस्थानच्या शिरावरील लष्करी धोरणाचा सासुरवास मर्यादित होईल. रिट्रेंचमेंट कमिटीनें हिंदुस्थानचा लष्करी खर्च निदान ५० कोटीपर्यंत आणून ठवावयास पाहिजे म्हणून सांगितलें.परंतु ती शिफारस अद्याप अमलांत आलेली नाहीं. हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें लष्करी खर्चाची वाटणी समाधानकारक व्हावी म्हणून सध्या लष्करी खर्च विभागणी कमिटी विचार करीत आहे. तींत दोन्ही सरकारचे प्रतिनिधी आहेत. हिंदुस्थानांतील एकंदर लष्करची विभागणी पुढीलप्रमाणें आहे.

ब्रिटिश सैन्य	६१२८४
ऑक्झिलिअरी ब्रि.) सैन्य	३१६००
इंडियन रिझर्व (शिलकी)	३२४३६
हिंदी सैन्य	१६८६६०
इंडियन टेरिटोरियल फोर्स	१५४००
संस्थानकडून पोसलेलें सैन्य	४४०००
	३५३३८०

(४६) होमचार्जेसः—हिंदुस्थान सरकारच्या खर्चापैकीं दुसरें महत्त्वाचें अंग म्हणजे होमचार्जेस होत. होम चार्जेस म्हणजे हिंदुस्थानच्या तिजोरींतून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हिंदुस्थानसाठीं म्हणून इंग्लंडमध्यें खर्ची पडलेली रक्कम. ह्याला प्रो. वकील यांनीं इंग्लिश चार्जेस असें बरेंच सार्थ नांव दिलें आहे. होम चार्जेसचें स्वरूप पुढील आंकड्यावरून स्पष्ट होईल.

इ. स. १९२९–३०

आकडे पौंडाचें आहेत

		वरिष्ठ सरकार	प्रांतिक सरकार
Direct Demands on Revenue		५६६५०	१४७५४४
वसुलांतून भांडवली	२०९८		
रेल्वे	९११५३४६		
कालवे	४०४१		६५६८०
इंग्लंड हिंदुस्थानचा इंग्लंडमधील तार खर्च			३५०
कर्ज व त्यावरील व्याज	६१८७२३६		
मुलकी राज्यकारभार	९७९४५८		११३३३८१
चलन टांकसाळ	७७२६५		
सरकारी बांधकाम	४७५४		२२१५५२

विविध	१९९४६७२	८८८७६९
लष्कर	१०६७९९१९	
	————	————
एकंदर	२९१०१७८९	२४५६९२६

एकंदर ३१५५८७१५

एकंदर ३१५ लक्ष पौंड म्हणजे ठोकळ मानानें ४० कोट रुपये झाले. मागें दिलेल्या खर्चाच्या निरनिराळ्या विभागांत इंग्लंडमध्यें झालेल्या खर्चाचे आंकडे आलेले आहेत. म्हणून हिंदुस्थानच्या अंदाजपत्रकांत होमचार्जेस हा खर्चाचा विभाग आढळून येत नाहीं. या ४० कोट रुपयांपैकीं सुमारें १० कोट रुपये हायकमिशनरच्या हातून स्टेशनरी, काटमाल वगैरेसाठीं खर्च होतात व बाकीचे स्टेट सेक्रेटरी खर्च करतो. कै.दादाभाई नौरोजींच्या काळापासून या खर्चाबद्दल हिंदी अर्थशास्त्रज्ञ राजकारणी पुरुषांनीं तक्रार केली आहे. कित्येकांनीं यांस इंग्रजी राज्याबद्दल द्यावी लागणारी खंडणी असें नांव दिलें आहे. या बाबतींत उलट बाजूची तक्रार अशी कीं, इंग्लंड हिंदुस्थानकडून बिनमोबदला अशी पैही घेत नाहीं. मग यास खंडणी असें निंदागर्भित नांव कां द्यावें? याचें उत्तर अवघड नाहीं. जो माल हिंदुस्थानांत मिळणार नाहीं तो इंग्लंडमध्यें म्हणजे जगाच्या बाजारपेठेंत घेतला व त्याबद्दल मोबदला दिला तर कोणी कांहीं म्हणणार नाहीं. परंतु जेथें कर्तबगार हिंदी अधिकारी मिळतील त्या जागीं इंग्रज अधिकारी ठेवले, नको असलेल्या इंडिया कौन्सिलचा खर्च हिंदुस्थानवर लादला, हिंदी शिपाई मिळत असून गोऱ्या शिपायांची भरती केली, हिंदुस्थानांत कर्ज मिळत असतांना विलायतेंत काढलें, कर्ज काढतांना फाजील सवलती दिल्या, विलायती रेल्वे कंपन्यांना आपला पाय रोवून बसण्यास सवलती व हक्क दिले गेले, हिंदी माल तितका चांगला कसा मिळेल हें पहाण्यापूर्वींच विलायती मालास टेंडर दिलें गेलें तर विलायतेंत झालेल्या खर्चास खंडणी म्हणणें अवास्तव होणार नाहीं. सारांश होमचार्जेस म्हणून खर्ची पडणारी सर्वच्या सर्व रक्कम खंडणी स्वरूपाची आहे असें म्हणणें अन्यायाचें होईल, हें कबूल केलें तरी होमचार्जेसमधील पुष्कळ प्रमुख कलमांत खंडणीचें बेमालूम मिश्रण झालें आहे इतकें बिनदिक्कत म्हणण्यास हरकत नाहीं.

राष्ट्रीय कर्जाचें स्वरूप.

(४७) तात्त्विकः—खाजगी मनुष्याला कर्ज असणें हें जितकें दूषणीय ठरेल तितकें सरकारला कर्ज असणें ठरत नाहीं. कारण सरकारच्या उत्पन्नास खाजगी मनुष्याच्या उत्पन्नाइतका निश्चित मर्यादितपणा नाहीं. तसेंच राष्ट्रापुढें येणारे प्रश्न खाजगी मनुष्यापुढें असलेल्या प्रश्नापेक्षां भिन्न प्रकारचे असतात. कांहीं बाबी नुसत्या विद्यमान पिढीच्याच नव्हे तर भावी पिढीच्या फायद्याच्या असतात. उताहरणार्थ, लढाईचा प्रसंग आल्यास त्यास तोंड देऊन त्यांत विजयी होणें हें विद्यमान पिढीच्याच नव्हे तर भावी पिढीच्याही फायद्याचें ठरतें. विद्यमान पिढी प्राण व पैसा देण्यास तयार झाली तर भावी पिढीनें निदान पैसा देण्याचा बोज पतकरणें हें वावगें नाहीं. एकाद्या तयार होणाऱ्या रेल्वेनें किंवा कालव्यानें विद्यमान पिढीचा जितका फायदा होईल त्यापेक्षां कदाचित् भावी पिढीचाच अधिक होण्याचा संभव आहे. म्हणून सरकारनें कर्ज काढून एकाद्या मोठ्या गोष्टीचा बोजा पुढील पिढीवर लोटणें गैर नाहीं; इतकेंच नव्हे तर तें योग्यही ठरेल. तसेंच राष्ट्रीय कर्ज हें क्रांतीला प्रतिबंधक ठरतें. एखाद्या देशांत क्रांति होण्याची वेळ आली तर राष्ट्रीय कर्जाचे रोखे हातांत असणाऱ्या लोकांना ती क्रांति बहुशः नको असते. कारण यशस्वी क्रांतीमुळें जुनें सरकार जाऊन नवें प्रस्थापित झाल्यास, न जाणों तें जुन्या सरकारनें काढलेलें कर्जच मान्य करावयाचें नाहीं. कर्जाच्या या स्वरूपाचा फायदा प्रथम इंग्लंडमध्यें वुइल्यम दि थर्ड याच्या विशेष अनुभवास आला. एखाद्या युद्धासारख्या अनपेक्षित प्रसंगास तोंड देण्यास कर्ज काढण्यावांचून सरकारास दुसरा मार्ग नाहीं. पूर्वीं राजांजवळ खजिना असे, पण आतां खर्चाची तोंडें वाढलीं.आतां राजांनीं करूं म्हटलें तरी कसाल्याही आपत्प्रसंगास पुरेलसा खजिना त्यांना करितां येणार नाहीं. सरकारचा खरा खजिना म्हटला म्हणजे प्रजेजवळ साठलेला पैसा व सरकारची प्रजेवळ असलेली पत हा होय. एकदम कर वाढवून पैसा उत्पन्न करूं म्हटलें तर करवाढ बेसुमार होऊनही कदाचित् हवा तेंवढा पैसा मिळणार नाहीं व एकदम करांची बेसुमार वाढही आर्थिक व्यवहारांत अनेक गोंधळ उत्पन्न करील म्हणून कर्जच काढणेंच सोईचें असतें. राष्ट्रीय कर्जाचा आणखी एक उपयोग असा कीं, त्यायोगें गोरगरीबास आपली थोडीबहुत शिल्लक व्याजी लावण्यास त्याचा फार उपयोग होतो. असे राष्ट्रीय कर्जाचे अनेक फायदे आहेत. पण म्हणून राष्ट्रीय कर्ज वाटेल तसें फुगूं देतां कामा नये. लोकांना

शिल्लक टाकतां येईल यापेक्षां अधिक वेगानें कर्जवाढ होऊं नये. तसेंच लोकांना किफायतशीर उद्योगधंद्याहून राष्ट्रीय कर्ज अधिक किफायतीचें वाटतां कामा नये. नाहींतर लोक व्यापारधंद्यांतून आपले पैसे काढून राष्ट्रीय कर्जांत घालतील. तसेच उद्योगधंदे मागासलेले असल्यास याची वाढ होण्याजोगा पैसा देशांत खेळत राहिला पाहिजे.

(४८) राष्ट्रीय कर्जाचे अपायः— राष्ट्रीय कर्ज फायद्याचें असलें तरी परक्या देशांत काढलेलें कर्ज तितकेंच फायद्याचें ठरत नाहीं. देशांतल्या देशांत काढलेलें कर्ज परत द्यावयाचें म्हणजे पर्यायानें या खिशांतून पैसा काढून त्या खिशांत टाकावयाचा. पण परक्या देशांतील कर्ज परत द्यावयाचें किंवा त्यावर व्याज भरावयाचें म्हणजे तितक्या किंमतीच्या मालाची पैदास करुन ती परदेशीं रवाना करावी लागते. तसेंच अशा सावकारांच्या हितसंबंधाच्या नांवावर परक्या राष्ट्रास आपल्या देशांत अधिकार गाजवितां येतो. मँचुरियांत जपानचें भांडवल गुंतल्यामुळें जपान मँचुरियांत हुकमत गाजवीत आहे हें आपण पाहात आहों. म्हणून परक्या देशांत कर्ज काढणें झालें तर प्रथम कर्ज आपल्या देशांत मिळणें शक्य आहे कीं नाहीं, कर्ज काढणें अगदीं अवश्यच आहे काय, या कर्जामुळें अमुक एक फायदा निश्चित कालावधींत देशाच्या पदरांत पडेल काय, वगैरे गोष्टी काळजीपूर्वक पाहिल्या पाहिजेत. शेवटीं सांगावयाचा मुद्दा असा कीं, कर्ज स्वदेशांतील लोकांचें असो वा परक्या देशाचें असो. 'मिळतें कर्ज म्हणून काढा' हें धोरण सरकारास घातक आहे. अंदाजपत्रकांत तूट आली काढ कर्ज, दुष्काळ पडला काढ कर्ज, नवी राजधानी थाटावयाची काढ कर्ज; या धोरणानें कर्जांत निष्कारण वाढ होत जाते व व्याजाच्या बोजामुळें कोणतीही सुधारणा करण्याचें काम खोळंबून बसतें. या पिढीप्रमाणें पुढल्याही पिढीला काहीं आपत्ति येणाऱ्या असतातच. तेव्हां एका पिढीनें दुसऱ्या पिढीवर कांहीं झालें तरी भलताच बोजा लोटून देऊन स्वस्थ राहूं नये.

(४९) हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कर्जाची वाढः— हिंदुस्थान सरकारचें राष्ट्रीय कर्ज ३१ मार्च १९३१ रोजीं ११७१·९६ कोट रुपये होतें. ह्या कर्जाची वाढ कसकशी झाली तें पुढील कोष्टकावरुन कळण्यासारखें आहे.

आंकडे दशलक्ष पौंडांत.

इ. स.			
१७९२–	७	१८८८–	१४९·५
१८२९–	३०	१८९८–	१९७·८
१८५७–	५१	१९०८–	२४५·०
१८५८–	६९॥	१९१३–	२७४·३
१८७६–	१२९	किंवा ४११·४५ को.रु.	

अलीकडील वर्षांतील वाढ.
आंकडे कोटी रुपयांचे.

इ. स. १९१४– ५१०.१९
इ. स. १९१८– ६९३.९१
इ. स. १९२२– ८३२.४८
इ. स. १९२६– ९९६.३६
इ. स. १९३०–११३६.४८
इ. स. १९३१–११७१.९६

(५०) कर्जाचें आजचें स्वरुपः—ह्या ११७१.९६ कोट कर्जापैकीं इंग्लंडमधील किती व हिंदुस्थानांतील किती तें तुलनात्मक दृष्टीनें इ. स. १९१४ चे व १९३१ चे कर्जाचे आंकडे घेऊन स्पष्ट दाखवितां येईल. त्या योगानें कर्जाच्या इतर अंगांचें स्वरुप तेव्हांच कळून येईल.

३१ मार्च १९१४ रोजीं

१ हिंदुस्थानांत एकंदर १७९.७९ कोट रुपये.
२ इंग्लंडांत एकंदर २४७.७ मिलियन पौंड १ शि. ६ पे.–१ रु. या दरानें ३३०.४० कोटी रुपये.

एकंदर कोट रुपये ५१०.१९

३१ मार्च १९३१ रोजीं.

१ हिंदुस्थानांतील

(अ) परत फेडीची व्यवस्था केलेलें कर्ज (Funded)	४१७.८५
ट्रेझरी बिलें	५५.३९
पेपरकरन्सी रिझर्वमधील ट्रे. बिल.	५.८९
	४७९·१२

(टीपः—बेरजेंतील चूक आंकडे दोन दशांशापर्यंतच घेतल्यामुळें येत आहे).

(आ) परत फेडीची व्यवस्था न झालेले. (Unfunded)	
पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँक	३७·०८
कॅशसर्टिफिकिटें	३८.४४
प्रॉव्हिडंट फंड	७०.३३
डिप्रीसिएशन व रिझर्व फंड	२३.८७

प्रांतिक शिलकी	६.११
	१७५.८३
वट एकूण	६५४.९५.
२ इंग्लंडमधील	मिलियन पौंड
स्टर्लिंग लोन	३१५.९७
लढाईचें कर्ज	१६.७२
वार्षिक हप्त्यानें (Annuities) परत दिलें जाणारें रेल्वेंतील भांडवल	५०.३२
इंपीरियल बँकेचें कर्ज	४.०५
प्रॉव्हिडंट फंड	.७०
एकंदर इंग्लंडमधील	३८७.७६
म्हणजे १ शि. ६ पे.=१-रु. या दरानें कोटी रुपये	५१७.०१
एकंदर कर्ज कोट रु. ११७१.९६	

वरील तुलनात्मक आकडयांवरून कळून येईल कीं,अद्याप इंग्लंडमध्यें असलेल्या कर्जाचा आंकडा हिंदुस्थानांतील कर्जाच्या आकडयाच्या मानानें फारसा लहान नसला तरी तारतम्यानें इंग्लंड-मधील कर्जाचें प्रमाण कमीच होत आहे. एकंदर कर्जांत शेंकडा ११२ हून अधिक वाढ झाली असतां हिंदुस्थानांतील कर्जांत शेंकडा २५० हून अधिक वाढ झाली आहे व इंग्लंडमधील कर्जांत फक्त जवळ जवळ ६० टक्के वाढ आहे. म्हणजे शक्य तों परदेशचें कर्ज कमी करण्याचें धोरण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र इ. स. १९१४ व इ. स. १९३१ ह्या दोन वर्षांत पदार्थांच्या किंमतींत फारसा फरक नसतांना कर्जाचा आकडा दुपटीपर्यंत फुगला हें पहातां ही वाढ नुसती चलनांतील वाढ न समजतां ऐन वाढच समजली पाहिजे हें उघड आहे. व ही ऐन वाढ देशांत चालू असलेल्या व्यापारधंद्यास ताण देणारी झाली आहे कीं, देशांत संपत्तीची रास्त वाढ झाल्यामुळें ही कर्जवाढ करतां आली तें पाहिलें पाहिजे.

(५१) उत्पादक व अनुत्पादक कर्जः— इतकें हें कर्ज कोठें गुंतविलें आहे ? ह्यांतील किती भागावर व्याज सुटतें? रेल्वे, कालवे यासारख्या धनोत्पादक बाजूंत गुंतवलेलें कर्ज किती? अनुत्पादक व्यवहारांत गुंतविलेलें कर्ज किती? असे प्रश्न उपस्थित होतात. त्यास उत्तर पुढील कोष्टकांत सांपडेल.

रेल्वेंत गुंतविलेलें कर्ज कोट रुपये	७४५.२९
पोस्ट, टेलिग्राफसारख्या व्यापारी खात्यास दिलेलें कर्ज	२३.४१
प्रांतांना दिलेलें कर्ज	१४९.१४
संस्थानांस दिलेलें कर्ज व दुसरें व्याजीं लावलेलें कर्ज	१९.६
	९३७.४४
सरकारी खजिन्यांत शिल्लक रोकड, सोनें सिक्युरिटिज वगैरे	३५.१८
व्याजीं न लाविलेली रक्कम	१९९.३४
एकंदर	११७१·९६

म्हणजे एकंदर कर्जापैकी ९३७.४४ कोट रुपये हें उत्पादक कर्ज होय व १९९·३४ हें अनुत्पादक कर्ज होय. यावरून अनुत्पादक कर्ज फार नाहीं हें दिसून येईल. किंबहुना युद्धकर्जाचा बोजा शिरावर नसता तर हें कर्ज याहूनही कमी दिसलें असतें. इ. स. १९१४ त अनुत्पादक कर्ज अवघें २६.५८ कोट रुपये होतें. तेव्हां या दृष्टीनें पहातां हिंदी राष्ट्रीय कर्जाची स्थिति असमाधानकारक नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

(५२) परदेशच्या कर्जाची जरूरीः— परंतु एवढयानें हिंदी कर्जाबद्दलचें विवेचन पूर्ण होऊं शकत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें हें कर्ज काढतांना वाजवीपेक्षां अधिक कर्ज न काढण्याची काळजी घेतली कीं नाहीं, परदेशचें कर्ज न वाढण्याबद्दल यत्न केले कीं नाहीं, या कर्जाची आतांपर्यंत कसकशी वाढ झाली व या कर्जापैकीं वास्तविक इंग्लंडनें आपल्या शिरावर घेण्याजोगा बोजा किती व हिंदुस्थाननें आपला म्हणून घ्यावयाचा बोजा किती याची छाननी करणें जरूर आहे. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत सरकारास हवें तेवढें कर्ज मिळूं शकलें असतें कीं नाहीं याचा विचार केल्यास नकारार्थीच उत्तर देणें भाग पडेल. कारण हिंदुस्थानांत बँकांची वाढ व्यवस्थित प्रमाणावर झालेली नसल्यानें व देशांत गरीबी असल्यानें सरकारास हवें तेवढें कर्ज देशांतल्या देशांत मिळणें अशक्य होतें. जरा अधिक सवलत देऊन पण देशांतल्या देशांतच कर्ज काढावें हा आग्रहही परिणामी हितकर ठरला नसता.कारण त्यायोगें देशांतील व्यापार व उद्योगधंद्यांस ओढ पडून त्यांत गुंतलेलें भांडवल सरकारकडे आकर्षिलें गेलें असतें. देशांत पुष्कळ सोनें गडप होतें त्याचा उपयोग व्यापारवृद्धीसाठीं व

सरकारास कर्ज देण्याकडे होऊं शकेल असा पुष्कळांचा आग्रह आहे तोही खरा नाहीं. हिंदुस्थानांत पुष्कळ सोनें गडप होतें हाच आग्रह खरा नाहीं. जगाच्या एकपंचमांश लोकसंख्या हिंदुस्थानांत असतांना शेकडा १४ पेक्षां अधिक सोनें हिंदुस्थानांत नाहीं. म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां ६ टक्क्यांनीं तें कमीच आहे. व आहे त्यांतील बरेंच सोनें हा द्रव्यसंचय म्हणून बाळगलें जात नसून, उपभोगाची वस्तु म्हणून वापरली जात आहे. अशा स्थितींत या थोड्याबहुत संचयाचा उपयोग होणें शक्य नाहीं.

(५३) आडमाप सवलत:-- यावरून हें दिसून येईल कीं, इंग्लंडमध्यें सरकारनें कर्ज काढण्यांत चूक केली असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण काढलें तें कर्ज कसोशीनें काढलें कीं नाहीं या प्रश्नास नकारार्थीच उत्तर द्यावें लागेल. इ. स. १९२१-२२ सालीं हिंदुस्थानांत ६ टक्के व्याजानें ४९ कोटी रु. चें कर्ज उभारलें असतां इंग्लंडमध्यें सरकारनें ७ टक्के व्याज देऊन ७॥ मिलियन पौंड कर्ज काढलें. त्याच वर्षी न्यूझीलंडला ५ टक्के व्याजावर इंग्लंडमध्यें कर्ज उभारतां आलें हें लक्षांत ठेण्यासारखें आहे. तसेंच हल्लीं रेल्वेवर ५ टक्क्यांहून अधिक व्याज सुटत नसतां रेल्वेच्या वाढीसाठीं ६ किंवा ७ टक्के व्याज देऊन सरकारनें कर्जवाढीची यातायात कां करावी तें कळत नाहीं. सरकारचें सामान्य धोरण असें कीं, मिळेल त्या व्याजानें कर्ज काढावयाचें व कर्ज काढलेला पैसा इंग्लंडमध्यें रेल्वेचा माल विकत घेण्यासाठीं खर्च करावयाचा व येथें रेल्वेंत नानाप्रकारची सुधारणा करावयाची. हिंदुस्थानांत आगगाड्यांचें विद्युच्चलन याच पद्धतीनें झालेलें आहे, तें पाहिलें म्हणजे काढलेलें कर्ज हिंदुस्थानच्या हितापेक्षां विलायती कारखानदारांचा माल उठविण्यासाठीं काढलें कीं काय असा साहजिकच प्रश्न विचारावासा वाटतो. हीं अलीकडील उदाहरणें झालीं. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर प्रथम आगगाडी सुरूं करतांना इंग्लंडमध्यें ३॥ टक्के. व्याजावर हवें तेवढें कर्ज मिळण्यासारखें होतें. परंतु रेल्वेकंपन्यास सरकारनें ५ टक्के व्याजाची हमी देऊन नफानुकसानीचा जिम्मा आपणाकडे घेतला हें इतिहासप्रसिद्ध आहे. वरील सारख्या उदाहरणावरून विलायतेंत कर्ज काढतांना कसोशी बाळगली नाहीं हें दिसून येईल.

(५४) कर्जवाढ कां झाली ?:--आतां हिंदुस्थानवर कोणकोणत्या प्रकारचे खर्च लादले गेल्यामुळें कर्जवाढ झाली तें पाहूं. इ. स. १८५८ पूर्वी ई. इं. कंपनीला राज्यकारभारांत जी शिल्लक उरे ती व्यापाराकडेच ओढली जाई व तूट येई तिचें कर्जांत रूपांतर होई. अशा रीतीनें कर्ज वाढत वाढत ३० एप्रिल १८५७ रोजीं ५१ मिलियन पौंड झालें. पुढें ई. इं. कंपनीकडून ब्रिटिश सरकारकडे हिंदुस्थानचा कारभार आला तेव्हां ई. इं. कंपनीच्या प्रोप्रायटर्सना दिलेला पैसा १२ कोटी रुपये हा हिंदुस्थानच्या तिजोरींतून देण्यांत आला. इं. स. १८५७ सालीं बंड झालें. तें बंड मोडण्यासाठीं झालेला खर्च हिंदुस्थानकडून घेण्यांत आला. इतकेंच नव्हे तर ज्या शिपायांच्या तुकड्या हिंदुस्थानांत आल्या पण ज्यांच्या लढण्याची जरूर पडली नाहीं अशा शिपायांच्या वाहतुकीचा खर्च व ज्या तुकड्या इंग्लंडमध्यें तयार ठेवण्यांत आल्या होत्या त्यांचा सहा महिन्यांचा शिकवणुकीचा (Training) खर्च हिंदुस्थाननें सोसला. चीन, पर्शिया, अबिसिनिया, ब्रम्हदेश या देशांत साम्राज्यसरकारनें केलेल्या युद्धामुळें त्या सरकारचा फायदा झाला. परंतु त्याचा खर्च मात्र हिंदुस्थानच्या शिरावर बसला. एकदांच काय तें अबीसिनियन युद्धाच्या वेळीं मि. ग्लॅडस्टन यांच्या प्रयत्नानें इंग्लंडनें खर्चाचा कांहीं भाग हिंदुस्थानास दिला.परंतु अपवादादाखल असें हें उदाहरण एवढेंच. साम्राज्य सरकारनें, हिंदुस्थान सरकार नको नको म्हणत असतांहि, त्यांच्या डोक्यावर लादलेल्या अफगाणयुद्धांचा खर्च हिंदुस्थाननें सोसला. फार काय सांगावें? इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील तारायंत्रा (Cablegram) चा खर्च, भूमध्य समुद्रांत आरमार ठेवण्याचा कांहीं खर्च,चीन व इराणमध्यें वकिलात ठेवण्याचा खर्च व इ. स. १८६८ त तुर्कस्थानचा सुलतान लंडनला आला असतां त्याच्या सन्मानार्थ केलेला नाचरंगाचा खर्च हा हिंदुस्थाननें सोसला!

(५५) राष्ट्रीय सभेची कर्जकमिटी:--या सर्व गोष्टींमुळें कांग्रेसच्या पुढाऱ्यांनीं इ. स. १९२२ त गया येथें भरलेल्या कांग्रेसमध्यें या प्रश्नास चालना दिली. व इ. स. १९३० सालीं राष्ट्रीय सभेनें मि. बहादूरजी, प्रो. के. टी. शहा, बॅ. भुलाभाई देसाई व प्रो. जी. सी. कुमारप्पा यांची एक कमिटी नेमून तिला राष्ट्रीय कर्जाची छाननी करून रिपोर्ट करावयास सांगितलें. त्या कमिटीनें आपला रिपोर्ट ६ जुलई १९३१ रोजीं वर्किंग कमि-

टीचे अध्यक्ष श्री. वल्लभभाई पटेल यांस सादर केला. या रिपोर्टाचा सर्व सारांश देत बसण्याची येथें जरुरी नाहीं. पण युद्धाच्या काळांत हिंदुस्थाननें इंग्लंडला जी एक दीडशें कोटी रुपयांची देणगी दिली,ती हिंदुस्थान सरकार व इंग्रज सरकार यांचे कायदेशीर संबंध लक्षांत घेतां कितपत देतां येते याबद्दल रिपोर्टांत संशय व्यक्त केला आहे. तो नमूद केला पाहिजे. हिंदुस्थान सरकार हें इंग्रज सरकारचे हुकूम पाळणारें असल्यामुळें याला इच्छास्वातंत्र्य नाहीं हें उघडच आहे. वर सांगितलेल्या चौघां जणांचें मत हिंदुस्थाननें इंग्लंडकडून ७२९.४कोट रुपये घेतले पाहिजेत असें आहे. हचा प्रश्नावर सर्वांचें या चौघाप्रमाणेंच एक मत होईल असें कोणाचेंच म्हणणें नाहीं. कांग्रेसनें या प्रश्नाची एक बाजू पुढें मांडली आहे. त्रयस्थ लवादमंडळ नेमून त्या मंडळापुढें कांग्रेसनें आपली बाजू मांडावी व सरकारनेंहि आपली बाजू मांडावी. जो काय लवाद निवाडा होईल तो उभय पक्षांस मान्य करणें भाग पडेल. वर सुचविलेली कर्जवांटणीची पद्धत अपूर्व नाहीं. तिला इतिहासाचा पाठिंबा आहे. इ. स. १९२१ सालीं आयर्लंडमध्यें फरीस्टेटची स्थापना होतांना जो कबुलायतनामा झाला त्याच्या पांचव्या कलमांत आयरिश फरीस्टेटनें निःपक्षपाती चौकशीअंतीं जो काय कर्जबोजा पडेल तो शिरावर घ्यावा असें स्वच्छ म्हटलें आहे. असें असूनहि इंग्लंडनें इंग्लंड व आयर्लंड यांच्यांत झालेल्या मोठ्या दंगलींचा खर्च तर सोसलाच, पण आयरिश फरीस्टेटला त्याच्या वांट्याच्या कर्जांतूनहि मुक्त केलें. हिंदुस्थानास ही सहानुभूतीची सवलत न मिळाली तरी न्यायाचें माप हिंदुस्थानच्या पदरीं पडलें पाहिजे.

(५६) एका आक्षेपाचें निरसनः—राष्ट्रीय कर्जाचें हें प्रकरण संपविण्यापूर्वीं एका आक्षेपाचें निरसन करणें जरूर आहे. अशी वारंवार ओरड केली जाते कीं, राष्ट्रीय सभेनें कर्जनाकारणीची ओरड केल्यामुळें हिंदुस्थानची पत खालावली. शांत विचार करणारांस हा आक्षेप निराधार आहे हें लक्षांत येईल. कांग्रेसनें कर्जनाकारण्याबद्दल ओरड केव्हांच केली नाहीं.कांहीं आग्रहानें प्रतिपादिलें असेल तर 'या कर्जाच्या जबाबदारींत आमचा आणखी एक वांटेकरी (इंग्लंड) आहे, ही होय. म्हणजे कांग्रेसच्या प्रतिपादनानें कर्जाची जबाबदारी गरीब हिंदुस्थानावरच न राहतां ती हिंदुस्थान व इंग्लंड या दोघांच्या पतीवर वांटली गेली. यामुळें वास्तविक पाहतां सावकारांना अविश्वास वांटण्याऐवजी आपल्या कर्जास दोन राष्ट्रांचें तारण मिळालें म्हणून विश्वास वांटला पाहिजे. सारांश,कांग्रेसच्या ओरडीमुळें हिंदुस्थानची पत खालावली असें म्हणणें ही नुसती दिशाभूल होय.

(७) हुजुर दौलतीची व्यवस्था

(५७) अंदाजपत्रकः— सरकारचें दरसालचें अंदाजपत्रक वर्ष सुरूं होण्यापूर्वीं चार आठवडे तयार असतें. व तेव्हां तें कायदेमंडळापुढें येतें. परंतु त्याच्याहि पूर्वीं म्हणजे आदल्या वर्षीच्या आगस्ट महिन्यापासून पुढील वर्षाचें अंदाजपत्रक तयार करण्यास खातेवार सुरुवात होते. प्रत्येक खात्यानें आपलें अंदाजपत्रक तयार करतांना (१) पगारासारखा कायम स्वरूपाचा खर्च, (२) स्टेशनरी साहित्यासारखा नेहमीं लागणारा कमजास्त खर्च, (३) व नवा खर्च हे द्यावयाचे असतात. व त्याबरोबरच त्या खात्याचा गेल्या वर्षीचा पक्का खर्च, चालू वर्षाचा मंजूर खर्च व पुढील वर्षाचा अंदाजी खर्च हे द्यावयाचे असतात. नवीन खर्चाचा मुद्दा लिहितांना (१) तो अंदाजपत्रकांत कोणत्या कलमांत पडेल (२) तो दरवर्षीं लागणारा आहे कीं नाहीं आणि (३) त्या मुद्यासंबंधीं विवेचनपर टिपण अशा तीन विभागांत तो लिहिला पाहिजे. यानंतर कायदेमंडळाची फिनॅन्स कमिटी सदरहू अंदाजपत्रक बरोबर आहे कीं नाहीं तें पाहते. अशा रीतीनें प्रत्येक खात्याचीं अंदाजपत्रकें तयार होतात व शेवटीं सर्व खात्यांचें मिळून अंदाजपत्रक मांडलें जातें. त्यावेळीं (१) गतवर्षाचा पक्का खर्च (२) चालू सालचा अंदाजी खर्च (३) चालू वर्षाच्या खर्चाचा दुरुस्त अंदाज हींही त्याबरोबरच तुलनेसाठीं सादर केलेलीं असतात. सरकारी वर्ष १ एप्रिलपासून सुरूं होतें म्हणजे दरसालचा पावसाचा अंदाज येण्यापूर्वींच अंदाजपत्रक तयार करावें लागतें. यामुळें बिनचूक अंदाजपत्रक तयार करणें कठीण जातें. एकंदरींत हिंदुस्थानच्या परिस्थितीस १ एप्रिल ही वर्षारंभाची तारीख फारशी सोयीची नाहीं. परंतु अनेक सुधारलेल्या देशांच्या सरकारांच्या वर्षारंभाची तारीख तीच असल्यामुळें हिंदुस्थान सरकारनें इ. स. १८६६ पासून त्या तारखेसच आपलाहि वर्षारंभ धरला आहे.

(५८) अंदाजपत्रकाबद्दल सूचनाः— फडणविसानें अंदाजपत्रक मांडतांना तें (१)सर्वंकष (Comprehensive) (२) समजण्या-

जोगें व (३) बिनचूक असें तयार करून मांडावें. अंदाजपत्रकांतील वर्गवारी वारंवार बदलूं नये. एकदां वर्षारंभीं अंदाजपत्रक पास करून घेतल्यावर पुनः वर्षाच्या मध्यभागीं पुरवणी अंदाजपत्रक पास करून घेण्याचा मोह टाळावा. कारण पुरवणी अंदाजपत्रक सादर करण्याचा परिपाठ पडल्यास मुख्य अंदाजपत्रक कांटेतोल बनविण्याचा देखावा करून पुरवणी अंदाजपत्रक वारेमाप तयार करावें लागेल, व तें वार्षिक खर्चाच्या कचाट्यांत कायदेमंडळास पास करावें लागेल. परंतु हें खरें असलें तरी सोळा महिन्यांपूर्वीं तयार केलेलें अंदाजपत्रक अगदींच चुकत नाहीं असें नाहीं.एकंदरींत मुद्दा असा कीं, पुरवणी अंदाजपत्रक नसावें पण मंजूर रकमेपेक्षां जास्त खर्च करण्याऐवजीं पुरवणी अंदाजपत्रक सादर करावें हा पक्ष उत्तम.

(५९) अंदाजपत्रकावरील चर्चाः— कायदेमंडळास अंदाजपत्रक सादर केल्यावर पहिले एकदोन दिवस सर्वसामान्य चर्चेंत जातात. नंतर खर्चाची मागणी मंजूर करण्याचें काम सुरूं होतें. हा अधिकार फक्त लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसच आहे. वरिष्ठ सरकारच्या अंदाजपत्रकांतील शेंकडा पन्नासहून अधिक खर्चाच्या बाबी असेंब्लीसही मतदानातीत आहेत. (non votable) त्या बाबी—राष्ट्रीय कर्जावरील व्याज, लष्कर, सनदी नोकरांचे पगार, संस्थानें व परराष्ट्रीय व्यवहारावरील खर्च या होत. खर्चाची मागण मंजूर झाल्यावर एकंदर खर्च कसा भागवावा, त्या बाजूकडे (वसुलाच्या बाजूकडे) लक्ष दिलें जातें व वसूल व खर्च समोरासमोर मांडून Money Bill तयार केलें जातें. हें Money Bill इतर कोणत्याहि बिलाप्रमाणें दोन्ही कायदेमंडळांत त्रिवार वाचन झाल्यावर पास होतें. इतर सुधारलेल्या देशांत उमराव सभेस (Upper House) मनी बिलाच्या बाबतींत निर्णायक अधिकार नसतात. परंतु हिंदुस्थानांत दोनहि कायदेमंडळास सारखेच अधिकार दिले आहेत.

(६०) मंजूर रकमेचा खर्चः— कोणतीहि रक्कम खर्चीं पडतांना ती खर्च करण्यास (१) त्या खात्याच्या वरिष्ठाची मंजुरी आहे कीं नाहीं (२) अंदाजपत्रकांत तिला मंजुरी आहे कीं नाहीं या दोन्ही बाबी काळजीपूर्वक पाहिल्या जातात. व त्या तशा असल्याबद्दल हिशेबतपासनिसाचा शेरा असतो. यानंतर कायदेमंडळानें नेमलेल्या हुजूर हिशेब कमिटीकडून Public Accounts Committee) या हिशेबाची छाननी केली जाते.

हिंदुस्थानांत एकंदर तीनशें मोठे खजिने व बाराशें छोट खजिन आहेत. हे सर्व देशभर ठविलेले आहेत. ठिकठिकाणच्या सरकारी खात्यांनीं या खजिन्यांत भरणा अगर उचल करावयाची असते. या खजिन्याबरोबरच ठिकठिकाणीं कागदी चलनाची गंगाजळी ठेविलेली असते. व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सरकारास पैसे पाठवावयाचे असल्यास प्रत्यक्ष पैशाचें स्थलांतर न होतां एके ठिकाणीं गंगाजळींतून सरकारी खजिन्यांत व दुसऱ्या ठिकाणीं सरकारी खजिन्यांतून गंगाजळींत रकमेची वजावट होते. व अशा रीतीनें प्रत्यक्ष पैसे पाठविण्या इतका कार्यभाग होतो.

(८) कराचा बोजा

(६१) दर माणशीं करः— हुजूर दौलतीचें प्रकरण पुरें करण्यापूर्वीं हिंदुस्थानांत दर माणशीं कराचा बोजा किती आहे व तो कितपत हलका किंवा भारी आहे हें पाहाणें जरूर आहे. हें काम अतिशय अवघड असल्यानें यांत ठोकळ अंदाज करण्यापलीकडे अधिक यश येणार नाहीं. हिंदुस्थान (वरिष्ठ व प्रांतिक) सरकारचें उत्पन्न इ. स. १९२९–३० सालीं २२७, २६, ४८,००० रुपये होतें. यांत म्युनिसिपालिटचा व लोकलबोर्डें यांचें अनुक्रमें १७ व १६ कोट रुपये उत्पन्न मिळवावयास पाहिजे. पण त्यांतहि प्रांतिक सरकारनें म्युनिसिपालिटीस व लो. बोर्डास जी ग्रँट दिली असेल ती वजा केली पाहिजे. अशा स्थितींत वरील २२७ कोटींत हे ३३ कोटी मिळविण्याऐवजीं ठोकळ मानानें २३ कोटी मिळविणें बरोबर होईल. मिळून २५० कोटी रुपये वसूल झाला.हा वसूल ब्रिटिश इंडियांतील लोकांकडून वसूल केला. ब्रिटिश इंडियाची लोकसंख्या इ. स. १९३१ च्या लोकसंख्येप्रमाणें (इ. स. १९२९–३० हें साल १९२१ पेक्षां १९३१ लाच अधिक जवळचें असल्यामुळें त्याच वर्षाची लोकसंख्या धरली पाहिजे.) २७०६१२१६२ होती व संस्थानची ८०८३८५, २७ होती; म्हणजे ठोकळ मानानें अनुक्रमें २७ कोट व ८ कोट होती. वर सांगितलेला २५० कोटी रुपये वसूल २७ कोट लोकांनीं दिला हें विधान बरोबर नाहीं. कारण जकातीचें उत्पन्न मुख्यतः ब्रिटिश हिंदुस्थाननें दिलें तरी पर्यायानें त्यांचा कांहीं बोजा संस्थानी प्रजेच्या शिरावर बसतो. जी गोष्ट जकातीची तीच गोष्ट मीठ,रेल्वे पोस्ट इत्यादींपासून येणाऱ्या वसुलाची. जमिनीचा

सारा किंवा प्राप्तीवरील कर यांसारख्या बाबतींत मात्र संस्थानी प्रजेचा वांटा येत नाहीं. मग हें सर्व उत्पन्न ३५ कोट प्रजेपासून घेतलें असें धरावें तर हिंदुस्थानांतील ६०० संस्थानिक आणखी आपापल्या प्रजेपासून किती रक्कम घेतात तें सांगता येत नाहीं. अशा स्थितींत २५० कोटींत संस्थानी प्रजेनें दिलेला असा कांहीं भाग वजा केला पाहिजे व राहिलेला ब्रिटिश हिंदुस्थानच्या २७ कोट प्रजेवर वांटून दिला पाहिजे हें उघड आहे. २५० कोट वसुलापैकीं सर्वस्वीं ब्रिटिश हिंदुस्थाननें दिलेला ठोकळ ८० कोट रुपये वजा करून राहिलेल्या १७० कोटी रुपयांत ३५ त २७ या प्रमाणांत ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रजेवरील बोजाचा अंदाज काढला पाहिजे. हा अंदाज ठोक मानानें १२५ कोट रुपये येतो. त्यांत वर सांगितलेले ८० कोट रुपये मिळविले तर २७ कोट प्रजेवरील एकंदर बोजा २०५ कोट रुपये झाला असा फारच ढोबळ अंदाज काढतां येतो. या ढोबळ अंदाजानें दर माणशीं कराचा बोजा ७ रु. ९ आ. ६ पै होय. (प्राप्तीवरील कर, जमिनीचा सारा, दस्तऐवज, जंगल, कालवे ह्यापासून येणारें उत्पन्न निव्वळ ब्रिटिश हिंदुस्थानचें असून त्याची ठोकळ बेरीज ८० कोट रुपये होते)

(६२) कराचा बोजा:—हा बोजा जड आहे कीं हलका आहे, तसेंच तो दिवसेंदिवस अधिकाधिक जड होत आहे कीं नाहीं, तसेंच तो इतर देशाच्या मानानें हलका आहे कां भारी आहे हें ठरविण्यास निरनिराळ्या देशांतील व हिंदुस्थानांतील दर माणशीं उत्पन्न काय आहे तें पाहिलें पाहिजे. हिंदुस्थानांत दर माणशीं उत्पन्न किती आहे हा प्रश्न अत्यंत वादग्रस्त असून सरकारनें याचें अधिकृत उत्तर केव्हांच दिलें नाहीं. प्रो. शहा यांनीं बारकाईनें चौकशी करून तें उत्पन्न इ. स. १९२१–२२ त दर माणशीं ७४ रु. आहे असें दिलें आहे. व प्रो. फिंडले शिरास यांनीं तें ११६ रु. आहे असें म्हटलें आहे. ११६ रु. हून अधिक मात्र कोणाच्याहि मतानें हा उत्पन्नाचा आंकडा येत नाहीं. या दिलेल्या आंकड्यांवरून दर माणशीं कराचा बोजा उत्पन्नाच्या ७ ते १० टक्के येतो. ग्रेटब्रिटनमध्यें दर माणशीं कराचा बोजा २० पौंड आहे व तो दर माणशीं उत्पन्नाच्या २० टक्के आहे असें ठोकळ मानानें म्हणतां येतें. परंतु या तुलनेनें खरा बोध कांहींच होणें शक्य नाहीं. कराचा बोजा भारी असूनहि त्या करामुळें बेकारी वेतन म्हातारपणाचें पेन्शन वगैरे फायदे पदरांत पडत असतील तर भारी कराचा बोजा सह्य होईल. तसेंच कराचें उत्पन्न हिंदुस्थानांत मुख्यतः जकात,मीठ, जमिनीचा सारा वगैरे बाबींपासून होत असल्यामुळें कराचा बोजा गरिबांवर पडतो. गरीबांवर पडणारे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कर कमी करून त्याच्या बदला श्रीमंतांवर पडणारे कर वसूल केले तर सरकारचें उत्पन्न तितकेंच येऊन कराचा बोजा हलका वाटेल. हिंदुस्थानांतील कराचा बोजा भारी असो वा हलका असो, प्रजेंत करदानाचें जें सामर्थ्य आहे त्यांतही आजच्या सदोष पद्धतीमुळें अधिक करवाढ अशक्य झाली आहे हें निर्विवाद होय. तसेंच हिंदुस्थानांत कराचें प्रमाण शेंकडा आठ आहे व ग्रेटब्रिटनमध्यें २० आहे यावरून हिंदुस्थानचें कराचें ओझें हलकें आहे असा निष्कर्ष निघत नाहीं. कारण १०० पौंडांतून २० पौंड देणें जितकें सोपें आहे तितकें १०० रुपयांतून ८ रुपये देणें सोपें नाहीं. कारण १०० रुपयांत निर्वाहास आवश्यक इतक्याही गोष्टी त्यास पुरत्या मिळत नाहींत. सारांश सदोष करदानाची पद्धत सुधारल्याखेरीज सरकारास करवाढ करूनहि हल्लींहून अधिक उत्पन्न येणें शक्य नाहीं ही गोष्ट अलीकडे दोनतीन वर्षांत कराचे दर वाढवूनहि उत्पन्नांत ऐन वाढ होत नाहीं त्यावरून स्पष्ट होईल. तसेंच आजची राज्यपद्धत ही हिंदुस्थानच्या आर्थिक स्थितीच्या मानानें अधिक महागाईची व न परवडणारी आहे ही गोष्ट आतां सर्वांस कबूल होत चालली आहे. कारण उद्यांची राज्यघटना करतांना त्यामुळें अधिक करवाढ झालेली दृष्टीस पडल्यास ती आजच्या स्थितींत दुर्दैवाची गोष्ट मानावी लागेल असा इषारा फेडरल फिनॅन्स कमिटीनें देऊन ठेविला आहे.

(९) हुजूर दौलतीबाबत आजचे प्रश्न

(६३) गोलमेज कमिट्या:—हिंदुस्थानची राज्यघटना संयुक्त पद्धतीची होवो वा न होवो, त्यांत संस्थानांचा समावेश होवो वा न होवो आजच्या हुजूर दौलतीच्या व्यवस्थेंतील कोणते दोष दूर करणें जरूर आहे तें सर वॉल्टर लेटन यांच्या योजनेवर टीका करतांना सांगितलें आहे. सर वॉल्टर यांची योजना प्रसिद्ध झाल्यावर दोन गोलमेज परिषदा झाल्या. हिंदुस्थानांत संयुक्त राज्यपद्धति अस्तित्वांत यावयाची हें पक्कें ठरलें तेव्हां त्या फेडरेशनमध्यें वरिष्ठ व प्रांतिक सरकारांचे संबंध कसे असावेत हें सांगण्यासाठीं Federal Structure Committee नांवाची कमिटी लॉर्ड पील यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आली. त्या कमिटीनें नोव्हेंबर

१९३१ त केलेल्या रिपोर्टांत बव्हंशीं सर वॉल्टर यांच्या सूचनेस अनुसरुन वरिष्ठ व प्रांतिक सरकारांच्या आर्थिक संबंधाविषयीं सूचना केल्या. पण प्राप्तीवरील कर सर्वच्या सर्व प्रांतांना द्यावा व वरिष्ठ सरकारांस आपल्या उत्पन्नांत तूट आल्यास ती प्रांतिक खंडण्यांच्या साहचानें भरुन काढावी असें सुचविलें. हृया प्रांतिक खंडण्या हलके हलके नाहींशा कराव्या असेंही त्यांनीं आपलें मत दिलें. पण हा आर्थिक संबंधाचा प्रश्न अधिक बारकाईनें तपासला जावा या हेतूनें एक तज्ज्ञाची कमिटी नेमावी असें त्यांनीं सुचविलें, त्याप्रमाणें लार्ड पर्सी यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली गेली. तिनें मे १९३२ मध्यें जो रिपोर्ट केला त्यांत पील कमिटीच्या शिफारशी उधळून लावल्या आहेत. पर्सी कमिटीनें लेटन रिपोर्टाच्याही मागें जाऊन असें सुचविलें आहे कीं, सर्वच्या सर्व प्राप्तीवरील कर वरिष्ठ सरकारनें ठेवावा व प्रांतांनीं लागल्यास त्यावर जादा पट्टी बसवावी. यांपैकीं कोणता निकालमान्य होतो तें अद्याप ठरावयाचें आहे.

वरिष्ठ व प्रांतिक सरकार यांच्यामधील आर्थिक व इतर संबंधाप्रमाणेंच संयुक्त सरकार व संस्थानें यांचे आर्थिक संबंध कसे असावेत याची छाननी डेव्हिडसन कमिटीनें केली असून तिनें आपला रिपोर्ट जुलैच्या शेवटच्या आठवडचांत प्रसिद्ध केला आहे. त्याचा सारांश स्वतंत्र दिला आहे.

एका वाक्यांत स्पष्ट लिहावयाचें तर हुजूरदौलतीसंबंधींचे हे अनेक प्रश्न चिवडल्याप्रमाणें झाले आहेत. त्यावर अनिर्णित चर्चा चालू आहे. किंबहुना त्यांतून निर्णय कसा काढावा हें न कळल्यानें वरीचशी चर्चा अधांत्री किंवा कांठाकांठानें जाणारी आहे. यांतून निश्चयात्मक स्वरूप असें काय बाहेर पडेल तें आज तरी सांगतां येत नाहीं.

(६४) तावडतोब आवश्यक सुधारणाः—

गेल्या दहा वर्षांच्या अनुभवानें शहाणें व्हावयाचें असेल तर पुढील सूचना लक्षांत घेतल्या पाहिजे. (१)

टीप—कांहीं सूचना कलम १८ मध्यें केल्या आहेत त्या पहा).

(१) प्रांतिक सरकारांना कर्ज काढण्याचें दिलेलें स्वातंत्र्य वरिष्ठ सरकारच्या तपासणीवर व मंजुरीवर अवलंबून ठेवावें. म्हणजे बँकचे रिक्लेमेशन लोनची पुनरावृत्ति टळेल.

(२) जगांतील व हिंदुस्थान देशांतील आर्थिक व्यवहारांत झपाटचानें बदल होत असल्यानें होतां होईतों मेस्टन कराराप्रमाणें दीर्घकालीन व गुंतागुंतीचे आर्थिक व्यवहार पक्के करूं नयेत.

(३) कर्ज काढणें व त्याची व्यवस्था लावणें हें काम फडणविसाच्या हातीं न ठेवतां तें राष्ट्रीय कर्ज मंडळाच्या(National Debt Council) च्या हातीं द्यावें व हें मंडळ कायदेमंडळास जबाबदार असावें.

(४) आतांपर्यंत काटकसरीच्या महत्त्वाच्या सूचना सेनापतीच्या हातांत सर्व संरक्षण खातें असल्यामुळें व्यर्थ गेल्या आहेत. हें लक्षांत घेऊन वरिष्ठ कार्यकारी मंडळांत संरक्षणखातें हें सेनापतीहून अन्य व व्हॉइसरॉयला जबाबदार अशा अधिकारी इसमाच्या ताब्यांत द्यावें व सेनापति हा त्याच्या हाताखालचा अधिकारी असावा.

(५) गेल्या दहा वर्षांत चलनाच्या व हुंडणावळीच्या गोंधळानें हुजूरदौलतींतील स्थैर्य नष्ट झालें व चलनाचें धोरण हुजूर दौलतीच्या फायद्यासाठीं आखलें जातें या आरोपास सरकारास तोंड द्यावें लागलें हें लक्षांत ठेवून चलन व हुंडणावळीची व्यवस्था रिझर्व्ह बँकेसारख्या त्रयस्थ संस्थेच्या हातांत शक्य तितक्या लवकर द्यावी.

खुला आणि संरक्षित व्यापार

देवघेव किंवा विनिमय हितावह होण्याचीं दोन प्रमुख कारणें आहेत. एक तर आपणांस हवा तो जिन्नस दुसऱ्याकडून मिळण्याची खात्री असली म्हणजे आपणांस जो धंदा करण्यास नैसर्गिक व इतर साधनें विशेष अनुकूल आहेत असा धंदा आपण करूं शकतो. प्रत्येक उत्पादकास त्याच्या विशिष्ट परिस्थितीस अनुसरून जो अधिकांतअधिक किफायतशीर असा धंदा वाटतो,तो त्यास करतां येणें हयांस धंद्याचें विशिष्टीकरण म्हणतात. (Specialisation of Industry) विशिष्टीकरणानें वस्तूंची निपज अत्यंत स्वस्तपणें होऊं लागल्यानें गिऱ्हाइकांचाही फायदा होतो. उत्पादन आणि उपभोग हयांच्यासंबंधीं देवघेवीचें दुसऱ्याही एका तऱ्हेनें महत्त्व आहे. विनिमयाचें क्षेत्र जेवढें अधिक विस्तृत असेल तेवढें त्या वस्तूच्या उत्पादनांत श्रमविभागाच्या तत्त्वाचें अधिकाधिक अवलंबन करतां येतें. जेथें वर्षांतून शेंपांचशें वार कापडाचीच विक्री व्हाव याची तेथें पिंजणें, कातणें, रंगविणें, विणणें इत्यादि निरनिराळ्या कृतींस निरनिराळीं माणसें कामास लावणें शक्य नसतें. तेंच पांच लाख अगर पांच कोटी वार कापड विकण्याची शक्यता असली तर कापड तयार करण्याचें काम शेंकडों स्वतंत्र कृतींत विभागून देतां येतें. प्रत्येक निराळ्या कृतीस निराळा मनुष्य व निराळें यंत्र, अशी योजना होऊन उत्पादनाचें परिमाण व कार्यक्षमता हयांत कमालीची वाढ होऊं शकते.

वस्तूंची देवघेव अगदीं अनियंत्रित असावी,असा आर्थिक व्यवहाराबद्दल सामान्यतः आग्रह धरण्यांत येतो,तो देवघेवीपासून त्यांत भाग घेणाऱ्या उत्पादकांचा व गिऱ्हाइकांचा अधिकांत अधिक फायदा व्हावा या हेतूनेंच होय. वस्तूंचें उत्पादन व व्यापार हयांच्या मार्गांत जकातीसारखे कांहीं अडथळे नसले,म्हणजे धंदा मोठ्या प्रमाणावर करण्यास उत्पादकांस हुरूप येतो. उत्पादकांतील चढाओढीमुळें व त्यांस माल तयार करण्यास कमी खर्च येऊं लागल्यानें गिऱ्हाइकांसही स्वस्त माल मिळूं शकतो. अनियंत्रित किंवा खुल्या व्यापारानें प्रमुख फायदा होतो तो हाच कीं, त्यामुळें धंद्याचें विशिष्टीकरण आणि उत्पादनांत श्रमविभाग हयांचा अधिकांत अधिक फैलाव होतो. उत्पादकांस विस्तृत बाजार मिळाल्यानें फायदा व गिऱ्हाइकांस स्वस्ताई आणि सुबत्ता हयामुळें फायदा, असे खुल्या व्यापाराचे गुण गाइले जातात. देशाच्या निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या व्यक्तींमध्यें होणाऱ्या देवघेवींस जसा वरील युक्तिवाद लागू आहे तसाच तो भिन्न देशांतील व्यक्तींमध्यें होणाऱ्या व्यापारासहि लागू आहे. प्रत्येक मनुष्यानें आपणास लागणाऱ्या सर्व वस्तु स्वतःच करण्याच्या भरीस पडणें हें जसें गैरफायद्याचें आहे तसेंच प्रत्येक देशानें आपल्या सर्व गरजा अंतर्गत उत्पादनानेंच भागवूं असें म्हणणें अनहिताचें आहे. नैसर्गिक साधनें, कामकऱ्यांचें कौशल्य, भांडवल, संघटना, बाजार इत्यादि बाबतींत जे धंदे राष्ट्राला अधिकांत अधिक फायद्याचे वाटतील तेच त्यांतील नागरिकांनीं करणें योग्य आहे. त्यांनीं उत्पादन केलेला माल इतर राष्ट्रांस पाठवून त्यांपासून त्यांना विशेष किफायतशीर असणाऱ्याधंद्याचा माल आयात करणें हेंच राष्ट्राच्या फायद्याचें आहे. ज्या मानानें राष्ट्राराष्ट्रांत जकाती, प्रतिबंध इत्यादि नियंत्रणें कमी असतील त्या मानानें आंतरराष्ट्रीय विशिष्टीकरण व श्रमविभाग हयांचा प्रसार अधिक होऊन उत्पादकांचा वाढत्या बाजारानें आणि गिऱ्हाईकांचा स्वस्ताई व सुबत्ता या मार्गांनीं फायदा होण्यासारखा असतो.अनियंत्रित आंतरराष्ट्रीय व्यापारापासून होणाऱ्या वरील आर्थिक फायद्याखेरीज इतरही कांहीं राजकीय व सांस्कृतिक बाबतींत त्या धोरणाचे इष्ट परिणाम होतात असें म्हणतात.परस्परांची परिस्थिति व मनोरचना हयांच्या अज्ञानामुळें राष्ट्राराष्ट्रांत द्वेषबुद्धि वाढून युद्धें निर्माण होतात असा अनुभव आहे. व्यापाराच्या निमित्तानें राष्ट्राराष्ट्रांचें परस्पर दळणवळण वाढलें व त्यांचे हितसंबंध निगडित झाले म्हणजे युद्धांस आळा बसण्याचा संभव आहे. एक तर दळणवळणानें आपलेपणा वाढतो, द्वेषबुद्धि कमी होते आणि सहजासहजीं परस्परांवर शस्त्र उचलण्यास भिन्न राष्ट्रांतील लोक तयार होत नाहींत. प्रत्येक राष्ट्राचें औद्योगिक जीवन इतर अनेक राष्ट्रांवर

अवलंबून राहिल्यानें दुसऱ्या राष्ट्राच्या आर्थिक घटनेवर ज्यामुळें अनिष्ट परिणाम होईल असें धोरण कोणाही राष्ट्रास सहजासहजीं स्वीकारतां येणार नाहीं. भौगोलिक दृष्ट्या निरनिराळीं राष्ट्रें निरनिराळ्या भागांत वसलीं असलीं तरी तीं एकाच मानव वंशाचीं अंगें आहेत व त्यांच्यांत बौद्धिक आणि नैतिक सुधारणा घडून येणें सारखेंच हितावह आहे. सर्व राष्ट्रांचे व्यापाराच्या निमित्तानें निकट संबंध उत्पन्न झाले म्हणजे चालीरीति, संस्था, वाङ्मय, विचार, तत्त्वज्ञान, धर्म इत्यादि बाबतींतही देवाणघेवाण सुरू होते. प्रत्येक राष्ट्राची व एकंदर मनुष्य जातीची अशा वाढत्या दळणवळणानें सांस्कृतिक उन्नति होण्यास मदत होते.

खुल्या व्यापाराचें वरील धोरण एका विशिष्ट आर्थिक तत्त्वावर उभारलेलें होतें. प्रत्येक मनुष्यास आपलें स्वतःचें हित पूर्णपणें कळतें. स्वतःचें हितसंरक्षण करण्यास प्रत्येक मनुष्य समर्थ असतो, आणि अनेक व्यक्तींचें जें हित तेंच समाजाचें हित अशी त्या तत्त्वांचीं तीन परस्परसंबद्ध अंगें आहेत. व्यक्तिवाद, (Individuali.m) आत्महित, (Self-interest) किंवा अनियंत्रण, (Liberalism) ह्या तिन्ही नांवांनीं प्रस्तुत तत्त्वांचा उल्लेख केला जातो. आठराव्या शतकाचा उत्तरार्ध व एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध ह्या सुमारें शंभर वर्षांच्या काळांत अर्थशास्त्रज्ञ व तत्त्ववेत्ते ह्यांचा ह्या तत्त्वांस पाठिंबा असे. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून तत्त्वज्ञान आणि अर्थशास्त्र ह्या दोन्हींच्या क्षेत्रांतून व्यक्तिमाहात्म्याचें उच्चाटन होऊं लागलें. प्रत्येक व्यक्तीचें आर्थिक व नैतिक जीवन भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतें, ही गोष्ट अधिक स्पष्ट होऊं लागली. प्रत्यक व्यक्तीस स्वतःचें खरें हित कळतेंच असें नाहीं. हित-अनहित कळलें तरी स्वहितसंरक्षणास प्रत्येक व्यक्ति समर्थ असतेंच असें नाहीं. आणि व्यक्तीचें हित तें समाजाचें हित हें समीकरण अचूक नाहीं, असा अनुभव येऊं लागला. व्यक्तीपेक्षां समाजाला महत्त्व अधिक हें एकदां मान्य केलें म्हणजे समाजहिताकरितां व्यक्तिस्वातंत्र्यावर नियंत्रण घालणें न्याय्य आहे हें ओघानेंच सिद्ध होतें. अनियंत्रणाचें धोरण हें व्यक्तिवादाच्या तत्त्वाचें दृश्य फळ होतें. मूळ तत्त्वच अमान्य झाल्यानें त्यावरील रचिलेलें धोरणहि ढासळून पडलें. एकंदर समाजाचें सांघिक हित किंवा समाजांतील अज्ञानी व असहाय व्यक्तींचें हित यांच्या संरक्षणाकरितां समाजसत्तेनें व्यक्तींवर जरूर तीं नियंत्रणें घालणें न्याय्य आहे एवढेंच नव्हे तर तसें करणें समाजाचें कर्तव्य आहे हें आतां सर्वमान्य झालें आहे. व्यक्तिनिष्ठेच्या जागीं समाजनिष्ठा आणि अनियंत्रणाच्या ऐवजीं सामाजिक नियमन ह्यांस तात्त्विक सत्यतेची प्रतिष्ठा प्राप्त झाल्या कारणानें खुला व्यापार म्हणजे जणूं काय एखाद्या धर्माचें आदि तत्त्व असा जो कांहीं लोकांचा पूर्वी आग्रह असे तो पुरा नाहींसा झाला आहे.

इंग्लंड हें राष्ट्र वरीच दशकें खुल्या व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार करीत असे. त्या राष्ट्राच्या सांपत्तिक भरभराटीचीं कारणें पाहूं लागलों तर आपणांस असें दिसेल कीं, इंग्लंडचा उत्कर्ष खुला व्यापार हें एक अचुक गुणकारी तत्त्व आहे म्हणून घडून आला असें नसून यांत्रिक सुधारणा आणि समुद्रावरील सत्ता ह्या बाबतींत अग्रेसरत्व प्राप्त झाल्यानेंच इंग्लंडची खरी भरभराट झाली. ही गोष्ट कित्येक काळ परदेशीयांस पूर्णपणें पटली नव्हती. परंतु खुल्या व्यापाराच्या धोरणाचा इतर राष्ट्रांस जसजसा अनुभव येऊं लागला तसतसा त्यांचा भ्रम दूर झाला. इंग्लंडाप्रमाणेंच आपली सांपत्तिक भरभराट करून घ्यावयाची असेल तर खुल्या व्यापाराच्या धोरणाचें अनुकरण करण्याऐवजीं यांत्रिक सुधारणांच्या व इतर मार्गांनीं धंद्यांची उत्पादकता वाढविणें आणि देशाचें राजकीय स्वातंत्र्य आणि वैभव राखणें ह्याच गोष्टींत इंग्लंडचें अनुकरण करणें योग्य आहे असें त्यांस दिसून आलें.

तात्त्विक दृष्ट्या समाजनियमन आणि ऐतिहासिक दृष्ट्या उत्पादनसामर्थ्य व राजकीय स्वायत्तता ह्यांस महत्त्व प्राप्त झाल्यापासून अनियंत्रणाचें धोरण मागें पडलें व संरक्षणाचें तत्त्व सर्वमान्य झालें. अतिशयोक्तीचा आरोप पदरांत न घेतां असें म्हणतां येईल कीं, आज पृथ्वीच्या पाठीवर एकाही सुधारलेल्या राष्ट्रांत खुला व्यापार चालू नाहीं. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं कोणाही प्रतिष्ठित अर्थशास्त्रज्ञास संरक्षणाच्या धोरणास पूर्णपणें पाठिंबा देववत नाहीं. संरक्षणाच्या धोरणाचें सर्वव्यापी स्वरूप आणि त्याच्या शास्त्रीय चिकित्सकांची ही साशंक वृत्ति ह्यांचें विवेचन करणें प्रत्येक अभ्यासकास मनोरंजक वाटेल. सर्व राष्ट्रें आज कमीअधिक प्रमाणांत संरक्षणाच्या धोरणाचीं पुरस्कर्तीं आहेत हें वर नमूद केलेंच आहे. परंतु त्या धोरणाच्या समर्थनार्थ जीं निर-

निराळीं कारणें पुढें केलीं जातात तीं मात्र बहुतेक अगदीं लंगडीं असतात.

ह्या कारणांचा विचार करण्यापूर्वी प्रथमतः संरक्षण म्हणजे काय ह्याचा उलगडा होणें जरूर आहे. स्वराष्ट्रांतील एखादा धंदा परदेशी मालाच्या आयातीमुळें बुडत असला म्हणजे संरक्षणाची मागणी सुरूं होते. परदेशी उत्पादकांना माल उत्पन्न करण्यास कमी खर्च येतो व त्या मानानें स्वदेशी धंदेवाल्यांस अधिक येतो म्हणून त्यांना परदेशी व्यापाऱ्यांची स्पर्धा मारक होते. परंतु स्वदेशी धंदेवाल्यांचा उत्पादन खर्च व परदेशी धंदेवाल्यांचा उत्पादन खर्च ह्या दोहोंमध्यें जेवढा फरक असेल तेवढ्या रकमेची जकात परदेशी मालाच्या आयातीवर बसविली, म्हणजे तो माल बाजारांत येऊन स्वदेशी मालाबरोबर स्पर्धा करूं लागेपर्यंत त्याचा एकंदर खर्च, स्वदेशी धंदेवाल्याच्या बरोबरीनें होतो, व स्वदेशी धंदेवाल्यांस परदेशी धंदेवाल्यांबरोबर टिकाव धरणें शक्य होतें. संरक्षक जकाती बसविण्याचा मुख्य उद्देश जो स्वदेशी उत्पादकांस ज्या किंमतीस माल द्यावयाला परवडतो त्यापेक्षां कमी किंमतीस परदेशी उत्पादकांस तो विकतां येऊं नये, तो अशा तऱ्हेनें सफळ होतो. संरक्षणाचें ध्येय दुसऱ्या एकदोन मार्गांनीं प्राप्त करून घेतां येतें. परदेशी मालाची किंमत आणि स्वदेशी धंदेवाल्याचा उत्पादन खर्च ह्या दोहोंत जेवढा फरक असेल तेवढ्या रकमेची बक्षिसी, (Bounty) सरकारनें धंदेवाल्यांस दिली तर स्वदेशी माल परदेशी मालाइतकाच स्वस्त विकण्यास हरकत नाहीं. संरक्षण जकातींच्या स्वरूपानें दिलेलें असलें तर धंदेवाल्यास परस्पर गिऱ्हाईकांकडून वाढत्या किंमतीच्या रूपानें आपला खर्च भरून काढतां येतो. बक्षिसीच्या रूपांत सरकारी मदत मिळाली तर कमी किंमतीस माल विकण्यानें होणारा तोटा सरकारी तिजोरींतून भरून निघतो. जकातीचा भार वाढत्या किंमतींनीं गिऱ्हाइकांवर लोटला जातो, तर बक्षिसाची रक्कम शेवटीं कर देणाऱ्या नागरिकांच्या खिशांतून येते. प्रत्यक्ष सरकारी बक्षिसें देणें हें सरकारच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहतें. आणि सामान्यतः सरकारी उत्पन्न हें खर्चाच्या मानानें अपुरेंच पडत असल्यानें अशी मदत देणें सरकारास परवडत नाहीं. शिवाय धंदेवाल्यांसहि असल्या गैरशाश्वतीच्या मदतीवर अवलंबून व्यवसाय वाढविणें धोक्याचें वाटतें. स्वदेशी धंद्यास मदत करण्याच्या दुसऱ्याहि एका साधनाचा उल्लेख केला पाहिजे. सरकारच्या निरनिराळ्या खात्यास जो माल लागतो तो स्वदेशी उत्पादकांकडून जरूर पडल्यास महागाईनेंही घेणें हाच तो मार्ग होय. सामान्यतः बहुतेक राष्ट्रीय सरकारांचें असेंच स्वदेशीप्रवण धोरण असतें. परंतु सार्वजनिक पैशाचा विनियोग काटेकोरपणें करणें इष्ट असल्यानें आणि ही मदतही एकंदरीनें अशाश्वतीची असल्यानें संरक्षणाच्या ह्या मार्गासहि जकातीइतकें महत्त्व नाहीं.

आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रणें घालून स्वदेशी धंद्यांस उत्तेजन देण्याच्या धोरणाचें समर्थन ज्या अनेक मुद्यांच्या जोरावर करण्यांत येतें, त्यांचा पूर्ण विचार होणें आवश्यक आहे. परदेशी वस्तूंच्या आयातीवर जकाती बसविल्यानें स्वदेशांतील धंदे उर्जितावस्थेस येतात, हा सामान्य समजच आपण परीक्षणार्थ घेऊं. जकाती बसविण्यापूर्वी देशांतील जमिनीचा, भांडवलाचा आणि श्रमाचा कांहीं धंद्यांत विनियोग होत असला पाहिजे. जकातींचें संरक्षण नसतांनाहि ज्याअर्थीं हे धंदे फायदेशीर ठरत त्याअर्थीं त्यांची उत्पादकता, म्हणजे श्रमभांडवलादि घटकांची त्यांमधील कार्यक्षमता, संरक्षित धंद्यापेक्षां निःसंशय अधिक असली पाहिजे. जकाती बसविल्यानंतर श्रम व भांडवल ह्यांचा ओघ जुन्या धंद्यांतून कमी उत्पादकतेच्या नव्या धंद्याकडे वळणार. जकातीमुळें किंमती वाढून संरक्षित धंद्याच्या चालकांस नफा होईल हें खरें. परंतु एकंदर राष्ट्राच्या दृष्टीनें पाहतां त्यांत उपलब्ध असलेल्या नैसर्गिक व कष्टार्जित साधनांचा संरक्षणामुळें अधिक कार्यक्षमतेनें विनियोग झाला, कीं कमी उत्पादक धंद्यांत तीं अडकविलीं गेलीं हें पाहिलें पाहिजे. संरक्षणानें नवे धंदे निघतात हें उघड आहे, पण ते जुन्या धंद्यांपेक्षां राष्ट्राच्या दृष्टीनें अधिक किफायतशीर असतात असें मात्र सिद्ध होत नाहीं. तसेंच नव्या धंद्यांत भांडवलवाले आणि मजूर ह्यांस काम मिळतें, पण तेंही दुसऱ्या अधिक उत्पादक धंद्यांतून निघूनच मिळतें हेंही ध्यानांत ठेवणें जरूर आहे. लंगड्याला कुबड्या पुरविणें हेंच संरक्षणाचें उद्दिष्ट. त्यामुळें कार्यक्षमतेंत अगर उत्पादकतेंत वाढ व्हावी कशी ?

दुसरा एक समज असा आहे कीं, संरक्षणामुळें नवे धंदे उत्पन्न झाले म्हणजे मजुरांस मागणी अधिक उत्पन्न होते व त्यांच्या मजुरीचे दर वाढतात. परंतु वेतन म्हणून मिळणारा पैसा वाढला तरी बाजारभावहि चढल्यानें प्रत्यक्ष उपभोगांत वाढत्या मजुरीचें रूपांतर होत नाहीं. मजुरी ही

बव्हंशीं उत्पादकतेच्या किंवा कार्यक्षमतेच्या प्रमाणांत ठरते; आणि ही तर संरक्षित धंद्यास कमीच असते. तेव्हां संरक्षणानें वास्तविक मजुरी वाढते हें म्हणणें युक्त नाहीं. संरक्षक जकातींच्या समर्थनार्थ मजुरीसंबंधाचाच दुसराही एक मुद्दा पुढें येतो. 'अमेरिकेंत आज कित्येक वर्षें व इंग्लंडमध्येंहि अलीकडे ह्या मुद्यावर बराच भर दिला जात आहे स्वदेशांत राहणीचें मान उच्च असल्यानें मजुरीही भारी द्यावी लागते. आणि मालाचा उत्पादनखर्च वाढतो. उलट परदेशांतील रहाणी कमी प्रतीची असल्यानें तेथें कमी मजूरी द्यावी लागते. भिकार मजूरांच्या श्रमाच्या साहाय्यानें उत्पन्न होणाऱ्या मालापुढें स्वराष्ट्रांतील प्रतिष्ठित मजुरांनीं तयार केलेला माल जर मागें पडूं लागला तर त्या परदेशी मालावर नियंत्रण घालूनच स्वराष्ट्रांतील उच्च राहणीचें संरक्षण केलें पाहिजे.' ह्या विचारसरणीचा मूळ पाया-म्हणजे उच्च राहणी असल्यानें चढीची मजुरी द्यावी लागते हा मुद्दा—पोकळ आहे. वरवर पाहतां जरी आपणांस असें दिसत असलें कीं प्रत्येक वर्गाच्या राहणीचें जें किमान मान आहे त्यापेक्षां कमी मजुरी घेण्यास त्यांतील लोक तयार होणार नाहींत, आणि म्हणून राहणीच्या मानानें मजुरी ठरते असें म्हणणें रास्त आहे, तरी वास्तविक प्रकार तसा नाहीं. मजुरी ठरते ती मुख्यत: निरनिराळ्या प्रकारच्या कामकऱ्यांच्या कार्यक्षमतेवरून आणि त्यांच्या श्रमास जी मागणी असेल त्या मानानें त्यांचा पुरवठा काय कमी अधिक असेल त्यांवरूनच होय. कार्यक्षमता, मजुरी आणि राहणी ह्यांचा परस्पर कार्यकारण संबंध असतो हें स्थूलमानानें कबूल केलें तरी एकंदरीनें कार्यक्षमतेवरूनच दुसरी दोन्ही ठरतात असें म्हणावें लागेल. शिवाय कमी प्रतीच्या राहणीच्या देशांतून उच्च प्रतीच्या राहणीच्या देशांत मालाचा सारखा ओघ चालूं राहून उच्च राष्ट्राचे धंदे अधोगतीस लागतील ही भीतीहि निराधार आहे. निकृष्ट राहणी असलेल्या देशांतून माल येऊं लागला तर त्या मोबदला त्या राष्ट्रांस एक माल किंवा सोनें-चांदी हीं पाठविलीं पाहिजेत. माल पाठवितां आला तर मजुरांचा रोजगार कायम राहिलाच आणि सोनें-चांदी पाठविली तर त्या दुसऱ्या राष्ट्राच्या आयातीस आपोआपच पायबंद बसणार. उच्च राहणीच्या देशांत सोन्याचा सांठा कमी झाल्यानें सोनें महाग व सोन्याच्या प्रमाणांत इतर पदार्थांच्या किंमती कमी होणार. तेंच निकृष्ट राहणीच्या देशांत सोन्याचा पुरवठा वाढून सोनें स्वस्त, तर त्या प्रमाणांत इतर माल मात्र महाग होणार. निकृष्ट राहणीच्या राष्ट्रांतील माल असा महाग झाला म्हणजे तो उच्च राहणीच्या देशांत जाण्याचा आपोआपच थांबतो.

धंदेवाले आणि मजूर ह्यांच्या हितसंरक्षणाच्या निमित्तानें संरक्षणाच्या सामान्य धोरणाचें समर्थन करण्याकरितां जीं कारणें पुढें केलीं जातात त्यांचा एथवर विचार केला. आतां ह्यांपेक्षां अधिक विश्वसनीय असे दुसरे दोन सार्वत्रिक महत्त्वाचे मुद्दे आहेत त्यांचा उल्लेख केला पाहिजे. ज्या धंद्यांत आपली अधिकांत अधिक कार्यक्षमता असेल ते धंदे स्वदेशांत चालवून त्यांमध्यें उत्पन्न होणारा माल परदेशांत पाठवावा. आणि आपणास लागणारा हरतऱ्हेचा माल ज्या ज्या देशांत सर्वांत स्वस्त मिळत असेल तेथून तो आणवावा. हा मार्ग राष्ट्राच्या आर्थिक हिताचा आहे ही गोष्ट ज्यांस मान्य आहे अशाही लोकांस एक विशिष्ट अडचण भासते. कित्येक धंदे असे असतात कीं, ते चालण्यास लागणारीं नैसर्गिक साधनें विद्यमान असूनहि केवळ दुसऱ्या एखाद्या राष्ट्रांत तो धंदा बरेच दिवस चालूं आहे म्हणून तो इतरांस करतां येत नाहीं. धंद्याचें अनुभवजन्य कसब आणि मोठ्या प्रमाणांत उत्पादन सुरूं केल्यानें खर्चांत होणारी बचत, ह्या दोन्ही गोष्टी अशा आहेत कीं, त्या कोणत्याहि धंद्याच्या बाल्यावस्थेंत उपलब्ध होणार नाहींत. परदेशी धंद्याच्या चढाओढीनें धंदा लहान असतांच बुडाला तर मोठेपणीं त्याच्याकडून इतर राष्ट्रांशीही जी टक्कर देववली असती तिची गोष्टच बोलावयास नको. धंदा किफायतशीर होण्यास आवश्यक असणाऱ्या सर्व साधनांचा अंदाज करून जर अशी खात्री वाटण्यासारखी असली कीं कांहीं वर्षांनीं तो धंदा आपल्या पायावर उभा राहूं शकेल तर त्याला त्याच्या बाल्यावस्थेंत जरूर तेवढें संरक्षण देणें शास्त्रशुद्ध ठरतें. ह्या युक्तिवादास इंग्रजींत Infant Industry Argument असें म्हणतात. आणि संरक्षणाच्या धोरणाच्या समर्थनार्थ जेवढीं कारणें उपयोगांत आणलीं जातात, त्या सर्वांत अर्थशास्त्राच्या दृष्टीनें हेंच कमींत कमी सदोष आहे. परंतु ह्या मुद्यावर विसंबून संरक्षणाच्या धोरणाचें अवलंबन करण्यास अनेक व्यावहारिक अडचणी आहेत. पहिलीच अडचण अशी कीं, अलीकडे धंद्यांचें जीवन एवढें अनिश्चित झालेलें आहे व त्यांचा किफायतशीरपणा इतक्या बहुविध, ज्ञात—अज्ञात, प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष, वर्तमान व भविष्यकालीन प्रकारच्या परिस्थितींवर अव-

लंबून असतो कीं, आज किफायतशीर नसलेला धंदा पुढें केव्हां किफायतशीर होईल व तो तसा होण्यास त्यास कसें व किती संरक्षण द्यावें लागेल हें सांगणें अशक्यप्राय असतें.ह्या अडचणीचा परिणाम मात्र असा होतो कीं, अनेक लायक नालायक धंद्यांस भरभक्कम जकातींनीं संरक्षण दिलें जातें. एकदां एखाद्या धंद्याला त्याची बाल्यावस्था आहे ह्या कारणानें संरक्षण दिलें म्हणजे सहसा त्या धंद्याची सुधारणा म्हणून होतच नाहीं. बहुतेक राष्ट्रांत संरक्षणाच्या धोरणाचा पहिल्याप्रथम प्रादुर्भाव होतो.तो बाल्यावस्थेंत असलेल्या धंद्यांना तात्पुरतें संरक्षण द्यावें ह्या स्तुत्य हेतूनेंच होय. परंतु अनुभव मात्र असा आहे कीं, बालक म्हणून ज्या धंद्याची जोपासना करावी तो सुदृढ व स्वायत्त होतच नाहीं, आणि तात्पुरती म्हणून केलेली मदत कायमची होऊन बसते.

बाल्यावस्थेंत असणाऱ्या लायक धंद्यांस तात्पुरती मदत करण्यास हरकत नाहीं, हें तत्त्व व्यवहारांत उतरवितांना कांटेकोरपणा राखतां न आल्यानें अनेक गैरलायक धंद्यांसही संरक्षण मिळतें. आणि एकदां हा क्रम सुरूं झाला म्हणजे कोणत्या धंद्यांस संरक्षण द्यावयाचें आणि कोणत्या धंद्यास तें नाकारावयाचें ह्याचा धरबंदच रहात नाहीं. सर्व प्रकारचे कारखानदारीचे धंदे तर संरक्षणाचा फायदा उकळतातच. परंतु शेतकीसारख्या बव्हंशी नैसर्गिक अनुकलतेवर अवलंबून असलेल्या धंद्यासही संरक्षक जकाती बहाल कराव्या लागतात. समाजांतील सर्व धंदेवाल्यांनीं परस्परांच्या खिशांतून संरक्षण मिळवावयाचा असा प्रयत्न केल्यानें लवकरच सर्व किंमती वाढून संरक्षणाचा विशिष्ट फायदा मात्र नाहींसा होतो. अलीकडील लोकसत्तेच्या काळांत आलटून पालटून येणाऱ्या सरकारास आपापल्या साहाय्यकांची मनधरणी करणें आवश्यक असल्यानेंही संरक्षणाचें धोरण सर्वव्यापी आणि चिरकाल होऊन बसतें. खरोखरी लायक असलेल्या धंद्यास तात्पुरतें संरक्षण द्यावयाचें असेल तर सामान्य राजकारणापासून अलिप्त असलेल्या एखाद्या जकात–मंडळाकडून निरनिराळ्या धंद्यांच्या लायकीविषयीं चौकशी झाली पाहिजे. परिस्थितीप्रमाणें धंद्याला संरक्षण तर भरपूर मिळावें परंतु त्या संरक्षणानें लाडावून धंदेवाल्यांनीं आपल्या कार्यक्षमतेंत सुधारणा करण्याचें विसरूं नये. तज्ज्ञ मंडळाकडून वेंचक धंद्यासच मदत करावयाची, आणि त्या मदतीचा स्वसुधारणेस धंदेवाले उपयोग करून घेतील अशी खात्री पटण्याकरितां त्या धंद्यावर कडक सरकारी पहाणी ठेवावयाची असें दुहेरी धोरण ठेवल्याखेरीज भरमसाट संरक्षणानें होणारी हानि थांबावयाची नाहीं. धंदेवाल्यास समाजाची विशेष मदत पाहिजे असल्यास त्यांनीं समाजाचें विशेष नियंत्रणही मान्य केलें पाहिजे. संरक्षण आणि नियंत्रण हीं दोन्हीं एकाच सामाजिक धोरणाचीं दोन अंगें आहेत.

राष्ट्राच्या सांस्कृतिक प्रगतीस संरक्षणाचें धोरण अनुकूल असल्यानें त्याचें अवलंबन केलें पाहिजे असाही एक मुद्दा कांहीं ग्रंथकार पुढें आणतात. नैसर्गिक अनुकूलतेप्रमाणें प्रत्येक राष्ट्रानें आपापला धंदा स्वीकारावा आणि अनिर्बंधपणें परदेशाशीं व्यापार करावा, असें धोरण स्वीकारलें तर बहुतेक राष्ट्रांचें आर्थिक जीवन एकांगी होण्याची खात्री असते. म्हणजे एखादा देश निव्वळ शेतकीप्रधान, दुसरा धनगरी पेशाचा, तिसरा जहाजवाल्यांचा, चौथा खाणीवाल्यांचा, पांचवा कारखानदारांचा असा परिणाम व्हावयाचा.एकाच धंद्याच्या मागें राष्ट्रांतील बहुतेक लोक लागलेले असल्यानें त्यांच्या मनोरचनेंत, आचारविचारांत आणि आकांक्षांत ठराविक एकांगीपणा येतो, व तो बौद्धिक आणि सांस्कृतिक प्रगतीस प्रतिकूल आहे. नैसर्गिक रीत्या राष्ट्राला जो धंदा सर्वांत किफायतशीर ठरेल त्याच्यावर मुख्य भर देऊन संरक्षणानें इतरहि धंदे थोडेबहुत वाढविले तर आर्थिक जीवनक्रमांत वैचित्र्य व प्रगमनशीलता उत्पन्न होण्याची खात्री आहे. संरक्षणाच्या धोरणामुळें राष्ट्राराष्ट्रांच्या परस्पर परिचयांत जो व्यत्यय आणला जातो त्यामुळें होणाऱ्या संस्कृतिनाशापेक्षां खुल्या व्यापारानें राष्ट्राच्या आर्थिक जीवनक्रमांत भासमान होणाऱ्या एकांगीपणानें प्रगतीच्या वाटेंत अधिक मोठा अडथळा आणला जातो किंवा काय हा वादग्रस्त प्रश्न आहे. इतर कारणें अनुकूल नसतांना केवळ सर्वांगीण संस्कृतीस पोषक म्हणून संरक्षणाच्या धोरणाचा कोणी सहसा स्वीकार करीत नाहीं. परंतु संरक्षित व्यापाराचें तत्त्व एकदां एकाद्या सरकारनें मान्य केलेलें असलें म्हणजे ज्या अनेक मुद्यांच्या जोरावर निरनिराळे धंदे आपल्या मालावर आयात जकाती लादाव्या अशी मागणी करूं लागतात त्यामध्यें ह्याही मुद्याचा अंतर्भाव होतो.

खुल्या व्यापारानें राष्ट्राची आर्थिक घटना एकांगी होते, ह्याच अनुमानावरून संरक्षणाच्या धोरणास पोषक अशा दुसऱ्या एका मुद्याचा उगम झालेला आहे. 'एकाच किंवा थोड्या वेंचक धंद्यां-

वर राष्ट्रांतील बहुतेक लोकांचा चरितार्थ अवलंबून असणें धोक्याचें आहे. विशेषतः खुल्या व्यापाराच्या धोरणानें ह्या कांहीं धंद्याची गिऱ्हाइकी परदेशांत मोठ्या प्रमाणावर असल्यानें जगांतील अनेक घडामोडींनीं ह्या धंद्यांत अचानक तोटा उत्पन्न व्हावयाचा. इतर धंदे मुख्यत्वेंकरून ह्याच धंद्यांतील लोकांच्या गिऱ्हाइकीवर उभारलेले असल्यानें राष्ट्राचें आर्थिक स्वास्थ्य आणि प्रगति नेहमीं धोक्यांत आणि परावलंबी राहावयाची. हा मुद्दा सामान्य निरीक्षकास महत्त्वाचा वाटण्यासारखा आहे.राष्ट्राचें आर्थिक जीवन एकाच धंद्यावर अवलंबून असण्यापेक्षां तें अनेक धंद्यावर अवलंबून असणें कमी धोक्याचें आहे हें तर सर्वांसच कबूल केलें पाहिजे.परंतु ह्या बाबतींत मुख्य गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे ती ही कीं, सर्व लोकांचीं उपजीविकेचीं साधनें एकदम धोक्यांत येऊं नयेत म्हणून जे इतर धंदे वाढवावयाचे तेच जर गैरफायद्याचे असले तर एकंदरीनें राष्ट्राचा नफा होणार कीं तोटा? इतर प्रकारच्या धोक्यास जसा विमा उतरतात व त्याकरितां कांहीं हप्त्यानें खर्च करावा लागतो त्याप्रमाणें एकांगी आर्थिक घटनेमुळें उत्पन्न होणाऱ्या धोक्याचा विमा म्हणून संरक्षक जकातींचा खर्च राष्ट्रानें सोसावा, असा कोणी युक्तिवाद केला तर त्यांत थोडें तरी सत्य आहे. परंतु अशा कोणत्याहि अनिश्चित स्वरूपाच्या मुद्यावर भर देऊन संरक्षण द्यावयाचें ठरलें म्हणजे कोणत्या धंद्याची संरक्षणाची मागणी भागवावी आणि कोणत्याची भागवूं नये असें सरकारास होऊन जातें. संरक्षित धंद्यामुळें समाजावर भारी किंमतीचा पडणारा बोजाच एवढा होऊन बसतो कीं, विम्याचें तत्त्व त्यास लावणें हास्यास्पद होऊन बसतें. अलीकडे सर्व राष्ट्रें आणि सर्व धंदे ह्यांच्या औद्योगिक, व्यापारी, चलनी, आणि पेढ्यांच्या घटना इतक्या परस्परावलंबी आहेत कीं, एखाद्या राष्ट्रानें एकाऐवजीं अनेक धंदे वाढविले तर तेवढ्यानें परराष्ट्रांतील घडामोडींचा तेथील लोकांच्या धंद्यावर होणारा परिणाम कमी होतो असें मुळींच नाहीं.

खुला आणि संरक्षित व्यापार ह्यासंबंधीं साधकबाधक मुद्यांचें एथपर्यंत जें विवेचन केलेलें आहे त्यावरून निव्वळ अर्थनिष्पत्तीच्या दृष्टीनें संरक्षित व्यापाराचें धोरण एकंदरीनें अल्पगुणी असल्याचें दिसून येईल. लायख धंद्यांना त्यांच्या बाल्यावस्थेंत तात्पुरतें संरक्षण द्यावें ह्याखेरीज दुसरा कोणताहि भरीव आर्थिक मुद्दा संरक्षणाच्या समर्थनार्थ पुढें करतां येत नाहीं आणि ह्या मुद्याचेंही व्यवहारांत परिवर्तन होतांना एवढे खांचखळगे आहेत कीं, तज्ज्ञ जकातमंडळ आणि सामाजिक नियमन ह्यांची जोड दिल्याखेरीज संरक्षणाचें धोरण स्वीकारणें इष्ट नाहीं. सुधारलेल्या जगांत आज शंभरांपैकीं नव्याण्णव अर्थशास्त्रज्ञ संरक्षणाच्या धोरणाचे विरोधक तर शंभरांपैकीं नव्याण्णव राजकारणी संरक्षणाचे पक्षपाती असतात हा देखावा अनेकास विस्मयकारक वाटतो. परंतु ह्या अनुभवांतच संरक्षणाच्या धोरणाचें यथार्थ स्वरूप प्रकट झालें आहे. ॲडॅम स्मिथ हा खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचा पहिला प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ होय. परंतु त्यांसहि असें कबूल करावें लागलें कीं,जेथें राष्ट्राच्या सुरक्षिततेचाच प्रश्न उद्भवेल तेथें अनियंत्रित देवघेवींचें तत्त्व सोडून देणें न्याय्य आहे. लष्करी आणि आरमारी संरक्षणार्थ जरूर असणाऱ्या धंद्यांच्या बाबतींत नियंत्रणाचें धोरण स्वीकारणेंच हितप्रद आहे ही गोष्ट मान्य करण्यांत स्मिथनें एका महत्त्वाच्या सत्याचा परिस्फोट केला आहे. तें सत्य म्हणजे हेंच कीं, राष्ट्रीय जीवनास ज्या ज्या गोष्टींपासून धोका उत्पन्न होईल तीं सर्व कारणें दूर करणें हें समाजसत्तेचें कर्तव्य आहे.मनुष्य जातीची इतिहासाच्या सुरुवातीपासून आजतागायत जी राजकीय घटना दिसून येते त्यांत राष्ट्र ह्या संस्थेस अत्युच्च महत्त्व दिलें पाहिजे. ज्या व्यापारी धोरणाच्या अवलंबनानें राष्ट्रांतील व्यक्तींचा आर्थिक फायदा होऊनहि एकंदर समाजाचें मात्र अनहित होण्यासारखें असतें असें धोरण असमर्थनीयच ठरतें. राष्ट्रांतील निरनिराळे प्रांत, जिल्हे, व गांवें ह्यांत अप्रतिहत देवघेव व्हावी हें तत्त्व सर्वमान्य असूनहि आंतरराष्ट्रीय व्यापार मात्र सर्वत्र नियंत्रणाखालीं आहे ह्यांतील रहस्य राजकीय किल्लीनेंच उघडणारें आहे. जोंपर्यंत प्रत्येक राष्ट्र हें राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, बौद्धिक इत्यादि जीवनक्रमाच्या बाबतींत स्वतंत्र घटक आहे तोंपर्यंत केवळ आर्थिक धोरणाच्या बाबतींतच त्यास आपलें व्यक्तिमत्व विसरून भागणार नाहीं. मनुष्यजातीनें स्वोन्नतीप्रीत्यर्थ ज्या सामुदायिक संस्था निर्माण केल्या आहेत, त्यामध्यें राष्ट्र ही राजकीय संस्था सर्वोत्तम आहे.आणि राष्ट्राचें स्वातंत्र्य, स्वाभिमान, सुरक्षितता इत्यादि हितसंबंधाचें रक्षण करण्याकरितां वेळोवेळीं जें धोरण जरूर व व्यवहार्य दिसेल तें अवलंबिणें राष्ट्रीय सरकारचें कर्तव्यच आहे.

रोगनिवारणार्थ औषध घेणें जसें योग्य तसेंच राष्ट्रीय आपत्तींतून सुटण्यास प्रसंगानुरूप आर्थिक संरक्षण योग्य आहे हा मुद्दा मान्य करूनहि दुसरी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. औषध घेण्यानें आरोग्याचा फायदा आहे,काव्य वाचण्यानें भावना जागृतीचा फायदा आहे, नाटक पाहण्यानें मनोरंजनाचा फायदा आहे,त्याप्रमाणें विविक्षित परिस्थितींत संरक्षणानें राष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक स्थिरतेस फायदा होईल हें खरें. परंतु संरक्षणाचे बहुतेक सामान्य पुरस्कर्ते त्या धोरणानें राष्ट्राचा आर्थिक फायदाही आहे असें प्रतिपादन करितात, तें मात्र प्रायः असमर्थनीय ठरतें. बाल्यावस्थेंतील धंद्यासंबंधीं वर जो एकदोन ठिकाणीं उल्लेख आलेला आहे तसले प्रसंग सोडले तर इतर बाबतींत संरक्षण हें जमेचें कलम न धरतां खर्चाचेंच कलम मानलें पाहिजे. राष्ट्राच्या संरक्षणाकरितां, सामाजिक स्वास्थ्याकरितां, आंतरराष्ट्रीय थोरपणाकरितां किंवा निव्वळ एकाद्या सामुदायिक भावनेच्या समाधानाकरितांही असा खर्च करण्यास सरकारनें अगर समाजानें पाहिजे तर तयार व्हावें. राष्ट्रीय धोरण आंखतांना सरकारास आर्थिक फायद्याखेरीज इतरही अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो, आणि कित्येक प्रसंगीं ह्या इतर गोष्टींसच अधिक महत्त्व द्यावें लागतें. ज्याप्रमाणें मनुष्यमात्र हा निव्वळ अगर मुख्यतः धनोत्पादकयंत्र नव्हे त्याचप्रमाणें राष्ट्र हीही केवळ परस्पर आर्थिक सहकारी मंडळी नव्हे. विशेषतः मानवी समाजाची राजकीय संघटनाविषयक प्रगति जोंपर्यंत राष्ट्रीय मर्यादेपलीकडे गेलेली नाहीं तोंपर्यंत आपलें स्वतंत्र व्यक्तिमत्व राखण्याकरितां अनेक प्रसंगीं संरक्षणाचें धोरण स्वीकारावें लागतें. अलीकडे औद्योगिक घटना आंतरराष्ट्रीय स्वरूपाचीं होत असून राजकीय घटना मात्र राष्ट्रीय मर्यादेपलीकडे गेलेली नाहीं. म्हणूनऔद्योगिक क्षेत्रांतहि बहुतेक राष्ट्रें स्वायत्ततेचें आणि तुटकपणाचें धोरण स्वीकारूं लागलीं आहेत. कित्यक मुत्सद्दी व अर्थशास्त्रज्ञ ह्यांस ही नवी परिस्थिति अप्रगमनशील वाटते आणि संरक्षणास पायबंद घालून परस्पर सहकार्य वाढविण्याकरितां जागतिक परिषदाहि भरविण्यांत येत आहेत. परंतु एक गोष्ट निश्चित आहे कीं, राजकीय क्षेत्रांत प्रत्येक लहानमोठ्या राष्ट्रास पूर्ण स्वातंत्र्य मिळून तीं सर्व राष्ट्रें परस्परांच्या न्याय्य हक्कांस मान्यता देणारे एकाच सर्वसामान्य सत्तेचे अवयव बनल्याखेरीज खुल्या व्यापाराचें धोरण प्रस्थापित होणार नाहीं. संरक्षणाच्या मार्गांत असणाऱ्या अडचणी व त्या धोरणापासून होणारी आर्थिक हानि ह्यांचा मात्र राजकीय सत्ताधाऱ्यांनीं योग्य विचार करावा एवढेंच सध्यां शक्य आहे.

(अनियंत्रित देवघेवीच्या तत्त्वानेंही ज्यांचें निखालस समर्थन होणार नाहीं अशा कांहीं आंतरराष्ट्रीय व्यापारांत अडचणी उत्पन्न होतात व त्यांच्या निराकरणार्थ संरक्षणात्मक जकातींचें अवलंबन करावें लागतें. एखाद्या राष्ट्रांतील विवक्षित वस्तूच्या उत्पादकांनीं आपला गट करून जर असें ठरविलें कीं, स्वराष्ट्रांत पुरवठा मर्यादित करून गिऱ्हाइकांकडून अधिकांत अधिक किंमत उकळावयाची, आणि परराष्ट्रांत मात्र अगदीं स्वस्त जरूर वाटल्यास उत्पादनाच्या खर्चापेक्षांहि कमी किंमतीस माल विकून त्या राष्ट्रांतील उत्पादकांचा धंदा बुडवावयाचा तर मोठीच आपत्ति उत्पन्न होते. अशा अन्याय्य स्पर्धेनें एकदां स्वदेशी धंदे बुडाले म्हणजे परदेशी व्यापारी आपले भाव वाटेल तसे वाढवूं शकतात. स्वदेशांत ज्या भावानें माल विकतो त्यापेक्षां परदेशांत स्वस्ताईनें माल विकणें ह्या कृतीस इंग्रजींत Dumping असें म्हणतात. असले प्रकार नेहमींच बुद्धिपुरःसर केले जातात असें नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या राष्ट्रांत कागदी चलनाचा बसुमार पुरवठा झाल्यानें इतर राष्ट्रांच्या चलनाचा मानानें त्याची किंमत उतरते. ह्या आपत्तीचा त्या राष्ट्राच्या निर्यात व्यापारास मात्र कांहीं काळ चांगलाच फायदा होतो. दुसऱ्या राष्ट्रांत कमी चलन घेऊनही आपल्या देशांत पूर्वी इतकेंच किंवा अधिक चलन मिळण्याची सोय झाल्यानें परराष्ट्रांत एकदम स्वस्ताईनें माल विकतां येतो व इतर प्रतिस्पर्ध्यांचा धंदा त्या मानानें मर्यादित होतो. ह्या प्रकारांतहि स्वराष्ट्रापेक्षां परराष्ट्रांत कमी किंमत ठेवली जात असल्यानें त्यास डंपिंग म्हणतात. व हें डंपिंग हुंडणावळीच्या फेरबदलानें होत असल्यानें ह्याला Exchange Dumping असें म्हणतात. अशा स्वरूपाच्या परराष्ट्रीय चढाओढीनें स्वराष्ट्रांतील धंद्यांचें नुकसान होऊं लागलें तर तें ताबडतोब थांबविण्याकरितां उतरलेल्या हुंडणावळीच्या, देशांतून आयात होणाऱ्या मालावर खास जकाती बसवाव्या लागतात. आतां तर सर्वच राष्ट्रांनीं संरक्षणाचें धोरण स्वीकारलेलें असल्यानें असल्या प्रकारास त्यांजकडून तात्काळ आळा घातला जातो.)

पोलिस-खातें व तुरुंग

खात्याची रचनाः—

इलाख्यांतील पोलिस खातें "गृहमंत्र्याच्या" नियंत्रणाखालीं असतें. पोलिस खात्याची सर्व व्यवस्था इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस हा एक मदतनिसाचे मदतीनें ठेवीत असतो. मुंबई इलाख्याचे मुख्यतः चार ठळक ठळक विभाग केलेले आहेत, व हे विभाग चार वडचा पोलिस अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालीं आहेत. ते असेः—सिंध, मुंबई शहर, उत्तर भाग व दक्षिण भाग या तीन विभागावर तीन डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस अधिकार चालवतात व मुंबई शहर हें कमिशनर ऑफ पोलिस यांचे ताब्यांत असते. मुंबई शहर व सिंध प्रांत हे जवळ जवळ स्वतंत्र व्यवस्थेखालीं असल्याकारणानें छोटचा पोलीस अंमलदारांची नेमणूक कायम त्याच ठिकाणीं असते. सिंध प्रांतांत एकंदर आठ जिल्हे आहेत. उत्तर भागांत १२ जिल्हे व बी. बी. अँड सी. आय. रेल्वे व दक्षिण भागांत, ९ जिल्हे व जी. आय. पी. व एम्. आणि एस्. एम्. आर. रेल्वे येतात.

प्रत्येक जिल्हयावर डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस नेमलेला असतो व जिल्हयांत शांतता व सुव्यवस्था राखण्याचें काम त्याचें असतें. कामाच्या सोईकरतां बी. बी. सी. आय. रेल्वेवर एक सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस व तसाच एक अधिकारी जी. आय. पी. आणि मद्रास व सदर्न मराठा रेल्वेवर असतो. महत्त्वाचा जिल्हा असल्यास डि. सु. ला मदत करण्याकरितां एक असिस्टंट सु. ऑफ पोलिस दिलेला असतो. जिल्हाधिकाऱ्यापासून वरपर्यंतचे सर्व पोलिस अधिकार वरिष्ठ दर्जाचे सरकारी नोकर असतात व त्यांच्यांत गोऱ्या अधिकाऱ्यांचा भरणाच मुख्यतः असतो.

प्रत्येक जिल्हयाचे दोन पासून चार भाग करतात, व एक भागावर डि. सु. ऑफ पोलीस व राहिलेल्या भागावर असिस्टंट सु. ऑफ पोलीस अगर डेप्यूटी सु.ऑफ पोलिस नांवाचे अधिकारी देखरेख करण्यासाठीं असतात.पुन्हा जिल्हयाचे दोन अगर तीन भाग करून त्याची तपासणी करण्याकरितां इन्स्पेक्टर नेमलेला असतो.डेप्यूटी सु.ऑफ पोलीस हे बहुधा हिंदी असून, ते प्रांतिक नोकर असतात. मोठमोठीं शहरें अगर व्यापारी गांवावर हुकमत चालविण्यास कधींकधीं इन्स्पेक्टरची योजना करण्यांत येते.

प्रत्येक तालुक्यांवर व मुख्य शहरावर एक सब-इन्स्पेक्टर नेमलेला असतो, व तो आपल्या भागांवर शांतता व सुव्यवस्था ठेवण्याबद्दल जबाबदार धरला जातो. तालुका मोठा असल्यास त्याचे दोन भाग करण्यांत येतात व दरएक पोलीस स्टेशनवर एक सब-इन्स्पेक्टर नेमला जातो.सब-इन्स्पेक्टरच्या ताब्यांतील मुलुखाचे अनेक लहान लहान गट करण्यांत येतात, व प्रत्येक गट एका हेड कॉन्स्टेबलच्या ताब्यांत देण्यांत येतो व तो आपले हाताखालील शिपायांमध्यें आपल्या ताब्यांतील खेडीं वाटून देतो. एका शिपायाच्या वाटणीस कधीं कधीं आठ खेडीं येतात.

आतां प्रत्येक खेडेगावांत एक पोलीस पाटील वंशपरंपरेनें नेमलेला असतो व ही नेमणूक जिल्हयाचा कलेक्टर करतो. गांवांत झालेल्या प्रत्येक गुन्हयाची नोंद, आल्यागेल्यांची टिपणवारी, संशयित मरणाबद्दल वरिष्टाकडे वर्दी वगैरे सर्व कामें या पोलीस पाटलास करावीं लागतात. सबंध इलाख्याची याप्रमाणें व्यवस्था झाली तरी कधीं कधीं मोठमोटचा बिकट व चिकट गुन्हयांचा तपास करणें जिल्हा अधिकाऱ्यांच्या अवांक्याबाहेर पडतें. तसेंच कांहीं गुन्हे व ते करणारे लोक यांचा संबंध इतर इलाख्यांशीं येतो. कांहीं गुन्हयांचा तपास अभ्यासपूर्वक करावा लागतो, आणि हें काम जिल्हाधिकाऱ्याच्या रोजच्या धाईंत होणें अशक्य असतें. म्हणून विशिष्ट प्रकारच्या असल्या कामासाठीं एक स्वतंत्र खातेंच केलेलें असतें. व या खात्यांत अनुभविक व कर्तबगार लोकांची भरती करण्यांत येते. याला सी. आय. डी. किंवा गुप्तपोलीसखातें म्हणतात. सी. आय. डी. खात्यावर एक डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस हा अधिकारी असतो व त्यांचें नियंत्रण सर्व इलाख्यांवर चालतें. याला मदतगार म्हणून एक असिस्टंट, तीन डेप्युटी सु. ऑफ पोलीस, अनेक इन्स्पेक्टर, सब-इन्स्पेक्टर वगैरे पोलिस अधिकारी दिलेले असतात व ते

सर्व इलाखाभर फिरून मोठमोठ्या गुन्ह्यांचा तपास करतात. याच खात्याला अंगठ्याच्या ठशाचें खातें म्हणजे फिंगर प्रिंट ब्यूरो जोडलेलें असते, व त्यांत इलाख्यांतील सर्व अट्टल गुन्हेगारांच्या ठशांची नोंद ठेवलेली असते.

जिल्ह्यांतील मुख्य पोलीस अधिकारी आपल्या जिल्ह्याची सुव्यवस्था त्या जिल्ह्याच्या कलेक्टराचे हुकमतीखालीं ठेवतो; व त्यास जिल्ह्यांतील सर्व हालचालींची सर्व दाखलगिरी जिल्ह्याच्या कलेक्टरास द्यावी लागते. सर्व जिल्ह्यांतील गुन्ह्यांचा तपास करून गुन्हेगार लोकांस न्यायासनासमोर खेचणें हें काम पोलिस अधिकाऱ्यांना मुख्यतः करावें लागतें. तरी त्यांचें खरें व जास्त महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे गुन्ह्यांचा प्रतिबंध करणें व गरीब प्रजाजनाचें संरक्षण करणें हें होय. या करितां जिल्ह्यांतील बदमाष लोकांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवण्याचें काम फार हुशारीनें त्यास करावें लागतें. व त्यांच्या चाललेल्या गुप्त बेतांची बित्तंबातमी काढून त्यांना गुन्हा करूं न देतां, काबूंत ठेवण्यांतच हुशार पोलिस अंमलदारांची कर्तबगारी दिसून येते. त्याचप्रमाणें परप्रांतांतून आलेल्या परकी लोकांबद्दल व गुन्हेगारांबद्दल चौकशी करून त्यांना कोणच्याही तऱ्हेचा गुन्हा आपल्या हद्दींत न करूं देण्याचें अवघड काम त्यांजकडे असतें.

पोलीस खात्यांतील खालच्या दर्जाच्या नोकरवर्गांत दोन प्रकार असतात. एकास हत्यारी अशी संज्ञा आहे. ही शाखा लष्करी शिक्षण देऊन तयार केलेली असते, व सरकारी इमारतींवर पहारा करणें, कैद्यांची नेआण करणें, दंग्याच्या वेळीं सुव्यवस्था राखणें वगैरे कामें त्यांजकडे असतात. दुसऱ्या शाखेंत थोडे शिकलेले लोक भरती करून घेतात, व त्यास लष्करी शिक्षण देऊन तयार झाल्यावर त्यांची योजना, गुन्ह्याचा तपास करण्यांत पोलीस अधिकाऱ्यांस मदत करण्यांत होते. व त्यास आडहत्यारी म्हणतात.

उच्च प्रकारचे पोलिस अधिकाऱ्याची भरती इंग्लंडांत व हिंदुस्थानांत होते. हिंदी उमेदवार घरंदाज घराण्यांतील असावा लागतो. त्याची निवडणूक कायम करण्यांत आल्यावर, त्यास हिंदुस्थान सरकारकडून होणाऱ्या चढाओढीच्या परीक्षेस बसावें लागतें. ही परीक्षा पब्लिक सर्व्हिसेस कमिशन घेतें. परीक्षा पास झाल्यावर उमेदवारास १८ महिने नाशिक पोलीस ट्रेनिंग स्कूलमध्यें शिक्षण मिळून मग त्याची नेमणूक होते. हिंदी उमेदवार निदान ग्रॅज्युएट तरी असलाच पाहिजे. प्रांतिक पोलिस अधिकाऱ्यांची भरती दोन प्रकारानें होते. कांहीं जागा खालील हुशार व अनुभवी पोलीस अधिकाऱ्यांमधून भरल्या जातात व कांहीं जागा खात्याबाहेरील उमेदवाराकरितां राखलेल्या असतात. त्या उमेदवारास १८ महिने शिक्षण दिलें जातें व त्यानंतर त्याची नेमणूक होते. त्याचा शैक्षणिक दर्जा ग्रॅज्युएटइतका तरी असावा लागतो.

सब–इन्स्पेक्टर यांची भरती इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस कमिटीच्या सल्यानें करतो व योग्य उमेदवारांना १८ महिने शिक्षण देऊन मग त्यांची नेमणूक होते. कांहीं सब–इन्स्पेक्टर खालच्या दर्जांतून वर आलेले असतात, पण त्यांना खात्याची परीक्षा पास व्हावी लागते. बाहेरून घेतल्या जाणाऱ्या उमेदवारांचें शिक्षण निदान मॅट्रिक तरी पाहिजे. निकृष्ट पोलीस अंमलदार व शिपाई यांची भरती पोलीस सुपरिंटेंडंटच करतो, पण एकदम एखाद्या बाहेरच्या उमेदवारास हेड कान्स्टेबल नेमणें असल्यास त्यास डे.इ. जनरल ऑफ पोलीसची परवानगी लागते. पोलीस खात्याचीं न्यायासनासमोर चालणारीं कामें करण्याकरितां एक निराळी योजना करण्यांत आली आहे आणि अलीकडे एल्. एल्. बी. झालेले उमेदवार पोलीस प्रासिक्यूटर म्हणून नेमण्यांत येतात. वरिष्ठ पोलीस अंमलदारांत गोऱ्या लोकांचा भरणा फार आहे, पण दिवसेंदिवस हिंदीकरण करण्याकडे सरकारची प्रवृत्ति दिसते. बाकी सर्व खातें हिंदी नोकरांचें आहे व त्यांत ब्राह्मणेतर, अस्पृश्य, मुसलमान इत्यादिकांनाच घेण्याचें धोरण सरकारनें कायम केल्यासारखेंच आहे.

मुंबई इलाख्याच्या (सिंध वगळून) पोलीस खात्याचा अहवाल सन (१९३१):—

पोलीस–संख्याः—अहवालाचे सालीं डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीसचे वरच्या अधिकाराचे रेल्वेसुद्धां अधिकारी ५८ होते व खालचे अधिकारी व पोलीस शिपाई अनुक्रमें ७१४ व १७४८५ होते. १९३० सालीं खालचे अधिकारी व पोलीस शिपाई अनुक्रमें ७१३ व १७५१६ होते. ह्याशिवाय १९३१ त हंगामी पोलीस १५५४ कामावर होते. १९३० मध्यें हीच संख्या २१८२ होती. १९३१ मध्यें ही संख्या कमी होण्याचें कारण ह्या सालीं कायदेभंगाच्या चळवळीचा जोर कमी झाला होता.

खात्याचा खर्चः— ह्या सालीं (१९३१–३२)

रेल्वे पोलीस व ऑफीस खर्च सुद्धां सर्व खात्याचा खर्च १,०४,९०,२०१ रु. झाला. १९३०–३१ सालीं १,०९,८०,११५ रु. झाला होता. यंदा खर्च कमी होण्याचीं कारणें. (१) कांहीं हंगामी अधिकाऱ्यांच्या जागा कमी केल्या. (२) कायदेभंगाच्या चळवळीमुळें वाढविलेल्या स्पेशल पोलीसांचें प्रमाण यंदा कमी केलें. (३) पगारांत शें. १० कपात. (४) स्पेशल पोलीसचा प्रवासाचा व इतर भत्ता कमी झाला. यंदा प्रत्येक पोलीसाकरितां सरकारनें ५२२ रु. खर्च केला. मागचे वर्षी ५४० रु. केला होता. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांचें प्रमाण खालीं दिल्याप्रमाणें होतें. ब्रह्मदेश ८८६ रु, बंगाल ६८१ रु. आसाम ६०९ रु., मद्रास ६०७ रु., बिहार–ओरिसा ६०७ रु., वायव्य सरहद्द प्रांत ६०२ रु., पंजाब ५५३ रु., मध्यप्रांत ५५२ रु., संयुक्त प्रांत ४६५ रु., (इंग्लंड वेल्स मिळून १९३१ सालीं प्रत्येक पोलिसाकरितां ४४८१ रु. खर्च झाला होता.)

पोलिसांचें प्रमाणः—यंदा ४·६१ चौ. मैलाला व दर ९४० माणसांमागें १ पोलीस असें प्रमाण होतें. रेल्वेंत २·२९ मैलांस एक असें होतें. (इंग्लंड वेल्समध्यें हें प्रमाण अनुक्रमें १·५४ चौ. मैल व ८५० माणसामागें १ पोलीस होतें.)

हत्यारेंः—५१७ नवीन बंदुका यंदा घेतल्या.

शिक्षाः—ह्या सालीं ३८६ पोलिसांना खात्यातर्फे व १७ पोलिसांना न्यायकोर्टाकडून शिक्षा देण्यांत आल्या.

बक्षिसें, पदव्या वगैरेः—यंदा २२ पोलीस अधिकाऱ्यांना चांगल्या कामगिरीबद्दल नवीन पदव्या देण्यांत आल्या. व चौघांना 'किंग्ज पोलीस मेडल' देण्यांत आलें. ह्याशिवाय प्रमोशन, रोख बक्षिसें वगैरे ८१६४ पोलिसांना देण्यांत आलीं. बक्षिसांकरितां एकंदर खर्च ३८,०२५ रु. झाला.

साक्षरताः—सर्व खात्यांत ६२६ अधिकारी व १२३८२ पोलीस साक्षर आहेत. यंदाचें प्रमाण शें. ७२·७२ आहे. १९३० सालीं साक्षरतेचें प्रमाण शें. ७१·४४ होतें.

राजिनामेः—१९३१ व १९३० सालीं अनुक्रमें १७२ व २३४ पोलिसांनीं राजीनामे दिले.

रिकाम्या जागा व नवीन उमेदवारः—यंदा ३३६ रिकाम्या जागा होत्या. आणि नवीन उमेदवार १०४५ घेण्यांत आले. ४८३ पोलीस पेन्शन घेऊन गेले व मृत्यू वगैरे कारणानें ५५७ लोक खात्यांतून गेले. सरकारी हुकुमाप्रमाणें निकृष्ट वर्गातील उमेदवारांना सवलती दिल्या. पोलीस खात्यांत निकृष्ट वर्गातील २९७ लोक सध्यां आहेत. यंदा त्यांतीलच नवीन उमेदवार ७८ घेतले.

खर्चः— अहवालाचे सालीं कपडेलत्ते, हत्यारें वगैरेकरितां खर्च २,३३,२७३ रु.झाला. १९३० सालीं ५७३८५६ रु. झाला होता.

हत्यारांचीं दुकानेंः— यंदा लायसेन्स असलेलीं दुकानें ४२७ होतीं. हत्यारें बाळगण्याबद्दल ३४९२९ लोकांना परवाने होते. पैकीं ८९ लोकांनीं परवान्याचे नियम मोडले. त्याबद्दल ५१ लोकांना मिळून २०२० रु. दंड केला गेला. पोलीस प्रासिक्यूटर कडून यंदा ३६१७ खटले चालविले गेले. त्यांत २८८९ खटल्यांत अपराध्यांना शिक्षा झाल्या. हेड कॉन्स्टेबलनीं ७५०७ खटले चालविले. पैकीं ६३१७ खटल्यांत अपराध्यांना शिक्षा झाल्या. (६४९ अधिकाऱ्यांपैकीं ५४० अधिकारी पिस्तुलाचा नेम धरण्यास शिकले.)

खेडेगांवांतील पोलीसः— यंदा ४१२ पोलिसांनीं चांगली कामगिरी बजावली म्हणून त्यांपैकीं चौघांना तरवारी, २०० जणांना दाखले व बाकीच्यांना, मिळून १४६० रु. रोख बक्षिस म्हणून दिले. ६६९ पोलिसांनीं कामगिरी नीट बजावली नाहीं. पैकीं ३४३ पोलिसांना खात्यातर्फे शिक्षा झाल्या.

नाशिकचें पोलिस ट्रेनिंग स्कूलः— १९३१ सालीं जानेवारींत ३८ व जुलैमध्यें ३४ नवीन उमेदवार सब–इन्स्पेक्टरच्या शिक्षणक्रमासाठीं घेण्यांत आले. मे १९३१ त २४ व नोव्हेंबरमध्यें २६ मिळून ५० लोकांनीं यंदा कोर्स पुरा केला. यंदा सर्व विद्यार्थ्यांची शिस्त व वर्तणूक चांगली होती. विद्यार्थ्यांचें आरोग्यमानही चांगलें होतें.

मदत–यंदा मृत्यू पावलेल्या पोलीस शिपायांपैकीं ५५ च्या कुटुंबांना मिळून ३३१३रु. "पोलीस विधवा फंडातून" मदत देण्यांत आले.

विशेष कामः—वर्षाच्या सुरवातीस झालेल्या "गांधी–अर्विन" करारामुळें कायदेभंगाची चळवळ १९३० पेक्षां यंदा कमी जोरांत होती. तरीही सरकारविरुद्ध काँग्रेसच्या अनुयायांची चळवळ खेडेगांवांतून चालली असल्यामुळें पोलीस खात्याला पुरेसें काम होतेंच. त्यामुळें इतर गुन्हेगारांकडे व गुन्ह्यांकडे पोलीस–खात्याला लक्ष देण्यास अडथळा येत असे. तरीही उत्तर व दक्षिण विभागांच्या डे. इ. जनरलकडून पोलिसांचीं सर्व कामें शिस्तवार झाल्याचे रिपोर्ट आहेत. ह्या वर्षीं कुर्ला व सोलापूर येथें गिरणी मजुरांच्या संपामुळें त्या ठिकाणीं पोलिसांना विशेष दक्षता बाळगावी लागली. तसेंच व्हाइसरॉयांचे मुंबई प्रांतांतून जाण्यायेण्याचे वेळीं विशेष

सावधगिरी ठेवली होती. नोव्हें. १९३१ मध्यें सिंहस्थ यात्रेमुळें नाशिक येथें पोलिसांना बरेच काम पडलें. शिवाय अस्पृश्यांच्या काळारामाच्या देवळावरील सत्याग्रहामुळें नाशिक येथें बरीच अशांतता होती. रामकुंडावर पोलीस पहारा ठेवण्यांत आला होता व दंग्याचे वेळीं इं. पि. को. १४४ कलमाप्रमाणें मिरवणुकीस बंदी करण्यांत आली होती. ह्याशिवाय २२-७-१९३१ रोजीं फर्ग्यूसन कॉलेजचे वाडिया लायब्ररींत त्यावेळचे गव्हर्नर सर अर्नेस्ट हॉटसन भेटीस गेले असतां श्री.वा. ब. गोगटे नांवाच्या विद्यार्थ्यानें गव्हर्नरसाहेबांवर दोन गोळ्या झाडल्या. ह्या प्रकरणीं सी. आय. डी. खात्याकडून चौकशी करण्यांत येऊन गोगटे यांस शिक्षा झाली.

गुन्हेः— अहवालाचे सालीं दाखल केलेल्या गुन्ह्यांची संख्या १,२३,८४३ होती.ह्यांपैकीं कॉग्निझेबल (वारंटाशिवाय चौकशी करतां येण्यासारखे) गुन्हे ३८,८९६ व वारंटानें चौकशी केले गेलेले ८४,९४७ गुन्हे होते. १९३० सालचे हे आंकडे अनुक्रमें १,१२,२८२ (सर्व गुन्ह्यांची संख्या), ३९,८४८ (कॉग्निझेबल), व ७२,४३४ (नॉन –कॉग्निझेबल) होत. इलाख्याच्या दक्षिण विभागांपैकीं बेळगांव, मुंबई सबर्बन, अहमदनगर, जी. आय. पी. व एम्. एस्. एम्. रेल्वे व पुणें या भागांत व उत्तर विभागांपैकीं खेडा जिल्ह्यांत गुन्ह्याचें प्रमाण कमी होतें. व गुजराथेंत गुन्ह्यांची संख्या वाढली होती. खून, दरोडे, चोऱ्या, घरफोडी वगैरे गुन्ह्यांची संख्या १९३१ सालीं १४,४७९ व १९३० सालीं १५२७० होती. अहमदाबाद जिल्ह्यांत ह्या सालीं खून व दरोडे यांचें प्रमाण वाढलेलें होतें. याचें कारण कायदेभंगाची चळवळ व लोकांची हलाखीची स्थिति होय. बेळगांव व खेडा जिल्ह्यांत असलेल्या गुन्ह्यांचें प्रमाण नेहमींप्रमाणें (इतर जिल्ह्यांपेक्षां) जास्त होतें.

गुन्ह्यांचें प्रमाणः—लोकसंख्येच्या दरहजारीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील प्रमाण १९३० सालीं पुढीलप्रमाणें होतें. ब्रह्मदेश (३·६८) वा. स. प्रांत (३·४७), मध्यप्रांत (२·५६), पंजाब (२·०७), संयुक्तप्रांत (१·५३) आसाम (१·४९), बंगाल (१·३२), मुंबई इलाखा सर्व (१·३०), बहार ओरिसा (१·०९), मद्रास (१·०३). भयंकर गुन्ह्यांचें प्रमाण लोकसंख्येच्या दरहजारीं मुंबई इलाख्यांत १९३१ मध्यें (·८४) व सर्व गुन्ह्यांचें प्रमाण (१·२) होतें. मुंबई इलाख्यांत मुंबई सबर्बन जिल्ह्यांत गुन्ह्याचें प्रमाण सर्वांत जास्त (४·०४) व रत्नागिरी जिल्ह्यांत सर्वांत कमी (·३०) होतें. १९३० व ३१ सालीं अनुक्रमें २५,२६८ व २४,१८५ गुन्ह्यांची चौकशी व तपास पोलिसांकडून झाला. पोलिसांना न सांपडलेल्या गुन्ह्यांची संख्या ह्या दोन सालीं अनुक्रमें ८०८४ व ७४७३ होती. म्हणजे एकंदर चौकशी केलेल्या गुन्ह्यांशीं शें. प्रमाण अनुक्रमें ३२ व ३१ होतें. न सांपडलेल्या गुन्ह्यांची संख्या जी. आय. पी. व सदर्नमराठा रेल्वेंत, मुंबई उपनगर, खानदेश (पूर्व) व नाशिक जिल्ह्यांत जास्त होती. कॉंग्रेसच्या चळवळीमुळें मोठ्या अधिकाऱ्यांना गुन्ह्यांची चौकशी व तपास करण्याकरितां पोलिसांकडून योग्य कामगिरी करवून घेण्यास सवड झाली नाहीं. व गुन्हेगारांच्या नवीन व आधुनिक पद्धतींनीं गुन्हे करण्यामुळें डिटेक्टिव खातें असावें तितकें तयार नसतें. अहवालाचे सालीं पोलिसांनीं भरलेल्या १५८७८ खटल्यांपैकीं १४८९४ खटल्यांत अपराध्यांना शिक्षा झाल्या. १९३० चे हे आंकडे अनुक्रमें १६२४९ व १५२८८ असे होते. ह्याशिवाय पोलिसांनीं न भरलेल्या मॅजिस्ट्रेटपुढें चाललेल्या व निकाल लागलेल्या खटल्यांची संख्या ९७४७ व ५२३६ अशी होती. १९३० चे हे आंकडे अनुक्रमें ८९०७ व ४५२४ असे होते. पोलिसांनीं अटक केलेल्यांची संख्या १९३१ सालीं ३२६५९ होती; १९३० सालीं ही संख्या ३७८६३ होती. १९३० चे खटल्याशिवाय राहिलेले गुन्हेगार धरून अहवालाचे सालीं ४१०६९ गुन्हेगारांपैकीं ३२३८६ गुन्हेगारांची चौकशी होऊन २१४७५ गुन्हेगारांना (शें. ६६) शिक्षा झाल्या. १९३० चें हेंच प्रमाण शें. ७२ होतें. ह्यासालीं हें प्रमाण कमी होण्याचें कारण पुष्कळ गुन्हेगारांनी माफी मागितली व कायदेभंगाच्या चळवळींत पकडलेल्या लोकांना 'गांधी–अर्विन' तहाप्रमाणें सोडण्यांतआलें. नॉन–कॉग्निझेबल गुन्ह्यांची संख्या ह्यासालीं ८४९४७ व १९३० सालीं ७२,४३४ होती. १९३०त राहिलेले खटले धरून यंदा ८९,३४४ खटल्यांपैकीं ६३,९५५ खटले चालविले गेले व त्यांपैकीं ५३२६५ खटल्यांत अपराध्यांना शिक्षा झाल्या. यंदां १,३०,४०० अपराध्यांना कोर्टापुढें उभें करण्यांत आलें. ६७३६ ना खटल्यापूर्वींच सोडून देण्यांत आलें, बाकीच्या ९३८०४ पैकीं ५९३२६ अपराध्यांना शिक्षा दिल्या व बाकीचे निर्दोषी म्हणून सुटले. अहवालाचे सालीं १०,२१,८४३ रु. किमतीचा माल चोरीस गेला.त्यांपैकीं फक्त ३००८१५ रु. किम-

तीचा माल सांपडला. १९३० चे हे आंकडे अनुक्रमें ११,५३,३४५ रु. व ३,२३,६१८ रु. असें होतें. म्हणजे परत मिळणाऱ्या चोरीच्या मालाचें चोरीस गेलेल्या मालाशीं शें. प्रमाण १९३१ व १९३० सालीं अनुक्रमें ३८.६३ व ३५.३१ असें होतें. ह्या सालीं इराणी लोकांच्या फिरत्या टोळचा मराठी जिल्हयांतून गेल्या, परंतु त्यांनीं विशेष त्रास दिला नाहीं. खेडा जिल्हयांत छार जातीच्या लोकांपैकीं कांहींनीं गुन्हे केले, त्यांना शिक्षा करण्यांत आली. गुन्हेगारांच्या टोळयांवर झालेल्या ६ खटल्यांपैकीं ४ मध्यें ११६ गुन्हेगारांपैकीं ८७ जणांना शिक्षा झाली. यंदा शिक्षा झालेल्या २१,४७५ गुन्हेगारांपैकीं ३६३४ गुन्हेगारांना पूर्वीं शिक्षा झाल्या होत्या. पैकीं ८७० "निर्ढावलेले" गुन्हेगार होते. इलाख्याच्या उत्तर विभागांत निर्ढावलेल्या गुन्हेगारांची संख्या ६४५ होती. त्यांपैकीं १५७म्हणजे एक चतुर्थांश एकटया अहमदाबाद जिल्हयांतले होते. अहवालाचे सालीं पुढील महत्त्वाचे गुन्हे पोलिसांनीं पकडले:—

(१) बलसाड येथें १००० रु. ची नोट म्हणून 'दि बाँड ऑफ इस्लामिक युनिटी अनलिमिटेड' नांवाची अगदीं हुबेहूब तसली नोट देऊन एका इसमास फसविण्यांत आलें. या बाबतींत दोघांना पकडण्यांत आलें असून खटला व्हावयाचा आहे.

(२) मनमाड येथें झालेल्या घरफोडीच्या व चोरीच्या खटल्यांतील आरोपीच्या धोतराच्या कांठावरून पोलिसांनीं त्यास पकडलें. आरोपीला ७ वर्षें स. म. शिक्षा झाली. (३) बडोद्याचे दोघे इसम खोटीं नाणीं तयार करीत व तीं बी. बी. सी. आय्. रेल्वेवर चालवीत. त्यांना पोलिसांनीं हुशारीनें पकडलें व पुढें त्यास शिक्षा झाल्या. (४) रेल्वेंतून कामावरून काढलेल्या चार नोकरांना पेशावर एक्सप्रेस उलथून पाडण्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलें व शिक्षा दिल्या. (५) घाटकूपर येथें दरोडयाचे वेळीं छापा घालून चार दरोडेखोरांना पकडण्यांत आलें. एका पठाणाला पकडतांना त्यानें सार्जंट ब्लॅकस्टोन यास सुरीनें भोसकून मारलें. सार्जंट ब्लॅकस्टोनच्या विधवेस पेन्शन देण्यांत आलें.

कॉंग्रेसची कायदेभंगाची चळवळ (१९३१):—वर्षाच्या सुरवातीस कायदेभंगाची चळवळ दारूबंदी व परदेशी कापडबंदी ह्यांशिवाय इतर बाबतींत कमी झालेली दिसत होती. परंतु मार्च मध्यें झालेल्या तहामुळें प्रत्यक्ष चळवळ जरी बंद झाली तरी कॉंग्रेसनें गुप्त रीतीनें सरकारविरुद्ध लोकमत तयार केलें. कॉंग्रेसकमिटया पूर्ववत चालू होऊन सर्व तऱ्हेनें कायदेभंगाची पूर्वतयारी करण्यांत येत होती. त्यामुळें वर्षभर पोलीसखात्याला अतीशय सावधगिरी राखावी लागली. नंतर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कर्नाटकांतील दौऱ्यामुळें सर्वत्र अशांतता झाली. पुढें डिसेंबरमध्यें पं. जवाहरलाल व अबदुल गफूर खान यास पकडण्यांत आलें. यानंतर थोडयाच दिवसांत सर्वत्र शांतताभंग व कायदेभंग सुरू झाला हें सर्व विश्रुत आहे.

गुप्तपोलीस खातें:— अहवालाचे सालीं लहान मोठे हंगामी व कायम मिळून ५४ अधिकारी या खात्यांत होते. ह्यासाठीं चौकशी केलेल्या १८६ प्रकरणांपैकीं ३९ फौजदारी व १४७ राजकीय व खाजगी प्रकरणें होतीं. एकंदर ८९ इसमांपैकीं ४६ लोकांवर खटले होऊन शिक्षा झाल्या. राजकीय वातावरणामुळें स्पेशल ब्रँचला फार काम पडत असे. ६९० जाहीर सभांना व व्याख्यानांना या खात्यांतील लघुलेखक व इतर लोक हजर होते. शिवाय ह्या खात्यातर्फे 'बाँबे पोलिस गॅझेट' मध्यें २९ गुन्हयांच्या हकीगतीचे रेकॉर्ड तयार करून प्रसिद्ध करण्यांत आलें. आतांपर्यंत असे २१७ रेकॉर्ड प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

फिंगर प्रिंट ब्यूरो:— ह्या खात्यांत १९३१ मध्यें एकंदर ३१ लोक होते. पूर्वींचे १,३२,१०४ व १९३१ सालीं आलेले ११,१९५ बोटांच्या निशाणीचे नमुने ब्यूरोंत ठेवण्यांत आले आहेत. पूर्वीं शिक्षा झालेल्या ५०८८ गुन्हेगारांची ह्या नमुन्यांवर खात्री करून घेण्यांत आली; त्यांपैकीं २२६० नमुने कोर्टापुढें खटल्याचे वेळीं ठेवले होते. फरारी झालेल्या ७०८ गुन्हेगारांच्या निशाणीनमुन्यांपैकीं १४१ जणांना हातठशावरून पकडण्यांत आलें. सर्व जिल्हयांतील १६ उमेदवारांना ह्या खात्याचें शिक्षण देण्यांत आलें.

पोलिसांनीं केलेलीं इतर कामें:— (१) सार्वजनिक वाहनांना लायसेन्स देणें व त्यावर लक्ष ठेवणें (२) १९३१ सालीं पोलिसांनीं २,२६,००६ समन्स व वॉरंटें बजाविलीं. (३) ४८६ आगी विझविण्यास मदत केली. (४) ५७,७६३ बेवारशी कुत्रीं मारलीं. (४) मॅजिस्ट्रेटकडून आलेल्या ११७५ प्रकरणांत चौकशी केली. (५) ७४६ आत्महत्त्येच्या प्रकरणांत चौकशी केली. (६) ५०६७ अपघातांत (रेल्वेंतील ७२२) व ४०१ आकस्मिक मृत्यूबद्दल चौकशी केली. ह्याशिवाय १९३१ सालीं १०,२५८ मोटारी रजिस्टर

केल्या, व १६,५१५ मोटारहक्यांना (परीक्षा घेऊन) मोटार हाकण्याचे परवाने दिले. ९३६ भयंकर गुन्ह्यांपैकीं ८२१ गुन्ह्याचे जागीं गॅझेटेड पोलीस ऑफीसर प्रत्यक्ष गेले होते.

सन १९३१ सालीं गुप्त पोलीस खात्यानें चौकशी केलेलीं कांहीं महत्त्वाचीं प्रकरणें:—— (१) कर्जत पोलीस स्टेशन नजीक दोन कापड-विकणारांचा खून झाला होता. त्या बाबतींत तीन मुसलमानांना कऱ्हाड, अहमदनगर अशा दूर ठिकाणीं पकडून पुढें त्यांस योग्य शिक्षा केल्या गेल्या (२) पुणें शहरांतून कांहीं तरुणांनीं बंदुका वगैरे हत्यारें चोरलीं होती, त्यांचा तपास कोल्हापूर-च्या पोलिसच्या मदतीनें लावण्यांत आला. (३) पुणें लष्करांतील एक युरोपियनांचें रिव्हाल्व्हर चोरीस गेलें होतें. त्या बाबतींत ३ मुसलमानांस मुंबईस पकडण्यांत आलें. (४) हैद्राबाद (दक्षिण) येथून बिगर परवाना गुप्त रीतीनें कांहीं हत्यारें आणल्याच्या संशयावरून वैद्य नांवाच्या ब्राह्मण इसमास पकडण्यांत आलें. (५) अहमदनगर इरिगेशन खात्यांतील लांचलुचपतीची चौकशी (६) प्रतापगडच्या दरोड्याबाबत चौकशी. (७) फर्ग्युसन कॉलेजांतील गव्हर्नरावरील गोळीबार प्रकरण. याशिवाय खोट्या नोटा व नाण्याच्या बाबतींत पुष्कळच कामगिरी ह्या खात्यानें बजाविली.

गुन्हेगार जाती:——१९३१ चे सुरवातीला (गुन्हेगार जातीच्या कायद्याप्रमाणें) गुन्हेगार जातींतील लोकांची संख्या २१,९०२ होती. सबंध वर्षांत ९१२ नवीन लोकांचा ह्या जातींत समावेश झाला. २१५१ लोकांना वरील कायद्याप्रमाणें सूट दिली. व २४७ गुन्हेगार मेले. वर्षाचे शेवटीं यादींत २०३५२ लोक होते पैकीं ७६७२ फरारी व ४२७ तुरुंगांत होते. गुन्हेगार जातीच्या सर्व वसाहतींत मिळून ३८४५ लोक होते. गुन्हेगार जातींबद्दल नवीन कायदा अमलांत आणल्यापासून दरसाल त्या कायद्याखालीं येणाऱ्या इसमांची संख्या कमी होत आहे. शिवाय कायद्याविरुद्ध वर्तन न केल्यास बहुधा रजिस्टरमधून नांव काढून टाकतात. १९३१ सालीं २०३५२ गुन्हेगार जातींतील लोकांपैकीं फक्त ९३० लोकांना गुन्हे केल्याबद्दल शिक्षा झाल्या. दरवर्षी शेंकडा प्रमाण कमी होत आहे. १९२८ (शें. ६.८६); १९२९ (शें. ५); १९३० (शें. ४.७५); १९३१ (शें. ४.५२), गुन्हेगार जातींत खालील जाती प्रमुख आहेत.—— (१) बेरड ७६४ इसम, (२) भिल्ल २२४७; (३) हरिणशिकारी ७००; (४) लामाणी २००६; (५) मांग-गारुडी १०२४; (६) रामोशी ५९५; (७) वाघारी १००९९. शिक्षा—इं. पि. कोडांतील गुन्ह्याबद्दल १९३१ सालीं ३८८ रजिस्टर केलेले गुन्हेगार जातीच्या लोकांना व ९९१ न रजिस्टर केलेल्यांना मिळून १३७९ जणांना शिक्षा झाल्या व गुन्हेगार जातीबद्दलचा कायदा मोडल्याबद्दल ५५१ इसमांना शिक्षा झाल्या. गुन्हेगार जातीच्या कायद्याप्रमाणें आपलें काम न बजावल्याबद्दल २३ खेड्यांतील पाटलांवर खटले भरण्यांत आले. व विजापूर जिल्ह्यांतील एका जमीनदार गुन्हेगार जातीच्या इसमाबद्दल पोलीसला खबर न दिल्याबद्दल दंड करण्यांत आला.

निरनिराळ्या गुन्हेगार जातींबद्दल थोडक्यांत माहिती:—— (१) वाघारी जातीचे १००६१ लोक खेडा जिल्ह्यांत आहेत. त्यांच्यांत ह्या सालीं फक्त ९१ लोकांना शिक्षा झाल्या. (२) मांग-गारुडी—फिरती जात—गुजराथखेरीज सर्व इलाख्यांत अहमदनगर, पुणें, खानदेश, जिल्ह्यांत विशेष. शें. १० लोकांना १९३१ सालीं शिक्षा झाल्या. (३) भिल्ल अहमदनगर, नाशिक, खानदेश—जिल्ह्यांत स्थानिक असणारे—शिक्षा होणाऱ्यांचें प्रमाण शें. ११ (४) बेरड—कर्नाटकांतील रहाणारे—शें. ७ लोकांना यंदा शिक्षा झाल्या. (५) हरिणशिकारी (फासेपारधी) अहमदनगर, खानदेश व सोलापूर जिल्ह्यांत विशेष फिरणारी जात. शिक्षा होणाऱ्यांचें प्रमाण शें. ७ (५) लामाणी-वंजारी—विजापूर, धारवाड, पू. खानदेश जिल्ह्यांतील शिक्षा होणाऱ्यांचें शें. प्रमाण ३ (७) रामोशी शिक्षा होणाऱ्यांचे शें. प्रमाण ४.

२ **तुरुंग**.:—तुरुंगाची व्यवस्था, १८९४ च्या तुरुंगासंबंधींच्या कायद्याप्रमाणें व हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें ठेवली जाते. तुरुंगाची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न १८८९ च्या तुरुंग कमिशनपासून सुरू झाला. त्या कमिशननें शिफारस केलेल्या महत्त्वाच्या बहुतेक सुधारणा प्रांतिक सरकारांनीं अंमलांत आणल्या आहेत. कमी महत्त्वाच्या कांहीं शिफारशींमध्यें, प्रांतानुसार फरक करून त्या घेतल्या आहेत, व कांहीं रद्द केल्या आहेत. त्या कमिशननें सुचविलेली सर्वांत महत्त्वाची सुधारणा ही कीं, प्रत्येक इलाख्यांत तीन प्रकारचे तुरुंग असावेत. (१) सेंट्रल तुरुंग. यांत १वर्षाहून जास्त शिक्षा झालेले कैदी ठेवावयाचे. (२) डिस्ट्रिक्ट तुरुंग, प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शहरीं असे तुरुंग असा-

वेत. (३) Subsidiary Jails व कोठड्या (Lock up). यांत चौकशी चालू आहे असे कैदी व थोडे दिवसांची शिक्षा मिळालेले कैदी हे ठेवावयाचे. प्रत्येक प्रांतांतील तुरुंगखातें हें एका इन्स्पेक्टर जनरलच्या ताब्यांत असतें. जिल्ह्यांतील तुरुंग सिव्हिल सर्जनच्या ताब्यांत असतो; पुष्कळवेळां डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट जिल्ह्यांतील तुरुंगाची पाहणी करतो.

मुंबई सरकारनें १९१५ ऑक्टोबरमध्यें प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत पुढील ओळी आहेत. "तुरुंग खात्यांतील खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांविषयीं फारसें चांगलें म्हणतां येत नाहीं.तुरुंगाच्या व्यवस्थेंत सध्यां दोन दोष प्रामुख्यानें आढळन येतातः—भरपूर सेंट्रल तुरुंगांची उणीव व चांगले व पुरेसे वॉर्डर्स मिळण्याची पंचाईत.

तुरुंग कमिटीः— सध्यां तुरुंगाचा खर्च प्रांतिक सरकारांना करावा लागतो व तुरुंगासंबंधीचे कायदे मध्यवर्ती कायदेमंडळांत पसार होतात. सर्व तुरुंग एका विशिष्ट पद्धतीनें चालवावेत असें हळूं हळूं भासूं लागल्याचा परिणाम एका तुरुंग–कमिशनच्या नेमणुकींत झाला. आणि त्या कमिशननें, तुरुंग खात्याच्या व्यवस्थेची तीस वर्षांची पहाणी केली. तुरुंगांत जास्त कैद्यांची सोय व्हावी व त्यांना जास्त चांगल्या तऱ्हेनें वागवण्यांत यावे या सूचनेवर त्यानें जास्त भर दिला. शिवाय जास्त चांगल्या प्रकारच्या वॉर्डर्सची नेमणूक, कैद्यांना शिक्षण मिळण्याची सोय, सरकारच्या खात्याला लागणारा माल तुरुंगांतील कैद्यांकडून करवून घेणें वगैरे इष्ट सुधारणाही त्यांनीं सुचविल्या. फौजदारी व दिवाणी गुन्हेगार कैदी वेगवेगळाले ठेवावेत. व लहान मुलांसाठीं एक कोर्ट स्थापन करावें असेंहि आपलें मत सांगितलें.

कैद्यांचा कामधंदाः— कैद्यांना बहुतकरून तुरुंगाच्या आवारांतच काम करावयास सांगतात. तुरुंगाचें काम, रिपेअर करण्याचें काम किंवा वर्कशॉपमधलें काम असल्या स्वरूपाचें काम बहुतकरून त्यांना देण्यांत येतें. छपाई, तंबू तयार करणें, व कापड तयार करणें, हें काम तुरुंगांत होतें. प्रौढ कैद्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न झाला, परंतु हिंदुस्थानांतील तुरुंगांत असणारे कैदी बहुधा अशिक्षित असतात; त्यांना शिक्षण घेणें जमत नाहीं. कैद्यांची वर्तणूक साधारणतः चांगली असते. कैदी भडकून जाऊन वाटेलतसें वागल्याचीं उदाहरणें थोडीं आहेत. नेमून दिलेलें काम न संपविणें हाच कैद्यांचा नेहमींचा गुन्हा असतो. १८८९ च्या कमिशननें सर्व प्रकारच्या शिक्षा तपासल्या व कांहीं शिक्षा बंद केल्या. तुरुंगासंबंधींच्या सर्व प्रश्नांत कैद्यांत सुव्यवस्था व शांतता कशी राहील हा प्रश्न मुख्य आहे. त्यासाठीं पगारी वॉर्डर्सची नेमणूक करतात.

लहान वयाचे कैदीः— १५ वर्षांखालच्या कैद्यांसाठीं कायद्यानें तुरुंगाच्या ऐवजीं दुसऱ्या शिक्षेची सोय करून ठेवली आहे. मुलांना तीनपासून सहावर्षापर्यंत रेफरमेटरी स्कूलमध्यें डांबून ठेवावयाचें, धमकावणी देऊन सोडून द्यावयाचें; मुलांच्या पालकांकडून त्यांच्या वर्तणुकीच्या चांगुलपणाबद्दल लेखी जामीन घ्यावयाचा किंवा शिस्त लावण्याचें हेतूने मुलांस छडीनें चोपावयाचें या पैकीं कोणती तरी शिक्षा तुरुंगवासाऐवजीं देतात. १८ वर्षांवरील तरुण गुन्हेगारांकडे अलीकडे सरकारचें बरेच लक्ष वेधलें आहे. निर्ढावलेल्या तरुण गुन्हेगारांपासून या गुन्हेगारांना वेगळें ठेवलें पाहिजे असें वाटून बऱ्याच ठिकाणीं त्या दृष्टीनें प्रयत्न झाले आहेत. तरीही गुन्हेगारांसंबंधीं आपलीं कांहीं कर्तव्यें आहेत हें अजून पोलिसांच्या लक्षांत येत नाहीं. त्यामुळें जरूर त्या इष्ट सुधारणा अजूनही दृष्टीस पडत नाहींत.

रेफर्मेटरी स्कूल्सः— १८९९ सालापासून या शाळा शिक्षणखात्यातर्फे चालविण्यांत येतात. त्यांमधील मुलांना शक्य तों औद्योगिक शिक्षण मिळावें असा अधिकाऱ्यांचा कटाक्ष असतो. मुलें रेफर्मेटरी स्कूलमधून बाहेर पडल्यावर त्यांना नोकरी लावून देण्याचा प्रयत्न करणें, व शक्य तों त्यांच्या आयुष्यक्रमावर लक्ष ठेवणें एवढीं कामें अधिकारी वर्ग करितो.

हद्दपारीः— ही फार जुनी शिक्षा आहे. हिंदुस्थानांतून हद्दपार झालेल्या लोकांसाठीं पूर्वीं बरींच ठिकाणें असत. सध्यां पोर्टब्लेअर व अंदमान बेटें येथें हद्दपारीचे कैदी पाठवितात.

१९१९ चें चौकशी कमिशनः—हिंदुस्थानांतील तुरुंग व्यवस्थेची पाहणी करण्यासाठीं व पाश्चात्य कायदे व सुधारणा बघून इकडील तुरुंगांत कांहीं सुधारणा सुचविण्यासाठीं एका कमिटीची नेमणूक झाली होती. त्या कमिटीचा रिपोर्ट १९२२ त प्रसिद्ध झाला. सुचविलेल्या सुधारणांपैकीं कांहीं सुधारणा, पैशाच्या टंचाईमुळें, अजूनही अंमलांत आल्या नाहींत.

जंगल खातें

जंगलाचा विस्तार	३१ मार्च १९३१ अखेर
राखीव जंगल	१३,७१७ चौ.मैल
संरक्षित जंगल	१,१६० चौ. मैल
एकूण	१४,८७७ चौ.मैल

या वर्षी (१९३०–३१) गुन्ह्यांची संख्या २०२९४ होती. दरवर्षीपेक्षां ही संख्या कमी आहे. यावर्षी ठिकठिकाणीं मोठमोठाल्या सभा होऊन जंगलाचे कायदे तोडण्याबद्दलचा उपदेश काँग्रेसकडून लोकांना करण्यांत आल्यामुळें व याकडेच खात्याचें सर्व लक्ष वेधलें गेल्यामुळें जंगल खात्यांत नेमके गुन्हे किती झाले याचें टिपण ठेवतां आलें नाहीं. नाशिक, सातारा, बेळगांव व कानडा जिल्ह्याचा किनारा या भागांत चळवळ जास्त जोरांत होती. चिरनेर येथें चळवळीचें स्वरूप भयंकर होऊन गोळीबार झाला. त्यांत इतर लोकांबरोबर त्यांत पनवेलचे मामलेदारसाहेब व राउंड फॉरेस्ट ऑफिसर ठार झाले.

नवीन रस्ते बांधण्याचें एकंदर १०० मैलांचें काम चालू होतें. तसेंच जुन्या रस्त्यांवर दुरुस्ती करण्याचें एकंदर १४५२ मैलांचें काम चालू होतें. त्यानिमित्त अनुक्रमें १,३४,४६३ रु. व ९३,७५९ रु. इतका खर्च आला. जंगलांतल्या इमारतींप्रीत्यर्थ एकंदर ५३,६७३ रु. इतका खर्च आला. एम्. एस्. एम्. रेल्वे कंपनीस स्लीपर्स पुरविण्याचें तीन वर्षांचें कंत्राट सरकारी जंगलखात्यास मिळालें आहे.

सरकारी कुरणांत एकंदर २१,५१,००० गुरें या वर्षीं सोडण्यांत आलीं. त्यांपैकीं ६१४५०० फुकट सोडण्यांत आलीं. चराईचें एकंदर ११,७१,००० रु. उत्पन्न झालें.

१९३०–३१ हें वर्ष जंगल खात्यास आर्थिक दृष्ट्या असमाधानकारक गेलें. खात्याचा एकंदर वसूल ५२,२४,००० रु. झाला. या वर्षीं एकंदर ९,७८,००० रु. शिल्लक उरले. ही रक्कम इतर वर्षांच्या मानानें फार थोडी आहे. परंतु लाकडाच्या व्यापारांत मंदी असल्यामुळें नफ्यांत बरीच काट होणें स्वाभाविक होतें. परंतु नफा इतका कमी होण्याचें दुसरें कारण म्हणजे कायदेभंगाची चळवळ होय. या चळवळींत लिलांवाच्या वेळीं निरोधन चालू असे आणि त्यांत भाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांना बहिष्काराची धमकी देण्यांत येत असे. यामुळें कंत्राटदार लिलांवांत भाग घेण्यास नाखूष असत. अर्थातच नफ्याची रक्कम रोडावली.

जंगलांतील झाडें, लाकूड, सरपण, बांबू, गवत वगैरे जें लहानमोठें उत्पन्न तें विकत घेणारांनीं आपल्या खर्चानें जंगलांतून नेलें. इमारती लाकूड सरपण, चंदन वगैरे महत्त्वाच्या उत्पन्नांतून १९३०–३१ या वर्षीं १९,३८,००० रु. वसूल झाले व बांबू, कुरणी गवत, चराईत वगैरे लहान प्रमाणांतील उत्पन्नांतून ९,४०,००० रु. इतके मिळाले. त्याच्या मागच्या वर्षींचे हेच आंकडे अनुक्रम ३६,५७,००० रु. व १२,२८,००० रु. असे होते. कांहींना सवलत देण्यांत आली होती, अशांकडून ११,७१,००० रु. जमा झाले. त्याच्या मागच्या वर्षीं ही रक्कम ११,५७,००० रु. होती.

जंगलाचा विस्तार

इलाख्याच्या निरनिराळ्या भागांत किती जंगल आहे तें पुढील कोष्टकांवरून ध्यानांत येईल.

उत्तर भाग	३,८०३ चौ.मैल
मध्य भाग	५,३१२ चौ.मैल
दक्षिण भाग	४,६२४ चौ.मैल
सिंध	१,१३८ " "
एकूण	१४,८७७ चौ.मैल

कांहीं जंगल मुलूख जंगल खात्याच्या ताब्यांत आहे व कांहीं रेव्हेन्यू खात्याच्या ताब्यांत आहे

३१ मार्च १९३१ रोजीं (चौ.मैल)

	राखीव	संरक्षित	एकूण
जंगल खात्याकडे	१२,००३	५३०	१२,५३३
रेव्हेन्यूखात्याकडे	१,७१४	६३०	२,३४४
एकूण	१३,७१७	११६०	१४,८७७

व्यापारांतील चालू मंदी, बाजारचा उतरता भाव आणि कायदेभंगाची चळवळ यामुळें उत्तर, मध्य व दक्षिण विभागांतील झाडें तोडण्याचें काम बरेंच तुंबून राहिलें. दक्षिण विभागामध्यें हें काम

मजूर आणि रीतसर पैसे घेणारे कंत्राटदार न मिळाल्यामुळें राहून गेलें.

पुरेसा पैसा हातीं नसल्यामुळें फक्त महत्त्वाच्या रस्त्यांप्रीत्यर्थच डागडुजीचा वगैरे खर्च करण्यांत आला. व अगदीं जरूरीचेच तेवढे नवे रस्ते बांधण्यांत आले. दुरुस्तीसाठीं झालेला वर जो खर्च दिला आहे, त्यांत अलनवार–दांडेली रेल्वे चालविण्यासाठीं आलेला खर्चही धरला आहे. हा खर्च ४३,८३५ रु. आला. कानडा जिल्हयाच्या जिल्हा लोकल बोर्डास देण्यांत येणारी २५०० रु. ची जंगलबजेटांतून मिळणारी वार्षिक मदत बंद करण्यांत आली. ती मदत आतां "४१-सिव्हिल वर्क्स" मधून देण्यांत येते.

हातीं घेतलेल्या नव्या कामाप्रीत्यर्थ ३,३७५ रु. खर्च करण्यांत आले व दुरुस्तीपायीं ९५२२ रु. खर्ची पडले. त्याच्या मागच्या वर्षी हे आकडे अनुक्रमें ७,५०९ रु. व १२,८०४ रु. इतके होते.

विहिरी आणि तारांचीं कुंपणें यांसाठीं ७७९ रु. खर्च झाला. मागच्या वर्षी यासाठीं ४९४ रु. खर्ची पडले होते.

विभाग	वणवा हंगाम वर्ष	किती मुलूख वांचविण्याचा प्रयत्न केला	निष्फळ प्रयत्न	किती मुलुखाचें संरक्षण झालें	खर्च किती आला
		चौ. मै.		चौ. मै.	रु.
उत्तर	१९३०-३१	३३१८	१४३	३१७५	१९२७२
,,	१९२९-३०	३३१८	१३९	३१७९	१९६२५
मध्य	१९३०-३१	३८३०	३५१	३४७९	९३४६
,,	१९२९-३०	३८४२	३२२	३५२०	८९१६
दक्षिण	१९३०-३१	१५६७	६९	१४९५	७४७२
,,	१९२९-३०	१६०६	८९	१५१७	७३८७
सिंध	१९३०-३१	५००	४	४९६	२६१
,,	१९२९-३०	४९३	२	४९१	३४४

सुरत विभागांतील मांडवी रेंजच्या बाबतींत वणवा उद्‌भवूं न देण्याविषयीं गांवकऱ्यांना आगाऊ ताकीद दिली असतांही मोठा जोराचा वणवा लागला.

विजापूर आणि कानडा जिल्हयांतील किनारा याजवळील लहानलहान जंगलांत बरेच वणवे लागले.

वणव्यांची संख्या :		किती एकर मुलूख जळाला	
१९३०-३१	१९२९-३०	१९३०-३१	१९२९-३०
२१७९	२१२२	३५१०९३	३८७१८२

नैसर्गिक अपायांपासून संरक्षण –:–

वनस्पतींवर पडणारे रोग किंवा मध्येंच वाढणारे वेल वगैरे यांचा जंगल कंत्राटदार, दुय्यम अधिकारी व कांहीं ठिकाणीं मजूर यांजकडून बंदोवस्त करण्यांत आला.

वादळ, धुकें व पूर:– अक्षी व नागांव (कुलाबा) मध्यें झाडें वठल्यामुळें सुमारें दीड एकर लागवड धुवून गेली. सिंध सर्कलमध्यें या वर्षी पाण्याचा पूर मोठा आल्यामुळें लारखाना विभागामधील बाभळाच्या नुकत्याच लावलेल्या लागवडीचा विध्वंस झाला. शिकारपूर येथील पुन्हा वाढविलेल्या जंगल मुलुख चें धुक्यामळें बरेंच नुकसान झालें.

त्रासदायक प्राणी:– हत्ती, रानबैल, सांबर, माकडें, ससे, साळू, रानडुकरें व रानघुशी यांमुळेंही लागवडी व सागाचे सोट यांना फार उपद्रव होतो.

पंचमहाल विभागामधील शिवणाच्या लागवडीस चिकारा व चार शिंगांचीं काळवीटें यांमुळें फार उपद्रव झाल्याची बातमी आहे.

किडयांपासून उपद्रव:– कानडा, उत्तर भाग व दक्षिण भाग यांमध्यें सागाचीं पानें झडण्याचें प्रमाण बरेंच होतें. कानडा, दक्षिणविभागामध्यें रातकिडयांनीं बराच उपद्रव दिला. बाकी कोठें विशेष उपद्रव झाल्याचें कळलें नाहीं.

सिंधमधील पूर:– या वर्षी (१९३०–३१) वीस चौरस मैलांत पुरामुळें खळगे पडले.

सिंध सर्कलमध्यें १९३०–३१ या वर्षी पूर जास्त मोठा आला, त्यामुळें जरी नदीकाठचीं जंगलें पाण्यांत बुडालीं होतीं तरी आंतल्या जंगलांना पाण्यापासून फार फायदा झाला. पुरापूर्वी केलेली लागवड जलमय झाली, परंतु पुरानंतर केलेली लागवड फारच जोरांत फोंफावली. एकंदर ५,७१,५०० एकर जमीन पुरांत बुडाली होती. याच्या मागच्या वर्षी एकंदर ६,३०,६३७ एकर जमीन पुरांत बुडाली होती.

सबंध इलाख्यांत वर्किंग प्लॅन एरिआज खेरीज करून नवीन लावणी कामासाठीं एकंदर ८७४० रुपये खर्च करण्यांत आले. १०४५ कूपें मिळून १५७७४ एकरांची जंगलाची लागवड केली.

पुणें विभागातर्फे १२० खंडीं हिरडा गोळा करण्यांत आला. इतका हिरडा व गेल्या वर्षी शिल्लक राहिलेला हिरडा विकून एकंदर १०२१८ रु. आले.

१९३०–३१मध्यें गिऱ्हाइकांनीं नेलेला महत्त्वाचा माल

	१९२९–३०	१९३०–३१
इमारत लाकूड–		
हजारी घन फूट	४,७५२	३,८३३
किंमत	२९८४६०१, ,	१३,६०,७५७
जळण–		
हजारी घन फूट	३४,८३७	२८,७४६
किंमत	६,६९,५४७	५,७४,९१०
चंदनाची किंमत रु.	२,७९७	२,६१५

१९३०–३१ व १९२९–३० या वर्षांत गिऱ्हाइकांनीं नेलेला सामान्य स्वरूपाचा माल:–

	१९२९–३०	१९३०–३१
बांबू किंमत	१,६७,३४९	१,४०,७७४
गवत व चराईत किं.	८,४९,३८६	६,४६,८८४
इतर किरकोळ माल	२,११,५४४	१,५२,६००
एकंदर किंमत	१२,२८,२७९	९,४०,२५८

इमारती लाकूड व जळण यांची पैदास व त्यांच्या उतरलेल्या किंमती यास सध्यांची, इमारतीच्या लाकडाची बाजारांतील खालावलेली स्थितीच जबाबदार आहे. उत्तर व मध्य विभागांत मात्र इमारतीच्या लाकडास व जळणास कायदेभंगाची चळवळही भोंवली आहे. गवत आणि चराई यांच्या उत्पन्नांत तूट येण्याचें कारण कायदेभंगाची चळवळ हेंच होय.

जंगलापासून कोणत्याही तऱ्हेनें उत्पन्न झालेला कमी अधिक स्वरूपाचा माल:–

जास्त महत्त्वाचा माल

वर्ष	इमारती लाकूड घ. फू.	जळण घ. फू.	चंदन रु.
१९३०–३१	५,८८६	३८,१३८	१,०३,६१७
१९२९–३०	६,६०५	४५,२८५	१,७५,२०१

कमी महत्त्वाचा माल

वर्ष	बांबू	गव.व चराई	इतर माल
१९३०-३१	१९२७१९	१४४५१९०	२०६३७५
१९२९-३०	२१८१६९	१६३७३५७	२६६९१७

या वर्षीं गुरचराई ४,९२,९६२ रु. मिळाली. १९२९–३० सालीं ५,७१,६८१ रु. मिळाली होती.

सरकारी जंगलांच्या व्यवस्थेसाठीं झालेला खर्च:

	१९३०–३१	१९२९–३०
उत्तर भाग	३,६७,२२६	४९६,९९३
मध्य विभाग	१,००,०३७	१,१६,७६२
दक्षिण विभाग	११,४५,९५५	११,५८,२२७
सिंध	३५,५००	६०,९६२
एकूण रु.	१६,४८,७१८	१८,३२,९७४

हा खर्च कमी होण्याचें कारण सर्व भागामध्यें वाहतूक, इमारती, आणि खात्यांतील इतर कामें यांस खर्च कमी आला हें होय.

इलाख्यांत जंगल खात्यानें चालविलेल्या, इमारतीचें लाकूड कापण्याच्या. पांच गिरण्या आहेत. या सर्व गिरण्यांचा एकंदर खर्च व एकंदर उत्पन्न पाहतां १९३०–३१ या वर्षीं या गिरण्यांपासून १,१३,३७४ रु. निवळ नफा झाला. १९२९–३० सालीं या गिरण्यांपासून २,०४,९४२ रु. फायदा झाला होता.

कोइमतूर येथें मद्रास फॉरेस्ट कॉलेज आहे. त्यांतून पांच रेंजर विद्यार्थ्यांनीं शिक्षण संपविलें. व त्यांनीं आतां नोकरी धरली आहे. १९३१–३३ च्या अभ्यासक्रमासाठीं म्हणून या वर्षीं (१९३०–३१) आणखी पांच विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली. यंदां काटकसरीचें धोरण म्हणून उत्तरभागामध्यें जंगल खात्याचें शिक्षण देणारा वर्ग भरविण्यांत आला नाहीं.

कूपांची विक्री न झाल्यामुळें आणि ज्यांची विक्री झाली त्यांना कमी किंमत आल्यामुळें उत्पन्नांत आलेली तूट एकटया ठाणें जिल्ह्यांतच ९,५०,००० असावी.

जंगलांचा नाश होऊं नये अशाबद्दलचे प्रयत्न प्रथम सव्वा शतकापूर्वीं सुरू झाले. लागवड करून सागाचें जंगल वाढविण्याचे चिकाटीचे प्रयत्न कोनोली नांवाच्या एका मुलकी अधिकाऱ्यानें मद्रास इलाख्यांत सुमारें एक शतकापूर्वीं केले. परंतु हिंदुस्थान व ब्रम्हदेश येथील उपयुक्त व मौल्यवान जंगलांचें संरक्षण करण्याचे हेतूनें कांहीं एक विशिष्ट धोरण आंखण्याचें काम १८५६त लॉर्ड डलहौसीनें केलें. आणि अशा जंगलांचा पुरा नाश होण्याऐवजीं त्यांपैकीं बऱ्याच जंगलांचें चांगलें संरक्षण होत आहे याचें श्रेय लॉर्ड डलहौसी यांसच आहे.

विस्तार

सरकारी जंगलाचें क्षेत्रफळ अदमासें २,४०,००० चौरस मैल म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानच्या सरासरीनें एक चतुर्थांश आहे. एवढा जंगल प्रदेश जो पसरला आहे त्यांत नियमितपणा किंवा व्यवस्थितपणा मुळींच नाहीं. त्यामुळें जेथें जंगल दाट आहे

अशा ठिकाणीं उपयुक्त आणि मौल्यवान लाकूड बाजारांत पुष्कळ माफक पडतें; आणि जेथें जंगल नाहीं त्या ठिकाणीं अगदीं सामान्य लाकडालाही भलतीच मोठी किंमत मोजावी लागते.

सरकारी जंगलांपैकीं सर्वांत मोठीं व सर्वांत उपयुक्त अशीं जंगलें ब्रह्मदेशांत आहेत. शिवाय ब्रह्मदेशभर जंगलच पसरलें आहे.

खुद्द हिंदुस्थानांत, हिमालयाच्या व हिमालया-जवळच्या डोंगरांच्या लगत जंगलांचे अखंड पट्टे आहेत.हे पट्टे वायव्येस काश्मीरच्या सरहद्दीपासून पसरत जाऊन, पंजाब, व संयुक्त प्रांतामधून नेपाळच्या सीमेवर गोरखपूरपर्यंत येऊन पोहोचले आहेत. जंगलांचा हा पट्टा नेपाळच्या हद्दींतून पुन्हां दार्जिलिंगजवळ ब्रिटिश हद्दींत शिरतो. अशा रीतीनें जंगलांच्या पट्टयांची ही एक साखळीच बनली आहे. ही साखळी पूर्व बंगालच्या अगदीं आग्नेय टोंकापर्यंत लखीमपूर विभागांत पोचली असून दक्षिणेकडे चितागांगच्या सीमेपर्यंत भिडली आहे.

हिमालयानजीकच्या जंगलपट्टयाच्या दक्षिणेस सिंधूनदाच्या कांठचीं, मुलतानजवळचीं व सिंध-मधील कांहीं जंगलें सोडलीं तर राजपुताना,उत्तर गुजराथ, मध्यप्रांत--एजन्सींतील पुष्कळसा मुलूख आणि गंगा नदीच्या खोऱ्यांतील लागवडीस लाव-लेला मुलूख या ठिकाणीं नांव घेण्याजोगीं मोटीं जंगलें नाहींत.

चितागांग किनाऱ्यावर उत्तरेकडे गारो व खाशिया डोंगरांतून व पूर्वेकडील आराकान प्रांतांत मोठमोटचा जंगलांची एक मालिकाच आहे.

जंगलांच्या मध्यवर्ति क्षेत्राला पश्चिमेकडील सुरतेपासून सुरवात होते; तें वाढत जाऊन सात-पुडा व मध्यप्रांतांतून सुंदरबनापर्यंत जाऊन पोंचलेलें आहे.

पश्चिम किनाऱ्यावरील जंगलांना ठाणें जिल्ह्या-पासून सुरुवात होते. तीं दक्षिणेकडे कानडा, मल-बार, निलगिरी व अन्नामलाई या प्रांतांतून थेट हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकापर्यंत पसरलीं आहेत.

पूर्व किनाऱ्यावर गंजम व विजगापट्टम हे जिल्हे, कुर्नूल, नेलोर, सालेम व दक्षिण मद्रास या भागांत जंगलें आहेत.

सन १९०८–०९ सालांतील जंगलांचें क्षेत्रफळ.

प्रांत अगर इलाखा	राखीव जंगलाचें क्षेत्रफळ	संरक्षित,अवर्गित व मुदतीच्या जंगलाचें क्षेत्रफळ	शेरा
	चौ. मैल	चौ. मैल	
बंगाल	४२४०	३३९२	
पूर्वबंगाल व आसाम	६५५६	(अ) २२६९५	(अ) अवर्गित (Unclassed) जंगलें
संयुक्त प्रांत	३९३४	(ब) ९२२४	(ब) ४२ चौरस मैल अवर्गित. १५७ चौरस मैल मुदतीचीं व बाकीचीं संरक्षित जंगलें.
पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत	२१७०	(क) २२११	(क) १७२२ चौरस मैल अवर्गित, ३६९ चौ. मैल मुदतीचीं आणि बाकीचीं संरक्षित जंगलें.
मध्यप्रांत	(ड) २२००१		(ड) यांपैकीं थोडा भाग संरक्षित जंगलांचा आहे.
मद्रास	१८५४९	(ई) १०५८	(ई) राखीव जमिनी.
मुंबई व सिंध	१३७६३	(फ) १३३७	(फ) इतर खात्यांच्या व्यवस्थेखालील संरक्षित जमिनी अथवा क्षेत्र.
अंदमानबेटें व ब्रम्हदेश	(ग) २३०१७	(ह) १०९३९२	(ग) १५९ चौ. मैल राखीव जंगले अंदमानांत आहेत. (ह) १७९४ चौ. मैल. अवर्गित जंगलें अंदमानांत आहेत.
एकूण	९४२३०	१४९३०९	
महासंख्या	२४३५३९ चौ. मैल.		

कांहीं संस्थानांनींही जंगलखात्यांत बरेंच लक्ष घातलें आहे. संस्थानांच्या ताब्यांतील ठळक-ठळक जंगल मुलूख खालीं दिला आहे.

संस्थान किंवा पोलिटिकल एजन्सी	राखीवजंगल चौ. मै.	संर. जं. शेरे. चौ. मै.
म्हैसूर	२३६६	६६७ रा.जमी.
कूर्ग	४७६	३०
बलुचिस्थान	२८२	४९६ अवर्गित
काश्मीर	२८१३	११८६
त्रावणकोर (१९०५–६)	२२६६	
हैद्राबाद	४८७८	३२९३

जंगलाचे प्रकार

सामान्य माहिती: हवामान, समुद्रसपाटीपासून उंची, ज्यावर जंगल पसरलेलें आहे तो विस्तीर्ण प्रदेश इत्यादींत आढळून येणाऱ्या बदलांमुळें जंगलांचे वेगवेगळे प्रकार आढळतात. जंगलाच्या दोन वेगवेगळ्या प्रकारांनीं अचूक मर्यादा दाखवितां येणार नाहीं. कारण एका प्रकाराचें हळूंहळूं दुसऱ्यांत रूपांतर होतें. उदाहरणार्थ देवदाराच्या जंगलाचें हळू हळू सिल्व्हर फर अँड स्प्रूस च्या जंगलांत रूपांतर होतें; आणि इतर ठिकाणीं Dry deciduous ची हळूंहळूं दलदलींची जंगलें व त्यानंतर त्याचीं हिरवींगार जंगलें बनतात. म्हणून अगदीं स्वतंत्र प्रकार असलेल्या जंगल पट्ट्याची रूपरेषा अगदीं स्थूलरूपानेंच देतां येणें शक्य आहे. समुद्रसपाटीपासून उंची , कमी अधिक पाऊसपाणी, भूगर्भ, घटना यांत बदल झाल्यानें पुष्कळदां दोन स्वतंत्र जंगलप्रकार अगदीं एकाच कक्षेंत येतात.

देवदाराचीं जंगलें–पंजाबव संयुक्त प्रांत यांतील हिमालयाच्या वायव्य भागांत अत्यंत उपयुक्त अशीं कोनिफर फॉरेस्ट आहेत. या प्रकारच्या जंगलांतील मुख्य तऱ्हा म्हणजे 'देवदार होय'. आगगाडी साठीं स्लिपर्सही या 'देवदार' लाकडाचे करतात. याशिवाय सिल्व्हर फर, पेन्सिल सेदार, पाईन, ओकाचे कित्येक प्रकार, वॉलनट, बर्च, पॉपलर वगैरे इमारती लाकडाचीं झाडेंही येथें आढळतात.

वर सांगितलेल्या ठिकाणाच्या पूर्वेस व वरच्या जंगलपटचास जवळ जवळ जोडूनच हिमालयाच्या पूर्वभागांतील जंगलें आहेत. या जंगलांत अगदीं वेगळ्या प्रकारच्या वनस्पति आहेत. हीं जंगलें नेपाळमधून व पूर्वबंगाल व आसामांतील खाशिया व गॅरोहिल्स मधून गेलीं आहेत. या जंगल मुलूखांत देवदार मुळींच नाहीं. हिमालयाच्या वरच्या उतरणीवर मात्र सिल्व्हर फर,यू, ओक व चेस्टनट वृक्ष आहेत. यामुळें हीं जंगलें हिमालयाच्या पश्चिम भागाकडील जंगलासारखीं वाटतात.

शिसवी व खैराची जंगलें

हिमालयाच्या खालच्या उतरणीवरचीं जंगलें रुंद पानांच्या झाडांचीं व कांहीं ठिकाणीं वेतांच्या बेटाचीं आहेत. जास्त कोरडचा जागीं व पाण्याच्या प्रवाहाच्या काठानें शिसवी व खैर हीं झाडें आढळतात. आणि आसामांतील दरीच्या वरच्या बाजूस हिरवेंगार जंगल आहे. त्यांत अनेक तऱ्हा सांपडतात. येथून खालीं दक्षिणेकडे काचरदरीकडे व तेथून चितागांग, ल्युशाय हिल्स व आणखो खालीं आराकान योमांकडे गेल्यास ठिकठिकाणी जंगलाचा वेगवेगळा प्रकार दृष्टीस पडतो. यापैकीं नदीच्या काठाकाठानें अनेक मोठालीं झाडें असून इतर अमीअधिक महत्त्वाच्या प्रकारचीं झाडें आहेत.

आसाम व आराकान येथील हिरवींगार जंगलें–

चितागांगच्या टेकडयांवर जंगलाच्या वाढीची उंची फारशी मोठी नाहीं. येथें बांबूचें पीक फार मोठें आहे. खाशा डोंगरावरील जंगलें हें खाशा पाइन्सचें माहेरघर आहे. शिवाय ओक झाडाच्याही अनेक जाती आहेत. आराकानमधील कित्येक जंगलांत फक्त बांबूचींच झाडें आहेत.

'साल' झाडाचीं जंगलें:––हिमालयांतील कोनिफर फॉरेस्टच्या दक्षिणेस व जास्त उंचीच्या टेकडयांच्या पायथ्याशीं उत्तर हिंदुस्थानांतील 'साल' झाडाचीं जंगलें आहेत.

हिंदुस्थानांतील आगगाड्यासाठीं जे स्लीपर्स वापरतात त्यासाठीं या जंगलांतील व मध्यप्रांतांतील 'साल' झाडाच्या जंगलपट्टींतील साल वापरण्यांत येते. 'साल'झाडाच्या मिश्रणानें झाडाचे इतर प्रकार अनेक उद्भवतात. खालच्या टेकडयावरील जंगलांतून चीरपाइन, कोरडचा प्रवाहाच्या काठानें शिसवा, इतर ठिकाणीं टून, खैर, आलबिझा, सेन व इतर अनेक प्रकारचीं लहानमोठीं झाडेंही आढळतात.

बाभळाचीं झाडें:––पंजाब, राजपुताना, सिंधमधील कोरडचा भागांतून कांहीं ठराविक जातीचीं जंगलें आहेत. हीं जंगलें पश्चिम मध्यहिंदुस्थान व काठेवाडपर्यंत पसरत आलीं आहेत. या जंगलांतील झाडें फार उंचीचीं नाहींत. लाकूड साधारण प्रतीचें असलें तरी बरेंच

उपयोगी आहे. विशेषतः सिंधू नदीच्या काठाकाठानें वाढणारीं बाभुळाचीं झाडें बरींच उंच वाढतात. हीं झाडें पाणीपुरवठा न झालेल्या जमिनींत व तळ्याचे कांठीं उगवतात. इतर महत्त्वाचीं झाडें म्हटलीं म्हणजे खैर, बाहन, कपारी आणि तामरिक्स स्पेसीज् हीं होत.

कोरड्या पट्ट्यांतील जंगलें

हीं जंगलें पुढील ठिकाणीं सांपडतातः—यमुना नदीच्या दक्षिणेस, तेथून गुजराथमधून पसरत पसरत पश्चिमेच्या बाजूस व पूर्वेस ओरिसा प्रांताकडे व दक्षिणेस मध्यप्रांतांतून, खानदेशांतील सातपुड्यांतून, दख्खनमधून ते थेट कर्नाटकापर्यंत हीं जंगलें पसरलींआहेत. या जंगलांतील झाडांच्या मुख्य जाती म्हणजे पश्चिम, मध्यभाग आणि मध्यभागालगतची दक्षिण बाजू यांत साग, जंगलाच्या मध्यभागीं व पूर्वभागीं साल झाडें व अगदीं दक्षिण टोकाला चंदनाचीं झाडें या होत. यांत साग व साल हीं झाडें जवळ जवळ कधींच आढळत नाहींत. याखेरीज इतर महत्त्वाचीं जीं झाडें आढळतात त्यांचीं नांवें:—ऐन,अंजन,कोसम,ब्लॅकवूड, रेड सँडर्स सेमूल वगैरे,

या झाडांच्या लाकडांचा उपयोग बहुतेक त्या भागांतील लोकांसच होतो.

पश्चिम घाटांतील जंगलें:—

कोरड्या पट्टीच्या पश्चिमेस सुरत डॉंगकडे पसरत पसरत ठाणें जिल्ह्यांतून पश्चिम घाटांतून, कुलाबा, कर्नाटक, मलबार, निलगिरी, अन्नमलई ते त्रावणकोरपर्यंत कोरडीं व सतत हिरवीं अशीं दोन्ही प्रकारचीं जंगलें आढळतात. या भागाच्या उत्तरेस आणि घाटाच्या वरवरच्या उतरणीवर जीं जंगलें आहेत तीं मध्यप्रांताच्या व दख्खनच्या जंगलासारखीच आहे. फक्त साग जास्त मोठ्या आकाराचा आहे. सागाखेरीज दुसरें महत्त्वाचें झाड ब्लॅक वूड हें आहे. येथील ब्लॅक वुड हें हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि भागांतील ब्लॅकवूड पेक्षां जास्त मोठ्या आकाराचें आहे.

घाटाच्या खालच्या उतरणीवर पश्चिम घाटावरील नद्यांच्या खोऱ्यांत द दलीची जंगलेंही आढळतात. मोहटीं, नाणी, जांब हीं झाडें त्यांत प्रामुख्यानें आढळतात. यांत मधूनमधून लांब बांबूंचे गटही उगवलेले दिसतात.

मलबारचीं हिरवींगार जंगलें:—

त्याच्याहि खालच्या उतरणीवर अतिशय दलदलीच्या प्रदेशांत घाटांच्या पायथ्याजवळील रॅव्हिन्सवर दाट हिरवींगार जंगलें आहेत. येथील झाडांचीं खोडें सरळ असून झाडें पुष्कळच उंच आहेत. आंबे इत्यादि झाडें या जंगलांतून आढळतात. निलगिरीच्या व अन्नमलईच्या टोकाच्या दिशेनें हिरवींगार जंगलें पसरलीं आहेत. परंतु तीं एका विशिष्ट प्रकारचीं आहेत. त्यांना तेथें शोलाज असें म्हणतात. ह्या जंगलांत लॉरेल्स, वगरे झाडें आढळतात. शिवाय कांहीं झुडपेंही आहेत.

ब्रम्हदेशांतील सागाचीं जंगलें:—

ब्रम्हदेशांत अनेक प्रकारचीं जंगलें आहेत. त्यांपैकीं तेनासेरीम, पेगूयोमाज, मार्तबान टेकड्या या प्रदेशांतील व आराकान योमाच्या पूर्व उतरणीवरील सागाचीं जंगलें सर्वांत मौल्यवान आहेत. याच वर्गांत आयर्नवुड झाडाचीं जंगलें मोडतात. यापासून उत्तम इमारती लाकूड व स्लीपर्स तयार होतात. दक्षिण हिंदुस्थानांतील या जातीच्या लाकडापेक्षां ब्रम्हदेशांतील लांकूड जास्त चांगलें असतें. याशिवाय जंगलांतून बांबूहि पुष्कळ प्रमाणांत आढळतात. तसेंच इंग झाडाचीं जंगलेंहि बरींच असून यापासून इमारती लाकूड मिळतें.

ब्रम्हदेशांतील कोरड्या प्रदेशांत खैराचीं जंगलें आहेत. या खैरापासून कात तयार होतो.

उत्तर ब्रम्हदेशांत बरींच जंगलें आहेत. पण तीं विशेष महत्त्वाचीं नाहींत.

अंदमान बेटांतील जंगलें:—

अंदमानांत ज्या एका विशिष्ट जातीचीं जंगलें आहेत ती जात दुसरीकडे कोठेंहि आढळत नाहीं. या जातीपैकीं अंदमान पॅडॉक व झेब्रा वूडचीं जंगलें महत्त्वाचीं होत.

इरावतीच्या मुखाजवळील जंगलांना टाईडल जंगलें म्हणतात. या जंगलांत मुख्यतः मॅनग्रोव्हज, सुंदरी हीं झाडें असून त्यापासून उत्तम इमारती लाकूड मिळतें.

इमारती लाकूड, सरपण व इतर किरकोळ पदार्थ :—सरकारी जंगलांतून स. १९०७–०८ सालीं २३४९८२१२३ घनफूट अथवा सुमारें ४६९९६४२ टन इमारती लांकूड व सरपण मिळालें यापैकीं ६५३६५५५५ घनफूट इमारती लांकूड व १६९६१६५६८ घनफूट सरपण होतें. त्याचप्रमाणें १९३४२७०२३ बांबू गोळा करण्यांत आले. त्यांपैकीं ५·२ कोटी बांबू हक्कदारांनीं मोफत नेले.

पंधरा दशलक्ष गुरांना जंगलांत चरण्याची परवानगी देण्यांत आली. यांपैकीं ४ दशलक्ष गुरांना मोफत व २॥ दशलक्ष गुरांना हक्काच्या दरानें परवानगी देण्यांत आली.

एकूण उत्पन्न २५८६२९७९ रु. आणि खर्च १४५,१२९३३ रु झाला. निव्वळ नफा ११३५,–००४६ रु झाला. सन १८८७–८८ सालीं हाच नफा ४१९९९२२ रु. होता.

निरनिराळ्या एजन्सींनीं नेलेल्या इतर किरकोळ पदार्थांची किंमत ७१३९२४१ रु. झाली.

जंगलांतील उत्पन्नाच्या मुख्य बाबीः–

या सदराखालीं इमारती लाकडाचे व जळाऊ लांकडाचे सर्व प्रकार येतात. लोकांना इमारती लांकडाचे जे प्रकार सामान्यतः ठाऊक असतात त्यांपेक्षां असंख्य प्रकार जंगलांत आढळतात.उदाहरणार्थ झाडांच्या जाती २५०० असून वेलींसारखीं रांगतीं झाडें व झुडपें यांच्याहि जाती जवळजवळ तितक्याच आहेत. यांपैकीं फारच थोडया जातींपासून मौल्यवान इमारती लांकूड मिळतें. दुसऱ्या जाती या नाहीं त्या कामाकरितां उपयोगी पडतात. कांहीं जातीपासून उत्तम जळाऊ लांकूड तर कांहींपासून इतर पदार्थ तयार होतात. जसें– कात, आगरतेल,राळ,कातडीं कमाविण्याच्या कामीं उपयोगीं पडणारीं फळें, ज्यापासून रंग तयार करतां येतो अशीं फुलें, तंतु, लाखेचे कीटक व रेशमाचे किडे यांचें भक्ष्य वगैरे.

उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबीः—

उत्पन्नाच्या विविध बाबींपैकीं साग ही एक निःसंशय महत्त्वाची बाब आहे. बाकीच्या इमारती लांकडाची वर्गवारी लावणे जरा कठीण आहे. परंतु साल, चंदन, सिसू, ब्लॅकवुड, देवदार, सुंदरी, अंदमान व बर्मा पॅडॉक, इन् अथवा इंग, आयर्नवुड, रेडसँडर्स, खैर व बाभूळ या जाती पहिल्या वर्गांत मोडतात.

सरकारी जंगलांतून जें विपुल इमारती लांकूड व सरपण दरवर्षीं मिळतें त्याची कल्पना येण्याकरितां सन १९०८–०९ सालचे आंकडे पहा. या सालीं इमारती लांकूड व जळाऊ लांकूड २२६४७०००० घन फूट अथवा४५२९०००टन निघालें. यांपैकीं २५०००० ते ३५०००० टन फक्त सागाचें इमारती लांकूड होतें.

मुम्बई इलाख्यांतील निरनिराळ्या तीन विभागांत होणारी जंगलाची वांटणी दाखविणारें पत्रक

विभाग	जंगल खात्याच्या ताब्यांतील राखीव जंगल			जंगल खात्याच्या ताब्यांतील संरक्षित जंगल		जमाबंदी खात्याच्या ताब्यांतील राखीव जंगल			जमाबंदी खात्याच्या ताब्यांतील संरक्षित जंगल	
	प्रत्यक्ष जंगल.	राखीव कुरण.	राखीव जळण व वैरण	प्रत्यक्ष जंगल.	राखीव कुरण.	प्रत्यक्ष जंगल.	राखीव कुरण.	राखीव वैरण व जळण	राखीव कुरण.	जंगलाचें एकूण क्षेत्रफळ
	चौ.मैल.	चौ.मैल.	चौ.मैल	चौ.मैल	चौ.मैल	चौ.मैल	चौ.मैल	चौ.मैल	चौ.मैल	चौ.मैल
उत्तर विभाग.	२९१२		५	३३८			७२	३१	४७५	३८३३
मध्यविभाग.	३६१६		१३५	१२			१५४८	६	७२	५३८९
दक्षिण विभाग.	३४१६	७३६	१०१		७६	१५		१६१	११२	४६१७
एकूण–	९९४४	७३६	२४१	३५०	७६	१५	१६२०	१९८	६५९	१३८३९

जंगलखातें

भाग	वर्ष	वसूल रु०	संरक्षण, संवर्धन व नवीन लागवड	कॅपिटल औटले	खर्च रुपये कचेरी	एकूण	नफा अगर तोटा	एकंदर वसुलाचे नफ्यांशीं शेंकडा प्रमाण
उत्तर भाग	१९३०–३१	१३९१५१३	२९७६२४	९९१४१	७२५३६१	११२२१२६	२०६९३८७	१९.४
	१९२९–३०	२८०२५५२	३६३५७५	१४६४२२	७०४६४९	१२१४६४६	१५८७९०६	५६.७
	सरासरी	२६५५१७७	४००००९	१२४९६३	६७६८३५	१२०१८०७	१४५३३७	५४.७
मध्यभाग	१९३०–३१	८९१३२०	८८६०३	२०९३६	५९७१७४	७०६७१३	१८४६०७	२०.७
	१९२९–३०	१२६०४९३	९६३०४	३५६६४	५८९१७०	७२११३८	५३९३५५	४२.३
	सरासरी	१२४५३०४	१०५७१८	२९७७५	५८२१५०	७१७६४३	५२७६६१	४२.३
दक्षिणभाग	१९३०–३१	२३७२८०५	११०००१९	४६०१६	६४४९६०	१७९०९९५	५८१८१०	२४.५
	१९२९–३०	३२९८५९८	११०७१३२	५११८०	६१८८०३	१७७७११५	१५२१४८३	४६.१
	सरासरी	२९६३७७६	१०५०५२७	६२१०९	६२२४४१	१७३५०७७	१२२८६९९	४१.५
सिंध	१९३०–३१	५६७५१९	२७९२०	७५८०	३२११५२	३५६६५२	२१०८६७	३७.२
	१९२९–३०	६१११६५	५७२१९	३८३३	३०५२५५	३६६३०७	२४४८५८	४०.१
	सरासरी	६९७५९५	८७४०९	४२७४	२९५००९	३८६६९२	३१०९०३	४४.५
जनरल डिरेक्शन	१९३०–३१	८	१०७७४२		८३२९९	१९१०४१	–१९१०३३	
	१९२९–३०	१९	९५७७९	११	७७८६५	१७३६५५	–१७३६३६	
	सरासरी	२१	४५२६६	१२६	९७३९४	१४२७८६	–१४२७६५	
फॉरेस्ट एंजिनिअरिंग	१९३०–३१	३३५	२६५१०	२१९७	४८८४१	७७५४८	–७७२१३	
	१९२९–३०	६१२	२५२६५	–१५०९०	४७२५८	५७४३३	–५६८२१	
	सरासरी	१८८४	४३३०८	२९७६	६३६२८	१०९९१२	–१०८०२८	
इलाखा (एकूण)	१९३०–३१	५२२३५००	१६४८४१८	१७५८७०	२४२०७८७	४२४५०७५	९७८४२५	१८.७
	१९२९–३०	७९७३४३९	१७४५२७४	२२२०२०	२३४३०००	४३१०२९४	३६६३१४५	४६.९
	सरासरी	७५६३७५७	१७३२२३७	२२४२२३	२३३७४५७	४२९३९१७	३२६९८४०	४३.२
दोहोंतील अंतर	१९३०–३१ १९२९–३०	–२७४९९३९	–९६८५६	–४६१५०	+७७७८७	–६५२१९	–२६८४७२०	....

वसुलाचें व खर्चाचें पृथक्करण

क्लास	जनरल डायरेक्शन व डिव्हि.फॉरेस्ट,एंजि.		उतर–भाग		मध्यभाग		दक्षिण–भाग		सिंध		एकूण	
वसूल	रु.	शें. प्र.	रु.	शें. प्र.	रु.	शें प्र	रु.	शें. प्र.	रु.	शें.प्र.	रु.	शें.प्र.
मुख्य उत्पन्न			११११५०८	८०	२७१२२९	३०	२०८०६५४	८८	३८१३५९	६७	३८४४७५०	७३
किरकोळ	३४३	१००	८०७७३	६	१५६८५१	१८	८८४६६	४	१२९२४५	२३	४५५६७८	९
तर उत्पन्न			२०१०९३	१४	४७८४४८	५४	२०४९३३	८	५९३४४	१०	९४३८१८	१८
रीफंडस			−१८६१		−१५२०८	−२	−१२४८		−२४२९		−२०७४६	
एकूण	३४३		१३९१५१३		८९१३२०		२३७२८०५		५६७५१९		५२२३५००	
खर्च:—												
वाढ			१२३०						७८		१३०८	
सुधारणा	१५१०	१	१८७४६५	४७	५०१८१	४६	१६७७५७	१५	१८६३४	९२	४२५५४७	२३
इतर कामें	२७१६५	२०	१९५०४५	४९	४४७४२	४१	९६८४९०	८४	११८८९	३४	१२४६८९०	६८
किरकोळ	१९९		१३०२५	४	१४६१६	१३	१०२२९	१	४८९९	१४	४२९६८	३
व्याज	१०७५७५	७९									१०७५७५	६
एकूण	१३६४४९		३९६७६५		१०९५३९		११४६०३५		३५५००		१८२४२८८	
कचेरी—												
व्यवस्था	६७६५२	५१	३९८९८	५	४२५८३	७	५०४४८	८	५४९४१	१७	२५५५२२	१०
अंमल	४८८४१	३७	२०९३७५	२९	१७०४९६	२९	२१३४३४	३३	१२५६९६	३९	७६८१४२	३२
संरक्षण	१५६४७	१२	४७६०८८	६६	३८३७९५	६४	३८१०७८	५१	१४०५१५	४४	१३९७१२३	५८
एकूण	१३२१४०		७२५३६१		५९७१७४		६४४९६०		३२११५२		२४२०७८७	

खर्चांच्या मुख्य बाबीचें पृथक्करण व तुलना

खर्चाच्या बाबी	जनरल डिरेक्शन	फॉरेस्ट इंजिनिय.	उत्तर-भाग	मध्यभाग	दक्षिण-भाग	सिंध	एकूण १९३०-३१	एकूण १९२९-३०	नफा अगर तूट
खर्च	रु.	रु.	रु.	रु	रु.	रु.	रु.	रु.	रु.
संरक्षण, संवर्धन, नवीन लागवड									
(१) इमारती लाकूड सरकारी		९८२२	१२२६३८	१६३४०	९५२५७१	९९५७	१११८३२८	११७८२३३-	−५९९०५
(२) इमारती लाकूड खाजगी			३६६३५	१५२६८	४९६२	८२७	५७६९२	५७७९७	−१०५
(३) संवर्धन दुरुस्ती		१९४३७	१३४७५९	३४०१४	१२२३२५	१४९२०	३२५४५५	४०२०७८	−७६६२३
(४) संरक्षण, नवीन लागवड.			५८७३४	१९८००	५५९४०	४८९७	१३९३७१	१३४८५६	+४५१५
(५) किरकोळ	१६७	−५५२	३६९९९	२४११७	१०२३७	४८९९	७५८६७	९८७७७	−२२९१०
व्याज	१०७५७५						१०७५७५	९५५५३	+१२०२२
एकूण	१०७७४२	२८७०७	३९६७६५	१०९५३९	११४६०३५	३५५००	१८२४२८८	१९६७२९४	−१४३००६
कचेरी									
(१) नोकरांचा पगार	३६६८०	१३८२६	१३७२२३	१०२८३३	११९३१९	८२००९	४९१९७०	४६०११५	+३१८५५
(२) कचेरी खर्च	१२०८४	२१६८५	४५७८४४	३९११२१	४१४४७७	१६६३४०	१४६३५५१	१४३८३०५	+२५२४६
(३) अलावन्सेस	२४२८०	१०३८५	१०८३२३	८९६८९	९३८७३	५४८२६	३८१३७६	३६१८००	+१९५७६
(४) आगांतुक	२००४	२९४५	२१९७१	१५०३१	१७२११	१७९७७	७७१३९	७८१५०	−१०११
(५) कचेरी (व. सरकार)	६८५०						६८५०	५६००	+१२५०
(६) येणे वसूल				−१५००			१५००	−१९६९	+४६९

(७) तूट (हुंडणा०)	१४०१						१४०१	९९९	+४०२
एकूण	८३२९९	४८८४१	७२५३६१	५९७१७४	६४४९६०	३२११५२	२४२०७८७	२३४३०००	+७७७८७
महासंख्या	१९१०४१	७७५४८	११२२१२६	७०६७१३	१७९०९९५	३५६६५२	४२४५०७५	४३१०२९४	−६५२१९
नफा १९३०–३१	−१९१०३३	−७७२१३	+२६९३८७	+१८४६०७	+१५८१८१०	+२१०८६९	+९७८४२५		
नफा १९२९–३०	−१७३६३६	−५६८२१	+१५८७९०६	+५३९३५५	+१५२१४८३	+२४४८५८		+३६६३१४५	
अंतर	−१७३९७	−२०३९२	−१३१८५१९	−३५४७४८	−९३९६७३	−३३९९१			−२६८४७२०
वसुलाच्या बाबी व प्रकार									
इमारती लाकूड			१०८७८४५	१६७४६७	१७६९१८९	६२८७४	३०८७३७५	५३१६४५२	−२२२९०७७
जळण			२३४२६	१०११४७	१८६५८३	३१८४८४	६२९६४०	७९२५६७	−१६२९२७
बांबू			५५६८९	१४००३	७११२२		१४०८१४	१६७६२२	−२६८०८
चंदन			२३७	२६१५	१२४८८२		१२७७३४	१४९५७१	−२१८३७
चारा व गवत			११२९०६	४१२०५६	८१५७७	४११३२	६४७६७१	८४२८८९	−१९५२१८
इतर			३२४९८	५२३८९	५२२३५	१८२१२	१५५३३४	२२७१०८	−७१७७४
अचानक व दंडाचें उत्पन्न			१२१	१४४५	३३४	३८६	२२८६	२५५४	−२६८
सरकारनें न रक्षिलेलीं जंगलें			२४०१	२०८४१	१०		२३२५२	४२०८७	−१८८३५
किरकोळ	८	३३५	७८२५१	१३४५६५	८८१२२	१२९९६०	४३०१४०	४६४१२२	−३३९८२
रीफंडस्			−१८६१	−१५२०८	−१२४८	−२४२९	−२०७४६	−३१४९३	+१०७४७
एकूण	८	३३५	१३९१५१३	८९१३२०	२३७२८०५	५६७५११	५२२३५००	७९७३४३९	−२७४९९३९

स्थानिक स्वराज्य

"हिंदुस्थानांतील सध्यांचें स्थानिक स्वराज्य ही एक ब्रिटिश अमदानींत सुरू झालेली गोष्ट आहे. सध्यांच्या स्थानिक स्वराज्यांत प्रतिनिधींच्या तर्फे कारभार चालतो. हे प्रतिनिधी मतदारांस जबाबदार असतात; या प्रतिनिधींच्या हातीं जवळ जवळ सर्व राज्यकारभार व कर बसविण्याचा हक्क असतो. सध्यां स्थानिक स्वराज्य हें राज्यकारभाराचें शिक्षण देणारी एक शाळा आहे. निरनिराळ्या घटकांमुळें ही जी राज्यकारभाराची सांखळी बनली आहे त्या साखळींत 'स्थानिक स्वराज्य' हा एक फार महत्त्वाचा दुवा आहे. पूर्वीं खेडेंगांवांतून ज्या तऱ्हेचें स्थानिक स्वराज्य होतें तें आनुवंशिक अगर जातीच्या तत्त्वावर उभारलेलें होतें. त्याचें कार्यक्षेत्र— करवसुली, मालमत्ता व प्राण यांचें संरक्षण करणें, यांपलीकडे जात नसे. त्यापासून लोकांना राज्यकारभाराचें शिक्षण मिळावें असा उद्देश नसे. आणि एकंदर देशाच्या राज्यव्यवस्थेंत सुद्धां ग्रामपंचायतीस फारसें महत्त्व नसे."

म्युनिसिपालिटीच्या कारभारास सुरवात

म्युनिसिपालिटी स्थापन करण्याचे प्रयत्न प्रथम कलकत्ता, मुंबई व मद्रास येथें झाले. १६८७ त मद्रास येथें स्थानिक करांसंबंधीं विचार करण्याकरितां शहरांतील युरोपियन व हिंदी सभासदांचें मिळून एक कॉरपोरेशन नेमण्यांत यावें, अशी बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनें सूचना केली. या कॉरपोरेशनला चिरस्थायी स्वरूप मिळालें नाहीं, किंवा स्थानिक स्वराज्याच्या लोकांच्या कल्पनांना यामुळें चालना मिळाली असेंही नव्हे. निवडणुकीच्या तत्त्वास मान्यता मिळून कलकत्ता, मुंबई, मद्रास येथील भाडेकऱ्यांना आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क मिळावयास १९ व्या शतकाच्या जवळजवळ मध्यापर्यंत अवधि लागला. इतर शहरांतून अशाच प्रकारच्या म्युनिसिपालट्या स्थापन करण्याबद्दल १८४२ पासून १८६२ पर्यंत बरेच कायदे पास झाले. प्रथम म्युनिसिपालिटीच्या हद्दींतील लोकांना ,त्यांनींच म्युनिसिपल कौन्सिलें स्थापावीत अशी सवलत दिलेली होती. पण लोकांनीं या सवलतीचा फायदा घेतला नाहीं. तेव्हां प्रांतिक सरकारांनीं ठराव पास करुन, म्युनिसिपालिट्या स्थापन कराव्या, असा अधिकार प्रांतिक सरकारांना देण्यांत आला. या काळांत निवडणुकीच्या तत्त्वाला जरी मान्यता मिळाली होती, तरी त्या तत्त्वाचा उपयोग मध्यप्रांतावाहेर क्वचितच होत असे.

१८७० तील लॉर्ड मेयो यांचा ठराव

१८७० त प्रांतिक दौलत (Finance) यासंबंधीं लॉर्ड मेयो यांचा जो ठराव प्रसिद्ध झाला,त्यामुळें या बाबतींत एक पाऊल पुढें पडलें. या ठरावांत हिंदी लोकांचा राज्यकारभाराशीं येत असलेला सहवास वाढत गेला पाहिजे, या मद्द्यावर जोर देऊन यासाठीं स्थानिक स्वराज्य हें अत्यंत विस्तृत कार्यक्षेत्र आहे असें सांगितलें होतें. स्थानिक स्वराज्याचा विकास होण्यास निवडणुकीचें तत्त्व अत्यंत उपयोगी आहे असेंही या ठरावांत म्हटलेलें होतें. याचा परिणाम असा झाला कीं, पुष्कळ शहरांतून म्युनिसिपल संस्था स्थापन करण्यांत आल्या. या संस्थांनीं स्वत:साठीं विस्तृत कार्यक्षेत्र आंखून घेतलें; व त्यांच्या घटनेंत निवडणुकीच्या तत्त्वाचाही शिरकाव झाला. खेडें गांवांतून मात्र, स्थानिक दुरुस्तीसाठीं केव्हां केव्हां जमा केलेल्या स्थानिक फंडाखेरीज या बाबतींत विशेष कांहींच झालें नाहीं.

लॉर्ड रिपन यांच्या खलित्याचे परिणाम

१८८२ त लॉर्ड रिपन यांनीं प्रसिद्ध केलेल्या ठरावाचा म्युनिसिपल संस्थांच्या प्रगतीवर बराच परिणाम झाला. सगळीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांचें जाळें पसरावयास हवें,त्यांतल्या त्यांत खेडेंगांवांत अशा प्रयत्नांची अतिशय जरूर आहे असें त्यांत स्पष्टपणें म्हटलें होतें. शिवाय स्थानिक मंडळांतून (Local Bodies) सरकारी सभासदांचें प्रमाण एक तृतियांशहून कमी असूं नये, दौलतीची सत्ता मध्यवर्ती सरकारच्या हांतून बरीचशी काढून घेण्यांत

यावी, स्थानिकमंडळांची घटना निवडणुकीची पद्धत जास्त प्रमाणांत अंमलांत आणून करावयास हवी; वगैरे गोष्टी,त्या खलित्यांत मांडलेल्या होत्या. या खलित्याचा परिणाम असा झाला कीं, त्यामागोमाग प्रांतांप्रांतांतून कायदे पास झाले.त्या कायद्यान्वयें म्युनिसिपालिटीच्या सभासदांपैकीं निम्मे सभासद निवडून यावेत असें ठरलें. कांहीं कायद्यांन्वयें म्युनिसिपालिटीच्या सभासदांस अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडून देण्याचीही सवलत मिळाली.

निरनिराळ्या परिस्थितींमुळें स्थानिक स्वराज्याचें एकच स्वरूप चोहींकडे दिसून येणें शक्य नव्हतें. इतकेंच नव्हे तर आपआपल्या सोयीनुसार प्रत्येक प्रांतानें त्यांत जरूर तो बदल करून घ्यावा असेंही लॉर्ड रिपनच्या खलित्यांत जोरानें सांगितलें होतें. त्यांस अनुसरून प्रत्येक प्रांतानें आपआपला मार्ग स्वतंत्रपणें आंखला. उदाहरणार्थ, मद्रास प्रांतांत 'खेडेंगांव' हा आरंभींचा घटक मानण्यांत येतो. दोनतीन खेडेंगांवांवर अधिकार चालणारें जें युनियन बोर्ड त्यांसच प्रथम (Self governing) स्वयंसत्तेचा अधिकार आहे. यांवर तालुकाबोर्डें व डिस्ट्रिक्टबोर्डें, यांचा अधिकार अनुक्रमें तालुका व जिल्हा यांवर चालतो. याच्या उलट मुंबई प्रांतांत 'खेडेंगांव' हा प्रथम घटक समजला जात नाहीं. कांहीं खेडेंगांवांचीं मिळून बनलेलीं अशीं मंडळें नाहींत. तेथें फक्त तालुकाबोर्डें व जिल्हाबोर्डेंच आहेत. असे बारीकसारीक फरक जरी प्रांतांप्रांतांतून आढळतात, तरी सर्व प्रांतांत कार्याची दिशा एकच आहे. खेडेंगांवांतील बोर्डें मात्र यावेळीं प्रथमच स्थापण्यांत आलीं. कर भरणाऱ्या लोकांना कांहीं सभासद निवडून देतां यऊं लागले. कांहीं ठिकाणीं अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडण्याचा हक्कही मिळाला. पण या हक्कांची अंमलबजावणी मात्र फारशी होत नसे. जिल्हाधिकारी हाच कार्यनियंत्रण (Executive control) करणारांत प्रमुख असे. १८८२ च्या लॉर्ड रिपनच्या खलित्यांतील तत्त्वांस धरूनच स्थानिक स्वराज्याची प्रगति १९१८ पर्यंत चालू होती.

स्थानिक स्वराज्याचे दोन प्रकारः—मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा अंमलांत येण्यापूर्वी हिंदुस्थानांत असलेलें स्थानिक स्वराज्य व इंग्लंडमधील स्थानिक स्वराज्य यांतील तफावत येथें दाखविणें जरूर आहे. स्थानिक स्वराज्य हें दोन प्रकारचें असूं शकेल. ब्रिटिश पद्धतीचें किंवा युरोपांतील देशांत आहे तसें. ब्रिटिश पद्धतींत मध्यवर्ति सरकारचे वेगवेगळे भाग केलेले असतात. त्या पद्धतींत स्वतःचीं मतें असणाऱ्या लोकल बॉडीज असतात. ते आपलें स्वतःचें राजकारण आंखतात व शक्त्यनुसार पार पाडतात. त्यांवर मध्यवर्ति सरकारचें योग्य दिशा दाखविण्यापुरतेंच नियंत्रण असतें.आपापल्या स्थळ-मर्यादेपुरती अधिकाऱ्यांची व नोकरांची व्यवस्था तेच पाहातात व बहुतेक वसूलही तेच करतात. राज्यकारभाराची ही एक सुटी, अलग पद्धत आहे असेंही म्हणतां येईल. स्थानिक स्वराज्यास राजकारणांत दुय्यम प्रतीचें स्थान आहे असें या प्रकारांत म्हणतां येत नाहीं. युरोपांत जो स्थानिक स्वराज्याचा प्रकार आढळून येतो त्यांत मुख्य स्थानिक अधिकारी हा तेथील बोर्डांत निवडून आलेल्या सभासदांचा नोकर नसतो; मध्यवर्ति सरकारनें त्या जागीं धाडलेला ,व मध्यवर्ति सरकारास जबाबदार असलेला तो नोकर असतो. त्या विशिष्ट भागांतील प्रेरक शक्ति ही तेथील लोकप्रतिनिधींची मतनिदर्शक नसते; ती मध्यवर्ति सरकारची असते.मॉन्टेग्यूचेम्सफर्ड सुधारणांपूर्वीं येथें या दुसऱ्या तऱ्हेचें स्थानिक स्वराज्य प्रचलित होतें. पूर्वीच्या हिंदी स्थानिक स्वराज्याचें ब्रिटिश स्थानिक स्वराज्यापेक्षां (फरेंच राज्यांतील स्थानिक स्वराज्याशीं) अधिक साम्य होतें. पूर्वी जिल्हाधिकारी हा मध्यवर्ति सरकारचा नोकर होता व त्या सरकारच्या सांगण्यावरून तो एकाद्या विशिष्ट जिल्ह्याचा मुख्य बनत असे. डिस्ट्रिक्ट बोर्डाचा अध्यक्ष व एकदोन म्युनिसिपालिटचांचा अध्यक्ष या नात्यानें तो आपल्या वरिष्ठांचे हुकूम अंमलांत आणी. त्याच्या अनेक कर्तव्यांपैकीं 'स्थानिक स्वराज्य' हें त्याचें फक्त एक कर्तव्य होतें. सबंध जिल्ह्यांत वरिष्ठ सरकारचें मत हेंच सर्वाधिकारी असे.

सुधारणांपूर्वीची हिंदी स्थानिक स्वराज्याची स्थितिः—लॉर्ड रिपन यांच्या सुधारणांचा उद्देश कितीही स्तुत्य असला तरी लोकांचे रीतिरिवाज, त्यांना जडलेल्या संवयी, सहानुभूतीचा अभाव, निवडून आलेल्या सभासदांत दिसून येणारा जबाबदारी अंगावर घेण्याच्या बाबतींतील निरुत्साह, वरिष्ठ अधिकारी या कार्याबद्दल दाखवीत असलेला कंटाळा, —या सर्व गोष्टींमुळें स्थानिक स्वराज्यामुळें लोकांना राजकीय व सामाजिक Popular शिक्षण मिळण्याचा उद्देश सफल होईना. लोकांच्या प्रतिनिधींच्या मताप्रमाणें चालणारी अशी एखादी स्थानिक स्वराज्याची पद्धति काढावी अशाबद्दल

कांहीं प्रयत्न झाले नाहींत. मोठमोठ्या शहरांतील म्युनिसिपालिटयांतूनही अध्यक्षाचे (हा अध्यक्ष मध्यवर्ति सरकारचा अधिकारी असे.) निकाल मान्य करण्यापलीकडे सभासदांच्या कर्तव्यदक्षतेची मजल गेली नाहीं. आणि जेव्हां उपाध्यक्षाच्या हातीं कारभार असे तेव्हां तो बहुतकरून अध्यक्षाच्या सूचनांप्रमाणेंचवागत असे.थोडक्यांत,म्हणजे कांहीं हाताच्या बोटांवर मोजण्याजोग्या म्युनिसिपालिटया सोडल्या तर ज्यांस ब्रिटिश पद्धतीचें स्थानिक स्वराज्य म्हणतां येईल तें स्थानिक-स्वराज्य मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा अमलांत येईपर्यंत, हिंदुस्थानांत जवळ जवळ नव्हतेंच.

मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्ट व १९१८ चा ठराव

वर दर्शविलेले सर्व दोष मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टांत नमूद केलेले आहेत. स्थानिक स्वराज्याच्या इतिहासाचें परीक्षण करितांना व लोकल बॉडीजच्या तत्कालीन स्थितीची पाहणी करितांना या रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं, स्थानिक स्वराज्यापासून लगेच काय फायदा मिळतो हें बघण्यापायीं त्यांत असलेल्या शिक्षणाच्या तत्त्वाकडे दुर्लक्ष झालें आहे. नागरिकास स्थानिक-स्वराज्यामुळें, जें शिक्षण मिळतें त्यावर रिपोर्ट-कर्त्यांनीं जास्त भर दिला आहे. त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, " नवशिक्या प्रतिनिधीस दूरच्या गोष्टींबद्दल मतें बनवितां यावीं म्हणून त्यांनीं प्रथम हातालगतच्या कारभारांत भाग घेण्यास शिकलें पाहिजे. म्हणून लोकल बॉडीजमध्यें मतदानाचा हक्क वाढविणें, निवडणुकीचें तत्त्व त्यांना पटविणें, लोकल कमिटयांची वाढ करणें वगैरे गोष्टी राष्ट्राच्या शासनपद्धतीच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या गोष्टी अमलांत आल्या तरच नागरिकत्वाच्या शिक्षणाचा प्रसार होईल. त्यांनीं अशी कल्पना पुढें मांडली कीं, लोकल बॉडीजमधून शक्य तों लोकांचीच सत्ता असावी व बाहेरून शक्य तों मुळींच अधिकारी नियंत्रण नसावें.

१६ मे १९१८ रोजीं झालेल्या लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या सरकारी ठरावांत असें म्हटलें होतें कीं, "जबाबदार संस्था विस्तृत पायावर उभारल्याखेरीज त्या चिरस्थायी होणार नाहींत. आपल्या मतदानहक्काची पूर्ण जाणीव असणें व स्थानिक स्वराज्याच्या क्षेत्रांतील कार्यशक्तीचा सदुपयोग करणें या दोन गोष्टींनींच नागरिकांना राजकीय शिक्षणाचे धडे मिळतील." लोकल बॉडीजवर शक्य तों लोकप्रतिनिधींचाच अधिकार चालावा यासाठीं त्या ठरावांत कांहीं सूचनाही केलेल्या आहेत. सर्व बोर्डांतून सभासदांपैकीं बहुसंख्यांक सभासद लोकनियुक्त असावेत, म्युनिसिपालिटयांतील अध्यक्ष सरकारी नोकर असण्याऐवजीं लोकनियुक्त सभासदांनीं निवडून दिलेला असावा, शक्य तों खेडेगांवांतील बोर्डांतून मतदानाचा हक्क जास्त जास्त लोकांस देऊन मतदारसंघांत शक्य तितके कर भरणारे लोक समाविष्ट करावेत, व अल्पसंख्यांकांचें प्रतिनिधित्व जातवारीनें न ठरवितां नेमणुकीच्या तत्त्वानें तें ठरवावें वगैरे सूचना ठरावांत केलेल्या आहेत. ज्या ठिकाणीं अनुभवी सरकारी नोकरांचा सल्ला जरूर असेल त्या ठिकाणीं चर्चा करण्यासाठीं व सल्लामसलत देण्यासाठीं तज्ज्ञ लोकांना नेमावें; पण त्यांना मतदानाचा हक्क असूं नये असेंही त्यांनीं सुचविलें. सरकारी नियंत्रणाची सीमा शक्य तों कमी झाली पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. खेडेगांवांतील राज्यकारभारास वाढीस लावलें पाहिजे या मुद्यावर त्यांत विशेष जोर दिला होता. १९०९ च्या Decentralization Commission या कमिशननेंही याबद्दल स्वतंत्रपणें विचार केला होता. १९१५ त हिंदुस्थान सरकारनें या बाबतींत कांहीं नियम घालून ठेविले होते. परंतु ३ वर्षांच्या अवधींत त्यांचा कांहीं दृश्य उपयोग झाला नाहीं. १९१८ च्या ठरावांत खेडेगांवांतील संघटित जीवन वाढीस लावणें हीच स्थानिक स्वराज्याच्या प्रगतीची पहिली पायरी आहे असें नमूद केलें आहे.

प्रांतिक कायदेमंडळें व स्थानिक स्वराज्यः—

गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टचें १९१९ त कायद्यांत रूपांतर झालें. १९२० च्या शेवटीं नवीन तऱ्हेचीं प्रांतिक कायदेमंडळें स्थापन झालीं. आणि स्थानिक स्वराज्य हें या कायदेमंडळास जबाबदार असणाऱ्या मंत्र्यांच्या हातीं गेलें, त्यामुळें स्थानिक स्वराज्याच्या भावी स्थितीची जबाबदारी प्रांतिक कायदेमंडळावर येऊन पडली. १९१८ च्या ठरावांत ज्या सूचना केलेल्या होत्या त्यांना आपापल्या कल्पनेप्रमाणें मूर्त स्वरूप देण्याची जबाबदारी त्यांजवरच पडली. प्रत्येक प्रांतानें आपल्या या नव्या अधिकाराचा उपयोग स्थानिक स्वराज्यामुळें जास्त जास्त राजकीय जबाबदारीच्या कामांचें शिक्षण कसें मिळेल या दृष्टीनेंच केला. मतदानाचा हक्क शक्य तों विस्तृत करणें, लोकल बॉडीजमध्यें लोकनियुक्तांचें प्रमाण वाढविणें व अधिकारसूत्रें बिनसरकारी सभासदांच्या

हातीं ठेवणें या गोष्टी साध्य करण्याचा सर्व प्रांतांतून प्रयत्न झाला.

प्रांतांच्या मुख्य शहरांतील प्रचलित पद्धति–

शहरवस्तींतील स्थानिक स्वराज्याचा प्रथम घटक 'म्युनिसिपालिटी 'हा मानला जातो. कलकत्ता, मुंबई व मद्रास येथें स्वतंत्र कायद्यान्वयें कार्पोरेशन्स स्थापण्यांत आल्या आहेत. प्रत्येकास कांहीं स्वतंत्र अधिकार व सवलती आहेत. कौन्सिलरांचीं संख्या ठराविक नाहीं. मुंबईस तीं संख्या १०६ आहे. मद्रासमध्यें ६१ आहे.हे कौन्सिलर्स निवडून देणाऱ्या मतदारांचें प्रमाणही ठराविक नाहीं.मुंबईंत मतदानाचा हक्क शेकडा १० लोकांना आहे. मद्रासमध्यें शेकडा ५ लोकांना आहे. या कौंसिलरांपैकीं, कांहीं थोडे सरकारी आहेत. बाकी सर्व लोकनियुक्त आहेत. शहराचे निरनिराळे भाग करून त्या प्रत्येकांतून प्रतिनिधी निवडावयाचे असें होत नाहीं. या प्रत्येक शहरांत धंद्यांत पडलेल्या लोकांच्या वेगवेगळ्या गटांनाही स्वतंत्र प्रतिनिधी पाठवितां येतात. आणि मुंबईंत तर मजूर लोकांचा प्रतिनिधी असावा म्हणून ट्रेड युनियन्सचा एक विशेष मतदार संघ निर्माण करण्यांत आला आहे.फक्त कलकत्ता येथें मुसलमानांसाठीं स्वतंत्र मतदार संघ निर्माण केला आहे. या शहरांना स्वतःच्या कारभाराची जवळजवळ मुखत्यारी आहे. फक्त नेमणुका, कर्ज उभारणें, हिशेब वगैरेसंबंधीं कांहीं अधिकार कायद्यान्वयें प्रांतिक सरकारच्या हातीं (In theory) आहेत. कलकत्त्याचें उत्पन्न सुमारें २ कोटी व मुंबईचें ३ कोटी रुपये आहे. कलकत्ता कॉर्पोरेशनमध्यें मेयर व मुख्य कार्यकारी मंत्रि निवडण्याचा अधिकार सभासदांस आहे. मद्रासमध्यें मुख्य कार्यमंत्र्याची नमणूक प्रांतिक सरकारकडून करण्यांत येते. मुंबई कॉर्पोरेशनमध्यें अध्यक्ष आळीपाळीनें हिंदु, मुसलमान, युरोपियन व पारशी जातीचा असावयाचा अशी वहिवाट आहे.

इतर म्युनिसिपालिटया–

हिंदुस्थानांत ७७७ म्युनिपालिटया आहेत. मॉ. चेम्स सुधारणानंतर म्युनिसिपालिटयांच्या निवणुकींत मत देण्यासाठीं लागणाऱ्या आवश्यक अटी कमी करण्यांत आल्या आहेत.शहरांतील लोकसंख्येपैकीं, शेकडा १४जणांना सध्यां मतदानाच हक्क आहे. प्रत्येक शहरांत बहुसंख्यांक कौंसिलर लोकनियुक्त असतात. बिहार ओरिसांत एकंदर कौंसिलरांत लोकनियुक्तांचें प्रमाण चारपंचमांश आहे व बंगालमध्यें तें प्रमाण दोन तृतियांश आहे. १९२५–२६ त ६८१ म्युनिसिपालिटयांनीं स्वतःचे अध्यक्ष नेमिले. व ६८म्युनिपालिटयांतील अध्यक्ष Ex Officio नमलेले होते. म्युनिसिपालिटीसंबंधानें आस्था निरनिराळ्या प्रांतांत वेगवेगळ्या प्रमाणांत आढळते. मद्रास इलाख्यांत ती सर्वांत जास्त आहे. १९२५–२६ त शेंकडा ७० हून जास्त मतदार मतें द्यावयास गेले. हिंदुस्थानांतील म्युनिसिपालिटयांच्या जबाबदारीवर जीं कामें सोंपविलीं आहेत तशींच कामें ग्रेट ब्रिटनमधील म्युनिसिपालिटयांवर सोंपविलेलीं असतात. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, रुग्णसेवा, रस्ते, पूल वगैरेसारखीं कामें म्युनिसिपालिटयांकडे सोंपविलेलीं असतात.म्युनिसिपालिटयांच्या अंतर्गत कारभारावर प्रांतिक सरकारचें फारसें नियंत्रण नसते. तरीही म्युनिसिपल कौंसिलचे ठराव फेंटाळून लावण्याचा किंवा तें कौंसिल रद्द करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे. शिवाय कौंसिलांतील लोकनियुक्त सभासद व नेमलेले सभासद यांचें प्रमाण कह्यांत ठेवण्याचा व कौंसिलच्या घटनेंत फेरबदल करण्याचा थोडाबहुत अधिकार प्रांतिक सरकारास आहे. अध्यक्षाचा पगार मंजूर करण्याच्या वेळीं त्यांस प्रांतिक सरकाराची मान्यता असावी लागते. कौंसिलचा ठराव अंमलांत आणण्याची अध्यक्ष जर टाळाटाळ करूं लागला तर त्यास कामावरून दूर करतां यतें. एकादा कार्यमंत्रि नेमण्याची जरूरी दिवसेंदिवस जास्त म्युनिसिपालिटयांस भासूं लागली आहे. शहराच्या कांहीं भागांत जर लष्करी ठाणें असेल तर त्या भागावर म्युनिसपालिटयांचा अधिकार चालत नाहीं. अशा भागास कॉन्टोनमेंट म्हणतात. अशा भागावर लोकनियुक्त कँटोन्मेंट बोर्डाचा अधिकार चालतो. या बोर्डाचा अध्यक्ष सरकारी अधिकारी असतो. कँटोन्मेन्ट संबंधींची सर्व वरिष्ठ सत्ता हिंदुस्थान सरकारच्या लष्करी खात्याच्या हातीं असते.

म्युनिसिपालिटयांची दौलत

म्युनिपालिटयांनीं वसूल करावयाच्या करांच्या बाबतींत त्यांना बरेंच स्वातंत्र्य आहे.जकात, दर सहामाहीस वसूल करावयाचे कर, प्राप्तीवरील कर, स्थावर मालमत्तेवरील कर, धंदे व वाहनें यांवरील कर वगैरे कर म्युनिसिपालिटीस वसूल करतां येतात. शिवाय शिक्षण, पाणी पुरवठा वगैरे विशिष्ट सोयींसाठीं स्वतंत्र कर आकारतां येतात.

लोकांस जर सरकारच्या संरक्षणाची गरज असेल तर तेवढ्याचपुरता सरकारचा म्युनिसिपालिटीच्या आर्थिक बाबतींत संबंध येतो. म्युनिसिपालिटीच्या बजेटांत कांहीं कमीजास्त आढळलें तर सरकारास त्यांत बदल करतां येतो. आणि लोकांचें जीवित, सुव्यवस्था आणि शांतता यांना जर धक्का बसूं लागला तर सरकारास कौंसिलच्या कारभारांत हात घालतां येतो. पण या अधिकाराचा उपयोग करण्याची वेळ आजपर्यंत क्वचितच आली आहे.

खेडगांवांतील स्थानिक स्वराज्य संस्था

डिस्ट्रिक्ट बोर्डे

आसामखेरीज इतर प्रांतांत स्थानिक स्वराज्याचा खेडेविषयक मुख्य घटक डिस्ट्रिक्ट बोर्ड व त्याचें अधिकारक्षेत्र जिल्ह्याचा विस्तार हें आहे. बहुसंख्यांक सभासद लोकनियुक्त आहेत. तरी मतदानाचा हक्क जास्त लोकांना मिळेल अशी योजना करूनही लोकसंख्येच्या शेकडा ३·२ पेक्षां जास्त लोकांना मतदान हक्क नाहीं. मुसलमानांकरितां मुंबई इलाख्यांत, मध्यप्रांतांत डिस्ट्रिक्ट बोर्डासाठीं व आसामांत लोकलबोर्डासाठीं स्वतंत्र (जातिविषयक) मतदारसंघ आहेत. इतर ठिकाणीं अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींची नेमणूक प्रांतिक सरकारकडून करण्यांत येते. पंजाबखरीज इतरत्र सगळीकडे अध्यक्ष हा सभासदांकडून निवडण्यांत यतो. पंजाबमध्यें, निवडणुकीची सवलत मागून घेण्याचा अधिकार असूनही फक्त दोन डिस्ट्रिक्ट बोर्डांनीं तो अधिकार उपयोगांत आणला. शहर आणि खेडेगांव यांतील भिन्न परिस्थितिमुळें होणारे फरक सोडून दिले तर म्युनिसिपालिटी व डिस्ट्रिक्टबोर्ड यांचे अधिकार सारखेच आहेत. आणि प्रांतिक सरकारची नियंत्रण शक्तीही तेवढीच आहे. मद्रास प्रांतांत डिस्ट्रिक्ट बोर्डांना लहान लहान रेल्वे बांधण्याची व चालविण्याची परवानगी आहे. व त्याप्रमाणें तंजावर बोर्ड १२४ मैल लांबीची लहानशी रेल्वे चालवीतही आहे.

खेडेगांवांतील छोटया स्वराज्य संस्था

डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या हद्दींत प्रांतानुसार निरनिराळीं नांवें असलेल्या, निरनिराळीं कामें करणाऱ्या व निरनिराळ्या घटनांप्रमाणें चालणाऱ्या अशा अनेक छोटया स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. पंजाब व मध्यप्रांत या खेरीज लोकल बोर्ड, तालुका बोर्ड व सर्कल बोर्ड हीं सगळींकडे आढळतात. जिल्ह्याच्या कांहीं भागांवर यांची सत्ता चालते. डिस्ट्रिक्ट बोर्डाचेंच काम करणारी ही एक लहान संस्था आहे. आसाममध्यें मात्र यासच डिस्ट्रिक्ट बोर्डाचें स्थान मिळालें आहे. यांतील बहुतेक सभासद लोकनियुक्त असतात. व याचे सभासदच आपला अध्यक्ष निवडतात. मद्रास प्रांतांतील डिस्ट्रिक्ट बोर्डांतील सर्व लोकनियुक्त सभासद व मध्यप्रांतांतील डि. बोर्डमधील लोकनियुक्तांपैकीं दोनतृतियांश सभासद हे तालुका बोर्डातील सभासदांनीं निवडून दिलेले असतात.

पंचायत

'खेडेगांव' हें स्थानिक स्वराज्याचें पुन्हां घटक बनविण्याच्या प्रयत्नाच्या दृष्टीनें 'ग्रामपंचायत' किंवा 'युनियन बोर्ड' यांस महत्व आहे. याची सत्ता एक खेडेगांव किंवा खेडेगांवांचा समूह यांवर चालते. ह्यांचीं मुख्य कामें म्हणजे पाणीपुरवठा, स्वच्छता अशासारख्या गोष्टींकडे लक्ष पुरविणें हीं होत. परंतु कांहीं वेळेस लहान लहान रस्त्यांकडे लक्ष पुरविणें, शाळा व दवाखाने चालविणें वगैरे कामेंही त्यांजवर सोपविण्यांत येतात. मद्रास इलाख्यांत खेडेगांवाजवळचीं जंगलें व पाणीपुरवठा यांकडेही ग्रामपंचायतीस बघावें लागतें. कांहीं प्रांतांत लहान लहान दिवाणी व फौजदारी खटले चालविण्याचें काम ग्रामपंचायतीकडे दिलें आहे. हीं सर्व कामें जी ग्रामपंचायत करते तिच्या हातीं आपापल्या हद्दीपुरती राखीव व सोपीव अशीं दोन्हीं खातीं असतात. मध्यप्रांताखेरीज इतर सगळीकडे सभासद लोकनियुक्त असतात. मद्रास, मुंबई व आसाम येथील वयांत आलेल्या सर्व पुरुषांना व मध्य प्रांतांत वयांत आलेल्या सर्वांना मताधिकार असतो. हात वर करूनच बहुतेक मत देण्याची पद्धत आहे. 'ग्रामपंचायत' ही संस्था रूढ करण्याचे पुष्कळ प्रयत्न होऊनसुद्धां यावें तसें यश आलेलें नाहीं. मध्यप्रांत, बंगाल, मद्रास या प्रांतांत हे प्रयत्न विशेष जोरानें झाले. बंगालमध्यें जास्तींत जास्त ६४७८ युनियन बोर्डें स्थापन करणें शक्य आहे. १९२८ पर्यंत तेथें २८७४ युनियन बोर्डें स्थापिलीं गेलीं. मध्यप्रांतांत १९२७ त एकंदर ४५९४ ग्रामपंचायती होत्या. व त्या सर्वांचा अधिकार एकूण साडेऐंशीं लक्ष लोकांवर चालत होता. इतर प्रांतांतून ही चळवळ अजून बाल्यावस्थेंतच आहे. मुंबई इलाख्यांत १९२५–२६ सालीं ग्रामपंचायतींच्या व्यवस्थेखालीं नांदणाऱ्या लोकांची संख्या ५ लक्षांहून

जास्त नव्हती. मध्यप्रांत सरकारच्या मेमोरँडममधील खालील उताऱ्यावरून या मार्गांतील अडचणींची कल्पना येईल.

"ग्राम पंचायत कोणत्या खेडेगांवांत स्थापावयाची हें ठरवितांना फार काळजी घ्यावी लागते. ज्या गांवांतील लोकांत आपापसांत फूट आहे अशीं गांवें सोडून द्यावीं लागतात. इतर ठिकाणीं हुषार, विश्वासू लोक फारसे मिळत नाहींत. मिळालेच तर ते एकाच जातीचे असतात. त्यामुळें ग्रामपंचायतींत समतोलपणा राहत नाहीं. पुष्कळ खेडेगांवें या ग्रामपंचायतीच्या बाबतींत पूर्ण उदासीन असतात. आणि गांवांतील एखाद्या जमिनदाराचें ग्रामपंचायतीवर वजन असलें तर तिची प्रगति खुंटल्यासारखी होते. ग्राम पंचायत चांगली यशस्वी होणें हें बहुधा सर पंचांवर अवलंबून असते. या सरपंचांची योग्य निवड करणें फारच अवघड असते असा अनुभव आहे. शिवाय गांवांतील फूट किंवा जातींतील वैमनस्यें यांमुळेंही ग्राम पंचायतीच्या कामांत अडथळा उत्पन्न होतो."

खेडेगांवांतील संस्थांच्या उत्पन्नांचीं साधनें

उत्पन्नाचें मुख्य साधन म्हणजे जमिनीच्या वार्षिक किंमतीवर बसविलेला कर हें होय. हा कर जमिनीवरील कराबरोबरच वसूल केला जातो. याशिवाय कंपन्या, धंदेवाईक लोक व वाहनांवरील जकात हेही बहुधा वसूल करण्यांत यतात. परंतु उत्पन्नांपैकीं बराचसा भाग प्रांतिक सरकारकडून येणाऱ्या पैशाच्या मदतीमुळें जमा होतो. सोंपविलेलीं कामें करण्यासाठीं मदत म्हणून केवळ ही रक्कम प्रांतिक सरकारकडून मिळते, असे नव्हे. पुष्कळ वेळां एकादें सार्वजनिक स्वरूपाचें काम करण्यासाठीं दिलेल्या ठोकळ रकमेचाही यांत समावेश झालेला असतो.

सायमन कमिशननें हिंदुस्थानांत जो दौरा काढला त्यांत ग्रामपंचायतीच्या बाबतींत त्यांना खालील दोष दिसून आले:--

मॉटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांमुळें हिंदुस्थानच्या स्थानिक स्वराज्यांत जो बदल घडून आला तो हिंदुस्थानांत अजून पूर्णपणें ध्यानीं आला नाहीं. ब्रिटिश पद्धतीच्या स्थानिक स्वराज्याचीं तत्वें व त्यांचा वापर हीं हिंदुस्थानांतील लोकांना समजून घेतां आलीं नाहींत. पूर्वीच्या पद्धतींत जिल्हाधिकारी हा डिस्ट्रिक्ट बोर्डाचा किंवा लोकल बोर्डाचा अध्यक्ष असे. शिवाय एकदोन म्युनिसिपालटचांचें अध्यक्षस्थानही त्याजकडेच असे. नवीन पद्धतीप्रमाणें पंजाबखेरीज इतरत्र चोंहीकडे प्रत्येक जिल्ह्यांत आणि म्युनिसिपालटींत अध्यक्ष लोकनियुक्त असतो यामुळें सरकारी नियंत्रण नाहींसें करून स्थानिक स्वराज्याचें क्षेत्र जास्त विस्तृत झालें.याशिवाय लोकलबॉडीजची सर्व घटना यामुळें बदलली जाऊन लोकल बॉडीजच्या प्रांतिक सरकारशीं असलेल्या संबंधांतही त्यामुळें अंतर पडलें.सरकारी अधिकारी हा लो.बो.चा नुसता अध्यक्षच असे असें नव्हे तर सर्व कारभार त्याच्या हातीं असे. हा सर्व कारभार हाकतांना अध्यक्ष लोकलबोर्डाच्या नोकर वर्गावर (Staff) पूर्णपणें अवलंबून कधींही वागत नसे. त्याच्यावर सोपविलेल्या अनेक कामांपैकीं हें फक्त एक काम असे त्याच्यावर जें वसुलाचें व न्यायदानाचें काम सोपविलेलें असें त्यानिमित्त त्याला आपल्या हाताखालच्या मुलुखाच्या कानाकोपऱ्यांतून हिंडावें लाग. त्यामुळें वेगळा वेळ व पैसा खर्च न होतां लोकल बोर्डाच्या कारभाराला लागणारी माहिती त्याला त्या दौऱ्यांमुळें साहजिकच मिळत असे. लोकनियुक्त अध्यक्षानें सरकारी अध्यक्षाची जागा पटकावून शिवाय फावल्या वेळांत बिन पगारानें लोकल बोर्डाचा कारभारही हाताखालच्या लोकांच्या तुटपुंज्या मदतीनें हाकावा अशी लोकांची इच्छा होती असें दिसतें. परंतु हें बरोबर नाहीं. ब्रिटिश पद्धतीच्या स्थानिक स्वराज्यांत ज्यांत लोकनियुक्त प्रतिनिधी व स्थानिक मुखत्यारी (Local Authority) ना अधिकारी यांची वेगवेगळीं कामें अगदीं स्पष्टपणें मांडलेलीं आहेत.भरपूर पगार देऊन व काम करण्यांत चोख असा नोकरवर्ग न ठेवल्यानें हिंदुस्थानांतील स्थानिक स्वराज्यांत सध्यां दिसून यणारे दोष व त्यांना येणारीं अपयशें हीं बहुधा आढळतात. लोकनियुक्त सभासदांनीं कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावयाचें या बाबतींतही हिंदुस्थानांत बराच गरसमज दिसून येतो. कारभाराच्या बारीकसारीक तपशीलांत ढवळाढवळ व चौकशी करण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानांतील लोकनियुक्त सभासदांत मोठ्या प्रमाणांत आढळून येते. खरें म्हटलें तर या गोष्टी पगारी नोकर वर्गावरच सोपविण्याच्या असतात.

लोकलबॉडीजवरील नियंत्रणाचा अभाव

आमच्या मतें दुसरी ढोबळ चूक ही कीं, प्रांतिक सरकारचें स्थानिक स्वराज्यांतील अंमलदारांवर असावें तितकें नियंत्रण नाहीं. "बाहेरील नियंत्रण स्थानिक स्वराज्यावर शक्य तों असूं नये." हें मॉं. चेम्सफर्ड रिपोर्टांतील वाक्य अगदीं

तंतोतंत अमलांत आणण्याचें प्रांतिक सरकारनें ठरविलें. स्थानिक स्वराज्याची ब्रिटिश पद्धत आहे, असें त्यांस वाटलें असावें. परंतु स्थानिक स्वराज्याला बाहेरच्या नियंत्रणांपासून शक्य तों उपद्रव नाहीं असें म्हणणें याहून ब्रिटिश पद्धतीच्या स्थानिक स्वराज्याचें विकृत स्वरूप दुसरें कोणतेंही नसेल. सुधारणा योजनेप्रमाणें कायदा व कारभार या बाबतींत स्थानिक स्वराज्य विषयक हें जें धोरण स्वीकारण्यांत आलें याचा परिणाम असा झाला कीं, स्थानिक स्वराज्याच्या नव्या मंत्र्याच्या हातून त्याचीं कामें नीट पार पडावींत म्हणून जे त्यांना अधिकार होते ते काढून घेण्यांत आले. स्थानिक स्वराज्य—मंत्र्यास आपली इच्छा जबरीनें लादतां येत नाहीं. बरें, या मंत्र्यास जबाबदार असे अधिकारी स्थानिक स्वराज्यासाठीं नेमावे अशी प्रांतिक सरकारलाही इच्छा होत नाहीं. आमच्या कानावर अशी टीका आली आहे कीं, लोकलबोर्डें रद्द करणें किंवा तहकूब करणें एवढ्याच गोष्टी प्रांतिक सरकारच्या हातीं असल्यामुळें त्याहून सौम्य उपायांनीं असल्या संस्थांचा कारभार सुधारण्याच्या बाबतींत स्थानिक स्वराज्य मंत्र्यांना अगदीं कांहींच करतां येत नाहीं. थोडासा लगाम खेचण्यानें किंवा एकादी टांच मारण्यानें काम होण्यासारखें असलें तरी मंत्र्यांच्या हातांत कुऱ्हाडीशिवाय दुसरें हत्यारच नाहीं. कांहीं लोकल बॉडीजना वाटेल तसें वागण्याची मुभा असूनही मंत्री राजकीय परिणाम अनिष्ट घडून येतील म्हणून आपल्या अधिकारांचा उपयोग करीत नाहींत. नियंत्रणसूत्रें जर जबाबदार मंत्र्यांच्या हातीं असतील तर लोकांना कुरकुरण्यास कांहीं जागा आहे असें वाटत नाहीं.

स्थानिक कारभारामधील अडचणी खेडेगांवांतील स्थानिक स्वराज्याचा साधारणपणें प्रथम घटक समजण्यांत येणारा जो जिल्हा त्याचें क्षेत्रफळ मद्रास प्रांतांत सुमारें ६००० चौ. मैल, मुंबई प्रांतांत सुमारें ५०००, मध्यप्रांतांत सुमारें २५०० व बंगालमध्यें सुमारें २७०० चौरस मैल असतें. इंग्लंडमधील अशा प्रकारच्या मुलुखाचें क्षेत्रफळ सरासरीनें ९७० चौरस मैल असतें. या दोहोंची तुलना करून पाहतां हिंदुस्थानांतील जिल्हे हे किती अवाक्याबाहेर मोठे झाले आहेत व राज्यकारभारांत कशा अडचणी उत्पन्न होतात, हें सहज ध्यानीं येईल. बोर्डाच्या निरनिराळ्या कामांतील प्रत्येक बारीक सारीक बाबींकडे स्वतः लक्ष पुरविणें हें लोकनियुक्त अध्यक्षांस कसें कठिण आहे, याची कल्पना सहज करतां येईल. दुसरें असें कीं, लोकनियुक्त सभासदांच्या हातीं सत्ता गेली त्याच वेळीं भाव वाढन आर्थिक टंचाई भासूं लागली. त्यामुळें ज्यांना आपल्या या नवीन अधिकाराचा शक्य तो उपयोग करून घ्यावयाची इच्छा होती, त्या लोकनियुक्त सभासदांना पैशाची कमतरता नडूं लागली. कित्येक बोर्डांचे कारभार अननुभवी लोकांच्या हातीं गेल्यामुळें तीं बोर्डें पैशाच्या बाबतींत अगदीं गोंधळून गेलीं. तिसरी गोष्ट अशी कीं, हिंदी स्थानिक स्वराज्यास नसतें महत्व देण्याच्या प्रवृत्तीस आळा बसला पाहिजे. सार्वजनिक आरोग्य वगैरेसारख्या सामाजिक उपयोगाच्या बाबी इंग्लंडमध्यें लोकांच्या ताब्यांत झपाट्यानें दिल्या जात आहेत. परंतु हिंदुस्थानांतही तितक्याच झपाट्यानें असल्या गोष्टी लोकांच्या हातीं येतील अशी कल्पना करणें अयुक्तिक आहे. कार्यक्षमता कमी झाली आहे. राज्यकारभारांत रोजच्या रोज चालणारा धबडगा आणि राजकारणाचें धोरणविषयक व मोठालीं जबाबदारीचीं कामें अंगावर घेण्याचें अंग यांतील फरक प्रथम ध्यानांत घेतला पाहिजे. यांपैकीं रोजच्या धबडग्याबद्दल पुढें आलेल्या पुराव्यावरून आम्हांस असें वाटतें कीं, सरकारी अधिकाऱ्यांच्या हातची सत्ता मर्यादित झाल्यापासून पूर्वीचा कस उरलेला नाहीं. राज्यकारभारांतील हा हिणकसपणा मध्यप्रांत, बिहार व ओरिसा यांत इतरांपेक्षां जास्त प्रमाणांत दिसून येतो आणि मद्राससारख्या प्रांतांत तो याहून कमी प्रमाणांत आहे. परंतु वरील विधान स्वतंत्ररीत्या प्रत्येक प्रांतास लागू करितां येईल. परंतु दिवसेंदिवस या लोकनियुक्त सभा आपआपल्या कामांत जास्त लक्ष घालूं लागल्या आहेत. शिक्षण आणि वैद्यकीय उपचाराची सोय या दोन गोष्टींचा प्रसार करण्याकडे सर्वांत जास्त लक्ष देण्यांत येतें. कांहीं ठिकाणीं लोकांचा उत्साह भलत्या मार्गाकडे वळतो. परंतु लोक जास्त जास्त लक्ष घालूं लागले आहेत एवढें मात्र खरें. राज्यकारभाराचा कस कमी झाला असला तरी ज्या प्रांतांत तो कमी आहे त्या प्रांतांत त्याची भरपाई इतर रीतीनें भरून निघालेली दिसून येईल. उदाहरणार्थ, बिहार व ओरीसा या प्रांतांत डिस्ट्रिक्ट बोर्डाचा कारभार समाधानकारक रीतीनें चालला नाहीं असें म्हटलें आहे खरें. पण

प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दींत एक दवाखाना असावा ही प्रांतिक कौन्सिलनें सुचविलेली सुधारणा तेथील डिस्ट्रिक्ट बोर्डांनीं, पैशाची कमतरता असूनही शक्य तों अमलांत आणली व दवाखान्यांची संख्या १७८ होती ती ३१९ केली. हीं फारच मोठी कामगिरी आहे.

आर्थिक अडचणी

हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत पैशाची टंचाई ही एक कायमची गोष्ट होऊन बसली आहे आणि स्थानिक स्वराज्याच्या बाबतींत तर ती सर्वस्वीं खरी आहे. म्युनिसिपालिटचा व डिस्ट्रिक्ट बोर्डें यांचें दारिद्र्य हेंच केवळ त्याच्या प्रगतीच्या आड येतें असें नव्हे, तर लोकनियुक्त सभासद स्थानिक कर बसविण्याचे कामीं टाळाटाळ करितात हें त्याचें खरें कारण आहे. हें विधान फक्त हिंदुस्थानास लागू आहे असें नव्हे. गरजा भागविण्यासाठीं स्वतःच्याच जातीवर कर बसवावयाचे हें नागरिकत्वाच्या जबाबदारीच्या जाणिवेचें लक्षण आहे. हिंदुस्थानांत जमिनीवरील करांत वाढ करून डिस्ट्रिक्ट बोर्डांना पैसा पुरविण्यांत येतो; परंतु स्वतःवरील कर वाढविण्यास कबूल असलेल्या जमिनदारांचीं मंडळें सांपडणें कठीण आहे. करवाढ करण्यापासून अलिप्त राहणें व प्रांतिक सरकारकडून जास्त मदत मागणें या गोष्टींकडे सध्यां जास्त कल आहे. हिंदुस्थानांत लोकलबॉडीजना सरकारकडून पैशाची मदत बहुतेक अनिर्बंधच करण्याची पद्धत इतकी पुढें गेली आहे कीं, पैशाची मदत करणाराच्या हातीं कारभाराचें धोरण ठरविण्याची मात्र कांहींच अखत्यारी नाहीं. मुंबई प्रांतांत डिस्ट्रिक्ट बोर्डांच्या उत्पन्नांपैकीं शें. ६० उत्पन्न सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक साहाय्याचेंच होतें. म्युनिसिपालिटचा आपलें उत्पन्न वाढविण्याची हरतऱ्हेनें खटपट करितात. परंतु मुख्य अडचण प्रत्यक्ष कर वसूल करतांना उत्पन्न होते. ग्रेट ब्रिटनमधील म्युनिसिपालिटी उत्पन्नांपैकीं शेकडा ९८ टक्के वसूल होईल अशी खबरदारी घेते. आणि शेकडा ९५-इतकाच वसूल झाला तर वसूल कमी कां झाला याची लगेच कसून चवकशी करण्यांत येते. परंतु मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणानंतरच्या म्युनिसिपालिटचांतून वसूल न झालेली रक्कम फुगतच चालली आहे. म्युनिसिपालिटचांच्या कारभाराचा आढावा घेतांना प्रत्येक प्रांतिक सरकारनें या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. या बाबतींत अतिशय चालढकलपणा आहे हें स्पष्ट आहे. नोकर वर्गानें पैसा गिळंकृत करण्याबद्दलही मोठी टीका होत असते. भरपूर पगार देऊन विश्वासू अधिकारी न नेमण्याचा हा परिणाम आहे. परंतु निष्काळजीपणा, गैरशिस्तपणा व योग्य देखरेखीचा अभाव याचाही हा परिणाम आहे. एकंदरीनें पाहतां मॉं.चेम्स. सुधारणापासून खेडेगांवांतील अधिकाऱ्यांच्या वसुलाची व्यवस्था फारच खालावली आहे. आणि प्रांतिक सरकारच्या हातांतील हिशेबाच्या बाबतींतील अधिकाऱ्यांनींही ती स्थिति सुधारलेली नाहीं.

सत्तेचा दुरुपयोग— म्युनिसिपालिटींत ज्या नेमणुका होतात त्या सर्व एकंदर कारभारांत सरसपणा यावा या उद्देशानें केलेल्या नसतात असें म्हणावयास भरपूर आधार आहे. म्युनिसिपल नेमणुकांच्या बाबतींत लुच्चेगिरी करणें हें एकटचा हिंदुस्थानांतच आढळून येतें असें नाहीं. ही लुच्चेगिरी बंद करण्याचें काम फार अवघड आहे; आणि जेथें कुटुंब, धर्म व जात यांचीं बंधनें अतिशय दृढ आहेत अशा हिंदुस्थानांत तर चोहींकडे तिचा एकदम प्रतिकार होईल, असें वाटत नाहीं. लायक माणसांना कामावरून काढून अयोग्य माणसांच्या नेमणुका झाल्याचीं उदाहरणें बरींच देतां येतील. बहुजन समाजाला याची नीट जाणीव झाली तरच हा अनिष्ट प्रकार बंद होईल. याखेरीज स्थानिक स्वराज्यांतील नोकऱ्यांना थोडी जास्त शाश्वति असणें जरूर आहे. सध्यां नोकरवर्गावर हुकमत चालविण्याचा वाजवीपेक्षां जास्त मोठा अधिकार अध्यक्षांच्या हातीं असतो. अध्यक्षांपैकीं बहुतेकांनीं आपापलीं कर्तव्यें चोखपणें बजावलीं असा जरी प्रांतिक सरकारांच्या रिपोर्टांतून उल्लेख असला तरी कांहीं ठिकाणीं अध्यक्षांकडून हातीं असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करण्यांत आला हेंही तितकेंच खरें आहे. अनेक तऱ्हेच्या लबाडचा केल्याचीं उदाहरणें अनेक सांपडतात. कित्येक ठिकाणीं स्थानिक स्वराज्यांत जागा पटकावण्यासाठीं किती तरी पैसा खर्च केल्याचे दाखलेही थोडथोडके नाहींत. यावरून अशी सहज कल्पना येते कीं, इतका खर्च करून ज्या जागा पटकावण्यांत येतात त्यापासून लबाडी करून जागांपायीं खर्च झालेला पैसा भरून काढण्याची या लोकांना आशा असते.

जातीजातींतील किंवा पक्षापक्षांतील तेढीचा

परिणामः––वर दाखविलेले दोष अनुभवानें आणि सार्वजनिक कार्याच्या वाढत्या जबाबदारीनें सुधारतां येतील. तरीही स्थानिक स्वराज्याच्या प्रगतीच्या मार्गांत एक दुसरी मोठी धोंड उभी आहे. राजकारणांत पदोपदीं नडणारी जातीजातींतील तेढ स्थानिक स्वराज्यालाही बरीच जाचते. हिंदुमुसलमान किंवा ब्राम्हणब्राम्हणेतर यांच्यांतील वैमनस्यामुळें स्थानिक स्वराज्याचा कारभार असावा तसा सकस नाहीं. या वैमनस्यांमुळें लायक इसमांना स्थानिक स्वराज्यांत प्रवेश मिळत नाहीं आणि कित्येक वेळीं सभासदांचें सर्व लक्ष या वैमनस्याकडे गुंतल्यामुळें इतर महत्त्वाच्या गोष्टींकडे अगदीं दुर्लक्ष होतें. सार्वजनिक जीविताच्या पोषणास अत्यंत आवश्यक असें नागरिकत्वाचें नातें दृढ होण्याच्या मार्गांत ही एक मोठीच अडचण आहे.

मतदारसंघाची प्रवृत्तिः––आतां ज्यांना मतदानाचा हक्क आहे त्यांपैकीं बहुतेकांनीं तो कोणत्या तऱ्हेनें बजावला आहे हें पाहूं. मतदानाच्या हक्काची किमत त्यांना जास्त जास्त पटूं लागली आहे हें आतां स्पष्ट आहे. आपला मतदानाचा हक्क बजावावा म्हणूनच सर्व लोक मतें देण्यास जातात असें नाहीं.त्यांस त्याव्यतिरिक्त अनेक कारणें असतात हें आम्हांस माहीत आहे तरी मतनोंदणीच्या ठिकाणीं जाऊन मतें देणाऱ्या लोकांची संख्या लक्षांत घेऊन जर बघूं लागलों तर प्रत्येक प्रांताचें या बाबतींत पुढें पाऊल पडत आहे असें दिसून येईल. मद्रास इलाख्यांत १९२१–२२ पासून मतनोंदणीचें प्रमाण सारखें वाढतच आहे. (१९२१ त सर्वांत कमी मतनोंद झाली त्याचें कारण असहकारितेची चळवळ होय.) तें प्रमाण म्युनिसिपालिटयांच्या बाबतींत शेकडा ४४·७पासून १९२६ त शेंकडा ७०·२ व तालुका बोर्डाच्या बाबतींत शेंकडा ३३·१७ पासून १९२६ त ५२·१ इतकें वाढलें आहे. यावरून दिसून येईल कीं, कोणत्या कां कारणांमुळें असो मतदानप्रवृत्ति वाढतच आहे. कांहीं ठिकाणीं मतदारांनीं अंदाधुंदीच्या व लवाडीच्या कारभारावर टीका केली आहे. परंतु आमचें मत असें आहे कीं, निवडणुकींत राज्यकारभाराच्या प्रश्नांचा फारच थोडा संबंध येतो. मतदार मतनोंदणीच्या जागीं जाऊन कोणास मत द्यावयाचें हें जें ठरवितो तें बहुधा जात, धर्म किंवा उमेदवाराबद्दलचा वैयक्तिक कल यांवरच ठरवितो.

म्युनिसिपालिटयांची सद्यःस्थिति––

हिंदुस्थानांत सध्यां सुमारें ७७७ म्युनिसिपालिटया असून त्यांच्या ताब्यांत १ कोटी ९० लक्षांवर लोकसंख्या आहे. या म्युनिसिपालिटयांपैकीं सुमारें ७१० म्युनिसिपालिटयांतील लोकसंख्या प्रत्येकीं ५०,००० हून कमी आहे. प्रांतांतील एकंदर लोकसंख्येशीं म्युनिसिपल हद्दींतील लोकसंख्येची तुलना करतां तें प्रमाण मुंबई इलाख्यांत सर्वांत जास्त म्हणज शेकडा २० व आसाममध्यें सर्वांत कमी म्हणजे फक्त शेंकडा २ इतकें आहे. इतर प्रांतांत तें शेंकडा ४ ते ९ या दरम्यान आहे. म्युनिसिपालिटयांतील एकंदर सभासदांपकीं निम्याहून जास्त सभासद लोकनियुक्त आहेत. व हें प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. म्युनिसिपालिटयांकडे सार्वजनिक सुरक्षितता, सा.आरोग्य, सा.सोय, सा.शिक्षण या स्वरूपाचीं कामें असतात. व हीं कामें करण्यासाठीं १४ ३ कोट रुपयांचें म्युनिसिपल उत्पन्न कराच्या रूपानें प्रांतिक सरकारकडून मदत व इतर रूपानें जमा होते. साधारणपणें म्युनिसिपालिटयांचें उत्पन्न कमीच असतें. वर दिलेल्या एकंदर उत्पन्नांपैकीं शेकडा ४० उत्पन्न कलकत्ता, मुंबई, मद्रास व रंगून या चार शहरांचेंच आहे. म्युनिसिपालिटीच्या मुख्य खर्चाच्या बाबी म्हटल्या म्हणजे जंगलरक्षण व पब्लिक वर्क्स. यापायीं उत्पन्नांपैकीं अनुक्रमें शेकडा १५ व शेकडा १४ इतका खर्च होतो. ड्रेनेजसाठीं शेकडा ६ खर्च पडतात. शिक्षणासाठीं शेकडा ८ खर्चिले जातात. कांहीं ठिकाणीं शिक्षणासाठीं खर्च यापेक्षां फारच जास्त असतो. मुंबई शहर सोडल्यास मुंबई प्रांतांत शिक्षणासाठीं शेकडा २१ इतका खर्च होतो. मध्यप्रांत व वऱ्हाड यांमध्यें एकंदर वसुलापैकीं शेकडा १७ हून जास्त रक्कम शिक्षणासाठीं खर्चीं पडते.

डिस्ट्रिक्ट बोर्ड

आसाम प्रांत वगळल्यास इतर प्रांतांतील बहुधा प्रत्येक जिल्ह्यांत एक डिस्ट्रिक्ट बोर्ड असून त्याखालीं २।३ दुय्यम बोर्डें असतात. बंगाल, मद्रास, बिहार ओरिसामध्यें युनियन्स कमिटयासुद्धां आहेत. सबंध हिंदुस्थानांत एकंदर २०७ डिस्ट्रिक्ट बोर्डें आहेत. ५८२ दुय्यम डिस्ट्रिक्ट बोर्डस आहेत. मद्रास प्रांतांत ४५७ पंचायत–मंडळें आहेत. यामुळें सर्व बोर्डांच्या ताब्यांत १९२९–३० मध्यें २१४० लक्ष लोकसंख्येची व्यवस्था होती. युनियन कमिटया व पंचा-

यत मंडळें सोडून बोर्डांतील एकंदर सभासदांची संख्या १९२९–३० त १६००० पेक्षां थोडी जास्त होती. त्यांपैकीं शेकडा ७३ सभासद लोकनियुक्त होते.म्युनिसिपालिटयांप्रमाणेंच बोर्डांतील लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण वाढवावें व नेमलेल्या किंवा सरकारी सभासदांचे कमी करावें अशा स्वरूपाचे प्रयत्न चालू आहेत. बोर्डांतील बहुतेक कारभार हिंदूंच्या हातीं आहे. एकंदर सभासदांपैकीं शेकडा ९६ सभासद हिंदु आहेत. सर्व बोर्डांतील सभासद–संख्यैपेकीं शेंकडा ११ सभासद सरकारी आहेत. सर्व बोर्डांचें एकंदर उत्पन्न १९२९–३० त १६·३७ कोट रुपये भरलें. म्हणजे प्रत्येक बोर्डाचें सरासरी उत्पन्न २००००० भरलें. खर्चाची मुख्य बाब शिक्षण होय. शिवाय रस्ते व पूल यांसारख्या सार्वजनिक उपयोगाच्या कामांवरहि खर्च होतो. वैद्यकीय मदतीपायींही बरीच रक्कम खर्चीं पडते.

प्रांत	बोर्डांची संख्या	सभासदांची संख्या निवडून आलेले	सरकारी व नेमलेले
१ मद्रास	६१२	६३७३	२२०१
२ मुंबई	२४९	३३१२	९८५
३ बंगाल	१०८	१२८७	७५४
४ संयुक्तप्रांत	४८	१४०७	९५
५ पंजाब	२९	८१३	३६६
६ बहार-ओरिसा	६५	८३५	२८३
७ मध्यप्रांत-वऱ्हाड	१०८	१३९३	४८३
८ आसाम	१९	३६०	१०४
९ वा.सरहद्द	५		२२२
१० अजमीर-मेरवाडा	१	१६	२७
११ कुर्ग	१	१३	७
१२ दिल्ली	१	११	८

एकूण वर्ष	बोर्डांची संख्या	सभासदांची निवडून आलेले	संख्या सरकारी व नेमलेले
१९२८–२९	१२४७	१५८३३	५४११
१९२७–२८	१२५६	१५७४४	५६८२
१९२६–२७	१२६५	१५८८९	५५४३
१९२५–२६	१२६९	१५३८०	५५८७
१९२४–२५	१२७९	१४७४१	५७३०
१९२३–२४	१२८९	१३५३९	६०३८
१९२२–२३	१३२५	१२८३७	६८२३
१९२१–२२	१३४०	९३६४	८९४६
१९२०–२१	१३४६	८८१५	८६४८

उत्पन्न—शिल्लक सोडून

प्रांत	प्रांतिक कर रु.	सार्वजनिक कामें रु.	इतर साधनें रु.	एकूण रु.	दरडोई किती रु. आ. पै
१ मद्रास	११११९१००६	१४३९८२०३	२९२५०८५८	५४८४८०६७	१– १– ८
२ मुंबई	५०४९४३०	२९९४०३६	१४५४७५०८	२२५९०९७४	१– ९– ०
३ बंगाल	८००८०९०	१६८६६६३	५११९१५६९	१४८८६३२२	०– ५– २
४ संयुक्त प्रांत	७६७८३८६	१५२५०७०	११००६६०७	२०२१००६३	०– ७– १
५ पंजाब	६११४६३८	२६६८६९२	१२७५३०६४	२१५३६३९४	१– १–१०
६ बहार व ओरिसा	७३५९३९१	१०४१०२९	६३५५९९४	१४७५६४१४	०– ६– ७
७ मध्यप्रांत-वऱ्हाड	२५३८८१६	८६५७३९	५६२३८५५	९०२८४१०	०– ८– २
८ आसाम	१०७१६४९	११०९६१६	१५८३५२९	३७६४७९४	०– ८– ९
९ वा. सरहद्दप्रांत	२६७८६३	२२०१४७	९९८५२३	१४८६५३३	०–१०– ७
१० अजमीरमेरवाडा	२९८५२	६२९८३	३६९०४	१२९७३९	०– ३– २
११ कुर्ग	६८३०८	६९३५५	४६३४२	१८४००५	१– २– ०
१२ दिल्ली	३२५१९	६७६९४	१८६५२५	२३६७३८	१– ३– ५

खर्च

	शिक्षण	सार्वजनिक कामें	सार्व. आरोग्य दवाखाने वगैरे	कर्ज व इतर किरकोळ	एकूण
	रु.	रु.	रु.	रु.	रु.
१ मद्रास	१२२३५४०८	१९८७६५६९	४१३७९८३	१७६६७९६६	५३९१७९२६
२ मुंबई	११८५४३९१	४७४७२१७	१३४४९५१	४४२७४७६	२२३७४०३५
३ बंगाल	३९६७९४१	५५००४०५	३३००४४९	२४६२१६१	१५२३०९५६
४ संयुक्त प्रांत	१०९७१३४८	३९२५४५५	४९५९३०२	३३८१७९	२०१९४२८४
५ पंजाब	१०६७७९१२	२१२४५५१	२८४३६५५	५९५४८७४	२१६००९९२
६ बहार व ओरिसा	४८३५३४५	५१३१७१६	२३०२९०९	२३०६१०८	१४५७६०७८
७ मध्यप्रांत-वऱ्हाड	३४८१३९८	१६१४३४१	५३१६४८	३७७६८२७	९४०४२१४
८ आसाम	१३५३३१२	१४५८३८६	६१७५७९	५५७६३२	३९८६९०९
९ वा. सरहद्दप्रांत	८९१५८७	१७८३४८	१२६९२०	२०२०५१	१३९८९०६
१० अजमीर-मेरवाडा	४५६९६	४४८५९	१०९६४	३०९७३	१३२४९२
११ कुर्ग	६५३८१	४४०६९	२५९७८	१४२४०	१४९६६८
१२ दिल्ली	१२९६५५	५९७४५	३४४१७	४३२६४	२६७०८१

उत्पन्न--शिल्लक सोडून

एकूण	प्रांतिक कर	साजर्वनिक कामें	इतर साधनें	एकूण	दरडोई किती
	रु.	रु.	रु.	रु.	रु. आ. पै
१९२८–२९	४९१४९३८९	२५६६२०४०	८५०१०२२६	१५९८२१६५५	०–१०– ९
१९२७–२८	४८३७१२१७	२५७७७७६२	८१४५२५७५	१५५६०१५५४	०–१०– ६
१९२६–२७	४९०३६०३४	२५२४५६८०	७६६३४६००	१५०९१६३१४	०–१०– २
१९२५–२६	४७०८३१९१	२२९५८७५४	७०५०००७८	१४०५४२०२३	०– ९– ६
१९२४–२५	४६००२९४३	१७८३८०४३	५९३४०२६२	१२३१८१२४८	०– ८– ६
१९२३–२४	४४१६५५५४	१८१८६५१३	५९०५८९५४	१२१४११०२१	०– ८– ३
१९२२–२३	४२६३६१८७	१६७९२०९३	५३८१५३२९	११३२४३६०९	०– ७– ८
१९२१–२२	३९४६२९९४	१७९७२१५३	५१८७५३१७	१०९३१०४६४	०– ७– ६
१९२०–२१	३६२२४३८४	१६९३९६३६	४९१५८९३७	१०२३२२९५७	०– ७–१०

–खर्च–

एकूण	शिक्षण	सार्व० कामें	आरोग्य, दवाखाने	कर्ज व इतर	एकूण
	रु.	रु.	रु.	रु.	रु.
१९२८–२९	५९०८४५४०	४८५३२०६६	५९९५६६३२	३६३५६६२३	१६३९२९८६१
१९२७–२८	५७१८९३९५	५०३८४९६४	१९४०७४३९	३२६०९९६६	१५९५९१७६४
१९२६–२७	५३०११६१५	४९४९४११५	१८०८८१००	३०७२१०३७	१५११३१४८६७
१९२५–२६	५०४५८३०८	४३३१९३६२	१७१५७४०७	२५६३९४४५	१३६५७४५२२
१९२४–२५	४४६२१९६६	३७३६७८१५	१४००३४२५	२५३०७०५७	१२१३००२६३
१९२३–२४	४२७७३२४७	३८१२९८७२	१३६१२०२२	२२८८२५६६	११७३९७७०७
१९२२–२३	४१९७७६४५	३६५६३८०८	१२८०३८६४	२२०६८१४०	११३४१३४५७
१९२१–२२	४०९१५२०५	३८४६५२७४	१२३६६३२७	२१५६०७५८	११३४७३०९३
१९२०–२१	३६१६४७२२	४४२१८७७५	१०९१८०५१	१५२४१३४१	१०६५४२८८९

स्थानिक स्वराज्य

(मुंबई इलाखा व सिंध यांमधील म्युनिसिपालिटीचे कर व त्यांचा खर्च याचा १९३०-३१ चा अहवाल.)

म्युनिसिपालिट्यांची एकंदर संख्या व विस्तारः- मुंबई इलाखा व सिंध यांमध्यें एकंदर म्युनिसिपालिट्यांची संख्या १९३१ अखेर १५५ होती. १९३० सालीं ती १५४ होती. पण ३१ सालांत विलेंपार्लें येथें नवीन म्युनिसिपालिटी स्थापन झाल्यामुळें ही संख्या एकानें वाढली.

शहर म्युनिसिपालिट्याः---ह्यांपैकीं म्युनिसिपालिटींत असलेलीं शहरें, २९ होतीं. नोटिफाइड एरियांची संख्या मुंबई उपनगरांत ८, मध्यभागांत २ व दक्षिण भागांत ५ अशी होती. १९२८ सालीं इंदापूर व सासवड येथील म्युनिसिपालिट्या रद्द झाल्या होत्या. पण १९३१ मध्यें त्यांना पुन्हां काम करण्यास परवानगी मिळाली. सुरत शहर म्युनिसिपालिटी ३१ सालांत रद्द करण्यांत येऊन त्याऐवजीं १५ इसमांचें कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें. व बोरसद येथील म्युनिसिपालिटी १९३० मध्यें रद्द करण्यांत आली. सिंधमधील कोत्रि म्युनिसिपालिटीनें अहवाल पाठविला नाहीं. म्हणून तिचा समावेश त्यांत केला नाहीं. १९३१ च्या खानेसुमारीवरून म्युनिसिपल क्षेत्रांतील एकंदर लोकसंख्या ३०४५९९४ होती. ३० सालांत २६७७२७२ होती. झालेली वाढ ही सिंधमध्यें व इतर सर्व प्रांतांमिळूनच झालेली होती. अहमदाबाद व भडोच या म्युनिसिपालिट्यांनीं खानेसुमारींत भाग न घेतल्यामुळें उत्तर भागांतील लोकसंख्येचा आंकडा कमी झाला. सर्वसाधारणपणें म्युनिसिपल क्षेत्राची वाढ कोठेंही झाली नव्हती. फक्त उत्तर भागांतील कल्याण म्युनिसिपालिटीचें क्षेत्र वाढलें. विलेपार्लें म्युनिसिपालिटीची मर्यादा १९३१ मध्यें तयार झाली. मुंबई उपनगर हा भाग १९३० सालीं कमी करण्यांत येऊन तो मध्यभाग कमिशनरच्या ताब्यांत देण्यांत आला.

म्युनिसिपालिट्यांची घटनाः---म्युनिसिपालिट्यांच्या १९३१ सालांत झालेल्या त्रिवार्षिक निवडणुकी,

(१) उत्तर भाग-अहमदाबाद, उमरेठ, आनंद, बोरसद, डाकोर, मेहेमदाबाद, कैरा, नडियाद, व भडोच.

(२) मध्यभाग-अहमदनगर, भुसावळ, धरणगांव, जळगांव, धुळें, नाशिक, मनमाड, त्रिंबक, पुणें सबर्बन, लोणावळें, जेजुरी, बारामती, शिरूर, आळंदी, विलेंपार्लें, जुहु, वांद्रें.

(३) दक्षिणभाग-नरगुंद नवलगुंद, माथेरान, रत्नागिरी व मालवण. कांहीं ठिकाणची सर्व साधारण निवडणूक खानेसुमारीच्या सोयीसाठीं पुढें ढकलण्यांत आली. व १० म्युनिसिपालिट्यांमध्यें फेरनिवडणूक झाली. सिंधमध्यें म्युनिसिपालिट्यांच्या घटनेमध्यें कांहींही फरक झाला नाहीं. कराची, हला, तांडो-अल्यार, नाझारपूर, तांडो महमंदखान, रोहिरी व जाकोबाबाद ह्या म्युनिसिपालिट्यांची त्रैवार्षिक निवडणूक झाली.

(४) म्युनिसिपालिट्यांच्या एकंदर सभा ह्या वर्षांत ४४०४ झाल्या. सबंध इलाख्यांत सभांस हजर रहाणाऱ्या सभासदांचें शेंकडा प्रमाण ५७·४३ असें होतें. ह्या सालांत तहकूब झालेल्या सभांची संख्या बरीच मोठी होती. कारण पुष्कळ म्युनिसिपालिट्यांनीं राजकीय कारणांसाठीं आपल्या सभा तहकूब केल्या होत्या. साधारणपणें दोन तृतियांश सभांस सभासद हजर नसत.

(५) कराच्या पद्धतींत झालेला फरक,:---(१) घरपट्टींत विशेष फरक झाला नाहीं. (२) म्युनिसिपल आयात जकात-संगमनेर व गोकाक, येथील म्युनिसिपालिट्यांनीं रॉकेल व पेट्रोल यांवर कर बसविला आणि कन्डाड व नवलगुंद येथील म्युनिसिपालिट्यांनीं आपल्या आयात कराच्या याद्या पुन्हां तयार केल्या. (३) सहामाही कर---धुळें, कुमठा, उमरेठ, भडोच, सक्कर व तांडो, अदाम येथील म्युनिसिपालिट्यांनीं ह्या करांत कांहीं सुधारणा केल्या. व चिपळूण म्युनिसिपालिटीनें पेट्रोल व मोबिलॉइल यांवर षाण्मासिक कर बसविला. (४) पाणीपट्टी---अहमदनगर म्युनिसिपालिटीनें दुकानांवर पाणीपट्टी बसविली. (५) सॅनिटरी कर---त्रिंबक, पांचगणी, इस्लामपूर, बार्शी व आनंद येथील म्युनिसिपालिट्यांनीं आपल्या सर्वसाधारण व विशिष्ट कराच्या याद्यांत सुधारणा केली. (६) वहातूक व वाहनें यांजवरील कर-सावदा म्युनिसिपालिटीनें व्हील टॅक्स काढून टाकला. रोहिरी, पांचगणी, त्रिंबक, करमाळा, नवलगुंद, गोकर्ण, चिपळूण व ठाणें येथील म्युनिसिपालिट्यांनीं व्हील टॅक्स व रोड टोल्स यांच्या याद्या तपासून जरूर ते फरक केले. (७) इतर कर-अहमदनगर, इगतपुरी, गोकाक, इलकल व बय-

दर्गि, म्युनिसिपालिटयांनीं दुकानें व हॉटेल्स यांवर कर ठेवला. कऱ्हाड व इस्लामपूर म्युनिसिपालिटयांनीं नोटीस फी व वॉरंट फी यांत सुधारणा केली. नवलगुंद म्युनिसिपालिटीनें गुरांच्या बाजारावर कर वाढविला. (६) म्युनिसिपालिटयांचें उत्पन्न--हया सालांत एकंदर उत्पन्न ३८४ लाख रुपये होतें. १९३० सालांत तें ४४५ लाख रुपये होतें. सर्व साधारणपणें प्रत्येक खात्यांत तूटच होती. एकटया रेव्हिन्यूमध्यें ३ लाखांची तूट होती. व त्या सर्वांला कारण व्यापारमंदी हें झालें. (७) म्युनिसिपल आयात जकात व पाण्मासिक कर हया खात्यांत २२०००० ची तूट व ती बहुतेक सर्व प्रांतांतूनच झालेली होती. फक्त सिंधमध्यें ७३००० रु. वाढ उत्पन्नांत झाली.

२ जमिनीवरील व घरांवरील कर--हया खात्यांत ५०००० रु. वाढ झाली. एकटया मध्यभागांत १०७०००रु.ची वाढ झाली. दक्षिण भागांत २०००० रु. ची वाढ झाली. फक्त सिंध व उत्तर भागांत अनुक्रमें २९००० व ४९००० ची तूट उत्पन्नांत आली. (९) पाणीपट्टी--हया खात्यांत ४७००० रु. ची तूट (१०) थकलेल्या बाकीची वसुली.–मुंबई इलाखा व सिंध मिळून एकंदर १९३१ अखेर थकलेली बाकी २७·५२ लाख होती ३० सालांत ही बाकी ५॥ लाख कमी होती. कांहीं कांहीं म्युनिसिपालिटयांतून खुद्द म्युनिसिपल कौंसिलर्संकडेच पुष्कळ बाकी शिल्लक आहे. (११) म्युनिसिपालिटयांच्या मालमत्तेंतून आलेला वसूल--हया खात्यांत एकंदर ९३००० रु. ची तूट होती. एकटया अहमदाबाद म्युनिसिपालिटींत १५३००० ची तूट होती. व इतर ठिकाणीं मात्र वाढच दिसून आली. (१२) सरकारी देणग्या व वर्गणी--एकंदर सरकारी ग्रँट २०,२८२०८ रु. मिळाली. मागील सालांत २३५९७४४ रु. होती. कांहीं संस्थांनीं सविनय कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतल्यामुळें सरकारनें कांहीं स्कूल बोर्डांची ग्रँट बंद केली व म्हणून उत्पन्न कमी झालें. (१३) म्युनिसिपल आयात जकात व पाण्मासिक कराची पद्धति--उत्तर भागांत ढोलका, विरमगांव, राणपूर, ठाणें व वसई येथें म्युनिसिपल–आयात–जकात पद्धतच कायम ठेविली व इतर सतरा म्युनिसिपालिटयांतून पाण्मासिक कराची पद्धति कायम ठेविली. मोदासा, बोरसद, डाकोर, कापडगंज व रणदेर हया म्युनिसिपालिटयांतून हया दोनही पद्धति नव्हत्या. एकंदर जकातीच्या वसुलांपैकीं ११५२९७ रु. रिफंड हया सालीं देण्यांत आला होता. मध्यभागांत ३४ म्युनिसिपालिटयांतून म्युनिसिपल आयात जकात पद्धति चालू होती. व ९ म्युनिसिपालिटयांत पाण्मासिक पद्धत चालू होती. या भागांत एकंदर जकात १४६६५७९ रु. वसूल झाली व त्यांपासून निवळ उत्पन्न १३६२७४३ रु. मिळालें. दिलेल्या रिफंडचें शेंकडा प्रमाण ७·०७ असें होतें. दक्षिण भागांत एकंदर आलेलें जकातीचें उत्पन्न रु. ५८५००० होतें व त्यांतून रु. १८००० रिफंड म्हणन देण्यांत आले. हया भागांत १० म्युनिसिपालिटया सोडून इतर सर्व ठिकाणीं म्युनिसिपल आयात जकात पद्धति चालू होती. सिंधमध्यें १५ म्युनिसिपालिटयांतून पाण्मासिक कर पद्धति चालू होती.

(१४) म्युनिसिपालिटयांचा खर्च–१९३१सालीं एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी व कर्ज या बाबी सोडून एकंदर खर्च ३८९९२००० रु. झाला. त्या मागील सालीं तो ४६११३००० रु. होता. एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी व कर्ज हयांवर २३२ लाख रु. खर्च झाला.

१५ पाणी पुरवठा–भांडवली खर्च--खात्यांत २५३००० रु. खर्च कमी झाला. एकटया उत्तर भागांत व सिंध प्रांतांत अनुक्रमें दोन लाख व १ लाख रु. खर्च कमी झाला. मध्यभाग व दक्षिणभाग हयांमध्यें जास्त खर्च झाला. (१६) पाणी पुरवठयाचा जमाखर्च--उत्तर भागांत अहमदाबाद म्युनिसिपालिटीचें पाणीपट्टीमुळें मिळालेलें उत्पन्न १९३१ सालीं रु. ११०६१९० होतें. १९३० सालांत तें ११०८९१५ रु. होतें. सुरत म्युनिसिपालिटींत पाणी पुरवठयाच्या कामापासून त्या सालीं ९०६७३ रु. फायदा झाला. होता. मध्यभागांत सातारा, सोलापूर, बार्शी, धुळें व नाशिक येथील पाणी पुरवठयाचें कामांत तूट आली नाहीं, पण जळगांव, त्रिंबक व विटे येथील कामांत तोटा झाला. मुंबई सबर्बन प्रांतांत एकही म्युनिसिपालिटीस स्वतःचा पाण्याचा सांठा नाहीं. त्यांना लागणारें पाणी त्या सरकारी साठयांतूनच विकत घेत होत्या. दक्षिण भागांत विजापूर, धारवाड, व अलिबाग येथील कामांत तोटा आला पण हुबळी, रोहें, माथेरान, पनवेल व पेण येथील पाण्याच्या साठयांपासून मात्र फायदा झाला. सिंधमध्यें हैद्राबाद म्युनिसिपालिटीस पाणीपुरवठयापासून ५१००० रु. फायदा झाला, व सक्कर म्युनिसिपालिटीस ९७००० रु. उत्पन्न झालें, व खर्च

८१००० झाला. (१८) ड्रेनेज—विशेषतः ऑफिस व दुरुस्ती या खात्यांत खर्च रु. १७७२००० पासून रु. १७१३००० पर्यंत उतरला. (१९) संरक्षक— ह्या खात्यांत एकंदर खर्च २८५८००० रु. झाला. १९३० सालीं हा खर्च रु. ३२४१००० होता. या खत्यांतील होणारे खर्चाचे पोटभाग —(१) नवीन शौचकूप, मोऱ्या वगैरेवर झालेला खर्च, (२) जुन्या कामगारांची पगाराची वाढ व नवीन नेमलेल्या नोकरांचा पगार. (३) मोटार लॉरीज कचऱ्याच्या पेटचा व इतर लागलेले सामान याची किंमत.

(२०) रस्त्यांवर होणारा खर्च व त्यासाठीं घेण्यांत येणारा व्हील टॅक्स व रोड टोल—एकंदर रस्त्यांवर झालेला खर्च १७७०००० रु. होता. ३० सालीं तो २०४६००० रु. होता. सिंध व इतर बहुतेक प्रांतांमिळून २७६००० रु. खर्च कमी झाला. एकटचा मध्यभागांत हा खर्च २१२००० रुपयांनीं कमीं झाला. गोळा झालेल्या जकातींतून तो गोळा करण्यास लागणारा पैसा व पाणी शिंपडण्यास लागणाऱ्या खर्चांतील एकतृतियांश रक्कम वजा जातां बाकीचा पैसा रस्ता दुरुस्ती व नवीन रस्ते करण्यांत खर्च करावा असा सरकारी हुकूम आहे पण तो बहुतेक म्युनिसिपालिटचा पाळीत नाहींत. २१ शिक्षण—३१ सालांत एकंदर शिक्षणावर खर्च ४८३८००० रु. झाला मागील सालीं हा खर्च ४८९३००० रु. होता. कमी झालेल्या खर्चांपैकीं, पुष्कळसा भाग सिंधमधीलच होता. एकटचा कराचीमध्यें हा खर्च ९४००० रु. कमीं झाला पण उत्तर भागांत विशेषतः अमदाबादेस नवीन इमारती वगैरे बांधल्यामुळें हा खर्च १०५००० रुपयांनीं वाढला. (२२) वर्ष अखेर शिल्लक—शिलकींत ६२७००० रु. ची एकंदर तूट आली. सिंध, मध्यभाग, व दक्षिणभाग यांमध्यें अनुक्रमें ३५३०००, ३४३००० व १४०००० रुपयांची तूट आली. पण उत्तर भागांत मात्र २०९००० रु. जास्त वाढ झाली. इलाख्यांतील सर्व म्युनिसिपालिटचांची (सिंधमधील धरून) एकंदर वर्षअखेर शिल्लक ९२२२००० रु. होती. १९३० सालांत ही शिल्लक ९८४९००० रु. होती. सिंधमध्यें निव्वळ शिल्लक (डिपॉझिटस सोडून) ५८४७००० रु. होती. त्यांपैकीं कराची म्युनिसिपालिटीची शिल्लक ४५५८००० रु. होती. (२३) हिशेब तपासणी— अकौंटंट जनरलच्या स्थानिक हिशेब तपासणी खात्याकडून इलाख्यांतील (सिंध धरून, सर्व म्युनिसिपालिटचांच्या हिशेबाची तपासणी झाली. नेहमींप्रमाणेंच ह्या सालीं पुष्कळ चुका दिसून आल्या. उत्तर भागांत—अहमदाबाद, कापडगंज व भडोच म्युनिसिपालिटचांच्या हिशेबांत अफरातफर, फसवेगिरी व कामांमधील अनियमितपणा दिसून आला. ठाणें म्युनिसिपालिटीनें म्युनिसिपल मार्केट व चाळी बांधण्याचें काम दिलेल्या कंत्राटदाराकडे २८००० रु. बाकी होती व त्याचीं कारणें म्हणजे म्युनिसिपाविलटीची ढिली हुकमत, व दुर्लक्ष हींच होतीं. ढोलका, मोडसा, राणपूर, प्रांतिज, धंडुका, उमरेठ, कापडवंज, कायरें, भडोच, रणदेर व वसई येथील म्युनिसिपालिटचांची आर्थिक स्थिति चांगली नव्हती, मध्यभागांत येवले, जुन्नर, विटे व सोलापूर ह्या म्युनिसिपालिटचांतून ३१ सालीं उधळपट्टी व पैसा खाऊपणाच्या पुष्कळ गोष्टी उघडकीस आल्या. येवलें म्युनिसिपालिटीचा कारभार अस्ताव्यस्त होता. व देखरेख मुळींच चांगली नव्हती. सोलापूर म्युनिसिपालिटींत एका कारकुनानें व कांहीं नाकेदारांनीं पैशांची अफरातफर केली . तसेंच म्युनिसिपल आयात जकात, व्हील टॅक्स व पाणीपट्टी या खात्यांत अंदाधुंदी होती. एका म्यु. कौंसिलरानें म्युनिसिपालिटीचा कायदा मोडून मुख्य नळीच्या खालच्या बाजूनें आपल्या शेतांस खताचें पाणी घेतलें तरी त्यावर म्युनिसिपालिटीनें काम चालविलें नाहीं. पुणें सबर्बन म्युनिसिपालिटीच्या कारभारांत उत्तम देखरेख नसल्यामुळें पुष्कळच घोटाळे दिसून आले. मध्यभागांत या सालीं मागील सालाप्रमाणेंच पुष्कळ ठिकाणीं गैर व्यवस्था दिसून आली. विजापूर, बागलकोट, चिपळूण, मालवण व रत्नागिरी ह्या म्युनिसिपालिटचांनीं आपल्या हिशेबाच्या वह्या वेळेवर दिल्या नाहींत. विजापूर म्युनिसिपालिटीच्या १९२६–२७ च्या वह्या १९३१ सालपर्यंत निकालांत निघाल्या नव्हत्या. बागलकोट म्युनिसिपालिटींच्या १९२८–१९२९ व १९२९–३० सालच्या वह्या मिळाल्या नाहींत. सिंधमध्यें खालीलप्रमाणें गैर व्यवस्था दिसली.

(१) हिशेबाच्या वह्या देण्यास विलंब त्यांतल्यात्यांत जाकोबाबाद म्युनिसिपालिटीनें ह्या कामांत फारच दिरंगाई केली. (२) कराची, हैद्राबाद, ठठ्ठा सक्कर व नझारपूर येथील हिशेब चुकीचे होते. (३) २६ म्युनिसिपालिटचांपैकीं

१२ म्युनिसिपालिटचांना आर्थिक स्थिति सुधारण्यास सांगितली पण तें त्यांनीं केलें नाहीं. (४) ठठ्ठा, कोत्री, रातोडेरा, मिपुर्खा, तांडो, महमदखान, सक्कर, लारखाना, बुबक, जाकोबाबाद, नझारपूर मतिआरि व तांडो अडचार येथील म्युनिसिपालिटचांनीं म्युनिसिपल नियम व उपनियम नीट पाहिले नव्हते असें आढळून आलें. (२४) स्वच्छता व शहर सुधारणासाठीं दिलेल्या देणग्या सरकारकडून मिळालेल्या कांहीं महत्त्वाच्या देणग्या

म्यु. नांव	हेतु	दिलेल्या देणग्या
सुरत	ड्रेनेज	२२६८०
पुणें	ड्रेनेज	४४९५४
नंदुर्बार	पाणी पुरवठा	१३६५०
अहमदनगर	पाणी पुरवठा	१४९९५
विटे	पाणी पुरवठा	८९५१
जळगांव	पाणी पुरवठा	६०००
सोलापूर	ड्रेनेज	७०००
हैद्राबाद	पाणी पुरवठा	३३८८०

पुणें म्युनिसिपालिटीविषयीं मत—

पुणें म्युनिसिपालिटीचा कारभार दिवसेनुदिवस प्रगतीपर होत आहे, असें आढळून आलें. उत्पन्नामध्यें थोडी वाढ व खर्चामध्यें थोडी बचत दिसून आली. रस्ते थोडेसे सुधारले. पण शहर वाढीची योजना पुष्कळ जोरांत दिसून आली. फ्लशिंगचे पायखाने सक्तीनें सुरूं केले. व शिक्षणाचा प्रसारही पुष्कळ झाला होता. शहराचे आरोग्य उत्तम होतें. ह्या म्युनिसिपालिटीचा कमीपणा फक्त एका गोष्टींत दिसून आला. व तो हा कीं, थकलेली बाकी जितक्या जारीनें वसूल व्हावयास पाहिजे तितक्या जारीनें झाली नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे पुष्कळ सभा निवळ राजकीय चळवळीच्या सहानुभूतीसाठीं तहकूब करण्यांत आल्या.

सर्वसाधारण मत—

एकंदरीनें पाहतां पुष्कळ म्युनिसिपालिटचा स्वतःच्या कायद्याच्या क्षेत्राच्या बाहेर गेल्या होत्या व त्यांनीं आपल्या कारभारांत राजकीय चळवळीचा संसर्ग लागू दिला. राजकारणासंबंधीं ठराव पास करणें, तसेंच राजकीय पुढाऱ्यांच्या सन्मानार्थ व सरकाराच्या धोरणाच्या निषेधार्थ सभा तहकब करणें, सार्वजनिकरित्या राष्ट्रीय ध्वज उभारणें व इतर सरकारविरुद्ध वर्तन करणें, इत्यादि बऱ्याच गोष्टी कांहीं म्युनिसिपालिटचांनीं करून स्वतःच्या कामांकडे दुर्लक्ष केलें. व त्यामुळें फक्त सरकारचीच त्यांच्यावर इतराजी झाली असें नाहीं तर लोकांनाही त्यांजबद्दल अनादर वाटूं लागला. उत्तर भागांत ४ म्युनिसिपालिटचांनीं खानेसुमारींत भाग घेतला नाहीं. तसेंच भडोच व अहमदाबाद म्युनिसिपालिटचांनीं शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें. व पुष्कळ मास्तरांना सक्तीनें राजकीय चळवळींत भाग घेण्यास लावलें व त्यामुळें त्यांच्या ग्रँटस रद्द कराव्या लागल्या. हें सोडून दिलें तरी इतर दृष्टीनेंही त्यांचा कारभार समाधानकारक नव्हता. पुष्कळ ठिकाणीं पक्षभेद व जातिद्वेष हा नेहमींप्रमाणेंच दिसून येत होता. व सुरत म्युनिसिपालिटींत ह्यामुळें तिच्या अंतर्गत कारभारांत गोंधळ झाला. आर्थिक संपत्ति बहुतेक सर्व म्युनिसिपालिटचांची अगदींच वाईट होती. व त्यामुळें वसुलांत तूट आली, पण तीही काटकसर करून अगर नवीन कर लादून भरून काढण्यांत आली नव्हती. त्याचप्रमाणें वसुलाच्या बाकयाही थकल्या होत्या. एक दोन ठिकाण सोडून बहुतेक ठिकाणीं विशेष सुधारणा कांहीं झाल्या नव्हत्या. सोलापूर म्युनिसिपालिटीचें काम मात्र समाधानकारक होतें. खुद्द म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष (मि. एम. आर. शहा) राजकीय चळवळींत भाग घतल्यामुळें तुरुंगांत गेले. पण उपाध्यक्ष श्री. जे. एस्. जसवाला यांनीं म्युनिसिपालिटीचें काम व्यवस्थित केलें.

तरी एकंदरीनें पाहतां हें वर्ष पुष्कळ अडचणीचें असून सुद्धां बहुतेक म्युनिसिपालिटचांनीं आपलें काम चोख बजाविलें होतें.

ग्रामपंचायत प्रसार

१ वेदकालापासून ग्रामपंचायतीमार्फत खेड्यापाड्यांची व्यवस्था उत्तम रीतीनें झाल्याचे दाखले सर्व वाङ्मयभर पसरलेले आढळतात अशाचपैकीं एक खालीं उद्धृत करतों:—

"चोल घराण्याचे इतिहासांतील उक्कल येथील चौदा शिलालेख या ग्रामपंचायतीचे निदर्शक आहेत. हे लेख सन ८०० ते ११०० पर्यंतचे आहेत. पंचायतीचे ताब्यांत कर, बागा, देवळें, तळीं, कालवे वगैरे कामें असत. त्यांच्या निरनिराळ्या समिति असत. जंगलखातेंहि त्यांच्या ताब्यांत असें. नवीन वसाहत करण्यास त्यांची परवानगी लागे. खंडानें द्यावयाच्या शेतजमिनीही पंचायत देई. गांवचे पोलीसही यांचे अधिकारांत असत. सार्वजनिक फंड त्यांच्या ताब्यांत असत. बिनवारसी माल किंवा जमिनी यांची खरेदी विक्री हीच करी. सारा वसुली अगर माफी किंवा त्यासाठीं जमीन

जप्त करणें वगैरे अधिकार दिला होते. सारावसुलीची शिल्लक राजधानीस न पाठवितां सभा आपल्या जवळ ठेवी व अडचणींत शेतकऱ्यांना मदतीदाखल देई. करवसुलीच्या कामीं जबरदस्ती होत नसे. इची निवडणूक दरसाल होत असे. व सर्व सभासद लोकनियुक्त असत. यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेखीसाठीं नेमणूक होई. मात्र त्यांचें काम हिशेब तपासणें व अंदाजपत्रकाप्रमाणें राज्यांतील वसुलांतून तितकी रकम पुरविणें इतकेंच असे. हे अधिकारी दोन असत. प्रथम देवस्थान व इनाम वगैरेची रक्कम देऊन बाकीचा गांवचा सर्व वसूल (सरकार देण्याशिवाय) पंचायतीचे हातींच राही. न्यायनिवाडेहि पंचायतच करी. फांशीची शिक्षा क्वचित अमलांत येई. देवळांत नंदादीप लावणें अगर पंचायतीस अमुक इतक्या गाई पुरविणें या गोष्टी शिक्षा म्हणून देत असत. ज्यूरीची पद्धत त्यावेळीं होती. पंच (ज्यूरर्स) निकालदेतील तो अखेरचा म्हणून सरकारकडून मानला जाई.फक्त सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं खटला चाले एवढेंच. तत्कालीन दळणवळणाचीं अल्प साधनें व अफाट प्रदेशविस्तार लक्षांत घेतां ही पंचायत बरीच निर्दोष होती असें वाटतें. (ज्ञानकोश,भाग१३पान२१३.) या अतिशय पुरातन काळापासून चालत आलेल्या संस्थेचे म्हैसूर संस्थानांत अगदीं कालपर्यंत अवशेष अस्तित्वांत होते. पांच सहा वर्षांपूर्वीं ही पद्धत वाढवून अधिक तपशिलाचा कायदा तयार झाला व तो हल्लीं सर्व संस्थानभर आठही जिल्ह्यांत चालू आहे.

२ हिंदुस्थानांत सरकारकडून जमीन महसुलाच्या बाबींसंबंधीं खेडेविभागाचे दोन प्रकार समजले जातात. (१) रयतवारी पद्धतीनें नांदणारीं खेडीं (२) जमीनदारी पद्धतीनें नांदणारीं खेडीं यांतील पहिली पद्धत हीं प्राचीन हिंदु काळीं पूर्णावस्थेला पोहोंचलेला होती.दुसरी पद्धत मुसलमानी अमदानीमध्यें खजिना जमविण्याच्या सोईला धरून अमलांत आणली गेली. कोणा तरी पराक्रमी व कर्तबगार माणसाला बादशाही अमलामध्यें लेखी फर्मानें देऊन जमीनदार, तालूकदार इनामदार इत्यादि लहान मोठीं नांवें देऊन त्याकडे दरसालची जमीन महसुलाची वसुली, कांहीं खडी फौज सरकार--दिमतीस देणें हीं कामें सोपविलीं जाऊन त्याचे ते अधिकार वंशपरंपरेनें चालविण्याची हमी मुसलमानी अमलांत घेतली जात असे. हीच पद्धत हल्ली यू. पी. प्रांत, बहार. बंगाल वगैरे कडील प्रांतांतून निरनिराळ्या नांवाखालीं चालू असलेली आढळते. रयतवारीचा प्रकार दक्षिणेकडे मद्रास,मुंबई, वऱ्हाड वगैरे प्रांतांतून शिल्लक राहिलेला आढळतो. हा प्रकार आधुनिक पद्धतीच्या लोकशाही वळणास अनुकूल असा ठरतो. उलटपक्षीं जमीनदारीचा कोणताहि प्रकार सबंध गावाच्या जमिनीची मालकी जमीनदाराकडे वंशपरंपरा राखीत असल्यामुळें कुळांना कारखान्यांतील कामगारासारखें वागविण्याकडे जमीनदाराची प्रवृत्ति राहून तेथें पंचायतीसारख्या लोकशाही नमुन्याची संस्था स्थापन होऊं देण्यास जमिनदार साहजिक विरोध करतो.

डिसेंट्रलायझेशन कमिशन रिपोर्ट १९०९सालीं प्रसिद्ध झाला.यामध्यें लॉर्ड रिपन साहेबांच्या स्थानिक स्वराज्यविषयक सन १८८२ सालच्या ठरावापुढें जाऊन ग्रामपंचायती संबंधानें बऱ्याच नव्या सूचना केल्या आहेत. त्यांतील कांहीं येणेंप्रमाणें—

१ गांव हा कारभाराच्या सोईसाठीं स्वतंत्र प्राथमिक घटक म्हणून गणला जावा. २एक गांव अथवा जवळपासचा एखादा दुसरा गांव यामध्यें नातलगांची वस्ती व सारखेपणाची राहणी आढळल्यास पंचायत स्थापावी. ३ प्रारंभीं स्थापिलेल्या पंचायतीवर कर लादणें व त्याची वसुली करणें इत्यादि लोकांना नापसंत होणारीं कामें लवकर लादलीं जाऊं नयेत. ४ पंचायतीला लहान सहान दिवाणी फौजदारी तंटे तोडण्याचा अधिकार असावा. ५ गांवकीचा कारभार स्वच्छता, शिक्षण, रस्तेदुरुस्ती, बाजार वगैरे त्यांना चालवितां यावा. पंचायतींना बोर्डासारख्या संस्थांतून दिल्या जाणाऱ्या लोकल फंडाचा हिस्सा मिळावा वगैरे शिफारसी केल्या गेल्या.

हिंदुस्थान सरकारनें या शिफारशी १९१०–११ सालीं सर्व प्रांतिक सरकारकडे पाठविल्या. तसेंच १९१५ सालीं एक ठराव प्रसिद्ध करून प्रांतिक सरकारना या कामीं अधिक लक्ष घालण्याची दिशा दाखविली. त्या पंधरा सालच्या ठरावांत खालील बाबी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत—

(१) पंचायत स्थापण्याचा प्रयोग लोकांची अनुकूलता पाहून सुरूं करावा. (२) पंचायतीचा कायदा साधा, कर्तव्य ऐच्छिक, अधिकार बेताचे व कामें स्पष्ट नमूद केलेलीं आणि सोईवार असावी (३) योग्य दिसेल त्या ठिकाणीं पंचायतीना न्यायाधिकार द्यावे व निरनिराळीं कामें एकाच पंचायतींमार्फत चालवावी. (४) हल्लीं खेड्यासाठीं आढळणाऱ्या स्वच्छता,

शिक्षण वगैरेसारख्या कमेटचा वेगळचा वेगळचा न ठेवतां नवीन होणाऱ्या पंचायतींत दाखल कराव्या (५) न्यायाधिकारासंबंधीं कोर्ट फी स्वल्प असावी. (६) कायदा चालवितांना कायद्याच्या कांटेकोरपणापेक्षां साधा तारतम्याचा न्याय देण्याकडे दृष्टि अधिक राहावी. व तो ताबडतोब मिळावा. (७) ऐच्छिक कर बसविण्याची सोय असावी व कराच्या भयानें पंचायत स्थापनेस अडथळा न व्हावा. (८) पंचायत व तालुका अथवा जिल्हा संस्था अथवा बोर्डें यांचे संबंध स्पष्ट असावे.

हिंदुस्थान सरकारनें यानंतर देशांत प्रचलित होणारा पुढील सुधारणा कायदा लक्षांत घेऊन त्याच्या अगोदरच १९१८ सालीं याच विषयावर पुन्हां एक आग्रहाचा ११ मे १९१८ चा ४१ नंबरचा ठराव प्रसिद्ध केला. वरील बहुतेक शिफारसी त्यांत नमूद करून ग्रामपंचायती शक्य तितक्या लवकर वाढविण्याची व त्याकरितां कायदे घडवून आणून अमलबजावणी करण्याची शिफारस केली. त्या संस्थावर मुलकी अधिकाऱ्याची देखरेख असावी व त्या धिमेपणानें व सावधपणानें वाढवाव्या वगैरे सूचना केल्या आहेत. हिंदुस्थान सरकारनें सन १९०९ ते १९१८ पर्यंत वेळोवेळीं या विषयाकडे थोडेंफार लक्ष देऊन प्रांतिक सरकारना बऱ्याचशा सूचना दिल्या. यापेक्षां अधिक महत्त्व देऊन जर त्यांनीं सबंध हिंदुस्थानाकरितां म्हणून एक लहानसा मूळ तत्त्व ग्रथित करून कायदाच करून टाकला असता तर त्यानंतर १९२०–२१ या वर्षांत निरनिराळचा प्रांतिक सरकारना हिंदुस्थान सरकारच्या हेतूंना बाजूला सारून वाटेल तसे संकुचित, प्रगति मंद ठेवणारे कायदे पास करतां आले, तसे आले नसते. या हिंदुस्थान सरकारच्या सर्व शिफारशी मांटेग्यु चेम्सफर्ड रिपोर्टांतही पसंत ठरविल्या गेल्या. त्यानंतर सन १९१९–१९२०–२१ सालीं बऱ्याच प्रांतिक सरकारांनीं पुढील वर्षीं येणाऱ्या नवीन लोकनियुक्त कौन्सिलाची वाट न पाहतां आपल्या मर्जीनुरूप कायदे पास करून घेतले. बऱ्याच प्रांतांत अद्यापहि त्याच संकुचित कायद्यावर निभावणी केली जात आहे.

सन १९११ सालीं बंगाल सरकारनें ग्रामपंचायत कायदा पास करून ठेवला. तो कायदा जिल्हा अधिकाऱ्यावर सर्व अधिकार सोंपविल्यामुळें प्रांतभर जाचकच वाटत आहे. सन १९२० सालीं सी. पी., मुंबई., यू. पी., व मद्रास या ठिकाणच्या प्रांतिक सरकारनें आपआपल्या प्रांताकरितां ग्रामपंचायत कायदे मंजूर करून घेतले. सी. पी. मधील ग्रामपंचायतीचा कायदा पडीत राहून पुढें कमेटी नेमली जाऊन तिच्या शिफारसीनंतर बराच व्यवहार्य झाला. मुंबईतील कायदा अत्यंत कंजूष वृत्तीचा ठरून कमेटीनें केलेल्या शिफारसी पडीत राहून अद्याप अव्यवहार्यच राहिला आहे. यू. पी. मधील कायदा निवडणुकीचा हक्क न देतां सभासदांच्या नेमणुकीवरच चालविला जात आहे. त्यामुळें लोकांना तो अग्राह्यच आहे. मद्रासच्या कायद्यामध्यें केवळ आरोग्य विषयच प्रमुख धरला जाऊन न्यायमनसुबा जंगल व पाटबंधारे या विषयांच्या वेगळचा वेगळचाच पंचायती प्रांतभर चालू राहिल्यामुळें तो घोटाळचांतच आहे. सन १९२१सालीं पंजाब सरकारनें आपलेकडे ग्रामपंचायत कायदा पास केला. त्यांत साधारणत: कामचलाऊ अशी व्यवस्था आहे. सन १९२२ सालीं बिहार प्रांतांत कायदा बनून अद्यापही फारच थोडें काम त्या प्रांताकडून होत आहे. आसाम प्रांतांतील कायदा सन १९२५ सालीं पास झाला व त्यामध्यें तत्त्वें मोठीं मोठीं नमूद असलीं तरी काम बेताचेंच चालू आहे.

एकंदरीनें हिंदुस्थान सरकारच्या सूचना कोणत्या ना कोणत्या तरी बाबीमध्यें मोडून प्रांतिक सरकारानें कोणत्याहि प्रांतामध्यें मनापासून शक्य ती स्थापना, जोपासना, वाढ व भरभराट करण्याचा अनुभव आणून दिला नाहीं. मांटेग्यू चेम्सफर्ड व सायमन कमिशन रिपोर्ट यांत सदरच्या देशाच्या मूलभूत घटकासंबंधीं फारशा उपयुक्त व परिणामीं हितकारक अशा सूचना न करितां झालेल्या कामावरच संतोष प्रदर्शित करून शुभचिंतन केलें आहे.

सन १९२९ सालीं असेंब्लीमध्यें ग्रामपंचायतीसंबंधीं आलेला खाजगी ठराव पास होऊन त्याचें लोण फक्त प्रांतिक सरकारपर्यंत पोहचविण्यांत आलें. त्यानंतर सदरच्या ठरावाप्रमाणें प्रांतिक सरकारनें विधायक कामगिरी केली किंवा नाहीं याची प्रसिद्धी नाहीं. मुंबई प्रांतापुरतेंच बोलावयाचें झाल्यास सन १९२० सालीं मुंबई कायदे कौन्सिलनें पास केलेल्या कायद्यानंतर सन १९२१–२४ पर्यंतचे काळांत ठिकठिकाणच्या कमिशनरकडून आलेल्या रिपोर्टावरून केलेल्या कायद्यानुसार प्रस्थापित झालेल्या ग्रामपंचायती यांची व्हावी तशी वाढ व उत्कर्ष होत नाहीं असाच निष्कर्ष निघत होता. यानंतर सन१९२५ चे जुलैमध्यें एक कमेटी नेमून तिचेमार्फत ग्रामपंचायती

कशा सुधारतां येतील याकरितां उपयुक्त सूचना देण्याची तजवीज करण्यांत आली. या कमिटीचा रिपोर्ट सन १९२६ सालीं प्रसिद्ध झाला. व त्यानंतरहि सन १९३२ पर्यंत तो सरकारदप्तरींच पडून होता. या कमिटीनें एकंदर ३४ सूचना केल्या त्यांत ग्रामपंचायतीस शक्य त्या ठिकाणीं न्यायाधिकारी सत्ता देण्यांत यावी अशीही सूचना करण्यांत आलेली होती. आलेल्या सूचनांनुसार सन १९२० चा कायदा बदलणें त्रासाचें होणार होतें.म्हणून आतां सन १९३२ सालीं सर्वच कायदा नवीन पद्धतीनें सर्व प्रांतिक कायदे व इतर सूचना यांचा साधकबाधक विचार करून बनविण्यांत आला. व तो बिलरूपानें आज मुंबई कायदे कौन्सिलचें पहिलें वाचन मंजूर होऊन सिलेक्ट कमेटीकडे गेलेला आहे.या आगामी कायद्याचा विशेष असा आहे कीं, ग्रामपंचायती या निवडणूक पद्धतीवर भरविण्यांत येणार आहेत. प्रत्येक वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यांत येणार आहे. त्यांच्या कामाचें क्षेत्र वाढविण्यांत येऊन यात्रा, बाजार,कसाईखाने, धर्मशाळांची देखरेख वगैरे कामें त्यांच्याकडे सोंपविण्यांत येणार आहेत. कर बसविणें, त्यांची वसुली करणें, इतर संस्थांप्रमाणें स्थावर जंगम इस्टेट आपल्या ताब्यांत मालकी हक्कानें ठेवणें वगैरे जास्त अधिकार पूर्वीपेक्षां देण्यांत यावयाचे आहेत. याशिवाय कांहीं ठिकाणीं सदरच्या ग्रामपंचायतींना दिवाणी व फौजदारी न्यायदानाचे अधिकारहि थोडचाफार प्रमाणांत देण्यांत येणार आहेत, कायदा शक्य तितका लवचीक व उपयुक्त करण्याकडे दृष्टि ठेवण्यांत आली आहे, वगैरे बाबींचा उल्लेख सरकारकडून प्राथमिक भाषणांत करण्यांत आलेला आहे. सदरचे बिलाचे प्रथम मंजूरीचे वेळीं बऱ्याचशा दुरुस्त्या त्यांत होण्याबद्दल सूचना करण्यांत आल्या आहेत. पहिलें वाचन होऊन बिल सिलेक्ट कमिटीकडे गेलें आहे. पुष्कळ मतभेद किरकोळ बाबीवर आहेत. मूलतत्त्वांतहि कांहीं फेरफार व्हावयास पाहिजे आहे. तो मतभेद व सूचना यांचा विचार पुढें योग्य ठिकाणीं करण्यांत येईल.येथें फक्त सरकार पक्षानें काय करण्याचें ठरविलें आहे याचेंच दिग्दर्शन केलें आहे.

हिंदुस्थान सरकारनें व प्रांतिक सरकारनीं ब्रिटिश इंडियामध्यें ग्रामपंचायतीबद्दल कोणते कायदे केले, त्याची अंमलबजावणी कशाप्रकारें करण्यांत आली व सदर कामीं सरकारची असलेली त्या बाबतची आस्था, याबद्दल वर उल्लेख आलेलाच आहे. आतां ब्रिटिश हिंदुस्थान वगळला असतां संस्थानी हिंदुस्थानानें याबाबत काय केलें याचा विचार करूं.---

प्रथमतः बडोदें संस्थानांत या कामीं कायदे होऊन ग्रामपंचायती स्थापन केल्या गेल्या.त्यांचेंच उदाहरण पाहून जवळच्या संस्थानांत म्हणजे धार वगैरे ठिकाणीं सदरच्या गोष्टीचें अनुकरण करण्यांत येऊं लागलें. इंदूर संस्थानांतहि या कामाकरितां एक स्वतंत्र अधिकारी नेमून त्याचेमार्फत या कामाची व्यवस्था होऊं लागली आहे. दक्षिणेंत कोल्हापूर, औंध या संस्थानांतून पंचायती उभारण्याचे, चालविण्याचे व यशस्वी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. नांव घेण्यासारखी कामगिरी ग्रामपंचायतीचे बाबत म्हैसूर संस्थानाकडून होत आहे. गेल्या चार वर्षांत संस्थानांत असलेल्या वीसहजार खेडयांपैकीं जवळ जवळ निम्या म्हणजे दहा हजार खेडयांत ग्रामपंचायती स्थापन करण्यांत येऊन त्यांचेवर न्यायाधिकाराशिवाय बहुतेक कामें सोपविण्यांत आलेलीं आहेत. अशा रीतीनें संस्थानांतून या चळवळीचें बीज रोवलें आहे. कदाचित् त्यांचेमध्यें ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुष्कळशा चांगल्या गोष्टी घेण्यासारख्या सांपडण्याचाहि संभव आहे. आजपर्यंत जवळ जवळ २० संस्थानांत कायदे होऊन थोडा अधिक प्रचार सुरू झाल्याचें कळतें.

सदरच्या ग्रामपंचायतीसंबंधीं सरकारनें काय काय कार्य केलें याचा उल्लेख वर आलेलाच आहे. आतां निमसरकारी संस्था म्हणजे तालुका व जिल्हा बोर्डें या संस्थांनीं ग्रामपंचायतीचे वाढीस, उत्कर्षास काय काय मदत केली तें पाहूं. तालुका बोर्डें व जिल्हा बोर्डें यासारख्या सबंध हिंदुस्थानभर खेडचांतील विभागासंबंधीं अप्रत्यक्ष कार्य करणाऱ्या संस्था बनवून बरींच वर्षें होऊन गेलीं. या संस्थाकडून झालेली कामगिरी म्हणजे रस्तेदुरुस्ती, शिक्षण, स्वच्छता वगैरे क्वचित ठिकाणीं ग्रामपंचायती स्थापण्यांत आल्या. या संस्थांचीं वार्षिक बजेटें हिंदुस्थानभर जवळ जवळ १६कोटी रुपयांचीं आहेत. या संस्थांचीं कार्यें खेडचापर्यंत पोहचत असलीं तरी खास खेडयांतील जनतेला स्थानिक स्वराज्याचें वळण देण्याच्या कामीं त्या पुरेशा ठरल्या नाहींत.व पूर्वींच प्रस्थापित होऊन त्यांची कांहीं ठराविक वळणदार वागणूक बनून गेलेली असल्यामुळें व या संस्थां

तील सभासदांतून सुशिक्षितपणा बेताचाच असल्यामुळें गेल्या १२ वर्षांतील ग्रामपंचायत—वाढीस बऱ्याच ठिकाणीं या संस्थांनीं उदासीनता, दाखविली अथवा अडथळेच आणले व ग्रामपंचायत स्थापना, पंचायतींची जोपासना, त्यांचा उत्कर्ष अथवा वाढ यांचें महत्त्व लक्षांत न आल्यामुळें वरील संस्थांची वागणूक आजही बऱ्याच अंशानें बेफिकीरीचीच चालू आहे.

येथपर्यंत सरकारी व निमसरकारी संस्था यांजकडून ग्रामपंचायतीचे बाबत काय कार्य व भावना ठेवण्यांत आली आहे याचें दिग्दर्शन थोडक्यांत केलें. आतां येथून पुढें लोकपक्षाकडून सदरचे बाबत काय धोरण स्वीकारण्यांत आलें होतें तें पाहूं:—सबंध हिंदुस्थानांतील खेड्यांतून शेकडा ९० वस्ती आहे. उरलेली शेकडा १० वस्ती शहरांतून आहे. खेडेगांवांतील समाज हा अशिक्षित व अडाणी असाच अद्याप तरी आहे. त्याला शिक्षणाचा व सुधारणांचा गंधही नाहीं. त्याला त्याच्या स्थितीची जाणीव करून देऊन कार्यप्रवण करण्याचें काम शहरांतील व त्यांच्यांतीलच सुशिक्षितांचें आहे. परंतु हें कर्तव्य अशा लोकांकडून सन १९२० ते १९३२ या दरम्यानचे १२ वर्षांचे काळांत झालेलें नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. कांहीं प्रयत्नांकडे बोट दाखविण्यांत येईल. परंतु ते इतके अपुरे आहेत कीं, त्यायोगानें रतिभरही पाऊल पुढें पडलेलें नाहीं. सन १९२१च्या सुरुवातीस सुरू झालेल्या चळवळीच्या योगानें कांहीं बुद्धिवान व कळकळीचे कार्यकर्ते त्या लाटेंत वाहवून गेले व खऱ्या विधायक मार्गाविरुन त्यांचा पाय घसरून ते भलत्याच दिशेनें कार्य करूं लागले. उरलेला बुद्धिवान समाजसुद्धां स्थिर व दिङ्मूढ होऊन पहातच उभा राहिला. या बारा वर्षांतील अनुभवानें आतां गंभीर असें वातावरण निर्माण होऊन ज्या गोष्टी पूर्वीं त्याज्य, बहिष्कृत वाटत होत्या त्या गंभीरपणें विचार करण्यासारख्या वाटूं लागल्या आहेत. अनुभवाचे खडतर खडक ओलांडून आल्यामुळें खरें कार्य, खरा फायदा कशांत आहे याची जाणीव होऊं लागली आहे हें प्रत्ययास येत आहे. सन १९२० ते १९२५ या काळांत या विषयावर विधायक कामगिरी न होतां हिंदुस्थानाच्या पुष्कळ भागांतून असलेल्या ग्रामपंचायती नष्ट झाल्या, केल्या गेल्या असाच अनुभव आहे. ग्रामपंचायतीचे दृष्टीनें बोलावयाचें म्हणजे हा काळ कोरा करकरीत गेला असेंच म्हणावें लागतें. यानंतरच्या काळांत राष्ट्राची घटना स्वराज्याचा पाया, त्याचे आधारस्तंभ म्हणजे खेडींपाडीच आहेत. त्यांचा उत्कर्ष, त्यांची जोपासना झाल्याशिवाय स्वराज्याचा सोन्याचा कळस चमकणार नाहीं, टिकणार नाहीं अशी भावना सुशिक्षित वर्गांत डोकावूं लागली आहे. त्याकरितां ग्रामोद्धार वगैरेसारख्या कल्पना मनांत घोळूं लागल्या आहेत, परंतु या कल्पना अगदीं अस्पष्ट, अमूर्त अनिश्चित अशा स्वरूपांत आचरणांत आणल्या जाऊं लागल्या व अशा स्थितींत आतां स्टॅट्यूटरी पंचायतीची कल्पना व जरूरी सुशिक्षितांना भासूं लागून प्रत्यक्ष व व्यवहार्य अशा योजना केल्या पाहिजेत अशी जाणीव होत आहे. व त्याच दिशेनें कांहीं ठिकाणीं प्रयत्न होत आहेत. बारा वर्षांचा काळ अशा अनुभवांत गेला, आतां कोठें निश्चित कार्य करावयाची कल्पना येऊं लागली आहे. याच बाबत श्री. रा. ल. ब. भोपटकर वकील पुणें यांनीं पूर्वीच एक खाजगी बिल मुंबई कायदेमंडळांत आणलें होतें, परंतु अनुभवच यावयाचा होता म्हणून बिलाचें पहिलें वाचनाचे दिवशींच कौन्सिलांतून उठून जाणाऱ्या पार्टीचा हुकूम झाल्यानें तें बिल तसेंच मागें पडलें. याच कामाकरितां पुणें येथें सन १९१८ सालीं ऑल इंडिया लोकल बॉडीज असोसिएशन या नांवाची ची संस्था स्थापन करण्यांत आली होती. त्या नंतर १९२४-२५ सालीं कॉंग्रेसच्या अधिवेशनाबरोबरच "अखिल भारतीय ग्रामपंचायत संमेलन" भरविण्यांत येत असे. त्या नंतर सातारा येथें व नगर येथें १९३२ सालीं ग्रामपंचायत परिषदा भरविण्यांत आलेल्या होत्या. लोकांकडून यापेक्षां जास्त कामगिरी झालेली दिसत नाहीं. व्यक्तिगत प्रयत्न करण्यांत येतात त्यांचा उल्लेख यथावकाश करण्यांत येईलच.

सर्व हिंदुस्थानांत ७ लक्षांवर खेडीं आहेत. त्यांपैकीं प्रांतवार ग्रामपंचायती स्थापन झालेल्या आहेत. त्यांचे आंकडे खालीं दिले आहेतः—

मद्रास प्रांतः—	४०००	पंचायती
म्हैसूर संस्थानः—	१००००	,,
बंगाल	५०००	,,
यू. पी.	४०००	,,
बडोदें	३०००	,,
सी. पी.	७००	,,
पंजाब	६००	,,

मुंबई	२५६	,,
कोल्हापूर	७०	,,

सरासरी प्रांत व संस्थानें मिळून अद्याप-पर्यंत फक्त तीस कायदे मंजूर झालेले आहेत. ब्रिटिशहिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान मिळून ग्रामपंचायतींची संख्या फार तर ४०००० पर्यंत जाईल. एकंदर खेड्यांची संख्या व त्या मानानें असलेल्या पंचायती यांचा आंकडा, तसेंच त्यांची बजेटाची रक्कम कोणत्याही सरकारी रिपोर्टां-तून सांपडत नाहीं. या सर्व गोष्टी अतिशय महत्त्वाच्या विषयासंबंधीं सरकारची किती अनास्था आहे तें स्पष्ट दाखवीत आहेत.

या ग्रामपंचायत विषयासंबंधीं कार्य करणाऱ्या संस्था पुढील प्रमाणें आढळतात.:–

(१) लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूट मुंबई व तिच्या उपशाखा.
(२) विदर्भ ग्रामपंचायत संघ इटकी–ता. दर्यापूर, जि. अमरावती.
(३) नागपूर पंचायत संघ.
(४) ग्रामणी संघ नागपूर.
(५) कलकत्ता युनियन बोर्डस् डेव्हलपमेंट ब्यूरो. १५ कॉलेज स्क्वेअर कलकत्ता.
(६) डिस्ट्रिक्ट ॲग्रिकल्चरल ॲसोसिएशनची 'रूरल अपलिफ्ट कमेटी' सेवासदन पुणें.

सदर विषयासंबंधीं उहापोह, माहिती चर्चा केली गेली आहे. अशा पुस्तकांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

(१) लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन्स्टिटयूटचें वार्षिक १९२८.
(२) स्टॅटयूटरी पंचायत; (ले. मुन्नास्वामी एम्. ए. बी. एल्.) कलकत्ता येथें छापलें.
(३) व्हिलेज पंचायत; हिरूरकरकृत एम्. ए. एल्. एल्. बी वकील, अमरावती.

(4) RushBrook Williams year Book–1921–22–26–27.

(5) Indian village system by Annie Besant & Ranganathan

(6) Village Government in British India–John Mattahi

पन्नास हजार व त्याचेवर लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक म्युनिसिपालिटीचें नांव व त्यांचा आदा व खर्च (रुपयांमध्यें)

उत्पन्न (चालू शिल्लक सोडून)

म्यु.चें नांव	१९१५–१६	१९२०–२१	१९२५–२६	१९२७–२८	१९२८–२९	१९२९–३०
मुंबई इलाखा						
१मुंबई	१३८७०१५३	२०२०१८५४	३०६५५४००	३१७५४६५७	३१५७६७१५	३३१८४१९६
२अहमदाबाद	१२५९०४६	१७१७३२९	२९३३१६०	३०६२७७६	३५४६४४२	३५३३००२
३कराची	१३६१५०१	५७८९५९४	४६०५५८६	५२७४८८४	५१०२९९७	३७३९६७४
४पुणें	४३७८३४	८६९१६१	१४४११४१	१६०४४३६	१५४८२१७	१९३७३०६
५सुरत	५३३३१४	६५१४०६	९८९७७४	१०६९५३१	१०४७६९८	१०६९८४७
६सोलापूर	२८५०४२	४६६५६७	७९४३६१	८४२६९२	८९०००८	१०५७३९५
७हैद्राबाद	३८२३२७	६७३२३५	८३७८९७	८३३२५४	९२०२३४	८७२०६३
८हुबळी	१९९४१४	२७७०४३	४९०१३०	४०९५०२	३८६२३४	३८५५०४
९शिकारपूर	१९००३७	६४२३८७	३५७५६६	३७८९८५	३६३७५४	३५०७७०
१ मद्रास इ.	३५३८०८९	५२३९३३७	६०६३८१३	५३९०७८४	५४६५७७८	६३८७३९१
२त्रिचनापल्ली	३१४९१५	४८५३८०	८०४४२८	८२४६९४	८९०८२३	९३६३३८
३तंजावर	१६३४५३	२४०४१३	२६४६९५	३८५०५५	७०६१८०	३७४८९५
४कोकनाडा	१३४९०५	२२८५८८	२७६९६७	४९३८६०	५७४५५२	४६०२०४
बंगाल						
१कलकत्ता	११९९२५५१	१५५६४७९०	२१८६६१९६	२३६३८९८२	२३११३०४०	२३७४३६९२
२हावरा	१०८३०२८	१३५४७१९	१९०४७८९	१९०३५४४	१९४६६९९	२१३५३९२
३डाका	३६०७४३	७१६६६८	४५९४०५	६८६६३८	६९२३१६	६९६९६२
संयुक्त प्रांत						
१लखनौ	१३०३७२८	१२८५७६१	१६९२३५२	१६७६६५१	१६७०७८३	१६३६०९३
२बनारस	७१०७५१	८५३०१५	१४४५८३८	१५८७४४१	१६७९२१७	१७४१३५३
३कानपूर	९७२५५९	१३३०४१४	१९८७२४१	१९७४७७७	२०७३८३९	२१४३४०२
४आग्रा	७९३७८२	७३०५३७	९२८५७७	८६७८१३	९२४०४९	८७४६८६
५अलाहाबाद	८१२३५८	८३२२६४	१४९९२०४	१३८२९२८	१४०९३७३	१५१२१०५
६मिरत	२९९०९३	४४७६४१	५१३३१४	४६४७२५	४४५७००	४३८३५५
७झांशी	१०२४४९	१५९१९६	२०४२३१	२१८५२४	२३५१६६	२३०७०७
पंजाब						
१लाहोर	११५१५१४	१७२९९६२	१८७६३१६	२०३३६७३	२२२२२८६	२१९८०५८
२अमृतसर	८००४३३	१४७९५९७	२०५२४५४	१९७९२८४	१९४०३७३	२०४१३००
३मुलतान	२६४९५८	६२९३८९	४९५०६६	५२३११७	६५६१३०	५९३५३६
ब्रह्म. १रंगून	४४१९३७४	८५६४२१८	८०५९२५०	९३१५१४१	९९३६६४५	१०१२३७५३
२मंडाले	८४३११८	१०४७६०५	१२९८१६१	१२६९४२३	१३२३५३४	१२५२९०५
बहार ओरि.						
१पाटणा	४०२५७०	४४०४१५	३९८६९८	४२०९४९	४५३७३७	१०४९३१०
२गया			२२७५४६	२५७३२४	२३६०३४	२६२२९९
३कटक	८४७२५	८७६१०	११५३८३	१३३२०६	१२९१२०	१५५३३५
४जमशेटपूर				७३९७	९५३२	२१६०१
मध्य. प्रां. व.						
१नागपूर	७७५६३९	१०१०६५२	१२०४१८१	१६६२५४८	१४९२५७५	१७१९३४२
वा.स. प्रांत १पेशा.	५६८२३१	८६६०१०	६९४२४५	६७९४६३	६२४५९१	७१०८३०
दिल्ली प्रांत						
१दिल्ली	१३३७३२२	२२७१०८८	२१६३२७६	२३२९३९२	२३९२८७९	२७५०१७९

खर्च

१९१५–१६	१९२०–२१	१९२५–२६	१९२७–२८	१९२८–२९	१९२९–३०	म्यु.हद्दींतील लोकसंख्या
१५६२४५४०	२४७४२२८४	४६४३४८६४	३९५२१९१९	३९३६७८०१	३९४९७१५४	११५७९१४
१२००९९९	१५८४२३६	३८२८५६०	३९८११३५	३२७७००४	३३०९१६८	२७००७७५
१७१२६७५	४३३२९७७	५४८५१५६	६६७५२९२	७३९९८२४	३६७०७६५	२०१६९१
४३१३२८	९१३८१५	१५०५८९६	१५९१९४७	१८३३८३१	२२२७२१०	१३३२२७
४८४८८१	७२४३०२	७३०६५९	९०८१३८	९६९६७१	१०५४७९५	११८४५२
२९३८३९	४५९२५५	८२८०५६	८१४९८७	७८०८६९	९६९५८८	११३९३१
३१३३२५	७०७४११	७७९९४३	९९०३९४	९३३१०७	११०४५२२	७३९५०
५३१३५४	२७१२८८	४३९१९०	४५३९३१	३५९९५०	३९१९५३	६६७७२
१७९८५८	२८४९९६	३७२०७९	३६७७४१	४०५९२२	३७८५९२	५४९९५
४३७५८१७	५५५४९४६	६५४६११७	५६४६९८८	५५१७३३६	६५०१२५१	५२८७९१
३१०५०८	४९८५६२	८०१९४१	८००७५३	७९७००३	९६३७७७	१२०४२२
१६९०८३	२१९४४०	३०१२५६	३५३९९९	५००६९७	६५२४३०	५९९१३
१४६४८२	१७६२६१	२७८४८९	५२८०९३	४६७१४०	५४०४१६	५३३४८
११९५४४६९	१७३१५१५३	२३२७४५००	२४३७०४३८	२६६८६१०६	२७९२२६१४	१०७७२६४
१२०६६२१	११८५६६४	१८३३०२९	२०८०७४१	१९९६२४३	२००३६९७	१९५३०१
३४८४८६	४०९७६२	६३२७८४	६०३७५०	७३५५११	९१८३९४	११७९००
१०१७५४१	१६१८९४३	१८६२२३४	१६२२७५७	२२३६५२६	१७९३९७९	२१७१६७
७७८४९५	८९२२३५	१२०८८८९	१४४८२४८	१८२३८१२	२१२६६२३	१९५३७३
६५६६५९	१५८४२४९	१८७९०५५	२०५७७३८	२१५३७१७	१९५६७३९	१९५०८५
६८९९९४	८०३३१०	८५७७७७	८२७४६२	११३६९०७	८४३६८८	१६३७५०
७६०१८९	७६२३८७	१४५००३४	१७८७९७५	१६८५६८९	१८६६१७६	१४५६०५
२८५४०१	४४१४०८	४५६९४२	४५१५९९	४८००९८	४३६७११	७७७११
१०८४७२	१५०१३०	२०६२४७	२१९३३७	२४८५४५	२२१९९७	५०४८०
१०६७३१२	१५९५४२१	१८४०४०७	२०८०६१३	२१७९२६३	२३०३१९०	२५७२९५
११२१७८२	१४३९७११	१८७६८६२	१९९९१९०	१८०७०३६	२३४७४०९	१५७०३१
२३०९११	४४१९११०	१०३९१२३	६९०३८२	७२१६७३	५९५०९७	८९४२५
४२०८८८५	६७९८८१७	१०२४०६६९	१०२६२७८३	१०१९४८६३	९७८७२२१	३३५४९१
८८८०५४	१११४५३३	११८४३७२	१२३६२३२	१४१२५७७	१२५४४५१	१३३२९५
४०८६८०	४५३८९४	३५०२१६	४१८००२	४७२२५१	४४९००९	११०५२३
		२६५६९१	२६९८९१	२४९१५३	२५४१७३	६७५६२
८७६५७	७७१६९	११७९३६	१२०९७२	१४६५८९	१५९२१६	५८५८२
			२९५५८	५०४६६	२३३५२	५७४५४
७८७८९७	१०७४९८९	१३६९७४५	१५८६८०२	१४७७१९९	१६३९३६३	१४५१९३
३९३८३८	५९८३६८	६६९४३५	६७०१५५	८३४०२२	६६२९७६	७९४२७
११८२२३०	२१६९४४७	२४०३८९०	२४४६२३८	२३१६०३५	२४५६२४	२४८३०२

म्युनिसिपालिटयांच्या हद्दींतील लोकसंख्या : त्यांची घटना व त्यांचा आदा व खर्च

प्रांत	म्युनि० संख्या	म्यु.हद्दींतील लोकसंख्या	सभासदांची संख्या	सभासदांची वर्गवारी		उत्पन्न (शिल्लक सोडून)			लोकसंख्येंत दरडोई किती		खर्च
				सर०	बिनसर	पट्टी व कर यांपासून	इतर साधनांनीं (कर्ज वगैरे ध.)	एकूण	पट्टी व कर	एकंदर उत्पन्न कर्ज वगैरे सो०	
मद्रास इ. (मद्रास सो.)	८१	२५१७३२८	१६८४	१६	१६६८	९०१८८६९	११६८७२५७	२०७०६१२६	२– ७– ८	५–१३– ७	२०८६३००६
मद्रास शहर	१	५२८७९१	५०	१	४९	४३९०८६१	५५६४६४८	९९५५५०९	८–११– ६	१२– १– ३	८७९४१०३
मुंबई इ. (मुंबई सो.)	१५४	२६७७२७२	३०९६	२०४	२८९२	१६३३६५४८	२८१८७६७४	४४५२४२२२	६– १– २	८–१०–११	४६११३७३६
मुंबई नगर	१	११७५९१४	१०८	४	१०४	२८३२६०३८	१४९२८८४६६	१७७६१४५०४	२४–१– ५	२८–३– ६	१७८७४००००
बंगाल (कलकत्ता सो.)	११७	२०१४२०३	१६६१	११३	१५२८	७१५१६२९	४५८२१६७	११७३३७९६	३– ८–१०	४–१३– ९	११७५६१३२
कलकत्ता	१	१०७७२६४	९०	१	८९	१९३०३७९८	१८२५३८३१	३७५५७६२९	१७–१४–९	२२–०– ८	३४९७३१५८
संयुक्त प्रांत	८५	२९१७१५०	११३७	१३	११२४	१०८९३१३२	६९५४५८३	१७८४७७१५	३–११–९	५– ९– १	१८६५६१८६
पंजाब	१०७	१८४५८०४	१२४५	१०९	११३६	७९५५२४०	७२९५५०४	१५२५०७४४	४– ४–११	७– ८– ८	१४७९८७७२
ब्रह्मदेश (रंगून सोडून)	५७	८१४९२२	८१७	७९	७३८	३४२५०५७	४५८३६५०	८००८७०७	४—३– ३	९– ३– ६	८१८६३६२
रंगून	१	३३५४९१	३४	३	३१	७४०२०८३	५४१९६९८	१२८२१७८१	२२–१– ०	३०– २–१०	१३२४०९५९
बहार-ओरिसा	६१	१२४९०३८	१०२७	१२२	९०५	२७४४८९७	२१६७०५९	४९११९५६	२– २– १	३– ४– ६	४६३७१६६
मध्यप्रांत व वऱ्हाड	६८	१०७९६३७	१२०७	५३	११५४	४९२२०६१	३८०१८१०	८७२३८७१	४– ८–११	६–१५– ९	८५८९६८२
आसाम	२५	१६८५८७	२८३	७	२७६	७१५९५०	५१९६०३	१२३५५५३	४– ३–११	७– ०– ३	१२३१७६३
वायव्य सरहद्द प्रांत	६	१५९४६९	१२१	३२	८९	९३१९९७	६५३८२०	१५८५८१७	५– ६– २	९– ६– ९	१४६४३३९
ब्रि. बलुचिस्थान	१	२८२३८	३७	५	३२	५१४०७६	२२६९०५	७४०९८१	१८–३– ३	२३– ४– ३	६६९३०८
अजमीर मेरवाडा	४	१४५०४८	५८	५	५३	४२३२२५	२४१३७७	६६४६०२	२–१४– ८	४– ६– ४	७०३५०३
कूर्ग	५	१२०७६	६१	१९	४२	३५२७१	२११७८	५६४४९	२–१४– ९	४– १०–३	४४७६८
दिल्ली	१	२४८३०२	३७	३	३४	१४०५७५२	१४०७८१६	२८१३५६८	५–१०– ९	११– १– ६	२४८६४७४
बंगलोर	१	११८९४०	२८	८	२०	५९०६९३	४४६७६७	१०३७४६०	४–१५– ६	८– २– ४	१०७६८८५
एकूण १९२९–३०	७७७	१९११३४७४	१२७८१	८१७	११९६४	१२६४८७१७७	२५१३०३८१३	३७७७९०९९०	६– ९–११	९– ५– ९	३७७०२६३०१
१९२८–२९	७७६	१९१०१०९१	१२७३२	८७०	११८६२	१२२९३६७११	२०८१७०९१३	३३११०७६२४	६– ७– ०	९– १– ५	३३१४७९४८२
१९२७–२८	७७४	१९०८६६१५	१२६७७	८९१	११७८६	११९६३८५०७	२४२५००७४३	३६२१३९२५०	६– ४– ३	८–१४– ७	३६६०५९४६८
१९२६–२७	७७१	१९०६२८१३	१२५८६	९०२	११६८४	११६८३२१७२	२६१३८०९९९	३७८२१३१७१	६– २– १	८–१३– ३	३७८८६९५९३

१९२५–२६	७६७	१८९५९३२४	१२४६८	९३२	११५३६	११४३१००५२	३०३२७४४६१	४१७५८४५१३ (ब) (क)	६– ०– ६	८– ८– ९	४१२९५१०१४
१९२४–२५	७६३	१८८९५६९२	१२१५८	१०४४	१११४४	११०६६२६६७	३४९२३१९५२	४५९९७२१४४	५–१३– ८	८– ६– ३	४५८३५७९२०
१९२३–२४	७७२	१८९६०४८६	१२१५५	११३३	११०२२	१०३१७६१२५	३३८४६७८६६	४४१६४८९६४ (ब)	५– ७– १	७– १२–६	४३६६८५९२१
१९२२–२३	७५७	१८८८०३७६	११५४३	१११८	१०४२५	९६९६७८७५	२६४३४४२८४	३६१३१९४८२ (ब)	५– २– २	७– ६–११	३५७४५६२४५
१९२१–२२	७५१	१८७९३५९६	११०९३	१२२७	९८६६	८६८६२६६१	१९८०८३४७३	२८४९५४९८५	४– ९–११	६–१४– ५	२८६९४४७५६
१९२०–२१	७४९	१८१२८६६७	१०३९५ (अ)	१५१४	८८८२	८०११९०२४	१९४९८७११२	२७५१०६१३६	४– ६– ९	६–१५– ५	२७०८३५७५५

टीप:––(अ) एक जागा रिकामी. (ब) १९२३–२४ व १९२४–२५ मिळालेले रु. ८८५१, रु. ७३२३, रु. ४९७३ व रु.२५२ धरून, (क) रु.७७२३३ धरून (मौबीन) सविस्तर आंकडे मिळत नाहींत.. १९२१–२२ व १९२२–२३ मध्यें राजपूर नोटीफाइड एरिया म्हैसूर म्युनिसिपालिटींत समाविष्ट झाला.

चलन

सुधारलेल्या राष्ट्रांची सध्यांची आर्थिक घटना विनिमयप्रधान आहे. विनिमय मोठ्या प्रमाणावर आणि सोयीनें घडावयाचा तर तो एकाद्या माध्यमाच्या मदतीखेरीज होत नाहीं. अशा माध्यमासच पैसा अगर चलन असें म्हणतात. पैसा म्हणून जी वस्तू वापरावयाची तीत पहिला गुण पाहिजे तो सर्वमान्यता , आणि दुसरा हा कीं, वस्तूच्या किंमतीच्या मानानें तिचें वजन व आकार हीं कमी असावीं. ह्यांखेरीज टिकाऊपणा, विभाज्यता वगैरे इतरहि कांहीं गुण पैसा म्हणून वापरावयाच्या वस्तूंत असणें इष्ट आहे. प्राचीन इतिहासांतील, किंवा बिनसुधारलेल्या देशांतील पैशाचे अनुभव हे कितीही मनोरंजक वाटले तरी आजच्या परिस्थितींत ते गैर लागूच समजले पाहिजेत. पैशाखेरीज आर्थिक व्यवसाय धड चालणार नाहींत. आणि पैशाला आधारभूत अशी एखादी वस्तु वापरावयाचीच तर ती सोनेंचांदी किंवा अशी एखादी मौल्यवान धातु असावी. एवढी गोष्ट आतां सर्वत्र मान्यता पावलेली आहे. पैशाच्या अनेक उपयोगांपैकीं, एक विशेष महत्त्वाचा उपयोग म्हणजे मूल्यमापन. देवघेव व्हावयाच्या सर्व वस्तूंचें पहिल्याप्रथम सर्वमान्य पैशांत मूल्यमापन होऊन मग त्यांचा परस्पर मूल्यसंबंध ठरतो. पैशाची पद्धति सुवर्णमय किंवा सुवर्णाधिष्ठित असली तर तिला सुवर्ण–परिमाण पद्धति म्हणतात. मुख्य धातु शुद्ध चांदी असेल तर त्या पद्धतीस रौप्य-परिमाण असें म्हणतात. आणि सोनें व चांदी या दोहोंचाही सर्वमान्य पैसा या नात्यानें सारखाच उपयोग करण्यास मुभा असली तर त्या पद्धतीस द्विधातुमय परिमाण असें म्हणतात. धात्वात्मक परिमाणांचे हे तीन मुख्य प्रकार आहेत. याशिवाय निव्वळ कागदी परिमाण किंवा बहुवस्तुमय परिमाण अशा इतरही पद्धति वादविवादांत पुढें येतात. त्यांचें यथार्थ स्वरूप कळण्यास सध्या धात्वात्मक पद्धतीची पूर्ण ओळख होणें जरूर आहे. सुधारलेल्या राष्ट्रांत प्रचलित असणाऱ्या चलनपद्धतीबद्दल कांहीं प्रास्ताविक गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे.नाणें पाडणें हें राजसत्तेचें एक निदर्शक आहे अशी पूर्वकालींही भावना होती. व प्रत्येक देशांतील जीं नाणीं पाडलीं जात त्यांवर तेथील सरकारचें कायदेशीर रीत्या कांहीं तरी नियंत्रण असे. परंतु नाणीं पाडून देण्याचा परवाना अनेक मक्तेदारांस दिला जात असल्यानें नाण्यांचें वजन, त्यांच्यांतील धातूची शुद्धता इत्यादि बाबतींत खात्रीलायक निर्बंध रहात नसत. अर्वाचीन काळांत मात्र केवळ राजसत्तेचें निदर्शक ह्या दृष्टीनेंच नव्हे तर व्यापाराचें उपयुक्त साधन ह्या नात्यानेंही पैसा पुरविणें हें काम कायद्यानें व व्यवहारानें खरोखरच सरकारच्या हुकमतीखालीं असतें. संघटित सरकारनें केलेल्या कायद्यांच्या साहाय्यानें अनेक वैयक्तिक, सामाजिक, व्यापारविषयक किंवा औद्योगिक करार पार पाडणें आज शक्य आहे. त्याचप्रमाणें सरकारला लोकांकडून व लोकांना सरकारकडून अनेक रीतीनें घेणींदेणीं वसूल करावयाचीं असतात. ह्या सर्व खाजगी आणि सरकारी व्यवहारांत शेवटीं पूर्ण फेड झाली किंवा नाहीं हें कायद्यानें ठरवावयाचें असतें. सोनेंचांदी, इतर धातु व वस्तु, अनेक प्रकारचीं नाणीं किंवा अंगमेहनतीच्या व इतर कामगिऱ्या तसेंच चेक, कर्जरोखे, हुंड्या वगैरे व्यापारी कागद ह्यांपैकीं कोणत्या स्वरूपांत कर्जफेड केली असतां कायद्याच्या दृष्टीनें ती समाधानकारक ठरेल हें प्रत्येक सरकारला आगाऊ जाहीर करावें लागतें. कर्जफेडीच्या ह्या 'सरकारमान्य' साधनांस Legal tender किंवा कायदेशीर चलन असें म्हणतात. सरकारला लोकांकडून जें येणें वसूल करावयाचें तें ह्याच चलनांत असावें लागतें. व सरकार आपल्या धनकोस त्या चलनांनीं परतफेड करूं लागलें तर तें धनकोस नाकारतां येत नाहीं. त्याचप्रमाणें खाजगी व्यवहारांतही कर्जफडी कायद्याच्या साहाय्यानें होतांना त्या अशा सरकारी मान्यतेच्या पैशांनींच कराव्या लागतात. प्रत्येक देशांत असें जें कायदेशीर चलन असतें त्यासच प्रमुख पैसा असें म्हणतात. ह्याखेरीज दुय्यम स्वरूपाचा खुर्दाही असतो; परंतु त्याच्या साहाय्यानें ठराविक मर्यादेपलीकडे कर्जफेड करतां येत नाहीं. महायुद्धा-

पासून चलनविषयक कायदा व व्यवहार यांत पुष्कळच स्थित्यंतरें झालीं आहेत. आणि त्यांच्या अनुषंगानें आजकाल चलनविषयक सुधारणसही निराळें वळण लागत आहे. परंतु अजूनहीं बहुतेक सर्व राजकारणी आणि अर्थशास्त्रज्ञ शक्य तर सुवर्ण चलन चालू रहावें असेंच म्हणारे आहेत. अलीकड कांहीं वर्षे सोन्याचें प्रतिवार्षिक उत्पादन कमी झाल्यामुळें सुवर्णचलन चालू ठेवणें अशक्य आहे असें कित्येकांस वाटत आहे. व म्हणून अनेक कमीअधिक व्यवहार्यतेच्या चलनी सुधारणा पुढें येत आहेत. तरी चलनविषयक सुधारणेचें प्रमुख ध्येय जें सुवर्णपरिमाण त्याचे विशेष समजून घेणें आवश्यक आहे.

महायुद्ध सुरूं होण्यापूर्वी इंग्लंडमध्यें सुवर्ण परिमाण चालू होतें. तेथील व्यवहार कसे चालत हें पाहिल्यास सुवर्ण चलन पद्धति संपूर्णतः अंमलांत येण्यांत कोणकोणते भाग आवश्यक आहेत तें उघड होईल. सरकारी टांकसाळींत ११३ ग्रन इतकें सोनें दिलें म्हणज त्याचा एक सॉव्हरिन पाडून मिळे. नाणें जसजसें लागेल तसतसें व्यक्तिशः नागरिक अगर पेढ्या ह्यांस ह्या पद्धतीनें तें हवें तेवढें मिळत असे.सॉव्हरीन हें चलन कर्जफेडीचें साधन म्हणून पूर्णपणें मान्य केलें जाई. सॉव्हरिनचा पुरवठा वाजवीपेक्षां जास्त आहे असें वाटल्यास कोणासही ते वितळवून किंवा न वितळवितांही सोनें म्हणून विकतां येत. अशा तऱ्हेनें कायदेशीर चलनाचा पुरवठा लोकांच्या मागणीनुसार अनायासें कमी अधिक करतां येई. सॉव्हरीनखेरीज शिलिंग, फार्दिंग, पेनी वगैरे दुय्यम नाणींही चालू असत. परंतु हीं केवळ प्रतीकस्वरूप असत. म्हणजे त्यांतील धातूची किंमत त्यांच्या कायदेशीर किंमतीहून कमी असे व ती फक्त सरकारच मागणी पाहून त्याप्रमाणें पाडीत असे. खाजगी लोकांस तीं नाणीं पाडून घतां येत नसत. अशा दुय्यम नाण्यांचा फक्त खुर्दा म्हणूनच उपयोग होई; व फार लहान देवघेवींतच त्यांस कायदेशीर चलन म्हणून मानावें लागे.

सॉव्हरिन या प्रमुख नाण्याखेरीज बँक ऑफ इंग्लंड या मध्यवर्ती पेढीच्या नोटाही कायदेशीर चलन म्हणून चालत असत. चलनी नोटा काढण्याचा अधिकार दुसऱ्या कोणत्याही पेढीस नसे. व ह्या पेढीवरही असें नियंत्रण असे कीं, एक कोटी नव्वद लक्ष पौंडांपेक्षां अधिक किंमतीच्या ज्या नोटा बँकेनें काढल्या असतील त्या नोटांच्या किंमतीइतकें सोनें पेढीनें स्वतः जवळ ठेवलें पाहिजे. म्हणजे नोट धारण करणारा केव्हांहीं नोट मोडण्यास पेढीवर गेला तर त्याला रोख सोन्याचें नाणें मिळण्याची खात्री असे. नोटांबद्दल केव्हांहीं सोनें मिळत असल्यानें नोटांचा पुरवठा वाजवीपेक्षां केव्हांहीं अधिक होत नसे. कारण फाजील नोटा झाल्यास त्या केव्हांहीं मोडतां येत. इंग्लिश चलन म्हणजे सोन्याचा ठराविक वजनाचा तुकडा हें निश्चित असल्यानें इतर देशांतील सोन्याच्या प्रमुख नाण्यांशीं त्याचा संबंध दृढ असे. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील डॉलरांतलें सोनें सुमारें सव्वा तेवीस ग्रेन इतकें असल्यानें एक इंग्लिश पौंड बरोबर ४·८६ डॉलर हा दर निश्चल असे. व्यापारी हुंडचांच्या कमीअधिक प्रमाणामुळें जर हा भाव खालीवर होऊं लागला तर इंग्लंडमधून अमेरिकेंत किंवा अमेरिकेमधून इंग्लंडमध्यें सोनें यऊन तो पूर्ववत होई. सर्व देवघेवी सोन्याच्या किंमतीच्या परिमाणावरून होत व प्रत्यक्ष व्यवहारांतही सोन्याचें नाणें खेळे; म्हणून अशा पद्धतीस 'सुवर्ण चलनयुक्त सुवर्णपरिमाण' असें म्हटलें पाहिजे. चलनाचा पुरवठा लोकांस पाहिजे त्यापेक्षां अधिक न होणें, कागदी चलनाचेंही वाटेल तेव्हां सोन्यांत रूपांतर करतां आल्यानें चलन पद्धतीवर लोकांचा पूर्ण विश्वास असणें आणि परदेशी हुंडणावळीचा दर निश्चल असल्यानें व्यापार--उदीमाची सोय होणें इत्यादि प्रमुख फायदे ह्या पद्धतीमुळें होत. आणि म्हणूनच इंग्लंडचें हें उदाहरण इतर सर्व राष्ट्रांनीं आदर्शवत् मानलें होतें. १९१४ सालीं महायुद्ध सुरूं झालें त्यापूर्वीं कित्येक अनुभवी अर्थशास्त्रज्ञांची अशी अपेक्षा होती कीं, सोन्याचा पुरवठा विपुल असल्यानें हळुहळू सर्व सुधारलेल्या जगभर सुवर्णचलन व सुवर्णपरिमाण हीं पसरतील व चलनविषयक प्रगतीचें ध्यय गांठलें जाईल. महायुद्धानें उत्पन्न झालेल्या परस्थितीमुळें ह्या पद्धतींतील वैगुण्य उघडकीस येऊं लागलें. कागदी चलनाबद्दल पेढीनें आपल्याजवळ पूर्ण किंमतीचें किंवा बऱ्याच मोठ्या किंमतीचें तारण ठेवावें असा कायदा केला म्हणजे कागदी चलनांचें सोन्यांत रूपांतर होण्याची खात्री असते. व एकंदर चलनाचा पुरवठा इष्ट मर्यादेपेक्षां फाजील होत नाहीं. तसेंच लोकांजवळ चलनाचा तुटवडा झाला तर त्यांनाही हवें तेव्हां टांकसाळींत आपल्याजवळील सोन्याचीं नाणीं पाडून घेतां येत, म्हणून पुरवठा सामान्यतः मागणीहून कमीही राहात नसे. परंतु ह्या पद्धती-

चा असा सरळ हितप्रद अनुभव येण्यास एक महत्त्वाची गोष्ट अनुकूल असावी लागे. ती म्हटली म्हणज सोन्याचा विपुल पुरवठा ही होय. युद्ध सुरूं झाल्याबरोबर देवघेवी आणि व्यापारी उलाढाली यांचें प्रमाण इतकें वाढलें कीं, त्यांस पुरें पडणारें नवें चलन काढण्यास लागणारें सोनें उपलब्ध होण्यासारखें नव्हतें. लोकांजवळ पुरेसें सोनें नाहीं म्हणून त्यांस टांकसाळींतून चलन पाडून घेतां येईना आणि पेढयांजवळ तारण ठेवण्यास पुरेसें सोनें नाहीं म्हणून त्यांसही नोटा काढतां येईनात. चलनाचा पुरवठा मागणीच्या मानानें असा मर्यादित झाल्यानें व्यापारधंद्यास फारच अडचण होऊं लागली. तसेंच सर्व पेढयांतील ठेवीदारांनीं युद्धकालच्या घाबरटपणास बळी पडून आपापल्या ठेवी काढून घेण्याचा उपक्रम नेहमीपेक्षां वाढत्या प्रमाणांत सुरूं केला. इतर पेढया 'बँकऑफ इंग्लंड'सारख्या पेढीजवळ आपल्या शिलकी ठेवतात. व जरूर पडली तर तिच्या कडून कर्जही घेतात.परंतु अशा मोठ्या पेढीजवळचीच हातांतली शिल्लक कमी पडली व सोन्याचा अभाव असल्यानें नव्या नोटा काढतां आल्या नाहींत तर तिचीही कुंचबणा व्हावयाची. ठेवीदारांच्या ठेवी परत न करतां आल्यानें सर्वच बँकांचें दिवाळें निघावयाचें व चलनाचा पुरवठा कल्पनातीत तुटवडयाचा होऊन आर्थिक व्यवहार चालणें दुर्घट व्हावयाचें.

ह्या सर्व आपत्तींतून सुटण्यास सुवर्णपरिमाणाचा त्याग हा एकच मार्ग होता. टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडून मिळणार नाहींत आणि मध्यवर्ती पेढीनें काढलेल्या नोटांचें रूपांतर सोन्यांत व्हावयाचें नाहीं असें एकदां कायद्यानें ठरविलें म्हणजे वरील सर्व अडचणी दूर झाल्या. महायुद्धांत भाग घेणाऱ्या सर्व राष्ट्रांत युद्धप्रारंभापासून लवकरच असे कायदे करण्यांत आले. आणि सुवर्णपरिमाणाऐवजीं कागदी चलन चालूं झालें. राष्ट्रीय सरकारांची आर्थिक परिस्थिति जसजशी अधिक हलाखीची होऊं लागली तसतशी नोटांची निपज वाढत चालली. नोटांचा छापखाना हीच टांकसाळ व तीच पेढी अशी कांहीं राष्ट्रांत स्थिति उत्पन्न झाली. बाजारभाव, हुंडणावळ, कर्जें, कर, पगार इत्यादि देवघेवींच्या बाबतींत अनुभूत अनर्थ घडून आले. युद्ध कालच्या इतर साधारण संकटांप्रमाणें हेंही संकट तात्पुरतें म्हणून त्यात्या राष्ट्रांतील लोकांनीं तें पत्करलें. नोटांस तारण ठेवण्याचा व सोन्यांत परिवर्तन होण्याचा कायदा एकदां रद्द केला म्हणजे कागदी चलनाचा पुरवठा बेसुमार होतो. हा अनुभव अपेक्षित असाच होता. परंतु त्या असामान्य परिस्थितीचीं जीं तीन चार वर्षें गेलीं त्या काळांत अनपेक्षित असे नवे महत्त्वाचे अनुभव आले. युद्धकाळीं शस्त्रवैद्यकींत जसे अनेक नवे प्रकार घडले तसे ते चलनविषयक संघटनेंतही घडून आले. सध्यांची आर्थिक घटना कायदेशीर चलनाच्या सहाय्याखेरीज चालू शकत नाहीं. असें चलन सरकारच पुरवीत असल्यानें सरकार ज्या प्रकारच्या चलनाला कायदेशीर मान्यता देईल तेंच लोकांस घेणें भाग आहे; कागदी चलनाचा सोन्याचा आधार काढून घेतला तरी अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहार दीर्घ कालपर्यंत चालू शकतात. कागदी चलनाला सोन्याचें किती तारण ठेवावें ह्याबद्दलचा कायदा फार कडक केल्यास थोडयाशा चलबिचलीनें किंवा सोन्याच्या टंचाईनें पेढयांचीं दिवाळीं निघतात वगैरे अनेक तात्त्विक सत्यांची यथार्थता बहुजनसमाजाला व त्यांतल्या त्यांत राजकारणी लोकांस कळून आली. महायुद्ध दीर्घकाळपर्यंत चाललें तरी तेंही असामान्य परिस्थितीचेंच उदाहरण मानून कांहीं कांहीं राष्ट्रांनीं शांतताप्रस्थापनेपासून जुनी सुवर्णचलन पद्धति अंमलांत आणण्याची पूर्वतयारी सुरूं केली. सुवर्णपरिमाण पुन्हां सुरूं करण्यास पहिल्याप्रथम नोटांचें सोन्यांत रूपांतर करण्याची मध्यवर्ती पेढीवर जबाबदारी पुन्हां अंमलांत आणणें जरूर होतें. युद्धकाळीं एवढया प्रचंड प्रमाणावर नोटा काढल्या गेल्या होत्या कीं, महायुद्धानंतरही अनेक वर्षें तेवढया सर्वांस पूर्ण तारण ठेवावयाचें, तर सर्व जगांतील सोनेंही कित्येक राष्ट्रांस पुरें पडलें नसतें. सुवर्ण परिमाणाच्या पुनर्स्थापनेची पूर्व तयारी म्हणून कागदी चलनाचा पुरवठा कमी करणें जरूर होतें. हें युद्धकालीन कागदी चलन राष्ट्रीय सरकारांनीं आपापल्या पतीवर उभारलेलें बिनव्याजी कर्जरोखेच होते असें म्हटलें असतां चालेल. तें चलन कमी करावयाचें तर सरकारनें आपल्या खर्चांत बचत करून तेवढया नोटा रद्द करणें जरूर होतें. महायुद्धानंतर प्रत्यक्ष युद्धखर्च नाहींसा झाला, तरी वाढलेल्या सैन्याचा व सरकारी नोकरांचा खर्च, प्रत्यक्षपणें उभारलेल्या कर्जांचीं व्याजें, इत्यादि मोठमोठे खर्च चालूंच होते. उलट उद्योगधंदे, व्यापार, शेतकी ह्यांची स्थिति असमाधानकारक असल्यानें चढीच्या करांनींही उत्पन्न बेताचेंच होई.

अशा बिकट परिस्थितींत कित्येक राष्ट्रांनीं आपली दिवाळखोरी मान्य करून आपल्या कर्ज-दारांस त्यांच्या हक्काचा ठराविक अल्प भागच देण्याचें ठरविलें. यूरोप खंडांत फक्त इंग्लंडनेंच आपल्या सर्व प्रकारच्या कर्जदारांचें पूर्ण देणें मान्य करून, १९२४ सालपर्यंत कागदी चलनही पुष्कळच कमी केलें. इंग्लिश नोट म्हटली म्हणजे ती तेवढ्या किंमतीच्या सोन्याच्या बरोबरीची, ही महायुद्धाच्या पूर्वीची परिस्थिति निर्माण करण्यांतच इंग्लंडचें राजकीय व आर्थिक अग्रसरत्व सांठविलेलें आहे, असें मानून १९२५ सालीं चलन-विषयक एक नवा कायदा ब्रिटिश पार्लमेंटनें पास केला. 'बँक ऑफ इंग्लंड'नें काढलेल्या सर्व नोटांचें सोन्यांत रूपांतर व्हावें, हा या कायद्याचा मुख्य भाग होता. मात्र हें सोनें पूर्वी-सारखें हरएक पौंडाच्या नोटीमागें ११३·३ ग्रेनचा सॉव्हरिन असें फुटकळ मिळावयाचें नसून, विशिष्ट मर्यादेपेक्षां अधिक किंमतीच्या नोटा बँकेकडे आणून देणाऱ्या कोणाही इसमास त्यांच्या मोबदला सोन्याच्या लगडी वरील कायदेशीर प्रमाणांत मिळावयाच्या होत्या. सॉव्हरिन हें नाणें कायद्यानें रद्द केलेलें नव्हतें. 'बँक ऑफ इंग्लंड'च्या मागणीवरून सरकारी टांकसाळींत असे कांहीं सॉव्हरिन पाडले जात. जेथें अशा नाण्यांची अगदीं जरूरच आहे, असे बँकेस वाटेल तेथें ती देण्यास बँकेला सवलत असे. त्याचप्रमाणें लोकांनीं आपल्या जवळचें सोनें (बँक ऑफ इंग्लंड) कडे ठराविक वजनापेक्षां जास्त वजनाचें एकदम नेलें तर, त्या मोबदला कायदेशीर प्रमाणांत बँक नोटा देई. अशा पद्धतींत सोनें हें चलनी नाणें ह्या स्वरूपांत लोकांजवळ रहात नाहीं. तरी सर्व कायदेशीर चलनांचें सोन्यांत व सोन्याचें चलनांत रूपांतर होण्याची व्यवस्था असल्यानें, सोन्याच्या भावावरूनच इतर पदार्थांच्या किंमती ठरतात. 'सुवर्णचलनाखेरीज सुवर्णपरिमाण' प्रस्थापित करण्याच्या ह्या पद्धतीस 'सुवर्णखंड मूल्यमापन' पद्धति म्हणतात. १९२५ सालीं ही पद्धत इंग्लंडांत प्रस्थापित झाल्यापासून इतरहि अनेक राष्ट्रांत तिचें अवलंबन क्रमाक्रमानें केलें गेलें. मात्र त्या राष्ट्रांची आर्थिक स्थिति इंग्लंडपेक्षांही पुष्कळच खालावलेली असल्यानें त्यांस, आपल्या युद्धकालीन कागदी चलनाचा पुरवठा शांततेच्या काळीं जरूर असणाऱ्या पुरवठ्या इतका मर्यादित करतां आला नाहीं. म्हणून सुवर्णपरिमाण पुन्हां स्थापन करतेवेळीं त्यांनीं सुवर्ण आणि कागदी चलन ह्यांच्यामध्यें नवें प्रमाण बसविलें. उदाहरणार्थ, फरान्समधील मुख्य नाणें जें फ्रँक तें जोंपर्यंत चालू असे, तोंपर्यंत पांच फ्रँकच्या नोटीबद्दल पांच फ्रँकचें सोन्याचें नाणें मिळे. परंतु आतां फ्रँकच्या नोटांचा फाजील पुरवठा झाल्यानें एक नवीन प्रमाण ठरविण्यांत येऊन फ्रँकच्या नोटीऐवजीं पूर्वीं एका फ्रँकास अदमासें साडेचार ग्रेन सोनें ह्या प्रमाणांत सोनें मिळे. तें आतां दर फ्रँकास पासष्ट मिलिग्राम म्हणजे एका ग्रेनहूनही थोडें कमी सोनें मिळण्याची व्यवस्था झाली आहे. ज्या देशांत अशा नव्या प्रमाणावर सुवर्णखंड पद्धति अस्तित्वांत आली त्यांच्या चलनाशीं इंग्लंडच्या चलनाचें गुणोत्तर साहजिकच बदललें. पौंड व फ्रँक यांचा परस्पर संबंध पूर्वी १:२५ असा होता. तोच आतां १:१२५ असा झाला. इंग्लंड व फ्रान्स यांमधील परस्पर देवघेवीच्या प्रमाणांत हा भाव नेहमींप्रमाणें थोडा खालींवर होई. परंतु त्यांत फार बदल होणें शक्य नसे. कारण भाव फार वाढल्यास अगर कमी झाल्यास सोन्याची ने-आण होऊन तो पुन्हां स्थिर होई. इंग्लंड व फरान्स या दोन देशांत ज्याप्रमाणें असें स्थित्यंतर घडून आलें, तसेंच स्थित्यं-तर इतर बहुतेक देशांतही झालें. व १९३१ च्या सप्टेंबर महिन्याच्या २१ तारखेस इंग्लंडनें आपली चलन पद्धति एकदम बदलली, तोंपर्यंत सामान्यतः वर वर्णन केलेल्या स्वरूपाची सुवर्णखंड पद्धति सर्वत्र अमलांत आली होती. महायुद्धाची परिस्थिति ही असाधारण होती व ती नाहींशी झाल्यानें आतां पूर्ववत् सर्व व्यवहार सुरू होतील, अशा अपेक्षेनें इंग्लंडनें मुद्दाम चलन घटवून १९२५ मध्यें सुवर्णपरिमाण पुन्हा सुरू केलें. व इंग्लंडचाच कित्ता आपापल्या आर्थिक परि-स्थितीप्रमाणें इतर राष्ट्रांनीं गिरविला. परंतु युद्धोत्तर काळांतील परिस्थितिही असामान्य स्वरू-पाची आहे, ही गोष्ट लौकरच त्यांच्या निदर्शनास येऊं लागली. चलनाचा पुरवठा व किंमती यांच्या अन्योन्य संबंधांविषयीं एक ठोकळ सिद्धांत या बाबतींत ध्यानांत घेण्यासारखा आहे. बाजार-भाव म्हणजे एका बाजूस पौंड, फ्रँक, रुपया इत्यादि चलन व दुसऱ्या बाजूस तांदूळ, ज्वार, कपास इत्यादि पदार्थ ह्यांच्या परस्पर मूल्यसंबंधाचें गुणोत्तर होय. फुटाच्या लांबीनें इतर वस्तूंची लांबी मोजतात. त्याप्रमाणें चलनाच्या मोलानें इतर पदार्थांची किंमत केली जाते. फुटांत जेवढी लांबी ठराविकपणें समाविष्ट

व्हावयाची तेवढ्याहून अधिक लांबीचा फट लांबी मोजण्यास घेतला तर तें माप पहिल्यापेक्षां कमी भरेल. आणि उलट फुटांत ठरल्यापेक्षां कमी लांबीचा अंतर्भाव झाल्यास, त्यानें मोजलेल्या इतर वस्तूंची लांबी पहिल्यापेक्षां अधिक भरेल. सुवर्ण-परिमाणाच्या पुनर्स्थापनेकरितां कागदी चलनाचा पुरवठा झपाट्यानें मर्यादित केला गेल्यानें, चलनाची किंमत वाढून इतर पदार्थांची किंमत म्हणजे बाजारभाव मात्र कमी झाले. बाजारभाव एकदम व झपाट्यानें घसरूं लागल्यानें अनेक प्रकारचे तोटे झाले. कारखानदारांस व शेतीच्या उत्पादकांस आपल्या मालाची कमी किंमत येऊं लागली; पण उलट भाडें, व्याज, मजूरी, कर इत्यादि मार्गांनीं त्यास जो उत्पादन खर्च करावा लागे, तो मात्र तेवढ्या प्रमाणांत कमी झाला नाहीं. सुवर्णपरिमाणास पुन्हां सुरुवात करण्यानें औद्योगिक भरभराटीच्या नव्या युगाचा प्रारंभ होईल असें मानणाऱ्यांची निराशा होऊं लागली. युद्धकालीं सर्व राष्ट्रांनीं मोठमोठीं कर्जें करून ठेविलीं होतीं. ज्या कालांत कर्जें घेतलीं तेव्हां चलनाचा सुकाळ होता व बाजारभाव चढीचे होते. परंतु शांततेच्या काळीं बरोबर उलट परिस्थिति असल्यानें व्याज व कर्जफेड ह्यांचा अवास्तव बोजा नागरिकांस सहन करावा लागतो. युद्धकाळीं किंमती दुप्पट तिप्पट वाढल्या होत्या, म्हणजे तेव्हां लोकांनीं दिलेल्या कर्जांतून जेवढ्या वस्तु विकत घेतां येत त्यापेक्षां आतां त्यांस परत दिल्या जाणाऱ्या व्याजांतून व मुदलांतून तिप्पट वस्तु विकत घेतां येतात. देण्याघेण्याच्या इतर व्यवहारांतही अशा प्रकारचाच विपरीतपणा दिसून येऊं लागला. धनको, पगारी वर्ग, ठराविक उत्पन्नाचे इतर लोक अशांचा जरी चलनाच्या मर्यादित पुरवठ्यानें व उतरत्या बाजार भावानें तात्कालिक फायदा झाला तरी, एकंदर संपत्तीच्या उत्पादनांतच मूळ खर्च आणि विक्रीची किंमत ह्यांत तफावत पडूं लागल्यानें एकंदरीत सुवर्ण परिमाणाच्या पुनर्स्थापनेनंतर भरभराटीची सुरुवात होण्याऐवजीं आर्थिक मंदी व विघटना ह्यांचेंच बीं रोवलें गेलें. बहुतेक राष्ट्रांस ह्याच वेळीं सोन्याची टंचाई भासण्यास अनेक महत्त्वाचीं कारणें झालीं. जगांतील सोन्याचा एकंदर सांठा सध्यां सुमारें ५,५०० कोटी रुपये किंमतीचा असून त्यांतील जवळजवळ निम्मा भाग चलनविषयक उपयोगांत गुंतलेला आहे असा अंदाज आहे. गेल्या कांहीं वर्षें सोन्याचें उत्पादन नेहमींपेक्षां कमी प्रमाणांत होऊं लागलें आहे. उलट अंतर्गत व आंतरराष्ट्रीय देवघेवींचें प्रमाण एकंदरीनें वाढतें आहे. चलनास असणाऱ्या मागणीच्या मानानें सोन्याचा पुरवठा कमी पडत असतांच वरील प्रकारानें सुवर्णपरिमाण पुन्हां अंमलांत आणण्यांत आलें. चलनाची टंचाई कायम राहिल्यानें बाजारभाव उतरण्यास, व त्यांचा उद्योगधंद्यावर अनिष्ट परिणाम होण्यास अधिकच मदत झाली.

महायुद्धानंतर जर्मनीला फ्रान्सची व इतर राष्ट्रांची खंडणी म्हणून आणि बहुतेक दोस्त राष्ट्रांना अमेरिकेच्या कर्जाची परतफेड म्हणून मोठमोठ्या रकमा द्यावयाच्या होत्या. ह्या 'कर्जफेडीस' व्यापारी देवघेवींचा मुळींच पाया नव्हता. ऋणको राष्ट्रांनीं आपल्या उत्पन्नांतून बचत करूनच हीं देणीं भागवावयाचीं होतीं. बरें, देणीं द्यावयाचींच तर तीं धनको राष्ट्रांस माल पाठवून देतां आलीं तर निदान राष्ट्रांतील उत्पादकांस तरी तेवढी गिऱ्हाइकी मिळाली असती. परंतु सर्वच राष्ट्रांनीं आणि विशेषतः अमेरिका व फ्रान्स यांनीं आयात जकाती वाढवून परकी माल येण्याचें मर्यादित केल्यानें ऋणको राष्ट्रांस बऱ्याच मोठ्या प्रमाणांत धनको राष्ट्रांकडे प्रत्यक्ष-सोनें पाठविणें जरूर झालें. आधींच टंचाईचा भासणारा सोन्याचा पुरवठा अमेरिका व फ्रान्स या दोन राष्ट्रांतच फार मोठ्या प्रमाणावर अडकला गेल्यानें इतर राष्ट्रांस त्याचा फारच थोडा भाग वापरावयास शिल्लक उरला. इंग्लंडनें सुवर्ण-परिमाणाची पुनर्स्थापना केल्यापासून इतर राष्ट्रांतील मोठमोठ्या पेढ्यांनीं आपल्या ठेवी बँक ऑफ इंग्लंडमध्यें ठेवण्यास सुरवात केली होती. अंतर्गत व्यवहारांत कागदी चलन, व परदेशी देवघेवीस आयात–निर्यात हुंड्यांची वजावाट होऊन अधिक चलन लागल्यास नोटांचें सोन्यांत रूपांतर करण्यास तयार असणाऱ्या बँक ऑफ इंग्लंडवर हुंडी, अशा स्वरूपांतच अनेक राष्ट्रांनीं सुवर्ण परिमाणाचें अवलंबन केलें होतें. ह्या पद्धतीस सुवर्ण परिवर्तन पद्धति असें नांव असून ती अनेक वर्षें हिंदुस्थानांत चालू असे. औद्योगिक मंदीला सुरवात होऊन अनेक राष्ट्रांचा निर्यात व्यापार घटूं लागला तसतशी त्यांस बँक ऑफ इंग्लंडजवळील आपल्या ठेवी काढून घेण्याची जास्त जरूर भासूं लागली. व त्या पेढीला आपल्याजवळ किती सोनें शिल्लक उरतें याचीच विवंचना येऊन पडली. ह्याच सुमारास म्हणजे १९२९ च्या जुलै महि-

न्यांत अमेरिकेंत सट्टेबाजीस ऊत येऊन बरींच दिवाळीं निघालीं. आणि अमेरिकन सावकारांनीं मध्य, दक्षिण व पूर्वयूरोपांत कित्येक राष्ट्रांना कर्जें दिलीं होतीं तीं परत घेण्याचा व नवीन कर्जें न देण्याचा उपक्रम सुरूं केला. ह्या आकस्मिक आपत्तीनें युरोपांतील अनेक वजनदार बँकांसही धोका उत्पन्न होऊन त्यांनीं इंग्लंडांतील आपल्या ठेवी काढून घेण्यास सुरुवात केली. जर्मन खंडणीच्या बाबतींत फ्रान्स व जर्मनी यांचा तीव्र बेबनाव होऊन,आतां जर्मनी जाहीरपणें आपलें कर्ज अमान्य करणार अशीहि भीति पडली.कित्येक ब्रिटिश पेढ्यांनीं जर्मन बँकांस कर्जें दिलेलीं असल्यानें त्यांनाही धक्का बसेल असा सर्वत्र बोभाटा झाला. हें सर्वच काहूर एकदम उठल्यानें इंग्लंडला सुवर्णपरिमाण कायम राखणें अशक्य झालें, व म्हणून बँक ऑफ इंग्लंडनें आपल्या नोटांच्या मोबदला सोनें दिलें पाहिजे, हा कायदा १९३१ २१ सप्टेंबर रोजीं रद्द करण्यांत आला. इंग्लिश पौंडाचें सोन्यांत रूपांतर होण्याचें बंद झाल्यामुळें अमेरिकन डॉलरशीं असलेलें त्याचें प्रमाण उतरूं लागलें. पूर्वीं एका पौंडास ४·८६ डॉलर मिळत, ते ३·४० एथवरच मिळूं लागले. व अगदीं अलीकडे तर हा भाव आणखीही उतरला आहे. इंग्लंड सारख्या प्रतिष्ठित व अनेक राष्ट्रांशीं व्यापार व सावकारी करणाऱ्या राष्ट्रानें सुवर्णपरिमाण सोडून दिल्यानंतर इतर अनेक राष्ट्रांनीं तोच मार्ग स्वीकारावा ह्यांत आश्चर्य नव्हतें. सध्यां फ्रान्स व अमेरिका ह्या दोन राष्ट्रांखेरीज कोणत्याहि पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत सुवर्ण परिमाण चालूं नाहीं.

दुधानें तोंड पोळल्यावर मनुष्य ताकही फुंकून पितो, ह्या न्यायानें आतां इंग्लंडांतील व इतर कांहीं मुत्सद्दी सुवर्ण परिमाणाचें नांवही काढूं देत नाहींसे झाले आहेत.अंतर्गत चलन कागदी, व परदेशी देवघेवींचें साधन खाजगी रीतीनें पाठविलेलें सोनें अगर कमी भावाच्या हुंड्या अशीच सध्यां स्थिति आहे. बहुतेक सरकारांनीं चलन व हुंडणावळ यांचें तारू व्यापारी तेजीमंदिवरच किंवा मागणीपुरवठ्याच्या वाऱ्यावर सोडून दिल्यासारखेंच झालें आहे. रौप्य चलन किंवा 'द्विधातु परिमाण' सुरूं करण्यांत यावें अशा कांहीं लोक सूचना करीत आहेत. चांदी उत्पन्न करणाऱ्या खाणीवाल्यांचा एक महत्त्वाचा गट अमेरिकेंत असल्यानें ज्या योजनांमुळें चांदीची गिऱ्हाइकी वाढल, अशा सर्व योजनांस त्यांचा पूर्ण पाठिंबा असतो. हिंदुस्थान, चीन व इतर गरीब राष्ट्रांनीं आपल्या परिस्थितीस साजेसें स्वस्त चलन म्हणजे रौप्य परिमाण स्थापन करावें असाही कित्येकांचा आग्रह आहे. परंतु चांदीच्या भावांतील चढउतार इतके तीव्र , अनपेक्षित आणि मोठे असतात कीं, त्या धातूस मूल्यमापनाचें परिमाण करणें वाजवी ठरणार नाहीं. विनिमयाचें माध्यम किंवा नुसतें चलन ह्या नात्यानें कदाचित् त्या धातूचा इतःपर अधिक उपयोग केला जाण्याचा संभव आहे. म्हणजे ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत रुपया हा कायदेशीर कर्जफेडीचें पूर्ण साधन असूनही तो वास्तविकपणें चांदीवर छापलेली नोटच आहे, त्याप्रमाणें इतरही राष्ट्रांत थोड्या फार प्रमाणांत चांदीचा असाच उपयोग होणें शक्य आहे. मूल्यमापक परिमाण कोणत्याही धातूचें न ठरवितां एकंदर बाजारभावांच्या चढउतारांवरून चलनी अधिकाऱ्यांनीं आपलें चलनविषयक धोरण ठरवावें, व चलनाचा पुरवठा कमी अधिक करावा, अशीही एक सूचना आहे. सर्व आर्थिक व्यवहारांवर दूरवर परिणाम घडविणारी चलनासारखी गोष्ठ मूठभर अधिकाऱ्यांच्या माहितीवर आणि प्रामाणिकपणावर अवलंबून रहावी ह्या प्रकारास कोणाही व्यवहारी मनुष्याची मान्यता नाहीं. या व्यावहारिक अडचणींखेरीज सदरहू योजनेंत महत्त्वाचे तात्त्विक दोषही आहेत. चलनाच्या पुरवठ्याचा आणि बाजार भावांचा अन्योन्य कार्यकारण संबंध स्थूल मानानें मान्य केला तरी बाजारभाव इतरही अनक कारणांनीं वरखालीं होतात, हें विसरणें योग्य नव्हे. तसेंच बाजारभाव स्थिर राखण्याचें धोरण स्वीकारून परदेशी हुंड्यांचे भाव हवे तसे हेलकावूं द्यावयाचे हें धोरणही एकांगीं व सदोष ठरतें.वरील एकंदर कारणमीमांसेनुसार सध्यां बहुतेक सर्व अर्थशास्त्रज्ञांनीं व तज्ज्ञ व्यापाऱ्यांनीं सुवर्ण परिमाणच पुन्हां स्थापन करणें इष्ट आहे असें ठरविलें आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, कर्जफेड, औद्योगिक मंदी, जकातींचीं युद्धें, चीन-जपान युद्धाची फलश्रुति इत्यादि अनेक जगड्व्याळ उपाधींमुळें सध्यांची आर्थिक परिस्थिति बिघडलेली आहे. नेहमीं सुवर्णपरिमाण स्थापन करण्याचे बाबतींत इंग्लंड पुढाकार घ्यावयाचें. परंतु पूर्वअनुभवामुळें म्हणा किंवा सध्यां कमी किंमतीच्या चलनामुळें इंग्लंडच्या निर्यात व्यापारास उत्तजन मिळत आहे म्हणून म्हणा, हल्लीं इंग्लंडच या बाबतींत मागें पाय घेत आहे. जर येत्या

चारसहा महिन्यांत आर्थिक किंवा राजकीय स्वरूपाचें एकादें नवें जागतिक संकट ओढवलें नाहीं, व जर या व इतर बावतींत परिस्थिति निवळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं तर, होऊं घातलेली जागतिक आर्थिक परिषद लवकरच भरेल, आणि सुवर्णपरिमाणाच्या पुनःस्थापनेस तिचा जोराचा पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे. ह्या योजनेचें सविस्तर स्वरूप आगाऊ सांगणें कोणासच शक्य नाहीं. परंतु आजवरच्या अनुभवांवरून असें दिसतें कीं, यापुढें स्थापन होणाऱ्या सुवर्ण परिमाणांत खालील गोष्टींस प्रामुख्य दिलें जाईल.

(अ) सोन्याचें प्रतिवार्षिक उत्पादन सध्यापेक्षां पुष्कळच वाढलें नाहीं तोंपर्यंत प्रत्यक्ष सोन्याचें नाणें चालू करणें अशक्य आहे; (ब) तरी सुवर्णपरिमाण योग्य तऱ्हेनें चालावयाचें तर ठराविक मर्यादेपलीकडे व विशिष्ट नियंत्रणाखालीं चलनाच्या ऐवजीं सोनें व सोन्याच्या ऐवजीं चलन असें कायदेशीर भावानें परस्पर परिवर्तन होणें जरूर आहे. (क) असें परिवर्तन प्रत्येक राष्ट्रांतील मध्यवर्ती पेढीनें सोन्याची खरेदीविक्री करून घडवून आणावयाचें असल्यानें पेढ्यांची संघटना सुधारणें आणि मध्यवर्ती पेढीवर चलन व सोन्याचें तारण ह्यांबद्दल घातलेलीं नियंत्रणें ढिलीं करणें जरूर आहे. (ड) प्रत्येक राष्ट्रांतील मध्यवर्ती पेढीनें इतर पेढ्यांच्या व्यवहारास धक्का न पोहोंचेल व एकंदर राष्ट्रीय हितास पोषक होईल अशा रीतीनें आपली चलनविषयक जबाबदारी पार पाडली पाहिजे. त्याप्रमाणें राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांनींही आपापसांत सहकार्य करून सर्वांच्या हिताचें होईल असेंच धोरण सोन्याच्या आयात निर्यातींत राखणें इष्ट आहे. बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट नांवाची जी एक आंतरराष्ट्रीय पेढी आधींच स्थापन झाली आहे, तिच्यामार्फत किंवा दुसऱ्या एखाद्या पेढीमार्फत निरनिराळ्या राष्ट्रांतील मध्यवर्ती पेढ्यांच्या धोरणांत शक्य तितका एकसूत्रीपणा आणण्याची कामगिरी झाली पाहिजे.

वरील प्रकारचें सुवर्णपरिमाण स्थापन झालें तर त्यास आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण असें म्हणतां येईल. निव्वळ आर्थिकच नव्हे तर अनेक राजकीय उलाढालींचा ह्या योजनेवर परिणाम होण्याजोगा आहे. विशेषतः राष्ट्राराष्ट्रांतील वैमनस्यें आणि हितविरोध कायम आहेत, तोंपर्यंत त्यांच्यांत आंतरराष्ट्रीय परिमाण कितपत स्थापन होईल, अशी शंका येणें साहजिक आहे. परंतु निदान त्या दिशेनें प्रयत्न होण्याची वेळ आलेली आहे यांत शंका नाहीं. राष्ट्रीय सरकारांनींही यापुढें आपापल्या अंतर्गत कायद्यांत पैसा हें एकसारखें बदलणारें माप आहे, ह्या सत्याची अधिक जाणीव ठेवणें आवश्यक आहे. पगार, मजुरी, कर, कर्जें इत्यादि बाबतींतील करारमदार चलनाच्या किंमतीनुसार किंवा बाजारभावांच्या चढउतारानुसार थोडे तरी बदलतील अशी व्यवस्था होणें जरूर आहे. अशा सुधारणा वेळींच न झाल्या तर गरीब मजूर वर्ग, कर्जबाजारी शेतकरी आणि करांच्या ओझ्याखालीं दडपलेला नागरिक ह्यांच्या असंतोषास केव्हां व कोणत्या मार्गानें तोंड फुटेल तें सांगवत नाहीं.

हिंदी–चलन–विचार

धान्य मोजण्याकरितां आपण पायलीचा उपयोग करतों व कापड मोजण्याकरितां वार उपयोगांत आणतों, त्याचप्रमाणें हरएक जिन्नसाची किंमत ठरविण्याकरितां सोन्यारुप्यासारख्या मौल्यवान् धातूंचा आपण उपयोग करितों. ज्या ज्या देशांमध्यें अशाकरितां सोन्याचा उपयोग केला जातो तेथें तेथें सुवर्णमापन प्रमाण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा देशामध्यें प्रत्येक मनुष्य उपयोगाची प्रत्येक वस्तू सोन्याचें मोल देऊन विकत घेतो. विकणारा व्यापारी हें सोनें आपल्या संग्रहीं ठेवतो व ज्यावेळीं त्याला जिन्नसाची गरज लागते त्यावेळीं तो त्याचा उपयोग करतो. पुरातनकाळीं जिन्नसांची सुखसोयींची देवघेव सोन्याच्या प्रत्यक्ष देवाणघेवाणीनें होत असे. कांहीं कालानंतर व्यापाराच्या व एकंदर लोकांच्या सोईकरितां या सोन्याचे तुकडे पाडण्यांत आले. यांनाच आपण नाणीं म्हणतों. नाणीं पाडणें हें काम प्रत्येक देशांतील सरकार करीत असतें व यामुळेंच नाण्यांच्या सत्यतेबद्दल कोणासही संशय येत नाहीं. यावरून नाणें व प्रत्यक्ष धातू यांच्या मोलामध्यें कांहींच फरक नाहीं हें कोणासही सांगावयास नको. एकोणिसाव्या शतकांत व्यापार जसजसा वाढूं लागला व मालाची देवघेव मोठ्या प्रमाणांत होऊं लागली तसतशी व्यापाऱ्यांना सुद्धां गैरसोय भासूं लागली. म्हणून नाण्याऐवजीं नाण्यांच्या पावत्यांचा उपयोग करण्यांत येऊं लागला. नाणीं किंवा सोनें हें सरकारकडे किंवा निमसरकारी मध्यवर्ति पेढीकडे एका गंगाजळींत सांठविण्यांत आलें व सोन्याच्या पावत्या लोकांच्या उपयोगांत येऊं लागल्या. यांनाच आपण नोटा म्हणतों. देशाच्या दररोजच्या व्यवहारांत यांचा उपयोग होतो. तथापि ज्या ज्या वेळीं प्रत्यक्ष सोन्याची किंवा नाण्यांची गरज लागते त्यावेळीं पावती पेढीपुढें किंवा सरकारपुढें हजर करतांच तिच्यावर नमूद केलेलें सोनें परत मिळतें. यावरून नोटांच्या व सोन्याच्या मोलांत कांहींच फरक असणें शक्य नाहीं हें सहजच लक्षांत येईल. परत केलेल्या नोटांना सरकार किंवा मध्यवर्ति निमसरकारी पेढी, जर नोटांवर लिहिलेल्या सोन्यापेक्षां कमी सोनें देईल तर तो गुन्हा ठरेल व लोकांचा सरकारवरील विश्वास उडेल.

हिंदुस्थानांतील रुपया म्हणजे चांदीवरील छापलेली नोटच म्हणावयास हरकत नाहीं. इ. स. १९२० पर्यंत सरकार लोकांकडून सॉव्हरीन (इंग्रजी सोन्याचें नाणें पौंड) घेऊन प्रत्येक सॉव्हरीनकरितां १५ रु. देत असे. एका रुपयास जसे १६ आणे कायद्यानें ठरलेले आहेत त्याचप्रमाणें एका सॉव्हरिनला १५ रु. कायद्यानें महायुद्धापूर्वी कित्येक वर्षें ठरलेले होते. सरकारास या चांदीच्या पंधरा नोटा जर आपण परत दिल्या तर सरकार आपणांस एक सॉव्हरीन परत देत असे. परंतु हा सॉव्हरीन हिंदुस्थानांत मिळण्याऐवजीं आपणांस लंडन शहरीं दिला जात असे. तसेंच लंडनमध्यें सॉव्हरीन घेऊन सरकार आपणांस हिंदुस्थानांत १५ रु. अगर १५ रुपयांच्या नोटा देत असे. इंग्लंड देशांत सुद्धां तेथील मध्यवर्ती पेढीनें सॉव्हरीन व सोन्यावर नोटा काढल्या आहेत. या नोटांना विलायतेंत स्टर्लिंग म्हणतात. स्टर्लिंगच्या व सोन्याच्या मोलांत फरक नसल्यामुळें प्रत्यक्ष नाण्याऐवजीं आपणांस लंडन शहरीं दर पंधरा रुपयांबद्दल स्टर्लिंग मिळत असे. यावरून आपल्या देशांत सुद्धां जवळ जवळ सुवर्णमापनच प्रमाण होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

महायुद्धाच्या धामधुमींत इतर देशांनीं हिंदुस्थानचा बराच माल खरेदी केला. आमच्या मालास चांगलें गिऱ्हाईक आल्यामुळें मालाच्या किंमतीही वाढून हिंदुस्थानचा बराच फायदा झाला. हा सर्व फायदा सोन्याच्या रूपानें आम्हांस मिळाला. मिळालेलें सोनें लंडन शहरीं स्टेट सेक्रेटरीनें जवळ ठेऊन आम्हांस सरकारनें सॉव्हरिनास १५ रुपये प्रमाणें नाणें किंवा नोटा दिल्या. अशा रीतीनें देशांत पैशाचा बराच पुरवठा झाला. महायुद्धाच्या समाप्तीच्या सुमारास चांदीचा भाव इतका वाढला कीं, सरकारास पूर्वीच्या भावानें रुपये पाडणें अशक्य झालें. या अचानक संधीचा फायदा घेऊन सरकारनें कायदा बदलून एका साव्हरिनास १० रुपयाचा दर नवीन काय-

द्यानें अमलांत आणला. थोड्या दिवसांत चांदीचा भाव एकाएकीं कमी झाला. याच सुमारास हिंदुस्थानांत दुष्काळ पडून कापूस, गहूं वगैरे जिनसांची निपज फार थोडी झाली. निर्यातीपेक्षां आयात फारच वाढली व आम्हांस परदेशचें देणें झालें. म्हणून सरकारास १० रुपये देऊन परदेशीं पाठविण्यासाठीं लोक सोनें मागूं लागले. अशा रीतीनें १५ रुपयास १ सावरीनच्या दरानें मिळालेलें सोनें व स्टर्लिंग सरकारास १० रुपये दरानें परत करावें लागले. ज्या ज्या परदेशी कंपन्यांनीं हिंदुस्थानांत व्यापार करून महायुद्धांत बराच फायदा मिळविला होता त्यांनीं नवीन दराचा फायदा घेऊन बरेंचसें सोनें सरकारकडून घेतलें. अशा रीतीनें क्रोडों रुपयांचें सोनें विकलें जाऊन सुद्धां लोकांची सोन्याची मागणी थांबेना. त्यावेळीं सरकारनें सोन्याची विक्री बंद केली. दरेक सावरिन मागें ५ रुपये असें कित्येक कोटींनीं देशाचें नुकसान झालें. दरवर्षी हिंदुस्थान सरकारास सुमारें तीन कोटी पौंड विलायतेस कर्जावरच्या व्याजाबाबत व इतर खर्चासाठीं पाठवावे लागतात. पौंडाची किंमत १० रुपये पर्यंत उतरवून १०।१२ कोटी रुपयांची बचत करण्यासाठीं सरकारनें हा घोटाळा केला असें बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे व तें खरें आहे यांत शंका नाहीं.

थोड्याच दिवसांनीं पाऊस काळ बरा येऊन देशांतून मालाची निर्यात वाढूं लागली व देशांत बाहेरचें सोनें येऊं लागलें. अशा वेळीं सॉव्हरीनचा बाजारभाव १५ रुपये व १७ रुपये याच्या आसपास होता. सोनें मिळूं लागतांच लोकांनीं सरकारजवळ रुपयांची मागणी केली. सरकारनें कायदा पुढें करून असें सांगितलें कीं, सॉव्हरिनास १० रुपये दरापर्यंत रुपये मिळतील. सॉव्हरीनचा बाजारभाव १५ ते १७ असल्याकारणानें सरकारजवळ रुपये मागण्यास कोणीही जाईना. वाढत्या व्यापाराकरितां नाणें व नोटांची जशजशी जास्त गरज भासूं लागली व सरकार कायद्याआड उभें राहून चलन वाढवीना त्यावेळीं साहजिकच देशांत खेळत्या असलेल्या पैशावरच लोकांना गरज भागवावी लागली. रुपयाच्या टंचाईमुळें सोन्यामध्यें रुपयाचें मोल वाढूं लागलें. १९२७च्या जानेवारी महिन्यांत सॉवरीनचा बाजारभाव १३॥ –१४ रुपये असतांना सरकारनें नवीन कायदा करून १३॥ रुपयास एक सॉव्हरीन हा नवीन दर अमलांत आणला. १५ रु. दर कित्येक वर्षें चालू असतांना १९२० सालीं व नंतर १९२७ सालीं अशा दोन वेळीं जो सरकारनें वहिवाटलेला दर बदलण्याचा खोडसाळ प्रयत्न केला त्यामुळें देशांतील शेतकऱ्याचें नुकसान झालें, बेकारी वाढली, व्यापार बसला व एकंदर उद्योगधंद्याचें नुकसान आलें. १३॥ रु. दरानें शेतकऱ्याचें, जवळ जवळ चाळीस कोटींचें नुकसान झालें. १९२८–२९ सालीं आमच्या देशांतून एकंदर ३३० कोटी रु. चा माल बाहेर गेला. पूर्वी ज्या मालाला शेतकऱ्यास १५ रु. मिळत असत त्याच मालास आतां १३॥ रु. मिळूं लागले. हें दीड रु. चें अथवा १२॥ टक्याचें नुकसान ३३० कोटीच्या निर्यातीवर जवळ जवळ चाळीस कोटींचें भरतें. शेतकऱ्याला मिळणारी प्राप्ती जरी इतकी कमी झाली तरी शेतकऱ्याचें देणें कांहीं त्याबरोबर कमी झालें नाहीं. जमीनसारा, सावकाराचें व्याज, शेतावरील मजुरी वगैरे शेतकऱ्यांचीं देणीं, पूर्वींइतकींच राहिली. शेतकऱ्याबरोबर इतर कारखानदारांचें व व्यापाऱ्यांचें बरेंच नुकसान होऊं लागलें. म्हणून बेकारी वाढूं लागली. इंग्लिश लोकांच्या हिंदुस्थानशीं चाललेल्या व्यापाराला मात्र यामुळें उत्तेजन मिळालें. पूर्वीं ज्या मालास ते १५ रु. आकारीत असत तोच माल १३॥ रु. स देणें त्यांना परवडूं लागलें. अशा रीतीनें दोनही खेपेस स्वतःच्या फायद्याकरितां व इंग्रजी व्यापाराच्या भरभराटीकरितां हिंदुस्थान देशाचें अपरिमित नुकसान करून सरकारनें दर बदलला.

१९२९ सालापासून अंतर्राष्ट्रीय व्यापारावर एकाएकी एक नवीन संकट आलें. महायुद्धानंतर प्रत्येक राष्ट्रांत राष्ट्राभिमानाचें वारें जोरानें खेळूं लागलें होतें. प्रत्येक राष्ट्राच्या सरकारनें देशांतील उद्योगधंद्याच्या वाढीकरतां संरक्षक–जकाती बसवण्यास सुरवात केली, यामुळें अंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीला जोराचा आळा बसला. निरनिराळ्या पौर्वात्य देशांतील उद्योगधंदे व गिरण्या वाढू लागल्यामुळें एकंदर जगांतील मालाची निपज फारच मोठ्या प्रमाणांत होऊं लागली. पण राष्ट्रांराष्ट्रांतील संरक्षक–जकातीच्या धोरणामुळें निपजलेल्या मालाची विक्री करणें अशक्य होऊं लागलें. शेतकीच्या धंद्यांतसुद्धां नवीन यंत्रांचा उपयोग सुरूं झाल्यामुळें कच्च्या मालाची पैदास मोठ्या प्रमाणांत होऊं लागली. या सर्व गोष्टींबरोबरच युरोपांतील बरेच देश युद्धासाठीं काढलेल्या कर्जाच्या फेडीपायीं बरेच जेरीस आले; व सुखसोयीच्या वस्तू इतर देशांतून विकत घेण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत

राहिलें नाहीं. हिंदुस्थान, चीन, द. अमेरिका वगैरे देशांमध्यें राजकीय असंतोषही याच सुमारास वाढू लागल्यामुळें त्या देशांतील व्यापारांत अनिश्चितता वाढूं लागली. बहिष्कारादि तत्त्वें अंमलांत आणल्यामुळें चीन, हिंदुस्थानसारख्या देशांत परदेशी माल येण्यास पूर्वीसारखा अवसर मिळेना. रशियासारखें मोठें साम्राज्य समाज-सत्तावादी पक्षांच्या राजछत्राखालीं गेल्यामुळें त्या देशाबरोबरचा इतर मोठ्या राष्ट्रांचा व्यापार जवळ जवळ थांबण्याच्या पंथास आला. इंग्लंड देश इतके दिवस परदेशी व्यापारावर अत्यंत पुष्ट झाला होता. वरील घडामोडीनें त्या देशाचा व्यापार एकसारखा बसत चालला. निर्यातीपेक्षां आयात जास्ती होऊं लागली. इंग्लंडचें इतर देशाचें देणें वाढूं लागलें व सोनें बाहेर जाऊं लागलें. सोन्याच्या एकसारख्या चाललेल्या ओघामुळें आपली गंगाजळी संपते कीं काय अशी इंग्लंडास भीति पडून अखेर १९३१ च्या सप्टेंबर महिन्याच्या एकवीस तारखेस विलायतसरकारनें नोटाबद्दल सोनें पूर्वीं प्रमाणें दिलें जाणार नाहीं असा कायदा केला व सोन्याच्या निर्यातीवर कायद्यानें बंधन घातलें. पूर्वीं नमूद केलेल्या एकंदर घडामोडीचा परिणाम व्यापारावर असा झाला कीं, जगांतील सर्वच देशांत मालाच्या किंमती भराभर उतरूं लागल्या. एका सोन्याच्या नाण्याला अथवा त्यावर काढलेल्या नोटीला पूर्वीपेक्षां माल जास्ती मिळूं लागला. म्हणजे मालाऐवजीं सोन्याची आतां महर्गता भासूं लागली. सोनें जसजसें महाग होऊं लागलें तसतसा हिंदुस्थानचा सरकारी कारवाईनें महाग झालेला रुपया सोनें महाग होतांच पुन्हां सवंग होतो कीं काय अशी भीति पडली. कायद्यानें ठरलेला १३॥ रु. चा दर कायम ठेवण्यासाठीं सरकारनें जंगजंग पछाडले व ज्या रीतीनें देशांतील खेळता पैसा कमी होईल असे बरेच उपाय योजले. तथापि या सर्व आटापिटींत सरकारास यश येणार नाहीं हें कित्येक चाणाक्ष लोकांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. अखेर १९३१ च्या सप्टेंबरांत ज्या वेळीं विलायत सरकारनें नोटांबद्दल म्हणजे स्टर्लिंगबद्दल सोनें मिळणार नाहीं असा कायदा केला. त्या संधीचा फायदा घेऊन हिंदुस्थान सरकारनें आपलाही कायदा बदलला व १३॥ रुपयास इंग्लंडचा एक सॉवरीन देण्याऐवजीं एक सॉव्हरीनची कागदी नोट देण्यांत येईल असा नवीन हुकूम अमलांत आणला. इंग्लंडच्या कागदी नोटांना सोनें मिळण्याचें बंद झाल्यामुळें लोक व इतर राष्ट्रें स्टर्लिंगची किंमत सोन्यापेक्षां कमी करूं लागलीं. ही किंमत कमी होतां होतां नोटांची किंमत सोन्यामध्यें शेंकडा तीस टक्के कमी झाली. स्टर्लिंगचें व येथील कमनशिबी रुपयाशीं कायद्यानें लग्न लागल्यामुळें रुपयाची किंमतसुद्धां सोन्यामध्यें तीस टक्के उतरली आहे हें निराळ सांगावयास नकोच. याही सरकारच्या देशघातकी धोरणामुळें देशाचें नुकसान झालें व अजूनही होत आहे. या धोरणाचा पहिला परिणाम हिंदुस्थानच्या आयात व्यापारावर झाला. येथील एकंदर आयातीपैकीं ५ टक्के आयात विलायतेंतून येते. विलायतेहून आम्ही साधें व लोकरीचें कापड यंत्रसामुग्री वगैरे बराच माल दरवर्षी घेतो. विलायती माल इतर देशाच्या मालापेक्षां सर्वसाधारण महाग असतो. वर सांगितल्यापैकीं कांहीं कांहीं माल जर्मनी, अमेरिका, बेल्जियम वगैरे देशांतून घेणें आम्हांस परवडतें. कारण या देशांतून येणारा माल विलायती मालापेक्षां सवंग असतो. परंतु स्टर्लिंगच्या पदराला रुपयाची गांठ घातल्यापासून हा विलायती मालापेक्षां सवंग असलेला माल हल्लीं महाग पडूं लागला आहे. वर सांगितलेल्या देशामध्यें सोन्याची व नोटांची अजून फारकत झाली नाहीं व म्हणूनच ब्रिटिश व्यापाराला हिंदुस्थानांत जास्ती अवकाश मिळूं लागला आहे. समजा कीं, एका विलायती जिन्नसाची किंमत एक पौंड स्टर्लिंग आहे. जोंपर्यंत स्टर्लिंगची व सोन्याची फारकत झाली नाहीं तोंपर्यंत आपणास त्या जिन्नसास १३॥ रुपये द्यावे लागतील. फारकत झाल्यानंतर त्याच जिन्नसाची किंमत एक पौंड स्टर्लिंग राहील, परंतु सॉव्हरीन मध्यें त्याची किंमत स्टर्लिंग, सोन्यामध्यें जितक्या प्रमाणांत उतरला असेल तितक्या प्रमाणांत वाढेल. रुपया स्टर्लिंगबरोबर जोडल्यामुळे आम्हाला त्याची किंमत १३॥ रुपये पडेल. हाच जिन्नस आम्हांस जर जर्मनीकडून १२ रुपयांत मिळत असेल तर आम्ही तो विलायतेहून आणण्याऐवजीं जर्मनीहून आणूं. रुपया-सोन्याची फारकत होण्यापूर्वीं आम्हाला त्याची किंमत नऊ दशांश सॉव्हरीन (म्हणज १८ शिलिंग) इतकी पडेल. रुपयाचें मोल वरील फारकतीमुळें सोन्यामध्यें पूर्वीइतकें राहाणार नाहीं. रुपया जर सोन्यामध्यें शेंकडा तीस टक्के उतरला तर नऊ दशांश सॉव्हरीन मिळण्यास आम्हांस एकंदर जवळजवळ १५ रुपये १० आणे खर्च करावे लागतील. अर्थात् पूर्वी १२ रुपयांनीं मिळणारा जिन्नस आप-

णास १५।। रुपयाखालीं मिळणार नाहीं. साहजिकच आम्हीं हा जिन्नस विलायतेंतून १३।। रुपये देऊन घेऊं. पूर्वी १२ रुपयांस मिळणारा जिन्नस आतां आपणांस १३।। रुपयांस घेणें भाग पडेल. प्रत्येक १२ रुपयाच्या जिन्नसासाठीं १।। रुपया जास्ती दिल्यामुळें आपलें एकंदर नुकसान किती होत असेल ह्याचा वाचकांनींच विचार करावा. एकंदर २००।२२५ कोटी रुपयांच्या आयातीपैकीं २१।। टक्के आयात जर्मनी, फ्रान्स अमेरिका, बेल्जियम व इटली ह्या देशांतून होते. यांपैकीं कांहीं भाग तरी इंग्लंडच्या वाट्यास मागच्या वर्षांत आला असला पाहिजे. वरील देशापासून जर आम्हीं कमी माल विकत घेऊं लागलों तर तेही आमच्याकडून कमी माल घेतील यांत शंका नाहीं. आमच्या निर्यातीपैकीं इंग्लंडांत फक्त शेंकडा २१।। टक्केच निर्यात उलटपक्षीं वर निर्दिष्ट केलेले देश आमच्या निर्यातीपैकीं शेंकडा ३३ टक्के हिस्सा घेतात.त्या दृष्टीनें हे देश आमच्या निर्याती व्यापाराला जास्ती महत्त्वाचे आहेत. व त्यांच्याबरोबर आमचा व्यापार वाढविणें हिंदुस्थानच्या दृष्टीनें फारच महत्त्वाचें आहे. सरकारी धोरणामुळें आमच्या त्या देशाबरोबरच्या व्यापारास कसा आळा बसला आहे हें वाचकांस समजलें असेलच. पारतंत्र्य कसें पदोपदीं भोंवतें याचें हें ढळढळीत उदाहरण आहे.

हिंदुस्थानांत कापडाच्या व्यापारांत आमच्या उद्योगधंद्यांशीं स्पर्धा करणारें राष्ट्र म्हणजे जपान हें होय. आमच्या देशांत तें राष्ट्र इंग्लिश व्यापाराशीं सुद्धां स्पर्धा करतें. स्टर्लिंग सोन्याची फारकत करून व रुपयाची आणि स्टर्लिंगची जोडगण घालून आम्हांला जपानविरुद्ध तरी कांहींसा फायदा मिळाला असता व इंग्लंडलासुद्धां जर्मनी, अमेरिकेविरुद्ध जसा फायदा लाभला तसा जपानविरुद्ध मिळाला असता. पण जपानला स्वहित चांगलें समजतें. मिळणारा फायदा पचूं न देण्यासाठीं जपाननेंसुद्धां सोनतळीं (गोल्ड बेसिन) सोडून आपल्या देशांतील कागद सोन्याची फारकत केली. व जपानी नोटांची किंमत सोन्यांत इतकी उतरली कीं पूर्वीपेक्षांही अधिक अवसानानें आमच्या मालाबरोबर व इंग्रजी मालाबरोबर त्यांना स्पर्धा करतां येणें शक्य झालें आहे. एवंच आमच्या परदेशी व्यापाराच्या बाबतींत आमचा इंग्लंडसारखा फायदा तर झाला नाहींच. उलट ब्रिटिश जिन्नसांच्या महर्गतेमुळें नुकसान झालें व इतर देशांबरोबरच्या व्यापारास धोका आला.

ही झाली व्यापाराविषयीं गोष्ट. याहीपेक्षां साध्या मनुष्याच्यासुद्धां चटदिशीं लक्षांत येणारा दुसरा परिणाम असा झाला कीं, आम्ही सोनतळी सोडतांच सोन्याची किंमत तोळचास २२ रुपये होती ती जवळ जवळ तीसपर्यंत एकदम चढली. या अचानक संधीचा फायदा घेऊन ज्या ज्या लोकांनीं बावीसानें सोनें घेतलें होतें त्यांनीं तें विकण्यास सुरवात केली. सोनें विकण्याची सर्व हिंदुस्थानांत एक प्रचंड लाटच उसळली. विकलेलें सोनें अर्थात परदेशी रवाना होऊं लागलें. प्रत्येक आठवड्यांत कोटी दोन कोटींचें सोनें बोटीनें हिंदुस्थानचा किनारा सोडून जाऊं लागलें. १९३१ च्या आक्टोबर महिन्यापासून तों १९३२ च्या अखेरीपर्यंत जवळ जवळ १०५ कोटी रुपयांचें सोनें हिंदुस्थानांतून परदेशीं गेलें. या सोन्यानें घसरणीवर लागलेला स्टर्लिंग बराचसा सावरून धरला व त्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या सोन्यानें इंग्लंडास मदत झाली. पण त्यामुळें हिंदुस्थानचा कांहींच फायदा झाला नाहीं. सोन्याच्या निर्यातीसंबंधीं लोकांमध्यें बरीच मतभिन्नता दिसून येते. कांहींचें म्हणणें असें कीं, सरकारनें हें सोनें बाहेर न सोडतां विकत घेतलें असतें तर बरें झालें असतें. एक तर हल्लीं जी मध्यवर्ती पेढी आपल्या देशांत नाहीं ती स्थापण्यास बरीच मदत झाली असती व दुसरी गोष्ट अशी कीं पुन्हां सोनतळींवर जाण्यास व रुपया सोन्याची जोडगण घालण्यास यानें फार मदत झाली असती. कांहींचें म्हणणें असें कीं, सोनें विकलें जातें हें एका दृष्टीनें बरेंच होत आहे. कारण तो पैसा बिनाकारण सोन्यांत अडकून पडला होता त्याचा आतां व्यापाराला व उद्योगधंद्याला बराच उपयोग होईल. सरकारचें म्हणणें असें कीं सोनें विकणारे लोक फायद्यासाठीं विकत आहेत. तेव्हां निर्यात बंद करून त्यांचा फायदा हिरावून घेणें हें सरकारचें काम नाहीं. हा त्यांचा रास्त फायदा त्यांना घेऊं देणें हेंच श्रेयस्कर आहे. सरकारला हें सोनें विकत घेण्याचें कांहींही कारण नाहीं व सरकारजवळ असलेली गंगाजळी त्यांना पुरेशी आहे. त्या तीनही मतांत कांहीं विशेष तथ्य नाहीं. पहिले लोक सरकारनें सोनें विकत घेतलें असतें तर काय झालें असतें त्याचा विचार करीत नाहींतसे दिसतात. सोनें विकत घेणें सरकारला नोटा काढूनच करतां आलें असतें. म्हणजे आतांपर्यंत देशांतल्या खेळत्या पैशांत १०० कोटींची भर पडली असती. याचा परिणाम परदेशी व्यापा-

रावर, मालाच्या किंमतीवर व इतर देशांवर काय झाला असता हें सांगणें मोठें कठीण आहे. केवळ देशांतला पैसा वाढवून मालाच्या किंमती वाढविणें शक्य असतें तर इतर राष्ट्रांनीं तसें केलें असतें; व उद्योगधंद्यास आणि व्यापारास जगभर लागलेली उतरती कळा तेव्हांच नाहींशी झाली असती. पैसा मुबलक असतांना सुद्धां मालाचे भाव हल्लीं इतके उतरले आहेत कीं, किंमती केवळ पैशाच्या पुरवठ्यानें चढतात किंवा उतरतात. ह्या तत्त्वावर विश्वास ठेवणें कठीण झालें आहे. उतरत्या किंमतीच्या परिस्थितींत १०० कोटी रुपयांच्या भरीनेंसुद्धां आपल्या देशांतल्या किंमती विशेष वाढल्या नसत्या असें वाटतें, व थोड्याबहुत प्रमाणांत जी वाढ झाली असती त्यानें आपली आयात निर्यातीपेक्षां जास्त वाढून पुन्हां सोनें बाहेर पाठविण्याची वेळ आली असती. दुसरें असें कीं, तीस रुपये तोळ्याप्रमाणें सरकारानें आज सोनें विकत घेतलें असतें व उद्यां सोन्याची किंमत २५ रु. तोळा किंवा कमी झाली असती म्हणजे हेंच सोनें सरकारास तोटयानें विकण्याची पाळी आली असती. सोन्याच्या निर्यातीवर नुसतेंच कायद्याचें बंधन घातलें असतें तर स्टर्लिंग व त्याबरोबर रुपया इतका घसरला असता कीं पुन्हां सोनतळी गांठण्यास बराच त्रास झाला असता व बरेच दिवस लागले असते. सोनें विकलें जात आहे तें बरेच होत आहे व इतके दिवस थिजलेलें भांडवल आतांतरी उद्योगधंद्याच्या कारणी लागेल असें ज्यांचें म्हणणें आहे त्यांनीं तर विक्रीचा परिणाम काय होत आहे ह्याचा विचारच केला नाहीं असें वाटतें. आधीं मुळीं विकलेल्या सोन्यापैकीं बरेंचसें सोनें शेतकऱ्यांनीं व मध्यम वर्गाच्या लोकांनीं विकलें. अर्थात् एकंदर आर्थिक परिस्थितीमुळें आपल्या पैदाशीला दर खेपेसारखा भाव आला नाहीं म्हणून शेतकऱ्यानें सोनें विकलें. जमीन सारा, सावकाराचें देणें, शेतावरची मजुरी वगैरे वाढतीं देणीं भागविण्याकडे सोनें विकून आलेल्या पैशाचा उपयोग शेतकऱ्यानें केला असला पाहिजे. धंद्यांत किंवा व्यापारांत पैसे घालण्याची त्यांच्या अगांत कुवतच नाहीं; बरें ज्या मध्यम वर्गाच्या लोकांनीं सोनें विकलें ते लोक सध्यांच्या एकंदर धंद्याच्या उतरत्या काळांत आपला पैसा धंद्यांत गुंतवितील असें वाटत नाहीं. त्यांनीं तो पैसा सरकारी कर्जरोख्यांत किंवा अशाच कांहीं ठिकाणीं गुंतविला असेल. व हें पोस्टल सर्टिफिकीटांच्या वाढलेल्या विक्रीवरून सिद्ध होतें. ज्या व्यापाऱ्यांनीं सोनें विकून फायदा मिळविला त्यांनीं बराच पैसा परदेशांत पाठविला आहे असें दिसतें. १९३२ च्या जूनजुलै महिन्यापर्यंत सोनें विकून एकंदर परदेशी देणें वजा घालतां जवळजवळ ५७ कोटींचें भांडवल हिंदुस्थानांतून जाऊन इतर देशांत गुंतविलें गेलें आहे. यांपैकीं कांहीं फ्रान्समध्यें, कांहीं इंग्लंडमध्यें व कांहीं अमेरिकेमध्यें गुंतलेलें आहे. अर्थात् हें सर्व अशा ठिकाणीं तात्पुरतें गुंतलें आहे, व तें प्रसंगविशेषीं पुन्हां इंग्लंड सोनें देऊं लागलें म्हणजे परत येईल यांत शंका नाहीं. यावरून सोनें विक्रीचा स्वदेशी उद्योगधंद्यास फायदा मिळत असेल ह्या म्हणण्यांत कांहींच तथ्य दिसत नाहीं. सरकारनें आपली बाजू समर्थन करण्याकरितां जें मत प्रतिपादिलें आहे तेंही असेंच पोकळ आहे. लोकांना सोनें विकण्याचा मोह पडला तो केवळ सरकारच्या धोरणामुळें पडला. मिळणारा फायदा विकणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें रास्त असेल; पण त्याला सरकार कारण आहे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. सरकारजवळ स्वतःची पत कायम राखण्यासाठीं जरूर ती शक्ति असेल. परंतु देशांत खरीखुरी सुवर्णमापन पद्धति आज नाहीं—उद्यां अमलांत आणण्याकरितां असलेलें सोनें विनाकारण दवडणें हें वर्तन अत्यंत देशघातकीपणाचें ठरेल. मध्यवर्ति पेढी स्थापण्यांतसुद्धां त्या सोन्याचा उपयोग झाला असता. गेलेलें सोनें परत मिळविण्याकरितां आतां आपणांस उद्योग करून सालोसाल निर्यात पाठविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. असलेलें गमावून पळत्याच्या पाठीस लागण्यासारखा हा वेडगळ प्रकार आहे. वरील विवेचनावरून असें दिसलें असेल कीं, हिंदुस्थान सरकारनें विलायत सरकारच्या गळ्यांत मिठी मारून रुपया—स्टर्लिंगचें जें लग्न लावलें व सोन्यावरून अथांग पोकळींत उडी मारली, तेंच कारण पसरत असलेल्या फापट पसाऱ्याच्या बुडाशीं आहे. १३॥ रुपयांचा सॉव्हरीन कायद्यानें अंमलांत आणला ही पहिली चूक झाली. ती दुरुस्त करण्याचें नाकारणें सरकारास शक्य नव्हतें हें दिसत होतें. म्हणून १९३१ मध्यें जर महायुद्धापूर्वीचा १५ रुपयांचा सॉव्हरीन कायदेशीर केला असता तर बरें झालें असतें. तो दर, जर कायद्यानें अंमलांत आणणें उत्पन्न झालेल्या परिस्थितीमध्यें त्यावेळीं शक्य नव्हतें, तर निदान सरकारनें तो किंवा देशाच्या हिताच्या दृष्टीनें एकादा निराळा जवळपासचा दर, पुढें मागें कायम कर-

ण्याच्या इराद्यानें रुपयाच्या पळत्या पायाला बंधन घालावयास पाहिजे होतें. १४।१५।१६ जो कोणता दर देशहिताचे दृष्टीनें चांगला असेल त्या भोंवतीं रुपया फिरता ठेवून योग्य समय येतांच तो कायद्यानें अमलांत आणावयास पाहिजे होता. आमचा व इंग्लंडचा व्यापारी संबंध मोठा आहे हें खरें. साम्राज्यांतील इतर कित्येक घटकांचाही इंग्लंडशीं असाच संबंध आहे. या घटकांनीं सुद्धां सोनतळी (गोल्डबेसिस्)सोडली हें खरें आहे. परंतु स्टर्लिंगबरोबर त्यांनीं आपल्या चलनाचें आमच्यासारखें लग्न लाविलें नाहीं. स्टर्लिंग, सोन्यामध्यें तीस टक्के घसरला; पण कानडाचा डॉलर १०।१२ टक्यापेक्षां जास्ती घसरलेला दिसत नाहीं. तीच गोष्ट आस्ट्रेलियाची; दक्षिण आफ्रिकेची. इंग्लंडशीं हितसंबंध असलेल्या साम्राज्यान्तर्गत मोठ्या राष्ट्रांनीं असें वर्तन ठेवलें आहे; तर आमचें अर्थकारण त्याच्या पेक्षां निराळें का असावें हें समजत नाहीं. पुढेंमागें आपणांस सुवर्णारूढ व्हावें लागेल ही गोष्ट हीं राष्ट्रें पक्कें समजून आहेत. व म्हणूनच तीं आपल्या पूर्वीच्या सोनतळीसभोंवतीं घोटाळत आहेत.

रुपया जर १४।१५।१६ या दराभोंवतीं खेचून धरला असता तर सोन्याची किंमत इतकी मुळींच वाढली नसती. फार फार तर २४।२५।२६ रुपयांपर्यंत सोन्याचा भाव वाढला असता. पण हा भाव पुढेंमागें कायम झाला असता व लोकांनीं ३।४ रुपये फायद्याकरितां इतकें सोनें विकलें नसतें व जरी कांहीं सोनें विकण्यास निघालें असतें तरी तें सरकारनें त्या भावानें घ्यावयास पाहिजे होतें. सोन्याचा खरेदी भाव विक्रीच्या भावापेक्षां खालीं गेला नसता व सरकारचें नुकसान झालें नसतें. नवीन नोटा काढून सोनें घेण्याऐवजीं सरकारनें बाजारभावानें लोकांकडून कर्ज म्हणून सोनें घेणें बरें झालें असतें. विक्रीस आलेलें सर्व सोनें बाजारभावानें कर्जाऊ म्हणून घेऊन त्याकरितां नवीन सरकारी कर्जरोखे लोकांस द्यावयास पाहिजे होते. त्यामुळें देशांतील खेळत्या पैशांत जरूर नसलेली भर पडली नसती व सरकारजवळही सोन्याची भक्कम गंगाजळी सांठली असती आणि सुवर्णारूढ होणें सुलभ झालें असतें. मध्यवर्ति पेढी स्थापणेंही शक्य झालें असतें. त्यामुळें सध्यां सुवर्णारूढ असलेल्या देशाबरोबरच्या आमच्या व्यापाराला धोका आला नसता. इंग्लंड व जपान यांना आमच्या देशांतल्या व्यापारांत जादा सवलत मिळूं नये म्हणून स्टर्लिंग किंवा जपानी चलन (त्यास येन म्हणतात) सोन्यांत जितके टक्के उतरेल तितके टक्के त्या देशांच्या मालावर जकात ठेवावयास पाहिजे होती. अशा रीतीनें आपली बाजू चोहींकडून संभाळणें सरकारास शक्य होतें व जगांतील चिंताजनक आर्थिक परिस्थितींत सध्यां जितकें आमच्या मायभूमीचें नुकसान होत आहे तितकें खास झालें नसतें. राष्ट्राभिमानी प्रत्येक सरकारनें हेंच केलें असतें. पारतंत्र्य आमच्या अज्ञानी व नादान जनतेस किती गांजणार आहे हें सांगणें कठीण आहे!

भूगर्भशास्त्र व पुराण–वस्तुसंशोधन

भूगर्भशास्त्र

भूकंप

(१) शारिघः––या वायव्य- सरहद्दीवरील ठिकाणीं तारीख २५ ऑगस्ट १९३१ रोजीं धरणीकंपाचे बरेच धक्के बसले. त्यामुळें बरीच घरें हादरलीं. हे धक्के क्वेटा येथें सुद्धां थोडेसे जाणवले.

(२) माखः–– या ठिकाणीं ता. २७ ऑगस्ट १९३१ ला बराच मोठा धक्का बसला व तो सिंध व बलुचिस्थान या प्रांतांतील बऱ्याच ठिकाणीं पोहोंचला. परंतु मुख्य नुकसान माखच्या आसपास झालें. कच्च्या विटांच्या इमारतींचें तर फारच नुकसान झालें. लाहोर व कराची या शहरांतूनसुद्धां याची हादर पोहोंचली व क्वेटा येथें तर फारच फार नुकसान झालें. हा भाग नेहमीं असेच धक्के खात रहाणार असें शास्त्रज्ञांचें मत आहे.

(३) कामेंग या ब्रह्मदेशांतील ठिकाणीं २८ जानेवारी १९३१ ला मध्यरात्रीं फार मोठा धक्का बसला. नुकसान पुष्कळच झालें.

(४) टावगाँ या ब्रह्मदेशाच्या ईशान्य सरहद्दीवरील भागांत वारंवार धक्के बसले. ब्रह्मदेशांत १९३१ सालांत जवळजवळ १०–१२ धक्के बसले. त्यांबाबत डॉ. चिबर यांनीं बरीच माहिती गोळा केली आहे.

बॉक्साइटः––(एक अल्युमिनिमसारखा खनिज पदार्थ). मध्यप्रांतांतील नांदगांव संस्थानांत हा पदार्थ बऱ्याच प्रमाणांत आहे. संस्थानाधिपतींच्या सूचनेप्रमाणें डॉ. चतर्जी यांनीं त्या प्रदेशाची पहाणी केली आहे.

दगडी कोळसाः–– जानेवारी व फेब्रुवारी (१९३१) या दोन महिन्यांत डॉ. व्ही.एस्. फॉक्स यांनीं कोळसा टापूची पहाणी केली. आसाममधील खासी व गारो डोंगरांतील खाणींकडे ते गेले होते. शिलाँग व चेरापुंजीच्या दरम्यानच्या खाणींचें आर्थिक महत्त्व विशेष नाहीं असें आढळलें. पण बालजंग, डाग्रिंग व वैमाँग या डोंगरांतून चाळीस लक्ष टन कोळसा निघेल व असिलगांव खाणींतून एक कोटी ६० लक्ष टन कोळसा बाहेर काढतां यईल असें आढळून आलें. धंद्याच्या दृष्टीनें बाकीची अनुकूलता असली तरी यांपासून उत्कृष्ट चुना अगर सिमेंट मिळेल असें डॉ. फॉक्स यांचें मत आहे. ब्रह्मदेशांत मैकतिला जिल्ह्यांत व आसपास थोडा कोळसा आढळला. पण तो काढला तर धंदा किफायतशीर होईलसें दिसत नाहीं.

तांबेंः––राजपुतान्यांतील अजमीर व मारवाड प्रांतांतील तोडगड तालुक्यांत थोडेफार तांबें आढळून आलें आहे.

बिकानेर संस्थानांतील ताल छप्पर स्टेशनजवळ दरिबा येथें एक जुनी खाण आहे असें म्हणतात; पण शोध करतां कांहीं आढळलें नाहीं. बिरमसर भागांतहि थोडें तांबें आहे. पण तेथें कारखाना चालण्यासारखा नाहीं.

काशी येथील घाटः–– गंगानदीवरील घाटांची पहाणी मार्च १९३१ मध्यें करण्यांत आली. घाट किती जुने असावेत याचा नीटसा अंदाज बांधतां येत नाहीं. पण १८३० पासून हे दगडी घाट ढासळत आहेत यांत शंका नाहीं. एकही घाट सध्यां सुस्थितींत नाहीं. याला दोन कारणें असू शकतील. पाण्याच्या हप्क्यामुळें घाट ढासळत असतील किंवा पाया चांगला नसेल. पहिल्या कारणाबद्दल विशेष जोरानें कांहीं सांगतां येत नाहीं. १९२१ पासून या गोष्टीचें शास्त्रीय निरीक्षण होत आहे.पण ९ वर्षांचा अवधी या गोष्टीला फार थोडा आहे. पुरांमुळें घाटांना विशेषसा धोका नाहीं. पाण्यामुळें पाण्याखालील दगडी बांधकामाला थोडासा उपद्रव होतो. पण पाया मात्र कोणत्याही घाटाचा चांगला नाहीं. हलकें हलकें चिखलावर असलेल्या पायऱ्या ढासळतात. शिंद्यांच्या घाटाची तर यामुळेंच नासधूस होत आहे. या बाबत पहाणी करून प्रसिद्ध केलेले अहवाल ‘बनारस व तेथील घाट’ या पुस्तकांत एकत्रित केले आहेत. घाट कसे दुरुस्त करावे व पुढें त्यांची निगा कशी राखावी याबद्दलच्या बऱ्याच योजना

तयार आहेत. पण कोणची योजना अमलांत आणावयाची हें अजून निश्चित झालें नाहीं.

कॅओलिनः—हा पदार्थ आसाममध्यें गॅरो डोंगरांत बराच आहे. चिनीमातीसारखी भांडी यापासून करतां येतील. भाजूनसुद्धां या पदार्थाचा रंग पांढराच रहातो.

संगमरवरी दगडः—जोधपूर संथानांतील मक्राना येथील सुप्रसिद्ध खाणींची कसून पहाणी करण्यांत आली आहे. पण आज ३०० वर्षें वाटेल त्या अव्यवस्थित प्रकारानें काम चालल्यामुळें त्यांत आतां सुधारणा होणें जवळ जवळ अशक्यच आहे. खाणीजवळ आगगाडीचे रूळ आहेत. पण रुळांच्या व खाणीच्यामध्यें घाणेरड्या दगडमातीचे डोंगर साचले आहेत. डॉ. हेरॉन यांनीं पहाणी करून कांहीं सूचना केल्या आहेत.

मिकाः—नांदगांव संस्थान (मध्यप्रांत) या ठिगाणीं मिका सांपडला आहे. पण डॉ. चतर्जींच्या मतें तेथें कारखाना सुरू करतां येणार नाहीं. पण उदेपूर संस्थानांत फार चांगल्या प्रकारचा मिका सांपडतो. गेल्या महायुद्धांत त्यापासून बराच फायदा करून घेतां आला.

(मिकाः—हा एक प्रकारचा दगडासारखा पदार्थ असून त्याचे अंगीं पारदर्शकत्व आहे.)

बंगालमध्यें मैमनसिंग जिल्ह्यांतील एका खेड्यांत कांहीं काम चाललें असतां हा आढळून आला. डॉ. घोष यांनीं या ठिकाणीं जाऊन बऱ्याच प्रयत्नानें या गॅसच्या दोन बाटल्या भरून दानबाद येथें पाठवल्या व तेथें या गॅसचें रासायनिक पृथक्करण करण्यांत आलें. हा गॅस पेट घतो.

ब्रह्मदेशांतील पेगू जिल्ह्यांत एके ठिकाणीं ह्या प्रकारचा गॅस थोड्या प्रमाणांत आढळून आला. पण चौकशीअंतीं त्याचा विशेष फायदा होईल असें आढळून आलें. ब्रह्मदेशांतील नॅचरल गॅससंबंधीं एकंदर माहिती मिळविण्याची खटपट सध्यां चालली आहे.

पंजाबांतील शहापूर जिल्ह्यांत एके ठिकाणीं गंधक असलेले कांहीं झरे आढळले.

सोनेंः— काश्मीर सिंधु नदीच्या कांठावर सोनें गोळा करणारे थोडे लोक आहेत. त्या भागाची पहाणी झाली. पण त्या लोकांचा हा मुख्य धंदा नाहीं. काश्मीर सरकार या लोकांकडून वार्षिक ८ ते १० रुपये घेऊन त्यांना आपला धंदा करण्यास परवानगी देते. वाळू बरीच खणल्यानंतर सुवर्णमिश्रित अशी एक प्रकारची वाळू लागते. या सुनियार लोकांची माणसें हातांत एक प्रकारची सुपली घेऊन मोठ्या कौशल्यानें आपलें काम करतांना मोठी गंमत दिसते. परंतु सोनें याठिकाणीं पुष्कळ मिळेल असें दिसत नाहीं.

पुराण-वस्तु-संशोधन

सिंधमध्यें मोहेंजो-दारो येथें व पंजाबांत हराप्पा येथें पुराण वस्तुसंशोधन खात्याला, जमीन उकरतांना जे पुरातनकालीन संस्कृतीचे अवशेष आढळून आले त्यावरून मागच्या सर्व कल्पनांत बदल पडला आहे; व ख्रिस्ती शकापूर्वी ३।४ हजार किंवा त्याहीपेक्षां जास्त वर्षांपूर्वीही हिंदुस्थानांत फार उच्च दर्जाची संस्कृति होती, मोठमोठीं शहरें होतीं, उंच वाडे त्यांना बांधतां येत असत; त्यांना सुंदर देवळें आणि मोठाल्या इमारती कशा बांधाव्या हेंही माहीत होतें असें आतां सिद्ध झालें आहे. त्या काळीं ईजिप्त आणि मेसापोटेमिया येथील लोक जितके सुधारलेले होते तितके हिंदुस्थानांतील लोकही सुधारलेले होते. महेंजो-दारो व हराप्पा या दोनही ठिकाणीं एक शहर नामशेष झाल्यावर तें गाडलें जाऊन त्यावर दुसरें शहर अशीं ५।६ शहरें आढळून आलीं आहेत.

वर सांगितलेल्या दोन ठिकाणच्या संशोधनावरून असें अनुमान काढतां येतें कीं, ख्रिस्ती शकापूर्वी २।३ हजार वर्षांच्या काळांत सिंध व पंजाब येथें उच्च प्रकारची संस्कृति आस्तित्वांत होती. संशोधनांत असेंही आढळून आलें आहे कीं, कांहीं घरांतून विहिरी व स्नानगृहें होतीं व सांडपाण्याची व्यवस्थाही मोठ्या कुशलतेनें केली होती. त्यावरून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, त्या काळची सामाजिक स्थिति सुमेर देशाइतकी व त्या वेळच्या बॅबिलोनिया व ईजिप्त येथील सामाजिक स्थितीहून श्रेष्ठ होती. हे लोक त्यावेळीं शेतकीवरच उदरनिर्वाह करीत.

सिंधू नदीच्या खोऱ्यांतल्या या संस्कृतीचा अंबाला जिल्ह्यांतील रूपारपर्यंत तलास लावण्यांत आला आहे; त्यावरून वरील संस्कृति सिंधूच्या खोऱ्यांत च राहिली असें समजणें चुकीचें होईल. आणि या पुढील संशोधनांत गंगेच्या खोऱ्यांतही पूर्वीं तीच संस्कृति होती असें दिसून येईल यांत शंका नाहीं.

अशोकानें बांधलेले असे १२ मनोरे माहीत आहेत. त्यांपैकीं १० वर अशोकाचे लेख आहेत. अशोकानंतरच्या काळांतील एक मनोरा ग्वाल्हेर संस्थानांतील बेसनगरच्या वायव्येस आहे दुसरा कार्ल्याच्या लेण्यासमोर आहे (इ. स. ७०) व तिसरा संयुक्त प्रांतांत एरन यथें आहे (इ. सनांतील ५ वें शतक).

सारनाथ येथील स्तूप, अलाहाबाद व जबलपूर मधील भारत येथील स्तूप, मद्रास इलाख्यांतील अमरवती येथील स्तूप व नेपाळच्या सरहद्दीवरील पिप्राव्ह येथील स्तूप हे बुद्ध लोकांचे कांहीं प्रसिद्ध स्तूप आहेत.

लेणीं:—हिंदुस्थानांतल्या अनेक अद्‌भुत गोष्टीं पैकीं दगडांत कोरलेलीं लेणीं ही एक होय. त्यांपैकीं बहुतेक लेणीं पश्चिम हिंदुस्थानांत आहेत.

भाजे, वेडसा, कार्ले, कान्हेरी, जुन्नर व नाशिक हीं मुंबई इलाख्यांतील लेणीं, निजामहद्दींतील वेरूळ व अजिंठा येथील लेणीं, गयेच्या उत्तरेस १६ मैलांवरची बारबार व नागार्जुनी येथील लेणीं व ओरिसा प्रांतांतील कटक येथून २० मैलांवर असलेलीं खंडगिरी येथील लेणीं, हिंदुस्थानांतील प्रमुख आहेत.

बौद्ध लोकांचीं लेणीं दोन प्रकारचीं आहेत. 'चैत्य' व 'विहार' म्हणजे भिक्षूंना रहावयाच्या जागा. बौद्ध लोकांच्या लेण्यांत 'विहार' व 'चैत्य' जवळ जवळ असतात. हिंदु लेण्यांपैकीं मुंबईजवळचीं एलफंटा लेणीं पुष्कळ लोक बघावयास जातात. तीं इ. सनांतील ७ व्या शतकापेक्षां जास्त जुनीं नाहींत. सर्वांत प्रसिद्ध लेणें म्हणजे वेरूळ येथील कैलास नांवाचें लेणें होय. तें लेणें म्हणजे शिवाचें देऊळ आहे. इतर देवळांप्रमाणेंच त्याचें खोदकाम रेखीव आहे; आणि विशेष हें कीं, सबंध देऊळ दगडांत कोरलेलें आहे. यांपैकीं बहुतेक सर्व लेण्यांतील छतांवर चित्रें रंगविलेलीं होतीं. यांपैकीं सध्यां अजिंठा येथील चित्रें अजून शाबूद आहेत. हीं चित्रें इ. स. ३५० ते इ. स. ६५० या काळांत वेळोवेळीं रंगविलेलीं आहेत व उत्तम कलाकुसरीचीं कामें म्हणून त्यांना अजूनही मान आहे. मुसलमान लोकांनीं अशा या सुंदर कोरीव कामाचा, त्यांतील मूर्तींचा व चित्रांचा विध्वंस केला आहे. मूर्तींचीं नाकें, कान असे अवयव फोडले आहेत व त्यांनीं कडबा भरून इमारतीच्या पोटांत पेटवून दिल्यामुळें छतावरील चित्रें नष्ट होऊन गेलीं आहेत. जुने लेख दोन तऱ्हेच्या लिप्यांत लिहिलेले आहेत. एक ब्राह्मणी व दुसरी फक्त वायव्य भागांत चालू असलेली खारोष्टी. ब्राह्मणी लिपी ही डावीकडून उजवीकडे वाचावयाची लिपी आहे व तीवरूनच हिंदुस्थानांतील सध्याच्या सर्व लिप्या उगम पावल्या आहेत. खारोष्टी लिपी ही डावीकडून उजवीकडे लिहिण्याची लिपी होती, ती इ. सनाच्या ४ थ्या शतकापर्यंत चालू होती. पण पुढें ब्राह्मणी लिपीमुळें ती नाहींशी झाली. सर्वांत जुने शिलालेख म्हणजे अशोक राजानें खोदलेल्या व आतां प्रख्यात झालेल्या राजाज्ञा होत. त्यांपैकीं कांहीं आज्ञा खडकावर कोरलेल्या आहेत व कांहीं स्तंभावर कोरलेल्या आहेत. या खोदलेल्या आज्ञा, पेशावरच्या वायव्येस ४० मैलांवरील शाहबझगाऱ्हीपासून नेपाळ तराईतील निग्लीवापर्यंत, काठेवाडांतील गिरनार पासून ओरिसांतील धौलीपर्यंत, हिमालयांतील कालसीपासून म्हैसूरमधील सिद्धपूरपर्यंत सांपडल्या आहेत, त्यावरून अशोकाच्या ताब्यांत किती विस्तीर्ण प्रदेश होता त्याची कल्पना येते. दुसरा महत्त्वाचा लेख म्हणजे बेसनगर येथील स्तंभलेख होय. त्यावरून असें दिसतें कीं, हेलिओडोरोझ नांयाचा एक ग्रीक मनु य हिंदुधर्मांत आला, त्यानें वैष्णव धर्मपंथ स्वीकारला व त्यानें 'वासुदेव प्रीत्यर्थ' हा स्तंभ उभारला. नाशिक येथीछ लेण्यांतील लेखवरूनही एका परधर्मीयानें हिंदुधर्म स्वीकारल्याची माहिती मिळते.

पुढें सारासीन पद्धत अंमलांत येऊं लागली. हा काळ म्हणजे १३ व्या शतकाचा प्रारंभ होय. मुसलमानी शिल्पकला, निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या राजवटींत बदलत गेली. सुरवातीची दिल्लीची पठाणी शिल्पकला होय. कुतुब मिनार, अल्लाउद्दीन खिलजी व अल्तमश यांची थडगीं हे या पठाणी शिल्पकलेचे नमुने आहेत. बंगाल्यांतील मुसलमानांनीं एक निराळीच शिल्पकलेची तऱ्हा तिकडे चालू केली. गुलबर्गा व बेदर येथील ब्राह्मणी राजवटींतसुद्धां उत्तम प्रकारची शिल्पकला वावरत होती, हिंदुस्थानांतील कोणत्याही मशिदीहून निराळी असलेली गुलबर्गा येथील मशीद प्रख्यात आहे. याच्या अगदीं विरुद्ध टोकाची तऱ्हा म्हणजे विजापूरच्या आदीलशाहीच्या राजवटींतील. या पद्धतींत हिंदी पद्धतीशीं जवळ जवळ संबंध नाहींच. आतां विजापूरला उरलेल्या इमारती म्हणजे जुम्मा मशीद, गगन महाल, मिहतार महाल, इब्राहिम रोझा व गोलघुमट या होत. हिंदू

व मुसलमान पद्धतीचा थोडा-थोडा अवलंब करून अकबराच्या कारकीर्दीपासून मोगल शिल्पकलेचा उदय होऊं लागला. अकबराच्या वेळच्या प्रख्यात इमारती म्हणजे हुमायूनचें थडगें व फत्तेपूर शिक्री व आग्रा येथील राजवाडे होत. याच कारकीर्दीत जगप्रसिद्ध ताजमहाल व आग्रा येथील मोती मशीद ही बांधली गेली.

पुराण–वस्तु–संशोधन खातें:––

या खात्याचीं कामें दोन प्रकारचीं असतात; संशोधन झालेल्या पुरातन वस्तूंचें रक्षण व दुसरें नवीन संशोधन. १८७० सालपर्यंत या दिशेनें तुरळक प्रयत्न झाले. १८७० मध्यें हिंदुस्थानची पुराणवस्तु संशोधनाच्या दृष्टीनें पहाणी झाली; १८७८ सालीं मात्र लॉर्ड लिटन व्हाईसरॉय असतांना सरकारनें या कामासाठीं पावणेचार लाख रुपये मंजूर केले; व या पैशांतून संयुक्त प्रांतांतील पुराणवस्तु दुरुस्त करण्याचें ठरलें; लॉर्ड कर्झननें या खात्याची पुन्हां शिस्तवार मांडणी केली व त्याला कायम स्थान दिलें. ऐतिहासिक स्मारकें व इतर वस्तू यांच्या संरक्षणासाठीं एक मॉन्युमेंटस् प्रिझर्व्हेशन ॲक्ट पास करण्यांत आला; याच कायद्यान्वयें उकरून काढलेल्या प्राचीन वस्तूंच्या संशोधनावर सरकारचा हक्क प्रस्थापित झाला. जॉन मार्शल यांच्या देखरेखीखालीं पुराणवस्तु संशोधनाचें काम शास्त्रीय पद्धतीनें सुरूं आहे व त्याचें दृश्य फल म्हणजे टॅक्सिला पाटलीपुत्र, भोपाळ संस्थानांतील सांची येथील उकरून काढलेली प्राचीन रम्य स्थळें होत. हें संशोधनाचें कार्य पहारपूर, मद्रासेंतील नागार्जुनकोंडा, पंजाबांत सिंधूच्या खोऱ्यांत हराप्पा येथें व पंजाबांत मोहेंजो–दारो येथेंही चालू आहे. या सर्वांत मोहेंजो–दारो येथील संशोधन जास्त महत्त्वाचें आहे, कारण येथें ख्रिस्ती शकापूर्वीं ३००० वर्षें किंवा त्याहूनही जास्त वर्षांपूर्वींचे अवशेष आढळून येत आहेत.

विमान-खातें

मुलकी विमाननयनाच्या प्रगतीचा अहवाल (१९३१-३२)

सदरहू अहवालांत ३१ मार्च १९३२ पर्यंतच्या सर्व गोष्टींचा समावेश केला आहे. परंतु इतर देशांच्या आंकडेवारींशीं पडताळून पहाण्यास सोईचें व्हावें म्हणून आंकडेवारी मात्र १९३१ सालच्या डिसेंबर अखेरपर्यंतचीच दिली आहे.

चालू वर्षी सरकारी खजिन्यांतून खर्चाची मागणी करणाऱ्या सर्व गोष्टींच्या वाढीला निश्चयात्मक बंधन पडल्याचें प्रामुख्यानें दिसून येतें. कारण सध्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्यें अगदीं आवश्यकच असेल त्याहून अधिक खर्च करणें शक्य नव्हतें. यामुळें पूर्वी योजलेली "इंडियन स्टेट एअर सर्व्हिस" व (विमानें उतरण्याच्या सोयीसाठीं) जमिनीच्या बंदिस्तींत सुधारणा या गोष्टी जरी गाळाव्या लागल्या, तरी प्रत्यक्ष उड्डाणक्रियेंत सतत सुधारणा होत गेली आहे. आगाऊच उपयोगांत असलेल्या जमिनींची योग्य बंदिस्ती करणें व त्या पुरेशा दृढ करणें, कोणत्याही प्रकारें पैशाचें साहाय्य न देतां टपालाची नेआण करणारी विमानव्यवस्था स्थापणें व वैमानिक कायदा व सामान्यतः विमानांच्या वाहतुकीचे नियम यांत सुधारणा करणें, या बाबतींत मुख्यतः प्रयत्न करण्यांत आले.

१ नियमित आकाशमार्ग

(१) इंपीरियल् एअरवेज लंडन-कराची एअर सर्व्हिसः—सबंध वर्षभर हिंदुस्थानाशीं साप्ताहिक दळणवळण चालूं होतें. पूर्वीच्या 'ड हॅविलँड'च्या 'हर्क्यूलीस' विमानांच्या ऐवजीं नवंबर महिन्यापासून नवीन 'हन्डले पेज' विमानें सुरूं करण्यांत आलीं आहेत, तीं सोयीच्या दृष्टीनें आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या बरोबरीचीं आहेत. नियमितपणा ठेवण्याच्या बाबतींत वेळोवेळीं बऱ्याच अडचणी आल्या, तरी नवीन वर्षाच्या आरंभीं बहुतेक सर्व अडचणी दूर करण्यांत आल्या. सबंध वर्षांत ह्या मार्गानें हिंदुस्थानांत आणलेल्या एकंदर टपालाच्या पिशव्या४६४७२होत्या,व हिंदुस्थानांतून नेलेल्या पिशव्या ४३०६६ होत्या.

(२) इंडियन् स्टेट एअर सर्व्हिस कराची-दिल्लीः—इंडियन स्टेट एअर सर्व्हिसशीं झालेल्या सनदी कराराप्रमाणें चालू असलेली व्यवस्था ता. २९ डिसेंबर १९३१ रोजीं सदरहू कराराची मुदत संपल्यानें बंद करण्यांत आली. जुलै ते डिसेंबर १९३१ पर्यंतच्या काळांत नेहमींचा नियमितपणा राखला गेला नाहीं. ठरलेल्या एकंदर १०४ उड्डाणापैकीं अवघीं ९३ उड्डाणें झालीं. एकंदर १०८ उतारूंची नेआण करण्यांत आली. कराचीहून दिल्लीला एकंदर ३७३९ टपालाच्या पिशव्या नेण्यांत आल्या व उलट दिल्लीहून कराचीला ४५५६पिशव्या नेण्यांत आल्या. इंडियन् स्टेट एअर सर्व्हिसशीं झालेला हा सनदी करार पुन्हां करण्यांत आला नाहीं. त्याचप्रमाणें कराची ते कलकत्ता मार्गाबद्दलचा करारही काटकसरीच्या योजनेबरहुकूम कायमचा रद्द करण्यांत आला.

इं. स्टे. ए. सर्व्हिसनें आगाऊ मागविलेल्या "अॅवरो १०" च्या चार विमानांपैकीं दोन ईजिप्त सरकारच्या विमानखात्याला विकण्यांत आलीं. ह्यांपैकींच एक विमान व्हाइसरॉय साहेबांच्या दौऱ्यासाठीं ठेवून घेण्यांत आलें व एक विकाऊ आहे. (३) दिल्ली फ्लाइंग क्लब एअर मेल सर्व्हिस, कराची ते दिल्लीः— इंपिरियल एअरवेजशीं झालेला करार संपल्यावर दुसरी कांहींतरी अंतर्गत व्यवस्था करण्याचें घाटत होतें. परंतु तत्पूर्वी टपालाच्या नेआणीच्या व्यवस्थेत खंड पडूं नये म्हणून "दिल्ली फ्लाईंग क्लब" बरोबर फक्त टपालाच्या पिशव्या नेण्यापुरता एक थोडचा मुदतीचा तात्पुरता करार करण्यांत आला. या योगानें क्लबाच्या शिक्षणाच्या कामांत व्यत्यय येऊं नये म्हणून सरकारनें क्लबाला एक "ड हॅविलँड" विमान दिलें. क्लबाला टपालाच्या वजनाप्रमाणें दर पौंडास ठराविक मुशाहिरा देण्यांत येतो. पैशाची मदत मात्र कांहींही देण्यांत येत नाहीं. त्याच वेळीं सिंध-हैद्राबाद येथें एक टप्पा ठरवून तेथून पंजाब मेल (आगगाडी) मधील टपाल घेऊन तें कराचीस इं. एअरवेजला वेळेवर मिळेल अशी व्यवस्था करण्यांत आली. त्यामुळें एक दिवसाची बचत झाली. ह्यासारखीच व्यवस्था

जोधपूर फ्लाईंग क्लबबरोबर करून दक्षिणेकडे जाणाऱ्या टपालाच्या बाबतींतही एक दिवसाची बचत करण्यांत आली. जोधपूर दरबारनें हृचा-सोयीसाठीं फालना येथें विमानांच्या उतारासाठीं जागा दिली. ही सर्व व्यवस्था ३१ मार्च १९३२ पर्यंत अगदीं नियमितपणें चालली. (४) कराची मुंबई मद्रास एअर मेलसर्व्हिसः—टपालाच्या सोयी-साठीं मुंबई व मद्रास येथून कराचीला हिंदुस्थान ते इंग्लंड मार्गाशीं जोडणारी अशी विमानव्यवस्था स्थापण्यासाठीं मेसर्स टाटा सन्स लिमिटेड यांज-बरोबर वाटाघाटी करण्यांत आल्या. सरकारतर्फे थोडीबहुत पैशाची मदत देऊन ही व्यवस्था जम-विण्याचें प्रथम ठरत होतें. परंतु सध्याच्या परि-स्थितींत विमान वाहातुकीस पैशाची मदत न करण्याच्या सरकारी आर्थिक धोरणामुळें पुढें वाटाघाटी फिसकटल्या. त्यानंतर टपालाच्या वजनाप्रमाणें दर पौंडी ठराविक मुशाहिरा देण्याचें ठरवून ही व्यवस्था जमविण्याबाबत पुन्हां वाटाघाटी सुरू झाल्या व त्या धर्तीवर लवकरच करार झाला. ही व्यवस्था १९३२ च्या पावसाळ्यानंतर लव-करच अमलांत येईल.

(५) हिंदुस्थानवरून जाणाऱ्या परदेशीं एअर सर्व्हिसेसः— पूर्वीच्याच ॲमस्टर डॅमहून बटा-व्हियाला जाणारी डच सर्व्हिस व पॅरिसहून साय-गनला (सयाम) जाणारी फरेंच बोट सर्व्हिस या दोन्ही सबंध वर्षभर चालू होत्या.

(६) नियमितपणा व वक्तशीरपणा:—— युरोपांतून हिंदुस्थानास येणाऱ्या मार्गावर वेळो-वेळीं वातावरणांत अडथळे उत्पन्न झाल्यामुळें सर्वच एअर सर्व्हिसेसना त्रास झाला व जरी कोणतीही सर्व्हिस बंद पडली नाहीं तरी करा-चीला पोहोंचण्यास पुष्कळ वेळां विमानांना उशीर होत असे. (७) विमानमार्गे आयात निर्यातः—— विमानांतून हिंदुस्थानांत एकंदर आयात १५७,४०२ रुपयांची झाली. पैकीं १,५०६०१ रु. किमतीचा व्यापारी माल व लगडी सोनें, रुपें व नोटा मिळून १,०६,८०१रु. किमतीचा माल होता. एकंदर निर्यात १०,०४,२८६ रु. किम-तीची झाली, पैकीं व्यापारी माल ४२८६ रु. किमतीचा व सोनें नाणें दहा लक्ष रु. किमतीचें होतें. (आंकडे कराचीचे आहेत व १९३१ च्या डिसेंबर अखेरपर्यंतचे आहेत.)

खाजगी उड्डाणें

(१) उड्डाणशाळा:——उड्डाणशाळांना सरकार-कडून पैशाची मदत गतवर्षीप्रमाणेंच देण्यांत आली. कराची, दिल्ली, मुंबई, कलकत्ता, लाहोर आणि मद्रास येथील सहा शाळांना १९३१—३२ मध्यें प्रत्येकीं २०००० रु. मिळाले; याशिवाय प्रत्येक शाळेला जास्तींत जास्त ५००० रु. पर्यंत, "ए" पदक मिळविलेल्या वैमानिकाला प्रत्येकीं १५० रु. प्रमाणें "बोनस" म्हणून देण्यासाठीं देण्यांत आले. "एरो क्लब ऑफ इंडिया ॲंड बर्मा लिमिटेड" ला कपात वजा करून मदतीदाखल २००००रु. मिळाले. दिल्लीच्या शाळेच्या कान-पूर व लखनौ येथें शाखा उघडणांत आल्या व त्या शाळेला आतां "दिल्ली ॲंड यु. पी. फ्लाईंग क्लब, लिमिटेड" हें नांव देण्यांत आलें. प्रत्येक शाखेवर युरोपियन शिक्षक नेमण्यांत आले आहेत

जोधपूरच्या महाराजांच्या प्रेरणेनें व सहा-य्यानें जोधपूर येथें एक नवीन शाळा उघडण्यांत आली. जोधपूरच्या मैदानावर विमानाकरतां खुंट, कचेऱ्या, कारखानें, सभासदांकरतां खोल्या हें सर्व नवीन बांधण्यांत आलें. दोन "डी. एच्. जिप्सी १" व एक "जिप्सी २ माथ्स्" अशीं तीन विमानें घेण्यांत आलीं. एक युरोपियन वैमा-निक शिक्षक व यंत्रविशारद नेमण्यांत आला. १६ नोव्हेंबर १९३१ रोजीं शाळा उघडण्याचा जाहीर समारंभ झाला. शाळेंत एकंदर ३८ सभासद आहेत. काठेवाडच्या बाजूला विमानोड्डाणाच्या बाबतींत लोकांत बरेंच कुतूहल उत्पन्न झाल्याचें व लोकांचें त्याकडे लक्ष वेधल्याचें स्पष्ट दिसून येतें. जुनागडच्या राजसाहेबांनीं एक "डी. एच्. जिप्सी १ मॉथ" विमान विकत घतलें व एक वैमानिक नोकरीस ठेविला. राजकोट येथें "काठेवाड उड्डाण शाळा" स्थापण्याच्या उद्देशानें प्रयोगादाखल प्रय-त्नही करण्यांत आले. यावर्षीं उड्डाणशाळांच्या सभासदांची एकंदर संख्या १५९६ वरून १८८० वर गेली. सर्व शाळांमध्यें मिळून ३१ डिसेंबर १९३१ या दिवशीं एकंदर २० विमानें उपयोगांत होतीं. गत वर्षीपेक्षां यावर्षी एक विमान जास्त आहे. एकंदर उड्डाणाचे तास १९३० मध्यें ७५४२ होते ते चालू वर्षीं ९०७० झाले. "एरो क्लब ऑफ इंडिया ॲंड बर्मा लिमिटेड" या संस्थेच्या व्यवस्थेखालीं ता. २१ फेब्रुवारी रोजीं नवी दिल्ली येथें उड्डाण शाळांचे शिक्षक व प्रतिनिधी यांची एक परिषद सर्वसाधारण कारभारविषयक व पारिभाषिक बाबींसंबंधीं विचारविनिमय कर-ण्यासाठीं भरली होती. हिंदुस्थानांत प्रथमपासू-नच शिक्षण घेऊन तयार झालेल्या वैमानिकांची संख्या सन १९३१ या वर्षी एकंदर ११३ होती.

ही संख्या सन १९३० च्या संख्येहून २० नीं जास्त आहे. "ए" परवाना मिळविणाऱ्या चालू वर्षांतील वैमानिकांची संख्या एकंदर १२३ भरली; पैकीं ४८ हिंदी असून ७५ युरोपियन आहेत. दिल्लीच्या उड्डाणशाळेंत १९३१ सालीं दोन विद्यार्थ्यांनीं शिक्षण घेऊन "बी" परवाना (व्यापारी वैमानिकांचा परवाना)मिळविला. उड्डाण शाळांमधून हिंदी वैमानिक जास्त जास्त नेमण्यांत येत आहेत. ता. ३१ डिसेंबर १९३२ रोजीं यांत्रिक खात्यांत फक्त २० युरोपियन होते. बाकी कचेरीच्या कामाला २८, किरकोळ कामाला ६९ व यांत्रिक कामाला ३०, असे सर्व हिंदी कामगारच होते. चालू वर्षी (१९३१) प्रवासाकरितां व सहलीकरितां म्हणून एकंदर ३२४७ माणसांनीं उड्डाण केलें. १९३० मध्यें ही संख्या २५१९ होती.

(२) चढाओढी:—विमानोड्डाणास प्रोत्साहन मिळावें या हेतूनें व्हाइसरॉयसाहेब व लेडी विलिंग्डन यांनीं "व्हाइसरॉय चॅलेन्ज ट्रॉफी" म्हणून एक चांदीचा पेला प्रतिवार्षिक चढाओढीकरितां ठेवल्यापासून हिंदुस्थानांत क्रीडोड्डाणास सुरवात झाली. या पेल्याकरितां सामन्यांची व्यवस्था करण्याचें काम वैमानिक आंतरराष्ट्रीय समितीचे हिंदुस्थानांतील प्रतिनिधी या नात्यानें "ए. क्ल. इं. ब. लिमिटेड" या संस्थेनें पत्करलें. आर्यविन–उड्डाण–निधीच्या व्यवस्थापकांनीं सदरहू निधीच्या उत्पन्नांतून बक्षिसाच्या रकमेंत चांगली भर घातली. व्हाइसरॉय साहेबांच्या या पेल्याशिवाय इतरही पेले, रोख रकमा वगैरे विमानवाहतुकीशीं संबंध येणाऱ्या व्यापारी पेढ्यांतर्फे ठेवण्यांत आले आहेत. व्हाइसरॉय साहेबांच्या पेल्याकरितां सामना २० फेब्रुवारी १९३२ रोजीं झाला. सामन्याचा आंखलेला मार्ग दिल्ली आग्रा, झांशी, लखनौ, आग्रा, दिल्ली असा एकंदर ७०९ मैलांचा होता, व ह्या प्रत्येक ठाण्यावर ३० मिनिटें उतरलेंच पाहिजे असें बंधन होतें. "ए" परवाना असलेल्या कोणाही वैमानिकास चढाओढींत भाग घेण्यास मोकळीक होती. याच वेळीं दुसरी एक तान्त्रिक चढाओढ ठेवण्यांत आली होती. या योगानें विमान व वैमानिक या दोघांचीही परीक्षा होते. यांत चार वैमानिकांनीं भाग घेतला होता. पैकीं दोन स्त्रिया होत्या. व्हाइसरॉय साहेबांचा पेला पंजाबच्या उड्डाण शाळेचे डॉ. स्प्राऊट या गृहस्थास मिळाला. व तान्त्रिक चढाओढींत दिल्लीच्या उड्डाण शाळेचे गुरबा जार्नासिंग हे पहिले आले.

(३) आंतरराष्ट्रीय उड्डाणें:— यांत कोणाही हिंदी वैमानिकानें भाग घेतला नाहीं. हिंदुस्थानवरून झालेल्या प्रख्यात उड्डाणांपैकीं जे. ए. मॉलीसनचें उड्डाण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ऑस्ट्रेलिया ते इंग्लंडचा प्रवास त्यांनीं अवघ्या ८ दिवस व २२॥ तासांत संपविला. तसेच दुसरे सी. ए. बटलर हे हिंदुस्थानावरून इंग्लंडहून ऑस्ट्रेलियाला गेले. त्यांनीं आपला प्रवास ९ दिवस २॥ तासांत संपविला व पुढें सी.डब्ल्यू स्काट यांनीं सर्वांवर ताण करून हा प्रवास ८ दिवस व १९॥ तासांत संपविला.

३ अपघात

अपघाताची चौकशी हिंदुस्थानांत "इंडियन एअरक्रॅफ्ट ॲक्ट" प्रमाणें होत नसून यांत्रिक तज्ज्ञाकडून करविण्यांत येते. विमानाची नासधूस, हवेंत विमानावरील ताबा सुटणें, आग लागणें, आंत बसणारांना इजा होणें, अशा तऱ्हेचे अपघात साधारणपणें घडतात. वरिष्ठ व कनिष्ठ अशा अपघाताच्यादोन प्रति लावण्यांत येतात.व वैमानिकाची चूक असल्यास त्याला अपघाताच्या प्रतीप्रमाणें कमीजास्त दंड करण्यांत येतो. हिंदुस्थानांत १९३१मध्यें मोठा असा एकच अपघात झाला. व किरकोळ १७ झाले. बहुतेक अपघात वमानिकांच्या चुकीमुळें व पुरेसा अनुभव नसल्यानें झाल्याचें दिसून आलें आहे.

४ किरकोळ उड्डाणें व व्यापारविषयक उलाढाली.

(१) व्हाइसरॉय साहेबांचे विमानांतून दौरे-व्हाइसरॉय साहेबांच्या दौऱ्याकरितां स्वतंत्र विमान ठेविल्यानें आगगाडीच्या मार्गावर जागोजाग पोलीसांचा बंदोबस्त ठेवण्याचा खर्च वांचला व त्या योगानें दौऱ्याबाबत होणाऱ्या खर्चांत बचत झाली. (२) डी. एच्. एअर क्रॅफ्ट कं. लिमिटेड ही कंपनी हिंदुस्थानशीं विमानें, विमानाचीं यंत्रें व सुटे भाग, यांचा व्यापार करते. कंपनीचीं यंत्रें उत्तम प्रतीचीं असतात. (३) मंजुरी असलेल्या पेढ्या:—खालील कंपन्यांना विमानांची यन्त्रें, सुटे भाग वगैरेंचा सांठा ठेवण्यास व विकण्यास सरकारी मंजुरी आहे. १ डी. हॅविलॅन्ड एअर क्रॅफ्ट कं. लि. कराची, २ इंडियन एअर सर्व्हे ट्रॅन्सपोर्ट लिमिटेड, डम डम, कलकत्ता. ३ हुसेनभाई करीमजी आणि कं. कराची. ४ ए. आर.

हॅजेलर, मुंबई५फ्रेंच मोटार कार कं.लि. कलकत्ता

(४) डांसाचें निवारण वगैरे:—विमानांतून जमिनीवर औषधी द्रव्याची भुकटी टाकल्यानें डांस वगैरे जंतूंचा नाश करतां आला तर पहावा या कल्पनेनें कलकत्त्याच्या जनरल एक्सपोर्ट कंपनीनें 'गार्डन रिसर्च अँन्टीमलेरिया अॅसोसिएशन'च्या मदतीनें प्रयोग करून पहाण्यासाठीं एक-दोन उड्डाणें केलीं. त्याचप्रमाणें जाहिरातींचीं पत्रकें विमानांतून खालीं सोडण्याचा प्रयोगही बंगाल चेंबर ऑफ कॉमर्स व बंगाल ज्यूट ग्रोइंग असोसिएशन यांनीं केला. एकंदर नऊ उड्डाणें करून अवघ्या तेवीस तासांत शेंकडो खेडचांपाडचांतून ३लक्षांहून जास्त पत्रकें वाटलीं गेलीं. (५) आवाज न करतां (इंजिन नसलेल्या विमानांतून) उड्डाण करणें व हवेंत तरंगत राहाणें या गोष्टी साधण्याच्या हेतूनें मुंबई येथें एक इंडियन ग्लायडिंग असोसिएशन नांवाची संस्था ऑगस्ट १९३१ मध्यें स्थापन झाली. या संस्थेला औंधच्या अधिपतींनीं प्रयोग करण्यास मैदान दिलें आहे. संस्थेचे एकंदर १०९ सभासद असून पैकीं सात जणांनीं प्रथमपासून येथें व्यवस्थित शिक्षण घेतलें आहे. या सात जणांपैकीं दोन हिंदी स्त्रिया आहेत. "बी" परवाना मिळविलेले श्री. पी. एम्. कबाली या हिंदी गृहस्थाची शिक्षकाच्या जागीं नेमणूक केली आहे. (६) बंगाल व संयुक्त प्रांत या भागांत नवीन वसाहती करण्यायोग्य जागा शोधण्यासाठीं "इंडियन एअर सर्वे अँड ट्रॅन्सपोर्ट लिमिटेड," या कंपनीनें विमानांतून पहाणी करणें फोटो काढणें, नकाशे तयार करणें वगैरे कामें सबंध वर्षभर चालविलीं होतीं.

५ कारभार

(१) विमाननयन खात्याचें अंदाजपत्रक:—सन १९३१–३२ करतां तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणें या खात्याला ३५,७७,००० रु. मिळणार होते. परंतु काटकसरीची आवश्यकता भासल्यानें इंडियन स्टेट एअर सर्व्हिस काढून टाकणें, विमान मार्गावर प्रकाशकिरण पुविण्याची योजना रद्द करणें, बिनतारी संदेशाची योजना रद्द करणें, अशा तऱ्हेनें खर्चांत कपात करून ही रक्कम २३,०५,००० रु. वर आणली. सन १९३२–३३ च्या अंदाजपत्रकांत आणखी अदमासें ९ लाख रुपयांची कपात करण्याचें ठरलें आहे. (२) डेप्यूटी डायरेक्टर ऑफ सिव्हिल एव्हिएशन या हुद्याचा एक नवीन अधिकारी १९३२ पासून नेमण्याचे ठरले आहे. (३) डायरेक्टर ऑफ सिव्हिल एव्हिएशन यांनीं या वर्षीं पहाणी करण्याकरितां एकंदर तीन दौरे काढले. बहुतेक प्रवास विमानांतूनच केला. (४) विमानगृहांचें नियमन ठिकठिकाणच्या विमानगृहांची व्यवस्था पहाण्याकरितां कलकत्ता, रंगून, अलाहाबाद या ठिकाणीं अधिकारी नेमण्यांत आले आहेत. कराचीस पूर्वीपासूनच 'रॉयल एअरशिप' चा अधिकारी आहे. दिल्लीची व्यवस्था तेथील उड्डाण शाळेकडे देण्यांत आली आहे. अवयाव येथें पी. डब्ल्यू. डी. च्या एक्झिक्यूटिव्ह इंजिनियरकडे ही व्यवस्था सोंपविण्यांत आली आहे. (५) हिंदुस्थानचा वैमानिक कायदा व सामान्य नियम यांत बराच फरक करण्यांत आला आहे. (६) विमानांची तपासणी वगैरे कामाकरितां १९३१ मध्यें एक विमानतपासनीस नेमलेला होता. या बाबतींत अधिक माहिती "हॅन्डबुक ऑफ इन्स्ट्रक्शन्स टु एअर क्रफ्ट ओनर्स अँड ग्राऊंड इंजिनियर्स" या पुस्तकांत पहावयास मिळेल. (७) वेळोवेळीं भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रातिनिधिक सभांना हिंदुस्थानतर्फें प्रतिनिधी पाठविण्यांत येतात. या वर्षीं पॅरिस येथें भरलेल्या 'इंटर नॅशनल कमिशन ऑफ एअर नॅव्हिगेशन व दि इंटर नॅशनल कन्व्हेन्शन फॉर दि सॅनिटरी कन्ट्रोल ऑफ एरिअल नॅव्हिगेशन' या सभांना हिंदुस्थानांतून मि. इ. जे. टर्नर व हिंदुस्थान सरकारचे पब्लिक हेल्थ कमिशनर हे गेले होते.

६ जमीनीवरील व्यवस्था

(१) अंदाज पत्रक:–या कामाकरितां एकंदर १३ लाख रु. चें अंदाज पत्रक करण्यांत आलें होतें खर्चाची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली.

(१) विमानमार्गावर प्रकाश किरण पुरविणें:—कराची ते दिली मार्गावर ही योजना अमलांत आणण्याचें घाटत होतें. परंतु काटकसरीच्या योजनेप्रमाणें ही योजना पुढें रद्द करण्यांत आली.

(२) मुंबई येथें विमानगृह स्थापणें. (३) कलकत्ता ते रंगून हा विमानमार्ग तयार करणें. चितागांग, सॅन्डोवे, व बसई येथें उताराच्या जागा तयार करणें. (४) इतर किरकोळ कामें (५) चालू खर्च. हिंदुस्थानांतील विमाननयनाची संपूर्ण माहिती पुरविणारें एअर पायलट विमानदर्शक नावाचे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल.

हवामान खातें

हिंदुस्थान सरकारचें हवामान खातें--

१९३०-३१चा अहवाल.

हें खातें सन १८७५मध्यें सुरूं करण्यांत आलें. त्यापूर्वीं जीं प्रांतिक खातीं होतीं तीं सर्व एकत्र करून ह्या खात्यातर्फे खालील कामें हळूंहळूं हातीं घेण्यांत आलीं. बंदरांना व समुद्रकिनाऱ्यालगतच्या प्रांतांना वादळी हवेची आगाऊ माहिती देण्यांत येऊं लागली. बिनतारी विद्युत्संदेशाची सोय झाल्यापासून हिंदी महासागरांतील बोटींनाही आगाऊ सूचना देण्यांत येतात व त्यांजकडून समुद्रावरील हवेसंबंधीं माहिती मिळते. सुरवातीस हवामान व आरोग्य यांचा परस्परसंबंध काय आहे हें पाहण्याकरितां हवामानाचे सर्व वर्षांचे आंकडे तयार करीत. हल्लीं सर्व ठिकाणच्या हवामानाची व्यवस्थित नोंदणी केलेली असते व लोकांच्या माहितीकरितां पावसासंबंधीं अंदाज अगोदर प्रसिद्ध करण्यांत येतात. तसेंच वातावरणांतील हालचाली, उष्ण कटिबंधांतील वावटळी, मान्सूनांतील व हिंवाळ्यांतील पावसासंबंधीं अनुमान, ऋतुमानाप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांतील पाऊसमान या सर्वांची नोंदणी व आढावा करण्याचें काम या खात्यातर्फे होतें. अतिवृष्टीबद्दल आगाऊ विद्युत्संदेश रेल्वेंना व कालव्यावरील व नदीकांठावरील लोकांना पाठविण्यांत येतात. तसेंच सरकारी खात्यांना, व्यापारी कंपन्यांना व खाजगी रीतीनें कोणास हवी असल्यास वातावरणासंबंधीं अनुमानात्मक माहिती पुरविण्यांत येते. इतर सरकारी खात्यातर्फे पावसाचें मोजमाप वगैरे हवामानासंबंधीं जीं कामें होतात त्यांजवर देखरेख ह्या खात्यातर्फे ठेविली जाते. उच्च वातावरणांतील हवेंतील उष्णतामान व दमसरपणा यांचे, रबरी फुग्यांत आपोआप नोंदणारीं यंत्रें सोडून मापन करणें; विमानखात्यास हवामानाबद्दल बातमी देणें; कराची येथील विमान--केंद्रांतून हवामानाची परिस्थिति पाहणें; तसेंच हिंदुस्थानांतील कालमापनाबद्दल माहिती ठेवणें; व सरकारी आरमार खात्यांतील, व नौकानयन खात्यांतील, कालमापनयंत्रांतील चुका दुरुस्त करणें; मुंबई येथें भूमिगत लोहचुंबकत्वाबद्दल निरीक्षण व संशोधन करणें तसेंच निरनिराळ्या ठिकाणच्या भूकंपलेखनाबद्दल नोंद ठेवणें; सूर्यासंबंधीं निरीक्षणात्मक अभ्यास करविणें वगैरे कामें हें खातें करितें.

हिंदुस्थानांत व इतरत्र विमानाचें दळणवळण सुरूं होण्यापूर्वीं ह्या खात्यांतील कामें वरीलप्रमाणें होतीं. हल्लीं विमानांचें दळणवळण दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत असल्यानें हवा खात्याचीं कामें फार वाढलीं आहेत. हवाखात्याचीं मुख्य ठिकाणें खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

(१) अलिबाग व कुलाबा येथें मनुष्याच्या मदतीशिवाय चालणारीं व आपोआप भूस्तर व पृथ्वीच्या अंतर्भागांतील हालचाली वगैरेंची नोंद करणारीं यंत्रें आहेत. येथें भूकंपलेखन व सूर्याच्या अगर ताऱ्यांच्या गतीवरून कालमापन, तसेंच कालमापन यंत्राची दुरुस्ती वगैरे कामें मुख्यतः होतात. (२) आग्रा येथें हिंदुस्थानांतील सर्व प्रदेशांतील व आसपासच्या कांहीं देशांतील उच्च वातावरणांतील सर्व प्रकारचें निरीक्षण व संशोधन कार्य मुख्यतः होतें.येथें भूकंप लेखनाचें यंत्रही ठेवलें आहे. (३) कलकत्ता--अलिपूर येथील केंद्रांतून हिंदुस्थानच्या ईशानीकडील हवामानाचें व बंगालच्या उपसागरांतून येणाऱ्या पावसाळी व वादळी वाऱ्यांच्या आगाऊ सूचनांचें माहितीपत्रक दररोज प्रसिद्ध होतें. याशिवाय हवाखात्याच्या निरनिराळ्या केंद्रांस लागणारीं यंत्रें येथून पाठविलीं जातात. (४) कोडाईकनल येथील केंद्रांत सूर्यासंबंधीं सर्व प्रकारचें निरीक्षण प्रत्यही चालू असतें. याशिवाय येथें हवामानासंबंधीं इतर कामें होतातच. (५) पुणें हें हिं. सरकारच्या हवाखात्याचें मुख्य ठिकाण आहे. हवाखात्याची सर्व व्यवस्था येथून पाहिली जाते. येथें हिंदुस्थानांतील सर्व भागांतून तारेनें हवामानाबद्दल दररोज माहिती येते ती एकत्र करून व त्यावरून हवामानाचें अनुमान काढण्यांत येऊन तें रोज छापून प्रसिद्ध करण्यांत येतें. तसेंच हिं. हवामानाबद्दल दैनिक, साप्ताहिक,मासिक व वार्षिक अहवाल येथें तयार होऊन प्रसिद्ध केला जातो.अतिवृष्टीबद्दल आगाऊ सूचना येथूनच दिल्या जातात. तसेंच हवामाना-

संबंधीं निरनिराळीं यंत्रें येथूनच तपासून दिलीं जातात. वातावरणाच्या सर्व प्रकारच्या अभ्यासाचें व संशोधनाचें हें एक ठिकाण आहे. (६) मद्रास येथें कालमापन व दैनिक हवामानाचें माहितीपत्रक प्रसिद्ध करणें, व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणीं तारेच्या साहाय्यानें नक्की वेळ कळविणें वगैरे कामें मुख्यतः होतात. सर्व जगांतील विमान वहातुकीसंबंधीं विचार करण्याकरितां भरलेल्या आन्तरराष्ट्रीय परिषदेनें विमानांना आवश्यक असलेल्या हवामानासंबंधीं माहिती देण्याबद्दल कांहीं सूचना केल्या आहेत. त्याप्रमाणें विमानमार्गांतील ठराविक अंतरावरील हवामान केंद्रीं तज्ज्ञ हवाशास्त्रज्ञ ठेवून विमानाच्या पुढच्या टप्यांपर्यंतची मार्गावरील हवामानासंबंधीं सर्व माहिती वैमानिकांना पुरविणें हें काम मुख्यतः सुरू करणें आवश्यक आहे. याकरितां हिंदुस्थानभर हवाखात्याचीं केंद्रें वाढविणें अवश्य आहे व पाश्चात्य देशांतील पद्धतीप्रमाणें हवामानाची स्थिति व अनुमान दाखविणारीं पत्रकें चोवीस तासांतून कमींतकमी दोनदां प्रसिद्ध केली पाहिजेत. याप्रमाणें विमानमार्गावरील हवामानाचें व्यवस्थित व तपशीलवार अनुमान वर्तविणारीं केंद्रें क्वेटा, पेशावर, दिल्ली, कराची व रंगून येथें उघडण्यांत आलीं आहेत. क्वेटा व पेशावर येथें रॉयल एअर फोर्सचे हवाशास्त्रज्ञ अधिकारी नेमण्यांत आले असून त्यांना लागणारीं यंत्रें वगैरे हिं. सरकारच्या हवाखात्याकडून पुरविलीं जातात. तसेंच तेथील निरीक्षक व कारकून वगैरेंचा खर्च हिं. सरकारचें हवाखातें करतें. अरबी समुद्राच्या व मकरानच्या किनाऱ्यालगतच्या प्रदेशाचें हवामान कळविण्याची व्यवस्था करण्यांत आली व ती सर्व माहिती कराची–केंद्रीं एकत्र करण्यांत येऊन कराचीहून वैमानिकांना पोंचविण्यांत येते. तसेंच लंडन ते कराची टपालाच्या विमानाला व इतर विमानांना बिनतारी विद्युत्संदेश पाठविण्याचें काम व इजिप्त व बगदादहून संदेश आणविण्याचें काम कराची केंद्रांत चालतें. हिंदुस्थानांतील विमान–मार्गावर असणाऱ्या प्रदेशांतील वातावरणमान कळण्याची सोय कराची, दिल्ली, रंगून, कलकत्ता येथें मुद्दाम केंद्रें स्थापून केली आहे. तसेंच हिंदुस्थानच्या उत्तर भागापलीकडील प्रदेशावरील वातावरणासंबंधीं अनुमानात्मक बातमी वैमानिकांना पुण्याहून कळविली जाते. वरील कामाशिवाय उच्च वातावरणांतील हवेचे थरासंबंधीं संशोधनात्मक प्रयोग आग्रा व पुणें येथें नेहमीं चालू असतात. पुणें–केंद्रीं अगदीं अलीकडील पाश्चात्य पद्धतीप्रमाणें हवामानाचे नकाशे तयार करण्यांत येतात. तसेंच कराची येथें निरनिराळ्या उंचीवरील हवामानासंबंधीं प्रयोग करण्यांत येत आहेत. त्यांचा उपयोग विमानांना व वैमानिकांना पुष्कळ होतो. ' पायलट–बलून' (मोठें विमान सोडण्या पूर्वी वारा अनुकूल आहे किंवा नाहीं हें पाहाण्याकरितां उडविलेलें)· स्टेशनें बरींच उघडण्यांत आलीं. एकंदर ३१ स्टेशनांपैकीं पंचवीस स्टेशनांनीं सकाळच्या प्रमाणें दुपारींहि विमानें उडवून हवेचें निरीक्षण केलें. 'पायलट बलून स्टेशनांत वाढ झाल्यामुळें हायड्रोजनहि जास्त लागूं लागला म्हणून त्याकरितां आग्रा येथील वेधशाळेंतील यंत्रांत व माणसांत वाढ करावी लागली. उत्तर हिंदुस्थान व ब्रह्मदेश येथील निरीक्षण शाळांप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांतहि निरीक्षण शाळा बांधणें जरूर आहे; पण पैशाच्या अभावीं तें काम अजून झालें नाहीं.

हिंदुस्थानांत खाजगी विमानांचा प्रसार बराच झाल्यानें, हवाखात्याच्या कामाविरहित माहितीहि वैमानिकांना पुरविण्याबद्दल हवाखात्याला विनंति करण्यांत येते. वैमानिकाचा परवाना मिळविण्याकरितां उमेदवारांना जो अभ्यासक्रम ठेविलेला आहे त्यांपैकीं हवामानशास्त्र हा एक भाग आहे. हवाखातें या उमेदवारांच्या शिक्षणाची व परीक्षेची सोय हवामानशास्त्रवेत्त्या कडून निरनिराळ्या फोरकास्टिंग केंद्रांत करवितें. 'आर. १०१'या विमानास अपघात झाल्यापासून कराची येथील हवाखातें आपल्या कामांत जास्त दक्षता ठेवितें.शेतकीविषयक हवामानाचें निरीक्षण करण्याची शाखा उघडण्याची योजना तयार झाली असून कामासहि सुरुवात झाली आहे. या योजनेमुळें वार्षिक चाळीस हजार रुपये जादा खर्च येईल. तो 'इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च'नें देण्याचें कबूल केलें आहे. या योजनेचें मूळ १९२८ सालच्या शेतकी कमिशनच्या रिपोर्टांत आहे.

हवामानशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या पोस्ट ग्रॅजुएट विद्यार्थ्यांना दरमहा शंभर रुपये प्रमाणें दोन शिष्यवृत्त्या देण्याचें या वर्षीं ठरलें असून,या विषयांत युनिव्हर्सिटीची डिग्री मिळविण्याकरितां अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना हवाखात्याचे अधिकारी वारंवार साहय करितात.

कुलाबा व अलिबाग येथील वेधशाळेंत रॉयल

इन्स्टिटयूट ऑफ सायन्स व विल्सन कॉलेज मुंबई येथील चार विद्यार्थी हवाशास्त्र–तज्ज्ञाच्या देखरेखीखालीं हवामानशास्त्रसंशोधनाचें काम करीत आहेत.

शास्त्रीय शाखेंत प्रगति. (१) एक 'उष्णतामानदर्शक' तयार करण्यांत आला असून तो हायड्रोजेन भरलेल्या बलूनबरोबर सोडून दिला म्हणजे ओळीनें चार उतरतीं उष्णतामानें त्यावरून समजूं शकतात. (२) मुंबई येथें बाष्पीभवन, घनगर्जनेंतून निघणारी विद्युत, मान्सून वारे वहातांना चमकणारी वीज, हिंदी महासागरांत उठणारीं वादळें वगैरे बाबतींत संशोधन करण्यांत आलें.

सामुद्रीय हवामानशास्त्रः—

आरबी समुद्रांतील बंदरांना व जहाजांना तुफानी वादळें व वादळी हवा यांची आगाऊ सूचना पुण्याहून देण्यांत येते. तसेंच बंगालच्या उपसागरांतील जहाजांना कलकत्त्याहून सूचना देण्यांत येते. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील ३७ बंदरांना व बंगालच्या उपसागरांतील २७ बंदरांना सूचना देण्यांत येते. याशिवाय आठ नदीकांठचीं बंदरें, १७ रिव्हर पोलिस स्टेशनें व ४५ जिल्हा पोलीसस्टेशनें यांचा समावेश कलकत्त्याच्या सूचना यादींत केलेला आहे. रोज दोनदां पत्रकाचा ध्वनिक्षेप करून जहाजांना हवेंतील फरकाची माहिती देण्यांत येते. जरूर पडल्यास दिवसांतून सहा वेळसुद्धां या पद्धतीनें हवामान कळविण्यांत येतें. स. १९३०–३१ सालीं हवामान पत्रकें व धोक्याच्या सूचना यांची संख्या ९७१२ होती. इरिगेशन, रेलवे, टेलिग्राफ वगैरे खात्यांना पावसाचा अंदाज कळविण्यांत आला व त्या त्या खात्याला त्याचा फार उपयोग झाला.

वैमानिकांकरतां कराची येथें ८००, दिल्लीस ४००, कलकत्त्यास १००, क्वेटा पेशावर मिळून ३०० अशीं हवामानाची अनुमानें प्रसिद्ध करण्यांत आलीं.

पुण्याची मुख्य कचेरीः—हवामान खात्याचे डायरेक्टर जनरल डॉ. नॉर्मंड हे सन १९३१ च्या जानेवारींत नागपूर येथें भरलेल्या 'इंडियन सायन्स काँग्रेसच्या फिजिक्स' विभागाचे अध्यक्ष होते.

हिंदुस्थानांतील वेधशाळांची संख्या.

	३१ मार्च १९३१रोजीं	३१मार्च १९३०रोजीं
१ ला वर्ग	१४	१३
२ रा वर्ग	१५३	१४८
३ रा वर्ग	८५	७८
४ था वर्ग	२३	२३
५ वा वर्ग	१९	१९
नॉन डिपार्टमेंटल	५४	५२

हवाखात्याची मुख्य कचेरी पुणें येथें आहे. याशिवाय मुख्य मुख्य ऑब्झरवेटरीज् व हवाखात्याच्या कचेऱ्या पुढील ठिकाणीं आहेत.

अपर एअर ऑब्झरवेटरी आग्रा; कुलाबा आणि अलिबाग ऑब्झरवेटरीज् मुंबई; अलिपूर ऑब्झरवेटरी; मीटिऑरॉलाजिकल ऑफिस कलकत्ता, मीटिऑरॉलॉजिकल ऑफीस नवीदिल्ली; मीटिऑरॉलाजिकल ऑफीस कराची, सोलर फिजिक्स ऑब्झर्वेटरी कोडाईकनल, मीटिऑरॉलाजिकल ऑफिस आणि ऑब्झरवेंटरी, मद्रास; मीटिऑरॉलाजिकल ऑफिस, रंगून. खात्याचे मुख्यः—डॉ. सी. डब्ल्यु, बी. नॉर्मंड, एम्. ए. डी. एस्‌सी. एडिंबरो.

हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार

१ परदेशचा व्यापार व देशाची संपन्नता:---

हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवहारांत परदेशाच्या व्यापारास बरेंच अवास्तव महत्त्व लाभलें आहे. वास्तविक परदेशच्या व्यापाराहून अंतर्गत व्यापार हा किती तरी मोठा असतो. हिंदुस्थानचा अंतर्गत व्यापार नेमका किती आहे याचा कोणी अंदाज केलेला नाहीं.परंतु नेमस्त अंदाज करणारांच्या मतें तो परदेशी व्यापाराच्या सहापट तरी मोठें आहे. व परदेशी व्यापाराचें दळणवळण चालू ठेवण्यास व त्याला पैसा पुरविण्यास जशा सुसंघटित संस्था व बँका आहेत तशा सुसंघटित सोयी अंतर्गत व्यापाराची वृद्धि करण्यास असत्या तर अंतर्गत व्यापार अधिक वाढलेला दृष्टीस पडला असता. हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार गेल्या पन्नास वर्षांत १३० कोटींपासून जवळ जवळ ६०० कोटींपर्यंत वाढला आहे. एवढ्यावरून हिंदुस्थानची भरभराट होत आहे असा निष्कर्ष कित्येक जण काढीत असतात, पण तो भ्रामक होय. परदेशाशीं असलेल्या वाढत्या व्यापारावरून एखाद्या देशाच्या सांपत्तिक स्थितीची मोजदाद करणें चुकीचें ठरेल. उदाहरणार्थ,इंग्लंडचा परदेशाशीं व्यापार दर माणशीं ४२ पौंड आहे तर अमेरिकेचा फक्त १२ पौंड आहे. परंतु इंग्लंड व अमेरिका या दोन राष्ट्रांत इंग्लंडपेक्षां अमेरिकाच अधिक श्रीमंत आहे हें सर्वांस माहीत आहे.

२ फायद्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार:---

परदेशच्या व्यापारांत आयात व निर्यात अशा दोन बाजू असतात. जेव्हां आयातीपेक्षां निर्यात अधिक असते तेव्हां निर्यात करणाऱ्या राष्ट्रास आयात–निर्यात मालाच्या किंमतीची वजावट होऊन अधिक निर्यात मालाबद्दल रोख किंमत मिळते. अशा वेळीं त्या राष्ट्राला आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा झाला. Balance of trade is favourable असें म्हणण्याची वहिवाट आहे. व याच्या उलट स्थिति झाल्यास म्हणजे निर्यातीपेक्षां आयात अधिक असल्यास व्यापाराचा ताजवा त्या राष्ट्राच्या विरुद्ध झुकला असें म्हणण्याची वहिवाट आहे.हिंदुस्थानांत दरसाल सामान्यत: आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा होत असतो.म्हणजे आयात मालापेक्षां निर्यात माल अधिक असणें हें देशाच्या श्रीमंतीचें लक्षण आहे, असें कांहीं जण समजतात, पण तो भ्रम आहे. आयात किंवा निर्यात अधिक असणें यावर देशाची श्रीमंती अवलंबून नाहीं. एखाद्या राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रानें दिलेल्या अप्रत्यक्ष मोबदल्याबद्दल प्रत्यक्ष मालाच्या रूपानें किंमत द्यावी लागल्यास त्या राष्ट्राची निर्यात आयातीपेक्षां अधिक होईल.उलट एखाद्या राष्ट्रास परदेशांत पेरलेल्या भांडवलावर व्याज घ्यावयाचें असल्यास तें व्याज अनेक प्रकारच्या मालाच्या रूपानें त्या देशांत येईल. अशा वेळीं निर्यातीपेक्षां आयात अधिक होईल. इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय व्यापारांत निर्यातीपेक्षां आयातच बहुश: अधिक असते. कारण, इंग्लंडला अनेक राष्ट्रांकडून आपल्या भांडवलावरील व्याज वसूल करावयाचें असतें. सारांश, आंतरराष्ट्रीय व्यापार हिंदुस्थानला फायद्याचा आहे व इंग्लंडला तो नाहीं, एवढ्यावरून त्या राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीबद्दल कोणी कांहीं विधान करूं शकत नाहीं. हिंदुस्थानचा निर्यात व्यापार याचा अर्थ एवढाच कीं, हिंदुस्थानच्या त्या त्या वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारांत मागणी आहे. म्हणून हिंदुस्थानला परदेशाकडून मिळणाऱ्या अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष गोष्टीबद्दल आपला माल किंमत म्हणून देतां येतो. परदेशीय तज्ज्ञांची किंवा शिपायांची गरज अनिर्वाहच असेल तर निर्यात माल हा त्या परदेशीयांच्या नोकरीबद्दल किंमत म्हणून द्यावा लागेल. सारांश, आयात मालापेक्षां निर्यात माल अधिक असणें हें जसें कधीं कधीं फायद्याचें चिन्ह असूं शकेल तसें तें परदेशास दिलेल्या अप्रत्यक्ष खंडणीचेंहि चिन्ह असूं शकेल. म्हणून फायद्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार हें देशाच्या गरिबीचें किंवा श्रीमंतीचें गमक होऊं शकत नाहीं.

३ आयात निर्यातीचे दोन प्रकार:---

वरील विवेचनाच्या ओघांत आलेंच आहे कीं, आयात आणि निर्यात दोन प्रकारची असते.प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष. परदेशाहून माल विकत आणल्यास प्रत्यक्ष आयात झाली. पण परदेशाहून एंजिनियर आणल्यास व तो आपल्या पगारांतून आपल्या

घरच्या कुटुंबास पैसे पाठवीत असल्यास त्या एंजिनियरची नोकरी ही अप्रत्यक्ष आयात होय.हाच हेतू अधिक व्यापक करून असें म्हणतां येईल कीं, ज्या ज्या कारणांमुळें देशांत पैसा येतो तीं तीं सर्व प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्यात होय.व ज्या ज्या कारणानीं परदेशीं पैसा जातो तीं तीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयात होय. या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आयात निर्यातीच्या सर्व बाबी घेतल्यास आयात–निर्यात समसमान झाली पाहिजे हें उघड आहे. कारण, कोणतेंहि राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास फुकट उचलून कांहींच देत नाहीं. या दृष्टीनें आपण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयात निर्यातीचीं कांहीं कलमें पुढें देऊं.

प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्यात–

१ परदेशीं जाणारा माल.

२ हिंदुस्थानांत तात्पुरता मुक्काम करावयास आलेले परदेशचे लोक.

३ हिंदुस्थानच्या बाहेर राहणाऱ्या हिंदी लोकांनीं हिंदुस्थानांतील स्वकुटुंबीयांस पाठविलेला पैसा.

४ सोनें चांदीची निर्यात.

५ परदेशांत काढलेलें कर्ज.

प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयात

१ परदेशी मालाची आयात.

२ परदेशांत राहणारे हिंदी राजे व विद्यार्थी.

३ हिंदुस्थानांत नफा मिळविणाऱ्या परदेशी बँका, व्यापारी व विमा कंपन्या.

४ हिंदुस्थानांतील परकीय सनदी नोकरांनीं आपल्या कुटुंबास पाठविलेले पैसे.

५ सरकारच्या उपयोगासाठीं लागणारा परदेशाहून आणलेला माल.

६ परदेशच्या कर्जावरील व्याज व कर्जाची परतफेड.

७ होमचार्जेस.

८ मालाच्या वाहतुकीचा खर्च.

९ सोनेंचांदी विकत घेण्याचा खर्च.

१० सोन्या–चांदीची आयात.

वरील कलमावरून राष्ट्रांतून किती निरनिराळ्या कारणांवरून पैसा जात असतो व किती कारणांनीं पैसा येत असतो त्याची कांहींशी कल्पना येईल.

४ हिंदुस्थानचा प्राक्कालिन परदेशांशीं व्यापार

हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार फार प्राचीन काळापासून म्हणजे इ. स. पू. २००० वर्षापासून चालत आलेला आहे हें प्रसिद्धच आहे. हिंदुस्थानांतील माल रोमकडे जात असल्यानें त्या देशांतून हिंदुस्थानाकडे संपत्तीचा ओघ वहात असे असें रोमन इतिहासकार प्लीन्टी यानें विधान केलें आहे. डाक्का येथें तयार होणारी मलमल ग्रीक लोकांस 'गँजेटीका' या नांवानें माहीत होती. याखेरीज चीन, अरबस्तान, इराण इत्यादि देशांत हिंदुस्थानांतून कापसाचें कापड,हस्तिदंत,रंग, मसाल्याचे जिन्नस वगैरे वस्तु जात असत. व परदेशांतून खनिज पदार्थ,दारू,घोडे वगैरे येत असत.सोळाव्या व सतराव्या शतकांत पाश्चिमात्य राष्ट्रांत पूर्वेकडील प्रदेशाशीं व्यापार करण्यासाठीं कंपन्या स्थापन करण्याची चढाओढ लागून राहिली होती. त्याचा एक उद्देश युरोपांत अवश्य लागणारे जिन्नस हिंदुस्थानांतून व्यवस्थित रीतीनें विकत घेऊन नेतां यावेत हा होय. पुढें इंग्लंडमध्यें ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना होऊन व तिला पूर्वेकडील प्रदेशाशीं व्यापार करण्याचा मक्ता मिळाला तेव्हां सतराव्या व आठराव्या शतकांत इंग्लंडमध्यें ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराविरुद्ध ओरड झाली. त्याचें एक कारण असें कीं, ई. इं. कंपनीच्या व्यापारामुळें इंग्लंडमधील पैशाचा ओघ हिंदुस्थानकडे वाहतो अशी त्यांची साधार तक्रार होती. हिंदुस्थानांतील कापसाचें कापड पाहून विलायतेंत लोकरीच्या कापडाला मागणी येईना तेव्हां त्या कापडाच्या आयातीवर प्रतिबंधक जकाती बसविल्या गेल्या वगैरेबद्दलची बोधप्रद हकीगत पं. मदन मोहन मालवीय यांनीं इंडस्ट्रियल कमिशनच्या रिपोर्टास जी भिन्न मतपत्रिका जोडली आहे, तींत अतिशय व्यवस्थित रीतीनें मांडली आहे. सारांश, हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार गेल्या चार हजार वर्षांपासूनचा आहे व अनेक पाश्चिमात्य राष्ट्रें हिंदुस्थानच्या मालाचीं गिऱ्हाईकें असत हें निर्विवाद आहे.

५ परदेशी व्यापाराची वाढः––

हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार गेल्या ६५ वर्षांत कसकसा वाढत गेला तें पुढील कोष्टकावरून दिसून येईल. (आयातीच्या आंकड्यांत सरकारला लागलेल्या मालाची किंमत आलेली आहे व निर्यातीच्या आंकड्यांत पुर्ननिर्यातीचे आंकडे आलेले आहेत.)

(पुर्ननिर्यातचा आंकडा कलम १७ वर पहा.)

–पंचवार्षिक सरासरी–

	आयात	निर्यात	एकूण
१८६४–६९	३१७०	५५८६	८७५६
१८६९–७४	३३०४	५६२५	८९२९

	आयात	निर्यात	एकूण
१८७४–७९	३८३६	६०३२	९८६८
१८७९–८४	५०१६	७९०८	१२९२४
१८८४–८९	६१५१	८८६४	१५०१५
१८८९–९४	७०७८	१०४९९	१७५७७
१८९४–९९	७३६७	१०७५३	१८१२०
१८९९–१९०४	८४६८	१२४९२	२०९६०
१९०४–०९	११९८५	१६५४४	२८५२९
१९०९–१४	१५१६७	२२४२३	३७५९०
१९१४–१९	१५९२५	२२५८३	३८५०८
१९१९–२४	२६७०५	३०६३८	५७३४३
१९२४–२९	२५१०२	३५३५१	६०४५३

वरील आंकडे हे लक्ष रुपयांच्या किमतींत दिलेले आहेत.परंतु ऐन वाढ कळण्यास रुपयांच्या आंकड्याबरोबर पदार्थांच्या किमतीची वाढ कसकशी झाली तें सांगितलें पाहिजे. अमुक एका वर्षाचे १०० रुपये पुढें किती रुपया बरोबरीचे आहेत हें दाखविणाऱ्या आंकड्यास 'परिमाणदर्शक' आंकडे म्हणतात. हे परिमाणदर्शक आंकडे आयात व निर्यात वस्तूसाठीं निरनिराळे तयार केले आहेत. व दोहोंचा एकत्रित सर्वसामान्य आंकडा दिलेला आहे.

इ. स.	आयात	निर्यात	सर्वसा.
१८७३	१००	१००	१००
१९१४	११४	१६०	१४७
१९१६	२३६	१६३	१८४
१९१८	२८९	१९९	२२५
१९२०	२८०	२८१	२८१
१९२१	२२८	२३९	२३६
१९२२	२०१	२४५	२३२
१९२३	१९३	२२४	२१५
१९२४	२१७	२२२	२२१
१९२५	२११	२३३	२२७
१९२६	१९५	२२५	२१६
१९२७	१८५	२०९	२०२
१९२८	१७१	२१२	२०१
१९२९	१७०	२१६	२०३
१९३०	१५७	१७७	१७१

१९३० सालचे आंकडे पक्क्या हिशेबाचे नसून कामचलाऊ आहेत.

इ. स. १९२९ च्या सप्टेंबरांतील कलकत्त्याचा परिमाणदर्शक आंकडा १४३ हून जानेवारी १९३१त९८ पर्यंत म्हणजे शेंकडा ३२नें उतरला. एप्रिल १९३० पासून मार्च १९३१ पर्यंत हिंदुस्थानांत पदार्थांच्या किमती शेकडा ३२ नें उतरल्या. इंग्लंडमध्यें हें प्रमाण याच काळांत शें. १५ नें उतरलें. पदार्थांच्या किमतींत १९२९ पासून झपाट्यानें उतार होऊं लागला. तेव्हांपासून सप्टेंबर १९३१ पर्यंत पदार्थांच्या किमती उतरत होत्या. तेव्हांच ह्या उतरत्या किमतींना बांध घातला गेला व किंमती हलके हलके चढत आहेत. तयार मालापेक्षां कच्च्या मालाच्या व खाद्य पदार्थांच्या किमती अधिक झपाट्यानें उतरल्या. हिंदुस्थानांत मुख्यतः याच पदार्थांची पैदास होते. म्हणून जागतिक किमतीच्या मानानें हिंदुस्थानांतील पदार्थांच्या किमतींत अधिक जोराचा चढउतार झाला असें म्हटलें पाहिजे.

६. आधुनिक मंदाईची मीमांसा:—

पदार्थांच्या किमतींत एवढा उतार एकदम होण्याचीं काय काय कारणें आहेत याबद्दल थोडक्यांत विवेचन करणें जरूर आहे. जागतिक मंदीच्या मुळाशीं युरोपांतील राष्ट्रांचीं व अमेरिकेचीं युद्धोत्तर चालू असलेलीं खंडण्याबद्दल व नुकसान भरपाईच्या रकमेबद्दलचीं भांडणें मुख्यतः आहेत. खेरीज अमेरिकेनें व फ्रान्सनें सोन्याचा अवास्तव संचय करावयाचें धोरण पत्करल्यापासून जागतिक व्यवहारास सोन्याची टंचाई पडली व त्यामुळें थोड्या नाण्यांत पुष्कळ व्यवहार करणें भाग पडलें. म्हणजे पदार्थांच्या किमती उतरल्या. ह्या जागतिक कारणांखेरीज हिंदुस्थानांत सरकारच्या चलनविषयक धोरणामुळें म्हणजे रुपयाचा भाव १८ पेन्स टिकवून धरण्याच्या हट्टामुळें देशांतील चलन कमी करावें लागलें व देशांत उत्पन्न झालेल्या राजकीय अस्वस्थतेचा परिणाम व्यापारावर झाला व मालाची निश्चित विक्री होईना. अशा रीतीनें हिंदुस्थानास जागतिक व स्थानिक दोन्ही कारणांमुळें मंदाईचे परिणाम अधिकच तीव्रतेनें भोगावे लागले.

७.गेल्या १० वर्षांतील परदेशाशीं व्यापार:—

हिंदुस्थानच्या आजकालच्या परदेशच्या व्यापाराचें स्वरूप पुढील कोष्टकावरून कळून येईल. या आंकड्यांत सरकारास लागलेल्या मालाचा अंतर्भाव आयात मालांत केलेला नाहीं. तसेंच निर्यात मालाच्या आंकड्यांत पुनर्निर्यातीचे आंकडे घेतलेले नाहींत. फक्त व्यापाऱ्यांनीं जी मालाची नेआण केली त्याचे आंकडे आहेत.

(आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.)

	निर्यात	आयात	अंतर
१९२१–२२	२३१३८	२६६३५	– ३४९७
१९२५–२६	३७४८४	२२६१७	+१४८६७
१९२६–२७	३०१४३	२३१२२	+ ७०२१
१९२७–२८	३१९१५	२४९८३	+ ६९३२
१९२८–२९	३३०१२	२५३३०	+ ७६८२
१९२९–३०	३१०८०	२४०८०	+ ७०००
१९३०–३१	२२०४९	१६४८२	+ ५५६७
१९३१–३२	१५५८९	१२६३४	+ २९५५

८ परदेशाशीं होणाऱ्या आर्थिक व्यवहाराचा ताळेबंद तक्ता

खाजगीं व्यापाऱ्यांनीं मालाची जी नेआण केली त्याखेरीज व्यापाऱ्यांकडून सोन्याचांदीची निर्यात होते, सरकार स्वतःसाठीं माल आणविते, कांहीं माल या देशांत तात्पुरता येऊन पुनः परदेशास जातो. सरकार स्वतःसाठीं सोन्याचांदीची नेआण करते. समुद्रमार्गानें होणाऱ्या ह्या सर्व व्यवहाराचा ताळेबंद तक्ता १९२८–२९ व २९–३० या दोन वर्षांचा इ. स. १९३२ च्या Statistical Abstract of Br. India प. ५३५ वरून दिला आहे. त्यावरून परदेशाशीं होणाऱ्या आवकजावकीचें स्वरूप कळून येईल.

हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार

समुद्रावरील व्यापार	१९२८–२९ रु. (हजारांत)	१९२९–३० रु. (हजारांत)
आयात––		
खाजगी व्यापारी माल	२५३३०६०	२४०७९६९
सरकारी स्टोअर	१००९२०	८९१०५
एकूण आयात माल	२६३३९८०	२४९७०७४
ट्रेझर––(सोनें-चांदी)		
खाजगी	३७२९४०	२७७६७६
सरकारी	२	६४४
एकूण सोनें–चांदी	३७२९४२	२७८३२०
एकंदर आयात	३००६९२२	२७७५३९४
निर्यात––		
खाजगी व्यापारी माल हिंदुस्थानांतील कच्चा व पक्का माल	३३०१२७९	३१०८०५५
परदेशी पुनर्निर्यात	७८३३३	७१२६९
एकूण खाजगी व्यापारी माल	३३७९६१२	३१७९३२४
सरकारी स्टोअर	११८९५	१०५७३
एकूण निर्यात माल	३३९१५०७	३१८९८९७
सोनें–चांदी––		
खाजगी	२९३११	१५६८७
सरकारी	३४२२०	३५७४६
एकूण सोनें–चांदी	६३५३१	५१४३३
एकूण निर्यात	३४५५०३८	३२४१३३०
एकंदर समुद्रावरील व्यापार	६४६१९६०	६०१६७२४
व्यापारी मालाची निव्वळ निर्यात	७५७५२७	६९२८२३
सोन्या–चांदीची निव्वळ आयात	३०९४११	२२६८८७
अधिक निर्यात मालाची निर्यात	४४८११६	४६५९३६

वरील आंकड्यांवरून स्पष्ट होईल कीं, हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार १८७९–१९२९ह्या पन्नास वर्षांत ठोकळ १०० कोटीपासून ६००कोटीपर्यंत वाढला. ही सहापट वाढ पोकळ आहे. परंतु ह्याच काळांत परिमाणदर्शक आंकडा ठोकळ मानानें १०० पासून २०० पर्यंत गेला. अर्थात् परदेशी व्यापारांत झालेली तिप्पट वाढ तरी ऐन वाढ असें म्हणतां येईल. इ.स. १८७९ त सर्व ब्रम्हदेश हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांत आला नव्हता. तेव्हां 'तिप्पट' या प्रमाणांतहि थोडाबहुत आंकडा बाद करावा लागेल. पण हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार जोरानें वाढत आहे हें निर्विवाद होय. त्यांतहि पहिल्या २५ वर्षांच्या मानानें पुढील २५ वर्षांतील (१९०४–१९२९) वाढ अधिक झपा-

टचानें झालेली दिसून येईल. इ. स. १८९९पासून हिंदुस्थानांत चलनाचा भाव स्थिर झाला. व हें एक कारण याच्या मुळाशीं आहे. वरील कोष्टकावरून दुसरी गोष्ट स्पष्टपणें नजरेंत भरेल ती ही कीं, हिंदुस्थानचा निर्यात व्यापार आयात व्यापाराहून अधिक असतो. इ. स. १९२१–२२ व त्याचप्रमाणें १९२०–२१ सालीं आयात निर्यातीहून अधिक होती. हे दोन अपवाद सोडून दिल्यास गेल्या ५० वर्षांत दरसाल निर्यात आयातीपेक्षां अधिक झालेली आहे. ह्याचा वास्तविक अर्थ काय तें वर दिलेल्या तात्त्विक विवेचनाच्या ओघांत आलेंच आहे.

९ आयातीची जिन्नसवारी

आयात विभाग– वाढत्या व्यापाराचे ठोकळ आंकडे सांगितल्यावर आपण व्यापाराच्या आंकड्यांचें अधिक सूक्ष्म वर्गीकरण करूं. सोबत इ. स. १९२८–२९,२९–३०, ३०–३१ चे आयातीचे आंकडे दिले आहेत. त्यांवरून हिंदुस्थानांत कोणकोणते पदार्थ किती येतात त्याची योग्य कल्पना येईल.

हिंदुस्थानचा आयात व्यापार

(आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.)

जिनसाचें नांव	सन १९२८–२९	सन १९२९–३०	सन १९३०–३१	सन १९३०-३१ सालांतील व्यापाराचें संपूर्ण आयातीशीं शें. प्रमाण
पोषाखाचें सामान	१८२	१७१	१११	.६७
स्थापत्य सामग्री	१२१	१३४	१०९	.६७
लांकूड–साधें व इमारतीचें	८३	१०३	८९	.५४
पादत्राणें	६८	८७	८८	. ३
स्टेशनरी	१०१	१०५	८१	.४९
सुया, सुताच्या गुंडचा, फिती, गोंडेवगैरे	१३४	१०४	७२	.४४
खतें	७३	९८	६७	.४१
यंत्राकरितां पट्टे	८३	९०	६३	.३९
चहाकरितां पेट्या	६७	८०	६३	.३९
छापील ग्रंथ वगैरे	६६	७१	६०	.३७
मौल्यवान रत्नें	११६	१०९	५९	.३६
लष्करी साहित्य	७६	६५	५४	.३३
सौंदर्य साधनें	६४	७२	५३	.३३
खेळणीं व खेळांचें सामान	६६	६४	४९	.३०
भांडीं–मातीचीं व चिनी मातीचीं	७३	७२	४८	.२९
चहा	७४	६३	४५	.२७
बावणी	३५	३९	४२	.२६
कागद तयार करण्याची सामग्री	४१	४४	४२	.२५
जडावाचें सामान	१५	२६	३९	.२४
कोळसा व कोक	३९	४५	३४	.२१
छत्र्या, फिटिंगचें सामान वगैरे	५७	४३	३१	.१९
चीक व धूप	३८	४१	३१	.१९
फर्निचर, चौकटी वगैरे	३६	३७	२७	.१७
मेणबत्त्यांसाठीं लागणारी चरबी	२४	३१	२७	.१७
चाकू, कात्र्या वगैरे	३६	४१	२६	.१६
कापूस व कापसाचा माल	६७१५	६२९०	३१६४	१९·२०
धातु (शुद्ध व अशुद्ध)	२६९८	२३६१	१५९२	९.६६

जिनसाचें नांव	सन १९२८–२९	सन १९२९–३०	सन १९३०–३१	सन १९३०–३१ सालांतील व्यापाराचें संपूर्ण आयातीशीं शें. प्रमाण
यांत्रिक सामग्री (गिरण्यासाठीं)	१८३६	१८२१	१४३४	८·७१
साखर	१६०८	१५७७	१०९६	६.६५
तेलें	११५३	११६८	१०९२	६.६३
वाहनें	११००	१०८४	७३०	४.४३
प्रोव्हिजन्स व ऑइलमन्स स्टोअर	६२१	५६३	४८७	२.९६
साधनें व उपकरणें	४९१	५३८	४७७	२.९०
लोखंडी सामान	५२३	५०६	३६०	२.१९
मादक पेयें	३५७	३७६	३३१	२.०१
रेशमी कापड व कच्चें रेशीम	५००	४५८	२९९	१.८२
कागद व पुठ्ठा	३२९	३७२	२८६	१.७४
धान्यें, डाळीं, पीठ	१०७२	५४२	२८१	१.७१
रासायनिक द्रव्यें	२४७	२७८	२६१	१.५९
रंग	२८३	२४३	२५९	१.५७
रबर	२८६	३३२	२५८	१·५७
मसाल्याचे पदार्थ	२९४	३२५	२५४	१·५५
लोकर व लोकरीचें कापड	५०१	४२८	२३१	१·४०
औषधें	२०२	२२६	१९३	१·१८
कांच व कांचसामान	२३७	२५१	१६४	१·००
तंबाकू	२७४	२६९	१५१	.९२
भाजीपाले व फळफळावळ	१६८	१८२	१४८	.९०
मीठ	१४६	१३०	११७	.७२
रंग व चित्रकाराची सामग्री	१४४	१४६	११२	.६८
साबण	१५८	१६६	१११	.६८
मांसळी	२५	२६	२३	.१४
अंबाडी कच्ची व तयार माल	३५	३३	२१	.१३
सजीव प्राणी	३५	३२	२०	.१२
ताग व तागाचें कापड	२६	२४	१८	.११
घड्याळें	२७	२३	१६	.१०
आगपेट्या	१७	१०	४	.०२
इतर	१५२६	१४३३	१०५३	६.३९
एकूण	२५४०२	२४०४८	१६३५३	१००

कापसाच्या कापडाच्या आयातीमध्यें ग्रेटब्रिटन व जपान यांचें शेंकडा प्रमाण:—

	ग्रेटब्रिटन १९१३–१४	जपान १९१३–१४	ग्रेटब्रिटन १९२८–२९	जपान १९२८–२९	ग्रेटब्रिटन १९२९–३०	जपान १९२९–३०	ग्रेटब्रिटन १९३०–३१	जपान १९३०–३१
कापसाचें कापड								
१ खाकी	९८.८	.५	६९.४	२८.८	५६.२	४२.५	३९.२	५९.८
२ पांढरें	९८.५		९४.८	१.०	९२.१	२·९	८४.६	१०.३
३ रंगीत	९२.६	.२	६६.२	२१.७	५७.६	३१.९	६०.०	३०.२

कापडाच्या आयातीचे देशवार शेकडा वांटणीचें प्रमाण

देश	१९१३–१४	१९२०–२१	१९२८–२९	१९२९–३०
ग्रेटब्रिटन	९७.१	८५.६	७५.२	६५.०
जपान	.३	११.३	१८.४	२९.३
युनायटेड स्टेट्स	.३	.९	१.५	१.७
नेदर्लंडस्	.८	.९	१.०	१.१०
इतर देश	१.५	१.३	३.९	२.९
एकूण	१००	१००	१००	१००

१० आयातीचें वर्गीकरण–

ह्या विस्तृत यादीवरून हिंदुस्थानांत कोण-कोणते पदार्थ किती येतात तें कळेल. पण या विस्तृत यादीचें वर्गीकरण केल्यास आयात व्यापाराचें स्वरूप अधिक स्पष्टपणें कळेल. सोबत इ.स. १९२८–२९ च्या परदेशच्या व्यापाराच्या आंकड्यांचें नेहमींच्या पद्धतीनें वर्गीकरण केलेलें आहे.

आयात माल (सरकारी सामान वगळून) आंकडे कोट रुपयांचे.

मालाचा वर्ग	लढाईपूर्वीची सरासरी	त्याचें शें. प्रमाण	महायुद्धांतील सरासरी	युद्धोत्तर सरासरी	इ.स.१९२८-२९ चे आंकडे	त्यांचें शें. प्रमाण
खाद्यपेय व तंबाखू	२१.८	१५	२६.४	३७.८	४६.	१८.१
कच्चा किंवा बहुतांशीं कच्चा माल	१०.१	७	९.९	१९	२२.६	८.९
पक्का किंवा बहुतांशीं पक्का माल	१११.८	७६.६	१०८.२	१९२.६	१८०.३	७१.१
विविध	२.१	१.४	३.३	४.६	४.४	१.९
एकंदर	१४५.८	१००	१४७.८	२५४.०	२५३.३	१००

वरील कोष्टकावरून लक्षांत येईल कीं, हिंदुस्थानांत मुख्यतः पक्क्या मालाची आयात होते. युद्धपूर्वकाल व आजचा काल यांत १५ वर्षांचें अंतर आहे. एवढ्या काळांत महायुद्धामुळें युरोपांत उडालेला गोंधळ व इ. स. १९२३ सालीं हिंदुस्थाननें स्वीकारलेले संरक्षक जकातीचें धोरण या दोन कारणांमुळें हिंदुस्थानांत येणाऱ्या आयातींत पक्क्या मालाचें प्रमाण हलकेंहलकें कमी होत आहे. पण हें प्रमाण अजूनही समाधानकारक नाहीं. खाद्यपदार्थांत मादक पेयें यासारखा माल आहेच. सारांश, हिंदुस्थानांत येणाऱ्या मालापैकीं बहुतेक माल परदेशाहून आलेल्या स्थितींत उपयोगांत आणण्यासारखा असतो. त्या मालाच्या आयातीनंतर त्यावर संस्कार करण्यासाठीं हिंदुस्थानांतील लोकांस काम मिळेल अशी स्थिति नाहीं.

११ इ. स. १९३०–३१मध्यें कापडाच्या आयातींत घट.

इ.स. १९३०-३१ सालीं हिंदुस्थानची आयात फारच घटली. इ.स. १९२९-३० त या वस्तूंची आयात ७८ कोट होती ती ३०-३१ सालीं अवघी ४१ कोट झाली. यामुळें वस्त्रप्रावरणाच्या आयातीचें आयात मालांतील पहिलें स्थान नाहींसें होऊन तें स्थान धातु व यंत्रसामुग्रीनें पटकाविलें. वस्त्रप्रावरणांत कापडाच्या तयार वस्त्राची आयात ५०२५ लक्ष रुपयांहून २००५ लक्षांवर आली. सुताची आयात ६ कोटींवरून ३०८ लक्षांवर आली. कृत्रिम रेशमाची आयात १२९ लक्षानें, रेशमी मालाची आयात १५८ लक्षानें व लोकरीची आयात १९७ लक्षानें घटली. कापडाच्या आयातींत विशेष घट ब्रिटिश मालांत दिसून आली. ह्या घटीचें स्वरूप पुढील दोन कोष्टकांवरून कळून येईल.

ही आयात कमी होण्याचीं अनेक कारणें आहेत. इ. स. १९३०-३१ सालीं पदार्थांच्या किंमती उतरल्या त्यांत धान्य, कच्चा माल वगैरेंच्या किमती विशेष उतरल्या. यामुळें हिंदी शेतकऱ्यांची पदार्थ विकत घेण्याची शक्ति कमी झाली म्हणून मालाला मागणी कमी आली. पण याही कारणापेक्षां इ. स. १९३०-३१ सालीं हिंदुस्थानांत परदेशी मालाच्या बहिष्काराच्या चळवळीस जोर आला हें प्रमुख कारण आहे यांत शंका नाहीं. कापसाचा तयार माल दिवसेंदिवस कमी प्रमाणांत येत असतां, कच्च्या कापसाची आयात मात्र इ.स. १९३०-३१ सालच्या २४००० टनांवरून इ.स. १९३०-३१ सालीं ५८००० टनांपर्यंत वाढली. बाहेरून येणारा कच्चा कापूस विशेषतः भारी दर्जाचा येतो. या कापसाच्या वाढत्या आयातीवरून हिंदुस्थानांत तलम कापड वाढत्या प्रमाणावर तयार होऊं लागलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१२ धातु व त्यांचे पदार्थांची आयातः--

धातु व त्यांचे पदार्थ यांची अयात ७७० लक्षानें घटली. लोखंड व पोलाद यांची आयात १७२१ लक्षांहून १०८९ लक्षावर आली. व त्यांत इंग्लंडहून आलेल्या मालाची आयात प्रामुख्यानें कमी झाली. लोखंड व पोलादाखेरीज इतर धातूंची आयात ६३८ लक्षांवरून ५०२ लक्षांवर आली. गिरण्यांसाठीं व इतर कारखान्यांस लागणाऱ्या यंत्रांची आयात १९३५ लक्षांहून १५१३ लक्षांवर आली. परंतु ही रुपयांत दिसणारी घट मुख्यत्वेंकरून किंमतीचें प्रमाण उतरल्यामुळें झालेली आहे. मोटार गाड्यांची आयात ३७६ लक्षांवरून २५८ लक्षांवर आली. इ. स. १९२८-२९ सालीं सर्वांत जास्त मोटारगाड्या आल्या. तेव्हांपासून त्यांची संख्या कमी कमी होत आहे. हें पुढील कोष्टकावरून कळेल.

वर्ष	संख्या	किंमत (लक्षरु.)
१९२८-२९	१९५६७	४२१
१९२९-३०	१७३९९	३७६
१९३०-३१	१२६०१	२५८

लोखंडी जाड सामाना (Hard ware) ची आयात ५ कोटींवरून ३६० लक्षांवर आली.

कापूस, रेशीम, लोकर इत्यादींच्या मालाचा 'वस्त्रवर्ग केला व धातु, त्यांचे पदार्थ, यंत्रें, वाहनें वगैरे सर्वांचा 'धातुवर्ग' केला तर त्यांची आयात कशी झाली तें पुढील कोष्टकावरून कळेल.

	वस्त्रवर्ग	धातुवर्ग (आंकडे कोट रुपयांचे)
१९२९-३०	७२·५	६३·५
१९३०-३१	३३	४६·५

साखरेची आयात १५७७ लक्षांवरून १०९६ लक्षांवर आली. साखर इंग्लंड, चीन, जावा, सीलोन इत्यादि देशांतून येते. पैकीं इंग्लंडहून येणारी साखर बरीच कमी झाली. या सालीं रशियाहून ४२००० टन साखर आली. याच्या आधीं गेल्या दोन वर्षांत रशियाहून साखर आलेली नव्हती. खाणीच्या तेलांची आयात ११०४ लक्षांवरून १०४८ लाखांवर आली. त्यांत घासलेटची आयात ५८९ लक्षांऐवजीं ५३४ लक्ष होती. सिगारेटवरील बहिष्कारामुळें तंबाखूची आयात २६९ लक्षांवरून १५१ लक्षांवर आली. कांचेची आयात २५२ लाखांवरून १६५ लाखांवर आली. काड्याच्या पेट्यांची आयात १० लाखांवरून ४ लाखांवर आलेली आहे. इ. स. १९२६-२७ त काड्याच्या पेट्या ६५ लक्षांच्या येत असत. यावरून हिंदुस्थानांत स्वतःच्या काड्याच्या पेट्या उपयोगापुरत्या तयार होऊं लागल्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र काड्याच्या पेट्या तयार करणाऱ्या बहुतेक कंपन्या विदेशी आहेत. असो. वर विस्तृत कलमवार दिलेल्या वर्णनावरून हिंदुस्थानांतील आयात मालाची योग्य कल्पना येईल.

१३ आयात व्यापाराची दिशाः–

आयात मालापैकीं ठळक ठळक माल कोणकोणत्या देशांतून येतो, त्याची पुढील कोष्टकावरून कल्पना येईल.

हिंदुस्थानांतील आयातींचें देशवार शेकडा प्रमाण दर्शविणारें पत्रक

देशाचें नांव	कापसाचें कापड		साखर		लोखंड व पोलाद		यंत्रें		लोखंडी सामान		मोटारी वगैरे		खाणींतील तेलें (पेट्रोल वगैरे)		कागद	
	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९	१९३३–४	१९२८–९
युनायटेड किंग्डम	९०.१	७१.३	१.८	.६	६९.९	६४.५	८९.८	७६.८	५७.२	३६.०	७१.३	२०.९	५.७	१.९	५६.०	३७.३
युनायटेड स्टेटस्	.४	१.३			२.६	३.०	३.३	११.३	९.७	११.७	१५.१	४७.०	५६.१	२४.५		२.४
जर्मनी	२.१	.५	.१		१४.५	५.३	५.६	६.२	१८.२	३२.२			७.३	३.७	१७.०	१३.३
बेल्जम		.४			११.५	२०.१				१.०	४.५	.२				
जपान	१.८	१८.३							१.५	५.५						
फरान्स		.२				४.०२				.९	४.५	१.३				१.२
इटली	१.५	२.२										३.६				
नेदर्लंडस्	१.६	१.७													२.५	७.६
नार्वे															५.०	११.३
स्वीडन															३.१	७.४
कॅनडा												२५.४				
बोर्निओ													२१.८	१२.९		
जावा			७१.८	९७.७												
मैरोती			१६.९													
रशिया (जार्जिया धरून)													३.७	२९.७		
चीन	.१	२.७											.९	२१.८		
एकूण व्यापार शे. प्रमाण	९७.६	९८.६	९०.६	९८.३	९८.५	९६.९	९८.७	९४.३	८६.६	८७.३	९५.४	९८.४	९५.५	९४.५	८३.६	८०.५
एकूण व्यापार (आं. कोट. रु.)	६६.३	६३.२	१४.९	१६.०	१६.०	२०.२	७.७	१८.३	३.९	५.२	१.५	७.७	४.१	१०.७	१.५	३.३

पुढील कोष्टक आयात मालांपैकीं कोणत्या देशांतून शेंकडा किती माल येतो तें दर्शवितें.

आयात (आंकडे शेंकडा प्रमाण दर्शविणारे)

देश	१९१३–१४	१९२८–२९	१९२९–३०
युनायटेड किंग्डम	६४.१	४४.७	४२.८
जर्मनी	६.९	६.३	६.६
जावा	५.८	६.५	५.७
जपान	२.६	७.०	९.८
अमे. संस्थानें	२.६	७.१	७.३
बेल्जम	२.३	२.८	२.८
आस्ट्रिया व हंगेरी	२.३	.६	.८
स्टेट्स् सेंटलमेंट्स	१.८	२.०	२.६
पर्शिया, अरेबिया, एशिया– टिक टर्की वगैरे	१.५	१.९	२.१
फ्रान्स	१.५	१.९	१.९
मॉरिशस	१.३		
इटली	१.२	२.९	२.८
चीन	.९	१.७	१.७
नेदर्लंडस	.८	१.९	१.८
आस्ट्रेलिया	.५	३.३	२.३
हॅांगकांग	.५	.३	.३
डच बोर्निओ	.४	.५	.४
सीलोन	.४	.८	.७
स्वित्झर्लंद	.३	१.०	.९
केनिया व झांजिबार	.३	१.१	१.४

वरील कोष्टकावरून लक्षांत येईल कीं, हिंदुस्थानांत माल पाठविणारांत अद्यापही ग्रेट ब्रिटनचा नंबर पहिला आहे. परंतु दिवसेंदिवस ग्रेट ब्रिटनकडून येणाऱ्या मालाचें प्रमाण घटत आहे. इ.स. १९३०-३१ सालांतील बहिष्काराची चळवळ लक्षांत घेतां हें प्रमाण आणखी घटलेलें दृष्टीस पडेल यांत शंका नाहीं. सुरुवातीस ईस्ट इंडिया कंपनीच्या वर्चस्वामुळें हिंदुस्थानशीं व्यापार करण्यांत इंग्रजी कंपन्यांचें बस्तान चांगलेंच बसलें. व तें महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत टिकून राहिलें. महायुद्धाच्या काळांत जपाननें चांगलाच हातमारला तेव्हांपासून जपाननें व इतर राष्ट्रांनीं बुद्धिपुरस्सर यत्न करून हिंदुस्थानशीं आपला व्यापार वाढविला आहे व या कार्यांत त्या त्या देशांतील लोकांस त्यांच्या सरकारची चांगलीच मदत झाली.

येथपर्यंत आयात विभागाचें विवेचन झालें. आतां आपण निर्यात मालाच्या विभागाकडे वळूं.

निर्यात विभाग.–

१४ निर्यातीची विल्हेवारीः—हिंदुस्थानांतून कोणकोणता माल किती प्रमाणांत जातो याचें कलमवार वर्णन पुढील कोष्टकांत दिलें आहे.

हिंदुस्थानचा निर्यात व्यापार
आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.

जिनसाचें नांव	१९२८–२९	१९२९–३०	१९३०–३१	१९३०–३१ साल निर्यात व्यापार शेंकडा प्रमाण
१	२	३	४	५
कापूस कच्चा व टाकाऊ	६६६९	६५६०	४६७२	२१.१९
कापसाचा तयार माल	७७९	७१८	५२१	२.३७
कच्चा ताग	३२३४	२७१७	१२८८	५.८४
तागाचा तयार माल	५६९०	५१९२	३१८९	१४.४६
धान्यें, डाळी, कणिक	३३६९	३४७९	२९८८	१३.५५
चहा	२६६०	२६००	२३५५	१०.६८
बीं	२९६२	२६४६	१७८६	८.१०
धातु	८९१	१०३३	७९४	३.६०
कमाविलेलें कातडें	९४४	८१६	६३९	२.९०
कच्चीं कातडीं	९५५	७९८	५४६	२.४८
लोंकर,–चें कापड	५९०	५३३	३२३	१.४७
लाख	८६४	६९६	३१३	१.४२
मेण	२४५	३१७	२८१	१.२८
पेंड	३८४	३११	२०८	.९४
कॉफी	१६९	१४५	१९१	.८७
लांकूड–साधें व इमारतीचें	१७६	१८०	१४०	.६४
कच्चा रबर	१९९	१७८	१२९	.५९
मसाल्याचे पदार्थ	१५८	१९६	१२७	.५८
खतें	१२२	१२४	१२२	.५६
अफू	१५७	१४२	१२२	.५५
रंगविण्याचे व कमावण्याचे जिन्नस	११८	१११	१०८	.४९
तंबाखू	१२९	१०६	१०३	.४७
काथ्या	१०६	१०४	८८	.४०
फळें व भाजीपाले	९६	९०	७९	.३६
चारा, कोंडा, भुसा	१४४	११८	७६	.३५

१	२	३	४	५
मासळी	७८	७३	६८	.३१
अभ्रक	९०	१०३	६७	.३१
प्रोव्हिजन्स–आईलमन्स स्टोअर्स	६४	६०	४९	.२३
कोळसा व कोक	७१	७२	४९	.२२
तेलें	८६	७२	४७	.२१
सजीव प्राणी	३९	३६	२६	.१२
वाख	८७	६८	३९	.१८
केरसुण्या व ब्रश यासाठीं तंतू	२५	२	२५	.१२
पोषाखाचें सामान	१७	२४	१६	.०७
औषधें	४१	४८	२०	.०९
काटेरी केस	१५	१४	१०	.०५
दोर	१६	१४	१०	.०५
स्थापत्य–साहित्य (लोखंड पोलाद व लाकूड)यांशिवाय	१५	१४	१०	.०५
कच्चें रेशीम व रेशमी कापड	३२	३२	१०	.०४
सोरमीठ	९	८	७	.०३
मेणबत्त्यासाठीं लागणारी चरबी	७	७	७	.०३
मेणबत्त्या	९	१०	६	.०३
शिंगे वगैरे	७	७	३	.०२
साखर	५	३	२	.०१
इतर	४६७	४५४	३७१	१.६९
एकूण	३२९९०	३१०५७	२२०३०	१००

निर्यातीचें वर्गीकरण

निर्यात व्यापाराचें स्वरूप अधिक स्पष्टपणें कळण्यास पुढील कोष्टक अधिक उपयोगाचें आहे.

निर्यात (पुनर्निर्यात सोडून) आंकडे कोट रुपयांचे.

मालाचा वर्ग.	युद्धपूर्व सरासरी	शें.प्रमाण	युद्ध कालीन सरासरी	युद्धोत्तर सरासरी	२८च्या निर्यातीचें वर्गीकरण	त्याचें शें. प्रमाण
१ खाद्यपेय-तंबाखू.	६३	२८.७	५९.५	६०	६७.३	२०.३
२ कच्चा किंवा बहुतांशीं कच्चा	१०४.६	४७.६	८५	१४५.९	१७०.२	५१.५
३ पक्का किंवा बहुतांशीं पक्का	५०.६	२३	६९.४	७७.९	८९.६	२७.१
४ विविध	१.२	.७	२	२.८	३	१.१
एकंदर–	२१९.४	१००	२१५.९	२८६.६	३३०.१	१००

वरील कोष्टकावरून लक्षांत येईल कीं, हिंदुस्थानांतून अद्यापही मुख्यतः कच्चा माल रवाना होतो. युद्धपूर्व कालापासूनच्या गेल्या १५ वर्षांत कच्च्या मालाची निर्यात घटण्याऐवजीं शें. ४७.६ वरून ५१.५ वर आलेली आहे. खाद्यपेयाच्या विभागांत इ. स. १९२८–२९ सालीं चहा २६ कोट व धान्यें वगैरे ३३ कोटींचीं आहेत. पक्क्या मालाच्या निर्यातीचें प्रमाण कांहींसें भरीव दिसतें. परंतु तेवढ्यावरून हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांच्या स्थितीबद्दलचें अनुमान काढणें चुकीचें होईल. कारण त्यांत ५६ कोटींची निर्यात तागाच्या तयार मालाची आहे. व तयार कापड व कमावलेलें कातडें यांची निर्यात अनुक्रमें ९ व ७ कोटींची आहे. या निर्यातीच्या धंद्यापैकीं ताग व चहा या दोहोंची पैदास व निर्यात मुख्यतः युरोपियन कारखानदार व मळेवाले यांच्या हातीं आहे. व हिंदी लोक तेथें नुसते मजुरीचे धनी आहेत. आयातनिर्यात मालाची यादी काळजीपूर्वक पाहिली तर असें दिसून येईल कीं, येथून जाणाऱ्या बऱ्याच कच्च्या मालाचा परदेशांत पक्का माल तयार होतो. उदाहरणार्थ, बीयांतून तेल निघतें, कातड्याचे बूट होतात, तंबाखूच्या सिगारेटस् होतात. व कच्च्या कापसाचें व लोकरीचें कापड तयार होतें. यावरून हें लक्षांत येईल कीं, कच्च्या मालाची निर्यात म्हणजे त्या मालाचा पक्का माल तयार करतांना लक्षावधि लोकांची जी उपजीविका चालू शकते त्या उपजीविकेच्या साधनास हिंदुस्थान मुकतो. हिंदुस्थानांत मनुष्यबळ व सृष्ट पदार्थ हे विपुल आहेत. सृष्ट पदार्थांची विविधताही मोठी आहे. असें असून ते पदार्थ बाहेरच्या देशांत पाठवून त्यांचा पक्का माल तयार करून आणण्याचा उपक्रम या देशांत गेल्या शतकभर चालू आहे!

१५ इ. स. १९३०–३१ सालच्या निर्यात व्यापाराचें स्वरूपः—निर्यात व्यापारांतही इ. स.

१९३०–३१ सालीं बहुतेक ठिकाणीं घट आली. हिंदुस्थानच्या निर्यात मालांत तागाची निर्यात प्रमुख होय. ती इ. स. १९२९–३० सालीं ७९ कोट रु. ची होती ती १९३०–३१ सालीं ४५ कोट रुपयांवर आली. यापैकीं कच्चा ताग २७ कोटींच्या ऐवजीं १३ कोट रुपयांचा गेला. गोणपाटाचीं पोतीं २२ कोटी रुपयांच्या ऐवजीं १५ कोट रु. चीं गेलीं. व गोणपाट कापड ३० कोटींच्या ऐवजीं १७ कोट रु. चें गेलें. तागाचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक जर्मनी होय. जर्मनीनें ७४१ लक्ष रु. ऐवजीं ३५० लक्ष रु. चा ताग खरेदी केला. त्याच्या खालोखाल ग्रेट ब्रिटननें ५५६ लक्ष रु. ऐवजीं २२३ लक्ष रु. चा ताग खरेदी केला.

निर्यात व्यापारांत दुसरा महत्त्वाचा जिन्नस कापूस व कापसाचें कापड होय. इ. स. १९२९–३० सालीं ७२ कोट रु. चा कापूस व कापसाचीं वस्त्रें गेलीं. इ. स. १९३०–३१ सालीं फक्त ५१ कोटी रु. चीं गेलीं. या पैकीं कच्चा कापूस ६५ कोटी रु. च्या ऐवजीं ४६ कोट रु. चा गेला. रुपयांच्या आकड्यांत ही घट मोठी दिसत असली तरी मालांत ही घट त्या मानानें लहान आहे. गत सालीं कच्च्या कापसाचे४० लक्ष गठ्ठे हिंदुस्थानाबाहेर गेले. ते सर सालांत (१९३०–३१) ३९ लक्ष गेले. कापसाच्या गिऱ्हाइकांत जपानचा नंबर पहिला आहे. व जरी पैशाच्या भाषेंत जपाननें २७ कोट रु. ऐवजीं २१ कोट रु. चा माल खरेदी केला. (म्हणजे कमी किंमतीचा) तरी त्यानें यंदा गतसालपेक्षां थोडे अधिकच गठ्ठे विकत घेतले आहेत. जी गोष्ट जपानची तीच चीनची. किंमतीच्या भाषेंत ९ कोटींच्या ऐवजी ७ कोटींचा माल चीननें खरेदी केला. परंतु चीनकडे यंदा गेलेला माल हा गतसालापेक्षां अधिकच होता. जपान व चीन यांच्या खालोखाल हिंदुस्थानच्या कापसाचे गिऱ्हाईक इंग्लंड होय. इंग्लंडनें मात्र गतसालपेक्षां यंदा विकत घेतलेला माल केवळ पैशाच्याच दृष्टीनें नव्हे तर प्रत्यक्षही कमीच आहे. वरील तीन राष्ट्रांखेरीज इटलीनें ३७७; जर्मनीनें ३३०; बेल्जमनें २६४; फ्रान्सनें २६८ लक्षांचा माल खरेदी केला. याखेरीज थोडाबहुत कापूस अमेरिका, व नेदर्लंडस या देशांत गेला.

सन १९३०-३१ सालची एकंदर निकृष्ट स्थिति लक्षांत घेतां कापडाच्या धंद्याला हें साल बरें गेलें असें म्हटलें पाहिजे. कारण यंदा हिंदी गिरण्यांत तयार झालेला माल गतसालपेक्षां शेकडा ६ नीं अधिक आहे. या वाढीस मुख्यतः तीन कारणें आहेत. एकतर इ. स. १९२९–३० च्या अंदाजपत्रकांत जकातीच्या दरांची वाढ झाल्यानें धंद्यास उत्तेजन मिळालें. दुसरी गोष्ट म्हणजे गतसालपेक्षां सर सालांत संप वगैरेंच्या कटकटी उद्भवल्या नाहींत. व तिसरें महत्वाचें कारण म्हणजे बहिष्काराच्या चळवळीमुळें स्वदेशी गिरण्यांतील मालाचा विशेष उठाव झाला. कापडाच्या धंद्याची ही स्थिति आशाजनक असली तरी तयार कापडाची निर्यात यंदा केवळ किंमतींतच नव्हे तर मालांतही घटली हें सांगितलें पाहिजे. याचें मुख्य कारण म्हणजे पर्शिया, इराकसारख्य ठिकाणचें हिंदुस्थानचे गिऱ्हाईक पश्चिमेकडून युरोपांतील राष्ट्रें काबीज करीत आहेत हें होय

धान्यें व पीठः—निर्यात व्यापारांतील तिसरा नंबर धान्यें व पीठ यांचा आहे. किंमतीच्या दृष्टीनें ही निर्यात ३४ कोटींवरून २९ कोटींवर आली. व एक गव्हाची बाब वगळली तर बहुतेक धान्यें पूर्वीपेक्षां कमीच किंमतीची गेलीं आहेत. गहूं मात्र तेरा हजार टनांऐवजी एक लक्ष ९७ हजार टन परदेशीं गेला. त्यामुळें मालाच्या भाषेंत बोलावयाचें तर गतसालपेक्षां यंदा धान्य अधिकच गेलें असें म्हटलें पाहिजे.

चहा वगैरेः— चहाची निर्यात २६ कोटींवरून २३ कोटी ५६ लक्षांवर आली. चहाचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक ग्रेट ब्रिटन हें होय. ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानपासून २० कोट रु.चा चहा खरेदी केला. तेल काढण्याचें बीं इ. स. १९२९–३० सालीं २६ कोटी ४७ लक्ष रु. चें गेलें होतें. ते १९३०–३१ सालीं १७८६ लक्ष रु.चें गेलें. कातडी १६ कोटी रु. ऐवजीं ११ कोटींची गेलीं. लाख ६९७ लक्ष रु. ऐवजीं ३९४ लक्ष रु. चीं गेली. लोकरीची निर्यात ४४२ लक्षांवरून २५१ लक्षांवर आली. शुद्ध व अशुद्ध धातूंची निर्यात १०३३ लक्षांऐवजीं ७९४ लक्षांची झाली. अशा रीतीनें निर्यात व्यापारांत सर्वत्र घट आली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

निर्यात व्यापाराची दिशाः—पुढील कोष्टकावरून हिंदुस्थानांतून जाणाऱ्या मालांपैकीं प्रमुख माल कोणकोणत्या देशांना जातो तें कळून येईल.

हिंदुस्थानांतील व्यापारी माहितीचें पत्रक

निर्यात

(आंकडे शेंकडा–प्रमाण दर्शविणारे)

देशाचें नांव	चहा		ताग कच्चा		तागाचे कापड		कापूस कच्चा		कच्चीं व कमावलेलीं कातडीं		गळिताचीं धान्यें		धान्यें (Food grains)	
	१९१३–१४	१९२८–२९	१९१३–१४	१९२८–२९	१९१३–१४	१९२८–२९	१९१३–१४	१९२८–२९	१९१३–१४	१९२८–२९	१९१३–१४	१९२८–२९	१९१३–१४	१९२८–२९
ग्रेट ब्रिटन-आयर्लंड	७२.४	८४.०	३८.०	२३.४	६.३	४.८	३.५	६.७	२५.९	४३.८	२२.२	१४.०	२६.७	६.९
कानडा	४.३	२.६				२.७								
आस्ट्रेलिया	३.१	१.४			१०.६	१०.४								
संयुक्त संस्थानें (यू.एस.ए.)	.७	२.२	११.९	१०.६	४१.५	३५.५			२४.३	२६.७	१.२	४.०		.२
जर्मनी			२१.८	२७.७			१४.६	८.६	२०.३	१०.५	१६.०	२१.३	७.८	१.७
जपान				१.१	.५	.८	४७.२	४३.८		२.०		१.४	३.८	१.२
फरांस			९.९	१२.५						३.१	३१.४	२३.८		.३
इटली			५.५	७.०			७.७	१०.०	५.३	३.०	५.०	१४.४		१.८
बेल्जम			.५	५.९		.५	१०.३	९.३		१.२	१६.०	१.९		१.२
सीलोन	१.६	१.२										.४	११.५	२२.१
रशिया	११.२	.९												
इराण वगैरे	१.२	२.०										.२	५.६	५.१
जावा					२.५	४.१								
आरजेंटाइन रिपब्लिक				.७	१०.४	१३.३								
चीन							१.७	११.०		.३				२.४
स्पेन									२.८	१.९		.९		.९
नेदर्लंड्स									३.३	२.२	१.०	१२.५	६.८	३.९
स्टेट्स् सेटलमेंटस्										.३		१.४	६.७	८.०
वरील देशांचें व्या.चें शे.प्र.	९४.४	९४.३	८७.६	८८.९	७१.८	७२.१	८५.०	८९.४	८१.९	९५.०	९२.८	९६.२	६८.६	६५.७
एकूण व्या. (आ.कोटी.रु.)	१४.९	२६.६	३०.८	३२.२	२८.२	५६.९	४१.०	६६.२	१५.९	१८.७	२५.६	२९.६	४५.१	३३.६

खालील कोष्टकावरून कोणते देश हिंदुस्थानच्या निर्यातीपैकीं शेकडा किती माल घेतात तें कळून येईल. शेकडा प्रमाण—

देशाचें नांव	१९१३–१४	२८-२९	२९-३०
यूनायटेड किंग्डम	२३.४	२१.४	२१.९
जर्मनी	१०.६	९.६	८.३
जपान	९.१	१०.२	१०.२
अमेरिकेंतील संयु. सं.	८.७	११.८	११.६
फरांस	७.१	५.३	५.३
बेल्जम	४.८	४.०	३.८
ऑस्ट्रिया व हंगेरी	४.०		
सीलोन	३.६	४.२	४.२
पर्शिया अरेबिया व इराक एशियाटिक टर्की इत्यादि.	३.२	२.१	२.१
इटाली.	३.१	४.५	३.६
हॉन्गकॉन्ग	३.१	.७	१.०
स्ट्रेटस सेटलमेंट्स	२.७	२.४	२.५
चीन	२.३	२.८	४.१
मध्य व द. अमेरिका	२.२	३.३	३.२
नेदर्लंड्स	१.७	२.६	२.८
ऑस्ट्रेलिया	१.६	२.२	१.८
केनिया व झांझिबार	१.०	.५	.५
रशिया	.९	.१	.१
स्पेन	.८	१.२	१.१
जावा	.८	१.१	१.३

या कोष्टकावरून लक्षांत येईल कीं, हिंदुस्थानचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक अजूनही ग्रेटब्रिटन असलें तरी तें हिंदुस्थानच्या निर्यातीपैकीं, अवघा २१.९ टक्के माल घेतें. बाकीचीं ७८.१ टक्के मालाची म्हणजे तीनचतुर्थांशहून अधिक मालाचीं गिऱ्हाईकें ग्रेट ब्रिटनच्या बाहेरचीं आहेत. यांत ब्रिटिश साम्राज्यांतील ग्रेट ब्रिटनखेरीज गिऱ्हाइकें १४ टक्के माल घेतात.म्हणजे हिंदुस्थानच्या मालपैकीं ३६ (२१.९+१४) टक्के माल ब्रिटिश साम्राज्यांतील देश विकत घेतात. व जवळ जवळ शे. ६४ टक्के माल ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेरचे देश घेतात. हिंदुस्थानच्या आयात निर्यात व्यापारांत ब्रिटिश साम्राज्यांतील गिऱ्हाइकांना ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेरच्या गिऱ्हाइकांपेक्षां अधिक सवलती द्याव्या किंवा नाहीं याचा विचार करतांना हिंदुस्थानच्या मालाचा देशवार होणारा हा खप अवश्य विचारांत घेतला पाहिजे. हिंदुस्थानच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापारांत हिंदुस्थान एका इंग्लंडखेरीज इतर सर्व देशांस त्यांच्याकडून घेतलेल्या मालापेक्षां आपला माल अधिक विकतें. एक इंग्लंड मात्र हिंदुस्थानकडून कमी किंमतीचा माल विकत घेतें. हिंदुस्थानचा ब्रिटिश साम्राज्याच्या बाहेरच्या देशांशीं होणारा व्यापार अधिक आहे. इतकेंच नव्हें तर युद्धपूर्व कालापासून आतांपर्यंत त्याचें प्रमाण सावकाश पण निश्चित वाढत आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखीं आहे.

१६ परकीय व्यापाऱ्यांचें वर्चस्वः—हिंदुस्थानच्या परदेशाशीं होत असलेल्या व्यापारांत परकीय व्यापाऱ्यांचें वर्चस्व फार आहे. कलकत्त्याच्या बाजूस चहा व तागाचा व्यापार बहुतांशीं युरोपियन व्यापाऱ्यांच्या हातीं आहे. तेथें हिंदी लोक मजुरीचे मात्र धनी आहेत. मुंबईंत कापसाचा व इतर व्यापार बऱ्याच अंशीं हिंदी लोकांच्या हातीं आहे. परंतु, व्यापाराचीं सर्व साधनें परदेशी लोकांच्या ताब्यांत आहेत. उदाहरणार्थ, मालाची ने-आण परदेशी कंपन्यांच्या परदेशी जहाजांतून होते. परदेशीं जाणाऱ्या मालाचा विमा उतरणाऱ्या कंपन्या परदेशी आहेत. या व्यापारांत हुंड्या पटविण्याचा धंदा करणाऱ्या बँका परदेशी आहेत. किंबहुना हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर एका बंदराहून दुसऱ्या बंदराकडे जाणारा येणारा माल बहुतांशीं परदेशी कंपन्यांचीं जहाजें नेतात व आणतात. सारांश, परदेशाशीं होणाऱ्या व्यापारासाठीं बँका,विमाकंपन्या, वहातुकीचीं साधनें यांची जीं संघटना लागते ती सर्वस्वीं परकीय व्यापाऱ्यांची असल्यानें हिंदी व्यापाऱ्यांना फारच अडचण भासते. ही परकीय व्यापाराची संघटना मुंबईसारख्या नुसत्या प्रमुख बंदरावरच आहे असें नाहीं, तर परकीय कंपन्यांचे एजंट हिंदुस्थानांत दूरवर जिल्ह्याचे ठिकाणीं आपल्या शाखा स्थापन करतात व केव्हां केव्हां शेतकऱ्यांना आगाऊ रकमा देऊन त्यांना आपला माल नेण्याविषयीं बांधून घेतात. अशा स्थितींत हिंदी लोकांच्या हातीं मजुरी व तिचा मोबदला याखेरीज कांहीं रहात नाहीं.

१७. पुनर्निर्यात व्यापारः—एका देशाहून माल मागवून दुसऱ्या देशास तो पाठविणें. याला पुनर्निर्यात व्यापार असें म्हणतात. इंग्रजींत याला सुटसुटीत शब्द नाहीं. जो माल या पद्धतीनें देशांतून पाठविला जातो त्याला इंग्रजींत री–एक्सपोर्ट असें म्हणतात. चीनमधील व्यापाऱ्यास इंग्लंडहून यंत्रें मागवावयाचीं असल्यास त्याला मुंबईच्या दलालामार्फत तीं विकत घेणें सोईचें जातें. कारण हिंदुस्थान

व इंग्लंड यांचे आणि हिंदुस्थान व चीन यांचें एकमेकांशीं जितकें दळणवळण असूं शकतें, तितकें कदाचित इंग्लंड व चीन यांचें नसेल. त्यामुळें मुंबईच्या व्यापाऱ्यास आपल्या इतर मालाबरोबर चीनच्या गिऱ्हाइकाचीं यंत्रें मागवून तीं चीनकडे जाणाऱ्या इतर मालाबरोबर पाठविणें सोईचें पडतें. तसेंच ज्या राष्ट्रांना समुद्र-किनारा नसेल, अशा राष्ट्रांना परदेशचा माल खुष्कीनें आणण्यापेक्षां जवळच्या देशांतील बंदरांतून आणविणें स्वस्त पडतें. यासाठीं अफगाणिस्थान, नेपाळ यांसारख्या देशांना हिंदुस्थानच्या कराची, कलकत्ता बंदरावाटे आपल्या मालाची नेआण करणें सोयीचें असतें. हिंदुस्थानचा पुर्ननिर्यात व्यापार मुख्यतः चीन, अफगाणिस्थान, इराण, इंग्लंड व अमेरिका या देशांशीं आहे. इंग्लंडमधील कापड इराण व पूर्व आफ्रिकेंत जातें. खुष्कीच्या मार्गानें सरहद्दीवरून येणारी लोंकर इंग्लंडला जाते. बेहरीन बेटांतील मोती विलायतेंत जातात. पुर्ननिर्यात व्यापारांत कोणकोणत्या जिनसांची निर्यात होते तें पुढील कोष्टकावरून कळेल.

पुर्ननिर्यात व्यापाराचे आकडे

(आकडे हजार रुपयांचे आहेत)

जिन्नस	युद्धपूर्व सरासरी	१९२८-२९
लोकर व लोकरीचें सामान	४६६६	१८५३६
कातडी		१५३०२
कच्चा कापूस	१४	८६८
कापसाचा माल	१५७५१	८८६९
चीक व धूप	१०५४	३३८१
लोखंडी सामान	१३८९	२७६२
धातु (शुद्ध अशुद्ध)	२००५	२७१४
साखर	५२९५	२३३५
वेषभूषा साधनें	१५८९	१६२५
फळें भाज्या	१३११	१३९५
सुया सूत गुंड्या गोंडे व.		७७६
रेशीम कच्चें पक्कें.	८२६	४००
इतर वस्तु	१२२८८	१९३७३
एकंदर	४६१८८	७८३३६

अलीकडील वर्षाचे आंकडे.

इ. स. १९२९–३०	रु. ७१३ लक्ष सुमारें
इ. स. १९३०–३१	५१५ लक्ष
इ. स. १९३१–३२	४६६ लक्ष

इ. स. १८८२–८३ सालीं पुर्ननिर्यात व्यापार ५–८ कोटींचा होता. तो इ. स. १९२०–२१ सालीं १८.०४ कोटींपर्यंत वाढला. व तेव्हांपासून तो पुढें पुढें कमी होत गेला. अलीकडील वर्षांत तर तो आणखीच कमी होत आहे. एकंदरींत ज्या देशांना समुद्रकिनारा नाहीं त्या देशांसाठीं पुर्ननिर्यात व्यापार चालूं राहील. पुनर्निर्यात व्यापार चालूं राहील हें खरें असलें तरी दिवसेंदिवस प्रत्येक देशाचे इतराशीं थेट संबंध राखण्याची व वाढविण्याची प्रवृत्ति वाढत आहे. हें लक्षांत घेतां हा व्यापार दिवसेंदिवस कमी होत जाईल. मात्र या ठिकाणीं मुद्दाम यत्न करून आशियांतील देशांसाठीं व्यापाराचें केंद्र तयार केलें व पुर्ननियात व्यापाराच्या सुखसोई वाढविल्या तर हिंदुस्थानच्या आयात निर्यात मालावरील बंधनांचा उपद्रव त्या व्यापाऱ्यांस न झाला तर मुंबई हें आशियाचें व्यापाराचें केंद्र होण्याची आशा आहे. हिंदुस्थान हें आशियाच्या मध्यभागीं आहे हें लक्षांत घेतां हिंदुस्थानला हें अशक्य नाहीं. सहेतुक यत्न करणारें सरकार पाहिजे.

१८ सरहद्दीवरील व्यापार––हिंदुस्थानला वायव्य व ईशान्य दिशेला जमिनीची सरहद्द सुमारें ६००० मैलांची आहे. परंतु सर्व प्रदेश डोंगराळ असल्यामुळें व्यापाराच्या दळणवळणाचे मार्ग तुरळक आहेत. हिंदुस्थानच्या समुद्रमार्गानें होणाऱ्या व्यापारापेक्षां हा व्यापार अगदींच लहान आहे. मुख्यतः अफगाणिस्थान, इराण, मध्य आशिया, नेपाळ, तिबेट, शान संस्थानें, सयाम इत्यादि देशांशीं हा व्यापार होतो. अफगाणिस्थानांतून काजू, फळें, व लोंकर येते. ताग, तेलाचें बीं, जनावरें वगैरे नेपाळमधून येतात. गहूं, डाळी, तांदूळ इतर देशाहून येतात. हिंदुस्थानांतून बाहेर देशी विदेशी कापड, चहा, कातड्याचें जिन्नस, रेशमी कापड वगैरे पदार्थ जातात. हा सरहद्दीवरील खुष्कीचा व्यापार, वाढत्या प्रमाणावर होत आहे व हिंदुस्थानांत जसजसे अनेक धंदे मूळ धरूं लागतील तसतशी ह्या व्यापाराची वाढ करण्यास पुष्कळ जागा आहे.

सरहद्दीवरील खुष्कीच्या मार्गानें चालू असलेल्या व्यापाराचें स्वरूप पुढील कोष्टकावरून कळून येईल. (आकडे कोट रुपयांचे आहेत)

	१९१६-१७	१८–१९	२०–२१	२४–२५
आयात	१२·८१	१५·९६	१८·१६	२३· ८
निर्यात	१०·३४	१४·८७	१५·८१	१८·७३
एकंदर	२३·३५	३०·८३	३३·९७	४१·८१

(यांत सोन्याचांदीच्या आयात–निर्यातीचे आंकडे आहेत.)

इ. स. १९२४–२५ पासून सरकार सरहद्दीवरील सर्व व्यापाराची नोंद ठेवीत नाहीं. ठळक वस्तूंची ये–जा किती होते एवढेंच पहातें.यामुळें पुढील आकडे कळण्यास साधन नाहीं.

१९. किनाऱ्यावरील व्यापारः––हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील एका बंदराहून दुसऱ्या बंदराकडे होणाऱ्या व्यापाराला किनाऱ्यावरील व्यापार म्हणतात. हा वास्तविक अंतर्गत व्यापारच होय. ब्रम्हदेशाशीं हिंदुस्थानचा होणारा बराचसा व्यापार समुद्र मार्गानें होतो. ब्रम्हदेशांतून हिंदुस्थानांत तांदूळ, साग, इमारतीचें लांकूड, रॉकेल, पेट्रोल, वगैरे जिन्नस येतात. व कापड, गोणपाट कोळसा वगैरे जिन्नस हिंदुस्थानांतून ब्रम्हदेशांत जातात. ब्रम्हदेश वेगळा झाल्यास हा सर्व व्यापार परदेशाशीं होणाराव्यापार म्हणून मोजावा लागेल. किनाऱ्यावरील मालाची वाहतुक सर्वस्वीं हिंदी जहाजांच्या कंपन्यांकडे असावी असा आग्रह धरणारें बिल मि. हाजी यांनीं गेल्या असेंब्लींत आणलें होतें. चालू असेंब्लींत (१९३०–३३) मि. हाजी हे निवडून न आल्यामुळें तो प्रश्न अजून धसास लागलेला नाहीं. किनाऱ्यावरील आयात–निर्यात व्यापाराचे आकडे पुढें दिले आहेत. त्यांत निर्यात व्यापारापेक्षां आयात व्यापाराचा आकडा मोठा असण्याचें कारण आयात व्यापाराच्या किंमतींत वाहतुकीचा खर्च जमा केलेला असतो. आजचा हा किनाऱ्यावरील आयात–निर्यात व्यापार सुमारें २०० हून अधिक कोट रुपयांचा आहे. हें पुढील कोष्टकावरून आढळून येईल.

किनाऱ्यावरील आयात–निर्यात व्यापार

	१९२८–२९	१९२९–३०
आयात		
खाजगी व्यापारी माल		
हिंदुस्थानांतील	९८७८९०	९१८३७७
परदेशांतील	८२९२८	१०३२८०
गव्हर्मेंट स्टोअर्स		
हिंदुस्थानांतील	८२०८	८७३४
परदेशांतील	४४४८	३९२८
एकंदर व्यापारी माल	१०८३४७४	१०३४३१९
ट्रेझर	१६८८१	१७८७६
एकूण आयात माल	११००३५५	१०५२१९५
निर्यात		
खाजगी व्या.माल		
हिंदुस्थानांतील	८५२०९४	८२६८५०
परदेशांतील (विदेशी)	११२०१४	१२६४७२
गव्हर्मेंट स्टोअर्स		
हिंदुस्थानांतील	५००६	८१७०
विदेशी	४८४३	३४९३
एकंदर व्यापारी माल	९७३९५७	९६४९८५
ट्रेझर	१८६१९	१५३५९
एकंदर निर्यात	९९२५७६	९८०३४४
एकंदर व्यापार	२०९२९३१	२०३२५३९

२० किनाऱ्यावरील बंदरांची आपसांतील चढाओढ––

हिंदुस्थानच्या आठ मुख्य बंदरांतून होत असलेल्या व्यापाराचे आकडे पुढें दिले आहेत. त्यावरून लक्षांत येईल कीं, सर्वच बंदरांतील व्यापार हलके हलके वाढत आहे. मुंबई बंदरांतील व्यापार युद्धपूर्व कालापासून आतांपर्यंत शेकडा ४५.५ या प्रमाणांत व कराची बंदरांतील ४०.४ या प्रमाणांत वाढला आहे. यावरून अलिकडे राजकीय अस्वास्थ्यामुळें मुंबई बंदरांतून व्यापाराचें वळण हटत जाऊन तें कराचीकडे जात आहे ही ओरड खरी नाहीं हें लक्षांत येईल.

आठ मुख्य बंदरांतील एकंदर व्यापार
(आकडे लक्ष रुपयांचे आहेत.)

	लढाई पूर्व वा. सरासरी	लढाई वेळीं वा. सरासरी	१९२८–२९	१९२९–३०
मुंबई	१४५४५	१५८३७	२२२९१	२११६३
कलकत्ता	१५९७८	१६२५०	२६०२२	२४०२३
रंगून	४८९६	५१५४	९०७७	९४१९
कराची	४७८७	४६८८	७४४६	६६४७
मद्रास	१९६१	२११५	५२०३	५०६३
कोचीन	६२८	५६०	१२००	१११४
तुतिकोरिन	७२३	७५५	११८७	११६०
चित्तागांग	७४७	६९३	१५२०	१२९२

संस्थानच्या हद्दींतील बंदरें व ब्रि. हिं. च्या हद्दींतील बंदरें यांच्यांत अनिष्ट चढाओढ होऊं लागल्यास ती कशी टाळावी हा ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांच्यांतील गुंतागुंतीचा एक प्रश्न आहे.

२१ जकातीचे चालू दरः––हिंदुस्थानच्या आयात मालाचे सामान्यतः चार वर्ग करण्यांत येतात. ते पुढीलप्रमाणें:––(१) खाद्य, पेय व तंबाखू. (२) कच्चा माल. (३) पक्का माल. (४) विविध. यांपैकीं पहिल्या वर्गावर जकातीचा

दर सामान्यतः शें. २५ टक्के आहे. परंतु दारूच्या आयातीवर निरनिराळ्या प्रकारांप्रमाणें निरनिराळे दर आहेत. एलबिअरवर दर गॅलनास पंधरा आणे, डिनेचर्ड स्पिरिट (स्टोव्ह पेटविण्यास लागणारें)वर शें.नऊ पूर्णांक तीन अष्टमांश, भारी जातीच्या ब्रँडीवर दर गॅलनास ३७॥ रु. सुवासिक स्पिरिटवर दर गॅलनास ६० रु. व हलक्या जातीच्या दारूच्या दोन प्रकारांवर दर ग्यालनास तेरा रुपये दोन आणे. व सात रुपये आठ आणे. याप्रमाणें जकाती आहेत. मसाल्याच्या पदार्थांवर ३७॥ टक्के जकात आहे. साखरेवर दर हंड्रेडवेटास ९ रु. १ आ. व सर्व हलक्या जातीच्या साखरेवर ३१। टक्के व दर हंड्रेडवेटास ३ रु. ७ आ. जकात आहे. Molasses वर ३१। टक्के जकात आहे. परदेशी मिठाच्या आयातीवर मुळींच जकात नाहीं. ती लादण्याचा विचार असेंब्लीच्या १९३२ च्या अधिवेशनांत चालू आहे. सिगारेटसच्या आयातीवर ११२॥ टक्के जकात आहे. कच्च्या तंबाखूवर दर पौंडास १ रु. १४ आणे व पक्या तंबाखूवर ३ रु. १२ आणे जकात आहे. आयात मालाचा दुसरा वर्ग कच्च्या मालाचा होय. यावरही सामान्यतः शें. २५ जकात आहे. त्यांत अपवाद म्हणजे जुनें लोखंड अगर पोलाद यांच्या आयातीवर १५ पूर्णांक पांचअष्टमांश टक्के जकात आहे. केरोसीनवर दर ग्यालनास ३ आ. ९ पै व मोटार स्पिरिटवर दर ग्यालनास १० आणे जकात आहे. रबर, कातडें कमावण्याच्या साली, लोंकर, सर्व प्रकारचीं खतें व कागद तयार करण्यास लागणारा लाकडाचा रंधा, हे जिन्नस जकातीवांचून येतात. कच्च्या कापसावर दरपौंडास ६ पै जकात आहे. आंबाडीवर १८॥। टक्के जकात आहे. सरपणावर अडीच टक्के जकात आहे. एकंदरींत कच्च्या मालावर जकात लादल्यानें पक्का माल तयार करण्याच्या चढाओढींत इतर देशांबरोबर टिकाव लागत नाहीं. हें लक्षांत घेतां हे जकातीचे दर देशांतील उद्योगधंद्यांस अनिष्टच आहेत असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. आयात मालाचा तिसरा वर्ग व सर्वांत मोठा वर्ग हा पक्या मालाचा होय. ह्याच्या संबंधीं सर्वमान्य असा कोणताही दर सांगतां येत नाहीं. तरीपण बहुतेक पदार्थांवर गेला बाजार शें. २५ जकात आहेच आहे. बुटाच्या आयातीवर २५ टक्के किंवा दर जोडीस पांच आणे यांपैकीं जी भारी असेल ती जकात लादण्यांत येते. बंदुका वगैरे शस्त्रांच्या व त्यास लागणाऱ्या हरएक कप्रारच्या यंत्रांच्या आयातीवर शेकडा ५० जकात आहे. परंतु बादशहाच्या सैन्यांत दाखल झालेले शिपाई हिंदुस्थानांत येतांना त्यांनीं आपलीं आवश्यक तेवढीं आयुधें म्हणून आणलेल्या बंदुका, प्लेग प्रतिबंधक सिरस, सिंकोना व कोयनेल, शेतकीच्याउपयोगाचीं लोखंडी हत्यारें डेअरीसाठीं व कोंबड्यांच्या पैदासीसाठीं लागणारे विविध जिन्नस यांवर जकात पडत नाहीं. कापरावर ५० टक्के, अफूवर दर शेरास३० रु. किंवा शें. १८॥। यापैकीं भारी असेल ती, सर्व प्रकारचीं रासायनिक औषधें यावर पंचवीस टक्के अशी जकात आहे. सर्व प्रकारच्या लोखंडी मालाच्या आयातीवर दोन प्रकारचे दर दिसतात. ब्रिटिश मालावर हलका व ब्रिटिशेतर मालावर भारी. उदाहरणार्थ, छोट्या रुळावरून माल वाहून नेणाऱ्या गाड्यांच्या आयातीवर ब्रिटिश मालावर दर टनास सव्वीस रुपये चार आणे व ब्रिटिशेतर मालावर दर टनास ४५ रु. जकात आहे. इमारतीस लागणाऱ्या लोखंडी कमानीवरही तोच दर आहे. लोखंडी गजांवर ब्रिटिश मालावर दर टनास ३२ रु. ८ आणे व ब्रिटिशेतर मालावर ४६ रु. ४ आणे, पोलादावर ब्रि. मा. वर २६ रु. ४ आणे व ब्रि. इतर मालावर ४५ रु., पोलादाच्या तुळ्या, पत्रें वगैरेसारख्या सर्व प्रकारच्या तयार मालावरही याचप्रमाणें दोन भिन्न प्रकारच्या जकाती आहेत. जेथें जेथें दर टनास २६रु. ४ आणे हा दर सांगितलेला आहे तेथें तेथें जकातीचा दर किमतीच्या २१। टक्के तरी असावा असा निर्बंध आहे. लोखंडी रुळावर दर टनास ब्रि. मा. वर ३२ रु. ८ आणे व ब्रि. इतर मालावर ४६ रु. ४ आणे जकात आहे. रेल्वेसाठीं लागणाऱ्या इतर उपयुक्त मालावर दर टनास ब्रि. मालावर ३६ रु. ४ आणे व ब्रि. इतर मालावर ५१ रु. ४ आणे असे दर आहेत. घड्याळांच्या आयातीवर, विजेच्या दिव्यांच्या गोळ्यांवर, वाद्यांवर शें. ५० जकात आहे. सर्व प्रकारच्या रंगांवर शें. १०टक्के जकात आहे.सर्व प्रकारच्या यंत्रांवर सामान्यतः१०टक्के जकातआहे. खिळ्यांवर व भट्टींतून काढलेल्या लोखंडावर सामान्यतः १५पूर्णांक पांच अष्टमांश टक्के जकात आहे. किंबहुना असेंही म्हणण्यास हरकत नाहीं कीं, जेथें संरक्षक जकातींचा प्रश्न नाहीं अशा सर्व प्रकारच्या लोखंडी व पोलादी मालावर

१५ पूर्णांक पांचअष्टमांश टक्के जकात आहे. सोन्याच्या आयातीवर जकात नाहीं. चांदीच्या आयातीवर दर औंसास ७ आणे ६ पै जकात आहे. जरावर (सिल्व्हर थ्रेड) ६२॥ टक्के व सोन्या–चांदीच्या हरएक वस्तूवर शे. ५० टक्के जकात आहे. इतर धातू व त्यांचे पदार्थ यांवर शे. २५ जकात आहे. कागदावर शे. २५ जकात आहे. कापडाच्या आयातीवरही ब्रिटिश मालावर व ब्रि. इतर मालावर हलक्या भारी अशा जकाती दोन आहेत. तयार कापडावर ब्रि. मालावर २५ टक्के व ब्रि. इतर मालावर ३१। टक्के जकात आहे. कृत्रिम रेशमावर १८।।। टक्के, सुतावर सामान्यतः २५ टक्के, रेशमी तयार मालावर ५० टक्के बांगड्यांवर ५० टक्के याप्रमाणें जकात आहे. विमानांवर २॥ टक्के जकात आहे. सर्व प्रकारचीं कलेचीं चित्रें व फोटो,तसेंच छापलेलीं पुस्तकें, हीं जकातीवांचून येतात. सिनेमा फिल्म्सपैकीं नॉट एक्स्पोज्डवर २५ टक्के व एक्सपोज्ड वर ३७॥ टक्के जकात आहे. हस्तीदंती तयार मालावर व रत्नांवर ५० टक्के जकात आहे. काडयाच्या पेटयांवर दर ग्रोसास १ रु. १४ आणे जकात आहे. छापण्याच्या शाईवर शे. १० टक्के, टायपावर दर पौंडास १ आणा ३पै व लेडा वगैरे सामानावर शे. २॥ टक्के जकात आहे. रबर टायर्स व साबण यांवर २५ टक्के व सर्व प्रकारच्या पत्त्यांसारख्या खेळाच्या पदार्थांवर ५० टक्के जकात आहे. आयात मालापैकीं, चौथा व शेवटचा वर्ग विविध मालाचा होय. यांपैकीं जिवंत प्राणी जकातीवांचून येतात. सुपाऱ्यांच्या आयातीवर ३७॥ टक्के व जकातीच्या यादीमध्यें अंतर्भाव न केलेले सर्व पदार्थ यांवर २५ टक्के जकात आहे. निर्यात व्यापारावर फारशी जकात लादण्याचा प्रकार नाहीं. कारण त्या योगानें देशांतील व्यापाऱ्यास परदेशचें गिऱ्हाईक मिळविण्यास अडचण उत्पन्न होते. निर्यात मालावर ठेवलीच तर वसूलउत्पन्नासाठीं अगदीं हलकी जकात लादली जाते. जेव्हां देशांतील विशिष्ट प्रकारचा कच्चा माल स्वदेशांतील उद्योगधंद्यास उपयोगी पडावा असा उद्देश असतो, तेव्हां मात्र अशा प्रकारच्या निर्यात मालावर भारी जकात लादतात. हिंदुस्थानांत निर्यात मालावरील जकातीचा दर सामान्यतः शे. ५ टक्के आहे. तांदुळावर दरमणीं २ आणे ३ पै, व पोत्यांवर दर टनास २० रु. व तागाच्या इतर तयार मालावर दर टनास ३२ रु. कच्च्या तागाच्या दोन प्रकारांवर दर ४०० पौंडांच्या गठ्यास अनुक्रमें १ रु. ४ आणे व ४ रु. ८ आणे असे जकातीचे दर आहेत. तागाच्या मालाची निर्यात करणारा हिंदुस्थान हा जवळजवळ एकच देश असल्यानें त्याच्या निर्यातीवरील दर अमळ भारी असले तरी व्यापारास प्रतिबंधक होत नाहींत.

२२ परदेशी व्यापाराची संघटनाः—जपान सारख्या राष्ट्राचा हिंदुस्थानशीं व्यापार प्रारंभीं अगदीं लहान प्रमाणावर असतां आज तो पुष्कळच वाढला आहे, याचें एक प्रमुख कारण त्या देशानें त्या दृष्टीनें बुद्धिपुरस्सर यत्न केला आहे हें होय. ज्या देशाशीं व्यापार वाढविणें असेल त्या देशांत आपले एजंट पाठवून तेथें काय खपेल याची बारकाईनें पाहणी करावी लागते. जे जे देश आज हिंदुस्थानशीं व्यापार करीत आहेत त्यांचे कॉन्सल्स या देशांत वास्तव्य करून आहेत. व ते आपापल्या देशांना हवी असलेली माहिती मिळवून मोठ्या तत्परतेनें पुरवीत असतात. हिंदुस्थान या बाबतींत इतर देशांच्या फार मागें आहे. हिंदुस्थान सरकारचें व्यापारी खातें लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींत इ. स. १९०५ सालीं अस्तित्वांत आलें. परंतु इ. स. १९२२ पर्यंत हिंदी व्यापाऱ्यांस एकादी माहिती लागल्यास ती पुरविण्याच्या कामीं त्याचा फारसा उपयोग होत नसे. इ. स. १९२२ सालीं व्यापारी बातम्या व व्यापारी आकडे यांची माहिती पुरविणारे एक स्वतंत्र खातें उघडण्यांत आलें. त्या खात्याकडून इंडियन ट्रेड जर्नल नांवाचें साप्ताहिक चालविलें जातें. व व्यापाऱ्यांनीं विचारलेल्या प्रश्नांची माहिती पुरविली जाते. इ. स. १९२६ सालीं लंडन येथील इंडियन ट्रेड कमिशनरच्या मदतीस ट्रेड पब्लिसिटी ऑफिसरची नेमणूक झाली आहे. व त्याच्यामार्फत इंग्लंडमध्यें व युरोपांत जेथें जेथें प्रदर्शनें भरतील तेथें तेथें हिंदी माल ठेवण्याची व्यवस्था केली जाते. हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी खात्याचें लक्ष मुख्यतः हिंदुस्थानच्या बाजारांत कोणत्या मालास मागणी आहे इकडे आहे. व त्यासाठीं ब्रिटन ट्रेड कमिशनर्सचें व त्यांचें बरेंच सहकार्य आहे. यापुढें हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी खात्याचें लक्ष हिंदी मालास बाहेरदेशीं कोणत्या कोणत्या पेठा आहेत, हेंही शोधून काढण्याकडे लागलें पाहिजे. इ. स. १९२९ सालीं हिंदुस्थान सरकारनें हिंदी कापडास बाहेर देशीं कितपत मागणी येऊं शकेल

हें पाहाण्यासाठीं पूर्वेकडील प्रदेश व आफ्रिका या भागांत एक शिष्टमंडळ पाठविलें होतें. या शिष्टमंडळानें लेव्हांट व दक्षिण आफ्रिका या देशांत हिंदी कापडास बरीच मागणी येईल असा आपला अभिप्राय दिला. अशाच प्रकारानें आणखी व्यापारी शिष्ट–मंडळें ठिकठिकाणीं पाठविणें जरूर आहे. तसेंच निरनिराळ्या देशांत आपले व्यापारी कॉन्सल्स ठेवण्याची आवश्यकता दिवसेंदिवस हिंदुस्थान सरकारास पटत आहे. इ. स. १९३१च्या मार्च महिन्यांत मि. एस. एन. गुप्त यांच्या नेतृत्वाखालीं हँबुर्ग (जर्मनी) येथें हिंदी व्यापारी केंद्र उघडण्यांत आलें आहे. आर्थिक अडचणीमुळें अशींच अनेक व्यापारी केंद्रें उघडण्याचें काम तूर्त पुढें ढकलण्यांत आलेलें आहे. खुद्द देशांतल्या देशांत हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी धोरणावर जागती नजर ठेवणाऱ्या व आपलें संघटित व्यापारी धोरण आंखणाऱ्या बऱ्याच व्यापारी संस्था आहेत. त्यांत इंडियन मर्चंट्स चेंबर ऑफ कॉमर्स मुंबई ही मुख्यतः हिंदी व्यापाऱ्यांची संस्था, ॲसोशिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स कलकत्ता, ही मुख्यतः युरोपियन व्यापाऱ्यांची संस्था या प्रमुख आहेत. मुंबईखेरीज मद्रास, कलकत्ता रंगून, कराची इत्यादि ठिकाणींही चेंबर ऑफ कॉमर्स या नांवाच्या संस्था आहेत. सर्व महाराष्ट्रासाठीं महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ही संस्था अस्तित्वांत आली आहे. या व्यापारी संस्था स्वतःच्या व्यापारी संघटनाकडे लक्ष देतात. व सरकारच्या व्यापारी धोरणावर वेळोवेळीं चांगलें लक्ष ठेवून अनुकूल प्रतिकूल टीका करतात. महाराष्ट्रांतील व्यापाराच्या उन्नतीसाठीं (गेल्या १५ वर्षांत) मधून मधून महाराष्ट्र व्यापारी परिषद भरत असते. पूर्वीं राष्ट्रीय सभेबरोबर इंडियन इंडस्ट्रिअल कॉन्ग्रेस भरत असे. ती बंद पडली आहे.

२३ एक अब्ज सुवर्ण–निर्यातीची मीमांसा–हिंदुस्थानच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापारांत आयातीपेक्षां सामान्यतः प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आयातीची किंमत वजा जाऊन निव्वळ अधिक निर्यातीबद्दल देशांत दरसाल सोन्याची आयात होत असे. या आयातीचें नेमकें स्वरूप लक्षांत येण्यास हिंदुस्थानांत १९०० सालापासून आजपर्यंत सोन्याचांदीची कसकशी आयात–निर्यात झाली तें पुढील कोष्टकांत पाहिल्यानें कळण्यासारखें आहे.

१९००–०१ ते १९३१–३२ पर्यंतची दर वर्षीची सोन्याची व चांदीची एकूण आयात व निर्यात
(किंमत, हजार रुपयांच्या आंकड्यांत)

	सोनें		चांदी	
	आयात	निर्यात	आयात	निर्यात
१९००–०१	११,८९,८०	११,०५,५९	१२,६७,८७	३,१७,१५
१९०१–०२	८,३०,७५	६,३६,९९	१२,२९,३८	५,१०,१०
१९०२–०३	१३,१९,२४	४,४३,७८	१२,१८,६५	५,२२,९८
१९०३–०४	२०,१४,७९	१०,२१,६२	१८,३७,८२	४,८२,७७
१९०४–०५	२१,८१,२०	१२,१०,६१	१७,६९,६२	४,३२,२७
१९०५–०६	१४,७५,९०	१४,२९,१०	१६,९०,२०	१,१७,९०
१९०६–०७	१८,५३,३४	३,६७,७३	२६,०४,६४	२,०४,०९
१९०७–०८	२०,७५,२६	३,३८,४९	२१,५३,१९	२,०६,३६
१९०८–०९	८,४०,४२	४,०४,८८	१४,३४,००	२,२७,१५
१९०९–१०	२५,०३,१०	३,१५,१७	१२,४९,२५	३,०४,७५
१९१०–११	२७,८९,२५	३,९१,३९	११,८४,३४	३,२१,३१
१९११–१२	४१,४९,३६	३,७३,३८	११,९७,७२	२,१८,०३
१९१२–१३	४१,२९,०८	७,२८,९६	२०,५४,१०	३,३४,२२
१९१३–१४	२८,२२,६४	४,९०,२६	१५,२१,३२	२,१८,०३
१९१४–१५	१०,७०,३८	३,०५,६४	११,१०,४५	२,२३,३०
१९१५–१६	५,२८,१७	६,३९,०८	६,६६,४६	१,८३,५०
१९१६–१७	१३,३३,७९	१०,२५	२५,११,४८	६,३१,४७
१९१७–१८	२९,०९,४९	३,९१,६३	२२,६६,९४	३,६२,७६

	सोनें		चांदीं	
	आयात	निर्यात	आयात	निर्यात
१९१८–१९	२,२७,६३	७,८४,००	६९,०८,९२	१,१७,०२
१९१९–२०	४८,२५,१६	१२,९२,१३	२९,९८,७३	७५,८४
१९२०–२१	२३,५७,३८	२१,४६,५६	११,११,८२	४,७०,५७
१९२१–२२	१३,८२,०४	१६,४८,४९	१७,४७,८६	२,३८,२४
१९२२–२३	४१,३२,३९	१३,३१	२०,९४,३३	२,५८,८६
१९२३–२४	२०,२५,३१	६,३८	२२,१०,२७	३,४०,४७
१९२४–२५	७४,२८,९८	३६,३२	२४,२८,०७	४,२०,६७
१९२५–२६	३५,२२,९९	३७,५४	१९,८९,७०	२,७७,२९
१९२६–२७	१९,५०,१२	१०,०७	२१,७६,३४	१,८९,५४
१९२७–२८	१८,१३,३४	३,४४	१६,४७,३७	२,६३,६९
१९२८–२९	२१,२१,९०	२,०३	१५,९२,१८	६,१५,११
१९२९–३०	१४,२३,११	१,०३	१३,४१,९१	४,७९,७९
१९३०–३१	१३,२४,६६	४९,३४	१३,४६,६३	३,३८,७०
१९३१–३२	२,७९,९५	६०,७७,२३	४,६२,६४	४,८४,८१

वरील कोष्टकावरून लक्षांत येईल कीं, हिंदुस्थानच्या बाबतींत सामान्यत: सोन्याच्या निर्यातीपेक्षां आयात अधिक असे. असें असतां २१ सप्टेंबर १९३१ पासून म्हणजे हिंदुस्थानांतील रुपया ह्या चलनाचा सोन्याशीं ठराविक दरानें असलेला संबंध तोडून स्टर्लिंगशीं जोडण्यांत आल्या दिवसापासून हिंदुस्थानांतून दर आठवड्यास सोन्याचा प्रवाह वाढत्या प्रमाणावर परदेशीं (इंग्लंडकडे) जात आहे. इ. स. १९३२ सालचा मालाच्या निर्यातीचा हंगाम सुरू झाला म्हणजे ह्या बाहेर वाहणाऱ्या प्रवाहास आळा बसेल अशी जी अपेक्षा होती तीही चुकीची ठरली आहे. २१ डिसेंबर १९३१ पासून डिसेंबर १९३२ च्या दरम्यान तिसऱ्या आठवड्यापर्यंत सोन्याची निर्यात १ अब्जापर्यंत येऊन ठेपली आहे.या निर्यातीची चलनविषयक कारणमीमांसा व परिणाम ह्याचा विचार करण्याचे बाजूस ठेवून व्यापाराच्या दृष्टीनें विचार केल्यास असें म्हणावेसें वाटतें कीं,हिंदुस्थानांत होणाऱ्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयातीची किंमत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्यातीच्या रूपानें द्यावी लागते. जेव्हां आयातीच्या मोबदल्यांत बाहेरचे देश हिंदुस्थानचा माल विकत घेण्यास कोणत्याहि कारणानें असमर्थ किंवा नाखूष असतात तेव्हां प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयातीची किंमत सोन्याच्या रूपानें त्यांना द्यावी लागणार हें उघडच आहे. एकीकडे धान्य कच्चा माल यांचे भाव बेसुमार उतरल्यामुळें व दुसरीकडे होमचार्जेस, परदेशाकडे जाणाऱ्या किंवा तेथून येणाऱ्या मालाच्या वाहतुकीचा खर्च इत्यादि अनेक अप्रत्यक्ष आयातीच्या बाबींवर होणारा खर्च तेवढाच राहिल्यामुळें किंवा त्यांत काटकसर करतां न आल्यानें त्याची किंमत परक्या व्यापाऱ्यास पटेल अशा स्वरूपांत द्यावी लागली. वर सांगितलेलें स्पष्टीकरण हें केवळ तात्त्विक स्वरूपाचें नाहीं. प्रत्यक्ष व्यवहारहीं त्याच स्वरूपाचा झालेला आढळून येईल. इ. स. १९३१–३२ ह्या वर्षांत मालाची निर्यात आयातीपेक्षां २९५५ लक्ष रुपयांची अधिक झाली पण एवढे पैसे अप्रत्यक्ष निर्यातीची किंमत देण्यास पुरेसे न झाल्यामुळें ५७९७ लक्ष रुपये किंमतीच्या सोन्याची या देशांतून निव्वळ निर्यात झाली. अर्थात्‌च हा सुवर्ण–ओघ थांबविण्यास इतर उपायाबरोबरच एक मुख्य उपाय परदेशांतून होणाऱ्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयातीचा खप कमी केला पाहिजे व शक्य त्या उपायांनीं निर्यात व्यापारास जोराची चालना मिळाली पाहिजे हें उघड आहे.

हिंदी आरमार खातें

हिंदी हुजुराती आरमार खात्यांतील सनदी अधिकाऱ्यांची उमेदवार–भरती, शिक्षण, पगार वगैरे संबंधींचे नियम–

प्रास्ताविक हिंदी आरमाराची लष्करी पद्धती-वर पुनर्घटना करतेवेळीं सनदी अधिकाऱ्यांच्या जागांत एकतृतीयांश जागा ठराविक गुणदर्शक इयत्ता प्राप्त झालेल्या हिंदी लोकांकरितां राखून ठेऊन याप्रकारें या खात्याचें हिंदीकरण करण्याचें स्पष्ट धोरण स्वीकारण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. यासाठीं यापुढें त्या खात्यांत शिरण्याची इच्छा धरून चढाओढीच्या प्रवेशपरीक्षेंत पास होणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक मदत करण्याचें सरकानें ठरविलें आहे. उमेदवार–भरणा, शिक्षण, सनदी अधिकाऱ्यांच्या रांकेंत प्रवेश मिळविणें, आर्थिक मदत, अदमासें खर्च वगैरे महत्त्वाच्या बाबीसंबंधीं सर्व माहिती पुढें दिली आहे.

हिंदी आरमार खात्याचें कार्य, संख्याबल व अधिकारीवर्गः—१ हिंदी आरमार खात्याचें शांततेच्या काळांतील कार्यः–लढाऊ पद्धतीचें शिक्षण देऊन कामगारवर्ग तयार करणें, हिंदुस्थानसरकारच्या नियंत्रणाखालील बंदरांतील आरमाराची व्यवस्था ठेवणें, ठराविक मर्यादेपर्यंत समुद्रपहाणी करणें, हिंदुस्थान सरकारची समुद्रावरील वाहतूक करणें.

२ सध्यां या खात्यांत जरुरीपुरती दुय्यम गलबतें असून शिवाय चार एककाठी गलबतें, दोन गस्तवालीं जहाजें, पांच मच्छिमारी बोटी, दोन पहाणीचीं गलबतें व एक वखारी बोट इतकी सामुग्री आहे.

३ मंजूर असलेली अधिकाऱ्यांची संख्याः— (अ) शासनखातेंः– निशाणाधिकारी अथवा आरमाराचा नायक १,कप्तान ९,कमांडर १८. लेफ्टनंट–कमांडर, लेफ्टनंट, व सब. लेफ्टनंट. ४८, एकूण ७६. यांपैकीं १८ अधिकारी किनाऱ्यावर व बंदरांत असतात.

(ब) यांत्रिक खातेंः—इंजिनियर कॅप्टन १, इंजिनियर कमांडर ७, इंजिनियर लेफ्ट. कमांडर इंजिनियर लेफ्टनंट व इंजिनियर सब-लेफ्टनंट ४२. एकूण ५०. पैकीं १८ अधिकारी किनाऱ्यावर व बंदरावर असतात.

उमेदवार भरतीः—या खात्यांत शिरण्याची इच्छा असणारांना चढाओढीची परीक्षा द्यावी लागते. हिंदी विद्यार्थ्यांकरितां ही परीक्षा हिंदुस्थानांत घेण्यांत येते. हिंदी विद्यार्थी ब्रिटिश प्रजाजन असून त्याचें वय १७॥ च्या वर व १९॥ च्या आंत असलें पाहिजे. परीक्षा वर्षांतून दोनदां (जून व नवंबर) मध्यें होते. हिंदी विद्यार्थी हिंदुस्थान सरकारच्या मतें या खात्यांत नौकरी करण्यास लायक असेल तरच त्याला या परीक्षेस बसतां येतें; नाहींतर येत नाहीं. यासाठीं प्रत्येक उमेदवाराला आपल्या अर्जाबरोबर आपल्या योग्यतेबद्दल सरकारी अगर विश्वविद्यालयाचा दाखला जोडावा लागतो. अर्जाचा छापील तक्ता असतो. शिवाय सोबत प्रयोगशाळेचा दाखला, वयाचा दाखला, देवी टोंचल्याबद्दलचा दाखला, व पालकाच्या कबुलीचा दाखला असे दाखले भरून पाठविण्यासाठींही छापील तक्ते असतात. पहिल्या प्रवेश परीक्षेच्या चढाओढींत जे लायक ठरतील त्यांनींच वरीप्रमाणें छापील अर्जाचे तक्ते भरून पाठवावयाचे असतात. त्याचवेळीं आपण शासनखात्यांत शिरणार कीं यांत्रिक खात्यांत शिरणार व कोणत्यांतही शिरण्याची तयारी असल्यास विशेष आवड कशाची तें कळवावे लागतें. अर्ज मिळाल्यावर सरकारतर्फे उमेदवारांबद्दल शाळेचे अगर कॉलेजचे मुख्य यांजकडे व इतर प्रकारें चौकशी होऊन विद्यार्थी लायक ठरल्यासच त्याला परीक्षेस बसतां येतें. परीक्षा लेखी व तोंडी अशी दोन्हीं प्रकारची असते. परीक्षेचे विषय व एकूण गुण खालीलप्रमाणें असतात.

भाग १ ला.—१ इंग्रजी १०० गुण २ सामान्य माहिती १००गुण. ३ पुढीलपैकीं एकः—आधुनिक भाषा अगर इतिहास १०० गुण. ४ तोंडी मुलाखत व नोंद (यांत इंग्रजी व सामान्य माहिती या परीक्षाही येतात.) ४०० गुण.

भाग २ राः—प्रत्येक विषयास ३०० एकूण गुण–लॅटिन,ग्रीक,फरेंच,जर्मन,हिंदी,संस्कृत, पर्शियन उर्दू आधुनिक इतिहास, हिंदुस्थानचा इतिहास

(१५२६ इ. स. पासून). प्राथमिक गणित,उच्च गणित. पदार्थविज्ञान शास्त्र, रसायनशास्त्र, प्राणी-शास्त्र. यांपैकीं पदार्थविज्ञानशास्त्र व प्राथमिक गणित हे दोन व बाकींच्यांपैकीं कोणताही एक विषय घ्यावा लागतो.

जादा विषयः—चित्रकला अगर भूमिति रेखन.

परीक्षेस बसण्यापूर्वी उमेदवारांची वैद्यकीय तपासणी होते, व पसंतीत उतरतील त्यांसच परीक्षेस बसण्याची परवानगी मिळते. परीक्षेची फी ५० रु. आहे.

शिक्षणः—वरीलप्रमाणें प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या हिंदी विद्यार्थ्यांतून ज्यांना शासनशाखेंत शिरावयाचें असतें त्यांना मुंबईच्या "डफरीन" नांवाच्या जहाजावर शिक्षण देण्यांत येतें. येथें त्यांना समुद्रावरील वातावरणाचा परिचय झाल्यावर मग त्यांना डेव्हानपोर्ट येथील "इरेबस" जहाजावर शिक्षणाकरितां पाठविण्यांत येतें. येथील शिक्षणक्रम बारा महिन्यांचा असतो. त्याचे तीन भाग केलेले असतात. हा शिक्षणक्रम चालू असतां विद्यार्थ्यांना "कॅडेटस्" म्हणतात व पुरा झाल्यावर त्यांना "मिडशिपमेन" म्हणतात. "मिडशिपमेन" चा शिक्षणक्रम सामान्यपणें एक वर्षाचा असतो. व उत्तीर्ण झाल्यास विद्यार्थी "सब लेफ्टनंट"च्या हुद्यावर जातो. ज्यांना यांत्रिक खात्यांत जावयाचें असतें. त्यांना प्रवेश परीक्षेनंतर इंग्लंडमध्यें "क्लाइड" अगर "टाइन" यांपैकीं कोणत्यातरी एका यांत्रिक पेढीवर पांच वर्षांचा शिक्षणक्रम पुरा करावा लागतो. वयाच्या पंचविसाव्या वर्षाच्या आंत हा क्रम पुरा केला व नंतर "इंडिया ऑफिसमध्यें" "सिलेक्शन बोर्ड व मेडिकल बोर्ड" यांचेंपुढें परीक्षा व तपासणी होऊन त्यांत उत्तीर्ण झाला तरच त्या विद्यार्थ्याची नोकरीवर नेमणूक होते. अशी नेमणूक झाल्यावर त्याला "इंजिनियर सब लेफ्टनंट" हा हुद्दा मिळतो. हिंदुस्थानांत परत येण्यापूर्वी त्याला तेथील आरमारखात्यांत तीन महिनें शिक्षण घ्यावें लागतें.

शिक्षणक्रम चालू असतां मिळणारी सरकारी मदतः—प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा इंग्लंडमध्यें जाण्याचा खर्च सरकार सोसतें इंग्लंडमध्यें "कॅडेटस्" ना प्रत्येकीं दररोज १ शिलिंगप्रमाणें व "मिडशिपमेन"ना प्रत्येकीं दररोज पांच शिलिंगप्रमाणें पगार मिळतो. खाजगी खर्चाखेरीज आरमार खात्यांतील सर्व खर्च सरकार सोशितें. जेवणाचा ठराविक खर्च सरकार देते.

शिवाय शासनखात्यांतील हिंदी विद्यार्थ्यांना कपड्याबद्दल म्हणून पहिल्या वर्षी ठराविक रक्कम (१०० पौंड) देण्यांत येते. व पुढील दोन वर्षें प्रत्येक वर्षी ५० पौंड पगारादाखल मिळतात.ह्या रकमा पालकाच्या ताब्यांत देण्यांत येतात. यांत्रिक खात्यांतील विद्यार्थ्यांना इंग्लंडमध्यें येणारा जादा खर्च परवडावा म्हणून पहिल्या वर्षी रोख २०० पौंड व पुढें चार वर्षें प्रत्येक वर्षी १०० पौंड प्रमाणें देण्यांत येतात. सब-लेफ्टनंट अगर इंजिनियर सब-लेफ्टनंट झाल्यावर विद्यार्थ्याला १०० पौंड "युनिफॉर्म" करण्याकरितां मिळतात. याशिवाय कांहीं विशिष्टप्रकारें जादा मदतही देण्यांत येते.

पालकांना येणाऱ्या खर्चाचा अंदाजः—शासन खात्यांत शिक्षण घेणाऱ्या हिंदी विद्यार्थ्याच्या पालकाला सरकारी साहाय्याखेरीज पहिल्या वर्षाकरितां ३४० पौंड व दुसऱ्या वर्षाकरितां २१५ पौंड असा एकंदर ५५५ पौंड म्हणजे जवळ जवळ जवळ ८००० रु. खर्च येतो. यांत्रिक शाखेंत शिक्षण घेणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांच्या पालकाला सरकारी साहाय्याशिवाय पहिल्या वर्षाकरितां २७० पौंड; दुसऱ्या वर्षाकरितां १७० पौंड; तिसऱ्या वर्षाकरितां १७० पौंड; चवथ्या वर्षाकरितां १७५ पौंड; पांचव्या वर्षाकरितां १८० पौंड; व इंजि. सबलेफ्ट. म्हणून नेमणूक झाल्यावर "युनिफार्म" करितां १६० पौंड असा एकंदर ११२५पौंड म्हणजे जवळ जवळ१६०००रु. खर्च येतो. विद्यार्थी इंग्लंडला जाण्यापूर्वी पालकानें ही रक्कम बँकेंत ठेवून त्या बँकेची पावती आरमार-खात्याच्या चिटणीसाकडे पाठविली पाहिजे.म्हणजे सर्व रक्कम परस्पर इंग्लंडमधील पालकाकडे अगर हाय कमिशमरकडे पावती करण्यांत यते.

आरमारखात्यांतील सनदी अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या अटी व वायदेः—सब-लेफ्टनंट अगर इंजि. सब लेफ्टनंट हा हुद्दा घेऊन हिंदुस्थानांत आल्याबरोबर त्या अधिकाऱ्याला मुंबईच्या निशाणाधिकाऱ्याकडे – आरमारखात्याचा – मुख्य वर्दी देऊन हुकूम घ्यावा लागतो. येथून त्याजवर येथील आरमारखात्याचे नियम लागू होतात. त्याला (हिंदी असल्यास) हिंदी लष्करी व आरमारी अधिकाऱ्यांच्या "तरतूदनिधि" चें वर्गणीदार व्हावेंच लागतें. येथील सर्व आरमारी अधिकाऱ्यांना १८८७ चा हिंदुस्थानचा आरमारी कायदा लावण्यांत येतो. सर्व अधिकाऱ्यांना विशिष्ट पोषाख

"यूनिफॉर्म" वापरावा लागतो. या खात्यांतील हुद्दे व पगारः— .

हुद्दा	शासनखातें पगार	यांत्रिकखातें पगार
सब–लेफ्टनंट	२५० रु.	३०० रु.
लेफ्टनंट (वाढत्या हु०)	३०० रु.	३५० रु.
लेफ्टनंट (४वर्षांनीं)	४०० रु.	४५० रु.
" (६वर्षांनीं)	४५० रु.	५०० रु.
लेफ्टनंट कमांडर		
वाढता हुद्दा)	५५० रु.	६०० रु.
"(२ वर्षांनीं)	५७५ रु.	६२५ रु.
"(४ वर्षांनीं)	६०० रु.	६५० रु.
" (६ वर्षांनीं)	६२५	
कमांडर (९ वर्षांनीं), इंजिनियरकमांडर (वाढताहुद्दा अगर २०वर्षें नौकरी झालेला इंजि. लेफ्ट. कमांडर.	७०० रु.	७०० रु.
कमांडर (९ वर्षांचा), इंजि. कमांडर (२०व.)	८०० रु.	८०० रु.
कॅप्टन,इंजि. कप्तान २५ वर्षें नौकरी झालेला इंजि. कमांडर.	९०० रु.	९०० रु.

या सर्व अधिकाऱ्यांना मुशाहिरा ,वाढ, रजा, हीं ठराविक नियमाप्रमाणें मिळतात. रजेच्या दिवसांत बिनखर्च प्रवासाची परवानगीही ठराविक नियमाप्रमाणें मिळते.

वयाला ५५ वें वर्ष लागल्याबरोबर सेवानिवृत्त व्हावेंच लागतें. मध्यंतरीं कांहीं सबळ कारणानें नौकरी सोडावी लागल्यास ठराविक नियमाप्रमाणें बसेल ती निवृत्ति मिळते. सर्व साधारण निवृत्तिही भरलेल्या वर्षावरूनच ठरविली जाते. कांहीं विशिष्ट बाबतींत जादा निवृत्तिही देण्यांत येते. नौकरीवर प्रत्यक्ष कामास आलेल्यांच्या (बुडाल्यानें अगर इतर कारणांनीं) कुटुंबास सहानुभूतिपूर्वक नेमणुका करून देण्यांत येतात.

दर्यावर्दीपणाच्या धंद्यांत प्रवेश व त्याचे प्रॉस्पेक्टस–

अलीकडे, समुद्रावरील व्यापारांत हिंदी लोकांनाहीं थोडा भाग मिळावा, कांहीं नाहीं तरी स्वदेशच्या किनाऱ्यावरील व्यापार तरी स्वतःच्या हातांत असावा अशी स्वाभाविक इच्छा आपल्यांत वृद्धिंगत होत आहे. त्यासाठीं 'कोस्टल ट्रेड बिल' वगैरे दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे दर्यावर्दीपणांत पारंगत, अनुभविक व जरूर त्या परीक्षा पास झालेली तरुण मंडळी स्वदेशी जहाजें चालवावयास पाहिजेत, हीं होय. सध्यां तशीं माणसे जवळ जवळ नाहींतच; त्यामुळें अस्तित्वांत असणाऱ्या एक-दोन देशी कंपन्यांच्या जहाजांवरही तीं चालविणारे अधिकारी परकीय असतात. अर्थात गोंवें, कोंकण, कराची येथें जाणाऱ्या लहान बोटी जरी देशी लोकच चालवितात, तरी २००० मैलांवर जाणाऱ्या ७००० टनांपेक्षां मोठ्या, मालाच्या बोटीदेखील चालवण्यास सध्यां हाताच्या बोटावर मोजतां येण्याइतके देशी कप्तान नाहींत. मग ऊतारू व पोस्ट नेणाऱ्या बोटीबद्दल तर बोलावयासच नको

खलाशी हा शब्द फार व्यापक आहे. त्यांत आगबोटींवर काम करणाऱ्या कोणाचाही समावेश होतो. बोटीवर बोटीचें नौकानयन करणारे जबाबदार अधिकारी, त्यांच्या हाताखालीं एंजिन चालविणारे एंजिनियर अधिकारी, डेकवरील शारीरिक काम करणारीं माणसें (त्यांना जहाजावर खलाशी म्हणतात), एंजिनरूममध्यें शारीरिक काम करणारीं माणसें, सैपाकी व अधिकाऱ्यांचे इतर नोकर हे सर्व खलाशीच होत. अधिकाऱ्यांखेरीज बाकीचीं सर्व कामे सध्यांसुद्धां सर्व जहाजांवर किनारपट्टींतील पिढीजाद खलाशाचा धंदा करणारे लोक करितात. तेव्हां हिंदीकरण करावयाचें तें या दोन शाखांतील अधिकाऱ्यांचें होय. अधिकाऱ्यांच्या मानाच्या अनुक्रमानें, त्यांना परीक्षा द्यावयास लागणारीं नोकरीचीं वर्षें व त्यांचा सामान्य रीत्या दरमहा पगार हें पुढील कोष्टकावरून चटकन् कळेल.

कप्तान	कमींत कमी १२ वर्षें नोकरी.	द. म. रु. ५०० ते १२००
प्रथमाधिकारी	वर्षे अनियमित	३५०
द्वितीयाधिकारी	१॥ वर्ष	२५०
तृतियाधिकारी	१॥ वर्ष	१५०
अॅप्रेंटिस	४ वर्षें	२० ते ३५
'डफरीन'चा ३ वर्षांचा कोर्स पुरा असल्यास	३ वर्षें	२० ते ३५

	नोकरी वर्षें	दरमहा पगार रुपये
चीफ एंजिनियर	अमियमित	४००ते६००
दुसरा एंजिनियर	अनियमित	३००
तिसरा एंजिनियर	१॥ वर्ष	१८०
चौथा एंजिनियर	१॥ वर्ष	१५०
पांचवा एंजिनियर	" "	१२५
किनाऱ्यावरील वर्कशॉपमध्यें अप्रेंटिसशिप्	५	

कप्तान हा बोटीवरील सर्वाधिकारी किंबहुना मालकच होय, कारण आगबोट जरी प्रत्यक्ष कंपनीच्या मालकीची असली तरी सदासर्वकाळ मालकाप्रमाणें तोच व्यवस्था पहाणारा आणि जबाबदार असतो. वर दाखविलेल्या दोन्ही शाखांचा तो प्रत्यक्ष मुख्य होय. पण कप्तान व्हावयास पहिल्याच शाखेंतून वर चढत जावें लागतें.

पहिल्या शाखेंत जावयास प्रथम अप्रेंटिस म्हणून बोटीवर ४ वर्षे नोकरी करावी लागते. त्या वेळांत अधिकाऱ्यांच्या हाताखालीं पडेल तें शारीरिक काम करून पुढील परिक्षेसाठीं नौकानयन व नाविकशास्त्र यांचे अध्ययन करून, प्रत्यक्ष अनुभव संपादन करावयाचा असतो.

"डफरिन" बोटीवरील तीन वर्षांचा बैठा कोर्स, प्रत्यक्ष दर्यावरील कामाच्या १ वर्षाबरोबर गणला जातो. त्यामुळें त्या ४ वर्षांच्या कोर्सनंतर अप्रेंटिसशिपमध्यें आणखी ३ वर्षें घालावीं लागतात. मग 'डफरीन'वर जाण्याचा फायदा काय? तो असा कीं, पुढच्या परीक्षांस लागणारी जी पुस्तकी विद्या अप्रेंटिसला कोणाच्या मदतीशिवाय संपादन करणें अवघड असतें ती येथें शिकवितात. दुसरें असें कीं, डफरीनवर जातांना इंग्रजी ३।४ इयत्ता व्हाव्या लागतात. तो कोर्स पुरा करण्यास किंवा शाळेचा अभ्यासक्रम पुरा करून मॅट्रिक होण्यास सारखाच वेळ लागतो आणि, 'डफरीन'ची शेवटची परीक्षा पास झाल्यास मॅट्रिक पास झाल्याचें समजावें असें सरकारनें ठरविल्यानें, तो कोर्स पुरा झाल्यावर दर्यावर्दी पसंत नसल्यास समुद्रावर न जातां कॉलेजमध्यें जातां येतें. एकाद्या टेकनिकल् कॉलेजप्रमाणें जरूर ते विषय शिकविणारें डफरीन हें एक कॉलेज आहे. त्यावर न जातां सरळ एकदमही समुद्रावर जातां येईल. फक्त एकाद्या आगबोट कंपनीनें तसें तुम्हांला पत्करिलें पाहिजे येवढेंच.

अप्रेंटिसना तसेंच इतरही अधिकाऱ्यांना जेवणखाण फुकट असतें. सुरवातीस कांहीं प्रीमीयमही द्यावें लागतें. कपडे स्वतः करावे लागतात.

अप्रेंटिसशिप पूर्ण झाल्यावर सेकंड 'मेटची' परीक्षा असते; ती उत्तीर्ण झाल्यावर अधिकारी होण्यास तो लायख होऊन, बहुधा थर्ड मेटची जागा त्याला मिळते. यापुढें दीड वर्षांची फर्स्ट मेटची परीक्षा झाल्यावर सेकंड मेटची जागा मिळते. त्यानंतर १॥ वर्षांनीं शेवटची परीक्षा मास्टर मारिनर अथवा कॅप्टनची असते. परीक्षा पास झाल्याबरोबर तें काम मिळतेंच असें नाहीं. बढती मिळणें कंपनीवर अवलंबून राहील. या प्रत्येक परीक्षेपूर्वी दृष्टिपरीक्षा पास व्हावी लागते. चष्मा चालत नाहीं. दृष्टि मंद झाल्यास फुकट गेलेल्या वर्षावर पाणी सोडून दुसरा धंदा पाहावा लागतो!

एंजिनियरिंगकडे जाण्यापूर्वी किनाऱ्यावरील वर्कशॉपमध्यें ५ वर्षें काम करावें लागतें. मग बोटीवर १॥ वर्ष एंजिनियरचें काम केल्यावर सेकंड एंजिनियरची परीक्षा द्यावी लागते. ती झाल्यावर १॥ वर्षं थर्ड एंजिनियरचें काम केल्यावर चीफ एंजिनियरची परीक्षा झाली म्हणजे संपलें. एंजिनियर शाखेस जरी दृष्टिपरीक्षा नसली तरी तें काम जास्त शरीरकष्टाचें असतें.

या सर्व परीक्षा सरकारी असून हीं कामें फार जबाबदारीचीं असल्यानें, त्या फार कडक व विस्तारपूर्वक घेतल्या जातात.

बोटीवरील अधिकाऱ्यांना पेन्शन वगैरे मिळत नाहीं, ताकद असे तों तें मिळवून ठेवावें लागतें.

सध्यां सर्वच बोटींवर अन्न युरोपिअन पद्धतीचें असतें. देशी अधिकारी बरेच आल्यास देशी अन्न मिळण्यास अडचण पडणार नाहीं येवढच नव्हें तर पूर्ण शाकाहारी राहणेंही अगदीं शक्य होईल.

मच्छीमार

मद्रास;:—मच्छीमारीच्या धंद्यांत आस्थेनें लक्ष घालणारें पहिलें मद्रास सरकार होय. मद्रास प्रांताचा समुद्रकिनारा १७६० मैल इतका लांब असला तरी त्यांपैकीं फारच थोडा पूर्वकिनारा मच्छीमारीस सोईस्कर असा आहे. अगदीं गैरसोयीच्या ठिकाणीं तर मच्छीमारीसाठीं तराफांचाच उपयोग करावा लागतो.

या प्रांतांतील मच्छीमार खात्यानें १९२७–२८ त केलेल्या खानेसुमारीवरून असें दिसून येतें कीं, पश्चिम किनाऱ्यावर मच्छीमारींत गुंतलेल्या लोकांची संख्या १,१४,५०२ आहे. सांपडणाऱ्या माशांमध्यें सारडीन व मॅकॅरेल या महत्त्वाच्या जाति येथें आढळतात.

१९०७ सालीं मच्छीमारीसाठीं एक ऑफिस स्थापन करण्यांत आलें. याच ऑफिसाची वाढ होत होत त्याचें एका स्वतंत्र सरकारी खात्यांत रूपांतर झालें. या खात्याचा व्याप वाढत जाऊन शेवटीं या खात्यांत सुधारणा काय करावयास हव्यात त्यांची शिफारस करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली व त्या सूचनांप्रमाणें बऱ्याच सुधारणा करण्यांत

आल्या. सध्यां या खात्याकडून मासे सांठविणें, खारे करणें इत्यादींच्या मोठमोठ्या वखारींची व्यवस्था ठेवण्यांत येते. तसेंच, कालीकत येथें मच्छीमारीचें शिक्षण देण्यासाठीं 'फिशरीज ट्रेनिंग इन्स्टिटयूट'ही खात्याकडून चालविण्यांत येते. त्यांत शिकलेले लोक, निरनिराळ्या ४३ शाळांतून 'शिक्षक' म्हणून नेमले जातात. या शाळा फक्त कोळ्यांच्या मुलांसाठींच आहेत.

१९३१ सालीं या भागांत जे मासे पकडण्यांत आले त्यांवर २,५०,८६७–३–२ रु. इतकी प्राप्ती झाली. १९२७ सालीं व्लानगड व पालापटी येथें नवीन औद्योगिक संस्था स्थापण्यांत आल्या. मध्यस्थी करणाऱ्या भांडवलवाल्यांच्या तावडींतून लोकांस सोडविणें हा यांचा उद्देश आहे.

बंगाल:—बंगालमध्यें हा धंदा हलका समजला जातो. तरीही ६,४४,००० इतके लोक या धंद्यांत गुंतलेले आहेत. व ३२४००० लोक मासे विकून उपजीविका करतात. या धंद्यांत बंगाली लोक फार निष्णात आहेत. या प्रांतांत 'हिलसा' जातीचे मासे पुष्कळ सांपडतात. बंगालच्या उपसागरांत कसल्या प्रकारचे मासे सांपडतात हें पाहण्यासाठीं १९०७।८ चे सुमारास 'गोल्डन क्राऊन' नांवाच्या बोटीनें प्रयत्न केले.मासे चांगल्या प्रतीचे आहेत असें आढळून आलें परंतु इतर अनेक अडचणींमुळें ही कल्पना टाकून देण्यांत आली.

डाक्का येथील खोट्या मोत्यांच्या गुंड्यांच्या कारखान्यांत ताज्या पाण्यांतील कालवांचा फार उपयोग करितात. कित्येकवेळां यांतच खरे मोती सांपडतात. डाक्का येथील बांगडीचे कारखाने फार जुने व भरभराटीस आलेले आहेत. त्यांसाठीं लागणारा कच्चा माल दक्षिण हिंदुस्थान व सीलोन. येथील शँक मच्छीमारीकडून पुरवला जातो. बंगालमध्यें मच्छीमारीपासून उत्पन्न होणारी संपत्ति फार मोठी आहे,परंतु त्यासाठीं जरूर त्या संघटित प्रयत्नांची मात्र उणीव दिसून येते.

मुंबई:—मुंबई इलाख्यांत, सिंधखेरीज करून इतर ठिकाणीं समुद्रावरील मच्छीमार हीच महत्त्वाची आहे. सर्व किनाराभर उत्तम स्वाभाविक बंदरेंआहेत व जवळ जवळ सात महिने हवा शांत असल्यामुळें हा धंदा फार चांगला चालतो. इतर प्रांतांपेक्षां येथील कोळी जास्त कुशल व धीट आहेत. मासे खारवणें, ते हवाबंद डब्यांतून भरणें व त्यांपासून इतर पदार्थ तयार करणें वगैरे कामांकडे मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यानें १९१८ पासून लक्ष देण्यास सुरवात केली आहे. १९२१ ते २२ त एक वाफेची मच्छीमार बोटही काम करीत होती. परंतु मासेविक्रीनें बोटीचा खर्च भागेनासा झाल्यामुळें ती ब्रह्मदेश सरकारला विकण्यांत आली. मुंबई इलाख्यांतील उत्तम मच्छीमार होड्या वसई ते सुरतच्या दरम्यान असतात. कित्येक आठवडे त्या समुद्रावर असतात; कच्छ, काठेवाड किनारा व खंबायतचें आखात येथें त्यांचा धंदा चालू असतो. दक्षिण इलाख्यांत रत्नागिरी व राजापूर येथील लोक हलक्या व लहान होड्या वापरतात. सिंधमध्यें कराचीच्या आसपास मोठ्या प्रमाणांत मच्छीमार चालू असते.सिंधूच्या खाड्यांतून कधीं कधीं विशिष्ट प्रकारचे शिंपले आढळतात. त्यापासून बारीक मोती बरेच मिळतात. येथील मोती बहुधा चीनमध्यें औषधें करण्यासाठीं विकले जातात. सिंधु नदींत 'पाल्ला' जातीचे मासे फार आढळतात त्यांपासून सरकारास एकंदर सुमारें २०,००० रु. वार्षिक उत्पन्न होतें.

काठेवाडकडील संस्थानानें अनेक प्रयोग करून समुद्रांतील बारीक मोत्यांचे शिंपले हस्तगत करण्याचे प्रयत्न केले. सध्यां त्यांमुळें संस्थानांस वार्षिक १५००० ते २५००० रु. उत्पन्न होतें.

ब्रह्मदेश:—मच्छीमारीचें उत्पन्न फार मोठें आहे. जमीनमहसुलाच्या एक अष्टमांश उत्पन्न मच्छीमारीपासून होतें. जाळी वापरण्याचे परवाने देण्याबद्दल ४ लाख व मच्छीमारीच्या मक्त्यावर ४१ लाखांहून जास्त वसूल होतो.

पंजाब:—१९२८ व १९२९ या सालांतील हिवाळ्यांतील पुरामुळें १९२८ ते ३० पर्यंतचा काळ येथील कोळी लोकांना फार कठीण गेला.

१९२८–२९ सालांतील माशांचें पीक पाहून एक पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यांत आला होता. त्यास सरकारकडून मान्यताही मिळाली होती. परंतु आर्थिक टंचाईमुळें ती कल्पना टाकून देणें भाग पडलें.

बंदरें व समुद्रप्रवास

हिंदुस्थानांतील बंदरें–मोठमोठ्या बंदरांतील कामकाजाची व्यवस्था त्याचसाठीं स्थापन झालेल्या संस्थांच्या हातीं कायद्यानें दिली आहे. या संस्थांच्या हातीं पुष्कळ सत्ता आहे. परंतु स्थानिक स्वराज्यानें सरकारचें या संस्थांच्या अधिकारावर जास्त नियंत्रण आंहे. सर्व बंदरांवर, सभासदांत युरोपियनांचें मताधिक्य असतें व रंगून येथील मंडळांत बहुतेक सगळा भरणा युरोपियनांचाच आहे. हिंदुस्थानांतील सहा मोठ्या बंदरांचें उत्पन्न खर्च व कर्ज याबद्दलचे आंकडे, व माहिती आंकडे पुरविणाऱ्या खात्याप्रमाणें खालीं दिली आहे.

बंदर	उत्पन्न	खर्च	भांडवली कर्ज
मुंबई	२,९७,२७.१३०	२,९०,१६,८३९	२२६०६८४०५
कलकत्ता	३,२१,२७,७४८	३,१५,४४,१०१	१७,७५,३१,१९४
मद्रास	३५,१२,८६१	३०,८८,९८२	१,४१,१४,७२१
कराची	६८,०२,५७०	६४,०१,६१३	४,३५,२४,०००
रंगून	८५,८८,९३२	७१,३३,७७६	३,७८,९०,१८२
चित्तागांग	७,२४,०६२	४,६७,३६८	३,६८,२०२

मुंबई.

मुंबईच्या व्यापारी संघाचा वसूल१९२९–३० मध्यें २,८१,०७,१८२ रुपये झाला. व खर्च २,७६२,३२,०४ रुपये झाला व गतवर्षीचा मुंबई बंदराचा एकंदर व्यापार २३७ कोटी रुपयांचा झाला.

कराची.

१९२९–३० या वर्षांत जमा महसूल (पोर्ट फंडाचा हिशेब धरून) ६७,४१,६८२ रुपयें. रेव्हेन्यू खर्च :––६८,०९,८०० रुपये. तूट:–– ६८,११८ रु.. गंगाजळी ठेव:––४५,१९,९९०रु.

मद्रास.

वसूल:–– १९२८–२९–४९,५५,९७४
,, १९२९–३०–४५,३१,०२१.
एकंदर खर्च१९२९–३०–४५,३३,९३८.

रंगून.

१९२९–३०–या वर्षांतील उत्पन्न:–– ८२,१०,९८१रु. खर्च:––८२,७४,५५५रु.

चित्तागांग.

परदेशाशी व्यापार१९२९–३०	लक्ष रुपये
आयात	२०६.९०
निर्यात	६६४.४८
किनाऱ्यावरचा व्यापार १९२९–३०	
आयात	३११.४७
निर्यात	११०.९८

'शिंदे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी' मुंबई

आधिकृत भांडवल:–– रु. १,५०,००,००० स्थापना १९१९

उभारलेलें भांडवल–रु. ८९,८३,५७५

या कंपनीच्या मालकीच्या १० आगबोटी आहेत. त्यांचें टनेज ४३०७४. बर्मा ते कोलंबो, मलबार ते मुंबई, कलकत्ता ते किनाऱ्याचीं बंदरें व कराची, मुंबई व कराची ते कलकत्ता व रंगून (मलबार व इतर किनाऱ्याच्या बंदरांवरून) अशी या कंपनीतर्फें सर्व्हिस चालूं आहे.

बॉम्बे स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. मुम्बई

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील ही सर्वांत जुनी कंपनी आहे. गेलीं पन्नास वर्षें ह्या कंपनीच्या आगबोटी उतारूंची व मालाची नेआण करीत आहेत. ह्या कंपनीनें नुकतीच 'एस्. एस् इरावती ' ही प्रचंड आगबोट कोंकण किनाऱ्यावर सुरूं केली असून तींत सुमारें अकराशें उता-

रूंची सोय होते.

कंपनीच्या मोठ्या आगबोटीः--

आगबोटीचे नांव	टनेज
एस्. एस्. बहादुरी	१५९०
,, पार्वती	१५४२
,, नेत्रावती	१५३६
,, इरावती	१२४३
,, दयावती	११८८
,, कलावती	११८५
,, भद्रावती	
,, सरस्वती	९६२
,, वेगावती	७८१
,, चंपावती	७६९
,, रूपावती	७६७
,, कमलावती	७६५
,, हिरावती	५८०

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील ज्या बंदरांशीं कंपनीचें दळणवळण चालू आहे त्यांची यादीः--आचरें, ओखा, एलेफंटा (पूर्वबाजू), कराची, करंजें, कारबोन, कारवार, कारूळ, कुमठा, कुरदांडा, कुंदला, कुंदापूर, कोंकण, खारेपाटण, गोवळकोट, चिवेली, जयगड, जाफराबाद जामनगर, जैतापूर, जोदिया, जंजिरा, जंबारी, डोंगर, ताद्री, तिवरी, दाभोळ, दीव, देवगड, द्वारका, धरमतर, धामणखोल, धालवेल, नवलखी (मोरवी), नवाबंदर, नहावा, पणजी, पालशेट, पूर्णगड, पोरबंदर, पांगारी, पोंबुर्लें, फुंगुस, बोरिआ, भाटकल, भावनगर, मणचें, महूवा, मार्मागोवा, मालपे मालवण, मिऱ्या, मुटाट, मुरा (उरण) मुसाकाजी, मोभार, मंगरूळ, मंगळूर, मांडवी (कच्छ) मुंद्रा, मुंबई, रत्नागिरी, राई, राजापूर, रेवदंडा, रेवास, वाघोटणें, वाल्यें, विजयदुर्ग, वेरावळ, वेंगुर्लें, सलाया, संगमेश्वर, श्रीवर्धन, हरेश्वर, हर्णै, होनावर.

कराचीपासून कारवार, मंगळूर, पर्यंत किनाऱ्यावरील व खाडी कांठची मिळून एकंदर ७७ बंदरें आहेत.

हर्णै, दाभोळ, विजयदुर्ग व गोवा लाईन.

(मुंबईहून व मंबईपर्यंतचे आगबोटीचे भाड्याचे दर

बंदर	केबिन रु. आ.	मजला रु. आ.	तळमजला रु. आ.
रेवदंडा		१– ८	१– ०
जंजिरा	४– २	२– १	१– ५
श्रीवर्धन	४–१४	२– ७	१– ९
हरेश्वर	५–१०	२–१३	१–१३
हर्णै	६–१२	३– ६	२– २
दाभोळ	७– ८	३–१२	२– ६
कारूळ		३–१४	२– ८
पांगारी		३–१४	२– ८
चिवेली		३–१४	२– ८
कारबोन		४– ०	२–१०
गोवळकोट		४– २	२–१२
पालशेट	७–१२	३–१४	२– ८
बोरिया	७–१२	३–१४	२– ९
जयगड	७–१२	३–१४	२– ९
जंबारी		४– ०	२–१०
मोवार		४– २	२–१२
राई		४– २	२–१२
फुंगूस		४– ४	२–१४
कुरदांडा		४– ५	२–१५
संगमेश्वर		४– ६	३– ०
तिवरी	८– ४	४– २	२–१०
रत्नागिरी	१०– ०	४–१२	३– ०
पूर्णगड	१०– २	४–१४	३– २
मुसाकाजी	१२–१०	५– २	३– ४
जैतापूर	१२–१२	५– ४	३– ४
राजापूर व डोंगर		५– ६	३– ८
विजयदुर्ग	१२–१४	५– ६	३– ६
वाघोटण		५– ७	३– ७
मुटाट		५– ७	३– ७
मणचें		५– ७	३– ७
धालवेल		५– ७	३– ७
पोंबुर्लें		५– ७	३– ७
वाल्यें		५– ८	३– ८
कोंकण		५– ८	३– ८
खारेपाटण		५– ८	३– ८
देवगड	१३– ४	५–१२	३–१२
आचरें	१४– ०	६– २	४– ४
मालवण	१४– ०	६– २	४– ४
वेंगुर्लें	१५– ०	६– ६	४– ८
पणजी	१५– ०	६– ८	५– ०

पत्ताः--- दि बाँबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी, मुंबई. एजंट्सः--- किलिक निक्सन आणि कं.,

१००, फ्रिअर रोड, मुंबई.

गेल्या १५ वर्षांतील व्यापाराचे व उत्पन्नाचे आंकडे

वर्ष	गोदी			धक्के	नद्यांतला व्यापार		बंदरांत शिरणाऱ्या जहाजांचें	उत्पन्न
	एकंदर निर्यात	कोळशाची निर्यात	आयात	आयात	निर्यात	आयात	एकंदर टनेज	
	टन	टन	टन	टन	टन	टन	टन	रुपये.
१९१४–१५	९,२०,६५९	२६,३३,८०५	७,००,१३३	९,१७,९७८			३७,१४,३४४	१,४४,५०,३४९
१९१५–१६	१०,५४,९८५	१६,१०,६४५	५,७०,९९७	७,८८,४८१			२९,६७,७९८	१,५९,३५,४५६
१९१६–१७	११,८५,१५९	१९,९४,५२८	४,४४,२१०	६,८६,०१०			२८,०४,६८०	१,५७,२३,४३२
१९१७–१८	९,९५,११२	१०,१४,९९३	३,६३,३८३	६,३३,६९३			२०,९४,०११	१,५८,३९,१७५
१९१८–१९	१०,९७,५६२	१३,३३,२८५	४,८२,४०३	५,७५,८३३			२२,९२,४६२	१,९०,५३,५१३
१९१९–२०	११,४६,४७९	२२,६४,९७६	६,५३,०६६	७,१३,७४६			२९,४१,८४६	२,२३,५५,६१४
१९२०–२१	११,३३,७१९	३०,४६,४००	४,१३,३५७	६,८५,०८०			४०,१७,५१४	२,६६,०८,०३२
१९२१–२२	९,७४,७८३	१६,८७,२२२	६,९३,३६१	६,२२,४११			३४,४६,०२१	२,१९,१७,०४२
१९२२–२३	१४,१४,१६६	११,७४,०४१	३,०४,१०९	६,८०,०५३			३३,३६,७२२	२,६४,७५,५२२
१९२३–२४	१७,२२,३०५	१३,२५,८०१	२,२१,०३५	७,६१,९२०			३६,२१,२४३	२,६०,८९,०२७
१९२४–२५	१७,७९,०५४	१४,९५,९१५	२,९०,४१२	८,७४,७१४			३८,४५,७८८	२,७८,२३,३६४
१९२५–२६	१४,९४,४४२	१७,९६,१०९	३,५२,७१४	९,५१,४४२	२२,३१,६३७	१६,०१,९४१	३८,८७,५६०	३,२१,२७,७४८
१९२६–२७	१४,६५,८५४	२४,७६,७९४	४,५५,५७७	९,६३,२९७	२३,४४,८००	१५,१३,८८५	४१,७७,११८	३,१२,०२,१८३
१९२७–२८	१८,३७,३७१	२८,१७,४४३	४,८०,३६७	१०,०७,९१७	२६,८९,१८७	१६,०६,७२८	४६,३८,५६९	३,३८,८२,१२४
१९२८–२९	१७,५०,९६९	२६,४४,२५६	११,६४,६३१	१०,४९,६६८	२५,२४,२०१	१७,०६,५५९	४८,१८,८३१	३,४१,८२,७२९
१९२९–३०	१९,८५,०४२	३०,१६,१८५	८,५३,४५२	८,२९,९०२	२५,३९,६५३	१६,४६,९३२	४९,८५,९९९	३,४३,९८,११०

पासपोर्ट मिळण्यासंबंधी नियम

ब्रिटिश इंडियन पासपोर्ट हा (१) जन्मानें ब्रिटिश असणारे. (२) त्यांच्या बायका (३) परदेशांतून आलेले पण इकडचेच झालेले लोक किंवा (४) ब्रिटिशांच्या संरक्षणाखालचे लोक यांनाच मिळूं शकतो.

पासपोर्ट मिळण्यासाठीं अगोदर एक अर्जाचा तक्ता भरून पाठवावा लागतो. त्यांत इतर अनेक गोष्टींबरोबरच प्रवासाचें कारणही नमूद करावें लागते, त्यावर एकाद्या राजकीय खात्यांतील अधिकाऱ्याची, मॅजिस्ट्रेटची, सुपरिटेंडेंट किंवा त्याहून उच्च दर्जाच्या पोलीस अंमलदाराची शिफारस जोडावी लागते. या अर्जाचे फॉर्म, कोणाही कलेक्टराकडे, कमिशनर ऑफ पोलीसकडे, मुंबई सरकारच्या पासपोर्ट ऑफीसरकडे पोस्टानें किंवा ऑफिसांत अर्ज करून मिळतात. तसेंच मुंबईतील कोणत्याही प्रमुख बँकिंग अँड शिपिंग एजंटकडे मिळतात. या अर्जाबरोबरच स्वतःच्या फोटोग्राफच्या प्रती व ३ रु. रोख फी पाठवावी लागते. फी पोस्टाच्या तिकिटाच्या स्वरूपांत दिली किंवा तेवढ्याचा चेक धाडला तर चालत नाहीं. स्वतःचा फोटो व फी यांसहित अर्ज पोस्टानें पासपोर्ट ऑफिसांत धाडावा किंवा स्वतः नेऊन द्यावा. मुंबईचें पासपोर्ट ऑफीस सिव्हिल सेक्रेटेरिएटमध्यें आहे. ऑफीस दुपारीं ११ वाजल्यापासून ४ वाजेपर्यंत उघडें असतें. शनिवारीं दुपारीं १ वाजतां ऑफीस बंद होतें. रविवार व सणावाराचे दिवशीं ऑफीस बंद असतें.

परदेशीं जाण्यासाठीं किंवा त्या देशांहून प्रवास करण्यासाठीं पासपोर्ट काढल्यावर, त्या त्या देशाच्या वकिलातीचा त्या पासपोर्टावर शेरा असावा लागतो. ऑस्ट्रिया, बेल्जम्, डेन्मार्क, फरान्स, जर्मनी, हॉलंड, आईसलंड, इटली, लक्सेम्बर्ग, नॉर्वे, पोर्तुगाल, सॅरो, स्पेन, स्वीडन, स्वित्झरलंड व झेकोस्लोव्हेकिया या देशांत जावयाचें असल्यास त्या त्या वकिलातीचा संमतिदर्शक शेरा असण्याची जरूर नाहीं. मात्र पासपोर्टवर त्या त्या देशांचीं नांवें ब्रिटिश पासपोर्ट अधिकाऱ्याकडून लिहिलेलीं असलीं पाहिजेत.

पासपोर्ट काढल्यापासून ५ वर्षेपर्यंत त्याचा उपयोग करतां येतो. त्यानंतर इच्छा असल्यास आणखी १ तें ५ वर्षें पर्यंत त्याची मुदत वाढवतां येते. पण पासपोर्ट मिळाल्याच्या मूळ तारखेपासून १० वर्षांनंतर कोणत्याही परिस्थितींत तो रद्दच समजला जातो. या अवधीनंतर किंवा परराष्ट्रीय वकिलातींनीं दिलेली मुदत संपल्यानंतर जर परदेशांत प्रवास करण्याची इच्छा असेल तर नवा पासपोर्ट काढावा लागतो. पासपोर्टची मुदत वाढवून घेण्यासंबंधींच्या अर्जाचा नमुना ठरलेला आहे. त्या अर्जाचे फॉर्म वर दिलेल्या ठिकाणाहून मागवले म्हणजे मिळतात. वाढवावयाच्या प्रत्येक वर्षाबद्दल १ रु. फी. पडते.

मुंबईतील परराष्ट्रीय प्रतिनिधींचीं ठिकाणें

अफगाणिस्थानः—अमीरांचा बंगला, वाळकेश्वर रोड, मलबार हिल.

ऑस्ट्रियाः—C/o ई–स्टेला आणि कंपनी, ताज-बिल्डिंग वॉलेस स्ट्रीट, फोर्ट.

बेल्जमः—१७, क्यूफे परेड, कुलाबा.

ब्राझीलः—एशियन बिल्डिंग, निकोल रोड, बेलार्ड इस्टेट.

क्यूबाः—जेर महाल, धोबी तलाव.

झेकोस्लोव्हेकियाः—१८, रामपार्ट रो, फोर्ट.

डेन्मार्कः—C/o लॉईट बँक, फोर्ट.

फ्रान्सः—११ क्यूफे परेड, कुलाबा.

फिन्लंडः—ॲलीस बिल्डिंग, हॉर्न्बी रोड, फोर्ट

जर्मनीः—नारायणदास बिल्डिंग, स्प्रॉट रोड, बॅलॉर्ड एस्टेट

ग्रीसः—१५, वॉडबी रोज

इटलीः—एडनवाला मॅन्शन, तळमजला, चौपाटी

जपानः—सुरवातवाला बिल्डिंग. १९२ हॉर्न्बी रोड, फोर्ट.

लक्सेंबर्गः—१७, क्यूफे परेड, कुलाबा.

नेदर्लंड्स्—२०४ हॉर्न्बी रोड फोर्ट.

निकाराः—अलाईस बिल्डिंग, हॉर्न्बी रोड, फोर्ट.

नॉर्वेः—इंपीरियल चेंबर्स, विल्सनरोड, बॅलॉर्ड इस्टेट.

पर्शियाः—" सीसाईड " १४७, ससूनडॉकरोड, मिडल् कुलाबा.

पोर्तुगालः—२१, क्यूफे परेड, कुलावा.

सयामः—C/o वॉलेस अँड कंपनी, वॉलेस स्ट्रीट फोर्ट

स्पेनः—पेट्रोपोलीस बिल्डिंग, कुलाबा रोड.

स्वीडनः—व्हल्कन हाऊस, निकोलरोड, बॅलॉर्ड इस्टेट.

स्वित्झरलंडः—व्होलकार्ट बिल्डिंग, ग्रॅहॅम रोड, बॅलार्ड इस्टेट.

युनायटेड स्टेटसः—जहांगीर वाडिया बिल्डिंग, एस्प्लनेड रोड, फोर्ट.

लॅटव्हियाः—फोर्ब्स बिल्डिंग, होम स्ट्रीट, फोर्ट.

रुमानियाः—मॅथ्यूरोड, चौपाटी.

उरुग्वे " " "

रेल्वे खातें

हिंदुस्थानांतील रेल्वेचा अहवाल १९३०–३१

(रेल्वे बोर्डानें तयार केलेला)

आर्थिक परिस्थिति

१९३०–३१ च्या व्यापारमंदीचा रेल्वेच्या उत्पन्नावर बराच परिणाम झाला. उतारूंच्या व मालाच्या नेआणीच्या उत्पन्नांत या मंदीमुळें बरीच तूट आली. हिंदुस्थानांतील सगळ्या रेल्वेचें उत्पन्न (ह्यांत हिंदुस्थान सरकारचा ज्यांशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं अशा रेल्वेच्या उत्पन्नाचा अंतर्भाव होतो.) रु. १०६·५७ कोटी झालें. त्यांतील रु. ६४·४१ कोटी मालाच्या ने-आणीवर, रु. ३४·२९ कोटी उतारूंच्या नेआणीवर व रु. ७·८७ कोटि पार्सलें, लगेज, इ. वर झाले.

उतारूंच्या नेआणीचें उत्पन्नः––१९२९–३० सालापेक्षां अहवालाचे वर्षीं रु. ४ कोटी कमी आले. त्यांत बी. बी. सी. आय. रेल्वेवर ३१ लक्ष, जी. आय. पी. वर ६६ लक्ष व एम्. एस्. एम्. वर ३६ लक्ष तूट आली.

मालाच्या नेआणीचें उत्पन्नः––कोळसा, कापूस, धातु, तांदूळ, लोखंड व पोलाद यांची वाहतूक गेल्या सालपेक्षां कमी झाल्यामुळे रु. ४·४० कोटि कमी आले.

रेल्वेरस्त्यांची वाढः––१९३०–३१ मध्ये ५७३·०९ मैल नवीन रेल्वेलाइन वाहतुकीकरितां उघडली. १६८ मैल रस्ता नवीन बांधण्याकरितां मंजुरी मिळाली. व ८०९·८५ मैल नवीन रस्त्याचे काम चालू आहे.

नवीन कामें:––जी. आय. पी. चा विजेच्या आगगाड्यांचा उपक्रमः–३० जुलै १९३० रोजीं कल्याण ते इगतपुरीचा ४९·५८मैल दुहेरी रस्त्यावर विजेच्या गाड्या सुरूं झाल्या.

बी. बी. सी. आय. चा दोहद कारखानाः–परळ वर्कशॉपवरील कामाचा बोजा हलका करण्याकरतां १९२५मध्ये दोहदला इंजिनें दुरुस्त करण्याकरितां वर्कशॉप बांधण्यास सुरवात झाली. व १९२८ मध्यें दोहद येथेच इंजिनें तयार करण्याचाही कारखाना बांधण्यास सुरवात झाली.

बी.बी. सी.आय. चें बॉंबे सेंट्रल स्टेशन १८ डिसेंबर १९३० मध्ये उघडलें.

जी. आय. पी. च्या मेन व सबर्बन लायनीवरील विजेच्या गाड्यांच्या योजनेचा ब्रिटिश साम्राज्यांत दुसरा नंबर लागतो. मुंबई ते पुणे, मुंबई ते इगतपुरी वरील विजेच्या गाड्यांना टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक कंपनी व कल्याणचें पावर स्टेशन यांजकडून विजेचा पुरवठा होतो.

मोटार ट्रॅफिकची रेल्वेशीं चढाओढः–– मोटार सर्व्हिसमध्ये संघटित प्रयत्न नसल्यामुळे, त्यांमध्ये वेळापत्रक नाहीं, कायमचा दर नाहीं, व जरूरीपेक्षां मोटारींची संख्या जास्त आहे. अशा परिस्थितीमध्यें रेल्वेला मोटारशीं चढाओढ कठीण जाते. जी. आय. पी. वर असा एकही फाटा नाहीं कीं जेथें खाजगी मोटारींची यें–जा सुरू झाली नाहीं. मोटारचा प्रवास जास्त लोकप्रिय झाला आहे, याचें कारण मोटारी भरशहरांतून जातात, व उतारूंना तें सोयीचें पडतें.

रेल्वे-सामानाचा पुरवठा:--१९३०-३१सालीं टाटा आयर्न अँड स्टील कंपनीकडे९२४१८ टन रूळांची व ३२४१ टन फिशप्लेटची मागणी केली. डबे बांधण्याकरतां लागणारें लाकूड दिवसेंदिवस हिंदुस्थानांतीलच घेतलें जात आहे. इमारती लाकडाची किंमत उतरल्यामुळें ब्रह्मी सागवानाची वाजवी प्रमाणांत मागणी केली. नॉ. वे. रेल्वे व इ. इं. रेल्वेवर हिंदुस्थानांतील सागवान व इतर लाकूड जास्त वापरलें जात आहे. ८४ लाख रुपये लांकडावर खर्च झाले. लाकडी स्लीपर यावर्षीं परदेशांहून मागविलेच नाहींत. बरेचसे नेपाळांतून खरेदी केले. हत्यारें, स्टेशनें, पूल, यंत्रसमूह, कोळसा, वीट, चुना वगैरे मालावर १९३०–३१सालीं २३·७५ कोटी रुपये खर्च झाले. (१९२९–३० सालीं ३०·०६ कोटी रुपये खर्च झाले होते. ह्यांपैकीं ११·५७कोटीचा माल परदेशाहून मागवला. व १२·१८ कोटींचा हिंदुस्थानांतून घेतला.

नोकरवर्ग—

१९३०–३१ साल अखेर सगळ्या हिंदी रेल्वेवरील नोकरांची संख्या ७८११३० होती १९२९–३० मध्ये ती ८१७७३३ होती.

जातिदृष्टया नोकरांचें वर्गीकरण

जात	३१–३–३०	३१–३–३१
युरोपियन	४९८१	४७९९
हिंदू	५७९०४०	५५३८५१
मुसलमान	१८२३४९	१७२३२१
अँग्लो-इंडियन	१४६४७	१४३५०
इतर	३६७१६	३५८०९
एकंदर	८१७७३३	७८११३०

पगारः—१९३० सालीं गॅझेटेड व नॉनगॅझेटेड नोकरांच्या पगाराकरितां रुपये ३९६९५३१५४ खर्च झाले, १९३१ सालीं ३९,९२,२०,२२० रु. खर्च झाले.

रेल्वे कारभारांत हिंदीकरणाच्या तत्त्वाची अंमलबजावणीः— ट्रान्स्पोर्टेशन व मेकॅनिकल एंजिनियरिंग खात्यामध्यें हायकमिशनरातर्फे दोघा हिंदी ऑफिसरांची नेमणूक झाली. व पब्लिक सर्व्हिस कमिशनला आणखी तिघांची हिंदुस्थानांत निवड करण्याची विनंति करण्यांत आली. अहवालाचे वर्षी सरकारी रेल्वेमध्यें ६० गॅझेटेड ऑफिसरांनी कायम केलें. त्यांत १२ युरोपियन २० हिंदु, ५ मुसलमान, १९ अँग्लोइंडियन व ४ इतर जमातीचे होते.

निरनिराळ्या खात्यांतून हिंदी नोकर–भरतीचें प्रमाण पुढीलप्रमाणें:—

खातें	शेंकडा
हिशेब	५०.०
इंजिनियरिंग	८५.७
वहातूक व व्यापार	८४.०
ट्रान्स्पोर्टेशन व मेक्यानिकल इंजिनियरिंग	८०.०
स्टोअर्स	१००.०
इतर	५०.०

हिंदी नोकरांत धर्मवार शेकडेवारी खालीलप्रमाणें:—

हिंदु	४१.७
मुसलमान	१०.४
अँग्लोइंडियन	३९.६
इतर जमाती	८.३

अहवालाचे वर्षी निरनिराळ्या खाजगी रेल्वे कंपन्यांना हिंदीकरणाचे तत्त्वाची व शेंकडा ७५ हिंदी नोकरांची भरती करण्याची आठवण करून दिली. खाजगी रेल्वेवर १९३०–३१ मध्यें ७२ सुपीरियर ऑफिसरांची नेमणूक झाली. यामध्यें ३२ युरोपियन, ३० हिंदु, १ अँग्लोइंडियन, ६ मुसलमान, व ३ इतर होते. एकंदरींत १९२५सालीं वरिष्ठ नोकरींत हिंदी नोकरांची संख्या सरकारी रेल्वेवर २८.०२ व खाजगी रेल्वेवर १७.७४ होती, ती १९३१ मध्यें अनुक्रमें ३७.६८ व ३१.९० इतकी झाली. कनिष्ठ नोकरींत १९२५ सालीं हिंदी नोकरांची संख्या सरकारी रेल्वेवर ६६.८६ व खाजगी रेल्वेवर ७३.६८ होती ती १९३१ मध्यें अनुक्रमें ७६.७१ व ८०.४० झाली.

नोकरवर्गाचे स्थितींत सुधारणा.:—

कनिष्ठ नोकरांची पगारवाढ करण्याकरतां जी. आय. पी. वर एप्रिल १९३० पासून दरसाल ५ लाख रुपये जास्त मंजूर झाले. एम्. एस्. एम्. वर जुलै १९३० पासून दरसाल ४ लाख जादा मंजूर झाले.

नोकरीचे तास व सुटी या बाबतींत ऑल-इंडिया रेल्वेमेन फेडरेशनच्या डेप्युटेशन बरोबर सप्टेंबर १९३० मध्यें चर्चा झाली. व ३१ जानेवारी १९३१ मध्यें याबाबत नवे नियम गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आले. त्याप्रमाणें आठवड्यांतून ६० तास काम व एक दिवस सुटी मुक्रर करण्यांत आली. रेल्वे नोकरांना मुलांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाकरतां मदत करण्याचे नियम सप्टेंबर १९३० मध्यें प्रसिद्ध केले. स्टेशनजवळ शाळा नसल्यामुळें ज्यांना आपलीं मुलें परगांवीं बोर्डिंगस्कूलमध्यें ठेवणें भाग पडतें अशांनाच ही मदत मिळते.

ऋणमुक्ततेकरतां मदतः—कनिष्ठ नोकर वर्गाकरतां लोन फंड उभारण्यांत आला. त्यांतून ज्यांना महिना २५ रुपयेही पगार नाहीं अशांनासुद्धां हलक्या व्याजानें रकमा कर्जाऊ मिळतात.

रेल्वे कामगारांची स्थितिः—ऑल इंडिया रेल्वेमेन फेडरेशनला वर्षांतून दोनदां रेल्वे बोर्डाशीं रेल्वे नोकरांच्या तक्रारी व गरजा याविषयीं चर्चा करण्यास परवानगी दिली आहे.

संपः—जी. आय. पी. वर फेब्रुवारी १९३० मध्यें संप सुरू झाला व २१ एप्रिल १९३० पासून पूर्वस्थिति आली.

ट्रेन–सर्व्हिसः—जी. आय. पी. वर वहातुकीच्या मंदीमुळें २ मेल व एक्स्प्रेस गाड्या कमी केल्या. व ८ प्यासेंजर गाड्या १६मिक्स्ड व पुष्कळशा विजेच्या गाड्या कमी केल्या. सदर्न

मराठा रेल्वेवर १ प्यासेंजर,व २ लोकल गाड्या बंद केल्या.

सुधारणाः—रेल्वे डब्यांतील सुखसोयी वाढवल्या, पुष्कळ स्टेशनावर पिण्याचे पाण्याची सोय केली; अनेक ठिकाणीं व खुद्द गाड्यांतच फराळ-दुकानांची सोय केली व वेटिंग रूम्स व बाकें यांतही वाढ केली. बरींच नवीन स्टेशनें, व शहरांतून तिकिटें मिळण्याची सोय केली.

पुरामुळें झालेलें नुकसानः—भयंकर पावसामुळें रेल्वेलाइनी व पूल नादुरुस्त झाले. जी. आय. पी. वर वाघूर नदीवरील पुलाच्या ६० फूट लांबीच्या ४ कमानी वाहून गेल्या.

अपघातः—१९२९–३० मध्यें हिंदी रेल्वेवरील अपघातांत ३३६५ लोक मेले, व ८०५४ लोकांना इजा झाल्या.१९३०–३१ सालीं ३१८० मेले, व ८५४७ लोकांना इजा झाल्या. ३१८० मेलेल्यांपैकीं, १९२१ रेल्वेलाईन ओलांडीत असतां मेले, ३६५ नीं (पोलिसांचे अहवाला प्रमाणें) आत्महत्या केली व ६८ लोक रेल्वेच्या हद्दींत (आगगाडीखालीं न सांपडतां, मृत्यु पावले. १९३०–३१ सालीं झालेले रेल्वेवरील एकंदर अपघात २२३०१; १९२९–३० मध्यें २३५२६ होते. आगगाडीखालीं गुरें सांपडण्याचें प्रमाण शेंकडा ४० आहे. प्यासेंजर गाड्याखेरीज इतर गाड्यांना अपघात शेंकडा १९, डबे जोडण्यांत झालेल्या चुकीमुळें शें. १४, एंजिन–ड्रायव्हरच्या चुकीमुळें शें. ११, इंजिनला वापरलेलीं यंत्रे हलकीं निघाल्यामुळें, शें. ३. असें प्रमाण आहे.

विशेष महत्त्वाचे अपघातः—बी. बी. सी. आय. रेल्वेवर १० जून १९३० रोजीं एका मिक्सड् गाडीला सोनासन ते हिंमतनगर मध्यें वादळामुळें अपघात झाला. ९ डबे उलटले, २४ उतारू जखमी झाले, त्यांपैकीं १ मेला; नुकसान रु. १८००.जी. आय. पी. वर २४ जुलै १९३० रोजीं पुणें ते रायचूर मार्गावर नारायणपेठ व यादगिरी यामध्यें प्यासेंजर गाडीला अडथळा आल्यामुळें अपघात झाला. २ रेल्वेनोकर व ३ उतारू थोडे जखमी झाले. नुकसान रु. ३५८४.

प्रसिद्धीखातें:—या वर्षी व्यापारमंदीमुळें व हिंदी राजकीय परिस्थितीमुळें परदेशचे उतारू फारच कमी आले व इतर भागांतील ने–आणही मंदावली. त्यामुळें उत्पन्नांत तूट आली. व प्रसिद्धी खात्याकडे खर्च होणाऱ्या रकमेंत कपात करावी लागली. तरी नैमित्तिक विषयाच्या चित्रपटांखेरीज या खात्यानें काश्मीर व शिलांग व नवीन दिल्लीचा अनावरण समारंभ, वगैरे चित्रपट प्रवाशाकरितां घेतले. क्षेत्रांचें वर्णन करणारीं पत्रकें यावर्षी ३१८००० वाटलीं.

हिंदी रेल्वेच्या प्रसिद्धीखात्याचीं लंडनला ५७, हेमार्केट व इंडिया हाऊसमध्यें ऑफिसें आहेत. तिकडील वर्तमानपत्रांतून जाहिराती देणें, वर्तमानपत्रकर्ते, ग्रंथकार, शैक्षणिक संस्था यांचें सहकार्य मिळविणें, व इतर तऱ्हेनें हिंदुस्थानांत प्रवास करण्याबद्दलची तिकडील जनतेंत आवड उत्पन्न करणें हीं त्या ऑफिसांचीं कामें आहेत.

न्यूयॉर्कला, ३८, ईस्ट ५७ स्ट्रीट, येथें ऑफिस उघडलें. अमेरिकन प्रवाशांच्या डोळ्यापुढें हिंदुस्थानचें नांव प्रामुख्यानें पुढें ठेवणें व हिंदुस्थानबद्दल तिकडील जनतेला व ट्रॅफिक एजंटांना माहिती पुरविणें हीं त्या ऑफिसचीं कामें आहेत.

सरकार व रेल्वे यांचें संबंधः— ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रमुख रेल्वेपैकीं एन्.डब्ल्यू. आर., इ. बी. आर., इ. आय. आर., जी. आय. पी. आर. व बर्मा रेल्वे या पांच सरकारचे मालकीच्या व नियंत्रणाखालीं आहेत. बी. बी. सी.आय. आर., एम्. एस्. एम्.,आसाम–बेंगाल, बी. एन्. आर., एस्. आय. आर. या पांच सरकारी मालकीच्या पण खाजगी कंपन्यांचे नियंत्रणाखालीं आहेत. बी. एन्. डब्ल्यू.आर. व रोहिलखंड कुमौन व इतर बऱ्याच खाजगी मालमत्ता आहेत. व पुष्कळ बारीकसारीक रेल्वे फाटे जिल्हा बोर्डाचे मालकीचेहि आहेत.

इंडियन रेल्वे ॲक्ट १८९० प्रमाणें हिंदुस्थानसरकारला ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेवर सत्ता गाजवितां येते. उदा. सरकारी इन्स्पेक्टरचे दाखल्याखेरीज नवीन रेल्वेलाईन उघडतां येत नाहीं. उतारूंचे संरक्षणाचे सबबीवर रेल्वे बंद करतां येते. रेल्वे इंजिनें व डबे नापास करतां येतात. व महत्त्वाचे तक्रारींच्या चौकशीकरतां रेल्वे कमिशन नेमतां येते. खाजगी कंपन्यांमध्यें सरकारचे आर्थिक हितसंबंधहि गुंतलेले आहेत.

हिंदुस्थानांतील रेल्वेची पूर्वपीठिकाः—

१८४४:—आर.एम्.स्टीफन्सननें ईस्ट इंडिया कंपनी पुढें हिंदुस्थानांत रेल्वे बांधण्याची योजना मांडली.
१८४९:—कलकत्ता ते मिर्झापूर ही १०० मैलांची लाईन बांधण्याचा इ. आय. आर.कंपनीशीं करार केला. व मुंबई ते कल्याण फाटयाबद्दल जी. आय. पी. कंपनीशीं करार केला.

१८५४:—लॉर्ड डलहौसीनें अशी शिफारस केली कीं, सरकारनें स्वत: रेल्वे बांधण्यापेक्षां तें कंपन्यांचे एजन्सीकडे सोपविण्यांत सार्वजनिक हिताचे दृष्टीनें फायद्याचें आहे. व इंग्लिश कंपन्या व इंग्लिश भांडवल हीं रेल्वेकरतां उपयोगिल्यानें हिंदुस्थानचें कल्याणच होईल. तेव्हांपासून खाजगी कंपन्याकडे रेल्वे बांधण्याचीं कामें सोपविण्यांत येऊं लागलीं.

१८५४–६०:— इ. आय. आर., जी. आय. पी. आर., मद्रास, बी. बी. सी. आय. आर., सिंध, ई. बी. आर. ग्रेट सदर्न ऑफ इंडिया कलकत्ता अँड साउथ ईस्टर्न या रेल्वे कंपन्यांशीं रेल्वे बांधण्याचे करारनामे झाले. रेल्वे ९९ वर्षांच्या करारानें कंपन्यांचे ताब्यांत दिल्या.

१८६७:———इंडियन ब्रँच रेल्वे कंपनी अयोध्या (रोहिलखंड रेल्वे कंपनी). शीं करारपत्र केलें.

१८७०:— कर्नाटक रेल्वे कंपनीशीं करारपत्र केलें.

१८६९–८०:—सरकारनेंच आपल्या भांडवलावर रेल्वे बांधण्यास सुरवात केली व इंडस व्हॅली पंजाब नार्दर्न, राजपुताना—माळवा, नार्दर्न बेंगाल, वगैरे रेल्वे बांधल्या.

१८७९:—रेल्वे हिंदुस्थानांत सुरूं झाल्यापासून पंचवीस वर्षांत, कंपन्यांनीं ६१२८ मैल रेल्वे बांधली. व सरकारनें २१७५ मैल बांधली.

१८८१–१८८७:—मध्यें बेंगाल सेंट्रल, बी. एन्. डब्ल्यू. आर. रोहिलखंड कुमौन हृया तीन नवीन कंपन्या सरकारी गॅरंटीशिवाय, व सदर्न मराठा, इंडियन मिडलँड, बी. एन्. आर. या गॅरंटी मिळालेल्या रेल्वे कंपन्या स्थापन झाल्या.

१८९२:—आसाम—बंगाल रेल्वे कंपनी स्थापन झाली.

कंपन्यांवरील हल्लींच्या सरकारी नियंत्रणाचें स्वरूप:—

स्टेट सेक्रेटरीच्या पसंतीस उतरेल अशी यंत्रसामुग्री, नोकरवर्ग व व्यवस्था असली पाहिजे. त्याच्या हुकुमावरून लायनींत बदल किंवा सुधारणा केली पाहिजे. उतारू व माल यांच्या ने-आणीचे कंपनीनें ठरविलेल्या दरांस त्याची मंजुरी पाहिजे. कपन्यांनीं आपला जमाखर्च स्टेट सेक्रेटरींच्या मंजुरीकरितां सादर केला पाहिजे.

सरकारच्या ताब्यांतील रेल्वेवरील

जमाखर्चाचा तक्ता.

सन १९३०–३१; आंकडे हजारांचे आहेत.

रेल्वे	उत्पन्न	खर्च	नफातोटा
१ नॉर्थ वेस्टर्न	१६४५४५	१३४७२१	—३३३८९
२ ईस्टर्न बंगाल	५८६००	४६५७३	—७९५९
३ ईस्ट इंडियन	१८२४३०	१२२४४०	—१७७१
४ जी. आय. पी.	१३३३३६	१०४५७८	—१७२२३
५ बर्मा	४२७८१	३१२६०	—४३७५

कंपन्यांनीं चालविलेल्या सरकारी रेल्वे

१ बंगाल-नाग.	८१७०१	६६७२५	—१९९०२
२ बी.बी.सी.अ	१०८९६०	७४७२२	+४३०८
३ एम.एस.एम	७९८२०	४७५८८	+१३१
४ साउथ इंडि.	५७९९७	३५६९४	+३१०६
५ इतर रेल्वे	४०७९६	२६८१६	—१८६२

न्याय खातें

राज्यव्यवस्थेंतील पृथक् पृथक् हितसंबंध संभाळण्यासाठीं राज्ययंत्राचे विभाग पाडावे लागतात. त्यालाच इंग्रजींत एक्झिक्यूटिव्ह (कार्यकारी), लेजिस्लेटिव्ह (कायदेकारी), ज्युडिशिअरी (न्याय) अशीं नावें आहेत. पैकीं न्याय खात्याविषयीं पुढील माहिती आहे.

कायदा योग्य आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याचें काम न्यायाधीशाचें नाहीं. फक्त विशिष्ट कृत्यें प्रचलित कायद्यान्वयें न्यायाचीं आहेत कीं नाहींत हे ठरविण्याचें काम न्यायाधीशाचें आहे. कायदा वाईट आहे, अन्यायाचा आहे म्हणून न्यायाधीश तो झुगारून देत नाहीं. परंतु ही गोष्ट जरी तात्त्विक दृष्टीनें खरी असली तरी व्यावहारिक दृष्टीनें कायदा स्पष्ट किंवा विशद करणें एवढेंच काम काटेतोलपणें न्यायाधीश करीत नाहींत. न्यायाधीश झाला तरी तो एक मनुष्य प्राणीच आहे, व म्हणून मनुष्यप्राण्याचे ठायीं असलेले सर्व गुणदोष त्याचे निकालांत प्रतिबिंबित होतात. व्यवहारांत असे कित्येक प्रसंग उद्भवतात कीं, जे कायदा कितीही विशद केलेला असला तरी त्याच्या कक्षेंत येत नाहींत. अशा वेळेला न्यायाधीशाला सारासार व युक्तायुक्त विचार करूनच निवाडा करावा लागतो. त्याचप्रमाणें कायद्याची भाषा संदिग्ध असतां ती स्पष्ट करणें व तिचा अर्थ करणें हेंही न्यायाधीशाचें काम असतें. अशा रीतीनें पूर्वीं दिलेला निकाल पुढील प्रसंगीं मार्गदर्शक होतो, व कांहीं अंशीं नवीन कायदा हळुहळू अस्तित्वांत येतो, त्यासच "न्यायाधीशकृत" कायदा म्हणतात. कित्येक देशांत न्यायखात्यास इतर दोन्ही विभागांपेक्षां जास्त प्राधान्य दिलेलें आहे. म्हणजे कायदेमंडळानें पास केलेले कायदे बेकायदा आहेत असें ठरविण्याचा अधिकार न्यायाधीशाचा असतो. ही पद्धत अमेरिकेंत प्रचलित आहे. उलट पक्षीं युरोपमधील देशांत कायदेमंडळानें पास केलेले कायदे फिरविण्याचा अधिकार न्यायासनास नाहीं. वरील विवेचनावरून न्यायखात्यास राज्यव्यवस्थेंत किती महत्त्व आहे हें दृष्टोत्पत्तीस येईल. हिंदुस्थानांत प्राचीन काळींही न्यायासनाचे महत्त्व फार मानलें होतें. मनुस्मृतीच्या आठव्या अध्यायांत न्यायाचे विवेचन केलेलें आहे. मनूनें व्यवहाराचे खालील प्रमाणें अठरा भाग केलेले आहेतः—(१) ऋणादान (कर्ज घेणें) (२) निक्षेप ठेव ठेवणें, (३) ज्याला स्वामी नाहीं अशा वस्तूंचा केलेला विक्रय, (४) संभूय समुत्थान—अनेक लोकांनीं मिळून व्यापारादि करणें, (५) दिलेलें दान परत घेणें, (६) सेवकांचें वेतन न देणें, (७) केलेल्या संकेताचें उल्लंघन करणें, (८) विकत दिलेली किंवा विकत घेतलेली वस्तु पसंत न पडल्यामुळें देणारांस किंवा घेणारास पश्चात्ताप होऊन त्यामुळें उत्पन्न होणारा वाद, (९) स्वामी व गुराखी यांच्या मधील पशूविषयीं होणारा वाद, (१०) ग्रामादि सीमांचा वाद, (११) शिव्यागाळी देणें, (१२) स्तेय (चोरी), (१३) साहस—बलात्कारानें धन ग्रहण करणें, (१४) स्त्री व परपुरुष—यांच्या समागमापासून होणारा वाद, (१५) स्त्रिया पुरुष यांची धर्मामध्यें व्यवस्था, (१६) पितृसंबंधीं धनाचा विचार, (१७) द्यूत, (१८) प्रकिर्णक. हिंदूकल्पनेप्रमाणें राजा हा साक्षात् विष्णूचा अवतार समजला जातो, व न्यायदानाचें पवित्र कर्तव्य करण्याची जबाबदारी राजाचे शिरावर असते. परंतु राजा दुसऱ्या कार्यांत निमग्न झाल्यामुळें किंवा रोगादिकांनीं व्याकूळ झाल्यामुळें किंवा स्वतः काम करीत नाहीं, अशावेळीं त्यानें न्यायदानासाठीं कार्यकुशल ब्राह्मण नेमावे. "धर्मशास्त्राप्रमाणें जेथें राजा खरें व खोटें यांजविषयीं न्याय करतो त्या जागेस न्यायदानाची जागा म्हणावी" अशी न्यायगृहाची व्याख्या कात्यायनांनीं दिलेली आहे. राजा, प्राड्विवेकमंत्री, गृहपुरोहित, नियुक्त ब्राह्मण व असेसर असे न्यायगृहाचे अधिकारी असावेत असेंही कात्यायनांनीं सांगितलें आहे. जो तंटयासंबंधीं प्रश्न किंवा उलट प्रश्न विचारतो व अशा रीतीनें तंटयासंबंधीं पूर्ण माहिती काढून घेतो त्यास प्राड्विवाक म्हणावें. असें बृहस्पति सांगतात. हें काम हल्लीं न्यायाधीशांवर सोपविलेलें असतें. सर्व शास्त्रांत निष्णात, निर्लोभी,

सत्यवक्ता अशा मनुष्यास अमात्य नेमावें. वाङ्-मय–विशारद,सत्यवक्ते, कायदेपंडित आणि शत्रु व मित्र यांसंबंधीं न्यायाचे कामी भेदभाव न करणारे अशा लोकांस असेसर (पंच) नेमावें असें याज्ञवल्क्य म्हणतात. याखेरीज न्यायखात्यांत दोन कामगार नेमावेत. चिटणीस व एक वाकनीस. दोघांनाही शब्दाचे अर्थ व व्युत्पत्ति माहीत असून हिशेब करण्यांत ते तयार असावेत. व त्यांसच निरनिराळ्या भाषा अवगत असाव्यात.त्याचप्रमाणें साक्षीदार, वादी व प्रतिवादी यांस बोलावणें, त्यांचा ताबा घेणें व त्यांच्यावर देखरेख ठेवणें या कामासाठीं एक मनुष्य असावा व तो जातीनें शूद्र असावा. अमात्याचे जागेसाठीं लायक ब्राह्मण नसल्यास क्षत्रिय किंवा वैश्य लायक असल्यास त्यांची नेमणूक राजानें करावी. वरील सर्व अधिकाऱ्यास निरनिराळी कामें वाटून दिलेलीं असत. मुख्य न्यायाधीश (प्राड्विवाक) यानें इतर असेसरांचे संमतीनें दाव्याची प्राथमिक चौकशी करून राजाकडे रिपोर्ट करावा व त्या रिपोर्टावरून जरूर ते हुकूम राजानें करावे. पैशासंबंधीं हिशेब करणें व ठेवणें हें काम वाकनिसाकडे सोपविलेलें होतें.

मनूचे वेळीं सर्वसाधारण कोर्टाखेरीज स्थानिक न्यायालयेंही असत. त्यांची परंपरा कुळे, श्रेणी व पूग अशी होती. ह्यावर स्थानिक कोर्टाला आपआपल्या मर्यादेंत विशिष्ट हक्क दिलेले असत. कुळानें दिलेल्या निकालांवर श्रेणीकडे अपील होई व श्रेणीनें दिलेल्या निकालावर पूगाकडे अपील चाले व ह्याचे निकालावर प्रत्यक्ष राजाकडे किंवा त्याने नेमलेल्या अधिकाऱ्याकडे अपील असे. नारदाच्या म्हणण्याप्रमाणें शेवटचें अपील प्रत्यक्ष राजाकडे असे. याखेरीज अरण्यांत वास्तव्य करणाऱ्या लोकांसाठीं अरण्यांत व सैनिक ज्या जागीं उतरले असतील त्या जागीं सैनिकांकरितां अशीं कोर्टें स्थापावींत असे बृहस्पति सांगतात. वादीनें तक्रार दिल्याशिवाय कोठलाही दिवाणी दावा चालत नसे. फिर्याद दाखल करणारा मनुष्य स्वतः वादी किंवा वादीचा बाप, भाऊ, मुलगा अगर मुखत्यार असावा. फौजदारी कामांत फिर्यादीनें न्यायाधीशासमोर हजर राहून आपलें गाऱ्हाणें सांगावें व तें कोर्टानें नेमलेल्या लेखकांनीं लिहून घ्यावें. व फिर्यादीकडून पूर्ण खुलासा होण्यासाठीं त्याला प्रश्न विचारावे. फिर्याद योग्य आहे व खरी आहे असें कोर्टास वाटल्यास प्रतिवादीला आज्ञापत्रानें बोलावण्यांत येत असे. फिर्याद खोटी अविश्वसनीय अशी असल्यास काढून टाकीत असत. प्रतिवादी आपलें म्हणणें सादर करीपर्यंत वादीस फिर्याद दुरुस्त करण्याचा हक्क नारदानें दिला होता. प्रतिवादी कोर्टापुढें हजर झाल्यानंतर दाव्यासंबंधीं अगर गुन्ह्यासंबंधीं त्याचें काय म्हणणें आहे हें त्यास वादीचे देखत कोर्टापुढें सांगावें लागत असे. प्रतिवादीचे उत्तरानंतर दाव्याचें काम कोणीं सुरू करावें हें कोर्ट ठरवीत असे व हें ठरविल्यानंतर उभयपक्षास आपल्या म्हणण्यास बळकटी आणण्यासाठीं जामीन करण्याची परवानगी असे.उभय पक्षाचा पुरावा ऐकून घेतल्यानंतर न्यायाधीशानें आपला निकाल जाहीर करावा व ज्या बाजूचा निकाल असेल त्या बाजूस न्यायाधीशाकडून जयपत्र मिळत असे. उभयपक्षाकडून कोर्टानें जयपत्राचें काम पूर्ण करण्यासाठीं जामीन घ्यावा असें याज्ञवल्क्यानें लिहिलें आहे. जयपत्राप्रमाणें दाद देण्याचें काम राजावर सोंपविलेलें असे. खोट्या पुराव्यानें, फसवून किंवा बळजबरीनें मिळविलेल्या जयपत्राचा फेरविचार (रिव्हिजन) करण्याचा अधिकार न्यायाधिशास दिलेला होता. त्याचप्रमाणें स्त्रिया, वेडे, रोगपीडित, बेशुद्ध व वयांत न आलेले अशा लोकांवर मिळविलेलें जयपत्र बेकायदा गणलें जात असे.

अकबराचे वेळीं राज्याचे पंधरा प्रांत केले होते. प्रत्येक प्रांतावर एक मुख्य गव्हर्नर अधिकारी असे व त्याचे खालीं सुभेदार,नबाब, नझीम वगैरे अधिकारी असत. याखेरीज त्याचेवेळीं राज्यांत मनसबदार नांवाचे अधिकारी असत. त्याचे तेहतीस वर्ग केले होते. राज्यांतील प्रत्येक मोठ्या अधिकाऱ्यास न्याय करण्याचा अधिकार असे. हा अधिकार फौजदारी गुन्ह्याचे बाबतींत जास्त असे. दिवाणी दाव्यांचा निकाल सर्वसाधारणपणें कुराणांत सांगितलेल्या आज्ञेप्रमाणें काजी करीत असत. प्रत्येक गव्हर्नर अगर वरिष्ठ अधिकारी यांस सर्व बाबतींत न्याय करण्याचा अधिकार असे. हल्लींप्रमाणें न्यायखातें अगर न्याय करणारे स्वतंत्र अधिकारी नसत. लेखी निकाल दिले जात नसत. तोंडी साक्षीदार अगर शपथा घेणें वगैरे गोष्टींस विशेष महत्त्व न देतां अधिकाऱ्यानेंच मनुष्य स्वभावाची पारख करून व सारासार विचार करून न्यायनिवाडा करावा, असा सरकारी हुकूम असे. फांशीची शिक्षा देण्यासंबंधीं किंवा कोणत्याच बाबतींत सर्वसाधारण उपयोगी पडणारे असे नियम नव्हते. प्रत्येक ठिकाणचे जमिनदारांस खात्यांची चौकशी करण्याचा

अधिकार दिला होता. फक्त फांशीची शिक्षा असलेल्या गुन्ह्यांचे निकालाचा रिपोर्ट नबाबाकडे पाठवावा लागत असे. राजधानीचे शहरीं भयंकर स्वरूपाचे खटले नवाब नझीम स्वतः चालवीत असे. साधारण मोठ्या स्वरूपाचे गुन्हे नायब नझीमाकडे चौकशीकरतां पाठविले जात असत. किरकोळ स्वरूपाचे गुन्ह्यांची चौकशी फौजदार, कोतवाल, वगैरे कनिष्ठ अधिकारी करीत असत.

मराठी राज्याचे वेळची न्यायपद्धति फार सोपी व सर्व दर्जाचे लोकांस सोईची अशी होती. कायद्याची स्पष्ट व सुसंगतवार व्यवस्था नव्हती, तरी बरेचसे निवाडे पूर्वापार वहिवाटीच्या अनुरोधानें केले जात असत. शक्य तों वादी व प्रतिवादी यांजमधील भांडणें आपसांत मिटविण्याकडे लोकांची प्रवृत्ति असे. आपसांत भांडण मिटण्यासारखें नसेल तर कोणीतरी लवाद नेमून तें भांडण मिटविण्याची खटपट करीत असत. लवादानें भांडण मिटविल्यास राजा आपली फी माफ करीत असे. खेड्यांतील मुख्य न्यायाधिकारी पाटील असे. मामलेदार व सर सुभेदार हे त्याचेवरील वरिष्ठ अधिकारी असत.व सर्वांचेवर देखरेख करण्याचा अधिकार पेशव्यांस दिला होता. इंग्लंडमधील राजाप्रमाणें मराठी राज्यास न्यायाचे बाबतींत राजा म्हणून शेवटचा अधिकार असे. मोठमोठ्या शहराच्या ठिकाणीं शास्त्रांत प्रवीण अशा न्यायाधिशांची नेमणूक होत असे. मराठ्यांचे वेळीं अम्मलबजावणीखातें व न्यायखातें यांचें पृथःकरण झालें नव्हतें. दिवाणी बाबतींत पंचायत पद्धतीनें न्याय केला जात असे. किरकोळ बाबतींत खेडेगावांत पाटील व शहरांत नगरशेट पंचायत भरवीत असत. उभय पक्षकारांस पंचाचा निकाल कबूल करण्याबाबत राजिनामा लिहून द्यावा लागत असे. व पूर्ण चौकशी करून व पुराव्याचा सारांश काढून पंचांना निकाल द्यावा लागत असे. अशा निकालास कायमपणा येण्यास मामलेदारांची मान्यता लागत असे. पंचांनीं लांच खाऊन अगर द्वेषबुद्धीनें एकादे पक्षकाराचे विरुद्ध निकाल दिल्यास तो निकाल फिरविला जात असे व पुनः पंच अगर लवाद नेमून निकाल देत असत. पंचांना पांच परमेश्वर अशी संज्ञा जनतेनें दिली होती. यावरून पंचायत पद्धतीवर न्याय देण्याचे बाबतींत लोकांचा विश्वास असला पाहिजे, ही गोष्ट स्पष्ट होते. पंचायतीचे मदतीनें निकाल देण्याची पूर्वीची पद्धती व हल्लींची पंच–पद्धती यांजमध्यें अंतर आहे. उभय पक्षांस आपले पंच नेमण्याचा अधिकार असे, व ते गांवांतील माहितगार लोक असल्यामुळें न्यायाधीश म्हणून काम करण्यापेक्षां वकील या नात्यानेंच त्यांचें काम जास्त होई. पंचांवर देखरेख करण्यास हल्लींसारखा वरिष्ठ अधिकारी नसे. फौजदारी कामांत पंचायत पद्धति विशेष अमलांत आल्याचें आढळत नाहीं. साधारण गांवांतील देशमुख, देशपांडे व इतर जातींतील लोक यांसच पंच नेमीत असत.पंचायतीस सरकारकडून मान्यता मिळाल्याखेरीज काम करितां येत नसे. तंट्याचा निकाल झाल्यावर पराजित पावलेल्या बाजूस तंटयांतील विषयांवर हक्क सोडल्याबद्दल कागद करून द्यावा लागत असे; व जय मिळालेल्या बाजूस सरकारी फीबद्दल शेंकडा पंचवीस टक्के सरकारास द्यावे लागत असत. याव्यतिरिक्त पक्षकारास इतर कोणताही खर्च करावा लागत नसे. यामुळें वरील फी कोणासही डोईजड वाटत नसे. फौजदारी गुन्ह्याचे बाबतींत फांशीची शिक्षा सहसा देत नसत. खून व राजद्रोहासारखे गुन्ह्यास दंड, कैद, अगर मालमत्ता जप्तकरणें अशा सारखी शिक्षा दिली जात असे. दंड करतांना आरोपीची सांपत्तिक स्थिति विचारांत घेत असत.

पंचायत पद्धतीमुळें, सर्वसाधारण गरीब लोकांस सुद्धां फारसा विलंब न लागतां न्याय मिळत असे व यामुळेंच ही पद्धत विशेष प्रचारांत आली होती. पंचायतीकडून योग्य व खरा न्याय मिळत नाहीं, अगर अन्याय केले जात आहेत, अशाबद्दल लोकांच्या विशेष तक्रारी झाल्याचें दिसत नाहीं. पंचायतीकडून अगर खेडेगांवांतच न्याय देण्याची पद्धति हल्लीं मध्यप्रांत व मद्रासचे बाजूस आहे व ती चांगल्या प्रकारें चालू आहे, अशाबद्दल लोकांचा रिपोर्ट आहे. मुंबई कायदेमंडळांत ग्रामपंचायतीबाबत एक नवें बिल सरकारकडून मांडलें गेलें आहे.या बिलान्वयें खेडेगांवांतील लोकांस कांहीं विशिष्ट क्षुल्लक गुन्ह्याची चौकशी खेडेगांवांतच करण्याचा अधिकार दिला जाणार आहे. अशा गुन्ह्यांची चौकशी करण्याचे वेळीं, पक्षकारांस वकिलाची मदत घेतां येणार नाहीं. व अशा रीतीनें झालेल्या निकालावर अपील वगैरे करण्याचा हक्क देण्यांत येणार नाहीं. दिवाणी दाव्याचे बाबतींत विषयाच्या किंमतीची मर्यादा पंचवीस रुपये ठेवण्यांत आली आहे. पंचवीस रुपयाचें आंतील खेडेगांवांतील सर्व दावे खेडेगांवांतच चालावे अशाबद्दल वरील बिलांत

व्यवस्था करण्यांत आली आहे. या बिलाचें पहिलें वाचन मंजूर होऊन सदरहू बिल हल्लीं सिलेक्ट कमेटीकडे गेलें आहे. या बिलांत कमीजास्त दुरुस्त्या होऊन मंजुरी मिळाल्यास ग्रामसुधारणेबाबत प्रगति होण्यास मदत होईल. अशा तऱ्हेचा कायदा झाल्यावर जनतेस त्यापासून फायदा होईल अशी सर्वसाधारण अपेक्षा आहे.

इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत आपलें राज्य स्थापल्यानंतर हळूंहळूं पूर्वीं अस्तित्वांत असलेली न्यायपद्धति बदलली. ईस्ट इंडिया कंपनीचें अस्तित्व केवळ व्यापारी कामासाठीं असल्यामुळें कंपनीचे पूर्व अंमलांत न्यायखात्यासंबंधीं हक्क व विचार असणें शक्य नव्हतें. इलिझाबेथनें दिलेल्या सनदेअन्वयें योग्य शासन करण्याचा अधिकार अधिकाऱ्यांस दिला होता, परंतु तो अधिकारखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा कनिष्ठ अधिकाऱ्यावर असलेल्या अधिकाराच्या स्वरूपाचा होता. १६६१ च्या सनदेअन्वयें प्रत्येक वसाहतीचा गव्हर्नर व कौन्सिल यांना कंपनीचे नोकर व प्रजाजन यांचे बाबतींत दिवाणी अगर फौजदारी कामांचे निवाडे करण्याचा हक्क दिला होता. १६६९ सालीं मुंबईंत दोन तऱ्हेचीं कोर्टें स्थापन झालीं. एक कनिष्ठ दर्जाचें कोर्ट असून यांत एतद्देशीय अंमलदारांसह एकंदर तीन अंमलदार असत.ह्या कोर्टाला विवक्षित मर्यादेपर्यंत काम करण्याचा अधिकार असे. दुसरें वरिष्ठ कोर्ट डेप्युटी गव्हर्नर व त्याचें कौन्सिल यांचें बनविलें होतें. ह्या कोर्टानें दिलेले निकाल कायम समजले जात असत.

१७७३ च्या रेग्युलेटिंग कायद्यान्वयें बंगालमध्यें वरिष्ठ कोर्ट (सुप्रीम कोर्ट) स्थापण्यांत आलें व तें कोर्ट १८६२ पर्यंत चालूं होतें. इंग्लंडच्या बादशहानें नेमलेले सर न्यायाधीश व त्याचे चार मदतनीस असे पांच न्यायाधीश या कोर्टांत काम करीत असत. दिवाणी,फौजदारी, धार्मिक व आरमारी वगैरे सर्व बाबतींत न्याय करण्याचा या कोर्टास अधिकार असे. बंगालमधील ब्रिटिश प्रजाजनावर व जे आपले तंटे चालविण्याची लेखी संमती देतील अशा सर्व लोकांवर ह्या कोर्टाचा अधिकार चालत असे. वरिष्ठ कोर्टाचे अधिकार अस्पष्ट व अनिर्णित राहिल्यामुळें ग. ज. व वरिष्ठ कोर्ट यांमध्यें मतभेद सुरू झाले. व त्यामुळें १७८१ चा दुरुस्ती कायदा करणें भाग पडलें. या कायद्यान्वयें ग. ज. व त्याचें कौन्सिल यांनीं केलेल्या सार्वजनिक स्वरूपाचे कामांत वरिष्ठ कोर्टास ढवळाढवळ करतां येणार नाहीं, असें नियंत्रण घालण्यांत आलें. त्याचप्रमाणें जमीनदार, शेतकरी व पेन्शनर कंपनीच्या हद्दींत राहतात एवढ्याच कारणानें त्यांजवर या कोर्टाची हुकमत चालूं नये असेंही ठरविण्यांत आलें. कलकत्ता येथें राहणाऱ्या हिंदु व मुसलमान रयतेसंबंधीं न्याय देतांना हिंदु व मुसलमानी कायद्यांचा उपयोग करावा; व जेथें वादी व प्रतिवादी हे भिन्नधर्मीय असतील तेथें प्रतिवादीचे कायद्यान्वयें न्याय करावा असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें धार्मिक चालीरितीस व वहिवाटीस कोर्टानें मान्यता द्यावी अशी कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. लॉर्ड कॉर्नवॉलीस यानें न्यायखात्यांत बऱ्याच सुधारणा केल्या. १७९३ सालीं त्यानें चार फिरतीं कोर्टें स्थापन केलीं. त्यांतील प्रत्येक कोर्टांत दोन अगर तीन "करारी नोकर" (कॉव्हेनन्टेड) व असेसर असत. भयंकर स्वरूपाचे नसलेल्या फौजदारी गुन्ह्यांची चौकशी करण्याचें काम या कोर्टावर सोपविलेलें असे. दिवाणी कामांत कलेक्टरचीं कामें व न्यायाधीशाचीं कामें निरनिराळीं केलीं. कलेक्टरचे सर्व दिवाणी अधिकार न्यायाधिशांकडे सोंपविण्यांत आले. त्यानें एकंदर सव्वीस न्यायाधीश नेमले. त्यांचे निकालावर अपिलें ऐकण्यासाठीं चार प्रांतिक अपिल कोर्टें स्थापण्यांत आलीं. या कोर्टानें दिलेल्या निकालावर अपील ऐकण्यासाठीं ग.ज. व त्याचें कौन्सिल यांचें कोर्ट असे. नवीन नेमलेल्या न्यायाधीशांवर किरकोळ फौजदारी खटले चालविणें व मोठ्या फौजदारी खटल्यांची प्राथमिक चौकशी करणें अशीं फौजदारी कामेंही सोंपविण्यांत आलीं होतीं.

प्रत्येक इलाख्याच्या राजधानीबाहेरील हद्दींत लॉर्ड कॉर्नवॉलिसनें किरकोळ स्वरूपाचें काम करण्यासाठीं नेटिव्ह कमिशनरचीं कोर्टें स्थापन केलीं होतीं. १८३१ सालीं लॉर्ड बेंटिकनें मुख्य सदर अमीन्स या नांवाचीं नवीन कोर्टें स्थापन केलीं. दाव्याची किंमत कितीही असली तरी तो चालविण्याचा अधिकार या कोर्टांना देण्यांत आला होता. ह्याच कोर्टास १८६८ नंतर मुन्सफाचीं कोर्टें असें नवीन नांव प्राप्त झालें. ह्याच कोर्टाचे धर्तीवर इलाख्याचे गांवीं जीं कोर्टें स्थापण्यांत आलीं होतीं त्यांचें रूपांतर हल्लींच्या 'स्मॉल कॉजेस् कोर्ट'मध्यें झालें.

१८६१च्या हिंदुस्थानच्या हायकोर्टबाबतच्या कायद्यान्वयें बादशहास मुंबई, मद्रास व कलकत्ता येथें हायकोर्टें स्थापण्याचा अधिकार देण्यांत

आला. पूर्वीचीं वरिष्ठ कोर्टे व अदालत कोर्टे बंद करण्यांत आलीं. प्रत्येक हायकोर्टांत एक सर न्यायाधीश व पंधरापर्यंत न्यायाधीश असावेत अशी मर्यादा ठरविण्यांत आली. त्यांपैकीं एकतृतीयांश बॅरिस्टर्स असावेत, व एक तृतीयांश कंपनीचे "करारी नोकर" असावेत असें नियंत्रण घालण्यांत आलें. ज्या ज्या कोर्टांचे निकालावर अपिलें ऐकण्याचा त्यास अधिकार दिला होता, अशा सर्व कोर्टांवर देखरेख ठेवणें, नियम करणें वगैरे सर्व अधिकार हायकोर्टास देण्यांत आले. १८६६ सालीं वायव्य सरहद्दीवरील प्रांतांमध्यें व पंजाबमध्यें वरीष्ठ कोर्टें स्थापण्यांत आलीं. १८५९ ते १८७२ पर्यंत सिव्हिल प्रोसिजर कोड, क्रिमिनल प्रोसिजर कोड, पिनल कोड व पुराव्याबाबत कायदा असे कायदे करून सर्व देशभर एकच कायदा अस्तित्वांत आणला. १९११ च्या हिंदुस्थानच्या हायकोर्टबाबत कायद्यान्वयें न्यायाधिशांची संख्या वीसपर्यंत वाढविण्याचा अधिकार देण्यांत आला. त्याचप्रमाणें तात्पुरते न्यायाधीश नेमण्याचा अधिकार ग. ज. इन कौन्सिल यास देण्यांत आला. हिंदुस्थानच्या कोठल्याही भागांत जरूर लागेल तर नवीन हायकोर्ट स्थापण्याचा अधिकार देण्यांत आला. या अधिकारान्वयें पाटणा, लाहोर व रंगून येथें हायकोर्टें स्थापण्यांत आलीं. हिंदुस्थानचे सर्वांत वरिष्ठ कोर्टांचे अधिकार १९१९ च्या हिंदुस्थानचे राज्यव्यवस्थेबाबतच्या कायद्यान्वयें कायम ठेवण्यांत आले.

मुंबई इलाख्यांतील सर्वांत कनिष्ठ दिवाणी न्यायाचें कोर्ट म्हणजे मुन्सफाचें होय. मुंबई इलाख्याचे सिंध प्रांत वगळून ज एकंदर अठरा जिल्हे आहेत, ह्या जिल्ह्यांच्या कामाचे सोईसाठीं तालुके केले आहेत. अशा जिल्हे व तालुक्याचे ठिकाणीं मुन्सफांचीं कोर्टें स्थापन केलेलीं आहेत. दुसरा वर्ग मुन्सफास ज्या दाव्याच्या विषयाची किंमत हजारापेक्षां जास्त नाहीं असे सर्व दावे चालविण्याचा हक्क आहे. परंतु कित्येक दुसरा-वर्ग मुन्सफास दाव्याच्या विषयाची रक्कम पांच हजारांपेक्षां जास्त असली तरी ते दावे चालविण्याचा अधिकार दिलेला असतो.तथापि अशा अधिकाराची मर्यादा ठरविलेली असते. पांच हजारांवरील सर्व दावे पहिला वर्ग मुन्सफानेंच चालवावे लागतात. दुसरा वर्ग सबजज्ज यानें दिलेल्या निकालावर जिल्हा कोर्टाकडे पहिलें अपील असतें व फक्त कायद्याचे मुद्यावर दुसरें अपील हायकोर्टाकडे असतें. पहिला वर्ग मुन्सफानें दिलेल्या निकालावर फक्त हायकोर्टाकडेच अपील करावें लागतें. साधारण प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं एकतरी पहिला वर्ग मुन्सफ असतोच. तालुक्याचे ठिकाणीं दुसरा वर्ग मुन्सफ असतो. तालुक्यांत काम कमी असल्यास दोन तालुके मिळून एक न्यायाधीश असतो. अशावेळीं तो ठराविक मुदतींत दोन्हीकडे काम करतो. जिल्ह्याचे ठिकाणच्या पहिल्या वर्ग मुन्सफास नादारी अर्जाची चौकशी करावी लागते. त्याचप्रमाणें कित्येक पहिला वर्ग मुन्सफास प्रांतिक जज्जानें वर्ग केलेलीं अपिलें घेण्याचा व वारसा सर्टिफिकेट देण्याचा अधिकार आहे.जादा अधिकारहि सरकारकडून दिले जातात. ज्या जिल्ह्यांना दक्षिण शेतकऱ्याबाबत कायदा पूर्णपणें लागू नाहीं अशा जिल्ह्यांतील पहिला वर्ग व दुसरा वर्ग मुन्सफास किरकोळ दाव्यांची तडकाफडकीनें चौकशी करण्याचा अधिकार देण्यांत येतो. अशा दाव्यांच्या विषयांची किंमत प्रत्येक मुन्सफाचे बाबतींत व्यक्तिपरत्वें ठरविण्यांत येतें. पुणें, सातारा, नगर व सोलापूर ह्या जिल्ह्यांना शेतकरी कायद्याचीं सर्व कलमें लागूं असल्यामुळें ह्या जिल्ह्यांतील मुन्सफास असे अधिकार देण्यांत येत नाहींत. पुणें व अहमदाबाद ह्या दोन गांवीं किरकोळ दाव्यांची चौकशी करण्यासाठीं एक स्वतंत्र न्यायाधीश आहे. त्यास स्मॉलकॉज जज्ज असें म्हणतात. प्रॉमेसरी नोटा,खाते उतारे, भाडें वसूल करणें वगैरेसारख्या किरकोळ दाव्यांची तडकाफडकीनें चौकशी करण्याचें काम या कोर्टांत होतें. क्षुल्लक बाबतीकरितां दावे विनाकारण लांबणीवर पडूं नयेत व पक्षकाराची गैरसोय होऊं नये याच हेतूनें अशा दाव्यांची तडकाफडकीनें चौकशी केली जाते.पुणे व अहमदाबाद या ठिकाणीं अशा दाव्यांची संख्या सहा सात हजारांवर असल्यामुळें त्यासाठीं एक स्वतंत्र न्यायाधीश नेमलेला आहे. स्मॉलकॉज कोर्टाचे मदतीस एक रजिस्ट्रार या नांवाचा अधिकारी दिलेला असतो. या अधिकाऱ्यास पन्नास रुपयांचे आंतील दावे चालविण्याचा अधिकार दिलेला आहे. नवीन घेतलेल्या मुन्सफास तीन वर्षांपर्यंत प्रोबेशनर म्हणून काम करावें लागतें व तीन वर्षांनंतर त्याची नेमणूक कायम केली जाते. वकीली सुरू करून तीन वर्षें झाल्यावर ज्याचें वय तिसापेक्षां जास्त नाहीं अशा वकिलास मुन्सफिकरतां अर्ज करतां येतो. सर्वसाधारणपणें

पहिल्या वर्गांत वकीलीची परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांस हायकोर्टाकडून निवडलें जातें.

हायकोर्ट व मुन्सफकोर्ट यांजमधील साखळीचा दुवा म्हणजे प्रांतिक उर्फ जिल्हा कोर्ट होय. प्रत्येक जिल्हयाचे ठिकाणीं एक डिस्ट्रिक्ट जज्ज असतो. परंतु ज्या जिल्हयांत काम कमी आहे अशा ठिकाणीं दोन जिल्हे मिळून एक जिल्हाजज्ज असतो. जिल्हयांतील मुन्सफांचे कोर्टांवर देखरेख करणें, मुन्सफांचे निकालावर झालेलीं अपिलें ऐकणें हीं जिल्हाकोर्टाचीं मुख्यतः कामे होत. हयाखेरीज मृत्युपत्रावाबत चौकशी, वारसाची चौकशी, कोर्ट ऑफ वॉर्डर्स, गार्डियन्स् अँड वॉर्डस् कायदा, कॉपिराइट वगैरे संबंधीं सर्व अव्वल कामें जिल्हा कोर्टांत चालतात. डिस्ट्रिक्ट जज्जाचे मदतीस असिस्टंट व ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज असतात. त्यांची निवडणूक मुख्यत: आय. सी. एस्. व मुन्सफ यांचेमधून केली जाते. परंतु कांहीं कांहीं वेळीं वकील वर्गांतून असिस्टंट जज्ज नेमले जातात. जिल्हा जज्जांपैकीं कांहीं लोक हायकोर्टाचे न्यायाधीश होण्याचा संभव असतो.

फौजदारी काम चालविण्यासाठीं प्रत्येक तालुक्याचे ठिकाणचे मामलेदार व फडणीस यांस मॅजिस्ट्रेटचे अधिकार दिलेले असतात. मॅजिस्ट्रेटच्या अधिकारांचें वर्गीकरण तीन प्रकारें केलेलें आहे. तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट यांस एक महिना शिक्षा व पन्नास रुपये पर्यंत दंड करण्याचा, दुसरा वर्ग मॅजिस्ट्रेट यास ६ महिने व १०० रुपये पर्यंत दंड व पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यास दोन वर्षे व एक हजार रुपये पर्यंत दंड करण्याचा असे अधिकार कायद्याने दिलेले आहेत. दुसरा व तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट यांनीं दिलेल्या निकालावर जिल्हा मॅजिस्ट्रेटकडे अगर प्रांत अधिकाऱ्याकडे अपील करतां येते. परंतु ज्याला सरकारनें मान्यता दिली आहे अशा आपल्या हाताखालील पहिला वर्ग मॅजिस्ट्रेटकडे सदर अपिलें वर्ग करण्याचा अधिकार जिल्हा मॅजिस्ट्रेट यास आहे. ॲसिस्टंट जज्ज, जिल्हा मॅजिस्ट्रेट अगर पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांनीं दिलेल्या निकालावर सेशन्स कोर्टाकडे अपील असतें; परंतु जर ॲसिस्टंट जज्जानें किंवा क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम ३० प्रमाणें अधिकार असलेल्या मॅजिस्ट्रेटनें चार वर्षांपेक्षां जास्त शिक्षा केली असेल तर हायकोर्टाकडेच अपील करावें लागतें. त्याचप्रमाणें राजद्रोहाच्या गुन्ह्याबावत दिलेल्या शिक्षेवर फक्त हायकोर्टाकडेच दाद मागावी लागते.

प्रांतिक सरकारच्या हुकुमानें, खटले चालविण्यास दोन किंवा अधिक मॅजिस्ट्रेट यास एकत्र बसतां येते. अशा एकच खटला ऐकण्यास बसलेल्या दोन किंवा अधिक मॅजिस्ट्रेटांस बेंच मॅजिस्ट्रेट असें म्हणतात. बेंचास पहिला, दुसरा व तिसरा वर्गाचे अधिकार दिलेले असतात. बेंच मॅजिस्ट्रेट यांस व्यक्तिशः निरनिराळचा वर्गाचे अधिकार असू शकतात; परंतु खटला चालविण्यास जे मॅजिस्ट्रेट बसले असतील त्यांतील जास्तींत जास्त अधिकार ज्या मॅजिस्ट्रेटास असतील त्या वर्गाचे अधिकार सामुदायिक रीत्या त्या सर्वांस आहेत असें समजण्यांत येतें. सर्वसाधारण मोठमोठ्या शहराचे ठिकाणीं ज्यास कायदा वगैरे माहीत नाहीं परंतु जे गांवांतील वजनदार व सुखवस्तू गृहस्थ समजले जातात अशा लोकांस ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमण्यांत येतें. त्यांचे अधिकार पगारी मॅजिस्ट्रेट प्रमाणेंच असतात. व्यक्तिशः ऑनररी मॅजिस्ट्रेट एकटे बसू शकतात, परंतु बहुधा अशा लोकांची बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक केली जाते. अशा एकटे बसणाऱ्या लोकांची स्पेशल मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक करावी लागतें. बेंच मॅजिस्ट्रेटसनीं कोणत्या केसेस चालवावयाच्या, त्यांनीं केव्हां व कोठें बसावयाचें, त्यांची गणसंख्या (कोरम) किती असावी, व त्यांच्या त्यांच्यांत झालेल्या मतभेदांचा निकाल कसा करावा वगैरेबद्दल प्रांतिक सरकारनें नियम केलेले आहेत. दोन्ही बाजूस मतें सारखीं पडलीं तर अध्यक्षास जादा मत असतें. ज्यांनीं खटला सुरवातीपासून शेवटपर्यंत स्वत: ऐकला आहे अशाच मॅजिस्ट्रेट लोकांस निकाल देतां येतो. अशा रीतीनें ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत सरकारचे दोन तऱ्हेनें फायदे होतात. खटले चालविण्यासाठीं नेमावयास लागणाऱ्या पगारी नोकरांच्या पगाराची बचत होते व साधारण जनतेवर वजन पाडणाऱ्या लोकांची नेमणूक करून त्यास आपले मदतनीस करून ठेवतां येतें. अशा कायदा न जाणणाऱ्या लोकांकडून न्यायदानासारख्या पवित्र क्षेत्रांत काम करवून घेणें सरकारदृष्टचा कितीही फायदेशीर असलें तरी जनतेच्या दृष्टीनें अयोग्य आहे. अशा लोकांकडून योग्य व खरा न्याय मिळत नाहीं. सबब ही पद्धत बंद करावी अशी जनतेनें ओरड केल्यास त्यांत नवल नाहीं. व अशा तऱ्हेची ओरड जनतेनें बरेच वेळां केली आहे.

तालुक्याच्या ठिकाणचे मामलेदार, फडणीस व जिल्हा कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांवर दोन तऱ्हेचीं कामें करण्याची जबाबदारी आहे. मामलेदार,फडणीस व जिल्हा कलेक्टर यांस शेतसारा वसूल करणें वगैरे मुलकी कामें बघावीं लागतात व मॅजिस्ट्रेट या नात्यानें त्यांस गुन्ह्याची चौकशी करावी लागते. अशा स्थितींत अंमलबजावणी खातें व न्याय खातें ह्यांचें पृथक्करण न झाल्यामुळें जनतेस योग्य न्याय मिळत नाहीं अशी योग्य तक्रार आहे. न्यायखातें व अंमलबजावणीखातें हे दोन विभाग स्वतंत्र करावे म्हणजे न्यायाची अंमलबजावणी योग्य होत जाईल अशाबद्दल कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद मागणी करीत आहेत.

हिंदुस्थानांतील सर्वांत वरिष्ठ कोर्ट हायकोर्टच होय. हायकोर्टांत एक सर न्यायाधीश व वीस पर्यंत इतर न्यायाधीश नेमलेले असतात. त्या सर्वांची नेमणूक बादशहानें केलेली असते. दोन वर्षेपर्यंत मदतनीस म्हणून न्यायाधीश नेमण्याचा अधिकार गव्हर्नर–जनरल–इन–कौंसिल यांना आहे. इंग्लंड व आयर्लंड येथील बॅरिस्टर, अगर स्कॉटलंड येथील ॲडव्होकेट, दहा वर्षेपर्यंत नोकरी करीत असलेले करारी नोकर, पांच वर्षेपर्यंत मुनसफाचें काम केलेले न्यायाधीश, अगर दहा वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत वकीली करीत असलेले वकील यांसच न्यायाधीश नेमतां येतें. प्रत्येक न्यायाधीशाची नेमणूक बादशहाच्या मर्जीची अनुकूलता राहील तितके दिवस असते. कामाच्या व्यवस्थेसाठीं हायकोर्टांतील कामाचें वर्गीकरण मुख्यतः दोन प्रकारें केलें जातें. एक दिवाणी व दुसरें फौजदारी. या दोनही वर्गांचे अव्वल (ओरिजिनल) व अपिलेट असे आणखी दोन भाग केले आहेत. इलाख्याचे मुख्य ठिकाणचे दाव्यांची आकारणी दोन हजार रुपयांच्या वर असल्यास ते सर्व दावे हायकोर्टांत दाखल करावे लागतात. त्याचप्रमाणें प्रत्येक दाव्याची किंमत दोन हजार रुपये किंवा कमी असूनही जे प्रेसिडेंसी स्मॉल कॉजेस कोर्ट ॲक्टाच्या कक्षेत येत नाहींत ते सर्व दावे हायकोर्टांत दाखल करावे लागतात. ह्या सर्व दाव्यांची चौकशी करण्यासाठीं हायकोर्टांतील न्यायाधीश जेव्हां जेव्हां बसतात तेव्हां त्यांस 'हायकोर्टाचा अव्वल दिवाणी अधिकारी' अशी संज्ञा आहे. तालुक्याचे अगर जिल्ह्याचे गांवीं ज्याप्रमाणें मुनसफ काम करतात त्याप्रमाणें हायकोर्टांतील दाव्यांचें काम चालतें. हायकोर्टाचे कक्षेंतील सर्व कनिष्ठ कोर्टें अगर हायकोर्टाचे न्यायाधीशानें अव्वल दाव्यांचे कामीं दिलेले निकाल ह्यांजवर हायकोर्टाकडे जीं अपीलें केलीं जातात तीं अपीलें ऐकण्यासाठीं जेव्हां हायकोर्टांतील न्यायाधीश बसतात, तेव्हां त्यांस हायकोर्टाचा 'दिवाणी अपिलेट अधिकारी' असें संबोधतात. अशीं अपीलें ऐकण्यासाठीं एक स्वतंत्र न्यायाधीश बसतो, किंवा दोन न्यायाधीशांचें कोर्ट बसतें.

हायकोर्टास फौजदारी कामाचे बाबतींत अव्वल अधिकार फारच मर्यादित आहेत. ज्या गुन्ह्यांची चौकशी फक्त सेशन्स कोर्टांत करण्याची असते ते सर्व खटले हायकोर्टांत चालतात. त्या सर्व खटल्यांची चौकशी पंचांचे साहाय्यानें केली जाते. त्या खटल्यांची प्राथमिक चौकशी प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट्स् यांचे कोर्टांत होते. हायकोर्टाचे हुकमतीखालीं असलेल्या कनिष्ठ कोर्टांनें दिलेल्या निकालावर हायकोर्टकडे अपील, फेरतपासणी अगर तपासणी अर्ज करण्याचा हक्क कायद्यानें पक्षकारास दिलेला आहे. ह्यासंबंधीं नियम क्रिमिनल प्रो. कोडमध्यें सांगितले आहेत. अशा अर्जांची चौकशी करण्याकरितां जेव्हां हायकोर्टांतील न्यायाधीश बसतात तेव्हां त्यांस फौजदारी अपीलेट अधिकारी असें म्हणतात.

ह्याखेरीज हायकोर्टास खुद्द इलाख्याचे मुख्य ठिकाणांतील नादारी अर्जांची चौकशी, आरमारी गुन्ह्यांची चौकशी समुद्रावरील गुन्ह्यांची चौकशी व मृत्युपत्राबावत चौकशी वगैरे कामें करावीं लागतात. याखेरीज कनिष्ठ कोर्टांवर देखरेख ठेवणें, काम चालविण्याबाबत नियम करणें वगैरे सर्व कामें हायकोर्टाचे कक्षेंत येतात. सर्वसाधारण इंग्लंडमधील प्रसिद्ध बॅरिस्टरांची नेमणूक सर-न्यायाधीशाच्या जागीं केली जाते. हायकोर्ट सुरू झालें म्हणजे वरील कामांची वाटणी केली जाते. व कामाचे मगदुराप्रमाणें निरनिराळ्या कामासाठीं न्यायाधीश नेमले जातात.

ज्या हायकोर्टांची राजाच्या सनदेनें स्थापना झाली आहे, अशा हायकोर्टांस सदर सनदेन्वयें विशेष अधिकार आहेत. जर एकादें अपील एकट्या न्यायाधिशापुढें चाललें असेल व त्यानें निकाल दिलेला असेल तर तें अपील दोन न्यायाधीशांपुढें चालावें अशी परवानगी मागतां येतें व अशा अपिलास 'लेटर्सपेटंट अन्वयें चाललेलें अपील' असें म्हणतात. त्याचप्रमाणें दोन न्यायाधिशांचे एकाद्या दाव्याचे अगर अपीलाचे बाबतींत

मतैक्य न झालें तर त्या दोन न्यायाधिशांपैकीं जो जास्त जुना असेल त्याच्या मताप्रमाणें निकाल दिला जातो. दोहोंपेक्षां जास्त न्यायाधीश असल्यास बहुमताप्रमाणें निकाल दिला जातो. एकादा कायद्याचा मुद्दा विचारासाठीं पुढे आला व त्याजवर बराच मतभेद असला तर अशा कायद्याच्या मुद्यास आपल्या हायकोर्टापुरतें निश्चितपणाचें स्वरूप येण्याकरितां कोणत्याही न्यायाधिशास त्या मुद्याचा आपण निकाल न करतां तो मुद्दा तीन किंवा अधिक न्यायाधिशांपुढें चालावा असें सांगतां येतें,व असें झालें म्हणजे त्या मुद्याची चौकशी तीन अगर जास्त न्यायाधिशांपुढें चालते व त्या न्यायाधिशानें दिलेल्या निकालाला निश्चिततेचें स्वरूप प्राप्त होतें. ह्याखेरीज एका कोर्टाकडून दुसऱ्या कोर्टाकडे खटला वर्ग करणें, खालील कोर्टानें एकादे बाबतींत चूक अगर अन्याय केला आहे असें वाटल्यास तीं चूक दुरुस्त करणें वगैरे अधिकार हायकोर्टास आहेत. हायकोर्टास जेव्हां सुटी असते त्यावेळीं सुटींत काम करण्यास व्हेकेशन जज्ज नेमला जातो.

मुंबई येथें किरकोळ स्वरूपाचे दावे चालविण्याकरितां स्मॉल कॉजेस् कोर्ट आहे. ज्या दाव्याच्या विषयाची किंमत दोन हजार रुपयांपेक्षां जास्त नाहीं असे सर्व किरकोळ दावे या कोर्टांत चालतात. स्मॉल कॉज कोर्टांत एक मुख्य न्यायाधीश असून दोन अथवा तीन न्यायाधीश त्यास मदत करण्यास म्हणून नेमलेले असतात. या कोर्टास कोणकोणते दावे चालविण्याचा अधिकार आहे अगर कोणकोणते दावे या कोर्टाचे कक्षेंत येतात याची मर्यादा, मुंबई प्रेसिडेंन्सी स्मॉल कॉजेस कोर्ट ॲक्टनें ठरविण्यांत आली आहे. मुंबई हायकोर्टात जे दावे लावले जातात त्या दाव्यास कोर्ट फी अगर स्टँप हीं दाव्याचे विषयांचे किंमतीच्या प्रमाणानें लावावीं लागत नाहींत. फक्त रु. ३० चा स्टँप द्यावा लागतो. बादशहाचा न्याय गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्व लोकांस मोफत मिळावा या तत्त्वाचें अवलंबन करून वरील तऱ्हेची व्यवस्था केली आहे. परंतु जरी कोर्ट फी द्यावी लागत नाहीं तरी इतर निरनिराळ्या खर्चाची आकारणी केली जाते. मुंबई स्मॉलकॉजेस् कोर्टास हा नियम लागू नाहीं. इलाख्याचे ठिकाणीं फौजदारी कामासाठीं प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचीं कोर्टें आहेत. ह्या मॅजिस्ट्रेटपैकीं मुख्य मॅजिस्ट्रेटच्या कोर्टास चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट असें म्हणतात. ह्या मॅजिस्ट्रेटचीं कोर्टें इलाख्याच्या राजधानीचे ठिकाणीं निरनिराळ्या जागीं आहेत. हायकोर्टाचे अव्वल बाजूस चालणाऱ्या गुन्ह्यांची प्राथमिक चौकशी ह्या कोर्टांत केली जाते. इतर गुन्ह्यांची चौकशी व निकाल ह्याच कोर्टांत केला जातो. ह्याचे निकालावर हायकोर्टाकडे अपील अगर तपासणी अर्ज करतां येतो. जिल्ह्यांतील ऑनररी मॅजिस्ट्रेटप्रमाणें इलाख्याच्या ठिकाणीं ऑनररी मॅजिस्ट्रेट्स् नेमले जातात व अशा मॅजिस्ट्रेटांची कोर्टें इलाख्याचे ठिकाणीं आहेत.

एकाद्या मनुष्याचा अपघातानें अगर आकस्मिक मृत्यु झाला तर त्याच्या प्रेताची चौकशी व अकस्मात मृत्यूसंबंधीं पंचनामा करण्यासाठीं इलाख्याचे मुख्य ठिकाणीं कोरोनर नांवाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली असते. १७९३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें वरिष्ठ कोर्टातील न्यायाधिशांकडे हें काम करण्याचें सोपविलें होतें. हल्लीं हें काम करण्यासाठीं मुंबई व कलकत्ता येथें कोरोनरची नेमणूक केली आहे. मयतासंबंधीं तपास व चौकशी करणें हें काम त्या अधिकाऱ्याचें आहे. पंचनामा करण्याचें काम हा अधिकारी पंचाचे मदतीनें करतो. इतर ठिकाणीं हें काम नेहमीचे सरकारी पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट्स् करतात.

हिंदुस्थान सरकारचें कायदाखातें म्हणून एक स्वतंत्र खातें आहे. व त्यावरील अधिकाऱ्यास सरकारचा कायदेमंत्री ही संज्ञा आहे. वरिष्ठ कायदेकौन्सिलांत जे जे कायदे मांडले जातात ते सर्व तयार करणें, कायदे प्रसिद्ध करणें व नियम व कानु तयार करणें वगैरे कामें या खात्याकडे असतात. मुंबई प्रांतिक सरकारचे कायद्याचे कामीं मदत करण्यास कायदे खातें म्हणून एक स्वतंत्र खातें आहे. प्रांतिक सरकारच्या कार्यकारी मंडळाच्या गृहमंत्र्याकडे ह्या खात्याची देखरेख असते. सेक्रेटेरिएटमधील या खात्याचा मुख्य अधिकारी म्हणजे रिमेंबरन्सर ऑफ लीगल अफेअर्स हा होय. याला मदतनीस म्हणन एक अधिकारी असतो. सर्वसाधारण कायद्याचे प्रश्नांत ह्या अधिकाऱ्याचा सल्ला घेतला जातो. प्रांतिक कायदेमंडळांत हा अधिकारी सरकारी सभासद म्हणून असतो. बंगाल सरकारनें लीगल रिमेंबरन्सर व डेप्युटी रीमेंबरन्सर असे दोन अधिकारी नेमले आहेत. पंजाब, संयुक्तप्रांत, बिहार, ओरिसा, ब्रह्मदेश व मध्यप्रांत वगैरे सर्व ठिकाणीं कायद्याचें बाबतींत सल्ला घेण्यासाठीं तज्ज्ञ अधिकारी नेमले आहेत. ह्याखेरीज मुंबई

इलाख्यांत प्रत्येक जिल्ह्याचेठिकाणीं एक सरकारी वकील व एक अगर दोन त्याचे मदतनीस असे नेमलेले असतात. सरकारची दिवाणी, फौजदारी कामें चालविण्याचें काम त्यांच्यावर सोंपविलेलें असतें. मुख्य सरकारी वकिलास सरकार विरुद्ध फौजदारी काम घेतां येत नाहीं. व म्हणून त्यास रीटेनर म्हणून ठराविक वेतन मिळते.कोर्ट असलेल्या प्रत्येक तालुक्याचे ठिकाणीं सरकारी वकिलाची नेमणूक केलेली असते. अशा वकिलांना इतर खाजगी कामें करण्याची परवानगी असते. फक्त जेव्हां सरकारी काम असेल तेव्हां त्यास तें काम करावें लागतें व त्याबद्दल त्यास वेतन मिळतें. ज्या गुन्ह्यास फांशीची शिक्षा सांगितली आहे त्या गुन्ह्याचे चौकशीचे कामीं आरोपीनें आपले बचावासाठीं वकील दिला नसल्यास त्याचे तर्फे बचाव करण्यासाठीं सरकारतर्फे वकील दिला जातो. त्या वकिलास प्रॉपर प्लीडर अशी संज्ञा आहे. सर्वसाधारण नवीन वकीलाची या कामीं नेमणूक केली जाते.

हिंदुस्थान सरकारचा कायद्याबाबत मुख्य अधिकारी म्हणजे बंगालचा अॅडव्होकेट जनरल होय. त्याची नेमणूक बादशहानें करावी लागते. सरकारास कायद्याचे बाबतींत सल्ला देणें, सरकारी कज्जे चालविणें व स्थानिक वकीलवर्गाचा पुढारीपणा घेणें हीं कामें मुख्यतः अॅडव्होकेट जनरलवर सोंपविलेलीं आहेत. मुंबई व मद्रास येथें अॅडव्होकेट जनरलची नेमणूक केली जाते. सरकारी सॉलीसीटर व स्टँडिंग कौन्सिल हे कलकत्ता येथें अॅडव्होकेट जनरल यास मदत करतात. मुंबई व मद्रास येथेंही सरकारी सॉलिसीटर नेमलेला आहे. तो अॅडव्होकेट जनरल यास मदत करतो. ह्याशिवाय खुद्द मुंबई येथें सरकारी वकील व त्यास मदतनीस असे नेमलेले असतात.

मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणीं शेरिफ या नांवाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली असते. गांवांतील प्रतिष्ठित व वजनदार अशा इसमाची वरील जागेकरितां सरकारकडून निवड केली जाते. ही निवडणूक दरसाल होते. हायकोर्टानें शिफारस केलेल्या मनुष्यास प्रांतिक सरकाराकडून नेमलें जातें. पंचांची व्यवस्था ठेवणें, त्यांस हजर राहण्याचे कामीं लागणारी योग्य ती तजवीज करणें, सरकारी समन्सें वगैरे बजावणें, दाव्याच्या बजावणीचे कामीं मदत करणें, वगैरे सर्व कामें या अधिकाऱ्याकडे सोंपविलेलीं असतात.

अल्पवयी गुन्हेगारांसाठीं १८९७ सालच्या ८ व्या कायद्यान्वयें (रेफर्मेटरी स्कूलस् अॅक्ट) विशेष व्यवस्था केली आहे. अल्पवयी गुन्हेगार म्हणजे ज्या मुलाचें वय पंधरापेक्षां जास्त नाहीं पण ज्याला काळेपाणी अगर कैद यांची शिक्षा झाली आहे तो. या कायद्यान्वयें अशा अल्पवयी गुन्हेगारासाठीं सरकारनें शाळा स्थापन केल्या आहेत व ह्या गुन्हेगारांस अशा शाळेंत कमींत कमी तीन व जास्तींत जास्ती सात वर्षेपर्यंत ठेवण्यांत यतें. गुन्हेगार अल्पवयी आहे असें जर शिक्षा सांगणाऱ्या अधिकाऱ्यास वाटेल तर त्यानें शिक्षा सांगतांना शिक्षेऐवजीं सदर गुन्हेगारास अशा शाळेंत ठेवावें असें आपल्या निकालांत म्हणावें लागतें. जर त्यास तो अधिकार नसेल तर त्यानें सदरचें प्रकरण आपल्या शिफारशीसहित जिल्हा मॅजिस्ट्रेट यांजकडे पाठवावें व त्यानें योग्य वाटल्यास तशी शिफारस करावी. एकाद्या अल्पवयी गुन्हेगारास शिक्षा झाली असेल व त्याची तुरुंगांत रवानगी झाली असेल तर त्या तुरुंगाच्या अधिकाऱ्यांस सदर गुन्हेगारास जिल्हा मॅजिस्ट्रेटकडे घेऊन जाण्याचा अधिकार आहे. व जर त्या गुन्हेगारास या कायद्याचा फायदा मिळावा असें सदर मॅजिस्ट्रेटास वाटलें तर त्याला गुन्हेगारांस शिक्षेऐवजीं शाळेंत ठेवावें असा हुकूम देण्याचा अधिकार आहे. गुन्हेगाराचें वय अठरा वर्षांच्या वर असल्यास त्यास अशा शाळेंत ठेवतां येणार नाहीं. वरीलप्रमाणें ज्या शाळा स्थापन झाल्या असतील किंवा ज्यांस सरकारी मान्यता मिळाली असेल अशा सर्व शाळांवर देखरेख ठेवण्यासाठीं सरकारनें कमिटी ऑफ व्हिजिटर्स अगर बोर्ड ऑफ मॅनेजमेंट नेमलेलें असतें. "देखरेख कमीटीला" शाळेला वारंवार भेट देणें, शिक्षा वही तपासणें,बेकायदा कृत्यें झालीं असल्यास तीं वरिष्ठांचे नजरेस आणणें वगैरे कामें करावीं लागतात. आरोग्य व स्वच्छता राखणें, मुलांची पृथक् पृथक् व्यवस्था करणें, धंदेशिक्षण देणें व आजारी मुलांस काळजीपूर्वक ठेवण्याची व्यवस्था करणें, हीं कामें मुख्यतः शाळाधिकाऱ्यांस करावीं लागतात. व त्याजवर देखरेख करण्याचें काम देखरेख कमिटीचें आहे. चौदा वर्षावरील मुलास लायक व विश्वासू अशा माणसाकडे धंदेशिक्षण घेण्यासाठीं पाठविण्याचा अधिकार शाळाधिकाऱ्यास आहे. अशा वेळीं अशा खात्री-

लायक मनुष्यास त्याचे नांवानें परवाना दिला जातो व तो परवाना केव्हांही रद्द करतां येतो.

अल्पवयी गुन्हेगारांस ज्या अपराधाबद्दल फांशीची अगर काळेपाण्याची शिक्षा सांगितली आहे असा अपराध करून सुद्धां जामिनावर सोडण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला क्रिमिनल प्रोसिजर कोडअन्वयें देण्यांत आला आहे. अशा अधिकाराचा उपयोग करणें किंवा न करणें हें सदर मॅजिस्ट्रेटच्या इच्छेवर अवलंबून आहे.

एकवीस वर्षांच्या आंतील गुन्हेगारास कायद्यानें आणखी एक सवलत देण्यांत आली आहे. ज्या गुन्ह्यास फांशीची अगर काळेपाण्याची शिक्षा होते त्या गुन्ह्या व्यतिरिक्त इतर कोणताही गुन्हा या गुन्हेगारांनें केला असला तर त्यास चांगल्या वर्तणुकीचा जामीन घेऊन सोडण्याचा अधिकार कोर्टास देण्यांत आला आहे. ही सवलत फक्त प्रथम गुन्हा करणारासच मिळते. अशा जामिनाची मुदत तीन वर्षांपेक्षां जास्त नसते. अल्पवयी पुरुष गुन्हेगारास ज्या सवलती आहेत त्या सर्व सवलती स्त्री गुन्हेगारांससुद्धां मिळतात. याखेरीज कोणत्याही गुन्ह्याचे बाबतींत स्त्रीस (मग ती कितीही वयाची असो) जामिनावर सोडण्याचा अधिकार कोर्टास देण्यांत आला आहे. सदर अधिकाराचा उपयोग करणें किंवा न करणें हें कोर्टाच्या अधिकाऱ्याचे मर्जीवर अवलंबून आहे. त्याच प्रमाणें स्त्री गुन्हेगारानें ज्यास फांशी अगर काळे पाण्याची शिक्षा सांगितली आहे अशा व्यतिरिक्त इतर कोणताही अपराध केला व ती प्रथम गुन्हेगार असली तर तिला क्रि. प्रो.कलम ५६२ अन्वयें चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन घेऊन सोडण्याचा अधिकार कोर्टास देण्यांत आला आहे. मात्र ज्या गुन्ह्यास दोन वर्षांपेक्षां जास्त शिक्षा नाहीं, अगर चोरी, ठकबाजी, अन्यायाचा अपहार असा गुन्हा असेल तर सदर प्रथम गुन्हेगारास ताकीदीवर सोडण्याचा अधिकार कोर्टाला देण्यांत आला आहे व त्याचा फायदा स्त्री व अल्पवयी गुन्हेगार या दोघांसही मिळतो. स्त्री गुन्हेगारास याखेरीज जास्त विशेष सवलती ठेवण्यांत आल्या नाहींत.

१९०९ च्या चवथ्या कायद्यान्वयें फटक्याची शिक्षा देण्याचा अधिकार प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट किंवा पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांस देण्यांत आला आहे. चोरी, इमारतींत चोरी, इजा करण्याची तयारी करून केलेली चोरी, घरफोडी,अशा प्रकारचे गुन्हे केले असल्यास त्या गुन्हेगारास शिक्षेऐवजीं फटक्यांची शिक्षा फर्माविण्याचा अधिकार पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यास आहे. जबरी-संभोग, अनैसर्गिक संभोग, दरोडा, जबरी दरोडा अशापकीं कोणताही अपराध करणें, करण्याचा प्रयत्न करणें अगर त्यांस प्रोत्साहन देणें अशा गुन्ह्यांस शिक्षेऐवजीं फटके किंवा शिक्षा व फटके अशी शिक्षा देण्याचा अधिकार या कायद्यान्वयें देण्यांत आला आहे. सोळा वर्षांच्या आंतील अल्पवयी गुन्हेगारानें कोणताही गुन्हा केल्यास त्यास शिक्षेऐवजीं फटक्याची शिक्षा देण्याचा अधिकार कोर्टास आहे. मात्र इं. पि. को. प्रकरण ६ (राजा-विरुद्ध गुन्हे म्हणजे बंड, लढाई वगैरे) जातीजातींतील वैमनस्य वाढविणें कलम ५०५ (राज्यांत असंतोष उत्पन्न करणें) व ज्यास फांशीची शिक्षा सांगितली आहे, असे गुन्हे केले असल्यास अल्पवयी गुन्हेगारास फक्त फटक्याची शिक्षा देतां येणार नाहीं. क्रि. प्रो. कलम ३९१ ते ३९४ मध्यें फटक्याची शिक्षा कशी अमलांत आणावी त्याची माहिती दिली आहे. ही शिक्षा देतांना न्यायाधीश अगर मॅजिस्ट्रेट स्वतः हजर असतो किंवा आरोपी तुरुंगांत असला तर तुरुंगाच्या अधिकाऱ्याच्या देखत फटके मारावे लागतात. फटक्याची शिक्षा सुनावलेला आरोपी आजारी अगर अशक्त असेल तर ही शिक्षा रद्द केली जाते. व त्याऐवजीं इतर शिक्षा देण्यांत येते.

फौजदारी गुन्ह्यांमध्यें गुन्ह्यांची चवकशी ज्यूरीच्या मदतीनें व्हावी अशा तऱ्हेच्या हक्कास इंग्लंडमध्यें फारच प्राधान्य दिलें जातें. हा हक्क मिळविण्यास इंग्लंडसारख्या देशांतील प्रजेस फारच खटपट करावी लागली. कायद्यासारख्या गुंतागुंतीच्या विषयावर कायदा वगैरे न जाणणाऱ्या सर्वसामान्य लोकांस मत देण्यास सांगणें व त्यांचें मत ग्राह्य धरून न्याय देणें हें जरासें चमत्कारिक वाटतें. पण विचार करतां ज्यूरी पद्धतीनें न्याय करणें हें एका दृष्टीनें ग्राह्य ठरेल.

फौजदारी कायद्याचें एक तत्त्व विशेषतः ध्यानांत ठेवलें म्हणजे वरील विचारसरणी स्पष्ट होईल. १०० गुन्हेगारांपैकीं ९० खरे गुन्हेगार सुटले तरी हरकत नाहीं, परंतु एकसुद्धां निरपराधी मनुष्य गुन्हेगार ठरला जाऊं नये,अशी फौजदारी कायदा करणाराची इच्छा असते. ज्यूरी पद्धतीनें निकाल देण्याचें ठरल्यास वरील तत्त्वाचें व्यावहारिक दृष्ट्या आचरण करण्यास सोपें पडतें. फिर्यादी व आरोपीतर्फे सर्व पुरावा जज्ज व ज्यूरी यांचेपुढें मांडला जातो व त्यावर कायद्याचें व गुन्ह्याचें स्वरूप न्यायाधीश पंचांस (ज्यूरी)

समजावून सांगतो व नंतर पंच विचारविनिमय करून आपला निकाल सांगतात. ज्यास कायद्याचें ज्ञान नाहीं अशा सर्वसाधारण व्यवहारज्ञान असलेल्या लोकांस पंच म्हणून बोलावलेलें असतें. व अशा सर्वसाधारण लोकांचें उभयपक्षांचें म्हणणें ऐकून जें मत तयार होतें, त्यास जास्त महत्त्व प्राप्त होतें, कारण तें सर्वसाधारण लोकांपकीं निवडक लोकांचें मत असते. गुन्हेगारानें गुन्हा केला आहे अशी सर्वसाधारण खात्री आहे अशा तऱ्हेचें अनुमान काढणें अयोग्य होणार नाहीं, असें पंचांच्या निकालावरून दिसून येतें. ज्यूरी किंवा असेसर यांचे मदतीनें चालावयाचे हे खटले फक्त सेशन्स कोर्टांत किंवा हायकोर्टांत फौजदारी अव्वल कामाच्या बाजूस चालतात. हायकोर्टांतील फौजदारी खटले ज्यूरीचे मदतीनें चालतात व ज्यूरीची संख्या ९ असावी लागते. जर ज्यूरीचे एकमत असेल अगर कमींत कमी ६ चें बहुमत असेल व तें न्यायाधिशाच्या मताशीं सुसंगत असेल तर तें ग्राह्य धरून त्याप्रमाणें न्यायाधीश निकाल करतो. परंतु जर न्यायाधिशाचें मत भिन्न असेल अगर सहा पंचांचें बहुमत नसेल तर त्या ज्यूरीला रजा देऊन नव्या पंचांची निवडणूक करण्याचा अधिकार न्यायाधिशास आहे. सेशन्स कोर्टांत ज्यास फांशीची शिक्षा सांगितली आहे अशा खटल्यांत नऊ पंच असावे लागतात. परंतु नऊ मिळणें शक्य नसेल तर निदान सात तरी पंच असावे लागतात. पंचाच्या बहुमताप्रमाणें न्यायाधिशाचें मत नसेल तर सदरचा खटला हायकोर्टाकडे विचाराकरितां पाठविण्याचा अधिकार न्यायाधिशास आहे. मग हायकोर्टानें दिलेला निकाल कायम समजला जातो.

मुंबई इलाख्यांत कित्येक जिल्हे मागासलेले समजले जातात. अशा जिल्ह्यांस ज्यूरी पद्धति लागू केलेली नाहीं. अशा ठिकाणीं असेसर नेमतात. ज्यूरी कोणच्या गुन्ह्याकरितां नेमावयाची व असेसर्स केव्हां नेमावयाचे यासंबंधीं नियम सरकारनें केले आहेत. ज्या गुन्ह्याबद्दल दहा अगर दहापेक्षां जास्त वर्षे शिक्षा सांगितली आहे असे सर्व गुन्हे जेथें ज्यूरीपद्धति आहे तेथें ज्यूरीचे मदतीनें चालतात. इतर गुन्ह्यांचे बाबतींत असेसर्स नेमले जातात. ज्यूरीचा निकाल सर–पंचामार्फत सांगितला जातो. व तो निकाल न्यायाधिशावर बंधनकारक समजला जातो. ज्युरीला आपण असा निकाल कां दिला त्याचीं कारणें सांगावीं लागत नाहींत. असेसर्सना आपला निकाल वैयक्तिक सांगावा लागतो व तो सांगतांना आपलीं कारणें सांगावीं लागतात. असेसर्सच्या निकालाविरुद्ध किंबहुना तो अग्राह्य लेखून न्यायाधिशाला आपला निकाल सांगण्याचा अधिकार आहे.

वकील वर्ग:—प्रचलित कायद्याप्रमाणें न्याय करणें जसें न्यायाधिशाचें कर्तव्य आहे, त्याप्रमाणेंच पक्षकारातर्फे न्यायाधिशास पक्षकाराचें म्हणणें विशद व स्पष्ट करून सांगणें हें कर्तव्य ज्या वर्गाचें आहे त्यास वकील वर्ग अशी संज्ञा आहे. सर्वसाधारण मनुष्यास कायदा व कायद्याचे सूक्ष्म फरक समजणें अत्यंत कठीण जातें. कायद्याचे सूक्ष्म फरक दाखविणें व कायद्याप्रमाणें आपलें म्हणणें कोर्टापुढें मांडणें हें पक्षकारास त्याच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीचें असतें. अशा वेळीं आपलें गाऱ्हाणें कायद्याचे भाषेंत कोर्टापुढें स्पष्ट व सुलभपणें मांडण्यासाठीं कायदा जाणणारा असा एकादा निष्णात मनुष्य मिळाल्यास त्या पक्षकाराची सोय होते. उलट पक्षीं अशा तऱ्हेनें काम करणाऱ्या कायदेपंडितास त्या इसमाकडून काम केल्याबद्दल योग्य तो मोबदला मिळतो व अशा रीतीनें वकील वर्ग अस्तित्वांत येण्यास मदत होते. मुंबई इलाख्यांत वकीलवर्गाचे मुख्यतः बॅरिस्टर व वकील असे दोन भाग पडतात. याखेरीज मुखत्यार वकील यांचाही वर्ग अस्तित्वांत आहे. इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड येथील बॅरिस्टरची परीक्षा पास झालेल्या सर्व इसमास हिंदुस्थानांत कोठेंही वकिली करण्यास परवानगी आहे.मुंबई इलाख्यांत वकिली करण्यापूर्वी त्यास मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट म्हणून नांव नोंदून घ्यावें लागतें. अशा ॲडव्होकेट लोकांस हायकोर्टाचे अव्वल बाजूस काम करण्यास पवारनगी असते. इतर वकील वर्गास ॲडव्होकेट म्हणून नोंदून घेतां येत नाहीं. पण अशा लोकांस फक्त हायकोर्टाचे अपेलेट–बाजूस काम चालविण्याची परवानगी असते.वरील दोन्ही ॲडव्होकेट लोकांस इलाख्यांत कोठेंही काम करण्याची परवानगी असते. वकीलीची परीक्षा पास झालेल्या वकिलास फक्त एका जिल्ह्यापुरती सनद काढतां येते. व मग त्यास फक्त त्या जिल्ह्यांतच काम करतां येतें. ॲडव्होकेट म्हणून नोंदून घेण्यास रुपये ५२५ फीबद्दल द्यावे लागतात. जिल्ह्याची सनद काढण्यास रुपये ५० पन्नास फी भरावी

लागते. प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हाधिकाऱ्याचे परवानगीनें कोणासही फौजदारी कामांत वकिली करण्याचा अधिकार असे. अशा लोकांस मुखत्यार म्हणत. ज्यावेळीं वकिलांची संख्या मर्यादित होती त्यावेळीं मुखत्यार वकिलांची नेमणूक करण्याची जरूरी भासत असे. हल्लीं अशी नेमणूक क्वचितच केली जाते. मुंबई विश्वविद्यालयाची वकिलीची परीक्षा पास होऊन दोन वर्षें झाल्यावर हायकोर्टाच्या अॅडव्होकेटचे परीक्षेस बसतां येते. व ही परीक्षा पास झालेला अॅडव्होकेट यास बॅरिस्टर प्रमाणें सर्व हक्क मिळतात. त्यास हायकोर्टाचे अव्वल बाजूस काम चालवितां येतें. परीक्षा पास न होतां कित्येक वकिलांचें नांव अव्वल बाजूचे अॅडव्होकेटचे यादींत घालण्याचा हायकोर्टास हक्क आहे. मुंबई हायकोर्टांत काम करण्याचे बाबतींत दुहेरी पद्धत अस्तित्वांत आहे. बॅरिस्टर अगर अॅडव्होकेट यांना स्वतंत्र काम चालवितां येत नाहीं. त्यांना माहिती देण्यासाठीं म्हणून दुसरा वकील अगर सॉलिसिटर असावा लागतो. मुंबई येथें अशा सॉलिसिटर लोकांच्या कंपन्या ऊर्फ फर्मस आहेत. मुंबई विश्वविद्यालयाची वकिलीची परीक्षा पास झालेल्या कोणत्याही माणसास दोन वर्षांनीं हायकोर्टाचे सॉलिसिटरचे परीक्षेस बसतां येतें. अशा लोकांस उमेदवार म्हणून सॉलिसीटरचे हाताखालीं काम करावें लागतें.

वकील वर्गाचे काम, त्यांचीं कर्तव्यें व त्यांना मिळणारें कायदेशीर वेतन,वगैरेसंबंधीं वकिली करणाराबाबत म्हणून कायदा आहे. त्या कायद्यान्वयें कोणत्याही वकिलानें बेकायदा कृत्य केल्यास त्याची चौकशी केली जाते. त्याचप्रमाणें वकिलांचे फीबाबत अगर इतर बाबतींत नियम या कायद्यान्वयें घातले आहेत. या कायद्यान्वयें अशा कृत्याबाबत चौकशी करण्याचा अधिकार जिल्हा जज्जास आहे. चौकशी करून व स्वतः अभिप्राय देऊन त्यास सर्व प्रकरण हायकोर्टाकडे पाठवावें लागतें. सन १९२६ सालीं झालेल्या इंडियन बार कौन्सिल कायद्यान्वयें प्रत्येक हायकोर्टाला एक बार कौन्सिल स्थापन करण्याची परवानगी देण्यांत आली आहे.प्रत्येक बार कौन्सिलांत पंधरा सभासद असतात. त्यांपैकीं एक अॅडव्होकेट जनरल असतो. व चार सभासद हायकोर्टानें नेमलेले असतात, व त्यांपैकीं दोनपेक्षां जास्त न्यायाधीश असतां कामा नये. हायकोर्टांतील अॅडव्होकेट वर्गानीं दहा लोकांची निवडणूक करावयाची असते. या दहांपैकीं, निदान पांच लोकांनीं कमींत कमी दहा वर्षें हायकोर्टांत काम केलें असलें पाहिजे. मुंबई व बंगाल येथील बार कौन्सिलांत हायकोर्टाचे अव्वल बाजूस काम करीत असलेल्या अॅडव्होकेटपैकीं कमींतकमी ठराविक लोक बार कौन्सिलमध्यें असावे लागतात. मुंबई, मद्रास व बंगाल येथील अॅडव्होकेट जनरल हा अधिकारपरत्वें या कौन्सिलचा अध्यक्ष असतो. कोणत्याही अॅडव्होकेटनें बेकायदा अगर गैरशिस्त वर्तन केलें असल्यास त्याची चौकशी करण्यासाठीं तें प्रकरण जिल्हा जज्जाकडे पाठविण्याचा हायकोर्टास अधिकार आहे. या खेरीज बार कौन्सिलमधील कमींत कमी तीन व जास्तींत जास्त पांच लोकांची चौकशी कमेटी नेमण्याचा अधिकार सर न्यायाधिशास आहे. या कमेटीनें चौकशी करून आपलें म्हणणें हायकोर्टाकडे सादर करावें लागते. अशा तऱ्हेचा रिपोर्ट आल्यावर हायकोर्टाकडून चौकशीसाठीं दिवस नेमला जातो, व त्या दिवसाची नोटीस, आरोपित अॅडव्होकेट, अॅडव्होकेट जनरल व बार कौन्सिल यांना देण्यांत येते. व त्या सर्वांचें म्हणणें ऐकून घेऊन अखेरचा निकाल न्यायाधिशाकडून दिला जातो. शासन अगर ताकीद दिली असल्यास त्याची नोंद त्या अॅडव्होकेटच्या नांवापुढें केली जाते. अॅडव्होकेट वर्गाचे हक्क व त्यांचीं कर्तव्यें वकिली करण्याबाबत नियम करणें,परीक्षा घेणें, वगैरे सर्व कामें करण्याचा अधिकार या कौन्सिलकडे सोपविण्यांत आला आहे. स्त्रियांस वकिलीची परीक्षा पास झाल्यावर वकीली करण्याची परवानगी आहे.हायकोर्टाचे अॅडव्होकेट व सॉलिसिटरचे परीक्षेचे नियमांत सन १९२५ सालीं दुरुस्ती करून 'मेल'हा शब्द काढून टाकण्यांत आला आहे. इंग्लंड, स्कॉटलंड, अगर आयर्लंड येथील बॅरिस्टरची अगर अॅडव्होकेटची परीक्षा पास झालेल्या स्त्रीस मुंबई इलाख्यांत अॅडव्होकेट म्हणून नोंदून घेऊन काम करतां येतें.

प्रीव्ही कौन्सिलः—न्यायदानाबाबत न्याय देण्याचा अखेरचा हक्क इंग्लंडचे बादशहाकडे ठेवण्यांत आला आहे. हल्लीं तें काम न्यायासनांनीं बळकाविलें आहे. हिंदुस्थानांतील लोकांस अखेरचा न्याय मिळण्याचा मार्ग म्हणजे प्रीव्ही कौन्सिलकडे अपील हा होय. तात्त्विक दृष्ट्या प्रिव्ही कौन्सिलांतील सर्व सभासद म्हणजे राजाचे सल्लागार होत. व राजास सर्व बाबतींत सल्ला देणें हें या मंडळाचें काम होय. परंतु हल्लीं राजा नामधारी झाल्यामुळें व्यावहारिक दृष्ट्या या मंड-

ळास इंग्लंडचे राज्यव्यवस्थेंत प्राधान्य आलें आहे. प्रीव्हि कौन्सिलची ज्युडिशनल कमेटी ही न्यायदानाचे बाबतींत अखेरची अधिकारी समजली जाते. या कमेटीनें दिलेला निकाल म्हणजे राजास दिलेला सल्ला असला तरी वस्तुतः हा निकाल कायम समजला जातो. प्रिव्हि कौन्सिलकडे अपील केव्हां करतां येतें यासंबंधीं नियम सिव्हिल प्रोसीजर कोडमध्यें सांगितले आहेत. ज्या दाव्याच्या विषयाची किंमत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रुपये-१०००० अगर त्याचेवर आहे असें सर्व दाव्याचे निकालांवर, अगर त्यांतील अपीलांचे निकालांवर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करतां येतें. हायकोर्टाचे अव्वल दाव्याचे बाबतींत झालेल्या निकालावर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करतां येते.मात्र अशा दाव्यांच्या विषयांची किंमत रुपये १०००० वर असावी लागते. प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यास हा दावा योग्य आहे, असें सर्टिफिकेट दिल्यास त्या दाव्यांत प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करतां येते. दोन्हीही बाबतींत सर्टिफिकेट घ्यावें लागते, पहिल्या बाबतींत दाव्याचे विषयाची किंमत रुपये १०००० अगर वर आहे एवढ्याबाबत सर्टिफिकेट घ्यावें लागतें. दाव्याची किंमत कमी असून त्यांत बऱ्याच गुंतागुंतीचे कायद्याचे प्रश्न अगर सार्वजनिक हिताचे प्रश्न असले तर दुसऱ्या बाबतींत सर्टिफिकेट देण्यांत येतें. ज्या ठिकाणीं लेटर्स पेटंट खालीं अपील करतां येतें अशा बाबतींत प्रिव्ही-कौन्सिलकडे अपील करतां येत नाहीं. ज्या पक्षकारांस प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करावयाचें असेल त्यास ज्या कोर्टानें शेवटचा निकाल दिला असेल त्या कोर्टाकडे प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्याची परवानगी मिळण्याचा अर्ज करावा लागतो. ह्या परवानगीबावत कारण दाखविण्यास त्यांस नोटीस दिली जाते. अशी परवानगी दिल्यावर प्रिव्ही कौन्सिलकडे कागद रवाना करणें, छपाई, वगैरेचे खर्चाबावत जामीन द्यावा लागतो. जामीन दिल्यावर अपील दाखल झालें असें समजून कागद वगैरे कौन्सिलकडे रवाना केले जातात. प्रिव्ही कौन्सिलकडे अपील चालूं असतां खालच्या कोर्टानें दिलेल्या निकालाची अम्मलबजावणी चालू राहते, अगर योग्य वाटल्यास तहकूब केली जाते. वर दिलेल्या नियमाप्रमाणें सर्वसाधारण व्यवस्था केली जाते. कोठल्याही बाबतींत अन्याय झाला असल्यास तो दूर करणें हें राजाचें कर्तव्य आहे. प्रिव्ही कौन्सिलला अशा तऱ्हेचा झालेला अन्याय दूर करण्याचा अधिकार आहे. फौजदारी बाबतींत अपीलें वगैरे ऐकण्याचा अधिकार या कौन्सिलला नाहीं व अशा तऱ्हेचा अधिकार आपणांस नाहीं असें या कौन्सिलनें डिलेटकेसमध्यें जाहीर केलें. परंतु जर एखादे बाबतींत भयंकर अन्याय झाला आहे अगर कायद्याचे मुद्याचे बाबतींत चूक झाली आहे, असें या कौन्सिलला वाटेल तर त्या वेळीं सदर निकालांत बदल करण्याचा अधिकार या कौन्सिलला आहे.परंतु हा अधिकार फारच मर्यादित आहे. हिंदुस्थानची राजकीय दृष्ट्या जी वाढ होत आहे त्या वाढीस पोषक म्हणून वरिष्ठ कोर्ट या देशास स्थापावें अशी कायदे मंडळाची इच्छा आहे. स्वतंत्र देशांत स्वतंत्र वरिष्ठ कोर्ट असलें पाहिजे, या दृष्टीनें प्रिव्ही कौन्सिलला हिंदुस्थानचें वरिष्ठ कोर्ट म्हणतां येणार नाहीं. शिवाय या कोर्टाकडे फक्त ठराविक अपिलाची चौकशी होते. साम्राज्याचे इतर वसाहतीचे बाबतींत अशा तऱ्हेचें वरिष्ठ कोर्ट स्थापणें हें घटनेचा भाग समजलें जातें. हिंदुस्थानापासून ६००० मैलांवर न्याय मिळण्याकरितां जावें लागणें अत्यंत त्रासाचें व खर्चाचें आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानांत वरिष्ठ कोर्ट स्थापन झाल्यास जनतेची सोय होईल.

लॉ–रिपोर्ट:—प्रस्तुत लेखाचे सुरवातीस "न्यायाधीशकृत" कायद्यासंबंधीं विवेचन केलें आहे. एका न्यायाधीशाने दिलेले निकाल हे पुढील न्यायाधीशास मार्गदर्शक होतात, किंबहुना त्यांस ते मानावे लागतात. ह्यांपैकीं महत्त्वाचे निकाल सरकारतर्फें छापून प्रसिद्ध करण्यांत येतात. सन १८७५च्या इंडियन लॉ–रिपोर्टस कायद्यान्वयें हायकोर्टानें दिलेले महत्त्वाचे निकाल छापण्याची जबाबदारी सरकारनें आपले शिरावर घेतली आहे. सरकारनें छापलेल्या पुस्तकांखेरीज इतर पुस्तकांतील निकाल न्यायाधिशानें बंधनकारक समजूं नयेत असेंही या कायद्यान्वयें ठरविण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें अशा निकालांना ॲथॉरिटी म्हणून मानण्यांत येत नाहीं. फक्त सरकारी पुस्तकांत छापलेल्या निकालास ॲथॉरिटी म्हणून मानण्यांत येतें. सरकारनें छापलेल्या निकालांसंबंधीं पुस्तकांना इंडियन लॉ-रिपोर्टस् ही संज्ञा आहे. हे निकाल हल्लीं गव्हर्नर जनरलचे अधिकारानें, मुंबई, मद्रास, कलकत्ता, रंगून, पाटणा, लाहोर व अलाहाबाद, अशा सात ठिकाणीं प्रसिद्ध होतात.ज्या हायकोर्टाचे निकालावर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील झालें असेल त्या

हायकोर्टाचे मालेंत तो प्रिव्ही कौन्सिलचा निकाल छापला जातो. प्रत्येक हायकोर्टाचे हे निकाल छापण्यासाठीं सरकारी रिपोर्टर्स नेमलेले असतात, व त्यांना मदत करण्यासाठीं वकील वर्ग व न्यायाधीश यांची एक कमेटी नेमलेली असते. परंतु या कायद्यान्वयें केलेली व्यवस्था अपुरी असल्याचें दिसतें. यामुळें प्रत्येक ठिकाणीं या सरकारी पुस्तकांखेरीज इतर पुस्तकें छापलीं जात आहेत. ज्या ठिकाणीं सरकारी रीत्या निकाल छापण्याची व्यवस्था नाहीं, अशा ठिकाणीं इतर तऱ्हेनें असे निकाल छापले जातात. याखेरीज प्रिव्ही कौन्सिल व सनदी हायकोर्टें यांनीं दिलेल्या महत्त्वाच्या निकालांची यादी सरकारी रीत्या छापण्यांत आली आहे.

हिंदी व युरोपियन अधिकाऱ्यांचें प्रमाण दाखविणारें कोष्टक (फौजदारी)

सन	सरन्यायाधीश व हाय. जज्ज	जिल्हा जज्ज	जादा जिल्हा जज्ज	असीस्टंट जिल्हा जज्ज	पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट	मॅजिस्ट्रेट वर्ग २	मॅजिस्ट्रेट वर्ग ३	पोलीस पाटील
१९२५ युरोपियन	४	११	२		४९	५		
हिंदी	६	५	६	२	×२८०	×३७०	×२६३	१९७१३
१९२७ युरोपियन	६	८			४९	३		
हिंदी	४	९	२	४	*३०३	*३७४	*२४४	१९७६९
१९२९ युरोपियन	७	५		१	४०	१०	१	
हिंदी	४	१२	६		३०३	४००	२३७	१९६३९
१९३० युरोपियन	६	४	१		४२	२	१	
हिंदी	५	१२	७		३२१	३६९	२४२	१९३९०

× यांत २० जिल्हा मॅजिस्ट्रेट, ६ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, ६१ सब् डिव्हिजन मॅजिस्ट्रेट, २५ स्पेशल मॅजिस्ट्रेट व ४६३ ऑनररी मॅजिस्ट्रेट यांचा समावेश होतो.

* यांत २० जिल्हा मॅजिस्ट्रेट, ६ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, ६० प्रांत मॅजिस्ट्रेट, २३ स्पेशल मॅजिस्ट्रेट व ४५८ ऑनररी मॅजिस्ट्रेट यांचा समावेश होतो.

हिंदी व युरोपियन अधिकाऱ्यांचें प्रमाण दाखविणारें कोष्टक (दिवाणी)

सन	सर न्यायाधीश व हाय. जज्जेस	डि. जज्ज	जॉइंट जज्ज	असिस्टं. जज्ज	स्मॉलकॉज कोर्ट जज्ज	मुन्सफ वर्ग १	मुन्सफ वर्ग २	गांव मुन्सफ	इनामदार व जहागिरदार
१९२५ युरोपियन	४	११	१						
हिंदी	६	५	१	८	८	२२	१०३		
१९२७ युरोपियन	६	८							
हिंदी	४	९	९	८	८	२२	१०३		
१९२९ युरोपियन	७	५		१					
हिंदी	४	१२		९	८	२१	१०१	९३	३
१९३० युरोपियन	६	४		२					
हिंदी	५	१३		१०	८	२२	९६	९३	३

१९३०—एकंदर गुन्ह्याबद्दल रिपोर्ट व त्याबाबत शिक्षा, अगर निर्दोषी झालेल्यांची संख्या व वर्गवारी.

अपराधाचे प्रकार	गुन्ह्याबद्दल रिपोर्ट	खरा असल्याबद्दल रिपोर्ट	चौकशीसाठीं	चालसालीं चौकशीवर मागील शिल्लक	निर्दोषी सोडले	शिक्षा दिली	मेले अगर दुसरीकडे गेले	२०३ क्रि. प्रो. कोड प्रमाणें फिर्याद काढली	२५० क्रि.प्रो.कोड प्र.फिर्यादीस दंड	मृत्यु	पळून गेले	बदली केले	अद्याप चौकशी चालू असलेले
राजकीय गुन्हे	११०	१०८	११०	२२४	३५	१६६		१					२३
नाण्यासंबंधीं गुन्हे	१९	१९	२६	४७	११	२९							७
धर्मासंबंधीं गुन्हे	३१	२६	३१	७९	४८	२१			५				१०
शारीरिक इजा	१५८२९	१३७६८	१४८१७	३७११९	२९८८०	३४४७	२६	१८६४	८४	१५	९		३७६६
जिवास धोका	६९०	६७२	९११	१६०३	६२५	६७	६	३		४		१	३०१
जिवास धो.कर.प्रयत्न	३२	३१	४७	८७	२४	३३	१						३
मुलें पळविणें इ.	२७१	२१०	२८३	६८८	३६८	१८१	३	५४	४	१		२	१३४
जबरी संभोग	६८	६५	९८	१७१	९२	५६	२	२		२			२१
ठेवीचा दुरुपयोग	१४४८	१२२६	१४३६	१७४५	७०२	७०२	१०	१९६	७	१	१	८	३३१
चोरी	६६३४	६३४७	६६९९	१०६६९	२४६०	७०६५	१८	२०२	३३	११	५	२	११२६
हत्याराबाबत गुन्हे	१८०	१८०	१८९	१९९	३१	१६३	१				१		४
दरोडा	४५०	४१३	४६७	१६३७	५६३	५०३	११	२७	३	८	१	२	५६०
लाग्निक गुन्हे	१३९६	१०७९	१२०६	२८२३	१८८६	४६०	१४	२९५	१०	२	११	१	४६३
गुन्हेगार जातीसंबं.	८४३	८३९	८५५	९६३	४५	८६५	३	१				३	५०
जुगारीबाबत	२२४९	२२४२	२३१२	४६६०	३८९	४१११		३					१६०
रेल्वेसंबंधीं गुन्हे	१८८६	१८७८	१९५०	२२२२	२८१	१८७९			६				६२
वटहुकूम नं.५	२२३४	२२३४	२२३३	३१३१	१८६	२९३४	१			१			१०
वेश्याबाबत गुन्हे	७४	७४	८६	१०५	१४	७७							१४
अबकारी गुन्हे	५४४६	५४३९	५५४४	६०२९	४११	५४०१	६	१	१	६			१४१
छापखान्याबाबत	९	९	९	९	१	७							१
जंगलाबाबत गुन्हे	२७१४	२६८४	२७०९	६८३४	३९७२	२००५	१	१०		१			८५६
मिठाबाबत गुन्हे	६७	६७	६७	१०५	४	१००							१

फांशी

मनुस्मृति अध्याय ९ मध्यें (१) खोटचा राजाज्ञा लिहिणें. (२) अमात्यांत भेद पाडणें. (३) स्त्री, बालक व ब्राह्मण यांस ठार मारणें व (४) शत्रूस फितूर होणें. या अपराधाबद्दल देहांत शासन सांगितलें आहे (१) ब्राह्मणास मारणारा. (२) मद्यपान करणारा. (३) गुरुपत्नीगमन करणारा व (४) ब्राह्मणाचें सुवर्ण हरण करणारा असा मनुष्य ब्राह्मणेतर असेल व त्यानें हेतुपूर्वक गुन्हा केला असेल तर त्यास देहान्त शासन द्यावें. व तो जर ब्राह्मण असेल तर त्यास हद्दपार करावें. (३) वस्त्रांत बांधलेलें सुवर्ण गांठ सोडून घेणें हा अपराध तीनदां केल्यास त्यास देहान्त शासन करावें. (४) जलाशय फोडणाऱ्यास पाण्यांत बुडवून मारावें (तो जर पुन्हां बांधून देईल तर माफी करावी.) (५) राजभाण्डार, आयुधागार, देऊळ हीं फोडणारास व हत्ती, घोडे व रथ चोरणारास देहान्त शासन द्यावें. जातीच्या वा श्रीमंतीच्या अभिमानानें जी स्त्री पतीचें उल्लंघन करून व्यभिचार करील तिला कुत्र्याकडून खाववावें. व त्या जाराला जिवंत जाळावा. (अध्याय ८-७१.७२) कोणच्याही अपराधाबद्दल ब्राह्मणास देहान्त शासन देऊं नये. त्यास हद्दपार करावें. (अ. ८) कुलीन स्त्रिया व उत्तम रत्नें यांचा अपहार करणारास देहान्त-शासन द्यावें. (८.३२३).

याज्ञवल्क्यः—

(१) युद्धांत जिंकून आणलेले (२) हत्ती घोडे वगैरे चोरणारे व (३) खुनी यांस देहांत शासन द्यावें. (२) भ्रूणहत्या करणारी, गर्भपात करणारी, पति किंवा गुरू यांस मारणारी, विष घालणारी, आग लावणारी जलाशय फोडणारी—अशी स्त्री गर्भिणी नसल्यास तिला बुडवून किंवा फरपटत नेऊन मारावी.

सध्यां हिंदुस्थानांत पुढील गुन्ह्यांसाठीं फांशी देण्यांत येते. (१) काळे पाण्याची शिक्षा भोगीत असलेल्या माणसानें खून केला तर त्यास देहान्त शासन दिलेंच पाहिजे. (इं.पी.को.सेक्शन ३०३)

(१) बादशहाविरुद्ध युद्ध करणें. (सेक्शन १२१) (२) घडलेल्या बंडास प्रत्यक्ष मदत करणें. (सेक्शन १३२, (३) निरपराध्यास देहान्त शासन होईल अशा तऱ्हेचा खोटा पुरावा देणें किंवा बनविणें. (सेक्शन १९४). (४) खून करणें. (सेक्शन ३०२) (५) अज्ञान, वेडे किंवा भ्रमिष्ट यांना आत्महत्येस मदत करणें. (सेक्शन ३०५) (६) ज्यांत खून झाला आहे अशा दरवडयांत साथीदारी. (सेक्शन ३९६) (७) काळेपाण्याची शिक्षा भोगणाऱ्या माणसानें खुनाचा प्रयत्न करून प्रत्यक्ष इजा करणें (सेक्शन ३०७) या ७ गुन्ह्यांना फांशीची शिक्षा देतां येते.

देहान्त शासन

अगदीं जुन्या काळीं नरहत्या करणाऱ्यावर मृत मनुष्याच्या नातेवाईकांनीं वाटेल तो सूड उगवावा अशी पद्धत समाजांत मान्य असे. कॉर्सिका मध्यें व्हेंडेटा या नांवानें व ग्रीस आणि उत्तर अमेरिकेच्या कांहीं संस्थानांत ही पद्धत अजूनही चालू आहे. शासनसंस्था स्थापित झाल्यावर खुनी माणसास ही शिक्षा त्या संस्थांकडून होऊं लागली. व व्यक्तीचा तो अधिकार काढून घेण्यांत आला.

बाबीलोनच्या खामुरबीच्या (इ. पू. २२८५–४२) कायद्यान्वयें अनेक गुन्ह्यांस फांशीची शिक्षा असे. व जाळणें, बुडविणें, क्रूसावर ठोकणें इ. अनेक तऱ्हांनीं ती अमलांत आणीत असत.

इंग्लंडमध्यें जुन्या काळीं लहान सहान गुन्ह्यांनाहीं मृत्यूची शिक्षा असे. व फाशी देणें, डोकें मारणें, जाळणें, बुडविणें, दगडांनीं ठेचणें व कडेलोट करणें असे तिचे प्रकार असत. नास्तिकांनाही मृत्यूची शिक्षा देत असत. पश्चिम युरोपांत पोपनें क्लर्जी लोकांना विशेष सवलती दिल्या होत्या. सरकारी कोर्टांना क्लर्जीचा निवाडा करण्यास अधिकार नसे. पुढें पुढें दीक्षा घेतल्याचें व क्षौरविधि केल्याचें सिद्ध करतील त्यांना तर वरील सवलत मिळेच, पण साधारण लॅटिन कविता (नेक्व्हर्स) वाचण्याइतपत ज्ञान जो दाखवी त्यालाही ही सवलत दिली जाई. युरोपांतील धर्मसुधारकांच्या चळवळीच्या आधीं तर राजशासनाचा भंग करणाऱ्या क्लर्जींना धार्मिक न्यायमंदिरें जवळ जवळ कांहींच शिक्षा करीत नसत. आठव्या हेन्रीच्या राज्यांत क्रूरतेचा अगदीं कळस झाला. जवळ जवळ ७२००० लोक त्यानें फांशी दिले. पुढें इंग्लिशांच्या अमेरिकेंत वसाहती झाल्यावर अमेरिकेंत गुलाम म्हणून जाण्याच्या अटीवर फांशीची शिक्षा माफ होऊं लागली. फाशीऐवजीं काळे पाणी देण्याचा अधिकार अठराव्या शतकांत न्यायाधीशास मिळाला. प्रथम ही सवलत फक्त क्लर्जींनाच मिळे. पण १७०५ मध्यें 'वाचता येतें' हें सिद्ध करण्याची

जरूरी नाहीं असें ठरल्यापासून ही सवलत सर्वांनाच मिळू लागली. 'क्लर्जीच्या सर्व सवलती' १८४१ मध्यें नष्ट झाल्या. अठराव्या शतकाच्या अखेरीस गुन्हेगारीचा कायदा इंग्लंडमध्यें फारच कडक होता. तरी राज्यव्यवस्थेच्या शैथिल्यामुळें आतांपेक्षां गुन्हयांचें प्रमाण तेव्हां फारच जास्त असे. बेंथाम, रोमिली, मॅकिंटाश, यांच्या प्रयत्नानें हा कायदा बराच सौम्य केला गेला. १८१९ मध्यें एकंदर १८० प्रकारच्या गुन्हयांना देहांत शासन असे. पण वरील लोक व विशेषतः सर रॉबर्ट पील यांच्या प्रयत्नानें आतां फक्त चारच पातकें महापातकें समजलीं जातात व तीं म्हणजे 'राजद्रोह, खून, चाचेगिरी, व गोदी किंवा शस्त्रागार यांचा विध्वंस हीं होत. शेवटच्या दोन गुन्हयांनाही देहांत शिक्षा प्रत्यक्ष न देतां नुसती नमूद केली तरी चालेल. असा विकल्प १८३८ पासून देण्यांत आला

लष्करी व आरमारी कायद्यान्वयें शत्रूला बातमी देणें, भ्याड वर्तन, पाहऱ्यावर निजणें वगैरे गुन्हयांना अजूनही देहांत शासन आहे. न्यू साउथ वेल्स, व्हिक्टोरिया, दक्षिण आफ्रिका, येथें बलात्कार व दहा वर्षांच्या आंतील मुलींचा दुरुपयोग यांस देहान्त शासन आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील बहुतेक सर्व देशांत देहान्त शासन फक्त फांशी देऊनच अमलांत आणतात. ऑस्ट्रेलिया–हंगेरीमध्यें १७८७ मध्यें देहांत शासन बंद केलें होतें.पण १७९५मध्यें तें फिरून सुरू करण्यांत आलें. फ्रान्स व बेल्जममध्यें गिलोटिनवर, डेन्मार्कमध्यें परशूनें घाव घालून देहान्तशासन देतात. इटालीमध्यें १७८६ मध्येंच देहान्त शासन रद्द करण्यांत आलें. व १८८८ मध्यें तर राजवधाबद्दलचीही देहान्तशिक्षा काढून टाकण्यांत आली. देहान्त शासनाला फार जोराचा विरोध प्रथम इटलीमध्यें सुरूं झाला. बॅसेरिया नांवाच्या न्यायाधीशानें हें मत प्रथम मांडलें. पण १९०५ च्या मोजणीवरून इटलींत दर दहा लक्षाला १०५ खून झाले तर युनायटेड किंग्डम्मध्यें २७ झाले. नॉर्वेमध्यें १९०५पासून रुमानिया १८६४ व पोर्तुगाल १८६७ पासून फांशीची शिक्षा रद्द करण्यांत आली.

स्वीडनमध्यें १९०१ मध्यें फांशी रद्द करण्याचा ठराव नापास झाला. स्वित्झर्लंडमध्यें १८७४ मध्यें देहान्तशासन रद्द करण्यांत आलें. पण १८७४ ते ७९ या ५ वर्षांत खुनांचें प्रमाण वाढल्यामुळें तें फिरून सुरूं करावें लागलें. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील पांचसहा संस्थानांनीं देहान्त शासन रद्द करून फिरून सुरूं केलें. न्यूयॉर्क वगैरे कांहीं संस्थानांत विजेनें देहान्त करतात. बाकी सर्व ठिकाणीं फांशी देतात. युरोप अमेरिका येथील पुष्कळ लेखक व संस्था देहान्त शासन नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. समाजाला कोणाही मनुष्याचा जीव घेण्याचा अधिकार नाहीं असें त्यांचें मत आहे. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें आहे. (१) देहान्त शासनामुळें गुन्हेगारास पश्चात्तापास अवसर मिळत नाहीं. (२) पुष्कळ वेळां मनोरचनेंत बिघाड असल्यामुळें हातून खून घडतो (३) फांशीची शिक्षा फार थोड्या वेळां दिली जाते म्हणून गुन्हेगारांस ती प्रतिबंधक होऊं शकत नाहीं. (४) पुष्कळ वेळां गुन्हा अप्रत्यक्ष पुराव्यावरून सिद्ध करतात. त्यांत चूक व म्हणूनच घोर अन्याय होण्याचा फार संभव असतो. व ही शिक्षा माफ करतां येण्याजोगी नसते. (५) पातक्यास सुधारावें हा शिक्षेचा हेतु यांत साध्य होत नाहीं या कारणासाठीं देहान्त शासन रद्द व्हावें. पण या मताला विरोधही अजून पुष्कळ जोराचा आहे. फांशीची शिक्षा अगदीं कमी वेळां देण्यांत येते ती वरील कारणांचा विचार करूनच दिली जाते असें शिक्षेला अनुकूल लोक म्हणतात. कांहीं लोकांनीं तर गुन्हेगार प्रवृत्तीच्या सर्व लोकांना, व वेड्यांनाही फांशी द्यावें असें सांगितलें आहे.

सैन्यघटना व कांहीं लढाऊ जाती

हिंदुस्थानांतील रेग्युलर ब्रिटिश सैन्य

ब्रिटिश घोडदळ:—

हिंदुस्थानांत घोडदळाचीं पांच ब्रिटिश रेजिमेंट्स आहेत. यांत एकंदर २७ अंमलदार आणि ५७१ सैनिक आहेत.

ब्रिटिश पायदळ:—

हिंदुस्थानांत हल्लीं पायदळाचीं ४५ बटॅलियनें आहेत. यांपैकीं प्रत्येकांत २८ अंमलदार आणि ८८२ इतर सैनिक असतात.

रेग्युलर हिंदी सैन्य

हिंदी घोडदळ:—हिंदी घोडदळांत हल्लीं २१ रेजिमेंट्स् आहेत. शांततेच्या काळीं प्रत्येक रेजिमेंटमध्यें पुढीलप्रमाणें सैनिक असतात. १४ ब्रिटिश अंमलदार, १९ हिंदी अंमलदार, ४९३ हिंदी नॉन कमिशन्ड अंमलदार आणि सैनिक.

हिंदी पायदळाची रचना येणेंप्रमाणें असते—

१९ पायदळ रेजिमेंट्स्. यांत १०१ बटॅलियन्स.
३ पायोनियर कोअर्स. यांत ९ बटॅलियन्स.
१ इंडिपेंडंट पायोनियर बटॅलियन यांत १ बटॅ.
३ सॅपर्स अॅन्ड मायनर्स रेजिमेंट्स् ७ बटॅलि.
१० गुरखा रेजिमेंट्स् २० बटॅलियन्स

एकूण रेजिमेंट्स्–३६; एकूण बटॅलियन्स–१३८

एका बटॅलियनमध्यें सामान्यतः खालीलप्रमाणें सैनिक असतात.

	ब्रि० अंमल०	हिं० अंमल०	हिं० इतर सै.
इन्फंट्री	१२	२०	७०८
पायोनियर्स	११	१५	६६१
गुरखे	१३	२२	९०५

राखीव सैन्य

राखीव सैन्य

यांत आजमितीस पुढीलप्रमाणे सैनिक आहेत.

कॅव्हलरी	२,९४३
आर्टिलरी	२,३२९
सॅपर्स अॅन्ड मायनर्स	१,६६०
इंडियन सिग्नल कोअर	९९४
इन्फंट्री	२२,९६०
गुरखे	२,०००
इं. पायोनिअर्स	८१
	३४,२०७.

हिंदी अधिकारी

हिंदी सैन्यांतील अंमलदारांचे दोन विभाग आहेत.एक किंग्ज कमिशनवाले आणि दुसरे व्हाईसरायचें कमिशन असणारे. यांपैकीं दुसऱ्या प्रकारचे अंमलदार, गुरखा बटॅलियन्समधील गुरख्याशिवाय सर्व हिंदी असतात. पूर्वीं किंग्ज कमिशन हिंदी लोकांना मिळत नसे. तें नुक्तेंच कांहीं जणांस मिळूं लागलें आहे. हें कमिशन असणारा अंमलदार साधारणतः लेफ्टनेंट कर्नलच्या हुद्यापर्यंत चढूं शकतो. हा हुद्दा मिळण्यास सामान्यतः २६ वर्षें नोकरी करावी लागते. यापुढील बढती मिळण्यास मुद्दाम निवड व्हावी लागते.

महायुद्धाचा हिंदी सैन्याच्या दृष्टीनें एक अत्यंत महत्त्वाचा परिणाम म्हणजे हिंदी लोकांना किंग्ज कमिशन मिळणें हा होय. हें कमिशन मिळविण्याचे तीन मार्ग आहेत. १ रॉयल मिलि. कॉ. सँढर्स्ट येथें किंवा रॉ. मि. एकॅ. वूलिथ येथें कॅडेटची परीक्षा उत्तीर्ण होणें. यासाठीं उमेदवार निवडण्याकरितां हिंदुस्थानांत वर्षांतून दोनदां परीक्षा होते. २ हिंदी सैन्यांतील विशेष कर्तबगार हिंदी अंमलदार म्हणून निवडणूक होण. यांना वर सांगितलेल्या कॉलेजांत किंवा अॅकॅडमींत शिक्षण घेतल्यानंतर कमिशन मिळतें. ३ वयोमर्यादा व शिक्षण यांचा अभाव असलेल्या हिंदी अंमलदारास ऑनररी कमिशन मिळणें.दरवर्षीं सँढर्स्ट येथें १० व वुलविच येथें ३ जागा हिंदी विद्यार्थ्यांसाठीं राखून ठेवण्यांत येतात. डेहराडून येथें प्रिन्स ऑफ वेल्स इंडियन मिलिटरी कॉलेज स्थापण्यांत आलें आहे. तेथें वुलिच किंवा सँढर्स्ट येथें जाऊन किंग्ज कमिशन मिळवूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास पूर्वशिक्षण देण्यांत येतें. येथील शिक्षणक्रम सहा वर्षांचा आहे.येथें एका वेळीं सुमारें ७० विद्यार्थ्यांची सोय आहे.

राखीव अधिकारी हिंदी सैन्य

महायुद्धापूर्वी इंडियन आर्मी रिझर्व्ह ऑफ ऑफिसर्स नांवाचें दळ होतें. यांतील अंमलदाराचा उपयोग हिंदी फौजेंतील मृत वा जखमी अमलदारांच्या जागा भरून काढण्याकडे होत असे. परंतु युद्धांत अनुभव असा आला कीं हे अंमलदार फारसे कार्यक्षम नाहींत. तेव्हां वरील दळाच्या जागीं आर्मी इन इंडिया रिझर्व्ह ऑफ ऑफिसर्स अस्तित्वांत आलें (१९२२) यांत पुढील गृहस्थांस प्रवेश मिळतो.

(१) एकदां किंग्ज कमिशन मिळालेले, पण कार्यनिवृत्त झालेले अंमलदार. (२) हिंदुस्थान सरकारचे किंवा एखाद्या स्थानिक सरकारचे, लष्करांत नसलेले अंमलदार. (३) आगाऊ (लष्करी) शिक्षण घेतलेले आणि इतर प्रकारची आवश्यक लायकी असलेले खाजगींतले सद्गृहस्थ. यांतील अंमलदारांस वार्षिक रु २०० रिटेनिंग फी म्हणून मिळतात. खेरीज सैन्यांत प्रत्यक्ष दाखल झाल्यावर कपडे व इतर सामान यासाठीं रु. ४०० मिळतात. जानेवारी १९२९ रोजीं या दळांतील अंमलदारांची संख्या १६७१ होती. सदर दळांत सीलोनमधून ५० अंमलदार घेतले जातात.

हिंदी टेरिटोरिअल सैन्य

इंडियन टेरिटोरियल सैन्य हा सैन्याच्या हिंदीकरणाचें एक अंग आहे. हें सैन्य ज्यांचा लष्करी नौकरी हा वंशपरंपरागत धंदा नाहीं, अशा लोकांसाठीं आहे. रेग्युलर हिंदी सैन्यास कुमक म्हणूनहि याचा उपयोग आहे. या कारणासाठीं यांत दाखल होणारावर वेळ पडल्यास प्रत्यक्ष युद्धांत भाग घेण्याची जबाबदारी असते.प्रसंगविशेषीं यांतील सैनिकास परदेशींही नोकरीसाठीं जावें लागण्याचा संभव आहे. यांत एकदां शिक्षण घेतलेल्या सैनिकास तौलनिक दृष्टया थोडक्याच तयारीनंतर प्रत्यक्ष युद्धांत रेग्युलर्सच्या बरोबरीनें भाग घेतां येईल.

या टेरिटोरियल फोर्समध्यें हल्लीं तीन मुख्य विभाग आहेत. १ प्रॉव्हिन्शिअल बॅटलियन्स आणि २ अर्बन युनिट्स् व ३ यूनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअर युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअरमधील सैनिकावर प्रत्यक्ष युद्धांत भाग घेण्याची जबाबदारी नसते.

प्रॉव्हिन्शियल बटॅलियन्समधील सैनिकावर मात्र ही जबाबदारी असते. प्रथम हीं बटॅलियनें ७ होतीं. त्यांची संख्या आतां १८ आहे. यांत सध्यां फक्त पायदळ आणि इं. टे. फो. मेडिकल ब्रँच आहे. यांतील नोकरीची सामान्य मुदत ६ वर्षांची असून विशिष्ट परिस्थितींत ती चार वर्षांची असते. ही मुदत संपल्यानंतर नियमित मुदतीसाठीं पुन्हां नोकरी धरितां येते. अर्बन युनिट्स् मधील सैनिकांवर फक्त प्रांतिक जबाबदारी असते. मुंबई, मद्रास आणि संयुक्तप्रांत यांत १९२८ सालीं चार युनिट्स् स्थापन करण्यांत आलें. त्यांत एक फक्त पारशींचें होतें यांतील नोकरीची मुदत ६ वर्षें आहे.

सैनिक शिक्षण शाळा

१. स्टाफ कॉलेज, क्वेटा
२. सिनियर ऑफिसर्स स्कूल, बेळगांव
३. स्कूल ऑफ आर्टिलरी, काबूल
४. एज्युकेशन स्कूल, सागर
५. स्मॉल आर्म्स स्कूल इंडिया, पांचगणी, अहमदनगर.
६. आर्मी स्कूल ऑफ फिझिकल ट्रेनिंग,अंबाला.
७. आर्मी सिग्नल स्कूल, पुणें.
८. रॉयल टँक कोअर स्कूल, अहमदनगर.
९. आर्मी स्कूल ऑफ एज्युकेशन, बेळगांव.
१०. आर्मी स्कूल ऑफ कुकरी, पुणें.
११. आर्मी व्हेटरिनरी स्कूल्स, अंबाला व पुणें.
१२. इंडियन आर्मी सर्व्हिस कोअर ट्रेनिंग एस्टॅब्लिशमेंट, रावळपिंडी.
१३. इंडियन आर्मी ऑर्डनन्स कोअर स्कूल ऑफ इंस्ट्रक्शन, खडकी.

हिंदुस्थानांत पुढील लष्करी संस्था आहेत.—

याखेरीज झेलम, जालंदर आणि अजमीर येथें किंग जर्जि रॉयल इंडियन मिलटरी स्कल असून नवगंज येथें किचनेर कॉलेज आहे. सदर कॉलेजांत व्हाईसरायचें कमिशन मिळविण्यास अवश्य असलेलें लष्करी शिक्षण देण्यांत येतें.

हिंदीकरण

१९२३च्या फेब्रुवारींत असें ठरविण्यांत आलें कीं, हिंदी सैन्याच्या ८ युनिटसचें संपूर्ण हिंदीकरण करावें. हिंदीकरणासाठीं निवडण्यांत आलेलीं युनिट्स् पुढीलप्रमाणें—

१. सातवी लाइट इन्फन्ट्री
२. सोळावी ,, ,,
३. दुसरी ब्रिटिश मद्रास पायोनियर्स
४. ४/१९ हद्राबाद रेजिमेंट

५. पांचवी रॉयल बॅटेलियन
६. १/७ रजपूत रेजिमेंट
७. १/४ पंजाब रेजिमेंट
८. २/१ ,, ,,

सैन्य खातें–घटना

कमँडर इन चीफ हा व्हाईसराय-च्या कार्यकारी मंडळाचा लष्करी सभासद असतो. त्याचप्रमाणें कौन्सिल ऑफ स्टेटचाही सभासद असतो. लष्कराच्या नियंत्रणासंबंधींचे सर्व अधिकार म्हणजे लष्करी धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी करणें, लष्कराची प्रत्येक तुकडी जय्यत तयार ठेवणें, आणि हिंदुस्थानासंबंधींच्या कोणत्याही युद्धांत सेनापतीचें काम करणें हें सर्व कमँडर इन चीफकडे असतें. याशिवाय रॉयल इंडियन मरीन आणि रॉयल एअरफोर्स यावरही त्याची हुकमत चालते. त्याच्या हुकमांची अंमलबजावणी करण्यासाठीं त्याच्या हाताखालीं चार मुख्य स्टाफ ऑफिसर्स असतात. ते म्हणजे चीफ ऑफ दी जनरल स्टाफ, अॅड्जूटंट जनरल, क्वार्टर मास्टर जनरल आणि मास्टर जनरल ऑफ ऑर्डिनन्स हे होत.

सैन्याचें कौन्सिल

यांत कमँडर इन् चीफ अध्यक्ष म्हणून असून पुढील सभासद असतात—चीफ ऑफ दि जनरल स्टाफ (उपाध्यक्ष), अॅड्जूटंट जनरल, क्वार्टर-मास्तर, जनरल, मास्टर जनरल ऑफ ऑर्डिनन्स हिंदुस्थान सरकारचा लष्करी खात्यांतील सेक्रेटरी आणि फिनॅन्स डिपार्टमेंटचा प्रतिनिधि म्हणून मिलिटरी फिनॅन्समधील आर्थिक सल्लागार या कौन्सिलचें काम कमँडर इन् चीफ यास सल्लागार म्हणून मदत करणें हें असतें. त्याच्यावर सामुदायिक जबाबदारी नाहीं. विशेष महत्त्वाच्या बाबतींत सल्ल्याची जरूरी भासली म्हणजे कमँडर इन् चीफ यांची बैठक बोलावतो.

सेक्रेटरीची कचेरी

लष्करी खात्याची व्यवस्था एका सेक्रेटरीकडून बघितली जाते. मुलकी खात्यांतील इतर सेक्रेटरीं-च्याप्रमाणेंच त्याचा तडक व्हाईसरायशीं संबंध असतो. याच्या हाताखालीं पुढीलप्रमाणें अधिकारी असतात—

एक डेप्युटी सेक्रेटरी, एक एस्टॅब्लिशमेंट ऑफिसर, एक डायरेक्टर ऑफ मिलिटरी लँड्स अँड कँट्नमेंट्स, तीन असिस्टंट सेक्रेटरीज् (यांतील एक इंडियन सोल्जर्स बोर्डचा सेक्रेटरी असतो), आणि एक ऑफिसर इन चार्ज, मेडल डिस्ट्रिब्यूशन.

संरक्षणविषयक खर्चाचा सारांश

कोष्टकांतील आकडे शेवटचीं तीन शून्यें (०००) वगळून दिलेले आहेत.	१९२८–'२९ पक्का हिशेब रु.	१९२९–'३० दुरुस्त अंदाज रु.	१९३०–'३१ अंदाज रु.
लष्कर	५२९७९५	५३२४५४	५२२१७८
आरमार	८१८६	८४५३	९०३२
लष्करी एंजिनियर खातीं	४४३४८	४६४७५	४८४९८
एकंदर	५८२३२९	५८७३८२	५७९७०८

टीपा:– (१) वरील आकड्यांत रॉयल एअर फोर्स आणि नॉनइफेक्टिव्ह सर्व्हिसेस यांच्या खर्चाचा समावेश केला आहे. डेट सर्व्हिसेसच्या खर्चाचा मात्र त्यांत अंतर्भाव नाहीं.

(२) यूनायटेड किंगडममध्यें लष्कराबावत हिंदुस्थान सरकारला करावा लागणारा खर्च, आणि त्याच कारणासाठीं इंपीरियल गव्हर्नमेंटला देण्यांत येणारा खर्च, यांचा अंतर्भाव वरील कोष्टकांत केला आहे.

लष्कर: ब्रिटिश शिपाई

सन	सरासरी संख्या	प्रवेश	मृत्यु	इंग्लंडांत पाठविलेले आजारी	आजाऱ्यांची सरासरी
१९१०–१४ (सरासरी)	६९४४०	३९३८९	३०३	४८८	२०९४.५७
१९१५–१९	६६१९९	५८३६७	५८३	१९८०	३२७७.५३
१९२०	५७३३२	६१४२९	३८५	२३१४	३४८८.०८
१९२१	५८६८१	६०५१५	४०८	७४९	३०७०.०४
१९२२	६०१६६	३७८३६	२८४	७१४	१९०२.३२
१९२३	६३१३९	३७५९५	२३७	९७९	१७९३.३१
१९२४	५८६१४	३८५६९	२४६	८७९	१८५७.९५
१९२५	५७३७८	३६०६९	१६६	९९७	१७५०.१९
१९२६	५६७९८	३६८९३	१७१	९१०	१७५८.६०
१९२७	५५६३२	३४६६६	१४९	८२९	१६५४.२२
१९२८	५६३२७	३३०३४	१६६	५५६	१६३५.९९
१९२९	५९८२७	३८७४२	२०३	६७१	१७४६.८४

संरक्षण-खर्चाचें पृथक्करण

कोष्टकांतील आंकडे शेवटची तीन शून्यें (०००) वगळून दिले आहेत.	१९२८–'२९ पक्का हिशेब	१९२९–'३० दुरुस्त अंदाज	१९३०–'३१ अंदाज
हिंदुस्थान:			
(अ) खडी फौज:			
(१) इफेक्टिव्ह सर्व्हिसेस			
खडया फौजेचा खर्च			१५२४७०
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विसेस.			६९२५५
मॅन्युफॅक्चरिंग एस्टॅब्लिशमेंट			२२७६३
आर्मी हेडक्वार्टर्स			२०३१२
स्टोअर्स इक्विपमेंट व जनावरें			४५२११
स्पेशल सर्व्हिसेस.			१२
ट्रान्स्पोर्टेशन, कंन्झर्वन्सी इ.			२३४३९
एकंदर:			३३३४६२
(२) नॉन–इफेक्टिव्ह चार्जेस:			३५६७१
(ब) ऑक्झिलिअरी व टेरिटोरिअल फोर्सेस			९६३९
(क) रॉयल एअर फोर्स: इफेक्टिव्ह			१२३१९
,, नॉन् इफेक्टिव्ह			३०
एकंदर हिंदुस्थान: इफेक्टिव्ह	३६५०३४	३५७४८३	३५५४२०
:नॉन् इफेक्टिव्ह	३५४६३	३५७५०	३५७०१
एकंदर.	४००४९७	३९३२३३	३९११२१

संरक्षण-खर्चाचें पृथक्करण

कोष्टकांत शेवटचीं तीन शुन्यें (०००) वगळलीं आहेत.	१९२८-'२९ पक्का हिशेब	१९२९-'३० दुरुस्त अंदाज	१९३०-'३१ अंदाज
इंग्लंड:			
(अ) खडी फौज:			
(१) इफेक्टिव्ह सर्विसेस:			
खडच्या फौजेचा खर्च			
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विसेस:			३५५९५
मॅन्युफॅक्चरिंग एस्टॅब्लिशमेंटस			४२९२
आर्मी हेडक्वार्टस			६३०८
स्टोअर्स इक्विपमेंट व जनावरें			१२०७
स्पेशल सर्व्हिसेस			१२३२५
ट्रान्स्पोर्टेशन कंझर्व्हन्सी इ.			१००४८
एकंदर:			६९७९५
(२) नॉन् इफेक्टिव्ह सर्व्हिसेस			४९५०५
(ब) रॉयल एअर फोर्स:			
इफेक्टिव्ह			११५४९
नॉन् इफेक्टिव्ह			२०८
एकंदर इंग्लंड			
एकंदर लष्करी खर्च	१२९२९८	१३९२२१	१३१०५७
इफेक्टिव्ह	४४५४९५	४४७०५०	४३६७६४
नॉन् इफेक्टिव्ह	८४३००	८५४०४	८५४१४
महासंख्या	५२९७९५	५३२४५४	५२२१७८

मिलिटरी एंजिनियर सर्व्हिसेसमधील इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील खर्चाची विभागणी

कोष्टकांतील आंकडे शेवटचीं तीन शून्यें (०००) वगळून दिले आहेत	१९२८-'२९ पक्का हिशेब	१९२९-'३० दुरुस्त अंदाज	१९३०-'३१ अंदाज
हिंदुस्थान	३८०१९	४०६८०	४३९४२
इंग्लंड	३६९	४७६	४४२
एकंदर	३८३८८	४११५६	४४३८४

लढाईस योग्य शिपाई

	किंज कमिशन असणारे अंमलदार	इतर ब्रिटिश सैनिक	व्हाइसरॉयचें कमिशन असणारे हिंदी अंमलदार	इतर हिंदी सैनिक	कारकून व इतर मुल्की नोकर	(अनुयायी)	हिंदी राखीव सैनिक
१ कॉम्बटंट सर्व्हिसेस (कॅव्हलरी, आर्टिलरी, इंजिनीअर्स, पायोनियर्स, इंन्फंट्री,... सिग्नल सर्व्हिसेस, आणि टँक कोअर इत्यादि.)	४१४५	५६१३४	३४१७	१३०९४८		२०४९८	३५११९
२ स्टाफ (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमधील लोक)	५७२	५११	७	११३	१३९५	५४५	---
३ ट्रेनिंग एस्टॅब्लिशमेंट्स् (डिपार्टमेंटल कोअरचे अधिकारी धरून)	११८	१६२	९	१०६	६४	३४०	---
४ एज्युकेशनल एस्टॅब्लिशमेंट्स्	६४	१६५	३५	३४	२५९	३०५	---
५ इंडियन आर्मी सर्व्हिस कोअर (नंबर१, २, व ३ शिवाय)	३९७	८०६	२९२	१६०२२	१२३५	६११४	७३३८
६ इंडियन आर्मी ऑर्डनन्स कोअर (नंबर २ मध्यें सांगितलेल्याशिवाय)	६९	५७३	६	१७५७	५७५	२०६	---
७ मेडिकल सर्व्हिस (नंबर २ मधील अधिकारी सोडून)	९०४	८६१	७१९	४२८८	--	४७४८	३४४०
८ व्हेटरनरी सर्व्हिसेस (,,)	४०	४	१०४	५७४	४६	९०	२००
९ रीमाउंट सर्व्हिसेस (,,)	३९	२४	२८	१९५	४७	३०९३	--
१० संकीर्ण खातीं (मिलिटरीअकाउंटस् खात्यासह)	२५९	१८४	११५	५४३	६९२०	१५७४	---
११ ऑग्झिलियरी आणि टेरिटोरियल फोर्सेस (कायम खातीं)	१९४	४०३			१२	५	
एकंदर	६७७१	५९८२७	४७३२	१५४५८०	१०८५३	३७५१८	४६०९७

लष्कर हिंदी शिपाई

काल	सरासरी संख्या	प्रवेश	मृत्यू	आजारी	नेहमी अजा. न्यांची सरा.	प्रवेश	दर हजारी मृत्यू	प्रमाण आजारी	नेहमीं अजा-न्यांची सरा-
१९१० ते १९१४ सरासरी	१३०२६१	७१२१३	५७३	६९९	२६६२	५४४.६	४.३९	५.४	२०.७
१९१४ ते १९१९(सरासरी	२०४२९८	१६१०२८	३४३५	४८२९	७७९२	७८८.२	१६.८१	२३.६	३८.१
१९२०	२१६४४५	१६४९८७	२१२४	४५६४	९२६५	७६२.३	९.८१	२१.१	४२.८
१९२१	१७५३८४	११९२१५	१७८२	३६३८	६०३१	६७९.७	१०.१६	२०.७	३४.४
१९२२	१४७८४०	७७४६८	१०१४	२६५९	३६३९	५२४.०	६.८६	१८.०	२४.६
१९२३	१४३२३४	६६८४७	८५६	२३२८	२९५५	४६६.७	५.९८	१६.३	२०.६३
१९२४	१३४७४२	५७०१४	७७२	१७३१	२४३२	४२३.१	५.७३	१२.८	१८.०५
१९२५	१३६४७३	४८६११	५४७	१७१२	२०५३	३५६.८	४.०१	१२.५	१५.०४
१९२६	१३५१४६	५२५१७	५०७	१५६९	२०८२	३८८.६	३.७५	११.६	१५.४१
१९२७	१३३२००	४७०५४	४४२	१८४२	१९७२	३५८.६	३.३७	१२.८	१५.०३
१९१८	१३११९०	४८७३९	३७२	१२५१	२०३४	३७१.५	२.८४	९.५४	१५.५१
१९२९	१५४५८०	४५६५४	६३९	१४३१	१८६४	३६१.५	३.४२		१६.८

लष्करी अधिकारश्रेणीचा तक्ता

कमँडर—इन—चीफ

- कमँडर, बर्मा इंडिपेंडंट डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग) — कमँडर, रंगून ब्रिगेड एरिया.

- जनरल ऑफिसर कमँडिंग इन चीफ दक्षिण फौज.
  - —कमँडर, मद्रास डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग).
    - कमँडर सदर्न ब्रिगेड एरिया,
  - —कमँडर ,बॉम्बे डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग)·
  - —कमँडर, पूना (इंडिपेन्डंट) ब्रिगेड एरिया,
  - —कमँडर, डेक्कन डिस्ट्रिक्ट (पहिला वर्ग).
    - कमँडर, ४थी (शिकंदराबाद) कॅव्हलरी ब्रिगेड,
    - कमँडर, १०वी (जबलपूर) इंफंट्री ब्रिगेड,
    - कमँडर, ११वी (अहमदनगर) इंफंट्री ब्रिगेड,
    - कमँडर, १२वी (शिकंदराबाद) इंफंट्री ब्रिगेड,
  - —कमँडर, मह्रू डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग).

- जनरल ऑफिसर कमँडिंग इन चीफ पूर्व फौज.
  - —कमँडर, प्रेसिडेंसी आणि आसाम डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग).
  - —कमँडर, लखनौ डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग).
    - कमँडर ६वी (लखनौ)इंफंट्री ब्रिगेड,
    - कमँडर अलाहाबाद ब्रिगेड एरिया,
  - —कमँडर, दिल्ली (इंडिपेंडट) ब्रिगेड एरिया,
  - —कमँडर, मीरत डिस्ट्रिक्ट (पहिला वर्ग).
    - कमँडर, ३री (मीरत) कॅव्हलरी ब्रिगेड, कमँडर, ७वी (डेहराडून) इंफंट्री ब्रिगेड, कमँडर, ८वी (बरेली) इंफंट्री ब्रिगेड, कमँडर, ९वी (झांशी) इंफंट्री ब्रिगेड

- जनरल ऑफिसर कमँडिंग इन चीफ पश्चिम फौज.
  - —कमँडर, बलुचिस्तान डिस्ट्रिक्ट (पहिला वर्ग).
    - कमँडर, ४ थी (क्वेटा) इंफंट्री ब्रिगेड,
    - कमँडर, ५ वी (क्वेटा) इंफंट्री ब्रिगेड,
  - —कमँडर, झोब (इंडिपेंडंट) ब्रिगेड एरिया,
  - —कमँडर, सिंध (इंडिपेंडंट) ब्रिगेड एरिया,

- जनरल ऑफिसर कमँडिंग इन चीफ उत्तर फौज.
  - —कमँडर, वजिरिस्तान डिस्ट्रिटक्ट (दुसरा वर्ग).
    - १ कमँडर, रझमक ब्रिगेड, २ कमँडर, बानू ब्रिगेड, ३ कमँडर वाना ब्रिगेड.
  - —कमँडर, लाहोर डिस्ट्रिक्ट (पहिला वर्ग).
    - कमँडर २री (सियालकोट) कॅव्हलरी ब्रिगेड, कमँडर, फिरोजपूर ब्रिगेड एरिया, कमँडर, मुलतान ब्रिगेड. कमँडर, जालंदर ब्रिगेड एरिया, कमँडर, लाहोर ब्रिगेड एरिया, कमँडर, अंबाला ब्रिगेड एरिया,
  - —कमँडर रावळपिंडी डिस्ट्रिक्ट (पहिला वर्ग).
    - कमँडर, १ली (अबोटाबाद) इंफंट्री ब्रिगेड, कमँडर, २री (रावळपिंडी) इंफंट्री ब्रिगेड, कमँडर, ३री (झेलम) इंफंट्री ब्रिगेड.
  - —कमँडर, कोहाट डिस्ट्रिक्ट (दुसरा वर्ग) कमँडर, कोहाट ब्रिगेड,
  - —कमँडर, पेशावर डिस्ट्रिक्ट (पहिला वर्ग).
    - कमँडर, १ली (रिसालपूर) कॅव्हलरी ब्रिगेड. कमँडर, लांडिकोटाल ब्रिगेड, कमँडर, पेशावर ब्रिगेड, कमँडर, नवशेरा ब्रिगेड.

कांहीं लढाऊ जाति

१. अहीर:—अहीर लोक आपण नंद राजाचे वंशज असून आपली उत्पत्ति रजपुतांपासून आहे असें सांगतात. अहिरांचें मूळ घराणें गुजराथेंतील. तेथील रहिवासी गुजर व काठी रजपूत यांनीं इ. स. च्या पांचव्या व आठव्या शतकांत त्यांना तेथून हांकून दिलें. त्यांच्या पैकीं नंदराम नांवाच्या एका शूर पुरुषानें अवरंगजेब बादशहाच्या कारकीर्दींत गुरगांव येथें आपल्या जातीची वसाहत केली.

इ. स. १७३९त नंदरामाचा मुलगा राव बालकिसन हा मोगलांचे बाजूनें नादिरशहाशीं लढत असतां कर्नाळ येथें मारला गेला. त्याचा धाकटा भाऊ राव गुजरमल हा त्याचे मागून गोकुळगडचा जवळ जवळ स्वतंत्र राजाच बनला.

याचे वंशज म्हणजेच गुरगांवचे अहीर; यांनीं जाट व मराठे यांच्याशीं अनेक लढाया करून आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेविलें आहे. हे उत्तम प्रकारचे शूर शिपाई असून चालिरीति व आंगलट यांमध्यें जाटांहून थोडे भिन्न आहेत. गुरगांव जिल्ह्यांत यांची फार वस्ती आहे. रेवाडी जिल्हा धरून यांची पुरुषसंख्या ४२,३८० असून यांची वस्ती २१८ खेडयांत पसरली आहे. ते कष्टाळू शेतकरी असून मितव्ययी व शिस्तप्रिय आहेत. आठराव्या शतकांत राव गुजरमल यानें मोगलांच्या केलेल्या कामगिरीमुळें अहीर लोकांचा उत्कर्ष होऊं लागला. या गुजरमलचे हल्लींचे वंशजाकडे अहीर जातीचें पुढारीपण आहे.

अहीर जातींत तीन पोटविभाग आहेत. (१) नंदबान (२) जदूबान व (३) गवळीबान. नंदबान हे गंगा व यमुना यांमधील प्रदेशांत, जदूबान हे पूर्व पंजाबांत व गवळीबान हे अयोध्या व बिहार प्रांतांत आढळतात. यांपैकीं जदूबान अहीर शूर असून ब्रिटिश पायदळांत त्यांची हल्लीं भरती होते.

धर्मसमजुती, चाली वगैरे:—अहीर लोकांचें धार्मिक आचरण उच्च वर्णीय हिंदूंप्रमाणेंच असतें. मूल जन्मल्यावर तें मुलगा असल्यास थाळी पिटून गांवकऱ्यास त्याची बातमी देतात. तसेंच षष्ठीपूजन, नामकरण, जातकर्म, चौल वगैरे मुलाचे धार्मिक संस्कार ब्राह्मणांप्रमाणें केले जातात. तसेंच पुरोहिताकडून जन्मपत्रिकाही करवून घेण्याची चाल आहे. वयाचे पांचवे अगर सातवे वर्षीं मुलामुलींचीं लग्नें ठरवितात. मुलगा निरोगी असून त्याला शारीरिक व्यंगें नसावीं याकडे कसून लक्ष दिलें जातें. मुलीचा विवाह सामान्यतः अकराव्या वर्षापर्यंत करतात. परंतु आईबापांच्या शुश्रूषेकरितां मुलीची जरूर असल्यास विसाव्या वर्षापर्यंतही ती नवऱ्याकडे नांदावयास जात नाहीं.

कुटुंबांतील अगर नात्यांतील माणूस मरण पावलें तर तीन अगर दहा दिवसपर्यंत अशौच पाळण्याची चाल आहे. दसरा, मकरसंक्रमण, दिवाळी वगैरेसारखे सण अहीर लोक पाळतात. स्त्रियांना पुरुषांचे बरोबरीचे हक्क नाहींत. त्या पुरुषांना शेतीच्या कामांत मदत करितात व घरकाम पहातात. वडील मुलानें घरीं राहून शेतीवाडीची व्यवस्था पहावी व धाकटया मुलांनीं नोकरी करून घरीं पैसे पाठवावे अशी पद्धत आहे. अहीर लोक नीतिमान आहेत. त्यांना व्यभिचाराचें नांवही खपत नाहीं. नग्न स्थितीची त्यांना अत्यंत चीड आहे. स्त्रियांशीं वागतांना व बोलतांना सभ्यता राखण्यांत ते दक्ष असतात.

सैन्यांत भरती:—अहीर लोकांची भरती करण्याचें काम लखनौ येथील रंगरूट अधिकारी (रिक्रूटिंग ऑफिसर) करतो. जानेवारी ते मेपर्यंत शेतावर थोडें काम असल्यामुळें लोक घरींच असतात. त्यामुळें ही वेळ रंगरूट भरतीला फारच सोयीची असते.

२. गुजर—लोकसंख्यानुक्रमें गुजरांचा पंजाबांत आठवा अनुक्रम लागतो. हल्लीं त्यांची वस्ती हिंदुस्थानच्या पश्चिमोत्तर भागांत आहे. त्यांची वस्ती असलेला प्रांत म्हणजे सिंधूनद व गंगा आणि हजरा पर्वत व गुजराथचें द्वीपकल्प यामधील प्रदेश हा होय. यांची बहुतेक वस्ती मैदानांत असून डोंगराळ मुलुखांत आहे. हे जवळजवळ अज्ञातच आहेत. यांची मुख्य वस्ती गुजराथेंतच आहे. तेथील शेंकडा १३॥ लोकसंख्या गुजरांची आहे. पेशावर प्रांतांत सर्वच धनगरांस 'गुजर' म्हणतात. म्हणून शिरगणतींत गुजर म्हणून नोंदले गेलेले सगळेच लोक जातीनें गुजर असतील असें नाहीं. डोंगरांत राहणारे गुजर हे भटके असतात. सखल प्रदेशांत राहणारे गुजरच शेती करतात. पण तींत ते फारसे प्रवीण नाहींत. येथेंही गुरें पाळण्याचा धंदा करण्याकडेच त्यांचा कल असतो. प्रांताच्या पूर्वार्धांतील मुसलमान गुजर, हिंदूचे बरेच आचार पाळतात.

गुजर हे जाटाप्रमाणेंच बलिष्ठ असतात. यांच्या चेहऱ्याच्या एकंदर ठेवणीवरून हे असंस्कृत अशा मूळ रहिवाशांपैकीं असतील असें वाटत नाहीं.

यांस समाजांत जाटांइतकाच मान आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं, कमी असल्यास तो फारच थोडा कमी आहे. या दोघांत रोटीव्यवहार होतो. पण व्यक्तिगत गुणांच्या बाबतींत गुजर हा जाटांपेक्षां कमी दर्जाचा आहे. हा आळशी असून शेतीच्या कामास जवळजवळ कुचकामाचा आहे. हे लोक जात्या बंडखोर व लुटारू आहेत.

हें यमुनेच्या आसपासच्या प्रांतांतील गुजरासंबंधीं झालें; परंतु पश्चिमेकडील गुजर यांपेक्षां वरिष्ठ दर्जाचे आहेत. यासंबंधीं मेजर वेसनें असें म्हटलें आहे कीं, हे साधे, कष्टाळू, काटकसरी आणि महत्त्वाकांक्षा नसलेले लोक आहेत. रावळपिंडीच्या गुजरांस स्टीडमननें उत्तम शेतकरी म्हटलें आहे. तर फिरोजपूर येथील गुजरांसंबंधीं ब्रँड्रेथचें असें मत आहे कीं, त्यांची प्रवृत्ति शेतकीपेक्षां चोऱ्यामाऱ्या करण्याकडे अधिक आहे. यावरून असें दिसून येईल कीं, गुजर हा आपलें मूळचें डोंगरांतलें घर सोडून जसजसा खालीं उतरूं लागतो, तसतसा त्याचा अधःपात होऊं लागतो!

डोंगरांतील गुजरांविषयीं असें म्हणतां येईल कीं, ते चांगले मर्द व देखणे लोक आहेत. त्यांना चोऱ्या करणें ठाऊक नाहीं. हे गुरांचे कळप पाळून दूधदुभत्याच्या विक्रीवरच आपला निर्वाह करतात

उत्पत्ती:– गुजरांची मूळ उत्पत्ति युची या सिथियन टोळीपासून झाली. सिंधूच्या खोऱ्यांतून खालीं उतरून ते सौराष्ट्रांत म्हणजे हल्लींच्या गुजराथेंत स्थायिक झाले. तेथील मूळचे रहिवासी जे अहीर त्यांशीं यांनीं बहुतकरून बेटीव्यवहार केला असावा (इबेटसन). स्वतः गुजर आपली उत्पत्ति रजपुतांपासून आहे असें सांगतात.

यांच्यांत बालविवाह व प्रौढविवाह असे दोनही रूढ आहेत. देवजी, देवी, भैरव वगैरेंची ते पूजा करतात. पुनर्विवाह रूढ आहे. परंतु विधवेनें जर दिराशीं विवाह केला नाहीं तर त्यास तिच्याशीं पुनर्विवाह करूं इच्छिणाऱ्यांकडून कांहीं तरी बिदागी घेण्याचा हक्क नाहे. जातीपुढें गाऱ्हाणें मांडलें असतां काडी–मोड मिळूं शकते.

बहुतेक गुजर वैष्णव असतात. परंतु विष्णूस ते राम किंवा नारायण या नांवानें ओळखतात.

३.गुरखा–हे लोक नेपाळचे रहिवासी. हिमालयाचे पायथ्याशीं ५२० मैल लांब व १० मैल रुंद असा हा प्रदेश आहे. हा प्रदेश भौगोलिक दृष्ट्या पांच निरनिराळ्या डोंगराळ मुलुखांचा बनलेला आहे. त्यांपैकीं मधल्या मुलुखांतून गुरख्यांची ब्रिटिश सैन्यांत भरती होते. ह्या मुलुखांत लहान लहान असे २४ तालुके आहेत. नेपाळ प्रांत सुमारें ५४,००० चौरस मैल असून त्याची लोकसंख्या जवळ जवळ ४०,००,००० आहे.

गुरखे लोक व इतर नेपाळी लोक हे मूळचे मंगोलिअन शाखेचे वंशज आहेत हें त्यांच्या चेहेरेपटीवरूनच कळून येतें. पण नेपाळमधील खस, मगर, गुरुंग, व ठाकूर आणि थोड्या प्रमाणांत लिंबूस, रैस, व सुनवार ह्या जातींमधून ब्रिटिश सैन्यांत शिपाईगिरीसाठीं लोक येतात. हिंदी लोकांबरोबर सर्व प्रकारचे व्यवहार अशोक राजाचे पूर्वीपासूनच होत आले असल्यामुळें आतां हे लोक अस्सल मंगोलिअन राहिलेले नाहींत. तरीपण थंड हवेंत पिढ्यानपिढ्या राहिल्यामुळें हे लोक बंगाली लोकांपेक्षां कितीतरी काटक व बळकट दिसतात. शिवाय मुसलमानांचा शिरकाव त्या प्रांतांत कधींच न झाल्यामुळें ते लोक स्वतःस इतर हिंदी लोकांपेक्षां थोडे मोठे समजतात.

ह्या लोकांचा पुरातन काळापासूनचा अस्सल इतिहास उपलब्ध नाहीं. व जी थोडीफार माहिती गोळा करण्यांत आलेली आहे त्यांतील इ. स. पूर्वीच्या ४०० वर्षांपूर्वींची माहिती इतिहासापेक्षां 'पौराणिक गोष्टीं' या नांवाला जास्त योग्य आहे. देवपाल नामक एका क्षत्रियाला सम्राट अशोकाची मुलगी दिली होती. व त्यानें नेपाळमधील देवपत्तन गांव वसविलें असें सांगतात. बऱ्याचशा हिंदु राजघराण्यांतील अंमल बरींच वर्षें नेपाळवर चालला असल्याचें इतिहासांत नमूद आहे. पुढें बुद्ध धर्माचा प्रसार नेपाळमध्यें झाला व बुद्ध धर्म विरुद्ध हिंदु धर्म असा सामनाही फार दिवस झाला. पण एकंदरींत नेपाळी लोक हिंदी लोकांच्या मानानें मागासलेले असत. विक्रमादित्यानेंहि नेपाळमध्यें जाऊन तेथें विक्रम शक सुरू केला असल्याचें इतिहास बोलतो. पण गुरखे लोकांचा व नेपाळचा इतिहास सुसंगत व वस्तृत असा मिळत नाहीं. इ. स. १७९२ मध्यें गुरखे व इंग्रज यांच्यामध्यें लॉर्ड कॉर्नवालिसचे कारकीर्दींत प्रथम व्यापारी तह झाला. व त्या निमित्तानें पुढें इंग्रजांची व गुरख्यांची तेढ सुरू झाली. इंग्रजांचा रेसिडेंट नेपाळांत राहूं लागला; व इ. स. १८१४ त लॉर्ड हेस्टिंग्जचे कारकीर्दींत नेपाळविरुद्ध युद्ध पुकारण्यांत आलें. ऑक्टरलोनी हा इंग्रजांचा एक सेनापती होता. व त्यानें अखेर साधली. पण

गुरख्यांचा पराक्रम इंग्रजांना कळून आला. गुरख्यांनीं इंग्रजांना ठिकठिकाणीं चांगलाच हात दाखविला. गुरखे खरे वीर असल्याबद्दल इंग्रजांची खात्री झाली. त्यांच्या स्त्रियासुद्धां स्वतःचा जीव धोक्यांत घालून शत्रूंवर दगडांचा वर्षाव करण्यास कमी करत नसत. १८२६ त ऑक्टरलोनीनें गुरख्यांची चिकाटी पाहून हात टेकले. ४ मार्च १८१६ ला सेगोलिचा तह झाला. इंग्रज रेसिडेंट नेपाळांत राहूं देण्याचें ठरलें. पुढें नेपाळचे राजे व मुख्य प्रधान यांचें ब्रिटिश सरकारशीं सख्य झालें. त्यांना बादशहांकडून पदव्या मिळूं लागल्या. १८५७ सालचें बंड मोडण्यासाठींसुद्धां इंग्रजांना गुरख्यांची चांगलीच मदत झाली. विशेषतः सर वीर समशेर या नेपाळी मुख्य प्रधानाची व इंग्रजांचीं फारच गट्टी जमली. त्यानेंच प्रथम हिंदी लष्करांत गुरख्यांना घेऊं देण्याची परवानगी दिली. सध्यां नेपाळची स्वतंत्र फौज असून सुमारें ३५००० खडें सैन्य नेपाळांत असतें. त्यांना कवायत इंग्रजी शिकविली जाते. शिपायी चांगले असले तरी नेपाळी सेनानायक चांगले नसतात. गुरखे लोकांमध्यें इंग्रजांबद्दल एक प्रचलित म्हण आहे. त्या म्हणीवरून वाचकांना इंग्रज व गुरखे" हा इतिहास थोडक्यांत कळून येईल. ती म्हण अशी:

With the merchant,
Comes the musket,
And with the Bibble,
Comes the bayonet

ब्रिटिश सैन्यामध्यें सध्यां गुरखा शिपायांच्या २० पलटणी आहेत. दरसाल सुमारें २००० रिक्रूटांची त्यांमधून भरती करावी लागते. या रिक्रूट भरतीचें मुख्य ठिकाण गोरखपूर येथें आहे. गुरुंग, मागर, खस, ठाकूर, नवार वगैरे जातींकडे विशेष लक्ष पुरविलें जातें. याशिवाय लाहेरिया, सिराय व दार्जिलिंग या ठिकाणींही वर्षांतून कांहीं महिने रिक्रूट भरतीच्या कचेऱ्या असतात. मुख्य रिक्रूट अधिकाऱ्याच्या हाताखालीं तीन मदतनीस असतात. ह्याच कचेरीकडे गुरख्यांच्या सर्व गोष्टींची व्यवस्था सोंपविलेली आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या पेन्शनची व मृत्यूनंतर गुरख्यांच्या कुटुंबाची तरतूद करण्याचें काम हीच कचेरी करते. रिक्रूटभरतीचें प्रत्यक्ष काम गोऱ्या कामगारांना जमत नाहीं. त्यासाठीं त्यांच्या हाताखालीं बरेच गुरखे असतात. नेपाळांत जत्रा वगैरे भरतात. त्यावेळीं कामगार स्वतःच तें काम करूं शकतात. पण इतर वेळीं खेडेगांवांतून योग्य माणसांची निवड करण्यासाठीं गुरखा लोकच जातात. १८८८ पर्यंत अशा रिक्रूटभरती करणाऱ्या लोकांना नेपाळमध्यें फार त्रास होत असे. पण पुढें अशीं उदाहरणें फारच क्वचित घडून आलीं आहेत. कधीं कधीं तर आपला मुलगा ब्रिटिश सैन्यांत दाखल झाल्याची बातमी त्याच्या आईबापांना तो मेल्यानंतरच प्रथम कळते. कारण हे तरुण गुरखे बहुधा घरीं पत्ता लागूं न देतां सैन्यांत दाखल झालेले असतात. सैन्याचा बाऊ न वाटूं देण्याची खबरदारी घेण्यांत येते. ज्या रिक्रूटांना सैन्यांत घेतलें जात नाहीं अशांना थोडेफार खर्चापुरते पैसे देऊन परत पाठविण्यांत येते. पसंतीस उतरलेल्या रिक्रूटांना देवी टोंचण्यांत येतात. व थोडीशी कवायत शिकवून त्यांना सैन्यांत दाखल करून घेतलें जातें. रिक्रूट भरती करणाऱ्या कामगारांना चांगल्या कामगिरीबद्दल बक्षीस मिळतें. नेपाळी लोकांमध्यें गुरखा लोकांची एक जात आहे. पण आतां सरसकट सगळ्या नेपाळी लोकांना गुरखा म्हणण्यांत येतें. व सामान्य माणसाला त्यांच्यामधील निरनिराळ्या पोटजाती ओळखतां येत नाहींत. गुरखा लोकांवर हिंदु संस्कृति व बुद्ध संस्कृति यांचा सारखाच परिणाम झालेला दिसतो. ते आपणाला हिंदु म्हणवून घेतात. पण ते फक्त हिंदुस्थानांतच. त्यांच्या प्रांतांतून त्यांना सर्व लोक बुद्धच म्हणतात. गुरखा लोकांमध्यें जातीभेद आहे. त्यांच्यांतील ब्राम्हण लोक जानवें घालतात. त्यांच्यामध्यें सरसकट रोटीबेटी–व्यवहार होत नाहीं. त्यांचे धार्मिक संस्कार बरेचसे हिंदु संस्कारांप्रमाणें आहेत. त्यांच्यांत सोयेर, सुतक पाळलें जातें. मुलगा जन्मास आल्यावर बापाची "क्रिया" करावयास वारस जन्मल्याबद्दल ते आनंद मानतात व मुलगी जन्मल्यास एक खर्चाची धोंड उभी राहिली असें ते समजतात. मूल जन्मल्याबरोबर बापास ब्रिटिश सैन्यांतून ११ दिवस रजा दिली जाते. मुलांच्या उष्टावणाचा समारंभ फार मोठ्या प्रमाणावर साजरा होतो व पुष्कळसे नातेवाईक लहान मुलाला त्याप्रसंगीं 'भात खिलावतात'. मुलामुलींच्या लग्नाची बोलणीं त्यांच्या लहानपणींच वडील माणसें सुरू करून विवाह ठरवून टाकतात. व मागणा घातल्या गेलेल्या मुलीला मुलाचा बाप त्याबद्दल त्यानिमित्त आंगठी नजर करतो. हा वाङ्निश्चय नातलगांसमोर ब्राम्हणांच्या देखरेखीखालीं उरकला जातो. सदर प्रसंगीं एक मेजवानी दिली

जाऊन तिचा खर्च मुलीचा बाप करतो. मुलाचा बाप फक्त दहीं व केळीं ह्या प्रसंगीं स्वखर्चानें आणतो. वाङनिश्चयापासून ढळतां येतें. पण ही गोष्ट फार वाईट मानली जाते. लग्नानंतर विधवेला पुनर्विवाह करतां येत नाहीं. पण ती दुसऱ्याच्या घरीं राहूं शकते. विधुराला पुनर्विवाह करतां येतो. मागर जातींत लग्नसमारंभ हिंदु पद्धतीनेंच होतो. गुरंग जातींत थोड्या प्रमाणावर काडीमोड होऊं शकते. एकंदरींत गुरख्यांचे "जैसा देश तैसा वेष" असें धोरण असतें. स्त्रियांच्या गैर वर्तनाबद्दल त्यांना फार जबर शासन करण्यांत येतें. पण अलीकडे शिक्षा जरा कमी कडक होत चालली आहे. ब्रिटिश सैन्यांतून गुरखे शिपाई परत गांवीं गेले म्हणजे त्यांना प्रत्येकीं ३ नेपाळी पये देऊन आपल्या जातीचे हक्क परत मिळवितां येतात. नेपाळमधील गुलामगिरीच्या पद्धतीस नुकताच आळा घालण्यांत आला आहे. अलीकडे न्याय—दानाची पद्धतीही बरीच सुधारली आहे. एकंदरींत नेपाळी रहाणी गरिबीची असते. पण लोक समाधानी दिसतात. माणूस मेल्यास त्याला कांहीं वेळां पुरण्यांत येते. तर कांहीं वेळां जाळण्यांत येते. गुरख्यांच्या पलटणीजवळ स्मशानाची व्यवस्था असल्यास ती सोय त्यांना आवडते. नेपाळमध्यें वंशपरंपरागत मालमत्तेची वांटणी हिंदु धर्माप्रमाणेंच होते. नेपाळांत रयतवारी पद्धत आहे. व कर जबर नाहींत.

मागर व गुरंग लोकांचा भुताखेतांवर फार विश्वास दिसून येतो व निरनिराळ्या देवतांना संतुष्ट ठेवण्यासाठीं ते फार खबरदारी घेतात. प्रत्येक गुरखा पलटणीमध्यें देवीचें लदानसें मंदिर असतें. व नवरात्रांतील सप्तमीचे दिवशीं त्या देवीचा गुरखा पलटणींतून उत्सव साजरा होऊन लवाजम्यासकट मिरवणुकीहि काढण्यांत येतात. याशिवाय गुरखे लोक पुढील सण पाळतात.

(१) वसंत पंचमी, (२) शिवरात्र, (३) होळी, (५) जन्माष्टमी, (५) दसरा, (६) दिवाळी, (७) संक्रांत वगैरे. हे सर्व सण हिंदु पद्धतीनें साजरे केले जातात. व त्यांना ब्रिटिश पलटणींतसुद्धां त्याबाबत पूर्ण मुभा आहे. गुरख्यांचें खाणें व स्वयंपाक करणें अगदीं लष्करी थाटाचें असतें. भात व वरण शिजवितांना सुद्धां ते कपडे वगैरे काढून ठेवीत नाहींत. नेपाळमध्यें ते फारतर पादत्राण व शिरस्त्राण काढून ठेवतात. पण रोटीव्यवहारांत जातिभेद आढळून येतो. निरनिराळ्या जातीचे लोक आपापले निरनिराळे भोजन—संघ स्थापन करतात. अविवाहित शिपाई मात्र जातिभेद पाळीत नाहींत. त्याचप्रमाणें मांसाहार किंवा त्यांच्या भाषेंत 'शिकार' करतांना ते सर्व एकत्रच बसतात. अगदीं हलक्या जाती सोडल्यास गुरखे लोक गाईचें व शेळीचें मांस खात नाहींत. वरणभात खातांनाच जातिभेद विशेष दिसून येतो. स्वयंपाक-सिद्धि व खाणें या बाबतींत दिसून येणाऱ्या हिंदी शिपायांच्या "सोवळेपणाची" गुरखे लोक टवाळी करतात. लढाईच्या वेळीं कित्येक दिवसांची शिधासामुग्री गुरखे लोक पाठीवर सहज वाहूं शकतात. हिंदी शिपायांना ते जरा कमीपणाचें वाटतें. गुरखे लोकांत लढाईचे वेळीं एकी असते तशी हिंदी शिपायांत नसते. कांहीं ब्रिटिश सेनानायकांच्या मतें गुरखे लोक हे आशिया खंडांतील सर्वांत चांगले लष्करी लोक आहेत. लढाईच्या वेळीं नसत्या गोष्टींचा ते कधींच बाऊ करून बसत नाहींत. त्यांना भाजीपाला, फळफळावळ पुष्कळ आवडते. विलायती दारूवरही ते योग्य ताव मारण्यास कमी करत नाहींत. त्याचप्रमाणें धूम्रपानसुद्धां ते देशी परदेशी हा विचार मनांत न आणतां करतात. गुरख्यांची कुकरी तर जगप्रसिद्धच आहे. कुकरीचा उपयोग करण्यांत ते खरोखर कुशल असतात. कुकरी हेंच त्यांचें राष्ट्रीय हत्यार आहे. "गलूल" मारण्यांतही ते निष्णात असतात. व ज्याला शक्य असेल तो एक छोटीशी बंदूक स्वतःकरतां विकत घेतल्याशिवाय कधीं रहात नाहीं. गुरख्यांचा पेहराव सुद्धां सुटसुटीत असतो. लंगोट, जाकीट, कुकरी अडकविण्याकरितां एक कापडी लांब कंबरपट्टा पायांत गुरखी वाहाणा, एक तिरपी टोपी व खांद्याभोंवती एक ब्लँकेट हा त्यांचा नेहमींचा पोषाख. गुरखे लोक खेळाडू वृत्तीचे असून निरनिराळ्या दांडगाईच्या खेळांची त्यांना हौस असते. शिकार करण्यांतसुद्धां ते चांगलेच पटाईत असतात. त्यांना फुलांची व फळांची फार हौस असते. त्यासाठीं पैसा खर्च करण्यास व गळ्यांत हार घालून मिरविण्यास ते मागेपुढें पहात नाहींत. ब्रिटिश सैन्यांत दाखल होणाऱ्या गुरख्यांना लिहितां वाचतां जवळजवळ येतच नसतें. त्यांच्या शिक्षणाची सोय पलटणींमधून थोडीफार केली जाते. व कित्येक शिपाई आपल्या मित्रांपासून लिहिणें वाचणें शिकून घेतात. कित्येक गुरखे तरुण केवळ शिक्षणासाठीं ब्रिटिश सैन्यांत नांव दाखल

करून घेत असल्याचें आढळून येतें. गुरख्यांचे महिने व वार हिंदु पद्धतीचेच आहेत. गुरखे लोक स्वतः चांगले लढवय्ये असल्यानें ते ब्रिटिश शिपायांच्या मर्दुमकीची मुक्त कंठानें स्तुति करतात. व "ते जवळ जवळ आमच्यासारखेच शूर आहेत" असें ब्रिटिश शिपायांना ते प्रशंसापत्रक देतात.

४ जाटः—कांहीं तज्ज्ञांच्या मतें जाठ हे आर्य असून रजपुतांच्याच वंशांतले आहेत तर कांहींच्या मतें ते इंडो सिथियन असून पूर्व युरोपांतील मग्यार आणि जिप्सी लोकांपासून त्यांची उत्पत्ति आहे. रजपूत आणि जाट यांमधील भेद जातिविषयक नसून सामाजिक आहे. हल्लीं रजपूत आणि जाट या भिन्न जाती असून त्यांत बेटीव्यवहार होत नाहीं.

इ. स. च्या पहिल्या शतकांत बोलन घाटांतून हिंदुस्थानांत प्रवेश करून जे सिथियन लोक पंजाबांत स्थायिक झाले त्यांच्या वंशजांपैकींच हल्लींचे जाट लोक असावेत.

टॉडनें आपल्या राजस्थानच्या इतिहासांत एक दंतकथा दिली आहे. ती अशीं कीं, इ. स. ५५० च्या सुमारास गझनीचा राजा तक्षक अथवा सिथियन यानें पंजाबांत येऊन तो प्रांत जिंकला व यदू रजपूत जातीच्या मनसूरराव नांवाच्या राजास कैद केलें. पुढें मनसूररावानें आपल्या पांच मुलास एका महाजनाच्या घरांत लपवून ठेवलें व वारसपुत्राला बरोबर घेऊन तो कैदेंतून निसटला. एका नोकराच्या फितुरीमुळें ही सर्व बातमी गझनीच्या राजाला समजली. तेव्हां त्यानें महाजनाच्या घराला सैन्यानिशीं वेढा दिला. महाजन भयभीत झाला. त्यानें त्या लहान मुलास शेतकऱ्याच्या मुलांचा वेष दिला व त्यास सोडून दिलें. पुढें त्यांना जाट म्हणजे गुरांचे जथे ऊर्फ कळप पाळणारे यांच्या आश्रयानें राहावें लागलें; व आपल्या बापाच्या राज्यांतील जे शेतकरी त्यांच्या मुलीशीं लग्नेंहि करावीं लागलीं.

हल्लींचे जाट हे रजपूतच आहेत. त्यांना वर सांगितलेल्या कारणामुळें जाट हें नांव मिळालें. तसेंच वरील दंतकथेची सत्यता एका गोष्टीवरून हल्लींही पटते. पोलादी बांगडी अगर सुदर्शन चक्र हें यदू राजांचें विशिष्ट हत्यार होतें व आजहि पंजाबांतील जाट लोकांचा आवडता खेळ म्हणून ती बांगडी प्रसिद्ध आहे. याशिवाय दुसरा एक पुरावा उपलब्ध आहे. एके काळीं हिंदुस्थानांतील छत्तीस राजकुळींपैकीं जाट आहेत अशी समजूत होती. रजपूत व जाट या हल्लीं जरी दोन निरनिराळ्या जाती आहेत व त्यांच्यांत बेटी व्यवहार होत नाहीं तरी इ. स. च्या पांचव्या शतकांत रजपूत लोक जाटिणींना आपल्या बायका करून घेत असत.

जाटीण रूपानें सुंदर व सशक्त असल्यामुळें रजपूत राजे त्यांच्यावर मोहून जात व त्यांना आपली रखेली म्हणून जनान्यांत ठेवीत. कांहीं जाटांचीं नांवें रजपूतांप्रमाणेंच आहेत.

जाटीण व गुजर लोक अशीच एक विलक्षण गोष्ट सांगतात. एकदां एक जाटीण पाण्याचा भरलेला घडा डोक्यावर घेऊन जात असतांना त्याच रस्त्यानें एक रेडा पळत होता. परंतु त्या बाईनें त्याच्या गळ्यांतील दोरीवर पाय देऊन त्यास उभें केलें. व विशेष हें कीं, आपल्या घड्यांतील पाणी हिसळू दिलें नाहीं. हें तिचें अद्भुत शक्तीचें काम एका रजपूत राजानें पाहिलें. तो तिच्यावर आसक्त झाला. व त्यानें तिला जनानखान्यांत ठेवलें. व त्यापासून झालेली संतति हीच हल्लींच्या जाटांचे पूर्वज होत.

वरील गोष्टीवरून जाट लोक हे रजपूतच आहेत असें दिसून येतें. तरी कांहीं जाट आपली परंपरा गझनी व कंदाहार येथून आलेल्या तक्षकाशीं जोडतात. तर कांहीं 'शिवगोत्री' म्हणजे शिवाचे वंशज असें सांगतात.

जाट लोकांचा जुना इतिहास उपलब्ध नाहीं. इ. स. च्या सातव्या शतकाच्या सुमारास सिंध प्रांतांतील जाट एका ब्राह्मण सत्तेखालीं होते. आणि अकराव्या शतकांत ते सर्व पंजाबभर पसरले.

गझनीचा महमूद सोमनाथाची लूट घेऊन स्वदेशीं परत जात असतांना सिंधमधील जाट लोकांनीं त्याचें पुष्कळ सैन्य कापून काढलें. (इ.स. १०२४). सिंधुनद व सतलज नदी यांमधील प्रदेशांत जाट लोकांची दांडगी वसाहत होती. इ. स. १०२६ सालीं गझनीच्या महमुदानें नावा तयार करून तिरंदाज लोकांच्या साहाय्यानें जाट लोकांच्या नाविक दलावर हल्ला केला व त्यांचा धुव्वा उडविला. लढाईच्या पूर्वी जाट लोकांनीं आपलीं बायकामुलें व चीजवस्त यांची रवानगी नदीपार केलीच होती व वरील लढाईंतून पळून गेलेल्या जाट लोकांनीं राजपुताना, माळवा वगैरे ठिकाणीं जाऊन वसाहत केली. यांपैकींच कांहीं लोकांनीं हल्लींच्या बिकानेर संस्थानची स्थापना केली असें म्हणतात.

वरील पराभवामुळें जाटांची इतकी धूळधाण उडाली कीं, इ. स. १६५८ पर्यंत त्यांना डोकें वर काढतां आलें नाहीं. या सुमारास त्यांनीं औरंगजेब बादशहाला राज्यपद मिळवून देण्याच्या कामीं फार मदत केली.

सिंधूच्या खोऱ्यांतील जाट लोकांना पंधराव्या शतकांत पठाण व बलूची लोकांनीं मुसलमान बनविलें व त्यांचें राज्य हिरावून घेतलें तेव्हांपासून ते इतके निर्वीर्य व निष्प्रभ बनले कीं आजतागायत ते गुरामेंढरांचे कळप पाळून व उंटांचे तांडे बाळगून आपली उपजीविका करीत आले आहेत.तसेंच मुसलमान समाजांतहि त्यांना हीन दर्जा प्राप्त झाला.पूर्व पंजाबांतील शीख जाट व माळवा येथील हिंदू जाट हे आजहि शूर व तेजस्वी आहेत. मोगलांनीं केलेल्या धार्मिक छळामुळें जाट लोक शूर व कडवे बनले. तसेंच त्यांना पुढें येण्याला मोंगल साम्राज्याच्या उत्तर कालांत अवसर मिळाला.

१७३७ च्या सुमारास सुरजमल्लाच्या आधिपत्याखालीं भरतपूर, आग्रा व मथुरा या भागांत जाट प्रबळ झाले. पण इ. स. १७५७ त अहमदशहा अबदालीनें त्यांचा पराभव केल्यामुळें ते आपलें राज्य टिकविण्याकडे लक्ष देऊं लागले. या त्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळें अखिल हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालें आहे. कारण १७६१ च्या पानिपतच्या सुप्रसिद्ध लढाईच्या वेळीं जाट लोक तटस्थ राहिले! रजपूत अगर मराठे यांच्याशीं ते कधींही समरस झाले नाहींत. रजपूत व मराठे यांच्याशीं वैर केल्यामुळें जाट लोकांचा नाश झाला.

इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यावर देशांत युद्धें थांबून शांतता प्रस्थापित झाली. त्यावेळीं कांहीं जाट लोक पेंढारी लोकांत सामील झाले. पण पुढें पेंढाऱ्यांचाच मोड झाल्यावर हे जाट लोक शेती करून गुरेंमेंढरें पाळून राहूं लागले.

सैन्यांत भरतीः––हिसार, रोहतक, गुरगांव, कर्नाळ हे जिल्हे, दिल्ली प्रांत, मारवाड व बिकानेर संस्थान या भागांतून जाट लोकांची निवड करून सैन्यांत भरती करण्यांत येते. त्यांपैकीं कांहीं घोडदळांत व कांहीं पायदळांत नोकरी करतात.

स्वभावविशेषः––जाट लोक शूर, मेहनती व शिस्तप्रिय आहेत. त्यांचा विशेष ओढा शेती करणें, गुरांचे कळप पाळणें यांकडे आहे. ते दिसण्यांत शांत असून मध्यम उंचीचे आहेत. त्यांच्या निरनिराळ्या पोटजाती असून ते आपआपसांत नेहमीं भांडतात व एखादे वेळीं भांडणाचें पर्यवसान एकमेकांच्या बायका व गुरेंढोरें पळवून नेण्यांत होतें. जुगार खेळण्याचा नादहि त्यांस आहे व खेळावरून तक्रार झाल्यास खूनहि पडतात. लष्करी पेशाची आवड म्हणून नव्हे तर पोट भरण्याचा एक धंदा म्हणून ते लष्करांत शिरतात. ते अगदीं सरळ मनाचे असून त्यांस अपमान व अन्याय सहन होत नाहींत.

जाट लोकांत शिक्षणाचा फैलाव झालेला नाहीं बहुतेक लोक निरक्षरच आहेत. सैन्यांत नोकरी करणाऱ्यांना थोडें हिंदी लिहितां वाचतां येतें.

धर्म, समजुती, चाली वगैरे–यांचे धार्मिक आचार साधारणपणें ब्राम्हणांच्या आचाराप्रमाणेंच आहेत. यांच्यांतहि गोत्रें आहेत. हे गंगा नदीपेक्षां यमुनेला अधिक पवित्र मानतात. व तिच्याप्रीत्यर्थ दर रविवारीं ब्राम्हणभोजन घालण्याची चाल आहे. त्यांच्यांत सुतार, लोहार, महार, चांभार, न्हावी, परीट वगैरे हलक्या जाती आहेत.

जाट लोकांना दूध फार प्रिय आहे. ते शाकाहारी आहेत. हिंदूमधील उच्च वर्णीयांत त्यांचा अनुक्रम दुसरा म्हणजे ब्राम्हणांच्या खालीं लागतो रजपूत लोक यांस हीन समजतात. कारण रजपुतांत विधवाविवाहाची चाल रूढ नसून ती जाट लोकांत आहे.

जाटांची संख्या (पुरुष–) ज्या भागांत जाट लोकांची वस्ती तुरळक आहे त्यांचे आंकडे दिलेले नाहींत.

हिसार जिल्हा––	८९८०६
रोहटक जिल्हा––	११५६४१
कर्नाळ जिल्हा––	६०१६१
गुरगांव जिल्हा––	४०८६२
राजपुतान्यांतील संस्थानें––	३९६११९
संयुक्तप्रांत––	३७७०००

वरील पुरुष संख्या सन १९०१ च्या खानेसुमारीवरून दिलेली आहे.

५ पठाणः–पूर्वपीठिकाः अस्सल अफगाण लोक, सालोमनचा सेपनाति सॉल याचा नातू अफघाना यास आपला मूळ पुरूष मानतात. 'नेबूचाडनेझार यानें आमच्या पूर्वजांना पॅलेस्टाईनमधून काढून मीडिया व इराण येथें वसाहत करावयास लाविलें' असें ते सांगतात.तेथून हे लोक नंतर घोर वगैरे पूर्वेकडील प्रांतांत पसरले. ' इ. स. पूर्वी ३२७ सालीं अलेक्झांडरनें हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां बुद्धानुयायी पॅक्टियन राष्ट्र अस्तित्वांत होतें; आणि या राष्ट्रामधील अपरयटी,सत्रागिद्धे,दादिफी

आणि गांधारी या चार जाती म्हणजेच हल्लींच्या पठाणांचे खरे पूर्वज होत.' असें हेरोडोटस् हा इतिहासकार लिहितो. वरील पैकीं पहिल्या तीन जातींना अनुक्रमें आफ्रिडी,कट्टक व दादी अशीं दुसरीं नांवें असून वरील चार जाती मूळच्या आर्यच आहेत. सहाव्या शतकांत हिंदुकुश पर्वताच्या आसपास हूण लोकांनीं गांधारी लोकांचे कित्येक पराभव केले. याच सुमारास गांधारी लोकांच्या एका टोळीनें गान्धार (हल्लीचें कंदाहार) शहर स्थापिलें. यानंतर हळू हळू तुर्की, सिथियन व मंगोलियन लोकांशीं संबंध आल्यामुळें त्यांचे कित्येक स्वभावविशेष वरील चार जातींत उतरूं लागले. व त्यामुळें पूर्वींची आर्यसंस्कृति या जातींतून कमीकमी झाली. महंमद पैगंबरानें मुसलमानी धर्माच्या प्रसाराकरितां घोरच्या अफगाणांकडे एक शिष्य पाठविला. अफगाणांनीं तावडतोब मुसलमानी धर्म स्वीकारून आपला पुढारी महंमदाकडे पाठविला. त्याला महंमदानें "पठाण" म्हणजे सुकाणू ही पदवी दिली. तसेंच महंमदाच्या शौर्याबद्दल लोकांनीं त्याला "फत्तचन" (म्हणजे शौर्यशाली) असा किताब दिला असून त्यापासून पठाण शब्द आला, असेंही म्हणतात. अशा रीतीनें अफगाण व पॅक्टिअन राष्ट्रांमधील लोक हे एकाच नांवाचे झाले. आठव्या शतकांत अफगाण लोक पूर्वेकडे पुढें सरकले. व गांधारी लोकांत स्वतः मिसळून जाऊन त्यांनीं त्यांना मुसलमान बनविले व अकराव्या शतकांत गझनीचा महमूद हिंदुस्थानवर स्वाऱ्या करीत होता तेव्हां मार्गांतील अफ्रिडी लोकांना त्यानें मुसलमान बनविलें. महमुदाबरोबरच सुलेमान पर्वतावर राहाणारा रोहिलाही हिंदुस्थानांत आला व त्यानें संयुक्त प्रांतांत कायमचा तंबू ठोकला. बाराव्या शतकामध्यें गझनीची सत्ता मागें पडून घोरचे अफगाण फारच प्रबळ झाले. आणि उरलेल्या दोन जातींचा व त्यांचा एकजीव होऊन संपूर्ण पॅक्टियन राष्ट्र मुसलमानी झालें. पठाण लोकांनीं सामान्यपणें १२०५ पासून १५२६ पर्यंत हिंदुस्थानांत राज्य केलें.

पठाणांची रुधिर-प्रियता आणि आडदांडपणा तर सर्वश्रुतच आहे या लोकांचीं भांडणें म्हणजे हाडवैरें असून तीं पिढ्यानपिढ्या चालतात. त्याच्या किंवा त्याच्या कुटुंबांतील एकाद्याच्या अपमानाबद्दल त्यानें आपल्या शत्रूचा सूड घेतला नाहीं तर त्या पठाणाची इतर जातवाले अगदीं छी थू करतात. कदाचित पठाणी मुलखांतील चोऱ्यामाऱ्या दंगेधोपे व रक्तपात यांनींच पठाण लोक इतके कडवे बनले असतील. हिंदुस्थानांत पठाणांची वस्ती बरीच असून मुख्यतः गरीबगुरीब लोकांना पैसे देऊन मग त्यांच्याकडून धाकदपटशानें दुप्पट तिप्पट पैसे उकळणें हा त्यांचा धंदा आहे. पठाणांची सावकारी फार प्रसिद्ध असून ठरलेला पैसा वाटेल त्या उपायांनीं परत मिळविण्यांत ते वस्ताद असतात.

जुगाराचा पठाणांना अतिशय नाद असून वायव्य सरहद्द प्रांतांतले लोक पिस्तुलाच्या चोऱ्या फार करतात. त्यांना नेम चांगलासा मारता येत नाहीं. ते शिक्षणांत फार मागासलेले असून त्यांना खेळाचीही विशेष आवड नाहीं. पठाण लोक टोळ्या करून राहतात. स्वदेशांत राहणाऱ्या पठाणांचा धंदा शेती व मेंढरांचे कळप पाळणें हा आहे. प्रत्येक टोळींतील मुख्य माणसाचें न्यायकोर्ट असतें. त्यास जिर्गा म्हणतात. असे सर्व टोळ्यांचे जिर्गे एकत्र जमून जातींतील न्याय करतात. तरी हा रीतसर मार्ग सोडून टोळींतील लोक 'हम करोसे कायदा' याच तत्त्वानें वागतात. जिर्ग्यांचें काम ज्या कोडाच्या आधारें चालतें त्यास ' पुकतुनवाली ' म्हणतात. पश्चिम सरहद्दीवर राहणाऱ्या पठाण टोळ्यांचे दोन मुख्य राजकीय तट आहेत.एका पक्षाचें नांव 'गार' व 'सामिल' व दुसऱ्याचें नांव 'तोरगुंडी' व स्पिनगुंडी' असें आहे.

पठाणांची सैन्यांत भरतीः——

सैन्यांत भरती करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्याची मुख्य कचेरी हिंवाळ्यांत पेशावर येथें व उन्हाळ्यांत फोर्ट लोखार्ट येथें असते. वायव्य सरहद्द प्रांतांतील हजारा, पेशावर, कोहट, कुर्रम बन्नू, डेरा–इस्माईल–खान व डेरा गाझीखान या जिल्ह्यांतून व बलुचिस्थानांतील झोब, लोरालाई व शिबि या भागांतून 'रंगरूट' भरती करण्यांत येते. रंगरूट अधिकारी दर सहा महिन्यांनीं नवा येतो. व यामुळें पठाणांच्या स्वभावविशेषाची माहिती अनेक अधिकाऱ्यांना मिळते व त्या प्रांतांत कामें करण्यास ते अनुभवी ठरतात. पठाण लोकांच्या अनेक टोळ्यांपैकीं शूर व लढवय्या टोळींतील भरती केली जाते. टोळीच्या मुख्यास लोक निवडून देण्याचें काम असतें. ब्रिटिश अधिकारी परीक्षा घेतो त्यांत मुख्यतः

पठाणांची उंची व छातीचा घेर हीं पाहतात. तसेंच शारीरिक व्यंगें त्यांस असतां कामा नये. डिसेंबर ते एप्रिल हा अवधि रंगरूट भरतीला सोयीचा असतो. कारण या वेळीं पठाण लोक शेतावर नसून घरींच असतात. सैन्यांत भरती होणाऱ्या पठाणांची जो ज्या खेड्यांतून आला असेल त्या खेड्यांत वडिलार्जित जमीन असली पाहिजे असा नियम आहे. व तो ज्या टोळींतील आहे असें सांगत असेल त्याच टोळींतील तो असला पाहिजे. ज्याला आपली माहिती नीट सांगणें अशक्य असतें त्याला नाकारलें जातें.

आफ्रिडी--यांची वस्ती वायव्य सरहद्द प्रांतांत पसरलेली आहे. ते मूळचे बौद्धधर्मीय होते असें म्हणतात. दहाव्या शतकांत त्यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारला. यांची वस्ती ८३,००० आहे. देशी सैन्यांत यांचा मोठा भरणा आहे. खैबर-आफ्रिडी शिपाईगिरी अगर गुरामेंढरांचे कळप पाळणें हे धंदे करतात. व कोहाट आफ्रिडी हे उद्योगशील असून व्यापारी पेशाचे आहेत. याशिवाय बाबर, बलूच, बंगष, झाजी, लोहानी, मुलतानी, शिनवारी, उरमर, वझीर, युसफझाई वगैरे अनेक जाती अगर टोळ्या आहेत. हे सर्व वायव्य सरहद्द प्रांतांतील होत. हिंदुस्थानांतील पठाणांची प्रांतवार लोकसंख्या पुढील प्रमाणें आहे. पंजाब--१४७७५२, संयुक्त प्रांत ४१७३२६ '(यांत रोहिल्यांचा समावेश होतो.) बंगाल--२१४३८७, यांपैकीं खुद्द पाटणा जिल्ह्यांत पुष्कळ वस्ती आहे व कलकत्ता शहरांत दहा हजार लोक आहेत. राजपुताना--६४९२१, मध्यप्रांत--(भोपाळ व ग्वाल्हेर संस्थानें धरून ३०,०००, वऱ्हाड---२६२२८, दक्षिण हैद्राबाद--६१८८७, मुंबई व बडोदें---६०००, मद्रास, कोचीन, व त्रावणकोर---५१८६७, म्हैसूर--१९८७३, आसाम---६६३२, काश्मीर---२६६३१ (यांत रोहिल्यांचा समावेश होतो.) ब्रम्हदेश---७४३०. वायव्य सरहद्दप्रांत व बलुचिस्थान सोडून हिंदुस्थानांत ११०३६८९ पठाण (पुरुष) आहेत.

६ शीख:--'शीख' ही कोणतीही विशिष्ट जात नाहीं. एका विशिष्ट धर्मपंथाचे, आणि लष्करी बाण्यासाठीं विशेष प्रसिद्ध असलेले लोक शीख म्हणून ओळखले जातात. यांची मुख्य वस्ती पंजाबांत आहे. जाट लोकांचा त्या प्रांतांत बराच भरणा असल्यामुळें दोनतृतियांशापेक्षां अधिक शीख जाट आहेत. ते शरीर-संपत्तीनें बलिष्ठ कामसू, स्वतंत्र बाण्याचे आणि अत्यंत कसलेले शेतकरी आहेत. शिखांचा आद्य गुरु बाबा नानक नांवाचा खत्री होता (१४६९-१५३९). त्याच्यामागून शिखांचे नऊ गुरु झाले ते येणेंप्रमाणें:--१ अंगद, २ अमरदास, ३ रामदास, ४ अर्जुन, ५ हरगोविंद, ६ हरराय, ७ हरकृष्ण, ८ तेजबहादूर आणि ९ गोविंदसिंग. नानकानें जाति आणि धर्मविधि हे अनवश्यक आहेत एवढेंच नव्हें तर घातुक आहेत असें म्हटलें. नानकाच्या अनुयायांना हल्लीं नानकपंथी म्हणतात. गुरु गोविंदसिंगाचे अनुयायी स्वतःस सिंग म्हणवितात. नानकी शीख बाह्यच वेषावरून ओळखतां येण्यासारखे नसतात. त्यांस तंबाखू ओढण्याची परवानगी असून ते बरेच वेळां मुंडणही करितात. चौथा शीख गुरु रामदास यानें अमृतसरची स्थापना केली. त्याच्यापुढील गुरु अर्जुन यानें शिखांची व्यवस्थित संघटना करून शिखांचा धर्मग्रंथ हा 'ग्रंथसाहेब' लिहिला. अमृतसर हें त्यानें शिखांचें मुख्य ठिकाण केलें. अर्जुनाच्या कारकीर्दींत मुसलमानी छळास सुरुवात झाली. जहांगिराचा मुलगा खुश्रू यानें शिखांच्या गुरूस कैद केलें आणि कैदेंत झालेल्या हालामुळेंच अर्जुनाचा मृत्यू ओढवला. शिखांच्या लष्करी बाण्याचा उगम येथूनच झाला. अर्जुनानंतरचा शीख गुरु हरगोविंद हा एक लढवय्या राजकारणी पुरुष होता. त्यानें आपल्या अनुयायांस मांसाशनास प्रवृत्त केलें. त्याच्या धोरणाचें अनुकरण पुढील दोन गुरूंनीं केलें. आणि तेजबहादूराच्या अमदानींत शीख हे केवळ लुटारू बनले. तेजबहादुरास पुढें मोगलांनीं ठार मारिलें आणि मुसलमान धर्म न स्वीकारणाऱ्या त्यांच्या अनुयायांस निर्घृणपणें छळलें. आपलें प्रेत मुसलमानांच्या हातून आपल्या अनुयायांनीं सोडवून न्यावें अशी इच्छा तेजबहादुरानें मरतांना प्रदर्शित केली. ती तिघां गृहस्थांनीं मोठ्या शौर्यानें आपला जीव धोक्यांत घालून पुरी केली. त्याबद्दल त्यांस गुरु गोविंदसिंगानें खालसांत सामील करून घेऊन त्यास मझभी ही पदवी दिली. यांच्या वंशजापासून मुख्यतः हल्लीं पायोनियर रेजिमेंटमध्यें सैन्यभरती होते.

वर्गीकरण:--ज्या प्रांतांतून शीख सैन्यांत भरती होते त्याच्या मर्यादा पुढीलप्रमाणें--पूर्वेकडे यमुना नदी, पश्चिमेस सिंधुनद, दक्षिणेकडे बिकानेरचें वाळवंट आणि उत्तरेस हिमालयाचा पायथा यांत बहुतेक पंजाब प्रांताचा समावेश होतो. सैन्यभरतीच्या सोयीसाठीं या प्रांताचे दोन विभाग करण्यांत आले आहेत. एक मांझा

आणि दुसरा माळवा. लाहोर आणि अमृतसर यांच्या आसपासचा बिआस आणि रावी या नद्यां-मधील प्रदेश म्हणजे मांझा; पण स्थूल मानानें असें म्हणतां येईल कीं, सतलज नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांतील शिखास मांझा शीख म्हणतात. याच नदीच्या दक्षिणेकडे असणाऱ्या आणि राजपुताना आणि यमुना यांजमध्यें पसर-णाऱ्या प्रदेशास माळवा म्हणतात. याचा दक्षिणें-तील माळव्याशीं संबंध नाहीं. लष्करी गुणांत या दोनहि प्रांतांतले शीख सामान्यतः एकाच दर्जाचे ठरतील. मांझा शीख हा जास्त हुषार, चपळ आणि सुसंस्कृत असून माळवा शीख हा जास्त करारी, पण मठ्ठ आणि हट्टी असतो. शौर्य आणि शिस्त या बाबतींत दोघांची योग्यता सारखीच ठरते.

शीख धर्मांत अनेक जाती आहेत. त्यांत जाट सर्वांत मुख्य होय. याखेरीज जाती म्हणजे ब्राम्हण, रजपूत, खत्री, अरोरा, लबना, महतान, सैनी, कंबोह, कलाल, तारखान न्हावी, छिंबा, झिनवार, रामदासिया व मझबी. खालसा लष्करांत या सर्वांचा समावेश होत असतो. जाटांत पोटभेद पुष्कळ असून त्यांतले सुमारें तीस मुख्य आहेत. एकंदर जाट चाळीस लाखावर असून त्यांतले अजमासें दहा लक्ष शीख आहेत. पुढें शिखांतील जातीसंबंधीं थोडक्यांत माहिती दिली आहे.

ब्राह्मणः—शिखांत ब्राम्हण थोडेच असून त्यांची सैन्यांतील संख्या तर फारच लहान आहे. ते चांगले लढवय्ये असतात. पंजाबांतले बहुतेक ब्राह्मण सारस्वत आहेत. ते मुख्यतः शेती किंवा कारकुनी करितात. सतलज नदीच्या दक्षिणेस यांची वस्ती विशेष आहे. १० लक्षावरील लोक-संख्येपैकीं फक्त ७ ते ८ हजार शीख आहेत.

रजपूतः—पंधरा लक्ष लोकांपैकीं फक्त २०,००० शीख आहेत. कांहीं गोविंदी शीख गुरु-दासपूर व सियालकोट येथें भेटतात. परंतु त्यांची मुख्य वस्ती हुशियारपूर प्रांतांत आहे. ते मुख्यतः शेती करीत असून आपला आत्यंतिक जात्यभिमान विसरले आहेत. जे थोडे लोक सैन्यांत आहेत ते उत्तम लढवय्ये आहेत.

खत्रीः—लष्करी नोकरी करणारे खत्री शीख घोडदळांतील नोकरी पसंत करतात. गुजरणवाला रावळपिंडी आणि झेलम या प्रांतांतील लोक सै-न्यांत दाखल होण्यास विशेष उत्सुक असतात. लुधियाना, हुशियारपूर, अमृतसर, लाहोर, गुज-रणवाला, रावळपिंडी आणि झेलम या प्रांतांत त्यांची वस्ती विशेष आहे. एकंदर लोकसंख्या ४४७००० असून तींतले ५२००० शीख आहेत. धर्मविधि पाळण्यांत हे विशेष कडवे आहेत. यां-पैकीं शेतकरी वर्गांतले लोक उत्कृष्ट सैनिक अस-तात. यांना समाजांत मोठा मान आहे.

धर्मः—धर्माचा आद्यसंस्थापक बाबा नानक हा होय. याच्यानंतरच्या शीख गुरूंत गोविंदसिंग हा प्रमुख होय. शिखांस लष्करी वळण देण्यांत गोविंदसिंगाची मोठीच कामगिरी आहे. सिंग किंवा लष्करी बाण्याचा शीख ओळखिता यावा याकरितां गोविंदसिंगानें आपल्या अनुयायांस पांच बाह्य चिन्हें धारण करण्याची आज्ञा केली. त्यास पांच 'कक्का' म्हणतात. तीं चिन्हें अशीं:—१ केंस, २ काच म्हणजे अर्धी विजार, ३ कारा, किंवा लोखंडी कंकण, ४ खांडा किंवा खंजीर आणि ५ कंगा (कंगवा). गोविंदसिंगाच्या शिकवणुकींतील आणखी एक महत्त्वाचें तत्त्व म्हणजे जातिभेद न पाळणें. सध्यां शीख धर्माचें फारसें महत्त्व राहिलेलें नाहीं. शिखांस हिंदी लष्करांत मिळणारें उत्तेजन हें शिखांचा पुरा नायनाट न होण्यास एक कारण आहे. शीख स्त्रियांचा कल हिंदू आचार पाळण्याकडे व हिंदू पुराणावर विश्वास ठेवण्याकडे बराच आहे. शीख, ब्राह्मणांस मान देतात व बरेच वेळां हिंदू देवतांची उपासना करतात. मूर्तिपूजेविरुद्ध शीख धर्माचा कटाक्ष असला तरी शीख आपल्या धर्मग्रंथाची पूजा करतात तो एक मूर्तिपूजेचाच प्रकार आहे. तुळस, पिंपळ, वड, बेल, आम्र इत्यादि झाडांची शीख हिंदूप्रमाणेंच पूजा करतात. गाईसही पवित्र मानतात. भुतांखेतावरही त्यांचा बऱ्याच प्रमाणांत विश्वास आहे. शिंक येणें हा शकुन होय यासारख्या भोळ्या समजुतीही त्यांत अनेक आहेत. शिखां-तील पोट धर्मपंथ पुढीलप्रमाणें:—

१ नानकपंथी, २ गोविंदी, ३ सुलतानी, ४ उदासी, ५ निरंजनी, ६ रामराई, ७ निर्मलपंथी, ८ अकाली, ९ देवी, १० गुलाबवासी, ११ निरंकारी १२ कूका.

स्वभावविशेषः—स्वतंत्र बाणा व कसून,, नेटानें काम करणें हे जाट शिखांचे मुख्य विशेष आहेत. यांची जातींतील जूट विलक्षण आहे. सामा-न्यतः जाट शांतपणें शेतकाम करतो, परंतु एकदां चिडला म्हणजे खून करणें, इतरांच्या बायका व गुरें पळविणें वगैरे गोष्टी करण्यास कचरत नाहीं. शेतींत तो अत्यंत कुशल असतो. तींत त्याचीं बाय-

कामुळेंहि त्यास मदत करतात. एकंदरीनें जाट शीख सुखवस्तू आहेत. ते निगर्वी परंतु बाणेदार, स्थिरवृत्ती, सुस्वभावी, आनंदी व कामसू आहेत. त्यांच्याशीं परिचय असणारांस त्याविषयीं आदर व आपलेपणा वाटल्याखेरीज राहणार नाहीं. समाजांत जाटांस ब्राम्हण, रजपूत व खत्री यांच्या खालोखाल मान आहे. जाटांत पुर्नविवाह रूढ असल्यामुळें अर्थात् त्यांस रजपुतांपेक्षां कमी मान आहे. त्यांत शिक्षणाची फारशी प्रगति झालेली नाहीं. तरी अलीकडे बरीच सुधारणा आहे. खत्री शीख हुषार व सुशिक्षित असतात. शिखांचा लष्करी पेशा प्रसिद्धच आहे. ते काटक, शूर, शिस्तीचे,स्वामिभक्त,असे असून आशिया खंडांतील शिपायांत सर्वोत्कृष्ट शिपाई आहेत. योग्य शिक्षण घेतल्यावर ते चांगले घोडेस्वार होत असले तरी त्यांचा खरा उपयोग पायदळांत आहे. त्यांची शरीरसंपत्ति उत्तम असून ते दिसण्यांत उमदे व चपळ असतात. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण आहे. जाट शीख सामान्यतः कद्रू असतात. इतके कीं बरेच वेळां ते पोटाल. पुरेसें खातही नाहींत.

शीख शेतकऱ्याचा वेष अगदीं साधा असतो. धोतर, मुंडासें आणि खांद्यावर एक चादर (उपरणें) कधीं कधीं तो कुडताही (पहिरण) घालतो. लष्करांतले शिपाई पोकळ पायजमे घालतात, आणि एक लहानशी पगडी घालून तीवर साफा (फेटा)बांधतात. सुखवस्तु जाट जाकीट व कोट घालतात.

बायकांच्या अंगावर बरेचसे चांदीचे दागिने असतात. पुरुषांनीं दागिने घालणें हें सामान्यतः बायकी समजलें जातें. तरी कांहीं लोक गळ्यांत माहला नांवाचा एक सोन्याचा व दागिना हातांत सोन्याचें कंकण किंवा कडें घालतात.

शेतकी खातें

शेतकी

शेती, दुभतें, जनावरें, पाणी.

शेतीस लागणारीं निरनिराळीं शास्त्रें

(१) वनस्पतीशास्त्रः—यावरून निरनिराळीं झाडें, त्यांची शरीररचना, वाढ, मुळ्यांचे प्रकार, फुलें, बीं, संकरक्रिया, वगैरेबद्दल माहिती होते.

(२) रसायनशास्त्रः—यावरून जमीनींचें पृथक्करण, त्यांतील गुणदोष, खतांतील गुणदोष, दूध, लोणी, पाणी वगैरेंची परीक्षा, शेतांत कोणतीं खतें केव्हां द्यावीं यावद्दल माहिती काढणें वगैरेबद्दल माहिती मिळते.

(३) पदार्थविज्ञानशास्त्रः—यावरून उष्णता, उजेड, प्रसरण, आकुंचन, घनता वगैरे वस्तूंच्या आंगच्या तत्त्वांबद्दल; तसेंच हवा, वारे, पाऊस, बर्फ, उन्हाळा, याबद्दल व जमिनी, त्यांचे कण, त्यांचे गुणदोष व त्यावरून त्यांची निगा राखणें, औतें तयार करणें, तीं वापरणें वगैरेबद्दल ज्ञान मिळतें.

या मुख्य शास्त्राशिवाय (४) कीटकशास्त्रः— (५) वनस्पतीजन्य रोग–शास्त्र. (६) हवामान शास्त्र. (७) जंतुशास्त्र. (८) पशुरोगचिकित्सा वगैरे शास्त्रांचेंहि ज्ञान जरूर आहे. कारण पिकांवर पडणाऱ्या कीटक व इतर रोगांचें निराकरण कसें करावें, पाऊस, वारे, वगैरेंची उत्पत्ति, त्यांची हालचाल, उष्णता व थंडी वगैरेंचा पिकांवर होणारा परिणाम, तसेंच आपलीं जनावरें आजारी पडल्यास निदान साधेसुधे आजार वगैरेंवर उपचार करतां येणें हें वरील दुय्यम शास्त्राच्या ज्ञानावरून समजतें. (९) अर्थशास्त्र यावरून पैसा, शेतींतील उत्पन्न, फायदातोटा, बाजारहाट, मागणी व पुरवठा, जमीनमहसूल, सारा, खंड, व्याजबट्टा, शेतीची व्यवस्था, पिकांच्या नफ्यातोट्यावरून त्यांचें महत्त्व, फेरपालटींत या गोष्टींचा विचार, मजूर, मजूरी व त्यांचा शेतीवरील होणारा परिणाम, शेतीचे कायदेकानू व त्यांचा शेतकऱ्यांच्या हक्कावर परिणाम, सहकार, पैसापुरवठा, वगैरेंबद्दल म्हणजे शेतीच्या नफ्यातोट्याच्या व शेतकऱ्यांच्या बऱ्यावाईटाच्या दृष्टीनें फारच महत्त्वाची माहिती मिळते.

पृथ्वीवरील जमिनीचा भाग एकंदर ५,२२,३२,००० चौरस मैल आहे. पैकीं रशिया शेंकडा १६.१, कानडा ६.९, ब्रॉझिल ६.२, ऑस्ट्रेलिया ५.७, अमेरिका (संयुक्त संस्थानें) ५.७, हिंदुस्थान ३.४, तुर्कस्थान १.४, जर्मन राज्य ०.४, फ्रान्स ०.४, जपान ०.३, ग्रेटब्रिटन ०.२, इटली ०.२, यांमध्यें इतका भाग येतो व उरलेला इतर देशांच्या हातांत आहे. तसेंच पृथ्वीवर सर्व देश मिळून मनुष्यवस्ती जवळ जवळ दोनशें कोटी इतकी आहे. त्यांपैकीं चीन (खराभाग) शेंकडा १८, हिंदुस्थान १८, रशिया (युरोपियन) ८, अमेरिका (संस्थानें) ५, जर्मन राज्य ४, जपान ३, इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड मिळून ३, फ्रान्स २, व उरलेला भाग इतर देशांत, अशा वांटण्या होतील.

देश	दर चौ. मै. वस्ती	पिकाऊ जमीन	नक्की पिकें घेतलेली जमीन
	मनुष्यें	१० लक्ष एकर	शेंकडा
१ चीन	२१०	३९०	४२
२ हिंदुस्थान	१७५	२८०	२५
३ रशिया	७५	२५०	१९
४ अमेरिका (सं. संस्थानें)	३४	३२०	१५
५ जर्मनी	३२०	८०	४८
६ जपान	१९०	१८	८
७ ऑस्ट्रियाहंगेरी	२०५	८०	४३
८ इंग्लंड वगैरे	३८०	२०	२५

१९२९-३० सालांतील
प्रत्येक प्रांतांतील लागवडीचें व बिनलागवडीचें क्षेत्रफळ

प्रांत	सर्व्हेप्रमाणें क्षेत्रफळ	वजा हिंदी संस्थानें	सर्व्हेप्रमाणें निवळक्षेत्र	खेडेगांवच्या तक्त्यां प्रमाणें निवळक्षेत्र
	एकर	एकर	एकर	एकर
मद्रास	९१,२९३,२४९		९१,२९३,२४९	९१,०१५,१३३
मुंबई	९७,४६५,५२३	१८,५६८,९६०	७८,८९६,५६३	७८,८९६,५६३
बंगाल	५२,६६४,६६९	३,४७७,७६०	४९,१८६,९०९	४९,१८६,९०९
संयुक्त प्रांत	७२,६४८,७४१	४,३४८,२३२	६८,३००,५०९	६७,९८९,८६४
पंजाब	६५,५४६,५८६	३,२८६,७००	६२,२५९,८८६	६०,१७३,७८९
ब्रह्मदेश	१५५,८४९,४८०		१५५,८४९,४८०	१५५,८४९,४८०
वहार ओरिसा	७१,५०७,८१९	१८,३३४,७२०	५३,१७३,०९९	५३,१७३,०९९
मध्यप्रांत, वऱ्हाड	८३,९९४,२१४	१९,९६०,७२७	६४,०३३,४८७	६४,१८०,६१३
आसाम	४३,३६१,४१०	८,०६१,४४०	३५,२९९,९७०	३५,२९९,९७०
वायव्यप्रांत	८,५७८,२११	१४०,८००	८,४३७,४११	८,५६५,३१७
अजमीर-मारवाड व मणिपूर परगणा	१,८०२,२७४		१,८०२,२७४	१,८०२,२७४
कुर्ग	१,०१२,२६०		१,०१२,२६०	१,०१२,२६०
दिल्ली	३७०,३३५		३७०,३३५	३७० ,३३५
.. एकंदर	७४६,०९४,७७१	७६,१७९,३३९	६६९,९१५,४३२	६६७,५१५,६०६

१९२९-३० सालांत
पाटानें भिजलेली प्रांतवार जमीन

प्रांत	पेरलेली एकंदर ज. ए.	सरकारी कालव्यानें एकर	खाजगी कालव्यानें एकर	तळ्याच्या पाण्यानें एकर	विहिरीच्या पाण्यानें एकर	अन्य प्रकारांनीं एकर
मद्रास	३९२५९५७१	३७३७७९८	२३४०८९	३३६८७३५	१४१५७३७	४९४२१७
मुंबई	३४२२२९८७	३३७१०४५	७९७८१	१२५८६८	६८९४८२	२४८१४५
बंगाल	२७८३२५००	५०३७५	१७६५७७	८६९०४८	३७६६२६	२७५१७३
संयुक्तप्रांत	४२२७९४०१	३३२५१३८	२४१६५	६३८७१	५६१०५५४	१९८३३०८
पंजाब	३०९५४२३७	१०६४८४८४	३९७२४४	३५२१२	४०१८८८२	१४३८३७
ब्रह्मदेश	१८६२०९४४	६४०५१६	२६८००६	१९७६१९	२१९७४	३३८९३१
बहार व ओरिसा	३०३८७९००	८५७९०२	९१४८१९	१५९५५२३	५६७६७९	१३८३८८१
मध्यप्रांत वऱ्हाड	२७२९७३१७		८८७७६५		११३५५४	४०८५८
आसाम	६१३५३५९	१०७२७	२६३५९६		३३	२७९१४४
वायव्यसरहद्दप्रां.	२८८५२६६	३८८०६४	४०८६१३	१४२९	८१०७८	९४७९१
अजमीर,मारवाड व मणिपूर परगणा	४५६१००			३६३४३	११०५१९	
कुर्ग	१३८८२८	२२९५		१३०८		
दिल्ली	२१०५३२	४०५४१		३१९९	३५०२८	
कंदर	२६०६८०९४२	२३०७२८८५	३६५४६५५	६२९८१५५	१२७०२१४६	५२८२२८५

पाणी मिळणारीं पिकें* (आंकडे एकराचे)

प्रांत	मका	इतर तृण धान्यें व द्विदळ धान्यें	ऊंस	तर खाद्य पिकें	कापूस	तर खाद्येतर पिकें	एकूण
मद्रास	४३०३	११९१७३७	९४४९९	२७८४५६	२०८००९	४८२८०७	११०५९६०९
मुंबई	३१७४०	२७५७०५	६५३४७	१९६३६२	३५५५२८	५१५५७६	४८९४९४०
बंगाल	११९४	६६७२८	३३८४५	१३५०९१	२३००	४१४६८	१५९८९८०
संयुक्त प्रांत	३११२२७	२४१९९६७	१०३४०२१	४२९६०७	५०३७०७	३७२०७४	१२१४९१३९
पंजाब	५३९२३८	१३९१४७८	२५६२५६	२७६४४७	२०८८६९४	३३८३८११	१५५०७९५४
ब्रह्मदेश	२८९	२७२८	१७०५	६७६३०	७५	१८३४१	१५०५६२८
बहार–ओरिसा	६२३३७	१०५८२६२	१३१९९८	१३५८३३	२०४१	१३०६७४	५४००८९८
मध्यप्रांत व वऱ्हाड	२१२	२४८४	२०३६६	७१३३१	१०९	६९२४	१०४२१७७
आसाम		८०		१८००		१००	५५४९२९
वायव्य सरहद्द प्रांत	२६७८८१	२८८८४	५०७१०	२९३७६	१६२७७	११६०५२	९७४५००
अजमीर–मारवाड व मणिपूर परगणा	२९९६८	१७८५२	१६२	१०४६३	२६८२४	९१७४	१५२४५६
कुर्ग							३६०३
दिल्ली	१६८३	७०१२	२५५६	६३५३	२४८५	१३१६२	७८७६८
एकूण	१२५००७२	६४६२९१७	१६९१४६५	१६३८७४९	३२०६०४९	५०९०१६३	५४९२३५३१

* दोनही हंगामाच्या वेळीं पाणी दिलेली जमीन यांत येते.

५४

पिकांचें जिल्हावार दर एकरी अंदाजी उत्पन्न (उत्पन्न पौन्डानें दर्शविलें आहे)

जिल्हा	तांदूळ तयार		गहूं		स्पेल्ट		ज्वारी		बाजरी		नाचणी (रागी)		कोद्रू		हरबरा		जवस		तीळ		भुइमूग		ऊंस		कापूस तयार	
	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली	पाटानें भिजलेली	पाटानें न भिजलेली
प. खानदेश	—	१०८०	१२८०	६००	१५००	—		ख ७२०	—	५००		९००	—	९००	१२००	५००	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	११०
पू. खानदेश	—	१०८०	१२८०	६००	१५००	—		ख ७२०	—	३८०		८५०	—		१२००	५५०	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	११०
नाशिक	—	१०८०	१३२०	४६०	१५००	—	१४००	र ५२०	—	३६०	१४००	८५०	—		१२००	३५०	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	१००
अहमदनगर	—	१०४०	११८०	४६०	१५००	—	१५००	र ५४०	—	३४०	१४००	९००	—		११००	३८०	—	३६०	—	४००	२५००	१२००	७०००	—	—	९०
पुणें	—	११२०	१०८०	३५०	१५००	—	१५००	र ५००	—	३४०		९००	—		१२००	३२०	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	९०
सोलापूर	—	९००	१०८०	४००	१५००	—	१५००	र ५४०	—	३२०			—		१२००	३६०	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	९०
सातारा	—	११२०	१३५०	४८०	१५००	—	१५००	र ७२०	—	३६०		९००	—		१२००	३८०	—	३६०	—	४००	२५००	१५००	७०००	—	—	९०
बेळगांव	—	११४०	१२००	५६०	१५००	—	१५००	र ८००	—	३४०		९००	—			४००	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	१००
विजापूर	—	८००	१०८०	४००	१५००	—		र ५४०	—	३२०			—			३४०	—	३६०	—	४००	२५००	१२५०	७०००	—	—	९०
धारवाड	—	११४०		५००	१५००	—		र १०००	—	४००		१२००	—			५००	—	३६०	—	४००	२५००	१५०	७०००	—	—	१२०
ठाणें	—	१२००				—			—			७७०	—	६४०		४००	—		—	३३०		१२५०	७०००	—	—	
कुलाबा	—	१२००				—			—			८००	—	८००		३८०	—		—	३००		१२५०	४०००	—	—	
रत्नागिरी	—	१०२०				—			—			६८०	—	६७५		३२०	—		—	३००			४०००	—	—	

ख=खरीप. र=रब्बी

मुम्बई इलाख्यांतील पिकाऊ जमीन व पिकें

या इलाख्याचें एकंदर क्षेत्रफळ ४८७२४००० एकर आहे. त्यांपैकीं जंगल व इतर कारणांमुळें शेतीस निरुपयोगी म्हणून १४३३४००० एकर असून उरलेली ३४३९०००० एकर जमीन पिकांच्या उपयोगी अशी आहे. पैकीं ८६२००० एकर जमीन पडीक आहे व ३३५२८००० एकर पिकांखालीं आहे. पैकीं साधारणत: २९० लक्ष एकर पिकांखालीं असून त्यांपकीं ८७३००० दुबार पिकें घेतलेली जमीन वजा केल्यास २८१२७००० नक्की पिकांखालीं राहते. व ५४०१००० बेवडाकरितां खुली राहिलेली त्यांत मिळविल्यास एकूण ३३५२८००० अशी विभागणी होते. या २९० लक्ष एकरपैकीं खालीलप्रमाणें वांटणी पिकांवरून होतें.

(अ) अन्नाचीं पिकें:—(१) तृणधान्यें ज्वारी ७१८६००० एकर, बाजरी ४०४५००० एकर, भात १९५३००० एकर, गहू १६४९००० एकर,. (२) डाळी:-हरभरा ६०६००० एकर, इतर डाळी व तृणधान्यें ३६९८००० एकर (३) ऊंस ६१००० एकर (४) इतर अन्नाचीं पिकें २२९००० एकर एकंदर अन्नाचीं पिकें १९४१४००० एकर

(आ) बिगर अन्नपिकें:—(१) तंबाखू १४७००० एकर (२) तेलाचीं पिकें १६२७००० एकर (३) कपाशी ४८०२००० एकर (४) इतर बिगर अन्नपिकें ३०१०००० एकर. एकंदर बिगर अन्नपिकें ९५८६००० एकर.

चांगल्या मशागतींत खालील गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत.:—

१ झाडांच्या मुळचा पसरण्यास व जमिनींतील पोषक द्रव्य घेण्यास सोपें जावें म्हणून जमीन मऊ, बारीक व भुसभुशीत करणें. २ जमिनींत ओलावा घेण्याची व तो राखून ठेवण्याची शक्ति वाढविणें.

३ जमिनींत हवा खेळून वनस्पतींस उपयोगी पडणाऱ्या नायट्रोजनचें प्रमाण वाढविणें. ४ पोषक द्रैव्यें झाडांना घेतां येतील अशा स्थितींत आणणें.

५ तणांचा, किडयांच्या अंडयांचा, व वनस्पति-जन्य रोगांचा नायनाट करणें.

पिकांची यादी

कोरडवाहू पिकें:—ज्वारी (दाण्याची किंवा वैरणीची), कापूस, बाजरी, गहूं, कुळीथ, भुईमूग, कारळा, तंबाखू, वाल, हरभरा, जवस, कारळा, तीळ, तूर, मूग, मटकी, आंबाडी, मका, भात, लांग, मसूर, नाचणी, कोद्रा, वरा, वरी, उडीद, करडई, वाटाणा वगैरे होत.

बागायत पिकें:—ऊस, कांदे, वांगीं, कोबी, नवलकोल, कॉलीफ्लॉवर, बटाटे, पालेभाज्या, मुळे, भोपळा, भेंडी, दुध्याभोपळा, पडवळ, दोडका, कारलीं, तोंडलीं, परवर, उवल, बीन, श्रावण-घेवडा, लसूण, टोमॅटो, सुरण, हळद, आलें, पान-वेल, फळझाडें कॉफी वगैरे वगैरे होत. याच पिकांची वर्गवारी त्यांच्या वनस्पतिजातीवरून व उपयोगावरूनही निराळी करतां येते. —

(१) तृणधान्यें:-ज्वारी, बाजरी, भात, मका गहू, डोंगरी पिकें-नाचणी, हरीक, (कोद्रा) वरी, वरा, बंटी, बराटी, भादली, ओट, जव वगैरे (२) डाळीचीं पिकें (Pulses):-हरभरा, मूग, मटकी, लांग (गुजराथमध्यें हें होतें,) मसूर तूर, उडीद, चवळी वगैरे, ज्यांच्या डाळी आपण खाण्यांत वापरतो अशीं.

३ तीळ, कारळा, जवस, करडई, नारळ, एरंडी, वगैरे, ज्यांच्यापासून आपण तेल काढतों.

(४) वाखाचीं पिकें:—कापूस, आंबाडी, ताग, घायपात, जवस, जूट, भेंडी वगैरे, ज्यांच्या खोडापासून किंवा बोंडापासून आपण वाख काढून दोरा किंवा पुढें कापड तयार करतों अशीं. जव-साचा वाक आतां रशियांत फार काढतात.

(५) पिष्टमय पिकें:— रताळीं, बटाटे वगैरे.

(६) साखरेचीं पिकें:—ऊस, बीट.

(७) भाज्या, (अ) पालेभाज्या:—करडई, आंबाडी, मेथी, पोकळा, राजगिरा, चुका, चाक-वत, मुळा, चंदनबटवा, कोबी, कांदा, लेटयूस (सालीट), शेपू वगैरे.

(आ) फळभाज्या:—भेंडी, गवारी, निरनि-निराळे घेवडे व वालाच्या जाती, दुधा भोपळा, कारलीं, दोडकीं, तोंडलीं, टोमँटो, वांगीं, परवर, मिरची (भोपळी)

(इ) मूळभाज्या:—मुळा, बीट, रताळीं.

(उ) खोडभाज्या:—बटाटे, सुरण, गोरॅडू, (कोन) नवलकोल वगैरे.

(उ) फुलभाज्या:—कॉली फ्लॉवर.

(८) मसाल्याचीं पिकें:—हळद, आलें, कांदा, ओवा, बडीशेप, जिरें, वेलदोडे, मिरें, पिंपरी, पानवेल, वगैरे.

(९) रंगाचीं पिकें:—हळद, करडी, नीळ.

(१०) कैफाची:—तमाखू, भांग, अफू.

(११) वैरण:—ज्वारी, घास, गिनी, मका.

विविध प्रकारचीं पिकें व फळझाडें कोणत्या महिन्यांत लावावीं.

महिना		जिराईत पिकें	बागाईत पिकें	फळें.
मार्च	चैत्र		भेंडी, गोवार, श्रावण घेवडा.	पोफळीची लागण, मिरी पिकून तयार
एप्रिल	वैशाख		अंबाडी, भोपळा, पडवळ, दोडका काकडी, घोसाळीं, कारलीं, तोंडलीं, दुध्या भोपळा, चाऊ चाऊ, भेंडी, मटार, खिरे, पानवेलीची लागण.	द्राक्षांच्या वेलांची छाटणी.
मे	ज्येष्ठ		आलें, हळद, सुरण, राजगिरा, गवार.	वेलदोडयांच्या झाडांची कायम ठिकाणीं लागण
जून	आषाढ	कपास (खानदेश) (भडोच) जोंधळा भुईमूग, भाताचे रोप तयार करणें, मका, मूग, उडीद, ताग.	मुळे,मेथी,माठ,चाकवत,चुका,चंदनबटवा, चवळाई, काकडी, टोमॅटो, भेंडी,श्रावण घवडा, चौधारी घेवडा, डफळ (डबल बीन्स) मटार, मिरची, खिरे, वांगी, कोथींबिर, बटाटा.	पपनसाच्या रोपांची लागण, केळीच्या खुंटाचीं लागण, पपईचे बी लावणें.
जुलै	श्रावण	तीळ, जोंधळा, बाजरी, भाताची लागण मका, हुलगा, मटकी, मूग, उडीद, कारळे एरंडी, मिरची, कोरडवाहू ताग, अंबाडी	पालक, शेपू, अंबाडी, राजगिरा, चवळाई भोपळा, गवार, वांगीं, चवळी, श्रावण-घेवडा,ड.बीन्स,मटार, मिरची,कोथिंबीर, लसूण, आडसुल्या, घास, उस-लागण	अंजिरांच्या रोपांची लागण, संत्रें व मोसंबीच्या रोपांची लागण, आंब्याची लागण, लिंबाचें बीं लावणें, डाळिंबाचें बीं लावणें.

महिना		जिराईत पिकें	बागाईत पिकें	फळें.
ऑगस्ट	भाद्रपद	कापूस (धारवाड, अमेरिकन व कुमठा,) तंबाखु, बाजरी, भाताची लागण	मुळे, भेंडी, डफळ, वालपापडी, मटार, मका, माठ,पोकळा, बटाटे.	पेरूंच्या रोपांची लागण. आंब्याच्या बुंधाशीं मीठ देणें(दोन व र्तिंीं एकदां).
सप्टेंबर	आश्विन	तीळ, तूर, वाल.	मुळे, गाजर, करडई, शेपू, गवार, मिरची, कोथिंबीर.	वेलदोडयाच्या तरुंची पेरणी, चिकूच्या कलमांची कायम जागीं लागण.
ऑक्टोबर	कार्तिक	गहूं, हरबरा, करडई, शाळू, जवस.	रताळीं, कांदे, लसूण, कोबी, नवलकोल चवळी, कालिफ्लावर, मोगरी, वांगीं टोमॅटो, डिंगरी, मका	द्राक्षांच्या वेलांची छाटणी. मिऱ्यांच्या वेलांची लागण. वेलदोडयांचा हंगाम. द्राक्षांचीं कलमें लावणें.
नोव्हेंबर	मार्गशीर्ष		मुळे, गाजर, बटाटे, मेथी,करडई, शेपू, राजगिरा, लसूणघास, कोथिंबीर.	वेलदोडयाचीं तरू तयार होतात.
डिसेंबर	पौष		मुळें, चवळी, मोगरी, डिंगरी, कोथिंबीर ऊंस	पोफळीच्या झाडास खत देणें.
जानेवारी	माघ		करडई, भोपळा, वांगीं, टोमॅटो, मिरची ऊंस.	द्राक्षांच्या रोपांची लागण.
फेब्रुवारी	फाल्गुन		चंदनबटवा, मेथी, कलिंगड, खरबूज, भेंडी दुध्या भोपळा, भोपळा, श्रावणघेवडा, वांगीं, ऊंस.	संत्र्यासाठीं रोप टाकणें.

- खतें
  - भारी अगर भरीचीं खतें
    - शेणखत.
    - मूत्र.
    - सोनखत.
    - पाचोऱ्याचें खत.
    - लेंडीचें खत व गुआनों.
    - बींगूड करणें.
  - कसदार खतें
    - बिन रासायनिक
      - स्वाभाविक
        - पेंड
          - निरनिराळ्या जाती
            - १ करडी–७ टक्के नायट्रोजन
            - २ भुईमुग–७ ,, ,,
            - ३ एरंडी –४ ,, ,,
            - ४ करंज –३॥ ,, ,,
            - ५ नारळी–३ ,, ,,
            - ६ उडीद –३ ,, ,,
            - ७ मोहडा पेंड–२ ,, ,,
            - ८ सरकीची पेंड३ ,, ,,
        - मासळी
          - निरनिराळ्या जाती
            - १ चिंगळी उत्तम–९ टक्के नायट्रोजन
            - २ टारली मध्यम–५ ,, ,,
            - ३ ढोंमा ,, –४ ,, ,,
            - ४ सुकट ,, –७ ,, ,,
      - नैसर्गिक
        - हवा, ऊन, पाणी.
    - रासायनिक
      - नायट्रोजीनस
        - १ अमोनियम सल्फेट
        - २ नायट्रेट ऑफ सोडा
        - ३ नायट्रेट ऑफ लाईम
        - ४ नायट्रेट ऑफ पोटॅश (सोरा)
      - फास्फोरिक
        - १ हाडें
        - २ सुपर फास्फेट
      - पोटॅश
        - १ राख
        - २ सल्फेट ऑफ पोटॅश.

पिकें व त्यांना खतें कोणतीं किती घालावीं याचें स्थूलमानपत्रक

नं.	पीक	शेणखत		वरखत		
		किती गाड्या १ ए.	केव्हां	कोणतें	किती (पौंड)	केव्हां
१	ऊंस	३०ते४०	लागणीच्या आधी	अमो० सल्फेट	१२५	ला. नं. ३ आ.†
				,,	१२५	
				पेंड	२५ (ना.)	,, ८, ९ आ.
				पेंड	५० (ना.)	खांदणी
२	सुरण	२०–२५	,,	पेंड	३० (ना.)	ला. नं. ४ आ.
				पेंड	३० (ना.)	,, ८ आ.
३	आलें	,,	,,	सुरणाप्रमाणें	सुरणाप्रमाणें	सुरणाप्रमाणें
४	कांदे	२०–२५	,,	अ० स०	२००–३००	ला. नं. २ आ.
	कांदे (अलिबाग)	१५	,,	मासळी	८००	ला. नं. ४ आ.
५	हळद	२०–२५	,,	पेंड	२५ (ना)	ला. नं. ३ आ.
				,,	,, ,,	,, ,, ८ ,,
६	मिरची बागायत	,,	,,	,,	१५ ,,	,, ,, २ ,,
				,,	,,	,, ,, ६ ,,
७	कोबी	,,	,,	अ० स०	२००–२५०	,, ,, ४ ,,
८	बटाटे	१५–२०				
९	वांगीं	,,	,,	पेंड	२००	,, ,, २ ,,
					२००	,, ,, ६ ,,
१०	भोपळे व दुध्या	,,	,,			
११	लसूण	,,	,,			
१२	टोमॅटो	,,	,,			
१३	तोंडलीं	,,	द.४यहिन्या-एक तृतियांश			
१४	लसूण घास	२५–३०	लाग. आधी	शेणखत सुपर फॉस्फेट	१५-२० गाड्या ३००-४०० पौंड	दर४महिने पावसाळ्याच्या सुरवातींस
१५	मका (वैरण)	१५–२०	,,			
१६	तंबाखू	१५	,,			
१७	कपाशी	५-६ किंवा पेंड २५०-३००पौं	,, पेरतांना			
१८	गहू (कोरडवाहू)	६–८	पेर. पूर्वी			
१९	,, (बागाईत)	१५किंवा ताग करून गाडणें	, खरीपांत			
२०	शाळू	६–८	पेर. पूर्वी			
२१	भुइमूग (उपटचा)	६–८	,,			
२२	,, (पसऱ्या)	१०–१२	,,			
२३	पानवेल	४०	उतरणी वेळीं.			
		,,	हिंवा. सुरवातीस.			

नं.	पीक	शेणखत		वरखत		
		किती गाड्या	केव्हां	कोणतें	किती (पौंड)	केव्हां
२४	नारळ	५ घमेली दर आळ्यांत	जून, जुलै	सु. फॉ. १ पौंड अ. स. ½ पौंड		जून, जुलै
२५	ज्वारी (दाण्याची)	६–८	पेर. पूर्वी			
२६	भात	,,	,,			
	(अ) का. मातींत	,,	,,	अ. स.	१००–१५०	ला.नं. १५ दि.
				,,	१००–१५०	,, ४५ दि.
	(आ) तांबड्या जांभ्या दगडाच्या मातींत (कारवार रत्नागिरी भागांत	,,	,,	हाडांचा भुगा (बोनमीळ)	२००	चिखलणी वेळेस

† ला. नं. आ = लावणीनंतर आठवडे.

खतें व त्यांतील अन्नांश

खताचें नांव, अन्नांशाचें सरासरी शेंकडा प्रमाण

खताचें नांव	नायट्रो.	पोटॅश	फॉ.ॲसिड
करडीची पेंड टरफलें न काढलेलीं	३–३.५		
करडीची पेंड (टरफलें) काढ.	६–७		
एरंडीची पेंड	३.५–४		
भुइमुग पेंड	७–८		
कपाशीची पेंड	४–५		
उंडीची पेंड	२.५-३.५		
करंजीची पेंड	३–३.५		
खोबऱ्याची पेंड	३–३.५		
सूर्यफूल पेंड	६		
तिळाची पेंड	३		
सल्फेट ऑ.अमो.	२०-२०.५	०	०
नायट्रेट ऑ.सोडा	१५	०	०
कॅ. सायनामाईड्	१७.८	०	०
निसिफॉस	१७.९	०	२१·१
सल्फे. ऑ. पोटॅश	०	४०–४१	०
सुपर फॉस्फेट	०	०	१७–४०
बोनमील	४–५		२२–२४
चिगळी मासळी	८·४		४.५
डोमा मासळी	३.५–४		५-५.५
तारली मासळी	५–६		४.५–५
फिश ग्वानो	३.५–४		२.९

खताचें नांव	नायट्रो.	पोटॅश	फा. ॲसिड.
कत्तलखान्यांतील टाकाऊ मासाचा वगैरे भुगा	११.४	७	२.५
शेणखत	०.५-०.९	२.६	०.६
घोड्याचेंलि.खत	०.६-०.८		
उसाचें पाचट	०.३-०.४		
तागाचा बिवड	०.४		
सोनखत	०.५-१	१.२	०.९
गुऱ्हाळ राख	०	१.५५	०.८
गांव कचरा	०.३-०.४		
कच्चा मैला	०.४-०.८	०.३०	०.१७
लाकूड भुसा	०.२	०.०४	०.०४
लेंडी खत	०.७	०.६	०.४
हि.पानें (सोपू)	१.२-१.५		
वाळ. पानें (तरकु)	०.८-०.९		
भाताचें तूस	०.४-०.६		
कोंबडी-विष्ठा	०.७-०.८	०.६	०.७-०.८
गाय-म्हैस-शेण	०.४		
गाय-म्हैस-मूत	०.९		
बकरीची लेंडी	१.५		
बकरीचें मूत	०.९		
घोड्याची लीद	०.०४		
घोड्याचें मूत	१.५५		

फळांचा हंगाम, पाणी, किडे खतें इ. दर्शविणारा तक्ता

फळाचें नांव	प्रकार जाती	हवामान	जमीन	किडे	खतें	पाणी
आंबा	हापूस,पायरी,रायवळ वगैरे	हिंदुस्थानातील कोणतें ही हवामान	नदीकांठीं गाळाची, मऊ भुसभुशीत	तुडतुडे किडे. १इडियोसिरस; कॅपिआलीस इडियोतिरस; ॲटकिसोराय; ३ इडियोसिरस नीव्हीओस्पार्सस.	हाडांचें पोड; शेणखत	पांच वर्षेपर्यंत द्यावें लागतें. नंतर द्यावें लागत नाहीं.
द्राक्षें	१भोंकरी; २गोसावी ३साहेबी ४फकडी ५करवंदी ६निळा ७ कालिंदी ८कंदाहारी ९ काळी.	मध्यम प्रतीचें	भारी, मध्यम, साधारण	उद्या नांवाचा किडा २बुरशीसारखा एक रोग. ३ ॲश्नाक्नोज नांवाचा एक रोग.	शेणखत; सोनखत	लागवडीनंतर रोज व पुढें आठा दिवसांनीं दिलें तरी चालतें
लिंबू	संत्रीं,मोसंबीं, पपनस महाळुंग, साखरलिंबू कागदी लिंबू.	सर्वसामान्य हवा चालते.	मध्यम काळी सुमारें २॥ते३फूट खोल व खालीं टिसूळ मुरूम नदीकांठची मळईची जमीन उत्तम.	एक प्रकारच्या माशा आफिडेरीस निस्टीपा ४मावा५काळालाख्या ६ तांबडा लाख्या	पाल्याचें खत; कुजलेलें शेणखत.	उन्हाळ्यांत जास्त पाणी व इतर वेळीं बेताचें द्यावें लागतें.
केळें	काळी म्हशेळी राजापुरी.	अतिउष्ण व कोरडें मध्यम प्रकारचें.	दीड ते दोन फूट खोल मध्यम काळी.	माशा वगैरे कीटक.	एकरी ४०ते६० गाड्या शेणखत	लावल्यानंतर व पुढें ८दिवसांनीं जरूरी प्र.
अंजीर	काळी ,पांढरी		साधारण हलकी, दोन फूट खोल; शाडवट	----	उंटाच्या लिदीचें खत गांवखत	प्रथम प्रथम हातपाणी,
पपई	----	सर्द हवा व पुष्कळ ऊन	चांगल्यापैकीं उत्तम निच.	----	शेणखत	पाणी पुष्कळ लागतें.
पेरू	तांबडी, पांढरी	उष्ण व कोरडी	जमीन साधारण १॥ फूट खोल व खालीं मुरूम असलेली चालते	मावा	शेणखत व गांवखत	फक्त बहाराच्या वेळीं पाणी लागतें.

डाळिंब	तांबडी, पांढरी व काळी	फार उष्ण रखरखीत व कोरडें.	फार हलक्या दर्जाची लागते. मऊ व मुरमाड जमीन	सुरसा नांवाची आळी चिकटा नांवाचे काळ कीटक.	शेणखत	८-१० दिवसांनीं २ वर्षें पर्यंत द्यावें.
नारळ		उष्ण	पुळणवट		मीठ, मासळी, शे.खत	भरपूर द्यावें लागतें.
माड	किंग कोकोनट		”	भंगे	विनड, शे.खत मासळी	
अननस		फार सर्द व दमट	उत्तम निचऱ्याची, पुळणवट		एरंडीची पेंड	एप्रिल अगर मे महिन्यांत पाणी देतात.
काजू	तांबडा व पिवळा		जांभ्या दगडाच्या व तांबडच्या मातींत			झाड लावल्यापासून लवकरच पाणी देतात.
बोर खानदेशी	अनेक जाती		कोणतीही जमीन बरड, मध्यम काळी	दोन प्रकारचे किडे फारच आढळतात.	मीठ	पाऊस पडेपर्यंत पाणी द्यावें लागतें.
सीताफळ, राम.		उष्ण व कोरडें.				
फणस	कापा व बरका	उष्ण व दमट	निचऱ्याची व तांबडी			

दूधदुभतें

हिंदुस्थानांत इतर देशाच्या मानानें दूध महाग आहे पण लोणी स्वस्त आहे; याचें कारण दुधाच्या वाहतुकीस योग्य व स्वस्त अशा साधनांचा अभाव हें होय. दूधदुरवठा शेंकडा ८० टक्के म्हशीपासून होतो. खेड्यांत गाईचें प्रमाण अधिक असतें. मजूर, कुणबी, धनगर वगैरे लोक शेळीच्या दुधाचा उपयोग करतात. 'शेळीला गरीब माणसाची गाय म्हणतात. शहरांत दुधाची जशी टंचाई तशीच सडकेपासून दूर असणाऱ्या खेड्यांतही टंचाई भासते. गेल्या वर्षीच्या मुंबई इलाख्याच्या शेतकी खात्याच्या अहवालांत गोदावरीच्या कांठच्या महालखेड नांवाच्या गांवांचें उदाहरण दिलें आहे. या गांवाची लोकसंख्या तीन हजार आहे. या सबंध गांवाला फक्त सात म्हशींचेंच दूध मिळतें. येथें दुधाचा भाव चार आणे शेर आहे. मुंबईसारख्या शहरांत उत्तम दुधाची किंमत दहा आणे शेराप्रमाणें आहे व साधारण दूध सहा आणे शेराप्रमाणें आहे. मुंबई इलाख्यांतील मोठ्या शहरास दुधाचा पुरवठा कसा वाढवितां येईल या प्रश्नाचा विचार करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली होती, तिचा अहवाल १९१६ सालीं प्रसिद्ध झाला आहे. त्याचप्रमाणें मुंबई इलाख्यांतील जनावरांची सुधारणा कशी करावी हें सुचविण्याकरितां रा. ब. चितळे यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. तिचा अहवाल १९२३ सालीं प्रसिद्ध झाला आहे. तथापि गेल्या सोळावर्षांत दूधपुरवठ्याच्या पद्धतीबाबत विशेषसा कांहीं फरक झालेला नाहीं.

शहरांतील दूधपुरवठ्यास सोईचें जनावर म्हैस हेंच होय. व्यापारी दृष्टीनें दूधपुरवठ्यास गाईपेक्षां म्हैसच अधिक योग्य आहे. हिंदी लोक लोण्याच्या दृष्टीनेंच दुधाची किंमत करतात. आणि म्हणूनच म्हशीच्या दुधाला विशेष मागणी असते. चहाला म्हशीचें दूध गाईच्या दुधापेक्षां चांगलें अशी समजूत आहे. मध्यम वर्गाला थोडेंसें दूध विकत घेऊन चहा, लोणी, ताक वगैरे सर्व गरजा थोड्या थोड्या भागवावयाच्या असतात. या दृष्टीनें म्हशीचें दूधच परवडतें. गवळी लोक म्हशीच बाळगतात व एखादीच गाय असते. कांहीं शहरांत विशेषतः पुण्यांत व्यक्तिशः मालकांनीं पाळलेल्या गाईंची संख्या मोठी होती. ही संख्या गेल्या पंधरा वर्षांत कमी होत चालली आहे. गाईंची संख्या मोठी असण्याचें कारण

गाईचें दूध अधिक पसंत आहे हें नसून, घरगुती दुभत्याकरितां एक म्हैस ठेवण्याऐवजीं एक गाय ठेवणें मध्यम स्थितीच्या कौटुंबिकाला अधिक परवडतें. गाय व म्हैस यांत आर्थिक दृष्टीनें फायदेशीर कोणतें जनावर आहे याबद्दल पुण्याच्या शेतकी-कॉलेज डेअरीवर कांहीं नोंदी ठेवण्यांत आल्या. चार सिंधी गाई व जार सुरती म्हशी यांच्या दुधाच्या व खर्चाच्या नोंदी ठेवून तुलनात्मक दृष्टीनें विचार केल्यावर असें आढळून आलें कीं, दुधाच्या बाबतींत सिंधी गाय म्हशीपेक्षां २९ टक्के अधिक फायदेशीर आहे. व लोण्याच्या बाबतींत म्हैस ही गाईपेक्षां २१टक्के अधिक फायदेशीर आहे. पुणें येथील लष्करी दुग्धालयांत असाच अनुभव येतो. तेथें सिंधी गाई दुधाकरतां व दिल्लीच्या म्हशी लोण्याकरितां ठेवल्या आहेत. तथापि ही तुलना दुधाळ जातीच्या गाईंशीं झाली. सामान्य गाई वासराला लागणाऱ्या दुधापेक्षां अधिक दूध देऊं शकत नाहींत. व दुधाच्या धंद्याच्या दृष्टीनें गाईच्या दुधाला विशेष मागणी असल्याखेरीज गाय ठेवणें परवडत नाहीं. पुणें, सोलापूर, नगर, पंढरपूर वगैरे शहरांतून गवळी-लोकांनीं गुजराथी अगर काठेवाडी गाई ठेवल्या आहेत. पण त्यांचें प्रमाण पंधरा म्हशींस एक गाय इतकेंही नाहीं. या गाई दुधाला व लोण्याला बऱ्या असतात व या जातीचे बैल शेतकामाला व विशेषतः ओझीं वाहण्याच्या कामाला फार उपयोगी पडतात. लष्करी दुग्धालयांनीं आयरशायर होल्स्टीन अगर जर्सी जातीच्या परदेशीय बैलांचा सिंधी अगर कराची गाईंशीं संकर करून दुधाळ गाईंची संकर जात निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण गेल्या शंभर वर्षांतील हा प्रयत्न अयशस्वी झाला आहे. सिंधी, कराची, थरपारकर, गीर, सोरटी या दुधाळ जातींची शुद्ध निपजच निभावूं शकते. शुद्ध परदेशी जनावर अगर संकर युक्त परदेशी जनावर येथील सर्व प्रकारच्या हवेच्या फरकांत तग धरूं शकत नाहीं. बंगलोर येथील लष्करी दुग्धालयांतील संकरजन्य शेंकडो कालवडी दरसाल गवळी लोकांना दिल्या जात असत. सध्यां तेथील गवळ्यांजवळ परदेशी संकर-जन्य गाई आहेत. परंतु पुढच्या पिढीला त्या देशी गाईइतक्यातरी दुधाला उतरतील कां नाहीं याची शंका आहे. व त्यांची संततीही टिकत नाहीं. सारांश दुधाचा धंदा करणाराला प्रामुख्येंकरून म्हैसच अधिक परवडतें. गाईच्या दुधाला मागणी असल्यास दुधाळ जातीची सिंधी अगर कराची गाय ठेवावयास पाहिजे.

शेतकरी व दुधाचा धंदाः—शेतीच्या धंद्याला दुधाचा धंदा पूरक आहे असें कांहीं वेळां म्हटलें जातें. परंतु महाराष्ट्रांतील सर्वसाधारण बहुसंख्य शेतकऱ्याला दुधाचा धंदा शेतीला तारक नसून मारक आहे. केवळ दुग्धालयाकरितां करावयाची शेती अगदीं वेगळ्या पद्धतीनें करावयास पाहिजे. बैलाकरतां म्हणून बाळगलेल्या गाईचें दूध विकण्याकरितां नियमित मिळणार नाहीं. दूध देणाऱ्या व शेतीचे बैल देणाऱ्या अशा जरी गाई पाळल्या तरी दुधाचा पुरवठा नियमित करावयाचा असल्यामुळें बैलांना लहानपणीं आईचें दूध मिळत नाहीं.ज्याची शेती जास्त असेल त्यास म्हशी ठेऊन दुधाचा स्वतंत्र धंदा करतां येईल. परंतु दहापांच मैलांच्या टापूंत जरी एकादें शहर असलें तरी तेथें नियमित दूध नेऊन घालणें हें शेतकऱ्याला शेती साधून करतां येणार नाहीं. त्याच्या घरांतील एक स्वतंत्र मनुष्य या कामाला लागेल. दुधाचा पुरवठा ठराविक करावा लागतो. व दुभतीं जनावरें वर्षांतून कांहीं महिने कमी दूध देतात या करतां जनावरांचा दुहेरी संच ठेवावा लागतो अगर वरचेवर खरेदीविक्री करावी लागते. या व्यवहारांत शेतकरी पुष्कळवेळां कर्जबाजारी होतो. म्हणून दूध विक्रीचा धंदा हा महाराष्ट्रांतील शेतकऱ्याचा दुय्यम धंदा होऊं शकत नाहीं. मात्र त्यांच्या दाराशीं जाऊन मिळेल तेवढें दूध खरेदी करणारी एखादी एजन्सी निघाल्यास शेतकऱ्याला शेती साधून चारदोन पैसे मिळवितां येतील. रोजीं चार दोन शेर दूध विकण्याकरितां पांचसहा मैल जाऊन येणें फायद्याचें होत नाहीं.

शेतकरी व लोण्याचा धंदाः—शिलकी दूधाचें लोणी करून तें आठपंधरा दिवसानें विकणें मात्र शेतकऱ्याला शक्य आहे. लोणी, खवा हे जिन्नस विकल्यानें दुधाइतका फायदा नाहीं, पण दुधाइतकी जबाबदारीही नाहीं. ज्या भागांत चराई मुबलक आहे व दुधाला म्हणण्यासारखा भाव नाहीं तेथें म्हशी ठेवून लोण्याचा धंदा करणें अत्यंत फायद्याचें आहे. सांगलीपासून दक्षिणेच्या कृष्णा काठच्या टापूत लोण्याचा धंदाच जोरांत चालू आहे. पुणें जिल्ह्यांतील मावळ भागांतून लोणी पुणें शहरांत विकावयास येतें. परंतु तें चांगल्या प्रतीचें नसतें. या बाबत अधिक दक्षता घेतल्यास लोण्याचा धंदा किफायतशीर होईल.कारण ताक शेतकऱ्याला मुबलक मिळूं शकतें. दुधाच्या धंद्यांत

पैसे मिळूं शकतील पण लोण्याच्या धंद्यांत कुटुंबांतील मंडळींना पौष्टिक अन्न मिळूं शकतें.

शहरांतील दूध पुरवठ्याची व्यवस्थाः—नागपूर, पुणें, सोलापूर, नगर, पंढरपूर, सातारा, वगैरे शहरांचा दूधपुरवठा पिढीजाद गवळ्यांमार्फतच होतो. हे गवळी आपल्या म्हशी शहरांत अगर शहराच्या हद्दीवरच वाळगतात. यामुळें त्यांना भाकड जनावरें ठेवणें परवडत नाहीं, इतकेंच नव्हे तर कांहीं विशिष्ट मर्यादेपेक्षां म्हैस कमी दूध देऊं लागली कीं ती विकून टाकावी लागते व नवीन दुभती म्हैस आणावी लागते. शहरांत दुधाला सारखी मागणी असल्यामुळें जास्तींत जास्त दूध देणारी म्हैस वाटेल ती किंमत देऊन विकत घेण्यास गवळी तयार असतात. पुणें शहरांत सर्व गवळ्यांच्या जवळ शेंकडा ९९ टक्के दिल्लीकडील मुऱ्हां जातीच्या म्हशी आहेत, व या म्हशींचा प्रसार बहुतेक सर्व शहरीं होत आहे. सोलापूर व पंढरपूर येथें सुरती म्हशींचा भरणा विशेष आहे. नागपुरी व वऱ्हाडी म्हशी लोण्याला चांगल्या असतात. या गवळी लोकांच्या धंद्याचा शहरवासीयांना असा फायदा आहे कीं, हे गवळी लागेल तेवढें दूध लागेल त्या वेळीं पुरवतात. पैशाकरितां महिना महिना थांबतात. दूध समक्ष पिळून देतात. उलट तोटा असा कीं भरवस्तीमध्यें जनावरें ठेवल्यानें शहराच्या आरोग्यास अपाय होतो. गवळ्यांची स्वतःची जमीन नसल्यामुळें वैरण व दाणा जबर भाव देऊन विकत घ्यावा लागल्यामुळें दुधाचा भाव स्वस्ताईतही उतरत नाहीं, व जनावरांना चरायला जागा नसल्यामुळें जनावरांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. वासरांचें संवर्धन करणें परवडत नाहीं. जनावरांचें मलमूत्र पुष्कळसें वाया जातें. नवीन निघणारीं दुग्धालयें लोकप्रिय होत नाहींत. याचें कारण पैसे रोख अगर आगाऊ द्यावे लागतात. वाटेल त्यावेळीं वाटेल तेवढं दूध मिळेलच असें नाहीं. तिसरा वर्ग खेडेंगांवातील गवळ्यांचा. ज्यांना शेती नाहीं अगर असून परवडत नाहीं अशा शेतकऱ्यांनीं आठ दहा म्हशी ठेऊन दुधाचा धंदा सुरूं केला आहे. त्याप्रमाणेंच सुखवस्तु जमीनदार, पाटील वगैरे लोकांनीं आपापल्या जमिनीवर दुधाचा धंदा सुरूं केला आहे. लोणावळा ते पुणें या वाटेवरच्या आसपासच्या खेड्यांतून रोज सकाळीं रेल्वेनें जवळ जवळ शंभर लोक तरी दूध घेऊन येतात. शिवाय कावड घेऊन पायीं व टांग्यांतून मिळून उत्तर बाजूनें शंभर सवाशें मण दूध येतें. पश्चिम व दक्षिण बाजूनें मोटारींनीं दूध येतें. पुण्याच्या पश्चिमेस सहा मैलांवर असलेल्या एकट्या बावधन गांवांतून रोजीं चार पांच मण दूध येतें. १९१३ सालीं पुणें व सोलापूर शहरांतील दूधपुरवठ्याची परिस्थिति पुढीलप्रमाणें होती.

पुणें	रोजीं शेर दूध
चहाच्या दुकानांस	२०००
मिठाईस	५००
तालीमबाज	३००

लोकसंख्या एक लक्ष सतरा हजार; गवळ्यांच्या म्हशी १३३८ व गांवांतील गाई १३५०. शहरांतील निघणारे दूध दहा हजार शेर बाहेरून येणारें अडीच हजार शेर. एकूण साडेबाराहजार शेर. भाव दर रुपयास चार शेर.

सोलापूर	रोजीं शेर दूध
चहाच्या दुकानांस	३००
मिठाईस	५००

लोकसंख्या ९५०००. सर्व पुरवठा गांवांतील म्हशींच्या दुधाचा; एकूण दूध साडेसहा हजार शेर; दुधाचा भाव रुपयास पांच शेर.

१९३० सालच्या खानेसुमारीप्रमाणें पुणें शहरांत तीन हजार म्हशी व दोन हजार गाई आहेत. म्हणजे १९१३ सालच्या दुप्पट जनावरें आहेत. व जवळ जवळ सर्व म्हशी मुऱ्हा जातीच्या आहेत. म्हणून हल्लीं शहरांत निघणारें दूध गांवांतील दुधाइतकेंच येतें. म्हणजे हल्लीं पुणें शहराला जवळ जवळ ४० हजार शेर दूध लागतें. यापैकीं एक तृतियांशाहून अधिक चहाच्या दुकानांत खपतें. सोलापूर शहरालाही बाहेर गांवाहून अधिकाधिक दूध येऊं लागलें आहे. कुर्डुवाडीहून रोज सकाळीं रेल्वेनें सोलापुरास दूध जातें व तेथें पांच शेराच्या भावानें विकलें जातें. १९१९ ते १९३१ पर्यंत चांगल्या दुधाचा भाव पुण्यांत अडीच ते साडेतीन शेराच्या दरम्यान होता. तथापि इतर जिनसाच्या स्वस्ताईच्या प्रमाणांत दुधाचा भाव उतरलेला नाहीं. कारण दुधाच्या पैदाशीच्या खर्चाचे कांहीं ठळक घटक कायम स्वरूपाचे होऊन बसले आहेत. उदा० वैरण कितीही स्वस्त झाली तरी गाडीभाडें व जकात कायम असल्यामुळें पुणें शहरांत ती एका विशिष्ट किंमतीच्या खालीं उतरूं शकत नाहीं. म्हशी स्वस्त झाल्या तरी रेल्वेभाडें कायम असल्यामुळें दिल्लीची म्हैस दीडशें रुपयांच्या खालीं मिळतच नाहीं. शिवाय धान्याचे दर स्वस्त झाले

पण त्या मानानें जागाभाडें व मजुरी उतरली नाहीं. पिढीजाद गवळ्यांच्या कुटुंबांतील सर्वच माणसें या धंद्यांत काम करतात म्हणून त्यांना फायदा झाल्यासारखा दिसतो. परंतु मजुरीनें काम करून घेतल्यास या धंद्यांत शहरांत तरी विशेष कूस नाहीं.

याकरितां खेड्यांतील लोकांस भांडवल पुरवून व धंद्यावर योग्य देखरेख ठेवून शहराच्या आसपास दहा मैलाच्या टापूंतून दूध गोळा करून मोटारीनें शहरांत आणण्याची व्यवस्था करणारी समाईक भांडवलाची अगर एखाद्या व्यक्तीची मंडळी निघाल्यास हे सर्व प्रश्न सुटतील. स्वस्त व स्वच्छ दुधाचा प्रश्न शेतकऱ्याकडून अगर शहरांतील दलालवजा दुग्धालयचालकांकडून सुटणार नाहीं. दुग्धालयाची सशास्त्र शिक्षण देणारी सहकारी संस्था बंगलोर येथें आहे.

निरनिराळ्या प्राण्यांच्या दुधामध्यें असलेल्या द्रव्यांचें शेंकडा प्रमाण :—

प्रा. जात.	पाणी	स्नेह	नत्रिल	दु. सा	नि.क्षा
स्त्री	८६.७	४.१	१.२	६.९	०.२
गाय	८५.३	५.८	३.५	४.५	०.७
म्हैस	८१.२	८.७	४.३	४.९	०.८
बकरें	८७.६	४.२	३.६	४.०	०.५
मेंढी	८२.३	५.३	७.२	४.२	२.०

नेहमीं उपयोगांत येणाऱ्यांपैकीं कांहीं खाद्य पदार्थांतील पोषक द्रव्यांच्या प्रमाणाचा तक्ता.

नांव	शें क डा प्र मा ण						उ. श.†
अ. नं.	टाकाऊ	पाणी	नत्रिल	स्नेह	कर्बोदित	ख.द्रव्यें	कॅलरी
१ गाईचें दूध		८७.२	३.३	४.०	४.८	०.७	३१४
२ दूध मलई काढलेलें		९०.५	३.४	०.३	५.१	०.७	१६७
३ ताक		९०.४	३.६	०.५	४.८	०.७	१६५
४ दहि(अख्या दुधाचें)		३४.२	२६.९	३३.७	२.४	३.८	१९१०
५ लोणी		१३.५	१.०	८५.१		०.४	३४९१
६ तूप				१००.०			४०८२
७ तांदूळ		१२.३	८.०	०.३	७९.०	०.४	१५९१
८ ज्वारी		१२.५	९.३	२.०	७४.५	१.७	१६५४
९ बाजरी		११.३	१०.४	३.३	७३.०	२.०	१६४७
१० गहूं		११.४	१३.८	१.९	७१.९	१.३	१६३०
११ हरभरे		११.५	२१.७	४.२	६०.०	२.६	१६५४
१२ तूर		१०.५	२२.३	२.१	६२.१	३.०	१६१७
१३ सटन		५३.६	१६.०	२९.८		०.८	१५०८
१४ भेंडी.	१२.५	७८.९	१.४	०.२	६.५	०.५	१५२
१५ भोपळा लाल	५०.०	४६.५	०.५	०.१	२.६	०.३	५९
१६ मुळे	३०.०	६४.३	०.९	०.१	४.०	०.७	९१
१७ रताळी	२०.०	५५.२	१.४	०.६	२१.९	०.९	४४७
१८ वांगीं		९२.५	१.२	०.३	५.१	०.५	१२७
१९ केळें		७५.३	१.३	०.६	२२.०	०.८	४४७
२० अंजीर (ओले)		७५.१	१.५		१८.८	०.६	३६८
२१ डाळिंब		७६.८	१.५	१.६	१९.५	०.६	४४७
२२ द्राक्षें		७७.४	१.३	१.६	१९.२	०.५	४३७
२३ नारिंग	२७.०	६३.४	०.६	०.१	८.५	०.४	१६९

† उष्णताजनकशक्ति दर रत्तलीं कॅलरी.

दुधामधील पोषक द्रव्यें:—

नत्रिल:— दुधांतील नत्रिलांस 'केसीन' हें नांव आहे. शरीराची झीज भरून काढण्याकरितां व त्याची वाढ होण्याकरितां ज्या ॲमिनो ॲसिडाची आवश्यकता असते तीं सर्व दुधाच्या नत्रिलामध्यें फार असतात. त्यामुळें दुधांतील नत्रिल इतर अन्नांतील नत्रिलापेक्षां फारच भारी दर्जाचें समजलें जातें. हें नत्रिल इतर सर्व नत्रिलांपेक्षां श्रेष्ठदर्जाचें गणण्यांत आलें आहे. दुधांतील नत्रिलाचा शेंकडा ९७ ते ९८ भाग पचला जाऊन त्याचें अभिशोषण होतें. दुधांतील नत्रिलाचा आणखी एक विशेष गुण असा आहे कीं, त्यापासून शरीराला अपायकारक असें युरिक ॲसिड उत्पन्न होत नाहीं.

स्नेहद्रव्यें:— दुधांतील स्नेहकण अतिशय सूक्ष्म असल्यामुळें दुधांतील स्नेहद्रव्य पचनाला सोपें जातें. दुधांतील स्नेहद्रव्य अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण लोणी याच द्रव्यापासून मिळतें. व हा पदार्थ व यापासून होणारें तूप हीं दोन्हीही फार महत्त्वाचीं आहेत.

जास्त दुधास उपाय:—

गुरानें दूध पुष्कळ द्यावें म्हणून खालील खाण्याचे उपाय करावे. (१) कथल्या गोंद व बाजरी एकत्र करून खाण्यास द्यावी. इसबगोल, दूध व गूळ हीं एकत्र करून द्यावीं. बाजरीचें पीठ व गूळ यांचा गोळा अर्धा शेरपर्यंत रोज चारावा. (२) शहाजिरें, गूळ व तूप यांचे लाडू करून सकाळसंध्याकाळ एकेकप्रमाणें कांहीं दिवस द्यावे. लिंबें किंवा आंबट लिंबारे यांचा रस काढून त्यांत साखर व पाणी घालून सरबत करून अनुकूलतेप्रमाणें दोनचार दिवसांनीं पाजीत जावें. (३) गुळवेल मिळेल तितकी व ढोराच्यानें खाववेल तितकी पेंडींत मिसळून देत जावी. ढोरास कधीं कधी सरकी चारीत असावें, सरकीनें कसदार दूध मिळतें. दुभत्या ढोरांचीं शिंगें कापल्यानें व त्यास डागल्यानें दूध कमी होतें. सबब शिंगें कापूं नयेत व त्यांस डागूं नयें. येणेंप्रमाणें उपाय केल्यास ढोर कमताकद न होतां दूध पुष्कळ देतें.

कीड जाण्यास उपाय:— रोग निवारण करण्यापेक्षां रोग होऊं न देणें हेंच अधिक उत्तम. कारण रोग झाला असतां निवारण करूं शकूंच असें खात्री लायक सांगतां येत नाहीं. पण तो रोग होऊं दिलाच नाहीं तर त्या सर्व भानगडीचें कारणच राहणार नाहीं. पण तो रोगाचा प्रतिबंध कसा करायाचा? रोग येणार किंवा कीड पडणार याची पूर्वसूचना माणसास मिळूं शकली तर खात्रीनें कांहीं तरी आगाऊ योजना करतां येते परंतु तशी सूचना कधीं मिळत नसते. शिवाय किडयांचे येणें हें कांहीं निश्चित नसतें. एकाद्या वर्षी कीड पडते, एकादे वर्षी पडत नाहीं. परंतु एवढें मात्र आपल्या हातीं असतें कीं, कीड पडल्याबरोबर तिचा लगेच नायनाट किंवा नीट बंदोबस्त करावा व तिची वाढ खुंटवावी. एकंदरीनें खालील प्रतिबंधक उपायांचा अवलंब करावा.

प्रतिबंधक उपाय:—

१ निर्मळ मशागत:—शेतांची मशागत नेहमीं चांगली असावी. कारण कोनाकोंपऱ्यांत किंवा तण असेल अशा ठिकाणीं पुष्कळ किडयांचीं अंडीं, आळ्या व कोश पडून असतात व तीं तशींच सुरक्षित ठिकाणीं पडून राहिल्यामुळें त्यांची वाढ होण्यास व योग्य समय सांपडल्यास बाहेर पडण्यास त्रास पडत नाहीं. हें आपल्या घरांत घाण ठेवण्याप्रमाणेंच आहे. घरांत घाण सांचल्यानें नाना प्रकारचे रोग उत्पन्न होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें शेतीचीही गोष्ट आहे. मागील पिकांचे खुंट वगैरे शेतांत पडून राहूं देऊं नयेत. कारण त्यांतहि पुष्कळसे किडे सुप्तावस्थेंत राहूं शकतात.

२ पिकांची अदलाबदल :—तेंच तेंच पीक वर्षानुवर्ष घेऊं नये. ज्वारीचे पीक एकाच ठिकाणीं घेणें जसें शेतकीच्या दृष्टीनें फायदेशीर नाहीं त्याच प्रमाणें किडयांच्या दृष्टीनेंही नाहीं. कारण ज्वारीवरचे जे किडे असतील त्यांना दरवर्षी तेंच पीक मिळालें म्हणजे त्यांची वाढ पुष्कळ होते. परंतु ज्वारीचे नंतर दुसरे वर्षी कापूस केल्यास ज्वारीच्या किडयांना जे पाहिजे तें अन्न मिळणार नाहीं. अर्थात् त्यांची उपासमार होईल व पुष्कळसे किडे मरून जातील. शिवाय ज्वारीच्या किडयापासून कापसास उपद्रव होणार नाहीं.

३ मिश्रित पिकें :—ज्वारी व तूर, कापूस व तूर, किंवा मका अशा प्रकारचीं मिश्र पिकें करणें पुष्कळ वेळां फायदेशीर पडतें. कारण ज्वारीवरच्या किंवा कापसावरच्या किडयांना इकडून तिकडें जाण्यास बराच त्रास पडतो व पुष्कळ वेळां पाखरांच्या किंवा दुसऱ्या एखाद्या किडयांच्या तडाख्यांत सांपडावें लागतें. शिवाय ज्वारीचे पिकांवर पुष्कळ कीड पडून नुकसान झाल्यास तुरीचें पीक पदरांत पडतें. म्हणजे एक नाहीं दुसरें पीक तरी पदरांत पडण्याचा बराच संभव असतो.

मिश्र पीक घेण्यांतही प्रकार आहे. कित्येक वेळां त्याच जातीचें दुसरें पीक घ्यावें. उदाहरणार्थ कापूस व भेंडी. हीं दोन्ही वनस्पतिशास्त्राच्या दृष्टीनें एका जातीचीं पिकें आहेत. त्यामुळें दोन्ही पिकावरचे किडे एकाच प्रकारचे असतात.पण अशा वेळीं भेंडीचें पीक हें जरा अगोदर पेरावें व तें कापूस लावण्यापूर्वीं किंवा लावल्याबरोबर उपटून काढावें उद्देश हा कीं, कापसावर येणारे किडे भेंडीवर ओढून घेतल्यामुळें कापसास फार कमी उपद्रव होण्याचा पुष्कळ संभव आहे.

४ किडे वेचून मारणें :—खरोखर उत्तम प्रतिबंधक उपाय म्हणजे दिसतील तेवढ्या किड्यांचा नाश करणें हा होय. हें काम निर्दयपणाचें आहे. पण जर पिकांच्या सुरक्षितपणाकडेच पहावयाचें असेल तर त्यांची हयगय करून चालणार नाहीं. कारण ते किडे सोडणें म्हणजे त्यांची बीण होऊं देणें. किड्यांचीं अंडीं घालण्याची शक्ति मोठी असल्यामुळें त्यांचा विस्तार फार होतो व आवरतां पुरेवाट होते. जास्त पाप करण्यापेक्षां वेळीं थोडेंच पाप केलेलें पुरवलें.

५ चर खणणें :—पुष्कळ वेळां असें होतें कीं, कांहीं आळ्या एखाद्या पिकावर एकदम येतात व पिकाचा फडशा उडवीत पुढें चालतात. अशा वेळीं भांबावून न जातां पुढची चाल बंद केली पाहिजे. त्या आळ्यांनीं खाल्लेल्या भागापुढें एक लहानसा चर एक फूट खोल असा खणावा म्हणजे त्याच्या बाजू घसरत्या असल्यामुळें आंत पडलेल्या आळ्यांना बाहेर पडतां येत नाहीं व त्या आंत मरतात. आंत सांपडलेल्या आळ्या वेंचून टाकाव्या.

६ पिशवीनें धरणें :—वेंचणें शक्य नसतें त्या वेळीं पिशवीचा उपयोग त्या कामीं करतां येण्यासारखा आहे. एक कापडाची झोळी करून तिच्या कडेस ओढण्याकरितां काठ्या लावाव्या व पिकावर किडे असतील त्यावेळीं पिकावरून व त्याचे उलट दिशेस ही झोळी फिरवावी म्हणजे अनायासें ती फुगून त्यांत दरवेळीं बरेचसे किडे सांपडतात. सांपडलेले किडे अर्थात् पकडून मारावे. या पिशव्यांचा उपयोग बेळगांवकडे भातावर टोळ पडले होते त्या वेळेस फार चांगला झाला. लाखों टोळ पकडले गेले व त्यांचा उपद्रव कमी झाला.

आमिषः— आपण उंदीर पकडतांना आमिषाचा उपयोग करतों, किंवा कुत्र्याला विष घालतांना मांसाचा उपयोग करतों. किडे मारण्याकरितांही त्यांना आवडणारे असे विष–मिश्रित पदार्थ घालणें यांस आमिष देणें म्हणतात. किड्यांना पुष्कळ वेळां भिजविलेला व आंबविलेला भुसा फार आवडतो. पुष्कळ वेळां ताज्या व कोवळ्या पानांची रास केली असतां पुष्कळ किडे तिकडे जातात. अशा वेळीं या ताज्या पिकावर किंवा आंबवलेल्या भुशांत विष घातलें असल्यास तें खाऊन पुष्कळ किडे मरतात. हाही एक उपाय करण्यासारखा आहे.

कीटकनाशक औषधें, त्यांचा उपयोग व फवारे–

'प्रतिबंधक' उपाय (म्हणजे कीड उत्पन्न होऊं न देण्याचे किंवा झाल्यास ते वाढूं न देण्याचे) करून त्यांचा उपयोग न झाल्यास मारक उपायांचा अवलंब करणें प्राप्त आहे.'मारक' उपाय म्हणजे विषारी औषधें झाडांवर, पानावर, फुलांवर किंवा झाडास उपद्रव करणाऱ्या इतर भागांवर शिंपडून किडे मारणें. पण त्यांतहि सर्व प्रकारच्या किड्यांवर एकाच तऱ्हेचें औषध शिंपडून भागणार नाहीं. कारण शिंपडलेलें औषध त्यांच्या पोटांत जाऊन त्याचा परिणाम झाला पाहिजे. पण त्याच्यापूर्वीं हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, सर्व प्रकारच्या किड्यांच्या तोंडाची रचना सारखी नसते. मुख्यत्वेंकरून दोन प्रकारच्या जातींचे किडे आढळतात. टोळासारखें आपलें अन्न चावून खाणारे व दुसरे ढेंकणासारखें शोषून खाणारे किडे. तेव्हां अर्थातच झाडावर पडलेलें विष पहिल्या जातींच्या किड्यांच्या पोटांत झाडांच्या भागाबरोबर जाऊं शकेल. परंतु ढेकणासारख्या शोषून खाणाऱ्या किड्यांच्या पोटांत जाऊं शकणार नाहीं. कारण हें औषध झाडांच्या रसांत भिनलेलें नसतें. आणि हे किडे तर झाडांचा रस शोषून खातात. त्यामुळें औषध किड्यांच्या पोटांत न जातां बाहेरच राहतें.

तेव्हां दोघांना एकच प्रकारचें औषध लागू पडणार नाहीं. त्याकरितां दोन वेगळ्या प्रकारचीं विषें उपयोगांत आणलीं जातात.(१) जठर विष व (२) सांसर्गिक विष.

जठर–विषें—१ लेड असेंनेट
२ पॅरिस ग्रीन

सांसर्गिक विषः—१ फिश ऑईल रोझीन सोप (माशाच्या तेलाचा राळमिश्रित साबण)
२ क्रूड ऑईल इमल्शन.
३ राकेल मिश्रण
४ तंबाखूचें उकळण.
५ चुना व गंधक यांचें मिश्रण

हीं जठर विषें व सांसर्गिक विषें वापरण्याचें प्रमाण काय आहे हें पाहूं.

जठर विषें

लेड असेंनेटः––हें दोन प्रकारचें मिळतें. १ पूड, २ ओलें. हें दोन प्रकारानें वापरतां येतें. पूड म्हणून झाडावर टाकतां येते किंवा पाण्यांत मिसळून शिंपडतां येतें. सोमल व शिसें यांच्या रासायनिक संयोगानें झालेलें हें एक औषध आहे. हें सोमलासारखें विषारी आहे.

१ पूड–१००० (एक हजार) भाग पाण्यांत या औषधाचा एक ते दोन भाग घालून शिंपडावें.

२ ओलें–ह्यांत कांहीं पाण्याचा अंश असतो. ह्याचा एक भाग ६०० भाग पाण्यांत मिसळावा व झाडांवर शिंपडावें.

३ पूड टाकावयाची झाल्यास पुडीच्या आठ ते सोळापट वस्त्रगाळ केलेली धूळ किंवा राख मिसळून फडक्यांत घालून पानावर टाकावी.

पॅरिस ग्रीनः––हें औषध लेड असेंनेटपेक्षां जालीम आहे. त्यांतहि सोमल आहे. व हें सुद्धां पूड किंवा पाण्यांत मिसळून वापरतां येतें. हें जालीम असल्यामुळें याचें प्रमाण वरच्या (ले.अ.) च्या निम्मे पुरतें. सर्व प्रकारच्या आळचांवर हें औषध उपयोगी आहे. गुलाबाचीं पानें खाणाऱ्या भुंगेऱ्यावर हें चांगलें लागू पडतें. १ याचा एक भाग २००० पट पाण्यांत मिसळून शिंपडावें. पूड टाकण्याची असल्यास आठ ते सोळापट वस्त्रगाळ धूळ किंवा राख मिसळून टाकावी.

सांसर्गिक विषें:––

१ माशाच्या तेलाचा राळमिश्रित साबणः–– मद्रासकडे 'मत्स्यसंवर्धना'करितां एक स्वतंत्र खातेंच आहे. त्यामध्यें माशांचें तेल काढण्याचा कारखाना आहे.व या तेलापासूनच वर सांगितलेले साबण तयार करतात. हें औषध सर्व प्रकारचा मावा, नागवेलीवरील कीड, आंब्यावरील तुडतुडे वगैरे किडयांवर फार चांगलें लागू पडतें.

ह्याचें प्रमाणः––एक भाग साबण शंभरपट पाण्यांत मिसळून फवाऱ्यानें शिंपडावें.

२ क्रूड ऑईल इमल्शन––हें औषध तयार मिळतें. त्याचा उपयोग वरच्या औषधासारखाच होतो व प्रमाणहि तेंच घ्यावें.

३ रॉकेल मिश्रण––१ भाग साबण, १० भाग पाणी व २० भाग राकेल घ्यावें.

४ तंबाखूचें उकळण––हें औषध "थ्रिप्स" किडयावर फार उपयोगी आहे. म्हणून कांद्याच्या पातीवर जेव्हां थ्रिप्स येतात तेव्हां शिंपडावें.

प्रमाणः––एक भाग १० पट पाण्यांत सुमारें अर्धा तास उकळत ठेवावा व त्यांत पाव हिस्सा साबण मिसळावा अशा रीतीनें केलेल्या मिश्रणांत सुमारें ७ पट पाणी मिसळावें व शिंपावें.

५ गंधक व चुना यांचें मिश्रणः––या औषधाचा उपयोग मिरच्यावर मुर्दा किंवा बटाटयावर तांबेरा नांवाचे रोग होतात त्यावर फार चांगला होतो. कारण हे रोग होण्यास जो एक गोचिडासारखा "माईट" नांवाचा प्राणी कारण असतो तो त्या मिश्रणानें मरतो.

प्रमाण––४० पौंड कळीचा जुना (पौंड–४० तोळे.), ८० पौंड गंधक, ५०० पौंड पाणी.

वरील औषधें शिंपडण्यास फवारे, पिचकाऱ्या वगैरे साधनांचा उपयोग करावा म्हणजे काम चांगलें होऊन वेळ थोडा खर्च होतो.

सुधारलेलीं आऊतें

सुधारलेलीं आऊतें म्हणजे ज्यांचा उपयोग केल्यानें कमी खर्च लागून वेळेची व मेहेनतीची बचत होते तीं होंत. तीं आऊतें मग हिंदुस्थानांत तयार झालेलीं असोत किंवा परदेशांतून आणलेलीं असोत,त्यांत पूर्वीच्या आऊतांपेक्षां कांहीं सुधारणा झालेल्या असल्या पाहिजेत. तीं आऊतें:––

१ लोखंडी नांगर–साधे बैली व इतर शक्तीनें चालणारे. २ ढेंकळें फोडण्याचीं आऊतें–नॉरवेजियन हॅरो, क्रॉसक्रील क्रेशर. ३ कुळव–डिस्क हॅरो (तव्याचा कुळव). ४ पामरी–अमेरिकन पांच फणी पामर. ५ कोळपीं–प्लानेट जुनिअर हो. ६ खुरपणीचा हातकोळपा.७ कापणीचें यंत्र. ८ मळणी–नोराग (इजिप्शन), दगडी रूळ, गहूं मळणीचें यंत्र, भात मळणीचें यंत्र, मका सोलण्याचें यंत्र, भुईमुगाच्या शेंगा फोडण्याचें यंत्र. ९ उफणणी –उफणणीचें पंखायंत्र. १० लोखंडी पेटारी. ११ कडबा कापण्याचें यंत्र. १२ उसाचे लोखंडी चरक. १३ गूळ रांधण्याच्या कढया, १४ मळी काढण्याची चाळणी. १५ पत्र्यांचीं ढेंपाळीं. १६ पाणी काढण्याचीं साधनें–लोखंडी मोट,बैलरहाट,(नोरीआ) हातानें चालणारा सांखळीचा पंप, बैलानें चालणारा सांखळीचा पंप, आर्किमीडिअन स्क्रू, ऑईल एंजिन व पंप. यापैकीं कांहीं आऊतें प्रत्येक शतकऱ्यानें स्वतः खर्चानें घण्याजोगीं आहेत व कांहीं जास्त किंमतीचीं असल्यानें सहकारितेनें घेण्याजोगीं आहेत. वरील पैकीं बरींच आऊतें शेतकरी लोकांची कळकळ बाळगणाऱ्या लोकांनीं व

त्याचप्रमाणें भांडवलवाल्यांनीं विकत घेऊन तीं भाड्यानें देण्याचा प्रघात जास्त प्रमाणावर सुरू केल्यास त्यांत दोघांचाही फायदा आहे.

शेतीचीं जनावरें

हिंदुस्थानांतील लोकांच्या जीवनक्रमांत व खेड्यांतील आर्थिक व्यवस्थेंत जनावरांचें महत्त्व इतर सर्व गोष्टींपेक्षां अधिक आहे. हिंदुस्थानांतील दूधदुभत्याचे पदार्थ निर्यात होत नाहींत इतकेंच नव्हे तर देशाच्या गरजपुरतेही नाहींत. हाडें व कांतडीं यांचा मात्र थोड्या प्रमाणावर निर्यात व्यापार चालतो. परंतु हा व्यापार जनावरांच्या मालकांना मात्र फायदेशीर होत नाहीं. जनावरांची मोठ्या प्रमाणावर पैदास करणाऱ्या अर्जेंटाईन, आस्ट्रेलिया किंवा अमेरिकेचीं संयुक्त संस्थानें यापेक्षां हिंदुस्थानला जनावरांचें महत्त्व अधिक आहे. परंतु गरजेच्या मानानें पैदास मुळींच होत नाहीं म्हटलें तरी चालेल. १९२५ ते १९३० या पांच वर्षांत हिंदुस्थानांत गाईबैलांची शेंकडा अडीच टक्के वाढ झाली आहे खरी.; परंतु गेल्या दहा वर्षांत लोकसंख्याहि वाढली आहे व अधिकाधिक जमीन लागवडीखालीं येत आहे. मोटारीमुळें लांब पल्ल्याची बैलगाड्यांची वाहतूक कमी झाली आहे; परंतु बैलगाड्यांचीं संख्या एकंदरींत वाढलीच आहे. १९२० सालीं ५७ लक्ष बैलगाड्या हिंदुस्थानांत होत्या त्या १९३० सालीं ६८ लक्ष झाल्या आहेत. कारण शेतीवर तयार झालेला माल बैलगाडीनेंच वाहून न्यावा लागतो. शेतीच्या वाटणीमुळें लहान तुकड्याच्या मालकाला स्वतंत्र गाडी ठेवावी लागते. परंतु बैलाला व गाडीला सबंध वर्षभर पुरेल इतकें काम मिळत नाहीं.

जनावरांचें आर्थिक महत्त्व हिंदुस्थानाइतकें दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं. जनावरें म्हणजे लोकांचें जीवन व जनावरें म्हणजे सरकारचें उत्पन्न. हिंदुस्थानांत शेतीच्या कामास उपयोगी येणाऱ्या बैलांची मेहनत ६२४ कोटी रुपये किंमतीची असते. गाडीचे बैल १४६ कोटी रुपयांची मेहनत देतात. गाई व म्हशी मिळून दरसाल८१० कोटी रुपये किंमतीचें दूध, तूप, लोणी वगैरे देतात. २७० कोटी रुपयांचें खत मिळतें. साडेबावीस कोटी रुपये कातड्यापासून मिळतात. मेंढरापासून ३ कोटी रुपयांची लोकर मिळते व इतर जनावरांचें उत्पन्न मिळून १८९८ कोटी रुपये दरसाल जनारांच्यामुळें मिळतात. आहे या परिस्थितींत वैरणीचा योग्य व्यय करून व जनावरांचें संवर्धन करून जनावरांची कार्यक्षमता व दुग्धदायिता शेंकडा दहा टक्के जरी वाढविली गेली तरी दरसाल जवळजवळ १९० कोटी रुपयांचा देशाला फायदा होणार आहे. सरकारी अगर सार्वजनिक पैसा पशुसंवर्धनाकडेच अधिक खर्च व्हावयास पाहिजे. हिंदुस्थान सरकार याबाबत फारच थोडा पैसा खर्च करते अशी तक्रार १९३०–३१ च्या अहवालांतच केली आहे. "जनावरांची पैदास करणाऱ्या मोठ्या देशाशीं तुलना करतां अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांनीं मध्यवर्ति सरकाराकडून ४ कोटी ४८ लक्ष रुपये जनावरांच्या पैदाशीकरितां मंजूर केले होते. व हिंदुस्थान सरकारनें मध्यवर्ति खर्चांतून १४ लाख व प्रांतिक सरकारकडून ७८ लाख रुपये फक्त खर्च केले. पंजाब सोडून इतर प्रांतांत असलेले सरकारी सांड गरजेच्या मानानें एक सहस्त्रांशसुद्धां नाहींत."

पांजरपोळ व गोशाळा याबाबत हिंदुस्थानांत दरसाल कित्येक लक्ष रुपये खर्च केले जातात. कलकत्ता व मुंबई येथील पांजरपोळांचा दरसाल लाख दोन लाख रुपयांचा खर्च आहे. यांपकीं थोडीशी रक्कम जरी संवर्धनाकडे खर्च झाली तरी देशाचा फायदा होणार आहे.

महाराष्ट्रांतील शेतीचीं जनावरें

बृहन्महाराष्ट्रांत शेतीच्या कामास बैलांचा उपयोगच मुख्यत्वेंकरून होतो. सातारा जिल्ह्याचा पश्चिम भाग म्हणजे इस्लामपूर तालुक्याचा कांहीं भाग व कोल्हापूर संस्थानांतील मलकापूर कडचा भाग यांत रेड्यांचा उपयोग शेतकीकडे कांहीं प्रमाणावर केला जातो. दगड वहाण्याचे वडाराचे गाड ओढण्याच्या कामीं मात्र रेड्यांचा पुष्कळ ठिकाणीं उपयोग होतो.

खिलारी बल:—खिलारी जातीचे बैल शेतीच्या व वाहतुकीच्या कामाला फार चांगले असतात. हे बैल चपळ, मजबूत व देखणे असतात. सोलापूर जिल्ह्यांतील माळशिरस, पंढरपूर व सातारा जिल्ह्यांतील माण या तालुक्यांत व औंध संस्थानांतील आटपाडी महालांत खिलारी बैलांची पैदास चांगली होते. म्हसवड गांवीं दरसाल जत्रा भरते त्यावेळीं हजारों बैलांची खरेदीविक्री होते व एका बैलजोडीची किंमत पांचशें रुपयाच्याही वर जाते. औंध संस्थानांतील खरसुंडी गांवींही अशाच प्रकारची खिलारी बलांची जत्रा भरते.सातारा, सोलापूर, नगर हे जिल्हे व सांगली, मिरज, कोल्हापूर, जत हीं संस्थानें, खिलारी बैल म्हसवड, सांगोलें अथवा आटपाडी या भागांत

खरेदी करितात. या खिलारी जातीस 'म्हसवड खिलारी' असेंच नांव आहे. म्हसवड, सांगोलें, आटपाडी वगैरे भागांतील शेतकरी एकदोन खिलारी गाई बाळगतो व तिच्या होणाऱ्या गोऱ्ह्याच्या विक्रीवर आपली उपजीविका करतो. खिलारी जातीचे चांगले वळू बैल गांवोगांव रहावे म्हणून सरकारी पशुसंवर्धन खात्यानें आपला एक भाग-अधिकारी पंढरपुरास ठेविला आहे. या अधिकाऱ्यामार्फत वळू ठेवण्यालायख खिलारी गोऱ्हे खरेदी करून ते कांहीं अटींवर गांवकऱ्यांना दिले जातात. ठिकठिकाणीं ठेवलेल्या वळूंची संतति कशी काय होत आहे हें पाहण्याकरितां दरसाल या भागांतील एका लहानशा गांवीं प्रदर्शन भरविण्यांत येतें. यंदा खिलारी बैलांचें प्रदर्शन मोठ्या प्रमाणावर पंढरपूर येथें तारीख ८ ते १४ नोव्हेंबर पर्यंत भरविण्यांत आलें होतें. कोल्हापूर, सांगली वगैरे भागांत व्यापारी लोक म्हैसूरहून खिलारी बैल आणतात. या खिलारी बैलांना अमृतमहाल हें नांव आहे. व्यापारी त्यास म्हसूरी बैल असेंच म्हणतात.

तापी खिलारी :–– पश्चिम खानदेशच्या शहादें, शिरपूर, तळोदें, नंदुरबार, या भागांत खिलारीची अवलाद आहे. इकडील खिलारीस तापी खिलारी असें स्थानवाचक नांव आहे. या अवलादीचें संवर्धन होण्याकरितां सांगवी येथें सरकारी संवर्धन क्षेत्र आहे. खिलारी गाईंना दूध कमी असतें.

डांगी अथवा डोंगरी :––हे बैल डोंगराळ मुलुखांत कामाला फार चांगले असतात. बैल उंच नसून बांध्यानें मजबूत असतात. डांगी गाईंना दूधही म्हणण्यासारखें नसतें व बैलाला किंमतही फार येत नाहीं म्हणून या बैलांच्या संवर्धनाचे विशेषसे प्रयत्न नाहींत. ही जात नाशिक, नगर व ठाणें या तीन जिल्ह्यांच्या सरहद्दीजवळच्या भागांत म्हणजे इगतपुरी, अकोला व शहापूर या तालुक्यांत आहे. डोंगराळ मुलुखांत या जातीचें संवर्धन केल्यास शेतकऱ्यांना या बैलांचा चांगला उपयोग होईल. ठाणें जिल्ह्यांतील डोंबिवली गोशाळेनें डांगी जातीचा वळू बैल आसपासच्या खेड्यांतील संवर्धन कार्याकरितां ठेविला आहे.

सोनखेडी:––पश्चिम खानदेशच्या दक्षिण भागांत व नाशिक जिल्ह्याच्या उत्तर भागांत सोनखेडी नांवाची जात आहे. रंग विशेषतः तांबडा पांढरा असतो. गाईंना दूधही बरेंच असतें. बैल शेतीच्या कामालाही उपयोगी असतात. तथापि डांगी अथवा सोनखेडी यांत विशेष असा गुण कांहीं नसल्यामुळें या जाती कांहीं थोड्या भागांतच उपयोगी पडतात. मोठ्या प्रमाणावर संवर्धन करून प्रसार करण्यासारख्या या जाती नाहींत.

कृष्णाकाठी:––सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड, विटें, खानापूर, तासगांव व सांगली, कुरुंदवाड, अथणी वगैरे भागांत कृष्णाकाठी नांवाची बैलाची अवलाद आहे. गाईंना दूध बरें असतें. बैल देखणा असतो. काळ्या भुसभुशीत जमिनींत या बैलाचा फार उपयोग होतो.हा बैल खिलारी इतका चलाख नसतो. मद्रासकडील नेलोर जातीची ही अवलाद असावी असें म्हणतात. हल्लीं कृष्णा नदीच्या कांठच्या प्रदेशांत हीं जनावरें सुबलक आहेत म्हणून या जातीचें नांव कृष्णाकाठी असें पडलें आहे

माळवी:––ही जात माळव्यांत आहे. बैल पांढरे शुभ्र असून वाहतुकीच्या व मोटेच्या कामाला फार उपयोगी असतात. किंमतही फार पडत नाहीं. हेडे लोक हे बैल माळव्यांत खरेदी करितात व सातपुड्यांतील जंगलांत चारणीकरितां ठेवतात. व कार्तिक महिन्याच्या सुमारास हजारों बैलांचा तांडा घेऊन महाराष्ट्रांत व द. हैद्राबाद येथें येतात. निरनिराळ्या गांवीं जाऊन बैल उधार देतात. व परत जातांना पैसे वसूल करतात. या हेडे लोकावरून या बैलांना महाराष्ट्रांतले लोक 'हेडी बैल' असें म्हणतात. माळवी गायी मात्र महाराष्ट्रांत येत नाहींत. या बैलांच्या नेआणीमुळें गुरांचे सांसर्गिक रोग मात्र फैलावतात.

गुजराथी:––बडोदे भागांत कांक्रेजगीर व सोरटी जातीचीं जनावरें आहेत. हे सर्व गुजराथी प्रकार आहेत. गुजराथी जनावरें दुधाला चांगलीं असतात. सर्व प्रकारच्या गुजराथी गाई दुधाळ आहेत. गीर गाय रोज ५ ते ८ शेरपर्यंत दूध देते. व गीर बैलही शेतीच्या कामाला बळकट असतो. तथापि निरनिराळ्या जनावरांचा संकर झाल्यामुळें बडोदें संस्थानांत जनावरांची खालावलेली स्थिति सुधारण्याकरितां उपाय–योजना सुचविण्यासाठीं श्री. मणीलाल नानावटी यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. त्या कमिटीचा अहवाल १९२६ सालीं प्रसिद्ध झाला आहे. बडोदें संस्थानांत अमरेली प्रांतांत गीर, कडी, बडोदें व नवसारी प्रांतांत कांक्रेज याप्रमाणें संवर्धन क्षेत्रें उघडावीं अशी समितीनें शिफारस केली आहे.

नागपुरी:––मध्यप्रांत–वऱ्हाडांत स्थानिक

नांवानीं ओळखल्या जाणाऱ्या व गुणरूपांत भेद असणाऱ्या अशा बैलांच्या पांच जाती आहेत. १ गौळाव, २ उमर्डा, ३ खामगांव, ४ खारगांव, ५ नीमार. उमर्डा जात वऱ्हाडच्या पूर्व भागांत व खामगांव वऱ्हाडच्या पश्चिम भागांत आहे.नीमार जात खांडवा भागांत आहे. गौलाव गाईला रोज तीन शेरपर्यंत दूध असतें. बाकीच्या जातींना दूध कमी व बैलांनाही किंमत कमी यामुळें संवर्धनाकडे विशेष लक्ष नाहीं.

दक्षिणी अथवा गांवठीः––वरील सर्व प्रकारच्या बलांच्या संकरापासून झालेली ही जात आहे. किंबहुना ही स्वतंत्र जात म्हणतां येणार नाहीं. परंतु बहुसंख्य गरीब शेतकरी याच बैलांचा उपयोग करितात. बैलांच्या किंमती बेताच्या असतात व चालचलाऊ कामाला बैल ठीक असतात. पुणें जिल्ह्यांत अशा बैलांचा भरणा फार आहे. या गाईची संतति खिलारी अगर गीर बैलापासून झाल्यास पुष्कळच चांगली होईल.

महाराष्ट्रांत सरकारी संवर्धनक्षेत्रें पुढील प्रमाण आहेत. पंढरपूर, माळशिरस, सांगोलें, माण, विटें येथें म्हसवड खिलारी बलांचें सवर्धन केलें जातें. अकोलें, इगतपुरी, शहापुर, मुरबाड येथें डांगी बैलांचें संवर्धन केलें जातें. व कांदिवलि व मुलूंड येथें गोरक्षक मंडळी व सरकारी संवर्धनखातें यांच्या मदतीनें गीरबैलांचें संवर्धन चालू आहे.

शिरपूर, शहादें सिदखेड व नंदुरबार येथें तापी खिलारी जातीचें संवर्धन चालू आहे.नाशिक, धुळें, मुंबई, डोंबिवलि, पंढरपूर, कऱ्हाड, वांई, बार्शी सोलापूर वगैरे ठिकाणीं मोठमोठ्या गोशाळा अगर पांजरपोळ आहेत. परंतु शास्त्रीय पद्धतीवर संवर्धन सर्व ठिकाणीं सुरूं झालें नाहीं. पशुसंवर्धनाचा खाजगी प्रयत्न करणारी स्वतंत्र संस्था पुणें येथें पशुसुधारणा मंडळ या नांवानें सुरूं झाली आहे. परंतु दृश्य प्रगती दिसण्यास अजून अवकाश आहे. या मंडळानें हवेली तालुक्यांतील खेड्यांची जनावरांच्या स्थितीच्या दृष्टीनें पाहणी सुरूं केली आहे. पुणें जिल्ह्यांत शेतीच्या जनावरांची पैदास जवळ जवळ नाहींच.म्हसवड अगर खरसुंडी येथील जत्रेला जाऊन खिलारी बैल रोख पैसे देऊन आणण्याचेंहि परवडत नाहीं. म्हणून माळवी बैलांचा खप पुणें जिल्ह्यांत बराच होतो. पुण्याच्या आसपास वैरण मुबलक व चांगली होते. परंतु ती सर्व पुण्यास विकावयास येते. गीर अगर खिलारी यांपैकीं कोणतीही जात पुणें जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागांत उत्तम रीतीनें पैदा होण्यास हरकत नाहीं.

खिलारी जनावरांच्या यात्रा (पुष्कळ दिवस भरणारे मोठे बाजार).

ठिकाण	तालुका व जिल्हा	वेळ
म्हसवड	माण-सातारा	कार्तिक ३० ते मार्गशीर्ष शु॥ ६
नागोबा	" "	मार्गशीर्ष १५ते मार्गशीर्ष व॥ ९
खरसुंडी	औंध-सातारा	पौष शु॥१४पौष ते व॥६
करगणी	" "	माघ ३० ते फाल्गुन शुद्ध ४
जत	जत संस्थान	मार्ग. व॥ १२ ते मार्ग व॥ १४
सोलापूर	सोलापूर	संक्रांतीपासून पुढें १५ दिवस

कृष्णाकाठी जनावरांची यात्रा

चिंचली	कोल्हापूर–संस्थान	माघ व॥ १ ते माघ व॥ १४

डांगी जनावरांची जत्रा

म्हसा	मुरबाड–ठाणें	पौष शु॥ १५ ते पौष व॥ १३

शिवाय डांगी जनावरांची पैदास करणारे लोक नगर जिल्ह्यांतील अकोलें तालुक्यांत आहेत. व ते १ वर्षाचीं वासरें पितीं सुटलीं म्हणजे त्यांचे तांडे घेऊन दिवाळीनंतर अनेक खेड्यांतून हिंडतात व तीं शेतकऱ्यांना विकतात.

अडूरी बैलः––अशा गांवठी बैलांपैकीं ठेंगणे व आखूड बैल रत्नागिरी जिल्ह्यांत व्यापारी लोक नेतात. असे बैल पाटण, येलूर, व मलकापूर येथील बाजारांत खरेदी करून ते कुंभार्ली, अंबा वगैरे घाटांतून कोंकणांत नेले जातात. यांना अडूरी बैल म्हणतात व यांच्या किंमतीही प्रत्येकीं १५ ते ३० रुपयांपर्यंत असतात.

शेतीच्या जनावरांची संख्या

इ. स. १९१६ मध्यें हिंदुस्थान सरकारनें असा ठराव केला कीं, डिसेंबर १९१९ ते एप्रिल १९२० च्या दरम्यान सर्व हिंदुस्थानांतील जनावरांची खानेसुमारी करण्यांत यावी; अशी खानेसुमारी त्यानंतर दर पांच वर्षांनीं घेण्यांत यावी. संस्थानांतहि त्याप्रमाणें खानेसुमारी घेण्यांत यावी अशी विनंति करण्यांत आली. त्याप्रमाणें १९१९–२० व १९२४–२५ सालीं खानेसुमारी घेण्यांत आली. परंतु मोजणीची मुदत डिसेंबर ते एप्रिल असल्यामुळें व याच

वेळीं प्रांताप्रांतांतून जनावरांच्या नेआणी सुरूं असल्यामुळें खानेसुमारीचे निकाल तितकेसे बरोबर धरतां येत नाहींत म्हणून शेतकी कमिशनच्या शिफारशीप्रमाणें १९३० च्या जानेवारींत खानेसुमारी घेण्यांत आली. या तिन्ही खानेसुमारीचा हिंदुस्थानांतील गाईबैलांचा तक्ता पुढीलप्रमाणें आहे:—

ब्रिटिश हिंदुस्थानांतील जनावरांची खानेसुमारी

	१ ली	२ री	३ री
	१९१९–२०	१९२४–२५	१९३०
बिन खच्ची बैल	५६९४३४४	५३३७०९७	४६४००९८
खच्ची बैल	४३५२४०५९	४५७९५०१२	४७३७०९६९
गाई	३७१५१२०७	३७८७७१५७	३८७८५४६२
वासरें	३०९४८७९७	३१३५८६२६	३२१८७९९२
एकूण	११७३१८४०७	१२०३६७८९२	१२२९८४५२१

संस्थानें

	१ ली	२ री	३ री
बिन खच्ची बैल	१३४८९२८	१११९०५६	१८४८३९८
खच्ची बैल	६४३६४८५	८३९४६२३	१०६१७६८०
गाई	६८७०८४७	९०२२१४४	१२१३००३८
वांसरें	५०१०४७५	६७४७६६०	९२३३२०२
एकूण	१९६६६७३५	२५२८३४८३	३३८२९३१८

महाराष्ट्रांतील शेतीची जमीन व बैलजोडीचें प्रमाण चितळे कमिटीच्या रिपोर्टावरून

प. खानदेश	१५७५४२१	१४२६९५	२२.०८
पूर्व खानदेश	२०६१९८१	२०९३४३	१९.७
नाशिक	२४८१३८८	२२५३२९	२२.०२
अहमदनगर	३२१६४९०	२३९१६१	२६.९
पुणें	२६६३२२२	२०७४१४	२४.७
सोलापूर	२५२६४०७	१६५१०५	३०.६
सातारा	२३२४१४०	२२१६९८	२१.०५
ठाणें	१०४७१६०	१७२६०१	१२.१
कुलाबा	८०२१८४	१२३७५६	१२.९
रत्नागिरी	१८०८५७४	२५३०७५	१४.२

मुंबई इलाखा, मध्यप्रांत–वऱ्हाड व मराठी संस्थानें यांतील १९३० सालची गाईबैलांची खानेसुमारी

इ. स. १८८६ ते १९१६ पर्यंतची महाराष्ट्रांतील जनावरांची संख्या ४७ ते ५४ लक्षापर्यंत कमी-जास्त होत होती, परंतु निश्चित वर्गवारी उपलब्ध नाहीं.

शेतीला लागणाऱ्या योग्य बैलांचा भरपूर पुरवठा बृहन्महाराष्ट्रांतील शेतकऱ्यास होत नाहीं. बैलांच्या खरेदी विक्रीच्या पायीं शेतकरी कर्ज–बाजारी होत आहे. खिलारी बैलांखेरीज इतर बैलांची पैदास धंदा या दृष्टीनें विशेष फायदेशीर नाहीं. गाईंना दूध कमी असल्यामुळें फक्त बैल मिळण्याच्या आशेनेंच शेतकरी गाई पाळतात. गाईंना विशेष खुराक मिळत नाहीं. व बैलही खुरटे निपजतात. बैलगाड्यांचा धंदाहि दिवसेंदिवस अतिशय कमी झाल्यामुळें वर्षांतून कांहीं महिनेच बैलांचा उपयोग होतो व इतर वेळीं बैल विकून टाकावे लागतात किंवा फुकट पोसावे लागतात. जेव्हां बैलांना काम नसतें तेव्हांच वैरणीचा तुटवडा असतो. दिवसेंदिवस अधिकाधिक जमीन लागवडीखालीं येऊं लागल्यामुळें सार्वजनिक गुरचरणें कमी होऊं लागलीं आहेत. अशा वेळीं वैरणीचीं पिकें अधिकाधिक व्हावयास पाहिजेत व वैरणीचा व्यय काटकसरीनेंच झाला पाहिजे. पावसाळ्यांतील हिरवें गवत बांधीव खड्ड्यांत मुरवून उन्हाळ्यांत जनावरांस घालण्याचा प्रघात सार्वत्रिक व्हावयास पाहिजे. रानांत चरावयास कांहीं नसतांना पाला पाचोळा खाण्यास हुडकण्याकरितां जनावरांना बारा तास हिंडविणें व रात्रीं बांधल्यावर त्यास कांहींच खाऊं न घलणें यामुळें जनावरें फार खराब होतात. फक्त अर्धा तास मोकळें सोडून इतर वेळीं बांधून एक पेंडी घातली तरी पुरी होईल. गांवांत देवाच्या नांवानें वळू बैल सोडण्याची पद्धत होती ती अलीकडे मोडत चालली आहे. तरी तिच्या ऐवजीं खिलारी, गीर अगर डांगी वळू बैल स्थानिक जरूरीप्रमाणें ठेऊन बैलांची पुढील पिढी सुधारणें जरूर आहे. योग्य वळू बैलांचा तुटवडा सर्वत्र दिसून येतो. अयोग्य वळू सर्व चांगल्या गाईंची संततिसुद्धां बिघडवूं शकतो पण योग्य वळू वाईट गाईपासूनहि चांगली संतति देऊं शकतो.

पाणी कोठें लागेल? – महर्षि मनूनें पाणी ओळखण्याचीं स्थूल लक्षणें दिलीं

आहेत. तसेंच कालिदासाला समकालीन असलेले वराहमिहिर हे उत्तर हिंदुस्थानांत होऊन गेले. त्यांनींहीं आपल्या ग्रंथांतपाणी ओळखण्याच्या कांहीं खुणा सांगितल्या आहेत.

मनू व वराहमिहिर यांनीं ठोकळ मानानें पाणी पारखण्याच्या खुणा दिल्या आहेत. त्या— १ वृक्षाश्रित, २ वृक्षवारुळाश्रित, ३ भूपृष्ठांतील परिस्थित्यनुरूप, ४ वृक्ष परिस्थित्यनुरूप, ५ वनस्पत्याश्रित, व ६ पाषाण परिस्थित्यनुरूप असणाऱ्या जलखुणा. मनूनें पाणी परीक्षेचीं दिलेलीं स्थूल लक्षणें—(१) ज्या ठिकाणीं झाडेंझुडपें निरंतर गार राहतात, त्या ठिकाणीं पाण्याचे विपुल झरे आहेत म्हणून समजावें. (२) भुईकमळ, तालीमखाना, वाळा, चिकणा, वाघांटी, देवनळ, हृयाचीं बेटेंच्या बेटें जेथें आढळतात तेथें पाण्याचा पुष्कळ संभव असतो. (३) अर्जुनसादडा, शिंदी, जांभूळ, कळंब, करंज, निर्गुडी, नागकेशर, बेहेडा, मेंदी हीं झाडें जोरदार व गार असतात, त्या ठिकाणीं १५ हात खोलींत पाणी मिळेल. (४) ज्या ठिकाणच्या दगडाचा रंग वैडूर्य मण्यासारखा 'मोत्यासारखा' मेघासारखा, किंवा उंबराच्या फळासारखा असतो त्या जागेला बरेंच पाणी सांपडेल. (५) ज्या जागेतील दगडाचा रंग मध, तूप, पारवा, तांबडें वस्त्र वगैरेसारखा आढळेल त्या दगडाखालीं कायम टिकाऊ पाणी मिळेल.

वराहमिहिर यांचे सिद्धांतः—(१) वेताचें बेट असेल, त्याच्या पश्चिमेस सुमारें तीन हातापलीकडे ७॥ हात खोलींत पाणी मिळेल. (२) जांभळीच्या वृक्षाच्या उत्तरेस १० हाताखालीं, पूर्वेकडून पाणी मिळेल, त्याच वृक्षाच्या पूर्वेस वारूळ, आढळेल तर त्याच्या दक्षिणेस १० हात खोलींत चांगलें गोड पाणी मिळेल, (३) औदुंबर वृक्षापासून ३ हात जागा सोडून १२॥ हात खोलींत चांगलें पाणी मिळेल. (४) अर्जुन वृक्ष म्हणजे अर्जुन सादडा वृक्षाच्या उत्तरेस वारूळ आढळेल तर त्यापासून ३ हातांपलीकडे १७॥ हात खोलींत पाणी मिळेल, (५) निर्गुडीच्या झाडाखालीं वारूळ असेल तर, तीन हातांपलीकडे १५ हात खोलींत पाणी मिळेल, (६) पळस व बोर एकत्र असून, त्यांच्याजवळ वारूळ असेल तर, ३ हातांपलीकडे १६॥ हात खोलींत पाणी मिळेल, (७) बेल व उंबर एकत्र वाढलेले आढळतील, तर त्यांच्या दक्षिणेस ३ हातांपलीकडे १५ हातांवर पाणी मिळेल. (८) बेहड्याच्या झाडाच्या दक्षिणेस वारूळ असेल तर, त्या वृक्षाच्या पूर्वेस, दोन हातापलीकडे ७॥ हात खोलींत पाणी मिळेल. (९) सातविणीचा वृक्ष वारुळाश्रित असेल तर, त्या वृक्षाच्या उत्तरेस २५ हातांखालीं उत्तरेकडून आलेला गोड पाण्याचा झरा मिळेल. (१०) करंज वृक्षाच्या दक्षिणेस वारूळ असेल तर २ हातांपलीकडे १५ हात खोलींत झरा लागेल. (११) मोहाचे झाडाचे उत्तरेस वारूळ असेल तर, त्याच्या पश्चिमेस पांच हातांपलिकडे दक्षिण बाजूस ११॥ हात खोलींत गोडें पाणी मिळेल. (१२) कळंब वृक्षाच्या पश्चिमेस वारुळ असेल तर, त्या वृक्षाच्या दक्षिणेस ३ हातांपलीकडे २८॥ हात खोलींत उत्तरेकडील झऱ्याचें पाणी लागेल. (१३) ताड किंवा नारळीचा वृक्ष वारुळाश्रित असेल तर, त्या वृक्षाच्या पश्चिमेस ६ हातांपलीकडे २० हात खोलींत दक्षिणेकडून झरा लागेल. (१४) कवठीच्या झाडाच्या दक्षिणेस वारूळ असेल तर त्या वृक्षाच्या उत्तर दिशेस ७ हात सोडून २५ हात खोलींत पाणी मिळेल. (१५) जेथें खैराचें रान असून, मध्येंच पळसासारखीं बिनकाटेरीं झाडें असतात, त्या ठिकाणी १५ हात खोलींत पाणी मिळेल. (१६) पांगारा व पळस हे पांढऱ्या फुलाचे जेथें आढळतात, त्यांच्या उत्तरेस दोन हात जागा सोडून १५ हात खोलींत पाणी मिळेल. (१७) अक्रोड वृक्षाजवळ वारूळ असेल, तर ५ हात पलीकडे पश्चिम दिशेस २५ हात खोलींत पाणी मिळेल. (१८) कण्हेर वृक्षाच्या उत्तर दिशेला वारूळ असेल तर त्याच्या दक्षिण दिशेला ४ हात जागा सोडून ५० हात खोलींत पाणी मिळेल. (१९) पळस, उंबर व वड हे एकत्र आढळतील तर त्यांच्या खालीं १५ हात खोलींत उत्तरेकडून येणारा झरा आढळेल. (२०) कोरड्या प्रदेशांत वाळा, दूर्वा, लव्हाळा हे आढळेल तर त्याजागीं ५।७ हात खोलींत पाणी मिळेल. (२१) नरम जमिनीवर ठोकलें असतां गंभीर असा ध्वनि येईल तर १७॥ हात खोलींत उत्तरेकडून वाहणारा झरा मिळल. (२२) जेथें पांढऱ्या फुलांनीं युक्त, कांटयाखेरीज, कांटे रिंगणीचीं झाडें आढळतील, त्या ठिकाणीं १७॥ हात खोलींत पाणी सांपडेल. (२३) ज्या ठिकाणीं वृक्ष सदोदीत गार असतात त्यांच्या दक्षिण दिशेस २० हात खोलींत मुबलक पाणी मिळेल. (२४) बोरीच्या झाडाच्यापूर्वेस वारूळ असेल,तर तीन हातांपलिकडे ३७॥हात खोलींत पूर्वेकडून झरा लागल.

पाणाड्याचें कसब

युरोपखडांत फार प्राचीन काळापासून जमितींतील धातूंचा शोध लावणें, गुन्हेगार हुडकून काढणें, पुरलेलें धन हुडकून काढणें इत्यादि कामीं डिव्हायनिंग रॉडचा (हेरणाराची यष्टि) उपयोग करीत असत. १४३० सालच्या लेखांत खाणीचा शोध लावण्यास रॉडचा उपयोग होतो, असा उल्लेख आहे; पण ही विद्या सामान्य प्रकारच्या लोकांच्या हातांतच राहिलेली होती. आपण काय करतों व म्हणून आपल्याला भूगर्भांतील हीं धनें माहीत होतात हें त्यांस सांगता येत नसल्यामुळें व आपली यष्टि चालवितांना त्याच्या अंगांत कांहीं संचार होतोसा दिसत असल्यामुळें या माणसानें भुताखेतांशीं ओळख करून घेऊन तिच्या द्वारा हें ज्ञान संपादिलें आहे असें सामान्य लोक समजत असत. आधुनिक शास्त्रविचार हा अजून उद्‌भवलाच नसल्यामुळें आपल्याला न कळणाऱ्या अशा अद्‌भुताची मीमांसा देव किंवा सैतान यांच्या आश्रयानेंच ते करीत असत. पण समाजांतले जे प्रतिष्ठित, उच्च दर्जाचे व धर्माचा अभ्यास करणारे लोक ते या कामांत पडले नसल्यामुळें त्यांत पडलेल्या लोकांच्या हीन दर्जाकडे पाहून लोकांनीं असें ठरविलें कीं, या कसबी लोकांना सैतानाचाच आश्रय असावा. आतां सैतानाचा आश्रय जरी म्हटला तरी त्याची फलश्रुति फायद्याची असल्यामुळें लोक आपलीं कामें या कसबी लोकांकडून थोड्या गुप्तपणानेंच कां होईना, पण करून घेत.

पाणाड्यांचा धिक्कार

देवाची मर्जी या प्रकरणीं काय असेल हें आपल्याला माहीत आहे असें ज्यांना वाटत होतें त्यांनीं या कसबी लोकांचा व त्यांच्या कसबाचा केवळ धिःकारच चालविला होता. गमतीची गोष्ट ही कीं, खुद्द मार्टिन लूथर यानें, हें कसब जे कोणी चालवितात ते परमेश्वराच्या आज्ञादशकांतील पहिली आज्ञा मोडतात असा अधिकारवजा अभिप्राय प्रगट केला होता! मग इतर सटर फटर उपाध्याय लोक काय बोलत असतील हें सहज उमगण्यासारखें आहे. पण उपाध्यायाचे अभिप्राय बाजूस राहून लोकांचा प्रत्यक्ष फायदा करून देणारें हें कसब काय आहे याकडे वरिष्ठ दर्जाच्या लोकांचेंसुद्धां लक्ष जाऊं लागलें. इ. स. १५५६ त ॲग्रिकोला यानें या प्रकरणाचा विचार केला व "सर्वांच्याच हातीं रॉड फिरत नाहीं, त्याअर्थी पाणी किंवा खनिज व रॉड यांचा अंतःस्नेह नसून ज्या माणसाच्या हातांत तो चलित होतो, त्याच्या अंगच्या गुणांचा म्हणजे देहधर्माचा कांहीं गुण असावा" हें त्यानें प्रतिपादिलें. १६ व्या शतकाच्या मध्यकाळांत सोन्यारुप्याच्या खाणी शोधून काढण्याच्या कामीं असल्या यष्टीचा उपयोग सरसहा चालू होता. हा उपयोग इतका सार्वत्रिक झाला कीं, यष्टीच्या उपयोगांतील नवीनपणा आणि "भुताटकी" अजीबात नष्ट होऊन शोधकांच्या धंद्यांत तिला चांगली प्रतिष्ठा आणि संभावितपणा हीं प्राप्त झालीं. फ्रान्स देशांतील बोसोलीद येथील जहागीरदारणीनें खनिज द्रव्यें व पाणी हीं हुडकून काढण्याच्या कामीं असल्या यष्टीचा उपयोग फारच केला, व पुढील लोकांच्या माहितीसाठीं या पद्धतीनें आपण कोणकोणच्या खाणी हुडकून काढल्या त्यांचीं नावेंहि तिनें लिहून ठेवलीं आहेत. इतकें झालें तरी उपाध्यायांचे शिव्याशाप चालूच होते.

जॅक्स अझाद

खनिज किंवा पाणी सांपडत नाहीं असें त्यांस म्हणतांच येण्यासारखें नव्हतें. पण हें सगळें सैतानांच्या द्वारां प्राप्त होतें हीं यांची तक्रार होतां होतां जॅक्स अझाद हा पाणाड्या जोरानें पुढें आला. कांहीं विशिष्ट ठिकाणीं आपल्या हातांतील रॉड जोरानें वळतो हें त्यानें पाहिलें, इतकेंच नव्हे तर कांहीं विशेष प्रकारची माणसें आपल्यासमोर असतानांही तो वळतो, असेंहि केव्हां केव्हां त्याला दिसूं लागलें. आपल्या अंगीं ही काय शक्ति आहे याचें जरी त्याला सोपपत्तिक ज्ञान होईना तरी ती आहे याची प्रतीति मात्र त्याला चांगलीच झाली. मोठमोठाले गुन्हेगार हुडकून काढण्याच्या कामीं त्यानें या यष्टीचा उपयोग केला व त्याला या कामीं अद्‌भुत यश मिळालें. इतकें कीं, शेवटीं त्याला राजदरबारीं पाचारण झालें. त्यानें केलेल्या शोधांच्या हकीकती सरकारी दप्तरांतहि नमूद आहेत. सतत दहा वर्षेंपर्यंत या जॅक्सच्या संबंधाच्या हकीकती फ्रेंच पत्रांतून भरभरून येत होत्या. शेवटीं लोकांना एवढी गोष्ट कळून चुकली कीं, कांहीं कांहीं माणसांना प्राप्त होणारी कां होईना पण ही एक उपयोगी विद्या आहे.

अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास प्लेटन हा प्रसिद्ध पाणाड्या जन्माला आला. सातआठ वर्षांचा असतांना तो सहज एका दगडावर बसला होता; तेथें त्याला भोंवळ आली; लोकांनीं त्याला दूर उचलून नेतांच भोंवळ गेली; त्या दगडावर तो येऊन बसतांच पुनः भोंवळ आली,

तेव्हां इतक्या लहानपणींच त्याच्या ध्यानांत आलें कीं, रॉड चालविणारे पाणाडे असतात म्हणून जें आपण एकतों त्यांतलेच आपणहि कदाचित् असूं. दगडाखालीं खणून पाहतां तेथ प्रत्यक्षच पाण्याचा प्रवाह सांपडला ! मग तो याच नादास लागला. रॉड हातीं घेतांच त्याला आंचके बसत. हवा कोरडी असली तर व जेवणाच्या आधीं हें फार होई. जमिनीवरचें वाहतें पाणी किंवा भुई-तील सांठलेलें पाणी याचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नसे. पण भुईच्या पोटांत जर पाण्याचा प्रवाह असला तर मात्र त्याला आंचके बसूं लागत. या लहानग्या पाणाड्याची परीक्षा नानाप्रकारें पहाण्यांत आली. त्याला माहीत नसलेल्या पाणप्रवाहावरील भूपृष्ठावरून डोळे बांधून त्याला चालत नेलें तरी त्याचें अंग थडथडूं लागे व तो म्हणे कीं, खालीं पाणी असलें पाहिजे. इतकें होतांच शेंकडो गरजू लोक आपापल्या शेत-वाड्यावर त्यास नेऊं लागले व आश्चर्य हें कीं, अनेक केवळ माळरान जमिनी त्यानें पाणी दाख-वून दिल्यामुळें अतिशय सुपीक बनून गेल्या.हें बोलणें केवळ सांगोपांगी नाहीं तर ज्यांचा असा फायदा झाला त्यांच्या स्वदस्तुरच्या लेखी जबान्या शिल्लक आहेत. अनेकांनीं अनेक शंका आल्या. शास्त्रज्ञांनी त्यांचें ज्ञान अशास्त्रीय आहे असे शेरे दिले. पण त्याच्या अंगीं पाणी दाखवून देण्याची शक्ति आहे ही जी प्रयोगसिद्ध गोष्ट ती कोणास नाकबूल करतां येईना.

पॅरमिल नांवाचा दुसरा एक मोठा पाणाड्या होऊन गेला. त्याच्या गांवचे सरकार १८४३ सालच्या आपल्या दप्तरांत म्हणतें, "पेरॅमिलनें दाखवून दिलेल्या एकंदर ३३८ जागीं आम्ही विहिरी काढल्या. पैकीं ३०५ जागीं बख्खळ पाणी लागलें" पंचवीस वर्षांत १०,००० ठिकाणीं त्यानें पाणी आहे असें सांगितलें व लोकांचा त्याच्या-वरील विश्वास इतका कायम झाला होता कीं, त्यांपैकीं ९,००० ठिकाणीं लोकांनीं विहिरी खोदल्या. फ्रान्समध्यें ३० परगण्यांत मिळून त्यानें एकंदर ६००० ठिकाणीं पाणी सांपडवून दिलें.

भूगर्भशास्त्र्यांचें मत

या सर्व गोष्टींना सरकारी कागदोपत्रीं भक्कम पुरावा आहे. कित्येक भूगर्भशास्त्री त्याच्या ज्ञानाची हेटाळणी करीत. पण कांहीं जाड्या पंडितांनीं त्याची शक्ति खरी मानली आहे व तसें लिहून ठेविलें आहे. सर आर्चिबाल्ड गीका हा जो महान् भूगर्भशास्त्री आहे त्यानें एकदां म्हटलें कीं, माझी या प्रकरणीं अजून खात्री झाली नाहीं. पण या बाबतींत पुढें आलेला पुरावा इतका मनांत भरतो कीं, याच्याविरुद्ध बोलणें बरोबर वाटत नाहीं! पुढें अनेक शास्त्रवेत्त्यांनीं या कलेवर पूर्ण विश्वास असल्याचें कबूल केलें व शेवटीं कॉनकॅलमधील रॉ. ए. स्त्रे. अध्यक्ष जो एनिस तो स्वतःच ही कला शिकला व पाणाड्याचे प्रयोग करूं लागला !

सर हेन्री हार्बेन याच्या मळ्यावर पाण्याची टंचाई फारच भासूं लागली. इतर सटरफटर इलाज करून पुष्कळ पैसा नासल्यावर प्रसिद्धीस चढूं लागलेला पाणाड्या जो मुलिन्स त्यास त्यानें बोलाविलें. इकडच्या परगण्यांत मुलिन्स हा पहिल्यानेंच आला होता. त्यानें आपला रॉड हातीं घेऊन या जमिनदाराच्या मळ्याची बार-काईनें पहाणी चालू केली. एके ठिकाणीं भुईच्या पोटांतून एक लहानसा प्रवाह झुळझुळत जात होता. तो पुढें पुष्कळ खालीं प्रकट झाला होता. पण हें त्याला माहीत नव्हतें. जमिनदार व तो असुक एके ठिकाणीं येतांच त्याच्या हातांतील दुवेळकें (रॉड) थडथडूं लागलें. तो म्हणाला, खालीं पाणी असलें पाहिजे. हार्बेनला आश्चर्य वाटलें. मग चांगली पहाणी करून मुलिन्सनें जेथें जेथें दाखविलें तेथें तेथें विहिरी खोदल्या व त्यांस भरपूर पाणी लागलें, विशेष हें कीं, किती हातांवर पाणी लागेल, किती जोराचें लागेल याही बाबी मुलीन्स अचुकपणें सांगूं लागला! कित्येक प्रसंगीं असें झालें कीं, भूगर्भशास्त्रवेत्त्यांनीं निर्वाळा द्यावा कीं, अमुक ठिकाणीं पाणी कधींहि लागवयाचें नाहीं आणि मुलिन्सनें सांगावें कीं, येथें लागेलच लागेल; व खणून पहावें तों त्यानें सांगितलेल्या खोलीवर जोराचें पाणी लागावें! हा मुलिन्स १८९४ त सालीं वारला.

शास्त्रचिकित्सा फार जोराची चालू झाल्यानंतरच्या काळीं हा झालेला असल्या-मुळें व त्याच्या प्रयोगाच्या खरेपणाबद्दल शेंकडों अमीर उमरावांनीं व शिष्ठ गृहस्थांनीं स्वदस्तु-रची जबानी लिहून ठेवलेली असल्यामुळें पाणी हेरून काढणें ही एक विश्वास्य विद्या आहे हें मत संभावितांत कायम झालें. याच सुमारास दुसरा पाणाड्या जो लॉरेन्स त्यानेंही जवळ जवळ सत्तर वर्षें आपल्या या शक्तीचा उपयोग जनतेस करून दिला. त्याच्या प्रयोगाबद्दल शेंकडों लोकांनीं निर्वाळा दिला आहे. कार्डिफ यथील कागदाचे कारखानदार म्हणतात, "तुम्हीं दाखविलेल्या जागीं आम्हीं विहिरी खोदल्या. एक ३१ फूट खोल

जातांच ताशीं २०००० गॅलन्स इतकें पाणी सांपडलें. दुसरीला ताशीं १४००० गॅलन्स इतकें लागलें!" ब्रिस्टल येथील म्यु. चॅरिटी ट्रस्टीजनीं त्यास लिहून कळविलें कीं,तुमचा अजमास अगदीं सोळा आणे खरा ठरून विहिरीला बख्खळ पाणी लागलें आहे. येथें पाणी लागेल असें कोणीं म्हटलें असतें तर खरेंसुद्धां वाटलें नसतें.

पाश्चात्य पाणाडे

विल्यम स्टोन, बेंजामिन, टॉम्किन्स, लीस्टर गॅटेंकर वगैरे पुष्कळ पाणाडे इंग्लंडांत झाले, व सध्यांहि आहेत. युरोपच्या भूमीवरही अनेक झाले व आहेत. त्यांचीं नांवें किंवा त्यांनीं केलेल्या प्रयोगाचीं वर्णनें देण्याची जरूरी नाहीं. पाणाडे जो रॉड करतात तो म्हणजे एक दुवेळकें असतें. कुबडीचा भुईवर टेकावयाचा दांडा बहुतेक छाटला व तिचीं शिंगें थोडीं वाढविलीं तर हा रॉड होईल. यूल नांवाच्या झाडाची फांदी तोडून आणून तिचा हा बनवितात. शिंगांचीं टोकें दोन हातांनीं धरून रॉडचा बुंधा आपल्या विरुद्ध दिशेला क्षितिजाकडे धरावयाचा. खालीं पाणी असलें तर कांहीं लोकांच्या हातांत हा रॉड थडथडूं लागतो, व त्याच्या त्याच्या अंगांत कांहीं चमत्कारिक वेदना होतात. वेदना होतांच पाणाडया ठासून सांगतो कीं, या ठिकाणीं म्हणजे जमिनीच्या ज्या टवक्यावर तो उभा असेल तेथें पाणी आहे. सरावानें हें पाणी किती खोलीवर लागेल व किती पुष्कळ लागेल हेंही त्यास सांगतां येऊं लागतें. मात्र हें पाणी प्रवाही असलें तर मात्र सांगतां येतें. नुसतें सांचवणीचें असेल तर सांगतां येत नाहीं.

दुष्काळाचें कालानुक्रमवार टिपण

१३९६ दुर्गादेवीचा दुष्काळ हा सतत १२ वर्षें चालू होता. नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व हिंदुस्थान भागांत याचा प्रसार झाला.

१८०२–३ सर्व दक्षिणदेश व कर्नाटक कोंकण प्रांतांतील ठाणें व रत्नागिरी. हा दुष्काळ यशवंतराव होळकरांच्या फौजेनें इकडील खेडींपाडीं लुटलीं व पिकांची नासाडी केली त्यामुळें पडला. हाच क्रम पुढें पेंढाऱ्यांनीं सुरू ठेवला.ज्या जिल्ह्यांतून धनधान्य उध्वस्त झालें नव्हतें तेथें बाहेरील लोक अन्नान्न करीत आल्यामुळें दुष्काळ भासला. पेशवे सरकारनें धान्याची आयात वाढविली आणि तें फुकट वाटलें.

१८१८ सोलापूर. बाजीराव पेशवे यांच्या फौजफाट्यानें शेतें उध्वस्त केलीं. त्यांतच त्यावर्षी पिकेंही आलीं नाहींत. कॉलऱ्याची सांथ जोरानें फोफावली. १८१९–२० पुणें, सोलापूर व विजापूर. पुणें, सोलापूर जिल्ह्यांत कॉलरा, व पावसाचें अवर्षण. विजापूर जिल्ह्यांतही पावसाचें अवर्षण.

१८२४–२५–दक्षिणदेश, कर्नाटक व कोंकण. पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ. बऱ्याच लोकांनीं देशत्याग केला. गुराढोरांची हानि. बहुतेक जिल्ह्यांत वसुलाची सूट. सरकारनें दुष्काळ–कामें सुरू केलीं.

१८३२–३३दक्षिणदेश व कर्नाटक. पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ. धान्यावरील जकात उठविली होती तरी बाजारभाव रुपयांस ५ ते ६ शेर पर्यंत चढला होता. खाजगी दानधर्म मुबलक झाला. सरकारनें दुष्काळकामें चालू केलीं. १८३४–खानदेश. पाऊस थोडा पडला, त्याकारणानें पिकें आलीं नाहींत. १८३८ ते ३९–खानदेश व ठाणें. पाऊस न पडल्यामुळें वसूलाची सूट बरीच द्यावी लागली. पुष्कळ खेडीं कांहीं काळ ओस पडलीं.१८४४–खानदेश व पुणें. पाऊस पडला नाहीं. हलाखीचे दिवस. अन्नान्न होऊन फार लोक मेले.१८४५–दख्खन. पावसाचा अभाव. कांहीं प्राणहानि झाली. १८४६–दख्खन. या प्रांतांत धान्याची कमतरता तशीच चालू होती. १८४८–कुलाबा व ठाणें. (उन्हाळ्यांतील भरतीमुळें खाऱ्या जमिनींतील भाताच्या पिकाचें अपरिमित नुकसान झाल्याकारणानें एकंदर सूट ३७००० रु. पर्यंत दिली. १८५२–कुलाबा. ता.७ ते १२ डिसेंबरपर्यंतसतत अतीशय पाऊस झाल्यामुळें शेतांत रचलेल्या धान्याच्या कणग्यांची खराबी झाली. १८५३–सोलापूर, विजापूर, कुलाबा, आणि ठाणें. पाऊस पडला नाहीं. सर्व मुख्य मुख्य पिकें बुडालीं. १८५४–कुलाबा व ठाणें. पिकें उत्तम आली. परंतु कापणी झाल्यानंतर भयंकर वादळ व पाऊस झाल्यामुळें सर्व नासाडी झाली. पुष्कळ भारी किंमतीचीं फळझाडें उपटून, मोडून पडलीं. वसूल सूट मुबलक देणें जरूर पडलें. नाशिक, सोलापूर व विजापूर, पाऊस अगदीं कमी पडला. बरेच लोक देश सोडून गेले. दुष्काळ–कामें सुरू केलीं होतीं. १८५५–ठाणें, कुलाबा. पावसाळ्यास सुरवात ठीक झाली, परंतु पुढें पाऊस थोडा पडला. तयार केलेल्या भातखाचरांपैकीं सुमारें सहावा हिस्सा जमिनींत पेरणी झाली नाहीं. आणि पेरणीपैकीं आलेल्या रोपट्यांचा नाश झाला. एकंदर नुकसान पुष्कळच झालें.

दुष्काळी क्षेत्रांची विभागणी

दुष्काळाची जास्त भीति			दुष्काळाची कमी भीति			दुष्काळाची भीति नाहीं		
जिल्हा, तालुका किंवा तालुका विभाग	क्षेत्र चौरस मैल	लोकसंख्या १९२१	तालुका किंवा तालुका विभाग	क्षेत्र चौरस मैल	लोकसंख्या १९२१	तालुका किंवा तालुका विभाग	क्षेत्र चौरस मैल	लोकसंख्या १९२१
पश्चिम खानदेश			सबंध जिल्हा	६४०१	६४१८४७			
पूर्व खानदेश			सबंध जिल्हा	४५५१	१०७५८३७			
नाशिक								
येवलें	४०९	४८४०८	नाशिक (अर्धा)	२३५	६७३१५			
नांदगांव	४४६	४८५४१	सिन्नर	५१८	५९३७५	नाशिक (अर्धा)	२३५	६७३१५
मालेगांव	७७७	१००८८८	निफाड	४०८	७६८१०	इगतपुरी	३९४	७६०७७
			बागलाण	५९९	६४७९८	दिंडोरी	५३२	६३८०८
			कळवण	५२१	५८६५६	पेठ	४३३	५३४२४
			चांदोर	३७०	४७१६१			
अहमदनगर								
आकोला वगळून सर्व जि.	६०३०	६६२९४४	अकोला (अर्धा)	२९०	३४३०४	अकोला (अर्धा)	२९०	३४३०४
सोलापूर								
बार्शी खेरीज सर्व जिल्हा	३९५९	६०९१६१	बार्शी	५९७	१३२८४९			
पुणें								
हवेली (पाव)	१५८	५८९३२	हवेली (अर्धा)	३१४	१७१८६२	हवेली (पाव)	१५८	८५९३२
जुन्नर (पाव)	१४८	२४७०६	खेड (अर्धा)	३२३	५१६४०	मुळशी	१९३	२५६५४
शिरूर	६०१	६०८३४	जुन्नर (पाव)	१४८	२४७०६	मावळ	३८६	७१६२९
पुरंदर (अर्धा)	२३८	३५५५९	आंबेगांव (पाव)	५८	८९३६	खेड (अर्धा)	३२३	५१६४१
बारामती	६५८	९८६९०	पुरंदर (अर्धा)	२३८	३५५६०	जुन्नर (अर्धा)	२९६	४९४१४
दौंड	३७८	३८९९९				अम्बेगांव (पाऊण)	१७२	१६८०८
इंदापूर	५६७	६०५३१						

सातारा								
खंडाळे	१५२	२२३७८				सातारा (अर्धा)	१६९	५५९४९
वाळवें	३०४	१०८०२७	सातारा (अर्धा)	१७०	५५९४९	जावळी	३३७	५२०१४
माण	६३८	५५९१८	कोरेगांव	३४५	७१३७९	महाबळेश्वर	८८	१५८३०
खटाव	५०२	७९४२४	वांई	२३८	५९७१४	पाटण	५०५	११३८६९
खानापूर	५०२	७४१७४	कऱ्हाड	३७७	१३०७०६	शिराळें	२४५	५२१०२
तासगांव	३३८	७८८२६						
बेळगांव								
पारसगड	६३८	१००२६६	बेळगांव जि.सांपगांव	४०९	११२२०१	बेळगांव	६४४	१४३४६१
गोकाक (पाव)	१६८	३२१८४	गोकाक (पाऊण)	५०३	९६५५१	खानापूर	६३३	७०५१२
चिकोडी (पाव)	१२३	४०९२१	चिकोडी (पाऊण)	३७१	१२२७६२			
अथणी	७७९	१२४६७८	हुक्केरी	३४३	१०८६८०			
विजापूर सबंध जिल्हा	५७०७	७९६८७६						
ठाणें						ठाणें जिल्हा	३४३४	७५१९१६
मुंबई सबर्बन						मुंबई सबर्बन जिल्हा	१४२	१५२८४०
कुलाबा						कुलाबा जिल्हा	२१६९	५६२९४२
रत्नागिरी						रत्नागिरी जिल्हा	३९८९	११५४२४४
धारवाड			धारवाड (अर्धा)	२१६	५४१५३	धारवाड (आर्धा)	२१६	५४१५२
गदग	६९९	१३९३४४	हुबळी (पाऊण)	२३३	९६७५१	हुबळी (पाव)	७८	३२२५०
नवलगुंद	५६७	१०३६१०	बंकापूर (पाऊण)	२५८	५६६२३	कलघटगी	२७५	३९६७५
रोण	४३२	१०३०४६	राणेबन्नूर (अर्धा)	२०३	४८८२४	बंकापूर (पाव)	८६	१८८७४
			करज्गी (पाऊण)	३३२	७१४२२	हांगल	२९९	६२४७७
						कोड	४००	८३१९१
						राणेबन्नूर (आर्धा)	२०२	४८८२४
						करज्गी (पाव)	११०	२३८०८

१८६२–दक्षिण प्रांत. अवर्षण. दुष्काळ कामें सुरूं होतीं. सरकारी नोकरींतील कमी पगारदारांस महागाईबद्दल मोबदला दिला. १८६५–६६ धारवाड. बरीच जमीन कापूसपेरणीकडे खर्च झाल्यामुळें धान्याचे भाव वाढले. पाऊस कमी पडला. १८७६–७७–दक्षिणदेश व कर्नाटक. अवर्षणामुळें हा मोठा दुष्काळ पडला.एकंदर नऊ जिल्हे (५०००० चौ. मैल) यांत सांपडले. ८०,००००० लोकांना हा दुष्काळ जाणवला. पहिली व दुसरी अशी दोन्हींहीं पिकें पूर्ण बुडालीं. दुष्काळी भागांत धान्याचा पुष्कळ पुरवठा झाला. दुष्काळकामें व संघटित दानधर्म चालूं ठेविल्यामुळें मनुष्यहानि बरीच थोपवली. प्रत्यक्ष मृत्युसंख्याही बरीच झाली. तसेच गुराढोरांची हानीही पुष्कळ झाली. कोंकण भागांत पाऊस अपुरा किंवा अवेळीं झाला. आणि एकंदर उत्पन्न फार कमी निघालें. १८७७–दक्षिण देश व कर्नाटक. मागील वर्षांतील दुष्काळ तसाच चालूं राहिला. दुष्काळ–कामें सुरूं होतीं. कांहीं काळ पावसाचीं बरींच चिन्हें दिसत होतीं. परंतु वाटला तसा पाऊस पडला नाहीं. सप्टेंबरमधील पावसामुळें दक्षिण देश व कर्नाटक या भागांत दुष्काळाचें रूप जरा कमी कडक झालें. धान्याचा पुरवठा पुरेसा होता. परंतु वहातुकीच्या अडचणीमुळें भाव कडकले. दुबळ्यांना मोफत मदत मिळत होती. अर्धा कोट रुपये केवळ दुष्काळी कामावर खर्च झाले. १८७६ नोव्हेंबर–दुष्काळी कामावर ९८४२२ लोक होते. १८७७ जानेवारी–दुष्काळी कामावर ३३९१२९ लोक होते. १८७७ जून–दुष्काळ कामावर ५२८९५१ लोक होते. १८७७ नोव्हेंबरमध्यें हीं कामें बंद केलीं. लोक शेतीवर गेले. १८९१–९२ कर्नाटक पाऊस पडला नाहीं.विजापूर, धारवाड, बेळगांव जिल्हयांतील कांहीं भाग (८१६९ चौ. मैल, १२४०००० लोकसंख्या) दुष्काळांत सांपडले. दुष्काळ कामें सुरूं होतीं. सोलापूर, सातारा, पुणें या जिल्हयांतून थोडाबहुत दुष्काळ भासलाच. वसूल सूट दिली होती व तगाई साडेसात लाख रुपये दिली. १८९६–९७ दक्षिण देश व कर्नाटक. हा मोठा दुष्काळ अनियमित पावसामुळें पडला. रबी पिकें तर झालींच नाहींत, पण खरीप पिकापैकीं तिसरा हिस्सा देखील पिकें हाताशीं आलीं नाहींत. पुणें व सातारा जिल्हयांत दुष्काळ फार जाणवला. दुष्काळ–कामावर रोजीं ४३८९३९ लोक खपत होते. साडेतीस लाख रुपये खर्च झाले; पैकीं बहुतेक रक्कम भावी दुष्काळाचा त्रास कमी व्हावा म्हणून सुधारणा करण्याकडे खर्ची पडली. १८९७ डिसेंबरमध्यें दुष्काळ–कामें बंद केलीं. १८९९–१९००–सर्व मुंबई इलाखा. हा दुष्काळ फार कडक होता. सुरवातीचा व शेवटचा असे दोनही पाऊस अगदीं जेमतेम झाले. त्यामुळें खरीप व रबी पिकें बुडालीं. खनदेश, नगर, सोलापूर व नाशिक, पुणें, सातारा यांतील कांहीं भाग आणि निम्मा अधिक विजापूर जिल्हा व ठाणें, बेळगांव जिल्हयांतील कांहीं थोडे तालुके हे भाग दुष्काळांत सांपडले होते. एकंदर १२२६३ हजारांपैकीं सुमारें ९७७६ हजार लोकसंख्या या दुष्काळांत गोवली गेली. दुष्काळ कामावरील जास्तींतजास्त संख्या १६११४२० झाली होती. १९०० मार्चपर्यंत दुष्काळ खर्च ११५ लाख रुपये झाला. याशिवाय ४० लाख रुपये तकवी कर्ज म्हणून शेतकऱ्यांना दिले. तदनंतर (१९००) मार्च ९९ लाख रुपये बियाणें व जनावरें खरेदीकरितां वाटले. चाऱ्याच्या तुटवड्यामुळें गुरेंढोरें अतीशय मेलीं. १९००–१९०१ दक्षिण देश व कर्नाटक. पावसाळा उशीरा सुरू झाला, व शेवटीं शेवटीं पाऊस पडलाच नाहीं. त्यामुळें खरीप व रबी दोनही पिकें आलीं नाहींत. इतर प्रांतांतून पिकें बरीं निघाल्यामुळें गतवर्षीपेक्षां धान्याचे भाव कमी होते. दुष्काळ–कामें चालूं होतीं. गुजराथ धरून एकंदर ११४९९ हजार लोकसंख्येपैकीं ७१४२ हजार लोकसंख्या या दुष्काळांत सांपडली. १९०१ एप्रीलमध्यें सर्व दक्षिणदेशांत पाऊस पडल्यामुळें पाण्याचा तुटवडा झाला नाहीं. एकंदर पाणी पुरवठा कमी होता. तो वाढण्याचे प्रयत्न चालूं होते. चाऱ्याचा तुटवडा पडला नाहीं त्यामुळें शेतीच्या उपयोगी पडणाऱ्या जनावरांकरितां विशेष सोयी कराव्या लागल्या नाहींत; दुष्काळ खर्च २८३००००० रु. याशिवाय वसूल सूट, देणग्या व कर्ज इत्यादि बाबतींत फार मोठी रक्कम खर्च झाली. . १९०१–१९०२–दक्षिणदेश व कर्नाटक. हा दुष्काळ मागील वर्षाप्रमाणेंच झाला. त्यांत टोळधाड व उंदीर यांपासून विशेषत: गुजराथमध्यें फार उपद्रव झाला. इतर प्रांतांतून धान्याचा पुरवठा होत होता. त्यामुळें भाव चढले नाहींत. गुजराथ धरून ८७७६ हजारापैकीं ४१८९ हजार लोकसंख्येवर दुष्काळाचा परिणाम झाला. दुष्काळ–कामावरील संख्या ४००००० पर्यंत चढली होती. दुष्काळ खर्च ७९ लाख रुपये. दानधर्म फंड १५॥ लाख रुपये. १४५

लाख वसूल सूट. तकवी कर्ज ६७ लाख व इतर बाब ६॥ लाख खर्च झाले. १९०२–१९०३ पावसाळा उशीरा सुरू झाल्यामुळें मागील दुष्काळ चालू राहिला. ऑगस्ट अखेर पाऊस भरपूर झाला. १९०३ सालच्या सुरवातीस दुष्काळकामें बंद करतां आलीं. १९०५–१९०६ दक्षिणदेश व कर्नाटक. (खानदेश सोडून) पाऊस चांगला झाला नाहीं. झाला तिथें अतिशय होऊन शेतीची नासाडी झाली. जुलै व ऑगस्ट महिन्यांत दरवर्षीपेक्षां पाऊस कमी झाला. गुजराथ व खानदेश भागांत मात्र सप्टेंबर महिन्यांत पाऊस पडला व पिकें तरलीं. इतर प्रांतांतील पिकें मात्र अक्टोबरमधील पाऊस येईपर्यंत कशीबशीं निभावलीं. नंतर पाऊस पडला नाहीं व रबी पिकेंही बुडालीं. एकंदरींत दोनही पिकें अगदींच कमी हाताशीं आलीं. कालवे व तलाव होते त्या भागांत फक्त पिकें टिकलीं. दुष्काळकामावर नगर व विजापूर जिल्ह्यांतील लोकांची संख्या मोठी होती. १९११ ते १२ दक्षिण देशचा पूर्व भाग व कर्नाटक. पाऊस अनियमित पडला. कोंकण, पश्चिम दक्षिणदेश आणि कर्नाटक येथील खरीप पिकें थोडीबहुत बरीं आलीं. रबी पीक मात्र सर्वत्र बुडालें. चोहींकडे चारा अपुरा पडला. १९१८–१९१९ सह्यांद्रीलगतचा मुलुख सोडून सर्व मुंबई इलाखा शेतीच्या दृष्टीनें हा काळ अशतिय खडतर गेला. पाण्याचा दुष्काळ सर्वत्र होता. पावसाळा नेहमीच्या निम्म्यानेंही झाला नाहीं. दक्षिण कोंकण व पश्चिमघाटांतही पुरेसा पाऊस नव्हता. पाण्याची वाण जारीनें भासली. यांतच इन्फ्लुएंझाच्या सांथीची भर पडली. धान्याचा तुटवडा दिसल्याबरोबर दुष्काळ जाहीर झाला. १९२०–२१– दक्षिण देशचा पूर्वभाग व कर्नाटक सबंध पावसाळाभर मन्सून पावसाला जोर असा आलाच नाहीं.नेहमींच्या निम्म्यानेंदेखील पहिला पाऊस झाला नाहीं. बेळगांव भागांत सरासरी नेहमींइतका पाऊस झाला. रबी पिकांस लागणारा पाऊस सातारा, सोलापूर या जिल्ह्यांतून नेहमींच्या तिसरा हिस्सा झाला. अशा परिस्थितीमुळें धान्य व चारा यांचा तुटवडा आणि पाण्याचा दुष्काळ पूर्व-दख्खन व कर्नाटक भागांत सुरू झाला.

महापूर

१८५० **खान**देश–उतवळी नदी पूर. घरादारांचा नाश बराच झाला, परंतु शेतींस धक्का पोंचला नाहीं.

१८७२ नाशिक, १४ सप्टेंबर. गिरणा, मोसम, गोदावरी व कादवा या नद्यांस पूर. गिरणेच्या खोऱ्यांत विशेष संकट ओढवलें. १२०० घरें वाहून गेलीं. घरेंदारें वगळून ऐन एस्टेटीचें नुकसान पाऊण लाख रुपयांपर्यंत झालें. गिरणा व मोसम यांच्या कांठावरील पिकें साफ बुडालीं. एकंदर १२८ खेडेगांवांतील मिळून ७००० एकर शेती पूर्ण धुऊन निघाली व १४०० एकर जमीन शेतीला निरुपयोगी झाली. प्रत्यक्ष जिल्ह्यांतील व मुंबई इलाख्यामधील मिळून एकंदर फंड= ११००० रु. जमला. सरकारी जंगलामधून इमारत लाकूड मोफत देण्यांत आलें.

खानदेश, १५ सप्टेंबर. पांझरा आणि गिरणा या नद्यांस पूर. तलाव व कालवे यांचें अपरिमित नुकसान झालें.एकंदर जिंदगीचा नास १६० लाख रुपयांपर्यंत गेला. ५५०० कुटुंबें निराधार झालीं. याशिवाय भिल्ल व जंगली जमाती संकटग्रस्त झाल्या त्या निराळ्याच. सरकारांतून ५००० रु. दान करण्यासाठीं व तगाई कर्ज म्हणून देण्यांत आलें. खाजगी दानधर्म ३५०००रु. १४९२ कुटुंबांतून वाटले व ७०००० रु. ११६४ लोकांना तगाई म्हणून दिले.

१८७५ खानदेश, ६ जुलै. अचानक पाऊस पडल्यामुळें अरुणावती नदीस पूर आला व त्यामुळें शिरपूर शहरांत पाणी शिरलें; सहा फूटापर्यंत चोहींकडे पाणी पसरलें. एकंदर जिंदगीचा नाश ३२००० रु. पर्यंत झाला.

१८७६ खनदेश, ५ सप्टेंबर. तापी नदीला महापूर आल्या कारणानें गिरणा, अंजनी आणि अरुणावती या तिच्या उपनद्यांसही पूर आला. पिकांची नुकसानी फार झाली.

१८८२ विजापूर, नोव्हेंबर. हुनगुंड तालुक्यांतील इलकाल नाल्यास पूर आला सरासरी पाऊस पंधरा इंच पडतो; परंतु नोव्हेंबर २६ ला एकदम पुष्कळ इंच पाऊस पडला. २६६ घरें वाहून गेलीं; त्यामळें कापणी करून कोठारांतून भरलेलें धान्यहीं वाया गेलें. नुकसान ३०००० रु झालें. खाजगी दानधर्म फक्त मुंबईंतच १५००० रु. झाला म्युनिसिपालिटीनें १८००० रु. खर्च करून संरक्षणार्थ कामें तयार केलीं.

१८९६ नाशिक. मोसम नदीस पूर. मालेगांव शहरांत एकंदर इस्टेटीचें नुकसान ३०००० रु. पर्यंत झालें. ३० घरें बुडालीं. मनुष्यहानि झाली नाहीं.

१९०९ रत्नागिरी. चिपळूण गांवामध्यें जुलै महिन्यांत आठ तासाच्या अवधींत एकंदर ११ इंच पाऊस पडला. नदीला पुराच्या अखेर मर्यादेपेक्षां चार फूट वरच पाणी आलें. अर्धेगांव पाण्यांत बुडालें.पुष्कळ घरें कोसळलीं.एकंदर जमीन जुमला वगैरे मिळून ८०००० रु. नुकसान झालें.

१९१३ सातारा. वाळवा तालुक्यांत पूर येऊन नासधूस झाली. सातारा जिल्हयामध्यें नदीकांठची शेती साफ धुवून निघाली.

१९१४ सातारा. कऱ्हाड तालुक्यांत पुरामुळें संकटें ओढवलीं. नदीकांठच्या प्रदेशांतील पिकें वाहून गेलीं

बेळगांव. मलप्रभा नदीस पूर आला. पिकें बुडालीं व घरें कोसळून पडलीं. पुन्हा नवीन घरें उभारण्याकरितां २०००० रु. तगाई म्हणून वाटले. घटप्रभा आणि कृष्णा व वेदगंगा आणि दूधगंगा या नद्यांसही पूर येऊन गेले. हा पूर गोकाक व चिकोडी तालुक्यांसही थोडाबहुत जाणवला.

विजापूर. हा जिल्हादेखील पूर आल्यामुळें संकटग्रस्त झाला. घरादारांस व खेड्यांच्या ठिकाणास जाणवेल असा उपद्रव झाला. पेवांत साठवलेलीं धान्यें वाया गेलीं. योग्य ठिकाणीं खाजगी मदत झाली व इमारतींचें नुकसान कांहींसें भरून निघालें.

१९१४ कुलाबा. जुलै महिन्यांत अतोनात पाऊस झाला. त्यामुळें जंगी पूर आले, सखल प्रदेशांत आंतपर्यंत पाणी शिरलें आणि पिकें वाहून गेलीं.

१९१६ कर्नाटक. नोव्हेंबर महिन्यांत पाऊस सडकून पडला. उभीं पिकें व जमीनजुमला याचें तर नुकसान झालेंच; परंतु थोडीबहुत मनुष्यहानि देखील झाली.

१९२३ धारवाड. वर्दा व तुंगभद्रा या नद्यांना पूर आला. जवळ जवळ दहा खेडीं संकटांत सांपडलीं.

कुलाबा. सह्याद्रीच्या रांगांतून जुलैमध्यें अतिवृष्टि झाली; त्यामुळें तिकडून वहात येणाऱ्या नद्यांना पूर आला. कित्येक शेतें साफ धुवून निघालीं मिळकतींची नुकसानी व मनुष्यहानि देखील चांगलीच जाणवली.

टोळधाडी

दक्षिण देशाकडे येणाऱ्या टोळांची निपज बहुतेक पश्चिमघाट व सातपुडा या नजीकच्या भागांत होते. टोळधाडीमुळें होणारा त्रास हा त्यांतील उडणाऱ्या तांबड्या झुंडीपासून होतो. त्यांच्या लहान पाखरांचा उपद्रव फारसा नसतो. या झुंडी हिंवाळ्यांत व उन्हाळ्यांत सैरावैरा उडूं लागतात. कित्येकवेळां वाऱ्याच्या झोताबरोबर त्यांचें प्रयाण चालू रहातें. बागाईत व रबी पिकें आणि विशेषत: आंबा व इतर फळझाडें यांचें या टोळधाडीपासून अतोनात नुकसान होतें. १९०१–१९०२ पासून खरीप पिकांच्या हंगामांतसुद्धां टोळधाडी येऊं लागल्या. १८८२–ते ८३ या वेळच्या टोळधाडीची संपूर्ण हकीकत प्रथमत: सरकारदप्तरीं नमूद झाली. यावेळीं सरकारांतून टोळांचा नाश करण्यासाठीं निरनिराळ्या उपाययोजना झाल्या- तेव्हा असें दिसून आलें कीं, उन्हाळ्यांत टोळ घाटांतील जंगलांतून असतात व नंतर ते दक्षिण देशांकडे येतात. टोळ समुद्रकांठच्या जिल्हयांतून मे व जून महिन्यांत यावयास लागतात तेव्हांच मारण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. म्हणजे त्यांची वाढ थांबेल. त्यांनीं एकदां अंडीं घातल्यावर ती शोधन जमविणें फार कठीण जातें व त्याचा फारसा उपयोग होत नाहीं. टोळांची निपज होत आहे असें दिसतांच सर्व गांवकऱ्यांस टोळ–किडे व लहान पाखरें मारण्याच्या कामीं एकदम रुजूं करावे. टोळांचा नाश करण्यासाठीं अनेक उपायांची योजना करावी कारण एका जिल्हयांत यशस्वी ठरलेले उपाय दुसऱ्या जिल्हयांत निरुपयोगी ठरतात. तेव्हां फक्त ठराविक उपाय योजून स्वस्थ बसूं नये.टोळांची संख्या कमी झाली कीं त्या प्रमाणांत पिकांची नासाडी देखील उतरते.

टोळधाड हाणून पाडण्याकरितां गांवकऱ्यांनीं स्वखुषीनें मदत करावी. टोळ मारण्याकरितां रोजगार देऊन लोक कामावर ठेवण्यापेक्षां, मारलेले टोळ किंवा अंडीं वजन करून ठराविक दरांनीं पैसे वाटणें जास्त फायदेशीर पडतें. १९०१ पासून सुरू झालेली टोळधाड फार काळपर्यंत टिकली. हिचा प्रसार सर्व इलाख्याभर होता. १९०४ मार्च पासून टोळांचा नाश करण्याचें काम जारीनें सुरू केलें. टोळ मारणारास शेरी अर्धा आणा मिळत असे. टोळांची निपज होण्याच्या मोसमास हा दर दरशेरी चार आणेपर्यंत चढे.अगदीं सुरवातीच्या वेळीं लोक या टोळ मारण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करीत, तेव्हां हीं लहान पाखरें मारणारास शेरीं एक रुपयाप्रमाणें पैसे वाटले. त्याचप्रमाणें टोळांची अंडीं जमा करणारांसही शेरी तीन आणे प्रमाणें

पैसे मिळाले. हा दर देखील एक रुपयापर्यंत चढला होता. भर ज्वानींतील टोळ मारणें फार कठीण जाऊं लागलें व तें किफायतशीर पडेना. त्यांचीं अंडीं जमा करणेंहीं फारसें सोईस्कर पडत नसे. तरी कुलाबा, पेण, नाशिक इत्यादि प्रांतांतील डोंगराळ भागांत बरींच अंडीं सांपडलीं. हें काम करण्यास डोंगरी लोकांस प्रोत्साहन दिलें व बक्षिस मिळविण्याच्या आशेनें ते तें करूं लागले व त्यापासून एकंदर फायदा बराच झाला. परंतु या सर्व उपायांपेक्षां अंड्यांतून बाहेर पडून टोळ तयार होईपर्यंतच्या मधील कालांतील पाखराच्या स्थितींतील टोळ मारणें सोपें आहे असें दिसून आलें. या कामांस ऑगस्टपासून सुरुवात झाली. व नोव्हेंबर अखेरपर्यंत अशीं पाखरें मारण्याचें काम जोरांत चालू होतें. फक्त याच कामीं दोन लाख रुपये खर्च झाले.

सरकारनीं नेमलेल्या तज्ज्ञांच्या चौकशी कमिटीला मुंबई इलाख्यांतील टोळांच्या आयुष्य संक्रमणांतील खालील ठळक गोष्टी स्पष्टपणें दिसून आल्या.

१ जून किंवा जुलैमधील पहिला उत्तम पाऊस पडल्यानंतर टोळ दलदलीच्या जागीं पुंजक्या पुंजक्यांनीं अंडीं घालतात. २ तीन ते चार आठवड्यांत अंडीं फुटतात. ३ अंड्यांतून नवीनच बाहेर पडलेलीं पाखरें साधारण हिरवट रंगावर व आकारानें आपल्या आईबापासारखीं असतात. मायक्रोस्कोप खालीं पाहिल्यास त्यांच्या सर्व अंगाभर काळे ठिपके असतात. ४ या नवीन पिल्लांची कातडी चार, पांचवेळां बदलते ५ चौथ्या खेपेस पंख फुटण्याचीं चिन्हें दिसूं लागतात. ६ पांचव्या खेपेस मात्र हें बीजरूपी पंख स्पष्ट दिसतात. ७ शेवटचे कातडे टाकल्यानंतर मात्र हे किडे फक्त रंगाशिवाय सर्व दृष्ट्या आपल्या आईबापाप्रमाणें दिसतात.यावेळीं त्यांचा रंग तेवढा साधारण तपकिरी व मधून मधून पांढरट पिवळट झाकेचा असतो. ८ जसजसा हिवाळा येऊं लागतो तसतसा त्यांचा रंग माशासारखा पांढरा तांबडा होत होत पूर्ण तांबडा बनतो. आणि टोळांच्या मोठमोठ्या झुंडी जमूं लागतात. या अवस्थेंत त्यांचें शरीरच्छेदन करून पृथक्करण केलें असतां अगदीं मूलरूपी जननेंद्रियेंच फक्त आढळतील. उन्हाळ्याच्या अखेरीस टोळमाद्यांचे अंडाशय हळू हळू वाढत असतात; आणि पावसाळा येऊन ठेपला म्हणजे त्या अंडाशयांची वाढ झपाट्यानें होते. या वेळपर्यंत टोळ अगदीं झुपके करून असतात व आतां मात्र सर्व प्रांतभर पसरतात. पहिला पाऊस झाल्याबरोबर त्यांचा रंग काळा व मधून मधून निळसर झाकीचा बनतो. आणि ते अंडीं घालतात. मॉन्सून उशीरां आला तर टोळांचीं अंडीं घालणें व निपज होणें या क्रियेस तो पोषक नसतो असें दिसतें.

टोळधाड:—

१८३५ पुणें जिल्हा. टोळधाड आल्यामुळें नुकसान फार झालें.

१८६४ व ६५ बेळगांव जिल्ह्यांत सांपगांव व पारसगड येथील पिकांचें नुकसान झालें.

१८६९ खानदेश.टोळांच्या झुंडी आल्या होत्या, परंतु नुकसान झालें नाहीं.

१८७३ खानदेश. अखेरच्या पिकांची नासाडी झाली.

१८७५ बेळगांव. सांपगांव व पारसगड येथें बरेंच नुकसान झालें.

१८७८ कुलाबा. हिवाळ्यांतील पिकांवर परिणाम झाला.

१८७८ ठाणें. पिकें उत्तम आलीं होतीं, परंतु टोळधाडीमुळें कांहींसें नुकसान झालें.

१८७८ पुणें.भिमथडी व पुरंदर येथील खरीप पिकें बुडालीं.

१८७८ सातारा. हिवाळ्यांतील पिकांवर परिणाम झाला.

१८७९ अहमदनगर. ज्वारीचा नाश झाला.

१८८० बेळगांव. ऊंस बराच दुखावला. बाकीच्या पिकांची कापणी झाली होती.

१८८२ खानदेश.जिल्ह्याच्या अर्ध्या भागावर चांगलाच परिणाम झाला. परंतु रब्बी पिकें मात्र पूर्ण बचावलीं. ३२२० रु. बक्षिसादाखल वाटले. ६७२० रु. सूट दिली.

१८८२ नाशिक.बाजरी व कापूस या पिकांचें जास्त नुकसान झालें. रब्बीचे पेरे झाले नाहींत. २०४२० रु. बक्षिसादाखल वाटले. २७५७२० रु. सूट दिली.

१८८२ अहमदनगर.कोपरगांव आणि अकोला यांतील बहुतेक खेड्यांतील खरीप पिकें साफ बुडालीं. इतर तालुक्यांतही बरेंच नुकसान झालें. ७३० रु. बक्षिसादाखल वाटले. २१७९४० रु. सूट दिली.

१८८२ पुणें. मावळ व पश्चिम बाजूच्या तालुक्यांतून कांहींसें नुकसान झालें. रब्बी पिकें चांगलीं आलीं.

१८८२ सोलापूर. २०४७० रु. सूट दिली.

१८८२ सातारा जिल्ह्यांतून टोळधाड जाण्यापूर्वींच खरीप पिकांची बहुतेक कापणी झाली होती.

१८८२ कुलाबा.

१८८२ रत्नागिरी. फक्त हरीक व नागली या पिकांची कापणी राहिली होती. आणि त्यामुळें तीं पिकें बुडालीं.

१८८२. बेळगांव. घाटाकडील तालुक्यांतील राळा व नाचणी या पिकांचें चांगलेंच नुकसान झालें. इतर पिकांची कापणी झाली होती.

१८८४ खानदेश.बक्षिस खातें.५१० रु.; सूट २८१७० रु.

१८८४ पुणें.

१८८४ सातारा सूट१३८० रु.

१८८४कुलाबा. बक्षिसखातें २१५८० रु. सूट८ टेकडीवरील पिकांचे फार फार नुकसान झालें. खरीप पिकांना थोडाबहुत धक्का पोहोंचला. पिकें चांगलीं येणार नाहींत असेंच भविष्य जरी बहुतेक ठिकाणीं झालें होतें तरी प्रत्यक्ष नुकसान असें फारच थोडें झालें. फक्त वर उल्लेखिलेल्या भागांतूनच काय तें नुकसान झालें.

रत्नागिरीः–टेकडीवरील व पठार जमिनीवरील पिकांचें फार नुकसान झालें. १९९०० रु. बक्षिसादाखल वाटले. ६६० रु. सूट दिली.

बेळगांवः–उन्हाळ्यांतील पिकाचा अतोनात नास झाला. नुकसान ७५००० रु. झाले.

१८९०–१८९१दक्षिण देश (सातारा सोडून) कर्नाटक (बेळगांव सोडून), आणि कोंकण (ठाणें व रत्नागिरी सोडून) टोळधाड एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं फार जलदीनें जात होती. म्हणून एकाच जिल्ह्याचें असें फार नुकसान झालें नाहीं. एकंदर नुकसान बरेंच झालें परंतु तें बहुतेक जिल्ह्यांतून वाटलें गेलें.

१८९७–९८–ठाणें, कुलाबा व अहमदनगर थोडेंबहुत नुसकान झालें.

१९००–१९०१दक्षिण देश (नगर सोडून), कर्नाटक (धारवाड सोडून), आणि कोंकण (कारवार सोडून) पिकांची नासाडी झाली. मारलेल्या टोळांस शेरी अर्धा आणा आणि टोळांच्या अंड्यास शेरी तीन अणे याप्रमाणें सरकारनें बक्षिस रकमा दिल्या.

१९०१–१९०२–दक्षिण देशांतील पांच जिल्हे,कर्नाटक,आणि कोंकणभागांतील तीन जिल्हे नुकसान झालें अशी माहिती सरकारांत कोठूनहीं आली नाहीं.

१९०२–१९०३खानदेश. टोळधाडीमुळें अतोनात नुकसान झालें. कारवार सोडून इलाख्यांतील इतर सर्व जिल्ह्यांत ही टोळधाड येऊन गेली असेसमजतें.

१९०३–१९०४–दक्षिण देश (सोलापूर व नगर सोडून), कोंकण (कारवार सोडून). टोळधाड आल्यामुळें एकंदर हंगाम अगदीं वाईट गेला.

१९०४–१९०५–सह्याद्रि घाटानजीकचा सर्व कोंकण प्रांत. मागील वर्षाअखेरीस एकंदर स्थिति फार चिंताजनक होती. टोळांनीं अंडीं खूपच घातलीं होतीं. जुलै अखेर पंख फुटून टोळ दिसूं लागले. टोळ मारणारांना बक्षिसादाखल म्हणून एकंदर दोन लाख रुपये वाटले. कांहीं ठिकाणीं अशा लोकांना रोजगार दिला इतरत्र मारलेले टोळ किंवा अंडीं याचें वजन करून पैसे दिले. खानदेश, नगर, सोलापूर, सातारा, विजापूर आणि बेळगांव उस व बागाईत पिकें यांचा नाश झाला.

१९०५–१९०६ पश्चिम खानदेश, नाशिक, पुणें, सोलापूर, सातारा, बेळगांव, बिजापूर धारवाड, रत्नागिरी आणि कुलाबा. शेतावरील पिकांना थोडासा धक्का पोहोंचला.

१९०६–१९०७ अहमदनगरपैकीं कांहीं भाग पुणें, सोलापूर, सातारा, बेळगांव, विजापूर आणि धारवाड. पुणें, सातारा व नगर जिल्ह्यांतील कांहीं भाग येथील पिकांचा नास झाला. बेळगांव व विजापूर येथील बागाईतीवर थोडासा परिणाम झाला.

१९०७–१९०८पश्चिम खानदेशांतील ओसाड भाग. विशेष असें कांहीं नुकसान झालें नाहीं.

१९०८–१९०९ पश्चिम खानदेशमधील नंदुरबार तालुका पिकांचें थोडें नुकसान झालें.

१९१३–१४कुलाबा. नुकसान झालें नाहीं.

१९१४–१५नाशिक व कुलाबा. वेळचेवेळीं उपाय योजना झाल्यामुळें पिकांची हानी टळली.

१९१६ पासून एप्रील १९२४ पर्यंत टोळधाड आली नाहीं.

शिक्षणखातें

संस्कृतविद्येची पूर्वींची शिक्षणपद्धति

या विषयाचे काळाच्या दृष्टीनें स्थूलमानानें चार भाग करतां येतील. ब्राह्मणग्रंथामध्यें ' स्वाध्यायोऽध्येतव्य ' असें वाक्य आहे. यावरून त्या वेळीं वेदांचें अध्ययन सुरू होतें; यापेक्षां या काळांतील जास्त माहिती मिळत नाहीं. म्हणून पहिला काळ म्हणजे पुराण व स्मृति यांचाच काळ धरूं. दुसरा काळ म्हणजे पाणिनि, उपवर्ष वगैरेंचा. हा साधारणपणें इसवी सनापूर्वी ८०० पासून इ. १५०० पर्यंतचा काळ होय. तिसरा म्हणजे त्या नंतरचा नागेश भट्टाचा काळ व चौथा म्हणजे गेल्या दोन तीनशें वर्षांपासून तों आतांपर्यंतचा काळ. या निरनिराळ्या काळांत कोणती शिक्षणपद्धति प्रचलित होती हें पाहूं. या दोनतीनशें वर्षांपासून जी शिक्षणपद्धति चालत आली आहे तीच सध्यां पाठशाळांतून वगैरे सुरू आहे.

स्मृतिकाळापूर्वी सूत्रांचा काळ; पण सूत्रकाळांतील व स्मृतिकाळांतील अध्ययनपद्धति समानच. या काळांतील पद्धति अशी असे:—बाप आपल्या मुलाचें आठव्या वर्षी उपनयन करून त्यास गुरुगृहीं पाठवीत. उपनयन म्हणजे गुरुगृहीं पाठविणें. गुरु वनांतील आश्रमांत रहात. गुरु त्यास चार वेद, वेदांगें आणि उपनिषदें शिकवीत. वेदांचें अध्ययन उत्तरायणांत व वेदांगें आणि उपनिषदें यांचें अध्ययन दक्षिणायनांत होत असे. विद्यार्थ्याचें परिपूर्ण अध्ययन झाल्याखेरीज गुरुगृह सोडावयाचें नाहीं असा नियम असे. असे हजारों गुरु व प्रत्येकाचें एकेक गुरुकुल अशीं हजारों गुरुकुलें असत. ज्यांना जें गुरुकुल सोईचें असेल येथें ते विद्यार्थी अध्ययनास जात व वर म्हटल्याप्रमाणें अध्ययन संपेपर्यंत ते विद्यापीठ सोडीत नसत. ही अगदीं प्राचीनकाळची शिक्षणपद्धति होय. या काळांतील प्रसिद्ध गुरु व शिष्य सांदीपनि आणि कृष्णसुदामा वगैरेंचीं उदाहरणें प्रसिद्ध आहेत. हे गुरु प्रायः ब्राह्मणजातीचेच असत; पण क्वचित् ठिकाणीं क्षत्रियही असत. मात्र ब्रह्मविद्या म्हणजे वेदान्तविद्या पुष्कळशी क्षत्रियांकडून ब्राह्मणांकडे आल्याचा उपनिषदांत निर्देश आहे.

यानंतर पाणिनीचा काळ. या पाणिनिप्रभृतींच्या काळांतील शिक्षणपद्धति कोणती हें पाहूं. या वेळीं वेद, (संहिता व ब्राह्मण,) श्रौतसूत्रें, धर्मसूत्रें आणि त्या वेळीं उपलब्ध असलेलीं न्याय, व्याकरण, मीमांसा, सांख्य, योग व वेदान्त यांचीं सूत्रें या ग्रंथांचें अध्ययन असे. यांवरूनच पुनः पाणिनिप्रभृतींनीं सूत्रें लिहिलीं. याकाळांतच पंजाबांतील **तक्षशिला** येथें एक सर्वांत मोठें विद्यापीठ होतें. विद्यापीठांत विद्यार्थी अध्ययनास जात. तक्षशिला येथील विद्यापीठांत ज्यांचें अध्ययन झालें त्यांपैकींच पाणिनि आणि उपवर्ष हे होत. या वेळच्या पंडितांमध्यें क्रमानें उपवर्ष पाणिनि, पतंजलि, कैयट, जैयट, मम्मट यांचा समावेश होतो. या वेळींच बौद्धांतही मोठे नामांकित विद्वान् होऊन गेले. त्यांचें विद्यापीठ श्रावस्ति होतें.

यानंतर बऱ्याच वर्षांनीं जैनांत हेमचंद्र हा मोठा पंडित होऊन गेला, व त्यानें व्याकरण व वेदान्त यांवर ग्रंथ केले आहेत. काव्य, कोश इत्यादींतही त्याचे स्वतंत्र ग्रंथ आहेत. या सुमारास, कदाचित् याचे पूर्वींच काशीचें विद्यापीठ चालू होतें. हें विद्यापीठ कुंभकोणम्, कांची वगैरे दक्षिणी विद्यापीठांपेक्षां सर्वमान्य व सर्वगुणश्रेष्ठ होतें.

जरी काशी येथें व्याकरण, न्याय आणि ज्योतिष हेच विषय विशेषेंकरून शिकविण्याची पद्धत होती व हल्लींही आहे, तरी मीमांसा, सांख्य, वेदान्त व इतर शास्त्रें शिकविणारे महाविद्वानही येथें आढळून येतात. न्यायांत मात्र काशीपेक्षां नवद्वीपाची योग्यता अधिक आहे. काशीस न्यायाचें अध्ययन संपविलेले विद्यार्थी पुढील अध्ययनाकरितां नवद्वीपास जात असत व जातात.

[नवद्वीप (नदिया–शांतिपूर) हें बंगालमध्यें आहे.]

यानंतरचा म्हणजे नागेशभट्टाचा काळ. नागेश भट्टाच्या वेळीं कोणती शिक्षणपद्धति होती हें समजण्याकरितां त्यावेळीं प्रत्येक विषयाचे कोणते ग्रंथ होते हें पाहणें जरूर आहे. कोणाही विद्वानास ज्या तीन मुख्य शास्त्रांचें अध्ययन करावेंच लागे तीं तीन शास्त्रें म्हणजे व्याकरण, न्याय व पूर्वमीमांसा हीं होत. यावरूनच विद्वानांना ‘ पदवाक्यप्रमाणपारावारपारीण ’ अशी पदवी लावण्यांत येत असे. या पदवीचा अर्थ व्याकरण, न्याय व मीमांसा यांमध्यें पारंगत असा आहे.

व्याकरणांतील ग्रंथ येणेंप्रमाणें:––

आकरग्रंथ (सूत्र, व त्यावरील भाष्य यांना आकरग्रंथ म्हणतात.)

१ पाणिनि याचीं सूत्रें (हिला अष्टाध्यायी म्हणतात.)

२ पातंजल–महाभाष्य (यांतच कात्यायनाच्या वार्तिकांचा विचार आहे.)

३ कैयटाची महाभाष्यावरील टीका–प्रदीप.

न्यायांतील ग्रंथ:—

न्यायांत दोन भेद आहेत. एक प्राचीन न्याय व दुसरा नव्य न्याय. प्राचीन न्यायांतही दोन मतें–एक गौतममत किंवा न्यायमत व दुसरें कणादमत किंवा वैशेषिकमत.

न्यायमताचे आकरग्रंथ:––

१ गौतमसूत्रें, २ वात्स्यायनाचें त्यांवरील भाष्य. वैशेषिकमताचे आकरग्रंथ.

१ कणादसूत्रें, २ प्रशस्तपादभाष्य, ३ उदयनाचार्य यांची ‘ किरणावलि ’ टीका.

मीमांसेचे ग्रंथ खालीलप्रमाणें:––

१ जैमिनिसूत्रें, २ शाबरभाष्य. ३ कुमारिक भट्ट यांचें श्लोकवार्तिक, तंत्रवार्तिक व टुप्टीका.

मीमांसाशास्त्रांत तीन मतें आहेत. एक भट्ट याचें मत, दुसरें प्रभाकरमत व तिसरें मुरारिमत.

नागेशाच्या काळीं, फक्त आकरग्रंथांचेंच (प्रत्येक शास्त्रांतील सूत्रग्रंथ व भाष्यग्रंथ यांचेंच) अध्ययनाची पद्धत असे. प्रकरण व वादग्रंथ यांचे अध्ययनाची पद्धत नसे. अलीकडच्या काळांतील विद्यार्थी प्रकरणग्रंथांचें अध्ययन झाल्याबरोबर वादग्रंथांचेंच अध्ययन करतात व सगळा वेळ यांतच गेल्यामुळें आकरग्रंथांचें व्हावें तसें अध्ययन होत नाहीं. ज्यांनीं वादग्रंथ निर्माण केले, त्यांनीं आकरग्रंथांचें अध्ययन केलें होतें. उदाहरणार्थ, नागेशांनीं लघुशब्देंदुशेखराच्या आरंभीं स्वतः-बद्दल असें म्हटलें आहे “ पातंजले महाभाष्ये कृतभूरिपरिश्रमः ” या अलीकडच्या २००–३०० वर्षांच्या काळांत म्हणजे नागेशानंतरच्या काळांत कोणी मोठे ग्रंथकार झाले नाहींत. याचें मुख्य कारण हेंच कीं, आकरग्रंथांचें कोणी अध्ययन करीत नाहीं. व त्यामुळें विषयाचें सांगोपांग ज्ञान नसल्यामुळें ग्रंथकर्तृत्व येत नाहीं. त्यांतही वादग्रंथांचें अपूर्णच अध्ययन करण्याची पद्धति हल्लीं चालू आहे. हल्लीं चालू असलेल्या शिक्षणपद्धतींत जर कोणता मोठा दोष असेल तर तो हाच कीं, वादग्रंथ शिकण्यांत वेळ गेल्यामुळें आकरग्रंथांचें अध्ययन होत नाहीं. आकरग्रंथ शिकल्यानंतर वादग्रंथ वाचणें अतिशय सोपें आहे. आकरग्रंथ वादग्रंथांपेक्षां सोपे आहेत. नागेशाच्या काळीं वादग्रंथांच्या अध्ययनाची पद्धत नसल्यामुळें विद्यार्थ्यांस सर्व शास्त्रांचें अध्ययन अल्प काळांत करतां येत असे. वादग्रंथ बरेच असल्यामुळें हल्लीं जेमतेम एकाच शास्त्राचें अध्ययन होतें. याबद्दल पुष्कळ विवेचन करतां येईल.

या तिसऱ्या काळांत जे विद्वान् होऊन गेले ते:—

काशीस नारायणभट्ट. हा तोडरमल्लाशी समकालीन होता. त्यानंतर काशीसच गागाभट्ट नांवाचे विद्वान् होऊन गेले. शिवाजी राजांना वैदिक मंत्रांनीं राज्याभिषेक केला म्हणून ज्यांचें नांव आज प्रसिद्ध आहे तेच हे गागाभट्ट होत. यानंतर भट्टोजी दीक्षित. यांनीं सिद्धांत कौमुदी लिहिली. यानंतर नागोजीभट्ट यांनीं उद्योत टीकाप्रभृति पुष्कळ ग्रंथ लिहिले. यानंतर खंडदेवमिश्र, शेष, धर्माधिकारी वगैरे.

हल्लींची संस्कृताध्ययनपद्धति

आतां आपण केलेल्या विभागांतील चौथ्या

भागाकडे वळूं. हल्लीं संस्कृतपाठशाळांतून वगैरे जी शिक्षणपद्धति सुरू आहे तीच या काळांतील होय.

विद्यार्थ्याला प्रथम अमरकोश शिकवितात. नंतर शब्दरूपावलि, धातुरूपावलि व नंतर समासचक्र. इतकें झाल्यानंतर रघुवंश, कुमारसंभव, किरातार्जुनीय, माघ, नैषध या काव्यांपैकीं तीन चार काव्यांतील कांहीं सर्ग शिकवितात. यानंतर व्याकरण किंवा न्याय वगैरे यांतील प्रकरणग्रंथ शिकवितात. नंतर वादग्रंथ शिकवतात. प्रकरणग्रंथ म्हणजेः--

व्याकरणाचे प्रकरणग्रंथ--

१ काशिका, २ सिद्धान्तकौमुदी. या दोहोंपैकीं हल्लीं सिद्धान्त कौमुदीचाच प्रघात आहे.

व्याकरणांतील वादग्रंथः--

१ मनोरमा, २ शब्दरत्न, ३ परिभाषेंदुशेखर, ४ वैयाकरणभूषण, ५ मंजूषा, ६ शब्दकौस्तुभ, ७ नागेशाचा उद्योत.

न्यायाचे प्रकरणग्रंथः--

१ तर्कसंग्रह, २ तर्कभाषा, ३ तर्ककौमुदी, ४ मुक्तावली.

न्यायाचे वादग्रंथः--

१ तत्त्वचिंतामणि, २ पक्षधरमिश्रांची टीका, ३ रघुनाथशिरोमणि यांची दीधिति नांवाची टीका, ४ माथुरी, ५ जागदीशी, ६ गादाधरी

पूर्वमीमांसेचे प्रकरणग्रंथः--

१ अर्थसंग्रह, २ मीमांसाबालप्रकाश, ३ मीमांसान्यायप्रकाश, ४ जैमिनिन्यायमालाविस्तर.

पूर्वमीसांसेचे वादग्रंथः--

१ शास्त्रदीपिका, २ भाट्टदीपिका, ३ न्यायरत्नाकर, ४ तंत्र रत्न वादग्रंथ झाल्यानंतर अनुकूलता असल्यास पातंजलमहाभाष्य वगैरे ग्रंथ शिकवितात. नाहींतर वादग्रंथ संपल्यावर सर्वसामान्य विद्यार्थ्यांचें त्या त्या विषयाचें शिक्षण पुरें होतें. मात्र या विद्यार्थ्यांचें या ग्रंथांचें अध्ययन पांक्त व पूर्ण असतें.

हिंदुस्तानांतील सर्वच ठिकाणीं सर्वच शास्त्रांचा सारखा अभ्यास होतो असें नाहीं. मुख्य--गौण--भाव, त्यांत आहेच. बंगालकडे न्यायशास्त्राला प्राधान्य आहे. महाराष्ट्रांत व्याकरण व अद्वैतवेदान्त यांना प्राधान्य आहे. कर्नाटकांत न्याय व द्वैतवेदांत यांना प्राधान्य आहे. न्यायांतही दक्षिणेकडे (कर्नाटकांत) गादाधरी व काशीकडे जागदीशी पढण्याचा विशेष प्रघात आहे. मद्रासेकडे श्रौत व अद्वैत आणि तैलंगणांत श्रौत आणि मीमांसा यांना आहे. मीमांसेचें अध्ययन सर्वच ठिकाणीं होतें, तथापि सध्यां व्हावें तसें मीमांसेवर परिश्रम होत नाहींत. याचें कारण श्रौतधर्म जो याज्ञिककर्म त्याचा लोप झाला हेंच आहे. मीमांसा ही वेदार्थप्रतिपादक असल्यामुळें व वेदांचा यज्ञाकडे उपयोग असल्यामुळें यज्ञकर्मांचे अभावीं तत्प्रतिपादक अर्थाची जरूरच शिल्लक रहात नाहीं.

व्याकरण वगैरे संपल्यावर सहा दर्शनांचें अध्ययन करावें लागतें. तीं सहा दर्शनें १ न्याय, २ वैशेषिक, ३ योग, ४ सांख्य, ५ पूर्वमीमांसा ६ उत्तरमीमांसा.

उत्तरमीमांसा म्हणजे ब्रह्मसूत्रें व गीता आणि उपनिषदें ही प्रस्थानत्रयी. यावर शंकराचार्यप्रभृति चारही आचार्यांचीं भाष्यें आहेत.

न्याय, व्याकरण, मीमांसा या तिन्हींचें अध्ययन झालें तरी विद्येच्या अंतिम फलाच्या दृष्टीनें वेदांताचें व त्यावरील भाष्यांचें अध्ययन अवश्य आहे. व म्हणून न्याय, व्याकरणादि अध्ययन करणारांनीं त्यांचा वेदांताकडे उपयोग करणें जरूर आहे. ज्याप्रमाणें विद्येचें अंतिम फल जें मोक्ष (निःश्रेयस्) त्या दृष्टीनें वेदान्ताची जरूरी, तसेंच ऐहिक सदाचारांचें ज्ञान या दृष्टीनें स्मृत्यादि धर्मशास्त्राचा फार उपयोग आहे. निर्णयसिंधुकारासारखे निबंधकार दिवंगत झाल्यापासून या स्मृत्यादिग्रंथांचें अध्ययन होईनासें झालें आहे. अलीकडचे लोक धर्मशास्त्र याचा अर्थ आशौचादिप्रसंगीं उपयोगीं पडणारीं धर्मसिंधूसारख्या सामान्य ग्रंथांतील कांहीं प्रकरणें, इतकेंच समजतात; परंतु त्यायोगें समाजाचे तत्तत्कालीन प्रश्न सुटत नाहींत. करितां स्मृतींचें सांगोपांग अध्य-

यन करण्याकडे न्याय वगैरे शिकणारांनीं विशेष लक्ष देणें आवश्यक व प्राप्तकाल आहे.

या २०० वर्षांच्या काळांत जे मोठमोठे नामांकित विद्वान् होऊन गेले त्यांचा नामनिर्देश:--

बालसरस्वती बाळशास्त्री रानडे. हे अत्यंत उज्ज्वल बुद्धीचे व प्रकाण्डपंडित होते. यांच्या शिष्यापैकीं अत्यंत नामांकित म्हणजे दामोदरशास्त्री भारद्वाज व त्यांचे बंधु गोविंदशास्त्री भारद्वाज, गंगाधरशास्त्री तेलंग,तात्याशास्त्रीं पटवर्धन व शिवकुमारशास्त्रीं हे होत. गंगाधरशास्त्री यांनीं साहित्यावर फारच परिश्रम करून ग्रंथ लिहिले आहेत. याचवेळीं कैलासचंद्र भट्टाचार्य, सीतारामशास्त्री व बापुदेवशास्त्री हे विद्वान्हि होऊन गेले. महाराष्ट्रांतील विद्वान् म्हणजे विठ्ठलोपाध्याय, मोडक, गर्गे, घाटे, सदाशिवशास्त्री घुले, मोरशास्त्री साठे, राघवाचार्य गजेंद्रगडकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भास्करशास्त्री अभ्यंकर, रघुनाथशास्त्री पर्वते. इंदूर—लष्कर येथें विष्णुशास्त्री भट्ट, गोपाळाचार्य कऱ्हाडकर हे होऊन गेले. वरील सर्व शास्त्री चांगले पढिक असून उत्तम अध्यापकही होते.

हल्लींच्या संस्कृत पाठशाळाः—

काशी येथें Queen's College नांवाची उच्च शिक्षण देणारी संस्था आहे. त्याशिवाय तेथेंच दरभंग्याचे महाराज वगैरे संस्थानिकांनीं चालविलेल्या आणि जयपूर वगैरे ठिकाणीं पुष्कळ पाठशाळा आहेत. आणखी नुकतीच 'वेदवेदांग' नांवाची एक अध्यापनसंस्था काशीस निघाली आहे. पुणें येथें संस्कृतपाठशाळा, नवीन संस्कृत कॉलेज, मीमांसाविद्यालय व आचार्यकुल या संस्था आहेत. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांत मुंबई, नाशिक, त्र्यंबकेश्वर, सोलापूर, पंढरपूर, बार्शी, राजापूर, रत्नागिरी, नागपूर, सांगली, वाई, कर्नाटकांत धारवाड येथें आणि इतरही बरेच गांवीं एकेक किंवा दोन पाठशाळा आहेत. बंगालमध्यें नवद्वीप म्हणजे नदिया—शांतिपूर येथें मोठी न्याय शिकविणारी संस्था आहे. विद्यार्थ्यांना मान्यता व उत्तेजन देण्याकरितां ज्या परीक्षा घेणाऱ्या संस्था आहेत त्याः—यांपैकीं कांहीं पदव्या आणि पारितोषिकें देतात, तर कांहीं फक्त पदव्याच देतात. काशीस सरकारी रीत्या प्रथम, मध्यम व आचार्य या परीक्षा सर्व शास्त्रांत होतात. कलकत्ता असोसिएशनतर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांत प्रत्येक शास्त्रांत तीर्थ ही शेवटची पदवी दिली जाते. पंजाबांत प्राज्ञ, विशारद व शास्त्री या पदव्या क्रमानें दिल्या जातात. म्हैसूर येथें घेतल्या जाणाऱ्या परीक्षांत विद्वान् ही पदवी दिली जाते. उ० व्याकरणविद्वान् इत्यादि. पुणें येथें वेदशास्त्रोत्तेजक सभा या संस्थेकडून सर्व वेदांत आणि सर्व शास्त्रांत परीक्षा घेतल्या जातात; दुसऱ्या आणि तिसऱ्या इयत्तांत प्रथम वर्गांत उत्तीर्ण होणारास अनुक्रमें त्या त्या शास्त्राचा कोविद व वाचस्पति अशा पदव्या दिल्या जातात. त्याशिवाय पारितोषिकेंही दिलीं जातात. बडोदें येथें श्रावणमासदक्षिणापरीक्षा बडोदेंसरकारतर्फे होते. त्यांत पारितोषिकें व भूषण, रत्न या पदव्या दिल्या जातात. त्याचप्रमाणें मद्रास वगैरे ठिकाणीं परीक्षा आहेत. आयुर्वेदसंमेलनातर्फे घेतलेल्या परीक्षेंत भिषक्, आयुर्वेदविशारद व आयुर्वेदाचार्य अशा पदव्या दिल्या जातात. हें विवेचन अर्थातच पूर्ण नव्हे.

शिक्षण (हिंदुस्थानविषयक.)

महाराष्ट्रांत अर्वाचीन शिक्षणप्रसाराचें पुष्कळसें श्रेय जगन्नाथ शंकरशेट यांस द्यावें लागेल. त्यांनीं १८२२ च्या आगस्टांत बॉंबे नेटिव्ह स्कूलबुक, अँड स्कूल सोसायटी, ही संस्था स्थापन केली व एतद्देशीय भाषांतून शालोपयोगी ग्रंथरचना करण्यास तत्कालीन विद्वानांना प्रोत्साहन दिलें. १८२४ मध्यें याच संस्थेस 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असें नांव मिळालें.

१८०४ मध्यें सर जेम्स् मॅकिंटॉश, सुप्रीम कोर्टाचे एक न्यायाधीश यांनीं इग्लंडांतलि रॉयल एशियाटिक सोसायटीची एक शाखा म्हणून 'बॉम्बे ब्रँच ऑफ दि रायल एशियाटिक सोसायटी' नांवाची मोठी ग्रंथशाळा स्थापली.

१८१६ मध्यें राममोहनरॉय व डेव्हिड हेअर यांनीं मिळून कलकत्त्यास हिंदुकॉलेज काढलें.

इंग्रजी शिक्षणाची आवड त्यामुळें हळूं हळूं वाढली व त्या कॉलेजांतल्या लोकांनीं गांवोगांवीं शाळा काढल्या.

१८१८. मार्शम व वार्ड या मिशनऱ्यांनीं श्रीरामपुराम कॉलेज काढलें.

१८२७. मुंबईस एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट स्थापन झाली.

१८३५. कलकत्त्यास मेडिकल कॉलेज.

१८३४. विल्सनस्कूल मुंबई.

१८३५. मेकालेच्या खलित्याच्या आधारें लॉर्ड बेंटिंक यानें खलिता काढला. त्या अन्वयें सरकारमार्फत इंग्रजी बोधभाषेंतून पाश्चात्य विद्येचा प्रसार होऊं लागला.

१८३५मुद्रणस्वातंत्र्य, मेटकॉफ व मेकॉले यांनीं दिलें.

१८३५ मुद्रणस्वातंत्र्य मिळालें. १८३७ त कोर्टांतून फारशी ऐवजीं इंग्रजी सुरू झाली व १८४४ त हार्डिंज यानें इंग्रजी शिकलेल्यांस नोकरीसाठीं अधिक पसंती मिळेल असें धोरण जाहीर केलें. या तीन गोष्टीमुळें इंग्रजी विद्येच्या प्रसारास फार मदत झाली.

१८३७. मद्रास ख्रिश्चन कॉलेज

१८३७ सालीं गव्हर्नर एल्फिन्स्टन यांच्या नांवें उभारलेल्या फंडांतून मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेज स्थापन करण्यांत आलें. व बॉम्बे ने. ए. सोसायटीला एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट हें नांव देऊन वरील कॉलेजशीं ती जोडून टाकण्यांत आली.

१८३८ मुंबईचे गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट पुण्यास मृत्यू पावले. त्यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ ग्रँट मेडिकल कॉलेज स्थापण्यांत आले.

१८४० बॉम्बे बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना झाली.

१८४५ स्टूडंटस् लिटररी अँड सायंटिफिक् सोसायटी स्थापन झाली. व्याख्यानें, वर्तमानपत्रें वगैरेद्वारा हे शिक्षणप्रसार करीत.

१८४८ स्टूडंट्स् लिटररी सोसायटीनें नानांच्या मदतीनें त्यांच्याच वाड्यांत मुलींची शाळा सुरू केली. पहिल्या विद्यार्थिनी शंकरशेटांच्याच मुली. हिंदुस्थानांतील हिंदु मुलींची हीच पहिली शाळा.

१८५०पर्यंत इंग्रजी शिक्षणाची आवड हिंदुमध्यें चांगलीच दृढमूल झाली.

१८५४. सालीं सर चार्लस वुडचा खलिता प्रसिद्ध झाला. त्या अन्वयें लोकशिक्षणखातें उघडण्यांत आलें. सर्व संस्था सरकारी ठेवण्याची पद्धत बंद होऊन खाजगी संस्था काढण्यास उत्तेजन देण्यासाठीं देणग्या देण्याची पद्धत (Grants-in-aid) सुरू झाली. युनिव्हर्सिट्यांची रूपरेषा ठरून त्याप्रमाणें १८५७ सालीं मुंबई, मद्रास व कलकत्ता विद्यापीठें स्थापन झालीं. हीं तिन्ही पुत्रीकरणपद्धतीची (affiliating) आहेत. हीं विद्यापीठें म्हणजे विद्वद् मंडळें नव्हती; अध्यापन हा त्यांचा विषय नव्हता. परीक्षेवरच सर्व भर असून त्याची व्यवस्था करणारी संस्था, येवढाच विद्यापीठाला अर्थ होता. त्यामुळें परीक्षा व नोकरी हेंच फक्त प्राप्तव्य आहे असें विद्यार्थ्यांचें धोरण दिसे. असे कांहीं दोष असले तरी एकंदरींत या विद्यापीठांनीं उत्तम कामगिरी बजावली यांत शंकाच नाहीं.

१८५६ डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन हें खातें निर्माण झालें व बोर्ड बंद झालें.

१८५७ सालीं गिरगांवांत जगन्नाथ शंकरशेट फर्स्ट ग्रेड अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल स्थापण्यांत आलें. नानांनींच या शाळेला विशेष मदत केली होती. तेव्हां त्यांच्या कांहीं जातीयांनीं आपल्या जातीपुरती ही शाळा काढावी असा सल्ला दिला. पण त्यांनीं तो मानला नाहीं.

१८८२च्या कमिशननंतर देणगीपद्धतीच्या शाळा पुष्कळ वाढल्या. शिक्षणक्षेत्रांत लोकांच्या प्रयत्नास मदत करणें हेंच मुख्य धोरण ठेवून, प्रत्येक शाखेंत सरकारनें नमुना म्हणून एखादी संस्था चालवावी असें ठरलें.

१९०२ मध्यें युनिव्हर्सिटी कमिशन नेमलें व १९०४ मध्यें युनिव्हर्सिटी ॲक्ट पास झाला. सरकारची विद्यापीठावर व तद्द्वारा शाळाकॉलेजांवर जास्त दृढ सत्ता बसवावी हा या कायद्याचा हेतु होता.

या कायद्यानें कुलगुरूंना (Chancellor) विद्यापीठाच्या सीनेटमधील शेकडा ८० माणसें स्वतःच नेमण्याचा व उरलेल्यांची निवडणूक नामंजूर करण्याचा अधिकार मिळाला. शाळाकॉलेजांना मान्यता देऊन त्यांची वार्षिक तपासणी करण्याचें काम विद्यापीठाकडे आलें. पण सर्व सत्ता सरकारच्या हातींच होती.

१९१० मध्यें एक स्वतंत्र शिक्षणखातें काढण्यांत आलें. व त्याचा एक प्रतिनिधि व्हाइसरॉयाच्या कार्यकारी मंडळांत बसूं लागला.

१९१९ च्या कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशननें (१) एफ्. वाय् व इंटर हे वर्ग शाळेकडेच सोपवावे व (१) पुत्रीकरणपद्धती ऐवजीं प्रत्यक्ष शिक्षण देणारीं विद्यापीठें स्थापावीं अशा सूचना केल्या. उत्तरप्रांतीं कांहीं ठिकाणीं या अमलांत आल्या.

१९१९ च्या सुधारणांमुळें शिक्षणखातें सोपीव होऊन लोकनियुक्त मंत्र्याच्या हातीं आलें. पण अलीगड, बनारस, दिल्ली हीं विद्यापीठें राखीव खात्यांत ठेवलीं असून हीं. सरकारच्या ताब्यांत आहेत.

१९१८त मुंबई शहरानें आपल्या कांहीं भागांत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू केलें आहे. इतर सात प्रांतांत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरूं करण्याचा अधिकार कायदेमंडळानें स्थानिकस्वराज्यांना देऊन टाकला आहे. सक्तीच्या शिक्षणास वय सहा ते दहा ठेवलें असून त्या काळांत त्या मुलांना नोकरी करण्याची मनाई आहे. सक्तीचें शिक्षण सर्वत्र मोफत असावें अशी कायद्यानें व्यवस्था केली आहे.

१९१७ सालीं सर शंकरन् नायर यांच्या अध्यक्षतेखालीं मातृभाषेंतून शिक्षण देण्याचा विचार करण्यासाठीं सिमल्यास सभा भरली होती. सर्व शिक्षण इंग्रजींतून दिलें तर इंग्रजी सुधारतें असे फायदे कांहींनीं सांगितले. शेवटीं निर्णय कांहींच झाला नाहीं.

औद्योगिक शिक्षण

पुसा—शेतकी संशोधन-संस्था.

मुंबई —सिडेनहॅम कॉलेज ऑफ् कॉमर्स; व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट.

बंगलूर—सायन्स इन्स्टिटयूट.

धानबाद—खाणकाम-शाळा.

बनारस—मायनिंग व मेटॅलर्जिकल कॉलेज

कलकत्ता विद्यापीठ—स्थापना १८५७. पुत्रीकरण पद्धतीचें. कायदेमंडळ म्हणजे सीनेट. याचे ७५ ते १०० सभासद असतात. त्यांतील शेकडा ८० सरकारनियुक्त. सिंडिकेट—कार्यकारी मंडळ. कलकत्त्याचा गव्हर्नर चॅन्सेलर. कॉलेजोत्तर शिक्षणाची आज पुष्कळ विद्यापीठांनीं सोय केली आहे. पण कलकत्ता विद्यापीठानें संशोधन मंदिरें काढून या बाबतींत फारच प्रगति केली आहे.

मद्रास—या विद्यापीठाची नुकतीच पुनर्घटना होऊन सीनेटमध्यें पुष्कळ सभासद लोकनियुक्त आले. सिंडिकेट हें कार्यकारी मंडळ होय. अध्यापनाचें कामही या पीठानें नुकतेंच सुरू केलें आहे.

मुंबई—१९२८ सालीं पुनर्घटना. सीनेट १५० सभासद. पैकीं ९३ निवडलेले. कॉलेजोत्तर शिक्षणाची सोय केली. ॲकडेमिक कौन्सिल नेमून शिक्षणविषयक बाबी त्यांच्या हातीं दिल्या.

अलाहाबाद—पुत्रीकरण बंद झालें असून, हें विद्यापीठ आतां युनिटरी (एकदली) व रेसिडेन्सिअल झालें आहे. संशोधनाबद्दल या विद्यापीठाची कीर्ति झाली आहे.

म्हैसूर—स्थापना १९१६, सीनेट ६० सभासदांचें, महाराजा चॅन्सेलर. विद्यापीठाचे अध्यापक हे सीनेटचे सभासद असतात. कॉलेजच्या पहिल्या वर्षांचें शिक्षण शाळांवर सोपवून बाकीचें वरचें शिक्षण विद्यापीठानें फक्त बंगलूर व म्हैसूर येथेंच ठेवलें आहे.

पाटणा—स्थापना १९१७ बव्हंशीं जुन्या पद्धतीचें. चॅन्सेलर—गव्हर्नर. हा सर्वाधिकारी आहे. सीनेटमध्यें लोकनियुक्त सभासद बरेच आहेत. कॉलेजचा प्रतिनिधि म्हणून प्रिन्सिपॉल हा सीनेटमध्यें असतो. निर्णायक सत्ता सिंडिकेटच्या हातीं आहे.

डाका—स्थापना १९२०. हें विद्यापीठ एकशाखी व वसतिगृहपद्धतीचें आहे. त्याचा सर्व खर्च

सरकारी व सत्ताहि सरकारच्या हातीं आहे. कौन्सिल ही कायदेकारी संस्था.

रंगून विद्यापीठ-स्थापना १९२०. सन १९२३ सालीं रचनेंत फरक होऊन पीठाला जास्त प्रातिनिधिक स्वरूप आलें. सीनेटच्या हातीं परीक्षा, अभ्यासक्रम, शिस्त वगैरे सर्व व्यवस्था. पण कौन्सिल ही निर्णायक सत्ता आहे.

लखनौ-१९२०. एकशाखी, अध्यापक व वसतिगृही-विद्यापीठ. कोर्ट-कायदेकारी संस्था; कौन्सिल-कार्यकारी संस्था; ॲकॅडेमिक कौन्सिल-शिक्षणपरीक्षा याची व्यवस्था पाहणारी संस्था; कमिटी ऑफ रेफरन्स्-नवीन खर्चाची व्यवस्था पाहणें.

दिल्ली-१९२२. एकशाखी, अध्यापक, व वसतिगृही विद्यापीठ; ३ महाविद्यालयें सध्यां आहेत. इंटरमिजिएटचे वर्ग काढून टाकून फक्त पदवीचे वर्ग ठेवावे अशी योजना घाटत आहे. गव्हर्नर जनरल चॅन्सेलर.

नागपुर १९२३ परीक्षा व पुत्रीकरण हीं दोन्ही हें विद्यापीठ करतें.

आंध्र-१९२६ तेलगू प्रांतांतलीं सर्व महाविद्यालयें या पीठाचीं पुत्रीकृत आहेत. मुख्य ठाणें विजगापट्टम.

आग्रा-१९२६ निवळ पुत्रीकरणपद्धतीचें विद्यापीठ. अलाहाबादचीं सर्व महाविद्यालयें यानें ताब्यांत घेतलीं.

अन्नमलाई विद्यापीठ-- (चिदंबरम्) अध्यापक व आश्रमपद्धतीचें विद्यापीठ. १९२९ स्थापना. तामीळ प्रांतांत उच्च शिक्षणप्रसार व्हावा या उद्देशानें सर अन्नमलाई चेट्टियार यांनीं २० लक्ष रुपये दिले, त्यामुळें हें विद्यापीठ निघालें आहे. सेंट जॉर्ज फोर्टचा गव्हर्नर हा चॅन्सेलर.

स्त्रीशिक्षणः—नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ. प्रो. कर्वे यांनीं स्थापन केलें. निवळ स्त्रियांसाठीं २७ महाविद्यालयें आहेत. पडदा व बालविवाह यांमुळें शिक्षणप्रसार झपाट्यानें होत नाहीं.

लष्करी शिक्षणः-सॅण्डर्स्ट कॉलेजच्या प्रवेश परीक्षेपर्यंतचें शिक्षण देण्यासाठीं डेहराडून येथें प्रिन्स ऑफ वेल्स रॉयल इंडियन मिलिटरी कॉलेज स्थापिलें आहे. याशिवाय शिपायांच्या मुलांसाठीं शिपाई तयार करण्यासाठीं अशा कांहीं शाळा आहेत.

संस्थानिकांसाठीं, अजमीर, इंदूर, लाहोर, राजकोट व रायपूर येथें कॉलेजें आहेत. अजमीर खेरीज इतरत्र मॅट्रिक पर्यंतचेंच शिक्षण होतें.

खाजगी शिक्षण. हिंदुस्थानांत सवा कोटी विद्यार्थी आहेत. त्यांपैकीं सुमारें ६ लक्ष विद्यार्थी खाजगी संस्थांतून शिक्षण घेतात. खाजगी संस्थांपैकीं गुरुकुल, शांतिनिकेतन व गांधींचा साबरमती-आश्रम यांनीं बरीच कीर्ति मिळविली आहे. हकीम अजमलखान यांनीं स्थापलेलें दिल्लीचें आयुर्वेदिक व युनानी कॉलेज हीहि उच्च दर्जाची संस्था आहे.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या शैक्षणिक विभागांतील विद्यार्थी व त्यांचा जातवार व धर्मवार केलेला तक्ता (१९२९–३०)

विभाग stage		युरोपिअन्स व अँग्लो इंडियन	हिंदी ख्रिश्चन्	हिंदू	मुसलमान	बौद्ध	पारशी	इतर	एकूण
उच्च (कॉलेज.)	पुरुष..	५०७	२५३४	६६९३३	११५८३	९६४	८३६	२७३८	(अ) ८७०३६
	स्त्रिया...	२८२	६९३	१३०४	६९	७०	१८२	९७	२६९७
वरिष्ठ (हाय.)	पुरुष...	२००१	८०१४	२०६१३७	३७३८६	३६०५	२८४१	७५८१	२६७५६५
	स्त्रिया...	१४१७	२७८३	४५७१	३४४	३५६	१२२५	२५७	१०९५३
माध्यमिक	पुरुष...	५७९६	२३०८५	५३१६६४	१३३५९२	२०२२३	२६२८	२३३०९	७४०२९७
	स्त्रिया...	४९९६	१३६३६	२५९७२	२९८०	३९७८	१९०३	११९४	५४६५९
प्राथमिक	पुरुष..	१६१६५	१९९५०६	५४७६३५६	२१६१२४४	२३७३८४	४३५९	२४५५९८	८३४०६१२
	स्त्रिया...	१६७९७	१२६३११	१२१३६६४	४९१७०७	१७०१४५	४८५३	३९७४७	२०६३२२४
स्पेशल् स्कूलस	पुरुष...	७०४	७४४३	१२९९७१	१५३०१३	१४६२८	६०७	८८७३	३१५१९२
	स्त्रिया...	७६३	६१५९	७६१९	१५७२	१२५२	२२७	६८७	१८२७९
मान्यता न दिलेल्या संस्था	पुरुष...	१२	४३८६	१४०४१४	१६५९२२	१८५८६६	११२	११४५३	५०८१६५
	स्त्रिया..	०	२१०५	२४३३२	७४०८६	३४१४	११८	४३०४	१०८३५९
एकूण	पुरुष...	२५१८५	२४४९७१	६५५१४२५	२६६२७४०	४६२६७०	११३८३	२९९५५२	(ब)१०२५८८६६
	स्त्रिया...	२४२५५	१५१६८७	१२७७४६२	५७०७५८	१७९२१५	८५०८	४६२८६	(क)२२५८१७१
	एकूण ...	४९४४०	३९६६५८	७८२८८८७	३[illegible]३३४९८	६४१८८५	१९८९१	३४५८३८	१२५१७०३७

टीप:– (अ) संयुक्त प्रांतांतील ८१६ हिंदु व १२४ मुसलमान विद्यार्थी धरून

(ब) पंजाबमधील ओरिएन्टल कॉलेजांतील १५४ विद्यार्थी,
बहार ओरिसांतील युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रम न धरणारे १७१ विद्यार्थी,
प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास करणारे आसामांतील ५० विद्यार्थी,
} सोडून

व १४१ संस्कृत टोल्स (Tols) मधील २३३७ विद्यार्थी धरून,

(क) प्राचीन वाङमयाचा अभ्यास करणाऱ्या ४१ मुली (आसाम) सोडून.

शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची विभागणी

प्रांत	प्रत्यक्ष खर्च								एकंदर अप्रत्यक्ष खर्च	एकूण
	आर्ट्स् व धंदे शिक्षणाची कॉलेजें	माध्यमिक शाळा		प्राथमिक शाळा		नार्मल व ट्रेनिंग शाळा	इतर सर्व विशिष्ट शाळा	एकूण		
		मुलें	मुली	मुलें	मुली					
	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.	रु.
मुंबई	३२६७८२३	६७५२२३५	१६४७८७३	१६५७९१८९	३६११८२९	४६३७८५	१६३७८७५	३३९६०६०९	६४६०३३७	४०४२०९४६
मध्यप्रांत-वऱ्हाड	७३२९४१	३०४३५३८	२७८७९२	३१६३७९३	४१५६०९	४०३५९९	१५५७७९	८१९४०५१	३३२७३४०	११५२१३९१
सर्व प्रांतांची मिळून संख्या १९२९-३०	२४७९८४३८	६८०८८६८१	१०५४६७०४	६६९७४१४७	१२१९३२७१	६५९३५८२	१३९८७०८७	२०३१८१९१०	७११००१०८	२७४२८२०१८

उस्मानिया विद्यापीठ द. हैदराबाद—

स्थापना १९१८ सालीं झाली. तोंपर्यंत सर्व शिक्षण मद्रास विद्यापीठाकडून होई. व बोधभाषा इंग्रजी असल्यामुळें प्रगति अगदींच मंद होई. तेव्हां १९१७ सालीं सर अकबर हैदरी यांनीं नव्या विद्यापीठाची स्थापना करावी अशा विनंतीचा एक दस्त सरकारपुढें मांडला. त्याप्रमाणें १८ सालीं या विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठांत सर्व शिक्षण उर्दू भाषेंत चालतें. तें सुलभ व्हावें यासाठीं एक भाषांतर-मंडळ नेमून इतिहास, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, गणित, रसायन, वनस्पतिशास्त्र इ. विद्यापीठाला लागणाऱ्या सर्व विषयांवरील ग्रंथांचीं भाषांतरें सरकारनें करविलीं आहेत. वैद्यक व स्थापत्य यांवरील ग्रंथांचीं भाषांतरें सध्यां चालू आहेत. 'कौन्सिल' हें सर्वाधिकारी मंडळ आहे. शिक्षणाचा सर्व कारभार, व्यवस्था, परीक्षा, अभ्यासक्रम आंखणें वगैरे सीनेटच्या हातीं आहे. सीनेटमध्यें ४० ते ७० सभासद असतात. सेनेटच्या कचेरीचें काम बघणारी संस्था म्हणजे सिंडिकेट. सीनेट मधलेच ५ते ७ लोक यांत असतात. हें विद्यापीठ एकशाखी व अध्यापक (Unitary & Teaching)आहे.उस्मानिया युनिव्हर्सिटी कॉलेज हें एकच कॉलेज तिच्या कक्षेंत आहे.तरी सध्यां हैद्राबाद, वरंगळ, औरंगाबाद व गुलबर्गा येथील संस्थांना इंटरमीजिएटच्या परीक्षेसाठीं मुलांना शिक्षण देण्यास परवानगी आहे शिवाय एक झनाना विद्यालय (college) आहे. त्यास बी. ए. पर्यंत वर्ग घेण्याची परवानगी आहे. १९२७ त मेडिकल व १९२९ त इंजिनीयरिंग व टीचर्स ट्रेनिंग कॉलेज उघडण्यांत आलें. (१) हैद्राबादचे निजाम हे विद्यापीठाचे मुख्य आश्रयदाते (पेट्रन) आहेत व (२) महाराजा सर किशन प्रसाद हे चॅन्सेलर आहेत. (३) निरनिराळ्या शाखांत ३१ सालीं एकंदर ८७२ विद्यार्थी होते. १९०८ सालीं स्थापन झालेली वेधशाळा १९१९ सालीं विद्यापीठाच्या ताब्यांत मिळाली. तेलगू, मराठी,कानडी,आरबी व उर्दू या भाषा व तत्त्वज्ञान, इतिहास, पदार्थविज्ञान, रसविज्ञान या शाखांत संशोधन करण्यासाठीं विद्यार्थ्यांना दरमहा ७५ रु. शिष्यवृत्ति देण्याची व्यवस्था झाली आहे. विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृह असून तेथें फक्त भोजनाचा खर्च विद्यार्थ्यांना करावा लागतो. इतर सर्व आनुषंगिक खर्च सरकार करतें. विद्यापीठाच्या सर्व खात्यांवर एकंदर खर्च वार्षिक १६७५८५४ रु. होतो.

अलीगड मुस्लीम युनिव्हर्सिटीः—

१९३०–३१ मधील युनि. विद्यार्थ्यांची संख्या.

पोस्ट ग्रॅज्युएट क्लासेस	२०८
बी. ए. व बी. एस् सी. क्लासेस	२०६
बी. टी. क्लासेस	४८

१९३१ मधील अलीगड युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचा निकाल.

परीक्षा	किती बसले	पास किती
एम्. ए.	५२	२६
एम्. एस् सी.	१०	६
बी. ए. ऑनर्स	५	१
बी. एस् सी. ऑनर्स	६	१
बी. ए. पास	२०७	१०६
बी. एस्सी. पास	४३	३०
एल्एल्. बी. प्रिव्हिअस	८४	४६
एल्एल्. बी. फायनल	८४	७०
बी. टी एच्. प्रिव्हिअस	१	१
बी. टी एच्. फायनल	१	१
इंटरमीजिएट	२४४	१०६
हायस्कूल	१९८	१०२
बी. टी. थिअरी	५१	४१
बी. टी. प्रॅक्टीस	५०	५०
सी. टी. थिअरी	२	१

१९३०–३१ या वर्षांत पब्लिक इन्स्ट्रक्शन डिपार्टमेंटकडन बी. टी. डिग्रीस मान्यता मिळाली. ट्रेनिंग कॉलेजसाठीं २५० अर्ज आले, पण ५२ विद्यार्थ्यांनाच परवानगी देतां येणें शक्य होतें.

लिटन लायब्ररीः—वर्षाच्या सुरवातीस ग्रंथांची संख्या २०४२६ होती. १९३०–३१ या वर्षांत १५७४ पुस्तकांची त्यांत भर पडली. पुस्तकें विकत घेण्याकरितां १०, ०० रु. खर्च झाले आणि मासिकें , पाक्षिकें, वगरेप्रीत्यर्थ १५०० रु. खर्ची पडले. ३२८०० वाचकांनीं वाचनालयाचा फायदा घेतला. इंटरमीजिएट कॉलेज :—१९३०–३१ सालीं विद्यार्थ्यांची संख्या ६४० होती. प्रिन्सिपॉल श्री. कुरेशी.टिब्बिया कॉलेज—१९३०-३१या वर्षांत पॅथॉलॉजी व मिड्वाइफरी या खात्याचे तक्ते व इतर उपकरणीं जर्मनींतून मागविण्यांत आलीं. (Unani Tibb)ची जुन्या वैद्यकीय पद्धतीचीं मूलतत्त्वें विद्यार्थ्यांना शिकविलीं जातातच. शिवाय साध्या व संयुक्त(Compound)औषधी युनानी (Unani)पद्धतीनें कशा बनवावयाच्या हेंही शिकविलें जातें. या कॉलेजच्या ग्रंथालयांत ५९० पुस्तकें आहेत. एकंदर या वर्षी ४६१६३ औषधें (Prescriptions) तयार झालीं व त्यां-

१९२१ च्या खानेसुमारी-प्रमाणें खालसा मुलखांतील
साक्षर-निरक्षरांची प्रमाण-दर्शिका.



पासून सुमारें १२०० रु. मिळाले. मध्यप्रांत सरकारच्या ५०,००० च्या ग्रँटमध्यें आर्थिक परिस्थितीमुळें १० टक्के कपात झाली आहे. तरी बोर्ड ऑफ इंडियन मेडिसिन्सकडून वार्षिक २००० रु. ची ग्रँट चालू आहे. १९३१ त या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची संख्या ४६ होती. हें कॉलेज डॉ. बट (Butt) यांच्या नतृत्वाखालीं चांगलें काम करीत आहे. मुस्लीम युनिव्हर्सिटी स्कूलः—१९३१ सालीं विद्यार्थ्यांची संख्या २८१होती. हेडमास्तर मि. जी. सी. वुड्स् बी. ए. (कँटब) एम्. आर. एस्. टी.

मुस्लीम युनिव्हर्सिटी सिटी हायस्कूलः विद्यार्थ्यांची संख्या २९४

मेडिकल डिपार्टमेंट :—इस्पितळ; १०२०६ (Out-patients), व १६६(Inpatients), यांना औषधोपचार करण्यांत आला. मलेरियानें पछाडलेल्या १७६४ रोग्यांना उपचार केले. २० हजारांवर औषधें दिलीं. आतां इस्पितळांत विजची सोय केली आहे.

मुस्लीम युनिव्हर्सिटी बुकडेपो व प्रेस :—स्थिति असमाधानकारक असून तोटयांत चालत आहेत.

मुस्लीम युनिव्हर्सिटी युनियनः— युनियनतर्फे खालील पाहुण्यांचीं भाषणें झालीं. मौ. शौकतअल्ली, डॉ. शफत अहमदखान, शठ याकुब हसन, श्री. शेरवानी वगैरे.

ड्रॅमॅटिक क्लबः— अखिल हिंदुस्थान आंतर विद्यापीठ संगीत सामन्यांसाठीं नबाब जादा सयदुझ्झफर खान यांनीं ठवलेली ढाल (Trophy) अलिगड येथील बॅरेली (Bareilly) कॉलेजचे श्री. Chaube यांनीं मिळविली. प्रो. चॅन्सेलर आर. बी. रॅम्सबोथॅम (Ramsbotham).

विश्वभारती शांतिनिकेतन, बोलपूर

उद्देशः— मनुष्याचें मन सत्याचा निरनिराळ्या तऱ्हेनें शोध करीत असतें. अशा या मनाचा अभ्यास करणें. प्राच्य देशांतील विविध संस्कृति या वास्तविक एकाच पायावर उभारलेल्या आहेत व म्हणून त्या मूलतः एकरूप आहेत हें लक्षांत घेऊन त्यांचा मिलाफ करण्याचा प्रयत्न करणें, व अशा रीतीनें आशिया खंडांतील सर्व विचारपद्धतींचा व जीवनक्रमांचा मिलाफ घडवून आणून त्या अधिष्ठानावरून पाश्चिमात्य संस्कृतीची ओळख करून घेणें; व पूर्वग्रहशून्य अशा सहाभ्यासानें पूर्व व पश्चिम यांचा जो संबंध आला आहे त्याचें मर्म प्रतीत करून घेणें व या मर्मकल्पना दोन्ही खंडांत पसरवून त्यांच्या द्वारां जगांत शांतता ठेवणारीं जीं कांहीं आवश्यक साधनें विद्यमान असतील तीं सबळ बनविणें, व या हेतूनें शांतिनिकेतन येथें हिंदु, ख्रिस्ती, मुसलमानी, बौद्ध, जैन, शीख, इत्यादींचा; धर्म, वाङमय, इतिहास, विज्ञानें व कला इत्यादींचा युरोपियन संस्कृतीशीं तोलून संशोधनपूर्वक अभ्यास करणें.

आशिया खंडांतील आयुष्य आणि विचार यांतील समतेच्या दृष्टीनें पाश्चिमात्य देशांशीं सहकार्य करणें; पौर्वात्य देश व पाश्चिमात्य देश यांमध्यें अध्ययनांतील साहचर्यानें, सलोखा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें, आणि या दोन गोलार्धांत विचारांची देवघव मुबलकपणें करून जागतिक शांततेचा पाया जास्त मजबूत करणें. वरील उद्देश ध्यानांत घेऊन शांतिनिकेतन येथें एक सांस्कृतिक केंद्र उत्पन्न करून तेथें हिंदु, बुद्ध, जैन, इस्लाम, शीख, ख्रिस्ती व इतर संस्कृतींचा व धर्म, वाङमय, इतिहास, शास्त्रें व कला इत्यादींचा अभ्यास व संशोधन करण्याची व पाश्चिमात्य संस्कृति अभ्यासण्याचीही सोय करणें. हें संशोधन व हा अभ्यास यांस जरूर असलेली बाह्यतः साधी वागणूक, पौर्वात्य व पाश्चिमात्य पंडितांतील व विचारवंतांतील सलोखा वंश, देश, जात, पंथ वगैरेंचा लटक्या अभिमानाचा त्याग व फक्त ईश्वरावर श्रद्धा ठेवून कार्य करण्याची मनःप्रवृत्ति इत्यादि गोष्टी अमलांत आणण्याचा येथें प्रयत्न करतांना अभ्यासकांनीं आपल्या बाह्य उपचार स्थितींत कसलाही कर्मठपणा ठेवतां उपयोगाचा नाहीं. कारण जर कांहीं आत्मिक ज्ञान व्हावयास हवें असेल तर हा कर्मठपणा गेलाच पाहिजे.

सभासदत्व—विश्वभारती किंवा त्या संस्थेची अंगोपांगें बनलेल्या संस्थांचे सभासद होण्यास, जात, गोत, धर्म व राष्ट्रीयत्व वगैरे कशाचीही आडकाठी नाहीं. सभासद, विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ते वगैरेच्या बाबतींत धार्मिक कल किंवा धंदा या बाबतींत कोणतीही कसोटी ठेवलेली नाहीं. सोसायटी सध्यां पुढील संस्था चालवीत आहे. पथभवन (शाळा), शिक्षाभवन (कॉलेज), विद्याभवन (संशोधन संस्था), कलाभवन (कला व संगीत यांची शाळा, शांतिनिकेतन), सुरल येथें ग्राम—पुनर्घटना मंडळ व कलकत्ता व डाक्का येथील संमीलनी (Sammilani) सोसायटीचा स्वतःचा छापखाना असून एक प्रकाशन खातेंही सोसायटीनें चालविलें आहे. वरिष्ठ सत्ता, साधा-

रण सभेंत जमलेल्या सभासदांच्या परिषदेच्या हातीं आहे. सभासदांनीं निवडून दिलेले लोक व निरनिराळ्या खात्यांचे प्रतिनिधि, हे मिळून बनलेलें संसद हें कार्यकारी मंडळ होय. तहाहयात सभासदत्व रु. २५०; साधारण सभासदत्व वार्षिक वर्गणी रु. १२.

त्रोटक इतिहासः—विश्वभारती ही संस्था २२ डिसेंबर १९२१ रोजीं स्थापन झाली असली तरी तिची कल्पना नवी नव्हती. 'विश्वभारती संस्था' हें शांतिनिकेतन आश्रमाचेंच हळूंहळूं वाढत गलेलें रूप होय. शांतिनिकेतन आश्रमाचे संस्थापक महर्षि देवेंद्रनाथ टागोर व त्यांचे चिरंजीव रवींद्रनाथ टागोर या दोघांनाही आरंभापासून राजा राममोहन रॉय यांचें साहाय्य होतें. महर्षि देवेंद्रनाथ प्रवासांत असतां त्यांना एक शांत ठिकाण फार आवडलें. तेथेंच आश्रम स्थापण्याचें त्यांनीं ठरविलें. हळूंहळूं तेथील जमीन सुपीक करून थोडीशी बाग करून त्यांनीं तेथें एक देऊळही बांधलें.व नंतर तें रम्य स्थान रु. ६००० चें वर्षासन देऊन धर्म, जात, गोत वगैरेचीं बंधन न ठेवतां ईश्वरोपासनेसाठीं जनतेच्या स्वाधीन केलें. तीस वर्षेंपर्यंत विशेष कांहीं घडलें नाहीं. नंतर रवींद्रनाथांच्या मनांत शांतिनिकेतन यथें एक वसति-विद्यालय (Boarding School) काढण्याची कल्पना आली व ती त्यांच्या वडिलांना फार पसंत पडली; आणि डिसेंबर १९०१ला विद्यालय सुरूं झालें. हें विद्यालय स्थापण्यांत एक उद्देश असा होता कीं, विद्यार्थ्यांचें निसर्गाशीं जास्त दृढ नातें जुळावें, व त्यांना जास्त मोकळीक मिळून त्यांचें आयुष्य सुखी व्हावें. रवींद्रनाथांच्या मनावर पूर्वींच्या ऋषींच्या तपोवनांतील राहणीचा फार परिणाम झाला आहे. हें विद्यालय काढण्याचे वेळीं त्यांच्या डोक्यांत हेच विचार घोळत होते. शिवाय त्यांच्या मनांतून शिक्षण मातृभाषेंतून द्यावें, आपलें जुनें वाङ्मय व आपले रीतिरिवाज आणि रुढी यांपासून आपल्याला स्फूर्ति मिळेल असेंच शिक्षण द्यावें असेंही होतें.स्वदेशीची चळवळ सुरूं झाली. रवींद्रनाथ शाळा, कॉलेजें यांवरील बहिष्काराच्या विरुद्ध असल्यानें आश्रमावर फारच परिणाम झाला. रवींद्रनाथांनीं ग्रामसंघटना व खेडेगांवांतील लोक सज्ञान करणें यांवर पुष्कळ भर दिला. शांतिनिकेतन येथील अनेक कार्यांच्या मुळाशीं हें तत्त्व आढळून येईल. १९१३ त रवींद्रनाथ इंग्लंडला जाण्यापूर्वीं आश्रमिक संघ (Ashramika Sangh) स्थापण्यांत आला. या संघाचा उद्देश, आश्रमाचें कार्य बाहेर जास्त जास्त लोकांस पटवून देणें हा होता. १९१४ त सी. एफ्. अँड्रूज व डब्ल्य.डब्ल्यू.पीअर्सन हे संस्थेच्या कार्यांत भाग घेऊं लागले. तेव्हांपासून संस्थेचें क्षेत्र अत्यंत व्यापक होऊन तिचें ध्येय अखिल मानवजातीच्या ध्येयास मूर्त स्वरूप देणें इतकें सर्वव्यापी ठरल्यासारखें झालें. १९१४ त कलकत्त्यास रवींद्रनाथांच्या देखरेखीखालीं 'विचित्र' नांवाची एक संस्था स्थापन झाली व लवकरच वाङ्मयिक व सांस्कृतिक क्षत्रांत ती फार पुढें आली. या संस्थेचा आणि 'विश्वभारती'चा प्रत्यक्ष संबंध कांहीं नसला तरी रवींद्रनाथांच्या चालकत्वामुळे अनेकांचें लक्ष शांतिनिकेतनकडे खेचलें गेलें त्यास पुष्कळ सहानुभूतिही मिळाली. १९१६ त बांकुरा यथील दुष्काळास मदत म्हणून कलकत्ता यथें विचित्र व शांतिनिकेतन या दोन संस्थांनीं मिळून एक उत्सव व नाटक केलें. पुढें बंगालमध्यें सांस्कृतिक चळवळ उत्पन्न करण्यास कारणीभूत झालेल्या कलकत्ता येथील 'विश्वभारती'तर्फें झालेल्या अनेक नाट्यप्रयोगांपैकीं हा पहिला प्रयोग होय. खेडेगांवांतील राहणी सुधारावी ही रवींद्रबाबूंची इच्छा होती. १९१३ त विलायतेहून आल्यावर त्यांनीं सुरल येथें ८० बिघे जमीन असलेलें एक मोठें घर विकत घेतलें व तेथें शेती, गुराढोरांची निपज, खेडेगांवांतील उद्योगधंदे यांसंबंधीं प्रयोग सुरूं केले. १९१६ त रवींद्रनाथ जपानला जाऊन आले. तेथें पाश्चिमात्य सुधारणा व जुनी पौर्वात्य संस्कृति यांतील फरक त्यांना स्पष्टपणें दिसून आला. परत हिंदुस्थानास आल्यावर त्यांना असें वाटूं लागलें कीं, शांतिनिकेतन आश्रम व विद्यालय यांचें कार्यक्षेत्र जास्त व्यापक आहे. हें कार्यक्षेत्र हिंदी संस्कृतीचें केंद्र होण्याइतकें मोठें झालें पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. १९१८ डिसेंबरांत शांतिनिकेतन आश्रमाचे जुन विद्यार्थी, चालूं विद्यार्थी, शिक्षक या सर्वांना जमवून रवींद्रबाबंनीं ही कल्पना त्यांना सांगितली. ती सर्वांना पसंत पडली. तेव्हांपासून संस्थस 'विश्वभारती' हें नांव मिळालें. १९१९ त बुद्ध वाङ्मय, वेदकालीन संस्कृत, पाली, प्राकृत, तिबेटियन व चिनी भाषा इत्यादिकांच्या अभ्यासाची सोय करण्यांतआली. १९१८ त शांतिनिकेतनांतील संस्थांच्या अभ्यासक्रमांत 'कला व संगीत' यांचा अभ्यास आवश्यक करण्यांत आला. १९२१ जुलैत रवींद्रनाथ हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांनीं ३ तऱ्हेचा कार्यक्रम आंखला. १ पौर्वात्य

संस्कृतींचा शांतिनिकेतन येथें अभ्यास. २ खेडेगांवांतील आयुष्य सुखी करण्याचे प्रयत्न . ३ पूर्व व पश्चिम यांच्यांत सलोखा उत्पन्न करून अखिल मानवजातींत ऐक्य उत्पन्न करणें.

विश्वभारती शिक्षणसंस्था

शांतिनिकेतन आश्रम विद्यालय.–याची माहिती वर आलीच आहे. स्थापना १९०१. वर्ग उघड्यावरच भरतात. शिक्षक व विद्यार्थी यांचें नातें अत्यंत जिव्हाळ्याचें असतें. शिवाय मुलें अतिथींच्या आदरातिथ्याचें, दुष्काळाचे वेळीं मदत करण्याचें व शेतकऱ्यांसाठीं वर्ग चालविण्याचें काम हौसेनें करतात.

नारीभवनः— १९२२ त प्रथम थोड्या मुलींसाठीं एक लहानसें वसतिगृह ठेवून सुरुवात झाली. आतां हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या शिक्षणाचें तें एक मोठें केंद्र झालें आहे. येथें मुलींना स्वयंपाक इत्यादि गृहशिक्षणही दिलें जातें. शिक्षणाच्या बाबतींत मुलें व मुली एकत्र शिक्षण घेतात. एकाच प्रकारचें शिक्षण दोघांनाही दिलें जाते. मुलींसाठीं स्वयंपाक, वीणकाम, गृहशास्त्र इत्यादि स्वतंत्र विषयही ठेवले आहेत. शांतिनिकेतन येथील शिक्षणपद्धतीचे ३विभाग पडतात. पाठभवन, शिक्षाभवन व विद्याभवन. प्रत्येक वर्गांत १५ हून जास्त मुलें नसावयाचीं अशी व्यवस्था असल्यानें शिक्षक व मुलें यांचा प्रत्यक्ष संबंध प्रत्यहीं येतो. प्रत्येक विद्यार्थ्यास चित्रकला व संगीत यांचें शिक्षण मिळतेंच. शिवाय शारीरिक कष्टाची संवय व्हावी म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यास शाळेंतील कांहीं वेळ घरगुती हत्यारांचा उपयोग शिकणें, बागाइतीची थोडीशी माहिती, घर व रस्ते यांच्या दुरुस्तीबद्दल माहिती वगैरे शिकून व्यावी लागते. सुतारकाम व वीणकाम यांचीही सोय केलेली असून विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडीप्रमाणें दुसरी एकादी कला शिकण्याची संधि त्याला देण्यांत येते. कॉलेज शिक्षणाचे उद्देश दोन. उच्च तऱ्हेच्या वाङमयिक किंवा कलाविषयक अभ्यासासाठीं विद्यार्थी तयार करणें किंवा व्यापार उद्योगधंदा करून उदरनिर्वाह करूं लागणार आहेत त्यांच्या शिक्षणाची सोय करणें. इतिहास शिकवितांना, सन, मुद्दे व राज्यांच्या घडामोडी यांवर विशेष भर न देतां प्रत्येक युगांतील सांस्कृतिक प्रगतीवर नजर ठेवून इतिहास शिकविण्यांत येतो. हिंदुस्थान व बाहेरील जग यांचा संबंध व जागतिक संस्कृतींत हिंदुस्थानचा वाटा केवढा, हेंही शिकविण्यांत येतें. जगांत चालू असलेल्या किंवा नवीन स्थापन होणाऱ्या नव्या जुन्या संस्थांची कॉलेजच्या विद्यार्थ्यांस माहिती असणें जरूर मानलें जातें. तसेंच आंतरराष्ट्रीय संस्थांची माहिती असणें हेंही त्याला जरूर आहे. या अभ्यासाचा हेतु असा कीं, विद्यार्थ्यांना आचार, विचार, उच्चार यांत सत्य मिळावें व जगांतील मानवजातीचा कल निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या दिशांनीं कसा वहात आहे हें त्यांच्या ध्यानांत यावें.शेतकी व खेडेगांवांतील धंदे (Cottage Industries) यांचेंही शिक्षण दिलें जातें.

कलाभवनः— १९१८ त, दोन तीन विद्यार्थ्यांनिशीं कलाभवनास सुरवात झाली. थोड्याच वर्षांत हिंदुस्थानांतील कलाशिक्षणाच्या अत्यंत मोठ्या संस्थांपैकीं ही एक होऊन बसली आहे. फरेस्की पेंटिंगचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें असून शांतिनिकेतनांतील इमारतींतील चित्रशोभा शांतिनिकेतनांतील चित्रकारांनीं या पद्धतीनेंच केली आहे. यालाच लागून एक ग्रंथालय व एक संग्रहालयही आहे. रवींद्रनाथांनीं सुमारें २५०० बंगाली गाणीं रचलीं आहेत. शांतिनिकेतन येथील विशिष्ट गायनपद्धति ही सर्वमान्य आहे. कलाभवनानें, हिंदुस्थानांतील संघटित नृत्याचें पुनरुज्जीवन केलें.

शांतिनिकेतन ग्रंथालयः— हें अनेक दृष्टीनें हिंदुस्थानांत अपूर्व आहे. त्यांत इंग्लिश, फरेंच, जर्मन, इटालियन ग्रंथ असून शिवाय संस्कृत व इतर हिंदी भाषेंतील ग्रंथ आहेत.शिवाय चिनी व तिबेटियन भाषेंतीलही पुस्तकें आहेत. शिवाय हिंदुस्थानांतील सर्व भागांतून जमा केलेले ३००० हस्तलिखित ग्रंथ आहेत. त्यांत लहान मुलांना उपयोगी असें वाङमय वेगळें ठेवण्यांत आलें आहे.

विद्याभवनः— १९१८ त पौर्वात्य देशांतील निरनिराळ्या संस्कृतींचें केंद्र बनणारी संस्था स्थापन करण्याचे हेतूनें उच्च शिक्षणाचा एक विभाग उघडण्यांत आला. या उच्च शिक्षण-संशोधनाच्या विभागांत, वैदिक व वाङमयीन संस्कृत, हिंदी, जैन व बुद्धी तत्त्वज्ञान, अव्हेस्ता व झोरास्ट्रियन यांचाअभ्यास, पाली, प्राकृत,बंगाली व हिंदी वाङमय, मध्यकालीन हिंदुधर्म, पर्शियन, अरेबिक व इस्लामी धर्मांचा अभ्यास वगैरे विषय यतात. शिवाय वाङमयीन व आधुनिक चिनी, वाङमयीन तिबेटियन, फरेंच व जर्मन भाषांतही धडे देण्यांत येतात. संस्थेतर्फे

महाभारताची एक काळजीपूर्वक संशोधन करून विश्वसनीय प्रत काढण्याचें काम चालूं आहे. रीसर्च इन्स्टिटयूटला आतां आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें असून जगांतील निरनिराळ्या देशांतून या संस्थेस विद्यार्थी मिळाले आहेत. विश्व–भारती १९२१ त स्थापन झाली.तेव्हांपासून जगांतील निरनिराळ्या देशांतील विद्वानांना शांतिनिकेतनास बोलाविण्याचा प्रघात पाडण्यांत आला आहे.

श्रीनिकेतनः—उद्देश—१ शतकरी व खेडेगांवांतील लोक यांचें प्रचलित प्रश्न सोडविण्याची खटपट करून त्यांना सहानुभूति दाखविणें. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा वर्गांत अभ्यास करणें व प्रयोगक्षेत्रांत प्रयोगरूपानें ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणें. ३ प्रयोग करून मिळविलेला अनुभव शेतकऱ्यांना सांगणें,त्यांचें आरोग्य सुधारण्याचे प्रयत्न करणें.शेतकीच्या सुधारलेल्या पद्धतीची शतकऱ्यांना माहिती देणें.हुन्नरकलांचें शिक्षण शेतकऱ्यांना देणें वगैरे कार्य–संस्थेच्या शेतांत शेतीची आधुनिक पद्धति, खतांचा उपयोग वगैरे बाबतींत मिळणारा अनुभव शेतकऱ्यांना सांगण्यांत येतो. संस्थेनें ठेवलेल्या डेअरीच्या योगानें जनावरांचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालूं आहे.कोंबड्यांचा धंदा लोकांना शिकविण्यासाठीं एक विभाग संस्थेनें ठेवला आहे. नवीन पद्धति उपयोगांत आणून त्यायोगें शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारेल असा संस्थेस भरंवसा आहे.

खेडेगांवांतील शाळाः—खेडेगांवांतील शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा हा एक प्रयत्न आहे. लहानपणापासूनच मुलांना धंदेशिक्षण व बौद्धिक शिक्षण दिलें जातें. बौद्धिक शिक्षण व प्रत्यक्ष आयुष्यांतील अनुभव यांची सांगड घालण्याचा हा प्रयत्न आहे. मुलें बागेंत भाजीपाला लावतात.मुलें मधूनमधून सफर करावयासही जातात. मुलींकरितांही एक शाळा असून तेथें वाचणें,लिहिणें व अंकगणित, विणकाम, स्वयंपाक, व बाग लावणें वगैरे बद्दलच्या मुख्य कल्पना सांगण्यांत येतात.

ग्रामपुनर्घटनाः—हें खातें खेडेगांवांतील लोकांत स्वावलंबन उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतें. १९२७ त जिल्ह्यांत पडलेल्या दुष्काळांत संस्थेनें अनेक प्रकारें मदत केली. व गरिबांस कापड व धान्य वाटलें. बीरभम (Birhhum) येथें सुमारें २०००० कोष्टी आहेत. परंतु कोष्ट्यांचा धंदा हळूंहळूं नाहींसा होत चालला आहे. तो धंदा पुन्हां भरभराटीस आणण्याची खटपट चालूं आहे. १९२२ पासून १९२८ पर्यंत १६२ माणसें संस्थेच्या विणकाम विभागांत शिक्षण घऊन बाहेर पडलीं.या जिल्ह्यांत संस्थेच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं १८ केंद्रें (Centres) आहेत व जिल्ह्याबाहेर ५ केंद्रें आहेत. बीरभमांत सुमारें २०००० कातडें कमावण्याचा धंदा करणारे आहेत. ते अत्यंत गरीब आहेत. त्यांच्याजवळ शेती नाहीं. कातडें कमावण्याच्या धंद्याच्या लहानशा विभागातर्फे अशा लोकांना या धंद्यांतील आधुनिक उपाय सांगण्याचा प्रयत्न चालूं आहे.

सहकारी मंडळें—सरकारी सहकारी खात्याच्या मदतीनें शांतिनिकेतन येथें एक सहकारी बँक स्थापण्यांत आली आहे. आणि १९२८ पर्यंत त्या बँकेशीं सहकार्य करण्यासाठीं म्हणून २२६ क्रेडिट सोसायट्या, ६९ इरिगेशन सोसायट्या व १२ आरोग्यमंडळें रजिस्टर करण्यांत आलीं आहेत.

सद्यःस्थिति—१९३१ त बडोदें सरकारकडून ६००० रु. ची ग्रँट मिळाली. शांतिनिकेतन यथील फलोशिपसाठीं इंग्लंडांतील फरेंड सर्व्हिस कौंसिलकडून १९३१ त रु. २९११–६–११ ची देणगी मिळाली. कलकत्याचे श्री. बहादूरसिंगजी सिंगही (Singhi) यांनीं शांतिनिकेतन यथें जैन धर्माच्या विद्याभ्यासासाठीं प्रतिवर्षीं २४०० रु. याप्रमाणें तीन वर्षें ग्रँट देऊं केली आहे. त्याचप्रमाणें मुंबईचे मेसर्स नगीनदास लल्लूभाई अँड सन्स यांनीं जैन संशोधनासाठीं ३०० रु. दिले आहेत.मि.एल्म्हर्स्ट (elm hirst) यांनीं दरवर्षी ५०० पौंडाची तीन वर्षें चालूं राहाणारी संशोधन शिष्यवृत्ति दिली आहे. खेडेगांवची सामाजिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न व प्रयोग करण्यासाठीं ही शिष्यवृत्ति आहे.या योजनेप्रमाणें शिष्यवृत्ति मिळालेल्या फेलोस राहण्यासाठीं सोईस्कर जागा वगरेसाठीं मि.एल्म्हर्स्ट यांनीं स्वतंत्र ६००० रु. ची देणगी दिली आहे. १९३१ च्या शवटीं सभासदांची संख्या ७६७ होती. त्यांपैकीं २२६ आजन्म सभासद होते. बंगाल सरकारनें १९३१ त ३००० रु. ची ग्रँट दिली. ती सर्व रक्कम शेतकीविषयक सुधारणप्रीत्यर्थ खर्च करण्यांत आली. विद्याभवनांत (संशोधनालयांत) एकंदर १३ विद्यार्थी होते. त्यांपैकीं १ चीनहून,१ सिलोनहून, १ मंगोलियांतून, १ नेपाळहून, व १ जपानहून असे परदेशचे विद्यार्थी आले होते. बाकीचे सर्व हिंदी होते (गुजराथी ३, बंगाली ५).१९३१ त संशोधनात्मक पुस्तकें व निबंध विद्याभवनातर्फे प्रकाशित करण्यांत आले.त्यांची संख्या सहा होती.

शिक्षाभवनांत (शांतिनिकेतन कॉलेज), १९३१ च्या डिसेंबरांत ७८ विद्यार्थी होते (६२ मुलगे व १६ मुली). विद्यार्थ्यांनीं 'लिटररी असोसिएशन' व 'इकॉनमिक सोसायटी' आपल्या हिंमतीवर चालविल्या आहेत. भोंवतालच्या खेड्यांची आर्थिक दृष्ट्या पाहणी करण्यांत आली. डांसाविरुद्ध चालविलेली मोहीमही यशस्वी झाली. बंगालमधील राजशाही जिल्ह्यांतील जलप्रलयाचे वेळीं विद्यार्थ्यांनीं वर्गणी जमवून मदत केली. पाठभवनांत (Pathabhavan), नोव्हेंबर १९३१ त विद्यार्थ्यांची संख्या १६७ होती (मुलगे १२२, मुली ४५). चित्रकला, संगीत, नृत्य, सुतारकाम, विणकाम, व बागाईत यांकडे लक्षही पुरविण्यांत येतें. कलाभवनांत २६ विद्यार्थी होते. (१० मुली). येथें लाकडाचें खोदकाम कशिद्याचें काम, (embroidery व (Modelling) वगैरेचें शिक्षणही दिलें जातें. विश्वभारती ग्रंथालयांत शांतिनिकेतन येथील जनरल लायब्ररी, विद्याभवनांतील संस्कृत व प्राच्य भाषांतील ग्रंथसंग्रह, कलाभवनची आर्ट लायब्ररी, लहान मुलांचें ग्रंथालय व सुरल येथील शांतिनिकेतन ग्रामसुधारणा ग्रंथालय यांचा समावेश होतो. १९३१ त ५८१ नवीन ग्रंथांची भर टाकण्यांत आली. एकंदर ग्रंथांची संख्या ३४१३० झाली. श्रीभवनांत राहणाऱ्या मुलींची सरासरी संख्या ४५ होती. त्यांपैकीं १ जपानी, १ जर्मन व १ पारशी विद्यार्थिनी होती. शाळेंतील अभ्यासक्रमाखेरीज मुली कशिद्याचें काम, शिवणकाम वगैरेही शिकतात. शिवाय लाठी, जंबिया व जुजुत्सु यांचे खेळही त्यांना शिकविण्यांत येतात. पिअर्सन मेमोरियल हॉस्पिटल—१९३०–३१ त एकंदर २८२९ बाहेरच्या रोग्यांना औषधोपचार झाले. हॉस्पिटलमध्यें एकही रोगी मेला नाहीं. खेळ—जुजुत्सुचें शिक्षण एका जपानी तज्ज्ञाकडून देण्यांत आलें होतें. व कलकत्ता व सुरी (Suri) प्रदर्शनांचे वेळीं यांचे प्रयोगही करून दाखविण्यांत आले. शिक्षाभवनांतील विद्यार्थ्यांनीं शारीरिक खेळाच्या चढाओढी भरवल्या होत्या. मुलांमुलींनीं त्यांत भाग घेतला होता. बाहेरचे संघ बोलावून आणून त्यांजबरोबर शांतिनिकेतन संघाचे फुटबॉलचे सामने झाले. शिवाय व्हॉली बॉल, लाठी, जंबिया वगैरे खेळ आहेतच.

श्रीनिकेतनची १९३०–३१ वर्षांतील एकूण जमा रु. ५३०४७–९–३ त्यांपैकीं रु. ७०३५–८–४एवढी रक्कम औषधविक्री व इतर विक्री यांमुळें मिळाली. अध्यापकांना राहण्यासाठीं या वर्षीं एक इमारत बांधली. त्यास रु. १०५६०–५–९ इतका खर्च आला.व इतर आवश्यक सामानसुमान वगैरेसाटीं रु. ६३९–१३–९ खर्च करण्यांत आले. प्रकाशन शाखेतर्फे १९३०–३१ त रु. ३३१३०–२–६ इतक्या किंमतीचीं बंगाली पुस्तकें विकलीं गेलीं. विश्वभारती संस्थेतर्फे एक त्रैमासिक चालविण्यांत येत असतें. अध्यक्ष व जनरल सेक्रेटरी कविवर्य रवींद्रनाथ टागोर, खजिनदार श्री. देवेंद्रमोहन बोस.

हिंदू विश्वविद्यालय, काशी:—भारतीय संस्कृति व धर्म यांच्या रक्षणासाठीं व त्याबरोबरच भौतिक विद्वानांच्या प्रसारासाठीं एक विश्वविद्यालय स्थापावें, ही पंडित मदन मोहन मालवीय यांची फार दिवसांची आकांक्षा होती. व काशीचें प्रचंड विद्यालय हें त्या आकांक्षेचेंच मूर्त फल होय. १९०५ सालीं प्रथम त्यांनीं या विद्यालयाची योजना प्रसिद्ध केली. पण ११ साला पर्यंत कांहींच झालें नाहीं. ११ सालीं ती योजना दुरुस्त करून पुनः प्रसिद्ध करण्यांत आली. त्यांत पुढीलप्रमाणें हेतु नमूद केले होते. (१) हिंदु शास्त्रें व संस्कृत भाषा यांच्या अध्ययनास उत्तेजन देणें, (२) कला (आर्टस), व विज्ञान (सायन्स) यांच्या सर्व शाखांचें अध्ययन करणें, (३) देशी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें (४) धर्म व व्यवहार यांचें शिक्षण देणें. या योजनेला सर्वांकडून फारच प्रोत्साहन मिळालें व अल्पावधींतच ३० लक्षांचीं अभिवचनें मिळालीं. नंतर मालवीयजी यांनीं राजे, महाराजे, संस्थानिक यांना विनंति केली व त्यांनींहि अगदीं उदार हस्तानें मदत दिली. सरकारनेंही या योजनेला मान्यता दिली. १९१५ सालीं हिंदुविश्वविद्यालय बिल रीतसर पास झालें, व त्या अन्वयें देशांतील इतर विद्यापीठांइतकाच याही पीठाचा दर्जा आहे हें मान्य करून या पीठाच्या पदव्याही मान्य याचें सरकारनें कबूल केलें. वरील बिल वरिष्ठ कायदेमंडळापुढें मांडतांना शिक्षणमंत्री सर हारकोर्ट बटलर यांनीं फारच प्रशंसेचे उद्गार काढले. व आज मी हिंदू असतों तर मला फार अभिमान वाटला असता असेंही सांगितलें. वरील ४।५ वर्षांच्या अवधींत मालवीयांनीं सुमारें १ कोटी ५ लक्ष रुपयांपर्यंत द्रव्यनिधि रोख जमविला. शिवाय पाच लक्ष सरकारनें दिले. वरील रकमेपैकीं जवळ जवळ २५ लक्ष रुपये मुंबईहून गेले आहेत, १३ लक्ष शिंदे.

होळकर व गायकवाड यांनीं दिले आहेत. १९१६ सालीं लार्ड हार्डिंज यांनीं विद्यापीठाची कोनशिला बसविली, व विद्यापीठाच्या १३०० एकराच्या जागेंत आज दीडशेंच्या वर इमारती उभारल्या आहेत. एक कोटी रुपयांपैकीं सुमारे सहा लक्ष जागेसाठीं, साडेसत्तेचाळीस लक्ष इमारतीसाठीं व तेवीस लक्ष शास्त्रीय उपकरणें व इतर सामान यासाठीं खर्च झाले आहेत. आज या पीठांत विद्येच्या जवळ जवळ तीस शाखांचें अध्ययन सुरूं आहे. २२०० च्या वर विद्यार्थी येथें शिकत असून शिक्षकांची संख्या दीडशेंच्या वर आहे. बारा प्रयोगशाळा चालूं असून त्यावर सुमारें तेवीस लक्ष रु. खर्च झाले आहेत. ग्रंथशाळेंत ४३००० च्या वर ग्रंथ आहेत. विद्यार्थ्यांना ३७० शिष्यवृत्त्या व ३५० पर्यंत नादाऱ्या दिल्या जातात. सर्व पौर्वात्य व पाश्चिमात्य खेळांचीं पूर्ण सोय केली असून लष्करी शिक्षणही देण्यांत येतें. त्यासाठीं ३०० बंदुकीही ठेवण्यांत आल्या आहेत. हा प्रचंड व्याप चालविण्यास दरसाल दहा लक्ष रु. खर्ची पडतात. अध्यात्म विद्या, पौर्वात्य विद्या, आयुर्वेद या शाखेच्या विद्यार्थ्यांना व स्त्रियांना फी माफ असते. इतर विद्यार्थ्यांनाहि बाहेरच्या मानानें येथें फी कमी असते. सर्व शाखांत एम. ए. व एम. एस सी. पर्यंतचें शिक्षण येथें मिळतेंच. पण शिवाय इंडस्ट्रियल केमिस्ट्री, मायनिंग मेटॅलर्जी, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग यांचेंहि उच्च शिक्षण येथें दिलें जातें. हें शिक्षण अन्यत्र मिळत नसल्यामुळें येथें त्याचे विद्यार्थी फार जमतात. या विद्यापीठाचें स्वरूप अखिल भारतीय आहे हिंदुस्थानांतील निरनिराळ्या २२२ जिल्ह्यांतून यथें विद्यार्थी यतात. १९२९ सालीं सर्व विद्यार्थ्यांपैकीं १११३ सं.प्रांतांतील होते. मुंबई प्रांतांतील १०५, वऱ्हाड १० व मध्यप्रांत २३१, वाकी इतर प्रांतांतील असे विद्यार्थी होते. विद्यापीठासाठीं आतांपर्यंत १॥ कोटी रु. खर्च झाले आहेत व तें अगदीं सर्वांगपरिपूर्ण व्हावयास आणखी ४ कोटी रु. तरी लागतील असें मालवीयजी म्हणतात. म्हणून १९२९ सालींच त्यांनीं आणखी एक कोटींची मागणी केली आहे. ती रक्कम जमतांच टेक्नॉलजी, शेतकी, कॉमर्स व संगीत यांचीं कॉलेजें सुरूं होतील. मातृभाषेंतून शिक्षण देणें हा हेतु चालकांनीं आरंभापासून दृष्टीपुढें ठेवला आहे. कॉलेजच्या शिक्षणासाठीं आज सर्व प्रकारचे ग्रंथ हिंदीमध्यें तयार झाले असून बी. ए. व एम. ए.च्या परीक्षाही लवकरच हिंदींतून होतील. हिंदभूमीजवळ अपार नैसर्गिक संपत्ति आहे. पण शास्त्रीय ज्ञानाच्या अभावीं ती एकतर तशीच पडून आहे व पुष्कळ ठिकाणीं तिचा परकीयांनाच उपयोग होत आहे. तेव्हां शास्त्रीय संशोधनाला शक्य त्या तऱ्हेनें उत्तेजन देऊन देशांतील सर्व संपत्तीचा उपयोग करून घ्यावयाचा व अशा तऱ्हेनें या भूमींतील दारिद्र्य नाहींसें करून टाकावयाचें ही मालवीयजींची जबर आकांक्षा आहे.—

१ कोटी ५ लक्षाचा द्रव्यनिधि कोणी कसकसा दिला त्याची यादी पुढें दिली आहे:—

उदयपूरचे महाराज, १॥ लक्ष.
जोधपूरचे महाराज, २लक्ष. (शिवाय वा.२४हजार)
जयपूरचे महाराज, ५ लक्ष.
बिकानेरचे महाराज, १॥ लक्ष (शिवाय वा.१२ह.)
कोटाचे महाराज, १॥ लक्ष.
किसनगडचे महाराज, -।।- लक्ष.
अलवारचे महाराज, २ लक्ष.
गायकवाड, ३ लक्ष.
म्हैसूरचे महाराज, ३ लक्ष २० हजार.
काश्मीरचे महाराज, वार्षिक १२ हजार
शिंदे, ५ लक्ष २५ हजार
होळकर, ५ लक्ष
पतियाळचे महाराज, ५ लक्ष (शिवाय वा.२४ ह.)
नाभाचे महाराज, १ लक्ष.
बनारसचे महाराज, १ लक्ष
धोलपूरचे महाराज, -।।।- लक्ष.
दरभंगाचे महाराज, ४ लक्ष.
कासिम बझारचे महाराज, १ लक्ष ३१ हजार
बाबू राजेंद्र किशोर रॉय, १ लक्ष.
डॉ. राजबिहारी घोष, १ लक्ष.
भोलानाथ बरूह आसाम, १ लक्ष २० हजार
राजा किस्नोदास व हृषिकेष लॉ, कलकत्ता-।।।-ल.
शेट बलदेवदास व हजारीमलदूधवाले, कलकत्ता १ल.
तारकेश्वरचे महंत, १ लक्ष.
सर भगवती प्रसाद, अयोध्या १ लक्ष २७ हजार.
राजा सुराजबक्षसिंग, अयोध्या १ लक्ष.
राजा मोतीचंद, काशी १ लक्ष.
डॉ. सर सुंदरलाल, प्रयाग १ लक्ष.
राजा सूर्यपाळसिंग, अवागड १ लक्ष.
राय रामचरणदास बहादूर, प्रयाग -।।।- लक्ष.
राजा हरिहर प्रसाद, पाटणा -।।- लक्ष.
शेठ संगीदास जैशीराम, मुंबई २॥ लक्ष
शेठ मथुरादास वसंजी खिमजी, १॥ लक्ष.

शेठ धरमसी व नरोत्तम मुरारजी गोकुळदास, मुंबई १ लक्ष.
शेठ रामनारायण हरनंद्रै, मुंबई १ लक्ष १ हजार.
शेठ खेतसी खैरसी, मुंबई १ लक्ष.
शेठ दयाशंकर देवशंकर दवे, मुंबई १ लक्ष.
शेठ मूळराज, व त्रिकमदास गोवर्धनदास खटाव, मुंबई २ लक्ष ८४ हजार.
राजा बलदेवदास बिर्ला, अँड सन्स, कलकत्ता व मुंबई ६ लक्ष ९२ हजार.
शेठ जीवनलाल पन्नालाल, मुंबई, ६२ हजार.
शेठ मुळजी हरिदास, मुंबई, ५० हजार.
शेठ सुरजमल हरणंद्रै, मुंबई, ५१ हजार.
शेठ शांतिदार असुकरण, मुंबई, ५१ हजार.
शेठ मणीलाल जगल्दास मुंबई, ५१ हजार.
शेठ वसंजी मुंजी, मुंबई, ५१ हजार.
शेठ छबिलदास लक्ष्मीदास, मुंबई ६१ हजार.
शेठ बंकीलाल मुंजीलाल, मुंबई, ५० हजार.
शेठ किलाचंद देवचंद, मुंबई, ५० हजार.
शेठ मंगलदास गिरधरदास परेख,अहमदाबाद५१ह.
शेठ हंसराज प्रागजी ठाकरसी मुंबई, ५१ हजार.
शेठ ताराचंद घनश्यामदास, कलकत्ता, ५० हजार.
शेठ चतुर्भुजदास गोवर्धनदास मुळजी जेठा, मुंबई १०० हजार
शेठ जम्नालाल बजाज, वर्धा ५० हजार.
राजा रामानंदसिंग व राजा किर्तनंदसिंग पूर्णिया १०० हजार.
लिंबडीचे ठाकूरसाहेब, ५५ हजार.
५०००० चे खालील देणग्या २१ लक्ष ८९ हजार.
राज व जनता मिळन एकूण १ कोटी ५ लक्ष.

मराठी राज्यांतील विद्योत्तेजक.

शाहू महाराजांचे कारकीर्दीचा उत्तरार्ध म्हणजे बाळाजी विश्वनाथ, थोरले बाजीराव व नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीचा अत्यंत महत्त्वाचा काळ. हे तिन्ही पुरुष शौर्यशाली व राजकारणकुशल असून त्यांना विद्याभिरुचिही चांगली होती. त्यामुळें त्यांच्या हातून विद्वान् लोकांस चांगलें उत्तेजन मिळून एकंदर लोकसमाजामध्यें विद्येविषयीं बरीच गोडी उत्पन्न झाली, आणि राजदरबारांतही समशेरीप्रमाणेंच लेखणीचेंही महत्त्व वाढलें. त्यामुळें रणशूर योद्धयाप्रमाणेंच लेखनकुशल कारकूनही प्रसिद्धीस येऊं लागले. अर्थात् ही स्थिति घडवून आणण्यास पुष्कळांशीं राजाश्रय हाच कारण झाला. पेशव्यांच्या कारकीर्दीपासून **उत्तम हस्ताक्षर** हा कारकुनांना मुख्य गुण बनल्यामुळें सर्व शिष्ट लोकांचीं मुलें लिहिण्यावाचण्यांत विशेष तरबेज झालीं. त्यामुळें ह्या कालापासून लोकसमाजाची प्रवृत्ति विद्यासंपादनाकडे अधिक होऊं लागली; आणि महाराष्ट्र लेखनपद्धति व भाष यांवर त्याचा इष्ट परिणाम घडून आला. खुद्द पेशव्यांचीं मुलें हीं बहुश्रुत व चाणाक्ष निपजून त्यांनाही विद्येची गोडी उत्पन्न झाली.

थोरले बाजीराव साहेब पेशवे हे स्वतः विद्वानांचे चहाते होते व त्यांनीं गुणी पुरुषांचा परामर्ष चांगला घेतला. त्यांच्या आश्रयानें **निरंजन माधव** नामक एक कर्नाटकांतील कवि प्रसिद्धीस आला. ह्या कवीनें आपल्या एका काव्यामध्यें बाजीराव पेशव्यांची कृतज्ञ अंतःकरणानें स्तुति केली आहेः—

शाहू भूपतीचा प्रधान । बाजीराव बल्लाळ पृथ्वीरत्न । परमयशस्वी पावन गुण । भूपाळ मंडळी शिरोमणी ॥ १ ॥

गुणरत्नांचा परीक्षक । स्वयें सद्गुण पूर्ण अनेक ॥ तेणें संग्रह केला सम्यक । ज्येष्ठ बंधूसह आमुचा ॥ २ ॥

यावरून बाजीरावसाहेब हे गुणरत्नांचे परीक्षक होते हें निराळें सांगावयास नकोच. बाजीराव साहेबांचे चिरंजीव नानासाहेब हेही चतुर, राजकारणप्रवीण आणि रसिक होते. त्यांनींही आपल्या कारकीर्दींत विद्वानांचा चांगला परामर्ष घेतला. नानासाहेबांप्रमाणें त्यांच्या वेळचे राजे लोक व संस्थानिक हेही गुणग्राही होते, असें **निरंजन माधवानें** अनुभवानें लिहिलें आहे.

नानासाहेब यांचे कारकीर्दीमध्यें पुष्कळ विद्वान् पुरुष आणि कवि उदयास आले. त्यांत **मोरोपंत** यांचा उल्लेख करणें अवश्य आहे. मोरोपंत हे बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या आश्रयानें आपल्या अपूर्व काव्यरसाचा महाराष्ट्रीयांस लाभ देण्यास समर्थ झाले. त्यांनीं आपल्या ह्या रसिक व गुणग्राही यजमानाची आपल्या ग्रंथामध्यें केलेली स्तुति प्रसिद्धच आहेः—

श्रीमत्सदाशिवात्मज बाबूजी नायक प्रभु ज्ञानी ॥

धन्य म्हणावें ज्याला शुद्धगुणश्रवणतृप्त सुज्ञांनीं १
दाता, वक्ता, योद्धा, तेजस्वी, मानधन, असामान्य ॥
अतुलें पितृप्रसादें मंडित देवव्रता-अपा मान्य २

ह्याप्रमाणें उत्तरोत्तर नदीच्या प्रवाहाप्रमाणें राजाश्रयाचा ओघ विस्तृत होत जाऊन, थोरले माधवराव व सवाई माधवराव यांचे कारकीर्दीत, विद्वान्, पंडित, कवि, शाहीर, वगैरे अनेक लोक निर्माण झाले; व त्यांनीं आपल्या वाणीच्या दिव्य प्रभावानें आणि विद्वत्तेच्या अपूर्व तेजानें महाराष्ट्र देशास सुप्रकाशित केलें. पेशवे, त्यांचे सरदार व त्यांचे मुत्सद्दी यांच्याकडून बुद्धिमान् लोकांस पुष्कळ उत्तेजन मिळालें. त्यांच्या आश्रयाच्या जोरानें महाराष्ट्रांत विद्या व वाङ्मय यांची चांगली अभिवृद्धि झाली, असें मानण्यास कोणतीच हरकत नाहीं. नानाफडणवीस, अहल्याबाई होळकर, महादजी शिंदे, अमरसिंह जाधव, बाबूजी नाईक बारामतीकर इत्यादि मानवरत्नें हीं—

ते धन्यास्ते महात्मानो तेषां लोके स्थिरं यशः ।
यैर्निबद्धानि काव्यानि येच काव्येषु कीर्तिताः॥१॥

ह्या सुभाषिताप्रमाणें धन्य होत.

पेशव्यांच्या कारकीर्दीत विद्योत्तेजनाचें कार्य अनेक प्रकारांनीं व अनेक रूपांनीं सिद्धीस गेलें, असें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. त्यामध्यें मुख्यत्वेंकरून **श्रावणमासाची दक्षिणा** ही पुरातन संस्था विद्वान् पंडितांस व शास्त्री लोकांस उत्तेजन देण्यास विशेष कारणीभूत झाली. ह्या संस्थेची अल्पशी माहिती येथें देणें अवश्य आहे. ह्या संस्थेचा उगम छत्रपति श्री शिवाजी महाराज यांचे कारकीर्दीतच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. छत्रपति शिवाजी महाराज हे प्रतिवर्षी विद्वान् लोकांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें श्रावणमासामध्यें दक्षिणा वांटीत असत. हीच संस्था सर्व प्रकारचे विद्वान् ब्राह्मण एकत्र जमवून त्यांच्या विद्वत्तेची परीक्षा घेण्यास व त्यांची योग्य प्रकारें संभावना करण्यास अत्यंत उपयुक्त झाली होती. ही संस्था तळेगांवचे दाभाडे सेनापति हे बरींच वर्षे चालवीत असत. त्रिंबकराव दाभाडे यांचा बाजीराव पेशव्यांनीं इ. स. १७३१ मध्यें पराभव केल्यानंतर त्यांनीं ही दक्षिणेची संस्था पुण्यामध्यें सुरू केली. तेव्हांपासून दुसरे बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दीपर्यंत ती अव्याहत रीतीनें चालली होती. त्यामुळें विद्वान् लोकांस उत्तेजन मिळून, विद्वान् लोकांची संख्या प्रतिवर्षी वाढत चालली, व त्याप्रमाणें दक्षिणेची रक्कमहि वाढत गेली. थोरले बाजीरावसाहेबांच्या कारकीर्दीतील दक्षिणेचा पहिला उल्लेख इ. स. १७३६ सालापासून सांपडतो. इ. स. १७३६ मध्यें दक्षिणेची रक्कम १६३५४ रुपये खर्ची पडल्याची माहिती सांपडते. याचेच दुसऱ्या वर्षी ४९०७३ रुपये नक्त व कापड मिळून वांटण्यांत आले. ह्यानंतर ही दक्षिणेची रक्कम एकसारखी वाढत गेली, व बाळाजी बाजीराव यांचे कारकीर्दींत ती एक लाखांवर गेली. इ. स. १७४९ मध्यें १२३५३० रुपये दक्षिणेचा खर्च झाला. पूर्वी ब्राह्मणांची संख्या थोडी असल्यामुळें ब्राह्मणांस भोजन देण्यांत येत असे; परंतु इ. स. १७४९ पासून खिचडी देण्याची चाल सुरू झाली.

ह्यानंतर प्रतिवर्षी दक्षिणेची रक्कम वाढत गेल्याचें दिसून येतें; व त्यावरून पेशवाईच्या भरभराटीचीही कल्पना करितां येते. इ. स. १७५२ मध्यें ६,२८,३५३ इतका खर्च झाला; व त्याचेच पुढें वर्षी १२,०६०१९ इतकी रक्कम खर्ची पडल्याचें दिसून येतें. ह्याप्रमाणें दक्षिणेची रक्कम व विद्वानांची संख्या एकसारखी वाढत गेली. ती पानिपतच्या लढाईपर्यंत भरभराटीच्या स्थितींत होती. पानिपतची लढाई झाल्यामुळें मराठी राज्यास मोठा धक्का पोंचला व त्याप्रमाणें दक्षिणेची रक्कमही कमी झाली. इ. स. १७६२ मध्यें काव्यपाठी, वैदिक व पंडित यांस मिळून अवघे ११,८९८ रुपये देण्यांत आले ! पुनः थोरले माधवराव साहेब यांच्या कारकीर्दीमध्यें ही रक्कम वाढत चालली. इ. स. १७६५ मध्यें १,३२,०४३ रुपये खर्ची पडले आहेत. या वर्षी दक्षिणेचा रमणा पर्वतीस केला होता; व तेव्हांपासून तो तेथेंच चालूं झाला. इ. स. १७६८ मध्यें दक्षिणेची रक्कम २,८८,७४५ रुपये झाली होती. आणि इ. स. १७७६ मध्यें ती ५,०५,१९८

पर्यंत गेली. ह्यावरून थोरल्या माधवराव साहेबांच्या कारकीर्दीमध्यें राज्याची भरभराट कशी झाली याची थोडीशी कल्पना करतां येते. यानंतर सवाई माधवरावांच्या कारकीर्दीमध्यें दक्षिणेची भरभराट विशेष झाली व विद्वानांची संख्या पुणें येथें विशेष वाढली. पुण्यामध्यें रामशास्त्री प्रभुणे, बाळशास्त्री टोकेकर, अय्याशास्त्री, काशीनाथशास्त्री, वगैरे मोठमोठे विद्वान् चमकूं लागले. श्रावणमासचे दक्षिणेसाठीं दूरदूरचे लोक येऊं लागले. कुंभकोण, श्रीरंगपट्टण, तंजावर, रामेश्वर, मथुरा, काशी, कानकुब्ज, गढवाळ, ब्रह्मणपुर, औरंगाबाद, जालनापूर, कोल्हापूर, इंदूर वगैरे दूरदूरचे ब्राह्मण पुण्यनगरींत येत असत. त्यांमध्यें वैदिकः—आश्वालायन दशग्रंथी, आपस्तंब पंचग्रंथी, तेलंग जटापाठी, वाजसेनी शतपथ संपूर्ण व पदक्रम जाणणारे, सामवेदी, अथर्ववेदी, पंचग्रंथी, काण्व क्रमपाठी, श्रौतीसोमाचे अध्वर्यु. पंडितः—व्याकरण, कौस्तुभ पढलेले. नैय्यायिकः—भावानंदी जाणणारे. मीमांसकः—शास्त्र दीपिका पढलेले. वेदांती—भाष्य व प्रकरणें, सिद्धांत लेश असे दोन पद्धतीचे. जोशीः—ग्रहकपर्व व संपूर्ण जातक, ताजक पढलेले, पत्रिका वर्षफळ जाणणारे. पुराणिकः—कौमुदी व वेदांतिक न्यायप्रकरण पढलेले. काव्यपाठीः—माघान्त काव्यें पढविणारे. अलंकारीः—कुवलयानंद पढविणारे. वैद्यः—शार्ङ्गधर पढविणारे व वैद्यक प्रकरण संपूर्ण पढवून रसायनक्रिया जाणणारे. अग्निहोत्री, तपस्वी, वैदिक, गायत्री, मांत्रिक, इत्यादि प्रकारचे विद्वान् व शास्त्रज्ञ असून शिवाय कविही असत. यांशिवाय विद्यावंतांचे पुत्रपौत्र, सरकारचे आश्रित उपाध्ये, दूरदेशस्थ, देवालयांत धरणें देऊन शुभचिंतन करणारे, वगैरे अनेक लोक असत. ह्यांशिवाय अन्य जातींचे म्हणजे जंगम, गोसावी, फकीर, वगैरेही लोक असत. अशा प्रकारचा लोकसमूह एकत्र करून त्यांची संभावना करणें व विद्योत्तेजन देणें हें महत्कार्य होय असें कोण म्हणणार नाहीं ? पुण्यामध्यें श्रावणमासीं हा जो विद्वानांचा भरणा होत असे त्यावरून विद्वानांची संख्या कसकशी वाढत गेली, व त्यांमध्यें निराळे विद्वान् किती होते, तेंही समजून येतें. इ. स. १७७६ मध्यें २६७ पंडित, ११३७ वैदिक, ६१ जोशी, ८२ पुराणिक, ४० वैद्य, १३ कवि, आणि ५४ तपस्वी हजर होते. इ. स. १७९७ मध्यें हीच संख्या पुढें लिहिल्याप्रमाणें आहेः—१०३४ पंडित, १७२८ वैदिक, २१३ जोशी, १०४ पुराणिक, १२६ वैद्य, ४३ कवि, १०८ तपस्वी. ह्यावरून वीस वर्षांत किती विद्यावृद्धि झाली याची कल्पना होईल.

इ. स. १८१८ मध्यें पेशवाई बुडाल्यावर ही दक्षिणा पूर्वीच्या स्वरूपांत फार दिवस राहिली नाहीं. या संस्थेचा हेतु व महत्त्व लक्षांत घेऊन मि० एल्फिन्स्टन यांनीं या द्रव्याचा विनियोग विद्योत्तेजनाकडेच केला, व लोकांस ज्ञानामृत पाजण्याकरितां पाठशाळा व शिष्यवृत्ति संस्थापित केल्या, हें सर्वश्रुतच आहे. इ. स. १८२१ मध्यें मि० एल्फिन्स्टन् यांनीं, पेशव्यांनीं चालविलेल्या या प्रतिवार्षिक विद्योत्तेजनाचे संस्थेबद्दल आपलें जें मत दिलें आहे, तें अतिशय महत्त्वाचें असल्यामुळें येथें नमूद केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ते म्हणतातः—

" The Dakshina was expressly designed to encourage learning. It formerly amounted to eight or ten lacs of rupees, and though Bajee Row reduced the expenses, he still gave a small sum to each of 50,000 Brahmins, besides large prizes to all who distinguished themselves by their learning. Both he and all his Sirdars and ministers employed many learned Brahmins in various offices connected with the Hindu ritual; and all, on a religious principle, allowed stipends and grants of land to many others for whose services they had no call. Add to this that learning was a certain title to the countenance of the great and to

the respect of the people, and we may estimate the incentives to the acquisition of it which were destroyed by our conquest. It is true that this encouragement may not have been judiciously directed, but the effects of it on the whole, were beneficial, and such as I cannot but think that it is still desirable to preserve. A class of men was maintained whose time was devoted to the cultivation of their understanding; their learning may have been obscure and degenerate, but still it bore some affinity to real science into which it might in time have been improved. They were not perhaps much inferior to those monks among whom the seeds of European learning were long kept alive; and their extinction, if it did not occasion the loss of much present wisdom would have cut off all hope for the future.

ह्यावरून मराठी राज्यांत मिळत असलेल्या ह्या विद्योत्तेजनानें केवढें महत्कार्य केलें, हें सिद्ध होतें, असो. मराठी अमदानींत विद्योत्तेजन कसें मिळालें. त्याची अल्प माहिती येथें सादर केली आहे. तिच्या वरून महाराष्ट्रामध्यें विद्याप्रसाराचे व लोकोन्नतीचे प्रयत्न अनेक रीतीनें होत असत, व त्यांचा राष्ट्राच्या संस्कृतीस व अभ्युदयास पुष्कळ उपयोग झाला, हें निर्विवाद आहे. लोकशिक्षणाचें स्वरूप पूर्वी अगदीं वेगळें असल्यामुळें या प्रयत्नांचें फळ पाश्चात्य शिक्षणासारखें तेजःपुंज व देदीप्यमान जरी दिसण्यांत येत नाहीं, तरी तें स्वराष्ट्र व स्वभाषा यांच्या उन्नतीस पुष्कळ कारणीभूत झालें असून तें मराठी राज्यास खरोखर भूषणास्पद होतें, यांत शंका नाहीं.

मुंबई विद्यापीठ

स्थापनेचा कायदा, १८ जुलै १८५७

मुंबई प्रांतांतील लोकांत शिक्षणाचा प्रसार व्हावा, सुशिक्षितांच्या परीक्षा घ्याव्या व त्यांना पदव्या द्याव्या यासाठीं मुंबईला एक विद्यापीठ स्थापन करावें असें ठरलें असल्यामुळें पुढील कायदा करण्यांत येत आहे.

लॉर्ड एलिफन्स्टन मुंबईचे गव्हर्नर, सर् यार्डले चीफ जास्टिस, रे हार्डिज मुंबईचे बिशप, जगन्नाथ शंकरशेट, भाऊदाजी, बमनजी होर्मसजी, जमशेटजी जिजीभाई व इतर आणखी २२ गृहस्थ हे पहिले चॅन्सेलर, व्हाइस चॅन्सेलर व फेलो; व यांच्या मागून याच जागीं येणारे लोक या सर्वांचें एक विद्वद्‌मंडळ Body politic आहे असें जाहीर करण्यांत येत असून त्या मंडळास ' मुंबई विद्यापीठ ' असें नांव देण्यांत येत आहे.

कांहीं फेलो हे एक्स–ऑफिशिओ असतील व कांहीं गव्हर्नर नेमील.

चॅन्सेलर, व्हाइस चॅन्सेलर व फेलो यांचें मिळून सीनेट होईल. चॅन्सेलर हा नेहमीं मुंबईचा गव्हर्नरच असणार.

फेलोची संख्या २६ राहील. चॅन्सेलर व्हाईस चॅन्सेलर व फेलो यांच्या हातीं विद्यापीठाचा सर्व कारभार राहील. वाङ्‌मयशास्त्र, कला इ० शाखांत परीक्षा घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांना पदव्या देणें हें काम सीनेटच करील. विद्यार्थ्यांकडून योग्य ती फी घेण्याचा सीनेटला अधिकार आहे.

विद्यापीठाचा १९०४ चा कायदा.

(१) सीनेट हें चॅन्सेलर, व्हाइस चॅन्सेलर एक्स–आफिशिओ फेलो व ऑर्डिनरी फेलो यांचें मिळून होईल.

(i) १० ऑर्डिनरी फेलो नोंदलेल्या पदवीधरांनीं;

(ii) १० फॅकल्टींनीं निवडावे व बाकीचे

(iii) चॅन्सेलरनें नेमावे.

ऑर्डिनरी फेलो हे ५० ते १०० पर्यंत असावे. यांपैकीं निदान ½ फेलो शिक्षणाच्या धंद्यांतले असले पाहिजेत.

(२) व्हाइस चॅन्सेलर, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, व ७ ते १५ पर्यंत फेलो यांचें मिळून सिंडिकेट होईल. व ती संस्था सर्व कारभार करील.

पदवी देण्याप्रमाणेंच, पदवीधरावर मोठा गुन्हा शाबीत झाला, तर पदवी काढून घेण्याचा सीनेटला अधिकार आहे.

पुत्रीकृत होऊं इच्छिणाऱ्या कॉलेजनें रजिस्ट्रारकडे रीतसर अर्ज केला पाहिजे. त्यांत कारभारी मंडळ, शिक्षक, इमारत, निधि, फी वगैरेचा समाधानकारक खुलासा असावा. मग सिंडिकेटनें योग्य ती चौकशी करून तो अर्ज सीनेटपुढें मांडावा. सीनेटनें विचार करून आपलें मत नमूद करून ठेवावें. मग तें सर्व प्रकरण रजिस्ट्रारनें सरकारकडे पाठवावें. मग सरकार परवानगी देईल वा न देईल त्याप्रमाणें करावें.

सिंडिकेट हें कॉलेजांची वरचेवर तपासणी करील.

विद्येच्या शाखा

वाङ्मय, कायदा, वैद्यक व स्थापत्य (Civil Engineering) या चार शाखा विद्यापीठांत असाव्या.

सीनेटचा प्रत्येक सभासद कोणच्या तरी शाखेचा सभासद असलाच पाहिजे.

रजिस्ट्रार--याची नेमणूक सीनेटनें करावी.

सिंडिकेटचें दप्तर, ग्रंथशाळा व शिक्का रजिस्ट्रारजवळ राहील. सिंडिकेटचा सेक्रेटरी म्हणून यानें काम करावें.

मुंबई विद्यापीठाचा १९२८ चा कायदा. युनिव्हर्सिटीनें (सीनेटनें) केलेला कोणताही निर्णय रद्द करण्याचा चॅन्सेलरला पूर्ण अधिकार आहे.

१ सीनेट, २ फॅकल्टी, ३ सिंडिकेट, ४ ॲकॅडेमिक् कौन्सिल, ५ बोर्ड ऑफ पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज् हीं विद्यापीठाचीं अधिकारमंडळें होत.

१ एक्स-ऑफिशिओ व ऑर्डिनरी फेलो यांची सभा तें सीनेट. चॅन्सेलर हा नेहमीं मुंबईचा गव्हर्नर असतो व तोच सीनेटचा अध्यक्ष. चॅन्सेलरनेंच व्हाइस चॅन्सेलरची नेमणूक करावी. सीनेटच्या ⅔ मतानें रेक्टरची नेमणूक करावी. रेक्टरचा दर्जा व्हाइस चॅन्सेलरच्या खालचा होय.

सीनेटमध्यें पुढील लोक एक्स-ऑफिशिओ फेलो समजावे. १ चॅन्सेलर २ व्हा. चॅन्सेलर ३ रेक्टर ४ रजिस्ट्रार ५ चीफ जस्टिस् ६ शिक्षणमंत्री ७ विद्याखात्याचे डायरेक्टर ८ मुंबईसरकारचे सर्जन जनरल ९ शेतकीचे डायरेक्टर १० मुंबई सरकारचे सेक्रेटरी ११ विद्यापीठांतील सर्व खात्यांचे मुख्य. १२ मुंबई प्रांतांत आणखी विद्यापीठें स्थापन झालीं तर त्यांचे व्हाइस चॅन्सेलर.

ऑर्डिनरी फेलो पुढीलप्रमाणें.

५ मुंबई प्रांताच्या पांच विभागांपैकीं प्रत्येक विभागांतील आर्ट्स्कॉलेजच्या प्रिन्सिपॉल मार्फत १.

३ पांची विभागांतील आर्ट्स् कॉलेजच्या प्रिन्सिपॉल मार्फत ३.

५ सायन्स, वैद्यक, शेतकी, इंजिनियरिंग व कायदा या कॉलेजांपैकीं प्रत्येक तऱ्हेच्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलामार्फत(त्यांच्यांपैकींच)१

२० युनिव्हर्सिटीचे व इतर कॉलेजांतील शिक्षक याचे मार्फत त्यांच्यापैकींच २०.

५ प्रत्येक विभागांतील शाळांतील हेडमास्तर मार्फत १.

१५ म्युनिसिपालिट्या लोकल बोर्ड वगैरेमार्फत २५

२५ नोंदलेल्या पदवीधरांमार्फत २५.

१० फॅकल्टींनीं निवडलेले १०.

५ मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलकडून ५.

४० चॅन्सेलरनें नेमलेले.

सु.१३३

कमींत कमी एक लक्ष रुपये देणगी देणारे गृहस्थ तहाहयात फेलो.

कमींत कमी एक लक्ष रु. देणगी देणाऱ्या संस्थेला एक फेलो नेमण्याचा अधिकार आहे. तो २० वर्षे फेलो राहील.

ऑर्डिनरी फेलो ५ वर्षें फेलो राहतील.

सीनेट ही विद्यापीठाची सर्वाधिकारी संस्था होय.

सिंडिकेट: हें विद्यापीठाचें कारभारी मंडळ होय. त्याची घटना पुढीलप्रमाणें—

१. व्हा. चॅन्सेलर २ रेक्टर ३ विद्याखात्याचा डायरेक्टर, अॅकॅडेमिक् कौन्सिलनें निवडलेले ७ लोक, प्रिन्सिपाल हेडमास्तर यांव्यतिरिक्त लोकांतून सीनेटनें निवडलेले ९ लोक. एकंदर १९

सिंडिकेटच्या सभासदाची मुदत ३ वर्षांचा असून तो सीनेटचा सभासद असलाच पाहिजे.

अॅकॅडमिक कौन्सिलची घटना

१ रेक्टर किंवा तो नसल्यास व्हा. चॅन्सेलर अध्यक्ष १ प्रत्येक फॅकल्टीचा डीन युनिव्हर्सिटी प्रोफेसरांच्या प्रतिनिधींपैकीं, ५ फेलोपैकीं २ हेडमास्तर (सीनेटनें निवडलेले) बोर्ड ऑफ स्टडीज् मधून २० प्रतिनिधि फेलोपैकीं सीनेटनें निवडलेले ५ लोक एकंदर ३४

अॅकॅडेमिक् कौन्सिलचा प्रत्येक सभासद असलाच पाहिजे असें नाहीं.

शिक्षण व परीक्षा यांसंबंधींचे सर्वाधिकार या कौन्सिलला आहेत.

बोर्ड ऑफ पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज् घटना :

१ रेक्टर (नसल्यास) व्हा. चॅन्सेलर.

४ सिंडिकेटनें नेमलेले ४ लोक

३ अॅ. कौन्सिलनें नेमलेले ३

१ यु. प्रोफेसर

इतर पोटमंडळें

युनिव्हर्सिटी बोर्ड ऑफ स्पोर्ट्स्.

घटना—मुंबईच्या पुरीकृत कॉलेजचे प्रिन्सिपॉल व सिंडिकेटनें नेमलेले इतर लोक

क्रिकेट हॉकी वगैरेच्या पोटकमिट्या या बोर्डानें नेमाव्या.

खेळाचे सर्वाधिकार या बोर्डाला आहेत.

लष्करी शिक्षण

(वूलविच, सँढर्स्ट, क्रॅनवेल व डेहराडून)

रॉयल मिलिटरी अॅकेडमी वूलविच, रॉयल मिलिटरी कॉलेज सँढर्स्ट व रॉयल एअर फोर्स कॅडेट कॉलेज क्रॅनवेल—सैन्य अगर विमान खात्यांत ज्यांना कायम राहावयाचें असेल त्यांच्या शिक्षणाची येथें सोय होते. वूलविच येथें मुख्यतः तोफखाना, एंजिनिअर्स व सिग्नल खात्यांचें शिक्षण मिळते; सँढर्स्ट येथें घोडदळ, पायदळ व टँक्स यांचें व क्रॅनवेल येथें लढाऊ विमानदळाचें शिक्षण देण्यांत येतें. साधारणतः सँढर्स्ट येथें दरवर्षी २० हिंदी उमेदवार घेण्यांत येतात; वूलविच येथें सहा व क्रॅनवेल येथें इंडियन एअर स्क्वाड्रनच्या जरुरीप्रमाणें (सध्यां दरवर्षीं सहा) घेण्यांत येतील. ह्या जागा भरण्याकरितां दरवर्षीं दिल्ली येथें (व इंग्लंडमधील उमेदवारांकरितां इंडिया ऑफिसच्या देखरेखीखाली इंग्लंडमध्यें) दोनदां जून व नोव्हेंबरमध्यें चढाओढीच्या परीक्षा घेण्यांत येतील. उमेदवारांकरितां साधारण नियम—ते अविवाहित असावेत. (तसेंच वरील कॉ. मध्यें शिक्षण घेत असतां विवाह करतां येणार नाहींत); शरीरानें सशक्त व निरोगी; जून-परीक्षेचे वेळीं १ जुलैला, व नोव्हेंबरमधील परीक्षेचे वेळीं १ जानेवारीला वय १८ पूर्ण व २० वें लागलेलें नसावें. वरील सदर चढाओढीच्या परीक्षेंत पास झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमें निवडणूक केली जाईल. तरी कमांडर इन-चीफ हे सुद्धां २० पर्यंत पास झालेले उमेदवार वरील जागा भरण्याकरितां नॉमिनेट करूं शकतात. परीक्षेसाठीं उमेदवारांची योग्यता मॅट्रिक किंवा स्कूल लीव्हिंग परीक्षा किंवा त्यावरील परीक्षा पास असावी. परीक्षेचे पेपर इंग्लंडमधील सिव्हिल सर्व्हिस कमिशनर काढतील व तपासतील. उमेदवारांनीं आपणांस सैन्य अगर विमानखात्यांत कायम नोकरी करावयाची आहे असा लेखी जबाब, आपल्या पालकाचे सहीसह दिला पाहिजे. परीक्षेचे वेळीं परीक्षकांनीं घेतलेल्या प्रत्यक्ष (Interview) भेटीचें व पूर्वशिक्षणाचें (Record) महत्त्व फार आहे. लेखी परीक्षेनंतर लगेच वैद्यकीय परीक्षा दिल्ली येथेंच होईल. क्रॅनवेल येथील उमेदवारांकरितां जास्त कडक वैद्यकीय परीक्षा अंबाला येथें घेण्यांत येते. परीक्षेची फी ५० रुपये पडते. दिल्लीस परीक्षेसाठीं येणाऱ्या उमेदवारांनीं सर्व खर्च स्वतःचा करावा. लेखी परीक्षा सेक्रेटरी (सैन्यखातें) यांचे व्यवस्थेप्रमाणें होते. प्रत्यक्ष भेटीची व पूर्वशिक्षणाची परीक्षा कमांडर-इन-चीफ यांनीं नेमलेल्या सरकारी खात्यांतील वरिष्ठ



डॉ. भांडारकर.



सार्वजनिक काका.



बापूसाहेब मेहेंदळे.



जावजी दादाजी.



रा. दिक्षित.



आण्णासाहेब किर्लोस्कर.



रमाबाई रानडे.



केरूनाना छत्रे.

अधिकारी मंडळाकडून घेतली जाते. (या मंडळांत व्हॉइसरॉयांनीं निवडलेले एक सरकारी नोकरींत नसलले गृहस्थ असतात.) प्रत्येक उमेदवारानें सदर परीक्षेचा छापील प्रवेश-अर्ज मागवून आपल्या हस्ताक्षरांत पूर्ण भरून त्याची एक नक्कल (सर्व सर्टिफिकेटांच्या नकलांसह) प्रांतिक अधिकाऱ्याकडे पाठवावी व दुसरी नक्कल सेक्रेटरी टु दि गव्हर्मेंट ऑफ् इंडिया (सैन्यखातें) यांजकडे पाठवावी. त्याबरोबर गेल्या पांच वर्षांमध्यें देवी टोचून घेतल्याबद्दलचा दाखला असावा. परीक्षेचे अर्ज नोव्हेंबर व जूनमधील परीक्षांसाठीं अनुक्रमें १ सप्टेंबर व १ एप्रिलचे आंत जावेत. वरील तीन्ही संस्थांत प्रवेश मिळण्यासाठीं एकत्रच परीक्षा आहेत. म्हणून उमेदवारांनीं कोणत्या कॉलेजांत प्रवेश हवा आहे तें अर्जांत नमूद करावें. उमेदवारांना सर्व कॉलेजांचीं नांवें लिहितां येतील व त्यांत आपल्या पसंतीप्रमाणें निवड करण्याची सवलत आहे. परंतु त्याप्रमाणें प्रत्येक कॉलेजांतील शिक्षणाला आवश्यक अशा विषयाची या चढाओढीच्या परीक्षेंत परीक्षा द्यावी लागेल. वय व पूर्वशिक्षण वगैरेबद्दल सर्टिफिकिटें परीक्षकाकडे दाखल करावीं लागतात. मिलिटरी कॉलेजसाठीं चढाओढीच्या परीक्षेचे विषयविभाग (१) आवश्यक इंग्रजी १०० पूर्ण गुण, सामान्य ज्ञान १००, प्रत्यक्ष भेट व पूर्वशिक्षण ४००; चालू भाषांपैकीं एक भाषा, इतिहास, गणित व सायन्स यांपैकीं एक विषय १०० पूर्ण विभाग (२)- भाषा, इतिहास, शास्त्रें, चित्रकला, गणित वगैरे विषयांतील कोणतेहि दोन विषय. पूर्ण गुण प्रत्येकीं ३००. वूलविच येथें प्रवेश इच्छिणारांना गणित, शास्त्रें, वगैरे तीन विषय विभाग (२) मध्यें घेतलेच पाहिजेत व त्यांत शें० ४० गुण मिळविलेच पाहिजेत. क्रॅनवेल येथें जाऊं इच्छिणारांनीं विभाग (२) मधील तीन विषय घ्यावे. तसेंच उमेदवारांनीं विभाग (२) मध्यें दोन परदेशी भाषा साधारणतः घेऊं नयेत. उमेदवारांना प्रत्यक्ष भेट व पूर्वशिक्षण या सदरांत शें. ३५ गुण मिळालेच पाहिजेत. इतर विषयांत वूलविचखेरीज इतर कॉलेजांत पास होण्यांत कमींत कमी कितीहि गुण मिळाले तरी चालतात. वूलविच येथें जाण्याकरितां शास्त्रें व गणित या विषयांत शें.४० गुण मिळावेच लागतात. साधारणतः उमेदवारांना शें.३५ गुण मिळावे लागतात.

वैद्यकीय तपासणी- सर्व उमेदवारांची मेडिकल बोर्डकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल. व मेडिकल बोर्डनें पास केलेल्या उमेदवारांनाच घेतलें जाईल. साधारणतः उमेदवारांना कोणताही कायम स्वरूपाचा रोग अगर व्यंग नसावें. दृष्टि (उपनेत्र न लावतां) चांगली असावी. उंची कमींत कमी ५ फूट २ इंच (वय १८) ते ५ फू. २½ इंच (वय २०) असावी. व वयाचे व उंचीचे मानानें फुगवलेल्या छातीचा घेर ३४ ते ३४½ चे वर असावा. छाती कमींत कमी २ इंच तरी फुगवितां आली पाहिजे. तसेंच हृदय, नसा वगैरे चांगल्या असाव्या. एकंदरींत सर्व शरीर सुदृढ (बांधेसूद व सशक्त) असावें.

वरील परीक्षेखेरीज क्रॅनवेलच्या उमेदवारांची वैद्यकीय परीक्षा जास्त कडक रीतीनें घेण्यांत येते.

सामान्यत: जूनमध्यें परीक्षा पास होऊन निवडलेल्या उमेदवारांना पुढील फेब्रुआरींत सुरू होणाऱ्या टर्मसाठीं पाठविण्यांत येतें. व नोव्हेंबरमधील उमेदवारांना पुढील सप्टेंबरमध्यें सुरू होणाऱ्या टर्मकरितां पाठविण्यांत येतें. उमेदवारांना जातांना व शिक्षण संपल्यावर परत येतांना लागणारा प्रवास खर्च सरकारतर्फे केला जातो. जातांना बोटींतील खर्चाबद्दल १० पौंड बरोबर असणाऱ्या सैन्यांतील अधिकाऱ्याजवळ आगाऊ द्यावे लागतात.

किंग इंडिया कॅडेट्सना (उमेदवारांना) वरील चढाओढीच्या परीक्षेसाठीं लागणारे सर्व नियम लागू आहेत. उमेदवारांपैकीं सरकारी नोकरींतील लोकांच्या मुलांतून दहा किंग इं. कॅडेट्स लायकीप्रमाणें सेक्रेटरी ऑफ् स्टेट कडून दर सहामाहीस निवडले जातात. उमेदवारांची आर्थिक स्थिति शिक्षण-खर्च करण्याइतकी नसल्यास त्यांना कमी फीची सवलत मिळवितां येते. ऑनररी किं. इं.

कॅडेट्स-सैन्य व आयू. एम्. एम्. मधील खात्यांतील जे अधिकारी प्रत्यक्ष युद्धांत मेले असतील किंवा जखमा लागून सहा महिन्यांत मरण पावले असतील त्यांच्या मुलांतून तीन उमेदवार सदर कॅडेटशिपकरितां निवडले जातात. सदर कॅडेटशिपला शिक्षणखर्चाबद्दल सवलत मिळत नाहीं.

शिष्यवृत्त्याः– दर सहामाहीस वूलविचकरितां अकरा व सँढर्स्ट करितां तेवीस प्रत्येकीं तीस पौंडाच्या शिष्यवृत्त्या एक वर्ष शिक्षण झाल्यानंतर महायुद्धांतील कामगिरीनें अधिकारी झालेल्यांच्या मुलांकरितां चढाओढीनें मिळविण्याकरितां ठेविल्या आहेत. वरीलप्रमाणें तीस विद्यार्थी नसल्यास सैन्य, आरमार वगैरे खात्यांतील अधिकाऱ्यांच्या मुलांनाही सदर शिष्यवृत्ति मिळण्यासारख्या आहेत. एखाद्या कॅडेटला कोणत्याही कारणामुळें शिक्षणक्रम सोडावा लागल्यास सदर शिष्यवृत्ति मिळत नाहीं व मिळालेले पैसे परत द्यावे लागतात. जोधपूरचे महाराज सर प्रतापसिंह यांच्या स्मरणार्थ असलेल्या प्रत्येकीं शंभर पौंडांच्या तीन शिष्यवृत्त्या सैन्यांतील लोकांच्या मुलांकरितां व विशेषतः डेहराडून येथें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरितां आहेत. सदर शिष्यवृत्ति सँढर्स्ट येथें होणाऱ्या खर्चाप्रीत्यर्थ आहेत. कॅडेटचे आईबाप गरीब असल्यास कॅडेटला ही शिष्यवृत्ति वरील किंग्ज कॅडेटशिपशिवाय मिळूं शकेल. ह्याशिवाय सिल्व्हर ज्युबिली फंडांतून महायुद्धांत अगर नंतर सैन्यांत उत्कृष्ट नोकरी बजावलेल्या इसमांच्या मुलाकरितां वार्षिक तीन हजार रुपयांची (किंवा त्याचे दोन भाग करून) शिष्यवृत्ति सँढर्स्ट येथील कॅडेटकरितां आहे. याप्रमाणेंच मुंबई-सरकारनें वार्षिक तीन तीन हजार रुपयांच्या दोन शिष्यवृत्ति मुंबई प्रांतांतील रहिवासी मुसलमान व मराठा (किंवा असे उमेदवार नसल्यास इतर जातींतील) उमेदवारांकरितां अठरा महिने चालणाऱ्या ठेविल्या आहेत. त्याकरितां शिक्षणखात्याच्या डायरेक्टरकडे (पुणें येथें) १ मार्च व १ आगस्टचे आंत अर्ज करावेत. उमेदवार कुलीन घराण्यांतील व शक्यतों राजनिष्ठ लढाऊ जातींपैकीं असावेत.

सदर शिष्यवृत्त्यांचे पैसे कसे व केव्हां देण्यांत येतील यासंबंधीं नियम सेक्रेटरी ऑफ् स्टेटकडून वेळोवेळीं करण्यांत येतील.

वरीलप्रमाणें शिष्यवृत्त्या व सरकारी खर्चाची सोय असल्यास सरकारी अधिकारी किंवा शिपाई यांचे मुलांस साधारणतः फी तीन टर्म्सची १८० पौंड व इतर खर्च मिळून ६५५ पौंड ४ शिलिंग एकंदर लागतात. इतरांना (वरीलप्रमाणें सोय नसणारांना) म्हणजे खासगी उमेदवारांना फी ३०० पौंड व इतर खर्च मिळून ७७५ पौंड ४ शि. इतका एकंदर खर्च येतो. याशिवाय इंग्लंडमध्यें आल्याबरोबर लागणाऱ्या नेहमींच्या पोषाखाचा वगैरे खर्च १०० ते २०० पौंड येतो. वरील खर्चाची रक्कम $\frac{2}{3}$ व $\frac{1}{3}$ अशा हप्त्यांत पहिल्या व तिसऱ्या टर्मचे सुरवातीस स्थानिक सरकारकडून वसूल केली जाते. शिक्षण घेत असतांना आजारी पडल्यास व आजाराचे मानानें तीन ते बारा महिने भरपगारी रजा देण्यांत येते. तसेंच विमानखात्यांतील कॅडेटना अपघातानें इजा झाल्यास बरें होईपर्यंत आजाराच्या प्रमाणांत पगार देण्यांत येतो. पोषाखाकरितां लागणाऱ्या खर्चाची रक्कम पहिल्या व तिसऱ्या टर्मच्या सुरवातीस भरावी लागते.

वरील प्रत्येक कॉलेज एका कमांडरच्या हाताखालीं असून ते वॉर ऑफिस व विमानखात्यांकडे कॉलेजसंबंधीं वेळोवेळीं कळवीत असतात. नियम किंवा शिस्त मोडल्याबद्दल वाईट वर्तणुकीबद्दल, टर्म अखेरच्या परीक्षेंत नापास झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारें शिक्षण घेत असतां कॅडेटपुढें सैन्यांत अधिकारी होण्यास अयोग्य दिसल्यास त्याला एक टर्मभर पुन्हां त्याच टर्मचा अभ्यास करावा लागतो, किंवा त्याला काढूनही टाकतात.

शिक्षणक्रम– तीन टर्म मिळून अठरा महिने शिक्षण दिलें जातें. टर्म फेब्रुवारी ते जुलै व सप्टेंबर ते डिसेंबर असतात. इतर महिने सुटी असते. सुटींत राहण्याची वगैरे सोय पालकांचे इच्छेप्रमाणें इंडिया ऑफिसतर्फे केली जाते. टर्म अखेर-

च्या परीक्षेंत शेंकडा ६० गुण मिळावेच लागतात. शिक्षणसंपतांना सर्वांची परीक्षा घेतली जाते. तींत चांगल्या रीतीनें पास झाल्यास कमिशन मिळतें. साधारणतः पास झालेल्यांना हिंदी सैन्यांत 'सेकंड लेफ्टेनंट' या हुद्दयावर नेमतात. क्रॅनवेल येथील शिक्षण दोन वर्षांत (चार टर्मचें) आहे. टर्म जानेवारी ते जुलै व सप्टेंबर ते डिसेंबर याप्रमाणें असतात. परीक्षा नियमित वेळीं घेतल्या जातात व कॅडेटना अभ्यासांतील प्रगति पाहून गुण देण्यांत येतात. प्रत्यक्ष विमान चालवितां येणें हा येथील शिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक कॉलेजच्या शेवटच्या परीक्षेंतील निकालांतील अनुक्रमवार निरनिराळ्या विषयांकरितां बक्षिसें (तरवार, पदकें, शिष्यवृत्ति वगैरे) दिलीं जातात. वरीलप्रमाणें बक्षिसें मिळविणारांना व विशेष प्रगति दाखविणारांना सैन्यांत नेमल्यावर पांच वर्षेपर्यंत वार्षिक प्रत्येकीं ५० पौंडांच्या नऊ शिष्यवृत्त्या देण्याकरितां ठेविल्या आहेत.

वूलविच येथें शिक्षण संपल्यावर तोफखान्याकडील कॅडेटना लार्कहिल येथील तोफ–शाळेंत चार महिने जादा शिक्षण घेण्याकरितां ठेविलें जातें; एंजिनियर खात्यांतील लोकांना चॅथॅम येथें व केंब्रिज विद्यापीठांत मिळून ३४ महिने शिक्षण घ्यावें लागतें. व शिक्षणखात्यांतील लोकांना एक वर्ष जादा शिक्षण घ्यावें लागतें. सामान्यतः शेवटच्या परीक्षेच्या निकालावर पास झालेल्यांच्या नेमणुका सैन्यांत करण्यांत येतात. सेंटर्हीमधून पास झालेल्यांना ब्रिटिश पलटणींत एक वर्षपर्यंत काम करावें लागतें. क्रॅनवेलमधून बाहेर पडणारांना इंडियन एअर फोर्समध्यें नेमलें जातें.

चढाओढीच्या प्रवेश परीक्षेचे विषय–नियम–विभाग (१) (अ) इंग्रजी–यांत उमेदवाराचें इंग्रजी भाषेचें ज्ञान अजमाविलें जातें. तसेंच एखाद्या उताऱ्याचा गोषवारा काढणें; हस्ताक्षर व स्पेलिंग वगैरेची परीक्षा केली जाते. (आ) सामान्य ज्ञान–वाङ्मय, भूगोल, वर्तमानकाळांतील महत्त्वाच्या गोष्टी वगैरेबद्दल ज्ञान अजमाविलें जातें. (इ) प्रत्यक्ष मुलाखत व पूर्वशिक्षण यांत उमेदवाराची एकंदर लायकी इंग्रजी भाषा–ज्ञान (चांगलें बोलता येणें) वगैरेची परीक्षा मुद्दाम नेमलेल्या बोर्डाकडून होते. गुण कमींत कमी चारशेंपैकीं १४० मिळावे लागतात. (इ) (१) चालू भाषा उमेदवारांना परभाषेंतून इंग्रजींत चांगलें भाषांतर करतां आलें पाहिजेच. आपल्या भाषेंतहि चांगलें लिहितां आलें पाहिजे. (२) इतिहास–ब्रिटिश इतिहासाची उमेदवाराच्या वयास असलेल्या सामान्य विद्यार्थ्यांस जी माहिती आवश्यक तिची परीक्षा घेतली जाईल. (३) गणित–अंकगणित मॅट्रिकइतकें, भूमिति–इंटरमीजिएटइतकी व बीजगणित प्रीव्हियसइतकें झालेलें असावें. सर्व पेपर पद्धतशीर, सुस्पष्ट व योग्य रीतीनें लिहिलेले असावेत. (४) सायन्स, वास्तव, रसायन, प्राणी व आरोग्य या शास्त्रांबद्दल सामान्य माहिती मॅट्रिकइतकी असावी. विभाग (२) इतर विषय (अ) भाषा ग्रीक, लॅटिन, फ्रेंच व जर्मन–सामान्य ज्ञान मॅट्रिकइतकें असावें, तसेंच देशी भाषा–संस्कृत, हिंदी, उर्दु, व पर्शियन यांजबद्दल. (आ) आधुनिक इतिहास–ब्रिटनचा व वसाहतींचा १६६० ते चालू तारखेपर्यंतचा सर्व व त्यापूर्वीचा साधारण इतिहास येत असावा. हिंदुस्थानचा इतिहास १५२६ ते चालू तारखेपर्यंतचा. (इ) गणित–सुस्पष्ट रीतीबद्दल व योग्य (बिनचूक) भाषेबद्दल गुण मिळतील. संदिग्धपणा नसावा.

उच्च गणितांत मेकॅनिक्स्, त्रिकोण–भूमिति, कॅलक्युलस, बीजगणित वगैरेंचा समावेश होतो. (ई) शास्त्रें–वास्तव, रसायन व प्राणि यांचें सामान्य ज्ञान व प्रयोग केलेले असावेत. साधारणतः इंटरइतकें या विषयांत शिक्षण झालेलें असावें.

इंडियन मिलिटरी अॅकेडमी, डेहराडून–सुरू ता. १ ऑक्टोबर १९३२ पासून. शिक्षणक्रम तीन वर्षांचा (सहा टर्म्स) एकंदर शिक्षणखर्च ४६०० रुपये येईल असा अंदाज आहे. पहिल्या

चढाओढीच्या परीक्षेतून पंधरा जागा भरण्यांत येणार आहेत. सैन्यांतील सर्व शाखांकरितां ही एकच परीक्षा आहे. परीक्षेची तारीख–१४–७ १९३२ वय १ ऑगस्ट रोजीं १८ पूर्ण व विसाचे आंत असावे. परीक्षेकरितां अर्ज छापील फॉर्म वर सुबोध रीतीनें भरून पाठवावेत.

सदर परीक्षेकरितां विषय व अभ्यास वर दिलेलेच आहेत.

तसेंच परीक्षेकरितां व प्रवेशाकरितां नियम वरील इंग्लंडमधील कॉलेजाप्रमाणेंच आहेत. उमेदवारानें आपल्या लायकीबद्दल पब्लिक सर्व्हिस कमिशनची खात्री पटवून दिली पाहिजे. परीक्षेची फी ५० रुपये.

परीक्षेचे पूर्ण गुण—विभाग (१)–आवश्यक मुलाखत व पूर्वशिक्षण ५०० इंग्रजी, ३००, सामान्य ज्ञान ३००, इतिहास, गणित, भाषा, भूगोल, सायन्स वगैरेपैकीं एक विषय १५०. विभाग (२) फ्रेंच, जर्मन, गाणत, उच्च गणित, इंग्लंडचा इतिहास (१६६० पासूनचा) हिंदुस्थानचा इतिहास (१५२६ पासूनचा) वास्तवशास्त्र, रसायनशास्त्र, लॅटिन, ग्रीक, हिंदी, उर्दू, संस्कृत व पर्शियन भाषा, प्राणिशास्त्र यांपैकीं कोणतेही दोन विषय गुण प्रत्येकीं ३०० विभाग (३) चित्रकला मर्जीप्रमाणें गुण ५०.

१९३३ पासून वरील विषयांत बदल करण्यांत येईल. पास होण्यास मुलाखत व पूर्वशिक्षण या सदरांत कमींत कमी शें. ३५ गुण व इतर सर्व लेखी विषयांत मिळून शें. ३५ गुण मिळाले पाहिजेत. हस्ताक्षर व विषयाचें ज्ञान यांकडे गुण देतांना जास्त लक्ष दिलें जाईल.

ब्रिटिश बेटांतील उच्च शिक्षणाची सोयः–

हाय कमिशनर ऑफ इंडिया, (लंडन) यांनीं हिंदी विद्यार्थ्यांकरितां प्रसिद्ध केलेली माहितीः–हिंदी विद्यार्थ्यांनी इकडे येण्यापूर्वी आपल्या कोर्सबद्दल, कॉलेजबद्दल, खर्चासंबंधीं व इतर सर्व बाबींची माहिती आगाऊ सविस्तर व शक्य तितकी खालीलायक मिळवावी. तसेंच इकडे बहुतेक कॉलेजें व विद्यापीठें सप्टेंबर किंवा आक्टोबर मध्यें सुरु होत असल्यानें, तत्पूर्वी कोणत्या विद्यापीठांत कोणता अभ्यास करावयाचा आहे हें ठरवून, तेथें प्रवेश मिळाल्यास आगष्ट महिन्याचे शेवटीं येथें यावें म्हणजे अभ्यासक्रम सुरुं होण्यापूर्वी कपडेलत्ते, पुस्तकें, राहाण्याची व खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था करण्यास त्याला पुष्कळ वेळ सांपडेल. इकडील शिक्षणाबद्दल वगैरे चौकशी फेब्रुआरी किंवा मार्च महिन्यांतच करावी. किंवा त्यापूर्वीही करावी. म्हणजे प्रवेश–अर्ज लौकर पाठवितां येईल व त्याचा विचार होऊन वेळेवर प्रवेश मिळाल्याचें उत्तर येईल. हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांच्या सोयीकरितां हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं युनिव्हर्सिटी ब्यूरो व सल्लागार कमिट्या स्थापन केल्या आहेत व त्यांचेजवळ ब्रि. बेटांतील सर्व युनिव्हर्सिट्यांतील शिक्षणक्रमाचीं माहितीपत्रकें ठेविलीं आहेत. त्यांजवरून विद्यार्थ्यांनीं सर्व माहिती करून घ्यावी व नंतर प्रवेशअर्ज पाठवावेत म्हणजे ते हायकमिशनरचे कचेरींतून योग्य ठिकाणीं पाठविले जातील. विद्यार्थ्यांनीं परस्पर अर्ज पाठविल्यास त्यांत कदाचित् संपूर्ण माहिती पूर्वशिक्षण–वय–अभ्यासांतील प्रगति–वगैरे–दिली जाणार नाहीं व वेळेच्या अभावीं पत्रोत्तरें पाठवणें होणार नाहींत. तसेंच आपलें नांव पूर्ण व स्पष्ट व आपल्या युनिव्हर्सिटींत जें वापरलें असेल तेंच (स्पेलिंगमध्यें चूक न करितां अगर न बदलतां) द्यावें म्हणजे विनाकारण घोटाळा उत्पन्न होणार नाहीं. ऑक्सफोर्ड व केंब्रिज येथें पाठविण्याचे अर्ज शक्य तितक्या लौकर पाठविणें अवश्य आहे. कारण येथें विद्यार्थ्यांची गर्दी फार होते व उशीरा अर्ज गेल्यास कदाचित् प्रवेश मिळण्यास अडचण पडते. येथील सर्व युनिव्हर्सिट्यांत हिंदी युनिव्हर्सिटीच्या पदवीधरास मॅट्रिक्युलेशनची सूट मिळते–व पुष्कळ युनिव्हर्सिट्यांत हिंदी युनिव्हर्सिटीची इंटरमिजिएटची परीक्षा मॅट्रिकबरोबर समजतात. याकरितां हिंदी विद्यार्थ्यांची कमींत कमी इंटरची परीक्षा पास झाली असली पाहिजे. म्हणजे येथें युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळतो. तसें नसल्यास त्यांनीं साधारणपणें नऊ महिने अगोदर यावें व येथील मॅट्रिकची परीक्षा द्यावी. याकरितां येथें शिक्षक असतात, त्यांचे जवळ अभ्यास करावा.

साधारणतः फी सोडून इतर खर्च वर्षाला २५० पौंड येतो. ऑक्सफोर्ड व केंब्रिज येथें वार्षिक ३५० ते ४०० पौंड खर्च येतो. येथें येणाऱ्या विद्यार्थ्यांनीं येथें वापरण्याकरितां कपडे करावयाचे ते येथें आल्यावर करावेत. हिंदुस्थानांतच केल्यास पुष्कळ वेळां ते येथें टाकून देण्याची पाळी येते.

अलीकडे हिंदी विद्यार्थिनी इकडे पुष्कळ येऊं लागल्या आहेत. त्यांनीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे येथें राहण्याची चांगली सोय विशेषतः उन्हाळ्याचे सुटींत अगोदर करणें व आपल्या प्रकृतीची विशेष काळजी घेणें. विद्यार्थिनींना सुटींत हॉस्टेलमध्यें राहणें शक्य नसल्यानें त्या दिवसांत त्यांना विद्यार्थ्यांपेक्षां जास्त खर्च येतो. इकडील हिंदी विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवून त्यांजबद्दल त्यांच्या पालकांना योग्य खबर देण्याचें काम बहुधा हाय कमिशनर करतो. तसेंच कोणत्याहि हिंदी विद्यार्थ्याला अडचणीचे वेळीं सल्ला हाय कमिशनरकडून मिळूं शकतो. याशिवाय कांहीं युनिव्हर्सिट्यांतून हिंदी विद्यार्थ्यांना सल्लागार नेमलेले असतात व ते त्यांच्या पालकाचें कामहि करितात.

हिंदी विद्यार्थी येथें आल्याबरोबर त्याची तात्पुरती राहण्याची सोय २१, क्रॉम्वेल रोड, साउथ केन्सिंग्टन एस्. डब्ल्यू. ७, तारेचा पत्ताः– Xafariz, London या पत्त्यावर वार्डनला आगाऊ पत्र पाठविल्यास होऊं शकते. येथें आठवड्यास २ ते अडीच पौंड खर्च येतो. पुढें कायम राहण्याची सोय (१) एखाद्या इंग्रज कुटुंबांत, किंवा (२) कॉलेज हॉस्टेलमध्यें, किंवा (३) बाहेर राहण्याची व जेवण्याची सोय असेल अशा ठिकाणीं करावी. इंग्रज कुटुंबांत त्यांचे घरांत राहिल्यानें इंग्रजांच्या सामाजिक जीवनाची चांगली संवय होते. कॉलेज हॉस्टेलमध्यें काटकसरीच्या दृष्टीनें व आपल्या सहाध्यायांच्या सहवासाच्या दृष्टीनें बरें असतें. इतर ठिकाणीं राहण्याची सोय करणें झाल्यास त्या ठिकाणची माहिती अगोदर करून घ्यावी. इंग्रज कुटुंबांत राहिल्यास आठवड्यास चार ते पांच पौंड खर्च येतो.

इकडे येणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवावयाची महत्त्वाची बाब म्हणजे स्वतःची वैद्यकीय तपासणी निघण्यापूर्वी हिंदुस्थानांत व येथें आल्यावर वेळोवेळीं करून घेतली पाहिजे. हिंदुस्थानांतील व येथील हवेंतील उष्णतामानांत पुष्कळ फरक असल्यानें फुप्फुसाचे रोग होण्याची भीति असते.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे पैसे वेळेवर मिळण्याची सोय असली पाहिजे. परदेशांत असल्यानें हातांत पैसे नसल्यास अडचणीचे प्रसंगीं विद्यार्थ्यांचे हाल होण्याचा संभव असतो व उसनवार पैसे मिळणें शक्य असलें तरी तशी संवय लागणें अनिष्ट असतें.

हिंदी विद्यार्थी येथें आल्यावर कांहीं दिवस त्याला फार परकें वाटतें. परंतु त्यांनीं तसें कांहीं वाटूं देण्याचें कारण नाहीं. उलट त्यांनीं येथील विद्यार्थ्यांशी सर्व प्रसंगीं मिसळून वागण्याचा प्रयत्न करावा, व युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या कार्यक्रमांत भाग घ्यावा म्हणजे त्याला येथील आयुष्यक्रम आनंदांत घालवितां येईल.

पत्ता—हाय कमिशनर ऑफ् इंडियाचें ऑफिस्, इंडिया हाऊस, आल्डविच, लंडन डब्ल्यू. सी. २.

तारेचा पत्ता —Hicomind, London.

मुंबई युनिव्हर्सिटींत खालील पत्त्यावर माहिती मिळेल—

University Information Bureau
University Building
Fort, Bombay.

चढाओढीच्या परीक्षेंतून पंधरा जागा भरण्यांत येणार आहेत. सैन्यांतील सर्व शाखांकरितां ही एकच परीक्षा आहे. परीक्षेची तारीख–१४–७ १९३२ वय १ ऑगस्ट रोजीं १८ पूर्ण व विसाचे आंत असावे. परीक्षेकरितां अर्ज छापील फॉर्म-वर सुबोध रीतीनें भरून पाठवावेत.

सदर परीक्षेकरितां विषय व अभ्यास वर दिलेलेच आहेत.

तसेंच परीक्षेकरितां व प्रवेशाकरितां नियम वरील इंग्लंडमधील कॉलेजाप्रमाणेंच आहेत. उमेद-वारांनें आपल्या लायकीबद्दल पब्लिक सर्व्हिस कमिशनची खात्री पटवून दिली पाहिजे. परीक्षेची फी ५० रुपये.

परीक्षेचे पूर्ण गुण—विभाग (१)–आवश्यक मुलाखत व पूर्वशिक्षण ५०० इंग्रजी, ३००, सामान्य ज्ञान ३००, इतिहास, गणित, भाषा, भूगोल, सायन्स वगैरेपैकीं एक विषय १५०. विभाग (२) फ्रेंच, जर्मन, गाणत, उच्च गणित, इंग्लंडचा इतिहास (१६६० पासूनचा) हिंदु-स्थानचा इतिहास (१५२६ पासूनचा) वास्तव-शास्त्र, रसायनशास्त्र, लॅटिन, ग्रीक, हिंदी, उर्दू, संस्कृत व पर्शियन भाषा, प्राणिशास्त्र यांपैकीं कोणतेही दोन विषय गुण प्रत्येकीं ३०० विभाग (३) चित्रकला मर्जीप्रमाणें गुण ५०.

१९३३ पासून वरील विषयांत बदल करण्यांत येईल. पास होण्यास मुलाखत व पूर्वशिक्षण या सदरांत कमींत कमी शें. ३५ गुण व इतर सर्व लेखी विषयांत मिळून शें. ३५ गुण मिळाले पाहि-जेत. हस्ताक्षर व विषयाचें ज्ञान यांकडे गुण देतांना जास्त लक्ष दिलें जाईल.

ब्रिटिश बेटांतील उच्च शिक्षणाची सोयः—

हाय कमिशनर ऑफ इंडिया, (लंडन) यांनीं हिंदी विद्यार्थ्यांकरितां प्रसिद्ध केलेली माहितीः–हिंदी विद्यार्थ्यांनी इकडे येण्यापूर्वीं आपल्या कोर्सबद्दल, कॉलेजबद्दल, खर्चासंबधीं व इतर सर्व बाबींची माहिती आगाऊ सविस्तर व शक्य तितकी खालीलायक मिळवावी. तसेंच इकडे बहुतेक कॉलेजें व विद्या-पीठें सप्टेंबर किंवा आक्टोबर मध्यें सुरूं होत असल्यानें, तत्पूर्वीं कोणत्या विद्यापीठांत कोणता अभ्यास करावयाचा आहे हें ठरवून, तेथें प्रवेश मिळाल्यास आगष्ट महिन्याचे शेवटीं येथें यावें म्हणजे अभ्यासक्रम सुरूं होण्यापूर्वीं कपडेलत्ते, पुस्तकें, राहाण्याची व खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था करण्यास त्याला पुष्कळ वेळ सांपडेल. इकडील शिक्षणाबद्दल वगैरे चौकशी फेब्रुआरी किंवा मार्च महिन्यांतच करावी. किंवा त्यापूर्वींही करावी. म्हणजे प्रवेश–अर्ज लौकर पाठवितां येईल व त्याचा विचार होऊन वेळेवर प्रवेश मिळाल्याचें उत्तर येईल. हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांच्या सोयी-करितां हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं युनिव्हर्सिटी ब्यूरो व सल्लागार कमिट्या स्थापन केल्या आहेत व त्यांचेजवळ ब्रि. बेटांतील सर्व युनिव्हर्सिट्यां-तील शिक्षणक्रमाचीं माहितीपत्रकें ठेविलीं आहेत. त्यांजवरून विद्यार्थ्यांनीं सर्व माहिती करून घ्यावी व नंतर प्रवेशअर्ज पाठवावेत म्हणजे ते हायकमि-शनरचे कचेरींतून योग्य ठिकाणीं पाठविले जातील. विद्यार्थ्यांनीं परस्पर अर्ज पाठविल्यास त्यांत कदाचित् संपूर्ण माहिती पूर्वशिक्षण–वय–अभ्या-सांतील प्रगति–वगैरे–दिली जाणार नाहीं व वेळेच्या अभावीं पत्रोत्तरें पाठवणें होणार नाहींत. तसेंच आपलें नांव पूर्ण व स्पष्ट व आपल्या युनि-व्हर्सिटींत जें वापरलें असेल तेंच (स्पेलिंगमध्यें चूक न करितां अगर न बदलतां) द्यावें म्हणजे विनाकारण घोटाळा उत्पन्न होणार नाहीं. ऑक्स-फोर्ड व केंब्रिज येथें पाठविण्याचे अर्ज शक्य तितक्या लौकर पाठविणें अवश्य आहे. कारण येथें विद्यार्थ्यांची गर्दी फार होते व उशीरा अर्ज गेल्यास कदाचित् प्रवेश मिळण्यास अडचण पडते. येथील सर्व युनिव्हर्सिट्यांत हिंदी युनि-व्हर्सिटीच्या पदवीधरास मॅट्रिक्युलेशनची सूट मिळते–व पुष्कळ युनिव्हर्सिट्यांत हिंदी युनिव्हर्सि-टीची इंटरमिजिएटची परीक्षा मॅट्रिकबरोबर समजतात. याकरितां हिंदी विद्यार्थ्यांची कमींत कमी इंटरची परीक्षा पास झाली असली पाहिजे. म्हणजे येथें युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळतो. तसें नसल्यास त्यांनीं साधारणतः नऊ महिने अगोदर यावें व येथील मॅट्रिकची परीक्षा द्यावी. याकरितां येथें शिक्षक असतात, त्यांचे जवळ अभ्यास करावा.

साधारणतः फी सोडून इतर खर्च वर्षाला २५० पौंड येतो. ऑक्सफोर्ड व केंब्रिज येथें वार्षिक ३५० ते ४०० पौंड खर्च येतो. येथें येणाऱ्या विद्यार्थ्यांनीं येथें वापरण्याकरितां कपडे करावयाचे ते येथें आल्यावर करवित. हिंदुस्थानांतच केल्यास पुष्कळ वेळां ते येथें टाकून देण्याची पाळी येते.

अलीकडे हिंदी विद्यार्थिनी इकडे पुष्कळ येऊं लागल्या आहेत. त्यांनीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे येथें राहण्याची चांगली सोय विशेषतः उन्हाळ्याचे सुटींत अगोदर करणें व आपल्या प्रकृतीची विशेष काळजी घेणें. विद्यार्थिनींना सुटींत हॉस्टेलमध्यें राहणें शक्य नसल्यानें त्या दिवसांत त्यांना विद्यार्थ्यांपेक्षां जास्त खर्च येतो. इकडील हिंदी विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवून त्यांजबद्दल त्यांच्या पालकांना योग्य खबर देण्याचें काम बहुधा हाय कमिशनर करतो. तसेंच कोणत्याहि हिंदी विद्यार्थ्याला अडचणीचे वेळीं सल्ला हाय कमिशनरकडून मिळूं शकतो. याशिवाय कांहीं युनिव्हर्सिट्यांतून हिंदी विद्यार्थ्यांना सल्लागार नेमलेले असतात व ते त्यांच्या पालकाचें कामहि करितात.

हिंदी विद्यार्थी येथें आल्याबरोबर त्याची तात्पुरती राहण्याची सोय २१, क्रॉम्वेल रोड, साउथ केन्सिंग्टन एस्. डब्ल्यू. ७, तारेचा पत्ताः– Xafariz, London या पत्त्यावर वार्डनला आगाऊ पत्र पाठविल्यास होऊं शकते. येथें आठवड्यास २ ते अडीच पौंड खर्च येतो. पुढें कायम राहण्याची सोय (१) एखाद्या इंग्रज कुटुंबांत, किंवा (२) कॉलेज हॉस्टेलमध्यें, किंवा (३) बाहेर राहण्याची व जेवण्याची सोय असेल अशा ठिकाणीं करावी. इंग्रज कुटुंबांत त्यांचे घरांत राहिल्यानें इंग्रजांच्या सामाजिक जीवनाची चांगली संवय होते. कॉलेज हॉस्टेलमध्यें काटकसरीच्या दृष्टीनें व आपल्या सहाध्यायांच्या सहवासाच्या दृष्टीनें बरें असतें. इतर ठिकाणीं राहण्याची सोय करणें झाल्यास त्या ठिकाणची माहिती अगोदर करून घ्यावी. इंग्रज कुटुंबांत राहिल्यास आठवड्यास चार ते पांच पौंड खर्च येतो.

इकडे येणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवावयाची महत्त्वाची बाब म्हणजे स्वतःची वैद्यकीय तपासणी निघण्यापूर्वी हिंदुस्थानांत व येथें आल्यावर वेळोवेळीं करून घेतली पाहिजे. हिंदुस्थानांतील व येथील हवेंतील उष्णतामानांत पुष्कळ फरक असल्यानें फुप्फुसाचे रोग होण्याची भीति असते.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे पैसे वेळेवर मिळण्याची सोय असली पाहिजे. परदेशांत असल्यानें हातांत पैसे नसल्यास अडचणीचे प्रसंगीं विद्यार्थ्यांचे हाल होण्याचा संभव असतो व उसनवार पैसे मिळणें शक्य असलें तरी तशी संवय लागणें अनिष्ट असतें.

हिंदी विद्यार्थी येथें आल्यावर कांहीं दिवस त्याला फार परकें वाटतें. परंतु त्यांनीं तसें कांहीं वाटूं देण्याचें कारण नाहीं. उलट त्यांनीं येथील विद्यार्थ्यांशी सर्व प्रसंगीं मिसळून वागण्याचा प्रयत्न करावा, व युनिव्हर्सिटीच्या निरनिराळ्या कार्यक्रमांत भाग घ्यावा म्हणजे त्याला येथील आयुष्यक्रम आनंदांत घालवितां येईल.

पत्ता—हाय कमिशनर ऑफ् इंडियाचें ऑफिस्, इंडिया हाऊस, आल्डविच, लंडन डब्ल्यू. सी. २.

तारेचा पत्ता —Hicomind, London.

मुंबई युनिव्हर्सिटींत खालील पत्त्यावर माहिती मिळेल—

University Information Bureau
University Building
Fort, Bombay.

इंडियन सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचा शिक्षणक्रम

(१) दरवर्षी एकदां जुलै–ऑगस्ट महिन्यांत सेक्रेटरी ऑफ स्टेट कळवितील तितक्या जागांकरितां ही परीक्षा घेण्यांत येते. उमेदवार–पुरुष; हिंदी ब्रिटिश अगर संस्थानी हद्दींतील; वय १ ऑगस्ट रोजीं २१ पूर्ण ते २४ असावें. हिंदी उमेदवारानें वय व लायकीसंबंधीं आपल्या प्रांताधिकाऱ्यांचें सर्टिफिकेट द्यावें. परीक्षेस खालील विषय असतात. विभाग (अ)–पूर्णगुण–८०० पैकीं ३०० गुण. तोंडी परीक्षेसाठीं विभाग (आ)—विद्यार्थ्यांना एक-हजार पूर्ण गुण भरतील इतकें विषय घेण्याची परवानगी आहे. यांत इतिहास, अर्थशास्त्र, राज्य-शास्त्र, गणित, शास्त्रें, कायदा, तत्त्वज्ञान, इंग्रजी व इतर भाषा व निरनिराळ्या संस्कृती वगैरे विषय असतात. विभाग (इ) मध्यें जादा विषय १०० पूर्ण गुणांचा घेतां येतो. विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणां-तून निव्वळ सामान्य ज्ञानाबद्दल मिळालेले गुण वजा करतात. तसेंच वाईट हस्ताक्षराबद्दलही पुष्कळ गुण कमी करतात. परीक्षेचे अर्ज ६ मेच्या आंत सिव्हिल सर्व्हिस कमिशनच्या सेक्रेटरीकडे पाठविण्यांत यावे.

(२) हिंदुस्थानांत घेण्यांत येणाऱ्या आय्. सी. एस्. परीक्षा–(सूचना–खालील माहिती १९३० सालची घेतली आहे. त्यानंतर १९३१ पासून बदलणाऱ्या नियमांची दुरुस्तीही यांत आहे. परंतु माहिती घेतली त्यावेळीं सदर नियम बदलण्याबद्दल पार्लमेंटची संमति मिळावयाची होती) गव्हर्नर–जनरल कळवितील त्याप्रमाणें जागा व तारीख ठरविण्यांत येईल. त्या तारखेपूर्वी चीफ सेक्रेटरी टु गव्हर्नर, किंवा चीफ कमिशनर किंवा संस्थानी हद्दींतील उमेदवारांनीं पोलिटिकल एजंटकडे अर्ज संपूर्ण भरून पाठवावेत. अर्जदाराचे आईबाप, अर्ज करण्याचे अगोदर तीन वर्षापेक्षां जास्त ज्या प्रांतांत राहात होते त्या प्रांताधिकाऱ्याकडे अर्ज पाठवावेत. अर्जदार ब्रिटिश किंवा संस्थानी हद्दींतील कायम राहणारे असावेत. वय एक जाने-वारीस २१ पूर्ण व २३ चे आंत असावें व तो पब्लिक सर्व्हिस कमिशननें मान्य केलेल्या विद्या-पीठाचा पदवीधर किंवा समान परीक्षा पास झाले-ला असावा.

परीक्षा–विभाग (अ)–लेखी ६५०; तोंडी २०० पूर्णगुण आवश्यक विभाग (ब)–८०० पूर्णगुण होतील इतके विषय घेतां येतात. विभाग (क)–एकच विषय पूर्णगुण १००. व विभागांत निरनिराळ्या भाषा व संस्कृति, इतिहास, अर्थ-शास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, तत्त्वज्ञान, गणित व भौतिकशास्त्रें वगैरे विषय असतात. देशी भाषांत मराठी, हिंदी, गुजराथी, कानडी वगैरे भाषा घेतां येतात. तसेंच वरपांगी ज्ञान, वाईट हस्ताक्षर वगैरेबद्दल गुण कमी करण्यांत येतात. इंग्रजी चांगलें असल्यास गुण जास्त देतात.

मुंबई इलाख्यांतील शिक्षणाच्या वाढीचा तक्ता.

	१९२७–२८	१९२८–२९	१९२९–३०
लोकसंख्या } पुरुष ...	१०१७६९६९	१०१७६९६९	१०१७६९६९
स्त्रिया ...	९१७१२५०	९१७१२५०	९१७१२५०
एकंदर लोकसंख्या ...	१९३४८२१९	१९३४८२१९	१९३४८२१९
मान्यता दिलेल्या संस्था (पुरुषांकरितां आर्ट्स् कॉलेजें ...			
हायस्कूल्स् ...	१४	१४	१४
माध्यमिक शाळा } इंग्रजी ...	१९४	१९८	२०१
मराठी ...	२८९	३०१	३२९
प्राथमिक शाळा ...	१२७७३	१२९४०	१३१३३
मान्यता दिलेल्या संस्थांमधील पु. विद्यार्थी आर्ट्स् कॉलेजमध्यें ...			
हायस्कूल्स्मध्यें ...	६६४४	६७७५	७३९३
माध्यमिक शाळांतून } इंग्रजी ...	७१४४४	७४२३४	७६८९३
मराठी ...	२२७४०	२४०८९	२४९४३
प्राथमिक शाळांतून ...	८१०८१३	८३०६८३	८४७५९७
मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थ्यांचें पुरुष लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण.	९.१८	८.४२	९.६२
मान्यता दिलेल्या संस्था (स्त्रियांकरितां आर्ट्स् कॉलेजें			
हायस्कूल्स्			
माध्यमिक शाळा } इंग्रजी ...	५२	५८	६०
मराठी ...	४५	४२	३९
प्राथमिक शाळा ...	१६२०	१६८८	१७०९
मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थिनी आर्ट्स् कॉलेजांमधील ...			
हायस्कूल्समधील ...	३८९	४१८	५५९
माध्यमिक शाळांमधील } इंग्रजी ...	११२८८	१२४२३	१४१११
मराठी	३६५८	३६९४	३७४०
प्राथमिक शाळांमधून ...	२१५५९३	२२१०४९	२३२९२६
मान्यता दिलेल्या शाळांतील विद्यार्थिनींचें स्त्रियांच्या लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण ...	२.५१	२.६२	२.७७
मान्यता दिलेल्या संस्थांतील एकंदर विद्यार्थी } पुरुष	९३२६४४	९५६४२५	९७७२३४
स्त्रिया	२२९९३४	२४०३९८	२५३०४०
एकूण	११६२५७८	११९६८२३	१२३०२७४

	१९२७–२८	१९२८–२९	१९२९–३०
सर्व संस्थांतील पुरुष व स्त्री विद्यार्थी	११९४३५१	१२३०८४०	१२६५०५५
एकंदर विद्यार्थ्यांचें लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण — पुरुष	९·४३	९·६९	९·८७
एकंदर विद्यार्थ्यांचें लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण — स्त्रिया	२·५८	२·७१	२·८६
एकुण	६·१८	६·१९	६·५४
चौथ्या वर्गांतील विद्यार्थी — पुरुष		१०३५६३	१०७२६८
चौथ्या वर्गांतील विद्यार्थी — स्त्रिया		२०८९०	२३६३२
एकुण	१२३२४४	१२४४५३	१३०९००
खर्च (आकडे हजारांचे आहेत)	रुपये	रुपये	रुपये
गव्हर्नमेंट फंडांतून ...	२००२९	१९७०८	२०९९९
लोकल ,, ...	२२५२	२२२४	१८४७
म्युनिसिपल ,, ...	४६१२	४९९४	५०७३
सार्वजनिक फंडांतून होणारा एकुण खर्च	२६८९३	२६९२६	२७९१९
फीमधून ...	६८९२	७२६०	७५००
इतर साधनांतून ...	५२०६	५५४५	५००२
खर्चाची एकुण बेरीज ...	३८९९१	३९७३१	४०४२१

टीपः—एडनबद्दल आकडेहि मुंबईंतच आहेत; पण शेंकडा प्रमाण मात्र फक्त मुंबईचें आहे.

मध्यप्रांत व वऱ्हाडमधील शिक्षणाच्या वाढीचा तक्ता

	१९२७-२८	१९२८-२९	१९२९-३०
लोकसंख्या — पुरुष ...	६९५१३९९	६९५१३ ९	६९५१३९९
लोकसंख्या — स्त्रिया ...	६९६१३६१	६९६१३६१	६९६१३६१
एकंदर लोकसंख्या...	१३९१२७६०	१३९१२७६०	१३९१२७६०
मान्यता दिलेल्या संस्था (पुरुषांकरितां)			
आर्ट्स् कॉलेजें ...	... ५	... ५	... ५
हायस्कूलस् ...	५२	५७	६१
माध्यमिक शाळा — इंग्रजी ...	१६४	१८०	१८२
माध्यमिक शाळा — मराठी ...	३५४	३५७	३६१
प्राथमिक शाळा ...	४१९७	४१६८	४१८१
मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थी			
आर्ट्स् कॉलेजमध्यें ...	१५३२	१६१२	१३३७
हायस्कूलस्मध्यें ...	५२८३	५९४७	७२७२
माध्यमिक शाळांतून — इंग्रजी ...	२५०५८	२६०८२	२७१९१
माध्यमिक शाळांतून — मराठी ...	६५०६८	६६१३९	६७८७८
प्राथमिक शाळांतून ...	२६२७२२	२६८४७५	२७७०८९
मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थ्यांचें पुरुषलोकसंख्येशीं शेकडा प्रमाण ...	५.२१	५·३५	५·५५
मान्यता दिलेल्या संस्था (स्त्रियांकरितां)			
आर्ट्स् कॉलेजें ...			
हायस्कूलस् ...	८	९	१०
माध्यमिक शाळा — इंग्रजी ...	१५	१५	१५
माध्यमिक शाळा — मराठी ...	४०	४०	४३
प्राथमिक शाळा ...	३३९	३५३	३७४
मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थिनी ...			
आर्ट्स् कॉलेजांत ...	२५	३३	३२
हायस्कूस्मध्यें ...	१९०	२१६	२५५
माध्यमिक शाळांतून — इंग्रजी ...	११०१	११८३	१३०२
माध्यमिक शाळांतून — मराठी ...	६८३९	७४८६	७८०८
प्राथमिक शाळांतून ...	३६८८२	४०८६९	४४८४३
मान्यता दिलेल्या संस्थांतील विद्यार्थिनींचें स्त्रीलोकसंख्येशीं शेकडा प्रमाण ...	०·६५	०·७२	०·७८
मान्यता दिलेल्या संस्थांतील एकूण विद्यार्थी — पुरुष ...	३६२२९४	३७२०४४	३८५६१४
मान्यता दिलेल्या संस्थांतील एकूण विद्यार्थी — स्त्रिया ...	४५६४४	५०४२६	५४९५१
एकूण...	४०७९३८	४२२४७०	४४०५०५

मध्यप्रांत व वऱ्हाडमधील शिक्षणाच्या वाढीचा तक्ता

	१९२७–२८	१९२८–२९	१९२९–३०
सर्व संस्थांतील विद्यार्थी (पुरुष व स्त्रिया)	४१४८७४	४३१८३६	४५११८२
एकंदर विद्यार्थ्यांचें लोकसंख्येशीं शेकडा प्रमाण } पुरुष ...	५·२९	५·४६	५·६६
स्त्रिया...	०·६८	०·७५	०·८३
एकुण ...	२·९८	३·१०	३·[illegible]४
४ थ्या वर्गातील विद्यार्थी } पुरुष ...	५१४५८	५४९०९	५७२८१
स्त्रिया ...	३३११	३७०४	४२०४
एकूण	५४७६९	५८६१३	६१४८५
खर्च (आंकडे हजारांचे आहेत). ...	रुपये	रुपये	रुपये
गव्हर्मेंट फंड ...	६५८९	६६७४	५७५३
लोकल फंड ...	१५६७	१५७१	२११२
म्युनिसिपल फंड ...	८३६	८५८	१०१६
सार्वजनिक फंडांतून होणारा एकूण खर्च...	८९९२	९१०३	८८८१
फीमधून ...	१३००	१४३५	१६३६
इतर साधनांतून ...	८४६	९२३	१००४
खर्चाची एकूण बेरीज ...	१११३९	११४६१	११५२१

वऱ्हाड व मध्यप्रांत यांतील सरकारी मान्यता मिळालेल्या शिक्षणसंस्था.

विभाग.	संस्था व पत्ता.	व्यवस्था.
वऱ्हाड	न्यू एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, अमरावती.	न्यू एज्युकेशन सोसायटी, अमरावती.
,,	श्रीशिवाजी मराठा हायस्कूल, अमरावती.	खाजगी मंडळी.
,,	सिटी हायस्कूल, एलिचपूर सिटी.	,,
,,	तेल्हारा हायस्कूल, तेल्हारा.	,,
,,	अंजूमान हायस्कूल, खामगांव.	,,
,,	एडेड हायस्कूल, धामणगांव.	,,
,,	न्यू एज्युकेशन सोसायटी, हायस्कूल, कारंजा.	,,
,,	एज्युकेशन सोसायटी. अकोट.	,,
,,	म्युनिसिपल हायस्कूल, एलिचपूर, कँप. (वऱ्हाड विभाग १० गव्हर्मेंट स्कूल्स.)	म्युनिसिपल कमिटी एलिचपूर कँप.
संस्थानें	हायस्कूल, राजनंद गांव.	...
,,	नतवार हायस्कूल, रायगड.	...
,,	क्रॉफर्ड हायस्कूल, कनकेर.	...
,,	व्हिक्टोरिया हायस्कूल, खैरगड.	...
,,	एडवर्ड हायस्कूल, शरणगड.	...
,,	एडवर्ड हायस्कूल, सिरगुजा.	...
,,	स्टेट हायस्कूल, जगदळपूर.	...

विभाग	शाळेचें नांव व पत्ता.	व्यवस्था.
नागपूर.	नील सिटी हायस्कूल, नागपूर.	खाजगी मंडळी.
,,	हिस्लॉप कॉलेजिएट हायस्कूल, नागपूर	युनायटेड फ्रीचर्च मिशन.
,,	न्यू इंग्लिश स्कूल, नागपूर.	खाजगी मंडळी.
,,	सेंट जॉन्स हायस्कूल, नागपूर.	रोमन कॅथॉलिक मिशन.
,,	अंजूमान हायस्कूल, नागपूर.	अंजूमान इस्लामिया सो.
,,	मुलींचें सेंट उर्सुला हायस्कूल, नागपूर.	युनायटेड फ्रीचर्च मिशन.
,,	सेंट जोसेफचे कॉन्व्हेन्ट गर्ल्स् हायस्कूल नागपूर.	रोमन कॅथलिक मिशन.
,,	न्यू इंग्लिश अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल, वर्धा.	खाजगी मंडळी.
,,	मुळे हायस्कूल, सिताबर्डी, नागपूर.	,,
,,	सेंट फ्रॉन्सिस डीसेल्स् हायस्कूल, नागपूर.	रोमन कॅथॉलिक मिशन.
,,	मारवाडी विद्यालय, वर्धा.	खाजगी मंडळी.
,,	म्युनिसिपल हायस्कूल, हिंगणघाट.	म्युनिसिपल कमिटि हिं.
,,	म्युनिसिपल हायस्कूल अर्वी. ५ गव्हर्मेंट स्कूल्स् (नागपूरविभाग)	म्युनिसिपल कमिटी, अर्वी.

विभाग	शाळेचें नांव व पत्ता	व्यवस्था
जबलपूर.	अंजूमान हायस्कूल, जबलपूर.	अंजूमान इस्लामिया सोसायटी.
,,	जॉन्सन गर्ल्स् हायस्कूल, हौबाग जबलपूर.	मेथॉडिस्ट एपिस्कोपल मिशन.
,,	सेंट आलायसिअस हायस्कूल, जबलपूर.	रोमन कॅथॉलिक मिशन.
,,	सेंट जोसेफ्स् कॉन्व्हेंट स्कूल जबलपूर.	,,
,,	ख्रिस्त चर्च बॉईज् हायस्कूल, जबलपूर.	खाजगी मंडळी.
,,	ख्रिस्तचर्च गर्ल्स् हायस्कूल. जबलपूर.	,,
,,	हितकारिणी हायस्कूल, जबलपूर.	हितकारिणी सभा.
,,	सी. एम्. एस्. हायस्कूल, जबलपूर.	सी मिशन.
,,	मिशन हायस्कूल, सिओनी.	युनायटेड ओरिजिनल सेक्सेशन चर्च ऑफ स्कॉटलंड मिशन.
,,	चर्च ऑफ इंग्लंड झेनाना गर्ल्स् हायस्कूल, कटणी.	चर्च ऑफ इंग्लंड झेनाना मिशन
,,	म्युनिसिपल हायस्कूल, कटणी.	म्युनिसिपल कमिटी, कटणी
	(जबलपूर विभाग ४ गव्हर्मेंट स्कूल्स)	
नर्मदा.	म्युनिसिपल हायस्कूल, हर्दा.	म्युनिसिपल कमिटि हर्दा.
,,	हकीमिया कॉर्नेशन हायस्कूल, बऱ्हाणपूर	खाजगी मंडळी.
,,	व्हिक्टोरिया हायस्कूल, बऱ्हाणपूर.	,,
,,	रॉबर्टसन् हायस्कूल, बऱ्हाणपूर.	म्युनिसिपल कमिटी बऱ्हाणपूर.
,,	म्युनिसिपल हायस्कूल, गदरवाडा.	,,
	(नर्मदा विभाग ५ गव्हर्मेंट स्कूल्स.)	म्युनिसिपल कमिटी गदरवाडा.
छत्तिसगड	सेंट पॉल्स हायस्कूल, रायपूर.	अमेरिकन इव्हँजेलिकल मिशन.
,,	मेनोनाईट मिशन हायस्कूल, धमतरी.	मेनोनाईट मिशन.
,,	बर्जेस मेमोरियल गर्ल्स्, हायस्कूल, बिलासपूर.	मिशन सोसायटी
,,	लॉरी म्युनिसिपल हायस्कूल, रायपूर.	म्युनिसिपल कमिटी.
	(छत्तिसगड विभाग ३ गव्हर्मेंट स्कूल्स्.)	

मुंबई विद्यापीठानें पुत्रीकृत महाविद्यालयें.

	नांव	स्थापना सन.	कोणच्या पदवीसाठीं शिक्षण	विद्यार्थी संख्या
१	फर्ग्युसन कॉलेज, पुणें	१८८४	बी.ए.ऑ; बी. एस्.सी.	१५००
२	सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें	१९१६	" "	
३	वुइलिंग्लन कॉलेज, सांगली	१९१९	बी. ए.	
४	कर्नाटक कॉलेज, धारवाड	१९१७	बी. ए; इं. सायन्स.	७००
५	हंसराज प्रागजी ठाकरसी आर्ट्स् कॉलेज, नाशिक	१९२४	बी. ए. ऑ.	७००
६	राजाराम कॉलेज, कोल्हापूर	१८८०	बी. ए. ऑ; इं. सा.	२८०
७	बडोदा कॉलेज	१८८१	बी.ए.ऑ; बी.एस्.सा.	५९५
८	बहाउद्दीन कॉलेज, जंगाध	१९०१	" "	...
९	शामळदास कॉलेज, भावनगर	१८८५	बी. ए.	...
१०	गुजराथ कॉलेज व माधवदास रणछोडलाल सायन्स इन्स्टिटयूट, अहमदाबाद	१८७९	बी.ए;ऑ. बी. एस्सी.	...
११	मगनलाल ठाकुरदास बालमुकुंददास कॉलेज सुरत	१९१८	बी. ए. ऑ. इं. सा	...
१२	दयाराम जेठमल सिध कॉलेज कराची ...	१८८७	बी.ए.ऑ;बी. एस्सी.	४९५
१३	सिंध नॅशनल कॉलेज हैद्राबाद	१९२२	बी. ए. ऑ.	...
१४	इस्माइल कॉलेज, अंधेरी	१९३०	बी. ए.	३६०
१५	एलिफन्स्टोन कॉलेज मुंबई	१८६०	बी. ए. ऑ.	४३०
१	विल्सन कॉलेज, मुंबई	१८६१	बी.ए.ऑ. बी. एस्सी.	...
१७	सेंट झेवियर कॉलेज, मुंबई	१८६९	बी.ए.ऑ; बी. एस्सी.	...
१८	डेक्कन कॉलेज, पुणें.	१८६०	बी. ए. ऑ. इं.सी.	...
१९	रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, मुंबई ..	१९२६	बी. एस्. सी.	२५०
	लॉ			
१	इंडियन लॉ सोसायटीचें लॉ कालेज, पुणें ...	१९२४	एल्. एल्. बी. एस्.	...
२	लल्लूभाई शहा लॉ कॉलेज, अहमदाबाद. ...	१९२७	" "	...
३	कराची लॉ कॉलेज ..	१९२६	" "	...
४	गव्हर्मेंट लॉ कॉलेज, मुंबई ...	१८६०	" "	...
	इंजिनियरिंग	१८६५	बी. ई.	
१	कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणें ...			...
२	नादिरशहा एडुलजी दिनशा, सिव्हिल इंजिनियरिंग कॉलेज, कराची ..	१९२२	बी. ई.	१५०
	वैद्यक			
१	ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई ...	१८६०		
२	शेठ गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज मुंबई	१९२५	बी.एस्सी. एम्.बी.बी. एस्.	
	इतर			
१	शेतकी कॉलेज पुणें. ...	१९०७	बी. एजी.	
२	सिडेनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड एकॉनॉमिक्स मुंबई. ...	१९१४	बी. कॉम्.	
३	सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज, मुंबई. ...	१९२२	बी. टी.	

पेढ्यांचे व्यवहार

प्राचीन कालापासून हिंदुस्थानचा स्वदेशांतील वेगवेगळ्या प्रांतांशीं व परदेशांशीं फार मोठ्या प्रमाणांत व्यापार चालत असल्यामुळें त्या काळीं-ही हिंदुस्थानांत मोठमोठ्या पेढ्या असून त्यांचा व्यवहार विस्तृत प्रमाणावर चालत असे. त्या पेढ्यांतून लोकांच्या ठेवी व्याजानें ठेवून घेणें, हुंड्या विकणें, सरकारास कर्ज देणें, मालाचा विमा उतरणें वगैरे व्यवहार, फार मोठ्या प्रमाणांत होत असे. हा बहुतेक व्यवहार वैश्य वर्गाचे हातीं असून त्याचें नियंत्रण करण्यासाठीं सविस्तर नियमही स्मृतिग्रंथांतून दिलेले आढळतात. त्यामुळें पेढ्यांचे व्यवहार हिंदुस्थान देशास नवीन नाहींत. तथापि अठराव्या शतकांत युरोपमध्यें औद्योगिक क्रान्ति झाल्यापासून पूर्वीच्या व अलीकडील पेढ्यांतील स्वरूपांत फार अंतर पडलें आहे. आतां हरतऱ्हेची यंत्रसामुग्री उपलब्ध झाल्यापासून उद्योगधंदे, व्यापार वगैरे सर्व इतक्या मोठ्या प्रमाणांत चालतात कीं, त्यांचा व्याप एका व्यक्तीस उरकणें शक्यच नसल्यामुळें पूर्वीच्या कौटुंबिक मालकीच्या अगर भागीदारीच्या खाजगी पेढ्या जाऊन त्यांचे जागीं सामुदायिक भांडवलाच्या पेढ्या अस्तित्वांत आल्या आहेत व या पेढ्यांचें कार्यक्षेत्रही पूर्वीच्या पेढ्यांच्या मानानें फार विस्तृत झालें आहे.

पेढ्यांचीं प्रमुख कामें—अर्वाचीन कालीं पेढी मुख्यतः पांच प्रकारचीं कामें करतेः—(१) लोकांच्या ठेवी ठेवणें व (२) गिऱ्हाइकांस व्याजानें पैसे देणें. देशांत केव्हांही कांहीं लोक असे असतात कीं त्यांचें उत्पन्न खर्चापेक्षां अधिक असतें. अशा लोकांचे पैसे सुरक्षित ठेवून शिवाय त्यावर व्याज देणें हें काम पेढी करते; त्यामुळें समाजांतील शिल्लक रक्कम साहजिकच पेढींत जमा होते. ही रक्कम पेढी चालू खातीं ठेवते किंवा ठराविक मुदतीपुरती ठेवते. चालू खातीं रक्कम ठेवल्यास ती केव्हांही परत देण्याची जबाबदारी पेढीवर असते, व त्यामुळें पेढी व्याज कमी देते. तीच रक्कम जर ठराविक मुदतीपुरती ठेवली तर पेढी ठेवीदारास व्याज जास्त देऊं शकते. याशिवाय सेव्हिंगकडेही ठेव ठेवतात. त्यांतील पैसे कांहीं थोडीशी आधीं सूचना देऊन वाटेल तेव्हां काढतां येतात व त्यावर व्याज चालू खात्यापेक्षां थोडें जास्त व मुदतीच्या ठेवीपेक्षां थोडें कमी असें मिळतें. याप्रमाणें जमा झालेली ठेव कारखानदार, व्यापारी, वगैरे लोकांस थोडेसे जास्त व्याजानें देऊन पेढी स्वतांस फायदा मिळवते; व राष्ट्रांतील व्यापार, कारखाने, उद्योगधंदे, शेती वगैरे व्यवहारास मदत करते. म्हणजे स्वतः जामीन राहून द्रव्यबल व मनुष्यबल एकत्र करणें हें पेढीवाल्याचें प्रमुख कार्य आहे. याप्रमाणें कर्जाऊ दिलेली रक्कम सहसा रोख देत नाहींत. तेवढ्या रकमेपुरता जरूर तेव्हां बँकेवर चेक (हुंडी) काढण्याची कर्जदारास परवानगी देण्यांत येते. त्यामुळें फक्त प्रत्यक्ष जरूर तितकीच रक्कम बाहेर जाऊन पेढीस आपले व्यवहार वाढविण्याची संधि मिळते. (३) पेढीचे तिसरें प्रमुख काम म्हणजे लोकांचे पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पोंचविणें. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील एकाद्या व्यापारास लंडनमध्यें पैसे पाठवणें असेल तर प्रत्यक्ष माणसाबरोबर पैसे पाठवणें हें खर्चाचें व धोक्याचें असतें. तेव्हां अशा वेळीं तो हिंदुस्थानांतील एकाद्या मोठ्या पेढींत आपली रक्कम जमा करतो व त्या पेढीकडून दर्शनी हुंडी घेऊन ती हुंडी त्या पेढीचे लंडनमधील शाखेवर किंवा दुसऱ्या एकाद्या पेढीवर नेऊन देतो म्हणजे तेथें त्याला रोख रक्कम मिळते. प्रवासीसुद्धां आपल्याबरोबर फारशी रक्कम न घेतां याच मार्गाचें अवलंबन

करतात. या कामासाठीं पेढीवाला थोडीशी हुंडणावळ घेतो. याशिवाय मुदतीच्या हुंड्या विकत घेण्याचा आणखी एक मोठा व्यवहार पेढी करते. एका व्यापाऱ्यानें दुसऱ्या व्यापाऱ्यास कांहीं माल विकत दिला असतां तो माल विकत घेणारा व्यापारी पहिल्या व्यापाऱ्यास एकादी मुदतीची हुंडी देतो; म्हणजे ती मुदत संपल्यावरच ती हुंडी पेढीवर द्यावयाची व मग पेढीनें पैसे द्यावयाचे. दरम्यानचे काळांत हुंडीची रोख रक्कम मिळत नाहीं. अशा वेळीं माल विकणाऱ्या व्यापाऱ्यास जर पैशाची जरूर असेल तर तो ती हुंडी मुदतीची वाट न पाहतां एकाद्या पेढीस विकून टाकतो व तिजकडून रोख रक्कम घेतो. पेढीला मात्र त्या हुंडीची रोख रक्कम मिळण्यासाठीं कांहीं काल थांबावें लागतें. याबद्दलही पेढी हुंडीच्या दर्शनी किंमतींतून कांहीं कसर कापून घेते. (४) पेढीचें चौथें मोठें काम नोटा काढण्याचें. हा अधिकार फार मोठा असल्यामुळें सरकार यावर सक्त नियंत्रण ठेवतें. हिंदुस्थानांत तर हा अधिकार सरकारनें स्वतःकडेच ठेवलेला आहे. एकाद्या पेढीची पत चांगली असेल तर तिनें काढलेल्या नोटा लोकांच्या व्यवहारांत व देवघेवींत दिल्या जातात व त्यामुळें जवळ थोडेंसें तारण सोनें ठेवून पेढ्या पुष्कळशा नोटा काढून फायदा मिळवतात. या नोटा पेढींत केव्हांही परत दिल्या असतां त्याबद्दल सोनें देण्याची जबाबदारी पेढीवर असल्यामुळें पेढीही आपल्या पतीसाठीं पुष्कळसें तारण जवळ ठेवते. व त्यामुळें पेढीवाले प्रमाणाबाहेर नोटा काढतील ही भीति उरत नाहीं. हा अधिकार युरोपमध्यें पुष्कळशा बँकांना सरकारनें दिला आहे. परंतु अलीकडे हुंड्यांची पद्धत पुष्कळशी अस्तित्वांत आल्यापासून त्यांनींच नोटांची देवघेवींतील बरीचशी जागा घेतली आहे. म्हणून नोटा काढण्याचे अधिकारास फारसें महत्त्व राहिलें नाहीं. कारण एकाद्या व्यक्तीनें दिलेली हुंडीसुद्धां त्या व्यक्तीची पत चांगली असेल तर पुष्कळशी नोटेप्रमाणेंच व्यापारी देवघेवींत व लोकांचे व्यवहारांत फिरत राहते. पेढीचे या कामगिरीमुळें व्यापाराचे जरुरीप्रमाणें देशांतील चलन आपोआप कमीजास्त होतें व द्रव्याभावीं व्यापार थंडावत नाहीं. कारण, ज्या दिवसांत व्यापार मोठा असेल त्यावेळीं पेढीवाले व्याजाचा दर वाढवून ठेवी पुष्कळ जमा करतील व ती रक्कम गिऱ्हाइकास कर्जानें देतील. पेढीचीं गिऱ्हाइकें पेढीवर जास्त हुंड्या काढतील; ज्या वेळीं जरूर नसेल त्या वेळीं कमी हुंड्या काढतील. (५) या महत्त्वाचे कामाशिवाय पेढी आपल्या गिऱ्हाइकांचें इतरही पुष्कळ काम करूं शकते. रोख्यावरील व्याज व फायदा जमा करणें, शेअर्सची खरेदीविक्री करणें, मौल्यवान् जिनसा जरूर तेव्हां सुरक्षित ठेवणें, एकाद्या इस्टेटीचे ट्रस्टी म्हणून संरक्षण करणें, वगैरे अनेक तऱ्हेचीं कामें थोडेसें कमिशन घेऊन पेढ्या करतात. एकंदरींत पेढीमुळें जनतेस काटकसरीनें राहून पैसा शिल्लक टाकण्याची संवय लागते; एकाद्या पेढीवर मोठी शिल्लक असणें हें समाजांत मान्यता मिळविण्यास उपयोगी पडते; पैसा गांठी बांधून अगर पुरून ठेवण्यापेक्षां पेढींत ठेवल्यानें ठेवीदार, पेढी व कर्जदार यांस फायदा होतो; पेढीच्या नोटा, हुंड्या, वगैरे वापरण्याची जनतेस संवय झाली कीं सर्व सोनें पेढींत शिल्लक राहून थोड्या सोन्यावर फार मोठी पत उत्पन्न करतां येते. राष्ट्रांत शेती, व्यापार, उद्योगधंदे, कारखाने वगैरेंच्या जरुरीप्रमाणें व सोईप्रमाणें वेगवेगळ्या पेढ्या असल्यास राष्ट्रांची सर्वांगीण उन्नति होऊन सर्व देशास एकप्रकारचा आत्मविश्वास वाटूं लागतो. सुधारलेल्या देशांच्या म्ह० अमेरिका व जपान वगैरे देशांच्या आजच्या उन्नतींत पेढ्यांची कामगिरी फार मोठी आहे यांत शंका नाहीं.

हिंदी पेढ्यांचे व्यवहारांतील घटकः— हिंदुस्थानांतील हल्लींच्या व्यवहारांत प्रामुख्यानें पुढील घटकांचा समावेश होतो. (१) इम्पीरिअल बँक. (२) परराष्ट्रीय देवघेवींचा व्यवहार करणाऱ्या बँका. (३) समाईक भांडवली पेढ्या. (४) प्रत्यक्ष शेतकऱ्याशीं व लहान गांवीं व्यवहार करणारे मारवाडी, सराफ, महाजन, चेटी, सावकार वगैरे लोकांच्या पेढ्या.

(५) पोस्टल सेव्हिंग बँका. (६) सहकारी पेढ्या. या सर्व घटकांची प्रथम थोडक्यांत माहिती पाहूं व औद्योगिक पेढ्या, जमीन तारण ठेवणाऱ्या पेढ्या, मध्यवर्ती पेढ्या वगैरे जरूर असलेल्या परंतु अस्तित्वांत नसलेल्या घटकांचा विचार करूं.

इम्पीरिअल बँक ऑफ इंडियाः—अ प्रेसिडेन्सी बँकाः—एकोणिसाव्या शतकाचे सुरवातीपासून ईस्ट इंडिया कंपनीचा परराष्ट्रांशीं व्यापार वाढूं लागल्यामुळें, व हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेचीहि जबाबदारी वाढूं लागल्यामुळें कंपनीला स्वतःची बँक असणें जरूर वाटूं लागलें व १८०६ सालीं कंपनीनें स्वतंत्र अधिकार (चार्टर) देऊन कलकत्ता येथें बँक ऑफ बंगाल स्थापन केली. या कंपनीचें भांडवल ५० लक्ष रुपये असून त्यांपैकीं १० लक्ष रुपये कंपनीनें दिलें होतें.त्यानंतर १८४०सालीं मुंबई-ची बँक ५२लक्ष रुपये भांडवलावर स्थापन झाली. त्यांपैकीं ३ लक्ष रुपये कंपनीचे होते; परंतु ही पेढी १८६८ सालीं बुडाल्यामुळें त्याच वर्षी एक कोट रुपये भांडवलावर नवी पेढी स्थापन करण्यांत आली. मद्रासची बँक १८४३ सालीं स्थापन झाली. हिचें भांडवल ३३ लक्ष रुपये असून त्यांपैकीं ३ लक्ष रुपये कंपनीनें दिले होते. प्रथमपासूनच या बँकांशीं कंपनीचा निकटचा संबंध होता. कंपनीनें या बँकांमध्यें कांहीं भांड-वल घातलें होतें व त्यांच्या डायरेक्टरांपैकीं कांहीं कंपनी नेमीत असे. १८५७ सालापर्यंत तर सेक्रेटरी व खजिनदार या जागांवर कंपनीचा नोकरच नेमला जात असे. याचा मोबदला म्हणून कंपनीचा सर्व पैशाचा व्यवहार या पेढ्याच पाहात व १८६२ पर्यंत नोटा काढण्याचा मक्ताहि याच पेढ्यांना असे. पुढें १८७६ सालीं कंपनीनें आपलें सर्व भांडवल या पेढ्यां-तून काढून घेतलें व त्यावर डायरेक्टर व इतर अधिकारी नेमण्याचा आपला हक्कहि सोडून दिला. या सालापर्यंत सरकारची सर्व ठेव प्रेसि-डेन्सी बँकाकडेच असे. पण त्या वर्षी मुंबई व बंगाल या पेढ्यांकडून सरकारांस पैसे वेळेवर न मिळाल्यामुळें सरकारनें आपली ठेव प्रेसीडेन्सी बँकाकडून काढून ‘ स्वतंत्र गंगाजळीची पद्धत ’ चालू केली. परंतु सरकारची थोडीशी ठेव यांचे-कडे असणें चालूंच असल्यामुळें व या पेढ्या सरकारची पेढीसंबंधीं बरींच कामें करीत राहिल्यामुळें यांचें महत्त्व कायम राहिलें व यांचा व्यवहार इतर कोणत्याहि पेढीचें व्यवहारापेक्षां सुरक्षित समजला जात असे. या मोबदला सर-कारनें प्रेसिडेन्सी बँकांचें कामावर कांहीं निर्बंध घातले होते. उदाहरणार्थ, या बँकांना परराष्ट्रीय देवघेव करतां येत नसे; परदेशांत पैसा कर्जाऊ उभारता येत नसे, व एका व्यक्तीस जास्तींत-जास्त किती रक्कम, किती काल व कोणत्या तारणावर देतां येईल याची किमान मर्यादा ठर-लेली असे. लोकांपासून ठेव घेणें, ठरावीक तारणावर ती गुंतवणें, हुंड्यांचा व्यवहार करणें, सोनेंचांदीची खरेदीविक्री करणें; सरकारनें उभारलेल्या कर्जाची व्यवस्था पाहणें वगैरे वगैरे या पेढ्यांचीं प्रमुख कामें असत.

१९२० सालीं सरकारनें एक कायदा पास करून या तिन्ही इलाखा बँका एकत्र केल्या व त्यांचेबद्दल एक मध्यवर्ती सर्व राष्ट्राची अशी इम्पीरिअल बँक स्थापन केली. या वेळेपर्यंत या पेढ्यांनीं कशी प्रगति केली होती हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.

बंगालची पेढी

सन	भांडवल	गंगाजळी (Reserved)	सरकारी ठेव	इतर ठेव	रोख	तारणावर	शेंकडा नफा
१८९५	२००	६८	१८४	६७७	४२२	१३२	१०
१९१३	२००	१९१	३०१	१८२४	८४०	३१९	१४
१९२०	२००	२१०	४३४	३३९८	१२२१	९१०	१९ १/२

मुंबईची पेढी

सन	भांडवल	गंगाजळी (Reserved)	सरकारी ठेव	इतर ठेव	रोख	तारणावर	शेंकडा नफा
१८९५	१००	५१	७६	३५८	२८८	१०५	११
१९१३	१००	१०६	२००	१०१५	४७७	२३२	१४
१९२०	१००	१२०	३४९	२७४८	८७६	२९८	२२

मद्रासची पेढी

सन	भांडवल	गंगाजळी (Reserved)	सरकारी ठेव	इतर ठेव	रोख	तारणावर	शेंकडा नफा
१८९५	५०	१६	४५	२७८	१४४	४७	१०
१९१३	७५	७३	८६	८०५	२१९	१७७	१२
१९२०	७५	४५	११८	१५७९	५०५	२११	१८

(आ) इंम्पीरियल बँकेची जरूरी व स्थापनाः—परस्पराशीं संबंध नसलेल्या अनेक पेढ्या असण्यापेक्षां एक मध्यवर्ती राष्ट्रीय पेढी असून तिनें घातलेल्या धोरणानें, तिचे देखरेखीखालीं व मदतीनें इतर पेढ्यांनीं काम करावें ही कल्पना फार जुनी आहे. प्रथम बंगालची पेढी ही मध्यवर्ती पेढी असावी अशी कल्पना होती. परंतु पुढें मुंबई व मद्रास येथें स्वतंत्र पेढ्या स्थापन झाल्यामुळें ती कल्पना अपुरीच राहिली. त्यानंतर १८६७ त बंगालच्या पेढीचा सेक्रेटरी डिक्सन यानें ही कल्पना पुन्हां मांडली. १८९८ मध्यें फौलरकमिटीनें या कल्पनेचा विचार केला. १९१३ सालीं मि. कोन्स यानें एक मध्यवर्ती पेढीची योजना करून ती सरकारपुढें मांडली. परंतु नंतर लौकरच महायुद्ध सुरू झाल्यामुळें त्या योजनेस मूर्त स्वरूप येऊं शकलें नाहीं. महायुद्ध संपल्यानंतर १९२० सालीं आन्तरराष्ट्रीय आर्थिक परिषदेनें असा ठराव केला कीं ज्या राष्ट्रांत मध्यवर्ती पेढ्या नसतील त्यांनीं त्या स्थापन कराव्या. कारण राष्ट्रांत आर्थिक स्थैर्य असणें हें बरेंचसें मध्यवर्ती पेढीवर अवलंबून आहे. शिवाय हिंदुस्थानसरकारची या वेळीं खात्री झाली होती कीं, (१) सरकारची स्वतंत्र गंगाजळी (Goverment reserves,) व बँकांची गंगाजळी अशा दोन ठिकाणीं गंगाजळ्या असल्यानें राष्ट्रांतील पैसा निष्कारण विभागला जाऊन अडकून रहातो. (२) सरकारनें राज्यव्यवस्थेबरोबरच पेढीवाल्याची सर्व कामें आपल्या अंगावर घेतल्यानें सरकारची जबाबदारी निष्कारण वाढते. (३) मध्यवर्ती पेढी नसल्यानें देशांतील आर्थिक व्यवस्थेस एक धोरण रहात नाहीं. (४) अशा तऱ्हेची पेढी 'बँक-रेट' जास्त स्थिर ठेवूं शकेल; (५) १९१३ सालच्या सारख्या पेढ्यांवरील आपत्तींत बुडणाऱ्या पेढ्यांना मदत करून लोकांचा पेढीचे व्यवहारावरील विश्वास कायम ठेवील. (६) या पेढींत हिंदी लोकांना पेढीच्या व्यवहाराचें शिक्षण देतां येईल. (७) मध्यवर्ती पेढीच्या द्वारा ठिकठिकाणीं पुष्कळशा शाखा

स्थापन करून लोकांत पेढीची कल्पना फैलावतां येईल. (८) त्याच सुमारास चालू केलेल्या सुवर्णपरिमाण पद्धतीला जरूर असलेल्या सोन्याची खरेदीविक्रीही मध्यवर्ती पेढीमार्फत करतां येईल. व (९) पैशाची किंमत स्थिर राखतां येईल. या व इतर कारणांचा विचार करून सरकारनें १९२० सालीं मध्यवर्ती पेढी स्थापन करण्याचें नक्की ठरवलें व पुढें असलेल्या सर्व योजनांपैकीं मि. कोन्स यानें मांडलेली योजना पसंत करून तिला अनुसरून इम्पीरिअल बँक ही मध्यवर्ती पेढी स्थापन केली.

घटनाः—' १९२० च्या बँक ॲक्ट ' नें अस्तित्वांत असलेल्या तिन्ही प्रांतिक पेढ्या एकत्र करण्यांत येऊन ही पेढी स्थापन केली आहे. या पेढीचें भांडवल १५ कोटींचें असून त्यांपैकीं ३ कोटी ७५ लक्ष राखून ठेवलेलें आहे. भांडवलाचा प्रत्येक विभाग (शेअर) ५०० रुपयांचा असून पूर्वीच्या प्रांतिक पेढ्यांचे भागीदार हे या पेढीचे भागीदार समजले गेले आहेत. व वाढलेल्या भांडवलापैकींही कांहीं विभाग घेण्याची जुन्या भागीदारांस सवलत ठेवण्यांत आली होती. या पेढीच्या नियंत्रणासाठीं एक मध्यवर्ती मंडळ स्थापन केलें असून कलकत्ता, मद्रास व मुंबई या ठिकाणीं स्थानिक मंडळें आहेत. पुढें बँकेचा व्यवहार वाढेल त्याप्रमाणें इतर ठिकाणींही गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे परवानगीनें स्थानिक मंडळें स्थापतां येतील.

या मध्यवर्ती मंडळांत पुढीलप्रमाणें सभासद असतातः—(१) या मंडळाचे शिफारशीवरून हिंदुस्थान सरकारनें नेमलेले दोनपर्यंत मुख्य व्यवस्थापक (मॅनेजिंग गव्हर्नर्स) (२) स्थानिक मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व चिटणीस (३) सरकारचा चलनखात्याचा मुख्य अधिकारी (कंट्रोलर ऑफ करन्सी) (४) हिंदुस्थान सरकारनें नेमलेले चारपर्यंत बिन-सरकारी सभासद. यापैकीं स्थानिक मंडळाचे चिटणीस व कलम तीनमधील अधिकाऱ्याला सभेस हजर मात्र राहतां येतें पण मत देता येत नाहीं. सरकारचें आर्थिक धोरणावर अगर शिलकेसंबंधीं बँकेच्या कोणत्याही कृत्याचा अनिष्ट परिणाम होईल असें सरकारास वाटल्यास त्या बाबतींत बँकेस जरूर तो हुकुम पाठवण्याचा सरकारला हक्क आहे. शिवाय, बँकेच्या नेहमींच्या कामाबद्दल एकादी सूचना पुढें आली असतां सरकारच्या चलनी अधिकाऱ्यास ती सरकारचे हिताचे दृष्टीनें आक्षेपार्ह वाटल्यास ती अमलांत न आणण्याबद्दल तो बँकेस लेखी नोटीस देऊं शकतो, व त्याबाबत ग. ज. इन् कौन्सिलचा निर्णय होईपर्यंत ती सूचना, अमलांत आणतां येत नाहीं. या मध्यवर्ती मंडळाकडे पेढीचें सामान्य धोरण ठरविणें स्थानिक मंडळावर देखरेख करणें, बँकेचा व्याजाचा दर ठरवणें, दर आठवड्यास पेढीचा आढावा प्रसिद्ध करणें वगैरे कामें आहेत. स्थानिक मंडळें आपल्या विभागांतील कामाकडे लक्ष देतात.

या पेढीनें करावयाचीं कामें—या पेढीन कोणतीं कामें करावयाचीं यावर सरकारचें पूर्ण नियंत्रण आहे. सामान्यतः पुढील व्यवहार या पेढीस करतां येतातः—(१) कांहीं ठराविक रोख्यांत पैसे गुंतवणें, किंवा त्यांचे तारणावर पैसे व्याजी देणें; (२) स्थानिक सरकारचें परवानगीनें कोर्ट ऑफ वॉर्डस्‌कडे असलेल्या इस्टेटीचे तारणावर पैसे व्याजी देणें; (३) हिंदुस्थान व सिलोनमध्यें हुंड्या काढणें, घेणें, विकणें वगैरे हुंड्यांचा व्यवहार करणें; (४) सोने चांदीची खरेदीविक्री करणें; (५) ठेवी ठेवणें; (६) कर्जवसुलीत पेढीकडे येणारी इस्टेट विकणें; (७) मौल्यवान जिन्नस सुरक्षीत ठेवण्यासाठीं घेणें; (८) हिंदुस्थानांत कर्ज उभारणें; (९) पेढीच्या तारणावर इंग्लंडमध्यें पैसे उभारणें; (१०) कामिशन घेऊन एजन्सीचीं कामें करणें, वगैरे वगैरे.

हिंदुस्थान सरकार व इम्पीरिअल बँक यामध्यें करार होऊन असें ठरलें आहे कीं, (१) सरकारचे पैशासंबंधीं सर्व व्यवहार बँकेनें करावे व ज्या ठिकाणीं बँकेच्या शाखा असतील तेथील सरकारी तिजोऱ्या बंद व्हाव्या; (२)

१९२६ पर्यंत बँकेनें शंभर नव्या शाखा काढाव्या. त्यांपैकीं वीस सरकार सांगेल त्या ठिकाणीं काढाव्या. [ही अट पूर्ण झाली आहे.] (३) सरकारी कर्जाची सर्व व्यवस्था बँकेनें पहावी. या बँकेची लंडन येथील शाखा १९२१ सालीं उघडल्यापासून हिंदुस्थान सरकारचे इंग्लड-मधील पैशाचे व्यवहार ही बँकच पहाते.

पेढीच्या कामावर नियंत्रण—याप्रमाणें या बँकेकडे जरी सरकारनें पुष्कळ कामें सोप वलीं असलीं तरी कायद्यानें पेढीचे कार्यावर नियंत्रणेंही पुष्कळ घातलीं आहेस. उदाहरणार्थ या पेढीस परराष्ट्रीय देवघेवीचें काम करतां येत नाहीं; पेढीचे पतीवर काढलेल्या कर्जाशिवाय इतर कोणत्याही मार्गानें पैसे उभारतां येत नाहींत; सहा महिन्यापेक्षां जास्त मुदतीचें कर्ज देतां येत नाहीं. एका गिऱ्हाइकास जास्तींत जास्त कर्ज किती द्यावें याची मर्यादा आहे; कसर कापून किंवा अंगावर कर्ज देतांना दोन भिन्न इसमांची अगर पेढ्यांची त्या व्यवहारास जामिनकी असली पाहिजे; एक व्यक्ति अगर भागिदारी यांना जास्तींत जास्त कर्ज किती देतां येईल यावर मर्यादा आहे. इ. इ.

इम्पीरिअल बँकेचे व्यवहार पुढील कोष्टकावरून दिसून येतील.(आकडे हजार रु.चे)

सन	भांडवल (जमा झालेलें)	रिझर्व्ह	ठेवी खाजगी	ठेवी सरकारी	रोख शिल्लक
१९२०	३७५००	३७७७९	७८०१९०	९०२६३	२६०३३४
१९२२	५६२५०	४३३०७	५७००५७	१४१५७३	१५०७४७
१९२४	,,	४८००८	७६७१२२	७५०२६	१५६०२६
१९२६	,,	५०९५०	७३८९७०	६४५३६	२०९०१०
१९२७	,,	५२४०७	७२०७२२	७२०२३	१०८८६६
१९२८	,,	५३९२२	७१३०४४	७९४८६	१०५७५८
१९२९	,,	५४७७६	७१६४३१	७५९९७	१३९९५९

इम्पीरिअल बँकेंतील दोष—हिंदुस्थानांत एक मध्यवर्ती पेढी असावी या कल्पनेनें सरकारनें मुद्दाम कायदा करून ही बँक स्थापन केली व तिजकडे पुष्कळशी महत्वाचीं कामेंही सोपविलीं. परंतु राष्ट्रीय पेढी किंवा 'बँकांची बँक' या दृष्टीनें या पेढींत पुष्कळच दोष आहेत. (१) नोटा काढणें, परराष्ट्रीय हुंड्यांचा व्यवहार करणें, सरकारचें व इतर पेढ्यांचें सोनें स्वतः-जवळ बाळगून देशांतील चलनविषयक गरजांचे मानानें त्यांचा विनियोग करणें वगैरे प्रत्येक राष्ट्रीय पेढीकडे असणारीं महत्वाचीं कामें या पेढीकडे सोपवलीं गेलीं नाहींत; (२) ही पेढी खाजगी मालकीची आहे; व त्यांतही युरोपियन लोकांचे हितसंबंध फार आहेत; त्यामुळें पेढीचे कामांत राष्ट्रीय दृष्टि मुळींच राखली जात नाहीं; तेथें हिंदी गरजाकडे लक्षच दिलें जात नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार सुद्धां केला जात नाहीं. (३) पेढीस सालोसाल पुष्कळ फायदा मिळत असून त्यास सरकार मुकतें; (४) मध्यवर्ती मंडळ हें जवळजवळ निरुपयोगी असून त्याचा धोरण ठरविण्याचे दृष्टीनें कांहींच उपयोग होत नाहीं; (५) सरकारला पेढीवर मुळींच दाब ठेवतां येत नाहीं. कारण जोंपर्यंत प्रत्यक्ष सरकारच्या कोणत्याही हितास बाध येत नाहीं तोंपर्यंत पेढीचे व्यवहारांत सरकारला हात घालतां येत नाहीं. (६)पेढीच्या पुष्कळशा नवीन नवीन शाखा काढण्याची योजना फारशी उपयोगी झाली नाहीं. कारण पेढीनें बहुतेक शाखा अशा ठिकाणीं काढल्या कीं तेथें मूळ इतर बँका होत्याच. त्यामुळें जन-

तेस नवीन पेढीचा फायदा न होतां इतर बँकांचे मात्र चढाओढींत नुकसान होऊं लागले. (७) पेढीच्या कामावर इतकीं नियंत्रणें घातली आहेत कीं त्यामुळें पेढीच्या हातून फारशी कामगिरी होऊं शकत नाहीं. (८) हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या चार बिनसरकारी सभासदांचे हातून हिंदी लोकांचें हित पाहिलें जात नाहीं. त्यामुळें बँक नेहमीं आपल्या व्यवहारांत पक्षपात करून युरोपियन व्यापाऱ्यास फायदा मिळवून देते.

गंगाजळी पेढी (रिझर्व्ह बँक)—वरील सर्व दोषांमुळें इम्पीरिअल बँक ही मध्यवर्ती पेढीची जागा भरून काढण्यास नालायक ठरल्यामुळें गंगाजळी पेढीची जरूरी शिल्लक राहिलीच. इम्पीरिअल बँकेचेच गंगाजळी पेढींत रूपांतर करणें फारसें फायदेशीर होणार नाहीं. कारण गंगाजळी पेढीचें मुख्य काम म्हणजे इतर पेढ्यांना जरूर तेव्हां पत देऊन त्यांच्या करवी शेती, उद्योग धंदे, व्यापार ही वाढवावयाची. त्या पेढीनें स्वतः या व्यवहारांत फारसा भाग घ्यावयाचा नाहीं; त्यामुळें गंगाजळी पेढीस फक्त मुख्य मुख्य ठिकाणीं शाखा असल्या कीं पुरे होते. या पेढीनें स्वतः मोठा फायदा मिळविण्याचीही हाव धरून चालत नाहीं. परंतु इम्पीरिअल बँक ही केवळ फायदा मिळविण्यासाठीं स्थापन झालेली खाजगी भागीदाराची संस्था असून तिच्या अनेक ठिकाणीं शाखाही आहेत. व तिच्या कडून व्यापारास मदत करण्याचें उपयुक्त काम केलें जात आहे. तेव्हां ही पेढी कायम ठेऊन गंगाजळी पेढी नवीनच निर्माण करावी असे हिल्टन यंग कमिशननें सुचविलें होतें. त्यांच्या सूचनेप्रमाणें इं. बँकेप्रमाणें ही नवी पेढी सुद्धां भागीदारांची पेढी असावी; तिच्या व्यवस्थेसाठीं एक मध्यवर्ती मंडळ असावें व त्याचे हाताखालीं प्रत्येक प्रांतासाठीं एक प्रांतिक मंडळ असावें. हीं सर्व मंडळें राजकारणापासून अलिप्त ठेवण्यांत यावीं व त्यांच्यावरील कोणीही सभासद अगर शासक प्रान्तिक किंवा भारतीय कायदे मंडळाचा अगर ग. ज. च्या कौन्सिलचा सभासद नसावा. परंतु लोकमत असें आहे कीं, ही मध्यवर्ती पेढी खाजगी व्यक्तींच्या भांडवलावर उभारलेली नसून ती सरकारनेच स्थापन केलेली असावी. तत्त्वाचे दृष्टीनें पाहिलें तर सरकारचें म्हणणें बरोबर आहे. कारण सरकारी पेढी असल्यास तिच्या कारभारांत सुद्धां प्रचलित राजकारणाचा ध्वनि वेळोवेळी उमटून आर्थिक कामगिरींत निष्कारण ढवळाढवळ होण्याचा संभव असतो. परंतु लोकपक्षाचें म्हणणें आहे कीं आजच्या परिस्थितींत भागीदारांची पेढी स्थापन केल्यास तेथें सुद्धां गोऱ्या भांडवलवाल्यांचा शिरकाव होऊन हिंदी हितसंबंधाकडे दुर्लक्ष केलें जाईल व हिंदी लोकांचा त्या पेढीवर विश्वास बसणार नाहीं. शिवाय गंगाजळी पेढीस भांडवलही फार थोडें लागत असल्यामुळें तेवढें सरकार सहज देऊं शकेल. व गंगाजळी पेढीकडे सर्व चलनाचा व्यवहारही सोपवावयाचा असल्यामुळें ती पेढी वरिष्ठ कायदेमंडळाला जबाबदार असणें हें युक्तच आहे.

वर दिलेल्या हिल्टनयंग कमिशनचे सूचनांस अनुसरून १९२७ सालीं सरकारनें एक गंगाजळी पेढी स्थापन करण्याचें बिल वरिष्ठ कायदे मंडळांत मांडलें होतें. परंतु ही संस्था भागीदाराची असावी या सूचनेला लोकपक्षानें विरोध करून ती सरकारी असावी असें सिलेक्ट कमेटींत बहुमतानें ठरलें. पण डायरेक्टरेटच्या घटनेबाबत सरकारला असेंब्लीचें मत न पटल्यामुळें सरकारनें आपला मूळ ठरावहि परत घेतला; व हिंदुस्थानचा स्टेट सेक्रेटरी लोकपक्षाशीं तडजोड करण्यास विरुद्ध असल्यानें हा प्रश्न सध्या तरी तसाच पडून राहिला आहे.

२. परराष्ट्रीय देवघेवीचा व्यवहार करणाऱ्या बँका—या हिंदी पेढ्यांच्या व्यवहारांतील दुसरा प्रमुख घटक होत. हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार जसजसा वाढत गला तसतशी या व्यापारांतील देवघेवी भागवण्याचें काम करण्यास पेढ्यांची जरूर लागली. मूळच्या प्रांतिक पेढ्या व हल्लींची इंपीरिअल बँक यांना हा व्यवहार करण्याची परवानगी नसल्यामुळें, व हिंदी भांडवली पेढ्या आपलें लक्ष सर्वस्वी अंतर्गत व्यापा-

राच्या देवघेवीला मदत करण्यांत घालीत असल्यामुळें हा व्यवहार सर्वस्वी परदेशी पेढ्यांचे हातीं आहे. या पेढ्या दोन प्रकारच्या आहेत; (१) त्यापैकीं कांहींचा बहुतेक व्यवहार हिंदुस्थानांतच होतो; व (२) कांहीं इतरत्र व्यवहार करणाऱ्या मोठ्या पेढ्या असून त्यांच्या फक्त येथें शाखा आहेत. या दोन्ही प्रकारच्या पेढ्यांच्या व्यवहाराची कल्पना येण्यासाठीं पुढील माहिती दिली आहे. आकडे हजार पौंडाचे व ता. ३१ डिसेंबर १९२६चे आहेत.

पेढ्यांचा प्रकार	त्यांची संख्या	भरणा झालेले भांडवल	शिल्लक	ठेवी		रोख शिल्लक	
				हिंदुस्थानांत	हिं.चे बाहेर	हिं.त.	हिं. चे बाहेर
नं. १	५	९६४४	१०४७१	५१०७२४	७३५३३	७३२९९	१४२३४
नं. २	१३	६७७६९	६०११९	२०४६९८	८३६३५३	३३९८५	१२२०५२

या पेढ्या हिंदुस्थानांतून परराष्ट्रास निर्यात झालेल्या मालाच्या हुंड्या विकत घेतात व परराष्ट्रांतील बँकास कटमिती कापून देऊन त्या विकतात, अगर मुदत भरताच त्या राष्ट्रांतील गिऱ्हाइकांस त्या सादर करून त्यांचे पैसे वसूल करून घेतात. उलट ज्या परदेशस्थ व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानांत माल पाठवलेला असतो त्यांच्या हुंड्या त्या देशांत विकत घेऊन त्या हिंदुस्थानांत आणतात. याप्रमाणें व्यापाराचे जरूरीस अनुसरून हिंदुस्थानचा पैसा परदेशीं नेणें व परदेशचा पैसा हिंदुस्थानांत आणणें हें यांचें काम आहे. हल्लीं हिंदुस्थानसरकारही पूर्वीप्रमाणें स्वतःच्या निर्यात हुंड्या स्टेट सेक्रेटरीकडे स्वतः पाठवत नसून, ते या पेढ्यांकडूनच हुंड्या विकत घेऊन स्वतःच्या पैशाची ने-आण करतात, या सर्व व्यवहारांत बट्टा कापून मिळाल्यामुळें ह्या पेढ्यांचा पुष्कळ फायदा होतो.

या सर्व पेढ्या परदेशी असल्यामुळें हिंदुस्थानच्या दरसाल सहाशे कोटी रुपयांहून अधिक असलेल्या व्यापाराच्या देवघेवीचा सर्व फायदा देशाबाहेर जातो. हॉलंड व जपानसारख्या लहान लहान देशांच्याहि बँकांचें सर्वत्र जाळें पसरलेलें असावें व हिंदुस्थानच्या एकाही पेढीची परदेशी हुंडणावळीचा व्यवहार करणारी एकही शाखा नसावी हें दुर्दैव आहे! आजपर्यंत या पेढ्या फक्त परराष्ट्रीय व्यापाराला मदत करण्याचेंच काम करीत होत्या. परंतु अलीकडे त्या हिंदुस्थानांतील लोकांच्या ठेवी ठेवून घेणें, त्यांना कर्ज देणें, व अंतर्गत व्यापारास साहाय्य करणें हेंही काम करूं लागल्यापासून देशांतील इतर पेढ्यांशींही त्या स्पर्धा करूं लागल्या आहेत व याही मार्गें फायदा मिळवीत आहेत. या पेढ्यांच्या हिंदुस्थानांत ६० वर शाखा असून यांचेकडे येथील लोकांच्या ठेवी ७ कोटी पौंडाहून अधिक आहेत हें लक्षांत घेतले असतां या पेढ्या हिंदी भांडवल कसें आकर्षीत आहेत हें दिसून येईल. शिवाय या पेढ्या आपल्या गंगाजळींत कर्जाचे मानानें शिल्लक फार थोडी ठेवतात ही गोष्टही पेढ्यांचे पतीस फार धोक्याची आहे. या पेढ्या हिंदी लोकांच्या नसल्यामुळें हिंदुस्थानांत पैशांची जरूर असतानामुद्धां त्या आपली ठेव जास्त फायद्यासाठीं परदेशीं घेऊन जाणें शक्य आहे. या सर्व कारणामुळें या पेढ्यांवर कांहीं तरी नियंत्रण घातलें पाहिजे व हिंदी पेढ्यांना परराष्ट्रीय हुंडणावळीचें काम हातीं घेण्यास उत्तेजन दिलें पाहिजे.

समाईक भांडवलाच्या पेढ्या—या हिंदी पेढ्यांच्या व्यवहारापैकीं तिसरा घटक होत. हिंदुस्थानांतील अन्तर्गत व्यापाराची जसजशी वाढ होत गेली तसतशा त्यासाठीं स्वतंत्र पेढ्या निघत गेल्या. त्यापैकीं १८६५ सालीं स्थापन झालेली अलाहाबाद बँक व १८७४ सालची अलायन्स बँक या प्रसिद्ध होत्या. या सर्व पेढ्या युरोपियन लोकांनीच स्थापन केलेल्या होत्या. १८९१सालची औध कमर्शिअल बँक ही पहिली हिंदी पेढी होय. १८९४सालीं लाला हरकिसन लाल यांनीं पंजाब नॅशनल बँक स्थापन केली,

व त्यांच्याच प्रयत्नानें १९०१ सालीं प्रख्यात 'पीपल्स बँक' स्थापन झाली. या बँकेनें १९१३ सालापर्यंत सुमारें १०० शाखा उघडल्या असून १९१३–१४सालीं तिच्या ठेवी सुमारें १। कोट रुपये होत्या. १९०५ सालीं स्वदेशीची लाट उसळल्यापासून अनेक देशी पेढ्या स्थापन झाल्या. परंतु त्यांपैकीं पुष्कळशा अनभिज्ञ माणसांनीं स्थापन केल्या असल्यामुळें १९१३सालीं एकंदर ५५ पेढ्यांचें दिवाळें निघालें व जनतेचा पेढ्यावरील विश्वास फारच डळमळला. या बुडलेल्या पेढ्यांत प्रसिद्ध पीपल्स बँक ही सुद्धां होती. १९१३ पासून १९१९पर्यंत बुडालेल्या पेढ्यांची संख्या ८९ होती. महायुद्धानंतर बुडालेल्या पेढींत १९२३ सालीं दिवाळें निघालेली अलायन्स बँक ही फार मोठी पेढी होती. व त्यामुळें ती बुडाल्यामुळें व्यापाराच्या पतीवर फारच वाईट परिणाम झाला असता. परंतु त्या पेढीवरील ठेवीदारास रुपयास आठ आणे परत करण्याचें इम्पीरिअल बँकेनें अभिवचन दिल्यामुळें तो प्रसंग टळला. १९१३ सालीं बँका बुडाल्या तेव्हां इम्पीरियल बँकेसारखी मध्यवर्ती संस्था नसल्यामुळें त्या वेळचा अनर्थ टाळण्यास कांहींच साधन नव्हतें. मध्यवर्ती बँकेचा उपयोग अडचणीच्या प्रसंगीं केवढा होतो, याचें हें एक उदाहरण आहे.

या दिवाळखोरीचीं कारणें—१९१३–१४ सालीं एकदम इतक्या पेढ्या बुडण्यास पुष्कळ कारणें आहेत. त्यांपैकीं प्रमुख येणें-प्रमाणें:—(१) यांपैकीं बहुतेक पेढ्या स्वदेशीच्या उत्साहांत काढलेल्या असल्यामुळें त्या पेढ्यांच्या संस्थापक व चालक मंडळांत तज्ज्ञ माणसें नव्हतीं; (२) पेढ्या आपल्या देण्याच्या फार थोड्या प्रमाणाइतकी–पुष्कळवेळां शेंकडा १० इतकी थोडी–शिल्लक गंगाजळींत ठेवीत असत. त्यामुळें पेढीवर एकदम मागणी आली असतां ती पुरवतां येत नसे, व म्हणून पेढी बंद करण्याचा प्रसंग येई; (३) आपल्याकडे ठेवी याव्या म्हणून पेढ्या चढाओढींत ठेवीदारास भलतेंच व्याज देऊं करीत असत. (४) अधिकृत भांडवल, नियोजित भांडवल व प्रत्यक्ष मिळालेलें भांडवल यांत फारच तफावत असे. म्हणजे अधिकृत भांडवलाचे शे. ४० नियोजित असे, व फक्त शे. १४ येवढेंच प्रत्यक्ष जमा झालें होतें. (५) ठेवीदार पेढीचे पतीबद्दल चौकशी न करतां नुसत्या भपक्यावर भुलून जात. (६) त्याचा फायदा घेऊन पुष्कळशी व्यवस्थामंडळीनें केलेली फसवेगिरी. (७) अशा संकटाचे प्रसंगीं सरकारनें ज्या ताबडतोब उपाययोजना करावयाच्या त्यांचा व मध्यवर्ती पेढीचा अभाव.

वर दिल्याप्रमाणें एकाएकीं पुष्कळशा पेढ्यांची दिवाळीं निघाल्यामुळें,पेढ्यांच्या व्यवहारावर नियंत्रण घालणें जरूर आहे कीं काय या प्रश्नावर हिंदुस्थान सरकारनें प्रान्तिक सरकारचीं मतें मागविलीं. व त्यांनीं यासंबंधीं बऱ्याच सूचनाहि केल्या होत्या. परंतु पुष्कळशी चर्चा होऊन त्या वेळीं तो प्रश्न तसाच राहिला. १९२९सालीं सरकारनें पेढ्यांच्या प्रश्नांची सांगोपांग चर्चा करण्यासाठीं प्रान्तिक व मध्यवर्ती कमेट्या नेमल्या होत्या. त्यांच्या सूचनांचा पुढें विचार करूं.

समाईक भांडवलाच्या पेढयांची वाढ कशी होत गेली हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

(अ) ज्या पेढ्यांत भांडवल व गंगाजळी ५ लक्ष किंवा अधिक आहे अशा पेढ्या, (आंकडे लक्षांचे)

सन	पेढयांची संख्या	उभारलेलें भांडवल	गंगाजळी	ठेवी	रोख शिल्लक
१८७०	२	९·८	१·८	१३	५
१८९०	५	३३	१७	२७०	५६
१९१०	१६	२७५	१००	२६६५	२८०
१९१५	२०	२८१	१५६	१७८७	३९९
१९२०	२५	८३७	२५५	७११४	१६३०
१९२६	२७	६६१	४०८	५९६१	९११
१९२९	३३	७८६	३६६	६२७२	५०४
(ब) ज्या पेढ्यांत भांडवल ५ लक्षांहून कमी आहे अशा पेढ्या					
१९१३	२३	३९	११	१५१	२४
१९१८	२८	४८	१४	१५५	३६
१९२१	३८	७७	२३	३२६	४३
१९२४	४०	७२	३४	२६६	३४
१९२६	४६	८३	३९	३४५	८२

या पेढ्या ठेवी घेणें, कर्जें देणें, हुंड्यांचे व्यवहार करणें वगैरे कामें करतात. हुंड्या, कापड, शेतकीमाल वगैरेवर कर्ज देतात. परंतु एकंदरींत समाईक भांडवली पेढ्यांच्या व्यवहाराची देशांत जितकी प्रगती व्हावयास पाहिजे तितकी अद्याप झालेली नाहीं. यांपैकीं बहुतेक पेढ्या मोठमोठ्या इलाख्याचीं ठिकाणें, बंदरें, व इतर व्यापाराचीं ठाणीं येथेंच स्थापन झाल्या आहेत; त्यामुळें सर्व देशभर यांचा व्यवहार चालू शकत नाहीं व या पेढ्याही लहान लहान व्यापारी अगर शेतकरी यांच्या गरजाकडे लक्ष देत नाहींत.

सराफ, महाजन वगैरे लोकांच्या पेढ्याः— अद्याप नवीन पद्धतींच्या पेढ्यांचा देशांतील अन्तर्गत व्यवहारापैकीं लहान लहान व्यापारी अगर शेतकरी यांना उपयोग होत नसल्यामुळें पूर्वींच्या पद्धतीनें व्यवहार करणारे सराफ, महाजन, चेट्टी वगैरेंच्या पेढ्या अद्याप कायमच आहेत; इतकेंच नव्हे तर एका तऱ्हेनें त्या भांडवली पेढ्यांच्या प्रतिस्पर्धीच आहेत. हे पेढीवाले व्याजाचा दर जास्त देत असल्यामुळें त्यांचेकडे ठेवी पुष्कळ येतात. बहुधा हे स्वतांच्याच भांडवलावर व्यापार करतात; परंतु जरूर तर आपल्या हुंड्यांचे पतीवर त्या इम्पीरिअल बँकेकडूनहि कर्ज काढतात. एकादा लहान व्यापारी आपली हुंडी शहरगांवच्या मोठ्या व्यापाऱ्यास विकतो, तो व्यापारी इलाख्याच्या ठिकाणच्या एकाद्या पेढीवर स्वतांची हुंडी पाठवतो व तो इलाख्याच्या ठिकाणचा व्यापारी एकाद्या मोठ्या पेढीकडून स्वतांच्या हुंडीवर पैसे काढतो. याप्रमाणें हे पेढीवाले मोठ्या बँकांचे पैसे देशभर खेळवण्यास अत्यंत जरूर असें मध्यस्थच आहेत. अशा तऱ्हेच्या पेढ्यांचा व सावकाराचा व्यवहार शंभर कोटी रुपयांच्या वर होत असावा.

पोस्टल सेव्हिंग्ज बँकाः—सन १८८२-८३ सालीं सरकारनें हिंदुस्थानचे सर्व भागांत पोस्टल बँका स्थापन केल्या, व तेव्हांपासून त्या पोस्ट खात्याचा एक विभाग समजला जातात. या बँकांतील ठेवी परत करण्यासाठीं सरकार वेगळीं गंगाजळी ठेवीत नाहीं. पोस्ट ऑफिसें असलेल्या बहुतेक गांवीं या पेढ्या असल्यामुळें त्यांपैकीं बऱ्याच ठिकाणीं दुसऱ्या कोणत्याही पेढ्या नसल्यामुळें मध्यम वर्ग व गरीब स्थितींतील लोक हे या पेढ्यांचा पुष्कळ उपयोग करतात. विशेषतः सन १९१३-१४ सालीं पेढ्यांच्या दिवा-

ळ्यामुळें लोकांचा पेढ्यावरील विश्वास उडाल्यापासून, व १९१४सालीं सरकारनें पेढींत किमान ठेव ठेवण्याची मर्यादा वाढवल्यापासून या पेढ्यांचा व्यवहार चांगला चालतो. याच पेढ्यामार्फत वॉर लोन व कॅश सर्टिफिकेटें विकत घेण्याची सोय केली असल्यामुळें त्यातही पुष्कळ लोक आपली ठेव ठेवतात. १९२९–३० सालापर्यंत पोस्ट ऑफीस कॅश सर्टिफिकेटें ३५ कोट रुपये किंमतीचीं खपलीं होतीं. पुढील कोष्टकावरून पोस्टल सेव्हिंग्ज बँकांची वाढ दिसून येईल.

सन	पेढ्यांची	ठेवीदार	ठेवी कोटी रु.
१९१३-१४	९८२४	१६३९०००	२३·१६
१९१४-१५	१०१६१	१६४४०७४	१४·८९
१९१८-१९	१०५८७	१६७७४०७	१८·२२
१९२२·२३	१०७१०	२०४३५०२	२३·१९
१९२३ २४	१०५३५	२०३९३१४	२४·७८
१९२४-२५	१०७२७	२१६४४७३	२६·६३
१९२५-२६	१११६२	२३१७३१०	२७·२३
१९२८ २९	१२६८४	२०२०८३२	३४·४९
१९२९-३०	१२७७८	२३०४९०४	३७·१२

ब्रिटिश हिंदुस्थानांत ७ लक्ष खेडेंगावें आहेत ही गोष्ट लक्षांत घेतां पोस्टल बँकांची संख्या फारच थोडी असल्याचें दिसून येईल. अद्याप यांत वाढ करण्यास पुष्कळ जागा आहे. त्यासाठीं अशी सूचना केली आहे कीं, गांवचे कुलकर्णी वगैरे जे अधिकारी जमीनसारा गोळा करण्याचें काम करतात त्यांनाच हें काम सांगण्यांत यावें. शिवाय व्याजाचे दर थोडे वाढवावे; ठेवीदारांनीं चेक दिल्यास तो घ्यावा व ठेवीच्या रकमेची किमान मर्यादा आणखी वाढवावी.

सहकारी पेढ्याः—हिंदी शेतकऱ्यांची अत्यंत हलाखीची स्थिति सुधारण्यासाठीं झालेल्या अनेक प्रयत्नांत अलीकडे सहकारी चळवळीस प्रामुख्याने स्थान दिलें पाहिजे. इ. स. १९०४ मध्यें सरकारनें कायदा करून सहकारी संस्था स्थापन होण्यास चालना दिली व तेव्हांपासून या संस्थांची वाढ होत आहे. सहकारी संस्थांबरोबरच त्यांना भांडवल पुरवण्यास मध्यवर्ती पेढ्या सुरू झाल्या. त्यांपैकीं ५ लक्षांहून अधिक भांडवल असलेल्या पेढ्यांचे व्यवहार पुढें दर्शविले आहेत.

सन	पेढ्यांची संख्या	भांडवल जमा झालेलें	रिझर्व्ह व इतर फंड	एकंदर	ठेवी व कर्ज मिळालेली	कर्ज (येणें)	रोख शिल्लक
१९२०-२१	५	२८१९	८४१	३६६६	२२९३८	२३१५९	३८३
१९२३-२४	८	४४३६	१७९९	६२३५	४१३९९	३३२८९	३७१३
१९२७-२८	१६	१०३४६	४६३६	१४९८२	८८३५६	६६२२९	६८३१
१९२८-२९	१८	११६९९	४६३५	१६३३४	९०१४९	६८०२९	७७७६
१९२९-३०	२२	१३९७६	६४९४	२९४७०	१०९०१६	८९२६६	७८६६

औद्योगिक पेढ्याः—वर दिलेल्या सहकारी पेढ्या खेरीज करून इतर सर्व पेढ्या फक्त व्यापारास मदत करणाऱ्या आहेत. या पेढ्या थोड्या मुदतीपुरतेंच कर्ज देऊं शकतात. पण देशांत नवे उद्योगधंदे स्थापन करणें असेल तर त्यांना भांडवलाची गरज भारी प्रमाणावर व जास्त मुदतीसाठीं असते. शिवाय तो धंदा फायदेशीर होण्यासारखा आहे कीं नाहीं हें ठरवून त्या धंद्यासाठीं एकदां कर्ज दिल्यानंतर त्यावर सारखी देखरेख ठेवणें हें कामही पेढीसच करावें लागत असल्यामुळें वेगळ्या औद्योगिक पेढ्या असणें जरूर आहे. जपान, व जर्मनी या देशांत अशा औद्योगिक पेढ्या असून त्या उद्योगधंदे वाढवण्याचें मोठें काम करीत आहेत. १९१६

सालच्या औद्योगिक कामिशननें अशा तऱ्हेच्या पेढ्या स्थापन व्हाव्यात असें सुचवून त्यांस सरकारनें कांहीं अटीवर मदत करावी असेंही म्हटलें होतें. परंतु हिंदुस्थानांत एकही औद्योगिक पेढी नाहीं. १९१८सालीं मुंबईस टाटा इंडस्ट्रिअल बँक निघाली होती. परंतु ती१९२२सालीं बंद पडली.

जमिनींचे तारणावर कर्ज देणाऱ्या पेढ्याः—उद्योगधंद्याप्रमाणेंच शेती सुधारण्यासाठीं सुद्धां लांब मुदतीच्या कर्जाची जरूरी असते. व म्हणून हें पुरविण्यासाठींसुद्धां स्वतंत्र पेढ्यांची जरूर आहे. मध्यंतरीं सहकारी चळवळ सुरू झाल्यापासून सहकारी पेढ्यांचे योगानें शेती सुधारण्यासाठीं लागणारें कर्ज मिळूं शकेल अशी अपेक्षा होती. परंतु ती फारशी फलद्रुप न झाल्यामुळें लोकांचे पुन्हां 'शेतकऱ्यांना कर्ज देण्याऱ्या स्वतंत्र पेढ्या असाव्या ' असें मत बनत चाललें आहे. १९२५ सालीं मद्रास इलाख्यांत अशी एक पेढी निघाली असून मुंबई इलाख्यांत अशा कांहीं पेढ्या अलीकडे निघत आहेत. असेच अनेक उपक्रम झाल्यास शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास पुष्कळ मदत होईल.

राष्ट्रांतील उद्योगधंदे, व्यापार, शेती वगैरेची वाढ होऊन एकंदर राष्ट्र सुधारण्यास पेढ्यांची किती जरूरी आहे हें वर दर्शविलेंच आहे. परंतु पेढ्यांचे व्यवहाराचे दृष्टीनें हिंदुस्थान देश अत्यंत मागासलेला आहे हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

देशाचें नाव	पेढ्यांच्या कचेऱ्यांची संख्या	दर दशलक्ष लोकसंख्येशीं पेढ्यांच्या कचेऱ्यांचें प्रमाण	दर २७०० चौरस मैलाशीं पेढ्यांचें प्रमाण
इंग्लंड	११९७६	२८५	३६२
अमेरिका	३००००	२५६	२०
जपान	७४६५	९२	८०
कानडा	४८८३	४४८	३
हिंदुस्थान	५९६	२	१

१९२३ सालीं हिंदुस्थानांत पेढ्यांतील ठेवींचें प्रमाण दरडोई ६ रुपये ३ आणे होतें व इंग्लंडमध्यें तेंच सुमारें ७६० रुपये होते. या गोष्टीवर येथें पेढ्यांचे व्यवहार किती लहान प्रमाणावर चालतात हें दिसून येतें. येथें ५० हजाराहून जास्त लोकसंख्या असलेली पुष्कळ शहरें अशीं आहेत कीं जेथें एकाही पेढीची एकही कचेरी नाहीं. व दहा हजार लोकसंख्येच्या शहरांपैकीं शेंकडा ७५ शहरांत एकही पेढी नाहीं. यामुळें लोकांना पेढीमार्फत व्यवहार करण्याची व पेढींत ठेव ठेवण्याची सवय नाहीं. ते आपला पैसा दागिन्यांत गुंतवतात अगर गाठीला बांधून ठेवतात. ज्याप्रमाणें येथें जास्त पेढ्यांची जरूर आहे त्याचप्रमाणें जास्त प्रकारच्याही पेढ्यांची जरूरी आहे. सध्यांच्या सर्व पेढ्या व्यापारास मदत करणाऱ्या आहेत. सर्व देशांत औद्योगिक अगर परराष्ट्रीय हुंडणावळीचा व्यवहार करणारी एकही पेढी नाहीं. व्यापारी पेढ्यासुद्धां बहुतेक परराष्ट्रीय लोकांचे हातीं असल्यामुळें त्या हिंदी व्यापारास उत्तेजन देत नाहींत, किंवा हिंदी तरुणास पेढीच्या व्यवहाराचें शिक्षण घेण्याससुद्धां संधी देत नाहींत. त्यांचा व्यवहार इंग्रजी भाषेंतून चालतो, पण येथील बहुजन समाज अक्षरशत्रू असल्यानें त्यांना पेढ्यांचा मुळींच फायदा घेता येत नाहीं. पेढ्यांचें नियंत्रण करण्यास सध्यां एकही स्वतंत्र कायदा नाहीं, किंवा सर्व पेढ्यांचे कामास दिशा दाखवणारी ' गंगाजळी पेढी ' नाहीं. अद्याप नोटा काढणें, गंगाजळ्यांची व्यवस्था पाहणें यासारखे महत्त्वाचे व्यवहार पेढीकडे न सोपवतां सरकारच स्वतः करते. मध्यवर्ती पेढी स्थापन करण्याचे हेतूनें सरकारनें इम्पीरिअल बँक स्थापन केली खरी परंतु त्यावर इतकीं नियंत्रणें घातलीं कीं तिचेकडून फारसें काम होणें शक्य नाहीं. ही परिस्थिती बदलणें अत्यंत जरूर आहे. त्यासाठीं पेढ्यांची चौकशी करण्याकरतां ना. हाजी यांचे ठरावावरून सरकारनें १९२५ सालीं सर भूपेन्द्रनाथ मित्र यांचे अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमली होती. तिजकडे प्रामुख्यानें तीन प्रश्नांची चौकशी

करण्याचें काम सोपवलें होतें. आजच्या पेढ्यांच्या व्यवहाराची चौकशी करून (१) पेढ्यांची-विशेषतः औद्योगिक, शेतकी व व्यापारी पेढ्यांची वाढ होण्यासाठीं सूचना करणें; (२) हिंदी हितसंबंधाचें रक्षण व्हावें यासाठीं पेढ्यावर जरूर ती नियंत्रणें सुचवणें. (३) पेढ्यांच्या व्यवहाराच्या शिक्षणाबाबत सूचना करणें. या मुख्य कमेटीस मदत करण्यासाठीं वेगवेगळ्या प्रांतांतून प्रान्तिक कमेट्या नेमल्या होत्या. या प्रांतिक कमेट्यांनीं चौकशी करून आपले रिपोर्ट मुख्य कमेटीस सादर केले; त्यानंतर मुख्य कमेटीनें जरूर ती आणखी स्वतः चौकशी करून, व परदेशी तज्ज्ञांच्या मदतीनें १९३१ सालीं आपला रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टावर अद्याप सरकारनें कांहींच केलेलें नाहीं.

या रिपोर्टांतील सूचना पुढीलप्रमाणें—प्रत्येक हिंदी पेढींत हिंदी डायरेक्टर व भागीदार यांचें बहुमत असावें. परदेशी पेढ्यांस येथें काम करण्यास परवानगी देण्यापूर्वीं त्यांचेवर नियंत्रणें असावीं. प्रत्येक पेढीनें व्यवहार सुरू करण्यापूर्वीं परवाना घेतला पाहिजे. पेढीचें भांडवल व्यवहार व्यवस्थापकाची लायकी, वगैरेवर नियंत्रणें असावीं. त्यासाठीं पेढ्यांचा स्वतंत्र कायदा असावा. पेढ्याबाबत शिक्षण देण्याची सोय असावी. लवकरच रिझर्व बँक स्थापन करून इंपीरिअल बँकेवरील सध्यांचीं नियंत्रणें काढून टाकावी व तिला परदेशी हुंडणावळीचा व्यापार करण्याची मोकळीक द्यावी. हें न जमल्यास त्या व्यवहारासाठीं स्वतंत्र पेढी काढावी. मोठमोठ्या पेढ्यांनीं परदेशी आपल्या शाखा उघडाव्या. पूर्वीं पेढी नसेल अशा ठिकाणीं एकाद्या पेढीनें आपली शाखा उघडल्यास रिझर्व्ह बँकेनें तिला मदत करावी. कोणत्याही दोन पेढ्या एकत्र होत असतील तर त्यास मदत करावी. एकत्र कुटुंबांतील इस्टेटीचे तारणावर कर्ज देण्यांत यावें. हुंड्यावरील ड्यूटी काढून टाकावी. रिझर्व्ह बँकेस हिंदी संस्थानासाठीं कामें करण्याची परवानगी असावी. पेढ्यासाठीं जरूर ती माहिती गोळा करण्यांत यावी. सोन्याचे रूपानं रक्कम परत मिळणारी सुवर्ण सर्टिफिकिटें काढण्यांत यावीं. चेकचा उपयोग वाढवण्यास उत्तेजन देण्यांत यावें. शेतकऱ्यांना मदत करण्याची व दुष्काळी योजना वाढवण्याची व्यवस्था करावी. वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी सोसायट्या स्थापन करण्यांत याव्या. ठिकठिकाणीं माल सांठवण्यासाठीं 'वेअर हौसेस' (वखारी) बांधण्यांत याव्या. उद्योगधंद्यांचे व्यवहारांत सध्यां प्रचलित असलेली 'मॅनेजिंग एजंटा'ची पद्धति बंद करावी. उद्योगधंद्याची वाढ करण्यासाठीं प्रत्येक प्रांतांत एक औद्योगिक मंडळ स्थापन करण्यांत यावें, व प्रत्येक धंद्यास जरूर ती माहिती गोळा करणें, भांडवल उभारणें, वगैरे कामें या मंडळाचे मदतीनें चालावीं. कांहीं अटीवर सावकारी करणाऱ्या जुन्या तऱ्हेच्या पेढ्यांना रिझर्व्ह बँकेनें कर्ज द्यावें इत्यादि. याशिवाय सहकारी पतपेढ्या सुधारण्यासाठीं पुष्कळ सूचना आहेत.

क्लिअरिंग हौसेस—चेकचे रूपानें पैसे देण्याघेण्याची पद्धत अस्तित्वांत आल्यामुळें 'क्लिअरिंग हौसेस'ची जरूर लागते. चेकचे योगानें पेढ्यांची परस्पर देणीघेणी सारखीं निघत असतात. दररोज प्रत्येक पेढीवर इतर पेढ्यांचे शेंकडो चेक दिले जातात, व त्या पेढीचे चेक त्याच प्रमाणें इतर पेढ्यांवर दिले जातात. क्लिअरिंग हौसेसमध्यें या सर्व परस्पर देवघेवींची वजावाट होऊन एकही रुपया रोख न देतां लाखो उपयांच्या रकमा दुबेरजी उडवल्या जातात. बहुतेक पेढ्या या 'हौसेस'च्या सभासद असून सर्व हिशोब करून राहिलेल्या शिलका इंपीरिअल बँकेवर चेक देऊन भागवण्यांत येतात. सध्यां क्लिअरिंग हौसेस मुंबई, मद्रास, कराची, रंगून, दिल्ली, सिमला व अमदाबाद येथें आहेत. प्रतिवर्षीं याप्रमाणें किती रकमांची वजावाट क्लिअरिंग हौसेसमार्फत होते हें पुढील कोष्टकावरून दिसून येईलः—

आकडे लक्ष रुपयांचे आहेतः—

सन	एकंदर रक्कम	सन	एकंदर रक्कम
१९०१	८,०२७	१९२६	१७५,४०८
१९०६	१२,८९५	१९२७	१७९,५१०
१९११	५१,६१२	१९२८	२००,०९३
१९१७	९०,१८१	१९२९	२१५,९१७
१९२०	३०१,१४०		
१९२४	१९२,२४९		

बँकेचा दर (बँक-रेट): —सरकारी कर्ज रोख्यांचे तारणांवर इम्पीरिअल बँक गिऱ्हाइकांस ज्या दरानें कर्ज देण्यास तयार असते त्या दरास बँकेचा दर म्हणतात. पूर्वी हे दर वेगवेगळ्या प्रान्तांसाठीं प्रान्तिक बँका ठरवीत असत. व त्यामुळें ते पुष्कळ वेळा तिन्ही प्रांतांत वेगवेगळे असत. सध्यां सर्व हिंदुस्थानभर एकच दर इं.बँ. कायम करते. इतर कर्जरोखे तारण ठेऊन दिल्या जाणाऱ्या कर्जाचे दर या दराहून जास्त असतात; व देशांतील अन्तर्गत व्यापारास मदत करणारे जे खासगी सराफ असतात त्यांचे हुंड्या वटवण्याचे दर याहूनही जास्त असतात. कारण ते सराफ व सावकार जरूर तेव्हां इं. बँकेकडून पैसे आणून देशांत जास्त व्याजानें देतात व दोहोंमधील फरक फायदा म्हणून ठेऊन घेतात. तेजीच्या दिवसांत पैशाची मागणी जोराची असल्यामुळें बँकाचे दर भारी असतात. जून नंतरच्या सहामाहींत हे दर उतरतात. पुढील कोष्टकावरून हें स्पष्ट होईल.

सन	पहिल्या सहा-माहींतील दर जून ३० अखेरपर्यंत	दुसऱ्या सहा-माहींतील दर जुलै ते डिसेंबर	वार्षिक सरासरी
१९२१	६·०३८	५·१०८	५·५७
१९२३	७·४१९	४·५	५·९५
१९२५	६·५८	४·७	५·६४
१९२७	६·५	४·९५	५·७३
१९२८	६·९४	५·४५	६·२
१९२९	६·८७	५·७८	६·३३
१९३०	६·५		

विमा

विम्याचे प्रकार

(१) होल लाइफ–जर एकादा मनुष्य प्रीमियमचे हप्ते आजन्म भरीत राहिला तर विमाकंपनी त्याचे मृत्यूनंतर ठराविक रक्कम त्याचे नातलगास देण्याची जबाबदारी घेते.

(२) लिमिटेड पेमेंट्स–हप्ते एका ठराविक मुदतीपर्यंत भरावयाचे व विमा उतरणारा मनुष्य जर ह्या मुदतीनंतर हयात असेल तर त्याची पॉलिसी पुढें हप्ते न भरतांच चालू राहील. विम्याची रक्कम मात्र त्याचे मरणानंतर मिळेल.

(३) एन्डौमेंट–मुदतबंद विमा– विमा उतरणाऱ्यास त्याचे हयातींतच ठराविक मुदतीनंतर पैसे मिळावयाचे.

(४) टेंपररी–विम्याची रक्कम विमेदाराच्या मृत्यूनंतर देण्यास कंपनी जबाबदार रहाते, पण मृत्यू एका ठराविक मुदतींत आला तरच. या मुदतीनंतर विमेदार जगला तर कंपनी कांहीं देऊं शकत नाहीं.

(५) प्युअर एन्डौमेंट–एका विवक्षित मुदतीपर्यंत जर विमेदार जिवंत असेल तर कंपनी विम्याची रक्कम देण्यास बांधलेली असते. विमा पॉलिसींत जर अशी अट असेल कीं,पॉलिसी म्याचुअर होण्यापूर्वीं विमेदारास मृत्यु आल्यास सर्व भरलेले हप्ते कंपनी परत करील तर त्या पॉलिसीला 'वुइथ रिटर्न' म्हणतात. नसेलतर ' विदौट रिटर्न' म्हणतात.

(६) डबल एन्डौमेंटः–ठराविक वर्षांचे मुदतींत मृत्यु आल्यास विम्याची रक्कम देण्यास कंपनी जबाबदार आहे; पण त्या मुदतीनंतर जर विमेदार हयात असेल तर त्या रकमेच्या दुप्पट रक्कम विमेदारास देण्यास कंपनी जबाबदार असते.

(७) डीफर्ड अॅशु.–वैद्यकीय तपासणीशिवाय लहान मुलाचा विमा उतरतात. लहानपणीं विमा उतरल्यानें हप्ता हलका बसतो व मुलगा वयांत आल्यावर कंपनीची जबाबदारी चालू होते. या वेळीं मुलगा जरी अशक्त किंवा अजारी असला तरी लहानपणींच ठरलेला हलका हप्ता स्वीकारणें कंपनीस भाग पडतें.

(८) जॉइंट लाइफ अॅशु.––आजन्म किंव मुदतबंद–दोन किंवा अधिक माणसांच्या आयुष्याचा संयुक्त विमा. नवरा–बायकोचा किंवा भागीदारांचा अशा पद्धतीनें विमा उतरतात. सगळे विमेदार हयात असेपर्यंत हप्ते भरावयाचे असतात. त्यांपैकीं एक मृत्यू पावल्यास, इतरांना विम्याचे पैसे मिळतात.

(९) हाफ प्रिमियमः–ज्यांना विमा उतरण्याची इच्छा आहे, पण मोठा हप्ता भरण्याची स्थिति नाहीं, अशा लोकांना या पद्धतीनें विमा उतरतां येईल. पहिल्या ५ किंवा १० वर्षेपर्यंत हप्ता हलका बसतो, व पुढें वयाला अनुसरून जो हप्ता ठरलेला असतो तितकाच जवळ जवळ भरावा लागतो.

(१०) हाफ क्रेडिट–पहिलीं ५।१० वर्षें कमी हप्ता भरावा लागतो. व प्रत्येक हप्त्यापैकीं कांहीं रक्कम या मुदतींत पॉलिसीवर लोन म्हणून बाजूस ठेवून विम्याची रक्कम परत द्यावयाचे वेळीं कंपनी ती वजा करून घेते.

(११) गॅरंटीड ऑप्शन पॉलिसीज्:––यामध्यें लिमिटेड पेमेंट होल लाइफ व प्युअर एन्डौमेंट विदाऊट रिटर्न या दोन्ही पद्धतीचें मिश्रण असतें.

(१२) सर्व्हायव्हरशिप किंवा काँटिंजेंट–यामध्यें विम्याची रक्कम विमेदाराच्या मृत्यूनंतर मिळावयाची; पण विमेदारानें उल्लेखिलेल्या दुसऱ्या माणसाच्या हयातींत जर विमेदार मरण पावला तरच ती रक्कम मिळते. तो उल्लेखिलेला मनुष्य जर विमेदाराच्या आधीं मृत्यू पावला तर विमेदारास रक्कम मिळत नाहीं.

एकाद्या कंपनीनें विमा उतरण्यापूर्वीं खालील गोष्टींबद्दल विमा उतरणारानें आपलें समाधान करून घेतलें पाहिजे.

(१) कंपनीचा कारभार व व्यवस्था तज्ज्ञांचे हातीं असली पाहिजे.

(२) कंपनीच्या डायरेक्टरांपैकीं कांहीं विमेदारांनीं निवडलेले असावे.

(३) कंपनीच्या लाइफ फंडाचे विम्याचे रकमेशीं योग्य प्रमाण पाहिजे.

(४) कंपनीनें सुरक्षित ठिकाणीं व फायदेशीर होईल अशा तऱ्हेनें रक्कम गुंतविली असली पाहिजे.

(५) व्हॅल्यूएशन योग्य तऱ्हेचें पाहिजे.

(६) हप्त्यांचे उत्पन्नाशीं वटखर्चाचें प्रमाण योग्य असलें पाहिजे.

(७) पॉलिसीच्या अटी कडक नसाव्या.

(८) मृताच्या वारसांना पैशाची पोंच कंपनीकडून तत्परतेनें व तावडतोब झाली पाहिजे.

हिंदी विमा कंपन्या

आयुष्याचा विमा

१९२०नंतर हिंदी विमा कंपन्यांची प्रगति फारच आश्चर्यकारक आहे. खालील कोष्टकांत वर्षअखेर हिंदी विमा कंपन्यांनीं एकंदर व्यवहार किती केला हें दिलें आहे. त्यावरून खरी प्रगति कळून येईल.

एकंदर काम

वर्ष	वर्षअखेर कोटी रुपये.	
१९२०	३१	,,
१९२१	३४	,,
१९२२	३७	,,
१९२३	३९	,,
१९२४	४२	,,
१९२५	४७	,,
१९२६	५३	,,
१९२७	६०	,,
१९२८	७१	,,
१९२९	८२	,,

हिंदी विमा कंपन्यांची एकंदर मत्ता (अॅसेट्स्) १९२९ मध्यें २५ कोटी होती. व त्यांपैकीं शें. ७५ हिंदुस्थान सरकारच्या रुपी सिक्यूरिटीज् मध्यें घातले. पॉलिसी व मॉर्टगेज च्या सरंडर व्हॅल्यूकरतां शें. १० खर्च झाले. १९३० व १९३१ मध्यें लाइफ फंडापैकीं बरीच रक्कम हिंदुस्थान सरकारच्या स्टर्लिंग सिक्यूरिटीमध्यें घालण्याची कंपन्यांची प्रवृत्ति दिसून येत आहे. हिंद्वितर कंपन्यांची हिंदुस्थानांतील मत्ता ३१॥ कोटि रुपये आहे. यांपैकीं २८ कोटि रुपये युनायटेड किंग्डममध्यें स्थापन झालेल्या कंपन्यांचे आहेत.

फायर अँड मरीन इन्शुअरन्स––

१८५० मध्यें कलकत्त्यास ट्रायटन विमाकंपनी स्थापन झाली. पण १९१९ नंतरच हिंदी कंपन्या आयुष्याच्या विम्याखेरीज इतर क्षेत्रांतील धंदा वाढवूं लागल्या. हा धंदा करणाऱ्या कंपन्या:––

१. न्यू इंडिया अॅशुअरन्स कंपनी,
२. ज्युपिटर जनरल ,,
३. व्हल्कन ,,
४. ट्रायटन ,,
५. युनिव्हर्सिटी फायर अँड जन. ,,
६. ब्रिटिश इंडिया जनरल ,,
७. इंडियनमर्कंटाइल ,,
८. हुकुमचंद ,,

यांचें एकंदर उभारलेलें भांडवल १ कोटि ४७ लक्ष व १९२९ मध्यें हप्त्यांचें उत्पन्न रु. ५१.७४ लक्ष व हिंदुस्थानाबाहेर ८३ लक्ष रुपये.हिंदी कंपन्यांचा भांडवलाच्या मानानें फारच थोडा धंदा झाला आहे.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, सातारा.–

संस्थापक:–– पहिल्या चालक मंडळाची स्थापना सन १९१३ सालीं झाली. त्यांतील डायरेक्टर्स:–– १. रा. ब. वि. ना. पाठक, चेअरमन, २रा.रा. बा.ग. चिरमुले, मॅनेजिंग डायरेक्टर, ३. ग. हि. देवी, ४ रा. रा. काळे,, ५. ल. मो. आपटे, ६. कु. नीं. कडुसकर, ७. र.पां. करंदीकर.

मूळ हेतु–हिंदुस्थानांतील लोकांना सर्वसंमत तत्त्वानुसार योग्य व फायदेशीर रीतीनें विमा उतरतां यावा याकरितां त्यांच्या पूर्ण ताब्यांत असलेली स्थानिक संस्था काढणें.

कंपनीचा प्रारंभींचा वार्षिक खर्च उत्पन्नाचे प्रमाणानें शेंकडा ७०-८० होता. हल्लीं हें प्रमाण कमी होऊन सरासरी २४ वर आलें आहे. कंपनीचें हप्त्यांचें उत्पन्न दरसाल सात लाखाचे वर आहे. प्रारंभीं नवीन काम सुमारें दोन लक्षांचें येत होतें. तें आतां जवळ जवळ तीस लक्ष येतें. १९३० अखेर एकंदर चालू विम्याचें काम सुमारें १४० लक्ष रुपयांचें आहे. व वारसास द्यावी लागणारी रक्कम एक लक्षाचे आंत आहे. पहिल्याचें दुसऱ्याशीं शेंकडा प्रमाण एकहून पुष्कळ कमी इतकेंच आहे. यावरून कंपनीनें केलेली विमेदारांची निवड पद्धतशीर व काळजीपूर्वक असतें हें दिसून येईल.कंपनीच्या जमेंतील मुख्य बाब हप्त्यांचें उत्पन्न हीं असून त्याच्या खालोखाल व्याजाचें उत्पन्न आहे. व्याजीं लावलेल्या रकमेवर सरासरीनें सहा टक्कें व्याज पडलें. जमा व खर्च या दोन्ही बाजू कंपनीनें चांगल्या प्रकारें संभाळल्यामुळें लाइफ इन्शुअरन्स फंड भरपूर वाढवून इतर रिझर्व फंड कंपनीला काढतां आले:–१ जनरल रिझर्व, २ इन्व्हेस्टमेंट रिझर्व, ३ डिव्हिडंड रिझर्व, ४पॉलिसी होल्डर्स रिझर्व, ५ बिल्डिंग रिझर्व, ६ कॉंटिजन्सी

रिझर्व. दरसालच्या जमाखर्चाची वजावाट करून राहिलेल्या शिलकेचा लाइफ ॲश्शुअरन्स फंड बनत जातो.

विमा कंपनीचा मुख्य व्यवहार म्हणजे विमेदारांकडून हप्त्यांचे पैसे घेणें व त्यांस पैसे देणें हा होय. ह्या व्यवहारांत कंपनीस किती नफा अगर तोटा झाला हें काढण्याचें साधन व्हॅल्यूएशन हें आहे. कंपनीकडे पुढें येणाऱ्या हप्त्यांच्या रकमेची आजची किंमत व तिला पुढें द्याव्या लागणाऱ्या (वारशाची) क्लेमची आजची किंमत काढणें ह्याला व्हॅल्युएशन म्हणतात. पॉलिसी जसजशी जुनी होत जाईल तसतशी तिच्यावरील येणाऱ्या हप्त्यांची आजची किंमत कमी येते व क्लेम म्हणून द्याव्या लागणाऱ्या रकमांची आजची किंमत वाढत जाते. म्हणजे एकंदरींत कंपनीचें देणें वाढत जातें. हें वाढतें देणें किती आहे, हें व्हॅल्यूएशन केल्यावर समजतें. व तें भागविण्याकरितां कंपनीजवळ लाईफ ॲश्शुअरन्स फंड पुरेसा नसला तर कंपनीचा तोटा होतो. व लाइफ ॲ. फंड पुरून उरेसा असला तर नफा होतो. गेल्या पांच व्हॅल्युएशनमध्यें ह्या कंपनीला नफा झालेला आहे व व्हॅल्युएशन करतांना मृत्युसंख्या, व्याजाचा दर व खर्च या संबंधानें कांहीं प्रमाणें गृहीत धरावीं लागतात, तीं मजबूत आधाराची गृहीत धरून सुद्धां हा नफा उत्तरोत्तर वाढत गेला आहे. तो इतका कीं, त्यांतून एकतृतियांश इतकी मोठी रक्कम वर लिहिल्याप्रमाणें रिझर्व फडांत घालून-सुद्धां भागीदारांस वाढत्या वार्षिक दरानें डिव्हिडंड व विमेदारांना वाढत्या वार्षिक दरानें बोनस कंपनी देऊं शकली.

महाराष्ट्रांत जोरानें काम सुरूं करून यशस्वी होणारी हीच पहिली कंपनी आहे. ही कंपनी भांडवल व कारभार या दोन्ही दृष्टींनीं पूर्ण स्वदेशी आहे. कंपनीचे प्रमुख चालक (आतां सेवानिवृत्त) श्री. वा. ग. चिरमुले यांच्या विशेष कर्तबगारीमुळें तिचा कारभार सुव्यस्थित चालला व ती लोकांच्या विश्वासास पात्र झाली.

कंपनीचे विशेषः—

कंपनीनें विमेदारांना मत देण्याचा व आपल्या तर्फे आपल्यांतून डायरेक्टर निवडून देण्याचा अधिकार दिला आहे. पॉलिसीची रोख किंमत, पेड–अप पॉलिसी, या व इतर बाबतींत अधिक सवलती दिल्या असून, सेव्हिंग्ज बँक वेगळी काढून विमेदारांचे हप्ते भरण्याकरितां विशेष सोय केली आहे.

सहाय्यकः—१. भागीदार १७०, २. एजंट, ३. कायद्याचे सल्लागार (अ) श्री. कृ. ह. केळकर, (आ) श्री. रा. ग. सोमण. ४. ॲक्च्युअरी (अ) श्री. ग. स. मराठे, (आ) श्री. कृ. य. जोशी. ५. ऑडिटर्स. ६. मेडिकल सेक्रेटरी (अ) श्री. कृ. वा. दाणी, (आ) श्री. मा. वि. पाठक, (इ) श्री. अ. को. दबडगे.

विमेदारांची संख्याः–१७२६८-१९३१ अखेर.

भांडवलः— रु. ६७७५०

आजची स्थितिः–

१९३१ अखेरचा रिपोर्ट.	रु. आ. पै.
१. लाइफ अशुअरन्स फंड	२८४६६५२–११–२
२. हप्त्यांचें उत्पन्न	८२५६०१– ४–०
३. क्लेम —	१०२३९५– ७–०
४. खर्च —	२०५०८९– ६–०
५. (अ.) रिझर्व —	३०८०८४– ७–९
(आ.) विमेदारांचा बो. रि.	३६७२०– ११–७
(इ.) डिव्हि. इक्विलाय. रि.	२०६४७– ९–२
(ई.) कांटिजन्सी रिझर्व	२५००– ०–०
(उ.) इमारत रिझर्व	२५००५०– २–८
६. नवीन काम	३१५३२५०– ०–०
७. एकूण काम	१६५८८३७४– ०–०
८. हप्त्याचें उत्पन्नाशी शेंवट खर्चाचें प्रमाण	२४.८
९. रद्द झालेल्या वि. शें. प्र.	५०३८

व्हॅल्यूएशन जाहलेल्या वर्षांचे प्रगतिदर्शक आंकडेः–

साल	हप्त्यांचें उत्पन्न	नवीन काम	एकूण चालूं काम	लाइफ फंड इतर रिझर्व्हें	सर्प्लस	बोनस	डि.
१९१७	४२४५९	३००४५०	८५१६००	४०१०९	११५२३		५
१९२०	१०५४५५	६९६५००	२२११७५०	८६१८९	२७७३८	७	५
१९२३	२२९५८७	१११४७५०	४४८७७०३	४१८४१०	११६५४४	१०	७
१९२६	२७६४५७	१४७६२५०	७४५६८९१	११४१४०९	३२५३२८	२२	१०
१९२९	६३७६७०	२८३८०००	१२२७३१५२	२३३९०९२	५२१८३२	२५	१५

कंपनीचें हेड ऑफिस सातारा येथें असून ब्रँच ऑफिसें, मुंबई, पुणें, नागपूर व सिंध येथें आहेत.

कंपनीचे स्पेशल डायरेक्टरः—श्री. वासुदेव गणेश चिरमुले, बी. ए. एल्‌एल्. बी.

चेअरमनः—श्री. र. पां. करंदीकर.

कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड, पुणें शहर.

सदरहु विमा कंपनी पुणें येथें इ. स. १९२८ मध्यें स्थापन झाली. रा. द. दा. देशपांडे (बी. ए. एफ्. सी. आर. ए.) व रा. रा. न. अभ्यंकर (बी. ए. एल्‌एल्. बी.) ह्यांच्या मनांत पुण्यासारख्या प्रमुख स्थानीं एक विमा कंपनी काढावी अशी कल्पना येऊन त्यांनीं ह्यासंबंधीं एक योजना रा. ग. स. उर्फ बाबासाहेब मराठे ह्यांजपुढें ठेवली. त्या योजनेस रा. मराठे यांची संमति मिळून सदर्हु योजना पुण्यांतील कार्यकर्ते व पुढारी रा. न. चिं. केळकर, रा. गो. कृ. देवधर, रा. बाबासाहेब कामत, व प्रो. वामनराव काळे, ह्यांजपुढें ठेवण्यांत आली. ह्या सर्व लोकांना ती योजना पसंत पडून पुणें येथें एक आयुष्याचा धंदा करणारी विमा कंपनी काढण्याचें निश्चित ठरलें, व त्याप्रमाणें आणखी कांहीं महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांना संचालक मंडळावर (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स) घेऊन, 'कॉमन वेल्थ विमा कंपनी' १९ नोव्हेंबर १९२८ रोजीं रजिस्टर करण्यांत आली, व रा. देशपांडे व रा. अभ्यंकर ह्यांना मॅनेजिंग एजन्ट्स् अगर व्यवस्थापक म्हणून नेमण्यांत आलें. अवघ्या सहा महिन्यांत चाळीस हजारांचें भांडवल विशेष कमिशन द्यावें न लागतां उभारलें गेलें. कंपनीला आयुष्याच्या विम्याचें कामही प्रथमपासूनच पुष्कळ मिळालें. व कंपनी उत्तरोत्तर अधिकच लोकप्रिय होत गेली हें कंपनीच्या खालीं दिलेल्या पहिल्या तीन वर्षांच्या आंकड्यांवरून दिसून येईल.

	वर्ष १ लें	वर्ष २ रें	वर्ष ३ रें
	रु.	रु.	रु.
विमाअर्ज	११५९२५०	१२२८३७५	१३०४०००
पॉलिसी फिटल्या.	७०४२५०	९१२३७५	१०५३७५०
एकंदर खर्चप्रमाण	८८ शे.	७२ शे.	४९.५शे.
नवीन कामावर खर्च	८८ शे.	९९·५शे.	९७·५शे.
जुन्या कामावरील.. खर्च.		१२·५शे.	१२·२शे.
लाईफफंड	४४२	११५००	६२४००

सध्यां कंपनीचें भाग—विक्रीचें रोख भांडवल ५३७२५ रुपयांचें असून, विक्री झालेलें भांडवल १०८४०० रुपयांचें आहे, कंपनीचा व्यवस्थाखर्च अतिशय काटकसरीचा असून, कंपनीनें अवघ्या तीनच वर्षांत आपल्या धंद्याचें मूल्यमापन (व्हॅल्यूएशन) करून भागीदारांना शेंकडा ६ व विमेदारांना त्रैवार्षिक रु. ३० व रु. ३६ इतका नफा वांटला. नुसत्या आयुष्याच्या विम्याचा धंदा करून अवघ्या तीन वर्षांत, इतका नफा वांटणारी ही हिंदुस्थानांतील पहिलीच हिंदी विमा कंपनी आहे. कंपनीनें विमेदारांच्या सोयीच्या अशा पुष्कळ निरनिराळ्या आकर्षक योजना केल्या आहेत. कंपनी सर्वतोप्रकारें प्रगतीच्या मार्गावर आहे. कंपनीचे कार्यकारी मंडळी पुढीलप्रमाणें आहेत.

अध्यक्षः—श्री. न. चिं. केळकर बी. ए. एल्.एल्.बी.

उपाध्यक्षः—खान बहादुर. एम्. एन्. मेहता एस्. बी. ई.

जनरल सेक्रेटरीः—श्री. रा. न. अभ्यंकर बी. ए. एल्.एल्.बी.

फायनन्स सेक्रेटरीः—श्री. द. दा. देशपांडे बी. ए. एफ्. सी. आर्. ए.

नवभारत इन्शुअरन्स कंपनी लि. मुंबई, ही कंपनी १९३२ सालच्या जानेवारीं महिन्यांत स्थापन करण्यांत आली. हिचे उत्पादक श्री. राजाराम नारायण मोघे हे आयुष्याच्या विम्याच्या धंद्यांतील एक अत्यंत अनुभवी गृहस्थ आहेत. कंपनीची अंतर्गत व्यवस्था पाहाण्यास श्री. मोघे यांना व्यापारविषयक शिक्षण घेतलेले व विमाशास्त्राचा विशिष्ट अभ्यास करून त्यांत पारंगत झालेले श्री. सदाशिव पांडुरंग नाडकर्णी डी. कॉम. एम्. सी. ए. सी.आय. आय. लंडन यांची जोड मिळाल्यानें कंपनीचा व्यवहार व्यवस्थित व आधुनिक पद्धतीनें चालविण्यांत येत आहे.

मुंबईचे सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय व्यापारी श्री. गणेश गोविंद उर्फ आण्णासाहेब नवरे हे कंपनीच्या चालक मंडळाचे (बोर्ड ऑफ डायरेक्टर्स) अध्यक्ष असून शेठ द्वारकादास त्रिभोवनदास जे. पी. यांच्यासारखे वजनदार व्यापारी, डॉ. सीताराम काशिनाथ गोखले, एम्. बी. बी. एस्. एफ. सी. पी. एस्. व डॉ. रुस्तुमजी धनजी भॉय मोदी एम्. आर. सी. एस्., एल्. आर. सी. पी. , एल्. एस्. एण्ड एस्. यांच्यासारखे अनेक विमाकंपन्यांचे कित्येक वर्षें वैद्यकीय तपासनीस म्हणून काम केल्यानें विमेदारांची चिकित्सक दृष्टीनें निवड

करण्यांत अनुभवी असे नामांकित डॉक्टर व "केसरी" आणि "मराठा" पत्राचे सहसंपादक श्री. आत्माराम रावजी भट एम्. कॉम. यांच्यासारखे आर्थिक व व्यापारी विषयांचा अभ्यास केलेले गृहस्थ त्या मंडळांत असल्यानें व विम्याच्या धंद्यांत अनुभविक व कसलेले असे गृहस्थ श्री. राजाराम नारायण मोघे हे कंपनीचे कार्यकारी चालक (मॅनजिग डायरेक्टर) असल्यानें नवभारताच्या भवितव्यतेबद्दल शंका घेण्यास जागाच उरलेली नाहीं.

एकंदर जनतेची सांपत्तिक स्थिति खालावलेली व देशांतील व्यापार मंदावलेला अशा प्रतिकूल परिस्थितींत कंपनीच्या प्रत्यक्ष कामास सुरवात झाली असूनही केवळ आठनऊ महिन्यांचे मुदतींतच कंपनीनें सुमारें अडीच तीन लाखांचे विमे उतरले आहेत. या कंपनीचें विशेष ध्येय म्हणजे "जनतेच्या राष्ट्रीय वृत्तीमुळें परदेशी कंपन्यांऐवजीं आपणांस मिळणाऱ्या तिच्या आश्रयाचा मोबदला म्हणून देशी व्यापारी कंपन्यांना आपल्या नफ्यांतून कांहीं ठराविक रक्कम लोकहितसाधनार्थ नियमितपणें व राष्ट्रीय भावनेनें खर्च करण्यास प्रवृत्त करणें " हें होय. या ध्येयाला अनुसरून 'नवभारतनें' आपल्याला होणाऱ्या नफ्यांतून निदान ५ टक्के रक्कम निरक्षरता-निवारण वगैरेसारख्या कार्यांकडे खर्च करण्यास स्वतःस बांधून घेतलें आहे. या व्यतिरिक्त धंद्याच्या दृष्टीनें इतरत्र सहसा आढळणाऱ्या अशा गोष्टी म्हणजे नवभारतनें आपल्या विमेदारांस दिलेल्या अनेक सवलती होत. त्या अशाः—

(१) विमेदारांना आपल्या तर्फे तीन चालक (डायरेक्टर्स) निवडून देण्याचा व कंपनीच्या हिशेबतपासनीसांचे जोडीस आपला एक स्वतंत्र हिशेबतपासनीस नेमण्याचा हक्क;

(२) रु. १०००च्या विमेदारास मतदानाचा व रु .३००० व अधिक रकमेच्या विमेदारांस चालकमंडळावर निवडून येण्याचा दिलेला अधिकार.

(३) इतर कंपन्यांप्रमाणें नफ्यापैकीं ९० टक्यांऐवजीं९५टक्के विमेदारांत वांटण्याची तयारी.

(४) भागीदारांसाठीं ठराविक डिव्हिडंड राखून न ठेविल्यामुळें, विमेदारांच्या वांट्यास येणारा अधिक नफा.

(५)प्रीमियम्स (हप्ते) आगाऊ भरल्यास देण्यांत येणारी ४ टक्के सूट

(६) हप्ते भरण्याचे राहिल्यास विमा रद्द न करण्याची तरतूद.

(७) विमेदारांना रोख किंमतीच्या (सरेंडर व्हॅल्यु) ९५टक्यांइतकी रक्कम आगाऊ दिली जाते.

(८) विमेदारांना कर्जाऊ दिलेल्या रकमांवर केवळ ६च टक्के व्याज आकारलें जातें..

(९) विम्याला रोख किंमत नसते, अशा पहिल्या तीन वर्षांच्या आंत रद्द झालेला विमा, थकलेले हप्ते न भरतांही पुढें केव्हांही पहिल्या वर्षांत भरलेल्या हप्त्याचा फायदा घेऊन चालू करितां येतो.

(१०) विम्याची रक्कम कंपनीकडून मुळींच विलंब न लागतां आणि कसलाही त्रास न पडतां मिळूं शकते.

(११) विम्याच्या हक्कदारांस कोणत्याहि प्रकारची अडचण भासूं नये म्हणून रु. १०० ते २०० इतकी रक्कम मृत्यूचा पुरावा मिळतांच ताबडतोब देण्यांत येते.

(१२) विम्याच्या रकमेवरील वारस अगर हक्कदार अल्पवयी असल्यास तो वयांत येईपर्यंत कंपनीकडे राहिलेल्या रकमेवर कमींत कमी ३ टक्के व्याज देण्यांत येतें.

याशिवाय ध्यानांत घेण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे हल्लीं अनुभवानें दोषार्ह व त्याज्य ठरलेल्या मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा अवलंब न करतां कंपनीचा व्यवहार कंपनीच्या कार्यकारी चालकांकरवीं चालविला जात आहे. शिवाय भागीदारांना मतदानाचा हक्क त्यांच्या त्यांच्या भागांच्या संख्येप्रमाणें कमीअधिक न ठेवतां सर्वांना सारखाच एका मताचा हक्क दिलेला असल्यानें कंपनीचा कारभार एकतंत्री होण्याची भीति राहिलेली नाहीं.

कंपनीचे सल्लागार विमागणक श्री. ग. स. मराठे, एम्. ए., ए. आय. ए. (लंडन) हे असून हिशेब-तपासनीस मेसर्स कुलकर्णी आणि खानोलकर, पब्लिक अकाउन्टन्ट्स् अँड ऑडिटर्स हे आहेत.

हिंदुस्थानांतील लाईफ अॅशुअरन्स कंपन्यांची यादी.

हिंदी कंपन्या

१ ऑल इंडिया अॅन्ड बर्मा प्रॉव्हिडंट फंड, १७, नॅरिस रोड, लँगफोर्ड टाऊन, बंगलोर.

२ ऑल इंडिया सिक्युरिटी लाइफ अॅन्ड जनरल अॅशुअरन्स कं., लि., अलाईस बिल्डिंग, हॉर्न्बी रोड, फोर्ट बॉम्बे.

३ आन्ध्र अॅशुअरन्स कं., लि., मच्छलीपट्टण

४ एन्जल्स् इन्शुअरन्स कं., लि., पी. ओ. बॉक्स नं. ११९, क्वीन्स रोड, दिल्ली.

५ ऑरगस इन्शुअरन्स कं., लि., कॉमिसरीट बिल्डिंग, हॉर्न्बी रोड बॉम्बे.

६ आर्यन म्युच्युअल लाइफ अशुअरन्स सोसायटी लि., चर्च गेट स्ट्रीट, फोर्ट, बॉम्बे.

७ एशिअन अॅशुअरन्स कंपनी लि., एशियन बिल्डिंग्ज, निकोल रोड, बॅलार्ड एस्टेट, बॉम्बे.

८ एशियाटिक गव्हर्मेंट सिक्युरिटी लाइफ अॅशुअरन्स कं.,लि.,एशियाटिक बिल्डिंग्ज,बंगलोर.

९ एसोसिएको गोआना डी म्युटो ऑक्सिलिओ लि.,एसोसिएको गोआना बिल्डिंग्ज,गिरगांव रोड, बॉम्बे.

१० बेंगाल इन्शुअरन्स अॅन्ड रिअल प्रॉपर्टी कं., लि.

११ बेंगाल मर्कंटाइल लाइफ इन्शुअरन्स कं., लि., २४ स्ट्रँड रोड, कलकत्ता.

१२ भारत इन्शुअरन्स कं., लि., भारत बिल्डिंग्ज लाहोर.

१३ बॉम्बे बडोदे अॅशुअरन्स कं., लि., रावपुरा, बडोदें.

१४ बी. बी. अॅन्ड सी. आय. रेल्वे झारोस्ट्रीअन अॅसोसिएशन,व्हिली मॅन्शन,पोस्ट ग्रँडरोड,बॉम्बे.

१५ बॉम्बे लाइफ अशुअरन्स कं.,लि., ७३–७५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, बॉम्बे.

१६ बॉम्बे म्युच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी लि., २७८ हॉर्नबी रोड, फोर्ट, बॉम्बे.

१७ बॉम्बे विडोज पेन्शन फंड २३–२५ हमाम स्ट्रीट, फोर्ट, बॉम्बे.

१८ बॉम्बे झोरोस्ट्रीन म्युच्युअल डेथ बेनिफिट फंड, १०१–१०३, आर्देशिर दादी स्ट्रीट, खेतवाडी, बॉम्बे.

१९ कलकत्ता इन्शुअरन्स लि., ८६ क्लाईव्ह स्ट्रीट कलकत्ता.

२० सेंट्रल म्युच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी लि. सेंचरी बिल्डिंग्ज, ३२१ हॉर्नबी रोड, फोर्ट, मुंबई.

२१ ख्रिश्चन म्युच्युअल इन्शुअरन्स कं., लि., मॅक्लिअड रोड, लाहोर.

२२ कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं., लि., ५९२ बुधवार पेठ, पुणें शहर.

२३ कोऑपरेटिव्ह अॅशुअरन्स कं., लि., डनिंग रोड. लाहोर.

२४ क्रेझंट इन्शुअरन्स कं., लि.,मोतीलाल मॅन्शन, १४ हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

२५ डेक्कन इन्शुअरन्स कं., लि., मुनगळ हाऊस, बेझवाडा.

२६ डोमिनिअन इन्शुअरन्स कं., लि., ५ व ६, हेअर स्ट्रीट, कलकत्ता,

२७ डोनेशन युनियन लिंक ऑन रेल्वेज, ४७, कोकबर्न रोड, बंगलोर.

२८ ईस्ट अॅन्ड वेस्ट इन्शुअरन्स कं., लि., ५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

२९ ईस्ट इंडिया इन्शुअरन्स कं., लि., ४ क्लाईव्ह स्ट्रीट, कलकत्ता..

३० ईस्टर्न नॅशनल इन्शुअरन्स कं., लि., ४ लिओनस् रेंज, कलकत्ता.

३१ एंपायर ऑफ इंडिया लाइफ अॅशुअरन्स कं., लि., एंपायर ऑफ इंडिया लाइफ बिल्डिंग्ज, हॉर्नबी रोड मुंबई.

३२ जनरल अॅशुअरन्स सोसायटी लि. कचेरी रोड, अजमीर.

३३ जनरल अॅशुअरन्स ट्रस्ट (इंडिया) लि., इवर्ट हाऊस टॅमरिंड लेन फोर्ट, मुंबई.

३४ ग्रेट इंडिया इन्शुअरन्स लि., ८४, क्लाईव्ह स्ट्रीट, कलकत्ता.

३५ जी. आय. पी. रेल्वे एम्प्लाइज डेथ बेनिफिट फंड, व्हिक्टोरिया टर्मिनस, मुंबई.

३६ गुजराथ झारोस्ट्रीअन म्युच्युअल डेथ बेनिफिट फ़ंड, लालकाका बिल्डिंग, नानपुरा,सुरत

३७ हिमालय अॅशुअरन्स कं., लि. ४, डलहौसी स्क्वेअर, कलकत्ता.

३८ हिंदु म्युच्युअल लाइफ अॅशुअरन्स लि.,३०९, बौबझार स्ट्रीट, कलकत्ता.

३९ हिंदुस्थान को–ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि., ६ ए, कार्पोरेशन स्ट्रीट, कलकत्ता.

४० आयडिअल डेमोक्रॅटिक अॅशुअरन्स अँड मॉर्टगेज लोन्स् लि., नागपूर सिटी.

४१ इंडिपेंडंट ऑर्डर ऑफ रिचेबिट्स ३८, मेजर बँक्स् रोड, लखनौ.

४२ इंडियन ख्रिश्चन प्रॉव्हिडंट फंड, व्हेपरी, मद्रास.

४३ इंडिया इक्विटेबल इन्शुअरन्स कं., लि. १०२, क्लाईव्ह स्ट्रीट कलकत्ता.

४४ इंडियन ग्लोब इन्शुअरन्स कं., लि., २८, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

४५ इंडियन लाइफ इन्शुअरन्स कं. लि., एलफिन्स्टन स्ट्रीट, कराची.

४६ इंडियन म्यूच्युअल लाइफ अॅसोसिएशन लि. ट्रिप्लीकेन, मद्रास.

४७ इंडियन ऑर्डनन्स म्युच्युअल अॅश्शुअरन्स फंड,अॅम्युनिशन फॅक्टरी,खडकी, १६,कचेरी-रोड, मैलापूर, मद्रास.

४८ इंडियन पेनिन्शुलर इन्शुअरन्स कं., लि., ९–११, रतन बझोर रोड, मद्रास.

४९ इंडस्ट्रिअल अँड प्रुडेन्शिअल इंन्शुअरन्स कं., लि. जहांगीर वाडिया बिल्डिंग, एस्प्लनेड रोड, फोर्ट, मुंबई.

५० ज्युपिटर जनरल अश्शुअरन्स कं., लि., इवर्ट हाऊस, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई.

५१ लक्ष्मी इन्शुअरन्स कं., लि. लक्ष्मी बिल्डिंग, मॅक्लिअड रोड, लाहोर.

५२ लाईट ऑफ एशिया इन्शुअरन्स कं. लि., स्टिफेन हाऊस कलकत्ता.

५३ मंगलोर रोमन कॅथॉलिक प्रॉव्हिडंट फंड, कोडिअलबाईल, पी. ओ. मंगलोर.

५४ मेट्रोपॉलिटन इंन्शुअरन्स कं. लि., २८, पोलॉक स्ट्रीट, कलकत्ता.

५५ मॉडर्न इंडिया अॅन्शुअरन्स कं., लि., ५ व ६, हेअर स्ट्रीट, कलकत्ता.

५६ मॉडर्न इंन्शुअरन्स कं. लि., ५५, अपोलो-स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

५७ म्युच्युअल हेल्प अॅसोसिएशन, सिमला, "डेसीडेल," सिमला.

५८ म्युच्युअल लाइफ अॅन्शुअरन्स कार्पोरेशन लि., बँक रोड बडोदें.

५९ नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कं., लि., नागपूर.

६० नॅशनल इंडियन लाईफ इन्शुअरन्स कं., लि., १२ मिशन रोड. कलकत्ता.

६१ नॅशनल इन्शुअरन्स कं., लि., ७ कौन्सिल हाऊस स्ट्रीट, कलकत्ता.

६२ न्यू इस्टर्न अॅशुअरन्स कं., लि., मंगळदास न्यू बिल्डिंग, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

६३ न्यू इंडिया अॅशुअरन्स कं., लि., एस्प्लनेड रोड, मुंबई.

६४ नॉर्दर्न इंदिया इन्शुअरन्स कं., लि., १८ निसबेट रोड, लाहोर.

६५ ओरिएंटल गव्हर्नमेंट सिक्युरिटी लाइफ अॅशुअरन्स कं., लि., ओरिएंटल बिल्डिंग्ज, हॉर्नबी रोड, मुंबई.

६६ पारशी झारोस्ट्रिअन डेथ बेनिफिट फंड, चेंबरलेन रोड, लाहोर.

६७ पेनिन्शुलर लाइफ अॅशुअरन्स कं., लि., ८७ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

६८ पीपल्स इन्शुरन्स कं. लि., १ चेंबरलेन रोड लाहोर

६९ पॉप्युलर इन्शुअरन्स कं., लि., मंगलोर.

७० प्रभात इन्शुअरन्स कं., लि., यूसफ बिल्डिंग्ज एस्प्लनेड रोड, फोर्ट, मुंबई.

७१ प्रेसिडेन्सि लाईफ इन्शुअरन्स कं., लि., यॉर्क बिल्डिंग, हॉर्न्बी रोड, फोर्ट, मुंबई.

७२ पंजाब म्युच्युअल हिंदु फॅमिली रिलीफ फंड, फंड, चेंबर लेन रोड, लाहोर.

७३ रॅडिकल इन्शुअरन्स कं., लि. कोमिल्ला. (बंगाल).

७४ श्री. लाइफ अॅन्शुअरन्स कं. लि. ३७–३९ फोर्बज् स्ट्रीट फोर्ट मुंबई.

७५ सिंध हिंदु प्रॉव्हिडंट फंड्स् सोसायटी हैद्राबाद सिंध.

७६ साउथ इंडियन जनरल अॅन्शुअरन्स कं., लि., ५५ पुनामेली हायरोड किलपॉक,मद्रास

७७ स्टार ऑफ इंडिया इन्शुअरन्स कं., लि., मॅक्लिअड रोड, लाहोर.

७८ स्वदेशी विमा कं., लि. अग्रा सिटी रेल्वे-स्टेशनच्यासमोर अग्रा.

७९ ताज इन्शुअरन्स कं., लि., १०, निसबेट रोड लाहोर.

८० तरुण भारत इन्शुअरन्स कं., लि., गांधी रोड, अहमदाबाद.

८१ तिनवेल्ली डायोसेसन कौन्सिल वुइडोज् फंड, पालसकोटा, मद्रास.

८२ ट्रॅपिकल इन्शुअरन्स कं., लि., चांदणी चौक दिल्ली.

८३ यूनिक अॅशुअरन्स कं. लि., १०, कॅनिंग स्ट्रीट कलकत्ता.

८४ युनायटेड इंडिया लाइफ अॅन्शुअरन्स कं. लि., शंभुदास स्ट्रीट, मद्रास.

८५ युनायटेड कर्नाटक अॅन्शुअरन्स कं., लि., धारवाड.

८६ युनायटेड नॅशनल इन्शुरन्स कं लि.प्रीडी रोड, कराची.

८७ व्हीनस इन्शुअरन्स कं. लि. चांदणीचौक, दिल्ली.

८८ वेस्लीअन मेथॉडिस्ट अॅन्यूइटंट सोसायटी फॉर इंडिया, बर्मा अँड सीलोन मेडाक, निजाम्स डोमिनिअन्म, शिकंदराबाद दक्षिण

८९ वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुरन्स कं. लि. सातारा शहर.

९० यंगइंडिया इन्शुअरन्स कं. लि., रीडरोड, अहमदाबाद.

९१ झेनिथ लाइफ अॅन्शुअरन्स कं. लि., अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

परदेशी कंपन्या

१ अलायन्स अँड स्टटगार्टर लाइफ इन्शुअरन्स बँक लि. पोस्ट बॉक्स नं. ११७, कुतुब रोड दिल्ली.

२ आटलास अॅन्शुअरन्स कं. लि. ४, क्लाइव्ह रो, पोस्ट बॉक्स १३३, कलकत्ता.

३ कमर्शिअल युनियन अॅशुअरन्स कं. नं. बी. क्लाइव्ह बिल्डिंग्ज् ८ क्लाइव्ह स्ट्रीट, कलकत्ता.

४ ग्रेट वेस्टर्न लाइफ अॅन्शुअरन्स कं. लि., ५०–५२ चर्चगेट स्ट्रीट मुंबई, व १ रॉयल एक्सचेंज प्लेस, कलकत्ता.

५ ग्रेशॅम लाइफ अॅश्शुअरन्स सोसायटी लि., ४५–४७ एस्प्लनेड रोड ,मुंबई.

६ लिव्हरपूर अँड लंडन अँड ग्लोब इशुअरन्स कं. लि. ९ क्लाइव्ह स्ट्रीट, कलकत्ता.

७ मॅन्युफॅक्चर्स लाइफ इन्शुअरन्स कं., ४९–५१ कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई; व २८ डलहौसी स्क्वेअर कलकत्ता.

८ नॅशनल म्युच्युअल लाइफ असोसिएशन ऑफ ऑस्ट्रेलेशिया लि.,चार्टर्ड बँक बिल्डिंगज, कलकत्ता, १५ व १५ ए एलिफन्स्टन सर्कल मुंबई.

९ नॉर्थ ब्रिटिश अँड मर्कन्टाइल इन्शुअरन्स कं. लि., १०१–१, क्लाइव्ह स्ट्रीट, कलकत्ता.

१० नॉरविच युनियन लाइफ इन्शुअरन्स ऑफिस पोस्ट बॉक्स नं. १४७९ क्लाइव्ह स्ट्रीट, कलकत्ता; व पोस्ट बॉक्स नं. ९० मुंबई.

११ पर्ल अॅश्शुअरन्स कं. लि. यॉर्क बिल्डिंग्ज् हौर्नबी रोड, फोर्ट मुंबई.

१२ फोनिक्स अॅश्शुअरन्स कं. २८ डलहौसी स्क्वेअर, कलकत्ता.

१३ प्रुडेन्शल अॅश्शुअरन्स कं. लि. क्लाइव्ह स्ट्रीट कलकत्ता.

१४ रॉयल एक्स्चेंज अॅश्शुअरन्स पोस्ट बॉक्स ३३७ १ व २ ओल्डकोर्ट हाऊस कॉर्नर, कलकत्ता.

१५ रॉयल इन्शुअरन्स कं. २६–२७ डलहौसी स्क्वेअर कलकत्ता.

१६ स्कॉटिश यूनियन अँड नॅशनल इन्शुअरन्स कं. ६ लिआॅन्स रेंज, कलकत्ता.

१७ स्टँडर्ड लाइफ अॅश्शुअरन्स कं., स्टँडर्ड बिल्डिंग्ज् डलहौसी स्क्वेअर, पो.बॉ.नं. १०१,कलकत्ता.

१८ सनलाइफ अॅश्शुअरन्स कं. ऑफ कानडा, बिल्डिंग्ज् फोर्ट, मुंबई.

१९ यॉर्कशायर इन्शुअरन्स कं., अमीर बिल्डिंग्ज् १० ब्रूस स्ट्रीट, बमुंबई.

जनरल इन्शुअरन्स बिझिनेस करणाऱ्या हिंदी कंपन्यांची यादी

१ ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि. फोर्ट, मुंबई.

२ बर्मा फायर अॅन्ड मरीन इन्शु. कं. लि. ६४४ मर्चन्ट स्ट्रीट, रंगून.

३ क्लाइव्ह इन्शुअरन्स कं. लि., ९ क्लाइव्ह स्ट्रीट, कलकत्ता.

४ क्रेसेंट इन्शुअरन्स कं. लि. हमामस्ट्रीट, फोर्ट मुंबई.

५ हुकुमचंद इन्शुअरन्स कं. लि. फोर्ट, मुंबई.

६ इंडियन एम्प्लॉयी फायडेलिटी अँड जनरल अश्शुअरन्स लि. अमीर नहाल रोड, रॉयपेटा, मद्रास.

७ इंडियन ग्लोब इन्शुअरन्स कं. लि. अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

८ इंडियन गॅरंटी अँड जनरल इन्शुअरन्स कं. लि. अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई.

९ इंडियन मर्कन्टाईल इन्शुअरन्स कं. लि., फोर्ट, मुंबई.

१० जुपिटर जनरल इन्शुअरन्स कं. लि. ईवर्ट हाऊस, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई.

११ मद्रास अक्सिडेंट अॅन्ड फायर इन्शुरन्स कं.लि. १३।१४ब्रॉडवे मद्रास.

१२ नॅशनल फायर अँड जनरल इन्शुरन्स कं. लि. ७ कौन्सिल हाऊस स्ट्रीट, कलकत्ता. स्ट्रीट, कलकत्ता.

१३ न्यू इंडिया अॅश्शुअरन्स कं. लि. एस्प्लनेड रोड, फोर्ट, मुंबई.

१४ युनिव्हर्सल फायर अँड जनरल इन्शुअरन्स कं. लि., ५१ कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.


१५. ट्रायटन इन्शुरन्स कं. लि., ४ क्लाइव्ह रोड कलकत्ता.

१६ व्हल्कन इन्शुरन्स कं. लि. जहांगिर वाडिया बिल्डिंग एस्प्लनेड, फोर्ट, मुंबई.

हिंदी विमा कंपन्या व्हॅल्युएशनचे तुलनात्मक आंकडे.


विमा कं.चें नांव	वर्षअखेर	लाईफ फंड	ह.चें उत्पन्न	क्लेम	खर्च	हप्त्यांचे उत्पन्नाशीं खर्चाचें प्र.	नवीन काम	एकूण काम	सर्प्लस	बोनस शे. हो.ला. व एन्डा.	डिव्हिडंड
१ एशियन	३१–१२–२८	१२५०११३	५१६३९५	१६८१६०	२०५३९५	३९.७७	३१२९७५०	१००४८३१०	९४११४	WL.end	६·२५
मुंबई	३१–१२–३०	१८१०९४९	६४८७९३	१६२९८३	२५०८७६	३८.८	३२०९०००	१२४५१२३३		१·२ ·१	
स्था. १९११	३१–१२–३१		७४३५७०	१७२०००	३०२०००	४१.	४०१७०००	१३८९९०२८			
२ एशियाटिक	३१–१२–२८	१८५६२४	११७३६५	१६०००	६१३११	५२ २३	७३१७५०				
गव्ह. बंगलोर	३१–१२–३०	३०६५७५	१५६६७६	३७५९५	८९८०३	५७.३	९६४७५०				
स्था. १९१३											
३ बंगाल इंशु.	३१–१२–२८	३२०००	९७०००	२२००	५२०००	५३.७६					
(१९२०)	३१–१२–३०	२२८२२१	१०८५६२	३२३८६	४८१७९	४४.४	५०१०००				
४ बंगाल मर्कंटा.	३०– ६–२८	२१५४८	५२८२५	१७७२८	३१४४१	६३·५					
(१९१०)	३०– ६–३१	८०६६०	६०६९३	११६५४	२२८९१	३७·७	२४०६००				
५ भारत लाहोर	३१–१२–२८	८७३७६५०	२३६०१०१	५५६०००	६९०६७५	२९·२६	१५७१८५४२	५१५६२२८७	१२३०६९३	२·५, २·१	१२·५
(१८९६)	३१–१२–३०	११२७१०१४	२८४९७३१	१०२२७३६	७७४४६९	२७·२	१९७२७३८	५९४५८१००			
६ बाँबे लाईफ	३१–१२–२९	२४६२०००	८६४०००	२४७०००	३४२०००	४०	५१२३०००				
(१९०८)	३१–१२–३०	२८००७९०	९८३३६७	३३६२४१	३८५०५०	३९.१	५८७३५००	२०६६८३२४	४३०५७८	WL.end २; १·५	८
७ बाँबे म्यूचुअ.	३१–१२–३०	१२९६२२०	६३२५६८	१५७८८६	३०३२८५	४७·३	५६९५०००	१२३७२३२४			
(१९१७)	३१–१२–३१	१५९९०००	९०९०००	१५८०००	३९००००	४२·९	६८७५०००				
८ कलकत्ता	३१–१२–२८	६२४१७	११३५४१	११०३४	७१११८	६२·६३	११२६०००	२०८५०००			
इंश्यु. १९१४	३१–१२–३०	१५६९९२	१४८०१६	१३०४१	७५७३५	५१.२	७२२२५०				
९ कॉ. वेल्थ	३०–४–३१	११५०१	५९२७८	६०००	४२६७९	७२·०	९१२३७५				
पुणें (१९२८)											
१० को. ऑ. ॲशु.	३१–७–२८	६५५७९६	१३७२२२	३८०००	३२९१४	२४·५	५५५५००	२९७७०९९			७(१९२९
(लाहोर १९०६)	३१- ७-३१	९३३३९६	१५११४१	६७०५२	२५३९४	१६·८	३२३५००	३२७९९१९			
११ ईस्ट अँड वेस्ट	३१-१२-२९	३४७०००	१८८०००	४४०००	९४०००	५०·०	१०१६०००	३२६३०००			
मुंबई १९१३	३१-१२-३०	४२५६६३	२१५३६४	३५९६८	११५२२२	५३·५	१३४८५००	३९७३४२४			

१८७२ पासून हिंदुस्थानची लोकसंख्या



लोकसंख्येच्या वाढीचीं कारणें

कालखंड	नवीन मुलूख सामील झाल्यामुळें	कसोशीच्या कामाच्या पद्धती मुळें	लोकसंख्येची खरी वाढ	एकंदर	खऱ्या वाढीचा शेकडा दर
	दश लक्ष	दश लक्ष	दश लक्ष	दश लक्ष	
१८७२–१८८१	३३·०	१२·०	३·०	४८·०	१·५
१८८१–१८९१	५·७	३·५	२४·३	३३·५	९·६
१८९१–१९०१	२·७	·२	४·१	७·०	१·४
१९०१–१९११	१·८	...	१८·७	२०·५	६·४
१९११–१९२१	·१	...	३·७	३·८	१·२
१९२१–१९३१	·०	...	३४·०	३४·०	१०·६
एकंदर	४३·३	१५·७	८७·८	१४६·८	३०·७



विमा कं.चें नांव	वर्षअखेर	लाइफ फंड	हप्त्यांचें उ.	क्लेम	खर्च	हप्ताउत्प. वटखर्चाचें प्रमाण	नवीन काम	एकूण काम	सप्लंस	बोनस हो.ला. व एन्डा. शें.	डिव्हिडंड शें.
१२ एंपायरऑ.इं	२९- २-२८	२९६८४४९४	४१४१५८२	२५९६४९६	९५६९३०	२३·१	११६१५७५०	८८७२४३४०			
मुंबई (१८९६)	२८- २-३१	३४३७५०३७	४८४५१६४	३१६२३३८	१०९२२८१	२२·५	११०१२३००	१०२८३०७४६			
१३ जन.अॅश्यु.	३१-१२-२८	२०११११६	८०८८१६	१९९४०८	३७४२१९	४५·९	६००००००	१६९६६४४५			
अजमीर १९०८	३१-१२-३०	२८९४९४०	१०४३३२२	२३८०८६	३२२६३८	३०·९	३८८००००	१९५०९७६८	४००३०५	WL.end २·२५१·८	१०
१४ हिंदी म्युच्यु.	३१-१२-२८	४०५०००	१०१०००	७००००	३३०००	३२·६					
कलकत्ता१८९१	३१-१२-३०	४२५४६७	१२७७६०	७८१४४	४२११०	३२·९	५७२०००	२६६७०५०			
१५ हिंदु को–ऑ.	३०- ४-२८	७६८६३७३	१४७८३०४	६८०७०५	४८५३४२	३२·८	६९४५५००	३२१६८४१९			
कलकत्ता१९०७	३०- ४-३१	१०४२२१४१	२३२१९३७	८४९२४३	८०४६७३	३४·७	११५४०७५०	५४१७६२३९			
१६आयडि.डेमो.	१५- ९-२८	६०००	२१०००	३०००	१४०००	६६·६					
नागपूर१९२६	३१- ६-३१	२१००६	२०४३६	७६१०	१४६३४	७१·६	१५९५००				
१७ इंडस्ट्रि. अँड	३१–१२–२८	१७५८९६३	६२८४६१	११८१६१	२१५२९९	३४·२५	३६१८२५०	११४१२७३९			
प्रुडें. मुं. १९१३	३१–१२–३०	२४६४१६४	८९११६७	२३०११२	३१३१५१	३५·१	४४४६२५०	१७७४६९७३			
१८ जुपिटर ज.	३०– ६ २९	३६३७४	७४७०२		६३३५८	८४·८		१३७९०००			
मुंबई१९१९	३०– ६–३१	११८६८०	१७०१२३	३२०३४	९०५७९	५३·२	१५०७५००	२२७९०००			
१९ लक्ष्मी	३०– ४–२८	५२८६८६	५७६४९३	३३०००	२६९०००	४७·८	५५२९५००	११५८३१७२			
लाहोर १९२४	३०– ४–३१	२१७५६९७	११०८१९९	१०९७८४	३५७५००	३२·२६	५३०८६००	२१७२६७०३	१२५६८५	WL.end १·२-१	५
२० नागपूर पा	३१–१२–२८	९८०००	५८०००	१२०००	३५०००	६०·३					
पायोनियर १९२१	३१–१२–३०	१५०४००	७६३४२	८४९३	४०७९६	५६·४					
२१ नॅशनल इंशु	३१–१२–२८	११८९७०००	२५०००००	११०९०००	७८९०००	३१·६	१००३४४००	५१८९५०२७			
कलकत्ता१९०६	३१–१२–३०	१४५८७९३२	८३०८३९३६	१३२२७४८	८५०५३९	२७·६	११३५५०६९	६५५७०९१६	१५७७०५७	WL.end १·५ १	
२२नॅशनल इंडि.	३१–१२–२८	२९८७४४९	७०७७५१	३७३२१४	२४४६५४	३४·५६	२३४९५००	१२५९६५५५			
कलकत्ता१९०७	३१–१२–३०	३७००२३४	७५४७११	३६७५७७	२६२३५८	३४·७	२००८५००	१५०५३९९३			
२३ न्यू इंडिया	३१– ३–३०	३१४९८	१५७५७९	६०००	१३३४४८	८४·६	३४६७५००	३११८५००			८
मुंबई १९१९	३१– ३–३१	१२८०५०	४०७०७१	४९४०३	२७४१६४	६७·३	६१८९५००	७६३५५९७			

विमा कं. चें नांव	वर्ष	लाइफफंड	हप्त्याचें उत्पन्न	क्लेम	खर्च	हप्ता उ. वटखर्चाचें प्र.	नवीन काम	एकूण काम	सर्प्लस	बोनस शें.	डिव्हिडंड शें.
२४ ओरिएंटल	३१–१२–३०	१०००९६०००	१७८९५०००	८१३००००	४०२२००	२२·४	५४४०९०००	११६२३५४३	२·५end.२		३७·५
मुंबई१८७४	३१–१२–३१	१०९३४३०००	१८६७६०००	८६२००००	४१८४००	२२·४	५३४६१०००				
२५ ट्रॉपिकल	३१–१२–२८	१०००	८३४८६	४०००	८०१९४	९६·०५	२४२६२८०	२०६०३८०			
दिल्ली१९२७	३१–१२–३०	३००५२	१२८८१०	१५८९८	८०९४१	६२·८	९८२५००	२३८७३४०			
२६ यूनिक कल-	३१– ५–२८	२८०४५७	११२०००	१८०००	५२०००	४६·४					
कत्ता १९१२	३१– ५–३१	४४६०२९	१७९३९६	४३२७०	८१५१५	४५·४					
२७ यूनायटेड इंडि	३१–१२–२८	२७९१०००	६१६०००	१६६०००	२१६०००	३५·१					
मद्रास १९०६	३१–१२–३०	३५५७१९७	७७५३८२	१६९६८०	१९८५५५	२५·६	३१३२०००	१४७९०१९८			
२८व्हीनस ॲशु.	३१– ३–२८	२६०००	५७०००	२०००	४५०००	७८·९					
दिल्ली १९२०	३१– ३–३१	९२८३२	६९६७४	११८५९	२१६४७	३१·०८	७०८०००	१२९४०००			
२९ वेस्टर्न इंडि	३१–१२–३०	२३१७७९९	७१६०८९	१२३०८६	१८१९३९	२५·४	२९३६५००				
सातारा१९१३	३१–१२–३१	२८४६६५२	८२५६०१	१०२३९५	२०५०८९	२४·८	३१५३२५०	१६५८८३७४			
३० झेनिथ मुंबई	३१–१२–२८	४३८६१६	२८५५६७	४७३४०	१८२७५	६४·१	२५४६५००	५७१४५३९			
१९१६	३१–१२–३०	६९१५९२	३७७१३८	८०१५०	१८६०२१	४९·५	१९४५२५०	६९९९६२४			

हिंदुस्थानची खानेसुमारी १९३१ (हिंदुस्थान सरकारच्या होमडिपार्टमेंटच्या १३।४।३२ च्या पत्रकावरून)

प्रांत, संस्थान अगर	१९३१ सालांतील लोकसंख्या			१९२१ सालांतील लोकसंख्या			फरक १९२१–३१ तूट (–) वाढ (+)	
एजन्सी	एकूण	पुरु	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शें० प्रमाण
हिंदुस्थान	३५२८३७७७८	१८१८२८९२३	१७१००८८५५	३१८९४२४८०	१६३९९५५५४	१५४९४६९२६	+३३८९५२९८	+१०.६
प्रांत	२७१५२६९३३	१३९९३१५५६	१३१५९५३७७	२४६८५६१९१	१२६७९८८८७	१२००५७३०४	+२४६७०७४२	+१०.०
१ अजमीर मारवाड	५६०२९२	२९६०८१	२६४२११	४९५२७१	२६९५६६	२२५७०५	+६५०२१	+१३.१
२ अंदमान-निकोबार	२९४६३	१९७०२	९७६१	२७०८६	२०७९३	६२९३	+२३७७	+ ८.८
३ आसाम	८६२२२५१	४५३७२०६	४०८५०४५	७४५९१२८	३८८७८८०	३५७१२४८	+११६३१२३	+१५.६
४ बलुचिस्थान	४६३५०८	२७०००४	१९३५०४	४२०६४८	२५५०१४	१६५६३४	+४२८६०	+१०.२
डिस्ट्रिक्टस् व	ॲडमिनिस्टर्ड	टेरिटोरीज–						
५ बंगाल	५०११४००२	२६०४१६९८	२४०७२३०४	४६७०२३०७	२४१५४५६३	२२५४७७४४	+३४११६९५	+ ७.३
६ बहार व								
ओरिसा	३७६७७५७६	१८७९४१३८	१८८८३४३८	३३९९५४१८	१६७६०५२५	१७२३४८९३	+३६८२१५८	+१०.८
बहार	२५७२७५००	१२८९६६६०	१२८३०८४०	२३३७३५१७	११५८०३०५	११७९३२१२	+२३५३९८३	+१०.१
ओरिसा	५३०६१४२	२५४९२५१	२७५६८९१	४९६८८७३	२३५०७९३	२६१८०८०	+३३७२६९	६.८
छोटानागपूर	६६४३९३४	३३४८२२७	३२९५७०७	५६५३०२८	२८२९४२७	२८२३६०१	+९९०९०६	+१७.५
७ मुंबई इलाखा	२१९३०६०१	११५३५९०३	१०३९४६९८	१९३४८२१९	१०१७६९६९	९१७१२५०	+२५८२३८२	+१३.३
मुंबई	१७९९२०५३	९३२२६०४	८६६९४४९	१६०१२३४२	८३०१३१०	७७११०३२	+१९७९७११	+१२.४
सिंध	३८८७०७०	२१८०९५४	१७०६११६	३२७९३७७	१८३७२६५	१४४२११२	+६०७६९३	+१८.५
एडन	५१४७८	३२३४५	१९१३३	५६५००	३८३९४	१८१०६	–५०२२	– ८.९
८ ब्रम्हदेश	१४६६७१४६	७४९०६०१	७१७६५४५	१३२१२१९२	६७५६९६९	६४५५२२३	+१४५४९५४	+११.०

प्रांत, संस्थान अगर एजन्सी	१९३१ सालांतील लोकसंख्या			१९२१ सालांतील लोकसंख्या			फरक १९२१–३१ तूट (−) वाढ (+)	
	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शें०प्रमाण
९ मध्यप्रांत-वऱ्हाड	१५५०७७२३	७७६१८१८	७७४५९०५	१३९१२७६०	६९५१३९९	६९६१३६१	+१५९४९६३	+११.५
मध्यप्रांत	१२०६५८८५	६००२२३९	६०६३६४६	१०८३७४४४	५३८५५२५	५४५१९१९	+१२२८४४१	+११.३
वऱ्हाड	३४४१८३८	१७५९५७९	१६८२२५९	३०७५३१६	१५६५८७४	१५०९४४२	+३६६५२२	+११.९
१० कूर्ग	१६३३२७	९०५७५	७२७५२	१६३८३८	८९५०१	७४३३७	−५११	− ०.३
११ दिल्ली	६३६२४६	३६९४९७	२६६७४९	४८८४५२	२८१७७७	२०६६७५	+१४७७९४	+३०.३
१२ मद्रास	४६७४०१०७	२३०८२९९९	२३६५७१०८	४२३१८९८५	२०८७०७४९	२१४४८२३६	+४४२११२२	+१०.४
१३ वायव्य सरहद्दप्रां. डि.अँ.अँ.टेरिटो.	२४२५०७६	१३१५८१८	११०९२५८	२२५१३४०	१२२९३१६	१०२२०२४	+१७३७३६	+ ७.७
१४ पंजाब	२३५८०८५२	१२८८०५१०	१०७००३४२	२०६८५४७८	११३०६५०७	९३७८९७१	+२८९५३७४	+१४.०
१५ सं.प्रांत-आग्रा,अ.	४८४०८७६३	२५४४५००६	२२९६३७५७	४५३७५०६९	२३७८७३५९	२१५८७७१०	+३०३३६९४	+ ६.७
आग्रा	३५६१३७८४	१८८०५१३२	१६८०८६५२	३३२०८४२७	१७४८८६९०	१५७१९७३७	+२४०५३५७	+ ७.२
अयोध्या	१२७९४९७९	६६३९८७४	६१५५१०५	१२१६६६४२	६२९८६६९	५८६७९७३	+६२८३३७	+ ५.२
संस्थानें,एजन्सीज्	८१३१०८४५	४१८९७३६७	३९४१३४७८	७२०८६२८९	३७१९६६६७	३४८८९६२२	+९२२४५५६	+१२.८
१६ आसाम स्टेटस् मणिपूर व काशी	६२५६०६	३०६९२७	३१८६७९	५३१११८	२६१३४८	२६९७७०	+९४४८८	+१७.८
१७ बलुचिस्थान सं.	४०५१०९	२१८४१०	१८६६९९	३७८९७७	२०५९८६	१७२९९१	२६१३२	+ ६.९
१८ बडोदें संस्थान	२४४३००७	१२५७८१७	११८५१९०	२१२६५२२	११००५६४	१०२५९५८	+३१६४८५	+१४.९
१९ बंगाल संस्थान	९७३३३६	५१६१६२	४५७१७४	८९६९२६	४७७१४३	४१९७८३	+७६४१०	+ ८.५
२० बहार व ओरिसा	४६५२००७	२२८८४२२	२३६३५८५	३९५९६६९	१९४६१८६	२०१३४८३	+६९२३३८	+१७.५
२१ मुंबई संस्थानें	४४६८३९६	२२८८६२३	२१७९७७३	३८६७८१९	१९७४१२१	१८९३६९८	+६००५७७	+१५.५
२२ मध्यहिंदुस्थान ए.	६६३२७९०	३४०५४३८	३२२७३५२	६००२५५१	३०७१७७०	२९३०७८१	+६३०२३९	+१०.५

प्रांत, संस्थान अगर एजन्सी	१९३१ सालांतील लोकसंख्या			१९२१ सालांतील लोकसंख्या			फरक १९२१–३१ तूट (–) वाढ (+)	
	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शें०प्रमाण
२३ मध्यप्रांत संस्थानें	२४८३२१४	१२३५३८५	१२४७८२९	२०६६९००	१०२९३९८	१०३७५०२	+४१६३१४	+२०.१
२४ ग्वाल्हेर	३५२३०७०	१८६७०३१	१६५६०३९	३१९३१७६	१६९५३५५	१४९७८२१	+३२९८९४	+१०.३
२५ हैद्राबाद संस्थान	१४४३६१४८	७३७००१०	७०६६१३८	१२४७१७७०	६३४५०७१	६१२६६९९	+१९६४३७८	+१५.८
२६ जम्मू व काश्मीर	३६४६२४३	१९३८३३८	१७०७९०५	३३२०५१८	१७५७१२२	१५६३३९६	+३२५७२५	+ ९.८
२७ मद्रास स्टेटस् ए.	६७५४४८४	३३७३०३२	३३८१४५२	५४६०३१२	२७४४९२१	२७१५३९१	+१२९४१७२	+२३.७
कोचीन संस्थान	१२०५०१६	५८९८१३	६१५२०३	९७९०८०	४८२९५९	४९६१२१	+२२५९३६	+२३.१
त्रावणकोर संस्थान	५०९५९७३	२५६५०७३	२५३०९००	४००६०६२	२०३२५५३	१९७३५०९	+१०८९९११	+२७.२
इतर मद्रास सं.	४५३४९५	२१८१४६	२३५३४९	४७५१७०	२२९४०९	२४५७६१	–२१६७५	– ४.६
२८ म्हैसूर संस्थान	६५५७३०२	३३५३९६३	३२०३३३९	५९७८८९२	३०४७११७	२९३१७७५	+५७८४१०	+ ९.७
२९ वायव्य सर.प्रां. एजन्सीज्,ट्रायबल ए.	२२५९२८८	१२१२३४७	१०४६९४१	२८२५१३६	१५१७७९१	१३०७३४५	–५६५८४८	–२०.०
३० पंजाब संस्थान	४३७७८७	२२९२९०	२०८४९७	४०८०१९	२१५६३३	१९२३८६	+२९७६८	+ ७.३
३१ पंजाब स्टेटस् एज-	४४७२२१८	२४५१३९४	२०२०८२४	४००८०१७	२२१०१५०	१७९७८६७	+४६४२०१	+११.६
३२ राजपुताना एज.	११२२५७१२	५८८५०२८	५३४०६८४	९८३१७५५	५१७८४२८	४६५३३२७	+१३९३९५७	+१४.२
३३ सिकिम स्टेट	१०९८०८	५५८२५	५३९८३	८१७२१	४१४९२	४०२२९	+२८०८७	+३४.४
३४ संयुक्तप्रांत सं.	१२०६०७०	६१८१७१	५८७८९९	११३४८८१	५८१२३०	५५३६५१	+७११८९	+ ६.३
३५ वेस्टर्नइंडिया स्टेटस् एजन्सी	३९९९२५०	२०२५७५४	१९७३४९६	३५४१६१०	१७९५८४१	१७४५७६९	+४५७६४०	+१२.९

धर्म व वय यांप्रमाणें वैवाहिक जीवन

अविवाहित

	पुरुष			स्त्रिया		
	० ते १५	१५ ते ५०	५० व वरचे	० ते १५	१५ ते ५०	५० व वरचे
हिंदुस्थान १सर्वधर्मीय	६६१३६३६८	१९६२३३३४	५७८२९९	५५२०९६९०	४३२४२००	१६४१५३
—ब्रह्मदेशसो.	६३३९७७९५	१८२३०६८७	५१४७५१	५२४९३०३१	३३५८८१०	११२०६६
२ हिंदु	४३५९९५५९	१२५२४८५०	३८०५९६	३६२३५०७९	२०८४४०५	७२४८५
३ मुसलमान	१५६४३१२७	४२९९२०८	८१४९७	१२५००५०१	७९९२४९	२४४६८
४ जमाती	१५९०१९८	३५६३८६	७४५३	१४९९६८६	१६८६०२	५८०५
५ ख्रिश्चन	१२४२१८१	४७६६५१	७१७५	११७२५६४	२००४५३	६१२८
६ शीख	८९८५०५	४०४८७७	३०४८७	७२०६७७	६३५२४	१७२३
७ बौद्ध	८८३५४	३०८५४	८२९	८११२१	१५०००	४५१
८ इतर	३३५८७१	१३७८६१	६७१४	२८३४०३	२७५७७	१००६

विवाहित

	पुरुष			स्त्रिया		
	० ते १५	१५ ते ५०	५० व वरचे	० ते १५	१५ ते ५०	५० व वरचे
हिंदुस्थान १ सर्वधर्मीय	५५३९६२५	६६३००८२४	१२३७७०१८	१२२७१५९४	६६७१९५१५	४६१६११४
—ब्रह्म.सो.	५५२५२२८	६३९६६३२५	११७८२०१२	१२२५३५५९	६४४९९१७९	४२६३६०८
२ हिंदु	४२८८५७५	४६०२८१३४	८३४६८६५	९०४९०७९	४६२४५१५८	३०५८८४५
३ मुसलमान	१०८७७७५	१४४९७२४४	२७१५७९४	२८७६८०१	१४५०२११३	८६२४९६
४जमाती	८३८५७	१३६१५२०	२४६२५७	१६१२२५	१४४७८५६	११९००४
५ ख्रिश्चन	१८७८३	९८३०९३	२१७५४५	५२४९५	१०६४६३१	९६२४९
६ शीख	२४१३५	७००६८९	१७०८३५	६२५९४	७४६११०	८९३१६
७ बौद्ध	१७८५	७५२६२	१८६२१	४४१४	७८७५९	१०१११
८ इतर	२०३१८	३२०३८३	६६०९५	४६९५१	३२४५५२	२७५८७

धर्म व वय यांप्रमाणें वैवाहिक जीवन

	विधुर			विधवा		
	० ते १५	१५ ते ५०	५० वरचे	० ते १५	१५ ते ५०	५०व वरच्या
हिंदुस्थान	१३६४३६	५१४६८७२	४३७५८०८	३२१७०१	१४३१७४८८	११६०९२७९
सर्व धर्मीय (ब्रह्म-सोडून)	१३६२५३	४९७६२५२	४१९५६०५	३२०३२६	१३९७९७६३	१११९६५७१
हिंदु	१११९७१	३७६०३८५	३१३२३९९	२५३०३६	१०८६०३५५	८५६७६७७
मुसलमान	२१२१०	९५३७५६	७९९४९२	५८७७७	२५६०६२४	२०६००९९
जमाती	१८१६	८३०४७	५७७४८	४९२८	२२०५९३	१९५८२२
ख्रिश्चन	६१५	५०९०१	५७६३६	१२९५	१५७८५७	१५७७४७
शीख	८४७	८६२४१	१०७१२२	७९४	८४०३७	१३१२१७
बौद्ध	४९	४२०८	४२७०	२३३	१०२७८	११२५८
इतर	५४५	३७७१४	३६९३८	१२६३	८६०१९	७२७५१


एकूण

	पुरुष			स्त्रिया		
	० ते १५	१५ ते ५०	५० व वरचे	० ते १५	१५ ते ५०	५० व वरचे
हिंदुस्था.	७१८०३४२९	९१०७१०३०	१७३३११२५	६७८०२९८५	८५३६१२०३	१६३८९५४६
सर्वधर्मीय ब्रह्म.सोडू	६९०५९२७६	८७१७३२६४	१६४९२३६८	६५०६६९१६	८१७४७७५२	१५५७२२४५
हिंदु	४७९९९३०५	६२३१३३६९	११८५९८६०	४५५३७१९४	५९१८९९१८	११६९९००७
मुसलमान	१६७५२११२	१९७५०२०८	३५९६७८३	१५४३६०७९	१७८६१९८६	२९४७०६३
जमाती	१६७५८७१	१८००९५३	३११४५८	१६६५८३९	१८३७०५१	३२०६३१
ख्रिश्चन	१२६१५७९	१५१०६४५	२८२३५६	१२२६३५४	१४२२९४१	२६०१२४
शीख	९२३४८७	११९१८०७	३०८४४४	७८४०६५	८९३६७१	२२२२५६
बौद्ध	९०१८८	११०३२४	२३७२०	८५७६८	१०४०३७	२१८२०
इतर	३५६७३४	४९५९५८	१०९७४७	३३१६१७	४३८१४८	१०१३४४

मुंबई-इलाख्यांतील जिल्ह्यांची-लोकसंख्या

जिल्हा	लोकसंख्या १९३१			लोकसंख्या १९२१			फरक (१९२१–३१) वाढ (+) तूट (–)	
	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शेंकडा
मुंबई	२६३९८९९७	१३८२४५२६	१२५७४४७१	२३२१६०३८	१२१५१०९०	११०६४९४८	+३१८२९५९	+१३.७
ब्रि.प्रां.एडन सो.	२१८७९१२३	११५०३५५८	१०३७५५६५	१९२९१७१९	१०१३८५७५	९१५३१४४	+२५८७४०४	+१३.४
१मुंबई नगर	११६१३८३	७४७३८१	४१४००२	११७५९१४	७७१३३२	४०४५८२	– १४५३१	– १.२
उत्तर भाग	४०६०३५२	२११३६२६	१९४६७२६	३७१८७६५	१९३५३९७	१७८३३६८	+ ३४१५८७	+ ९.२
२ अहमदाबाद	९९९७६८	५२८१९०	४७१५७८	८९०९११	४७६२६६	४१४६४५	+ १०८८५७	+१२.२
३ भडोच	३३४१७०	१७४८९४	१५९२७६	३०७७४५	१५८५८८	१४९१५७	+ २६४२५	+ ८.६
४ खेडा	७४१६५०	३९५१०४	३४६५४६	७१०९८२	३७९७३५	३३१२४७	+ ३०६६८	+ ४.३
५ पंचमहाल	४५४५२६	२३६६२२	२१७९०४	३७४८६०	१९३४००	१८१४६०	+ ७९६६६	+२१.३
६ सुरत	६९३६१३	३४८२८३	३४५३३०	६७४३५१	३३७३८७	३३६९६४	+ १९२६२	+ २.९
७ ठाणें	८३६६२५	४३०५३३	४०६०९२	७५९९१६	३९००२१	३६९८९५	+ ७६७०९	+१०.१
मध्यविभाग	७३७२६३७	३७६४५८६	३६०८०५१	६२११९५४	३१६३९१७	३०४८०३७	+११६०६८३	+१८.७
८ अहमदनगर	९८८२०६	५०११८६	४८७०२०	७३१५५२	३६९६२९	३६१९२३	+ २५६६५४	+३५.१
९ पूर्वखानदेश	१२०६०३५	६१२६९३	५९३३४२	१०७५८३७	५४५७८९	५३००४८	+ १३०१९८	+१२.१
१० पश्चिमखानदेश	७७१७९४	३९१८००	३७९९९४	६४१८४७	३२४८३१	३१७०१६	+ १२९९४७	+२०.२
११नाशिक	१०००४८	५०८८६५	४९११८३	८३२५७६	४२४३५९	४०८२१७	+ १६७४७२	+२०.१
१२पुणें	११६९७९८	६०१०१३	५६८७८५	१००९०३३	५१६८७१	४९२१६२	+ १६०७६५	+१५.९
१३ सातारा	११७९७१२	५९२३०३	५८७४०९	१०२६२५९	५११४८०	५१४७७९	+ १५३४५३	+१५.०
१४सोलापूर	८७७५२०	४५३५०९	४२४०११	७४२०१०	३८२५७१	३५९४३९	+ १३५५१०	+१८.३

लोकसंख्या (१९३१)



महासंख्या
पुरुषांची
स्त्रियांची
खेडेगावांतील
शहरांतील
१९२१
१९३१
०
५०
१००
१५०
२००
२५०
३००
३५०

जिल्हा	लोकसंख्या १९३१			लोकसंख्या १९२१			फरक (१९२१–३१) वाढ (+) तूट (–)	
	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शेंकडा
१५ मुंबई उपनगरें	१७९५२४	१०३२१७	७६३०७	१५२८४०	८८३८७	६४४५३	+ २६६८४	+१७.५
दक्षिण भाग	५३९७६८१	२६९७०११	२७००६७०	४९०५७०९	२४३०६६४	२४७५०४५	+ ४९१९७२	+१०.०
१६ बेळगाव	१०७६७०१	५५२३८०	५२४३२१	९५२९९६	४८७०३६	४६५९६०	+ १२३७०५	+१३.०
१७ विजापूर	८६९२२०	४४०५७९	४२८६४१	७९६८७६	४०५६३७	३९१२३९	+ ७२३४४	+ ९.१
१८ धारवाड	११०२६७७	५६५६४१	५३७०३६	१०३६९२४	५२८८८९	५०८०३५	+ ६५७५३	+ ६.३
१९ कारवार	४१७८३५	२१४०८५	२०३७५०	४०१७२७	२०४१६५	१९७५६२	+ १६१०८	+ ४.०
२० कुलाबा	६२८७२१	३१५०१७	३१३७०४	५६२९४२	२७९५९६	२८३३४६	+ ६५७७९	+११.७
२१ रत्नागिरी	१३०२५२७	६०९३०९	६९३२१८	११५४२४४	५२५३४१	६२८९०३	+ १४८२८३	+१२.८
सिंध	३८८७०७०	२१८०९५४	१७०६११६	३२७९३७७	१८३७२६५	१४४२११२	+ ६०७६९३	+१८.५
२२ हद्राबाद	६६२९२४	३७१७८८	२९११३६	५७३४५०	३२२४४४	२५१००६	+ ८९४७४	+१५.६
२३ कराची	६५०२४०	३६९८७३	२८०३६७	५४२०६५	३१२०४८	२३००१७	+ १०८१७५	+२०.०
२४ लारखाना	६९३७३५	३८५७०५	३०८०३०	५९७९६०	३३१२१७	२६६७४३	+ ९५७७५	+१६.०
२५ नवाबशहा	४९६६१२	२७९०३२	२१७५८०	४१८६६०	२३३८३०	१८४८३०	+ ७७९५२	+१८.६
२६ सक्कर	६२३७७९	३४९३१२	२७४४६७	५१०२९२	२८२३०६	२२७९८६	+ ११३४८७	+२२.२
२७ थर व पारकर	४६८०४०	२६१९४५	२०६०९५	३९६३३१	२२१०९५	१७५२३६	+ ७१७०९	+१८.१
२८ अपर सिंध फ्रॉं.	२९१७४०	१६३२९९	१२८४४१	२४०६१९	१३४३२५	१०६२९४	+ ५११२१	+२१.२
एडन	५१४७८	३२३४५	१९१३३	५६५००	३८३९४	१८१०६	– ५०२२	– ८.९
मुंबई संस्थानें	४४६८३९६	२२८८६२३	२१७९७७३	३८६७८१९	१९७४१२१	१८९३६९८	+ ६००५७७	+१५.५
१ महिकाठा एज.	५१८१६४	२६३३९८	२५४७६६	४५०४७८	२२६९७४	२२३५०४	+ ६७६८६	+१५.०
ईदर	२६२६६०	१३१९२७	१३०७३३	२२६३५१	११२०७७	११४२७४	+ ३६३०९	+१६.०
२रेवाकाठा एजन्सी	८८००८६	४५११३३	४२८९५३	७५३०५८	३८६७५६	३६६३०२	+ १३५०२८	+१७.९

जिल्हा	लोकसंख्या १९३१			लोकसंख्या १९२१			फरक (१९२१–३१) वाढ (+) तूट (–)	
	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शेंकडा
राजपिप्पला	२०६११४	१०६४४५	९९६६९	१६८४२५	८६५१८	८१९०७	+ ३७६८९	+२२.४
३ सावंतवाडी	२३०५८९	११०९६२	११९६२७	२०६४४०	९७००६	१०९४३४	+ २४१४९	+११.७
४ दक्षिणीमराठा सं.	१६४८२४८	८४१८५६	८०६३९२	१४४२०८८	७३८४९५	७०३५९३	+ २०६१६०	+१४.३
कोल्हापूर	९५७१३७	४९०३३६	४६६८०१	८३३७२६	४२८५४३	४०५१८३	+ १२३४११	+१४.८
सांगली	२५८४४२	१३१९८९	१२६४५३	२२१३२१	११३१९९	१०८१२२	+ ३७१२१	+१६.८
५ भोर	१४१५४६	७०१२२	७१४२४	१३०४२०	६४७६१	६५६५९	+ ११२२६	+ ८.५
६ इतर संस्थानें	८१४५८०	४१८०९८	३९६४८२	६९२२०४	३५२९१३	३३९२९१	+ १२२३७६	+१७.७
७ खैरपूर सिंध	२२७१८३	१२५०५४	१०२१२९	१९३१३१	१०७२१६	८५९१५	+ ३४०५२	+१७.६

मुंबई इलाख्यांतील मुख्य शहरांची–लोकसंख्या

शहर	लोकसंख्या १९३१			लोकसंख्या १९२१			फरक (१९२१–३१) वाढ (+) तूट (–)	
	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया	प्रत्यक्ष	शेंकडा
मुंबई	११६१३८३	७४७३८१	४१४००२	११७५९१४	७७१३३२	४०४५८२	–१४५३१	–१.२
अहमदाबाद	३१३७८९	१६९३५६	१४४४३३	२७४००७	१५५३७२	११८६३५	+३९७८२	+१४.५
कराची	२६३५६५	१५६१२०	१०७४४५	२१६८८३	१३३०८४	८३७९९	+४६६८२	+२१.५
पुणें	२५०१८७	१३८१३९	११२०४८	२१४७९६	११८४७३	९६३२३	+३५३९१	+१६.५
सोलापूर	१४४६५४	७६८३७	६७८१७	११९५८१	६३११५	५६४६६	+२५०७३	+२१.०

चालू उद्योग

चालू उद्योग

महाराष्ट्रांतील कांहीं संस्था व कांहीं व्यक्ति ज्या उद्योगांत सध्यां निमग्न आहेत त्या उद्योगांची अधिकृत माहिती पुढें दिली आहे.

—सं. म. सां.

धर्मकोश

(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वांई यांजकडून आलेली माहिती)

उद्देशः—भारतीय समाजाचा व भारतीय संस्कृतीचा इतिहास पाश्चात्यांच्या मतें कमींत कमी ६ हजार वर्षांचा सांपडत आहे. भारतीयांचा इतिहास म्हणजे भारतीय धर्माचा इतिहास होय. कारण मनुष्याच्या आयुष्यांतील सर्व प्रवृत्तींचें प्रगतिमय, विकासमय व हितपरिणामीं जें स्वरूप तोच धर्म होय. अशी धर्माची व्याख्या भारतीय पूर्वाचार्यांनीं मानली आहे. अर्थात् भारतीयांच्या धर्माचा इतिहास म्हणजे आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, संस्कार, तत्त्वज्ञान, उपासना, यज्ञदेवता, कुलधर्म, जातिधर्म, वर्णधर्म, आश्रमधर्म, नीति, राजकारण, इत्यादिकांचा इतिहास होय.

या सर्व विषयांचें म्हणजे भारतीय धर्माचें वर्णन व विधान करणारे जे ग्रंथ काळाच्या प्रभावांतून बचावले आहेत त्यांत अत्यंत पुरातन (लो. टिळकांच्या मतें १०,००० वर्षांपूर्वींचा) ग्रंथ ऋग्वेद हा होय. त्यानंतरचें परंतु बुद्धपूर्वकालीन वाङ्मय म्हणजे यजुःसंहिता, अथर्वसंहिता, सामसंहिता, ब्राह्मण्यें, आरण्यकें, उपनिषदें, कांहीं श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें व धर्मसूत्रें हें होय.

बुद्धपूर्वकालांत प्रारंभिलेलें व बुद्धोत्तर कालांत ज्यांच्यांत भर पडली असे रामायण, महाभारत स्मृतिग्रंथ, पुराणें, तंत्रागम हे होत. इ. स. सातव्या शतकापासून तों वारन हेस्टिंगच्या काळापर्यंतचें भाष्य, टीका व स्वतंत्र निबंध ग्रंथ हे होत. या ग्रंथांत प्रामुख्यानें मिताक्षरी, चतुर्वर्ग चिंतामणि, वीरमित्रोदय, पराशरमाधव, निर्णयसिंधू इत्यादिकांचा समावेश होतो. या वाङ्मयसागरांत भारतीयांचा धर्मेतिहास प्रामुख्यानें सांपडतो. धर्मेतिहासाच्या बाबतींत दृढ प्रामाण्य याच ग्रंथांना देणें भाग आहे. कारण हे ग्रंथ भारतीयांचे केवळ श्रद्धेय ग्रंथच नव्हते, तर हजारों वर्षें राजकीय शासनही याच ग्रंथाच्या कमी अधिक साहाय्यानें चालू होतें. या सर्व ग्रंथांचें आलोडन करून धर्मविषयक वचनांचा त्याचें पुढील चतुर्विध फलित लक्षांत घेऊन विषयवारीनें संग्रह करावयाचा आहे.

१ भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासकास विचारपरंपरा सांपडावी. २ भारतीय धर्मेतिहासाचा अभ्यास करणाऱ्यास संकलित सामग्री मिळावी. ३ धर्मजिज्ञासूंना धर्माच्या मूल सिद्धांतांचें दोहन करण्यास मिळावें. ४ कायदे सुधारणा मंडळास (हिंदू लॉ रिसर्च सोसायटी) हिंदू कायद्याचें सर्वांगपूर्ण विवरण उपलब्ध व्हावें.

धर्मशास्त्रकोशाचें स्वरूप

वेदापासून तों धर्मसिंधूपर्यंतच्या वाङ्मयांत प्रत्येक विषयावर मिळणारी माहिती विषयवारीनें संग्रह करणें—उदा० 'विवाहकाल' या विषयावर वेद, सूत्रें, स्मृति, पुराणें, व निबंधग्रंथ यांच्यांतील वचनांचा कालानुक्रमें संग्रह करणें. त्यामुळें त्या विशिष्ट कल्पनेंत झालेलीं परिवर्तनें प्रत्यक्ष गोचर होतात. (१) चारी वेदांच्या उपलब्ध असलेल्या संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें यांतील श्रौतयज्ञसंस्था वगळून संस्कार, आचार, वर्णाश्रम, विवाह, जाति, नीति इत्यादि विषयासंबंधीं असलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उल्लेखांचा संग्रह. (२) हल्लीं उपलब्ध असलेलीं १५ गृह्यसूत्रें, ५ धर्मसूत्रें, १५ श्रौतसूत्रें, मन्वादिप्रणीत मुद्रित व अमुद्रित ५५ स्मृति यांतील वचनांचा विषयवारीनें संग्रह. (३) विश्वरूप, मिताक्षरा, माधव, वीरमित्रोदय, मयूख इत्यादि भाष्य टीका व निबंधग्रंथ यांत उद्धृत केलेल्या (हिंदुस्थानांतील किंवा युरोपांतील पुस्तकालयांत न मिळणाऱ्या) स्मृतिकारांच्या वचनांचा संग्रह. त्यामुळें स्वतंत्र २०–२५ अनुपलब्ध स्मृतिग्रंथ उपलब्ध होतील. (४) इ. स. ७ व्या शतकापासून तों १९ व्या शतकापर्यंत झालेल्या धर्मनिबंधकारांनीं स्मृतिवचनांचीं जीं निरनिराळीं विवरणें व भाष्यें केलीं त्यांचा वादग्रस्त विषयांवर संग्रह.

या धर्मकोशांत विशिष्ट मतानुकूल अशा वचनांचा संग्रह कर्तव्य नसून सर्व तऱ्हेच्या व सर्व बाजूच्या मतांशीं संबद्ध असलेलीं सर्व वचनें निःपक्षपाती अभ्यासकास साह्य मिळावें म्हणून संग्रहित करावयाचीं आहेत.

हें काम सुरूं होऊन ७ वर्षें झालीं. श्री.केवलानंद सरस्वती (वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे) यांनीं दक्षिण हैद्राबादचे श्रीमंत वामनराव नाईक यांच्या द्रव्य साहाय्यानें आरंभिलें. स्वामींनीं १९३१ सालीं संन्यास घेतल्यानंतर वांई प्राज्ञ पाठशाळेचे मुख्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मुख्य संपादकत्वाखालीं अनेक विद्वान् शास्त्री मंडळाच्या साहाय्यानें सध्यां सुरूं आहे.

प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास

(डॉ. श्री. व्यं. केतकर यांजकडून)

ज्ञानकोशाचा चोविसावा भाग म्हणून महाराष्ट्रासंबंधाचा विभाग काढावा असा संकल्प होता आणि तो जाहीरहि केला होता. तथापि पुढें तो संकल्प रद्द करून स्वतंत्र ग्रंथाची रचना करावयाचा संकल्प मागाहून केला व त्यासंबंधाचीं वर्णनपत्रकें आपणांकडे पाठविलीं. त्यानंतर जसजशी प्रगति झाली तसतशी स्थानिक पत्रांतून व विद्यासेवकांतून जाहीर करण्यांत आली होतीच. गेलीं दोन अडीच वर्षें या विषयाकडेच गेल्यामुळें आतां तिन्हीही भागांकरितां साहित्याची जमवाजमव व कच्चा खर्डा करणें याची तयारी इत्यादि कामें झालीं. पण तीं पुरीं झालीं नाहींत. उपलब्ध सर्व साहित्य हिंदुस्थानांत एका ठिकाणीं मिळत नाहीं व शेंकडों (सुमारें १०००) अंकित लेखांचे ठसे हिंदुस्थानांत उपलब्ध नसून इंग्लंडांत आहेत. यासाठीं केवळ हिंदुस्थानांत बसून पुरें काम होणार नाहीं. त्यासाठीं इंग्लंडलाहि गेलें पाहिजे इत्यादि गोष्टी कळून आल्या व या सर्व गोष्टी वाचकांना मागें कळविल्याच आहेत. कार्याची व्याप्ति विद्यासेवकाच्या एका अंकांत (वर्ष ५ अंक ४ था) कळविलीच आहे. त्यानंतर कळवावयाची गोष्ट म्हणजे वेदकाल व पौराणिक काल या काळचा महाराष्ट्राचा इतिहास शोधण्यासाठीं बराच परिश्रम झाला आणि त्या श्रमाचें फळ ग्रंथरूपानें वाचकांस लवकरच मिळेल.

१. आदिपर्व

प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास वेदकाल व पौराणिक काल यांपासून लिहिण्याजोगा आहे व वेदाचा कांहींतरी भाग विदर्भांत तयार झाला असला पाहिजे असें प्रस्तुत लेखकाचें निश्चयात्मक मत झालें आहे व त्याचप्रमाणें अनेक पौराणिक कथा वेदपूर्वकालीन आहेत व त्यांमधून वेदपूर्वकालीन महाराष्ट्राचें स्वरूप दृग्गोचर होत आहे. महाराष्ट्राचा वसाहतकाल अत्यंत प्राचीन आहे आणि ऋग्वेदांतील अनेक मंत्र तयार होण्यापूर्वींच अनेक प्रकारचे यज्ञसंप्रदाय आणि वेदशाखा महाराष्ट्रांत तयार झाल्या होत्या हेंही आज निश्चयानें सांगतां येतें. शातवाहन पूर्वकालाचा दक्षिणेचा राजकीय इतिहास देण्यास जरी साहित्य अपुरें आहे तरी सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहास देण्यासाठीं साहित्य मुळींच अपुरें नाहीं. तत्कालीन उद्योग, शेतकी, भोज्यवस्तू, गृहव्यवस्था इत्यादि गोष्टींची सविस्तर माहिती देतां येणें शक्य आहे हें वाचकांस समजेल व त्याबरोबर वैदिक आणि पौराणिक साहित्याचा इतिहासार्थ उपयोग कसा करून घ्यावा याच्या पद्धतींतदेखील सुधारणा झालेली सांपडेल. आणि त्यामुळें वेदाभ्यासाला आणखी एक नवीन दिशा निश्चयेंकरून लागेल.

आदिपर्वांत जो काळ आहे तो अत्यंत प्राचीन असल्यामुळें त्या प्राचीन काळासंबंधानें भाषाशास्त्र तौलनिक व्याकरण यांच्या साहाय्यानें जें संशोधन झालें आहे त्याचें परीक्षणात्मक विधान दिलें गेलें आहे. महाराष्ट्राच्या वसाहतकालासंबंधानें कै. राजवाडे यांचे जे लेख आहेत त्यांचें निरीक्षण या प्रसंगीं केलें आहे आणि तसेंच महाराष्ट्राच्या संस्कृतींत जो कर्नाटकीय अंश आहे त्याचें विधान आज कर्नाटकीय व महाराष्ट्रीय लेखकांकडून जें भिन्न तऱ्हेनें होत आहे व झालें आहे त्या दोहोंचाही विचार प्रस्तुत ग्रंथांत अत्यंत काळजीपूर्वक केलेला आहे असें वाचकांचें मत होईल.

२. शातवाहनपर्व

पहिल्या विभागांत या आदिपर्वाखेरीज शातवाहन पर्व येतें. यांत मौर्य कालापासून चालुक्यांच्या काळापर्यंतचा ८०० शें वर्षांचा इतिहास सबंध देण्यांत आला आहे. व तो देतांना आधारास घेतलेले सर्व शिलालेख व ताम्रपट यांचें मूळ व भाषांतर दिलें आहे.या ८००शें वर्षांच्या इतिहासावर प्रकाश पाडणारें जें परकीय साहित्य आहे त्याचें अगदीं विस्तृत तऱ्हेनें अवलोकन व प्रसंगीं संपूर्ण भाषांतर दिलें गेलें आहे. याशिवाय दक्षिणेच्या इतिहासावर प्रकाश पाडणारें जें ललितवाङ्मय आणि शास्त्रीय वाङ्मय आहे याचाहि आढावा घेण्यांत आला आहे.

पुढील संकल्पित भाग २ व ३

प्राचीन महाराष्ट्राचे जे पुढील भाग आहेत ते एकंदर किती होतील याचा अदमास कांहीं एक सांगतां येत नाहीं. पूर्वीचे सर्व अजमास चुकले आहेत. आणि सध्यांचें सांपडलेलें साहित्य इतकें मुबलक आहे कीं, ग्रंथकारास अडचण साहित्याचा दुर्भिक्षही नसून साहित्याचें वैपुल्य हीच आहे. उपयोगाचीं अंकित लिखाणें तीन हजारांवर आहेत व ललित आणि शास्त्रीय वाङ्मयाचें आणि प्रत्यक्ष अवशेषांचें साहित्य आहे तें निराळेंच. यामुळें हे पुढील ग्रंथ अत्यंत मनोरंजक होतील असा अदमास वाटतो.

माझी अशी कल्पना आहे कीं, हा ग्रंथ उपलब्ध सर्व साहित्य वापरून लिहिला गेला तर त्याचीं पृष्ठें पूर्वसंकल्पाप्रमाणें १८०० न होतां ३००० च्या वर जातील व हा ग्रंथ पुरा व्हावयास अजून पांच वर्षें लागतील. ग्रंथाचा विस्तार अधिकाधिक होत आहे व साहित्यहि पुष्कळ जमत आहे. आपली पूर्वींची योजना बदलावी लागेल हें समजून गेलें व त्यामुळें एक वर्षभर नवीन वर्गणीदार करणें जवळ जवळ बंदच ठेविलें होतें. तथापि आतां पुन्हां वर्गणीदार नोंदणें सुरूं करण्यांत येत आहे व एकंदर तीन भागांचा म्हणजे १७४० पृष्ठांचा करार करण्यांत येत आहे.

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासाचें काम १९२७ च्या अखेरीस सुरूं झालें म्हणजे याला अर्थात् सुरूं होऊन सुमारें पांच वर्षें होत आलीं. काम फार वाढत गेलें आणि पूर्वीं ठरलेल्या वेळांत जितकें द्यावयाचें होतें तितकें देणें झालें नाहीं. संकल्पित कार्य पुरें व्हावयास दहाबारा वर्षें लागतील असा अदमास आहे. आणि आतां लोकांना ताबडतोब द्यावयाच्या हप्त्याचें क्षेत्र नियमित केलें आहे. त्यांत शातवाहनांच्या अंतापर्यंतच कथासूत्र आणलेसें आढळेल. चालुक्यांच्या काळापासून मुसलमानी राज्य सुरूं होण्यापर्यंत महाराष्ट्राचा इतिहास हिंदुस्थानच्या सर्व भागाशीं आणि विशेषतः दक्षिणेशीं अत्यंत संलग्न आहे. आणि यासाठीं सर्व इतिहास नीट मांडण्यासाठीं सर्व चिरंजीवी लिखाणांचा म्हणजे इन्स्क्रिप्शनचा डायजेस्ट बनविला पाहिजे असें आढळून आलें आणि ग्रंथक्षेत्राचें नियमन करावें लागलें आणि चालुक्योत्तर काळावरील हातीं घेतलेलेंही बरेंच झालेलें काम टाकून द्यावें लागलें. या प्रकारचा डायजेस्ट करण्यासाठीं पुराणवस्तुसंशोधन खात्यानें जी मदत करावयास पाहिजे होती ती केली नाहीं. हा डायजेस्टही आपणच हातीं घ्यावा असें मनांत आहे. पण तें लोकांच्या सहकारितेवर अवलंबून आहे. डायजेस्ट झाल्यानंतर चालुक्योत्तर काळावर अधिक निर्णयपणें लिहितां येईल. कामचलाऊ डायजेस्ट करून काम पुढें चालू करणें शक्य नाहीं. कारण हीं लिखितें जवळ जवळ दहा हजार भरतील. केवळ स्वाऱ्यांची जंत्री किंवा राजावलि बनविण्याचेंच ध्येय ठेवलें तर तें काम सोपें होईल. पण व्यापक इतिहासाचें ध्येय ठेवणाऱ्याला प्रत्येक लिखाणांतील अनेक गोष्टी उपयोगी होतात. असो.

चालुक्य पूर्व काळांचेंच काम पुष्कळ असल्यामुळें तेवढ्या काळावरच काम चांगलें सविस्तर करून तेवढा भाग लोकांच्या हवालीं करावा असें ठरविलें आहे. तेवढ्या काळांतील इतिहासोपयोगी साहित्य थोडथोडकें नाहीं. जें साहित्य उपलब्ध असतें त्याचा इतिहासाला आत्यंतिक उपयोग करून घेणें ही कलादेखील वाढावयाचीच आहे. आणि शासनशास्त्री, अर्थशास्त्री आणि समाजशास्त्री इतिहासलेखनांत जसजसे अधिक पडतील तशी ती वाढत जाणार आहे. आतां महाराष्ट्राच्या इतिहासांतहि वेदकाळ येतो म्हणून वेदकाळापासून शातवाहनांच्या शेवटापर्यंत ४ भाग करून तें द्यावयाचें ठरविलें आहे. यांत वसाहतकालीन सामाजिक स्थित्यंतराचा, प्राचीन वाङ्मयाचा, मनोरंजनाच्य साधनांचा, गोत्रकुलविषयक जातींच्या आगमनाचा व तसाच घटना विघटना इतिहास पुष्कळच येणार आहे.

मध्ययुगीन चरित्रकोश

(विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांजकडून)

प्राचीन चरित्रकोशांत जगाच्या आरंभापासून मौर्य चंद्रगुप्तापर्यंत झालेल्या आपल्या वाङ्मयांतील व्यक्तींचा समावेश झाला आहे. मध्ययुगीन चरित्रकोशांत मौर्य चंद्रगुप्तापासून पेशवाईअखेर (१८१८) झालेल्या व्यक्तींचा समावेश होणार आहे. मध्ययुग शब्दानें वरील अर्थ गृहित धरला आहे. कोणत्याही क्षेत्रांत प्रामुख्य पावलेल्या या कालांतील व्यक्तींचा समावेश या कोशांत होण्याविषयीं अत्यंत दक्षता ठेवण्यांत येत आहे. मौर्य, शुंग, काण्व, आंध्र, कुशान, कनिष्क, क्षत्रप, हूण, हर्ष, शाही, चव्हाण, राष्ट्रकूट, चालुक्य, भोज, कलचुरी, परमार वगैरे सर्व प्रान्तांतील राजघराण्यांतील लोकांची पद्धतशीर माहिती या ग्रंथांत पाहावयास मिळेल. तसेंच विजयानगर, दिल्ली, मराहाष्ट्र व पंजाब येथें

उदयास आलेल्या लोकांची सविस्तर व साधार माहिती या ग्रंथांत नमूद होईल. याशिवाय वाङमय, कलाकौशल्य आणि सांप्रदाय इकडेही विशेष लक्ष दिलें जात आहे. या क्षेत्रांतीलहि ग्रंथकार,शास्त्रकार, कवि, शिल्पी, कलाविशारद, सांप्रदायप्रवर्तक आणि आचार्य यांच्या माहितीचा शोधपूर्वक संग्रह या ग्रंथांत आढळल. उपलब्ध माहितीचा संगतवार संग्रह आणि आवश्यक तेवढें संशोधन करून वैशिष्टचहि दिग्दर्शित करण्याचा उद्देश आहे. भरपूर सूच्या, नकाशे, वंश वगैरे देऊन ग्रंथ उपयुक्त करण्याची पराकाष्ठा करण्यांत येत आहे. याकरितां शिलालेख, ताम्रपट, समकालीन कागदपत्रें वगैरे सारख्या विश्वसनीय साधनसामुग्रीचा आणि विश्वसनीय ग्रंथांचा उपयोग आहेच. शिवाय आख्यायिका, चालीरीति, कुलदैवतें आणि गुरुपरंपरा यांचाहि अत्यंत उपयोग आहे. या सर्व दृष्टीनें माहिती एकत्र करून विभागशः संग्रहित करण्याचें काम सध्यां चालू आहे. हाहि ग्रंथ प्राचीन चरित्रकोशाएवढाच होईल. (पत्ता– ५८ शनिवार, अमृतेश्वर देऊळ पुणें २.)

मराठी वाङ्मयाचा इतिहास

ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नाशिक यांनीं या इतिहासाचा पहिला खंड (ज्ञानेश्वर नामदेवाचा काल) शके १८५४ च्या वैशाखांत छापून प्रसिद्ध केला. त्यांत १ वेदविद्या, २ उपनिषदांतील ब्रह्मविद्या, ३ भगवद्गीता, ४ श्रीमद्भागवत, ५ भक्ति मार्गाचें अनादित्व व शिव विष्णु संप्रदाय, ६ मध्यकाळाचा थोडासा इतिहास, ७ तामीळांचें साम्राज्य; तामीळ संत व तामीळ आचार्य, ८ महाराष्ट्री ऊर्फ मराठी भाषा , १० आदि कवि मुकुंदराज, ११ महानुभाव पंथाचें मराठी वाङमय, १२ नाथपरंपरा,१३ श्रीज्ञानेश्वर दर्शन, १४ भक्त नामदेव (पूर्वार्ध), १५ संत मेळा व त्याचें अभंग वाङमय,१६ ज्ञानेश्वरीचें अंतरंग, १७ ज्ञानेश्वरी सृष्टि, १८ भक्त नामदेव हीं प्रकरणें आलीं आहेत. याच्या पुढील खंडाची योजना सिद्ध आहे. एकनाथ–तुकारामांचा काल हा दुसरा खंड होणार आहे. नामदेवाचें प्रयाण शके १२७२ मध्यें झालें. तेथपासून तों तुकोबारायांच्या प्रयाणापर्यंतच्या म्हणजे शके १५७२ पर्यंतच्या तीनशें वर्षांच्या कालाचा मराठी वाङमयाचा इतिहास या दुसऱ्या खंडांत यावयाचा आहे. १५ व्या व १६ व्या शतकांत वैष्णव धर्माची जी प्रचंड लाट भरतखंडभर उठली व पसरली तिचा इतिहास या भागांत यावयाचा आहे. कबीर, रामानंद, तुळशीदास, सूरदास, मिराबाई, नरसी मेहता, कृष्णचैतन्य इत्यादि वैष्णव भक्तांच्या कामगिरीचें व वाङमयाचें स्वरूप हचा दुसऱ्या खंडांत व्यक्त होणार असून पुढें महाराष्ट्र संतकवींचें म्हणजे मुख्यतः एकनाथ व तुकाराम यांच्या वाङमयाचें विवरण विशेषेंकरून येईल. रामदास व रामदासी संप्रदायाचें वाङमय या विषयास तिसरा खंड दिला जाईल. पांच खंडांत मराठी वाङमयाचा संपूर्ण इतिहास द्यावयाचा आहे.

महाभारत संशोधन

(डॉ. सुखटणकर एम्. ए. पीएच्.डी. यांजकडून)

भाण्डारकर इन्स्टिटयूट, पुणें:—येथील महाभारत संशोधन–कामास आरंभ सर रा. गो. भांडारकर यांचे हस्तें ता. १ एप्रिल १९१९ रोजीं झाला. महाभारताच्या निरनिराळ्या पाठपरंपरा हस्तलिखित प्रतींतून मिळतात. त्यांत दाक्षिणात्य व औत्तराह या दोन प्रमुख असून बाकीच्या सर्व या दोहोंपैकीं एकींत समाविष्ट होतात. हल्लीं छापील पुस्तकांतून बहुतेक सर्वत्र प्रचलित असलेली नीलकंठाची पाठपरंपरा कालमानानें बरीच अलीकडील व दक्षिणोत्तर पाठांची बरीच भेसळ झालेली अशी आहे. आणि नीलकण्ठाच्या पूर्वीचे टीकाकार देवबोध, अर्जुनमिश्र वगैरेनीं स्वीकारलेला पाठ बराच शुद्ध दिसतो. तथापि टीकाकारांच्याहि पूर्वींच्या परंपरा दाखविणाऱ्या हस्तलिखित पोथ्या उपलब्ध झाल्यामुळें या सर्वांचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करून महाभारताची शक्य तों जास्तींत जास्त **जुनी पाठपरंपरा शोधून काढणें हें या कामाचें ध्येय होय.**

द्रव्यसाहच—या कामाला सुरवात करतांना प्रथमच औंध संस्थानचे सुविद्य अधिपति श्री. बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनीं एक लक्ष रु. ची देणगी कांही ठराविक वार्षिक हप्त्यांनीं देणेचें कबूल केलें. त्यानंतर मुंबई सरकार, हिंदुस्थानसरकार, मुंबई युनिव्हर्सिटी, बडोदा, म्हैसूर वगैरे निरनिराळ्या ठिकाणाहून द्रव्यसाहच मिळालें.

कामाची पद्धतः— गणपत कृष्णाजीची महाभारताची छापील प्रत प्रथम आधारास घेऊन तिच्यांतून प्रत्येक आखलेल्या कागदावर एक या प्रमाणें सर्व श्लोक लिहून काढून नंतर प्रत्येक हस्तलिखितांतील बारीकसारीक पाठभेद, दुरुस्त्या वगैरे सर्वांची नोंद त्या कागदांवर करावयाची. श्लोकाच्या बत्तीस अक्षरांचीं वेगवेगळीं कोष्टकें

करून त्यांत हे पाठभेद क्रमशः लिहिण्यांत येतात. अशा रीतीनें आजपर्यंत प्रत्येक पर्वास सरासरीनें १५ हस्तलिखितांची नोंद झाली आहे. यांत शक्यतोंवर निरनिराळ्या परंपरा दर्शविणाऱ्या पोथ्या निवडण्याकडे विशेष लक्ष दिलें जातें. अशा रीतीनें काश्मीरी, नेपाळी, मैथिली, बंगाली व देवनागरी या उत्तरेकडील व तेलगू व मल्याळी ग्रंथ या दक्षिणेकडील परंपरांची नोंद होत आली आहे.

पुरेशा हस्तलिखितांची नोंद होऊन शक्य त्या बहुतेक पाठपरंपरांचा समावेश झाला, असें झालें म्हणजे मग तें सर्व साहित्य संपादकांपुढें जातें, व ते सर्व परंपरांचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करून श्लोकाचा पाठ ठरवितात. एखादा पाठ संपादकाला संशयित वाटल्यास त्याखालीं नागमोडी ओळ काढतात आणि बाकीचे नोंदले गलेले पाठ हस्तलिखितांच्या वर्गवारीप्रमाणें व्यवस्थेनें श्लोकांखालीं लिहिले जातात. मूळ पाठांत न घेतलेले श्लोक किंवा श्लोकार्धें खालच्या पाठभेदांतून किंवा पुरवणी म्हणून देतात. आशा रीतीनें मूळ श्लोक व त्याखालीं इतर सर्व पाठ या संशोधित आवृत्तीचें स्वरूप आहे.

प्रकाशनः––प्रथम चांचणीसाठीं म्हणून विराटपर्वाची एक आवृत्ति श्री. उटगीकर यांचे संपादकत्वाखालीं निघाली. त्यानंतर १९२७ सालापासून मुख्य आवृत्ति-प्रकाशन डॉ. वि. सी. सुखटणकर यांचे संपादकत्वाखालीं सुरूं होऊन चालूं सालीं आदिपर्व समाप्त झालें आहे. निरनिराळ्या प्रसंगास अनुरूप अशीं रंगीत चित्रें श्री. पंतप्रतिनिधी यांच्या देखरेखीखालीं तयार झालेलीं या आवृत्तींत घालण्यांत आलीं आहेत.

महाराष्ट्र शब्दकोश (६ विभाग)
(रा. रा. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए. यांजकडून आलेली माहिती.)

आरंभ–इ. स. १९१६ ते १९२८ हीं बारा वर्षें ज्या प्रचंड कामाला लागलीं तें २३ भागांत पुरें झालेलें महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें अपूर्व काम जेव्हां तडीस लागलें, तेव्हां पूर्व योजनेप्रमाणें, संपादक वर्गांपैकीं श्री. यशवंत रामकृष्ण दाते, श्री. चिंतामण गणेश कर्वे, श्री. आबा चांदोरकर व वे. शा. सं. चिंतामण शंकर दातार यांनीं हें महाराष्ट्र शब्दकोशाचें ज्ञानकोशाइतकेंच अवघड काम हातीं घेतलें.

प्रचारस्थळें:––मराठी बोलणारे लोक हिंदुस्थानांत सर्वत्र पसरल्यामुळें त्या त्या बहुतेक सर्व ठिकाणीं मंडळानें प्रचार केला आहे व करीत आहे. हिंदुस्थानाबाहेरही पत्रव्यवहारानें महाराष्ट्रीयांस या राष्ट्रीय कार्याची जाणीव करून दिली आहे. प्रचाराच्या अनुषंगानें महाराष्ट्र एकीकरणाच्या कामीं मंडळाला बऱ्याच गोष्टी करतां आल्या व पुढें मागें महाराष्ट्रास त्याचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं. पुढें दिलेल्या शाखा–साहाय्यक संस्थांच्या यादीवरून यांचें कांहीं प्रत्यंतर येईल. विदर्भ साहित्य संघ, उमरावती (वऱ्हाडी भाषा); साहित्यसेवक मंडळ, पणजी–गोवें (गोमंतकी); शारदाश्रम, यवतमाळ (महानुभावी); कर्नाटक महाराष्ट्र मंडळ, धारवाड (कर्नाटकी); बोधमाला कार्यालय, फलटण (माणदेशी); वाङमय चर्चामंडळ, बेळगांव (कानडी); शारदोपासक मंडळ, मालवण (कुडाळी व कोंकणी); हेटकरी भंडारी मंडळ, दादर, (नाविक, कोळी); साहित्यसेवा मंडळ, कऱ्हाड (बायकी व संकीर्ण); महाराष्ट्र वाङमय मंडळ, हैद्राबाद (आंध्र मराठी); इ. इ.यांखेरीज निरनिराळ्या क्षेत्रांतील–उदा० बनारसी,तंजावरी, गुजराथी, हिंदी, इ. –शब्दासाठीं इतर अनेक व्यक्तींची मदत घेतली आहे.

शब्दविभाग––आतां कोशाची व्याप्ति, वाङमय,बोली, शास्त्रें व उद्योगधंदे आणि सर्व व्यवहार यांतील एकूण एक शब्दांपर्यंत पोंचत असल्यानें शब्द निवडण्यासाठीं खालील विभाग पाडावे लागले––१ शिलालेख वाङमय, २ महानुभावी, ३मुकुंद–ज्ञानेश्वर, ४एकनाथ–मुक्तेश्वर, ५ रामदासी परंपरा; ६ अभंग व स्फुट काव्य, ७ आर्यावाङमय, ८ शाहिरी वाङमय, ९ ऐतिहासिक, १० निबंधमालाकालीन गद्य, ११ आधुनिक काव्य १२ नाटच–नृत्य; १३ साहित्य (अलंकार); १४ परीक्षणात्मक, १५ निबंधात्मक; १६ वृत्तपत्रीय वाङमय, १७ शास्त्रीय (परिभाषा) वाङमय, १८ प्रांतिक भाषा (बोली), १९बायकी (व्यवहारांतले शब्द)! २०कारागीर वर्गाचें वाङमय इ.

यांपैकीं ग्रंथांचें वाचन करून शब्द निवडण्याचें काम बहुतेक कचेरींत संपादकांनींच उरकलें. सुमारें ७०० ग्रंथ वाचले असतील. प्रांतिक बोलींतील (उदा०–गोमंतकी, वऱ्हाडी, कोंकणी इ.) शब्द मात्र बहुतेक साहाय्यकांकडून आले. सुतार, सोनार, कासार, चांभार, यांसारख्या शेंकडों धंदेवाईकांच्या व्यवहारांतील शब्द जमविण्यासाठीं कचेरींतील पगारी नोकर त्यांकडे पाठवून कांहीं शब्द मिळविले. सर्वच जुन्यानव्या धंद्या-

तील शब्दसागर मंथन करणें केव्हांही अशक्यच आहे. तथापि शक्य तों वरील बरेचसे विभाग थोड्याफार प्रमाणानें आटोपल्यासारखेंच आहेत.

शब्दसंख्याः—एक शब्दाला एक कार्ड व त्या कार्डावर—१ शब्द; २ व्याकरण; ३ भाषा; ४ व्युत्पत्ति; ५ वाक्य; ६ आधार; ७ अर्थ; ८ लेखक व ९ परीक्षक इतकीं सदरें. हीं कार्डें सर्व जमलेल्या शब्दांचीं तयार केलीं. त्यांची संख्या सुमारें पांच लाख भरेल. मग तीं सर्व अकार-विल्हयानें लाविलीं व त्यांवर शब्द तपासणीच्या पुढील क्रिया सुरूं केल्या. शब्दाचे एकाहून अधिक अर्थ क्रमानें देऊन त्यांच्या स्पष्टीकरणासाठीं ग्रंथांतून सुंदर सुबोध उदाहरणें देण्यांत आलीं. शब्दार्थ ठरवितांना अनेक भाषांची, ठिकाणची व ग्रंथांची मदत घेणें भाग होतें. उदाहरणांचे आधार बरोबर देतांना मूळ ग्रंथ बारीक रीतीनें पाहावे लागले व शेवटीं व्युत्पत्ति देतांना तर सर्व भाषाभ्यास व संशोधन खर्ची पडलें.

व्युत्पत्ति विचारः—मागील कोशांतून व्युत्पत्ति देण्यांत कांहीं विशेष आहे असें मानण्यांत येत नव्हतें. पण आज कोशशास्त्राची इतकी प्रगति झाली आहे कीं, शब्दांचा भाषाशास्त्रदृष्ट्या तौलनिक अभ्यास करून मग कोशांत त्यांची मांडणी करावी लागते. तेव्हां या कोशासाठीं प्रथम 'व्युत्पत्ति–चर्चा–मंडळ' स्थापलें व नंतर तौलनिक आणि व्यापक अभ्यासासाठीं 'पुणें भाषा-शास्त्रमंडळ' बनविलें. प्रि. वै. का. राजवाडे, श्री. वि. रा. शिंदे; श्री. कृ. पां. कुळकर्णी; श्री. गो. कृ. मोडक; डॉ. सुखटणकर; कोशसंपादक व इतर कांहीं विद्वान् मंडळी या व्युत्पत्तिमंडळांत भाग घेतात. या मंडळामुळें मराठी शब्दाची व्युत्पत्ति शोधण्याची दृष्टि संपादक वर्गाला नवीन आली. या कामासाठीं अनेक भारतीय आणि भारतीयेतर भाषांचे कोश आणि व्याकरणें मंडळाच्या संग्रहीं आहेत. कोशाला नवीन वळण म्हणजे हा व्युत्पत्ति भागच म्हणतां येईल.

प्रगतिः—थोड्या मंडळींनीं थोड्या भांडवलावर अशा व्यापक दृष्टीनें १९३२ सालपर्यंत शब्दसंग्रहाचें व परीक्षणाचें काम करून या सालीं कोशाचा पहिला भाग छापण्यास आरंभ केला. प्रथम शब्दरचना, व्याकरण, अक्षरभेद इ. संबंधीं सर्वांच्या सूचना मागवून मग ठराविक पद्धत अंमलांत आणिली. सप्टेंबर अखेर सुमारें सव्वा पांचशें पानांचा अ ते ऐ अक्षरापावेतों पहिला भाग तयार झाला. या भागास 'कोशरचनाशास्त्र व कोशवाङमय' ही सुमारें ५० पानांची संशोधन निबंधवजा प्रस्तावना जोडली आहे. पुढील ५ भागांसही खालील प्रस्तावना अनुक्रमें देण्याचा विचार आहेः १ भाषाशास्त्र व जगांतील भाषा; २ महाराष्ट्र, मराठी भाषा आणि जनता; ३ मराठी भाषेची घटना; ४ मराठी वाङमयाचा, इतिहास, ५ महाराष्ट्र शब्दकोशाचें समालोचन. पुढील पांच भाग आणखी तीन वर्षांत प्रसिद्ध होतील.

कोशाचें महत्त्वः—हा ३००० पानांत रचला जाणारा मराठी–मराठी कोश हिंदुस्थानांतील सर्व भाषांतील वाङमयांत ज्ञानकोशाप्रमाणेंच अद्वितीय व राष्ट्र-ललामभूत म्हणतां येईल. कारण ८० वर्षांत पुरा झालेल्या जगांतील पहिल्याच प्रचंड 'न्यू ऑक्सफोर्ड डिक्शनरी' या दहा भागांच्या कोशाप्रमाणेंच याची रचना असून शब्देतिहासावर त्या कोशाप्रमाणेंच यांतहि भर दिली आहे. आज सर्वांत मोठा मराठी कोश म्हणजे मोल-स्वर्थचा मराठी–इंग्रजी कोश होय. ही १८३१ सालीं निघालेल्या त्या कोशाची १८५७ ची दुसरी आवृत्ति होय. यांत सुमारें ६०००० शब्द आहेत, व याच्या तोडीचा मोठा दुसरा मराठी कोश अद्याप निघाला नाहीं. पण यांत बरेच दोष राहून गेले आहेत. व मुख्यतः इंग्रज माणसासाठीं म्हणून हा जो रचला आहे तें त्याचें स्वरूप पार बदलून व दुप्पट भर घालून सर्व आधुनिक शास्त्रीय पद्धतींनीं तयार केलेला हा महाराष्ट्र शब्द–कोश राष्ट्रीय म्हणतां येईल. मराठी भाषा आणि वाङ-मय यांची वाढ होण्याला याची मदत होईल. शिष्ट–अशिष्ट मराठी असा राष्ट्रैकीकरणास अनिष्ट असा भेद यामुळें राहाणार नाहीं. सर्वच बोली भाषासाम्राज्याला पोषक असून त्यांना शिष्टमान्यता दिल्यानें भाषा उत्कर्ष पावते व जागतिक भाषांमध्यें तिला स्थान मिळतें. या दृष्टीनें प्रस्तुत कोशाचें फार महत्त्व वाटेल. यांत सुमारें एक लाख मराठी शब्द म्हणून अंतर्भूत होतील. पुन्हां असा व्यापक कोश निदान ५० वर्षें तरी निघूं शकणार नाहीं.

पुणें भाषाशास्त्र मण्डळ

महाराष्ट्रशब्दकोश रचतांना व्युत्पत्तीच्या कामीं मदत करण्यासाठीं याच शब्दकोश मंडळाच्या अंतर्भूत असलेलें जें 'व्युत्पत्तिचर्चामंडळ' त्याची व्याप्ति वाढवून १९२९ सालअखेर हें मंडळ स्थापण्यांत आलें.

उद्देशः—१ भारतीयांत भाषाशास्त्राच्या तौलनिक विवेचनात्मक अभ्यासाचा आरंभ करून देऊन त्याला चालना देणें. २ भाषाशास्त्राच्या संशोधनाला उत्तेजन देणें. ३ भाषाशास्त्रीय नियतकालिक चालविणें. ४ भाषाशास्त्रीय प्रश्नासंबंधीं ग्रंथ प्रसिद्ध करणें. ५ भाषा शास्त्रीय ग्रंथालय चालविणें.

साधनें—१ व्याख्यानमाला; २ नियतकालिकांतून निबंध लिहिणें; ३ भाषाशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं वर्ग काढणें; ४ चर्चा सभा करणें.

प्रगति—या मंडळानें भाषा शास्त्रीय विषयावर कांहीं चर्चासभा करविल्या व व्याख्यानेंहि घडवून आणलीं. श्री. वि. रा. शिंदे हे १९३० सालीं गुजराथेंत गेल्यावेळीं त्यांनीं बडोदे व अहमदाबाद येथें या संबंधीं कांहीं व्याख्यानें दिलीं व गुजराथी विद्वानांत जागृति केली. विशेष महत्त्वाचा उल्लेख श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनीं एम्. ए. च्या विद्यार्थ्यांसाठीं जी व्याख्यानमाला गुंफिली त्याचा करणें जरूर आहे. सुमारें ५।६ महिने ही माला चालू असून त्याचा विद्यार्थ्यांना फार उपयोग झाला. हीं व्याख्यानें प्रसिद्धही झालीं होतीं.

पुढील कार्याची आंखणीः— निरनिराळ्या भाषापंडितांचे निरनिराळ्या भाषांचे वर्ग काढून ठराविक काळांत त्या त्या भाषांचें स्थूल ज्ञान श्रोत्यांना होईल असें करण्याचा मंडळाचा विचार आहे. पुण्यांत जर्मन, फ्रेंच, फारसी, कानडी, तेलगू इ. भाषांचे पंडित मिळूं शकतील; तसेंच भाषाशास्त्रासाठीं हें मंडळ मुंबई विश्वविद्यालयाला जोडून एम्. ए. च्या विद्यार्थ्यांची सोय करावी असा बेत आहे.

शास्त्रीय उद्योग—शिक्षण संस्था

(संचालक—मो. शंकर मुळे एम्. ए. उद्योग—रसायन संशोधक अहमदनगर यांजकडून आलेली माहिती)

"रानडे इंडस्ट्रिअल अँड एकॉनामिक इन्स्टिटयूट"मध्यें केलेल्या रासायनिक संशोधनाचा, त्याचप्रमाणें ओगले बंधूंच्या काच कारखान्यासंबंधीं आणि किर्लोस्कर बंधूंच्या लोखंडी कारखान्यासंबंधीं आणि औंध संस्थानमधील 'रसायन उद्योगसंस्थे'मध्यें प्रमुख रसायन संशोधक म्हणून गेलीं १८ वर्षे केलेल्या संशोधनाचा उपयोग मुक्त अंतःकरणानें आणि व्यावहारिक दृष्टीनें विद्यार्थ्यांना द्यावा या हेतूनें अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्यें एक शास्त्रीय उद्योगधंद्याचा वर्ग १९३१ च्या जूनमध्यें सुरू केला. प्रस्तुतचें आर्थिकदृष्ट्या व इतर दृष्टींनींहि अति बिकट होत चाललेल्या परिस्थितीमध्यें या व्यवहार्य शास्त्रीय ज्ञानाची योगक्षेमासाठीं अत्यंत आवश्यकता आहे. अल्पारंभ आहे; परंतु विद्यार्थ्यांची एतद्विषयक जाणीव, औत्सुक्य आणि उत्साह अवर्णनीय आहे. हें शास्त्रीय औद्योगिक शिक्षण घेण्यास विद्यार्थी—विद्यार्थिनींची गर्दी, उसळली. सुगृहिणींनींही इतकीच तीव्र ज्ञानलालसा दाखविली. जागा आणि वेळही पुरेनासा झाला. तेव्हां केवळ कार्यक्षमतेकडे लक्ष देऊन कर्तृत्वसामर्थ्याप्रमाणें उद्योगार्थींची निवड केली. ४० विद्यार्थी निवडले. सुगृहिणींची वेगळी दुसरीकडे सोय केली. योग्य शिक्षणक्रम तयार केला. शिक्षणक्रम तीन निरनिराळ्या शाखांमधून विभागला. दोन शाखांमधून व्यवहार्य कार्यही सुरू झालें. आठवड्यांतून दोन तास याप्रमाणें शिक्षण देण्यांत येतें. पहिल्या विभागामध्यें पुढें दिलेल्या विषयांचा समावेश होतो.

(१) प्रास्ताविक रसायनशास्त्र, (२) साबण, (३) साबूकरण, (४) साबू मूलद्रव्यें—कृति. (५) वनस्पतिज्—प्राणिज तेलें—चरबी, गुणधर्म. (६) सोडा, पोटॅश, चुना, अमोनिया, स्वरूप गुणधर्म. (७) इतर उपकारक द्रव्यें. (८) लहान साबणाचा कारखाना. यंत्रसामुग्री साधनें. (९) साबूकरण पद्धति—प्रमाणें. (१०) नानाविध नाना कार्योपयोगी साबण. (११) साबूयुक्त अंगराग द्रव्यें. गुणधर्म कृति. हा दोन वर्षांचा शिक्षणक्रम.

दुसऱ्या विभागामध्यें पुढील विषयांचा समावेश होतोः—

(१) प्रास्ताविक रसायनशास्त्र, (२) बिनधोक काड्या, (३) आगकाडी मूलद्रव्यें, गुणधर्म कृति. (४) कार्डबोर्डाच्या आगकाड्या पेटचांचा लहान कारखाना. (५) यंत्रसामुग्री साधनें (६) पद्धतिप्रमाणें नाना क्रिया. (७) नानाविध नाना कार्योपयोगी बिनधोक काड्या. (८) धंद्यासंबंधीं उपयुक्त माहिती. सुसंरक्षण सूचना.

तिसऱ्या विभागामध्यें विद्युद्धातूकरणाचा (इलेक्ट्रोप्लेटिंगचा) शिक्षणक्रम समाविष्ट करण्यांत आला आहे. शिक्षणक्रम एक वर्षाचा आहे. अवश्य तेवढ्या सर्व विषयांचा समावेश होणार आहे. सध्यांचे विद्युद्युगामध्यें "विद्युद्धातूकरण" हा एक लहान प्रमाणावर करतां येण्यासारखा विद्यार्थ्यांना बहुमोल असा धंदा आहे.

पुणें शिक्षण प्रसारक मण्डळीची नवी योजना

उद्योगमंदीर

उद्योगमंदिराची म्हणजे टेक्निकल शिक्षण देणाऱ्या शाळेची समाजास वाटत असलेली जरूरी आतां नव्यानें प्रस्थापित करावयास नको आहे. शिक्षणक्षेत्रांत प्रत्यक्ष काम करणारे चालक व त्यांशीं कांहींसा दुरून परंतु जिव्हाळ्याचा संबंध येणारे पालक या उभयतांना अशा औद्योगिक शिक्षणाच्या सोयीची नुसती जरूरीच भासत नाहीं, तर प्रत्यक्ष उणीवच भासते. तशी उणीव भरून काढण्याकरितां आमचें मंडळ यथाशक्ति प्रयत्न करूं इच्छितें. या औद्योगिक शिक्षणाचा व्याप व विविधता इतकी मोठी आहे कीं, अगदीं सुरुवातीससुद्धां लक्षावधि रुपये खर्च करून काढलेली एकादी शाळासुद्धां त्या शिक्षणाची गरज पुरेशी उरकूं शकेलच असें नाहीं. इतका मोठा प्रयत्न सुरुवातीसही अंगावर घेण्यास जरूर असणारी सहानुभूति आमच्या शाळेबद्दल समाजांत आहे अशी मंडळास खात्री वाटत असली तरी प्रत्यक्ष अनुभवाचे टप्पे घेतघेतच अशा नव्या संस्थेचा विस्तार होण्यांतच तिची उपयुक्तता अधिक होते अशी मंडळाची समजूत असल्यानें सुरुवातीस इतका मोठा विस्तार न मांडतां अल्पसा आरंभ करण्याचें ठरवून मंडळानें कांहीं निधी जमविण्याचें काम सुरूं केलें आहे.

योजनेची रूपरेषा

मंडळानें या कामीं अशा प्रकारच्या कांहीं शिक्षणसंस्था पाहून व कित्येक अनुभवी गृहस्थांशीं विचारविनिमय करून एक योजना तयार केली आहे.

(अ) असें उद्योगमंदीर ही स्वतंत्र संस्था असावी. (आ) या शाळेंत येणाऱ्या विद्यार्थ्याचें वय १४ पेक्षां कमी नसावें व १८ पेक्षां अधिक नसावें. त्याचें शिक्षण इंग्रजी चौथी पास झाल्याइतकें असावें. (इ) विद्यार्थ्याचा शिक्षणक्रम एकंदर चार वर्षांचा असेल. पैकीं पहिलीं दोन वर्षें सर्वसाधारण शिक्षण म्हणून लोहारी, सुतारी, ड्रॉइंग, गणित, इंग्रजी वगैरे विषय शिकविण्यांत येतील व मग पुढचे २ वर्षांत त्याचे आवडीप्रमाणें त्या त्या शाखेंत अधिक अभ्यास करून त्यास व्यवहार्य असें प्रावीण्य मिळवितां येईल. तूर्त योजिलेले अभ्यासक्रमः——

(१) सुतारी कॅबिनेट व पॅटर्न मेकर, (२) घराचे कामांतील सुतारकाम, स्मिथी (३) मेकॅनिक (४) फेब्रिकेटेड स्टीलमेकर (५) मोटार मेकॅनिक (६) प्लंबर आणि फिटर (७) इलेक्ट्रिक वायरमन.

या शाखेंतील विद्यार्थ्यानें मॅट्रिक्युलेशन परीक्षेस बसून त्या बाजूचे शिक्षणक्रमाची कल्पना सोडून इकडे यावें.

सुरवातीस फी पहिले वर्षीं मासिक ३ रु. दुसरे वर्षीं ५ रु. व पुढचे २ वर्षांस ६।७ रुपये तरी ठेवावी लागेल.याप्रमाणें तूर्त स्वरूप आखलें आहे.

स्वावलंबी बनण्यास विद्यार्थ्यानें बुद्धिशिक्षणाबरोबरच धंदेशिक्षण अगर कारागिरीचें शिक्षण घेणें जरूर आहे. खरा कारागीर प्रामाणिक,कुशल, जिज्ञासु व महत्त्वाकांक्षी असणें अवश्य आहे. अशाच कारागिरांच्या हातून देशांतील उद्योगधंद्याची वाढ व जोपासना होणें शक्य आहे.

१ या शिक्षणक्रमास साधारणपणें इंग्रजी पांचवीचा अभ्यास पुरा झाल्यावर सुरुवात करावी.

२ विद्यार्थ्याची शरीरयष्टि ठीक असावी.

३ विद्यार्थ्याची दृष्टि मॅट्रिककडे नसावी म्हणजे हायस्कूलमधील वर्गाहून या मुलांचा वर्ग भिन्न असावा.

४ साधारणपणें खालील धंद्यांचें शिक्षण देतां येईल:—

सुतारी——घरें बांधणें, लाकडी सामान तयार करणें, पॅटर्न तयार करणें, वगैरे.

लोहारी——फिटरचें काम, घरगुती वा यांत्रिक. टिनमेकरचें काम——कल्हई लावणें वगैरे. इलेक्ट्रिक वायरमनचें काम; शिंपीकाम; मोटारचें काम (यांत सायकलचें काम येतेंच); गवंडी व पाथरवट; रंगारी काम; बेकरी व कन्फेक्शनरी कांहीं रासायनिक उद्योगधंदे वगैरे. वरील धंद्यांपैकीं बहुतेकासाठीं पूर्वतयारीचा म्हणून दोन वर्षांचा शिक्षणक्रम पुढील वर्षापासूनहि सुरु करतां यईल. या दोन वर्षांत ड्रॉइंग, सुतारी, लाकुडज्ञान, गणित, लोहारी व इंग्रजी शिकवावें.

५ सर्व शिक्षण मराठींतून दिलें जावें.

६ दोन वर्षांचा हा पूर्वतयारीचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर मग पुढें दोन वर्षें विद्यार्थ्यानें फक्त एकाच धंद्यांत प्रावीण्य मिळविण्यासाठीं म्हणून शिक्षण घ्यावें.

सेक्स इन्स्टिटयूट, कर्जत (कुलाबा)

(रा. गजानन रघुनाथ मुळे यांजकडून आलेली माहिती)

सेक्स इन्स्टिटयूट ही संस्था कर्जत येथें रा. गजानन रघुनाथ मुळें यांनीं स्थापन केली आहे. 'काम' या पुरुषार्थावरील संस्कृत भाषेंतील सु-

प्रसिद्ध व अभिजात असा "वात्स्यायन कामसूत्रम्" हा ग्रंथ मूळासह मराठी भाषेंत हल्लीं छापीत असून मराठी वाचकांना लवकरच पांच सहा महिन्यांत "वात्स्यायन कामसूत्रम्" हा ग्रंथ वाचावयास मिळून लैंगिक शास्त्रांतहि आपल्या पूर्वजांनीं किती प्रगति केली होती हें उत्तम तऱ्हेनें दिसून येईल. ह्या पुस्तकप्रकाशनाच्या व्यवसायाबरोबरच कांहीं शोध व तत्संबंधीं प्रयोग हे रा. मुळे यांनीं चालूच ठेवले आहेत. त्या कार्यासाठींच "सेक्स इन्स्टिटयूट" ही संस्था त्यांनीं स्वतःच्या उत्पन्नांतून स्थापन केली. पाश्चिमात्यांच्या ज्ञानाचा दिमाख व छाया आपल्या शोधावर व प्रयोगावर पडूं नये म्हणून त्यांचा सर्वस्वी भर पौर्वात्य ज्ञानावरच आहे. त्यांच्या शोधांची व प्रयोगांची कल्पना अशी आहे कीं,कांहीं प्राण्यांमध्यें व वनस्पतीय झाडांमध्यें शेंकडों वर्षे जगण्याचें सामर्थ्य असतें. तसेंच त्यांचें हें दीर्घकालीन जगणें निरोगीहि असतें. कांहीं प्राण्यांकडे व वनस्पतीय झाडांकडे मनुष्यानें पाहिलें असतां निराशा, दुःख हीं जाऊन उल्हास व सुख वाटत असतें. इतकी त्यांत आकर्षकता उत्पन्न झालेली असते. ज्या जीवनरसाच्या जोरावर प्राण्यांची अगर वनस्पतीय झाडांची आकर्षकता अगर दीर्घकालीन आयुष्य प्राप्त होत असतें, तो "जीवनरस" कोणता? त्या जीवनरसाचा मनुष्यप्राण्याला कसा उपयोग करून घेतां येईल, कीं जेणेंकरून मनुष्याला शंभर वर्षे निदान दीर्घकाल जगतां येऊन त्या आयुष्याचा निर्वेध उपभोग घेतां येईल? तसेंच बहुतेक तरुणवर्ग तारुण्यांतच आपल्या अमोलिक पौरुषत्वाला मुकून सदोदित दुःखीकष्टी असा निस्तेज चेहरा, कोणत्याहि कामाला हुरूप नाहीं, सदोदित त्याचे निराशेचे उद्गार अशी परिस्थिति प्राप्त करून घेऊन ते तरुण व त्यांनीं उत्पन्न केलेली निस्तेज व निरुपयोगी प्रजा राष्ट्राला पोषक होण्याऐवजीं राष्ट्राला विनाकारण भारभूत मात्र होत असते. ही त्यांची परिस्थिति बदलून प्रयोगांतीं शोधून काढलेल्या "जीवनरसाच्या जोरावर गमावलेलें पौरुषत्त्व परत मिळवून "लाथ मारूं तेथें पाणी काढूं" अशी कर्तृत्वशक्ति उत्पन्न करून राष्ट्राला पोषक अशी ती कशी होईल याबद्दल प्रयोग ते करीत आहेत. एकाच भूमींतून उसाला गोडी, मिरचीला तिखटपणा, कारल्याला कडूपणा असे निरनिराळे जीवनरस प्राप्त होतात. मग ज्या जीवनरसासाठीं मीं शोध व प्रयोग चालविले आहेत तो जीवनरस या अफाट जगांत मला कां मिळणार नाहीं? या विचारशक्तीच्या जोरावर अनेक संकटें व निराशेचें वातावरण अनेक वेळां उत्पन्न झालें असतांना शोध व प्रयोग चालूच ठेऊन अखेरीस तो जीवनरस रा. मुळे यांनीं शोधून काढला आहे. आतां त्या जीवनरसावर कोणकोणत्या क्रिया अगर संस्कार केले असतां त्यांतील दोष जाऊन तो संस्कार पूर्ण जीवनरस मनुष्यप्राण्याला दिला असतां गुणाला तंतोतंत उतरेल, ह्याबद्दलचे प्रयोग चालू आहेत. या प्रयोगाबद्दल अगर शोधाबद्दल रा. मुळे यांनीं गाजावाजा न करितां अजून गुप्तता राखिली आहे.

श्रीछत्रपति संभाजी चरित्र-कार्यालय, लिमिटेड:—(रा. गिरिधर भिवाजी नरे यांजकडून आलेली माहिती)—स्थापना-चैत्र शु. १ शके १८५३, राजशक २५८, ता. ६ एप्रिल १९३२ रोजीं श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. उद्देश—(१) श्रीछत्रपति संभाजी महाराज व श्रीछत्रपति राजाराम महाराज यांच्या चरित्रांचीं साधनें मिळवून तीं प्रस्तावना व टीपांसह प्रसिद्ध करणें. (२) श्रीसंभाजी व राजाराम महाराज यांच्या कालीं लिहिले गेलेले किंवा त्या कालावर लिहिलेले ग्रंथ प्रकाशित करणें. (३) श्रीसंभाजी व राजाराम यांचीं चरित्रें तयार करून तीं प्रसिद्ध करणें. श्रीसंभाजी महाराजांच्या चरित्राचीं साधनेंच इतकीं आहेत कीं, त्यांचीं क्राऊन आकाराचीं सुमारें आठदहा हजार छापील पृष्ठें होतील असा अंदाज आहे. एकंदरींत काम मोठें आहे.

श्रीशिवचरित्र कार्यालय, पुणें:—शिवकालीन इतिहासाच्या संबंधीं जगतांत जेथें जेथें व ज्या ज्या भाषेंत साधनसामग्री मिळण्यासारखी असेल ती आणवून छापविणें व तिचा शास्त्रीय पद्धतीनें उपयोग करून शिवाजी महाराजांचें एक संपूर्ण व सांगोपांग चरित्र लिहून प्रसिद्ध करणें, हा उद्देश पुढें ठेवून कार्यालयाचें काम भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सहकार्यानें आरंभिलें. इ. स. १६३० च्या मार्च महिन्यांत नवीन जन्मतिथीप्रमाणें त्रिशतसांवत्सरिक जन्मदिन महोत्सव साजरा करण्यांत आल्यावेळीं कार्यालयानें स्वतःचे पांच महत्त्वाचे ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यांत दोन खंड सर्व भाषेंतील उपलब्ध असलेल्या समकालीन पत्राचे मराठींत सारांश,एक खंड चरित्रावर चर्चात्मक निबंध व दोन खंड शिवकालीन

व्यक्ति व इतर महत्वाचे प्रसंग यावद्दल वर्णनें असे होते. पुढच्या जन्मतिथीला इंग्रजी भाषेतील अस्सल पत्रव्यवहार समूळ छापला. यापुढें शिवकालीन वृत्तसारसंग्रह, चित्रमय शिवाजी, हे पूर्वसंकल्पित ग्रंथ व फारसी, डच, पोर्तुगीज, फरेंच आदिकरून पाश्चात्य व मराठी, संस्कृत वगैरे नवीन उपलब्ध होणारा पत्रव्यवहार, बखरी, वृत्तांत, इत्यादि सर्व कांहीं साधार छापून प्रसिद्ध करावयाचे आहेत व शेवटीं संपूर्ण चरित्रहि प्रसिद्ध करावयाचें आहे. इतरत्र चालू असलेल्या पुष्कळ प्रयत्नांना एकसूत्रत्व येण्याच्या दृष्टीनेंहि सहकार्यानें कार्यालयामार्फत खटपट केली जात आहे.

कार्याला सुरुवात १९२९ च्या जानेवारीपासून झाली. द्रव्यसहाय्य रायगड स्मारक मंडळाकडून २५०० रुपये, इंदूर ग्रंथोत्तेजक मंडळ १०००, श्रीमंत तुकोजीराव होळकर १००० रु. व इतर संस्थानिक, आश्रयदाते वगैरे सहाय्यकांकडून भरपूर मिळालें. पुस्तकांची विक्रीही करण्यांत येते. यापुढें द्रव्यार्जन होईल त्याप्रमाणें पुढचे ग्रंथ प्रसिद्ध होतील. चिटणीस—श्री. नरसिंह चिंतामण केळकर, श्री. दत्तात्रय विष्णु आपटे; कार्यकर्ते-श्री. दिनकर विनायक काळे; कचेरी—३१२, सदाशिव पेठ, पुणें २.

श्रीसयाजी शासनशब्द कल्पतरु

(रा. रा . वि. स. वाकसकर यांजकडून आलेली माहिती)

१. सन १८७५ मध्यें श्रीमंत सयाजीराव महाराज हे बडोद्यास गायकवाडांच्या गादीवर विराजमान झाले. पुढें त्यांना विद्याभिवृद्धीचा अतिशय व्यास लागून सन १८८२ मध्येंच त्यांनीं बडोद्यास कॉलेजची स्थापना केली. गेल्या पन्नास साठ वर्षांच्या कालावधींत महाराजांनीं विद्येच्या प्रसारासाठीं अनेक प्रयत्न केले. युरोप वगैरे पाश्चात्य देशांतील अनेक प्रवासामुळें महाराजांच्या मार्मिक व तीक्ष्ण दृष्टीस विद्येचें महत्त्व पूर्णपणें बाणलें व आपल्या देशांतील जनता साक्षर झाल्याशिवाय जनतेस खऱ्या सुखाची प्राप्ति होणें शक्य नाहीं अशी त्यांच्या मनाची खात्री पटली. आजहि राज्याच्या एकंदर उत्पन्नांतून सरासरी चाळीस लक्ष रुपये फक्त शिक्षणाकडेच खर्च होतात. शाळेच्या इमारती, नोकरांचीं सेवान्तवेतनें, पाणी वगैरेसंबंधींचे कर इत्यादि अप्रत्यक्ष शिक्षणखर्चांचा समावेश वरील रकमेंत केलेला नाहीं. सारांश राज्याच्या उत्पन्नांतून पांचवा सहावा भाग सार्वत्रिक शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च होतो असें दिसतें.

२. एकराष्ट्रीयत्वाला एकभाषा फार आवश्यक आहे हा मुद्दा महाराजांच्या मनांत आरंभापासून आहे. अमूकच एक भाषा राष्ट्रीय भाषा असावी असा त्यांचा आग्रह नाहीं. सध्यांच्या प्रचलित भाषांचा विचार करून हिंदुस्थानांतील बहुजन समाजाला कांहीं विशेष अभ्यासाशिवाय हिंदी भाषा समजते या वस्तुस्थितीची जाणीव महाराजांना आहे. एकच भाषा सर्वांना समजण्यास कांहीं काळ अडचण पडेल, परंतु ती अडचण नंतर दूर होईल. कदाचित हा कांहीं काळ अधिकांत अधिक एक पिढीचाहि असू शकेल. परंतु राष्ट्रीय उन्नतीकडे व राष्ट्राच्या विशालत्वाकडे दृष्टि देऊन हा एक पिढीचा काळ म्हणजे फार मोठा आहे असें त्यांसहि वाटत नाहीं. एकभाषा प्रसाराचा हेतू मनांत धरून महाराजांनीं विज्ञानशास्त्रासंबंधीं एक वैज्ञानिक शब्दकोश पूर्वीच तयार करविला होता, यानंतर राज्यांतील न्यायखात्यांतून नेहमीं वापरण्यांत येणाऱ्या शब्दांचाहि संग्रह करविला. प्रस्तुत शासनशब्द—कल्पतरु हा कोश अशाच शब्दांचा आहे.

३. प्रथम बरेच शब्द एकत्र करून त्यांचें परीक्षण करण्यासाठीं सन १९२७ सालीं एक समिती नेमण्यांत आली होती. त्या समितीनें केलेल्या परीक्षणानंतर प्रस्तुतचा कोश तयार करण्यासाठीं ॲडव्होकेट श्री. धुरंधर यांच्या अध्यक्षतेखालीं गुजराथी, मराठी, बंगाली, हिंदी, ऊर्दू व फारशी या सहा भाषांसाठीं सहा तज्ज्ञांची नेमणूक करण्यांत आली. ऊर्दू व फारशी भाषांसाठीं दोन मुसलमान विद्वानच नेमले होते. डॉ. भट्टाचार्य यांनीं संस्कृत व बंगाली शब्द सुचविलेले आहेत. मात्र असे संस्कृत शब्द सुचवितांना स्मृति व चाणक्याचें अर्थशास्त्र या प्राचीन ग्रंथाचेंच साहाय्य घेणें अवश्य असल्यानें घेतलेलें आहे. कारण वुईल, ट्रस्ट, निगोशिएबल ईन्स्ट्रुमेंट अशा शब्दांतील कल्पना आपणांस अगदींच अपरिचित असल्यानें अर्थबोधक असे शब्द तयार करावे लागले.

४. प्रस्तुत कोशांत इंग्रजी शब्द प्रारंभीं देऊन त्याचा अर्थ त्याच्यापुढेंच १ गुजराथी, २ मराठी, ३ संस्कृत, ४ उर्दू, ५ पर्शियन, ६ हिंदी, ७ बंगाली अशा सात भाषांत देऊन नंतर पुढेंच प्रस्तुत गुजराथेंत प्रचलित शब्द कोणता आहे हेंहि दर्शविलें आहे. आणि शेवटीं सार्वत्रिक उपयोगाचे शब्द सुचविले आहेत. असे शब्द सुचवितांना संस्कृत शब्दाबरोबरच हल्लीं रूढ असलेले मुसलमानी

शब्दहि पसंत करून सुचविलेले आहेत. या सुचविलेल्या शब्दांचें मुख्य धोरण म्हणजे अर्थग्राही असा लहानसा शब्दच पसंत करणें हें ठेविलेलें सर्वत्र दिसतें.

५. अशा प्रकारचा हा ग्रंथ तयार झाला असल्यानें यापासून विशेषतः पुढील फायदे होतील असा अंदाज आहे. १ अनेक भाषांतील कायद्यांच्या शब्दांचा विस्तृत संग्रह एकत्र असणें, २ पृथक् पृथक् भाषेमध्यें कायद्यांतील शब्दांची योजना काय आहे ? ३ कोणत्या भाषेंतील शब्द उत्तम अर्थबोधक व सुटसुटीत आहेत? व ४ सर्वसामान्य शब्द कोणते? असे चार फायदे तर उघड उघड दृष्टीस पडतात. १ नामलिंगानुशासन, २ नाममाला, ३ अनेकार्थध्वनिमंजरी, ४ अभिधानरत्नमाला, ५ नानार्थ शब्दरत्न, ६ अनेकार्थकोश, ७ त्रिकांडशेष, ८ एकाक्षरकोश, ९ द्विरूपकोश, १० वर्णदर्शन, ११ हारावली, १२ मुक्तावली अथवा विश्वलोचन, १३ अभिधान चिंतामणि, १४ अनेकार्थसंग्रह, १५ निघंटुशेष, १६ देशी नाममाला, १७ मेदिनीकोश, १८ नानार्थार्णव संक्षेप, १९ मदनपाल निघंटु, २० एकाक्षर नाममाला, २१ विविक्त नामसंग्रह, २२ पारसिक प्रकाश, २३ शीघ्रबोध नाममाला, २४ मुग्ध बोधिनी, २५ द्विरूपध्वनिसंग्रह, २६ एकवर्णार्थ संग्रह, २७शब्दार्थरत्नावलि, २८ सुधा, २९ सारदोहन, ३० राजव्यवहारकोश, ३१ शब्दरत्नसमन्वय, ३२ शब्दार्थसंग्रह, ३३ पदमणिमंजरी, ३४ आदि निघंटु, ३५ वर्णप्रकाश, ३६ वैभाषिक. असे छत्तीस कोश इसवी सनाच्या पांचव्या शतकापासून आज पंधराशें वर्षांत झालेले प्रसिद्ध आहेत. मोंगली अमलांत अकबरानें सुद्धां असा एक कोश तयार करविला होता. सारांश भाषेच्या वृद्धीमुळें असे कोश करणें अवश्य होतें व तेंच महत्कार्य श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं आज केलें आहे ही फार आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.

हिंदुधर्मशास्त्र संशोधन व सुधारणा मंडळ

(रा.रा. नानासाहेब भोंडे, पुणें यांजकडून आलेली माहिती.)

प्राचीन हिंदुधर्मशास्त्राचा अभ्यास करणें, त्यांतील मूलभूत तत्त्व व हेतु हीं लक्षांत घेणें, विद्यमान कायद्यानें त्यावर केलेलीं आक्रमणें शोधणें व प्राचीन संस्कृति व हिंदुधर्म पावित्र्य यास विरोध न करतां हिंदुसमाजाच्या वाढत्या गरजा व परिस्थिति ह्या लक्षांत घेऊन आवश्यक ते फरक कायद्यांत सुचविणें, ह्या मुख्य उद्देशांनीं 'हिंदु लॉ रिसर्च अँड रिफॉर्म अॅसोसिएशन' ह्या नांवाच्या संस्था नागपूर व मुंबई येथें स्थापन झाल्या तथापि अशा संस्थांचें एकीकरण करून मध्यवर्ती संस्था निर्माण करावी व तिच्या प्रांतिक शाखा स्थापन कराव्यात म्हणून २१ आक्टोबर १९२६ रोजीं श्री. भवानीशंकर नियोगी यांचे अध्यक्षतेखालीं पुणें मुक्कामीं महाराष्ट्रांतील शास्त्रीपंडित, वकील व अॅडव्होकेट यांची एक सभा झाली व त्यांत अखिल भारतीय संस्था स्थापन करण्यांत येऊन मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश सर महादेव चौबळ यांस अध्यक्ष व ना. वि. भोंडे एल्. एल्. बी. यांस चिटणीस म्हणून निवडण्यांत आलें. तथापि मीमांसाविद्यालयाचे प्रमुख पंडित वामनशास्त्री किंजवडेकर हे ह्या कार्याचे प्रवर्तक असून अॅ. कंठाळे, बॅ. जयकर, पी. व्ही.काणे, पी. बी. साठे ह्यांचें अत्यंत साह्य होतें. ही मध्यवर्ती संस्था स्थापन झाल्यानंतर लोकमत तयार करण्यासाठीं चालकांकडून बरेंच प्रचारकार्य करण्यांत आलें. १९२७ सालीं पं. किंजवडेकर यांचे प्रयत्नानें कलकत्ता विश्वविद्यालयाचे इमारतींत सर देवप्रसाद सर्वाधिकारी यांचे प्रमुखत्वाखालीं सभा भरून संशोधनकार्यास मदत करण्याचें ठरलें व तेथें एक संस्थाही स्थापन करण्यांत आली. ह्या संस्थेस सर नलिनी रंजन चतर्जी न्या. सर चारूचंद्र घोस, न्या. बिपिनविहारी घोस, न्या. मन्मथनाथ मुकर्जी, सर प्रव्होशचंद्रमित्र, हिरेंद्रनाथ दत्त, ऋषींद्रनाथ सरकार, अनंतकृष्ण शास्त्री, डॉ.पशुपतिनाथ शास्त्री, मि. खैतान वगैरे विद्वान् जनांचें साहाय्य मिळालें आहे. तसेंच १९२८ चे एप्रिल महिन्यांत संस्थेचे चिटणीस रा. भोंडे हे प्रयाग येथें जाऊन त्यांनीं तेथील प्रोफेसर्स, वकील, न्यायाधीश यांच्या गांठी घेतल्या व अखेर अलाहाबाद विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर डॉ. गंगानाथ झा यांचे अध्यक्षतेखालीं विश्वविद्यालयाचेच इमारतींत खास सार्वजनिक सभा भरून तेथें शाखा स्थापन करण्यांत आली. ह्या सभेंत न्या. डॉ. सुरेंद्रनाथ सेन (अध्यक्ष) डॉ. गंगानाथ झा, सर तेजबहादुर सप्रू, न्या. लालगोपाळ मुकर्जी, रावबहादुर पंडित कनय्यालाल (उपाध्यक्ष) व डॉ. के. एन्. मालवीय व विश्वविद्यालयाचे कायदा शाखेचे त्यावेळचे प्रमुख शरश्चंद्र चौधरी यास चिटणीस म्हणून निवडण्यांत आलें. लीडर पत्राचे संपादक सी. वाय्. चिंतामणी हे सदर सभेस हजर असून त्यांनीं अत्यंत अनुकूल लेख आपल्या पत्रांत लिहिला. पुढें १९३० सालीं दिल्ली येथें ना.दादा-

साहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरून तेथें ही शाखा स्थापन झाली. त्यावेळीं श्री.न.चिं.केळकर, किंजवडेकर, भोंडे वगैरे मंडळी उपस्थित असून संस्थेच्या उपयुक्ततेबद्दल स्थानिक व बाहेर ठिकाणच्या मंडळींचीं भाषणें झालीं. श्रीमत् शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, टयूडर ओवेन,मुंबईचे माजी गव्हर्नर सर लेस्ली वुइल्सन, तसेच न्या. सुंदरराव पाटकर,बॅ.दळवी,ॲ.गजेंद्रगडकर वगैरे अनेक मतांचें व विचारांचें सहाय्य व सहानुभूति संस्थेच्या कार्यास व उद्देशास मिळालेली आहे. पुणें येथील संस्थेस, टिळक व जिन्सिवाले यांजकडून विद्यालयास मिळालेला ग्रंथसंग्रह चितळे यांचे ऑल इंडिया रिपोर्टस्, कीर्तने व पटवर्धन यांनीं दिलेले निवाडे,म्हैसूर विश्वविद्यालयानें दिलेली पौरस्त्य वाङमयविषयक ग्रंथमाला वगैरे देणग्यांनीं वाचनालयांत उपयुक्त भर पडली आहे. संस्थेच्या चालकांनीं कांहीं वाङमयही प्रसिद्ध करून कायद्यांत सुधारणा सुचविल्या आहेत. तथापि सदर बिलें जशींच्या तशीं कायदेमंडळांत प्रविष्ट करण्यासाठीं तयार केलीं नसून लोकमत तयार करण्याच्या त्या योजना होत.

१९२९ चे मे महिन्यांत पुणें येथें न्या. गोविंदराव माडगांवकर यांचे अध्यक्षतेखालीं परिषद भरून ह्या कार्यास जास्त संघटित स्वरूप आलें. त्यानंतर मुख्य कचेरी मुंबई येथें हालविण्यांत येऊन बॅ. मुळगांवकर, पुरुषोत्तमदास व भोंडे यांस चिटणीस नेमण्यांत आलें व संस्थेची घटना नक्की करण्यांत आली. पुढें सर गोविंदराव यांचे धुरीणत्वाखालीं संस्थेस विशेष चालना मिळून बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यासारखे संस्थानिक; तसेंच सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, मि. जव्हेरी, सर सी. पी. रामस्वामी, मि. घनःश्यामदास बिर्ला यांजकडून देणग्या मिळून ते आश्रयदाते झाले. शिवाय सर गोविंदराव माडगांवकर हे अहमदनगर,सोलापूर, बेळगांव, धारवाड, रत्नागिरी, खानदेश वगैरे भागांत जाऊन त्यांनीं शाखा स्थापन करून लोकमत जागृत केलें व विद्यमान हिंदु कायद्यांचें स्वरूप वकील, न्यायाधीश व इतर सद्गृहस्थ यांस समजावून सांगितलें व कोणत्या प्रकारें संशोधन व सुधारणा करणें इष्ट आहे याचें त्यांनीं अधिकारयुक्त वाणीनें विवरण केलें. सारांश भावी 'स्वराज्य' मिळविणें हा जरी कालावधीचा प्रश्न असला तरी हिंदु समाज सुदृढ व कार्यक्षम होण्याचे दृष्टीनें व त्याच्या वाढत्या आकांक्षा व गरजा पुऱ्या करण्याचे हेतूनें त्यांत काय करणें इष्ट व शक्य आहे ह्या प्रश्नास ह्या संस्थेनें बरीच चालना मिळाली आहे यांत शंका नाहीं.

प्रचलित राज्यघटना

बादशहांचे अधिकार

पार्लमेंटच्या लॉर्डस् व कॉमन्स या दोन्ही सभांच्या शिफारशीवरून बादशहाला इंडिया-कौन्सिलच्या सभासदांस कामावरून काढतां येतें. सेक्रेटरी ऑफ स्टेट इन् कौन्सिलच्या खात्यांत हिज् मॅजेस्टी इन् कौन्सिल यांस कांहीं अधिकार आहेत. से० ऑफ स्टेट इन् कौ. चा हिशेबतपासनीस, हिंदुस्थानचा हायकमिशनर, गव्हर्नर जनरल व ग. ज. च्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद, गव्हर्नर व त्याच्या ए. कौ. चे सभासद, या अंमलदारांच्या नेमणुका बादशहा करितात. लेफ्टनंट गव्हर्नरच्या सत्तेखालीं एकादी नवीन प्रांतघटना तयार करावयाची असल्यास आणि ले. गव्हर्नरची नेमणूक करणें असल्यास बादशहांच्या संमतीची जरूरी आहे. आपल्या मर्जीनुसार बिलें थोपवून धरणें व वाटल्यास तीं फेंटाळून लावणें हा हक्क बादशहांना आहे. एकादें बिल गव्हर्नरच्या सर्टिफिकेटमुळें पास झालें तरी तें सुरूं होण्यास हिज् मॅजेस्टी इन् कौन्सिलची संमतिदर्शक सही लागते. नवीन ले. गव्हर्नरच्या प्रांतांत कायदेकौन्सिल स्थापावयाचें असल्यास बादशहांची परवानगी लागते. एकाद्या इलाख्यांतून आलेलें बिल गव्हर्नर जनरल यांना बादशहांच्या संमतीसाठीं राखून ठेवतां येतें. संमतिनिदर्शक सही झाल्याशिवाय तें बिल अमलांत आणतां येत नाहीं.प्रांतिक कायदेमंडळाचा कायदा बादशहांना फेटाळून लावतां येतो. स्टॅटच्यूटरी कमिशन नेमण्यास बादशहांची संमति लागते. कायमचे चीफ जस्टिस व हायकोर्ट यांच्या नेमणुका बादशहांच्या अनुमतीनें होतात. नवीन हायकोर्टें फक्त 'लेटर्स पेटंट' अन्वयेंच काढतां येतात. ग.ज.इन् कौ.नें हायकोर्टाच्या अधिकारकक्षेंत फेरबदल करण्याचा हुकूम केला तरी तो बादशहांना रद्द करतां येतो. अॅडव्होकेट जनरलांच्या नेमणुका बादशहा करितात. धर्मखात्यासंबंधानेंहि बादशहांना कांहीं विशिष्ट अधिकार आहेत. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट–सेक्शन १२९ (अ) या अन्वय केलेले नियम रद्द करण्याचा बादशहांना हक्क आहे. बादशहांच्या या अधिकारांत जर कांहीं फरक व्हावयाचा असेल तर त्याला पार्लमेंटचा स्वतंत्र कायदाच व्हावा लागतो. राजेसाहेबांचे अधिकार त्या त्या वेळचे इंग्लडचे जे कोणी प्रधानमंत्री असतील त्यांच्या सल्ल्यानेंच उपयोजिले जातात, हें स्पष्ट आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेट किंवा ग. ज. इन् कौ. यांना कायदे करण्याचे जे अधिकार आहेत त्या अधिकारांमुळेंही बादशहांच्या या अधिकारावर त्यांना कसलेंहि आक्रमण करतां येत नाहीं.

इंडिया कौन्सिल

या कौन्सिलमध्यें कमींत कमी आठ व जास्तींत जास्त बारा या दरम्यान सभासद असतात. नक्की आंकडा सेक्रेटरी ऑफ स्टेटनें ठरवावा. यांतील निम्मे सभासद हिंदुस्थानांत कमींत कमी दहा वर्षें नोकरी केलेले किंवा राहिलेले आणि नेमणुकीपूर्वी हिंदुस्थान सोडून पांच वर्षांहून जास्त काळ न गेलेले असेच असावेत, असें कायद्यानें ठरविण्यांत आलें आहे. नोकरीचा काळ पांच वर्षें. विशिष्ट कारणें असल्यास ही मुदत वाढवितां येते. रिकाम्या झालेल्या जागा भरण्याचा हक्क सेक्रेटरी ऑफ स्टेटला आहे. पार्लमेंटच्या दोन्ही सभांनीं बादशहांना विनंति केल्याविना कोणाहि सभासदास कामावरून काढतां येत नाहीं. हिंदुस्थानच्या संबंधांत विलायत सरकारांत जें काम चालतें तें चालविणें व हिंदुस्थान सरकारशीं पत्रव्यवहार करणें हीं कामें इंडिया कौन्सिलनें करावयाचीं असतात. यावर स्टेट सेक्रेटरीची देखरेख असावी लागते. आणि ग. ऑफ इं. अॅक्टच्या कलमान्वयें हें सर्व काम चालावयाचें असतें. कौन्सिलची महिन्याकाठीं एक बैठक तरी झालीच पाहिजे. सेक्रेटरी ऑफ स्टेट हा कौन्सिलचा अध्यक्ष होय. त्याला मत देण्याचा अधिकार आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेटला एखाद्या सभासदाची उपाध्यक्ष म्हणून नेमणूक करतां येते. कामाचा फडशा पडावा म्हणून स्टेट सेक्रटरीला कौन्सिलच्या निरनिराळ्या पोट कमिट्या पाडण्याचा हक्क आहे. कौन्सिलच्या बैठकींत निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा होते. कांहीं कांहीं विषयांच्या बाबतींत सभेचें मताधिक्य स्टेट सेक्रेटरीनें मानलेंच पाहिजे अशी त्यावर सक्ति आहे. पण तदितर बाबतींत मतभेद उद्भवला असतां

स्टेट सेक्रटरीचें मतच निर्णायक म्हणून मानलें जातें. अध्यक्षाला कास्टिंग व्होटचा अधिकार आहे. हिंदुस्थानच्या वसुलावरील खर्च व नियंत्रण, बँक ऑफ इंग्लंडकडे असलेल्या तारणांची व्यवस्था, हिंदुस्थान सरकारकरितां तात्पुरती क्राउनच्या ताब्यांत असलेली एस्टेट (रियल किंवा पर्सनल) पाहणें व गहाण ठेवून पैसे उभारणें, कॉन्ट्रॅक्ट्स् पटविणें आणि फिर्यादी दाखल करणें व प्रतिवादीचें काम करणें इ. कामें पाहण्याकरितां कौन्सिलची सेक्रटरी ऑफ स्टेटशीं सांगड घालून दिली आहे हल्लीं इंडिया कौन्सिलमध्यें तीन हिंदी सभासद असतात.

हायकमिशनर

हिंदुस्थान सरकारचें एजन्सी व व्यापाराचे व्यवहार पाहण्याचें काम या अंमलदाराकडे सोंपविलें आहे. हा पूर्णपणें हिंदुस्थान सरकारचा नोकर व एजंट आहे. याचा पगार व याच्या एकंदर खात्याचा खर्च हिंदुस्थानच्या वसुलांतून दिला जातो. याची कचेरी लंडन येथें आहे.

सेक्रेटरी ऑफ स्टेट

सेक्रटरी ऑफ स्टेटला (१) हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था व वसूल या बाबतींत सर्व हक्क आहेत व तत्संबंधीं कर्तव्यें तो पार पाडतो. (२) गव्हर्मेंट ऑफ इंडिया (१९१९) कायद्यानुसार, सेक्रटरी ऑफ स्टेटला नवीन नेमलेल्या व जुन्या कायम झालेल्या सर्व अमलदारांवर पूर्ण सत्ता आहे. हिंदुस्थानचा वसूल व राज्यकारभार यासंबंधीं घडामोडी व उद्योग यावर सेक्रेटरी ऑफ स्टेटला नियंत्रण करणें, तपासणी करणें, व कार्यमार्ग दाखविणें वगैरे हक्क आहेत. हिंदुस्थानच्या वसुलांतून दिल्या जाणाऱ्या देणग्या, पगार, भत्ते, ग्रॅच्युइटी, व इतर खर्च यांवर स्टेट सेक्रटरीची पूर्ण सत्ता आहे. हिंदुस्थानचा वसूल व राज्यकारभार या बाबतींत हिंदुस्थान सरकार जें जें कांहीं करीत असेल त्या सर्वांवर देखरेख करणें, त्यास मार्ग दाखविणें व त्याचें नियमन करणें हीं कामें से. ऑफ स्टेटकडे आहेत. सेक्रेटरी ऑफ स्टेटचा पगार ब्रिटिश खजिन्यांतून दिला जातो. परंतु त्याच्या अंडर सेक्रेटरीजचा पगार व खात्याचा इतर खर्च हिंदुस्थानच्या वसुलांतून किंवा पार्लमेंटनीं पुरविलेल्या पैशांतून होतो. हिंदुस्थानच्या मुलकी व लष्करी कारभारासंबंधानें सेक्रटरी ऑफ स्टेटकडून येणारे हुकूम गव्हर्नर जनरल इन् कौन्सिलला मानावे लागतात. खालील अंमलदारांच्या नेमणुका सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या सल्ल्यानेंच कराव्या लागतात.

(१) गव्हर्नर जनरल, (२) ग. ज. च्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद, (३) गव्हर्नर (४) ग. च्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद, (५) लेफ्टनंट गव्हर्नर, (६) पब्लिक सर्व्हिसेस कमिशन (७) हिंदुस्थानांतील ऑडिटर जनरल (८) चीफ जस्टिस, जज्ज व अॅडव्होकेट–जनरल (हायकोर्ट) आणि (९) कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील बिशप.

ब्रिटिश हिंदुस्थानची सुरक्षितता, देशांतील शांतता किंवा इतर हितसंबंध यांच्या बाबतींत ग. ज. इन् कौ. यांच्यापुढें विचारासाठीं जर एकादा ठराव आला व खुद्द ग. ज. यांचें मत जर असें असलें कीं, हा ठराव मान्य करून अंमलांत आणावा किंवा तहकूब ठेवावा किंवा फेटाळून लावावा तर कौ. तील बहुमत या त्यांच्या मताच्या जरी विरुद्ध असलें तरी आपल्या अधिकारांत व आपल्या जबाबदारीवर त्यांना हा ठराव सबंध किंवा अंशतः मान्य करतां येतो, तहकूब ठेवतां येतो किंवा फेटाळून लावतां येतो. मात्र अशा प्रसंगीं कौ. तील कोणाहि दोन सदस्यांना ही बाब सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजकडे कळविण्यांत यावी असा आग्रह धरतां येतो. सेक्शन ४४ यांतील कलमान्वयें ग. ज. इन् कौ. यांना सेक्रेटरी ऑफ स्टेट इन् कौ. यांच्या हुकुमाशिवाय युद्ध सुरूं करतां येत नाहीं किंवा तहनामा करतां येत नाहीं, आणि जर युद्ध सुरूं झालेंच किंवा तहनामा ठरवावा लागला तर असें करण्याचीं जीं काय कारणें असतील त्यांसह या युद्धाविषयीं किंवा तहनाम्याविषयीं सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजकडे ताबडतोब माहिती द्यावी लागते. सोंपीव खात्यांपैकीं एखादें खातें जर गव्हर्नरच्या मनांतून कायमचें किंवा तात्पुरतें घ्यावें असें आलें तर तें त्याला सेक्रेटरीं ऑफ स्टेटच्या परवानगीशिवाय घेतां येत नाहीं. सनदी नोकरांचा संबंध थेट सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्याशीं असतो. सोंपीव खात्यावरील प्रधानांची त्यांच्यावर कसलीही हुकमत चालत नाहीं.

हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडे कांहीं लष्करी हालचाली झाल्या तर त्यांचा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून करूं नये पण जर पार्लमेंटची या खर्चाला संमति असेल तर मात्र असा खर्च करावयास हरकत नाहीं असें ठरलेलें आहे. आतां हा खर्च करणें जरूर किंवा योग्य आहे कीं नाहीं याविषयीं सेक्रेटरी ऑफ स्टेट याचें जें मत पडेल

त्यावरच पार्लमेंटची संमति अवलंबून असते हें उघड आहे. सामान्यतः कौन्सिल ऑफ इंडियांतील मताधिक्य त्याच्या बाजू असलें तर सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस हिंदुस्थान सरकारसाठीं म्हणून हिंदुस्थान सरकारला माल पुरविण्याचीं कंत्राटें परस्पर तिकडेच पटवितां येतात. इतकेंच कीं अलीकडे हिंदुस्थानसाठीं हायकमिशनरची नेमणूक झाली असल्यामुळें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या या अधिकाराला थोडीशी मर्यादा बसली आहे. एकादें हायकोर्ट अजिबात बंद करण्याचा किंवा बादशहांच्या युरोपांत जन्मलेल्या प्रजाजनांना किंवा त्यांच्या मुलांना फांशी देण्याचा अधिकार हायकोर्टव्यतिरिक्त कोणच्याहि कोर्टास देण्याचा कायदा करण्याची हिंदुस्थान सरकारच्या कायदेमंडळास मनाई आहे. पण जर याच कामास सेक्रेटरी ऑफ स्टेट याची आगाऊ संमति असेल तर मात्र हिंदुस्थान सरकारच्या कायदेमंडळास या कामीं मोकळीक आहे. हिंदुस्थानच्या कायदेमंडळानें पास केलेला प्रत्येक कायदा, त्यास आपली स्वतःची संमति देऊन ग. ज. यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे पाठवावा लागतो. आणि मग योग्य वाटल्यास बादशहांना तो रद्द करतां येतो. पण अशा रीतीनें तयार झालेला कायदा रद्द करावा कीं काय या बाबतींत बादशहा हे आपल्या सनदी सल्लागारांचाच सल्ला घेतात व ते सल्लागार म्हणजे सेक्रेटरी ऑफ स्टेट हेच होत. ग. ज. इन् कौन्सिल यांना वायव्य सरहद्द प्रांत, अजमीर, मेवाड, आणि कुर्ग या प्रांतांतील कारभार सुयंत्र चालावा म्हणून व तेथें शांतता नांदावी म्हणून रेग्युलेशन्स काढण्याचा विशेष हक्क आहे. पण या कामींही सेक्रेटरी ऑफ स्टेट इन् कौन्सिल किंवा स्टेट सेक्रेटरी यांची हुकमत त्यांना मानावीच लागते.

ग. ज. यांस कौन्सिलची संमति न घेतां खालसा मुलुखांत शांतता राहावी म्हणून आणि राज्यकारभार सुयंत्र चालावा म्हणून सहाच महिनेपर्यंत चालू राहतील असे वटहुकूम काढण्याचा अधिकार आहे. पण यालाही सेक्रे. ऑफ स्टेट यांची संमति लागतेच. एकादे वेळीं सेक्रे. ऑफ स्टेट यांना न कळवितांच अशा तऱ्हेचा वटहुकूम ग. ज. यांना गडबडीनें काढावा लागला तर आपण असें केलें आहे असें त्यांस स्टेट सेक्रेटरींना ताबडतोब कळवावें लागतें. प्रांतिक कायदेमंडळांनीं पास केलेले सर्व कायदे स्टेट सेक्रेटरीकडे जावेच लागतात; अशासाठीं कीं, जरूर वाटल्यास बादशहांनीं ते रद्द करावे. शासनसूत्रान्वयें सेक्रे. ऑफ स्टेट यांना आपल्या कृत्याबद्दलचा जाब फक्त पार्लमेंटलाच द्यावा लागतो. हिंदुस्थानच्या कायदेमंडळाला हा जाब त्यांना विचारतां येत नाहीं.

हिंदुस्थान सरकार

हिंदुस्थान सरकारच्या कारभारावर पार्लमेंटला विविध तऱ्हांनीं नियंत्रण घालतां येतें. प्रत्यक्ष कायदा करून, हिंदुस्थानांतील कायदे मंडळानें पास केलेल्या कायद्यास आपली संमति हवीच असा नियम घालून, हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीवर आपली हुकमत ठेवून व तसेंच जबाबदार मंत्र्याला आपल्या कृत्याचा जाब विचारून हिंदुस्थानच्या कारभारावर नियंत्रण घालण्यास पार्लमेंटास पूर्ण मोकळीक आहे. ब्रिटिश फौजांचें आधिपत्य तात्त्विक रीत्या तरी बादशहाकडेच असतें. पण हिंदुस्थानांतील फौजांचें आधिपत्य तात्त्विक रीत्यासुद्धां बादशहाकडेही नाहीं व ग. ज. कडेही नाहीं. इतकेंच कीं, ग. ज. इन् कौ. यांच्याकडे हिंदुस्थानच्या लष्करी कारभाराची (लष्कराच्या कारभाराची नव्हे) जबाबदारी आहे. १९१९ च्या कायद्यानें कमँडर–इन–चीफ याची ग. ज. यांच्या कार्यकारी मंडळांत नेमणूक झालीच पाहिजे अशी तरतूद केलेली नाहीं. त्या कायद्यांत इतकेंच म्हटलें आहे कीं, जर अशी नेमणूक झाली असली तर त्या कौन्सिलांत ग. ज. यांच्या खालोखाल कमँडर–इन्–चीफ यांचा मान व दर्जा राहावा. ग. ज. हे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमधील एखाद्या सभासदास त्या कौन्सिलचा उपाध्यक्ष नेमतात. देशांतील शांतता, लोकरक्षण व लोकल्याण या बाबींचा प्रश्न नसेल तर मात्र ग. ज. यांस नेहमींच कार्यकारी मंडळांतील बहुमताच्या तंत्रानें वागावें लागतें. व जर कौन्सिलांतील सभासदांत मतभेद होऊन दोन्ही अंगास सारखीं सारखींच मतें पडलीं तर ग. ज. यांना जादा मत देण्याचा अधिकार असतो. तसेंच कार्यकारी मंडळांतील कामकाज विशेष प्रकारच्या सोईनें चालावें म्हणून कांहीं नियम करावयाचे असल्यास किंवा हुकूम द्यावयाचे असल्यास, तसें करावयास ग. ज. यांना अधिकार आहे. हे नियम खाजगी स्वरूपाचेच असतात व त्यांची माहिती कार्यकारी मंडळाचे सभासद व सेक्रेटरीएट यांनाच केवळ दिली जाते. ग. ज. यांच्या कौन्सिलांतील प्रत्येक सभासदाकडे विषयांचा एक एक गट वाटून दिलेला असतो. या विषयांचा कारभार जरी तत्त्वतः त्या त्या सभासदाकडे असतो तरी त्या त्या विषयांचे जे सेक्रेटरी असतात त्यांना परस्पर ग. ज. कडे जातां येतें

व हवें असल्यास त्यांजकडून जरूर ते परवाने त्यास घेतां येतात व त्यानें असें केल्यास त्या खात्याच्या मेंबरास कसलाहि अडथळा करतां येत नाहीं. कौन्सिलचा मेंबर व सेक्रेटरी यांच्यांत मतभेद झाला तर तें प्रकरण परस्पर ग. ज. कडे नेण्याचा सेक्रेटरीस पूर्ण अधिकार आहे. याचें कारण तरी हेंच कीं, सेक्रेटरी हा या मेंबराच्या दिमतीस दिलेला असतो असें नव्हे, तर हिंदुस्थान सरकारचा तो एक स्वतंत्र अधिकारी म्हणून वागतो. व त्याचें कामच हें आहे कीं, ज्या खात्यांत आपण आहों त्या खात्याचें काम कसें चाललें आहे त्यांत कोणते प्रश्न उपस्थित झाले आहेत, इत्यादि संबंधानें त्यानें ग. ज. यास हरतऱ्हेची माहिती पोंचवावी. खास कायद्याप्रमाणें पाहतां ग.ज. च्या नेमणुकीची मुदत अमुकच वर्षांची असली पाहिजे असें नाहीं. पण रूढी मात्र अशी पडली आहे कीं, ही मुदत पांच वर्षांची असावी. अर्थात् विशेष प्रसंगीं ही केव्हां केव्हां वाढविली जाते. व्हाइसरॉय हे खुद्द बादशहांचे प्रतिनिधि असल्यामुळें न्याय-कोर्टांनीं ज्यास शिक्षा दिलेली आहे अशा गुन्हे-गारांना माफी करण्याचा त्यांना अधिकार आहे. ग. ज. यांस तिजोरी, राज्यकारभार व कायदे करणें या तीनहि प्रकरणीं हुकमत चालविण्याचा अधिकार कायद्यानेंच दिलेला आहे.आपल्या कार्य-कारी मंडळाचा उपाध्यक्ष नेमणें, कौन्सिलचे सेक्रेटरी नेमणें, लेफ्टनंट गव्हर्नर्स यांची नेमणक करणें व कौन्सिल ऑफ स्टेटचा अध्यक्ष नेमणें हे अधिकार ग. ज. यास आहेत. आपल्याला योग्य वाटेल त्या ठिकाणीं कार्यकारी मंडळाची सभा बोलावणें, हिंदुस्थानांतील शांतता, सुरक्षितता किंवा इतर महत्त्वाचे हितसंबंध यांच्या रक्षणा-साठीं, कौ. च्या मेंबरांचें मत विरुद्ध असतांहि आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी करणें, कायदे-मंडळाच्या बैठकी बोलाविणें, बैठकी लांबणीवर टाकणें, आणि कायदेमंडळें बरखास्त करून नवीन निवडणुकी भरविणें किंवा त्यांची नेहमींची मुदत वाढविणें हेंहि अधिकार ग. ज. यास आहेत. कसल्याहि प्रकरणांत कितीही रक्कम खर्चावयाची सूचना करावयाची झाल्यास तिला ग. ज. ची आगाऊ शिफारस असावी लागते. पुढें दिलेल्या विषयासंबंधानें कायदेमंडळांत जर एकादें बिल यावयाचें असलें तर तें आणावयास ग. ज. याची आगाऊ संमति लागते.

(१) हिंदुस्थानला असलेलें कर्ज, हिंदुस्थानचा महसूल, किंवा तिजोरीवर नवे खर्च लादणें

(२) धर्म व धार्मिक विधि.

(३) फौज, आरमार व विमानदळ यांत शिस्त ठेवणें.

(४) परदेशी राजे व देश यांच्याशीं हिंदुस्थान सरकारचे संबंध.

(५) कायद्यानें मध्यवर्ति कायदेमंडळाकडे जे विषय सोपविलेले नाहींत असे प्रांतिक विषय.

(६) प्रांतिक कायदेमंडळानें केलेला कायदा परत घेणें किंवा दुरुस्त करणें.

(७) ग. ज. यांनीं काढलेला वटहुकूम किंवा कायदा परत घेणें किंवा दुरुस्त करणें.

विधिमंडळें एखादें बिल विचारांत घेण्याचेंच नाकारूं लागलीं किंवा ग. ज. यांस तें बिल ज्या स्वरूपांत पास व्हावयास हवें असें वाटलें त्या स्वरू पांत पास करीनात पण जर देशाचा सुरक्षितपणा, त्याची शांतता किंवा त्याचे हितसंबंध यांच्या-साठीं तें बिल पास होणें जरूरच आहे असें ग. ज. यांस वाटत असेल तर हें बिल पास झालेंच आहे, अशा तऱ्हेचें सर्टिफिकेट देण्याचा ग. ज. यांस पूर्ण अधिकार आहे. कायदेमंडळांनीं पास केलेलें बिल नापसंत ठरवून फेटाळण्याचा त्यांस अधिकार आहे. देशांत शांतता राहावी व राज्यकारभार सुयंत्र चालावा यासाठीं जास्तींत जास्त सहा महिने-पर्यंतच चालू राहील असा वटहुकूम काढण्याचा त्यास अधिकार आहे. प्रांतिक कायदेमंडळांनीं पास केलेलें बिल नापसंत ठरवून फेटाळण्याचा त्यास अधिकार आहे. प्रांतिक सरकारानें पास केलेलें एखादें बिल प्रांतिक गव्हर्नरानें ग. ज. यांच्या विचारासाठीं राखून ठेवलें असलें (म्हणजे त्याची अंमलबजावणी होऊं दिली नसली) तर सहा महिन्यांच्या आंत संमति देण्याचा किंवा (मुळींच) न देण्याचा त्यांस अधिकार आहे. प्रांतिक विधिमंडळानें पास केलेल्यालें कोणत्याहि बिलाची अंमलबजावणी बादशहांच्या मर्जीप्रमाणें त्याचा निकाल लागावा म्हणन तहकब ठेवण्याचा त्यास अधिकार आहे.

ग. ज इन कौन्सिल

ग. ज. यांच्या कार्यकारी मडळाच्या सभा-सदांची नेमणूक बादशहाकडूनच होते. या सभा-सदांची संख्या निश्चित नसते. बादशहांनीं कितीही सभासद नेमावे, अर्थात्च या कामीं त्यांच्या प्रधानांचा शासनसूत्रानुसार जो सल्ला मिळत असेल त्याप्रमाणेंच ते वागत असतील. अट इतकीच आहे कीं, या सभासदांपैकीं निदान तीन, निदान

दहा वर्षेपर्यंत जे सरकारी नोकर म्हणून काम करीत आहेत त्यांच्यापैकींच असले पाहिजेत. यांच्या जोडीला एक सभासद असा असावा लागतो कीं, जो इंग्लंड किंवा आयर्लंड येथील बॅरिस्टर आहे किंवा स्कॉटलंडचा ॲडव्होकेट आहे किंवा निदान दहा वर्षे हिंदुस्थानांतील हायकोर्टांत काम केलेला असा एकादा वकील आहे.

मध्यवर्ति-विधिमण्डळ

या मंडळाच्या दोन सभा आहेत. एक 'कौन्सिल ऑफ स्टेट' व दुसरी 'लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली'; पहिलींत जास्तींत जास्ती ६० सभासद असतात. यांपकीं कांहीं सरकारनें नेमलेले व कांहीं लोकांनीं निवडून दिलेले असतात. खास सरकारी सभासद म्हणजे सरकारी नोकरांतून घेतलेले सभासद वीसाहून जास्त नसतात. लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीमध्येंही कांहीं सभासद लोकांनीं निवडलेले व कांहीं सरकारने नेमलेले असतात.एकंदर सभासद-संख्या १४० असते. पकीं लोकांनीं न निवडलेले असे ४० असतात. या ४० पकीं २६ प्रत्यक्ष सरकारी नोकरांतून घेतलेले असतात.

कायद्याप्रमाणें ॲसेंब्लींतील सभासदांची संख्या वाढविणें व सभासदांच्या गटांचे परस्परांशीं संख्याप्रमाण बदलणें या गोष्टी शक्य आहेत; एक अट मात्र नेहमींच संभाळावयास हवी ती ही कीं, असेंब्लीच्या सभासदांपकीं निदान पांच सप्तमांश तरी लोकांनीं निवडून दिलेलेच असले पाहिजेत व उरलेल्यापकीं निदान एक तृतियांश सरकारी नोकर असतां उपयोगाचे नाहींत.

ग. ज. हा यापैकीं कोणत्याच सभेचा सभासद नसतो; पण त्यांची बठक भरविणें, त्याजपुढें भाषण करणें व चालू बठक बरखास्त करणें हे अधिकार त्यास आहेत. ॲसेंब्लीचा अध्यक्ष ॲसेंब्लीचा मेंबर असावयास हवा, तो ॲसेंब्लीनें निवडून दिलेला असावा व त्याची नेमणूक ग. ज. यांस पसंत असावी. उपाध्यक्षाची नेमणूक ही ग. ज. यांस संमत असावयास हवी, पण जर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक ग. ज. यांस संमत नसेल तर काय करावयाचें हें कायद्यांत कोठेंच सांगितलेलें नाहीं. या दोनही जागा पगारी आहेत. व त्यांचे पगार ॲसेंब्लीनेंच ठरवावयाचे असतात.

कौन्सिल ऑफ स्टेटचा अध्यक्ष हा त्यांतीलच एक सभासद असला पाहिजे व त्याची नेमणूक ग. ज. हा करतो. हा अध्यक्ष सभेनेंच निवडून द्यावा अशी योजना कायद्यांत नाहीं. कौन्सिल ऑफ स्टेटची मुदत पांच वर्षांची व ले. ॲसेंब्लीची तीन वर्षांची असते. तथापि या मुदतीच्या पूर्वींही या सभा मोडण्याची अखत्यारी ग. ज. यास आहे. तसेंच या सभांची मुदत वाढविण्याचा अधिकारहि त्यांस कायद्यानें दिलेला आहे. या सभा मोडल्यानंतर त्यांची सहा महिन्यांत पुन्हां बैठक भरविण्याची तारीख ग. ज. यांस ठरवावी लागते व से. ऑफ स्टेट यांची परवानगी असल्यास नऊ महिनेपर्यंत ही मुदत वाढवतां येते. या प्रकरणीं सभांची पुढील बैठक म्हणजे काय या शब्दांचा अर्थ निश्चित झालेला नाहीं.

सरकारी नोकरांना यापैकीं कोणच्याही सभेच्या निवडणुकीस उभे रहातां येत नाहीं. व जर एकाद्या बिनसरकारी सभासदानें कौन्सिलांतील एकादी सरकारी ज.गा पत्करली तर त्याची कौन्सिलांतील सभासदत्वाची जागा तो गमावतो. कोणालाही दोन्ही सभांचा सभासद होतां येत नाहीं. व जर दोन्ही सभांच्या निवडणुकींत त्यास यश मिळालें तर कोणची तरी एक जागा पत्करून त्यांस दुसरी सोडावी लागते. ग. ज. च्या कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सभासदास कौन्सिलांत किंवा असेंब्लींत सरकारांतून नेमणूक होऊन सभासदत्व मिळालेंच पाहिजे असा नियम आहे. पण तो कोणच्यातरी एका सभेचा जरी सभासद असला तरी दुसऱ्या सभेपुढें भाषण करण्याचा त्यास अधिकार आहे. एकाद्या संस्थानाचा अधिपति किंवा संस्थानचा प्रजाजन यास या सभांत सभासद नेमून घेण्याची सोयही केलेली आहे. जर एकाद्या माणसास फौजदारी कोर्टांत सहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीची शिक्षा झाली असेल किंवा सहा महिन्यांपेक्षां जास्त हद्दपारी झाली असेल तर त्यास शिक्षा संपल्याच्या दिवसापासून पांच वर्षेपर्यंत या निवडणुकीस उभे रहातां येत नाहीं. तसेंच जे कोणी निवडणुकीच्या कामीं लाचलुचपत किंवा इतर लबाड्या करतील त्यांनाही हेंच प्रायश्चित्त सांगितलें आहे. जे कोणी ब्रिटिश प्रजाजन असतील किंवा वेडे नसतील, व जे कोणी २१ वर्षांच्या खालीं असतील त्यांचीं नांवें मतदारांच्या यादींत घालीत नाहींत. पण ज्याला उमेदवार म्हणून निवडणुकीस उभें राहावयाचें असेल त्याचें वय मात्र २५ हून कमी असतां उपयोगाचें नाहीं. पार्लमेंटनें प्रत्यक्ष कायदा करून परवानगी दिल्याशिवाय खालीं दिलेल्या प्रकारचे कोणचेही कायदे त्यांस करतां येत नाहींत.

१ १८६०नंतर ब्रिटिश पार्लमेंटनें जे जे कायदे पास केले आहेत त्यांपैकीं कोणचाही कायदा ज्याच्या योगानें रद्द केला जाईल किंवा बदलला जाईल असा कोणचाही कायदा हिंदुस्थानांतील कायदेमंडळांस करतां येत नाहीं.

२ सेक्रेटरी ऑफ स्टेट याला हिंदुस्थान देशाकरितां कर्ज काढण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटनें ज्या कायद्यांनीं दिला असेल ते कायदे ज्याच्या योगानें रद्द होतील किंवा बदलतील असे कायदे हिंदी कायदेमंडळांस करतां येत नाहींत.तसेंच पार्लमेंटचा अधिकार कमी करतील किंवा ग्रेट ब्रिटनची जी लेखी घटना व शासन सूत्रावली आहे तिला यत्किंचितही धक्का पोहोंचवील किंवा ग्रेट-ब्रिटनचें जें हिंदुस्थानावर सार्वभौमत्व आहे त्याजवर राज्य करण्याचा जो त्यास हक्क आहे त्या सार्वभौमत्वास किंवा हक्कास इजा पोंहोचवील असा कसलाही कायदा हिंदी कायदेमंडळांस करतां येत नाहीं. एका सभेनें जें बिल पास केलेलें असेल पण तें पास झाल्यापासून सहा महिन्याच्या आंत जर तें दुसऱ्या सभेनें पास केलें नसेल तर दोन्ही सभांची संयुक्त बैठक करून त्यांच्याकडे फेरविचारासाठीं तें बिल पाठविण्याचा हक्क ग. ज. यांस आहे. तसेंच कायदे-मंडळानें पास किंवा नापास केलेलें बिल त्यांजकडे पुर्नविचारासाठीं धाडण्याचा हक्क ग. ज. यांस आहे. पुढील वर्षांतील खर्चाचे अंदाजी आंकडे दोनही सभांच्या पुढें मांडण्यांत येतात. पण खर्चाची स्वतंत्र सूचना मात्र ग. ज. यांच्या शिफारशीशिवाय करतां यत नाहीं. जर एकाद्या सभेंत एकादें बिल पुढें आलें किंवा येणार अशी सूचना आली किंवा बिलाला जोडावयाची एकादी पुस्ती पुढें आली किंवा जोडण्याची सूचना आली तर देशांतील शांतता व सुरक्षितता त्या योगानें बिघडेल असें ग. ज. यास वाटल्यास त्याला बिलाचें पुढील वाचनादि संस्कार एकदम बंद पाडतां येतात. अशा रीतीनें पुढें आलेलीं बिलें किंवा सूचना यांचें पुढें चालू व्हावयाचें काम बंद पाडण्याचा हा जो अधिकार त्यांस आहे तो फक्त त्यांच्याच मताप्रमाणें कां होईना पण देशांतील शांतता व सुरक्षितता यांस धक्का पोहोंचण्यासारखा आहे असें दिसेल तरच चालविता येतो.

तसेंच जर एकाद्या सभेनें एकादें बिल विचारास घेण्याचें नाकारलें किंवा ग. ज. यास तें ज्या स्वरूपांत पास व्हावयास हवें त्या स्वरूपांत तिनें तें पास केलें नाहीं तर देशाच्या शांतता इत्यादिसाठीं तें बिल पास झालें आहे असें ठरविण्याचा (सर्टिफिकेशन) त्यास हक्क आहे. पण सर्टिफिकेशन करण्याच्या पूर्वीं बिलाचा पुन:विचार करण्याची शिफारस करण्याचा अधिकार त्यास आहे. व या शिफारशीकडेही जर या सभांनीं लक्ष दिलें नाहीं तर मात्र तें बिल पास झालें आहे असें त्यांस ठरवितां येतें व त्यास हिंदी कायदेमंडळानें पास केलेला कायदा असें नांव पडतें.वास्तविक पाहातां ग. ज. हा कायदेमंडळाचा सभासद नसतो हें एक व दुसरें असें कीं त्यानें 'सर्टिफाय' केल्यानंतर होय—नाहीं म्हणण्याचा कसलाही हक्क कायदेमंडळास उरत नाहीं. मग हा कायदा 'हिंदी कायदेमंडळानें पास केलेला कायदा' या नांवास कसा पात्र होतो ? वाटल्यास त्याचें नांव ग. ज. यांनीं पास केलेला कायदा असें ठेवावें. असला कायदा पार्लमेंटच्या दोन्ही सभांपुढें मांडावा लागतो. आणि बादशहांची संमति मिळाल्यावांचून त्याची अंमलबजावणीही होऊं शकत नाहीं. पण हे सर्व संस्कार झाल्यावर हिंदी कायदेमंडळानें पास केलेले कायदे जितके प्रभावी तितकाच हाही कायदा बनतो.

प्रांतिक सरकार

मुंबई, मद्रास व बंगाल येथील गव्हर्नरांची नेमणूक बादशहांकडून होते. पंजाब, संयुक्तप्रांत, बहार—ओरिसा, मध्यप्रांत, व आसाम येथील गव्हर्नरांच्या नेमणुकाही बादशहाच करतात. पण त्या करतांना ग. ज. यांचा सल्ला घेतात. प्रांतिक राज्यकारभारांतील पद्धत अशी आहे कीं कांहीं खातीं गव्हर्नर व त्यांचे कार्यकारी मंडळ यांच्या हातीं राखून ठेवलेलीं असतात व उरलेलीं कांहीं लोकप्रतिनिधींतून सरकार ज्यांना दिवाण नेमतें त्यांच्याकडे सोपविलेलीं असतात. कार्यकारी मंडळाचे सभासद यांची नेमणूक बादशहाकडूनच होते. सभासदांची जास्तींत जास्त संख्या चार असते. पण नक्की किती सभासद नेमावे हें सेक्रेटरी ऑफ स्टेट ठरवितात. या सभासदांपैकीं निदान एक तरी इकडील राज्यकारभारांत निदान १२ वर्षें तरी ज्यानें घालविलीं आहेत असा एकादा सनदी नोकर असावा लागतो.

दिवाण नेमण्याचा अधिकार गव्हर्नर यांसच आहे. लोकनियुक्त नसलेल्या अशा एकाद्या सभासदाला दिवाण नेमण्याचा अधिकारही त्यांना आहे. पण अशी नेमणूक झाल्यास ती झाल्यापासून सहा महिन्यांच्या आंत जर त्याला लोकनियुक्तपण संपादितां आलें नाहीं तर दिवाणगिरीस

मुकावें लागतें. कार्यकारी मंडळ ही एक समष्टि-रूप संस्था आहे व म्हणून इतरांशीं वागतांना त्यांतील सभासदांना एकेकटयाच्या जबाबदारी-वर वागतां येत नाहीं; तर सर्व कार्यकारी मंडळ मिळून एक अशा धोरणानें त्यांस वागावें लागतें.

दिवाणांच्या बाबतींत मात्र सगळे दिवाण मिळून एक समष्टिरूप संस्था अशी कल्पना अंम-लांत नाहीं. प्रत्येक दिवाण आपापल्यापुरतें स्वतंत्र पणें पाहातो. व क्वचित् कोठे दिवाणांनीं आपलें मंडळ बनविण्याची खटपट केली तरी त्यांना यश मिळत नाहीं, कारण गव्हर्नर हा त्यापैकीं प्रत्ये-काशीं स्वतंत्र संबंध ठेवण्याचें धोरण राखतो. सगळे दिवाण एकाच राजकीय पक्षाचे असले पाहिजेत असें नाहीं. कार्यकारी मंडळांतील सभा-सदांचा जितका पगार असतो तितकाच दिवाणा-लाही असावा असा नियम आहे; पण त्या त्या कायदेमंडळानें जर याहून कमी पगार द्यावा असें ठरविलें तर त्यांस तो कमी पगार पतकरावा लागतो. सामान्य रीत्या दिवाणांच्या सल्ल्यानेंच गव्हर्नर हे वागतात, पण जर दिवाणांचें म्हणणें बाजूस सारून एकादी गोष्ट करणें योग्य आहे असें गव्हर्नर यांस वाटलें तर तसें करण्याचा गव्हर्नर यांस अखत्यार आहे. व जर दिवाणांना ही गोष्ट नापसंत झाली तर राजिनामा देऊन आपली नापसंती व्यक्त करण्यापलीकडे त्यांस कांहीं करतां येत नाहीं. कार्यकारी मंडळाच्या मताप्रमाणेंच गव्हर्नर यास वागावें लागतें, व मंडळांत मतभेद होऊन सारखीं सारखींच मतें दोन्ही अंगांस पडलीं तर जादा मत देण्याचा गव्हर्नरला हक्क आहे. पण शांतता इत्यादि कारणास्तव मात्र जरूर वाटल्यास या मंडळाचें मत न जुमानतां योग्य तें करण्याचा गव्हर्नरास पूर्ण अधिकार आहे. राखीव खात्याचें कार्यकारी मंडळ व सोपीव खात्यांचे दिवाण यांनीं एकाद्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं संयुक्त बैठकी भरवाव्या अशी तर-तूद कायद्यानें केलेली नाहीं. सोपीव खात्यांतील एकादा विषय परत कायमचा राखीव करून घेणें, किंवा एकादा कांहीं मुदतीपर्यंत राखीव बनविणें व तसेंच एकादा राखीव विषय सोपीव बनविणें या गोष्टीस से. ऑफ स्टेट इन् कौ. यांची संमति असावी लागते. गव्हर्नरांच्या प्रांतांच्या कारभारा-वर ग. ज. इन् कौ. यांस देखरेख ठेवण्याचा, दिशा दाखविण्याचा आणि नियमन घालण्याचा जो अधिकार आहे त्या अधिकाराचा उपयोग सोपीव खात्यांच्या बाबतींत ग. ज. इन् कौ. यांस पुढें मिळालेल्या दोन मुख्य प्रसंगीं करतां येतो.

(१) सोपीव खात्याच्या दिवाणांच्या कार-भारानें मध्यवर्ती सरकाराच्या खात्यांस जर कांहीं बाधा होऊं लागली तर, व (२) प्रांताप्रांतांत कांहीं कटकटी उत्पन्न होऊन जर कांही तडजोडी-चा मार्ग निघत नसेल तर प्रांतिक कौन्सिलांत पास झालेलें एकादें बिल रद्द करण्याचा हक्क ग. ज. यांस आहे. तसेंच एकाद्या बिलाच्या कामीं बादशहांच्या मर्जीचा कल कसा आहे हें पाहण्या-साठीं त्यांस तें बिल तहकूब ठेवतां येतें व हिज मॅजेस्टी इन् कौन्सिल यांची सही त्याच्यावर झाल्यानंतरच या कायदेमंडळांत पास झालेल्या बिलास कायद्याचें स्वरूप येतें. हिंदुस्थानांतील कोणत्याही कायदेमंडळांत पास झालेला प्रत्येक कायदा ग. ज. यांच्या द्वारा से. ऑफ स्टेट यांज-कडे जावा लागतो, व हा कायदा अंमलांत याव-यास नको असें म्हणण्याचा हक्क हिज् मॅजेस्टी इन् कौन्सिलला आहे. पास झालेलें बिल पसंतीसाठीं गव्हर्नर यांजकडे गेलें असतां जर त्यांस तें त्याच स्वरूपांत पसंत नसेल तर आपल्या शिफारशी-सह पुनर्विचारासाठीं कायदेमंडळाकडे तें त्यास परत पाठवितां येतें. शांतता इत्यादिकांसाठीं एकादा नवा कायदा आपल्या प्रांतास हवा आहे असें प्रांतिक गव्हर्नरनें जर ग. ज. इन् कौ. यांस कळविलें तर तसा कायदा पास करून पाठव-ण्याचा अधिकार ग. ज. इन् कौ. यांस आहे. शांतता इत्यादिकांसाठीं सबंध हिंदुस्थानला किंवा एकाद्या प्रांताला लागू पडेल असे वटहुकूम काढणें जरूर आहे असें जर ग. ज. यांस वाटलें तर ते काढण्याचा अधिकार त्यांना आहे. हे वटहुकूम सहा महिन्यांपेक्षां जास्त अंमलांत राहात नाहींत.

प्रांतिक कायदेमंडळः—.गव्हर्नर असलेल्या प्रत्येक प्रांतांत कायदेमंडळाची स्थापना झालेली आहे. गव्हर्नर हा स्वतः या कायदेमंडळाचा सभासद नसतो. पण त्याच्या कार्यकारी मंडळाचे सभासद मात्र कायदेमंडळाचे सभासद असतात. व खुद्द त्यास कायदेमंडळाची बैठक बोलावितां येते व त्याजपुढें भाषणही करतां येते. निरनिराळ्या प्रांतांतील कायदेमंडळांतील सभासदांची संख्या निरनिराळी असते. बंगाल्यांत १२५, मद्रास व संयुक्त प्रांत यांत प्रत्येकीं ११८, मुंबईंत ११८ बिहार ओरिसा यांत ९८, पंजाबांत ८३, मध्यप्रांतांत ७० व आसामांत ५३ याप्रमाणें सभासद आहेत. कायदे-मंडळांत शेंकडा २० हून जास्त सरकारी सभासद असतां उपयोगी नाहीं व शेंकडा ७० लोकनियुक्त

असले पाहिजेत असा नियम आहे. सरकारी नोकरांस निवडणुकीस उभे रहातां येत नाहीं. सभासदांच्या संख्येचें वर दिलेलें परस्पर प्रमाण कायम ठेवून कायदेमंडळांतील सभासदांची संख्या वाढवितां येते. कायदेमंडळांत कांहीं सभासद नेमण्याचा हक्क गव्हर्नर यांस आहे; तसेंच एकाद्या बिलाच्या चर्चेच्या प्रसंगीं तज्ज्ञ माणसांची नेमणूक करण्याचा अधिकारही त्यांस आहे. ही तज्ज्ञांची संख्या मात्र आसामांत १ व इतर प्रांतांत दोन इतकीच असावी लागते. वऱ्हाडातर्फेचे सभासद जरी लोकनियुक्त असले तरी त्यांना 'मध्यप्रांतांतील कायदेमंडळांतील नेमलेले सभासद' हेंच नांव मिळतें. कायदेमंडळाची मुदत सामान्यतः तीन वर्षांची असते. मुदतीपूर्वीच तें बरखास्त करावयाचें असेल किंवा नवें कौन्सिल बोलवावयाचें असेल किंवा बैठक लांबणीवर टाकावयाची असेल तर ग.ज. यास त्यांच्या कायदेमंडळाच्या बाबतींत या प्रकरणीं जे अधिकार असतात तेच अधिकार गव्हर्नर यांस असतात. गव्हर्नर यांस कौन्सिलची मुदत एक वर्ष वाढवितां येते. ग. ज. यांस मात्र आपल्या कायदेमंडळाची मुदत वाटेल तितकी वाढविण्याचा अधिकार आहे. कायदेमंडळाचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हे लोकनियुक्त असावे लागतात व त्यांच्या नेमणुकीस गव्हर्नर याची मंजुरी असावी लागते. राखीव खात्याच्या खर्चासाठीं कार्यकारी मंडळानें केलेल्या पैशाच्या मागण्या जर कायदेमंडळानें पास केल्या नाहींत व जर या पैशाशिवाय तीं तीं राखीव खातीं चांगलीं चालावयाचीं नाहींत असें गव्हर्नर यांस वाटेल तर कौ. चें मत बाजूला सारून जरूर तो पैसा पास करून घेण्याचा अधिकार गव्हर्नर यास आहे.

पण जर शांतता इत्यादिकांसाठीं किंवा एकादें खातें सुरळीत चालू राहावें यासाठीं कौन्सिलचें मत विरुद्ध असलें तरी, गव्हर्नर यांस 'कोणच्याही खात्याच्या' खर्चास लागणाऱ्या रकमा पास करून देतां येतात. येथे कोणच्याही 'खात्याच्या' या शब्दांच्या अर्थाविषयीं ओढाताण होणें शक्य आहे. वास्तविक पाहतां जर कांहीं खातीं सोपीव आहेत व त्यांच्या पैशाच्या मागण्या कौन्सिलनेंच नाकबूल केल्या आहेत तर गव्हर्नर यांस त्या कशा पास करतां येतील? (बंगालचे गव्हर्नर लॉर्ड लिटन यांनीं असाच प्रसंग उद्भवला असतां शिक्षण खातें व वैद्यक खातें यांच्या पैशाच्या मागण्या कौन्सिलनें नाकारलेल्या आहेत हें लक्षांत घेऊन त्या भागविण्याचें आपणही नाकारिलें). 'कोणच्याही खात्याच्या' यांचा शब्दार्थ घेऊन वागावयाचें म्हटल्यास गव्हर्नरना या रकमा मंजूर करतां येतील. पण जर शासनसूत्रांचा मूळ भाव लक्षांत घ्यावयाचा असेल तर त्यांस असें करतां येणार नाहीं. कांहीं विषयावर कौन्सिलनें मत द्यावयाचें नाहीं इतकेंच नव्हे तर त्यांची चर्चाही करावयाची नाहीं असें ठरलेलें आहे. हे विषय म्हणजे १ मध्यवर्ती सरकारांत प्रांतिक सरकारांनीं भरावयाचे हप्ते. २ काढलेल्या कर्जावरील व्याज व त्याच्या फेडीसाठीं टाकावयाच्या शिलकी. ३ कायद्यानें ठरलेल्या खर्चाच्या रकमा. ४ बादशहांनीं किंवा से. आ. स्टेट इन् को. यांनीं नेमलेल्या लोकांचे पगार व त्याचीं सेवान्त वेतनें. ५ हायकोर्ट जज्ज व ॲडव्होकेट जनरल यांचे पगार शांतता इत्यादिकांसाठीं एकादें बिल सभेपुढें येऊं न देण्याचा जो सर्टिफिकेशनचा अधिकार ग. ज. यांस आहे तोच आपल्या प्रांतापुरता गव्हर्नर यासही आहे. त्याप्रमाणेंच सर्टिफिकेशन करून कौन्सिलनें नापसंत केलेलें बिल त्यास पास म्हणून ठरवितां येतें. हा अधिकार बिलाचा संबंध राखीव खात्याशीं जेव्हां असेल तेव्हांच त्यांस चालवितां येतो. गव्हर्नर यानें अशा रीतीनें 'सर्टिफाय' करून हें बिल पास झालें आहे असें ठरविलें म्हणजे त्यांस कायद्याचें रूप येतें. व हा कायदा "प्रांतिक कायदेमंडळांनीं पास केलेला कायदा" ह्या नांवास पात्र होतो. अशा रीतीनें तयार केलेला हा कायदा ग. ज. कडे पाठवावा लागतो व ग. ज. स्वतः बादशहांच्या मर्जीवर सोपविण्यासाठीं राखून पाठवितो. फारच जरूर पडल्यास बादशहांची पसंती न घेतां सुद्धां अशा कायद्याला ग. ज. आपली संमति देतो. मात्र हें झाल्यावर बादशहांच्या मनांत त्या कायद्याला परवानगी नाकारण्याचें आलें तर तो त्यांस नाकारता येतो. पण बादशहांच्या पसंतीसाठीं त्याजपुढें हा कायदा मांडावयाच्या पूर्वीं से. ऑफ स्टेटला तो पार्लमेंटच्या दोन्ही सभांपुढें आठ दिवसपर्यंत ठेवावा लागतो. हा सर्टिफिकेशनचा अधिकार गव्हर्नर यांस सोपीव खात्याच्या बाबतींत चालवितां येत नाहीं हें अगदीं उघड आहे. प्रांतिक कायदेमंडळांना आपापल्या प्रांतांत शांतता राखावी व कारभार सुयंत्र चालावा यासाठीं कायदे करण्याचा हक्क आहे. कायदेमंडळाला एकादा कायदा अजिबात परत घेतां येतो किंवा बदलता येतो, मात्र हा कायदा त्यांनीं स्वतःच पास केलेला नसला पाहिजे ब्रिटिश पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्याच्या मतलबास धक्का बसेल

असा कसलाही कायदा त्यांस पास करतां येत नाहीं.

नोकरांचे पगार

अंमलदार	जास्तींत जास्त वार्षिक पगार.रु.
गव्हर्नर जनरल	२५६०००
बंगाल,मद्रास,मुंबई व संयुक्त प्रांत येथील गव्हर्नर	१२८०००
कमांडर इन् चीफ	१००,०००
पंजाब व बिहार आणि ओरिसा येथील गव्हर्नर.	१००,०००
मध्यप्रांत--गव्हर्नर	७२,०००
आसाम--गव्हर्नर	६६०००
लेफ्टनंट गव्हर्नर	१००,०००
ग. ज. च्या कार्यकारी मंडळाचे सभासद (कमांडर इन्-चीफ खेरीजकरून).	८०,०००
बंगाल, मद्रास,मुंबई व संयुक्त प्रांत येथील गव्हर्नरांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद	६४,०००
पंजाब, बिहार व ओरिसा येथील ग. च्या कार्यकारी मंडळाचे सभासद	६००००
मध्यप्रांत ग. च्या कार्यकारी मडळाचे सभासद.	४८०००
आसाम ग. च्या कार्यकारी मंडळाचे सभासद	४२०००

या यादींतील अंमलदारांचे पगार हिंदुस्थानच्या खजिन्यांतून दिले जातात.

या नोकरांची इतर सर्व तरतूद करणें व विलायतेहून जाण्यायेण्याचा खर्च देणें या गोष्टी स्टेट सेक्रेटरी यांस करतां येतात. या अधिकाऱ्यांना मिळणारें वेतन हें ते येथें जोंपर्यंत काम करीत आहेत तोंपर्यंतच्या त्यांच्या नोकरीवर त्यांना मिळालेला निवळ नफा आहे असें समजण्यांत येतें.

सनदी नोकरांच्या राखीव जागा

ग. ज. इन् कौ. यांच्या हाताखालील जागा.

फौज, मरीन, शिक्षण, परदेश, पोलिटिकल, पी. डब्ल्यू. डी. हीं खातीं सोडून इतर प्रत्येक खात्यांतील सेक्रेटरी, जॉइंट सेक्रेटरी व डेप्युटी सेक्रेटरी, तीन अकाउंटंट जनरल.

गव्हर्नरच्या हातांखालील जागा.

१ बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचा सभासद.
२ फिनॅन्शिअल कमिशनर.
३ कमिशनर ऑफ रेव्हेन्यू.
४ कमिशनर ऑफ कस्टम्स्.
५ अफूचा एजंट
६ पब्लिक वर्क्स व मरीन हीं सोडून इतर प्रत्येक खात्याचा सेक्रेटरी
७ बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचा सेक्रेटरी.
८ डिस्ट्रिक्ट अथवा सेशन्स् जज्ज.
९ ॲडिशनल डिस्ट्रिक्ट अथवा सेशन्स् जज्ज
१० डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट.
११ कलेक्टर ऑफ रेव्हेन्यू अथवा चीफ रेव्हेन्यू ऑफिसर ऑफ ए डिस्ट्रिक्ट.

ग. ज. गव्हर्नर व ग. ज. च्या कार्यकारी मंडळांतील सभासद यांच्या जागावर जर एकादे वेळीं तात्पुरती नेमणूक करावयाची असेल तर तीबद्दल जे कांहीं नियम आहेत त्यांत पुढें दिलेला नियम विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ग. ज. च्या जागीं जर तात्पुरती नेमणूक व्हावयाची असेल तर ती मुंबई, मद्रास व बंगाल या तीन प्रांतांच्या गव्हर्नरांपैकीं, त्यांच्या नेमणुकीच्या तारखा लक्षांत घेतां जो कोणी अधिक जुना असेल त्याची निवड करतात. बाकीच्या प्रांतांचे गव्हर्नर हे या निवडणुकीस पात्र नाहींत. ही नवी नेमणूक होऊन ती अंमलांत येईपर्यंतच्या संधिकालांत कार्यकारी मंडळाचा व्हाईस-प्रेसिडेंट किंवा तो नसल्यास कार्यकारी मंडळाच्या सभासदांपैकीं जो सर्वांत जुना असेल तो ग. ज. चें काम चालवितो. गव्हर्नरची जागा रिकामी पडल्यास दुसऱ्याची नेमणूक होऊन ती अंमलांत येईपर्यंत, कार्यकारी मंडळाच्या उपाध्यक्षानें, तो नसल्यास कार्यकारी मंडळाच्या सभासदांपैकीं सर्वांत जुन्या सभासदानें व एकाद्या प्रांतांत कार्यकारी मंडळच नसल्यास तेथील सरकारचा जो मुख्य सेक्रेटरी असतो त्यानें हें गव्हर्नरचें काम चालवावें असें ठरलें आहे.

१९१९ च्या कायद्याचें ९६ वें कलम फारच महत्त्वाचें आहे तें असें--

खालसा मुलुखांतील कोणीही नागरिक किंवा (बादशहांच्या साम्राज्यांतील कोणीही इतरदेशीय खालसा मुलखाचा रहिवासी झालेला असा नागरिक) असल्यास तो केवळ अमुक धर्माचा, अमुक देशाचा, अमुक ठिकाणीं जन्मलेला, अमुक कुळांत जन्मलेला, अमुक रंगाचा आहे या सबबीवर त्यांस अमुक एक अधिकाराची जागा मिळावयास केव्हांही प्रतिबंध होणार नाहीं. संस्थानिक किंवा त्यांचे प्रजाजन यांनाही खालसा मुलुखांतील राज्यकारभारांत नेमले जाण्यास कसलाही प्रत्यवाय नाहीं; इतकेंच कीं सेक्रे. ऑफ स्टेट इन् कौ. यांच्या

संमतीनें ग. ज. इन् कौ. हे जीं कोणचीं नियंत्रणें किंवा ज्या अटी घालतील त्या त्यांना पतकराव्या लागतात. या सनदी नोकर खात्यांत प्रवेश हवा असल्यास विलायतेस जी एक कॉम्पिटिटिव्ह (चढाओढीची) परीक्षा ठेवली आहे तीस बसावें लागतें. या परीक्षेस कोणासही बसतां येतें. सध्या असलीच परीक्षा दिल्ली येथेंही घेतात. पास झालेल्या उमेदवारांना सहा महिनेपर्यंत सरकारी खर्चानें विलायतेस राहवून आणतात. या विलायतच्या व दिल्लीच्या परीक्षांत पास झालेल्यांना आय. सी. एस. (इंडियन सिव्हिल सर्वंट) म्हणतात व यादी नं. २ यांत दिलेल्या जागावर त्यांच्या नेमणुका होतात. अलीकडे अलीकडे या परीक्षेस न बसलेल्या पण त्या त्या खात्यांत विशेष हुषारी दाखविलेल्या कांहीं माणसांना आय. सी. एस्. या नोकरवर्गांत दाखल करून घेण्याची पद्धति पडत आहे. प्रांतिक सरकारच्या हातीं 'लिस्टेड सर्व्हिसेस' या नांवाच्या कांहीं जागा असतात. सगळ्या प्रांतांत त्या सारख्याच असतात असें नाहीं. या जागांवरही आय. सी. एस्. झालेल्यांचीच नेमणूक व्हावी असा नियम असला तरी प्रांतिक नोकर वर्गांतून कांहीं हुषार नोकरांना या जागा देण्यांत येतात.

सायमन कमिशन

फेडरेशनच्या कल्पनेचा स्वीकारः—अखिल हिंदुस्थानाकरितां हिंदुस्थानांतील प्रत्येक भागाचा जिच्यामध्यें समावेश होईल अशी फेडरेशनसारखी एखादी व्यवस्था असावयास पाहिजे आहे, या महत्त्वाच्या मुद्याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. बारा वर्षांपूर्वीं मि. मांटेग्यु व लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, "भविष्यकालीन हिंदुस्थानाकडे पाहिलें तर 'फेडरेशन'ची कल्पना केवळ वरून दिसण्यापुरतीच आहे असें आम्हांस वाटतें. निरनिराळे प्रांत शेवटीं स्वयंशासित विभाग बनतील व त्या सर्वांशीं मिळून ज्या प्रश्नांचा संबंध येईल ते प्रश्न केवळ मध्यवर्ती सरकारकडूनच निकालांत काढण्यांत येतील. पण ब्रिटिश प्रांताच्या संरक्षण, जकाती, हुंडणावळ, अफू, आगगाडया, पोस्टें व टेलेग्राफ अशा सर्वप्रांतीय प्रश्नांमध्यें देशी संस्थानांचे हितसंबंधही निगडित झालेले असणार. अशा प्रकारचे प्रश्न जर मध्यवर्ती सरकारांत केंद्रीभूत झाले तर अंतर्गत स्वायत्तता असूनही देशी संस्थानिकांना त्यांची इच्छा असल्यास, मध्यवर्ती सरकारशीं असलेला आपला संबंध अधिकाधिक दृढ करतां येईल. पण अशा तऱ्हेची फेडरेशनची घडण आम्हांस शक्य वाटत असली तरीही तिचें अस्तित्व शक्य तितक्या जवळ आणण्याकरितां जरूर तो प्रयत्न करणें हें आम्ही अत्यंत महत्त्वाचें समजतों. व अशा तऱ्हेचें कार्यही सुरूं आहे. एकंदरींत भविष्यकालीन फेडरेशनची घडण सहज रीतीनें व शक्य तितक्या लवकर घडवून आणणें एवढेंच आमचें कर्तव्य आहे व तें आम्हांस करतां येईल."

राज्यघटनेच्या दृष्टीनें वरील उताऱ्यांतील सूचनेवरून 'कौन्सिल ऑफ प्रिन्सेस' स्थापन करावें व त्याची 'स्टँडिंग कमिटी' असावी इतका निष्कर्ष निघतो. फेडरेशनच्या महत्त्वाच्या दृष्टीनें आणखीही दोन महत्त्वाचे उतारे विचारांत घ्यावयास पाहिजेत. बिकानेरचे महाराज म्हणतात कीं, "योग्य परिस्थिति व काल उत्पन्न होईल त्यावेळीं हिंदुस्थानचा प्रश्न निकालांत काढण्यासाठीं हिंदुस्थानचें अंतिम ध्येय जें फेडरेशन तेंच हिंदुस्थानला द्यावयास हवें. या शब्दानें संस्थानिकांना किंवा संस्थानी सरकारांना काडीमात्र भीति वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यावरील आपला विश्वास संस्थानिकांनीं कधींच व्यक्त केला आहे." आणि बटलर कमिटीनें मांटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्टांतील तत्त्वांना संमति दाखविली असून त्याचबरोबर या बाबतींत फार घाई करणें योग्य होणार नाहीं अशी एक धोक्याची पण धूर्ततेची सूचना देऊन ठेविली आहे. बटलर कमिटीची ही सूचना आम्हांसहि पूर्ण पसंत आहे. कमिटी म्हणते, "परस्परांमधील संबंध अधिकाधिक दृढावत जावेत म्हणून जरूर ती सर्व व्यवस्था आम्हीं केलीच आहे. भविष्य काळामध्यें सध्यांचे दोन हिंदुस्थान जसजसे एकमेकांच्या अधिकाधिक जवळ येतील तसतशी फेडरेशनसारखी एकादी व्यवस्था अमलांत येण्यास आमच्या सूचनांमुळें कोठेंहि अडथळा येणार नाहीं. आमच्या शिफारशींमध्यें अशी एकही गोष्ट नाहीं कीं, जी एकाद्या मोठ्या संस्थानाला किंवा संस्थानाच्या गटाला ब्रिटिश हिंदुस्थानशीं असलेले आपले संबंध दृढावून घेण्याच्या कामीं सध्यां किंवा पुढें केव्हांही अडथळा करील. ....पण बहुतेक सर्व संस्थानिक आपली मालमत्ता व मानमरातब अगदीं जसाच्या तसा रहावा आणि संस्थानामध्यें आपली सत्ता एकमेळ अशीच असावी याविषयीं इतक्या पराकाष्ठेनें झटत आहेत कीं, सध्यांच्या काळीं फेडरेशनसंबंधीं कोणत्याहि प्रश्नावर बोलावयाचें म्हणजे अत्यंत खबरदारी घ्यावी लागते."

तेव्हां साधारणपणें सर्वसंमत झालेली कल्पनाच उचलून धरून आम्ही असें म्हणतों कीं, आज ना उद्यां अखिल हिंदुस्थानचें फेडरेशनसारख्या एखाद्या संस्थेमध्यें एकीकरण होईल, आणि या फेडरेशनची उत्क्रांति सावकाशच व्हावयाची असून ती घाई करून जोरानें घडवून आणूं पाहणें अगदीं अशक्य आहे.

अंतिम फेडरेशनचें स्वरूपः—अंतिम ध्येय जरी पुष्कळ दूर असलें तरी हिंदी फेडरेशनमधील हिंदुस्थानची परिस्थिति कशी असेल याचा आपण थोडासा विचार करूं. म्हणजे

फेडरेशनच्या दृष्टीनें सध्यां काय करतां येण्यासारखें आहे, व त्याला कोणते अडथळे येण्याचा संभव आहे याचा कयास आपणांस सहज बांधतां येईल. फेडरेशनच्या संपूर्ण स्वरूपांत त्यांमध्यें फेडरेशनचें कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, जमीनमहसूल या सर्वांचाच समावेश व्हावयाचा आहे. फेडरेशनच्या कार्यकारी मंडळामध्यें संस्थानें व प्रांत या दोघांनाही प्रतिनिधि असतील व या कायदेमंडळाचा तावा संयुक्त संबंध असणाऱ्या सर्व प्रश्नांवर चालेल तसेंच फेडरेशनच्या करांचें उत्पन्न व खर्च (निदान खर्चाची विभागणी) यावरही त्याची सत्ता चालेल. फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाचा तावा फेडरेशनसंबंधींच्या सर्व प्रश्नांवर चालेल; आणि ज्याअर्थी हातांत पुरेशी सत्ता नसतांना कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी अंगावर घेणें निरर्थक आहे त्याअर्थी आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्यास पुरेशी सत्ता व सामर्थ्य या मंडळाच्या हातीं राहील. फेडरेशन दोन मुख्य विभाग मिळून तयार होईल. (१) निरनिराळे सर्व प्रांत. या प्रत्येक प्रांतांतून कायदेमंडळ, त्याला जबाबदार असलेलें कार्यकारी मंडळ व सर्वांच्यावर मुख्य गव्हर्नर अशी राज्यकारभाराची व्यवस्था असेल.प्रांताची सर्व अंतर्व्यवस्था प्रांतिक सरकारच्या कार्यकारी मंडळाकडे राहील व प्रत्येक प्रांताचा वसूल आणि खर्च त्या त्या प्रांताच्या ताब्यांत राहील. (२) निरनिराळीं हिंदी संस्थानें. प्रत्येक संस्थानाला अंतर्गत राज्यव्यवस्थेबाबत संपूर्ण अखत्यारी मिळेल आणि त्याच्या अधिपतीचा संबंध खुद्द ब्रिटिश राजाशीं राहील. अंतर्गत राज्यकारभार आणि जमीनमहसुलाची पद्धति या बाबतींत प्रत्येक संस्थान स्वतंत्र असलें तरी संस्थानच्या सरहद्दीवर त्याला जकात बसवितां येणार नाहीं. सर्व प्रांत आणि हिंदी संस्थानें या दोघांवरहि इंग्लंडच्या राजाचा प्रतिनिधि मुख्य म्हणून राहील. हिंदी संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान या दोघांकडून तो अनुक्रमें व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणून ओळखला जाईल. अशा रीतीनें हिंदी फेडरेशनमधील मुख्य मुख्य तत्त्वांचा विचार केला म्हणजे त्याच्या मार्गांतील कोणते अडथळे दूर केले पाहिजेत आणि त्याचा विचार करतांना प्रत्येक पाऊल किती विचारानें व खबरदारी घेऊन पुढें टाकावयास हवें याचा उमज पडतो. फेडरेशनच्या कायदे मंडळासंबंधानें बोलावयाचें तर ज्याअर्थी कायदे करण्याच्या बाबतींत प्रत्येक प्रांत व प्रत्येक संस्थान यांना संपूर्ण स्वायत्तता द्यावयाची आहे, त्याअर्थी जे प्रश्न कोणतेंही संस्थानी किंवा प्रांतिक कायदेमंडळ विचारांत घेऊं शकणार नाहीं अशा विशिष्ट प्रश्नांपुरताच कायदे करण्याचा अधिकार देऊन फेडरेशनच्या कायदेमंडळाची सत्ता मर्यादित करावयास नको काय? अशा रीतीनें फेडरेशनच्या अधिकारक्षेत्राबाहेरची कायदे करण्याची सत्ता संस्थानें व प्रांत यांमध्यें वांटून दिली जाईल व ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें सध्यां नसलेल्या कायदे करण्याच्या अधिकाराची उत्तम विभागणी त्या वेळीं दिसेल. यामुळें फेडरेशनचें कायदेमंडळ आपल्या अधिकाराचें अतिक्रमण करीत नाहीं व संस्थानी आणि प्रांतिक कायदेमंडळें आगाऊच मध्यवर्ती सरकाराकडे सोपविलेल्या अधिकारांचा उपयोग करीत नाहींत हें पाहण्याकरितां फेडरेशनच्या न्यायमंदिराची आवश्यकता भासत नाहीं काय? भावी फेडरेशनचे वर सांगितलेले दोन मुख्य विभाग ज्या वेळीं आपण होऊनच फेडरेशनसंबंधीं विचारविनिमय करण्याकरितां एकत्र येतील त्याच वेळीं वरच्यासारख्या प्रश्नांना चालना मिळून त्यांचीं उत्तरेंही मिळतील. आम्हीं आगाऊच म्हटल्याप्रमाणें प्रांतिक कायदेमंडळासंबंधानेंही असेच भानगडीचे प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाहींत. व्हेटोचा अधिकार यापुढें गव्हर्नर जनरल किंवा मध्यवर्ती सरकार यांच्याकडे ठेवावयाचा कीं काय ? गव्हर्नरनें परवानगी किंवा नकार देतांना गव्हर्नर जनरलला विचारून त्याच्या सूचनेप्रमाणेंच वागावयाचें कीं काय? अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार करतांना सल्ला देण्यासाठीं व्हाइसरायाच्या दिमतीला एकादें हिंदी प्रिव्ही कौन्सिल असावें कीं काय? स्वतःमध्यें हिंदी संस्थानांचाहि अंतर्भाव करणाऱ्या फेडरेशनच्या घटनेसंबंधीं अशा तऱ्हेचे प्रश्न म्हणजे खरोखरीच अत्यंत अवघड आहेत. तसेंच प्रांतिक स्वायत्ततेचें प्रमाण जों जों वाढत जाईल तों तों मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकारच्या कारभारावर अतिक्रमणाच्या बाबतींत परिणामकारक अधिकार चालविण्याचा प्रश्न अधिकाधिक महत्त्वाचा होत जाईल आणि अशा प्रकारच्या प्रश्नांची व्यवस्था हिंदुस्थानाकरितां लिहिलेल्या कायद्यान्वयें करतां आली तरी आत्यंतिक प्रसंगीं हिंदी संस्थानांच्या कारभारांत हक्कानें हात घालण्याचा मध्यवर्ति सत्तेच्या अधिकाराचा उगम अगदीं निराळ्याच ठिकाणीं असेल व तो अधिकारही मध्यवर्ती सत्तेला अगदी निराळ्या तऱ्हेनें प्राप्त होईल. फेडरेशनच्या कार्यकारी मंडळासंबंधानें विचार करूं लागतांच कित्येक

प्रश्न डोळ्यांपुढें येतात. त्याची घटना कशी करावयाची व त्याचें कार्य कोणतें? अर्थात्‌च या कार्यकारी मंडळांत ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें या दोहोंच्याहि प्रतिनिधींचा अंतर्भाव झाला आहे. पण हे प्रतिनिधि कसे व कोणत्या प्रमाणांत निवडावयाचे हें ठरविणें फारच अवघड आहे. घटना कशीही असली तरी या कार्यकारी मंडळाच्या निकालाचा अंमल सर्व हिंदुस्थानभर चालावयास पाहिजे. तेव्हां ज्यावेळीं हिंदी संस्थानिकांच्या प्रतिनिधींच्या संमतीनें व साहाय्यानें तयार केलेल्या निकालाचा अंमल वरील प्रतिनिधि ज्या संस्थानांतील नाहींत त्याही संस्थानांत व ब्रिटिश हिंदुस्थानच्या सर्व भागांत, म्हणजे थोडक्यांत बोलावयाचें तर सर्व हिंदुस्थानभर चालेल; त्या कालाची अपेक्षा करीत राहिलें पाहिजे.फेडरेशनच्या कायदेमंडळाची संघटना ठरवितांनाहि अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. या बाबतींत आम्हांस दोन सूचना करावयाच्या आहेत. फेडरेशनच्या कायदेमंडळांत अर्थात्‌च संस्थानें व प्रांत या दोहोंचेही प्रतिनिधि असणार आणि यामुळें मध्यवर्ती कायदेमंडळांतील ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधि प्रांतिक कायदेमंडळाच्या सभासदांमधूनच निवडलेले असावेत या आमच्या म्हणण्यास पुष्टि मिळते. या रीतीनें आणि केवळ याच रीतीनें संस्थानिकांचे प्रतिनिधि घेण्याचा मार्ग पूर्ण मोकळा राहतो.संस्थानी प्रतिनिधि,अर्थात्‌च,संस्थानांत जी मुख्य सत्ता असेल तिच्याकडूनच निवडले जातील; मग ती सत्ता कोणत्याहि प्रकारची असो. अशा रीतीनें फेडरेशनच्या पोटांत निरनिराळ्या स्वरूपाचीं सरकारें असतांना फेडरेशनच्या एकच एक कायदेमंडळाची कल्पना शक्य कोटींतीलच आहे. दुसऱ्या दृष्टीनें आम्हांस असें वाटतें कीं, सर्व मुख्य मुख्य हिंदी संस्थानिकांवर एकाच वेळीं एकदम संपूर्ण अंमल सुरू करण्यापेक्षां जर खुद्द संस्थानिकांच्याच, फेडरेशनसंबंधींच्या कल्पना वृद्धि पावतील तर मध्यवर्ती कायदे मंडळाच्या उत्क्रांतीचा तो एक अधिक शक्य असा मार्ग होईल.

अल्पसंख्य समाजाचें मतदान

समेट न झाल्यास मुसलमानांचे विभक्त मतदार संघ कायमः--- हिंदु व मुसलमान यांच्यांत अद्याप समेट झालेला नाहीं. व अशा तऱ्हेचा समेट होणें जर शक्य नसेल तर 'लोकशाहीच्या मार्गांत एक मोठीच धोंड' ठेवल्यासारखें होईल. तरीपण कोणाहि तिऱ्हाइतानें या भानगडींत पडण्यापेक्षां आपापसांत समेट झालेलाच अधिक बरा. तेव्हां अशा तऱ्हेच्या समेटाच्या अभावीं मुसलमानांचे विभक्त मतदारसंघच कायम ठेवावेत असें म्हणणें आम्हांस भाग पडत आहे.

शीख प्रतिनिधित्वः—मुसलमान जर इलाख्या—इलाख्यांतून विभक्त मतदार संघ मागतात व ते त्यांनां मिळताताहि तर पंजाबच्या शिखांची विभक्त मतदार संघाची मागणी झिडकारणें अगदीं अशक्य आहे. मांटेग्यू चेल्म्सफर्ड रिपोर्टनेंही या प्रश्नाबाबत सहानुभूतिच दाखविली आहे. पंजाबच्या प्रांतिक कायदे मंडळामध्यें सध्यां शिखांना ज्या जागा मिळाल्या आहेत, त्यांचा आंकडा, लोकसंख्येचें प्रमाण व मतदारांच्या संख्येचें प्रमाण यांच्या जवळ जवळ मध्यावर आहे. सध्यांची मतदानाच्या पात्रतेची मर्यादा कमी केली तर वरील दोनही प्रमाणें जवळ जवळ सारखीं होतील. लाहोर येथें आम्हांस भेटलेल्या शिखांच्या शिष्टमंडळानें सध्यां शिखांना जितक्या राखीव जागा आहेत त्यांत शेकडा ३० वाढ करावी अशी मागणी केली. आतां शें. ३० इतकी मोठी मागणी करणें जरी शक्य नाहीं तरी शिखांच्या सध्यांच्या जागांत छाटाछाट करणें मात्र अन्यायाचें होईल. राखीव जागांच्या ऐवजीं विभक्त मतदार संघ स्वीकारण्यास जर शीख तयार असतील तर कदाचित् त्यांना सध्यांच्या राखीव जागांपेक्षां अधिक जागा मिळण्याचाच संभव आहे. मात्र सध्यांची परिस्थितिच जर चालू ठेवावयाची असेल तर शिखांना कांहीं अधिक सवलती द्याव्यात असें आमचें मत आहे. विशेषतः मध्यवर्ती कायदेमंडळांतील त्यांचें प्रतिनिधित्व एकाच प्रांतांत त्यांचें जें वजन आहे त्यावर अवलंबून असलें पाहिजे. "सर्वसामान्य" हिंदी गटांतून ज्या जागा भरण्यांत येतात, त्यांतील शिखांचें सध्यांचें प्रमाण मात्र आम्हांस न्याय्य वाटतें.

मद्रास इलाख्यांतील ब्राम्हणेतर व मुंबई इलाख्यांतील मराठेः— मद्रास इलाख्यांतील ब्राम्हणेतर व मुंबई इलाख्यांतील "मराठे व तत्सम जाती' हे जरी अल्पसंख्यांक नसले तरीही मुसलमानेतर गटांत राखीव जागा देऊन त्यांना संरक्षण देण्यांत आलें होतें. राखीव जागांशिवाय ब्राम्हणांपुढें आपला निभाव लागावयाचा नाहीं, ही मद्रासमधील ब्राम्हणेतरांची भीति अगदींच निराधार ठरली आहे. तीन निवडणुकींत एकदांही असें झालें नाहीं कीं, ब्राह्मणेतराला मिळालेली एकादी जागा केवळ ती

राखीव म्हणूनच त्याला मिळाली. तेव्हां मद्रास इलाख्यांतील ब्राम्हणेतरांकरितां राखीव जागा ठवण्याची मुळींच जरूरी नाहीं हें अगदीं उघड दिसतें. मुंबईंतील मराठ्यांच्या बाबतींत मात्र राखीव जागांची जरुरी आहे किंवा नाहीं यांपकीं कांहींच सिद्ध झालेलें नाहीं. राखीवपणाचा फायदा न घेतां पुष्कळ मराठे निवडून आलेले आहेत. तर कांहीं जागा केवळ राखीव म्हणूनच त्यांना मिळाल्या आहेत. एकंदरीनें पाहतां मराठ्यांचा राखीव जागांचा हक्क इतक्यांतच काढून घेतां कामा नये.

मागासलेल्या वर्गाचें प्रतिनिधित्वः--मागासलेल्या वर्गाच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून तो तितक्याच भानगडीचा आहे. या बाबतींत अजूनपर्यंत नियोजन (Nomination) पद्धतीचाच अवलंब केलेला आहे. व ही नियोजनपद्धति त्या त्या इलाख्याच्या नियमान्वयें ठरलेली आहे. मद्रास इलाख्याखेरीज इतर प्रांतांतून गव्हर्नराच्या मतें जे वर्ग मागासलेले असतील त्यांना प्रतिनिधित्व मिळावें या हेतूनें या पद्धतीची योजना केलेली आहे. अशा प्रकारें बंगाल व संयुक्तप्रांत यांत प्रत्येकीं एक, मुंबई व बिहार आणि ओरिसा यांत प्रत्येकीं दोन व मध्यप्रांतांत चार सभासद नियोजित केले जातात. पंजाब व आसामच्या कायदेमंडळामध्यें मागासलेल्या वर्गाचा एकही प्रतिनिधि नसतो. गव्हर्नर जनरल आपल्या अधिकारांत वरिष्ठ कायदेमंडळामध्यें मागासलेल्या वर्गाचा म्हणून एक प्रतिनिधि नियोजित करतो. निरनिराळ्या नऊ मागासलेल्या जातींचे प्रतिनिधि म्हणून मद्रासच्या कायदेमंडळांत दहा नियोजित सभासद असतात. मागासलेल्या वर्गांतील मतदानाचा अधिकार मिळालेल्या व्यक्तींना अर्थातच सर्वसामान्य मुसलमानेतर मतदार संघांतून मत देतां यतें. पण मतदानाच्या लायकीकरितां कमींत कमी जेवढी मालमत्ता एखाद्या व्यक्तीच्या मालकीची असावयास पाहिजे, तितकी मागासलेल्या वर्गांतील फारच थोड्या लोकांची असते. मद्रास इलाख्यांत मागासलेल्या वर्गाची लोकसंख्या शेंकडा १५॥ असून एकंदर मतदारांपैकीं शेंकडा ४·१ इतकेच मतदार मागासलेल्या वर्गांत आहेत. मुंबई इलाख्यामध्येंही हे आंकडे शें. ८ शें. २ असे आहेत. मताधिकाराच्या पात्रतेची मर्यादा कमी केली तरीही कांहीं विशेष व्यवस्था केल्याशिवाय मागासलेल्या वर्गांना सर्वसामान्य मतदार संघांतून आपले प्रतिनिधि निवडून आणतां येतील अशी आशा करणें अगदीं फुकट आहे. त्यामुळें इतकें मात्र होईल कीं, मागासलेल्या वर्गांतील मतदारांचें प्रमाण खात्रीनें वाढेल. स्वतःचीं उन्नति साधण्याकरितां त्या लोकांना जसजसे अधिक महत्त्वाचे अधिकार मिळतील तसतसा राजकारणांत त्यांचा प्रवेश होईल व अशा रीतीनें बऱ्याच कालानंतर त्या वर्गांची प्रगति होईल.अखर शेवटीं मात्र, मागासलेले वर्ग कांहीं विशेष संरक्षण दिल्याशिवाय संयुक्त मतदारसंघांत राहूनही आपलें वैशिष्ट्य कायम राखूं शकतील अशी आम्हांस आशा वाटते. तथापि, जोंपर्यंत त्यांचें प्रतिनिधित्व केवळ नियोजनेच्या (Nomination) स्वरूपांतच कायम राहील, तोंपर्यंत मात्र या दृष्टीनें त्यांची कांहींच प्रगति होणार नाहीं; कारण नियोजन-पद्धतीमुळें राजकारणाचें शिक्षण घेण्यास अवसरच राहात नाहीं. सध्यांसारखा मतदानाधिकार अत्यंत मर्यादित असतांनासुद्धां मागासलेल्या वर्गांत निवडणुकीची पद्धत सुरूं करणें पुष्कळ ठिकाणीं अगदीं शक्य आहे; आणि मतदानाधिकार विस्तृत करणें जरूर आहे असें आम्हीं सांगितलेंच आहे.

त्यांना विभक्त मतदारसंघ द्यावेत काय?:— आम्हांस भेटलेल्या बहुतेक प्रतिनिधींनीं 'आम्हांस विभक्त मतदारसंघ देऊन, लोकसंख्येच्या प्रमाणांत जागा द्याव्यात' अशी मागणी केली. एक-दोघांनींच काय ती नियोजित पद्धतीची तरफदारी केली. विभक्त मतदार संघामुळें अर्थातच मागासलेल्या लोकांचा ज्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे असे पुरेसे लोक निवडूं देणें त्यांना शक्य होईल, पण अशा रीतीनें मागासलेले वर्ग व इतर हिंदु लोक यांच्यांतील फरक अधिक दृढमूल करणें ही गोष्ट अत्यंत गर्हणीय आहे. कारण त्यामुळें मागासलेल्या वर्गांचें इतर हिंदूंशीं पुढें जें राजकीय संम्मीलन व्हावयाचें त्याच्या मुळावरच घाव घातल्यासारखें होईल; आणि ज्या ठिकाणीं मागासलेल्या वर्गांच्या उन्नतीकरतां पुष्कळ प्रयत्न होत आहेत, त्या ठिकाणीं विभक्त मतदारसंघाची तरफदारी करणें चांगलेंच अवघड जाईल. ज्या वर्गांना विभक्त मतदारसंघ आगाऊच मिळाले आहेत, त्यांचे जरी ते कायम ठेवावयाचे असले तरी शक्य असल्यास दुसऱ्या एखाद्या वर्गाला नवीन मतदारसंघ देऊं नयेत या म्हणण्याला त्यामुळें कांहींच बाध येत नाहीं. बरें, मागासलेल्या वर्गांना विभक्त मतदारसंघ द्यावयाचे म्हटलें तरी कोणत्या वर्गांना मागासलेले म्हणावयाचें हें आधीं ठरवावें लागेल; व तें अगदीं स्पष्ट रीतीनें ठर-

विणें फारच अवघड काम आहे. मागासलेल्या-वर्गांचे विभक्त मतदारसंघ, त्या वर्गांची सामाजिक व आर्थिक उन्नति व्हावी म्हणून ठिकठिकाणीं अभिनंदनीय प्रयत्न कधींच सुरू झाले आहेत, त्यांना मात्र खात्रीनें मारक ठरतील.

मागासलेल्या वर्गांकरितां राखीव जागा :—— आम्हांस मुख्य मुद्दा सांगावयाचा तो एवढाच कीं, आठही प्रांतांतून मागासलेल्या वर्गांकरितां कांहीं राखीव जागा ठेवण्यांत याव्यात. या जागा अर्थातच मुसलमानेतर गटांतून राखून ठेवाव्यात. या पद्धतीमुळें मागासलेल्या जातींतील उमेदवारानें कोणत्या अटींची पूर्तता करावयास हवी हें मात्र ठरवावें लागेल; पण मागासलेल्या वर्गांतील मतदार व इतर मुसलमानेतर मतदार यांच्यांत मात्र कांहींच फरक राहावयाचा नाहीं. मात्र एकादा, उमेदवार केवळ वरच्या जातींनीं त्याचें नांव सुचविलें म्हणूनच मागासलेल्या वर्गांचा प्रतिनिधि ठरूं लागला तर त्याला आळा बसावा व या राखीव जागांवर बसणारे सभासद मागासलेल्या वर्गांचे खरोखरीचे प्रनितिधि असावेत म्हणून कांहींतरी नवीन उपाययोजना करावी लागेल. प्रत्येक इलाख्यामध्यें किंवा प्रांतामध्यें, ज्यांना मागासलेल्या वर्गांच्या प्रतिनिधित्वाचा मान देणें न्याय्य आहे अशा संस्था बहुधा असतातच. तेव्हां असे नियम करावेत कीं, वरील-सारख्या संस्थांशीं विचारविनिमय करून किंवा स्वतःच्याच मतानें, कोणत्या उमेदवारांना मागासलेल्या वर्गांच्या राखीव जागांकरितां उभें राहातां येईल हें गव्हर्नरानें स्वतः जाहीर करावें. पुष्कळ ठिकाणीं अशी भीति व्यक्त करण्यांत येते कीं, शिक्षण व अनुभव यांमुळें, प्रांतिक कायदेमंडळांत बसून मागासलेल्या वर्गांचें हिताहित पहाण्यास लायक असे पुरेसे सभासदच त्या वर्गांतून मिळणार नाहींत. अशी स्थिति जरी खरोखरीच उत्पन्न झाली तरी ती फार थोडावेळ टिकेल;पण त्यांतूनही मार्ग काढण्याकरितां आम्हीं गव्हर्नराला आणखी असाही अधिकार देऊन ठेवूं कीं,त्यानें मागासलेल्या जातींतील नसलेल्याही एकाद्या उमेदवाराला त्या जातीतर्फे उभें राहण्याचा हक्क द्यावा किंवा राखीव जागांपैकीं एकाद्या जागेवर त्याची नेमणूकच करावी; हा उमेदवार स्त्री किंवा पुरुष कोणीही असला तरी चालेल. मात्र अट इतकीच कीं, मागासलेल्या जातींत आणखी लायख उमेदवार नाहींत आणि नवीन नेमला जाणारा उमेदवार मागासलेल्या लोकांकरितां विशेष झटत असतो या दोनही गोष्टींबद्दल स्वतः गव्हर्नराची पूर्ण खात्री असली पाहिजे. पण वर दर्शविलेली अडचण बहुतकरून येणार नाहीं अशी आशा वाटत आहे व म्हणून गव्हर्नराला दिलेला हा पुढचा अधिकार फक्त दहा वर्षांपुरतांच असावा आणि या मुदतींत सुद्धां या अधिकाराचा उपयोग त्याला फक्त निम्मे राखीव जागांकरतांच करतां यावा. आमच्या या योजनेचा असा परिणाम होईल कीं, मागासलेल्या वर्गांचे प्रतिनिधि प्रांतिक कायदेमंडळाचे सभासद म्हणून निवडून येतील व मागासलेल्या वर्गांना नियोजनपद्धतीवर अवलंबून राहाण्याचें कारण पडणार नाहीं. दुसरा फायदा असा होईल कीं, मुसलमानेतरांचे सर्व प्रतिनिधि हे मुसलमानेतरांच्या एकाच गटांतून निवडून आल्यासारखें होईल व सहकार्याचीही संधि येईल. शिवाय, मागासलेल्या लोकांच्या प्रश्नाला पुरेशी चालना देण्याकरतां या एकवटलेल्या जोमाचा चांगलाच उपयोग होईल. मागासलेल्या लोकांकरितां ज्या राखीव जागा ठेवावयाच्या त्यांचा आकडा, अर्थातच, प्रत्येक प्रांतामध्यें त्यांची जी लोकसंख्या असेल तीवरून ठरविण्यांत यावा. या जागांच्या संख्येसंबंधीं पहिल्या भागाच्या ५८ व्या परिच्छेदांत आम्हीं एक योजना मांडली आहे, पण पुष्कळ प्रांतांच्या बाबतींत ती केवळ सिद्धांतात्मक ठरण्याचा बराच संभव आहे. प्रतिनिधित्वाच्या नवीन पद्धतीचीं मूलतत्त्वें निश्चित झाल्यानंतर 'फ्रँचाइझ कमिटी' सारख्या एकाद्या मुद्दाम नेमलेल्या मंडळाकडून हीं मूलतत्त्वें प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याकरितां निवडणुकीचे नवीन नियम करणें अगदीं जरूरीचें होईल. अनक कामांपकीं प्रत्येक प्रांताकरतां "मागासलेल्या वर्गा"ची व्याख्या (ही व्याख्या एकाच प्रांताच्या निरनिराळ्या भागांकरितांही वेगळी असूं शकेल) ठरविणें व नंतर त्या प्रांतांतील मागासलेल्या वर्गांची लोकसंख्या ठरविणें हीं दोन कामें मंडळास करावीं लागतील. व्याख्या ठरवून लोकसंख्या कायम केल्यानंतर मुसलमानेतर गटांतील मागासलेल्या वर्गांच्या प्रतिनिधींचा आकडा पुढील तत्त्वानुसार निश्चित करण्यांत यावा असें आमचें मत आहे. सर्वसाधारण हिंदी गटांतील एकूण जागांशीं राखीव जागांचें प्रमाण, मागासलेल्या वर्गांच्या लोकसंख्येचें प्रांतांतील मतदानाधिकार असणाऱ्या सर्व लोकसंख्येशीं जें प्रमाण असेल, त्याच्या तीन-चतुर्थांश असावें.

मागासलेल्या वर्गांच्या एकूण लोकसंख्येच्या

प्रमाणांत त्यांना राखीव जागा देणें आम्हांला संमत नाहीं हें स्पष्टच झालें. राखीव प्रतिनिधित्वाचें आम्हीं सुचविलेलें प्रमाण, मागासलेल्या वर्गांच्या प्रतिनिधींची प्रांतिक कायदेमंडळांतील संख्या खात्रीनें वाढवील.दारिद्रय आणि शिक्षणाचा अभाव यांमुळें मागासलेल्या वर्गांतून पुरेसे लायक प्रतिनिधि एका वेळीं मिळतील कीं नाहीं याबद्दल जबर शंका येते व वरच्या जातींच्या धोरणानें चालणाऱ्या मागासलेल्या जातींतील प्रतिनिधींपेक्षां, मागासलेल्या वर्गांत घटलेल्या पुढाऱ्यांच्याच हातीं त्यांचें प्रतिनिधित्व, असणें बरें असें आम्हांस वाटतें. कांहीं झालें तरी, आम्हीं सुचविलेली योजना सध्यांच्या दृष्टीनें ठीक आहे. विशेषतः राखीव जागांचा हक्क दिल्यामुळें ज्या जागा राखीव नाहींत, त्यांपैकीं कांहीं जागा काबीज करणें मागासलेल्या वर्गांना शक्य होईल.

युरोपिअन प्रतिनिधित्वः— युरोपिअनांचें प्रतिनिधित्व त्यांना विभक्त मतदारसंघ देऊनच कायम राखलें पाहिजे. युरोपिअनांमुळें होणारा देशाचा फायदा किंवा त्यांचें देशांत असलेलें वजन निव्वळ त्यांच्या संख्येवरून ठरविणें चुकीचें होईल. एकंदरींत विचार करतां आम्हांस असें वाटतें कीं, मुंबई कायदेमंडळांत जी थोडीशी वाढ करणें शक्य आहे ती खेरीज करून इतर ठिकाणीं सर्वसाधारण युरोपिअन मतदारसंघाच्या जागांचें सर्वसाधारण हिंदी मतदारसंघाच्या जागांशीं असलेलें प्रमाण व खास व्यापारी औद्योगिक आणि तत्सम जागांचें सर्वसाधारण गटांतील जागांशीं प्रमाणहीं दोनही कायम असावींत. (खास व्यापारी, औद्योगिक व तत्सम या जागांतील सर्वच्या सर्व जागा अर्थातच युरोपिअनांना मिळत नाहींत).वाढविलेल्या कौन्सिलांत व्यापारीं युरोपिअनांचें प्रमाण अर्थातच कमी कमी होत जाईल. पण, अधिकाधिक जागा मिळविण्याकरतांच केवळ नव्हे, तर प्रतिनिधित्वाचें वाजवीहून जास्त असलेलें प्रमाण कायम राखण्याकरतांही जों जों प्रयत्न केला जाईल तो आम्हीं फार महत्त्वाचा समजतों.

अँग्लो इंडियनांचें प्रतिनिधित्वः— अँग्लोइंडियनांच्या बाबतींत नियोजन पद्धतीपेक्षां निवडणुकीचा अवलंब करणेंच फार चांगलें असें आम्हांस वाटतें. कारण या वर्गांत साक्षरतेचें प्रमाण इतकें मोठें आहे कीं, उमेदवार जरी थोडेच व निरनिराळ्या ठिकाणीं राहाणारे असले तरी पोस्टाच्या साहाय्यानेंही निवडणूक सहज पार पाडतां येईल. आणि ज्याअर्थीं निवडणुकीची पद्धति अंमलांत आणावयाची त्याअर्थीं त्या वर्गाला विभक्त मतदार संघ दिले पाहिजेत हें ओघानेंच आलें. अँग्लोइंडियनांची लोकसंख्या इतकी थोडी आहे कीं, त्यांच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याही पद्धतीचा अवलंब करणें अशक्य आहे. अँग्लोइंडियनांच्या जागांविषयीं बोलतांना एवढेंच ध्यानांत घ्यावयाचें कीं, योग्य प्रतिनिधीमार्फत त्या वर्गाचीं मतें कायदेमंडळाला कळलीं पाहिजेत. लोकसंख्या किंवा राजकीय महत्त्व या दृष्टीनें जागा देण्याचा प्रश्नच येथें उद्भवत नाहीं. आम्हांस असें वाटतें कीं,मुंबई व मद्रास येथील कायदेमंडळामध्यें त्यांना एकाऐवजीं प्रत्येक ठिकाणीं दोन दोन जागा देण्यांत याव्यात; इतर ठिकाणीं सध्यां असलेली जागांची संख्या ठीक आहे. तरीपण,मध्यप्रांतांत युरोपियनांना व अँग्लोइंडियनांना मिळून एक जागा आहे त्याऐवजीं प्रत्येकाला एक जागा देण्यांत यावी. आसाम प्रांतांत मात्र अँग्लोइंडियनांची वस्ती फारच थोडी असल्यामुळें त्यांनीं सध्यांप्रमाणें पुढेंही मुसलमानेतर मतदारसंघातर्फेच मतें द्यावींत; त्या प्रांतांत त्यांना प्रनितिधि नाहीं.

इंडियन ख्रिश्चनांचें प्रतिनिधित्वः— इंडियन ख्रिश्चन लोकांनीं नियोजन पद्धतीपेक्षां निवडणुकीलाच विशेष संमति दाखविली. सध्यां या वर्गाला मद्रास इलाख्यांत विभक्त मतदारसंघ असून ते पांच सभासद निवडून देतात. इतर ज्या ज्या ठिकाणीं त्यांना प्रतिनिधित्वाचा हक्क आहे, तेथें तेथें नियोजन पद्धतिच सुरू आहे. अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, दिल्ली येथें आम्हांस भेटलेल्या इंडियन ख्रिश्चनांच्या एका शिष्टमंडळानें, इतर सर्व वर्ग तयार असतील तर, सार्वजनिक नागरिकत्वाच्या उत्तेजनार्थ, सर्वसाधारण मतदारसंघांत समाविष्ट होण्यास मोठ्या आनंदानें आपली संमति दाखविली. इंडियन ख्रिश्चनांना विभक्त मतदारसंघापेक्षां राखीव जागा देणेंच अधिक बरें असें आमचें मत आहे. राखीव जागांच्या संख्येसंबंधानें बोलावयाचें तर मद्रास कायदेमंडळांतील इंडियन ख्रिश्चनांच्या जागांचें सध्यांचें प्रमाण अगदीं योग्य आहे. व तें तसेंच पुढें चालविण्यांत यावें. कौन्सिलच्या वाढीच्या दृष्टीनें, इंडियन ख्रिश्चनांना सध्यां जेथें जेथें एक एक जागा आहे, त्या ठिकाणीं एकाऐवजीं दोन दोन जागा त्यांना देण्यांत याव्या. मध्यप्रांत व आसाम या दोनही ठिकाणीं या वर्गाला सध्यां

एकही जागा नाहीं, तेव्हां यापुढें वरील दोहोंपैकीं प्रत्येक कौन्सिलांत त्यांना एक एक जागा देण्यांत यावी.

मुसलमानांच्या जागांची संख्याः—निवडणुकीनें काबीज करतां यणाऱ्या एकूण हिंदी जागांपैकीं कित्येक प्रांतांत मुसलमानांकरितां किती जागा वेगळ्या करावयाच्या हें हिंदु-मुसलमानांच्या लखनौ येथील करारांत स्पष्ट केलेलें आहे, व सध्यांच्या प्रांतिक कायदेमंडळांतूनही त्याच प्रमाणांत मुसलमानांना जागा देण्यांत आल्या आहेत. पण यापुढें मात्र कोणताच पक्ष लखनौ करार पाळण्यास तयार नाहीं आणि उभय पक्षांच्या समेटानें सर्वसम्मत अशी नवीन एकादी योजना लवकरच बाहेर पडेल अशी आशा करणें व्यर्थ आहे.तेव्हां तिऱ्हाइताला या प्रश्नावर आपलें मत द्यावयाचें म्हणजे विभक्त मतदारसंघ कायम आहेत, असें समजूनच पुढें काय तें बोललें पाहिजे. सध्यांची परिस्थिति व ब्रह्मदेश वगळून आठांपैकीं सहा प्रांतांमधील अल्पसंख्याक मुसलमानांची दुर्बलता हीं लक्षांत घेतां त्या प्रांतांतून मुसलमानांना मिळालेल्या वाजवीहून जास्त हक्कांचें प्रमाण योग्य असून तें यापुढेंही तसेंच ठेवण्यांत यावें असें आमचें मत आहे. तेव्हां, युरोपिअन गट खेरीज करून इतर 'सर्वसाधारण' मतदारसंघाच्या जागांशीं, त्यांना मिळणाऱ्या जागांचें प्रमाण पुढेंही सध्यांप्रमाणें कायम करण्यांत यावें. पण, मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाकरितां ते स्वतः जे हक्क मागत आहेत ते अगदींच अव्यवहार्य आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं,या सहा प्रांतांतून त्यांना मिळालेले फाजील हक्क अगदीं जसेच्या तसे राखण्याची सरकारनें हमी द्यावी व बंगाल आणि पंजाब या दोन प्रांतांत सध्यांचें प्रमाण वाढवून लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांना जागा देण्यांत याव्यात, यामुळें बंगालमध्यें व पंजाबांत दोनही ठिकाणीं सर्व—सामान्य मतदारसंघाच्या जागांमध्यें मुसलमानांचें कधींही न बदलणारें असें चिरस्थायी बहुमत होईल. ही मागणी आम्हांला कधींही मान्य होणार नाहीं. हिंदु व मुसलमान या दोन पक्षांतील समेटाच्या अभावीं इतर सहा प्रांतांत फाजील हक्क कायम ठेवण्याबरोबरच मुसलमानांना बंगाल व पंजाबमध्यें कायमचें बहुमत देणें न्याय्य होणार नाहीं, इतर सहा प्रांतांतून मुसलमान लोक जे वाजवीहून फारच अधिक हक्क उपभोगतात ते कायम ठेवूनही, शिखांचा व हिंदूंचा अत्यंत विरोध असतांना सुद्धां, मसलमानांना बंगाल व पंजाबमध्यें आम्हीं जर कोणत्याही उपायांनीं बदलतां येणार नाहीं असें हमखास बहुमत दिलें तर तो मोठाच अन्याय होईल. बंगाल व पंजाब यांमधील विभक्त मतदारसंघ बंद करुन एकच सर्वसाधारण हिंदी गट बनवावयाचा, आणि प्रत्येक पक्षानें मतदारांच्या विश्वासाप्रमाणें शक्य तितक्या जागा मिळवावयाच्या अशी योजना सर्वसम्मत झाली, तरी इतर सहा प्रांतांतून मुसलमानांना दिलेले जादा हक्क काढून घ्यावेत असें म्हणण्यास आम्ही मुळींच तयार नाहीं. मुसलमानांना दोहोंपैकीं कोणताही एक मार्ग स्वीकारतां यावा म्हणूनच आम्हीं वरील शेवटची सूचना केली आहे, कारण आमची खरोखरीच अशी इच्छा आहे कीं, शक्य तितके विभक्त मतदारसंघ कमी व्हावेत व संयुक्त मतदारसंघ अस्तित्वांत येण्यास शक्य ती मदत व्हावी.

राजपक्षीयांचा गट Official Block काढून टाकाः—संयुक्त रिपोर्टानें राजकीय सुधारणा म्हणून ज्या ज्या गोष्टी केल्या त्यांपैकीं दुसरी कोणतीही गोष्ट राजपक्षीयांच्या गटाइतकी मूळ हेतूंशीं अगदीं विसंगत ठरली नाहीं. रिपोर्टकारांना अशी आशा होती कीं, हे सरकारी सभासद सोंपीव खात्याच्या प्रश्नावर सहसा मत देणार नाहींत व निवडक प्रसंग वगळल्यास, त्यांना भाषणस्वातंत्र्याची व योग्य वाटेल त्या बाजूला मत देण्याची पूर्ण मोकळीक राहील. खरें म्हणजे, या राजपक्षीयांच्या गटाचा कायदेमंडळांत दोनही बाजूनें नेहमीं उपयोग होत असतो. निवडून आलेल्या सभासदांचें बहुमत जर दिवाणांच्या विरुद्ध असेल तर आपली जागा कायम राहावी म्हणून दिवाण राजपक्षीयांच्या गटाचा उपयोग करतो व कांहीं प्रांतांतून जरूर तो पुरवठा आणि महत्त्वाचे कायदे केवळ या राजपक्षीयांच्या मताच्या जोरावर कित्येक वेळां पसार झालेले आहेत. एवढें मात्र खरें कीं, लोकपक्षाला या गटाचा उपयोग तर नाहींच, पण प्रत्यहीं अडथळा मात्र होत असतो. या प्रकारच्या सभासदांची संख्या मुंबई व संयुक्तप्रांत यांत प्रत्येकीं १५, पंजाब व बिहार आणि ओरिसा यांत प्रत्येकीं १३, बंगाल्यांत १२ इत्यादि अशी आहे.

अर्थातच असें केव्हांही समजतां कामा नये कीं,राजपक्षीयांच्या गटाला जर अशा रीतीनें मूठमाती दिली तर प्रांतिक सरकारचें तेवढ्या मतांचें नुकसान होईल. उलट कित्यक ठिकाणीं आम्हीं असें मत एकलें आहे कीं, राजपक्षीयांचा गट

काढून टाकल्यास दिवाणांच्या कार्याचें हमखास समर्थनच करणारा पक्ष नाहींसा होईल व त्यामुळें निवडून आलेले सभासद दिवाणावर टीकेची झोड उठविण्यास जे अगदीं टपून बसलेले असतात, ती स्थिति पुष्कळच सुधारेल. आमची अशी सूचना आहे कीं, प्रांतिक सरकारांना यापुढें जर खरो-खरीची जबाबदार राज्यपद्धति द्यावयाची असेल तर अशा प्रकारची मदत न घेतांच त्यांना आपला राज्यकारभार चालवितां आला पाहिजे. कित्येक प्रांतिक सरकारांचें दप्तर व बहुतेक प्रांतिक कमिटयांचे अहवाल यांवरून 'राजपक्षीय गट' कायदेमंडळावरील जबाबदारीची जाणीव नाहींशी करतो आणि त्यामुळें कायदेमंडळांत चिरस्थायी पक्ष बनविण्यास मोठाच अडथळा येतो या विधानास चांगलीच पुष्टि मिळते. मुंबई, मद्रास, आसाम, बिहार आणि ओरिसा व पंजाब येथील सरकारांनीं राजपक्षीयांचा गट कायम ठेवण्यास चांगलाच विरोध केला आहे. या सर्वांनीं आपल्या मताचें एक मुख्य कारण असें दिलें आहे कीं या गटामुळें दिवाण व कायदेमंडळ यांच्यामधील सलोख्यावर सारखे आघात होत राहतात आणि दिवाणांच्या पाठीमागें राजपक्षीय गट उभा असल्यामुळें शेवटीं दिवाण व कायदेमंडळ एकमेकांचे वैरी बनतात. बंगाल, संयुक्तप्रांत व पंजाब येथील सरकारांनीं हा गट अगदीं नाहींसा करावा असें मत दिलेलें नाहीं. तरी तो आहे त्याच स्थितींत कायम राहातां कामा नये असें त्यांचें मत आहे.

प्रांतिक कायदेमंडळांतून मताधिकार असलेले, वाजवीहून फाजील सभासद असतात एवढी गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे हा राजपक्षीयांचा गट नाहींसा करावा असेंच आमचें ठाम मत आहे. पण आम्हांस असें वाटतें कीं, नवीन कायद्यावयें हा गट नाहींसा केल्यानंतर अगदीं ठराविक सरकारी सभासद किंवा सरकार तर्फेचेच पण सरकारचे नोकर नाहींत असे तज्ज्ञ कायदेमंडळांत असावेत. व या तज्ज्ञांनीं ते ते विषय ज्यावेळीं कायदेमंडळापुढें यतील त्यावेळीं आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा कायदेमंडळाला द्यावा. कांहीं झालें तरी, हा गट मात्र नाहींसा केलाच पाहिजे, कारण तसें झाल्याशिवाय प्रांतिक सरकारांना खरी जबाबदारी कधींच मिळावयाची नाहीं; व म्हणजेच दिवाण आणि कायदेमंडळें आपापली जबाबदारी ओळखून ती पार पाडण्यास कधींच समर्थ होणार नाहींत.

सरहद्दीचें संरक्षण

हिंदुस्थानच्या सरहद्दीचें रक्षण आणि ब्रिटिशांची आवश्यकता.

वायव्य सरहद्दीकडून शत्रूची भीति ही हिंदुस्थानच्या डोक्यावरील लोंबती तरवारच आहे. ब्रिटिश साम्राज्याला या गोष्टीइतकी दुसऱ्या कशाचीच काळजी नाहीं. वरील संकटापासून आपला बचाव करण्याकरितां हिंदुस्थान अर्थातच देशांतील सैन्यावर अवलंबून राहणार व म्हणून हें सैन्य उत्कृष्ट अधिकारी, लायक सैनिक, उत्तम व्यवस्था आणि पुरेशी संख्या यांनीं युक्त असेंच असावयास हवें. भविष्यकालीन पुष्कळच वर्षेंपर्यंत हिंदुस्थानच्या संरक्षणाची संपूर्ण जबावदारी डोक्यावर असलेल्या सैन्याला, निरनिराळ्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या सैन्याला, ब्रिटिश ट्रूप्स बऱ्याच कमी करणें. हिंदी सैन्यामध्यें निरनिराळ्या पथकावर असणाऱ्या वाजवीहून अधिक ब्रिटिश ऑफिसरांचें प्रमाण पुष्कळच उतरविणें आणि सैन्यांतील वरिष्ठ अधिकारावर असणाऱ्या ब्रिटिशांना रजा देणें या गोष्टी करणें अशक्य होईल. हिंदुस्थानांत आम्ही जे जे साक्षीपुरावे घेतले व ज्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या त्यावरून वरील विधान करतांना आम्हांला त्याविषयीं अगदीं तिळभरही संशय येत नाहीं. हिंदी सैन्याची भरती हिंदुस्थानच्या सर्व भागांतून केली जात नाहीं. तर सैन्यांत येणारे लोक बहुधा कांहीं ठराविक लढाऊ जातींतूनच येतात. तेव्हां अशा प्रकारच्या सैन्यावर सर्वस्वीं ब्रिटिशेतरांचेंच वर्चस्व ठेवणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची व तितकीच घोटाळ्याची झाली आहे. कांहीं झालें तरी शेवटीं सर्व सैन्याचें संपूर्ण हिंदीकरण व्हावयाचें आहे. याच दृष्टीनें हळूहळू प्रगति करावी असें आमचें मत आहे. पण ब्रिटिश लोकांच्या जागावर हिंदी फौजेंत भराभर हिंदी लोक नेमून टाकावेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण तशी सुरुवात केल्यास मध्यें कित्येक संकटें व अडथळे उपस्थित होतील. हिंदुस्थान आणि हिंदुस्थानाबाहेरून हिंदुस्थानांला असलेली भीति यांमध्यें हिंदुस्थानांतील फौज एवढा एकच जोरदार आणि परिणामकारक बंधारा आहे. या प्रश्नामध्यें गुंतलेले हिंदुस्थानचे आणि साम्राज्याचे हितसंबंध लक्षांत घेतां हिंदी सैन्यासंबंधींची आपल्यावरील जबाबदारी सोडून देण्यास पार्लमेंट असें सहजासहजीं तयार होणार नाहीं. याबद्दल आम्हांस पूर्ण खात्री वाटते. म्हणून या प्रश्नाचा विचार करून निकाल



बॅ. जयकर



डॉ. आंबेडकर



पी. एम. बापट



बॅ. सावरकर

द्यावयाचा, तर इकडे आड व तिकडे विहिर अशी स्थिति होते. ता. २० ऑगस्ट १९१७ ला जाहीर केल्याप्रमाणें ब्रिटिश लोक व ब्रिटिश पार्लमेंट यांची या बाबतींतही प्रगति करण्याचीच इच्छा आहे. पण अगदीं प्रथमपासूनहि हिंदी सैन्यामध्यें ब्रिटिश लोक कामावर असल्यामुळें सध्यांची भानगड उपस्थित झाली आहे. ब्रिटिश लोक ज्या सैन्यामध्यें आहेत, त्या सैन्यावरील ताबा लोकनियुक्त कायदेमंडळाला जबाबदार असलेल्या दिवाणांच्या हातीं देणें अशक्य आहे. हिंदुस्थानच्या सैन्यामध्यें एकही ब्रिटिश अंमलदार किंवा वरिष्ठ सरकारनें भरती केलेलें एकही पथक नाहीं अशी स्थिति ज्यावेळीं येईल त्याच वेळीं अशा तऱ्हेचा अधिकार देणें शक्य होईल. दुसरें असें कीं, सध्यां ज्या हिंदी लोकांना 'किंग्ज कमिशन' मिळालेलें आहे त्यांना सैन्यामध्यें कॅप्टनच्या वरच्या जागा मिळालेल्या नाहींत. एकंदर ३९ कॅप्टनांपैकीं २५ कॅप्टन अगदींच सामान्य आहेत. कांहींना त्यांच्या वयामुळें त्यांनीं जरूर त्या परीक्षा दिल्या तरीसुद्धां वरच्या अधिकाराच्या जागा स्वीकारतां येणार नाहींत. या लोकांपैकीं बहुतेक लोकांनीं सँढर्स्ट कॉलेजांत शिक्षण घेतलेलें नसून गेल्या महायुद्धामध्यें त्यांना कमिशनें मिळालीं आहेत. आतां हिंदुस्थानचें सैन्य पूर्णांशानें हिंदी करण्याची हिंदुस्थानची इच्छा कितीही तीव्र असली व इंग्लंडनेंही त्याकरितां प्रामाणिकपणानें प्रयत्न करण्याचें ठरविलें तरी त्या दृष्टीनें प्रगति व्हावयाची ती हळुहळू व प्रमाणशीरच झाली पाहिजे. स्कीन कमिटीच्या शब्दांत बोलावयाचें तर "ही प्रगति, सैन्याचा दमदारपणा नेहमीं कायम ठेवून जसजसें यश मिळेल त्या प्रमाणांत प्रसंगाप्रसंगानेंच करण्यांत आली पाहिजे." ज्यावेळीं अंमलदाराच्या जागेकरितां बरेचसे लायक हिंदी लोक पुढें येतील निदान कांहीं हिंदी रेजिमेंटस्चे अंमलदार होण्यास जरूर तो अनुभव आणि ज्ञान हिंदी लोक मिळवितील व ज्यावेळीं खालच्या दर्जाचे हिंदी अधिकारी भरीव लष्करी कामगिरीमुळें वरच्या जागांवरून काम करण्याची आपली लायकी सिद्ध करतील त्याच वेळीं हिंदुस्थानच्या सैन्याच्या संपूर्ण हिंदीकरणाचें धोरण प्रगतिपर ठेवतां येईल. कारण वर सांगितलेल्या गोष्टी म्हणजे हिंदी लोकांच्या क्षात्रतेजाची कसोटीच होत. त्यानंतरहि हिंदुस्थानांतील सर्व सैन्य अगदीं पूर्णांशानें हिंदी होण्यास बऱ्याच वर्षांचा अवधि जावा लागेल.

सरहद्दीच्या संरक्षणाचा साम्राज्याच्या दृष्टीनें विचार—

या प्रश्नाचा विचार करतांना केवळ हिंदुस्थानच्या हिताहिताकडे लक्ष ठेवूनच भागणार नाहीं. कारण त्याच्याशीं अधिक महत्त्वाच्या प्रश्नांचा संबंध येतो. हिंदुस्थानचें संरक्षण करण्यास हिंदुस्थान जर असमर्थ ठरला तर त्याचे परिणाम केवळ हिंदुस्थानलाच भोगून भागणार नाहीं. शत्रूच्या स्वारीला प्रथम जरी हिंदी जीवित व हिंदी मालमत्ता यांचाच बळी पडणार आहे,तरी त्या स्वारीचे परिणाम एवढ्यावरच थांबावयाचे नाहींत. तर या प्रकारामुळें सबंध साम्राज्याला धक्का बसेल. खरोखरी याच कारणाकरितां जमिनीच्या बाजूनें हिंदुस्थानचें संरक्षण करण्याच्या बाबतींत आपलें लक्ष तिळभरहि कमी करण्यास साम्राज्यसरकार तयार नाहीं व यामुळेंच हिंदुस्थानच्या शेजारीं राष्ट्रांच्या संबंधांत महत्त्वाच्या लष्करी हालचालींबद्दल मुद्याचे प्रश्न ज्या ज्या वेळीं उपस्थित होतात त्या प्रत्येक वेळीं इंपीरियल जनरल स्टाफ व कमिटी ऑफ इंपीरियल डिफेन्स या दोहोंचे मुख्य हिंदुस्थान सरकारबरोबर विचारविनिमय करून सरकारला सल्ला ही देतात असें गृहीत धरावयास कांहींच हरकत नाहीं. वायव्य सरहद्द म्हणजे केवळ हिंदुस्थानचीच सरहद्द नव्हे तर सबंध साम्राज्याची लष्करी दृष्ट्या सर्वांत अधिक महत्त्वाची अशी ती एक आंतरराष्ट्रीय सरहद्द आहे. केवळ हिंदुस्थानच्या सरहद्दीवरूनच ब्रिटिश साम्राज्यावर जमिनीच्या बाजूनें जोरदार हल्ला चढवितां येण्यासारखा आहे व त्याबरोबर हेंही ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, अशा प्रकारचा हल्ला हिंदुस्थानशीं असलेल्या दुसऱ्या एकाद्या राष्ट्राच्या भांडणामुळें होणार नाहीं तर ब्रिटिशसाम्राज्य व एकादी परकीय सत्ता यांच्या दरम्यान जगाच्या निराळ्याच एकाद्या भागामध्यें उद्भवलेला तंटाही या हल्ल्याचें कारण असेल. परिणामीं अत्यंत भयंकर अशा हल्ल्यास मोकळी व जिच्या संरक्षणाकरितां अत्यंत अवाढव्य खर्च करावा लागतो अशी सबंध ब्रिटिश साम्राज्यांत ही एवढी एकच सरहद्द आहे. व म्हणूनच हिंदुस्थानचा प्रश्न नेहमीं अत्यंत महत्त्वाचा होऊन राहिलेला आहे. इतर सर्व ठिकाणीं सरहद्दीच्या संरक्षणाचा प्रश्न बहुधा स्थानिक म्हणून समजण्यांत येतो. पण या ठिकाणीं हिंदुस्थानच्या संपूर्ण संरक्षणामध्यें साम्राज्याच्या इतर भागांचे हितसंबंध अगदीं पूर्णपणें

व प्रत्यक्ष रीतीनें गुंतलेले आहेत. ज्या संकटाची सध्यां भीति वाटत आहे,तशा प्रकारचें संकट हिंदुस्थानावर आल्यास साम्राज्याचें परराष्ट्रीय धोरण, साम्राज्यांतील दळणवळणाचीं साधनें व व्यापार आणि इंग्लंडचें पूर्वेकडील वजन हीं सर्व चांगलींच हादरून जातील. आणि आपल्याहून बलाढ्य सत्तेशीं झगडतांना त्या संकटास तोंड देण्याकरितां दुर्दैवानें फारच मोठी कामगिरी बजाविण्याची वेळ आलीच, तर आंतरराष्ट्रीय प्रश्नांचें बहुतांशीं पूर्ण ज्ञान आणि साम्राज्यांतील सर्व लष्करी हालचालींशीं असलेला प्रत्यक्ष संबंध यामुळें त्या झगड्यांत साम्राज्य सरकारच महत्त्वाचा कार्यभाग करील.

वायव्य सरहद्द प्रांतांतील जिरगे—

ज्या जिल्ह्यांतून राज्यकारभार चालतो व जेथें फक्त टोळ्याच राहतात अशा दोनहि ठिकाणीं न्याय देण्याची एक अगदीं परंपरागत पद्धत रूढ झाली आहे. अशा प्रकारचा न्याय देणाऱ्या कोर्टांना किंवा सभांना 'जिरगे' असें म्हणतात. ध्यानांत ठेवावयाची मुख्य गोष्ट अशी कीं, या जिरगा पद्धतीचा उगम त्या प्रांतांतील लोकांच्या रीतिरिवाजामध्यें च सांपडतो व हिंदुस्थान सरकारचे एजंट ज्या ज्या ठिकाणीं अडथळा आणीत नाहींत त्या सर्व ठिकाणीं टोळीमधील लोक वरील कायद्यांना मान देतात व स्वतःच त्याची अंमलबजावणीही करितात. ही जिरगापद्धत काळजीपूर्वक ठरविण्यांत आलेली असून हिंदुस्थान सरकारच्या नेतृत्वाखालीं ज्या ठिकाणीं पद्धतशीर राज्यकारभार चालतो त्या ठिकाणीं व टोळ्यांच्या प्रदेशांतील कांहीं भागांतहि या पद्धतीचाच अवलंब केला जातो.

जिरग्यांच्या उपयोगावर बंधनें घालणारें कोड १९०१ च्या "दि फ्रांटियर क्राइम्स रेग्युलेशन्स" मध्यें छापलेलें आहे. हें कोड पांचहि जिल्ह्यांतून आणि शिवाय पोलिटिकल एजन्सीमधूनहि उपयोगांत आहे. मात्र या कायद्यान्वयें जिरग्यांचें महत्त्व कमी करण्याचा किंवा मुख्य रस्त्यापासून दूर अंतरावर झालेल्या गुन्ह्याबद्दल गुन्हेगाराला शिक्षा देण्याचा टोळीच्या मुख्यांना जो अधिकार असतो तो कमी करण्याचा आपला मुळींच उद्देश नाहीं हें हिंदुस्थान सरकारनें स्पष्ट केलेलें आहे.

दिवाणी दाव्याच्या संबंधांत जर त्यामुळें शांतताभंग होणार असेल किंवा सरहद्दीवरील टोळ्यांतील एकाद्याही माणसाचा जर त्यांत संबंध असेल तर डेप्युटी कमिशनर चौकशी करून निकाल देण्यासाठीं तो दावा 'कौंसिल ऑफ एल्डर्स'कडे म्हणजेच जिरग्याकडे पाठवून देतो. जर जिरग्यांतील तीन चतुर्थांश किंवा त्याहून अधिक लोकांनीं एकमतानें खटल्याचा निकाल दिला असेल तर तो निकाल हातीं पडल्याबरोबर डेप्युटी कमिशनर निकालाप्रमाणें फर्मान काढतो. व मग त्याचें फर्मान लगेच अंमलांतहि येतें. तेव्हां टोळ्यांतील एखाद्याही माणसाचा ज्यांत संबंध येतो असे लोकरीत, लग्नासंबंधीं विश्वासघात, कर्ज इत्यादि भानगडीचे प्रश्न सामान्य कोर्टांच्या मदतीशिवायच निकालांत काढण्यांत येतात. वकील लोक या पद्धतीकडे अर्थातच संशयित दृष्टीनें पाहतात. कारण अशा प्रकारच्या न्यायदानांत वकिलांचा कांडीइतकाही संबंध येत नाहीं. पण ही पद्धत पूर्वापार परंपरेस धरूनच आहे व व्यवहाराच्या दृष्टीनें या पद्धतीचा असा एक मोठा फायदा आहे कीं, ज्या लोकांना वस्तुस्थिति व लोकरीत यांचें पूर्ण ज्ञान आहे त्यांच्या मदतीनें कोणत्याहि खटल्याचा निकाल झटकन् मिळू शकतो. धंदेवाईक वकील आपापल्या अशिलांच्या वतीनें जेथें भांडत असतात, अशा सामान्य कोर्टापेक्षां खऱ्या गोष्टीच सिद्ध होण्याची शक्यता जिरग्यामध्यें च अधिक असते हें स्पष्टच दिसतें.

फौजदारी दाव्यासंबंधीं अशी व्यवस्था आहे:— गुन्ह्याचा आरोप आलेला माणूस खरोखरीच दोषी आहे किंवा निर्दोषी आहे याबद्दल फौजदारी कोर्टांत रीतसर चौकशी व्हावी असें कमिशनरला किंवा डेप्युटी कमिशनरला वाटल्यास तो तें सर्व प्रकरण जिरग्याकडे पाठवून देतो. जिरग्यामध्यें ज्या लोकांना घेण्यांत येतें, त्यांपैकीं कोणाही माणसाबद्दल हरकत घेण्याचा कायदेशीर हक्क आरोपीला दिलेला असतो. जिरग्यामधील सर्व लोक एकदां नक्की ठरले, म्हणजे त्यांनीं चौकशी करून निकाल द्यावयाचा असतो. त्यांच्या निकालाला व्यवस्थित स्वरूप देऊन अहवाल लिहिण्याचें काम डेप्युटी कमिशनरचें असतें. जिरग्यानें जर आरोपीला निर्दोषी ठरविलें तर एकंदर प्रकरणाचा बहुधा येथेंच निकाल लागतो. जर आरोपी दोषी ठरला तर शिक्षा कोणती द्यावयाची याबद्दलही जिरगा शिफारस करतो. मोठ्यांत मोठी शिक्षा म्हणजे १४ वर्षें सक्तमजुरी ही होय. खुनाचा आरोप शाबीत झाल्यावर सुद्धां यापेक्षां मोठी शिक्षा दिली जात नाहीं. जिरग्याचा निकाल बहुधा एक

मतानें दिलेला असतो. डेप्युटी कमिशनराला नियमाप्रमाणें तो निकाल मान्य करतां येतो किंवा त्याच प्रश्नाची पुढें आणखी चौकशी चालवितां येते, किंवा त्या निकालावर विश्वास ठेवणें योग्य नाहीं असें जर त्यांचें ठाम मत असेल, तर त्याला जिरग्याचा निकाल अमान्य करण्याचाहि अधिकार दिलेला आहे. कायदेशीर रीतीनें डेप्युटी कमिशनराच्या निकालावर अपील नाहीं. पण जिरग्याला जर तो निकाल मान्य नसेल तर डेप्युटी कमिशनराच्या निकालाविरुद्ध चीफ कमिशनरकडे अर्ज करणें ही अगदीं नेहमींची गोष्ट आहे.

मुसलमानांच्या विभक्तीकरणाचा इतिहास

१८९२ सालच्या 'कौन्सिल्स ॲक्ट'नें सरकारनें स्थानिक संस्थांनीं निवडलेले लोक कौन्सिलांवर नेमण्याचें ठरलें. हेतु असा कीं, लोकल बोर्डें, म्युनिसिपालिटचा, व्यापारी संस्था वगैरेंना आपआपलें म्हणणें आपल्या प्रतिनिधींच्या कडून कौन्सिलांत मांडतां यावें. कांहीं वर्गांची व कांहींच्या हितसंबंधांची सोय व्हावी असें सुचविण्यांत आलें होतें; व त्यांत मुसलमानांचा मुद्दाम नांव घेऊन उल्लेख झाला होता. परंतु प्रत्यक्ष विभक्तीकरणाची भाषा त्यावेळीं नव्हती. प्रांतिक सरकारांनीं इकडे लक्ष द्यावें असें सूचित केलें होतें. १९०९ सालीं मोर्लेमिंटो सुधारणांच्या वेळीं प्रथम प्रत्यक्ष विभक्तीकरण झालें. १९०६ सालापासून त्याबद्दल प्रयत्न चालू होते. त्यासालीं सुधारणासंबंधीं विचार करण्यासाठीं लाटसाहेबांच्या कार्यकारी मंडळांतील सभासदांची एक कमिटी नेमण्यांत आली होती त्याच सालीं आगाखानसाहेबांच्या नेतृत्वाखालीं एक मुसलमानांचें शिष्टमंडळ लाटसाहेबांना (मिंटो साहेबांना) भेटलें. या मंडळानें खालील-मुद्दे मांडले:—(१) हिंदुस्थानांतील लोकांमध्यें एक पंचमांश ते एक चतुर्थांश(२९ कोटींपैकीं ६ कोटी) लोक मुसलमान आहेत. (२) हिंदूमध्यें अस्पृश्य लोक व इतर रानटी लोक यांचा समावेश केला जातो. त्यामुळें हिंदूंच्या मानानें मुसलमान थोडे वाटतात. (३) रशिया सोडून दिल्यास इतर कुठल्याही युरोपियन राष्ट्रांमध्यें हिंदुस्थानांतील मुसलमानांइतकी लोकसंख्या नाहीं. (४) मुसलमानांचें राजकीय महत्त्व व साम्राज्य संरक्षणासाठीं होत असलेला त्यांचा उपयोग या गोष्टी त्यांची लायकी फक्त लोकसंख्येच्या मानानेंच प्रतिनिधि मिळण्यापेक्षां जास्त असल्याच्या द्योतक आहेत. (५) यापूर्वींचे मुसलमानांचे प्रतिनिधि कमी असून ते खरे प्रतिनिधि नसत. (६) अविभक्त निवडणुकींत हिंदूंच्याकडे कल असणारेच तेवढे मुसलमान निवडून येणें शक्य असे. या मुद्द्यांच्या जोरावर या शिष्टमंडळानें खालील मागण्या केल्या. (१) लोकसंख्येच्या, सामाजिक परिस्थितीच्या व स्थानिक वजनदारीच्या मानानें लोकलबोर्डें व म्युनिसिपालिटचा यांमध्यें जातवार प्रतिनिधि (२) विश्वविद्यालयाच्या नियामक मंडळांवर मुसलमानांना स्थान मिळण्याब ल अभिवचन (३) प्रांतिक कायदे कौन्सिलावर वेगळ्या मतदारांकडून जातवार प्रतिनिधि. (४) थोरल्या कौन्सिलांवर (हल्लींच्या असेंब्लीवर) मुसलमानांना वेगळे प्रतिनिधि; मात्र ते लोकसंख्येच्या मानानें नाहींत; तर ज्यामुळें मुसलमान सभासद बिनसत्ता अल्पसंख्याक रहाणार नाहींत इतकें. याला मिंटोसाहेबांनीं जें उत्तर दिलें तें उत्तर म्हणजे मुसलमानांच्या विभक्त प्रतिनिधींसंबंधीं अधिकारवाणीनें काढलेले पहिले उद्गार होत. व ते उद्गार म्हणजे आपल्याला मिळालें असलेलें वचनच असें मुसलमान लोक धरून चालतात. यावेळीं मिंटोसाहेब बोलले कीं, "तुमचें म्हणणें खरें आहे. तुमचें मागणें रास्त आहे, मला तुमचें म्हणणें पूर्ण पटत आहे. व निरनिराळ्या लोकांची संस्कृति व त्यांचीं मतें वगैरे विचारांत न घेतां सर्वांना सरसकट मताधिकार दिल्यास तें कृत्य खोडसाळ ठरून त्याचा बोजवारा होईल."

यानंतर लाटसाहेबांच्या कार्यकारी कौन्सिलर्सच्या कमेटीचें मत तसेंच झालें. व त्या कमेटीनें सुद्धां विभक्त प्रतिनिधींची मागणी मान्य केली व अविभक्त निवडणुकींत मुसलमानांना ज्या थोडचाफार जागा मिळतील त्यांशिवाय त्यांची वेगळी निवडणूक व्हावी व जास्त प्रतिनिधि त्यांना मिळावेत, थोरल्या कौन्सिलांत त्यांना ४ वेगळे प्रतिनिधि असावेत असें सुचविलें. ही शिफारस हिंदुस्थान सरकारला पसंत पडली. पण शेवटचा निकाल देण्यापूर्वीं प्रांतिक सरकारांचीं मतें मागविण्यांत आलीं. त्यांपैकीं बऱ्याच प्रांतिक सरकारांनीं आपल्याला विभक्तीकरण पसंत नसल्याचें कळविलें. तेव्हां हिंदुस्थान सरकारनें असें सुचविलें कीं ज्या ठिकाणीं विभक्तीकरण शक्य असेल तेथें ते करण्यांत यावें. नाहींतर मुसलमानांच्या स्थानिक संस्थांच्या कडून त्यांचे प्रतिनिधि निवडावेत. हेंहि शक्य नसेल तर ते त्याचे प्रतिनिधि सरकारनें नेमावेत.

२७ नोव्हेंबर १९०८ रोजीं स्टेट सेक्रेटरी लॉर्ड मोर्ले यांनीं एक पत्रक काढलें. त्यांत त्यांनीं मुसल-

मानांची प्रतिनिधीच्याबद्दलची मागणी मान्य केली. पण विभक्तीकरणाबद्दल मात्र जरा शंका प्रदर्शित केली.व त्या शंकेचीं कारणें अशीं सांगितलीं कीं, विभक्तीकरणानें, मुसलमान लोक कांहीं प्रांतांतून थोडे व पसरलेले असल्यानें निवडणुकी त्रासदायक होतील व मुसलमानांना सर्वसाधारण मतदारांमध्यें व विभक्त पद्धतींत अशीं दुप्पट मतें मिळतील. यासाठीं मोर्लेसाहेबांनीं राखीव जागा सुचविल्या व त्यासाठीं मतदारसंघाची स्थापना करावी असें सुचविलें. पण याला मुसलमानांनीं जोराची हरकत घेतली व २७ जानेवारीं १९०९ रोजीं सर अमीरअल्ली यांच्या नेतृत्वाखालीं मुसलमानी शिष्टमंडळानें मोर्लेसाहेबांची भेट घेतली. या मंडळानें मागचेच मुद्दे पुन्हां मोर्लेसाहेबांच्यापुढें मांडले. अर्थात् मोर्लेसाहेबांची योजना जागच्या जागींच जिरून गेली. शेवटीं १९०९ च्या कायद्यानें हिंदुस्थान सरकारनें योजलेली व कै. नामदार गोखले यांनीं पुष्टि दिलेली मुसलमानांना विभक्त प्रतिनिधि देण्याची व शिवाय सामान्य मतदार संघांतून त्यांना मताधिकार कायम ठेवणारी, अशी योजना मान्य केली. (मात्र याला पंजाब व ब्रह्मदेश अपवाद होते.) शिवाय मताधिकार सुद्धां निरनिराळे होते. मुसलमानांची निवडणूक प्रत्यक्ष मतदानानें व सर्वसाधारण निवडणूक अप्रत्यक्ष मार्गानें होती.या पक्षपाताविरुद्ध व मुलमानांना मिळालेल्या दुहेरी मताधिकाराविरुद्ध फार गवगवा झाला.

१९०९च्या सुधारणांमुळें तीन गोष्टी झाल्या. (१) सर्वसाधारण निवडणुकी जाऊन त्याऐवजीं पक्ष, हितसंबंध वगैरे गोष्टी उत्पन्न झाल्या.(२) मुसलमानांच्या लोकसंख्येच्या ऐवजीं त्यांचें राजकीय महत्त्व ध्यानांत घेतलें गेलें. (३) कौन्सिलस्थापनेमुळें हिंदुस्थानांत पार्लमेंट पद्धतीचें राज्य सुरू झालें. पण महायुद्धामुळें हिंदुस्थानांतही थोड्या उदात्त कल्पना व ऐक्याची भावना यांचा प्रादुर्भाव झाला. व थोरल्या कौन्सिलच्या १९ सभासदांनीं १९१६ च्या आक्टोबर महिन्यांत व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांच्यापुढें हिंदुमुसलमानांच्या संबंधीं एक योजना मांडली. या १९ लोकांमध्यें दोन्ही पक्षाचे लोक असून त्यांच्या सूचनेला कॉन्ग्रेसची व मुस्लीमलीगची या दोन्ही संस्थांची अनुमति होती. ह्या योजनेचा थोड्या फरकानें 'काँग्रेस–लीग योजनें'तही समावेश करण्यांत आला व त्यांत ज्या गोष्टी ठरल्या त्यांनाच "लखनौचा करार" असें नांव प्राप्त झालें. पण दीड वर्षांनीं मँटेग्यू–चेम्सफर्ड अहवालांत या नव्या योजनेची छाननी होऊन ही योजना राजकीय परिस्थितींतून मार्ग काढण्यास असमर्थ असल्याचें ठरलें. पण या योजनेचा एकंदर परिणाम नव्या योजनेवर झालाच. लखनौ करारांत प्रांतिक कौन्सिलांकरितां प्रत्यक्ष निवडणुकी व्हाव्यात व सर्वसाधारण मतदारसंघांतून अंग काढून घेतल्यास मुसलमानांना विभक्त प्रतिनिधि मिळावेत असें ठरलें. मुसलमानांच्या जागा आसामखेरीज–पंजाब मध्यप्रांतसुद्धां सर्व प्रांतांतून ठरविण्यांत आल्या. अशी योजना केली कीं त्यामुळें मुसलमानांची संख्या ज्या प्रांतांतून जास्त असेल तेथें त्यांना लोकसंख्येच्या मानानें जरा कमी प्रतिनिधि व जेथें ते अल्पसंख्यांक असतील त्या प्रांतांतून त्यांना संख्येच्या मानानें पुष्कळच जास्त प्रतिनिधि मिळावेत. याशिवाय लखनौ करारामध्यें अशी एक सूचना केली होती कीं एकाद्या ठरावाचा परिणाम एकाद्या पक्षावर होत असल्यास त्या पक्षाच्या लोकांपैकीं तीन चतुर्थांश लोक त्या ठरावास अनुकूल असले पाहिजेत. लखनौ करारानें मुसलमानांना (असेंब्लीमध्यें एक तृतीयांश जागा दिल्या होत्या. अशा रीतीनें 'लखनौचा करार' हाच १९१९च्या सुधारणांचा बराचसा आधार होता.) सध्यांच्या कायद्याचा) व लखनौ करारानें सुचविलेल्या गोष्टींचा तुलनात्मक अभ्यास केल्यास ही गोष्ट दिसून येईल.

गोलमेज परिषद्

[परिषदेच्या बैठकींची अनुक्रमवार कल्पना यावी, व सरकारपक्षाच्या व प्रजापक्षाच्या प्रमुख सभासदांनीं निरनिराळ्या प्रश्नांवर काय मतें दिलीं हें कळावें येवढ्याच दृष्टीनेंच मजकुराची निवड केली आहे.]

प्रास्ताविक लंडन येथें लॉर्ड सभेच्या रॉयल गॅलरींत गोलमेज परिषदेच्या खुल्या बैठकीचा उद्घाटन समारंभ ता. १२ नवंबर १९३० रोजीं राजेसाहेबांच्या हस्तें करण्यांत आला.

राजेसाहेब आपलें भाषण संपवून रॉयल गॅलरींतून उठून गेल्यावर रॅम्सेमॅकडोनल्ड हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले.

यानंतर कामकाज कमिटीची निवडणूक होऊन परिषदेची पहिली बैठक समाप्त झाली. कामकाज कमिटी खालील सभासदांची होती:—

अलवारचे राजेसाहेब, मि. बेन, बिकानेरचे राजेसाहेब, सर हरबर्ट कार, कर्नर हक्सर, सर सॅम्युएल होअर, सर अकबर हैदरी, सर मिर्झा महंमद इस्माइल, श्रीयुत जयकर, मि. जिना, सर भूपेन्द्रनाथ मित्र, दि मार्क्विस ऑफ रीडिंग, सर तेजबहादूर सप्रू, सर महंमद शफी, मिस्टर श्रीनिवास शास्त्री, सरदारसाहेब उज्वल सिंग.

दुसऱ्या बैठकीच्या सुरवातीला परिषदेनें कामकाज कमिटीच्या सल्यावरून असें ठरविलें कीं, "हिंदुस्थानची भावी राज्यघटना संयुक्त असावी कीं एकावयवी असावी" या प्रश्नावर सर्वसाधारण चर्चा सुरू करण्यांत यावी. या चर्चेवरून प्रश्नाचा कोणत्याही प्रकारें निकाल लागावा असें नसून, वादविवादाच्या एकंदर रोंखावरून पुढें कमिटींत होणाऱ्या चर्चेचा कार्यक्रम ठरविणें परिषदेस सुलभ व्हावें इतकाच हेतु होता, व तो सफलही झाला. या चर्चेत हिंदी संस्थानांच्या प्रतिनिधींनीं असें स्पष्टपणें जाहीर केलें कीं, हिंदी संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान या दोहोंचाही जींत समावेश होईल अशा तऱ्हेच्या संयुक्त घटनेचा विचार करण्यांत यावा. यावर परिषदेनें ठरविलें कीं, हिंदी संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान यांचे संबंध कसे असावेत, त्याचप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतिक सरकार व मध्यवर्ति सरकार यांचे परस्पर संबंध कसे असावे याचा योग्य विचार करून संयुक्त राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यास व कोणत्या तत्त्वांवर ही घटना उभारावी याचाही विचार करण्यास एक "संयुक्त संबंध विचार मंडळ" (फेडरल रिलेशन्स कमिटी) नेमावें. मध्यवर्ति सरकारची जबाबदारी काय असावी हेंही या मंडळानें ठरवावें.

संयुक्तसंबंध–विचारमंडळापुढें चर्चेकरितां मांडण्यासाठीं लॉर्ड चॅन्सेलर साहेबांनीं प्रश्नांची क्रमवारी तयार केली ती अशी:—

१ संयुक्त राज्यघटनेचे घटकावयव

२ संयुक्त कायदेमंडळ कशा नमुन्याचें असावें व त्याचीं कितीं मन्त्रिमंडळें (चेंबर्स) असावीं.

३ संयुक्त कायदेमंडळाचे अधिकार काय असावे

४ संयुक्त कायदेमंडळांतील प्रतिनिधींची संख्या किती असावी; कायदेमंडळाचीं एकाहून अधिक मंत्रिमंडळें असल्यास, प्रत्येक मंत्रिमंडळांत किती प्रतिनिधि असावे; संयुक्त घटनेच्या घटकांत या प्रतिनिधींची कशी विभागणी केली जावी.

५ ब्रिटिश हिंदुस्थानांतले व संस्थानांतले प्रतिनिधि कोणत्या पद्धतीनें निवडले जावे.

६ संयुक्त कार्यकारी मंडळाची (एक्झिक्यूटिव्ह) घटना, प्रकार, अधिकार व जबाबदारी, हीं सर्व कशीं असावीं.

७ प्रांतिक कायदेमंडळाचे अधिकार काय असावे

८ प्रांतिक कार्यकारी मंडळाची घटना, प्रकार, अधिकार व जबाबदारी, हीं सर्व कशीं असावीं.

९ अल्पसंख्याक व विशिष्ट हितसंबंधी यांचें खुषीचें सहकार्य मिळण्यास काय योजना करावी.

१० वरिष्ठ न्यायमंदिर (सुप्रीम कोर्ट) स्थापणें व त्याच्या अधिकार सीमा ठरविणें.

११ संरक्षण सैन्याचा प्रश्न.

१२ कार्यकारी मंडळ व प्रांतिक कार्यकारी मंडळ यांचे राजेसाहेबांशीं संबंध कसे असावे.

तथापि संयुक्त संबंध विचारमंडळापेक्षां सर्व परिषदेच्या कमिटीनेंच काम करणें अधिक सोयीचें वाटलें व म्हणून परिषदेनें निरनिराळ्या प्रश्नांचा विचार करण्याकरितां नऊ पोट–कमिटया नेमल्या

पोट–कमिटचांचीं नांवें व त्यांच्याकडे सोंपविलेले प्रश्न यांची क्रमवारी पुढील प्रमाणें:—

(१) फेडरल स्ट्रक्चर. (संयुक्त घटनेचा आराखडा तयार करणारी कमिटी).

सोंपविलेले प्रश्न.

१ संयुक्त राज्यघटनेचे घटकावयव.

२ संयुक्त कायदेमंडळ कशा नमुन्याचें असावें व त्याचीं किती मंत्रिमंडळें असावीं.

३ संयुक्त कायदेमंडळाचे अधिकार काय असावे.

४ संयुक्त कायदेमंडळांतील प्रतिनिधींची संख्या किती असावी; कायदेमंडळाचीं एकाहून अधिक मंत्रिमंडळें असल्यास प्रत्येक मंत्रिमंडळांत किती प्रतिनिधी असावे; संयुक्त घटनेच्या घटकांत या प्रतिनिधींची कशी विभागणी केली जावी.

५ ब्रिटिश हिंदुस्थानांतले व संस्थानांतले प्रतिनिधि कोणत्या पद्धतीनें निवडले जावे.

६ कार्यकारी मंडळाची (एक्झिक्यूटिव्ह) घटना, प्रकार, अधिकार व जबाबदारी, हीं सर्व कशीं असावीं.

(२) प्रॉव्हिन्शिअल् कान्स्टिटयूशन (प्रांतिक राज्यघटना ठरविणारी कमिटी):–प्रांतिक कायदेमंडळाचे अधिकारी काय असावे; प्रांतिक कार्यकारी मंडळाची घटना,प्रकार, अधिकार व जबाबदारी हीं सर्व कशीं असावीं.

(३)मायनॉरिटीज् (अल्पसंख्याकांचे हितसंबंधांचा विचार करणारी). अल्पसंख्याक व विशिष्ट हितसंबंधी यांचें खुषीचें सहकार्य मिळण्यास काय योजना आंखावी.

(४) बर्मा (ब्रह्मदेशासंबंधीं विचार करणारी). न्याय्य तत्त्वांवर ब्रह्मदेश ब्रिटिश हिंदुस्थानपासून अलग करणें शक्य आहे कां, याचा विचार करून तसें करण्यास सर्वांत उत्तम तोड सुचविणें.

(५) नॉर्थवेस्ट फ्रॉन्टीयर प्राव्हिन्स. (वायव्य सरहद्द प्रान्तासंबंधीं विचार करणारी)—–वायव्य सरहद्द प्रांताला लागूं पडतील असे सर्व साधारण प्रांतिक राज्यघटनेंत कांहीं फेरफार करणें शक्य आहे कां व कसें.

(६) फ्रॅन्चाइझ:–(मताधिकारासंबंधीं-विचार करणारी). स्त्रिया व पुरुष यांना कोणत्या तत्त्वावर मताधिकार देण्यांत यावे.

(७) डिफेन्स:–(संरक्षणासंबंधीं–सैन्यासंबंधीं विचार करणारी) :— प्रत्यक्ष राज्यघटनेतील बाबी वगळून सामान्यतः राज्यशास्त्रदृष्टचा संरक्षणासंबंधींच्या प्रश्नांचा विचार.

(८) सर्व्हिसेस (नोकरी खात्यासंबंधीं विचार करणारी) –नवीन राज्यघटनेंत नोकरी खात्याचें संबंध कसे असावे.

(९)सिंध (सिंधच्या प्रश्नावर विचार करणारी) सिंध हा स्वतंत्र प्रांत करण्याच्या प्रश्नासंबंधीं.

वरील क्रमवारी वरून असें दिसून येईल कीं, लॉर्ड चॅन्सेलर साहेबांनीं सुचविलेल्या बारा प्रश्नांपैकीं पहिले सहा प्रश्न फेडरल स्ट्रक्चर पोट कमिटीकडे सोंपविण्यांत आले. सातवा व आठवा प्रॉव्हिन्शल कान्स्टिटयूशन पोट कमिटीकडे सोंपविण्यांत आले. नववा मायनॉरिटी पोटकमिटीकडे सोंपविण्यांत आला. अकरावा डिफेन्स पोटकमिटीकडे सोंपविण्यांत आला. दहाव्या प्रश्नाचा विचार फेडरल स्ट्रक्चर कमिटीनेंच करावा असें ठरलें, परंतु वेळेच्या अभावीं तें शक्य झालें नाहीं; तरीसुद्धां शेवटच्या प्लेनरी सेशनमध्यें चॅन्सेलर साहेबांनीं त्याबाबत थोडाबहुत खुलासा केलाच. त्यांच्या बाराव्या प्रश्नाचा जरी स्वतंत्रपणें विचार झाला नाहीं तरी सहाव्या प्रश्नाचा विचार करतेवेळीं त्यावरही चर्चा झाली.

वरील माहितीवरून असेंही दिसून येईल कीं चौथी, पांचवी, सहावी, आठवी व नववी या पोट कमिटयानीं चर्चेस घेतलेले प्रश्न मूळच्या संयुक्त संबंध–विचार–मंडळाच्या कक्षेबाहेरचे होते.

अखिल परिषदेनें हे प्रश्न पोट कमिटचांकडे सोंपवितेवेळीं कोणत्याही प्रश्नावर परिषदेपुढें आगाऊ चर्चा केली नव्हती. ब्रह्मदेश अलग करण्यासंबंधींच्या प्रश्नावर मात्र स्वतंत्र चर्चा झाली होती. अखिल परिषदेनें यानंतर प्रत्येक सब कमिटीचा अभिप्राय घेऊन त्यावर स्वतंत्रपणें विचार करून प्रत्येकाची निरनिराळी नोंद केली. ह्या बाबतींत अध्यक्षांनीं असा निवाडा दिला कीं, या अभिप्रायावरून ही परिषद ह्या प्रश्नांचा अखेरचा निकाल देत नसून हे अभिप्राय व त्यावर अखिल परिषदेनें पाहणी करून केलेली नोंद या सर्वांची, ज्या कोणावर या प्रश्नांचा अखेरचा निकाल सांगण्याची जबाबदारी पडेल त्यांना मार्गदर्शक होईल अशी एकत्र नोंद करून ठेवील. याप्रमाणें प्लेनरी सेशनमध्यें परिषदेपुढें पोट कमिटचांचे अभिप्राय मांडण्यांत आले व त्यावर टीकाही झाली. शेवटची चर्चा ता. १६ व ता. १९ जानेवारी रोजीं झाली. या चर्चेंत परिषदेच्या एकंदर सर्व कामकाजाचा समावेश करण्यांत आला होता. या चर्चेच्या शेवटीं परिषदेनें अशा आशयाचा एक ठराव एकमतानें

पसार केला कीं, पोटकमिट्यांच्या रिपोर्टांत हिंदुस्थानची भावी घटना तयार करण्यास उपयुक्त होईल असें उत्कृष्ट दर्जाचें साहित्य असून मुख्य मुख्य बाबींसंबंधीं मतैक्य असल्याचेंही ठळकपणें दिसून येतें.

मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांचें उपसंहारात्मक भाषण १९ जानेवारी रोजीं झालें. त्यांत, त्यांनीं बादशहांच्या सरकारच्या वतीनें हिंदुस्थानच्या प्रजेसाठीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला.

वर दिल्याप्रमाणें उद्घाटन समारंभ जाहीरपणें करण्यांत आला, व मुख्य प्रधानांच्या भाषणाच्यावेळीं वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधीनांही हजर राहाण्यास मोकळीक होती. बाकीच्या बैठकींना मात्र कुणालाच हजर राहण्याची परवानगी नव्हती. तरीपण परिषदेनेंच नेमलेल्या व परिषदेच्या नियंत्रणाखालीं असलेल्या वार्ताधिकाऱ्यांच्या मार्फत परिषदेच्या कामकाजासंबंधीं बातमी वर्तमानपत्रांस पुरविली जात असे. मिस्टर वेजवुड बेन, मिस्टर चिंतामणी व मिस्टर रशब्रुक विलियम्स् यांची वार्ताधिकाऱ्यांच्या जागीं नेमणूक केली होती.

प्रतिनिधींची यादी

ब्रिटिश प्रतिनिधी:—

दि. राइट ऑनरे. जे. रॅम्से मॅक्डोनल्ड, एम्.पी.
दि.राइट ऑनरे. लॉर्ड सँकी, जी. बी. ई.
दि राइट ऑनरे. वेजवुड्बेन, डी. सी. ओ; डी. एफ्. सी.; एम्. पी.
दि राइट ऑनरे. आर्थर हेंडरसन, एम्. पी.
दि राइट ऑनरे. जे. एच्. टॉमस, एम्. पी.
सर वुइल्यम् जॉविट्, के. सी. एम्. पी.
मि. एच्. बी. लीज्स्मिथ, एम्. पी.
दि राइट ऑनरे. अर्ल रसेल.
दि राइट ऑनरे. अर्ल पील, जी. बी. ई.
दि मोस्ट ऑनरे. दि मार्क्वेस ऑफ झेटलॅन्ड, जी. सी. एस्. आय.; जी. सी. आय. ई.
दि राइट ऑनरे सर सॅम्युएल् होअर, बॅरि., जी. बी. ई. सी. एम्. जी. एम्. पी.
मेजर दि ऑनरे. ऑलिव्हर स्टॅनले, एम्. सी. एम्. पी.
दि मोस्ट ऑनरे.दि मार्क्वेस ऑफ रीडिंग, जी. सी. बी., जी. सी. एम्. आय., जी. सी. आय. ई., जी. सी. व्ही. ओ.
दि मोस्ट ऑनरे. दि मार्क्वेस ऑफ लोथियन सी.एच्
सर रॉबर्ट हमिल्टन एम्. पी.
मि. ऐझाक फूट, एम्. पी.

हिंदी संस्थानांचे प्रतिनिधि:—

कर्नल हिज् हायनेस अलवारचे राजेसाहेब महाराज, जी. सी. एस्. आय. , जी. सी. आय. ई.
हिज् हायनेस् बडोद्याचे गायकवाड महाराज, जी. सी. एस्. आय., जी. सी. आय. ई.
लेफ्टनंट् कर्नल हिज् हायनेस भोपाळचे नबाबसाहेब, जी. सी. आय्. ई., सी. एस्. आय्. सी. व्ही. ओ.
लेफ्टनंट कर्नल् हिज् हायनेस् बिकानेरचे महाराज, जी. सी. एस. आय्.,जी.सी.आय्.ई., जी.सी. व्ही. ओ., जी.बी.ई., के.सी. बी.,ए. डी.सी.
लेफ्टनंट कर्नल हिज् हायनेस् दोहलपूरचे राणा महाराज,जी.सी.आय्. ई., के. सी. एस्. आय्., के. सी. व्ही. ओ.
कर्नल् हिज् हायनेस काश्मीर व जम्मूचे महाराज, जी. सी. आय्. ई., के. सी. व्ही. ओ.
लेफ्टनंट कर्नल हिज् हायनेस् नवानगरचे महाराज जी. सी. एस्. आय., जी. बी. ई.
मेजर जनरल् हिज् हायनेस् पतियाळाचे महाराज, जी.सी.एस्.आय., जी. सी. आय्. ई., जी. सी. व्ही. ओ., जी. बी. ई., ए. डी. सी.
हिज् हायनेस् रेवाचे महाराज, जी. सी. आय. ई., के. सी. एस्. आय.
हिज् हायनेस् सांगलीचे राजे साहेब, के. सी. आय्. ई.
सर प्रभाशंकर पट्टणी, के. सी. आय्. ई.
सर मनुभाई मेथा, सी. एस्. आय्.
सरदार साहेबजादा सुलतान अहमदखान, सी. आय्. ई.
नबाब सर महमद अकबर हैदरी
सर मिर्झा एम्. इस्मायल, सी. आय्. ई.,ओ. बी. ई
कर्नल के. एन्. हक्सर, सी. आय. ई.

बडोद्याच्या महाराजांच्या गैरहजेरींत त्यांच्या वतीनें रा. ब. कृष्णम्माचारी, सी. आय. ई. हे काम करीत असत.

जे. रॅम्से मॅक्डोनल्ड यांची परिषदेच्या अध्यक्षांच्या जागीं निवडणूक झाली.

लॉर्ड सँकी यांची उपाध्यक्षाच्या जागीं निवडणूक झाली.

अर्ल पील, मार्क्वेस ऑफ रीडिंग, भोपाळचे महाराज व बिकानेरचे महाराज, यांची परिषदेच्या सभापतींच्या जागीं निवडणूक झाली.

कर्नल हक्सर यांनीं हिंदी संस्थानांच्या प्रतिनिधींचे "सेक्रेटरी जनरल्" म्हणूनही काम केलें

ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधिः--
हिज् हायनेस दि आगाखान, जी. सी. एस्. आय्, जी. सी. आय. ई, जी. सी. व्ही. ओ.
सर पी. सी. रामस्वामी अय्यर, के. सी. आय. ई.
मौलाना महंमदअल्ली.
डॉ. बी. आर. आंबेडकर
यू. आँग थिन् के. एस्. एम्.
यू. बा. पे.
श्रीयुत चन्द्रधर भरूचा.
मिस्टर जे. एन्. वसू.
सर शहा नवाजखान भूतो, सी. आय्. ई, ओ. बी.ई.
सर ह्यूबर्ट कार
मि. सी. वाय्. चिंतामणी
छतारीचे कॅप्टन नबाब सर अहंमद सयदखान, के. सी. आय्. ई, एम्. बी. ई.
दरभंग्याचे महाराजाधिराज
मि. फाजल्. उल्. हक्.
मि. एम्. एम्. गनी
मि. ए. एच् गझनवी.
ले. कर्नल्. एच्. ए. जे. गिडने, आय. एम्. एस्. (रिटायर्ड)
सर ओ. डी. ग्लॅन्व्हिल् सी. आय. ई. ओ. बी. ई.
सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला.
खान बहादूर हाफिझहिदायत् हुसेन
मि. बी. व्ही. जाधव
मि. एम्. आर. जयकर
सर कावसजी जहांगीर, के. सी. आय्. ई, ओ.बी.ई.
मि. एम्. ए. जिना
मि. टी. एफ. गॅव्हिन जोन्स
मि. एन्. एम्. जोशी
डॉ. नरेंद्रनाथ लॉ
सर बी. एन्. मित्र, के. सी. एस्. आय, के. सी. आय. ई, सी. बी. ई.
सर सी. पी. मित्र, सी. आय. ई.
मि. एच्. पी. मोदी.
डॉ. बी. एस्. मुंजे.
दि. ब. रामस्वामी मुदलीआर.
दि. ब. राजा नरेंन्द्रनाथ
रा. ब. ए. टी. पन्निर सेल्वम्
पार्लाकिमीडीचे राजेसाहेब
रा. ब. सर ए. पी. पेट्रो.
मि. के. टी. पाल, ओ. बी. ई.
नबाब सर अबदुल खय्यम, के. सी. आय्. ई.
दि. ब. एम्. रामचंद्र राव
मि. बी. शिवराव
सर सय्यद सुलतान अहंमद
सर तेजबहादूर सप्रू, के. सी. एस्. आय्.
सर महंमद शफी, के, सी. एस्. आय्, सी. आय्. ई.
सरदार श्यामपूरणसिंग
दि राइट आन. श्रीनिवासशास्त्री, सी. एच्.
सर चिमणलाल सेटलवाड, के. सी. आय्. ई.
रायबहादुर कुंवर विशेश्वर दयाळशेट
सर फिरोज् सेटना, ओ. बी. ई.
डॉ. शफत् अहंमदखान
बेगम शहानवाज
एम्. आर. आर. वाय. रा. ब. श्रीनिवासन्
मिसेस सुब्बायरान्
मि. एस्. बी. तांबे.
सरदारसाहेब सरदार उज्जलसिंग
सर सी. ई. वुड
मि. जाफरउल्लाखान

मौलाना महंमदअल्ली हे ता. ४ जानेवारी १९३१ रोजीं इंग्लंडमध्येंच वारले.

नाम्.आगाखान व श्रीनिवासशास्त्री यांची सभापतींच्या जागीं निवडणूक झाली.

सल्लागार म्हणून सरकारतर्फें नेमलेले अधिकारी
सर डब्ल्यू. एम्. हेले, जी. सी. आय्. ई., के. सी. एस्. आय्, आय्. सी. एस्.
सर सी. ए. इन्नेस् के. सी. एस् आय्., सी. आय् ई., आय्. सी. एस्.
सर ए. सी. मॅक्वॉटर्स, सी, आय्. ई., आय्. सी. एस्.
मि. एच्. जी. हेग, सी. एस्, आय्, सी. आय्. ई., आय. सी. एस्.
मि. एल्. डब्ल्यू. रेनॉल्डस्, सी. एस्. आय्., सी. आय्. ई. एम्., सी.

हिंदी संस्थानचे सल्लागार

हैद्राबादच्या प्रतिनिधीचे सल्लागारः---
ले. कर्नल. सर रिचर्ड केनिव्हिक्स ट्रेन्च, सी. आय. ई., ओ. बी. ई.
नबाब महमदीयार जंग
सर अहंमद हुसेन, अमीन जंग, के. सी. आय्. ई., सी. एस्. आय.
सर रेजिनाल्ड ग्लँसी, के. सी. आय.ई., सी. एस्.आय

दक्षिण हिंदुस्थानांतील संस्थानांच्या प्रतिनिधींचे सल्लागारः--
दि. ब. टी. राघवय्या, सी. एस्. आय्.

बडोद्याच्या गायकवाड महाराजांचे सल्लागारः-- रा. ब. कृष्णम्मा चारी, सी. आय्. ई.

ओरिसा संस्थानचा सल्लागारः----
मि. के. सी. नियोगी, एम्. एल्. ए.

नरेन्द्र मंडळातर्फे मुद्दाम नेमिलेले सल्लागारः—
मि. एल्. एफ्. रशब्रुक वुइल्यम्स्. सी. बी. ई.
काझी अल्ली हैदर अब्बासी
सरदार जरमणी दास, ओ. बी. ई.
दि. ब. ए. वी. लठ्ठे.
रा. सा. डी. ए. सुर्वे
प्रतिनिधींच्या कचेरीतील चिटणीसः——
सरकारतर्फे:——
मि. एस्. के. ब्राऊन, सी. व्ही. ओ.
मि. व्ही. डॉसन्, सी. आय्. ई.
मि. के. एस्. फिट्झ्. आय. सी. एस्.
मि. डब्ल्यू एच्. लुइस. सी. आय्. ई. आय्. सी. एस्
कॉन्सरव्हेटिव्हः——
मि. आर. जे. स्टाफर्ड
लिबरलः——
प्रो. जे. कोटमन्. सी. आय्. ई.
हिंदी संस्थानांतर्फे:——
मि. एम्. पिक्थॉल.
मि. के. एम्. पॅनिकर
मि. एन्. एस्. सुब्बाराव
ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रतिनिधींतर्फे:——
सर जॉफ्रे कॉर्बेट, के. बी. ई. सी. आय्. ई. आय्. सी. एस्.
मि. ए. लतीफी, ओ. बी. ई. आय्. सी. एस्.
मि. जी. एस्.बाजपेयी,सी.आय्. ई. सी. बी. ई., आय्. सी. एस्.
परिषदेच्या सर्वसामान्य कचेरीचें चिटणीसमंडळ
प्रमुख चिटणीसः——
मि. आर. एच्. ए. कार्टर, सी. बी.
इतर चिटणीसः——
खानबहादूर मियान अबदुल अजीज,सी. बी. आय्, पंजाब सी. एस्.
मि. डब्ल्यू. डी. क्रॉफ्ट
मि. जी. ई. जे. जंट, टी. एस्. ओ., एम्. सी.
मि. बी. जी. होल्डस्वर्थ आय्. सी. एस्.
मि. आर. एफ्. मुडी, ओ. बी. ई., आय. सी. एस्.
मि. जी. एस्. राजाध्यक्ष, आय्. सी. एस्.
प्रकाशनाधिकारीः——
मि. ह्यू. मॅक्ग्रेगॉर
मि. जी. एफ. स्टीवर्ड, सी. बी. ई.
मि. ए. एच्. जॉइस्.

पहिली गोलमेज परिषद

(भाषणांतील उतारे)

१६ नोव्हेंबर १९३० ते १९ जानेवारी १९३१.

सर तेजबाहदूर सप्रूः—हिंदुस्थानची परिस्थिति आतां बदलली आहे. कायदेभंगाच्या चळवळीचा अवलंब करण्यापर्यंत लोकांची मजल गेली आहे. याचा आपणांस विचार केला पाहिजे. हें मी धमकी देण्यासाठीं सांगत नाहीं. तर वस्तुस्थिति ध्यानांत येण्यासाठीं सांगत आहे. (१) वसाहतीचें स्वराज्य—कॅनडा, ऑस्ट्रेलिया, यांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त झाल्यावांचून लोकांचें समाधान होणार नाहीं. नुसत्या प्रांतिक स्वराज्यानें आतां भागणार नाहीं. मध्यवर्ती कायदेमंडळाची सत्ता कार्यकारी मंडळावर चालली पाहिजे. सैन्य, शांतता, सुव्यवस्था, ब्रिटिशांचे हितसंबंध, खजिना इत्यादि अनेक महत्त्वाचे प्रश्न मध्यवर्ती मंडळाच्या हातीं आहे, तत्या सर्वांचा योग्य विचार करून देवघेव करण्यास आम्ही तयार आहों. त्याबाबत सर्वच किल्ल्या स्वाधीन करा असें आम्ही म्हणत नाहीं.

सैन्यः—सैन्य आज एकदमच ताब्यांत द्या, असें आम्ही म्हणत नाहीं. कमांडर इन चीफ किंवा कोणी मंत्री यांच्या मार्फत व्हाइसरायांची हुकमत त्यावर राहिली तरी फारशी हरकत नाहीं. पण मुख्य मागणी अशी आहे कीं, सैन्याच्या उभारणींत आम्हांला भाग घेऊं द्या. आम्हांला येथें आमच्या लष्करी संस्था स्थापन करण्यास परवानगी द्या. शिस्तीचे वारे देशांत वाहविण्यासाठीं तरुणांचीं मनें तयार करूं द्या. म्हणजे कांहीं दिवसांनीं तरी आमचे प्रश्न धसाला लागतील. देशांत शांतता ठेवून व्यवस्था संभाळण्यास आम्हांस प्रारंभीं त्रास पडेल हें खरें; पण तुम्हीं तरी काय असें मोठें यश मिळविलें आहे? दर पांच वर्षांनीं कुठेंतरी जबरदस्त चळवळ सुरू होऊन अशांतता माजतेच ना? तेव्हां लोकांच्या राजकीय आकांक्षा तृप्त करणें हाच शांततेस खरा उपाय आहे. तेव्हां मध्यवर्ती मंडळांत पुष्कळशी जबाबदारी आमच्यावर सोपवावी अशी आमची पहिली मागणी आहे. (२) शासन पद्धतीच्या बाबतींत माझी दुसरी सूचना अशी आहे कीं, यापुढें ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान यांची संयुक्त घटना करावी. संस्थानिकांच्या मनांत आमच्या इतकीच जाज्वल्य देशभक्ति आहे. तेव्हां सर्व संस्थानिकांनीं देशाच्या एकीकरणास मान्यता द्यावी अशी माझी विनंति आहे. हिंदुस्थानच्या मध्यवर्ती मंडळाला त्यामुळें

फार वजन प्राप्त होईल. देशाचें एकीकरण होईल व देशाच्या संरक्षणाच्या कामीं अनुभवी लोकांची मदत मिळेल.

बिकानेरचे महाराजः—(१) बादशहा व मातृभूमि याबद्दल माझ्या मनांत सारखीच अढळ श्रद्धा आहे. तेव्हां बादशहांच्या छत्राखालीं वसाहतीचा दर्जा हिंदुस्थानला प्राप्त करुन घेणें हेंच आमचें ध्येय आहे. ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें कॅनडा, आफ्रिका यांच्यासारखाच आम्हांसही दर्जा मिळावा. (२) पण त्याबरोबरच बादशहांशीं झालेले आमचे तहही अबाधित राहिले पाहिजेत. आम्ही दुसऱ्या कोणासहीं बरोबरीचे लेखणार नाहीं. आमच्या इच्छेवाचून बादशहाशीं केलेले करारमदार रद्द होऊं शकणार नाहींत. (३) तेव्हां आमचे करार व दर्जा संभाळून संयुक्त हिंदुस्थानांत येण्यास आम्ही तयार आहोंत. मात्र कोणच्याही संस्थानावर या घटनेंत येण्याची सक्ती करतां येणार नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानी हिंदुस्थान असा भेदभाव आमच्या चित्तांत कधींच नव्हता व नाहीं. (४) संस्थानिकांचे मूलभूत हक्क काय आहेत याचा निवाडा व्हावयास हवा आहे. हे प्रश्न नेहमींच उपस्थित होत राहतील. तेव्हां त्यांच्यासाठीं संयुक्त हिंदुस्थानचें एक वरिष्ठ न्याय मंदिर स्थापन केलें पाहिजे. या सर्व गोष्टी मान्य केल्यावर हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षासाठीं आम्ही पण संयुक्तघटनेस मान्यता देऊं.

सर महमद शफीः—हिंदुस्थानच्या कल्याणाकडे इंग्लंडनें आतांपर्यंत दुर्लक्ष केलें आहे. त्यामुळेंच सध्यांची भयंकर अस्वस्थता व चळवळ उद्भवली आहे. (१) आम्हांला वसाहतींचा दर्जा प्राप्त झाला पाहिजे. (२) मध्यवर्ती मंडळांत जबाबदारी पाहिजे. (३) संक्रमण कालापुरतीं कांहीं बंधनें ठेवलीं तर चालतील. (४) घटना संयुक्तच असावी. संस्थानिकांनीं ती मान्य केल्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. (५) पण हें सर्व होत असतांना मध्यवर्ती मंडळांत व प्रांतिक मंडळांतही मुसलमानांना जरूर त्या सवलती मिळाल्याच पाहिजेत. सवलती कोणत्या त्याचा विचार पोटकमिटयांतून होईल.

ना. श्रीनिवास शास्त्रीः—वसाहतीचें स्वराज्य व संयुक्त घटना ह्या दोन नव्या गोष्टी या परिषदेंतून उद्भवल्या आहेत.संयुक्त घटनेच्या कल्पनेशीं मी बराच वेळ घोटाळत होतों. पण आतां तीं मला पटली आहे. पण एक सूचना देऊन ठेवावीशी वाटते कीं, ज्या पोट कमिटचा बारीक विचारासाठीं आपण नेमल्या आहेत त्यांत वसाहत दर्जा, किंवा संयुक्त घटना, यांच्या पुरस्कर्त्यांनीं दुसऱ्या बाजूचें म्हणणें दडपून टाकण्याचा प्रयत्न करूं नये. म्हणजे खरोखरच लोकांच्या मनांत काय आहे तें कळेल. कारण राजकारणांत दोन कल्पना कांहीं एका मर्यादेपर्यंतच सलोख्यानें नांदू शकतात. आणखी पुढें खेचल्या तर एकेकाला त्या विघातक होण्याचा बराच संभव असतो. दुसऱ्या एका मुद्याकडे मला आपलें लक्ष वेधावेंसें वाटतें. ब्रिटिश सरकारला अशी भीति वाटते कीं, कोणचीही घटना आपण दिली तरी शेवटी ती कॉंग्रेस पक्षाच्या हातांत जाऊन तिचा ते दुरुपयोग करतील व पुन्हा अराजक माजवितील. ही भीति शमविण्यासाठीं देशांत कॉंग्रेसच्या कक्षेंत न येणारा बराच मोठा जनसमूह आहे व तो राजनिष्ठ आहे असें सांगण्यांत येतें. पण या भीतीच्या शमनार्थ मीं आणखी एक उपाय सांगतों. चळवळी करून अराजक माजविणारे हे लोक कोण आहेत असें आपणांस वाटतें? अत्यंत थोर व घरंदाज असेच ते लोक आहेत. केवळ राजकीय आकांक्षासाठीं त्यांनीं हा उद्योग मांडला आहे हें आपल्याला माहीत नाहीं का? माझ्या मनानें तर त्यांच्यांत व माझ्यांत फारच थोडा फरक आहे. ज्यांचा आज आपण निषेध करीत आहों त्यांचा व माझा राजकीय बाबतींतील अनुभव पुष्कळच सारखा आहे. माझाही सरकारला संशय आला होता व माझ्यावरही गुप्त पोलीस होते. आणि स्वतः मुख्य प्रधानांनाही याचा अनुभव अगदींच नाहीं असें नाहीं. तेव्हां त्यांची भीति नाहींशी करावयाची असेल तर त्यांचें समाधान होईल अशी कांहीं योजना तयार करा. त्यांना पटली तर ती यशस्वी करण्याची ते पराकाष्टा करतील. अशा प्रयत्नांत परमेश्वर-कृपेनें आपणांस यश येवो.

सांगलीचे संस्थानिकः—संयुक्त घटना या सभेस मान्य झाली तर ज्या लहान संस्थानांचा मी प्रतिनिधी आहें त्यांनाही तीं मान्य होईल असें मी सांगू शकतों. पण लहान संस्थानांच्या वतीनें मला कांहीं सूचना करावयाच्या आहेत. लहानपणा सोडला तर मोठीं संस्थानें व लहान संस्थानें यांच्या योग्यतेंत, अधिकारांत व परंपरेंत, कांहींही फरक नाहीं. आमच्याही प्रजेमध्यें राजकीय आकांक्षा जागृत झाल्या आहेत. तेव्हां संयुक्त घटनेंत लहान संस्थानांचा गटशः तरी विचार होईल अशी आशा आहे.

डॉ. मुंजेः—लॉर्ड पील यांनीं काल भाषण

केलें; प्रत्येकानें आपले विचार अगदीं मोकळे-पणानें सांगावे अशी त्यांनीं सूचना केली. या सूचने-बद्दल मी त्यांचा ऋणी आहे. पील साहेब म्हण-तात, "हिंदुस्थानांत कोणच्याही खात्यांत इंग्लि-शांना नोकऱ्यांचा मक्ता दिला आहे असें नाहीं. कसब, मेहनत हीं पाहूनच माणसाची पारख केली जाते". खरोखरच असें असतें तर किती चांगलें झालें असतें. आज शंभर वर्षें इंग्रज लोक हिंदी उद्योग-धंदे ठार मारीत आहेत, मेलव्हिल म्हणतो मुंबईचा जहाजें बांधण्याचा धंदा तेथील गव्हर्नरानें मारून टाकला. इंग्रजेतर परकीयांना ज्या सव-लती दिल्या तितक्या सुद्धां हिंदी लोकांना दिल्या नाहींत. हिंदी विणकऱ्यांशीं योग्य स्पर्धा केली असती तर मँचेस्टर जगूंच शकलें नसतें असें इति-हासकार विलसननें म्हटलें आहे. आमचे धंदे ठार मारल्यावर पीलसाहेब येऊन सांगतात-कार्य-क्षमता हीच खरी कसोटी हिंदुस्थानांत आहे. त्यांच्याच उपदेशाप्रमाणें मी हें स्पष्टपणें सांगत आहें. त्याचा राग नसावा. पील म्हणतात 'आय-र्विन साहेबांनीं पूर्ण वसाहतीचें स्वराज्य आतांच देऊं असें अभिवचन मुळींच दिलेलें नाहीं'. मला तें सांगण्याची जरूर नाहीं. कोणचा इंग्रज योग्य काळीं एकादी गोष्ट करीत असतो? आणि आम्ही येथें भीक मागावयास आलोंच नाहीं. हिंदुस्थानची परिस्थिति तुमच्या कानावर एकदां घालावी एवढाच आमचा हेतु आहे. हिंदी लोक आज स्वातंत्र्यासाठीं वाटेल ते कष्ट सोसण्यास तयार झाले आहेत हें ध्यानांत ठेवा. लहान मुलें, वृद्ध स्त्री-पुरुष तरुणांच्या बरोबर लाठ्यांचे तडाखे खाऊन तुरुंगांत जात आहेत. आणि एका इंग्रज सेनानीच्या मुलीनेंच-कुमारी स्लेडनेंच-वर्णन केल्याप्रमाणें ब्रिटिश लोक त्यांच्यावर भयं-कर आसुरी अत्याचार करीत आहेत. ही चळवळ वसाहतीचें स्वराज्य दिल्यावांचून थांबणार नाहीं हें ध्यानांत ठेवा. स्पष्ट बोलावें म्हणून पीलसाहे-बांनीं सांगितलें आहे. म्हणून सांगतों कीं, जुलमानें चळवळ दडपूं असें वाटत असेल तर तो भ्रम आहे. आमचें साम्राज्य आतां बुडालें आहे. पण आम्हीं स्थापलें होतें म्हणून बुडालें हें लक्षांत असूं द्या. हिंदु-स्थान मित्र किंवा शत्रु राष्ट्र करणें आतां तुमच्या हातीं आहे. तेव्हां इतकें ध्यानांत ठेवा कीं, इंग्लंडांत इंग्रजाला जितकें स्वातंत्र्य आहे तितकें हिंदुस्था-नांत हिंदी माणसास मिळाल्यावांचून हिंदुस्थानांत शांतता नांदणें यापुढें शक्य नाहीं.

महंमद अल्ली:--बर्कसारख्या तत्त्व-वेत्त्यांचा शब्द तुम्हीं मानला नाहीं म्हणून फशी पडलां व अमेरिका हातची घालविलीत. आज तुम्ही तसें करणार नाहीं अशी मला आशा वाटते. माझा जॉर्जवर फार विश्वास आहे. तुम्ही त्याला बादशहा म्हणा वा न म्हणा. हिंदुस्थानचें खरें हित त्यांनाच समजतें. वसाहतीचें स्वराज्य मला मान्य नाहीं. मला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. वसाहतीच्या स्वराज्याच्या मागणीस मीं वेळोवेळीं विरोध केला आहे. पूर्ण स्वातंत्र्य मिळालें नाहीं तर आम्ही फुटून निघूं. हिंदुमुसलमानांच्या दुहीचा प्रश्न वारंवार पुढें केला जातो. पण ही तुमचीच कारवाई आहे. फोडा व झोडा ही तुमची नीति आहे. एरव्ही आम-च्यांत भांडणें होणार नाहींत. त्याचप्रमाणें सैन्याची गोष्ट. हिंदुस्थानला निःशस्त्र करून तुम्ही फार मोठें पाप जोडलें आहे. हिंदी लष्करांतील लोकां-मध्यें सुद्धां स्वातंत्र्याचें वारें नाहीं. कसें असणार? आम्हीं 'हिंदी सैनिक' असें त्यांस म्हणतां येत नाहीं. 'ब्रिटिश सैन्यांतले' असेंच त्यांना म्हणून घ्यावें लागतें. हें थांबलें पाहिजे. आम्हांस पूर्ण जबाब-दारीचें स्वराज्य पाहिजे. सर सप्रू, सर शफी हे प्रधानपदास काय अयोग्य आहेत? मी कमांडर इन चीफ कां होऊं शकणार नाहीं? असो. हिंदुस्थान इंग्लंडइतका स्वतंत्र झाला असें जाहीर होईपर्यंत मला फिरून बोलण्याची पाळी येऊं नये अशी इच्छा आहे.

भोपाळचे नबाबः--संयुक्त घटनेस माझी मान्यता आहे. पण आमच्या संस्थानच्या अंतर्गत कारभारांत व बादशहाशीं झालेल्या करा-रांत त्यामुळें मुळींच फेरफार होतां कामा नये. तसेंच ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांचे हक्क व दर्जा संयुक्त घटनेंत सारखेच असले पाहिजेत. या अटीवर या घटनेंत यावयास आम्ही तयार आहों. हिंदुमुसलमानांचा प्रश्न आमच्या संस्थानांत फारसा नाहींच. तो ब्रिटिश हिंदुस्थानांतच उद्भवतो. तोही राजकीय कारणांमुळें. कारण या दोन धर्मांत परस्परविरोधी असें कांहींच नाहीं. आम्ही हिंदी लोक फार प्राचीन व संस्कृत आहोंत हें आपण ध्यानांत ठेवा. ख्रिस्ती शक सुरूं होण्यापूर्वीं आर्यांनीं साम्राज्यें स्थापिलीं होतीं. व नॉर्मनांच्या दिग्विजयाच्या वेळीं इस्लाम सत्ता जगभर पस-रली होती. आज ब्रिटिशांच्या कृपाछत्राखालीं हिंदुस्थानला पुन्हां तें प्राचीन वैभव मिळावें अशी आमची इच्छा आहे.

डॉ. आंबेडकरः-मी ज्या समाजाचा प्रतिनिधि आहें त्याची लोकसंख्या अदमासें इंग्लंड इतकी

म्हणजे ४॥ कोटी आहे. आम्ही मुसलमान नाहीं. आम्हांला हिंदू म्हणतात. पण वास्तविक आमचा समाज हिंदूपासूनही अगदीं विभक्त असा आहे. आम्हांला पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य पाहिजे आहे. हिंदुस्थान जिंकण्यासाठीं आमचें रक्त सांडून आम्हीं ब्रिटिशांना मदत केली आहे. पण आतांपर्यंत उपेक्षेखेरीज त्यांच्याकडून आम्हांला कांहींच मिळालें नाहीं. आम्हांला असें आढळून आलें आहे कीं, इच्छा असली तरी ब्रिटिश लोक सध्याच्या राज्यव्यवस्थेंत आमचें कल्याण करण्यास असमर्थ आहेत. एकतर सत्ताधारी लोकांना हिंदुस्थानांतील कोणच्याही वर्गाचा उत्कर्ष सहन होणार नाहीं व दुसरें म्हणजे वरिष्ठ जातीच्या लोकांच्या भीतीमुळें ते आमचीं दुःखें नाहींशीं करूं शकत नाहीं. तेव्हां असलें सरकार काय उपयोगाचें? नव्या राज्ययंत्राला डोमिनियन स्टेटस असें म्हणण्यांत येतें. मीं तें नांव मुद्दामच गाळलें आहे.माझा त्याला विरोध आहे असें नाहीं. पण ज्या राज्यव्यवस्थेंत आमचे ठराविक प्रतिनिधि असतील व देशावरील सत्तेंतील योग्य तो अंश आमच्या समाजाच्या वाटचाला येईल अशी राज्यव्यवस्था आम्हांस हवी आहे. नुसतें डोमिनियन स्टेटस दिलें तर त्याचा आम्हांस काडीचाही उपयोग नाहीं. कारण देशांतील वरिष्ठ वर्गाचे लोक सर्व सत्ताधारी होतील व आमचीं दुःखें कधींच दूर होणार नाहींत. सध्याची हिंदुस्थानांतील स्थिति फार वाईट आहे. आपण पाशवी शक्तीनें ती कदाचित सुधारूं पाहाल. पण एडमंड बर्कचा उपदेश तुम्हीं विसरूं नका.एकदां तुम्हीं तो डावललात तर अमेरिका गेली.त्याची पुनरावृत्ति करूं नका. तेव्हां तडजोडीचा मार्ग श्रेयस्कर होय.

जिनाः—पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य देण्यास लॉर्ड पील यांनीं एक अडचण दाखविली आहे. ते म्हणतात कीं, तुम्हांला आम्हीं कांहीं दिलें तरी तुमच्या देशांत कॉंग्रेसचा जो बलिष्ठ पक्ष आहे त्यांच्याच हातांत तें सर्व जाणार. व मग त्याचा ते दुरुपयोग करतील. मी पील साहेबांना असें विचारतों कीं, असल्या सबबी सांगून, ज्यांनीं त्या कॉंग्रेसच्या पक्षाला जरा कह्यांत ठेवून अगदींच बेफाम होऊं दिलें नाहीं, व जे सामोपचाराच्या मार्गास तयार झाले त्या आम्हांला तुम्हीं हात हालवीत परत धाडण्याचा बेत केला आहे काय? वास्तविक तुमची भीति मुळांतच खोटी आहे असें मला दाखवितां येईल. हिंदुस्थानांत ७ कोटी मुसलमान व ४ कोटी अस्पृश्य या चळवळीपासून अलिप्त आहेत. व हिंदूपैकींही बहुसंख्यांचा तिला पाठिंबा नाहीं. (टाळ्या) कॉन्ग्रेस पक्ष महत्वाचा आहे हें खरें. पण तुमची भीति अगदीं निराधार आहे. असें असतांना भलत्या सबबीवर आमच्या तोंडास पानें पुसून आम्हांला त्याच चळवळींत जाणें भाग पाडणार आहां काय? या प्रश्नाचा तुम्हांला गंभीरपणेंच विचार केला पाहिजे.हिंदुस्थानच्या भावि घटनेस तुम्ही वसाहतीचें स्वराज्य, जबाबदारीचें स्वराज्य किंवा स्वराज्य (Self-Government)कांहींही नांव द्या. मुख्य तत्त्व असें आहे कीं, हिंदी मनुष्य हिंदुस्थानांत मालक झाला पाहिजे. आतां संक्रमण कालांत सैन्य, परराष्ट्रधोरण, अल्पसंख्यांक जाती, या संबंधाचीं कांहीं बंधनें (Safe-guards) घालावीं लागतील हें खरें. पण त्यानें मुख्य तत्त्वास बाध येणार नाहीं.

येथील कांहीं लोक अजून सायमन रिपोर्ट, हिंदुस्थान सरकारचा खलिता, यांच्या आधारानें बोलतात. पण मी म्हणतों कीं, ते खलिते, रिपोर्ट आतां टोपलींत फेकून द्या.सर्व हिंदुस्थानच्या संयुक्त घटनेचा विचार आपण करावयाचा आहे.

ना.जाधव—दक्षिण हिंदुस्थानांतील लढवय्या मराठ्यांचा मी प्रतिनिधि आहें.आम्ही अगदीं राजनिष्ठ आहों. कॉन्ग्रेसच्या चळवळींत आम्ही सामील होत नाहीं. १९२१च्या असहकारितेंत आम्ही नव्हतों. विंडसरच्या राजवंशावरील आमची भक्ति प्रगट करण्यासाठीं प्रिन्स ऑफ वेल्स पुण्यास आले असतांना आम्ही २५०००मराठे जमलों होतों. गल्या एक दोन वर्षांतच महात्मा गांधींच्या चळवळीस आमचे शेतकरी कसे मिळाले याचें आश्चर्य वाटतें. तीस तीस हजार लोक जंगलाचा कायदा मोडतात. पण यावरून आमची राजनिष्ठा कमी झाली असें मात्र नाहीं. आम्हांस ब्रिटिश साम्राज्यांतच रहावयाचें आहे. फक्त आमचा कारभार आमच्या हातीं असावा येवढीच आमची मागणी आहे. नुसत्या प्रांतिक स्वराज्यानें आमचें समाधान होणार नाहीं. मध्यवर्ति मंडळांतही आमच्यावर जबाबदारी असली पाहिजे.

गोलमेज परिषद्

(फेडरल स्ट्रक्चर सब–कमिटीचा रिपोर्ट):—

सब् कमिटी नं. १—फेडरल स्ट्रक्चर (संयुक्त राज्यघटना) सब् कमिटीमध्यें खालील सभासद होते— ब्रिटिश प्रतिनिधि— लॉर्ड चॅन्सेलर

(चेअरमन), लीज स्मिथ एम्.पी., अर्ल पील, सर सॅम्युअल होअर एम्. पी., लॉर्ड रेडींग, लॉर्ड लोथियन. संस्थानचे प्रतिनिधिः—बिकानेरचे महाराज, भोपाळचे नवाब, हैद्राबादचे सर अकबर हैदरी, म्हैसूरचे सर मिर्झा इस्माइल,नरेंद्र मंडळाचे कर्नल हस्कर. ब्रिटिश हिंदुस्थानाचे प्रतिनिधिः— श्रीनिवासशास्त्री (मद्रास), सर रामस्वामी अय्यर (मद्रास),दि. ब. रामस्वामी मुदलियार (मद्रास), जयकर (मुंबई), जिना (मुंबई), सर तेजबहादुर सप्रू (संयुक्त प्रांत), गाविन जोन्स (संयुक्त प्रांत), सर महमद शफी (पंजाब.) सरदार उज्जलसिंग (पंजाब) सर सय्यद सुलतान अहमद (बिहार ओरिसा)

याशिवाय सर बी. एन् मित्र यांनीं बऱ्याच बैठकांस हजर राहून सब् कमिटीस मदत केली.

फेडरल रिलेशन्स कमिटीकडे सोपविलेल्या चर्चेच्या अनेक विषयांपैकीं खालील चार विषयां-वर विचार करून रिपोर्ट सादर करण्याचें काम ह्या सब–कमिटीकडे सोंपविलें होतें. ते विषय येणेप्रमाणें—

(१) संयुक्त राज्यपद्धतीचे घटकावयव.

(२) या राज्यघटनेमध्यें कायदेमंडळ कोणत्या प्रकारचें असावें व त्यांत उपमंडळें(Chambers) किती असावीं.

(३) या कायदेमंडळाची अधिकार मर्यादा काय असावी.

(६)संयुक्त घटनेमध्यें मंत्रीमंडळाची रचना स्वरूप,अधिकार मर्यादा व जबाबदारी काय असावी.

सब् कमिटीनें नं. १, २, व ३ या विषयांवर एक रिपोर्ट केला आहे. व नं. ६ वर स्वतंत्र रिपोर्ट केला आहे.

प्रास्ताविक:—

नं. १, २, ३ यांवर कमिटीमध्यें बरेंच मतैक्य झालें. आपापल्या जातीचें, पक्षाचें वैयक्तिक हित बाजूस सारून सर्व पक्षांचे प्रतिनिधींनीं या कमि-टीच्या चर्चेमध्यें सर्व हिंदुस्थान देशाचें कल्याण डोळ्यापुढें ठेविलें होतें. कमिटीच्या रिपोर्टावर अशी टीका होण्याचा संभव आहे कीं, फेडरेशन च्या कांहीं कांहीं घटकांमधील दुवे नीट सांधवि-लेले नाहींत. पण यांत आश्चर्य वाटावयास नको. नवीन राज्यघटना परिपक्व होऊन एकदम कधीं उदयास येत नसते. तिची पूर्ण वाढ होण्यास पुष्क-ळच वाव असतो. हिंदुस्थानांतील संयुक्त राष्ट्र-घटनेची पूर्ण वाढ होणें हें हिंदी मुत्सद्यांच्याच प्रयत्नांवर अवलंबून आहे.

सब–कमिटीचा निर्णय

(१) फेडरेशनचे घटक कोणते ?

हिंदी फेडरेशनचे घटक दोन. एका बाजूला ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांत व दुसऱ्या बाजूला फेडरेशनमध्यें येऊं इच्छिणारीं हिंदी संस्थानें किंवा हिंदी संस्थानांचे संघ. एकदां फेडरेशन अस्तित्वांत आल्यानंतर पुढें वेळोवेळीं फेडरेशनमध्यें सामील होऊं इच्छिणाऱ्या हिंदी संस्थानांचा समावेश त्या त्या वेळीं करतां येईल अशी योजना असावी. ब्रिटिश हिंदुस्थानाविषयीं बोलावयाचें तर हल्लीं अस्तित्वांत असलेलें हिंदुस्थान सरकार किंवा मध्य-वर्ति सरकारचे जबाबदारींतून मुक्त होणारे स्वतंत्र प्रांत यांपैकीं, कोणालाही फेडरेशनचे घटक म्हणतां येणार नाहीं. फेडरेशन व्हावयाचें म्हणजे एक नवीन राज्यघटना उदयास यावयाची आहे व त्या राज्यघटनेला सत्ता मिळ-ण्याचे उगम दोन. (१) हिंदी संस्थानें हीं आपले कांहीं अधिकार सार्वभौम सर-कारला देऊं करतील व उलट सार्वभौम सरकार ते अधिकार नवीन राज्यघटनेकडे सोंपवील.

(२) मध्यवर्ती हिंदुस्थान सरकार आपल्या अधिकारांपैकीं (व प्रांतिक सरकारही म्हणा पाहिज तर) नवीन संयुक्त राज्यघटनेला आवश्यक असे ठरविण्यांत आलेले अधिकार नवीन राज्यघटनेकड सोपवील.

फेडरल कायदे मंडळाचें स्वरूप व घटनाः— या वरिष्ठ कायदे मंडळांत दोन मंडळें असावींत व प्रत्येकामध्यें ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें या दोघांचेही प्रतिनिधि असावेत. (या प्रतिनि-धींचें प्रमाण काय असावें हा प्रश्न या सब्कमिटीकडे अजून सोपविण्यांत न आलेल्या प्रश्नांपैकीं आहे.) ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधि निवडण्याची पद्धति काय असावी हा प्रश्न या कमिटीकडे सोपविला नव्हता. पण संस्थानिकांनीं आपलें मत असें ठासून मांडलें आहे कीं, संस्थानिकांचे प्रति-निधि निवडण्याची पद्धत संस्थानिकच ठरवितील; जोंपर्यंत राखीव खातीं अस्तित्वांत राहणार अस-तील तोंपर्यंत दोन्ही कायदेमंडळांमध्यें सरकार-तर्फेचे प्रतिनिधि असणें अवश्य आहे. या दोन कायदेमंडळांत जर एकाद्या प्रश्नावर मतभेद झाला तर त्याचा निकाल दोन्ही कायदेमंडळांची संयुक्त सभा भरवून मताधिक्यानें व्हावा.

फेडरल कायदे मंडळाचे अधिकारः--

फेडरल विषयांची एक तात्पुरती यादी तयार करतांना हें गृहीत धरलें आहे कीं, त्या यादींतील सर्व विषयांसंबंधीं कायदेकानू करण्याचे अधिकार फेडरल कायदे-मंडळाला दिले जातील. परचक्रनिवारण (Defence) व परदेशांशीं हितसंबंध (External affairs) ह्या विषयांपासून हिंदुस्थान सरकार व सार्वभौम सरकार यांचे संबंधाचा प्रश्न उपस्थित होतो व तो या कमिटीच्या बाहेरचा आहे म्हणून हे दोन विषय यादींत घातले नाहींत. संयुक्त राष्ट्र-घटनेचें हें एक तत्त्व आहे कीं, त्या घटनेखालील कायदे-मंडळानें केलेले कायदेकानू त्या राज्यघटनेच्या सर्व घटकावयवांमध्यें एकजात अमलांत आणले पाहिजेत. फेडरल विषयांचे यादींत वेळोवेळीं नवीन विषयांचा अंतर्भाव करण्याची नवीन राज्यपद्धतींत कांहींतरी योजना असावी. फेडरल विषयांचे बाबतींत राजकीय धोरण व कायदे ह्यांचा प्रश्न प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या प्रश्नापासून अलग ठेवला पाहिजे. कांहीं कांहीं फेडरल राज्यघटनांमध्यें राज्यकारभार व राजशासन (Administrative & Legislature) हीं दोन्हीं खातीं संयुक्त राष्ट्रसंघ व प्रत्येक संस्थान (फेडरेशनमध्यें सामील झालेलें) स्वतंत्ररीत्या पहातात. पण इतर कांहीं राज्यघटनांमध्यें राज्यकारभार प्रत्येक संस्थानाकडेच सोपविला जातो. फक्त संयुक्त राष्ट्र संघाचा देखरेखीचा हक्क कायम राहतो. ह्या दोन प्रकारांपैकीं कोणची राज्यघटना हिंदुस्थानाला लागू करावयाची हा तत्त्वाचा प्रश्न नसून फेडरेशन होतांना जी परिस्थिति असेल त्यावर अवलंबून आहे. पण कांहीं कांहीं बाबी अशा आहेत कीं, संस्थानानें राजकीय जबाबदारी जरी फेडरेशनकडे सोपविली असली तरी त्या बाबतींत राज्यकारभारविषयक सत्ता गाजविण्याचा हक्क संस्थानांना आपलेकडेच ठेवावासा वाटेल. त्यांनीं तो ठेवावा. अट येवढीच कीं, फेडरेशनमध्यें सामील झालेलीं सर्व संस्थानें व प्रांत यांच्या योग्य उत्क्रांतीच्या मार्गांत अडथळे येतील अशी परिस्थिति त्या संस्थानांनीं निर्माण करूं नये. या दिशेनें संस्थानें वागल्यास कांहीं कांहीं बाबींत त्यांनीं अंतर्गत राज्यकारभारविषयक सत्ता हल्लींप्रमाणेंच गाजवावी. प्रचलित राज्यव्यवस्थेप्रमाणें उलथापालथ जेवढी कमी होईल तेवढें चांगलेंच आहे. या बाबतींमध्यें फेडरल सरकार व संस्थान सरकार यांची अधिकारमर्यादा प्रत्येक संस्थानाशीं बोलणें करून ठरवावी. या सब-कमिटीचें असें ठाम मत आहे कीं, जीं फेडरल खातीं म्हणून निश्चित केलीं आहेत व ज्या खात्यांविषयीं अजून कांहींच ठरलेलें नाहीं (फेडरेशनकडे सोपवावयाचीं कीं प्रांताकडे हें) त्यांचेविषयीं कायदेकानू करण्याकरितां एकच कायदेमंडळ असावें. ही गोष्ट खरी आहे कीं, कायदेमंडळामध्यें फेडरेशनच्या अशा घटकांचे (संस्थानांचे व प्रांतांचे) प्रतिनिधि येतील कीं, ज्यांचा कायदेमंडळामधील चर्चेच्या कांहीं कांहीं विषयांशीं अर्थाअर्थीं मुळींच संबंध नसेल. पण या चमत्कारिक व्यवस्थेला संमति दिल्याखेरीज भागणार नाहीं. दोष असतील ते पुढें काढून टाकतां येतील.

१२ डिसेंबर १९३०

सब् कमिटी (फेडरल स्ट्रक्चर)
रिपोर्ट नंबर २

प्रास्ताविक--

सर्वांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, सब् कमिटींमध्यें बहुमतानें पुष्कळ महत्वाच्या प्रश्नांचा निकाल लागला असला तरी हा निकाल तात्पुरताच होय. फेडरल राज्यघटनेच्या पूर्ण योजना जेव्हां चर्चेस येतील तेव्हां या कमिटींतील सभासदांना आधीं दिलेल्या तात्पुरत्या संमतीमध्यें फेरफार अगर बदल करण्याची पूर्ण मुभा राहील हें प्रथमपासूनच मी गृहीत धरून चाललों आहें, हा जो लॉर्ड रीडिंग यांनीं इषारा दिला त्याला प्रत्येक सभासदानें पाठिंबा दिला. शेवटची व कायम योजना निश्चित होईपर्यंत सभासदाला आपल्या मतांमध्यें फेरबदल करण्याचा हक्क आहे. याच दृष्टीनें ब्रिटिश व हिंदी प्रतिनिधींनीं मतप्रदर्शन केलें. शिवाय पुढील मंत्रिमंडळाची जबाबदारी या परिच्छेदांत जें मूलतत्त्व प्रतिपादिलें आहे त्याविषयीं आमच्या माहितीप्रमाणें व बरेच प्रश्न अनिर्णीत स्थितीमध्यें असल्यामुळें आमची खात्री झालेली नाहीं असें लॉर्ड पील व सर सॅम्युअल होअर म्हणतात. ह्या रिपोर्टामध्यें पुढें रेखाटलेलें फेडरल मंत्रिमंडळाचें (Executive) चित्र हिंदी फेडरेशनच्या विशिष्ट परिस्थितीमध्यें जसेंच्या तसेंच उचलावें कीं काय? याविषयीं लॉर्ड पील व सर सॅम्युअल होअर साशंक आहेत. म्हणून त्यांची अशी इच्छा आहे कीं, केवळ ब्रिटिश उदाहरणांचें अनुकरण न करतां सर्व हिंदुस्थानच्या परिस्थितीला योग्य अशा फेडरल सरकारवरील हिंदी ताबा वाढविणाऱ्या आणखी कांहीं योजना

आहेत कीं काय हें पाहावें.तसेंच राखीव खात्यां-बाबत जबाबदारी(Imperial obligations पार पाडतां येण्याकरितां जी संरक्षणात्मक योजना सुचविलेली आहे तिचा कांहीं उपयोग होईल असें लॉर्ड पील व सर सॅम्युअल होअर यांस वाटत नाहीं. विशेषतः यांना भीति वाटते ती ही कीं, या रिपोर्टमध्यें जी आर्थिक योजना-(Financial Proposals) सुचविलेली आहे, त्या योगानें व्यापारी वर्गाचा विश्वास ढळेल व हिंदुस्थानची पत कमी होईल. असें जरी आहे तरी वादग्रस्त प्रश्न सोडविण्यांत जी कमिटीनें प्रगति केली आहे त्याकडे आम्हीं सहृदयतेनेंच पाहात आहों, व तो प्रश्न सोडविण्यांत आम्ही सहानुभूतीनें व अभिनिवेशरहित बुद्धीनें भाग घेण्यास तयार आहों, असें नमूद करावें अशी सर सॅम्युअल होअर व लॉर्ड पील यांची इच्छा आहे. आर्थिक योजनेवर (Financial) हिंदी प्रतिनिधींचें असें मत आ कीं, रिपोर्टांत नमूद केलेल्या संरक्षक अटी व विशेषतः गव्हर्नर जनरलला देण्यांत येणारे जादा अधिकार हे अवास्तव होत. मुसलमान प्रतिनिधींतर्फे सर महमद शफी यांनीं हिंदु–मुसलमानांच्या वादग्रस्त प्रश्नांचा उल्लेख केला व त्यांनीं स्वतःचें मत म्हणून असें स्पष्ट सांगितलें कीं, ह्या प्रश्नाचा निकाल लागल्याखेरीज कोणतीही राज्यघटना ठरविण्यांत आपण निखालस मत देणार नाहीं. मि. जिना यांनीं ह्याच मताला पाठिंबा दिला व असें स्पष्टीकरण केलें कीं, मुसलमान व इतर अल्पसंख्यांक वर्ग यांच्या हितांचें संरक्षण करणाऱ्या अटी राज्यघटनेमध्यें नाहींत. ती राज्यघटना चालणेंच कठीण. रिपोर्टामधील कांहीं तपशिलावर त्यांनीं आक्षेप घेतले. इतर प्रतिनिधींनींसुद्धां स्वसमर्थनार्थ असेंच सांगितलें कीं, तपशिलाबद्दल अजून त्यांचें मत निश्चित झालें नाहीं. तत्पूर्वी त्यांना हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें त्या तपशिलावर लोकमत अजमावावयाचें आहे.जे फक्त ब्रिटिश हिंदुस्थानविषयक प्रश्न आहेत, अशा प्रश्नांची चर्चा करण्याची अगर त्यांवर मत देण्याची हिंदी संस्थानिकांची इच्छा नाहीं व हे प्रश्न अजिबात चर्चेतून गाळावे असें त्यांचें मत आहे. फेडरल राज्यघटनेच्या कक्षेंत सार्वभौमत्वाचा (Paramountcy) प्रश्न पुढें कधींकाळीं येईल असेंही संस्थानिकांस वाटत नाहीं. १२ डिसेंबरला केलेल्या रिपोर्टांत हिंदुस्थानची भावी राज्यघटना फेडरेशनच्या धर्तीवर असावी असें सब्-कमिटीनें ठरविलें.त्या फेडरेशनचे घटक कोणते असावे, यावर आपलें मत दिलें व ह्या भावि संयुक्त राष्ट्रघटनेंत येणाऱ्या संस्थानांना व सर्व प्रांतांना फेडरल कायदेमंडळाच्या दोन्ही मंडळांमध्यें प्रतिनिधित्व असावें अशीही कमिटीनें शिफारस केली. फेडरेशनमध्यें यणाऱ्या सर्व घटकांमध्यें लागू पडणारे ज्या विषयासंबंधीचे कायदेकानू करण्याचा अधिकार कायदेमंडळाला दिला,त्या विषयांची तात्पुरती यादीही सब्कमिटीनें तयार केली आहे.फेडरल कायदेमंडळाच्या अधिकाराबद्दल केलेल्या तात्पुरत्या शिफारशींना या रिपोर्टाच्या शेवटच्या भागांत सब्–कमिटीनें पुरवणी जोडली आहे. कांहीं कांहीं बाबतींमध्यें संस्थानांतून अंमल गाजवितां येणें हें फडरल मंत्रि मंडळ व कायदेमंडळ यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरचें आहे. पण ह्या बाबतींवर ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांची एकवाक्यता होणें जरूर आहे. असे विषय पुरवणीमध्यें दिले आहेत.या बाबतींत कमिटीचें असें निश्चित मत आहे कीं, कांहीं खात्यांसंबंधीं सर्व घटकांची एकवाक्यता करणें हें फेडरल कायदे मंडळाचें काम आहे. कारण पूर्णपणें फडरल सरकारवर सोपविलीं नाहींत अशीं खातीं चालविण्यासाठीं जर स्वतंत्र अधिकारमंडळ नेमलें तर मोठे घोटाळे होतील. शिवाय नवीन राज्यघटनेंतच अशी योजना असलेली बरी कीं, ज्यामुळें तिची वाढ होऊं शकेल. व ब्रिटिश हिंदुस्थान आणि संस्थानें यांची एकसमयावच्छेदेंकरून स्वाभाविक उत्क्रांति होत जाईल. म्हणूनच फेडरल खातीं व फडरल न झालेलीं खातीं यांना जोडणारा दुवा फेडरल कायदेमंडळ होय.

यापुढें खालील तीन विषयांची चर्चा करावयाची

(१) फेडरल कायदेमंडळाच्या प्रत्येक उपमंडळामध्यें किती सभासद असावे व सर्व प्रांतांतून त्यांची कशी विभागणी करावी.

(२) ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांमधून प्रतिनिधि निवडण्याची पद्धति कोणती असावी.

(३) फेडरल मंत्रि मंडळाची (Executive) घटना,स्वरूप(character) अधिकार व जबाबदारी फेडरल राज्यघटनेची सर्व तपशिलासह संपूर्ण योजना तयार केल्याचा बहाणा ही सब्–कमिटी मुळींच करीत नाहीं. कांहीं सर्वसामान्य मूलतत्त्वें सांगून ज्या गोष्टींवर बरेंच बहुमत झालेलें आहे त्यांवरील निकाल नमूद करणें व या विषयावर

जास्ती तपशीलवार चर्चा व छाननी कोणच्या दिशेनें व्हावी ती दिशा दाखविणें एवढ्यानेंच गोलमेज परिषदेला पुष्कळ मदत होईल असें सब्-कमिटीस वाटतें. बऱ्याच प्रश्नांवरील निकाल हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील लोकमत अजमावूनच द्यावा लागेल. म्हणून ते तसेच अनिर्णित ठेवले आहेत. यामुळेंच दोन्ही देशांतील जनतेच्या संमतीवर संपूर्ण राज्यघटना उभारली जाईल.

प्रथम तिसरा विषय घेऊं.

मंत्रिमंडळाची जबाबदारी––पुढील रिपोर्ट लिहितांना हें गृहीत धरून चाललों आहों कीं, या रिपोर्टांत विशेष उल्लेखिलेल्या जादा संरक्षक अटी जमेस धरावयाच्या-पण हें तत्व विसरावयाचें नाहीं कीं, फेडरल सरकारची जबाबदारी पुढें हिंदी लोकांवरच राहील.हें तत्त्व प्रचारांत येण्यास ब्रिटिश नॉर्थ अमेरिका कायदा १८६७ , यूनियन ऑफ साऊथ आफ्रिका कायदा १९०८, कॉमनवेल्थ ऑफ आस्ट्रेलिया १९००इतर वसाहतींच्याराज्य घटनांवरून एक साधन सुचलें आहे. तें हें कीं, कायद्यांची अंमलबजावणीची सत्ता व अधिकार सार्वभौम सरकारवर सोपवावयाचे किंवा बादशहाचा प्रतिनिधी जो गव्हर्नर जनरल त्याचेकडे सोपवावयाचे,व गव्हर्नर जनरल नेंच दिवाणांचें मंत्रिमंडळ (Council of Ministers)नेमावयाचें व त्या मंत्रिमंडळानें सत्तारूढ असेपर्यंत त्याला सल्लामसलत द्यावयाची. कायदेमंडळाचा ज्यांचेवर विश्वास आहे अशाच सभासदांना गव्हर्नर जनरल दिवाण नेमील व ब्रिटिश कॉमनवेल्थच्या वहिवाटीला अनुसरून मंत्रिमंडळ बनविण्याकरितां तो एका दिवाणाला आमंत्रण देईल व इतर दिवाणांचीं नांवें सुचविण्यास त्यास विनंति करील.

जबाबदारी म्हणजे काय?:––

कायदेमंडळाच्या विश्वासाला पात्र असलेल्या सभासदांनाच गव्हर्नर जनरल दिवाण नेमील. यावरून हें उघड आहे कीं, जोंपर्यंत कायदेमंडळाचा त्यांचेवर विश्वास आहे,तोंपर्यंतच ते अधिकारारूढ रहातील. सरकार (मंत्रिमंडळ) कायदे–मंडळाला जबाबदार आहे याचा कमिटीच्या मतें वरील अर्थ आहे व जबाबदारीचा हाच अर्थ ब्रिटिश कॉमनवेल्थ मध्यें रूढ आहे. कमिटीच्या मतानें जबाबदारी या शब्दामध्यें हाहि गर्भितार्थ आहे कीं, मंत्रिमंडळ हें सगळेंच्या सगळेंच जबाबदार आहे. व्यक्तिशः प्रत्येक दिवाण नव्हे व एकतर सगळे दिवाण अधिकारारूढ असतील; नाहींतर सगळे दिवाण पदच्युत होतील.

संरक्षक अटी––

जबाबदारीचें मध्यवर्ति मंत्रिमंडळ ही आतां उभारण्यांत येणाऱ्या राज्यघटनेची अंतिम पायरी आहे व या जबाबदारीच्या ढोबळ तत्त्वाला थोडी मुरड घालणें जरूर आहे. आतांपर्यंत पार्लमेंटकडे असलेली सत्ता व जबाबदारी हिंदुस्थानकडे एकदम सोपविणें शक्य नाहीं. याबद्दल सब्-कमिटीचें मतैक्य झालें म्हणून राजकीय उत्क्रांतीच्या काळांत–– (१) परचक्र निवारण (Defence) व परराष्ट्रीय संबंध (फेडरेशनमध्यें सामील न झालेल्या संस्थानांचेही संबंध)या दोन खात्यांबद्दल गव्हर्नर जनरल जबाबदार राहील. (२) या खात्यांव्यतिरिक्त पुढें निर्देशिलेल्या परिस्थितीमध्यें गव्हर्नर जनरलला स्वतःच्या जबाबदारीवर वागण्याचें स्वातंत्र्य राहील व आपले निकाल अमलांत आणण्याकरितां शक्य तो अधिकार त्याला दिला जाईल. राखीव खात्यांवरील गव्हर्नर जनरलचे सल्लागार कमिटीमधील सभासदांचें असें मत पडलें कीं, Defence खात्यावरील गव्हर्नर जनरलचीं काय मतें आहेत ह्याचें कायदेमंडळामध्यें स्पष्टीकरण करण्याकरितां एक दिवाण मंत्रिमंडळामध्यें असावा.परराष्ट्रीय संबंधाचे खात्यालासुद्धां हें तत्त्व लागू आहे. पण या खात्याकरितां व्हाइसराय तर्फेचा एक दिवाण असावा किंवा नाहीं यावर मतभेद झाला. पण राखीव खात्यांवर आपले प्रतिनिधि निवडतांना आपणास योग्य वाटतील त्यांचीच निवड करण्याचें, गव्हर्नर जनरलला स्वातंत्र्य असणें अवश्य आहे हें उघड आहे. व ते प्रतिनिधि दिवाणपदावर असल्यास इतर दिवाणांप्रमाणेंच कायदेमंडळाचे दोन्ही शाखांमध्यें बसण्याचा, भाषण करण्याचा त्यांना हक्क प्राप्त होईल. हे प्रतिनिधि अर्थात गव्हर्नर जनरलला जबाबदार राहणार, कायदेमंडळाला नव्हे. तरी पण कांहीं सभासदांनीं अशी सूचना केली कीं,त्या प्रतिनिधींचा देखील मंत्रिमंडळाच्या इतर दिवाणांमध्येंच समावेश करावा. व आपल्या सहकाऱ्यांबरोबर पदच्युत होण्याची त्यांनींही आपत्ति भोगावी. (गव्हर्नर जनरल हवेतर पुन्हां नेमणूक करील.) पण यामुळें दिवाणांच्या संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाला बाध येतो. म्हणून सब् कमिटीला या प्रश्नावर निर्णय देतां येत नाहीं. पण या प्रश्नावर सविस्तर चर्चा व्हावी इतका हा महत्त्वाचा प्रश्न आहे, असें कमिटीचें मत आहे.

गव्हर्नर जनरलचा मंत्रिमंडळाशीं काय संबंध असावा तसेंच मंत्रिमंडळाच्या बैठकांना गव्हर्नर जनरलनें स्वतः अध्यक्ष व्हावें किंवा नाहीं ह्याहि प्रश्नाचा विचार ओघानें येतो. सब्-कमिटीच्या मतानें ह्याविषयीं निश्चित नियम करतां येत नाहीं. एवढें मात्र उघड आहे कीं, या उत्क्रांतीच्या काळांत कांहीं प्रसंगीं गव्हर्नरजनरल सभांना उपस्थित असणें इष्ट आहे. व विशेष प्रसंगीं आवश्यक आहे. म्हणून व्हाइसरॉयच्या सूचना पुस्तकांत (Instrument of instructions) असा नियम घालावा कीं, व्हाइसरॉयला जेव्हां जेव्हां इष्ट वाटेल तेव्हां तेव्हां त्यानें मंत्रिमंडळाच्या सभांना हजर रहावें, व अध्यक्षस्थान स्वीकारावें. पण सार्वजनिक हिताच्या बाबीविषयीं गव्हर्नर जनरलला नेहमी संपूर्ण माहिती पुरविणें अगत्याचें आहे. व निरनिराळ्या खात्यांच्या मंत्र्याकडून त्या त्या खात्याविषयीं माहिती व कागदपत्र मागविण्याचा गव्हर्नर जनरलला हक्क आहे.

गव्हर्नर जनरलचे राखीव खात्यावरील अधिकारः–

राखीव खात्यांच्या कारभाराची जबाबदारी सर्वस्वी गव्हर्नर जनरलवर राहील.अर्थात राखीव खात्यांच्या खर्चाकरितां त्याला कायदेमंडळाची संमति घ्यावी लागणार नाहीं. व त्या खात्यांवरील वार्षिक खर्च, युनायटेड किंग्डममधील Consolidated fund charges प्रमाणेंच समजावा. कांहीं वर्षांच्या मुदतीच्या करारपद्धतिवर (Contract–basis) अंदाजपत्रक ठरविण्यांत येईल. तसेंच राखीव खात्यांकरितां लागणारा पैसा उभा करण्याकरितां उपाय योजण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला असावा. तसेंच मुदतीच्या करारापेक्षां जादा लागणारा पैसा ह्या राखीव खात्याकरितां मंजूर करण्याची गव्हर्नर जनरलला सत्ता असावी.राखीव खात्यांबद्दलची आपली जबाबदारी नीट रीतीनें पार पाडण्याकरितां आवश्यक असे कायदे–कानू करण्याची सत्ता गव्हर्नर जनरलला असावी.हे सर्व अधिकार बजावण्याच्या प्रसंगीं गव्हर्नर जनरल आपल्या मंत्र्याची सल्ला मसलत घेतल्याशिवाय राहणार नाहीं अशी कमिटीस आशा वाटते. मात्र स्वतःच्या कृत्याची सर्वस्वी जबाबदारी मंत्र्यावर न राहतां गव्हर्नर जनरलवरच राहील.

गव्हर्नर जनरलचे जादा अधिकारः–

राखीव खात्यांखेरीज इतर खात्यांचे कारभाराचे बाबतींत गव्हर्नर जनरल सामान्यपणें त्या त्या खात्यांच्या मंत्र्याच्या सल्ल्यानेंच वागेल. पण सर्व देशांत शांतता ज्या योगानें नांदेल, एकाद्या विशिष्ट वर्गाच्या हिताला बाधक होणाऱ्या गोष्टी टाळतां येतील, व राज्यघटनेनें वरिष्ठ नोकरांतील उमेदवारांना दिलेले हक्क संभाळले जातील अशी कांहीं तरी योजना करणें अवश्य आहे. ह्याला सब्-कमिटीमधील सभासदांनीं संमति दिली. वरील हेतु साध्य होण्याकरितां गव्हर्नर जनरलला पार्लमेंटला जबाबदार होण्याचा व आपल्या अधिकारांत कायदेकानू करण्याचा अधिकार द्यावा. मंत्र्याच्या जबाबदारीची पर्वा न करितां दररोजच्या कारभारांतहि हे जादा अधिकार गव्हर्नर जनरलनें उपयोगांत आणू नये. म्हणून ह्या जादा अंमलबजावणीची मर्यादा ठरविण्याची सब् कमिटीमधील कांहीं सभासदांना आवश्यकता वाटली. पण हें उघड आहे कीं, आपल्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यापूर्वी आपला मंत्रिमंडळाशीं व कायदे मंडळाशीं संबंध काय आहे ह्याचा गव्हर्नर जनरल विचार करीलच. शक्य तोंवर हे स्वतःचे जादा अधिकार तो उपयोगांतहि आणणार नाहीं. व आपला हात आंखडता घेईल. म्हणजे मंत्र्यांना आपली जबाबदारी त्याच्यावर टाकतां येणार नाहीं.

आर्थिक योजना–जादा निर्बंधः––फिनान्सचे बाबतींत सब्-कमिटीच्या मतानें स्वदेशांत व परदेशांत हिंदुस्थानचें आर्थिक स्थैर्य व पत कायम ठेवण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानचे आर्थिक परिस्थितीमध्यें निशंकपणें आहे. ह्या मूलाधारावरच नवीन राज्यघटनेची सिद्धि अवलंबून आहे. याकरितां अंदाजपत्रक तयार करणें व कर्ज उभारणें याविषयीं जादा अधिकार गव्हर्नर जनरलकडे राखून ठेवणें अवश्य आहे. म्हणजेच जगाच्या आर्थिक बाजारांत हिंदुस्थानची पत ज्या योगें कमी होईल अशा योजना होऊं लागल्यास त्याला मध्यें पडता येईल व त्या योजना फेटाळतां येतील. हिंदुस्थानची पत व चलन या बाबतींत जास्त विश्वास उत्पन्न करण्याच्या हेतूनें सब् कमिटी अशी शिफारस करीत आहे कीं, बळकट पायावर व राजकारणापासून अलिप्त अशी एक रिझर्व्ह बँक शक्य तितक्या लवकर स्थापण्याचा प्रयत्न करावा. व या बँकेकडे हीं चलन व एक्स्चेंज यांची व्यवस्था सोपवावी. व अशी अट घालावी कीं, गव्हर्नर जनरलची मंजुरी घेतल्याशिवाय कागदी चलनांचे किंवा नाण्यांच्या चलनाचे कायद्यांत दुरुस्ती करण्याचें बिल पुढें आणतां येणार

नाहीं. सिंकिंग फंडाच्या द्वारें वसुलीची तरतूद करून देण्यांत येणारें तारण व सेक्रेटरी ऑफ स्टेटनें आश्वासन देऊन नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांचे पगार व पेन्शन तसेंच राखीव खात्यांचा खर्च ह्या.करितां लागणारी सर्व रक्कम Consolidated fund charges मधून देण्याचें आश्वासन द्यावें.

वरील मर्यादा संभाळल्यास सब् कमिटीच्या मतानें फिनान्सचा दिवाण व कायदेमंडळाला जबाबदार असणारे दुसरे दिवाण यांच्या दर्जामध्यें कांहीं फरक नाहीं व करवाढ आणि गव्हर्नर जनरलच्या ताब्यांतील खात्यांव्यतिरिक्त इतर खात्यांचे बाबतींतील आर्थिक धोरण व खर्च ह्या गोष्टींबद्दल फिनान्स दिवाण हा कायदेमंडळालाच सर्वस्वीं जबाबदार राहील.या विषयीं सब् कमिटीला एका पुढें आलेल्या योजनेचा उल्लेख करावासा वाटतो. ती अशी कीं, स्टॅच्युटरी रेल्वे ॲथॉरिटी स्थापन करावी व तज्ज्ञांचे परीक्षणानंतर जर असें करणें इष्ट आहे असें वाटलें तर तसें करावें.

हल्लींच्या परिस्थितीमध्यें तावडतोब बळकट पायावर रिझर्व्ह बँक स्थापणें व तिला सोन्याची आवश्यक इतकी शिल्लक (Reserve) मिळवून देणें कठीण आहे.हें सब्कमिटी जाणून आहे. व रिझर्व्ह बँक अस्तित्वांत येईपर्यंत गव्हर्नर जनरलला आर्थिक धोरण व चलन यावर जरूर तो ताबा मिळण्याकरितां कांहीं तरी योजना करणें अवश्य आहे.

गव्हर्नर जनरलचे सामान्य अधिकारः-- वर निर्दिष्ट केलेल्या जादा अधिकारांखेरीज कायदेमंडळांत पास होणाऱ्या कायदेकानूंना संमति देण्याचें नाकारणें व पुर्नविचाराकरितां बिल परत पाठविणें हे अधिकार हल्लींप्रमाणेंच चालू रहातील व गव्हर्नर जनरलला खास सूचना मिळाल्याखेरीज बिलास तहकुबी व नकार देण्याचे हल्लीचे अधिकार त्यानें चालू ठेवावयाचे आहेत.

धर्मविषयक व व्यापारविषयक बिलें:-- एकाद्या समाजाच्या पोट जातीच्या धर्मकृत्यासंबंधाचीं व धार्मिक चालीरीतींविषयींचीं बिलें पुढें आणण्याकरितां गव्हर्नर जनरलची मंजुरी पाहिजे कीं काय यावर जास्त विचार होणें आवश्यक आहे. तसेंच उद्योगधंदे व व्यापार यांविषयीं एकाद्या समाजाच्या पोटजातींत भेद करण्याच्या प्रश्नाविषयीं गव्हर्नर जनरलची मंजुरी पाहिजे कीं काय? ह्याचाहि विचार झाला पाहिजे.

कमिटीचें असें मत पडलें कीं, या प्रश्नाचे बाबतींत समानतेचें तत्त्व लागू केलें पाहिजे. व याकरितां निरनिराळे उपाय सुचविले गेले. पण कमिटीचें असें मत आहे कीं, निरनिराळे हितसंबंध असलेल्या समाजांशीं या प्रश्नाविषयीं जास्त विचारविनियम करावा.

राज्यघटनेचा विध्वंस झाला तर?:-- दुर्दैवानें अशी परिस्थिति आली कीं, एकजात विरोधामुळें राज्ययंत्र पुढें चालणेंच अशक्य झालें तर आपला जादा अधिकार चालवून सार्वभौम सरकारचें (King's) राज्ययंत्र पुनः सुरळीत चालू करण्याची सत्ता गव्हर्नर जनरल यास द्यावी.

कायदेमण्डळ

घटना व स्वरूपः--

(१) फेडरल कायदेमंडळाच्या प्रत्येक उपमंडळामध्यें किती सभासद असावे व फेडरेशनच्या घटकांमध्यें त्यांची विभागणी कशी करावी.

(२) ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें ह्यांमधून प्रतिनिधि निवडण्याची पद्धति.

मूलभूत तत्त्वें:--फेडरल राज्यघटनेंत बहुधा दोन कायदेमंडळें असतात. पैकीं एका मंडळामध्यें फेडरेशनच्या प्रत्येक घटकानें सारखे प्रमाणांत निवडलेले प्रतिनिधि व दुसऱ्या मंडळामध्यें सर्व फेडरेशनच्या लोकसंख्येनें निवडलेले प्रतिनिधि असतात. यामध्यें राज्यशास्त्रकोविदांनीं अशीहि योजना केली आहे कीं, वर सांगितलेल्या पहिल्या मंडळांतील प्रतिनिधींची निवडणूक त्या त्या घटकाच्या सरकारांनीं अगर कायदेमंडळांनीं करावी. व दुसऱ्या मंडळांतील प्रतिनिधींची निवडणूक सामान्य तऱ्हेनें इलेक्शनच्या पद्धतीनें करावी. व पहिलें मंडळ दुसऱ्यापेक्षां लहान असावें, अशीहि योजना असते. पण हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थिति पाहतां व हिंदी लोकांच्या गरजा व मनोधर्म लक्षांत घेतां हिंदुस्थानची संयुक्त राज्यघटना अशी असावी कीं, त्यांत कोणाला परस्पराविरुद्ध लढा उपस्थित करण्यास जागाच राहूं नये, व सर्व हिंदुस्थान देशाचें हितसंवर्धनाचें धोरण निरनिराळ्या घटकांनीं एकत्र सहकार्याच्या तत्त्वावर ठरविण्याची त्या घटनेंत तरतूद असावी. सर्व घटकांची सहकारिता होण्यास फेडरल सरकारचें आसन स्थिर करण्याकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. सब् कमिटीच्या चर्चेंत असें ठरलें कीं, कायदेमंडळें दोन असावीं. पैकीं वरिष्ठमंडळ कनिष्ठमंडळापेक्षां लहान असावें. पण या मंडळांचे परस्पर संबंध काय असावे व प्रत्येकाचे अधिकार

काय असावे यावर निर्णय झाला नाहीं. फेडरल कायदेमंडळाचें वरिष्ठमंडळ किंवा सिनेट म्हणा, लहान असावें व त्यामध्यें १००–१५० सभासद असावेत कीं, ज्यामुळें या मंडळाला दर्जा, अनुभव व योग्यता यामुळें वजनदारपणा, वरिष्ठपणा येईल, हा हेतु साध्य होण्याकरितां हल्लींच्या कौन्सिल ऑफ स्टेटच्या उमेदवारांचे गुण ब्रिटिश हिंदुस्थानांतील उमेदवारांना लागू करावें असें मत पडलें. व सब् कमिटीची अशी खात्री आहे कीं, आपले प्रतिनिधि निवडतांना हिंदी संस्थानिकसुद्धां वरील हेतु ध्यानांत ठेवतील.

वरिष्ठमंडळाच्या निवडणुकीची पद्धतिः—

सब् कमिटीनें जवळजवळ मतैक्यानें असें ठरविलें कीं, ब्रिटिश हिंदुस्थानतर्फे सिनेटमध्यें धाडावयाचे प्रतिनिधि त्या त्या प्रांतिक कायदेमंडळांनीं एकाच ट्रॅन्स्फरेबल व्होटनें निवडावे.

वरिष्ठमंडळाची कालमर्यादाः—

लोअर हाऊसप्रमाणें सिनट अजिबात बरखास्त करतां येऊं नये. पण सिनेटचे सभासदांपैकीं कांहीं मोजक्या सभासदांचें सभासदत्व नियमित मुदतींत नष्ट व्हावें व त्यांच्या जागांवर पुनः त्यांची किंवा इतरांची निवडणूक व्हावी.

वरिष्ठमंडळामधील जागांची वर्गवारीः—

संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान यांच्यामध्यें वरिष्ठमंडळाच्या जागांची विभागणी कशी व्हावी या प्रश्नावर सब् कमिटीमध्यें मतभेद झाला. सब् कमिटींतील संस्थानचे प्रतिनिधींनीं आग्रह धरला कीं, संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान यांमध्यें या जागांची समसमान वांटणी व्हावी. उलट ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधींनीं आपले देशाचें क्षेत्रफळ व लोकसंख्या लक्षांत घेऊन अशी मागणी केली कीं, ब्रिटिश हिंदुस्थानाला संस्थानांपेक्षां जास्त जागा मिळाव्या. पण सब् कमिटीनें मतैक्यानें असें ठरविलें कीं, संस्थानांना कांहीं तरी पासंग द्यावें. कारण लोकसंख्येच्या प्रमाणावर जागांची विभागणी करणें हें तत्वतःच असमर्थनीय व व्यवहाराचे दृष्टीनें अनिष्ट आहे. गोलमेज परिषदेंतही जर या प्रश्नावर मतैक्य झालें नाहीं, तर एकमेकांशीं चर्चा करून व एकमेकांनीं थोडें मिळतें घेऊन या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागेल अशी सब् कमिटीस बळकट आशा आहे.

वरिष्ठमंडळामधील जागांची ब्रिटिश प्रांतांत विभागणी कशी करावीः—संस्थानांविषयीं येथें विचार करण्याचें कारण नाहीं. व्यक्तिशः संस्थानिकांनीं व्हाइसरायांशीं चर्चा करून काय तें ठरवावें. ब्रिटिश प्रांतांविषयीं बोलावयाचें म्हणज सर्व प्रांतांना सारख्या जागा द्याव्या. असें कांहीं सभासदांचें मत पडलें व त्यांनीं पुराव्यादाखल इतर देशांतील फेडरेशनचे दाखले दिले. पण ज्या योजनेनें ७॥ लक्ष लोकसंख्येचा आसाम प्रांत व ४६॥ लक्ष लोकसंख्येचा बंगाल प्रांत यांना सारखाच मताधिकाराचा हक्क मिळतो, ती योजना जनतेला कितपत पसंत पडेल याविषयीं सब् कमिटीला शंका वाटते. व तिच्या मतानें समाधानकारक योजना म्हणजे अशी कीं, प्रत्येक प्रांताला लोकसंख्येच्या प्रमाणांत जागा द्याव्या.

कनिष्ठमंडळः—

लोअर चेंबरमध्यें जवळजवळ ३०० सभासद असावे. म्हणजे हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या प्रत्येक कोटीमागें एक प्रतिनिधि असावा. उलट कांहींनीं असा आग्रह धरला कीं, २०० पेक्षां जास्त सभासद झाले कीं, तितकी चेंबरची कार्यक्षमता कमी होणार. पण सब् कमिटीला असें वाटतें कीं, कार्यक्षमतेचें महत्त्व लक्षांत आणून लोअर चेंबरमध्यें सभासदांची संख्या २५० करावी.

कनिष्ठ मंडळामधील जागांची विभागणीः—

या चेंबरमध्येंहि संस्थानांना लोकसंख्येच्या प्रमाणांत मिळणाऱ्या जागांपेक्षां जास्त जागा पाहिजेत. पण ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधींनीं लोकसंख्येच्या प्रमाणांतच जागा विभागण्याचा आग्रह धरिला. या योगानें शेकडा ७६ जागा ब्रिटिश हिंदुस्थानला मिळतील व शे. २४ संस्थानांना मिळतील. ही विभागणी कमिटीमधील बहुमतानें झाली. पण विचारी अशा अल्पमतवाल्यांचें म्हणणें असें कीं, जागांच्या विभागणींतील ही मोठी तफावत गोल मेज परिषदेच्या ध्येयाच्या विरुद्ध आहे. व बहुमतवाल्यांनीं तत्त्व जरासें बाजूस ठेवून परस्परप्रेम वृद्धिंगत होईल अशा सामोपचारानें बोलावें. त्यांचें म्हणणें असें कीं, एकमेकांनीं मिळतें घेऊन या प्रश्नाचा निकाल लावावा.

कनिष्ठ मंडळामध्यें प्रतिनिधि निवडण्याची पद्धतिः—या प्रश्नावरहि कमिटीमध्यें मतैक्य नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रतिनिधींना सार्वत्रिक मतदारसंघामार्फत निवडणुकी होणें जास्त पसंत आहे. आज दहा वर्षें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें याच तऱ्हेनें निवडणुकी होत आल्या आहेत. व ही पद्धत व्यवहार्य ठरली आहे. व जागांची संख्या वाढवून व मतदारसंघाचा संकोच करून आतांपर्यंत आलेले अडथळेही नाहींसे होतील. अप्रत्यक्ष रीतीनें

निवडणूक होणें (Indirect election) हिंदी लोकमताविरुद्ध आहे.हा ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रतिनिधींच्या म्हणण्याचा सारांश होय. तर सभासदांचें म्हणणें असें कीं, जर ब्रिटिश हिंदी प्रतिनिधींना २०० जागा देण्याचें गृहीत धरलें तर प्रत्येक मतदारसंघ ४०००चौरस मैलांचा होईल. या मतदारसंघाच्या जवळजवळ ५००० मतदारांनीं प्रतिनिधि निवडणें म्हणजे खरें लोकमत प्रदर्शित करण्याचा मार्ग नव्हे. कमिटीच्या कांहीं सभासदांचें असें स्पष्ट मत आहे कीं, हिंदुस्थानच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमध्यें (Direct Election) सार्वत्रिक निवडणुकीची पद्धति फडरेशनच्या ध्येयाच्या सिद्धीला बाधक होईल. त्याच्या मतानें मध्यवर्ति सरकार व प्रत्येक घटक यांचेमध्यें जितके घट्ट दुवे असतील तितकें चांगलें. नाहींतर अधिक स्वायत्तता (Autonomy) मिळाल्यावर प्रांतांना मध्यवर्ति सरकारपासून फुटण्याची बुद्धि बळावत जाईल.म्हणून त्यांच्या मतें फेडरल कायदेमंडळाच्या दोन्हीं उपमंडळांत जे प्रतिनिधि यावयाचे ते त्या त्या प्रांतांच्या कायदेमंडळांनीं निवडलेले असावेत.

कनिष्ठ मंडळाची कालमर्यादाः—५ वर्षांची असावी (जर गव्हर्नर जनरलनें आधींच बरखास्त केलें नाहीं तर).

फेडरल कायदेमंडळामध्यें विशिष्ट वर्गांना (दलितवर्ग, हिंदी ख्रिश्चन, युरोपियन, अँग्लो, इंडियन, जमिनदार, व्यापारी व मजूर) जागा राखून ठेवण्याविषयीं सब् कमिटीमध्यें मतैक्य झालें. जोंपर्यंत राखीव खातीं अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत दोन्हीं उपमंडळांतून सरकारचे प्रतिनिधि असावे अशीहि सबकमिटी शिफारस करीत आहे. पण त्या प्रतिनिधींची संख्या किती असावी, व त्यांचें कायदेमंडळांत काम कोणत्या प्रकारचें असावें ह्याबद्दल मतभेद झाला. कांहीं सभासदांचें मत असें कीं, गव्हर्नर जनरलच्या वतीनें त्यांचे धोरणाचें स्पष्टीकरण करण्याकरितांच फक्त त्यांनीं कायदेमंडळामध्यें हजर राहावें व मतविभागणीच्या वेळीं त्यांना मत देण्याचा अधिकार असूं नये. इतर सभासदांचें मत असें कीं, ह्या सरकारच्या प्रतिनिधींना कायदेमंडळाच्या सभासदत्वाचे सर्व हक्क असावे.तसेंच कांहीं सभासद म्हणतात कीं, राखीव खात्यांच्या कारभारांत गव्हर्नर जनरलला ह्या प्रतिनिधींनींच सल्ला द्यावी. इतरांचें मत असें कीं, प्रत्येक उपमंडळामध्यें जास्तींत जास्त दहा सभासदांना नेमण्याचा गव्हर्नर जनरल यास अधिकार असावा.

मंत्रिमंडळाचें आसन स्थिर करण्याचा उपाय—याबद्दल जी एक सूचना पुढें आली व जिला बराच पाठिंबा मिळाला ती ही कीं, दोन्हीं मंडळांची संयुक्त सभा होऊन त्यामध्यें दोन तृतियांश मतांनीं जर मंत्रिमंडळावरील अविश्वासाचा ठराव पास झाला तरच मंत्रिमंडळ राजिनामा देईल. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, दोन तृतियांशापेक्षां कमी मतें पडलीं, तर मंत्रिमंडळावरील सभेचा विश्वास पूर्वीपेक्षां वाढला. पण पदोपदीं अविश्वासाच्या ठरावानें मंत्रिमंडळाला राजिनामा द्यावयास लावणें हें मंत्रिमंडळाचे स्थैर्याचे दृष्टीनें अनिष्ट आहे. म्हणून ह्या प्रश्नावर जास्त चर्चा होऊन कांहीं तरी उपाययोजना व्हावी.

ब्रिटिश हिंदुस्थान विषयक प्रश्नाबाबत संस्थानी प्रतिनिधींचें धोरण काय असावें? संस्थानिकांची अशी इच्छा आहे कीं, मंत्रिमंडळाचें अस्तित्वच ज्यावर अवलंबून आहे अशा प्रश्नावर-मग तो प्रश्न ब्रिटिश हिंदुस्थानविषयक कां असेना—संस्थानी प्रतिनिधींनीं ब्रिटिश हिंदी प्रतिनिधींबरोबर मतप्रदर्शन करून तो प्रश्न तडीस न्यावा. याबरोबरच संस्थानिकांचें असें म्हणणें आहे कीं, फेडरल विषयांच्या व्यतिरिक्त इतर बाबींवर (ज्यांचा संस्थानाशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं) संस्थानी प्रतिनिधींनीं मतप्रदर्शन करूं नये. पण कमिटीच्या कांहीं सभासदांस असें वाटतें कीं, असा पंक्तिप्रपंच करणें कायदेमंडळाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. ह्यामुळें कायदेमंडळाला कांहीं सभासदांच्या सल्लामसलतीला मुकावें लागेल. संस्थानी व बिनसंस्थानी असें खात्यांचें वर्गीकरण करणेंहि अव्यवहार्य आहे. म्हणून सबकमिटी अशी शिफारस करते कीं, या प्रश्नाची छाननी व्हावी.

फेडरल कायदेमंडळाची सत्ता— हल्लीं वरिष्ठ कायदे मंडळाच्या अधिकार क्षेत्रांत येणाऱ्या खात्यांचे पुरवणी रिपोर्टांत फेडरल, सेंट्रल व प्रांतिक (प्रॉव्हिन्शियल) असें वर्गीकरण केलें आहे. पण यांमध्यें तज्ज्ञांकडून जास्ती छाननी होऊन फेरबदल करणेंही भाग पडेल. कांहीं प्रांतिक खात्याबाबतचे कायद्यांमध्यें एकजिनसीपणा आणण्याकरितां दोन गोष्टी कराव्या. (१) गव्हर्नर जनरलच्या मंजूरीशिवाय प्रांतिक कायदेमंडळांना कांहीं प्रांतिक खात्यांचे कायद्यामध्यें दुरुस्ती करतां येऊं नये. अशा कायद्यांचा तक्ता तयार करावा. (२) व प्रांतिक खात्यांच्या कांहीं प्रश्नां-

बाबत कायदे करण्याचा अधिकार फेडरल कायदे-मंडळाकडे द्यावा. ह्या खात्यावरील कोणचाही प्रांतिक कायदा जर फेडरल कायद्याच्या विरुद्ध जात असेल तर तो बाद समजावा.

शिल्लक खात्यावरील सत्ता–खात्यांचें वरील तीन प्रकारचें वर्गीकरण केल्यानंतरसुद्धां त्यांमध्यें न येणारीं कांहीं खातीं शिल्लक राहतातच. ह्या खात्याबाबत कायदे करण्याचा अधिकार फेडरल सरकारकडे असावा कीं, प्रांताकडे असावा हा प्रश्न कमिटीमध्यें अनिर्णीत राहिला.पण या प्रश्नाचा फार काळजीपूर्वक विचार व्हावयास पाहिजे. फेडरल सरकारचें प्रांतिक सरकारवरील नियंत्रण व फेडरल खात्यांचे बाबतींत प्रांतांमध्यें फेडरल कायद्यांची योग्य बजावणी होते आहे कीं नाहीं हें पाहण्याचा अधिकार फेडरल मंत्रिमंडळाला आहे. व फेडरल खात्याव्यतिरिक्त इतर खात्यांचे बाबतींत असा अधिकार संस्थानी मुलुखांत चालविण्यास फेडरल मंत्रिमंडळ असमर्थ आहे. पण हें उघड आहे कीं, एकादा प्रांतिक खात्याबाबतचा प्रश्न इतर प्रांतांना बाधक होणार असला, किंवा इतर प्रांतांचे हितसंबंध त्यांत गुंतले असले तर तो प्रांतिक खात्यांतील कां असेना, त्यावर निकाल देण्याचा व एकंदर राज्यकारभारविषयक धोरणांत एकजिनसीपणा आणण्याचा अधिकार फेडरल सरकारला असावा, असें सब कमिटीचें मत आहे.

सेंट जेम्स राजवाडा, लंडन, सब कमिटीतर्फें
ता. १३–१–१९३१. सँकी.

फेडरल स्ट्रक्चर सबकमिटीमधील सभासदांच्या भाषणांतील उतारे

फेडरेशन––सामान्य चर्चा

लॉर्ड सँकी:––संयुक्त राष्ट्रघटनेची सामान्य कल्पना अशी कीं,सार्वजनिक हिताच्या खात्यांचा कारभार प्रत्येक घटकानें, घटनेमध्यें सामील होणाऱ्या प्रत्येक राष्ट्रानें, प्रांतानें आपल्या वतीनें संयुक्त राष्ट्रसंघाकडे सोंपवावयाचा. अशा खात्यांची व्यवस्था सर्व प्रांतामार्फत फेडरल मंत्रिमंडळ व कायदेमंडळ यांनीं पहावयाची.

कर्नल हक्सर:––फेडरेशनची कल्पना उदयास कशी आली? १९१९ चा हिंदुस्थान सरकारचा कायदा झाल्यापासून ब्रिटिश हिंदुस्थानचें मंत्रिमंडळ व कायदेमंडळ यांना असे कायदेकानू करतां येऊं लागले कीं, जे संस्थानच्या हिताला बाधक होऊं लागले व संस्थानांना आपलें मतप्रदर्शन करण्यास वाव मिळेना, म्हणून संस्थानांना आपलीही (आपल्या हितसंबंधांविषयीं) बाजू जोरानें मांडतां यावी, याकरितां फेडरेशनची कल्पना निघाली.

सर महमद शफी:–हिंदुस्थानच्या भावी राज्य–घटनेचें चित्र बारा वर्षांपूर्वी मांटेग्यु चेम्सफर्ड रिपोर्टाच्या शेवटच्या प्रकरणामध्येंच रेखाटलेलें आहे. तें असें–आमच्या कल्पनेप्रमाणें हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेमध्यें सर्व प्रांत (States) एका संयुक्त राज्यघटनमध्यें सामील होतील. व केवळ प्रांतिक स्थानिक संबंधाच्या बाबतींतच स्वायत्त असतील. या प्रांतांवर एक मध्यवर्ती सरकार असेल व त्यांमध्यें सर्व प्रांतांतील जनतेतर्फें जास्त जास्त प्रतिनिधी घेतले जातील व वाढत्या प्रमाणांत जबाबदारी मिळेल.हें मध्यवर्ति सरकार सर्व हिंदुस्थानच्या हिताच्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय बाबींची व्यवस्था पाहील, प्रांताप्रांतामधीलसंबंधांचे बाबतींत लवाद म्हणून काम करील व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर स्वायत्त घटकां–(वसाहती) च्या इतकाच दर्जा,सर्व हिंदुस्थानच्या हितसंबंधाचा प्रतिनिधी म्हणून, या मध्यवर्ति सरकारास प्राप्त होईल. या भावी राज्यघटनेमध्यें हिंदी संस्थानासहि सामील होण्यास मुभा आहे. राजकीय उत्क्रांतीचें हें अंतिम ध्येय सायमन कमिशननेंही आपल्या रिपोर्टाच्या १३व्या परिच्छेदामध्यें मान्य केलें आहे.व हें ध्येय साध्य होण्याकरितां सायमन कमिशननें २७ व्या परिच्छेदांत स्वतःचा खास उपायहि सुचविला आहे. रिपोर्टाच्या दुसऱ्या भागांत शिफारसवजा सुचविलेल्या योजनेचा हेतूः-सर्व हिंदुस्थानच्या सर्वसाधारण हिताच्या आड न येणारी जितकी जास्त प्रांतिक स्वायत्तता देतां येईल तितकी देण्याचा हेतु आहे. सर्व हिंदुस्थानच्या हिताच्या बाबी फेडरल सरकारकडे सोंपवून इतर बाबी फेडरेशनच्या घटकांकडे–स्वायत्त ब्रिटिश प्रांतांकडे, व हिंदी संस्थानांकडे सोपवाव्या. अशा तऱ्हेनें अमेरिका, आस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड व लढाईनंतरचें आस्ट्रिया यांच्या धर्तीवर हिंदुस्थानमध्यें फेडरेशन होईल.

फेडरल कायदेमंडळ

सप्रू:––हल्लीं कायदे करणारे अधिकारी तीन. एक कायदेमंडळ व कौन्सिल ऑफ स्टेट; दुसरा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल (यानें केलेल्या कायद्यांना Regulations म्हणतात. ते कायदे मंडळाकडे पाठविले जात नाहींत.) तिसरा गव्ह-

र्नर जनरल खुद्द. त्याला ऑर्डिनन्स काढण्याचा अधिकार असतो. माझें स्वतःचें मत असें आहे कीं, भावी फेडरल कायदेमंडळांत सर्व कायदे करण्याची सत्ता केंद्रित व्हावी. हल्लींचें हिंदी कायदेमंडळ खरें वरिष्ठ कायदेमंडळ नव्हे. त्याची सत्ता फारच मर्यादित केलेली आहे. हिंदुस्थान सरकारचा कायदा कलम ६५ पहा. तें बहुतेक बदलावें लागेल. या कलमानें कायदेमंडळाचें कायदे करण्याचें क्षेत्र फारच संकुचित केलें आहे. तसेंच कलम ६७ बी मध्यें कायदेमंडळाला धाब्यावर बसविण्याचे मंत्रिमंडळाला दिलेले अधिकार पहा.व सर्टिफिकेशनचा अधिकार पहा. ही कायदे मंडळाच्या स्वातंत्र्यावरच गदा होय. तसेंच कलम ६७ (अ) वरून आर्थिक बाबीमध्यें हिंदी कायदेमंडळाची सत्ता किती मर्यादित आहे हें दिसतें याकरितां माझी अशी आकांक्षा आहे कीं, भावी फेडरल कायदेमंडळ ब्रिटिश पार्लमेंटच्या नियंत्रणाखालीं राहणार नाहीं. व त्यावर सोंपविलेल्या सर्व बाबींमध्यें त्याला पूर्ण अधिकार राहील व व्हाइसरॉयला त्या बाबतींत सर्टिफिकेशनचा अधिकार राहणार नाहीं. असें झालें तरच तें खरेंखुरें फेडरल कायदेमंडळ. फेडरेशन व युनियन यांमध्यें राजकीय दृष्ट्या जमीन अस्मानाचें अंतर आहे. जर आपणाला संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान यांचें खरें फेडरेशन बनवावयाचें असेल, तर फेडरल कायदेमंडळानें केलेले कायदे ब्रिटिश प्रांतांना व त्याबरोबरच संस्थानांना लागू झाले पाहिजेत.

व्हाइसरायचें मंत्रिमंडळ

सप्रूः—मध्यवर्ति सरकारमध्यें जबाबदारी—हल्लीं या मंत्रिमंडळाचे सभासदांची बादशहाकडूनच नेमणूक होते व ते बादशहालाच जबाबदार असतात.कायदेमंडळाचा किंवा कौन्सिल ऑफ स्टेटचा कांहींहि निर्णय होवो तो मंत्रिमंडळावर बंधनकारक नाहीं. हल्लींच्या मंत्रिमंडळाबद्दल एवढेंच म्हणतां येईल कीं, त्याची बुद्धि ठिकाणावर नसली म्हणजेच तें कायदेमंडळाला जबाबदार असतें. व अहंभावाची जाणीव झाली कीं, तें चाटूक्ति व वचनें यांची खैरात करतें. अशा या मंत्रिमंडळाला असेंब्लीमध्यें निवडून आलेल्या १०५ सभासदांना तोंड द्यावें लागतें. व त्यांमध्यें जिनांसारखे कडक लोकसत्तावादी सभासद असतात. मग या मंत्रिमंडळाची काय तारांबळ उडते हें सांगावयास नको. मीच स्वतः लॉर्ड रेडिंगच्या अमदानीमध्यें मंत्रिमंडळांत असतांना बऱ्याच प्रसंगीं मला असें वांचत असे कीं, जर आम्हांला लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींचें —कायदे मंडळाचें—पाठबळ असतें तर आम्ही जास्ती धाडसानें पुढें पाऊल टाकलें असतें. मी हें ठांसून सांगतों कीं,हल्लींचें कायदेमंडळाला जबाबदार नसलेलें व्हाइसरायचें मंत्रिमंडळ समर्थ तर नाहींच, पण गेलीं दहा वर्षें अतिशय दुर्बळ झालें आहे.म्हणूनच कायदा व शांतता यांचें योग्य तऱ्हेनें देशांत परिपालन करतां येत नाहीं. देशामध्यें भयंकर प्रकोप गुदरला असतां परिस्थितीला टक्कर द्यावयास असमर्थ असल्यामुळें दरवेळीं मंत्रिमंडळाला गव्हर्नर जनरलच्या पंखांखालीं आश्रय घ्यावा लागला आहे. साध्या कायद्यानें भागलें नाहीं. हल्लीं तरी आपण काय पाहतों आहों? हल्लीं कायद्याचें राज्य नसून दंडुकेशाहीचें (Ordinance) राज्य आहे.राज्यव्यवस्थाविषयक व आर्थिक प्रश्नांचे बाबतींत सुद्धां मंत्रिमंडळाची परावलंबी स्थिति आहे. व्हाईसराय व मंत्रिमंडळ यांना सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या तोंडाकडे पाहावें लागतें. मी मंत्रि असतांना मला असा अनुभव आला आहे कीं, हिंदुस्थान सरकारचें एकमत. पण व्हाईट हॉलच्या या बड्या मोंगल बादशहानें आमच्या मताला किंमत दिली नाहीं. व एकतर आम्हांला कायदेमंडळाकडे दातीं तृण धरून जावें लागे किंवा कांहींतरी तडजोड करणें भाग पडे व कायदेमंडळापुढें आमचें हंसें झालेलें सहन करावें लागे. ज्या मंत्रिमंडळाला कायदेमंडळाचा पाठिंबा नाहीं त्याला देशाचा कसा असणार? जर जनतेची अशी खात्री असती कीं हें मंत्रिमंडळ आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कायदेमंडळाला जबाबदार आहे, तर जनतेनें मंत्रिमंडळाला नैतिक पाठिंबा दिला असता. यावरून मंत्र्यांची दृष्टीच विकृत झालेली असते असें मी म्हणत नाहीं. त्यांनासुद्धां जनतेची मागणी पुरवठ्याची उत्कंठा असते. पण कायद्यानेंच त्यांची अशी स्थिति झाली आहे कीं, त्यांना लोकमताला जबाबदार राहणें अशक्य होतें, मग लोकमताप्रमाणें वागणें दूरच.

सेक्रेटरी ऑफ स्टेट खरोखरच मोंगल बादशहा आहे, यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. पार्लमेंटनेंच त्याला अशी अनिर्बंध सत्ता दिलेली आहे.तो खरोखरच मोंगल बादशहा आहे. व व्हाईट हॉलमधलीं त्याची कचेरी हा त्याचा जनानखाना. गरीब बिचाऱ्या मोंगल बादशहालासुद्धां लखनौ, अलाहाबाद, व लाहोर येथील आपल्या व्हाईसरायांवर सत्ता गाजवितां आली नसेल, इतकी अनियंत्रित

सत्ता हिंदुस्थान सरकारच्या कायद्यांतील कलम २व ३३ यांनीं सेक्रेटरी ऑफ स्टेटला दिलेली आहे. गव्हर्नरजनरल व त्याचें मंत्रिमंडळ हे त्याचे निव्वळ चाकर होत. व त्यांनीं आपल्या धन्याच्या हुकुमाप्रमाणें वागावयाचें आहे. हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें निराळें धोरण स्वीकारलें पाहिजे. सेक्रेटरी ऑफ स्टेट आपणास चकीच्या मार्गावर नेत आहे, ही जाणीव असूनसुद्धां गव्हर्नरजनरल व त्याचें मंत्रिमंडळ यांना व्हाईटहॉलच्या हुकुमाला कित्येकदां मान तुकवावी लागली. मी फक्त माझ्या देशाच्या स्वातंत्र्याची याचना करीत नाहीं,तर माझ्या देशाच्या राज्यव्यवस्थेच्या स्वातंत्र्याचीहि मी याचना करीत आहें. कांहीं कांहीं बाबतींत गव्हर्नर जनरल याला दिलेली सत्ता, हीसुद्धां दिखाऊ असून खरा सत्ताधिकारी स्टेटसेक्रेटरीच असतो. (कलम ६७ अ). बरें. कलम ७२ नें दिलेले अधिकार पहा. कायदा व शांतता यांचे नांवावर Ordinances काढतां येतात. तें निर्वाणीचें अस्त्र म्हणून वापरावयाचें असतें. पण हल्लीं पहावें तों जरा खुट्ट वाजलें कीं, Ordinance ! "अगदीं लोकांचा प्रतिनिधी असा मिनिस्टर असता तर त्यानें तरी शांतता कशी राखली असती? तो कायदेमंडळाला जबाबदार! म्हणजे सगळें राज्ययंत्रच बंद पडलें असतें,असें आम्हांस हिणविण्यांत येतें. पण मी म्हणतों गेल्या बारा महिन्यांमध्यें हल्लींच्या सरकारनें तरी परिस्थितीला कितपत यशस्वी तऱ्हेनें तोंड दिलें आहे? केवळ दंडुकेशाहीच्या कायद्यांनींच ना! त्यांना शांतता राखतां आली? मग हिंदी दिवाण असता तर यापेक्षां वाईट तें काय होणार होतें? गव्हर्नर जनरलला निर्वाणीचें अस्त्र द्यावें, नाहीं असें नाहीं. जपानमध्यें तसें दिलेलें आहे. पण तेथें येथल्याप्रमाणें असा तरी बहाणा करीत नाहींत कीं आम्ही शांतता व कायदा राखीत आहों! दंडुकेशाहीचा कायदा म्हणजे सामान्य कायदा नव्हे. वरचेवर निर्वाणीचे अस्त्राचा उपयोग करावयास लागणें, याचा अर्थ हाच कीं, हिंदुस्थान सरकार दुर्बळ आहे, परावलंबी आहे. आर्थिक प्रश्नांमध्यें सर्टिफिकेशनचा अधिकार गव्हर्नर जनरलला आहेच. या अधिकारानें कायदे मंडळाची वाढ न होतां तें खुरटत जाणार. याच्या उलट स्वायत्त वसाहतींची स्थिति पहा. वसाहतींच्या राज्यघटना पहा. प्रथम ब्रिटिश नॉर्थ अमेरिकेचा कायदा घेऊं. कलम ११।१२ मध्यें कॅनडा सरकारची घटना दिलेली आहे. यावरून असें दिसेल कीं, कॅनडा सरकार हें खरें जबाबदार सरकार आहे. या दोन कलमांवरुन हें सिद्ध होतें कीं, कॅनडामध्यें जबाबदारीचें स्वराज्य आहे. तेथील मंत्रिमंडळावर संयुक्त जबाबदारी असते. आस्ट्रेलियाचे राज्यघटनेमधील कलमें ६१ व ६२ वरून हें दिसेल कीं, आस्ट्रेलियामध्येंसुद्धां जबाबदार सरकार आहे. तसेंच आयरिश फ्री स्टेटचें ५४ व ५१ कलम घ्या.त्यांत मंत्रिमंडळाची जबाबदारी जास्त स्पष्टपणानें सांगितली आहे. जबाबदारीचें स्वराज्य म्हणजे काय? हें सांगतों. हल्लींच्या राज्यघटनेमध्यें गव्हर्नर जनरल व त्याचें मंत्रिमंडळ हे आपल्या खात्यांच्या कारभाराबद्दल वरिष्ठ कायदेमंडळाला जबाबदार नाहींत.ते बादशहाला किंवा स्टेट सेक्रेटरीमार्फत पार्लमेंटला जबाबदार असतात. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें बहुमतानें जरी एखादी गोष्ट ठरविली तरी,त्या बहुमताला धाब्यावर बसविण्याचें सामर्थ्य त्यांना आहे. माझा अनुभव तसाच आहे. सर महंमद शफी व सर भूपेंद्रनाथ मित्र यांचाहि तसाच असेल. पण यायोगानें (मंत्रिमंडळ व कायदेमंडळ यांचेमधील चकमकीमुळें) मंत्र्यांचा दर्जा कमी कमी होत जातो व कायदे मंडळाचा मात्र वाढत जातो. कायदेमंडळाला जर हें ठाऊक आहे कीं आपणांस जबाबदारी नाहीं,सत्ता नाहीं,मग त्यानें मंत्रिमंडळाचा खरपूस समाचार घेऊन तें किती बेजबाबदार आहे व जुलमी आहे हें जर लोकांचे निदर्शनास आणलें तर त्यांत कायदेमंडळाचा काय दोष? पण जर कायदेमंडळाला बहुमतानें प्रचलित मंत्रिमंडळ पदच्युत करतां आलें तर आपल्या निर्णयाची जबाबदारी कायदेमंडळावर पडेल व मग तेंच कायदेमंडळ प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या धकाधकीच्या मामलयांत पडलें कीं तें जबाबदारपणाची व सौम्यपणाची जाणीव ठेवील. यावरून असें दिसेल कीं जबाबदारी पाहिजे ती केवळ नैतिक, शाब्दिक नव्हे.मध्यवर्ति सरकारमध्यें जबाबदारी पाहिजे याचा अर्थ तें सरकार आपल्या कारभारांत व निर्णयामध्यें कायदेमंडळाला जबाबदार असलें पाहिजे. आपल्या कारभाराचा व निर्णयाचा जाब त्यानें कायदेमंडळापुढें दिला पाहिजे.म्हणजे कायदेमंडळाच्या ताब्यांत जीं खातीं दिलीं जातील त्या खात्यांवरील मंत्रिमंडळांतील प्रतिनिधींना अशी जाणीव झाली पाहिजे कीं आपलें अस्तित्व लोकप्रतिनिधी किंवा फेडरल घटकांच्या प्रतिनिधींच्या अनुकूल मतावर व पाठिंब्यावर अवलंबून आहे. पण कायदेमंडळाच्या अविश्वासाच्या

ठरावानें आपणांस अधिकारच्युत होण्याची भीति नाहीं, असें जर त्यांस वाटलें तर तें जबाबदारीचें स्वराज्य नव्हें.रिस्पॉन्सिबिलिटि याचा अर्थ, मंत्रि-मंडळ हें राज्यकारभाराचे बाबतींत कायदेमंड-ळाला जबाबदार असणें. वसाहतींमध्यें असलेंच जबाबदारीचें स्वराज्य आहे. एकादा देश आर्थिक संपन्नतेपेक्षां शांतता व कायदा राखण्यास समर्थ झाला म्हणजे तो स्वराज्यास लायक झाला असें समजावें. हल्लींचें हिंदुस्थान सरकार जितकी शांतता व सुव्यवस्था राज्यकारभारविषयक अनुभवांत मुरलेलें असूनसुद्धां ठेवूं शकत नाहीं, तितकी किंवा त्यापेक्षां जास्त आम्ही स्वराज्यांत ठेवूं शकूं असें म्हणण्याचें धाडस मी करतों. माझें ब्रिटिश प्रतिनिधींना हेंच सांगणें आहे कीं, प्रांतिक जबाबदारी घ्या व पुढें मध्यवर्ति जबाबदारी मिळेल. असें आम्हांस सांगण्याचे दिवस आतां गेले. हल्लीं हिंदुस्थान देश भयंकर दिव्यांतून पार पडत आहे. यावेळीं ५० ते ६० हजार लोक तुरुंगांत असावे हें कांहीं ब्रिटिश सरकारला मोठें भूषणावह नाहीं. त्या लोकांत कांहीं आम्हांला वंदनीय असे पुरुष आहेत, कांहीं आमचे निकट संबंधी आहेत, मुलें आहेत, मुली आहेत, बायका, पुरुष, म्हातारे आहेत. त्यांचा मार्ग चुकीचा असेल. पण त्यांनीं भयंकर यातना व मानहानि कशासाठीं सोसली आहे? इंग्लंडवरील त्यांचा विश्वास पार उडाला आहे म्हणून. त्यांच्या विश्वासास पुन्हां पात्र होणें हें तुमच्या हातीं आहे. "आम्हीं आणखी २०।२५ वर्षें आहे ह्याच स्थितींत हिंदुस्थानवर राज्य करूं शकूं" हें म्हणणें ब्रिटिश सरकारसारख्या सर्व जगांत श्रेष्ठ व सुधारलेल्या, पुढारलेल्या राष्ट्राला शोभणार नाहीं व शक्यहि नाहीं. सामान्य कायद्यांचे जोरावर तुम्हांस राज्य करतां येणार नाहीं. तर फक्त रोजच्या रोज दंडुकेशाहीचीं फर्मानें काढून अगर लष्करी कायद्यानेंच राज्य करावें लागेल. व त्यासारखी तुम्हांस दुसरी लाजिरवाणी गोष्ट कोणती नाहीं. मी हें धमकीवजा मुळींच बोलत नाहीं. मी मनापासून बोलत आहें. आमची तरुण पिढी अत्याचाराच्या भयंकर मार्गानें जात आहे. तिनें आम्हांस राष्ट्रद्रोही ठरविलें आहे. व आम्ही केवळ स्टेट सेक्रेटरी, मुख्य प्रधान, यांच्याकडून सत्कार करून घेण्यास येथें आलों आहों, असें त्यांस वाटत आहे. हिंदुस्थानच्या हल्लींच्या स्थितीबद्दल आम्हांला तीव्र वेदना होत आहेत. माझ्या देशाची मनःस्थिति ओळखून मीं म्हणतों कीं, जर आम्हांस जबाबदारीचें स्वराज्य मिळालें नाहीं तर इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांच्या भवितव्याबद्दल खात्री वाटत नाहीं. तुमच्यांतीलच एक मोठा राजकारणी पुरुष ग्लॅडस्टन एकदां म्हणाला कीं, 'अविश्वासाला विश्वास हेंच औषध'. हेंच वाक्य लक्षांत ठेऊन इंग्लिश राजकारणी पुरुषांनीं हल्लींच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीकडे पहावें.

लॉर्ड रेडिंगः—फेडरल मंत्रिमंडळ फेडरल कायदेमंडळाला जबाबदार करण्याच्या प्रश्नासंबंधीं लिबरल पक्षाचे प्रतिनिधींची अशी कळकळीची इच्छा आहे कीं, योग्य मर्यादेपर्यंत ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रतिनिधींबरोबर पाऊल टाकावयास आम्ही तयार आहों. मात्र सर्वांचे हितसंबंधाचें रक्षण करण्याचें सामर्थ्य, संरक्षक अटी व जादा अधिकार यांच्या द्वारें हिंदुस्थान सरकारला प्राप्त करून दिलें पाहिजे. स्टेट सेक्रेटरीला मोंगल बादशहा म्हणणें गैर आहे. तो इंडिया कौन्सिलचा अध्यक्ष असतो. व प्रधानमंडळांतील इतर सभासदांनीं व बादशहानें त्याला हिंदुस्थानविषयक प्रश्न सोडविण्याची सत्ता दिलेली असते. तो प्रधानमंडळाचा प्रतिनिधी असतो. व प्रधानमंडळ हें पार्लमेंटच्या मताचें निदर्शक आहे. याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानचा कारभार स्टेट सेक्रेटरी पाहात नसून पार्लमेंट पाहतें.

सर सॅम्युअल होअरः—आम्ही ब्रिटिश लोक जबाबदारीचें राज्य याचा अर्थ असा समजतों—(१) पार्लमेंटला जबाबदार असणाऱ्या Unitary प्रधानमंडळाचें राज्य (२) हें प्रधान मंडळ एका पक्षावर बहुधा अवलंबून असतें. व नेहमीं हाऊस ऑफ कॉमन्समधील बहुमतावर अवलंबून असतें. (३) हाऊस ऑफ कॉमन्सचा पाठिंबा मिळनासा झाला म्हणजे प्रधानमंडळ बरखास्त होतें. प्रधान राजिनामे देतात. (४) प्रधानमंडळ बरखास्त झाल्यावर, लहानशा दाट वस्ती असलेल्या व राजकीय हक्कांना सावध असलेल्या या देशांत सार्वत्रिक निवडणूक होते व तो दोन किंवा तीन पक्षांमध्यें सामना असतो व उभ्या राहणाऱ्या उमेदवारांचें आपापल्या मतदारसंघाशीं संघटन असतें. वरील अटी राज्यघटनेच्या स्थैर्याला आवश्यक आहेत. पण आजच्या क्षणाला यांपैकीं एकहि अट हिंदुस्थानच्या परिस्थितीला लागू पडत नाहीं. हिंदी प्रधान मंडळ एकमुखी (Unitary) असूं शकणार नाहीं. त्यांत कांहीं मंत्री नेमलेले तर कांहीं निवडून

आलेले असतील. त्यांत अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधींचा समावेश केला कीं, जबाबदारीचा जास्त विच्छेद होईल. सार्वत्रिक निवडणूक अव्यवहार्य ठरेल. कायदेमंडळाचे बरेच सभासद हिंदी संस्थानाकडून नेमले जातील. पक्षांच्या कार्यक्रमावर भर देऊन निवडणूक लढविली जाणार नाहीं. कारण ज्याला आम्ही पक्ष म्हणतों तसे पक्ष अजून हिंदुस्थानांत अस्तित्वांत नाहींत. जों जों मी इंग्लंडचीं परिस्थिति व हिंदुस्थानची परिस्थति यांच्या मधील भिन्नतेचा विचार करतों, तों तों प्रधानमंडळाची (जबाबदारीची पद्धति) राज्यपद्धति (Cabinet Government) हिंदुस्थानांत कितपत यशस्वी होईल याबद्दल माझ्या शंका बळावत जातात. तसेच ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सची पार्लमेंटरी पद्धति अखिल हिंदुस्थानच्या फेडरेशनला लावण्याचा प्रयत्न करणें शहाणपणाचें होईल कीं नाहीं, याविषयीं मी अथपासून इतिपर्यंत साशंक आहें. मात्र अखिल हिंदुस्थानच्या फेडरेशनला माझा मनापासून पाठिंबा आहे. पण प्रथमच मध्यवर्ति सरकार कायदेमंडळाला जबाबदार करण्याच्या योजनेनें मी गांगरून गेलों आहें.

सर सी. पी. रामस्वामी ऐय्यर:––माझें असें स्पष्ट मत आहे कीं, कायदेमंडळ व त्यांतील पुढारी व प्रतिनिधी यांना जर सरकारनें कायदा व शांतता ठेवण्याकरितां उपाययोजना करण्याचे बाबतींत विश्वासांत घेतलें, तर हिंदी कायदेमंडळें कायदा व शांतता राखण्याचे कामीं सरकारला मदत करण्यास एका पायावर तयार असतात. मद्रास मंत्रिमंडळामध्यें मी या खात्याचा मंत्रि असतांना, लॉर्ड विलिंग्डन यांनीं मोपला बंड मोडण्याकरितां दिवाण व मंत्री यांच्या एकत्र सभा भरवून उपाययोजना ठरविली. कायदेमंडळांतील बहुमतवाल्या पक्षाचे प्रतिनिधींना विश्वासांत घेतल्यामुळें सरकारचें काम सुकर झालें. एकत्र चर्चा व एकत्र सल्ला मसलत केल्याचा हा परिणाम.

नेहमीं राज्यकारभाराला आर्डिनन्स काढण्याची अमर्याद अधिकाराची जरूर नाहीं. व तो यापुढें बंद झाला पाहिजे. प्रांतिक स्वायत्ततेनें आमची भूक आतां भागणार नाहीं; मध्यवर्ति सरकारांत जर जबाबदारी नसेल तर प्रांतिक स्वायत्तता कुचकामाची आहे. बरें. फेडरेशन करावयाचें म्हटलें तरी मध्यवर्ति सरकारमध्यें जबाबदारी पाहिजेच. हिंदी फेडरेशन हें स्वायत्त ब्रिटिश हिंदुस्थान व स्वायत्त संस्थानें यांमध्येंच होणार. फेडरेशनला पाठिंबा द्यावयाचा असेल तर ब्रिटिश हिंदुस्थानांत स्वराज्य (Self-Government) सुरू झालें पाहिजे.

प्रचलित राजकीय चळवळ गतकालच्या राजकीय चळवळीपेक्षां फार निराळी आहे. हल्लींची चळवळ केवळ राजकारणाचा पेशा घेतलेल्या लोकांनीं चालविलेली नसून, तिला व्यापारी वर्गाचा मोठा पाठिंबा आहे. व ते पैसा व नैतिक बल या चळवळीकरितां खर्च करीत आहेत. असें कां? तर व्यापाऱ्यांना वाटतें कीं, सरकारचें व्यापारविषयक आर्थिक धोरण त्यांच्या हिताला बाधक आहे. हिंदुस्थानचें आर्थिक धोरण हिंदुस्थानच्याच केवळ हिताकरितां हिंदी लोकांनींच आंखण्याची जबाबदारी हिंदी लोकांवर टाकल्याशिवाय ही चळवळ थांबणार नाहीं. आम्हांला जबाबदारीचें मध्यवर्ति सरकार पाहिजे याचा अर्थ आर्थिक धोरण ठरविण्याची जबाबदारी पाहिजे. इंग्लंडची व्यापारी पेशाची कर्तबगारी मोठी आहे. व त्याचा हिंदुस्थानालाहि फायदा झाला आहे. रेल्वे, कालवे पाटबंधारे झाले, पण मला गोलमेज परिषदेच्या प्रतिनिधींना असें सुचवावयाचें आहे कीं, हिंदुस्थानचीं उद्योगधंदे व व्यापाराची गतकालीन प्रगति थांबली ती थांबलीच. इंग्लंड त्या उन्नत स्थितीला हिंदुस्थानला पुन्हा आणं पुन्हां शकलें नाहीं.

लॉर्ड पील:—कोणतीही राज्यघटना सुरू करा, पण ती हिंदी परिस्थितीमुळें निर्माण झालेल्या विशिष्ट गरजा भागविणारी पाहिजे. लोकमत, लोकांची मनोवृत्ति यांकडे लक्ष देणें अवश्य आहे. हें मला कबूल आहे. पण आपण या प्रयोगशाळेमध्यें राज्यघटनांची चिकित्सा करण्यास बसलों आहों तेव्हां आपण भावनाविवश न होतां चिकित्सात्मक बुद्धीनें चाललें पाहिजे.

बिकानेरचे महाराज:––संस्थानांचे हक्कांचें योग्य संरक्षण होणार असेल तर शेंकडा ७५ संस्थानें फेडरेशनमध्यें यावयास एकदम तयार होतील. मध्यवर्ति सरकारमध्यें जबाबदारी देण्याविषयींच्या योजनेला माझा पूर्ण पाठिंबा आहे.

आतां अशी वेळ आली आहे कीं, यापुढें ब्रिटिश हिंदुस्थान अगर संस्थानें यांना आर्थिक सत्तेचे बाबतींत कुकुलें बाळ समजून चालणार नाहीं. त्यांना आर्थिक स्वायत्तता दिली पाहिजे.

संस्थानिकांविषयीं कोणी कसलीही शंका घेवो, मला असा आत्मविश्वास वाटतो कीं, संयुक्त राज्यघटना चालू करण्यांत जी जी मदत लागेल ती ती संस्थानिक करतील. असा एक समज आहे कीं, संस्थानें म्हणजे अल्पसंख्यांक वर्गापैकीं एक वर्ग.

पण तसें नसून संस्थानांना ब्रिटिश हिंदुस्थानव्यतिरिक्त स्वतंत्र अस्तित्व आहे, व फेडरेशनमधील दोन पक्षांपैकीं त्यांचा एक पक्ष आहे. व तीं स्वतंत्र असून राज्यपदाचे हक्क भोगीत आहेत. तेव्हां संस्थानिकांच्या हक्कांची समाधानकारक निरवानिरव करण्याकडे आपण लक्ष जरूर पुरविलें पाहिजे. फेडरेशनमध्यें येण्याचा अनुकूल विचार संस्थानिकांनीं करावा अशी इच्छा असेल तर दोन अटी पाळल्या पाहिजेत. (१) भावी राज्यघटनेंत ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्समधील एक समान पातीदार म्हणून हिंदुस्थान ब्रिटिशांशीं संबंध कायम ठेवील. (२) ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांचे परस्पर संबंधाविषयीं योग्य करार झाला पाहिजे, व त्यांत संस्थानांना ब्रिटिश हिंदुस्थानबरोबर राज्यघटनेंतील समान भागीदाराचा दर्जा मिळाला पाहिजे. त्यांचे तहनामे, त्यांची अंतर्गत सार्वभौमसत्ता व त्यांचे प्रजाजनांचे हितसंबंध यांचें योग्य व दोन्ही पक्षांना माननीय असें संरक्षण झालें पाहिजे.

आतां आमचेपुढें बसलेल्या पुढाऱ्यांसारखे पुढारी व प्रतिनिधी जर भावी फेडरल कायदेमंडळांत येणार असतील, तर संस्थानांना काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं. पण आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, अधिकार अनिष्ट लोकांचे हातीं जाण्याचा संभव आहे. व वर्तमानपत्रांतून व भाषणांतून एका विशिष्ट राजकीय मताचे लोक असें उघड लिहीत बोलत आहेत कीं, हिंदुस्थानचे नकाशावरील संस्थानें पुसटून टाकलीं पाहिजेत. म्हणून संरक्षक अटींची आवश्यकता आहे.

लॉर्ड लोथियनः—

गेल्या कांहीं वर्षांतील असंतोषाचें कारण माझ्या मतानें राज्यकारभाराची जबाबदारी हिंदी लोकांवर फारच थोडी टाकली हें होय. ब्रिटिश कॉमनवेल्थ, अमेरिका, युरोप, इजिप्त वगैरे देशांचा इतिहास काय सांगतो? हेंच कीं, बेजबाबदारीला योग्य उपाय व क्रांतिकारकांच्या चळवळीला प्रतिबंधक इलाज म्हणजे जबाबदारीचें स्वराज्य देणें, राज्यकारभाराची जबाबदारी लोकांवर टाकणें. हिंदुस्थानच्या खजिन्याला परचक्रनिवारणाकरितां फार चाट बसते असें ऐकण्यांत येतें. पण युरोपला त्याकरितां किती खर्च करावा लागतो हें लक्षांत घ्या. युरोपची लोकसंख्या जवळजवळ हिंदुस्थान इतकीच आहे, व युरोप परचक्रनिवारणावर (Security and defence) दर वर्षी ३० कोटी पौंड खर्च करितें.

जयकरः— अल्पसंख्याकांना संतुष्ट केल्याखेरीज कोणतीही राज्यघटना चालूं शकणार नाहीं. धार्मिक चाली, शिक्षण वगैरे बाबतींत अल्पसंख्याकांच्या सर्व मागण्या पुरवणें योग्य आहे; पण राजकीय जादा सवलती देतांना मात्र तीन महत्त्वाचीं तत्त्वें डोळ्यापुढें सतत ठेविलीं पाहिजेत. (१) या संरक्षक अटी कांहीं काळापुरत्याच असाव्यात. (२) त्यांचा परिणाम राष्ट्रीय ऐक्य वाढविण्यांत व्हावा. व मुसलमान, हिंदु असे देशाचे तट पडून, फूट होण्यांत होऊं नये. देशांत फूट न होतां जूट वाढविणाऱ्या अटी असाव्यात. (३) हिंदुस्थानांत जबाबदारीचें राज्य झाल्यावर राज्यकारभारांत, वेळोवेळीं ज्या नाजूक योजना कराव्या लागतील त्या करण्याचे स्वातंत्र्याचे आड हया अटी येऊं नयेत.

प्रांतिक राज्यघटना

पोट कमिटीचा अहवाल

पोट कमिटीचे सभासद——

मि. आर्थर हेंडरसन (चेअरमन)

दि मार्क्विस ऑफ झेटलंड; सर राबर्ट हॅमिल्टन;

हि. हा. दि. महाराजा ऑफ नवानगर, सर प्रभाशंकर पट्टणी, रा. ब. कृष्णम्मा चारी, } Holding a watching brief

सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला; मि. बी. व्ही. जाधव; सर चिमणलाल सेटलवाड; सर कावसजी जहांगीर; सर शहा नवाझ भुतो; सर प्रोवेश चंद्र मित्र; मि. फाझल-अल-हक; राजा ऑफ पार्लेकिमेडी; दि. ब. रामचंद्रराव; सर ए. पी. पेट्रो; नबाब सर अहमद सय्यदखान; मि. सी. वाय. चिंतामणी; मि. एस. बी. तांबे; मि. झाफरुल्ला खान; राजा नरेंद्रनाथ; सरदार संपूर्ण सिंग; दर्भंग्याचे महाराज; मि. सी. बऱ्हो; सर अबदुल क्वायम; मि. सी. ई. वूड.; मि. के. टी. पॉल; मि. एन. एम. जोशी; डॉ. भीमराव आर. आंबेडकर.

प्रांतिक कायदेमंडळाचे अधिकार व प्रांतिक कार्यकारी मंडळाची म्हणजे मंत्रिमंडळाची घटना, स्वरूप, अधिकार आणि जबाबदारी या दोन प्रश्नांचा विचार करण्याकरितां ही पोट कमिटी नेमली होती. चेअरमन साहेबांनीं नियमन केलें कीं, प्रांतिक कायदेमंडळाचा आकार, (म्हणजे

सभासद संख्या) त्यांची मुदत व त्यांत किती चेंबर्स असावीं व सरकारी सभासदांच्या (Official Block) गटाबाबत काय निकाल द्यावा, हे सर्व मुद्दे वरील प्रश्नांत अंतर्भूत होतात आणि म्हणूनच सबकमिटीला या सर्व बाबतींत पूर्ण खल करण्याचा अधिकार आहे.

४ द्विदल राज्यपद्धतीचा शेवट—ज्या प्रांतावरील मुख्य अधिकारी गव्हर्नर आहे,त्या प्रांतांतील हल्लींची द्विदलराज्यपद्धति काढून टाकावी. कायदा व सुव्यवस्था (Law and Order) या सर्व प्रांतिक विषयांचा कारभार प्रांतिक कायदेमंडळाच्या संमतीनें चालू रहावा.

५ प्रांतिक कार्यकारी मंडळाची म्हणजे मंत्रिमंडळाची घटना—(अ) संयुक्त जबाबदारी—मंत्रिमंडळांतील सर्व दिवाण एकजुटीनें कायदेमंडळांस जबाबदार रहावेत. ('अल्पसंख्याक' या प्रश्नाचा विचार करण्याकरितां नेमलेल्या पोट कमिटीचा रिपोर्ट तयार झाल्याविना संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वांस राजा नरेंद्रनाथ पूर्ण संमति देऊं इच्छित नाहींत.) (ब) दिवाणांची नेमणूक—दिवाण नेमण्याची जबाबदारी गव्हर्नरवर असावी. साधारणतः, गव्हर्नरनें कायदेमंडळांत ज्या सभासदाला सर्वांत जास्त पाठिंबा असेल,त्यास बोलावून दिवाणांच्या जागेकरितां सभासदांचीं नांवें सुचविण्यास सांगावें. दिवाणांच्या जागा निवडून आलेल्या सभासदांतूनच भराव्या. बिनसरकारी व कायदेमंडळांतहि निवडून न आलेल्या अशा एकाद्या गृहस्थास जर दिवाणाच्या जागेवर नेमण्यांत आलें, तर त्या गृहस्थास ठराविक मुदतीच्या आंत कायदेमंडळांत निवडून आलें पाहिजे. तीं ठराविक मुदत सहा महिन्यांहून जास्त नसावी. (कायदेमंडळांत जर दोन सभा असतील,तर कोठल्याहि एकांत त्यांनीं निवडून यावें) परंतु ही अट त्याच्यावर घालून त्याची नेमणूक गव्हर्नर यानें करावी.कार्यकारी मंडळांत सरकारी मनुष्याची नेमणूक करण्याच्या कामीं सारासार विवेक करण्याची ही परवानगी गव्हर्नर यांस नसावी. म्हणजे कोणाही सरकारी माणसाला कोणच्याही मुद्यावर कार्यकारी मंडळांत घेतां येऊं नये.(वरील कलमांतील अखेरीच्या भागास मार्क्विस ऑफ झेटलंड व सर रॉबर्ट हॅमिल्टन या सभासदांचा विरोध आहे.) (क) कार्यकारी मंडळांत निरनिराळ्या गटांचें किंवा जातींचें प्रतिनिधित्व—प्रांतिक कायदेमंडळाच्या घटनेंत प्रमुख अल्पसंख्य जातींना व गटांना योग्य तो वांटा मिळावा. त्यामुळें त्यांचे हितसंबंध अबाधित राहतील व नवीन राज्यघटना व कारभार सुरळीत चालण्यासहि त्यांचा चांगलाच उपयोग होईल. अशा गटांना व जातींना कार्यकारी मंडळांत प्रतिनिधित्व मिळवून देण्याकरितां गव्हर्नरनें शक्यतों प्रयत्न केलाच पाहिजे, अशी जबाबदारी त्यावर Instrument of Instructions च्या द्वारां घातली जावी. (या शेवटच्या वाक्यास मि. चिंतामणी यांचा पूर्ण विरोध आहे).

६ गव्हर्नरचे अधिकारः—(अ) कायदेमंडळाबाबत—(१) गव्हर्नरला कायदेमंडळ बरखास्त करण्याचा अधिकार असावा. कायदेमंडळानें पास केलेल्या कायद्यांस संमति देणें किंवा न देणें हा अधिकार गव्हर्नर यांचा आहे. गव्हर्नरला एखादें बिल कायदेमंडळाकडे पुर्नविचाराकरितां धाडतां येईल, किंवा गव्हर्नर जनरलच्या सल्लयाकरितां राखून ठेवतां येईल. (२) एकाद्या प्रांतांतील कोठल्याहि जातीच्या किंवा वर्गाच्या धर्मास किंवा धर्मकृत्यांस बाध असा कोठलाही कायद्याचा मसुदा गव्हर्नरची परवानगी घेतल्याशिवाय कायदेमंडळापुढें आणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें राज्यघटनेप्रमाणें जीं खातीं मध्यवर्ति सरकारकडे किंवा फेडरल सरकारकडे सोपवलेलीं असतील,त्यांपैकीं कोठल्याहि खात्याबाबत एखादें बिल प्रांतिक कायदेमंडळापुढें आणण्यापूर्वी तसें करण्यास गव्हर्नरची परवानगी घेतली पाहिजे. (४) मध्यवर्ति किंवा फेडरल कायदेमंडळानें पास केलेला कोठलाही कायदा किंवा गव्हर्नर जनरलनें काढलेला वट हुकूम यापैकीं कोठल्यासहि बाधकारक किंवा (Repealing) निरुपयोगी करण्याकरितां प्रांतिक कायदेमंडळापुढें बिल आणावयाचें असल्यास त्यास गव्हर्नरची परवानगी लागते.

(ब) कारभारविषयक—(१) राज्यघटनेप्रमाणें गव्हर्नर यांस स्वतः म्हणून कांहीं कामें करावयाचीं असतील, तीं करतांना त्याला जी जी माहिती लागेल ती सतत पुरविली जावी,व हें सर्व दिवाणांच्या संमतीनें चालावें. (२) मंत्रिमंडळाच्या सभेंत मुख्य दिवाण अध्यक्ष असावा. परंतु तसेंच कांहीं कारण असतां गव्हर्नरला अध्यक्ष होतां येईल

(क) गव्हर्नर साहेबांचे दिवाणाशीं संबंध—(१) गव्हर्नरची मर्जी असेतोंपर्यंतच दिवाण आपापल्या कामांवर असतील. (२) गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अ‍ॅक्टमधील ५२व्या कलमांतील तिसऱ्या पोटकलमामुळें गव्हर्नरला एक सरसकट सत्ता मिळाली आहे. ती अशी कीं, गव्हर्नरला आपल्या दिवा-

णांचीं मतें पसंत नसलीं व त्यास तशीं पुरेशीं कारणें दिसून आलीं म्हणजे त्यांचा सल्ला झुगारून देऊन आपणांस योग्य दिसेल, त्याप्रमाणें वागण्याचा त्याला अधिकार आहे.इतःपर हा गव्हर्नरचा अधिकार चालूं राहूं नये. नवीन राज्यघटनेंत गव्हर्नरवर जें कांहीं कामकाज सोंपविण्यांत आलें आहे, त्यासंबंधीं व्यवहार सुरळीत चालावा, म्हणून तेवढ्यापुरतें दिवाणांच्या सल्ल्याविरुद्ध वागण्याचा अधिकार चालूं रहावा.हें कामकाज म्हणजे अल्पसंख्याकांचें संरक्षण करणें व प्रांतांत शांतता व बंदोबस्त राखणें इत्यादि गोष्टी होत. (३) गव्हर्नरचे विशिष्ट व आपत्प्रसंगीं उपयोगांत आणण्याचे अधिकार––१ राज्यघटनेनुसार जें कांहीं कामकाज गव्हर्नरकडे सोंपविण्यांत आलें आहे, त्याचा कारभार हांकण्याकरितां गव्हर्नरला कायदेकानूसंबंधीं व आर्थिक बाबींसंबंधीं जरूर ते अधिकार मिळतील. २ राज्यघटनेचा सर्वच गाडा मोडून पडला असतां, किंवा प्रचलित सरकार उलथून पडल्यामुळें सर्व कारभार अडून राहूं नये, म्हणून गव्हर्नरला तो कारभार हांकण्याकरितां कांहीं नैमित्तिक (Emergency Powers) अधिकार असतील. या नैमित्तिक अधिकाराचा अंमल सहा महिन्यांपेक्षां जास्त काळपर्यंत चालूं राहूं नये, व तसा तो चालूं राहावयाचा असलाच तर त्यास पार्लमेंटच्या लॉर्डस व कॉमन्स या दोन्ही सभांत ठराव होऊन तशी संमति मिळालेली असावी. हल्लीं इलाखे तेवढे वगळून बाकीच्या प्रांतांवरील गव्हर्नर, सनदी नोकरवर्गांतून निवडण्याची रुढी पडली आहे. इतःपर ही रुढी ढिली व्हावी असें, सब कमिटीचें मत आहे. ही रुढी ढिली करण्याच्या ऐवजीं साफ मोडावी.

७ प्रांतिक कायदेमंडळाची रचनाः––

(अ) कायदेमंडळाचें आकारमान–––नवीन घटना व मतदार वर्ग यांना पुरें पडावें म्हणून प्रांतिक कायदेमंडळाची जरूर तेवढी वाढ करणें आवश्यक आहे. ही वाढ करावयाची ती तपासाअंतीं जेवढी जरूर वाटेल तेवढीच करावी. व ही करतांना निरनिराळ्या मतदार संघांचे गुणविशेष व त्यांतील मतदारांची संख्या या सर्व बाबी ध्यानांत घ्यावा. (ब) कायदेमंडळाची मुदत–प्रांतिक कायदेमंडळाची मुदत साधारणतः पांच वर्षांहून जास्त असूं नये. (क) कायदेमंडळांतील सरकारी सभासदांचा गट–नवीन होणाऱ्या प्रांतिक कायदेमंडळांत सरकारी सभासद बिलकूल नेमूं नयेत, सर्व सभासदांचा प्रवेश निवडणुकीच्या द्वारां व्हावा. आतां कांहीं प्रांतांतील वर्गांना व जातींना आपापले प्रतिनिधि कायदेमंडळांत निवडून आणणें अशक्य होईल. परंतु अशा वर्गांचे प्रतिनिधि कायदेमंडळांत तर असावयास हवेत. फक्त याच कारणास्तव गव्हर्नरला कांहीं ठराविक प्रमाणांत बिनसरकारी सभासद कायदेमंडळांत नेमतां येतील. (ड) कायदे मंडळांतील वरिष्ठ सभा––प्रचलित प्रांतिक कायदेमंडळांत एकच सभा आहे. कांहीं प्रांतांतील परिस्थिति लक्षांत घेतां, तेथील कायदेमंडळांत दोन सभा असणें श्रेयस्कर दिसतें.परंतु कोठल्याहि प्रांताच्या नवीन घटनेंत वरिष्ठ किंवा दुसरी सभा सुरू करण्याचे पूर्वी त्या प्रांतांतील एकंदर जनमत काय आहे,तें पहावें व आपल्या प्रांतिक कायदेमंडळांत वरिष्ठ किंवा दुसरी सभा असावी असें निश्चित मत दिसल्याविना तशी सभा कायदेमंडळांत सुरू करूं नये. अ तां बंगाल, संयुक्तप्रांत व बिहार आणि ओरिसा या प्रांतांतील कायदेमंडळांत दुसरी सभा स्थापण्याचें या नवीन घटनेंतच नमूद करावें. कारण तसें करण्यास तेथील लोकांचें मत अनुकूल आहे. बंगाल, संयुक्तप्रांत व बिहार आणि ओरिसा या प्रांतांचीं नांवें वरील कलमांत नमूद करावींत. असें पोटकमिटींतील सभासदांचें बहुमत झालें म्हणून वरील उल्लेख केला आहे. (सर चिमणलाल सेटलवाड, सर कावसजी जहांगीर, मेसर्स रामचंद्रराव, वोहरा, चिंतामणी, जोशी, पील व आंबेडकर या मंडळींचा गव्हर्नरचे अधिकार या सदराखालील पोट–कमिटीनें पास केलेल्या सर्व कलमांना विरोध आहे.) नोट–(१) प्यारिग्राफ ४ वर वादविवाद चलू असतां लॉर्ड झेटलंड यांनीं पोलिस खात्याच्या कारभारासंबंधीं प्रश्न उपस्थित केला होता. परंतु हा प्रश्न 'सर्व्हिसेस' या विषयावर जी पोट–कमिटी नेमली जाणार आहे तिजकडे सोंपवावा असें ठरलें. (२) वायव्य सरहद्द (N. W. F.) प्रांताची राज्यघटना आंखण्याकरितां एक स्वतंत्र पोट–कमिटी नेमण्यांत येणार आहे, असें कळल्यावरून त्या प्रांताबावतचा प्रश्न या पोट–कमिटीपुढें आलेला नाहीं.

सेंट जेम्स पॅलेस लंडन, आॅर्थर हेंडरसन
१५ डिसेंबर १९३०. (चेअरमन).

———————

रा. टे. कॉ. १ ली बैठक

अल्पसंख्य समाज

सब कमिटीचा रिपोर्ट.

(१) अल्पसंख्याकांचे हक्कासंबंधीं विचार करण्याकरितां ही पोट-कमिटी नेमली आहे.अशाच इतर कमिट्यांकडे सोपविलेले प्रश्न सोडून,बाकी प्रश्नांचा येथें विचार व्हावा.पोट-कमिटीचे सभासद

रॅम्से मॅक्डोनल्ड [प्राइम मिनिस्टर] (अध्यक्ष), सर डब्ल्यू.ए. जोविट; लॉर्ड पील; मेजर स्टॅन्ले; लॉर्ड रीडिंग; मि. फूट; हि. हा. दि आगाखान; मौलाना महमदअल्ली; सर ह्यूबर्ट कार; मि. चिंतामणी; छतारीचे नवाब; मि. फाझल–अल –हक; मि. गझनवी; ले. कर्नल गिडने; के. बी. हफिझ हिदायत हुसेन; मि. जोशी; सर पी. सी. मितर; डॉ. मुंजे; राजा नरेंद्रनाथ; रावबहादुर पन्नीर सेलवम; सर ए. पी. पेट्रो; लॉर्ड पॉल; मि. रामचंद्रराव; मि. शिवराव; सर सुलतान अहमद; सर महमद शफी; सरदार संपूर्णसिंग; मि. शास्त्री; सर चिमणलाल सेटलवाड; सर फिरोझ सेटना; डॉ. शफत अहमदखान; बेगम शहा नवाझ; रावबहादूर श्रीनिवासन्; मिसेस सुब्बरायन; सरदार उज्वलसिंग; मि. झाफरुल्लाखान; सर शहा नवाझ भूतो (मौ. महमदअल्ली निवर्तल्यानंतर); कॅ. राजा शेर महमदखान आणि नवाब सर अबदूल क्वयम; (सर सुलतान अहमद आणि छतारीचे नवाब गेल्यानंतर). (२) प्रत्येक जातीच्या प्रतिनिधींकडून आपापल्या जातीच्या हक्कांचें व हितसंबंधाचें संरक्षण व्हावें, याकरतां केलेल्या सूचनांचा तरजुमा प्रथम कमिटीपुढें सादर व्हावा. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति सुयंत्र चालावी,म्हणून सर्व जातींचें साहचर्य असणें जरूर आहे. त्याकरितां नवीन राज्यघटनेंत कोठल्याहि जातीच्या हितसंबंधास धक्का पोहोंचणार नाहीं, अशी व्यवस्था करणें इष्ट आहे. बहुसंख्याक जातींचें आपापसांत जर एकमत झालें, तर या सर्व प्रश्नांचा निकाल लावणें सोपें जाईल. ही गोष्ट अजून पूर्ण साध्य झाली नाहीं, तरी पण त्याकरितां खुद्द येथें (इंग्लंडमध्यें) व हिंदुस्थानांत वाटाघाटी चालू रहातील.(३) सब--कमिटीपुढें खालील मुद्दा प्रामुख्यानें आला होता, तो असा–नवीन राज्यघटनेंत निरनिराळ्या जातीच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवन सुरक्षित रहावें, म्हणून मूलभूत हक्कांचा समावेश असावा. त्यामुळ प्रत्येकास धर्म, जात, पंथ व लिंग हा भेद न ठेवतां आर्थिक, सामाजिक व मुलकी हक्कांचा सर्रास उपयोग करण्यास मुभा असावी. मि. जोशी यांनीं निरनिराळ्या जातींचे आर्थिक हक्क या सदराचा उल्लेख वरील कलमांत झाला पाहिजे, असा आग्रह धरला. डॉ. आंबेडकर यांनीं कमिटीच्या नजरेस आणिलें कीं, मूलभूत हक्कांची बजावणी करण्यास व त्याबरोबरच त्यांचें उल्लंघन किंवा अतिक्रमण झालें असतां दाद मागण्याच्या हक्कास प्रत्यक्ष राज्यघटनेंत मंजुरी असणें जरूर आहे. कांहीं अटी पत्करल्या असतां कायदे मंडळांच्या निवडणुकी सर्वसामान्य रजिस्टरांवरून करतां येतील, असें दिसून आलें. परंतु सभासदांमध्यें या अटीबाबत एकवाक्यता होईना. (४) एकत्र सुसंघटित मतदारसंघ हे लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या तत्त्वास विशेष अनुसरून होतील, हें सर्व सभासदांना पटलें होतें. कांहीं मध्यंतरीचा काळ गेल्यानंतर असे मतदार संघ अस्पृश्य लोकहि मान्य करतील. मात्र मतदान पद्धतींत, प्रत्येक वयांत आलेल्यास मताधिकार मिळावयास पाहिजे. असें असतांहि कमिटींत एकंदर मत असें पडलें कीं, हिंदुस्थानांतील अनेक जाति व त्यांची भिन्नभिन्न आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिति लक्षांत घेतां एकत्र मतदार संघ आजच सुरू करणें इष्ट नाहीं.कारण त्यामुळें कायदेमंडळांत अल्पसंख्याकांचे प्रतिनिधि अगदीं थोडे येतील, व त्या त्या जातींच्या हितसंबंधास धक्का पोहोंचण्याचा संभव शिल्लक राहील. (५)निरनिराळ्या जातींनीं अशा सूचना पुढें मांडल्या कीं, जातवार प्रतिनिधित्व सुरू करावें व कायदे–मंडळांतील कांहीं जागा आपणांसच मिळाव्या. अल्पसंख्यांक जातीसाठीं ज्या राखीव जागा ठेवलेल्या असतील त्या, त्या जातींचें एकंदर लोकसंख्येशीं जें प्रमाण पडत असेल, त्याहून बिलकूल कमी नसाव्या. मुख्यत: तीन मार्गांनीं या सूचना अमलांत आणतां येतील. ते मार्ग असे--१ नेमणूक करणें (Nomination), २ एकत्र मतदार-संघांत राखीव जागा ठेवणें, व ३ भिन्न मतदार संघ तयार करणें.(६)नेमणूक करण्याचा मार्ग कोणाही सभासदांस पसंत पडला नाहीं. (७) एकत्र मतदार संघच सुरू करावेत व निरनिराळ्या जातींना कांहीं प्रमाणांत राखीव जागा ठेवाव्यात, अशी सूचना प्रथम पुढें आली.असें केलें असतां निवडणुकीदेखील बऱ्याचशा लोकसत्ताकाच्या तत्त्वास अनुसरून होतील व भिन्न मतदार संघ पद्धति सुरू करण्याची जरूरी शिल्लक राह-

णार नाहीं. कांहीं सभासदांनीं अशी शंका प्रदर्शित केली कीं, वरील तऱ्हेनें निवडणुकी केल्या असतां अल्पसंख्याकांचे प्रतिनिधि कायदेमंडळांत येतील खरे, परंतु तें प्रतिनिधित्व अस्सल व खरेंखुरें असेल अशी खात्री देतां येत नाहीं.किंवहुना प्रत्यक्ष निवडणुकी वगैरे कामकाज सुरूं झालें म्हणजे, व्यावहारिक दृष्टया त्याचा अर्थ नेमणूक असाही होऊं लागेल,किंवा बहुसंख्याक जातींनीं अल्पसंख्याकांचें प्रतिनिधि निवडून देणें असा होईल. कांहीं सभासदांनीं असें दर्शविलें कीं, वास्तविक वरील मार्ग म्हणजे जातवार प्रतिनिधित्वाचीच एक तऱ्हा आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत निव्वळ जातवार प्रतिनिधित्वापेक्षां वर निर्देश केलेला मार्गच अधिक सदोष ठरेल. (८) एकंदर वादविवाद झाल्यानंतर असें दिसून आलें कीं, भिन्न मतदारसंघ सुरूं करावे हेंच सर्वसाधारण मत आहे.हिंदुस्थानांत या कल्पनेविरुद्ध बरेंच चर्वितचर्वण झालें आहे. भिन्न मतदार वर्ग सुरूं करण्यास मुख्य अडचणम्हणजे मध्यवर्ति कायदेमंडळांत व प्रांतिक कायदेमंडळांत जातवार प्रतिनिधित्वाचें प्रमाण काय असावें,आणि जर कायदेमंडळांतील बहुतेक सर्व जागा जातींना वाटून गेल्या तर, स्वतंत्र राजकीय मत व पक्ष–उपपक्ष यांची वाढ कशी व्हावी, त्यांतहि अस्पृश्य समाजाच्या एका प्रतिनिधीच्या मागणीमुळें भरच पडली आहे. निवडणुकीपुरती अस्पृश्य समाज ही एक वेगळीच जात समजण्यांत यावी व तेवढ्यापुरतां तो समाज हिंदु लोकांपासून भिन्न समजावा अशी ती मागणी होय.(९) निरनिराळ्या जातींना कायदेमंडळांत अमुक एक जागा मिळतील असें नक्की ठरविण्याऐवजीं कांहीं एक प्रमाण आंखण्यांत यावें. उदा० ८० हिस्से किंवा ९० हिस्से; व बाकीच्या जागा सार्वजनिक निवडणूक करून भरण्यांत याव्यात,अशीही एक सूचना पोटकमिटीपुढें आली होती. परंतु कांहीं जातींना ही सूचना पटली नाहीं. कारण त्यामुळें त्यांना हवें तितकें खात्रीलायक स्थान मिळत नव्हतें. (१०) मौ.महमदअल्ली यांच्या सूचनेचाहि कमिटीनें विचार केला. त्यांची सूचना अशी होती कीं, कोठल्याही जातीच्या उमेदवाराला आपल्या जातींतील ४० हिस्से मतें व दुसऱ्या जातीपैकीं निदान ५ किंवा १०हिस्से मतें जसें ठरेल तसें पडल्याविना तो जातवार उमेदवार निवडून आला असें समजूं नये. भिन्न मतदार संघाविरुद्ध ज्या तक्रारी आहेत, त्या येथेंही शिल्लक राहतातच. व ही कल्पना अमलांत आणावयाची म्हणजे जातींचीं रजिष्टरें ठेवणें अपरिहार्य आहे.

(११) भिन्न–मतदार-संघ-किंवा एकत्र मतदार संघांत राखीव जागा या मागण्या स्त्रियांतर्फे करण्यांत आल्या नाहींत. निवडणुकीस उमेदवार म्हणून उभें राहण्याकरितां पुरुषांना जी लायकी लागते, तीच स्त्रियांनाही असावी. राजकीय कार्यक्षेत्रांत स्त्रियाहि भाग घेऊं शकतात, ही कल्पना जन–मनांत रूढ व्हावी म्हणून व मध्यंतरीच्या कालांत कायदेमंडळांतून स्त्रीवर्गाचे प्रतिनिधि असावेत म्हणून पहिल्या तीन कौन्सिलसमध्यें ५ हिस्से जागा स्त्रियांसाठीं राखून ठेवाव्यात. त्या जागा सर्व निवडून आलेल्या सभासदांनीं एकत्रित होऊन प्रमाण शीरमत दानपद्धतीनुसार मतें देऊन भराव्यात.

(१२) प्रांतिक कार्यकारी मंडळांत मुख्य मुख्य अल्पसंख्याक जातींचे प्रतिनिधि असावेत, त्यामुळें नवीन राज्यघटना सुरळीत चालू राहील. ही प्रॉव्हिन्शियल कांस्टिटयूशन म्हणजे पोट कमिटी नं. २ ची शिफारस सर्व सभासदांस पसंत पडली. व असेंही ठरलें कीं,याचकरितां फेडरल किंवा मध्यवर्ति कार्यकारी मंडळांत मुसलमानांचे प्रतिनिधि असावेत. लहानसहान अल्पसंख्याक जातींनींही अशीच मागणी केली, ती अशी–प्रांतिक (फेडरल) मध्यवर्ति कार्यकारी मंडळांत आम्हांला जागा मिळाव्या. त्या जागा प्रत्येक जातीस किंवा सर्व जातींना मिळून दिल्या तरी चालतील. हेंही जर शक्य झालें नाहीं तर प्रत्येक कार्यकारी मंडळांत अल्पसंख्याक जातींचे हितसंबंध रक्षण करण्याकरितां म्हणून एक दिवाण नेमावा. डॉ. आंबेडकर व सरदार उज्वलसिंग यांच्या मतें मुसलमानांप्रमाणें इतर मुख्य मुख्य अल्पसंख्याकांचे प्रतिनिधिही फेडरल कार्यकारी मंडळांत असावेत. वरील सूचना अमलांत आणल्या असतां जबाबदार कार्यकारी मंडळें व्यवहार्य होणार नाहींत अशी शंका कांहीं सभासदांनीं प्रदर्शित केली. (१३) राज्यकारभार सुयंत्र चालावा म्हणून प्रांतिक व मध्यवर्ती नोकरवर्गांत नवीन भरणा करण्याचें काम पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे सोंपवावें. कमिशननें निरनिराळ्या जातींतील लोक योग्य प्रमाणांत नोकरवर्गांत घ्यावेत. व तसें करतांना कार्यक्षमतेचें प्रमाण मात्र बिघडूं देऊं नये. (१४) ब्रिटिश व्यापारी वर्गांनीं असा आग्रह धरला कीं, हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन यांमध्यें एक व्यापारी तह व्हावा. त्या तहामुळें हिंदुस्थानांत जन्मलेल्या बादशहांच्या प्रजाजनांस हिंदुस्थानांत व्यापार

धंदा करण्याचे जे हक्क व अधिकार आहेत, ते ब्रिटिश व्यापारी वर्गासही मिळत राहतील व त्या-बरहुकूम हिंदी लोकांसही युनायटेड किंग्डममध्यें तसेच हक्क मिळतील, अशी खात्री उत्पन्न व्हावी. हिंदुस्थानांतील युरोपियन लोकांस फौजदारी खट-ल्याबाबत जे हक्क हल्लीं आहेत ते तसेच चालू रहावेत. (१५) पोट कमिटीपुढें आलेल्या सूचनांतील अव्यवहार्य मुद्यावर बराच वादविवाद झाला. इतकें करूनहि सर्वांचें एकमत झालें नाहींच. परंतु या बाबतींत सर्वत्र एकमत असणें किती आव-श्यक आहे, हें स्पष्टपणें दिसून आलें. (१६) ज्या मतदार संघ पद्धतीला (Electoral Principal) निरनिराळ्या मुद्यावर जातींचा विरोध असेल असें इलेक्टोरल प्रिन्सिपल, थोडाबहुत पाठिंबा मिळाला तरी ब्रिटिश सरकार तें कोणावरहि लादणार नाहीं. सर्वांना मान्य अशी कोठलीही सूचना नाहीं. तेव्हां नवीन राज्यघटनें-तील निवडणुकीच्या योजनेंत मध्यें भिन्न मतदार संघ चालू ठेवल्याविना गत्यंतर नाहीं. आतां भिन्न–मतदार–संघ पद्धति देखील सदोष व थोडीबहुत अव्यवहार्यच आहे. भिन्न–मतदार संघ चालू केले असतां कायदेमंडळांतील जागांचें प्रमाण कसें टेवावें हा प्रश्न उपस्थित होणार. आणि अशा परिस्थितींत अस्पृश्य समाजा-च्या मागण्यांचाहि योग्य विचार झाला पाहिजे. (१७) एकंदर प्रश्नांचा विचार करतां सब कमि-टीची अशी शिफारस आहे कीं, गोलमेज परिषदे-पुढें ज्या अनेक मागण्या करण्यांत आल्या, त्यां-संबंधीं एकमत होणें अवश्य आहे. त्याकरितां त्या त्या प्रतिनिधींमध्यें आपापसांत वाटाघाट चालू रहावी व त्यांपासून जो निष्कर्ष निघेल तोही वाटा-घाट इतःपर ज्यांच्यापुढें चालूं राहील त्यांच्यापुढें मांडण्यांत यावा. असें मत या बैठकीनें नमूद करून ठेवावें.

(१८) अल्पसंख्याक जाति व अस्पृश्य समाज हे त्यांच्या मागण्यांना योग्य तऱ्हेनें मान मिळाल्या-विना हिंदुस्थानकरतां होऊं घातलेल्या कोठल्याहि स्वसत्ताक राज्यघटनेस संमति देऊं शकत नाहीं; असें (अल्पसंख्याक जाति व अस्पृश्य समाज) यांचें स्पष्ट म्हणणें आहे. गोलमेज परिषदेच्या सर्वसाधा-रण बैठकींत (१९ जाने. १९३१) १४व्या पॅरि-ग्राफच्या ऐवजीं खालील मजकूर घालावा असें ठरलें. "हिंदुस्थानांत व्यापारधंदा करणारा ब्रिटिश व्यापारी वर्ग त्यांच्या पेढ्या व मंडळ्या यांच्या व प्रत्यक्ष हिंदुस्थानांत जन्मलेल्या प्रजाजनांच्या हक्कांत कांहींही फरक असू नये. आणि हे हक्क नियमित करण्याकरितां परस्पर संबंधांचा योग्य ठराव व्हावा. अशी सूचना ब्रिटिश व्यापारी वर्गांनीं केली. सूचनेंतील तथ्यांश सर्वांना पटला होता. हिंदुस्था-नांतील युरोपियन लोकांस फौजदारी खटल्या-बाबत जे हक्क हल्लीं आहेत ते तसेच चालूं रहावेत.

१६–१–३१ जे. रॅम्सेमॅक्डोनल्ड

रा. टे कॉ. [१ ली बैठक] ब्रम्हदेश

सब-कमिटीची रिपोर्ट

रा.टे.कॉ.च्या ब्रम्हदेश सब कमिटीचे सभासदः

अर्ल रसेल (चेअरमन); अर्ल पील; मि. ऐझॅक फूट; यू आँग थिन; यू बा पे; मि. एम एम. ओहन घिने; मि. डी. ग्लॅंगव्हिल; मि. बी. शिवराव; रावबहादूर. श्रीनिवासन; कॅ. राजा शेरमहमद खान; मि. एच. पी. मोदी; मि. ए. एच. घुशनावी; सर बी. एन. मित्र; सर ह्यूबर्ट कार;

विचाराचा मुद्दा––ज्या शर्तीमुळें ब्रिटिश हिंदु-स्थानापासून ब्रम्हदेश परस्पर सलोख्यांत वेगळा होईल, अशा शर्तींचा सर्वदृष्टचा विचार करणें. आणि हें साधण्याकरितां उत्तम मार्ग सुचविणें.

१ विभक्तीकरणाचें तत्त्व मान्य झालें आहे आणि ब्रम्हदेश वेगळा निघाला तरी ब्रिटिश हिंदु-स्थानचा भाग म्हणून ब्रम्हदेशाला शासनसूत्रानुसार मिळणाऱ्या भावी जबाबदार राज्यपद्धतीवर कांहींही परिणाम होणार नाहीं. असें बादशहांच्या सरकारनें सार्वजनिकरीत्या जाहीर करावें. (मि. मोदी व मि. शिवराव यांची या सूचनेला सर्वस्वी मान्यता नाहीं. यांच्या मतें बादशहांच्या सरकारांतून वरील घोषणा व्हावी अशी शिफारस या कमिटीनें करूं नये).

२ हिंदी व इतर अल्पसंख्याकांचे न्याय्य हक्क व हितसंबंध यांचा बचाव झाला पाहिजे. या हितसंबंधास कोठल्या प्रकारचें रक्षण असावें हें या कमिटीस सांगतां येणार नाहीं. ब्रम्हदेशाची संपूर्ण घटना तयार करण्याचे वेळीं सर्व अल्पसंख्याकांना व हिंदुस्थान सरकारला प्रति-निधि पाठवून आपापलीं मतें कळविण्याची आणि कोठल्या प्रकारचीं कितपत हितरक्षकें त्यांना आवश्यक वाटतात तें सांगण्याची पूर्ण सवलत मिळावी. देशांतर केलेल्या हिंदी मजुरांच्या हितसंबं-धाकडे योग्य लक्ष पुरवावें आणि अशा या परदेश-वासीयांचें आयुष्य व काम या दोनही बाबतींत नियमबंधनें घालण्याची तरतूद करावी. ब्रह्मदेशांत

येणाऱ्या हिंदी लोकांच्या बाबतींत कोठल्याहि प्रकारचा भेदभाव नसावा असें कमिटीचें आग्रहपूर्वक सांगणें आहे.

३ हिंदुस्थान व ब्रम्हदेश या देशामध्यें आर्थिक ठराव (Financial Settlement) असावा. या मुद्यावर उपस्थित होणारे प्रश्न बिकट व विशिष्ट खात्यासंबंधीं आहेत. त्यांचा विचार हिंदुस्थान सरकारच्या खलित्यांतील ९८व्या पॅरिग्राफमध्यें सुचविलेल्या पद्धतिनुसार व्हावा. दोनही सरकारच्या तज्ज्ञांच्या मार्फत या प्रश्नाची कसून चौकशी झाल्यानंतर त्या तज्ज्ञांनीं केलेलीं टिपणें इंडियन लेजिस्लेटिव्ह अॅसेंब्लीच्या व बर्मा लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या स्टँडिंग फिनॅन्स कमिटीपुढें अनुक्रमें ठेवावींत. आणि लवाद मंडळाचें काम चालू असतां मंडळांतील तज्ज्ञांच्या मदतीस या फिनान्स कमिटीचे प्रतिनिधि द्यावे.

४ ब्रम्हदेश वेगळा केल्यानंतर त्याच्या संरक्षणार्थ अनरूप व्यवस्था केली पाहिजे. परंतु व्यवस्थेचें सर्वसाधारण स्वरूप लष्करांतील तज्ज्ञांच्या मतानुसार आखावें.

५ विभागणी नियमानुसार (Devolution Rules) मध्यवर्ति सरकारकडे असलेलीं खातीं आपल्या ताब्यांत घेण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी ब्रम्हदेश सरकारवर आहे. हिंदुस्थान सरकारच्या कांहीं विशिष्ट शास्त्रीय नोकरदारींचा ब्रम्हदेश सरकारनें फायदा घेणें चालू ठेवावें कीं नाहीं याचा विचार व्हावा. मात्र यास हिंदु० सरकारची संमति हवी व परस्परांत ठरतील त्या अटींस धरून हें सर्व चालावें.

६ हिंदुस्थान व ब्रम्हदेश यामध्यें अनुकूल असे व्यापारी करार घडवून आणणें शक्य आहे. या सब–कमिटीच्या मतें या ट्रेड कन्व्हेन्शनमुळें दोनही देशांस फायदा होईल. शिवाय या दोन देशांमध्यें असलेल्या निगडित व्यापारी संबंधांत विभक्तीकरणामुळें शक्य तितका थोडा बिघाडच व्हावा.

९–१२–३० **रसेल**

मतदान

रा. टे. कॉ. च्या मतदान (Franchise) सब कमिटीचा रिपोर्ट

सभासदः—सर डब्ल्यू. ए. जोविट (चेअरमन); लॉर्ड झेटलंड; मेजर स्टॅन्ले; सर आर. हॅमिल्टन; मि. कूट; डॉ. आंबेडकर; मि. बसू; मि. बरो (Barooah); मि. चिंतामणी; मि. फजल–उल–हक; मि. गझनवी; ले. कर्नल गिडने; सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला; मि. हफिज हिदायत हुसेन; मि. वी. व्ही. जाधव; सर कावसजी जहांगीर; मि. जोशी; डॉ. नरेंद्रनाथ लॉ; सर पी. सी. मित्र; मि. पन्नीर सेलवम; राजा ऑफ पार्लेकिमेदी; मि. रामचंद्रराव; मि. शिवराव; सरदार संपूर्ण सिंग; सर चिमणलाल सेटलवाड; सरदार उज्वलसिंग; कुनवर विश्वेश्वर दयाळशेठ; सर फिरोज सेठना; डॉ. शफत अहमदखान; मि. झाफरूल्लाखान; बेगम शहानवाज; मिसेस सुबरायन; मि. श्रीनिवासन्; मि. एस. बी. तांबे; सर हयूबर्ट कार;

मि. चिंतामणीः— मतदान हक्काचें क्षेत्र विस्तृत करावें. प्रत्येक वयांत आलेल्या स्त्रीपुरुषास मत असावें हें योग्य आहे. या बाबतींत कारभारविषयक अडचणी पुढें मांडण्यांत येतात, परंतु त्या अडथळे आहेत असें धरून चालण्यांत अर्थ नाहीं. ते अडथळे दूर केलेच पाहिजेत.

सध्यांच प्रत्येक वयांत आलेल्यास मत असावें हें तूर्त निर्णय करणारांना पटत नसल्यास मि. श्रीनिवासन् म्हणतात त्याप्रमाणें सध्यां मतदारसंघांत एकदम शें. २५ प्रमाणें (Adult Franchise,) वाढ करावी व दर दहा वर्षांनीं आणखी शेंकडा २५ नीं वाढ व्हावी अशी कायमची तरतूद करून ठेवावी अशा तऱ्हेनें योग्य कालांत प्रत्येक वयांत आलेल्यास मतदानहक्क मिळेल.

निरक्षर लोकांस मत नसावें असें हिंदुस्थान सरकारला तरी म्हणतां येणार नाहीं. कारण मि. गोखले यांनीं लोकांस साक्षर करण्याकरितां केलेल्या प्रयत्नास सरकारनें विरोध केला. हिंदुस्थानांतील लोक साक्षर झाले असतां बिघडतात या तत्त्वावर त्या विरोधाची उभारणी होती.

मि. श्रीनिवासन् यांच्या सूचनेस माझी संमति आहे. ती पतकरत नसल्यास मी, डॉ. अंबेडकर व मि. जोशी यांच्या बाजूचा (Adult Franchise) आहे.

विचाराचा मुद्दाः–

स्त्रीपुरुषांच्या मतदानहक्काची उभारणी कोणच्या तत्त्वावर करावी?

कमिटीचा रिपोर्टः–

मतदानहक्काच्या प्रश्नाचा विचार करीत असतां आपणांस असें आढळून आलें कीं, या प्रश्नाचा कायदेमंडळाची घटना, मतदारसंघाचें स्वरूप व निवडणुकीकरितां उमेदवारांस लागणारी लायकी यावरील प्रश्नांशीं निकट संबंध आहे. या प्रश्नां-

चा सब् कमिटीनें विचार केला नाहीं. कारण ते त्यांच्या कार्यक्षेत्रापलीकडील आहेत. परंतु कोठलीही मतदानपद्धति पूर्णपणें सफल ठरणें हें जितकें मताधिकारास लागणाऱ्या लायकीवर अवलंबून आहे तितकेंच वरील बाबतींतील मुद्द्यावर आहे. तेव्हां आमच्या मतें या प्रश्नाची पूर्ण तपासणी व्हावी.

मताधिकारवाढः–

वयांत आलेल्या सर्वांस मताधिकार असावा हें ध्यय, आणि सरतेशेवटीं हें साध्य व्हावें. यापुढें मताधिकार वाढवतां येईल व तसा तो वाढवणें इष्ट आहे.

हल्लींच्या परिस्थितींत अशी वाढ कितपत करतां येईल यावर मतभेद आहे. नक्की वाढ किती व्हावी हें ठरविण्यास लागणारी जरूर ती माहिती कमिटीजवळ नाहीं.एकंदर लोकसंख्येशीं शेंकडा दहा प्रमाण होईल एवढी वाढ मतदारांच्या संख्येंत व्हावी, अशी स्टॅटय़ूटरी कमिशनची सूचना आहे. सब्–कमिटींतील कांहींच्या मतें एकदम एकंदर लोकसंख्येशीं शेंकडा २५ प्रमाण पडेल एवढी वाढ करावयास हवी.

एक तज्ज्ञांचें फ्रँचाईज कमिशन नेमावें. त्यांना लोकसंख्येशीं शेंकडा १० प्रमाण पडेल एवढी वाढ मतदारसंख्येंत ताबडतोब घडवून आणण्यास सांगावी. याहून जास्त वाढ झाली तर हवीच आहे, परंतु ती योग्य व अनुकूल असावी आणि एकंदर लोकसंख्येशीं मतदारसंख्येचें शेंकडा२५ हून जास्त प्रमाण मात्र पडूं नये.

वरील योजनेकरितां तरतूद चालू असतां दुसऱ्याही एका योजनेचा कमिशननें विचार करावा ती अशीः–ज्या वयांत आलेल्यास प्रत्यक्ष मताधिकार नाहीं अशा लोकांचे विसाविसांचे किंवा आणखी एकाद्या सोइस्कर तऱ्हेचे गट बनवावेत. अशा प्रत्येक गटांतून एक प्रतिनिधि निवडला जावा. या प्रतिनिधीस प्रत्यक्ष मतवाल्यांच्या मतदारसंघांतून किंवा फक्त त्यांच्याचकरितां बनविलेल्या मतदारसंघांतून, प्रांतिक निवडणुकींत मत देण्याचा अधिकार असावा. (मि. जोशी, मि. शिवराव, डॉ.आंबेडकर, मि. श्रीनिवासन्, मि. के. टी. पौल आणि मि. जाधव या सभासदांच्या मतें वरील सूचना अगदीं अपुऱ्या आहेत; आणि वयांत आलेल्या प्रत्येकास मताधिकार ताबडतोब मिळावा हें योग्य व इष्ट आहे. सर कॉ. जहांगीर व सर पी. सी. मित्र यांचा वरील सूचनांस विरोध आहे. त्यांचे मतें मतदानहक्काची एकंदर वाढ करणेंच असल्यास ती दुसऱ्या एकाद्या पद्धतीनें करावी.)

मतदान हक्क मिळण्याकरितां लागणाऱ्या लायकीचा सार्वत्रिकपणाः–कोठल्याही ठराविक भागांत सर्व जातींना सारखेच मतदानहक्क असावेत.फ्रँचाईज् कमिशननें नवीन सूचना तयार करतांना प्रत्येक जातीला तींतील लोकसंख्येस योग्य प्रमाण बसेल इतकी मतदारसंख्या राहील तीच आदर्शभूत मतदानपद्धत होय हें ध्यानांत ठेवावें. कमिशननें नवीन मतदानपद्धत वरील तत्त्व शक्य तितकें अंमलांत येईल अशी तयार करावी. (सरदार उज्वलसिंग, सरदार संपूर्णसिंग, सर कावसजी जहांगीर आणि ले. कर्नल गिडने या सभासदांचा वरील शिफारशींतील शेवटच्या भागास विरोध आहे.)

मताधिकारास सांपत्तिक गणाची मर्यादाः––

मतदान हक्क मिळण्यास कांहींतरी ठराविक सांपत्तिक स्थितिमर्यादा असावी. येथें गिळकतीचा अर्थ विशाल असावा. यांत फक्त जमीनमालकीचा समावेश व्हावा असें नसून जमिनीचा वहिवाटदार किंवा घराचा रहिवाशी, पगारदार आणि उत्पन्नदार यांचाही समावेश व्हावा.

शिक्षणसंबंधीं मर्यादाः––फ्रँचाईज कमिशननें मतदान हक्क मिळण्यास आणखी योग्य अशी शिक्षण अट घालणें कितपत श्रेयस्कर ठरेल तें पहावें. परंतु मतदान हक्काचा सार्वत्रिकपणा या कलमाखालीं शेवटीं दिलेली सूचना मात्र ध्यानांत धरावी.

लष्करांतील नोकरीमुळें आलेली लायकीः–– हल्लीं असलेली लष्कर नोकरी–लायकी कायम ठेवावी. फ्रँचाइज् कमिशननें अशा लायकीचें क्षेत्र विशाल करून त्यांत Auxiliary and Territorial forces मधील नोकरीचा अंतर्भाव करावा कीं काय हें विचारांत घ्यावें.

स्त्रियांना मताधिकाराकरितां विशिष्ट लायकी–मर्यादाः––हल्लींच्या मतदान हक्क–पद्धतींत मताधिकार असलेल्या स्त्रियांची संख्या पुरुषांच्या मानानें अतिशयच थोडी आहे. मताधिकारवाल्या स्त्रीपुरुषांमध्यें असें महदंतर असलेली कोठलीही मतदान पद्धति सर्वमान्य होणार नाहीं किंवा त्यापासून उत्तम राज्यकारभार सुरू होणार नाहीं. या कमिटीनें केलेल्या सूचनेमुळें हें महदंतर कमी होईल असें नाहीं किंवा त्यामुळें स्त्रियांना पुरेसा

मतदान–हक्क प्राप्त होत आहे असेंही नाहीं. तेव्हां स्त्रियांकरितां विशिष्ट असें लायकीचें प्रमाण असावें. परंतु असें प्रमाण ठरविण्याचा या कमिटीनें यत्न करणें योग्य नाहीं. कारण त्यास लागणारा पाठपुरावा येथें नाहीं. फ्रँचाइज् कमिशननें या प्रश्नाकडे लक्ष पुरवावें. साध्य ती सर्व माहिती, स्टॅटचूटरी कमिशननें केलेल्या शिफारशी, आणि स्टॅटचू. कमिशननें सुचविलेली वयोमर्यादा २५ ही न ठेवतां २१ करावी अशी या सब् कमिटीची सूचना. या सर्व गोष्टी फ्रँचाइज् कमिशननें ध्यानांत घ्याव्या. (मि. जोशी, मि. शिवराव, डॉ. आंबेडकर व मि. श्रीनिवासन् या सभासदांची वरील तीनही कलमांस संमति नाहीं.)

विशिष्ट मतदारसंघास मतदान–हक्कः–विशिष्ट मतदार–संघांना मताधिकाराकरितां लागणारी लायकी ही त्या मतदार संघाच्या एकंदर स्वरूपावर अवलंबून असते. अशा मतदार संघाच्या स्वरूपाचा विचार करणें या कमिटीच्या कक्षेबाहेर आहे. असे कोठले विशिष्ट मतदार संघ विचारांत घ्यावयाचे याबद्दलही या कमिटीस कांहीं माहिती नाहीं. एखाद्या लायक अशा मंडळानें या प्रश्नांची चौकशी केली पाहिजे. या सब्–कमिटींत फक्त मताधिकाराबाबत विचार झाला. त्या वेळीं विशिष्ट मतदार संघ व सामान्य मतदार संघ या दोहोंतही मताधिकार असल्यास दोनही ठिकाणीं मत द्यावयास परवानगी देणें कितपत श्रेयस्कर आहे या मुद्यावर मतभेद झाला.

शहरवासीयांस व खेडेगांवकऱ्यांस मताधिकार–दानः—मताधिकार लायकी मर्यादेमुळें ज्या भागांतील–शहरांतील व खेड्यांतील वस्तींपैकीं मताधिकार असलेल्यांच्या परस्पर संख्येंत फार फरक असेल तो नाहींसा व्हावा म्हणून फ्रँचाइज् कमिशननें मताधिकार लायकी मर्यादा तदनुसार बसविण्याचा प्रयत्न करावा. वसतिस्थानाची आवश्यकताः—कांहीं प्रांतांच्या मताधिकार नियमानुसार मतदान हक्क वस्तीमुळें प्राप्त होतो. Residential Qualifications किंबहुना तो हक्क मिळण्यास वसतिस्थानाची जरूरी असते. ती आवश्यकता काढून टाकावी. भविष्य कालांतील मतदारसंघः— मतदान–हक्काचा (फैलाव) विस्तार आपोआप होईल अशा एखाद्या योजनेची मांडणी करणें श्रेयस्कर नाहीं. नवीन घटना अंमलांत आल्यानंतर दहा वर्षांनीं प्रत्येक प्रांतिक कायदेमंडळानें मतदान हक्क आणखी विस्तृत करावयाचा कीं नाहीं व तो किती करावा हें ठरवावें. (मि. जोशी, मि. शिवराव, डॉ. आंबेडकर व मि. श्रीनिवासन् या सभासदांच्या मतें मतदान हक्काचा विस्तार आपोआप होत जाईल अशी व्यवस्था करावी.) मध्यवर्ति किंवा फेडरल् कायदेमंडळाकरितां मताधिकारः—या कायदेमंडळाची घटना अजून निश्चित झाली नाहीं. तेव्हां अशा स्थितींत सोईस्कर किंवा योग्य अशा मतदानहक्क पद्धतीबाबत कांहीं सूचना करतां येत नाहींत. (मि. फाजल अल–हक व मि. गझनवी यांची विभक्त मतदार संघ ठेवले जाणार असतील तरच या रिपोर्टास संमति आहे.)

१–१–३१		डब्ल्यू. ए. जोविट.

संरक्षण (Defence) सब् कमिटी रिपोर्ट.

रा.टे.कॉ.च्या 'संरक्षण' पोट कमिटीचे सभासद. मि. जे. एच्. थॉमस (चेअरमन), लॉर्ड पील, सर सॅ. होअर, लॉर्ड रीडींग, लॉर्ड लोथियन, हि. हा. दी महाराजा ऑफ अलवार, हि. हा. दी नबाब ऑफ भोपाळ, हि. हा. दी महाराजा ऑफ बिकानेर, हि. हा. दी महाराजा ऑफ काश्मीर, हि. हा. दी महाराजा ऑफ पतियाळा, सर अकबर हैदरी, सर मिर्झा इस्माईल, कर्नल हक्सर, नामदार श्रीनिवास शास्त्री, सर तेज बहादूर सप्रू, दि. ब. एम्. रामचंद्रराव, दि. ब. रामस्वामी मुदलियार, सर फिरोज सेटना, मि. एम्. आर्. जयकर, डॉ. बी. एस्. मुंजे, मि. जाधव, सर बी. एन्. मित्र, सरदारसाहेब उज्ज्वलसिंग, ले. कर्नल गिडने, सर हयूबर्ट कार, सर महंमद शफी, मि. एम्. ए. जिना, डॉ. शफत अहमदखान नबाब सर अब्दुल क्वयम, राजा शेर महंमद खान. विचाराचा मुद्दाः—संरक्षण प्रकरणीं उपस्थित होणाऱ्या राजकीय प्रश्नांचा विचार करणें. मात्र कार्यकारी मंडळाचे हक्क (Powers of the Executive) बादशहांशीं संबंध (Relations with the Crown) यामध्यें येणारे शासनविषयक प्रश्न सोडून द्यावे. सब् कमिटींत लष्कराचें हिंदीकरण या मुद्द्यावरच सर्व वाटाघाट झाली. या मुद्याची सर्व बाजूंची कसून चौकशी झाली. संरक्षणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर मत प्रतिपादतांना फारच काळजी घेतली पाहिजे असें सर्वानुमतें ठरलें. देशाच्या सुरक्षिततेस बाधक किंवा लष्करांत दौर्बल्य होईल, अशा तऱ्हेचें मत कोणाही सभासदाच्या कोठल्याही विधानामुळें होऊं नये, याबद्दल सर्व कमिटी विशेष जागरूक होती. अशा तऱ्हेचें सार्वत्रिक वातावरण असल्यामुळें कमिटीच्या

सर्व पक्षोपपक्षांनीं शिक्षणक्रमांत इंग्लंडमध्यें चालू असलेलें कार्यक्षमता प्रमाणच येथेंही राखावें असें आग्रहपुरस्सर प्रतिपादिलें. संरक्षण प्रश्नाचा विचार करतांना एक गोष्ट कमिटीस वगळून चालणार नाहीं. या प्रश्नावरील सर्व बाबतींमध्यें एक घटकावयव प्रमुख आहे. तो म्हणजे कमिटी ऑफ इंपीरिअल डिफेन्स मार्फत असलेली बादशहांची जबाबदारी. हे सर्व मुद्दे तपासण्याची जबाबदारी सरतेशेवटीं याच कमिटीवर येते. या कमिटीवरील जबाबदारी ही केवळ हिंदुस्थानविषयक आहे असें नाहीं. तर सर्व साम्राज्याबद्दलची आहे. फौजेच्या हिंदीकरणावरील सर्व साधारण वाटाघाट उपरिनिर्दिष्ट ठराव लक्षांत घेऊन खालील धर्तीवर झाली. कमिटींतील बहुमत असें आहे कीं, फौजेच्या हिंदीकरणाचें प्रमाण निश्चित करणें सध्यां व्यवहार्य नाहीं. कारण त्यायोगें हिंदुस्थानच्या संरक्षणाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांना घोटाळ्यांत पाडण्यासारखें होईल. व प्रत्यक्ष फौजेंतील अंमलदारांना आपलें तारतम्य चालविण्याला मोकळीक राहाणार नाहीं. वरील प्रकारच्या मतवाल्यांना वाटतें कीं, 'हिंदी लष्करांतील अधिकाऱ्यांचें हिंदीकरण' हें तत्त्व एखादा अधिकारी किंवा अधिकारीवर्ग व एखादें युनिट किंवा अशीं कांहीं युनिटें यांच्या कार्यक्षमतेपुरतेंच नसून सर्व लष्करावर याचा बरावाईट परिणाम होईल. कमिटींतील बऱ्याच जणांच्या मतें हा प्रश्न विशिष्ट खात्यासंबंधीं असल्यामुळें कमिटीस त्यावर मत देतां येत नाहीं. कमेटींतील कांहीं सभासद विशिष्ट कालमर्यादेंत हिंदी लष्करांतील अधिकाऱ्यांचें संपूर्ण हिंदीकरण व्हावें असें स्पष्ट नमूद करावें या मताचे होते. अर्थात फौज सध्यांइतकीं कार्यक्षम रहावी व योग्य माणसांची भरती करतां आली तरच हें हिंदीकरण व्हावें असेंही त्यांचें मत होतें. या दोन विभागांत मूलभूत मतांतर असल्यामुळें व हीं दोन मतें मूलतःच परस्परभिन्न असल्यामुळें रिपोर्टमध्यें नमूद करावीं असें कमिटीनें ठरविलें. या कमिटीच्या ठरावानुसार पुढें तज्ज्ञांच्या कमिटचा नेमिल्या गेल्यावर त्या कमिटचांनीं आजपर्यंत या विषयावर नेमल्या गेलेल्या कमिटचांचें कामकाज ध्यानांत घ्यावें; विशेषतः १९२१ची मिलिटरी रिक्वायरमेंट्स कमिटी व १९२२ ची इंडियनायझेशन ऑफ दि इंडियन आर्मी अशा या दोन कमिटचांचें कामकाज अवश्य नजरेखालीं घालावें असें चेअरमन साहेबांनीं नमूद केलें आहे. वरील मजकूर ध्यानांत घेऊन पोटकमिटीनें खालील ठराव नक्की केले.

(१) हिंदुस्थानांत नवीन राज्यघटना प्रस्थापित होत आहे तेव्हां तदनुरोधानें हिंदुस्थानचें संरक्षण ही बाब फक्त ब्रिटिश सरकारची म्हणून राहूं नये. तर ती वाढत्या प्रमाणांत हिंदी लोकांकडे सोपवावी. (२) हें तत्त्व अमलांत आणण्याकरितां केलेल्या सूचना (अ) हिंदी लष्करांतील हिंदीकरण करण्याचें काम तावडतोब झपाट्यानें सुरूं करावें. (ब) कलम (अ) अंमलांत येण्याकरितां शक्य तितक्या लवकर हिंदुस्थानांत एक ट्रेनिंग कॉलेज उघडावें. येथें हिंदी संरक्षण नोकरींतील सर्व तऱ्हेच्या लष्करी खात्यांत कमिशनें मिळविण्याकरितां उमेदवारांना शिक्षण द्यावें. (तयार करावें.) या कॉलेजमध्यें हिंदी संस्थानांमधील लष्करांतील होतकरू अधिकाऱ्यांसही शिक्षण मिळेल. सँढर्स्ट, वुलविच व क्रॅनवेल येथें प्रवेश मिळण्यास हल्लीं लायक म्हणून समजल्या जाणाऱ्या हिंदी लष्करी उमेदवारांस या कॉलेजमध्यें घ्यावें. (क) विलंब टाळण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास एक तज्ज्ञांची कमिटी नेमण्यास सांगावें. कमिटींतील सभासद ब्रिटिश व हिंदी (यांत हिंदी संस्थानांचे प्रतिनिधि घ्यावेत) असावेत. अशा तऱ्हेच्या लष्करी कॉलेजस्थापनेचा सविस्तर तपशील या कमिटीनें तयार करावा.

(कलम (अ) यास मि. जिना यांनीं संमति दिली नाहीं. त्यांच्या मतें हिंदीकरणाचें प्रमाण स्पष्ट आंखलें जावयास हवें.)

वरील सूचना कमिटीस मान्य आहेत. हें नुसतें मतप्रतिपादन नसून, हीं कॉन्फरन्स आटोपल्यावरोबर या सूचना अंमलांत आणण्यासाठीं योग्य तऱ्हेनें कामास सुरुवात व्हावी. हिंदी संस्थानांचे प्रतिनिधि असलेलें असें एक मिलिटरी कौंसिल स्थापणें फायदेशीर आहे असें ठरलें. विशिष्ट हिंदी संस्थानांशीं झालेल्या करारानुसार उत्पन्न होणारीं लष्करी बंधनें पुरीं करण्याचा जो बादशहांना हक्क आहे, त्यासंबंधीं कोठल्याही तऱ्हेनें प्रतिकूल ग्रह होईल, अशी कृति किंवा हालचाल (Action) करूं नये, अशा तऱ्हेचा ठराव कमिटीनें करून तो बाकीच्या ठरावांस जोडावा, असें मत पुढें आलें होतें. अशा तऱ्हेच्या स्पष्ट घोषणेची बिलकूल जरूरी नाहीं, असें नियमन झालें व हें कमिटीसही पसंत पडलें. चेअरमननीं नियमन दिलें कीं, हीं किंवा दुसरी कोठलीही कमिटी चालूं किंवा ह्यात असलेले तह, करार, बंधनें व ठराव कोणत्याहि तऱ्हेनें

रद्द करूं शकत नाहीं. १४–१–३१ जे.एच्. थॉमस

चर्चेंतील कांहीं महत्त्वाचीं भाषणें

चेअरमनः—— हिंदीकरण म्हणजे अधिकाराच्या जागा हिंदी लोकांस देणें व ब्रिटिश तुकड्यांच्या जागीं हिंदी तुकड्या तयार करणें. परंतु हे दोन प्रश्न एकमेकांपासून वेगळे ठेवले पाहिजेत. या कमिटीला फारफार तर हिंदुस्थानांतील फौजेचें हिंदीकरण व तत्संबंधीं इतर निगडित प्रश्न हिंदुस्थानांत सँढर्स्ट स्थापणें आणि लंडनमधील सँढर्स्टमध्यें प्रवेश मिळावा याबर चर्चा करतां येईल. लष्कराबाबत विशिष्ट प्रश्नाचा विचार त्यांतील तज्ज्ञांकडेच सोपवावा. 'ब्रिटिश तुकड्यांच्या जागीं हिंदी तुकड्या तयार करणें' हा प्रश्न जरा बारीक आहे. तेव्हां हा मुद्दा जरी या कमिटीच्या कार्यक्षेत्रांत येत असला तरी विशिष्ट बारीक प्रश्नावर ही कमिटी निर्णायक मतें देऊं शकत नाहीं. व या कमिटीनें बारीक प्रश्नांत शिरूं नये. असल्या गोष्टी तज्ज्ञांकडे सोपवाव्या. 'संरक्षण' मुद्यावर विचार करीत असतां या कमिटीस निर्णायक असें कांहीं निश्चित ठरवितां येणार नाहीं. कारण या प्रश्नाचा निकाल लावणारे संरक्षण करण्यास जबाबदार धरले जातात ते व त्यांचे सल्लागार हेच होत.

डॉ. मुंजेः——हिंदुस्थानला 'डोमिनियन स्टेटस' केव्हां मिळणें व हिंदुस्थानच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी त्याजवरच असणें याचा परस्परांशीं इतकासा निगडीत संबंध नाहीं. देशाचें संरक्षण इतक्यांतच पूर्णपणें करतां येत नाहीं, ही चूक हिंदवासियांची नाहीं. परंतु संरक्षण करण्यास अंगीं लागणारें शिक्षण आम्हांला दिलें गेलें नाहीं, म्हणून हिंदुस्थान 'डोमिनिअन स्टेटस' मिळण्यास लायक नाहीं असें मात्र नव्हे. साम्राज्यांतील इतर वसाहतींस त्यांच्या अंगीं संरक्षण करण्याची ताकद नसतां स्वायत्तता मिळाली आहे. त्या वसाहतींचें संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी ब्रिटिश साम्राज्यानें पतकरली आहे. कमिटीनें खालील मसुदा मान्य करावाः——

"फौज, आरमार व विमान या खात्यांतील 'कमिशन्ड' रँक्सवर इतःपर हिंदी लोक नेमावेत. ज्या रिकाम्या जागा हिंदुस्थानांत भरतां येणार नाहींत त्या इंग्लंडमधून भरण्याची सरकारास सवलत असावी."

सर फिरोज सेटना——हिंदी लोक लष्करांत चांगले अधिकारी म्हणून ठरत नसले तर तो दोष त्यांचा नसून त्यांना इतके दिवस अधिकाराच्या जागा न दिल्यामुळें आणि लष्कराच्या शास्त्रीय शाखांतून त्यांना वगळल्यामुळें आलेला आहे. महायुद्धांत चमकलेल्या हिंदी शिपायांस अधिकाराच्या जागेवर नमण्यांत आलें. आणि ते सँढर्स्टसारख्या शाळांतून बाहेर पडलेले नसले तरी त्यांच्या अंगीं किती कार्यक्षमता आहे हें स्पष्ट दिसतें. तेव्हां योग्य शिक्षण मिळाल्यावर हिंदी लोकदेखील ब्रिटिशांच्या इतकेच निपुण अंमलदार होतील. हिंदुस्थानांत अमुक एक लढवय्या जातिच (उदा०–शीख) फक्त आहेत असें नसून देशांतील निरनिराळ्या प्रांतांतून लढवय्या जाति आहेत. व यांस त्या त्या प्रांतांतील सेवानिवृत्त अंमलदारांचे दाखलेहि आहेत. इंडियन सँढर्स्टच नव्हे तर जरूर वाटल्यास इंडियन वुलविच व इंडियन क्रॅनवेल उघडण्यासहि सरकार तयार आहे हें समाधानकारक आहे. अशी संस्था उघडणें आवश्यक आहे. ब्रिटिश फौज काढून त्या जागीं हिंदी तुकड्या नेमतां यतील. तशी सुरवात करणें इष्ट आहे. कारण खर्चाच्या दृष्टीनें तें किफायतशीर होईल. एका ब्रिटिश सोजिराचा खर्च हिंदी शिपायाच्या चौपट असतो. ही योजना अमलांत आली तर पडणारी नवीन शिल्लक 'इंडियन सँढर्स्टचा खर्च भागविण्याकडे जाईल. लष्करी खर्चांत कॅपिटेशन चार्जेस म्हणून वीस लाख पौंड रक्कम आहे. गेलीं वीस वर्षें याबद्दल हिंदुस्थान सरकार तक्रार करीत आहे. हिंदुस्थानला 'डोमिनियन स्टेटस' असतें तर वरील रक्कम खर्चीं पडली नसती. परंतु आज हिंदुस्थानचा महसूल स्टेट सेक्रेटरीच्या ताब्यांत असल्यामुळें हा खर्च चालू आहे. सप्रू, शफी यांनीं पुढें आणलेल्या रिपोर्टावरून लष्करांतील सर्व अधिकाराच्या जागांवर ३० वर्षांत हिंदी लोक येतील असें दिसतें व त्यांस माझी संमति आहे. यापुढें सरकारनें कमिशन्ड ऑफिसरच्या जागा हिंदी लोकांस द्याव्यात व हें लवकर अमलांत आणावें.

सर तेजबहादूर सप्रूः——ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांत सँढर्स्ट स्थापण्याच्या विरुद्ध नाहीं एवढ्यावर मी संतुष्ट नसून त्या सरकारनें लष्करी कॉलेज उघडण्याच्या ताबडतोब तयारीस लागावें अशी माझी अपेक्षा आहे. हिंदी उमेदवारांना लष्कराच्या सर्व खात्यांतील शिक्षण मिळावें उदा Artillery, Engineering, Air force etc. हिंदी लोकांना इंग्लंडमधील सँढर्स्टमध्येंही प्रवेश

मिळत रहावा. लष्करांत पूर्ण हिंदीकरण होण्यास नक्की किती अवधि लागेल हें ठरवतां येत नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं, हिंदीकरण प्रमाणयोग्य असावें आणि सुधारणेचें पाऊल देशाच्या सुरक्षिततेस व फौजेच्या कार्यक्षमतेस धक्का न पोहचतां जलदी पुढें पडत जावें. लष्करांतील ब्रिटिश अंश ताबडतोब काढून टाकावा असें माझें म्हणणें नाहीं. परंतु हिंदीकरणाचें प्रमाण वाढतें ठेवून यापुढे रिकाम्या जागा हिंदी लोकांतूनच भरल्या जाव्यात व हें सर्व जलदी अंमलांत आणावें.

मि. जिना—हिंदी फौजेंतील अधिकाराच्या जागांवर हिंदी मनुष्य नेमणें म्हणजेच हिंदीकरण आणि ब्रिटिश तुकड्यांच्या बद्दल हिंदी तयार करणें. कारण असें न केलें तर आपल्याला हिंदी पलटणी वाढवतां येणार नाहींत. दरवर्षी पलटणींतील अधिकाराच्या जागा ज्या रिकाम्या होतील त्या ठिकाणीं हिंदी मनुष्य नेमणें हीच आपली हिंदीकरणाची अखेर मर्यादा आहे. शक्य तितक्या लवकर हिंदुस्थाननें संरक्षणाची जबाबदारी आपल्या अंगावर घ्यावी.हें ध्येय साध्य होईतोंपर्यंत मध्यंतरीच्या काळांत जबाबदार अधिकारी म्हणून कोण असावे या प्रश्नाचा निकाल फेडरल कमिटीनें लावावा. नंतर 'बादशहांशीं संबंध' हा प्रश्न उपस्थित होतो. हा प्रश्न निराळा मानून चालणार नाहीं. कारण डोमिनियन स्टेटसचें बोलणें चालूं आहे. तेव्हां किंग्ज कमिशनहून भिन्न असें डोमिनियम कमिशन म्हणून एक असणारच. त्याचा विचार या कमिटींत झाला पाहिजे. 'ब्रिटिश तुकडचा कमी कमी करणें' हा प्रश्न विचारांत घ्यावयाचा आहे. या दर वर्षीं किती कमी कराव्यात एकंदर प्रमाण काय असावें, वगैरे प्रश्नांचा विचार तज्ज्ञांकडेच सोपविला पाहिजे. परंतु या कमिटीनें हिंदीकरण चालूं ठेवावयाचें म्हणजे मग ब्रिटिश तुकड्या हळूंहळूं कमी केल्या पाहिजेत. या तत्त्वावर नक्की काय तें मत दिलेंच पाहिजे.

हिंदीकरणाचें तत्त्व आपणा सर्वांस मान्य आहे. हिंदुस्थानांत सँढर्स्ट स्थापन करावें. असें स्कूल हिंदुस्थानांत उघडलें तरी विलायतेंतील सँढर्स्टमध्यें हल्लींप्रमाणें हिंदी उमेदवारांस प्रवेश मिळावा. अशी लष्करी शाळा उघडण्याकरितां योग्य त्या कामांस सुरवात व्हावी. हिंदीकरण प्रमाण कसें अमलांत आणावें याचा येथें निकाल लावून कांहींतरी तत्त्व किंवा रीत घालून दिली पाहिजे. नक्की किती वर्षें लागतील, हें जरी आपणांस ठरवतां येणार नाहीं तरी हिंदीकरणास कशी सुरवात करावी हें ठरवतां येईल. या कमिटीनें कांहीं तरी निश्चित तत्त्वांचा मसुदा तयार करावा. व त्यास अनुसरून तज्ज्ञांच्या कमिटीनें एकंदर प्रश्नांचा विचार करावा. नाहींतर तशी कमिटी नेमणें निरर्थक होईल. हिंदीकरणाच्या प्रमाणाबाबत कांहीं तरी ठाम मत आपण दिलेंच पाहिजे, नाहींतर सर्व व्यर्थ आहे. असें न केल्यास पुढें नेमल्या जाणाऱ्या कमिटीस माझी संमति नाहीं. दरवर्षीं रिकाम्या होणाऱ्या जागा १२० आहेत. या सर्व जागांवर इतःपर हिंदी लोक नेमावेत. म्हणजे ३५ वर्षांनंतर आपली कल्पना पूर्णत्वास येईल. परंतु आजपासूनच नवीन भरती थांबवली पाहिजे. तेव्हां असें घडून येण्यास इतःपर ब्रिटिश भरती होऊं नये असें कमिटीनें स्पष्ट मत द्यावें. हिंदुस्थानच्या संरक्षणास ब्रिटिश सरकार जबाबदार असल्यामुळें हिंदवासियांकडे ही जबाबदारी कितपत सोपवावी, यास कांहीं मर्यादा आहेच, असें आपणांस सांगितलें जातें. परंतु एकदां हिंदीकरण करावयाचें म्हटलें म्हणजे मग अधिकाराच्या जागांवार हिंदी लोक नेमावेत हें तर खरेंच,पण ब्रिटिश तुकड्या कमी कमी करीत, त्याबद्दल जरूर तर हिंदी पलटणी वाढवाव्यात, हा विचार ध्यानांत घ्यावा लागतो. कारण तसें केल्याशिवाय आपली कल्पना पूर्णत्वास कशी पोहोंचणार? सायमन कमिशननें निराळी डोमियमन आर्मी असावी अशी शिफारस केली आहे. त्यास माझा पूर्ण विरोध आहे. विलायतेंत इंपिरीयल डिफेन्स कमिटी आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत मिलिटरी कौन्सिल असणें जरूर आहे. त्या कौन्सिलमध्यें हिंदी राजे व संस्थानें यांचे प्रतिनिधि असावेत; कारण हा अखिल-भारतीय संक्षणाचा प्रश्न आहे. नंतर येथें Second line of defence चा विचार करणें इष्ट आहे. हल्लीं याकरितां Auxiliary force and territorial force आहेत. Territorial force ही येथें फक्त नांवापुरतीच आहे. इतर देशांतून अशी फौज फार मोठी आहे. हिंदुस्थानला खडें सैन्य संभाळण्याचा खर्च झेपणार नाहीं. हिंदुस्थानचा अवाढव्य लष्करी खर्च कमी करणें असल्यास आपणांस प्रत्यक्ष Second line of defence उभारली पाहिजे. तेव्हां संरक्षण प्रश्नांतील राजकीय अशा मुद्यावर उपयोगी पडेल

असें कांहीं कामकाज या कमिटीस करावयाचें असेल तर, कांहीं निश्चित अशा शिफारसवजा सूचना आपण तयार केल्याच पाहिजेत. हल्लीं २० जागा हिंदी लोकांस मिळतात. त्या ३० किंवा अमुक एक मिळाव्यात,असें कमिटीस म्हणतां येईल. तसा नक्की आंकडा या कमिटीनें ठरविणें इष्ट नसलें तरी हें हिंदीकरण भरीव प्रमाणांत वाढावें एवढें येथें स्पष्ट नमूद करावें. असें केल्याविना माझी या तरजुम्यांतील कलम (२ अ) ला संमति नाहीं.

महाराजा ऑफ बिकानेरः—हल्लीं-प्रमाणें पुढेंही संस्थानांच्या पलटणी असतीलच. आणि देशाच्या संरक्षणार्थ व बादशहांच्या नोकरी करितां त्या केव्हांही खडचाच आहेत. हिंदी संस्थानांच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटिश सरकारवर आहे. फेडरेशननंतरही हे संबंध असेच रहावेत ही जबाबदारी पार पाडणें, ब्रिटिश तुकड्यांच्या संख्येवरच अवलंबून आहे असें नाहीं किंवा निव्वळ या कारणास्तव तशा ब्रिटिश तुकड्या संभाळल्या पाहिजेत असेंही नाहीं. परंतु संरक्षणाचा खातरजमा मिळाला म्हणजे पुरे. मिलिटरी कौन्सिलमध्यें संस्थानांना योग्य त्या जागा मिळतीलच व तेथें 'फेडरल इंडिया' संबंधीं पुढें येणाऱ्या प्रश्नाची वासलात लावतांना त्यांच्या मतांस योग्य मान मिळणें इष्ट आहे. प्रत्यक्ष हिंदीकरण ताबडतोब सुरूं व्हावें. फार दिवसांपासून त्याची आवश्यकता भासत आहे.

सर्व्हिसेस सबकमिटी रिपोर्ट

राऊंड टेबल कॉन्फरन्सः—१२ नोव्हेंबर १९३०–१९ जानेवारी १९३१.

सबकमिटी नंबर ८ (सरकारी नोकऱ्यांचा प्रश्न) चा रिपोर्ट–

या सबकमिटीमध्यें खालील प्रतिनिधि होते. सर विल्यम जोविट (चेअरमन), लॉर्ड झेटलंड, मेजर स्टान्ले, लॉर्ड रीडिंग, सर रॉबर्ट हॅमिल्टन, अलवारचे महाराजा, नवानगरचे महाराजा, सर प्रभाशंकर पट्टणी, साहेबजादा सुलतान अहमदखान, चितामणि, सर पी. सी. मित्र, डॉ. नरेंद्रनाथ लॉ, बसू, तांबे, सर चिमणलाल सेटलवाड, शिवराव, मोदी, सर कावसजी जहांगीर, सर ए. पी. पात्रो, रावबहादूर कुन्वार विश्वेश्वर दयाळशेट, महाराजाधिराज कामेश्वरसिंग (दरभंगा), राजा पार्लाकिमेडि, डॉ. अंबेडकर, ले. क. गिडने, पॉल, सरदार संपूर्णसिंग, सर शहानवाज भुट्टो, गझनवी, खा. ब. हफीज हिदायत हुसेन, झफरुल्ला खान, डॉ. शफत अहमदखान फझलुल हक्, सर, एडगर वुड. ह्या सबकमिटीच्या बैठका तारीख, ६, ७, ८, ९, १२, १३ जानेवारी १९३१ रोजीं झाल्या, व तिनें खालील रिपोर्ट सादर केला.

विषयाची व्याप्तिः—'नव्या राज्यघटनेमध्यें वरिष्ठ सरकारी नोकरांचें स्थान'.

(१) नोकरीमध्यें असलेले लोकः—गव्हर्मेंट ऑफ इंडिया कायदा व त्याच्या अनुरोधानें भारतमंत्र्या (सेक्रेटरी ऑफ स्टेट) नें केलेले नियम, यांमध्यें ज्याअर्थीं सरकारी नोकरांना त्यांचे विशिष्ट हक्कांचे संरक्षणाबद्दल आश्वासन दिलें आहे, त्याअर्थीं नवीन राज्यघटना अमलांत येण्यापूर्वीं नेमलेल्या सर्व सरकारी नोकरांचे हक्कसंरक्षणाबाबत नवीन राज्यघटनेंत योग्य ती व्यवस्था व्हावी; तसेंच पेन्शन (यामध्यें फॅमिली पेन्शन येतें) व प्रॉव्हिडंट फंड याबाबतहि योग्य ती संरक्षक योजना नवीन राज्यघटनेंत असावी. (मतैक्य)

नवीन राज्यघटना अमलांत आली कीं, सरकारी नोकरीमध्यें मोठी उलथापालथ होणार, आर्थिक नुकसानी होणार व राज्यकारभारांत भानगडीचे प्रश्न उपस्थित होणार. नवीन राज्यघटना चालविण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर पडेल, ते प्राथमिक उलथापालथीनें बुचकळ्यांत पडूं नयेत, म्हणून कांहींतरी योजना करून हल्लीं नोकरीमध्यें असणाऱ्या लोकांना आश्वासन देणें आवश्यक आहे. म्हणजेच ते इमानें इतबारें आपली नोकरी मुदतीअखेर पुरी करतील. हा हेतु साध्य होण्याकरितां नोकरीच्या मुदतीच्या मानानें ठरविलेल्या पेन्शनवर सेवानिवृत्त होण्याचा हक्क नवीन राज्य घटनेंतही अंमलांत रहावा, याबद्दल मतैक्य झालें, पण तो विनमुदत अमलांत रहावा कीं ५ वर्षें पर्यंत रहावा ह्या मुद्यावर मतभेद झाला.

(२) सार्वराष्ट्रीय नोकऱ्यांच्या भरतीची पद्धत-आम्ही अशी शिफारस करितों कीं, इंडियन (मुलकीखातें) सिव्हिल व इंडियन (पोलिस खातें) पोलिस सर्व्हिस यांमध्यें (सार्वराष्ट्रीय तत्त्वावर (ऑलइंडिया बेसिस) भरती व्हावी, (नेमणुका हिंदुस्थान सरकारनें कराव्या). पण कमिटीमधील बहुमत असें आहे कीं,यापुढें आय. सी. एस्. अधिकाऱ्याला न्यायखात्यांत जागा देऊं नये. इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस (जंगलखातें) व इरिगेशन शाखा, (इंजिनियरिंग सर्व्हिसची) या प्रांतिक

नोकऱ्या व्हाव्या. ह्या खात्यांमधील नेमणुका प्रांतिक सरकारांनींच कराव्या. कमिटीपैकीं चौघांचें असें मत आहे कीं, इरिगेशन ही ऑल इंडिया सर्व्हिस असावी. याचें कारण सर कावसजी जहांगीर असें देतात कीं, इरिगेशन हें देशांतलें फार महत्त्वाचें खातें आहे. विशेषतः सिंध व पंजाबमध्यें तर इरिगेशनवरच जीवित अवलंबून आहे. म्हणून या खात्यांत कार्यप्रवीण अधिकाऱ्यांची जास्त आवश्यकता आहे. व असे अधिकारी ऑल इंडिया या रिक्रूटमेंट केल्यानेंच मिळतील.मि. शिवराव व मि. तांबे यांचे इच्छेनुसार त्यांचें असें मत नमूद करण्यांत येतें कीं, सर्व वरिष्ठ नोकऱ्या तावडतोब प्रांतिक व्हाव्या. (सर्व खात्यांतील नेमणुका प्रांतिक सरकारांनींच कराव्या.) डॉ. अंबेडकर , मि. झाफरुल्लाखान व सरदार संपूर्णसिंग यांचें असें मत आहे कीं,इंडियन सिव्हिल व पोलिस खातें यांमध्यें सार्वराष्ट्रीय तत्त्वावर भरती व्हावी. ही अट फक्त त्या सर्व्हिसमधील युरोपियन नोकरांनाच लागूं असावी. इतरांचे बाबतींत हीं दोन खातीं प्रांतिक करावीं. (या दोन खात्यांतील नेमणुका प्रांतिक सरकारनें कराव्या)

(३)ऑल इंडिया सर्व्हिसेसः—भावी सार्वराष्ट्रीय नोकऱ्यांची भरती व नियंत्रण ह्यांकरितां अधिकार मंडळाची योजना इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस, व इरिगेशन सर्व्हिस यांची भरती प्रांतिक सरकारांनींच करावी (सार्वराष्ट्रीय तत्त्वावर यापुढें होऊं नये) अशी आमची शिफारस असल्यामुळें या दोन खात्यांविषयीं आम्हांस कांहीं म्हणावेंसें वाटत नाहीं. इंडियन सिव्हिल व पोलिस सर्व्हिस यांमध्यें युरोपियन अधिकाऱ्यांची भरती अबाधित चालूं ठेवण्याच्या इष्टतेविषयीं शिफारस करावी किंवा नाहीं,या प्रश्नावर कमेटीमध्यें मतभेद दिसून आला. बहुमत असें कीं, या दोन सर्व्हिसेसमध्यें कांहीं युरोपियनांची भरती चालूं ठेवणें इष्ट आहे. भुट्टो आपल्या अनुभवावरून सांगतात कीं, युरोपियनांची उचलबांगडी करण्याची जे उत्सुकता दाखवितात,ते खरोखर ८५ टक्के शेतकरी असलेल्या हिंदी जनतेचें हित दृष्टिआड करीत आहेत.ते सिंधमधील आपला अनुभव सांगून म्हणतात कीं, १९२९ मध्यें सिंधू नदीला भयंकर पाणी आलें व गांवचे गांव बुडून जावयाची भीति वाटूं लागली, तेव्हां युरोपियन इंजिनियरांनीं जिवावर उदार होऊन बंदोबस्त ठेवून अनर्थ टाळला. तेंच १९३० सालीं हिंदी इंजिनियरांच्या हातांत सूत्रें आल्यावर १९२९ इतका पाऊस नसतांना सुद्धां केवळ अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळें,आळशीपणामुळें भयंकर नुकसान झालें. या भरतीचें प्रमाण काय असावें याबद्दलहि मतभेद आहे. कांहीं सभासदांचें मत असें कीं, ली कमिशननें आंखून दिलेल्या योजनेप्रमाणें कांहीं काळपर्यंत भरती चालूं ठेवावी.इतरांचें मत असें कीं, भावी हिंदुस्थान सरकारकडेच ही गोष्ट सोपवावी. (सेटलवाड व चिंतामणी यांनीं विशष भर दिला.) प्रमाण योजना कशीही होवो. पण बहुमत असें आहे कीं, यापुढें भरती करण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार सर्वस्वीं हिंदुस्थान सरकारकडे सोपवावे. व भरती, नोकरीची मुदत पगार व नियंत्रण याबद्दलच्या अटी इत्यादि सर्व, प्रश्नांचा निकाल करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारकडेच असावा हें ज्यांचें मत आहे अशा सभासदांनीं वरिष्ट नोकऱ्यांवरील पूर्ण ताबा मध्यवर्ति व त्या त्या प्रांतिक सरकारांकडेच असावा (भारतमंत्र्याकडे असूं नये)यांचेवर विशेष भर दिला आहे. (सेटलवाड, चिंतामणी, कावसजी जहांगीर, कमिटीमधील अल्पमतवाल्यांचे प्रतिनिधि झटलंड, फझलुल हक्क, डॉ. शफत अहमदखान यांचें असें मत आहे कीं, भरती करण्याचे अधिकार सेक्रेटरी ऑफ स्टेटकडेच असावे कारण त्यांचे मतें सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे व त्यांचेमार्फत ब्रिटिश पार्लमेंटकडे गाऱ्हाणें नण्याचा शेवटचा हक्क जर काढून घेण्यांत आला तर वरिष्ठ नोकऱ्यांमध्यें योग्य अशा ब्रिटिश अधिकाऱ्यांची भरती करणें अशक्य होईल. ह्या मताचे सभासदांना असें वाटतें कीं, हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार ह्यांना वरिष्ठ नोकऱ्यांमधील अधिकाऱ्यांवर आवश्यक असा अंमल सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या डेव्होल्युशन नियमांप्रमाणें ठेवतां येईल.हल्लीं हिंदुस्थान सरकार कांहीं मध्यवर्ति जागांवर प्रांतिक सरकारकडून मागविलेल्या अधिकाऱ्यांची नेमणूक करूं शकते व करतेही. नवीन राज्यघटनेंतहि ही सोईस्कर पद्धत प्रचारांत राहील अशी व्यवस्था हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार आपसांत घडवून आणतील अशी आशा आहे.

(४)इंडियन मेडिकल सर्व्हिसः——

परिच्छेद १ जमेस धरून ह्या कमिटीचें असें मत आहे कीं, यापुढें मेडिकल सर्व्हिसची सिव्हिल शाखा असूं नये. व हिंदुस्थान सरकारच्या अगर प्रांतिक सरकारच्या अमलाखालील एकहि सिव्हिल मेडिकल जागा यापुढें केवळ युरोपियनांकरितां

राखून ठेवण्यांत येऊं नये. सिव्हिल मेडिकल जागांची पब्लिक सर्व्हिस कमिशनांकडून भरती व्हावी. युद्धप्रसंगीं आवश्यक इतक्याच मेडिकल अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या करारांत अशी एक अट घालावी कीं, सरकारचा हुकूम होईल त्याप्रमाणें त्यांना लष्करी शिक्षणक्रम पुरा करून लष्करी नोकरींत मेडिकल अधिकारी म्हणून वेळप्रसंगीं काम करावें लागेल. या प्रीत्यर्थ येणारा जो जादा खर्च तो लष्करी खात्यावर पडेल. हिंदुस्थानांतील प्रांतिक सरकारांनीं व पब्लिक सर्व्हिस कमिशनांनीं लष्कराच्या व हिंदुस्थानांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या गरजा लक्षांत घेऊन, आपापल्या प्रांतिक सिव्हिल मेडिकल जागांवर योग्य व आवश्यक इतक्या युरोपियन डॉक्टरांची नेमणूक करावी. व हेतु साध्य होण्याकरितां जरूर तितका पगार देण्यास तयार असावें, असेंहि सुचविण्यांत येत आहे कीं, युरोपियन डॉक्टरांची निवडणूक करतांना इंडियन मेडिकल सर्व्हिसमधल्या I. M. S. मधल्या ज्या डॉक्टरांनीं कांहीं कालपर्यंत लष्करी नोकरी केली आहे, त्यांचीच नेमणूक प्रांतिक सरकारनें आधी करावी. अशा तऱ्हेची तडजोड मध्यवर्ति सरकारनें प्रांतिक सरकारशीं करावी. आम्हांस असें वाटतें कीं, प्रांतिक सरकारनें निवडलेले मेडिकल अधिकारी जोंपर्यंत प्रांतिक मेडिकल सर्व्हिसमध्यें नोकरी करीत आहेत तोंपर्यंत त्यांनीं (आय्. एम्. एस्.चे हक्क व सवलती मागूं नये) इंडियन मेडिकल सर्व्हिसशीं आपला संबंध तोडावा. ह्या अटीवर आय. एम्. एस्. अधिकाऱ्यांचा युद्धप्रसंगीं पुन्हा लष्करी नोकरींत जाण्याचा हक्क लष्करी खात्यानें राखून ठेवला पाहिजे. ह्या व्यवस्थेचा प्रत्यक्ष तपशील लष्करी खातें व प्रत्येक प्रांतिक सरकार यांच्या विचारविनिमयानेंच ठरावयाचा आहे. मेजर स्टॅन्ले आपल्या मताच्या स्पष्टीकरणार्थ असें सांगूं इच्छितात कीं, ४थ्या प्याऱ्यामध्यें उल्लेखिलेला प्रांतिक व मध्यवर्ति सरकार यांचेमधील तडजोड होण्याचा संभव असेल तरच त्यांना वरील परिच्छेद मान्य आहे. लॉर्ड झेटलंड व सर एड्गर वुड यांना धास्ती वाटत आहे कीं, वरील योजनेनुसार प्रांतिक सरकार काय, किंवा इंडियन मेडिकल सर्व्हिस काय (आय. एम्. एस.) कोणासच योग्य असे युरोपियन मेडिकल अधिकारी मिळणार नाहींत. म्हणून त्यांचें असें मत आहे कीं, लष्कर व सिव्हिल सर्व्हिस यांचे हिंदीकरणांत जास्त प्रगति होईपर्यंत प्रचलित व्यवस्थाच अमलांत रहावी.

(५) पब्लिक सर्व्हिस कमिशन——

(१) प्रत्येक प्रांतांत गव्हर्नरानें व मध्यवर्ति सरकारतर्फे गव्हर्नर जनरल यानें स्टॅटयूटरी पब्लिक सर्व्हिस कमिशनांची नेमणूक करावी. (२) पब्लिक सर्व्हिसमध्यें ह्या कमिशनांकडूनच भरती केली जाईल, व ती अशी केली जाईल कीं, नोकरीला आवश्यक असे गुण लक्षांत घेऊन निरनिराळ्या जातींना योग्य व आवश्यक प्रमाणांत नोकऱ्या मिळतील. ह्या नेमणुकांच्या कामावर प्रांतिक कमिशनांचे बाबतींत प्रांताचे गव्हर्नराची नियतकालिक देखरेख राहील. व मध्यवर्ति कमिशनवर गव्हर्नर जनरलची देखरेख राहील व अभिप्रेत हेतु साध्य होण्याकरितां कमिशनांना मार्गदर्शक असे हुकम सोडण्याचा गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांना अधिकार देण्यांत येईल. (राजा नरेंद्रनाथ व सरदार संपूर्णसिंग यांना अशी पुस्ती जोडावयाची आहे कीं, जातपातविषयक असमानतेमुळें अल्पसंख्याक जातींचे बाबतींत होणारा अन्याय दूर करण्याकरितां ज्या नेमणुका करावयाच्या त्यांचें प्रमाण एकंदर केलेल्या नेमणुकांच्या एकतृतियांशपेक्षां जास्त असूं नये. दोनतृतियांश नेमणुका केवळ गुणावगुणांचा विचार करूनच कराव्या.) कमिशननें नेमलेल्या एकाद्या अधिकाऱ्यानें निंदाव्यंजक हुकुमाविरुद्ध किंवा पगारवाढ—बढती थांबविण्याच्या, दुय्यम जागेवर बदली करण्याच्या, बडतर्फ करण्याच्या, किंवा नौकरीवरून काढून टाकण्याच्या हुकुमाविरुद्ध जर गव्हर्नराकडे अपील केलें तर अपील ऐकण्यापूर्वीं गव्हर्नरानें त्याबाबत हुकूम सोडण्यापूर्वीं प्रांतिक कमिशनची सल्ला घेतली पाहिजे. (३) पब्लिक सर्व्हिस कमिशनांचे सभासदांच्या नोकरीची मुदत सार्वभौम सरकारचे मर्जीवर अवलंबून राहील. प्रांतिक कमिशनचे सभासदांना काढून टाकण्याचा अधिकार गव्हर्नरकडे राहील. मध्यवर्ति व कमिशनचे सभासदांना काढण्याचा अधिकार गव्हर्नरजनरलकडे राहील. कमिशनचे सभासदांचें सभासदत्व नष्ट झालें म्हणजे गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल ठरवील त्या मुदतींत हिंदुस्थान सार्वभौम सरकारची कोणतीहि नोकरी करण्यास ते अपात्र ठरतील. फक्त एका प्रांतिक कमिशनचे सभासदांची मध्यवर्ति कमिशनचे किंवा दुसऱ्या प्रांतांतील कमिशनचे सभासद म्हणून नेमणूक होण्यास हरकत नाहीं. तसेंच मध्यवर्ति कमिशनचे सभासदांची प्रांतिक कमिशनचे सभासद म्हणून नेमणूक

होण्यास हरकत नाहीं. (४) सरकारी वरिष्ट नोकऱ्यांचे बाबतींत अँग्लो इंडियन समाजाची विशिष्ट परिस्थिति ओळखून कमिटी अशी शिफारस करीत आहे कीं, वरिष्ठ जागांवर नेमणूक करतांना त्यांच्या हक्कांचा विशेष सवलतीनें विचार व्हावा. (५) कायद्याच्या रुपानें असें जाहीर करावें कीं, (अ) कोणाहि नागरिकाचा पब्लिक सर्व्हिसेसच्या कुठच्याहि शाखेमध्यें प्रवेश होण्याला जमात, जातगोत, धर्म यांची आडकाठी येणार नाहीं. (ब) तसेंच कोठच्याहि पब्लिक सर्व्हिसेसमध्यें जातीच्या किंवा धर्माच्या मुद्यावर कोणाहि नोकरींत बढती मिळणार नाहीं. ही शिफारस करतांना कमिटीच्या डोळ्यापुढें डिप्रेस्ड क्लासिस—दलित वर्गाचें उदाहरण आहे. कमिटीची अशी इच्छा आहे कीं, पब्लिक सर्व्हिसमध्यें दलित वर्गाची नेमणूक करण्याचे बाबतींत उदारपणाचें धोरण स्वीकारावें; व कमिटी विशेषत: अशी शिफारस करीत आहे कीं, सर्व नोकऱ्यांचें (पोलिस सर्व्हिससुद्धां) द्वार दलित वर्गाला मोकळें ठेवावें.

(६) पोलिस सर्व्हिसची अंतर्व्यवस्था:—

प्रांतिक घटना सब—कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, नवीन राज्यघटनमध्यें कायदा व बंदोबस्त यांची जबाबदारी प्रांतिक सरकारांवर टाकावी. ही शिफारस ध्यानांत धरूनच पोलीस खात्याच्या अंतर्व्यवस्थेबाबत शिफारस करण्याचें आमचे कमिटीवर सोंपविलें होतें. या बाबत आलेल्या सर्व सूचनांचा आम्हीं विचार केला आहे. कमिटीपैकीं कांहीं सभासदांचें असें मत आहे कीं, भावी प्रांतिक सरकारच्या अधिकारांचें आक्रमण करणारी शिफारस करणें अनिष्ट आहे. (शिफारस केली तर भावी प्रांतिक सरकारचे आधींच हात बांधून टाकल्यासारखें होईल.) इतर सभासदांना असें वाटतें कीं, कायद्यानें इन्स्पेक्टर जनरलला दिलेला पोलिस खात्यावरील ताबा तसाच चालू रहावा. व ते अशी शिफारस करतात कीं, गव्हर्नर जनरलच्या संमतीशिवाय कायदेमंडळाला १८६१ चा पोलीस कायदा रद्द (रिपील) करतां येऊं नये, किंवा बदलतां येऊं नये. तसेंच मुंबई, बंगाल व मद्रास सरकारचे पोलीस कायदेही गव्हर्नर जनरलच्या संमतीशिवाय प्रांतिक कायदेमंडळांना रद्द करतां किंवा बदलतां येऊं नयेत.

(७) सेंट्रल सर्व्हिसेस:—आम्हीं अशी शिफारस करितों कीं, कायदेमंडळाला जबाबदार असणाऱ्या मिनिस्टरच्या ताब्यांत असलेल्या नोकऱ्यांची भरती करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारकडे असावा. गव्हर्नर जनरलच्या ताब्यांतील नोकऱ्यांविषयीं शिफारस करण्याचें आम्हांस कारण दिसत नाहीं.

सेंट जेम्स राजवाडा लंडन. सब् कमिटीतर्फे
१३ जानेवारी १९३१. डब्ल्यू ए. जोविट.
चेअरमन

सिंधचें विभक्तीकरण

सब—कमिटीचा रिपोर्ट

राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या सिंध—सब—कमिटीचे सभासद

दि अर्ल रसेल (चेअरमन), दि मार्क्विस ऑफ झेटलंड,* दि मार्क्विस ऑफ रीडिंग, एच्.एच्. दि आगाखान, एम्. ए. जिना, सर शहा नवाज भुतो, सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला, सर अब्दुल क्वेयम, सर महमद शफी, डॉ. शफत अहमदखान, सरदार संपूर्णसिंग, डॉ. बी. एस्. मुंजे, एम्. आर. जयकर, राजा नरेंद्रनाथ, सी. वाय. चिंतामणी, बी. व्ही. जाधव, सर फिरोज सेठना, एच्. पी. मोदी, सर हुबर्ट कार.

* मि. ऐझॅक फूट यांनीं लॉर्ड रीडिंग साहेबांच्या जागीं काम केलें.

सिंधची सुमारें तीनचतुर्थांश लोकसंख्या मुसलमान आहे. हल्लीं हा प्रांत मुंबई इलाख्यांत मोडतो. मुंबई सरकार या प्रांताचा कारभार कमिशनरमार्फत चालवितें. इतर कमिशनर्सपेक्षां या प्रांतावरील कमिशनरला जरा जास्त स्वतंत्रता मिळते. मुंबई हायकोर्टाच्या अधिकारकक्षेंत सिंधचा समावेश होत नाहीं ही विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आर्थिक बाबतींत मात्र सिंध बिलकूल वेगळा नाहीं. मुंबई सरकारकडून नुकत्याच पार पडलेल्या सक्कर बॅरेजवरून ही गोष्ट ताबडतोब लक्षांत येते. सायमन कमिशन सिंधचें ताबडतोब विभक्तीकरण घडवून आणण्याच्या विरुद्ध होतें. परंतु लेजिस्लेटिव्ह कमिटीसारखे कांहीं तरी करावें असें त्यांनीं सुचविलें आहे. या बाबतींत आणखी चौकशी केल्याविना व स्पेशल कमिटी नेमून विशेषत: कारभार व आर्थिक आणि महसूल प्रश्न सोडविल्याशिवाय निर्णयात्मक मत देतां येत नाहीं असें सायमन कमिशननें नमूद केलें आहे. मुंबई सरकार सिंधच्या विभक्तीकरणाच्या पूर्णपणें विरुद्ध आहे त्यांचे मतें ही गोष्ट आर्थिक दृष्ट्या फार उधळपट्टीची

होईल. प्रॉव्हिन्शिअल कमिटीच्या मतें देखील आर्थिक प्रश्न विचारांत घेतां सिंध वेगळा करणें अयोग्य आहे. इंडियन सेंट्रल कमिटीची विभक्तिकरणास मान्यता आहे. सय्यद मिरान महमद शहा यांचें कमिटीपासून वेगळें असलेलें मत नमूद झालें आहे.त्यांत आर्थिक दृष्टचा यां प्रश्नाचा विचार केला आहे. डॉ. अंबेडकर याचें मतहि नमूद केलें आहे. ते कांहीं निराळ्याच कारणाकरितां सिंधच्या विभक्तिकरणाच्या विरुद्ध आहेत.

डॉ. मुंजे—(३, १८, १९, २०, २३, २६, २८, ३१, ४९, ५१, ६६, ६७, ७१,) सिंधप्रमाणें आणखी बरेच प्रांत कर्नाटक इ. विभक्त होण्याची मनिषा दाखवीत असतां याच प्रांताचा प्रश्न तेवढा रा.टे.कॉ.नें निराळा कां विचा रांत घेतला आहे हें समजत नाहीं.'सिंधचें विभक्तिकरण' म्हणजे अल्पसंख्यांक प्रश्नांचा एक विभ ग समजला जातो असें दिसतें. हा प्रश्न मायनॉरिटीज–सब–कमिटींत उपस्थित झाला होता. व त्याच कमिटीनें या बाबतींत बिझिनेस कमिटीकडे सूचना धाडल्या. परंतु या प्रश्नाचा या सब कमिटींत आर्थिक व राज्यकारभार या बाबतींत विचार करावयाचा असल्यास त्यास कमिटींत असलेल्या हिंदूमध्यें सिंध प्रांताच्या सर्व गोष्टीशीं परिचित असा एकादा हिंदु सभासद पाहिजे होता. ज्याप्रमाणें मुसलमान समाजांतील सिंधप्रांतीय कमिटींत आहेत. त्याचप्रमाणें हिंदूंही अवश्य हवे होते. म्हणजे परस्परांचे मतभेद व मतैक्य नजरेस आलें असतें. मीं (डॉ मुंजे) स्वतः हिंदुस्थानची जातवार (एका जातीचें बहुमत असणें) प्रांत विभागणी करण्याच्या विरुद्ध आहें. हिंदुस्थान हें एक राष्ट्र बनवावयाचें असल्यास या जातवार प्रांतविभागणी करण्याच्या पद्धतीस प्रोत्साहन देतां कामा नये. राज्यकारभाराची सोय पाहण्याच्या दृष्टीनें जर हिंदुस्थानची प्रांतवार पुर्नविभागणी करणें असेल व या तत्त्वांस अनुसरुन सिंधचा प्रश्न येत असेल तर त्यास माझी हरकत नाहीं. परंतु या कामावर हिंदुस्थान सरकारनें सुचविल्याप्रमाणें 'बाऊंडरीज् कमिशन' नेमावें. फक्त सिंधचाच प्रश्न विचारांत घेणें असेल तर त्याला जातीवार विभागणीचा वास येऊं लागतो आणि आतांपर्यंत जातीचा प्रश्न(Communal Question)म्हणूनच तो आपणा सर्वांपुढें ठेवण्यांत आला आहे. बाऊंडरीज् कमिशन नेमलें असतां हा प्रश्न ओरिसा किंवा कर्नाटक इत्यादि प्रांतांच्या धर्तीवरच विचारांत घेतला जाईल. या आणि अशा तऱ्हेच्या प्रश्नांचा विचार करण्याकरितां बाऊंडरीज् कमिशन नेमण्यांत यावें असा निर्णय देऊन ह्या प्रश्नाचा निकाल लावावा. अशी माझी एकमेव सूचना आहे.

नेहरू कमिटीच्या रिपोर्टांत या प्रश्नाचा आर्थिक दृष्टचा पूर्ण विचार केला असून सिंध आपल्या पाया वर उभा राहूं शकणार नाहीं असा निकाल दिला आहे. सिंधच्या विभक्तिकरणाची आर्थिकदृष्टचा चौकशी करण्यासाठीं कमिटी नेमावी व कमिटीच्या मतें त्या दृष्टीनें विभागणीच्या शक्याक्यतेचा रिपोर्ट द्यावा. या चेअरमनसाहेबांच्या सूचनेला डॉ. मुंजे यांनीं सुचविलेली पुस्ती 'तदनंतर सिंध प्रांतीयांची विभक्तिकरणाला कितपत पसंति आहे तें ताडून पहावें.ही सूचना आर्थिक कमिटीच्या कक्षेंत येत नाहीं. हें खरें परंतु तेथील रहिवाशांची जर विभक्तिकरणाकडे प्रवृत्ति नसेल?ती गोष्ट त्यांच्यावर काय म्हणून लादावी? चेअरमनसाहेबांना वाटतें त्याप्रमाणें या बाबतींत मतैक्य नाहीं. कारण आम्हाला परस्परविरोधी टेलिग्रॅम्स येत आहेत. सिंधची लोकसंख्या लक्षांत घेतां वसूलापैकीं बराचसा भाग हिंदूच भरतात. आणि जादा कर बसविले असतां मुसलमानांपेक्षां हिंदूंवर भार जास्त पडतो. असें आढळून आलें तर विभागणीची खरोखर इच्छा आहे कीं नाहीं हें जरूर अजमावलें पाहिजे. मुद्दा हा कीं, विभागणीकरितां जादा कराचा बोजाही सहन करण्यास सिंधवासीय तयार आहेत कीं काय? हिंदुस्थानांत निरनिराळे मतदार संघ आहेतच. त्यामुळें मुसलमान व तदेतर अशी विभागणी झालीच आहे. मी (डॉ. मुंजे) हिंदुस्थानची, मुसलमान हिंदुस्थान व तदेतर जनांचा हिंदुस्थान अशी विभागणी करणाऱ्या तत्त्वाला पाठिंबा देऊं इच्छित नाहीं. तत्वाच्या मुद्यावर मी सिंधच्या विभक्तिकरणास विरोध करतों. राज्यकारभाराच्या सुलभतेकरितां प्रांतांची पुर्नविभागणी करणें असल्यास माझा दुजोरा आहे. त्या पुनर्घटनेंत सिंध पंजाबला जोडावा असेंहि आढळून येईल. सिंधचें विभक्तिकरण घडवून आणल्यावर आर्थिक तूट पडं लागली तर ती हिंदुस्थान सरकारनें भागवावी. या सूचनेस माझा विरोध आहे. मि. चितामणींनीं सुचविल्याप्रमाणें सिंधचें विभक्तिकरण तद्प्रांतीयांच्या फायद्याचें होईल कीं नाहीं या बाबतींत चौकशी करावी. आणि सिंधवासियांना विभक्तीकरणाची खरीखुरी इच्छा आहे कीं काय हें

पाहावें. प्रथम तेथील लोकांची मनीषा अजमावल्याशिवाय त्यांच्यावर तूट भरून काढण्यासाठीं जादा कराचा बोजा लादणें योग्य होणार नाही. या प्रश्नास पोषक म्हणून वंश, जात, भाषा, इ. कारणें विनाकारण पुढें आणलीं आहेत. या दृष्टीनें विचार करितां मुंबई इलाख्याचे तीन चार तुकडे पाडावे लागतील. कारण मराठी, गुजराथी, कानडी व कारवारी असे बरेच विभाग पडतील. वास्तविक आपण जातिदृष्ट्या (Racially) एकच आहोंत परंतु वादविवादासाठीं जरी नाहीं असें मानलें तरी एकंदरींत अशी इलाख्याची प्रांतीय विभागणी योग्य ठरणार नाहीं. बाऊंडरीज् कमिशन नेमून हा प्रश्न त्या कमिशनकडे सोंपवावा. सब–कमिटीपुढें ज्या तऱ्हेनें हा प्रश्न आला त्याच्याशी मी विरुद्ध आहें. आणि ज्या तत्त्वानुसार हिंदुस्थानची मुसलमान हिंदु० व तदइतर हिंदु० अशी फाळणी होईल त्यास माझा पूर्ण विरोध आहे. निरनिराळे मतदार संघ पद्धत जशी वाईट तसेंच जातवार प्रांतविभागणी करणें हें तत्त्व वाईट. अमुक एक जात एखाद्या प्रांतांत बहुसंख्यांक आहे या तत्त्वानुसार प्रांतघटना केल्यावर हिंदुस्थान एकत्रित देश कसा राहणार? देशभक्तीचें बीज नाहींसें होणार. जातवारीचें खूळ सर्वत्र पसरणार. तेव्हां अशा तऱ्हेनें सब कमिटीपुढें आलेल्या या प्रश्नास माझा मुळांतच विरोध आहे. हिंदुस्थानांतील प्रांतांचें पुनर्घटन या विशाल प्रश्नाचा विचार करण्यास मी स्वखुषीनें तयार आहें.

सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला:—

सिंधचें विभक्तिकरण या प्रश्नाचा विचार जातिदृष्ट्या करणें मला पसंत नाहीं. मुंबई इलाख्यांतील इतर प्रांतांपेक्षां हा प्रांत, भूगोल, भाषा, जात, चालीरीति या सर्व दृष्ट्या पूर्ण भिन्न आहे. मुंबई सरकारनें हा प्रांत काबीज केल्यामुळेंच हा प्रांत त्या इलाख्यास जोडला गेला आहे. याशिवाय दुसरें विशिष्ट कारण कांहीं नाहीं. हा प्रांत वेगळा करावा असें एकमेव मत आहे. त्याला पूर्वपीठिका भरपूर असल्यामुळें ही नवीन कल्पना समजण्याचें कारण नाहीं. मुसलमान व हिंदु दोनही समाजांत हेंच मत वावरत आहे. विभक्तीकरणानंतर सिंध कांहीं वायव्य सरहद्द प्रांताइतका छोटा होणार नाहीं. सिंधचें आकारमान वेल्सविरहित ग्रेटब्रिटन एवढें आहे. राज्यकारभाराच्या दृष्टीनें पाहतां सिंध वेगळा करणेंच सोईचें होईल. कारण हल्लीं मुंबई सरकारास चीफ कमिशनर नेमून इतक्या दूरवरचा कारभार चालवावा लागतो. मुंबईहून ही गोष्ट व्यवस्थित करणें शक्य होत नाहीं, तेव्हां सिंध हा स्वतंत्र घटकच बनवावा वसूल व न्याय हीं खातीं अगदींच स्वतंत्र आहेत. मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याकडून सिंधला कांहींच फायदा होत नाहीं. सिंधकरितां स्वतंत्र एंजिनिअर्स आहेत. तेव्हां तूर्त तरी अडथळे कांहींच नाहींत.

विचाराचा मुद्दा:—मुंबई इलाख्यापासून सिंध वेगळा काढून तो स्वतंत्र प्रांत बनविणें. भौगोलिक दृष्ट्या मुंबईपासून सिंध एकीकडे आहे. जात, वंश व भाषा या बाबतींत इलाख्यांतील इतर रहिवाशी व सिंधवासीय यांत बराच फरक आहे. मुंबई व सिंध यांतील दळणवळणाचे मार्गही सोईस्कर नाहींत आणि विभक्तीकरणाचा फार जोरानें पुरस्कार केला जातो. वरील गोष्टी विचारांत घेत-मुंबई इलाख्यापासून सिंध वेगळा करून तेथें स्वतंत्र प्रांत कारभार चालू करावा असेंच म्हणण्याकडे कल होता. मुंबई सरकारनें विभक्तीकरणमार्गांत कांहीं राज्यकारभार-अडथळे दृष्टोत्पत्तीस आणले आहेत. कमिटीच्या मतें ते अनुल्लंघनीय नाहींत. या प्रश्नाची आर्थिक दृष्ट्या पूर्ण तपासणी झालेली नाहीं. उपलब्ध आखबंदावरून आर्थिक बाबतींत कमिटी कांहीं मत दर्शवूं शकत नाहीं. विभक्तीकरणाच्या तत्वांस कमिटीची संमति आहे. (डॉ. मुंजे व राजा नरेंद्रनाथ यांचा या तत्त्वांस विरोध आहे.) विभक्त सिंधचा अदमासें वसूल व खर्च, सक्कर बॅरेजच्या कर्जाकरितां जामीन, याची चौकशी करण्याकरितां हिंदुस्थानांत एक कुशल कमिटी नेमावी अशी या कमिटीची शिफारस आहे. विभक्त होणाऱ्या या नवीन प्रांताच्या जमाखर्चांत जर तूट पडेल असें चौकशीअंतीं दिसून आलें तर सिंधच्या प्रतिनिधींना असा नवीन प्रांत बनविण्यापूर्वी ही तूट कशी भरून काढतां येईल तें पटण्याजोगें दाखवून देण्यास, सांगावें.

राजा नरेंद्रनाथ (पान ८९):—अल्पसंख्यांकांचा प्रश्न सोडविला गेला नाहीं म्हणून माझा येथें विरोध आहे.

---

१९ जानेवारी १९३१ रोजीं सरकारचें धोरण जाहीर झालें त्यासंबंधीं मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं गो. मे. परिषदेंत वाचलेला जाहीरनामा (१) हिंदुस्थानचा राजकीय उत्कर्ष होत जावा हा एकच हेतू आमच्या पुढें आहे. एरवीं मोर्ले–मिंटो व मांटफर्ड सुधारणा यांच्या वेळीं आम्हीं पुढील अभिवचनें देऊन ठेवलीं नसतीं. तसेंच स्वातंत्र्याच्या

आकांक्षा उद्दीपित करणारें शिक्षणही तुम्हांस दिलें नसतें. (२) संस्थानिकांचा मीं फार ऋणी आहें. मध्यवर्ती जबाबदार मंडळ केवळ एकट्या ब्रिटिश हिंदुस्थानला झेपेल कां अशी आम्हांस शंका वाटे. पण संस्थानिकांनीं त्या बाबतींत साहचाचें अभिवचन देऊन ती शंका दूर केली. व संयुक्त घटनेस ते तयार झाले यासाठीं हिंदुस्थान व ब्रिटन त्यांचे सारखेच ऋणी आहेत. (३) पूर्ण जबाबदारी म्हटली तरी कांहीं बंधनें Safe-guards घातलींच पाहिजेत. हीं बंधनें तीन प्रकारचीं असतील. (१) गव्हर्नर किंवा बादशहा यांच्या हातीं कांहीं सत्ता अगदीं अबाधित (Reserved) ठेवणें हें पहिलें बंधन होय. असलें बंधन अगदीं आवश्यक असतें. तुम्ही कशीही घटना करा असलें बंधन त्यांत येणारच.

दुसऱ्या प्रकारच्या बंधनाचे दोन भाग आहेत. बादशहा किंवा स्टेट सेक्रेटरी यांनीं केलेले करार. आम्हांला सध्यांप्रमाणें पुढील घटनेच्या अमदानींतही पाळलेच पाहिजेत. सनदी नोकऱ्या व फायनॅन्स या सदरांत येतील. आम्हांला तुमच्या कारभारांत हात घालावयाची इच्छा नाहीं. पण हिंदी लोकांच्या ताब्यांत कारभार जातांच व त्यांना आपल्या वित्ताबद्दल धोका वाटेल म्हणून तें खातें राखीवच राहिलें पाहिजे. दुसरा भाग म्हणजे कांहीं खात्यांत हिंदुस्थानाचा बाह्य राष्ट्रांशीं संबंध येतो. त्याची जबाबदारी आम्हांलाच घेतली पाहिजे. तिसरें बंधन म्हणजे भिन्न जातीसंबंधींचें. या बाबतींत तुमचें प्रकरण तुम्हींच मिटवावें अशी आमची इच्छा आहे. तुमच्यांत भेदभाव निर्माण करून आपला फायदा करून घ्यावा अशी सरकारची मुळींच इच्छा नाहीं. हिंदुस्थानची एकी व्हावी हीच आमची उत्कट इच्छा आहे. पण तुमचा तंटा तुम्हांस तोडतां आला नाहीं तर भिन्न जातीच्या हितसंबंधाचें रक्षण करण्यासाठीं घटनेंत कांहीं कलमें घालून ठेवणें सरकारला भाग पडेल. पुढील जाहीरनाम्यांत हेंच धोरण ठेविलें आहे. आतां मी सरकारतर्फे पुढील जाहीरनामा वाचतों.

"प्रांतिक व मध्यवर्ति मंडळही, जनतेस जबाबदार करावें असेंच सरकारचें धोरण आहे. मात्र सरकारनें आधींच केलेले करार पाळण्यासाठीं व अल्पसंख्याकाच्या संरक्षणासाठीं कांहीं बंधनें (Safe-guards) घालावीं लागतील. संक्रमण कालापुरतीं जीं बंधनें घालण्यांत येतील व त्या अन्वयें जे कांहीं अधिकार राखून ठेवले जातील. त्यांचा उपयोग हिंदुस्थानच्या उत्कर्षास विघातक होईल अशा रीतीनें केव्हांच केला जाणार नाहीं अशी आम्ही ग्वाही देतों. संस्थानिक ज्या बाबी संयुक्त हिंदी सरकारच्या हातीं सोपवूं इच्छीत नसतील त्यांच्या संबंधांत त्यांचे बादशहाशीं असलेले करार कायमच राहातील. कार्यकारी मंडळ कायदेमंडळाच्या ताब्यांत जाईल. पण सध्यांतरी सैन्य व परराष्ट्रीय धोरण सर्वस्वी ग. ज. च्या हातीं राहील. शिवाय शांतता, सुव्यवस्था यासाठीं कांहीं अधिकार त्यास देण्यांत येतीलच. खजिन्याच्या बाबतींत वर सांगितलेंच आहे. आमचे करारमदार, सनदी नोकऱ्या वगैरे भागविण्यासाठीं तिजोरीचा कांहीं भाग वगळावा लागेल. म्हणजे कांहीं काल खजिन्यावरच सत्ता द्विदल पद्धतीची होईल. प्रांतांना पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य मिळेल. कायदेमंडळांतून प्रधान निवडले जातील व त्यांची जबाबदारी संयुक्त राहील. संयुक्त मध्यवर्ती सरकारची प्रांतावरची सत्ता पुष्कळच मर्यादित राहील. गव्हर्नरला काहीं विशेष अधिकार अर्थातच दिले जातील. या सूचनांवर हिंदी लोकमत घेण्यासाठीं सध्याची बैठक कांहीं काळ थांबविण्यांत येत आहे. आपल्या या प्रयत्नानें हिंदुस्थानला पूर्ण वसाहतीचें स्वराज्य प्राप्त होईल अशी मला आशा आहे."

दुसरी गोलमेज परिषद

गोलमेज परिषदेचें दुसरें अधिवेशन तारीख ७ सप्टेंबर ते तारीख १ डिसेंबर १९३१ पर्यंत भरलें होतें. ह्या अधिवेशनाला एकतीस नवीन सभासदांची नेमणूक करण्यांत आली होती.

ह्या अधिवेशनाच्या आरंभीं संपूर्ण परिषद भरविण्यांत आली नाहीं. तारीख ७ सप्टेंबर रोजीं फेडरल स्ट्रक्चर कमिटीची बैठक पुढें चालू करण्यांत आली. तारीख २८ सप्टेंबर रोजीं सदरहू प्रमाणेंच "मायनारिटीज कमिटीची"ही बैठक पुढें चालूं करण्यांत आली. व मागाहून तारीख २८ नोव्हेंबर रोजीं "प्लेनरी सेशन"ला सुरवात झाली. बाकीच्या कमिटचांच्या बैठकी पुन्हां झाल्या नाहींत. फेडरल स्ट्रक्चर कमिटीच्या व मायनॉरिटीज कमिटीच्या सभासदांच्या संख्येंत मात्र थोडी वाढ करण्यांत आली होती.

पहिल्या अधिवेशनांत झालेली चर्चा पढें चालूं करण्यासाठीं लॉर्ड चॅन्सेलर साहेबांनीं खालील मुद्दे 'फेडरल स्ट्रक्चर' कमिटीपुढें मांडले:—

(१) संयुक्त कायदेमंडळाची घटना व संख्या, व प्रत्येक कायदेमंडळामध्यें (चेंबर) संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान यांच्या सभासदांचें प्रमाण;

(२) निवडणुकीच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धति;

(३) दोन्हीं मन्त्रिमंडळाचे परस्पर संबंध;

(४) संयुक्त घटना व तिचे घटक यांमध्यें उत्पन्नाच्या बाबींची विभागणी;

(५) प्रधान मंडळ व त्याचे कायदेमंडळाशीं संबंध;

(६) संयुक्त व प्रान्तिक कायदेमंडळें यांमध्यें अधिकाराची विभागणी; संयुक्त घटनेच्या कायदेकानूंचा संस्थानी मुलखांत परिणाम;

(७) संयुक्त सरकार, संस्थानें, व प्रांतिक सरकारें यांचे शासनाधिकारविषयक परस्पर संबंध;

(८) संयुक्त, न्यायकचेरी; पहिले चार व आठवा या मुद्यावर कमिटीनें अभिप्राय तयार केला तो कमिटीचा तिसरा अभिप्राय होय; पांचवा सहा व सात ह्या मुद्यांत मायनॉरिटीज् कमिटीला कांहीं प्रश्न वादग्रस्त वाटले. परंतु त्या कमिटीला कांहीं तोड सुचवितां न आल्यानें ह्या मुद्यांवर फक्त थोडीशी चर्चा झाली व कमिटीनें अभिप्राय असा कांहींच दिला नाहीं.

यानंतर कमिटीनें संरक्षण (घटनात्मक दृष्टचा) परराष्ट्रीय संबंध, आर्थिक संरक्षण (सेफगार्डस्) व व्यापारी धोरण या प्रश्नांवर चर्चा करून आपला चवथा अभिप्राय तयार केला. या प्रश्नांवर चर्चा चालूं असतां कमिटीचे पुष्कळसे सभासद हजर नव्हते.

मायनॉरिटीज् कमिटीमध्यें कोणत्याच प्रश्नाचा शेवट न लागल्यानें तिनें आपल्या दुसऱ्या अभिप्रायांत तसें नमूद केलें आहे.

ता. २८ नोव्हेंबर पासून १ डिसेंबर १९३१ पर्यंत प्लेनरी सेशनची बैठक चालू होती. या बैठकींत फेडरल स्ट्रक्चर कमिटीचे दोन रिपोर्ट व मायनारिटी कमिटीचा रिपोर्ट यांवर व परिषदेच्या एकंदर कार्यावर चर्चा झाली.

दुसऱ्या अधिवेशनाकरितां नवीन नेमलेले सभासद :—

ब्रिटिश प्रतिनिधि :—

मेजर डब्ल्यू. ई. इलियट, एम्. सी., एम्. पी.,
मिस्टर एच्. ग्रॅहॅम् व्हाईट्, एम् पी.
दि राईट ऑनरेबल व्हायकाऊंट हेलशॅम,
मिस्टर एफ्. डब्ल्यू. पेथिक लॉरेन्स, एम्. पी.
लॉर्ड स्नेल

हिंदी संस्थानांचे प्रतिनिधि :—

हिज् हायनेस कच्छचे महाराव, जी.सी.एस्.आय्. जी. सी. आय्. ई.
हिज् हायनेस इंदूरचे महाराज
कर्नल हिज हायनेस कपूरथळचाचे महाराज. जी.सी.एस्.आय्., जी. सी.आय्.जी.बी.ई.
कोरियाचे राजेसाहेब
सारिलाचे राजेसाहेब
दि. ब. टी. राघवय्या, सी. एस्. आय्.
नवाब लियाकत हैयत खान

ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधि :—

सर सय्यद अल्ली इमाम, कें. सी. एस्. आय्.
मौलाना शौकत अल्ली
मिस्टर इ. सी. बेन्थॉल
मिस्टर जी. डी. बिर्ला
बोबिलीचे राजेसाहेब
सर माणिकजी दादाभाई, के. सी. आय्. ई.
मौलवी महंमद शफी दाऊदी
डॉ. एस्. के. दत्त
महात्मा गांधी
सर पदमजी जिनवाला
मिस्टर व्ही. व्ही. गिरी
सर महंमद इकबाल
मिस्टर ए. रंगास्वामी अय्यर
मिस्टर जमाल महंमद
पंडित मदन मोहन मालवीय
नवाब साहेबजादा सर सय्यद महंमद मेहेरशहा,
सौ. सरोजिनी नायडू
सय्यद महंमद पादशहा साहेब बहादूर
सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास

पहिल्या परिषदेचे प्रतिनिधि असून दुसऱ्या अधिवेशनाला हजर नसलेले सभासद:—

ब्रिटिश प्रतिनिधि :—

दि. रा. ऑन. आर्थर हेंडरसन, एम्. पी.
दि. रा. ऑन. जे. एच्. थॉमस, एम्. पी.

हिंदी संस्थानांचे प्रतिनिधि :—

कर्नल हिज हायनेस अलवारचे महाराजेसाहेब जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई.
कर्नल हिज् हायनेस जम्मू व काश्मिरचे महाराजे साहेब, जी.सी.आय्.ई., के.सी.व्ही.ओ.

ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधि :—

मिस्टर सी. वाय्. चिंतामणी
मिस्टर एच्. पी. मोदी
पारलकी मेढीचे राजेसाहेब
रायबहादुर कुंवर विश्वेश्वर दयाळशेट

या अधिवेशनाला प्रो. के. टी. शहा वगैरे बरेच सन्माननीय सद्गृहस्थही हजर होते.

मुख्य अधिवेशनामधील भाषणांचे उतारे:—

लॉर्ड सँकी:—सर तेजबहादूर सप्रू यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें मी माझें कर्तव्य समजतों. आमचा म्होरक्या या नात्यानें त्यांनीं आपल्या अनुभवाचा आणि कार्यपटुत्वाचा आम्हांस फायदा करून दिला.ते थोडेसे हेकेखोर, खरमरीत व आपलेंच घेऊन बसणारे असले तरी त्यांनीं वेळोवेळीं आम्हांस उत्तम सल्ला दिला आहे. एकादे काम कोणत्या पद्धतीनें केलें असतां उत्तम वठेल, हातीं असलेल्या माहितीचा योग्य उपयोग कुठें व केव्हां करावयाचा वगैरे गोष्टी ते आम्हांस नेहमीं समजावून देत.

सर ए. पी. पॅट्रो:—अनुभवावरून माझें असें मत बनलें आहे कीं, जबाबदार राज्यपद्धति हळूंहळूं मिळावयाची आहे. ती मिळण्यासाठीं द्विदलराज्यपद्धति हें एक उत्तम साधन आहे. द्विदल राज्यपद्धतींत ज्यांनीं काम केलें नाहीं त्यांना या पद्धतीचें नांव काढतांच धसका बसणें साहजिक आहे. परंतु फेडरल राज्यपद्धतींत अशासारखी एकादी पद्धति असावी; संक्रमणावस्थेंत राखीव खातीं व संरक्षक योजना सरकारच्याच हातीं असाव्या, हें मत परिषदेंतील प्रत्येक सभासदास मान्य झालेलें आहे, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

सर अबदुल क्वायम— तांबडया डगलेवाल्यांची चळवळ जोरांत सुरूं झाली व त्या मागोमाग दडपशाहीही सुरूं झाली. त्यामुळें प्रांताचें कोणत्याच बाबबींत पुढें पाऊल पडेना. प्रांतांतील लोकांना सुधारणांचें महत्त्व पटवून देऊन त्या त्यांजकडून अमलांत येतील अशी खटपट करणाऱ्या पक्षाच्या कार्यास अडथळा उत्पन्न झाला व त्याची वाढ खुंटल्यासारखी झाली. प्रांतांत जर बंड होऊं द्यावयाचें नसेल व १९२० च्या हिजरत चळवळीची पुनरावृत्ति टाळावयाची असेल, तर ताबडतोब जालीम उपाय अंमलांत आणले पाहिजेत इतकी येथील परिस्थिति भयंकर आहे. सरहद्दीवरील सुशिक्षित पठाणांची संख्या अल.कडे पुष्कळच वाढली आहे. पश्चिम पंजाबांतील सुशिक्षित पठाणापेक्षां येथील सुशिक्षित पठाणांचें शेंकडा प्रमाण जास्त आहे. 'काँग्रेसचे एकमेवाद्वितीय' प्रतिनिधि महात्माजी यांनीं या प्रांतांतील लोकांना स्वतःच्या पाठबळाचें बरेचवेळां अभिवचन दिलें आहे. व हिंदुस्थानांतील इतर लोकांच्या बरोबरीचें हक्क मिळवून देण्याची खटपट करण्याचेंही त्यांनीं कबूल केलें आहे.

सर कावसजी जहांगीर:—मी स्वतः पुरतें असें सांगूं शकेन कीं, जिवंत जीव असेपर्यंत मी स्वातंत्र्याविरुद्धच खटपट करीन.इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या संबंधांत खंड पडलेला मला आवडणार नाहीं. हा संबंध असाच कायमचा रहावा अशी माझी इच्छा आहे. परचक्रनिवारण व परराष्ट्रीय व्यवहार ही सोडून बाकीचीं सर्व खातीं सोपीव बनवावींत असें माझें मत आहे. हिंदुस्थान व इंग्लंड या दोन देशांच्या इतक्या वर्षांच्या संबंधांत ग्रेट ब्रिटननें थोडीफार आर्थिक जबाबदारी अंगावर घेतली असेल हें मला कबूल आहे. शासनपद्धतीनुसार हिंदुस्थानवर नियंत्रण व वचक राहील इतका अधिकार ब्रिटनच्या हातीं असावा. मात्र हिंदुस्थान म्हणजे ब्रिटनच्या मगरमिठींत गहाण पडलेली चीजवस्तु, इतकी स्थिति शासन पद्धतीच्या कायदेशीरपणानें हिंदुस्थानला येऊं नये असेंच मी म्हणेन. सध्यां आमची इच्छा अशी आहे, व पुढें ती अशीच असेल कीं आमच्या देशाचा वसूल व चलन यांच्या व्यवस्थेची जोखीम आम्हींच संभाळावी. सरकारनें आजपर्यंत जे कांहीं बोजे करून ठेवले असतील त्याच्या परतफेडीसाठीं ज्या ज्या कांहीं संरक्षक योजना करावयास हव्या त्या त्यांनीं खुशाल कराव्या. पण कोणत्या करावयाच्या हें एकदां ठरल्यावर मग मात्र तेथेंच थांबलें पाहिजे. मंत्रीवर, आपला उत्साह, राज्यकारभारांतील आपली प्रचंड शक्ति, आपलें आर्थिक बळ यांच्या जोरावर जसें आजपर्यंत तसेंच पुढेंही आपलें हिंदुस्थानांतील आसन स्थिर रहावयास कांहींच हरकत नाहीं. त्याला वटहुकुमांची जरूर आहे असें मुळींच नाहीं. हिंदुस्थान व इंग्लंड यांचें नातें कायम रहावें असे इच्छिणारे माझ्यासारखे कितीतरी लोक तुम्हांला आढळतील. त्यांपैकीं कित्येकांनीं आपल्या हयातीचीं बरींच वर्षें इंग्लंडमध्यें खर्चिलीं आहेत. व इंग्लंड हें आपलें दुसरें घरच आहे असें त्यांना नेहमीं वाटतें हिंदुस्थान व इंग्लंड यांचे संबंध कायम ठेवण्याच्या लढ्यांत त्यांना भाग घेतां येऊं नये. अशा पेंचांत त्यांना तुम्ही पाडूं नका. तुम्ही कांहींही करा; पण सर तेजबहादूर सप्रू म्हणतात त्याप्रमाणें, अशा

लोकांची 'चित्रांतून कायमची हकालपटी करूं नका' एवढेंच माझें म्हणणें आहे.

डॉ. नरेंद्रनाथ लॉ.—बंगालमधील अराजकांचा प्रश्न हा ज्याप्रमाणें पोलिसांनीं सोडवावयाचा आहे, त्याचप्रमाणें मुत्सद्देगिरीच्या मदतीनेंही सोडविला पाहिजे. उच्च शिक्षणानें सुसंस्कृत बनलेले व मोठ्या घराण्यांत जन्मलेले हजारों तरुण,अन्नानें दिवस काढतां येत नाहींत म्हणून,जळफळत आहेत. लोकांनीं जबाबदार अशी राज्यपद्धति स्वीकारल्या खेरीज, हाताशीं मुबलक पैसा आल्याखेरीज व आर्थिक पुनर्घटनेची एकादी जोरदार योजना हातीं घेतल्याखेरीज या अराजक स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या मुळाशीं कधींहीं घाव पडणार नाहीं. आमच्या बंगाल (प्रांतांत) संयुक्त मतदारसंघास अनुकूल असलेल्या राष्ट्रीय वृत्तीच्या मुसलमानांची संख्या मोठी आहे. त्यांचा एकही प्रतिनिधि या परिषदेंत नाहीं. जबाबदार राज्यपद्धतीचीं तत्त्वें मान्य करूनही मी असें म्हणतों कीं, बंगालच्या कायदेमंडळांत नेहमीं एकाच जातीच्या सभासदांचें बहुमत असणें आणि हे सभासद लोकसंख्येच्या एका विवक्षित घटकासच, फक्त समानधर्माच्या आधारावर, जबाबदार असणें हें मला योग्य दिसत नाहीं.

दरभंग्याचे महाराजः— हिंदी कायदेमंडळाचा अलीकडील कल पाहिला तर, हिंदुधर्मीयांच्या रूढीविषयक व धार्मिक भावना ज्यायोगें दुखावतील अशा सामाजिक सुधारणांचा खल करण्याकडेच तो जास्त झुकलेला आहे असें म्हणावें लागेल. धार्मिक गोष्टी व सामाजिक सुधारणा या कायदेमंडळाच्या कक्षेबाहेर असल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या सुधारणा कायदेमंडळांनीं हातीं घ्यावयाच्या नसतात. त्या त्या जातींच्या पुढाऱ्यांनाच हीं कामें सुलभपणें करतां येतात. किंवा जातींत न कळत इष्ट फरक घडवून आणणाऱ्या काळावरच या बाबतींत विसंबून राहिलें पाहिजे. धार्मिक आणि सामाजिक बाबतींत कायदेमंडळानें लुडबुड सुरूं केली तर त्यास तसें करण्याचा अधिकारच नाहीं असेंच लोक म्हणतात. ज्यांना रूढी व परंपरा पूज्य वाटतात त्यांच्या भावना साफ चिरडल्या जातात; म्हणून असल्या गोष्टींत तोंड न घालण्याचें धोरणच सक्तपणें अंमलांत आणलें पाहिजे; हिंदु लोकांना एवढी हक्काची सवलत मिळालीच पाहिजे.

मि. फझल–उल्–हक्.:—मी आणि डॉ. मुंजे, आमच्या सारखी अत्यंत परस्परविरोधी अशी जोडी मानवजातींत सर ऑस्टेन चेंबरलेन यांना कुठें सांपडली असेल कीं नाहीं, मला शंकाच आहे. आमचे धर्म वेगळे, आमचे देव वेगळे (एक सभासद–नाहीं, देव एकच. मि. फझल्–उल्–हक् छेः छेः देव एकच कसा असेल!) माझा देव विभक्त मतदारसंघास अनुकूल आहे. त्यांचा देव संयुक्त मतदारसंघास अनुकूल आहे. मि. बसू यांनीं असें विधान केलें आहे कीं, सरकारनें या (लखनौ) पॅक्टला पाठिंबा दिला. खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, सरकारनें असें कांहींहीं केलें नाहीं. हिंदुस्थान सरकारनें या पॅक्टमुळें बंगालच्या बाबतींत जो अन्याय झाला आहे, त्याचा जोरानें निषेधच केला. व सर विल्यम व्हिंसेंट यांनीं निराळी पुस्ती जोडून, बंगल्यांतील मुसलमानांचें जें प्रमाण पॅक्टमध्यें सुचविण्यांत आलें आहे त्याची चांगली हजेरी घेतली.

सर पदमजी जिनवालाः—हिंदुस्थानची मूलतः सुधारणा झाल्याखेरीज त्याची सर्वांगीण उन्नति (यांत राजकीय प्रगति आलीच) होणार नाहीं. आणि यासाठीं सर्वांत मोठी जरूरी कशाची आहे! या प्रश्नाचें उत्तर एकच–पैसा. तुम्हांला जर दुसऱ्याचा पैसा हवा असेल तर त्याला जी कांहीं हमी पाहिजे आहे त्या बाबतींत तुम्ही त्याचें समाधान करणें जरूर आहे. आपल्या सावकाराची आपण अशी खात्री पटवून दिली पाहिजे कीं, 'तुझा पैसा माझ्या हातीं असला तरी तो सुरक्षित जागीं आहे. असें आश्वासन देणें हें आपलें कर्तव्य आहे. सध्यां तो आपला सावकार आहे, म्हणूनच त्याच्या हक्काबद्दल आदर दाखवावयाचा असें नव्हे, तर पूर्वीप्रमाणें पुढेंही पूर्वीच्याच सवलती त्यांजकडून आपणास मिळाव्या म्हणून तसें केलें पाहिजे. हिंदुस्थानांतील सावकाराची स्थिति थोडक्यांत अशी आहे! तो आपले पैसे लोकांना कर्जाऊ देतो. त्याबद्दल हिंदुस्थान सरकारचा वसूल आपल्याला जामीन आहे हें त्याला माहीत असतें व आपले पैसे कर्जदार बुडवूं लागला तर त्या कर्जदाराविरुद्ध भांडण्यास आपल्या वतीनें एक कोणती तरी वरिष्ठ सत्ता आपल्यामागें उभी आहे अशी त्याच्या मनाची खात्री असते. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं,सध्यांची राज्यघटना बदलून त्या जागीं दुसरी राज्यघटना सुरूं झाली तरी सावकारास सरकारच्या पाठिंब्याची पूर्वी जितकी खात्री होती तितकीच ती या बदलणाऱ्या राज्यघटनेंतही कायम रहावी.

मि. गिरीः—निवडणुकीच्या प्रसंगीं

एकाद्या जातीचें धर्मदृष्टया व वंशदृष्टया वर्गीकरण करण्याऐवजीं धंदेवारीनें तें वर्गीकरण करावें असें आमचें मत आहे. याचें एक कारण असें आहे कीं, कायदेमंडळापुढें जातिविषयक जे भानगडीचे प्रश्न येतात त्यांचा धर्माशीं अगर वंशाशीं फारच थोडा संबंध असतो. हिंदुस्थानांतील कामगारवर्गाविषयीं आम्हांस जें काय म्हणावयाचें आहे त्याबद्दलचें पत्रक मायनॉरिटीज सब-कमिटीच्या शेवटच्या सभेस आम्हीं सादर केलेंच आहे. आमची सूचना जर अमलांत येणार नसेल व इतर धार्मिक व आर्थिक गटांसाठीं जर स्वतंत्र मतदारसंघ निर्माण होणार असतील, तर कामगारवर्गाकरतांही स्वतंत्र मतदारसंघ असावेत व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत कांहीं जागा कायदेमंडळांत त्यांच्यासाठीं राखून ठेवण्यांत याव्या. एकंदरींत आमचें म्हणणें असें कीं, या नव्या राज्यघटनेंत समाजांतील प्रत्येक लोकांचे प्रतिनिधि कायदेमंडळांत यावयास हवे. तसेंच एकाद्या विशिष्ट कार्यासाठीं निरनिराळ्या जातीचे व निरनिराळ्या दर्जाचे लोक संघटित होतात; अशा संघांनीं निवडून दिलेल्या आपआपल्या प्रतिनिधींनाही या नव्या कायदेमंडळांत जागा मिळाली पाहिजे. यावरून ओघानेंच असें म्हणतां येतें कीं, लोकसंख्येच्या मानानें जितक्या जागा राखून ठेवावयाच्या त्यापेक्षां जास्त जागा राखून ठेवण्याच्या तत्त्वास आमचा विरोध आहे; मग त्या जागा एखाद्या जातीसाठीं राखून ठेवायच्या असोत, कीं हिंदी संस्थानासाठीं ठेवायच्या असोत. आम्हांला त्या मुळींच मान्य नाहींत. फेडरल पद्धतीच्या राज्यव्यवस्थेस आमचा विरोध आहे असें नव्हे. त्या राज्यपद्धतींत सर्व दर्जाच्या व सर्व संघाच्या प्रतिनिधींना स्थान मिळावें; ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें येथील लोकांनाही आपले खरे प्रतिनिधि त्यांत धाडतां यावेत. त्या राज्यघटनेंत श्रीमंत लोक व संस्थानिकांचे हस्तक एवढ्यांचाच चंचुप्रवेश नसावा, ह्यांकडे मात्र आमचें लक्ष आहे. शिवाय फेडरेशन जर यशस्वी व्हावयाचें असेल तर त्यांत भाग घेणाऱ्या सर्व पक्षांची बरोबरीनें स्वार्थत्याग करण्याची तयारी असली पाहिजे. परंतु फेडरल स्ट्रक्चर सब्-कमेटीनें मसुदा आंखला आहे त्यावरून पाहतां, हिंदी संस्थानें द्रव्यदृष्टया व अधिकारदृष्टया वर सांगितल्याप्रमाणें स्वार्थत्याग करावयास तयार नाहींत असें आम्हांस वाटतें.

खानबहादूर हिदायतुल्ला हुसेनः--सर ए. पी. पेट्रो यांनीं सांगितलें कीं, "हिंदुस्थानांतील मुसलमानांना शेंकडा ३० इतक्या जागा हव्यात. बरें, संस्थानांनाही शेंकडा ३० इतक्या जागा हव्यात. मग बहुसंख्याकांना उरलें काय?" या त्यांच्या विधानांत थोडी दुरुस्ती व्हावयास हवी. संस्थानांबद्दल माझें मत काय आहे तें मीं आतांच सांगितलें. सबंध फेडरल लेजिस्लेचरपैकीं शेंकडा ३० जागा मुसलमानांना हव्यात; म्हणजे मुसलमानांची प्रत्यक्ष लोकसंख्या आहे त्यांतून शेंकडा २६ व संस्थानांतून शेंकडा ७ इतक्या जागा मुसलमानांस हव्या. हिंदुस्थानांत सध्या जे प्रांत आहेत त्यांच्या सरहद्दी नैसर्गिक नाहींत. तसेंच प्रांतांत एकसूत्रीपणाही आढळून येत नाहीं. या प्रांतांत एकसूत्रीपणा येईल व त्यांचें एकमेकांशीं संबंध अधिक सलोख्याचे होतील अशी कांहीं तरी योजना ठरविणें हें या परिषदेचें काम आहे.

मि. बसूः--मी अल्पसंख्याक कमिटीचा सभासद नसल्यानें मी माझें एक टिपण मुख्य प्रधानांजवळ दिलें होतें. त्यांनीं तें टिपण, माझ्या विनंतीस मान देऊन सर्व सभासदांना वाटलें. मि. फझल्-उल् हक यांनीं आपल्या भाषणांत माझ्या त्या टिपणाचा उल्लेख केला आहे. मुसलमानांची संख्या जेथें जास्त आहे अशा बंगालमधील कित्येक जिल्ह्यांत लोकलबोर्डें इत्यादींच्या ज्या निवडणुकी होतात त्यांत स्वतंत्र मतदारसंघ किंवा निरनिराळ्या जातीसाठीं स्वतंत्र राखीव जागा वगैरे प्रकार नसतात. अशा निवडणुकांतून मुसलमानलोक जास्त निवडून येतात असें एक विधान मीं त्या टिपणांत केलें, असें श्री. फझल् उल् हक यांचें म्हणणें आहे. माझें विधान असें होतें कीं, जमीनदार व्यापारी सावकार वगैरे लोक जर बहुतेक हिंदु असतील व मतदार लोकांत मुसलमानांचा भरणा जास्त असेल तर निवडून आलेल्यांत मुसलमानांचीच संख्या जास्त भरेल. श्री. फझल्-उल् हक व श्री. गझनवी यांनीं आपापल्या जिल्ह्यांतील अनुभव सांगावा जेथें हिंदु मतदारांची संख्या मोठी आहे, तेथें निवडून आलेल्या लोकांत हिंदूच जास्त भरतात. ज्या जिल्ह्यांतून मुसलमानांची संख्या जास्त असते व तेच जास्त जागा पटकावतात, त्या जिल्ह्यांतील हिंदुलोक कधीं याबद्दल कुरकुरत नाहींत. मग जेथें मुसलमानांची मतदारसंख्या कमी आहे तेथें कमी मुसलमान निवडून आल्याबद्दल मुसलमानांनी आरडाओरड कां करावी हें कळत नाहीं. बंगालमधील मुसलमानेतर जातींना असें वाटत आहे कीं,

जर धर्माच्या मुद्द्यावर स्वतंत्र मतदारसंघ स्थापण्यांत आले व ज्या जातींत मताधिक्य असेल त्या जातीसाठीं जास्त जागा राखून ठेवण्यांत आल्या तर सर्व राजकीय सत्ता कायमची त्या जातीच्या हातीं जाईल, आणि ती केवळ, सर्वांत जास्त लोक एकाच धार्मिक भावनेचे आहेत म्हणून, बहुसंख्याक जातीसाठीं जास्त राखीव जागा व स्वतंत्र मतदारसंघ असावेत हें तत्त्व नवीन आहे. परिस्थिति अगदीं निकराची झाली आहे, असें सांगण्यांत आलें आहे. परंतु ती तितकी निकराची आहे, असें उघडकीस आलेलें नाहीं असें मला वाटतें.

राजा नरेंद्रनाथः—पंजाबमध्यें कौन्सिलच्या दोन तृतीयांश भागाची घटना अशी कांहीं आहे कीं, उरलेल्या एक तृतीयांश हिंदूंच्या प्रतिनिधींना, त्या दोन तृतीयांश कौन्सिलच्या निवडणुकींत 'ब्र' काढण्याचाही अधिकार नाहीं. जोंपर्यंत बहुसंख्याकांच्या मनांत हिंदूंना हा अधिकार द्यावयाचा नाहीं, तोंपर्यंत हा अधिकार त्यांना मिळणार नाहीं का? आणि बहुसंख्याक आपण होऊन हा अधिकार गमावतील असें आपणांस वाटतें काय?

पब्लिक सर्व्हिसेसमध्यें नवीन लोकांना दाखल करून घेतांना अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, सर्व वर्गाच्या आणि सर्व जातीच्या लोकांना न्याय्य वाटा मिळावा. हिंदुस्थान सरकारच्या भावी काळच्या कार्यकारी मंडळाच्या मुख्यानें बहुसंख्याकाकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. अल्पसंख्याक हिंदूंना इतर अल्पसंख्याकांइतकी सहानुभूति (सरकारकडून) मिळणार नाहीं अशी मला भीति वाटत आहे.

बोबिलीचे राजेसाहेबः—जमीनदारांचें असें म्हणणें आहे कीं, आजपर्यंत जसें त्यांना आपले स्वतंत्र प्रतिनिधि मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांत पाठवितां येत, तसेच ते पुढेंही पाठवितां यावे; इतकेंच नव्हे तर स्वतंत्र प्रतिनिधि पाठविण्याच्या या हक्काची आतां त्यांना पूर्वीपेक्षांही जास्त गरज आहे. स्वतंत्र प्रतिनिधित्वाचें हें प्रमाण बरेंच वाढवूनही संरक्षक योजनेस अपुरें पडतें; हें ध्यानांत घेऊन सर्व प्रांतांतून दोन कायदेमंडळें स्थापण्यांत यावीं असें त्यांचें आग्रहाचें म्हणणें आहे. जमिनदारांशीं आतांपर्यंत झालेल्या करारांना धक्का न लावण्याबद्दल ते खबरदारी घेतात. सार्वभौम सत्तेनें त्यांना दिलेल्या सनदांनाही ते अतिशय जपतात. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन मूलभूत हक्कांमध्यें एक कलम घालून, हे करार व या सनदा यांच्यांत कांहींही बदल होणार नाहीं असें आश्वासन त्यांना मिळावें असा त्यांचा आग्रह आहे.

आमची मालमत्ता हरण करणाऱ्या अशा कोणत्याही कायद्यास परवानगी मिळूं नये. योग्य न्यायाधीश नेमून ते ठरवतील ती नुकसानभरपाई आम्हांस मिळाली तर चालेल. पण त्याहीपेक्षां आमच्या मालमत्तेची किंमत कमी होईल अशा कायद्यास परवानगी नसावी. कायदेशीरपणें मिळविलेले जमीनदारांचे सध्याचे हक्क शाबूद ठेवा असें नेहमीच्या परिस्थितींत बजावण्याची मला जरूर नव्हती; परंतु हिंदुस्थानांतील चळवळ ही जरी फार थोड्या भागावर पसरलेली आहे तरी, ज्या एका दिशेनें जात आहे त्यामुळें मी ज्यांचा प्रतिनिधि आहें त्या जमीनदार वर्गांत बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. फेडरल स्ट्रक्चर कमिटींत ब्रिटिशांच्या व्यापारी हक्काविषयीं चर्चा करतांना महात्मा गांधींनीं जें भाषण केलें, त्यामुळेंही आमचें भय आणि चिंता कमी झाली नाहीं, उलट वाढली आहे. जी एक सूचना गंभीरपणें पुढें मांडण्यांत आली आहे त्यामुळें तर आम्हांला धक्काच बसला आहे. ती सूचना अशी कीं, नव्या सरकारांत मालमत्तेच्या सर्व गोष्टी तपासण्यांत याव्या, सर्व हिशेबही तपासण्यांत यावे. ही तपासणी कांहीं निश्चित कायद्यानुसार न करतां अशा गूढ पद्धतीनें करावयाची कीं त्या तपासणीपद्धतीस 'यथान्याय' व सर्वतोपरी देशांस अत्यंत उपयोगी अशी मालमत्ता फक्त मान्य असावी. आम्हांस असें वाटतें कीं, नैतिक विचार आणि कायदेशीर विचार यांची सरमिसळ केल्यानें नैतिक विचार व कायदेशीर विचार या दोनही बाबतींत अन्याय घडून येतो. या प्रश्नाचा या दृष्टीनें मी आतां जास्त विचार न करतां एवढेंच म्हणतों कीं, अशा सूचनेस जमीनदारांकडून कधींही पाठिंबा मिळणार नाहीं. आमच्या बरोबर सरकारनें जे करार केले आहेत ते नव्या राज्यपद्धतींत तसेच्या तसे जावयास हवे आणि नव्या सरकारकडून त्यांस मान्यता मिळावयास हवी अशी आमची इच्छा आहे.

सर ह्यूबर्ट कारः—ब्रि. हिंदुस्थानांतील प्रतिनिधींपैकीं युरोपियन गटाचें मत आर्थिक संरक्षक योजनांना अनुकूल आहे. त्यायोगें हिंदुस्थानची पत कायम राहील. हिंदुस्थानच्या शासनपद्धतीची नैसर्गिक प्रगति व्हावी असें आम्हांस वाटत नाहीं, असा आरोप कोणीं आमच्यावर केला

एकाद्या जातीचें धर्मदृष्टचा व वंशदृष्टचा वर्गीकरण करण्याऐवजीं धंदेवारीनें तें वर्गीकरण करावें असें आमचें मत आहे. याचें एक कारण असें आहे कीं, कायदेमंडळापुढें जातिविषयक जे भानगडीचे प्रश्न येतात त्यांचा धर्माशीं अगर वंशाशीं फारच थोडा संबंध असतो. हिंदुस्थानांतील कामगारवर्गाविषयीं आम्हांस जें काय म्हणावयाचें आहे त्याबद्दलचें पत्रक मायनॉरिटीज सब-कमिटीच्या शेवटच्या सभेस आम्हीं सादर केलेंच आहे. आमची सूचना जर अमलांत येणार नसेल व इतर धार्मिक व आर्थिक गटांसाठीं जर स्वतंत्र मतदारसंघ निर्माण होणार असतील, तर कामगारवर्गाकरतांही स्वतंत्र मतदारसंघ असावेत व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत कांहीं जागा कायदेमंडळांत त्यांच्यासाठीं राखून ठेवण्यांत याव्या. एकंदरींत आमचें म्हणणें असें कीं, या नव्या राज्यघटनेंत समाजांतील प्रत्येक लोकांचे प्रतिनिधि कायदेमंडळांत यावयास हवे. तसेंच एकाद्या विशिष्ट कार्यासाठीं निरनिराळचा जातीचे व निरनिराळचा दर्जाचे लोक संघटित होतात; अशा संघांनीं निवडून दिलेल्या आपआपल्या प्रतिनिधींनाही या नव्या कायदेमंडळांत जागा मिळाली पाहिजे. यावरून ओघानेंच असें म्हणतां येतें कीं, लोकसंख्येच्या मानानें जितक्या जागा राखून ठेवावयाच्या त्यापेक्षां जास्त जागा राखून ठेवण्याच्या तत्त्वास आमचा विरोध आहे; मग त्या जागा एखाद्या जातीसाठीं राखून ठेवायच्या असोत, कीं हिंदी संस्थानासाठीं ठेवायच्या असोत. आम्हांला त्या मुळींच मान्य नाहींत .फेडरल पद्धतीच्या राज्यव्यवस्थेस आमचा विरोध आहे असें नव्हे. त्या राज्यपद्धतींत सर्व दर्जाच्या व सर्व संघाच्या प्रतिनिधींना स्थान मिळावें; ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें येथील लोकांनाही आपले खरे प्रतिनिधि त्यांत धाडतां यावेत. त्या राज्यघटनेंत श्रीमंत लोक व संस्थानिकांचे हस्तक एवढचांचाच चंचुप्रवेश नसावा, हचांकडे मात्र आमचें लक्ष आहे. शिवाय फेडरेशन जर यशस्वी व्हावयाचें असेल तर त्यांत भाग घेणाऱ्या सर्व पक्षांची बरोबरीनें स्वार्थत्याग करण्याची तयारी असली पाहिजे. परंतु फेडरल स्ट्रक्चर सब्-कमेटीनें मसुदा आंखला आहे त्यावरून पाहतां,हिंदी संस्थानें द्रव्यदृष्टचा व अधिकारदृष्टचा वर सांगितल्याप्रमाणें स्वार्थत्याग करावयास तयार नाहींत असें आम्हांस वाटतें.

खानबहादूर हिदायतुल्ला हुसेनः——सर ए. पी. पेट्रो यांनीं सांगितलें कीं, "हिंदुस्थानांतील मुसलमानांना शेंकडा ३० इतक्या जागा हव्यात. बरें, संस्थानांनाही शेंकडा ३० इतक्या जागा हव्यात. मग बहुसंख्याकांना उरलें काय?" या त्यांच्या विधानांत थोडी दुरुस्ती व्हावयास हवी. संस्थानांबद्दल माझें मत काय आहे तें मीं आतांच सांगितलें. सबंध फेडरल लेजिस्लेचरपैकीं शेंकडा ३० जागा मुसलमानांना हव्यात; म्हणजे मुसलमानांची प्रत्यक्ष लोकसंख्या आहे त्यांतून शेंकडा २६ व संस्थानांतून शेंकडा ७ इतक्या जागा मुसलमानांस हव्या. हिंदुस्थानांत सध्या जे प्रांत आहेत त्यांच्या सरहद्दी नैसर्गिक नाहींत. तसेंच प्रांतांत एकसूत्रीपणाही आढळून येत नाहीं. या प्रांतांत एकसूत्रीपणा येईल व त्यांचें एकमेकांशीं संबंध अधिक सलोख्याचे होतील अशी कांहीं तरी योजना ठरविणें हें या परिषदेचें काम आहे.

मि. बसूः——मी अल्पसंख्याक कमिटीचा सभासद नसल्यानें मी माझें एक टिपण मुख्य प्रधानांजवळ दिलें होतें. त्यांनीं तें टिपण, माझ्या विनंतीस मान देऊन सर्व सभासदांना वाटलें. मि. फझल्–उल् हक यांनीं आपल्या भाषणांत माझ्या त्या टिपणाचा उल्लेख केला आहे. मुसलमानांची संख्या जेथें जास्त आहे अशा बंगालमधील कित्येक जिल्हयांत लोकलबोर्डें इत्यादींच्या ज्या निवडणुकी होतात त्यांत स्वतंत्र मतदारसंघ किंवा निरनिराळचा जातीसाठीं स्वतंत्र राखीव जागा वगैरे प्रकार नसतात. अशा निवडणुकांतून मुसलमानलोक जास्त निवडून येतात असें एक विधान मीं त्या टिपणांत केलें, असें श्री. फझल् उल् हक यांचें म्हणणें आहे. माझें विधान असें होतें कीं, जमीनदार व्यापारी सावकार वगैरे लोक जर बहुतेक हिंदु असतील व मतदार लोकांत मुसलमानांचा भरणा जास्त असेल तर निवडून आलेल्यांत मुसलमानांचीच संख्या जास्त भरेल. श्री. फझल्–उल् हक व श्री. गझनवी यांनीं आपापल्या जिल्हयांतील अनुभव सांगावा जेथें हिंदु मतदारांची संख्या मोठी आहे,तेथें निवडून आलेल्या लोकांत हिंदूच जास्त भरतात. ज्या जिल्हयांतून मुसलमानांची संख्या जास्त असते व तेच जास्त जागा पटकावतात, त्या जिल्हयांतील हिंदुलोक कधीं याबद्दल कुरकुरत नाहींत.मग जेथें मुसलमानांची मतदारसंख्या कमी आहे तेथें कमी मुसलमान निवडून आल्याबद्दल मुसलमानांनी आरडाओरड कां करावी हें कळत नाहीं. बंगालमधील मुसलमानेतर जातींना असें वाटत आहे कीं,

जर धर्माच्या मुद्द्यावर स्वतंत्र मतदारसंघ स्थापण्यांत आले व ज्या जातींत मताधिक्य असेल त्या जातीसाठीं जास्त जागा राखून ठेवण्यांत आल्या तर सर्व राजकीय सत्ता कायमची त्या जातीच्या हातीं जाईल, आणि ती केवळ, सर्वांत जास्त लोक एकाच धार्मिक भावनेचे आहेत म्हणून, बहुसंख्याक जातीसाठीं जास्त राखीव जागा व स्वतंत्र मतदारसंघ असावेत हें तत्त्व नवीन आहे. परिस्थिति अगदीं निकराची झाली आहे, असें सांगण्यांत आलें आहे. परंतु ती तितकी निकराची आहे, असें उघडकीस आलेलें नाहीं असें मला वाटतें.

राजा नरेंद्रनाथः––पंजाबमध्यें कौन्सिलच्या दोन तृतीयांश भागाची घटना अशी कांहीं आहे कीं, उरलेल्या एक तृतीयांश हिंदूंच्या प्रतिनिधींना, त्या दोन तृतीयांश कौन्सिलच्या निवडणुकींत 'ब्र' काढण्याचाही अधिकार नाहीं. जोंपर्यंत बहुसंख्याकांच्या मनांत हिंदूंना हा अधिकार द्यावयाचा नाहीं, तोंपर्यंत हा अधिकार त्यांना मिळणार नाहीं का? आणि बहुसंख्याक आपण होऊन हा अधिकार गमावतील असें आपणांस वाटतें काय?

पब्लिक सर्व्हिसेसमध्यें नवीन लोकांना दाखल करून घेतांना अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, सर्व वर्गाच्या आणि सर्व जातीच्या लोकांना न्याय्य वाटा मिळावा. हिंदुस्थान सरकारच्या भावी काळच्या कार्यकारी मंडळाच्या मुख्यानें बहुसंख्याकाकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. अल्पसंख्याक हिंदूंना इतर अल्पसंख्याकांइतकी सहानुभूति (सरकारकडून) मिळणार नाहीं अशी मला भीति वाटत आहे.

बोबिलीचे राजेसाहेबः––जमीनदारांचें असें म्हणणें आहे कीं, आजपर्यंत जसें त्यांना आपले स्वतंत्र प्रतिनिधि मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांत पाठवितां येत, तसेच ते पुढेंही पाठवितां यावे; इतकेंच नव्हे तर स्वतंत्र प्रतिनिधि पाठविण्याच्या या हक्काची आतां त्यांना पूर्वीपेक्षांही जास्त गरज आहे. स्वतंत्र प्रतिनिधित्वाचें हें प्रमाण बरेंच वाढवूनही संरक्षक योजनेस अपुरें पडतें; हें ध्यानांत घेऊन सर्व प्रांतांतून दोन कायदेमंडळें स्थापण्यांत यावीं असें त्यांचें आग्रहाचें म्हणणें आहे. जमिनदारांशीं आतांपर्यंत झालेल्या करारांना धक्का न लावण्याबद्दल ते खबरदारी घेतात. सार्वभौम सत्तेनें त्यांना दिलेल्या सनदांनाही ते अतिशय जपतात. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन मूलभूत हक्कांमध्यें एक कलम घालून, हे करार व या सनदा यांच्यांत कांहींही बदल होणार नाहीं असें आश्वासन त्यांना मिळावें असा त्यांचा आग्रह आहे.

आमची मालमत्ता हरण करणाऱ्या अशा कोणत्याही कायद्यास परवानगी मिळूं नये. योग्य न्यायाधीश नेमून ते ठरवतील ती नुकसानभरपाई आम्हांस मिळाली तर चालेल. पण त्याहीपेक्षां आमच्या मालमत्तेची किंमत कमी होईल अशा कायद्यास परवानगी नसावी. कायदेशीरपणें मिळविलेले जमीनदारांचे सध्याचे हक्क शाबूद ठेवा असें नेहमीच्या परिस्थितींत बजावण्याची मला जरूर नव्हती; परंतु हिंदुस्थानांतील चळवळ ही जरी फार थोड्या भागावर पसरलेली आहे तरी, ज्या एका दिशेनें जात आहे त्यामुळें मी ज्यांचा प्रतिनिधि आहें त्या जमीनदार वर्गांत बरीच अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. फेडरल स्ट्रक्चर कमिटींत ब्रिटिशांच्या व्यापारी हक्काविषयीं चर्चा करतांना महात्मा गांधींनीं जें भाषण केलें, त्यामुळेंही आमचें भय आणि चिंता कमी झाली नाहीं, उलट वाढली आहे. जी एक सूचना गंभीरपणें पुढें मांडण्यांत आली आहे त्यामुळें तर आम्हांला धक्काच बसला आहे. ती सूचना अशी कीं, नव्या सरकारांत मालमत्तेच्या सर्व गोष्टी तपासण्यांत याव्या, सर्व हिशेबही तपासण्यांत यावे. ही तपासणी कांहीं निश्चित कायद्यानुसार न करतां अशा गूढ पद्धतीनें करावयाची कीं त्या तपासणीपद्धतीस 'यथान्याय' व सर्वतोपरी देशांस अत्यंत उपयोगी अशी मालमत्ता फक्त मान्य असावी. आम्हांस असें वाटतें कीं, नैतिक विचार आणि कायदेशीर विचार यांची सरमिसळ केल्यानें नैतिक विचार व कायदेशीर विचार या दोनही बाबतींत अन्याय घडून येतो. या प्रश्नाचा या दृष्टीनें मी आतां जास्त विचार न करतां एवढेंच म्हणतों कीं, अशा सूचनेस जमीनदारांकडून कधींही पाठिंबा मिळणार नाहीं. आमच्या बरोबर सरकारनें जे करार केले आहेत ते नव्या राज्यपद्धतींत तसेच्या तसे जावयास हवे आणि नव्या सरकारकडून त्यांस मान्यता मिळावयास हवी अशी आमची इच्छा आहे.

सर ह्यूबर्ट कारः––ब्रि. हिंदुस्थानांतील प्रतिनिधींपैकीं युरोपियन गटाचें मत आर्थिक संरक्षक योजनांना अनुकूल आहे. त्यायोगें हिंदुस्थानची पत कायम राहील. हिंदुस्थानच्या शासनपद्धतीची नैसर्गिक प्रगति व्हावी असें आम्हांस वाटत नाहीं, असा आरोप कोणीं आमच्यावर केला

तरी त्याची आम्हांस भीति नाहीं. आम्हीं आमची बाजू पुढें मांडण्याचें कारण असें कीं, हिंदुस्थानची एकदां पत गेली कीं, त्याची राजकीय, आर्थिक, व सामाजिक बाबतींत पिछेहाट होईल. याच दृष्टीनें आम्ही म्हणतों कीं, हिंदुस्थानांत राहून थोडीफार लोकसेवा करीत असतां आम्हांस आमचे प्रतिनिधि कायदेमंडळांत पाठविण्यासाठीं स्वतंत्र मतदारसंघाची जरूर आहे.

मि. अय्यंगारः—संक्रमणावस्थेंत संरक्षक योजना व राखीव जागा नसाव्या असें माझें म्हणणें नाहीं. त्याला या परिषदेंतील सर्वांची मान्यता मिळाली आहे. परंतु या बाबतींत हिंदुस्थान सरकार सार्वभौम राजेसाहेबांच्या सरकारास जबाबदार, व सार्वभौम सरकार पार्लमेंटला जबाबदार, असा प्रकार मात्र होऊं नये. संरक्षक योजना व राखीव जागा यामुळें जबाबदारीला मूठमाती मिळूं नये किंवा स्वराज्य किंवा जबाबदारी यांचा लचका तोडला जाऊं नये. कोणत्या संकटांमुळें या संरक्षक योजनांची जरूर वाटूं लागली व या संरक्षक योजना काय आहेत, कशा असावयास हव्या, हें सगळें आम्हांस सरकारनें सांगावयास हवें. हिंदुस्थानची आर्थिक स्थिति वस्तुतः कशी आहे, हिंदुस्थानची पत बाहेर कायम ठेवण्यासाठीं सरकारला काय अडचणी येतात, वगैरे सर्व गोष्टींचा उलगडा बादशहांचे सरकार व भारतमंत्री यांच्या व्यतिरिक्त कोणास होत नाहीं. या अडचणी काय आहेत, कोणकोणत्या संकटांतून आपणांस निभावून जावयाचें आहे याची नीटशी कल्पना जर आम्हांस कळूं दिली नाहीं, तर या असल्या गोष्टींची नुसती दिखाऊ चर्चा करणें आम्हांला शक्य नाहीं. परचक्रनिवारण व परराष्ट्राशीं व्यवहार यांचीही तीच गत. सार्वभौम सरकाराखेरीज इतरांना त्यांतली बारीकसारीक माहिती नाहीं. बरें, या परिषदेसारख्या मोठ्या परिषदेंत उघडपणें चर्चा करणें सरकारास प्रशस्त वाटत नसेल तर सरकारनें पुढाऱ्यांस आपल्या विश्वासांत घ्यावें आणि आपल्या अडचणी त्यांजपुढें मांडाव्या, हाच त्याला उत्तम उपाय आहे.

सर मनुभाई मेहताः—"प्रांतिक स्वराज्य" ही शब्दांची परस्परविरोधी जोडी आहे असें मला वाटतें. "प्रांतिक स्वराज्य" म्हणावयाचें आणि मध्यवर्ती सरकारच्या हातीं नियंत्रणाचा अधिकार असावयाचा. मग प्रांतिक 'स्वराज्य' उरलें कुठें?

दिवाणबहादूर रामचंद्ररावः—संस्थानच्या लोकांचे प्रतिनिधि या परिषदेंत नाहींत त्यांचें काय म्हणणें आहे हें कोणी ऐकून घेत नाहीं. जरी त्यांच्याकडे दुर्लक्षच केलें जात आहे तरी, संयुक्त राज्यघटनेंत सामील होणाऱ्या संस्थानांच्या लोकांना उपयोगी पडेल अशा दृष्टीनेंच परिषदेपुढें येणाऱ्या सूचनांचा विचार करण्याचें या परिषदेचें कर्तव्य आहे. संस्थानच्या रहिवाशांना फेडरल नागरिकत्वाचा हक्क असावा व तसें शासनपद्धतींत नमूद करून ठेवावें. तसेंच संस्थानच्या रहिवाशांना ब्रिटिश हिंदुस्थानांतून हद्दपार करतांना किंवा ब्रि. हिं.च्या रहिवाशाला संस्थानांतून हद्दपार करतांना जो फॉरिनर्स ॲक्ट लावण्यांत येतो तो लावूं नये. संस्थानांतील लोकांना मूलभूत हक्क बहाल करण्यांत यावयाचे तर त्यावरून ओघानेंच येतें कीं, जर या हक्कांची पायमल्ली झाली तर हिंदी संस्थानांना फेडरल सुप्रीम कोर्टाकडून मदत मिळाली पाहिजे. प्रांतांच्या क्षेत्रफळाची पुन्हा विभागणी करणें हा नव्या घटनेंतील फेडरल सरकार व फेडरल कायदेमंडळ यांपुढील फार महत्त्वाचा प्रश्न होऊन बसेल यांत शंका नाहीं.

सर फिरोज सेठनाः—म्हणायचें प्रांतिक स्वराज्य व सत्ताधिकार मध्यवर्ती सरकारच्या हातीं. या गोष्टीं, सर मनुभाई मेहता यांनीं सांगितल्याप्रमाणें परस्परविरोधी आहेत. प्रगतीची ही तऱ्हा सायमन कमिशननें सुचविलेली होती. आणि आम्हांस जर हेंच दान मिळणार असेल तर गोलमेज परिषद भरविण्याचें व आम्हांला एवढें ६००० मैल येण्यास सांगण्याचें व आम्हीं इतका खटाटोप करण्याचे सर्व श्रम अनाठायीं झाले असेंच म्हणावें लागेल.

कॅप्टन राजा शेरमहमद खानः—फेडरल स्ट्रक्चर कमिटींत कांहीं वक्त्यांनीं असें सुचविलें होतें कीं, हिंदुस्थानांतील लष्कर व ब्रिटिश फौज हीं कमी करावी. देशाभिमान आणि भावना यांना बळी न पडतां त्यांनीं आपलीं मतें प्रदर्शित करीत जावीं, अशी माझ्या मित्रांना मी प्रार्थना करतों. राखीव फौज वगैरे सर्व मिळून सध्यां हिंदुस्थानची फौज १,५०,००० हून किंचित जास्त आहे. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशाला इतकी फौज जास्त नाहीं असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें. फेडरल स्ट्रक्चर कमिटींतील कांहीं वक्त्यांनीं असेंही जोरानें प्रतिपादलें कीं, हिंदुस्थानांतील सर्व जातीच्या लोकांस सैन्यांत प्रवेश मिळावा. किंग्ज

कमिशनच्या नेमणुका करण्याच्या बाबतींत सध्याही कोणतेच निर्बंध नाहींत. सर्व जातीच्या लोकांना सैन्यांत प्रवेश तुम्ही कां देत नाहीं असें विचारतां, लॉर्ड रॉबर्टस् म्हणाले, "हिंदुस्थान देश फार मोठा आहे, त्याची लोकसंख्या फार मोठी आहे. त्यांतून शक्यतों निवडक लोकांचाच आम्ही उपयोग करून घेतला पाहिजे." माझेंही म्हणणें असेंच आहे. एक-जातीय लोकसंख्येच्या लहान लहान देशांची गोष्ट वेगळी आहे. महायुद्धांत वाटेल त्या जातींतील लोकांची सैन्यांत भरती करण्यांत आली; ही भरतीची पद्धति कुचकामाची ठरली आणि मला जी प्रत्यक्ष माहिती आहे तीवरून मी असें सांगूं शकतों कीं, एकाद्या लांब वाटचालींत जे सैनिक थकून रांगेंतून गळाले त्यांपैकीं शें. ९० सैनिक सैन्यभरतीस नालायक ठरलेल्या जातींपैकीं होते. महायुद्धांत जे सैनिक होते अशा लोकांना जर योग्य त्या प्रमाणांत स्थानिक व प्रांतिक कायदेमंडळांत प्रतिनिधित्व दिलें तर तें न्याय्यच ठरेल. मतदानहक्काच्या कोठल्याही योजनेंत, त्यांना मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांसाठीं मतें देण्याचा हक्क असावयास हवा.

श्रीमती सौ. सरोजिनी नायडू:––अस्पृश्य लोक किंवा गरीब लोक यांच्या बाबतींत अन्याय झालेला मला खपणार नाहीं; परंतु डॉ. अंबेडकरांना माझें असें सांगणें आहे कीं, अमुक एका कनिष्ठ जातींतील लोकांत आत्मविश्वास आणि स्वाभिमान उत्पन्न करणें हें ज्यांचें कर्तव्य आहे अशा समूहापासून, जर त्या कनिष्ठ जातींतील एकादा प्रमुख कार्यकर्ता निवडणुकीच्या बंधनांनीं स्वतःच्या जातीस बहिष्कृत करण्याचा प्रयत्न करील तर तो आपल्या जातीचें अकल्याण करीत आहे असेंच म्हणावें लागेल.

डॉ. मुंजे:––फेडरल स्ट्रक्चर कमिटीच्या ३ऱ्या रिपोर्टाच्या २२ व्या व २३ व्या पॅरिग्राफांसंबंधानें मला असें म्हणावयाचें आहे कीं, माझ्या प्रांताच्या वांट्यास आलेल्या जागा त्या मानानें फारच कमी आहेत. आतां मला हिंदी संस्थानांतील प्रजाजनांबद्दल थोडे शब्द बोलणें भाग आहे. हिंदी संस्थानांतील प्रजेच्या मूलभूत हक्कांचें संरक्षण करणें किंवा त्यांची स्पष्ट मर्यादा ठरविणें या बाबतींत कांहींच प्रयत्न झालेले नाहींत. ख्रिश्चन लोकांविषयीं म्हणाल तर स्वतंत्र मतदारसंघाच्या बाबतींत त्यांच्यात एकमत आहे असें मुळींच नाहीं. माझे मित्र डॉ. दत्त यांनीं आपलें तसें मत सांगितलें आहे. आणि ज्यांची जागा डॉ. दत्त यांनीं भरून काढली आहे ते मरहूम मि. पॉल यांनींही गेल्यावर्षी असेंच सांगितलें कीं, एकंदरींत ख्रिश्चन समाजाचा कल स्वतंत्र मतदारसंघाच्या विरुद्धच आहे असें म्हटलें तरी चालेल. जें पत्र मी आतां वाचून दाखविणार आहे तें लंडन टाईम्समध्यें प्रसिद्ध झालेलें असून त्यावर, हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून देशसेवा करणाऱ्या दहा प्रसिद्ध मिशनऱ्यांच्या सह्या आहेत. हिंदुस्थानांत असलेल्या युरोपियन लोकांच्या राजकीय हक्कांबद्दल सध्यां चर्चा चालूं आहे. या देशांत हक्काची रजा घेऊन आलेले आम्ही मिशनरी लोक, हिंदुस्थानांतील बहुतेक मिशनऱ्यांच्या वतीनें असें सांगूं इच्छितों कीं, हिंदुस्थानांतील युरोपियनांप्रमाणें आपल्यालाही राजकीय सवलती असाव्यात अशी आम्हां मिशनऱ्यांची मुळींच इच्छा नाहीं." जरी संस्थानिक फेडरेशनमध्यें येत नसतील किंवा कांहीं कारणामुळें त्यांना येणें न येणें ठरवितां येत नसेल तरी ब्रिटिश हिंदुस्थानच्या घटनेच्या उत्क्रांतीच्या मार्गांत ह्या कारणामुळें अडथळा येऊं नये, कारण त्यामुळें व्हाइसरॉयसाहेबांनीं आपल्या पत्रकांत दिलेल्या हमीस बाध येईल.

रावबहादूर श्रीनिवासन्:––आमची मुख्य मागणी इतकीच आहे कीं, आम्हांस स्वतंत्र मतदार संघ हवेत आमची मागणी न्याय्य आहे इतकेंच नव्हे तर इतरांसही, ती रास्त आहे असें आमच्या प्रमाणेंच वाटेल. कोणत्या तऱ्हेच्या मतदारसंघानें अस्पृश्य लोकांस खरेंखुरें प्रतिनिधित्व मिळेल याकडे आपण दृष्टि ठेवली पाहिजे आतां असें सांगण्यांत येतें कीं, सायमन कमिशननें संयुक्त मतदार संघ व राखीव जागा ह्यांची शिफारस केली. परंतु असें म्हणणें म्हणजे सायमन कमिशनचा अर्थ नीट समजून न घेण्यासारखें आहे. कारण, सायमन कमिशननें 'संयुक्त मतदारसंघ' व 'राखीव जागा' असें निखालसपणें म्हटलें नव्हतें; त्यांनीं 'संयुक्त मतदार संघ व (सर्टिफाईड) उमेदवार' असें स्पष्ट म्हटलें होतें. ज्या कारणासाठीं सायमन कमिशननें सर्टिफाईड उमेदवाराची शिफारस केली त्याच कारणासाठीं अस्पृश्य लोकांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजे आहेत. तें कारण असें कीं, नुसत्या संयुक्त मतदारसंघामुळें अस्पृश्य लोकांचे प्रतिनिधी हे हिंदु जातीचे केवळ हस्तक बनतील आणि त्यामुळें त्यांना प्रतिनिधित्व देण्याच्या मुळच्या उद्देशावरच घाव घातल्यासारखा होणार आहे. शेवटीं मला तीन गोष्टी

सांगावयाच्या आहेत. पहिली गोष्ट अशी कीं, स्वतंत्र मतदारसंघामुळें आमच्यावर अस्पृश्यतेचा शिक्का कायमचा बसून त्यामुळें आमचें नुकसान होईल ही कल्पना आम्हांस मुळींच पटत नाहीं. या बाबतींतील आमची दृष्टि वेगळी आहे.ती अशी कीं, रोगग्रस्तानें आपला रोग काय आहे हें स्पष्ट सांगितलें तर त्यावर कांहीं उपाय करून तो रोग बरा करणें शक्य असतें.परंतु भलतीच लाजमुर्वत ठेवून जर त्यानें योग्य वेळीं त्यावर कांहीं उपचार केला नाहीं तर त्याचें हें कृत्य प्राणघातकच ठरेल. म्हणून आम्हांस हवें तें संरक्षण मिळविण्याच्या आमच्या प्रयत्नांत कोणीं अडथळा आणल्यास आम्हांस चालणार नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, आमचे मूलभूत हक्क किंवा अस्पृश्यतानिवारण हें जर कायद्याच्या जोरावर होणार असेल तर त्यानें आमचें फारसें समाधान होणार नाहीं. कायद्यानें अस्पृश्यतानिवारण घडून येणें ही एक बाब; परंतु तें खरोखरीच येणें ही त्याहून वेगळी आणि त्याहून महत्त्वाची बाब आहे. अस्पृश्यतानिवारण खरोखरीच घडून येणें हें कायदा व राज्यव्यवस्था यांत आम्हांस किती वाटा मिळतो यावर अवलंबून आहे. आणि ह्याच एका गोष्टीमुळें इतर लोकांच्या बरोबरीचा दर्जा आम्हांस प्राप्त होईल. कायदेमंडळांवर अस्पृश्यांचा पुष्कळसा ताबा राहिल्याखेरीज आणि तदनुषंगानें कार्यकारी मंडळ हातीं आल्याखेरीज आम्हांस समान दर्जा प्राप्त होणार नाहीं.

डॉ. एस्. के. दत्त:—मुख्य प्रधानसाहेब, मीं जातिविषयक असा कोणताच हक्क कधींच सांगितला नाहीं. परंतु आपली परवानगी असेल तर एक जातिविषक सूचना आपणापुढें मांडतों. एकादी जात, राज्यकारभारांत कांहींही अडथळा उत्पन्न करीत नाहीं तोंपर्यंत तिजकडे विशेषसें लक्ष दिलें जात नाहीं. परंतु ती जात, राज्यकारभारास नडूं लागतांच तिकडे आपोआप लक्ष वेधलें जातें. आम्ही ख्रिश्चन लोक कोणत्याही प्रकारें त्रासदायक आहों असें अजून सिद्ध झालेलें नाहीं.

मि. वेजवुड बेन:—मुख्य प्रधानसाहेब, या कॉन्फरन्समध्यें बंधुभाव वसत आहे. ज्या स्वातंत्र्यभूमीवर हें अधिवेशन भरलें आहे त्यास शोभून दिसेल अशी समतेची भावनाही येथें दिसून येत आहे. राऊंड टेबल परिषदेंत उच्चारलें गेलेलें सर्वांत महत्त्वाचें म्हणून कोणतें वाक्य चिरस्मरणीय राहील हें मला आतांच सांगतां येणार नाहीं. सर अकबर हैदरी यांनीं श्री. जोशी यांस 'पिअर' ही पदवी बहाल करतांना मीं ऐकलें आहे. परंतु माझ्या मतें सर्वांत महत्त्वाचें वाक्य म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या तोंडांतून चुकून गेलेलें वाक्य होय. त्यांनीं संस्थानिकांचा उल्लेख करतांना "माझे नृपतिबंधु" असा शब्द प्रयोग केला, तरीही त्याबद्दल संस्थानिकांनीं नापसंति मुळींच दर्शविली नाहीं.

सर तेजबहादूर सप्रू:—लॉर्ड चॅन्सेलरसाहेब, तुम्हांला कल्पना असेल त्याहून जास्त आदरभाव लॉर्ड आर्यावनसाहेबांविषयीं हिंदुस्थानांत होता. शिवाय म. गांधी होते.त्यांच्या साधनाविषयीं दुमत असलें तरी त्यांच्या साध्याविषयीं कोणताही मतभेद नाहीं. गेल्या वर्षीच्या अधिवेशनाच्या यशास साक्षीदार या नात्याने ते आज येथें हजर आहेत. हीच गेल्या वर्षीच्या अधिवेशनानें बजावलेली कामगिरी होय.

डॉ. शफत अहमद खान:—मी अलाहाबाद सोडण्यापूर्वी आम्हीं मुस्लीम कॉन्फरन्सची एक बैठक भरविली होती व त्यांत सबंध मुसलमान समाजास बंधनकारक असा एक ठराव पास करण्यांत आला. त्याच ठरावानुसार आम्ही वागत आहों. त्या ठरावाचा मथितार्थ असा होता कीं, मुसलमानांच्या मागण्यांचा समाधानकारक रीतीनें निकाल लागल्याखेरीज, मुसलमान प्रतिनिधींनीं, मध्यवर्ती सरकारच्या हातीं किती सत्ता ठेवावी याबद्दलच्या कोणत्याही प्रश्नांत अगर कोणत्याही चर्चेंत मुळींच भाग घेऊं नये.

मि. गझनवी:—कलकत्ता कॉर्पोरेशन ही हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी स्थानिक स्वराज्यसंस्था आहे. तिचें उत्पन्न सर्वांहून जास्त म्हणजे प्रतिवर्षी ६ कोट रुपये आहे. त्यांतील शेंकडा ८० सभासद कॉंग्रेसानुयायी आहेत. ही संस्था फांशीं गेलेल्या राजकीय गुन्हेगारांच्या बद्दल सहानुभूतीचे व दुःखाचे ठराव पास करते, कॉर्पोरेशनच्या सरकारी गॅझेटांतून शक्य तों ठळक जागीं हे ठराव प्रसिद्ध करते आणि अशा रीतीने अशा अमानुष कृत्यांना उत्तेजन देते. अशा राक्षसी प्रकारास सुधारलेल्या जगांत दुसरीकडे कोठें तुलना आढळेल कीं नाहीं याची मला शंका आहे. कलकत्ता म्युनिसिपालिटीच्या गॅझेटच्या एका अंकाच्या मुखपृष्ठावरचा उतारा जसाच्या तसा खालीं देत आहे:—"पेरिशनची बैठक" दिनेशगुप्तास फांशीची शिक्षा. कॉर्पोरेशननें दाखविलेली सहानुभूति. बैठक तहकूब होते. कलकत्ता कॉर्पो-

रेशननें दिनेश गुप्ताच्या फांशीबद्दल दुःख प्रदर्शित केलें व आपली 'जुलईची बैठक तहकूब केली.' कॉर्पोरेशनची सभा भरली त्यावेळीं कौन्सिलर भूपेंद्रनाथ बानर्जी यांनीं पुढील ठराव मांडला.—'स्वतःचें ध्येय गांठण्याच्या प्रयत्नांत ज्यानें आपल्या प्राणाचा बळी दिला त्या दिनेश गुप्ताच्या फांशीबद्दल ही कॉर्पोरेशन आपलें दुःख नमूद करीत आहे.' सर्वजणांनीं उभे राहून या ठरावास मान्यता दिली. कौन्सिलर मदन मोहन बरमन यांच्या ठरावांप्रमाणें कॉर्पोरेशनची बैठक शुक्रवार, ता. १०जुलै पर्यंत तहकूब करण्यांत आली. मेयरसाहेबांनीं त्या ठरावास आपली अनुमति दर्शविली आणि मृताच्या धैर्याची आणि अढळ निष्ठेची प्रशंसा केली." यावरून मला दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीची आठवण होते. कलकत्ता कार्पोरेशननें चालविलेल्या, प्राथमिक शिक्षण फुकट देणाऱ्या पुष्कळ शाळा आहेत. त्या शाळांतून सुमारें वीस हजार मुलें शिक्षण घेत आहेत. व त्यांना सुमारें एक हजार शिक्षक शिक्षण देत आहेत. या शिक्षकांबद्दल जास्त बारकाईनें चौकशी केली तर असें आढळून येईल कीं, राजकीय चळवळीसंबंधांत ज्यांच्याबद्दल बळकट संशय घेतां येईल अशा लोकांतूनच हे शिक्षक बहुधा निवडलेले आहेत. या शाळेंतल्या मुलांना कसलें शिक्षण मिळत असेल हें कळून घेण्याची तुम्हांस उत्सुकता असेल.त्यांना ब्रिटिशांचा द्वेष करण्याचे धडे देण्यांत येतात. ज्या गाण्यांच्या रूपानें मुलांस धडे देण्यांत येतात त्यांपैकीं मी एकाचें नमुन्यादाखल भाषांतर करून दाखवितों. "एक, दोन, तीन होऊं दे स्वतंत्र, हिंदुस्थान. चार, पांच, छे—म्हणोरे 'गांधीजी की जय' (पंडीत मदन मोहन मालवीय. तथास्तु. मि. गझनवीः—मीसुद्धां 'तथास्तु'च म्हणतो)परंतु यापुढें माझा मतभेद आहे. "सात—आठ, नऊं, चलारे, निरोधना जाऊं." या ठिकाणीं मी 'तथास्तु' म्हणत नाहीं. माझा येथें मतभेद आहे. यानंतर सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे ब्रिटिशांचा द्वेष ही आहे. " दहा अकरा, बारा—साहिबां धरा, हल्ला करा"(पंडित मदन मोहन मालवीयः—अरेरे!) १९०६ सालीं सरकारनें पत्रकें काढून असें म्हटलें होतें कीं, पब्लिक सर्व्हिसेसमधील एक तृतीयांश नोकऱ्या मुसलमानांस मिळाव्या. याचीच उजळणी १९१४ व १९२५ मध्यें झाली. त्याचा परिणाम काय झाला? तीं पत्रकें आतांपर्यंत असून नसून सारखींच झालीं आहेत आणि त्यांतील शिफारशींची तर वाताहात झाली आहे. आतां पंचवीस वर्षांच्या कालावधीनंतर, पब्लिक सर्व्हिसेसमधील कांहीं शाखांतील मुसलमानांचें प्रमाण शेंकडा १ इतकें अल्प आहे; आणि बाकीच्या शाखांतून शेंकडा तीन व जास्तींत जास्त शेंकडा पांच आहे. थोडक्यांत म्हणजे, ब्रिटिश सरकारानें मुसलमानांची आजपर्यंत अगदीं आबाळ केली आहे. लॉर्ड मोर्ले यांची अशी कल्पना होती कीं, आम्हीं संयुक्त मतदारसंघाच्या पायावर चुरशीनें स्पर्धा करावी व १७ पैकीं शक्य तितक्या जागा पटकवाव्या. त्याचा परिणाम काय झाला? एका हिंदु उमेदवाराची अर्ज लिहिण्यांत चूक झाल्यामुळें केवळ योगायोगानेच एक जागा मुसलमानास मिळाली. त्याखेरीज कोणीही मुसलमान निवडून आला नाहीं.

श्री. तांबेः——१९०२ च्या करारानें निजाम सरकारचे जे हक्क मान्य केलेले आहेत किंवा जे इतर खास हक्क आहेत त्या हक्कांना बाध यावा असें मला सुचवावयाचें आहे असें मुळींच नाहीं. परंतु, सर अकबर हैदरींच्या विधानाच्या पूर्वभागांत जर कांहीं सूचित अर्थ भरलेला असेल तर मी असें स्पष्ट सांगतों कीं, दुसऱ्या कोणत्याही ब्रिटिश—इंडियन प्रान्ताहून वेगळी वागणूक झालेली वऱ्हाडकरांना मुळींच पसंत नाहीं.

महात्मा गांधीः——या बैठकींतील इतर सर्व पक्ष आपापल्या हितसंबंधाची बाजू उघड करण्यासाठीं येथें जमले आहेत; परंतु सबंध हिंदुस्थानचें आणि सर्व प्रकारच्या हितसंबंधाचें प्रतिनिधित्व एकट्या काँग्रेसकडे आहे. काँग्रेस ही जातिविषयक संस्था नाहीं.कोणत्याही स्वरूपांतील जातिसंबंधाचा काँग्रेस हा एक शत्रु आहे. काँग्रेसला जात, वर्ण किंवा संप्रदाय वगैरे संबंधीचे फरक माहीत नाहींत. तिचें क्षेत्र विश्वव्यापक आहे. काँग्रेसला असें दाखवितां आलें कीं, हातीं सैन्य नसतांना विपन्नावस्थेंतही सरकारच्या बरोबरीनें राज्यकारभार हांकणें हें एका स्वयंप्रेरणेने चाललेल्या संस्थेला शक्य आहे. मि. गझनवी यांनीं आपल्या भाषणांत क्रांतिकारक आणलें आणि त्यांनीं कलकत्ता कॉर्पोरेशनचा उल्लेख केला.परंतु जी चुकी मेयरसाहेबांनीं किंवा कॉर्पोरेशननें केली तिची त्यांनीं योग्य भरपाई केली हें सांगण्यास मात्र ते विसरले. मि. गझनवी यांनीं म्हणून दाखविलेल्या कविता जर कलकत्त्यांतील लहान मुलांना शिकविल्या जात असतील तर त्यांच्यातर्फे मी आपली माफी मागतों.परंतु शिक्षकांकडून मुलांना मिळणारे हे धडे, कॉर्पोरेशनच्या संमतीनें व उत्साहानें दिले जात होते असें मात्र

मला सिद्ध करून दाखवा. माझ्या देशबांधवांना आणि देशभगिनींना पूर्वीप्रमाणें स्वातंत्र्ययुद्ध सुरू ठेवावयास सांगावें ही मला कांहीं मोठ्या आनंदाची आणि समाधानाची गोष्ट वाटत नाहीं. परंतु असलें अग्निदिव्य जर पुन्हां करावेंच लागेल तर मात्र मी मोठ्या आनंदानें त्यांत भाग घेईन; आणि जें बरोबर वाटतें तेंच मी करीत आहें असें समाधान मला प्राप्त होईल. तुमच्या मतानें, या कॉन्फरन्सच्या मतानें वब्रिटिशांच्या मतानें,आपण उच्चारूं त्या शब्दांचे अर्थ जर एकच असतील तर, आपल्याला मिळतें घ्यावयाला हवी तेवढी संधि आहे. तुम्हांला असें दिसेल कीं कॉंग्रेस समेटासाठीं केव्हांही तयारच आहे. परंतु जोंपर्यंत आपलीं मनें एक नाहींत, त्याच शब्दांच्या व्याख्या भिन्न भिन्न आहेत, तुम्ही आणि मी जो एकच शब्द उच्चारूं त्याचे अर्थ दोघांच्या मनांत जोंपर्यंत निरनिराळे आहेत तों पर्यंत हें मिळतें घेणें अशक्य आहे. फेडरल कमिटीच्या एका बैठकींत मीं असेंही म्हटलें कीं, या संरक्षक योजना ग्रेटब्रिटनच्याही फायद्याच्या असावयास हव्या. फक्त हिंदुस्थानास हितकारक आणि ग्रेटब्रिटनच्या खऱ्या हिताकडे दुर्लक्ष करणाऱ्या संरक्षक योजना मला नकोत. म्हणून मी पुन्हां सांगतों कीं, जर एका शब्दाचे तेच अर्थ जर सर्वांच्या मनांत असतील तर या अधिवेशनांत बोललेले श्री. जयकर, सर तेजबहादूर सप्रू आणि इतर नामांकित वक्त्यांचें आणि माझें एकमत होईल.तर मग,एवढे श्रम करून कां होईना, अखेरीस आमच्यांत बरेंच जुळलें असें मी कबूल करीन. परंतु तुम्ही ज्या अर्थानें शब्द योजतां तो अर्थ मला मान्य नाहीं ही मोठी निराशेची आणि दुःखाची गोष्ट आहे. कोणत्याही मुत्सद्यास गोंधळून सोडतील असे प्रश्न आपल्यापुढें आहेत. इतर देशांपुढें ज्या अडचणी कधीं उभ्या राहिल्या नाहींत, अशा अडचणींतून आपल्याला मार्ग काढावयाचा आहे. परंतु या सर्व प्रश्नांमुळें मी गोंधळून गेलों नाहीं; हिंदी वातावरणांत जे लोक वाढले आहेत, त्यांना या प्रश्नांचा बाऊ वाटणार नाहीं. कॉंग्रेसच्या वतीनें मीं ज्या ज्या हक्कांची मागणी केली आहे त्याची पुनरावृत्ति मी येथें करीत नाहीं. त्यांत एक तसूभरही कमी करणार नाहीं; किंवा फेडरल स्ट्रक्चर कमिटींत मला जीं भाषणें करावीं लागलीं त्यांतील एक शब्दही मागें घेण्यास तयार नाहीं. तरीही मी समेट घडवून आणण्यासाठीं आलों आहें याबद्दल विश्वास असूं द्या. ब्रिटिश कल्पकतेला सुचेल तो प्रत्येक मसुदा मी विचारांत घेईन. मि. शास्त्री, सर तेजबहादूर सप्रू, श्री. जयकर, मि. जिना, सर महंमद शफी, यांच्यासारख्या व इतर अनेक राज्यघटनानिपुणांच्या कल्पकतेंतूनच ज्या ज्या योजना निघतील त्या प्रत्येकीकडे मी जरूर लक्ष पुरवीन.मी भांबावून जाणार नाहीं. माझा जितके दिवस उपयोग होण्यासारखा असेल तितके दिवस मी येथें राहीन, कायदेभंगाची चळवळ पुन्हां सुरू करण्याची माझी इच्छा नाहीं. मला, दिल्ली येथें झालेला समेट कायम स्वरूपाचा व्हावयास हवा आहे. परंतु कृपा करून ६२ वर्षें उलटून गेलेल्या व अस्थिपंजर झालेल्या माझ्यासारख्या माणसास थोडी संधि द्या. त्याच्यासाठीं आणि तो ज्या संस्थेचा प्रतिनिधि आहे त्या संस्थेसाठीं आपल्या हृदयाचा कोपरा मिळूं द्या. मीं इतरत्र जें काय म्हटलें आहे तेंच पुन्हां म्हणतों. जोंपर्यंत ही परसत्तेची पाचर एका समाजापासून दुसरा समाज आणि एका वर्गापासून दुसरा वर्ग यांची फाटाफूट करीत आहे, तोंपर्यंत या समाजांत टिकाऊ मैत्री राहणार नाहीं. कांहीं झालें तरी तें फार तर कागदी उत्तर ठरेल. परंतु तुम्हीं ही पाचर काढतांच प्रापंचिक बंधनें, प्रापंचिक प्रेम, समजन्माचें ज्ञान–यांना कांहींच अर्थ नाहीं काय? ग्रेट ब्रिटन आणि हिंदुस्थान यांचें नातें भागीदारीचें झालें आणि त्या दोघांपैकीं कोणाही एकास वाटेल तेव्हां तें नातें जर तोडून टाकतां आलें तर, आणि हिंदु, मुसलमान, शीख, युरोपियन, अँग्लो इंडियन, ख्रिश्चन, अस्पृश्य वगैरे सर्व सलोख्यानें व समान दर्जानें रहात असलेले तुम्हांस दिसतील तर, ग्रेटब्रिटन व हिंदुस्थानचे सध्याचे दुर्दैवी, कृत्रिम, आणि अस्वाभाविक संबंध स्वाभाविक होतील. हिंदुस्थानांत जे काय मिळायचें असेल व जेव्हां मिळायचें असेल तें मिळूं दे. परंतु वायव्य सरहद्द प्रांतास मात्र आजच संपूर्ण स्वायत्तता मिळूं दे. सबंध हिंदुस्थानला तो सरहद्द प्रांत म्हणजे एक मूर्तिमंत आदर्श होईल. आणि उद्यां, सरहद्द प्रांतास प्रांतिक स्वायत्तता द्यावी असें कॉंग्रेस आपलें मत देईल.

पंडीत मदन मोहन मालवीयः—चार हजार वर्षेपर्यंत आमच्या पूर्वजांनीं आमच्या देशावर राज्य केलें. तेथें इंग्रजांचा पाय पडण्यापूर्वी कितीतरी वर्षें आमच्या पूर्वजांची राज्यपद्धति इतकी चांगली होती कीं,तिची तुमच्या इतिहासकारांनीही प्रशंसा केली आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचा अंमल फक्त दीडशें वर्षांचा आहे आणि स्वराज्याची पात्रता तुमच्या अंगीं उरली नाहीं असें

कोणीं सांगितलें तर आम्हांस तें आवडत नाहीं. आजमितीस देखील एकतृतीयांश हिंदुस्थानभर हिंदी लोकांचेंच राज्य आहे. आणि बहुतेक संस्थानांसंबंधीं मला व्यक्तिशः माहिती असल्यामुळें मी असें म्हणूं शकतों कीं, हिंदी संस्थानांतील लोकांची स्थिति व ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति यांत फारसें अंतर नाहीं. मुख्य प्रधानसाहेब, तुम्ही स्वतः चला, लॉर्ड सँकी यांनींही चलावें. मि. बाल्डवीन आणि मि. लॉईड जॉर्ज यांनींही यावें. तुमचे मुख्य प्रधान व पूर्वीचे मुख्य प्रधान यांपैकीं तिघांनीं हिंदुस्थानला चलावें असें मी सुचवितों. लॉर्ड सँकी यांनीं यावें. कारण त्यांनीं गेले बारा महिने या प्रश्नाचा अभ्यास केला असल्यामुळें या बाबतींत आपणांस साहाय्य करण्यास तेच अतिशय समर्थ आहेत. तुम्ही तीन महिन्यांसाठीं हिंदुस्थानास चलावें असें मी सुचवितों. हे हिवाळ्याचे दिवस आहेत. डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यांत येथें रहावें असें वाटण्याजोगी एथील हवा कोणासही उत्तेजक वाटत नाहीं. या तीन महिन्यांच्या अवधींत इंग्लंडमधील सर्वांत मोठें असे तुम्हीं तिघेजण जर माझ्या उबदार देशांत आलां आणि बसून तुम्हांस जें काय ऐकायचें तें ऐकलें व जी काय चौकशी करावयाची असेल ती तुम्ही केली, तर तुम्ही परत याल त्यावेळीं तुमची खात्री पटलेली असेल कीं, कांहीं प्रदेशांत अंदाजापेक्षांही लवकर कायदा करणें सध्यांही शक्य आहे.

मि. शास्त्री––होय, महात्माजी, मुख्य प्रधानसाहेब सोडले तर, तुमचें कर्तव्य आतां आमच्यासंबंधीं आहे. तुम्हीं अतुल कीर्ति मिळविली आहे. तुम्ही लोकांवर छाप पाडतां ती अद्वितीय आहे. सर्व लोकांवर प्रभुत्व चालविणारी आणि त्यांची उन्नति करणारी तुमची दैवी शक्ति सर्व जगांत मान्यता पावली आहे. या थोर देणग्यांचा उपयोग देशाचें एकादे विधायक काम करण्याकडे करतां येणार नाहीं काय ? तुम्हांला आमचा थोडासा तरी उपयोग होईल. आम्हांला हातीं धरा. आमच्या कल्पना अजून वाढत आहेत. आणि काँग्रेसएवढें ज्ञान प्राप्त होण्यास आम्हांस बरीच काल लागेल असें समजूं नका. तुम्ही आणि तुमचे सहकारी यांच्याबरोबर आम्हांसही आपली राज्यपद्धति अत्यंत यशस्वी करून दाखवितां येईल आणि आपण आपले बेत बदलून येथें आलां याबद्दल हिंदुस्थान आपल्याला दुवाच देईल, याबद्दल मजवर विश्वास ठेवा. हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशाचें कार्य अनेक दिशांनीं करावयास हवें आहे. आपल्या लोकांच्या मुक्ततेसाठीं एकच मार्ग नाहीं; आणि देशभक्ति ही परिस्थित्यनुरूप निरनिराळे वेश आणि निरनिराळे मार्ग पत्करिते. आजची परिस्थिति अशी सांगते कीं, तुम्ही आपला कार्यक्रम बदला, तुमच्या मतांतून कायदेभंगाची चळवळ काढून टाका आणि आमच्यावर पूर्ण विश्वास टाकून आणि ब्रिटिश जनतेवरही श्रद्धा ठेवून हें काम हातीं घ्या. मला तुम्हांस एवढें सांगावयाचें आहे. मीं थोडाफार इतिहास वाचला आहे. ब्रिटिश लोक नेहमीं अन्याय करतात आणि ब्रिटिश लोक नेहमीं चुकीचा मार्ग आक्रमितात या माझ्या म्हणण्यावर तुम्ही विश्वास ठेवा. परंतु तसें झालें तरी कालांतरानें ते शुद्ध विचार बुद्धि, नेमस्तपणा आणि न्याय यांच्या मार्गावर येतात. सध्यांची त्यांची वृत्ति आपणांस वश करणारी व म्हणून प्रशंसनीय आहे. त्यांच्या या वृत्तीचा फायदा करून घ्या, कीं आपला विजय ठेवलेलाच.

फेडरल स्ट्रक्चर कमिटीतील भाषणें:––

१७ सप्टेंबर १९३१. महात्मा गांधी–– (१) या कमिटींत भाग घेतांना चित्ताला विषाद वाटतो. कारण सभासदांची यादी पाहिली तर असें दिसतें कीं, यथें लोकांनीं निवडलेले लोक जमले नसून सरकारनें निवडलेले लोक जमले आहेत. (२) कामाची पद्धत पाहातां वाटतें कीं, या पद्धतीनें चर्चा करण्यापलीकडे कांहींच हातीं येणार नाहीं. हें कांहीं चर्चामंडळ नव्हे. तेव्हां उत्तम मार्ग म्हणजे हा कीं सरकारनें आपला मसुदा पुढें मांडावा, कोठपर्यंत द्यायला ते तयार आहेत तें सांगावें व त्यावर बाद करावा. एरव्हीं वादास अंत नाहीं. सुंदर भाषणें ऐकण्यास आम्हांला वेळ नाहीं. आमचे उद्योग आम्हांला आहेतच. (३) कायदेमंडळाच्या उमेदवारीस कांहीं लायकीचे निर्बंध असावे. नैतिक वर्तनासंबंधीचे निर्बंध त्यावर असलेच पाहिजेत. मत सर्व सज्ञानांस असावें. संपत्ति, शिक्षण, दर्जा यांवर मताधिकार अवलंबून ठेवूं नये. माझी नवीन सूचना अशी आहे. वय वगैरे दृष्टीनें जवढे मतदार योग्य ठरतील तेवढ्या सगळ्यांचींच नांवें नोंदूं नयेत. ज्यांना मतें हवीं असतील त्यांनीं मागणी करून घ्यावीं. अशानें ज्यांना हक्क असूनही मत नको असेल त्यांवर तें लादलें जाणार नाहीं, व मतदारसंख्या अगदींच अवाच्या सवा मोठी होणार नाहीं. (४) अप्रत्यक्ष निवडणुकीच्या दोन तऱ्हा.–गांवकमिटींतील सभासदांनीं तालुका कमिटीचे सभासद निवडावे, तिनें जिल्हा–कमिटीचे, तिनें प्रांतिक

कमिटीचें व तिनें इंडिया कमिटीचें; किंवा प्रत्येक गांवचा एक प्रतिनिधि निवडावा व त्या सर्व प्रतिनिधींनीं कायदेमंडळांत पाठवावयाचे प्रतिनिधि निवडावे. (५) लोक प्रतीनिधींच्या दोन सभा असूं नयेत. लोकसभेला पायबंद घालण्यासाठीं वरिष्ठ सभा ठेवण्याइतका लोक-सभेवर माझा अविश्वास नाहीं. व दुसरें म्हणजे यामुळें खर्चांत खूपच बचत होईल. (६) हिंदु मुसलमान शीख यांना योग्य ठिकाणीं स्वतंत्र मतदारसंघ देऊन काँग्रेसनें तो प्रश्न सोडविला आहे त्याला कांहीं कारणें आहेत. पण **म्हणून** इतर कोणालाही तो मिळणार नाहीं. अस्पृश्य, मजूर, सरदार, युरोपीयन, ख्रिस्ती यांपैकीं कोणासही स्वतंत्र मतदारसंघाची जरूर नाहीं. (७) राजनिष्ठेच्या शपथेबद्दल मी आतांच मत देऊं शकत नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार असेल तर ही शपथ नैमित्तिक स्वरूपाची होईल. हिंदुस्थान परतंत्र रहाणार असेल तर मला त्यांत राहातांच येणार नाहीं. तेव्हां तो विचार सध्यां शक्य नाहीं. (८) सरकारनियुक्त सभासद लोकसभेंत मुळींच असूं नयेत. अडचण पडेल तेव्हां तज्ज्ञ बोलवावे. त्यांचा सल्ला घ्यावा, पण त्यास मत नसावें. एकादेवेळीं कदाचित् युरोपीय, मजूर, अस्पृश्य, स्त्रिया यांचा एकही सभासद निवडला न जाण्याचा संभव आहे. त्यासाठीं नॉमिनेशनची जरूर आहे असें वाटेल, पण तसें नाहीं. अशा वेळीं एक सवलत ठेवावी. कायदेमंडळांतील निवडून आलेल्या सभासदांनीं वरील वर्गापैकीं ज्यांचे प्रतिनिधि निवडून आले नसतील त्यांच्यासाठीं ज्यांचे जे पडलेले उमेदवार असतील त्यांतून स्वतः योग्य ते सभासद निवडावे.

काँग्रेसचा जाहीरनामाः—दिल्लीच्या तात्पुरत्या करारास आमची मान्यता आहे. पण त्यामुळें काँग्रेसच्या पूर्ण स्वराज्याच्या ध्येयास आडकाठीं येत नाहीं. ब्रिटिश प्रतिनिधींशीं काँग्रेसचें शिष्टमंडळ जेव्हां वाटाघाट करील तेव्हां त्या मंडळानें पूर्ण स्वराज्याचें ध्येयच पुढें ठेवलें पाहिजे. विशेषतः सैन्य, परराष्ट्रीय राजकारण, खजिना, आर्थिक धोरण यावर सत्ता, त्रयस्थाकडून इंग्लंड व हिंदुस्थान यांचें परस्परांचें देणेंघेणें ठरवून घेण्याचा अधिकार, ब्रिटिशांच्या करवीं होणाऱ्या हिंदुस्थानांतील आर्थिक घडामोडींची त्रयस्थाकडून तपासणी करून घेण्याचा अधिकार, व ब्रिटिशांचे संबंध केव्हांही तोडण्याचा अधिकार, या संबंधीं त्या शिष्टमंडळानें फार दक्ष असलें पाहिजे.

म. गांधीः—आम्ही ब्रिटिशांचे संबंध तोडूं इच्छितो असें कांहीं जणास वाटतें, पण तें चूक आहे. आम्हांस तो संबंध हवा आहे. पण तो पूर्ण बरोबरीचा असला पाहिजे. एके काळीं मला ब्रिटिश प्रजाजन असण्यांत अभिमान वाटे. पण आतां ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घेण्यापेक्षां बंडखोर म्हणून घेणें मला जास्त आवडेल.

सर महंमद शफीः—(१) लोअरचें बर मधील सभासदांची निवडणूक प्रत्यक्ष लोकांकडूनच व्हावी प्रांतिक कायदे मंडळाकडून होऊं नये. मात्र अपर चेंबर मधील सभासद प्रांतिक कौन्सिलरांनींच निवडावे. (२) निरनिराळ्या जाती खेरीज आणखी मजूर, ख्रिस्ती, अँग्लोइंडियन यांचेही स्वतंत्र मतदारसंघानें निवडलेले प्रतिनिधि कायदेमंडळांत असावेत. (३) अप्पर हाऊसच्या प्रतिनिधींचें वय तिसाखालीं नसावें. मालमत्तेच्या अटीसकट बाकीच्या सर्व चालू अटी उमेदवारावर असाव्या. (४) राजनिष्ठेच्या शपथेत दोन भाग आहेत. फेडरल घटनेसंबंधीं निष्ठा व राजासंबंधीं निष्ठा. पैकीं पहिलीस कोणाचाही विरोध नाहीं. दुसरीस संस्थानच्या प्रतिनिधींचा विरोध होण्याचा संभव आहे. पण वास्तविक संस्थानिक व सार्वभौम यांच्यावरील निष्ठेंत परस्परविरोधी कांहींच नाहीं. दोन्ही एकाच वेळीं असणें शक्य आहे. तेव्हां राजनिष्ठेच्या शपथेस कोणाचाही विरोध वास्तविक होऊं नये. (५) सरकारनियुक्त सभासद तज्ज्ञ सरकारनियुक्त असावे व बादशाहा प्रजेचा प्रतिनिधि असावा. माझीं वरील मतें अल्पसंख्याकांच्या कमिटींत जे निकाल होतील त्यास अगदीं अविरोधी अशाच दृष्टीनें पहावी. विरोध झाल्यास कमिटीचें मत मान्य. (६) मुसलमानांस मध्यवर्ती मंडळांत एक तृतीयांश प्रतिनिधि पाहिजेत.

सर तेजबहादूर सप्रू.—अपरहाऊस. ब्रिटिश इंडियाचे प्रतिनिधी प्रांतिक कौन्सिलरांनीं निवडावे. संस्थानिकांचे प्रतिनिधि त्यांनीं नेमावे. (२) लोअर चेंबरमध्यें ब्रिटिश इंडियाचे प्रतिनिधि लोकांनीं प्रत्यक्ष निवडलेले असावेत. संस्थानिकाचे प्रतिनिधि निदान म्युनिसिपालिटचा, कायदेकौन्सिलें यासारख्या लोकप्रतिनिधींच्या संस्थानांतील सभासदांनीं निवडलेले असावेत. राजा-महाराजांनीं नेमलेले असूं नये. (३) जातीशिवाय आणखी युरोपीय, अस्पृश्य, व्यापारी वगैरे हितसंबंधाचे स्वतंत्र प्रतिनिधि स्वतंत्रपणें निवडून कायदेमंडळांत यावे. (४) बादशाही प्रजेचे प्रतिनिधि

थोडके असले तर सरकारनियुक्त असावयास हरकत नाहीं.

फेडरल कायदेमंडळाची संख्या व घटना

बिकानेरचे महाराज—अपर हौसमध्यें २५० सभासद असावे पैकीं १२५ संस्थानिकांतर्फे, १२५ ब्रिटिश हिंदुस्थानतर्फे. लोअर हौसमध्यें ३५० सभासद असावे. त्यांत शें. ३३ पूर्णांक एक तृतीयांश संस्थानिकांचे व ६६ पूर्णांक दोन तृतीयांश इतर असावे. कांहीं संस्थानें कमी आलीं तरी जवळीं असतील तितक्यांनाच १२५ जागा वाटून द्याव्या.

सर अकबर हैदरी:—मध्यवर्ती एकच सभा असावी, दोन नसाव्यात. त्यांतील सभासद प्रांतिक सभासदांनींच निवडलेले असावे. ती शक्य तितकी लहान असावी. दोन सभा ठेवणेंच असेल तर दोन्हीं सभांत संस्थानिकांचे सारखेच प्रतिनिधि असावे.

तेजबहादूर सप्रू:—अपर हौसमध्यें संस्थानिकांना शेंकडा ४० प्रतिनिधि असावे. मग सर्व संख्या २५० किंवा ३०० चालेल. लोअरमध्यें ४०० ते ४५० असावे.

सुप्रीम कोर्ट

सर महंमद शफी:—१ सुप्रीम कोर्ट असावें. (२) संस्थानी व ब्रिटिश हायकोर्टावरचें अपील त्यांच्या पुढें चालावें. (३) फेडरल घटना व फेडरल घटक यांच्यामधील मतभेद प्रथमच त्यांच्यापुढें जावा. दुसऱ्या कोर्टास तो अधिकार नाहीं.

सर तेजबहादूर सप्रू:—(१) सुप्रीम कोर्ट असावें याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं. (२) संस्थानिकांनीं आपल्यांतील कांहीं बाबींचा अधिकार क्राउनकडे सोंपविला तर त्या अधिकारानें सम्राट हें सुप्रीम कोर्ट स्थापतील. (३) हिंदी संस्थानें व ब्रिटिश इंडिया यांमधील तंटा त्यांनीं तोडावा. (४) संस्थानिकांना यामुळें नाराज होण्याचें कारण नाहीं. कारण ही त्यांनींच निर्माण केलेली संस्था आहे. (५) फेडरल कायदा व घटनेचा कायदा यासंबंधींचे सर्व वाद प्रथम सुप्रीम कोर्टापुढें जातील. खाजगी व्यक्ति ज्या खटल्यांत असतील त्यांतसुद्धां घटनेच्या मूलतत्त्वाचा मुद्दा उपस्थित होत असेल तर त्यावर हायकोर्टानें फेडरल कोर्टाचें मत घेतलें पाहिजे. (६) फेडरल कायदा व घटना यासंबंधींचे सुप्रीम कोर्टाचे निकाल शेवटचे समजावे. त्यावर प्रीव्ही कौन्सिलकडे अपील असूं नये.

(७) महत्त्वाच्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टाचा सल्ला घेण्याचा ग. ज. ला अधिकार आहे. त्याचप्रमाणें कायदेमंडळानें संमत केलेला एकादा कायदा मूल घटनेलाच विरोधी आहे कीं काय हें त्या कायद्याला मंजुरी देण्यापूर्वी सुप्रीम कोर्टाला विचारण्याचा अधिकार ग. ज. ला देण्यांत यावा. (८) फारच महत्त्वाच्या तत्त्वाचा खटला असला किंवा त्यांत फार मोठी मालमत्ता गोविली गेली तरच सुप्रीम कोर्टावर प्रीव्ही कौन्सिलकडे अपील असावें.

महात्मा गांधी:— देशाचें संरक्षण आमचे हातांत आहे असें समजून मी बोलतों. एरवीं सुप्रीम कोर्टाच्या अधिकाराबद्दल बोलण्यांत अर्थ नाहीं. कारण त्याचे हुकूम अमलांत कोण आणणार? (१) सुप्रीम कोर्ट असावे. (२) पण त्याच्यावर कोठेंच, कोणत्याही बाबतींत अपील असूं नये. प्रीव्ही कौन्सिल आमचे आम्ही उभारूं तरच स्वातंत्र्य याला अर्थ आहे. एरवी नाहीं. (३) या सुप्रीम कोर्टाच्या सत्तला मर्यादा नसावी. संस्थानांच्या सर्व खटल्यांचा निकाल येथेंच झाला पाहिजे. (३) हें सुप्रीम कोर्ट आम्हीं नेमावयाचें आहे. सम्राटांनीं नाहीं. प्रत्येक वेळीं सम्राट मध्यें कशाला?

मिर्झा इस्माइलखान:—संस्थानिकांतर्फे (१) सुप्रीम कोर्ट असावें. (२) आपल्या सत्तेचा सुप्रीमकोर्टामुळें अंशमात्रही कमी होऊं नये अशी संस्थानिकांची इच्छा आहे. म्हणून सुप्रीमकोर्टाला जें अधिकारपद मिळावयाचें तें केवळ सम्राटाकडून न मिळतां संस्थानिकांकडूनही मिळावें. (३) फेडरल कायदा व घटना याबद्दलचे सर्व वाद त्यांनीं मिटवावे. पण (अ) फेडरल बाबतींतही ब्रिटिश इंडिया व संस्थान यांमधील तंटा तोडण्याचा अधिकार या कोर्टाला द्यावयास हरकत नाहीं. (४) याचे न्यायाधीश सम्राटानें नमावे. (५) संस्थानी व प्रांतिक हायकोर्टावरचें अपील या कोर्टापुढें चालावें. (६) सुप्रीम कोर्टावर संस्थानिकांच्या प्रश्नापुरतें तरी प्रीव्ही कौन्सिलकडे अपील आणूं नये. कारण प्रीव्ही कौन्सिलच्या निर्मितींत संस्थानिकांचा कांहींच हात नाहीं.

बिकानेर:—मिर्झा साहेबांपेक्षां जास्त मला कांहींच सांगावयाचें नाहीं. त्यांनीं सांगितल्या बाहेर मात्र सुप्रीम कोर्टाला कांहींच अधिकार असूं नये. म्हणजे संस्थानच्या अंतर्गत अधिराज्यांत त्याचा हात मुळींच शिरकतां कामा नये.

सर अकबर हैदरी:— (१) न्यायाधीश बादशहांनीं नेमावे. (२) फेडरल कायदा व घटना यांसंबंधींचे वाद त्यांच्यापुढें जावे. पण बादशहाशीं जे संस्थानिकांचे तह-

नामे झाले आहेत त्यांच्या बाबतींत या कोर्टाला मुळींच अधिकार असूं नये. (३) खाजगी व्यक्ति ज्या वादांत असतील त्यांत तत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले तर, सर सप्रू म्हणतात त्याप्रमाणें न्यायाधिशांनीं त्या मुद्यापुरता निवाडा फडरल कोर्टाकडून मागवावा.

म. गांधी:—(१) भावी स्वराज्यांतील युरोपियन लोकांच्या हक्कासंबंधीं हिंदी लोकांप्रमाणेंच युरोपियन लोकांना व्यापारी सवलती मिळाव्या अशी मागणी आहे. ती आम्हांस मान्य करतां येत नाहीं. भावी राज्यांत उच्च वर्गानें भांडवलशाहीनें व ब्रिटिश जुलमानें सध्यां जे लोक रसातळास गेले आहेत त्यांना प्रथम सवलती दिल्या जातील. त्यासाठीं श्रीमंतावर कर पडेल. तसाच युरोपीय लोकांनाही पडेल. मी एवढें आश्वासन देऊं शकतों कीं, जन्मानें युरोपीय एवढ्याच कारणासाठीं कोणाचीही कसलीही कुचंबणा होणार नाहीं. (२) गुन्हेगारांच्या चौकशीसंबंधाच्या सध्यां युरोपीयांस मिळत असलेल्या सवलती चालू राहाव्या अशी त्यांची दुसरी मागणी आहे. तीही पण आम्हांस अमान्य आहे. एकमेकांच्या विश्वासावर पुढील स्वराज्य उभारावयाचें आहे. तेव्हां आपल्या विशेष हक्कांच्या संरक्षणासंबंधींची कल्पना युरोपीयांनीं मनांतून काढून टाकावी. अशीं संरक्षणें आम्ही कबूल करूं लागलों तर आम्हांस मिळणारें स्वातंत्र्य तुरुंगांतील कैद्यांच्या स्वातंत्र्याइतकेंच स्पृहणीय होईल.

महात्मा गांधी—प्रांतिक स्वराज्य, मध्यवर्ती सत्तेचा अंशही न देतां प्रांतिक स्वराज्य द्यावें असें आपण सुचवितां. मला हें मान्य करतां यत नाहीं. कारण त्यांत कांहींच अर्थ नाहीं. सन्य व खजिना यांवर आम्हांस सत्ता पाहिजे आहे. ती तुम्ही देत नाहीं. माझी सहकारितां संपली. देशीं जाऊन माझ्या लोकांना फिरून एकदां खडतर तपश्चर्येचा मार्ग स्वीकारण्यास सांगणें मला भाग आहे. कलकत्त्याच्या रस्त्यांतून सन्य फिरवून तुम्ही आपल्या पाशवी सत्तेचें प्रदर्शन करून माझ्या लोकांना भिवविण्याचा प्रयत्न करीत आहां. पण त्याचा काडीचाही उपयोग होणार नाहीं. गोळ्याच्या भडिमारांतही शांतपणें कसें खेळावें हें आम्हीं आमच्या मुलांस शिकविलें आहे. तीं यानें भिऊन तर जाणार नाहींतच, पण इंग्रजी वेडगळपणाला हंसतील मात्र. स्वातंत्र्याच्या मार्गाला लागलेल्या कोणच्याही देशाला जुलूम थांबवूं शकत नाहीं. जोंपर्यंत अनत्याचाराचें व्रत कॉंग्रेसनें सोडलें नाहीं तोंपर्यंत मला तुमची मुळींच दिक्कत वाटत नाहीं. निराश तर मी मुळींच झालों नाहीं.

महात्मा गांधी:—खजिन्यावरील बंधनें. तुम्हीं सुचविलेलीं बंधनें आम्हांस मान्य नाहींत. परकीयांनीं हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं हिंदुस्थानांत जें भांडवल घातलें त्याचें संरक्षण झालें पाहिजे असें तुम्ही म्हणतां. मी एकदांच सांगून ठेवतों कीं, न्याय्य असें जें देणें असेल ते पै न् पै फेडण्याची भावी राष्ट्रीय सरकार काळजी घेईल. पण त्रयस्थांची एक कमिटी नेमून तसें देणें कोणचें तें ठरविलें पाहिजे. ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत घातलेलें भांडवल, हिं. सरकारनें काढलेलें कर्ज हें हिंदुस्थानच्या हितासाठीं कधींच नव्हतें. अफगाणिस्थानच्या युद्धानें हिंदुस्थानचा कोणचा फायदा झाला? तसेंच रुपयाचा भाव अठरा पेन्स करतांना हिंदुस्थानचें कोणतें हित तुम्हीं पाहिलें? दादाभाई नौरोजींनीं आम्हांस मागेंच पटवून दिलें आहे कीं, हिंदुस्थानच्या तिजोरीच्या बाबतींत नुसतां गोंधळ आणि घोटाळा आहे. तेव्हां असें असल्यामुळें तिजोरी आमच्याच ताब्यांत पाहिजे. तुमचे लोक फडणिशीच्या कसबांत जास्त हुषार आहेत. पण ती हुषारी आमच्या उपयोगी पडत नाहीं. आमची गरीब प्रजा शेतकरी. यांच्या हितासाठीं त्या हुषारीचा उपयोग होत नाहीं, होणें शक्य नाहीं म्हणून आमचा खजिना आमच्याच ताब्यांत पाहिजे.

गोलमेज परिषद:—दुसरी बैठक अल्पसंख्याकांची कमिटी—मतें:—

डॉ. मुन्जे:—(हिंदुमहासभेचें मत). जातवार प्रतिनिधि देण्याचें तत्त्व राष्ट्रीयत्वास विघातक आहे म्हणून प्रत्येक प्रांतांत सर्व जातींना सारखाच मताधिकार असावा. मतदारसंघ मिश्र असावा. कोणच्याच मंडळांत राखीव जागा नसाव्या. फार तर कायदेमंडळांत आरंभीं थोडे दिवस अगदीं लहान जातीला थोड्या राखीव जागा द्याव्यात. सर्व जातींत मताधिकार एकच तत्त्वावर अवलंबून ठेवावा. प्रांतांची पुनर्रचना करावयाची असल्यास सर्वमान्य तत्त्वावर करावी. एकाद्या विशिष्ट जातीला बहुमत मिळेल असा यत्न करूं नये. म्हणून सिंधविभागणीस सभेचा विरोध आहे. मध्यवर्ती किंवा प्रांतिक प्रधानमंडळांत कांहीं मुसलमान असलेच पाहिजेत, ही मागणी अमान्य आहे. सर्वांना सारखेंच धर्ममत—स्वातंत्र्य असावें. अगदींच जिकीर असेल तर मुसलमानासाठीं म्हणून आम्ही लखनौ करार मान्य करूं. पण मुख्य गोष्ट अशी कीं, मुसल-

मान हीं अल्पसंख्य जमात मुळींच नाहीं. तेव्हां त्यांना सवलत देणें अयुक्त आहे.हिंदु-मुसलमानांचा प्रश्न कांहीं त्रयस्थांकडे किंवा राष्ट्रसंघाकडे सोंपविण्यास सभा तयार आहे. नागरिकत्वाचे व अर्थविषयक असे विशिष्ट जातींसाठीं असलेले निरनिराळे कायदे रद्द व्हावे.

अल्पसंख्याकांना सवलतीं देण्याबाबतींत पुढील उद्गार विचारणीय आहेत. श्री. डे ड्रामिस, राष्ट्रसंघांतील ग्रीक प्रतिनिधि 'अल्पसंख्याकांशीं ठराव करणाऱ्यांच्या मनांत विशेष हक्क असलेला एक गट राष्ट्रांत निर्माण करावा असा मुळींच हेतु नव्हता. अल्पत्वामुळें येणाऱ्या उणीवा नाहींशा व्हाव्या या हेतूनें सवलतीं दिल्या आहेत. अल्पसंख्याकांना जास्त हक्क दिले तर उद्यां बहुसंख्यांकानाच जाच होऊन त्यांना राष्ट्रसंघाकडे यावें लागेल.' राष्ट्रसंघांतील या विषयावरचे एक तज्ज्ञ म्हणतात, 'अल्पसंख्यांकांना विशेष हक्क दिल्यानें त्यांना सर्व जातींतून तोडून काढून कायमचे परकीं ठेवल्यासारखे होतें. ते सर्व राष्ट्राशीं एकजीव कधींच होत नाहींत. व राष्ट्रांत एक घातक तत्त्व शिरतें.'

डॉ. भीमराव आंबेडकरः--(१) अस्पृश्य लोकांसाठीं खास प्रतिनिधि असावे.बंगाल, मध्यप्रांत, आसाम, बिहार,ओरिसा,पंजाब व संयुक्त प्रांत या प्रांतांत संख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधि पाहिजेत. मद्रासमध्यें शें.बावीस व मुंबईत शें.सोळा प्रतिनिधि पाहिजेत. सिंधविभागणी झाल्यास मुंबईंत मुसलमानांइतके प्रतिनिधि हवे. (२)मध्यवर्ती कायदेमंडळांत संख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधि पाहिजत. (३) सायमन कमिशननें दिलेली लोकसंख्या व सध्यां आहे ही प्रांतांची रचना या जमेस धरून व सर्व हिंदुस्थानचे फेडरल लेजिस्लेचर होणार असें समजून आम्ही या मागण्या करीत आहों. वरील गोष्टींत बदल झाला तर आम्हांसही बदल करावा लागेल. (४) अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजे. मध्यवर्ती मंडळाचीं निवडणूक प्रांतिक मंडळांच्या सभासदांच्या द्वारां व्हावयाची असेल तर तेवढ्यापुरता स्वतंत्र मतदारसंघ नसला तरी चालेल. मात्र मध्यवर्ती मंडळांत संख्येच्या –प्रमाणांत जागा मिळाल्याच पाहिजेत. (५) पुढील अटींवर आम्ही संयुक्त मतदार संघास तयार होऊं. 'या प्रश्नासंबंधीं आमच्या मतदारसंघांतील प्रत्येकाचें मत घ्यावें' अशी मागणी कायदेमंडळांतील आमच्या प्रतिनिधींनीं बहुमतानें केली व त्या विचारणेप्रमाणें मतदारसंघानें फार मोठ्या बहुमतानें संयुक्त मतदार संघास संमति दिली, तर तो अमलांत यावा. पण मतदार संघाची अशी संमति आणखी वीस वर्षेपर्यंत व प्रत्येक सज्ञानास मताधिकार मिळाल्यावांचून विचारूंच नये. (६) दलित वर्गाचे स्वतंत्र प्रतिनिधि दलित वर्गांतीलच असले पाहिजेत व त्यासाठीं दलित वर्ग कोणचे याची स्पष्ट व्याख्या करून त्या जातींची यादी तयार करावी. अस्पृश्यता ही दलितांची मुख्य खूण आहे. (७) या वर्गास सध्यां दिलेलें दलितवर्ग हें नांव आम्हांस कमीपणाचें वाटतें. 'जातिबाह्य हिंदु' किंवा 'व्रात्य हिंदु' (Noncaste Hindus Protestant Hindus, Non-conformist Hindus.) असें कांहीं तरी नांव या वर्गास मिळावें. आमच्या या मसुद्यास पुष्टि देण्यासाठीं दलित वर्गांतील लोकांच्या हिंदुस्थानांतून पुष्कळ तारा आल्या आहेत.

अल्पसंख्याकांचे संबंधांत गांधींचें मत

(१) प्रत्येक जातीची संस्कृति, राजकीय हक्कपरंपरा, भाषा वगैरे सर्व संभाळले जाईल अशी आम्ही ग्वाही देतों. (२) सर्व सज्ञान स्त्री–पुरुषांना मताधिकार असावा. (३) संयुक्त मतदारसंघ असावा. १ सिंधमधील हिंदु, आसामांतील मुसलमान, पंजाब व वायव्यप्रांतांतील शीख यांस, व इतरत्रही जेथें हिंदु व मुसलमान शें.पंचवीस पेक्षां कमी असतील तेथें त्यांस प्रांतिक व फेडरल कायदेमंडळांत लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधि मिळावे व शिवाय आणखी जागा मिळण्याचाही त्यास हक्क राहावा. (४) खर्च झेपत असेल तर सिंध वेगळा करावा. (५) वायव्यप्रांत व बलुचिस्तान ह्यांची व्यवस्था इतर प्रांतांप्रमाणें असावी.

हिंदी ख्रिस्ती यांच्यातर्फे--

रावबहादूर ए. टी. पन्नर सेल्वम (१) वंश, जाति, धर्म, लिंग–निरपेक्ष प्रत्येक मनुष्यास स्वतःचें मत सांगण्याचा व त्यांस दुसऱ्यांचीं मतें वळवून न्याय्य मार्गांनीं धर्मांतरास प्रवृत्त करण्याचा हक्क असला पाहिजे. (२) धर्मांतरामुळें कोणासही शिक्षा होऊं नये वा त्याचे मूळचे हक्क जावूं नयेत. (३) हिंदु,मुसलमान व शीख हे जेथें अल्पसंख्याक असतील तेथें त्यांस संख्याप्रमाण जागा कांग्रेसनें दिल्या आहेत. तशाच ख्रिस्त्यांसही मिळाल्या पाहिजेत.

मुसलमान, दलितवर्ग, हिंदी–ख्रिस्ती–अंग्लोइंडियन्स, व युरोपियन्स या सर्वांच्या प्रतिनिधींचें जातिविषयक प्रश्नावर एकत्र कथन–

(१) धर्म, जाति, वंश, मतें यासाठीं कोणाच्याही कसल्याही हक्कास बाध येऊं नये. (२) अल्पसंख्याक जातींना अहितकारक कायदे कायदेमंडळाकडून होऊं नयेत म्हणून घटनेच्या कायद्यांतच त्यांस संरक्षक अशीं कलमें घालून ठेवावीं. (३) शांतता व नीतिमत्ता यास बाध न येईल अशा बेतानें सर्वांस धार्मिक स्वातंत्र्य दिलें जावें. (४) अल्पसंख्याकांची संस्कृति, धर्म, शिक्षण यांस योग्य तीं संरक्षणें कायद्यांत असावीं. (५) प्रांतिक व मध्यवर्ती प्रधानमंडळांत मुसलमानांचे व इतर अल्पसंख्याकांचे प्रतिनिधि घेण्याची रूढी बाढावी. (६) प्रत्येक प्रांतांत एक पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमावें व त्यांनीं योग्यतेनुरूप निवड करावी. पण ती करतांना सर्व वर्गांतून माणसें निवडण्याकडे लक्ष ठेवावें. (७) कायदेमंडळानें पास केलेला एकादा ठराव जर जनतेच्या मूलभूत हक्काला, किंवा एकाद्या जातीच्या धार्मिक स्वातंत्र्याला, त्या जातीच्या दोन तृतीयांश प्रतिनिधींच्या मतें बाध आणीत असेल तर त्यानीं अध्यक्षांकडे एक महिन्याचे आंत तक्रार गुदरावी. अध्यक्षांनीं तो ठराव गव्हर्नर वा ग. जनरलकडे पाठवावा. त्यांनीं ठरावाचा अंमल एक वर्ष तहकूब करून तो फेरविचारासाठीं कायदेमंडळाकडे पाठवावा. नंतरही मंडळानें तो दुरुस्त करण्याचें नाकारलें तर मग गव्हर्नरानें आपल्याबुद्धिप्रमाणें त्यास संमति द्यावी वा देऊं नये. पण नंतरही त्या त्या जातींना आपल्या मूलभूत हक्कांना बाध आल्याच्या सबबीवर सुप्रीम कोर्टांत त्या ठरावाच्या न्यायतेवर आक्षेप घेतां यावा.

मुसलमानांच्या खास मागण्या—

(१) वायव्यप्रांत गव्हर्नरच्या प्रांतासारखा करावा. (२) प्रांतिक कायदेमंडळांत सरकारनें नेमलेले लोक शें. दहावर नसावे. (३) सिंध वेगळा करून गव्हर्नरचा प्रांत करावा. (४) मध्यवर्ती कायदेमंडळांत मुसलमानांचे एक तृतीयांश प्रतिनिधि असावेत.

दलितवर्गाच्या खास मागण्या—

(१) एकाद्या चालीमुळें किंवा रूढीमुळें एकाद्या व्यक्तीबद्दल भेदभाव निर्माण होऊन किंवा तिला तोटा अगर दंड सोसावा लागून तिच्या नागरिकत्वाच्या हक्कावरच बाध येत असेल तर ती कायदे मंडळानें रद्द ठरवावी. (२) पब्लिक सर्व्हिस, पोलीस, लष्कर यांत भरती करतांना दलितांकडे उदार दृष्टि असावी. (३) पंजाबांतील दलितवर्गाला पंजाबलँड अलिनिएशन अॅक्टचा फायदा मिळावा. (४) एकाद्या अधिकाऱ्यानें दलितांसंबंधी हलगर्जीपणा केला किंवा आकसाचें कृत्य केलें तर गव्हर्नर किंवा ग. जनरल यांचेकडे अर्ज करण्याचा त्यांना हक्क असावा.

अँग्लो इंडियनांच्या खास मागण्या:—

(१) आठ नंबरच्या सर्व्हिसेस-पोटकमिटीनें मान्य केलेल्या हक्कांचा सवलतीनें अर्थ करून व आमच्या समाजाच्या विशिष्ट दर्जाकडे लक्ष देऊन आमच्या उच्च राहणीसाठीं, आम्हांस पब्लिक एम्प्लॉयमेंटमध्यें खास सवलती मिळाव्या. (२) आमच्या शिक्षण–संस्था स्वतंत्रपणें युरोपीय वळणावर चालविण्याचा हक्क आम्हांस असावा. अर्थात शिक्षणमंत्र्याच्या हुकमतीखालींच हें सर्व व्हावें. (३) औरसपणा किंवा कुल हें सिद्ध करण्याच्या आवश्यकतेची अट न घालतां इतर हिंदी जातींप्रमाणेंच ज्यूरींसंबंधींचे सर्व हक्क आम्हांस मिळावे

युरोपियांच्या खास मागण्या:—

(१) हिंदी नागरिकांप्रमाणेंच व्यापाराच्या व औद्योगिक बाबतींत आम्हांस हक्क असावे. (२) गुन्हेगारांच्या चौकशीचे सध्याचे हक्कच आम्हांला मिळावे व त्यांत ग. जनरलच्या संमतीवाचून बदल होऊं नये.

अँग्लो इंडियन:— सर हेन्रि गिडने यांच्या बहुतेक सुचना संयुक्त पत्रकांत आल्याच आहेत. न आलेल्या पुढें दिल्या आहेत. (१) फेडरल प्रधानमंडळांत सर्व अल्पसंख्य जातींचा मिळून व अल्पसंख्य जातींतून निवडलेला एक मंत्री असावा व दोन पार्लमेंटरी अंडरसेक्रेटरी असावे. (२) प्रांतिक प्रधानमंडळांत मात्र पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी एकच असावा.

पंजाबांतील अल्पसंख्य हिंदू:— राजा नरेंद्रनाथ:— स्वतंत्र मतदारसंघ हा अल्पसंख्याकास घातक होय असें हिंदूंचें मत आहे. पण सध्याच्या घटनेंत स्वतंत्र मतदारसंघ जर मान्य झाला व पांचवर्षांपेक्षां जास्त तो टिकणार असला तर घटनेमध्यें पुढील कलम घालावें असें आम्ही म्हणतों. (२) एकाद्या लोकनियुक्त संस्थेंत दोन अल्पसंख्य जातींच्या दोन तृतीयांश प्रतिनिधींनीं, त्या दोन्हीं जातींचे स्वतंत्र मतदार एक करून टाकावे असा ठराव पास केला किंवा सरकारकडे मागणी केली व त्या मागणीस वा ठरावास त्या त्या जातींतील दोनतृतीयांश लोकांचें पाठबळ असलें तर दोहींचे मतदार एकत्र करून टाकावे. (२) एकाद्या लोकनियुक्त संस्थेंतील एकाद्या अल्पसंख्य जातीच्या

प्रतिनिधींनीं आपल्या जातीचे मतदार दुसऱ्या एकाद्या बहुसंख्य जातीशीं एक करून टाकावे असा ठराव केला किंवा सरकारकडे मागणी केली व त्या ठरावास किंवा मागणीस त्या जातीच्या दोन-तृतीयांश लोकांची अनुमति असली तर तसें करावें (३) दोन्ही बाबतींत हा फरक पुढील निवड-णुकीच्या वेळीं करण्यांत यावा. (४) पंजाबांतील युरोपियन, ख्रिस्ती व दलित यांना स्वतंत्र मतदार संघ हवे असले तरी आमची हरकत नाहीं. मात्र माझ्या माहितीप्रमाणें त्यांनाच नको आहेत. (५) पंजाबांतील हिंदूंना मध्यवर्ती व प्रांतिक कायदे-मंडळांत राखीव जागा पाहिजेत. सायमन रिपो-र्टांत दिलेली पंजाबांतील अस्पृश्यांची संख्या आज चूक आहे. त्यानंतर मुसलमान १९ लक्षांनीं व शीख ८ लक्षांनीं वाढले आहेत. या दोन्ही जातींनीं अस्पृश्यांतलेच लोक घेतले आहेत. अल्पसंख्या-कांची पब्लिक सर्व्हिसच्या बाबतींत मागणी अशी आहे कीं, कार्यक्षमतेच्या व शिक्ष-णाच्या कांहीं किमान मर्यादा ठरवून त्यानंतर सर्व जातींना योग्य हिस्सा मिळण्याची व्यवस्था व्हावी पण कार्यक्षमता पाहावी व जातीकडे पाहावें हें परस्पर विरुद्ध व घातुक आहे. योग्यतेप्रमाणें जागा द्याव्या. आरंभीं आरंभीं अल्पसंख्याकांच्या साठीं कांहीं प्रमाणांत नोकऱ्या राखून ठेवाव्या म्हणजे झालें.

सर चिमणलाल सेटलवाड:—वास्त-विक निरनिराळ्या वर्गांमध्यें जितकें दुमत आहे असें दाखविण्यांत येत आहे तितकें मुळींच नाहीं. पुष्कळशा मुद्यावर एक्यमत्यच दिसून येत आहे. मध्यवर्ती मंडळांत एकतृतीयांश प्रतिनिधी व सिंध, वायव्यप्रांत, यासंबंधाच्या मुसलमानांच्या मागण्या या बाबी बहुतेक मान्य झाल्याच आहेत. मुख्य वाद दोन मुद्यांवर आहे. (१) संयुक्त कीं विभक्त मतदारसंघ व (२) पंजाब व बंगाल येथील प्रांतिक मंडळांतील, जागांची वाटणी. पहिल्या बाबतींत मला वाटतें कीं सर्व वर्गांना संयुक्त मतदार संघच हितकारक आहेत. कारण एकदा धर्म, संस्कृति, शिक्षण, रूढी, यांबद्दलचीं संरक्षणें घटनेंतच नमूद केलीं म्हणजे मग भय रहात नाहीं, तरी पण मुसल-मानांना विभक्त मतदारसंघ हवाच असेल तर त्यांच्यावर बळजबरी करणें अन्यायाचें आहे.त्यांना तो द्यावा. मात्र त्यांच्या पैकीं ज्यांना संयुक्त मत-दारसंघांत यावयाचें असेल त्यांना येऊं द्यावें. (३) पंजाब व बंगालमधील प्रांतिक मंडळांतील जागेच्या वाटणीसंबंधीं मुख्य प्रधानांचा निकाल सर्वांनीं मान्य करावा.

दुसरी गोलमेज परिषद बरखास्त करतांना मुख्य प्रधानांनीं १-१२-३१ला केलेल्या भाषणाचा सारांश:—

जानेवारी १९३१ मध्यें जाहीर केलेल्या सर-कारी धोरणास हल्लीचें प्रधान मंडळ आपला पूर्ण पाठिंबा देत आहे. विशेषत: हिंदी फेडरेशनच्या कल्पनेमुळेंच हिंदुस्थानच्या राजकीय घटनेचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटेल असा प्रधान-मंडळाला दृढ विश्वास वाटत आहे.

अजून सर्व बाबतींत मतैक्य झालेलें नाहीं फेडरल कायदेमंडळाची घटना व अधिकार, अल्प-संख्याकांचें संरक्षण, फेडरल कार्यकारी मंडळ व फेडरल कायदेमंडळ यांचे संबंध, संस्थानिकांचें फेडरेशनमध्यें स्थान व परस्पर संबंध,हे प्रश्न अजून अनिर्णित अवस्थेमध्यें आहेत.

पण दोन गोष्टी निश्चित आहेत.जबाबदारीची संयुक्त राज्यघटना (संक्रमणावस्थेंतील कांहीं संरक्षक अटीसह) व संपूर्ण प्रांतिक स्वायत्तता, यापैकीं पहिली योजना शक्य तितक्या तांतडीनें आंखण्याचा आमचा निश्चय आहे. पण फेडरेशन म्हणजे कांहीं १।२ महिन्यांत अमलांत येणारी गोष्ट नव्हे. प्रांतिक स्वायत्तता लवकर अमलांत आणणें जास्त सोपें आहे. व मध्यंतरी वायव्य सर हद्द प्रांताला इतर गव्हर्नरच्या प्रांतांचा दर्जा देण्याचा आमचा निश्चय आहे. पण राजकीय प्रग-तीच्या मार्गांत एक मोठी धोंड आडवी येत आहे. ती म्हणजे जातिविषयक निर्णय या परिषदेनें दोनदा प्रयत्न केले, पण निकाल लागला नाहीं. अशा परिस्थितींत अल्प संख्याक जातींना संर-क्षण देण्यासाठीं सार्वभौम सरकारला एक तात्पु-रती योजना आखणें भाग पडेल. ती समाधान-कारक होणारच नाहीं. तरी पुन्हां तुम्ही तडजोडी-चे प्रयत्न करून या प्रश्नाचा आपआपसांतच निकाल लावावा अशी माझी विनंति आहे.

या दोन परिषदानंतर आपण कांहीं विशिष्ट प्रश्नांच्या चर्चेपर्यंत येऊन ठेपलों आहों. ती चर्चा खोल व सविस्तर झाली पाहिजे, व ती एवढ्या अवाढव्य परिषदांनीं तशी होणार नाहीं. लेखी,लांबलांब भाषणें करून खरा व्यवहार्य विचा-रविनिमय होणें शक्य नाहीं. म्हणून त्याकरितां एक निराळीच योजना केली पाहिजे. पण इकडे चर्चा चालू असतां व निर्णय होत असतां, आम्हांस तुमचा सल्ला वेळोवेळीं पाहिजे म्हणून

तुमच्या संमतीनें एक प्रातिनिधिक सल्लागार कमिटी हिंदुस्थानांत नेमण्याचा माझा विचार आहे. व्हाइसरॉयमार्फत आम्हांस या कमिटीशीं विचारविनिमय करतां येईल. या रीतीनेंच हिंदुस्थानची राज्यघटना लवकर, परिणामकारक रीतीनें व शास्त्रीय पद्धतीनें उभारतां येईल असें सरकारला वाटत आहे. म्हणून आम्ही परिषदेच्या शिफारशीवरूनच कमिटया नेमणार आहों.त्यांचीं कामें:—

(१) मतदानाचा हक्क व मतदार संघ यांच्या सुधारणेबाबत चौकशी करणें व सल्ला देणें. (२) फेडरल फिनान्स कमिटयांच्या शिफारशी अंदाजपत्रकांतील आंकडयांच्या कोष्टकवारींत बसतात कीं नाहीं हें पाहणें. (३) कांहीं विशिष्ट संस्थानांचे बाबतींतील आर्थिक प्रश्नांची जास्त छाननी करणें या कमिटयांचे अध्यक्षस्थानीं इंग्लंडमधील सुसुप्रसिद्ध कार्यकर्ते नेमले जातील व कमिटया नवीन वर्षारंभींच हिंदुस्थानांत कामास सुरुवात करतील. फेडरल स्ट्रक्चर कमिटीच्या तिसऱ्या रिपोर्टांतील २६ व्या पॅऱ्याकडे सरकारचें लक्ष आहे. व कायदेमंडळांतील संस्थानचे प्रतिनिधींची संस्थानासंस्थानांत कशी वांटणी करावी, हा प्रश्न सोडविण्यास संस्थानिकांस वेळ लागला,तर सरकार योग्य उपाय योजून तो प्रश्न सोडवील, व तेवढयाकरतां व्यर्थ वेळ दवडू देणार नाहीं. जातिविषयक प्रश्न सोडवून जातींना कायदेमंडळांत प्रातिनिधिक्य दिलें तरी जन्मसिद्ध हक्कांचा प्रश्न राहतोच. म्हणूनच राज्यघटनेच्या मसुद्यांत अशा अटी पाहिजेत कीं,ज्यायोगें सर्व जातींना व जमातींना असें आश्वासन दिलें जाईल कीं, बहुसंख्याकांच्या राज्यघटनेंत अल्पसंख्याकांच्या नैतिक व आर्थिक हितसंबंधांना धोका पोंचणार नाहीं. काय अटी घालावयाच्या तें काळजीपूर्वक ठरविलें पाहिजे. या बाबतींत सल्लागार कमिटीचा सल्ला फारच उपयोगी पडेल. या परिषदांमुळें हिंदुस्थान व इंग्लंड जवळजवळ आलें व आम्हांस हिंदुस्थानचे महत्त्वाचे प्रश्नांची चर्चा करावयास मिळाली. परिषदांच्या मार्गांत बरींच संकटें आलीं. पण मी आपणांस असें आश्वासन देतों कीं, आपले संयुक्त प्रयत्न फलद्रूप करण्याकरितां सरकार सतत झटत राहील.

तिसरी गोलमेज परिषद

ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रतिनिधीः—

हिज हायनेस दि आगाखान, जी. सी. एस. आय. जी. सी. आय. ई.; जी. सी. व्ही.ओ.
डॉ. बी. आर. आंबेडकर.
सर हर्बर्ट कार
पण्डित नानकचंद.
मिस्टर ए. एच. गझनवी.
लेफ्ट. कर्नल सर हेन्री गिडने, आय. एम. एस. (रिटायर्ड)
खानबहादूर हाफिज हिदायत हुसेन
सर महंमद इकबाल
बॅ. एम. आर. जयकर
श्री. न. चिं. केळकर
सर कावसजी जहांगीर, के. सी. आय. ई.; ओ. बी. ई.
श्री. एन्. एम्. जोशी
कालीकोटचे राजेसाहेब
दि. ब. रामस्वामी मुदलियार
बेगम शहा नवाज
रा. ब. सर ए. पी. पेट्रो.
सर तेजबहादूर सप्रू, के. सी. एस. आय.
डॉ. शफा–अत अहमदखान.
सरदार तारासिंग.
सर नृपेंद्रनाथ सरकार.
सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, सी. आय. ई.; एम. बी. ई.
मिस्टर झाफरुल्लाखान.

दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या अखेर कन्सल्टेटिव्ह म्हणून एक कमिटी नेमण्यांत आली आणि सरकारचा घाट असा होता कीं या कमिटीवरच पुढील सर्व काम भागवावें. या कमिटीवर म. गांधी यांनींही काम करण्याचें कबूल केलें होतें. कमिटीच्या कांहीं बैठकीही झाल्या. परंतु तिसरी गोलमेज परिषद भरत नाहीं असें उघडकीस येतांच कमिटीच्या बऱ्याच सभासदांनीं राजीनामे दिले व लोकमताचा जोर पाहून अखेर ब्रिटिश मंत्रिमंडळानें तिसरी गोलमेज परिषद भरविण्याचें जाहीर केलें. त्याप्रमाणें ता. १७ नोव्हेंबर १९३२ पासून तिचें काम सुरू झालें. परिषदेंत सुमारें ४० सभासद होते. त्यांत मुख्य गट खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१. ब्रिटिश इंडियन प्रतिनिधि–मंडळ. यांतच मुसलमान, हिंदी, युरोपियन यांचा समावेश होतो.
२. संस्थान प्रतिनिधि मंडळ.

३. ब्रिटिश प्रतिनिधि मंडळ,यांत कॉंझर्वेटिव्ह, लिबरल या दोन्ही पक्षाचे प्रतिनिधि होते. त्यांतील कांहीं प्रधानमंडळांत असलेले व कांहीं नसलेले असे होते. कॉंग्रेसचे प्रतिनिधि या परिषदेंत नव्हते. कारण म. गांधी यांनीं कायदेभंगाची चळवळ गेल्या जानेवारीपासून सुरूं केली होती.

सभेचे नामधारी अध्यक्ष मुख्य प्रधान मि. रॅम्से मॅक्डोनाल्ड हे होते. पण इतर कामांमुळें त्यांनीं पहिले दिवशीं अध्यक्षाचें काम करून पुढें तें लॉर्ड सँकी यांचे स्वाधीन केलें व लॉर्ड सँकी यांच्या अभावीं केव्हां केव्हां सर सॅम्युअल होअर हेही अध्यक्षस्थानीं बसत. परिषदेचें खरें काम ता. २१ नोव्हेंबरपासून सुरूं झालें. व ता. २४ डिसेंबर १९३२ रोजीं संपलें. परिषदेमध्यें सामान्यतः खालील विषयांची चर्चा झाली.

१. नव्या घटनेंत मतदारीचे हक्क कोणाला असावे.

२. प्रांतिक कायदेमंडळाची घटना कशी असावी.

३. वरिष्ठ कायदेमंडळाची घटना कशी असावी.

४. या कायदेमंडळांत संस्थानिकांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना कोणतें स्थान व किती जागा दिल्या जाव्या.

५. ब्रिटिश राज्यकारभाराशीं संस्थानिकांचा व संस्थानी कारभाराशीं ब्रिटिश सरकारचा संबंध कसा व किती असावा.

६. उभयतांमध्यें आर्थिक संबंध कसे काय असावे.

७. उभयतांमधील करारांचीं मुख्य तत्त्वें कोणतीं असावीं?

८. प्रांतिक कायदेमंडळांत कांहीं राखून ठेवलेलीं खातीं असावीं किंवा सर्व कारभार लोकतंत्र असावा.

९. हिंदुस्थान सरकारच्या कारभारांत कोणतीं खातीं राखीव व कोणतीं सोंपीव असावीं.

१०.हिंदुस्थानच्या ब्रिटिश सावकारांच्या कर्जफेडीकरतां कोणती हमी द्यावी व कोणतीं बंधनें घालावीं.

११. गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांना स्वतंत्र व जादा अधिकार कोणते असावे.

१२. प्रांतिक व वरिष्ठ सरकारांचे आर्थिक संबंध कसे असावे ? इत्यादि.

एका ठराविक कार्यक्रम पत्रिकेप्रमाणें वरील विषयांपैकीं प्रत्येक परिषदेपुढें निघून त्यावर चर्चा झाली. अगदीं ऐकमत्य असें बहुधा झालेंच नाहीं. प्रत्येक प्रश्नावर मतभेद थोडाथोडा तरी दिसत होता. मुसलमान प्रतिनिधींनी आपल्या हक्कसंरक्षणाविषयीं फार दक्षता ठेवली. राष्ट्रीय महत्वाच्या व राष्ट्रीय आकांक्षांच्या प्रश्नासंबंधानें त्यांनीं फारशी पर्वा केला नाहीं. फक्त स्पष्ट व तीव्र विरोध केला नाहीं इतकेंच. ब्रिटिश प्रतिनिधीमंडळांत दोन पक्ष होते. त्यांत एक कॉंझर्व्हेटिव्ह व एक लिबरल. पण पार्लमेंटचे व गव्हर्नर जनरलचे अधिकार यांचें रक्षण करण्यांत ते दोघेहि बहुधा एकमतानें वागत. हिंदुस्थानला सवलती देण्याविषयीं कोणी डावा तर कोणी उजवा इतकाच फरक. अशा स्थितींत चर्चा झाल्या. चर्चांचे समारोप झाले. तथापि नक्की निर्णय कोणते झाले ही गोष्ट अदमासाने ओळखण्याची अशीच राहिली. कारण जेथें मतभेद होई तेथें सरकार योग्य विचार करून काय तें ठरवील असें सांगण्यांत येई. एकाद्या प्रश्नावर सरकारचें म्हणून मत स्टेट सेक्रेटरी हे बोलून दाखवीत. पण त्याविषयीं अखेर निर्णय प्रधानमंडळ करील असें दर्शवीत. सर सॅम्युअल होअर यांनीं दोन तीन विषयांवर विस्तृत भाषणें केलीं पण सर्व कागदपत्र पाहून आपसांत चर्चा करून प्रधानमंडळ 'व्हाइटपेपर' या नांवाचा खलिता फेब्रुवारीच्या सुमारास प्रसिद्ध करील. नंतर मार्चमध्यें प्रधानमंडळ जॉइंट सिलेक्ट कमिटी नेमण्याबद्दल पार्लमेंटपुढें ठराव आणील व तो मंजूर होईल. दरम्यान तयार झालेलें बिल या कमिटीपुढें एप्रिल महिन्यांत ठेवण्यांत येईल व बिलासंबंधानें साक्षी देऊं इच्छिणारांना जाहीर निमंत्रण देण्यांत येईल. कमिटींत पार्लमेंटचे काहीं सभासद नेमले जातील व त्यांच्या बरोबर काम करण्याकरितां कांहीं हिंदी प्रतिनिधि नेमले जातील असें म्हणतात. साक्षी घेऊन उपसूचनांचा विचार घेऊन आपल्या रिपोर्टसह कमिटी बिलाचा मसुदा पाठवील.तो सुमारे ऑगस्ट महिन्यांत पार्लमेंटमध्यें प्रविष्ट होईल आणि त्याचा कायदा झाल्यावर १९३३ अखेर नव्या निवडणुकी होतील असा आजचा फक्त अंदाज आहे. तथापि आज नक्की ठरल्यासारख्या म्हणून गोष्टी दिसत आहेत त्या खाली लिहिल्याप्रमाणें.—


१. संस्थानिक येऊन मिळाल्यामुळें फेडरेशन प्रस्थापित होईल.

२. हिंदुस्थानच्या कारभारांत सैन्य व परराष्ट्रीय संबंध हीं दोन खातीं वगळून बाकीच्या खात्यांतील बहुतेक सत्ता जबाबदार प्रधान मंडळाकडे देण्यांत येईल.

३. प्रांतामध्यें सर्व कारभार जबाबदार मंत्रिमंडळाकडे सोपविण्यांत येईल. म्हणजे १९१९ च्या कायद्यानें प्रांतामध्यें द्विदल राज्यपद्धति स्थापन केली तशीच हिंदुस्थान सरकारामध्येंहि नव्या कायद्यानें होईल.

निरनिराळ्या जातींना मतदारीचे हक्क व कायदेकौन्सिलांत प्रतिनिधींच्या संख्येचें प्रमाण कसें द्यावें या संबंधानें एक दोन ठराव स्वतः सरकारने किंवा त्यांच्या संमतीनें झालेले आहेत, तेच अमलांत येतील व सर्व अनिर्णीत गोष्टींचा निकाल शेवटीं सरकार करील. तिसऱ्या गोलमेज परिषदेमध्यें राष्ट्रीय सभेनें मागितलेलें स्वातंत्र्य मिळत नाहीं किंवा महात्मा गांधी यांनीं मागितलेलें स्वातंत्र्याचें सार किंवा सत्त्व मिळत नाहीं. डोमिनियन स्टेटस् म्हणतात तेंहि नाहीं, त्याहून कमी अधिकाराचा पण हल्लीपेक्षां अधिक अधिकाराचा असा वाढत्या अधिकारांचा स्वराज्याचा एक नवा नमुना तिसऱ्या गोलमेज परिषदेने निर्माण केला असें म्हणतां येईल. संस्थानिक फेडरेशनमध्यें समाविष्ट होतील. तथापि कायदेकौन्सिलांतील त्यांच्या हिश्शांच्या जागांची वाटणी कशी करावी हें त्यांच्या त्यांच्यात न ठरल्यास प्रधानमंडळ ठरवील. त्यांच्या अंतर्गत कारभारांत हात घालण्याचा परंपरेचा हक्क व्हाइसरॉयसाहेबांकडे राहाणार असून बादशहांच्या नांवानें प्रसंगविशेषीं तो गाजविला जाईल. तथापि आपल्या प्रजाजनांना प्रातिनिधिक संस्था देण्याचें जाहीर आश्वासन संस्थानिकांनी दिलेलें नाहीं व इकडील कायदेमंडळांत त्यांचे प्रतिनिधि येतील ते प्रायः संस्थानिकांचे हस्तक व प्रेषित म्हणूनच येतील.

१९२१च्या खानेसुमारी-प्रमाणें खालसा मुलखांतील मतदारांची प्रमाणदर्शिका.



हिंदी मतदान कमिटी

(लोथियन कमिटीचा रिपोट)

गोलमेज परिषदेच्या मतदान पोटकमिटीच्या शिफारशीवरून हृचा इंडियन फरँचाइज कमिटीची नेमणूक १९३१ डिसेंबर महिन्यांत झाली. कमिटी २९।१।१९३२ रोजीं हिंदुस्थानांत आली. १।२।३२ ला तिनें कामाला सुरुवात केली व १।५।३२ ला आपला रिपोर्ट सादर केला.

कमिटीची घटना---कमिटीच्या सभासदांचीं नांवें:--(१) मार्क्विस ऑफ लोथियन, सी.एच्. दुय्यम भारतमंत्री, अध्यक्ष. (२) सर जॉन केर, उपाध्यक्ष; (३) डॉ. आंबेडकर एम. एल. सी.; (४) खानबहादूर मौलवी अझिझ उल् हक एम. एल. सी.; (५) रा. आर. आर. बखले एम.एल. सी.; (६) सर अर्नेस्ट बेनेट एम. पी.; (७) रा. आर. ए. बटलर एम. पी.; (८) रा. सी. वाय. चिंतामणि एम. एल. सी.; (९) मार्क्विस ऑफ डफरिन व अन्हा; (१०) नामदार मिलर; (११) मेजर जे. मिल्जर एम. सी. एम. पी.; (१२) दिवाणबहादूर ए. रामस्वामी मुदलियार एम्. एल. ए.; (१३) नामदार मेरी पिकफोर्ड सी. बी. इ. एम. पी.; (१४) सौ. पी. सुब्बारायन (१५)सरदार बहादूर सर सुंदरसिंग मजिथिया के. टी. सी. आय. ई.; (१६) रा. एस. बी. तांबे; (१७) सर महंमद याकूब एम. एल. ए.; (१८) सर झुल्पिकार अलीखान एम. एल. ए.

कार्यपद्धति--

प्रथम कमिटीनें एक प्रश्नावली तयार करून ती सर्व प्रांतिक सरकाराकडे धाडून दिली. त्यांनीं तिला वर्तमानपत्रांतून शक्य तेवढी प्रसिद्धी देऊन तिच्यावर विचारी लोकांचे अभिप्राय मागविले. शिवाय सर्व प्रश्नांचा खल करण्यासाठीं बव्हंशीं लोकनियुक्त अशी प्रांतिक कमिटी नेमून अनेक लोकांच्या साक्षी, मतें घेऊन त्यांचेही निष्कर्ष तयार ठेवले. अशा रीतीनें तयारी करण्याच्या सूचना पाठवून मग कमिटी प्रांतोप्रांत हिंडू लागली. प्रत्येक प्रांतांत तेथील सरकारच्या सूचना व प्रांतिक कमिटीचा अहवाल त्यांनीं पाहिला. त्यांशीं चर्चा केली. कित्येक बाहेरच्या तज्ज्ञांशींही विचारविनिमय केला.कमिटीनें एकंदर ३११ लोकांच्या साक्षी घेतल्या व लोकांनीं आपलीं मतें सांगण्यासाठीं पाठविलेल्या ११२० कथनांचा विचार केला. कांग्रेस पक्षाखेरीज बाकी सर्व पक्षांच्या मतांचाहि तिनें विचार केला व कांग्रेसचीं मतें सांगण्यास कोणी गेला नसला तरी वर्तमानपत्रांतून कांग्रेसपक्षीयांचे अभिप्राय प्रगट होत.त्यांचाहि कमिटीनें विचार केला आहे. वेळ नसल्यामुळें मध्यप्रांत व आसाम सोडून बाकी प्रत्येक प्रांतांत कमिटी स्वतः जाऊन आली. दिल्लीस असतांना असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट यांच्या सभासदांच्या व अखिल भारतीय संस्थांच्या प्रतिनिधींच्याही साक्षी कमिटीनें घेतल्या. व अशा प्रयत्नानें आपल्या रिपोर्टांत लोकमताचें प्रतिबिंब आणण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला.

विषय--जातिप्रश्न अजून सुटला नाहीं. त्याचा नक्की निकाल हातांत नसल्यामुळें कायदेमंडळांतील जागांची वांटणी कशी असावी हें कमिटीस सुचवितां आलें नाहीं. तरीपण मख्य प्रधानांच्या पत्राप्रमाणें कांहीं ठिकाणीं जातवार मतदार संघ होणार असें गृहीत धरून विचार केला आहे तसेंच अस्पृश्य,मजूर व स्त्रिया यांच्या संख्येसंबंधीं कांहीं सूचना कमिटीनें केल्या आहेत. तेव्हां कमिटीनें मुख्यतः मताधिकाराची पूर्ण योजना, स्त्रिया व मजूर यांचे प्रतिनिधी व कांहीं विशेष हितसंबंधाचे प्रतिनिधी या संबंधींच विचार करून सूचना मांडल्या आहेत.

प्रौढमत--पद्धति--(Adult Franchise) प्रौढमतपद्धति हेंच अंतिम साध्य आहे असें कमिटीचें व कित्येक हिंदी लोकांचेंहि मत आहे. पण आजच्या परिस्थितींत ती पद्धति सुचविणें कमिटीस बरोबर वाटत नाहीं. राजकीय हक्कांची जाणीव समाजाच्या सर्व थरांत अजून पसरली नाहीं. राजकारणांतील विविध पक्षांच्या शाखा-उपशाखा जनतेच्या सर्व भागांत अजून पोंचल्या नाहींत. राजकीय संघटण अजून बाल्यावस्थेंत आहे व बहुजनसमाज अजून निरक्षर आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां प्रौढमत--पद्धति येथें स्वीकारणें अव्यवहार्य आहे असें दिसून येईल. या पद्धतीनें सुमारें १३ कोटी

लोकांना मत मिळेल. या मतांच्या नोंदणीसाठीं व्यवस्था करणें या देशांत अशक्य आहे. कोणत्याहि प्रांतांत पुरेसे पर्यवेक्षक (Presiding Officers) व पोलीस मिळणार नाहींत याशिवाय मतें देणाऱ्या लोकांचा अडाणीपणा, स्त्रियांच्यासाठीं स्वतंत्र व्यवस्था, पडद्यांतील स्त्रियांच्या मतदानाची सोय, इत्यादि गोष्टी ध्यानांत घेतां एवढ्या मतांची नुसती नोंद करणेंही कसें अशक्य आहे हें समजतें. म्हणून प्रौढ मतपद्धतीचा विचारहि आज करतां येत नाहीं. अप्रत्यक्ष मतदानपद्धति, गटपद्धति, दर-घरटी-मत (Household sufferage) इत्यादि, प्रौढमतपद्धतीच्याच निराळ्या स्वरूपांचा आम्हीं विचार केला. पण त्यांतील कोणचीही आम्हांस घ्यावीशी वाटत नाहीं.

आमचें धोरणः——सध्याचा मताधिकार तर आम्हांस अत्यंत अपुरा वाटतो. सध्याच्या संस्था प्रातिनिधिक संस्थाच नव्हत असें वाटतें. म्हणून गोलमेज परिषदेच्या मतदान-पोटकमिटीनें सुचविल्याप्रमाणें मतदानहक्क पुष्कळच वाढवून त्याची समवांटणी करावी हें धोरण आम्ही पसंत करतों व त्याच धोरणानें आम्हीं आपल्या सूचना केल्या आहेत.

आमच्या योजनेचे विशेषः——(१) आमच्या नव्या योजनेप्रमाणें शेंकडा १५ लोकांना मताधिकार मिळेल. म्हणजे प्रौढ समाजापैकीं शेंकडा ३० लोकांना हक्क मिळेल. त्यांतहि विभागून पाहिलें तर प्रौढ पुरुषांपैकीं शें. ४३ व प्रौढ स्त्रियांपैकीं शेंकडा १० स्त्रियांना हा हक्क मिळतो. (२) मताधिकारास अवश्य अशा मालमत्तांचें प्रमाण आम्हीं फारच कमी ठेवलें आहे. (३) याशिवाय केवळ शिक्षणावरहि मताधिकार आम्हीं ठेवला आहे. मात्र प्रांतिक व मध्यवर्ति मंडळ आणि स्त्रिया व पुरुष यांना आवश्यक त्या शिक्षणाच्या मर्यादा भिन्न ठेवल्या आहेत. (४) मताधिकाराचीं मूलतत्त्वें सर्वांना सारखीं लागू करूनहि कित्येक वर्गांना मताधिकार मिळत नाहीं. म्हणून त्यांना आम्हीं विशेष सवलती दिल्या आहेत. (५) या सर्व मतदान हक्काची वांटणी सर्व समाज-विभागांना योग्य मिळेल अशी आम्हीं फार काळजी घेतली आहे. (६) या योजनेप्रमाणें ७० लक्षांऐवजीं ३ कोटी६० लक्ष लोकांना मताधिकार मिळेल. म्हणजे देशांत जे १३ कोटी प्रौढ लोक आहेत त्यांपैकीं शेंकडा ३० लोकांना मताधिकार मिळणार. (७) त्याचप्रमाणें मध्यवर्ति मंडळासाठींही मतहक्क वाढवून आम्हीं तो ११ लक्ष लोकांऐवजीं ८५ लक्ष लोकांना दिलेला आहे. या सर्वांचा प्रांतवार व विषयवार खुलासा पुढें दिला आहे.

प्रांतिक कायदेमंडळें—— हिंदुस्थानांतील कित्येक प्रांत शिक्षण, संस्कृती या दृष्टीनें एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत. त्यामुळें सामान्य धोरण सगळीकडे सारखें ठेवलें तरी प्रत्येक प्रांतांत त्या धोरणाला तेथील परिस्थितीप्रमाणें मुरड घालावी लागते. सर्व प्रांतांना सारख्या लागू पडणाऱ्या सूचना पुढें दिल्या आहेत. (१) प्राथमिक शिक्षण (प्राथमिक इतिहास, भूगोल, लेखन-वाचन व अंकगणित) घेतलेल्या २१ वर्षांवरील प्रत्येक पुरुषास मत असावें. (२) सर्व साक्षर स्त्रियांना मत असावें. (३) किमान मालमत्तेच्या मालकीमुळें ज्या पुरुषांना मत मिळालें असेल त्यांच्या २१ वर्षांवरील बायकांना मत असावें. (४) नवरा जिवंत असतांना नवऱ्याच्या मताधिकारामुळेंच जिला मताधिकार मिळालेला आहे त्या स्त्रीला विधवा झाली तरी तो हक्क कायमपणें द्यावा. किमान मालमत्ता व केवळ साक्षरता या तत्त्वांनींही अगदीं थोड्याच स्त्रियांना मतहक्क मिळूं लागला म्हणून वरील सूचना केल्या आहेत. नाहींतर पुरुषांच्या निदान एक चतुर्थांश तरी स्त्रियांना मतहक्क असावा हें धोरण सांभाळतां येणार नाहीं. (५) स्त्रियांसाठीं कायदेमंडळांत जागा राखून ठेवाव्या.

१मजूर वर्ग-शेतकरी मजूरः-ज्याला मालकीची जमीन मुळींच नसून जो केवळ शेतकामाच्या मजुरीवर राहतो.

२ कामकरी मजूर-संघटित वा फुटकळ धंद्यांत किंवा अन्यत्र मजुरी करून पोट भरणारे.

१शेतमजूर-मताधिकारास आवश्यक मालमत्ता व शिक्षण सर्वांच्याच बाबतींत आम्हीं इतकें खालीं आणलें आहे कीं, त्यामध्यें पुष्कळसे शेतमजूर येतील असा आमचा अंदाज आहे. बंगालमध्यें तर वार्षिक ६आणे चौकीदारी कर भरणारासही मत मिळणार आहे. त्यापेक्षां जास्त लोकांना मत मिळणें आवश्यक आहे हें खरें, पण प्रौढ-मतपद्धतीखेरीज तें शक्य नाहीं. ती तर आम्हांस मान्य नाहीं. शेतमजूरांसाठींही कांहीं स्वतंत्र सवलती द्याव्या असेंही आम्हांस वाटत नाहीं. कारण अनेक कारणांनीं तें अव्यवहार्य होईल. म्हणून सामान्य सवलतींत जो मताधिकार

शेतमजूरांना मिळेल त्यावरच सध्यां समाधान मानणें जरूर आहे.

२ कामकरी–यांचे स्वतंत्र प्रतिनिधी असावे. ते कामगार-संघामार्फत व त्यांच्या स्वतंत्र मतदार-संघामार्फत निवडून यावे. त्यांच्यासाठीं सर्व प्रांतांतील कायदेमंडळांत एकंदर ३८ जागा ठेवाव्या. (मुंबई, बंगाल व मद्रास येथील कायदेमंडळांत ८, ८ व ६ असाव्या). मताधिकार येण्यासाठीं कामगारसंघ निदान एक वर्षभर तरी नोंदलेला असला पाहिजे. व त्याचे निदान १०० सभासद असले पाहिजेत. मतदार हा निदान ६ महिनेपर्यंत तरी त्या संघाचा सभासद असून २१ वर्षांवर असला पाहिजे. स्वतंत्र–मतदार-संघांतील मतदार कोणातरी धन्याजवळ निदान ६ महिने लगतपूर्वी नोकर असला पाहिजे.

अस्पृश्य––ज्यांना शिवलें तर विटाळ होतो अशी कल्पना रूढ आहे त्यांचीच फक्त या वर्गात कमिटी गणना करते. भिल्ल, गोंड इ. रानटी जाति त्यांत घ्याव्या असें आम्हांस वाटत नाहीं. या व्याख्येप्रमाणें ब्रि. हिंदुस्थानांत सुमारें ३॥ कोटी अस्पृश्य आहेत. मतहक्कास सामान्य आवश्यक पात्रता आहे ती लागू करून यांच्यांतून शें. १० लोक निवडून येणार नाहींत. म्हणून त्यांना विशेष सवलती द्याव्या असें कमिटीस वाटतें. (१) मद्रास, मुंबई व मध्यप्रांत यां प्रांतांतील खेड्याच्या गांवकींत जे अस्पृश्य कामगार असतील त्यांस मत असावें. (२) प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता काढून निव्वळ साक्षर अस्पृश्यास मत द्यावें. याशिवाय आपापल्या प्रांतांत प्रांतिक सरकारांनीं आणखी योग्य त्या सवलती द्याव्या.

अल्पसंख्याक जातीः–युरोपियन, हिंदी, ख्रिस्ती व अँग्लो इंडियन यांना राखीव जागा असाव्या.

स्वतंत्र हितसंबंध–अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापारी, जमिनदार व विद्यापीठें यांनाहि राखीव जागा असाव्या, पण ज्या मानानें कायदेमंडळाची संख्या वाढेल त्या मानानें त्यांच्या जागा न वाढवितां, आहेत इतक्याच ठेवाव्या. युरोपी व हिंदी व्यापारी संघ यांना मिळून साधारण प्रतिनिधी असावे हें मत कमिटीस मान्य नाहीं. त्यांचे सवते प्रतिनिधी असावे. विद्यापीठाचा प्रतिनिधी नोंदलेल्या पदवीधरांनीं निवडावा, असें कमिटीस वाटतें. कोर्ट किंवा सीनेटला तो अधिकार असूं नये.

रानटी लोक––जंगलांत भटकणाऱ्या टोळ्या व मूळचे एतद्देशीय लोक यांच्या प्रतिनिधित्वाची कांहीं तरी योजना प्रांतिक सरकारनें काढावी. वेळाच्या अभावीं कमिटीला ती सुचवितां येत नाहीं. मात्र नेमणूक करणें किंवा या लोकांची अस्पृश्यांत गणना करणें या दोन्ही गोष्टीस कमिटीचा विरोध आहे.

लष्करी लोकांचे प्रतिनिधीः––सध्यां रेग्युलर फोर्सपैकीं निवृत्त, मुक्त व पेन्शनी अधिकारी व निवृत्त शिपाई यांना मताधिकार आहे, तो तसाच राहावा. रेग्युलर फोर्समध्यें कामावर असलेल्या लोकांना व ऑक्झिलियरी व टेरिटोरियल फोर्समधल्या निवृत्त व कामावर असलेल्या लोकांनाही मताधिकार मिळावा अशी सूचना आली आहे, ती कमिटीस मान्य नाहीं. चालू हक्कांत कोणचीही वाढ करण्यास कमिटी तयार नाहीं. तसेंच लष्करी लोकांसाठीं स्वतंत्र–मतदार-संघ ठेवण्यासहि कमिटीचा विरोध आहे.

मतदार संघ–– हे संघ एकप्रतिनिधिक असावे कां बहुप्रतिनिधिक असावे हें जातिप्रश्न सुटल्याखेरीज सांगतां येणार नाहीं. मताच्या बाबतींत रिस्ट्रिक्टिवपेक्षां क्युम्युलेटिव्ह मतच कमिटीस पसंत आहे. सेकंड बॅलट पद्धतीला व अल्टरनेटिव्ह व्होटलाही कमिटीचा एकमतानें विरोध आहे. प्रांतिक कायदेमंडळाच्याही दोन सभा असाव्या कीं काय याबद्दल कमिटी कांहीं मत देऊं शकत नाहीं.

मतदान पद्धति––– सर्व प्रांतांत कलर्ड बॉक्स अथवा सिंबॉलची पद्धत सुरूं करावी असें कमिटीचें मत आहे. या पद्धतींत मतदाराला कागदावर कसलीच खूण करावी लागत नाहीं. विशिष्ट खुणेच्या किंवा रंगाच्या पेटींत त्यास कागद टाकावयाचा असतो. प्रांतिक कायदेमंडळांतील **प्रतिनिधींची संख्या** पुष्कळच वाढवावी असें कमिटीचें मत आहे. पुढील कोष्टकांत कमिटीच्या सूचना दिल्या आहेत. नवीन मंडळांत सरकार-नियुक्त सभासद मुळींच नसावेत असें कमिटीचें मत आहे.

प्रांत	सध्याची संख्या	कमिटीनें सुचविलेली संख्या
मद्रास	१३२	२१५
मुंबई	११४	२००
बंगाल	१४०	२५०
संयुक्तप्रांत	१२३	२२५
पंजाब	९४	१७५
बिहार ओरिसा	१०३	१७५
मध्यप्रांत	७३	१०५

आसाम	५३	१००
वायव्य सरहद्दप्रांत	४०	५०

मद्रास—सध्याचा मताधिकार–(कौन्सिल-साठीं). (१) वार्षिक २० रु. सारा असलेली जमीन असणें. (२) मद्रास शहरांत १२० रु. भाड्याची जागा असणें किंवा त्या जागेची मालकी असणें. (३) मालमत्ता किंवा धंदा याबद्दल मद्रास-मध्यें ८ रु. व अन्यत्र ३ रु. वार्षिक कर भरणें. नवीन सूचनांप्रमाणें मताधिकार-मद्रास जिल्हा-म्युनिसिपालिटया व लोकलबोर्डें यांनीं ज्या तत्त्वावर मताधिकार दिला आहे त्यावरच कौन्सिल-साठीं मताधिकार असावा. त्याअन्वयें कितीही थोडी जमीन मालकीची असली किंवा कसलाही कर कितीही थोडा करावा लागत असला तरी त्याबद्दल त्या माणसाला मत मिळेल. मद्रास शहरांत १२० रु. ऐवजीं १८ रु. भाडें भरणारास मतहक्क येईल.

मुंबई—सध्याचा मताधिकार—(कौन्सिल-साठीं). (१) ३२ रु. सारा भरणारांस (कांहीं ठिकाणीं १६ रु.). (२) मुंबईमध्यें १२०रु.वार्षिक भाड्याची जागा घेणारांस, कराचींत ६० रुपयांची व इतरत्र रु.३६ वार्षिक भाडें भरणारास मताधिकार आहे.

नवीन सूचनाप्रमाणें मताधिकार— (१) ३२ रु. ऐवजीं ८ रु. जमीनधारा भरणारांस. (कांहीं ठिकाणी ४ रु.) व (२) मुंबई, कराची व इतरत्र अनुक्रमें ६०, ३० व १८ रु. वार्षिक भाडें भरणारास मत असावें. याचप्रमाणें इतर प्रांतांतही मताधिकार पुष्कळ विस्तृत केला आहे.

फेडरेशन

वरिष्ठ कायदेमंडळाच्या दोन सभा असाव्या. एक सीनेट व दुसरी असेंब्ली. सीनेट–(१)सीनेट-मध्यें २०० प्रतिनिधी असून त्यांतील १२०ब्रिटिश हिंदुस्थानचे असावे. (२) प्रांतिक कायदेमंडळांतील सभासदांनीं आपल्यांतून किंवा बाहेरच्या लोकांतून सीनेटसाठीं प्रतिनिधी निवडावे.म्हणजे सीनेटची निवडणूक अप्रत्यक्ष व्हावी. प्रांतिक मंडळांनीं सीनेटसाठीं मंडळांतूनच सभासद निवडल्यास त्यांची जागा पोट निवडणूक करून भरावी

असेंब्ली–(१) असेंब्लींत एकंदर ३०० सभासद असावे व त्यांपैकीं २०० ब्रि. हिंदुस्थानांतले असावे असें स्ट्रक्चर कमिटीचें मत आहे. आमच्या मतें ब्रि. हिंदुस्थानांतले ३०० सभासद होतील अशा प्रमाणानें ही संख्या वाढवावी. (२) असेंब्लीची निवडणूक सीनेटप्रमाणें अप्रत्यक्ष न होतां लोकांकडून प्रत्यक्ष व्हावी. प्रांतिक कौन्सिलें निवडण्यासाठीं **सध्यां** ज्यांना मताधिकार आहे त्यांना पुढील व्यवस्थेंत असेंब्ली निवडण्यासाठीं मताधिकार मिळावा. शिवाय (१) मॅट्रिकइतकें शिक्षण झालेल्या पुरुषास व (२) प्राथमिक शिक्षण झालेल्या स्त्रीस मताधिकार असावा.

अगदीं पहिल्या खेपेला वरील योजनेंत समाविष्ट होणाऱ्या स्त्रियांखेरीज नवीन योजनेप्रमाणें प्रांतिक मंडळासाठीं ज्या स्त्रियांना मतहक्क आलेला असेल त्यांनाही असेंब्लीसाठीं मतहक्क द्यावा. आमच्या योजनेप्रमाणें सध्याच्या सातपट लोकांना असेंब्लीसाठीं मत येईल.

स्वतंत्र प्रतिनिधी–राखीव जागा— स्त्रिया–प्रत्येक प्रांताला एक म्हणजे एकंदर ९ जागा स्त्रियांना राखून ठेवाव्या. सामान्य निवडणुकींतून स्त्रिया निवडून येतील असें दिसत नाहीं. म्हणून प्रांतिक मंडळातर्फे यांची निवडणूक व्हावी. अस्पृश्य–सामान्य पात्रतेखेरीज निव्वळ साक्षरता ही पात्रता यांच्या मतदारांना असेंब्लीसाठींही मान्य करावी. व्यापार –युरोपियास ४ व हिंदी व्यापाऱ्यास ४ अशा ८ जागा राखून ठेवाव्या. मजूर–मजुरांसाठीं ८ जागा राखून ठेवाव्या. जमीनदार–सध्याइतकेच यांचे प्रतिनिधी असावे. संख्येच्या प्रमाणांत वाढ करूं नये.

करार

जाति-प्रतिनिधि-प्रमाण-निर्णय

ता. १६-८-३२

मॅक्डोनल्ड यांनीं केलेल्या मूळ योजनेप्रमाणें कायदेकौन्सिलांतील जागांच्या प्रांतवार वांटणीचा तक्ता-

प्रांताचें नांव	सर्वसामान्य	अस्पृश्य	मागासलेले	मुसलमान	हिंदी ख्रिश्चन	ॲंग्लो-इंडियन	युरोपियन	व्यापार, खाणी	जमीनदार	विश्वविद्यालय	मजूर	एकंदर
मद्रास	१३४ (५स्त्रियांसुद्धां)	१८	१	२१ (एक स्त्री)	९ १स्त्री	२	३	६	६	१	६	२१५
मुंबई (सिंधसह)	९७ (६स्त्रियांसुद्धां)	१०	१	६३ (१ स्त्रीसुद्धां)	३	२	४	८	३	१	८	२००
बंगाल	८० (२स्त्रियांसुद्धां)	०		११९ (२स्त्रियां)	२	४ १स्त्री	११	१९	५	२	८	२५०
संयुक्तप्रांत	१३२ (४स्त्रियांसुद्धां)	१२		६६ (२स्त्रियां)	२	१	२	३	६	१	३	२२८
पंजाब	४३ (१ स्त्रीसुद्धां)	शीख ३२ (१स्त्री.)		८६ (२स्त्रियां)	२	१	१	१	५	१	३	१७५
बिहार-ओरिसा	९९ (३स्त्रियांसुद्धां)	७	८	४२ (१ स्त्रीसुद्धां)	२	१	२	४	५	१	४	१७५
मध्यप्रांत-वऱ्हाड	७७ (३स्त्रियांसुद्धां)	१०	१	१४		१	१	२	३	१	२	११२
आसाम	४४ (१ स्त्रीसुद्धां)	४	९	३४	१		१	११			४	१०८
वायव्यप्रांत	९	शीख ३		३६					२			५०

वर प्रांतवारीच्या दिलेल्या आंकड्यांत मुंबई इलाख्याच्या जागा सिध धरून दिल्या आहेत. परंतु मुंबई इलाख्यांतून सिध वगळून तो स्वतंत्र झाल्यास मुंबई इलाख्यांतील जागांची वांटणी पुढीलप्रमाणें होईल:--सर्वसामान्य जागा १०९ (यांत ७ जागा मराठे व ५ जागा स्त्रियांना), मुसलमान ३० (१ स्त्रीसुद्धां), अस्पृश्य १०, व्यापार ७, मजूर ७, युरोपियन्स ३, हिंदी ख्रिस्ती ३, जमीनदार २, ॲंग्लोइंडियन्स २, मागासलेले १, विश्वविद्यालय १, एकूण १७५.

सिध स्वतंत्र झाल्यास त्यांतील जागांची वांटणी पुढीलप्रमाणें होईल:—सर्वसामान्य १९ (१ स्त्रीसुद्धां), मुसलमान ३४ (१ स्त्रीसुद्धां), व्यापार २, युरोपियन्स २, जमिनदार २, मजूर १, एकूण ६०.

मौलाना महमद अल्लींचें सूत्र व बॅ. जिनांचे १३ मुद्दे

या सूत्रानुरूप निवडून आलेल्या उमेदवाराला इतर जातींतून शें. १० मतें व आपल्या जातींतून कमींत कमी शेंकडा ४० मतें मिळालींच पाहिजेत. जिना यांनीं प्रथम १४ मुद्दे सुचविले. व त्यांपैकीं पुढील १३ मुद्यांचा महमदअल्ली यांनीं पुरस्कार केला आहे. १९२९ मध्यें नाम. आगाखान यांच्या अध्यक्षतेखालीं दिल्ली येथें भरलेल्या सर्व राष्ट्रीय परिषदेमध्यें जो ठराव पास झाला त्यांत हे मुद्दे ग्रथित केलेले आहेत.

(१) भावी राज्यघटना 'फेडरल'–संयुक्त तऱ्हेची असावी. (२) शेषाधिकार प्रांतांकडे असावा. (३) बलुचिस्थानमध्यें सुधारलेली राज्यपद्धति चालू करावी. (४) सिंध मुंबई इलाख्यापासून वेगळा करावा. (५) वायव्य सरहद्दीवरील प्रांताला इतर प्रांतांचा दर्जा द्यावा. (६) बंगाल व पंजाब कायदेमंडळांत मुसलमानांचें हुकमी बहुमत असावें. (७) फेडरल कायदेमंडळांत एक तृतीयांश मुसलमान सभासद असावेत. (८) ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्याक आहेत, तेथें त्यांना जादा जागा द्याव्या. (९) एकाद्या जमातीच्या कायदेमंडळांतील सभासदांपैकीं तीनचतुर्थांश सभासदांनीं एखाद्या ठरावाला किंवा कायद्याला आपले जमातीचे हितसंबंधाच्या सबबीवर विरोध केला तर तो ठराव कायदेमंडळापुढें मांडला जाऊं नये. (१०) धर्म व संस्कृति यांचेबाबत संरक्षक अटी घालाव्यात. (११) प्रांतिक व फेडरल मंत्रिमंडळामध्यें मुसलमानांचे दोनतृतीयांश सभासद असावे. (१२) सरकारी नोकरींत मुसलमानांचें ठराविक किमान प्रमाण असावें. (१३) फेडरेशनच्या निरनिराळ्या सर्व घटकांनीं एकमुखी मागणी केल्याखेरीज राज्यघटनेमध्यें कांहींही फरक करूं नये.

पुणें करार

(ता. २४।९।३२)

(१) मतदार संघाच्या सर्वसाधारण यादींत ज्या अस्पृश्य मतदारांचीं नांवें नोंदलीं गेलीं असतील, त्या अस्पृश्य मतदारांचा एक संघ मानला जाईल. या (२) संघांतील प्रत्येक मतदार आपलें एक मत देऊन राखीव जागांपैकीं प्रत्येक जागेकरितां चार उमेदवारांचीं नांवें निवडील. ज्यांना या प्राथमिक निवडणुकींत जास्तींत जास्त मतें या संघांतील मतदारांकडून मिळतील तेच गृहस्थ प्रत्येक राखीव जागेकरितां म्हणून सर्वसाधारण मतदार संघातर्फे निवडून देण्याकरितां उमेदवार म्हणून कबूल केले जातील.

(३) वरिष्ठ कायदे कौन्सिलांत अस्पृश्य वर्गातर्फे जे प्रतिनिधी निवडले जातील तेही संयुक्त मतदार संघातर्फे परंतु राखीव जागांकरितां म्हणून निवडले जातील, व या निवडणुकीकरितां प्रांतिक कायदेमंडळाच्या प्रतिनिधींच्या निवडणुकीप्रमाणेंच वर कलम दोनमध्यें सांगितलेल्या पद्धतीनें प्राथमिक निवडणुकी होऊन मग संयुक्त मतदार संघातर्फे निवडणुकी होतील.

(४) वरिष्ठ कायदे कौन्सिलांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व साधारण मतदार संघाकरितां ज्या जागा दिल्या जातील त्यांपैकीं दहा टक्के जागा अस्पृश्य वर्गाकरितां म्हणून राखून ठेवण्यांत येतील.

(५) प्रांतिक कायदेकौन्सिलांत व वरिष्ठ कायदे कौन्सिलांत अस्पृश्य वर्गातर्फे प्रतिनिधी वर सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें निवडून देतांना प्राथमिक निवडणूक होऊन उमेदवार ठरविण्याची जी पद्धति सांगितली आहे, ती दहा वर्षांनंतर बंद राहील. खालीं दिलेल्या ६ व्या कलमांत सांगितलेल्या कलमांप्रमाणें स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंनीं परस्पर नवा करार केल्यास दहा वर्षांच्या अगोदर ही पद्धत बंद करण्यांत येईल.

(६) प्रांतिक व वरिष्ठ कायदे मंडळांत अस्पृश्य वर्गाकरितां ज्या राखीव जागा ठेविल्या आहेत, त्यांच्या निवडणुकीची कलम १ व कलम ४ मध्यें जी पद्धत सांगितली आहे, ती पद्धत या करारावर सही करणारे जे समाज आहेत त्यांच्या ऐकमत्यानें हा करार बंद होईपर्यंत चालू राहील.

(७) वरिष्ठ व प्रांतिक कायदे कौन्सिलांतील निवडणकीकरितां मतदानाचा हक्क प्राप्त होण्यासाठीं लोथियन कमिटीच्या शिफारशीमध्यें अस्पृश्यांकरितां म्हणून जे गुण सांगितले आहेत, ते ज्या अस्पृश्यांना असतील त्यांनाच मताधिकार मिळेल.

(८) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत किंवा सरकारी नोकरीबाबत कोणालाही तो अस्पृश्य आहे या सबबीवर नालायख समजण्यांत येणार नाहीं.

(९) वरील निवडणुकीबाबत व सरकारी नोकरीबाबत अस्पृश्य वर्गांना योग्य प्रमाणांत जागा मिळाव्या म्हणून शक्य तितका प्रयत्न केला

जाईल. फक्त सरकारी नोकरीकरितां शिक्षणाच्या ज्या अटी सरकारनें ठरविल्या असतील त्या मात्र पुऱ्या असल्या पाहिजेत.

(१०) प्रत्येक प्रांतांत शिक्षण खर्चासाठीं म्हणून जी रक्कम खर्च केली जाईल तींत योग्य प्रमाणांत अस्पृश्य वर्गातील लोकांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कांहीं रक्कम निराळी काढून ठेविली जाईल.

(११) पुढील प्रमाणें निरनिराळ्या प्रांतांच्या कायदेमंडळांत अस्पृश्य वर्गाकरितां म्हणून जागा राखून ठेविल्या जातील. सर्वसाधारण मतदार संघांना ज्या जागा दिल्या आहेत, त्या जागांमध्यें त्या राखीव जागांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

प्रांत	कायदेमंडळांतील सर्वसाधारण जागा (हिंदू)	अस्पृश्याकरितां राखीव जागा
१ मद्रास	१५३	३०
२ सिंधसह मुंबई	१०८	१५
३ पंजाब	४३	८
४ बिहार ओरिसा	११४	१८
५ मध्यप्रांत व वऱ्हाड	८८	२०
६ आसाम	५७	७
७ बंगाल	८०	३०
८ संयुक्तप्रांत	१४४	२०
	७८७	१४८

अलाहाबादचा करार (नवंबर १९३२)

पंडित मालवीय यांच्या ठरावाप्रमाणें सुमारें २० सभासदांची एक कमिटी ऐक्य घडवून आणण्याकरितां नेमली गेली. या कमिटीनें जे ठराव पास केले ते पुढीलप्रमाणें आहेतः––

मध्यवर्ति सत्ता

(१) या सभेचें असें स्पष्ट मत आहे कीं, हिंदुस्थानचें मध्यवर्ति सरकार लोकांना पूर्णपणें जबाबदार असें बनविल्याखेरीज व दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रीय सरकारला असणारे पूर्ण हक्क त्याला दिले गेल्याखेरीज हिंदुस्थानच्या गरजा समाधानकारक रीतीनें भागविल्या जाणार नाहींत व हिंदी लोकांचें राष्ट्रीय हितही साधणार नाहीं. म्हणून या परिषदेची अशी मागणी आहे कीं, मध्यवर्ती सरकारवरील ताबा हिंदी लोकांकडे दिला जावा व या बाबतींत जीं संरक्षक बंधनें कायद्यानें घालणें जरूर असेल तीं हिंदुस्थानच्या दृष्टीनें अपरिहार्य आहेत अशी खात्री पटली पाहिजे.

(२) धर्म, संस्कृति व व्यक्तिगत कायद्यांचें संरक्षणः––(अ) भावी राज्यघटनेमध्यें मूलभूत हक्कांसंबंधानें जीं कलमें घातलीं जातील त्यांत निरनिराळ्या समाजांची संस्कृति, भाषा, लिपी, शिक्षण आणि धर्माच्या बाबी व धर्मादाय देणग्या या सर्व बाबतींत संरक्षण दिलें जाईल अशी हमी असली पाहिजे. (आ) घटनेमध्यें विशिष्ट कलमें घालून व्यक्तिगत कायद्याचें संरक्षण केलें जाईल. (इ) निरनिराळ्या प्रांतांतील अल्पसंख्याक समाजांचे राजकीय व इतर हक्क यासंबंधीं संरक्षणाची व्यवस्था करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारवर राहील. (ई) कोणत्याहि समाजाच्या व्यक्तिगत कायद्यांत बदल केला जाणार नाहीं. परंतु कायदेमंडळांतील त्या समाजांच्या प्रतिनिधींच्या द्वारें तशी इच्छा प्रदर्शित केली तर व त्या समाजांतील लोकमत अनुकूल असेल तरच त्यांत बदल केला जाईल. (४) आज ब्रिटिश हिंदुस्थानांत मुसलमान समाजाचे बाबतींत जो व्यक्तिगत कायदा अंमलांत आहे त्यामध्यें फरक केला जाणार नाहीं. परंतु जरूर पडल्यास असा फरक मुसलमानी धर्माच्या तत्त्वाप्रमाणें केला जाईल. (५) जर एखादें बिल कायदेमंडळांत पसार झालें, परंतु एखाद्या विशिष्ट समाजाच्या त्या कौन्सिलांतील दोनतृतीयांश सभासदांना असें वाटलें कीं, त्या कायद्यामुळें त्यांच्या धर्माला किंवा धर्माच्या पायावर उभारलेल्या चालीरीतींना हें बाधक आहे किंवा प्रजाजनांच्या मूलभूत हक्कांपैकीं एखाद्या हक्काला हें बिल बाधक आहे असें वाटून त्या कायदेमंडळाच्या एकतृतीयांश सभासदांनीं त्या बिलाला आक्षेप घेतला तर तें बिल पास झाल्यापासून एक महिन्याच्या आंत त्यांना आपली तक्रार कायदेमंडळाच्या अध्यक्षांकडे दाखल करण्याचा अधिकार आहे. अशा तऱ्हेची तक्रार दाखल झाल्यानंतर अध्यक्षांनीं ती तक्रार गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल यांच्याकडे पाठवावी व गव्हर्नरांनीं अगर गव्हर्नर जनरलांनीं तक्रार हातीं आल्यावर एक वर्षपर्यंत त्या बिलाचा अंमल करण्याची परवानगी देऊं नये. एक वर्ष गेल्यानंतर तें बिल फेरविचाराकरितां कायदेमंडळाकडे पाठविण्यांत येईल. कायदेमंडळानें अशा तऱ्हेनें परत आलेल्या बिलाचा विचार पुन्हां केला व त्या बिलांत हरकती दूर होतील अशा प्रकारचा कोणताही फरक करण्याचें त्यांनीं नाकारलें तर गव्हर्नर अथवा गव्हर्नर जनरलनें आपल्या इच्छेप्रमाणें त्या बिलाला मंजुरी द्यावी अगर न द्यावी. परंतु त्या बिलाचा ज्याच्यावर परिणाम होणार आहे त्या समाजाच्या कोणाहीं दोन सभासदांना वरिष्ठ न्यायकोर्टांत याबद्दल दाद मागतां येईल. व त्या बिलाच्या

कायदेशीरपणाविरुद्ध तक्रार करतां येईल. या सभासदांनीं या बिलाच्या योगानें आपल्या धर्माला अगर धर्मावर उभारलेल्या सामाजिक चालीरीतींना किंवा त्या समाजाच्या मूलभूत हक्कांना बाध येतो असें सिद्ध केलें म्हणजे पुरे. या अटींमुळें पंजाब, मुंबई, बिहार–ओरिसा आणि संयुक्तप्रांत यांच्यासंबंधीं जीं संरक्षक बंधनें या परिषदेंत मान्य केलीं गेलीं आहेत त्यांना बाध येणार नाहीं.

(३) लष्कर व न्यायखातें यांतील जागा हिंदुस्थानच्या सर्व लोकांना मोकळ्या ठेवल्या जातील. असें या परिषदेंत एकमतानें ठरलें आहे. या नोकऱ्या देतांना फक्त गुणांकडेच लक्ष दिलें जाईल व ज्ञातीच्या वैशिष्ट्याचा किंवा प्रांताच्या विशेषत्त्वाचा अगर राजकीय पक्षभेदाचा कोणताही संबंध मानला जाणार नाहीं.

(४) मंत्रिमंडळः––(अ) मध्यवर्ति सरकारचें मंत्रिमंडळ बनवितांना मुसलमान, शीख व इतर अल्पसंख्यांक यांचे प्रतिनिधी समाविष्ट केले जातील व ही बाब वहिवाटीच्या पायावर उभारलेली अशी समजली जाईल. पहिल्या दहा वर्षांत मध्यवर्ति सरकारच्या प्रधान–मंडळांत एका शीख सभासदाला जागा दिली जाईल. (आ) प्रांतिक सरकारच्या प्रधान-मंडळांत अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी वरीलप्रमाणेंच प्रघात पाडून घेतले जातील.

(५) नोकऱ्याः––(अ) पक्षभेदातीत असें एक 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' म्हणजे नोकऱ्या देणारें मंडळ नेमलें जाईल. हें कमिशन नोकऱ्याकरितां कोणते गुण पाहिजेत हें ठरवील. नोकऱ्या देतांना दोन गोष्टी तें कमिशन डोळ्यापुढें ठेवील. पहिली गोष्ट ही कीं, सरकारी नोकरांची कार्यक्षमता कोणत्याहि दृष्टीनें कमी होऊं द्यावयाची नाहीं व दुसरी गोष्ट म्हणजे देशाच्या सरकारी नोकरींत देशांतील सर्व समाजांना न्याय्य वाटा व न्याय्य संधि दिली जाईल. (आ) पंजाब प्रांतांतील पब्लिक सर्व्हिस कमिशन मध्यें हिंदू, मुसलमान व शीख या समाजाचे प्रतिनिधी घेतले जातील तसेंच इतर प्रांतीय कमिशनमध्यें त्या त्या प्रांतांतील महत्त्वाच्या समाजांचे प्रतिनिधी घेतले जातील. (इ) वरील ठरावांत जीं तत्त्वें सांगितलीं आहेत, त्याप्रमाणें एक योजना करण्याकरितां एक सात सद्‌गृहस्थांची कमिटी नेमण्याचें एकमतानें ठरलें आहे. या कमिटीला आणखी सभासद करून घेण्याचा अधिकार आहे. सूचनाः––या सात गृहस्थांच्या कमिटींत तीन हिंदू, दोन मुसलमान, एक शीख व एक ख्रिस्ती सभासद असला पाहिजे असें ठरलें आहे.

(६) शेषाधिकारः––शेषाधिकारासंबंधानें पुढील गोष्टींवर ऐकमत्य झालें. कोणते अधिकार प्रांतिक सरकारकडे राहावयाचे व कोणते हिंदुस्थान सरकाराकडे राहावयाचे याचें साकल्यानें एक कोष्टक प्रथम तयार करावयाचें. एकदां असें कोष्टक तयार झालें म्हणजे या कोष्टकांत सांगितल्याप्रमाणें प्रांतिक सरकारकडे दिलेले अधिकार त्यांच्याकडे कयम राहतील. ते काढून घेण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारास नाहीं. जो अधिकार स्पष्टपणें या कोष्टकांत सांगितला नाहीं तो अधिकार कोष्टकांत दिलेल्या विषयांच्या अनुरोधानें प्रांतिक सरकारकडे अगर हिंदुस्थान सरकारकडे राहील. या बाबतींत मतभेद उत्पन्न झाल्यास त्याचा कायमचा निकाल करण्याचा अधिकार वरिष्ठ न्यायसभेकडे राहील. विशेष निकडीनें निकाल हवा असल्यास न्यायसभेचा निकाल कळेपर्यंत हिंदुस्थान सरकारच्या मताप्रमाणें हे अधिकार दिले जातील.

(७) कायदेमंडळेंः––मध्यवर्ति कायदे-मंडळांत लोकनियुक्त जागांपैकीं ३२ टक्के जागा मुसलमानांकरितां राखून ठेविल्या जातील व चार पूर्णांक दोन तृतीयांश टक्के जागा किंवा ३०० पैकीं १४ जागा शिखांकरितां राखून ठेवल्या जातील. संस्थानांचा समावेश संयुक्त राज्यघटनेंत करण्यासंबंधीं अजून कांहीं कळलें नसल्यानें सध्यां ब्रिटिश हिंदुस्थानपुरतीच ही योजना आहे असें समजावें.

(८) संयुक्त मतदार संघः––सर्व निवडणुकी संयुक्त मतदार संघातर्फे व्हाव्या. परंतु पुढील दहा वर्षांकरितां खालीं दिलेली योजना अंमलांत राहील. ही योजना महंमद अल्लींनीं जी तोड सुचविली होती तींतच कमीजास्त करून ठरविली आहे. जे उमेदवार निवडणुकीकरितां उभे असतील त्यांपैकीं ज्या ज्या उमेदवारांनीं आपल्या समाजापैकीं ३० टक्के मतें मिळविलीं असतील त्या उमेदवारांपैकीं ज्यांना संयुक्त मतदार संघांतून अधिकांत अधिक मतें मिळालीं असतील ते निवडले गेले असें समजलें जाईल. जर कोणत्याच उमेदवाराला वर सांगितलेलीं ३० टक्के मतें मिळणार नाहींत तर जास्तींत जास्त मतें मिळालीं असतील त्याला निवडलें जाईल. १० वर्षांनंतर हा ३० टक्क्यांचा नियम आपोआपच नष्ट झाला असें समजलें जाईल. परंतु या १० वर्षांपूर्वींही जर कोण-

त्याहि समाजाला शुद्ध संयुक्त मतदार संघ आपल्यास पाहिजे असें वाटेल तर ती पद्धत स्वीकारण्यास त्याला हरकत नाहीं.

(९) मुसलमानांना जादा जागा:—पुढील दहा वर्षपर्यंत ब्रिटिश प्रधानमंडळाच्या नुकत्याच झालेल्या निर्णयापूर्वी ज्या १४ जागा मुसलमानांना दिल्या गेल्या होत्या त्याच त्यांना देण्यांत येतील.

(१०) बंगाल:—(अ) संयुक्त मतदार संघातर्फे निवडणुकी होतील. परंतु राखीव जागेची पद्धत अंमलांत येईल. (आ) मुसलमानांना ५१ टक्के जागा दिल्या जातील. आणि सर्वसाधारण मतदारसंघांत हिंदु वगैरे जे लोक आहेत, त्यांना ४४·७ टक्के जागा दिल्या जातील. खास मतदार संघाच्या जागेचा अंतर्भाव वरील प्रमाणांत होतो. (इ) सर्व राखीव जागा व सर्व खास मतदार संघाच्या जागा दहा वर्षानंतर नष्ट होतील. (ई) बंगालच्या कायदेमंडळांत वर लिहिलेल्या प्रमाणांत हिंदु व मुसलमान या समाजांत जागा मिळतात कीं नाहीं हें पाहण्याकरितां, तसेंच वरील व या बाबतींत मतभेद झाला तर निकाल देण्याकरितां एक कमिटी नेमली जाईल. (उ) बंगालच्या प्रांतिक कायदेमंडळांत मुसलमानांना एकंदरींत ५१ टक्के प्रतिनिधी मिळाले तरच मुसलमान समाजाला संयुक्त मतदार संघाची योजना मान्य आहे असें समजलें जाईल. (ऊ) प्रांतिक सरकारांत व मध्यवर्ति सरकारांत पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य तावडतोब संस्थापित व्हावें म्हणून हिंदू व मुसलमान या दोनही समाजांनीं एकत्र प्रयत्न करावा. (क) राखीव जागेची पद्धत नष्ट झाल्यावर वयांत आलेल्या प्रत्येक स्त्री–पुरुषांस मताधिकार दिला जाईल. (ग) वरील सर्व कलमें हा एक गठ्ठा समजला जाईल.

(११) बलुचिस्थान:—बलुचिस्थानला इतर प्रांतांप्रमाणें कायदेमंडळ देण्यांत यावें व त्या प्रांताचा कारभार इतर प्रांताप्रमाणेंच चालावा.

(१२) सरहद्द प्रांत:—हिंदुस्थानांतील इतर प्रांतांप्रमाणेंच सरहद्द प्रांतालाही कायदेमंडळ असावें.

(१३) पंजाब:—पंजाबांतील मंत्रिमंडळांत कमींत कमी एक शीख व एक हिंदू सभासद असेल व प्रधानमंडळ सामुदायिक रीतीनें कायदेमंडळाला जबाबदार राहील. पंजाब कायदेमंडळाची संख्या २०० राहील. तींत मुसलमानांना ५१ टक्के, शिखांना २० टक्के, हिंदूंना २७ टक्के व ख्रिस्ती, अँग्लो–इंडियन व युरोपियन यांना मिळून २ टक्के जागा दिल्या जातील. पंजाबचा हा करार १० वर्षांकरितां आहे.

(१४) सिंध:—सिंध हा प्रांत मुंबई इलाख्यापासून स्वतंत्र केला जाईल व इतर मोठ्या प्रांतांप्रमाणेंच अल्पसंख्याकांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याची जी योजना आहे तीच सिंध प्रांताला लागूं पडेल.

चरित्रें

अणे लोकनायक माधव श्रीहरि ऊर्फ बांपूजी :--जन्म १८८०, वणी (जि. यवतमाळ); शिक्षण१९०२ बी. ए. (कलकत्ता युनिव्हर्सिटी); १९०७ बी. एल्. यवतमाळ येथें वकिली सुरू केली; १९०९सालीं१०८ क्रि.प्रो. कोड खालीं मुकदमा होऊन जामीन घण्यांत आला व लीगल प्रक्टिशनर्स अॅक्टखालीं एक वर्षपर्यंत वकिलीची सनद रद्द; १९२० पासून दहा वर्षेपर्यंत वऱ्हाड प्रां. कॉं.कमिटीचे अध्यक्ष; १९२३ वऱ्हाडतर्फे असेंब्लींत सभासद निवडून आले; १९२६सालीं त्याच जागेवर बिनविरोध निवडन आले; 'नेहरू रिपोर्ट' कमिटीचे प्रमुख सभासद; १९३० एप्रील, असेंब्लीच्या सभासदत्वाचा राजीनामा व जंगल कायदेभंग सुरू केला; सहा महिने साधी शिक्षा; १९३२ जानेवारी अॅमेंडमेंट अॅक्टखालीं सहा महिन साधी शिक्षा झाली; १९२८अध्यक्ष–महाराष्ट्र-साहित्य-संमेलन, ग्वाल्हेर; १९३२ जानेवारी अध्यक्ष-महाराष्ट्र प्रांतिक परिषद, पनवेल; हल्लीं अध्यक्ष यवतमाळ डिस्ट्रिक्ट-अॅसोसिएशन व राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटीचे सभासद; 'बापूजी-वाङ्मय-मंडळानें' (यवतमाळ) यांचा 'लेख व भाषणें' हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

अत्रे प्रल्हाद केशव :--जन्म १८९८, सासवड (जि.पुणें).शिक्षण–फर्ग्युसन कॉलेज, पुणें; १९१९ बी. ए. ; १९२६ बी. टी. (पहिल्या वर्गांत पहिले); १९२८ 'टीचर्स डिप्लोमा' डे ट्रेनिंग कॉलेज, लंडन; १९१९–२१ शिक्षक भर्डा न्यू हायस्कूल, मुंबई; १९२१ पासून कँप एज्युकेशन सोसायटीच्या पुणें (लष्कर) येथील हायस्कूलचे प्रिन्सिपाल, १९२४ पासून दुय्यम शिक्षकासाठीं एस्. टी. सी. चे वर्ग चालवीत आहेत. मॅट्रिक व बी. टी. परिक्षांचे परीक्षक; इंडियन–वुइमन्स–युनिव्हर्सिटीचे फेलो; 'मनोरमा' व 'अध्यापन' या मासिकांचे संपादक; यांच्या कविता 'केशवकुमार' या नांवाखालीं अनेक मासिकांतून आज १६ वर्षें येत आहेत.याशिवाय याचे लघुकथा, टीकात्मक लेख व प्रस्तावना इ. लिखाण प्रसिद्ध आहे. 'झेंडूचीं फुलें', 'विडंबन' काव्यांचा संग्रह यांचाच आहे. 'महाराष्ट्र शारदा' भाग २, हा आधुनिक कवींचा कविता-संग्रह यांनीं संपादिलेला आहे. जातिभेद मोडण्यासाठीं यांनीं स्वतः मिश्र-विवाह केला आहे. ४८१ नारायण पेठ डोलकर आळी, पुणें २.

अन्ड्र्यूज सी. एफ्. बंगाल्यांत शांतिनिकेतनमध्यें रविंद्रनाथ टागोर यांच्या आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयामध्यें प्रोफेसर; जन्म–१२ फेब्रुआरी १८७१; १८९९ मध्यें पेंब्रोक विद्यापीठाचे फेलो व व्याख्याते. १९०४ पासून १९१३ पर्यंत दिल्लीच्या सेंट स्टीफन्स विद्यापीठांत प्रोफेसर; केंब्रीज विद्यापीठ भ्रातृमंडळाचे सभासद पंजाब विश्वविद्यालयाचे फेलो व कांहीं काळ सिंडिकेटचे सभासद; पुढें बंगाल्यांत शांतिनिकेतनमध्यें; महात्मा गांधींचे अनुयायी; आफ्रिकेंतील हिंदी लोकांचे वाली; जाव्हा इत्यादि ठिकाणचे हिंदी मजुरांचे वाली; हिंदुस्थानविषयक व धर्मविषयक बरेच ग्रंथ; पत्ता–शांतिनिकेतन सोलापूर, बंगाल.

अन्त्रोळीकर डॉ. कृ. भी. जन्म १८९८; शिक्षण– फर्ग्युसन कॉलेज व ग्रँट मे. कॉ. असहकारांत शिक्षण सोडलें, पुन्हां १९२१ सालीं डॉ. झाले. १९२८ मजूरसंघ स्थापना, तुरुंगवास, १९३०मीठ–जंगल सत्याग्रहांत सामील व शिक्षा, पुढें सोलापूर दंगा, कोर्ट जाळण्याच्या कटाच्या आरोपावरून १० वर्षें सक्त मजुरी; १९३१ अपीलांत सुटले,१९३२ हजेरी अट मोडल्याबद्दल २ वर्षें स. म. (सध्यां तुरुंगांत) पत्ता:– सोलापूर.

अन्सारी डॉक्टर मुखतार अहमद :--जन्म १८८०; शिक्षण–मूर सेंट्रल कॉलेज अलाहाबाद; निजाम कॉलेज डेक्कन; एडिंबरो विश्वविद्यालय; एम्. बी. सी. एच्. बी. (१९०५); लंडनच्या चेरिंग क्रॉस हॉस्पिटलचे हाऊस-सर्जन; तुर्कस्तानांतील "ऑल् इंडिया मेडिकल् मिशन्" मध्यें समावेश (१९१२–१३). होमरूलच्या चळवळीमधील प्रमुख कार्यकर्ते; "ऑल इंडिया मुस्लिम लीग "चे अध्यक्ष,१९२०; हिंदीराष्ट्रीय सभेचे अध्यक्ष १९२७; सर्व पक्षीय परिषदेचे अध्यक्ष १९२८. राष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान पुढारी. सध्यां प्रकृतीसाठीं युरोपांत.

अभ्यंकर प्रोफेसर गणेश रघुनाथ :–– जन्म शक १७९५; लक्ष्मेश्वर (सं. मिरज). शिक्षण––बी. ए. एल्. एल्. बी. (मुंबई). हुद्दे–अॅडव्होकेट, प्रोफेसर–'कॉन्स्टिटयुशनल लॉ' लॉ कॉलेज, पुणें. हायकोर्ट वकील सांगली. ग्रंथ-कर्तृत्व:–गोखले चरित्र, राष्ट्रीय सभेची उत्पत्ति व वाढ, नेटिव्ह स्टेटस् अॅन्ड पोस्ट वॉर रिफॉर्मस्, प्रॉब्लेम्स् ऑफ दि इंडियन स्टेट्स्, मेमोरेंडम ऑफ इंडियन स्टेट्स्, इंडियन स्टेट्स् डेप्युटेशन–वर्क इन् इंग्लंड, संपादक–'स्थानिक स्वराज्य' (इंग्रजी बाजू). इंडियन स्टेट्स् पीपल्स कॉन्फरन्सचे जनरल सेक्रेटरी. १९२८–३१ संस्थानी प्रजेचे इंग्लंडला गेलेले प्रतिनिधि. सांगली सं.

अभ्यंकर, महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री यांचा जन्म सन १८६३ सालीं सातारा येथें झाला. लहानपणीं कै. रामशास्त्री गोडबोले यांजपाशीं व्याकरणाचें अध्ययन सातारा येथें यांनीं केलें. वयाच्या २७ व्या वर्षी हे पुणें येथें आले. (१८९०) व तेव्हांपासून त्यांनीं संस्कृत पाठशाळेंत अध्यापनाचें काम सुरूं केलें.ते आजपर्यंत चालू आहे. पुढें दोन वर्षांनीं (१८९२) फर्ग्युसन कॉलेजांत शास्त्री म्हणून यांची नमणूक झाली. त्यावेळीं वेदान्त न्याय, व्याकरण, अलंकार इत्यादि शास्त्रें बी. ए. व एम्. ए. ला शिकवीत. याशिवाय वरील शास्त्रांच्या व्यासंगानें शास्त्रीबुवांनीं त्या शास्त्रांवर संशोधनरूप, टीकात्मक, भाषान्तरात्मक ग्रंथही प्रसिद्ध केले आहेत. यांचें संशोधनरूप मुख्य ग्रंथ काव्यप्रदीपोद्यान, (१९११) योगभाष्य (१९१७), काव्यप्रकाश संकेत (१९२१) व न्यायकोश (१९२८) हे होत; टीकात्मकग्रंथांत मुख्य सर्वदर्शनसंग्रह (१९२४) होय. त्याचप्रमाणें श्रीभाष्य टीका (१९०४), यतीन्द्रमत दीपिकाप्रकाश (१९०५) श्रीभाष्य निवृत्ति (१९१६), याही टीका लिहिल्या आहेत. अद्वैतामोद हा स्वतंत्र ग्रंथ यांनीं रचिला असून शारीरभाष्याचे मराठी भाषांतर (१९०१) केलें आहे. इ. स. १९२२ मध्यें महामहोपाध्याय हा किताब सरकारकडून त्यांस मिळाला. इ. स. १९२८ सालीं यांनीं कॉलेजचें काम सोडून देऊन पेन्शन घेतलें आहे. हल्लीं मुख्य उद्योग म्हणजे व्याकरण-महाभाष्याचे मराठी भाषांतर करणें हा होय. पत्ता:–– पुणें.

अर्विन लॉर्ड (१८८१ सालीं जन्म); व्हायकाऊंट हॅलीफॅक्स यांचे हे चिरंजीव व वारस; १९१० सालीं रिपन भागातर्फें हे पार्लमेंटचे मेंबर झाले व १९२२–२५ च्या दरम्यान ते मंत्रिमंडळांत होते; ते प्रथम शिक्षणखात्याचे मंत्रि होते व नंतर शेतकी खात्याचे प्रधान होते. १९२६त ते हिंदुस्थानचे व्हाईसरॉय झाले व त्यांना 'पीअर' करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीसंबंधानें यांनीं बरीच उदार दृष्टि ठेविली होती; गांधी–अर्विन करार प्रसिद्ध आहे. तिसऱ्या रा. टे. कॉ. वर यांची नेमणूक झाली.

अली शौकत :––मुसलमानांचे पुढारी. शिक्षण–एम्. ए. ओ. कॉलेज अलिगड (कॅप्टन क्रिकेट). सरकारी अफू खात्यामध्यें सुमारें१५ वर्षें नोकरी; आलिगड ओल्ड बॉइज् असोसिएशन् चे चिटणीस व ऑर्गनायझर; एम्. ए. ओ. कॉलेजचे पंच. अलिगड विश्वविद्यालयाकरितां वर्गणीचे कल्पक व व्यवस्थापक. महायुद्धामध्यें निवास–निर्बंधित;१९१९ व १९२०मध्यें खिलाफत व असहकार या चळवळीचे प्रमुख पुढारी; मध्यवर्ती खिलाफत कमिटीचे सेक्रेटरी . 'खुद्दाम - ई- क्वाबा' मंडळीचे जनक व व्यवस्थापक. दोन वर्षें कैद. अध्यक्ष अखिल भारतीय मुसलमान संमेलन१९२८, दुसऱ्या राउंड टेबल परिषदेचे सभासद; सध्यां अमेरिकेंत दौऱ्यावर.

आगाखान आगा सुलतान महंमदशहा मुसलमानांचे पुढारी; जी. सी. आय. ई. (१९०२); जी. सी. एस्. आय. (१९११); जी. सी. व्ही. ओ. (१९२३); के. सी. आय. ई. (१८९८); एल्एल्. डी. ऑनर्स केंब्रिज. जन्म–१८७५; झांजिबारचा तेजस्वी तारा, १९००, पहिला वर्ग; इराणी पदवी मिळाली; पूर्व आफ्रिका, मध्य आशिया व हिंदुस्थान यांमध्यें कित्येक धार्मिक अनुयायी. खोजा समाजाचे धर्मगुरु; महायुद्धांत सरकारला साहाय्य केल्याबद्दल ११ तोफांच्या सलामीसह हिंदुस्थानांतील पहिल्या वर्गाच्या राजाची पदवी व अधिकार; रा. टे. प. मधील मुसलमानांचे मुख्य सूत्रचालक. ग्रंथ–India in Transition पत्ता–आगाहॉल, मुंबई.

आचार्य एम. के. :–– जन्म १८७६; मद्रास ख्रिश्चन कॉलेजांत शिक्षण; बी.ए.एल्.टी.एम्. एल्. ए. व्याख्याते १८९६ ते १९०२; हेडमास्तर १९०२ ते १९१७; १९१७ पासून स्वतंत्र राजकारणी; सार्वजनिक कार्यकर्ते व वर्तमानपत्रकार,ग्रंथ पोर्ट्रेस फ्राम इंडियन क्लासिस.

दि बेसिक ब्लंडर इन् दि रीकन्स्ट्रक्शन ऑफ दि इंडियन क्रॉनॉलजी बाय ओरियंटलिस्ट्स् इंडो ब्रिटानिया; कुमुद; दशरथ ही नाटकें इ.इ. १९२३ व १९२६ त चिंगलपट व अर्काटतर्फे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें १९२८ पर्यंत स्वराज्य पक्ष व कांग्रेसमधील प्रमुख सभासद.

आठवले श्री. पार्वतीबाई—— जन्म १८७० सालीं रत्नागिरी जिल्ह्यांतील देवरूख मुक्कामीं झाला. माहेरचें नांव जोशी. मुलाची विद्या करण्यासाठीं पुण्यास प्रो. कर्वे यांचा आश्रय. १९०२ सालीं प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजची तिसऱ्या वर्षाची परीक्षा पास होऊन त्यांनीं अनाथ बालिकाश्रमाचें काम आंगावर घेतलें व १९०४ ते १९३२ पर्यंत त्या आश्रमासाठीं वर्गणी मिळविण्याचें काम व आश्रमाचे प्रचारकार्य करीत आहेत. आजपर्यंत त्यांनीं आश्रमास सुमारें ८०००० रुपये मिळवून दिले आहेत. प्रो. कर्वे यांच्या प्रोत्साहनानें त्यांनीं १९१५ सालीं अमेरिकेस प्रयाण केलें व स्वतः कष्ट करून पोटाला मिळवून अमेरिकेंत ३ वर्षें काढलीं व आश्रमासाठीं अमेरिकेंत ४००० रुपये वर्गणी मिळविली. त्यांनीं "माझी कहाणी" हें आत्मचरित्रपर लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. पत्ताः——हिंगणें आश्रम, पुणें ४.

आपटे गोविंद सदाशिवः—जन्म १८७० सातारा जि.पाल शिक्षण मॅट्रिक पुणें,माधव कॉलेज उज्जयिनी,ग्वाल्हेर व उज्जयिनी येथें सायन्स,गणित व विशेषतः रसायनशास्त्र या विषयांचे प्रोफेसर; दहा वर्षें माधव कॉलेजचे प्रिन्सिपाल; हल्लीं पेन्शनर व उज्जयिनी वेधशाळेचे सुपरिंटेंडेंट कॉलेजांत असतांना ज्योतिषाचा नाद लागला इ.स.१९०४ च्या अखिल भारतीय पंचांग सभेचे उज्जयिनीचे प्रतिनिधी इ. स. १९२५ च्या पुणें येथील पंचांग सभेंत शुद्ध पंचांग पक्षातर्फे एक पंच होते. "ज्योतिर्गणितवार्तिक" व "सर्वानंदकरणकम्" ज्योतिषकर्ते ग्रंथ. पत्ताः—उज्जयिनी वेधशाला उज्जयिनी.

आपटे दत्तात्रय विष्णुः—— इतिहाससंशोधक. जन्म मार्च १८८० हनगंडी (सं. सांगली) येथें. शिक्षण—१८९७ मॅट्रिक, १९०२ सालीं फर्ग्युसन कॉलेज (पुणें) मधून गणित हा ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. झाले. रँ. परांजपे यांच्या पहिल्या वर्षीच्या विद्यार्थ्यांपैकीं एक. १९०४ यवतमाळ येथें खाजगी शिक्षक, तेथें बंगालच्या फाळणीच्या चळवळींत निघालेल्या विद्यागृहाचे तीन वर्षें मुख्याध्यापक. नंतर मुंबईच्या 'राष्ट्रमत' दैनिकाचे सहा महिने संपादक. त्यानंतर एक वर्षानें गोव्यांत जाऊन आल्मैद कॉलेज ही शाळा चार वर्षें चालविली. १९१५ गोव्याहून पुण्यास आगमन. चित्रमय जगत्चे सात वर्षें संपादक. १९२४ आनंदाश्रम, पुणें येथें नोकरीस लागले. ग्रंथ—इतिहासमंजरी, श्रीरंगपट्टणची मोहीम, शिव—चरित्र प्रदीप, खरे जंत्री, शिवचरित्र निबंधावलि, करणकौस्तुभ, भास्कराचार्यकृत बीजगणित, शिवभारत प्रस्तावना, Factory Record व सटीक लीलावती. पत्ता—आनंदाश्रम, बुधवार पेठ, पुणें २.

आपटे दाजी नागेशः——जन्म खेड जिल्हा पुणें शक १८०९. शिक्षण बी. ए. (मुंबई); एल्. एल्. बी. (अलाहाबाद); बडोदें हायकोर्टांत वकील; ग्रंथ—सुधारणा आणि प्रगति, तत्त्वज्ञानांतील कूट प्रश्न, पार्लमेंट, मिराबाई, हिंदी सुमेरी संस्कृति, इंद्रधनुष्य, नीतिशास्त्र इ. खेरीज महाराष्ट्र धर्म व मराठ्यांची सर्दुसकी, संस्कृत वाङ्मयाचा इतिहास, शिवछत्रपतींचा जन्मकाल वगैरे लेख; अध्यक्ष, अखिल भारतीय फलज्योतिष परिषद, पुणें (१९२१) स्वागताध्यक्ष, वाङ्मय परिषद , बडोदें,१९३१; पत्ताः—रावपुरा बडोदें.

आपटे, नारायण हरीः——जन्मस्थान समडोळी, जि. सातारा. जन्मसालः इ.स. १८८९. शिक्षण—मराठी चार इयत्ता जन्मगांवीं; पुढें इंग्रजी चार इयत्ता साताऱ्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्यें. १९०४ सालीं घरून पळून गेले. १ वर्ष हिंदुस्थानांत पायीं प्रवास. १९०५—११ जयपूर(राजपुताना) येथें वास्तव्य; १९०६ 'करमणूक' पत्रांत पहिली गोष्ट प्रसिद्ध. १९०९'अजिंक्य तारा' कादंबरी प्रसिद्ध. १९३२ पर्यंत अदमासें ३० पुस्तकें लिहिलीं. पत्ता—कोरेगांव, जि. सातारा.

आपटे, प्रिन्सिपल विनायक गणेशः—— जन्म १८६६ पुणें शिक्षण डेक्कन कॉलेजांत, फर्ग्युसन कॉलेज, बी. ए. होण्यापूर्वी वांगी येथें इंग्रजी बोर्डिंग स्कूल काढलें नंतर १८९२ सालीं नूतन मराठी विद्यालयांत आले. १८९४ बी. ए. झाले. १८९५ पासून सुपरिंटेंडेंट १९१५ सालीं नू म. वि. ची इमारत झाली. न्यू पूना (सर परशुराम भाऊ) कॉलेजचे पहिले प्रिन्सिपाल सध्यां सेवानिवृत्त. पत्ताः——सदाशिव पेठ, पुणें.

आपटे, सखाराम विनायकः——जन्म इ. स. १८८९. यवत जवळील राहू-पिंपळगांव

शिक्षण—नू. म. विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज, सेंट झेविअर कॉलेज व सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज. पदव्या-एम.ए.; बी. एस. सी.कांहीं काल शाळेंत शिक्षक; नंतर इंजिनियरिंग कॉलेजांत प्रथम 'निदर्शक' व १९२० पासून 'व्याख्याता' म्हणून काम करीत आहेत. वास्तवशास्त्र व विशेषतः बैजिक विज्ञान हा आवडीचा विषय. आधुनिक शास्त्रांतील परिभाषा तयार करण्याचें काम करितात. प्रकाशित ग्रंथ व लेख; यामिक प्रदीप भाग १(१९२४); वाहती वीज; याशिवाय चित्रमय जगत, डिप्लोमा क्लास मॅगझिन, न्यू पूना कॉ. मॅगझिन, लोकशिक्षण वगैरे मासिकांतील लेख. पत्ताः २८१ सदाशिव पेठ पुणें २.

आयर सर पी. एस. शिवस्वामी :—जन्म १८६४; शिक्षण—एस्.पी.जी.कॉलेज तंजावर; गव्हर्नमेंट कॉलेज; कुंभकोणम् प्रेसिडेंसी कॉलेज, मद्रास; हायकोर्ट वकील १८८५, "मद्रास लॉजर्नल-चे सहसम्पादक १८९३-१९०७; ॲडव्होकेट जनरल १९०७; मद्रास सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद १९१२ते१९१७, मद्रास विश्वविद्यालयाचे व्हाईस चॅन्सेलर १९१६–१८; बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर १९१८–१९; तंजावर व त्रिचनापल्ली या जिल्ह्यांतर्फे हिंदी विधिमंडळांत निवडणूक १९२०; राष्ट्रीय प्रागतिक परिषदेच्या कलकत्ता व अकोला येथें भरलेल्या दुसऱ्या व नवव्या अधिवेशनाचे अध्यक्ष १९१९ व १९२६; राष्ट्रसंघाच्या जिनेव्हा येथील अधिवेशनामध्यें हिंदी शिष्टमंडळाचे सभासद १९२२. हिंदी विधिमंडळाचे सरकारनें नेमिलेले सभासद १९२४; —सुधर्म, एडवर्ड इलियट रोड, मद्रास.

आयर सर सी.पी. रामस्वामी :—जन्म १८७९; शिक्षण-वेलसली कॉलेज; प्रेसिडेन्सी कॉलेज व लॉ कॉलेज मद्रास; इंग्लिश बी.ए.व संस्कृत या विषयांतील बक्षिसें; वकील १९०३ व ॲडव्होकेट १९२३; राष्ट्रीय सभेचे चिटणीस १९१७–१८; राष्ट्रीय सभेशीं फक्त १९१८ पर्यंत संबंध. जॉइंट पार्लमेंटरी कमिशनपुढें सुधारणेसंबंधानें साक्ष १९१९; मद्रास विश्वविद्यालयातर्फे विधिमंडळाचे सभासद १९१८ व मद्रास शहरातर्फे सभासद १९२०; ॲडव्होकेट जनरल १९२०–२३; जिनेव्हा येथील राष्ट्रसंघाच्या बैठकीमध्यें हिंदुस्थानचे बदली प्रतिनिधि १९२६ व खुद्द प्रतिनिधि १९२७; सर तेज बहादुर सप्रूंच्या बरोबर पतियाळ संस्थानचे महाराजाच्या चौकशी कमिशनमध्यें समावेश; तंजावर–त्रिचनापल्ली विभागातर्फे विधिमण्डळाकरितां निवडणूक (१९३०); मद्रास कार्यका. मं. चे कायदेमंत्री; कांहीं दिवस हिं. सर० चे कायदे मंत्री.

आळतेकर, प्रो. माधव दामोदर—एम. ए. जन्म सन १८९० कसबा कळें (सं.कोल्हापूर); शिक्षण—बी. ए. १९१५ व एम. ए. १९१७ फर्ग्युसन कॉलेज पुणें. १९१५–१६ संपादक 'इंदुप्रकाश' मुंबई. १९१७–२० संपादक New Review मुंबई. १९१७–१८ असि. सेक्रेटरी प्रेसिडेन्सी असोसिएशन. १९२३–२४ असिस्टंट एडिटर, इंडियन टेक्स्टाईल जर्नल मुंबई. १९२४ पासून मराठीचे अध्यापक, विल्सन कॉलेज मुंबई. ग्रंथ—गोपाळ गणेश आगरकर चरित्रात्मक निबंध, मुक्तबंध वगैरे चार कादंबऱ्या, कॅपिटल (कलकत्ता), टाइम्स ऑफ इंडिया वगैरे इंग्रजी नियतकालिकांतून आर्थिक विषयावर अनेक निबंध, नवयुग, मनोरंजन, वगैरे मासिकांतून गोष्टी, कविता, निबंध इ. पत्ता—लोकमान्य निवास,विलेंपार्लें, मुंबई.

आळतेकर, सदाशिव खंडोः—जन्म शके १७९४, आळते (सं. कोल्हापूर) शिक्षण—राजाराम हायस्कूल व कॉलेज, कोल्हापूर; डेक्कन कॉलेज, पुणें. बी.ए.एल्एल्.बी.(१९०१); १९०२–१९०८ कोल्हापुरांत वकिली. तेथें असतांना निरनिराळे उत्सव व स्वदेशी चळवळ यांत प्रामुख्यानें भाग घेतला; १९०६मध्यें कोल्हापूर–प्रतिनिधि–सभा स्थापन करण्यांत पुढाकार घेतला. त्यामुळें १९०८सनद रद्द, १९२१पर्यंत कऱ्हाड येथें वकिली, १९१८ कऱ्हाड म्युनिसिपालिटीचे चेअरमन, कऱ्हाड वाचनालय व अर्बन क्रेडिट सो. चे अध्यक्ष. १९२१ असहकारी चळवळींत वकिली सोडली. दोन वर्षें ऑल इंडिया कां. क. चे सभासद. १९३२ जानेवारी, फेब्रुवारी 'डेटिन्यू प्रिझनर', ग्रंथप्रकाशन—'सुलभ दासबोध' 'समर्थरत्न संग्रह', 'बालबोध समर्थ वाङ्मय माला' याचीं तीन पुष्पें, 'मनोबोध' इत्यादि. पत्ताः—कऱ्हाड, जि. सातारा.

उपाध्ये, जयकृष्ण केशवः—जन्म १८८३, नागपूर. २३वे वर्षी घराचा त्याग करून वर्धा येथें रामनामाचें तीन वर्षें पुरश्चरण केलें. तेथें जुन्या मराठी ग्रंथांचें वाचन झालें. बहुतेक सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. कविता करण्याचा नाद १९०१ पासून आहे. १९२४ लोकमान्यांचें

ओवीबद्ध चरित्र लिहून (खंड १ला) प्रसिद्ध केलें. निरनिराळ्या मासिकांतून कविता प्रसिद्ध होतात. पोपटपंची हें पुस्तक प्रसिद्ध; हल्लीं संपादक 'वागीश्वरी' मासिक, नागपूर.

ओगले, गोपाळ अनंतः-- वय वर्षें ५३. जन्म–विजयदुर्ग (कोंकण). शिक्षणः–रत्नागिरी हायस्कूल, फर्ग्युसन कॉलेज. कांहीं वर्षें 'न्यू इंग्लिश स्कूल पुणें' इ. शाळांतून शिक्षकाची नोकरी. १९०७ पासून पुढें दहा वर्षें 'देशसेवक' पत्राचे संपादक. त्यावेळीं १०८ कलमाखालीं 'राजद्रोही' लेखाबद्दल जामीन घेण्यांत आला. एक वर्ष मुंबईच्या 'राष्ट्रमत' पत्राच्या संपादक मंडळांत काम केलें. १९१८ सालीं नागपूर येथें 'महाराष्ट्र' पत्र सुरू केलें. १९३१ सालीं सोलापूर प्रकरणावर लिहिलेल्या अग्रलेखाबद्दल राजद्रोहाचा खटला होऊन 'तीन महिने सक्त मजुरी' शिक्षा. पत्ताः–संपादक 'महाराष्ट्र', नागपूर,.

ओगले, श्रीपाद प्रभाकरः-- जन्म-१८९०शिरहट्टी(सं.सांगली). शिक्षण–राजाराम हायस्कूल, कोल्हापूर. कांचेच्या धंद्यांतील शिक्षण–पैसाफंड कांचशाळा, तळेगांव. १९१४ स्वतंत्र कारखान्याचे कामास प्रारंभ केला. गेल्या १८ वर्षांत कारखान्याची सर्व दृष्टया बरीच वाढ झाली व लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें. कारखान्याचें नांव– ओगले ग्लास वर्क्स, लिमिटेड.

आंकलीकर--लेफ्ट. कर्नल सर आप्पाजीराव साहेब शितोळे देशमुख, के. बी. ई. (१९१९); सी. आय. ई. (१९१३.) १९१८ पासून ग्वाल्हेर सरकारच्या महसूल खात्याचे सभासद व १९२५ मध्यें रीजन्सी कौंसिलचे उपाध्यक्ष; जन्म–१८७४, शिक्षण–बेळगांव; १८९७ मध्यें ग्वाल्हेरच्या महाराजांचे खाजगी कारभारी. ग्वाल्हेरचे महाराज जयाजीरावसाहेब शिंद्यांच्या सर्वांत लहान मुलीशीं लग्न. पत्ता–ग्वाल्हेर.

आंबेकर बापूजी मार्तंडः-- जन्म सन १८७५ पुणें, शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल, पुणें व बडोदें कॉलेज; १८१८ ते १९०६ शिक्षकाचा व्यवसाय; १९०० एकवर्ष सयाजी विजया'चे संपादक; चार पांच वर्षें वाईच्या मोदवृत्ता'चे संपादक; १९०७ पासून आजतागायत ज्ञानप्रकाशचे संपादकांपैकीं एक; ग्रंथ ह. ना. आपटे चरित्र, आपटे यांच्या आठवणी, पंचतन्त्र व हितोपदेश (मराठी) पत्ताः–डेक्कन जिमखाना, पुणें.४

औंधकर वि. ह.:-- जन्म शके १८१६, कोल्हापूर; शिक्षण–मराठी चार इयत्तेपर्यंत झालें; १९०७ महाराष्ट्र नाटक मंडळींत प्रवेश; मध्यंतरीं मंडळी सोडली ते पुन्हां १९१४ सालीं त्याच मंडळींत आले.ते १९२५ पर्यंत होते. पुढें दोन वर्षें पुणें येथील 'युनायटेड पिक्चर सिंडिकेट' मध्यें डायरेक्टर होते; १९२७ यांनीं समर्थ नाटक मंडळी सुरू केली; सध्यां मंडळीचे तीन भागीदारांपैकीं हे एक आहेत. यांच्या विठाई (तोतयाचें बंड), तुळशी (विचित्रलीला) व जिजाई (शिवसंभव) या भूमिका विशेष प्रसिद्ध आहेत. ग्रंथ–बेबंदशाही व आग्न्याहून सुटका हीं दोन नाटकें.

करमरकर, प्रो. रघुनाथ दामोदरः-- महाभारत संशोधक; जन्म–१८९३ भिलवडी (जि. सातारा). शिक्षण--सातारा हायस्कूल, फर्ग्युसन कॉलेज, पुणें व डेक्कन कॉलेज पुणें. १९०९मॅट्रिक (चवथा नंबर), इंटर व बी. ए. (१९१३)दोनही परीक्षांत पहिल्या वर्गांत दुसरा नंबर, १९१६ एम्. ए. इंटरच्या परीक्षेंत (१) वरजीवनदास संस्कृत स्कॉलरशिप व (२) जैन लिटरेचर स्कॉलरशिप बी. ए.च्या परीक्षेंत (१) गंगादास रंगिलदास स्कॉलरशिप; व (२)भाऊदाजी बक्षीस. एम. ए.च्या परीक्षेंत (१) भगवानदास स्कॉलरशिप् व (२) झाला वेदांत बक्षीस. 'वेदान्त भाष्यांची तुलना' या विषयावरील स्वतंत्र निबंधासाटीं 'मंडलिक सुवर्णपदक'. शिक्षण–प्रसारक मंडळीचे आजन्मसेवक. अध्यापक संस्कृत स. प. कॉलेज, १९३० पासून व्हाईस प्रिन्सिपाल. १९१९, युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअरमध्यें स्थापनेपासून ऑफिसर. हल्लीं लेफ्टनंट, व बॅटेलिअनचे 'सेकंड-इन्-कमांड'. कांहीं काळ भांडारकर इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी; लिखाण–भारत प्राच्य परिषदेपुढें वेळोवेळीं वाचलेले निबंध, 'रत्नाकर' वगैरे मासिकांतून लेख, 'रघुवंश' 'तर्कसंग्रह' इत्यादि संस्कृत ग्रंथांच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरतां सटीक आवृत्त्या, पत्ताः–दामोदर व्हिला, पुणें. ४.

करमरकर, विनायक पांडुरंगः– मूर्तिकार,जन्मः–सासवणें,जि.कुलाबा येथें सन१८९२; प्रि. ओरो रॉथफील्डच्या मदतीनें १९१३त बॉ. स्कूल ऑ. आर्टचा शिक्षणक्रम मेयो, मेडल मिळून पुरा.१९२०–२२ युरोपमध्यें शिक्षण. १९१६–२६ कलकत्ता येथें आजोबांपासून परंपरागत असलेला शिल्पकाराचा धंदा. पुण्याचा श्री शिवाजीमहा-

राजांचा ब्रांझचा अश्वारूढ पुतळा पुरा, १९२८. गोंडळच्या महाराजांच्या निमंत्रणावरून १९३१ पासून गोंडळ मुक्कामीं पुतळ्याचें काम करीत आहेत. पत्ताः ६८ तारदेवरोड, मुंबई.

करंदीकर जनार्दन सखाराम ऊर्फ तात्यासाहेब जन्म–१८७५ कुंदगोळ, सं.जमखिंडी. शिक्षण–फर्ग्युसन कॉलेज, पुणें १८९७ बी. ए.; १८९८–१९०३, हेडमास्तर-सेकंड ग्रेड शाळा, मुधोळ,; १९०३ एल्. एल्.बी.; १९०५ ॲसिस्टंट मास्तर, व्हिक्टोरिया हायस्कूल-धारवाड. १९०७पासून विद्यालय बंद पडेपर्यंत हे समर्थ विद्यालयांत शिक्षक व तळेगांव येथें वसतिगृहाचे सुपरिंटेंडंट होते. ' समर्थ ' पत्राचे व 'ग्रंथमाला ' मासिकाचे सहसंपादक त्याच सुमारास होते. १९११ केसरींत लेख लिहिण्यास सुरवात; १९१५ दुय्यम संपादक म्हणून नेमणूक. १९२२ मुळशी सत्याग्रहांत भाग घेतल्यामुळें तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली, पुणें येथील टिळक महाविद्यालयांत हे इतिहास व अर्थशास्त्र हे विषय शिकवीत असत. वाईस भरलेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे व झांशीला भरलेल्या बृहन्महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष; १९३१ पासून संपादक 'केसरी'; हल्लीं कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतल्यामुळें दीड वर्ष कारागृहवास. लेखनव्यवसाय–'कौटिलीय–अर्थ–शास्त्राचें भाषांतर', 'जगांतील क्रांतिकारक लढाया'; याशिवाय राजकारण, इतिहास व इतिहास-संशोधन, अर्थशास्त्र, फलज्योतिष, पंचांग-संशोधन, गीतार्थचर्चा इत्यादि विषयांवर यांचे लेख केसरींत व इतरत्र आजवर प्रसिद्ध झाले आहेत. पत्ताः–केसरी ऑफिस, पुणें. २.

करंदीकर रघुनाथ पांडुरंगः– ॲडव्होकेट हायकोर्ट मुंबई. जन्म २१ऑगस्ट१८५७. जन्म खाडिलकर घराण्यांत व करन्दीकर घराण्यांत दत्तक १८८५. शिक्षणः–सातारा व पुणें. सब्जज्ज (१८८४). भोर फॉरेस्ट कमिटीचे सभासद १८८५. मुंबई कायदे मंडळाचे लोकनियुक्त सभासद १९११; १९१९ मध्यें यॉर्कशायर मधील लिकले येथें पहिली हिन्दी परिषद उघडली. प्रॉव्हिन्शिअल पोस्टल अँड आर्. एम्. एस्. परिषद,अधिवेशन १९२८चे अध्यक्ष; वेस्टर्न इण्डिया लाईफ ॲशुअरन्स कंपनीच्या बोर्ड ऑफ डिरेक्टर्सचे चेअरमन; कौन्सिल ऑफ स्टेटचे पांच वर्षें सभासद होते; पूना लॉ कॉलेजचे प्रोफेसर. हल्लींचा पत्ताः–शनिवार पेठ, सातारा.

कर्वे सौ. इरावतीबाईः– जन्म १९०५ मिंज्यान, (ब्रह्मदेश); शिक्षण–'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स' पुणें. १९२२ मॅट्रिक. १९२६ बी.ए. १९२८ एम्. . (निबंधाचा विषय–चित्पावन कोंकणस्थ ब्राह्मण–समाजशास्त्र विषयक अभ्यास). १९३० पी एच्. डी.(बर्लिन); संशोधनात्मक निबंधाचा विषय–मनुष्याच्या डोक्याच्या कवटीची नेहमीची असमप्रमाणता.–मानववंश-शास्त्र, प्राणिशास्त्र, संस्कृत व तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास. १९२६ विवाह, डॉ. दिनकर धोंडो कर्वे यांच्याशीं; १९३१ पासून श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला-विद्यापीठाच्या रजिस्ट्रार. १९३२ अनाथबालिकाश्रमाच्या आजन्मसेविका. पत्ताः–५९, डेक्कन जिमखाना कॉलनी, पुणें ४.

कर्वे प्रो. धोंडो केशवः— जन्म १८५८ शेरवली (जि. रत्नागिरी, ता. खेड). शिक्षण–प्राथमिक व थोडें इंग्रजी दापोली तालुक्यांतील मुरुड येथें; पुढें रत्नागिरी व मुंबई. १८८१ राबर्टमनी हायस्कूल, मुंबईमधून मॅट्रिक. वुइल्सन कॉलेज व एल्फिन्स्टन कॉलेज; १८८४ बी. ए.; १८८४–९१ मुंबईंत खाजगी शिकवण्या व मराठा हायस्कूलमध्यें नोकरी १८९१अखेर; १८९४ फर्ग्युसन कॉलेज व न्यू इंग्लिश स्कूलमध्यें गणिताचे अध्यापक. १९१४ सेवानिवृत्त. १८९३ पुर्नविवाह.विधवा-विवाह-प्रतिबंध निवारक मंडळ स्थापन केलें; त्याचे सात वर्षें चिटणीस होते. संस्थापक–अनाथ बालिकाश्रम, हिंगणें महिला विद्यालय, (१९१५ सालीं वरील दोन संस्थांचें एकीकरण केलें). श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ. विद्यापीठासाठीं द्रव्यसंपादनार्थ १०–१२ वर्षें हिंदुस्थानांत प्रवास; विद्यापीठाच्या माहिती–प्रसारार्थ युरोप, अमेरिका, जपान व आफ्रिका या देशांत वयाच्या सत्तराव्या वर्षानंतर प्रवास. यांच्या 'आत्मवृत्त' पुस्तकाचें उत्पन्न हिंगण्याच्या आश्रमाकडे जातें. हल्लीं यांचें 'वुइमेन्स युनिव्हर्सिटी'साठीं काम चालू आहे. पत्ताः–'वुइमेन्स युनिव्हर्सिटी' एरंडवणें, पुणें ४.

कर्वे डॉ. शंकर धोंडोः— एम्. बी. बी. एस., 'क्ष–किरण–तज्ज्ञ,' कॅप्टन, आय. एम्. एस्. गुरुवर्य धों. के. कर्वे यांचे द्वितीय चिरंजीव; पत्नी–सौ. रेवतीबाई कर्वे जी. ए., १९२२ पासून आफ्रिकेंत वास्तव्य; नैरोबी व मोंबासा म्युनिसिपालिटीचे सभासद; पत्ता—मोंबासा, केनिया कॉलनी, आफ्रिका.

कवडे वैद्य पंचानन कृष्णशास्त्री नारायणः–जन्मः शके १८०५, पिंपरी पेंढार (ता. जुन्नर). शिक्षणः–बी. ए.(मुंबई) वैद्यपंचानन ही पदवी निखिल भारतवर्षीय वैद्यसंमेलनानें मथुरेस दिली. कोचीनचे राजबंधु यांच्या अध्यक्ष-तेखालीं पुणें येथें भरलेल्या वैद्यक परिषदेचे मुख्य कार्यकर्ते; १३व्या वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष–राज-महेंद्री १९२२; प्रधानमंत्री निखिल भारतवर्षीय वैद्यसंमेलन; २५ वर्षे पुणें येथील गणेशोत्सव कमिटीचे चिटणीस ९।१० वर्षे वेदशास्त्रोत्ते-जक सभेचे चिटणीस; ६।७ वर्षे पुणें शहर म्युनि-सिपालिटीचे सभासद; ग्रंथकर्तृत्वः–श्रीमत्भागव-तामृत; लो. टिळक व प्रो. शि. म. परांजपे यांज-वरील १९०८ सालांतील राजद्रोहाचा खटला; आर्यवैद्यकलानिधि–संशोधक; चरकसंहिता भाषां-तर संशोधन; आयुर्वेदीय धमनी विवेचन, क्लोम-निर्णय (संस्कृत) इ. पत्ताः–९९९ सदाशिव पेठ, पुणें २.

काणे पांडुरंग वामनः–– जन्मस्थान दापोली, जि. रत्नागिरी. जन्म शके १८०२ (इ. स. १८८०).शिक्षण- मॅट्रिकपर्यंत दापोली; पुढें एम्.ए.पर्यंत विल्सन कॉलेज मुंबई; एम्. ए., एलएल् बी.; एम्.ए.पर्यंत संस्कृतचीं युनिव्हर्सिटीचीं सर्व बक्षिसें; एम्. ए.ला झाला वेदान्त प्राईझ.नंतर निबंधांबद्दल दोनदां मंडलिक गोल्ड मेडल व प्राईझ.विल्सन फिलॉलॉजिकल लेक्चरर(१९१३); स्पिंगर रिसर्च स्कॉलर १९१५ व १६. व्हाईस प्रेसिडेंट व फेलो बॉम्बे रॉ. ए. सोसायटी; उपा-ध्यक्ष मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय; अध्यक्ष दक्षिणी ब्राम्हण को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, माटुंगा; ट्रस्टी ब्रा.सभा मुंबई; युनिव्हर्सिटी फेलो (१९१९–२८); संस्कृत प्रोफेसर एल्फिन्स्टन कॉ-लेज (१९०९) व विल्सन कॉलेज (१९१६); सरकारी लॉ कॉलेज प्रोफेसर (१९१७–२३); ग्रंथ––बाणभट्टाची कादंबरी व हर्षचरित्र (सटि-प्पणी), History of Alankara Literature, संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास, History of Dharmasastra vol. I, Smriti of sankhya and Lohhita (reconstructed), कात्यायनस्मृतिसारो-द्धार, व्यवहारमूख, Brief sketch of Purvamimansa, Sanskrit Geography of Maharashtra, etc. पत्ताः–आंग्रेवाडी,गिरगांव मुंबई.

कानिटकर केशव रामचंद्रः–– प्रोफे-सर वाडिया कॉलेज, पुणें; जन्म–१८७६; शिक्षण––न्यू इंग्लिश स्कूल, वाई व पुणें व फर्ग्यु-सन कॉलेज पुणें; १९०३ पासून डेक्कन एज्यु-केशन सोसायटीचे आजीव सभासद व पदार्थ विज्ञान शास्त्राचे प्रोफेसर; १९२१ पासून १० वर्षे फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल; गेलीं १५ वर्षे मुंबई विश्वविद्यालयाच्या सीनेटमध्यें सभासद ; सिण्डि-केटमध्यें १९२१ ते १९२९; स्कूल लीव्हिंग एक्झॅमिनेशन बोर्ड ६ वर्षे; पांच वर्षे पुणें जिल्हा स्कूल बोर्डाचे चेअरमन; विश्वेश्वरय्या टेक्निकल एज्युकेशन कमिटीवर काम केलें १९२०; सर-कारनें नेमिलेल्या शारीरिक शिक्षण मंडळाचे चिट-णीस १९२८; शिक्षण पद्धतीच्या अवलोकनार्थ यूरोपचा प्रवास१९३२; युनि. ट्रे.कोअरमध्यें आरं-भापासून ऑफिसर; हल्लीं लेफ्टनंट. पत्ताः-वाडिया कॉलेज. पुणें.

कानिटकर ग. ना. ऊर्फ बाळूकाकाः– जन्म- शके १८०८, पुणें शहर.सन १९०८ बी.ए. दरिद्र नारायण सेवेप्रीत्यर्थ अनाथ वि. गृह, राम-दासी मठ, स्वावलंबन रा. पाठशाला, मुळशी सत्याग्रह मंडळें, पुणें शहर काँ. कमेटी, देशसेवा-श्रम वगैरे संस्थांतर्फे शिक्षण व खादी,अस्पृश्यता-निवारण, कायदेभंग इत्यादि विषयीं प्रचारकार्य; तिनदां तुरुंगवास स्वावलंबन–वार्षिक, मासिक साप्ताहिक; गांधी शिक्षण-माला, राष्ट्रीय पद्य-माला यांचें प्रकाशन; दरिद्र-नारायणाचे चरणीं; स्वावलंबी, ग्रामसंघटना, भारतमातामंदीर इत्यादि पुस्तकांचे व अनेक लेखांचें राष्ट्रीय पद्यांचें लेखन व प्रकाशन. पत्ताः––देशसेवाश्रम, पुणें.

कानिटकर श्रीमती काशीबाईः–– जन्म–१८६१ अष्टें (ता. वाळवें, जि. सातारा) रावसाहेब कृ. चिं. बापट यांच्या कन्या; रा.ब. वा. बा. कानिटकर यांचे चिरंजीव श्री. गो. वा. कानिटकर यांच्या पत्नी. लग्न १८७०; शिक्षण-घरीं, थोडें इंग्रजी व कांहीं संस्कृत! लेखनव्यवसाय दोन कादंबऱ्या,डॉ.आनंदीबाई जोशी यांचें चरित्र, शिळोप्याच्या गोष्टी, चांदण्यांतील गप्पा,व कित्येक खास अंकांत लेख व लघुकथा.

कानेटकर शंकर केशव गिरीशः––जन्म इ. स. १८९३; फत्यापूर (जि. सातारा); शिक्षण फर्ग्युसन कॉलेज; मूळ नोकरी– डे. ए. सोसायटी पुणें; न्यू. इं. स्कूलमध्यें कायम शिक्षक; सध्यां लेंट सर्व्हिसवर फलटन संस्थानकडे हेडमास्तर; मुधोजी हायस्कूल–फलटन; ग्रंथकतृत्व–कविता

लेख व गोष्टी; 'अभागी कमल' प्रकाशन १९२४ 'कला' (१९२६), 'आंबराई' (१९२८) हीं खंडकाव्यें लिहिलीं; कांचनगंगा, (१९३०); स्फुट कविता संग्रह, पत्ता:— फलटण. सदस्य रविकिरणमंडळ पुणें.

कामत आमदार बाळकृष्ण सिताराम:— व्यापारी. जन्म १८७१; बी. ए. डेक्कन कॉलेज; मुंबई कायदेमंडळाचे सभासद १९१३–१६; १९१६–२० लेजिस्लेटिव्ह असेंब्ली; प्रागतिक सभासद (१९२१–२३); १९२३ मध्यें इंग्लंडला गेलेल्या केनिया शिष्टमंडळाचे सभासद; "रॉयल कमिशन ऑन इंडियन ॲग्रिकल्चर"चे सभासद व "प्रॉव्हिन्शिअल बँकिंग इन्क्वायरी कमिटी"चे सभासद; सध्यां मुंबई कौन्सिलचे सरकारनियुक्त सभासद; पत्ता–गणेशखिंड रोड पुणें, किंवा डोंगरे बिल्डिंग, ताडदेव मुंबई.

कामत जनार्दन विष्णु:— जन्म १८८६ काकोडें (गोवें); शिक्षणानंतर न्यायमंदिराची पायरी; पोटजातींचें एकीकरण; अस्पृश्यता निवारण; मद्यपान, जुगार, वेश्या-व्यवसाय इत्यादिकांस बंदी करणें वगैरे सार्वजनिक कार्यांत सक्रिय भाग; संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद व प्रागतिक संघ या संस्थांचे एक कार्यकर्ते; पारोडें मराठी–ग्रंथसंग्रहालयाचे संस्थापक व चिटणीस होते; शुद्धिसाहाय्यक मंडळाचे कार्यवाह होते; हल्लीं गोमांतकीय हिंदु सभेचे चिटणीस; १९२२ सालीं व १९३२ सालीं १००० गावड्यांचें शुद्धिकरण घडवून आणलें; शुद्धिकरण व पोलिसचीं दुष्कृत्यें उघडकीस आणणें हीं कार्यें सतत चालू आहेत; १९३० गोमांतकांत भरलेल्या साहित्यसंमेलनाचे कार्यकर्ते व प्रदर्शन मंडळाचे चिटणीस; 'भारत' व 'हिंदु' या पत्रांतून यांच्या सार्वजनिक विषयावर अनेक लेखमाला प्रसिद्ध झाल्या आहेत. पत्ता–पारोडें गोंवा.

कारखानीस त्र्यंबक सीताराम:— जन्म–१८७४ महाड; शिक्षण प्रिव्हिएस पर्यंत, १८९८–१९०० दापोली बोर्डिंगमध्यें सहकारी मंडळीबरोबर बोर्डिंग हायस्कूलची स्थापना, १९०४ सालीं कांहीं मित्रांच्या साहाय्यानें पुणें येथें 'महाराष्ट्र नाटक मंडळीची स्थापना' केली व ती १५ वर्षें यांनीं चालविली. लिखाण–कांहीं छोट्या गोष्टी, कांहीं लेख व 'राजाचें बंड' हें नाटक. पत्ता:–२८१ शनवार पेठ पुणें. २.

४७

काळे सौ. अनसूयाबाई:— जन्म १८९६, बळगांव; कै. स. वा. भाटे वकील यांच्या कन्या; शिक्षण बडोदें व पुणें येथें झालें; १९१३ मॅट्रिक (हुजूरपागा, पुणें), प्रीव्हियस फर्ग्युसन कॉ. पुणें; विवाह १९१६; १९१८ जमशेटपूर येथें रा. ठक्कर (सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी) यांचे हाताखालीं शिकविण्याचें काम केलें; १९२४ नागपूर प्रांतिक महिला परिषदेचें काम पत्करलें; १९२७ सरकारनें कायदेकौन्सिलांत सभासद नेमलें; कैद्यांना शिकविण्याचें काम केलें; ऑनररी मॅजिस्ट्रेट; मध्यंतरीं लेबर कमिशनवर असिस्टंट कमिशनर म्हणून मध्यप्रांतातर्फे नेमणूक; नंतर कौन्सिलचा राजिनामा व कॉंग्रेसचें प्रचारकार्य सुरू केलें; १९३० नोव्हेंबरमध्यें प्रां. कॉंग्रेसच्या अध्यक्ष असतां कौन्सिल–पिकेटिंग केल्याबद्दल शिक्षा झाली; पत्ता–धनतोली, नागपूर.

काळे प्रो. वामन गोविंद:— जन्म १८७६; शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज पुणें; १९०७ मध्यें पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें आजन्म सभासद म्हणून प्रवेश; १९१९ पासून पांच वर्षेंपर्यंत मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो; फर्ग्युसन कॉलेजांत इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचे प्रोफेसर; कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद १९२१–२३; इंडियन टॅरिफ बोर्डाचे सभासद १९२३–२५; डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस १९२५ ते १९२८; राजकारणामध्यें प्रागतिक; राजकीय व सामाजिक सुधारणा आणि अर्थशास्त्र यावर कित्येक लेख प्रसिद्ध केले आहेत. आर्थिक विषयावर कित्येक ग्रंथ आहेत. जर्मन भाषेंतून अर्थशास्त्राचा अभ्यास; को-ऑपरेटिव्ह बँकेचे (पुणें) मुख्य. पत्ता–दुर्गानिवास, पुणें, (४).

काळे यादव माधव– बी. ए. एल्एल्. बी. वकील बुलढाणा (वऱ्हाड) जन्म–१८८१ लोणार (वऱ्हाड); मेंबर नागपूर कायदेकौन्सिल (१९२४ते चालू), अध्यक्ष नागपूर कायदे कौन्सिल (१९२६) अ.हैद्राबाद सं.प्रजा परिषद मुंबई१९२६ बाजीराव उत्सव रावेरखेडी चालू अध्यक्ष मध्यप्रांत व वऱ्हाड व्हर्नाक्युलर लिटररी अकॅडेमी नागपूर; उपा. विदर्भ साहित्यसंघ; मेंबर नागपूर युनिव्हर्सिटी अकॅडेमिक व एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल; परीक्षक देशी भाषांच्या शाखेचे

प्रमुख ; वऱ्हाडचा इतिहास, गोंडांचा इतिहास, शशिसेना काव्य , ऐ. पत्रें,यादी. वगैरे पुस्तकांचे कर्ते व संपादक; डे. व्ह. ट्रा. सोसायटी; भोजराज प्राइझचे परीक्षक वगैरे.

काळे रा. ब. रावजी रामचंद्र :— जन्म १८६८, विटें (जि. सातारा); शिक्षण सातारा हायस्कूल, मॅट्रिकच्या परीक्षेंत जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप मिळाली. पुढील कॉलेजमधील परीक्षांतही युनिव्हर्सिटीचीं पारितोषिकें व शिष्यवृत्त्या मिळविल्या; डेक्कन कॉलेज व एल्फिन्स्टन कॉ. १८८८ बी. ए.; नंतर 'दक्षिणा फेलोशिप' मिळाली. १८८९–९१ कांहीं काळ संस्कृतचे प्रोफेसर म्हणून काम केलें; १८९२ एल्एल्. बी. व सातारा येथें वकिलीस सुरुवात; १९०२–२० गव्हर्नमेंट प्लीडर व पब्लिक प्रॉसिक्युटर; १९२० मुंबई कायदेकौन्सिलांत निवडणूक; हायकोर्टकडून पहिल्या वार कौन्सिलमध्यें नेमणूक झाली; १९१३ रावसाहेब ही पदवी मिळाली व १९२० सालीं रावबहादुर झाले; न्यू इंग्लिश स्कूल सातारा, कन्याशाळा सातारा, व आर्यांग्ल वैद्यक विद्यालय सातारा या संस्थेचे संस्थापक व दाते; या संस्थांच्या स्थापनेच्या कामीं यांनीं मदत केली; मुंबई विश्वविद्यालय व इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी यांच्या सेनेट्स्मध्यें सभासद; मुंबई युनि०तर्फे मुंबई कायदे कौन्सिलांत सभासद; १८९६ लिबरल अॅसोसिएशनची (सातारा) स्थापना यांनीं केली; १९००डिप्रेस्ड क्लासेस, नाईट स्कूल स्थापलें व प्रार्थना समाजामार्फत चालूं ठेवलें; सातारा येथें सेवासदन व किंग एडवर्ड मॅटर्निटी हॉस्पिटल स्थापण्यांत पुढाकार घेतला; सातारा म्युनि०चे प्रेसिडेंट आहेत. लोकल सेल्फ गव्हर्नमेंट कॉन्फरन्स १९२७ कोंकण व १९३१ महाराष्ट्र–अध्यक्ष; १९२० सातारा डिस्ट्रिक्ट नॅशनल लिबरल लीगची स्थापना व अध्यक्ष; १९२४ 'ऐक्य' वर्तमानपत्र सुरूं केलें; सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे असोशिएट व त्या संस्थेस १। लाख रु. ची देणगी देऊन गोखले स्कूल काढलें; १९२० पासून मधील १९२३ –२६ हा काळ सोडून मुंबई कायदे कौन्सिलचे निवडून आलेले सभासद; रा. टे. कॉ. च्या प्रॉ. फरँचाईज कमिटीवर सभासद म्हणून नेमणूक; सध्यां मुं. कौं.चे सभासद; पत्ता–सातारा.

किबे सरदार माधवराव विनायकः— जन्म १८७७ इंदूर; १९०१ एम्. ए.; हुद्दे–सरदार, रावबहादूर, एतमाद उद्दौला; दिवाण देवास राज्य (धाकटीपाती); १९११–१४ हुजूर सेक्रेटरी–महाराजा होळकर; १९१५–२६ एक्साइज व होम मिनिस्टर इंदूर; हल्लीं डेप्युटी प्राइम मिनिस्टर, इंदूर; एम. आर., ए. एस., एफ. आर. एस. ए., (लंडन), अध्यक्ष मराठी साहित्य परिषद, अनेक इंग्रजी, मराठी, हिंदी लेख लिहिले. पुरातन, प्राचीन व अर्वाचीन इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण व साहित्य या विषयांवर लेखन. पत्ता–सरस्वती निकेतन, लष्कर, इंदूर.

किबे सौ. कमलाबाई : — जन्म शके १८०८ कोल्हापूर; सीताचरित्र, राजकुमारी, इंदिरेस पत्र, बालकथा इत्यादि पुस्तकें लिहिलीं असून विविध विषयावर अनेक लेख लिहिले आहेत. मुंबई मराठीग्रंथ–संग्रहालयाच्या एका वार्षिकोत्सवाच्या अध्यक्ष; पंजाब साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष व अनेक महिला समाजांचें अध्यक्षत्व यांच्याकडे आहे. इंदुरांतील अहिल्योत्सवाच्या या प्रमुख कार्यकर्त्या आहेत; हिंदी उत्तम जाणतात; १९३१ युरोपांत प्रवास; पत्ता–इंदूर.

किर्लोस्कर लक्ष्मण काशिनाथः— जन्म धारवाड येथें सन १८६९; शिक्षण–इंग्रजी पांच इयत्तांपर्यंत धारवाड; पुढें मुंबई व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटमध्यें १० वर्षें शिक्षकाची नोकरी; नंतर वडील बंधूंसह बेळगांव येथें सायकलीचें दुकान; १९०० सालीं शेतकीचीं लोखंडी आऊतें तयार करण्याचा, अशा प्रकारचा पहिला हिंदी कारखाना; १९१० सालीं कारखाना बेळगांव येथून औंध संस्थानच्या हद्दींत आणून किर्लोस्करवाडीची स्थापना; १९२० मध्यें त्याचें श्री. लक्ष्मणराव यांच्या चालकत्वाखालीं १६ लक्ष रुपये भांडवलाच्या लिमिटेड कंपनींत रूपांतर; सध्यां कामगारांची संख्या ६००वर; कामगारांच्या सुखाकडे विशेष लक्ष देण्याबद्दल रा. लक्ष्मणरावांस दोनदां कैसर–इ–हिंद रौप्यपदक सरकारनें दिलें. सध्यां कारखान्यांत शेतीचीं आऊतें, रहाट, पंप, खुर्च्या, पलंग, वगैरे लोखंडी सामान होतें. पत्ता–किर्लोस्करवाडी, जि. सातारा, सं. औंध.

कुकडे कर्नल कृष्णाजी विष्णु

सी. आय्. ई., आय्. एम्. एस्. (रिटायर्ड). जन्म–१८७० बालाघाट (मध्यप्रांत); शिक्षण–१८९३ एल्. एम्. अॅन्ड एस्. ग्रँट मेडिकल कॉलेज (मुंबई); १८९४ एल्. आर. सी. पी. अँड एस्. (एडिंबरो); १८९६ इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें प्रवेश. १९२५–२७, मुंबई सरकारांत सर्जन जनरल व नंतर मध्यप्रांत इन्स्पेक्टर जनरल ऑफ सिव्हिल हॉस्पिटल्स. १९२६ सी. आय. ई. ही पदवी मिळाली. १८९८ ब्रि.ईस्ट आफ्रिकेंत वॉर सर्व्हिस; १९१४–१९ युरोपियन वॉरमध्यें वॉर–सर्व्हिस; १९३१ आपलें आरोग्य हें पुस्तक लिहिलें. पत्ता––जेल रोड, नागपूर, (मध्यप्रांत).

कुलकर्णी त्रिंबक अनंतः–जन्म१८८३; शिक्षण नूतन मराठी विद्यालय पुणें, गरूड हायस्कूल धुळें, विल्सन कॉलेज मुंबई; बी.ए. (१९०४); एस. टी. सी. डी. (१९०६); १९०६–११ शिक्षक एलिफन्स्टन हायस्कूल; १९१२ स्थापना–न्यू इंग्लिश स्कूल, मुंबई; १९१८ स्थापना–गोखले एज्युकेशन सोसायटी; १९२४ स्थापना–हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज, नाशिक; प्रिन्सिपॉल–हं. प्रॉ. ठा. कॉलेज, नाशिक.

कुवलयानंद :–– जन्मस्थान– डभोई, संस्थान बडोदें; जन्म इ. स. १८८३; १९०३ मध्यें मॅट्रिकची परीक्षा; जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति मिळविली. उच्च शिक्षण–बडोदें. १९१० सालीं बी. ए. ; १९१६ पर्यंत बडोद्यास संस्कृत शिक्षक; १९१६–१९२६; आजीव सदस्य खानदेश शिक्षण मंडळ; १९२१ते १९२३ राष्ट्रीय महाविद्यालय प्रमुख; १९२४ कैवल्यधाम स्थापना; ग्रंथकर्तृत्व–१९०१ त कांहीं किरकोळ कविता; १९०४ सुदामदेव चरित्र खंड, काव्यरत्नावली, १९१७ कुवलयानंदांचीं गाणीं; १९२४ ते ३२ योगमीमांसा(इंग्रजी); १९३२ प्राणायाम (इंग्रजी); पत्ताः––कैवल्यधाम , पोस्ट लोणावळें.

कूर्तकोटी डॉ. श्रीविद्याशंकर भारतीस्वामी, शंकराचार्य मठ संकेश्वर–करवीर. जन्म ता. २० मे १८७९, कूर्तकोटी (जि. धारवाड) मूळचें नांव लिंगेश महाभागवत. मूळ घराणें कूर्तकोटी येथील कुळकर्ण्यांचें. लहानपणीं धारवाड हायस्कुलांत शिक्षण झालें. संस्कृत विद्येंत प्रावीण्य संपादन केलें. इंग्रजी, मराठी व कानडी भाषा उत्तम येतात. वयाच्या १३ व्या वर्षी विवाह झाला. यांनीं इंग्रजींत The Heart of Bhagwatgeeta या नांवाचा ग्रंथ लिहून तो Oriental University of Washington या संस्थेकड पाठविला,व तिनें तो पसंत करून त्यांस पीएच्. डी. ही पदवी दिली. मुंबई विद्यापीठानें एम्.ए.च्या Additional Vedant Prize Paperया परीक्षेस परीक्षक म्हणून यांची नेमणूक केली होती.मुंबई सरकारनें Moral Education consultative Committee वर सभासद नमिलें होतें. अंमळनेर येथील Indian Institute of Philosophyही संस्था स्थापन करण्यांत यांनीं पुढाकार घतला व तेथें Philosophy of Shankaracharya या विषयावर कित्येक व्याख्यानें दिलीं. तीं आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत. भांडारकर रिसर्च इंस्टिटयूटमध्यें 'फिलॉसफी ऑफ शंकराचार्य' या विषयावर लेक्चरर होते. त्याचप्रमाणें बंगलोर येथील 'संस्कृत अॅकेडमी'मध्यें लेक्चरर होते. 'संस्कृत रिसर्च' या इंग्रजी संस्कृत त्रैमासिकाचे संपादक, लो. टिळकांच्या सल्ल्यानें धर्मकारणांत सुधारणा करण्यासाठीं म्हणून संन्यास घेऊन संकेश्वर–करवीर पीठाचे आचार्य झाले (ता. ३ जून १९१७). त्यावेळीं व्हॉइसरॉयपासून तों कित्येक छोटे मोठे राजे रजवाडे, व प्रांतिक सरकारें यांनीं त्यांचें अभिनंदन केलें. कोल्हापुरांत शंकराचार्य म्हणून वास्तव्य. परंतु पुढें लौकरच आचार्यपीठाला दिलेल्या जहागिरींतील कुळकर्ण्यांचीं वतनें कोल्हापूरकरांनीं शंकराचार्य कूर्तकोटी यांस न विचारतां परस्पर जप्त केल्यामुळें वाद होऊन श्री एका छाटीनिशीं कोल्हापुरांतून बाहेर पडले (ऑक्टोबर १९१८). त्यामुळें फार गवगवा झाला.पुढें लागलीच संकेश्वर व करवीर या दोन पीठांच्या आचार्यांत औदुंबर मुक्कामीं तडजोड होऊन (ऑक्टोबर १९१८) शंकराचार्य कूर्तकोटी यांनीं नर्मदोत्तरीं मठ करून धर्मप्रचार करावा व संकेश्वर मठांतून ८००१ रु. घ्यावे असें ठरलें. पुढें नर्मदेची मर्यादा गोदावरीपर्यंत आणावी म्हणून लो. टिळकांच्या मध्यस्थीनें खाजगी रीतीनें ठरलें,पण लो. टिळक मध्यंतरीं विलायतेस गेल्यामुळें व पुढें ते लौकरच निवर्तल्यामुळें कागदोपत्रीं गोदावरीची मर्यादा नमूद व्हावयाची राहून गेली. पुढें आचार्य पीठांत वाद होऊन हें प्रकरण प्रीव्ही कौन्सिलपर्यंत गेलें. व अखेर स. १९२७ त औदुंबरची तडजोड कायम झाली. १९१८ सालीं मॉंटेग्यू चेम्सफर्ड यांनीं नवीन सुधारणाबाबत

धर्मपीठांचें मत विचारण्याकरितां श्रीशंकराचार्यांस मुंबईस खास भेटीस बोलाविलें होतें. १९१९ सालीं अलाहाबाद येथील ऑल इंडिया हिंदु कॉन्फरन्सचे अध्यक्ष झाले. या सभेचें पुढें हिंदु महासभेंत नामांतर करण्यांत आलें. १९२० सालीं नाशिकजवळ गंगापूर येथें स्वतंत्र पीठाची स्थापना. त्याच वर्षी नाशिक येथें पहिल्यांदा महाराष्ट्र हिंदु धर्म परिषद यांनीं पीठातर्फे भरविली. १९२१ सालीं टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपति झाले त्याच वर्षी बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचे सिंडिकेटचे सभासद झाले. १९२२ सालीं नाशिक येथें संस्कृत कॉलेज स्थापन केलें. १९२४ सालीं अलाहाबाद येथें भरलेल्या विद्वत्परिषदेचे अध्यक्ष. १९२८ सालीं मिस् मिलरचें शुद्धिकरण; त्याच वर्षी जबलपूर येथील शुद्धिसभेचे अध्यक्ष. १९२९ सालीं सुरत येथील शुद्धिसभेचे अध्यक्ष. आजपर्यंत कमींत कमी पांच हजारांच्यावर व्याख्यानें–प्रवचनें दिलीं. पतितपरावर्तन, अहिंदूंचें हिंदूकरण, क्षत्रिय–वैश्यांचें अस्तित्व व अस्पृश्यतानिवारण या चार प्रश्नास विशेषेंकरून चालना देऊन ते सोडविले. ग्रंथकर्तृत्वः–संस्कृत भाषेंत सिद्धांतसार, अष्टोत्तर शतश्लोकी, षड्दर्शनादर्श हे ग्रंथ, कानडी भाषेंत भगवद्गीतासार विचार, इंग्रजींत The Highest goal human life, Spiritual Knowledge and how to attain it, The heart of Bhagwatgeeta, Philosophy of Shankaracharya मराठींत गंगासमिति अथवा हिंदुकरण मान्यता. इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय आपद्धर्ममीमांसा ऊर्फ शिवराजस्मृति हा ग्रंथ तयार होत आला असून अद्याप अप्रसिद्ध आहे. नेहमीं महाराष्ट्र व इतर प्रांतांतून धर्मप्रचारार्थ फिरत असतात. वास्तव्य आचार्यमठ, नाशिक पंचवटी.

केतकर डॉ. श्रीधर व्यंकटेश :—जन्म १८८४, रायपूर (मध्यप्रांत); शिक्षण–मॅट्रिक उमरावती हायस्कूल; १९०६ ते १९११ कार्नेल युनिव्हर्सिटी (अमेरिका); लेखनव्यवसाय–१८९९ शिवरामस्वामीचें चरित्र व काव्यग्रंथ; रा. भि. जोशी यांच्या व्याकरणावर टीका; १९०६ महाराष्ट्र वाग्विलास सुरू केलें. अमेरिकेंत हिस्टरी ऑफ कास्टचा पहिला भाग प्रसिद्ध केला; १९११ मध्यें लंडन येथें दुसरा भाग प्रसिद्ध झाला; मराठी ज्ञानकोशाचे मुख्य संपादक; गोंडवनांतील प्रियंवदा, ब्राह्मणकन्या, गांवसासू, इत्यादींचे कर्ते; महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास यांचें लिखाण चालू. हैद्राबाद येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष; पत्ता- १४५ मेनस्ट्रीट, पुणें १.

केतकर विष्णु गंगाधर, व्यवस्थापक पुणें अनाथ विद्यार्थी गृह, ६२४ सदाशिव, पुणें जन्म १८८६ मुंबई. मूळचे राहणार वरसई, (जि. कुलाबा). घरची अतिशय गरीबी. वडील रामदासी वृत्तीनें चरितार्थ चालवीत. मधुकरी मागून विद्याभ्यास केला. लहानपणीं मिशनरी शाळेंत व पुढें पुण्यास न्यू इं. स्कूलमध्यें मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें. १९०८ सालीं यवतमाळ येथें राष्ट्रीय विद्यालयांत शिक्षक व तेथील अनाथाश्रमांत चालक म्हणून काम केलें. तेथील हरिकिशोर वर्तमानपत्राचे तिसरे संपादक. १९०९ सालीं दडपशाहीमुळें यवतमाळ येथील राष्ट्रीय संस्था उध्वस्त झाल्यामुळें पुण्यास आले व अनाथ विद्यार्थी गृहाचे चालक म्हणून काम करूं लागले. मध्यंतरीं १९०९ ते १० सालीं डे. ए. सोसायटीच्या नवीन मराठी शाळेंत शिक्षक होते. आरंभीं हे स्वतः मधुकरी मागून आणून अ. वि. गृहांतील मुलांस घालीत असत. यांनीं चालविलेल्या पुणें अ. वि. गृह संस्थेंत सध्यां दीडशें विद्यार्थी असून त्याची नाशिक येथें एक शाखा आहे. गरीब व होतकरू मुलांस बौद्धिक व औद्योगिक शिक्षण देऊन त्यांस स्वावलंबी बनविणें हें यांचें ध्येय आहे. याच संस्थेंत तयार झालेली १०-१२ माणसें ती चालविण्यास मदत करीत असून यांच्या साहचार्यानें आतांपर्यंत संस्थेंतील ८ विद्यार्थी परदेशीं उच्च शिक्षणासाठीं गेले असून कांहीं परतही आले आहेत. पत्ताः–६२४ सदाशिव पुणें.

केळकर नरसिंह चिंतामण, संचालक केसरीः—जन्म मोडनिंब सं. मिरज. सन १८७२, मॅट्रिक १८८८, एल्.एल्. बी. १८९४; सातारा जिल्ह्यांत वकिलीची सनद १८९५, केसरी–मराठा संस्थेंत दाखल १८९६, केसरी–मराठा पत्राचे संपादक १८९७; केसरीचें संपादकत्व सोडलें १८९९; हायकोर्टाची बेअदबी केल्याबद्दल शिक्षा १९०८; मराठा पत्राचें संपादकत्व सोडलें १९०८ ऑक्टोबर; कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटीचे सेक्रेटरी १९०९; केसरीचे व मराठा पत्राचे पुनः संपादक १९१०; होमरूल लीगचे सेक्रेटरी १९१६; मुंबई इलाखा राष्ट्र परिषदेचे वेळीं सभागृहत्याग १९१८; विलायतेस प्रयाण, केसरीमराठा पत्राचें संपादकत्व सोडलें १९१८; पुणें शहर म्यु. पा. चे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष १९१८; विलायतेंत इंडिया पत्राचे संपादक १९१९; केसरीचे पुनः संपादक १९२०; बडोदें येथील

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष १९२१; अकोला येथील अ. म. परिषदेचे अध्यक्ष १९२१ डिसेंबर; भोर सं. प्र. प. च्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष व कायदेभंगाबद्दल खटला १९२२; कायदेभंग कमिटीपुढें साक्ष १९२२ जुलै; अ. भा. सं. प्र. परिषदेचे अध्यक्ष; ले. असेंब्लीचे मध्यभागातर्फे सभासद १९२३; हायकोर्टाच्या बेअदबीचा दुसरा खटला व दंड १९२४; प्रतिसहकार पक्षाची स्थापना व असेंब्लीच्या सभासदत्वाचा राजिनामा; कानपूर हिंदु महासभेच्या जादा अधि. चे अध्यक्ष १९२५; प्रतिसहकारपक्षातर्फे ले. असेंब्लीचे सभासद १९२६; दिल्ली येथील दलितोद्धार परिषदेचे अध्यक्ष १९२८; ले. असेंब्लीच्या सभासदत्वाचा राजीनामा, पेणकांग्रेस शिबिरांत झेंडावंदन समारंभ व जाहीर कायदेभंग १९३०; एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रभर उत्सव, तिसऱ्या रा. टे. परिषदेला प्रयाण १९३२; ग्रंथकर्तुत्व—नाटकें, निबंध, चरित्रें, वगैरे एकंदर ३२ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं पांच इंग्रजी आहेत. पत्ता—टिळकरोड पुणें नं. २

केळकर सौ. गिरजाबाई—- जन्म १८८६ मुंबई. १७वे वर्षी पहिला लेख प्रसिद्ध झाला. तेव्हांपासून विविध विषयांवर लेख लिहिले. २२वे वर्षी ग्रंथलेखनास सुरवात, आजपावेतों आठ नऊ पुस्तकें लिहिलीं आहेत. यांनीं स्त्रियांच्या उन्नतीकरितां २।३ संस्था स्थापन केल्या आहेत. नाटच–संमेलनाच्या एकवेळीं अध्यक्ष, पुष्कळ लघुकथा व 'सतीप्रभाव' वगैरे नाटकेंही त्यांनीं लिहिलीं आहेत. पत्ता—धुळें.

केळुसकर कृष्णराव अर्जुन :—— जन्म केळुस (जि. रत्नागिरी) येथें स. १८६०; शिक्षण—मॅट्रिक (१८८०). नंतर विल्सन हायस्कूल मुंबई येथें शिक्षक, सुमारें ४५ वर्षें. १८९२ सालीं "आध्यात्मिक ज्ञानरत्नावली" मासिक काढून ७ वर्षें चालविलें. १९०७–१४ मुंबईच्या 'जगद्वृत्त' पत्राचे संपादक; लेखक व वक्ते; ग्रंथ—श्री. शिवाजी महाराजांचें चरित्र; सात उप पदांचें भाषांतर; तुकारामबुवांचें चरित्र; पत्ता—मराठा ऐक्येच्छु-मंडळ, दादर, मुंबई.

कोकटनूर डॉ. वामन रामचंद्रः—— जन्म १८८६ अथणी; शिक्षण- १९११बी. एस्. सी. (मुंबई); १९१२–१३ कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी; १९१४ एम्.एस्.(मिनिपॉलिस युनि.); १९१६ पी. एच्. डी.; १९११–१२ केमिस्ट 'रानडे इंडस्ट्रियल इन्स्टिटयूट' पुणें; १९१२युनायटेड स्टेट्सला प्रयाण; १९२१हेलेन ग्रॅबरशी विवाह; १९१४–१५ शेवलिन्फेलो मिनीपॉलिस युनिव्हर्सिटी, १९१५–१९१७ रिसर्च असिस्टंट–मिनीपॉलिस युनिव्हर्सिटी; १९१७-१८रिसर्च केमिस्ट-मॅथिसन अल्कली वर्क्स; १९१८–२० चीफ ऑफ रिसर्च डिपार्टमेंट-नायगारा,अल्कली कंपनी; १९२२पासून कन्सल्टिंग प्रॅक्टिस, रिसर्च डेव्हलपमेंट, न्यू प्रोसेसेस इत्यादि बाबतींत; १९२८ रशियामध्यें 'फाइव्ह इयर प्लॅन'वर तज्ज्ञ म्हणून नेमणूक; १९३०–३१ध्रांगध्रा येथील 'श्रीशक्ती अल्कली वर्क्स' वर टेक्निकल ॲडव्हाइसर म्हणून हिंदुस्थानांत आले. तीसाहून अधिक केमिस्ट्री पेटंट्स्चे मालक; अमेरिकेंत यांनीं प्रथम 'एरोप्लेन डोप सॉल्व्हंट' व 'व्हॅट डाइज्' तयार केले; वॉर गॅससचा शोध लावला; अमेरिकन केमिस्ट सोसायटीचे सभासद; हिस्टरी ऑफ सायन्स सोसायटीचे सभासद ; पत्ताः—केमिस्ट्स् क्लब, ५२ इ. ४१ एस्. टी. स्ट्रीट, न्यू यॉर्क (एन्. वाय्.)

कोरेकल कविवर्य यशवंत सदाशिव रावः—जन्म १८०८ शके, हैद्राबाद (दक्षिण); लहानपणीं जेमतेम शिक्षण घेऊन सरकारी नोकरींत शिरले; हे केवळ कवीच नसून उत्कृष्ट लेखक, वक्ते,प्रवचन व कीर्तनकार, तसेंच कातरकाम, चित्रकला, सूक्ष्मलेखन, पेटीवादन, गायन इत्यादि ललितकलाविशारद आहेत; यांना काव्यकौस्तुभ, वृत्तसम्राट, सकलकलाकोविद, काव्यसम्राट इ. पदव्या मिळाल्या आहेत; यांचें मराठी व उर्दू भाषेंत प्रावीण्य आहे. यांचे ३ मराठी काव्यग्रंथ व १ उर्दू काव्यग्रंथ व 'विरोध वैचित्र्य' नामक मराठी नाटक व दोन उर्दू नाटकें इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पत्ता—शालीबंडा, हैद्राबाद (दक्षिण).

कोल्हटकर चिं.ग. नट मालक बलवंत सं. मं. जन्म १८९१ सातारा. शिक्षण न्यू. इं. स्कूल सातारा. १९११ महा. ना. मं. त प्रवेश, नंतर भारत ना. मं. नंतर किर्लोस्कर सं. ना. मं. नंतर १९१८ त भागीदारासह ब. सं. मं. काढली. भूमिका तोतया, भार्गव, लंबोदर, वृंदावन, घनःश्याम, साबाजी, इ. किर्लोस्कर कं. ताजेवफा वगविलें. सरस्वती मं. प्रका. काढलें, रामराज्य वियोग व वेडयांचा बाजार पुरे केले.

कोल्हटकर श्रीपाद कृष्णः—— जन्म–१८७१ जन्मस्थान–नागपूर; प्राथमिक व दुय्यम शिक्षण अकोला वऱ्हाड येथें; कॉलेजांत

शिक्षण—डेक्कन कॉलेज , पुणें येथें; १८९१ बी.ए. व १८९७ एल्‌एल्. बी.; वकिली—कांहीं महिने अकोल्यास; १९०५ पर्यंत तेल्हाऱ्यास; १९०५—१९१८खामगांव,१९१८-१९३१जळगांव जामोद; ग्रंथकर्तृत्व——१८९६ सालीं पहिलें नाटक "वीर तनय" रंगभूमीवर आलें; त्यानंतर सं.मूकनायक, सं. मतिविकार , वधूपरीक्षा, सहचारिणी, श्रमसाफल्य, वगैरे नाटकें प्रसिद्ध झालीं; १८९७पासून कविता प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली; त्यांची संख्या १५—१६ . "सुदाम्याचे पोहे" या पुस्तकांत यांचे विनोदी लेख आहेत. १९२३—२४ चे सुमारास "दुटप्पी कीं दुहेरी" व "श्यामसुंदर"य दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. १८९३ पासूनच्या सुमारें२५ वर्षांत बरेच टीकालेख लिहिले. वरील लेखनाशिवाय कांहीं गोष्टी व कांहीं निबंधही प्रसिद्ध झाले आहेत; पुढें दिलेल्या प्रसंगीं अध्यक्ष होते. (१) ज्योतिष संमेलन सांगली १९२०; (२) कविसंमेलन, पुणें १९२२; (३) साहित्य-संमेलन पुणें १९२७ (४)विदर्भ साहित्य संघाचें प्रथम अधिवेशन; (५) मराठी ग्रंथसंग्रहालय तिसरा वार्षिक समारंभ मुंबई; (६)मराठी ग्रंथसंग्रहालय, वार्षिक समारंभ ठाणें; हल्लींचें वास्तव्य——खामगांव वऱ्हाड.

कोबहॅम सर ॲलन:—— (जन्म १८९४) ब्रिटिश वैमानिक. कांहीं वर्षें व्यापारधंद्यांत घालविल्यावर ते विमानविद्येकडे वळले. महायुद्धांत त्यांनीं 'रॉयल एअर फोर्स' मध्यें काम केलें. त्यांनीं लांब पल्ल्याचीं बरींच उड्डाणें केलीं आहेत. बेल्गेड ते लंडन; युरोप, उत्तर अफ्रिका, इजिप्त, लंडन ते रंगून व तेथून परत लंडन वगैरे; १९२६ त ते लंडनहून केप टाऊनला विमानमार्गें गेले व तेथून परत लंडनला आले;तसेंच ऑस्ट्रेलियास जाऊन तेथून परत आले; १९२८त लंडनहून केपटाऊनला गेले व परत विमानमार्गेंच आले.१९२६ त त्यांनाK.B.E. किताब मिळाला.स्वतःच्या उड्डाणासंबंधीं त्यांनीं बरेच ग्रंथ लिहिले आहेत.

कौजलगी श्रीनिवास वेंकटेश:—— जन्म १८७३, कलादगी येथें; शिक्षण विजापूर, धारवाड हायस्कूल; डेक्कन कॉलेज, पुणें बी. ए. १८९४; एल् एल्. बी. १८९६; १८९७ मध्यें हायकोर्टाची सनद काढिली, तेव्हांपासून विजापूर येथें वकिली; १८९७ पासून दोन त्रैवार्षिकें सोडून आजपर्यंत म्युनिसिपालिटीचे सभासद; त्यांत दोन वेळां अध्यक्ष; कित्येक वर्षें कर्नाटक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष; १९२२—२३ च्या धामधुमींत एक वर्ष कारागृहवास; तुरुंगांत लिहिलेलें 'स्फुट रामायण' जून १९३२ मध्यें प्रसिद्ध केलें; निरनिराळ्या मासिकांत लेख वगैरे लिहिले आहेत; कर्नाटक जनतेनें 'कर्नाटक—भूषण' ही पदवी दिली आहे.

कौल हरि किसन:— राजा; पंडित एम्. ए. सी. एस्.आय. सी.आय्. ई; राजबहादूर. जन्म १८६९. राजा पण्डित सुरज कौल सी. आय्. ई. यांचे चिरंजीव.शिक्षण सरकारी विद्यापीठ लाहोर; असिस्टंट कमिशनर १८९०; फिनॅन्शिअल कमिशनचे ज्युनिअर सेक्रेटरी १८९३—१८९७, डिस्ट्रिक्ट जज्ज लाहोर १८९७—९८; डेप्युटी कमिशनर झांग १८९८; सेटल्मेंट ऑफिसर मुझाफर्गर्ह १८९८—१९०३; एस्. ओ. मिआनवली१९०३—१९०८;डेप्यूटी कमिशनर १९०६; डेप्यूटी कमिशनर मुझाफर्गर्ह १९०८—९; डि. कमिशनर ॲंड सुपरिंटेंडेंट सेन्सस् ऑपरेशन्स पंजाब १९१०—१२; डेप्यूटी कमिशनर मॉंट्‌गोमेरी १९१३; गुन्हेगार जातींच्यासंबंधीं रिपोर्ट लिहिण्याच्या कामावर खास नेमणूक डिसेंबर १९१३ एप्रिल १९१४. डेप्यूटी कमिशनर फॉर क्रिमिनल ट्राइब्ज १९१७—१९१९; डेप्यूटी कमिशनर झीलम १९१९; कमिशनर रावळपिंडी डिव्हिजन १९१९—२०; कमिशनर जालंदर डिव्हिजन नोव्हेंबर १९२० ते १९२३; रॉयल कमिशनवर नेमणूक १९२३—२४; कमिशनर रावळपिंडी डिव्हिजन१९२४;सेवानिवृत्त नोव्हेंबर १९२४;एकॉनॉमिक इन्क्वायरी कमिटीचे सभासद १९२५; इंडियन् टॅरिफ बोर्डाचे (कॉट्‌न टेक्स्टाइल इंडस्ट्री इन्क्वायरी) सभासद१९२६—२७. भरतपूर संस्थानचे दिवाण एप्रिल ते आक्टोबर १९२७. पत्ता:—२७ लॉरेन्स रोड लाहोर.

कृष्णमूर्ती जे "ऑर्डर ऑफ दी स्टार"चे संस्थापक; कित्येक थिऑसफिस्ट पंथीय यांना जगद्‌गुरु म्हणून मान देतात.जन्म मदनपल्ले(मद्रास) १८९५; शिक्षण—लंडन व पॅरिस ; १२ व्या वर्षी "ॲट दी फीट ऑफ् दी मास्टर " हें पुस्तक लिहिलें; यूरोप व अमेरिका येथें प्रवास केला आहे. पत्ता—अड्यार (मद्रास)

कंबळी, रावबहाद्दूर सिद्धप्पा तोतप्पा:——बी. ए. एल् एल्. बी. मुंबई सरकारचे शेतकी मंत्री; जन्म सप्टेंबर १८८२; शिक्षण—डेक्कन कॉलेज; १९०६ पासून १९३० पर्यंत धारवाड कोर्टांत वकिली; १९२२ पासून १९३० पर्यंत हुबळी म्युनिसिपल बरोचे नॉन ऑफिशि-

अल अध्यक्ष; १९२९ ते ३० धारवाड डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाचे अध्यक्ष; १९२१ पासून मुंबई कायदे-मंडळाचे सभासद; १९२७–३० पर्यंत मुंबई कायदे–मंडळाचे डेप्युटि प्रेसिडेंट; १९२० सालीं हुबळी येथें पहिल्या ब्राम्हणेतर परिषदेची एकंदर व्यवस्था केली. पत्ता–फिन्टोना, मलबार हिल मुंबई.

क्रेरार सर जेम्सः–– के. सी. एस्. आय. (१९२९) सी. एस्. आय. (१९२२) सी. आय. ई. (१९१७) जुलै १९२७ पासून हिं. सरकारचे गृहमंत्री. जन्म १८७७. कै. ऑनरेबल चार्ल्स ब्रँड यांच्या एव्हेलीन या मुलीशीं विवाह. शिक्षण जॉर्ज वॉटसन् कॉलेज्, एडिनबर्ग; एडिनबर्ग युनिव्हर्सिटी व बॅलिअल् कॉलेज (ऑक्सफर्ड) असिस्टंट कलेक्टर सिंध, 'एन्कंबर्ड एस्टेट्स, सिंध चे मॅनेजर, असिस्टंट कमिशनर, सिंध; डेप्यूटी; म्युनिसिपल कमिशनर मुंबई; म्युनिसिपल कमिशनर मुंबई, मुंबईच्या गव्हर्नराचे खाजगी सेक्रेटरी; मुंबई सरकारचे चिटणीस होम डिपार्टमेंट; १९२६ त हिं. सरकारचे तात्पुरते गृहमंत्री. पत्ताः सेक्रेटरीएट् दिल्ली किंवा सिमला.

खरे यशवंत वासुदेवः–– जन्म १८.४ शिक्षण–मॅट्रिकपर्यंत; वडील कै. वासुदेवशास्त्री खरे इतिहाससंशोधक यांचे हाताखालीं कैक वर्षे काम केलें, १९२४ पासून लेखन सुरूं, 'ऐतिहासिक लेखसंग्रह' 'नाना फडणविसाचें चरित्र' 'मराठी राज्याचा उत्तरार्ध' इत्यादि. पत्ताः––मिरज.

खरे कु. बाळुताईः–– जन्म स. १९०५ आवास (जि. कुलाबा); उच्च शिक्षण प्रो.कर्वे यांच्या विद्यापीठांत; १९२३ जी.ए.; याच सालीं पुणें येथील कन्याशाळेंत अध्यापिका; १९२५ सदर शाळेच्या मुख्याध्यापिका, १९२८ 'अलंकार–मंजूषा' या निबंधानें पी.ए.ही पदवी मिळाली. ग्रंथ–अलंकार–मंजूषा, स्त्रियांच्या हक्काची सुधारणा, हिंदुधर्म व्यवहारशास्त्र व रानफुलें. प्रो. कर्वे यांच्या आश्रमाच्या आजन्म सेविका. पत्ता–मुख्याध्यापिका कन्याशाळा, पुणें २.

खाडिलकर, नाट्याचार्य, कृष्णाजी प्रभाकरः––जन्म १८७२ सांगली; शिक्षण–१८९२ बी. ए. फर्ग्युसन कॉलेज पुणें; १८९२ ते ९४ दोन वर्षे सांगली हायस्कुलांत शिक्षक; १८९७ 'केसरी' संस्थेंत दाखल; १९०२ नेपाळास प्रयाण; तेथें स्वदेशी कौलांचा कारखाना काढून नवीन राजवाड्याकरितां कौलें तयार करून दिलीं. १९०३ नाट्यलेखनास सुरुवात; १९०८ ते १० केसरीचे संपादक; १९१० ते १८ लो. टिळकांचे दुय्यम सहकारी; १९१८ पासून दीड वर्ष केसरीचे पुन्हां संपादक; १९२० केसरी संस्था कायमची सोडली; दीड वर्ष मुंबईच्या लोकमान्य दैनिकाचे संपादक. नंतर 'नवाकाळ' दैनिक सुरूं केलें. ग्रंथ–कीचकवध, मानापमान, स्वयंवर, द्रौपदी, विद्याहरण, मेनका वगैरे तेरा गद्यपद्य नाटकें. पत्ता–खटाव मकनजी बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

खानखोजे प्रो. भाऊरावः– जन्म–वर्धा; शिक्षण नागपूर येथें; १९०६ च्या सुमारास हिंदुस्थानहून जपानला प्रयाण, नंतर एक वर्षानें अमेरिकेस प्रयाण. शेतकी विषयांत बी. ए. Oregon Agriculture College; M.S. च्या पदव्या, सियाटल विश्वविद्यालय; तीन चार वर्षे मेक्सिको येथें विश्वविद्यालयांत मुख्य प्रोफेसर, मक्याच्या (Maize) दाण्यांत व उत्पन्नांत शोध लावून सुधारणा केली. त्यामुळें मेक्सिको सरकारांत, विश्वविद्यालयांत व शेतकरी संघटनांत कीर्ति. सहासात महिन्यांपूर्वी मेक्सिको सोडून दुसरीकडे प्रयाण.

खापर्डे गणेश श्रीकृष्णः– बी. ए. (१८७७); एलएल्. बी. (१८८४); ॲडव्होकेट व कौंसिल ऑफ स्टेटचे सभासद; जन्म–१८५५; शिक्षण–वऱ्हाड व मुंबई; एक्स्ट्रॉ असिस्टंट कमिशनवर, वऱ्हाड १८८५–८९; नंतर वकिलीला सुरुवात; कॉंग्रेस ही लोकपक्षीय बनविण्याकरितां लो. टिळक यांजबरोबर मेहनत करणारे; १९१८ सालीं स्वराज्य शिष्टाईस विलायतस गमन, वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद व कौन्सिल ऑफ स्टेटचे आरंभापासून आजतागायत सभासद, पत्ता– अमरावती, वऱ्हाड; सी. पी.

खापर्डे बलवंत गणेशः– जन्म १८९० त वऱ्हाडांत एलिचपूर कँप येथें; शिक्षण उमरावती व कलकत्ता येथें; डॉ. कुर्तकोटी यांजकडून 'कविभूषण' ही पदवी ' उदय ' पत्राचे ५–७ वर्षे संपादक; शुद्धलेखन कमिटीचे सभासद; १९२९ पासून बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत मराठीचे अध्यापक, यांनीं बरींच कवितांचीं पुस्तकें लिहिलीं आहेत. पत्ता–बनारस विश्वविद्यालय.

खापर्डे बाळकृष्ण गणेश ऊर्फ बाबासाहेबः––बी. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट वकील जन्म–इ. स. १८८० एलिचपूर; नामदार दादासाहेब खापर्डे यांचे ज्येष्ठ चिरंजीव व लो. टिळकांचे स्नेही. कै. बाबामहाराज (श्री. जगन्नाथ महाराजांचे वडील) यांचे जामात; गेल्या तीन निव-

डणुकींत जमीनदार मतदार संघातर्फे मध्यप्रांत कायदेमंडळांत सभासद निवडून आले. कायदेमंडळांतील राष्ट्रीय पक्षाचे पुढारी; इंग्रजी, मराठी व उर्दु वक्तृत्वाबद्दल प्रसिद्ध; फौजदारी व दिवाणी वकील; उमरावतीच्या उदय पत्राचे पहिले संस्थापक व संपादक; मुख्य धंदा वकिलीचा. पत्ताः– उमरावती.

गजेंद्रगडकर प्रो. अश्वत्थामा बालाचार्यः—एम्. ए. पी. एच्. डी. एम्. आर. ए. एस्. एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई येथें संस्कृतचे प्रोफेसर; जन्म १८९२; शिक्षण–सातारा हायस्कूल, डेक्कन कॉलेज पुणें, बी. ए. च्या पहिल्या वर्गांत पहिले; कॉलेजच्या व विश्वविद्यालयाच्या परीक्षांतून कित्येक बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळविल्या; एल्फिन्स्टन् कॉलेजांत संस्कृतचे प्रोफेसर म्हणून नेमणूक १९२०कोअर युनिव्हर्सिटी ट्रेनिंग.स्वस्तिक लीगमध्यें प्रमुख ऑफिसर व ब्राह्मण सभेचे एक प्रमुख कार्यकर्ते; कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरितां कित्येक संस्कृत ग्रंथावर टिपणें यांनीं लिहिलीं आहेत. पत्ता–महाराजा बिल्डिंग, मुंबई ४

गझनवी, दि ऑनरेबल अल्लाज सर अब्दुल करीम अबु अहंमदखान के. टी. (१९२८) एम्.एल्.सी. जमिनदार; बंगाल सरकारच्या कार्यकारी कौन्सिलचे सभासद; जन्म-१८७२; शिक्षण—सेंट पिटर्स स्कूल एक्स् माऊथ डेव्होनशायर मेसर्स रेन् अँड गर्नीज इन्स्टिटयूशन लंडन; जर्मनींतील जेना आणि इंग्लंडांतील ऑक्सफर्ड विश्वविद्यालयें; १८९४त हिंदुस्थानांत परत येऊन मालमत्ता ताब्यांत घेतली; जुन्या इंपिरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें १९०९ ते १९१२ पर्यंत पूर्वबंगाल व आसाम यांच्या तर्फे हिंदुमुसलमानांच्या नात्यासंबंधीं खटपट ; व्हाइसरायाच्या कौन्सिलमध्यें १९१३ ते १९१६ पर्यंत मुसलमानांच्या हितासंबंधीं सर्व बंगालतर्फे सभासद ; यात्रेकरूंच्या रहदारीसंबंधीं चौकशी करण्याकरितां सीरिया, पॅलेस्टाईन आणि हेडजाझचे माजी राजे हुसेन यांच्या दरबारीं एका राजकीय मंडळाबरोबर रवानगी (१९१३); बंगाल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें प्रवेश १९२३ व १९२६; १९२४ व १९२७ मध्यें बंगाल सरकारचे प्रधानपदावर नेमणूक; एप्रिल १९२९ मध्यें बंगाल सरकारच्या कार्यकारी कौन्सिलचे सभासद म्हणून नेमणूक; रा. टे. कॉ. चे सभासद; पत्ताः– नॉर्थ हाऊस् दिल दुअर मैमनसिंग, रायटर्स बिल्डिंग्ज्. कलकत्ता.

गांङ्गुली सुप्रकाश कारागीरः— एम्. आर. ए. एस्. एफ्. आर. एस्. ए. (लंडन); जगद्विख्यात कवि डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांचे भाचे; बडोदा येथील आर्ट गॅलरी व पदार्थ संग्रहालय यांचे व्यवस्थापक; जन्म १८८६; शिक्षण—डोव्हेटन विद्यापीठ, कलकत्ता; नंतर लगेच विशेषतः उत्तम कला व पुराण वस्तु– संशोधन यांच्या अभ्यासासाठीं युरोपला प्रयाण; या ठिकाणीं त्यांनीं बंगाल, बहार, ओरिसा, आसाम व छोटा नागपूर या प्रांतांतील जुने शिलालेख घेऊन त्यांचे फोटो काढणें,त्यांची यादी तयार करणें व कलकत्ता येथील पदार्थ संग्रहालय आणि त्याच्या शाखा यांमधून जुन्या हिंदी कलावशेषांचा अभ्यास करणें अशा तऱ्हेचा व्यासंग; पत्ताः–पुष्पबाग बडोदा.

गाडगीळ, प्रि. धनंजय रामचंद्रः— जन्म–१९०१ (नागपूर) शिक्षण–पटवर्धन हायस्कूल नागपूर १९१०–१५; क्वीन्स कॉलेज, केंब्रिज १९१८–२३; एम्. ए. एम्. लिट्. (केंब्रिज); १९२४–२५ असिस्टंट सेक्रेटरी फायनन्स डिपार्टमेंट मुंबई; या जागेचा राजिनामा दिला. १९२५ –३० प्रिन्सिपल म. टा. वा. कॉलेज, सुरत; ही जागा सोडून गोखले इ. ऑ. पॉ. अँन्ड इ. या संस्थेचें चालकत्व पतकरलें १९२७; फेलो मुंबई युनिव्हर्सिटी; १९३१ मेंबर सीनेट व सिंडिकेट; श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ. ग्रंथ–१९२४, इंडस्ट्रियल एव्होल्यूशन ऑफ इंडिया; १९२८ बॉम्बे लॅंड रेव्हेन्यू सिस्टम; १९३१ सॅलरीज ऑफ पब्लिक ऑफिशियल्स इंडिया; १९३२, हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास; ओटावा अर्वाचीन विभाग; लो. ल. ग्रं. माला. पत्ताः—डेक्कन जिमखाना कॉलनी पुणें.

गायकवाड, एच्. एच्. महाराजा सयाजीराव तिसरेः—जी. सी. एस्. आय. (१८८१); जी. सी. आय. ई. (१९१९); एल्. एल्. डी. (१९२४) बनारस हिंदु विश्वविद्यालय सेना खास खेल समशेर बहादूर; जन्म १८६३; लग्न तंजावरच्या चिमणाबाई साहेब यांच्याशीं पहिलें (१८८०) (मृत्यु १८८५).दुसरें लग्न १८८५ देवासच्या चिमणाबाईसाहेब दुसऱ्या यांच्याशीं. ४ मुलगे व ३ मुली झाल्या. पैकीं १ मुलगा व १ मुलगी जिवंत. शिक्षण महाराज् स्कूल बडोदें. राज्यारोहण १८७५. अधिकारसूत्रें हातीं आलीं १८८१.ग्रंथ–From Caesar to

Sultan; Famine Notes; Speeches; १९०४ भारतीय सामाजिक कॉन्फरन्सचे अध्यक्ष. १९३२ कोल्हापूर येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

गोर्की:--(जन्म १८६९) रशियन लेखक. याचें सुरुवातीचें आयुष्य उनाडण्यांतच गेलें; पण या वयांतच पुढील लेखनाची साधनसामुग्री त्यानें जमविली. १८९२ त त्याची पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली व त्यानंतर तो फार लोकप्रिय लेखक बनला. १९०१ त त्याच्या गोष्टींचा संग्रह प्रसिद्ध झाला व त्याचीं इंग्रजींत भाषांतरेंही झालीं. १९०३ मध्यें त्याचें एक नाटक लंडनच्या रंगभूमीवर आलें. महायुद्ध सुरू झाल्यानंतर त्यानें रशियन रेडक्रॉसमध्यें काम केलें. पुढें तो बोल्शेव्हिस्ट लोकांत मिसळला.पण १९२० त्यानें बोल्शेव्हिस्ट लोकांशीं असलेला संबंध तोडून टाकला. Fragments from my diary हें त्याचें पुस्तक १९२४ त व Bystander हें पुस्तक १९३० त प्रसिद्ध झालें.

गांधी, मो. क.:-- जन्म--ता. २।१० १८६९ रोजीं काठेवाडांत सुदामपुरी अगर पोरबंदर येथें; जात वैष्णव वैश्य; आजे उत्तमचंद पोरबंदरचे दिवाण; वडील करमचंद पोरबंदर व राजकोटचे दिवाण; आई कर्मठ धर्मशील व करारी; शिक्षण--काठेवाड हायस्कूल, भावनगर कॉलेज; लंडन विश्वविद्यालय व इतर टेंपल या शिक्षण संस्थांमध्यें; सन १८८७ मध्यें मॅट्रिक पास; ता. ४।९।१८८८ रोजीं शिक्षणासाठीं विलायतेला गमन; लंडन मॅट्रिकची परीक्षा देऊन ता. १०।६।९१ रोजीं बॅरिस्टरची परीक्षा पास होणें.सन १८९३ मध्यें मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट; विवाह--१३ व्या वर्षी श्री. कस्तुरबाई गांधी यांचेशीं; १६ व्या वर्षी प्रथम अपत्य; सन १८९३ मध्यें दक्षिण आफ्रिकेंत गमन व सुप्रीम कोर्टाचे ॲडव्होकेट; सन १८९४ मध्यें नाताळ हिंदी काँग्रेसची स्थापना; सन १८९६ मध्यें आफ्रिकेंतील हिंदी लोकांसाठीं हिंदुस्थानांत खटपट; व नंतर ऑफ्रिकेस पुन्हां प्रयाण; किनाऱ्यावर उतरतांच गोऱ्या लोकांकडून भयंकर हल्ला व पोलिस सुपरिंटेंडेंटच्या पत्नीकडून बचाव; सन १८९९ पर्यंत नाताळ कांग्रेसची संघटना, मुलांचें शिक्षण व ऑफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या करितां हरएक प्रकारची चळवळ; सन १८९९ मध्यें बोअर युद्धांत शुश्रूषापथक काढून जखमी लोकांची शुश्रूषा; सन १९०१ मध्यें हिंदुस्थानांत आगमन. येतांना लोकांकडून मिळालेल्या अनेक देणग्यांचा सार्वजनिक कार्यासाठीं सार्वजनिक ट्रस्ट करून ठेवणें; कलकत्ता कांग्रेसमध्यें ऑफ्रिकेंतील लोकांच्या वतीनें भाषण. ना. गोखल्यांचा परिचय. व ब्रह्मदेशाला भेट, व नंतर ऑफ्रिकेस पुन्हां गमन.तेथें चेंबरलेन कमिटीपुढें साक्ष; ट्रान्सवॉलच्या सुप्रीम कोर्टाचे ॲटर्नी व ब्रिटिश इंडियन असोसिएशनची स्थापना; सन १९०४सालीं इंडियन ओपिनियन या वृत्तपत्राची सुरवात.फिनिक्स आश्रमाची स्थापना; जोहान्सबर्ग येथें महामारी व काळा प्लेग या रोगांच्या शमनाप्रीत्यर्थ जिवापाड मेहेनत.सन १९०५सालीं झुलू लोकांच्या बंडांत प्रेतवाहक तुकडीचे नायक. एशियाटिक लॉ या कायद्याचे विरुद्ध सत्याग्रहाची चळवळ व तत्पूर्वी इंग्लंडमध्यें काम. चळवळींत तुरुंगवास; नंतर गांधी--स्मट्स् करार व तो न आवडल्यामुळें एका पठाणाचा भयंकर हल्ला. स्मट्स्कडून कराराचा भंग व पुन्हां सत्याग्रह व तुरुंगवास. सन १९०९ मध्यें शिष्टमंडळ घेऊन इंग्लंडला गमन; वाटेंत बोटीमध्यें 'हिंद स्वराज्य' या पुस्तकाचें लेखन व नंतर तें सरकारजमा होणें. सर रतन टाटांची सत्याग्रही लोकांच्या खर्चासाठीं पंचवीस हजार रुपयांची मदत. सन १९११ सालीं लढ्याचा तात्पुरता शेवट, व टॉलस्टॉय फार्मची स्थापना. या फॉर्मला नामदार गोखले यांची भेट. सन १९१३ सालीं तीन पौंडाचा कर रद्द करण्याच्या वचनाचा भंग. मजुरांचा संप; सत्याग्रह व पुन्हां सहकुटुंब तुरुंगवास . सत्याग्रहाचा विजय. सन १९१४ सालीं पुन्हां इंग्लंडची यात्रा. व महायुद्धांत शुश्रूषा पथकाची स्थापना.सन १९१५ सालीं हिंदुस्थानांत पुनरागमन व सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीला मिळण्याबद्दल ना. गोखल्यांकडून विनंति. विरमगांवच्या जकातीचे बाबतींत होणारा जुलूम बंद करण्याची खटपट. शांतिनिकेतनमध्यें कांहीं दिवस वस्ती. हरिद्वारच्या मेळ्यांतील अनुभव; ता.२५ मे रोजीं अहमदाबादनजिक सत्याग्रहाश्रमाची स्थापना व लक्ष्मी नांवाच्या अस्पृश्य मुलीस स्वतःची मुलगी समजून आश्रमांत घेणें. आश्रमांत अस्पृश्य कुटुंब घेतल्याबद्दल मित्रांचा रोष व मदत बंद होणें. लगेच एका अनोळखी गृहस्थाकडून १३ हजार रुपयांची देणगी. ता. ४।२।१९१६ रोजीं बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या अनावरणाचे वेळीं स्पष्टोक्ती जाहीर सभेंत. अराजकता, काशींतील घाण आणि राजेरजवाड्यांचा उथळेपणा व

चैन यांवर कडक टीका. सन १९१७ सालीं चंपारण्यांतील अन्यायाविरुद्ध चळवळ. अहमदाबाद येथील गिरणी मजुरांच्या संपास पाठिंबा, तत्प्रीत्यर्थ तीन दिवसांचा उपवास व संपाचा विजय. सन १९१८ सालीं खेडा जिल्ह्यांत सत्याग्रह व यशःप्राप्ती. दिल्ली युद्ध परिषदेशीं सहकारिता, लष्कर भरतीचा प्रयत्न. सन १९१९ मध्यें यंग इंडिया व नवजीवन या पत्रांचे संपादक होणें. रौलेट कायद्याविरुद्ध सत्याग्रह, देशभर प्रवास व अपूर्व जागृति. दिल्लीच्या वाटेवर अटक व पंजाब आणि गुजराथमधील दंग्यांमुळें सत्याग्रहाची तहकुबी. पंजाब प्रकरणाची चौकशी. खिलापत चळवळीस पाठिंबा . अमृतसर काँग्रेसमध्यें सहकारितेचा हात पुढें करूनही सरकारनें तो झिडकारल्यामुळें खिलापत परिषदेंत असहकारितेच्या ठरावाचा स्वीकार . १ ऑगस्ट १९२० ला सहकारितेच्या चळवळीस सुरवात. याच सालीं काँग्रेसची पुनर्घटना, चरख्याचें पुनरुज्जीवन, गुजराथ विद्यापीठाचीं स्थापना व कलकत्ता व नागपूर काँग्रेसमध्यें असहकारितेस मंजुरी ; राष्ट्रीय सभेच्या ध्येयांत व कार्यक्रमांत क्रांति ; 'एक वर्षांत स्वराज्य' ही घोषणा.सन १९१८सालीं एक कोटि रुपयांचा टिळक स्वराज्य फंड जमविणें,कांग्रेसचे एक कोटी सभासद नोंदणें,खादी,युवराज–बहिष्कार, अस्पृश्यता–निवारण व हिंदु–मुसलमानांचें ऐक्य वगैरे कार्यक्रमांच्या प्रचारासाठीं सर्व देशभर प्रवास.मुंबई वगैरे ठिकाणचे दंगे शांत करण्यासाठीं उपवास व अहमदाबाद कांग्रेसमध्यें राष्ट्राकडून सर्वाधिकारी म्हणन नेमणूक ; सन१९२२सालीं चौरिचौरा येथील दंग्यामुळें बार्डोलीच्या सविनय कायदेभंगाची व करबंदीची तहकुबी ; नंतर तयारी म्हणून विधायक कार्यक्रम पार पाडण्याबद्दल राष्ट्रास उपदेश व लगेच राजद्रोहाबद्दल खटला. व सहा वर्षांची शिक्षा.सन१९२४ फेब्रुवारीमध्यें आजार व इतर कारणामुळें येरवडा तुरुंगांतून मुक्तता व हिंदु–मुसलमानांच्या ऐक्यासाठीं दिल्लीस २१ दिवस उपवास. स्वराज्य पक्षाशीं समेट, बेळगांव काँग्रसचें अध्यक्षपद व 'सुतास मत' या ठरावास कांग्रेसकडून मंजुरी आणि असहकारितेची तहकुबी. सन १९२५ सालीं राष्ट्रीय सभेचीं सूत्रें स्वराज्य पक्षाच्या स्वाधीन करून सुतास मत या ठरावांत बदल करणें व अखिल भारतीय चरखा संघाची स्थापना. याच सालीं चरखा, खादी, ग्रामसंघटना वगैरेबद्दल दे. दास यांचेशीं विचारविनियम व दे.दास यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मारकासंबंधीं खटपट. पुढील दोन तीन वर्षे अखिल भा.चरखा संघाच्या कार्यासाठीं सर्व प्रांतांतून प्रवास व प्रचार. सन१९२८ सालीं बार्डोली सत्याग्रहांत विजय. राष्ट्रीय सभेचीं सूत्रें पुन्हां हातीं घेणें.स्वातंत्र्याच्या ठरावाला पाठिंबा ; 'स्वराज्याचें वचन द्या' अशी व्हाइसरॉय लॉर्ड अर्विन यांचेकडे मागणी व त्यांचेकडन नकार ; ता.१।१। १९३० चे आंत स्वराज्य न मिळाल्यास स्वातंत्र्य हें काँग्रेसचें ध्येय आहे असें जाहीर करण्याचा ठराव लाहोर कांग्रेसमध्यें मंजूर करून घेणें ; सरकारच्या निराशाजनक वर्तनामुळें सविनय कायदेभंगाचा निश्चय व ता. १२।३।१९३० रोजीं साबरमती सत्याग्रहाश्रमांतून दांडीची यात्रा करण्यासाठीं ८० स्वयंसेवकांबरोबर प्रयाण व वाटेंत अपूर्व स्वागत व देशांत अभूतपूर्व जागृति ; ता. ५।४।३० रोजीं दांडी येथें आगमन, मिठाचा कायदेभंग व कायदेभंगाचा प्रचार ; मिठागरावर हल्ले करण्याचा कार्यक्रम ठरविल्याबद्दल सरकारला इशारा व ता. ५।५।३० रोजीं रासगांवीं अटक व एरवडा तुरुंगांत बिनमुदत कैद. १० महिन्यांच्या प्रचंड चळवळीनंतर ता.२६ जानेवारी १९३१ रोजीं एरवडा तुरुंगांतून सुटका व दिल्ली येथें ता. ५।३।१९३१ रोजीं गांधी आर्यविन तह ; एप्रिल३१ कराची येथें भरलेल्या काँग्रेसमध्यें या तहाला मंजुरी व २ऱ्या गोलमेज परिषदेंत काँग्रेसचे एकच एक प्रतिनिधि म्हणून नेमणूक ; ता. २९।८।३१ रोजीं इंग्लंडला प्रयाण. वाटेंत ठिकठिकाणीं प्रचंड स्वागत. इंग्लंडमध्यें २ऱ्या गोलमेज–परिषदेंत अनेक सडेतोड भाषणें व शेवटच्या भाषणांत हिंदुस्थानच्या मागण्या अत्यंत स्पष्ट शब्दांत परिषदेपुढें मांडून परत स्वदेशाला फ्रान्स,स्वित्सरलंड,इटालीमार्गे गमन ; परत आल्यावर बंगाल, सरहद्द व संयुक्तप्रांत यांमधील वटहुकुमांबद्दलच्या वाटाघाटीसाठीं व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डनकडे मागणी व त्यांचेकडून नकार. सविनय कायदेभंगाला पुनश्च सुरवात. व पुन्हां प्रचंड चळवळ. ता. ४।१।३२ रोजीं मुंबई येथें अटक व पुन्हां एरवडा तुरुंगांत बिनमुदत कैद. मतदार संघाबाबत मुख्य प्रधान व स्टेट सेक्रेटरी यांचेशीं पत्रव्यवहार व अस्पृश्यांस स्वतंत्र मतदार संघ दिल्याबद्दल ता. २०।९।३२ रोजीं उपवासाला सुरुवात ; पुणें येथें पुढाऱ्यांच्या परिषदेंत अस्पृश्यांना संयुक्त मतदार संघ व राखीव जागा देण्याचा करार मंजूर झाल्यावर व तो ब्रिटिश प्रधान मंडळानें मान्य केल्यावर उपवासा-

चें विसर्जन. या कराराची अंमलबजावणी स्पृश्यांकडून न झाल्यास पुनश्च उपवास करण्याबद्दल आगाऊ इषारत.

गांधी नेमचंद वालचंदः— जन्म १९३० संवत्, धाराशिव (उस्मानाबाद); शिक्षण–मराठी, उर्दू, संस्कृत व थोडें इंग्रजी; वयाच्या १७व्या वर्षी निजाम संस्थानांतील वकिलीची परीक्षा पास झाले. कलकत्त्यास 'भारतवर्षीय जैन सिद्धान्त प्रकाशिनी' संस्थची स्थापना केली; यांनीं मुसलमानांच्या विरोधास न जुमानतां उस्मानाबाद येथें नूतन जैन-मंदिर बांधून प्रतिष्ठा–समारंभ साजरा केला. ग्रंथ–'ईश्वर कांहीं करतो काय'? कांहीं संस्कृत ग्रंथांचें मराठींत किंवा हिंदींत भाषांतर केलें; जैन–प्रकाशिनी संस्थेंतून जैन वाङमयाचे संस्कृत, प्राकृत, हिंदी वगैरे बरेच ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. पत्ताः—वकील, उस्मानाबाद.

गिडने हेन्री अल्बर्ट जॉनः—लेफ्टेनंट कर्नल; आय. एम. एस. (सेवानिवृत्त); एफ्. आर. सी. एस.; एफ्. आर. एस्.; सी. ओ. (ऑक्सफर्ड); एफ. आर. एस्. ए. (लंडन); डी. पी. एच्. (केंब्रीज); जे. पी.; एम्. एल्. ए.; डोळ्यांचे सर्जन; जन्म १८७३. शिक्षण–कलकत्ता व एडिंबरो; युनिव्हर्सिटी कॉलेज हॉस्पिटल लंडन, केंब्रीज व ऑक्सफर्ड; नेत्ररोग या विषयावरील पोस्ट ग्रॅज्युएट लेक्चरर्, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी (१९११); हिंदी लष्करी खात्यांत शिरकाव १८९८; चीनवरील मोहीम १९००–१९०१, ईशान्य सरहद्द १९१३, वायव्य सरहद्द १९१४–१५ (जखमी); ग्रंथ– Numerous works on Ophthalmic Surgery अखिल भारतीय व ब्रम्ही 'अँग्लो इंडियन अॅन्ड डोमीसाइल्ड युरोपियन असोसिएशन'चे प्रेसिडेंट; इंग्लंडला गेलेल्या अँग्लो इंडियन शिष्ट मंडळाचे पुढारी १९२४; लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद; असिस्टंट कमिशनर, रॉयल मजूर कमिशन; रा. टे. कॉ.चे सभासद. पत्ता– ८१ अ, पार्क स्ट्रीट, कलकत्ता.

गोखले, सौ. अवंतिकाबाई —जन्म १८८३; इंदूर येथें जोशी घराण्यांत; श्री. बबन गोखले यांच्याशीं विवाह ९ वे वर्षी झाला; मराठी व इंग्रजी शिक्षण घरींच झालें; १९१३ विलायतचा प्रवास; नंतर सार्वजनिक कामास सुरुवात केली; १९१७ चंपारण्यांत म. गांधींचे बरोबर स्वयंसेवक म्हणून काम केलें; नंतर म. गांधींचें चरित्र लिहिलें; १९२३ पासून मुंबई म्यु. कार्पोरेशनच्या पहिल्या महाराष्ट्रीय स्त्री-सभासद; यांपैकीं तीन वर्षें स्टँडिंग कमिटीमध्यें पहिल्या स्त्री सभासद; १९३० मुंबई प्रॉव्हिन्शिअल कांग्रेस कमिटीच्या अध्यक्ष म्हणून ९ महिने शिक्षा; 'हिंद महिला समाज, मुंबई' या संस्थच्या आज बारा वर्षे अध्यक्ष आहेत; पत्ता–भटवाडी, गिरगांव, मुंबई.

गोखले दामोदर विश्वनाथ बी. ए. एल् एल्.बी. सहसंपादक केसरी पुणें; जन्म शके १८०७; जन्मस्थान कोल्हापूर; शिक्षण राजाराम व बडोदा कॉ.; १९१५ केसरींत प्रवेश; मराठ्याचे १२ वर्षे संपादक; सार्वजनिक सभा, होमरूल लीग इ०चे एकदां चिटणीस; बारा वर्षे ऑ. इं. कॉंग्रेस कमिटीचे मेंबर; दहा वर्षे पुणें म्यु.चे सभासद; सहकारी चळवळींतील कार्यकर्ते; कॉस्मॉस, सेंट्रल को. ऑ., बॉंबे प्रॉ. को. बॅंक इत्यादींतील प्रमुखांपैकीं कार्यकर्ते; १९३१ सालापासून केसरीचे सहसंपादक; १९३० **सत्याग्रहांत** ८ महिने शिक्षा व २५० रु. दंड; १९३२ वटहुकुमाखालीं २ महिने कारागृहवास. पत्ता– शनवार पेठ, पुणें.

गोखले प्रि. **गंगाधर** निळकंठः— जन्म १८८७ पुणें; मूळ घराणें मिरज; शिक्षण सातारा हायस्कूल, १९०२ मॅट्रिक; १९०६ बी. एस्. सी.; १९०९ एल्. सी. ई.; १९१० इंडियन सर्व्हिस ऑफ इंजिनिअर्समध्यें दाखल व १९२७ सेवानिवृत्त; १९१७ इंडियन डिफेन्स फोर्स, पुणें हवालदार; मेंबर, इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स, इंडिया (धारवाड, हुबळी, नीरा कॅनॉल, सक्कर बॅरेज प्रॉजक्ट, जामराव कॅनॉल, इंडस रिव्हर गजिंग–लारखाना इत्यादि ठिकाणीं कामें केलीं); १९२१ सेक्रेटरी, विश्वेश्वर अय्या टेक्निकल एज्युकेशन कमिटी; १९२६ पासून फेलो– मुंबई विश्वविद्यालय; १९२८ मेंबर, हेस्केथ कमिटी–प्रायमरी सेकंडरी एज्युकेशन; १९२३ पासून आजतागायत प्रिन्सिपल, नादिरशा एदलजी दिनशा सिव्हिल इंजिनिअरिंग कॉलेज. कराची; १९३२ सेकंड लेफ्टनंट एलेक्वथ कराची यु. टी. सी.; ग्रंथ Practical Education, Science & Arts Causes, Engineering causes, Scientific Religion; **Two**

Volumes–पत्ता–प्रिन्सिपल, ना. ए. वि. सिव्हिल इंजिनिअरिंग कॉलेज कराची.

गोखले, प्रो. शंकर लक्ष्मण:–– जन्म सन १८६९ वांई; शिक्षण–१८९२ बी. ए. कलकत्ता; १८९३ एम. ए. (केमिस्ट्री) कलकत्ता; १९०५ एम. ए. (फिजिक्स) कलकत्ता. १८९५ ते ९६ प्रोफेसर हिस्लॉप कॉलेज, नागपूर. १८९८ ते १९०८ प्रोफेसर होळकर कॉलेज इंदूर. १९०९ प्रिन्सिपाल पावना कॉलेज पावना. १९०८ ते ९ युनिव्हर्सिटीचे परीक्षक अलाहाबाद. १९२१–२२; प्रि. होळकर कॉलेज, इंदूर १९१३ ते ३२; मॅग्नेटिक इंजिनियर, जनरल इलेक्ट्रिक कं. Schenectady Newyork; यांना युनायटेड स्टेट्समध्यें नागरिकत्वाचे हक्क मिळाले आहेत. ग्रंथ–दुर्योधनाची फिर्याद, मार्गदर्शनी पद्धति, Law of Magnetization वगैरे पत्ता–६ इल्बर्ट स्ट्रीट, शेनेक्टाडी, (Schenectady Newyork) न्यूयॉर्क, अमेरिका.

गोडबोले डॉ. एन्. एन्.:–जन्म १८८८ धारवाड; शिक्षण–धारवाड हायस्कूल, बी. ए., (१९०७) डेक्कन कॉलेज, पुणें; १९०८ बी.एस्. सी. व इंटर-सायन्स परीक्षा एकाच वर्षात उत्तीर्ण, फर्ग्युसन कॉलेज पुणें; १९१० एम्. ए. (केमिस्ट्री) सेकंड क्लासमध्यें उत्तीर्ण एकाच वर्षांत–झेविअर कॉ. मुंबई, (युनिव्हर्सिटींत दुसरे); १९११–१२ प्रोफेसर केमिस्ट्री, डी. टी. कॉलेज कराची (सिंध); १९१२–१९ सायन्स प्रोफेसर, सरदार दयाळसिंग कॉ. लाहोर; १९१७–१८ प्रवास–जपान व फिलिपाइन आयलंड्स्; १९१९ पासून बनारस हिंदु युनि० येथें Industrial Chemistry Department चे संस्थापक व त्या विषयाचे प्रोफेसर; १९१९–२० पंजाब, कलकत्ता, म्हैसूर येथील युनिव्हर्सिटीजकडून 'स्पेशल लेक्चरर' म्हणून निमंत्रणें; तेथें ठिकठिकाणीं मिळून 'जपानची औद्योगिक व आर्थिक प्रगति' या विषयावर ३० व्याख्यानें दिलीं; बनारस येथें 'अॅप्लाईड केमिस्ट्री'चें शिक्षकत्व चालू असतांच Semi Large scale manufacturing ला सुरुवात व अशाच तऱ्हेचा हा जगांतील पहिला उपक्रम; १९२३–२५ जर्मनींत शिक्षण व चार टर्ममध्यें बर्लिन युनि०ची डॉक्टरेट मिळविली; तुपांतील भेसळ ओळखण्याचें अगदीं नवीन यंत्र यांनीं काढिलें आहे. पत्ता–बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, बनारस.

गोडबोले दिवाणबहादूर काशिनाथ रामचंद्र:––––जन्म–१८४७ इ. स. शिक्षण–१८६९ बी. ए. १८७२ इंजिनिअरिंग परीक्षा पास झाले, तीस वर्षें सरकारी नोकरी; सेवानिवृत्त झाल्यावरही यांनीं अनेक योजना हातीं घेऊन त्या तडीस नेल्या. उदा. दौंड बारामती रेल्वे फाटा, पुणें शहर विद्युत पुरवठा, धुळें शहर विद्युत पुरवठा, इत्यादि, यांचा भारतस्नेहसंवर्धन संस्थेच्या विद्यमानें ८५ वा वाढदिवस नुकताच ता. ६।२।३२ रोजीं साजरा झाला. हे डेक्कन एज्युकेशन सोसायटी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी व शिक्षण प्रसारक मंडळी या संस्थांचे चेअरमन आहेत. पत्ता:––शनीच्या पारानजीक, सदाशिव पेठ, पुणें २

गोडसे पुरुषोत्तम माधवराव:––जन्म शके १८०६ औरंगाबाद; शिक्षण–प्राथमिक व नंतर कायद्याचा अभ्यास करून 'ज्युडिशिअल' ची परीक्षा दिली; मुनसफ होण्याचा हक्क असतां तो नाकारून हायकोर्ट वकिलीची सनद घेतली; तेव्हांपासून आज २२ वर्षें वकिली; हे प्रसिद्ध वकील, जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद, सहकारी पतपेढीचे ऑ. सेक्रेटरी असून खादीप्रसार, दुष्काळग्रस्तांचें संकटनिवारण व श्रीकनकालयेश्वर दर्शनाची बंदी उठविण्याचा प्रयत्न करणारे व इतर लोकोपयोगी कार्यें करणारे आहेत. पत्ता–बीड, (निजाम), पोस्ट मुर्शीदपूर, जि. अहमदनगर.

गौर सर हरिसिंग:–के.टी. (१९२५); एम्. ए. डी. लिट्.; डी. सी. एल्.; एल्. एल्. डी.; ले० असेंब्लीचे सभासद; बॅरिस्टर अॅट लॉ; जन्म १८७२; शिक्षण–सरकारी हायस्कूल, सौगोर; हिस्लॉप विद्यापीठ नागपूर; डाउनिंग विद्यापीठ केंब्रीज; नागपूरच्या म्युनिसिपल कमिटीचे अध्यक्ष; दिल्ली विश्वविद्यालयाचे पहिले व्हाइस् चॅन्सेलर व ऑन डी. लिट्.; १ मे १९२४–२६ ला पुन्हां नेमणूक; इंडियन सेंट्रल कमिटीचे सभासद; ले० असेंब्लीचे निवडलेले डेप्युटी प्रेसिडेंट व एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशनचे (हिंदुस्थान शाखा) उपाध्यक्ष; ब्रिटिश एम्पायर सोसायटी व नॅशनल लिबरल क्लब यांचे सन्मान्य सभासद अनेक कायद्यावरील ग्रंथ–Law of The Transfer in British India पत्ता–नागपूर, (सी. पी.).

घारपुरे प्रि. जगन्नाथ रघुनाथ:-जन्म शके

१७९४नागपूर; शिक्षण–१८९५ बी. ए.; १९०० एल्. एल्. बी.; १९०२ ऑनर्स–इन्–लॉ; अॅडव्होकेट हायकोर्ट (मुंबई); प्रिन्सिपॉल व प्रोफेसर लॉ कॉलेज पुणें; भांडारकर इन्स्टि-ट्यूट पुणें; हिंदू लॉ टेक्स्ट्स् सेरीज्मध्यें २५ पुस्तकें लिहिलीं आहेत; उदा०– मिताक्षरी, स्मृतिचंद्रिका, उत्सर्ग–मयूख वगैरे; पत्ता– आंग्रेवाडी, गिरगांव, मुंबई.

घुर्ये डॉ. जी. एस्.–जन्म १८९३ मालवण (जि. रत्नागिरी); शिक्षण–१९१३ जुनागड येथें इंटरमिजिएट होईतोंपर्यंत; १९१३–१८ एल्फिन्स्टन कॉ. मुंबई; १९१८ एम्. ए.; (बी. ए. व एम्. ए. संस्कृत ऑनर्स व इंग्लिश घेऊन); युनिव्हर्सिटीच्या सर्व परीक्षांत पहिला वर्ग मिळविला; बी. ए.ला भाऊ दाजी प्राइझ् व गंगादास रंगिलदास स्कॉलरशिप मिळाली; पुढें दोन वर्षें एल्फिन्स्टन कॉ.मध्यें दक्षिणा फेलो; एम्. ए.ला चॅन्सलर्स मेडल्, भगवान दास पुरुषोत्तमदास आणि सर लॉरेन्स जेंकिन्स या स्कालर्शिप्स् मिळाल्या; पुढें स्पिन्जर रिसर्च स्कॉलरशिप व भगवानलाल मुळजी प्राइझ मिळालें; १९१९पासून कांहीं काळ एल्फि-न्स्टन कॉ.मध्यें प्रोफेसर ऑफ संस्कृतचे असि-स्टंट; १९१९–२० युनिव्हर्सिटी स्कलमध्यें सोशिऑलजीचा अभ्यास केला; युनिव्हर्सि-टीची स्कॉलरशिप मिळाल्यामुळें इंग्लंडला गेले; १९२०–२३ लंडन, स्कूल ऑफ इकॉ-नॉमिक्स व केंब्रिज येथें शिक्षण; १९२३ पी एच्. डी. (केंब्रीज); १९२३ पूर्वीच्या गव्ह-र्नमेंट सबॉर्डिनेट सर्व्हिसचा राजिनामा; एक वर्ष मुंबई युनिव्हर्सिटीची स्पेशल स्कॉलरशिप मिळाली; १९२४ पासून युनिव्हर्सिटीनें 'रीडर इन् सोशिऑलजी' म्हणून नेमणूक केली आहे. यांचीं कित्येक ग्रंथपरीक्षणें 'सर्व्हंट ऑफ इंडिया' पत्रांत प्रसिद्ध झालीं आहेत. याशिवाय लंडन, व्हिएन्ना येथील सोशिऑलॉ-जिकल व रांची येथील नियतकालिकांतून 'मॅन इन् इंडिया' या पत्रांत यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत; ग्रंथ–कास्ट अँड रेस इन् इंडिया (इन् दि हिस्टरी ऑफ सिव्हिलिझेशन) १९३२; पत्ता–स्कूल ऑफ इकॉनमिक्स् अँड सोशिऑलजी. बॉम्बे युनिव्हर्सिटी.

घोरपडे श्रीमंत नारायणराव गोविंद-राव ऊर्फ बाबासाहेब (इचलकरंजीकर) इचल-करंजी संस्थानचे अधिपति; जन्म रा. १८७१ करकंब (जि. सोलापूर); १८७६ दत्तविधान, १८८५ रा. रा. मोहनीराज परांजपे, वकील,नगर यांच्या कन्येशीं विवाह; शिक्षण–कोल्हापूर येथें १८८८ मॅट्रिक; एकवर्ष राजाराम कॉलेज, बी. ए. (इंग्रजी इतिहास आणि अर्थशास्त्र) एल-फिन्स्टन कॉलेज, मुंबई; कायद्याचें ज्ञान लॉस्कूल व हायकोर्टाच्या कामाचें निरीक्षण; १८९२ संस्थानचीं अधिकारसूत्रें मिळालीं; १८९७ प्रथम कौन्सिलमध्यें सरदार वर्गातर्फे निवडून आले. सदर कौन्सिलांत १२–१३ वर्षे चांगल्या प्रकारें काम केलें. मुंबई इलाख्याच्या शेतकी परिषदेचे अध्यक्ष १९१०; प्रवास १९१२ मद्रासकडून सिलोन, तेथून मलाया पेनिन्शुला, पिनांग, सिंगा-पूर व जावा बेट. १९२३ काश्मिरांत ७।८ महिने मुक्काम; अमरनाथची यात्रा; १९१३ विलाय-तेस प्रयाण; तिकडे इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड वगैरे देशांत प्रवास व रोम, व्हेनिस, पॅरिस, बर्लिन व व्हिएन्ना या शहरांस भेट. १९१४ हिंदु-स्थानास आगमन, हे वाङमय, काव्य, गायन, वादन, नाटय, चित्रकला वगैरे ललितकलांचे भोक्ते आहेत. १९२४ नाटयसंमेलनाचे अध्यक्ष, संस्थानच्या दगदगींतून बाहेर पडावें म्हणून त्यांनीं एक वर्षापूर्वी पुन्हां एकदां विलायतेचा प्रवास केला. बाबासाहेब यांचे दत्तक चिरंजीव व त्यांचे चिरंजीव हे मृत्यु पावल्यामुळें त्यांच्यापुढें दत्त-काचा प्रश्न पुनः उपस्थित झाला आहे.

घोष अरविंदः– जन्म कलकत्ता १८७२; शिक्षण–सेण्ट पॉल स्कूल दार्जिलिंग; नंतर इंग्लंड-मध्यें सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेला बसले; लेखी परीक्षेंत पास, पण घोड्यावर बसण्यांत नापास १८९०; नंतर केंब्रिजच्या किंग्ज कॉलेजांत नांव घातलें. व ग्रॅज्युएट झाले; बडोदा राज्यांत १२ वर्षें नोकरी केली; कलकत्त्याच्या नॅशनल कॉलेजचे प्रिन्सिपाल १९०६; 'वंदे मातरम्'चे संपादक; राजद्रोही म्हणून पकडलें; राष्ट्रीय चळवळीमध्यें मोठा भाग घेतला १९०७; राजद्रोह व बॉम्ब तयार करणें या आरोपावरून कैद; १ वर्षभर खटला चालून शेवटीं निर्दोष म्हणून सुटले; हल्लीं पांडिचरी येथें योग्या-प्रमाणें राहतात. पत्ता–पांडिचरी.

चमनलाल:— दिवाण एस्. एल्. ए. १९२३पासून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद; जन्म १८९२; शिक्षण– मुरी रावळपिंडी, लंडन व पॅरिस येथें; १९१० मध्यें मिडल टेम्पलमध्यें प्रवेश; १९१४मध्यें शेवटची

कायद्याची परीक्षा पास; ऑक्सफर्डच्या जीझस् विद्यापीठांत कायदेशास्त्रांतील पदवी (Hon.) मिळविली १९१७; टिळकांच्या नेतृत्वाखालीं होमरूल शिष्टमंडळांतून १९१८–१९ सालीं विलायतेस प्रयाण; कला आणि वाङ्मय यांवर लिहिणाऱ्या 'कोटेरी' या लंडनमधील त्रैमासिकाचे सर्वसाधारण संपादक; १९२० मध्यें ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना. पत्ता–लाहोर (पंजाब).

चापेकर ना. गो.:–जन्म मुंबई येथें शके १७९१; शिक्षण– एल्एल्. बी. पर्यंत; एल्फिन्स्टन हायस्कूल व विल्सन कॉलेज मुंबई; बी. ए. नंतर २ वर्षें एल्फिन्स्टन हायस्कुलांत शिक्षक; एल्एल्. बी. नंतर चार वर्षें ठाण्यास वकिली; नंतर मुंबई इलाख्यांत मुन्सफीचे जागेवर नेमणूक; १९२६ सालीं फ. क्ला. सबजज्जाचे जागेवरून सेवानिवृत्ति; १९२८ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष व महाराष्ट्र साहित्य-पत्रिकेचे संपादक; १९३१ पासून औंध संस्थानांत हायकोर्ट जज्ज; ग्रंथ–पैसा, गच्चीवरील गप्पा, एडमंड बर्कचें चरित्र, निवडक लेख, वैदिक निबंध, आमचा गांव इत्यादि. पत्ता–बदलापूर, जि. ठाणें.

चित्रावशास्त्री सिद्धेश्वर विष्णु:–जन्म शके १८१५ पुणें; शिक्षण–संस्कृत पाठशाळा पुणें; आचार्यांकडून विद्यानिधि ही पदवी मिळाली; तीन वर्षें सहसंपादक ज्ञानकोश मंडळ; सरस्वती मंदिर पुणें व भारत हायस्कूल पुणें या शाळांच्या संस्थापकांपैकीं एक; महाराष्ट्र हिंदुमहासभेचे स्थापनेपासूनचे अध्यक्ष; यांनीं शुद्धीचा जोरानें पुरस्कार केला; शुद्धिसंस्कार तयार केला व शेंकडों लोकांना स्वतः शुद्ध केलें. ऋग्वेदाचें संपूर्ण मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें; भारतवर्षीय चरित्र कोश मंडळ लि. ही संस्था स्थापन करून प्राचीन चरित्र–कोश तयार केला; याशिवाय यांचीं नित्यकर्म, संस्कार व धर्म या विषयावर सुमारें पंधरा पुस्तकें आहेत; संस्कृतमध्येंही 'महाभाष्यशब्दकोशः' वगैरे ग्रंथ लिहिले आहेत., पत्ता–५८ शनवार पेठ, अमृतेश्वराचें देऊळ पुणें २.

चिरमुले वासुदेव गणेश:–बी. ए. एल्एल्. बी. जन्म–स. १८६३; शिक्षण १८८१ मॅट्रिक; बी. ए. (डेक्कन कॉलेज पुणें); एल्. एल्. बी झाल्यावर दोन वर्षें मुधोळ येथें न्यायाधीश. १८९३ सातारा येथें वकिलीस सुरुवात; १८९८ असि. पब्लिक प्रॉसिक्यूटर; १९१३ प्रॉसिक्यूटरी सोडली व वेस्टर्न इंडिया विमाकंपनी स्थापिली. १९१३ ते ३१ सदर कंपनीचे चालक. त्यांनीं आपल्या परिश्रमानें ह्या कंपनीजवळ अवघ्या वीस वर्षांत तीस लाखाची मत्ता जमा करून दिली. व हल्लीं ही संस्था सर्व हिंदुस्थानांत आदर्श गणली जाते. याशिवाय हे सातारा येथील स्वदेशी कमर्शिअल कंपनीचे संस्थापक व चालक आहेत. पत्ता:–भवानी पेठ, सातारा.

चिंतामणी सी.वाय्.:–अलाहाबादेच्या लीडर पत्राचे मुख्य संपादक; जन्म १८८०; शिक्षण–'महाराजाज् कॉलेज' विजयानगरम्; अलाहाबादच्या लीडर पत्राचे संपादक १९०९–२०; सं. प्रांत लेजिस्लेटिव्ह कौंसिलचे सभासद १९१६–२३; आणि पुन्हां १९२७ पासून; १९१९ ला इंग्लंडला गेलेल्या लिबरल पार्टीचे सन्मान्य सभासद; हिं.च्या नॅशनल लिबरल फेडरेशनचे सर्वसाधारण चिटणीस; १९२० मध्यें त्याच फेडरेशनचे अध्यक्ष; १९२१–२३ त सं. प्रांत सरकारच्या शिक्षण व उद्योगधंदे या खात्याचे दिवाण; संपादक इंडियन डेलीमेल १९२५; रा. टे. कॉ.चे सभासद; पत्ता–गौरीनिवास, १७ हॅमिल्टन रोड, अलाहाबाद.

चेट्टी आर्. के. षण्मुखम् बी. ए. बी. एल्.:–वकील व लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद; जन्म १८९२; शिक्षण–मद्रास ख्रिश्चन कॉलेज; मद्रास लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे निवडलेले सभासद १९२०; डिव्हेलप्मेंट मिनिस्टर यांचे कौन्सिल सेक्रटरी १९२२; लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे निवडून आलेले सभासद १९२३; नॅशनल कन्व्हेन्शन् ऑफ इंडिया तर्फे विलायतेस गमन १९२४; १९२६ मध्यें एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशनच्या प्रतिनिधि–मंडळांतील हिंदी प्रतिनिधि म्हणून ऑस्ट्रेलियाला भेट; १९२६ च्या लेजिस्ले. असेंब्लीच्या निवडणुकींतील बिनविरोध यशस्वी उमेदवार; जिनेव्हा येथें भरलेल्या 'इन्टर नॅशनल लेबर कॉन्फरन्स'च्या ११ व्या अधिवेशनामध्यें 'इंडियन एम्प्लॉयर्स डेलिगेट'ला मार्गदर्शक म्हणून हिंदुस्थान सरकारकडून नेमणूक जून १९२८; पुन्हां १९२९ मध्यें हिं. सरकारकडून 'इंडियन एम्प्लॉयर्स' चे प्रतिनिधि म्हणून जिनेव्हाच्या

१२व्या 'इंटर नॅशनल्' लेबर कॉन्फरन्समध्यें नेमणूक; 'सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटी'चे सभासद म्हणून नेमणूक; पुन्हां १९३० मध्यें ले. असेंब्लीचे सभासद म्हणून बिनविरोध निवडणूक. पत्ता–"हावरडेन" रेसकोर्स, कोइमतूर.

चौन्डे महाराज बालकृष्ण मार्तंडः– जन्म १८७७ वांई; १९०० सालीं कीर्तनें करीत उत्तर हिंदुस्थानापर्यंत पर्यटन; १९०५ वांईच्या कृष्णाकांठावर कसायाच्या हातांतून गाय सोडविली, तेव्हांपासून गोरक्षण कार्यास सुरुवात; प्रसिद्ध श्रीगोवर्धन संस्थेची स्थापना व आजपावेतों संस्थेच्या प्रसाराचें काम अव्याहत चालविलें आहे; १९०६ काशी क्षेत्रीं रामघाटावर 'बालकराममंदिर' स्थापन केलें; समर्थ शिष्यांच्या सज्जनगडास पालख्या नेण्याची सुरुवात यांनीं केली; १९२९ मध्यवर्ती गोवर्धन निधीची उभारणी; १९२९ पासून शुद्धिकरणाचें कार्यही यांनीं हातीं घेतलें; सर्वश्रेष्ठ गोभक्तांत यांची गणना होते. पत्ता–श्रीगोवर्धन संस्था, वांई (जि. सातारा).

चौबळ सर महादेव भास्करः– के.सी. आय.ई. (१९१७); सी.एस्.आय. (१९११); बी. ए.एल्.एल्.बी.जन्म १८५७; शिक्षण सरकारी हायस्कूल पुणें; डेक्कन कॉलेज पुणें; असिस्टंट मास्तर एल्फिन्स्टन हायस्कूल मुंबई १८७९ ते १८८३; हायकोर्ट वकील मुंबई १८८३; सरकारी वकील हायकोर्ट मुंबई १९०६; मुंबई हायकोर्टांत तात्पुरते दुय्यम जज्ज १९०८; मुंबईच्या गव्हर्नरच्या कार्यकारी कौन्सिलचे सभासद १९१० ते १९१२ व १९१५ ते १९१७; 'पब्लिक सर्व्हिसेस् कमिशन'चे सभासद १९१३–१५; 'इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटीचे चॅन्सेलर १९२०; व्हाइस चेअरमन आणि चेअरमन 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' १९२७ पासून. पत्ता–७ फिनॅन्स ऑफिस रोड, पुणें.

छापखाने केशव रामचंद्रः–– जन्म १८७५ सांगली; शिक्षण–एम्. ए. एल्. एल्. बी. हुद्दा पब्लिक प्रॉसिक्युटर व स्टेट प्लीडर; ग्रंथ–'रोमिओ अँड ज्युलिएट', च्या आधारें 'मोहनतारा' या नांवाचें एक नाटक १९००; 'स्वाध्याय ज्ञानेश्वरी' १९३१; सध्यांचा पत्ता–सांगली.

जगताप बाबूराव गणपतरावः–जन्म १८९० पुणें; शिक्षण–१९१३ बी.ए.; बी.टी.पोलिस ट्रेनिंग स्कूल डिप्लोमा (ऑनर्स); थर्ड ग्रेड ड्रॉइंग (पहिला नंबर); १९१६–१८ बडोदें संस्थान, मिलिटरी खात्यांत नोकरी; कांहीं दिवस श्रीमंत महाराज व महाराणी या उभयतांचे ए. डी. सी. म्हणून नोकरी केली; लेफ्टनंट अथवा नायब सरनोबत (बडोदें); १९१८ नोकरी सोडून श्रीशिवाजी स्कूल स्थापन केलें; हेडमास्तर श्रीशिवाजी मराठा हायस्कूल; सध्यां चेअरमन डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्ड, पुणें; गेल्या दहा वर्षांपासून संपादक 'शिक्षक' मासिक.

जगताप रा. ब. बाळकृष्णराव पिराजीरावः–– जन्मस्थान बेळगांव शिक्षण १९१२ एल्. सी. ई. परीक्षा उत्तीर्ण व कोल्हापूरच्या महाराजांच्या आश्रयानें इंग्लंडला प्रयाण. १९१३ सालीं सॅनिटरी शास्त्राचा डिप्लोमा मिळवून हिंदुस्थानास आगमन. कोल्हापूर संस्थानांत राधानगरी येथील तलावाच्या कामावर इंजिनियर म्हणून नेमणूक; तेथें त्यांनीं संस्थानांतील अल्युमिनिअम धातूच्या खाणी व हायड्रो–इलेक्ट्रिक पॉवर यांचा शोध करून त्याची योजना प्रसिद्ध केली. १९१८ ब्रिटिश मुलुखांत नोकरीस आले. १९२१ बी.ई.एस्.मध्यें व १९२५ आय.एस्.ई मध्यें कायम. १९२८ स्पेशल इरिगेशन खात्याचे एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर; १९३० सातारा जिल्ह्याचे ए. इं. म्हणून नेमणूक १९२८ सालीं रावबहादूर पदवी मिळाली. अ. भा. शिवस्मारक कमिटींत, शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याचे कामीं व शिवाजी मिलटरी स्कूल पुणें येथें उघडण्याच्या कामीं यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. पत्ताः––६ ताडीवाला रोड, पुणें.

जठार प्रि. ग. भा. :–जन्म १८८७ धारवाड; शिक्षण–डेक्कन कॉलेज पुणें; बी. ए. (कँटब) (नॅचरल सायन्स ट्रायपॉस व हिस्टरी ट्राय-पॉस) एम्. ए. (एडिंबरो); इकॉनॉमिक्स ऑनर्स १९१५; 'होल्डर ऑफ लॅनफाइन बरसरी इन् इकॉनॉमिक्स अॅट एडिंबरो'; १९११–१४ रेव्हेन्यू ऑफिसर, बडोदें सं. नोकरी; १९१७ पासून कर्नाटक कॉलेजमध्यें इंग्लिश व लॉजिक या विषयांचे प्रोफेसर; १९२० आय. ई. एस. मध्यें बढती; डेक्कन कॉलेजमध्यें हिस्टरी व पोलिटिकल इकॉनमी या विषयांचे प्रोफेसर; हल्लीं ऑफिशिएटिंग प्रिन्सिपॉल कर्नाटक कॉलेज, धारवाड; 'जठार अँड बेरीज् इंडियन इकॉनॉमिक्स' (भाग दोन) या ग्रंथाचे सहलेखक. पत्ता–प्रिन्सिपॉल कर्नाटक कॉलेज, धारवाड.

जयकर बॅ. मुकुंद रामरावः—एम.ए. एल.एल. बी., बार. ॲट लॉ.; शिक्षण—मुंबई विश्वविद्यालय; मुंबई येथें 'आर्यन एज्युकेशन सोसायटीज् हायस्कूल' या नांवाची एक धर्मार्थ शाळा उघडली; तेथें चार वर्षें काम केलें; मुंबई हायकोर्टामध्यें बॅरिस्टर; १९१६ पासून सार्वजनिक कामास सुरुवात; मुंबई विश्वविद्यालय गटातर्फे मुंबई लेजिस्लेटिव्ह कौंसिलांत निवडणूक १९२३; १९२५ मध्यें राष्ट्रीय सभेनंतर राजीनामा देईपर्यंत मुंबई कायदेमंडळांत स्वराज्य पक्षाचे पुढारी; १९२६ सालीं मुंबई शहराचे प्रतिनिधि म्हणून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें प्रवेश; तेव्हांपासून १९३० पर्यंत सभासदत्व कायम; १९२७ पासून मार्च १९३० पर्यंत राष्ट्रीय पक्षाचे डेप्युटी लीडर; १९३०च्या सिमला बैठकींत विरोधी पक्षाचे प्रमुख; राउंड टेबल कॉ. साठीं लंडनला तीन वेळां प्रयाण; 'गांधी—अर्विन पॅक्ट' व 'पुणें—करार' हे घडवून आणण्यांत प्रमुख. पत्ता—विंटर रोड, मलबार हिल्, मुंबई.

जयरामदास दौलतरामः— मुंबई कायदेमंडळाचे सभासद (१९२७); वकिलीची परीक्षा पास झाल्यावरोबर कराची येथें वकिली सुरू केली; नंतर राजकारणांत पडावें लागल्यामुळें वकिली सोडून दिली; सिंधमध्यें राष्ट्रीय पुढारी म्हणून प्रसिद्ध; "हिंदुस्थान टाइम्स" या दैनिकाचे संपादक १९२५–२६; हिंदु महासभेचे चिटणीस; पत्ता—हैद्राबाद, सिंध.

जहांगीर कावसजी (ज्यूनियर):— एम. ए. (केंब्रीज); के. सी. आय. ई. (१९२७); सी. आय. ई. (१९२०); ओ. बी. ई.; एम. एल. ए.; जन्म १८७९; शिक्षण—सेंट झेवियर्स कॉलेज मुंबई; सेंट जॉन्स कॉलेज केंब्रीज; मुंबई कॉर्पोरेशनचे सभासद १९०४–१९२१; स्टँडिंग कमेटीचे चेअरमन १९१४–१५; बॉम्बे इंप्रुव्हमेंट ट्रस्टचे सभासद; मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे अध्यक्ष १९१९–२०; वॉरलोन कमिटीचे ऑनररी चिटणीस १९१७–१८; ६ डिसेंबर १९२१ पासून १५ जुलई १९२२ पर्यंत मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे तात्पुरते सभासद, रेव्हिन्यू खातें. मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळामध्यें सर्वसाधारण खात्याचे मंत्री २३ जून १९२३ ते २३ जून १९२८; मुंबई शहरातर्फे ले० असेंब्लीमध्यें निवडून आलेले सभासद १९३०; मेसर्स कावसजी जहांगीर अँड कंपनी लिमिटेड या संस्थेचे भागीदार; रा. टे. कॉ. चे सभासद. पत्ता—नीपिअन सी. रोड, मलबार हिल, मुंबई.

जाधव भास्करराव विठोजीरावः—एम. ए. एल. एल. बी. एम. एल.ए. जन्म १८६७; शिक्षण—विल्सन कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज आणि गव्हर्नमेंट लॉ स्कूल. कोल्हापूर संस्थानांत नोकरी; व संस्थानी कौन्सिलचे रेव्हीन्यू मेंबर असतांना सेवानिवृत्ति; मराठा शैक्षणिक परिषदेला सुरुवात १९०७; सत्यशोधक चळवळीचा प्रसार १९११; ब्राम्हणेतर चळवळीचे सुरुवातीपासूनचे प्रमुख; १९१९ सालीं इंग्लंडांत जॉइंट पार्लमेंटरी कमिटीपुढें मराठा व संयुक्त जाती यांची बाजू मांडली; शिक्षणखात्याचे मंत्री १९२४–२६ व १९२७–३०; लेजि० कौंसिलमधील ब्राम्हणेतर पक्षाचे पुढारी; १९२० पासून सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष; रा. टे. कॉ.चे सभासद.

जिना, बॅ. महंमदअल्लीः—बार—ॲट लॉ; जन्म १८७६; शिक्षण—कराची व इंग्लंड; मुंबई हायकोर्टांत ॲड्व्होकेट म्हणून दाखल १९०६; दादाभाई नौरोजींचे खाजगी चिटणीस १९०६; इंपिरिअल लेजिस्लेटिव्ह कौंसिलचे सभासद १९१०; मुस्लिम लिगच्या खास अधिवेशनाचे अध्यक्ष १९२०; रा. टे. कॉ.चे सभासद; हिंदु—मुसलमानांच्या वादांतील चौदा मुद्यांचे जनक; ले० असेंब्लीचे सभासद होते.

जोगळेकर डॉ. शंकर रामचंद्रः— जन्म—१८९४ पुणें; शिक्षण—हायस्कूल पुणें, डेक्कन कॉलेज पुणें, ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई युनिव्हर्सिटी कॉलेज हॉस्पिटल व गाइज हॉस्पिटल (लंडन), एम्. बी. बी. एस्. (मुंबई व लंडन); एफ्. आर. सी. एस्. इंग्लंड व एडिंबरो); हल्लीं ऑनररी सर्जन जे. जे. हॉस्पिटल (मुंबई); हे नामांकित सर्जन म्हणून प्रसिद्ध आहेत. पत्ताः—६४ ह्यूज रोड, मुंबई ७.

जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजीः—जन्म शके १८२४ पिंपळनेर (प. खानदेश); शिक्षण—वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे यांचेपाशीं वांई येथें संस्कृत साहित्य व तर्क वेदांतादि दर्शनें यांचें अध्ययन. सन १९२४ सालीं कलकत्ता संस्कृत असोसिएशनची 'तर्कतीर्थ' पदवी. न्यायमार्तंड ही उपाधि. सन १९२१ पासून वांईच्या प्राज्ञपाठशाळेंत तर्क, वेदांत वगैरे विषयांचें अध्यापन करीत असतात. धार्मिक व सामा

जिक बाबतींत प्रागतिक मताचे पुरस्कर्ते. ग्रंथ–शुद्धिसर्वस्वम् (संस्कृत), आनंदमीमांसा (मराठी) श्री. नारायणशास्त्री मराठे यांनीं सुरू केलेल्या धर्मशास्त्र कोशाचे मुख्य संपादक. कायदेभंगाच्या चळवळींत तीनदां शिक्षा. पत्ता–प्राज्ञपाठशाळा, वांई, जि, सातारा.

जोशी नारायण मल्हारः—बी. ए. एम. एल. ए.; जे. पी. सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद; जन्म १८७९; शिक्षण–पुणें न्यू इंग्लिश स्कूल व डेक्कन कॉलेज; खाजगी व सरकारी शाळांमध्यें आठ वर्षें शिकविण्याचें काम केलें; सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीमध्यें प्रवेश १९०९; बॉम्बे सोशल सर्व्हिस लीगचे चिटणीस १९११ पासून; आणि बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म असोसिएशनचे चिटणीस १९१७ पासून; वेस्टर्न इंडिया नॅशनल लिबरल असोसिएशनचे चिटणीस १९१९ पासून; 'इंडियन प्रेस'चे प्रतिनिधि म्हणून हिं. सरकारनें मेसापोटेमियांत पाठविलें १९१७; तसेंच १९२० मध्यें वॉशिंग्टनला व १९२१, १९२२, १९२५ आणि १९२७ मध्यें जिनेव्हाला आंतरराष्ट्रीय मजूर–परिषदेसाठीं हिंदुस्थानांतील कामकरी वर्गातर्फें हिं. सरकारकडून नेमणूक; कैसर–ई–हिंद रौप्यपदक (१९१९); १९२१ सालीं सी. आय. ई. पदवी देऊं केली असतां नाकारली; १९१९ पासून मार्च १९२३ अखेरपर्यंत बॉंबे म्यु. कॉर्पोरेशनचे सभासद; मजुरांच्या हितासंबंधीं लक्ष ठेवण्याकरितां हिं. सरकारकडून विधिमंडळांत (ले. असेंब्ली) नेमणूक १९२१, १९२४, १९२७; मजुरांचे प्रतिनिधि म्हणून रॉयल कमिशन ऑन इंडियन लेबर व सभासद म्हणून नेमणूक; रा. टे. कॉ. चे सभासद. पत्ता–सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, सँढर्स्ट रोड, मुंबई.

जोशी माधव नारायणः–जन्म १८८५. शिक्षण–वऱ्हाड; न्यू इंग्लिश स्कूल पुणें मॅट्रिकपर्यंत; लेखन–व्यवसाय– नाटकें व कविता; एकंदर सोळा नाटकें लिहिलीं; विनोद, आनंद, स्था. स्वराज्य, वऱ्हाडचा पाटील, वशीकरण, विश्ववैचित्र्य इत्यादि. पत्ता–१००५ सदाशिव पेठ, पुणें.

जोशी वामन मल्हारः—जन्म तळें, जि. कुलाबा येथें १८८२; शिक्षण–बी. ए. १९०४; डेक्कन कॉलेजचे फेलो १९०४–०६; एम. ए. १९०६; श्री. ना. दा. ठा. महिला पाठशाळा, एरंडवणें येथें मराठी व मानसशास्त्र या विषयांचे अध्यापक; अनाथ बालिकाश्रम, हिंगणें बुद्रुक पुणें या संस्थेचे १९२० पासून आजन्मसेवक; प्रथम प्रो. विजापूरकर यांच्या समर्थ विद्यालयाच्या चालक वर्गापैकीं एक; 'विश्ववृत्ता'चे सहसंपादक; मराठा पत्राचे उपसंपादक; विश्ववृत्ताचे संपादक असतां श्री. सातवळेकरांच्या 'वैदिक मंत्रांची तेजस्विता' या लेखाबद्दल ३ वर्षें शिक्षा; मडगांव, गोवें येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष १९३०; ग्रंथ–रागिणी, आश्रमहरिणी, नलिनी, सुशिलेचा देव, नीतिशास्त्र–प्रवेश, सॉक्रेटिसाचे संवाद, नवपुष्प–करंडक, विचार–विलास इत्यादि. पत्ता–अनाथ बालिकाश्रम, हिंगणें बुद्रुक, पुणें.

जोशी वीर वामन गोपाळः–जन्म ता. २१ मार्च १८८१ उमरावती; शिक्षण १८९९ मॅट्रिक; १९०८ नागपूर येथें राजकीय खटला; १९०९ मुंबईच्या 'राष्ट्रमत' दैनिकांत दे. भ. गंगाधरराव देशपांडे ह्यांचे प्रमुख सहकारी, १९२१ अकोला येथें १२४ अ कलमाखालीं राजद्रोहाचा खटला व दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा, याच वेळीं लोकांनीं त्यांना 'वीर' ही पदवी दिली. उमरावतीच्या 'स्वतंत्र हिंदुस्थान' साप्ताहिकाचे संस्थापक व सात वर्षें संपादक; १९३० पासून वऱ्हाड प्रां. कॉं. कमिटीचे अध्यक्ष; १९३० मे १२४ अ कलमाखालीं खटला व दोन वर्षें शिक्षा; पण दिल्ली करारान्वयें नऊ महिन्यानंतर सुटका. उत्तम शिक्षक, आजन्म राष्ट्रसेवक, वक्ते व लेखक म्हणून प्रसिद्ध. ग्रंथ–राक्षसी महत्त्वाकांक्षा, रणदुंदुभि, धर्मसिंहासन हीं नाटकें पत्ताः–उमरावती

जोशी सर मोरोपंत विश्वनाथः–के. टी.; के.सी.आय. ई.; बी. ए. एलएल. बी.; जन्म १८६१; शिक्षण–डेक्कन कॉलेज पुणें; एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई; १८८४ ते १९२० पर्यंत वऱ्हाडांत ज्युडिशियल कमिशनरच्या कोर्टामध्यें ॲडव्होकेट म्हणून वकिली; मध्यप्रांत सरकारचे गृहमंत्री १९२०–२५; अखिल भारतीय प्रागतिक परिषदेचे अध्यक्ष १९२५; एज् ऑफ कन्सेंट कमिटीचे चेअरमन १९२८–२९; ज्युडिशियल कमिशनर्स कोर्ट मध्यप्रांत यांचे ॲडव्होकेट; सांगली संस्थानचे कांहीं काळपर्यंत सर्वाधिकारी दिवाण; पत्ता–अमरावती, वऱ्हाड,

जोशी शंकर नारायणः–(वांईकर)

जन्म शक १८११; व्यवसाय व धंदा इतिहास–संशोधन; लेखन–मुळशी पेटा; पंतसचीव घराणें सं. भोर, यांचे छोटे इतिहास; कांहीं ऐतिहासिक ग्रंथपरीक्षणें; अनेक शोध–निबंध; प्रचार सातारा जिल्ह्यांतील ११ तालुक्यांमधील शेंकडों खेडेगांवांतून इतिहास–संशोधन, राष्ट्रीय लोकलबोर्ड निवडणुकी,सातारा जि. लो. बोर्ड परिषद १९२५ चे चिटणीस व कांग्रेस या कामानिमित्त; वैराज व्या. माला वांई व भारत स्वयंसेवक मंडळ पुणें या संस्थांचे स्थापक व दहा वर्षें चालक; मुळशी सत्याग्रह प्रकरणीं कैद 'केसरी–प्रबोध व 'कळकर' यांच्या संपादकांपैकीं एक; आजीव सभासद–भारत इ.सं. मंडळ, पुणें.

टागोर सर रवींद्रनाथ. :–– के. टी. डी. लिट्. (कलकत्ता) जन्म १८६१; शिक्षणः––खाजगी; पहिल्यानें कलकत्ता यथें राहात असत; २४व्या वर्षी वडिलांच्या मालमत्तेची व्यवस्था पाहाण्याकरितां खेडेगांवीं गेले; तेथेंच त्यांनीं पुष्कळ ग्रंथ लिहिले. ४० व्या वर्षी बोलपूर यथील शान्तिनिकेतनाश्रमांत शाळा काढिली १९२१; तेव्हांपासून ते मुख्यतः या शाळेंत शिकविण्याचेंच काम करितात.१९१२ सालीं इंग्लंडला प्रयाण; तेथें त्यांनीं आपल्या बंगाली ग्रंथांपकीं कांहींचीं इंग्रजी भाषांतरें केलीं. १९१३ सालचें वाङमयशाखेचें "नोबेल प्राइझ्" यांना मिळालें आहे. ग्रंथ– (बंगाली) सुमारें ३५ राजकीय ग्रंथ; ३८ नाटकें; १९ लघुकथा व कादंबऱ्या; सुमारें ५० निबंधसंग्रह (वाङमय, कला, धर्म इत्यादिविषयक); आणि सुमारें ३००० लहानमोठ्या कविता (इंग्रजी); इटली, चीन, जपान, इराण इत्यादि देशांत प्रवास.

टिकेकर, श्रीपाद रामचंद्रः–– जन्म शके १८२२ बार्शी (जि. सोलापूर); शिक्षण–अंडर ग्रॅज्युएट; केसरी, मराठा, हिंदू, प्रताप, श्रीलोकमान्य वगैरे पत्रांचे खास बातमीदार.ग्रंथः– १ ब्रम्ही बंडाळीचें ब्रम्हपुराण, २ मुसलमानी मुलुखांतील मुशाफरी, व ३ सिंहाला शह. कायदेभंगाच्या चळवळींत यांना शिक्षा झाली असून हे सध्यां तुरुंगांत आहेत. पत्ता–१९६।३० सदाशिव पेठ, पुणें २.

टिळक प्रि. सौ. कमलाबाई :–– जन्म १९०५ जेजुरी (जि. पुणें); माहेरचें नांव कु. कमलाबाई उकिडवे; शिक्षण– १९२३ मॅट्रिक, दुसरी जगन्नाथ शंकरशेठ संस्कृत स्कॉलरशिप, दळवी स्कॉलरशिप, व चॅटफील्ड प्राइझ हीं पारितोषिकें; १९२५ इंटरमिजीएट (न्यू पूना कॉलेज पुणें); फर्स्ट क्लास, गंगाबाई भट व लालकाका या स्कॉलरशिप्स; १९२७ बी. ए. (इंग्लिश ऑनर्स सेकंड क्लास); १९२९ एम्. ए. (इंग्लिश विषय) फर्स्ट क्लास व मानकर स्कॉलरशिप; १९२९ विवाह; वुइमेन्स कॉलेज (बनारस हिंदु युनिव्हर्सिटी) मध्यें लेक्चरर म्हणून नेमणक; १९३२ मार्चपासून सदरहू कॉलेजच्या प्रिन्सिपल; पत्ता–– प्रिन्सिपल वुइमेन्स कॉलेज, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी.

ठक्कर अमृतलाल व्ही. –– जन्म १८६७ भावनगर; शिक्षण १८८६ मॅट्रिक, १८९० एल् सी. ई. (मुंबई युनि.) पुणें इंजिनिअरिंग कॉ. मधून १८९०–१९१४ अनेक ठिकाणीं इंजिनियर या नात्यानें काम केलें. पैकीं ३ वर्षें पूर्व आफ्रिकेंत युगांडा रेल्वेवर होते, १९०३–१९०५ स्टेट इंजिनियर सांगली संस्थान, १९०५–१९१४ मुंबई कॉर्पोरेशनमध्यें नोकरी; १९१४ कार्पोरेशनची नोकरी सोडून सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद झाले. सोसायटींत आल्यानंतर त्यांनीं पंचमहाल जिल्ह्यांत दाहोद येथें भिल्ल सेवामंडळ स्थापन करून भिल्लांच्या उन्नतिसाठीं अविश्रांत खटपट केली! १९२२–३२ भिल्लसेवा मंडळाचें काम केलें; हल्लीं अस्पृश्यता निवारक मंडळाचे (स्थापना) १९३२ संचालक १९१४ पासून अस्पृश्योद्धाराचें काम हे करीत आहेत. १९२० सालीं जमशेठपूर येथील टाटा आयर्न वर्क्समध्यें दीड वर्ष वास्तव्य करून तेथील कामगारांत समाजसेवा केली. १९२६ मध्यें रानटी जातींची चौकशी करण्यासाठीं यांनीं खानदेश, ओरिसा, आसाम, मध्यप्रांत या प्रदेशांत धारमास पर्यंत दौरा केला; यांना रानटी जातीचे कैवारी व त्या प्रश्नांतील तज्ज्ञ मानतात. पत्ता–सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, पुणें.

ठाकूर नारायण श्री. :– व्यापारी; नैरोबी इंडियन असोसिएशनचे माजी सेक्रेटरी; ईस्ट आफ्रिकन इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे माजी संयुक्त चिटणीस; 'डेमोक्रॅट'चे माजी संपादक; इत्यादि. पत्ता––नैरोबी, केनिया कॉलनी आफ्रिका

तांबे भास्कर रामचंद्रः–– जन्म १८७४ मुगावली, (संस्थान ग्वाल्हेर); शिक्षण–१८९३ प्रवेश–परीक्षा (अलाहाबाद); पुढें कांहीं काळ इंदूर येथील होळकर कॉलेजमध्यें; तीनचार महिने देवास व्हिक्टोरिया हायस्कूलमध्यें नोकरी;

१८९३–१९०३ श्रीमंतसाहेब महाराज पवार सं. देवास यांचे शिक्षकाचे जागीं; १९०३–१९०८ रेसिडेन्सी वकील देवास दरबार (इंदूर येथें); १९०८–१९११ सुपरिन्टेन्डेन्ट गुदरखडा एस्टेट; १९११–१४ दिवाण पिपलोदा संस्थान; १९१४–२० सुपरिन्टेन्डेन्ट पोलिस व नंतर सदर कोर्ट जज्ज प्रतापगड स्टेट (राजपुताना;) १९२१–२३ मेयो कॉलेज अजमीर येथें ग्वाल्हेर संस्थानच्या सरदारांचे टयूटर व गार्डियन; १९२३–२५ सुपरिन्टेन्डन्ट संस्थान शोपूर–बडोदा (ग्वाल्हेर–रियासत); १९२६ रजिस्ट्रार एक्झॅमिनेशन्स; लेखनव्यवसाय–मुख्यतः काव्यलेखन, १ 'तांबे यांची कविता,' प्रकाशक प्रो. मायदेव. २'तांबे यांची कविता (भाग २ रा) प्रकाशक श्री. दि. गं .केळकर; याशिवाय किरकोळ गद्य लेख व कविता इत्यादि.पत्ता –दत्तमंदिराजवळ फाळक्यांचें घर, कंपू, लष्कर (ग्वाल्हेर).

तांबे श्रीपाद बलवंतः–– बी. ए. ; एलूएल्. बी. मध्यप्रांत सरकारचे गृहमंत्री; जन्म–१८७५; शिक्षण––जबलपूर (हितकारिणी स्कूल); अमरावती अँग्लोव्हर्नाक्युलर हायस्कूल; बॉंबे एल्फिन्स्टन कॉलेज व सरकारी लॉ–स्कूल; अमरावती येथें वकील; अमरावती टाउन् म्युनिसिपल कमिटीचे उपाध्यक्ष; प्रॉव्हिन्शिअल कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष; मध्यप्रांत कायदे मंडळाचे सभासद १९१७–२० व १९२४; मध्यप्रांत कायदेमंडळाचे अध्यक्ष,मार्च १९२५; मध्यप्रांताचे बदली गव्हर्नर १९२९; रा. टे. कॉ. चे सभासद; पत्ता–– नागपूर सी.पी.

दप्तरी केशव लक्ष्मणः–– जन्म शके १८०२ नागपूर; शिक्षण–– बी. ए. बी. एल्. कॉंग्रेस ठरावानुसार वकिली सोडली; बायोकेमिक औषधी शास्त्रांतील हे एक तज्ज्ञ आहेत. ग्रंथकर्तृत्व––भारतीय युद्धकालनिर्णय, भारतीय ज्योतिषशास्त्र–निरीक्षण, सच्चिकित्सा–प्रकाश, धर्मरहस्य, मौर्यपूर्व कालाचा इतिहास इत्यादि. पत्ता–– महाल, नागपूर.

दाते, के. त्र्यं,: ––जन्म शके १८११ आडिवरें (जि. रत्नागिरी); शिक्षण–––इंग्रजी सहा इयत्तेपर्यंत; १९०७ महाराष्ट्र नाटक मंडळींत प्रवेश; १९१९ त्या मंडळीचे एक चालक झाले. १९२९ महाराष्ट्र नाटक मंडळी सोडली; हल्लीं समर्थ नाटक मंडळींत आहेत. यांच्या जयंत, वृन्दावन, हरिश्चंद्र, राम, कवीश्वर, औरंगजेब इत्यादि भूमिका प्रसिद्ध आहेत.

दाते, यशवंत रामकृष्णः–– मूळ वस्ती किन्हळ गांव; ता. दापोली, जि. रत्नागिरी; १९०९ मॅट्रिक; फर्ग्युसन कॉलेज पुणें, १९१३ बी. ए.; शाळेंत व कॉलेजमध्यें स्कॉलरशिप; १९१६ एल्एल्. बी., मॉरिस कॉलेज नागपूर, अलाहाबाद विश्वविद्यालय१९१७–१८; महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे संपादकीय व्यवस्थापक; १९१७ महाराष्ट्र वाङमयसूची संपादन; १९२८ महाराष्ट्र–कोश–मंडळाची स्थापना; महाराष्ट्र शब्दकोशाचे मुख्य संपादक, कोशमंडळाचे व्यवस्थापक चालक; १९२० सरस्वती मंदिर संस्थेची स्थापना व अध्यक्ष; १९२० ते ३०स. मंदिर संस्थेच्या पूना नाईट हायस्कूलचे सुपरिन्टेन्डेन्ट; १९३० पासून या संस्थेनें चालविलेल्या खेडेगांवांतील इंग्रजी वर्गाचे प्रवर्तक; १९२६–२८ महाराष्ट्र साहित्य परिषदेचे चिटणीस; पत्ता–– डेक्कन जिमखाना कॉलनी, पुणें ४.

दाते, शंकर रामचंद्रः–– जन्म १८९८, अरवी (ता. संगमनेर, जि. अहमदनगर) शिक्षण–– बी. ए. न्यू पूना कॉलेज,१९२०; १९३२ श्रीशंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्याकडून 'मुद्रणकलानिधि' ही पदवी मिळाली. मराठी टाइपांत सुधारणा; मोनोटाइपावर मराठी लिपी बसविण्याची कल्पना कायम करून विलायतेस जाऊन ती सिद्ध केली १९३२; हिंदुसभा, पुणें–६ वर्षें चिटणीस; शुद्धिकरणाचें काम केलें. अनाथ वि. गृ. चे आजन्म सेवक; पत्ता–– लोकसंग्रह प्रस विद्याभवन ६२४ सदाशिव पेठ पुणें२.

दिवेकर, दिनकर वासुदेवः–– जन्म शके १८१८ भिवंडी (जि. ठाणें); शिक्षण–एम् ए. १९२० केसरी मराठा संस्थेंत दाखल; १९३१ कायदेभंग चळवळींत शिक्षा; १९३० ते १९३२ जानेवारीपर्यंत मराठा पत्राचे संपादक. पुन्हां १९३२ जुलैपासून आजतागाइत सदर पत्राचे संपादक; ग्रंथ राष्ट्रीय शिक्षण, आजचा रशिया, टिळक चरित्र पहिला खंड (इंग्रजी), इंपीरियल प्रेफरन्स फॉर इंडिया; निरनिराळ्या मासिकांत हिंदी पुढाऱ्यांचीं शब्दचित्रें यांनीं लिहिलीं आहेत. पत्ताः–केसरी कचेरी, पुणें २.

दिवेकर, महादेवशास्त्री वासुदेवः–– जन्म शके १८१०, उगार खुर्द (सं. सांगली); शिक्षण–––उगार, सांगली व बेळगांव; माजी समर्थ विद्यालय; ज्ञानेश्वरीचें अध्ययन आणि

गायनाचा व कीर्तनाचा अभ्यास; नंतर वेदांत, व्याकरणशास्त्र व धर्मशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. कांहीं काल दारुपिकेटिंग केलें. माजी समर्थ विद्यालय मोडल्यावर अर्जनवाड यथें स्वत: एक राष्ट्रीय शाळा चालू केली. शिक्षण संपल्यावर वांई यथील प्राज्ञपाठशाळेचे प्रचारक, चालक व उपाध्यक्ष या नात्यानें १० वर्षें काम केलें. एवढ्या कालांत संस्थेकरितां एकट्यानें ८० हजार रुपये मिळविले व इतरही कामें केलीं. प्रवचन, कीर्तन, व्याख्यान व निरूपण याद्वारां धार्मिक विषयांना चांगली चालना दिली. बृ. म. ब्राह्मण परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते; हिंदुसंघटनेचा प्रचार बृहन्महाराष्ट्रामध्यें केला. अस्पृश्यतानिवारण, शुद्धि, पोटजातींचें एकीकरण, शरीरसंवर्धन, ब्राह्मण परिषद इत्यादि प्रकारच्या धार्मिक, सामाजिक व तात्त्विक विषयांवर यांचे लेख 'केसरी', 'महाराष्ट्र इत्यादि पत्रांतून प्रसिद्ध झालेले आहेत. उगार खुर्द येथें ग्रामोद्धाराचें कार्य चालू आहे. पत्ता–मिरज.

दीक्षित काशिनाथ नारायण:—
जन्म १८८९ पंढरपूर; शिक्षण मॅट्रिक १९०५ (जगन्नाथशंकरशेट स्कॉलर); बी. ए. १९०९ डेक्कन कॉलेज पुणें (भाऊ दाजी संस्कृत प्राइज मिळालें); एम्. ए. १९११ (भगवानदास पुरुषोत्तम संस्कृत स्कॉलर); व 'झाला वेदांत प्राइझ' मिळालें. पुराणवस्तुसंशोधन खात्यांत स्कॉलर (१९१२ ते १९१४); मुंबई प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझिअमचे असिस्टंट क्यूरेटर (१९१४–१६ लखनौ प्रॉव्हिन्शियल म्यूझिअमचे क्यूरेटर (१९१७–१९१८) पु. व. सं. खात्याचे सुपरिंटेंडंट पूर्वविभाग,पाटणा (१९१८–१९१९) कलकत्ता (१९२०–२४;) पश्चिमविभाग पुणें (१९२४-२६) पूर्व विभाग कलकत्ता (१९२६–२९) डेप्युटी डायरेक्टर, जनरल संशोधन सिमला १९३०–३१ सरकारी लिपीशास्त्रज्ञ उटकमंड (१९३२); सुपरिंटेंडेंट इंडियन म्यूझियम कलकत्ता (सप्टेंबर १९३२); १९२४–२६ सिंध प्रांतांतील अत्यंत प्राचीन शहर मोहेंजो–दडो याचे अवशेष उत्खनन करण्याचें काम केलें. १९२६ ते १९३० बंगालमधील पहाडपूर येथील प्रचंड मंदिर व विहार यांचें संशोधन. १९२८–२९ बंगाल्यांतील महास्थान ऊर्फ पुंड्रवर्धन शहराचें उत्खनन केलें.ग्रंथ–प्राचीन इतिहासांची व संस्कृतीचीं साधनें, शिलालेख, ताम्रपट, मूर्ति, नाणीं, स्थापत्य इत्यादींसंबंधीं अनेक संशोधनात्मक इंग्रजी लेख प्रसिद्ध केले आहेत.

दुनीचंद लाला बी. ए.:—कायद्याबाबत प्रावीण्यपत्र, आणि पर्शियन व वाङ्मय यांमध्यें ऑनर्स (१८९४)ले. असेंब्लीचे सभासद, वकिलात व सार्वजनिक काम. जन्म १८७३. लग्न श्रीमती भागदेवी यांच्याशीं. शिक्षण ख्रिश्चन कॉलेज व ओरिएंटल् कॉलेज लाहोर. १९२१ पर्यंत वकिली केली. १८९९ पासून सामाजिक आयुष्यामध्यें शिरून आर्यसमाजाच्या कित्येक चळवळींत भाग घेतला. १९०६ पासून १९२१ पर्यंत अंबाला येथील अँग्लोसंस्कृत हायस्कूलचे व्यवस्थापक. डी. ए. व्ही. कॉलेजच्या मॅनेजिंग कमिटीचे सभासद. १९२३ त वकिली पुन्हां सुरू केली. ऑल इंडिया शुद्धि-परिषदेचे अध्यक्ष; १९२० पासून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सभासद. क्रिमिनल् अमेंडमेंट ॲक्टान्वयें १९२२ मध्यें पकडून ६ महिने तुरुंगवास; १९२२ सालीं रोहटक येथें भरलेल्या पंजाब प्रॉव्हिन्शिअल कॉन्फरन्सचे अध्यक्ष. दुसऱ्या ले. असेंब्लीमध्यें स्वराज्यपक्षाचे सभासद. १९३० मध्यें वकिली कायमची बंद केली. ऑल् इंडिया काँग्रेस कमिटीचे नेमलेले सभासद. पंजाब प्रॉव्हिन्शिअल काँग्रेस कमिटीचे निवडलेले अध्यक्ष ऑगस्ट १९३०. पत्ता:–कृपानिवास–अंबाला.

दुलीपसिंह:— क्रिकेटपटु नवानगरचे जामसाहेब रणजितसिंग यांचे पुतणे सध्यां वय २९ केंब्रिज येथें शिक्षणाकरितां गेले होते, त्यावेळेपासून उत्तम बॅट्स्मन म्हणून प्रसिद्धि; १९३० इंग्लंडतर्फे ऑस्ट्रेलियाचे विरुद्ध टेस्टमॅचेसमध्यें खेळण्याकरतां निवडणूक झाली; त्यावेळीं १७८ धांवा काढल्या. यंदाहि ऑस्ट्रेलियास जाणाऱ्या इंग्लंडच्या टीममध्यें समावेश झाला होता, परंतु प्रकृति नादुरुस्त म्हणून गेले नाहींत. जगांतील पहिल्या५ बॅट्स्मनमध्यें यांची गणना होते. यांच्या खेळांत तडफ व सहजता असते.

देवधर गोपाळ कृष्ण:— एम्. ए. सी. आय्. ई. (कैसर–इ–हिंद सुवर्ण पदक १९२०); अध्यक्ष सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी; जन्म १८७१; शिक्षण—न्यू इंग्लिश स्कूल पुणें; विल्सन कॉलेज मुंबई; एम्. ए. (मुंबई विश्वविद्यालय) १९०४; आर्यन एज्युकेशन सोसायटीज मुंबई यांचे कांहीं काळ प्रिन्सिपाल; व मुंबई विश्वविद्यालयामध्यें मॅट्रिकचे व एम्. ए.चे परीक्षक, फक्त मराठी विषयाकरितां ५ वर्षांहून अधिक; कै. गो. कृ. गोखले यांना १९०४ मध्यें त्यांच्या सार्वजनिक कामांत जाऊन

मिळाले; सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीचे पहिले सभासद १९०५; कैसर-इ-हिंद रौप्य पदक मिळालें १९१४; या सोसायटीच्या मुंबई शाखेच्या सुरुवातीपासूनच ते त्याचे मुख्य आहेत; इंडियन प्रेस डेलेगेशनचे सभासद म्हणून १९१८ त इंग्लंड-मध्यें व युरोप खंडांत सफर केली. ते १९०९ मध्यें स्थापन झालेल्या पूना सेवासदन सोसायटीचे संस्थापक, ऑ. ऑर्गनायझर व सर्वसाधारण चिटणीस आहेत, नॅशनल सोशल कॉन्फरन्सचे ऑ. सर्वसाधारण चिटणीस; अध्यक्ष–सोलापूरची इलाखा सामाजिक परिषद १९२०; व लखनौची राष्ट्रीय सामाजिक परिषद १९२४; मलबार रिलीफ फंडाचे उत्पादक व व्यवस्थापक १९२१; साउथ इंडियन व मलबार फ्लड रिलीफ फंडाचे उत्पादक व व्यवस्थापक १९२४; १९२७ सालीं गुजराथ, काठेवाड, बडोदा, सिंध आणि ओरिसा येथील पुरामुळें निराश्रित झालेल्यां-करितां सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटीच्या तर्फे मोठी वर्गणी जमविली. म्हैसूर सरकार व मद्रास सरकार यांनीं नेमिलेल्या कमिटी ऑफ् को-ऑपरेशनमध्यें सभासद म्हणून काम केलें. राजीनामा देण्यापूर्वी दोन वर्षे बॉंबे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयटचे निवडलेले अध्यक्ष; प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर; सिमला येथील इम्पीरिअल कौन्सिल ऑफ् ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या सल्लागार मंडळाचे सभासद; सिमल्याच्या इंडियन सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीचे सभासद; जून १९२७ मध्यें पुणें येथील सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीच्या अध्यक्षपदावर एकमतानें निवडणूक; अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संस्थेचे महाराष्ट्रांतील अध्यक्ष; पत्ता––सेवासदन, पुणें २.

देवधर प्रो. दिनकर बळवंतः––
जन्म १८९२ पुणें; शिक्षण–बी. ए. १९१२; एम. ए. १९१७; फर्ग्युसन कॉलेज पुणें, सन १९१७ पासून आजपर्यंत सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें संस्कृतचे अध्यापक व शिक्षण प्रसारक मंडळीचे तहाहयात सभासद. खळ–क्रिकेट, फुटबॉल, आटयापाटया व खोखो शील्डमधील प्रमुख खेळाडू. पुणें पी. वाय. सी. जिमखान्याचे १९२० पासून आजपर्यंत व्हाइस चेअरमन व लाइफ मेंबर. सदर जिमखान्याचे बॅटिंगमध्यें (सरासरी व जास्त धांवा यांत) चॅम्पिअन व १९१५ पासून कॅप्टन. टेनिस–१९२० पासून याच जिमखान्याचे सिंगल्स व डबल्स चॅम्पिअन. १९२५ पासून बेळगांव ओपन टेनिस टूर्नामेंट मध्यें चॅम्पिअन. १९१३ पासून १९२९ पर्यंत मुंबईच्या क्रिकेटच्या चौरंगी सामन्यांतील प्रमुख खळाडू. १९२९ मध्यें हिंदू टीमचे कॅप्टन. मोठे सामने–१९११ नॉर्थकोट शील्ड मॅच फर्ग्युसन कॉ. विरुद्ध झेवियर कॉ. मुंबई, धांवा ५६ नॉट आऊट; १९१७ काठेवाड टीमविरुद्ध ८०; १९१६ चौरंगी सामना ९६ व ७५ नॉट आऊट युरोपियन बोलर टॅरंटविरुद्ध. १९२५ चौरंगी सामन्यांत पारशी टीमविरुद्ध १३५; १९२६ एम. सी. सी. विरुद्ध १४८; हिंदु जिमखान्याविरुद्ध १४६; १९२७ पुणें येथें मद्रास युनायटड टीमविरुद्ध ९५; १९२८ चौरंगी सामन्यांत पारशी टीमविरुद्ध ८६; शिकंदराबाद ओपन टूर्नामेंटमध्यें १०५; १९३० सिलोन येथें सिलोन युरोपियन्स विरुद्ध १०१; एकंदर शतकांचा आजपर्यंतचा आंकडा ५० पर्यंत आहे. पत्ता–पी. वाय. सी. जिमखाना, कॉलनी पुणें ४

देवधर, श्रीमती काशीबाईः––
जन्म १८७७, कासारवेल (जि. रत्नागिरी); शिक्षण– कै. पंडिता रमाबाईंचें शारदासदन, हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स, पुणें, महाराणी कॉलेज, म्हैसूर; पचाईअप्पा कॉलेज, मद्रास; बी. ए. पर्यंत झालें. खालील संस्थांतून यांनीं शिक्षकिणीचें व देखरेखीचें काम केलें.–अनाथ बालकाश्रम, (हिंगणें); अहिल्याश्रम व चं ावती महिला विद्यालय (इंदूर) महार.णी हायस्कूल व त्याला जोडून असलेलीं वसतिगहें (म्हैसूर): वसंताश्रम (बनारस); –तीन महिने अवेतन; ाजीव सभासद अनाथ बालिकाश्रम, हिंगणें; या संस्थेकरितां वर्गणीनिमित्त फिरत असत. सामाजिक विषयांवर भाषणें केलीं. त्यानंतर नियतकालिकांतून लेख व गोष्टी लिहीत असत. पत्ता–१९६/८६ सदाशिव पेट, पुणें २.

देशपांडे, प्रि. कमलाबाईः––जन्म १८९८ मिरज; शिक्षण––१९१७ मॅट्रिक, १९२० जी. ए.; १९२९–३१ प्राग येथील जर्मन युनिव्हर्सिटींत अभ्यास व पी. एच् डी. डि ी. १९२१–२२वारजाची शाळा चालविली; अनाथ बालिकाश्रमाच्या आजन्म सेविका; १९२२–२९ सुप. कन्याशाळा, सातारा; १९३१–३२ प्रोफेसर संस्कृत विषय; श्री. ना. दा. ठा. महिला पाठशाळा १९३२ मे, प्रिन्सिपल महिला पाठशाला; गीतं दल पुस्तक लिहिलें; आणि The Child in Encient India हा ी.एच्. डी. साठीं

लिहिलेला निबंध; पत्ता—श्री. ना.दा.ठा.महिला पाठशाला येरंडवणें, पुणें ४.

देशमुख, डॉ. गोपाळ विनायकः— एल्. एम् अँड एस्. (मुंबई) एफ्. आर्. सी. एस (इंग्लंड); एम्. डी. (लंडन); सल्ला देणारे शस्त्रवैद्य व डॉक्टर; जन्म १८८४; शिक्षण— मॉरिस विद्यापीठ नागपूर, ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई; किंग्ज कॉलेज आणि लंडन मेडिकल हॉस्पिटल कॉलेज, लंडन; महायुद्धामध्यें लेडी हार्डिज हॉस्पिटलमध्यें ऑनररी मेजर, जे. जे. हॉस्पिटलमध्यें शस्त्रवैद्य व ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें ऑपरेटिव्ह सर्जरीचे प्रोफेसर १९२०; गोवर्धनदास सुंदरदास मेडिकल कॉलेजामध्यें शस्त्रवैद्यकीचे प्रोफेसर आणि किंग्ज एडवर्ड हॉस्पिटलमध्यें ऑन. शस्त्रवैद्य; मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे सभासद १९२२ पासून व त्याचेच अध्यक्ष १९२८; पत्ता— चौपाटी, मुंबई.

देशमुख नामदार डॉ. पंजाबरावः— जन्म—पापळगांव, ता मूर्तिजापूर (वऱ्हाड); शिक्षण—१९१८ मॅट्रिक (अलाहाबाद विश्वविद्यालय); पुढील शिक्षण फर्ग्युसन कॉलेज, पुणें नंतर इंग्लंडला प्रयाण १९२५ एम्. ए. (एडिंबरो) तेथें शंभर पौंडांची सॅन्स डनलॉप संस्कृत रिसर्च स्कॉलरशिप मिळाली. १९२६ बॅरिस्टर व हिंदुस्थानास आगमन, वऱ्हाडमध्यप्रांतांत शेतकरी संघाची स्थापना; १९२८ उमरावती जिल्हा कौन्सिलचे लोकनियुक्त सभासद; १९३१ मध्यप्रांत वऱ्हाड सरकारचे शिक्षणमंत्री; १९३२ कोल्हापूर येथील साहित्यसंमेलन प्रसंगीं भरलेल्या ग्रंथप्रदर्शनाचे अध्यक्ष. ग्रंथ क्षत्रियांचा इतिहास. पत्ताः— उमरावती, वऱ्हाड.

देशमुख, बॅरिस्टर रामराव माधवरावः—जन्म १८९२; शिक्षण—केंब्रिज (बी.ए. एल एल्. बी. बार अॅट लॉ.) १९१७ प्रेसिडेंट ऑल इंडिया मराठा कॉन्फरन्स, बेळगांव १९१८; उमरावती येथें वकिली १९१९–२०; नागपूर येथें १९२०; मध्यप्रांत कौन्सिलचे सभासद १९२१; ऑल् इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद; १९२५ सातारा महाराष्ट्र कॉन्फरन्सचे अध्यक्ष; अमरावती डिस्ट्रिक्ट कौन्सिलचे पहिले चेअरमन; १९२७ पासून मध्यप्रांत सरकारचे मिनिस्टर; १९२८ राजीनामा; १९२९ पुन्हां नेमणूक; १९३० राजीनामा; १९३१ मेपासून 'वऱ्हाड हा इंडियन फेडरेशनचा स्वतंत्र घटक व्हावा' याकरितां चळवळ सुरू केली आहे. पत्ता—मोर्शी रोड, उमरावती (वऱ्हाड).

देसाई, गोविंद गोपाळः—जन्म शके १८११ नाधवडें (कोंकण); इंग्रजी शिक्षण कोल्हापूर व सांगली हायस्कूल; १९११ गु. विष्णु दिगंबर पलुस्करांच्या शाळेंत दाखल; १९१४–१७ पुणें, गांधर्व महाविद्यालय शाखेचे प्रमुख; १९१८ पुण्यास गोपाळ गायन समाज ही संस्था स्थापन केली; ऐतिहासिक पोवाड्यांस नवीन वळण लावण्याकरितां १९२३ सालीं शाहीराच्या रंगभूमीवर हे पहिले गृहस्थ चढले; १९२७ सालीं समाजाची स्वतंत्र इमारत तयार झाली; पत्ता— गोपाळ गायन समाज टिळक रोड पुणें २.

देहेलवी, दि ऑनरेबल सर अली महंमदखानः—के. टी. बार अॅट-लॉ (१८९६); अध्यक्ष मुंबई लेजि.कौन्सिल; जन्म— १८७४; शिक्षण— मुंबई आणि लंडन; गुजराथ व सिंध येथें वकिली; सिंधी जमिनदारांच्या हितासाठीं चाललेलें 'अल-हग्' हें वर्तमानपत्र काढून ३ वर्षें संपादक म्हणून चालविलें; मंगरोल (काठेवाड) व पालनपूर येथील दिवाण; स्मॉल् कॉझेस कोर्टाचे न्यायाधीश, मुंबई; १९२४–२७ पा.न शेतकी खात्याचे दिवाण;

धुरंधर, रावबहादूर महादेव विश्वनाथ, ए. एम्. आर्टिस्ट.जन्म १८७१मुंबई; शिक्षण राजाराम हायस्कूल कोल्हापूर व जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई; १८९४ मेयो मेडॅलिस्ट (जे.जे. आर्ट स्कूल); १८९५ गोल्डमेडॅलिस्ट बॉम्बे आर्ट सोसायटी; १८९६ स्कूल ऑफ आर्टमध्यें प्रथमतः असिस्टंट मास्तर, नंतर १९०९ मध्यें हेडमास्तर, १९१८ मुंबई इलाख्याचे इन्स्पेक्टर ऑफ ड्राईंग अँड क्राफ्ट वर्क; १९२५पर्सनल असिस्टंट टू दि प्रिन्सिपाल आर्ट स्कूल, १९३०ऑफिशिएटिंग डायरेक्टर स्कूल ऑफ आर्ट, या जागेवर असतांनाच पेन्शन घेतलें, राजा रविवर्मा यांच्या निधनानंतर त्यांचे छापखान्यांतून प्रसिद्ध झालेल्या खालील पुस्तकांतील सर्व चित्रें यांनींच काढलेलीं आहेत. वुइमेन ऑफ इंडिया, रोथफील्ड, १९०९ ते १२ सुवर्णमालेचे अंक, मॅकमीलन मराठी क्रमिक पुस्तकें, १९२८ "रावबहादूर" हा किताब मिळाला. पत्ताः—'अंबासदन', प्रभूनगर, खार— मुंबई नंबर २१.

ध्यानचन्दः—सध्यां २५ वर्षांचे आहेत. पंजाब राइफल्स नांवाच्या फलटणींत नाईक

कार्पोरलचा हुद्दा.हे वयाच्या १५ व्या वर्षापासून हॉकी खेळूं लागले. १९२६ सालीं हिंदुस्थानांतील सैन्यांतर्फे एक संघ न्यूझिलंड व ऑस्ट्रेलिया येथें पाठविण्यांत आला होता; त्यांत त्यांस सेंटर फॉर्वर्ड म्हणून निवडलें होतें. त्यावेळीं यांनीं अप्रतिम कामगिरी करून १२५ वर गोलस केले. त्यामुळें 'हॉकीचा जादुगार' अशी पदवी मिळून जगप्रसिद्धी मिळाली. पुढें १९२८ सालीं ॲम्स्टरडॅम येथें झालेल्या आंतरराष्ट्रीय सामन्याचे वेळीं हिंदुस्थान तर्फेची निवडणूक झाली. त्या वेळींही त्यांनीं १०० वर गोलस केले. पुन्हां यंदां (१९३२) लॉस अँजेलिस येथेंही अशीच कामगिरी करून हिंदुस्थानला हॉकींतील अजिंक्यपद मिळवून देण्यास त्यांनीं मदत केली.या वर्षीही त्यांनीं १०० वर गोलस केले आहेत.

नटराजन्, कामाक्षी:—बी. ए. (मद्रास विश्वविद्यालय) १८८९; "दी इंडियन सोशियल रिफॉर्मर"चे संपादक, मुंबई; जन्म १८६८; ट्रिप्लिकेन (मद्रास) येथील आर्यन हायस्कूलचे हेडमास्तर; मद्रासच्या 'हिंदू' चे दुय्यम संपादक; मद्रास इलाखा सामाजिक परिषदेचे अध्यक्ष; कर्नल १९११; मुंबई इलाखा सामाजिक परिषदेचे अध्यक्ष,विजापूर १९१८; राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष, अहमदाबाद १९२१; हिंदी राष्ीय सामाजिक परिषदेचे सर्वसाधारण चिटणीस १९२३–२४ ४०व्या हिंदी राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष मद्रास १९२७.

नटेसन दी ऑनरेबल मिस्टर जी. ए.; नटेसन आणि कं. चे प्रमुख; 'दी इंडियन रिव्हयू' चे संपादक; कौन्सिल ऑफ् स्टेटचे सभासद; जन्म–२५ ऑगस्ट १८७३; शिक्षण–मद्रास विश्वविद्यालयाचे बी. ए. (१८९७); विश्वविद्यालयाचे फेलो; मद्रास कार्पोरेशनचे कमिशनर; १९१९ मध्यें मॉडरेट् कॉन्फरन्समध्यें प्रवेश; मद्रास लिबरल लीगचे चिटणीस; नॅशनल लिबरल् फेडरेशनचे सहकारी चिटणीस१९२२; एम्पायर पार्लमेंटरी डेलिगेशनबरोबर कानडाला भेट दिली १९२८; पत्ता—जॉर्ज टाऊन, मद्रास.

नरिमन के. एफ्. :—हायकोर्ट वकील मुंबई; मुंबई कायदेमंडळाचे एकदां सभासद; मुंबई कार्पोरेशनचे दोनदां सभासद; लहान वयापासून टिळकांचे अभिमानी; मि.हार्वे यांनीं नरिमन यांच्यावर बॉम्बे रेक्लेमेशन प्रकरणीं अब्रुनुकसानीची फिर्याद मांडली; हावचा पराभव झाला व नरिमन निर्दोषी म्हणन सुटले; मुंबई प्रांतिक युवक परिषदेचे अध्यक्ष व मुंबईंतील तरुणांच्या चळवळीचे पुढारी; कायदेभंगाबद्दल कित्येक वेळीं तुरुंगवास; हल्लीं (मे १९३२) तुरुंगांत. पत्ता—हीयस रोड, चौपाटी, मुंबई.

नाईक विष्णु रामचंद्र —जन्म १७८८ मडगांव (गोवें); शिक्षण व वाचन–कायदेशास्त्र, वेदांत व धार्मिक, सामाजिक, आणि राजकीय विषय. वकिलीची परीक्षा पास होऊन वकिलीस सुरुवात केली. देशांतील अनेक चळवळींत भाग घतला व त्यांचा पुरस्कार केला; तरुण मंडळींत प्रचार करून त्यांच्यांत सार्वजनिक कामाची आवड उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. पत्ता—वकील, मडगांव, गोवें.

नाईक सौ. सरलाबाई— जन्मः– १८९१ वांद्रे (जि. ठाणें); माहेरचें नांव–कु. कृष्णाबाई ठाकूर; विवाह–१९१६ श्री. बाबुराव हरी नाईक (एम्. ए.) यांच्याशीं; शिक्षण–अलेक्झांड्रा गर्ल्स स्कूल ,एल्फिन्स्टन कॉलेज,मुंबई; १९१३ एम्. ए.; १९१४–१६, लेडी सुपरिंटेंडेंट्, अनाथ बालिकाश्रम, हिंगणें; १९१५-१६ प्रचारिका भारतीय महिला पीठ, पुणें; १९१६–२१ चीफ इन्स्पेक्ट्रेस गर्ल्स स्कूल इंदूर; १९२१–२४ प्रिन्सिपल व प्रोफेसर ऑफ हिस्ट्री, क्रॉसवेट गर्ल्स इंटर मिजिएट कॉलेज, अलाहाबाद ; १९२४–२७ प्रिन्सिपल व प्रोफेसर ऑफ हिस्टरी, मुस्लीम गर्ल्स इंटरमिजिएट कॉलेज, लखनौ; १९२७पासून ऑनररी वर्कर सेवासदन सोसायटी पुणें, माजी फेलो अलाहाबाद व बनारस युनिव्हर्सिटीज; माजी मेंबर यू. पी. बोर्ड ऑफ हायस्कूल्स ॲन्ड इंटरमिजिएट एज्युकेशन; परीक्षक व फेलो, मुंबई युनिव्हर्सिटी; स्फुट लेखिका मनोरंजन, रत्नाकर, स्त्री इत्यादि मासिकांतून. पत्ता–हरिबाग, भटवाडी, वेंगुर्लें.

नानलशास्त्री पु. ग.:—जन्म— १८९३ पुणें; शिक्षण–मराठी, संस्कृत व इतर व्यावहारिक १९०८ पर्यंत; पुढें १९०८ ते १४ पर्यंत कै. प्राणाचार्य लागवणकर वद्य यांचे विद्यालयांत आयुर्वेदीय उच्च शिक्षण. आयुर्वेदीय परीक्षा– वे. शा. सभा, पुणें, राजकीय परीक्षा सभा, बडोदें व नि.भा.आयुर्वेद महामंडळ यांच्या सर्व परीक्षा दिल्या; पदव्या–बडोदें वैद्यभूषण; नि. भा. आयुर्वेद म. मंडळ, 'आयुर्वेदाचार्य '; १९१४ पासून स्वतंत्र व्यवसायास सुरुवात; १९१७ त यांनीं लागवणकर आयुर्वेद

विद्यालय सुरूं केलें.ग्रंथकर्तृत्व–१९२०त 'आरोग्य' मासिक सुरूं केलें.विषतंत्र पुस्तक लिहिलें.'भावप्रकाश'ग्रंथाचें मराठी भाषांतर; १९२१पासून शेवटपर्यंत टिळक महाविद्यालयांतील आयुर्वेद शाखेची जबाबदारी; 'आयुर्वेदीय रुग्णालयां'च्या संस्थापकांपैकीं व आजपर्यंतच्या चालकांपैकीं एक; संस्कृत वाग्वर्धिनी सभा, आयुर्वेद महामंडळ, वेदशास्त्रोत्तेजक सभा, इ. संस्थांचे एक कार्यकर्ते.पत्ता–पुणें ४

नायडू कॅप्टन कनकय्या सूर्यकांत– बॅटस्‌मन, बोलर, फिल्डर, विकेटकीपर. मॅट्रिक हिस्लॉप मिशन हायस्कूल, नागपूर; इंटरपर्यंत हिस्लॉप कॉलेज, नागपूर, १९२६पासून इंदूर संस्थान लष्करांत नोकरी; क्रिकेट शिक्षण श्री. राजलिंगम् व श्री. भाऊसाहेब भिडे यांनीं दिलें. कॉलेजमध्यें यांनीं सर्व खेळांत प्रावीण्य दाखविलें, मुख्यतः क्रिकेट व हॉकी यांत नैपुण्य; वाय्. एम्. सी. ए. स्पोर्टस् चँपियन् मुंबई, १९०५ म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षी प्रथम क्रीडांगणावर आले; १९१६, मुंबईच्या चौरंगी सामन्यांत प्रवेश; हिंदुस्थानला आलेल्या एम्. सी. सी. टीम विरुद्ध खेळले, त्यावेळीं एका मॅचमध्यें ११ ओव्हर बाऊंडरीज् (सिक्सर्स) व १३ बाऊंड्या (फोर्स) मारून १५३ स्कोअर केला, त्यांतील १०० धावा त्यांनीं १ तास १३ मिनिटांत काढल्या; विलायतेस टूर करून आलेल्या हिंदी टीमचे ते कॅप्टन होते; तेथें त्यांनीं सर्व मॅचेस् मिळून ४० ओव्हर बाऊंड्या मारल्या, ७८ विकेटस् घेतल्या, व ५२ इनिंग्ज् मिळून १७७९ धांवा काढल्या व ६ वेळां नॉटऔट राहिले.

नायडू सौ. सरोजिनीः–– 'रॉयल सोसायटी ऑफ लिटरेचर' च्या फेलो १९१४; जन्म–हैद्राबाद (दक्षिण); १३ फेब्रुवारी १८७९; शिक्षण–हैद्राबाद; किंग्ज कॉलेज लण्डन; गर्टन कॉलेज केंब्रीज ; इंग्रजीमध्यें कवितांचे तीन खंड प्रसिद्ध केले. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष १९२५; १९३१ सालीं महात्मा गांधींच्या बरोबर विलायतेला रा.टे.प.करतां प्रयाण.त्यानंतर हिं.सरकारतर्फे आफ्रिकेला जाणाऱ्या शिष्ट मंडळाच्या एक प्रमुख सभासद. सविनय कायदेभंगाच्या चळवळींत दोन वेळ शिक्षा. सध्यां तुरुंगांत आहेत.

नायर :––शंकरन सर बी. ए., बी. एल्., जन्म–११ जुलै १८५७; शिक्षण–मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेज; हायकोर्ट वकील; सरकारी वकील; मद्रास सरकारचे पब्लिक प्रॉसिक्यूटर, ॲडव्होकेट जनरल व मद्रास हायकोर्टाचे न्यायाधीश, मद्रास कायदेमंडळाचे कित्येक वर्षें सभासद. अमरावतीच्या हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष; मद्रास हिंदी सामाजिक परिषदेचे अध्यक्ष; मद्रासच्या औद्योगिक प्रदर्शनाचे अध्यक्ष; "मद्रास रिव्ह्यू;" "मद्रास लॉ जर्नल" व दैनिक" मद्रास स्टँडर्ड" यांचे जनक व कांहीं काळ संपादक; व्हाइसरायांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद १९१५–१९१९; "कौंसिल ऑफ दि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया" चे सभासद १९१९ ते१९२१; कौंसिल ऑफ स्टेटचे लोक नियुक्त सभासद नोव्हेंबर १९२५. सायमन कमिशन रोबरच्या सेंट्रल लेजि लेचर कमिटीचे चेअरमन १९२८.

नारळीकर रँग्लर व्ही. व्ही.:–जन्म १९०८ कोल्हापूर; शिक्षण–विद्यापीठ, कोल्हापूर व एक वर्ष राजाराम हायस्कूलकोल्हापूर; कॉलेज-एक वर्ष, एल्फिन्सटन कॉलेज मुंबई व नंतर तीन वर्षें रॉयल इन्स्टिटयूट ऑफ् सायन्स,मुंबई; १९२८ बी. एस्. सी.; १९३० बी. स्टार रँग्लर, केंब्रिज फिट्झ् वुइल्यम हाउस; पहिले हिंदी टायसन् मेडॅलिस्ट; १९३० ऑक्टोबर, आयझॅक न्यूटन शिष्यवृत्ति (सालिना २५० पौंड) मिळाली. ती सतत चार वर्षें मिळण्याचा हक्क १९३१ मध्यें मिळाला; १९३२ रेले प्राइझ; पदव्या–बी. एस्.सी. (मुंबई) बी. ए. (कँटब), एफ्. आर. ए. एस्. बी–स्टार रँग्लर; अनेक फिलॉसॉफिकल सोसायटीजचे सभासद; डायनॅमिक्स, रिलेटिव्हिटी, ॲस्ट्रॉनमी, कॉस्मॉगमी वगैरे विषयांवर 'नेचर' 'फिलॉसॉफिकल मॅगझिन''मॅथेमेटिकल गॅझेट'इत्यादि मासिकांत यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

नेहरू जवाहरलालः–जन्म १८८९ कै. पंडित मोतीलाल नेहरू यांचे चिरंजीव; बार-ॲट-लॉ; शिक्षण–हॅरो स्कूल व ट्रिनिटी कॉलेज,केंब्रिज; अलाहाबाद हायकोर्टाचे ॲडव्होकेट; होमरूल लीगचे चिटणीस अलाहाबाद १९१८; अखिल भारतीय राष्ट्रसभेच्या कमिटीचे सभासद१९१८; कट्टर असहयोगी १९२१; तुरुंगवास १९२२; दलित राष्ट्र परिषदेमधील हिंदुस्थानचे प्रतिनिधि; रिपब्लिकन कॉंग्रेसचे अध्यक्ष १९२७; अखिल भारतीय राष्ट्रसभा कमिटीचे चिटणीस; "इंडिपेण्डन्स" लीगचे संस्थापक १९२८; लाहोर येथील राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष १९३०; कायदेभंगाच्या चळवळीमुळें सध्यां (१९३२) तुरुंगांत; ही पांचवी शिक्षा होय. पत्ता–अलाहाबाद.

पटवर्धन, अनंत विनायक ऊर्फ वामनरावः––जन्म–शके १७९४ (इ. स. १८७३)

सांगली; हें घराणें भिलवडीकर शाखेंतील आहे. शिक्षण सांगली हायस्कूल व न्यू इंग्लिश स्कूल, पुणें; १८९६ बी.ए.; १९०१ कोल्हापूर येथें श्रीमंत बाबासाहेब जतकर यांचे शिक्षक; १९०४ कै.ना. गोखले यांचे हाताखालीं हे काम करीत होते. १९०५ सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे स्थापनेपासूनचे आजन्म सेवक, मद्रासव्लाख्यांत व म्हैसूर संस्थानांत दौरा; १९०७ पासून आजतागायत सोसायटीचे आर्यभूषण व ज्ञानप्रकाश छापखान्याचे व्यवस्थापक; १९२१ पासून संस्थानी राजकारणांत, श्री. न. चि. केळकर यांचे सहकारी, हल्लीं चालक—'संस्थानी स्वराज्य' पत्र; कांहीं काल 'ज्ञानप्रकाशचे संपादक होते. त्या वेळीं संस्थानी मजकुराची पुरवणी पत्रास जोडीत असत. हे सोसायटीतर्फे आर्यभूषण व ज्ञानप्रकाश छापखान्याचे 'कीपर' आहेत. गेलीं सहा वर्षें सतत मेहनत करून यांनीं १९२६ सालीं किबे वाड्यास आग लागून छापखान्याचें अतिशय नुकसान झालें तें भरून काढलें.

पटवर्धन ज्योतिषरत्न पंडित रघुनाथ शास्त्री:—जन्म शके १८१४, पुणें; ज्योतिषशास्त्राचें शिक्षण पुणें येथें घेतलें. पदव्या—काशीच्या भारत धर्म मंडळाकडून 'ज्योतिष सुधाकर' ही पदवी; श्री शंकराचार्य करवीरकर (संकेश्वर) यांजकडून ' ज्योतिषरत्न ' ही पदवी. श्री प्रतिवादी—भयंकर मठ, कांची यांचेकडून ' ज्योतिर्भूषण'ही पदवी; चिटणीस—शुद्ध—पंचांग—प्रवर्तन—कमिटी व भारतीय ज्योतिर्मंडळ. संपादक—ज्योतिर्भूषण व ज्योतिष शिक्षण क्रम; कौन्सिलर सिटी म्युनिसिपालिटी; डायरेक्टर सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक; ग्रंथकर्तृत्व—ज्योतिषशिक्षक अथवा जातककेसरी, भविष्यसिद्धांत, धनयोग, दारिद्र्ययोग, ग्रहदशा, कुंडलीसंग्रह, इत्यादि; पत्ता—शुक्रवार पेठ घ. नं १२३, पुणें २.

पटवर्धन, डॉ. शिवाजीराव:—जन्म शके १८१२ जमखंडी; शिक्षण—पुणें, अलाहाबाद व कलकत्ता येथें; सन १९१७ होमिओपाथीची एम. बी. ही परीक्षा उत्तीर्ण. याच सालीं दवाखाना सुरू. हे दीनदुबळ्यांना फुकट औषधोपचार करितात. अध्यक्ष—महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद, विलेंपार्ले व अ. भा. शा. शि.परिषद कलकत्ता, प्रां.कां.कमिटीचे उपाध्यक्ष; यांच्याच कर्तबगारीनें अमरावतीचें हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ नांवारूपास आलें. हल्लीं या मंडळाचे अध्यक्ष; श्रीमच्छंकराचार्य यांनीं 'समाजबलरक्षक' पदवी अर्पण केली.ग्रंथ—हिंदुधर्म मीमांसा; (हिंदी) १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळींत १ वर्ष साधी कैद व १९३२ च्या चळवळींत ३ वर्षें सक्तमजुरी व साडेसातशें रुपये दंड. सध्यां तुरुंगांत. पत्ता—अमरावती, वऱ्हाड.

पटवर्धन प्रो. माधव त्रिंबक:—जन्म १८९४ बडोदें; शिक्षण—बडोदें, १९१८ एम्.ए.; १९१८ पासून आजन्म सदस्य डेक्कन एज्युकेशन सोसायटी,पुणें; फर्ग्युसन कॉलेजांत फार्सीचे अध्यापक; १९२५ ऑक्टोबर राजीनामा; १९२८ जूनपासून आजतागायत राजाराम कॉलेजांत (कोल्हापूर) फार्सीचे व इंग्रजीचे अध्यापक; काव्यलेखन 'माधव ज्यूलियन' या नांवाखालीं प्रसिद्ध होतें. ग्रंथकर्तृत्व—१९२५ फार्सी-मराठी कोश; १९२७ छंदोरचना; १९२९ उमरखय्यामच्या रुबाया; काव्यें—मधुमाधव (१९२४); द्राक्षकन्या (१९३१); इत्यादि.

पटवर्धन सौ. मालतीबाई:—ऑनररी प्रेसिडन्सी मॅजिस्ट्रेट,मद्रास; जन्म १८९९; इंग्लंड, बनारस व अड्यार (मद्रास) येथें शिक्षण; मि. व्ही. सी. पटवर्धन, बॅरिस्टर सांगली यांच्याशीं विवाह; अखिल भारतीय युवक परिषदेच्या उपाध्यक्ष मद्रास १९२७; कन्यागृहाच्या ऑनररी सुपरिंटेंडेंट्; पत्ता—अड्यार, मद्रास.

पटेल वल्लभभाई जव्हेरभाई:—बार-अॅट-लॉ; नडियादजवळील करमसद गांवीं पातीदार कुटुंबामध्यें जन्म; शिक्षण—नडियाद हायस्कूलमधून मॅट्रिक पसार; गोध्रा येथें डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा दिली व तेथेंच वकिलीला सुरुवात केली. इंग्लंडला प्रयाण व बार अॅट मिड्ल् टेंपलमध्यें प्रवेश; इंग्लंडहून परत आल्यावर अहमदाबाद येथें बॅरिस्टरीला सुरुवात; १९१६ मध्यें म. गांधींचे सहकारी म्हणून सार्वजनिक जीवनास आरंभ;पहिल्यानें खेडा मग नागपूर राष्ट्रीय निशाण प्रकरण व त्यानंतर बार्डोलीची करबंदीची चळवळ यांमध्यें सत्याग्रही पुढारी; असहकार चळवळीच्या तहकुबीनंतर व महात्मा गांधींच्या तुरुंगवासानंतर पहिल्या प्रथम अहमदाबाद म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष १९२७—२८; कराची येथील राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष १९३१; कायदेभंगाच्या चळवळींत दोनदां शिक्षा; पत्ता—भद्र अहमदाबाद.

पटेल विठ्ठलभाई जव्हेरभाई :—शिक्षण—अहमदाबाद व इंग्लंड; १९१८ सालच्या मुंबईच्या जादा राष्ट्रीय सभेच्या स्वागत समितीचे

चेअरमन्; मुंबई कार्पोरेशनचे सभासद; स्कूल्स कमिटीचे चेअरमन् १९२३–२४; मुंबई कायदेमंडळ व इंपीरिअल कौन्सिल; मुंबई कार्पोरेशनचे अध्यक्ष १९२४–२५; १९२२ सालीं हिंदुस्थानभर प्रवास करणाऱ्या कायदेभंग कमिटीचे सभासद; ले. असेंब्लीचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष (१९२५), व पुन्हां अध्यक्ष (जाने.१९२७); १९३० सालीं असेंब्लीचा राजीनामा; कायदेभंगांत शिक्षा; प्रकृतीसाठीं युरोपास प्रयाण; आयर्लंड, अमेरिका इकडे दौरा.

पट्टणी सर प्रभाशंकर दलपतराम:– के. सी. आय्. ई. जन्म १८६२; शिक्षण–मोरवी, राजकोट, मुंबई; मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद १९१२–१५; मुंबई कायदेमंडळाचे सभासद १९१६; इम्पीरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद १९१७; इंडिया कौन्सिलचे सभासद १९१७–१९; भावनगर संस्थानांतील राज्यकारभारी मंडळाचे अध्यक्ष १९२०; राऊंड टेबल कॉ.चे सभासद; पत्ता–अनंतवाडी, भावनगर.

पतौडीचे नवाब:-– सध्यां वय २३. उत्तर हिंदुस्थानांत पतौडी नांवाचे लहानसें संस्थान आहे. तेथील नवाब; इंग्लंडमध्यें ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत सध्यां अभ्यासक्रम चालू आहे. गेल्या वर्षापासून क्रिकेटमध्यें प्रसिद्धि. त्यामुळें यंदा ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणाऱ्या टीममध्यें समावेश झाला. आस्ट्रेलियांत आपले खेळांतील कौशल्य चांगलेंच दाखविलें. त्यामुळें जगांतील अत्युत्कृष्ट खेळाडूंत त्यांची गणना होऊं लागली.

परमहंस प्रज्ञानेश्वर यति (श्रीकृष्ण सदाशिव घारपुरे बी. ए.) जन्म शक १७८३ सन १८६१ स्थान सातारा. प्रथम सरकारी नौकरी रेव्हिन्यूखातें; नंतर होळकर सरकारच्या दरबार ऑफीसमध्यें असि. मॅनेजर; नंतर शिक्षक न्यू. इं. स्कूल, पुणें. नंतर हेडमास्तर पंढरपूर हायस्कूल. तें सरकारच्या गैरमर्जीतून काढून त्यास कायमपणा आणिला. म्युनिसिपालिटीचा राग, व त्यामुळें डिसमिस. स्पेशल सिव्हिल ऑफिसर फॅमिन रिलीफ. नंतर नोकरी सरकारी हायस्कूल. Marks System बदलून घेतली.सेवानिवृत्त १९१६; धर्मसंशोधनाकरितां संन्यास १९२४. ग्रंथकर्तृत्व:—सनातन मानवधर्मरहस्य, स्यूत सौतिक (Sartor Resartus), हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें, चातुर्वर्ण्यविचार व उपनयन, धर्मतत्त्व, जन्मान्तर मतचिकित्सा आणि शारीर अध्यात्म. पत्ता:–३२९ सदाशिव पुणें २.

परमानंद मिसेस् डॉ. सीताबाई :–– कै. श्री. ना. ल. अजगांवकर यांच्या कन्या; शिक्षण–'हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स' पुणें; मॅट्रिक रत्नागिरी हायस्कूल; जगन्नाथ शंकरशेठ संस्कृत शिष्यवृत्ति मिळविणारी पहिली विद्यार्थिनी; १९२३ बी. ए. एलिफन्स्टन कॉलेज, मुंबई; १९२५ बी. लिट्. (ऑक्सफर्ड); The position of women in ancient India as represented by the Dharmashastras हा निबंध (Thesis) लिहून ही पदवी मिळविली; १९२६ डी. फिल् (डॉक्टर ऑफ फिलॉसफी) ऑक्सफर्ड; The position of women in ancient India as represented by the Epics the Ramayan and the Mahabharat हा निबंध लिहून डॉक्टर झाल्या. ब्रिटिश युनिव्हर्सिटीची ही पदवी मिळविणारी पहिली हिंदी स्त्री आणि ऑक्सफर्डमधील तिसरी स्त्री विद्यार्थिनी; १९२७ बॅरिस्टर, हिंदु–स्त्रियांत बॅरिस्टर होणाऱ्या या पहिल्या स्त्री होत व हिंदी स्त्रियांतील बॅरिस्टरांत या तिसऱ्या होत; १९२७ मि. परमानंद आय. सी. एस. यांच्याशीं विवाह; १९२५ पहिली ब्रिटिश कॉमनवेल्थ वुइमेन्स कॉन्फरन्स, लंडन–या सभेस हिंदी प्रतिनिधि म्हणून हजर होत्या; त्यावेळीं " the position of women under Hindu and Mohamedan Laws" हा निबंध वाचला; १९२८, पहिल्या सी. पी. अँड बेरार वुइमेन्स एज्युकेशनल कॉन्फरन्सच्या अध्यक्ष (नागपूर); नागपूर युनिव्हर्सिटीच्या 'फॅकल्टि ऑफ आर्टस्' 'कोर्ट' वगैरे मंडळाच्या सभासद आहेत; १९३१ पासून ज्युडिशिअल कमिशन्स कोर्ट, नागपूर येथें प्रॅक्टिस करण्याकरतां सनद घेतली.

पराडकर बाबूराव:––हिंदी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक; बनारसच्या "आज" पत्राचे कित्येक वर्षें संपादक; सामाजिक सुधारणांच्या बाबतींत असामान्य कर्तृत्वाचे पुढारी; विधवा विवाहाचे कट्टे पक्षपाती; पत्ता–"आज" कार्यालय, काशी.

परांजपे गोपाळ रामचंद्र:––एम्. एस. सी.; ए. आय. आय. एस. सी.; "रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स" मुंबई येथें, सृष्टिशास्त्राचे प्रोफेसर; जन्म जानेवारी १८९१;

शिक्षण–पुणें, हिडेलबर्ग व बर्लिन; मुंबई विश्वविद्यालयांतील संशोधनाचे तीन वर्षांपर्यंत, बंगलोर येथें स्कॉलर; "इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स" बंगलोर येथें कांहीं काळ फिजिकल केमिस्ट्री शाखेमध्यें दुय्यम; १९२० पासून "इंडियन एज्युकेशनल सर्व्हिस" मध्यें; मुंबईच्या "रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स" या संस्थेंत सृष्टिशास्त्राचे प्रोफेसर; मुंबई विश्वविद्यालयाचे फलो; अनेक शास्त्रीय मुद्यांवर लेख लिहिले आहेत; मराठीमधील शास्त्रीय मासिक "सृष्टिज्ञान" याचे सहसंपादक. पत्ता–"रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स" मेयो रोड, मुंबई.

परांजपे डॉ. रघुनाथ पुरुषोत्तमः––लखनौ युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर; बी. एस. सी. (मुंबई); डी. एस. सी. (कलकत्ता); इंडिया कौंसिलचे सभासद (१९२७); जन्म–मुरडी १६ फेब्रुवारी १८७६; शिक्षण–मराठा हायस्कल, मुंबई; फर्ग्युसन कॉलेज, पुणें; सेंट जॉन्स कॉलेज (केंब्रीज)चे फेलो; पॅरिस व गटिंगेन; हिंदुस्थानांतील सर्व विश्वविद्यालयीन परीक्षांतून पहिले; हिं. सरकारचे स्कॉलर म्हणून विलायतेस गेले; केंब्रीजला पहिल्या आलेल्या दोन सीनियर रँगलरांपैकीं एक १८९९; गणिताचे प्रोफेसर व प्रिन्सिपॉल फर्ग्युसन कॉलेज पुणें १९०२–२४ ; मुंबई इलाख्यांतील सर्व सामाजिक, राजकीय व शैक्षणिक चळवळींमधून प्रमुख भाग घेतला; इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटीचे व्हॉइस चॅन्सेलर १९१६–२०; मुंबई कायदेमंडळांत १९१३ सालीं; मुंबई विश्वविद्यालयांतील मुं. का. मंडळांतील प्रतिनिधी १९१६–२३ व १९२६; कैसर–ई–हिंद सुवर्णपदक मिळालें १९१६; मुंबई सरकारचे मंत्री १९२१–२३ व १९२७; रिफॉर्म्स इन्क्वायरी कमिटीचे सभासद १९२४; ऑक्झिलिअरी व टेरिटोरिअल फोर्सेस कमिटी १९२४; इंडियन टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटी १९२४–२५; इंडिया ऑफिसमध्यें नेमणूक झाली म्हणून मुंबई सरकारच्या मंत्रीपदाचा राजिनामा १९२७; १९३२ च्या फेब्रु. महिन्यांत हिंदुस्थानला परत. पुन्हां फर्ग्युसन कॉलेजमध्यें गणिताध्यायनाच्या कामास सुरुवात; हल्लीं लखनौ युनिव्हर्सिटीचे व्हॉइस चॅन्सेलर.

परांजपे, तपस्वी डॉ. बाबासाहेब ––जन्म १८७४ पुणें; शिक्षण–मराठी व इंग्रजी यवतमाळ येथें; पुढें अमरावती हायस्कुलांतून हैद्राबाद येथील मेडिकल स्कूलमध्यें सरकारी शिष्यवृत्ति घेऊन गेले. तेथेंच १८९५ ते ९७ डॉक्टरीची नोकरी. १९०२ पर्यंत वऱ्हाडांत नोकरी. १९०९ पर्यंत यवतमाळ येथें प्रायव्हेट प्रॅक्टिस व विद्यागृह नांवाची राष्ट्रीय शाळा तीन वर्षें चालविली. १९१० एक वर्ष मुंबई येथील दैनिक राष्ट्रमतांत. त्यानंतर पुणें येथें मराठी वैद्यक वर्ग ही संस्था तीन वर्षें चालविली. नंतर टिळक स्वराज्य संघाचे चिटणीस. वऱ्हाडांत बिगार–बलुत्याची चळवळ पांच वर्षें चालविली. त्यांत १९२१ सालीं सव्वा वर्ष तुरुंगवास. १९२३ पासून ग्रामपंचायत प्रचाराकरितां मुंबई, मद्रास, बंगाल, आसाम वगैरे प्रांतांत हिंडून १९३० सालीं नागपूर येथें ग्रामणी संघ स्थापन केला. प्रथम ८ महिने इंग्रजी ग्रामणी मासिक चालवून एप्रिल १९३२ पासून मराठी ग्रामणी मासिक चालवितात. पत्ता–दि ग्रामणी असोसिएशन, नागपूर.

पवार शिवराम गणपतः––जन्म तारीख ३० मे १८६७ इसवी. जन्मभूमी राहुरी; ट्रेनिंगचें तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकेट मिळविलेले शिक्षक; पेन्शनर; मेंबर डिस्ट्रिक्ट स्कूलबोर्ड अहमदनगर; राहणार मौजे सडें, तालुका राहुरी जि. नगर; यांनीं करणकौमुदी (सूर्य, चंद्र, ग्रह यांचें स्थान ठरविणारा ज्योतिषशास्त्रविषयक ग्रंथ) रेवती योगतारेचा शोध, भमितीचीं मूलतत्त्वें, त्रिकोणमिति, शकुनच्छिन्हें, ग्रहगतिसिद्धांत (डायनामिकल आस्ट्रानामी), पंचांगकल्पतरू, उपरागविज्ञान, (चंद्रसूर्यांच्या ग्रहणाची उपपत्ति, बेसेलियन सिस्टिमप्रमाणें परंतु शरभोगात्मक व कृति, चंद्रछाया वृत्ताच्या गमनाचा नकाशा) हे ग्रंथ लिहिले आहेत. ह्यांपैकीं पहिले तीन मात्र छापून प्रसिद्ध झाले आहेत. ग्रहस्थान–निर्णयाची पाश्चात्य ज्योतिर्विदांची पद्धति अशी आहे कीं, प्रथम हेलिओसेंट्रिक ग्रह स्पष्ट करून नंतर जीओसेंट्रिक स्पष्ट करतात. पण पवार यांनीं एकदम जीओसेंट्रिक ग्रह करण्याची एक रीति बसविली आहे. हे रैवत पक्षाचे पुरस्कर्ते असून शके १८५१ सालचें पंचांग छापून प्रसिद्ध केलें आहे. शुद्ध पंचांग व आरंभस्थान ह्या केसरीमधील लेखमालेवरून यांचे विचार कसे आहेत हें कळून येतें.

पळसुले गोपाळ सदाशिवः––पुणें येथील होमिओपाथिक डॉक्टर; जन्म शक १८०२; –कोल्हापूर; शिक्षण –राजाराम कॉलेज; कलकत्त्यास होमि-

ओपाथिक शिक्षण; तेथील नॅशनल मेडिकल कॉलेजचे L. M. & S.; आज २० वर्षे निवळ होमिओपाथीची चिकित्सा करितात; ग्रंथ जीवन-रसायन चिकित्साशास्त्र, मराठी जीवनरसायन औषधें शास्त्रोक्त रीतीनें तयार करावयाचा कारखाना काढून या धंद्यास स्वदेशीचें स्वरूप दिलें आहे. पोवाड्याच्या वाङमयाचें पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूनें १९२० सालीं लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखालीं शिवाजी मंदिरांत शिवाजी-उत्सव करून त्यांत पोवाड्याच्या कार्यक्रमाचा उपक्रम सुरूं केला. भारत स्वयंसेवक मं. चे चिटणीस, आज महाराष्ट्रांतील उत्सवांत पोवाड्याचा जो कार्यक्रम करण्यांत येतो त्याचा उगम भारत स्वयंसेवक मंडळानें १९२० सालीं केलेल्या उपक्रमांत आहे. मुळशी सत्याग्रहाच्या चळवळींत १९२२ सालीं ३ महिने शिक्षा. सावरकर पट्टी कमिटीचे चिटणीस १९२३–२४ सालीं. १९३० सालच्या चळवळींत कायदेभंग करून चळवळींत भाग घेतला. १९३२ सालच्या चळवळींत ६ महिन्यांची शिक्षा. महाराष्ट्रांतील प्रतिसहकार पक्षाचे सभासद, व कॉंग्रेसचे अभिमानी.

पाटकर नामदार जस्टिस सिताराम सुंदरराव:––(बी. ए. एल्‌एल्. बी.) जन्म–– १८७३ शिक्षण–एल्फिन्स्टन हायस्कूल व कॉलेज; १८९७ अ‍ॅपिलेट साइडकडे मुंबई हायकोर्टांत वकीली सुरूं केली. १९१३ सरकारी वकील म्हणून नेमणूक जुलै १९२६ पर्यंत; १९२३ लॉर्ड रीडिंगनीं नेमलेल्या इंडिया बार कमिटीचे सभासद; १९२६ मुंबई हायकोर्टांत अ‍ॅडिशनल जज्ज म्हणून नेमणूक. पुढें जज्ज म्हणून कायम झाले. जून १९३१ ऑफिशीएटिंग चीफ जस्टिस म्हणून काम करण्याकरितां नेमणूक झाली. जुलै १९३१ इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर. पत्ता––ह्यूज रोड, चौपाटी मुंबई.

पाटील (थोरात) पांडुरंग चिमणाजी:–जन्म–१८७७वडगांव,विशाळगड जहागीर सं. कोल्हापूर. शिक्षण–एल्. एजी. (मुंबई). एम्. एस्. सी. (विसकॉनसीन यू. एस्. ए.). पदवी– रावबहादूर; १९१४–२५ डेप्युटी डायरेक्टर ऑफ अ‍ॅग्रिकल्चरल.१९२५ पासून प्रोफेसर अ‍ॅग्रिकल्चर इकॉनॉमिक्स; हल्लीं अ‍ॅक्टिंग प्रिन्सिपल–अ‍ॅग्रिकल्चर कॉ. पुणें. युरोप, अमेरिका, जपान व जावा या देशांतून यांनीं प्रवास केला आहे. यांनीं 'प्रिन्सिपल्स अ‍ॅन्ड प्रॅक्टिस ऑफ फार्म कास्टिंग' हें पुस्तक लिहिलें आहे. व कित्येक 'बुलेटिन्स' प्रसिद्ध केलीं आहेत. उदा. 'प्रिलिमिनरी स्टडीज इन इंपॉर्टंट क्रॉप्स् इन दि बॉम्बे डेक्कन', 'फर्नेस ऑफ मेकिंग गूळ' इत्यादि.पत्ता–शेतकी कॉलेज पुणें.

पाठक महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री:-जन्म-१७९९ पारोळे (पूर्व खानदेश); शिक्षण–इंदूर व काशी येथें; गव्हर्मेंट क्वीन्स कॉलेज, बनारस व्याकरणाचार्य. 'वेदांतवागीश' ही पदवी श्री. शंकराचार्य यांनीं दिली. शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखा; न्याय, व्याकरण, मीमांसा, धर्मशास्त्र, अद्वैत वेदांत या शास्त्रांचें अध्ययन व अध्यापन. डेक्कन कॉलेज पुणें या संस्थेंत शास्त्री; आतां सेवानिवृत्त. ग्रंथ–महाभाष्य (इंडेक्स), ईश, केन, कठ, मुण्डक,शांकरभाष्य, बालबोधिनी, शुक्ल यजुर्वेद संहिता भाषांतर, इत्यादि. धर्मशास्त्र व वेदान्त या विषयावर संशोधनदृष्टचा ओरिएंटल कॉन्फरन्स, मद्रास, पुणें–करतां आणि प्रो. के. बी. पाठक कॉमेमोरेशन व्हॉल्यूमकरतां निबंध. वेदशास्त्रोत्तेजक सभा, व भांडारकर ओरिएंटल रिसर्च या संस्थांच्या विद्यमानें व्याख्यानें.१९२४ प्रयाग येथें पं. मालवीय यांनीं भरविलेल्या भारतीय विशिष्ट विद्वत्सभेंत उपस्थिति. पत्ता–केअर ऑफ पाठक वकील, खोलगल्ली, धुळें. पश्चिम खानदेश.

पाणंदीकर डॉ. सत्याश्रय गोपाल:–– एम्. ए. (मुंबई) १९१६; पीएच्. डी. (अर्थशास्त्र, लंडन) १९२१; डी. एस्. सी. (अर्थशास्त्र, लंडन) १९२६; इतिहास, राजकीय अर्थशास्त्र या विषयांचे प्रोफेसर, एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई; जन्म १८ जुलै १८९४; १९२१–२३ च्या दरम्यान डाक्क्याच्या विश्वविद्यालयामध्यें अर्थशास्त्राचे प्रोफेसर. पत्ता–एल्फिन्स्टन कॉलेज. कोट मुंबई.

पात्रो रावबहादूर सर अन्नपूपरशुरामदास:––के. टी. (१९२४); हायकोर्ट वकील, गंजम जमीनदार; मद्रास कायदे मंडळाचे सभासद; शिक्षण, सार्वजनिक कामें व अंतर्जकात या खात्यांचे सरकारी मंत्रि १९२१–२७; राउंड टेबल परिषदेचे एक प्रतिनिधि पत्ता––कॉस्मॉपॉलिटन क्लब, मद्रास.

पाध्ये वामन हणमंत–– जन्म–शके १८२०, सन (१८९९) कोल्हापूर; प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथें; १९०८ मुंबई गांधर्व

महाविद्यालयांत प्रवेश; १९१९ पर्यंत पं. विष्णुबुवा दि. पलुस्कर यांचे देखरेखीखालीं संगीत शिक्षण; नागपूर गांधर्व महाविद्यालयाचे चालकाचें काम सुमारें एक वर्ष केलें. नंतर गुरुजीबरोबर उत्तर हिंदुस्थानांत गायनाच्या दौऱ्यावर जावयास निघाले. १९२० कोल्हापूर गांधर्व महा विद्यालयाची स्थापना यांनीं केली. १९२१ मुंबई गां. म. विद्यालयांत गव्हर्नर नामदार सर जॉर्ज लॉइड यांचे हस्तें 'संगीत–प्रवीण' ही पदवी व सुवर्ण पदक मिळालें; प्रिन्सिपल गांधर्व महाविद्यालय, कोल्हापूर. पत्ता––नवा बुधवार कोल्हापूर.

पाशा अहमद फॉद:–(जन्म १८६८) ईजिप्तचा राजा. मार्च १८६८ रोजीं ईजिप्त येथें जन्मला. ईस्माईल पाशाचा हा सर्वांत धाकटा मुलगा व ईजिप्तचा पहिला सुलतान हुहेन कामीन याचा हा भाऊ होता. त्याच्या मागून हा ९ आक्टोबर १९१७ रोजीं गादीवर बसला. अल्बेनियाच्या नव्या गादीचा हा एक हक्कदार होता. पण ईजिप्तसाठीं त्यानें आपला हक्क सोडून दिला १९२२ सालीं हा ईजिप्तचा राजा असल्याचें जाहीर करण्यांत आलें.

पुप्पाला शंकर कृष्णाजी :––जन्म सन १८९३; जन्मस्थळ मुंबई. व्यवहारोपयोगी असें शिक्षण घेतल्यावर मुंबईंतील एका नामांकित अशा मेसर्स कृष्णाजी चिन्नु आणि कंपनींत भागिदारी. पुढ सन १९१८ पासून राष्ट्रीय चळवळींत भाग घेऊन स्वदेशी व अस्पृश्यतानिवारण यांचा पुरस्कार. नंतर सहा वर्षें मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन सभासद व चार वर्षें मुंबई म्युनिसिपल स्कूल्स कमिटी सभासद व त्याच मुदतींत म्युनिसिपल शाळेंतील मुलांचें आरोग्य या विषयावर म्युनिसिपल शिक्षणमंत्री यांचें प्रस्तावनेसह पुस्तक लिहिलें. सन १९३० मध्यें संग्राम समितीचा एक प्रमुख सभासद म्हणून सहा महिने कारागृहवास. सन १९३१ मध्यें आर्डिनन्सखालीं पकडल्यामुळें पुन्हां कारागृहवास. सन १९३२ मधील हिंदु–मुसलमानांचे दंग्यांत शांतता प्रस्थापनेचें काम करीत असतां मुसलमान व पोलीस यांच्या गैरसमजामुळें उद्भवलेला खटला व हायकोर्टांत निर्दोषी; पत्ता–कामाठीपुरा. ६ वी गल्ली मुंबई.

पुरुषोत्तमदास ठाकूरदास सर, के. टी. (१९२३); सी. आय. ई. (१९१९); एम्. बी. ई. हिंदी विधी मंडळाचे नॉन् ऑफिशिअल सभासद, (हिंदी व्यापार); कापसाचे व्यापारी जन्म–३० मे १८७९; शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई; ईस्ट इंडियन कॉटन असोसिएशनचे अध्यक्ष; "लॉर्ड इंचकेप रिट्रेंचमेंट कमिटी"चे सभासद; "इंपिरिअल बँक ऑफ इंडिया"चे गव्हर्नर; "रॉयल कमिशन ऑन इंडियन करन्सी अँड फिनॅन्स"चे सभासद; रा. टे. कॉ. चे सभासद पत्ता–११ रिज रोड, मलबार हिल मंबई.

पुरंदरे नीलकंठ अनंत–जन्म १८७७ मुंबई; शिक्षण–एल्फिन्स्टन हायस्कूल, मुंबई; ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई; १९०० एल्. एम्. एस्. (मुंबई); चार्लस मोरहेड प्राइझ मिळालें. १९०८ एम्. डी. (मिड्विफरी विषय घेऊन); १९०५–१९०८ बाई मोटलाबाई आणि पेटिट हॉस्पिटलसमधून काम केलें. १९०६–१९१० ग्रँट मेडिकल कॉलेज (मुंबई) मध्यें मिडिविफरी व गायनकॉलजी या विषयांचे ट्यूटर. १९१२ स्वत:च्या मालकीचें 'सूतिकागृह' सुरू केलें. १९२१ मुंबईच्या 'कॉलेज व फिजिशिअन्स अँड सर्जन' कडून एफ्. सी. पी. एस्. ही पदवी मिळाली. १९२६ पासून आजतागायत ऑनररी गायनेकॉलजिस्ट किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई. ऑनररी ऑब्स्टेट्रिशिअन नवरोजी वाडिया हॉस्पिटल मुंबई; प्रोफेसर, मिड्विफरी व गायनेकॉलजी शेठ गो. सुं. मेडिकल कॉलेज, मुंबई. १९२९ कॉलेज ऑफ फिजिशिअन्स अँड सर्जन्सच्या मॅनेजिंग कौंसिलमध्यें निवडणूक. १९३० मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें प्रोफेसर मतदार संघांतून फेलो म्हणून निवडणूक; 'गर्भमोचन विद्या' हें पुस्तक लिहिलें आहे. पत्ता– ३७९ सँढर्स्ट रोड (वेस्ट) मुंबई ४.

पै दत्तात्रय व्यंकटेश––जन्म–१८९९ पारोडें गांव-कुर्पें (गोवा); शिक्षण–मराठी २।३ इयत्ता, पोर्तुगीज दुय्यमापर्यंत, मराठी भाषा व वाङमय याचा स्वतंत्र अभ्यास १९२०–२३ फोंडें येथील 'आत्मैद कॉलेजांत' गणिताचें अध्यापन; १९२४–३० मडगांव येथील 'हिंदू' साप्ताहिकाचे संपादक, १९३० कांहींकाळ मुंबई येथील 'लोकहित' दैनिकाचे उपसंपादक; व्यवसाय–लेखन व वक्तृत्व; गोमांतकाची राज्यव्यवस्था, पोर्तुगीज भाषा प्रवेश, निवडक भाषणें, इ. पुस्तकें प्रसिद्ध केलीं. हिंदी भाषेचें व्याकरण व महात्मा गांधी' लेखन चालू. संपादक 'हिंदू' (गोवा) पत्ता–मडगांव गोवा.

पोतदार (सरपोतदार, ओरपें) दत्तो वामनः—जन्म—शके १८१२, बिरवाडी जि. (कुलाबा). शिक्षण— बी. ए.शके १८३२ नूतन मराठी विद्यालय हायस्कूल व फर्ग्यूसन कॉलेज पुणें. व्यवसाय—अध्ययन, अध्यापन. शके १८३४ पासून अध्यापक नू. म. विद्यालय पुणें. शके १८३७ पासून शिक्षण प्रसारक मंडळीचे आजन्म सदस्य. शके १८३८ पासून चिटणीस भारत इतिहास संशोधक मंडळ. शके १८४४—४९ मुंबई विद्यापीठ वाङ्मय मंडळाचे जोड जादा सभासद; मुंबई, उस्मानिया, नागपूर व भा. म. विद्यापीठ परीक्षक. ग्रंथलेखन——मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, मराठे व इंग्रज टीका (परीक्षण), मुलांस उपदेशात्मक सुमारें १०।१२ पुस्तकें. शके १८३४—३९ एक चिटणीस वसंत व्याख्यान माला. (तिकिट पद्धति सुरूं केली.) व्यवस्थापक नू. म. विद्यालय मराठी शाळा. (नऊ वर्षें) शके १८३८—४५ नू. म. विद्यालय, इंग्रजी शाळा. इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशन—जादा जोड सभासद. प्रोफेसर सर परशुरामभाऊ कॉलेज,पुणें.

पंत प्रतिनिधी श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव ऊर्फ बाळासाहेबः—अधिपति सं. औंध.जन्म—१८६८ सातारा; शिक्षण—बी. ए. (मुंबई); १९०९श्रीमंत संस्थानचे गादीवर आले. हे उत्तम दर्जाचे चित्रकार व कीर्तनकार आहेत. यांनीं स्वतः तयार केलेलीं सुमारें ३२ कीर्तनें आहेत. यांचा राज्यकारभार अत्यंत प्रगतिपर आहे. व संस्थानची औद्योगिक प्रगति यांनींच घडवून आणली आहे. संस्थानचे राज्यव्यवस्थेमध्यें दिवाणी व फौजदारी बाबतींत पूर्ण अधिकार आहेत. संस्थानांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें आहे. जबाबदार राज्यपद्धति सुरूं करण्याचा उपक्रम झाला असून त्याकरिता 'प्रातिनिधिक सभा' नांवाची संस्था स्थापन केली आहे. संस्थानांतील ३४ गांवांतून ग्रामपंचायती आहेत. त्यांनीं इंग्रजी व मराठी भाषांमध्यें बरींच पुस्तकें लिहिलीं आहेत. सूर्यनमस्कार, अजंठा, वेरुळ, सचित्र शिव—चरित्र,चित्ररामायण, आहार-चिकित्सा शिक्षक व नेत्रबल—संवर्धन इत्यादि. शारीरिक सामर्थ्य व आरोग्य या विषयांकडे श्रीमंतांचा ओढा फार आहे. पत्ता—पोस्ट औंध, जि. सातारा.

पांगारकर लक्ष्मण रामचंद्रः—— लेखक, वक्ते, प्रवचनकार, जन्म—१८७२.शिक्षण— बी. ए. १८९८; सातआठ वर्षें पंढरपूर, पुणें, उमरावती येथें शिक्षकाची नोकरी; १९०७ पासून 'मुमुक्षु' मासिक सुरूं. 'भक्तिमार्ग—प्रदीप' ' श्रीतुकाराम चरित्र', 'मोरोपंत', मराठी भाषेचा इतिहास इ. तीस ग्रंथ लिहिले . पत्ता—— 'मुमुक्षु' नाशिक.

पेंडसे प्रो. शंकर दामोदरः—जन्म—— शके १८१८; शिक्षण—एम्. ए. एम्. ओ. एल्. (मास्टर ऑफ ओरिएंटल लर्निंग)या दोन पंजाब विश्वविद्यालयाच्या संस्कृत विषयांतील पदव्या. एम्. ए. मराठी विषयांतील नागपूर विश्वविद्यालयाची पदवी.'वेदांत—तीर्थ'कलकत्ता संस्कृत ॲसोसिएशनची पदवी; 'शास्त्री' पंजाब विश्वविद्यालयाची पदवी.या सर्व पदव्या त्या त्या आवश्यक परीक्षा देऊन मिळविलेल्या आहेत. धंदा—नागपूर येथील हिस्लॉप कॉलेजांत मराठी विषयाचे अध्यापक. ग्रंथ—'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' हें पुस्तक. "समर्थ रामदास व त्यांचे आक्षेपक' 'शिवकालीन संस्कृति आणि धर्म' 'कर्मयोग कीं कर्मसंन्यास' इत्यादि निबंध.अधिकार— 'लिटररी ॲकडमी सी. पी. बेरार' या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद; नागपूर विश्वविद्यालय ' बोर्ड ऑफ स्टडीज' सभासद; सी. पी. बेरार हायस्कूल एज्युकेशन बोर्डाच्या मराठी कमिटीचे कन्व्हेनर.

पेंढरकर कवि यशवंत दिनकरः— जन्म—तारीख ९ मार्च १८९९, क्षेत्र चाफळ (जि.सातारा); १९१७ सालीं युनिव्हर्सिटी स्कूल फायनल परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर सरकारी शाळाखात्यांत कारकुनी पेशा पत्करला. कविता रचनेचा नाद नांवारूपास आला तो १९१९ सालापासून. तुटलेला तारा, मित्रप्रेम—रहस्य, यशवंती, यशोधन (इंदुकलेसह), भावमन्थन व बन्दीशाळा हीं छोटीं मोठीं काव्यपुस्तकें आजवर प्रसिद्ध झालीं आहेत. हे रविकिरण मंडळाचे एक सदस्य असून सध्याचा पत्ता—गायकवाड वाडा" नारायण पेठ पुणें शहर, असा आहे.

प्रधान मनोहर गोपाळ बी. ई. (मेकॅनिकल) डी. आय. सी. (एरोनॉटिक्स), ए. एम्. आय. ए. ई. जन्म—१९०६; शिक्षण— नाशिक हायस्कूल, एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई व इंजिनिअरिंग कॉलेज (पुणें), बी. ई. (मेकॅनिकल); १९२९ पब्लिक सर्व्हिस कमिशननें सिव्हिल एव्हिएशन स्कॉलरशिपकरितां निवडले. इंग्लंड येथें वैमानिक शिक्षण सव्वा दोन वर्षें, पायलटचा लायसेन्स (फ्लाइंग) व डिप्लोमा

इन् एरोनॉटिक्स. १९३२, हिंदुस्थान सरकारनें सिव्हिल एव्हिएशन डिरेक्टोरेटमध्यें एरोड्रोम ऑफिसरच्या जागेवर नेमिलें. पहिली नेमणूक कराची, एअर पोर्टवर झाली. हल्लीं कलकत्ता एरोड्रोमचे ऑफिसर आहेत. पत्ता–एरोड्रोम ऑफिसर, सिव्हिल एरोड्रोम डम्डम्, कलकत्ता.

प्रधान सर गोविंद बलवंत, बी.ए. एल्एल्. बी. जन्म–१८७४; शिक्षण बी.जे. हायस्कूल ठाणें; एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई आणि गव्हर्मेंट लॉ स्कूल मुंबई; ठाणें येथें वकिली. १९०७–२० पब्लिक प्रॉसिक्यूटर,कुलाबा; १९२० सालीं राजिनामा दिला. ठाणें म्युनिसिपालिटीचे सतत २० वर्षें सभासद, सात वर्षें प्रेसिडेंट निवडून आले. तीन वर्षें ठाणें , डि. लो. बोर्डाचे सभासद; ठाणा डि. को. क्रेडिट बँकेच्या डायरेक्टरांपैकीं एक; प्रेसिडेंट ठाणा डि. बॉ. स्काउटस् मुव्हमेंट; चां. का. प्रभू समाजाच्या इंदूर येथील परिषदेंत व्हाइस प्रेसिडेंटस् मध्यें निवडले गेले. १९२४ मुंबई कायदे कौन्सिलांत सभासद निवडून आले. १९२६ प्रतिसहकार पक्षातर्फे निवडून आले. १९२७–२८ जंगल व अबकारी खात्यांचे दिवाण; १९३१ 'नाइट' पदवी मिळाली. १९२८–३२ (जून) मुंबई सरकारचे 'फायनान्स मेंबर'. राजिनामा दिला. पत्ता–बलवंत बाग, ठाणें.

प्रतापशेट ऊर्फ मोतीलाल माणिकचंद जन्म–मूनपुरा, सं. जयपूर (मारवाड); संवत् १९३६. गुरांना चारणें व उंट फिरवून आणणें इत्यादि कामांत यांचीं पहिलीं नऊ वर्षें गेलीं, चोपडें (खानदेश) येथील शेठ माणिकचंद यांचे मांडीवर दत्तक. वयाच्या १४ वे वर्षापर्यंत सरासरी मराठी ५ इयत्ता शिक्षण झालें. सावळारामपंत नाईक यांच्या हाताखालीं पंधरा वर्षें शिक्षण घेऊन मराठी भाषेचें अध्ययन, तत्त्वज्ञानविषयक चर्चा केली. तत्त्वज्ञान हा यांचा एक जिव्हाळ्याचा विषय आहे. या विषयावर यांचे तत्त्वज्ञान–मंदिर नियतकालिकांत लेख प्रसिद्ध झाले आहेत. १९०५ स्वदेशी चळवळींत यांनीं चोपडें येथें स्वदेशी कापडाचें दुकान उघडलें. १९०६ 'प्रताप मिल्स लिमिटेड' अंमळनेर येथें सुरू केली; सहा सात वर्षांनंतर तेथेंच एक दुसरी गिरणी उभारली; नंतर १९२३–२४ ला धुळें येथें 'न्यू प्रताप मिल्स लि.' नांवाची आणखी एक गिरणी सुरू केली. या तीनही गिरण्यांची व्यवस्था शेटजी स्वतः पाहतात. यांच्याच खटपटीनें व एक लाखाच्या देणगीनें अंमळनेरचें तत्त्वज्ञान-मंदिर (Indian Institute of Philosophy)स्थापन झालें. शेठजींनीं आजपावेतों मोठमोठ्या कित्येक देणग्या देऊन दानशूरत्व प्रकट केलें आहे. यांना सरकारकडून कैसर-इ-हिंद ही पदवी व सुवर्णपदक मिळालें आहे. पत्ता: अंमळनेर, खानदेश.

फडके नारायण सीताराम:–जन्म–१८९४, कर्जत (अहमदनगर) शिक्षण–न्यू. म. वि. व फर्ग्युसन कॉलेज, पुणें. बी. ए. १९१४; एम्. ए. १९१७; दोन्ही परीक्षांत फिलॉसफीचीं बक्षिसें; न्यू पूना कॉलेजांत प्रोफेसर,१९१६–१९; कांहीं काळ केसरी–मराठा कचेरींत उपसंपादक; दिल्ली,हैद्राबाद (सिंध), नागपूर येथें प्रोफेसर, १९२६ पासून राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथें प्रोफेसर. लेखनास सुरुवात १९१२; दादाभाई नौरोजी–चरित्राबद्दल युनिव्हर्सिटीचें बक्षीस १९१५; 'सुप्रजाजनशास्त्र' निबंधाबद्दल (१९२४) व 'प्रतिभासाधन'बद्दल (१९३२); इंदूर सरकारकडून पारितोषिकें; ग्रंथ–जादूगार, दौलत, इ. कादंबऱ्या; प्रतिभासाधन; युगांतर नाटक; Sex Problem in India इ. इ. पत्ता–राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

फडके बॅरिस्टर वामन वि.:–एम्.ए (ऑक्सफर्ड), बार–ॲट–लॉ. नैरोबी म्युनिसिपालिटी, केनिया कायदे कौंसिल व कार्यकारी कौंसिल याशिवाय अनेक कमिटयांचे व डेप्यूटेशनचे माजी सभासद;एक नामांकित वकील. पत्ता–नैरोबी, केनिया कॉलनी, आफ्रिका.

फडके र.कृ.चित्रकार:–जन्म १८८४ वसई येथें झाला. प्रथम त्यांना ड्राइंग मास्तरची व नंतर ड्राफ्ट्समनची नोकरी लागली पण या दोन्ही नोकऱ्या लवकरच सुटल्या.वसई येथें मेणाच्या चित्रांचीं प्रदर्शनें भरविणारे श्री. मराठे यांच्या मदतीनें ते या शिल्पकलेच्या धंद्यांत शिरले. यांनीं गुरुस्थानीं मानलेल्या श्री. हरपनल्ली यांच्या प्रोत्साहनानें त्यांनीं मुंबई आर्ट सोसायटी प्रदर्शनांत 'प्रवचन' नांवाची शिल्पकृति ठेविली व तीस १९१४ त सुवर्ण पदक मिळालें. शिल्पकृतीबद्दल प्रदर्शनातर्फे सुवर्णपदक कोणालाही देण्यांत आलें नव्हतें. १९१५ त त्यांनीं बॉम्बे आर्ट सोसायटी प्रदर्शनांत श्री. हरपनल्ली यांचा अर्धपुतळा ठेवला.त्यास रौप्य पदक मिळालें. म्हैसूर, मद्रास, बडोदें, कलकत्ता अशा अनेक ठिकाणच्या प्रदर्शनांत त्यांच्या शिल्पकृतीस बक्षिसें

मिळत गेलीं. पुढें मुंबईस ते मेणाच्या हालत्या चित्रांचीं प्रदर्शनें भरवूं लागले. १९२५ सालच्या वेंबलेच्या प्रदर्शनांत या चित्रांची प्रशंसा झाली. १९२६ सालच्या फिलॅडेलफिआ येथील प्रदर्शनांतही त्यांचा गौरव झाला. 'लोकमान्यांचें स्वराज्य कीर्तन','गांधींचें ऑपरेशन', 'दे.बं. दास यांचें निधन', 'प्रवचन'वगैरे त्यांच्या कृति प्रसिद्धच आहेत. सध्यां चौपाटीवर उभ्या राहणाऱ्या लोकमान्यांच्या पुतळ्याचें काम करण्यांत गुंतले आहेत.

फडके सदाशिव कृष्णः—जन्म वसई जि. ठाणें यथें सन १८७७. शिक्षण—अठरावे वर्षीं स्कूल फायनल,विसावे वर्षीं मॅट्रिक व सव्विसावे वर्षीं डिस्ट्रिक्ट प्लीडर. ग्रंथ—वयाच्या बाविसावे वर्षीं 'संसार—चित्र' नांवाचें पहिलें पुस्तक प्रसिद्ध. पुढें शेतकऱ्याचा कायदा व सिव्हिल प्रोसिजर कोड यांजवर सटीक पुस्तकें. नंतर नवयुगधर्म खंड १ ला, श्रीमद्दयानंद चरित्र, लाला लजपतराय, दत्तभक्त रहस्य, इ. पत्ता—पनवेल, जि. कुलाबा.

१५१ फुलंब्रीकर कृष्णाजी गणेश ऊर्फ मास्तर कृष्णरावः—जन्म—शके १८१९, आळंदी (श्रीज्ञानोबाची) येथें. शिक्षण—कै. भास्करबुवा बखले यांजकडे गाण्याचें शिक्षण—शके १८३१ ते १८३७; शके १८३८ पासून गंधर्व नाटक मंडळींत गवई व नट, बैठकीच्या गाण्याबद्दल यांची सर्वत्र प्रसिद्धी आहे. श्रीमच्छंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांजकडून 'संगीतकलानिधि' ही पदवी, शके १८५२. ग्रंथ—कांहीं नाटकांतील वगैरे पदांच्या व कांही हिंदी चिजांच्या नोटेशनचीं वगैरे पुस्तकें. पत्ता—गणेशभुवन टिळकवाडी, पुणें.

फोर्ड हेन्रीः—जन्म १८६३. अमेरिकन कारखानदार; जन्मस्थान ग्रीनफील्ड, मिचिगान. डेट्रॉइट येथील इंजिनियरिंग वर्कशॉपमध्यें लहानपणींच कामाला सुरुवात. कांहीं काळानंतर 'एडिसन इल्युमिनेटिंग कंपनीं' मध्यें चीफ इंजिनियरची जागा मिळविली. १९०३, डेट्रॉइट येथें स्वतःचा धंदा सुरूं केला. त्यालाच पुढें 'फोर्ड मोटार कंपनी' हें नांव मिळालें. आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं हीच कंपनी ऑटोमोबाइल्स व फार्म ट्रॅक्टर्स करणारीं जगांतील सर्वांत मोठी आहे असें ठरलें. यांनीं मँचेस्टर व कॉर्क येथें फॅक्टरीज् उघडल्या आणि १९२९ मध्यें डॅगनहॅम येथें मोठ्या प्रमाणावर कामास सुरवात केली. १९२२ 'माय लाइफ अँड वर्क' व १९२९ 'माय फिलॉसफी ऑफ इन्डस्ट्री' हीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

बखले, रघुनाथ रामचंद्रः—जन्म सांगली, १८९६ शिक्षण, बी. ए. पर्यंत, १९२३ सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे तहाहयात सभासद. १९२४—२८ ट्रेड युनियन काँग्रेसचे दुय्यम चिटणीस व ट्रेड युनियन बुलेटिनचे संपादक.१९२९ बेलजममध्यें झालेल्या आंतर्राष्ट्रीय गिरणी कामगार परिषदेला हिंदी कामगारांचे प्रतिनिधी; जिनिव्हा येथील आंतर्राष्ट्रीय मजूर परिषदेला गेलेल्या हिंदी मजूर मंडळाचे सभासद; ब्रिटिश ट्रेड यूनियन काँग्रेसला हिंदी कामगारांचे प्रतिनिधि. इंग्लंड फ्रान्स जर्मनी, बेलजम, हॉलंड व रशिया यादेशांतील कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास.१९३१ जिनिव्हाच्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेस हिंदी कामगारांचे मुख्य प्रतिनिधी.मुंबई गिरणी कामगार संघाचे व इंडियन ट्रेड यूनियन फेडरेशनचे चिटणीस. मुंबई कायदे कौन्सिलचे सभासद. पत्ताः—सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, मुंबई ४.

बनहट्टी श्रीनिवास नारायणः—जन्म पुणें येथें सन १९०१. शिक्षण डे. कॉ. पुणें. एम्. ए. एल्एल्. बी. भगवानदास स्कॉलर; झाला वेदांत; प्राइझमन सर लॉ.जें.स्कॉलर; फेलो डे.कॉ. पुणें. १९२१—२३ मराठीचे अध्यापक, एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई, १९२६—२७ मराठीचे अध्यापक मॉरिस कॉलेज, नागपूर; १९२७ पुढें उत्पादक व चालक नवभारत ग्रंथमाला. ग्रंथ—मयूर काव्यविवेचन; ज्ञानोपासना आणि भारतीयांचें कर्तव्य; विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे आधुनिक आक्षेपक, लो. टिळकांचीं धर्मविषयक मतें, मराठी वाङ्मयाचें अज्ञात दालन, इ.चे लेखक पत्ता—काँग्रेस नगर नागपूर.

बापट सदाशिव विनायकः—जन्म वैशाख वद्य पंचमी शके १८०९ (१२ मे १८८७) जन्मस्थान वडगांव (पोतनिसांचे) तालुके वाई, जि. सातारा. १९०६ते १९०९ पुणें येथें "महाराष्ट्र विद्यालय" या राष्ट्रीय इंग्रजी शाळेंत शिक्षकाचें काम केलें. १९०९ पासून पुणें सार्वजनिक सभा या संस्थेचे दु. चिटणीस व सांप्रत मुख्य चिटणीस म्हणून काम करीत आहेत. तसेंच लो. टिळक व श्री. न. चिं. केळकर यांचे 'लेखक' म्हणून बरेच दिवस काम केलें. "लो. टिळक स्मारक ट्रस्ट" या संस्थेचे दु. चिटणीस असून सार्वजनिक सभा व टिळक स्मारक ट्रस्ट या संस्थांतर्फे प्रचारकाचें

कित्येक वर्षे काम करीत असतात. यांस राजकीय चळवळींत अनेक वेळां दंड झाले असून १९३० सालीं कायदेभंग केल्याबद्दल शिक्षा झाली "लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका" खंड १–३ व 'लो. टिळक सूक्ति संग्रह' हे त्यांनीं संपादिले व त्याबद्दल त्यांचा बेळगांव येथें साहित्य संमेलनानें सत्कार केला. पत्ता–५६६ नारायण पेठ, पेंडसे वाडा–पुणें शहर.

बापना एस्. एम्.:–हिज हायनेस होळकर सरकारचे मुख्य प्रधान. जन्म २४ एप्रिल १८८२. शिक्षण–महाराणा हायस्कूल उदयपूर, सरकारी विद्यापीठ अजमीर, मूर मध्यवर्ति विद्यापीठ, अलाहाबाद. अजमीर मेवाडामध्यें सुमारें एक वर्ष वकिली; मेवाडमध्यें ज्युडिशिअल अम्मलदार म्हणून सुमारें दीड वर्ष नौकरी, जानेवारी १९०७ मध्यें इंदूर संस्थानांत डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज म्हणून नेमणूक; १९०८ मध्यें महाराजा तिसरे तुकोजीराव होळकर यांना कायद्याचे शिक्षक; १९१३ मध्यें सेक्रेटरी; १९१५ मध्यें गृहमंत्री म्हणून नेमणूक; १९२१ मध्यें जादा पेन्शन घेऊन सेवानिवृत्त; नंतर ऑगस्ट १९२३ पर्यंत पतिआळा संस्थानचे दिवाण. १९२३ त पुन्हां होळकर संस्थानला गृहमंत्री; नंतर लवकरच डेप्युटी प्राइम मिनिस्टर व मंत्रि–मंडळाच्या अपील कमिटीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक; फेब्रु. १९२६ मध्यें मुख्य प्रधान व मंत्रि–मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक. पत्ता– इंदूर सी. आय.

बामणगांवकर नारायण रामलिंग:–जन्म विरूळ, जि. वर्धा येथें इ. स. १८८८.पोरके झाल्यामुळें आतेनें शिक्षण केलें. १९०७ मध्यें 'तरुण हिंदु' साप्ताहिक; १९०९ त खटला, दंड व 'तरुण हिंदु' बंद; १९२८ त रा. खापर्ड्यांचा 'उदय' चालवावयास घेतला. १९३२ त त्याचे व 'अरुण' छापखान्याचे मालक. १९२३ व ३० मध्यें चळवळींत भाग घेण्याबद्दल तुरुंगवास; व्याख्याते व लेखक; ग्रंथ- सं. धनुर्भंग व सं. आत्मतेज हीं नाटकें आणि नामदार A. S. S. व शिपाई या नाटिका. पत्ता–'उदय' कचेरी अमरावती.

बालगन्धर्व (नारायण श्रीपाद राजहंस) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध नट व गायक. गंधर्व नाटक मंडळीचे मालक; जन्म–सन १८८८ पुणें. १८९८ बालगंधर्व पदवी लो.टिळकांकडून मिळाली. १९०५ किर्लोस्कर नाटक मंडळींत प्रवेश; १९१३ मे, किर्लोस्कर नाटक मंडळी सोडली; १९१३ जुलै,गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली. १९१९ गं. ना. मंडळीचे पूर्ण मालक झाले. १९२९ नाट्य संमेलनाचे अध्यक्ष. हे नाटकांतील मुख्य स्त्रीची भूमिका घेतात. अभिनय व गायन यांबद्दल त्यांची ख्याति आहे. त्यांच्या सुप्रसिद्ध भूमिका:– रुक्मिणी, द्रौपदी, सिंधू, सुभद्रा, भामिनी वगैरे. गेल्या अठरा वर्षांत त्यांना सुमारें बावीस लाख रुपये उत्पन्न झालें. सन १९२१ सालीं स्वराज्य फंडासाठीं, त्यांनीं व कै. केशवराव भोसल्यांनीं संयुक्त 'मानापमान' नाटकाचा प्रयोग केला; त्या खेळास १५३०० रुपये उत्पन्न झालें. आजपर्यंत धर्मार्थ खेळ करून निरनिराळ्या संस्थांस त्यांनीं एक लाख रुपयांहून अधिक रक्कम देणगीदाखल दिली आहे.

बाल्डवीन स्टॅन्ले:–पार्लमेंटचे सभासद. मे १९२२–२३ पासून जानेवारी १९२४ पर्यंत मुख्य प्रधान; नोव्हेंबर १९२४ पासून जून १९२९ पर्यंत मुख्य प्रधान आणि कॉमन्स सभेचे पुढारी; नोव्हेंबर १९२२ ते ऑगस्ट १९२३ पर्यंत Chancellor of the exchequer व्यापारी मंडळाचे अध्यक्ष १९२१-२२; त्यापूर्वी खजिन्याचे आर्थिक व्यवस्थापक.वय ६४. G.W.R. चे डायरेक्टर; जाने.१९१७त प्रधान मंडळांत शिरण्यापूर्वी मि. बॉनर लॉ यांचे खाजगी सेक्रेटरी म्हणून काम केलें. मे १९२३ त मि. बॉनर लॉ प्रधानमंडळांतून सेवानिवृत्त झाल्यावर हे मुख्य प्रधान बनले. पण त्यांच्या प्रधान मंडळाचा जाने.१९२४ त पराभव झाल्यामुळें त्यांनीं राजीनामा दिला. आक्टोबर १९२४ च्या जनरल निवडणुकीनंतर एक हुजूर पक्षाचें प्रधानमंडळ स्थापन झालें व मि. बाल्डवीन त्याचे प्रमुख झाले. उद्योगधंद्यांतील प्रश्नांवरील त्यांच्या भाषणांकड सर्वांचें लक्ष विशेष ओढलें गेलें. एप्रिल १९२६ त "on England" नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यांत यांचीं कांहीं भाषणें आहेत. मे १९२६ मध्यें संपाच्या भडक्यासंबंधीं त्यांनीं देशाला एक महत्वाचा संदेशbroadcast केला. आणि त्या संकटाला तोंड देण्याच्या हिकमतीमुळें यांना फार प्रसिद्धी मिळाली. मि. व्हाइट यांनीं लिहिलेलें यांचें चरित्र १९२८ त निघालें. जून १९२७ मध्यें Royal Society चेFellow निवडले गेले. ब्रिटिश अजबखान्याचे पंच म्हणून निवडून जुलै व ऑगस्ट १९२७ त कॅनडांत प्रवास केला. कॅनडाच्या Privy Council चे सभासद; यांच्या

व्याख्यानांचा एक ग्रंथ १९२८ त प्रसिद्ध झाला सेंट अँड्रूज युनिव्हर्सिटीनें चॅन्सेलर म्हणून निवडणूक जानेवारी १९२९ जून ४; १९२९ च्या निवडणुकीनंतर राजीनामा दिला.

बाळकृष्ण डॉक्टरः–एम्. ए., पी एच्. डी., एफ्. एस्. एस्.; एफ्. आर. ई. एस्. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल व अर्थशास्त्राचे प्रोफेसर; जन्म–२२ डिसेंबर १८८२; शिक्षण–सरकारी हायस्कूल मुलतान ; डी. ए. व्ही. विद्यापीठ, सरकारी विद्यापीठ लाहोर; व स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स लंडन; एक वर्ष हरिद्वार गुरुकुल विश्वविद्यालयाचे व्हाईस प्रिन्सिपॉल व सर्वाधिकारी; सहा वर्षे व्हाइस प्रिन्सिपॉल व ११ वर्षे इतिहास आणि अर्थशास्त्र यांचे प्रोफेसर,; १९२२ सालीं राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. हिंदी इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण व धर्म यांवर सात पुस्तकें. हिंदुस्थानचा इतिहास (मराठी). शिवाजी महाराजांचें चरित्र नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. पत्ता–शाहूपुरी, कोल्हापूर.

बिकानेरचे महाराजः––यांना १९ तोफांच्या सलामीची परवानगी आहे. १९१४ त हे हिंदी फौजेबरोबर फ्रान्समध्यें गेले होते. १९१९च्या पॅरिस येथें भरलेल्या शांतता परिषदेस हिंदुस्थानचे प्रतिनिधि या नात्यानें हे हजर राहिले होते. १९१६ त ईजिप्तमध्यें तुर्कस्थानविरुद्ध बिकानेरच्या उंटाळच्या दळानें उपयुक्त कामगिरी बजावली होती.

बिर्ला घनश्यामदास–––जन्म–१८९४; वयाच्या १३ वे वर्षीं आपल्या घरच्या धंद्यांत लक्ष घालण्यास सुरवात केली व १९१८ सालीं त्या धंद्याचें 'बिर्ला ब्रदर्स लिमिटेड' या कंपनींत रूपांतर केलें. १९१९ कलकत्ता येथें ज्यूट मिल व दिल्ली येथें कॉटन मिल सुरू केली. १९२१ शिंदे सरकारची 'जयाजीराव कॉटन मिल' यांनीं उभारून दिली. १९२४ बंगालमधील सर्वांत मोठी कॉटन मिल (The Kesoram cotton mills ltd.) विकत घतली; कलकत्ता ज्यूट प्रेस आणि मध्यप्रांत व पंजाब येथील मिळून दोन कॉटन जिनिंग फॅक्टरीज खरेदी केल्या . १९३१ बिहारमध्यें दोन साखरेचे कारखाने काढले. याशिवाय यांचे खालीं दिल्याप्रमाणें उद्योगधंदे आहेतच.–– (१) ईस्ट इंडियन प्रॉड्यूस कं. लि. लंडन; (२) कॉटन एजंटस लि. मुंबई; (३) ज्यूट व गनी ब्रोकर्स लि. (४) शिपिंग कं. लि. (५) ज्यूट सप्लाय एजन्सी लि. कलकत्ता. हरतऱ्हेच्या इन्शुअरन्स कंपन्यांचे मुख्य एजंट; १९२० सभासद– बंगाल कायदे कौंसिल; १९२१ सभासद–इंडियन फिस्कल कमिशन; १९२६ सभासद–मध्यवर्ति कायदे मंडळ व १९३० सरकारच्या इंपिरिअल प्रेफरन्स धोरणास विरोध दर्शविण्याकरितां राजिनामा; १९२६ प्रेसिडेंट–इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स कलकत्ता; १९२७ पुन्हां प्रेसिडेंट म्हणून निवडणूक; १९२७ इंटर नॅशनल लेबर कॉन्फरन्स, जिनिव्हा येथें 'इंडियन एंप्लॉयर्स' प्रतिनिधि. १९२९ प्रेसिडेंट, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री; १९२९ सभासद रॉयलकमीशन ऑफ लेबर (व्हिटले कमिशन); १९३१ दुसऱ्या रा. टे. कॉ. ला हिंदी व्यापारी मंडळिचे प्रतिनिधि म्हणून गेलेल्या तीन सभासदांपैकीं एक. पत्ता–बिर्ला ब्रदर्स लिमिटेड. ८ रॉयल क्स्चेज प्लेस, कलकत्ता.

बिझांट ॲनी. नॅशनल होमरूल लीग व थिऑसॉफिकल सोसायटी यांच्या अध्यक्ष. शास्त्रीय, राजकारणविषयक, धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक विषयांमधील व्याख्यात्री. जन्म–१ ऑक्टोबर १८४७; १८६७ त रेव्हरंड फरँक् बीझांट यांच्याशीं विवाह. १८७३ मध्यें काडीमोड; एक मुलगा व एक मुलगी अशीं अपत्यें; शिक्षण–इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स यांमध्यें खाजगी शिक्षण; १८७४ त नॅशनल सेक्यूलर सोसायटीला येऊन मिळाल्या. चार्ल्स ब्रॅड्ला एम्.पी. यांनीं पुढाकार घेऊन चालविलेल्या 'फरी थॉट अँड रॅडिकल मुव्हमेंट्स्' मध्यें काम केलें. त्यांच्याच बरोबर 'नॅशनल रिफॉर्मरच्या' उपसंपादक; फेबियन सोसायटीच्या सभासद; १८८७–१८९० पर्यंत लंडन स्कूलबोर्डाच्या सभासद. १८८९ त दी थिऑसफिकल सोसायटीला जाऊन मिळाल्या; ब्लॅव्हॅटस्कीबाईच्या शिष्य व १९०७, १९१४, १९२१, १९२८मध्यें त्या सोसायटीच्या निवडलेल्या अध्यक्ष; १८९८ त बनारस सेंट्रल हिंदू कॉलेजाची स्थापना ; १९०४ त सेंट्रल हिंदू गर्ल्स स्कूलची स्थापना (बनारस); सध्यां बनारस हिदु विश्वविद्यालयाच्या कोर्ट कौंसिल व सीनेटमध्यें आहेत. नॅशनल विश्वविद्यालयाच्या कौंसिल व सीनेटमध्यें आहेत. ब. हिं. विश्वविद्यालयाकडून विद्यालयास झालेल्या अमूल्य मदतीबद्दल डी. एल्. (ऑनर्स) ची पदवी. १९१७–१८ मध्यें हिंदी राष्ट्रीय कॉंग्रसच्या

अध्यक्ष; मद्रासला भरलेल्या सर्वपक्षीय कॉन्फरन्सच्या सेक्रेटरी. दी थिऑसॉफिकल व दी अडचार बुलेटिन यांच्या संपादक ; न्यू इंडिया या दैनिकाच्या व मासिकाच्या संपादक. पत्ता– अडचार, मद्रास.

बेंद्रे वासुदेव सीताराम–जन्म१८९६ शिक्षण–पेण व पुढें विल्सन हायस्कूल मुंबई; १९१४ व १९१६ खुल्या रिपोर्टिंगच्या चढाओढींत राम्सगेट (लंडन) येथून व इतर ठिकाणांहून शिफारसपत्रें व रौप्य, सुवर्ण पदकें मिळालीं. 'मराठी शॉर्ट हँड', 'गुजराथी शॉर्टहँड' व स्टेनॉग्रफी फॉर इंडिया'अशीं शीघ्रध्वनिलेखन कलेवर तीन पुस्तकें. १९१९ इतिहास संशोधन सुरू. 'साधन चिकित्सा' 'राजाराम चरितम्' व 'अब्दुला अँड अबुल हसन कुतुबशहा' हीं पुस्तकें व इतर निबंध प्रसिद्ध केले. 'साधन चिकित्सा' या ग्रंथावरून श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनीं 'इतिहासभूषण' अशी पदवी दिली. १९३२ एप्रिलमध्यें स्थापन झालेल्या 'श्री छत्रपति संभाजी चरित्र कार्यालय लि.' संस्थेचे कायमचे 'मुख्य संपादक' म्हणून योजना झाली. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या कचेरींत नोकरी. पत्ता–५६८, नारायण पेठ टिळक वाडा, पुणें २.

बेलवलकर श्रीपाद कृष्ण एम्.ए. पी. एच. डी. (हारवर्ड विश्वविद्यालय) आय. ई. एस्. संस्कृतचे प्रोफेसर डेक्कन कॉलेज पुणें; जन्म–११ डिसेंबर १८८१; शिक्षण–राजाराम विद्यापीठ कोल्हापूर , दक्षिणी विद्यापीठ पुणें, आणि हारवर्ड (अमेरिका). १९०७ मध्यें मुंबई शैक्षणिक खात्याला येऊन मिळाले. १९१४ पासून डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर; भाण्डारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटयूटच्या प्रमुख स्थापकांपैकीं एक व सध्यां त्या संस्थेचे सन्मान्य (Hon.) सेक्रेटरी; शिवाय पुण्याच्या संस्कृत विद्यापीठ असोसिएशनचे ऑ. सेक्रेटरी, आणि ऑल इंडिया ओरिएन्टल कॉन्फरन्सचे जॉइंट सेक्रेटरी. ग्रंथ History of systems of Sanskrit Grammar, भवभूतीचें उत्तररामचरित व भाषांतर; (In collaboration with Prof. Ranade) History of Indian Philosophy.पत्ता–बिल्वकुंज, भांबुर्डा पुणें ४.

बेवूर गुरुनाथ वेंकटेश जन्म–१८८८ बागलकोट (जि. विजापूर); शिक्षण–डेक्कन कॉलेज पुणें, व सिडने ससेक्स कॉलेज, केंब्रिज १९०८बी.ए.(मुंबई) ; १९११ बी. ए. (कॅन्टब) ; धंदा–इंडियन सिव्हिल सर्व्हिस.१९३२सी. आय.ई. पदवी मिळाली. १९२७ इंटर नॅशनल एअर मेल्स कॉन्फरन्स, हेग–हिंदी प्रतिनिधि; १९२९ युनिव्हर्सल पोस्टल कॉन्फरन्स, लंडन हिंदी प्रतिनिधी; डिस्ट्रिक्ट कमिशनर फॉर बॉय स्कॉउट्स मुंबई.टाइम–टेस्ट–फॉर पोस्ट ऑफिसेसचे लेखक; जनरल पोस्ट मास्टर, मुंबई; पत्ता–श्रीकृष्ण निवास पुणें नं. ४

बेहेरे नारायण केशव जन्म–१८९० टेंभूर्णी (मध्यप्रांत); शिक्षण–मॉरिस व सायन्स कॉलेज नागपूर; पदव्या– एम्. ए., बी.एस्सी., एल्. टी.; नागपूर युनिव्हर्सिटीच्या सिनेट, सिंडिकेट, लिटररी अॅकेडमी, टेक्स्ट बुक कमिटी वगैरेंचे सभासद. लेखन–मध्यप्रांतांतील मराठी क्रमिक पुस्तकें, मोत्यांची माळ (कवितासंग्रह); जीवन–रहस्य, हिंदु कोण, युद्धसंसार, सीता-वनवास, अहिल्योद्धार, भविष्यकाळ इत्यादि कादंबऱ्या ; १८५७, बाजीराव पेशवे इ. ऐतिहासिक ग्रंथ; बोथट बाण इ. विनोदी लेख व कथा.राजद्रोही वाङमय लिहिल्याच्या कारणावरून सरकारी शाळाखात्यांतून कमी करण्यांत आलें. पत्ता–१९३२ महाराष्ट्र कवि संघ अध्यक्ष नागपूर.

बोडस गणेश गोविंदः–जन्म–शके १८०२; शेवगांव(अहमदनगर); शिक्षण– मराठी ६ इयत्ता व इंग्रजी २ इयत्ता; वयाच्या १५वे वर्षी नाटयव्यवसायांत शिरले; वयाच्या १५ व्या वर्षापासून ते ५२ वर्षांपर्यंत सुमारें ३७ वर्षें नट व अभिनय–शिक्षक; यांच्या 'फाल्गुनराव', 'सुधाकर', 'लक्ष्मीधर' इत्यादि भूमिका प्रसिद्ध आहेत. अभिनयकलेंत प्रावीण्य संपादिलें असल्यामुळें यांना नटवर्य असें म्हणतात. हल्लीं उतार वयामुळें खेडेगांवीं शेती करून असतात. पत्ता–मौजे बोरगांव, पोस्ट महाकाळ कवठें, संस्थान मिरजमळा. (ता. बुधगांव.)

बोरकर डॉ. आत्माराम गोविंदः–जन्म १८८७ बोरी–फोंडा–गोवा. पणजी येथील सरकारी मेडिकल ऑफिसर; गोमांतकांतील हिंदूंच्या 'प्रागतिक संघाचे' अध्यक्ष; १९३१ नवव्या गोंवा कॉंग्रेसमध्यें 'हिंदु स्त्रियांचें शिक्षण' या विषयाचे पुरस्कर्ते. पोर्तुगीज भाषेंतील लेखक व वक्ते. पत्ता–पणजी, गोवा.

बोस सर जगदीशचंद्रः–एम्. ए. (कँटब) डी.एस्.सी. (लंडन) ; एलूएल्. डी., एफ्. आर.एस्. कलकत्त्याच्या प्रेसिडेंसी कॉलेजचे

सेवानिवृत्त प्रोफेसर; बोस रिसर्च इंस्टिटयूटचे संस्थापक व मालक; जन्म–३० नोव्हेंबर १८५८; शिक्षण–कलकत्ता; ख्राइस्ट्स कॉलेज केंब्रीज; पॅरिसच्या १९००मधील आंतरराष्ट्रीय सायन्टिफिक काँग्रेसचे सभासद; १९०७, १९१४ व १९१९ मध्यें युरोप व अमेरिकेला गलेल्या शिष्टमंडळांत शास्त्रज्ञ सभासद; लीग् ऑफ नेशन्स व कमिटी ऑफ इंटलेक्चुअल् को-ऑपरेशनचे सभासद. Response in the Living and Nonliving, Plant Response, Electro Physiology of Plants इत्यादि ग्रंथांचे कर्ते. पत्ता– बोस इन्स्टिटयूट कलकत्ता.

बोस सुभाषचंद्रः-बंगाल कायदे मंडळाचे सभासद. जन्म–१८९७; शिक्षण–कलकत्ता व केंब्रीज; १९१५ हिंदी शिक्षण खात्यांत शिरले. १९२१ च्या असहकार चळवळीमध्यें सामील; कलकत्त्याच्या "फॉरवर्ड" पत्राचे व्यवस्थापक १९२२–२४; कलकत्ता कॉर्पोरेशनचे सभासद १९२४; कलकत्ता कॉर्पोरेशनचे चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर १९२४; १९१८च्या बंगाल रेग्युलेशन ॲक्टाखालीं कैद.सध्यां तुरुंगवासांत.

बांवर्डेकर, रावबहादूर वासुदेव अनंत– जन्मस्थान बांबर्डे (सावंतवाडी सं.) हल्लीं वय अदमासें ५५; कुडाळदेशकर गौड ब्राह्मण; त्यांनीं इतिहास संशोधनात्मक बरेच लेख लिहिले असून त्यांच्या ज्ञातीच्या द्वैमासिकांत ऐतिहासिक लेख व कोंकणच्या इतिहासाचीं साधनें म्हणून जुने कागद प्रसिद्ध केले आहेत. ते सध्यां नाशिक येथील करन्सी नोटप्रेसमध्यें 'चीफ सुपरवायझर कंट्रोल' च्या हुद्यावर आहेत. कॉईन एक्सपर्ट म्हणून चांगली कामगिरी केल्याबद्दल सरकारनें त्यांस १९२६ सालीं रावबहादूर हा किताब दिला. पत्ताः—चीफ सुपरवायझर कंट्रोल, करन्सी नोट प्रेस, नाशिक रोड.

भट आत्माराम रावजीः—एम्. कॉम. हे सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्सचे फेलो होते; सर जेम्स वेग्नी स्कॉलर (मुंबई युनि.); मुंबई इलाखा युवक संघाचे संस्थापकांपैकीं एक व प्रथम-वर्षाचे पब्लिसिटी सेक्रेटरी होते; हे कोंकण अभ्युदय संघाचे संस्थापक व चिटणीस मंडळीपैकीं एक आहेत; फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ इंडस्ट्री या संस्थेवर डेक्कन मर्चंटस् ॲसोसिएशनचे प्रतिनिधि म्हणून आहेत; हल्लीं केसरी–मराठा संस्थेचे दुय्यम संपादक व मुंबई शाखेचे व्यवस्थापक. पत्ताः–सरदारगृह, मुंबई २.

भट डॉ. विष्णु महादेव–जन्म १८८५ नाशिक; शिक्षण–१९०२ मॅट्रिक; विल्सन कॉ. मुंबई व फर्ग्युसन कॉलेज पुणें; १९०६ बी.ए.; १९०७ ते १९०९ ग्रँट मेडिकल कॉलेज व लॉ क्लास एकाच वेळीं शिक्षण; या दोन शाखांतील शेवटच्या परीक्षा पास होण्यापूर्वीच १९१० मध्यें नाशिक येथील 'बादशहाविरुद्ध बंड करण्याच्या कटाच्या' खटल्यांत अडकले जाऊन ५ वर्षें सक्तमजुरीची कारागृहवासाची शिक्षा झाली. शिक्षा भोगल्यावर एक वर्ष सतत गुप्त पोलिसांचा ससेमिरा यांच्यामागें होता. युनिव्हर्सिटीनें बी. ए. ची पदवी काढून घेतली, त्यामुळें एल्.एल्. बी. च्या परीक्षेस बसतां येईना. शिवाय त्यावेळीं म्हणजे १९१५ सालीं सर्व मुंबई इलाख्यांत एकच मेडिकल कॉलेज होते. व तेथें ५ वर्षें प्रवेश नाकारला गेला; १९१६ ते २० सहसंपादक, केसरी मराठा संस्था; लो. टिळकांनीं चिरोल केसचें हिंदुस्थानांतील बहुतेक काम यांचेवर सोंपविलें होतें. १९२० मेडिकल कॉलेजमध्यें प्रवेश मिळाला. १९२२ एम्.बी.बी.एस्.; युनिव्हर्सिटीनें बी.ए. ची पदवी पुन्हां देण्यास संमति दिली. १९२४ येवलें येथील श्री. गं. छ. धर्मार्थ आर्य औषधालयांत मुख्य चालकाची जागा मिळाली. तेथें हल्लीं आयुर्वेद संशोधनाचें काम करीत आहेत. 'पाश्चात्य रोग निदान' या नांवाचें एक लहानसें पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें आहे. यांच्या कविता व यांचे राजकीय, सामाजिक व वैद्यक या विषयावरील लेख 'चित्रमय जगत्' व 'केसरी' मधून येत असतात. पत्ता–S. G. C. C. Dispensary येवलें. जि. नाशिक.

भट दामोदर मोरेश्वरः– जन्म–१८८८ मेंढापूर (सं. मिरज); शिक्षण–मिरज येथें मराठी; इंग्रजी नाशिक, मिरज, हुबळी; मिरज, रहिमतपूर, सातारा येथील हायस्कूलांतून एकंदर ११ वर्षें नोकरी; १९०५ पासून स्वदेशीव्रत व स्वराज्य चळवळ; १९२० नोकरी सोडली. १९२१–२४ काँग्रेसची चळवळ (बिनवेतन); दारू–पिकेटिंग, स्वदेशीचा उपदेश डॉ. हर्डीकर यांजबरोबर स्वयंसेवक प्रचार, मुळशी पेटा सत्याग्रह; १९२४ ते आजपर्यंत गीता-अभ्यास, त्यांतील 'उत्तमा' प्रथमवर्ग, प्रथम क्रमांक, वासुदेवशास्त्री खरे चरित्र लेखन; 'राजवाडे साहित्यसंग्रह' (काम चालू); केसरींत

व पुरुषार्थांत लेख. 'श्रीमद्‌भगवद्‌गीतेची शिकवण' या निबंधाला 'गोविंद भवन' कलकत्ता या संस्थेकडून पारितोषिक. पत्ता—मिरज (संस्थान).

भट श्रीमती जानकीबाई:— जन्म—१८७९ पुणें; लग्न १८९१; वैधव्य १८९६; शिक्षण—१८९१ मुलींच्या ६ व्या इयत्तेची परीक्षा पास; १९०८ मिडवाईफची परीक्षा उत्तीर्ण; पृथ्वीचे गोल तयार करण्याची कला. १९१० सेवासदन पुणें; शिवण शिक्षिका; १९०९–१९१८ मिडवाईफरीचा धंदा, १९१७ सेवासदन मुख्य व्यवस्थापिका; १९२४ पासून सेवासदन संस्थेच्या प्रमुख संचालिका. १९२७ कैसर इ. हिंद सिल्व्हर मेडॅलिस्ट; १९२९ अध्यक्ष अखिल भारतीय महिला प्रांतिक परिषद. साळुंक्याचा अग्निप्रलय १९१०, गजराथ व अहमदनगर येथील दुष्काळ १९११–१२ व १९१९, मलबारचें बंड १९२१ इत्यादि प्रकरणीं जबाबदार स्वयंसेविका. पत्ता—सेवासदन, पुणें २.

भडकमकर रा.ह.:— जन्म— कुरुंदवाड येथें शके १८०४; शिक्षण—एम्. ए.; एम्. डी. (मेडिसिन). ग्रँट मेडिकल, कॉलेज मुंबई, येथें पॅथॉलॉजिचे टयूटर १९१०–१३; पॅ. चे असिस्टंट प्रोफेसर १९१३–१८; पत्ता—व्यवसाय मंबई; राहणें-फलटण अगर मिरज.

भाटे गोविंद चिमणाजी:— एम्. ए. (मुंबई); जन्म—१९ सेप्टेंबर १८७०; शिक्षण—डेक्कन कॉलेज, इंग्रजी व तत्त्वज्ञान प्रोफेसर फर्ग्युसंन कॉलेज, पुणें. १८९५ पासून विलिंग्डन कॉलेजचे आरंभापासूनचे प्रिन्सिपाल; महाराष्ट्रांतील सुधारकांपैकीं एक प्रमुख; पुर्नविवाह केला; जातिभेद मोडावा म्हणून मिश्रविवाह केला. इतिहास दप्तरें पाहण्यासाठीं विलायतेस वर्षभर वस्ती. ग्रंथ—अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें; माझे दूरदूरचे प्रवास; कार्लाईल व हिंदु चालीरीती; तीन तत्त्ववेत्ते; कला विषयक तत्त्वज्ञान; प्रेम कीं लौकिक, कँट् व शंकराचार्य, Speeches & Essays पत्ता—महाड, जिल्हा कुलाबा.

भावे वासुदेव कृष्ण:—संपादक, केसरी, पुणें, जन्म—सन १८८५ मिरज; १९०३ 'यू. एस्. एफ्' परीक्षा उत्तीर्ण (सातारा हायस्कूल). नंतर नऊवर्षें नोकरी व खाजगी उद्योग. १९१२ मॅट्रिक. दोनवर्षें फलटण येथील मुधोजी हायस्कुलांत शिक्षक; अडीच वर्षें पुण्याच्या दैनिक 'लोकसंग्रह' पत्राच्या संपादकांपैकीं एक; १९२२ केसरी—संपादकांपैकीं एक; १९२२केसरी-मराठा संस्थेंत दाखल; पिकेटिंगच्या चळवळींत, १९०८, त्यावेळचे पुण्याच्या कलेक्टरांचे पर्सनल असि.मि. अंडरसन यांच्याशीं मारामारी केल्याच्या आरोपावरून शंभर रुपये दंड. ग्रंथ 'ब्राह्मणेतर वादाचें स्वरूप' 'तुर्कांचें साम्राज्य' व 'खरा देशभक्त' पत्ता:—२२६ सदाशिव पुणें नं.२

भिडे म.वि. जन्म— १८८३ पुणें; शिक्षण—नूतन मराठी विद्यालय पुणें; फर्ग्युसन कॉलेज, पुणें; सेंट जॉन कॉलेज केंब्रिज; बी. ए. (मुंबई) बी. ए. (केंब्रिज) रँग्लर. १९०६ आय. सी. एस्. पास होऊन पंजाबांत नेमणूक झाली. डेप्युटी कमिशनर व डिस्टिक्ट जज्ज; युद्धकाळीं असिस्टंट पोस्टल सेन्सर (मुंबई); पोस्टल सेन्सर (लाहोर) लीगल रिमेंब्रन्सर व सेक्रेटरी लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट (पंजाब). अॅडिशनल जज्ज, हायकोर्ट लाहोर.

भिडेशास्त्री सदाशिव गोपाळ— जन्म शके १७९८ सांगली; शिक्षण—वयाच्या ८ व्या वर्षीं देवीनें दृष्टी गेल्यानंतर सर्व शिक्षण झालें. हरीपूर व इचलकरंजी पाठशाळा—व्याकरण, न्याय व वेदांत; श्रीमत् शंकराचार्य यांचेकडून गीता—वाचस्पति ही पदवी मिळाली. भगवद्‌गीतेवरील 'रहस्य--दीपिका' व दशोपनिषदांवरील मराठी विवरण 'उपनिषद्रत्नप्रकाश' असे दोन ग्रंथ लिहिले. विद्याध्ययनानंतर तासगांव (सातारा) येथें संस्कृत पाठशाळा स्थापन केली व ती १२ वर्षें चालवून शाळेंतील विद्यार्थ्यांच्या स्वाधीन केली असून ती अद्यापि चालू आहे. यानंतर पुण्यांत गीता—धर्म—मंडळ स्थापन केलें असून व्याख्यान, प्रवचन, शिक्षण व ग्रंथप्रकाशनद्वारा गीता—धर्म प्रसाराचें कार्य चालू आहे. पत्ता—पुणें, टिळकरोड.

भिडे शंकर विष्णु ऊर्फ बाबुराव जन्म—१८९९ सातारा; शिक्षण—न्यू इंग्लिश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज पुणें; १९२० बी. ए.; १९२२ एल्‌एल्. बी. पुढें साताऱ्यास वकिली. १९२५–२६ 'प्रकाश' पत्राचे संपादक, ग्रामसंघटनेचा प्रयत्न व त्याकरितां 'खेडयापाडयांची संघटना' हें पुस्तक प्रसिद्ध केलें. १९३० काँग्रेस चळवळींतील कार्यकर्ते म्हणून दोनदां कारागृहवास. १९३१ डायरेक्टर वेस्टर्न इंडिया विमा कंपनी. राष्ट्रीय पक्षाकरितां मतप्रचार व हल्लीं सातारा शहर म्युनिसिपालटींत लोकपक्षाचे प्रमुख सभासद. संपादक पोस्टल मासिक 'मराठी जनरल लेटर' पत्ता ७२ भवानी पेठ, सातारा शहर.

भिसे डॉ. शंकर आबाजी डी. एस्. सी, एफ्. एस्. सी. (लंडन); जन्म–१८६७; १८८८ मॅट्रिक; १८८९–१८९८ सरकारी नोकरी (मुंबई) ; १८९४ मुंबई उद्योगवृद्धि संस्थेचे शास्त्रीय शोधनाबद्दल मानपत्र व सुवर्णपदक; १८९७ पिठाचें यंत्र शोधल्याबद्दल चढाओढीचें पहिलें बक्षिस, लंडन; १८९७ वाचण्याचे प्रयोगाबद्दल श्री. सयाजीराव महाराज गायकवाड बडोदें यांजकडून हिऱ्याची आंगठी बक्षीस; १८९९ पासून आजतागायत प्रमुख हिंदी शोधक म्हणून प्रसिद्ध; १९०१ 'जाहिरातीचें मशीन' या शोधाबद्दल सुवर्णपदक (अर्लस कोर्ट एक्झिबिशन, लंडन); १९०८ टाईप तयार करण्याचें यंत्र पूर्णत्वास आणलें म्हणून लंडन येथील तज्ज्ञांकडून 'हिंदुस्थानचे एडिसन' ही बहुमोल मानाची पदवी मिळाली; १९०८ राष्ट्रीय उद्योग धंदा; काँग्रेसच्या मद्रास येथील अधिवेशनांत सन्मान; १९१०लंडन येथें टाटा भिसे कंपनीची स्थापना; १९१४ सिंगल (पृथक्) टाइप पाडणारें मशीन तयार केलें. १९१६ पासून अमेरिकेंत वास्तव्य व तेथें टाइप कास्टिंग मशीनची स्थापना १९२०; १९१४ ऑटोमिडीनचा शोध; १९२० न्यूयॉर्क येथें ऑटोमिडिन कंपनीची स्थापना ; १९२७ साठाव्या वाढदिवसानिमित्त अमेरिकेंतील निरनिराळ्या संस्थांकडून अभिनंदन व न्यूयॉर्क येथें मानपत्र; हल्लींचें वास्तव्य माउंट व्हर्नान (न्यूयॉर्क) पत्ता–पोस्ट बॉक्स–२८८, ग्रँट सेंट्रल स्टेशन, न्यूयॉर्क (यू. एस्. ए.)

भोपटकर प्रो.लक्ष्मण बळवंतः–वकील पुणें, जन्म–१८८०पुणें; १९०० बी. ए.; १९०४ एम्. ए. ; १९०७ एलएल्.;बी. १९०५–१० सहसंपादक 'भाला'; १९२०–२२ संपादक 'लोकसंग्रह'; १९२४ संपादक 'लोकमान्य'; मिठाच्या चळवळींत ६ महिने शिक्षा; पुन्हां १९३२ त २ महिने राजबंदी; पूना लॉ कॉलेजमध्यें प्रोफेसर व व्हाईस प्रिन्सिपॉल. अध्यक्ष पूना बार असोसिएशन; कार्याध्यक्ष महाराष्ट्रीय मंडळ पुणें; व्हाईस प्रेसिडेंट सार्वजनिक सभा, पुणें. ग्रंथकर्तृत्व लॉ ऑफ टॉर्टस,कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर,इंडियन पार्टनरशिप ॲक्ट१९३२,माझी व्यायाम पद्धति,कुस्ती, दांडपट्टा, मृत्यूच्या मांडीवर, स्वराज्याची मीमांसा इ. पत्ता ३२२।१सदाशिव पेठ, पुणें नंबर २

भोंडे गोपाळ विनायकः–नकलाकार, जन्म १८८३; स्कूलफायनल परीक्षा उत्तीर्ण १९०१; पूना हायस्कूलमधील स्कॉलर; सरकारी नोकर,कलेक्टर ऑफीस १९०३ ते १९०७; मिलिटरी फायनॅन्स डिपार्टमेंटमध्यें नोकर १९०७ ते १९३२ पर्यंत; पुणें, नसिराबाद, देवळाली, मुंबई, जबलपूर, पेशावर, रावळपिंडी व महू वगैरे ठिकाणीं वास्तव्य.

विद्यार्थीदशेपासूनच त्यांना अनुकरणाची हातोटी साधली होती. तिचा विकास होतां होतां शाळामास्तर, लोकपुढारी, हरिदास, उपाध्ये, नर्सेस इत्यादि सर्व प्रकारच्या लोकांचे आवाज, पोषाख इत्यादिकांत ते अनुकरण करूं लागले.इतकेंच नव्हे तर ज्याचें अनुकरण करावयाचें त्याच्या सारखी हुबेहूब चर्यासुद्धां ते करून दाखवितात. पत्ताः–२८ बुधवार, पुणें २.

मॅक्डोनल्ड राइट ऑनरेबल जे. रॅम्से. एम्. पी.:– मुख्य प्रधान जून १९२९पासून; ज्यानुआरी २२ ,१९२४–नोव्हेंबर १९२४; वय ६५. अध्यक्ष–I. L. P. १९०६–०९; वर्तमानपत्रकार व आर्थिक विषयांवरील फर्डे लेखक; यांच्या पत्नी म्हणजे कै. डॉ. जॉन हॉल ग्लॅडस्टन यांची मुलगी; इंडियन सिव्हिल सर्व्हिसवरील कमिशनचे एक सभासद १९१२–१४; ग्रेट ब्रिटनला युद्धांत भाग घेतल्याबद्दल यांनीं दोष दिला. लिस्टरतर्फे डिसेंबर १९१८ त व पूर्व बूलिचतर्फे मार्च १९२१ मध्यें बहुमतानें पराजित झाले. जनरल इलेक्शनमध्यें नोव्हेंबर १९२२ त निवडले जाऊन मजूरपक्षाचे पुढारी निवडले गेल्यामुळें पार्लमेंटांतील Opposition चे अध्वर्यू बनले. डिसेंबर १९२३ मधील सार्वजनिक निवडणुकीनंतर, मजूरपक्ष पुष्कळच संघटित झाल्यानंतर जानेवारी १९२४ त बाल्डविन प्रधानमंडळ मोडलें. व मॅकडोनल्ड मुख्य प्रधान बनले. १९२४ ऑक्टोबरमध्यें प्रधान मंडळाचा पराभव झाल्यामुळें आणि जनरल निवडणुकीनंतर यांनीं राजिनामा दिला. डिसेंबर १९२४ त ब्रिटिश अजबखान्याचे ते पंच नेमले गेले. व १९२८ त National gallary चे पंच म्हणून नेमणूक; १९२९च्या निवडणुकींत पुन्हां निवडून येऊन बाल्डविन प्रधान मंडळाच्या राजिनाम्यानंतर पुन्हां जून १९२९ त मुख्य प्रधान झाले. ऑक्टोबर १९२९ त अमेरिकेला भेट. रा. टे. कॉ. चे मुख्य सूत्रचालक.

मराठे गणेश सदाशिवः–एम्.ए.,ए.आय्.ए. ॲक्चुअरी; जन्म–ता. १ ऑगष्ट १८८२ नडियाद (गुजराथ), शिक्षण–१९०२ बी. ए. फर्ग्यु-

सन कॉलेज, एम्. ए. १९०५; सुरत काँग्रेसमधून आल्यानंतर लो. टिळकांनीं काढलेल्या 'नॅशनॅलिस्ट यूनियन' या संस्थेचे चिटणीस; १९०८ पुणें येथील पिकेटिंगच्या चळवळींत भाग घेतल्या-बद्दल खटला व दंड; 'नाटयकलारुक्कुठार' या विनोदी टीकात्मक पुस्तकाचे सहलेखक; मे१९०९ वसंत व्याख्यान मालेचें पुनरुज्जीवन; जुलै १९०९ हिं. को. इ. सोसायटीच्या मुंबई येथील शाखेंत रुजू; विलायतेंत १९१२ मध्यें जॉर्ज किंग नांवाच्या अ‍ॅक्चुअरीच्या ऑफिसांत प्रवेश; युरोपांतल्या प्रवासाचें विनोदी वर्णन 'विलायत-विहार' या नांवानें केसरींत प्रसिद्ध; १९१३ हिंदुस्थानास परत; १९१४ स्वतंत्र अ‍ॅक्चुअरी म्हणून प्रॅक्टिस सुरू. हल्लीं सुमारें शंभर हिंदी विमा कंपन्यांचे सल्लागार अ‍ॅक्चुअरी, भद्रायु मासिक व महाराष्ट्र विमा संघ यांचे उत्पादक व चालक; पत्ता:-- भांबुर्डा पुणें नं. ४.

मराठे नारायणशास्त्री सदाशिव:- स्वामी केवलानंद-जन्म शके १७९९, सुडकोली (ता. रोहे, जि. कुलाबा); व्यवहारधर्म व वेदान्त यांचें बौद्धिक व आचारात्मक शिक्षण मातापितरां-कडून मिळालें, प्राचीन चौदाही विद्या व आस्तिक षड्दर्शनें यांचें अध्ययन व वाचन; मराठी ग्रंथ-शास्त्रीय, इतिहास व निबंधात्मक इत्यादीचें वाचन; गाणें व हार्मोनियम याचा अभ्यास; प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक व चालक; ३० वर्षें अध्यापन केलें; अकोला ब्राह्मण परिषदेचे अध्यक्ष; शके १८५३ मध्यें संन्यास घेतला व बद्रिनारा-यणाचें दर्शन घेतलें.

महाजन प. वि.:-जन्म १८८४ इ. स. शिक्षण-रत्नागिरी हायस्कूल; १९०१ स्कूल फायनल. सुमारें दहा वर्षें चिटणीस महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी; १९१६-२० होमरूल लीगचे काम केलें, होमरूल लीग-ठाणें शाखेचे चिटणीस; १९२०ठाणें जिल्हा परिषदेचे (पहिली) चिटणीस; १९२८ पुणें येथील महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे चिटणीस. पत्ता:-केसरी मुख्य एजंट, कल्याण.

महाजनी गणेश सखाराम: प्रिन्सिपॉल फर्ग्युसन कॉ. डॉ. रँगलर -जन्म १८९८ शिक्षण-मॅट्रिक (तिसरा नंबर) सातारा हाय-स्कूल; फर्ग्युसन कॉलेज इंटरमिजिएट (पहिला वर्ग पहिला नंबर व संस्कृतमध्यें दुसरी शिष्य-वृत्ति); १९२० बी. ए. (९२ टक्के गुण पडले, पहिला वर्ग, पहिला नंबर); दक्षिणा फेलोशिप व ड्यूक ऑफ एडिंबर्ग फेलोशिप मिळाली. १९२१, सरकारकडून शिष्यवृत्ति मिळाल्यामुळें हे विलाय-तेस गेले. तेथें रँग्लर (बी स्टार) झाले; १९२६ स्मिथ प्राइझ मिळविलें. पुढें संशोधनात्मक नि-बंध लिहून डॉक्टर ही पदवी मिळविली. हल्लीं प्रिन्सिपाल फर्ग्युसन कॉ. पुणें.

माडगांवकर सर गोविंद दिनानाथ नाइट, बी. ए. आय. सी. एस्.:-जन्म-१८७१; शिक्षण-सेंट झेविअर हायस्कूल, सेंट झेविअर कॉलेज, एल्फिन्स्टन् कॉलेज व बॅलिऑल. १८९२ आय. सी. एस्. उत्तीर्ण. तीन वर्षें ब्रह्मदेशांत नोकरी केली. १९०५ डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज म्हणून नेमणूक; १९२० अ‍ॅडिशनल जुडीशिअल कमिशनर (कराची); १९२५-३१ हायकोर्ट जज्ज, मुंबई; सध्यां सेवानिवृत्त; हिंदु सामाजिक कायद्याची सुधारणा करण्यासाठीं चळवळ करतात. पत्ता-पुणें लष्कर.

माणिक प्रभु खंडेराव महाराज, श्री सद्‌गुरु मार्तंड; जन्म-शके १७८३, माणिक नगर (हुमनाबाद); संस्कृत, अरबी व फारसी या भाषांचें शिक्षण उत्तम झालेलें आहे. शास्त्रीय गायनाची सर्वांगीण माहिती असून त्या कलेचे मोठे पुरस्कर्ते आहेत. हे श्री. सकल मताचार्य श्री माणिक प्रभू महाराजांच्या गादीवर विराज-मान असून यांना श्री शंकराचार्यांचे सर्व अधि-कार आहेत. या संप्रदायाच्या शिष्यशाखेंत मुसलमान, वाणी, लिंगायत इत्यादि सर्व धर्मांचे लोक आहेत. मुसलमान समाजांतही यांची मानमान्यता आहे. ग्रंथ-ज्ञानमार्तंड, (गद्य) श्री माणिक निर्विकल्पबोध (ओंवी), महामौन शतक (श्लोक), वेदांतविषयक पद्यें, गुरु संप्रदाय (ओंवी). पत्ता- श्रीमाणिक प्रभू, संस्थान माणिकनगर, हुमनाबाद.

माणिकराव, राजरत्न प्रोफेसर गजानन यशवंत:- जन्म-१८८० आजन्म ब्रह्म-चारी. महंत जुम्मादादा यांचे शिष्य. यांनीं शास्त्रीय पद्धतिनुसार मल्लविद्येचें पुनर्जीवन केलें. १९२१ व्यायाम मंदिराची नवीन उभारणी केली. (बडोदें) अशा तऱ्हेच्या शाखा सर्वत्र काढल्या. सांघिक व्यायाम पद्धति, देशी खेळांस आधुनिक वळण देणें व हिंदी कवायत हे सर्व प्रकार प्रथमतः यांनीं सुरू केले. १९२५ कन्या आरोग्य मंदिर स्थापलें. १९२७ शिवाजी-मंदिर (बडोदें) उभा-रलें. १९३० हिंदुस्थानांत पहिलें अस्तिसंघनालय यांनीं बांधलें. १९२७ बडोद्यांतील महापुराचे

वेळीं लोकांचे जीव वांचविण्याकरितां अतिशय खटपट केली म्हणून 'राजरत्न' हा इल्काब मिळाला. ग्रंथ—यांनीं हिंदी, मराठी व गुजराथी या तीनही भाषांत पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. यांनीं 'भारतीय युवाओंकी शरीर रक्षा' 'पोटाचे व्यायाम','ब्रह्मचर्य', 'प्राचीन ऐतिहासिक हत्यारें', 'संघ व्यायाम स्पष्टीकरण' इत्यादि दहा पुस्तकें प्रसिद्ध आहेत. पत्ता—जुम्मादादा व्यायाम मंदिर, विठ्ठल क्रीडाभवन, बडोदें.

माधवराव व्ही.पी.:—सी.आय. ई. (१८९९). जन्म—फेब्रुआरी १८५०; शिक्षण—गव्हर्नमेंट कॉलेज कुंभकोणम् (बी. ए. १८६९ फेलो १८९९.). म्हैसूर संस्थानामध्यें मोठमोठ्या हुद्यांच्या व महत्वाच्या जागांवर सुमारें ३५ वर्षे काम केलें. कौन्सिल ऑफ रीजन्सीचे सभासद १८९८—१९०२; इन्स्पेक्टर जनरल ऑफ् पोलिस १८९२; प्लेग—कमिशनर १८९८; कार्यकारी मंडळाचे सभासद व रेव्हिन्यू कमिशनर १९०२ —१९०४. त्रावणकोरचे दिवाण १९०४—०६; म्हैसूरचे दिवाण १९०६—१९०९.बडोद्याचे दिवाण १९१४—१९१६. २३व्या वर्षी मद्रास इलाखा परिषदेचे अध्यक्ष, कुड्डलोर १९१७. हिंदी राष्ट्रीय सभेनें पाठविलेल्या शिष्टमंडळाबरोबर इंग्लंडला गेले. पार्लमेंटरी जॉइन्ट कमिटीपुढें साक्ष दिली. पहिल्या कर्नाटक परिषदेचे अध्यक्ष, धारवाड १९२०; पत्ता—पट्टणभवन बंगलोर.

मायदेव प्रो. वासुदेव गोविंद— जन्म—१८९४, इंडी (विजापूर); शिक्षण—न्यू स्कूल, पुणें. १९१६ बी. ए.; १९२३ एम्.ए.; अनाथ बालिकाश्रम, हिंगणें येथें शिक्षक; १९१७ पासून या संस्थेचे आजन्मसेवक; १९१८ पासून महिला विद्यापीठांतील कॉलेजमध्यें मराठीचे व इंग्रजीचे अध्यापक; १९२८—३२ आश्रमाचे चिटणीस; १९३२ मे पासून भारत महिला विद्यापीठाचे असिस्टंट ऑर्गनायझर; हे आश्रम व विद्यापीठ यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचा यत्न करीत असतात. गेलीं १२—१४ वर्षे आधुनिक कविता गाऊन तिचा प्रचार केला. संग्राहक—कविवर्य तांबे यांच्या कविता. ग्रंथकर्तृत्व—'भावतरंग'—स्फुट भावगीतें. 'गरिबांची गोष्ट'—खंडकाव्य.

मार्क्विस ऑफ रेडिंग:—(जन्म १८६०) ब्रिटिश वकील व राज्यकारभारांतील अधिकारी; हे १८८७ त बॅरिस्टर झाले. १९०४ मध्यें हुजूर पक्षातर्फे त्यांनीं पार्लमेंटांत प्रवेश केला. इसवी सन १९१० त त्यांना सॉलिसिटर जनरल बनविण्यांत आलें. व 'नाईट' ही पदवी देण्यांत आली. तेथून त्यांची अॅटर्नी— जनरलच्या जागेवर बढती झाली; या हुद्द्यावरील गृहस्थास मंत्रिमंडळांत जागा मिळण्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. १९१३त त्यांना Lord Chief Justice ची जागा मिळाली. ज्यू इसमास ही जागा मिळाल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. १९१४ त यांना बॅरन करण्यांत आलें. १९२१ त हे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल झाले. व १९२६ त सेवानिवृत्त झाले; १९१६ त हे व्हायकाउंट झाले. १९१७ त हे 'अर्ल' बनले; व १९२६ त यांना मार्क्विस हा किताब देण्यांत आला.

मालवीय पण्डित मदन मोहान एम्. एल्. ए. जन्म २५ डिसेंबर १८६१, अलाहाबाद. शिक्षण—धर्मयज्ञोपदेश पाठशाळेंत संस्कृत; गव्हर्नमेंट हायस्कूल; मूर सेंट्रल कॉलेज, अलाहाबाद. बी. ए. (कलकत्ता); शाळामास्तर १८८५-८७ इण्डियन यूनियनचे संपादक १८८५—८७ हिंदुस्थानचे संपादक १८८७—८९; एल्.एल्.बी.व अलाहाबाद विश्वविद्यालय (१८९२); प्रॉव्हिन्शिअल् कायदेमंडळाचे सभासद १९०२—१२; हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष १९०९ व १९१८. इम्पीरियल लेजिस्ले. कौन्सिलचे सभासद १९१०ते १९; इंडियन इंडस्ट्रियल कमिशनचे सभासद १९१६—१८. 'सेवा समिति प्रयाग'चे अध्यक्ष. 'सेवा समिती स्काउट्स् ॲसोसिएशन'चे मुख्य बालवीर. १९१९ पासून बनारस हिंदु विश्वविद्यालयाचे व्हाइस-चॅन्सेलर,हिंदुमहासभेचे अध्यक्ष १९२३—२४. विधि—मंडळाचे सभासद १९२४ पासून. १९३० मध्यें राजीनामा. १९३१ सालीं महात्मा गांधींच्या बरोबर गोलमेज परिषदेसाठीं विलायतेस प्रयाण. सविनय का. भंगाच्या चळवळींत अटक; जातिसमेटाचा प्रयत्न करणारे; पत्ता— बनारस हिंदु विश्वविद्यालय.

१८५ **मावळंकर** गणेश वासुदेव ऊर्फ दादासाहेब, जन्म:—१८८८ बडोदें. कुटुंबाचें मळ नांव—मावळंगेकर, शिक्षण—१९०४ मॅट्रिक सरकारी हायस्कूल, अहमदाबाद. १९०८ बी. ए. गुजराथ कॉलेज, एक वर्ष फेलो म्हणून काम केलें. १९११ फर्स्ट एल्. एल्. बी. (पहिला वर्ग) सेकंड एल् एल्. बी. (पहिला नंबर—पहिला वर्ग) १९१३ वकिली सुरू केली. १९१६ गुजराथ सभेचे सेक्रेटरी. गुजराथ सभेतर्फे मोलेमिंटो सुधा-

रणांविषयीं व १९१७–१८ सालच्या खेडा जिल्हयांतील कर न देण्याच्या चळवळींत आणि १९१८ सालचा इन्फ्लुएंझा व १९१९चा दुष्काळ इ. कामें केलीं. १९१९ अहमदाबाद म्युनिसिपालिटींत प्रवेश; १९२२ मध्यें म्युनिसिपालिटी सस्पेंड झाली तोंपावेतों सभासद होते. १९२१–२२ दोन वर्षे वकिली सोडून अहमदाबादेस भरलेल्या ३६व्या राष्ट्रीय सभेच्या स्वागत समितीचे व गुजराथ प्रांतिक समितीचे मंत्री. १९२५ म्युनिसिपालिटींत पुन्हां प्रवेश. एक वर्ष सॅनिटरी कमिटीचे चेअरमन. १९२९ म्यु. सभासदत्वाचा राजिनामा. १९२७ अतिवृष्टीचे कामीं मदत करण्याकरितां स्थापन झालेल्या फंडाचे चिटणीस, कार्य अजून चालू आहे. १९३० राणपूर (पोलिस अत्याचार) तपास समितीचे अध्यक्ष. तपासास बंदी करणारा हुकूम अमान्य केल्यामुळें २ महिने कैद व ५०० रु. दंड अशी शिक्षा झाली. ता. ३१।८।३० रोजीं कैद होऊन हायकोर्टनें शिक्षा रद्द केल्यामुळें ता. १५।१०।३० रोजीं साबरमती तुरुंगांतून सुटका. १९३० आक्टोबर म्युनिसिपालिटींत निवडणूक. सध्यां म्युनिसिपालिटीचे पुन्हां अध्यक्ष. पत्ता–भद्र, अहमदाबाद.

मिस्त्री बाबूराव–जन्म– १८९२ कोल्हापूर. पिढीजाद धंदा मिस्त्री. १९१९पर्यंत पेंटिंग, पडदे रंगविणें, फोटोग्राफी वगैरे कामें केलीं. १९१९ 'महाराष्ट्र फिल्म कंपनी' स्थापन केली. कंपनीतर्फे सुमारें २० चित्रपट निघाले. त्यांतील 'सिंहगड' 'नेताजी पालकर' हे लोकप्रिय आहेत. यांचीं कित्येक पेंटिंग्ज् प्रसिद्ध आहेत. 'नदीकांठची स्मृति' 'श्री दत्तात्रेय' 'राधाकृष्ण' इत्यादि चित्रें 'रत्नाकर' मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत.

मुजुमदार शंकर बापूजी:––जन्म सन १८६२ पुणें; शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व हायस्कूल पुणें, १९०७ पासून मराठी भाषेंत पूर्वी नसलेलें महाराष्ट्र नाटचकलेचें वाङमय "रंगभूमि" मासिकाच्या द्वारें सुमारें बारा वर्षे लिहिलें. यांचें गॅरिकचें चरित्र प्रसिद्ध आहे. किर्लोस्कर नाटक कंपनीच्या उत्कर्षाला यांचेंच अभिनयपटुत्व व कार्यकौशल्य कारणीभूत झालें. पत्ता:––१९९ कसबा पेठ पुणें.

मुजुमदार सरदार आबासाहेब:– मुजुमदार घराण्यांत दत्तक; मूळ नांव श्रीधर पांडुरंग प्रभुणे; जन्म–१८८६; दत्तक १८९२; शिक्षण–डेक्कन कॉलेज पुणें; भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस; डेक्कन सरदार व इनामदार संघातर्फे मुंबई कौन्सिलांत सभासद १९२३; १९२६ मुंबई कौन्सिलांत पुन्हां निवडणूक; १९३०लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडणूक; दुमालदार मासिकाचे चालक; 'ईस्ट इंडिया कंपनीचे पेशवे दरबाराशीं फारसी पत्रव्यवहार' या ग्रंथाचे लेखक, कालिदास व संगीत या निबंधाचे लेखक, भांडारकर इन्स्टिटयूट, म. ए. सोसायटी, शि. प्र. मंडळी, पुणें गायन समाज, भारत गायन समाज, कॉमन वेल्थ विमा कंपनी, पर्वती संस्थान इत्यादि संस्थांतील सभासद व कार्यकर्ते. १९२८ दुसऱ्या प्रतीच्या सरदारांतून यांचें नांव पहिल्या प्रतीच्या सरदारपटांत दाखल झालें. पत्ता--कसबा पेठ १८७ मुजुमदार वाडा, पुणें नं. २.

मुतालिक सरदार, एम्. एल्. ए. विष्णु नारायण (अण्णासाहेब) जन्म–१८७९ शिक्षण–सातारा हायस्कूल, डेक्कन कॉलेज. पुणें. (बी. ए.) १९२१–२३ दक्षिण सरदारांतर्फे मुंबई कौन्सिलांत सभासद. १९१४ पासून इनामदार–सेंट्रल–ॲसोसिएशनचे अध्यक्ष. सातारा म्युनिसिपालिटीचे चेअरमन (४ वर्षें). जिल्हा बोर्ड व तालुका लोकल बोर्डचे सभासद (१५ वर्षें). १९२५–२६ आर्मी अकौंट्स् कमिटीवर असेंब्लीचे प्रतिनिधि म्हणून नेमणूक. १९२६ सरदार, इनामदार, वतनदार लोकांच्या पहिल्या प्रॉव्हिन्शिअल कॉन्फरन्सचे अध्यक्ष व प्रॉव्हिन्शिअल पोस्टल कॉन्फरन्सचे अध्यक्ष. १९२७ व १९३१ सरदार व इनामदार लोकांच्या प्रॉव्हिन्शिअल कॉन्फरन्सच्या एक्झिक्यूटिव्ह कमिटीचे चेअरमन; १९२८ सायमन कमिशन पुढें साक्ष देण्याकरितां गेलेल्या सरदार इनामदार डेप्युटेशनचे लीडर; १९२७ व २९ सालीं इलाख्यांतील सरदार इनामदारांच्या तर्फे गेलेल्या दोनही डप्युटेशन्सचे लीडर. १९३० फर्स्टक्लास सरदार झाले. ग्रंथप्रकाशन- करन्सी सिस्टिम ऑफ इंडिया (मराठी) लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद. पत्ता–शनवार पेठ, सातारा शहर.

मुनशी ॲडव्होकेट कनयालाल माणेकलाल:–जन्म– १८८७; सन १९२६ लीलावती शेट ह्या गुजराथी भाषेंतील नाणावलेल्या लेखिका जैन विधवाबाईशीं लग्न. शिक्षण–दलाल हायस्कूल, भडोच. बडोदा कॉलेज. १९०६,बी.ए.; १९१०, एल्.एल्.बी. १९१३ ॲडव्होकेटची परीक्षा उत्तीर्ण. १९१३ ॲडव्होकेट मुंबई हायकोर्ट. १९१५

'यंग इंडिया' सहसंपादक; १९१९-२०सेक्रेटरी बॉंबे होमरुल लीग.१९२२ पासून साहित्य सं.चे अध्यक्ष. गुजराथी वाङमय (सायक्लोपिडीया) ज्ञानकोशाचे अध्यक्ष १९२५ रजिस्टर्ड ग्रॅजुएटतर्फे मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटचे सभासद. १९२६ गुजराथ साहित्य परिषद मंडळाचे व्हाईस-प्रेसिडेंट. १९२६ मुंबई युनि.च्या सिंडिकेटचे सभासद. १९२६, बडोदा युनिव्हर्सिटी-कमिशनवर नेमणूक. १९२७ मुंबई यु. च्या गुजराथी बोर्ड ऑफ स्टडीज्चे चेअरमन, मुंबई कौन्सिलमधील युनिव्हर्सिटीचे सभासद. १९३०सत्याग्रह चळवळींत भाग घेतला. सहा महिने-शिक्षा.ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद १९३०-३१. १९३२ अटक. (जानेवारी). ग्रंथप्रकाशनः-पौराणिक नाटकें. अविभक्त आत्मा, ध्रुवस्वामिनी देवी इत्यादि; भगवान् कौटिल्य, स्वप्नद्रष्ट, पृथ्वीवल्लभ; लघु-कथा, निबंध वगैरे. पत्ताः-गिल्बर्ट बिल्डिंग बाबुलनाथ रोड, मुंबई ७.

मुनशी सौ. लीलावती कनयालाल जन्म १८९९, सेक्रेटरी-स्त्री-सेवा संघ, मुंबई. १९३० सत्याग्रह चळवळींत भाग, मुंबई बॉर कौन्सिलच्या व्हाइस प्रेसिडेंट म्हणून नेमणूक; अटक-४ जुलै १९३०; तीन महिने सक्त मजुरी शिक्षा, आक्टोबर १९३० सुटका, १९३० मुंबई स्वदेशी मार्केटची मांडणी केली; १९३१ ऑल-इंडिया कांग्रेस कमेटीच्या सभासद, १९३२ जानेवारी अटक. ग्रंथ-प्रकाशन-रेखा चित्रो आणि बीजा लेकनो संकीर्ण उतारे 'कुमारदेवी' ऐतिहासिक नाटक, नाटकें, लघुकथा, निबंध वगैरे. पत्ता-गिल्बर्ट बिल्डिंग, बाबुलनाथ रोड. मुंबई ७.

मुल्ला दी राइट् ऑनरेबल सर दिनशा फारदुनजी. के. टी. (१९३०); पी. सी. एल् एल् बी.; सी. आय. ई.; जन्म एप्रील १८६८; शिक्षण-सर जमशेटजी जीजीभाई स्कूल, व एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई. मुंबई विश्वविद्यालयाचे माजी फेलो व 'ट्रायब्यूनल ऑफ अपील बॉम्बे' या संस्थेचे माजी अध्यक्ष; १९१९-२१ मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश. एच्. इ. दी व्हाइसराय यांच्या कार्यकारी मंडळांत कायदेमंत्री. प्रीव्ही कौन्सिलवर नेमणूक. १९३१ सालीं मुंबई विश्वविद्यालयानें एल्. एल्. डीची पदवी दिली. अनेक कायद्यांवरील ग्रंथ.पत्ता-२१ मरीन लाइन्स,मुंबई.

मुसोलिनी:-(जन्म-१८८३) इटालियन मुत्सद्दी; याचे आईबाप गरीब होते; हा प्रथम शिक्षक होता. १९०२ सालीं हा स्वित्सर्लंडला गेला; त्याच्या समाजसत्तावादी मतांमुळें त्याला १९०४ त हद्दपार करण्यांत आलें. नंतर त्यानें वर्तमानपत्राच्या धंद्यांत शिरकाव केला; व १९१२ त मिलन येथील Avanti नांवाच्या समाजसत्तावादी वर्तमानपत्राचा तो संपादक झाला. १९१४ त इटालीनें महायुद्धांत भाग घ्यावा अशी यानें ओरड सुरू केली. व महायुद्ध सुरू झाल्यावर यानें त्यांत स्वतः काम केलें. १९१७ त तो जखमी झाला. महायुद्धानंतर मुसोलिनीचें महत्त्व वाढलें. राष्ट्रांतील परिस्थिति बिकट झाली होती.लोकांच्या मनांत क्रांतिकारक कल्पना घोळत होत्या; अशा वेळीं फॅशिझम पंथाचीं तत्त्वें लोकांत बिंबविण्याचा त्यानें प्रयत्न केला. तो प्रयत्न अत्यंत यशस्वी होऊन १९२२ त राज्यकारभारांत कल्पनातीत बदल झाला; याचा परिणाम म्हणजे १९२२ त मुसोलिनी इटालीचा मुख्य प्रधान झाला. त्यानें अनेक खात्यांची व्यवस्था आपल्या हातीं घेतली. व जवळजवळ इटालीचा सर्वाधिकारी तोच बनला. त्याची सत्ता कमी करण्याचे व त्याला ठार करण्याचेही प्रयत्न झाले. ते सर्व फसले व १९३० त तर इटलीवरील त्याचें प्रभुत्व कांकणभर जास्तच होतें. १९२८ त त्यानें आत्मचरित्र लिहिलें; त्याचें इंग्रजी भाषांतरही झालें आहे.

मेहता जमनादास, एम्.ः-एम्.ए. एल् एल्.बी. बार-ॲट-लॉ. जन्म ३ ऑगस्ट १८८४ शिक्षण-जामनगर, जुनागड, मुंबई, लंडन. मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे सभासद. १९२३-२९ विधिमंडळाचे सभासद. बी. बी. एन्ड सी. आय् रेल्वे एम्प्लॉयर्स यूनियन व बॉम्बे टॅक्सी ड्रायव्हर्स युनियन यांचे अध्यक्ष. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद. ठाणा डिस्ट्रिक्ट कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष, ३० सालच्या चळवळींत ६ महिने शिक्षा. एशिअन इन्शुअरन्स कमिटीचे चेअरमन. सर्व आर्थिक विषय व मजुरांचे प्रश्न यांचे अभ्यासक. पत्ता-रिज रोड, मलबार हिल, मुंबई.

१९३ मेहेंदळे खण्डेराव चिंतामणः-सरदार व जहागिरदार. जन्म ५ डिसेंबर १८६९ पुणें. शिक्षण-न्यू इंग्लिश स्कूल व डेक्कन कॉलेज. बी. ए. १८९२; इ. स. १९१०त 'भारत इतिहास संशोधक मंडळ' पुणें या संस्थेची स्थापना केली; तिचे बरेच वर्षे चिटणीस व सध्यां उपाध्यक्ष. ग्रंथ-किरकोळ ऐतिहासिक निबंध व टिपणें. पत्ता-५३८ शनिवार पेठ, पुणें नं. २.

मोडक क. गणेश वासुदेवः-ग्वाल्हेर

जन्म १८८९ पुणें. शिक्षण–न्यू इंग्लिश स्कूल व डेक्कन कॉलेज, पुणें. १९०९ मध्यें ग्वाल्हेर फौजेंत कॅडेट म्हणून भरती; १९१४त महायुद्धांत फ्रान्सची सरहद्द; ग्वाल्हेर सैन्यांत अंमलदार, फर्स्ट ग्वॉलियार इंपीरियल सर्व्हिस लान्सर्स; लेक्चरर, मिलिटरी हिस्टरी आर्मी ट्रेनिंग स्कूल, जनरल स्टाफ व इन्टेलिजन्स ऑफिसर; असिस्टंट क्वार्टर मास्टर जनरल; असिस्टंट ॲड्जुटंट जनरल, वगैरे हुद्द्याचीं कामें केलीं. सतत २० वर्षें इंडियन आर्मीचें हिंदीकरण व तत्सम आणखी २५ विषयांचा अभ्यास व प्रचार. युनिव्हर्सिटीच्या डिग्री परिक्षांना'मिलिटरी सायन्स' व 'मिलिटरी हिस्टरी' हे विषय सुरू करण्याची अव्याहत खटपट. १०।१५ हिंदुस्थानी लढायांचा 'युद्धशास्त्र'दृष्टया अभ्यास. ग्रंथकर्तृत्व––व्हिज्युअल ट्रेनिंग (हिंदी); मस्केट्री लेक्चर्स (हिंदी); प्रतापगडचें युद्ध (मराठी); सध्याचा पत्ता–– ग्वाल्हेर.

मोदी होरमसजी पेरोशा. एम्. ए. (१९०४); एल्. एल्. बी. (१९०६)–ॲड्व्होकेट हायकोर्ट मुंबई. जन्म २३ सप्टेंबर १८८१; शिक्षण–सेंट झेविअर्स कॉलेज मुंबई. बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे सभासद व बां. म्यु. कॉ.च्या स्टँडिंग कमिटीचे चेअरमन, १९२१–२२; व अध्यक्ष १९२३–२४; बॉंबे मिल ओनर्स असोसिएशनचे चेअरमन १९२७–२८; १९२९–३० व १९३०–३१; इंडियन मर्चंटस् चेंबरचे अध्यक्ष १९२८–२९; विधि मंडळाचे सभासद. पत्ता–– कंबाला हिल्, मुंबई.

मोने डॉ. रामचंद्र व्यंकटेश. जन्म १८८६; शिक्षण--१९०४ मॅट्रिक; विल्सन कॉलेज मुंबई; कांहीं दिवस पोस्टल खात्यांत नोकरी व पुढें १९०६ सालीं नगर येथें शिक्षकाची नोकरी व कायद्याचा अभ्यास. १९०६ पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्यें प्रवेश; तेथें अनेक विषयांत बक्षिसें मिळविलीं. १९१० 'डॉक्टरची' परीक्षा पास झाले. या परीक्षेंत व पुढील कांहीं परिक्षांतही 'मेडिसिन' विषयांत शेंकडा १०० गुण मिळविले. सरकारी मेडिकल खात्यांत सर्व्हिस व १९११पासून १०।११ वर्षें पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्यें शिक्षक. १९१५, कॉलेज ऑफ फिजिशिअन्स ॲन्ड सर्जन्स मुंबई येथील डिप्लोमा परीक्षेंत पहिला नंबर आला. १९१८ एम्. सी. पी. एस्. (पहिला वर्ग). यापुढें प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिस व पुणें येथील ससून हॉस्पिटलमध्यें असिस्टिंन्ट सिव्हिल-सर्जन म्हणून काम केलें. १९२३ मध्यें मुंबईस नेत्रविद्येच्या विषयांत पारंगतता मिळविली. १९२४, सिव्हिल सर्जन, नाशिक. यांनीं नाशिक येथें 'मेडिकल युनियन' स्थापन केली व सेवासदनच्या नर्सिंग होमची एक शाखा काढली, आणि नर्सेसकरितां एक शिक्षणवर्ग सुरू केला. १९२६ मध्यें उच्च शिक्षणाकरितां इंग्लंडला गेले. तेथें त्यांनीं एल्. आर्. सी. पी.; एम्. आर्. सी. एस्; डी. टी. एम् व एल्. एम्. या पदव्या मिळविल्या. इंग्लंडहून आल्यावर हुबळी, जळगांव, धुळें, पुणें इत्यादि ठिकाणीं सिव्हिल सर्जन किंवा सर्जन म्हणून काम केलें. हल्लीं बेळगांव येथें सिव्हिल सर्जन आहेत.

मंडलिक रामचंद्र नारायण. जन्म शके १८०७ पेण येथें; शिक्षण–फर्ग्युसन कॉलेज बी. ए. १९०४; विहारीचे सं. १९०७; राजद्रोहाबद्दल स. म. शिक्षा २ वर्षें, १००० दंड १९०८; सुटका १९१०; जपानला प्रयाण; परत १९११; मुंबई नॅ. यूनि. व टि. स्व. सं. मुंबई यांचे जॉ. ऑ. सेक्रे. १९१६–२४; 'लोकमान्य' संपादक १९२३–२५; बरीच वर्षें ऑ. इं. कां. क.चे सभासद; कुलाब्याच्या पहिल्या मीठ सत्त्याग्रहाचे शिबिराध्यक्ष; ९ महिने शिक्षा; १९३०–१९३२ पोलीस हजेरी नोटीस-भंगाबद्दल ६ म. स. म. शिक्षा भोगली; कुलाबा डिक्टेटर झाल्याबद्दल १ वर्ष स. म. व ५०० रु. दंड शिक्षा झाली; १ महिन्यानंतर हायकोर्टानें रद्द केली. पेणच्या कुलाबा समाचाराचे प्रथमपासून आजपर्यंतचे सहसं.; ग्रंथ–बेझंटचें चरित्र व मतें १९०५; मुस्तफा केमालपाशा सरकारजमा; इ.

येवले हरी आबाजी एम्. ए. बी. टी. एफ्. आर्. ई. एस्. (लंडन) जन्मस्थळ–शेंदुरजणें (जिल्हा सातारा.) शिक्षण–१९०८–१७; मॅट्रिक, बी. ए., (गणित) १९२१ फर्ग्युसन कॉलेज, पुणें, एम्. ए., (गणित) १९२४ न्यू पूना कॉलेज; बी. टी., (इंग्रजी व गणित) १९२६ ट्रेनिंग कॉलेज, मुंबई. लंडन विश्वविद्यालयांत शिक्षणशास्त्राचा व प्रायोगिक मानसशास्त्राचा उच्च अभ्यासक्रम पुरा केला. १९३०–३१, लंडन काउन्टी कौंसिलच्या दहा नमुनेदार प्राथमिक व प्रौढ शाळांची विशेष पाहणी केली. यासंबंधीं लेख 'प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन' पुणें या इंग्रजी मासिकांत आले आहेत. मुंबई व सातारा येथें सरकारी हायस्कुलांत शिक्षक, १९२४–१९२८, हेडमास्तर श्रीशिवाजी मराठा हायस्कूल, उमरावती (सी. पी.); १९२८–१९३१ तीन वर्षें शिक्षण संस्था

चालविली, मुलांचें शास्त्रीय वर्गीकरण करण्यासाठीं व अभ्यासक्रमाचे विषय ठरविण्यासाठीं बुद्धीची मोजणी केली; या कामीं लोकलबोर्ड व म्युनिसिपालिटी यांच्या प्राथमिक शाळेंतील सुमारें ८००० मुलें तपासलीं, बुद्धीची मोजणी करण्याचें सर्व साहित्य जमविलें; (अ) नागपूर युनिव्हर्सिटीचा फेलो म्हणून निवडणूक; (ब) लंडन येथें जुलै १९३१ च्या ब्रिटिश कॉमनवेल्थ शिक्षण परिषदेमध्यें मुंबई युनिव्हर्सिटीचा प्रतिनिधि; (क) लंडनच्या औद्योगिक मानसशास्त्र–संस्थेचे सदस्य; (अ) अखिल भारत ऑलिम्पिक सामने, पुणें, १९२० मध्यें कुस्तींतील प्राविण्याबद्दल पदक; (ब) हिंदी संरक्षक–दलांत सैनिक; तसेंच मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेंतील अधिकारी, (क) स्काऊट मास्तर–१९२३ पासून; मुंबई,सातारा व उमरावती. हल्लीं व्हाईस प्रिन्सिपाल, श्रीशिवाजी प्राथमिक लष्करी शिक्षण शाळा, भांबुर्डा, पुणें.

रणजितसिंगजी:––जन्म– १८७२ हिंदी संस्थानिक व क्रिकेटपटु यांचें शिक्षण ऑक्सफर्ड येथें झालें व तेथें यांच्या क्रिकेटनैपुण्याकडे सर्वांचें लक्ष वेधलें. १८९५ त ते ससेक्स परगण्याच्या क्रिकेटसंघाचे सभासद झाले. १८९६ त व १९०० त यांच्या धावांचें प्रमाण सर्वांत अधिक होतें. हे केंब्रिज युनिर्व्हसिटीतर्फे खेळले, शिवाय ऑस्ट्रेलियाविरुद्ध इंग्लंडच्या संघातर्फेही हे खेळले. १९०६ त हे गादीवर बसले; सध्यां हे नवानगरचे महाराज आहेत.

रसेल बर्ट्रंडः–(जन्म–१८७२) ब्रिटिश तत्ववेत्ता व गणितज्ञ; यांचें शिक्षण केंब्रिज येथील ट्रिनिटि कॉलेजांत झालें. या कॉलेजांत ते लेक्चरर व फेलो झाले. बर्गसनच्या तत्वज्ञानावरील यांच्या टीकेमुळें हे फार लोकप्रिय झाले. Symbolic किंवा Mathematical logic चे हे एक प्रवर्तक असून त्यांनीं गणित, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र यावर पुष्कळ महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत.

राजवाडे मेजर जनरल्, रावराजा, गणपतराव रघुनाथराव, राव राजा, मशिर ई–खास, बहादुर शौकतजंग सी. बी. ई.; ए. डी. सी.; ग्वाल्हेर सरकारचे सैन्य-मंत्रि व ग्वाल्हेर सरकारच्या सैन्याचे इन्स्पेक्टर जनरल; कौंसिल ऑफ रीजन्सीचे सभासद; मुंबई इलाखा व संयुक्त प्रांतांत आग्रा आणि अयोध्या यांतील पहिल्या वर्गाचे सरदार. जन्म–जानेवारी १८८४; नागपूरचे सर मोरोपंत जोशी यांच्या कन्या कु. डॉ. नागूताई जोशी यांच्याशीं विवाह, शिक्षण–व्हिक्टोरिया कॉलेज; पत्ता–ग्वाल्हेर.

राजवाडे रामचंद्र शंकर–जन्म–सन १८९१, वडूज, जि. सातारा; शिक्षण–स्कूल फायनल व हायकोर्ट वकिलीची परीक्षा; इंग्रजी सातवीनंतर५ वर्षे मुलकी खात्यांत नोकरी, वकिलीच्या परीक्षेनंतर १९१५–१९२० पर्यंत वकिली, १९२० ते १९२२ केसरी व काँग्रेस कचेरी यांत काम केलें; एका लिंगायत अज्ञानाच्या सावकारी मालमत्तेचे वहिवाटदार; आठ वर्षे सोलापूरच्या 'कर्मयोगी' पत्राचे संपादक; हिंदुसभेचे चिटणीस, सोलापूर मार्शल लॉच्या अमदानींत ७ वर्षे सक्त मजुरी व १०,००० रु. दंड. एक वर्षानंतर गांधी–अर्विन करारान्वयें व महात्माजींच्या जोरकस आग्रहामुळें सुटका. १९३२ सालीं ऑर्डिनन्समुळें दोन महिने तुरुंगवास; ,पत्ता–५८४ दक्षिण कसबा सोलापूर.

राजा एम्. सी. रावबहादूर एम्. एल्. ए. जन्म–१८८३ सेंट थॉमस माउंट, दक्षिण हिंदुस्थान. शिक्षण–वेस्ले कॉलेज व मद्रास ख्रिश्चन कॉलेज, टीचर्स कॉलेज, (Saidapet); शिक्षक–१९२४, मद्रास युनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्यें नेमणूक; अस्पृश्य वर्गाकरितां मोफत वसतिगृहाची स्थापना; स्काऊट चळवळींत पुढाकार घेतला; १९१६ मद्रास आदि–द्रवीड–महाजन–सभा-घटना व सेक्रेटरी; निरनिराळ्या डेप्युटेशनचे पुढारी; १९२८ सीलोन व १९२६ ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस लीडर्स ॲसोसिएशनचे अध्यक्ष; १९२६पासून ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशनचे अध्यक्ष; १९१९ पासून ऑननरी प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट; १९१९ मद्रास कौंसिलमध्यें नेमणूक; १९२७ असेंब्लीमध्यें नेमणूक; १९२८ इंडियन सेंट्रल कमिटीवर नेमणूक; १९२२ रावबहादूर हा किताब मिळाला. हे जस्टिस पार्टीचे प्रमुख सभासदांपैकीं एक आहेत. रा. टे. कॉन्फरन्सचे सभासद म्हणून नेमणूक; यांची राजा–मुंजे पॅक्टची कल्पना प्रसिद्ध आहे.

राजेंद्रप्रसाद जन्म–१८८४, कलकत्ता विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पहिले; एम्. ए. १९०७; एम्. एल्. १९१५; पाटणा विश्वविद्यालयाच्या सीनेटचे सभासद; असहकारितेच्या चळवळींत वकिली सोडून दिली; बिहार छात्र परिषदेचे अध्यक्ष; राष्ट्रीय सभचे कांहीं काळपर्यंत चिटणीस . चंपारण्यांत महात्मा गांधींच्याबरोबर काम केलें. असहकार चळवळींत

व स. का. भंगाच्या चळवळींतील कार्यकर्ते. पत्ता–खादी डेपो, बंकीपूर, पो. आ. पाटणा.

राधाकृष्णन् एस्.:–एम्. ए.; डी. लिट्. (ऑनर्स) 'तत्त्वज्ञाना'चे 'किंग जॉर्ज फिफ्थ' प्रोफेसर आणि 'पोस्ट ग्रॅज्युएट कौन्सिल इन् आर्टस्' चे अध्यक्ष; कलकत्ता विश्वविद्यालय. जन्म ५ सेप्टेंबर १८८८; शिक्षण–मद्रास ख्रिश्चन कॉलेज, प्रेसिडेंसी कॉलेज, मद्रास येथें कांहीं काळ तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर; म्हैसूर विश्वविद्यालयांत कांहीं काळ तत्त्वज्ञानाध्यापक. "तौलनिक धर्म" यावर व्याख्यान देणारे मँचेस्टर कॉलेजचे 'अॅपटॉन' व्याख्याते व ऑक्सफर्ड येथें "हिबर्ट" व्याख्यान देणारे. अनेक तत्त्वज्ञानग्रंथांचे कर्ते. पत्ता–युनिव्हर्सिटी कलकत्ता.

रानडे देशदास कृष्णाजी महादेव जन्म–शके १८०१ ज्येष्ठ कृष्ण ७, (ता. ११।६ १८७९) पुणें; मराठी सहा इयत्तांपर्यंत शिक्षण संगमनेर येथें; नंतर १८९५ ते १८९८ पर्यंत पुणें येथें वेदाभ्यास; नंतर औंध येथें इंग्रजी शिक्षण ५ ६ इयत्तेपर्यंत; त्यानंतर श्रीमंत सरदार तात्यासाहेब खाजगीवाले यांचेकडे नोकरी. १९०३ पासून सरकारी नोकरी, १९१५ पासून सहकुटुंब पैसाफंडाचे कामास सुरुवात केली. १९१७ते १९२८ पैसाफंड मेळा (लहान मुलांमुलींचा) काढून त्याचे द्वारां पैसाफंडास ६०००० साठहजार रुपयांची मदत केली. सुमारें १९२२–२३ सालीं तात्यासाहेब केळकर यांनीं 'देशदास' ही पदवी दिली. सन १९२० ते १९३२ अखेर मुळशी सत्याग्रह, शेरे सत्याग्रह, दारू–पिकेटिंग, हिंदू मुसलमान, परदेशी मालावर बहिष्कार, शिरोडा सत्याग्रह, कायदेभंग वगैरेंत मिळून ६वेळां तुरुंगवास (शिक्षा). लोकमान्य पंथाचे अनुयायी; आजन्म पैसाफंड स्वयंसेवक. पत्ता–३४ शुक्रवार, पेठ पुणें.

रामन् सर चंद्रशेखर वेंकट, प्रिन्सिपाल बंगलोर इन्स्टिटयूट ऑफ सायन्स. के. टी. एम्. ए. (ऑनर्स) पी. एच्. डी. (फरीबर्ग) ऑनर्स; एल्एल्. डी. (ग्लासगो ऑनर्स) डी. एस्. सी. (कलकत्ता); एफ्. आर. एस्., एल्. एल्. डी. (मुंबई) १९३१; कलकत्ता विश्वविद्यालयाचे सृष्टिशास्त्राचे पलित प्रोफेसर; जन्म– ७ नोव्हेंबर १८८८; लग्न–लोकसुन्दराम्मल; शिक्षण–ए. व्ही.एन्. कॉलेज विजगापट्टण; प्रेसिडेंसी कॉलेज मद्रास; इंडियन फिनॅन्सचे एन्रोलड ऑफिसर १९०७; कलकत्ता विश्वविद्यालयाचे पलित प्रोफेसर १९१७; "इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स"चे ऑनररी चिटणीस १९१९; ब्रिटिश असोसिएशन व्याख्याते (टोरोण्टो) १९२४; "कॅलिफोर्निया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी"चे सहसंशोधक १९२४; इंडियन सायन्स कॉंग्रेसचे अध्यक्ष १९२८; मॅटेंकी मेडॅलिस्ट रोम १९२९; "इन्स्टिटयूट ऑफ फिजिक्स" व "एशिॲटिक सोसायटी ऑफ बंगाल" चे फेलो; सृष्टिशास्त्र संशोधनाबद्दल "नोबेल प्राइझ" मिळालें; १९३० सध्यां बंगलोर सायन्स इन्स्टिटयूटचे चालक.

राय आचार्य प्रफुल्लचंद्र हरिश्चंद्र, जन्म सन १८६१ रारुली कातीपारा (जि. खुल्ना) शिक्षण हेअर स्कूल, आल्बर्ट स्कूल व प्रेसिडेन्सी कॉलेज कलकत्ता. गिलक्रिस्ट स्कॉलरशिप मिळाल्यानें विलायतेस प्रयाण व एडिंबरो विश्वविद्यालयांत प्रवेश १८८२; बी. एस्. सी. १८८५; डी. एस्. सी. १८८७; होप प्राइझ स्कॉलरशिप (रसायनशास्त्र) १८८७ ते १८८८. कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत रसायन शास्त्राचे प्रोफेसर १८८९ ते १९०४; बंगाल सरकारनें जगांतील रसायन संशोधन–मंदिरें पाहण्यास पाठविलें १९०४; यांचे बरेचसे शोध पाऱ्यासंबंधीं क्षारांचेच आहेत. १८९५ त मर्क्यूरस नायट्राइटचा महत्त्वाचा शोध लावला; बंगाल केमिकल आणि फार्मास्युटिकल वर्क्सचे संस्थापक व चालक, १९१७ अ. भा. सामाजिक परिषदेचे अध्यक्ष; ऑल इंडिया केमिकल सर्व्हिस कमिशनचे सभासद; हजारों रुपये शिक्षणसंस्थांना दिले असून आपल्या सर्व मिळकतीचा ट्रस्ट करून खादीकार्याला दिला आहे. हल्लीं ते स्वतंत्र व संन्यस्तवृत्तीनें राहतात. ग्रंथकर्तृत्व–बंडापूर्वीचें हिंदुस्थान, प्रेसिडेन्सी कॉलेजमधील रसायन संशोधन, हिंदूचा इतिहास, व रसायन शास्त्रांतील शोधांसंबंधीं शंभरांवर लेख. पत्ता:–बंगाल केमिकल आणि फार्मास्युटिकल वर्क्स, कलकत्ता.

रीड सर स्टॅन्ले:––जन्म–ब्रिस्टल १८७२; केटी.; के. बी. ई., एल्. एल्. डी. (ग्लासगो); "टाइम्स ऑफ इंडिया" च्या संपादक मंडळांत प्रवेश १८९७; हिंदुस्थानच्या दुष्काळी जिल्हयांतील "टाइम्स ऑफ इंडिया" व "डेली क्रॉनिकल"यांचे खास बातमीदार १९००; प्रिन्स व प्रिन्सेस ऑफ वेल्स यांच्या हिंदुस्थानांतील दौऱ्याचे (१९०५–६) खास बातमीदार; तसेंच "आर्मीज व्हिजिट टु इंडिया" १९०७ व "पर्शियन

गल्फ" १९०७चे खास बातमीदार; "किंग एडवर्ड व लॉर्ड हार्डिज स्मारकाचे" मुंबई इलाख्यापुरते ऑनररी सहकारी चिटणीस; बॉंबे लाइट हॉर्सचे माजी लेफ्टेनंट कर्नल; १९०९ सालच्या "इम्पीरिअल प्रेस कॉन्फरन्सला" पश्चिम हिंदुस्थानचे प्रतिनिधि .

रूझवेल्ट फरॅंकलिनः—अमेरिकेचे अध्यक्षः जन्म सन १८८२; शिक्षण १९०४ हारवर्ड युनिव्हर्सिटीचे पदवीधर; १९०७ बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण व न्यूयॉर्क शहरीं वकिलीस सुरुवात. १९१३ पासून आठ वर्षेपर्यंत ते नाविक खात्याचे असिस्टंट सेक्रेटरी होते. नाविक शास्त्र, आरमारी युद्धशास्त्र व तत्संबंधीं कायदा या विषयांचा त्यांचा उत्कृष्ट अभ्यास आहे. हे डेमोक्रॅटिक पक्षाचे असून मद्यपानबंदी व युद्धकर्ज माफी यांच्या विरुद्ध आहेत. १९३२ च्या नोव्हेंबरांत हे अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे अध्यक्ष निवडले गेले.

लठ्ठे, दिवाण बहादूर, अण्णा बाबाजी एम्. ए. एलएल्. बी.; मुंबई; जन्म—१८७८; शिक्षण—डेक्कन कॉलेज पुणें; कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत इंग्रजीचे अध्यापक १९०७—११; सदर्न मराठा जैन असोसिएशन व कर्नाटक नॉन—ब्रॅह्मिन लीग यांचे अध्यक्ष; हिंदी विधिमंडळाचे सभासद १९२१—२३; युनिव्हर्सिटी रिफॉर्म कमिटीचे सभासद १९२४; कोल्हापूरचे दिवाण १९२६—३०; ग्रंथ—Introduction to jainism; हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याची वाढ; "शाहू छत्रपति" व "श्रीशाहू छत्रपतीचें चरित्र" (१९२५). पत्ता—कोल्हापूर.

लॅन्सबरी जॉर्जः—जन्म—१८५९; ब्रिटिश मुत्सद्दी; यांनीं १८८४ त आस्ट्रेलियास प्रयाण केलें. १८८५ त इंग्लंडला परत आल्यानंतर ते राजकीय पुढारी बनले. १९१०—१९१२ मध्यें ते पार्लमेंटांत निवडून आले. १९१४—१९२२ पर्यंत ते 'डेली हेरल्ड' पत्राचे संपादक होते. १९२२त पुन्हां पार्लमेंटांत निवडून आले. १९२९ च्या मजूर सरकारांत त्यांना First Commissioner of works नेमण्यांत आलें.

लवाटे शंकर गणेशः—जन्म सन १८७० कोल्हार (जि. अहमदनगर). पुणें न्यू इंग्लिश स्कूल मधून १८९० सालीं मॅट्रिक पास झाले. पुढें न्यू. इं. स्कूलमध्येंच शिक्षक; १८९२ ते १९०५ प्रिपेरेटरी क्लासेस चालविले. १९०४ ते १९०५ केसरीच्या संपादक मंडळांत प्रवेश. १९०६ ते १९१६ पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस व मद्यपान निषेध प्रचारक. १९०८ सालीं बी. ए. झाले. १९१० ते २० पर्यंत पुणें विद्यार्थी गृह चालविलें. १९१५ ते १९२६ पुणें शहर म्युनिसिपालिटीचे सभासद. दोन वेळां चेअरमन व एक वेळ व्हाईस प्रेसिडेंट. १९२० ते २३ लोकसंग्रह वर्तमानपत्रांत संपादक म्हणून काम केलें व अखेर मुख्य संपादक. १९२६ ते २९ शंकराचार्य मठ संकेश्वर यांचे सर्वाधिकारी व नंतर कारभारी. यांनीं मद्यपाननिषेधाची जंगी मोहीम कांहीं वर्षें चालविली होती. सडकेच्या कडेला उभे राहून मद्यपाननिषेधपर पद्यें म्हणणें, पिकेटिंग करणें, इत्यादि चळवळी केल्या. हल्लीं गीतेचा अभ्यास करतात. पत्ताः—२९०शनवार पेठ पुणें.

लल्लूभाई सामळदास सर; के. टी. (१९२६); जे. पी.; सी. आय. ई. (१९१४) जन्म—आक्टोबर १८६३; शिक्षण—भावनगर हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेज. हिज हायनेस दि महाराजा ऑफ भावनगर यांचे दुय्यम चिटणीस व रेव्हिन्यू कमिशनर, भावनगर; १८९९मध्यें नौकरीचा राजिनामा; व्यापारी संस्था व बॅंका यांमधून डायरेक्टर; मुंबई कायदेमंडळांत १९१०, १९१३ व१९१६ सालीं सरकारनियुक्त सभासद; अखिल भारतीय औद्योगिक परिषदेचे अध्यक्ष कराची १९१३; म्हैसूर सरकारी परिषदेचे अध्यक्ष १९१५; विश्वविद्यालयाच्या सीनेटमध्यें सभासद १९१७—१८; १९१८—२२ सालीं इंडियन मर्चंटस चेंबर व ब्यूरो यांचे अध्यक्ष; कौंसिल ऑफ स्टेटकरितां निवडणूक १९२०; इंडियन मर्कंटाइल मरीन कमिटीचे सभासद १९२३—२४; बनारस हिंदी आर्थिक परिषदेचे अध्यक्ष १९२५; मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळांत तात्पुरते मंत्री १९२५; मद्रास, बिहार आणि ओरिसा व संयुक्त प्रांत सहकारी परिषदांचे अध्यक्ष १९२६, १९२८, १९२९. पत्ता— अंधेरी व्हाया बी. बी. अँड सी. आय. रेल्वे.

लॉईड जॉर्जः—(जन्म—१८६३) ब्रिटिश मुत्सद्दी; १८८४ सालीं यांनीं वकिली सुरू केली. इ.स. १८९० त कार्नर व्हाइस परगण्यातर्फे हे पार्लमेंटमध्यें निवडून आले. तेथें त्यांच्या वादविवादांतील कौशल्य प्रगट झालें. ट्रान्सवाल व ऑरेंज फ्री स्टेट येथील बोअर लोकांच्या बाबतींत अन्याय

होत आहे हें पाहून त्यांनीं दक्षिण आफ्रिका-युद्धांत त्यांची बाजू उचलली; व चेंबरलेन ज्या परगण्यातर्फे निवडून आले त्या परगण्यांत बर्मिंगहॅम येथें भरलेल्या युद्धाविरुद्ध असलेल्यांच्या सभेंत भाषण केलें. १९०५ च्या डिसेंबरांत सर कँबेल-बॅनरमन यांनीं जेव्हां हुजूर प्रधानमंडळ स्थापिलें त्या वेळीं यांना व्यापारी मंडळाचे अध्यक्ष करण्यांत आलें. १९०८ –१९१५ पर्यंत ते फडणवीस होते. यानंतरचे कायद्यासंबंधींची त्यांनीं केलेली मुख्य गोष्ट म्हणजे 'नॅशनल इन्शुअरन्स ॲक्ट' ही होय. नंतर महायुद्धाचे वेळीं पैसा पुरविण्यासंबंधीच्या यांच्या योजना सुरू झाल्या; १९१५त हें काम दुसऱ्यावर सोपवून त्यांनीं आपलें लक्ष सैन्य व दारू यांचा पुरवठा करण्याकडे लावलें. यावेळीं व पुढेंही त्यांनीं फार अमोलिक कामगिरी केली.व १९१६च्या अखेरीस ते मुख्य प्रधान बनले. १९१८सालीं लॉइड जॉर्ज व त्यांचें प्रधानमंडळ यांची निवडणुकींत सरशी झाली व शांतता परिषदेंत युरोपचें भवितव्य ठरविण्याबद्दल थोडासा अंश यांच्याकडे आला. शांतता पत्रकावर सही केल्यानंतर १९१९त त्यांना Order of Merit ची पदवी मिळाली; व १९२०–२२ त भरलेल्या दोस्त राष्ट्रांच्या परिषदेंतील प्रमुख लोकांपैकीं हे एक होते. यांनीं १९२२ ऑक्टोबरमध्यें मुख्य प्रधानाच्या जागेचा राजीनामा दिला.व 'नॅशनल लिबरल्स' या नांवाचा स्वतःचा पक्ष ॲक्विस्वथच्या अनुयायांत १९२३ त मिसळून टाकला. लिबरल पक्षांत फाटाफूट होऊन ते सध्यां एका लहानशा पक्षाचेच नायक राहिले आहेत.

लॉज सर ऑलिव्हरः—(जन्म–१८५१) ब्रिटिश शास्त्रज्ञ; यांना १८७९ त लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजांत गणिताचे दुय्यम अध्यापक नेमण्यांत आलें. १८८०–१९०० पर्यंत लिव्हरपूरच्या युनिव्हर्सिटी कॉलेजांत ते पदार्थविज्ञानाचे अध्यापक होते. व १९००–१९२० पर्यंत बर्मिंगहॅम युनिव्हर्सिटीचे ते प्रिन्सिपाल होते. १९१३ त ते ब्रिटिश ॲसोसिएशनचे अध्यक्ष होते. १९०२ त त्यांना 'नाईट' ही पदवी मिळाली. त्यांना मिळालेल्या अनेक पदव्यांत F. R. S. ही एक आहे. ईथरचें स्वरूप ओळखणें व बिनतारी तारायंत्र ही सर ऑलिव्हर लॉज यांची महत्वाची कामगिरी होय. त्यांनीं अनेक शास्त्रीय विषयांवर पुस्तकें लिहिलीं आहेत.

यांनीं पदार्थविज्ञानासंबंधींच्या संशोधनावर बराच यत्न खर्च केला. ते १९०१–१९०४ पर्यंत रॉयल सोसायटीचे अध्यक्ष होते.परलोक व परलोकयोनि यांविषयीं यांचे जे अस्तिपक्षी विचार आहेत ते लोकांत प्रसिद्ध आहेत.

लॉरेन्सः—(जन्म–१८८८) याचें शिक्षण ऑक्सफर्ड येथील जीझस कॉलेजांत झालें; तेथें त्यानें पौर्वात्य भाषांत प्रावीण्य संपादिलें; त्यानें अरेबिया , सीरिया, मेसापोटेमिया या देशांत कांहीं वर्षें घालविलीं व तेथील भाषा पूर्णपणें अवगत करून घेतल्या; व पुराण वस्तूंची पाहणी केली. मुसलमानांत गुप्त हेराचें काम यानें अनेकदां केलें आहे. १९१६–१८ त तुर्कस्थानच्या लोकांविरुद्ध उठण्यास त्यानें अरबांस चिथावणी दिली व पुढें अरबी व्यवहारासंबंधींचा तो सल्लागार होता. त्यानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. अफगाणिस्थानचे अमीर अमानुल्ला यांच्याविरुद्ध कटकटी उत्पन्न करण्यांत हाच पुढारी होता.

वरेरकर भार्गवराम विठ्ठलः—कादंबरीकार व नाटककार; जन्म–१८८३ चिपळूण; प्राथमिक मराठी व इंग्रजी शिक्षण मालवण येथें; कांहीं दिवस दापोली व रत्नागिरी येथें इंग्रजी शिक्षण; १८९९ पोष्टखात्यांत थोडे दिवस नोकरी; ग्रंथ–पहिलें नाटक 'कुंजविहारी' १९०७ सालीं खामगांव येथें रंगभूमीवर आलें; १९१६ 'हाच मुलाचा बाप', १९१९ 'संन्याशाचा संसार'; १९२२ 'सत्तेचे गुलाम'; पहिलें लघुनाटक 'तुरुंगाच्या दारांत' १९२३; १९३२ 'सोन्याचा कळस'; 'पापी पुण्य', 'नवाखेळ', 'करग्रहण' वगैरे लघुनाटकें; 'चिमणी' 'विधवाकुमारी' (गतभर्तृका या टोपणनांवानें), 'धांवता धोटा' १९३०, 'गोदूगोखले' १९३२ या चार कादंबऱ्या; स्वैरसंचार (लघुकथा संग्रह) १९३२ पत्ताः–८२, तुळशी बिल्डिंग, खेतवाडी, मुंबई.

वाछा सर दिनशा एदलजी.जन्म–२ ऑगस्ट १८४४; १८६० मध्यें लग्न झालें. १८८८ पासून विधुर. के. टी.; जे. पी. इम्पिरिअल बँक ऑफ इंडियाचे एक गव्हर्नर (१९२०); मुंबई कायदे मंडळाचे सभासद (१९१५–१६); इंपीरिअल लेजिस्लेटिव्ह कौंसिलचे सभासद १९१६–२०; कौंसिल ऑफ स्टेटचे सभासद; "मेसर्स मोरारजी गोकुळदास अँड कंपनीचे" सभासद; "मोरारजी गोकुळदास एस् अँड डब्ल्यू कंपनी लिमिटेड" व "सोलापूर एस्. अँड डब्ल्यू कंपनी लिमिटेड" यांचे दलाल; सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे माजी डायरेक्टर; "बेरार कंपनी"चे डायरेक्टर (१९२८); "शिंद्या नॅव्हि-

गेशन कंपनी"चे डायरेक्टर; शिक्षण–एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई ; १८७४ पासून कापसाचे व्यापारी; मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे सुमारें ३० वर्षे सभासद व अध्यक्ष (१९०१–०२); १८८९ पासून ४१ वर्षें "बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन कमिटी"चे सभासद व अध्यक्ष १९१७; १८९८ मध्यें "बॉम्बे इंपीरिअल ट्रस्ट" स्थापन झाल्यापासून तों १९१९ पर्यंत त्याचे सभासद; कलकत्त्याच्या १७ व्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष १९०१; बेळगांव प्रान्तिक काँग्रेसचे अध्यक्ष १८९४; १८९७ मधील "रॉयल कमिशन ऑफ इंडियन एक्स्पेंडिचर" पुढें साक्ष दिली; एल्फिन्स्टन कॉलेजचे पंच; डियन मर्चंट्स चेंबर व ब्यूरो यांचे माजी चेअरमन; १८९४ पासून १८ वर्षें हिंदी राष्ट्रीय सभेचे सर्वसाधारण चिटणीस; व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटचे १९०२ सालापासून पंच व ऑनररी चिटणीस (१९०९–२३); वेस्टर्न इंडिया लिबरल असोसिएशनचे अध्यक्ष १९१९–२७; बॉम्बे प्रेसिडेंसी असोसिएशनचे चिटणीस १८८५ ते१९१५ व अध्यक्ष १९१५–१८; पहिल्या मुंबई इलाखा प्रागतिक परिषदेचे अध्यक्ष १९२२; १९१७ पासून "पीपल्स फ्री रीडींग रूम व लायब्ररी"चे चेअरमन व पंच; ग्रंथ–हिंदी वसूल, चलन, अर्थशास्त्र, हिंदुस्थानच्या शेतीची स्थिति, रेल्वे, लष्करी खर्च, इत्यादि विषयांवर शेंकडो लेख लिहिले आहेत. पूर्वी सुमारें ४५ वर्षें प्रसिद्ध वर्तमानपत्रांतून व मासिकांतून लिहीत असत. Life of Premchand Roychand, Life of J. N. Tata, the Rise and Growth of Bombay–Muni. Govt. पत्ता–जिजी हाऊस, रॅव्हेलिन स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

वाजपेई गिरजा शंकर–जन्म–३ एप्रिल १८९१; बी.ए. (ऑक्सफर्ड); आय्.सी.एस्. हिंदुस्थान सरकारच्या शिक्षण, आरोग्य व जमीन या खात्यांमध्यें डेप्युटी सेक्रेटरी; शिक्षण–मूर मध्यवर्ति विद्यापीठ अलाहाबाद आणि मर्टन विद्यापीठ ऑक्सफर्ड; १९१५–१९१९ दुय्यम न्यायाधीश व कलेक्टर संयुक्त प्रांत; १९२०–२१ मध्यें संयुक्त प्रांत सरकारचे अंडर सेक्रेटरी; १९२१ मध्यें दी राइट ऑनरेबल व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्री यांचे खाजगी सेक्रेटरी व इंपीरिअल् कॉन्फरन्समध्यें हिंदुस्थानचे सेक्रेटरी; १९२१–२२ च्या वाशिंग्टनच्या शस्त्रनियामक कॉन्फरन्सला हजर; कानडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यू झीलंड या वसाहतींमधील हिंदी रहिवाशांच्या परिस्थितीची चौकशी करण्याकरितां त्या त्या वसाहतींत गेलेल्या शिष्टमंडळावर नेमणूक १९२२; सन १९२३ मध्यें हिंदुस्थान सरकारचे शिक्षण, आरोग्य व जमीन या खात्यांमधील अंडर सेक्रेटरी; १९२४ मध्यें हिंदुस्थान सरकारच्या शिक्षण, जमीन व आरोग्य या खात्यांमध्यें तात्पुरते डेप्युटी सेक्रेटरी. सन १९२५–२६ मध्यें दक्षिण आफ्रिकेला गेलेल्या हिंदी शिष्ट मंडळाचे सेक्रेटरी; जून १९२६ मध्यें हिंदुस्थान सरकारचे डेप्युटी सेक्रेटरी. पत्ता–पेटलँड सिमला.

वालचंद हिराचंद–हिंदु (जैन) जन्म सन १८८२, सोलापूर. शिक्षण–बी. ए. पर्यंत; सन १९०७ पासून २४–२५ वर्षें रेल्वे, मिलिटरी तसेंच ईतर मोठमोठ्या कामाचे कॉन्ट्रॅक्टर्स, आणि सन १९२३ पासून आधुनिक पद्धतीच्या १८०० एकर शेतीचे मालक; चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर वगैरे (१) शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लि. १९१९ पासून डायरेक्टर, १९२९ पासून चेअरमन. (२) ओरिएन्टल ग. सि. लाइफ अशुरन्स कं. लि. (३) ओखा सॉल्ट वर्क्स लि. (४) ओखा सीमेंट लि. वगैरेचे डायरेक्टर. (५) टाटा कन्स्ट्रक्शन कं. लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर सन १९२० पासून; प्रेसिडेंट वगैरे.–(१) इंडियन नॅशनल कमिटी ऑफ इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स (सन १९३१). (२) फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री (१९३२) (३) इंडियन मर्चंट्स् चेंबर मुंबई (सन१९२७). (४) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई (सन १९२७ ते सन १९३२). (५) लेबर कॉन्फरन्स जिनेव्हा, सन १९३१ मध्यें हिंदुस्थान सरकारमार्फत भांडवलवाल्यांचे प्रतिनिधि. (६) व्हाइस प्रेसिडेंट, इंटर नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स (सन १९३२) पत्ता ऑफिस––फिनिक्स बिल्डिंग, बॅलर्ड एस्टेट, फोर्ट, मुंबई.

विजय राघवाचार्य दिवाण बहादुर सर, टी. के. बी. इ. (१९२६). १९२९पासून "इम्पीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च" चे व्हाइस चेअरमन. जन्म ऑगस्ट १८७५. शिक्षण–प्रेसिडेन्सी कॉलेज मद्रास. प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिसमध्यें शिरले १८९८. मद्रास कॉर्पोरेशनचे रेव्हिन्यू ऑफिसर १९१२–१७. "बोर्ड ऑफ रेव्हिन्यू"चे चिटणीस १९१७–१८. लँड रेकॉर्ड्सचे डिरेक्टर १९१८. उद्योगधंद्याचे डेप्युटी डिरेक्टर

१९१८–१९. कोचीनचे दिवाण १९१९–२२. कलेक्टर व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट १९२०; ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शनामध्यें हिंदुस्थानतर्फे कमिशनर १९२२–२५; विधिमंडळाचे सभासद १९२५–२६ उद्योगधंद्याचे डिरेक्टर १९२६; डिरेक्टर ऑफ फिशरीज १९२६; कानडाचें राष्ट्रीय प्रदर्शन उघडलें, ऑगस्ट १९२६; "पब्लिक सर्व्हिस कमिशनचे" सभासद, १९२६–१९२९.

विद्वांस धोंडो वासुदेव ऊर्फ बाबासाहेबः– जन्म शके १८८९ केळशी (जि. रत्नागिरी); शिक्षण– सन १८८२ सालीं शिक्षणाकरितां त्यांचे मामा कै. लो. टिळक यांचेकडे पुण्यास आगमन; १८९० मॅट्रिक; १८९७ केसरी–मराठा संस्थेचे मॅनेजर; सन १९२० सालीं केसरी–मराठा ट्रस्टचे हे एक ट्रस्ट नेमले गेले. तेव्हांपासून ट्रस्टी व मॅनेजर या नात्यानें ते संस्थेचें काम पहात आहेत. पत्ताः–केसरी कचेरी, पुणें २.

विलिंग्डन लॉर्ड (जन्म १८६६); हुजूर पक्षातर्फे हेस्टिंग्जतर्फे पार्लमेंटांतील सभासद. १९१३ ते १९१९पर्यंत ते मुंबईचे गव्हर्नर होते. १९१९ ते १९२४ पर्यंत मद्रास प्रांताचे गव्हर्नर होते. १९१० त त्यांना 'बॅरन'करण्यांत आलें. व १९२४ त 'व्हायकाऊंट' बनविण्यांत आलें. १९२६त ते कॅनडाचे गव्हर्नर जनरल झाले. व १९३१त हिंदुस्थानचे व्हाइसरॉय बनले.

विश्वेश्वरय्या सर मोक्षगुण्डम्. के. सी. आय्. ई.; डी. एस्. सी.; एम्. आय. सी. ई.; ह्मसूरचे माजी दिवाण. जन्म १५ सेप्टेंबर १८६१. शिक्षण–सेंट्रल कॉलेज बॅंगलोर व सायन्स कॉलेज पुणें. मुंबईच्या पब्लिक वर्क्स खात्याचे दुय्यम एंजिनियर १८८४.सुपरिंटेंडिंग एंजिनियर १९०४; मुंबई सरकारची नोकरी सोडली १९०८. हैदराबाद (द.) सरकारनें खास सल्लागार एंजिनियर म्हणून नेमणूक केली १९०९; ह्मसूर सरकारचे मुख्य एंजिनियर म्हणून व सार्वजनिक कामें व रेलवे या खात्याचे चिटणीस १९०९; ह्मसूर सरकारचे दिवाण १९१२–१८; मुंबई सरकारनें नेमिलेल्या "बॉम्बे टेक्निकल अॅन्ड इंडस्ट्रियल एज्युकेशन कमिटी"चे चेअरमन १९२१–२२; दिल्लीच्या "न्यू कॅपिटल एन्क्वायरी कमिटी"चे सभासद, १९२२; मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे काटकसर–सल्लागार १९२४; हिंदुस्थान सरकारनें नेमिलेल्या "इण्डियन एकॉनॉमिक एनक्वायरी कमिटी"चे चेअरमन १९२५. हिंदुस्थान सरकारनें नेमिलेल्या "बाम्बे बॅंक बे इन्क्वायरी कमिटीचे" सभासद १९२६.जगासभोवार सफर काढली. (१९१९–२०) व आणखी शेंकडों मैल प्रवास केला. पत्ता –अप् लॅंड्स्, हाय ग्राउण्ड, बंगलोर.

वेलकर डॉ. मोतीराम बाळकृष्ण–– जन्म–मुंबई, पाठारे प्रभु. शिक्षण– एल्. एम्. अॅन्ड एस्. (मुंबई). मुंबई कॉर्पोरेशनचे गेलीं १२ वर्षे सभासद. १९२३–२६ मुंबई स्वराज्य पक्षातर्फे मुंबई कायदे कौंसिलचे सभासद; मुंबई स्वराज्य पक्षाचे उपाध्यक्ष; हिन्दी-स्वराज्य-संघ व हिंदी मजूर-संघ यातर्फे लोकमान्य टिळकांच्या बरोबर १९१९ सालीं मांटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांबाबत विलायतेस गेलेल्या डेप्युटेशनवर सभासद. कांग्रेस वर्किंग कमिटीनें १९३० सालच्या सत्याग्रह चळवळीच्या वेळीं नेमलेल्या विसापूर जेल इन्क्वायरी कमिटीचे सभासद, चिरनेर गोळीबार चौकशी कमिटीचे सभासद; १९१७ इंडियन नॅशनल कांग्रेसच्या जादा अधिवेशनाचे चिटणीस. ऑल इंडिया कांग्रेस कमिटीचे महाराष्ट्रातर्फे कांहीं वर्षे सभासद. १९२०–२६, मुंबई प्रांतिक कांग्रेस कमिटीचे चिटणीस; मुंबई प्रांतिक हिंदुमहासभेचे अध्यक्ष. (गिरगांव शाखा); १९३०–३१ अध्यक्ष–डेक्कन मर्चंट्स क्रेडिट सोसायटी अॅन्ड बॅंक; यंग मेन्स एज्युकेशन सोसायटीच्या रात्रीच्या शाळेचे आणि मोफत वाचनालयाचे अध्यक्ष; त्याच संस्थेच्या बालचमु पथकाचे ऑ. कमिशनर; प्रोग्रेसिव्ह व्हॉलन्टियर कोअरचे अध्यक्ष. पत्ता–– ३७२ ठाकुरद्वार, मुंबई नं. २

वेल्स एच्. जी.:––जन्म–१८८६; ब्रिटिश कादंबरीकार; १८८८त लंडन युनिव्हर्सिटींतील प्राणिशास्त्राची डिग्री यांनीं मिळविली; शास्त्रीय प्रगति कोणकोणत्या टप्यांनीं जाईल हें अजमावण्याची बुद्धि यांजजवळ दिसून येते. त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून मध्यम वर्गांतील लोकांच्या मनाचें सूक्ष्म पृथःकरण केलें आहे. त्यांच्या कांहीं पुस्तकांत भविष्य कालासंबंधीचे अंदाज व तत्वज्ञान आढळून येतें. समाजशास्त्राचाही त्यांनीं अभ्यास केला आहे. व तद्विषयक त्यांचें वाङमय प्रसिद्ध आहे.

वैद्य काशिनाथ सिताराम–जन्म–१८९०, सातारें (औरंगाबाद). शिक्षण–एम्. ए. एल् एल्. बी. (मुंबई). १९१७ पासून हैद्राबाद हायकोर्ट व सिकंदराबाद येथील इंग्रजी कोर्ट या दोनही ठिकाणीं वकिली. १९३० हैद्राबाद हायकोर्टानें यांना अॅडव्होकेट केलें. सेक्रेटरी– 'विवेकानंद–वर्धिनी–संस्था' व 'अनाथ–विद्यार्थी-

गृह'. संस्थान हैद्राबाद येथें भरलेल्या निरनिराळ्या संमेलनांच्या अधिकारी मंडळाचे सभासद. पत्ता:– १३०७, रेसिडेन्सी बझार; हैद्राबाद–दक्षिण.

वैद्य चिंतामण विनायक:–जन्म–सन १८६१ कल्याण येथें. शिक्षण एल्फिन्स्टन हायस्कूल व कॉलेज, मुंबई. बी. ए., १८८०; एम्. ए. १८८२, एल्. एल्. बी. १८८४. कांहीं काळ पुण्यास वकीली. उज्जनी येथें प्रान्तजज्, १८८७. चीफ जस्टिस ग्वाल्हेर संस्थान, १८९६–१९०५. नंतर बरींच वर्षे लो. टिळकांबरोबर कॉंग्रेसचें कार्य व ग्रंथलेखन. ग्रंथ–इंग्रजी: Riddle of the Ramayan, History of Mediaeval Hindu India, History of Sanskrit Literature, Vedic Period etc. मराठी: श्रीरामचरित्र, श्रीकृष्ण-चरित्र, दुर्दैवी रंगू, मध्ययुगीन भारत, हिंदु-धर्माचीं तत्त्वें, महाभारताचा उपसंहार, शेंकडों ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक, वाङ्मयात्मक निबंध. सध्यां रा. यंदे यांच्या महाभारत ग्रंथाचें संपादन.

वैद्य रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादा-साहेब:–जन्म–१८५९, केरी, महालफोंडा (गोंवा). शिक्षण–मराठी व संस्कृत भाषा, आयुर्वेदीय ग्रंथपठण, मराठी भाषेंतून पाश्चात्य वैद्यकाची ठोकळ माहिती. धंदा–वैद्यकी, प्रसिद्ध आयुर्वेद–विशारद. पणजी येथें 'हिंदु फार्मसी' व तिची मडगांव येथें एक शाखा आणि 'आयुर्वेदिक-रसशाळा' फोंडा, या यांच्या मालकीच्या आहेत. 'पथ्यबोध' व 'प्राचीभाषा' या मराठी मासिकांचे संपादक व चालक होते. 'लूज दु आर्येंत' हें पोर्तुगीज मासिक लिहवून घेऊन ५।७वर्षें चालविलें. गोमांतकीय हिंदूंच्या व विशेषत: कऱ्हाड्यांतर्गत 'पद्ये' या स्वज्ञातीच्या उत्कर्षाबद्दल कित्येक उद्योग आरंभिले. 'आल्मैद' विद्यालय चालविलें. या विद्यालयास इमारत मोफत दिली व वार्षिक हप्त्यानें देणगी दिली. ग्रंथकर्तृत्व–'स्थूलतनुवर्णन' (८०० आर्या) व 'काव्यतरंगिणी' पत्ता: श्री. दुर्गाभुवन, हवेली, फोंडें–गोंवा.

व्यास नारायण गणेश– जन्म: १९०२, कोल्हापूर. १९१३–२२ पं. विष्णु दिगंबर पलुसकर यांचेजवळ गायन–वादन व नृत्यशिक्षण; १९२३ पासून जलसे करण्यास सुरवात; १९२४ जालंदर येथें पहिला मान. १९२७ मुंबईस आगमन. १९२९ ग्रामोफोन रेकॉर्ड्स्. १९३१ दूरदूर प्रान्तांचीं आमंत्रणें; अलाहाबाद व कानपूर संगीत परिषदेंत श्रेष्ठ प्रतीचा गौरव, ग्रामोफोन कंपनीकडून पहिलें सुवर्ण–पदक. हिंदी संगीताचे प्रोफेसर. पत्ता: सरदार गृह, मुंबई.

शर्मा राघवेंद्रराव:––जन्म १८८५ तालुका चिचोली, जिल्हा गुलवर्गा (हैद्राबाद संस्थान) ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. हैद्राबाद येथें हायकोर्ट वकिलीचा धंदा करीत असत. १९०६ पासून सामाजिक व राजकीय कामांत भाग घेण्यास सुरवात. हैद्राबाद येथील 'राजकीय व सामाजिक सुधारणा संघ' स्थापना; सभा, परिषदा इ० प्रकरणांत प्रमुख भाग घेतला. हैद्राबाद संस्थानच्या राजकीय सुधारणेबद्दल भाषणें व लेख लिहून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न; ऑर्डिनन्समुळें १९२३ मध्यें कोकोनाडा येथील कॉंग्रेसच्या वेळीं पहिली हैद्राबाद सं. प्रजा परिषद भरविली. ह्या चळवळी निजाम सरकारास न आवडल्यामुळें चौकशी न करतां १९२३ सालीं सनद रद्द केली. गुन्हा काय झाला तेंही कळविलें नाहीं. १९२४ पासून पुण्यास आले. तेव्हांपासून देशबांधवांची सेवा हा एकच उद्योग. हैद्राबाद सं. प्रजापरिषद स्थापून तिचीं तीन अधिवेशनें भरविलीं. १९२८ सालीं 'हैद्राबाद व देशी संस्थानें', हें संस्थानी चळवळी-बाबत पहिलेंच पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें. १९३० अध्यक्ष–पंजाब संस्थान प्रजा–परिषद, लुधियाना. पत्ता:–वैदिकाश्रम, फर्ग्युसन कॉ. रोड, पुणें ४.

शॉ जॉर्ज बर्नार्ड:–फेबियन सोशॅलिस्ट' नाटककार, कादंबरीकार, अर्थशास्त्रज्ञ, आणि संगीत चित्रकला आणि नाट्यशास्त्र यांतील तज्ज्ञ टीकाकार, आयरिश. वरवर पहातां याच्या भाषणांत आणि लेखनांत विरोधाचा आभास होतो. वादविवादपटु Humanitarian; लंडन इतकीच याचीं नाटकें युरोप आणि अमेरिका यांत प्रसिद्ध आहेत. १९२६ नोव्हेंबरमध्यें नोबेल पारितोषक मिळालें.

शारदा हरविलास:––रावसाहेब, एफ्. आर्. एस्. एल्; एम्. आर्. एस्; एफ्. एस्. एस्; ले. असेंब्लीचे सभासद; जन्म–३जून १८६७; शिक्षण–अजमीर सरकारी कॉलेज व आग्रा कॉलेज; अजमीरच्या सरकारी कॉलेजांत शिक्षक असतांना न्यायखात्याकडे बदली १८९२; एच्. एच्. दी महाराजा ऑफ् जेसलमीर यांचे शिक्षक १८९४; ॲडिशनल डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज म्हणून नेमणूक व डिसेंबर १९२३ मध्यें सेवानिवृत्ति; जोधपूरच्या मुख्य कोर्टाचे न्याया-

धीश; अजमीर–मेवाडा विभागातर्फे ले. असेंब्ली-मध्यें पुन्हां निवडणूक १९२७ व पुन्हां सेप्टेंबर १९३०; रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ् ग्रेट ब्रिटन् व आयर्लंड या संस्थेचे निवडलेले सभासद; रॉयल् स्टॅटिस्टिकल् सोसायटीज ऑफ् लंडन; स्टॅटिस्टिकल् असोसिएशन ऑफ् बोस्टन यू. एस्.ए. रॉयल् सोसायटी ऑफ् लिटरेचर; व टीचर्स गिल्ड ऑफ् ग्रेट ब्रिटन् अँड आयर्लंड यांचे निवडलेले सभासद; हिंदुस्थानच्या परोपकारिणी सभेचे सेक्रेटरी; ग्रंथ––Hindu Superiority; Ajmer Historical and Descriptive; Maharana Sanga; Maharana Kumblia; Maharaja Hammir of Ranthanbhor; Prithviraj Vijaya. पत्ता–सिव्हिल् लाइन्स, अजमीर राजपुताना.

शास्त्री दी राइट ऑनरेबल व्ही.एस्. श्रीनिवास पी. सी. (१९२१); सी. एच्. (१९३०). जन्म २२ सेप्टेंबर १८६९. शिक्षण–कुंभकोणम्. शाळामास्तर म्हणून आयुष्याला आरंभ. १९०७ मध्यें सर्व्हंट्स् ऑफ् इण्डिया सोसायटीमध्यें प्रवेश. १९१५ सालापासून कै. गोखल्यांच्या जागीं सोसायटीचे अध्यक्ष. मद्रास कायदे-मण्डळाचे सभासद १९१३–१६; मद्रास इलाख्यांतून इम्पीरियल लेजि० कौन्सिलकरितां निवड १९१६–२०. १९१८ सालीं मिस्टर मँटेग्यू यांच्या हिंदुस्थानांतील दौऱ्यांत त्यांचे सहकारी. साउथ्बरो कमिटीचे सभासद. १९१९ सालीं "जॉइंट पार्लमेण्टरी कमिटी ऑन् इण्डियन् रिफॉर्म बिल्" च्या पुढें साक्ष दिली. हिंदी रेल्वे कमिटीवर काम केलें. इम्पीरिअल् कॉन्फरन्समध्यें हिंदुस्थानचे प्रतिनिधि १९२१; त्याच वर्षी जिनेव्हा व वॉशिंग्टन येथें राष्ट्रसंघाच्या आरमार परिषदेला हजर. प्रीव्ही कौन्सिलमध्यें नेमणूक करून लंडनच्या नागरिकत्वाचे हक्क दिले १९२१. हिं. सरकारचे प्रतिनिधि म्हणून वसाहतीमध्यें सफर काढिली, १९२२. कौन्सिल ऑफ् स्टेटचे लोकनियुक्त सभासद, १९२१. "हिंदी नागरिकांचे हक्क व कर्तव्यें" यावर कलकत्ता विश्वविद्यालयामध्यें "कमला" व्याख्यानें दिलीं. दक्षिण आफ्रिकेमधील हाय् कमिशनर फॉर इण्डिया १९२७–२९. 'रॉयल् कमिशन् ऑन् लेबर'चे सभासद १९२९; रा. टे. कॉं. चे सभासद. पत्ता–सर्व्हण्ट्स् ऑफ् इंडिया सोसायटी, मुंबई अगर पुणें.

शिखरे बाळकृष्ण विठ्ठल:–जन्म १८९० तासगांव (जि. सातारा); शिक्षण इंग्रजी सात इयत्तेपर्यंत; १९०५ पासून स्वदेशी व सार्वजनिक कार्य; १९१६–१७ स्वराज्य संघाचे सभासद वाढविण्याचें कार्य; श्रीशिवजयंत्युत्सव, १९१८–१९,मिरजेस श्रीराघवेंद्रस्वामींच्या पुण्यतिथि उत्सवास नवीन स्वरूप दिलें. १९२१–२२ लो. टिळक सप्ताह; राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्याचा प्रचार. १९२२–२३, मिरजेंतील पाणी-पुरवठा वाढविण्याकरितां चळवळ; प्रजापरिषदेस सुरवात; १९२८–२९ मिरज संस्थानांत सारा-वाढ आणि रयतेंत सत्याग्रह चळवळ; १९३०–३१ सभाबंदीचा जाहिरनामा रद्द व्हावा म्हणून चळवळ व त्याकरितां १८–२० दिवसांची साधी कैद.आज दीड वर्ष राजद्रोहाच्या आरोपावरून मिरज संस्थानचें वॉरंट तयार आहे. १९३१–३२ दक्षिणी संस्थान हितवर्धक संस्थेचें एक चिटणीस पत्ता–सांगली. (S. M. C.)

शिराळकर पां. के. (जन्म शके १७९८ कऱ्हाड, जि. सातारा). दानशूर सावकार व टिळकांचे कट्टे भक्त. १९०८ सालीं स्वदेशीच्या पुरस्कारार्थ 'दि डेक्कन मॅच मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' चे डायरेक्टर होऊन त्यानीं ३०–३५ हजार रुपये झीज सोसली. सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष (१९२८), ऑ. इं. कॉं. कमिटीचे सभासद (१९२७–२९); म. प्रां. कॉं. कमिटीचे उपाध्यक्ष (१९२७–३०); कऱ्हाड म्यु. चे सभासद (१९१५ ते २१); कऱ्हाडचें शिक्षणमंडळ व सार्वजनिक वाचनालय यांचे आश्रयदाते, ज्ञानविकास–मंदिर (कऱ्हाड) या संस्थेचे अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा (वांई) चे एक चालक, गीताधर्ममंडळ (पुणें)चे आश्रयदाते,पैसाफंड व होमरूल लीग यांचे आजीव सभासद, शिवचरित्र कार्यालयाचे आश्रयदाते, रायगड स्मारक फंड कमिटीचे सभासद, भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कारभारी मंडळाचे सभासद. शब्दकोशमंडळाचे डायरेक्टर,इत्यादि; निरनिराळ्या प्रकारांनीं त्यांनीं समाजसेवा केलेली आहे. अशा सार्वजनिक स्वरूपाच्या विविध कार्यास त्यांनीं गेल्या २५ वर्षांत २५ हजार रुपयांहून अधिक मदत केली आहे.

शिंदे नानासाहेब गणपतराव, जनरल बडोदा आर्मी. जन्म पेडांबे, ता. चिपळूण. जि. रत्नागिरी येथें सन १८७६. कॉलेज शिक्षण बडोदा कॉलेज. बडोदा फौजेंत अटॅशे (attache) म्हणून नोकर १८९५. फर्स्ट कॅव्हलरीमध्यें लेफ्टनंट १८९७. पहिल्या पलटणीमध्यें १९०१. श्रीमंत

सरकार महाराज साहेबांचे ए. डी. सी. १८९८ ते १९०४. पलटण दुसरीचा कॅप्टन कमॅंडिंग १९०५; पलटण पहिली १९०८. फर्स्ट कॅव्हलरींत मेजर १९१५. सीनियर ए. डी. सी. १९१७. कर्नल कमॅंडिंग कॅव्हलरी व आर्टिलरी ब्रिगेड १९१७. डॅकाइटी समितीचे सभासद १९२१. कडी प्रांतांत बारवटिया कामगिरी १९२२. जनरल कमॅंडिंग बडोदा आर्मी १९२२. राजरत्न सोनेरी चांद, १९२७. ग्रंथ–शिस्त, मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया, हिंदुस्थानचा लष्करी इतिहास व दोस्त राष्ट्रांच्या फौजा, पानपतच्या घनघोर संग्रामासंबंधीं युद्धशास्त्रदृष्ट्या विचार, बाना आणि फरीगदगा, इत्यादि. पत्ता–यशवन्त निवास, नवापुरा, बडोदें.

शिंदे विठ्ठल रामजीः–जन्म १८७३ जमखिंडी, शिक्षण–प्राथमिक व मॅट्रिकपर्यंत जमखिंडी येथें झालें. १८९१ मॅट्रिक; १८९१ ते ९३ नोकरी–शाळामास्तर. पुढील शिक्षणक्रम फर्ग्युसन कॉ. पुणें. १८९८ बी. ए. व फर्स्ट एल्. एल्. बी पास, प्रार्थना समाजांत प्रवेश व पुढें प्रार्थना समाजाचे प्रचारक. युनिटेरियन स्कॉलरशिप मिळाली. १९०१–१९०३ मँचेस्टर कॉ. (ऑक्सफर्ड); १९०३लिव्हरपूल येथें भरलेल्या त्रैवार्षिक युनिटेरिअन् परिषदेस हजर होते. १९०३ ॲमस्टर डॅम येथील युनिटेरिअन ॲसोसिएशनच्या परिषदेस हिंदुस्थानच्या वतीनें हजर होते. त्यावेळीं यांनीं 'लिबरल रिलिजन इन् इंडिया' हा निबंध वाचला. १९०३–१९०६ प्रार्थना समाज प्रचारकार्याकरतां सर्व हिंदुस्थानभर प्रवास; १९०६ 'डिस्प्रेस्ड क्लासेस्'ची स्थापना; १९१२ सेक्रेटरी भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी. सातारा येथें भरलेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेचे अध्यक्ष; १९३०सालच्या सत्याग्रहाच्या चळवळींत सहा महिने शिक्षा.संस्थापक–'राष्ट्रीय मराठा पक्ष'. नागपूरला भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या विषयनियामक कमिटींत नेमणूक. १९२० सालानंतर यांनीं मिशनच्या कार्याशीं फारसा संबंध ठेवला नाहीं.इतिहास–संशोधन व तौलनिक भाषाध्ययन हे त्यांचे वाङ्मयिक व्यवसाय आहेत.

सकलातवाला शापुरजीः–ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद १९२२–२३ व १९२४. जन्म १८७४, मुंबई. शिक्षण–सेण्ट झेवियर्स स्कूल व कॉलेज. लिंकन्स 'इन्'चे बॅरिस्टर. "टाटा ॲण्ड् सन्स्"मध्यें शिरून तीन वर्षें जंगलांतून लोखंडाचा शोध केला; व त्याचें फळ म्हणजेच "टाटा आयर्न ॲण्ड् इंडस्ट्रियल् वर्क्स"ची स्थापना हें होय. जनरल् वर्क्स यूनियन्मध्यें शिरले. आय. एल्. पी; बी. एस्. पी; को–ऑपरेटिव्ह चळवळ व थर्ड इण्टर नॅशनल (रशिया) यांचे सभासद. ब्रिटिश कम्यूनिस्ट् पार्टी (इंग्लंड) चे सभासद. "वेल्फेअर् ऑफ् इंडिया लीग"चे संस्थापक. लोकप्रिय वक्ते. १९२७ मध्यें हिंदुस्थानला आले, त्यावेळीं त्यांचा अपूर्व सत्कार झाला. त्यांनीं कांहीं राजकारणविषयक ग्रंथ लिहिले आहेत. पत्ताः–२ सेंट अलबियन्स विलास, हायगेट रोड, एन्. डब्ल्यू ५ लंडन.

सत्यमूर्ति एस्.ः–हायकोर्ट वकील, मद्रास कायदेमंडळाचे सभासद १९२३. जन्म १८८७, पदुकोटा. शिक्षण–राज्य कॉलेज पदुकोटा, खिश्चन लॉ–कॉलेज् मद्रास. मद्रास विश्वविद्यालयाच्या सिण्डिकेटचे व सीनेटचे सभासद. मद्रास कायदेमंडळांतील काँग्रेस पक्षाचे डेप्युटी लीडर. युरोपला जाऊन आले आहेत. कायदेभंग चळवळींत शिक्षा. ग्रंथ–नागरिकांचे हक्क. पत्ताः–२।१९ सिङ्गर्च्यु स्ट्रीट; ट्रिप्लिकेन्, मद्रास.

सप्तर्षि, चिंतामण मोहनीराज––
जन्म १८८६, सोलापूर;–१९०२ मॅट्रिक (नगर हायस्कूल), १९०८ एम्. ए. (डेक्कन कॉलेज, पुणें), १९११ एल्.एल्.बी. तेव्हांपासून अहमदनगर येथें वकिली; लोकमान्यांचे अनुयायी; १९२२ सालीं सार्वजनिक सभेंत राष्ट्रीय पुढाऱ्यांचें अभिनंदन केल्याबद्दल एक महिना सनद रद्द; १९२४–२६ मुंबई कायदेकौन्सिलांत स्वराज्य पक्षाचे सभासद, प्रतिसहकार पक्षाचे अनुयायी; अध्यक्ष–नगर हिंदुसभा व सनातनधर्मसभा; अहमदनगर जिल्हा बोर्डाचे १ वर्ष सभासद; कोपरगांव तालुका बोर्डाचे १३ वर्षें अध्यक्ष; कॉमनवेल्थ विमा कंपनीचे डायरेक्टर; डिसेंबर १९३० मध्यें दडपशाहींत शिक्षा व अपिलांत सुटका झाली. पत्ता–– ॲडव्होकेट, अहमदनगर.

सप्रू सर तेज बहादूरः–एम्. ए.; एल्.एल्. डी.; के. सी. एस्. आय्. (१९२३); जन्म ८ डिसेम्बर १८७५. शिक्षण–आग्रा कॉलेज, आग्रा; अलाहाबादच्या हायकोर्टाचे ॲड्व्होकेट १८९६–१९२६; सं. प्रान्त कायदेमंडळाचे सभासद १९१३–१६; म्पीरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद १९१६–२०; लॉर्ड साउथ् बरोज फङ्क्शन् कमिटीचे सभासद १९१८–१९१९; मॉडरेट डेप्युटेशनचे सभासद. लंडनच्या

लॉर्ड सेलबोर्न्स कमिटीपुढील साक्षीदार, १९१९. ऑल इण्डिया काँग्रेस कमिटीचे सभासद (१९०६–१७). संयुक्तप्रांत राजकीय परिषदेचे अध्यक्ष १९१४; सं. प्रांत सामाजिक परिषदेचे अध्यक्ष १९१३; 'सं. प्रान्त लिबरल् लीग्'चे अध्यक्ष १९१८–२०; अलाहाबाद विश्वविद्यालयाचे फेलो १९१०–२०; बनारस हिंदु विश्व विद्यालयाच्या कोर्ट, सीनेट व सिंडिकेट यांचे सभासद; गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचे कायदेमंत्री व नंतर सेवानिवृत्ति (१९२२); लन्डनच्या इंपीरिअल कॉन्फरन्सचे सभासद १९२३; १९२३ सालीं पुणें येथें भरलेल्या अखिल भारतीय प्रागतिक परिषदेचे अध्यक्ष; रिफॉर्म्स एन्क्वायरी कमिटीचे सभासद १९२४; रा. टे. कॉं.चे सभासद व प्रमुख कार्यकर्ते; पूना पॅक्ट घडविणारे; पत्ता– १९ अल्बर्ट रोड्, अलाहाबाद.

सबनीस रावबहादूर, सर रघुनाथराव व्ही., के. टी. (१९२५); बी. ए.; सी. आय. ई.; जन्म– १ एप्रिल १८५७; शिक्षण– राजाराम हायस्कूल, कोल्हापूर, एल्फीन्स्टन कॉलेज मुंबई; शिक्षण खात्यांत शिरले; हुजूर चिटणीस व चीफ रेव्हीन्यू ऑफिसर या जागांवर कोल्हापूर येथें काम केलें; कोल्हापूर संस्थानचे दिवाण १८९८–१९२५; सेवानिवृत्ति १९२६, "रॉयल सोसायटी ऑफ आर्टस्, एशिॲटिक सोसायटी, बॉम्बे ब्रँच" चे फेलो; इलाखा पंचायतीचे अध्यक्ष–कोल्हापूर; कोल्हापूर बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन; पत्ता–शाहूपुरी, कोल्हापूर.

सरकार सर जदुनाथ के. टी.; एम्. ए.; सी. आय. ई.; एम्. एल्. सी. (बंगाल १९२९); इंग्रजींतील प्राविण्याबद्दल सुवर्णपदक. प्रेमचंद रॉयचंद स्कॉलर (माउंट सुवर्ण पदक); "रॉयल एशिॲटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन चे ऑनररी सभासद (१९२३); सर जेम्स कँपबेल गोल्ड मेडॅलिस्ट, बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो. ; कलकत्ता विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर १९२६–१९२८; इंडियन एज्युकेशन सर्व्हिस मधून सेवानिवृत्त; जन्म–१० डिसेंबर १८७०; लग्न– कादम्बिनी चौधरी; शिक्षण–प्रेसिडेंसी कॉलेज कलकत्ता; कांहीं काळ बनारस हिंदु विश्वविद्यालयामध्यें अर्वाचीन इतिहासाचे अध्यापक (१९१७–१९१९); सर डब्ल्य मेयर लेक्चरर (मद्रास विश्वविद्यालय) १९२८; पाटणा विश्वविद्यालयामध्यें हिंदी इतिहासाचे रीडर (१९२०-२२) ग्रंथ–India of Aurangzib; Statistics, Topography, and Roads (1901); History of Aurangzib, 5 vols; Shiwaji and His Times; Mughal Administration; Studies of Mughal India; Anecdotes of Aurangzib; Chaitanya: His Life and Teachings; Economics of British India. इत्यादि. पत्ता–ऑकलंड रोड, दार्जिलिंग.

सरदेसाई गोविंद सखाराम :जन्म १७ मे १८६५; जन्मस्थान–गोवील तालुका संगमेश्वर जि. रत्नागिरी; शिक्षण–रत्नागिरी हायस्कूल, फर्ग्युसन कॉलेज व एल्फिन्स्टन कॉलेज, बी. ए. १८८८ नोकरी बडोदें राजपुत्र शिक्षक इ. स. १८८९ ते १९२५ नंतर सेवानिवृत्त; ग्रंथकर्तृत्व मराठींत लिहिलेली मुसलमानी, मराठी व ब्रिटिश रियासत, मराठ्यांच्या इतिहासाच्या आजवरच्या उपलब्ध साधनांवरुन सबंध मराठेशाहीचा इतिहास यांनींच लिहिला; हल्लींचें वास्तव्य–कामशेट, जिल्हा पुणें.

सरदेसाई प्रोफेसर लक्ष्मणरावः–– जन्म–१९०४ वेरें (फोंडा, गोवा); शिक्षण– पणजीच्या 'लिसे व सेंत्राल'च्या वाङमयशाखेचा कोर्स; प्रोफेसरचा सरकारकडून डिप्लोमा; हल्लीं आल्मैद कॉलेज नांवाच्या शिक्षण संस्थेचे डायरेक्टर; १४ वर्षांपासून स्थानिक वृत्तपत्रांतून लेख लिहिण्यास सुरुवात; २३ व्या वर्षापासून प्रमुख मराठी मासिकांतून २५ च्यावर लघुकथा व कांहीं टीकालेख. पत्ता–डायरेक्टर, आल्मैद कॉलेज, फोंडा, गोवा.

सरदेसाई शांबाकृष्णाजी सूर्यरावः– जन्म–१८८४ वेरें महाल, (फोंडा गोवा); पोर्तुगीज सरकारचे सर्व्हे ऑफिसर; 'गोवापंच' (१८९९); 'सत्संग' (१९०६); 'धारत' (१९१२); यांच्या संपादक मंडळांपैकीं एक; पोर्तुगीज मराठी कोशाचे (अपूर्ण) प्रकाशक; १९१० मराठी हस्तपत्रकें व पुस्तकें प्रसिद्ध करून पोटभेदांच्या एकीकरणाची चळवळ केली; १९१४ पोर्तुगीज वर्तमानपत्रांत लेखमाला लिहिली व पहिल्या गोंवा काँग्रेसमध्यें भाषण केलें; अशा तऱ्हेनें कोंकणी मराठी वादांत मराठीची तरफदारी केली; १९२२ पोर्तुगीज हस्तपत्रकें वाटून हिंदुधर्मावरील ख्रिस्ती धर्माच्या हल्ल्याचा प्रतिकार केला; १९३२ नवव्या गोंवा काँग्रेसमध्यें निबंध वाचला; या मार्गानें हिंदु स्त्रियांचें शिक्षण

इत्यादि समाजकार्यांचा पुरस्कार केला; १९१० सेक्रेटरी संयुक्त गौड सारस्वत ब्राह्मण परिषद (म्हापसें); १९३० स्वागताध्यक्ष, पंधरावें मराठी साहित्य संमेलन (मडगांव); पत्ता–पणजी, गोवा.

ससून सर (एलिस्) व्हिक्टर तिसरे बॅरोनेट् एस्. एल्. ए. १९०९; जन्म ३० डसें. १८८१; दुसऱ्या बॅरोनेटचे चिरंजीव. शिक्षण हॅरो. ट्रिनिटी कॉलेज (केंब्रीज) ई. डी. ससून अँड कंपनी लिमिटेड वगैरेचे चेअरमन आर. ए. एफ्. चे माजी कॅप्टन. पत्ता:–मुंबई.

सहस्रबुध्दे शंकर बळवंत–जन्म १८८७ जन्मस्थान पुणें, १९०५ बी. ए. १९०७ ते ९ मँचेस्टर येथें रा. माडगांवकरांच्या ज्ञानदेवीचें काम, १९१०–११ मँचेस्टर कॉलेज ऑफ टेक्नालजीमध्यें फोटोग्राफी व प्रिंटिंगचा अभ्यास; १९११ सालीं सिटि गिल्डस् ऑफ लंडन इंन्स्टिटयूटचे (पूर्वीं ८ वर्षें कोणालाही न मिळालेले) ऑनर्स परीक्षेंतील पहिले मेडॅलिस्ट; १९१२ लंडन पॉलिटेक्निक इन्स्टिटयूटमध्यें फोटोग्राफीला लागणारे कागद व कांचा तयार करण्याचे स्वतंत्र प्रयोग; १९१३–१४ कॅपस्टन प्रेस, १९१५–१६ लक्ष्मी आर्ट मुंबई येथें प्रोसेस डिपार्टमेंटचे मुख्य; १९१७–२४ पुणें येथें स्वतंत्र धंदा; ८ वर्षें बालोद्यान मासिक; १९२५ युरोपमध्यें शाईचे कारखाने पहाण्याकरितां सफर. १९२६ पासून सरकारी छापखाने वगैरे ठिकाणीं शाई पुरविली जाते. १९१८ पासून फोटोग्राफी व प्रिंटिंग या धंद्याची शाळा काढली असून हिंदुस्थानांतील अनेक छापखान्यांचे मालक व त्यांचीं मुलें तींतून शिकून गेलीं आहेत. फोटोग्राफी व प्रिंटिंगच्या धंद्याला लागणारा माल मोठ्या प्रमाणावर करण्याची कोणाची इच्छा असल्यास जिज्ञासूंना सर्व माहिती पुरविली जाते. पत्ता:–६८९ सदाशिव पेठ, पुणें.२

साठये दिनकर धोंडो:–जन्म १८७७ पुणें, शिक्षण–न्यू इंग्लिश स्कूल, पुणें. सिटी स्कूल मॉरिस कॉलेज–नागपूर. ग्रँट मेडिकल कॉ. मुंबई. युनिव्हर्सिटी कॉलेज–लंडन. १९०३, एल्. आर्. सी. पी. ॲण्ड एस्. १९१३ एफ्. आर. एफ्. पी. एस्. (ग्लासगो). १९१७–१८ संपादक 'न्याशनल यूनिअन इअर–बुक' व १९२८ ऑपथॅलाजिक बुलेटिन संस्थापक–१९१४ आ. मे. चें धर्मार्थ डोळ्याचें हॉस्पिटल; १९२१ न्याशनल मेडिकल कॉलेज; १९३० कॉंग्रेस फरी हॉस्पिटल, मुंबई. प्रेसिडेंट–मुंबई ऑपथॉलमिक सोसायटी. सेक्रेटरी इंडियन मेडिकल ॲसोसिएशन.

सायमन सर जॉन:–पत्ता:–फ्रिवेल मॅनार, बॅनबरी; वय ५६. १९१० त सॉलिसिटर-जनरल म्हणून निवडणूक; यांची वकिली फारच झपाटयानें फोफावत गली. रस्त्यावरील व्यापारावर अध्यक्ष, Justices of Peace च्या बादशाही कमिशनचे सभासद. आक्टोबर १९१३ त कॅबिनेटमध्यें जागा मिळाली; ॲटर्नें जनरल झाले. मे १९१५ तील संयुक्त प्रधानमंडळाच्या स्थापनेनंतर गृहमंत्री बनले. Compulsion बिलानंतर राजीनामा दिला व १९१६ जानेवारी पासून पुन्हां वकिली सुरू केली. आक्टोबरांत सैन्यांत शिरले. डिसेंबर १९१७ त मिसेस मॅनिंग यांच्याशीं लग्न केलें. डिसेंबर १९१८ च्या निवडणुकींत पराजय झाला. पण १९२२ च्या निवडणुकींत निवडून आले व नोव्हें. १९२२ त मजूर पक्षाचे डेप्युटी लीडर बनले. व १९२३ त पार्लमेंटच्या कामांत नांव मिळविलें. १९२६ च्या सार्वत्रिक संपाच्या विरुद्ध बरींच महत्त्वाचीं भाषणें केलीं. वकिली सोडून देऊन १९२८ च्या उन्हाळ्यांत हिंदी प्रश्नांवरच्या बादशाही कमिशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं हिंदुस्थानला भेट दिली व एप्रिल १९२९ मध्यें हिंदुस्थानांतून परत गेले.

सावरकर डॉ. ना. दा. जन्म–शके १८१० त, भगूर, जि. नाशिक येथें. मराठी शिक्षण तेथेंच. १९०६ सालीं नाशिकच्या 'वंदेमातरम्'च्या दाव्यांत कैद व सुटका. १९०९ मध्यें लॉर्ड मिंटोवर उडालेल्या बॉम्बच्या संबंधांत पकडलें, पण सोडून दिलें. पुन्हां नाशिकच्या जॅक्सनच्या खुनाच्या प्रकरणांत कैद. त्यांतूनही सुटका. नंतर लगेच नाशिकच्या कटामध्यें कैद व सहा महिने सक्त मजुरी. तींतून १९११ त सुटका. नंतर कलकत्त्याच्या कॉलेज ऑफ फिजिशियन्स व सर्जन्समध्यें शिक्षण चालू असतां लॉर्ड हार्डिज बॉम्ब प्रकरणांत नजरकैद; कांहीं दिवसांनंतर पुण्यास मुक्तता. १९१६त वरील कॉलेजचे L. C. P. & S. त्याचवेळीं होमिओपाथीच्या कलकत्त्याच्या कॉलेजची L. M. & S. व दंतवैद्यकीचा विशेष अभ्यास. १९१६ पासून मुंबईस डॉक्टरीचा धंदा. नॅशनल यूनियन, टिळक होमरूल लीग, महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस वगैरेंतून अधिकाराचीं कामें. मुंबई कॉर्पोरेशनचे ३ वर्षें लोकनियुक्त सभासद. १९३० व ३२ मध्यें राष्ट्रीय चळवळींत कैद. ग्रंथ–जाईचा मंडप इ. कादंबऱ्या,

हिंदुत्व व हिंदुपदपादशाही या बॅ. सावरकरांच्या इंग्रजी पुस्तकांचीं मराठी भाषांतरें; 'श्रद्धानंद' संपादक, इतर लेख. पत्ताः–गिरगांव, मुंबई ४, किंवा खार, मुंबई.

सावरकर बॅ. विनायक दामोदर. जन्म स. १८८३ भगूर जि. नाशिक. वयाच्या दहाव्या वर्षी पुण्याच्या 'जगद्धितेच्छु' पत्रांत कविता प्रसिद्ध; स. १८९७ ची चळवळ व टिळकांची अटक यामुळें देशसेवेची स्फूर्ति; स. १९०१ मॅट्रिक, बी. ए. फर्ग्युसन कॉलेज पुणें; कॉलेजांत असतांना विद्यार्थीवर्गांत देशभक्तीची चळवळ. १९०६ एल्. एल्. बी. करितां मुंबईंत वास; तेथें 'विहारी' पत्राचे चालक व 'अभिनव भारत'संस्थेची स्थापना; पं. श्यामजी कृष्णवर्मा यांची 'शिवाजी'स्कॉलरशिप मिळून विलायतेस बॅरिस्टरचे अभ्यासाकरितां प्रयाण. १९०९ परीक्षा उत्तीर्ण; पण सनद मिळाली नाहीं. लंडन येथें 'तरवार' पत्र काढलें. पॅरिस येथें कांहीं दिवस मॅडम कामा हिचे नेतृत्वाखालीं चळवळ. १९१० लंडनला परत प्रयाण व १२१ कलम इं. पी. को. खालीं अटक व हिंदुस्थानास नेण्याचा हुकूम, मार्गांत मार्सेलिस येथें बोटींतून निसटून फ्रान्सच्या भूमीवर दाखल; परत अटक व हिंदुस्थानांत आल्यावर दोन जन्मठेपीची शिक्षा. ग्रंथकर्तृत्वः–जोसेफ मॅझिनी (जप्त), १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध (जप्त), शीख जातीचा इतिहास (जप्त), हिंदुपद पातशाही व माझी जन्मठेप. १९११ ते १९२४ बंदिवास. जानेवारी १९२४ सशर्त सुटका व आजतागायत रत्नागिरीस सरकारच्या अटबंदींत. अस्पृश्योद्धाराची चळवळ व दानशूर भंडारी गृहस्थ कीर यांचेकरवीं पतित पावन मंदिर बांधलें. पत्ताः–रत्नागिरी.

सीमंत डॉ. गंगाधर चिमणाजीः– जन्म–१८९७, शिक्षण–हैद्राबाद मेडिकल कॉलेज, १९२० एल्. एम्. अँण्ड एस्. (हैद्राबाद). औरंगाबाद (निजाम स्टेट) येथील प्रसिद्ध डॉक्टर व सार्वजनिक कार्यकर्ते; अनेक संस्थांत त्यांचें प्रत्यक्षाप्रत्यक्ष अंग आहे. गेल्या दोन वर्षांपासून हे श्री. सरस्वती भुवन पाठशाळेचे चिटणीस आहेत. पत्ताः–औरंगाबाद, निजाम स्टेट.

सुखटणकर विष्णु सितारामः–– जन्म ४ मे १८८७. एम्. ए. (केंब्रीज); पीएच्. डी. (बर्लिन) मुंबई विश्वविद्यालयामध्यें संशोधन स्कॉलर व पोस्ट ग्रॅजुएट् डिपार्टमेण्टचे व्याख्याते. शिक्षण–मराठी हायस्कूल व सेण्ट झेवियर्स कॉलेज मुंबई. सेण्ट जॉन्स् कॉलेज (केंब्रीज, इंग्लंड) व बर्लिन विश्वविद्यालय वेस्टर्न सर्कल् मधील आर्केऑलॉजिकल् सर्व्हेचे असिस्टंट सुपरिंटेंडेंट. मुंबई विश्वविद्यालयाच्या पोस्ट ग्रॅज्युएट विभागामधील व्याख्याते. पुणें येथील "भाण्डारकर ओरिएण्ट्ल रिसर्च इन्स्टिटयूट"च्या "महाभारत एडिटोरिअल् बोर्डा"चे चिटणीस. पत्ता– शान्ताराम हाउस, मलबार हिल, मुंबई आणि भाण्डारकर ओरिएण्ट्ल रिसर्च इन्स्टिटयूट, पुणें.

सुऱ्हावर्दी हुसेन शहीद. बार–ॲट्–लॉ. जन्म १८९३. शिक्षण–सेण्ट झेवियर्स कॉलेज् कलकत्ता व ऑक्सफर्ड विश्वविद्यालय. बंगाल कायदेमंडळाचे सभासद; तीन वर्षे कलकत्त्याचे डेप्युटी मेम्बर."इंडिपेंडंट मुस्लीम पार्टी, बंगाल"चे संस्थापक. पत्ताः–वेल्स्ली स्ट्रीट, फर्स्ट लेन्; कलकत्ता.

सेटलवाड सर चिमणलाल हरिलाल के. सी. आय. ई. (१९२४); एल्. एल्. डी. ॲडव्होकेट हायकोर्ट मुंबई. जन्म–जुलै १८६६; लग्न–कृष्णगौरी. शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई; मुंबई हायकोर्टाचे प्लीडर. हायकोर्टाचे ॲडव्होकेट म्हणून प्रवेश. साउथ्बरो रिफॉर्म्स कमिटीचे सभासद १९१८. हंटर कमिटीचे सभासद १९१९. ॲडिशनल् जज्ज बॉंबे हायकोर्ट १९२०; मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, जाने. १९२१ ते जून १९२३. मुंबई विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर १९१७–२९; रा. टे. कॉ. चे सभासद.पत्ताः–सेटलवाड रोड मलबार हिल्, मुंबई.

सोमण रामचंद्र गणेश, सातारा. हायकोर्ट वकील.जन्म२४।११।७६; मॅट्रिक१८९२; वकिलीची परीक्षा १९००; प्रकाश पत्राचे १८ वर्षे संपादक; कौन्सिलप्रवेश १९२४; सातारा जिल्ह्यांतील प्रमुख कार्यकर्ते; स्थानिक संस्थांचे आश्रयदाते. सत्याग्रहाच्या चळवळींत प्रथम कैद व पुन्हां जेलबंदी.

सँकी लॉर्डः–(जन्म १८६६) ब्रिटिश वकील. यांचें शिक्षण ऑक्सफोर्ड येथील लॅन्सिंग व जीसस कॉलेजांत झालें. १९१४ त ते हायकोर्टाचे न्यायाधीश झाले. कोणच्याशा खाणीच्या व्यापारासंबंधीं यांना माहिती असल्यामुळें १९१९ त खाणींतील मजुरांची स्थिति व मजुरीचे दर यांचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या कमिशनचें अध्यक्षपद लॉर्ड सँकी यांना देण्यांत आलें. १९१४ यांना 'नाईट' हा किताब देण्यांत आला. १९२८ त यांना 'Lord Justice of Appeal

करण्यांत आलें. इ. स. १९२९त ते मजूर पक्षास मिळाले व लॉर्ड चॅन्सेलर झाले; त्यानंतर त्यांना 'पिअर' बनविण्यांत आलें. हिंदुस्थानसाठीं भरलेल्या रा. टे. कॉन्फरन्सच्या कामांत यांजकडे फार महत्वाचें काम होतें.

स्टॅलिन:—(जन्म १८७९) रशियन मुत्सद्दी. १८९६ त सोशल डेमोक्रॅट्स्मध्यें तो मिसळला. १९०२ मध्यें याला पकडून सैबेरियांत पाठविण्यांत आलें; पण पुढें १९१७ याची सुटका झाली. या सुमारास लेनिन व ट्रॉट्स्की यांजबरोबर त्याचें बरेंच सूत जमलें होतें व यापुढील कांहीं वर्षे तो एक बोल्शेव्हिक पुढारी होता. लेनिनच्या मृत्यूनंतर ज्या तिघांच्या हातांत सर्व अधिकार होते त्यांपैकीं स्टॅलिन हा एक होता.पण १९२७ त ट्रॉट्स्कीची विचारसरणी याला पटली नाहीं. बोल्शेव्हिक पक्षांतून ट्रॉट्स्कीच्या अनुयायांना त्यानें हुसकून लावलें व १९२७–२८ त तो रशियाचा सर्वाधिकारी होता. १९३० त त्याची सत्ता पूर्णपणें प्रस्थापित झाली.

हर्डीकर डॉक्टर नारायण सुबराव. जन्म १८८९. शिक्षण–राष्ट्रीय मेडिकल कॉलेज, कलकत्ता, निचिगोन,अमेरिका. न्यूयॉर्कच्या "यंग-इण्डिया" चे सम्पादक. कांहीं काळ कर्नाटक प्रान्तिक काँग्रेस कमिटीचे मुख्य चिटणीस. हिंदुस्थानी सेवादलाचे मुख्य."व्हॉलंटीयर"चे संपादक; कर्नाटकचे स्वयंसेवक घेऊन नागपूरला झेंडा सत्याग्रह केल्यामुळें तुरुंगवास. आपले स्वयंसेवक चीनला पाठविण्यासंबंधीं त्यांची विनंति सरकारनें मान्य केली नाहीं. असहकार व कायदेभंग या चळवळींतील कार्यकर्ते–शिक्षा.

हिदायतुल्ला दी ऑनरेबल् खानबहादुर सर शेख गुलाम हुसेन. के. टी.(१९२६); कौन्सिलचे सभासद (२३ जून १९२८); जन्म–जानेवारी १८७८. शिक्षण शिकारपूर हायस्कूल डी. जे सिंध विद्यापीठ; गव्हर्नमेंट लॉ स्कूल मुंबई; वकील; हैदराबाद (उत्तर), म्युनिसिपालिटीचे सभासद व निवडलेले उपाध्यक्ष. डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे अध्यक्ष, हैदराबाद मुंबई ले. कौन्सिलचे सभासद गेलीं १४ वर्षे; १९२१ पासून स्थानिक स्वराज्य खात्याचे सरकारचे प्रधान. जून १९२८ पासून कार्यकारी कौन्सिलचे सभासद. पत्ता–सेक्रेटरीएट मुंबई.

हुदलीकर प्रो. सत्यबोध बाळकृष्ण–जन्म–१८८८, धारवाड; शिक्षण १९११ एम्. ए. सर्व शिक्षण होईपर्यंत शिष्यवृत्त्या व शिकवण्या यावर चरितार्थ चालू होता; १९१२ भूस्तर शास्त्राचे प्रोफेसर म्हणून फर्ग्युसन कॉलेजमध्यें नेमणूक व न्यू इंग्लिश स्कूलमध्यें गणिताचे शिक्षक. १९१२ जर्मनीस प्रयाण; हायडलबेर्ग व बर्लिन या विश्वविद्यालयांत विद्याभ्यास करून १९१४ सालीं पीएच्. डी. (हायडलबेर्ग) पदवी मिळविली; १९१४–१६ इंदूर संस्थानांत नोकरी; स्टेट जिऑलॉजिस्ट, माईनिंग इंजिनियर, कस्टम्स कमिशनर, म्युनिसिपल कमिशनर, असिस्टंट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज इत्यादि कामें केलीं; मध्यंतरीं १९१८ मध्यें बनारस विश्वविद्यालयांत युनिव्हर्सिटी प्रोफेसर ऑफ जिऑलजी म्हणून काम केलें व तेथील भूस्तर विभागाची व्यवस्था केली; १९२८ पुणें येथें 'बालकमंदिर' स्थापलें, हल्लीं त्या संस्थेचे आजन्म सेवक म्हणून काम करीत आहेत; सभासद फॅकल्टी ऑफ सायन्स (मुंबई युनि.) व बोर्ड ऑफ स्टडीज् इन् जिऑलजी (उपशाखा); चालक 'बालबोध' मासिक; यांनीं 'बूबी', तरुण वेर्टरचीं दुःखें (जर्मन), जर्मनभाषा–प्रवेश व पश्चिम आघाडीवर सामसूम (जर्मन) हीं पुस्तकें लिहिलीं आहेत. पत्ताः–'बालक मंदिर', ४३ ससून रोड, पुणें.

हुदलीकर सौ. सुलोचनाबाईः––जन्म–१८९२ या यवतमाळचे रा. ब. रा. ग. मुंडले यांच्या ज्येष्ठ कन्या होत, शिक्षण हुजुरपागा, पुणें. १९११ मॅट्रिक (मुंबई युनि.); १९१६ बी. ए. डायोसीसन कॉलेज, कलकत्ता; १९१६ प्रो. स. बा. हुदलीकर यांच्याशीं विवाह (देशस्थ कऱ्हाडे); १९२७ 'बालक मंदिर' स्थापण्याचे कामांत प्रो. हुदलीकर यांच्या बरोबर सहकार्य. मंदिराच्या आजन्म सेविका व हल्लीं व्हाइस प्रिन्सिपाल; फेलो–महिला विद्यालय, हिंगणें; यांनीं आजपर्यंत बरेच टीकात्मक लेख व इतर निबंध लिहिले आहेत. पत्ताः––'बालक मंदिर' ४३ ससून रोड, पुणें.

हेले सर विलिअम मालकम. जी. सी. आय्. ई; के. सी. एस्. आय्. सी. एस्. सं. प्रांताचे गव्हर्नर (१९२८). नाइट् ऑफ् ग्रेस ऑफ् ऑर्डर ऑफ् सेण्ट जॉन् ऑफ जेरुशलेम. कॉरपस ख्रिस्ती कॉलेजचे ऑनररी फेलो, ऑक्सफर्ड; डी. लिट्. लाहोर. जन्म १८७२; १८९६ सालीं काउंट् हॅनिबल (बॅलझॅनी, इटली) यांची मुलगी अँड्रीना हिच्याशीं लग्न. लेडी ऑफ् ग्रेस्ट ऑफ् ऑर्डर ऑफ् सेण्टजॉन ऑफ् जेरुशलेम एफ्. आर. जी. एस्. शिक्षक

मर्चंट टेलर्स स्कूल; कॉर्पस् ख्रिस्ती कॉलेज. ऑक्स फर्ड (स्कॉलर) वसाहत–अधिकारी, झीलम कालवा वसाहत (१९०२); सेक्रेटरी पंजाब सरकार १९०७; हिं. सरकारचे डेप्युटी सेक्रेटरी १९०८; दरबार कमिटीचे सभासद १९११; चीफ् कमिशनर दिल्ली १९१२–१९; हिंदुस्थान सरकारचे फिनॅन्स मेम्बर १९१९–१९२२; हिंदु. सरकारचे गृहमंत्री १९२२–१९२४; पंजाबचे गव्हर्नर १९२४–१९२८; पुढें यू. पी. गव्हर्नर.

हैदरी सर अकबर. नवाब हैदर नवाबजंग बहादूर. महसूल खात्याचे प्रधान हैदराबाद. जन्म ८ नोव्हें. १८६९. शिक्षण–सेण्ट झेवियर्स कॉलेज मुंबई, हिंदुस्थानच्या महसूल खात्यामध्यें प्रवेश १८८८. असिस्टंट अकौंटंट जनरल यू. पी. १८९०; डेप्यूटी अकौंटंट जनरल मुंबई १८९७; डेप्यूटी अकौंटंट जनरल मद्रास १९००. गव्हर्नमेंट प्रेस अकौंट्स्चे तपासक १९०१; कंट्रोलर इंडिया ट्रेझरीज् १९०३ व सी. पी. १९०४. हैदराबाद संस्थानला मागितल्यावरून बदललेले अकौण्टण्ट जनरल् १९०५; महसूल–मंत्री १९०७; सरकारचे सेक्रेटरी गृहखातें (न्याय, पोलीस, शिक्षण इत्यादि) १९११; व्यापार व उद्योगधंदे यांचे तात्पुरते डिरेक्टर जनरल १९१९; अकौंटण्ट जनरल मुंबई १९२०; हैदराबादच्या कार्यकारी कौन्सिलमध्यें महसूल व रेल्वे या खात्यांचे मुख्य १९२१; हैदराबादच्या उस्मानिया युनिव्हर्सिटीची कल्पना काढून तीस मूर्त स्वरूप दिलें. संस्थानच्या पुराण वस्तुसंशोधन खात्यास चालना देऊन व्यवस्थित रूप दिलें; अजिंठा येथील लेणीं व उर्दू पद्धतीचीं जुनी हिंदी चित्रें यांकडे फार लक्ष. राउंड टेबल परिषदेला हैदराबादेहून गेलेल्या लोकांचे प्रमुख.

होअर सॅम्युएल (जन्म १८८०) ब्रिटिश मुत्सद्दी. यांचें शिक्षण हॅरो व ऑक्सफर्ड यथें झालें. १९१० त हे पार्लमेंटांत निवडून आले व १९१५ त आपल्या वडिलांच्या मागें हे बॅरोनेट झाले. १९२२–२४ च्या यूनियनिस्ट मंत्रिमंडळांत हे हवाखात्याचे मंत्री होते; १९२४–२९ पर्यंत पुन्हां हीच जागा त्यांना मिळाली. सध्या ते हिंदुस्थानचे स्टट सेक्रेटरी आहेत.

हिंडेनबुर्ग:–––(जन्म १८४७) जर्मन सैनिक. १८६५ त प्रशिअन सैन्यांत यांनीं प्रवेश केला व १८६६ तील ऑस्ट्रिया–प्रशिया युद्धांत व १८७० –७१ च्या फ्रान्स–प्रशिया युद्धांत त्यांनीं काम केलें. क्रमाक्रमानें चढत ते पायदळाचे अधिकारी झाले व एका फौजेचे अधिकारी बनले व १९११ त ते फौजेंतून सेवानिवृत्त झाले. १९१४ त रशियानें पूर्व प्रशियावर स्वारी केली त्यावेळीं त्या प्रांतांतील जर्मन सैन्याचें आधिपत्य त्यांना देण्यांत आलें होतें. यांनीं लगेच टॅनेन्बर्गच्या लढाईंत रशियाचा धुव्वा उडविला. पोलंडवर स्वारी करणाऱ्या आस्ट्रियन व जर्मन सैन्याचें आधिपत्य १५ सप्टेंबरास यांना देण्यांत आलें. त्यांनीं कुटनो (Kutno) येथें १५ व १६ नोव्हेंबर रोजीं रशियनांचा पराभव केला; या विजयाबद्दल त्यांना 'फील्ड मार्शल' बनविण्यांत आलें. तेव्हांपासून १९१८ त युद्धतहकुबीच्या पत्रकावर सही करीपर्यंत हिंडेनबुर्ग हे जर्मनीचे वजनदार नेते होते. जर्मन क्रांतीनंतर ते सैन्याचे अधिपति होते; त्यापुढें १९१९ त त्यांनीं अधिकारत्याग केला. १९२५ त जर्मनीच्या प्रजासत्ताकाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक झाली. १९३२ तील निवडणुकींतही ते पुन्हां यशस्वी झाले.

व्हॅलेरा डीः–– (जन्म १८९२) १९१७ त 'गेलीक लीग'चे (Gaelic League) अध्यक्ष. क्रांतिकारक चळवळीमुळें त्यांना अटक. अटकेंत असतांना त्यांची पार्लमेंटमध्यें निवडणूक; एप्रिलमध्यें आयर्लंडच्या प्रजासत्ताकाचे ते अध्यक्ष; त्यांनीं १९२१ च्या डिसेंबरच्या तहनाम्यास विरोध व १९२२ त राजीनामा देऊन प्रजासत्ताकवादींच्या सैन्याचे पुढारी. ऑगस्ट १९२३ पासून १९२४ ऑगस्टपर्यंत ते तुरुंगांत होते. नंतर थोड्या दिवसांनीं त्यांनीं सरकारच्या विरुद्ध पक्षाचें नेतृत्व स्वीकारलें. १९३२ त ते पुन्हां आयर्लंडच्या प्रजासत्ताकाचे अध्यक्ष निवडून आले. शपथेचें प्रकरण सुरू केलें.

श्रीक्षात्रजगद्गुरु करवीरः––जन्म १८९४ बेनाडी (जि. बेळगांव); शिक्षण–बी. ए. पर्यंत झालें आहे. १९२० श्रीक्षात्र जगद्गुरु पीठावर स्थापना; पालखी, पाद्यपूजा, दक्षिणा घेणें वगैरे जुन्या पद्धतीचे प्रकार यांनीं बंद केले आहेत. व्याख्यान, प्रवचन, लेखन वगैरे मार्गानें हिंदुसमाजाची धार्मिक व सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात, अस्पृश्योद्धाराचे बाबतींतही यांनीं बराच पुढाकार घेतला आहे. पत्ताः–अद्वैताश्रम, कोल्हापूर–शाहूपुरी.

–––––––

बृहन्महाराष्ट्रांतील संस्था

या प्रकरणांत बृहन्महाराष्ट्रांतील संस्थांची माहिती देत आहों. या संस्थांच्या जोडीला महाराष्ट्रांतील लोकांना इतर प्रांतांतील ज्या मोठ्या संस्थांची माहिती अवश्य असावयास हवी, त्याहि कांहीं थोड्या संस्थांची माहिती येथें दिली आहे.

प्रथम महाराष्ट्रांतील जिल्हे अकारविल्हेनें घेऊन त्यांतील संस्थांची माहिती दिली आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील संस्थाहि अकारविल्ह्यानेंच घेतल्या आहेत. मुंबई शहर महाराष्ट्रांतच घेतलें आहे. हे जिल्हे संपल्यावर महाराष्ट्रांतील संस्थानें अकारविल्ह्यानें घेऊन प्रत्येकांतील संस्था अकारविल्ह्यानेंच दिल्या आहेत. त्यानंतर गोवा प्रांत, वऱ्हाड, मराठी मध्यप्रांत व निजामशाहींतील मराठवाडा असे प्रांत अनुक्रमानें घेऊन प्रत्येकांतील संस्था वरील पद्धतीनेंच दिल्या आहेत.

अहमदनगर

१. अनाथ विद्यार्थीगृह अहमदनगर— सप्टेंबर १९१३ त कै. देशपांडे वकील यांच्या हस्तें स्थापना; त्यांच्या मृत्यूनंतर श्री. बोरकर व श्री. देवचक्रे यांच्या हातून उत्कर्ष; सुतारकाम, लोहारकाम, छापखाना, शेतकी, बँड वगैरे औद्योगिक शिक्षणही मिळतें. कार्यांत १०००० रु. गुंतले असून मासिक खर्च १००० रु. आहे. आश्रयदात्यांची व वर्गणीदारांची संख्या ७५०; खर्च सार्वजनिक मदत व वर्गणी यांवर चालतो. संस्थेच्या उद्योगमंदिरास म्युनिसिपालिटीकडून १२५० रु. व लोकलबोर्डाकडून ५०० रु.ची ग्रँट; सध्यां ५५ विद्यार्थी आहेत. आतांपर्यंत सुमारें ४०० विद्यार्थी संस्थेबाहेर पडले. अध्यक्ष—रा. ब. चितळे; व्यवस्थापक—श्री. भट.

२. छत्रपती एज्युकेशन सोसायटी, संगमनेरः-स्थापना १९२६; कार्य—१. मराठा इंग्लिश स्कूल, शारीरिक शिक्षण, को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स इ. गीताजयंति, शिवजयंति व गणेशोत्सव वगैरे साजरे केले जातात. २. मराठा स्कूल डार्मिटरी— संस्थेंत विद्यार्थी ७०; सोसायटीचें हायस्कूल व बोर्डिंग केवळ लोकाश्रयावर चाललें आहे. संगमनेर म्युनिसिपालिटी व अहमदनगर जिल्हा बोर्ड यांजकडून मधूनमधून मदत; सेक्रेटरी— श्री. देशमुख.

कुलाबा

१. कुलाबा मॅटर्निटी हॉस्पिटल व नर्सिंग होम अलिबागः—स्थापना एप्रिल १९२५; उद्देश—"आरोग्य—शिक्षण—प्रसाराचें प्रत्यक्ष काम करून आरोग्याविषयीं सामान्य ज्ञानाचें महत्त्व व जबाबदारी लोकांच्या पूर्णपणें लक्षांत आणणें." साहाय्यक—त्या वेळचे कुलाबा जिल्ह्याचे कलेक्टर मि. अॅबट यांच्या आग्रहावरून श्री. गो. कृ. देवधर यांनीं संस्था सुरू केली. संस्थेला सरकारी इमारत मिळाली. व दरसाल १५००० रुपये सरकारकडून मिळूं लागले. हल्लीं फक्त ८००० च मिळतात. संस्थेची व्यवस्था पुणें सेवासदन सोसायटी पहाते. कार्य— गेल्या सात वर्षांत संस्थेच्या मॅटर्निटी होममध्यें बाळंतपणाकरितां आलेल्या स्त्रियांचें प्रमाण दरमहा १४ पडतें. औषधोपचाराकरितां व शुश्रूषेकरितां दवाखान्यांत येऊन राहिलेल्या स्त्रियांचें प्रमाण दरमहा १५ पडतें. शिवाय दवाखान्यांत हजारों रोग्यांस निरनिराळ्या रोगांवर औषधें दिलीं. त्यांत ब्राह्मण, ब्राह्मणेतर, ख्रिस्ती, मुसलमान, यहुदी व अस्पृश्यवर्गीय होते. अगदीं अनाथ स्त्रियांना मोफत अन्न देण्याची सोय आहे. दवाखान्याचें काम अलिबागचे डॉ. भट व डॉ. टिळक पहातात. व्यवस्थापक—श्री. गोपाळ कृष्ण देवधर. एम्. ए. एल्. सी. ई. ऑर्गनायझर व जनरल सेक्रेटरी पुणें सेवासदन सोसायटी.

२. कोंकण एज्युकेशन सोसायटीः— सन १९१६—१७ च्या सुमारास कांहीं उत्साही तरुणांनीं कुलाबा जिल्हा स्टूडंट्स् असोसिएशन नांवाची संस्था स्थापन केली. उद्देश— "गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास द्रव्यद्वारा मदत करणें, सोयीच्या ठिकाणीं इंग्रजी शिक्षणाचे वर्ग उघडणें, रात्रींच्या शाळा स्थापन करणें व ठिकठिकाणीं ग्रंथालयें स्थापन करणें."

कार्य—१९१७ सालीं असोसिएशनचें रूपांतर कोंकण एज्युकेशन सोसायटी या संस्थेंत करण्यांत

आलें. सोसायटीचे उद्देशः—"कोंकण प्रांतांत सोयी-स्कर ठिकाणीं नवीन शाळा काढणें, जुन्या शाळा ताब्यांत घेऊन चालविणें, कॉलेज काढणें व अशा रीतीनें शिक्षणाचा फलाव करणें, औद्योगिक शिक्षणाची तरतूद करणें इत्यादि" सन १९१८ सालीं रोहें येथील इंग्रजी शाळा, १९१९ त पनवेल येथील व १९२० त महाड येथील म्युनिसिपल शाळा ताब्यांत घेतल्या. आज सर्वहि ठिकाणीं सोसायटीच्या मालकीच्या इमारती आहेत. इमारतींत गुंतलेलें भांडवल एक लाख भरेल. साहाय्यक—रोहृयाचे श्री. आबासाहेब मेहेंदळ, मेढयाचे रावसाहेब दांडेकर व पनवेलचे श्री. आत्मारामशट आटवणे यांनीं मोठ्या देणग्या दिल्या. तसेंच वामन राव ओक फंडांतून महाड येथील शाळेला मोठी देणगी मिळाली आहे. औद्योगिक शिक्षणाकडेच विनियोग करावयाचा या अटीवर जिल्हाबोर्डाजवळ बावन्न हजारांचा द्रव्यनिधि पडून होता. म्हणून जिल्ह्यांत औद्योगिक शिक्षण देणारी शाळा काढण्याची योजना सोसायटीनें बोर्डापुढें मांडली. ती बोर्डानें मान्य केल्यानें अलिबाग येथें सन १९२४ सालीं औद्योगिक शाळा स्थापन करण्यांत आली. केवळ औद्योगिक शिक्षण दिल्यास मुलांचा अभाव म्हणून औद्योगिक व बौद्धिक शिक्षणाची सांगड घालण्याची योजना अमेरिकेंतील 'पॉली टेकनिक' शाळांच्या धर्तीवर आंखली. व हेस्केथ कमिटीनें याच योजनेचा पुरस्कार केला. आज या शाळेंत विणकाम, सुतारकाम व मुद्रणकला यांचें शिक्षण दिलें जातें.औद्योगिक शाखांची परीक्षा सरकारनें नेमलेली 'कमिटी ऑफ डायरेक्शन फॉर टेकनिकल एज्युकेशन ' घेते. परीक्षेचा निकाल नेहमी शेंकडा ८५ च्या वर असतो. जिल्हा बोर्डाकडून वरील फंडाचें व्याज प्रतिवर्षी मिळतें व हरएक तऱ्हेची सामुग्री घेण्याकरितां बोर्डानें सोळा हजार रुपये दिले आहेत. टोपीवाला औद्योगिक फंडांतून एक हजार रुपयांची ग्रँट मिळते. मुंबईचे श्री. नारायणराव देसाई यांनीं मुद्रण शाखेसाठीं दहा हजार रुपयांची इमारत बांधून दिली आहे. १९२५ सालीं अलिबाग तालुक्यांतील पोयनाड जवळच्या पेझारी गांवीं मागसलेल्या लोकांच्या करितां एक शाळा काढण्यांत आली. हल्लीं तेथें इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण दिलें जातें. तेथील दानशूर पारशीबाई पिरोजबाई यांनीं आपल्या पतीच्या स्मरणार्थ शाळेला इमारत बांधून दिली आहे. सांपत्तिक स्थितिः—आज सोसायटीची मालमत्ता सुमारें दोन लाख रुपये किंमतीची आहे. सेक्रेटरीः—रा. गणेश दामोदर टिल्लू, पत्ता—कोंकण एज्युकेशन सोसायटी, महाड जि. कुलाबा.

३. धूतपापेश्वर आरोग्य मंदिर आर्यौषधि कारखाना, पनवेल—कुलाबा. आयुर्वेदीय औषधें मोठ्या प्रमाणावर तयार करून त्यांचा गांवोगांवीं प्रसार करावा ही कल्पना प्रथम उभयतां पितापुत्र क. कृष्णशास्त्री पुराणिक व कै. विष्णुशास्त्री पुराणिक यांनीं सुमारें ५५वर्षांपूर्वी काढली. कल्पनस मूर्त स्वरूप यावयाचें म्हणजे कारखाना काढणें जरूर होतें. १८७८ पासून औषधें तयार होऊं लागलीं. सुरवातीचें भांडवल पांचपंचवीस रुपयांहून अधिक नव्हतें. कारखान्यास दृश्य स्वरूप १८८६ मध्यें आलें. १८९६ मध्यें नामकरणविधि झाला. पुढें कै. विष्णुशास्त्री पुराणिक यांनीं कारखाना अधिकाधिक वाढवून त्यास मोठें स्वरूप प्राप्त करून दिलें. कारखान्यांत आर्यवैद्यकाप्रमाणें शास्त्रोक्त व अनुभविक रसायनें, भस्में, लेप, तेलें इत्यादि अनेक औषधें तयार होतात. नवीन अनुभवानें सिद्ध केलेल्या औषधांची संख्याही बरीच आहे. वनस्पतींचा संग्रह फार मोठा आहे. कै. विष्ण शास्त्री यांनीं स्वतःच यांत्रिक दगडी खल पनवेल येथें तयार करविले. खलाचा दगड उत्कृष्ट वापरला असून औषधें निर्दोष तयार होतील अशीच त्यांची रचना व गति ठेवली आहे. कारखान्यांत तयार झालेल्या औषधांच्या माहितीचें पुस्तक निरनिराळ्या भाषांतून प्रसिद्ध झालें आहे. शिवाय सामान्य लोकांस आरोग्यविषयक माहिती व्हावी म्हणून व्यवहार—वैद्यक माला म्हणून एक ग्रंथमाला मराठींत प्रसिद्ध केली आहे. तींत औषधयोजना, पथ्यापथ्य विचार वगैरे पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. पत्रव्यवहारानेंही वैद्यकीय सल्ला देण्यांत येतो. शिवाय पनवेल येथें वैद्याचे देखरेखीखालीं औषधोपचार करण्यांत येतो. प्रांताप्रांतांतून औषधोपचाराकरितां समक्ष येणाऱ्या रोगी लोकांची संख्या बरीच मोठी असते. कारखान्याच्या एकंदर एजंटांची संख्या सुमारें एक हजार आहे. सुमारें १७५एजंट आपआपल्या गांवचे मुख्य एजंट आहेत. प्रत्यक्ष वैद्य मंडळींकडून व लोकलबोर्ड, म्युनिसिपालिटचा वगैरे संस्थांनीं काढलेल्या दवाखान्यांतून येथील औषधांचा उपयोग केला जातो. अनेक प्रदर्शनांचे व संमेलनाचे वेळीं कारखान्याच्या औषधांस सुवर्ण पदकें,रौप्य पदकें,व प्रशस्तिपत्रकें मिळालीं आहेत.या संस्थेचा एक स्वतःचा छापखाना असून त्याचा उपयोग व्यवहार—वैद्यक मालेसारखें वाङमय छापण्यास व इतर अनेक कामा-

कडे होतो. प्रयोगशाळा, आयुर्वेद–विद्यालय, रुग्णालय व वनस्पतींचा बाग वगैरे अनेक उपयुक्त अंगांची जोड देऊन कारखाना उत्तरोत्तर ऊर्जितावस्थेस आणण्याची चालकांची मनीषा आहे.

४ माता–बाल–संगोपन मंडळ, पनवेल स्थापना:–ता. १४ डिसेंबर १९२४. उद्देश:–(१) गरोदर स्त्रियांस प्रसूतीचे वेळीं शिक्षित सुइणीची मदत त्यांचे घरींच देणें. (२) सूतिकाशास्त्र, प्रथमोपचार, गृहपरिचर्या व गृहारोग्य या विषयांचे वर्ग स्त्रियांकरितां चालविणें. (३) माता–बाल–संगोपनासंबंधींच्या मूलतत्त्वांची माहिती लोकांस करून देणें. (४) सूतिकागृह सुरूं करणें. (५) स्त्रिया व मुलें यांचेकरितां दवाखाना उघडणें. संस्थापक डॉ. रा. धों. पटवर्धन. कार्य:–मंडळानें जून १९२८ मध्यें सूतिकागृह सुरूं केलें. सन १९२५ सालीं मंडळानें पनवेल येथें शिशुसप्ताह साजरा केला. सूतिकागृहांत सर्व जातींच्या स्त्रियांना दाखल करण्यांत येतें. आतांपर्यंत ब्राह्मण, सोनार, प्रभु, कासार, मराठा, गुजराथी, लिंगायत, भंडारी, शिंपी, चांभार, बुरूड, तेली, कुंभार व मुसलमान अशा निरनिराळ्या जातीच्या स्त्रिया सूतिकागृहामध्यें प्रसूत झाल्या आहेत. गेल्या सात वर्षांत पनवेल शहरांत घरोघरीं ४८५१ सूतिकागृहांत ९८ व बाहेरगांवीं ७२ स्त्रियांस मदत करण्यांत आली. सूतिकागृहाला जोडून व स्त्रिया व मुलें यांचेकरितां दवाखाना आहे. मंडळानें स्त्रियांकरितां प्रथमोपचाराचा वर्ग चालविला होता. पांच विद्यार्थिनींस सेंट जॉन अँब्यूलन्स असोसिएशनचीं सर्टिफिकिटें देण्यांत आलीं. सहाय्यक:–पनवेल म्युनिसिपालिटी रु. १०००, कुलाबा जिल्हा लोकलबोर्ड रु. ५००, पनवेल तालुका लोकलबोर्ड रु. १०१, श्रीमंत सरदार बिवलकर रु. २००, श्रीमंत रामचंद्र कृष्ण पुराणिक रु. १०१, शेट लक्ष्मीदास भास्करशेट ठक्कर रु. ५१, शेट चांपसी परसोत्तम रु. ५१, डॉ. कृ. श्री. म्हसकर एम्. डी. रु. ५०. याप्रमाणें वार्षिक देणग्या मिळतात. १९३०–३१ सालीं विलसन व्हिलेज मॅटर्निटी असोसिएशननें रु. १०० ग्रँट मंजूर केली आहे. इमारत फंडाला रा. कृ. पुराणिक यांनीं १००० रु. व श्री. वामन ऊर्फ वल्लभदास हरगोवनदास गुजर यांनीं ३००० रु. दिले. इमारतीकरितां मंडळाला ७००० रु. कर्ज आहे. जमाखर्च–सन १९३० सालीं जमा २९८१ रु. ८ आणे. खर्च २७५४ रु. ३ आ. ६ पै शिल्लक:–२२७ रु. ४ आ. ६पै. अध्यक्ष–रा. रामचंद्र कृष्ण पुराणिक; ऑ. सेक्रेटरी व ऑर्गनायझर डॉ. रा. धों. पटवर्धन.

खानदेश

१ खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर. ता. १७ जुलै १९०८ रोजीं रा. वासुदेव महादेव भावे यांनीं अमळनेर येथें काढलेल्या खाजगी इंग्रजी शाळेचें रूपांतर ता. २१ मे १९१४ रोजीं खानदेश एज्यु. सोसायटीचे शाळेंत झालें. खानदेश एज्युकेशन सोसायटीची स्थापना होण्यास ज्यांचें द्रव्य–साहाय्य प्रामुख्यानें झालें त्यांत विशेषत: अमळनेर येथील सुप्रसिद्ध दानशूर श्रीमंत प्रतापशेठ आणि येथील दुसरे एक प्रमुख सावकार रा. रा. सखाराम रावजी ऊर्फ नानासाहेब बंगाली यांचा उल्लेख करणें अवश्य आहे. संस्थेला स्थैर्य येण्याचे बाबतींत त्या वेळचे खानदेशचे कलेक्टर मे. रॉथफील्डसाहेब यांनींही वेळोवेळीं उपयुक्त असा सल्ला दिला. अशा रीतीनें संस्थेचा पाया भक्कम भरला गेला तरी संस्थेमध्यें चैतन्य ओतून तिला विकसित आणि तेजस्वी करण्याकरितां लायक माणसांची विशेष जरूरी होती. अकल्पित योजनेनें या वेळेस महाराष्ट्रांतील कांहीं तरुण व कर्तबगार पदवीधर शिक्षणाच्या पवित्र कार्यास स्वत:स आजन्म वाहून घेण्याच्या उद्देशानें एकाद्या सोयीस्कर अशा स्थळाच्या शोधांत होते. साहजिकच या तरुण मंडळींचीं नजर शिक्षणांत मागासलेल्या खानदेश जिल्ह्याकडे वळली आणि दैवयोगानें ही मंडळी संस्थेस लाभली. खानदेशांतील तरुण पिढीला विश्वविद्यालयांत शिक्षण देऊन त्यांचीं मनें सुसंस्कृत करावयाचीं अशी त्यांनीं उमेद बांधली. ही नवीन मंडळी संस्थेला जून १९१६ मध्यें येऊन मिळाली. यापुढें संस्थेचा उत्कर्ष फारच झपाट्यानें होत गेला. त्याचें एक दृश्य फल म्हणजेच संस्थेनें प्रवेश परीक्षेस पाठविलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल अत्यंत समाधानकारक लागले हें होय. खानदेशांत कॉलेज काढून उच्च शिक्षण सुलभ करून त्याचा फैलाव इलाख्यांतील इकडील भागांत करण्याचे प्रयत्न संस्थेनें लवकरच सुरूं केले. या वेळेस अमळनेरमधील सधन लोकांनीं तर मदत केलीच पण येथील त्यावेळचे जिल्हाधिकारी मे. मॉन्टीथसाहेब यांनींही प्रोत्साहन देऊन शक्य तेवढी मदत दिली. संस्था अशा तऱ्हेनें कॉलेज काढण्याच्या बाबतींत पूर्ण व्यग्र असतांच १९२१ मध्यें देशामध्यें एक नवीन तऱ्हेचें वारें खेळूं लागलें. इ. स. १९२१ मध्यें महात्मा गांधींनीं सर-

काराशीं अनत्याचारी असहकारिता पुकारली. असहकारितेच्या चळवळीनें देशांत राष्ट्रीय वृत्ति जागृत झाली. राष्ट्रीय मनोभावनांच्या क्रांतीची लाट या संस्थेपर्यंत पोंचली आणि त्याचें रूपांतर संस्था राष्ट्रीय होण्यांत झालें. संस्थेचें अशा तऱ्हेचें रूपांतर होण्याच्या बुडाशीं कोणतीही असहकारितेची विचारसरणी नसून देशांतील तरुण माणसांना पटलेले असे दोष शिक्षणांतून काढून टाकण्याच्या इच्छेनेंच संस्था राष्ट्रीय करण्यांत आली. संस्थेच्या या कार्यांत यश येईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं; किंबहुना राष्ट्रीय शिक्षणाचें एक प्रमुख केंद्रच ही संस्था होणार अशी आशा करावयास जागा होती. परंतु अशा तऱ्हेनें नवीन तत्त्वांवर चाललेल्या संस्थांना ज्या गोष्टीची विशेष अडचण भासते ती द्रव्याची असून या संस्थेचें गाडें पुन्हां मूळपदावर येण्यासही विशेषतः तीच गोष्ट कारणीभूत झाली. संस्थेनें सुरूं केलेल्या राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग पैशाच्या अभावामुळें बंद करावा लागला, हें संस्थेचें दुर्दैव होय. संस्था पुन्हां जुन्या क्षुण्ण मार्गानें मे १९२३ पासून वाटचाल करूं लागली. या विशेष घडामोडीचे वेळीं संस्थेचे कांहीं तहाहयात सभासद हे परावर्तन न आवडल्यामळें संस्था सोडून गेले. तेव्हांपासून आजपर्यंत संस्था व्यवस्थितपणें चालली असून संस्थेला तरुण, कर्तबगार व हुशार असे तीन नवीन तहाहयात सभासदही लाभले आहेत व संस्थेचें काम चांगलें चाललें आहे. संस्थेचे वर्गणीदार आज सुमारें ११५ असून त्यांत १९ पेट्रन्स् व ९६ फेलोज् आहेत. संस्थेच्या स्वतः-च्या मालकीच्या अशा शाळा व छात्रालय वगैरेच्या इमारती असून आज संस्थेजवळ सुमारें एक लाख फंडही आहे. छात्रालयांत सुमारें १०० मुलांची सोय असून हल्लीं ६० मुलें आहेत. सभोंवार बऱ्याचशा शाळा झाल्या असूनहि या शाळेंतील मुलांची वाढती संख्या संस्थेच्या लोकप्रियतेची द्योतक आहे.

खानदेश शिक्षण मंडळ—हायस्कूल सन १९३०–३१ सालीं ५८६ विद्यार्थी होते. त्यांची जातवारीः ब्राह्मण ३७२; जैन ४०; इतर हिंदू १४९; पारशी २; मुसलमान २२; इंडोख्रिश्चन १. जमा—३२८९९ रु. ७ आ. ९ पै. खर्च ३९१७६ रु. ६ आ. ५ पै. तूट—६२७६ रु. १४ आ. ८ पै. सोसायटीकडून घेतले. अध्यक्ष—श्री. शेठ मोतीलाल माणकचंद ऊर्फ प्रतापशेठ, अमळनेर. चेअरमन—श्री. विष्णु काशिनाथ भागवत. सेक्रेटरी—विनायक विश्वनाथ चितळे बी. ए. पत्ताः—खानदेश एज्युकेशन सोसायटी. अमळनेर. जि. खानदेश.

२ प्राणिरक्षक संस्था, धुळें:—कै. नथूभाई शिवजी यांच्या प्रयत्नांनीं १९०६त स्थापना; हेतू (१) धर्माचे नांवानें होणारा जनावरांचा वध बंद करणें (२) ज्ञानाचा प्रसार करणें. व (३) अनाथांच्या उपयोगी पडणें. संस्थेनें चालविलेलें कार्य (१) पशुहत्यानिवारणासाठीं हस्तपत्रकें वाटणें; व्याख्यानें, मॅजिकलँटर्न इ.द्वारां प्रचारकाकडून आरोग्य, गोरक्षण, शेतकीबद्दल माहिती; (२) २० वर्षांपासून धुळें येथें आयुर्वेदिक औषधालय; दररोज सुमारें १५० रोगी फायदा घेतात. संस्थेनें कॉलऱ्यावर रामबाण औषध तयार केलें आहे; तें मोफत पुरविण्यांत येतें. गेल्या सालीं ४० हजार लोकांनीं औषधालयाचा फायदा घेतला. (३) धुळें येथे एक मोफत वाचनालय व ग्रंथालय; यांची शाखा फागणें गांवीं. अध्यक्ष—शेठ चुनीलाल मगनलाल. सेक्रेटरी शेठ भारतीय व श्री. साठे.

३. राजवाडे–संशोधन–मंडळ, धुळें—स्थापना शके १८४८ पौष शु॥ ६; सन १९२७. चिटणीस श्री. भास्कर वामन भट धुळें हेतू—(१) ऐतिहासिक आणि वाङ्मयात्मक संशोधन करणें. (२) कै. राजवाडे यांचा व यापुढें नवीन उपलब्ध होणारा संग्रह सुरक्षित राखणें. (३) त्या संग्रहाचें यथावकाश प्रकाशन करणें. (४) कै. राजवाडे यांनीं लिहून ठेवलेला प्रचंड मराठी धातुकोश व त्यांचीं इतर पूर्णापूर्ण टांचणें प्रसिद्ध करणें. (५) एकवार प्रकाशित पण हल्लीं दुर्मिळ झालेल्या त्यांच्या लेखांचें विषयवारीनें खंडशः पुनर्मुद्रण करणें (६) कै. राजवाडे यांचें स्मारक म्हणून धुळें येथें राजवाडे-संशोधन—मंदिर उभारणें. (७) वरील कार्यार्थ द्रव्यनिधि जमविणें. (८) वरील सर्व कार्यें व तत्सदृश कार्यें सिद्ध होण्यासाठीं जरूर ती उपाययोजना करणें. सभासदांचे वर्गः—एक हजार किंवा त्याहून जास्त रुपये एकदम देणारे आधारस्तंभ सभासद, पांचशें किंवा जास्त रक्कम देणारे आश्रयदाते सभासद, शंभर किंवा जास्त रुपये देणारे तहाहयात सभासद व दरसाल १२, ६ अगर ३ रुपये देणारे साधारण सभासद असे सभासदांचे प्रकार आहेत. कार्य—राजवाडे संशोधन मंडळाच्या अनेक हेतूंपैकीं मुख्य हेतु राजवाडे—संशोधन—मंदिराची उभारणी करणें हा असल्यामुळें तें काम मंडळाकडून प्रथम हातीं घेण्यांत आलें. संशोधन मंदिराचें बांधकाम शके १८५३ च्या आश्विनांत पुरें झालें. व राज-

वाडयांचा ऐतिहासिक लेखसंग्रह मंदिरांत नेऊन प्रतिष्ठित करण्यांत आला. संशोधन मंदिरांत क. राजवाडयांनीं मोठया परिश्रमानें केलेला जो ऐतिहासिक संग्रह ठेवलेला आहे त्यांत वेद, ब्राह्मण उपनिषदें, वेदांत, धर्मशास्त्र, मीमांसा, व्याकरण, न्याय, ज्योतिष, आयुर्वेद, नाटक, काव्य, इतिहास, छंद, अलंकार, याज्ञिक, मंत्र, तंत्र इत्यादिविषयां-वरील हस्तलिखित २५०–३०० वर्षांपूर्वीचे ग्रंथ आहेत. राजवाडयांच्या संस्कृत ग्रंथसंग्रहाप्रमाणें त्यांचा मराठी हस्तलिखित ग्रंथांचा संग्रहही फार मोठा आहे. वेदांत, भक्ति, कथा, ज्योतिष, वैद्यक, फलज्योतिष, सामुद्रिक इत्यादि विषयांवरील ग्रंथ असून विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव इत्यादि मराठी वाङ्मयांतील प्राचीन ग्रंथांच्या अनेक हस्तलिखित प्रति, त्याचप्रमाणें महानुभाव पंथाचे प्राचीन हस्तलिखित ग्रंथही या संग्रहांत आहेत. गतकालीं मराठयांच्या इतिहासांत जीं घराणीं आपल्या कर्तबगारीनें उदयास आलीं, त्या अनेक घराण्यांचे कागदपत्र या संग्रहांत आहेत. छत्रपति शिवाजी महाराज, थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, नाना फडणीस, राघोबादादा पेशवे इत्यादि अनेक व्यक्तींचीं पत्रें या संग्रहांत आहेत. संस्कृत हस्त-लिखित ग्रंथ सुमारें तीन हजार आहेत. तसेंच मराठींतील वेदांत, पुराणें, ज्योतिष वगरे विषया-संबंधीं सुमारें दीडदोन हजार हस्तलिखित ग्रंथ आहेत. त्याशिवाय इंग्रजपूर्वकालीन ऐतिहासिक कागदपत्र जवळजवळ पांच सहा हजार तरी आहेत हा संग्रह सुरक्षित ठेवून त्यांत भर टाकण्याचा मंडळाचा प्रयत्न चालू आहे. राजवाडे–संशोधन मंडळाकडून ऐतिहासिक संशोधनाचें कार्य बऱ्या प्रकारें होण्याकरितां नानाविध शास्त्रांवरील मराठी, संस्कृत व इंग्रजी ग्रंथाच्या चांगल्या व भर-पूर संग्रहाची आवश्यकता लक्षांत घेऊन संशोधन मंदिराच्या तळमजल्यांत "राजवाडे–संशोधन–मंदिर ग्रंथालया"ची स्थापना करण्यांत आली आहे. यांत मराठी व इंग्रजी भाषेंतील अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहासशास्त्र, तत्त्वज्ञान, चरित्रें, बँका, चलनपद्धति इत्यादि विषयांवरील ग्रंथांचा संग्रह असून शिवाय निरनिराळया सरकारी खात्यांचे अहवाल, कोश व इतर संदर्भग्रंथ यांचाही मोठा संग्रह केलेला आहे. शास्त्रीय ज्ञानाची अभि-रुचि सामान्य लोकांत उत्पन्न करून तिचा प्रसार व्हावा हाही या ग्रंथालयाच्या स्थापनेचा हेतु आहे. हा हेतु साध्य होण्यास्तव धुळें शहरांतील नागरि-कांना वार्षिक अल्प वर्गणी देऊन या ग्रंथालयाचे सभासद होण्याची सवलत ठेवण्यांत आली आहे. कै. राजवाडयांच्या अप्रकाशित लेखांचें प्रकाशन, त्यांच्या संग्रहापैकीं मराठयांच्या इतिहासाच्या साधनांचें प्रकाशन वगैरे कार्यासाठीं मंडळातर्फे 'संशोधक' त्रैमासिक चालविण्यांत येत आहे. राजवाडे–संशोधन–मंडळामार्फत होणाऱ्या संशो-धनाच्या व प्रकाशनाच्या कार्यास द्रव्यसाहाय्य मिळण्याकरितां "राजवाडे ग्रंथप्रकाशक परस्पर सहकारी मंडळी" नांवाची मंडळी स्थापन कर-ण्यांत आली आहे. आधारस्तंभ झालेल्यांचीं नांवें– रु.११०० श्रीमंत सौ. महाराणी इंदिराबाई मा-साहेब होळकर, इंदूर सं.; रु.१००० कौन्सिल ऑफ रीजन्सी, ग्वाल्हेर संस्थान. रु.१००० श्रीमंत बाळा-साहेब पंडित पंतप्रतिनिधि सं. औंध. रु. १५०० रा. पांडुरंग वासुदेव जोशी वकील हैद्राबाद (दक्षिण). रु.१००० रा. रा. व्यंकटेश गणेश जावडेकर, धुळें. रु.१००१ रा. रा. नारायण वंकट शेट, चाळीसगांव.

४. **समर्थ सेवाश्रम**, धुळें:––स्थापना शके १८५१. संस्थापक श्री. अनंत श्रीधर क्षीरे. प्रथम यांनीं समर्थ मंडळ या नांवाची संस्था स्थापन केली. पुढें अनेक गंडांतरांतून बाहेर पडल्यावर मंडळा-मार्फत मोफत वाचनालय व तालीम सुरू करून विद्यार्थ्यांस राष्ट्रीय व तेजस्वी शिक्षण देण्यास सुरुवात केली. मंडळाचा व्याप वाढल्यामुळें त्याचें रूपांतर करण्यांत येऊन श्री समर्थ सेवाश्रम स्थाप-ण्यांत आला. या आश्रमाचें मुख्य ध्येय धर्मजागृति, राष्ट्रसेवा व सर्वांगीण उन्नति हें आहे व त्यासाठीं फकिरी बाण्यानें राहणारे प्रचारक तयार करण्या-चा उद्योगही सुरू आहे. "देवाच्या सख्यत्वा-साठीं, पडाव्या जिवलगासी तुटी, सर्वस्व अर्पावें शेवटीं, प्राण तोही वेंचावा" या त्यागवृत्तीचा जनतें-त सार्वत्रिक प्रचार करणें हा हेतु आहे. व्यायाम-शाळा, वाचनालय, विद्यार्थ्यांसाठीं धार्मिक शिक्ष-णाचा वर्ग, धर्मवीरांचीं व देशभक्तांचीं व्याख्यानें व प्रवचनें, निरनिराळे सार्वजनिक उत्सव करणें इत्यादि. प्रचारक तयार करण्याचा आश्रमाचा जो हेतु आहे त्यानुसार चालविण्यांत आलेल्या प्रचारक शिक्षणवर्गाची रूपरेषा:– प्रचारकीय विद्यार्थ्यांची लायकी–मराठी सात इयत्ता अगर इंग्रजी पांचवी किंवा मॅट्रिक (टिळक विद्यापीठ); अभ्यासक्रमाची मुदत मराठीचीं ४ वर्षें व इंग्रजी जाणणाऱ्यास किमान पक्षीं ३ वर्षें. शिक्षण:–(१) धार्मिक, वेदकालीन, बौद्धकालीन, पुराणकालीन

परिस्थितीचें ज्ञान व माहिती. याशिवाय श्रीज्ञानेश्वरी, श्रीदासबोध, श्रीमत् भागवत यांचें सार्थ वाचन व रात्रीं वारकरी भजन, निरूपण, कीर्तन वगैरे. (२) राजकीय (अ) परीक्षितापासून तों. रजपूत कालापर्यंत रामायण व महाभारतासह (आ) रजपूत व मुसलमान (इ) मुसलमान–मराठे (ई) मराठे व इंग्रज–इतिहासाचें शिक्षण. (३) सामाजिक सांपत्तिक स्थिति (जग व हिंदुस्थान) (अ) औद्योगिक जीवन (आ) समाजरचना. (४) औद्योगिक–बाइंडिंग, वीणकाम, रंगकाम वगैरे. (५) शारीरिक शिक्षण, मल्लखांब, कुस्ती, गदगाफरी, पट्टा, लेजीम वगैरे.

ठाणें

१. चित्तरंजन ग्रंथसंग्रहालय, वसई:—स्थापना-१ ऑगस्ट १९२६; संस्था मालकी हक्कावर स्थापन करण्यांत आली. संस्थापक–कै. गोडबोले, रा. दोंदे व सामंत बंधु. ग्रंथांची संख्या प्रथम २५५; सध्यां दीड हजारापेक्षां जास्त. वाचक प्रथम २५; सध्या १००. याखेरीजचें कार्य–शिवजयंत्युत्सव; गुजराथेंतील अतिवृष्टीमुळें अनाथ झालेल्यांच्या मदतीसाठीं मेळा, व्याख्यानें इत्यादि कार्य केलें. चिटणीसः–श्री. ना. मा. सामंत.

२. सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नति संघ, मु. बोर्डी–जि. ठाणें. उद्देशः–समाजांत शिक्षणप्रसार करणें व इतर शक्य त्या रीतीनें समाजसुधारणा करणें. १९३१च्या खानेसुमारीप्रमाणें समाजाची लोकसंख्या ९६७१ आहे. पैकीं ४८५७ पुरुष व ४८१४ स्त्रिया आहेत. संघाची मुख्य कचेरी मु. बोर्डी जि. ठाणें येथें असून शाखा २१ आहेत. संघाचे आश्रयदाते ५, साहाय्यक ३, तहाहयात सभासद १०८, साधारण सभासद १००० व स्त्री सभासद २० आहेत. १९३१ सालीं वीस विद्यार्थ्यांना फी व पुस्तकांकरितां मदत देण्यांत आली. सांपत्तिक स्थितिः–स. १९३१–३२ सालीं मागील शिल्लक १४२५ रु. १० आ. १० पै. जमा २६८९३ रु. ११ आ. ५ पै. खर्च २५९९० रुपये गव्हर्मेंट बाँड मध्यें गुंतविले आहेत. इतर खर्च १२२६ रु. १५ आ. ६ पै. शिल्लकः–११०२ रु. ६ आ. ९ पै. कार्यकारी मंडळ. अध्यक्षः–श्री. भाईजी जगू राऊत, उपाध्यक्षः–श्री. बळवंत जगन्नाथ वर्तक, खजिनदारः– श्री. गोविंद धर्माजी वर्तक बी. ए., चिटणीसः–श्री. आत्माराम विठ्ठल सावे. बी. ए. बी. टी., श्री. मदन लक्ष्मण राऊत एल्. सी. ई., श्री. रघुनाथ रामचंद्र चौधरी. पत्ता–मु. पो. बोर्डी जि. ठाणें.

धारवाड

१. कर्नाटक–महाराष्ट्र मंडळ धारवाड–स्थापना शके १८४९; मंडळाचे मुख्य उद्देश महाराष्ट्रीयांनीं आपली मातृभाषा व स्वत्व कायम ठेवणें, महाराष्ट्राशीं संबंध न तोडणें, कर्नाटक महाराष्ट्र ह्यांच्या संस्कृतीचा व वाङ्मय वगैरेचा परिचय परस्परांस करून देऊन महाराष्ट्र व कर्नाटक यांमधील प्रेमहितसंबंध दृढ करणें व वाढविणें हे आहेत. हल्लीं (१९३१) सभासदांची संख्या ६० आहे. मंडळाचें ग्रंथालय व वाचनालय आहे. मंडळातर्फे उत्सव, समारंभ, व्याख्यानें वगैरे चाल असतात. श्रीयुत जठार ह्यांच्या कर्नाटक प्रिंटिंग वर्क्समध्यें मंडळाची कचेरी, ग्रंथालय व वाचनालय प्रथमपासून आजतागायत आहेत. १९३१ जमा ४९३–२–६ रु. खर्च २१४–५–० रु. व शिल्लक २७८–१३–६ रु. अध्यक्षः–श्री. वि. ना. जोग बी. ए. एलएल्. बी. एम् एल्. ए.; उपाध्यक्ष श्री. त्रि. का. पित्रे बी. ए. एल् एल्. बी. कार्यदर्शी श्री. भा. रा. पटवर्धन एम्. ए. एल् एल्. बी

२. मराठी वाङ्मयप्रेमी मंडळ गदग.:—स्थापना १९२९; उद्देश मराठी भाषसंबंधीं आदर असणारांची संघटना, दळणवळण घडविणें; मराठी वाचकांची व लेखकांची शक्य तों सोय जमवून देणें; महाराष्ट्रीयांसंबंधींचे गैरसमज दूर करणें, महाराष्ट्र व कर्नाटक यांमधील हितसंबंध वाढविणें वगैरे. कार्य मराठी मोफत वाचनालय, मासिकें व ग्रंथ यांची फिरती वाचनव्यवस्था, संघशक्ति, नांवाचें हस्तलिखित मासिक, ग्रंथसंग्रह, मोफत व्यायाममंदिर व शिवजयंत्युत्सव, टिळक पुण्यतिथि व गडकरी स्मृतिदिन वगैरे उत्सव. सभासदांची सध्याची संख्या १००; कार्यदर्शी द. वा. चाफेकर.

३. लोकमान्य मोफत वाचनालय शिरहट्टी (धारवाड). संस्थचें पहिलें नांव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'; नागेशराव तांबे यांचे हस्तें १८८१ त स्थापना. १९२० त पूर्वींचें नांव बदलून लो. टिळकांचें नांव दिलें; १९२१ त वाचनालय मोफत करण्यांत आलें. पुस्तकांची संख्या दीड हजारावर आहे. सांगली सरकारकडन ५० रु. ची व म्युनिसिपालिटीकडून २५ रु. ची. दरसाल ग्रँट; आश्रयदात्यांची संख्या ११५. सेक्रेटरीः–श्री. देशपांडे व श्री. मंगसुळी.

४. वनिता सेवा समाज (धारवाड):—स्थापना १९२८. संस्थापकः–श्री. भागीरथीबाई

पुराणीक व श्री. डॉ. लक्ष्मण वेंकटेश मळबेन्नूर. स्त्रियांच्या उन्नतीकरितां व त्यांचीदु:स्थिति निवारण्याकरितां प्रयत्न करणें हा समाजाचा आद्य उद्देश आहे. थोड्या वेळांत थोड्या आयासानें जास्तींत जास्ती उपयुक्त ज्ञान विवाहित स्त्रियांना व विधवांना कसें मिळेल इकडे समाजाचें विशेष लक्ष राहील. आश्रयदाते, साहाय्यक १ला वर्ग, २रा वर्ग, ३रा वर्ग वगैरे तऱ्हेचे सभासद असे बरेच संस्थेचे सदस्य आहेत.प्रचलित कार्यक्रम–निरक्षर प्राथमिक, दुय्यम व मिश्र वर्गांत लहान मोठ्या सर्व विद्यार्थिनी शिकत असतात. सर्व विद्यार्थिनींना पुराण, कीर्तन कार्यक्रमांनीं कांहीं विषय शिकविणें, धर्मार्थ औषधोपचार, बायका–मुलांकरितां, फिरतें वाचनालय, अनाथांचें संरक्षण व शिवणकाम, बांगड्या वगैरे धंदे, हीं कामें चालू आहेत. शिवाय व्याख्यानें व वार्षिकोत्सव होत असतात. सेक्रेटरी डॉ. ल. वें. मळेबेन्नूर. उपाध्यक्षः–रावसाहेब पी. जी. हलकट्टी. बी. ए. एल् एल्. बी. संपादक नवकर्नाटक.

पुणें

१. **ॲडल्ट एज्युकेशन लीग,** पुणें:– स्थापना १९२९.हेतु व उद्देश:–(१) प्रौढ माणसांमध्यें, आयुष्य जास्त सुखकारक करणाऱ्या अनेक गोष्टींबद्दल ज्ञान मिळविण्याची इच्छा उत्पन्न करणें.(२) चित्रदीप (Magic Lantern)' आराखडे, नकाशे, चित्रपट वगैरे उपायांनीं स्वतंत्रपणें किंवा इतर संस्थांच्या सहकार्यानें, ज्ञानांत भर टाकणें. (३) तज्ज्ञांच्या साहाय्यानें उपयुक्त विषयावर उद्बोधक चित्र वाङ्मय (Pictorial Literature) तयार करणें. (४) निरनिराळ्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याबद्दल निरनिराळ्या कसबी लोकांना गळ घालणें. (५) आपल्या फावल्या वेळांत बहुजनसमाजास थोडेंफार शिक्षण द्या असें वृद्धांस आग्रहपूर्वक सांगणें इत्यादि. सभासदांचे वर्ग–रु.५०० किंवा जास्त रुपये देणारे आश्रयदाते, एकदम ५० रु. देणारे तहाहयात सभासद व वार्षिक ५ रु. देणारे साधारण सभासद असे सभासदांचे वर्ग आहेत. कार्य–लोकोपयुक्त विषयांवर, लीगतर्फें, अनेक चित्रदीपांतून दाखविण्यासाठीं चित्रें तयार केलीं आहेत व त्या चित्रदीपाच्या कार्यक्रमाबरोबर त्या त्या विषयांवर व्याख्यानें दिलीं जातात. मंडळानें एकंदर ३० विषयांवरील चित्रव्याख्यानें तयार केलीं आहेत. अध्यक्ष:–श्री. गो. कृ. देवधर. चिटणीस:–श्री. एस्. व्ही. आपटे.


२. **अनाथबालिकाश्रम** अथवा **हिंदु वुइडोज् होम:**—ही संस्था काढण्याच्या हेतूनें प्रोफेसर धोंडो केशव कर्वे यांनीं १४ जून १८९६ रोजीं पंधरावीस गृहस्थांच्या मदतीनें अनाथबालिकाश्रमाची मंडळी' अथवा 'हिंदु वुइडोज् होम असोसिएशन' स्थापन केली. डॉ. भांडारकर हे त्या मंडळीचे अध्यक्ष व प्रो. कर्वे हे चिटणीस झाले. आरंभीं एकदम विधवागृह काढण्याची जबाबदारी न घेतां प्रो. कर्वे फंड जमविण्याच्या उद्योगास लागले. मोठ्या काटकसरीनें शिल्लक टाकलेले एक हजार रुपये प्रो. कर्वे यांनीं ह्या संस्थेला दिले व नंतर ते लोकांकडे वर्गणीसाठीं हिंडले. त्यांच्या ह्या उद्योगाला हळूहळू यश येऊं लागलें. अल्पवयी, गरीब व होतकरू विधवांना शिक्षण देऊन त्यांचे अंगीं स्वतःच्या व समाजाच्या उपयोगी पडण्याची पात्रता आणावी हा ह्या संस्थेचा हेतु होता. पहिल्यानें कांहीं विद्यार्थिनींना सरकारी मुलींचें हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज ह्यांच्या बोर्डिंगांत ठेवून त्यांचा खर्च द्यावा व तेथेंच त्यांचें शिक्षण होऊं द्यावें असें ठरविलें व एकदम कामाला सुरवात केली. अशा सात आठ विधवांचें शिक्षण चालू झालें. पुढें १८९९ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस स्वतंत्र आश्रमाला सुरुवात बारा तोटच्यांच्या हौदाजवळ हल्लीं जेथें ब्राह्मणकार्यालय आहे त्या घरांत झाली. त्या वर्षींच्या प्लेगांत आश्रमाच्या मुली व प्रो. कर्वे, प. वा. रावबहादूर गणेश गोविंद गोखले यांच्या हिंगणें येथील बागेंतील घरांत राहावयास गेले. ही बाग आश्रमाच्या हल्लींच्या जागेजवळच पूर्वेच्या बाजूस आहे.तेथें राहत असतांना आश्रमाची मोकळी माळ जमीन रावबहादुरांनीं आश्रमाकरितां देण्याचें ठरविलें. व त्या जमिनीवर झोंपडी बांधून तेथें १९०० च्या जूनमध्यें आश्रमाच्या विद्यार्थिनी राहूं लागल्या. ती झोंपडी अजून त्याच ठिकाणीं पाहण्यास सांपडते. दोन वर्षांच्या अनुभवानें हें ठिकाण सोईचें होईल असें वाटल्यावरून तेथेंच जरूरीप्रमाणें आश्रमाच्या इमारती बांधण्यांत आल्या. हें ठिकाण हिंगणें-बुद्रुक गांवाच्या हद्दींत असून पुण्यापासून चार मैलांवर आहे. विद्यार्थिनींची संख्या हळूहळू वाढूं लागली व थोड्याशा कुमारिका मुलीही पालकांच्या खर्चानें घेण्यांत आल्या. परंतु कुमारिका व सुवासिनी स्त्रियांसाठीं वेगळी संस्था निघाली तर बरी असें वाटल्यावरून प्रो. कर्वे यांनीं १९०७ च्या मार्च महिन्यांत लकडीपुलाजवळ डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दिलेल्या गोडबोले वाड्यांत महिला विद्यालयाची स्थापना



आण्णासाहेब कर्वे.



डॉ. कुर्तकोटी.



राजेश्वरशास्त्री द्रविड.



मसूरकर महाराज.



डॉ. परांजपे.



तात्यासाहेब केळकर.



कृ. प्र. खाडीलकर.



गो. कृ. देवधर



डॉ. मुंजे

केली. ह्या संस्थेंत मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. ब्रह्मचर्यफंड म्हणून वेगळा फंड काढून त्यांतून स्कॉलरशिपा देण्यांत आल्या. मुलीचें लग्न ती वीस वर्षांची होई-पर्यंत करणार नाहीं असा पालकांकडून करार करून घेऊन अशा मुलींना ह्या स्कॉलरशिपा देण्यांत आल्या. अशा सात आठ मुली मिळाल्या. १९१२ पर्यंत ही संस्था पुण्यांत चालली. प्रो. कर्वे यांजवरच दोनही संस्थांची जबाबदारी असल्या-मुळें दोन्ही संस्था जवळ जवळ असल्या तर देख-रेखीला सोईचें होईल ह्या दृष्टीनें आश्रमाजवळच इमारत बांधून तेथें ही संस्था नेण्यांत आली. नंतर १९१५ मध्यें दोन्ही संस्था एक होऊन विशेषतः विधवांसाठीं काढलेल्या अनाथबालिका-श्रमाला सामान्यतः स्त्रियांच्या शिक्षणाची संस्था असें स्वरूप प्राप्त झालें. प्रो. कर्वे यांच्या पत्नी आनंदीबाई कर्वे ह्यांची आरंभींच्या स्थितींत आश्रमाला फारच मदत झाली. अंतर्व्यवस्थेची सर्व जबाबदारी त्यांजवरच असे. त्यांचें ६७ वर्षांचें वय झालें असतां अजूनही त्या आश्रमाच्या भाऊ-बीजफंडासाठीं व वर्गणी मिळविण्यासाठीं दूर-दूरचा प्रवास करून झटून प्रयत्न करीत आहेत. त्यांचे मागून आनंदीबाईंच्या भगिनी पार्वतीबाई आठवले ह्या आश्रमाला येऊन मिळाल्या व त्यांनीं ही जबाबदारी घेतली. ह्याही बासष्ट वर्षांचें वय असतां आश्रमासाठीं वर्गणीचें काम करीत आहेत. त्यानंतर कांहीं वर्षांनीं श्रीमती काशीबाई देवधर व श्रीमती वेणूबाई नामजोशी (आतां सौ. जानकीबाई साठे), ह्यांची आश्रमाला फार मोठी मदत झाली. प्रो. कर्वे हे फर्ग्युसन कॉलेज व न्यू-इंग्लिश स्कूल यांतलें काम संभाळून राहिलेला वेळ आश्रम व विद्यालय यांजकडे लावीत. महिला-विद्यालयाचे कामीं कै. श्रीयुत कौलगेकर व श्रीयुत गाडगीळ यांची फार मोठी मदत झाली. दोन्ही संस्था एक झाल्यावरही ह्यांची मदत बरेच वर्षें चालू होती. नंतर ते सेवानिवृत्त झाले. प्रो. कर्वे यांचें लक्ष १९१६ सालापासून महिला विद्यापीठा-कडे लागलें व आश्रमाकडे त्यांना फारसा वेळ देतां येईनासें झालें. आश्रमानें आरंभीं महिला विद्या-पीठाच्या शिक्षणकार्याची जबाबदारी स्वीकारली. महिलाविद्यापीठाचें एक हायस्कूल व लहानसेंच कॉलेज ह्या संस्था आश्रमानें पुष्कळ घस सोसून आठ वर्षें हिंगण्यास चालविल्या. पुढें विद्यापीठाचें हायस्कूल पुण्यास झालें व कॉलेज येरंडवण्यास बांधलेल्या नव्या इमारतींत नेण्यांत आलें. महिला विद्यापीठाला चालना देण्याचें श्रेय आश्रमालाच आहे. आश्रमाची व विद्यापीठाची नवीन जबाब-दारी संभाळण्यासाठीं स्वार्थत्यागानें काम करणारे नवे आजन्मसेवक घ्यावे लागले. प्रो. दिवेकर, प्रो. आठवले, कै. प्रो. गो. म. चिपळूणकर, व श्रीयुत मोडक आणि प्रो. वामनराव जोशी, प्रो. केळकर, प्रि. पटवर्धन, प्रो. मायदेव, श्री. वारूबाई शेवडे, डॉ. कमळाबाई देशपांडे, श्री. सीताबाई अण्णिगिरी, श्री. बनूबाई अहो, श्री. गंगूबाई तांबोळे वगैरे आजन्म सेवक—सेविकांची मदत ह्या पुढल्या सोळा वर्षांत आश्रमाचें व विद्या-पीठाचें काम चालविण्यासाठीं झाली व होत आहे. गेल्या वर्षी डॉ. सौ. इरावतीबाई कर्वे व कु. बाळू-बाई खरे ह्या दोन स्त्रिया संस्थेस आजन्मसेविका म्हणून येऊन मिळाल्या आहेत. आश्रमांतील शिक्षण बहुतेक सरकारी सातवी इयत्ता व मुंबई युनिव्ह-र्सिटीच्या मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेचा अभ्यासक्रम ह्या धोरणानेंच १९१६ पर्यंत चाललें होतें. पुढें महिला विद्यापीठाचा अभ्यासक्रम ठरल्याबरोबर आश्रमांत चाललेलें हायस्कूल विद्यापीठाचें पहिलें हायस्कूल झालें व सरकारी परीक्षेसाठीं मुली पाठविण्याचें बंद होऊन विद्यापीठाच्या परीक्षां-साठीं मुली तयार करण्यांत येऊं लागल्या. हल्लीं आश्रमांत एक पूर्ण हायस्कल, अध्यापिकाशाळा अथवा ट्रेनिंग कॉलेज, आणि ह्या शाळेसाठीं प्रॅक्टि-सिंग स्कल म्हणन एक प्राथमिक शाळा अशा शिक्षणसंस्था चालल्या आहेत. जवळ राहणाऱ्या शेतकरी लोकांच्या मुलांमुलींसाठींही एक लहानसा स्वतंत्र वर्ग चालविण्यांत येत आहे. त्याचाही उप-योग प्रॅक्टिसिंग स्कूलप्रमाणें होत असतो. पांच वर्षांच्या वयापासून मुली घेण्यांत येतात. हल्लीं हिंदूंच्या बहुतेक जातींच्या पावणे—दोनशें विद्या-र्थिनी आश्रमांत आहेत. त्यांत ६५ विधवा, ९६ कुमारिका व १४ सुवासिनी आहेत. ह्यांपैकीं सुमारें पन्नास विद्यार्थिनींचा खर्च आश्रमांतून होत असतो. ह्या ठिकाणीं मुलगी ठेवावयाची झाल्यास एकंदर खर्च सुमारें द. म. वीस रुपये येतो. आश्र-माची जमीन सुमारें बारा एकर आहे, व इमारती दीड लाखाच्या आहेत. स्कॉलरशिपा व बक्षिसें ह्यासाठीं फंड ८३००० रु. आहे. शिवाय कायम-निधि ३३००० रुपये आहे व स्वतःच्या किंवा कोणा आप्ताच्या ह्यातीपर्यंत व्याज देण्यांत येऊन नंतर आश्रमाकडे जाण्याची रक्कम ३२००० रु. आहे. हा सर्व फंड बहुतेक साडेतीन टक्क्याच्या सरकारी प्रॉमिसरी नोटांच्या रूपांत आहे. स्त्रियांच्या

शिक्षणाची महाराष्ट्रांतली ही अत्युपयोगी संस्था चांगली स्थायिक झालेली आहे. सुमारें १५० शिक्षकिणी आश्रमानें महाराष्ट्राला पुरविल्या आहेत. येथें आरंभीचें शिक्षण घेऊन नंतर सुइणी, नर्स व डॉक्टरणीचें शिक्षण घेऊन समाजांत उपयुक्त कामें करीत असलेल्या स्त्रियाही चाळीस पन्नास आहेत. आश्रमांत शिक्षण घेतलेल्या शेंकडों स्त्रिया आज समाजांत वावरत आहेत. हल्लीं ह्या मंडळीचे चिटणीस आश्रमाचे नवीन आजन्मसेवक प्रो. कर्वे यांचे चिरंजीव श्री. भास्कर धोंडो कर्वे हे असून अध्यक्ष श्री. बा. सी. कामत व उपाध्यक्ष प्रो. द. ल. सहस्रबुद्धे आहेत. संस्थेचे ट्रस्टी श्री. बा. सी. कामत व डॉ. वि. चिं. गोखले हे असून संस्थेच्या पैशांचा सर्व व्यवहार त्यांच्या हातांत असतो. ही संस्था वर्षानुवर्ष वाढत जाऊन महाराष्ट्राला भूषणभूत होऊन राहिली आहे.

३. अनाथ विद्यार्थी गृह, पुणें:— ही संस्था पुणें येथें ता. १२ मे १९०९ रोजीं श्री. रा. ज. पटवर्धन व श्री. ग. ना. कानिटकर यांनीं सुरू केली. तत्पूर्वी कांहीं दिवस दि. ब. का. रा. गोडबोलेप्रभृति मंडळींनीं गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना थोडीफार मदत करण्याची योजना चालविली होती, तिचेंच पुढें अ. वि. गृहांत रूपांतर करण्यांत आलें. पुढें कांहीं दिवसांनीं यवतमाळ येथील राष्ट्रीय शाळेंतील शिक्षक व तेथील अनाथाश्रमाचे चालक श्री. वि. गं. केतकर हे यवतमाळ येथील राष्ट्रीय संस्था सरकारच्या अवकृपेस बळी पडल्यामुळें पुण्यास आले व सदर संस्थेंत चालक म्हणून काम करूं लागले. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत करून त्यांस स्वावलंबी बनवावें या हेतूनें संस्थेचें काम गेलीं २४ वर्षें चालू आहे. संस्थेस सुरवात पांच विद्यार्थ्यांपासून झाली. आरंभीं आरंभीं चालक मंडळी स्वतः मधुकरी मागून आणून ती विद्यार्थ्यांस घालीत असत. पुढें १९१२ सालीं जागेच्या सोयीसाठीं संस्थेच्या दोन शाखा करण्यांत येऊन प्राथमिक वर्ग श्री. बाळूकाका कानिटकरांचे व्यवस्थेखालीं व हायस्कूलचे वरचे वर्ग श्री. वि. गं. केतकर यांचे देखरेखीखालीं चालू राहिले. पुढें १९१६ सालीं श्री. बाळुकाका कानिटकरांची शाखा चिंचवड येथें नेण्यांत आली, व विद्यार्थ्यांच्या वाढीच्या व व्यापक शिक्षणाच्या दृष्टीनें चिंचवड येथेंच संस्थेची विशेष वाढ करण्याचें ठरलें. तेथें विद्यार्थ्यांना बौद्धिक शिक्षणाबरोबरच शेतकीचें शिक्षण द्यावें असाही विचार होता. पुढें १९२० सालीं चिंचवड येथेंच एक आयुर्वेदिक धर्मार्थ दवाखाना सुरू करण्यांत आला होता. १९१७ सालीं पालनपूरचे स्टेट सर्जन श्री. बाबासाहेब पटवर्धन यांनीं पुणें येथील कसबा पेठेंतील आपला राहता वाडा संस्थेस दिल्यामुळें पुणें शाखा तेथें नेण्यांत आली. ती १९२९ पर्यंत तेथेंच होती. मध्यंतरीं १९२१ सालीं असहकारितेच्या काळांत संस्थेच्या चालकांत शिक्षणाच्या कल्पनेसंबंधानें मतभेद होऊन पुणें व चिंचवड या दोनही शाखा विभक्त झाल्या; व चिंचवडच्या शाळेचें नेतृत्व श्री. बाळुकाका कानिटकर यांनीं पतकरिलें व पुणें शाखा श्री. वि. गं. केतकर यांनीं चालविली. पुढें चिंचवड शाखेचें राष्ट्रीय पाठशाळेंत रूपांतर झालें. १९२१ सालींच पुणें शाखेनें महाराष्ट्र विद्यालय या नांवाचें हायस्कूल सुरू केलें. येथें आतां इंग्रजी १ ल्या यत्तेपासून मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण मोफत दिलें जातें. तथापि सदर विद्यालय कोणत्याहि युनिव्हर्सिटीस जोडण्यांत आलेलें नसून येथील विद्यार्थी सरकारमान्य हायस्कुलांत प्रिलिमिनरीच्या परीक्षेस पाठविले जातात याच संस्थेची एक शाखा नाशिक येथ १९२६ सालीं काढण्यांत आली असून तेथेंही पुणें शाखेच्या धर्तीवरच काम चालू आहे. १९२९ सालीं या संस्थेनें लोकसंग्रह छापखाना विकत घेतला. याच छापखान्याचे व्यवस्थापक श्री. शंकर रामचंद्र दाते यांनीं विलायतेस जाऊन मोनोटाईप यंत्रावर मराठी लिपी बसविली.

या संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालय, महाराष्ट्र मोफत वाचनालय, पंखाकारखाना, छापखाना, मुद्रणशाळा, शालोपयोगी ग्रंथसंग्रह इत्यादि अनेक शाखा असून सध्यां येथें एकंदर विद्यार्थ्यांची संख्या दीडशें आहे. कोणत्याही जातीच्या स्पृश्य हिंदू गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस संस्थेंत घेतलें जातें व त्याचा पालनपोषणाचा व शिक्षणाचा सर्व खर्च संस्था करते. संस्थेचा कायमनिधि असा नाहीं. तथापि संस्थेला लोकांची सर्वप्रकारें सहानुभूति असून मधुकरी, भिक्षा, धान्य, कपडे, पुस्तकें, सामान, देणग्या इत्यादि अनेकविध रूपानें संस्थेला मदत होते. संस्थेच्या आश्रयदात्यांत सरकारी नोकरांपासून तों काँग्रेसच्या पुढाऱ्यांपर्यंत सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश होतो. संस्थेचें कार्य पक्षातीत असतें. शिक्षण व लोकसेवा हें या संस्थेचें ध्येय असून स्वदेशीच्या पुरस्काराकरितां व प्रचाराकरितां येथील विद्यार्थी निरनिराळचा मार्गांनीं खटपट

करतात.येथील हायस्कुलांत शिक्षणविषयक निरनिराळे प्रयोग करण्यांत येत असून बौद्धिक शिक्षणाच्या जोडीला औद्योगिक व धार्मिक शिक्षणाची जोड देण्याचा संस्थेचा प्रयत्न चालू आहे. याच संस्थेंतील पांचसहा विद्यार्थी आतांपर्यंत परदेशीं शिक्षण घेऊन आले असून कांहीं परदेशींही आहेत. या संस्थेचे एक विद्यार्थी डॉ. देवधर हे व्हिएन्ना युनिव्हर्सिटीचे एम्. डी. व क्षयरोगतज्ज्ञ झाले असून संस्थेचा क्षयरोगाचें एक सॅनिटोरियम काढण्याचा विचार चालू आहे. महाराष्ट्रांत ही संस्था या धर्तीची पहिली असून तिचें अनेक ठिकाणीं अनुकरण झालें आहे; व कित्येक ठिकाणीं जातिविशिष्ट अनाथ–विद्यार्थीगृहेंही काढण्यांत आलीं आहेत.

४. **अहिल्याबाई मोफत सूतिकागृह**–स्थापना १९२४. वाडिया चॅरिटीज्‌कडून प्रतिवर्षी मदत मिळते. ३१ मार्च १९३२ च्या वर्षअखेर एकंदर खर्च रु. १५२९–८–०व एकंदर जमा रु. ५७९–८–० अध्यक्षः–श्री. गो. कृ. देवधर, चिटणीस श्री. राजवाडकर व बोऱ्हाडे.

५. **अंजूमने इशाते इसलाम**,दौंड.जि.पुणें या संस्थेचा उद्देश फक्त ‘सर्व तऱ्हेचें शिक्षण देऊन त्याची वृद्धि करण्याचा’ आहे. हल्लीं संस्थेतर्फे एक अँग्लो–उर्दू स्कूल, एक अरबी स्कूल व एक मोफत वाचनालय अशा तीन संस्था चालू आहेत. शाळेचा जमाखर्च १०६६–९–९ रु. जमा, ६६१–५–९ रु. खर्च. ४०५–४–० रु. शिल्लक. संस्थेचा जमाखर्च ९२८–१४–० रु. जमा. ३८०–३–९ रु. खर्च ५४८–१०–३रु.शिल्लक. सेक्रेटरी अबदुल हामीदखान, ड्रायव्हर, दौंड.

६ **आचार्यकुल**, पुणें. (अद्वैत-वेदान्त संस्कृत पाठशाला) कै. विष्णुशास्त्री बापट यांनीं स्थापिली. शके १८४७. आचार्य कुलांत ६–७ वर्षें शिक्षण घेऊन तयार झालेल्या प्रौढ विद्यार्थ्यांवरच आचार्य-कुलांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचें कार्य सोपविलें आहे. सालाबादप्रमाणें गेल्या सालीं कलकत्याच्या परीक्षेस आचार्य कुलांतून ४५ विद्यार्थी बसले होते. या संस्थेला सरकारी विद्याखात्याचीही पूर्ण अनुकलता मिळालेली आहे. या संस्थेंत ब्राह्मणेतरांना वेद-शास्त्राध्ययन सांगण्याचा मानस नाहीं,म्हणून ही संस्था सरकारी ग्रँटसाठीं रजिस्टर केलेली नाहीं. कै.बापट शास्त्री यांनीं आरंभीं साठ हजार रुपयांचीं पुस्तकें संस्थेला अर्पिलीं.आजवर २०।२५हजारांचीं पुस्तकें विकलीं असूनही सांप्रत सुमारें ४०–५० हजारांचीं पुस्तकें शिल्लक आहेत. जमा, ६५३६–१३–९ व खर्च ६०५१–१३–३ रु. शिल्लक ४८५–०–६ रु. (शके १८५४)). पत्ताः–आचार्यकुल,सदाशिवपेठ, पुणें नं. २

७.**आनंदाश्रम**,पुणें:––हिंदुस्थानांतील प्राचीन विद्या व प्राचीन ग्रंथ दिवसेंदिवस नाहींसे होत चाललेले पाहून ते राखण्याबद्दल उपाय करण्याच्या हेतूनें आनंदाश्रम संस्था मुंबई हायकोर्टांतील नामांकित वकील कै. महादेव चिमणाजी आपटे यांनीं इ. स. १८८७–८८ मध्यें स्थापन केली. या संस्थेंत सुमारें ८ हजार संस्कृत हस्तलिखित ग्रंथ ठेवण्यांत आले असून इ. १९३२ अखेर आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलींत सुमारें सव्वापांचशें रुपये किंमतीचे १०५ ग्रंथ छापले गेले आहेत. त्यांत वेदांताचे ३८, श्रुति ११, धर्मशास्त्र ९, पुराणें ९, श्रौत ६, वैद्यक ६, मीमांसा २, व इतर विषयावरील २५ ग्रंथ आहेत. ग्रंथछपाई व पोथ्यांचा संग्रह याखेरीज कांहीं विद्यार्थी व संन्याशी यांच्या राहण्या–जेवण्याची वगैरे सोय आश्रमांत करण्यांत येते. संस्थेची व्यवस्था पांच पंचांच्या हातीं असून प्रत्यक्ष काम करण्यास एक व्यवस्थापक नेमला जातो. जुन्या महत्त्वाच्या पोथ्या कोणी आश्रमांत ठेवण्यासाठीं दिल्यास त्या स्वीकारल्या जातात व त्याबद्दल रीतसर पावती देण्यांत येते आणि मालकांनीं परत मागितल्यास पावती परत घेऊन पोथ्या परत देण्यांत येतात. आश्रमांतील पोथ्या व्यवस्थापकांच्या परवानगीनें विद्वानांना आश्रमांत बसून पाहण्यास देण्याची व्यवस्था आहे. सध्यां संस्थेचे व्यवस्थापक श्री. द. वि. आपटे, बी. ए. हे आहेत.
पत्ताः––२२ बुधवार पेठ, पुणें २.

८.**आयुर्वेद संशोधन मंडळ** (मुंबई प्रांतिक) पुणें:––स्थापना–प्राचीन चरकसुश्रुतादि ग्रंथ शास्त्रीय पद्धतीनें शिक्षणप्रचारांत राहून त्यांचें रक्षण होणें आवश्यक आहे; या उद्देशास अनुसरून व्यक्तिशः प्रयत्न झाले. पण यांपैकीं कांहीं प्रयत्नांमुळें ग्रंथाची अवहेलनाच झालेली दिसते. (उदा. गणनाथसेन यांचा प्रत्यक्ष शारीरग्रंथ). आयुर्वेदांत सोपपत्तिक व समर्पक असें शारीर व इंद्रियविज्ञान आहे. पण तें बरेंच सूत्रमय असल्यानें सद्यःस्थितींत नीट तऱ्हेनें समजण्यास व प्रचारांत आणण्यास अडचण पडते. ही अडचण दूर करण्याकरितां या मंडळाची स्थापना करण्यांत आली. प्रधान उद्देश––चरक, सुश्रुतादिक प्राचीन वैद्य-

कीय ग्रंथांचें संशोधन करून आकृतिविज्ञान, शारीर, प्रकृतिविज्ञान शारीर, द्रव्यगुणशास्त्र, निदान व चिकित्साशास्त्र इत्यादि विषयांवर आयुर्वेदीय परंपरेशीं पूर्णपणें सुसंगत होईल अशा तऱ्हेनें नवीन पद्धतीची ग्रंथरचना होण्यास उत्तेजन देणें. व २ भारतवर्षामध्यें उत्पन्न होणाऱ्या औषधी द्रव्यांचें आयुर्वेदीयदृष्टचा संशोधन करण्यास उत्तेजन देणें. या मंडळाच्या दोन शाखा–१ संशोधन शाखा–कार्यें–चरक सुश्रुत, वृद्धवाग्भट, व इतर आर्ष ग्रंथांतील वैद्यकीय विषयांची छाननी करून ते विषय प्रत्यक्षाशीं व अनुभवाशीं सुसंगत कसे व किती प्रमाणानें आहेत हें शास्त्रीय पद्धतीनें दाखविणें. २ प्राचीन ग्रंथांतील पारिभाषिक शब्दांचा अर्थ निश्चित करणें, व त्यांचा यथासंभव उपयोग करून नवीन परिभाषा निर्माण करणें. ३ आयुर्वेदांतील आर्ष ग्रंथांत जे जे विषय आहेत त्या त्या प्रत्येक विषयावर शास्त्रीय पद्धतीनें नवीन व विस्तृत ग्रंथ निर्माण करणें. व्यवस्थापक शाखा–संशोधन मंडळद्वारां व व्याख्यानद्वारां. आयुर्वेदासंबंधीं जागृति करणें,ग्रंथ प्रकाशित करणें. सभासदत्वाचे प्रकार–आश्रयदाता रु. १०१ किंवा अधिक देणगी देणारा, सहाय्यक रु. ५१ किंवा अधिक देणगी देणारा, हितकर्ता रु. २५ किंवा अधिक देणगी देणारा. साधारण सभासद–एकदम दहा रु. देणारा.

मंडळाची प्राथमिक सभा २८–११–३१ रोजीं होऊन १९३२ करितां पुढील कार्यकारी मंडळाची निवड झाली. अध्यक्ष–रा.ब. रा. रा. काळे, उपाध्यक्ष–१ डॉ. ग. स. सहस्रबुद्धे, २ वै. अप्पाशास्त्री साठे, ३ वै. वासुदेवाचार्य ऐनापुरे, ४ वै. भाऊसाहेब पुराणिक, ५ वै. कृष्णशास्त्री देवधर. खजिनदार–डॉ. ग. स. सहस्रबुद्धे हिशेब तपासनीस–रा. नी. रा. सहस्रबुद्धे, साधारण सभासद–१ श्री. रा. वि. पटवर्धन, २ डॉ. वा. रा. ढमढेरे, ३ वै. पु. ग. नानल, ४ श्री. बाबासाहेब गोखले, ५ वै. गंगाधरशास्त्री जोशी, ६ डॉ. न. गो. सरदेसाई. चिटणीस–डॉ. मो. ना. नातू, डॉ. मा. पु. जोशी

९. **कैवल्यधाम**–लोणावळें:–ही संस्था श्रीमत् स्वामी कुवलयानंद (श्री. जे. जी. गुणे). यांनीं लोणावळें येथें ७ ऑक्टोबर १९२४ सालीं स्थापन केली. पूर्व व पश्चिम यांच्या संस्कृतीचा मेळ घालून दोहींच्या संयोगानें अखिल मानवजातीला उद्‌बोधक असें नवीन तत्त्वज्ञान निर्मावयाचें असा स्वामीजींचा प्रधान हेतु आहे. पूर्वेकडील योगीजनांची संस्कृति आध्यात्मिक व व्यक्तिनिष्ठ असून अतींद्रिय ज्ञानाचा तिला आधार आहे. उलट पश्चिमेची संस्कृति जड व वस्तुनिष्ठ असून प्रायोगिक विज्ञानावर उभारलेली आहे; आणि यामुळें या दोन्ही संस्कृति एकमेकींपासून पूर्ण भिन्न झाल्या आहेत. व्यक्तिनिष्ठ अनुभवाला विज्ञानाच्या प्रकाशांत आणून जुन्या योगीजनांच्या सिद्धान्तांचें नव्या शास्त्राच्या साहचानें स्पष्टीकरण करावें व त्या योगें या दोन संस्कृतींची सांगड घालून द्यावी अशी कैवल्यधामाची ईर्षा आहे. यावरोबरच आध्यात्मिक, सामाजिक व शारीरिक शिक्षणाचा प्रसार करावा असाही संस्थेचा हेतु आहे. कैवल्यधाम आश्रम १९२४ सालीं स्थापन झाला. पण त्यापूर्वींच स्वामीजींनीं यौगिक क्षेत्रांत पुष्कळ संशोधन केलें होतें. त्यामुळें आश्रमाच्या स्थापनेबरोबरच योगमीमांसा नांवाचें एक त्रैमासिक त्यांनीं सुरू केलें व आसनें, बंध, क्रिया, मुद्रा व प्राणायाम यांचा 'क्ष' किरणादि अर्वाचीन शास्त्रीय साधनांच्या साहचानें केलेला अभ्यास त्यांत प्रसिद्ध करण्यास त्यांनीं सुरवात केली. थोडयाच अवधींत या मासिकानें सर्व जगाचें लक्ष वेधून घेतलें. व जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, या देशांतील पंडितांकडूनही स्वामीजींची प्रशंसा होऊं लागली. व गेल्या पांच सहा वर्षांत उडियान, नौली, बस्ती, धौती, प्राणायाम यांचें जें विवरण स्वामींनीं त्या मासिकाच्या द्वारां केलें त्यावरून आपण ते व्यायाम सुरू केले असल्याबद्दल पुष्कळच देशी–विदेशी पंडितांचीं पत्रें त्यांस आलीं आहेत. शरीरशिक्षा व रोगपरिहार या बाबतींत योगाची उपयुक्तता अर्वाचीन शास्त्रांच्या आधारें सिद्ध करून देऊन स्वामीजी स्वतः आश्रमांत अनेक रोग्यांना परिहार देऊं लागले. त्यामुळें आश्रमाकडे येणाऱ्या गरजू लोकांची संख्या पुष्कळच वाढली. तेव्हां त्या रोग्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठीं क्लिनिकल लॅबोरेटरी स्थापून त्यावर एका तज्ज्ञाची नेमणूक करण्यांत आली.याच सुमारास पोरबंदरच्या महाराजांनीं ३००० हजार रुपयांची वार्षिक देणगी दिली. तेव्हां लॅबोरेटरीला राणा नरवरसिंग (पोरबंदर) यांचें नांव देण्यांत आलें. २७ ते ३० या वर्षांत सु. १३०० रोग्यांची येथें परीक्षा करण्यांत आली. ही सर्व परीक्षा फुकट करण्यांत येते. कांहीं रोग्यांना उपचारासाठीं तेथेंच राहावें लागतें. त्यांच्यासाठीं एक बंगला भाडयानें घेतला आहे. त्यास रुग्णसेवामंदिर असें नांव दिलें आहे. पण सध्यां तो बंगला अपुरा पडत आहे. आतांपर्यंत

आश्रमानें तेथें राहणारे व बाहेरचे अशा सुमारें २००० रोग्यांना यौगिक उपचार केले आहेत. वरील परीक्षेप्रमाणेंच उपचारही फुकट करण्यांत येतात. (Physical Culture.) यौगिक शरीरशिक्षेचा एक अभ्यासक्रम आखून त्याचा प्रसार करावा असा आश्रमाचा फार हेतु आहे. हिंदुस्थानांतील अनेक शिक्षणसंस्थांनीं स्वामीजींकडे यासंबंधीं सल्ला व मदत मागितली आहे. मुंबई सरकारनें १९२७ सालीं शारीरिक शिक्षण विचारासाठीं नेमलेल्या कमेटीवर स्वामीजींना नेमलें होतें. कमिटीनें आपल्या अहवालांत आश्रमाचा स्वतंत्र उल्लेख करून त्याची पुष्कळच प्रशंसा केली आहे. संयुक्त प्रांताच्या सरकारनें खास निमंत्रण केल्यावरून स्वामीजी लखनौस गेले होते.तेथील शिक्षण खात्यानें व्यवस्था केल्यावरून स्वामींनीं तेथील २८ शिक्षकांना यौगिक शरीरशिक्षेचा अभ्यासक्रम शिकविला व लखनौ युनिव्हर्सिटी व मेडिकल कॉलेज येथें दोन व्याख्यानेंही दिलीं. तेथील तज्ज्ञांनीं स्वामींचा फारच गौरव केला.यौगिक अभ्यासक्रम शाळेंत सुरू करावा असें तेथील सरकारनें ठरविलें आहे. अमेरिकेच्या येल युनिव्हर्सिटीमधील एक संशोधक श्रीयुत बेहानन हे आश्रमाला नुकतीच भेट देऊन गेले. योगविद्येच्या प्रचारासाठीं स्वामीजींना येल येथें बोलवावें असा त्यांचा विचार असल्याचें त्यांनीं कळविलें आहे. आश्रमाच्या शाखा निरनिराळ्या प्रांतांत काढण्याविषयीं तेथीलांनीं विनंति केली आहे. पण तशा शाखा चालविण्यास आश्रमांतून अजून माणसें तयार झालेलीं नसल्यामुळें तें सध्यां शक्य नाहीं.

श्रीमन्माधव योगमंदिरः—आध्यात्मिक उन्नति हें आश्रमाचें ध्येय आहे. त्यासाठीं योगविद्येचा प्रसार होणें अत्यंत जरूर आहे. तसे समर्थ-योगी निर्माण करून त्यांचा "कैवल्यधाम अध्यात्म सेवा संघ" करावा हें तर आश्रमाचें अंतिम ध्येय आहे. त्या संघाचे सभासद व्हावयास विशिष्ट प्रकारचें शिक्षण, निग्रह व योग्यता असलेले विद्यार्थी पाहिजेत. तसे बाहेरून कोठूनही मिळावयाचे नाहींत. म्हणून तसे विद्यार्थी निर्माण करण्यासाठीं 'श्रीमन्माधव योग-मंदिर' नांवाचें विद्यापीठ आश्रमानें स्थापिलें आहे. त्याचा शिक्षणक्रम चार वर्षांचा आहे. योगविद्या, दर्शनें, पश्चिमेकडील तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, अनॉटमी, शरीरविज्ञान, रोग—परीक्षा,अर्थशास्त्र व जगांतील प्रमुख देशांतील शासनसंस्था इतके विषय तेथें अभ्यासले जातात. स्वतः स्वामीजींशिवाय डॉ. मर्चंट रिटायर्ड सिव्हिल सर्जन, डॉ. कडगोल, रघुनाथशास्त्री कोगजे, प्रो. दांडेकर हे शिक्षक आज तेथें काम करीत आहेत. हा चार वर्षांचा शिक्षणक्रम पुरा झाला तरी विद्यार्थ्यांची योग्यता पाहूनच आध्यात्मिक सेवा-संघांत त्यास घेतलें जाईल. सध्यां स्वामीजी हे एकटेच त्या संघाचे सभासद आहेत. माधवमंदिरांत सध्यां ६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पैकीं दोन पदवीधर आहेत. संघांत शिरण्याचा हेतु नसला तर त्या विद्यार्थ्यांना योगाच्या अध्यात्मिक व शारीरिक अंगाचें शिक्षण देण्याची आश्रमानें व्यवस्था केली आहे. आश्रमांत यांना थोडें काम करावें लागतें. वरील दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांचा सर्व खर्च आश्रमांतून होतो. त्यांनीं पूर्ण निग्रहानें आश्रमांत आजन्म राहिलें पाहिजे अशी अट आहे. बाहेरच्या लोकांनाही योगविद्येचें शिक्षण देण्याची स्वामीजींनीं सोय केली आहे. हें शिक्षणही फुकट दिलें जातें. **आर्थिक साहाय्य**—सर प्रभाशंकर पटणी—आश्रम उभा असलेली २० हजार रु. किंमतीची जागा उपयोगासाठीं. रा. चितळे वकील—लोणावळ्यास५६ एकर जमीन ९९वर्षें उपयोगासाठीं.रा. लालजी गोकुळदास—बोरिवलीजवळ १३ हजार रु. किंमतीची इस्टेट कायम देणगी.

वार्षिक देणग्या कायम.

पोरबंदर संस्थान	३०००
खंबायत संस्थान	५००
राजेसाहेब रायरणबहादूर हैद्राबाद	३००
डॉ. टी. आर. गुणे पंढरपूर	१००
श्रीकृष्णदास अहमदनगर	५०

इतर देणग्या.

श्रीमंत प्रतापशेट	५०००
मोरवी संस्थान	३०००
राजा प्रतापगिरजी	३०००
इचलकरंजी	२४००
बांसदा संस्थान	२०००
रा. भुलाभाई देसाई	२०००
शेट मोतीलाल दयाभाई	१५००
रा. ए. सि. मेहेता.	११००
१. भावनगर २ लिंबडी, ३ वढवाण, ४ कोचीन संस्थानें प्रत्येकीं	१०००
१ शेट बिर्ला, २ श्रीकृष्णदास, ३ एक सद्गृहस्थ प्रत्येकीं.	१०००

१०. **कॅंप एज्युकेशन सोसायटी**, पुणें—स्थापनाः—सन १८८२. उद्देश—पूना कॅन्टोनमेंट

हद्दींत राहणाऱ्या मुलांस शिक्षण देणें. कार्यः– १९२२ पर्यंत फक्त ए. व्ही. मिड्ल् स्कूल, गुजराथी व मराठी प्राथमिक शाळा सोसायटी चालवी. या वर्षापासून रा. पी. के. अत्रे यांच्या नेतृत्वाखालीं हायस्कूल सुरू केलें. पुढील वर्षी तें मुंबई विश्वविद्यालयाला जोडून मॅट्रिकचे परीक्षेस प्रथमच विद्यार्थी पाठविले. कॅन्टोनमेंट हद्दींत हायस्कूलची स्वतःची इमारत आहे. रास्ता पेठेंत याची शाखा १९२७ सालीं उघडली असून ए. व्ही. जोशी व्यवस्थापक आहेत. रास्ता पेठेंतील हायस्कुलाकरतां पुणें म्यु. नें दरसाल एक रुपया भाड्यानें सोसायटीस मोकळी जागा दिली आहे. सोसायटीनें चालविलेल्या सर्व शाळांत सध्यां ८०० विद्यार्थी शिकत आहेत. शेंकडा ८० मागसलेल्या वर्गांतील आहेत. गुजराथी प्राथमिक शाळेंत दोन गुजराथी शिक्षक आहेत. १९३१ च्या मॅट्रिकच्या परीक्षेंत ४२ विद्यार्थ्यांपैकीं २९ उत्तीर्ण झाले. शाळेचे व्यवस्थापक श्री. पी. के. अत्रे यांनीं एस्. टी. सी. चा वर्ग चालविला असून त्याचा शिक्षकांस चांगला उपयोग होतो. सोसायटीचें संदर्भ–ग्रंथालय व विद्यार्थिभांडार आहे. खेळ व बालवीरांची स्वतंत्र व्यवस्था आहे. साहाय्यकः–सोसायटीच्या मूळ संस्थापकांत रावसाहेब बाळकृष्ण सायण्णा व श्री. राजण्णा लिंगू पोलस हे प्रमुख होते. सन १८९८ सालीं सर डी. एम्. पेटिट व मुंबई सरकार यांनीं प्रत्येकीं ७५०० रु. दिले व हल्लीं दरसाल ५००० रुपये सरकारी ग्रँट मिळते. सन १९२२ सालीं वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबाची दहा हजार रुपये देणगी; व त्याच क्लबानें आजपर्यंत आणखी १२००० बारा हजार रुपये दिले. शिवाय मुंबईचे गव्हर्नर, डॉ. र. पु. परांजपे, बॅ. जयकर, हशमभाई प्रेमजी, कै. नामदार केशवराव (हद्राबाद), कै. शेट अण्णासाहेब ठाकरसी, व्ही. आर्. रानडे आणि कं. पुणें, शेट तुळशीदास खट्टू व श्री. विठ्ठलदास एन्. केदारी अशा सर्व ज्ञातींतील व वर्गांतील लोकांनीं वेळोवेळीं देणग्या दिल्या.सोसायटीच्या हायस्कूलची सांपत्तिक स्थितिः–(स.१९३१।३२) जमा १९५११ रु. १० आ. ० पै. खर्च २१७९३ रु. १५ आ. ६ पै. तूट–२२८२ रु. ५ आ. ६ पै. मराठी प्राथमिक शाळा जमाः–२३१० रु. ५ आ. ० पै. खर्च–३१५५ रु. ८ आ. ६ पै. तूट ८४५ रु. ३ आ. ६ पै. गुजराथी प्राथमिक शाळा. जमाः– १४०० रु. १४ आ. ० पै. खर्चः–१७८५ रु. ४ आ. ६ पै. तूट–३८४ रु. ६ आ. ६ पै. सोसायटीच्या निधींतून तूट भरून काढली. सोसायटीची सांपत्तिक स्थितिः–सन १९३१–३२ सालीं जमाः– ४२९३ रु. १० आ. ४ पै. खर्च ४२१८ रु. ४ आ. ६ पै. शिल्लकः–७३ रु. ५ आ. १० प. अध्यक्ष– सरदार बैरामजी पदमजी. उपाध्यक्ष–सरदार आर. एस्. पुरंदरे बी. ए., शेट व्ही. एन्. केदारी, श्री. व्ही. एन्. दातार. ट्रस्टीः–सरदार गंगाधरराव नारायणराव मुजुमदार एम्. एल्. ए., रा. ना. रा. गुंजाळ एम्. एल्. ए. चेअरमन–ए. बी. सेटना, बी. ए. एल्. एल्. बी. पत्ता कँप, पूना.

११. **किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल व सरदार मुदलियार डिस्पेन्सरी** पुणें.सन१९३१ चा मॅनेजिंग कमिटीचा सतरावा रिपोर्ट. सरदार पदमजी यांनीं प्रसूतिगृहाकरितां २४७०५ रु.दिले. राजा बहादूर प्रतापगिरजी यांनीं १०००० रु. विश्रांतिगृहाकरितां देण्याचें आश्वासन दिलें आहे. सरकारी ग्रँट सुमारें ४००० दरसाल मिळते. यासालीं पुणें शहर म्यु. कडून रु. ५००० मिळाले. अहवालसालीं १०९२ हॉस्पिटलमध्यें ठेवलेल्या रोग्यास औषधोपचार करण्यांत आले. बाहेरच्या ६०६८४ रोग्यांस औषधोपचार केले. लहान मुलांच्या विभागांत रोजची सरासरी हजेरी ८० होती. सांपत्तिक स्थितिः–जमा (सन १९३१) ४०२३१ रु. १३ आ. ४ पै. खर्च ४६०४९ रु. ११ आ. ८ पै. चालू शिल्लकः–९३०१८ रु. १३ आ. ६ पै. अध्यक्ष–पुणें जिल्ह्याचे कलेक्टर. उपाध्यक्षः–सरदार एस्. सी. मुदलियार, रावबहादूर हणमंतराम रामनाथ. ऑ. सेक्रेटरी रावबहादूर चिमणलाल किसनदास, रावबहादूर व्ही. जी. मानकर.

१२. **गीता–धर्म–मंडळ**, पुणें.–स्थापना ता. २७ जुलै १९२४. संस्थापक गीतावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे आणि गनाजन विश्वनाथ केतकर. उद्देश–लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्यांत प्रतिपादन केलेला श्रीमत्भगवद्गीतांतर्गत कर्मयोग हा सनातन वैदिक धर्माचें अंतरंगच होय. या कर्मयोगाचा व्याख्यानें, पुस्तकें, नियतकालिकें यांच्या प्रकाशनानें, प्रचारकांच्या शिक्षणानें व गीताभ्यासाच्या उत्तेजनानें शक्य तितका प्रसार करणें; आणि अशा तऱ्हेनें गीताभ्यास वाढवून राष्ट्रोन्नति साधणें. घटना–आश्रयदाते–पांचशें रुपये किंवा अधिक देणगी देणारे; आजन्म सभासद शंभर रुपये किंवा अधिक देणगी देणारे; वर्गणीदार दरसाल पांच रुपये किंवा अधिक वर्गणी देणारे. कार्यकारी मंडळांत पांच इसम असतात. गी. वा.

सदाशिवशास्त्री भिडे व श्री. ग. वि. केतकर हे कार्यकारी मंडळाचे कायमचे सभासद असून इतर तीन सभासदांची नेमणक दर तीन वर्षांनीं आश्रयदाते, आजन्म सभासद व वर्गणीदार यांनीं प्रत्येकीं एक याप्रमाणें करावयाची असते. कार्य–गीताशिक्षण, गीतार्थचर्चा, ग्रंथप्रकाशन, गीताजयंति-उत्सव इत्यादि प्रकारांनीं गीताधर्मप्रसाराचें काम मंडळानें अविरत चालविलें आहे. प्राचीन उपनिषदांचें रहस्य मराठी वाचकांस समजून देण्याकरितां १९२९ पासून मंडळानें "वैदिक कर्मयोग" नांवाचें मासिक काढलें आहे. मंडळाचें गीतार्थ-चर्चा–मंडळ दर आठवड्यास नियमानें भरतें. संस्थेचे आश्रयदाते तीन (दोन प्रत्येकीं एक हजार व एक पांचशें रु.) सभासद दहा व वर्गणीदार सुमारें सवाशें आहेत. "टिळक स्मारक ट्रस्टनें" मंडळाला १८०० रुपयांची मदत दिली आहे. कार्यकारी मंडळः–जुलै १९३१ ते जुलै १९३४. श्री. न. चिं. केळकर (अध्यक्ष). श्री. पां. के. शिराळकर. श्री. शं. स. नाईक. श्री. स. गो. भिडे-शास्त्री. श्री. ग. वि. केतकर. पत्ताः–टिळक रोड पुणें नं. २

१३. गूढ चिकित्सा–मंडळ–ही संस्था सन १९३० च्या दसऱ्याच्या सुमारास स्थापन झाली. संस्थचा हेतुः–पाहण्यास मिळतील त्या गूढ गोष्टींची चिकित्सा (म्हणजे चर्चा व संशोधन) करून सत्याचा प्रसार करणें,व त्याद्वारें लोकांतील भोळसटपणा व फाजील श्रद्धाळूपणा कमी करून त्यांच्यांतील चिकित्साबुद्धि व सावधगिरी वाढविणें. सभासदत्वाची अट–संस्थेच्या हेतूविषयीं सहानुभति–सभासदत्वास वर्गणीची अट नाहीं. सर्पविषावरील बक्षिसाच्या रकमा निरनिराळ्या सभासदांनीं देऊं केलेल्या आहेत. किरकोळ खर्च चिटणीस स्वतः करतात. या मंडळानें केलेलीं कामें (१) कसबा पेठेंतील एकदोन कुंभारांच्या कुटुंबांतील लोकांच्या अंगावर बिब्बा सारवल्यासारखे पट्टे उत्पन्न होत. याबद्दल एक पत्र मंडळाकडे आल्यावरून त्या ठिकाणीं २।४वेळां जाऊन चौकशी केली. दोन वेळीं डॉ. सहस्रबुद्धे यांना मुद्दाम बरोबर घेतलें होतें. पुढें लवकरच हा बिब्बा येणें बंद झालें. दोन पक्षांत घराच्या बाबतींत भांडण झाल्यामुळें, दुसऱ्या पक्षावर चेटुक केल्याची तोहमत घेऊन त्याचें नांव बद्द करण्यासाठीं कांहीं लोक शेराचा चीक अथवा बिब्बा सारवण्याचा उपद्व्याप मुद्दाम करीत व बोभाटा झाल्यामुळें त्यांनीं हें काम भीतीनें बंद केलें असावें अशी या चमत्कारासंबंधानें मंडळाची समजूत आहे. (२) 'केसरीं'त पत्र प्रसिद्ध करून श्री. ऋषि यांस विनंति केली कीं,"मध्यस्थ कोण व त्याचे द्वारें कोणता मृतात्मा बोलतो हें आपण सांगितल्यावर मृतात्म्यास ज्ञात पण मध्यस्थास अज्ञात अशा गोष्टींसंबंधानें चार समंजस लोकांत मान्य असे प्रश्न आम्ही विचारूं. या प्रश्नाचीं उत्तरें बरोबर येतील तर उत्तर देणारी व्यक्ति मृतात्मा हें सिद्ध होईल."त्यास त्यांचें उत्तर सहकार्य करण्यास माझी कोणतीच हरकत नाहीं असें आलें. परंतु पुण्यास श्री. ऋषि यांचे जे अनेक प्रयोग झाले त्यांत मंडळाची खात्री होईल असा एकही संदेश मिळाला नाहीं. प्लँचेट वगैरेंच्या द्वारें येणारे संदेश एकंदरीनें अस्सल मानण्यापेक्षां अविश्वसनीय मानणें हेंच व्यवहारदृष्ट्या योग्य असें मंडळ समजतें. (३) सर्पभक्षक प्रो. राव यांचा दंभस्फोटः–प्रो. राव यांनीं आपल्याजवळ सर्पविषावर औषध आहे असा बभ्रा केला. त्यांस एक अनावृत पत्र प्रसिद्ध करून सदर औषधाचे प्रयोग करण्यात त्यांनीं मंडळांत यावें म्हणून सांगितलें. ते येथें आल्यावर त्यांच्या मागें लागून त्यांना डॉ. म्हसकर यांचेकडे धाडलें. त्यांचा प्रयोग मुंबईस अयशस्वी झाला. प्रो. राव ज्या औषधाबद्दल बढाई मारीत होते व लाख रुपये मागत होते तें औषध निरुपयोगी आहे हें मंडळानें ठरविलें. (४) सर्पविषावर रामबाण समजलीं जाणारीं औषधें व मंत्र यांच्यासंबंधानें जो लोकांचा समज आहे त्याच्यांतील खरेखोटेपणाचा निर्णय व्हावा म्हणून 'सर्प, सर्पविष व सर्पविषचिकित्सा' या विषयांवर केसरींत अनेक लेख लिहून सुलभ रामबाण उपायास पांच हजार रुपयांचें पारितोषिक देऊं केलें. अद्यापपर्यंत मंडळाकडे आलेल्या औषधांपैकीं एकही यशस्वी ठरलें नाहीं. जनावरांवर प्रयोग करावा म्हणून श्री. पाचलेगांवकर महाराज यांना विनंति केली. परंतु त्यांनीं प्रयोग करण्याचें नाकारलें. प्रो. वा. म. जोशी, प्रो. कोल्हटकर, प्रो. नाईक, प्रो. पोतदार, प्रो. जोग, प्रो. हर्डीकर, डॉ. आपटे, डॉ. सहस्रबुद्धे, श्री. प्र. के. अत्रे वगैरे गृहस्थ मंडळाचे सभासद आहेत. चिटणीस–श्री. रा. ज. गोखले, डेक्कन जिमखाना कॉलनी, पुणें.

१४. गोपाल गायन समाज, पुणें:––संगीत विद्येच्या द्वारां मातृभूमीची सेवा करावी व आवाजाची देणगी असलेल्यांना या कलेचें शिक्षण द्यावें,या उद्देशानें ही संस्था स्थापन केली. संस्थेचा सात वर्षांचा शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत

दरमहा दोन रुपये प्रदेय ठेविलें आहे. गेल्या बारा वर्षांत अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले. मुख्य ध्येय गायनकलेचा प्रसार, परंतु उपांगें म्हणून कीर्तन, भजन, मेळे, ऐतिहासिक पोवाडे इत्यादि कार्यक्रम होतात. गरीब विद्यार्थ्यांस मोफत शिक्षण मिळतें. श्री.स.आबासाहेब मुजुमदार यांनीं संस्थेंत शिकून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां दरमहा ३ ते ५ पर्यंत कायमची शिष्यवृत्ति ठेविली आहे. पोवाड्याचा प्रसार प्रथम येथूनच झाला व नंतर इतरत्र शाहीर बाहेर पडूं लागले.दर शनिवारीं भजनाचा कार्यक्रम असतो. संस्थेचे प्रमुख श्री. गोविंदबुवा देसाई यांनीं गतवर्षीपासून कीर्तनें करण्यास सुरुवात केली आहे. १९२६ सालच्या पुणें गणेशोत्सवांतील शिवछत्रपति मेळ्यांत समाजानें बरीच कामगिरी केली. सालीना सरासरी ५०० रु. उत्पन्न होतें. खर्च तितकाच होतो. संस्थेस कर्ज नाहीं. पत्ता–टिळकरोड, भाऊमहाराज बाग, पुणें २.

१५. **चांद्रसेनीय कायस्थप्रभु शिक्षणोत्तेजक संस्था,** पुणें व मावळः—या संस्थेची स्थापना माहे ऑगष्ट १९१०त दिवाण बहादूर समर्थांच्या प्रयत्नानें झाली व ती ता. १६ ऑक्टोबर १८६०च्या ॲक्टान्वयें नोंदली गेली. संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजांतील पुणें व मावळ येथील गरीब व होतकरू विद्यार्थी व विद्यार्थिनींस आर्थिक व इतर साहाय्य करणें हा होय. दरवर्षी सुमारें रु. २०० ची मदत दिली जाते. **सन १९३२ चें** कार्यकारी मंडळ–(१) अध्यक्ष-रा. रा. रामचंद्र मल्हार देशपांडे बी. ए., (२) उपाध्यक्ष–रावसाहेब केशव त्रिंबक गुप्ते एम्.ए. एल्‌एल्. बी.(३) खजिनदार–श्री. भालचंद्र महेश्वर गुप्ते एम्.ए. एल्‌एल्. बी.,(४) चिटणीस–श्री. बा. सी. बेंद्रे पत्ता–५६८ नारायण पेठ, गायकवाड–वाडा, पुणें शहर.

१६. जॉली क्लब पुणें :—स्थापना–सन १९१६. उद्देश–परस्परांत स्नेहभाव वृद्धिंगत करणें, त्याकरितां सर्व प्रकारचे बैठे खेळ खेळणें व त्या त्या खेळांचे सार्वजनिक सामने भरवून उत्तम खेळाडूंना पारितोषिकें देणें व त्यांचा गौरव करणें, उत्तम संगीतज्ञांचीं गाणीं करविणें वगैरे. कार्य–१९२१ सालीं ह्या संस्थेमार्फत अखिल भारतीय बुद्धिबळाचे सामने (ऑल इंडिया चेस टूर्नामेंट) भरविण्यांत आले. त्यांत अखिल भारतांतील नामांकित बुद्धिबळपटूंनीं भाग घेतला होता. त्यांतील पहिल्या पांच गृहस्थास १५०० रुपयांचीं रोख किंमतीचीं बक्षिसें देण्यांत आलीं. १९२३ सालीं 'मुंबई इलाखा बुद्धिबळ सामना' भरविण्यांत आला. व तेव्हांपासून दरवर्षी मे महिन्यांत बुद्धिबळाचे सामने भरविण्यांत येतात. त्यांत बृहन्महाराष्ट्रांतील बुद्धिबळपटू भाग घेतात.सध्यां सरदार, डॉक्टर, वकील, व्यापारी, सरकारी नोकर, असे मिळून क्लबाचे १२५ सभासद आहेत. दरमहा १ एक रुपया फी असून प्रवेश फी दोन रुपये देऊन कोणासहि सभासद होतां येतें. क्लबाच्या मालकीच्या जागेवर क्लबाची इमारत लवकरच बांधण्याचा विचार चालू आहे. अध्यक्ष–डॅ.गो.का. गाडगीळ, उपाध्यक्ष–श्री. डांगे वकील, सेक्रेटरी–आर.एम.वाळिंबे.पत्ताः–३९७ नारायण पेठ,पुणें२.

१७. ज्युनिअर लॅबोरेटरी ॲपॅरेटस-वर्कशॉप, पुणें.—"शास्त्रीय उपकरणांची, आणि त्यांतल्यात्यांत जास्त किंमतीच्या व उच्च दर्जाच्या शास्त्रीय उपकरणांची या देशांत पैदास व्हावी" या हेतूनें वरील नांवाचें लहानसें वर्कशॉप १९२२ सालीं स्थापन करण्यांत आलें. १९३२पर्यंत तें अव्याहत चालू असून कारखान्याचें स्वरूप त्याला आलें नसलें तरी दरवर्षी अजमासें चार-पांच हजारांची उपकरण सामुग्री या वर्कशॉपकडून हिंदुस्थानांतील निरनिराळ्या कॉलेजांस पुरविली जाते. १९२२ सालीं १७ रु. किंमतीचा एक असे विद्युत्प्रवाहमापक प्रथमतः करण्यांत आले. आज १९३२ सालापर्यंत वर्कशॉपमधून प्रत्येकीं १००, २००, ३५०, ५०० रुपये जास्तींत जास्त किंमतीपर्यंतचीं लहान-मोठीं सुमारें ५० निरनिराळीं उपकरणें मागणी येईल त्याप्रमाणें पुरविण्याची व्यवस्था होऊं शकते. उपकरणांच्या बिनचूकपणाविषयीं खात्री करण्यासाठीं तीं बाहेर पाठविण्यापूर्वीं कसोशीनें तपासणें, उपकरणांची रचना मुक्रर करणें व वर्कशॉपची सामान्य व्यवस्था ही ना. म. आठवले एम्.ए. यांजकडे असून ते हें काम निर्वेतन करतात. मालाच्या विक्रीपासून येणाऱ्या पैशांवर कारागीर लोकांची मजुरी, कच्च्या मालाची खरेदी, इत्यादि खर्च भागतात. वर्कशॉपसाठीं भांडवलादाखल काढलेलें कर्ज आजतागायत ३००० रुपयांचें आहे. लवकरच वर्कशॉपच्या मिळकतींतून हें कर्ज वारून वर्कशॉप स्वतःचे पायांवर उभें राहील अशी आशा आहे. यानंतर मिळणाऱ्या फायद्याचा विनियोग वर्कशॉपची वाढ करण्याकडेच होईल. यापुढें अजून ५–१० वर्षें तरी या वर्कशॉपचें स्वरूप शास्त्रीय

उपकरणांच्या पैदासीसाठीं स्थापिलेली प्रयोगशाळा असेंच राहणार आहे. या वर्कशॉपमध्यें तयार केलीं जाणारीं उपकरणें हीं विलायती उपकरणांच्या तोडीचीं आहेत याबद्दल उपकरणें वापरणाऱ्या अध्यापकांचें एकमत आहे. आजमितीस सुमारें १०–१५ शिक्षणसंस्था या वर्कशॉपमध्यें तयार झालेलीं उपकरणें वापरीत आहेत. १९२२ ते ३२ या दहा वर्षांच्या कालांत सुमारें ३०,००० रुपये किमतीचा माल करून विकण्यांत आला. पत्ता—येरंडवणें, जि. पुणें.

१८. डेक्कन अग्रिकल्चरल असोसिएशन, पुणें—स्थापना १९०९ संस्थेचें काम एप्रिल १९२९ पासून जोरकसपणें सुरूं झालें.त्यापूर्वी अनेक कारणांनीं तें नीट चालूं नव्हतें. प्रत्यक्ष कार्य कार्यकारी मंडळ व दोन पोट—कमिटयांच्या द्वारें होत असतें. गेल्या वर्षीं खालील नवीन कामें हातीं घेण्यांत आलीं (१) प्रचार—पोटकमिटीतर्फे जलसंशोधन; (२) खेड—शिवापूर येथील ग्रामोद्धार केंद्रांतून सुधारलेले नांगर भाडयानें देण्याची व्यवस्था; (३) ग्रामोद्धार—पोट—कमिटीतर्फे कोंबडीं पाळण्याचा व अंडयांचा धंदा लोकांत सुरूं व्हावा ह्याबद्दल प्रयत्न. (४) संस्थेचीं शेतकी—विषयक सर्व कामें पहाण्याकरितां एक पगारी अनुभवी शेतकी पदवीधर नेमण्यांत आला. प्रत्यक्ष कार्यांत, लोकांत विशेषतः शेतकऱ्यांत स्वावलंबनाची जागृति व आत्मोन्नतीची जाणीव उत्पन्न होण्याकरितां साक्षरता वाढविणें, सांपत्तिक स्थिति सुधारण्याकरितां सहकारी तत्त्वांवर सर्व व्यवहार करण्यास शिकविणें, आरोग्यविषयक माहिती देणें वगैरे ग्रामोद्धाराचीं कामें वेळोवेळीं खेडयांतून प्रदर्शनें भरवून, परिषदा करवून व व्याख्यानें देऊन करण्यांत येतात. सुशिक्षित व श्रीमंत सरदार मंडळीही संस्थेच्या कार्यांत लक्ष घालतात. व द्रव्यद्वारां मदत करितात. संस्थेची सांपत्तिक स्थिति—ता. १।७।१९३१ ते ३०।६।१९३२ जमा ३२२५ खर्च तितकाच. जमेंत वर्गणी २९० रु. व ठेवीचें वगैरे व्याज ६९१ रु. आहे. संस्थेच्या खेडशिवापूर केंद्रास मुंबई—गव्हर्नर, व दक्षिणेंतील पुष्कळ संस्थानिक यांनीं भेट देऊन तेथील कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें आहे. ह्या वर्षीं संस्थेतर्फे भरविलेल्या खेडशिवापूर येथील ग्रामोद्धार परिषदेनें लोकांत बरीच जागृति झाली आहे. प्रचार-पोटकमिटीतर्फे १४ व्याख्यानें व विचारविनिमय करण्यांत आला. एक व्याख्यान चित्रदीपाचे साहाय्यानें देण्यांत आलें.जलसंशोधनाविषयीं पत्रकें व परिषदेची माहिती लोकांना दिली. ३९ ठिकाणीं जलसंशोधन करण्यांत आलें. प्रचारकार्यामुळें लोकांत हळूहळू जागृति होत आहे. या कामीं सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचीही मदत होते. प्रचार कमिटीतर्फे या वर्षीं निरनिराळ्या ग्रामोद्धार केंद्रांतून व्याख्यानें करविणें, एक मध्यवर्ती पुस्तकालय स्थापणें, शेतकीविषयक सल्ला देणें, ग्रामोद्धारासंबंधीं सदीप व्याख्यानें देणें व प्रदर्शनें भरविणें वगैरे कामें करण्याचा विचार आहे. संस्थेतर्फे "शेतकी व शेतकरी" हें मासिक चालविण्यांत येतें. सर विजयराघवाचार्य यांचें व्याख्यान—ग्रामोद्धाराच्या पद्धति (१) दर एकरीं पिकाचें उत्पन्न वाढविणें (२) शेतीवरचा खर्च शक्य तितका कमी करणें (३) धान्याच्या विक्रीची कानडांतील पद्धतीनें व्यवस्था करणें म्हणजे शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे पैसे लवकर व योग्य किमतीनें करतां येतील. (४) कोणीही फसून कायद्याच्या कचाटींत न सापडण्याइतकें ज्ञान होण्याकरितां साक्षरता वाढविणें (५) खेडयांत राहून व शेतकी करून जगणें शक्य आहे हें लोकांना समजावून देणें. सांगली संस्थानाधिपतीचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या दुसऱ्या ग्रामोद्धार परिषदेंत ग्रामपंचायतीचें कार्यक्षेत्र सध्यां आहे त्यापेक्षां विस्तृत करण्याकरितां सरकारनें कायदे—कौन्सिलांत ग्रामपंचायतीचा कायदा आणावा, परंतु तत्पूर्वी लोकमत अजमावण्याकरितां सदर कायद्याचा मसुदा अगोदर प्रसिद्ध करावा. संस्थेच्या वार्षिक सभेंत सरकारच्या शेतकी खात्याची पुनर्घटना करण्याविषयीं सरकारला कळविण्याबद्दल ठराव करण्यांत आला. तसेंच पुढील वर्षीं नवीन कामें पोट कमिटयांतर्फे करवून घेण्याची व्यवस्था करण्यांत आली. चेअरमन—श्रीयुत गो. कृ. देवधर ऑ. सेक्रेटरी—प्रो. व्ही. जी. गोखले, श्री. व्ही. व्ही. गाडगीळ, सरदार आर. जे. पोतनीस.

पत्ताः—शेतकी कॉलेज, पुणें ५

डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन—ग्रामोद्धार कमिटी खेड—शिवापूर केंद्र—स्थापना—१जानेवारी १९३०. उद्देश—"खेडयांतील लोकांना स्वतःच्या खेडयापलीकडे काय चाललें आहे हें कळण्याची अडचण पडते. हिंदुस्थानांतील शेंकडा ९० प्रजा खेडेगांवांतच राहात आहे. तेव्हां सबंध देशाची उन्नति करण्यास खेडीं सुधारणें." डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनच्या पुरस्कारानें व पुणें सेवासदन सोसायटीच्या साहाय्यानें हें ग्रामोद्धाराचें केंद्र सुरूं करण्यांत आलें.

शिक्षणाचे वर्ग, आरोग्य, व्यायाम व शेतकी यांबद्दल लोकांस माहिती देणें हीं कामें सुरू आहेत. सुतारकामाचा व मागावरील कामाचा वर्ग चालू आहे. गांवांत वाचनालय व ग्रंथालय उघडलें आहे. १९२९च्या डिसेंबरांत शिवापूर येथें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें. त्यांत आरोग्य–विषयक, शिक्षण–विषयक, शेतकी व तिला जोडून करतां यणारे दुय्यम धंदे यांबद्दल माहिती देणारीं, सहकार्य व सहकारी पतपेढ्यांसंबंधीं चित्रें व देखावे मांडून प्रत्यक्ष माहिती लोकांस देण्यांत आली. हडपसर व दुधनवाडी येथें वरील कामें सुरू केलीं आहेत. देणगी–शिवापूर केंद्रास १९३१ सालीं ६५ रुपये ५ आणे. जमा–(जुलै १९३० ते १९३१ अखेर) ३५८ रुपये १४ आणे. खर्च–३५८ रुपये १४ आणे. अध्यक्ष–श्री. रा. गो. कृ. देवधर एम्. ए. सी. आय. ई., ऑनररी सेक्रेटरी कु. द्वारकाबाई भट, पत्ता–खेड शिवापूर जि.पुणें.

१९. डेक्कन एज्युकेशन सोसायटी

पुणें. स्थापनाः––२४ आक्टोबर १८८४, रजिस्टर १३ ऑगष्ट १८८५, सोसायटी पुढील संस्था चालवितेः–(१) फर्ग्युसन कॉलेज, पुणें, (२) विलिंग्डन, कॉलेज कुपवाड (सांगली), (३) न्यू इंग्लिश स्कूल, पुणें, (४) न्यू इंग्लिश स्कूल, सातारा, (५) नवीन मराठी शाळा, पुणें, (६) न्यू इंग्लिश स्कूल, उंबरगांव, (७) न्यू इंग्लिश स्कूल होस्टेल, पुणें. फर्ग्युसन कॉलेजमधील बाई जेरबाई वाडिया लायब्ररीच्या इमारतीकरितां सी. एन्. वाडिया व सरनेस वाडिया यांनीं १५८८१६ रु. ४ आणे ५ पै इ. स. १९२९–३० सालीं दिले. पत्ता–डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज, पुणें नं. ४

फर्ग्युसन कॉलेजः–चालू सालीं विद्यार्थ्यांची संख्या १५५३; पैकीं ५३विद्यार्थिनी होत्या. विद्यार्थ्यांची जातवारीः–– कोंकणस्थ ब्राह्मण ३५२, देशस्थ ब्राह्मण ४०२, कऱ्हाडे ब्राह्मण ४५, सारस्वत ब्राह्मण ७०, देवरुखे ब्राह्मण ५, प्रभू ८३, मराठे ११२, गुजराथी ७२, लिंगायत ३०, जैन ८३, सिंधी ११, अस्पृश्य ७, इतर हिंदु १५१, मुसलमान ४४, पार्शी १९, ख्रिश्चन १९, कुणबी व कोळी २६, कारागीर २७, रजपूत ४. एकूण १५५३. परीक्षांचे निकाल–बी. ए. ८६, बी. एस्. सी. (Whole)८९, बी.एस्.सी. (सब्सिडिअरी) १२०, एम्. ए. १२, एम्. एस्सी. ४, इंटर आर्टस् १३८, इंटर सायन्स १७१ आणि फर्स्ट इयर ३८७; याप्रमाणें विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

बाई जेरबाई वाडिया लायब्ररीः–– या वर्षी दहा हजार रुपये पर्मनंट फंड म्हणून वेगळे काढण्यांत आले आहेत; त्याचें व्याज 'रिसर्च जर्नल्स' करितां खर्च करण्यांत येईल. डॉ. परांजपे यांनीं आपल्या संग्रहांतील तीन हजार पुस्तकें लायब्ररीस दिलीं. कॉलेजचा जमाखर्च–एकूण जमा ३०४९२७ रु. १ आ. खर्च ३०८५४७ रु. ४ आ. ४ पै. जमेपैकीं सरकारी ग्रँट ३३६९५ रु. प्रिन्सिपाल–रँ. गणेश सखाराम महाजनी, एम्. ए., पीच्. डी.

विलिंग्डन कॉलेजः––ता. ३१।३।३२ रोजीं हजेरीपटावर ३८० विद्यार्थी होते. त्यांत कोंकणस्थ ब्राह्मण १०२, देशस्थ ब्राह्मण १२३, कऱ्हाडे ब्राह्मण २३,सारस्वत ब्राह्मण १०,प्रभु ८, मराठे १४, लिंगायत ५५, जैन ३०, इतर हिंदु १३ व मुसलमान २, परीक्षांचे निकाल–एम्. ए. १, बी. ए. ३४, इंटर आर्टस ५४, एफ्. वाय, १६१ याप्रमाणें विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इंटर-सायन्स क्लास सुरू करण्याकरितां डे.ए. सोसायटीनें परवानगी दिली असून सीनेटचीही अनुकूलता मिळाली आहे. प्रारंभींच्या वीस हजार रुपये खर्चापैकीं, प्रो. गो. चिं. भाटे यांनीं मार्च १९३२ अखेर बारा हजार रुपये जमविले. कॉलेजच्या जमाखर्चांत बरेच वर्षे तूट येत असे. परंतु चालू वर्षी जमा ६४२५३ रु. ५ आ. १ पै.व खर्च ६२८१० रु. ६ आ. ६ पै. झाला. आणि १४४२ रु. १४ आ. ७ पै. शिल्लक राहिले. प्रिन्सिपाल प्रो. परशुराम महादेव लिमये एम्. ए.

न्यू इंग्लिश स्कूल, पुणेंः–– यावर्षी १७०२ विद्यार्थी पटावर होते. त्यांत ब्राह्मण ११०९, सारस्वत ब्राह्मण २७, देवरुखे ब्राह्मण ८, प्रभु ९८, मराठे २१३, गुजराथी १९, लिंगायत १२, जैन २०, अस्पृश्य १६, इतर हिंदु १२७, मुसलमान ३०, पार्शी २, ख्रिश्चन १०, ज्यू ३, आणि इतर ८,मॅट्रिकपरीक्षेस२३० विद्यार्थी बसले. त्यांपैकीं ८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जमाखर्च–जमा ९८३८१ रु. ८ आ. २ पै. खर्च ९३२६० रु. ७ आ. ११ पै. जमेपैकीं सरकारी ग्रँट २१७०० रु. सुपरिंटेंडेंट–प्रो. शंकर रामचंद्र कानिटकर एम्. ए.

न्यू इंग्लिश स्कूल साताराः–शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या ७८४, पैकीं ब्राह्मण ५१२, सारस्वत ब्राह्मण १४, देवरुखे ब्राह्मण ७, प्रभु ८, मराठे १४२,गुजराथी ८, लिंगायत ७, जैन १०, अस्पृश्य २०, इतर हिंदु ४२, मुसलमान ४ व ख्रिश्चन १०. मॅट्रिक परीक्षेस ११५

विद्यार्थी बसले; पैकीं ३८ उत्तीर्ण झाले. जमाखर्च–जमा ४३६७१ रु. खर्च ४३०३० रु. सुपरिंटेंडेंट–डॉ. वासुदेव गोपाळ परांजपे, एम. ए. एल्‌एल्. बी., डी. लिट्.

नवीन मराठी शाळा पुणें:–शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या ६२५ पैकी ब्राह्मण ४८२, सारस्वत ब्राह्मण २, प्रभु २४, मराठे ९२, गुजराथी १, लिंगायत १, अस्पृश्य १, इतर १, इतर हिंदु १९ व मुसलमान ३. जमाखर्च–फीचें उत्पन्न ४९७७ रु. शहर म्युनिसिपालिटीची ग्रँट ५१४९ रु., सरकारी ग्रँट १८७२ रु. खर्च २०२५१ रु. व्यवस्थापक–प्रो. केशव गोपाळ पंडित, एम्. ए.

मावजी माधवजी ए. व्ही. स्कूल, उंबरगांव:– शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या ७४; पैकीं ब्राह्मण ४१, प्रभु २, मराठे ६, गुजराथी १६, अस्पृश्य १, इतर हिंदु ५, मुसलमान १, पार्शी १, ख्रिश्चन १. जमाखर्च–जमा ६१४४ रु. ६ आ. खर्च ८७१७ रुपये. ४ आ. ३ पै. तूट सुमारें २६०० रु. व्यवस्थापक–श्री. आर. जी. गोखले बी. ए., बी. टी.

न्यू इंग्लिश स्कूल होस्टेल पुणें:— विद्यार्थ्यांची संख्या ३९; त्यांत ब्राह्मण२१, प्रभु ४, लिंगायत २, मराठे १०, गुजराथी १ आणि चांभार१.व्यवस्थापक–प्रो. आर. एन्. जोशी बी. एस्‌सी.

द्रविड हायस्कूल वांई:–ही शाळा सोसायटीच्या व्यवस्थेखालीं घेण्याचा ठराव ता. १३ जानेवारी १९३१ रोजीं कौन्सिलनें मंजूर केला आहे. त्याप्रमाणें लवकरच ही शाळा सोसायटीच्या संस्थांपैकीं एक होईल.

डे. ए. सोसायटीची सांपत्तिक स्थिति:– पेन्शन फंड–(१९३१–३२ अखर शिल्लक)२१५९३६ रु. १३ आ. ६ पै. पर्मनंट फंड–४१४६६६ रु. ०आ. ८पै. करंट फंड जमा ६४६८० रु. १३ आ. १ पै. खर्च ६४६८० रु. १३ आ. १ पै. सोसायटीची स्थावर मिळकत-(१९३१–३२ अखेर किंमत) २१४१७४६ रु. जंगम मिळकत–५५६९८६ रु. लायाबिलिटीज-३४१८४४ रु. ४ आ. ३ पै. सोसायटीचे अध्यक्ष–हिज हायनेस सर राजाराम छत्रपति महाराज जी. सी. आय. ई. कोल्हापूरचे महाराज. चेअरमन–दिवाण बहादूर का. रा. गोडबोले, बी. ए. एम्. सी. ई. सी. बी. ई. सेक्रेटरी प्रो. महादेव कृष्णाजी जोशी, एम्. ए.

२०. डेक्कन सभा–या संस्थेचा जन्म ता. ४ नोव्हेंबर १८९६ रोजीं झाला. राजकीय कार्याकरितां अशा तऱ्हेची संस्था काढण्याची कल्पना प. वा. न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांनीं काढिली व ती प. वा. ना. गोपाळ कृष्ण गोखले, रा. ब. वि. मो. भिडे, रा. ब. श्री. भि. जठार, रा.ब. नारायणभाई दांडेकर, सरदार कुपुस्वामी मुदलियार व बॅ. काशिनाथपंत गाडगीळ वगैरे त्यावेळच्या पुढारी मंडळींच्या साहाय्यानें अंमलांत आणिली. ना. गोखले हे डेक्कन सभेचे पहिले चिटणीस असून १८९७ सालीं विलायतेंत वेल्बी कमिशनपुढें त्यांची साक्ष झाली ती याच संस्थेच्या वतीनें होय. सरकारकडे अर्ज करणें, डेप्युटेशनें पाठविणें वगैरे सनदशीर मार्गांनीं महाराष्ट्रांतील जनतेच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याच्या व हिंदुस्थानचा राजकीय दर्जा वाढविण्याच्या दृष्टीनें या संस्थेनें आपल्या पस्तीस वर्षांच्या हयातींत बरीच महत्त्वाची कामगिरी केली आहे. सन १९१८ पर्यंत ही संस्था राष्ट्रीय सभेशीं संलग्न असून तिला प्रतिनिधि पाठविण्याचाही डेक्कन सभेस अधिकार होता. त्या सालीं प. वा. सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस एक परिषद भरून प्रागतिक पक्षाची स्थापना झाली. तेव्हांपासून ही संस्था राष्ट्रीय प्रागतिक परिषदेस जोडण्यांत आली असून परिषदेच्या कार्यकारी मंडळावर दरसाल पांच प्रतिनिधि निवडून पाठविण्याचा तिला हक्क देण्यांत आला आहे. हिंदुस्थानास शक्य तितक्या लवकर साम्राज्यांतील स्वयंशासित वसाहतीचा दर्जा अथवा डोमिनिअन स्टेटस् प्राप्त करून देणें हें प्रागतिक पक्षाचें ध्येय असून तें सनदशीर मार्गांनीं मिळवावयाचें असा त्याचा निश्चय आहे. हें ध्येय व ही कार्यपद्धति हीं दोन्हीहि या संस्थेस मान्य असल्याचें तिच्या उद्देशपत्रिकेवरून स्पष्ट दिसतें. सभेचे एक प्रमुख संस्थापक ना. गोखले यांच्या नांवानें एक स्मारक मंदिर बांधून त्यांत राजकीय विषयांच्या अध्ययनाकरितां जरूर त्या ग्रंथसंग्रहाची सोय करण्याचा सभेचा मानस होता. त्याप्रमाणें स्मारक मंदिराची इमारत बहुतेक पुरी झाली असून ती चांगली भव्य व प्रशस्त आहे व मध्यवस्तींत आहे. संस्थेचा कारभार तीस सभासदांच्या एका कार्यकारी मंडळामार्फत चालतो.त्याची निवड दरसाल होत असते. ने. ना. श्रीनिवासशास्त्री पी. सी. सी. एच्, हे सभेचे अध्यक्ष असून रा. ब. ह. व्यं. चिनमुलगुंद, रा. का. श्री. जठार, सी. आय्. ई.,रा. हरीभाऊ

घारपुरे, आय्. सी. एस्. (रिटायर्ड), व रा. ग. रा. गांधी वकील हे उपाध्यक्ष आहेत.

२१. डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें. स्थापना–१८९४. महाराष्ट्र भाषेच्या अभिवृद्धयर्थ निरनिराळ्या विषयांवर भाषांतर रुपानें अथवा स्वतंत्र रीतीनें ग्रंथ तयार व्हावेत व त्यांच्या द्वारें विद्याप्रसारास उत्तेजन मिळावें हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. १९३१ अखेर तहाहयात सभासद ९८ व वार्षिक वर्गणीदार ३३; आश्रयार्थ विनंति करणारीं पुस्तकें संस्थेकडे येतात व त्यांतील निवडक पुस्तकांना बक्षीस किंवा शिफारसपत्र मिळतें. १९३१ जमा–४५५२९-६–६रु. खर्च–२८५५–१२–९ रु. शिल्लक–४२६७३–९–९ रु.अध्यक्षः–श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, चीफ ऑफ इचलकरंजी. चिटणीसः–श्री. पाळंदे, श्री. ठोसर एम्. ए. (पुणें) प्रि. घारपुरे बी. ए. एल्एल्. बी. (मुंबई). कचेरी १००३ सदाशिव पेठ, पुणें २.

२२. पी.वाय्. सी. हिंदु जिमखाना, पुणें. स्थापना–सन १९००. उद्देशः–(१) सर्व वर्गांच्या व दर्जांच्या लोकांना खेळ,करमणूक वगैरेचीं साधनें सुलभ करुन देणें (२) सहकार्य, सामाजिक कामें, स्वार्थत्याग व शिस्त यांबद्दल सभासदांची आवड वाढविणें (३) देशी व विदेशी मर्दानी खेळांची दांडगी आवड नवीन पिढीच्या मनांत उत्पन्न करणें (४) हिंदु जमातीची शारीरिक व नैतिक वाढ करणें. ह्या जिमखान्याचें मूळ म्हणजे शाळेंतील मुलांचा एक संघ (club). पुढें सन १९०० सालीं त्याला संघटित स्वरुप आलें व त्याचें 'पूना यंग क्रिकेटर्स क्लब' असें नांव ठेवलें; आणि याचाच विस्तार म्हणजे हल्लींचा पी. वाय्. सी. हिंदु जिमखाना. हें नांव त्यास १९१२ सालीं देण्यांत आलें. साहाय्यकः–१९०६ सालीं श्रीमंत एस्. आर. विंचूरकर यांनीं क्रिकेट पॅव्हिलिन बांधण्यास मदत दिली. भोर संस्थानाधिपति श्रीमंत बाबासाहेब पंतसचिव यांनीं एक टेनिस कोर्ट तयार करण्याचा खर्च दिला. सांगली, मिरज, कुरुंदवाड, इचलकरंजी, अक्कलकोट, फलटण, कुचबिहार व पोरबंदर या संस्थानच्या अधिपतींनीं तसेंच शेट विठ्ठलदास ठाकरसी, शेट नरोत्तम मोरारजी, शेट अंबालाल साराभाई, सर चौबळ, दिवाण बहादूर गोडबोले, बॅ. जयकर वगैरे सद्गृहस्थांनीं वेळोवेळीं जिमखान्यास देणगी दिली आहे. सन १९२१पासून निरनिराळ्या खेळांतील जाहीर सामने जिमखान्यातर्फे होतात. यशस्वी संघ अगर खेळाडू यांस देण्याकरितां ७ 'ढाली' व ७ 'कप, आहेत. (१) दळवी टेनिसशील्ड, (२) सरदार रास्ते टेनिस शील्ड, (३) पी. वाय्. सी. हिंदु जिमखाना फुटबॉल शील्ड, (४) बी. बी. भोपटकर कप, (५) के. बी. मांडके शील्ड, (६) एस्. बी. करपे कप, (७) हिज् हायनेस दि महाराजा ऑफ् पोरबंदर कप, (८) हरि जनार्दन मेहेंदळे शील्ड, (९) शेट नरोत्तम मोरारजी कप व शील्ड, (१०) प्रो. डेव्हिड् शील्ड, (११) सिङ्नहॅम कप, (१२) भुसारी कप, (१३) श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव कप. हिंदु जिमखान्याचे सभासद सख्यां ५१८ आहेत. त्यांत आश्रयदाते १३,आजीव सभासद २८, देणगीदार ३०,पहिला वर्ग सभासद ९४, दुसरा वर्ग २२४ शाळांचे विद्यार्थी ३२ आणि हितचिंतक ९७. सांपत्तिक स्थितिः–सन (१९३१ ते ३२) मागील शिल्लक २०३३ रु. ५ आ. ६ पै. जमा ७१७१ रु. १२ आ. २ पै. खर्च ७९५१ रु. ७ आ. ८ पै. शिल्लकः–१४५३ रु. १० आणे. अध्यक्षः–राजा धनराजगिरजी राजा नरसिंगिरजी उपाध्यक्ष–श्री.एच्. जी. घारपुरे. आय्. सी. एस्. प्रो. बा. गो. काळे एम्. ए. जनरल सेक्रेटरीः–डॉ. व्ही. बी. वापट. पत्ताः–पी. वाय. सी. हिंदु जिमखाना, पुणें नं. ४.

२३. पूना वुइमेन्स कौन्सिलः–स्थापना १९२५. ही संस्था म्हणजे 'बॉम्बे प्रेसिडेन्सी वुइमेन्स कौन्सिल'ची पुणें येथील शाखा आहे. कोणत्याही सामाजिक, धार्मिक, किंवा राजकीय पक्षाशीं सहकार्य करण्याकरितां ही संस्था स्थापली नाहीं. उद्देशः–"(१) सर्व जातीच्या स्त्रियांना एकत्र आणणें व परस्परांच्या उन्नतीसाठीं परस्परांचें साहाय्यघेणें; (२) स्त्रियांस नागरिकत्व म्हणजे काय हें शिकवून चांगल्या नागरिक बनविणें. (३) अखिल जगांतील स्त्रिया व मुलें यांची स्थिति सुधारण्याकरितां खटपट करणें."स्त्रियांच्या चळवळींत काम करणाऱ्या सर्व स्त्रियांना व त्यांस सहानुभूति दाखविणाऱ्या स्त्रियांना सभासद होतां येतें. शिवाय ज्या संस्था या संस्थेस जोडल्या गेल्या असतील, त्या संस्थांतील सर्व स्त्री–सभासदांना या कौन्सिलचे सभासद होतां येतें. असेच उद्देश असणाऱ्या दुसऱ्या संस्थांना किंवा या संस्थेचे उद्देश सफल होण्याकरितां खटपट करणाऱ्या दुसऱ्या संस्थांना ही संस्था जोडून घेते. अशा संस्थांना वार्षिक ५ रु. वर्गणी द्यावी लागते. सभासदांस वार्षिक वर्गणी २ रु.; जोडलेल्या संस्थांच्या सभासदांना सभासदत्वासाठीं येथें वेगळी वर्गणी पडत

नाहीं. कौन्सिलनें 'ऑल इंडिया वुइमेन्स कॉन्फरन्स मुंबई' या सभेशीं सहकार्य केलें असून तिचीं कांहीं कामें आपल्या अंगावर घेतलीं आहेत. संस्थेनें 'येरवडा मेन्टल हॉस्पिटल व नर्सेस क्वार्टर्स' यांची तपासणी एक पोटमंडळ नेमून केली व तेथील स्थिति सुधारण्याबाबत सरकारकडे कांहीं सूचना केल्या आहेत. कौन्सिलच्या 'लोकल कमिटीनें' दोन पोट कमिटचा नेमल्या आहेत. १ इंडस्ट्रियल सर्व्हे ऑफ वुइमेन वर्कर्स करितां, २ एज्युकॅशनल सर्व्हे ऑफ प्रायमरी स्कूल्स्. दोन्ही कमिटचांचीं कामें चालू असून एज्युकॅशनल कमिटीनें तीन शाळांची तपासणी केली आहे. या कामांत त्या त्या अधिकाऱ्यांकडून योग्य मदत मिळत आहे. कौन्सिलतर्फे स्त्री-दिन थाटानें साजरा होतो. 'शारदा ॲक्ट' मुंबई इलाख्यास लागू होऊं नये या श्री. गुंजाळ यांच्या प्रयत्नास विरोध करण्यासाठीं मुंबई सरकारास त्याप्रमाणें पत्र धाडलें, तसेंच 'प्रॉस्टिटयूशन ॲक्ट व त्यांतील नवीन दुरुस्त्या' यामुळें वेश्याव्यवसायावर जें नियंत्रण पडलें त्याला दुजोरा देण्याकरितां एक पत्र धाडलें. सभासद संख्या-७५, जोडलेल्या संस्था-१३, १९३० जून अखेर जमाखर्च-जमा रु.२६०-१५-०खर्च रु.११८ ६ आ. ० पै. शिल्लक रु.१४२-९-० चेअरमन मिसेस् एन्. दस्तूर; व्हा. चेअरमन मिसेस इंग्लिस् चिटणीस-डॉ. मिसेस् के. खाडचे ३४५ सदाशिव पेठ, मिस् बी. खरे कन्याशाळा, शनवार पेठ, पुणें.

२४ पैसाफंड:-१८७३सालापासून वसई व विशेषतः मुंबई येथें "सार्वजनिक पै फंडाची पेटी" या व अशाच इतर विषयांवर लेख आणि व्याख्यानें जोमांत चालू झालीं. त्यांतूनच "पैसाफंडा"च्या कल्पनेचा जन्म झाला. श्री. अंताजी दामोदर काळे यांनीं पैसाफंडाच्या प्रचाराचें काम समाधानकारक रीतीनें चालविल्यानंतर लोकमान्य टिळकांनीं पैसाफंडाकडे पूर्वीहून विशेष लक्ष दिलें, व १९०४ सालीं "पैसाफंड कमिटीची" स्थापना करण्यांत आली.पैसाफंडालाच "औद्योगिक निधि" असें दुसरें नांव आहे. म्हणजे देशाची औद्योगिक प्रगति करणें हें पैसाफंडाचें ध्येय आहे. त्या ध्येयाला अनुसरूनच तळेगांव दाभाडें येथें एक नमुनेदार राष्ट्रीय कांचकारखाना सुरूं आहे. येथें नानाप्रकारच्या दिव्यांच्या चिमण्या, कांचेच्या मोठचा व एअरटाइट् बरण्या, लहानमोठचा हंडचा, चिनीमातीच्या कुंडचा, दौती, पेपरवेट्स् वगैरे हरतऱ्हेचा सुबक व संपूर्ण स्वदेशी माल तयार होतो. या कारखान्यांत शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनीं आणखी नवीन लहान लहान धंदे सुरूं करून पैसाफंडाच्या कीर्तींत भर टाकली आहे. पैसाफंडाच्या प्रचाराचें काम स्वयंसेवक गांवोगांव हिंडून करीत असतात. पैसाफंडही संस्था महाराष्ट्राला चिरपरिचित व राष्ट्रीय असल्यामुळें बृहन्महाराष्ट्रभर पसरलेले कित्येक मोठमोठे वकील व डॉक्टरसुद्धां स्वयंस्फूर्ती वर्गणी जमवून ती पैसाफंडाकडे पाठवितात. कोंकणांतील आचरें या गांवचे संन्यस्त वृत्तीनें राहणारे गृहस्थ श्री. रा. रा. लक्ष्मण गणेश मराठे यांनीं १९२९ सालीं पैसाफंडाला केवळ स्वयंस्फूर्तीनें दहा हजार १०,००० रुपये दिले. पैसाफंडाच्या आश्रयदात्यांची (रु. ५०१ अगर अधिक देणारें) संख्या ८९ असून, तहाहयात सभासदांची संख्या (रु. ५० ते १०० देणारे) ३९९ आहे. श्री. रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर हे पैसाफंडाचे अध्यक्ष असून, रा. नेने हे खजिनदार व मुख्य चिटणीस आहेत. श्री. अनंत दत्तात्रय जोशी बी. ए. बी. एस्.सी. हे चिटणीस असून श्री. अंताजी दामोदर काळे हे ऑर्गनायझर आहेत. व्यवस्थापक श्री. रामचंद्र दामोदर चांदोरकर. पत्ता:— तळेगांव दाभाडें, जि. पुणें.

२५ प्रेस ओनर्स असोसिएशन:—

जर्मन महायुद्धानंतर सर्व जिनसाचे दर महाग झाल्यामुळें छापखान्यांतील कामगारांनीं आपल्या मुशाहिऱ्यांत वाढ करावी म्हणून मागणी करण्यास सुरवात केली. परंतु त्याप्रमाणें छपाईचे दर गिऱ्हाइकांकडून वाढवून मिळण्यास कुरकुर व्हावयास लागली, व कारखान्याकारखान्यांत चढाओढ होऊन कारखाने नुकसानींत येऊं लागले. याला कांहीं उपाय योजणें इष्ट वाटून ता. ४ मे सन १९१९ रोजीं 'पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन'ची स्थापना झाली. अशी संस्था स्थापन व्हावी म्हणून चित्रशाळा छापखान्याचे मालक रा. रा. वासुदेव गणेश जोशी व जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक रा. रा. केशव रावजी गोंधळेकर यांनीं सन १९१४ ते १५ चे सुमारास खटपट केली होती; परंतु तेव्हां तो योग आला नाहीं. सन १९१९ सालीं संस्था स्थापन झाल्यावेळीं सुमारें वीस छापखान्यांचे प्रतिनिधी या संस्थेचे सभासद झाले. कारखानदारांमधील परस्पर स्नेहसंबंध वाढावा म्हणून कित्येक वर्षें दरमहा कोणत्या तरी छापखान्यांत सभासद जमत. या असोसिएशनतर्फे प्रेस-ॲक्ट कमिटी, पुणें सिटीम्युनिसिपालिटी वगैरेकडे छापखान्यांतील धंद्याचे अडचणीचें निवारण

करण्याकरितां वेळोवेळीं अर्ज करण्यांत येऊन गेल्या वर्षी पुणें जिल्ह्याचे डि. मॅजिस्ट्रेटनीं प्रेस-ऑर्डिनन्समधील निर्बंधाचा विस्तृत अर्थ करून छापखान्याकडे जेव्हां सर्क्युलर-पत्र पाठविलें, तेव्हां सदर सर्क्युलरमुळें या धंद्याचे कामीं कशा अडचणी येणार आहेत तें दाखवून देण्याकरितां शहरांतील व कँपांतील छापखानेवाले, वर्तमानपत्रवाले, डेपोवाले यांची एक सभा श्री. तात्यासाहेब केळकर यांचे अध्यक्षतेखालीं या असोसिएशनतर्फे बोलावण्यांत आली होती; व सदर सभेंत पास झालेल्या ठरावाबरहुकूम मे. डि. मॅजिस्ट्रेट पुणें यांचेकडे कलमीं करण्यांत आलें होतें. या संस्थेचे अध्यक्ष रा. रा. अनंत विनायक पटवर्धन हे असून सेक्रटरी रा. रा. केशवराव बाळ व रा. रा. बाबुराव सहस्रबुद्धे हे आहेत.

२६बालक-मंदिर-पुणें–स्थापनाः–१९२८; संस्थापक–प्रो. स. बा. हुदलीकर एम्. ए. पीएच्. डी. व सौ. सुलोचनाबाई हुदलीकर बी.ए. 'स्वातंत्र्य व खेळाची इच्छा' या बालकांच्या नैसर्गिक प्रवृत्तीवर अवलंबून ही संस्था स्थापण्यांत आलेली आहे. या ठिकाणीं शिक्षणांचें महत्त्व नमून बालकांचें महत्त्व अधिक आहे मुलांची वृत्ति आनंदी बनविणें व त्यांचें चारित्र्य व शील बनविणें, याकडे विशेष लक्ष दिलें जातें. मुलें थोडीं असल्यामुळें प्रत्येकाला वैयक्तिकरीत्या शिकविणें शक्य होतें. बालक मंदिर शाळेचे प्रथमतः २ वर्ग होते (१) पहिला वर्ग ३ ते ५ वर्षे वयाच्या बालकांच्यासाठीं व याला "बालोद्यान" (किंडरगार्टन) असें नांव आहे. दुसरा वर्ग ५ ते ६ वयाच्या मुलांमुलींसाठीं होता. त्याला 'प्राथमिक वर्ग' असें नांव आहे. हल्लीं मात्र २॥ वर्षांपासून १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना घेण्याची सोय केली आहे. मुलांमुलींचें शिक्षण बरोबरच व्हावें अशी व्यवस्था करण्यांत आली असून मुलींना घरांमध्यें उपयुक्त होईल असें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. हल्लीं मॅट्रिकपर्यंत मुलें घेतां येतात व इंग्रजी, जर्मन, फ्रेंच. गुजराथी, मराठी व उर्दू इतक्या भाषा शिकविण्यांत येतात. ही संस्था १९२९ मध्यें रजिस्टर्ड झाली व तिचा कारभार संस्थेच्या बोर्डामार्फत चालतो. संस्थेच्या सभासदांचे वर्गः––१००० रु. देणगी देणारे पेट्रन्स. ५०० रु. देणगी देणारे फेलोज. ३०० रु. देणगी देणारे आश्रयदाते. २० वर्षे संस्थेंत काम करण्यास तयार असलेले व जे कार्यकारी मंडळाकडून निवडले जातील अशा इसमांना संस्थेचे तहाहयात सभासद होतां येतें. प्रिन्सिपाल व्हाइस-प्रिन्सिपाल् यांची निवडणूक सभासदांचे मार्फत होते व त्यांची नेमणूक दर तीन वर्षांनीं होते. सध्यां प्रो. स. बा. हुदलीकर एम्.ए.पीएच्.डी. हे प्रिन्सिपल असून सौ. सुलोचनाबाई हुदलीकर बी. ए. ह्या व्हाइस प्रिन्सिपाल आहेत. संस्थेचा पत्ताः–बालक मंदिर, ८३ ससूनरोड, पुणें १

२७ भारत इतिहास संशोधक-मंडळ, पुणें. स्थापना शके १८३२. ही संस्था श्रीमंत सरदार खं. चिं. मेहेंदळे व कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनीं स्थापन केली. संस्थेचें उद्देश व कार्य–'स्वदेशाच्या इतिहासाच्या साधनांचा शोध करणे; इतिहासाच्या शास्त्रशुद्ध अध्ययनाला चालना देणें, संशोधित साहित्याचें परीक्षण करून व त्यावर चर्चा करून ते शोध साधनांसह प्रसिद्ध करणें.' ह्या उद्देशानुसार मंडळानें आतांपर्यंत सुमारें ५० ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. मंडळाच्या कामाची स्थलकालसीमा मंडळाच्या नांवावरून जी ध्यानांत येते तीच बरोबर आहे. सर्व भारतवर्षांत श. १७४० (इ. १८१८) पूर्वीच्या कालांत जें जें घडलें व लिहिलें गेलें, तें तें ह्या मंडळाच्या कार्यांत समाविष्ट होतें. पण साधनपरत्वें आणि सान्निध्यामुळें अर्वाचीन व महाराष्ट्राच्या इतिहासाचें संशोधन इतरांच्या सापेक्षतेनें बरेंच झालें व होत आहे हें उघड आहे. इतिहास-साधनांत शिलालेख, ताम्रपत्रें, ताडपत्रावरील पोथ्या, भूर्जपत्रें, नाणीं, आयुधें, चित्रे, वस्त्रें, इष्टिका लेख, पोथ्या, बाडें, कागद, कपडे, मूर्ति इ. इ. वस्तूंचा समावेश होतो व ह्या सर्व प्रकारच्या वस्तू मंडळाच्या संग्रहीं आहेत. अर्थात् मंडळाची प्रदर्शनशालाही प्रेक्षणीय, उद्बोधक, व अभ्यसनीय झाली आहे. ह्याशिवाय मंडळाची लेख्यशाळा किंवा दप्तरखाना हा फार महत्त्वाचा आहे. ह्यांत निरनिराळ्या संशोधकांनीं मोठ्या कष्टानें व गांवोगांव हिंडून संशोधून आणलेले ऐतिहासिक कागदपत्र व पोथ्या ठेविल्या आहेत. पोथ्यांमध्यें कांहीं मंत्रग्रंथ आहेत; तसे तंत्र ग्रंथ, स्मृती, काव्येंहि आहेत. विशेषतः कांहीं पोथ्या बऱ्याच जुन्या म्हणजे पृष्ठमात्रांकित आहेत. यांपैकीं कांहीं पोथ्या-ग्रंथ अप्रसिद्ध आहेत. संतांचेहि ग्रंथ आहेत. कागदपत्रांचा विभाग हा मोठा आहे. त्यांत जमाबंदी प्रकरणाचे, वतनी तंट्याबाबतचे व सामाजिक आणि राजकीय विषयांतील तसेंच बहामनी कालचे व दक्षिणेंतील तिन्ही मुसलमानी शाह्यांचे, शिवकालीन आणि पेशवेकालीन कागद बरेच आहेत. फारसी

हस्तलिखित ग्रंथ व कागदपत्रहि मंडळाचे दप्तरखान्यांत आहेत. सर्व मिळून एक लाखाचे सुमारे कागदपत्रांचा संग्रह संस्थेजवळ आहे. मंडळाच्या स्वीयग्रंथमालेंत जे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यांत लहानमोठे व विविध विषयावरचे मिळून ११२५ शोधनिबंध व टिपणें प्रसिद्ध झालीं आहेत. व त्यांचा आधार मराठी रियासती, घराण्यांचे इतिहास, विषयवार इतिहास इत्यादि ऐतिहासिक ग्रंथरचनेचे कामीं अनेकांना झालेला आहे. प्राचीन किंवा मध्ययुगीन इतिहासकालासंबंधानेंहि मंडळाची कामगिरी उल्लेखनीय व आदरणीय झाली आहे. मंडळानें आतांपर्यंत सुमारें ३५ ताम्रपत्रें व शिलालेख प्रसिद्ध केले आहेत. ताम्रपत्रांत वाकाटक, नल, कोल्हापूरचे शिलाहार, अरिकेसरी (परभणी) हे ताम्रपट अत्यंत महत्त्वाचे व अभिनव माहिती देणारे झाले आहेत. शिलालेखांत ज्ञानेश्वरकालीन मराठीचेहि कांहीं लेख प्रसिद्ध केले असून त्यापूर्वीचे व संस्कृत आणि कानडी भाषेंतीलहि प्रसिद्ध केले आहेत्.संस्थेनें ऐ. साधनें,शोधनिबंध जसे प्रसिद्ध केले आहेत तसेंच इतिहासाभ्यासकांस व इतरांसहि अत्यंत उपयोगी असे संदर्भग्रंथ,सूचिग्रंथ,कोश,जंत्री हेहि प्रसिद्ध केले आहेत. शकें १५५१–१६५१ ह्या शंभर वर्षांची प्रत्यहींच्या तिथिघटकापळांसुद्धां व तिन्ही चारी कालगणनेच्या (अरबी, हिजरी, जुलूस, इंग्रजी, शक, फसली व राज्याभिषेक शक ह्यांसह) पद्धतींसह शिवकालीन जंत्री; फारसी–मराठी कोश, राजवाडे–खंडस्थल सूचि हेहि ग्रंथ मंडळानें प्रसिद्ध केले आहेत. फारसी ग्रंथामध्यें इंग्रज व पेशवे यांमधील फारसी पत्रांचा एक खंड मूळ फारसी पत्रें, त्यांचे मराठी भाषांतर, यांसह प्रसिद्ध केला आहे. फारसीचे अभ्यासक व त्या आधारानें इतिहासग्रंथ रचना करणाऱ्यांपैकीं कोणीही असा मूळपत्रांचा खंड प्रसिद्ध केला नाहीं. म्हणून मंडळाची हीहि कामगिरी विशेष उल्लेखनीय होय. अलिकडे फारसी फर्मानें छापलीं जात असून तरीखे–अल्ली, हप्तकुर्सी व अलीनामा या फारसींतील महत्त्वाच्या मूळ ग्रंथांची छपाई हल्लीं सुरू आहे. तसेंच मंडळाच्या लेख्यशालेचें परिचयपुस्तक तयार होत आहे. क्वचितच अन्यत्र प्रसिद्ध असलेलीं अत्यंत दुर्मिळ अशीं नाणीं असलेल्या मं. संग्रहांतील नाण्यांचा सचित्र कॅटलागहि औन्ध संस्थानाधिपतींच्या साहाय्यानें व देखरेखीखालीं तेथेंच छापला जात आहे. मंडळाची एक पुरस्कृत ग्रंथमालाही असून त्या मालेंत निरनिराळे इतिहासासंबंधीं २९ ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. मंडळानें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतील कांहीं लेखकांचीं नांवें निर्दिष्ट करावींशी वाटतात. श्री. राजवाडे, चांदोरकर, देव, भट, शेजवलकर, लेले, ओक, पिसुर्लेकर, ॲबट, सरकार, सरदेसाई, भावे, भानू, खरे, जोशी, पोतदार, आपटे, काळे, देशपांडे, पारसनीस, वैद्य, मेहेंदळे, वाकसकर, गुप्ते, साने, टिळक, पटवर्धन, बेंद्रे, दीक्षित, खरे, केळकर इ.इ. कांहीं विशेष लेखहि सूचित करणें मंडळाचे काम सांगण्याच्या दृष्टीनें इष्ट आहे. महानुभावांच्या गुप्त लिपींचा उलगडा, पाणिनी कालनिर्णय, गोत्रें, जेधे शकावलि, व्यवहारनिर्णय पद्धति, शब्दव्युत्पत्ति, जुनीं गाणीं, मेस्तकें, राज्याभिषेक कल्पतरु, महादजी शिंदे, नागपूरकर भोसले इ.इ. इतिहास मंडळाच्या सभासदांचे ४वर्ग (वार्षिक ३, ६, १२ व २५ रु. देणारे) असून त्या त्या वर्गाची दसपट वर्गणी दिल्यानें, तहाहयात सभासद होतां येते.शिवाय आश्रयदाते हितचिंतक हे ३०० व १५० रु. प्रतिवर्षीं देणारे यांचाहि त्या थोर नात्यानें सभासदांत समावेश होतो. मंडळाचें वार्षिक संमेलन व वाढदिवस हे दोन मुख्य समारंभ होतात. मंडळाचे कारभारीमंडळाची दर तीन वर्षांनीं निवडणूक होते. व त्यांचे देखरेखीखालीं सर्व कारभार चालतो. मंडळ रजिस्टर असून त्याच्या स्वतःच्या जागेंत व इमारतींत त्याचें कार्यालय आहे.

मंडळाच्या चर्चासभा दर पंधरवड्यास भरत असून सभेंत संशोधित नव्या साहित्यावर लेखनिबद्ध असे विचार मांडून चर्चा केली जाते. पहिलीं बारा वर्षें मंडळामार्फत वार्षिक इतिवृत्त व संमेलनवृत्त असे दोन ग्रंथ प्रसिद्ध होत असत. गेलीं १२ वर्षें मं. चें त्रैमासिक सुरू असून त्यांत निबंध, ऐ. फारसी साधनें, शिलालेख, ताम्रपत्रें म्हणजे मध्ययुगीन इ. चीं साधनें, शिवाजीकालीन साहित्य खं. ४ था व ऐ. संकीर्ण साहित्य आणि अधूनमधून कविकाव्यचर्चा प्रसिद्ध होत असते. मंडळाचे सभासद ७८७ असून त्यांपैकीं २२३ तहाहयात सभासद आहेत. मंडळाचें २२ वर्षांमधील कार्य अनेक अंगांनीं असे भरदार आहे. मंडळानें साधनग्रंथहि पुष्कळ व उत्कृष्ट असे प्रसिद्ध केले.पण त्या कामांत मंडळास १५ हजार रुपये देणें झालें आहे. आतांपर्यंत महाराष्ट्रांतील कांहीं संस्थानिक,श्रीमंत आणि जाणत्या सद्‌गृहस्थांच्या उदार आश्रयावर ३५ हजारपर्यंत रकम वेळोवेळीं मिळाली. त्यांतूनच ही सध्यांची इमारत उभी झाली व त्यापैकींच हें

कर्ज आहे. मंडळाचे हे प्रयत्न व कार्य लक्ष्यांत येऊन आणि विशेषतः मंडळाच्या वाढत्या इमारतीची जरूरी जाणून त्या हेतूनें मंडळास एक नवीन देणगी मिळाली आहे. ही देणगी म्हणजे अमेरिकेचे रहिवासी, महाराष्ट्र संत वाङ्मयाचे भक्त, डॉ. जस्टिन इ. ॲबट यांनीं ३० ह. डॉलर्सची मोठी रक्कम आपल्या मालमत्तेंतून देऊन ठेवली आहे. पण एवढी सर्व रक्कम मंडळाच्या हातांत पडेल असें नाहीं, हें ॲबट यांच्या मृत्यूपत्राचे व्यवस्थापकाकडून कळविण्यांत आलें आहे. कारण, बिघडलेली आर्थिक परिस्थिति व उतरलेले बाजार भाव. मंडळाचे सभासदांत औंध, भोर, फलटण, इचलकरंजी व मुधोळ ह्या संस्थानांचे अधिपति आहेत.

अध्यक्षः—भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य. चिटणीसः—प्रो. द. वा. पोतदार व सरदार गं. ना. मुजुमदार पत्ताः—सदाशिव पेठ, पुणे नं. २.

२८. भिमथडी शिक्षण संस्था, दौंड (जि. पुणें). स्थापनाः—सन १९२० उद्देशः—"ज्ञानाचे निरनिराळे विभाग व सर्वसाधारण नीतितत्त्वें यांसंबंधीं मुलांमुलींना शिक्षण देण्याकरितां एक अगर अनेक विद्यालयें स्थापन करणें." साहाय्यक श्री. ए. सी. पटेल. श्री. दत्तात्रय गणेश शाळू. तहाहयात आश्रयदाते, आश्रयदाते, तहाहयात सभासद, सदस्य, सभासद व तहाहयात कार्यवाह अशांनीं मिळून संस्था बनलेली आहे. दौंड हें रेल्वे जंक्शन आहे. येथील युरोपिअन लोकांच्या मुलांची इंग्रजी शिक्षणाची सोय आहे. परंतु इतर लोकांच्या मुलांच्या इंग्रजी शिक्षणाची सोय व्हावी म्हणन संस्थेनें 'सेंट्रल इंग्लिश स्कूल' या नांवानें एक इंग्रजी शाळा सुरू केली. हल्लीं शाळेला स्वतःची इमारत आहे. ती सुमारें १८००० रुपये स्वतः खर्चून सोलापूरचे बी. ई. सेटना यांनीं बांधून दिली. प्रथम तींत अकरा विद्यार्थी होते. हल्लीं १०५ विद्यार्थी शिकत आहेत. त्यांची जातवारी ब्राह्मण ४०, मराठे २७, जैन ३, लिंगायत १, इतर हिंदू ११, अस्पृश्य ११, मुसलमान ८ व ख्रिश्चन ४. शाळेंत इंग्रजी पांच इयत्तांचें शिक्षण दिलें जातें; शिक्षकांत एक बी. ए. बी. टी. आहेत. शाळेला सरकारी ग्रँट १२१२ रु. व रेलवेची ४६५ रु. १२ आ. मिळते. सांपत्तिक स्थिति—(सन १९२९ ते ३०) जमा ४६७२ रु. १ आ. ६ पै. खर्च ४६७२ रु. १ आ. ६ पै. मॅनेजिंग बोर्डाचे चेअरमन—श्री. ए. सी. पटेल. ऑ. सेक्रेटरी—श्री. डी. जी. शाळू.

२९. भांडारकर प्राच्य संशोधन मंदिर (Bhandarkar Oriental Research Institute) पुणें नं. ४. (१८६० च्या २१ व्या कायद्याप्रमाणें नोंदलेली) इ. स. १९१५ मध्यें या संशोधन-मंदिराची कल्पना निघाली. यामध्यें दोन हेतु होते. संशोधकांना संशोधन करण्यास मदत मिळावी व सर रामकृष्ण भांडारकर यांच्या कार्याचें व नांवाचें स्मारक व्हावें. या योजनेला जनतेचें पाठबळ, सरकारची सहानुभति व विशेषतः टाटा आणि जैनसंप्रदाय यांची सक्रिय मदत मिळाल्यामुळें या संशोधनमंदिराचा उद्घाटन समारंभ हिज एक्सलन्सी लॉर्ड विलिंग्डन यांचे हस्तें ६ जुलै १९१७ रोजीं झाला. आक्टोबर १९१८मध्यें संस्थेनें साहित्यविषयक कामास सुरवात केली. मुंबई सरकारनेंही डेक्कन कॉलेजांत असलेली हस्तलिखितांची लायब्ररी या संस्थेचे स्वाधीन करून तिचे व्यवस्थेकरितां रु. ३००० ची ग्रँटसुद्धां संस्थेच्या नांवावर करून दिली. तसेंच मुंबई सरकारी संस्कृत व प्राकृत ग्रंथमाला व रु. १२००० ची ग्रँट संस्थेच्या स्वाधीन केली. इमारतीला एकंदर खर्च रु. १२५००० इतका आला. संस्थेचें कार्य (१) हस्तलिखितांचें खातें—निरीक्षक डॉ. बेलवलकर, यांमध्यें २०००० संस्कृत हस्तलिखित ग्रंथ आहेत व ते कांहीं अटींवर अभ्यासकांना वाचावयास दिले जातात. हे ग्रंथ बुल्हर, कीलहार्न, भांडारकर वगैरे संशोधकांनीं १८६८ पासून सरकारकरितां जमवले. (भांडारकरांचे संग्रहांत ११६ व न्यायमूर्ति रानडे यांचे ग्रंथसंग्रहांतील ८९ हस्तलिखितें, व ६ ताडपत्रावरील तेलगू भाषेंतील तिरुपतिचे कवी एम्. ए. यांनीं दिलेलीं—संस्थेकडे आहेत. (२) इराणियन व सेमिटिक खातें—(प्रो. सर्फराज निरीक्षक) अवेस्ता, पेल्हवी, पर्शियन व अरेबिक हस्तलिखितांकरतां १९२० सालीं हें खातें उघडलें, व बरेच महत्त्वाचे जुने दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथ मिळविले आहेत. ते २१० आहेत व २९२ छापील ग्रंथ आहेत. (३) प्रकाशन खातें—मुंबई—संस्कृत व प्राकृत ग्रंथमालेचें काम ह्या खात्यानें चालू ठेविलेंच आहे. पण सरकारी प्राच्य ग्रंथमाला (Govt. Oriental Series) ही नवीन मालाहि या खात्यानें सुरू करून, मूळ ग्रंथ भाषांतरें व स्वतंत्र संशोधन ग्रंथ छापण्यास सुरुवात केली आहे. जैन लोकांच्या उदार देणगीमुळें, संस्था जैन वाङ्मयाच्या प्रकाशनाकडे विशेष लक्ष देत असून, हल्लीं जैन हस्त-



ग. स. मराठे



रा. आगरकर



रा. राजवाडे



रा. विठ्ठलराव शिंदे



चौंडे महाराज



प्रो. माणिकराव



रा. फाळके



लक्ष्मणराव किर्लोस्कर



डॉ. केतकर

लिखितांचा मोठा कॅटलॉग तयार करण्याच्या व्यवस्थेमध्यें आहे. प्रकाशित केलेल्या पुस्तकांची यादी कोणासही फुकट मिळते. गेल्या पांच वर्षांत प्रसिद्ध झालेले विशेष ग्रंथ—डॉ. भांडारकरांचे लेखांचे तीन खंड, (चारांपैकीं), न्यायकोश (११३६ पानें तिसरी आवृत्ति), व्याकरण महाभाष्य, शद्बसूचि (११५० पानें) व काणे यांचे धर्मशास्त्राचा इतिहास (८०८पानें).(४) विक्रीखातें–संस्थेनें प्रकाशित केलेल्या, तसेंच मुंबई ग्रंथमालेतर्फें प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची विक्री या खात्याकडे सोंपविली आहे. ९० निरनिराळीं पुस्तकें विक्रीस तयार आहेत. संस्थेच्या सभासदांना विशेष सवलत मिळते. ऑल इंडिया प्राच्य परिषदेनें आपले अहवाल,पत्र-व्यवहार व परिषदेच्या हकिगतीचे छापील वृत्तांत विकण्याकरितां संस्थेला मुख्य एजंट नेमिलें आहे. गेल्या पांच वर्षांत विक्री सरासरीनें वार्षिक ६००० रुपये झाली व खात्यावर खर्च सरासरी १६०० रु. आहे. (५) नियतकालिक खातें—Journal हें१९१९ पासून एक संस्थेचें त्रैमासिक प्रो. गजेंद्रगडकर प्रसिद्ध करीत असतात. विषय—ऋग्वेद, धर्मशास्त्र, शिलालेख व तत्त्वज्ञान. तें सभासदांना फुकट मिळतें. इतरांना वार्षिक वर्गणी रु.दहा पडते.हिंदुस्थानांतील व बाहेरील नियतकालिकांना परत भेट म्हणूनही पाठविलें जातें. (६) पुस्तकालय खातें-प्रि.व्ही.जी.आपटे कै.भांडारकरांचा ग्रंथसंग्रह१९२५ साली संस्थेच्या ताब्यांत आला. त्यामध्यें जुने व दुर्मिळ असे इंडॉलॉजीवरचे ३००० ग्रंथ आहेत. प्रो. के.बी. पाठक यांनीं आपलीं ४१३ पुस्तकें संस्थेला दिलीं. शिवाय संस्थेच्या ग्रंथसंग्रहालयांत ५२८० पुस्तकें आहेत व तीं बाहेर पाठविलीं जात नाहींत, पण संस्थेच्या सभासदांना अभ्यासाकरितां व संदर्भाकरितां दिलीं जातात. संस्थेला दरवर्षी कित्येक पुस्तकें व संशोधन मासिकें विकत घ्यावीं लागतात व हिंदुस्थानांतील ७६ व बाहेरील ४९ मासिकें भेट म्हणून येतात. सभासदांकरतां एक स्वतंत्र वाचनालय बांधण्यांत येत आहे.त्यामध्यें हिंदुस्थान,युरोप व अमेरिका या देशांमध्यें प्रसिद्ध होणारीं प्राच्य संशोधन नियतकालिकें ठेवण्यांत येतील. (सभासद नसणाऱ्यांना ऑफिसचे वेळांत महिना १ रु. फी भरून पुस्तकें वाचावयास मिळतील.) (७) संशोधन खातें–(डॉ.बेलवलकर) १९२७ पासून संस्थेनें पोस्ट ग्राज्युएट शिक्षणाकरितां शाखा उघडली आहे.त्यामध्यें संस्कृत,पाली,अर्धमागधी व प्राचीन हिंदी संस्कृति हे विषय एम्.ए. ला व इतर उच्च परीक्षांना (लेखी व संशोधन निबंधरूपानें होणाऱ्या) शिकविले जातात. फी टर्मला ३० रुपये एम्. ए. करितां. वरील विषयांच्या विद्यार्थ्यांचीं नांवें नोंदण्याचा युनिव्हर्सिटीनें अधिकार दिलेला आहे. पोस्ट ग्राज्युएट विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमांत, देशचे व परदेशचे विद्वान् लोकांचे आगमनाचा फायदा घेऊन संस्थेमध्यें व्याख्यानें करण्यांत येतात त्याचाही समावेश होतो. गेल्या पांच वर्षांत ज्यांच्या व्याख्यानांचा विद्यार्थ्यांना फायदा मिळाला त्यांपैकीं कांहीं:—प्रो. ल्यूडर्स (बर्लिन), प्रो. श्यूब्रिंग (हाम्बर्ग), प्रो. ग्लासेनाप (बर्लिन), डॉ. कालिदास नाग (कलकत्ता), डॉ.बेटी हायमन (हाले). युनिव्हर्सिटीनें पोस्ट ग्राज्युएट शिक्षणक्रम शिकविण्याची संस्थेस परवानगी दिली आहे. डॉ. सुखटणकर व डॉ. बेलवलकर यांची युनिव्हर्सिटी टीचर म्हणून नेमणूक केली आहे. (८)—संस्थेचा छापखाना (डॉ. परांजपे). गेल्या पांच वर्षांतील छपाई अनुक्रमें पानें ८००,८८८, १३६८, ११३६ व५२२ (९) संकीर्णखातें (सरदार–मेहेंदळे)—प्रथम सभासदांची संख्या २८० होती.व आतां ती ३३० आहे.आर्थिक स्थितिः—हल्लीं संस्थेस १३५५० रु. कर्ज आहे. इतर चळवळी–संस्थेनें ऑक्स्फर्ड येथें १९२८ सालीं भरलेल्या आंतरराष्ट्रीय प्राच्य परिषदेस पांच प्रतिनिधि पाठविले व १९३१ सालीं लंडन येथें २ प्रतिनिधि पाठविले. १९२८ सालीं लाहोरास भरलेल्या हिंदी प्राच्य परिषदेस व १९३० सालीं पाटणास भरलेल्या परिषदेस बरेच प्रतिनिधि पाठविले. डॉ. पाठक, संस्थेच्या जनरल बोर्डाचे उपाध्यक्ष यांना त्यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त संस्थेनें स्मारक निबंधावली अर्पण केली. दरवर्षी ऋषीपंचमीस वार्षिक समारंभ थाटानें साजरा होतो. थोर लोकांच्या भेटी—१९३१–३२ सालीं साठ सन्मान्य लोकांनीं संस्थेस भेट दिली. त्यांमध्यें प्रो. हॉकिंग (हार्वर्ड युनिव्हर्सिटी), डॉ. ऑटोस्टीन (प्राग), डॉ. एडवर्ड टॉमसन (ऑक्स्फर्ड), प्रो. हार्टन (ओहियो), डॉ. बेटी हायमन व प्रो.प्रॅट (म्यासाच्युसेट्स) हे आहेत. (१०) महाभारत संशोधन,प्रकाशन खातें—(डॉ. सुखटणकर) या खात्यामार्फत महाभारताची संशोधिलेली आवृत्ति प्रकाशित होत आहे. प्रत्येक पर्व एकेका विद्वानाकडून संपादिलें जाणार आहे. सभापर्वावर डॉ.विंटरनित्झ यांची व विराट पर्वावर प्रो.गजेंद्रगडकर यांची नेमणूक झाली आहे. आतांपर्यंत ८८० पानें छापून प्रसिद्ध झालीं आहेत. व आदिपर्व संपलें आहे व फक्त प्रस्तावना, व

पुष्टिपत्रकें जोडावयाचीं आहेत. म्हणजे १० नियोजित ग्रंथांपैकीं एक ग्रंथ पुरा झाला.या कामीं प्रो. ल्यूडर्स यांनीं आपले महाभारताचे अमूल्य नमुने (Specimen collection) दिले आहेत. तंजावर व विश्वभारती येथें चाललेल्या हस्तलिखित संशोधनाचीहि या संस्थेचें महाभारत संशोधन मंडळ मदत घेत आहे. या महाभारत प्रकाशनामध्यें गेल्या पांच वर्षांत याप्रमाणें उत्पन्न झालें रु. १६७८९-९-५, रु. २०८८०-१-४, रु. १७४१९-११-९, रु. ३२११६-१४-२, व रु. २६०३१-११-६ व खर्च येणेंप्रमाणें रु. १८८०५ ६ आ. ३ पै. रु. २१२८५-०-१, रु. २१२८५-७ आ. ७ पै., रु. २२५९९-१३-४, व रु. २४६३३ १३ आ. ११ पै. औंधच्या चीफसाहेबांनीं दौरा काढून वार्षिक रु. ११०० चीं आश्वासनें मिळविलीं आहेत. म्हैसूर सरकार १९२८-२९ पासून वार्षिक रु. ५०० देत आहे व इचलकरंजी व पोरबंदर संस्थानांनीं १९२९-३० पासून पुढें दहा वर्षेपर्यंत वार्षिक २५० रु. देण्याचें अभिवचन दिलें आहे. हिंदुस्थान सरकारनेंहि वार्षिक रु. ४००० देण्याचें ठरविलें आहे व एकंदर रक्कम रु. ५०००० देणार आहे. संस्थेच्या सभासदांची वर्गवारी तारीख ३१-३-३२ (१) सन्मान्य सभासद ९ (२) पेट्रन (रु. १००० किंवा जास्त देणारे) ३१, (३) व्हाइस पेट्रन (रु. ५०० किंवा जास्त देणारे) ११, (४) बेनिफ्याक्टर्स (२५० किंवा जास्त देणारे) १२, (५) आजन्म सभासद (रु. १०० किंवा जास्त देणारे) २०१, (६) वार्षिक वर्गणीदार (रु. १० वार्षिक) ६६, एकूण ३३०. १९३१-३२ सालचे उत्पन्नापैकीं ठळक बाबीः-१ सरकारी ग्रँट (हस्तलिखितांकरितां) रु. ३०००, २ पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांची फी २०५५, ३ सरकारी ग्रँट ग्रंथप्रकाशनाबाबत १२०००, ४ औंधसंस्थान १७५५, ५ मुंबई युनिव्हर्सिटी ग्रँट ४२६५, ६ सरकारी ग्रँट (महाभारत प्रकाशन) ६०००, ७ हिंदुस्थान सरकार ग्रँट (महाभारताकरितां) रु. ५०००. एकंदर जमा (१९३१-३२) रु. ८३३४७-६-७, एकंदर खर्च (१९३१-३२) रु. ८०४११-११-२. व्यवस्थापक-मंडळ १९३०-३३ प्रेसिडेंटः- हिज् एक्सलन्सी सर फरेडरिक साइक्स, व्हा. प्रेसिडेंट १ औंधचे चीफसाहेब, २ इचलकरंजीचे चीफसाहेब, ३ डॉ. जे. जे. मोदी, ४ के. एस्. जठार. नियामक मंडळ १९३०-३३ १ प्रि. रॉलिन्सन चेअरमन, २ न. चिं. केळकर (व्हा. चेअरमन), ३ व्ही.पी. वैद्य व ४ सरदार मुजुमदार ट्रस्टीज्, कार्यकारी मंडळ ५ प्रि.व्ही. जी. आपटे चेअरमन, ६ डॉ. बेलवलकर सेक्रेटरी, ७ प्रो. व्ही. जी. काळे खजिनदार, ८ प्रो. ए. बी. गजेंद्रगडकर ९ प्रो.डी. डी. कापडिया, १० सरदार मेहेंदळे, ११ डॉ. व्ही. जी. परांजपे, १२ प्रो. शेख सर्फराज १३ डॉ. पी. एल्. वैद्य. नियामक मंडळामध्यें एकंदर ३२ सभासद आहेत. त्यांमध्यें ५ सरकारनें नेमलेले आहेत.

३०. **मराठी ग्रंथालय** पुणेंः-स्थापना-शके १८३३विजयादशमी.उद्देशः-"मराठी वाङमयाभिवृद्धि आणि महाराष्ट्र वाचक वर्गाची वृद्धि होऊन त्यांचें ज्ञानार्जनकुतूहल चांगलें वाढीस लागावें" कार्यः-या संस्थेची कल्पना प्रथम कै. भिकाजीपंत हर्डीकर यांची; पुढें ठाणें व मुंबई येथें ग्रंथसंग्रहालयें स्थापन झालीं, व तीं भरभराटीस आल्यावर पुणें येथें या कल्पनेस फिरून चालना मिळाली.व स्थापना-समारंभ किर्लोस्कर नाटक गृहांत, रावसाहेब नानासाहेब पावगी यांचे अध्यक्षतेखालीं शके १८३३ सालीं विजयादशमीस पार पडला. सध्यां ग्रंथसंग्रहालयाची स्वतःची इमारत आहे. सुरवातीला अवघे १४० वर्गणीदार होते. हल्लीं साधारण सभासद ३५२ आहेत. आश्रयदाते १०३; साहाय्यक २२, व तहहयात सभासद २६१आहेत. पहिल्या चार वर्षांत संस्थेनें ३२४० ग्रंथांचा संग्रह केला. हल्लीं संग्रहालय शाखेंत ६५०७ व वाचनालय शाखेंत ३६६६ पुस्तकें आहेत. संस्थेंत २१ वर्तमानपत्रें, २३ मासिकें व ८ इंग्रजी वर्तमानपत्रें येतात. ग्रंथालयाचे मूळ कल्पक रा. भिकाजीपंत हर्डीकर यांची इच्छा ग्रंथालय सर्वांस मोफत असावें अशी होती. पण तें शक्य झालें नाहीं. तरी मासिक वर्गणी चार आणेच आहे. महाराष्ट्र नाटक मंडळी, सोशल क्लब पुणें वगैरेंनीं आपल्या खेळांचे उत्पन्नांतून संस्थेस मदत केली आहे. शहर म्यु. दरसाल पांचशें रुपये ग्रँट देते. आर्थिक परिस्थिति-सन १९२९-३० सालीं इमारत फंड धरून जमा २२२२० रु. १० आ. ६ पै., खर्च १२५५० रु. १३ आ. ६ पै. शिल्लक ९६६९ रु. १३ आ. ० पै. अध्यक्षः-श्री. नारायणराव भवानराव पावगी, उपाध्यक्षः-श्री. नरसिंह चिंतामण केळकर बी.ए. एल् एल्. बी., श्री. लक्ष्मण रघुनाथ गोखले वकील चिटणीसः-श्री. जनार्दन महादेव जोशी, श्री. लक्ष्मण दत्तात्रय जोशी बी. ए. एल् एल्. बी. पत्ताः-नारायण पेठ घ. नं. ४३७ (अ) पुणें.

३१ **महाराष्ट्र चित्रकार मंडळ**, पुणेंः-

सन १९३० सालीं चित्रकलेसंबंधीं जागृति व उन्नति करण्याचे हेतूनें या मंडळाची स्थापना श्री. गोपाळ कृष्ण देवधर यांचे अध्यक्षतेखालीं झाली. मंडळाच्या प्रमुख कार्यापैकीं, महाराष्ट्रीय चित्रकारांची प्रथम परिषद पुणें येथें भरविणें हें एक होतें. व प्रथम महाराष्ट्र चित्रकार परिषद त्याचसालीं पुणें येथें श्रीमंत औंधसंस्थानाधिपति बाळासाहेब पंतप्रतिनिधि यांचे अध्यक्षतेखालीं पार पडली. परिषदेनें केलेल्या ठरावांचा अंमल करण्याचें काम महाराष्ट्र चित्रकार मंडळ गेलीं दोन वर्षें करीत असून मंडळानें परिषदेचे वेळींच महाराष्ट्र आर्ट गॅलरीची स्थापना केली. आजमितीस सदरहू आर्टगॅलरीस दर्शनीय स्वरूप प्राप्त झालें असून या बाबतींत अत्यंत शोभिवंत अशी जागा गॅलरीस मिळवून देण्यांत श्रीयुत न. चिं. केळकर यांची अमुल्य मदत झालीच. तसेंच महाराष्ट्रीय चित्रकार वर्गामध्यें संघटनात्मक चळवळ करून, चित्रकलेच्या शास्त्रीय उन्नतीबरोबरच चित्रकारांनीं संस्कृति आणि राष्ट्रीयत्व या दोहोंकडेहि लक्ष देऊन आपल्या कलेची व व्यवसायाची उन्नति करून घेण्यासाठीं मंडळ खटपट करीत असून, व्याख्यानें वगैरे द्वारां अशी खटपट गेलीं दोन वर्षें अव्याहत चालूं आहे. या चळवळीचा एक परिणाम म्हणजे आधुनिक चित्रकला शास्त्राच्या दृष्टीनें, ज्यांनीं संस्कृति आणि राष्ट्रीयत्वाची भावना आपल्या चित्रकौशल्यानें महाराष्ट्रांत प्रसरण करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे, असे प्रख्यात चित्रकार राजा रविवर्मा यांचेसंबंधीं, अनुदारतेची भावना आतां मंडळाच्या उपक्रमानें नष्ट झाली असून त्यांचें मोठें स्मारक करण्याची योजना सध्यां मुंबईस चालूं झाली आहे. मंडळानें यापुढें चित्रग्रंथालय, व चित्रकला विषयक वृत्तपत्र अगर मासिक सुरूं करण्याच्या योजना हातीं घेतल्या असून त्यानंतर चित्रकला शिक्षणाची योजनाहि हातीं घेण्यांत येणार आहे. मंडळाच्या सर्व कार्यांत औंध संस्थानाधिपति श्री. बाळासाहेब यांच्या सल्लामसलतीचा लाभ मिळत असून, मंडळाचे अध्यक्ष श्री. सरदार गंगाधरराव नारायणराव मुजुमदार यांचीहि मदत होत असते. महाराष्ट्र चित्रकार मंडळ व परिषद या दोन्ही कल्पना पुणें येथील एक चित्रकार श्री. र. द. गोडबोले यांच्या आहेत. सध्यां मंडळाचे सतरा सभासद आहेत. चिटणीस :—श्री. र. द. गोडबोले. पत्ता:—सदाशिव पेठ, पुणें २.

३२ महाराष्ट्र शास्त्रीय परिभाषा–मंडळ

पुणें:— स्थापना १९२९ महाराष्ट्रीय जनतेंत शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा एवढेंच नव्हे, तर हीं शास्त्रें येथें रुजावीं आणि वाढीस लागावीं अशी आकांक्षा आज महाराष्ट्रांत उत्पन्न झालेली आहे. तिला अनुसरून जे उद्योग करावयाचे त्यांतला एक महत्त्वाचा उद्योग म्हणजे मराठींत शास्त्रीय वाङमय उत्पन्न करणें हा होय. हा उद्योग विद्वानांच्या मनांत येऊन तसा थोडासा प्रयत्नही कांहीं दिवसांपासून होत आलेला आहे. परंतु या प्रयत्नाला किती तरी पटीनें मोठें स्वरूप यावयास पाहिजे आहे. अनेक व्यक्तींनीं व अनेक संस्थांनीं आपले प्रयत्न एकवटून हें स्वरूप आणलें पाहिजे. अशा तऱ्हेचा हेतु धरून प्रस्तुत मंडळाची स्थापना १९२९ सालीं झालेली आहे. नवे शास्त्रीय विचार प्रकट करावयाचे म्हणजे भाषेलाही कांहीं नियमित व निश्चित वळण देऊन तिचा विकास करणें अवश्य आहे. शास्त्रीय व्यवहाराकरितां संकेतबद्ध झालेली भाषा ती परिभाषा होय. अशी परिभाषा सिद्ध होण्यास त्या भाषेमध्यें बोलणें, लिहिणें सतत चालू असावें लागतें व तें स्थानिक मंडळींत सहज शक्य असल्यामुळें मंडळाचे सभासदत्व पुण्यापुरतेंच सध्यां मर्यादित आहे. मंडळाचे अध्यक्ष प्रो. वै. का. राजवाडे हे असून अनेक शास्त्रशाखांच्या उपमंडळांत त्या त्या शास्त्रांतील तज्ज्ञ विद्वान् मंडळी कार्य करीत आहेत.

मंडळानें प्रथमतः मराठीमध्यें पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या शास्त्रीय पुस्तकांच्या आणि परिभाषा कोशांचा संग्रह केला, त्याचप्रमाणें संस्कृत व हिंदी भाषेंतील संग्रहही बहुतेक पाहून घेतला; आणि मग हे संग्रह नजरेपुढें ठेवून, शास्त्राचें विद्यमान स्वरूप व्यक्त करण्यास समर्थ होईल, अशी परिभाषा अनेक सभांतून चर्चा करून ठरविण्याचा क्रम सुरूं केला. तो अद्याप चालू आहेच. चर्चेनंतर संमत झालेली परिभाषा क्रमशः साहित्यसंमेलन पत्रिकेंत प्रसिद्ध होत असते. तूर्त मराठी शब्द व इंग्रजी प्रतिशब्द अशाच याद्या प्रसिद्ध होत आहेत. परंतु पुढें या शब्दकोशावर मंडळाबाहेर चर्चा होऊन कांहीं सुधारणा सुचविल्या गेल्यास त्यांचा विचार करून शब्द निश्चित झाल्यावर, मराठी व्याख्येसहित शब्दकोश प्रसिद्ध करावा असा हेतु आहे. अशा प्रकारच्या शब्दकोश मंडळाच्या सभासदांपैकीं श्री. आपटे व लिमये यांनीं एंजिनियर मासिकांतून थोडासा नमुन्यादाखल प्रसिद्ध केलाही आहे. आतांपर्यंत विशेषतः गणित,वास्तव, रसायन, वैद्यक, जैव, भौमिक, या शाखांचें कार्य बरेंच

झालें आहे. कोणासही मराठी शास्त्रीय ग्रंथरचना करतांना परिभाषेबाबत शक्य तेवढी मदत करावयास मंडळाचे सभासद तयार असतात. केसरींत प्रसिद्ध झालेल्या "भौतिक शास्त्रांतील महर्षि" या लेखमालेचा अर्धाअधिक भाग, चित्रमय जगतांतील "विजेचा इतिहास" आणि सृष्टिज्ञानमधील "तडित्" इत्यादि लेख रचण्याच्या कामीं मंडळानें थोडाबहुत हातभार लावलेला आहे.

या संस्थनें महाराष्ट्र साहित्यपत्रिकेंत प्रसिद्ध केलेलीं परिभाषापत्रकें:—(१) प्रकाश; (२) वीज; (३) रसायन, सामान्यविभाग; (४) रसायन अनावर्ण विभाग; (५) उष्णता (६) भौमिक पृष्ठें २५, शब्दसंख्या १२००.

कै. ज्योतिर्विद् दीक्षित यांच्या स्मरणार्थ ता. ११ मे, सन १९३२ रोजीं, म्हणजे त्यांच्या ३४ व्या श्राद्धतिथीचे दिवशीं मंडळानें 'विश्वाची रचना आणि उत्क्रांति' या नांवाचा (रा. ढवळे कृत) निबंध प्रसिद्ध केला आहे. त्यावरून परिभाषा अन्वर्थक आणि व्यवहारक्षम कितपत होऊं शकते याचें दिग्दर्शन होईल. ज्योतिःशास्त्रा–प्रमाणेंच इतर निरनिराळ्या शास्त्रांचेंही आधुनिक स्वरूप दाखविणारे निबंध लिहून प्रसिद्ध करणें व व्याख्यानद्वारा शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणें या गोष्टी चालू आहेत व वाढत्या प्रमाणावर त्या चालू ठेवावयाच्या आहेत. कार्यवाह–डॉ. म. वि. आपटे, श्री. वि. के. खासनीस.

पत्ताः–शास्त्रीय–परिभाषा–मंडळ कार्यालय, २८१ सदाशिव, पुणें २.

३३महाराष्ट्र गर्लस एज्युकेशन सोसायटी

हायस्कूल फॉर इंडियन गर्लस् व त्यास जोडलेली प्राथमिक शाळा (हुजुरपागा):–स्थापना–२९ सप्टेंबर १८८४; **सर विल्यम वेडरबर्न** यांनीं आपल्या स्वर्गवासी प्रिय बंधूच्या स्मरणार्थ दहा हजार रुपये लोककार्यासाठीं विशेषतः सामाजिक सुधारणेच्या कार्यासाठीं देणगी म्हणून देण्याची इच्छा कै. रा. ब. महादेव गोविंद रानडे यांच्यापाशीं प्रकट केली. या देणगीसंबंधीं कै. रानडे, कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, कै. सर रामकृष्ण भांडारकर यांनीं खाजगी रीतीनें परस्परांत विचारविनिमय करून मुलींना उच्च शिक्षण देण्याचे कामीं या देणगीचा उपयोग करण्याचें ठरविलें व १९ जुलै १८८४ रोजीं सर विल्यम् वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखालीं हिराबागेंत टाउनहॉलमध्यें मुलींच्या शिक्षणासंबंधीं योजना करण्यासाठीं पुण्यांतील नागरिकांची सभा भरविली. कागलचे अधिपति श्री. आबासाहेब घाटगे, कोल्हापूरचे पोलिटिकल् एजंट कर्नल रीव्हज्, कर्नल वेस्ट, सर विल्यम् वेडरबर्न, श्री. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, रा. ब. रानडे, रा. ब. पंडित, डॉ. भांडारकर, डॉ. विश्राम, श्री. नारायणभाई दांडेकर, श्री. सीताराम विश्वनाथ पटवर्धन, श्री.वामन आबाजी मोडक वगैरे सद्गृहस्थांची पुढील कार्याकरितां कमिटी नेमण्यांत आली या कमेटीचे सेक्रेटरी रा. ब. पंडित होते.

१८८४च्या ऑगस्ट महिन्यांत वरील मंडळींचे गव्हर्नर साहेबांच्याकडे एक डेप्युटेशन गेलें. रा. ब. पंडित यांनीं मुलींच्या शाळेची कल्पना गव्हर्नर साहेबांच्यापुढें विस्तृतपणें मांडली. गव्हर्नर साहेबांनीं शक्य ती मदत करण्याचें अभिवचन दिलें.

सर विल्यम वेडरबर्न यांच्या दहा हजारांच्या देणगीच्या मागोमाग कोल्हापूर, बडोदा, धार, जत, मिरज, फलटण, जंजीरा, जुनागड, पोरबंदर इत्यादि संस्थानाधिपतींकडून व इतर दानशूर स्त्री–पुरुषांकडून रावबहादूर शंकर पांडुरंग पंडित यांनीं अनेक देणग्या मिळविल्या. अशा रीतीनें सरकार व समाजांतील प्रमुख सुसंस्कृत स्त्री–पुरुषांच्या सहानुभूतीनें व परिश्रमानें २९ सप्टेंबर १८८४ सालीं किबेवाड्यांत मुलींचें हायस्कूल स्थापन करण्यांत आलें. पहिल्याच दिवशींच्या हजेरीपटावर १८ मुलींचीं नांवें होतीं. इ. स. १८८५ सालीं हायस्कुलांतील विद्यार्थिनींची जातवारी पुढीलप्रमाणें होतीं. ––ब्राह्मण १९, प्रभु ६, मराठे ३, सोनार ३, वाणी १, कासार २, इतर हिंदु ७, ज्यू १०, ख्रिश्चन ७, एकूण ५८.

यावरून अगदीं प्रारंभापासूनच या शाळेस सार्वजातीय स्वरूप प्राप्त झालें होतें असें दिसून येईल. सरकारची मनःपूर्वक सहानुभूति व रा. ब. पंडित, श्री. नारायणभाई दांडेकर, रा. ब. रानडे इत्यादि पुढाऱ्यांचे परिश्रम यांचे योगानें दोन तीन वर्षांत शाळेची इतकी प्रगति झाली कीं, इ. स. १८८७ सालीं या संस्थेला "महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटी" हें नांव देऊन ती १८६० च्या २१व्या ॲक्टान्वयें रजिस्टर करण्यांत आली. इ. स. १८८९ सालीं सरकारी फीमेल ट्रेनिंग कॉलेज व त्यास जोडून असलेली प्राथमिक शाळा सोसायटीच्या स्वाधीन करण्यांत आली. अध्यापक वर्गाचा पगार सरकार देई; परंतु इतर खर्च सोसायटीस करावा लागे. केवळ तीन चार वर्षांतच इंग्रजी सहा इयत्ता उघडण्यांत आल्या.

मुलींची संख्या कशी वाढत गेली हें खालील आंकड्यांवरून कळेल.–

सन	हायस्कुलांतील मुलींची संख्या.
१८८४	४०
१८९०	६५
१९००	५२ प्लेगमुळें या सालीं संख्या कमी झाली.
१९१०	१३०
१९२०	४११
१९३०	५१७
१९३३	६१७

इ. स. १८९५ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस श्रीमंत सांगलीकरांकडून ९९ वर्षांच्या करारानें भाड्यानें घेतलेल्या जागेंत शाळेसाठीं सोसायटीनें नवीन बांधलेल्या इमारतीत शाळा भरविण्यांत आली. यानंतर थोड्याच वर्षांनंतर बाहेरगांवच्या मुलींच्यासाठीं होस्टेलच्या नवीन इमारती व प्ले–शेडहि बांधण्यांत आलें.हिंदू व हिंद्वेतर यांच्यासाठीं निरनिराळीं दोन बोर्डिंगें आहेत. मुलींच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं एका अनुभविक अशा बाईची नेमणूक केलेली आहे. हल्लीं वसतिगृहांत राहणाऱ्या एकंदर ११९ मुली असून त्यांपैकीं १०६ हिंदू, ९ ज्यू व ४ ख्रिश्चन आहेत. शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट शाळेच्या आवारांतच राहात असल्यानें वसतिगृहाच्या व्यवस्थेवर त्यांची रात्रंदिवस देखरेख असते. हॉस्टेलमध्यें लाहोर, इंदूर, बनारस, अजमीर, कराची, नागपूर, पाटणा, बंगलोर, मद्रास, अशा दूरदूरच्या मुली आहेत. मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेस नेमलेल्या विषयांचें या शाळेंत शिक्षण दिलें जातें व शिवाय मुलींना अत्यंत आवश्यक अशा शिवण, चित्रकला, गायन इत्यादि ललितकलांचें शिक्षण देण्याचीहि या शाळेंत विशेष व्यवस्था केलेली आहे. इंग्रजी चौथी, पांचवी व सहावी या इयत्तांतील विद्यार्थिनींना शिवण, चित्रकला व गायन यांपैकीं कोणताहि विषय ऐच्छिक म्हणून घेऊन त्याचा विशेष अभ्यास करण्याची संधि दिली जाते. हे विषय शिकविण्यास त्या त्या विषयांत निपुण असलेल्या अध्यापकांची योजना केली आहे. मुलींच्या शारीरिक उन्नतीची काळजी घेण्याचे दृष्टीनें मुलींना अनुरूप अशी कवाईत, देशी व विदेशी खेळ यासाठीं प्रत्येक आठवड्यांत नेमलेला वेळ असून शिवाय आवश्यक म्हणून रोज पंधरा मिनिटें " फिझिकल एक्झरसाइजेस " करितां मुद्दाम राखून ठेवलेलीं आहेत. बौद्धिक शिक्षणास जोड देण्यासाठीं बागेंत काम करणें, शाळेसाठीं मुद्दाम काढलेल्या बालिका वस्तुभाण्डाराची व्यवस्था पहाणें इत्यादि व्यवहारोपयोगी शिक्षण मुलींना देण्याची मुद्दाम व्यवस्था केली आहे. वसतिगृहांतील मुलींना पाळीपाळीनें धान्यकोठाराची व्यवस्था पहाणें, आठवड्याचा जेवणाच्या पदार्थांचा कार्यक्रम तयार करणें, भाजीपाला निवडणें, वाढणें इत्यादि कामें देण्यांत येऊन गृहशिक्षणाचा उपक्रम करण्याची तजवीज केली आहे. हायस्कूलमधील पंचवीस शिक्षकांपैकीं एकवीस अध्यापिका आहेत व एकवीसपैकीं बारा अध्यापिका या शाळेच्या माजी विद्यार्थिनी आहेत. लेडी सुपरिंटेंडेंट मिसेस् मोझेस याहि शाळेच्याच माजी विद्यार्थिनी आहेत. अध्यापिकांपैकीं तिघी मॅट्रिक्युलेट असून बाकी सर्व मुंबई विश्वविद्यालयाच्या पदवीधर आहेत. मॅट्रिक्युलेशनचे या शाळेचे निकाल उत्कृष्ट असतात ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. मिस् रुबन (सन १९०५) व कु. वेणूबाई अभ्यंकर सन (१९२६) या मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत पहिल्या आल्या. कु. सुलभा पाणंदीकर, सौ. कमला टिळक (उकिडवे), व सौ. सीताबाई परमानंद (आजगांवकर) यांनीं संस्कृत भाषेंतील नैपुण्याबद्दल जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळविली. त्याचप्रमाणें अनेक विद्यार्थिनींनीं चॅटफील्ड प्राइझ व यमुनाबाई दळवी स्कॉलरशिप मिळविलेली आहे. या शाळेंतील विद्यार्थिनींपैकीं कित्येकींनीं मुंबई विश्वविद्यालयांतील बी. ए. व एम्. ए. या उच्च परिक्षेंत उज्ज्वल यश संपादिलें,तर कित्येकींनीं इंग्लंड, जर्मनी व युनायटेड स्टेट्स् इत्यादि पाश्चिमात्य विद्यालयांतहि उत्तम यश मिळविलें. संस्थेंतून बाहेर पडलेल्या विद्यार्थिनींपैकीं अनेक समाजांतील निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत आपलीं कार्यें एकनिष्ठतेनें बजावीत आहेत. मिस् झिराड एम्. डी. (लंडन) या मुंबईच्या कामा हॉस्पिटलवरील मुख्य अधिकारी आहेत. डॉ. कु. काशीताई नवरंगे आपल्या धंद्यांत निष्णात असून गेलीं पंचवीस वर्षें समाजसेवेचें कार्यहि करीत आहेत. त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना जस्टिस ऑफ पीस हा किताब मिळाला आहे. डॉ. कमलाबाई देशपांडे या पुण्यांतील मुलींच्या कॉलेजच्या प्रिन्सिपाल आहेत; तर सौ. कमलाबाई टिळक बनारस येथील मुलींच्या कॉलेजच्या प्रिन्सिपाल आहेत. सौ. विमलाबाई देशपांडे एम्. ए. या बहुमतानें नागपूर विश्वविद्यालयाच्या सीनेटमध्यें यंदाच निव-

डून आल्या. सौ. कुसुमावती देशपांडे बी. ए. (ऑक्सफर्ड), कु. सुलभा पाणंदीकर एम्. ए. टी. डी. (लंडन) डॉ. सुलोचना श्रीखंडे या अनुक्रमें मॉरिस् कॉलेज, मुंबईचें सेकेंडरी ट्रेनिंग कॉलेज, व लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज, दिल्ली, येथें प्रोफेसरचीं कामें करीत आहेत. डॉ. सौ. इरावती कर्वे एम्. ए. पीएच्. डी. (जर्मनी) यांनीं महिला विद्यापीठाच्या रजिस्ट्रारची जबाबदारी स्वीकारली आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत पसरलेल्या अनेक शाळांत व इस्पितळांत याच संस्थेच्या माजी विद्यार्थिनी अध्यापिका व डॉक्टर म्हणून काम करीत आहेत.

१९१५।१६ सालीं सरकारी शाळाखात्यानें बायकांचें ट्रेनिंग कॉलेज या संस्थेपासून वेगळें काढून लष्करांत नेलें. १९१७ सालीं सोसायटीचें नांव "महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटी" असें होतें, तें बदलून "महाराष्ट्र गर्लस् एज्युकेशन सोसायटी" असें ठेवण्यांत आलें. इ. स. १८८४ सालापासून १९३१ पर्यंत सोसायटीचें हायस्कूल सरकारी शाळाखातें व सोसायटी यांच्या दुहेरी व्यवस्थेखालीं चाललें होतें. सरकार शिक्षकांचा सर्व पगार देत असें व सोसायटी इतर खर्च करीत असे; परंतु प्रस्तुतची मुंबई सरकारची सांपत्तिक अडचण सोसायटीसही भोंवल्यावांचून राहिली नाहीं. सप्टेंबर १९३१ मध्यें सरकारनें सोसायटीशीं नवा करार करून फक्त ३०००० रुपये वार्षिक ग्रँट देण्याचें कबूल केलें आहे व हा करार पुढील पांच वर्षें अंमलांत राहणेचा आहे. मात्र सरकारनें एक अट घातली आहे ती ही कीं, केव्हांही शिक्षकांवरील खर्च ३०,००० रुपयांपेक्षां कमी होतां कामा नये. या नव्या व्यवस्थेनें आतां शाळा सोसायटीच्या पूर्णपणें ताब्यांत आली आहे. सोसायटीच्या इंग्रजी शाळेंत हल्लीं ६१७ मुली आहेत व प्राथमिक शाळेंत २५० मुली आहेत. प्राथमिक शाळेंत रु. ४००० ग्रँट मिळते. सोसायटीचा हायस्कूलवरील वार्षिक खर्च ४९००० रु. आहे व प्राथमिक शाळेवरील खर्च ५३०० रु. आहे. सरकारी ग्रँट वजा जातां सोसायटीस या दोन्ही संस्थांवर मिळून २०–२१ हजार रुपये खर्च करावा लागतो. या नव्या व्यवस्थेनें ही संस्था लोकांचीच व लोकाश्रयावर अवलंबून राहणारी अशी झाली आहे.

सोसायटीचे प्रेसिडेंट हिज हायनेस, समशेर बहादूर, श्रीमंत सयाजीराव गायकवाड बडोद्याचे महाराज आहेत. सोसायटीच्या सभा वर्षांतून दोनदां होतात. पण नेहमींचे कामाकरितां १२ सभासदांचें एक कार्यकारी मंडळ आहे. या मंडळाच्या सभा दरसहा एकदां होतात. कार्यकारी मंडळाचे हल्लींचे चेअरमन दिवाणबहादूर के. आर. गोडबोले आहेत व सेक्रेटरी रावबहादूर के. जी. जोशी आहेत. कै. डॉ. भांडारकर हे बरींच वर्षें या मंडळाचे चेअरमन होते.

नव्या व्यवस्थेनें सरकारकडून शाळा सोसायटीच्या ताब्यांत आल्यावर सोसायटीनें आपल्या शिक्षकांकरितां प्रॉव्हिडंड फंडाची योजना सुरू केली आहे. अशी योजना फारच थोड्या मदतीच्या शाळांत आहे.

ज्या मुलींचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण होऊन ज्यांना पुढें कॉलेजचें शिक्षण घेण्याची संधि लाभत नाहीं अशा मुलींसाठीं शारीरशास्त्र, गृहजीवनशास्त्र, रुग्णपरिचर्या, बालसंगोपन व बालशिक्षणशास्त्र अशा प्रकारचे स्त्रियांना अत्यंत उपयुक्त असे विषय शिकविण्यासाठीं व त्यांस गायन, चित्रकला, शिवण, कशीदा इत्यादि ललितकलांमध्यें निपुण करण्यासाठीं हायस्कूलला जोडून पुरवणी वर्ग सुरू करण्याची योजना नुक्तीच कार्यकारी मंडळानें मुक्रर केली आहे व तिला वुइमेन्स कौन्सिलनें संमति दिली आहे.

३४. महाराष्ट्र–साहित्य–परिषद:–पूर्वेतिहास–"या देशांत ग्रंथकारांस उत्तेजन यावें व स्वस्त दरानें ग्रंथ प्रसिद्ध व्हावा" या हेतूनें मराठी ग्रंथोत्तेजक मंडळाची योजना १८७८ सालीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली. ही साहित्यसंमेलनाची कल्पना आणखी ७ वर्षांनीं मूर्त व स्पष्ट झाली. ही साहित्य–संमेलनाची कल्पना महाराष्ट्राकडून इतर प्रांतांनीं घेतली व देशी भाषांचीं साहित्य–संमेलनें भरविण्याचा उद्योग सुरू झाला. १८९३ मध्यें काशी येथें नागरी प्रचारिणी सभा स्थापन होऊन ती हिंदी व संस्कृत पुस्तकांचें संशोधन, संरक्षण व प्रकाशन करूं लागली. १८९४ सालीं वंगीय साहित्य परिषद स्थापन होऊन वार्षिक संमेलन भरविण्याखेरीज जुन्या काळचे ग्रंथ संशोधन करणें व ते प्रकाशित करणें, कोशादि संदर्भ ग्रंथ तयार करणें इत्यादि महत्त्वाचीं कामें ती हातीं घेऊं लागली. १९०६ सालीं महाराष्ट्र साहित्य संमेलन पुण्यास भरल्यावेळीं "मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें मराठी भाषेचा प्रवेश करविणें, ऐतिहासिक व वाङ्मयात्मक लेखांचा संग्रह करणें, इतिहास–संशोधनास व्यवस्थित स्वरूप देणें, शिलालेखांचें वाचन करणें, आधुनिक कवींचा परामर्श घेणें,

मराठी भाषेचा कोश. विश्वकोश यांसारखे प्रचंड ग्रंथ निर्माण करणें" इत्यादि उच्च प्रतीच्या विषयांची चर्चा होऊन प्रत्यक्ष कार्य करण्यासाठीं साहित्य-परिषद् नांवाची कायमची संस्था स्थापण्यांत आली. यानंतर या पुणें संमेलनांत स्थापन झालेल्या महाराष्ट्र-साहित्य परिषदेतर्फे पुढील संमेलनें भरत आलीं आहेत. अकोल्याच्या संमेलनांत (१९१२) साहित्याचा व्यासंग वाढविणें व साहित्यसंपत्ति जुळविणें, साहित्य विषयाची चर्चा करणें, ग्रंथसंमृद्धीचीं साधनें जुळविणें, साहित्य संमेलनें भरविणें, निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ तयार करवून किंवा परिभाषेंतील उत्तम ग्रंथांचें मराठींत भाषांतर करवून तें प्रसिद्ध करणें हे साहित्य परिषदेचे उद्देश ठरविण्यांत आले. या उद्देशानुसार आतांपर्यंत परिषदेनें बरीच कामगिरी केलेली आहे. आतांपर्यंत परिषदेनें केलेली कामें—१९०७ सालीं भरलेल्या संमेलनांतील ठरावानुसार शास्त्रीय परिभाषेविषयींचें कार्य परिषदेनें अंगावर घेतलें व त्याप्रमाणें अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, ज्योतिष, तत्त्वज्ञान आणि भूगोल या निरनिराळ्या विषयांच्या पारिभाषिक शब्दांच्या याद्या तपासून सुधारण्यासाठीं पुढील संमेलनांत निरनिराळ्या कमिट्या नेमण्यांत आल्या होत्या. १९०७-८ मध्यें राजवाड्यांचें "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ७ वा" हें पुस्तक परिषदेमार्फत प्रसिद्ध झालें. याखेरीज आणखी दोन तीन ग्रंथ लिहविले. श्री. बा. अ. भिडे यांनीं मराठी भाषेवर, प्रो. मा. दा. अळतेकर यांनीं अर्थशास्त्रावर व प्रो. भिडे यांनीं राज्यव्यवस्थेवर ग्रंथ लिहिले आहेत. परिषदेमार्फत १९१३ पासून "महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका" (त्रैमासिक) "विविधज्ञान-विस्ताराला" जोडून निघूं लागली. चैत्र शु. १ श. १८५० (सन १९२८) पासून ती स्वतंत्र प्रसिद्ध होत आहे. लोकगीतें, लोककथा, म्हणी, भाषा प्रकार, जुन्या काव्यग्रंथांतून सांपडणारे भाषाविशेष इत्यादि साहित्यात्मक लेख पत्रिकेंतून प्रसिद्ध होत असतात. परिषदेंत विद्वानांचा अंतर्भाव:—आरंभापासून संस्थेला न्या. मू. रानडे, रा. ब. महाजनी यांसारखे वजनदार पुढारी कार्यकर्ते लाभले; म्हणून लवकरच तिच्या कार्यास चांगली सुरवात झाली. तसेंच कै. वासुदेव गोविंद आपटे, रा. सा. मोरमकर, श्री. कृ.प्र. खाडिलकर. श्रीमंत संपतराव गायकवाड, श्री. कीर्तीकर यांचें प्रत्यक्ष साहाय्य अतिशय झालें. मराठी संस्थानिकांचीही परिषदेला विशेष सहानुभति लाभली. श्री. सवाई तुकोजीराव होळकर सरकार यांनी इंदुरास संमेलन भरल्यावेळीं परिषदेच्या प्रकाशनकार्याला चालना मिळावी यासाठी दहा हजार रुपयांची मोठी देणगी एकदम दिली. साहित्यपत्रिकेच्या वर्गणीखेरीज या देणगीच्या व्याजांतूनच परिषदेचा वार्षिक खर्च चालविण्यांत येत असतो. यांखेरीज श्री. नरसिंह चिंतामण केळकर, श्रीमंत सरदार आंग्रे, व श्री. चिंतामणराव वैद्य वगैरे अनेक पुढारी मंडळी परिषदेच्या कामांत नेहमीं मन घालतात.

परिषदेची व्याप्ति व घटना:—महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्रांत ठिकठिकाणी संमेलनें भरवून परिषदेनें महाराष्ट्रएकीकरणाचें उत्कृष्ट कार्य केलेलें आहे. यामुळें मराठी भाषेचा प्रसार बराच झालेला व झाला तो टिकलेला दृष्टीस पडतो. आज दूरदूरच्या महाराष्ट्रीयांत तर विलक्षण भाषाभिमान जागृत आहे. या यशाचा बराचसा वाटा परिषदेकडे येतो. १९२७ सालीं परिषद १८६०च्या २१ व्या कलमान्वयें सरकारांत नोंदण्यांत आली. घटनाही प्रसिद्ध झाली. उद्देशांत 'मराठी भाषा, वाङ्मय व साहित्य यांची उन्नति करणें आणि ह्यांचा व्यासंग वाढविणें' हा प्रधान आहे. परिषदेची घटना हैद्राबाद संमेलनांत (१९३१) बदलण्यांत आली. एक सर्व महाराष्ट्र-बृहन्महाराष्ट्र भागांतील ५० प्रतिनिधींचें नियामक मंडळ (Senate) व या मंडळानें आंखून दिलेलें कार्य करणारें एक पांच सभासदांचें सुटसुटीत कार्यकारी-मंडळ (Syndicate) अशी व्यवस्था करण्यांत आलेली आहे. आतां पुन्हां नवीन घटना तयार करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली आहे. परिषदेचे सभासद खालीलप्रमाणें:—(१) आश्रयदाते-परिषदेस एक हजार रुपये किंवा अधिक रक्कम देणारे. (२) तहहयात सभासद-परिषदेस निदान शंभर रुपये देणगी देणारे. (३) साधारण सभासद-वार्षिक वर्गणी रु. ३ किंवा अधिक देणारे. (४) प्रतिनिधि सभासद-परिषदेस जोडलेल्या शाखासभांनीं आपल्या स्थानिक सभासदांपैकीं पोटनियमाप्रमाणें नियमित प्रतिनिधि दरसाल निवडून दिले असतील ते. (५) सन्मान्य सभासद-अलौकिक विद्वत्ता, महाराष्ट्र भाषेची विशेष सेवा वगैरे गुणांसाठीं परिषदेच्या सभेनें मुद्दाम निवडलेले गृहस्थ व स्त्रिया. चालू कार्यकारी मंडळ:—अध्यक्ष-सरदार माधवरावसाहेब किबे. उपाध्यक्ष-१ श्री. चिंतामणराव वैद्य. २ श्री. नरसिंह चिंतामण केळकर. ३ श्री. वामन मल्हार जोशी, ४ श्रीमंत संपतराव गायकवाड. कार्याध्यक्ष-श्री.

ना. गो. चापेकर. चिटणीसः—१ श्री. मा. त्रि. पटवर्धन. २ श्री. कृ. पां. कुलकर्णी. कोशाध्यक्षः— श्री. सुंदरराव भास्कर वैद्य. मुंबई. हिशेब तपासनीस—१ श्री. परुळकर, मुंबई. २ श्री. ग.स.मराठे; कार्यकारी मंडळः—१ श्री. ना. गो. चापेकर, २ प्रो. माधव त्रिंबक पटवर्धन, ३ श्री. कृ. पां. कुलकर्णी. ४ श्री. चिं. ग. कर्वे, ५ शं. गो. घैसास. परिषदेची कचेरीः—४९५ शनिवार पेठ, पुणें, २

३५ **महाराष्ट्रीय मंडळ**, पुणेंः—स्थापना १९२४, रजिस्टर्ड १९२८ श्री. ल. ब. भोपटकर यांच्या नेतृत्वाखालीं श्री. शि. वि. दामले, श्री. ज. वि. करंदीकर वगैरे पुण्यांतील कांहीं तरुण मंडळींनीं ह्या संस्थची स्थापना केली. सर्वसाधारण लोकांमध्यें व्यायामाची अभिरुचि उत्पन्न करणें व स्त्री—पुरुषांना आणि मुलांमुलींना व्यायाम-शिक्षण देणें हे संस्थेचें उद्देश होत. मंडळाचे वर्गणीदार अंदाजें ३००, मंडळाचें प्रकाशन श्री. ल. ब. भोपटकरकृत 'फिजिकल कल्चर', श्री. कृ. न. जजुरीकर कृत 'फिजिकल ॲण्ड मेडिकल एक्झॅमिनेशन चार्ट', 'फिजिकल कल्चर ॲकेडमी,'टेबल्स ऑफ व्हेरियस कोर्सेस'. मंडळाचीं खातींः— १ व्यायाम शाळा—विद्यार्थी, अंदाजें ४००; व्यवस्थापक—भा. पं. सोमण. २ ग्रंथालय—पुस्तकें सुमारें ३०० व्यवस्थापक—गोऱ्हे. ३ वैद्यकीय खातें—व्यवस्थापक—कृ. न. जजुरीकर. व्यायाम शाळेंत शिकविले जाणारे विषय—लाठी, बोथाटी, लकडी, लेजीम, जोडी, कुस्ती, डबलबार, सिंगलबार, तरवार, भाला, जंबिया, शारीरिक कवाईत, प्रथमोपचार, पोहणें, मैदानी खेळ (देशी, परदेशी), वालचर—शिक्षण. निरनिराळ्या उत्सवांत स्वयंसेवक धाडून मंडळानें समाजसेवा केली आहे. मंडळातर्फे हनुमान—जयंति, वाढदिवस सप्ताह व वासंतिक रसपान हे उत्सव होतात. मंडळाच्या कार्यक्रमांत मोफत शारीरिक शिक्षण व पोहण्याचा वर्ग आणि व्यायामावर व्याख्यानें, व शारीरिक शिक्षण परिषद पहिली इ. गोष्टी मोडतात.मंडळातर्फे नू. म. विद्यालय, पुणें; कन्याशाळा पुणें; मुंबई युनि. ट्रेनिंग कँप, पांचगणी, सेंट हेलिना स्कूल, पुणें इत्यादि तेरा संस्थांतून व्यायामशिक्षण देण्यांत आलें. मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत मेहेरबान बाळासाहेब पंतप्रतिनिधि बी. ए. औंध—अधिपति. उपाध्यक्ष—श्री. न. चिं. केळकर, दि. ब. के. आर. गोडबोले, श्रीमंत सरदार नामदार जगन्नाथ महाराज, कार्याध्यक्ष—श्री. ल. ब. भोपटकर एम्. ए. एल् एल्. बी. चिटणीसः—शि. वि. दामले. दुय्यम चिटणीसः—कृ. न. जेजुरीकर.

३६.**मॉडर्न एज्युकेशन सोसायटी**,पुणेंः- स्थापना—१५ फेब्रु. १९३२.तरुण पिढीस प्राथमिक शिक्षणापासून सर्व प्रकारचें उच्च शिक्षण योग्य अल्प फी घेऊन देणें हें संस्थेचें ध्येय आहे. याकरितां पुण्यास व इलाख्यांतील इतर ठिकाणीं शाळा, कॉलेजें जमेल तसतसें काढण्याचा विचार आहे. संस्थेचे हेतु साध्य होतील अशा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें शिक्षण देण्यांत येईल.तहाहयात सभासद, बेनिफॅक्टर्स, पेट्रन्स व फेलोज् या सर्वांची मिळून सोसायटी झाली आहे.सोसायटीची व्यवस्था सेनेट, ॲकॅडमिक कौन्सिल, फिनान्स कौन्सिल व तहाहयात सभासदांचें बोर्ड यांचेकडे आहे. सोसायटी ही राजकीय संस्था नाहीं. संस्थेंतील अध्यापक व शिक्षक वर्गास व व्यवस्थापक मंडळीस संस्थेच्या कोठल्याही जागेचा राजकीय बाबीसाठीं उपयोग करतां येणार नाहीं.सोसायटीच्या शाळा—कॉलेजांतील विद्यार्थ्यांना चालू राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेतां यणार नाहीं. आपापला अभ्यासक्रम कसोशीनें करण्याकडेच त्यांना सर्व लक्ष द्यावें लागेल. संस्थेचे अधिकारीः—प्रेसिडेंट सर सी. एन्. वाडिया. व्हा. प्रेसि.—मि. माणिकलाल प्रमचंद. ॲकॅडमिक कौन्सिलचे डीन—प्रो. डी. डी.कपाडिया, फिनान्स कौन्सिलचे कंट्रोलर—खा. ब. एम्. एन्. मेहता. संस्थेचे सेक्रेटरी—प्रो. व्ही. के. जोग. हल्लीं चालू असलेली संस्था—नवरोज्जी वाडिया कॉलेज पुणें. मुंबई विश्वविद्यालयास जोडलेलें आहे.आर्टस् शाखेंत बी. ए. पर्यंत भाषा (इंग्रजी, संस्कृत, अर्धमागधी, मराठी, जर्मन् व पर्शियन) इतिहास, अर्थशास्त्र, आणि तत्त्वज्ञान या विषयांचें शिक्षण दिलें जातें. तसेंच सायन्स शाखेंत इंटर सायन्स (ग्रुप 'ए' व 'बी') हे वर्ग आहेत. कॉलेजचे प्रिन्सिपाल प्रो. के. एम्. खाडचे, व्हा. प्रिन्सि. प्रो. एस्. बी. बोंडाळे. वॉर्डन—डॉ. पी. एल्. वैद्य. लायब्ररिअन्—प्रो. अय्यर. पत्ताः—कॅनॉट रोड, पुणें १.

३७ **रविकिरणमंडळ** पुणेंः—ही साहित्यसेवक स्नेह्यांची संस्था १९२३ सालीं अस्तित्वांत आली, त्यावेळीं यशवंत, गिरीश,माधव जूलियन द. ल. गोखले, ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. बा. रानडे, सौ. मनोरमाबाई रानडे व नाट्यछटाकार दिवाकर हे मंडळाचे घटक होते. पुढें दिवाकर मंडळापासून अलग झाले आणि वि. द. घाटे हे मंडळांत समाविष्ट झाले. सौ. मनोरमाबाई रानडे कालवश झाल्या. मंडळाची आजवर आठरा पुस्तकें

प्रसिद्ध झालीं आहेत तीं येणेंप्रमाणें:–किरण, काव्य-विचार, उषा, मधु–माधव, शलाका, विरहतरंग, कला, नाटयरूप महाराष्ट्र, छन्दोरचना, प्रभा, सुधारक, आम्बराई, यशोधन, उमर खय्यामच्या रुबाया, भावमन्थन, कांचनगंगा, द्राक्षकन्या आणि बन्दीशाळा. पत्ता:–कवि यशवंत, गायकवाड वाडा नारायण पेठ, पुणें.

३८ **रानडे इंडस्ट्रियल अॅण्ड इकॉनॉमिक इन्स्टिटयूट**, पुणें:— १९०१ सालीं न्या. मू. रानडे यांचें स्मारक उभारण्याबाबत विचार करण्याकरितां पुणें येथें पहिली सभा भरली होती. स्मारकखर्चाकरितां फंड गोळा करावा असें ठरलें. १९०३ मध्यें स्मारक म्हणून औद्योगिक व आर्थिक संस्था स्थापन करावी असें ठरलें. याकरितां एक लक्ष रुपये जमा करण्याचें स्मारक कमिटीनें ठरविलें व १९०८ सालपर्यंत रक्कम गोळा झाली. १९१० मध्यें तेव्हांचे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर हि. ए. सर जॉर्ज क्लार्क यांचे हस्तें पुणें, लकडी-पुलानजीकच्या संस्थेच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ झाला. इमारतींत टेक्नो–केमिकल लेबोरेटरी, ब्यूरो ऑफ इन्फर्मेशन, डायरेक्टर्स लॅबोरेटरी, म्यूझिअम वगैरेपुरती जागा आहे. १९१० सालपर्यंत एकंदर फंड १,००,१७८–१४–० रु. जमला. त्या रकमेंतूनच इमारतखर्च झाला. स्मारक संस्थेचे तीन विभाग आहेत. १ टेक्नो–केमिकल लॅबोरेटरी यांत सायन्स ग्रॅज्युएटस्ना संशोधन व प्रयोग करण्याकरितां शिरकाव मिळतो शिवाय देखरेखीकरतां व संशोधनकार्य चालू ठेवण्याकरितां म्हणून येथें एक पगारी रसायनज्ञ असतो. २ ब्यूरो ऑफ इन्फर्मेशन यामध्यें औद्योगिक व आर्थिक विषयांवर ग्रंथसंग्रहालय व म्यूझिअमचा समावेश होतो. थोडा मोबदला देऊन यांचा फायदा सर्व लोकांना घेतां येतो. ३ स्कॉलर्शिप फंड वरील दोन विभागांचा खर्च भागून जी रक्कम शिल्लक राहील त्यामधून टेक्नोकेमिकल लॅबोरेटरींतील शिक्षणक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देशांतील निरनिराळ्या भागांतून हिंडण्याकरतां वगैरे शिष्यवृत्त्या देणें.या वर्षी (१९३१ ते ३२) सहा सायन्स ग्रॅज्युएटस् येथें संशोधन काम करीत होते. जमाखर्च (३१–३२) जमा ५९३४–१३–५ रु. व खर्च ५५२७–१५–४ रु. शिल्लक–४०६–१४–१ रु. चेअरमन सर गंगाधरराव पटवर्धन के. सी. आय. ई. चीफ ऑफ मिरज. डायरेक्टर व सेक्रेटरी डी.बी. लिमये,एम्. ए. बी. एस्सी. ऑ.सेक्रेटरी:— दि. बा. के.आर. गोडबोले, एम्. सी. ई.

३९ **लष्करी शिक्षण–शाळा, पुणें** 'अखिल भारतीय श्रीशिवाजी महाराज प्राथमिक'' ही शाळा सन १९३२ च्या जूनमध्यें सुरू झाली. उद्देश:–''(१) रॉयल मिलिटरी अॅकॅडमी, उलीच, रॉयल मिलिटरी कॉलेज, कॅनवेल: हिंदी लष्करी कॉलेज डेहराडून,या संस्थांना अनुरूप होतील असे उमेदवार घेऊन त्यांना अशा रीतीनें शिक्षण द्यावयाचें कीं, वरील कॉलेजांतून शिक्षण मिळवून त्यांना पदवीधर होतां यावें आणि हिंदी सैन्य,आरमार व वैमानिक दल यांत बादशहाचे कमिशनचा मान मिळविण्यास ते सर्वतोपरी लायक व्हावे. (२) विद्यार्थ्यांना अशा तऱ्हेचें शिक्षण द्यावयाचें कीं, त्यांचें वय वीस वर्षांचें होण्यापूर्वी सैन्य, आरमार अगर वैमानिक दल यांच्या चढाओढीच्या प्रवेशपरीक्षेत त्यांना खात्रीनें यश मिळावें. (३) सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक शिक्षण अशा तऱ्हेचें द्यावयाचें कीं, त्यांना स्वत:ला अगर दुसऱ्यांना संकोच न वाटतां, हिंदी अगर युरोपियन समाजांत मोकळेपणानें वावरतां यावें. (४) पद्धतशीर शारीरिक शिक्षणानें आणि नियमित खेळानें मुलांची शरीरसंपत्ति बळकट बनवून त्यांना इंग्लंड अगर हिंदुस्थान येथील कॅडेट कॉलेजांतील जागा मिळवितां याव्यात, आणि पुढें सैन्य, आरमार व वैमानिक दल यांतील आयुष्यक्रमास निगडित झालेले काबाडकष्ट हिंमतीनें आणि धिटाईनें सोसतां यावे. (५)मुद्दाम निवड करून घेतलेल्या शिक्षकवर्गाच्या काळजीपूर्वक व अहर्निश देखरेखीमुळें सर्व विद्यार्थ्यांत राजनिष्ठेची जाणीव,स्वदेशाभिमान, मर्दपणा, स्वावलंबन हे गुण अंगीं मुरावे. तसेंच सुदृढ मन आणि शरीर (प्रगल्भ मन व बळकट शरीर) या योगें ते साम्राज्य आणि हिंदुस्थान या दोघांचे खरे आणि उपयुक्त असे सेवक व नागरिक होण्यास लायक व्हावे.''संस्थापक:–अखिल भारतीय श्रीशिवाजी स्मारक कमिटी व तिचे अध्यक्ष श्रीमंत सरकार छत्रपति महाराज कोल्हापूर. स्मारकाचा मूळ हेतु–ऐतिहासिक संशोधन करण्याचा होता. परंतु सध्यांच्या परिस्थितींत लष्करी शाळाच देशाला अधिक उपयुक्त आणि शिवाजी महाराजांसारख्या अद्वितीय हिंदी वीरास साजेसें स्मारक होईल असें विचारांतीं ठरून ही शाळा स्थापण्यांत आली. शाळेची भव्य इमारत असून तिचें क्षेत्र वीस हजार चौरस फूट आहे. स्मारक कमिटीनें आतांपावेतों पुतळा, इमारत,

जागा वगैरेकरितां सुमारें साडेसहा लाख रुपये खर्च केले आहेत. एकंदर १२५ मुलें घेण्याचें सध्यां ठरविलें आहे. त्यांपैकीं १९३२ सालीं ७५, १९३३ सालीं २५ व १९३४ सालीं २५ अशीं मुलें घेण्यांत येतील. यानंतर रिकाम्या जागा होतील त्या मानानें वार्षिक भरती करण्यांत येईल. गेल्या महायुद्धांत ज्यांनीं कामगिरी केली अशा अधिकाऱ्यांच्या व शिपायांच्या मुलांना तसेंच आजतागायत सैन्यांत काम करीत असलेल्या लोकांच्या मुलांना विशेष सवलती देण्याकरितां 'मराठा वॉर मेमोरियल फंड' बेळगांव या संस्थेकडून येणाऱ्या मुलांकरितां कांहीं जागा (सवलतीच्या दरानें) राखून ठेवण्याचें योजिलें आहे. तसेंच कोल्हापूर, ग्वाल्हेर आणि इंदूर या संस्थानांकरितां २५ जागा राखून ठेवण्यांत येतील. पण त्यांजकडून इतर विद्यार्थ्यांप्रमाणें फी घेण्यांत येईल. शाळेचे कांहीं नियमः—(१) दुसरी इयत्ता झालेलीं, १२ वर्षें अगर त्यापेक्षां कमी वयाचीं अविवाहित हिंदी मुलें वैद्यकीय तपासणींत योग्य ठरल्यास शाळेंत दाखल होण्याकरितां त्यांची निवड करण्यांत येईल. (२) वार्षिक फी दर मुलामागें ७२० रुपये ठेविली आहे. शिक्षणाची व राहण्याची सोय, जेवण, कपडे धुणें, फाटतूट शिवणें, पादत्राण पॉलिश करणें, साध्या आजाराकरितां वैद्यकीय मदत व नोकरचार या सर्वांचा खर्च वरील फीतून होईल. (३) सर्वांना एकाच तऱ्हेचें व एकत्र शिजविलेलें अन्न देण्यांत येईल. सर्व विद्यार्थ्यांना टेबलावर एकाच पंक्तींत जेवावें लागेल. तथापि कोणाहि विद्यार्थ्याच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील असे मांस-मत्स्य वगैरेसारखे पदार्थ विवक्षित विद्यार्थ्याच्या ताटांत वाढले जाणार नाहींत. अभ्यासक्रमः—हिंदी सैन्य, आरमार अगर वैमानिक दल यांत कमिशनें मिळविण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांतील अगर इंग्लंडमधील कॅडेट कॉलेजांत शिरूं इच्छिणाऱ्या हिंदी तरुणांना या शाळेंत इंग्लिश पद्धतीवर पब्लिक स्कूलचें शिक्षण दिलें जाईल. शाळा आपलें स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट मॅट्रिकचे बरोबरीचें ठेवील. सैन्य, आरमार व वैमानिक दल यांच्या चढाओढीच्या परीक्षेंत खात्रीलायक यश मिळविण्यास जरूर लागणाऱ्या शिक्षणाकडे योग्य लक्ष पुरवून सध्यांचा अभ्यासक्रम मुंबई विश्वविद्यालयानें मंजूर केलेल्या हायस्कूलच्या धर्तीवर राहील. शारीरिक शिक्षणः—शरीर आणि बुद्धि यांची वाढ व्हावी म्हणून रोज कवाईत (परेड) घेतली जाईल. खेळ खेळणें हें सर्व विद्यार्थ्यांकरितां सक्तीचें आहे. धार्मिकः—जातिभेदाचें उच्चाटन करणें हें या शाळेचें वैशिष्ट्य राहील. याकरितां आर्यधर्मास अनुसरून सामान्य धार्मिक प्रार्थना (कमिटीनें संमति दिलेली) रोज करण्यांत येईल. शिक्षक वर्गः—शाळेंत शिस्त राहावी म्हणून विद्याव्यासंगी युरोपियन लष्करी अधिकारी शाळेचा प्रिन्सिपाल म्हणून नेमण्याचें ठरविलें आहे. साहाय्यक—कोल्हापूर, ग्वाल्हेर आणि इंदूर या संस्थानांनीं स्मारक उभारण्याचे कामीं पुढाकार घेऊन उदारतेनें मदत केली आहे. शाळा व स्मारक अस्तित्वांत येण्यास कोल्हापूर व ग्वाल्हेर महाराजांचे श्रम कारणीभूत झाले. इंदूरचे श्री. तुकोजीराव महाराज यांनीं पांच लाख रुपये देणगी दिली. प्रोव्हिजनल स्कूलबोर्डः—१ सर रघुनाथराव सबनीस, के. टी. ऑनररी सेक्रेटरी, कोल्हापूर, २ मे. बी. व्ही. जाधव माजी दिवाण एम्. एल्. ए. ऑनररी जनरल सेक्रेटरी, कोल्हापूर, ३ श्रीमंत खासेसाहेब पवार, होममेंबर ग्वाल्हेर. ४ मेजर बाळासाहेब डफळे, जनरल कमांडिंग इंदूर फोर्सेस इंदूर, ५ रावसाहेब डी. ए. सुर्वे, प्राइममिनिस्टर कोल्हापूर. ६ रा. ब. वी. पी. जगताप, आय्. एस्. ई. ऑनररी कन्सल्टिंग इंजिनीअर पुणें. पत्ताः—रावसाहेब डी. ए. सुर्वे अध्यक्षांचे पर्सनल सेक्रेटरी, अखिल भारतील श्रीशिवाजी स्मारक कमिटी, नवा राजवाडा, कोल्हापूर.

४०. **वक्तृत्वोत्तेजक सभा** पुणें:—ही संस्था १८७१ सालीं स्थापन झाली. ती स्थापन करण्याचें श्रेय कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर, अण्णा मोरेश्वर कुंटे, महादेव गोविंद रानडे व केरो लक्ष्मण छत्रे यांस आहे. आपल्या वक्तृत्वशक्तीस चांगलें वळण नसतें. ही न्यूनता घालविण्याकरितां व आपले लोकांस धर्मपर, नीतिपर, राजकीय अथवा व्यावहारिक कोणत्याही विषयावर कांहीं वेळपर्यंत अस्खलित रीतीनें विषयानुरूप व चित्तवेधक असें महाराष्ट्र भाषेंत भाषण करण्याचा प्रसंग आणून उत्तेजन यावें, या हेतूनें ही संस्था स्थापन झाली आहे. संस्थेपाशीं शिल्लक सुमारें वीस हजार रुपयांचे बॅाड्स् असून त्यांचें व्याज दरसाल अजमासें साडेसहाशें रुपयांपर्यंत येतें. त्याखेरीज कै. न्या. मू. रानडे यांच्या ट्रस्टमधून दरसाल २० रुपयांची देणगी संस्थेस मिळते. या वार्षिक उत्पन्नाचा विनियोग वक्त्यांकडून मराठी व इंग्रजी अशा विविध विषयांवर भाषणें करवून त्यांत जे उत्तीर्ण होतील त्यांस बक्षिसें देण्याकडे होतो. हा समारंभ पुण्यास दरसाल होतो. खरीज त्यांतून

रत्नागिरी, चिपळूण इत्यादि बाहेर गांवींहि स्वतंत्र वक्तृत्वसमारंभ करण्यांत आले आहेत. कीर्तनकार व प्रवचनकार यांनाहि उत्तेजन देण्यांत आलें आहे. या समारंभाकडे पूर्वी जनतेचें लक्ष जितकें असे तितकें हल्लीं नाहीं. संस्थेचे वर्गणीदार २२ आहेत. स्थिति समाधानकारक आहे व कार्य नियमितपणें सुरू आहे. संस्थेचे विद्यमान चिटणीस श्री. विष्णु लक्ष्मण गोडबोले व श्री. वासुदेव कृष्ण भावे हे आहेत.

४१. वसंत व्याख्यानमाला:—पुणें येथें कै. न्या. म. गो. रानडे यांनीं ही माला १८७५ त स्थापन केली. तेव्हांपासून बेलबागेसमोरील भिडे वाडा, हिराबाग, सार्वजनिक सभा, क्रीडाभुवन, आर्यक्षत्रिय सोमवंशीय धर्मशाळा व केळकरांची बाग, अशीं स्थानांतरें करीत सांप्रत ती श्रीशिवाजीमंदिरांत सुस्थित झालेली आहे.समर व्हेकेशन सीरीज,हिराबाग लेक्चर सीरीज,वसंतोत्सव व्याख्यानमाला इत्यादि नामांतरेंहि होत होत आतां वसंतव्याख्यानमाला हें नांव रूढ झालें आहे. मे महिन्यांत व्यासंगी विद्वानांचीं व्याख्यानें करवून श्रोत्यांना ज्ञानलाभ देणें हें मालेचें उद्दिष्ट आहे. १९०७ सालीं लो. मा. बा. गं. टिळक यांनीं मालेचें पुनरुज्जीवन केलें, तेव्हांपासून तिला चिटणीस लाभले. या चिटणिशी पद्धतीचा उपक्रम प्रो. शि. म. परांजपे यांच्यापासून झाला. न्या.रानडे यांच्याकडून आणि त्यांच्या मरणोत्तर त्यांच्या ट्रस्टकडून मालेला प्रतिवर्षी वीस रुपयांची देणगी अव्याहत मिळत आहे. तिकिटांची पद्धति गेल्या दहा वर्षांतीलच आहे. मालेला पडेल ती तूट भरून काढण्याचें औदार्य 'वक्तृत्वसभा' दाखवीत असते. आतांपर्यंत प्लेग किंवा दडपशाही अशा अस्मानीसुलतानीमुळें माला सात वेळां बंद पडली; पण एरवीं तिचा 'वाग्यज्ञ' अव्याहत चालू आहे. त्यांत महाराष्ट्रामध्यें अग्रेसर ठरलेल्या एखाद्या विद्वानाचें व्याख्यान झालें नाहीं असें सांपडणें कठीण; बहुधा प्रत्येक विद्वानानें आपले विचार मालेच्या द्वारें महाराष्ट्र जनतेस ऐकविले आहेत. सुरुवातीपासून आतांपर्यंतच्या व्याख्यानांची संख्या सुमारें ९५०; १९३२ सालीं तिकिटविक्रीचें उत्पन्न सुमारें रु. २५०, खर्च जवळ जवळ तितकाच. १९३२ चे चिटणीस रा. दा. ना. शिखरे एम्. ए. व रा. नवाथे बी. ए.

४२ विद्याप्रसारिणी सभा:—पुणें येथील सरकारी हायस्कूल १९२२ सालीं सरकारनें बंद केल्यामुळें विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय होणार हें जाणून त्यांची सोय करण्यासाठीं तारीख ६ मार्च १९२२ रोजीं "भारत हायस्कूल" नांवाची इंग्रजी इ. १ ते ७ पर्यंत शिक्षण देणारी शाळा रा. गो. चि. अनगळ बी. ए. यांनीं रविवार पेठेंत सुरू केली. व ती चालविण्यासाठीं श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव (हल्लीचे भोरचे राजेसाहेब) यांचे अध्यक्षतेखालीं विद्याप्रसारिणी सभा या शैक्षणिक संस्थेची स्थापना करण्यांत आली. ती दुसऱ्याच वर्षी १८६० च्या २१ व्या कायद्यान्वयें रजिस्टर करण्यांत आली.

१ भारत हायस्कूल:—या शाळेस पहिल्याच वर्षी "संपूर्ण हायस्कूल" म्हणून सरकारी मान्यता मिळाली. दुसऱ्या वर्षी मुंबई युनिव्हर्सिटीचीही मान्यता मिळाली. हल्लीं या शाळेंत सुमारें २०० विद्यार्थी शिक्षण घेत असून या शाळेंतून मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेस यंदा पाठविलेल्या १७ मुलांपैकीं ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या शाळेंत एकंदर ११ शिक्षक असून त्यांपैकीं ५ ग्रॅज्युएटस् आहेत.सदर शाळा हल्लीं कसबा घ. नं. १४०१ येथें भरत असते. सदर शाळेस दरसाल सरकारी मदत मिळत असते.

२ भारत मराठी विद्यालय, ब्रँच नं.१,कसबा पेठ:—विद्या प्रसारिणी सभेमार्फतच "भारत मराठी विद्यालय" नांवाची मराठी इ. १ ते ४ पर्यंत शिक्षण देणारी शाळा १८ मार्च १९२३ रोजीं स्थापन करण्यांत आली. सदर शाळेस आरंभापासूनच सरकारी ग्रँट मिळत आहे.

३ भारत मराठी विद्यालय ब्रँच नं. २ शनिवार पेठ:—या ब्रँच नं. २ शाळेची स्थापना आक्टोबर १९२९ मध्यें करण्यांत आली. या दोन्ही प्राथमिक शाळांस सरकारी ग्रँट मिळत असते. या शाळेंत एकंदर १० शिक्षक असून त्यांपैकीं ४ ट्रेंड आहेत. शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या सुमारें ३०० आहे.

४ ए. व्हीं. हायस्कूल लोणावळें:—विद्याप्रसारिणी सभेनें सदर शाळा तारीख १ आक्टोबर १९३१ पासून लोणावळा म्यु. पा. कडून पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतली आहे. पटावरील विद्यार्थ्यांची संख्या ६५ आहे. अध्यक्ष—सरदार गं. ना. मुजुमदार, एम्. एल्. ए. चेअरमन—रा. एन्. बी. चंद्रचूड, बी. ए. एल्एल्. बी. सेक्रेटरी—१ श्री. ना. वि. भोंडे, बी. ए. एल्एल्. बी.२ श्री. जी. सी. अनगळ, बी. ए. बी.टी. पत्ता:—भारत-हायस्कूल, कसबा पेठ, पुणें.

४३ विधवा विवाह मण्डळ पुणें:-१९३१ सालचा अहवाल. १९३२ सालचें व्यवस्थापक

मंडळ, अध्यक्षः–प्रो. गो. चिं. भाटे, उपाध्यक्ष–प्रो. द. ल. सहस्रबुद्धे, सभासद–प्रो. धों. के. कर्वे, प्रो. बि. के. जोग, श्री. काशीबाई देवधर, रा. त्र्यं. अ. साठे,ग. ल. ढेकणे, श्री. कृ. ग. लिमये, भा. बा. भाजेकर. सेक्रेटरी–रा. मा. रा. जोशी, रा. ज. कृ. पाटणकर. हिशेबतपासनीस–रा. ग. रा. गांधी वकील. रिपोर्टाचे सालीं व्यवस्थापक मंडळाच्या पांच सभा झाल्या. दरवर्षीप्रमाणें सन १९३१ सालीं २५ जुलै रोजीं 'पुनर्विवाहदिन' साजरा केला. ज्ञानप्रकाशमधील मंडळाच्या जाहिरातीचा उपयोग कार्यप्रचारार्थ चांगला होतो. रिपोर्टाचे सालीं सेक्रेटरीकडे पत्रें ४११ आलीं व ४०० माणसें मुलाखतीला आलीं. सन १९३० सालीं पुनर्विवाहेच्छु लोकांनीं नांवें नोंदविलीं,त्यांपैकीं ३८ पटावर होतीं व सन १९३१ सालीं नवीन ८० लोकांनीं नांवें नोंदलीं .विवाहेच्छु विधवांचीं १६ नांवें नोंदलीं. सन १९३१ सालीं मंडळामार्फत पुण्यांत चार व बाहेरगांवीं दोन पुनर्विवाह झाले. १९३० सालीं वर्गणीदारांची संख्या ३५ होती. त्यांत १२५ नवीन वर्गणीदारांची भर पडून एकंदर संख्या १६० झाली आहे. रिपोर्टाचे सालीं एकंदर रु. ५४७–८–० मिळाले. सन १९३१ चा हिशोब. जमा रु. १०३३५–१–० (वर्गण्या, देणग्या, प्रॉमिसरी नोटा. मागची शिल्लक.) खर्च मंडळाप्रीत्यर्थ रु. ५९९–१४–३ व नवीन प्रॉमिसरी नोटा; मागची शिल्लक.रु.१२८४–१–४ एकूण रु.१८८३–१५–७.शिल्लक ८४५१–१–५

४४. वेदपाठशाळा पुणें:– स्थापना–शके १८०३ आश्विन शु. ५ उद्देशः–"वेदरक्षण व वेदविद्याभिवृद्धि कार्य" आजपर्यंत संस्थेनें अनेक दशग्रंथी वैदिक तयार केले व गृहस्थ लोकांचे मुलांस ब्रह्मकर्माचें यथासांग शिक्षण देण्याचा व सनातन वेदविद्या जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला. संस्थेच्या ऋग्वेदी व हिरण्यकेशी अशा दोन शाळांतून ८२ व ४२ विद्यार्थी अनुक्रमें सध्यां शिक्षण घेत आहेत. संस्थेचें मालकीचें घर आहे. पण दोनही शाळांचा समावेश होण्यास स्वतंत्र विद्यामंदिराची आवश्यकता आहे. देणगी–पुणें शहर म्यु. दरसाल २०० रु. गरीब विद्यार्थ्यांस पुस्तकें देण्याकरितां,सांगलीचे रावसाहेब वि. ना. साठये १०० रु. (शके १८५३) सांपत्तिक स्थिति–शके १८५३ सालीं जमा २१३७ रु. १२ आणे, व खर्च १८०३ रु. १३ आ. १० पै. एकूण शिल्लक–१११७७ रुपये. कार्यकारी मंडळ– (१) रावसाहेब विनायक त्र्यंबक आगाशे (२) रा. गोपाळ महादेव विद्वांस, (३) रा. पुरुषोत्तम गणेश नानल आयुर्वेदाचार्य, (४) रा. पुरुषोत्तम शिवराम जोगळेकर, (५) रा. गणेश महादेव दामले. पत्ता–५१९ नारायण पेठ, पुणें.

४५. वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें.–स्थापना–शके १७९७, उद्देश–"वेदशास्त्रादिकांवर परिश्रम करणाऱ्या विद्वानांची व विद्यार्थ्यांची चार वेद, सहा शास्त्रें, ज्योतिष, वैद्यक वगैरे विषयांत परीक्षा घेऊन तींत जे पसंत ठरतील त्यांस द्रव्यरूपानें पारितोषिकें, संमतिपत्रें व पदव्या यांपैकीं एक अगर अनेक देऊन व निरनिराळ्या ठिकाणच्या वेदशास्त्रपाठशाळांस शक्य तों आश्रय देऊन आर्यविद्येच्या व वेदशास्त्रादिकांच्या अध्ययनास व धर्माचरणास हल्लीं सर्वत्र आलेली ग्लानि दूर करणें व जुनी विद्या जिवंत ठेवणें." कार्य–आपल्या उद्देशाप्रमाणें सभा आपलें काम गेलीं ५७ वर्षें करीत आहे. आजपर्यंत निरनिराळ्या शास्त्रांत सुमारें साडे नऊशेंच्या वर वैदिक, शास्त्री व पंडित सभेच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत. सभा सर्व वेद व शास्त्रें यांत उमेदवारांची परीक्षा घेऊन संमतिपत्रें देते. सभा ता. ३०–८ सन १९२० रोजीं रजिष्टर झाली. सभेचे सभासद पांच प्रकारचे–(१) सन्मान्य आश्रयदाते, (२) आश्रयदाते, (३) आजन्म सभासद, (४) वर्गणीदार, व (५)देणगीदार शके १८५२ अखेर ५६२ वर्गणीदार झाले. आजन्म सभासद १५५ असून आश्रयदाते ६४ आहेत. सभेस अनेक देणग्या मिळालेल्या असून पुष्कळ सद्गृहस्थांनीं परीक्षेंत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बऱ्याच शिष्यवृत्त्याही ठेवल्या आहेत. सभा पुढील विषयांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेते.–(१) वेदपठण, (२) याज्ञिक, (३) नित्यकर्म, (४) व्याकरण, (५) अद्वैत वेदांत, (६)ज्योतिष, (७)मीमांसा, (८) वैद्यक, (९) व्युत्पत्ति, (१०) प्रवेश, (११) संस्कृत वक्तृत्व, (१२) अष्टाध्यायी, (१३) शिक्षाचतुष्टय. उमेदवारांच्या परीक्षा घेण्याकरितां परीक्षामंडळ आहे, व शेंकडा पन्नास गुण मिळाल्यानंतरच संमतिपत्र व बक्षीस दिलें जातें. पुण्यांतील पंडितांची परंपरा कायम राखण्याकरितां सभेच्या तीन परिक्षा दिलेल्या मनुष्यास पुढें दुसऱ्या कोणत्याही शास्त्राचें अध्ययन करावयाचें असल्यास दरमहा ३० ते ३५ रुपये शिष्यवृत्ति सभेमार्फत देण्याचा विचार चालू आहे. सभेचा निधि–शके १८५२ सालां, जमा १७०९९ रुपये ३ आणे ११ पै, खर्च २६२४ रु. ४ आ. ९ पै.

शिल्लक–५५९८८ रु. ११ आ. २ पै. कार्यवाह–प्रो. विश्वनाथ बळवंत नाईक, व वैद्य शंकरशास्त्री पराडकर, पत्ता–६०८ सदाशिव पेठ, पुणें.२.

४६ वैदिक संशोधन मंडळ, पुणें. स्थापना ता. १–८–१९२९ उद्देश– (१) वैदिक वाङ्मय विषयक उच्च प्रतीच्या अध्ययनअध्यापनाची व्यवस्था करणें. (२) वैदिक वाङ्मयविषयक ग्रंथांचा व हस्तलिखितांचा संग्रह करणें, (३) वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासास उपयोगी पडल असे निबंध, सूची, टिप्पणी इत्यादि प्रकारचें साहित्य निर्माण करणें, (४) वैदिक वाङ्मयविषयक ग्रंथांचें प्रकाशन करणें, व (५) अन्य प्रकारें वेद-विद्येचें संशोधन करणें. टिळक–महाराष्ट्र–विद्यापीठांत वेदविद्येचा सर्वांगीण अभ्यास व्हावा या हेतूनें लो. टिळकांच्या स्मरणार्थ ही संस्था स्थापन करण्यांत आली. कार्य–मंडळानें प्रथम ऋग्वेद सायण भाष्य प्रकाशित करण्याचें ठरविलें आहे. पहिल्या भागाचें संशोधन पूर्ण होऊन मुद्रण चालूं आहे. पहिल्या भागाकरितां एकंदर तीस हस्तलिखितें वाचण्यांत आलीं. तंजावर, त्रिवेंद्रम व म्हैसूर या ठिकाणीं जाऊन तेथील हस्तलिखितें वाचलीं. सांपत्तिक स्थिति–(१ जून १९३१ ते ३१ मे १९३२) मागील शिल्लक–१४२० रु .१२ आ. ४पै. जमा–४६८० रु. ६ आ. १० प. खर्च २९७२ रु. ११ आ. ६ पै.शिल्लक–३१२८ रु. ७ आ. ८ पै. वरील जमेंत ४००० रुपये कर्ज काढलेली रक्कम आहे. सायण भाष्याच्या पांचही भागांच्या प्रकाशनास सुमारें साठ हजार रुपये खर्च येईल. प्रकाशनास लवकर सुरुवात व्हावी म्हणन कर्ज काढून प्रारंभ केला आहे. व्यवस्थापक मंडळ– अध्यक्ष–प्रि. वैजनाथ काशिनाथ राजवाडे एम्. ए. उपाध्यक्ष–चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल्.एल्. बी. चिटणीस–नारायण श्रीपाद सोनटक्के वाङ्मयविशारद, प्रकाशक–मंडळ– (१) श्री. न. चिं. केळकर (अध्यक्ष) (२) श्री. चिं .वि. वैद्य, (३) प्रि. वै. का. राजवाडे, (४) श्री. ह. वि. तुळपुळे (खजिनदार) पत्ता–वैदिक संशोधन मंडळ, टिळक स्मारक मंदिर, पुणें नं. २.

४७ शिवाजी आखाडा, पुणें:––स्थापना:–१९२३; उद्देश–'मनोबलाबरोबरच शारीरिक बलाचीहि वृद्धि होऊन सुशिक्षित तरुणांत व्यायामाची आवड उत्पन्न व्हावी व त्यांना जोमदार बनवावें.' आखाड्यांत मैदानी व मर्दानी खेळांची सोय करण्यांत आली आहे. हुतुतू, खो, खो, आटयापाट्या, लंगडी, लाठी, लेजीम वगैरे मैदानी खेळ व कुस्ती, मलखांब वगैरे मर्दानी खेळ संस्थेच्या जागेंत होत असतात. सहाय्यक:–सरदार जगन्नाथ महाराज, श्री. म्हात्रे, श्री. नानूराम ठोले, श्री. मालशे, रा. राजमाचीकर वकील, कार्लेकर सर्कशीचे मालक वगैरे.

हनुमान स्पोर्टस क्लब:––क्लबची स्थापना १९२३ सालीं झाली. क्रिकेट, फुटबॉल, हॉकी वगैरे परदेशीं खेळांची आवड उत्पन्न करणें हा क्लबचा उद्देश होता. व त्याप्रमाणें म. ए. सो. हायस्कूलच्या इंग्रजी २ रीतील विद्यार्थ्यांनीं सुरूं केला. हा क्लब १९२६ त आखाड्यास येऊन मिळाला. १९२७ सालीं अठरा वर्षांचे आंतील संघानें हुतुतूच्या सामन्यांत विजय मिळवून ढाल मिळविली. १९२८ सालीं पी. वाय्. सी. जिमखान्यातर्फें होणाऱ्या सामन्यांत हुतुतू संघानें भाग घेऊन विजय मिळविला व 'तलवार' व 'कप' बक्षिस मिळविला. संघानें परगांवीं जाऊन सामने खेळावयास सुरवात केली आहे. बडोद्याच्या हिंदविजय जिमखान्यातर्फें होणाऱ्या अखिल भारतीय खेळांत संघानें भाग घेऊन बरीच कीर्ति मिळविली. हल्लीं संस्थेंत सुमारें सत्तर मंडळी व्यायामाचा फायदा घेत आहेत.

जमाखर्च (१९३०–३१) जमा–३४९ रु. १४ आ. खर्च १४२ रु. १४ आ. ६ पै. शिल्लक–२०६ रु. १५ आणे ६ पै. अध्यक्ष श्री. स. ब.

४८ शिवाजी मराठा सोसायटी, पुणें. स्थापना–१९१८, ध्येय व उद्देश– मराठा ज्ञातीच्या शिक्षण प्रसारार्थ नवीन शिक्षणसंस्था काढणें, मराठा ज्ञातींतील शैक्षणिक चळवळींची पद्धतशीर संघटना करणें, मराठा बांधवांत एकी करणें, व मराठा व इतर जातींतील स्नेहभाव वाढविणें, मराठा जात मागासण्यास जीं कारणें असतील तीं दूर करणें, धंदेशिक्षणाचें महत्त्व ज्ञातीस पटविणें, वाचनालयें, नियतकालिकें, पुस्तकें, हस्तपत्रकें, वादविवादोत्तेजक सभा, भाषणें, वगैरे साधनांनीं मराठ्यांमध्यें वाङ्मयविषयक चळवळीची आवड उत्पन्न करून तिचा प्रसार करणें, लष्करी शिक्षण घेण्यासाठीं मराठा तरुणांना उत्तेजन देण्याची खटपट करणें; बॉयस्काऊट, गर्लगाईड, ॲम्ब्युलन्स वगैरे चळवळींचा प्रसार करणें, पाटील व तलाठ्यांचे वर्ग काढणें, सहकारी तत्त्वाचें शिक्षण देणें व सहकारी चळवळीचा प्रसार करणें. श्री शिवाजी महाराजांचा एक घोड्यावरचा पुतळा उभारून त्यांचें स्मारक करणें व मराठा वर्गाची

छत्रपति राजाराम महाराज, कोल्हापूर, उपाध्यक्ष श्रीमंत खासेसाहेब महाराज पवार, देवास (ज्यूनि) १९३१–३२ चें कार्यकारी मंडळः–चेअरमन मे. गंगाजीराव मु. काळभोर एम्. एल्. सी., श्री. शिंदे, सेक्रेटरी.

४९ शिक्षण प्रसारक मण्डळी पुणें.स्थापना–सन १८८८ (१८६० च्या २१ व्या अॅक्टान्वयें नोंदलेली). उद्देशः– (१) लोकप्रिय व थोडक्या खर्चांत शिक्षण देणें. (२) खाजगी शाळा काढणें, (३) असलेल्या देखरेखीखालीं घेणें, (४) मराठी वाङमयाला उत्तेजन देणें वगैरे. कार्य– सध्यां मंडळीच्या पुढील संस्था आहेतः–(१) सर परशुराम भाऊ कॉलेज, (२) नूतन मराठी विद्यालय हायस्कूल, (३) नूतन मराठी विद्यालय मराठी शाळा, (४) मीमांसा विद्यालय, (५) हरिभाई देवकरण हायस्कूल सोलापूर. सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें सन १९३०–३१ सालीं ५७६ विद्यार्थी होते. त्यांची जातवारी–ब्राह्मण ४८८, प्रभु १९, जैन ४, लिंगायत ५, मराठा १४, ज्यू १, मुसलमान १, इंडियन ख्रिश्चन १, इतर ३९, अस्पृश्य ४. सांपत्तिक स्थितिः–जमा ९९७४३ रुपये, खर्च– ९९७४३ रुपये. नूतन मराठी विद्यालय हायस्कूल (स. १९३०–३१) विद्यार्थी ब्राह्मण १३५३; इतर पुढारलेल्या जाती १०३; मराठा १३४; कुणबी २०; सुतार वगैरे ३६; लिंगायत १९; अस्पृश्य ४२; इतर ३; मुसलमान १; जैन ३९; ज्यू १; ख्रिश्चन ४, एकण १७५५. जमाः–९११३१ रु. खर्च–९११३१ रुपये. नूतन मराठी विद्यालय मराठी शाळाः–सन १९३०–३१ सालीं ५२७ मुलें होतीं. येथें शिशवर्गापासून मराठी चौथीपर्यंत शिक्षण दिलें जातें. जमाः–११८६३ रु. ६ आ. ९पै खर्च–११८६३ रु. ६ आ. ९ पै. मीमांसा विद्यालयातर्फे शाबरभाष्य सटीक छापण्याचें काम चालू आहे. सन १९३०–३१ सालीं १३८५७ रु. विद्यालयाच्या फंडाकरितां मिळाले. त्यांपैकीं प्रमुख देणगीदार–शेट घनश्यामदास बिर्ला १००० रु. बिकानेर दरबार ३००० रु., ग्वाल्हेर दरबार ४००० रु., राजेसाहेब धनराजगीर राजा मानसिंग गिरजी ५००० रु., सरकारी ग्रँट ४०० रु. हरिभाई देवकरण हायस्कूल सोलापूरः– शाळेला स्वतंत्र इमारत बांधण्याचें काम संपून मुंबईचे गव्हर्नर साहेब यांचे हस्तें ती उघडण्यांत आली. सन १९३०–३१ सालीं ९६३ विद्यार्थी होते. ख्रिश्चन १६; ब्राह्मण ५१५; इतर हिंदू ४८; लिंगायत ६१; मराठा ९६; मध्यमवर्गीय हिंदू ५८; अस्पृश्य १७; मागसलेले ५४; मुसलमान ३९; पार्शी १२; जैन ४७. जमा–४६७३३ रु. १ आ. ४ पै., खर्च–४६७३३ रु. १ आ. ४ पै, शिक्षण प्रसारक मंडळीची सांपत्तिक स्थितिः— चालू जमाखर्चः—जमा ५३६४३ रु. १३ आ. ६ पै. खर्च– ५३६४३ रु. १३ आ. ६पै. खर्चापैकीं कर्जफेड १५७४३ रु. ९ आ. ३ पै. लोन २१८७१३ रु.; पेन्शन फंड ४४८५२ रु.९ आ. ०पै मालमत्ताः–(Property) इमारती ९३४१४७ रु.फर्निचर४८४८६रु.उपकरणें (Apparatus) ६५१३७ रु., ग्रंथालय ७८५२५ रु. एकण ११२६२९५ रुपये. मॅनेजिंग कौन्सिल-चेअरमन– दिवाणबहादूर के. आर. गोडबोले बी. ए. एम्. सी. ई, सी. बी. ई. मंडळीचे सेक्रेटरीः–प्रो. एन्. जी. नारळकर एम्. ए. एल्. टी. पत्ताः–शिक्षण प्रसारक मंडळी, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें नंबर २.

५०. शेट ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल, पुणें—१ स्थापना व संस्थापक–टिळक महाविद्यालयांतील आयुर्वेद शाखेच्या विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाकरितां महाविद्यालयानें सदर हॉस्पिटल १० ऑगस्ट १९२५ रोजीं भवानी पेठेंत भाड्याच्या जागेमध्यें 'धर्मार्थ आयुर्वेदीय रुग्णालय' या नांवानें प्रथम सुरूं केलें. २ मूळ हेतु–आयुर्वेद शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षण मिळून शिवाय शहरांतील गोरगरीबांना मोफत औषधोपचार व त्यांची शुश्रूषा करावयास मिळावी व औषधोपचार देशी पद्धतीनें करून आयुर्वेदाची सशास्त्रता व उपयुक्तता सिद्ध करण्यास संधि मिळावी या उद्देशानें सदर रुग्णालय सुरूं करण्यांत आलें. ३ स्थापनेपासून आजपर्यंतचा इतिहास–वरील उद्देशानुरूप रुग्णालयाच्या कार्याची प्रगति झपाट्यानें होऊं लागल्यामुळें सदर रुग्णालयास कायम स्वरूप देऊन तें स्वतःच्या इमारतींत नेण्याची जरूरी वर्ष दोन वर्षांतच भासूं लागली, व त्याकरितां एक वजनदार गृहस्थांची 'इमारत व कायमनिधि कमिटी' नेमण्यांत आली. सदर कमिटीच्या प्रयत्नानें रा. ब. हणमंतराम रामनाथ यांनीं कांहीं अटींवर ५० हजार रुपये देण्याचें अभिवचन दिलें व चालकांनींही आणखी ५० हजार रुपये इतर लोकांकडून जमविले. इतकी तयारी झाल्यानंतर शहर म्युनिसिपालिटीनें केवळ नांवापुरती भाड्यानें व ४९९ वर्षांच्या करारानें दारूवाल्याचे पुलाजवळील सुमारें दोन एकर जागा सदर रुग्णालयास प्रथम

सर्वांगीण उन्नति करणें हा उद्देश डोळ्यापुढें ठेऊन सोसायटीनें कामास सुरुवात केली. श्री. खासेसाहेब महाराज पवार यांनीं सोसायटीकरितां जवळ-जवळ १। लाख रुपये जमा केले.ठळक नांवें व रकमा पुढीलप्रमाणें. कै. श्रीमंत छत्रपति शाहूमहाराज कोल्हापूर २५०००, कै. श्रीमंत माधवराव महाराज शिंदे, ग्वाल्हेर २५०००, श्रीमंत तुकोजीराव होळकर, इंदूर २५०००, कै. श्रीमंत जितेंद्रनारायण भूपबहाद्दर महाराजा कुचबिहार ५०,०००, पैकीं १५०००, कै. श्रीमंत उदाजीराव पवार महाराजा धार ५०००, श्रीमंत राजाबहाद्दूर महाराजा नरसिंगड ५०००, श्रीमंत मालोजीराव ऊर्फ नानासाहेब निंबाळकर फलटण ५०००, श्रीमंत सरदार चंद्रोजीराव आंग्रे, ग्वाल्हेर २५००, श्रीमंत सरदार एन्. आर. बुळेसाहेब, इंदूर २०००, श्रीमंत सरदार मालोजीराव शितोळे (मोठे) ग्वाल्हेर १००० श्रीमंत चेर्नासिंगजी ठाकोर साहेब पंचेड (नामली) ५००, कै. श्रीमंत बापूसाहेब घाटगे, कागल सीनीअर ५००, सन १९१८त रा. बाबूराव जगताप बी. ए.बी.टी.यांनीं कांहीं उत्साही मंडळींच्या मदतीनें श्रीशिवाजी मराठा स्कूलची स्थापना केली. प्रारंभीं अवघी तीन मुलें होतीं. परंतु लवकरच मुलांची संख्या वाढत चाललेली पाहून शिवाजी मराठा सोसायटीनें, मदत म्हणून १ वर्षाकरितां ३ हजार रुपयांची ग्रँट दिली. १९१९ त ही शाळा सोसायटीस जोडण्यांत आली. अखिल भारतीय शिवस्मारकाची कल्पना सोसायटीच्या प्रयत्नानेंच प्रत्यक्ष अमलांत आली. सध्यां स्मारक संस्था जरी वेगळी असली तरी सोसायटीच्या प्रोत्साहनानेंच हें स्मारक घडून आलें आहे. १९१८ पासून १९२६ पर्यंत शाळेच्या जागेचीं बरींच स्थित्यंतरें झालीं. १९२६ सालीं स्वतःच्या मालकीचें शालागृह उघडण्यांत आलें. शालागृहास एकंदर खर्च ८१ हजार रुपये आला. त्यांपैकीं सरकारकडून ग्रँट ४२,६६४ रु. व श्री. कोल्हापूर महाराज यांचेकडून २५ हजारांची मदत झाली आहे. १५ सद्गृहस्थांनीं प्रत्येकीं हजार रुपयांची देणगी दिली. सध्याची इमारत प्राथमिक शाळेची असून त्यांत ५०० मुलांची सोय होऊं शकते. कॉलेजमधील मराठा विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्याकरितां सोसायटीनें भांबुर्डायेथें श्री छत्रपति ताराबाई मराठा बोर्डिंग १९२०त सुरूं केलें. इमारतीच्या खर्चाच्या २२ हजारांपैकीं १६००० रु. कै. श्री. छत्रपति शाहू महाराज कोल्हापूर यांनीं दिले. बाकीचा खर्च सोसायटीनें केला. बोर्डिंगास जागा, बडोद्याचे श्री. नरसिंगराव ऊर्फ बाबासाहेब घोरपडे, अमीर-उल्-उमराव यांनीं मोफत दिली आहे. सध्यां येथें २१ मुलांची सोय करण्यांत येते. १९२७ त रावसाहेब रामचंद्रराव वंडेकर, जे. पी. नाशिक यांच्या ५ हजारांच्या देणगीमुळें, शाळेच्या लायब्ररीसाठीं त्यांच्या वडिलांचे स्मरणार्थ, एक स्वतंत्र इमारत बांधण्यांत आली. १९२५ त २॥ हजार रु. खर्च करून मुलांच्या व्यायामासाठीं एक तालीमखाना बांधण्यांत आला आहे. शाळा स्थापन झाल्यापासून सहकारी तत्त्वावर, एक स्टोअर चालविण्यांत येत आहे. मे. किसनराव गणपतराव शिंदे यांनीं २ हजार रुपयांची देणगी दिली असून, त्यांचे वडिलांचे स्मरणार्थ स्टोअर्सची स्वतंत्र इमारत बांधण्यांत आली आहे. शाळेच्या वसतिगृहाचीं अनेक स्थित्यंतरें झालीं आहेत. सध्यां तें शाळेच्या काम्पाउंडमध्यें आणलें आहे. त्यांत २५ मुलांची सोय आहे. शाळेतर्फे दिपवाळी फंड जमविण्याचें काम ५।६ वर्षे चालू असून फंडाचा उपयोग सभागृह बांधण्याकडे करण्याचा विचार आहे. सोसायटीच्या मालकीच्या जवळजवळ १ लाख ३५ हजारांच्या इमारती आहेत. सरकारी ग्रँट व फी मिळून शाळेच्या हातीं येणारी सर्व रक्कम धरून शिवाय सोसायटीला शाळेकरितां दरसाल अदमासें ४००० पर्यंत खर्च करावा लागत आहे. सोसायटीच्या शाळांतून सुमारें ९०० विद्यार्थी शिक्षण घेतात. सोसायटीच्या सुरवातीच्या वर्षाचा व १९३१ सालचा जमा खर्चः—१९१८—१९ जमा—२५,४८२, खर्च १४,१९०-१९३०-३१ जमा २५७४७-११-८, खर्च—२४८११ ० आ. ९ पै. सद्यःस्थिति—१९३१ सालीं श्रीछत्रपति ताराबाई मराठा बोर्डिंगमध्यें पहिल्या सहामाहींत ११ व दुसऱ्या सहामाहींत ११ विद्यार्थी होते. १९३१ सालीं सोसायटीच्या पटावर पेट्रन्स, व्हाईस पेट्रन्स, डोनर्स, फेलोज, १ल्या, २ऱ्या व ३ऱ्या वर्गाच्या सभासदांची मिळून संख्या ३४० होती. सोसायटीची प्रायमरी मुख्य शाळा व ब्रँचस्कूल भवानीपेठ या शाळांमध्यें जुलै १९३१ रोजीं अनुक्रमें ३८५,व १३१ असे विद्यार्थी होते.हायस्कूलच्या प्रिलिमिनरी परीक्षेस ४४ विद्यार्थी बसले होते त्यांपैकीं ३२ विद्यार्थ्यांना मॅट्रिक परीक्षेस पाठविण्यांत आलें त्यांपैकीं २० विद्यार्थी यशस्वी झाले. सध्यां दिवाळीफंडाची रक्कम २३६८ रु. १० आ. ६ पै इतकी झाली आहे.'पुअर बॉईज फंडा' कडून १९३१ सालीं एकूण ८३ विद्यार्थ्यांना २४३ पुस्तकें मदत म्हणन दिलीं गेलीं. अध्यक्षः—श्रीमंत

छत्रपति राजाराम महाराज, कोल्हापूर, उपाध्यक्ष श्रीमंत खासेसाहेब महाराज पवार, देवास (ज्यूनि) १९३१–३२ चें कार्यकारी मंडळ:–चेअरमन मे. गंगाजीराव मु. काळभोर एम्. एल्. सी., श्री. शिंदे, सेक्रेटरी.

४९ शिक्षण प्रसारक मण्डळी पुणें.स्थापना–सन १८८८ (१८६० च्या २१ व्या अॅक्टान्वयें नोंदलेली). उद्देश:– (१) लोकप्रिय व थोडक्या खर्चात शिक्षण देणें. (२) खाजगी शाळा काढणें, (३) असलेल्या देखरेखीखालीं घेणें, (४) मराठी वाङ्मयाला उत्तेजन देणें वगैरे. कार्य–सध्यां मंडळीच्या पुढील संस्था आहेत:–(१) सर परशुराम भाऊ कॉलेज, (२) नूतन मराठी विद्यालय हायस्कूल, (३) नूतन मराठी विद्यालय मराठी शाळा, (४) मीमांसा विद्यालय, (५) हरिभाई देवकरण हायस्कूल सोलापूर. सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें सन १९३०–३१ सालीं ५७६ विद्यार्थी होते. त्यांची जातवारी–ब्राह्मण ४८८, प्रभु १९, जैन ४, लिंगायत ५, मराठा १४, ज्यू १, मुसलमान १, इंडियन ख्रिश्चन १, इतर ३९, अस्पृश्य ४. सांपत्तिक स्थिति:–जमा ९९७४३ रुपये, खर्च–९९७४३ रुपये. नूतन मराठी विद्यालय हायस्कूल (स. १९३०–३१) विद्यार्थी ब्राह्मण १३५३; इतर पुढारलेल्या जाती १०३; मराठा १३४; कुणबी २०; सुतार वगैरे ३६; लिंगायत १९; अस्पृश्य ४२; इतर ३; मुसलमान १; जैन ३९; ज्यू १; ख्रिश्चन ४, एकण १७५५. जमा:–९११३१ रु. खर्च–९११३१ रुपये. नूतन मराठी विद्यालय मराठी शाळा:–सन १९३०–३१ सालीं ५२७ मुलें होतीं. येथें शिशवर्गापासून मराठी चौथीपर्यंत शिक्षण दिलें जातें. जमा:–११८६३ रु. ६ आ. ९पै खर्च–११८६३ रु. ६ आ. ९ पै. मीमांसा विद्यालयातर्फे शाबरभाष्य सटीक छापण्याचें काम चालू आहे. सन १९३०–३१ सालीं १३८५७ रु. विद्यालयाच्या फंडाकरितां मिळाले. त्यांपैकीं प्रमुख देणगीदार–शेट घनश्यामदास बिर्ला १००० रु. बिकानेर दरबार ३००० रु., ग्वाल्हेर दरबार ४००० रु., राजेसाहेब धनराजगीर राजा मानसिंग गिरजी ५००० रु., सरकारी ग्रँट ४०० रु. हरिभाई देवकरण हायस्कूल सोलापूर:– शाळेला स्वतंत्र इमारत बांधण्याचें काम संपून मुंबईचे गव्हर्नर साहेब यांचे हस्तें ती उघडण्यांत आली. सन १९३०–३१ सालीं ९६३ विद्यार्थी होते. ख्रिश्चन १६; ब्राह्मण ५१५; इतर हिंदू ४८; लिंगायत ६१; मराठा ९६; मध्यमवर्गीय हिंदू ५८; अस्पृश्य १७; मागसलेले ५४; मुसलमान ३९; पार्शी १२; जैन ४७. जमा–४६७३३ रु. १ आ. ४ पै., खर्च–४६७३३ रु. १ आ. ४ पै, शिक्षण प्रसारक मंडळीची सांपत्तिक स्थिति:–चालू जमाखर्च:–जमा ५३६४३ रु. १३ आ. ६ पै. खर्च– ५३६४३ रु. १३ आ. ६पै. खर्चापैकीं कर्जफेड १५७४३ रु. ९ आ. ३ पै. लोन २१८७१३ रु.; पेन्शन फंड ४४८५२ रु.९ आ. ०पै मालमत्ता:–(Property) इमारती ९३४१४७ रु.फर्निचर४८४८६रु.उपकरणें(Apparatus) ६५१३७ रु., ग्रंथालय ७८५२५ रु. एकण ११२६२९५ रुपये. मॅनेजिंग कौन्सिल-चेअरमन–दिवाणबहादूर के. आर. गोडबोले बी. ए. एम्. सी. ई, सी. बी. ई. मंडळीचे सेक्रेटरी:–प्रो. एन्. जी. नारळकर एम्. ए. एल्. टी. पत्ता:–शिक्षण प्रसारक मंडळी, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें नंबर २.

५०. शेट ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल, पुणें—१ स्थापना व संस्थापक–टिळक महाविद्यालयांतील आयुर्वेद शाखेच्या विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाकरितां महाविद्यालयानें सदर हॉस्पिटल १० ऑगस्ट १९२५ रोजीं भवानी पेठेंत भाड्याच्या जागेमध्यें 'धर्मार्थ आयुर्वेदीय रुग्णालय' या नांवानें प्रथम सुरूं केलें. २ मूळ हेतु–आयुर्वेद शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षण मिळून शिवाय शहरांतील गोरगरीबांना मोफत औषधोपचार व त्यांची शुश्रुषा करावयास मिळावी व औषधोपचार देशी पद्धतीनें करून आयुर्वेदाची सशास्त्रता व उपयुक्तता सिद्ध करण्यास संधि मिळावी या उद्देशानें सदर रुग्णालय सुरूं करण्यांत आलें. ३ स्थापनेपासून आजपर्यंतचा इतिहास–वरील उद्देशानुरूप रुग्णालयाच्या कार्याची प्रगति झपाट्यानें होऊं लागल्यामुळें सदर रुग्णालयास कायम स्वरूप देऊन तें स्वतःच्या इमारतींत नेण्याची जरूरी वर्ष दोन वर्षांतच भासूं लागली, व त्याकरितां एक वजनदार गृहस्थांची 'इमारत व कायमनिधि कमिटी' नेमण्यांत आली. सदर कमिटीच्या प्रयत्नानें रा. ब. हणमंतराम रामनाथ यांनीं कांहीं अटींवर ५० हजार रुपये देण्याचें अभिवचन दिलें व चालकांनींही आणखी ५० हजार रुपये इतर लोकांकडून जमविले. इतकी तयारी झाल्यानंतर शहर म्युनिसिपालिटीनें केवळ नांवापुरती भाड्यानें व ४९९ वर्षांच्या करारानें दारुवाल्याचे पुलाजवळील सुमारें दोन एकर जागा सदर रुग्णालयास प्रथम

दिली व मागाहून आणखी एक एकर जागा देण्या-चेंही ठरविलें. याच वेळीं मूळ संस्थापक 'राष्ट्रीय शिक्षण मंडळ पुणें', रा. ब. हणमंतराम रामनाथ व पुणें शहर म्युनिसिपालिटी या तिघांच्या संम-तीनें सदर हॉस्पिटलची एक कायमची योजना ठरली व त्याप्रमाणें सदर रुग्णालयास 'शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल' असें नांव देण्यांत येऊन हॉस्पिटलची व्यवस्था ट्रस्टडीड-प्रमाणें होत आहे. ट्रस्टडीडप्रमाणें सदर हॉस्पिटलचें नांव 'शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल पुणें' असें रहावयाचें असून त्याचे उद्देश आरंभीं दिलेलेच कायम करण्यांत आलेले आहेत. महाविद्यालयाच्या आयुर्वेदाकडील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाचें कायमचें बंधन उद्देशांत नमूद केलेलें आहे. या हॉस्पिटलचे (१) शहर म्यु. चे त्या त्या वेळचे अध्यक्ष, (२) रा. ब. हणमंतराम रामनाथ यांचे तर्फे एक, व (३) राष्ट्रीय शिक्षण मंडळातर्फे एक असे तिघे ट्रस्टी असावयाचे आहेत. व हॉस्पिटलची व्यवस्था शहर म्यु.निसिपालिटी-तर्फे ६, रा. ब. हणमंतराम रामनाथ यांचे तर्फे २ देणगीदारांतर्फे ३ व राष्ट्रीय शिक्षण मंडळातर्फे ४ अशा पंधरा प्रतिनिधींच्या कार्यकारी मंडळानें पहावयाची आहे. इमारतफंड व कायमनिधि मंडळानें एकंदर जमविलेल्या एक लाख रुपयां-पैकीं ६० हजार रुपये खर्च करून हॉस्पिटलची इमारत बांधण्यांत आली असून ती सर्व साहित्यानें सुसज्जित केलेली आहे. राहिलेले ४० हजार रुपये ट्रस्टींच्या नांवानें कायम फंड म्हणून ठेविले आहेत. त्याचें व्याज हॉस्पिटलच्या चालू खर्चाकरितां घेतलें जातें. शिवाय शहर म्युनिसिपालिटीनें चालू खर्चाकरितां दरसाल ५ हजार रुपये देण्याचा करार करून दिला आहे. परंतु हॉस्पिटलचा सध्यांचा चालू खर्च वार्षिक १५ हजार रुपयेपर्यंत गेलेला आहे. त्यामुळें आणखी दहा हजार रुपये ज्याचें व्याज येईल इतका कायमनिधि जमविणें आवश्यक झालें आहे व तें काम सध्यां चालू आहे. हॉस्पिटलमध्यें राहत्या २५ रोग्यांची सोय सध्यां केली आहे. सर्व तऱ्हेच्या शस्त्रक्रिया करण्यास योग्य असें 'लो. टिळक शस्त्रकर्ममंदिर' बांधण्यांत आलें आहे व तेथें सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया होत असतात. महिन्यास सरासरी २० शस्त्रक्रिया होतात. बाहेरून औषधास येणारे रोगी सरासरी रोजचे २५० असतात. हॉस्पिटलमध्यें संपूर्ण वेळ काम करण्या-करितां ३ आयुर्विद्याविशारद नेमण्यांत आले आहेत. व शिवाय महाविद्यालयांतील अध्यापक वर्गापैकीं वैद्य व डॉक्टर आपआपल्या शाखेचें काम हॉस्पिटलमध्यें निर्वेतन करतात. या हॉस्पिटलचा उपयोग शहरांतील सर्व वर्गांच्या व जातींच्या लोकांना होतो. हॉस्पिटलला मदत करणारांमध्येंही सर्व दर्जाचे लोक आहेत. संस्थेला मुख्य आश्रय रा. ब. हणमंतराम रामनाथ, शहर म्युनिसिपालिटी पुणें व टिळक महाविद्यालय यांचा आहे. संस्थेचें कार्य लोकांना पसंत पडल्यामुळें सर्व लोकांची सहानुभूति आहे. कार्याचे दृष्टीनें आजची स्थिति आशाजनक आहे. परंतु आर्थिक स्थिति फार विकट आहे. प्रगतीचें पत्रक त्रोटकः—

	१९२५–२६	१९२६–२७	१९२७–२८	१९२८–२९	१९२९–३०	१९३०–३१	१९३१–३२
नवीन रोगी	४७२७	५३९४	५८९१	६५९३	६०१९	५२३०	८१५२
एकूण रोगी	२७७१९	२९४२९	३२७५५	३६१३६	३२६४०	३६६६४	६४७७२
प्रवेशित रोगी	३१	४७	८०	६४	९५	१२६	२९१
शस्त्रक्रिया	५	१२	८	८	२५	११	८३
स्पृश्या-स्पृश्य हिंदु	४४७९	४९८८	५१५८	५८३४	५४७७	४५४३	६९८५
मुसलमान	५५६	६१०	७७६	७९६	६९९	५७१	१०४८
ख्रिस्ती वगैरे इतर धर्मी	४३	१७७	४१५	४०८	३७४	४२१	३११

५१ **श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी** पुणें–स्थापना १९१६. संस्थापक प्रो. धों. के. कर्वे. उद्देश (१) कॉलेजें चालविणें, किंवा कॉलेजांस मदत करणें, Faculty of Art च्या परीक्षा घेणें. (२) युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळण्यासाठीं होणाऱ्या परीक्षेस तयार करणारीं हायस्कुलें चालविणें व देखरेख करणें. (३) शिक्षकांसाठीं नॉर्मल स्कूलपरीक्षा घणें व नॉर्मल स्कूलसना साहाय्य करणें. कार्य–१९१६ पासून १९३१ पर्यंत वेगवेगळ्या परीक्षेंत पास झालेल्या मुलींची एकंदर संख्या एफ्. वाय. ए. १५०, एस्. वाय्. ए. १०८, जी. ए. ७६, प्रवेशपरीक्षा ३७३, नॉर्मल स्कूल (शेवटलें वर्ष) ५६; १९३२ च्या परीक्षेस बसलेल्या मुलींची संख्याः–एफ्. वाय्. ए. ६७, एस्. वाय्. ए. ३२, जी. ए. २३, नॉर्मल स्कूल (दुसरें वर्ष) १०, एन्ट्रन्स २५३. युनिव्हर्सिटीनें चालविलेल्या व तिची मान्यता असलेल्या सर्व कॉलेजांतून १९३१–३२ या वर्षांत मुलींची संख्या ११४ आहे. इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटीची मान्यता असलेल्या मुलींच्या शाळा १२ आहेत. इतर कॉलेजांशीं या युनिव्हर्सिटीचीं कॉलेजें बरोबरी करूं शकतात असें म्हणतां येईल. सध्यां उच्च शिक्षणार्थ युनि. पुढीलप्रमाणें खर्च करते. रु. ४००० अहमदाबाद येथील गुजराथी महिला पाठशाळेस ग्रँट; रु. १६००० पूना कॉलेजप्रीत्यर्थ खर्च. १९३१–३२ या वर्षी पांच शाळांनीं मंजुरी मिळण्यासाठीं अर्ज केले. त्यांपैकीं दोहोंत मराठी, एकींत गुजराथी, एकींत सिंधी व एकींत तेलगू भाषेंत शिक्षण दिलें जातें. या शाळांपैकीं एक दक्षिण हैद्राबाद, दोन मध्यप्रांत, एक सिंध व एक गुजराथ येथील आहेत. १९१६–३१ या वर्षांत युनि.ची मान्यता मिळालेल्या शाळांची व मुलींची संख्या पुढीलप्रमाणें आहेः–

वर्षे	शाळांची संख्या	मु. संख्या
१९१६	१	१२५
१९२१	५	८०८
१९२६	१४	९९८
१९३१	१५	११५०

पुढील कोष्टकावरून युनि. दुय्यम शिक्षणावर खर्च किती करते तें दिसून येईलः—

कन्याशाळा, पुणें सन १९२५-११४९५रु. १९२७–९४९६ रु. १९२९–१०५००रु. १९३१–८५०० रु.; कन्याशाळा, मुंबई सन–१९२५–८०८०रु. १९२७–८६३१ रु. १९२९–९३०६ रु. १९३१–९५०० रु.; युनि. मान्यता असलेल्या संस्थांना ग्रँट सन १९२५–१६००० रु. १९२७–१७५०० रु. १९२९–१९००० रु. १९३१–१७००० रु. एकूण १९२५ साली ३५५७५ रु. १९२७–३५६२७ रु. १९२९–३८८०६ रु. १९३१–३५००० रु. वनिता विश्राम मुंबई–सन १९२५–३००० रु. १९२७–३००० रु. १९२९–३००० रु. १९३१–३००० रु. एकंदर रक्कम सन १९२५–३८५७५रु. १९२७–३८६२७ रु. १९२९–४१८०६ रु. १९३१–३८००० रु. १९३१ त पुणें कन्याशाळेस सरकारी ग्रँट रु. १००० १९३१ त मुंबई व पुणें येथील हायस्कुलांतील मुलींची संख्या सुमारें ८०० व त्यांप्रीत्यर्थ एकंदर खर्च रु. ३३६००.

५२ **सरस्वती मंदिर संस्था**, पुणें स्थापना १९२० आरंभ–पुण्यास महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें प्रचंड काम चालू असतां त्याच्या संपादक वर्गाला आपण मिळवीत असलेलें अफाट, सर्वांगीण ज्ञान शक्य तर फावल्या वेळांत इतरांस निरपेक्षपणें करून द्यावें अशी सात्त्विक इच्छा होऊन, आरंभ म्हणून त्यांनीं दिवसा काम करीत असणाऱ्या शिक्षणेच्छू लोकांसाठीं एक रात्रीचें हायस्कूल 'पूना नाइट हायस्कूल' या नांवानें काढलें. याच्या चालक मंडळींत प्रमुख म्हणजे श्री. यशवंत रामकृष्ण दाते व श्री. चिंतामण गणेश कर्वे हे ज्ञानकोश संपादक असून, त्यांनीं या शाळेची उपयुक्तता समाजास लवकरच पटवून दिली. दिवसा निरनिराळ्या धंद्यांत असणाऱ्या कामगारांना आपलें हायस्कूलचें शिक्षण पुरें करून आपल्या कार्यक्षमतेंत व आर्थिक स्थितींत भर घालतां येऊं लागली. या शाळेंतून उत्तीर्ण झालेले ट्रेन्ड शिक्षक ऑफिसर व सुपरवायझर होऊं लागले. रेव्हेन्यू खात्यांतले कारकून अव्वल कारकून (महालकरी) झाले. याप्रमाणें आज बारा वर्षें ही रात्रीची शाळा मुंबई विश्वविद्यालय व सरकारी शिक्षणखातें यांच्या मान्यतेनें चांगली चालत आहे. रजिस्टर्ड संस्था–याप्रमाणें आरंभ केलेलें आपलें पहिलें कार्य यशस्वी होत असलेलें पाहून, चालकांनीं संस्था १८६०च्या २१व्या कायद्याप्रमाणें (चॅरिटेबल इन्स्टिटयूशन म्हणून) इतर संस्थांप्रमाणें घटना-उद्देश ठरवून रजिस्टर करून घेतली. (१) शिक्षण व वाङ्मय यांचा प्रसार करणें, (२) शिक्षणविषयक संस्था स्थापन करणें व त्या चालविणें, व (३) ग्रंथलेखन, मुद्रण व प्रकाशन यांद्वारें ज्ञानाचा प्रसार करणें, हे या संस्थेचे उद्देश निश्चित करण्यांत आले आहेत. पेट्रन, फेलो आणि लाइफ

मेंबर, व सिंपथायझर यांनीं ही संस्था (अ) कौन्सिल, (आ) मॅनेजिंग बोर्ड व (इ) ट्रस्टी यांमार्फत चालवावयाची असें घटनेंत असून याप्रमाणें संस्था आजवर चालत आलेली आहे. यंदा जास्त व्यापक प्रमाणावर संस्थेचे नियम, पोटनियम तयार करून घेण्याचें काम चालू आहे. पुढील सालच्या अहवालांत त्याची माहिती येईलच. पूना नाइट हायस्कूल–ही संस्थेची पहिली शाखा, १ ऑगस्ट १९२० रोजीं स्थापन झाली. शाळा रात्रीं ७–१० भरत असून इंग्रजी पहिली ते सातवी असे सर्व हायस्कूलवर्ग हींत आहेत. (विद्यार्थ्यांकरितां स्वतंत्र पुस्तकालय, शास्त्रीय प्रयोगालय व क्रीडांगण हीं आहेत. मधून मधून तज्ज्ञांचीं शिक्षणविशयक व्याख्यानें केलीं जातात). विद्यार्थी शाळेंतूनच मॅट्रिक परीक्षेस पाठविले जातात आजपर्यंत सुमारें १०४ विद्यार्थी मॅट्रिक उत्तीर्ण झाले आहेत. सुमारें शंभर सवाशें विद्यार्थी पटावर असतात, त्यांची गुदस्तांची धंदेवारी अशी १४ शिक्षक, १५ कारकून, ४ कंपाझिटर, ६ शिंपी, २ पाटचा रंगविणारे, १६ दुकानदार, ३ फिटर, २ नकसकाम करणारे, ४ फोटोग्राफर, ४ पट्टेवाले, ७ मोटार ड्रायव्हर, १ विणकर, १ सोनार, १ टायपिस्ट, व २० खाजगी कामांत असणारे. दिवसाच्या हायस्कूलप्रमाणें सर्व साधनांची व शिक्षणाची एकंदर तरतूद शाळेंत आहे. १६०० रुपये सरकारी ग्रँट मिळते. विद्यार्थी थोडे असल्यामुळें ग्रँट व फी यावर खर्च भागत नाहीं. शिक्षक व चालक यांच्या स्वार्थत्यागामुळेंच संस्था टिकून आहे. १९३१ सालीं फी व सरकारी ग्रँट मिळून रु.५६५३ उत्पन्न जमा झालें व रु. ९१४१ खर्च झाला. त्यामुळें रु. ३४८८ संस्थेस घालावे लागले. रा. य. रा. दाते हे पहिलीं १० वर्षें शाळेचे सुपरिंटेंडेंट होते सध्यां श्री. चिं. ग. कर्वे हे या शाळेचे सुपरिटेंडेंट आहेत. पूना इंग्लिश स्कूल–संस्था व रात्रीची शाळा यांत काम करण्यास केवळ संस्थेवरच अवलंबून असणारे आजीव सेवक मिळावेत म्हणून सरकार व विश्वविद्यालय यांच्या सूचनेवर हें दिवसाचें हायस्कल १९२६ सालीं काढलें. प्रथम पहिल्या इंग्रजी तीनच इयत्ता होत्या.पुढें पुढचे वर्ग जोडीत यंदा तें सबंध हायस्कूल झालें आहे. शुक्रवार–सदाशिव या पेठांच्या सांध्यावर कोणतीच शाळा नसल्यानें या भागांतील विद्यार्थ्यांना या शाळेचा फार उपयोग होतो. चालू सालीं पटावर २७५ विद्यार्थी आहेत. शारीरिक शिक्षण सक्तीचें आहे. गेल्या वर्षीं या शाखेचें उत्पन्न रु. ३७३३ झालें व खर्च रु. ५५६९ झाला. बाकीचे रु. १८३६ संस्थेस घालावे लागले. व्हर्न्यांक्युलर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या एका वर्षांत इंग्रजी पहिल्या तीन यत्ता करून घेण्याची परवानगी दोन वर्षांपासून शाळेला आहे. तेव्हां त्या वर्गाच्या दोन तुकडचा असून विद्यार्थी ५० वर आहेत. शाळेंतील एक शिक्षक बी. टी. असून बाकीचे बहुतेक एस्. टी. सी. आहेत. पदवीधरांची संख्या जास्त आहे. कोणत्याहि बाबतींत इतर मोठ्या शाळांपेक्षां ही मागें नाहीं. यासाठीं संस्थेला पदरचा बराच खर्च करावा लागतो. कारण सरकारी ग्रँट मुळींच नाहीं व विद्यमान काटकसरीच्या सरकारी परिस्थितींत कांहीं वर्षें ती मिळेल असेंहि वाटत नाहीं. श्री. द. गो. फडके हे तूर्त शाळेचे सुपरिटेंडेंट आहेत. पुणें जिल्ह्यांतील इंग्रजी वर्ग–खेडचांतून शहरांतल्याप्रमाणें शैक्षणिक वातावरण निर्माण करावें व खेडीं सुधारावींत या उद्देशानें संस्थेनें १९२५ सालीं, पूना नाइट हायस्कूल आतां सुरळीत चालेल असें पाहून खेडचांतील इंग्रजी शिक्षणाचें कार्य प्रथम हातीं घेतलें. आरंभीं पुणें जिल्ह्यांत खेड, आळें, ओतूर, घोडें व सुपें या पांच ठिकाणीं लोकल–बोर्डाच्या मराठी पांच,सहा,सात या यत्तांना जोडून चालावयाचे इंग्रजी १–२–३ वर्ग काढले. संस्थेंतून एका शिक्षकाची त्या त्या गांवीं रवानगी होऊन शिक्षणाचें काम उत्तम चालू झालें. जिल्हाबोर्डाची ग्रँट व सरकारी मान्यता मिळाली. हळूहळू पांच शाळांच्या बारा शाळा झाल्या. खेडचांतील संस्थचा शिक्षक खेडचांतील लोकांना अनेक प्रकारांनीं उपयोगी पडावा व ग्रामोद्धाराचा कांहीं उपक्रम संस्थेकडून यशस्वी व्हावा म्हणून प्रयत्न करण्यांत आले. पण अद्याप हें ग्रामोद्धाराचें कार्य बाल्यावस्थेंतून बाहेर पडलें नाहीं. सरकारी व सार्वजनिक, व विशेषतः स्थानिक मदतीच्या अभावीं संस्थेनें आंखलेला व्यापक कार्यक्रम अपूर्ण स्थितींत आहे. सुमारें २५० विद्यार्थी या शाळांतून आहेत. पांच हजारांपर्यंत दरसाल खर्च होतो. सध्या रा. य. रा. दाते हे या शाखेचें काम पहातात. संस्थेनें दिवसाच्या इंग्रजी शाळेला जोडून लहानशी मराठी शाळा नुकतीच उघडली आहे. त्यांत ७५ विद्यार्थी आहेत. प्रकाशनकार्य–विविध विषयांचें ज्ञान सोपीं व क्रमिक पुस्तकें लिहून व मासिक चालवून विद्यार्थ्यांना द्यावें या हेतूनें (१) आफ्रिका, (२) हिंदुस्थान हीं दोन भूगोलाचीं पुस्तकें संस्थेनें प्रसिद्ध केलीं. 'सरस्वती मंदीर' नांवाचें एक त्रैमासिक चालविलें आहे.

५३. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, पुणें:—सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी अर्थात् भारत सेवक समाज या संस्थेची स्थापना कै. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनीं ता. १२ जून सन १९०५ रोजीं केली. सत्तावीस वर्षांपूर्वी जेव्हां भारत सेवक समाजाची स्थापना करण्यांत आली त्यावेळची राजकीय, सामाजिक व शैक्षणिक परिस्थिति आतांच्या सारखी नव्हती. ही संस्था काढण्याचा उद्देश हा होता कीं, ज्या प्रकारें हिंदुस्थानची उन्नति होईल, त्या तऱ्हेनें काम करणारे निःस्वार्थी प्रचारक तयार करावयाचे. कै. नामदार गोखले यांच्या मनावर ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कामाचा व पद्धतीचा परिणाम झाला असल्याकारणानें, हिंदुस्थानची प्रगति मिशनरी पद्धतीनें काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्याकडून होणारी आहे, व ती एकटच्या दुकटयाच्यानें न होतां संघात्मक पद्धतीनेंच होईल, अशा विचारानें त्यांनीं या समाजाची स्थापना केली. या सोसायटीच्या धर्तीवर कै. लाला लजपतराय यांनीं 'सर्व्हंट्स् ऑफ दि पीपल्स सोसायटी' लाहोरास काढलेली आहे. अशा प्रकारच्या संस्था अलीकड राजकीय कार्यक्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांत निघत आहेत. परंतु आपल्या देशाच्या अभ्युदयासाठीं स्वार्थत्यागानें काम करणाऱ्या हिंदी मिशनरी लोकांची ही टोळी प्रथम स्थापन झाली. कै. नामदार गोपाळराव गोखले यांनीं श्री. गोपाळ कृष्ण देवधर, श्री. नटेश आप्पाजी द्रवीड व श्री. अनंत विनायक पटवर्धन या अगदीं स्थापनेच्या वेळच्या आपल्या पहिल्या तीन सहकाऱ्यांत फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर उभें राहून दशदिशांस साक्षी ठेवून देशहित साधण्याची व जन्मभर आत्मयज्ञ करण्याची शपथ घेतली. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ही फर्ग्युसन कॉलेज टेकडीच्या पायथ्याशीं आहे; सोसायटीची एक लायब्ररी असून पुस्तकांचा संग्रह मोठा आहे. राजकारण व अर्थशास्त्र या विषयांवरील सोसायटीच्या संग्रहांतील पुस्तकें आजतागायतचीं आहेत. गेल्या सत्तावीस वर्षांच्या अवधींत सोसायटीच्या कार्यक्षेत्राचा पसारा बराच वाढलेला असून हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणीं सोसायटीच्या शाखा व केन्द्रें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. त्या ठिकाणीं सोसायटीनें आपले सभासद पाठविलेले आहेत. पुणें हें मुख्य केंद्र असून मुंबई, मद्रास, नागपूर व अलाहाबाद येथें सोसायटीच्या शाखा आहेत; याशिवाय लखनौ, मायानूर, कटक, कालिकत व लाहोर या ठिकाणीं उपकेन्द्रें आहेत. सोसायटीच्या विद्यमानें 'सर्व्हंट ऑफ इंडिया' व 'हितवाद' हीं साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक इंग्रजी पत्रें पुणें व नागपूर येथें अनुक्रमें प्रसिद्ध होत असतात; 'ज्ञानप्रकाश' हें मराठी दैनिक पुण्यास प्रसिद्ध होतें. याशिवाय कांहीं सभासद दुसरीं कांहीं वृत्तपत्रें दुसऱ्या संस्थांच्या विद्यमानें प्रसिद्ध करीत असतात. सोसायटीचे पहिले अध्यक्ष कै. नामदार गोखले होते. त्यांच्या मृत्यूनंतर नक नामदार श्रीनिवासशास्त्री हे अध्यक्ष झाले. व ते दक्षिण आफ्रिकेस हिंदुस्थान सरकारचे एजंट म्हणून गल्यावर श्री. गोपाळ कृष्ण देवधर यांची अध्यक्षस्थानीं निवड झाली व आजतागायत तेच अध्यक्ष आहेत. सध्यां सोसायटीचे उपाध्यक्ष, अलाहाबाद शाखेचे प्रमुख पंडित हृदयनाथ कुंझरू हे असून सेक्रेटरी श्री. पी. कोदंडराव आहेत. सोसायटीचे सभासद २६ असून कायमचे सदस्य तीन आहेत व प्रोबेशनर्स म्हणन पांच गृहस्थ आहेत. राजकारण हें सोसायटीच्या विविध अंगांपैकीं एक आहे; सोसायटीचें कार्यक्षेत्र राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक असून अस्पृश्योन्नति हाहि एक प्रमुख विभाग आहे. राजकारणांत कै. ना. गोखले, ने. ना. श्रीनिवासशास्त्री व पंडित हृदयनाथ कुंझरू यांची कामगिरी प्रसिद्धच आहे. सामाजिक प्रश्न, सहकारी चळवळ व ग्रामोद्धार या प्रश्नांस श्री. गो. कृ. देवधरांनीं स्वतःस वाहून घेतलें आहे. मद्रास इलाख्यांतील सभासदांनीं सहकारी चळवळ व ग्रामसंघटना या प्रश्नांकडे लक्ष दिलेलें असून तिकडे या चळवळीचा प्रसार फार झाला आहे. मद्रास शाखेचे प्रमुख श्री. वेंकटसुबय्या आहेत. मजुरांची चळवळ श्री. ना म. जोशी व श्री. र. रा. बखले यांनीं हातीं घेतली आहे. संस्थानी प्रजेची चळवळ श्री. ठक्कर, श्री. पटवर्धन व श्री. वझे यांच्याकडे आहे. भिल्लांच्या उन्नतीसाठीं श्री. ठक्कर झटत असतात. बालवीर चळवळींत श्रीराम वाजपेयी यांनीं संयुक्त प्रांतांत मोठी कामगिरी केली आहे. वृत्तपत्राच्या धंद्यांत सोसायटीचे सात सभासद गुंतलेले आहेत. दोन वर्षांपूर्वी सातारचे रा. ब. काळे यांनीं दिलेल्या एक लाख रुपयांच्या देणगींतून 'गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स' ही संस्था काढण्यांत आली. या संस्थेचा उद्देश आर्थिक प्रश्नांचें संशोधन करणें हा आहे. संस्थेचें संशोधनकार्य चालूं झालें असून संस्थेचे प्रमुख प्रि. धनंजय रामचंद्र गाडगीळ हे आहेत.

५४. सार्वजनिक सभा, पुणें:—स्थापना

संस्थापक, हेतु व इतर माहिती:—पुणें सार्वजनिक संस्थेची स्थापना शके १७९२ चे चैत्र शुद्ध प्रतिपदा (तारीख २ एप्रिल१८७०) या सुमुहूर्तावर पुणें पेठ सदाशिव यथें श्रीमंत पंतप्रतिनिधिसाहेब संस्थान औंध यांचे वाड्यांत श्रीमंतांचे हस्तेंच झाली. न्यायमूर्ति माधवरावजी रानडे व गणेश वासुदेव जोशी हे सभेच्या मूळ उत्पादकांपैकीं होते. पहिलीं कांहीं वर्षे हे सभेचे चालक व आधारस्तंभ होते. पेशवाई नष्ट झाल्यावर सुमारें ५० वर्षेपर्यंत सार्वजनिक हितबुद्धीची भमि पडिक पडली होती. लोक वेगळे व सरकार वेगळें, व त्यांतूनही सरकार विजातीय जातीचें, ही गोष्ट ध्य.नांत घेतां, या नव्या काळांत पूर्वीहून निराळ्या पद्धतीचा अवलंब केला पाहिजे ही गोष्ट त्या वेळच्या पुढाऱ्यांच्या ध्यानांत आली. सरकार करावयाचें तें कदाचित् अखेर एकाचेंच ऐकून करील, पण अनेकांनीं एकादी गोष्ट म्हटली असतां तिचा विचार करण्याचा बहाणा तरी सरकारास केल्याविना गत्यंतर नाहीं, या विचारानें सार्वजनिक सभा स्थापन झाली. पर्वती संस्थानच्या कारभारासंबंधानें सरकारास लोकमत कळविण्याकरितां पुण्यास जी एक जाहीर सभा—कदाचित् पहिलीच—भरली, ती या सभेचें उगमस्थान होय. प्रथमचे अधिकारी पुढीलप्रमाणें—अध्यक्ष—श्रीमंत श्रीनिवासराव पंतप्रतिनिधि, संस्थान औंध, उपाध्यक्ष, भोरकर, जमखिंडीकर, सांगलीकर, कुरुंदवाडकर, मेणवलीकर, पुरंदरे, चिटणीस—श्री. राजमाचीकर, गं. वि. गोखले, वा. कृ. गोखले, ग. वा. जोशी व पां. दि. कर्वे. सांपत्तिक स्थिति:—सभा स्थापन झाल्यानंतर महिन्याचे आंतच श्रीमंत सांगलीकरांनीं ५०० रु. दिले. १८७४ त होळकर सरकार यांजकडून ८००० रु.ची. देणगी मिळाली, १८८०त, ६६०० रु. सांगलीकरांकडून १८८५ त बडोदे-सरकारकडून रु. ४०००; १८८८ त ठाकूरसाहेब गोंडळ यांजकडून ५००; १८९१ त दरभंग्याचे महाराजांकडून २००० रु.; १८९४ त कोल्हापूर महाराजांकडून ५०० रु. न्या. रानडे यांनीं १८९५ पासून १००० रु. च्या प्रॉ. नोटांचें व्याज दरसाल रु. ३५ सुरू केलें तें अजून चालूं आहे. पहिले वर्षी सालअखेर जमा २५८३ रु. खर्च १६७७ रु.झाला. १८८४ त सभेनें १५००० रु. ची इमारत खरेदी केली. यापूर्वीं सभा सांगलीकर यांचे वाड्यांत भरत होती. पुढें फडतरे यांचे वाड्यांत व नंतर विश्रामबागेजवळील नगरकरांचे वाड्यांत भरत असे. सभासद—पहिल्या दिवशीं सभा स्थापनसमयीं ९५ मुखत्यार हजर होते. आजमितीस पटावर एकंदर १४५ सभासदांचीं नांवें आहेत. प्रचारकार्य:—पहिला जाहीर अर्ज सार्वजनिक सभेनेंच लिहिला, पहिलें त्रैमासिक १८७८ त सभेनेंच काढलें, पहिला उपदेशक व प्रचारक सभेनेंच बाहेर पाठविला, पहिली स्वदेशीची चळवळ सभेनेंच केली. बडोद्याचे मल्हारराव महाराज यांचेवर आलेल्या प्रसंगाचे वेळीं सभेनें दाखविलेली तडफ, १८७७—७८ सालचे भयंकर दुष्काळाचे वेळीं सभेनें केलेलें काम, लॉर्ड रिपन साहेबांनीं १८८२ च्या मे महिन्यांत स्वराज्याचा उपक्रम केला त्यावेळीं सभेनें केलेली कामगिरी, क्राफर्ड प्रकरणाचे वेळेस माफीच्या कायद्याबद्दल केलेली चळवळ वगैरे महत्त्वाच्या बाबी सभेच्या पहिल्या पंचवीस वर्षांच्या इतिहासांतील आहेत. प्रथम पुणें शहराचे सुधारणेकडे सभेनें लक्ष दिलें,दारूचीं दुकानें कमी व्हावीं अशी खटपट केली, लवकरच तिचें लक्ष सार्वजनिक व सर्वदेशीय विषयांकडे लागलें. १८७१त मुंबई हायकोर्टांत एतद्देशीय न्यायाधीश नेमावा अशी सूचना सभेनें केली. मॉरिशस बेटांत हिंदी मजुरांची स्थिति फार कष्टमय झाली होती. त्या परिस्थितीचें वर्णन लिव्हरीज नांवाच्या एका गृहस्थानें १८७५ सालीं एका पुस्तकांत केलें. परंतु त्यापासून त्यास त्रास होऊन नुकसानही झालें. तें नुकसान भरून देण्याकरितां वर्गणी जमविण्याची खटपट सार्वजनिक सभेनें केली. १८७८ च्या देशी वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणाऱ्या कायद्याविरुद्ध सभेनें जोराची चळवळ केली. पाटबंधारे बांधून शेतीस उत्तेजन देण्याबद्दल सभेनें बरेच अर्ज केले. रायगडावरील श्रीशिवाजी महाराजांच्या छत्रीच्या जीर्णोद्धारासाठीं हिराबागेंत सभा भरवून सभेनें उपक्रम केला. मिठावरील कर कमी करणें, अबकारी खात्यांत सुधारणा करणें, कायमधाऱ्याची पद्धत सुरू करणें इ. बाबतींत सभेनें सरकारास अर्ज करून हरएक प्रकारें खटपटही केली आहे. आजची स्थिति— सभेतर्फे १८५३ शके, या वर्षी ६ जाहीर सभा झाल्या.हवेली तालुक्यांत महामारीचा उपद्रव चालू आहे असें कळल्यावरून सभेचे चिटणीस श्री. बापट यांनीं सदर तालुक्यांतील २० गांवीं जाऊन तेथें लोकांस सभेतर्फे मोफत औषधोपचार केले. शके १८५३ या वर्षी सभेच्या दिवाणखान्यांत निरनिराळ्या संस्थांमार्फत एकंदर २७ सभा भरल्या. त्याचा खर्च व व्यवस्था सार्वजनिक सभेनेंच ठेविली. शके १८५३ सर सालीं जमा २१७२८३८१ व सर सालीं खर्च

२०९९८९८३. शके १८५४ चें कार्यकारी मंडळ- अध्यक्ष, न. चिं. केळकर; उपाध्यक्ष, नामदार खापर्डे, हणमंतराम रामनाथ, भा. ब. भोपटकर वा. मो. पोतदार, दा. वि. गोखले, चिटणीस- श्री. वा. कृ. भावे व श्री. स. वि. बापट.

५३ सेवासदन सोसायटी, पुणें:— संस्थापक--या संस्थेचे संस्थापक श्री. गोपाळ कृष्ण ऊर्फ बाबासाहेब देवधर सी. आय्. ई. एम्. ए. हे होत. संस्थेच्या संस्थापनेची तारीख २-१०-१९०९ ही होय. आरंभीं ही संस्था मुंबईच्या सेवासदनाची शाखा म्हणून सुरूं झाली. पुढें स्वतंत्र व्यवहाराची कायदेशीर जरूर असल्यामुळें ती ता. १२-१०-१९१७ रोजीं, सन १८६० च्या २१ व्या ॲक्टान्वयें रजिस्टर करण्यांत येऊन पूर्णपणें स्वतंत्र झाली. संस्थेच्या स्थापनेपासून श्री. बाबासाहेब देवधर हे तिचे ऑनररी ऑर्गनायझर आणि जनरल सेक्रटरी आहेत. मूळ इतिहास:— श्री. बाबासाहेब देवधर हे येथील लष्करमध्यें सन १८९२सालीं ख्रिश्चन मिशनरी संस्थेमार्फत चाललेल्या मुलींच्या अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलचे हेडमास्तर होते. त्यावेळीं मिशनरी मंडळींची स्त्री-शिक्षणाविषयींची आस्था पाहून, त्यांना तसलेंच कार्य करण्यांत आपलें आयुष्य वेंचण्याची कल्पना उद्भूत झाली; पण ती प्रतिकूल परिस्थितीमुळें मनांतच राहिली. पुढें ते एम्. ए. होऊन सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे तहाहयात सेवक झाले, तेव्हां दुष्काळांत व प्लेगच्या दिवसांत संकटग्रस्तांना मदत करण्याचे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले. अशा प्रसंगीं स्त्रियांवर येणाऱ्या आपत्ति फारच हृदयभेदक असतात. असले आपत्प्रसंग निवारण्याची व्यवस्था लावल्याशिवाय राहणें हें त्यांच्या हृदयास मोठें दडपण वाटूं लागलें. म्हणून स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनवावें, व तेंच कार्य पुढेंही तसेंच चालूं ठेवावें याकरितां स्त्री-शिक्षणाचें कार्य चालविणारी एखादी संस्था असण्याची त्यांची प्रस्तुत मनीषा जोरानें पुढें येऊं लागली. तीस पुढील संधि मिळाली. सन १९०६ सालीं श्री. बाबासाहेब देवधर हे प्लेगची आपत्ति निवारण्याची खटपट करीत होते. त्यांनीं स्त्री-वर्गाला मदत करणें सुलभ व्हावें, म्हणून एक स्त्री स्वयंसेविका दल स्थापन केलें. त्यांत त्यांना सर्व जातींच्या व धर्मांच्या स्त्रिया मिळाल्या. प्रमुख स्त्री-मंडळींत कै. श्री. रमाबाई रानडे, श्री. अन्नपूर्णाबाई आपटे, श्री. जानकीबाई भट व श्री. यमुनाबाई भट या असून शिवाय कै. सौ. सीताबाई परांजपे, श्री. सीताबाई डुकले, कै. मिस् सोराबजी, मिस् हिराबाई पदमजी आणि सौ. सीताबाई भांडारकर यांचाही उल्लेख करणें योग्य होईल. तथापि ही संस्था कार्याच्या मानानें फारच अल्प होती. कारण सार्वजनिक कार्याची स्वयंस्फूर्तीनें आवड बाळगणाऱ्या शिक्षित स्त्रियाच मुळीं त्या वेळीं कमी होत्या. शिवाय डॉक्टरणी व परिचारिका यांची तर अत्यंतच दुर्मिळता भासली. या सर्व गोष्टींची सोय लागणें आवश्यक होतें. श्री. बाबासाहेब देवधर यांनीं या बाबतींत पुढाकार घेऊन आपली स्त्री-शिक्षण-योजनेविषयक कल्पना वरील स्वयंसेविका-दलांतील प्रमुख स्त्री मंडळीपुढें मांडली, तेव्हां त्यांनीं कार्याचें महत्त्व जाणून तीस पूर्ण पाठिंबा दिला. कै. श्री. रमाबाई साहेब यांनीं या कार्यांत आमरण भाग घतला. आणि श्री. जानकीबाई भट, श्री. यमुनाबाई भट या अजूनही संस्थेंत निःस्वार्थ बुद्धीनेंच कामें करीत आहेत. या कार्यास मिळालेली पुरुषमंडळी क. डॉ. पी. व्ही. शिखरे, डॉ. व्ही. सी. गोखले, क. डी. एम्. पटवर्धन ही होत. याही मंडळींच्या निःस्वार्थ-बुद्धीच्या कार्यांनीं संस्थेस हल्लींचे सर्वांगीण उन्नतीचें स्वरूप प्राप्त झालें आहे. पुढें कार्यास मिळालेली स्त्री मंडळी:—कु. द्वारकाबाई भट बी. ए. बी. टी. या टी. डी. करतां विलायतेस गेल्या आहेत. सौ. सरलाबाई नाईक एम्. ए., श्री. ताराबाई पटवर्धन, व श्री. यमुनाबाई जोशी. पुरुष मंडळी श्री. जी. बी. गरुड बी. ए. हे नागपूर शाखेचे मुख्य आहेत. डॉ. एन्. एल्. रानडे. विविध कार्यें:—आरंभीचा वर्ग प्रौढ विधवा स्त्रियांचाच असून त्यांत प्राथमिक शिक्षण दिलें जाई. पुढें सर्व प्रकारच्या स्त्रियांकरितां विविध प्रकारच्या शिक्षणाची योजना करणें भाग पडलें. हल्लींचीं खातीं:—(१) प्राथमिक शिक्षण खातें-प्रौढ स्त्रियांचे वर्ग. इयत्ता १ ते ५ (२) बाई मोटली वाडिया ट्रेनिंग कॉलेज, शिक्षिकांचे वर्ग, दोन्ही वर्षें, (३) प्रॅक्टिसिंग स्कूल-इयत्ता बालवर्ग ते ६ वी, व इंग्लिश २ री, (४) हायस्कूल फॉर गर्ल्स-इयत्ता १ ते ७ (५) औद्योगिक खातें:—शिवणकाम, विणकाम, जरीचें व रंगाचें कामशिकण्याचे वर्ग, (६) महिला विजय प्रेस-छापखान्याचें काम शिकण्याचे वर्ग. स्त्रियांना उपयुक्त अशीं पुस्तकेंही या खात्यास जोडलेल्या प्रसिद्धी-खात्यामार्फत प्रसिद्ध होतात. (७) म्युझिक खातें-गायन-वादन-शिकण्याचे वर्ग (८) स्पेशल इंग्लिश क्लासेस्-नर्सिंग कोर्सकडे जाणाऱ्या मुलींचे वर्ग, (९) पब्लिक हेल्थ स्कूल-परिचारिका तयार

करण्याचे वर्ग (१०) नर्सिंग अँड मेडिकल कमेटी नर्सेस आणि डॉक्टरिणी तयार करण्याचें खातें. (११) बालसंगोपनगृह--बालसंगोपनाचें शिक्षण देण्याचे वर्ग, (१२) मॅटर्निटी होम—गोरगरीब व मध्यम स्थितींतील स्त्रियांना मदत देणें व संस्थेंत तयार झालेल्या नर्सेस व डॉक्टरिणी यांना प्रात्यक्षिक शिक्षण देणें. विद्यार्थिनींची संख्याः—आरंभीं फक्त १५ विद्यार्थिनी होत्या. पुढें संख्या वाढत जाऊन आतां ती १००० वर गेली आहे. यांत सर्व जातींच्या,धर्मांच्या व गरीब-श्रीमंतांच्या कुमारिका सुवासिनी व विधवा स्त्रिया असून अस्पृश्यांच्याही मुली आहेत. या सर्वांकरितां ६ वसतिगृहें आहेत. त्यांत संस्थेवर पूर्ण व भागशः अवलंबून असणाऱ्या मुली पुष्कळ असून कांहीं थोडया अवलंबून नसणाऱ्याही मुली आहेत. सांपत्तिक स्थितिः—आरंभीं कार्याच्या व्यापाप्रमाणें धनिकांची थोडीफार मदत मिळत गेली. ही मदत देणाऱ्यांत सर्व जातींच्या, वर्गांच्या व दर्जांच्या मंडळीचा समावेश होऊं लागला. पुढें सरकारी ग्रँटही मिळूं लागली, मासिक,वार्षिक व प्रासंगिक देणगी देणाऱ्यांचीही संख्या वाढूं लागली. हल्लीं संस्थेच्या मालकीच्या दोन लाखांच्या इमारती आहेत. त्या दोन लाखांच्या किंमतींत बराच मोठा भाग सर विठ्ठलदास ठाकरसी यांचा असून त्याच्या खालोखाल मदत वाडीया चारिटी ट्रस्टीकडून झालेली आहे, शिवाय सरकारी युरोपियन अधिकारी, संस्थानिक, व्यापारी, पारशी, भाटचे यांच्या स्त्री--पुरुष मंडळीचाही त्यांत समावेश होतो.बाई मोटली बाई वाडीया ट्रेनिंग कॉलेज तर वाडिया चारिटी ट्रस्टींच्या देणगीमुळेंच अस्तित्वांत आलें आहे. संस्थेची एकंदर जमा दरसाल सुमारें दोन लाखांपर्यंत असून खर्च सव्वादोन लाखांचा आहे. या तुटीकरितां लोकांकडे द्रव्याची याचना करावी लागते. संस्थेस यामुळें ६० हजारांचें कर्ज झालें आहे. तें कमी करण्याकडे चालकांचें लक्ष असून तें कमीही होत आहे. विस्तारः—पुणें सेवासदन संस्था ही सेवासदनच्या कार्यक्षेत्राचें मुख्य केंद्र समजलें जातें. तिच्या शाखाः—(१) अहमदनगर, (२) नाशिक, (३) सोलापूर, (४) बारामती, (५) अलिबाग, (६) गिरगांव—मुंबई,(७) फोर्ट—मुंबई (८) दादर—मुंबई, (९) नागपूर, (१०) सातारा (११) ग्वाल्हेर,यांपैकीं बऱ्याच शाखांना पुणें सेवासदन संस्थेंतून मदत होत असते. संस्थेमुळें—स्त्री—शिक्षणाची उत्कृष्ट सोय झाली. आतांपर्यंत शिकून स्वावलंबी बनलेल्या स्त्रियांची संख्या ९०० वर असेल. त्यांत दरमहा पंधरा रुपये मिळविणाऱ्या स्त्रियांपासून दरमहा तीनशें रुपये मिळविणाऱ्याही स्त्रिया आहेत. यांत नोकरी करणाऱ्या व पूर्ण स्वतंत्र उद्योग करणाऱ्याही स्त्रिया आहेत. त्यांचा प्रसार बहुतेक प्रांतांतील जिल्ह्यांतून असून त्या मलबार दंगासारख्या,व दुष्काळ व सांथीच्या आपत्प्रसंगीं स्वयंसेविका होण्यास सदैव तयार असतात. निरनिराळ्या ठिकाणीं संस्थेचीं दहा सूतिकागृहें आहेत. याशिवाय आरोग्य व शिशुसंगोपन याकडे समाजाचें जास्त लक्ष वेधावें म्हणून संस्था प्रदर्शनें व शिशुसप्ताह भरविते. हिंदी सैनिकांच्या बायकामुलांच्या औषधपाण्याची व्यवस्था करण्याकरितां संस्थेनें खडकी, घोरपडी, वानवडी, देवळाली येथें तज्ज्ञ स्त्रियांना पाठवून दवाखाने उघडले आहेत. खेडचापाडयांतील सुईणी या अशिक्षित असतात. त्यांना नवीन शिक्षण देण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्यास एक अशी फिरती तज्ज्ञ सुईण नेमावी असा संस्थेचा विचार आहे.पुणें व कुलाबा या जिल्ह्यांत हें काम सुरूं झालें आहे. ग्रामसुधारणेचेंही काम सदनानें नुकतेंच हातीं घेतलें आहे. व त्यासाठीं प्रथम खेड-शिवापूर येथें ग्रामोद्धार केंद्र स्थापिलें आहे. (सन १९३०). प्रथम सदनाच्या सभासदांनीं त्या भागांत हिंडून अशा प्रकारच्या केंद्राची जरूरी तेथील लोकांस पटवून दिली. व डिसेंबर १९२९ मध्यें एक वाचनालय सुरूं केलें व त्याच महिन्यांत एक प्रदर्शनही शिवापुरास भरविलें या योगानें लोकांत शिक्षणाची आवड निर्माण झाल्यावर १।१।१९३० रोजीं कामास व्यवस्थित सुरवात झाली. मुलांसाठीं मराठी इंग्रजी वर्ग रात्रीचे; स्त्रियांसाठीं शिवण—प्राथमिक वर्ग संस्था चालविते. सुतारकाम व मागकाम हेंही शिकविलें जातें. स्त्री-डॉक्टरकडून औषधोपचार करून आरोग्यविषयक सचित्र व्याख्यानेंही होतात. किर्लोस्कर बंधूंचे नऊ नांगर आणून ते शेतकऱ्यांना भाडयानें देतात बी, खत वगैरेंबद्दल माहिती पुरविली जाते.कोंबडया व मधमाशा पाळण्याचा धंदा शेतकऱ्यांना शिकविण्याची लवकरच व्यवस्था होणार आहे. निरनिराळे उत्सव करून त्या वेळीं शेतकऱ्यांना जमवून विविध विषयांवर व्याख्यानें दिलीं जातात. केंद्राच्या कामासाठीं इनामदार देशपांडे यांनीं आपला वाडा दिला आहे.

५६ सोशल क्लब,पुणें:—स्थापना १८९५ हेतु—नाटयप्रयोग करून त्या कलेकडे सुशिक्षितांचें लक्ष वेधून जनतेंत योग्य अभिरुचि उत्पन्न करणें व धर्मार्थ नाटयप्रयोग करून भेदभाव न करतां सार्व-

जनिक कार्यांना द्रव्यसाहाय्य करणें, सभासद–फी दरमहा चार आणे. प्रत्यक्ष सभासद संख्या ३५ ते ४० आहे. आजपर्यंत संस्थेनें विविध नाटचप्रयोग केले असून २६००० रु. ची एकंदर मदत केली आहे. १९२४ मध्यें संस्थेच्या मालकीची इमारत उभारली. संस्थेनें भारत–नाटच–संशोधन सुरूं केलें असून नटांचे फोटो, इतिहास, संस्थांचा व मंडळचांचा इतिहास, त्या कलेवरील लेख, जुनीं उपकरणीं इत्यादि जमवाजमव चालूं आहे. नाटच-शाळा स्थापण्याची व भारत नाटचकलेची ग्रंथ तयार करण्याची खटपट चालूं आहे. संस्थेनें आतां-पर्यंत १४ नाटकें बसविलीं व एकंदर प्रयोगसंख्या ११९ पर्यंत गेली. १९०६–३१ पर्यंत नाटचरूपानें शिक्षण, आरोग्य, व्यायाम, धार्मिक इत्यादि निर-निराळचा ४२ संस्थांना एकूण २५६२५ रुपये मदत केली. अध्यक्षः–वि. न. दातार. डायरेक्टर–द. अ. फाटक. बी. ए. एल्‌एल्. बी.

५७ क्षत्रिय मराठा धनगर तरुण मंडळ, पुणें:––स्थापना–शके १८५०. ध्येय–"समाजांत सतत एकी नांदूं देणें, धार्मिक काम करणें, औद्यो-गिक उपाय करणें, शिक्षणाविषयीं खटपट करणें. ही संस्था कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे हस्तें स्थापन झाली. कार्य–मल्हारराव होळकरांची पुण्यतिथि, अहिल्याबाई होळकर पुण्यतिथि, श्रीगणेशोत्सव वगैरे उत्सव मंडळांत साजरे होतात. संस्थेचें श्रीदेवी अहिल्याबाई मोफत वाचनालय आहे. मंडळ ठिकठिकाणीं दौरे काढून समाजांत शिक्षणाची अभिरुचि उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत आहे. श्रीगोंदें येथें मोफत वाचनालय मंड-ळानें उघडलें असून तरुण मंडळाची शाखाहि सुरू केली आहे. गरीब पण हुशार विद्यार्थ्यांची शिक्षणाची अडचण दूर व्हावी म्हणून मंडळानें पुणें मोफत बोर्डिंग काढलें आहे. तेथें विद्यार्थ्यांची जेवण, फी व पुस्तकें यांची सोय केली जाते. श्री. अहिल्याबाई मोफत वाचनालयास तूर्त ७५ रु. ग्रँट दिली आहे. तसेंच मोफत बोर्डिंगास कर्ना-टकांतील एका ब्राह्मण हितचिंतकानें वीस रु. दिले आहेत.

जमाखर्च–मागील शिल्लक ३५२७रु. २आ. ६ पै. १९३०–३१ सालीं जमा २९१ रु. ९ आ.; खर्च ८४५ रु. ६ आ. ६ पै.

अध्यक्ष–मे. रामभाऊ अनंतराव निकुडे पाटील. सेक्रेटरी–पुरुषोत्तम शंकरराव खांगटे पाटील. पत्ता:–८५७ भवानी पेठ, पुणें.

बेळगांव

१. आचार्य शांतिसागर जैन–अनाथ छात्राश्रम–शेडबाळ. स्थापना–ता. १४ फब्रु-वारी १९२७ उद्देश:–"दिगंबर जैन धर्मांतील सर्व जातींच्या सहा वर्षांपासून बारा वर्षांपर्यंतच्या अनाथ मुलांस दाखल करून घेऊन त्यांचें संगोपन व प्राथमिक शिक्षणाबरोबर धर्मशिक्षण देणें." साहाय्यक–शेडबाळवासी पंचांनीं अर्पण केलेल्या जागेवर कोल्हापूरचे श्रीमान् शांताप्पा दादा हेर-वाडे यांनीं आपल्या पूज्य पित्याच्या स्मरणार्थ 'श्रीनमिनाथ विद्यालय' या नांवाची एक इमारत स्वखर्चानें बांधून दिली आहे. या इमारतींत विद्या-लय व चैत्यालय आहे. संस्थेकरितां ३८००० रु. ध्रुवफंड जमा असून फंडाचें कायदेशीर ट्रस्टडीड करून तें ४ सप्टेंबर १९२८ रोजीं नोंदण्यांत आलें. कार्य–आश्रमाचा अभ्यासक्रम सात वर्षांचा असून अनाथ विद्यार्थ्यांची वयोमर्यादा ठरविलेली आहे. आश्रमांत शिशुवर्गापासून सातव्या इयत्तेपर्यंत वर्ग आहेत. आरंभीं सात विद्यार्थी होते. हल्लीं ते तिसा-वर आहेत. जमाखर्च–(आश्विन व॥ ३० वीर-संवत् २४५६ अखेर.) जमा २५८२१॥. रु. (ध्रुवफंड धरून) खर्च २५५८०रु. १४।आ. (सुमारें २१००० रु. व्याजीं लाविले आहेत). शिल्लक २४०॥–॥. रु. ट्रस्टी अध्यक्ष–श्रीमान् रामचंद्र धनजी दावडा, नातेपुतें, कोषाध्यक्ष–रावजी सखा-राम दोशी सोलापूर, महामंत्रि–श्रीमान् शहा गुलाबचंद खेमचंद सांगली. पत्ता:–आचार्य शांति-सागर जैन–अनाथ छात्राश्रम शेडबाळ (रत्नत्रय-पुरी) बळगांव.

मुंबई

१. आर्यन एज्युकेशन सोसायटी, मुंबई स्थापना–हायस्कल जून १८९७, मिडल स्कूल–ऑक्टोबर १८९७, सोसायटी–१९ फेब्रुवारी १८९९. संस्थापकः–१ विनायक हरिश्चंद्र ठाकूर बी. ए., २ मुकुंदराव रामराव जयकर एम्. ए. एल्‌एल्. बी. Bar at law, ३ प्रो. शामराव रामचंद्र धराधर एम्. ए. ४ पद्मनाभ भास्कर शिंगणे बी. ए. एल्‌एल्. बी. जे. पी. ५ वामन राम-चंद्र जोशी, बी. ए. ६ रामराव नारायण कोठारे, बी. ए. Solicitor, ७ रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर बी. ए. एल्‌एल्. बी., ८ डॉ. आनंदराव कोठारे, एल्. एम्. अँड एस्. ९ शामराव सखा-राम त्रिलोकेकर, उद्देश–(अ.) मुलांमुलींस भावी आयुष्यांत कर्तव्यतत्पर करणारें व राष्ट्रीय वळ

णाचें अल्प फी घेऊन उत्तम शिक्षण देणें; व शारीरिक बौद्धिक शिक्षणास नैतिक व धार्मिक शिक्षणाची जोड देणें, (आ) व या कार्याकरितां शाळा, कॉलेजें वगैरे स्थापन करणें किंवा असलेलीं जोडून घेणें किंवा या कार्याकरितां जनतेच्या गरजेप्रमाणें अन्य व्यवस्था करणें. संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्षः—१ ले क. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे १८९९ ते १९०१, २ रे डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर १९०१ ते १९२२ चालू श्री. गोपाळ कृष्ण देवधर एम्. ए. सी. आय्. ई. चालू कार्यकारी मंडळः—१ मुकुंदराव रामराव जयकर एम्. ए. एल्‌एल्. बी. Bar at law पद्मनाभ भास्कर शिरगणे बी. ए. एल्. एल्. बी. जे. पी. इत्यादि गेल्या ३५ वर्षांतील (१८९७ १९३२) संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देणारे कांहीं आंकडे खालीं दिले आहेत. शाळेंतील विद्यार्थ्यांच्या संख्येची वार्षिक सरासरी ९६०, सातही इयत्तांची मासिक फीच्या दरांची सरासरी रु. २—९—६, फीचे उत्पन्नाची वार्षिक सरासरी रु. ३१५५८, शिलकेची वार्षिक सरासरी रु. ८६१, देणग्यांची वार्षिक सरासरी रु. ११९५. प्रवेश परीक्षेंत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या शेकडेवारीची वार्षिक सरासरी ४८. गेल्या ३५ वर्षांत शाळेंत नोंद झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या १४६१७ गेल्या ३५ वर्षांत शाळेंतून प्रवेश परीक्षेस बसून यशस्वी झालेल्यांची संख्या १११२.

२. कित्तेभंडारी ऐक्यवर्धक मंडळी, मुंबईः—स्थापना १८९०, मुंबईंतील भंडारी समाजांतील मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याकरितां १८९२त फंड गोळा करून शाळा सुरूं करण्यांत आली. १९१६ सालीं कायम विद्यावृद्धि फंड सुरूं करण्यांत आला. मंडळीतर्फे मोफत वाचनालयाच्या निरनिराळ्या ठिकाणीं पांच शाखा उघडण्यांत आल्या, विजयादशमी, मकरसंक्रांत वगैरे उत्सव होतात. मुलांमुलींच्या शिक्षणासाठीं त्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. चिटणीस श्री. पारकर.

३. कुडाळदेशकर आद्यगौड ब्रह्ममंडळ, मुंबईः—सदरहू संस्था शके १८३७ (सन १९१५) सालीं, मुंबईंत गिरगांवांत सरकारी तबेला येथें, श्री. कृष्णराव पाटकर, श्री. श्रीधर शिवराम गोसावी, श्री. शंकर महादेव मतकरी, कै. श्री. परशुरामपंत देसाई, इत्यादि गृहस्थांनीं स्थापन केली. संस्थेचा उद्देश—"आद्यगौड ब्राह्मण वर्गाची सर्वांगीण उन्नति करणें" असा असून, तदनुरूप गेल्या १७ वर्षांत संस्थेनें यथाशक्ति पुढीलप्रमाणें कामें केलीं आहेत. उत्तर भारतीय आदिगौड ब्राह्मण, आणि महाराष्ट्रीय द्रविड ब्राह्मण यांच्याशीं परिषदादि द्वारा संघटण, ज्ञातीच्या प्राचीन इतिहासाचीं साधनें गोळा करून तीं प्रकाशित करणें, ज्ञातीबद्दल अज्ञानानें किंवा जाणूनबुजून गैरसमज पसरविणारांची योग्य ती व्यवस्था करणें, ज्ञातींतील गतकालीन राजघराण्यांतील प्रसिद्ध स्त्री—पुरुष तसेंच साधुसंत यांचे स्मृतिदिन पाळणें, ब्राह्मण्याच्या आचारपरंपरेचें यथाशक्ति रक्षण होईल असें करणें, ज्ञातीची सार्वजनिक श्रावणी आणि दसरा—संमेलन घडवून आणणें, इत्यादि. संस्थचे चार प्रकारचे सभासद आहेत. १००० रु. देणारे ते आधारस्तंभ, १०० रु. देणारे ते आश्रयदाते, ५० रु. देणारे ते आजन्म सभासद, आणि प्रतिवर्षी कमींतकमी आठ आणे देणारे ते वार्षिक सभासद. अधिकारी वर्गाची दर दोन वर्षांनीं निवडणूक होते. सध्यांचे प्रमुख अधिकारी पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—(अध्यक्ष) रा. ब. वासुदेव अनंत बांबर्डेकर, (उपाध्यक्ष) श्री. रामचंद्र गोविंद सामंत टोपीवाले, (कार्यवाह) १ श्री. शंकर महादेव मतकरी, २ रामकृष्ण विठ्ठल मतकरी बी. ए. एल्‌एल्. बी. (कोषाध्यक्ष) श्री. बाळकृष्ण अनंत पाटील. पत्ताः—चिमण बिल्डिंग दुसरा मजला, गायआळी, कांदेवाडी गिरगांव मुं.

४ 'कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण निराश्रित सहाय्यकारी फंड' ही संस्था मुंबई यथील कुडाळदेशकर आद्यगौडब्राह्मण ज्ञातींतील व्यापारी मंडळीनें सन १९१३सालीं स्थापन केली, तिचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेत.— (१) कुडाळदेशकर आद्यगौडब्राह्मण ज्ञातींतील निराश्रित यांस उदरनिर्वाहार्थ द्रव्यद्वारा मदत करणें. (२) द्रव्याभावामुळें औषधोपचारावांचून ज्यांचे हाल होत असतील अशा स्वज्ञातींतील कोणाही इसमाला द्रव्यद्वारा अगर इतर शक्य ती मदत करणें. (३) स्वज्ञातींतील कोणाही इसमावर किंवा कुटुंबावर कांहीं अपरिहार्य आकस्मिक प्रसंग गुदरल्यास त्यावेळीं द्रव्याभावामुळें होणाऱ्या दुःस्थितींत त्यांना द्रव्यद्वारा अथवा इतर शक्य ती मदत करणें. (४) स्वज्ञातींतील निराश्रित मुलांच्या उपनयन—विधीसाठीं द्रव्यासहाय्य करणें. (५) स्वज्ञातींतील निराश्रित मृतांच्या अंत्यविधीप्रीत्यर्थ खर्चाची मदत करणें. या ज्ञातीची वसती मुंबई, ठाणें जिल्हा, कुडाळप्रांत, सावंतवाडी संस्थान, बेळगांव, धारवाड, गोवें, मोगरनाड (दक्षिण कानडा) वगैरे प्रांतांत असून त्या सर्व भागांत रहाणाऱ्या ज्ञातीं-

तील निराश्रितांस या संस्थेकडून मदत दिली जाते संस्थेस ज्ञातीतील धनिकांकडून आश्रयही चांगला असून संस्थेचे संवर्धक (रु. ५०० किंवा अधिक देणारे) सभासद, तहाहयात (रु. १०० किंवा अधिक देणारे) सभासद २८ व वार्षिक व मासिक वर्गणी देणारे सुमारें ३०० सभासद आहेत.

संस्थेचें सन१९३१–३२–३३सालांचें व्यवस्थापक मंडळ पुढीलप्रमाणें आहे. अध्यक्ष–रा. ब. वासुदेवराव अनंत बांबर्डेकर, उपाध्यक्ष–रा. रामचंद्र कृष्णाजी पाटकर. चिटणीस श्री. दादाजी सखाराम सामंत परुळकर, श्री. तातो सखाराम सामंत. कार्यकारी मंडळ–रा. रा. पुरुषोत्तम रघुनाथ प्रभुदेसाई (अध्यक्ष). संस्थेच्या ऑफीसचा पत्ताः–मेसर्स रामचंद्र गोपाळ आणि कं. कॅप अँड व्हेलवेर धनजी स्ट्रीट मर्चंट, मुंबई नं. ३.

५. **कुडाळ देशस्थ गौडब्राह्मण विद्यावृद्धि समाज** मुंबई स्थापना–सन १८९४ संस्थापक–१ कै. अनंत सीताराम देसाई बी. ए. एल्.एल्. बी., २ श्री. पांडुरंग भिकाजी नाईक, एम्. ए. माजी प्रोफेसर बडोदा कॉलेज, हे संस्थेचे एक चिटणीस या नात्यानें संस्थेची सेवा बजावीत आहेत. कार्य–१९३०–३१ सालीं ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षणक्रम सुव्यवस्थित चालले अशा ७१ विद्यार्थ्यांस एकंदर ६४१५ रु. देण्यांत आले. १९३१ पर्यंतचा जमाखर्च जमा–२०६९८१ रु. ११ आ. १ पै. खर्च–८७०९ रु. ७ आ. ५ पै. शिल्लक–१९८२७२ रु. ३ आ. ८ पै. समाजाचें कायम भांडवल–१९०६९५ रु. १३ आ. १० पै. पत्ताः–चिटणीस श्री. र. ग. ठाकूर कुडाळदेशस्थ गौडब्राह्मण विद्यावृद्धि समाज, ३३ कुडाळदेशकर ब्राह्मणनिवास, गिरगांव, मुंबई.

६ **कुंभार-हितवर्धक मंडळ** मुंबई–स्थापना १९१५. पुनर्घटना १९२८, कुंभार समाजांत प्रेम व ऐक्य वाढावें, शिक्षणाचा प्रसार व्हावा, ज्ञातीची उन्नति व्हावी, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस मदत, सामाजिक व धार्मिक सुधारणा करणें आणि अनाथ प्रेतसंस्कारास खर्च पुरविणें, वगैरे उद्देशानें ही संस्था स्थापन करण्यांत आली आहे. अठरा वर्षांवरील ज्ञातिबंधुभगिनींना या मंडळाचें सभासद होतां येतें. सभासदवर्ग निरनिराळे आहेत. हल्लीं (१९३०) सभासद सुमारें २७० जमा ९५६–५–६ रु. अध्यक्ष–श्री. धोंडो रामजी पणदीकर, चिटणीस–श्री. महादेव बाळा गुडेकर पत्ताः–कुंभारवाडा २ गल्ली घ. नं. २४५ मुंबई ४

७. **गोखले एज्युकेशन सोसायटी** मुंबई–स्थापना १९१८. उद्देश–मुलांना शिक्षण देण्याकरितां संस्था सुरू करणें, चालविणें किंवा ताब्यांत ठेवणें. संस्थेच्या आजन्म सभासदांना देशांतील शिक्षणाचा व त्या शास्त्राचा अभ्यास करण्यास उत्तेजन देणें व मदत करणें. व्याख्यानें देऊन व पुस्तकें प्रसिद्ध करून शिक्षण–प्रसार करणें. हिंदुस्थानांतील किंवा परदेशांतील कोठल्याहीं विश्वविद्यालयाच्या पदवीधरांस सोसायटीचे सभासद होतां येतें. सोसायटीच्या सभासदांस कांहीं अटी मान्य कराव्या लागतात. व त्यांस त्याप्रमाणें कांहीं जादा हक्कही मिळतात. सोसायटीचे चिटणीस, खजिनदार, हिशेबतपासनीस वगैरे हुद्देदार आहेत. त्यांचीं कार्यक्षेत्रें आंखलेलीं आहेत. सोसायटीची सेनेट ही सभा सर्वाधिकारी आहे. सभेचीं कामें,तिच्या बैठकी वगैरे सर्व सोसायटीच्या घटनेंत नमूद केलें आहे. सोसायटीचें मुंबईला 'दि. डी. जी. टी. हायस्कूल' गिरगांवांत आहे. स्थापना १९१२. तेथें ८५० विद्यार्थी (१९२९) शिक्षण घेतात.प्रयोग शाळा, वाचनालय, मासिकें, शिष्यवृत्त्या व मुलांचे खेळ वगैरे सर्व गोष्टी चालू आहेत. अजमासें ६०० रु. सरकारी ग्रँट मिळते. येथें एक मुंबईतील शिक्षकांकरितां 'को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी'सुरू केली आहे. त्यांतील सभासदांना कर्जाऊ रकमा मिळतात. परेळला 'दि परेळ हायस्कूल' (स्थापना १९१८); व 'दि ए. व्ही. नाईट स्कूल' (स्थापना १९२०) अशा दोन संस्था आहेत. 'दि परेळ हायस्कूल'मध्यें विद्यार्थी सुमारें४००आहेत. (१९२९); १९२५ पासून सरकारी ग्रँट २५०० रु. मिळते. या शाळेंत सुतारकाम, शिंपी काम, वगैरे प्रकारचें धंदेशिक्षण देण्यास सुरुवात केली होती. परंतु तें पैशाच्या अभावीं बंद पडलें, येथें गिरणीमधील मजुरांचीं मुलें शाळेंत जास्त असल्यामुळें अशा प्रकारचें शिक्षण देणें योग्य आहे. शाळेंत मुलांचें पार्लमेंट असून त्या सभेमार्फत अनेक कामें चालू असतात. उदा. स्टोअर्स, सेव्हिंग बँक, ड्रॅमॅटिक क्लब, स्काउट्स् इत्यादि. शिवाय येथें सक्तीचें शारीरिक शिक्षण चालू आहे. दरवर्षी प्रत्येक मुलाची वैद्यकीय तपासणी होते. कांहीं मुलांना दुपारीं कामधंदा करावा लागतो त्यामुळें शिक्षण घेतां येत नाहीं म्हणून सोसायटीनें हें 'नाइट स्कूल' काढलें. त्यांत हल्लीं ६० विद्यार्थी आहेत (१९२९). ही संस्था परेल हायस्कूलमधील माजी विद्यार्थ्यांनीं त्या हायस्कूलच्या प्रिन्सिपालच्या नेतृत्वाखालीं चालविली आहे. या शाळेंतहीं डिबेटिंग, अॅथ्लेटिक, मेडिकल, हेल्थ

वगैरे अॅसोसिएशन आहेत. सोसायटीच्या नेतृत्वाखालीं बोर्डी (ठाणें जिल्हा) येथें तीन संस्था चालू आहेत. १ दि एस्. पी. एच्. हायस्कूल, बोर्डी (स्थापना १९१९) २ दि एस्. पी. एच्. हायस्कूल हॉस्टेल्स, ३ दि आलारखिया सीनवाला इंडस्ट्रियल स्कूल, बोर्डी येथें एकंदर १९०विद्यार्थी आहेत (१९२९) वसतिगृहांत ब्राह्मण, प्रभू, मराठा या जातींचीं मुलें आहेत. पारशी व मुसलमान मुलांचीही सोय करावी अशी लोकांची इच्छा आहे. या शाळेंत धंदेशिक्षणही नेहमीच्या शिक्षणास जोड म्हणून द्यावें असें ठरलें. प्रथमतः बागाइतीचें शिक्षण व हातमागावर विणण्याचें शिक्षणही देण्यास सुरवात करण्याचें ठरलें.त्याप्रमाणें हातमागावर विणण्याचें शिक्षण देणारी शाळा निघाली व सीनवाला यांच्या'चॅरिटी फंड' मधून त्याकरितां २१००० रु. मिळाले म्हणून त्या इंडस्ट्रियल स्कूलला वरील नांव दिलें. बागाइतीचें व शेतकी शिक्षण देण्याकरितां तयार केलेली योजना सरकारांत सादर केली असून त्यांस'डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर' व 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' यांकडून संमति मिळाली आहे. तेव्हां सरकारांतून तें शिक्षण देण्यास लवकर परवानगी मिळेल. वरील उद्योगामुळें हायस्कूलला धंदेशिक्षण शाळेची जोड मिळाली आहे. सोसायटीनें येथेंच एक 'गुजराथी प्राथमिक शाळा' नांवाची लहानशी शाळा चालू केली आहे. या सोसायटीनें १९२४ जून मध्यें 'नाशिक आर्टस् कॉलेज' सुरू केलें. प्रथमतः हें सेकंड ग्रेड कॉलेज होतें. नंतर १९२५ मध्यें गव्हर्नर साहेबांतर्फे कॉलेजला कै. शेठ हंसराज प्रागजी ठाकरसी यांच्या इस्टेटीच्या ट्रस्टीज्कडून १६५००० रु. देणगी मिळाली. त्यांतून ३०००० रु. खर्चून इमारत बांधली. १९२५ सप्टेंबरपासून कांहीं अटींवर कॉलेज फर्स्ट ग्रेडमध्यें दाखल होण्यास मुंबई युनिव्हर्सिटीनें परवानगी दिली. वरील मोठ्या देणगीमुळें कॉलेजला पहिलें नांव बदलून दि हं. प्रा. ठा. कॉलेज नांव देण्यांत आलें. कॉलेजची स्वतःची इमारत आहे. मालकीची जमीन सुमारें ७० एकर; वाचनालयांत सुमारें ८००० ग्रंथ आहेत. कॉलेजच्या वसतिगृहांत ५४ विद्यार्थी राहण्याची सोय आहे. सुमारें १५ विद्यार्थ्यांचा 'टय्‌टोरियल क्लास' घेण्याची येथें एक नवीन पद्धत सुरू केली आहे. कॉलेजचे प्रिन्सिपाल श्री. टी. ए. कुलकर्णी असून त्यांच्या कर्तबगारीनेंच सोसायटीचा हा सर्व कार्यव्याप वाढत चालला आहे. ३१ मार्च १९२९ अखेर सोसायटीजवळ बँकेकडील डिपॉझिट्स व रोख मिळून १५७९३-३-१० रु. एकंदर इमारती, जमिनी वगैरे स्थावर इस्टेट किंमत ३७३७५९-१०-६ रु. सोसायटीची लोन्स् ११९१०९-४-७ रु. सोसायटीचे चेअरमन– प्रि. टी. ए. कुलकर्णी. पत्रव्यवहाराचा पत्ताः–सेक्रेटरी गोखले एज्युकेशन सोसायटी, बदामवाडी, गिरगांव बॅकरोड मुंबई.

८ गोवर्धन संस्था, वांई, पुणें व मुम्बई- स्थापना शके १८२७; संस्थापक–श्री. चौंडेमहाराज. ध्येय- राष्ट्रांत अहर्निश चाललेला गोवध बंद करणें व देशांत गोधनसमृद्धि करणें. कार्य– मुंबईंत प्रचारकांतर्फे मिळालेलें साहाय्य,वर्गण्या वगैरे एकंदर रु. ५५३००० जमा झाले. त्यांपैकीं रु. ३१७००० गाईंना कसायांच्या तावडींतून सोडविण्यांत, त्यांच्या चारापाण्यास, नोकर व प्रचारक यांच्या योगक्षमास खर्च होऊन बाकीची रक्कम गोचरभमि, इमारत वगैरे इस्टेटी खरेदींत खर्च झाली. ४४६१ गाईगुरें कसायांच्या हातीं पडण्यापूर्वीं शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यांत आलीं, ३०९२ गुरें प्रचारकांच्या उपदेशावरून शेतकऱ्यांनीं मोफत गोशाळेंत पोचविलीं. गोशाळेंत उपजलीं किंवा मोबदल्यानें घेतलीं अशा गुरांची संख्या १४२३ आहे. एकण ८९७६ गुरांचा सांभाळ झाला. सध्यां नाशिक, नगर, सोलापूर, खानदेश, विजापूर इ० जिल्ह्यांतून व कर्नाटक, गोवा प्रांतांत प्रचारकांमार्फत व स्वयंसेविकांमार्फत प्रचारकार्य चालू आहे संस्थेतर्फे स्त्रीकीर्तनकार गोरक्षणाविषयींची जागृति करीत आहेत. संस्थेचें मुखपत्र 'गोरक्षण' साप्ताहिक (तूर्त पाक्षिक) मराठी भाषेंत गेलीं चौदा वर्षें प्रसिद्ध होत आहे. वरील प्रकारच्या प्रचारकार्यापुढें महाराष्ट्रांतील वांद्रचाच्या मख्य कत्तलखान्यांत प्रतिवर्षीं जनावरांचा संहार कमी प्रमाणांत होत आहे हें पुढील आकडयांवरून दिसून येईल. १९१९–६४६६८, १९२१–६१२९८, १९२३–३९०४६, १९२५–३४५४५, १९२८–१३७८१. प्रचारकांच्या प्रयत्नानें हिंदुस्थानांत निरनिराळ्या ३० ठिकाणीं गोशाळा स्थापन झाल्या. गाईच्या नित्योपयोगासाठीं व आपत्कालीं संरक्षणासाठीं संस्थेनें ४०,००० रु. खर्चून सुमारें ५०० एकरांची गोचरभूमि संपादन केली आहे. (१।८।१९३१ च्या पत्रकाप्रमाणें) उसनवार व देणगी धरून जमा रु. १४६०००; २०६००० रु. कर्ज देणें आहे. साडेतीन लाख रुपये किंमतीची मुंबई येथें खेतवाडी मेनरोडवर "मार्कर बिल्डिंग"

विकत घेतली आहे. अखिल हिंदुस्थानांत गोरक्षण सप्ताह साजरा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. गोपालनाचा प्रचार वाढविण्यासाठीं 'डेअरीमन' हें अमेरिकन पाक्षिक पत्र संस्थेतर्फे कमी किमतींत दिलें जातें. संस्थेनें या पाक्षिकास १०० ग्राहक मिळवून दिले आहेत. वारकरी महंतांत सतत ८ वर्षे रिघाव करून संस्थेच्या चालकांनीं "वारकरी संतांचें सुप्रसिद्ध फर्मान" काढविलें. या फर्मानांत वारकरी बंधूंस कसायांस गाई न विकण्याबद्दल संतांकरवीं आज्ञा करविली आहे. संस्थेच्या वांई येथील नवीन भागेश्वर गोशाळेचें पायाप्रस्थापन महात्मा गांधीजींनीं व उद्‌घाटन पं. मालवीयजींनी केलें.

९. **गोमांतक मराठा समाज**, मुंबई स्थापना १९२७. या समाजाचें कार्यक्षेत्र जेथें मराठी भाषा रूढ आहे तेथें म्हणजे मुंबई, पुणें, रत्नागिरी, सावंतवाडी, गोमंतक, कारवार वगैरे प्रांतांपुरतेंच आहे. या समाजाचा उद्धार करण्याकरितां निरनिराळ्या नांवाखालीं तीन संस्था होऊन गेल्या. तिसरी १९१४ च्या सुमारास बंद पडली; पण तिचा लहानसा फंड १९२७ सालीं या संस्थेस मिळाला. प्रथम 'गोमंतकीय बालसंरक्षक मंडळ' व 'गोमंतक मराठा विद्यार्थी मंडळ' अशा दोन संस्था १९२७ सालीं निघाल्या. त्यांचें एकीकरण १९२९ त होऊन वरील सुसंघटित संस्था स्थापन झाली. संस्थेचें ध्येय समाजाची शारीरिक, शैक्षणिक, नैतिक व आर्थिक अतएव सर्वांगीण उन्नति करणें हें होय. संस्थेचे हितचिंतक व सभासद यांची एकंदर संख्या २२९ आहे. संस्थेकडून निरनिराळ्या प्रकारची कामगिरी केली जाते. संस्थेचें विद्यार्थी वसति–गृह आज तीन वर्षे असून त्यांत विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाखाण्याची सोय केली आहे. विद्यार्थ्यांची संख्या १२ ते १५ असते. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठीं एक सुपरिंटेंडेंट असतात. राहण्याचा खर्च अल्प असतो व कांहीं विद्यार्थी मोफत व कांहीं अंशतः मोफत ठेवले आहेत. दहा वर्षांच्या खालील मुलांमुलींकरितां "नैतिक वर्ग" दर रविवारीं भरतो. संस्थेची एक व्यायामशाळा व एक 'नूतन क्रिकेट क्लब' आहे. स्त्रियांकरितां 'शिवणकामाचा वर्ग' स्त्री शिक्षकांकडूनच चालविला जातो. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. उच्च यश मिळविणारांना बक्षिसें मिळतात. शिवाय त्यांच्याकडून निबंध व लेख लिहवून त्यांना पारितोषिकें मिळतात. खेडेगांवांतील (गोमंतक) प्राथमिक शाळांना आर्थिक मदत करण्यांत येते. साधारणपणें वर्षादीडवर्षांनीं शेकडों स्त्री–पुरुषांना बोलावून सामाजिक–संमेलनाचे समारंभ होतात. थोर विभतींचे स्मृतिदिन साजरे होतात. सर्व सभासदांचें दसरा-संमेलन भरतें. 'दिवाळी–भेट' म्हणन स्त्रिया व मुलींकडून फंड गोळा केला जातो व त्यामुळें प्रचारकार्यही होतें. याशिवाय दरसाल नाटक रूपानेंही फंड गोळा होतो. संस्थेतर्फे 'समाज–सुधारक' मासिक आज ३॥ वर्षे वक्तशीरपणें चालू आहे. गोमांतकांतील 'पोर्तुगीज शिक्षण–प्रसारक समाज' या संस्थेशीं सहकार्य करून संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं 'प्रागतिक मराठा सामाजिक परिषद' (१९२९) शिरोडा–गोवा येथें मोठ्या थाटानें पार पाडली. परिषदेच्या व श्री. बांदोडकर यांच्या प्रयत्नास यश येऊन 'शेजविधि–प्रतिबंधक' कायदा पोर्तुगीज सरकारनें पसार केला. (१९३०) गो. म. समाजांतील तरुण मुलांमुलींचे विवाह जुळून येण्यास सुलभ व्हावें म्हणून 'विवाह–कार्यालय'. तसेंच होतकरू मंडळींच्या उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठीं 'सहकारी पतपेढी' या दोनही गोष्टींची सुरवात करण्याचें संस्थेनें मुक्रर केलें आहे. संस्था पूर्ण लोकाश्रयावर चालू आहे. दरसाल सरासरी एकंदर ६००० रु. खर्च होतात. शिवाय खर्च जाऊन संस्था दरवर्षी दोनएक हजार रुपय कायम फंडांत शिल्लक टाकते. १९३१ ऑगस्ट अखेर जमाखर्च–जमा १६८८०–८–८ रु. खर्च ५८०९ रु. १४ आ. ४ पै. शिल्लक ११०७०–१०–४ रु. अध्यक्ष–प्रो. रा. ना. वेलिंगकर बी. ए. (ऑक्स.) सं. उपाध्यक्ष–डॉ. शा. रा. मुळगांवकर, एफ. आर. सी. एस्. डॉ. रा. मं. नावकर एम्. बी. बी. एस्. चेअरमन–श्री. सुं. बा. रायकर, बी. ए. सं. खजिनदार–डॉ. वा. ना. वेलिंगकर, एल्. आर. सी. पी, एम्. आर. सी. एस. डॉ. वि. ना. शिरोडकर, एम्. डी. (मुंबई), एफ्. आर. सी. एस्. (इंग्लंड). सं. चिटणीस–श्री. ना. ज. मांजरेकर, श्री. श्री. स. काकोडकर, श्री. एस्. व्ही. काटकर. पत्ताः— ४ ए, फरेंच ब्रिज रोड मुंबई, नं. ७.

१० **गौड सारस्वत ब्राह्मण स्कॉलरशिपलीग**, मुंबई–स्थापना १९१२ गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील गरीब होतकरू विद्यार्थ्यांस (विद्यार्थी अगर विद्यार्थिनी) सर्व प्रकारच्या शिक्षणास मदत करणें व त्यांना विद्यार्जनाकरितां अवश्य लागणारीं साधनें व सोई पुरविणें हा या संस्थेचा उद्देश आहे. १९३१ सालीं सभासद संख्या २७६; एकंदर उत्पन्न २६७८–०–८ रु. त्यांतील शाळा शिक्षणास

व पुस्तकांसाठीं मदत १०२४–४–० रु. दिली व इतर खर्च वजा जातां कायमनिधि नांवें १२४७ रु. १३ आ. ६ पै. रकम आहे. चेअरमन–वि. भि. प्रभू, बी. ए. चिटणीस–गो. श्री. गुडाळ, व कुं. वि. शानभाग. कचेरी–सारस्वत ब्राह्मण समाज २६३ चर्नीरोड, गिरगांव मुंबई.

११. चांद्रसेनीय कायस्थ प्रभु को–ऑपरेटिव्ह करेडिट बँक लि. दादर:–स्थापना १९१५सन १९३१–३२ सालीं कर्जमागणीचे ३१२ अर्ज आले त्यांपैकीं २७८अर्ज मंजूर करण्यांत येऊन त्यापोटीं तारण घेऊन ९२४२१ रुपये कर्ज देण्यांत आलें. कर्जमागणीचीं कारणें–व्यापार, मिळकत-खरेदी, घरदुरुस्ती, शिक्षण, विमाहप्ते, आजारी-पण, जुन्या कर्जाची फेड व लग्नें–वरीलपैकीं शिक्ष-णाकरितां ५६० रु. आजारीपण ९२३८ रु. लग्नें १९४१० रु. सध्यां बँकेचे सभासद १७८३ आहेत. बँकेची ठेव–१७८१८० रुपये, भांडवल–२१८७५ रुपये, गंगाजळी–१५४१८ रुपये. सन १९३१ व ३२ सालीं बँकेस नफा ५६६८ रु. १० आ. ९ पै. अध्यक्ष–रा. भगवंत हरि शृंगारपुरे बी. ए. एल्. एल्. बी. चेअरमन–रा. अनंत राजाराम वैद्य बी. ए. एल्. एल्. बी. सॉलिसिटर. ऑ. सेक्रेटरी–रा. गजानन विनायक देशपांडे. पत्ता:–दादर मुंबई नं. १४.

१२. तेली ज्ञानोत्तेजक फंड मुंबई–स्थापना १९१६; उद्देश; समाजांतील अक्षरहीनता घालविणें, आर्थिक दुर्बलतेमुळें शिक्षण घेतां येत नाहीं अशांस व निराश्रित व पंगु समाज बंधु–भगिनींस मदत करणें, ज्ञातींतील व्यक्तीस. स्वत:-च्या मालकीचें कांहीं साधन नसतां मृत्यु आला तर त्याच्या प्रेतसंस्कारार्थ अवश्य तो खर्च करणें. हल्लीं मदतीबद्दल जी वर्गणी जमा होते ती खर्चाच्या मानानें अपुरी असल्यानें, विद्यार्थ्यांस व अनाथ बंधुभगिनींस केली जाणारी मदत १९२९ एप्रिल पासून बंद केली आहे. फंडाचा सर्व खर्च समाजाश्रयावर अवलंबून आहे. अध्यक्ष रा. रसाल सेक्रेटरी रा. रहाटे, गुहाकरकर.

१३. दी बॉम्बे व्हिजिलन्स असोसिएशन (अनीतीवर पाळत ठेवणारें मंडळ) मुंबई.-स्थापना मुंबईत एका तरुण वेश्येचा अत्यंत क्रूरपणानें खून करण्यांत आल्यामुळें बहुजनसमाजाचें लक्ष इकडे वेधलें, व "बॉम्बे प्रेसिडेन्सी वुइमेन्स कौन्सिल" आणि "यंगमेन्स ख्रिश्चन अॅसोसिएशन" या दोन संस्थांच्या प्रयत्नानें १९११ सालीं 'मुंबई समाज-शुद्धिमंडळ'(Social purity committee) अस्तित्वांत आलें. याच मंडळाला जरा व्यापक व संघटित स्वरूप येऊन त्याचें "दी बॉम्बे व्हिजि-लन्स अॅसोसिएशन" या संस्थेंत रुपांतर झालें, सन १९२३.उद्देश; (१)अनीतीच्या मार्गाला लावण्या-करितां चालणारा स्त्रियांचा व मुलींचा व्यापार थांबविणें व नाहींसा करणें, (२) पळवून नेलेल्या स्त्रियांची त्या धंद्यांतून सुटका करणें व त्या पुन्हां त्या धंद्यांत न पडण्याची व्यवस्था करणें. (३) इंडियन पीनल कोडांतील वेश्यांचा कायदा व त्यांत झालेल्या दुरुस्त्या यांची अम्मलबजावणी नीट होत आहे कीं नाहीं हें पाहणें. (४) कुंटणखाने अजिबात बंद करण्याची चळवळ करणें,इ. कार्य. १९२४ मध्यें पसार झालेला बालसंरक्षक कायदा, १९२६ मध्यें वेश्यांसंबंधींच्या कायद्यांतील सुधा-रणा, व १९२७ सालीं वरील दोनही कायद्यांची अंमलबजावणी करण्याकरितां उघडलेली पोलीस-खात्याची नवीन स्वतंत्र शाखा या सर्व गोष्टींचें श्रेय अॅसोसिएशनलाच आहे. संस्थेच्या प्रयत्नामुळें १९३० सालींही वेश्यांच्या कायद्यांत महत्त्वाच्या सुधारणा झाल्या. संकटांतून सोडविलेल्या स्त्रियांच्या जातीचा किंवा धर्माचा विचार न करितां त्यांना मदत करण्यासाठीं १९२६मध्यें एक महिला-श्रम काढण्यांत आला आहे. १९३०च्या अखेरीस आश्रमांत फक्त १५ स्त्रिया होत्या. १९३१ सालीं ४२ स्त्रिया व एक मूल नवीन आलें व ४८ स्त्रिया आश्रम सोडून आपल्या नातेवाइकांकडे किंवा प्रतिष्ठित रोजगाराकरितां गेल्या. घटना–आश्रय-दाते, तहाहयात सभासद, साधारण सभासद व सन्मान्य सभासद असे सभासदांचे चार प्रकार आहेत. संस्थेचा खर्च वर्गणी, देणग्या व सरकारी मदत यांतून चालतो. सर्व जातीचे व धर्माचे लोक संस्थेचे सभासद आहेत. अध्यक्ष–नामदार सर फिरोज सेटना. ऑ. सेक्रटरी–मि. एच्. डब्ल्यू. ब्रायंट, प्रि. एम्. जे. अँटिया, वर्कर पी. जी. नाईक. लेडि सुपरिंटेंडेंट–सौ. रमाबाई नाईक. पत्ता:–– १२ वुडहाउस रोड, फोर्ट मुंबई.

१४. धर्माजीराव रोकडे मोफत वाच-नालय, मुंबई स्थापना १९२५ उत्पादक श्रीमती जनाबाई रोकडे, जे. पी. सभासदांची संख्या १९३१ एप्रिलांत १३२; मराठी पुस्तकें १९३३ व इंग्रजी ९०६ मिळून एकंदर ग्रंथसंग्रह २८३९ इतका आहे. वर्गणीदार व आश्रयदाते यांजकडून द्रव्यसाहाय्य होतें. अहवालाच्या वर्षांत जमा ७१४–५–६ व खर्च अदमासें रु. ६७० झाला. व्यवस्थापक मंड-

ळाचे अध्यक्ष श्री. खेडकर व सेक्रेटरी श्री. सावळ, आचरेकर व उंदकुले हे आहेत.

१५. **धर्मशिक्षण व निराश्रित साहाय्यक मंडळ** भायखळा मुंबई:—संस्थापक पां. रा. राण स्थापना १९१७ उद्देश–(१) हिंदु धर्माच्या तत्त्वांचा व शिक्षणाचा प्रसार व (२) गरीब विद्यार्थ्यांस मदत. संस्थचें कार्य–व्याख्यानें, कीर्तनें, प्रवचनें, वाङमय वगैरे द्वारा लोकसेवा; आतांपर्यंत ९२ विद्यार्थ्यांस २०७१ रु. ची मदत; अम्बोली यथें रात्रीची मराठी शाळा व भायखळचास कामगारबंधूंसाठीं मराठी व इंग्रजी रात्रीची शाळा चालविली आहे. भायखळचास मोफत वाचनालय व पुस्तकालय. चिटणीस श्री. मठकर.

१६. **नॅशनल लायब्ररी**–बांद्रा:— सुरवात १५–२० पुस्तकें व १५–२० वर्गणीदार ह्यांवरच झाली; १९२६ सालीं घटना, नियम, वगैरे पद्धतशीर करण्यांत आलें. १९२९ मध्यें लायब्ररी रजिस्टर करण्यांत आली. १९२७ पासून येथील म्युनिसिपालिटीकडून वार्षिक रक्कम देणगी म्हणून मिळत असते. (१९२७ व १९२८ सालीं दरवर्षं रु. ५०, १९२८ व १९२९ सालीं रु. १०० प्रमाणें १९३० सालीं रु. १५०, व १९३१ पासून दरवर्षी रु. २०० प्रमाणें) उद्देश–'मराठी व इतर भाषांतील मुद्रित ग्रंथांचा संग्रह करून वाचकांमध्यें प्रसार करणें व वाङमयाशीं संबद्ध अशीं इतर कामें करणें'. सभासद–आश्रयदाते रु. ५१ देणारे; तहाहयात सभासद–४३ (रु. २५ देणारे) साधारण सभासद २५० (दरमहा ४ आणे देणारे) वर्गणीदार–हिंदुधर्मीतील बहुतेक सर्व जातींतील. आजची स्थिति–२५०० मराठी पुस्तकें. ३००–४०० रुपयांचें फर्निचर, बँकेंत शिल्लक १५०० इमारतनिधि म्हणून. पुस्तकें एकूण २५००. अध्यक्ष श्री. म. ल. डहाणूकर चिटणीस–श्री. द. श्री. तेंडूलकर.

१७ **नाईक मराठा मंडळ**:—स्थापना–सन १९२६ उद्देश–नाईक–मराठा समाजांत शिक्षणप्रसार व देवदासीची चाल कायद्यानें बंद करण्याबाबत प्रयत्न करणें. मंडळ ना. म. समाजांतील विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देतें. अंशतः मंडळाच्या प्रयत्नानें सावंतवाडी संस्थानांत १९३१ पासून देवदासीची चाल महाराजांनीं बंद केली. मुंबईच्या पटावर ८० सभासद. कराचीच्या शाखेंत २५ सभासद. अध्यक्ष कृ. अ. केळूसकर. पत्ता–विठ्ठलवाडी, दादर, मुंबई.

१८ **बाई जेरबाई वाडिया हॉस्पिटल फॉर चिल्ड्रेन**:— १९३१ च्या अहवालाचा सारांश. एकंदर रोगी १००५: ६२९ मेडिकल, ३७६ सर्जिकल.यांतील ५९९ हिंदू; १७८ इंडियन ख्रिश्चन; १२९ मुसलमान; ४२ पारशी; ४३ अँग्लो इंडियन; १४ ज्यू; ५२८ पूर्ण बरे झाले व १५८ मेले. एकंदर आऊट–पेशन्ट्स् ४०२८. वर्षाच्या सुरवातीस ७८ रोग्यांची सोय होती; ती पुढें ९४ पर्यंत वाढली. मुख्य रोग पुढीलप्रमाणें :–ब्रॉको–न्युमोनिया (८३) डायरिया (६९), मलेरिया (५५), न्युमोनिया (३९), व डिसेंट्री (२२). सिफिलिस (Cong.)चे रोगी ११ होते.सर्जिकल केसेसमध्यें टॉन्सिलसचे रोगी ११० होते. इस्पितळाचा १९३१ चा खर्च सुमारें १,४२,०००;सर खुश्रू व सर नेस वाडिया यांनीं १५००००० फेस व्हॅल्यू असलेल्या बॉण्ड्स्‌ची देणगी दिली आहे. मॅनेजमेंट बोर्डांत सर खुश्रू व सर नेस वाडिया, एच्. पी. मोदी, डॉ. गो. वि. देशमूख वगैरे सद्‌गृहस्थ आहेत. मुख्य मेडिकल ऑफिसर, डॉ. आर. एन्. कूपर.

१९ **ब्राह्मण सभा** मुंबई:— मूळ ब्राह्मण सभा सन १८८८ त स्थापन झाली.त्या वेळीं आठवडचांतून एकदा सर्व लहान थोर ब्राह्मण मंडळींनीं (रा. ब. रानडे, रा. सा. कोल्हटकर, नानासाहेब देशमूख, सर भालचंद्र, डॉ. काणे, खरे वकील वगैरे) जमावें, करमणूक करावी इतकाच उद्देश होता. पुढें १९०८ चे सुमारास ब्राह्मण विद्यार्थी साहाय्यक मंडळ म्हणून एक संस्था विद्यार्थ्यांना मदत देण्यासाठीं काढण्यांत आली. आपल्या ब्राह्मण जातीची मुंबईत मालकीची महाजनवाडी असावी म्हणून १९१३ चे सुमारास "शंकरवाडी निधि" जमविण्यास सुरवात निराळी संस्था काढून करण्यांत आली. १९१७चे सुमारास ब्राह्मण समाजासाठीं स्वयंसेवक म्हणून कार्य करण्यासाठीं "ब्राह्मण हितवर्धिनी सभा" स्थापन झाली. ह्या चारही संस्था पृथक होत्या.परंतु त्यांतील बरीचशी कार्यकर्ती माणसें तींच असल्यामुळें पृथक कार्य करण्याऐवजीं एकत्र चारही संस्थांनीं कार्य केल्यास कालाचा अपव्यय होणार नाहीं. व सुसंघटित रीतीनें कार्य होईल हें ध्यानांत घेऊन चारही संस्थांचें एकीकरण १९१७ अखेर करण्यांत आलें त्यापूर्वी "ब्राह्मण–हितवर्धिनी" संस्थेनें दक्षिणी ब्राह्मण समाजाची शिरगणती केली होती. जानेवारी १९१८ पासून ब्राह्मणसभा जोरानें कार्य करूं लागली. सभेचे उद्देश–ब्राह्मण लोकांत प्रेम

व ऐक्य वाढावें, करमणूक व्हावी, ज्ञानप्राप्ति व ज्ञानप्रसार व्हावा, ज्ञातींतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस विद्यार्जनाचे कामीं मदत करितां यावी व ज्ञातीसंबंधीं सामाजिक व धार्मिक बाबतींत (राजकीय बाबींखेरीज करून) वेळोवेळीं निघतील तीं कामें करितां यावीं हे आहेत. १९१८पासून सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब देशमुख होते व व्य. मं.चे अध्यक्ष रा. पांडुरंग वामन काणे होते. १९२५ सालीं संस्थेनें महाजनवाडी विकत घेण्याचें ठरविलें व गिरगांवांत भर रस्त्यावरची उत्तम जागा खरेदी केली. ७१००० रु. महाजनवाडीला पडले. त्यावेळीं १९१८–१९२५ पर्यंत सभेचें काम व्यवस्थित चालविल्यामुळें १९२५ अखेर वीस हजार रुपये शिल्लक होते. व शंकरवाडी निधि या संस्थेचे सतरा हजार रुपये होते. ती संस्था ब्राह्मण सभेंत सामील केल्यामुळें तेही सतरा हजार रुपये ब्राह्मण सभेकडे आले. बाकीचे पैसे सतत दोन महिने व्य. मं. चे अध्यक्ष रा. काणे, डॉ. भडकमकर, रा. पुणतांबेकर, कै. गोविंदराव मोडक व स्वयंसेवक मंडळी यांनीं आटोकाट प्रयत्न करून जमविले. पुढें रा. हरि केशव गोखले यांनीं १०००० रु. एकरकमेनें दिल्यामुळें शंकरवाडीच्या हॉलला त्यांचें नांव देण्यांत आलें. हरि केशव गोखले हॉल हा मुंबईच्या सार्वजनिक हॉलमध्यें फारच सुंदर शृंगारलेला असा आहे. या हॉलमध्यें सर्व महत्त्वाचे कार्यक्रम, व्याख्यानें, कीर्तनें, गजाननोत्सव वगैरे होतात. पुढें सरदारगृहाचे मालक कै. बिसुभाऊ साळवेकर यांचे स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव रा. बाबूराव साळवेकर यांनीं दहा हजार रुपये दिले. त्यामुळें संस्थेनें नवीन बांधलेल्या इमारतींत व्यायामशाळा सुरूं केली. तिला 'साळवेकर व्यायामशाळा' असें नांव दिलें आहे. १९१८ सालापासून चवदा वर्षांत संस्थेनें सुमारें पन्नास हजार रुपये विद्यार्थ्यांना मदत म्हणून दिले. यांतील सुमारें ३५००० रुपये परत फेडीचे अटीवर दिले गेले. सुमारें २०० विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे बाबतींत मदत करण्यांत आली. व्यायाम शाळेंत सुमारें ३०० विद्यार्थी पटावर आहेत. उत्तम शिक्षक ठेऊन त्यांचेकडून मलखांब, कुस्ती, लेजिम वगैरे विविध प्रकारचा व्यायाम शिकविण्यांत येतो. दहा वर्षें व्य. मं.च्या अध्यक्षाचें काम केल्यावर प्रकृतीचे अस्वास्थ्यामुळें रा. काणे यांनीं अध्यक्षाचें काम सोडलें. हल्लीच्या व्य. मं. अध्यक्ष रा. मोरेश्वर भालचंद्र भाटवडेकर आहेत. सन १९३१ सालीं डॉ. म्हसकर यांनीं ४१००० रुपयांची उदार देणगी देऊन गरीब ब्राह्मण वर्गावर फार मोठा उपकार करून ठेवला आहे. संस्थेनें दरमहा १८० रुपये भाडें येत असलेले आपल्या नवीन चार मजली इमारतीपैकीं वरचे दोन मजले सूतिका गृहासाठीं दिले आहेत. हल्लीं सूतिकागृहांत नेहमीं १० सूतिकांची सोय होते व अडचणीचे वेळीं आणखी तीन चारही घ्याव्या लागतात. सूतिका–गृहांतील टापटीप व व्यवस्था पाहून सर्व लोक प्रशंसा करीत आहेत. याचें सर्व श्रेय डॉ. म्हसकर व त्यांना मदत करणारे डॉ. पटवर्धन, डॉ. गोखले, डॉ. टिळक, डॉ. गाडगीळ व डॉ. आठवले वगैरे मंडळीस आहे. यंदा डॉ. म्हसकर यांनीं आणखी २०००० रुपये विद्यार्थिनींचे कायम फंडांत सामील करण्यासाठीं दिले आहेत. रा. केशवरावजी गोखले यांनीं विद्यार्थी फंडासाठीं ५००० रुपयांच्या "प्रॉमिसरी नोटा" देऊं केल्या आहेत. रा. ब. परांजपे यांनींही २००० च्या प्रॉ. नोटा दिल्या आहेत. कै. रा. धोंडोपंत सावले (माधवाश्रमाचे मालक) यांचे स्मरणार्थ त्यांचे कुटुंबाकडून दर वर्षीं दीडशें रुपये आज तीन वर्षें येत आहेत. त्याप्रमाणें गेल्या दिवाळींत भाऊबीज भेट म्हणून ब्राह्मणभगिनी समाजानें वर्गणी सूतिकागृहासाठीं जमविली आहे. ती सुमारें साडेचार हजार झाली आहे. व्यायामशाळेसाठीं कायमनिधि नव्हता त्याला यंदा सुरवात होऊन रा. पळसुले इंजिनियर यांनीं एक हजार रुपये देण्याचें अभिवचन देऊन व रा. निळकंठ रावजी महाजन यांनीं पांचशें रुपये रोख देऊन कायम फंडास सुरवात झाली आहे. शंकरवाडीच्या नेहमींच्या खर्चाकरितां रा. नारायण विश्वनाथ मंडलिक यांनीं पांच हजार रुपये आपली पत्नी कै. सौ. इंदिराबाई मंडलिक यांचे नांवानें दिले आहेत. त्याचे व्याजांतून नेहमीचीं दुरुस्ती साफसफाई वगैरे कामें होत असतात. याप्रमाणें विविध बाजूंनीं उपयुक्त कामगिरी चालविली आहे. सभेच्या मालकीच्या इमारती व जागा सुमारें दीड लाखाच्या आहेत. सुमारें पन्नास हजार रुपये विद्यार्थ्यांस दिले आहेत. व्यायामशाळा व सूतिकागृह चालविलें आहे. ही सर्व गेल्या चौदा वर्षांतील कामगिरी आहे. त्याचें श्रेय ब्राह्मण समाजांतील लहानथोर मंडळीला व त्यांतील स्वयंसेवक व उदार धनिक यांना आहे. आतां सभेच्या मुख्य गरजा म्हणजे सूतिकागृहासाठीं आणखी सुमारें तीस हजारांचा निधि जमवून नित्याच्या सर्व खर्चाची तरतूद करणें, व्यायामशाळेसाठीं व विद्यार्थ्यांसाठींही

कायमनिधि जमविणें हृया आहेत.सभेंत व्याख्यानें, कीर्तनें, प्रवचनें यांच्या रूपानें ज्ञानदानाचें काम सतत चाललेलें असतें. याशिवाय धार्मिक शिक्षण देण्यासाठीं वर्ग, स्त्रियांना शिवणकामाचें शिक्षण देण्यासाठीं व त्यांना आरोग्य-विज्ञानाचे बाबतींत माहिती देण्यासाठीं, इंग्रजी शिक्षण व मुलींना व्यायामाचें शिक्षण देण्यासाठीं वर्ग काढलेले आहेत. याप्रमाणें ब्राह्मणसभेची थोडक्यांत हकीकत आहे. ट्रस्टीः–श्री. पां. वा. काणे, श्री. ग. गो. नवरे,श्री. ग. वि. साळवेकर, सल्लागार–श्री. वा. श्री.आपटे, श्रीं. ज. र. घारपुरे. साधारण सभा अध्यक्षः–– डॉ. वि. ना. भाजेकर. उपाध्यक्ष–श्री. पु. धों. वैद्य, श्री. अ. ग. साठचे, डॉ. रा. ह. भडकमकर,श्री. ह. के. गोखले, व्यवस्थापक मंडळ अध्यक्ष– श्री. मो. भा. भाटवडेकर. उपाध्यक्ष–श्री. अ. बा. गजेंद्रगडकर. खजिनदार–डॉ. सी. का. गोखले, श्री. कृ. ग. पणशीकर, श्री. प. पां. महाजन. चिटणीसः–श्री. अं. गो. पुणतांबेकर, २ श्री. का. वि. खानवीलकर. पत्ता––ब्राह्मण सभा,शंकरवाडी गृह १९० चर्नीरोड, गिरगांव, मुंबई.

२० **ब्राह्मण सेवा संघ,** कुर्लाः––स्थापना शके १८४२ उद्देश–गरीब व अनाथ ब्राह्मण मुलांस मदत करणें, ब्राह्मण पोटजातींत परस्परांविषयीं प्रेमसंवर्धन करणें, व अशा रीतीनें ब्राह्मण जातीची सर्वतोपरी शक्त्यनुसार उन्नति करणें. सुरवातीस ९ सभासद होते. आतां ३७ तहाहयात व १४६ साधारण मिळून एकंदर १८३ सभासद आहेत. या संस्थेचीं कामें–या संस्थेकडून रामनवमी, वसंतोत्सव, श्रावणी, गणेशोत्सव, कोजागिरी, गीताजयंती यासारखे धार्मिक व टिळक पुण्यतिथि, शिवजयंती या राष्ट्रीय विभूतींच्या जयंत्या व पुण्यतिथ्या मिळून एकंदर १०–१२ उत्सव वर्षांतून साजरे होतात. गीताजयंतीचे दिवशीं मुलांमुलींची धार्मिक विषयांत परीक्षा घेऊन त्यांत यशस्वी होणाऱ्या मुलांमुलींस बक्षिसें देण्यांत येतात. या संस्थेचें एक वाचनालय आहे. संघाच्या सभासदांसाठीं "ब्राह्मण सेवासंघ परस्पर साहाय्यकारी" नांवाची पतपेढी चालू असून हिची दरवर्षी सुमारें ४|५ हजार रुपयांची देवघेव होते. चिटणीस गो. ना. सोमण.

२१. **मराठा ऐक्येच्छु सभा**:–– स्थापना १८८७. उद्देश–१ मराठा व तत्सम जातींत ऐक्यवृद्धि, २ निरनिराळ्या हक्कांचा पुरस्कार; ३ शिक्षणप्रसार. सभेनें मुंबईस १९१२ सालीं मागासलेल्या मराठी बोलणाऱ्या जातींच्या पुढाऱ्यांची परिषद् भरविली. सभेचें प्रतिनिधित्व सरकारास मान्य आहे. शिक्षणफंड–रु. १५०००. सभासदांची संख्या सुमारें ११०. अध्यक्ष–कृ. अ. केळुसकर. पत्ताः–खांडके बिल्डिंग नं. ३, दादर, मुंबई.

२२. **राष्ट्रधर्म**, मुंबईः–– स्थापना १९२७ हिंदी जनतेची सार्वांगिक प्रगति व्हावी या ध्येयास अनुसरून देशकालस्थित्यनुरूप निरनिराळ्या संस्था काढणें व त्या चालविणें, हा संस्थेचा उद्देश आहे. हितेच्छु, अनुयायी, सभासद, तहाहयात सभासद, प्रचारक असे निरनिराळे संस्थेच्या घटकांचे वर्ग आहेत. राष्ट्रधर्म निधि जमा–५३३६ रु. ४ आ. ७ पै. त्यांतील सरस्वती मठ संस्थेस २००३–१३–३ रु. व शिल्लक ३२६१–१२–७ रु. बाकीचा किरकोळ खर्च. राष्ट्रधर्म सरस्वती मठ संस्था–स्थापना १९२७ अनुयायी ६२९; १९३० अखेरपर्यंत एकंदर निरनिराळ्या खेडेगांवीं ८ मठ स्थापन केले. उद्देश खेडेगांवांतून शिक्षण–प्रसार. संस्थेस खेड्यांतील जनतेकडून चांगलें साहाय्य मिळतें. राष्ट्रधर्मनिधीकडून २००३–१३–३ रु. आले व तेवढाच निरनिराळ्या मठांकडे व किरकोळ मिळून एकंदर खर्च झाला. भूमाता नैवेद्य २२४७–९–९ रु. त्यांतील पोस्टेज, छपाई इ. खर्च वजा जातां २२१२–६–३रु. इतकी रक्कम राष्ट्रधर्मनिधीकड दिली. व्यवस्थापक स. म. संस्था– श. अ. गोपुजकर,प्रचारक राष्ट्रधर्म–रा. ना. मोघे पत्ता–गणपति बिल्डिंग, मुंबई नं. ६

२३. **लोकमान्य सेवासंघ** पारलेंः–स्थापना शके १८४४. लोकमान्य टिळक यांचें पारलें गांवांतील सार्वजनिक स्मारक. सनदशीर मार्गानें लोक जागृति करणें व जनहितार्थ झटणें असा या संघाचा उद्देश राहील. या संस्थेच्या उत्सव शाखा, करमणूक शाखा, प्रचारक शाखा, म्युनिसिपल शाखा, व्यायाम शाखा, शिक्षण शाखा, स्त्रीशाखा, स्वदेशी वस्तुप्रचार व काटकसर फंड अशा निरनिराळ्या शाखा आहेत.हल्लीं सुमारें चारशें सभासद आहेत. एकूण जमा ८५९६–१३–६ रु. खर्च ८३८८ रु. ८ आ. ११ पै. व शिल्लक २०८–४–७ रु. अध्यक्ष गो. रा. फाटक. उपाध्यक्ष–वा. रा. हेरलेकर. चिटणीस–श्री. शं. का. गोखले श्री. र. वि. कानिटकर.

२४ वैश्य हितवर्धक समाज मुम्बई– स्थापना १९१८. ज्ञातींतील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांस शिक्षणासाठीं मदत करणें, वेगवेगळ्या गांवीं प्राथमिक शाळा उघडण्याचा प्रयत्न करणें. निराश्रित स्त्री अगर पुरुष मयत झाल्यास त्याच्या

प्रेतसंस्कारास मदत करणें इत्यादि संस्थेचे उद्देश आहेत. १९२९ सालीं पटावर ५२८ सभासद होते. संस्थेनें गुजराथेंतील दुष्काळग्रस्तांना मदत केली. संस्थेनें एक पतपेढी सुरू केली असून संघांत मदत करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. १९२९ अखर जमा २८७२ रु. खर्च ७८०–४–६ रु. व शिल्लक २०९१–११–७ रु.

२५ व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट मुम्बई:—या संस्थेंत खालील विषयांचें शिक्षण होते. १ मेकॅनिकल इंजिनियरिंग (यंत्रविज्ञान) २ टेक्स्टाइल मॅन्युफॅक्चर्स (वीणकाम) ३ इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग (विद्युत्विज्ञान) ४ टेक्निकल व अप्लाईड केमिस्ट्री (व्यावहारिक रसायनशास्त्र) सॅनिटरी इंजिनियरिंग व प्लंबिंग (आरोग्य–विज्ञान व नळ बसविणें) प्रत्येक शाखेच्या विशेष शिक्षणाखेरीज, गणित, मेकॅनिक्स् मशीन ड्रॉइंग इ. विषय सर्व विद्यार्थ्यांना शिकावे लागतात. केमिस्ट्रीच्या विद्यार्थ्यांना सामान्य शिक्षण २वर्षें व पुढील दोन वर्षांमध्यें पुढें दिल्यापैकीं कोणचीही शाखा निवडून विद्यार्थी त्याचा विशेष अभ्यास करतो. (अ) Oil Extraction, Purification, Desolorisation (ब) साबण मेणबत्त्या तयार करणें, (क) रंग व्हार्निश तयार करणें, (ड) Food and Drug analysis (इ) Textile and Tinctorial Chemistry प्रवेश–१९०७ सालापासून संस्थेची स्वतंत्र प्रवेशपरीक्षा घेण्यांत येते. मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग, आणि टेक्निकल केमिस्ट्री या विषयांसाठीं प्रवेश हवा असेल तर प्रवेशपरीक्षेंत शेंकडा ४५ गुण मिळावे लागतात. इतरांसाठीं ४० चालतात. प्रवेश परीक्षेसाठीं प्रीव्हियस पास झालेले विद्यार्थी आधीं पसंत केले जातात. ही प्रवेशपरीक्षा १९२६ सालापासून कलकत्ता, कानपूर, लाहोर, मद्रास, नागपूर, पाटणा व मुंबई येथें घेतली जाते. मुंबईचे विद्यार्थी आधीं घेतले जातात. सर्व प्रांतांतले विद्यार्थी संस्थेंत आहेत. १९३० सालीं ४।५ जूनला परीक्षा झाली. परीक्षा नेहमी तेव्हांच होते. ३८३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. पैकीं १५३ पास होऊन त्यांना प्रवेश मिळाला. त्यांत ८९ मुंबई प्रांताचे, २५ मद्रास, इराण १ व बाकी हिंदुस्थानांतील इतर प्रांतांतले होते. सामान्यतः २० जून ते सप्टेंबर अखेर पहिली टर्म व नोव्हेंबर सुरवातीपासून मार्च १५ पर्यंत दुसरी टर्म असते. विद्यार्थी एकंदर शिक्षणक्रम ४ वर्षांचा आहे. १९३१ सालीं पहिल्या वर्गांत १४१ दुसऱ्यांत १०६ तिसऱ्यांत १२५ व चौथ्यांत १०७ मिळून ४७९ विद्यार्थी होते. त्यांत १२८ ब्राह्मण, १३८ इतर हिंदू, ८० पारशी, ६ मराठे, ५० खालच्या वर्गाचे हिंदु, ३५येथले ख्रिस्ती व ब.की ज्यू, लिंगायत वगैरे होते. या मुख्य शिक्षणक्रमाखेरीज इंजिनियरिंग टेक्स्टाईल, इलेक्ट्रिकल वायरमेन यांचे अॅप्रेंटिस वर्ग संस्था चालविते. गिरणी कामगार, रेल्वेकामगार यांच्यासाठीं येथें ६ महिन्याचा अभ्यासक्रम ठेवला आहे. बारीकसारीक कामें येथून पुष्कळ लोक शिकून जातात. सिटी अँड गिल्ड्स् ऑफ लंडन या संस्थेची परीक्षा येथें घेण्याची व्यवस्था व्हि.ज्यु. संस्थेनें केली आहे. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका इंग्लंडहून येतात व पेपर तपासावयासही इंग्लंडला जातात. आतांपर्यंतच्या निकालावरून पाहातां इंग्लंडच्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें या संस्थेचे विद्यार्थी पास होतात. पत्ताः—परेळ, मुंबई

२६ श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम, दादर मुंबई. (शांतिकुंज, नायगांव क्रॉसरोड) स्थापना १९२८ हा 'दि हिंदू वुइमेन्स रेस्क्यू होम सोसायटी'नें काढलेला पहिला आश्रम होय. संकटांत सांपडलेल्या कोणत्याहि जातीच्या अनाथ हिंदु स्त्रीला आश्रय देऊन मदत करणें हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. असा आश्रय देण्याकरितां संस्था ठिकठिकाणीं आश्रम स्थापन करील. वरील आश्रम हा असा पहिला प्रयत्न आहे. १८ वर्षांवरील कोणाही हिंदु स्त्री–पुरुषाला वार्षिक ३ रुपये देऊन सभासद होतां येतें. शिवाय आश्रयदाते व आजन्म सभासद असे वर्ग आहेत. चार वर्षांत एकंदर २३० स्त्रियांना व १३६ मुलांना आश्रमांत आश्रय मिळाला. दिवसानुदिवस संस्था अधिक लोकांस उपयोगी पडत आहे. संस्थेंत स्त्रिया निरनिराळ्या स्थितींत येतात. पतित, अनाथ, संकटांतून सोडविलेल्या, नवऱ्यानें टाकलेल्या व नवऱ्याला टाकून आलेल्या, तात्पुरत्या आश्रयार्थ व फक्त प्रसूतीकरितां अशी त्यांची वर्गवारी करतां येईल. आलेल्या स्त्रिया कांहीं नवऱ्याकडे किंवा पालकांकडे परत पाठविण्याची सोय होते. कांहींचीं लग्नें होतात, तर कांहीं कामधंदा पत्करतात. कांहीं पळूनही जातात. तरीपण अशी संख्या उरतेच कीं, त्यांचें कांहींही करतां येत नाहीं व आश्रमही त्यांना सतत आश्रय देऊं शकत नाहीं. यांची योग्य विल्हेवाट कशी लावावी, हा प्रश्न अजून सुटला नाहीं. आश्रम केवळ स्त्रियांच्याकरितां असला तरी त्यांच्या अनुषंगानें अर्भकें व १० वर्षांच्या आंतील मुलें आश्रमांत घेण्यांत येतात.

अवाढव्य मुंबई शहरांत बेवारशी हिंदू मुलें संभाळणारी केवळ हिंदूंची अशी एकही संस्था नाहीं. अशीं मुलें घण्याबद्दल आश्रमाकडे नित्य विचारणा करण्यांत येते. पण द्रव्याच्या अभावीं तान्ह्या मुलांची सोय संस्थेला अद्यापि करतां येत नाहीं. आश्रमांत जन्मलेल्या मुलांची सोय विजापूर, नागपूर इत्यादि ठिकाणच्या बालकाश्रमामध्यें संस्था करते. आश्रमांत प्रविष्ट झालेलीं मुलें कांहीं आप्तांच्या बरोबर जातात, कांहीं दुसरीकडे बाळगण्यास देतात, दुसऱ्या संस्थेंत पाठवतात व कांहीं पालकांकड पोहोंचती होतात. थोडींबहुत मृत्युमुखीं पडतात. आश्रमांतील चालतीं बोलतीं मुलें म्युनिसिपल शाळेंत जातात. स्त्रियांना नैतिक आणि धार्मिक आचारात्मक शिक्षण प्रामुख्यानें देण्यांत येते. हें काम श्रीमती लक्ष्मीबाई कोल्हटकर या करतात. पुष्कळ स्त्रियांचा 'सामाजिक पुनर्जन्म' होण्यास याच कारणीभूत झाल्या आहेत. याशिवाय संस्थेंत एक शिवणकामाचा वर्ग असून शक्य तें कलात्मक शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. आश्रमांत देवी अहल्योत्सव, चैत्री हळदीकुंकू, रामनवमी इ. अनेक उत्सवसमारंभ साजरे होतात. १९३१ सालचा जमाखर्च जमा ३२३९७ रु. आश्रमखातें खर्च १९३१ सालचा ५७९१–१२–० रु. शिल्लक २६१३२–०–६ रु. अध्यक्ष बॅ. जयकर उपाध्यक्ष–शेठ गोविंदलाल शिवलाल मोतीलाल. श्री. बा. गं. खेर, सॉलिसीटर. श्रीमती सौ. ताराबाई माणिकलाल प्रमचंद. सेक्रेटरी–डॉ. माधव भैरव उदगांवकर, श्री. श्रीपाद शंकर नवरे. आश्रमव्यवस्थापिका–श्रीमती लक्ष्मीबाई कोल्हटकर. पत्रव्यवहार पत्ता:—सेक्रटरी श्री. अ. म. आश्रम हरी बिल्डिंग कस्टम हाऊस रोड फोर्ट, मुंबई.

२७ हेटकरी भंडारी मंडळ, दादर (मुंबई) स्थापना १९०७; ज्ञातीचें ऐक्य व सर्वांगीण उन्नति करणें हा संस्थेचा मूळ हेतु आहे. संस्थेनें गेल्या २५ वर्षांत विद्यादानाच्या कामीं सुमारें ८००० रु. खर्च केले असून शिवाय सुमारें २५००० रु. ची स्थावर मिळकत आज स्वतःच्या मालकीची केली आहे. पटावर १०१५ सभासद असून त्यांपैकीं ३०० तहाहयात सभासद व ७१५ वार्षिक वर्गणीदार आहेत. संस्थेतर्फे निरनिराळे उत्सव साजरे होतात. ज्ञातिबांधवांना नोकरीधंदा मिळवून देणें व त्यांची स्थिति सुधारणें हें कार्य प्रथमपासून चालू आहे. अनाथांना अन्नवस्त्र देणें व निराश्रितांचा प्रेतसंस्कार-खर्च करणें, या तत्त्वानुसार कोंकण पलड रिलिफ फंडास ५५४ रु. मदत दिली. ज्ञातींतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीच्या रूपानें आजपावेतों ७५९२ रु. मदत केली. पदवीधर मंडळींचा पारितोषिकें देऊन गौरव करण्यांत येतो. सरस्वती उत्सवांत ज्ञातींतील बालबालिकांची वक्तृत्व चढाओढ होऊन बक्षिसें वाटण्यांत येतात. संस्थेच्या २६व्या वाढदिवसानिमित्त रौप्य महोत्सव प्रसंगीं ज्ञातीचा 'डिरेक्टरी' वजा ज्युबिली रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे. मर्दानी खेळांत प्रावीण्य संपादणारांस बक्षिसें दिलीं जातात. मंडळाच्या सभासदांकरितां 'हेटकरी भंडारी को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' काढली आहे. आज तिचे २९७ सभासद असून खेळतें भांडवल २०००० रु. वर आहे. ज्ञातींत वक्ते, कीर्तनकार व प्रवचनकार तयार व्हावेत म्हणून 'हेटकरी भंडारी स्वयंसेवक संघ' अशी एक संस्थेची पोटशाखा असून तिच्या मार्फत सभा वगैरे होतात व तेथें होतकरू मंडळी व्याख्यानें देतात. महायुद्धाचे वेळीं भंडारी लोकांची डबल कंपनी उभारण्यासाठीं ७०० रु. खर्च केला व संस्थेनें ३५ रिक्रूट मिळवून दिले. संस्थेला गेल्या २५ वर्षांत ५०४३५–१४–२ रु. लोकांकडून आश्रय मिळाला. भंडारी ज्ञातींतील २५०० पेक्षां अधिक मंडळींनीं संस्थेस हातभार लाविला. संस्थेची स्वतःची एक इमारत आहे. हेटकरी महाजनवाडीचें वार्षिक उत्पन्न सुमारें १३०० रु. आहे. याशिवाय दरवर्षीं वर्गणी म्हणून व शिक्षणफंडास देणगी म्हणून मिळून १०००–१२०० रु. जमा होतात. यांतून शिष्यवृत्त्या देण्याकरितां ७००–८०० रु. खर्च होतात. ही संस्था ज्ञातींतील पोटभेद वगैरे न मानतां मदत करते. इतर ज्ञाति, परज्ञातिसंस्थांशीं ही संस्था पूर्ण सहकार्यानें वागत असून केवळ स्वावलंबनानें समाजकार्य करीत आहे. अध्यक्ष–श्री. ह. ये. साळसकर, उपाध्यक्ष–श्री. कृ. भि. वायंगणकर, श्री. दा. धों. पावसकर. सेक्रेटरी–गोविंद विष्णु चमणकर. पत्ता:—हेटकरी महाजन वाडी दादर.

रत्नागिरी

१. तेली समाजोन्नति संघ, अंजनवेल (चिपळूण) स्थापना शके १८५० तेली समाजांतील ठिकठिकाणीं असलेल्या लोकांचें दळणवळण सुरू होऊन एकमेकांची ओळख पटली जावी व समाजांत शिरलेल्या अनिष्ट व घातुक रूढींचें उच्चाटण व्हावें एतदर्थ प्रयत्न चालू आहेत. समाजातर्फे सार्वजनिक रीत्या श्रीक्षेत्र सुदुंबरें येथें भगवद्भक्त श्रीसंताजी महाराज जगवाडे यांची पुण्यतिथि त्यांच्या समाधिमंदिरासमोर दरसाल

साजरी केली जाते. कार्यकर्ते–गोविंद रामशेट राऊत पडवेकर, ऑफिस–अबू बिल्डिंग, २रा मजला डिलाईल रोड, पोष्ट नं. १३ मुंबई.

२. परशुराम एज्युकेशन सोसायटी चिपळूणः––स्थापना–१९१८ उद्देश–"चिपळूण तालुक्यांत व इतर निरनिराळचा ठिकाणीं संस्था स्थापून शिक्षणाचा प्रसार शक्त्यनुसार करणें" घटना–पेट्रन्स, व्हाइस् पेट्रन्स, फेलोज्, ऑर्डिनरी मेंबर्स व लाइफ मेंबर्स असे तिचे घटक असून दरतीन वर्षांनीं निवडलेलें कौन्सिल व गव्हर्निंग बॉडी हीं मंडळें तिची सर्व व्यवस्था पाहतात. सोसायटीची सर्व मालमत्ता ट्रस्टींच्या ताब्यांत असते. कार्य–सोसायटीनें चालविलेल्या 'युनायटेड इंग्लिश स्कूल' नांवाच्या हायस्कुलांत सन १९३१ सालीं ११४ पांढरपेशे, ३६ मध्यमवर्गीय व २१ मुसलमान मिळून १७१ विद्यार्थी पटावर होते. मुसलमानां-करितां पर्शियन टीचर आहे. देणगी म्युनिसि-पालिटी ५०० रु. दरसाल. सोसायटीचे हाय-स्कुलांत सध्यां ११ शिक्षक असून त्यांत पांच ग्रॅज्यु-एट्स् व दोन एस्. टी. सी. परीक्षा दिलेले आहेत. सुपरिंटेंडेंट श्री. पु. वि. पोंक्षे. सांपत्तिक स्थिति–कायमनिधि १३३८–८–११– रु. चालू निधि–जमा १४५८६–१२–१ रु. खर्च १२९२४–०–५ रु. शिल्लक १६६१ रु. ८ आ. ५ पै. अध्यक्ष–डॉ. वि.ना. भाजेकर एफ्. आर. सी. एस्. (मुंबई)–चिटणीस–श्री. आर. व्ही. जोशी, श्री. डी. व्ही. लिमये बी. ए.

३. शिक्षण प्रसारक मंडळ राजापूरः–(१) राजापूर हायस्कूल-इंग्रजी शाळा स्था. १८९० तिला हायस्कूलचें रूप १९१२ सालीं आलें. शाळें-तील विद्यार्थी सरासरीनें ३०० ; कांहीं वर्गांत चित्र-कला, सुतारकाम व शतकी ह्यांचें शिक्षण आव-श्यक केलें आहे. विद्यार्थ्यांस स्वावलंबी बनविणें हें ध्यय. प्रतिवर्षीं सरकारी ग्रँट सुमारें ४५०० रु. मिळते. शाळचा वार्षिक खर्च सुमारें १७५०० रु. (२) शेतीशाळा–उद्देश सध्याच्या एकांगी शिक्ष-णांत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर दिला जाणारा फाजील भर कमी करून हस्तव्यवसाया-त्मक शिक्षणानें त्यांच्या सर्वांगीण उन्नतीस मदत व्हावी म्हणन १९२० सालीं औद्योगिक शिक्षण सुरू करण्याचें धोरण हायस्कूलच्या चालकांनीं निश्चित केलें. कार्य या धोरणाची पहिली पायरी म्हणून १९२३–२४ सालीं सुतारकामाच्या वर्गाची जोड. १९२८ सालीं स्वतंत्र शेती शाळा काढली. अभ्यासक्रम २ वर्षांचा ठेवण्यांत आला. मार्च १९३१ अखेर विद्यार्थ्यांची संख्या १४; अभ्यास-क्रमांत वर्गांतील काम व प्रत्यक्ष शेतावर काम असे विभाग आहेत. १९३० सालीं आजूबाजूच्या खेडचां-तील शेतकऱ्यांना भात, नागली व इतर पिकांचे प्रयोग दाखविण्यांत आले. शिवाय विद्यार्थ्यांना कोंबडचांची पैदास, Fruit canning, वगैरे दुय्यम धंदेही शिकविण्यांत यतात. डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाकडून प्राथमिक खर्चासाठीं ५०० व पुढें दरसाल १००० रु. ची. ग्रँट मिळते. राजापूर तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनकडून प्राथमिक खर्चासाठीं रु. ५०० व पुढें दरसाल रु. ५०० या-प्रमाणें ग्रँट मिळते. शिक्षणप्रसारक मंडळाचे अध्यक्ष–श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, चीफ ऑफ इचलकरंजी. सेक्रेटरी–श्री. सरदेशपांडे.

४. संस्कृत पाठशाळा राजापूरः–– ही पाठशाळा शके १८११ मार्गशीर्ष कृष्ण ८ या दिवशीं राजापूर व मुंबई येथील एक प्रसिद्ध व्यापारी कै. वा. श्री. अंताजी महादेव बोरवण-कर यांनीं स्थापिली. कोंकण प्रांतामध्यें–विशे-षतः रत्नागिरी जिल्हयामध्यें– प्राचीन परंपरेनें संस्कृत–शास्त्र–शिक्षणाची सोय व्हावी या हेतूनें ही पाठशाळा त्यांनीं स्थापन केली व तेव्हांपासून शाळेचा सर्व खर्च (अध्यापक–दक्षिणा, दिवाबत्ती, बैठका इत्यादि सुमारें ५।६ शें रुपये) तेच करीत असत. दुसरा कोणी साहाय्यक नव्हता. कै. अंताजी-पंतांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव कै. भास्करराव यांनीं तें काम तसेंच पुढें चालविलें. पश्चात् त्यांचे चिरंजीवही परिस्थित्यनुसार तें काम चालवीत आले आहेत. शके १८३८ मध्यें गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना साहाय्य करून जरूरीप्रमाणें अधिक अध्यापक नेमावे आणि अशा रीतीनें पाठशाळेला उत्तेजन द्यावें या हेतूनें एका निधीची स्थापना कै. डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आली. त्याला आज १५ पंधरा वर्षें झालीं. एवढचा कालांत साधारणपणें ३२।३३ हजार रुपये संस्थेकडे जमा झाले व त्यांतील ६।। हजार रुपये शाळेचे मुख्याध्यापक वैकुंठवासी गुरु पं. दत्तात्रेयशास्त्री निगुडकर यांचे स्मर-णार्थ बांधिलेल्या 'श्रीमद्दत्तात्रेय गुरुगृहा' करितां व इतर सुमारें १२ हजार रु. विद्यार्थ्यांस साह्य व अध्यापक–दक्षिणा वगैरे कामाकरितां खर्च झाले असून सु. १४ हजार रु. संस्थेपाशीं शिल्लक आहेत. संस्थेच्या पाठशाळेला जोडून एक 'संस्कृत ग्रंथसंग्रहालय' शके १८२९ सालीं स्था-निक मंडळीचे साहाय्यानें स्थापण्यांत आलें आहे.

व त्यांत आजमितीस सुमारें ५००० ग्रंथ जमले आहेत. त्यांत मुद्रित ३००० व लिखित २००० आहेत. शाळेमध्यें विद्यार्थ्यांची संख्या पूर्वी सरासरी २५ असे. अलीकडे ती वाढून ४० ते ५० पर्यंत होत आली आहे. शाळेंत शिक्षण घेणारे विद्यार्थी पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेकडे व कलकत्ता सं. असोसिएशनकडे परीक्षेला पाठविण्यांत येतात. शाळा सोडल्यानंतर विद्यार्थी छापखान्यांत अगर शाळांवर 'शास्त्री' म्हणून काम करितात. अथवा पुराण, प्रवचन, कीर्तन, वैद्य, ज्योतिषी, पुरोहित इत्यादि व्यवसाय करितात. अशी संख्या साधारणपणें १०० तरी भरेल. हें शके १८५० सालीं झालेल्या संमेलनावरून स्पष्ट समजून आलें आहे. देणगीदारांमध्यें सुप्रसिद्ध दानशूर श्री. केशवराव गोखले यांचे २२०० रु. कै. रामचंद्रशास्त्री पाध्ये मुंबई यांचे ट्रस्टींकडून आलेले ३००० चे म्यु. बॉन्ड्स् , श्री. शिवराम गोविंद रानडे पेन्शनर मास्तर इळिपें (देवगड) यांचे १००१ इत्यादि प्रमुख देणग्या आहेत. 'आर्यवैद्यकाचा वर्ग' सुरूं करावा, असें ध्येय चालकांनीं सांप्रत बाळगिलें असून त्याकरितां ६।७ हजार रु. कर्ज काढून इमारत बांधण्यांत आली आहे. व्यवस्थापक–र. कृ. पाटणकर.

५. हिंदुसभा, रत्नागिरी स्थापना १९२४. उद्देश–अखिल हिंदु जातीस संघटित, सबळ आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यास समर्थ करून तिची सर्वांगीण उन्नति साधणें आणि अशा रीतीनें मनुष्याच्या हितार्थ झटण्याची शक्ति तिच्यांत उत्पन्न करणें. कार्य–हिंदुस्थानांतील हिंदुसभांशीं व हिंदुसंघटनाप्रीत्यर्थ झटणाऱ्या संस्थांशीं सहकार्य करणें. पक्षोपपक्षांत व जातीजातींत प्रेम व सहकार्य उत्पन्न करण्याचा यत्न करणें. हिंदुराष्ट्रार्थ झटणाऱ्या ऐतिहासिक हुतात्म्यांचे व महात्म्यांचे उत्सव करणें. स्वदेशीचा प्रसार, शारीरिक, शिक्षणास उत्तेजन, अस्पृश्यतानिवारण शुद्धीकरण.

विजापूर

१ दोशी रावजी मियाचंद जेन मोफत औषधालय–चडचण :— स्थापना १९२७; उद्देश–"चडचण गांवांत अगर आजूबाजूस इतर गांवीं दवाखाना नाहीं म्हणून या खेड्यांतील लोकांना वेळेवर औषध मिळण्याची व्यवस्था करणें." साहाय्यक– श्री. गुलाबचंद रावजी यांनीं ८००० रु. दिले व संस्था ट्रस्टींच्या अनुमतीनें चालावी असें ठरविलें. कार्य–औषधें देण्याकरितां एक वैद्य असून आजपर्यंत सुमारें ४५००० रोग्यांना मोफत औषधें देण्यांत आलीं. सांपत्तिक स्थिति–सन १९३० जमा ८०० रु. १४ आ. ९ पै; खर्च ७८९ रु. ९ आ. ६ पै. व्यवस्थापक–शेट दोशी जिवराज रावजी पत्ता पो. चडचण, जि. विजापूर.

सातारा

१. आयुर्वेद प्रसारक मण्डळी, सातारा:—स्थापना १९१३; उद्देश–महाराष्ट्रांत आर्यवैद्यकाचें अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकाचें शिक्षण देणें, आर्यवैद्यकाचीं मोफत औषधालयें व रुग्णालयें काढणें, शास्त्रोक्त व खरीं आर्योषधें तयार करण्याचा कारखाना काढून तीं वैद्यवर्गाला व जनतेला पुरविणें. सभासदत्वाचे चार प्रकार आहेत. संस्थेस मिळालेल्या कायमच्या देणग्यांतून शिष्यवृत्त्या सुरूं केल्या आहेत. रावबहादूर काळे यांनीं दिलेल्या ५००० रु. च्या निधीच्या व्याजांतून "रामचंद्र बल्लाळ काळे स्मारक मोफत आयुर्वेदीय दवाखाना" चालू आहे. सातारा जिल्हा लोकलबोर्डाकडून दरसाल ४०० रु. ची मदत. आयुर्वेदीय दवाखान्यास सातारा म्यु. दरसाल १००-रु. देणगीदाखल देत होती. सध्यां देणगी बंद झाली आहे. शवच्छेदन–गृह बांधून पुरें झालें आहे. आर्यांग्ल वैद्यक विद्यालयांत ३५ विद्यार्थी आहेत, त्यांत १ विद्यार्थिनी आहे. कार्यवाह डॉ. आगाशे.

२ डेक्कन इंडस्ट्रियल यूनियन, समर्थपूर:– स्थापना स. १९२६. हेतु–'औद्योगिक शाखेंत मिळविलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष धंद्यास उपयोग करून देणें. चालकांनीं प्रथम टिळक महाविद्यालयाच्या औद्योगिक शाखेंत शिक्षण घेतलें. परंतु त्या शाखेचें पूर्ण ज्ञान व्हावें म्हणून किर्लोस्करवाडी येथील कारखान्यांत शिक्षण ३।४ वर्षें घेतलें. संस्थापक–रा. खरे, गोगटे, लागवणकर, हरोलीकर, गोखले, जोशी, गोडबोले. साहाय्यक–कऱ्हाडचे कै. नानासाहेब भागवत, रा. रा. बाळासाहेब वेलापुरे, अर्बन को. बँकेचे व्यवस्थापक, ओगले ग्लास वर्क्स, 'किर्लोस्कर बंधु' वगैरे.

कार्य:–संस्थेच्या सुरवातीस भांडवल थोडें असल्यामुळें लांकूडकाम, लोखंडाचें काम, बाहेरील लोकांची यंत्रदुरुस्ती व यंत्रउभारणी हीं कामें करावीं लागलीं. त्यावेळीं यंत्रउभारणीच्या

व दुरुस्तीच्या कामामुळें आसपासच्या लोकांना मदत मिळून त्यांची गैरसोय दूर झाली व संस्थेसहि आर्थिक फायदा झाला. संधि मिळतांच लाकूड कामाचें पर्यवसान नौकाबंधनांत चालकांनीं केलें व गेलीं चार वर्षें त्याच क्षेत्रांत त्यांना भरपूर काम मिळालें व त्या धंद्यास लागणारें ज्ञान प्रत्यक्ष व तात्त्विक, हें चालकांनीं मिळवून त्यांत पुष्कळच प्रगति गेली. त्यांनीं सातारा, बेळगांव वगैरे जिल्हा लोकलबोर्डाला व औंध, जमखंडी, सांगली, वगैरे संस्थानांना बऱ्याच नावा बांधून दिल्या, त्या उत्तम प्रकारें काम देत आहेत. अशा प्रकारें अगदीं अपरिचित अशा नवीनच धंद्यांत इतक्या अवधींत चालकांनीं समाधानकारक प्रगति केली खरी; पण त्याचप्रकारचें नौकाबंधनाचें काम त्यांना सतत मिळण्यास इकडील प्रांतांची परिस्थिति अनुकूल नाहीं, हें त्यांना ३।४ वर्षांच्या अनुभवानें लक्षांत आलें. व लगेच त्यांनीं कारखान्यास बिडाच्या ओतकामाची जोड देण्याचें ठरविलें. या कामाचें शिक्षण त्यांनीं किर्लोस्कर बंधू यांचे कारखान्यांत अगोदरच मिळविलें होतें. पण या धंद्यास कऱ्हाडची जागा अत्यंत गैरसोयीची म्हणून अनेक दृष्टींनें सोइस्कर व कारखान्यास उपयुक्त अशी जागा जमखिंडी संस्थानचे हद्दींत शिरवडें स्टेशनावर श्रीमंतांच्या मध्यस्थीनें चालकांनीं खरेदी केली व तेथें कारखाना नुकताच नेला. खुद्द जमखिंडी दरबारकडूनहि त्यांनीं कांहीं सवलती मिळविल्या आहेत.

आजची स्थितिः—सध्यां कारखान्यांत बिडाचें ओतकाम—कढड, बाकाचे पाय, लोखंडी नांगर, पलंग, पाळणे वगैरे नित्योपयोगी माल निघत असून मागणीप्रमाणें नौकाबंधनाचेंहि काम चालू असतें. कारखान्याचें आजपर्यंतचें वैशिष्टच "नौकाबंधनाचें" असल्यामुळें पुढेंहि अनुकूल वातावरण मिळतांच त्यांत प्रगति करण्याचा चालकांचा विचार कायमच आहे व त्या अनुरोधानें चालकांचे प्रयत्नहि चालू आहेत. सध्यां संस्थेजवळ शेअररूपानें व कर्जरूपानें दहा हजार रुपये भांडवल आहे. चालकांनीं कारखाना स्वतःच्या मालकीच्या जागेवर उभारला असून कायम स्वरूपाच्या कामाची जोड दिली आहे. चिटणीसः—रा. लक्ष्मण विनायक लागवणकर. पत्ताः—शिरवडें (एम्. एस्. एम्. रेल्वे) जि. सातारा.

३ प्राज्ञपाठशाळामण्डळ, वांईः—स्थापना १९२०; उद्देश—कर्तृत्ववान नागरिक तयार करण्यासाठीं स्वधर्म व स्वसंस्कृति एतत्प्रधान शिक्षण देणें व त्यासाठीं संस्था स्थापणें. (२) विद्यार्थ्यांच्या योग्यतेनुरूप व मंडळाच्या सामर्थ्यानुसार शास्त्रीय, व्यावहारिक व औद्योगिक शिक्षणाची सोय करणें. (३) स्वधर्माचा व स्वसंस्कृतीचा (हिंदुसमाजशास्त्राचा) सांगोपांग अभ्यास करणारे पंडित व धर्मोपदेशक ब्राह्मण तयार करणें. (४) लेखन—भाषणद्वारां स्वधर्म व स्वसंस्कृतीचा जनतेमध्यें प्रसार व जागृति करण्याकरितां विद्वन्मंडळें स्थापणें. संस्थापकः— पं. नारायणशास्त्री मराठे. घटना :—मंडळाचें काम व्यवस्थित होण्याकरितां साधारण मंडळ, चालक मंडळ, कार्यकारी मंडळ व निधि—मंडळ अशीं चार मंडळें नेमलीं आहेत. सभासदांचे वर्ग—आश्रयदाते, आजन्म सभासद, सामान्य सभासद व सभासद वर्ग १, २ व ३. कार्य—प्राज्ञपाठशाळा शके १८३८ विजयादशमीस स्थापन झाली. मंडळानें धर्मसाहित्य—संग्रह, प्राचीन शास्त्रांचें अध्यापन व माध्यमिक शिक्षण हीं तीन कार्यें चालविलीं आहेत. (१) धर्मसाहित्य संग्रह—अनेक धर्मग्रंथांतील वचनांचा संग्रह केलेला 'धर्मकोश' नांवाचा ग्रंथ तयार होत आहे. (२) प्राचीन शास्त्रांचें अध्यापन—प्राज्ञपाठशाळा ही केवळ पंचद्रविड व पंचगौड ब्राह्मणांकरितांच आहे. शास्त्रशिक्षण शाखेंत हल्लीं १९ विद्यार्थी शिकत असून पैकीं ४ व्याकरण, ३ न्याय, २ वेदांत, २ धर्मशास्त्र—मीमांसा, ८ काव्यव्युत्पत्ति शिकत आहेत. संस्कृत असोसिएशन कलकत्ता या संस्थेच्या काव्यप्रथमा, व्याकरणप्रथमा व मध्यमा व न्यायमध्यमा अशा परीक्षा या शाळेंतील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. (३) माध्यमिक शाखा—या शाखेंत ६६ विद्यार्थी शिकत आहेत. टिळक महाविद्यालयाचे प्रवेशपरीक्षेंत गेल्या दोन वर्षांत दहा विद्यार्थी पास झाले. विद्यार्थ्यांची वर्गवारी—कोकणस्थ ४५, देशस्थ ३३, ७ कऱ्हाडे, ६१ ऋग्वेदी, १७ हिरण्यकेशी व ७ शुक्लयजुर्वेदी. गीताजयंति, टिळकजयंति, गणेशोत्सव, गांधीजयंति, सरस्वत्युत्सव वगैरे महोत्सव पाठशाळेंत साजरे होतात. प्राज्ञपाठशाळा मंडळ पुस्तकमालेंतून (१) अस्पृश्योद्धार (२) धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण (३) क्षत्रिय—वैश्यांचें अस्तित्व (४) हिंदु विधवांचा धर्म (५) विद्यार्थी धर्म (६) आनंदमीमांसा (७) भारतवाचनपाठ (८) शुद्धिसर्वस्वम् हीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं. सांप-

त्तिक स्थिति– (शके १८५२–५३) मागील शिल्लक––१९९०२ रु. ६ आ. ७ पै; जमा ९७९८ रु. ११ आ. ११ पै; खर्च १०५११ रु. ११ आ. ५ पै; शिल्लक ११९८९ रु. ७ आ. १ पै. अध्यक्ष–पं. नारायणशास्त्री मराठे वेदांत–वाचस्पति, उपाध्यक्ष–श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, चिटणीस–श्री. म. बा. वाटवे. सध्यां नारायणशास्त्री मराठे (केवलानंद) यांनीं संन्यास घेतला असून संस्थेशीं असलेला सर्व संबंध तोडिलेला आहे. पत्ता:–– प्राज्ञपाठशाळा,वांई, जिसातारा..

४ शिक्षण–मंडळ, कऱ्हाड:–– स्थापना १९२०; उद्देश––लोकोपयोगी शिक्षण नवीन शाळा काढून देणें, शक्य तर प्रचलित शाळा ताब्यांत घेऊन चालविणें व इतर मार्गांनीं शिक्षणाचा प्रसार करणें. म्युनिसिपालिटीनें चालविलेली इंग्रजी ५ व्या इयत्तेपर्यंतची शाळा ताब्यांत घेऊन तिचेंच हायस्कुलांत रूपांतर करावें असें ठरलें. शिक्षणमंडळ व म्युनिसिपालिटी यांत वाटाघाट होऊन सामानासह शाळा मंडळाच्या ताब्यांत देण्याचें ठरलें व त्या शाळेस टिळक–हायस्कुलास दरसाल रु. २००० प्रमाणें पहिलीं पांच वर्षे मदत करण्याचें ठरलें व त्याप्रमाणें १–४–२१ रोजीं शाळा ताब्यांत दिली. 'शिक्षणमंडळ' ही संस्था १९२१ मे महिन्यांत रजिस्टर करण्यांत आली. विशेष देणग्या–कऱ्हाडचे व्यापारी शेठ किसनलाल प्रेमराज यांनीं आपल्या बंधूंच्या ट्रस्टमधून रु. ५००० ची इमारत हायस्कूलला बांधून दिली. श्री. पांडुरंग नाईक काळे यांनीं आपल्या खर्चानें 'काळे–व्यायामशाळा' संस्थेसाठीं बांधून दिली. श्रीमती आनंदीबाई काळे यांनीं संस्कृत विषयासाठीं व्याजांतून शिष्यवृत्ति देण्यासाठीं १५०० रु. ची देणगी संस्थेस दिली आहे. कै. बळवंतराव ढवळे यांनीं १००० रु. ची देणगी दिली आहे. स्टेशन रस्त्याचे कडेला कृष्णेच्या काठीं संस्थेच्या मालकीची विस्तृत जागा आहे. तेथें ३०० मुलांचे वर्ग चालतील एवढी मोठी सोयीची सुमारें २०००० रु. किंमतीची इमारत बांधली आहे. टिळक ज्युबिली ट्रस्ट फंडाचे ट्रस्टींकडून १००० रु. ची देणगी मंडळास मिळाली. (शिवाय पांडुरंग केशव शिराळकर २००० रु., श्री. ल. म. देशपांडे २००० रु., द. के. शिराळकर १००० रु. श्री. वि. द. शिराळकर १००० रु., पन्नालाल गोपीलाल मारवाडी १००० रु., हे लोक संस्थेचे आश्रयदाते आहेत.) म्यु. शाळेस दरसाल २००० रु. ची मदत करण्याच्या ५ वर्षांच्या कराराची मुदत संपल्यावर पुन्हां तसाच नवा करार झाला. १९२७ सालीं १३५० रु. ग्रँट मिळाली. १९२८ पासून ग्रँट रु. १६५० इतकी मिळते. नव्या करारांत ठरल्याप्रमाणें म्यु.कडून दरसाल २००० रु. ची ग्रँट मिळावयाची ती एकदांही मिळाली नाहीं. शिक्षण मंडळाच्या पुरस्कारासाठीं चालू असलेल्या रा. रेटरेकरांच्या प्राथमिक वर्गास सातारा जिल्हा लोकलबोर्डानें मान्यता देऊन १९३०–३१ त ६१ रु. ११ आ. ची ग्रँट दिली. १९३१ त विद्यार्थ्यांची संख्या २५६. मॅट्रिक्युलेशन परीक्षेचा निकाल या वर्षी शें. ६७ लागला. विद्यार्थ्यांनीं उद्योगमंदिर स्टूडंट्स् स्टोअर्स, डिबेटिंग सोसायटी व वाचनालय चालविलें आहे. १९२७ पासून हायस्कूलचें नियतकालिकही निघत असतें. हायस्कलतर्फे भीष्म, शिवाजी, तुकाराम, रामदास, नामदेव, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर वगैरेंसारख्या विभतींचे उत्सव साजरे केले जातात. त्या प्रसंगीं महाराष्ट्रांतील ठळक प्रमुख व्यक्तींचीं व्याख्यानें होतात. टिळक हायस्कूलचा जमाखर्च– जमा रु. १३२०६–११–९; खर्च रु. १३१५२–०–६; कार्यकारी मंडळ १९३०–३१––चेअरमन श्री. ग. अ. जोशी, सेक्रेटरी श्री. म. ह. दुवेरी.

५. शेतकी सुधारणा संघ, कऱ्हाड तालुका:––स्थापना १९२६; उद्देश–आधुनिक पद्धतीनें शेतींत सुधारणा घडवून आणणें, शेतकऱ्यांत दुय्यम धंद्याचा प्रसार करणें, व्याख्यानें वगैरेंच्या साहाय्यानें शेतकऱ्यांचें अज्ञान दूर करणें, शेतकरी वर्गाची आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिक प्रगति करणें इ०. सभासदांची संख्या ५६; शेतकी खात्याकडून ६६७ रु. ग्रँट; सातारा जिल्हा लोकलबोर्डाकडून ५०० रु. ग्रँट; रिपोर्टाच्या वर्षांत १६ सोसायटचा मेंबर झाल्या. कार्य– भुईमूग, बटाटे, कांदे, गहूं वगैरेचीं प्रयोगक्षेत्रें करण्यांत आलीं. मालखेड येथें १९३० मध्यें शेतकीविषयक प्रदर्शन. पाल येथें जत्रचे वेळीं शेतकीप्रदर्शन. पिकांवर पडलेल्या रोगांवर औषधें. लेगहार्न जातीच्या कोंबड्याच्या अंड्यांचा प्रसार. प्रेसिडेंट:– श्री. कल्याणी.

६. **श्रीसीतारामचंद्र वैदिक धर्मप्रसारक मंडळ**, सातारा:–श्री. सीताबाई कान्हेरे सातारा यांनीं शके १८४८ मध्यें 'श्री सीतारामचंद्र सनातन वैदिक सद्धर्म कार्यालय' स्थापन केलें. कार्यालयाचे दोन विभाग पाडले. पहिला विभाग अग्निहोत्र व दुसरा विभाग वेदपाठ व वेदश्रवण. दोनही विभागांतील कामें चालू आहेत. शके १८५३ मध्यें "श्री. उमाशंकर अद्वैत वेदांत विद्यापीठ" सुरू केलें. कार्यालय व विद्यापीठ हीं दोनही श्री. सीताबाईंच्या मालकीच्या इमारतींत व स्वखर्चानें चालूं आहेत. वरील दोनही संस्था निरंतर चालवावयाच्या असल्यामुळें त्या एकत्रित करुन 'श्री सीतारामचंद्र वैदिक धर्मप्रसारक मंडळ' असें नांव देऊन संस्थारूपानें शके १८५४ (इ.स. १९३२) मध्यें स्थापन केल्या. श्री. सीताबाईंनीं सदर संस्थेला (दोनही शाखांकरितां) स्थावर जंगम मिळून ६२३०० रु. दर्शनी किंमतीची मिळकत दिली आहे. त्याची स्टॅम्पाकरितां रोख किंमत रु. ४९३०० आहे. सदरची संस्था शाखांच्या द्वारें हल्लीं खुद्द श्री. सीताबाई चालवितात. त्यांच्या मूळ हेतूस अनुसरुन ही संस्था शाखांचे द्वारेंच त्यांचे पश्चातूही निरंतर चालू रहावी याकरितां अधिकार देऊन एकंदर सात पंच नेमिले आहेत. ते येणेंप्रमाणें:–श्री. सीताबाई भ्र. रामचंद्र वासुदेव कान्हेरे, संस्थापक, सरपंच व वहिवाटदार (सातारा); श्री. शं. रा. कान्हेरे श्री. द. कृ. गोसावी ब्रह्मनाळकर वकील, श्री. भाऊसाहेब सोमण वकील; श्री. का.रा. माजगांवकर वकील; वे. शं. वि. जोशी मोघे; श्री. रा. ज. साठ्ये. विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठीं परीक्षामंडळ नेमलेलें आहे. सभासदांचे वर्ग:–आश्रयदाते, तहाहयात सभासद, हितचिंतक इत्यादि. संस्थेची व्यवस्था श्री. सीताबाई स्वतःचे हयातीपर्यंत ट्रस्टडीडचे उद्देशाप्रमाणें सरपंच मुखत्यारीनें पाहाणार आहेत.

७. **स्वस्तिक मंडळ वांई**:– स्थापना १९३०; संस्थापक श्री. विष्णु वामन पाटणकर; उद्देश–'तरुणांची संघटना व त्यांचा सर्व तऱ्हेनें अभ्युदय करणें'. संस्थेचे चालक व कार्यकर्ते विद्यार्थीच आहेत. प्रथम स्वस्तिक नांवाचें हस्तलिखित पाक्षिक काढण्यांत येत असे. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळींत संस्थेच्या नऊ कार्यकर्त्यांनीं भाग घेतला. १९३१ च्या प्रारंभापासून संस्था राजकीय चळवळीपासून अलिप्त झाली. स्वस्तिक–मंडळ—पुस्तकमाला:—या मालेचीं (१) आदर्शयुवक व (२) अस्पृश्यतेचें उच्चाटण हीं दोन पुस्तकें प्रकाशित झालीं आहेत. वांई तालुक्याची उपयुक्त पण दुर्मिळ अशी माहिती यांत संग्रहित केली जात आहे. अध्यक्ष विष्णु वामन पाटणकर पत्ता–शाहीर चौक, गंगापुरी, वांई जि. सातारा.

सोलापूर

१ **बालहत्या-प्रतिबंधक गृह व अनाथ बालकाश्रम** पंढरपूर:—(सन १९२८ ते १९३० च्या रिपोर्टावरुन). सन १८७५ सालीं अनाथ बालकांच्या प्राणरक्षणाच्या हेतूनें रा. ब. लालशंकर यांनीं प्रथम एक लहानशी संस्था काढली. परंतु अर्भकांच्या प्राणरक्षणासाठीं उपाययोजना करण्यापेक्षां त्यांच्या मातांसच प्रसूतीपूर्वी ह्या गृहांत ठेविल्यानें बालहत्येचें प्रमाण कमी होईल असें वाटून प्रसूतिगृहाची स्थापना करण्यांत आली. नंतर १८७६–७७ सालीं भयंकर दुष्काळ पडला. त्यावेळीं अन्नपाण्यावांचून भटकणाऱ्या मुलांचें प्राणरक्षण रा. ब. लालशंकर यांनीं सरकारच्या साहाय्यानें केलें. दुष्काळाचा ताप कमी झाल्यावर पुष्कळ मुलें आईबापांनीं नेलीं; व बाकीच्यांची जोपासना करण्यासाठीं अनाथबालिकाश्रम ऑर्फनेज स्थापण्यांत आला. १८८१ पर्यंत रा. ब. लालशंकर व त्यांचे मित्र रा. अनंत नारायण दांडेकर यांनीं ह्या संस्था चालविल्या. गेलीं ५० वर्षें ह्या संस्था मुंबई प्रार्थना समाज चालवीत आहे. हल्लींच्या मुख्य इमारतीसाठीं शेठ चतुर्भुज मुरारजी यांनीं अकरा हजार रुपये दिले. सर नारायणराव चंदावरकर यांनीं कै. सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर ह्यांच्या स्मरणार्थ दहा हजार रुपये आर्य महिला समाजाच्या दूध फंडास दिले. त्याचें जें ५०० रु. व्याज येतें त्याचा उपयोग पंढरपूर येथील मुलांस दूध पुरविण्याकडे केला जातो. याशिवाय पंढरपूर म्यु. कडून ४०० रु. व मुंबई सरकारकडून ५०० रु. वार्षिक ग्रँट मिळते.

आश्रमांतील स्त्रिया :—

१९२८–२९ या वर्षी १०६ बायांना आश्रमांत दाखल करण्यांत आलें. ह्यांपैकीं ८२ विधवा. नवऱ्यानें सोडलेल्या १३ व ११ अविवाहित होत्या. ३५ स्त्रियांना लिहितां वाचतां येत होतें, ६ शिक्षकिणी होत्या व ६५ अशिक्षित होत्या. जातवारी:– ४७ ब्राह्मण, २० मराठा, ५ मारवाडी, १ सोनार, ३ क्षत्रिय, ९ गुजराथी, २ तेली, ४ प्रभु, २ सारस्वत, ४

बनिया, २ कासार, २ रजपूत, २ धनगर, १ रंगारी, १ जैन व १ सुतार.

प्रांत अगर स्थलवारी :—१४ मुंबई, ८ पुणें, ६ ठाणें, ३ खानदेश, २४ वऱ्हाड, ५ निझामप्रांत, २ मध्यप्रांत, ५ अहमदनगर, ३ द. कानडा, २ कारवार, २ गुजराथ, २ बेळगांव, २ मद्रास, १ कुलाबा, १ मारवाड, १ सांगली, १ जमखंडी, १ सावंतवाडी, १ राजपुताना, १ कोल्हापूर, १ रत्नागिरी, ३ नाशिक, २ सोलापूर, २ काठेवाड, २ कच्छ व ३ धारवाड. ७३ स्त्रियांनीं सर्व फी दिली, ३ बायांनीं अर्धी फी दिली, ३० स्त्रियांना फुकट दाखल करण्यांत आलें. सन १९२९–३० सालीं ८५ स्त्रियांना आश्रमांत दाखल करण्यांत आलें. यांपैकीं ६४ विधवा, नवऱ्यानें सोडलेल्या १५ व अविवाहित ६ होत्या. २३ बायांना लिहितां वाचतां येत होतें, ४ शिक्षकिणी होत्या व ५८ अशिक्षित होत्या. जातवारी:—३६ ब्राह्मण, १७ मराठा, ३ गुजराथी, ५ मारवाडी १ रजपूत, ६ बनिया, २ माळी, १ खाटीक, १ तांबट, १ वंजारी, १ कामाठी, १ जैन, २ सोनार, ३ प्रभू, २ सारस्वत, १ रंगारी. १ कोळी व १ खत्री होती. प्रांत अगर स्थलवारी–२० वऱ्हाड, १२ मुंबई, १ पुणें, १० निजामप्रांत, ५ ठाणें, १ खानदेश, २ सातारा, २ धारवाड, ७ रत्नागिरी, २ कुलाबा, १ कारवार, १ सावंतवाडी, १ कच्छ, १ बनारस, ३ अहमदनगर, २ इंदूर, २ मध्यप्रांत, २ नाशिक, १ विजापूर, २ सांगली, ४ सोलापूर व ३ बेळगांव. ६० स्त्रियांनीं सर्व फी दिली, ८ नीं अर्धी फी दिली. व १७ स्त्रियांना फुकट दाखल करण्यांत आलें. ज्या स्त्रिया विवाहास अनुमति दर्शवितात त्यांचे विवाह जुळविण्याच्या कामीं आश्रमाचे अधिकारी खटपट करतात. कित्येक स्त्रिया आश्रमांतच राहून मेट्रन, मिडवाइफ व नर्सिस यांस मदत करतात. निरक्षर स्त्रियांना आश्रमांत लिहिण्यावाचण्यास शिकविण्यांत येतें. आश्रमांतील मुलें:–(सन १९२८–२९) या वर्षी ११ मुलें दायांच्या ताब्यांत होतीं व १३० मुलांस बाहेरचें दूध देण्यांत आलें. प्रसूतिगृहांत ९१ मुलें जन्मलीं व २८ बाहेरून देण्यांत आलीं. १९२९–३० सालीं ८ मुलें दायांचे ताब्यांत होतीं व १०७ मुलांना बाहेरचें दूध देण्यांत आलें. प्रसूतिगृहांत ८४ मुलें जन्मलीं व २३ बाहेरून देण्यांत आलीं. या दोन वर्षांत जागेच्या अभावामुळें बाहेरून येणाऱ्या बऱ्याच मुलांना आश्रमांत घेतां आलें नाहीं. मुलांच्या मृत्यूचें प्रमाण–१९२८–२९ व १९२९ ते ३० सालीं अनुक्रमें शेंकडा ३६ व ४४.६ होतें. १९२८–२९ च्या प्रारंभीं आश्रमांत ४० मुलगे व ३९ मुली होत्या. १९२९–३० च्या प्रारंभीं ४५ मुलगे व ४४ मुली होत्या. यांपैकीं कांहीं मुलगे व मुली म्युनि. शाळांत पुणें सेवासदनांत व पंढरपूर येथील उद्योगशाळेंत शिकत आहेत. विधवा स्त्रियांवर खटले होऊन, मूल मारल्याचा आरोप शाबीत होऊन शिक्षा होते. अशा स्त्रियांना इतर कैद्यांप्रमाणें न मानतां त्यांस सुधारण्यास अवसर असावा व अशा स्त्रिया आमच्या ताब्यांत दिल्यास ह्या दिशेनें प्रयत्न करण्यास आम्ही तयार आहों असें आश्रमाकडून मुंबई सरकारास कळविण्यांत आलें. ही विनंति मान्य करून १९२२ सालीं मुंबई सरकारनें नवे नियम केले. असेच नियम मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारनेंहि केले आहेत. या नियमानुसार सरकार ज्या स्त्रियांना संस्थेकडे पाठविते त्यांना आश्रमांत दाखल करण्यांत येतें. १९२९–३० सालीं सरकारनें शिक्षा झालेल्या पांच स्त्रियांस संस्थेकडे पाठविलें. वर्षाचे आरंभीं ४६ स्त्रिया संस्थेच्या 'निराश्रित स्त्रियां'च्या गृहांत होत्या. सांपत्तिक स्थितिः—या संस्थांना सुमारें अकरा हजार रुपये कर्ज झालें आहे. संस्थांचा वार्षिक खर्च सुमारें तीस हजार रुपये आहे. १९२९ ३० सालीं जमा व खर्च (कर्जफेड व कर्जावरील व्याज धरून) ४९५३६ रु. १ आ. ५ पै.

प्रसूतिगृहाचे नियम.—१ ज्या बायांचें चुकून वांकडें पाऊल पडलें असून, त्या अडचणींत असतील तर त्यांस या गृहांत प्रसूतिगृहांत घेतलें जाईल. २ प्रवेश फी ५ रु. पोटगी खर्च १५ रु. सुइणीबद्दल २ रु., देणगी २५ रु. इतका खर्च द्यावा लागेल. ३ ऐपतवाल्याचें मल गृहांत घ्यावयाचें असल्यास निदान २०० रु. फी द्यावी लागेल.

अनाथ बालकाश्रमाचे नियम—१ ज्यांचे आईबाप अगर नातलग नाहींत अशा सोळा वर्षांच्या आंतील मुलांस आश्रमांत घेतलें जाईल. व मुलगा २१ वर्षांचा झाला म्हणजे त्याला आश्रम सोडावा लागेल. २ येथून कोणास मुलें पाहिजे असल्यास मुंबई प्रार्थनासमाजाकडे अर्ज करावा. पत्रव्यवहाराचा पत्ताः—श्री. जी. बी. त्रिवेदी, ऑ. सेक्रेटरी, प्रार्थनासमाज, गिरगांव, मुंबई.

२. शेठ सखाराम नेमचंद जैन औषधालय, सोलापूर.:— स्थापना १९१७, मरहूम शेठ सखाराम नेमचंद यांनीं चिरस्थायी फंडासाठीं वीस हजार रुपये दिले आहेत. या शेठजींच्या स्मर-

णार्थ म्हणून शेट वालचंद हिराचंद यांनीं २० हजार रुपये व रा. जिवराम गौतमचंद यांनीं संस्थेची इमारत बांधण्यास १२२२०–०–९ रु. अशा रकमा दिल्या आहेत. १९३०–३१ या वर्षांत औषधें व ड्रेसिंगसाठीं ८१४–७–६ रु. खर्च झाला. नवे रोगी १०३३५, जुने रोगी १९५२६ नव्या रोग्यांत ४०९० पुरुष, ३०९२ स्त्रिया, व ३१५३ मुलें आहेत. या संस्थेचें एक फिरतें धर्मार्थ औषधालय आहे. या सालांत त्याचा उपयोग २९९३ लोकांस झाला. व्यवस्थापकः–जिवराज गौतमचंद दोशी.

संस्थानें---औन्ध

१. ओगले ग्लास वर्क्स, लिमिटेडः— ओगलेवाडी, सं. औंध. कारखानदार श्री. प्र. ओगले; स्थापना अल्प प्रमाणांत किर्लोस्करवाडी येथें. १९१५ त पंतप्रतिनिधी सं. औंध यांचे आश्रयाखालीं सुरुवात. मूळ भांडवल ६ हजार रुपये. कामावर माणसें २०।२५; तयार होणारा माल एकदोन जातींच्या सामान्य चिमण्या व बांगडीची रंगीत कांच. १९१७ सालीं जागा अपुरी पडूं लागल्यानें कारखाना हल्लींच्या जागीं आणला. १९२० सालीं खाजगी धंद्याचें लिमिटेड कंपनींत रूपांतर. सर्व प्रकारच्या चिमण्या, ग्लोब, कांचेचीं कौलें, इलेक्ट्रिक शेड्स् वगैरे माल होऊं लागला. "प्रभाकर" कंदिलाची योजना श्री. गुरुनाथ प्रभाकर ओगले यांची.त्यासाठीं कंपनीनें भांडवल दोन लक्षापासून दहा लक्ष रुपयेपर्यंत वाढविलें. व अदमासें ५ लक्ष जमा केले. १९२६ सालीं कंदील करण्यास सुरुवात केली. आजमितीस दरसाल कांचमाल अंदाजें १,७५,००० रु.व कंदील दरसाल अंदाजे २,००,००० रु.किंमतीचे तयार होतात. सध्यां कामावर माणसें ५००. श्रीमंत औंध संस्थानाधिपतींकडून संस्थेस सर्व प्रकारची मदत होते.

२. किर्लोस्करवाडी कारखानाः— याचे संस्थापक रा. लक्ष्मण काशिनाथ किर्लोस्कर हे होत. यांस व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूलमध्यें 'स्टीम एंजिन'च्या वर्गाला शिकविण्यासाठीं नेमलें होतें. पुढें बढती बंद झाल्यामुळें यांनीं राजिनामा दिला. व घरींच गुंड्या, लहान डब्या वगैरे करण्याचा कारखाना काढला. त्यावेळीं सायकली नुकत्याच येथें येत होत्या. तेव्हां एका अमेरिकन कंपनीची एजन्सी घेऊन त्यांनीं सायकल विकण्याचें व दुरुस्त करण्याचें दुकान काढलें. १८९६ सालीं मुंबईस प्लेग झाल्यामुळें हें दुकान बेळगांवास आलें. तेथेंच प्रथम त्यास किर्लोस्कर बंधूंचा कारखाना हें नांव मिळालें. सायकलीच्या धंद्याबरोबरच पवनचक्क्याही तयार करण्यास लक्ष्मणरावांनीं सुरुवात केली. पुढील कांहीं वर्षें हेंच काम चालूं होतें. पण सायकलीचा धंदा पुष्कळ लोक करूं लागल्यानें त्याचें महत्त्व नाहींसें झालें. तेव्हां लक्ष्मणरावांनीं १९०० सालीं दुकान विकून टाकलें व कडबा कापण्याचें यंत्र करण्याचा कारखाना काढला. प्रथम त्याचे सुटे भाग मुंबईहून मागवीत. पुढें तेही घरीं करूं लागले. हा कारखाना चालूं असतांनाच हिंदी शेतकऱ्यांसाठीं लोखंडी नांगर तयार करण्याची कल्पना लक्ष्मणरावांना सुचली. प्रथम महाराष्ट्रांतल्या कठीण जमिनीस चालेल असा नांगर त्यांनीं बनविला. ९ नंबरचा नांगर तो हाच. आजमितीला निरनिराळ्या वीस प्रकारचे नांगर कारखान्यांत तयार होतात, व सर्व हिंदुस्थानांत ते खपतात. अगदीं पहिल्यानें शेतकरी अनेक भ्रामक समजुतीमुळें हा नांगर घेण्यास मुळींच तयार नव्हते. इतकेंच नव्हे तर फुकट देऊन सुद्धां आपल्या जमिनींत नुसता चालवून पाहण्यासही ते तयार नव्हते. त्यामुळें पहिल्यानें तयार केलेले सहा नांगर दोन वर्षें तसेच पडून होते. दोन वर्षांनीं मिरजेच्या एका माणसानें ते साही नांगर घेतले. तेथून म्हणजे १९०४ पासून खप वाढत जाऊन १९२४पर्यंत ४०,००० नांगर खपले. बेळगांवच्या बाहेर जेथें हा कारखाना होता तेथें हळू हळू कांहीं श्रीमंत लोक येऊन राहूं लागले. व तेथें चांगली वसाहत करण्याचें मनांत येऊन बेळगांव म्युनिसिपालिटीनें किर्लोस्कर बंधूंना ६ महिन्यांत जागा सोडण्याची नोटीस दिली. ही नोटीस म्हणजे गंडांतरच होतें. पण औंधचे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनीं कुंडलरोड स्टेशनजवळ ३५ एकर जमीन व १ हजार रुपये भांडवलासाठीं देऊन या अडचणींतून किर्लोस्करांना सोडविलें. अशा रीतीनें १९१० सालीं कारखाना सध्यांच्या जागीं आला. १० ते २० सालापर्यंत कारखान्याची खूपच प्रगति झाली. शेतकीला लागणारीं सर्व प्रकारचीं हत्यारें तेथें तयार होऊं लागलीं. तसेंच कटडे, चरक, पाण्याचे पंप, पलंग, खुर्च्या, टेबलें, शेंगा फोडण्याचें यंत्र वगैरे सामानही येथें होऊं लागलें. कार-

खान्याचा जम उत्तम बसलेला पाहून १९२० सालीं किर्लोस्करांनीं त्याचें १२ लक्ष भांडवलाच्या कंपनींत रूपांतर केलें. त्यापैकीं तीन लक्ष ३० हजार रु. कंपनीनें स्वतः किर्लोस्करांना देऊन त्यांचे हक्क व गुडविल विकत घेतली. कंपनीचे शेअर फारच लवकर खपले. कांहींतर वरभावानें (प्रीमियम्) विकले व प्रथम कंपनीनें १५ टक्केपर्यंत नफाही (डिव्हिडन्ड) वाटला. सध्यांच्या मंद दिवसांतही कंपनी ४ टक्के नफा देऊं शकते. १२ लक्षाचे सर्व भाग खपल्यावर कंपनीनें १ कोटीचें नवें भांडवल काढलें. ऑइलएंजिनें व इतर मोठीं यंत्रें करण्याचा कारखाना काढावा असा यांत हेतू होता. पण सार्वत्रिक मंदाईमुळें तो विचार पुढें ढकलून १६ लक्षांचे शेअर खपल्यावर कंपनीनें ते विकणें बंद केलें. किर्लोस्कर–वाडी हें अगदीं थेट इंग्लंडमधल्या औद्योगिक खेड्यासारखें खेडें आहे. आखीव रस्ते, बीज, मैदानें, आखाडे, शाळा, स्वच्छ व टुमदार घरें, बाग वगैरे सुखसोयी मजुरांनासुद्धां तेथें आहेत. कोणच्याही सार्वजनिक कामांत तेथें जातिभेद तर नाहींच, पण अस्पृश्यताही नाहीं. सर्व कामगारांना शारीरिक व बौद्धिक शिक्षण सक्तीचें आहे. आज कारखान्यांत एकंदर ६०० कामगार आहेत. पैकीं ११० ब्राह्मण, ४०४ मराठे, ६२ खालच्या जातीचे व २४ मुसलमान आहेत. एवढ्यांचा दरमहा पगार १५८३३ रु. होतो. १९४० सालापर्यंत कंपनीवर कोणचाही कर न बसविण्याचें औंध सरकारनें अभिवचन दिलें आहे. रेल्वेकडून नेणावळीमध्यें सवलत मिळणें अत्यंत जरूर आहे. पण अनेक अर्ज करूनही कंपनीला अजून मुळींच सवलत मिळाली नाहीं.

सावंतवाडी

१. **वेदशास्त्र पाठशाळा**, सावंतवाडीः– स्थापना (शके १८२५). १९०४. संस्थापक– वे. शा. सं. आ. वि. अळवणी व सावंतवाडी येथील इतर वृद्ध गृहस्थ. प्रथम २०।२५ विद्यार्थी होते पण ते कमी कमी होत २।४ वर आले. गुरुजी वे. शा. सं. शंकर शास्त्री कशळीकर; यांचे वडील वे.शा. सं. दाजी कशळीकर हे पूर्वगुरु असून अध्यापकाचें काम करतात. दरबारांतून संस्थेला वार्षिक ५० रु. मिळतात. व कै. शि. वा. साधले यांचे ट्रस्टकडून ५० रु. सालीना मिळतात.

२ **श्रीकुमार द्रव्यनिधि**–स्थापना शके १८३६. वरील पाठशाळेंत दरवर्षी कमी कमी विद्यार्थी येऊं लागले त्याचें कारण बरेच विद्यार्थी मधुकरीवर राहात असत. रोगराईमुळें मधुकरी मिळेनाशी झाली. तेव्हां ही अडचण दूर करावी व संस्कृत, याज्ञिक, ज्योतिष, मराठी वगैरे शिक्षणाची सोय करावी म्हणून ही निधिसंस्था स्थापन झाली. निधिसंस्थेचा ट्रस्ट डॉ. नानासाहेब देशमुख, सॉलिसिटर राव, वे.शा. सं. वि. वि. अळवणी व वैद्यभूषण सातवळेकर यांचे नांवें मुंबईंत झाला आहे. मदत करणारांचे वर्ग आश्रयदाते, संवर्धक, उपकारक, साहाय्यक असे आहेत. ह्या निधिसंस्थेंतून वेदशाळेस मदत होऊन शिवाय 'छात्रवास' व 'सरस्वति–मंदिर' या दोन संस्था चालत आहेत. वार्षिक वर्गणी, देणगी व छात्रांच्या पालकांकडून मिळणारी रक्कम ह्या तीन प्रकारानें कु. द्र. निधीचें पोषण होत असतें. शके १८५२ जमाखर्च–– जमा २७८७–१५–० रु. वार्षिक व मागील वर्षाची शिल्लक १०७९–६–४ रु. एकंदर ३८६७–५–४ रु. वार्षिक खर्च २३६५–७–९ रु. पुढील वर्षाकरितां शिल्लक १५०१–१३–७ रु. एकूण ३८६७–५–४ रु. वरील रोख शिलकेशिवाय संस्थेजवळ ३३६० रु. किंमतीचे सरकारी रोखे आहेत. (कॅश सर्टिफिकेटें). अध्यक्ष–शं वि. कळसूलकर. चिटणीस–प्रथमपासूनच ना. गो. फळणीकर. पाठशाळा व कु. द्र.निधि या दोनहि संस्थांचे चालक वे. शा. सं. वि. वि. अळवणी.

कोल्हापूर

१. **गांधर्व महाविद्यालय**:––स्थापना १९२०; पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे अध्यक्षतेखालीं प्रो. पाध्ये, संगीत–प्रवीण यांनीं केली. या संस्थेंत सिंध, राजपुताना व महाराष्ट्र या भागांतून विद्यार्थी संगीत कलेचें शिक्षण घेण्यास येतात. आजपर्यंत १०।१२ विद्यार्थी येथें तयार होऊन निरनिराळ्या ठिकाणीं विद्यालयें चालवीत आहेत. किंवा संगीत शिक्षकाचें काम करीत आहेत. याखेरीज मामुली शिक्षण घेतलेले शेंकडों विद्यार्थी आहेत. विद्यालयाचे प्रथमपासून आजतागायत चालक प्रो. वा. ह. पाध्ये.

२. **बालवीर संस्था**:––संस्थान कोल्हापूर स्थापना १९२५; साहाय्यक– बालवीर संस्थेच्या स्थापनेपासून डॉ. बाळकृष्ण एम. ए. पी. एच. डी. यांचें साहाय्य आहे. करवीर दरबारचीही सक्रिय मदत व सहानुभूति आहे.

कार्य—बालवीरांनीं गुजराथ जलप्रलय व कोंकण जलप्रलयाचे वेळीं संस्थानभर हिंडून फंड गोळा केला. ग्रामसुधारणच्या अनेक गोष्टी केल्या. ग्रँट १७०० रु. दरसाल. १९३१ ते ३२ चा जमाखर्चः—जमा रु. २६६२ आ. ७ – पैं; मागील शिल्लक ६९६ रु. ८ आ. १० पै. खर्च २७९३ रु. ८ आ. ३ पै. शिल्लक– इमारत फंड १२५१ रु. ४ आ. ६ पैं; कायमनिधी ७०० रु. ६ आ.६ पैं; चालू शिल्लक ३३५८ रु.१५ आ. १० पै.अध्यक्ष डॉ.बाळकृष्ण एम. ए.पी. एच डी. स्काऊट आर्गनायझर श्री. डी. बी. पाटील, पत्ता—बॉय स्काऊट असोसिएशन कोल्हापूर सिटी.

३. विद्यापीठ कोल्हापूरः— स्थापना १९१७; या शाळेंत १३५ विद्यार्थी (१९३१) आहेत. वसतिगृहांत २९ विद्यार्थी राहतात. १९३१ सालीं मॅट्रिकला शाळेंतून धाडलेल्या २७ मुलांपैकीं १९ पास झालीं. शाळेची प्रयोगशाळा व लायब्ररी आहे. शिवाय जिमखाना, स्काउटिंग व नाटक क्लब इ. चळवळी चालू आहेत. विद्यार्थ्यांच्या करितां व्याख्यानमाला चालू असते. जमा ८८१६ रु. १३ आ. १० पैं; खर्च ८७६६ रु. २ आ. ० पै. व शिल्लक ५० रु. ११ आ. १० पै; चेअरमन सर आर. व्ही. सवनीस, माजी दिवाण कोल्हापूर. हेडमास्तर बी. आर. कोलटकर एम. ए.

मिरज

१. गीताधर्ममंडळ मिरजः— मिरज स्थापना—विजया दशमी शके १८४८; पुण्याच्या गीताधर्म मंडळाच्या उद्देशानुरूप ही संस्था येथें श्री. पुंडलीकजी कातगडे यांनीं शके १८४८ च्या विजयादशमीला स्थापन केली. संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत संस्थेचे चिटणीस व खजिनदार म्हणून केशव रघुनाथ सरदेशपांडे हेच काम करीत आहेत. दरसाल गीताजयंतीचा उत्सव होतो. त्यावेळीं प्रवचनें, व्याख्यानें वगैरे करविलीं जातात. गीताजयंतीच्या दिवशीं अखंड पाठही होतो. मुलांमुलींकडून गीतापाठ म्हणून घेऊन त्यांना बक्षिसें दिलीं जातात. या परीक्षेस मुलगे व मुली मिळून दरसाल ३० ते ४० पर्यंत संख्या असते. गीतेसंबंधानें झालेली प्रथमा, मध्यमा, उत्तमा ही परीक्षाही येथें घेण्यांत आली. त्यांत येथील केंद्रांत परीक्षेस बसलेल्या दोघां विद्यार्थ्यांचे पहिले नंबर त्या त्या वर्गांत आले आहेत. गीतेंतील विषय नेमन देऊन त्यावर विद्यार्थ्यांची वक्तृत्व परीक्षा घेण्यांत येऊन बक्षिसें दिलीं जातात. गीतार्थसंबंधानें वारंवार चर्चा केली जाते.. गीताधर्म मंडळ स्थापन झाल्यापासून रा. हरेराम बाळकृष्ण बोडस व कल्याण पांडुरंग मुश्रीफ व कुमारी इंदुताई काळे अशा तिघांची सबंध गीता पाठ झाली आहे. सदरचे दोघेही विद्यार्थी वुइलिंग्डन कॉलेजमध्यें आहेत. चालू सालीं सभासद ५९ ब्राह्मण मराठे मिळून आहेत. वर्गणी दर ाल चार आणे आहे. दे. भ. श्री. बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांनीं ३०० रु. देऊन 'चित्राक्का शिराळकर ट्रस्ट' या नांवाचा आपल्या कै. बहिणीच्या नांवानें ट्रस्ट केला आहे. त्या रकमेच्या व्याजांतून दरसाल गीतापाठाबद्दल बक्षिसें वांटण्यांत येतात.

२. भानु तालीम संस्था, मिरजः— या तालमीचे जनक क. नरसो गणेश भानू व आद्य चालक कै. विठ्ठलराव दादा घारपुरे हे होत. ही तालीम इ. स. १८६७ सालीं सप्टेंबर महिन्यांत स्थापन झाली. सुरुवातीस २५।३० लोक येऊं लागले. तालमीचें काम विठ्ठलराव दादांनीं १८६७ पासून तीन तपें पाहिलें. तत्कालीन व्यायामाचे प्रकार प्रकार म्हणजे जोर, बैठका व जोडी, मल्लखांब व कुस्ती हे होते. १९१८ चे सुमारास जीर्णोद्धार फंड उभा करून कांहीं लोकांनीं संघटित कार्यास प्रारंभ केला. १९२६ सालीं तालमीस समष्टिरूप मिळालें. व घटना आणि नियम ठरविले. "जनतेंत व विशेषतः बाल व तरुण वर्गांत व्यायामाची अभिरुचि उत्पन्न करणें आणि तद्द्वारां त्यांचे आरोग्यसंवर्धन आणि शरीरसामर्थ्याची वाढ करणें" हें या संस्थेचें ध्येय आहे. सांप्रत आश्रयदाते (५१ रु. देणारे) चार आहेत. तहाहयात सभासद (२५ रु. देणारे) १ आहे. व साधारण सभासद (वार्षिक-१ रु.) ५५ आहेत. संस्थेमध्यें शिकविले जाणारे विषय—जोर, बैठका, जोडी, मल्लखांब, कुस्ती, सिंगलबार, डबलबार, लाठी, लेजीम, भाला, खोखो आणि आटचापाटचा.व्यायामशाळेकरितां नवीन इमारत बांधली आहे.शके १८५१ चें कार्यकारी मंडळ— अध्यक्ष स. वि. अण्णेगिरीकर, उपाध्यक्ष ग. कृ. भोगले बी. ए., डॉ. रा. म. भातखंडे, चिटणीस बा. कृ. बागलकोटे बी. ए., खजिनदार र. न. जोशी; साधारण सभासद– गो. धों. सुरनीस, धों. बा. धम, व्ही. व्ही. पंचनदीकर, कृ. ग. भोगळे; इमारत

फंडास मदत करणारांमध्यें—श्रीमंत नानासाहेब मिरजकर १०१ रु., सरदार घोरपडे १००, आनंद संगीत मंडळी ७७५ रु., डॉ. भातखंडे १०८ रु.; शके १८४० ते १८५० जमाखर्चाचें पत्रक—एकूण जमा (वर्गणी, देणगी, व्यायामशाला फी, इमारत फंड, कायमनिधि वगैरे.) रु. ४४१७८३८९. यापैकीं दुरुस्ती, सामान खरेदी, उत्सव, नित्यखर्च, इमारत बांधणी बिल वगैरे जाऊन रु. ११३४८१० शिल्लक.

३ मोफत वाचनालय, मिरजः—१९१६ सालचे सुमारास संस्था स्थापन झाली. त्या वेळीं मिरजेचे जे विद्यार्थी कॉलेजमध्यें होते त्यांचे प्रयत्नानें संस्था स्थापन झाली आहे. मोफत वाचनालय व ग्रंथसंग्रहालय यांचे सहाय्यानें ज्ञानप्रसार करणें हा संस्थेचा मूळ हेतू आहे. साहाय्यक—डॉ. नारायण विष्णु जोशी; यांनीं ट्रस्टडीड करून १५०० रु. ची रक्कम ट्रस्टींचे ताब्यांत दिली आहे. व त्याचे व्याजांतून मोफत वाचनालयांत वर्तमानपत्रें व मासिकें घेतलीं जातात. श्री. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांनीं १९३० सालीं एका खेळाचें उत्पन्न दोन हजार रुपये दिलें. मिरज म्यु. कमेटीकडून दरसाल रु. ५० मिळतात. वर्गणीदारांची संख्या—तहाहयात सभासद ४ (एकदम रु. ६० देणारे), दरसाल रु. ३ देणारे २ सभासद, दरसाल रु. १ देणारे १०० सभासद, दरसाल ८ आणे देणारे ६० सभासद. प्रचारकार्य—मोफत वाचनालय, ग्रंथसंग्रहालय, व्याख्यानें, वगैरे चालविणें. घातलेलें भांडवल—जागा एक हजार रुपये किंमतीची व त्याचेवर पांच हजार रुपये किंमतीची दुमजली इमारत आहे. वर्गणीदारांची जातवारी—ब्राह्मण १५०, मराठे इतर १३, मुसलमान २, ख्रिश्चन १. चिटणीस— कृ. ग. जोशी.

४ श्री शिवजयंत्युत्सव मण्डळ, मिरजः—स्थापना १८९४ इ. शिवाजी महाराजांचा व पर्यायानें महाराष्ट्रीयांचा मोठेपणा प्रस्थापित करणें व इतिहासकालीन राजवैभव वर्णन करणें, आणि धर्म व शरीरबल विषयक व्याख्यानें करून समाजास त्या बाबतींत व देशसेवेंत गोडी उत्पन्न करणें हा मंडळाचा मळ हेतू आहे. हल्लीं वर्गणीदारांची संख्या ३२५ असून वर्गणी अदमासें २२९ रु. जमली आहे. चालू सालीं मंडळाजवळ ४४४ रु. शिल्लक आहेत. एकंदर जमा रु. ५६५—९—० व खर्च रु. १२१—९—० . १९२३ पासून मंडळाचे अध्यक्ष गो. म. रानडे व मुख्य व्यवस्थापक दा. मो. भट हे आहेत.

५ स्नेहसंवर्धक संघ, मिरज—स्थापना—१९२४. प्रधान उद्देशः—"परस्पर स्नेहसंवर्धन आणि उच्च भावना आणि उन्नत विचार यांस पोषक असें वाचन व चर्चा करणें." दुय्यम उद्देशः—"समाजोपयोगी वाङ्मयात्मक व शैक्षणिक स्वरूपाचें कांहीं कार्य करणें." कार्यः—संघातर्फे—१ श्रीवीर रसायन अर्थात् सिंहगडचा पोवाडा, २ नूपुर (श्री. साठये यांच्या निवडक कवितांचा संग्रह) ३ भक्तिविलासावरील पुस्तकांपैकीं 'नूपुर' काव्यास डेक्कन व्हर्नाक्यूलर ट्रान्सलेशन सोसायटी पुणें यांजकडून २० रुपये पारितोषिक मिळालें आहे. देणगी—डॉ. विष्णु माधव गोखले ५० रु. संघाची वर्गणी नाहीं. खर्चाचें काम उत्पन्न झाल्यावर वर्गणी जमवून व देणगी मिळवून खर्च भागविण्यांत येतो. पांडुरंग श्रीपाद जोशी प्रमुख—स्नेहसंवर्धक संघ मिरज.

सांगली

१ अनाथ विद्यार्थी आश्रम सांगली—स्थापना सन १९२१; उद्देश—"निराश्रित, गरीब पण होतकरू आणि बुद्धिमान अशा विद्यार्थ्यांस शारीरिक, धार्मिक, नैतिक, बौद्धिक व औद्योगिक शिक्षण देणें."कार्य—हल्लीं आश्रमांत ३० विद्यार्थी आहेत. यांत कोंकण जिल्ह्यांतील ६,सातारा १२, कानडी जि.५,संस्थानांतील ७.विद्यार्थ्यांची जागा, भोजन, वगैरेची सोय आश्रमांतच केली आहे. दुपारचें जेवण मधुकरीवर भागतें. सायंकाळच्या जेवणाकरितां दर रविवारीं विद्यार्थी धान्यभिक्षा मागतात. आश्रमानें जागा खरेदी केली असून त्यावर साधारण जुनी इमारत आहे. विद्यार्थीच नेहमींचा स्वयंपाक करितात. शिक्षण—शारीरिक. नमस्कार, मल्लखांब, आसनें, लाठी, पोहणें. धार्मिक व नैतिक—संध्या, रुद्र, वगैरे वैदिक भाग पाठ करणें. सत्पुरुषांचीं स्तोत्रें पाठ करणें व रामायण, दासबोध, गीता वगैरे ग्रंथांचें वाचन.बौद्धिक-आश्रमांतील विद्यार्थी सांगली हायस्कूल, मराठी शाळा या संस्थांत शिक्षण घेतात. औद्योगिक—चातींवर व रहाटावर सूत काढणें. देणगी—कै. राजवैद्य सांभारे यांनीं १००० रु. दिले. सांपत्तिक स्थिति—जमा (स. १९३०—३१) १३४३ रु. १२ आ. ६ पै. मागीलशिल्लक ५२८१ रु. ६ आ. ११ पै. खर्च ५९० रु. १३ आ. ६ पै

अखेर शिल्लक–६६३० रु. ३ आ. ५ पै. व्यवस्थापक–पांडुरंग विष्णु कुलकर्णी.

२. आरोग्य संवर्धक मंडळ, सांगली––स्थापना–१९१८, संस्थापक– वैद्य गणेश पांडुरंग परांजपे व रा. रा. कृष्णाजी केशव बक्षी. हेतु–जनतेंत आरोग्य संरक्षण, रोगसंहार व आरोग्य तेजस्विता यांची वृद्धि व्हावी, यांसाठीं शक्य तो प्रयत्न करणें. कार्य (१)साष्टांग नमस्कारांचा प्रसार करून ठिकठिकाणीं नमस्कारांचे सामने घडवून आणणें व त्यांस यथाशक्ति साहाय्य करणें. (२) व्याख्यानद्वारां व्यायाम, आरोग्य, धर्म, नीति यांचीं जागृति व विकास करणें. (३) शक्य तीं आरोग्य विषयक पुस्तकें, पत्रकें, वगैरे छापून त्यांचा प्रसार करणें. (४) लहान मुलांना मोफत औषधोपचार करणें व त्यांच्या आरोग्य–संरक्षणार्थ झटणें. सल्लागार–तज्ज्ञ वैद्य, डॉक्टर व इतर विद्वान् मंडळी मंडळाच्या महत्त्वाच्या कामांत सल्ला देतात. सभासद–आरोग्याचा प्रसार करणें हीच फी देऊन सभासद होतां येते. प्रत्यक्ष फी नाहीं. ग्रामस्थ व परस्थ असे सभासद २५० च्या वर आहेत. आश्रय– आरोग्य–संवर्धक मालेचे संपादक– वैद्य परांजपे यांच्या मालेच्या उत्पन्नांतील बराचसा भाग या संस्थेच्या कार्यास मिळतो. शिवाय वैद्य परांजपे यांच्या दवाखान्यांत मुलांना उपचार मोफत केले जातात.त्यांतील कांहीं धनिक लोक संस्थेच्या कार्यास द्रव्याची मदत करितात, ती रक्कमही या संस्थेच्या कार्याकडे मिळते. सुमारें दोनशें रुपयांपर्यंत रक्कम दरसाल संस्थेकडे जमा होते. व तितकीच खर्च केली जाते. श्रीमंत चीफसाहेब भोर,श्रीमंत राजे साहेब सांगली, श्रीमंत चीफ साहेब औंध या संस्थानिकांकडून व इतर अनेक व्यापारी व धनिक लोकांकडून योग्य आश्रय मिळालेला आहे व मिळत आहे. प्रचारकार्यः–संस्थेनें लोकलबोर्डाशीं व संस्थानांतील डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांच्यांशीं पत्रव्यवहार करून व कित्येक ठिकाणीं अधिकाऱ्यांची समक्ष भेट घेऊन त्या त्या जिल्ह्यांतून व संस्थानांतून मुलांमुलींच्या शाळांत साष्टांग नमस्काराचा व्यायाम सुरूं केला आहे. प्रथम सातारा जिल्ह्याचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर मे. एस्. आर. तावडे, एम्. ए टी. ई. डी. यांनीं सातारा जिल्ह्यांतील सर्व शाळांतून नमस्कारांचा व्यायाम सुरूं केला. व त्याचेंच अनुकरण इतर जिल्ह्यांनीं व संस्थानांनीं केलें. सबब याचें सर्व श्रेय मे. तावडेसाहेब यांच्याकडेच आहे. सर्व जिल्ह्यांतून व संस्थानांतून वद्य परांजपेकृत नमस्कार पुस्तकांतील पद्धतीप्रमाणेंच साष्टांग नमस्काराचा व्यायाम सुरूं आहे.हा व्यायाम अत्यंत यशस्वी होत असल्याचे अनुभव लोकांनीं कळविले आहेत. स्त्री–पुरुष, मुलें, मुली, मिळून सुमारें पांच सहा लाखांपेक्षां अधिक लोक हा व्यायाम नित्य घेतात. आरोग्यसंरक्षण, संवर्धन व रोगसंहार हीं कार्यें घडून येण्यास हा व्यायाम उत्तम ठरला आहे. व्याख्यानें–संस्थेचे प्रचारक–वैद्य परांजपे यांनीं नागपूरपासून धारवाडपर्यंत प्रचार करून ठिकठिकाणीं मिळून सुमारें २५० वर सप्रयोग व्याख्यानें दिलीं आहेत, वाङमयप्रकाशनः––श्री. सौ. रमाबाई कानेटकर यांनीं स्वानुभवानें लिहिलेलें "श्री सूर्योपासना अथवा साष्टांग नमस्कार" हें पुस्तक संस्थेनें छापून प्रसिद्ध केलें असून त्याच्या चारशें प्रति भगिनींना मोफत वाटण्यांत आल्या आहेत.आरोग्यासंबंधींचीं पत्रकें वेळोवेळीं छापून संस्थनें मोफत वांटलीं आहेत. रोग्यांना मोफत उपचार–कॉलरा, इन्फ्ल्युएन्झा,प्लेग अशा रोगांच्या सांथींत वेळोवेळीं औषधांची मदत मोफत करण्यांत येते. नवीन उपक्रम मोफत––फिरती––तपासणी. आठवड्यांतून एक दिवस दर मंगळवारीं सकाळीं दोन तास सांगली शहराच्या निरनिराळ्या भागांत फिरून आजारी मुलें तपासणें व त्यांस योग्य उपचार मोफत करणें हें कार्य आज २॥ महिने सुरूं आहे. संस्थेतर्फे वैद्य–ग. पां. परांजपे व वा. वा. जोशी हे मोफत काम करितात. चिटणीस––कृ. के. बक्षी.

३. आयुर्वेद सहकारी मंडळ सांगली. स्थापना शके १८५३. मंडळाची स्थापना करून त्याचें प्रत्यक्ष कार्य सुरूं करण्याचें श्रेय श्री.वेलणकर यांस आहे. कार्य–या वर्षांत मंडळाच्या एकंदर २८ सभा झाल्या. त्यांत गुळवेलसत्त्व,चण्य, मध, गर्जपिपळी,एरंड इत्यादि द्रव्यांच्या गुणदोषांविषयीं व प्लेग,गोंवर वगैरे रोगांवरच्या उपायांविषयीं शास्त्रीय चर्चा झाली व योजना ठरविण्यांत आली. स्टेट नोकरांच्या रजेसाठीं आयुर्वेदिक तज्ज्ञ वैद्यांचें सर्टिफिकेट मान्य व्हावें याबद्दलचे प्रयत्न; म्युनिसिपालिटीकडून लहान मुलांच्या जन्ममरणाचें मासिक रजिस्टर मागवून त्यावरून आरोग्यविषयक अनुमानें, कोल्हापूर येथील २५० विद्यार्थ्यांचीं विनामूल्य शारीरिक तपासणी, प्लेगचीं चिन्हें दिसतांच प्लेगा

वरील उपचारांचें पत्रक छापून वाटलें, गोंवराच्या उपचारांचें पत्रक प्रसिद्ध करणें वगैरे गोष्टी केल्या. संस्थेचे प्रचारक–वैद्य गोपाळ भाऊ वाटवे.संस्थेची सांपत्तिक स्थिति बेताचीच आहे. अध्यक्ष–वैद्य ग. पां. परांजपे. उपाध्यक्ष–वैद्य वा. वा. जोशी. चिटणीस वैद्य अ. ना. नाणदीकर.

४. **एज्युकेशन सोसायटी** सांगली:— स्थापना–१९१४. जुन्या सांगलीपासून 'स्टेट–हायस्कूल' फार लांब, म्हणून जुन्या सांगलींतील मुलांना व मुलींना बौद्धिक, शारीरिक व नैतिक शिक्षण देण्याच्या हेतूनें (१) श्री. आर. आर. चिकोडीकर (२) श्री. जी.जी. तोरो (३) श्री. व्ही. एस्. जोशी व (४) श्री. डी. व्ही. सखदेव यांनीं १९१४ सालीं सिटी हायस्कूल स्थापन केलें. प्रथम इंग्रजी तीन इयत्तांचें सेकंड ग्रेड ए. व्ही. स्कूलच होतें. त्याचीं वाढ होऊन सन १९२० सालीं त्याचें सिटी हायस्कूल बनलें. व तें मार्च १९२० मध्यें सोसायटीनें आपल्या ताब्यांत घेतलें. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टान्वयें १९२१ सालीं रजिस्टर झालेली आहे. सांगली दरबारनें १९१७ सालीं चारशें रुपये व १९१८ सालीं ८०० रु. ग्रँट दिली. १९१९ त शाळेच्या वार्षिक खर्चापैकीं निम्मा खर्च पांच वर्षेंपर्यंत द्यावा असें ठरविलें. सुमारें ४९००० रु. किंमतीच्या शाळेच्या मालकीच्या इमारती आहेत. सांपत्तिक स्थिति-जमा (१९१४–१५ ते १९३१–३२) (१)फी व दंड १४२२५७ रु. ११आ. ३ पै., (२)संस्थानची ग्रँट ४९८४७ रु., (३)म्युनिसिपल ग्रँट ४५० रु., (४) किरकोळ देणग्या ९७९६ रु.६ आ. ४ पै.(५) किरकोळ १३४०–८–८ रु. एकूण २०३६९१रु. १० आ. ३ पै. खर्च २०१७९० रु. २ आ. १ पै. सध्यां पटावरील मुलांची संख्या ४२५ मुलगे व १५ मुली. (ता. २३–७–३२ रोजीं). चेअरमन रा. एम्. के. आठवले बी. ए. एलूएल्. बी., रा. दत्तात्रय पुरुषोत्तम ताम्हणकर बी. ए. बी. टी. (एक्स–ऑफिशिओ) सेक्रेटरी रा. ए. जी. करंदीकर बी. ए.

५. **कन्याशाळा** सांगली:—प्रो. धोंडो केशव कर्वे यांच्या हस्तें १९२५ त स्थापना. सध्यां चार इयत्तांत मिळून ३४ विद्यार्थिनी आहेत. १९२९ त अ. भा. महिला विद्यापीठास शाळा जोडण्यांत आली. विद्यापीठाकडून ६०० रु. ची, सांगली सरकारकडून ७५० रु. ची, व सांगली म्युनिसिपालिटीकडून दरसाल २००–२५० ची ग्रँट, बाकीची रक्कम गोळा करावी लागते. १ चेअरमन, २ सेक्रेटरी, २ खजिनदार व ४ सभासद अशा ९ जगांचें कार्यकारी मंडळ; विलिंग्डन व फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्रोफेसर द्रवीड हे मंडळाचे चेअरमन; यंदा नाथीबाई दामोदर ठाकरसी यांचे ट्रस्टींनीं ग्रँट बंद केली. अदमासें वार्षिक जमाखर्च. जमा:–७५० सरकारी ग्रँट, ६०० म. विद्यापीठ ग्रँट, २५० सांगली म्यु. कडून, ९०० निश्चित वर्गणी, ६०० किरकोळ वर्गणी, ३०० फी. एकंदर ३४०० रु. खर्च–३००० शिक्षक पगार, १८० जागा भाडें, १८ झाडलोट वगैरे, १२५ सायन्स सामान, ७७ पुस्तकें, टपाल इ. एकंदर ३४०० रु. सेक्रेटरी,रा. वाडेकर व रा.देवल

६.**परस्पर सहकारी मंडळी** (अन्लि.) दुधोंडी, सं. सांगली. स्थापना १९१० उद्देश— (१) शेतकरी बंधूंत सहकार्याची आवड उत्पन्न करणें, (२) सहकार्याचे तत्त्वावर लागवडीकरितां व किरकोळ खर्चाकरतां कमी व्याजाच्या दरानें पैसा पुरविणें. (३) हलक्या व्याजानें सभासदांस कर्ज देऊन ऋणमुक्त करण्याचा यत्न करणें. (४) सहकारी तत्त्वांवर सभासदांस उद्योगधंद्यांस योग्य ती मदत करणें. (५) काटकसरीची संवय लावून सभासदांची सर्वांगीण उन्नति करण्याचा यत्न करणें. चेअरमन–विष्णु अंताजी वेलणकर. सेक्रेटरी–यशवंत तातोबा फुके; भांडवल–सभासदांच्या व इतरांच्या ठेवी मिळवून भांडवल उभारलें आहे. स. १९३१ मे अखेर या ठेवी पुढीलप्रमाणें आहेत. सभासदांच्या ठेवी. ६७६७–११–११ रु. इतर ठेवी–९३७७–७–५ रु. एकूण–१६१४५–३–४ रु. रिझर्व फंड–२८४१–२–२रु. सभासदांची जातवारी— ब्राह्मण २३, मराठे १५८, मुसलमान १९, कोष्टी ८, जैन ९, लिंगायत ३, सोनार २, महार १०, रामोशी १, सुतार १, चांभार २, एकूण २३६. पुरुष २२५; स्त्रिया ११ उपयोग–दुय्यम धंदे करणाऱ्या लोकांना, (कोष्टी, चांभार, सोनार वगैरे) हलक्या व्याजानें भांडवल मिळून धंदा करतां येतो. तसेंच शेतकरी वर्गास जरूरीच्या वेळीं पैसे मिळाल्यानें शेती फायदेशीर करण्यास बरीच मदत होते. आजची स्थिति— संस्थेची आजची स्थिति अत्यंत समाधानकारक आहे. जमा रु. २८६१६–१४–४रु. खर्च २८३४५ रु. ३ आ. ४ पै.

७. **लोकमान्य टिळक स्मारक मंदिर** सांगली:— ता. २५।८।३२ रोजीं लोकमान्य स्मारक कमिटीच्या (सांगली) सेक्रेटरींनीं पत्रक

प्रसिद्ध करून संस्थानांतील जनतेकडे १ लाख रुपयांची मागणी केली व प्रत्यक्ष पंचवीस हजारांचीं अश्वासनें आलीं. नानातऱ्हेची पत्रकें काढून स्मारकाच्या कार्याला व स्मारकाच्या स्वरूपाच्या विचाराला एकसारखी चालना देण्यांत येत होती. कोणी लोकमान्य बँक, कोणी राष्ट्रीय शाळा, कोणी विणकऱ्यांची उद्योगशाळा, कोणी लोकमान्यांच्या तत्त्वज्ञानाचें व राजकारणाचें प्रचारकार्य, याप्रमाणें आपले स्मारकाबद्दल विचार सुचविले. कोणी टिळकमंदिराची कल्पना सुचविली. लवकर फंड न जमल्यामुळें १९।१२ २४ रोजीं लोकमान्य ग्रंथसंग्रहालयास श्री. न. चिं. केळकर यांचे हस्तें सुरुवात केली. नंतर स्मारकाकरितां नव्यापुलानजिक ३१०० रुपयांस जागा घेण्यांत आली व मंदिराचे चौथऱ्याचा कोनशिलासमारंभ श्री. न. चिं. केळकर यांचे हस्तें झाला. चौथरा बांधण्यास 'सरस्वति केमिकल वर्क्स'चे उत्पादक रा. गणपतराव वझे यांनीं रु. ५०० ची देणगी दिली. चौथऱ्यावर होणाऱ्या मेघडंबरीचे खर्चाकरितां रा. म. के. आठवले वकील यांनीं ५०० रुपये दिले आहेत. लोकमान्यांच्या अर्धपुतळ्याचा अनावरण समारंभ श्री. अणे यांचे हस्तें झाला. त्याचें काम र. कृ. फडके शिल्पकार, यांनीं केलें आहे. तूर्त मंडळानें स्मारकाच्या इमारतीचा नकाशा काढून ती कल्पना पुढें ठेवली आहे. स्मारक-मंदिरांत एक हॉल बांधून तेथें ग्रंथसंग्रह ठेवण्याचें ठरलें आहे. आतांपर्यंत चौदा हजार रु. स्मारकास खर्च झाले आहेत. मंडळानें टिळक ग्रंथसंग्रहालय उघडून स्मारकाचे कार्यास सुरवात केली आहे. संग्रहालयामध्यें मराठी, इंग्रजी, संस्कृत भाषांमधील व विशेषतः गीतेवरील दुर्मिळ व उपयुक्त अशा ग्रंथांचा संग्रह व्हावा अशी चालकांची इच्छा आहे. 'विद्यार्थीमंडळ' सांगली, श्री. छापखाने, श्री. मरळीकर, श्री. गोखले यांनीं पुस्तकें देऊन मदत केली आहे. अध्यक्ष-वि. गो. करमरकर, चिटणीस-गो. रा. बिनीवाले, ज. वि. ताम्हनकर, वि. रा. परांजपे.

८. व्यापारी मोफत वाचनालय सांगली:—सांगली व्यापारी मित्र मंडळाचे मार्फत १८९६ त स्थापना, त्यास १९१७ त सार्वजनिक स्वरूप देण्यांत आलें. उद्देश:-(१) लोकांत वाचनाभिरुचि वाढविणें (२) जातीजातींत सलोख्याचे प्रयत्न करणें. (३) व्यापारी वर्गाला वाङ्मयाचा उपयोग सुलभ रीतीनें करून देणें वगैरे. ७ सभासदांच्या नियामक मंडळातर्फे संस्थेचें काम चालतें. कार्य-(१) मोफत वाचनालय चालवून त्यास पुस्तकालयाची जोड. (२) शारीरिक शिक्षणाची व्यवस्था. (३) व्याख्यानद्वारां धर्मजागृति (४) १९१९ सालापासून फंडास सुरुवात होऊन १९३० सालीं रु. १२॥ हजारांची इमारत पूर्ण झाली. सभासदांची वार्षिक वर्गणी रु. ५२; नाटक मंडळचांकडून धर्मार्थ खेळ, व्यापारी लोकांकडून देणग्या, संस्थेच्या इमारतीचें भाडें (दरसाल रु. ४५०) या संस्थेच्या उत्पन्नाच्या बाबी आहेत. १९३२ अखेर सभासदांची संख्या १०, संस्थेस लोकांचें देणें रु. ३०७८-८-९ अध्यक्ष-श्री. जोग (सराफ) चिटणीस श्री. कुलकर्णी, खेडेकर.

९ श्रीगजानन मिल्स सांगली:—(लुगडयांचा व पातळांचा कारखाना). संस्थापक-विष्णु रामचंद्र वेलणकर, मूळ हेतु-"उद्योगधंदा करण्याची महत्त्वाकांक्षा व ब्राह्मणवर्गालाहि कारखाने चालवितां येऊन यशस्वी होतां येतें हें दाखविणें." साहाय्यक- १ श्रीमंत राजे सर आप्पासाहेब पटवर्धन, संस्थानाधिपति सांगली. २ रा. रा. विनायक गोविंद अभ्यंकर. ही संस्था लिमिटेड नसून रा. विष्णु रामचंद्र वेलणकर यांच्या मालकीची आहे. श्रीगजानन मिल्सचा मूळ जन्म लिंब गांवीं हातमागाच्या रूपांत १९०८ सालीं झाला. परंतु हचा कारखान्यांत रा. विष्णुपंत वेलणकर यांना अपयश आलें. त्यानंतर दोन तीन वर्षें निरनिराळचा ठिकाणच्या अनुभवानें त्यांनीं फिरून पुणें मुक्कामीं हा कारखाना चालू केला. त्यांत ३ माग होते व भांडवल कर्जाऊ होतें. याप्रमाणें ही नवीन गिरणी स्थापन होऊन तींत निघणाऱ्या लुगडयांचा जम बाजारांत बसतो न बसतो तोंच १९१३ सालीं बँका बुडण्याची सांथ आल्यानें सावकारांनीं पैशाचें मागणें सुरूं केलें. व त्या देण्याची निरवानिरव करून पुन्हां श्रीगजानन मिल्स सांगली मुक्कामीं आली. श्रीमंत राजे आप्पासाहेब संस्थानाधिपति सांगली व श्रीमंत मातोश्री सौ. कमलाताई राणीसाहेब यांच्या आश्रयाखालीं ही नवीन गिरणी-श्रीमंतांनीं मोफत दिलेल्या जागेंत व बिनव्याजीं भांडवलावर सुरूं झाली. १९१४ पासून १९२४ सालापर्यंत गिरणी श्रीमंतांनीं दिलेल्या जागेंतच होती. हल्लीं ती स्वतःच्या मालकीच्या इमारतींत आहे.

श्रीगजानन वीव्हिंग मिल्स सांगली या गिरणीचा अहवाल.

तपशील	१९१२	१९१४	१९१४ ते १९२४	१९२४	१९३०	१९३२
मागांची संख्या	३	३	३ ते २०	२०	५०	९०
इंजिनची हॉर्स पॉवर	५	५	२२	२२	८७	८७
गुंतलेलें भांडवल	७॥ ह. रु.				३ लक्ष रुपये	४ लक्ष रुपये
नोकरांची संख्या	१५	१५	१५ ते ६०	६०	१६५	२७५
रोज किती पातळें	१० ते १५	१० ते १५	१० तें ६०	६० ते ८०	१५० ते २००	३०० ते ३७५
रंग	प्रथमपासून पक्के रंगच वापरीत होतों.			सध्यां सर्व रंग जर्मनीचे आहेत हे रंग पक्के व डोळ्यांत भरण्यासारखे असतात.		

मजुरांची सोयः—गिरणीच्या नोकरांसाटीं एक सुंदर व नमुनेदार वाडी असावी अशा इच्छेनें सरकारस्वारीचेकडे जागा मिळण्याबद्दल विनंति अर्ज केला आहे, जागा मिळाल्यावर उत्तम सोय करावी अशी मालकांची इच्छा व महत्वाकांक्षा आहे.

किती रुपयांची विक्री	१९२६–२७	१९२८–२९	१९३१–३२
	सुमारें १ लक्ष १३ हजार	सुमारें २॥ लाख	साडेतीन लाख

मॅनेजर—व्ही. व्ही. वैद्य

गोवा प्रांत

१ **गोमांतक–गीता–धर्म–मंडळः**–मडगांव–गोवें.––पुणें–गीता–धर्म–मंडळाची सह-कारी संस्था म्हणून हें मंडळ शके १८४९ मध्यें आर्यवैद्य श्री. पुंडलीक वामन विर्जोनकर यांनीं स्थापन केलें. गीता–धर्म मंडळाची तत्त्वनिष्ठा आणि उद्देश निश्चित झालेला आहेच. त्याला अनुसरून गोमंतकांतील हरिजन, नवहिंदु इत्यादि सर्व हिंदु जनता–विशेषतः विद्यालयीन विद्यार्थी हें मंडळानें आपलें कार्यक्षेत्र ठरविलें आहे. श्री-गीतागुह्य,श्रीगीतामृत इत्यादि वेगवेगळ्या गीता श्लोकांचीं लहान लहान पत्रकें मुद्रित करून त्यांचा प्रसार विद्यार्थ्यांत करून त्यांचें पठण करणारास गीताजयंति–दिनीं बक्षिसें वांटणें हें कार्य मंडळानें पहिल्या दोन वर्षांत केलें.ह्याप्रमाणें गीताश्लोक-पठणाची अभिरुचि लागून महति पटल्यावर मंड-ळानें ६ पुष्पांच्या धर्मशिक्षणमालेची योजना हातीं घेतली आहे. श्रीगीतागुह्य; १२ वा, १५ वा, ३ रा, २ रा, आणि १८ वा गीताध्याय; तसेंच इतर मराठी संतकवींची धर्मनीतिपर कविता; गद्य उतारे इत्यादि विषय या पुष्पांतून इयत्ते-नुसार विभागून दिले आहेत. शैक्षणिक वर्षारंभीं हीं पुस्तकें विद्यार्थ्यांस विनामूल्य किंवा फारतर अगदीं अल्प मूल्यांत वांटून त्यांतील विषयांची परीक्षा कार्तिकी एकादशीला घेतली जावी व गीताजयंतीदिनीं बक्षिससमारंभ केला जावा असा मंडळाचा हेतु आहे. येथील लहानमोठ्या २०० मराठी शाळा आहेत. या सर्व हिंदू लोकांनीं चाल-

विल्या असून यांत सुमारें १० हजार विद्यार्थी आहेत. यांतील बहुतेक शाळा, देवालयें, धर्मगुरूंचे मठ इत्यादि ठिकाणीं गोमंतक गीता–धर्म मंडळाच्या विनंतिपत्रानुसार गीताजयंत्युत्सव साजरा होत असतो. गोमंतकांतील अगदीं मोठ्या शहरांपासून खेड्यांपर्यंत ही चळवळ पसरत आहे. त्याकरितां गीताशिक्षण–वर्ग चालविणें, निबंध प्रसिद्ध करणें, व्याख्यानें इ.करितां दौरे काढणें इ. ज्या ज्या गोष्टी करणें शक्य व इष्ट आहे त्या सर्व मंडळ करीत आहे. गीतापठणाबद्दल पुस्तकें इत्यादि बक्षीस वांटलीं जातात व त्यांकरितां लहान लहान पुस्तकें छापली जातात. मंडळाचें वार्षिक उत्पन्न सुमारें १०० रु. असून खर्च १०० रुपये आहे. सभासदांची संख्या २५० आहे. ह्यांत सर्व जातींच्या हिंदूंचा समावेश झालेला आहे. प्रस्तुत कार्यकारी मंडळांत अध्यक्ष श्री. विष्णु रामचंद्र नाईक, वकील; उपाध्यक्ष–श्री.पुरुषोत्तम श्री. सुकेरकर. मंडळाजवळ शिल्लक ३०० रु. आहे.

२ पोर्तुगीज शिक्षण प्रसारक मराठा समाज प्रांत गोवा.स्थापना–सन १९२५, रजिस्टर–१० जुलै १९२६; उद्देश–"मराठा गायक व तत्सम ज्ञातींतील मुलांमुलींना शिक्षण देऊन समाजाची उन्नति करणें" कार्य–होतकरू विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देऊन फक्त पोर्तुगीज शिक्षणास सध्यां मदत. दरसाल सुमारें पांच विद्यार्थी संस्थेची मदत घेऊन शिक्षण घेतात. गरीब विद्यार्थ्यांचा अर्ज मंजूर करण्यापूर्वी कार्यकारी मंडळानें खालील गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवावें:– (अ) अत्यंत गरिबी, (आ) निराश्रितपणा, (इ) अंगहुषारी व चातुर्य, (ई) सुवर्तन, (उ) शिक्षणाची आवड. शाखा–स. १९३० सालीं कारवार व अंकोला येथें शाखा उघडल्या. सहाय्यक–तहाहयात सभासद ११ (१०१ रुपये देऊन कायम झालेले). प्रत्येकीं दहा रुपये देणारे ६५ सभासद; हितचिंतक ३७; देणगीदार ४. सांपत्तिक स्थिति–(सन १९३१–३२) मागील शिल्लक–२२०८ रु. १५ आणे. जमा–४६३९ रु. २ आ. खर्च–८४२ रु. ९ आ. ८ पै. शिल्लक–६००५ रु. ७ आ. ४ पै. अध्यक्ष–श्री. कृष्ण सगुणजी फातर्पेकर. सेक्रेटरी–नरहरी कामणू पगणकर.

३ मठग्रामस्थ हिंदुसभा मडगांव गोवा:– प्राचीन काळीं स्थानिक, धार्मिक व सामाजिक प्रश्नांचा विचार व निर्णय करणारी 'दहाजण' नांवाची संस्था बहुधा प्रत्येक गांवांत असे व अनेक गांवांतून ती अद्यापही आढळते. या संस्थेला आतांच्याप्रमाणें निरनिराळीं कामचलाऊ मंडळें, त्यांचे अध्यक्षादि अधिकारी,सभेंत काम चालविण्याचे नियम, वगैरे कांहींच नसे. तथापि गांवांतील वजनदार गृहस्थाच्या नेतृत्वाखालीं संस्थेचीं सर्व कामें शिस्तीनें व दक्तशीर पार पडत. पुढें पाश्चात्य संस्कृतीच्या आगमनानंतर सदर संस्थांची ही जुनी पद्धति नवशिक्षितांस रुचेना व नवीन पद्धति परंपराभिमानी लोकांच्या आंगवळणी उतरेना अशी स्थिति झाली,आणि त्यामुळें 'दहा जण' हीसंस्था जरी निर्माल्यवत् झाली नाहीं तरी निष्फळ मात्र ठरली खरी. पण मडगांव शहरांत मात्र अशी स्थिति झाली नाहीं. कारण गांवच्या लोकांनीं तींत कालानुरूप फेरफार घडवून आणण्याचे प्रयत्न वेळोवेळीं केले. सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी संस्थेचें "हिंदु कैवारी सार्वजनिक सभा"असें नामकरण करून आणि नियम लिहून व अधिकारी निवडून तिचें काम चालविण्याचा प्रयत्न झाल्याचें कागदपत्रांवरून स्पष्ट दिसतें. पण नवे लिखित नियम अमलांत येण्याचें यश तत्कालीन पुढाऱ्यांच्या पदरांत किती पडलें तें निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि अगदीं अलीकडे म्हणजे सन १९२७ सालीं संस्थेस आधुनिक रूप देण्याचा जो प्रयत्न झाला, तो मात्र बराच यशस्वी झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

या संस्थेचें कार्य धार्मिक व सामाजिक प्रश्नांपुरतें मर्यादित आहे असें वर सांगितलेंच आहे.पण केवळ एवढ्या कार्यानें समाधान होईना. तेव्हां संस्थेनें गांवांत मराठी शिक्षणदानाचें कामही पत्करावें असें ठरलें आणि सन १९१३ पासून तिनें 'श्रीदामोदर विद्यालय' स्थापनही केलें. केवळ शिक्षणावरच खर्च करण्यासाठीं सुमारें ५५० रु. व्याज येईल इतकी रक्कम संस्थेनें बाजूला काढून ठेवल्याप्रमाणें व्यवस्था झाली होती. व शाळा सुरळीत चालली होती असें म्हणतां येण्याजोगें आहे.तथापि या सर्व व्यवस्थेला कायदेशीरपणा असा आलेला नव्हता. आणि त्यामुळें धार्मिक उत्सवांप्रमाणेंच शाळाही स्थिर झाली असें मानतां येण्यासारखें नव्हतें. तेव्हां एकंदर संस्थेचीच पुनर्घटना करावी आणि तिच्या द्वारां एकंदर कामांना स्थिर, व्यवस्थित आणि कायदेशीर स्वरूप प्राप्त करून द्यावें अशी कल्पना निघाली व ती शके १८४९ (सन १९२७ मध्यें) यशस्वी रीतीनें अमलांतही आली.

पुनर्घटनेंत संस्थेला 'मठग्रामस्थ हिंदुसभा

असें नांव देण्यांत येऊन हिंदु समाजाची धार्मिक, शारीरिक, बौद्धिक व नैतिक उन्नति घडवून आणणें,प्रसंग पडेल तेव्हां, हितसंबंधांस जपणें व दीनसहाय्यक कार्य करणें असें तिचें ध्येय निश्चित करण्यांत आलें.

मडगांवांत एका वर्षाहून अधिक काल वास्तव्य असणाऱ्या कोणाहि हिंदुधर्मीयास संस्थेचा सभासद होतां येतें. संस्थेच्या सभासदांचे ३ वर्ग असून त्यांची वार्षिक वर्गणी अनुक्रमें ६, ३, व १॥ रु. आहे. व सभासद म्हणून नांव नोंदवितांना प्रवेश फी दाखल २५,२० व १५ रु. भरावे लागतात. शिवाय प्रवेश फी व नियमित वर्गणी न देणारे पण प्रतिवर्षी 'पसाई' म्हणजे देणगी देणारे सद्गृहस्थ संस्थेचे हितचिंतक मानले जातात.आणि शिक्षण-विषयक आणि उत्सवविषयक अशीं जीं संस्थेचीं दोन खास मंडळें असतात त्यांवर त्यांना निवडूनहि येतां येतें.पसाई किंवा देणगी हिचा अमुक हिस्सा अमुकच कामावर खर्च केला जावा असें देणगीदारांस सांगतां येतें. रकमेचा विनियोग अनुल्लिखित ठेवला तर संस्थेचें कार्यकारी मंडळ ठरवील तदनुसार ती खर्चिली जाते. कार्यकारी मंडळ व सर्वसाधारण सभेचे अधिकारी हे मात्र सभासदच असावे लागतात.

मडगांवचा श्रीदामोदर हा ग्रामदेव. पोर्तुगीजांनीं सासष्टींत बाटविण्यास प्रारंभ केला, तेव्हां म्हणजे सुमारें १५६० च्या सुमारास तो जांबावलि येथें नेऊन ठेवण्यांत आला. त्यामुळें मडगांवचे लोक ग्रामोत्सव तेथेंच जाऊन करीत असतात. त्यांत मुख्य उत्सव शिशिरोत्सवाचा असतो. याला लोकशिक्षणोपयोगी बनविण्याच्या हेतूनें त्यांत बालवीरांचे खेळ, मर्दानी शर्यती, स्त्री–पुरुषांचीं कथाकीर्तनें, सदीप व्याख्यानें,महिलांच्या हस्तकौशल्याच्या कामांचीं प्रदर्शनें इत्यादि कार्यक्रम शिरकविण्याचे यशस्वी प्रयत्न केले जात आहेत. आणि उत्सव आठवडाभर होत असल्यानें व भोजनाची सोय संस्थेकडून मोफत केली जात असल्यानें विविध कार्यक्रम पार पाडणें सुलभही होत आहे.

संस्थेतर्फे चाललेल्या विद्यालयाच्या गांवांत तीन शाळा आहेत. मुख्य शाळेंत मराठी ६ पर्यंत आणि दोन्ही शाखांत ३ इयत्तांपर्यंत शिक्षण दिलें जातें. ५ व्या इयत्तेपासून विद्यार्थ्यांना पोर्तुगीज किंवा इंग्रजी भाषेचें शिक्षण घेतां येतें. इंग्रजीचा अभ्यासक्रम अशा रीतीनें आंखला आहे कीं,मराठी ६ वी पुरी केलेल्या विद्यार्थ्याला इंग्रजी चौथींत

बसतां यावें. त्याचप्रमाणें मराठी ६ वीबरोबर पोर्तुगीज ३ इयत्तांचा अभ्यासक्रम पुरा होऊन विद्यार्थ्याला प्रिमैंग्रावची परीक्षा देतां यावी,अशा रीतीनें पोर्तुगिजीचा अभ्यासक्रम आंखला आहे. यांशिवाय स्वतंत्रपणें पोर्तुगीज ४ इयत्ता शिकविण्याची सोयहि संस्थेनें केली आहे. शाळेंत विद्यार्थ्यांसाठीं वै.दामोदर वासुदेव नाईक यांच्या नांवानें एक वाचनालय उघडलें असून त्यांत सुमारें ५०० बालोपयोगी पुस्तकांचा संग्रह आहे.शिक्षण शास्त्रावरील बहुतेक मराठी पुस्तकें आणि शास्त्रीय उपकरणें यांचाही संग्रह चांगल्या प्रकारें करण्यांत आला आहे. बालवीर शिक्षणाचे वर्गही संस्थेनें चालवले आहेत.एकंदर विद्यार्थ्यांची संख्या सुमारें ५०० असते. त्यांत मुलांमुलींचें प्रमाण ३:२ असें आहे. शाळेंत स्पृश्यास्पृश्य किंवा जाति अगर धर्मभेद मानला जात नाहीं. एकंदर शिक्षकांची संख्या १३ असून त्यांत दोन ट्रेंड शिक्षकिणी आहेत.तहाहयात नेमणुकीच्या शिक्षकांना अल्प प्रमाणावर प्रॉव्हिडंट फंड देण्याची व्यवस्था केली आहे.

गांवांतील हिंदु स्मशानभूमीची व्यवस्थाही संस्थेकडेच असते. ही जागा बरीच मोठी असून तींत केलेल्या लागवडीचें उत्पन्न ५।६ वर्षांनीं मिळूं लागलें. म्हणजे अनाथ प्रेतदहनाची कायम व्यवस्था संस्थेकडून मोफत केली जाण्यासारखी आहे.

संस्थेची स्थिर मालमत्ता सुमारें १३००० रु. किमतीची असून व्याजीं लागलेली आणि न लागलेली रक्कम सुमारें १२००० रु. आहे. एकंदर सभासदांची वर्गणी सुमारें ६०० रु. व्याज व भाडें सुमारें ११०० रु.,विद्यार्थ्यांची फी सुमारें २६०० रु. आणि पसाई सुमारें १५०० रु. व इतर उत्पन्न ७०० रु. मिळून एकंदरीत सुमारें ६५०० रु. वार्षिक उत्पन्न असून उत्सवाप्रीत्यर्थ सुमारें १७००, रु. शाळेप्रीत्यर्थ सुमारें ४५०० रु. व इतर खर्च सुमारें ३०० रु. मिळून ६५०० वार्षिक खर्च आहे.

सभासदांची तूर्तची संख्या २४० आहे. त्यांत १५६ सारस्वत ब्राम्हण, ५९ वैश्य, १३ दैवज्ञ ब्राम्हण, ९ मराठे, २ लिंगायत, व १ जैन असून शिवाय हितचिंतक १०० आहेत.

४ मुष्टिफंड संस्था, नवीन गोवें:— स्थापना शके १८३० (सन १९०८) ; मूळ हेतु— सरकारी आश्रय नसल्यामुळें मराठी शिक्षणाची जी गैरसोय होते ती दूर करणें आणि गरीब मुलांस तें मोफत देणें. वर्गणीदारांची संख्या—हल्लीं २५० वर्गणीदार आहेत. परंतु हरएक कारणांमुळें वर्गणी

वसूल होत असलेल्या वर्गणीदारांची संख्या १५४ आहे. साहाय्यक–संस्थेस ज्यांकडून विशेष साहाय्य झालें आहे, अशांची संख्या १८ आहे. चालू कार्य–नवीन गोवें येथें "श्रीसरस्वति विद्यालय" व "श्रीमहालक्ष्मी विद्यालय" या नावांचीं दोन विद्यालयें चालविण्यांत येतात. या विद्यालयांतून प्राथमिक ४ थ्या इयत्तेपर्यंत मराठी शिक्षण देण्यांत येतें. चालू वर्षी अकरा विद्यार्थी मोफत शिकत आहेत. मिळालेला आश्रय–सन १९१३ सालीं सरकारकडून एक जुनें घर असलेली जागा मिळाली. त्या ठिकाणीं संस्थेचें 'श्रीसरस्वति विद्यालय' बांधण्यांत आलें. सन १९२१ सालीं सरकारकडून इमारत फंडासाठीं १००० रु.मिळाले. सन १९२२ सालीं श्रीमहालक्ष्मी संस्थेच्या जागेंत सार्वजनिक फंडानें "श्रीमहालक्ष्मी विद्यालया"ची इमारत बांधण्यास प्रारंभ झाला.ती सन १९३१त पूर्ण झाली. दोन्ही विद्यालयांच्या इमारत फंडास अनेक सद्‌गृहस्थांकडून देणग्या मिळाल्या आहेत. सभासदांत १२४ सारस्वत ब्राम्हण, १० वैश्य, ७ गुर्जर, ५ मराठे, २ पद्ये ब्राम्हण, २ लिंगायत कानडी, २ दैवज्ञ ब्राम्हण, १ भंडारी व १ ख्रिश्चन आहेत. आजची आर्थिक परिस्थिति–स्थावर इस्टेट अजमासें रु. १०५००, जंगम अजमासें रु. १०००' रोकड अजमासें रु. ३५००, गेल्या सालचें उत्पन्न रु. २५२५–६–४; खर्च रु. १४०७–०–३; यांत कायम फंडाचें उत्पन्न ८३०–१०–६ असून चालू उत्पन्न रु. १६४९–१०–० आहे. सेक्रेटरी–मुकुंद लक्ष्मण प्रभु कोळवाळकर.

५ शारदा विद्यालय, कुम्भारजुवें गोंवाः– स्थापना १९१३; ध्येय–मातृभाषेच्या द्वारें शिक्षणाचा प्रसार करून मुलांचें बौद्धिक, नैतिक व शारीरिक विकसन करणें व राष्ट्रीय भावनांची जोपासना करून स्वातंत्र्यप्रियता वाढविणें. प्रगति–शिक्षण प्रसारक मंडळानें हें विद्यालय स्थापिलें. आरंभीं दोनच इयत्ता असून विद्यार्थ्यांची संख्या १५ च होती. सध्यां शाळेंत १६५ विद्यार्थी असून शिक्षण ६ इयत्तांपर्यंत आहे. विद्यार्थ्यांपैकीं मुली ४०, मुलगे १२५; एकूण ब्राम्हण ८० व ब्राम्हणेतर ८५; विद्यालयाची मालकीची इमारत असून ती सार्वजनिक वर्गणी गोळा करून बांधली. संस्थापक–१ सुब्राय पै, २ फटवा भिकू भांडारे, ३ नारायण गोपाळ भांडारे; आर्थिक स्थिति–उत्पन्नाच्या बाबी, फी, मुष्टिफंड, मासिक वर्गणी. प्रस्तुत वर्गणीदार वीस आहेत. देणगी–वै. नरसिंह कृष्ण नाईक सुकेरकर यांनीं आपल्या इस्टेटींतून विद्यालयास दरमहा १५ रुपयेप्रमाणें रक्कम मिळावी असा लेख करून ठेवला आहे. सेक्रेटरी– केशव मर्तोबा भांडारे.

६ सरस्वती सेवक मंडळ आणि श्रीदामोदर वाचन–मंदीर, मडगांव गोवें:–– शके १८३८ (सन १९१६) ह्या वर्षी शाळा, सभा, वाचनालयें, इत्यादि सार्वजनिक कार्यांच्या उपयोगी पडावी म्हणून श्रीदामोदर विद्याभुवन या नांवाची एक भव्य इमारत येथील गौड सारस्वत ब्राम्हण मंडळींनीं मडगांव येथें बांधली. आतांपर्यंत या इमारतीप्रीत्यर्थ ४० हजार रुपये खर्च झाले आहेत. मडगांव येथें श्रीरामनाथ दामोदर वाचनमंदिर नांवाचें एक सार्वजनिक वाचनालय कांहीं वर्षें चालून युक्त इमारतीचे अभावीं बंद पडलें होतें. त्याच्या कांहीं सभासदांनीं आपल्या संस्थेचें पुनरुज्जीवन व्हावें, या हेतूनें एक नाटचप्रयोग करून त्याचें ५०१ रुपये उत्पन्न श्रीदामोदर विद्याभुवनाच्या इमारत फंडास दिलें. श्रीलक्ष्मी आणि श्रीसरस्वति या देवतांचे सार्वजनिक उत्सव शके १८३८ सालापासून याच इमारतींत होऊं लागले. श्रीसरस्वत्युत्सव साजरा करणाऱ्या मंडळींनीं आपल्या संस्थेस श्रीसरस्वति सेवक मंडळ हें नांव दिलें. व शके १८३९ सालापासून या उत्सवास सार्वजनिक व्याख्यानमालेची जोड देऊन विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर श्रीदामोदर वाचनमंदिर या संस्थेची स्थापना झाली. श्रीसरस्वति सेवक मंडळाकडून प्रतिवर्षीं विजयादशमीपासून पुढें तीन दिवस श्रीसरस्वत्युत्सव साजरा होत असतो. या उत्सवांत शारदीय व्याख्यानमाला हा एक आणि कीर्तनमाला हा एक असे दोन महत्त्वाचे कार्यक्रम असतात. श्रीदामोदर वाचनमंदिरांत आरंभीं मराठी, संस्कृत, गुजराथी, हिंदी, पोर्तुगीज इत्यादि पुस्तकें सुमारें १००० होतीं, तीं आतां ३००० वर झालीं आहेत. निरनिराळ्या भाषांतील नियतकालिकें सुमारें ५० वर संस्थेच्या वाचनमंदिरांत येत असतात. वार्षिक वर्गणी, प्रवेशफी, देणग्या, पुस्तकभाडें इ. चें उत्पन्न आजपर्यंत ६१३९ रु. १४ आ. ७ पै झालें असून खर्च ६००८ रु. १॥ पै झाला आहे. शिल्लक १३१ रु. १४ आ. ६ पै आहे. आहे. दररोजची वाचकांची संख्या सुमारें सरासरीनें ३० असते. वाचनमंदिरांत कोणाही स्त्रीपुरुषांस वाचनाचा लाभ बिनखर्चे घेतां येतो. कार्यकारी मंडळ–दत्तात्रय पांडुरंग दलाल, दा. श्री. दलाल, य. वि. पै रायतूरकर, ग. पुं. कारे, ज. र. पै फोंडेकर.

७ सारस्वत विद्यालय; म्हापसें गोवा:– संयुक्त गौड सारस्वत ब्राम्हण परिषदेच्या म्हापसें येथें भरलेल्या अधिवेशनांत ठरविल्याप्रमाणें १९११ सालीं सारस्वत विद्यालयाची स्थापना होऊन आज एकवीस वर्षे पूर्ण झालीं आहेत. संस्थेचे संस्थापक कै. शांताराम नारायण ऊर्फ बाबासाहेब दाभोलकर व कै. पांडुरंग सदाशिव ऊर्फ काकासाहेब दणाईत; संस्थेची शैक्षणिक बाबतींत प्रगति कै. परशुराम रामचंद्र शिनारी मुख्याध्यापक सारस्वत विद्यालय यांचेमुळेंच झाली. संस्थेंत आरंभीं ३९ च मुलें होतीं. परंतु लौकरच ही संख्या २०० पर्यंत वाढत गेली. आरंभीं मराठी चार इयत्तांपर्यंतचेंच शिक्षण दिलें जात होतें. परंतु पुढील शिक्षणाकरितांही मुलें येऊं लागल्यानें विद्यालयांत मराठी सात इयत्तांपर्यंतचें शिक्षण दिलें जाऊं लागलें. मध्यंतरीं कांहीं वर्षे विद्यालयांत इंग्रजी तीन इयत्ता व पोर्तुगीज प्रिमैरग्रावचेही वर्ग चालू होते. १९२४ सालानंतर पोर्तुगीज सरकारनें दुय्यम पोर्तुगीज शिक्षण घेण्यास जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर वयोमर्यादेचा निर्बंध लादल्यामुळें शिक्षणाची गळचेपी होऊन फक्त मराठी चार इयत्ताच ठेवणें क्रमप्राप्त झालें. इ. स. १९१४ सालीं पोर्तुगीज गव्हर्नर नेक नामदार कोसेर दे कोस्त ह्यांनीं शहराच्या मध्यभागीं संस्थेच्या इमारतीकरितां मोफत जागा दिली. यानंतर १९१६सालीं इमारतीच्या बांधकामास सुरुवात होऊन सन १९१९ सालीं इमारत पुरी झाली. इमारतीस सुमारें १६ हजार रुपये खर्च आला. सदर संस्था सरकारांत रजिस्टर झालेली असून १९३१सालीं तिची कायदेशीर रीत्या नियमावलीही प्रसिद्ध झालेली आहे. संस्थेचा कायमनिधि सरकारी रोख्यांच्या रूपानें एकवीस हजारांचा असून त्याचा ट्रस्ट केला आहे. संस्थेचा वार्षिक खर्च अंदाजें १६५० रु. असून उत्पन्नही जवळ जवळ तितकेंच आहे. उत्पन्नाच्या बाबी पुढीलप्रमाणें आहेत–– (१) कायमनिधीचें व्याज (७००) सातशें रु. (२) कै. बाळकृष्ण बाबुराव तेलंग ह्यांनीं आपल्या मृत्युपत्रान्वयें दिलेल्या इस्टेटीच्या भागाचें सरासरीं वार्षिक उत्पन्न ७५ रु. (३) म्हापसें म्युनिसिपालिटीकडून मिळणारी वार्षिक मदत १८० रु. (४) वर्गणीदारांची वार्षिक वर्गणी सुमारें १५० रु. (५) फीचें वार्षिक उत्पन्न सरासरी ६५० रु

संस्थेचा ग्रंथसंग्रह जवळ जवळ दोन हजार असून शिक्षकांकरितां व विद्यार्थ्यांकरितां विद्यालयांत ग्रंथसंग्रहाची व वाचनालयाची सोय केलेली आहे. चालू सालीं विद्यालयांत २०६ मुलें असून त्यांपैकीं ७४ मुली आहेत. शिक्षण मराठी चार इयत्तांपर्यंत आधुनिक पद्धतीनें सर्व जातींच्या मुलांस सारखें दिलें जातें. सध्यां शिक्षकांची संख्या पांच असून मुख्याध्यापकाचे जागीं श्री. ग. ब. गोळवलकर हे ट्रेंड शिक्षक आहेत. विद्यालयाची व्यवस्था कार्यकारी मंडळ व सर्वसाधारण मंडळ पाहतें. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. वामन शंभू बोरकर एम. बी. बी. एस. , खजिनदार श्री. मुकुंद विनायक भोवे व सेक्रेटरी श्री. गुंडू सिताराम आमोणकर बी. ए.; सर्व साधारण मंडळाचे अध्यक्ष पणजीचे डॉ. आत्माराम गोविंद बोरकर, सेक्रेटरी श्री. शिवा फटू पै आंगले.

८ सारस्वत ब्राह्मण समाज मडगांव गोंवा:– स्थापना १९१२; ध्येय–सामान्यतः एकंदर लोकसमूह व विशेषतः विद्यार्थी, तरुण पिढी यांची शारीरिक, मानसिक व नैतिक उन्नति, त्यांना आवश्यक साधनांची मदत करून साधणें. संस्थेचे ७३ सभासद आहेत. सारस्वत ब्राम्हण ज्ञातींतील कोणत्याही सद्गृहस्थांस संस्थेचे सभासद होतां येतें. संस्थेचें वार्षिक उत्पन्न सुमारें एक हजार रुपये असून यांत पुस्तक–फीचें उत्पन्न जवळजवळ २०० रुपये असतें. संस्थेच्या वाचनालयाचा पुस्तकसंग्रह, संस्थेची इमारत व इतर सामानसुमान वगैरे मिळून संस्थेच्या एकंदर मालमत्तेची किंमत अजमासें २७।२८ हजार रुपयांवर होईल. प्रथमतः संस्थेचें एक वाचनालय उघडण्यांत आलें. व तें मोफत ठेवण्यांत येऊन त्याचा फायदा सर्व धर्माच्या व वर्णाच्या लोकांस बिनहरकत घेतां यावा अशी व्यवस्था करण्यांत आली. या वाचनालयाचाच नव्हे तर संस्थेच्या लोकोपयोगी अशा कोणत्याही नवीन उपक्रमाचा फायदा सर्व लोकांस मोफत घेण्यास मिळतो. वाचनालयांत मराठी, पोर्तुगीज, इंग्रजी, हिंदी वगैरे भाषांतील मिळून एकंदर ६०।६५ नियतकालिकें येतात. या संस्थेचा फायदा रोज ५०।६० वाचक घेतात. पुस्तकांचा संग्रह सात हजारांवर आहे. पुस्तकसंग्रहांतील वैशिष्टच म्हणजे जुन्या दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह हें होय. त्याचप्रमाणें बालबोध, विविधज्ञानविस्तार, केरळकोकिळ इत्यादि मासिकांची बहुतेक जुनीं पूर्ण वर्षांचीं पुस्तकें आहेत. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या भाषांतर सोसायटीमार्फत प्रसिद्ध झालेले सर्व ग्रंथ बडोदें सरकारच्या विद्याधिकाऱ्यामार्फत संस्थेला देणगीदाखल मिळाले

आहेत. सन १९१८ सालीं पोर्तुगीज सरकारच्या कायद्याप्रमाणें संस्था रजिस्टर करण्यांत आली. अस्पृश्योद्धाराच्या चळवळीस गोमंतकांत प्रारंभ होण्यापूर्वीच संस्थेनें त्यांचीं एकत्र कीर्तनें वगैरे करून व कांहीं सभासदांनीं त्यांच्या लग्नासारख्या समारंभास हजर राहून सक्रिय सहानुभूति दाखविली आहे. संस्थेनें स्वतःची इमारत बांधली असून त्या कामीं आतांपर्यंत जवळजवळ १७।१८ हजार रुपये इतकी रक्कम खर्च झाली आहे. शहरच्या मध्यभागीं भर वस्तींत हमरस्त्यावर सरकारची एक इमारत होती ती ४२२५ रुपयाला विकत घेतली व त्या खालची जमीन त्या वेळचे गव्हर्नर जनरल दोतोर ज्यायमिद मोराईस यांनीं संस्थेस बक्षीस दिली. जुनी इमारत पाडून त्या ठिकाणीं आतां सुंदर व भव्य नवी बांधण्यांत आली असून तूर्त तिचे दोन भाग—वाचनालय व व्याख्यानाचा हॉल हे पूर्ण झाले आहेत. चिटणीस—केशव अनंत नाईक.

९ ज्ञानप्रसारक मंडळी, म्हापसें:— स्थापना १९०८; गोमंतकांतील सार्वजनिक स्वरूपाची ही आद्यसंस्था होय. या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे अखिल गोमंतकांत व विशेषतः म्हापसें शहरांत शारीरिक, औद्योगिक व वाङ्मयात्मक शिक्षणाच्या द्वारें ज्ञानाचा प्रसार करणें हा असून तत्सिद्धयर्थ संस्थेनें एक शाळा, एक वाचनमंदिर व एक व्यायामशाळा हीं चालविलीं आहेत. या संस्थेंतील सर्व प्रकारचें शिक्षण अगदीं मोफत देण्यांत येत असून अशा प्रकारें मोफत ज्ञानदान करणारी सबंध गोमंतकांत ही एकच एक संस्था आहे. या संस्थेच्या विद्यालयांत मराठी ४ इयत्तांपर्यंत शिक्षण देण्यांत येतें. विद्यार्थ्यांची संख्या १७५ वर आहे. बलभीमपथक व भीष्मपथक हीं पथकें नुकतींच सुरू झालीं. उद्योगधंद्यांना व कलाकौशल्यांना उत्तेजन देण्याकरितां संस्थेनें १९१२ सालीं एक मोठें प्रदर्शन भरविलें होतें. याशिवाय संस्थेनें एक पोर्तुगीज क्लासहि चालविला असून त्यांत श्री. वामन अनंत खलप यांनीं ७ वर्षेंपर्यंत विनावेतन काम केलें आहे. या संस्थेच्या सभासदांत सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांचा समावेश होतो. संस्थेंत चार शिक्षक काम करीत असून संस्थेचा खर्च धर्ममूठ, सभासदांची वर्गणी, वैश्यमंडळ या संस्थेकडून मिळणारी मासिक वीस रुपयांची रक्कम व सरकारी व बारदेश नगर पालिकेकडून मिळणाऱ्या देणग्या यांतून होतो. गव्हर्नर सि. कौसेर द कोस्त यांनीं १९१२ सालीं संस्थेला शिक्षणफंडांतून दरमहा १५ रुपयांची देणगी सुरू केली. त्याचप्रमाणें येथील नगरपालिकेनेंहि संस्थेच्या कार्याचें महत्त्व जाणून तिला दरमहा वीस रुपयांची देणगी सुरू केली आहे. संस्थेच्या सभासदांची संख्या ५० असून धर्ममूठ देणारे सभासद जवळजवळ ७५ आहेत. संस्थेला स्वतःची इमारत नाहीं. परंतु येथील वैश्यमंडळ या संस्थेनें आपली इमारत तिला वरील कार्यें चालविण्यासाठीं देऊं केली आहे. शिवाय संस्थेकडून वेळोवेळीं राष्ट्रीय पुरुषांचे उत्सव चालविले जात असून त्या प्रसंगीं ब्रिटिश हिंदुस्थानांत चाललेल्या समाजोन्नतिकारक चळवळींची माहिती तिकडील व्याख्यात्यांकडून लोकांना करून देण्यांत येत असते. चिटणीस —सी. ग. मेणरकर.

वऱ्हाड

१ इंडियन रेडक्रॉस सोसायटी— यवतमाळ—शाखा. ही शाखा स्थापन होऊन सात वर्षें (१९३१ अखेर) होऊन गेलीं. दुःखितांचें दुःख कमी करणें, रोगांचा परिहार करणें व देशांतील आरोग्य वाढविणें हे सोसायटीचे उद्देश आहेत. तहाहयात व वार्षिक सभासद आणि तहाहयात व वार्षिक हितचिंतक असे सदस्यांचे वर्ग आहेत. या शाखेचे हल्लीं एकूण १८३ सभासद आहेत. संस्था हल्लीं आरोग्यप्रचार, नर्सिंगचें शिक्षण, शिशुसप्ताहांचीं प्रदर्शनें, व्याख्यानें व शिशुसंगोपन हीं कामें करीत आहे. आरोग्य—प्रचार—खेड्यापाड्यांतून मॅजिक लँटर्नच्या साहाय्यानें व्याख्यानें दिलीं. नर्सेसचा वर्ग येथें सुरू केला आहे. एकूण १३ नर्सेसना शिकवून पास झाल्याचे दाखले देण्यांत आले. सरासरी १० नर्सेस या क्लासमध्यें शिक्षण घेत असतात. शिशुसप्ताह साजरे होतात, तेथें मॅजिक लँटर्न लेक्चर्स व मुलांची परीक्षा करून त्यांना बक्षिसें देणें हे कार्यक्रम होतात. शिशु—संगोपन—मंडळाचें कार्य चालू आहे. सरासरी मुलांची व स्त्रियांची मिळून रोजी १८ ते २० आवक आहे. स्त्रिया व मुलें यांना तपासणें, उपचार करणें इ. कामें येथें सुरू आहेत. लहान मुलांवर देखरेख, त्यांना स्नान घालणें, दूध पाजणें वगैरे कामांशिवाय दुपारीं इतर वर्ग भरविण्यांत येतात. दर सोमवारीं नर्सेसचा वर्ग व बुधवारीं शिवणकामाचा वर्ग भरतो. दर गुरुवारीं आयांचा वर्ग व महिना अखेरच्या शनिवारीं गरोदर बायकांकरितां म्हणून खास वर्ग भरविण्यांत येतो. बालसंगोपन गृहें (क्रीश) काढण्याची संस्थेची इच्छा आहे. अशा गृहांची आवश्यकता

फार आहे.हेल्थवर्कर्सचीं कामें फार चांगलीं होतात. त्या गांवांत बाळंत झालेल्या बायांना जाऊन पाहतात; फी वगैरे कांहीं घेत नाहींत. मोफत बाळंतपणें करतात. जमाखर्च (१९३१)–जमा २४८०–४–९ रु. खर्च ५२०–६–६ रु. शिल्लक १९५९–१४–३ रु. जिल्हा सब्कमिटीचे अध्यक्ष श्री. सी. सी. देसाई आय. सी. एस्, ऑ. सेक्रेटरी–डॉ. सि. कृ. काणे.

२ उत्तमश्लोक ग्रंथप्रकाशक मंडळ– उमरखेड–वऱ्हाड. या संस्थेचे मूळ उत्पादक विदर्भांतील वेदमूर्ति दासंभटशास्त्री अयाचित व श्रीयुत सर्वोत्तम रघुनाथ पांडे हे होत. संस्थेचा उद्देशः–(१) या भागांतील साधुसंतांचें वाङ्मय प्रसिद्ध करणें. (२)वाङ्मयात्मक लोकशिक्षणाचें कार्य करणें. पंचवार्षिक समालोचन––सन १९२४ मध्यें संस्थेनें 'उत्तम श्लोक'प्राकृत सप्तशती हा ग्रंथ सुमारें दोन हजार रुपये खर्च करून प्रसिद्ध केला. सदर ग्रंथ खपवण्याच्या दृष्टीनें वेळोवेळीं प्रचारक पाठविण्यांत आले होते. खुद्द संस्थेचे चिटणीस हे मोगलाई विभागांत प्रचारार्थ गेले होते. पुस्तकें थोडींबहुत खपलीं.परंतु विशेष प्रोत्साहन मिळालें नाहीं.मध्यप्रांत विद्याखात्यानें व नागपूर विश्वविद्यालयानें शाळाकॉलेजांतील अभ्यासक्रमांत या पुस्तकास स्थान दिलें आहे एवढें खास. अध्यक्ष एकनाथ जनार्दन मुनी. संस्थेचा द्रव्यनिधि–पुस्तकें रोख व इतर रोख सामान मिळून संस्थेची अंदाजी शिल्लक आज १०००।१२०० रुपये आहे. सदर शिलकेपैकीं रोख रक्कम योग्य तारणावर तूर्त कर्जाऊ दिली आहे.

३ डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशन यवतमाळः– ही संस्था यवतमाळ येथें शके १८३७ सन (१९१५) मध्यें स्थापन झाली. संस्थेचे मूळ उत्पादक श्री. बापूजी अणे. उद्देशः–– "सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति उत्पन्न करणें, असल्या अभ्यासाचीं साधनें विचारी लोकांना उपलब्ध करून देणें, सार्वजनिक प्रश्नावरील लोकमताला योग्य वळण लावणें, प्रसंगविशेषीं लोकांच्या अडचणी अर्ज, डेप्युटेशन वगैरे कायदेशीर मार्गानें सरकारच्या कानावर घालणें आणि हिंदुस्थानचा राज्यकारभार लोकहिताच्याच दृष्टीनें चालविण्याकरितां वेळोवेळीं सरकारला सूचना करणें," संस्थेचें ध्येय पुढीलप्रमाणें (अ) "ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशभागाला जे राजकीय हक्क आहेत, त्यांचेच बरोबरीचे सर्व हक्क हिंदुस्थानला मिळणें" (ब) लोकांच्या अडचणी सरकारला कळविणें, सामाजिक व धार्मिक या बाबींशिवायकरून बाकीच्या सर्व बाबतींत हिंदी लोकांचें हितवर्धन करण्याकरितां सनदशीर मार्गानें खटपट करणें व अशा सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास करण्याची सोय करणें (क) हिंदुस्थानवर ब्रिटिश राजसत्तेचें अबाधित्व व ब्रिटिश राज्यासनाबद्दल राजनिष्ठा यांना धरून जे मार्ग असतील त्यांनाच सनदशीर मार्ग समजण्यांत येईल. सन १९२६ सालीं संस्थेच्या ध्येयांत आणि मार्गांत पुढीलप्रमाणें फरक करण्यांत आला. उपरिनिर्दिष्ट ध्येयांतील 'ब्रिटिश साम्राज्यांतील' या शब्दाऐवजी 'ब्रिटिश राष्ट्रसंघ' हे शब्द घालण्यांत आले व (क) हें पोट कलम काढून टाकण्यांत आलें.

घटनाः––संस्थेचें एक कार्यकारी मंडळ असून त्याचे १४ सभासद आहेत. सन १९२६ पर्यंत संस्थेस अध्यक्ष मुळींच नसत. कार्यकारी मंडळ आणि तीन चिटणीस एवढेंच संस्थेचें अधिकारी मंडळ असे. सन १९२६ सालीं संस्थेस अध्यक्ष व सन १९२७ सालीं उपाध्यक्ष असावा असा ठराव होऊन त्याप्रमाणें घटनेंत बदल करण्यांत आला. संस्थेच्या शाखा जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यांत तालुकासभा या नांवानें स्थापन झाल्या आहेत. सभासदत्व व वर्गणी–वयांत आलेल्या कोणाही इसमास संस्थेचा सभासद होण्याकरितां अर्ज करतां येतो. सदरहू अर्जाचे पत्रकावर संस्थेच्या पूर्वीच्या दोन सभासदांनीं आपली संमति द्यावी लागते. नंतर कार्यकारी मंडळाचे सभेंत सदरहू गृहस्थाचे सभासदत्वास संमति मिळाली म्हणजे तो गृहस्थ संस्थेचा सभासद होतो. संस्थच्या पटावर सध्यां ३७५ सभासदांची संख्या आहे. प्रत्यक सभासदास महिन्यास अगर सालिना ठराविक वर्गणी द्यावी लागते. तसेंच संस्थेस निरनिराळ्या सद्गृहस्थांकडून वेळोवेळीं देणग्या मिळतात. त्यांतून संस्थेचा खर्च करण्यांत येतो. संस्थेचा एक पुस्तक संग्रह असून त्यांत विशेषतः राजकारण, राज्यघटनात्मक ग्रंथ, अर्थशास्त्र, शिक्षण, इत्यादि विषयांवरील पुस्तकांचा भरणा आहे.

एकाद्या प्रश्नासंबंधीं चळवळ करून लोकमत जागृत करण्याची आवश्यकता असेल तर संस्थेकडून खटपट करण्यांत येते.

या प्रांतांत पूर्वीं बिगारीचा बराच जुलूम असे. संस्थेनें हा प्रश्न हातीं घेऊन, सर्व वऱ्हाडांत त्यासंबंधीं लोकमत जागृत केलें लोकांतील

जागृतीप्रमाणेंच सरकारलाही बिगारीचें बेकायदा स्वरूप पटवून देऊन अखेर हा जुलूम नाहींसा करण्याचें श्रेय घेतलें. बिगारीप्रमाणेंच महार-वलुत्याची पद्धती नाहींशी करण्याकरितां संस्थेस सर्व वऱ्हाडांत जोराची खटपट करावी लागली. सन १९२१ सालीं वऱ्हाडांत शेतकऱ्यांनीं बलुतें देण्याचें नाकारून चाळीस हजार जप्त्या लावून घेतल्या. अखेर बलुतापद्धतीचें अजिबात उच्चाटन झालें. यवतमाळ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या जंगलच्या तक्रारी सुमारें गेल्या १५ वर्षांपासून सुरूं होत्या. सन १९३० सालीं जंगल कायदेभंगाचा प्रश्न वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमिटीनें आपलेकडे घेतल्यामुळें संस्थेचे अध्यक्ष श्री. बापूजी अणे आणि इतर २५ सभासद त्या कायदेभंगांत सामील झाले. राष्ट्रीय सभेस ही संस्था जोडलेली नसली तरी राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांतील स्वदेशी, बहिष्कार, मद्यपान बंदी इत्यादि चळवळी या संस्थेमार्फत झाल्या आहेत. तसेंच वऱ्हाड लँडरेव्हेन्यू कोडची पुनर्रचना झाली त्यावेळींही त्यांत लोकहितानुकूल फेरफार घडवून आणणें, वऱ्हाडचे प्रश्नाकरितां स्वतंत्र कायदेकमिटी स्थापन करण्याची खटपट करणें,इत्यादि कार्येंही हातीं घतलीं आहेत.पंचायती नसतील तेथें स्थापन करणें, स्थापन होतील तेथील लोकांना पंचायतीचे कामकाजासंबंधीं लागेल त्यावेळीं सल्ला देणें इत्यादि कार्यें संस्थेकडून केलीं जातात.जिल्हा परिषदाः—यवतमाळ जिल्हा परिषदेचीं अधिवेशनें सालोसाल तालुक्यातालुक्यांतून या संस्थेमार्फत भरविण्यांत येत असतात.

जमाखर्च (१९३१–३२) जमा २०३४ रुपये होऊन खर्चही तितकाच झाला. सन १९३२–३३ सालाकरितां कार्यकारी मंडळ. अध्यक्ष लो. ना. मा. श्री. अणे. सेक्रेटरी–(१) द. कृ. काणे, (२) श्री. श्री. पांडे, (३) त्र्यं. स. बापट. पुसद येथील दानशूर धनिक गृहस्थांनीं मदत असोसिएशनला दिली असून त्याचें व्याज दरसाल असोसिएशनच्या कामांत खर्च करावें अशी त्यांची अट आहे.

४ टिळक राष्ट्रीय विद्यालय:—खामगांव (वऱ्हाड) स्थापना—१९२१ उद्दश "विद्यार्थी स्वावलंबी, स्वदेशाभिमानी आणि शीलसंपन्न देशसेवक व्हावा असें शिक्षण देण्याची व्यवस्था करणें." कार्य—संस्थेची मालकीची इमारत असून शिवाय शेतजमीनहि आहे. संस्थेंत मराठी चौथी पास झालेल्या विद्यार्थ्यांकरतां ६ वर्षांचा अभ्यासक्रम आहे. सहा वर्षांत टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणें) या संस्थेच्या मॅट्रिक परिक्षेची तयारी होते. संस्थेंत बाहेर गांवच्या विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाची सोय आहे. दरमहा १० रु. खर्च येतो. सोळा वर्षें वयापर्यंतच्या बुद्धिमान् व मेहनती अशा अनाथ विद्यार्थ्यांची जेवणाची व शिक्षणाची सोय संस्था मोफत करते. संस्थेंत १९३१ सालीं ९० विद्यार्थी होते. त्यांत अनाथ ३५ होते. बौद्धिक शिक्षणाशिवाय शेतकी, चित्रकला, सुतारकाम, विणकाम यांपैकीं कोणत्याही एका उद्योगाचें उत्तम शिक्षण विद्यार्थ्यांच्या आवडीप्रमाणें दिलें जातें. संस्थेंत नऊ शिक्षक आहेत. कायदेभंगाच्या चळवळींत संस्थेंतील चाळीस विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता. सांपत्तिक स्थितिः—१९३० सालीं जमा ४६१२ रु. १५ आणे. खर्च ४४९१ रु. १ आ. शिल्लक—१२१ रु. १४ आणे. कार्यकारी मंडळ.—अध्यक्ष—डॉ. महादेव नारायण पारसनीस, चिटणीस श्री. लालचंद रामप्रसाद पुरवार. पत्ताः—टिळक राष्ट्रीय विद्यालय खामगांव (वऱ्हाड).

५ दिगंबर जैन बोर्डींग, वर्धाः—–स्थापना सन १९१२. उद्देश—"जैन समाजांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाकरितां मदत देणें, व सदाचारी तरुण तयार करणें." कार्य—१९३० सालीं १६ विद्यार्थी संस्थेंत होते. कार्यकारी मंडळांत पदाधिकारी ७ व सदस्य ११ मिळून १८ लोकांची कमिटी आहे. सांपत्तिक स्थिति—१९२९—३० जमा—१९८ रु. ११ आ. ९ पै; खर्च १६५ रु. ६ आ. ३ पै. शिल्लक ३३ रु. ५ आ. ६ पै. अध्यक्ष—श्री.पूज्य धर्मभूषण ब्र. शितल प्रसादजी, जनरल सेक्रेटरी एम. जे. श्रावणे.

६ नारिंगी स्वस्तिक मंडळ:—यवतमाळ:—–(वऱ्हाड—मध्यप्रांत) स्थापना १९३०; अपघात झालेल्यांना तात्पुरते इलाज करणाऱ्या आजवरच्या संस्था म्हणजे पाश्चात्यांची रेडक्रॉस सोसायटी, मुसलमानांचा रेडक्रीसेंट, पारशांचें पारशी अँब्युलन्स—यांच्या धर्तीवर केवळ परोपकार बुद्धीनें व जातगोत किंवा धर्म यांजकडे न पाहतां कार्य करणारी हिंदुधर्माभिमानीयांनीं चालविलेली एखादी संस्था काढावी असा विचार यवतमाळचे डॉ. महादेव भास्कर टेंबे यांच्या मनांत बरेंच वर्षांपासून होता.१९२९सालीं त्यांनीं वऱ्हाड—मध्यप्रांतांतील पुढारी व कार्यकर्ते यांच्याशीं यासंबंधानें सल्लामसलत व पत्रव्यवहार सुरूं केला त्या सर्वांनीं आपली सहानुभूति दर्शविली आणि याबद्दलची सर्व जबाबदारी डॉ. टेंबे यांजवरच सोंपविली. डॉ. टेंबे या संस्थेच्या कार्यास रीतसर-

पणानें सुरुवात करणार–याकरितां त्यांनीं कांहीं निमंत्रित गृहस्थांची सभाहि बोलावली होती–पण इतक्यांत १९३० च्या मे महिन्यांत लोकनायक बापूजी अणे यांनीं जंगलसत्याग्रहाची घोषणाही जाहीर केली.शांततेच्या काळांत या संस्थेकडे प्रथम कोणाचें फारसें लक्षहि गेलें नव्हतें.पण ही संस्था सुरू होण्यास व कायदेभंगाची घोषणा होण्यास एकच गांठ पडली. आणि तिच्या कार्याचा विस्तार एकसमयावच्छेदानें यवतमाळ, पुसद, वणी, अमरावती, अकोला, खामगांव, मेहकर, बुलढाणा इत्यादि शहरीं झाला. सत्याग्रहाचे वेळीं गर्दींत अपघात झालेले लोक, तसेंच पोलिसांकडून जखमी झालेले लोक इत्यादिकांस वेळचे वेळीं इलाज व औषधोपचार करण्याचें कार्य या संस्थेनें अतिशय तत्परतेनें केलें. यावेळीं तिनें निरनिराळ्या शाखांतून एकंदर ८६१ लोकांची शुश्रूषा केली. कायदेभंगाशीं या संस्थेचा संबंध नाहीं. अर्थात् सदोदित व वर्षानुवर्षे तिचे हातून असली सेवा व्हावी असा तिच्या उत्पादकांचा मूळ हेतु आहे व त्यास अनुसरून लोकनायक माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखालीं एक तात्पुरतें प्रांतिक मंडळ नेमण्यांत आलेलें आहे. डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, नागपूर,हे तिचे उपाध्यक्ष असून डॉ. टेंबे, डॉ. एल. व्ही. परांजपे आणि डॉ. हेडगेवार हे तिचे सेक्रेटरी आहेत. सदोदित काम करण्याकरितां संस्थेतर्फे यवतमाळ येथें एक औषधालय आहे. पारवा, वडगांव, भारी, लोहारा वगैरे खेड्यांत दर आठवड्यास जाऊन आरोग्यविषयक ज्ञानाचा प्रसार आणि औषधोपचार तेथील लोकांस या शाखेमार्फत करण्यांत आले. अमरावतीचें हनुमान व्यायामप्रसारक मंडळ आणि नागपूरचा राष्ट्रीय सेवासंघ या संस्थांतून नारिंगी स्वस्तिक मंडळाच्या शाखा चालविल्या जात आहेत. अशा प्रकारें केवळ परोपकार बुद्धीनें जनसेवा करण्याकरितां ही संस्था अस्तित्वांत आलेली आहे. शाखा–मेहेकर, वणी, खामगांव, बुलढाणा, यवतमाळ या गांवीं आहेत. अध्यक्ष–श्री. भी. ह. जतकर, चिटणीस–डॉ. भा. म. टेंबे, पत्ता-नारिंगी स्वस्तिक मंडळ यवतमाळ (वऱ्हाड).

७ बजरंगबली हिंदु आखाडा, वाशीमः–– (जि. आकोला). या संस्थेचे आजपर्यंत तीनदां पुनरुज्जीवन करण्यांत आलें. पहिलें १९०७, दुसरें १९२१ व तिसरें १९२५. 'निरनिराळ्या प्रकारच्या व्यायामाचा प्रसार करणें' हा या संस्थेचा उद्देश आहे. जनतेमध्यें व्यायामाची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून व्यायाम प्रचाराचें काम चालू आहे. १९३१ जमा–रु. ४६६४–३–९ अध्यक्ष–रु. ह. देशपांडे, वकील. सेक्रेटरी–वा. ना. चिंचवडकर.

८ रायफल असोसिएशन,यवतमाळः–– जिल्हा परिषदेच्या यवतमाळ येथील अधिवेशनांतील ठरावास अनुसरून डॉ. टेंबे यांच्या पुढाकारानें ही संस्था १९२९ सालीं स्थापन झाली. १९३० सालीं रीतसर अधिकारी मंडळ निवडलें; अध्यक्षपदाकरतां श्री. भीमराव हणमंत जतकर यांची निवड झाली. नंतर लायसन्स घेणें; बंदुका, काडतुसें आणवणें वगैरे पूर्वतयारी झाली व नागपूर येथील डॉ. चोळकर यांचें हस्तें प्रथम बंदुकीनें निशाणबाजी करविली. संस्थेचा हेतु–बंदुकीनें निशाण मारण्यास शिकविणें व निशाणबाजीची आवड उत्पन्न करून त्याबरोबर खेळाडूपणा, शिस्त व आत्मविश्वास इत्यादि गुणांची तरुण पिढींत वाढ होण्यास एक साधन उपलब्ध करून देणें. सभासदांची संख्याः–आजन्म सभासद ६ एकदम रु. १०० देऊन झालेले; साधारण सभासद२१; प्रथमवर्षी रु. २५ दिलेले; एकदा रु. २५ दिल्यानंतर पुढें दरसाल रु. ६ देऊन सभासद राहतां येतें. याप्रमाणें चालू सालीं आजन्म सभासद सहा (प्रथमवर्षी झालेले) अगदीं नवीन ४ व जुन्यापैकीं १६ येणेंप्रमाणें २६ सभासद आहेत. कार्य–एकंदर सभासदांपैकीं जवळ जवळ २० जण बंदुक उडविण्यास शिकले.यांपैकीं ८–१० सभासदांनीं चिकाटीनें संवय ठेवून निशाणबाजींत बरीच प्रगति केली आहे. संस्थेनें प्रथम सालीं रु. ११२५ जमविले व दुसऱ्या वर्षी १९६ रु. जमले संस्थेजवळ ६ मिनिएचर रायफल्स आहेत. लवकरच १।२ मोठ्या रायफल्स लॅंगरेंजच्या बोलावण्यांत येतील. आज संस्थेजवळ ३०० रु. शिल्लक आहेत. अध्यक्षः–श्री. मा. गं. जोगळेकर; कृ. स. केळकर, ऑ. सेक्रेटरी प्रॉ. रा.अ. यवतमाळ ब्रँच.

९. **विदर्भ प्रकाशन संस्था**, उमरावतीः–– स्थापना १९३२. उद्देश–"उद्बोधक ललित वाङ्मय व सुलभ पद्धतीनें लिहिलेलें विदग्ध वाङ्मय प्रसिद्ध करणें." संस्थापक–श्री. अ. तु. वाळके. कार्य–संस्थेनें 'संवेदना' (लघुकथासंग्रह) व 'निर्माल्यमाला' (वीणागीतसंग्रह) हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. 'वृंदा' (कादंबरी), 'भाषाशास्त्राचा संक्षिप्त इतिहास' 'संस्कृत नाट्य वाङ्मय' व 'हिंदी लोकस्थितीचें आलोचन' हीं पुस्तकें यापुढें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत. संपादक–पी. आर. पाठक. चालक–श्री. प. वि. जोशी.

१० विद्यार्थी फंड, यवतमाळ:—स्थापना १९१२; विद्यार्थी फंड गेलीं १९ वर्षें अव्याहतपणें आपले उद्देशाप्रमाणें गरीब विद्यार्थ्यांस त्यांचे दुय्यम व उच्च शिक्षणाकरितां म्हणून मदत करीत आहे. या फंडांतून मदत मिळालेले कित्येक जण आज उत्तम स्थितींत असून कोणी वकील, कोणी डॉक्टर, बरेच सरकारी अंमलदार, व कांहीं व्यापारी व कारागीर असे व्यवसाय करीत आहेत. संस्थेला पाश्चात्य देशांत शिक्षण घेण्यास विद्यार्थ्यांस मदत करतां यावी अशी अपेक्षा आहे. हल्लीं एकंदर समाज संस्थेस मदत करण्याच्या बाबतींत अगदीं उदास आहे. त्याला निरनिराळीं कारणें असतील, परंतु अशा प्रकारची संस्था चालू रहावी असें मात्र लोकमत आहे. जातिविशिष्ट भेद न ठेवतां गरीब विद्यार्थ्यांस मदत देण्यांत येते. गतवर्षापासून कॉलेजमधील शिष्यवृत्ति बंद आहे. एकंदर उदासीनतेमुळें १९३०–३१ सालीं तर फंडाला १२९ रु. १० आ. कर्जाऊ घ्यावे लागले. जमाखर्च—जमा वरील कर्जाऊ रक्कम धरून १५४१–१४–९ रु. शिल्लक रु. १०८८–४–९ खर्च ४५३–रु. १० आ. सेक्रेटरी डॉ. सि. कृ. काणे.

११ विद्यार्थी वसतिगृह, उमरखेड:—संस्थापक श्री. कृष्णाजी रामचंद्र देशपांडे (संस्था सुरूं झाल्यापासून हेच संस्थेचे बिनपगारी व्यवस्थापक व चालक आहेत). संस्थेचें ध्येय–खेड्यापाड्यांतील मुलांच्या रहाण्याची व जेवणाची सोय करून शिक्षणाचा प्रसार करणें व कर्तव्यदक्ष असे नमुनेदार नागरिक बनविणें. आर्थिक साहाय्य—ही संस्था सर्वस्वी भिक्षेवर चालली आहे.दर आठवड्यास संस्थेंतील मुलें गांवांत भिक्षा मागतात. तसेंच उन्हाळ्याच्या व इतर सुट्यांच्या अवधींत चालक बाहेरगांवीं फिरावयास जाऊन भिक्षा जमवतात व त्यावर संस्था चालविली जाते. क्वचित् कांहीं देणग्या मिळतात. पण त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे. स्थिर साहाय्य म्हणून श्री. महाराज शिखर (माहूर) यांचेकडून दरसाल १० पोतीं धान्य, श्री. धोंडू महाराज खंदार यांचेकडून द. सा. ११ व यवतमाळ जिल्हा बोर्डाकडून सालिना १५० रु. संस्थेस मिळतात. सवडीनुसार व्यायामपटु मुलांचे खेळ बाहेरगांवीं करून दाखविले. त्यामुळें व्यायामाचा प्रसार होऊन आर्थिक बाबतींत थोडीशी भर पडली पण काळ,श्रम व जोखम इ. दृष्टीनें विचार केल्यास हा प्रयोग समाधानकारक नाहीं. कै. सखुबाई रजपूत यांचेकडून संस्थेस एक शेत (१७ एकर) मिळालें आहे. कार्याचा लोकांवर परिणाम—संस्थेच्या हेतूप्रमाणें नमुनेदार नागरिक बनविण्याचें अजून सर्वस्वीं साधत नाहीं. तथापि खेड्यांतील लोकांत शिक्षणाची अभिरुचि उत्पन्न झाली असून तिचें प्रमाणही वाढतेंच आहे. तसेंच, अशा प्रकारच्या संस्थेपासून बरेंच जनहित होऊं शकतें असें लोकांच्या प्रत्ययास येऊं लागल्यामुळें आमच्या संस्थेंत येऊं इच्छिणारीं मुलें पुष्कळच असतात. (सांपत्तिक अडचणीमुळें आम्ही त्या सर्वांस घेऊं शकत नाहीं.) पण त्याशिवाय इतरत्रही अशा संस्था निघत आहेत. व्यायामाची आवड, सार्वजनिक उत्सव साजरे करणें, प्रसंगीं लोकांच्या उपयोगी पडणें, इ. उपयुक्त गोष्टींचें बीं खेड्यांतील लोकांच्या मनोभूमींत नकळत रुजविलें जात आहे. बाहेरील परिस्थिति अत्यंत प्रतिकूल असतांही ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादास हळूंहळूं पण कायमची मूठमाती मिळत आहे. (शेवटच्या गोष्टीचें कारण म्हणजे चालक व संस्थेचे इतर बरेच ब्राह्मण साहाय्यक यांची निरपेक्ष व समतेची वागणूक.)

संस्थेची अंतर्गत व्यवस्था:—

१९२७ जाने.–एप्रिल–मुलें १४; २७–२८, ७५; २८–२९,५०; २९–३०, ४०; ३०–३१ ५१; ३१–३२,३७; ३२–३३, ३२;

१९३२–३३ सालांतील मुलांची जातवारी:—

मराठे	ब्राह्मण	आंध्र	कोळी	कलाल	महार	मुसल.
१७	१	१	२	१	९	१

संस्थेच्या ध्येयाप्रमाणें नमुनेदार व कर्तव्यदक्ष असे नागरिक तयार करण्याकरितां आवश्यक म्हणून जो नित्य कार्यक्रम ठरविला आहे तो व्यवस्थित करवून घेतला जातो. स्वयंपाकाव्यतिरिक्त मुलांचीं सर्व कामें त्यांच्याकडूनच करवून घेतलीं जातात. त्यांशिवाय मुलांची एक पंच–कमिटी निवडून त्यांचा सर्व कारभार, न्याय देणें, शिक्षा ठरविणें, इ. सुद्धां–त्यांच्याकडून, करविला जातो. एक व्यायामशाळा व एक वाचनालय चालविलें असून त्यांचा लाभ कोणालाही घेतां येतो. गांवांत कोठें आग लागल्यास ती विझविणें, कोठें कोणी आडांत पडल्यास त्यास बाहेर काढणें, साथीच्या रोगांचे वेळीं गोरगरिबांना औषधपाणी देणें, नाल्या,गटारें साफ करणें, आडांविहिरींत औषध टाकून त्यांचें पाणी शुद्ध करणें. व प्रसंगानुसार गांवांत हस्तपत्रकें वाटून व व्याख्यानें करवून लोकांना उपयुक्त माहिती पुरविणें यांसारखीं कामें मुलांकडून करवून घेतलीं जातात. यामुळें सार्वजनिक कामें

करण्याचें लोण खेड्यांपाड्यांतसुद्धां सहज पोहों-चविलें जातें व संस्थेविषयीं लोकांच्या मनांत सहानुभूति उत्पन्न होते. संस्थेतर्फे प्रतिवर्षी श्रीगणेशोत्सव व श्रीशिवजयंत्युत्सव मोठ्या प्रमाणांत साजरे केले जातात व त्यांच्या मिरवणुकीचे प्रसंगीं लष्करी थाटाच्या मिरवणुकी काढून लष्करी शिस्त शिकविण्याचा प्रयत्न केला जातो. ह्या मिरवणुकी आकर्षक होत असल्यामुळें फारच यशस्वी ठरत आहेत. संस्थेत होणारा एकादा कार्यक्रम स्वतः दवंडी पिटून जाहीर करण्यास संस्थेतील कोणत्याही जातीच्या मुलांस कमीपणाचें वाटत नाहीं. गांवांतील इतर मुलेंही यांचें अनुकरण करतात. घटना–ही संस्था १५ जानेवारी १९२७ रोजीं स्थापन झाली.त्या वेळीं संस्थेस घटना वगेरे कांहीं नव्हती, पण पुढें लवकरच म्हणजे फेब्रुवारी महिन्यांत गांवांतील कांहीं शिष्ट लोकांचें एक मंडळ नेमण्यांत आलें. हें मंडळ २ वर्षें अधिकारारूढ होतें. पण त्यानंतर स्थानिक वातावरण बदलल्यामुळें पूर्वीच्या मंडळाच्या जागीं नव्या उत्साही तरुणांची विशेषतः ब्राह्मणेतरांची योजना झाली. या नव्या मंडळानेंही संस्थस नांवारूपास आणण्याची कांहीं खटपट केली नाहीं, तेव्हां ता. ८।२।३२ ला या मंडळाची तिसऱ्यांदा पुनर्घटना झाली. आतांपर्यंत सभासदास वर्गणी मुळींच नव्हती, ती यापुढें सालिना १ रुपया ठरविण्यांत आली. या अटीमुळें संस्थेविषयीं कळकळ बाळगणारे लोकच संस्थेमध्यें राहिले व बाकीच्यांनीं संस्था सोडली. आतांपर्यंत संस्थेस एक मंडळ असूनही कामाचा बोजा मात्र एकट्या व्यवस्थापकावरच पडत असे.जमा१९३१–३२,रु.२६०८–१–१० खर्च रु.३२२२–११–३

१२ शारदाश्रम यवतमाळ: (वाङ्मयेतिहास–संशोधक–संस्था):––स्थापना इ.स.१९२६. पुनर्घटना इ. स. १९३२. संस्थेचा उद्देश–"प्राचीन व अर्वाचीन वाङ्मय, ऐतिहासिक लिखाण यांचें संशोधन, संपादन व प्रकाशन करणें, प्राचीन ऐतिहासिक कागदपत्रें, नाणीं व वस्तु यांचा व हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह करणें. संमेलनें,सभा व व्याख्यानें यांच्याद्वारां जनतेंत एतद्विषयक अभिरुचि उत्पन्न करणें." वाङ्मयाची आणि इतिहासाची आवड असणाऱ्या कोणाही १८ वर्षांवरील पुरुषांस अथवा स्त्रीस संस्थेचे सभासद होण्याचा अधिकार आहे. संस्थेनें जुन्या व ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह केला आहे.सध्यां अजमासें १००० हस्तलिखित ग्रंथ व बरेचसे ऐतिहासिक कागद आहेत. त्यांच्या आधारें कांहीं सभासदांनीं शोधपूर्वक निबंध लिहिले आहेत. याशिवाय संस्थेनें 'महानुभावीय मराठी वाङ्मय,' 'विदर्भवीणा' इ० स्वीय व पुरस्कृत ग्रंथ प्रकाशित केले आहेत. अध्यक्ष–लोकनायक मा. श्री. अणे,उपाध्यक्ष–डॉ. भा. म. टेंबे, चिटणीस–श्री. य. खु. देशपांडे, एम. ए. एलएल. बी., श्री.म.दा.साठे, एम.ए. एल.टी.

१३ हनुमान आखाडा (यवतमाळ):–– स्थापना सन १९१७; आखाड्याचे मुख्य सूत्रधार, उत्पादक व आधारस्तंभ डॉ.काणे हे होत. उद्देश–१ जनतेचें शारीरिक सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करणें आणि तें सामर्थ्य प्राप्त होण्यास कारणीभूत अशा व्यायामांची व उघड्या हवेंतील खेळांची अभिरुचि लोकांत उत्पन्न करणें; २ तरुण पिढींत मैदानी व मर्दानी खेळांची हौस उत्पन्न करून त्यांना कुस्ती, मल्लखांब, लाठी, छडीपट्टा, ड्रिल, ज्युजित्सु, व बॉक्सिंग इ. देशी व परदेशी पद्धतीच्या व्यायामांचें शिक्षण देणें. ३ ईश्वर,राजा व स्वदेश यांसंबंधींच्या कर्तव्याची जाणीव तरुण पिढीस करून देणें. ४ अपघात प्रसंगीं बांधवांस मदत करण्यास लागणारी क्षात्रवृत्ति समाजांत उत्पन्न करणें. ५ अशा तऱ्हेच्या संस्था ठिकठिकाणीं स्थापन करणें. आखाड्याचा नित्यक्रम–– आखाड्यांत व्यायाम घेण्यास येणाऱ्या लोकांकरितां वार्षिक ३ रु., २ रु., १ रु. असे तीन वर्ग आहेत.या आखाड्यांत कुस्ती, मलखांब (साधा, वेताचा,झुलता), डबलबार, सिंगलबार, भाला, जोडी, लाठी, रुग्णपरिचर्या, स्काउटिंग, कँपिंग, लाठी, काठी व जोडी, आसनें, लष्करी कवायत, डंबेल्स, जोर, बैठका, लेजीम, बोथाटी,गदगाफरी, तलवार, पट्टा, बॉक्सिंग, फ्री जिम्नास्टिक, चेस्ट एक्सपँडर्स, डेव्हलपर्स, वजन उचलणें, दोरावर चढणें, पळणें, उड्या मारणें, लहान मुलांचे खेळ, तलवार, पट्टा, लेजीम, ड्रील्स, इत्यादि बाबींत पद्धतशीर शिक्षण दिलें जातें व वार्षिक परीक्षा घेऊन प्रशस्तिपत्रें दिलीं जातात. पुस्तकसंग्रह–आखाड्यासाठीं उपयुक्त अशा इंग्रजी व मराठी सुमारें १७५ पुस्तकांचा संग्रह आहे. व्यायामविषयक मासिकेंहि आखाड्यांत येत असतात. श्रीहनुमान आखाड्याचे पेट्रन्समध्यें प.वा. राजे लक्ष्मणराव भोंसले, ना. डॉ. सर फ्रॅंक स्लॉय, गव्हर्नर, सी. पी. अँड बेरार, ना. रा. ब. नारायणराव केळकर इ. मंडळी आहेत. लाइफ मेंबर्समध्यें ना.तांबे, डॉ. गो. वि. देशमुख ऑनररी मेंबर्समध्यें वऱ्हाडचे कमिशनर, श्री

दादासाहेब करंदीकर व सिंपथायझर्समध्यें बॅ. राघवेंद्रराव वगैरे मंडळी आहेत. संस्थेला मिळत असलेल्या वार्षिक देणग्या––ऑक्टोबर १९२० ते जून १९२६. यवतमाळ म्युनिसिपल कमिटी १३५० रु.; यवतमाळ डिस्ट्रिक्ट कौंसिल ६२५रु. यवतमाळ कॉटन बायर्स धर्मादाय फंड कमिटी १२५रु.; यवतमाळ स्पोर्टस् अँड आर्ट असोसिएशन ७५रु.; यवतमाळ डे. कमिशनर ३०रु. ऑक्टोबर १९२० ते फेब्रुवारी १९२७ जमाखर्च––उत्पन्न इमारत फंड धरून २४८२४ रु. खर्च–इमारतीचा खर्च धरून २४७०८ रु. आखाड्याचे कंट्रोलर–डॉ. सि. कृ. काणे, आखाड्याचे मॅनेजर–कृ. स. केळकर, आखाड्याचे जनरल सेक्रेटरी–गो. ग. आवदे.

१४ हनुमान व्यायामप्रसारक मंडळ, अमरावतीः––संस्थापक व मूळ हेतु–हिंदुस्थानांतील लोकांचा शारीरिक ऱ्हास दिवसेंदिवस अत्यंत झपाट्यानें होत असतां त्याचा प्रतिकार करून तरुण पिढी बलवान् व तेजस्वी करण्याकडे पुढारी लोकांचें जावें तितकें लक्ष जात नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊन १९१४ सालीं 'वैद्य बंधू व त्यांचे मित्र' यांनीं बाल स्वरूपांत हनुमान व्यायाम शाळेची स्थापना केली व पुढें त्याच मंडळींच्या चिकाटीनें तिची दिवसेंदिवस वाढ होत जाऊन आज श्रीहनुमान व्यायाम प्रसारक मंडळांत पर्यवसान झालें आहे. ही संस्था नुकतीच रजिस्टर झालेली आहे. हनुमान व्यायाम मंदिरांत शिकविले जाणारे विषयः––दंड, *बैठक, *जोडी, *लेझीम, *संतोला, *यौगिक व्यायाम, *मलखांब, अंतरपकड, वेताचा मलखांब, दुहेरी अंतरपकड, लाठी,* बोथाटी* (सर्व प्रकारची), गद्गाफरी, दांडपट्टा* भाला, *कुस्ती, तरवार, *जंबिया, *काठी, *परशु, * बाना, * माडू, खोखो, धनुर्विद्या, व्हॉली–बॉल, हॉरि–झॉन्टलबार, पॅरलल बार्स, रोमन रिंग्स, ट्रॅपिझ बार, पोल–जंप, रोप–क्लाईंबिंग, डंबेल्स, चेस्ट-एक्सपँडर, सँडोडेव्हलपर, हायजंप, फर्स्ट एड, हायजिन, स्काउटिंग, आट्यापाट्या, टॉर्चेस–मार्चिंग, जुजुत्सु, बास्केट बॉल, पोहणें, हुतुतु, बॉक्सिंग, ब्रिज–लँडर्स.

*फुल्या मारलेले विषय सांघिक (drill) व वैयक्तिक (Individual) अशा दोनहि पद्धतींनीं शिकविले जातात.

संस्थेंत प्रवेश करूं इच्छिणाराला प्रवेश फी १ रुपया द्यावी लागते व पुढें दर महिन्यास २ आणे फी द्यावी लागते. गरीब विद्यार्थ्याला प्रवेश फी व मासिक फी माफ केली जाते. प्रत्येक विद्यार्थ्यानें संस्थेच्या शिस्त–नियमानुसारच वागावयाचें असतें. रोज संध्याकाळीं प्रार्थनेच्या वेळीं व दर शनिवारीं आरतीच्या वेळीं प्रत्येक सभासदानें अवश्य हजर असलें पाहिजे.

विद्यार्थ्यांचा दैनिक शिक्षणक्रमः–– शिस्तवार शिक्षण मिळण्यासाठीं मंडळानें पथक-पद्धति अमलांत आणली आहे, एकंदर पथकें सोळा असून त्यांमध्यें विद्यार्थी ३८५ आहेत. पथकें फक्त सायंकाळीं नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांचींच पाडलीं आहेत. व्यायाममंदिर सकाळीं व सायंकाळीं उघडें असतें.

संस्थेंतील विविध कार्यविभागः–– १ शारीरिक शिक्षण वर्ग–आज गेलीं ७ वर्षें सुरूं आहे. १९२८ ते १९२९ च्या मे महिन्यांत भरलेल्या वर्गांत विद्यार्थ्यांची संख्या सुमारें १००० होती. शिक्षणक्रम–या वर्गाचा शिक्षणक्रम एकंदर तीन वर्षांचा आहे. प्रथम वर्षाचा शिक्षणक्रम पुरा करून परीक्षेंत पास होणारास 'व्यायाम प्रवेश'चें प्रमाणपत्र मिळतें, दुसऱ्या वर्षाचा अभ्यास पुरा करून पास झाल्यास 'व्यायामपटु' व तिसऱ्या वर्षाचा अभ्यास पुरा करून पास होणारास 'व्यायाम विशारद' या पदव्या मिळतात.

शिक्षणक्रमाची विविधता––शारीरिक शिक्षणक्रमांत शरीरवाढीचे व रक्षा–प्रहाराचे व्यायाम असून यौगिक शिक्षणक्रमांत व्यक्तिशः आरोग्याच्या व बलसंवर्धनाच्या दृष्टीनें उपयुक्त असा आसनें, वायुक्रिया व मुद्रादिकांचा अभ्यास आहे. लष्करी शिक्षणक्रमहि आहे. बौद्धिक व मानसिक शिक्षणक्रमांत भारताचा शारीरिक ऱ्हास, वैदिक बलधर्म, ब्रम्हचर्य, प्राथमिक शुश्रूषा, स्वस्थवृत्त इत्यादिकांवर व्याख्यानें, स्काउटिंगचें शिक्षण, लष्करी शिस्त, दैनिक लेखन, मनोविनोद इ० गोष्टी अंतर्भूत होतात. बँडविभाग––मंडळाचा या विभागावर विशेष भर असून मंडळानें या विभागासाठीं १००० रुपयांचें सामान खरेदी केलें आहे. बिगूल व फ्ल्यूट बँड हे सार्वजनिक कार्यास आमंत्रणावरून जातात. नगर–संरक्षक दल–– मंडळाच्या लष्करी विभागातर्फें एक नगर संरक्षण दल स्थापन करण्यांत आलें आहे. आठवड्यांतून तीन दिवस या दलाची मंडळाच्या पटांगणांत कवायत होत असते. सर्व विद्यार्थ्यांना हें शिक्षण सक्तीनें दिलें जातें. मंडळानें या दलाकरितां Air Rifles खरेदी केल्या असून विद्यार्थ्यांना शूटिंगचें व लष्करी हालचालींचें उत्तम शिक्षण

देण्यांत येतें. या दलांत व्यायाम शाळेंतील विद्यार्थ्यांखेरीज कॉलेजें व शाळांमधील विद्यार्थ्यांनाहि प्रवेश मिळतो.

आरोग्य–विभागः––या विभागातर्फे प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी डॉक्टरांच्या साहाय्यानें केली जाते. तसेंच संस्थेंतील विद्यार्थ्यांची दर तीन महिन्यास तपासणी करून प्रत्येकाचें प्रगतिपत्रक त्यांच्या पालकांकडे पाठविण्यांत येतें. दिगंबर वादविवाद मंडळ–– संस्थेंतील विद्यार्थ्यांच्या मानसिक उन्नतीप्रीत्यर्थ व्यायाम, आरोग्य, ब्रम्हचर्य, व सद्यःस्थिति यांवर दर शनिवारीं या मंडळातर्फे व्याख्यानें होतात. हनुमान स्काउट ट्रूप––स्काउट आर्गनायझर मि. हाऊटन यांनीं मुद्दाम मंडळांत येऊन मंडळाच्या शिक्षक वर्गाचा एक स्काउटिंग क्लास चालविला. येथें होणाऱ्या स्काउटच्या कार्यक्रमांत हें पटु भाग घेत असतें. ग्रंथसंग्रहालयः––संस्थेंतील विद्यार्थ्यांना व्यायामविषयक, शीलसंवर्धक व तेजस्विता उत्पन्न करून कार्यक्षम करणारीं पुस्तकें व वृत्तपत्रें येथें ठेवण्यांत आलीं आहेत. व्यायामाचा शास्त्रोक्त अभ्यास करण्यास नुकतीच रु. ४०० चीं पुस्तकें अमेरिका व इतर देशांतून आणविलेलीं आहेत. व्यायाम–वस्तु–भांडार––आधुनिक व्यायामशाळांना उपयुक्त असें व्यायामविषयक पौर्वात्य व पाश्चिमात्य सर्व साहित्यांचा संग्रह करून मंडळाच्या शाखोपशाखांना व इतर व्यायामसंस्थांना स्वस्त दरांत माल पुरविण्याकरितां हा भांडार विभाग काढला आहे. दरवर्षी सुमारें ४।५ हजारांची विक्री होते. मधु–मंदार माला–महाराष्ट्रांतील तरुणांकरितां तेजस्वी वाङमयाच्या योगें त्यांची शारीरिक व मानसिक उन्नति करून त्यांना शीलवान् व कर्तृत्ववान् बनविण्याकरितांही माला काढण्यांत आली आहे. पहिलें पुष्प 'पौरुषप्रदीप,' दुसरें 'अवनतिमय भारतवर्ष,' तिसरें 'नित्शेचें चरित्र व त्याचें तत्त्वज्ञान' चवथें 'सामुदायिक उपासना' मुद्रणालय-ग्रंथप्रकाशनास सुलभता यावी या हेतूनें मंडळानें स्वतःच्या मालकीचें मुद्रणालय सुरूं केलें आहे. सर्व प्रकारचीं हिंदी, मराठी, इंग्लिश छपाईचीं कामें मंडळाच्या विद्युत् यंत्राच्या साहाय्यानें केलीं जातात.

शाखा व प्रचारकार्य––उमरावती येथें ५०० विद्यार्थ्यांपेक्षां जास्त विद्यार्थ्यांना घेतां येत नसल्यानें इतर ठिकाणीं वर्ग काढावे लागतात. आज जवळ जवळ २०० शाखा आहेत. विदर्भापुरतेंच मंडळानें कार्यक्षेत्र मर्यादित केलें असलें तरी इतर प्रांतांतहि आपले प्रचारक तत्प्रांतीय लोकांच्या मागणीवरून पाठवावे लागतात. १९२८।२९ या वर्षी मंडळाचे सदस्य श्री. हरिहर वामन देशपांडे, यांनीं अखिल भारतीय हिंदुसभेच्या वतीनें संयुक्त प्रांत फिरून लेखन व्याख्यानद्वारां बलधर्म प्रसाराची जरूरी लोकांस पटवून दिली. इतर व्यायामसंस्थांनीं मंडळाच्या शारीरिक शिक्षण वर्गाचें अनुकरण करून ठिकठिकाणीं व्यायाम शिक्षणाचे वर्ग उघडले आहेत. १९२८।२९ मध्यें मंडळाकडून पाठविण्यांत आलेल्या १८ व्यायाम प्रचारकांनीं निरनिराळ्या ४ प्रांतांत हिंडून व्यायाममंदिरें स्थापन केलीं व व्यायामाचा प्रसार केला. १९२८।२९ मध्यें पुण्यांतील सर्व शिक्षण संस्थांनीं पुण्यास व राष्ट्रीय सभेनें कलकत्त्यास आमंत्रण देऊन मंडळाचे खेळ करवून मंडळाच्या कार्याचा गौरव केला. मंडळाचे अध्यक्ष डॉ. शि ग. पटवर्धन यांना महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे, तसेंच कलकत्त्यास भरलेल्या अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषदेचे अध्यक्ष निवडिलें यावरून मंडळाच्या कार्याचें महत्त्व लोकांस पटत चाललें आहे हें उघड आहे.

मंडळाचे परदेशांत गेलेले सदस्य–– मंडळाचे एक सदस्य श्री. ल. जा. कोकर्डेकर यांना पाश्चिमात्य व्यायामपद्धति, व्यायामशास्त्र, व्यायामसंघटना व व्यायामवाङमय यांचा अभ्यास करण्याकरितां बर्लिन येथील व्यायाम विद्यापीठांत पाठविलें. तेथील अभ्यासक्रम ४ वर्षांचा आहे. तो पुरा करून व यशस्वी होऊन ते नुकतेच स्वदेशीं आले. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील व्यायाम पद्धतीच्या कार्यक्षेत्रांत सुधारणा करून तें कार्यक्षेत्र व्यापक करण्याचा उपक्रम मंडळानें केला आहे. श्री. ज्ञानेश्वरपंत देशपांडे यांना मंडळानें जपानला जुजुत्सुचें शिक्षण घेण्यासाठीं पाठविलें आहे. संस्थेचे एक सदस्य श्री. विष्णू महादेव अत्रे हे जर्मनीस असतांना त्यांनीं बर्लिनमध्यें एका मोठ्या मुलींच्या शाळेंत आसनें शिकविण्याच्या अध्यापकाचें काम करून व इतर लोकांनाही भारतीय व्यायाम पद्धतीचें शिक्षण दिलें. धनुर्विद्या आक्रमण करण्याचा मंडळाचा आज कित्येक वर्षे मानस होता. तो लक्षांत घेऊन श्री. रघुनाथराव खानीवाले यांनीं रात्रंदिवस मेहनत घेऊन धनुर्विद्येसारख्या कठीण विषयांत प्राविण्य संपादन केलें. चरणवेध, अक्षनिमीलन वेध, चक्रवेध, शयनवेध अशा दुःसाध्य शरसंधानामध्यें यांनीं प्रावीण्य मिळविलें आहे.

दैवी आपत्ति—१३ जून १९२८ रोजीं भयंकर व आकस्मिक् वादळामुळें संस्थेचें (इमारतीचें व व्यायामविषयक वस्तूंचें) अपरिमित नुकसान झालें व आपत्तिनिवारण फंड काढण्यांत आला. ज्यांनीं या फंडाला देणगी दिली त्यांमध्यें ना. तांबे, शेठ जमनालाल बजाज, भावनगरचे महाराज, बिर्ला, राणीसाहेब पोरबंदर, म्यानेजर केसरी, ठाकूरसाहेब राजकोट, सेक्रेटरी डेक्कन जिमखाना वगैरे लोक आहेत. तो फंड २३००० च्या वर जमला. सांपत्तिक स्थिति—सध्यां मंडळावर कर्जाचा बोजा असून दरमहा मंडळाचा खर्च ३००।३५० रुपये आहे. सप्टेंबर १९२८ ते आगस्ट १९२९ अखेर संस्थेचें उत्पन्न २६००० च्यावर आहे. पण सरस्वति प्रेसला १३००० वर व इमारत दुरुस्तीला ५ हजारावर खर्च व संस्थेचा इतर खर्च मिळून बहुतेक खर्च झाले आहेत. व शिल्लक २२३ रुपये आहे. श्रीहनुमान व्यायाम-प्रसारक मंडळाचे सन्माननीय सभासदांमध्यें ना. तांबे, बॅ. जयकर, सांगलीचे राजेसाहेब, मध्यप्रांताचे गव्हर्नर, भावनगरचे व पोरबंदरचे महाराज हे आहेत. संस्थेचे अध्यक्ष—शि. ग. पटवर्धन. सेक्रेटरी—द. वि. खेडकर.

मध्यप्रांत

१ अभिनव कार्यालय नागपूरः—या संस्थेच्या अभिनव ग्रंथमाला, अभिनव मुद्रणालय, अभिनव ग्रंथशाळा व अभिनव भारत साप्ताहिक अशा चार शाखा आहेत. सन १९२५त पुणें येथें संस्थेची स्थापना. १९२६ पासून नागपूर हें कार्याचें केंद्र. अभिनव ग्रंथमालेंतून आतांपर्यंत १७ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. १९३२ पासून अभिनव चिकित्सालय व आरोग्यमंडळ या दोन नवीन शाखा जोडण्यांत आल्या आहेत. संस्थेचे चालक रा. श्री. ना. हुद्दार आहेत.

२ कल्चरल एज्युकेशन सोसायटी नागपूरः—स्थापना—क.ए.सोसायटी नागपूर ही १९२५ सालीं श्री. जनार्दन माधव कायंदे, बी. ए. एम्. आर्. ए. एस्. ह्यांनीं श्री. कै. शंकर जनार्दन खोत व श्री. कृष्णराव गणेश रेखडे बी. ए. एल्‌एल्.बी. ह्या दोघांच्या साहाय्यानें स्थापन केली. उद्देश—नागपुरांत आणि नागपुराबाहेर प्राथमिक शाळा, हायस्कुलें कॉलेजें, वाचनालयें, पुस्तकालयें, प्रयोगशाला, कारखाने इत्यादीसारख्या शिक्षणसंस्था प्रत्यक्ष काढून त्यांना मान्यता देऊन, देखरेख किंवा मदत करून शैक्षणिक प्रगतीला मदत करणें. विद्यार्थी वसतिगृहें, प्रौढ शिक्षणसंस्था इत्यादि प्रत्यक्ष चालविणें किंवा त्यांना मदत करणें. पुस्तकें, पत्रकें, मासिकें, वर्तमानपत्रें, इत्यादि चालविणें, संशोधन केंद्रें निर्माण करणें व त्यायोगें संस्कृतीचा प्रसार व उन्नति घडवून आणणें.

१ कायंदे हायस्कूल—स्थापना १९२५; सुरवातीस फक्त दोन मुलें होतीं. पण पुढें क्रमशः वाढत जाऊन या संस्थेंत आज दीडशेंवर मुलें आहेत. येथें मॅट्रिकपर्यंत शिक्षण देण्यांत येत असतें. हुषार आणि मेहेनती विद्यार्थ्यांना अल्प काळांत परीक्षेसाठीं तयार करून त्यांचा वेळ वाचविणें हाही एक संस्थेचा हेतु आहे. विद्यार्थ्यांना तेजस्वी शिक्षण देऊन त्यांना स्वसंस्कृतीची महति पटवून देणें व अशा तऱ्हेनें योग्य नागरिक बनविणें ह्या गोष्टीबद्दल मोठा कटाक्ष आहे.

२ समर्थ मंदिर—वरील कायंदे हायस्कूलला जोडूनच समर्थमंदिर नांवाचें विद्यार्थीवसतिगृह काढण्यांत आलें आहे. येथें रोज दासबोध वाचनाचा कार्यक्रम असतो. शाळेप्रमाणेंच समर्थमंदिरांतही वेगवेगळे नीतिविषयक आणि इतर प्रयोग करण्यांत येतात व त्यांपकीं बरेचसे यशस्वी झाले आहेत.

३ नागपूर संस्कृत कॉलेज—ह्याची स्थापना शके १८५२ त झाली. संस्कृत वाङ्मय व शास्त्रें यांचें अध्ययन आधुनिक पद्धतीनें व दृष्टीनें करून संस्कृतीचा प्रसार करणें हें प्रस्तुत कॉलेजचें ध्येय आहे. येथें काव्य, व्याकरण, वेदान्त, न्याय, स्मृति इत्यादि शास्त्रांच्या अध्ययनाची सोय करण्यांत आली आहे, प्रो. दिवाकर विश्वनाथ वऱ्हाडपांडे एम्. ए. हे संस्कृत कॉलेजचे अध्यक्ष आहेत. सध्यां विद्यार्थी कलकत्ता संस्कृत असोसिएशनच्या प्रथमा, मध्यमा व तीर्थ ह्या व पंजाब युनि.च्या 'शास्त्री' परीक्षेला पाठविण्यांत येतात. कलकत्त्याच्या परीक्षेचें केंद्र नागपूर येथें आहे. सध्यां सुमारें २५।३० विद्यार्थी शिक्षण घेत असतात. संस्कृतच्या अध्ययनाची आधुनिक पद्धतीची सोय मध्यप्रांतांत दुसरीकडे कोठेंही नाहीं. जुन्या पद्धतींतले सर्व गुण घेऊन येथें शिक्षण देण्यांत येत असतें. अध्यापक निर्वेतन आहेत व विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत देण्यांत येतें. कलकत्ता, पंजाब किंवा बनारस येथें जशा सरकारमान्य बोर्डें किंवा युनिव्हर्सिटचा काढून परीक्षा घेण्यांत येतात, तशा या प्रांतांतही शक्य तर नागपूर युनि.च्या विद्यमानें सुरू करण्यांत याव्या याबद्दल कॉलेजच्या चालकांचे प्रयत्न चालू आहेत.

४ नागपूर कॉलेज (सध्यां सिटी कॉलेज)—

मध्यप्रांतांत सरकारी कॉलेजांशिवाय इतर खाजगी कॉलेज एकच असे आणि तें म्हणजे गोऱ्या मिशनरींनीं चालविलेलें हिस्लॉप कॉलेज होय. खास हिंदी लोकांनीं चालविलेलें एकही कॉलेज नव्हतें. ही उणीव भरून काढण्याकरितां श्री. ज. मा. कायंदे बी. ए. एम्. आर. ए. एस्. ह्यांनीं प्रो. दिवाकर विश्वनाथ वऱ्हाडपांडे एम. ए. व प्रो.पांडुरंग कृष्ण सावळापूरकर बी. ए. एम.ओ.एल. शास्त्री व काव्य तीर्थ यांच्या मदतीनें उपरोक्त कॉलेज सुरू केलें. व श्री. श्री. ल. पंढरीपांडे यांना प्रिन्सिपाल नेमण्यांत आलें. अनावरण समारंभ गुरुवर्य महामहोपाध्याय केशवरावजी ताम्हने एम्. ए.,माजी प्रिन्सिपाल मॉरिस कॉलेज यांच्या हस्तें ता. १७ जुलई १९३० रोजीं झाला. युनि. व सरकारी मान्यतेच्या अभावीं प्रथमतः फारच थोडे विद्यार्थी कॉलेजांत दाखल झाले. दोन वर्षांनंतर नागपूर युनि.ची व सरकारी मान्यता मिळाली. पहिल्या वर्षीं कॉलेजकरतां सुमारें ५००० रु. खर्च आला. तो सोसायटीनें आपल्या फंडांतून व श्री. कायंदे यांनीं आपल्या खाजगींतून मिळून केला.यापुढें सोसायटीजवळ पुरेसा फंड नसल्यामुळें दुसऱ्या वर्षीं येथील नीलसिटी हायस्कुलकमिटीशीं सहकार्य करावयाचें ठरलें.ह्याप्रमाणें १९३१–३२ ह्या वर्षाच्या खर्चाची अंशतः जबाबदारी सिटी हायस्कूल कमिटीनें घेतली. पुढें युनि. ठरावास अनुसरून क. ए. सोसायटी व सिटी स्कूल कमिटी यांतील निवडक गृहस्थांची एक स्वतंत्र कमिटी स्थापून तिला 'नागपूर शिक्षण मंडळ' हें नांव देण्यांत आलें. व ह्या वेळींच शिक्षण मंत्र्याच्या सूचनेवरून 'नागपूर कॉलेज हें नांव बदलून 'सिटी कॉलेज' असें नांव ठेवण्यांत आलें. यु. ची मान्यता फक्त ५ वर्षांपुरती असून एकंदर १२५ विद्यार्थीच घेण्याची परवानगी देण्यांत आली आहे. कॉलेजांत बी. ए. पर्यंत बहुतेक सर्व विषयांचें आर्टसचें शिक्षण देण्यांत येतें.

५ डी. डी. सी. —प्रौढ स्त्रिया व मुली ह्यांच्या शिक्षणाची सोय करण्याकरितां डी. डी. सी. ही संस्था १९३० सालीं स्थापन करण्यांत आली. घरगुती कामें करून शिक्षणास सोयीवार पडावें म्हणून शिक्षणाची वेळ, दुपारीं एक ते ४ किंवा ५ अशी असते. विद्यार्थिनींस शिक्षण मोफत देण्यांत येतें. सध्यां त्यांना महिला विद्यापीठाच्या प्रवेश व महाविद्यालयीन परीक्षांना तयार करण्यांत येत असतें. मान्यतेशिवाय ही संस्था चालावयास हरकत नाहीं असें आढळून आल्यामुळें म्यु. किंवा सरकारी मान्यतेचा प्रयत्न करण्यांत आला नाहीं.

६ श्रद्धानंद वाचन–मंदिरः— ह्यांत शिक्षणशास्त्रावरील व संस्कृत ग्रंथांचा संग्रह आहे; मंदिरांत मराठी व इंग्रजी प्रमुख मासिकें व वृत्तपत्रें येत असतात. सोसायटी नुकतीच रजिस्टर करण्यांत आली आहे. अध्यक्ष–श्री. ज. मा. कायंदे, बी. ए. एम्. आर. ए. एस्. चिटणीस–प्रो. पां. कृ. सावळापूरकर, बी. ए. शास्त्री, काव्यतीर्थ.

३ नवभारत ग्रंथमाला (महाराष्ट्राची ज्ञानगंगा) नागपूरः—स्थापना १९३१; ही माला विद्वानांकडून ज्ञान संपादण्याचें व ज्ञानप्रसाराचें कार्य घडवून आणण्यासाठीं जन्मास आली आहे. यच्चयावत् महाराष्ट्रांतील तज्ज्ञ विद्वान् मंडळींचें लेखनसाहाय्य प्रस्तुत मालेस आहे. ज्ञानाच्या सर्व शाखांची शास्त्रीयरीत्या विभागणी करून सर्व शाखांमधील समग्र ज्ञान आपल्या भाषेमध्यें एकत्रित केलें जावें या धोरणानें मालेमधील पुस्तकांची योजना केली जाते. प्रत्येक पुस्तकाची किंमत अत्यंत अल्प असते. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें येणेंप्रमाणें:—

१ ज्ञानोपासना (लेखक–श्री. ना. बनहट्टी), २ महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (ले.–प्रो. शं. दा. पेंडसे), ३ शेक्सपियर व तत्कालीन इंग्रजी रंगभूमि (ले.–प्रो. ग. ह. केळकर), ४ राज्यशास्त्र (ले.–न. चिं. केळकर). पुढील कांहीं पुस्तकेंही आज जाहीर झालेलीं आहेत. मालेमध्यें दरसाल तीन किंवा चार ग्रंथ प्रसिद्ध होतात. कायम ग्राहक होण्यास प्रवेशफी सध्यां तरी नाहीं. मात्र कायम ग्राहकांनीं मालेचे सर्व ग्रंथ घेतले पाहिजेत. मागील सर्व पुस्तकें घेण्याबद्दल सक्ती नाहीं. फक्त चालू वर्षांतील मागचीं सर्व पुस्तकें मात्र घ्यावीं लागतील. ठिकठिकाणीं मालेच्या एजन्सी व कार्यशाखा आहेत. मालेच्या सल्लागार मंडळांत श्री. ना.गो. चाफेकर, श्री. न.चिं. केळकर, श्री.विठ्ठल रामजी शिंदे, श्री. माधव श्रीहरि अणे हे सन्मान्य गृहस्थ आहेत. विषयांची वर्गवारी करून निरनिराळे दहा वर्ग पाडले आहेत व प्रत्येक विषयावर त्या त्या शास्त्रांतील तज्ज्ञ लोकांचें लेखनसाहाय्य किंवा सल्लामसलत मिळण्याचीं अभिवचनें मिळालीं आहेत. संपादक–श्रीनिवास नारायण बनहट्टी, एम्. ए. एलएल्. बी. व्यवस्थापकः–वेंकटेश शामराव बलकुंदी, बी. ए. एलएल्. बी.

पत्ताः—कॉंग्रेसनगर, धनतोली, नागपूर.

४ ब्लाइंड रिलीफ असोसिएशन, (मध्यप्रांत व वऱ्हाड) नागपूरः—स्थापना—१९२८. उद्देश—मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील आंधळ्या लोकांना शिक्षण देऊन सुस्थित करणें. संस्थापक—श्री. वामनराव वाडेगांवकर. साहाय्यक—यंग-मेन्स इंडियन असोसिएशन,नागपूर. मि. जे.एफ्. दायर आय. सी. एस्. एक्स—कमिशनर, नागपूर आणि सर सोराबजी मेहता मॅनेजर,एम्प्रेस मिल्स, नागपूर. मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून अंधसंख्या ४७०७१ आहे. पैकीं ४५००,सात ते बारा वयाचीं मुलें आहेत. त्यांच्याकरितां असोसिएशननें 'ब्लाइंड बॉइज् इन्स्टिटच्यूट' १९२८मध्यें उघडली. प्रारंभीं चार विद्यार्थी होते. सध्यां २४ आहेत. नऊ ते सोळा वर्षांचींच मुलें घेतलीं जातात. भोजनाचा व राहण्याचा खर्च प्रत्येकीं दरमहा आठ रुपये आहे. गरीब मुलांस मोफत घेतलें जातें. इन्स्टिटच्यूटचा शिक्षणक्रम सहा वर्षांचा आहे.इंग्रजी मराठी, अंकगणित, गायन व धार्मिक शिक्षण हे विषय शिकविले जातात. तसेंच चरखा व टकळी यांवर सूत काढणें, रेशमी व सुती गुंड्या तयार करणें, व्हॉलीबॉल व टेनिसचीं जाळीं तयार करणें वगैरेचें धंदेशिक्षण मिळतें. देणगी—टाटाट्रस्ट-मधून ५००० रु. इमारत फंडाकरितां मिळाले. तसेंच एन्. एम्. वाडिया (मुंबई) चारिटीज मधून ५०००रु.; सेंट्रल इं. स्पि.—वी. मॅ.कं. नागपूर ३००० रु. हितचिंतक ३६०० रु.; सर सोराबजी बी. मेहता. (मृत्युपत्रान्वयें) रा. ब. डी. लक्ष्मण-स्वामी ११११रु.; सर एम्.बी.दादाभाई१०००रु. एस्. सी. खंबाटा, मुंबई १००० रु. रावबहादूर वाडेगांवकर २००० रु. यांशिवाय ५००, २०० व १०० रुपये देणारे बरेच गृहस्थ आहेत. सन १९३१ सालीं मध्यप्रांत सरकारकडून १३७७ रु. ग्रँट मिळाली. व सेक्रेटरी म्युनिसिपल कमिटी नागपूर यांजकडून १००० रु. मिळाले. सांपत्तिक स्थितिः—जमा (सन १९३१—३२) ८४७३ रु. १ आ. मागील शिल्लक २६४६२ रु. ९ आ. ३ पै. खर्च—४३८६ रु. ६ आ. ९ पै. शिल्लक ३०५४९ रु. ३ आ. ६ पै. अध्यक्ष—रा. ब. ए. आर. बंबावाले बी. ए. एल्एल्. बी. चिटणीस—श्री. के. एन्. वाडेगांवकर. पत्ताः—धनतोली, नागपूर.

५ महाराष्ट्र ब्राह्मण साहाय्यक मंडळ, नागपूरः— स्थापना १९२८; उद्देश—महाराष्ट्र ब्राह्मणांची सर्वांगीण उन्नति करणें असा मंडळाचा व्यापक उद्देश आहे. पण आज सभासदांच्या मृत्यू-नंतर त्यांच्या कुटुंबास आर्थिक मदत देणें हाच हेतु प्रमुखपणें आहे. म्हणजे विम्यासारखेंच कांहींसें मंडळाचें कार्य आहे. यांत परोपकार, धर्म, या कल्पना नसून संघशक्तीच्या बळावर ब्राह्मण-वर्गाची उन्नति करण्याचा हा प्रयत्न आहे.व्याप्ति—जातीनें ब्राह्मण असून जो कोणी आपणांस महाराष्ट्र ब्राह्मण म्हणविण्यास तयार असेल त्याला मंडळाचा सभासद होतां येईल. ४० वर्षांच्या वरील गृहस्थांस सभासद होतां येणार नाहीं. आरंभींच्या १ वर्षभर तशी सवलत होती. तेथून पुढें नांव नोंदतांना सभासदाचें वय २१ च्या वर असलें पाहिजे.सभासदाचें वय २८ च्या वर व ४० च्या आंत असलें तर त्यास कांहीं जादा रक्कम भरावी लागते. सभासदांस भरावे लागणारे पैसे—प्रत्येक सभासदास प्रवेश फी १ रु. गंगाजळी १८ रु. व मृत्यूपर्यंत दरसाल २ रु. भरावे लागतात. याशिवाय मंडळाचा कोणीही सभासद मृत्यु पावल्यास दर मृत्यूमागें १ रु.भरावा लागतो. अर्जासोबत ३ रु. भरावे लागतात. गंगाजळी भरण्यास कांहीं सवड मिळते. या सर्वांचा मोबदला म्हणून कोणाही सभासदास मृत्यू आल्यास त्याच्या कायदेशीर वारसास पटावर जितके सभासद असतील त्यांच्या संख्येच्या तीन चतुर्थांश रक्कम मिळते. १९३१ अखेर मंडळाचे ७५७ सभासद होते. त्या सालीं दोन सभासदांच्या वारसांना ४६७ व ४७६ रु. रक्कम दिली. या सभासदांनीं फक्त ३६ व ३७ रु. भरले होते. सभासदांची आर्थिक जबाबदारी मर्यादित आहे. मंडळाची कचेरी नागपुरास असते. कार्यकारी मंडळांत बॅ.गोविंदराव देशमूख, श्रीमंत दाजीसाहेब बुटी, श्रीमंत टालाटुले, डॉ. बुचे यांसारखे लोक आहेत. मंडळाचे सेक्रेटरी डॉ. ना. गं. बुचे, (टिळक पुतळ्याजवळ नागपूर) यांचे प्रयत्न संस्थेच्या यशास बरेच कारणीभूत आहेत.

६ महाराष्ट्र ब्राह्मण समाज सागरः— उद्देश (१) सागर जिल्हा, पंचमहाल, जबलपूर, झांशी, श्रीनगर येथील महाराष्ट्र ब्रह्मवृंदात प्रेमभाव उत्पन्न करून सामाजिक व धार्मिक अडचणी दूर करणें. (२) आपल्या सर्व ऋषींनीं जी समाज व धर्मव्यवस्था केली आहे तिची शक्य तों जोपासना करून आधिभौतिक व आध्यात्मिक उन्नति करणें. (३) सागरस्थ महाराष्ट्र समाजांतील देवस्थानावर देखरेख, मुलींच्या शिक्षणाची सोय, वाचनालय, व्यायामशाळा, निराश्रित मुलांमुलींचें संगोपन, निराश्रित विधवांना मदत वगैरे उन्नतीचे उपाय अमलांत आणणें.

सात सभासदांचें एक अधिकारी मंडळ कारभार पाहातें. हें अधिकारी मंडळ संस्थेच्या आश्रयाखालच्या संस्थांची जोपासना करतें. कार्य–इ. स. १८८८ त मराठी शाळा उघडण्यांत आली. १८९६ त इंग्रजी वर्ग जोडण्यांत आले. १९०१ त हिंदीही सुरूं केले. १९१२ त सरकारी मान्यता बंद झाली. १९२० त इंग्रजी वर्ग बंद पडले. सरकारी ग्रँट काढण्यांत आली. १९२४ त नुसती मुलींची शाळा 'महिला विद्यालय' या नांवानें कायम केली. सध्यां हायस्कूलपावेतों शिक्षण दिलें जातें. संस्था कर्वे युनिव्हर्सिटीस जोडलेली आहे. या वर्षी मॅट्रिकला ७ मुली बसल्या; २ उत्तीर्ण झाल्या. सर्व मिळून १५० मुली शिकत आहेत. मुलींकरितां बोर्डिंग आहे. गेल्या वर्षीं १०।१२ मुली होत्या. संस्थेस स्वतःची इमारत व १०।१२ हजारचा कायमनिधि आहे. याखेरीज समाजाच्या देखरेखीखालीं महाराष्ट्र वाचनालय, म. तरुण मंडळ, बालसमाज, वनिता समाज, व्यायाम शाळा इ. संस्था आहेत. गणेशोत्सव, थोर पुरुषांचे स्मृतिदिन इ. साजरे केले जातात. याखेरीज प्रतिवर्षी जुलई महिन्यांत 'महाराष्ट्र राष्ट्रीय आठवडा' साजरा करण्यांत येतो. 'कै. गणपतराव श्रीखंडे मेमोरियल फंड' नांवाचा एक लक्ष रुपयांचा फंड आहे त्याच्या व्याजांतून स्थानिक गरीब होतकरू महाराष्ट्रीय ब्राह्मण विद्यार्थीविद्यार्थिनींस शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. 'आर्य–चिकित्सालय' नांवाची वैद्यकसंस्था आहे; जनक, कै. देसाई; गरीब लोकांस फुकट औषधें देण्यांत येतात. गणेश चिकित्सा भवन–श्री. नवाथे यांनीं काढलेल्या या संस्थेंतही गरीब रोग्यांस फुकट औषध देण्यांत येतें. हिंदु संस्कृत शाळा व ब्रह्मचर्याश्रम, सनातनधर्मसभा, हिंदुसभा, हिंदु आखाडा प्रबंधक कमेटी, अनाथालय, वाचनालय, पंडितसभा, धर्मादाय सभा इ. सामाजिक व धार्मिक संस्थांचे उत्पादक व प्रामुख्यानें कार्य करणारे महाराष्ट्रीय आहेत. समाज कायम होण्यापूर्वी जुन्या पद्धतीनें म्हणजे धर्माधिकारीद्वारां सामाजिक व धार्मिक कार्यें चालत, त्यांत सदैव ग्रामण्यें चालत. सुमारें ७५।८० वर्षांपासून दोन पक्ष चालत आले. पुढें समाजांत एकीचा प्रयत्न करण्यांत आला. १९२४ त दोन पक्ष एक झाले. महाराष्ट्र ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष. श्री. श्रीखंडे, वकील; चिटणीस–श्री. ग. गो. टेंबे.

७ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ–नागपूर:– स्थापना–ही संस्था नागपूर यथें शके १८४८ मध्यें डॉ. के. ब. हेडगेवार यांच्या चालकत्वाखालीं स्थापन झाली. ध्येय–"हिंदु राष्ट्र, हिंदु संस्कृति व हिंदुधर्म यांचें परकीय आक्रमणापासून संरक्षण करण्याच्या हेतूनें अखिल हिंदूंची जोमदार संघटना शक्य तितक्या लवकर निर्माण करणें." संघकार्याची वाढ–प्रारंभीं स्वयंसेवकांची संख्या अल्प होती. पण प्रत्यक्ष कार्य चालू होतांच तरुणांची जोरानें भरती होऊं लागली. तीर्थस्थानीं भरणाऱ्या यात्रा, हिंदुमहासभेचीं अधिवेशनें व सामाजिक आणि आकस्मिक् उत्पातांच्या प्रसंगीं जिवापाड मेहनत करून समाजाची सेवा व संरक्षण करण्याचा क्रम संघानें ठेविल्यामुळें लोकांना संघाचें कार्य पटूं लागलें. आजमित्तीस वऱ्हाड मध्यप्रांतांत संघाच्या १०० चे वर शाखा असून १२००० चे वर स्वयंसेवक संघाचें शिक्षण घेत आहेत. याशिवाय पुणें, सातारा, कऱ्हाड, कराची, काशी इ. अनेक ठिकाणीं संघाच्या शाखा नुकत्याच स्थापन झाल्या आहेत. कार्यक्रम आठवड्यांतून तीन दिवस लाठी, तरवार, शूल, जंबिया, लेझीम यांचें सांघिक शिक्षण, दोन दिवस लष्करी शिक्षण व एक दिवस व्याख्यान, चर्चा, प्रवचनद्वारां बौद्धिक शिक्षण असा सामान्यतः कार्यक्रम असतो. गांवांतील प्रमुख डॉक्टरांच्या साहाय्यानें स्वयंसेवकांना प्रथमोपचारांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. उत्सवः–गुडी पाडवा, हिंदु साम्राज्य दिनोत्सव (ज्ये. शु. १३), गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, विजयादशमी व मकर संक्रांत असे सहा उत्सव संघांत पाळले जातात. विजयादशमीचे दिवशीं स्वयंसेवकांची लष्करी थाटांत जंगी मिरवणूक निघते. संघाचे तळ (Camps) सैनिक रहाणीची कल्पना यावी म्हणून व ती नीट अंगांत बाणावी म्हणून गांवाबाहेर मैदानांत तंबू डेरे, राहुटचा, वगैरे लावून संघाचे तळ दिले जातात. तळांमधून लष्करी शिस्त पूर्णांशानें अनुभवावयास मिळते. उन्हाळ्यांतील वर्ग–बाहेर गांवच्या संघशाखांना कार्यकर्त्यांचा पुरवठा करण्यासाठीं उन्हाळ्यांत संघ–शिक्षणाचे खास वर्ग प्रतिवर्षी नागपुरास चालविले जातात. १९३२ च्या मे महिन्यांत कराचीस भरलेल्या अ. भा. हिंदुयुवक परिषदेनें, तसेंच दिल्ली येथील हिंदुमहासभेच्या १४ व्या अधिवेशनांत संघाच्या कार्याचा उल्लेख केला असून, ठराव करून गौरव केला आहे. मुख्य कार्यवाह–श्री. स. सहाबोट, बी. ए. एलएल्. बी. पत्रव्यवहाराचा पत्ता:–डॉ. के. ब. हेडगेवार एल्. एम्. एस्. नागपूर सिटी.

हैद्राबाद संस्थान (मराठा वाडा)

१ अंजुमन–तरक्की–ए–दस्तकारी– औरंगाबाद––स्थापना ता. ५–१–२९. उद्देश–''खादी तयार करण्याचें काम संघटित स्वरुपांत करणें व त्यामुळें जुन्या धंद्याला उत्तेजन देणें, व बेकार अशा गरीब लोकांना आर्थिक मदत करणें.'' ही संस्था खादीभक्त श्रीयुत बाबू रुपनारायण-साहेब यांच्या परिश्रमानें स्थापन झाली. ही को–ऑपरेटिव्ह सोसायटयांच्या कायद्यान्वयें रजिस्टर झाली आहे. या संस्थेचे सभासद तीन प्रकारचे आहेतः–(१) अलीफ. (२) बे. (३) जीम क्लास. एकंदर सभासद ५८ आहेत. कार्य––येथील सरस्वतीभुवनांतील विद्यार्थ्यांस कापूस पिंजणें, लडी तयार करणें, व सूत कांतणें हीं कामें शिकविण्याकरितां साबरमतीच्या उद्योगमंदिरांतील श्री. राजारामपंत गव्हाणकर यांस शिक्षक नेमलें आहे. श्री. जीवनदास पुरुषोत्तमदासजी यांनींसुद्धां पुष्कळ स्त्रियांना व विद्यार्थ्यांना चरख्यावर सूत कातण्यास शिकविलें. सन १९२९ सालीं एकंदर ४४२६८५ वार सूत कातण्यांत आलें. जमा १३३३ रु. ६ आ.; खर्च–१३२१ रु. ११ आणे. शिल्लक ११ रु. ११ आणे. प्रधान मौलाना मौलवी अब्दुल हकसाहेब, मंत्री–राय किसनप्रसाद साहेब.

२ श्री सरस्वती भवन पाठशाळा, औरंगाबादः––ही संस्था, शके १८३८ च्या चैत्र शु. १ स, अल्प खर्चांत आणि मुख्यतः मातृभाषेंतून (मराठींतून) विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचें–बौद्धिक शारीरिक, नैतिक व औद्योगिक शिक्षण देण्याच्या उद्देशानें, औरंगाबादच्या प्रमुख नागरिकांनीं स्थापन केली. संस्थेंत मराठी चार व इंग्रजी चार ईयत्तांपर्यंत शिक्षणाची सोय असून निजाम सरकारच्या शाळाखात्यानें ''इंग्रजी मिडलस्कूल'' म्हणून तिला मान्यता दिलेली आहे. गेल्या पांच वर्षांपासून संस्थेला सरकारकडून मासिक २२२ रुपयांची हंगामी मदत मिळत आहे. संस्थेंतील विद्यार्थ्यांची संख्या चारशेंच्या वर असून शिक्षक व वर्गांची संख्या अनुक्रमें १६ व १३ आहे. याच संस्थेच्या वतीनें 'श्रीशारदा–मंदिर कन्या पाठशाळा'ही संस्था चालवली जात आहे. या संस्थेंत जवळ जवळ १०० विद्यार्थिनी असून अपर प्रायमरीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. ही संस्थाही सरकारमान्य असून तिला सरकारांकडून मासिक ३५ रुपयांची मदत मिळत आहे. दोन्ही संस्थांचा वार्षिक खर्च ९।१० हजारांचा आहे. वर्गणीदारांची संख्या ५०।६० असून वार्षिक वर्गणी जेमतेम एक हजार रुपये वसूल होते. फीचें वार्षिक उत्पन्न साधारण दोन हजार आहे. बाकीच्या सहासात हजारांची भरपाई सरकारी ग्रँट व बाहेरगांवाहून मिळालेलें साहाय्य यांतून केली जाते. स्थानिक व्यापारीवर्गाकडून संस्थेला गतवर्षी १६६० रु. ची मदत मिळाली असून पुढेंही ती देण्याचें आश्वासन मिळालें आहे. चालू वर्षी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष श्री. दशरथनंदन शामराव कोठारे, हे असून चिटणीस डॉ. गंगाधर चिमणाजी सीमंत हे आहेत.

महाराष्ट्राबाहेरील

१ महाराष्ट्रसमाज, अहमदाबादः––ही संस्था आगस्ट सन १९२४ मध्यें स्थापन झाली. उद्देश––महाराष्ट्रीय रहिवाशांमध्यें परस्पर ऐक्य, स्नेहभाव व सहकारिता वाढविणें व त्यांचे ठिकाणीं महाराष्ट्रीयत्वाची जोपासना करणें. या संस्थेचे उद्देश व नियम मान्य असणाऱ्या अठरा वर्षांवरील वयाच्या कोणाहि हिंदुधर्मीय स्त्रीपुरुषास संस्थेचे सभासद होतां येते. प्रतिवर्षी संस्थेकडून मुख्यतः चंद्रिकोत्सव, श्रीदासनवमी उत्सव व वार्षिक संमेलन हे उत्सव साजरे केले जातात. शिवाय येथें वेळोवेळीं कारणपरत्वें आलेले अनेक सन्मान्य व विद्वान् महाराष्ट्रीय सद्गृहस्थ संस्थेस भेट देतात. त्या वेळीं त्यांचा संस्थेकडून सन्मान केला जातो व अशा रीतीनें त्यांच्या परिचयाचा व ज्ञानाचा अपूर्व लाभ संस्थेचे सभासदांस घेतां येतो. सध्यां या संस्थेंत १२५ सभासद आहेत. त्यांत मुख्यतः लहानमोठे सरकारी व बिनसरकारी नोकर, तसेंच वकील, व्यापारी, डॉक्टर, प्रोफेसर व शिक्षकवर्ग व गिरण्यांमधील लहानमोठे कामगार व अधिकारी इत्यादिकांचा समावेश होतो.

संस्थेची व्यवस्था पहाण्याकरितां दरसाल नवीन, कार्यकारी मंडळ निवडण्यांत येतें. त्यांत अध्यक्ष, उपाध्यक्ष, दोन चिटणीस, खजिनदार व पांच साधारण सभासद असे दहा सभासद असतात.

संस्थेची एक मुख्य शाखा म्हणजे ''श्रीसरस्वती मंदिर''ही होय. या शाखेचे वतीनें एक वाचनालय व एक ग्रंथ–संग्रहालय हीं चालविलीं जातात. या शाखेची व्यवस्था एका स्वतंत्र चिटणीसाकडे सोंपविली आहे. सध्यां संस्थेजवळ सुमारें १५०० इतका ग्रंथसंग्रह आहे. त्यांपैकीं बहुतेक पुस्तकें येथील महाराष्ट्रीय सद्गृहस्थांनीं वेळोवेळीं संस्थेस देणगी म्हणून दिलेली आहेत. येथील सुप्रसिद्ध नागरिक श्री. गणेश वासुदेव मावळणकर वकील यांनीं आपला सर्व खाजगी मराठी ग्रंथसंग्रह संस्थेस

देणगी म्हणून दिला आहे. संस्थेची दुसरी शाखा म्हणजे क्रीडाविभाग–शाखा होय. या शाखेकडून सभासदांकरितां देशी व विदेशी बैठ्या व मैदानी खेळांची व करमणुकीची व्यवस्था केली जाते. चिटणीस, श्री. गो. प. भट. पत्ता–भद्र, अहमदाबाद.

२ मल्हारराव–बाजीराव उत्सव मंडळ, इंदूरः–– हें मंडळ इंदूरास इ. स. १९२५ सालीं स्थापन झालें. कल्पना कै. बंडोपंत भाजेकरांची, प्रोत्साहन श्रीमंत महाराज सवाई तुकोजी राव (तृतीय) होळकरांचें. तत्पूर्वी मल्हारराव होळकरांचा उत्सव एकदोनदां झाला होता. १९२५ पासून व्यवस्थित व वार्षिक उत्सव होत आहेत. मल्हाररावांचा उत्सव वैशाख शु. ११ स इंदुरास; पेशवे १ ले बाजीरावांचा वैशाख शु. १३ स रावेरखेडीस; याप्रमाणें कार्य चालू आहे. दोन्ही तिथी त्यांच्या निधनदिवसांच्या होत. मल्हाररावांची छत्री अलंपूरास आहे, तेथेंही या मंडळाकडून उत्सव होतो. उत्सवांत चरित्र–कथन, पूजा, अन्नसंतर्पण व मर्दानी खेळ यांचा समावेश होतो. रावेरखेडी नर्मदातटाकीं आहे. खांडवा–अजमीर लाइनचे सनावदस्टेशनवरून मोटार व बैलगाडीचा रस्ता आहे. रावेरखेडीस पेशव्यांचें वृंदावन, शिंद्यांनीं बांधलेली धर्मशाळा, घाट, श्रीरामेश्वराचें मंदिर व वाड्याचा अवशेष इत्यादि ऐतिहासिक स्थळें आहेत. तीं सर्व आर्किआलॉजिकल् खात्याचे स्वाधीन आहेत. वृंदावनाचे पूजेचा बंदोबस्त होळकर सरकारकडून चालू आहे. उत्सवाचे कामीं होळकर सरकार, देवास संस्थानाधिपति व मध्यप्रांत सरकार यांचा पाठिंबा आहे. मंडळाचे अध्यक्ष सरदार शंकरराव चांगण, बॅरिस्टर ॲट्–लॉ, हे आहेत. मध्यहिंदुस्थान व मध्य प्रांतांतील पुढाऱ्यांचे विचारानें सर्व व्यवस्था चालते. खर्चवेंच जाऊन मंडळाचा निधि सन १९३१ अखेर रुपये २५०० आहे. चिटणीस–ग. बा. देशमुख.

३ महाराष्ट्र ब्राह्मणसभा, इंदूर. स्थापना सन १९२६.

उद्देशः––इंदूरांतील महाराष्ट्र ब्राह्मणांचें हितसंवर्धन करणें. सभासद व त्यांचे विभाग–अठरा वर्षांवरील (इंदूरांतील अथवा इंदूरचे बाहेरील) कोणत्याही महाराष्ट्रीय ब्राह्मण स्त्री–पुरुषांस या संस्थेचे सभासद होतां येते. आक्टोबर १९३१ अखेर सभासदांची संख्या ७१८.

कार्य––सभेस रा. रा. सीताराम विष्णु सरवटे यांनीं देणगीदाखल जागा दिली असून तीवर इमारत बांधण्याचें काम चालू आहे. समाजाचे उपयोगासाठीं सुमारें ५०० पात्रांचीं भांडीं व बिछायती सामान विकत घेतलें आहे. सभेच्या घटकांच्या हितासाठीं "महाराष्ट्र ब्राम्हण सभा कुटुंब सहायक", नांवाची पोटसंस्था स्थापन केली आहे. सदर संस्थेच्या सभासदांकडून मृत सभासदाचे कुटुंबास प्रत्येकीं एक रुपयाप्रमाणें मदत दिली जाते. सन १९३१–३२ अखेर या संस्थेचे २७५ सभासद होते. या संस्थेची व्यवस्था तिच्या सभासदांनीं निवडलेल्या स्वतंत्र कार्यकारी मंडळाकडे असते. सभा प्रत्येक वर्षी श्रीमदाद्य–शंकराचार्यांचा सार्वजनिक उत्सव करते. तसेंच होळीच्या सणांतील अश्लील प्रकारांना आळा घालण्यासाठीं धुलवडीचे दिवशीं होलीकोत्सव सार्वजनिक स्वरूपाचा करते. या प्रसंगीं ब्राह्मण तरुणांत गायन–वादनाच्या चढाओढी होतात. सर्वसाधारण जनतेसाठीं सभेकडून वेळोवेळीं व्याख्यानें व प्रवचनें थोर थोर अशा महाराष्ट्रीय विद्वानांकडून करविलीं जातात. सभा सवडीप्रमाणें अनाथ मुलांच्या उपनयनांस, गरीब विद्यार्थ्यांस व अनाथ ब्राह्मण प्रेतसंस्कारास द्रव्यद्वारा मदत करते. तूर्त गरीब ब्राह्मण स्त्रियांस प्रसूतिसमयीं द्रव्यद्वारां मदत करण्याची सोय केली आहे. संस्थेजवळ सध्यां ११९३३ रुपये शिल्लक आहेत.

अध्यक्ष––वामन गणेश पंतवैद्य,

चिटणीस–केशव सखाराम भाटे.

४ नूतन मराठी विद्यालय, उज्जयिनीः–– श्री. काकासाहेब यांनीं शके १८४४ त स्थापन केली. उद्देशः––चालू अनिष्ट शिक्षणपद्धतींत सुधारणा करून विद्यार्थ्यांच्या मानसिक, नैतिक व व्यावहारिक विचारशक्तींचा विकास होईल, व त्यांची शारीरिक व आत्मिक उन्नति होईल, असें शिक्षण देणें. आरंभीं विद्यार्थ्यांची संख्या फक्त ४ होती. शके १८५० पर्यंत वेदपठण, कांतणें, विणणें यांची प्रगति बरीच झाली. संस्थेची भिस्त नियमित देणग्या, वर्गण्या व फी यांवर अवलंबून आहे. १९२६सालापासून ग्वाल्हेर दरबारनें रु. ३० ची ग्रँट सुरू केली. पुढें ती दरमहा ६४पर्यंत वाढली. परंतु १९२८–२९ त राजकीय कारणामुळें दरबारनें ग्रँट बंद केली. मासिक वर्गणीदार व घटक मानलेले वर्गणीदार यांच्या साधारण सभेतर्फें दरवर्षी समिति निवडण्यांत येते व तिच्यातर्फें संस्थेचें कार्य चालतें. सर्व सभासदांची संख्या ७२. शके १८५३ चा जमाखर्च–जमा रु. १४५१–१–० खर्च रु. १४९६–५–०

५ दक्षिणी ब्राह्मणसभा, कराची.—
सभेचीं कार्यें—गीताजयंति, संक्रांति–संमेलन, ध्वजारोपण, श्रीमदाद्य शंकराचार्य जयंति, बाजीराव स्मृतिदिन, लो. टिळक पुण्यतिथि, श्रीगणेशोत्सव. हल्लीं क्रीडाविभाग सुरू केला आहे.स्थानिक संस्था व लग्नकार्यासाठीं इतर गृहस्थांस सभेच्या जागचा उपयोग होतो. कराचीस येणाऱ्या परस्थ मंडळीस उतरण्यास, व सार्वजनिक संस्थांस सभा, व्याख्यान,कीर्तन वगैरेकरितां जागेचा उपयोग होतो देणगी–प्रो. नारायणराव व्यासांनीं जलशाचें निम्में उत्पन्न ३५० रुपये दिलें. बडोद्याचे श्री. आबासाहेब पटवर्धन रु. २५; सन (१९३१)चा जमाखर्चः—जमा–१५७१ रु. १४ आणे १०पै.; खर्च–१०५२ रु. १३ आणे. शिल्लक ५१९ रु. १ आणा १० पै. अध्यक्ष–श्री. शं. वि. गोरे; चिटणीस–श्री. गो. वा. जोग.

६ महाराष्ट्र मित्रमंडळ (सिंध) कराची–
स्थापना–सन १९२७; उद्देश–(१) सिंध प्रांतांतील महाराष्ट्रीय जनतेंत, जातिविषयक भेद व बंधनें लक्षांत न घेतां स्नेहभाव व सहकार्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणें. (२) व्याख्यानद्वारां ज्ञानप्रसार करणें. (३) सन्मान्य व्यक्तींचा सत्कार करणें. (४) लायक विद्यार्थी व शिक्षणसंस्था यांस आर्थिक मदत करणें. (५) जनतेंत गायनाची आवड उत्पन्न करणें.जात अगर पंथ यांपासून अलिप्त असणारी ही संस्था निरनिराळ्या जातींतील कांहीं महाराष्ट्रीय उत्साही मित्रांनीं स्थापन केली.मराठी भाषा लिहितां,वाचतां येणाऱ्या, अगर समजणाऱ्या गृहस्थास मंडळाचे सभासद होतां येतें. सध्यां मंडळाच्या सभासदांत महाराष्ट्रीय हिंदूंप्रमाणेंच ख्रिश्चन, ज्यू व तुरळक मुसलमानही आहेत. पुणें वसंत व्याख्यानमालेच्या धर्तीवर संस्थेची व्याख्यानमाला आहे. तिच्यातर्फे कराची शहराच्या निरनिराळ्या भागांत विद्वान् वक्त्यांचीं भाषणें होतात.

आजपर्यंत मंडळानें पुढील संस्थांस व सद्‌गृहस्थांस पैशाची मदत केली:—

(१) मराठा जनरल एज्युकेशन सोसायटी, कराची, ३५० रुपये. (२) एन्. जे. हायस्कुल कराची या शाळेंतून मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण होऊन इतिहासांत पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ११०० च्या व्याजांतून बक्षीस देणें. (३) इंटर नॅशनल ऑलिंपिक गेम्सकरितां गेलेल्या कराची येथील रा.दशरथ चव्हाण,या महाराष्ट्र खेळाडूस देणगी रु. १०१. (४) कन्या–महाविद्यालय–ग्रंथालय कराची–५०० रुपये. शिवाय श्रीशिवाजी हायस्कूल कराची,सिंध जलप्रलय निवारक-फंड,व रायगड स्मारक फंड यांस मदत केली.महाराष्ट्र निवासाकरितां जागा घेतली असून इमारत बांधून व्हावयाची आहे. आतांपर्यंत ७५०० रुपये गोळा झाले आहेत. पैकीं शेठ लखमीचंद ईश्वरदास यांनीं ५०० रुपये दिले. अध्यक्ष–रावसाहेब जे. व्ही. मुजुमदार बी.ए.चिटणीस–श्री. एन्. व्ही. गोखले. पत्ता–बार्नेस स्ट्रीट, कराची.

७ बेंगाल केमिकल अँड फारमॅस्युटिकल वर्क्स लि.कलकत्ताः–स्थापना-१८९२त सर प्रफुल्लचंद्र रॉय यांनीं केली.अगदीं प्रथमचे मदतनीस डॉ. ए. सी. बोस व मि. सिह. १९०१ त कंपनी पब्लिक लिमिटेड कंपनी म्हणून रजिस्टर करण्यांत आली. तेव्हांचें भांडवल रु. ५०,०००, पुढें तें वाढत वाढत १ लाख, नंतर ३ लाख, ५ लाख, १० लाख, व शेवटीं १९ लाखांपर्यंत गेलें. विक्रीची वाढ पहिल्या वर्षीच्या रु. २५००० च्या विक्रीपासून २६ व्या वर्षी रु.२९,००,०००पर्यंत वाढत गेली. कंपनीचे शेअरहोल्डर्स सुमारे ७०० आहेत. त्यांत शास्त्रज्ञ, सरकारी अधिकारी, वैद्यकीय खात्यांतील व कायद्याचे अधिकारी, वगैरे सर्व प्रकारचे लोक आहेत. माणिकतोळा यथें कारखान्याची सुमारें १,५०,००० चौरस फूट जागा आहे; त्यांत निरनिराळ्या कामांकरितां ५३ इमारती आहेत. कारखान्यांत उत्पन्न केलेली वीज हीच चालक शक्ति (Motive Power) असून रोज १५०० युनिट्स विजचा व्यय होतो. कारखान्यास रोज सुमारें ८०,००० गॅलन पाणी लागतें. कंपनीच्या मालकीचा एक छापखाना, पेटचा तयार करण्यासाठीं एक (Saw Mill) व इतर अनेक वर्कशॉप्स आहेत.

कारखान्यांत तयार होणारा मुख्य माल म्हणजे रसायनें, औषधी व शास्त्रीय उपकरणीं, शिवाय जंतुविनाशकें, (Surgical dressing)शस्त्रक्रियेंत लागणारे प्रयोगशाळेंतील सामान, वायुजनक (Gas-generator) अग्निशामकें (Fire extinguisher) व यंत्रोपकरणें इत्यादीहीं करण्यांत येतात.महायुद्धांत कंपनीनें मेसापोटेमिया व इतर ठिकाणीं हजारों अग्निशामकें पुरविलीं. कंपनींत सुमारें १४०० माणसें काम करीत आहेत. १५रु. च्या वर उत्पन्न असलेल्या प्रत्येक नोकरास कंपनी आपल्या फायद्यांतील कांहीं भाग भर टाकीत असलेल्या प्रॉव्हिडंट फंडांत भाग घेतां येतो.

८ **दाक्षिणात्य परिषद् शारदाभवन,** काशीः—स्थापनाः संवत् १९८७. मुख्य उद्देश—दाक्षिणात्य बांधवांत परस्पर स्नेहसंवर्धन व साहाय्य करणें, येथील दाक्षिणात्य संस्थांना या संस्थेच्या देखरेखीखालीं चालवून त्यांची उन्नति करणें. बाहेरील महाराष्ट्रीयांच्या अडचणी दूर करणें इत्यादि. अंतर्गत संस्थांचीं नांवें—१ महाराष्ट्र वाचनालय, २ बालगंगोत्सव कमिटी, ३ वीर महाराष्ट्र मंडळ, ४ बाल गणेशोत्सव मंडळ, ५ शारदा वादविवाद समिति, ६ शारदा संगीत समिति. दर शनिवारीं संस्थेतर्फे व्याख्यानें होतात.येथील महाराष्ट्रीयांस मराठी वृत्तपत्रें व पुस्तकें वाचावयास मिळावीं म्हणून 'महाराष्ट्र वाचनालय' नांवाची संस्था चार वर्षांपूर्वीपासून चालू केली आहे. पुस्तकांची संख्या १५००; सध्यां सभासदांची पटावरील संख्या ५५ आहे. अध्यक्ष—श्री. काळे, चिटणीस—श्री. पाठक, जोशी व देशमुख.

९ **मराठा मित्र समाज,** खरगपूरः—(B. N. Ry.)स्थापनाः सन १९१८; बी.एन. रेल्वेनें नागपूर येथें असलेला मोठा कारखाना सन १९०४ सालीं आणला. त्यावेळीं बरीच महाराष्ट्रीय मंडळी येथें येऊन स्थायिक झाली. त्यांची संख्या सध्यां सुमारें एक हजार आहे. पांढरपेशा वर्गाची मंडळी सुमारें १०० असून तेलगू लोकांचा भरणा विशेष आहे. समाजातर्फे धार्मिक व राष्ट्रीय उत्सव होतात. शारीरिक शिक्षणाकरितां आखाड्याची सोय आहे. सभासद चाळीस आहेत. वर्गणी नांवापुरती आहे. म्हणून गणपती उत्सवासारख्या खर्चांच्या बाबीसाठीं स्वतंत्र वर्गणी गोळा केली जाते. सेक्रेटरी—पुरुषोत्तम शिवराम लुखे.

१० **महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाज,** दिल्लीः—स्थापनाः १९१९; 'मायदेश सोडून नोकरी किंवा धंद्याचे निमित्तानें स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीय लोकांत सहकारिता व प्रेम वाढावें व त्यांचें पर प्रांतांतील आयुष्य सुकर जावें' हा उद्देश धरून ही संस्था स्थापन केली. महाराष्ट्रीय धार्मिकउत्सव व पुण्यतिथि येथें पाळल्या जातात. उत्सव समारंभ होतात.प्रवासी पाहुण्यांच्या सोयीकरितां भोजनाची व राहण्याची सोय केली आहे. त्याच जागेंत दत्तमूर्ति स्थापन केली आहे व तेथें भजनपूजन चालू असतें. महाराष्ट्रीय प्रवाशांच्या सोयीकरितां म्हणून संस्थेची स्वतंत्र इमारत अवश्य पाहिजे. त्याकरितां सुरुवात म्हणून संस्थेच्या शिलकेंतून 'भवननिधी' स्थापन केला. त्यांत ३००० रु. चीं कॅशसर्टिफिकेट्स व सुमारें २५० रु. लोकांकडून मदत एवढी रक्कम झाली आहे.सभासद संख्या १९३१अखेर १७८,व दूरस्थ ८,अशी होती. स्थानिक सभासदांच्या सुखसोयी म्हणून बैठे खेळ, रुग्णशुश्रुषेचीं उपकरणीं व समारंभोपयोगी सामान इत्यादि व्यवस्था आहे. शिवाय संस्थेचें लोकमान्य पुस्तकालय व वाचनालय आहे. त्यांत एकंदर ९२५ पुस्तकें आहेत आणि विविध मासिकें व वृत्तपत्रें येतात. १९२९ त समाजानें महाराष्ट्रीयांच्या सोयीकरितां मराठी प्राथमिक शाळा उघडली. १९३१ अखेर विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून संख्या ४५ होती. समाजांतील अभिनयकलेचे हौसी नाटचप्रयोग करतात, व होणारें उत्पन्न देणगीखातीं जमा होतें.या महाराष्ट्रीय नाटचमंडळानें 'भवननिधी'स २४७–१२–६ रु. देणगी दिली. १९३१ सालअखेर—जमा ६८३९–१०–२ रु., खर्च ४८८८–०–० रु. शिल्लक १९५१–१०–२ रु. अध्यक्ष—रावसाहेब का. रा. बखले बी. ए., चिटणीस—श्री. अ. मो. गोडबोले, श्री. कृ. मा. आपटे. बी.ए. एलएल. बी. पत्ता—बर्न बॅस्टियन रोड, (नवाबाजार) दिल्ली.

बडोदें

११ **मूक विद्यालय** बडोदेंः—(अंधशिक्षणाचीही व्यवस्था केली आहे.) संस्थापक—पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर. सध्यांचे मुख्य अध्यापक—गणेश विनायक बधिरे. संस्था श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या खर्चानें चाललेली आहे. दरमहा ७० रु. भाड्याची इमारत असून वसतिगृहाचीही सोय आहे.दरमहा सुमारें७ ते१०रु.पर्यंत खर्च येतो. गरीब विद्यार्थ्यांची सोय मोफत होते. शाळेंत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचें वय ८ वर्षांचें तरी पाहिजे. अभ्यासक्रम आठ वर्षांचा आहे. शिक्षण मोफत मिळतें. १९०९ सालीं खाजगी रीत्या संस्थापकांनीं शाळा सुरू केली. प्रथम एक बहिरा—मुका मुलगा होता. १९१५ पासून सर्व खर्च सरकारांतून होऊं लागला. हल्लीं आठ शिक्षक आहेत व २९ विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांचें वर्गीकरण—मुकीं—मुलगे १९,मुली३; आंधळीं—मुलगे ७.एकूण २६व३बहिऱ्या मुक्यांना मौखिक प्रणालीनें (Oral Method) व आंधळ्यांना ब्रेल लिपींत मातृभाषेचें शिक्षण मिळतें.शिवाय मुक्यांकरितां धंदेशिक्षणाची सोय केली आहे. (१) शिवणकाम (२) सुतारकाम (३) लाकडावर कोरीव काम (४) कशिद्याचें काम (५) चित्रकाम. आंधळ्यांकरितां वेताचें विणकाम व संगीत आणि वाद्यवादन शिकविण्याची व्यवस्था आहे

वार्षिक खर्च–१. शाळा, रु., ५०८६–२–२ २. वसतिगृह रु.१५९२–१५–० प्रत्येक मुलामागें शिक्षणाचा सरासरी वार्षिक खर्च रु.१६९–२–३ बसतो. हिंदुस्थानांत सरकारी खर्चानें बहिरे, मुके व आंधळे यांच्या शिक्षणाची सोय फक्त बडोदें संस्थानांतच आहे. शाळेंतून बाहेर पडलेले पुष्कळ मुके धंदा करून आपला निर्वाह करीत आहेत. त्यांचें मासिक उत्पन्न १५ ते ५० रु.पर्यंत जातें. विद्यालय १९०९ सालीं स्थापन झालें, तेव्हां-पासून संस्थापकांनीं प्रचारकार्य चालू ठेवलें होतें. १९२३ सालीं बहिरे, मुके व आंधळ्यांच्या हिता-करितां एक स्वतंत्र मंडळ स्थापन झालें. त्यामुळें प्रचारकार्य बरेंच झालें आहे.

१२ हिंदविजय जिमखाना, बडोदें:––स्थापना १९१८; उद्देश–शारीरिक शिक्षणाच्या प्रश्नाला जोराची चालना देणें व तरुण पिढी-करितां मर्दानी खेळ खेळण्यास एक सार्वजनिक पीठ तयार करणें. कार्य–सन १९०६ सालीं शाळें-तील विद्यार्थ्यांनीं एक क्रिकेट क्लब सुरू केला, त्याचीच वाढ होऊन हिंदविजय जिमखाना स्थापन झाला. या जिमखान्यातर्फे दरवर्षी 'अॅथलेटिक टूर्नामेंटस' भरविण्यांत येतात. शिवाय निरनि-राळ्या खेळांत प्रावीण्य दाखविणाऱ्या खेळाडूंस देण्याकरितां सव्वीस ढाली व पेले आहेत. जिम-खान्याचे साहाय्यक पेट्रन्स १९; तहाहयात सभासद ८८, देणगीदार १५ व साधारण सभा ५० आहेत. सांप-त्तिक स्थिति–(३० एप्रिल १९३२ अखेर) मागील शिल्लक ११५८६ रु. ११ आ. ३ पै; जमा ११९६ रु. ९ आ. ७ पै. खर्च ८५३ रु. ९ आ. ८ पै. शिल्लक ११९२९ रु. १० आ. २ पै; अध्यक्ष–श्रीमंत संपतराव गायकवाड बार-अॅट-लॉ, मॅनेजिंग कमिटी चेअरमन–रा. सी. बी. पटेल. जनरल सेक्रेटरी–रा. न. जी. गोखले बी. ए.

१३ ब्राह्मणसंघ, भुसावळ:––स्थापना––शके १८४६; उद्देश–ब्राम्हणांचें नित्यकर्म शिक-विण्यासाठीं पाठशाळा चालविणें, व्यायामशाळा चालविणें, मुंज, लग्न, इत्यादि मंगल कार्यांत लागणारीं भांडीं, बैठका, दिवे वगैरे जिनसांचा संग्रह करून ब्राम्हण लोकांना सवलतीनें वापर-ण्यास देणें, अनाथ व लायक विद्यार्थ्यांस यथाशक्ति मदत करणें, अनाथ प्रेतसंस्काराची तजवीज करणें इ. संस्थापक–श्री. काशिनाथ विष्णु पंडित, भुसा-वळ. शके १८५४ च्या सुरुवातीस वर्गणीदारांची संख्या २०२; शके १८५४ चे आरंभीं शिल्लक–इमारत (फंड) २५००, कायमवस्तुसंग्रह ७००, रोख रु. १५०. वर्गणीदार व देणगी देणारे यांचाच संघास आधार आहे. या संघांत फक्त महाराष्ट्रीय दक्षिणी ब्राम्हणांनाच दाखल करून घेण्यांत येते. चिटणीस–मोरेश्वर नागेश दातार.

१४ परशुराम पॉटरी वर्क्स कं. लि. मोरवी:–सदरहू कारखाना मोरवी येथें रा. परशु-राम बळवंत गणपुले, कॉन्ट्रॅक्टर बडोदें यांनीं सुरू केला. भांडवल २,००,००० रु.चें आहे. पैकीं मो-रवी सरकार यांनीं त्यांचा पूर्वीचा जो पॉटरीचा कारखाना होता तो बिल्डिंग व मशि-नरीसुद्धां ३५००० रुपयांस रा. परशुरामपंत गणपुले यांस खरेदी दिला. हल्लीं रा. परशुराम-पंत यांनीं आपला कारखाना लिमिटेड केल्यामुळें रु. ३५००० च्या ऐवजीं सहा परसेंटचे प्रेफरन्स शेअर्स रु. ३५००० चे मोरवी सरकारनें घेतले आहेत. व इतर मिळून सुमारें १,३०,०००रु. चें भांडवल भरलें आहे. कारखान्यांत सर्व प्रकारच्या लहानमोठ्या चिनई मातीच्या बरण्या, पेपर-वेट्, चित्रें, फ्लॉवरपॉट्स, फायरब्रिक्स वगैरे माल हल्लीं निघतो. अॅसिडकरितां केलेल्या बरण्या अॅसिडच्या टेस्टला उत्तम उतरलेल्या आहेत व त्यांचा खप अॅसिड ठेवण्याकरितां चांगला होतो. हल्लीं हिंदु-स्थानांत बरण्या तयार करणारे जे ५।६ नामांकित कारखाने आहेत, त्यांमध्यें हा कारखाना प्रमुख आहे. कारखान्यांतील काम हिंदी तज्ज्ञांच्या देख-रेखीखालीं होतें. हल्लीं कारखान्यांत दर महिना सुमारें १०,००० रु.किंमतीचा माल निघतो. कार-खाना महाराष्ट्रीयांनीं पुढाकार घेऊन काढलेला असल्यामुळें सर्व महाराष्ट्रीयांस त्याबद्दल अभि-मान वाटणें साहजिकच आहे. कारखान्यामध्यें निपज वाढत्या प्रमाणावर होत असून खर्चाचें प्रमाणहि हलकें हलकें उतरत आहे. रा. परशुराम-पंत यांच्या देखरेखीखालीं आणखी तीन कारखाने आहेत. १ बिलीमोरा येथें मंगलोर टाइलचा, २ बडोदें येथें ब्रिक्स व मंगलोर टाइलचा व ३ वांकानेर येथें फायर ब्रिक्स व इतर गुड्स तयार करण्याचा; असे हे तीन कारखाने आहेत व ते सुस्थितींत चालू आहेत. रा. परशुरामपंत हे बडोद्यास सुमारें ८ वर्षांच्या वयाचे असतांना कोणताहि आधार नाहीं अशा स्थितींत आले व स्वतःचें शिक्षण कलाभुवनमध्यें थोडेंबहुत घेऊन कॉन्ट्रॅक्टर म्हणून P. W. D. मध्यें काम करण्यास लागले. P. W. D. मध्यें प्रमुख कॉन्ट्रॅक्टर झाल्यानंतर कॉन्ट्रॅक्टरचा धंदा कमी केला. नंतर श्रीमंत गायकवाड सरकार यांची

पूर्वी बरोबर चालत नसलेली फॅक्टरी विकत घेऊन स्वतंत्र धंद्यास सुरुवात केली. पुढें गुजराथ व दक्षिण भागांत मंगलोर टाइलचा कारखाना कुठेंहि नसल्यानें प्रथम मंगलोर टाइलचा कारखाना ह्याच कारखान्यास जोडून काढला.त्यानंतर मंगलोर टाइलची वाढ जास्त व्हावी म्हणून बिलिमोरा येथें जॉइंट स्टॉक कंपनी काढून मंगलोर टाइलचा दुसरा कारखाना काढला व तो हल्लीं सुस्थितींत चालू आहे. त्यानंतर वांकानेर येथें पूर्वीचा बंद पडलेला फायर गुड्सचा कारखाना विकत घेऊन 'इंडियन पॉटरी वर्क्स' नांवाचा कारखाना कांहीं अटीवर विकत घेऊन सुरूं केला व तो हल्लीं सुस्थितींत आहे. नंतर त्यांनीं मोरवी येथें 'परशुराम पॉटरी वर्क्स' नांवाचा कारखाना काढला. त्याचीच माहिती सुरुवातीस दिली आहे.

१५ महाराष्ट्र मण्डळ, रावळपिंडी:—स्थापना १९३०; उद्देश—कोणत्याहि तऱ्हेचा, उच्चनीच भाव मनांत न आणतां हरएक प्रकारची मदत एकमेकांस करणें व पर प्रांतांतील महाराष्ट्रीयांचें जीवित शक्य तितकें सुखकर करणें.

कार्य—मंडळाचे सभासद२४ असून दरमहा१ रुपया वर्गणी प्रत्येकास द्यावी लागते. गणेशोत्सव, विजयादशमी यांसारखे उत्सव साजरे होतात. तसेंच व्याख्यान, प्रवचन व कीर्तनद्वारां ज्ञानदान चालू असतें. मंडळ महाराष्ट्रीय पाहुण्यांची तजवीज व आदरसत्कार शक्त्यनुसार करतें. काश्मीर पाहण्यास तिकड जाणाऱ्या मंडळींनीं आगाऊ कळविल्यास त्यांची शक्य ती सोय मंडळ करतें. येथील महाराष्ट्रीय भगिनींनीं १९३१ सालीं भगिनी मंडळाची स्थापना केली असून त्याचें कार्य व्यवस्थितपणें चालू आहे. जमा—६५० रु.५ आ.; खर्च ५४५ रु.; शिल्लक १०५ रु. ५ आ. अध्यक्ष—डॉ. सदाशिव गोविंद भिसे, चिटणीस—१ रा. शंकर नारायण श्रोत्री, २ रा. गणेश गोपाळ रांगणेकर.

१६ दयानंद अँग्लो—वेदिक कॉलेज, सोसायटी, लाहोर:—स्थापना सन १८८७; द. अँ. वै. कॉलेज—सन १९३१।३२ सालीं १२०९ विद्यार्थी शिकत होते. त्यांपैकीं वाङमय विभागांत (Arts) ७७२ व शास्त्रीय (Science) विभागांत ४३७. संस्कृत भाषा घेणारे ३१२ व हिंदी घेणारे ७४८. प्रत्येक वर्गांत रोज पंचवीस मिनिटें धर्मशिक्षण दिलें जातें. कॉलेजचे तहाहयात सभासद आपलें काम सांभाळून आर्य समाजाची अनेक रीतीनें सेवा करितात. संशोधन खातें—यांत ६४५३ हस्तलिखितांचा संग्रह आहे. आजपर्यंत दुर्मिळ असलेला मैत्रीयणी संहितेचा पदपाठ मिळाला आहे.' वैदिक वाङमयाचा इतिहास' या पुस्तकाचे दोन भाग प्रसिद्ध करण्यांत आले. या खात्याचा ८००० रु. फंड आहे.

दयानंद अँग्लो वैदिक हायस्कूल, लाहोर:—१९३१।३२ सालीं २८३२ विद्यार्थी शिकत होते. त्यांपैकीं एम. एस. एल. सी. परीक्षकरितां पाठविलेल्या ३३४ विद्यार्थ्यांपैकीं २८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले म्हणजे शेंकडा ८५.६ प्रमाण पडलें.

आयुर्वेदिक कॉलेज—या संस्थेंत १४५ विद्यार्थी १९३१।३२ सालीं शिक्षण घेत होते. पुष्कळ विद्यार्थी पंजाबांतूनच येतात. कांहीं संयुक्तप्रांत, गुजराथ व इतर प्रांतांतून येतात. 'कविराज' परीक्षेंत ४३ पैकीं २९ व 'वाचस्पति' परीक्षेंत १४ पैकीं १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कॉलेजला जोडून औषधांचा कारखाना (Pharmacy) काढलेला आहे. यांत तयार होणाऱ्या औषधांचा दरवर्षी बराच खप होतो.

दयानंद ब्राह्म महाविद्यालय-१९३१—३२सालीं ४९ विद्यार्थी होते. त्यांपैकीं १८ विद्यार्थ्यांना विद्यालयानें भोजन, कपडे व पुस्तकें दिलीं व ७ जणांना भागशः मदत केली. विद्यावाचस्पति, विद्यानिधी व विद्यारत्न अशा तीन परीक्षा आहेत. पंजाब युनिव्हर्सिटीच्या 'शास्त्री' परीक्षला या विद्यालयांतील चार विद्यार्थी बसले व सर्व पास झाले! यावरून या महाविद्यालयांत संस्कृतचें शिक्षण किती उच्च दर्जाचें मिळतें हें दिसून यतें. महाविद्यालयातर्फे या वर्षी ८५ संस्कार पार पडले लग्नें १७; यज्ञोपवीत २; नामकरण ३; जातकर्म १; मुंडण ७; गृहप्रवेश १८; हवन २५ व अंत्येष्टि १२. 'वैदिक कोश' व 'वैदिक शब्दार्थ पारिजात' छापण्याचें काम सुरूं आहे. 'वेदसार' छापून प्रसिद्ध करण्यांत आलें. विद्यालयाची या वर्षी जमा १०७७१ रु. १३ आ. २ पै. आहे. त्यांपैकीं द. अँ. वे. कॉलेजच्या कार्यकारी मंडळानें ५४५२ रु. १५ आ. ८ पै दिले.

दयानंद औद्योगिक शाळा:—१९३१—३२ सालीं या शाळेंत पुढीलप्रमाणें विद्यार्थी शिकत होते. शिवणकला ५७, ग्रंथबांधणी ७, सुतारकाम ३२, सायकल दुरुस्ती ४. एकूण १००. सुतारकाम ११८४४ रु. चें, शिवणकाम ९८२ रु. चें व बुकबाइंडिंग ६६१ रु.चें करण्यांत आलें. या वर्षी १६०० रु. शिल्लक राहिले.

दयानंद अँग्लो–वेदिक कॉलेज, जालंदर (Jullundur) हें कॉलेज १९१८ सालीं स्थापन झालें. १९३१।३२ सालीं ७४६ विद्यार्थी शिकत होते. त्यांची जातवारी हिंदू व शीख ६०३; मुसलमान १४२ व ख्रिश्चन १ जमा–८२५४१ रु. ० आ. ९ पै. खर्च–४२२७३ रु. ७ आ.६ पै. सध्यां २,०१,००० रु. कॉलेजचा फंड आहे. पुढील परगांवच्या शाळा सोसायटीच्या देखरेखीखालीं आहेत––१ नॅशनल हायस्कूल, पेशावर; २ द. अँ. वे. हायस्कूल, मुलतान; ३ द. अँ. वे. हायस्कूल, अमृतसर; ४ द. अँ. वे. हायस्कूल, दिल्ली; ५ द. अँ.वे. हायस्कूल, क्वाडियन; ६ द. अँ. वे. हायस्कूल, कांजरूर; ७ द. अँ. वे. हायस्कूल, पट्टी; ८ द. अँ. वे.हायस्कूल, बटाला; ९ द. अँ. वे. हायस्कूल, दसूया; १० द. अँ. वे. हायस्कूल, शहापूर; ११ द. अँ. वे. हायस्कूल, केटा. १२ एच्. बी. एस्. ए. हायस्कूल, शुजाबाद; १३ जी. एस्. ए. एस्. हायस्कूल, हफिजाबाद; १४ डी. एम्. ए. एस्. हायस्कूल, ल्यालपूर; १५ ए. व्ही. ए. एस्. हायस्कूल, अबोटाबाद; १६ जी. ए. व्ही. हायस्कूल कांगरा; १७ सी. ए. व्ही. हायस्कूल, हिसार; १८ ए. एस्. हायस्कूल, अंबाला; १९ ए. एस्. हायस्कूल, पुंडरी; २० डी. ए. व्ही. मिडल स्कूल, बेहरामपूर; २१ एम्. आर. आर्य मिडलस्कूल, चुहारामांडा; २२ डी. ए. व्ही. मिडलस्कूल, खानेवाल; २३ डी. ए. व्ही. मिडल स्कूल मुबारकपूर; २४ ए. एस्. मिडलस्कूल, कोटगड; २५ जी. ए. एस्. मिडलस्कूल, अहमदपूर २६ जी. ए. एस्. मिडलस्कूल, सालियाना; २७ डी. ए. व्ही. प्रायमरी स्कूल, टार्नटारन; सोसायटीचा फंड (Funded Capital) २०,९९,७१९ रु. ७ आ. ९ पै. आहे. दयानंद अँग्लो वेदिक कॉलेज सोसायटी. अध्यक्ष–लाला सेनदास एम्. ए.; जनरल सेक्रेटरी–प्रि. सी. एल्. आनंद एम्. ए. एल्एल्. बी., बार अॅट–लॉ. प्रिन्सिपाल लॉ–कॉलेज.; चिटणीस–लाला हरगोपाळ एम्. ए. एल्एल्. बी.

१७सार्वजनिक एज्युकेशन सोसायटीसुरत प्रथम १८८८ त 'इंग्लिश हायस्कूल, सुरत' नांवाचें एक अँग्लोव्हर्न्याक्युलर स्कूल निघालें. त्याचा पुढें विस्तार होऊन, कै. सी. जी. शहा यांच्या प्रयत्नानें 'सार्वजनिक एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना झाली. सुरत जिल्ह्यांत खाजगी किंवा शक्य त्या इतर उपायांनीं कॉलेजें, शाळा वगैरे काढून शिक्षण सुलभ करणें असा सोसायटीचा उद्देश आहे. मॅनेजिंग कमिटींत सध्यां ५०६ सभासद आहेत. या वर्षी जमा झालेल्या देणग्या–२४,२५५।–रु. Contributed Fund of the Society आतांपर्यंत जमा झालेला सोसायटीचा फंड १४ लक्ष रु. चा आहे. त्यांपैकीं इमारत व इतर स्थावर ९ लक्ष रु. ची आहे. सोसायटीचें कामकाज बघण्यासाठीं एक मॅनेजिंग कमिटी, एक एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल, एक ट्रस्टींचें बोर्ड व एक व्हॉलंटियर्स बोर्ड आहे. सोसायटीनें चालविलेल्या संस्था–

(१) एम्. टी. बी. कॉलेज, सुरतः–– प्रिन्सिपॉल, रं. शहा, विद्यार्थ्यांची संख्या ४३९; रेसिडेन्सींत राहणारे १३८; एकंदर खर्च रु. ८९४२१–१–१०; सरकारी ग्रँट रु. १२,५९८ यंदापासून प्रत्येक वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याची युनिव्हर्सिटीकडून परवानगी मिळाली आहे. एम्. ए. च्या 'गणित' विषयाच्या विद्यार्थ्यांसाठीं गणितशास्त्रावरील पुस्तक खरेदीप्रीत्यर्थ यंदा १००० र. मंजूर झाले आहेत.

(२) टी. अँड टी. व्ही. सार्वजनिक हायस्कूल, सुरतः–– हेडमास्तर श्री. अकद, (Akkad) बी. ए. एस्. टी. सी. विद्यार्थी संख्या १३६२. एकंदर खर्च र. ८१५३६–३–४ रु.; ग्रँट रु. १३७४६. इतर माहिती १९३१ सालीं ११३ मुलें मॅट्रिक परीक्षेसाठीं धाडलीं, ७७ पास झालीं. मास्तरांसाठीं एक ट्रेनिंग क्लास या वर्षी काढण्यांत आला. जिल्ह्यांतून सुमारें ५० शिक्षक फायदा घेतात. पुस्तकांसाठीं व मासिकांसाठीं ४५० रु. खर्च करण्यांत आले. सुरत जिल्ह्यांत शिक्षकांसाठीं असें एकच ग्रंथालय आहे. क्लासचे ऑर्गनायझर. सी. सी. शहा.

(३) एन्. जी. जव्हेरी जैन हायस्कूल, सुरत-हेडमास्तर श्री. जोगळेकर, एम्. ए., विद्यार्थी संख्या १४३; एकंदर खर्च रु. ११७०३–१३–४. सरकारी ग्रँट रु. ५००. यंदाची तूट १९३– रु. ५ आ. ४ पै. (१९३१–३२) इतर माहितीः– स्कूल लीव्हिंग परीक्षेस १९३१ सालीं ३१ पाठविले, २४ पास झाले.

(४) सार्वजनिक ए. व्ही. स्कूल, काटरगांव-हेडमास्तर श्री. देसाई–विद्यार्थी संख्या ८९, एकंदर खर्च रु. ३६२३–७–० सरकारी ग्रँट रु.७४०.

(५) हरिपूर सार्वजनिक मिल स्कूलः–सुरत हेडमास्तर श्री. मोदी, बी. ए. एस्. टी. सी. विद्यार्थ्यांची संख्या २३९. एकंदर खर्च रु. ७९१५–७ या वर्षी रु. ५४४–१–८ ची बचत झाली.

(६)सार्वजनिक ए.व्ही. स्कूल, (Deehen)

हेडमास्तर, श्री. परेख. विद्यार्थ्यांची संख्या ४२, एकंदर खर्च–रु. १६५५–९–९ प्रेसिडेंट–सर पुरुषोत्तमदास ठाकोरदास. चेअरमन–श्री. चिमणलाल माणेकलाल गांधी.

१८ **महाराष्ट्रमित्र मंडळी**, रंगून:— स्थापना–मकरसंक्रांत १९०१. हेतु–(अ) ब्रह्मदेशांतील महाराष्ट्रीयांमधील प्रेमभाव वृद्धिंगत होऊन त्यांचें परस्परांस सहाय्य होईल असा प्रयत्न करणें. (आ) ब्रह्मदेशांत राहणाऱ्या व येणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या हरएक प्रकारच्या शक्य त्या सोयी करणें. (इ) महाराष्ट्रीय लोक व मराठी भाषा यांच्या उत्कर्षास मदत करणें. कार्याची दिशा–वरील हेतु सिद्धीस जाण्यासाठीं खालील गोष्टी करण्याचा प्रयत्न चालू आहे. (१) ब्रह्मदेशांतील महाराष्ट्रीयांचें वर्षांतून एकदां संमेलन; (२) थोर व्यक्तींचे उत्सव व सन्मान करणें; (३) मराठी शाळा, ग्रंथालय व मोफत वाचनालय चालविणें, व्याख्यानें करविणें, ग्रंथ लिहून प्रसिद्ध करणें अथवा अशा कामीं मदत करणें; (४) ब्रह्मदेशांतील महाराष्ट्रीयांची आणि हिंदुस्थानांतील अथवा इतरत्र त्यांच्या जवळच्या नातलगांचीं नांवें व पत्ते यांची यादी ठेवणें. (५) महाराष्ट्रीय प्रवाशांकरितां पथिकालय चालविणें. (६) महाराष्ट्रीयांस ब्रह्मदेशसंबंधीं माहिती पुरविणें. (७) मंडळीसारख्या इतर संस्थांशीं सहकार्य करणें इत्यादि. सभासदत्व–२१ वर्षें वयाच्या कोणाही सभ्य स्त्री–पुरुषांस मंडळीचे हेतु व कार्याची दिशा पसंत असून त्या नियमांप्रमाणें वागणें कबूल असल्यास मंडळीच्या संमतीनें सभासद होतां येतें. सभासदांचे आश्रयदाते, साहाय्यक, तहाहयात व साधारण असे वर्ग करण्यांत आले आहेत. सभासद नसूनही किरकोळ देणग्या देणारे इसम हितचिंतक समजले जातात. दासनवमी, शिवजयंती वगैरे उत्सव करण्यांत येतात. १९२३ सालीं मंडळीची स्वतःच्या मालकीची इमारत बांधण्यांत आली.ती दरमहा ५० रु. भाड्यानें दिली आहे. इमारतीचें अग्नीपासून संरक्षण व्हावें म्हणून ४५०० रुपयांचा विमा उतरण्यांत आला आहे. मंडळीच्या ग्रंथालयांत सुमारें ७५० मराठी व २५० इंग्रजी ग्रंथ आहेत. मंडळीनें चालविलेलें एक वाचनालय असून त्यांत अनेक वृत्तपत्रें व मासिकें येतात. १९३०–ते ३१ पर्यंतचा जमाखर्च–एकूण जमा–रु. ३३८२ २ आ. ४ पै. एकूण खर्च–रु.१३५८–१ आ. एकूण शिल्लक–रु. २०२४–१–४. १९३०–३१ चें अधिकारी मंडळ—अध्यक्ष–श्री. वामन विनायक नेने; उपाध्यक्ष–श्री. दत्तात्रय गणेश भागवत बी. एस्सी.; चिटणीस–श्री. रा. गो. नातू.

१९ **मराठा–मण्डळ—दारेसलाम** पूर्व–आफ्रिका. स्थापना एप्रिल १९२२. उद्देश– 'महाराष्ट्रीय लोकांत परस्परांतील प्रेम व ऐक्यवृद्धि करणें' कार्य—संस्थेच्या इमारतीचा फायदा सभासद व इतर मंडळी करून घेतात. स्त्रियांकरितां 'भगिनीमंडळ' आहे. श्रीशिवाजी जन्मोत्सवासारख उत्सव साजरे होतात. छोटें वाचनालय व ग्रंथालय असून इतर करमणुकीच्याहि सोयी आहेत. संस्थेचे सभासद ५० आहेत. देणगी–डॉ. एस्. आर. अभ्यंकर ५०० रुपये देऊन संस्थेचे आश्रयदाते झाले आहेत. सांपत्तिक स्थिति—१९३१ सालीं जमा १४५३Shs३६Cts. खर्च १०४१; ३३.शिल्लक ४१२–३ अध्यक्ष–डॉ.व्ही. जी. साकीकर; चिटणीस–श्री. एन्. के. दाणी.

उपस्थित प्रश्न

खोती

खोती ही संस्था कोंकणांतील रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांत आज निदान ३००।४०० वर्षें तरी अस्तित्वांत आहे. ही संस्था कां अस्तित्वांत आली याचा इतिहास बोधप्रद व मनोरंजक आहे. सह्याद्रि पर्वताचे पश्चिमेकडील मुलूख विशेषें- करून रत्नागिरी व कुलाबा हे जिल्हे सुपीक व सपाट नसल्याकारणानें त्यांत कायम वसाहत करून राहणारा शेतकरी वर्ग पूर्वी नव्हता. या जिल्ह्यांत लागवड करतां येईल अशी जमीन पुष्कळ होती. पण ती लागवडीस आणणें अत्यंत मेहनतीचें व खर्चाचें काम होतें आणि त्यामुळें तें सर्व साधारण शेतकरी वर्गाचे आटोक्याबाहेरचें होतें. हें काम ज्या धडाडीच्या, साहसी, उद्योगी वर्गानें पत्करिलें तेच हल्लींच्या खोतांचे पूर्वज होत. यामुळेंच पूर्वीच्या बहुतेक खोतांच्या सनदांत जमीन लागवडीस आणण्याबद्दल परमुलखी कुळें आणून महामुरी करणेंबद्दल, गांव वसविण्याबद्दल, पड जमिनी लागवडीस आणण्याबद्दल उल्लेख आढळतो. ह्या लोकांनीं त्या वेळच्या सरकारकडून जमिनी घेऊन त्या ऊर्जितावस्थेला आणण्याचें, परमुलखी कुळें आणून गांव वसविण्याचें व जमिनी लागवडीस आणण्याचें काम पत्करिलें व त्याबरोबरच सरकार मागेल ते कर देण्याची जबाबदारीही पत्करिली. यामुळें कोंकणांतील जमिनीची ऊर्जितावस्था तर झालीच पण त्याबरोबरच त्या वेळच्या सरकारला त्यांचा जमीनमहसूल व इतर कर देण्याला जबाबदार असा सधन व लायक वर्ग मिळाला. त्यामुळें त्यावेळच्या सरकारला ही खोतीची पद्धत कोकणासारख्या डोंगराळ,नापिकी प्रदेशांत अत्यंत सोईची वाटली व ती पद्धत झपाटयानें अंमलांत येऊं लागली. नाना फडणविसाच्या कारकीर्दींत रत्नागिरी जिल्ह्याची पहिली पद्धतशीर पाहणी झाली. त्यावेळीं पुष्कळ गांवांत खोतीची पद्धत सुरूं होतीच. व पुढें ही खोतीची पद्धतच जमीनमहसूल व इतर कर गोळा करण्याचे बाबतींत स्वीकारण्यांत आली. या पद्धतीप्रमाणें सर्व गांवचा सरकारचा वसूल करण्याची जबाबदारी खोतावर असे. त्याचे मोबदला कुळांकडून मिळेल तो नफा घेण्याची खोताला मोकळीक असे. खोत कुळाकडून नवीन जमिनी लागवडीस आणून वगैरे प्रकारांनींही आपली भर करीत. कासाईसारखे कांहीं जुलुमी कर कांहीं ठिकाणीं घेतले जात. पण एकंदरीनें खोत व कुळें यांचे संबंध फारच सलोख्याचे होते.

परंतु पुढें पेशवाईचे अखेरीस व इंग्रजी अंमल सुरूं झाला त्या सुमारास सर्वत्र बेबंदशाही झाली व खोत हे गांवचे राजे बनले. गांवचें सरकार-देणें ते देतात अगर नाहीं,एवढेंच सरकार पाहात असे. एकदां खोतांनीं हें देणें दिलें कीं, गांवांतील कुळांकडून वाटेल त्याप्रमाणें ते जमिनीचा खंड व इतर कर वसूल करीत; वाटेल ती जमीन वाटेल त्याला लागवडीला देत. शिवाय वेठ, बेगार यासारख्या जुलमी पद्धतीही चालू होत्या. एकंदरींत खोत कुळांवर वाटेल तशी सत्ता गाजवीत असत.यावेळीं खोती गांवांत पिढ्यान्‌पिढ्या तीच जमीन करणारा असा शेतकरी वर्ग उत्पन्न झाला होता.पण त्याला कायम कुळपणाचे अथवा अशा तऱ्हेचे कसलेही हक्क नव्हते. इतर नवीन कुळें व हीं कुळें यांमध्यें फरक करण्यांत येत नसे. इंग्रज सरकारचें धोरण या खोती गांवाच्या बाबतींत बरेच वर्षें अगदीं अनिश्चित स्वरूपाचें होतें. इंग्रज सरकारनें या जिल्ह्यांची सर्वे अनेकदां अनेक कामगारांकडून करविली पण या कामगारांमध्येंच खोतीच्या प्रश्नाबद्दल मतभेद होता. कित्येक कामगारांचें मत असें होतें कीं, खोत हेच खरे जमिनदार व खोती गांवांतील इतर शेतकरी वर्ग हीं सर्व एक सालीं अथवा उपरीं कुळें होत. सरकारला या शेतकरी वर्गाकडे पाहण्याचें कांहीं कारण नाहीं. जमीन महसूल खोतांबरोबर ठरविला म्हणजे झालें. दुसऱ्या कांहीं कामगारांचें असें मत होतें कीं, खरा जमीन धारण करणारा वर्ग हा खोती गांवांतील कुळें होत. खोत हे उगीच मध्यस्थ, पोटभरू आहेत. तेव्हां खोती नष्ट करून रयतवारी पद्धतीप्रमाणें प्रत्येक कुळाजवळ जमीन महसूल ठरवावा. या दुसऱ्या पक्षाचें वजन पडून खोती साफ नष्ट होते कीं काय असें एके वेळेस वाटत होतें. पण त्यावेळीं खोतांनीं एकजूट करून फार

जोराची चळवळ केली. खोतांची बाजू कै. रा.सा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं जोरानें पुढें मांडून असें प्रस्थापित केलें कीं, खोत हे मध्यस्थ, पोटभरू नव्हेत त्यांनीं आपल्या हाडांची काडें करून पैसा खर्च करून कोंकणची जमीन ऊर्जितावस्थेस आणली आहे. तेव्हां खोतांना वगळून रयतवारी पद्धत सुरू करून कुळाबरोबर जमीन महसुलाचे बाबतीत कांहीही करार करतां येणें शक्य नाहीं. शेवटीं सरकारनें खोती कमिशन नेमलें व त्याचा रिपोर्ट आल्यावर खोती ॲक्ट सन १८८० सालीं पास करण्यांत आला. त्यांत पुढें १९०४, १९१२, १९१३ सालीं कांहीं बाबतींत दुरुस्त्या करण्यांत आल्या. रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व खोती गांवांना हाच कायदा लागू आहे. खोती गांवांतील खोत व कुळें यांच्या हल्लीच्या परिस्थितीचा पाया हाच कायदा होय. ह्या कायद्यानें खोत व कुळें ह्या दोघांच्या हक्कांचें संरक्षण झालें आहे. त्यामुळें हा कायदा आपणाला लागू करावा म्हणून कुलाबा जिल्ह्यांतील लोकांनीं प्रयत्न चालविले आहेत. या खोतीच्या कायद्यानें खोती गांवांतील कुळांचे दोन वर्ग करण्यांत आले आहेत. ज्या कुळांकडे सन १८४५ पूर्वीपासून जमीन वहिवाटीस होती त्यांना "कायम कुळें" ठरविण्यांत आलें आहे व जीं कुळें १८४५ नंतर जमिनी कसूं लागलीं त्यांना साधीं उपरीं अगर एकसाली कुळें असें ठरविण्यांत आलें आहे. या दुसऱ्या वर्गांतील कुळांना विशेष असे हक्क नाहीत. खोतांना त्यांना जमिनींतून काढून टाकण्याचा व तीं जमीन स्वतः करण्याचा अगर दुसऱ्या कुळाला देण्याचा हक्क आहे.

"कायम कुळें"

त्यांचे हक्क——कायम कुळांना जमीन वंशपरंपरेनें कसण्याचा अधिकार आहे. खोतांना कायम कुळाला जमिनींतून काढून टाकतां येत नाहीं. मात्र कायम कुळाला खोताचे परवानगीशिवाय जमीन विकतां अथवा गहाण टाकतां येत नाहीं. त्याचप्रमाणें कायम कुळानें खोताला, लागोपाठ दोन वर्षें खंड अथवा वसूल दिला नाहीं तर कलेक्टरकडे अर्ज करून ती जमीन खोताला खालसा करून घेतां येते. परंतु कलेक्टरचे परवानगीशिवाय खोताला स्वतः जमीन खालसा करण्याचा अधिकार नाहीं. खोताचा वसूलः—— कायम कुळानें खोताला काय वसूल द्यावयाचा याबद्दल अत्यंत बारकाईनें तपास करून पूर्वी कायम कूळ खोताला काय देत आलें तें पाहून सरकारी कामगारांनीं ठराव केले आहेत व हे ठराव सर्व कागदांत नोंदण्यांत आले आहेत.जर कायमकूळ फक्त सरकारदस्तच अथवा कांहीं ठराविक खंड देत असेल तर त्याबद्दलची नोंद केलेली असते. जेथें असे स्पेशल ठराव नाहींत,त्या ठिकाणीं खोतांनी कायम कुळांच्या जमिनींची पाहणी करावयाची व उत्पन्न किती येईल याचा अंदाज उभें पीक पाहून पंचमार्फत त्यांचे विचारानें कुळासमक्ष करावयाचा व तो एका वहींत प्रत्येक शेतवार मांडून ठेवावयाचा व या केलेल्या पिकाच्या अंदाजावरून खोतानें गांवशिरस्त्याप्रमाणें पिकाचा एक द्वितियांश अथवा एक तृतियांश हिस्सा कायम कुळाकडून खंड म्हणून घ्यावयाचा प्रघात आहे. ज्या वहींत पिकाचा अंदाज मांडतात ती वही प्रत्येक वर्षीं सरकारी ऑफिसांतून प्रत्येक पानांवर अनुक्रम नंबर घालून व सरकारी शिक्का मारून खोताला दिली जाते. व ती सरकारी कामगार तपासतात. त्याचप्रमाणें पिकाचा कितवा हिस्सा खोतानें घ्यावयाचा ह्याबद्दलचा गांवशिरस्ताहि सरकारी कामगारांनीं ठरविलेला असतो. याप्रमाणें खोताला मिळावयाचा वसूल ठरविण्यांत येतो. याशिवाय खोताला वसूल देण्याचे बाबतींत कायम कुळाला एक महत्त्वाचा हक्क देण्यांत आला आहे. तो म्हणजे नक्त खंड देण्याचा हक्क. कायम कुळानें ऐनजिनसी खंड अगर गल्ला देण्याऐवजीं पैशाचे रूपानें दरवर्षीं खोताला काय रक्कम द्यावयाची हें कलेक्टरकडे अर्ज करून ठरवून घेण्याचा हक्क कायम कुळाला देण्यांत आलेला आहे. ही कायम रक्कम ठरवितांना गेल्या १२ वर्षांची कुळानें खोताला दिलेल्या वसुलाची सरासरी काढून सरकार दस्ताची अमूक पट अशी रक्कम ठरविण्याचा प्रघात आहे. मात्र कायम कुळानें आपल्या सर्व जमिनीबद्दल अशी पट ठरवून घेतली पाहिजे. त्यांपैकीं कांहीं भागांची पट ठरवून घेण्याचा त्याला अधिकार नाहीं. याप्रमाणें पट ठरवून घेतल्यावर तेवढे पैसे दरवर्षीं खोताला दिले म्हणजे झालें. या कायम कुळाला दिलेल्या हक्कामुळें शेतवार पिकाचा अंदाज करून त्यावरून खंड घेण्याची जी सत्ता खोताचे हातांत असते ती पार नाहींशी झाली आहे. कायम कुळानें खोताला ही ठरलेली पटीची रक्कम दिली कीं, खोताची त्याच्यावर कांहीं सत्ता नाहीं. या हक्काचा फायदा पुष्कळच कायम कुळांनीं घेतला आहे. अलीकडे २ वर्षें भात वगैरे धान्यांचे भाव फारच उतरल्यामुळें या पटीपेक्षां ऐन जिनसी

गल्ला अगर खंड देणें वरें असें कांहीं ठिकाणीं कायम कुळास वाटू लागलें आहे. पण ही स्थिति कायम टिकणारी नव्हे. पुढेंमागें धान्याचे भाव स्थिर झाले म्हणजे पूर्ववत स्थिति पुन्हां होईल.

खोत

खोतीच्या कायद्यानें खोत हा जमिनीचा मालक आहे असें ठरविण्यांत आलें आहे. अर्थात्‌च सरकार सारा वारण्याची जबाबदारी खोतावरच आहे. खोताच्या जमिनीचे मुख्यत्वेंकरून दोन भाग पाडतां येतील. (१) कुळारगी जमीन म्हणजे ज्या जमिनींत कायम कुळें आहेत ती, (२) खोती खासगी जमीन म्हणजे ज्या जमिनींत खोत स्वत: वहिवाट करतो ती. पहिल्या म्हणजे कायम कुळें असलेल्या जमिनीबद्दल खोताला फक्त खंड वसूल करण्याचा अधिकार आहे. यासंबंधीं वर विवेचन केलेंच आहे. याशिवाय कायम कुळानें खोताच्या परवानगीशिवाय जमीन खरेदी अगर गहाण दिली तर ती जमीन खालसा करण्याचा खोताला हक्क आहे. त्याचप्रमाणें कायमकुळानें लागोपाठ दोन वर्षे वसूल न दिल्यास त्याची जमीन कलेक्टरमार्फत खालसा करवून घेण्याचा खोताला हक्क आहे. या व्यतिरिक्त खोताला कायम कुळें असलेल्या जमिनीवर जास्त हक्क अथवा अधिकार नाहीं. दुसऱ्या म्हणजे खोती खासगी जमिनीचा खोत हा पूर्णपणें मालक आहे. ही जमीन तो स्वत: घरीं कसतो कथवा कूळामार्फत वहिवाटतो. मात्र हीं कुळें उपरि अथवा एकसाली कुळें असतात. त्यांना काढून टाकण्याचा खोताला अधिकार असतो. ही जमीन खोताची स्वत:ची, पूर्ण मालकीची म्हणूनच त्याला ‘खोती खासगी’ जमीन म्हणतात. खोती जरी नष्ट झाली तरी ही जमीन खोताचे मालकीची म्हणूनच ठरेल. पुष्कळ खोती गांवाच्या वांटण्या झालेल्या नसून ते गांव अद्याप समाईक आहेत. त्या गांवांत खोतीमध्यें पुष्कळ हिस्सेदार असतात. त्यांपैकीं एकाला सरकार सारा वसूल करून त्यांचा भरणा करण्याकरितां कलेक्टर दरवर्षी नेमतो व त्याला कबुलायतदार खोत म्हणतात. हाच सर्व गांवचा वसूल करतो व त्यांतून सरकारदस्त वारतो. सरकारदस्त भागवून जी शिल्लक राहते तो खोताचा फायदा. ही रक्कम मग खोत हिस्सेदार आपल्या हिश्शांप्रमाणें आपसांत वाटून घेतात. खोती गांवची वांटणी झाली कीं, प्रत्येक खोत-हिस्सेदाराचा वेगळा भाग पडतो त्याला ‘धडा’ म्हणतात. अर्थात् प्रत्येक भागांत अथवा धडयांत त्या त्या हिश्शाचे मानानें कांहीं कायम कुळें असलेली जमीन व कांहीं खोती खासगी जमीन असते. याप्रमाणें वाटणी झाल्यावर प्रत्येक धडा हा आपल्यापुरता वेगळा खोती गांवच बनतो. त्या धडयाच्या खोतानें कुळाकडून वसूल करावयाचा व त्यांतून धडयाचा सरकारदस्त लावावयाचा असतो. इतर धडयाशीं त्याचा कांहीं संबंध नसतो.

खोतीविरुद्ध तक्रारी—खोतीविरुद्ध बऱ्याच तक्रारींचें काहूर अलीकडे करण्यांत आलें होतें. मुंबई कायदे कौन्सिलांत मि. बोले व ॲ.सुर्वे यांनीं खोती नष्ट करावी व खोतांची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमावें असे ठराव कौन्सिल पुढे आणले. कुळांनींही खोत आपल्यावर जुलूम करतात, आपणाला जास्त हक्क मिळावे, आपल्यांपैकीं आणखी कांहींना कायम कुळपणाचे हक्क देण्यांत यावेत वगैरे तक्रारी केल्या. व बरीच चळवळ केली. त्यावरून या बाबतींत चौकशी करण्याचे कामीं दक्षिण भागाचे कमिशनर मि.माउंटफर्ड यांची नेमणूक करण्यांत आली. कमिशनर साहेब यांनीं बऱ्याच बारकाईनें तपास केला व खोत व कुळें यांचें म्हणणें ऐकून घेतलें. तपासाअंतीं कुळांच्या तक्रारी निरर्थक ठरल्या व सरकारनें स्पष्टपणें जाहीर केलें कीं, खोती कायद्यानें खोतांचे व कुळांचे हक्क ठरले गेले आहेत. खोती कायदा पास करण्यापूर्वी म्हणजे सन १८७६ ते ७९ मध्यें जी खोती गांवाची पहाणी करण्यांत आली ती पूर्ण तपास करून करण्यांत आली. त्यावेळीं १८४५ सालचे पूर्वीचीं जीं कुळें ठरलीं गेलीं त्यांना कायद्यानें कायम कुळपणाचे हक्क देण्यांत आले आहेत. त्याशिवाय बाकीचीं कुळें हीं नवीन कुळें आहेत; सबब त्यांस कायम कुळाचे हक्क देणें योग्य नाहीं. खोती नष्ट करणें जवळ जवळ अशक्य आहे. खोती गांवांत सरकारी गांवांपेक्षां जास्त जुलूम कुळावर होतो असें म्हणणें योग्य होणार नाहीं. खोती गांवांत वेठ, बेगार या पद्धति कायद्यानें बंद करण्यांत आल्या आहेत. खोतांची सत्ता कायद्यानें फारच कमी झालेली आहे. सरकारी गांवांत मोठे जमीनदार जितका जुलूम कुळावर करूं शकतात तितकाच फार तर जुलूम खोती गांवांत होतो असें म्हणतां येईल. सारांश, जमीनदार व कुळें हे दोन वर्ग जथें आहेत तेथें कुळें आपणावर जुलूम होतो असें म्हणणारच, मग ते गांव खोती असोत अथवा सरकारी खालसा गांव असोत. परंतु खोती गांवांत कायम कुळाला जमीन गहाण, खरेदी देण्याचा अधिकार नसल्या-

मुळें पिढ्यान्‌पिढ्या तीच जमीन कसणारीं अशीं कुळें पुष्कळ आढळतात. सरकारी गांवांत अशीं कुळें फारच थोडीं दिसून येतात. बहुतेक दोन तीन पिढ्यांतच जमीन गहाण, खरेदी होऊन परकी इसमाकडे जाते. या दृष्टीनें पाहिलें असतां या बंधनामुळें कायम कुळांचा फायदाच झाला आहे असें दिसून येईल.

सरकारी धोरण-- सरकारी धोरण अलीकडे २०।२५ वर्षें तरी कुळांचें बाजूकडें झुकतें आहे. कायम कुळांच्या जमिनीचे वसुलाची रक्कम अथवा पट ठरवितांना कुळांना वाजवीपेक्षां जास्त सवलती देण्यांत येतात असेंच दिसून येईल. कित्येक ठिकाणीं सरकारदरताची फक्त दीडपट इतका वसूल खोतानें घ्यावा असें ठरविण्यांत आलेलीं उदाहरणें दिसून येतात. त्याचप्रमाणें कायम कुळाची जमीन लागोपाठ दोन वर्षें खंड अथवा वसूल न आल्यास खालसा करवून घेण्याचा खोताला हक्क आहे ही गोष्ट खरी. पण त्याप्रमाणें जमीन खालसा करण्याबद्दल कलेक्टरकडे अर्ज केला तर ती क्वचितच खालसा करण्यांत येते. बहुधा कायम कुळाला खंड देण्याला आणखी मुदत देण्यांत येते. व त्याप्रमाणें त्यानें अगदीं थोडा खंड दिला तरी खोताचा अर्ज निकालांत काढण्यांत येतो. याशिवाय पीकपहाणीचे बाबतींत वगैरे खोतावर सरकारी कामगारांची फार करडी नजर असते. खोताला कुळानें वसूल दिला कीं, खोतानें पावती दिलीच पाहिजे याबद्दलही फार खबरदारी घेण्यांत येते. एकंदरींत सरकारी कामगारांचें धोरण कुळांचे बाजूचेंच असतें. याशिवाय कालमानाप्रमाणेंहि खोतांची सत्ता आपोआप कमी होत आहे. पुष्कळशा खोती गांवाच्या वांटण्या होऊन अनेक हिस्सेदारांमध्यें गांवची खोती विभागली गेली आहे. मोठे हिस्सेदार अथवा सबंध गांवचे खोत असे फारसे राहिलेले नाहींत. या खोत हिस्सेदारांमध्यें आपसांत जूट नसते व त्यांपैकीं कांहींचें उलट कुळांना प्रोत्साहन असतें. ज्याप्रमाणें खोतांत फूट पडत आहे तितक्या जोरानें कुळामध्यें जूट होत आहे. त्यामुळें कित्येक गांवांत कुळांचे संप होऊन खोतांच्या स्वतःच्या खासगी जमिनी ओसाड पडण्याची पाळी आली आहे.

(हा लेख विशेषेंकरून रत्नागिरी जिल्हचांतील खोतीसंबंधानें लिहिलेला आहे.)

वऱ्हाडची दुर्धर स्थिति

मध्यप्रांताचा नागपूर म्हणून जो विभाग आहे व मुंबई इलाख्याचा जो खानदेश म्हणून विभाग त्यांच्या मध्यंतरीं उमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा या चार जिल्ह्यांचा मराठी भागच आज वऱ्हाड म्हणून संबोधला जातो. हे चार जिल्हे आज ब्रिटिश सरकारच्या वहिवाटीखालीं राज्यकारभाराकरितां आहेत. पण ह्यांना ब्रिटिशांनीं खालसा केलेले जिल्हे वा मुलूख असें म्हणतां येत नाहीं. मोंगली सत्तेचे धिंडवडे निघाल्यानंतर वऱ्हाडचे हे चार जिल्हे निजाम व नागपूरकर भोसले ह्यांच्यांतील यादवीचे मूळ होते. परंतु मोंगलानंतर वऱ्हाडवर भोसल्यांचीच सत्ता सुरूं झाली होती. इ. स. १८०३ मध्यें निजामाच्या सहाय्यानें इंग्रजांनीं भोसल्यांचा पराभव केला व इंग्रजांनीं निजामचे उपकार समजून अथवा त्याच्या घरबुडव्या स्थितीस उत्तेजन द्यावें म्हणून वऱ्हाडचे हे चार जिल्हे निजामकडे दिले व भोसल्यांचा इतर मुलूख इंग्रजांनीं खालसा केला. त्या मुलुखासच सध्यांचा मध्यप्रांत म्हणतात. ह्या मध्यप्रांतांत मराठी व हिंदी असे दोन भाषा-विभाग आहेत. १८५३ पासून तो १९०३ पर्यंत वऱ्हाडच्या या चार जिल्ह्यांचा मालक निजाम पूर्णपणें बनला होता. परंतु पुढें इंग्रजी फौजेच्या तैनातीचा खर्च निजामास भागेना. यामुळें इंग्रजांचें हें कर्ज निजामाकडे वाढूं लागलें. ह्या करितां निजामानें वऱ्हाड इंग्रजांकडे गहाण टाकला व इंग्रजांनींही तो गहाण करून घेतला. ह्याप्रमाणें १८५३ सालापासून निजामाकडून इंग्रजाकडे वऱ्हाड गहाण म्हणून ताब्यांत आला. आणि १८५३ ते १९०२ पर्यंत वऱ्हाड हा रेसिडेन्सी मुलूख म्हणून इंग्रजांनीं त्याचा राज्यकारभार हांकला. वऱ्हाड ज्यावेळीं निजामानें गहाण दिला त्यावेळीं निजामास इंग्रजांचें कर्ज किती होतें व पुढें तें किती फिटलें व किती राहिलें ह्याचे आंकडे लोकांना उपलब्ध होतील असें कोठेंहि आढळत नाहींत. तथापि ह्या पन्नास वर्षांत वऱ्हाडला स्वतंत्र हायकोर्ट होतें व नवशिक्षणाची ज्योतही वाढली होती. सर्व प्रकारच्या भौतिक सुधारणा वाढत होत्या. ह्या परिस्थितींत वऱ्हाडचे चार जिल्हे मूळचे पन्नास लक्ष रुपये उत्पन्नाचे असूनहि एक कोटीपर्यंत वाढत होते. १८५३ ते १९०२ पर्यंतची जी वऱ्हाडची स्थिति होती त्या परिस्थितींतच वऱ्हाडला सोन्याची कुऱ्हाड म्हणण्याचा प्रसंग प्राप्त झाला होता. ह्या अवधींत हिंदुस्थानच्या

नकाशावर मराठी भाषा बोलणारा जो भाग आहे त्या सर्वभागापेक्षां,मग तो भाग निजामाच्या नियंत्रणाखालील असो वा इंग्रजी खालसा मुलुखांतील असो, त्या सर्व भागापेक्षां वऱ्हाड सर्व दृष्टीनें समृद्ध, सुखी, आनंदी व तसाच विलासी होता. वऱ्हाडच्या मनाचें औदार्य ह्याच स्थितींत प्रकाशमान झालें होतें. पण १९०२ सालाला ही स्थिति पाहवली नाहीं. लॉर्ड कर्झन व्हाईसरॉय असतांना ज्या अनेक संस्मरणीय अशा घडामोडी ह्या देशांत झाल्या त्यांत वऱ्हाडची झालेली देवाणघेवाण ही अधिक संस्मरणीय आहे. पण वऱ्हाडचा हा वृत्तांत असावा तितका जाणत्या लोकांच्याही स्मरणांत नाहीं. त्यामुळें वऱ्हाडच्या प्रश्नाला यावें तसें महत्त्व राजकीय घडामोडींत येत नाहीं.

१९०२ इसवीमध्यें लॉर्ड कर्झन यांनीं वऱ्हाड हा कायमचा भाड्यानें घेतला. निजामास सालाचे पंचवीस लक्ष रुपये देऊन व त्याच्या नांवानें त्याच्या वाढदिवसाचें निशाण उभारून व तोफांची सलामी झाडून कायमचा भाड्यानें घेतला. आणि ब्रिटिश पार्लमेंटनें वऱ्हाडची व्यवस्था हिंदुस्थान सरकारच्या 'फॉरीन ज्युरिस्डिक्शन' खात्याच्या स्वाधीन केली. हिंदुस्थान सरकारचें हें 'फॉरीन ज्युरिस्डिक्शन' खातें वऱ्हाडची राज्यव्यवस्था कशी करतें ही गोष्ट सांगण्यापूर्वी निजाम व इंग्रज ह्यांचें वऱ्हाडच्या बाबतींत आतांपर्यंत काय बोलणेंचालणें झालें हें पाहणें हेंच अधिक उपयुक्त आहे. १८५३ मध्यें निजामानें वऱ्हाड इंग्रजांना ताबेगहाण दिला हें खरें. पण १८७८ मध्यें निजामानें वऱ्हाड परत मिळावा असा प्रयत्न केला होता. अर्थात् इंग्रजांचें निजामाला असलेलें देणें फिटलें अशी कदाचित् निजामाची समजूत असेल. पण निजामाच्या ह्या वेळच्या मागणीला त्या वेळच्या स्टेट सेक्रेटरीनें जें उत्तर दिलें त्या उत्तरांत वऱ्हाडविषयीं इंग्रजांची भावना काय होती व आहे हें स्पष्ट प्रगट होतें. "ही कांहीं परस्परांमधील मानापमान, महसूल अगर वैयक्तिक सुखाची गोष्ट नव्हे, तर हा वीस लाख लोकांच्या जीविताचा व संपत्तीचा प्रश्न आहे' असें स्टेट सेक्रेटरी लिहितात. ह्याचा स्पष्ट अर्थ हा कीं, राज्यविस्ताराच्या भावनेनें, उत्पन्नाच्या लालसेनें,किंवा चैनीच्या दृष्टीनें वऱ्हाडवर इंग्रजांना राज्यव्यवस्था करावयाची नाहीं, तर वीस लक्ष लोकांचें (१८७८ मधील लोकसंख्या) जीवित व मालमत्ता ह्यांचें संरक्षण करण्याची ही जबाबदारी आहे. वऱ्हाडच्या लोकांच्या हिताकरितां इंग्रजांनीं वऱ्हाड ताब्यांत घेतला. निजामी प्रजेवर जी इंग्रज प्रभूची कृपा होऊं शकली नाहीं व अद्याप होत नाहीं ती वऱ्हाडवर ह्या निजामाच्या मुलुखावर झाली. आणि म्हणूनच १९०२ मध्यें वऱ्हाड कायम भाड्यानें इंग्रजांनीं घेतला. कायम भाड्यानें वऱ्हाड घेतल्यावर त्याची पूर्वीसारखीच वेगळी व्यवस्था चालविली असती तर वऱ्हाडला आज जें दैन्य आलें तें प्राप्त झालें नसतें. हैद्राबादच्या रेसिडेंटाचा अंमल जाऊन मध्यप्रांताच्या चीफ कमिशनरच्या ताब्यांत जरी हा वेगळा प्रांत राहिला असता तरी वऱ्हाडला इंग्रजांनीं फसविलें असें म्हणतां आलें नसतें. परंतु हिंदुस्थान सरकारच्या 'फॉरिन ज्युरिस्डिक्शन' खात्यानें तो नागपूरच्या चीफ कमिशनराकडे १९०२ नंतर व्यवस्थेला दिला. त्यावेळीं वऱ्हाडचें उत्पन्न जवळजवळ एक कोटी होतें. मध्यप्रांताच्या चीफ कमिशनरानें वऱ्हाड स्वतःच्या ताब्यांत घेऊन वऱ्हाडचें हायकोर्ट तर उठविलेंच उठविलें. पण सहा जिल्ह्यांचे चार जिल्हे करून खर्चहि कमी केला आणि सिव्हिलियनांना वाढता पगार दिला. इतकेंच नव्हे तर वऱ्हाडचें व मध्यप्रांताचें उत्पन्न एक करून मध्यप्रांताच्या खर्चाच्या तुटींत भर घातली. आणि मध्यप्रांत सुधारल्याचें श्रेय मिळविलें. मध्यप्रांताच्या चीफ कमिशनरानें ही जी वऱ्हाडच्या कारभारांत आनागोंदी ढवळाढवळ केली, ती काय वऱ्हाड भाड्यानें घेतला व तो येथील लोकांच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन घेतला ह्या समजुतीनें केली? वऱ्हाडचा खर्च जातां, राहील ती रक्कम वऱ्हाडकरतांच खर्च केली असती वा शिल्लक असती तर ही व्यवस्था वऱ्हाडकरितां आहे असें म्हणतां आलें असतें. किंवा शिल्लक रकमेंतून निजामाचें कर्ज आम्ही फेडून घेतो असें म्हटलें असतें तरी कांहीं अर्थ होता. पण निजामाकडे येणें किती होतें व तें १८५३ ते १९०२ पर्यंत किती राहिलें होतें आणि राहिलेल्या रकमेच्या वसुलीकरितां कोणत्या हिशेबानें कायम भाडेपट्टा केला ह्याचा कोठेंच कांहीं थांग लागत नाहीं. ह्यावरून वऱ्हाडी लोकांचें संरक्षण व कायम भाडेपट्टा ही भाषा कागदावर; पण खरा वऱ्हाड निजामाला थापाथुपा देऊन घशांतच घातला असें चीफ कमिशनरच्या व्यवस्थेवरून सिद्ध होऊं लागलें. तथापि कायद्याच्या भाषेंत वऱ्हाड खालसा मुलूख होय असें म्हणण्याची छाती होईना. वऱ्हाडच्या कारभारांत अशी अनागोंदी सुरूं आहे अशी ओरड सुरूं असतांच १९२०

च्या मॉन्टफर्ड सुधारणा सुरुं झाल्या. ह्यामुळें वऱ्हाडच्या रयतेच्या हक्काची कशी पायमल्ली होत आहे ही गोष्ट रा. ब. मुधोळकर यांनीं मॉंटेग्यु च्या कानावर घालण्याचा चिकाटीनें प्रयत्न केला व त्या प्रयत्नाचें फळ म्हणूनच मॉन्टेग्यूच्या रिपोर्टींत वऱ्हाड हा प्रांत स्वतंत्र करण्याच्या लायकीचा आहे असा शेरा लाभला. १९२० च्या सुधारणांत वऱ्हाडचे प्रतिनिधी मध्यप्रांत कायदेमंडळांत, लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत व कौन्सिल ऑफ स्टेट-मध्यें जाऊन बसले. हे सर्व प्रतिनिधी लोकनियुक्त खरे. पण त्यांना सरकारनियुक्त समजण्याचा मान मिळाला.! कारण वऱ्हाड हा खालसा मुलूख नव्हे. तर वऱ्हाडचा मुलूख हा हक्कानें निजामाचा व बहिवाटीनें इंग्रजांचा. अर्थात् हिंदुस्थान सरकारच्या फॉरिन ज्युरिस्‌डिक्शन खात्याच्या अंमलाखालचा, असें स्पष्ट झालें. अशा प्रकारें प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत जरी वऱ्हाडच्या प्रतिनिधींचा समावेश झाला तरी त्यांना वऱ्हाडविषयीं तेथें कांहीं बोलताचालतां येतें असें मुळींच नाहीं. इतरांच्या कारभारांत मात्र ढवळाढवळ करतां येते. म्हणजें स्वतःच्या घरांत पारतंत्र्य, पण दुसऱ्याच्या घरांत मालकी अशी वऱ्हाडच्या प्रतिनिधींची शोचनीय स्थिति आहे.

१९२० पूर्वी चीफ कमिशनराच्या कारभारानें वऱ्हाडच्या कारभारास जें जवळजवळ खालसा मुलुखाच्या कारभाराचें स्वरूप आलें होतें तें १९२० नंतर गव्हर्नरच्या कारभारांत नष्ट होऊं लागलें. राज्यकारभाराच्या सोयीकरितां वऱ्हाड जरी मध्यप्रांताला जोडला म्हणजे मध्यप्रांत सरकारच्या नियंत्रणाखालीं दिला, तरी वऱ्हाडचा खर्च वजा जातां वऱ्हाडचें राहिलेलें उत्पन्न त्या सरकारनें फस्त करावें असा त्याचा अर्थ नव्हता. वऱ्हाड हा वेगळा प्रांत आहे असें समजूनच कारभार चालवावयास पाहिजे होता. परंतु चीफ कमिशनरानें १९२० पूर्वी जो घोंटाळा करून ठेवला होता, त्यांतून वऱ्हाड हा विभक्त समजला जावा असा प्रश्न पुढें उत्पन्न झाल्यावर मध्यप्रांत व वऱ्हाड यांच्यांतील एकत्र जमाखर्चांतून वऱ्हाडचें विभक्तीकरण कसें मानावें हा प्रश्न उत्पन्न झाला व त्याकरितां सीम—कमिटी निर्माण झाली व तिनें खर्चाची वांटणी सुचविली. व ती सरकारासहि तत्त्वतः मान्य झाली.वऱ्हाडच्या चार जिल्हयांचें उत्पन्न दोन कोट रुपये व मध्यप्रांताच्यां १८ जिल्हयांचें उत्पन्न ३॥ कोट रु. म्हणजे मध्यप्रांत-वऱ्हाडचें एकंदर साडपांच कोट रुपये उत्पन्न धरून खर्चात समाईक खर्च व विभक्त खर्च असे दोन भाग पडले. समाईक खर्च सव्वाचार कोटीपर्यंत धरला आहे व विभक्त खर्च सव्वा कोटीचा धरला आहे. गव्हर्नर, याचें सेक्रेटरीएट वगैरेचा खर्च चाळीस लक्षांचा समाईकच आहे. वऱ्हाड मिळून बावीस जिल्हयांचा ४। कोटींचा हा समाईक खर्च वजा जातां राहिलेल्या सव्वा कोटींत ३:२ ह्या प्रमाणांत मध्यप्रांत व वऱ्हाड यांत वांटणी केली. ह्या वांटणीप्रमाणें सुद्धां हिशेब वऱ्हाडच्या वाटयास येत नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं, वऱ्हाडचा जमाखर्च वेगळा ठेविला पाहिजे ही गोष्ट कशी तरी सरकारास मान्य झाली व वऱ्हाडकरितां एक निराळी कायदेकमिटी स्थापन करून तिला कांहीं वाढते अधिकारहि प्राप्त होऊं लागले. ह्या सर्व गोष्टींचा स्पष्ट अर्थ असा झाला कीं, वऱ्हाड हा निजामाच्या मालकीचा खरा; पण त्याची बहिवाट इंग्रजांकडे असल्यामुळें तो एक स्वतंत्र प्रांत आहे ही गोष्ट ब्रिटिशांना दहाबारा वर्षांत हळूहळू कबूल करावी लागली. ह्यावरून वऱ्हाड विभक्त करा ही वऱ्हाडची नवी मागणी नसून निजामाकडून वऱ्हाड घेतांना सरकारानें वापरलेल्या भाषेचाच हा परिणाम आहे. अशा स्थितींत १९२५ मध्यें निजामानें वऱ्हाड परत मिळावा म्हणून प्रयत्न चालविले असतां, त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड रेडिंग ह्यांनीं निजामास असें निकालाचें उत्तर दिलें कीं, झालेल्या करारमदारान्वयें ब्रिटिश सरकाराला तोडून दिलेल्या प्रांताची व्यवस्था त्यांना योग्य वाटेल तशी त्यांनीं ठेवावी असेंच ठरलें आहे. असें खणखणीत उत्तर देऊन निजाम व इंग्रज ह्यांच्यांत जो कांहीं एक करार होता त्या करारास एक प्रकारचा निश्चित अर्थ करून दिला. अर्थात् वऱ्हाडसंबंधानें ह्यानंतर निजाम जबाबदार नसून इंग्रजच स्वेच्छेनुरूप जबाबदार आहेत ही गोष्ट स्पष्ट झाली. आणि इंग्रजांनीं हिंदुस्थानांत संयुक्त घटना प्रस्थापित करण्याचा व आपल्या प्रांतांना स्वायत्तता देण्याचा संकल्प सोडल्यावर हिंदुस्थान सरकारच्या 'फॉरिन ज्युरिस्‌डिक्शन' खात्याच्या वर्चस्वाखालीं असलेल्या वऱ्हाडनेंच स्वायत्त होऊन संयुक्त घटनेंत स्वतंत्र म्हणून कां बसूं नये? कां हिंदुस्थान सरकाराच्या परदेशीय खात्यानें वऱ्हाड वरच सुलतानशाही चालवावी व इतर प्रांतानें स्वतंत्र व्हावें यांत हिंदुस्थानचें तरी स्वातंत्र्य कसें अभिप्रेत होतें?

भावी संयुक्त घटनेंत संस्थानिकांचे तह व करार हे बादशहाशीं निगडित राहणार. अर्थात्

वऱ्हाड हा या दृष्टीनें बादशहाच्या वहिवाटीखालील प्रांत राहणार. बादशहा आपल्या प्रजाजनांना स्वायत्त करणार आणि बादशहाच्या वहिवाटीखालील वऱ्हाडला तसेंच ठेवणार हें तरी न्याय्य कसें? अशा प्रकारें वऱ्हाडच्या स्वायत्ततेचा प्रश्न न्याय्य असला तरी हा चार जिल्ह्यांचा प्रांत वेगळा केला तर त्याचा खर्च भागेल काय? व हा लहान प्रांत अलग राहून त्याची प्रगति होईल काय, हाच त्यांतल्यात्यांत महत्त्वाचा प्रश्न आहे. मध्यप्रांत–वऱ्हाडचा गव्हर्नरासह समाईक खर्च बावीस जिल्ह्यांचा मिळून चार कोटींचा धरला तर वऱ्हाडच्या चार जिल्ह्याच्या वांट्यास एकंदर खर्च ऱ्याहत्तर लक्षांचा होतो. यांत प्रांतास अनुरूप असा गव्हर्नराचा खर्च घातला तर अधिकाधिक एक कोटीचा खर्च होईल. पण वऱ्हाडचे चार जिल्हे दोन कोटी रुपयांच्या उत्पन्नाचे आहेत. यांतून एक कोटी रुपये गेले तर राहिलेले एक कोट रुपये विभक्त खर्चाकरितां राहतात. हें सध्यांच्याच हिशेबानें स्पष्ट होतें. शिवाय उत्पन्न वाढवून घेण्याच्या सोयीही वऱ्हाडांत आहेत. यासहि उत्तेजन मिळेल. तेव्हां खर्चांत तूट येईल ही सबब व्यर्थ आहे. आतां निजामाला मालकी हक्काबद्दल जे सालीना पंचवीस लक्ष द्यावे लागतात ते हिंदुस्थान सरकारला जें वऱ्हाडचें उत्पन्न आहे त्यांतून दिले जातात. तेव्हां ह्या पंचवीस लक्षाची धोंड सध्यांच्या प्रांतिक उत्पन्नावर येत नाहींच. आतां लहान प्रांत होतो हें खरें. पण पृथ्वीच्या पाठीवर वऱ्हाडएवढे स्वतंत्र देश नाहींत काय? आणि जीं संस्थानें संयुक्त घटनेंत स्वतंत्र घटक बनणार तीं काय सर्वच वऱ्हाडपेक्षां मोठीं आहेत? तेव्हां हा लहानपणाचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. अशा प्रकारें एकदां हिंदुस्थान सरकारच्या फॉरिन ज्युरिस्‌डिक्शन खात्याच्या मगरमिठींतून वऱ्हाड स्वायत्त झाला म्हणजे मग,भाषावार प्रांत रचनेनें जर प्रांत विभागले गेले तर त्यांत सामील व्हावयास वऱ्हाड स्वतंत्र राहील. म्हणून वऱ्हाडपुढें पहिला प्रश्न त्यानें स्वायत्त होणें हाच आहे. याची रचना आज निजामाचा मुलूख पण वहिवाट ब्रिटिशांची अशी आहे. आणि यावर हिंदुस्थान सरकारच्या परदेशी खात्याची एकतंत्री सासू आरूढ झाली आहे. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन तो स्वायत्त होणें कां जरूर आहे ह्याचा न्याय्य बुद्धीनें सर्वांनीं विचार करावा अशी विनंति आहे. म्हणूनच प्रत्येक प्रांताचीं जीं गाऱ्हाणीं आहेत त्यापेक्षां वऱ्हाडचें गाऱ्हाणें जुनें व महत्त्वाचें आहे, हेंहि त्याबरोबर सर्व राष्ट्राच्या दृष्टीनें विचार करणारानें लक्षांत घेणें अवश्य आहे.

'वऱ्हाड निजामास परत द्यावा काय?' असा प्रश्न जर कोणत्याहि वऱ्हाडच्या माणसास कोणीही टाकला तरी त्यास 'नाहीं' हेंच उत्तर येईल. तद्वतच वऱ्हाडनें आहे तसेंच मान झुकवून सांप्रतच्या हिंदुस्थान सरकारच्या 'फॉरिन ज्युरिस्‌डिक्शन' खात्याची गुलामगिरी पत्करून राहावें काय,असें जर कोणी म्हटलें तर त्यासहि तितक्याच जोरानें वऱ्हाडचा नागरिक'नाहीं' हेंच उत्तर देईल. वऱ्हाडनें 'फॉरिन ज्युरिस्‌डिक्शन' खातें मान्य करावयाचें नाहीं, म्हणजे आहे ह्या स्थितींत वऱ्हाड राहूं इच्छित नाहीं, असें वऱ्हाडनें म्हटलें कीं, इंग्रज अधिकारी सांगतात कीं, मग आम्हांला वऱ्हाड निजामालाच द्यावा लागेल. तेव्हां वऱ्हाड निजामास द्यावा काय, हा सवाल इंग्रज प्रथम उत्पन्न करितात व यास वऱ्हाडचे जे हितशत्रू आहेत ते उचलून धरतात, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. गेल्या आक्टोबरमध्येंच मुंबईच्या क्रॉनिकलमध्यें व मद्रासच्या हिंदूमध्यें दिल्लीची वऱ्हाडच्या बाबतींत अशी तार प्रसिद्ध झाली कीं, 'तिसरी वर्तुळ परिषद आटोपली कीं, वऱ्हाडचा प्रश्न पुढीलप्रमाणें सुटेल असें जवळ जवळ निश्चित झालें आहे. (१) वऱ्हाडवर निशाण निजामाचें राहील. (२) वऱ्हाडांत निजामाचा जन्मदिवस साजरा होईल. (३) निजामचा युवराज हा वऱ्हाडचा युवराज ठरेल. (४) वऱ्हाडतर्फे निवडून जाणारे वरिष्ठ कायदेमंडळामधील प्रतिनिधी आज व्हाइसरॉय मान्य करतो त्याऐवजीं त्यांना निजामाची मान्यता मिळेल. (५)आणि वऱ्हाडबद्दल जे पंचवीस लक्ष आज निजामाला मिळतात त्याबद्दल निजाम आपले स्टँप वऱ्हाडांत चालवील. अशा रीतीनें वऱ्हाडवर निजामाची सत्ता प्रस्थापित होणार' ही बातमी वाचून वऱ्हाडच्या बाहेरच्या लोकांना वऱ्हाड निजामाच्या घशांत जाणार अशी भीति वाटणें साहजिक आहे. पण वऱ्हाडकरांना ही बातमी वाचून अगर ऐकून ती गांज्याच्या चिलमींतून प्रसवली आहे असें वाटलें. कारण आजहि निजाम वऱ्हाडचा राजा आहे. त्याचें निशाण आजहि वऱ्हाडवर आहे. त्याचा जन्मदिवस आजहि साजरा होतो.निजामाचा युवराज आजहि वऱ्हाडचा युवराज आहे. तेव्हां ह्यांत नवीन काय? ह्या बातमींत नवीन जर कांहीं असेल तर तें हें कीं, वऱ्हाडबद्दल पंचवीस लक्षाची रक्कम दरसाल उकळण्याकरितां निजाम

आपला वऱ्हाडांत स्टँप चालविणार. अर्थात् ह्या रकमेची गॅरंटी वऱ्हाडच्या रयतेकडून स्टँप चालवून निजाम घेणार. म्हणजे ह्या रकमेला इंग्रज जबाबदार राहिला नाहीं, हाच सरळ अर्थ आहे, आणि म्हणूनच वऱ्हाडच्या प्रतिनिधींना व्हाइसरॉयऐवजीं निजामाची मान्यता चालणार. आणि बाकीचा कारभार लोकांचा लोकांच्या स्वाधीन होणार. अर्थात् लोकांना मिळणाऱ्या ह्या स्वातंत्र्याचें निजामापासून कायमचें संरक्षण होईल अशी जबाबदारी कोणी तरी घेतलीच पाहिजे. १९०२ चा तह जर विचारांत घेतला व वरील बातमीकडे पाहिलें तर तो तह बदलला अगर बदलणार असेंच म्हणण्याचा प्रसंग आहे. कारण मध्यवर्ति सरकारास आज जें वऱ्हाडचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचें मिळून ५८ लक्ष, ६८ हजार, ३०० रु. उत्पन्न आहे आणि निजामास दरसाल द्यावयाचे पंचवीस लक्ष वरील बातमी-प्रमाणें स्टँपरूपानें प्रांतिक खात्यांतून वसूल झाल्यावर मध्यवर्ति सरकारास वऱ्हाडची ४८ लक्ष ४९ हजार २०० रु. शिल्लक उरणार हें उघड आहे. ही शिल्लक जें मध्यवर्ति सरकार घेईल त्या सरकारास वऱ्हाडच्या हक्काचें निजामा-पासून संरक्षण करावेंच लागेल. संयुक्त घटना अंमलांत आल्यावर वऱ्हाडचा प्रश्न वरील बातमी प्रमाणें सुटणार असला तर संयुक्त सरकारच्या स्वाधीनच वऱ्हाडच्या हक्कांच्या संरक्षणाची बाब राहील. पण संयुक्त सरकाराच्या स्वाधीन जों-पर्यंत लष्कर व परदेशीय संबंधाचीं खातीं याव-याचीं नाहींत तोंपर्यंत इंग्रजच ह्या बाबीस जबाब-दार राहणार. अर्थात् इंग्रज राज्यव्यवस्था वऱ्हाड ची वऱ्हाडनें करावी म्हणणार, आणि हा हक्क निजामानें हिरावून घेऊं नये म्हणून आम्ही तुमचें रक्षण करणार असेंच म्हणणार. इतका स्पष्ट अर्थ जर वरील बातमीच्या मागें असला असें मानलें तर, वऱ्हाड निजामाकडे गेला ह्यांत नवीन कांहीं घडलें असें आम्हांला वाटण्याचा संभव नाहीं. परंतु दरसालचे २५ लक्ष वसूल करण्याकरितां निजामाचा स्टँप वऱ्हाडांत चालणार हें जें वरील बातमींत आहे त्यावरून प्रांतिक उत्पन्नावर निजामाची धोंड बसणार हें उघड आहे. आज वऱ्हाडचें उत्पन्न २ कोट २ हजार ७५० रु. आहे. ह्यांतून वऱ्हाडचा खर्च वजा जातां ४४ लक्ष ३४ हजार १०० रु. शिल्लक राहते. ह्यांतून स्टँपाचें उत्पन्न निजामास गेलें म्हणजे काय शिल्लक राह-णार.? अर्थात् तें उत्पन्न काढून घेण्याकरितां निजामाचा हात वऱ्हाडच्या व्यवस्थेंत शिरणार हेंहि उघड आहे. वऱ्हाडची व्यवस्था १९०२ च्या तहान्वयें इंग्रजांकडून कारभारापुरती वऱ्हाडकडेच आली तर तह बदलविण्याची गरज पडत नाहीं. पण कोणत्याहि निमित्तानें निजामाचा हात व्यव-स्थेंत आला कीं, तह हा बदलला हाच अर्थ होतो. आणि १९०२ चा निजाम व इंग्रज ह्यांच्यांत वऱ्हाडबद्दल झालेला तह बदलत नाहीं असें लॉर्ड रेडिंगसारखे व्हाइसरॉय स्पष्ट बोलले आहेत. हा १९०२ चा तह न बदलणारा आहे म्हणून, तुमच्या-कडील वऱ्हाडची व्यवस्था वऱ्हाडला द्या असें इंग्रजांना वऱ्हाड म्हणतो. ह्याचा अर्थ वऱ्हाड निजामास राज्यव्यवस्थेला द्या असा होत नाहीं. वऱ्हाडची व्यवस्था वऱ्हाडच्या स्वाधीन न करतां इंग्रज आपल्या लहरीनें करीत राहिले तर वऱ्हाड निजामास म्हणेल कीं, आपण तर आमचे राजे. वऱ्हाडची व्यवस्था आमच्या स्वाधीन करून व त्यास संरक्षण देऊन तुम्ही जर आमचे राजे राहिलां तर आम्हांस चालेल. कशाकरितां? तर इंग्रजां-कडून वऱ्हाडची व्यवस्था वऱ्हाडच्याच स्वाधीन व्हावी म्हणून! हें सामर्थ्य निजामांत नाहीं हें वऱ्हाड जाणून आहे. पण ह्या लोभानें दोन सत्ता-धिशांची झुंज घटकाभर झाली तर हवी. तात्पर्य काय कीं, वऱ्हाड निजामाचाच आहे. आणि १९०२ चा तह बदलवून घेण्याचें सामर्थ्य जोंपर्यंत वऱ्हाडांत नाहीं तोंपर्यंत वऱ्हाड निजामाचाच राहणार. पण राज्यव्यवस्थेला तो निजामाचा होऊं इच्छित नाहीं. तेव्हां वऱ्हाड निजामाकडे परत द्यावा काय? म्हणजे राज्यव्यवस्थेकरितां परत द्यावा काय, असा जर कोणी प्रश्न टाकला तर वऱ्हाड एक-मुखानें नाहींच म्हणेल. पण आहे हेंच निजामाचें राजेपण कायम ठेऊन वऱ्हाडची व्यवस्था वऱ्हाड-च्या स्वाधीन—हक्क संरक्षणाची जबाबदारी घेऊन जर कोणी करीत असला तर त्यास वऱ्हाड नकार द्यावयाचा नाहीं, हेंहि तितकेंच खरें. आणि सामर्थ्य आज ब्रिटिश सत्तेंतच असल्यामुळें ब्रिटिशां कडूनच वऱ्हाड आपली व्यवस्था आपल्याकडे घेईल व या व्यवस्थेस त्यासच संरक्षण मागेल. अशा प्रकारें वऱ्हाडचा प्रश्न तहाच्या मर्यादेंत असल्यामुळें गुंतागुंतीचा व भानगडीचा आहे.

जर्मन खंडणी व तिच्यापासून उत्पन्न होणारे बिकट प्रश्नः–

इ. स. १९१४–१८ या कालखंडांत झालेल्या प्रचंड महायुद्धामध्यें जर्मन राष्ट्राचा पूर्ण पाडाव झाला. हें युद्ध पुकारतेवेळीं, व नंतर तें चालू असतांना देखील दोस्त राष्ट्रें अशी वारंवार घोषणा करीत कीं, स्वातंत्र्य, समता, स्वयंनिर्णय अशा उदात्त तत्त्वांच्या संरक्षणासाठींच केवळ त्यांना हत्यार उपसणें भाग पडलें. इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. लॉइड जॉर्ज व अमेरिकेचे प्रेसिडेंट मि. वुड्रो विल्सन यांच्या भाषणांतून अशा उच्च हेतूंचा सदोदित उच्चार होई. इतकेंच नव्हे तर, अनेक वेळां असें आश्वासन देण्यांत आलें होतें कीं, युद्धाचा शेवट होऊन दोस्त राष्ट्रांना जरी यश आलें तरी जित राष्ट्रांवर खंडणी लादणें अथवा त्यांच्या प्रदेशाचे लचके तोडून जेत्या राष्ट्रांनीं ते आपल्या घशाखालीं उतरविणें अशा इतिहासप्रसिद्ध परंतु आसुरी व अन्यायी प्रकारांची पुनरावृत्ति या अपूर्व युद्धाच्या समाप्तीनंतर खास होणार नाहीं.

महायुद्धांत दोस्त राष्ट्रांना यश लाभलें. पण त्यांची ध्येयनिष्ठा मात्र टिकून राहिली नाहीं. जर्मनीसारख्या जबरदस्त राष्ट्रास जबर खंडणीची शिक्षा फर्माविली पाहिजे असा नीतिनिर्णय विजयी राष्ट्रांनीं सांगितला व जर्मन देशावर खंडणीचें ओझें लादणारें विस्तृत कलम तहनाम्यांत प्रशस्तपणें गोवण्यांत आलें!.

याप्रमाणें खंडणी घेण्याचें ठरलें. पण तिची आकारणी कशी करावी व एकंदर रक्कम किती ठरवावी इत्यादि प्रश्नांवर रणें माजलीं. महायुद्धामुळें बेल्जम, फ्रान्स व इतर दोस्त राष्ट्रें यांचा व्यापार बुडाला, उद्योगधंद्यांची राख रांगोळी झाली, जमिनजुमला उध्वस्त झाला, घरेंदारें बेचिराख झालीं. या अपरिमित नुकसानीची भरपूर भरपाई जर्मनीकडून चोपून घ्यावी असा आक्रोश जेत्या राष्ट्रांतील प्रजाजन करूं लागले. एकंदर नुकसानीची पैशांत गणति करतांना विवेकी अंकगणितापेक्षां स्वार्थी कल्पनेच्या स्वैर भरारीला अवसर देण्याकडे विजयी देशांची प्रवृत्ति दिसू लागली. १२०० कोटी पौंड इतक्या अगडबंब संख्येचा उच्चार होऊं लागला.

तहपरिषदेला या संबंधांत कांहीं नक्की निर्णय करतां येईना. तेव्हां हा सर्व प्रश्न एका लहानशा तज्ज्ञ मंडळाकडे सोंपवावा असें त्या परिषदेनें ठरविलें व त्याप्रमाणें 'खंडणी मंडळ' या नांवाची संस्था अस्तित्वांत आली. वर्ष दीड वर्षावर वाटाघाट करून या मंडळानें असें मत दिलें कीं, एकूण सुमारें ६६० कोटी पौंड इतकी रक्कम दोस्त राष्ट्रांस जर्मनीकडून मिळणें न्याय्य व अवश्य आहे आणि ती देणें जर्मनीस शक्यही आहे. तज्ज्ञांच्या या मताच्या स्वीकार दोस्त राष्ट्रांनीं केला व त्याप्रमाणें जर्मनीकडे खंडणीची मागणी करण्यांत आली.

डॉस कमिटीची नेमणूक व तिनें केलेली योजनाः- तथापि एवढी मोठी रक्कम भरणें जर्मनीच्या शक्तीपलीकडचें आहे आणि म्हणून तिची मागणी मान्य करणें अशक्य आहे असा निर्वाणीचा जबाब जर्मन मुत्सद्यांनीं लगेच दिला. दोन वर्षेपर्यंत पुष्कळ बाचाबाची होऊन जर्मनी आणि फ्रान्स यांच्यामधील तेढ वाढत गेली. खंडणीची वरील मागणी अमान्य केल्याबद्दल शिक्षा म्हणून फ्रान्सनें जर्मनीचा रूर प्रांतदेखील आक्रमण केला. तरी या प्रश्नाचा निकाल लागेना. उलट देणेकऱ्यांच्या दिवाळखोरीची आत्यंतिक भीति उत्पन्न झाली. तेव्हां नाइलाज म्हणून सर्व प्रश्नांचा फेरविचार करणें प्राप्त झालें. त्या कार्यासाठीं अमेरिकेंतील एक विख्यात नागरिक जनरल डॉस यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें खंडणी फेडण्याची एक लांबलचक योजना तयार केली व जर्मनीसुद्धां सर्व राष्ट्रांनीं तिला संमति देऊन ती अमलांत आणण्याचें कबूल केलें.

खंडणीची एकूण मुद्दली रक्कम किती असावी या वादग्रस्त व कलहमूलक प्रश्नाचा विचारच करावयाचा नाहीं असें डॉस कमिटीनें ठरविलें. कारण खंडणीची मुदली रक्कम कितीही ठरविली तरी, तिची भरपाई एकदम एका वर्षांत होणें स्वप्नांत देखील शक्य नाहीं हें त्या कमिटीस पटलें. वार्षिक हप्त्यांनींच खंडणीची फेड होणें शक्य आहे. अर्थात् धनको राष्ट्रांना देखील तात्काळ व्यवहार्यतेच्या दृष्टीनें खंडणीवसुलीचे हे वार्षिक हप्ते प्रत्येकीं किती रकमेचे असावेत या प्रश्नाचा निकाल लागला तर हिताचें होतें. खंडणी कर्जाची एकूण वटरक्कम मागाहून ठरली गेली तरी चिंता नव्हती. डॉस कमिटीनें मोठ्या चातुर्यानें मुद्दलाचा व हप्तेबंदीचा, असे दोन प्रश्न एकमेकांपासून अलग केले; आणि त्यांनीं आपली योजना फक्त हप्तेबंदीपुरतीच मांडली. यशाच्या धुंदीमुळें दोस्त राष्ट्रांतील जनसमुहाच्या भावना उच्छृंखल झालेल्या आहेत, अशा प्रसंगीं मुद्दली रक्कम ठरवितां येण्यास अवश्य असणारी शांत व निर्विकार मनःस्थिति रहाणें शक्य नाहीं असें कमिटीनें मत दिलें.

शिवाय ती रक्कम निश्चित होणें तावडतोब अवश्यही नव्हतें.

खंडणीची भरपाई वार्षिक हप्त्यांनीच करावयाची इतकें धोरण कायम झाल्यावर,या हप्त्यांची रचना कशी करावयाची हा पुढचा प्रश्न सोडविणें प्राप्त झालें. हप्ते भरणारा देश जर्मनी. तो देश वार्षिक कर्ज फेडणार कशांतून? अर्थात् स्वतःच्या वार्षिक उत्पन्नांतून.हप्त्यांचा बोजा व त्या राष्ट्रांचें वार्षिक उत्पन्न यांचा नीट मेळ बसला पाहिजे. नाहींतर बोजा डोईजड होऊन त्याची वसुली होणें अशक्य होणार. दरवर्षी जर्मनीकडून जास्तीत जास्त किती रक्कम वसूल करून घेतां येईल, या मुद्याकडे डॉस कमिटीनें विशेष लक्ष दिलें. जर्मनीच्या एकंदर सांपत्तिक स्थितीचें संशोधन करण्याच्या भरीस न पडतां फक्त त्या राष्ट्राची दरवर्षी आवक किती होत असेल तिचा सूक्ष्म अंदाज करण्यांत कमिटीच्या तज्ज्ञ निरीक्षकांनीं मन घातलें. आणि त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीवरून शेवटीं त्यांनीं आपली योजना तयार केली.

डॉस कमिटीचे मुख्य विशेष खालीं दिल्याप्रमाणें होतेः—

(१) जर्मन खंडणीची ऐनमुद्दली रक्कम निश्चित करूं नये.

(२) खंडणीची फेड वार्षिक हप्त्यांनीं करण्यास सुरुवात व्हावी. १९२८–२९ सनापासून प्रतिवर्षी जर्मनीनें दोस्त राष्ट्रांस १२॥ कोटी पौंड पावते करावे. १९२३–२९ या काळांत ही रक्कम १२॥ कोटी पौंडांपेक्षां जराशी कमी, पण दरवर्षी वाढती असावी.

(३) या वार्षिक १२॥ कोटी पौंडाच्या हप्त्यांपैकीं एकंदर मुद्दली कर्जाचें व्याज किती व मुद्दलफेडीचा हप्ता किती,या गुंतागुंतीच्या पृथक्करणांत तूर्त पडूं नये.

(४) हे वार्षिक हप्ते किती मुदतीपर्यंत भरत रहावयाचे याचा विचार लांबणीवर टाकावा. पुन्हां करार होईतों जर्मनीनें दरसाल पैसे भरीत जावे.

(५) जर्मनीनें खंडणीची रक्कम मार्कस् नाण्यामध्यें भरावी. जर्मन हुंडणावळीला धक्का न पोहोंचेल अशा बेतानें मार्क्सचें रूपांतर इतर नाण्यांत करण्याची जबाबदारी दोस्त राष्ट्रांनीं नेमलेल्या तज्ज्ञ 'खंडणीमंडळाकडे' रहावी.

(६) वार्षिक १२॥ कोटी पौंडाची कर्जफेड करण्यासाठीं जर्मन सरकारनें उत्पन्नाची तरतूद कशी करावी,या संबंधींही डॉस कमिटीनें तपशीलवार सूचना केल्या. त्यांपैकीं ६। कोटी पौंड जर्मन सरकारनें प्रत्यक्ष आपल्या बजेटांतून भरावे व बाकीचा बोजा जर्मन रेल्वे, जर्मन उद्योगधंदे व प्रवाशांची वाहतूक यांवर पाडावा,अशी विभागणी त्यांनी सुचविली. जर्मन सरकारनें ही योजना तात्पुरती मान्य केली व १९२९ पर्यंतचे सर्व हप्ते ठरल्याप्रमाणें बिनचूक भरले. तथापि एवढा प्रचंड वार्षिक बोजा जर्मन राष्ट्रास सहन करणें केवळ अशक्य आहे अशी तक्रार प्रारंभापासूनच करण्यांत आली. या योजनेंत सुधारणा झाली पाहिजे, त्यांत समाविष्ट झालेल्या अधिकृत रकमा आणि जर्मनीचें सांपत्तिक बल यांचा बरोबर मेळ बसला पाहिजे, अशी मागणी जर्मनी सारखी करीत होता. पांच वर्षांचे हप्ते न कुरकुरतां बिनचुक भरल्यामुळें जर्मन हेतूंचा प्रामाणिकपणा व कर्तृत्व विषयक तळमळ व्यक्त झाली. आणि शेवटीं जगांतील प्रमुख राष्ट्रांना या खंडणीच्या प्रश्नाचा पुन्हां एकदां विचार करणें अवश्य आहे असें वाटूं लागलें.

धनकोचा ऋणकोविरुद्ध आग्रह एका विशिष्ट मर्यादेंतच चालूं शकतो. ती मर्यादा म्हणजे ऋणकोची कर्ज फेडण्याची ऐपत. ऐपतीपलीकडे मागणी झाली कीं अगदीं घातक द्रव्यशोष सुरूं झाला असें नक्की समजावें. शेवटीं नाइलाजानें कर्जदाराला दिवाळें काढण्याची पाळी येते व सावकार सपशेल बुडतात. दिवाळखोरीची आपति होतां होईतों जर्मनीवर येऊं नये व या देण्याघेण्यांचा निकाल शांततेनें व सामोपचारानें व्हावा अशी सावकारी दोस्त राष्ट्रांची इच्छा असावी हें साहजिक आहे.

यंग कमिटीची नेमणूक व तिनें सुचविलेली योजनाः–

जर्मनीच्या तक्रारींत कितपत तथ्य आहे हें अजमावण्यासाठीं व अवश्य वाटलें तर खंडणीबाबत नव्यासूचना करण्यासाठीं पुन्हां एक तज्ज्ञांची कमिटी नेमावी, असें इ. स. १९२८ मध्यें ठरून त्याप्रमाणें कमिटीची स्थापना पण झाली. तिचें अध्यक्षस्थान अमेरिकेंतील प्रख्यात नागरिक ओवेन डी यंग यांना देण्यांत आलें. इंग्लंडतर्फे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सर जोसाय स्टँप यांची नेमणूक करण्यांत आली. गेल्या पांचसहा वर्षांतील परिस्थितीचा आढावा घेऊन व भविष्य काळासंबंधीं कांहीं आडाखे बांधून खंडणीच्या प्रश्नासंबंधीं या यंग कमिटीनें कांहीं नव्या शिफारशी केल्या आणि त्यांवर चर्चा होऊन पूर्वीच्या डॉस योजनेऐवजीं यंग योजना, अथवा अधिकारी भाषेंत बोलावयाचें तर 'नवी योजना' अमलांत आली.

सन १९२४ च्या सप्टेंबरमध्यें डॉस योजना अमलांत आली त्यावेळीं जर्मनीची परिस्थिति विकट झालेली होती. कागदी नोटांचे डोंगरच्या डोंगर दररोज टांकसाळींतून बाहेर पडत असल्यामुळें चलनाची किंमत सपशेल बुडाली व सर्व व्यवहार विस्कळित झाले. लोकांमधील विश्वास विलयास गेला. अशामध्येंच खंडणीचा गोंधळ उत्पन्न झाल्यामुळें अधिकच दुर्दशा उडाली. या आणीबाणीच्या प्रसंगीं जगांतील मुत्सद्यांचें पहिलें कर्तव्य असें होतें कीं, जर्मनीचा पडता गाडा नीट उभा करावा व त्याची गति चालू ठेवावी. म्हणून डॉस योजनेंत खंडणीच्या एकण रकमेचा उल्लेख नव्हता. शिवाय त्या योजनेचा नीट कारभार चालविण्याचें काम एकट्या जर्मनीवर सोंपविण्यांत आलें नाहीं. त्यासाठीं एक स्वतंत्र खंडणी–मंडळ नेमण्यांत आलें. या मंडळांत प्रमुख दोस्त राष्ट्रांचे प्रतिनिधी असून त्यांची मुख्य कचेरी बर्लिन येथें स्थापन झाली. 'दि एजंट–जनरल फॉर रिपेरेशन्स', या बड्या हुद्याचा एक मोठा अधिकारी नेमण्यांत आला. आणि त्याच्या देखरेखीखालीं खंडणी वसुलाचें काम सुरू झालें.

यंगयोजनेच्या वेळीं जर्मन राष्ट्राची परिस्थिति पूर्वीपेक्षां पुष्कळ सुधारली होती. खंडणीच्या रकमा वसूल होऊन वेळेवर चुकत्या झाल्या होत्या. चलनाची किंमत स्थिर झाली होती. जर्मन देशांत उद्योगधंदे व व्यापार यांना तेजी येऊन तेथील जनतेची सांपत्तिक स्थिति सुधारूं लागणार असा अदमास वाटूं लागला. पांच वर्षांपूर्वी जर्मनीचें अस्तित्वच डळमळतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली होती. आतां ती धास्ती राहिली नाहीं. त्या देशाच्या स्थैर्याविषयीं साशंक वृत्ति प्रगट करणारे लोक दिवसेंदिवस कमी होऊं लागले. अर्थात् यंग कमिटीनें केलेल्या सूचना या बदललेल्या परिस्थितीला अनुरूप असाव्यात यांत नवल नाहीं. नव्या योजनेंतील मुख्य कलमें खालीं दिलीं आहेत:–

(१) जर्मनीचें मुख्य गाऱ्हाणें असें कीं, डॉस कमिटीनें ठरविलेल्या वार्षिक १२॥ कोटी पौंडांचा हप्ता जर्मनीच्या शक्तीबाहेरचा असल्यामुळें तो सतत भरीत राहणें त्या राष्ट्रास झेंपणार नाहीं. ती रक्कम कांहीं झालें तरी कमी झालीच पाहिजे. यंग कमिटींतील तज्ज्ञांची या तक्रारींत सत्य आहे अशी खात्री पटली. त्यांनीं अशी शिफारस केली कीं, या पुढें प्रतिवर्षीं १२॥ कोटी पौंडांऐवजीं फक्त सुमारें ९ कोटी पौंडच जर्मनीकडून वसूल करण्यांत यावेत. पुढें पुढें हा ९ कोटी पौंडाचा आंकडा वाढत जाऊन, शेवटीं तर तो १२ कोटीपर्यंत पोंहोंचावा अशी तजवीज करण्यांत आली आहे हें खरें. पण तात्काळ महत्त्वाच्या दृष्टीनें इतकें निःसंशय कीं, यंग कमिटीनें सुचविलेल्या हप्त्यांत जर्मनीला आतां पूर्वीपेक्षां एक तृतियांशाइतकी सूट मिळाली. ३–३॥ कोटी पौंडाची दरसाल होणारी बचत अगदींच अल्प आहे असें कसें म्हणतां येईल ? (२) डॉस योजनेमध्यें खंडणीचे वार्षिक हप्ते किती मुदतीपर्यंत जर्मनीनें भरत राहावयाचें याचा कांहींच निश्चय झाला नव्हता. नव्या योजनेंत ही मुदत इ. स. १९२९ पासून पुढें ५८ वर्षें अशी मुक्रर करण्यांत आली. त्यामुळें पर्यायानें खंडणीची एकूण रक्कमही ठरल्यासारखें झालें. ५८ वर्षांपर्यंत पहिल्या ३७ वर्षेंपर्यंत दरसाल भरावयाचा हप्ता ९ कोटी पौंडापासून १२ कोटी पौंडापर्यंत चढत जावा, व त्यानंतर हा आंकडा पुष्कळ उतरत खालीं यावा, असें तपशीलवार कोष्टक बनविण्यांत आलें. (३) डॉस योजनेमध्यें जर्मनीवर खंडणीची रक्कम मार्क्स नाण्यामध्यें भरावी एवढीच जबाबदारी टाकली होती. या मार्क्सचें इतर नाण्यांमध्यें रूपांतर करण्याचें कार्य एजंट–जनरल व खंडणी–मंडळ यांनीं पार पाडावयाचें होतें. इतकेंच नव्हें तर हें रूपांतर घडवून आणतांना जर्मनीच्या हुंडणावळीला धक्का पोहोंचणार नाहीं अशी या अधिकाऱ्यांनीं खबरदारी घ्यावी असा स्पष्ट निर्बंध होता. यंग योजनेंत हा प्रकार पालटला. खंडणीच्या हप्त्यांची फेड मार्क्संनीं न करतां दोस्त राष्ट्रांच्या चलनानें करण्यांत यावी, अशी नवी जबाबदारी यापुढें जर्मनीवर येऊन पडली. खण्डणीची रक्कम देशांतील नागरिकांकडून देशाच्या कायदेशीर चलनांत वसूल करावयाची व धनको राष्ट्राकडे त्यांच्या चलनी नाण्यानें तिचा भरणा करावयाचा, असें दुहेरी कर्तव्य बजावणें जर्मनीस भाग पडलें. (४) खंडणीच्या वार्षिक हप्त्यांचे दोन विभाग करण्यांत आले. पहिल्या हिश्शांतील रक्कम ही सुमारें ३ कोटी ३०लक्ष पौंडाइतकी ठरविण्यांत आली.जर्मनीनें वेळच्या वेळीं स्वदेशांतून वसूल करूनदोस्त राष्ट्रांकडे त्यांच्या नाण्यानें रक्कम पाठविलीच पाहिजे असा सक्तीचा नियम करण्यांत आला. दुसऱ्या हिश्शांत राहिलेली बाकी रक्कम ही वरीलप्रमाणेंच वसूल केली पाहिजे, त्यांत चूक पडून चालणार नाहीं असा इषारा स्पष्ट होता. पण व्यापारी परिस्थिति फार विपरित झालेली

असली आणि अनेक कारणांमुळें स्वदेशांतून परदेशाकडे पैसा पाठविणें अत्यंत अनिष्ट होईल असें जर्मनीला वाटलें तर अशी सवलत ठेवण्यांत आली कीं, या हिश्शांतील रक्कम परराष्ट्रांकडे पावती करण्याचें कार्य जर्मनीनें आपल्या सोईप्रमाणें दोन वर्षेपर्यंत लांबवावें. (५) डॉस योजनेप्रमाणें निर्माण झालेलें खंडणी–मंडळ व एजंट--जनरल फॉर रिपेरेशन्स इत्यादि अधिकाऱ्यांच्या जागा यापुढें नामशेष झाल्या. खंडणीची वसुली व फेड करण्याच्या कामावर देखरेख करण्यासाठीं व तें काम सुरळीत चालू ठेवण्यासाठीं हे अधिकारी दोस्त राष्ट्रांतर्फे जर्मनींत ठेवण्यांत आलेले होते. यंग योजनेनंतर हीं परकी सत्ता कमी करण्यांत आली आणि खंडणीबाबतची सर्व जबाबदारी जर्मनीनें स्वतःच स्वीकारावी असें ठरलें. (६) यंग योजनेंत समाविष्ट झालेली सर्वांत महत्त्वाची सूचना म्हणजे एका आंतरराष्ट्रीय पेढीच्या स्थापनेसंबंधींची होय. ही सूचना अंमलांत येऊन इ. स. १९३० च्या मे महिन्यांत 'दि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स' नांवाची संस्था स्वित्झर्लंड देशांतील बॅसल या शहरामध्यें अस्तित्वांत आली. खंडणी वसुलीसंबंधीं अनेक प्रकारचीं कामें या बँकेवर सोंपवून दिलीं आहेत. वार्षिक हप्त्याच्या रकमा जमा झाल्या आहेत कां नाहीं तें पाहणें, त्या रकमांची धनको राष्ट्रांमध्यें ठरलेल्या प्रमाणांत वांटणी करणें, त्या रकमांचें मुद्रीकरण करून शक्य असलें तर त्याबद्दलचे कर्जरोखे जर्मन सरकारकडून लिहून घेणें, लांबणीवर पडलेल्या हिश्शांची फेड नीट होईल अशी व्यवस्था करणें, इत्यादि मार्गांनीं या फेडीचा जर्मनी व दोस्त राष्ट्रांना उपयोग व्हावा अशी कल्पना आहे.

खंडणी फेडण्याचे सुगम मार्गः–

खंडणीच्या प्रश्नाचें स्वरूप योग्य रीतीनें आकलन होण्यासाठीं आणखी कांहीं महत्त्वाची माहिती लक्षांत ठेविली पाहिजे. खंडणीसारख्या प्रचंड खर्चाची सर्व फेड केवळ रोकड नाण्यानें होणें कधींच शक्य नाहीं. तसें होण्यास जगांतील सोन्याचा सांठादेखील सर्व पुरा पडणें अशक्य आहे. तीच गोष्ट राष्ट्रांराष्ट्रांमधील व्यापारी कर्जाची. आंतरराष्ट्रीय देवघेवीचे व्यवहार सोन्याच्या नाण्यावर अधिष्ठित झालेले असले तरी, सोन्याची अप्रत्यक्ष उलाढाल फार थोडी होत असते. देशाची आयात व निर्गत यांची परस्पर तोंडमिळवणी झाल्यानंतर जी निव्वळ बाकी कोणाकडे थकली असेल तिची फेड सोन्यानें करतात. डॉस योजनेप्रमाणें जर्मनीवर दरसाल १२॥ कोटी पौंडइतका मोठा बोजा बसविण्यांत आला. हिंदुस्थानसरकारचें वार्षिक बजेट सरासरी इतक्या आंकड्यांचें असतें! एवढ्या रकमेची भरपाई करण्याचें मुख्य साधन कोणतें? जर्मनीपाशीं कांहीं सोन्याच्या राशी पडून राहिल्या नव्हत्या. नाना तऱ्हेच्या जिन्नसांची निपज करून त्यांची परदेशांत निर्गत करणें व त्या निर्गतीची किंमत न घेणें हा कर्जफेडीचा मार्ग होय. आणि खंडणीचे हप्ते भरतांना तो मार्ग जर्मनीस स्वीकारणें प्राप्त होतें. तथापि ही युक्ति सिद्धीस जाण्यासाठीं सुद्धां कांहीं गोष्टींची अनुकूलता असणें अवश्य आहे. परदेशांत वस्तु पाठवितां येण्यापूर्वी स्वदेशांत त्या निर्माण झाल्या पाहिजेत. त्या निर्माण होण्यासाठीं मोठमोठे कारखाने अस्तित्वांत येऊन अहोरात्र त्यांचा धूमधडाका सुरू असला पाहिजे. मोठमोठाले कारखाने म्हटले कीं, मोठें भांडवल आलेंच. युद्धानंतर जर्मन राष्ट्र अगदीं कफल्लक, कंगाल बनलें, त्याची सर्व संपत्ति धुवून गेली, मोठमोठ्या श्रीमंत लोकांतदेखील त्राण राहिलें नाहीं. अशा आर्थिक पांडुरतेनें घेरलेल्या राष्ट्रास धनोत्पादक कारखाने कसे चालवितां येणार? कोणी कर्जाऊ भांडवल दिलें तरच निर्वाह लागावयाचा. डॉस योजना अंमलांत आल्यानंतर जगांतील–विशेषतः अमेरिकेंतील– श्रीमान् लोकांना जर्मनीच्या कर्तबगारीविषयीं व स्थैर्याविषयीं विश्वास उत्पन्न झाला व त्यांच्याकडून कोट्यवधि रुपयांचें कर्ज जर्मनीस मिळूं लागलें. असें कर्ज मिळाल्यामुळें दोन परिणाम घडून आले. एकतर जर्मनीच्या औद्योगिक पुनर्जन्मास सुरुवात झाली व जिनसांची निर्गत करून खंडणी फेडण्याचा मार्ग सुगम झाला. दुसरें असें कीं, खंडणीच्या वार्षिक हप्त्याची निकड भागविणें थोडेंसें सोपें झालें. एक कर्ज काढून दुसरें भिटविण्यापैकींच हा प्रकार खरा. पण कर्ज देणारे धनको जोंपर्यंत भेटत आहेत तोंपर्यंत आजचें मरण उद्यांवर गेलें एवढेंच समाधान! अर्थात् ही स्थिति फार वेळ टिकणारी नव्हे. कर्जाचा बोजा फार वाढला तर सर्वच पत गडगडावयाची. स्वदेशांत जिन्नस उत्पन्न केल्यानंतर ते परदेशीं पाठवावयाचे म्हटले तर मार्गांत जकातीची धोंड असें इष्ट नाहीं. जकातीच्या उंच उंच भिंती बांधून त्यांच्या संरक्षणाखालीं सर्व राष्ट्रें राहूं लागलीं तर बाहेरून येणाऱ्या मालाचा प्रवेश आंत व्हावयाचा कसा? गतवर्षीपर्यंत दोस्त राष्ट्रांपैकीं इंग्लंडखेरीज सर्व राष्ट्रें संरक्षित जकातींनीं

वेष्टित होतीं, त्यांना जर्मनीपासून खंडणी तर चोपून घ्यावयाची, पण ती भरण्याचा जो एकच सुलभ व शक्य मार्ग त्या मार्गांत संरक्षक जकातीचीं विघ्नें आलेलीं.अशा परिस्थितींत ऋणको राष्ट्रानें काय करावें? उलट धनको राष्ट्रांनादेखील स्वतांचें हित पाहणें आवश्यक नाहीं कां? समजा कीं, त्यांनीं संरक्षक जकाती काढून टाकून जर्मनीच्या मालाचा अप्रतिबंध प्रवेश आपल्या देशांत होऊं देण्यास परवानगी दिली, तर त्यामुळें खंडणीची रक्कम वसूल होईल हें खरें. पण जर्मन मालानें त्यांचा बाजार भरून निघाल्यामुळें त्यांच्या स्वतःच्या उद्योगधंद्याची अवस्था किती बिकट होईल? त्यांना टिकाव धरून राहणेंदेखील शक्य होणार नाहीं. अशा उलटसुलट अडचणींमधून कौशल्यानें निभावून जातां आलें तरच निर्गत रूपानें खंडणीची फेड करणें शक्य होणार.

यंग योजना अस्तित्वांत येण्याच्या सुमारास जगावर प्रस्तुतचें आर्थिक संकट ओढवलें. सन १९२९ मध्यें अमेरिकेंतील बँकांवर गंडांतरें येऊं लागलीं. सट्टेबाजीचा भोपळा फुटला. त्याबरोबर लोकांचा विश्वास उडून जाऊन जो तो आपापल्या पैशाची मागणी करूं लागला. अमेरिकेंतून सतत चार पांच वर्षें जर्मनीकडे वाहणारा द्रव्याचा ओघ कोरडा पडला. कर्जाऊ म्हणून परदेशांतून मिळत असलेलें भांडवल जर्मनीस मिळेनासें झालें. उलट होत्या त्या भांडवलासच देशाबाहेर पाय फुटण्याची वेळ आली. त्यामुळें खंडणीचा हप्ता भरणेंदेखील अशक्य झालें. या सर्व गोष्टी इतक्या अकस्मात् व अनपेक्षित रीतीनें घडून आल्या कीं, यंग योजनेच्या जनकांना त्यांची अंधुकदेखील कल्पना आगाऊ आली नाहीं. आणि अशा भयंकर वावटळींत सांपडल्यामुळें यंग योजनेंत दिलेल्या सवलतीचा फायदा जर्मनीनें करून घेणें अपरिहार्य झालें. गतवर्षींच्या नोव्हेंबरांत जर्मनीनें असें जाहीर केलें कीं, खंडणीच्या हप्त्यांपैकीं जो हिस्सा लांबणीवर टाकण्याची परवानगी घेण्यांत आली आहे तो हिस्सा परराष्ट्रांकडे पाठविण्याचें काम तात्पुरतें तहकूब करणें जर्मनीस भाग आहे. दरम्यान प्रेसिडेंट हूव्हर यांनीं पण अमेरिकेच्या कर्जवसुलीची तहकुबी युरोपखंडाला दिली, व जर्मनीवरचा खंडणीचा बोजा जरासा पुढें ढकलला. जगांतील प्रमुख मुत्सद्दी व अर्थशास्त्रज्ञ असें वारंवार प्रतिपादन करीत आहेत कीं, जर्मनीकडून खंडणी चोपून वसूल करण्याचा आग्रह दोस्त राष्ट्रांनीं सोडल्याशिवाय जगाची सांपत्तिक स्थिति सुधारणें शक्य नाहीं. कारण आधुनिक काळामध्यें राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारी व आर्थिक संबंध इतके गुंतागुंतीचे, परस्परावलंबी व दृढ झाले आहेत कीं, एका देशास विपन्नावस्था आली तर त्याची आंच सर्वांस बसते. सांप्रतच्या जागतिक हलाखीचें एक प्रमुख कारण म्हणजे जर्मनीवर बसविलेला कर्जाचा बेसुमार बोजा होय, असें अनेक विद्वानांचें मत आहे. हा बोजा अगदीं हलका केल्याशिवाय --किंबहुना नामशेष केल्याशिवाय-- जगाची घडी पुन्हां नीट बसणार नाहीं असें उघड दिसतें. तथापि सर्व खंडणीची सूट देऊन जर्मनीस कर्जमुक्त करणें अशक्य आहे असें दोस्त राष्ट्रें म्हणतात.

दोस्त राष्ट्रांमधील परस्पर कर्जबाजारी व तिचा जर्मन खंडणीशीं संबंधः--

कारण खुद्द दोस्त राष्ट्रें तरी निष्कर्जी व स्वतंत्र कोठें आहेत? महायुद्ध युरोपखंडांत चालू झालें. दोन अडीच वर्षें तें चालून इंग्लंड, फ्रान्स, इटली इत्यादि राष्ट्रें जराशीं थकल्यानंतर अमेरिकेनें त्यांची बाजू उचलण्याचें ठरविलें. नव्या दमाचें हें धनाढ्य राष्ट्र ज्या बाजूस जाईल तिकडे यशाचें पारडें हमखास फिरणार यांत शंका नव्हती. युद्धांत जय मिळविण्यासाठीं जिवापाड यत्न करतांना युरोपियन राष्ट्रांना हजारों जिनसांची गरज लागत असे. त्या जिन्नसा पैदा करण्यासाठीं त्यांचे जवळ पैसा नव्हता. अशा दारिद्र्यपूर्ण व असहाय स्थितींत अमेरिकेसारख्या श्रीमान् दोस्त राष्ट्रानें अडचणीच्या वेळीं सदर जिनसांचा उधार पुरवठा करण्याची हमी घेतली, व युद्धसमाप्तीनंतर या उधार व्यवहाराची ऋणको मित्रराष्ट्रांनीं पूर्तता करावी असा संकेत ठरला. अशा रीतीनें इंग्लंड फ्रान्स, इटली इत्यादि देशांकडून अमेरिकेला कोट्यवधि पौंड लढाई संपून तह झाल्यावर वसूल करावयाचे होते. या रकमेची सव्याज फेड, दरवर्षी सुमारें प्रत्येकीं ७ कोटी पौंडाचे असे ६०--६२ हप्ते युरोपखंडांतून अमेरिकेकडे गेल्याशिवाय होणारी नव्हती. अमेरिकेनंतर दुसरें महत्त्वाचें सावकारी राष्ट्र म्हणजे इंग्लंड. या सधन देशानें बेलजम, फ्रान्स, रशिया, इटली अशा आपल्या गरजू दोस्तास सढळ हातानें आणीबाणीच्या प्रसंगीं मदत केली.या कर्जाची परतफेडही इंग्लंडास करून घ्यावयाची आहे. म्हणजे तात्पर्य असें कीं, जर्मनीच्या दृष्टीनें इंग्लंड, फ्रान्स, इटली इत्यादि दोस्त राष्ट्रें जरी धनको असलीं तरी अमेरिकेच्या दृष्टीनें तीं ऋणकोच आहेत आणि

फ्रान्स, इटली इत्यादि देशांना शिवाय इंग्लंडचें देणेंही फेडावयाचें आहे. दोस्त राष्ट्रें साहजिकच असें म्हणतात कीं आमच्या माथ्यावर असलेल्या कर्जाची फेड होण्यासाठीं तरी निदान जर्मनीकडून खंडणी वसूल करण्याचा हट्ट धरण्याशिवाय आम्हांला गत्यंतर नाहीं. त्यांच्या मतें जर्मनीनें किमानपक्ष इतकी तरी खंडणी दिली पाहिजे कीं, जिच्यामधून दोस्त राष्ट्रांवर पडलेल्या अमेरिकन व इंग्लिश कर्जाचा बोजा दूर होईल, व फ्रान्स, बेल्जम इत्यादि देशांच्या उध्वस्त झालेल्या भागांची पुनर्घटना होईल. या युरोपियन देशांना अमेरिकेच्या तोंडाकडे कां पाहावें लागलें? युद्धांतील बिकट परिस्थितीमुळें. हें युद्ध कोणाच्या प्रमादामुळें उत्पन्न झालें? दोस्तराष्ट्रें उत्तर देतात कीं,जर्मनीच्या आसुरी व अन्यायी साम्राज्यलालसेमुळें.अर्थात् त्याबद्दलचा भुर्दंड या अपराधी राष्ट्रानें भरणें अवश्यच नव्हे तर न्याय्य होय असें त्यांच्या मतें सहज सिद्ध होतें. अशा रीतीनें दोस्त राष्ट्रांनीं जर्मनीकडून घेण्याची खंडणीची रक्कम आणि त्यांचीं आपआपसांतील देणींघेणीं या दोघांचे धागेदोरे एकमेकांत बेमालूम सांधले गेले आहेत असें दिसतें.कोणत्याहि उपायानें युरोप खंडांतील दोस्त राष्ट्रांवर बसलेला अमेरिकन कर्जाचा बोजा हलका करतां आला तर त्या प्रमाणांत जर्मनीवरीलखंडणीचें ओझें हलकें करतां येईल.इंग्लंडांतील मुत्सद्यांनीं सन १९२२ सालीं लॉर्ड बाल्फर यांच्या मुखानें अमेरिकेस असें कळविलें कीं, इंग्लंडनें अमेरिकेस देणें असलेल्या कर्जाच्या व्यतिरिक्त इंग्लंडास दोस्त राष्ट्राकडून येणारें सर्व कर्ज इंग्लंड सोडून देण्यास तयार आहे. अमेरिकेनें पण असेंच औदार्य दाखवून इंग्लंडसुद्धां सर्व राष्ट्रांना कर्जाची सूट दिली तर जर्मन खंडणीचा प्रश्न आपोआपच सुटण्याच्या मार्गास लागेल. व जगावर सध्यां आलेलें आर्थिक अरिष्ट टळण्यास मदत होईल. तथापि अमेरिकेला ही विचारसरणी अद्याप मान्य झालेली नाहीं. तुमच्या गरजेच्या वेळीं भरपूर द्रव्यसहाय्य देण्याचें आमचें कर्तव्य आम्ही बजाविलें. आतां तें द्रव्य परत फेडण्याचें तुमचें कर्तव्य तुम्ही अंगचुकारपणा न करतां बजावा, असा अमेरिकेचा आग्रह आहे.त्यांच्या मतें जर्मन खंडणी व दोस्त राष्ट्रांना असलेलें अमेरिकन कर्ज, यांचा परस्पर संबंध नाहीं. खंडणी वसूल केल्याशिवाय देखील मनापासून खरी कळकळ असेल तर,अमेरिकन कर्जाची फेड करणें दोस्तांस अगदीं शक्य आहे, असें अमेरिकन पुढारी उघड प्रतिपादन करितात. ज्या राष्ट्रांना दरवर्षीं कोटयवधि पौंड युद्धसामुग्री जय्यत तयार ठेवण्याचे कामीं अद्यापसुद्धां खर्च करतां येण्याची कुवत आहे, त्या राष्ट्रांनीं युद्धांत यश संपादन करण्यासाठीं घेतलेलें अमेरिकेचें कर्ज आम्हांस फेडतां येत नाहीं असा कांगावा करणें म्हणजे शुद्ध आपमतलबीपणाचें प्रदर्शन करणें होय असें अमेरिकन लोकांना वाटतें. निःशस्त्रीकरणाच्या व शांतताप्रस्थापनेच्या केवळ ढोंगी वल्गना न करतां, दोस्त राष्ट्रांनीं शस्त्र-संन्यास करण्याचें धोरण खरोखरच अंगिकारिलें तर, जीवहत्येंत नैपुण्य मिळविण्याचे कामीं होत असलेला कोटयवधि पौंडाचा खर्च अनायासें वाचेल व आम्हांला कर्जाची सूट द्या अशी स्वाभिमान्यशून्य मागणी करण्याचें कारण त्यांना पडणार नाहीं, असें अमेरिकेचें म्हणणें आहे. शिवाय युद्धसमाप्तीनंतरच्या तहान्वयें तुम्ही युरोपियन दोस्त राष्ट्रांनीं युरोपखंडाचा नकाशा बदलला, प्रदेशाची वांटणी केली, नवीं राज्यें स्थापिलीं, जर्मन देशाचे लचके तोडले, इतकेंच नव्हे तर, जर्मनीच्या सर्व वसाहती पण गिळंकृत केल्या व आपल्या हद्दींतील जर्मन मालमत्ता जप्त केली; अशा प्रकारचें स्वार्थी व ध्येयदृष्टीशीं विसंगत पण स्वतःस फायदेशीर असे अत्याचार अमेरिकेनें केले नाहीं आणि म्हणून अमेरिकेला न्याय्य कर्ज मागण्याची यत्किंचितही दिक्कत वाटण्याचें कारण नाहीं, अशा अर्थाचे उद्‌गार अमेरिकन पुढाऱ्यांचे तोंडून अनेकदां निघाले आहेत.

तथापि अमेरिकेचा हा दृष्टिकोण थोडासा तरी बदलल्यावांचून गत्यंतर नाहीं. परराष्ट्रांना आयत्या वेळीं त्यांनीं उसने दिलेले पैसे त्यांच्याकडे परत जावेत व त्यांनीं पण ते परत मिळविण्याची खटपट करावी, हें अगदीं स्वाभाविक व न्यायबुद्धीस धरून आहे. पण त्या पैशाची फेड होतांना अशी कांहीं विलक्षण वस्तुस्थिति निर्माण होऊं लागली कीं, तिच्यामुळें कर्जबाजारी राष्ट्रावरच नव्हे तर खुद्द सावकारी अमेरिकेवर देखील अनवस्था प्रसंग ओढवला. जगांतील गिऱ्हाइकांची जिनसा खरेदी करण्याची ऐपत अगदीं कमी झाली. राष्ट्राराष्ट्रामधील व्यापारी व्यवहार थंडावले. अमेरिकेच्या निर्गत व्यापाराला ओहटी लागली. सन १९३० पासून आर्थिक दृष्टया सर्व जगाला ग्रहण लागल्यासारखें झालें आहे.

ओटावा-करार

युनायटेड किंग्डम व हिंदुस्थान यांचीं सरकारें यांचेमध्यें झालेला व्यापारी करार

कलम १:—इम्पोर्ट ड्यूटी ॲक्ट १९३२ प्रमाणें आज तारखेस जो हिंदी माल जकात दिल्याशिवाय येत आहे त्यापैकीं एम्पायर गुडस् या व्याख्येखालीं पडू शकेल तो ता.१५।११।३२ नंतरहि तसा यावा याबाबत त्या ॲक्टाचें कलम ४ प्रमाणें हुकूम होण्याची हमी इंग्लिश सरकार घेत आहे.

कलम २:—परिशिष्ट 'अ' मध्यें दर्शविल्याप्रमाणें त्या त्या परराष्ट्रीय मालावर जकाती बसविण्याबाबत इंग्लिश सरकार पार्लमेंटमध्यें कायदा करुन घेईल.

परिशिष्ट 'अ' पदार्थ	जकात
गहूं धान्य	१ क्वार्टरवर २ शिलींग
तांदूळ बिन भरडलेला व भरडलेला पण कण्या नव्हत	पौंडास १ शि.
एरंडी, अळशी, खोबरें, शेंगादाणा, तीळ व जवस यांचें तेल	किंमतीवर १५ टक्के
मॅग्नेशियम क्लोराईड—	दर क्वार्ट. १ शि.
अळशी	किंमतीवर १० टक्के

कलम ३:—परिशिष्ट 'ब' मध्यें दर्शविलेल्या हिंदी मालावर फक्त त्या तऱ्हेच्या परराष्ट्रीय मालापेक्षां कमी दराच्या म्हणजे सवलतीचा फरक असलेल्या जकाती बसविल्या जातील. परिशिष्ट'ब'—कॉफी सवलतीचा फरक ९ शि. ४ पेन्स दर. क्वार्टरास,

कलम ४:—परिशिष्ट 'क' मध्यें दर्शविलेल्या हिंदी मालावर परराष्ट्रीय मालाशीं तुलना करतां दिलेल्या सवलतीच्या फरकाचा फायदा कायद्यानें अगर राजेसाहेबांचे हुकुमानें कमी करण्यांत येणार नाहीं. व साम्राज्यांतील इतर घटकास जास्त फरकाचा फायदा दिल्यास तोच हिंदुस्थानासहि देण्यांत येईल. परिशिष्ट 'क'—चहा, काथ्या व त्याचीं तरटें, ४० नंबरापर्यंत सूत, सुती कापड, तळव्याचें कातडें याशिवाय बिन इतर कमावलेलीं कातडीं व चामडीं, तागाचें कापड, पेंड, पॅरॅफिन वॅक्स, मसाल्याचे पदार्थ, सागवान ताशीव व कापीव, व तत्सम लाकूड, लोकरीचे गालिचे व रग्ज, कोंडा, तांदळाचें पीठ, तंबाखू, एरंडी, मॅग्नेसाइट, चंदनाचें तेल, ग्राफाईट, शेंगादाणा, शिसें.

कलम ५:—गहूं व शिसें याबाबत असा करार कीं, साम्राज्यांतील वरील जिन्नस उत्पादन करणारे लोक हे पदार्थ जागतिक किंमतीस व इंग्लिश लोकांस पुरेल इतक्या प्रमाणांत प्रथम विक्रीकरितां इंग्लंडला पाठवू शकले नाहींत अगर पाठवूं इच्छिनासे झाले तर वरील जिन्नसावरील जकात काढून टाकावी.

कलम ६:—साम्राज्योत्पन्न तंबाखूवर परराष्ट्रीय तंबाखूशीं तुलना करतां दिलेल्या सवलतीच्या जकातीचे फरकाचा कायदा १० वर्षेपर्यंत रहावा. एतदर्थ पार्लमेंटकडून कायदा व्हावयाची तजवीज होईल.पण जर परराष्ट्रीय अशोधित तंबाखूवरील जकात पौंडास२२॥ पेन्साखालीं गेली तर त्या जकातीचे दराचे आंकड्याइतकाच सवलतीचे फरकाचा आकडा राहील.

कलम ७:—परिशिष्ट 'ड' यांत नमूद केलेल्या मालावर, मग तो कोठूनहि येवो, जकात बसवूं नये अशी खबरदारी घेतली जाईल. परिशिष्ट 'ड' लाख व ताग व त्यांच्या जाती, तांदळाच्या कण्या, अभ्रक, आंवळकटी इ०

कलम ८:—हिंदी कापसाचा इग्लंडमध्यें जास्त उपयोग व्हावा, एतदर्थ दोन्ही देशांतील कापूस उत्पन्न करणारे व्यापारी व कारखानदार हे जर संशोधनप्रचार किंवा सुधारलेल्या विक्रीचे स्वरुपाचा व्यवहार्य मार्ग शोधून काढतील तर त्याबाबत सहकार्य करण्याचा करार इंग्रज सरकार हिंदुस्थान सरकारशीं करतें.

कलम ९:—नार्दर्न ऱ्होदेशियाखेरीज करून बाकीच्या अस्वयंसत्ताक वसाहती व रक्षणाखालील देश यांनीं ब्रिटिश साम्राज्यांतील व इतर देशांचे बरोबरीनें हिंदुस्थानला सवलती द्याव्या याबाबत इंग्लिश सरकार त्यास सांगेल. त्याचप्रमाणें परिशिष्ट 'ई' मध्यें दर्शविल्याप्रमाणें त्या त्या वसाहतींनीं नवीन किंवा जास्त सवलती हिंदुस्थानास द्याव्या असें त्यास सांलगे.
परिशिष्ट'ई'—१ सिलोन–(अ) मालाचे किंमतीवर१०टक्क्याहून कमी नाहीं असा दर.सुती कापड, सूत, फळें, भाजीपाला, खारलेलीं अगर सुकीं फळें, व भाजीपाला, शिसें (पण पत्रे अगर पान इ.वर्ज्य करुन), लोखंड, पोलाद,सागवान, सुगंधी पदार्थ, बूट व जोडे, लोकरी गालिचे, पेहेरावाचे कपडे, धन इ. (ब) चहा पौंडास १२॥ सेंट, कॉफी कच्ची, भाजकी, दळलेली तंबाखू, पुढें ठरवूं त्याप्रमाणें. २ ब्रिटिश मलायांतील ज्या देशांचें व्यापारी धोरण खालील पदार्थांवर जकाती बसविण्याच्या आड येत नसेल ते देश.(अ)किंमतीवर १० टक्यांहून कमी नाहीं. कमावलेलीं कातडीं व चामडीं, पितळेचीं व काशाचीं भांडीं, व धातू, तांबें व त्याचीं भांडीं, पॅरॅफिन, सुगंधी पदार्थ, भुईमूग, सुती कापड इ० (ब) भुईमुगाचें तेल व तिळाचें तेल.

कलम १०:–परिशिष्ट 'फ' मध्यें दर्शविलेल्या साम्राज्योत्पन्न पदार्थावर त्याच तऱ्हेच्या पर-राष्ट्रीय पदार्थावरील जकातीपेक्षां कमी जकाती घ्याव्या असा कायदा हिंदुस्थान सरकार कायदेमंडळाकडून घडवून आणील. परिशिष्ट 'फ'–टीप—खालील पांच अनुक्रमांक यांत अंतर्भूत होणाऱ्या पदार्थावर १० टक्के सवलत मिळणार नाहीं. अ. नं. १ इंडियन टॅरिफ ॲक्टाचे परिशिष्ट२ मध्यें भाग१ यांत विना–जकात म्हणून नमूद केलेला माल. अ. नं. २ त्याच परिशिष्टांत भाग २ मध्यें २७ अ,२९,४३ अ व ब व ४५ ब मध्यें जकातीस पात्र म्हणून नमूद असलेला माल. अ.नं. ३ त्याच परिशिष्टांत भाग ३ मध्यें नमूद असलेला माल. अ. नं. ४ त्याच परिशिष्टांत भाग ४ मध्यें नंबर ६०, ६१, ६२ खेरीज करुन नमूद असलेला माल. अ. नं. ५ त्याच परिशिष्टांत भाग ७ मध्यें विशेष दरानें संरक्षक जकातीस पात्र म्हणून नमूद असलेला माल.

दर्यावरील व्यापाराबाबत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रकाप्रमाणें तपशील असलेला खालील माल— सवलतीचे जकातीचा किंमतीवर १० टक्के दर.

हा माल १६३ प्रकारचा आहे. त्याच्या ठळक जाती दिल्या आहेत त्या येणें-प्रमाणें:—पेहेरावयाचे जिन्नस, बंदुका व काडतुसें, इ. बूट व जोडे, ब्रश, (लोखंड, पोलाद व लाकूड खेरीज करून) इमारती सामान म्हणजे सीमेंट, कौलें इ., बटणें, रासायनिक द्रव्यें, (खतें व औषधें वगळून) कोको व चाकोलेट, दोऱ्या, दोरखंडें, बुचें, औषधें (मादक द्रव्याखेरीज) पोर्सेलिन, फर्निचर, गोंद, हार्डवेअर, विद्युद्यंत्रें व तत्संबंधीं वस्तू, शास्त्रीय उपकरणें, वाद्यें व गाणारीं यंत्रें, फोटोग्रॉफिक वस्तू, शस्त्रक्रियेचीं हत्यारें, चर्में, दारू, इंडियन टॅरिफ ॲक्ट नं. ९६ खालील जकातीस पात्र अशा सर्व यंत्रसामुग्री, टाईपरायटर, शिवण्याचीं यंत्रें इ. धरुन.ॲल्यूमिनम धातू, व वस्तू पितळ व तांबें यांचे पत्रे, नळ्या, कांबी, तारा इ. जर्मनसिल्व्हर, इं. टॅ. ॲ. परिशिष्ट २ चे ६०, ६१, ६२ व ९७ खालील लोखंडी व पोलादी जिन्नस, शिसे, पत्रे (चहाचे पेटयांचे पत्रेखेरीज) नळ्या इ. तेलें, मेणकापड, रंग, कागद लिहिण्याचा व छापण्याचा, कार्डबोर्ड, प्रोव्हिजन, रबर, साबण, स्टेशनरी, लेस (इं. टॅ. ॲ. ७.२ नं. ४५ अ व १३३ मध्यें न पडणारा) लोकर, खेळणीं, घरगुती व मैदानी, छत्र्या, वाहनें सायकली इ. मोटारी (७॥ टक्केप्रमाणें जकात फक्त) इत्यादि १६३ प्रकारच्या वस्तु.

कलम ११:—टॅरिफबोर्ड चौकशी करुन शिफारस करील त्याप्रमाणें ब्रिटिश अगर ब्रिटिशे-तर सुती कापड व कृत्रिम रेशीम यावर कोणत्या संरक्षक जकाती बसवावयाच्या तें हिंदुस्थान सर-कार ठरवील. व त्या न बसविल्या तर 'जी' परि-शिष्टांत दर्शविलेल्या मालावर तेथेंच दर्शविलेल्या फरकाप्रमाणें सवलतीच्या जकाती बसविण्यांत येतील.

कलम १२:—'एच.' परिशिष्टांत दर्शविल्या-प्रमाणें वसाहती, रक्षितदेश व हुकमतीखालील प्रदेश यांना साम्राज्योत्पन्न मालाकरितां सवलती मिळाव्या म्हणून हिंदुस्थान सरकार वरिष्ठ कायदे कौन्सिलाची संमति मिळवील व इंग्लंडला वेळोवेळ ज्या सवलती मिळतील त्याचा फायदा वरील देशास मिळेल. पण जर आंतरराष्ट्रीय कायद्यांचें बंधन नसतांदेखील वसाहती अगर रक्षित देश हिंदुस्थानास सवलती देणार नाहींत अगर साम्राज्यांतर्गत इतर देशास दिलेली सवलत हिंदुस्थानास देण्याचें नाकारतील तर हिंदुस्थाननें त्यास सवलती देण्याचें कारण नाहीं.

कलम १३:—इंग्लंड डोमिनियन्सना ज्या सवलती देईल त्याच हिंदुस्तानाला देईल व हिंदु-स्थान डोमिनियन्सना ज्या सवलती देईल त्या इंग्लंडला देईल.

कलम १४:—हा करार करणाऱ्या दोन बाजू-पैकीं कोणी एकानें करार मोडण्याची नोटीस दिल्या तारखेपासून सहा महिने होईतोंपर्यंत हा करार अमलांत राहील. करारांतील ठरविलेले दरांत अगर सवलतीचे फरकांत फेरफार करण्या-सारखी परिस्थिति उत्पन्न झाली नाहीं असें कोणाही बाजूचें मत झाल्यास त्याबाबत दुसऱ्याशीं बोलणें करण्याकरितां नोटीस देण्याचा हक्क करार करणारांस आहे. नोटिशीचे तारखे-पासून ६ महिन्यांत कांहीं ठरलें नाहीं तर त्यानंतर तो फेरफार घडवून आणण्याचा आपला हेतू दुस-ऱ्यास नोटिशीनें कळवून या दुसऱ्या नोटिशीचे तारखेपासून ६ महिन्यांनंतर दुरुस्ती अंमलांत आणण्याचा हक्क करार करणारांस आहे. ता. २० ऑगस्ट १९३२. युनायटेड किंग्डमतर्फे स्टॅन्ले बाल्डविन, हिंदुस्थानतर्फे अतुल चतर्जी.

हा करार वरिष्ठ कायदेमंडळानें तीन वर्षां-पुरता मंजूर केला असून त्यावर देखरेख करण्या-करितां एक कमिटी नेमली आहे.

उपस्थित प्रश्न.

—:०:—

कुलाबा जिल्ह्याची फाळणी

१९३१सालीं मुंबई सरकारनें नेमलेल्या काटकसर कमिटीनें कुलाबा जिल्हा फोडून त्याचे निरनिराळे तालुके पुणें, सातारा, ठाणें, रत्नागिरी या जिल्ह्यांत समाविष्ट करून टाकावे अशी सूचना केली.

असें करण्यानें कुलाब्याच्या रहिवाशाचें सर्वस्वी नुकसान होणार आहे व सरकारचाही विशेष फायदा होणार नाहीं असें कुलाबा समाचार या पत्राचें म्हणणें आहे. त्याचीं कारणें पुढें दिलीं आहेत——

१ सध्यां कुलाबा जिल्ह्यांत नाहींत व इतर जिल्ह्यांत आहेत असे कर कुलाब्यांतील लोकांस विनाकारण भरावे लागतील.

(अ) कुलाब्यांत सध्यां लोकलफंड एक आणा आहे. ठाणें जिल्ह्यांत जाणाऱ्या तालुक्यांना तो तेथील नियमाप्रमाणें दोन आणे भरावा लागेल. (आ) कुलाब्यांत ' आक्ट्राई ' कर नाहीं. रत्नागिरींत जाणाऱ्या तालुक्यांस तो भरावा लागेल.

२ रत्नागिरी व मुंबई उपनगर जिल्हा यांस जोडल्या जाणाऱ्या तालुक्यांतील लोकांस सरकारी कामकाजासाठीं जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं जाणें फार कष्टाचे व खर्चाचें होईल. पावसाळीं तर रत्नागिरीस जाण्यास ४।५ दिवस लागतील.

३ हाच जिल्हा कमी करण्याचें विशेष कारण कांहींच नाहीं इलाख्यांतील इतर पांच सात जिल्ह्यांची लोकसंख्या कुलाब्यांपेक्षां पुष्कळ कमी आहे. कुलाब्याचा जमीन महसूल तर अहमदाबादच्या बरोबरीचा आहे. तसेंच जंगल, अबकारी, स्टँप, रजिस्ट्रेशन या खात्यांचीं उत्पन्नेंहि खुद्द रत्नागिरी, ठाणें व इतर कित्येक जिल्हे यांपेक्षां जास्त आहेत. तेव्हां कुलाबा जिल्हा फोडणें अगदीं अनिष्ट आहे.

४ कुलाब्यांत खोती कायदा इतर ठिकाणच्या पेक्षां अगदीं निराळा आहे. व कुलाब्याचे जे तालुके रत्नागिरींत जातील तेथें फारच अव्यवस्था होईल.

५ नैसर्गिक रचना व लोकस्वभाव लक्षांत घेतां कुलाबा हा एक स्वतंत्र गट पडतो. तो फोडून काढल्यास लोकांची कार्यक्षमता फार कमी होईल. कायदे कौन्सिलांतील त्यांचा स्वतंत्र प्रतिनिधी गेल्यामुळें राजकीयदृष्ट्याही नुकसान होईल.

६ कुलाबा जिल्हा न फोडतां ठाणे जिल्ह्यांतील कल्याण तालुका त्यास जोडून मुंबई उपनगर जिल्हा पूर्ववत् ठाणें जिल्ह्यास जोडून टाकल्यास खर्च कमी करण्याचा हेतूही साध्य होईल.

कर्नाटकाचा प्रश्न

कर्नाटक हा मुंबई, मद्रास यासारखा स्वतंत्र प्रांत असावा अशी मागणी अलीकडे कर्नाटकानें व सर्व कानडी भाषा बोलणारांनीं करण्यास सुरवात केली आहे. वर्तमानपत्रांतून व परिषदांतून ह्या प्रश्नावर वाटाघाट व चर्चा करण्यांत येत असते. केवळ हा प्रश्न सिद्ध करण्याकरितां "ब्रिटिश कर्नाटक असोशिएशन" सारख्या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. १९२१ सालापासून मुंबईच्या व वरिष्ठ कायदेमंडळांतून हा प्रश्न उपस्थित करून त्याला चालना देण्याचे प्रयत्न वेळोवेळीं झाले आहेत.

हा प्रश्न उपस्थित करणारांचें व त्यावर आग्रह धरणारांचें मुख्य विधान असें कीं, हिंदुस्थानांतील प्रांतरचना भाषावार नसल्यानें विशिष्ट भाषेच्या लोकांना ज्या अनेक निरनिराळ्या अडचणी व गैरसोयी सोसाव्या लागतात त्या सर्व एकदम कर्नाटक व कानडी भाषा बोलणारे यांना सोसाव्या लागत आहेत. इतिहास असा

आहे कीं, कानडी भाषा बोलणाराचा कर्नाटक हा स्वतंत्र विभाग असल्याचे उल्लेख पौराणिक काळापासून आढळतात. हिंदुस्थानच्या इतिहासांत व संस्कृतींत ज्यांना आपला हिस्सा सांगतां येईल असें अनेक बलिष्ठ कर्नाटकी राजवंश होऊन गेले आहेत. बृहत्कर्नाटकच्या या राजांचा अम्मल तर विंध्यपर्वताखालील सर्व दक्षिण हिंदुस्थानवर चालत असे. पुढें जरी हा अम्मल कमी झाला तरी इतिहासावरून एवढें खास सांगतां येतें कीं, उत्तरेस गोदावरी, दक्षिणेस कावेरी, पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस बंगालचा उपसागर यांमधला भाग हा खरा कर्नाटक होय व त्यांत कानडी भाषा कित्येक शतकें चालत आहे. १५६५ च्या सुमारास कर्नाटक मुसलमानांच्या ताब्यांत होता. पुढें उत्तरेचा भाग पेशव्यांच्या ताब्यांत गेला व दक्षिण भाग हैदर व टिपू सुलतान यांनीं बळकाविला. यानंतर ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाली, त्यावेळीं कंपनी सरकारनें सोयीवार प्रांतरचना न करतां कर्नाटकी जिल्हे जसे ताब्यांत आले तसे कांहीं मुंबई प्रान्ताला व कांहीं मद्रास प्रान्ताला जोडून दिले. कुर्ग हा एक लहान विभाग काय तो एका चीफ कमिशनरच्या ताब्यांत निराळा असा आहे.

अशा प्रकारें विस्कळित झाल्यामुळें कर्नाटकाचें अतोनात नुकसान झालें आहे, हें कर्नाटकी लोकांचें म्हणणें बरेंच सयुक्तिक दिसतें.

शिक्षणाच्या सोयीच्या दृष्टीनें कर्नाटकी जिल्ह्यांना एकीकडे मुंबई व दुसरीकडे मद्रास इतकें दूर पहावें लागतें. मुंबई युनिव्हर्सिटींत मराठी व गुजराथीचा प्रभाव असून कानडीकडे दुर्लक्ष होतें. तसेंच मद्रास युनिव्हर्सिटीमध्यें आंध्र व तामिल यांचा प्रभाव असल्यानें कानडीचें तेज पडत नाहीं.

राजकीय क्षेत्रांतही कर्नाटक असाच मागें ढकलला जातो. सरकारी नोकऱ्या प्रमाणशीर मिळत नाहींत. कायदेमंडळांत प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे हक्क मिळत नाहींत व त्यामुळें कर्नाटकच्या मागणीची ओरड कोणाला ऐकूंही जात नाहीं. गैरसोयी दूर होणें तर दूरच, खर्च वजा जातां कर्नाटकच्या उत्पन्नांत दरसाल अदमासें ७५ लाखांची शिल्लक उरते त्याचा फायदा कर्नाटकाला मिळत नाहीं.

मुंबई व मद्रास येथील हायकोर्टें कर्नाटकाला दोन्ही बाजूंस ४०० मैल दूर पडतात, यामुळें निष्कारण वाढीव खर्च व खोळंबा होतो.

कर्नाटकांतील बरेच सरकारी नोकर महाराष्ट्रीय, गुजराती अगर सिंधी आहेत. त्यांच्याकडून लोकांच्या हिताकडे लक्ष पुरविणें अनेक कारणांनीं अशक्य होतें.

तसेंच आर्थिक दृष्ट्याही कर्नाटकचें फार नुकसान होतें. आगगाडीनें परस्पर मुंबईशीं संबंध जोडल्यानें कर्नाटकचीं बंदरें फुकट गेलीं. मुंबईचे व्यापारी कर्नाटकच्या व्यापाऱ्यांवर वरचष्मा ठेवूं शकतात.

शेतकीसुधारणेकडे लक्ष पुरविलें जात नाहीं.

उद्योगधंदे उत्तम चालणें शक्य असून तिकडे दुर्लक्ष झालें आहे. कच्चा माल व खाणी या प्रांतांत उत्तम आहेत, पण येथल्या कापसावर अहमदाबाद गिरण्या चालतात.

कर्नाटकच्या अडचणी अशा सर्व प्रकारच्या असून त्या वाढत आहेत. मराठी, तेलगू किंवा आन्ध्र–तामील या भाषांच्या वाढत्या वरचढपणामुळें कानडीचें तेज अजिबात लोपण्याचा संभव आहे अशी साधार भीति वाटत आहे. या सर्व अतिक्रमांना आळा घालणें व कर्नाटकचें अस्तित्व भासमान् करणें याकरितां सर्वांत उत्तम व एकच एक उपाय म्हणजे सर्व ब्रिटिश कर्नाटकी जिल्ह्यांचें एकत्रीकरण करून त्यांचा एक स्वतंत्र प्रान्त तयार करणें हा होय; अशा हेतूनें हा प्रश्न उपस्थित करून ह्या एकीकरणाची योजना कर्नाटकी पुढाऱ्यांनीं तयार केली आहे.

सर्व कानडी मुलुखाचें एकत्रीकरण करून तें कुर्गप्रांताला जोडून घेऊन एक स्वतंत्र प्रांत करणें शक्य आहे अशी ही योजना आहे. ह्याप्रमाणें मुंबईप्रांतांपैकीं विजापूर, धारवाड, कारवार, बेळगांव हे जिल्हे व मद्रासपैकीं मंगळूर, निलगिरी हे जिल्हे व मलबार, कोइमतूर, सलेम,

चित्तूर, कारनोळ, अनंतपूर, यांपैकीं भाग हा तर कर्नाटकांत घ्यावाच; पण सोलापूर, सातारा या जिल्ह्यांतील कांहीं भाग व बेल्लारी जिल्ह्यापैकीं कांहीं भाग हाही त्यांत घ्यावा असा ह्या मंडळींचा आग्रह आहे. जेथें वरांतून कानडी भाषा बोलण्याचा प्रचार आहे व एकंदरीनें जो भाग कर्नाटकांत समाविष्ट करणें हितावह होईल तो तसा समाविष्ट करावा हें या मंडळींचें म्हणणें सयुक्तिक वाटतें. परंतु जेथें कानडी शिलालेख व इतर ऐतिहासिक पुरावे सांपडतील तो कानडी मुलूख समजावा असें एक विधान करण्यांत येतें तें मात्र अगदीं अप्रस्तुत वाटतें. कारण अशा रीतीनें पाहिल्यास वर नर्मदेपर्यंतचा मुलूख कर्नाटकांतच सामील करावा लागेल.

सध्यां जी सदर्नमराठा संस्थानें म्हणून गणलीं जातात ती सर्व संस्थानें वास्तविक 'नॉर्दर्न कर्नाटक स्टेट्स' आहेत व तीं तशीं कर्नाटक प्रांताला जोडून घ्यावीं.

अशा रीतीनें तयार होणारा प्रांत गव्हर्नरच्या अमलाखालीं घ्यावा व त्याला स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ असावें. त्याचप्रमाणें या प्रांताला स्वतंत्र हायकोर्ट व स्वतंत्र युनिव्हर्सिटी असावी. भाटकळ हें बंदर सुधारून त्याचा एकंदर प्रांताशीं आगगाडीनें संबंध जोडावा.

अशा प्रकारें म्हैसूर संस्थानच्या भोंवतीं सरलेला असा हा जवळ जवळ ४८०००मैल क्षेत्रफळाचा व सुमारें ८०००,००० लोकसंख्येचा एक प्रांत होईल. ह्या प्रांताचें उत्पन्न अदमासें५ कोटीचें होईल असें झालें तर कानडी भाषेचें व संस्कृतीचें फार हित होईल. कानडी वाङ्मय व कानडी संगीत हीं प्रसिद्धच आहेत. त्याचप्रमाणें कानडी खोदकाम व कोरींव कामहीं ही उत्कृष्ट आहेत. सांस्कृतिक दृष्ट्या या गोष्टींचें महत्त्व नजरेआड करून चालणार नाहीं.

परंतु असें न झालें तर मात्र कर्नाटकची धडगत नाहीं; प्रांतिक स्वायत्तता मिळाल्यावर कर्नाटक विस्कळित राहिल्यास कर्नाटकचें व कानडी लोकांचें अतोनात नुकसान होणार आहे, असें हा प्रश्न उपस्थित करणारांचें म्हणणें आहे.

सिंधचें विभक्तीकरण.

सिंध हा स्वतंत्र प्रांत करावा काय, हा प्रस्तुत राजकारणांतील एक महत्त्वाच्या चर्चेचा विषय आहे. १९१९ चा सुधारणांचा हप्ता हिंदुस्थानला मिळण्यापूर्वी सिंध हा कमिशनरचा प्रांत होता. त्यावेळीं सिंध प्रांतांतून रेल्वे मुंबईपर्यंत आली नव्हती व कामाचा खोळंबा होण्याचा संभव असे म्हणून कमिशनरला विशेष अधिकार देण्यांत आले होते. अशा तऱ्हेनें एका व्यक्तीच्या हातीं पुष्कळ अधिकार रहाणें हें लोकांच्या हिताला व प्रगतीला बाधक आहे, म्हणून कमिशनरचे असे अधिकार काढून टाकून सिंध हा मुंबईच्या गव्हर्नर-इन् काउन्सिलच्या प्रत्यक्ष अमलाखालीं जावा अशी १११७ पासून सिंधच्या पुढाऱ्यांची एकमुखीं मागणी होती. त्याही वेळीं सिंध स्वतंत्र प्रांत करावा, सिंध व बलुचिस्तान मिळून एक प्रान्त करावा, सिंध पंजाबला जोडावा असे निरनिराळे मुद्दे पुढें करण्यांत आले होते. परंतु प्रत्येक वेळीं सिंध मुंबईला जोडलेलाच हितावह आहे असा सिंधि पुढाऱ्यांचा एकमताचा निर्णय होता. इ. स. १९२०मध्यें ज्या सुधारणा मिळाल्या त्यांमुळें सिंधच्या कमिशनरचे जादा अधिकार कमी झाले व सिंधी लोकांचें तात्पुरतें समाधान झालें. हा प्रश्न तेव्हांपासून १९२५ पर्यंत हिंदु अगर मुसलमान यांपैकीं कोणींच काढला नाहीं. इ. स. १९२५ च्या डिसेंबर महिन्यांत ऑल इंडिया मुस्लीम लीगनें हा प्रश्न उकरून काढला, व दिल्लीच्या मुसलमानांच्या मागण्यांत सुद्धां या प्रश्नाला स्थान मिळालें व तेव्हांपासून याला महत्त्व आलें आहे.

सिंध स्वतंत्र प्रांत करावा असें म्हणणारांचीं आपल्या म्हणण्याला पुष्टिकारक अशीं एक-दोनच विधानें आहेत. एक विधान असें कीं, हिंदुस्तानची प्रांतरचना सदोष आहे ती बदलून भाषावार प्रान्तरचना करावी व अशा मुद्द्यावर सिंध हा स्वतंत्र प्रान्त होणें इष्ट आहे. दुसरें विधान असें कीं, सिंधमध्यें मुसलमान बहु-

संख्याक आहेत; तेव्हां स्वतंत्र सिंध प्रांतांत सत्ता मुसलमानांच्या हातांत राहील व अशा रीतीनें ज्या प्रांतांत हिंदू बहुसंख्याक अतएव सत्ताधीश असतील त्यांना वचक रहावा व एकंदरींत राजकीय समतोलपणा कायम रहावा अशासाठीं असे बहुसंख्याक मुसलमानांचे प्रांत निर्माण होणें इष्ट आहे. हीं विधानें मांडून या प्रश्नाला महत्त्व देणारे मुसलमानच आहेत.

सिंधच्या हिंदूंचा ह्या म्हणण्याला पूर्ण विरोध आहे. ह्या विरोधकांचें म्हणणें असें कीं सिंध स्वतंत्र होण्यापासून त्यांतील हिंदूंचें तर सर्व प्रकारें नुकसान आहेच; परंतु एकंदर प्रान्ताचेंही नुकसान आहे. मुसलमानांची मागणी केवळ जात्यभिमानानें प्रेरित होऊन झालेली आहे हें स्पष्ट आहे. सध्यांच्या परिस्थितींतच हिंदूंना सिंधमध्यें अत्यंत त्रास होत आहे व त्यांची सर्व प्रकारें पिछेहाट करण्यांत येत आहे. त्यांत सिंध स्वतंत्र झाल्यावर व मुसलमान सत्ताधीश झाल्यावर ह्या सर्वांचा कळसच होईल यांत नवल नाहीं. शिवाय एकंदर राष्ट्रीय एकीच्या दृष्टीनेंही अशा प्रकारें जात्यभिमानाला प्रोत्साहन देणें अनिष्ट होय. भाषावार प्रान्तरचनेच्या दृष्टीनें पहातां सिंधी भाषेला विशेष महत्त्व नाहीं व जरी दिलें तरी सर्व सिंधी भाषा बोलणारे लोक सध्यांसुद्धां एकाच प्रांतांत (मुंबई) समाविष्ट आहेत. केवळ सिंधी लोकांकरितां स्वतंत्र प्रान्त करणें म्हणजे एक अगदीं लहान प्रान्त होईल. लहान प्रान्ताची व्यवस्था करणें अधिक अडचणीचें व अधिक खर्चाचें पडतें व आजपर्यंत सिंधची जी प्रगति झालेली आहे ती यामुळें बंद पडेल.

एकंदरींत या वादाला जात्यभिमान व जातिद्वेष यांचा वास येतो. पण यांत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, दोनही पक्षांना स्वतंत्र प्रान्त चालविण्यास खर्चाची अडचण सारखीच भासत आहे. एका पक्षाचें म्हणणें, ही अडचण दूर होणें शक्य आहे तर दुसऱ्याचें म्हणणें अगदीं त्याविरुद्ध. ह्या अडचणींतून निभावून सिंधला जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें शक्य आहे का ? याचा विचार करण्यासाठीं पहिल्या गोलमेज परिषदेच्या सिंध सब-कमिटीच्या अभिप्रायावरून सिंधच्या पुढाऱ्यांची एक "कॉन्फरन्स" भरविली होती. ह्या कॉन्फरन्सचे अध्यक्ष ऑ. मिस्टर ब्रायन सी. आय्. ई.; आय्. सी. एस्. हे होते. ह्या कॉन्फरन्समध्यें सिंध स्वतंत्र केल्यास त्याचें उत्पन्न व खर्च किती असतील व त्यांत कशी वाढ व कपात करतां येईल, याचा विचार करण्यांत आला. त्यावेळीं पुढें आलेल्या आंकडेवारीप्रमाणें सिंधचें उत्पन्न १८२·४२ लक्ष रु. आहे व खर्च २८९·८२लक्ष रु. आहे. खर्चाच्या आंकड्यांत व्याज व कर्जफेड आणि पेन्शनरी लाएबिलिटी हीं आहेत. शिवाय प्रांत स्वतंत्र करण्याचा वाढीव खर्च सुमारें ११ लक्ष रु. येईल. हे आंकडे आयर्व्हिंग कमिटीचे आहेत. या कमिटीच्या म्हणण्याप्रमाणें सिंधला पहिल्या प्रथम ९७·४० लक्ष रु. तूट व ११·०५ लक्ष रु. जादा खर्च मिळून १०८·४५ लक्ष रु. तूट येते. मुसलमानांच्या म्हणण्याप्रमाणें ही सर्व तूट भरून काढून फारच झालें तर ३० लक्ष रु. तूट राहील, उलट हिंदूंच्या म्हणण्याप्रमाणें ही तूट कमी आकारली असून अधिक २५लक्षांची तरी तूट येणें संभवनीय आहे. मिस्टर ब्रायन आपल्या रिपोर्टांत म्हणतात कीं, हिंदू वाजवीपेक्षां अधिक निराशावादी दिसतात; तर उलट मुसलमान फाजील आशावादी दिसतात. मि. ब्रायन यांचें म्हणणें कीं, कांहीं झालें तरी सिंधला स्वतंत्र होणें असेल तर कमींत कमी ८०·५लक्ष रुपयांची तूट सोसावी लागणारच.

मांचूरियांतील चीन–जपान वादाचा प्रश्न.

एकोणिसशें एकतीसच्या सप्टेंबर महिन्यांत चीन व जपान या दोन राष्ट्रांमध्यें जो झगडा उत्पन्न झाल्याचें जगाच्या निदर्शनास आलें, त्याचा वास्तविक उगम या राष्ट्रांच्या इतिहासांत बराच मागें आहे. मांचूरियांत या दोनही राष्ट्रांचे हितसंबंध अत्यंत महत्त्वाचे असून त्यांच्या परस्पर घर्षणानें या राष्ट्रांच्या परस्पर संबंधावर जो ताण पडत गेला व वेळोवेळीं त्यांच्या आपसांत

ज्या चकमकी उडाल्या, त्यावरून वाढत वाढत गोष्टी हातघाईवर आल्याचें दिसून येतें; म्हणून या दोन राष्ट्रांचे मांचूरियांतील हितसंबंध कशा प्रकारचे होते याचा इतिहास थोडक्यांत पाहिल्यावांचून प्रस्तुतच्या लढ्याचें स्वरूप काय आहे त्याची बरोबर कल्पना येणार नाहीं

मांचूरिया हा प्रदेश चीनच्या ईशान्य टोंकाला आहे. त्याच्या वायव्य, उत्तर व ईशान्य बाजूस सोव्हिएट रशिया आहे व आग्नेय बाजूस कोरिया आहे. त्याचे दक्षिण टोंकाचा सुमारें १३०० चौरस मैल क्षेत्रफळाचा प्रदेश जपाननें करारानें घेतल्यामुळें इ. स. १९०५ पासून जपानच्या ताब्यांत आहे. त्याचें एकंदर क्षेत्रफळ ३४००० चौरस मैल आहे. जमीन मूळचीच सुपीक आहे व सुधारलेल्या मार्गांचा अवलंब केल्यानें गेल्या वर्षांत पीक दुप्पट झाल्याचें आढळून आलें आहे. याशिवाय तसर रेशमाची पैदास ह्या प्रदेशांत उत्तम होते. डोंगराळ प्रदेशांत इमारती लांकूड व खाणी विशेषतः कोळशाच्या भरपूर आहेत. सोन्याच्या व लोखंडाच्या खाणीही असल्याचें माहीत झालें आहे. शिवाय शेल-ऑईल, चुनखडी, खड्ड, मॅग्नेसाल्ट, सिलिका यांचे उत्तम नमुने सांपडले आहेत व एकंदर खाणीचा धंदा अत्यंत महत्त्वाचा होईल असें तज्ज्ञांचें मत आहे.

असा हा अत्यंत सुपीक व विस्तीर्ण प्रदेश चाळीस वर्षांपूर्वींपर्यंत अगदीं मागासलेला व कमी लोकवस्ती असलेला असा होता. अर्थातच आपल्या देशांतील वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडवितांना चीन व जपान ह्या दोन्ही देशांचें लक्ष शेजारींच असलेल्या मांचूरियाकडे जावें हें अगदीं सहज होतें. चीनच्या शांटुग व होपे प्रान्तांतून लक्षावधी बेकार शेतकरी मांचूरियांत वसाहत करण्यास आले. उलटपक्षीं मांचूरियातील धान्य व कच्चा माल यांच्या मोबदल्याकरितां जपाननें आपला तयार माल व भांडवल मांचूरियांत पाठविण्यास सुरवात केली. अशा प्रकारें जपाननें बाजारपेठ म्हणून मांचूरियाला महत्त्व दिलें व चिनी शेतकरी व कामकरी हे जपानला कच्च्या मालाचा पुरवठा करणारे व पक्क्या मालाला गिऱ्हाइक झाले.

परंतु चीन, जपान व रशिया या तीहींच्या कात्रींत असलेल्या मांचुरियाच्या भौगोलिक स्थानामुळें या तीन देशांत सहकार्य वाढण्याऐवजीं विकोपाला वाव मिळाल्याचेंच दिसून येतें. मांचूरियाची ही महत्त्वाची जाणीव चीनपेक्षां रशिया व जपान यांनाच अगोदर झाली; व रशियानें तर जवळ जवळ सर्व मांचूरियावर ताबा मिळविला होता, परंतु चीन व मांचुरीया यांचे हितसंबंध निव्वळ राजकीय व आर्थिक स्वरूपाचे नव्हते, तर जातिविषयक संस्कारांचे होते. मांचुरियाच्या मूळच्या मांच्यू लोकांचे चिनी लोकांशीं चांगलें पटलें—इतकें कीं मांचुरीयाची भाषासुद्धां मांच्यू होती ती चिनी झाली. ह्या मांच्यूना रशियन मोंगलांचें मांचुरियांत येणें न आवडून त्यांना मागें हटविण्यासाठीं त्यांनीं चिनी लोकांना १८४८ पासून मांचूरियाचे दरवाजे सताड उघडे केले. पुढें चीनशीं मांचूरियांचे संबंध जास्त निगडीत होत गेले व रशियाशीं संबंध तुटत गेलें. इ. स. १८९४-९५ च्या चीन-जपान युद्धाचा फायदा घेऊन रशियानें मांचूरियांत प्रवेश केला, व आपलें वर्चस्व इतकें वाढविलें कीं, इ. स. १९००च्या बॉक्सर बंडाचा फायदा घेऊन सर्व मांचूरिया त्यानें आपल्या ताब्यांत घेतला. ही गोष्ट जपानच्या मांचूरियांतील हितसंबंधाच्या आड आल्यानें जपाननें रशियाशीं युद्ध पुकारलें. तेंच इ. स. १९०४ चें रूसो—जपानी युद्ध. त्यांत रशियाचा पराभव झाला व त्याला जपानचे हक्क कबूल करावे लागले. पुढें १९०७ च्या रशियन राज्यक्रान्तीचा फायदा घेऊन चीननें रशियाविरुद्ध मांचूरियांतील आपले हक्क शाबीत करून घेतले, व सन १८९६ पासूनचा रशियाचा मांचूरियाशीं असलेला संबंध तोडून टाकिला. फक्त रेल्वेवरील आपला हक्क रशिया टिकवून होता. तोही इ. स. १९२९ मध्यें उडवून देण्यांत आला. स्वदेशांतील क्रान्तीमुळें रशियाचें या गोष्टींकडे दुर्लक्ष झालें; तरी सुद्धां इ.स.१९२९

मध्यें आपलें वर्चस्व परत मिळविण्याचा सोव्हिएट रशियानें करून प्रयत्न केला; पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. यापुढें मांचूरियांतील वाद फक्त चीन व जपान या दोघांमध्येंच राहिला.

स्वतःच्या मालकीच्या मांचूरियाचें महत्त्व खुद्द चीनला फार उशीरां कळलें. एवढा मोठा देश (चीन) इ. स. १८४२ पर्यंत अगदीं मागासलेला व एकलकोंडा होता. इ. स. १८४२ च्या नानकिंगच्या तहापासून त्याचा परदेशांशीं व्यापार व दळणवळण सुरू झालें. पण त्यामुळें बंदरांतून वसाहती करणाऱ्या परदेशी लोकांचीं चीनमध्यें स्वतंत्रच शहरें निर्माण झालीं व त्यांची व्यवस्थाही स्वतंत्रपणेंच होऊं लागली. इ. स. १९०० मध्यें झालेल्या बॉक्सरच्या बंडामुळें चीनचे डोळे खरे उघडले व डॉ. सन्‌यत्सेन व इतर पुढाऱ्यांच्या नियंत्रणाखालीं राष्ट्रीय चळवळीला व सुधारणेला सुरवात झाली. या सर्व चळवळीचा शेवट इ.स. १९२७ मध्यें सर्व चीनचें एकीकरण होण्यांत झाला व नानकिंग येथें मध्यवर्ती सरकार स्थापन झालें. इ. स. १९२८ मध्यें मांचूरियासुद्धां या एकीकरणांत सामील झाला. सर्व चीनमध्यें एकराष्ट्रीयत्त्वाची भावना जागृत करणें हें ही चळवळ यशस्वी करणारांचें पहिलें व अत्यंत महत्त्वाचें कार्य होतें. डॉ. सन्‌यत्सेन यांनीं स्थापिलेल्या "कौमिटँग" (राष्ट्रीय) पक्षानें या बाबतींत पहिल्या प्रतीची कामगिरी बजावली. चीनसारख्या परिस्थितींत असलेल्या कोणत्याही राष्ट्रांत सामान्यपणें आढळेल अशा प्रकारच्या राष्ट्रीय वृत्तीपेक्षां चिनी लोकांच्या मनांत उद्भवलेल्या राष्ट्रीय भावनेंत एक विशेष फरक आढळतो. तो म्हणजे सर्व प्रकारच्या परदेशी नियंत्रणांबद्दल एक प्रकारचा तिरस्कार वाटणें हा होय. यांतूनच पुढें साम्राज्यशाहीच्या जुलुमांतून सर्व आशियांतील राष्ट्रांची मुक्तता करण्याच्या प्रवृत्तीचा उगम झाला. आपल्या प्राचीन काळच्या मोठेपणाची जाणीव होऊन ती स्थिति पुन्हां प्राप्त व्हावी ही महत्त्वाकांक्षाही चिनी लोकांत बळावली आहे, त्यामुळें करारानें दिलेले प्रान्त, आगगाडीच्या खात्यांत परदेशी कंपन्यांचे शासनविषयक अगर निव्वळ व्यापारी नसलेले हक्क, वसाहतींच्या आणि इनामांच्या शासनाबद्दलचे हक्क व ज्या योगानें परदेशी लोक चिनी कायदा, कोर्टें अगर कर यांचे नियंत्रणाखालीं येत नाहींत असे जादा प्रांतिक हक्क, हे सर्व काढून घ्यावे अशी प्रवृत्ति वाढत आहे; व अशा तऱ्हेचे हक्क राहूं देणें यांत राष्ट्राचा मानभंग होतो असें एकंदर लोकमत आहे. शिक्षणादि अंतर्गत सुधारणांनीं जागृत केलेल्या या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेस प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठीं चीनच्या राष्ट्रीयपक्षानें जे प्रयत्न केले. त्यांपैकीं १९२२ मध्यें चीनचा स्वतंत्र राष्ट्र म्हणून राष्ट्रसंघांत प्रवेश करविणें व त्यायोगें चीनचे राष्ट्रीय हक्क पुन्हा प्रस्थापित करण्यास इतर स्वतंत्र राष्ट्रांची सहानुभूती व मदत मिळविणें हा एक, व सबंध चीनमध्यें परदेशी व परदेशीय धांजवर कडक बहिष्कार पुकारण्याच्या कार्यक्रमाचा प्रसार करणें हा दुसरा, हे दोन महत्त्वाचे हेतू आहेत.

राष्ट्रसंघानें चीनच्या म्हणण्यास सहानुभूति दाखवून तें म्हणणें तत्त्वतः न्याय्य असल्याचें एकमतानें कबूल केलें. परंतु हें म्हणणें प्रत्यक्ष अमलांत आणून वर सांगितलेले चीनचे सर्व हक्क चीनला परत करणें बरेंच अडचणीचें व गुंतागुंतीचें होईल असें राष्ट्रसंघाचें मत पडलें. चीनचें मुख्य सरकार स्थिर नव्हतें व आपली सत्ता सर्व देशभर कायमची जाणवेल व मानली जाईल अशा तऱ्हेचीं साधनेंही सरकारजवळ पुरेशीं नव्हतीं व अद्यापही नाहींत. शिवाय चीनमध्यें कॉम्यूनिझमूचा प्रसार इतक्या जोराचा झाला आहे कीं, राष्ट्रीय सरकारला तो एक प्रत्यक्ष प्रतिस्पर्धीच झाला आहे. अशा वेळीं चीनचे हक्क चीनला परत देऊन राष्ट्रीय सरकारवर त्याच्या आंवाक्याबाहेरची जबाबदारी टाकणें राष्ट्रसंघाला गैर दिसलें. शिवाय या प्रश्नामध्यें एकट्या चीनचेच हितसंबंध नाहींत; तर इतर बऱ्याच राष्ट्रांचे हितसंबंध त्यांत येतात. जगांतील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षां चीनमध्यें परदेशी वसाहती अधिक आहेत. या सर्व चीनच्या कायद्याच्या नियंत्रणाखालीं सध्यांच्या परिस्थितींत

गेल्यास त्यांच्या सुरक्षिततेची शाश्वती नाहीं असें राष्ट्रसंघाचें मत पडलें; कारण एक तर राष्ट्रीय सरकार दुबळें, दुसरें परदेशीयांबद्दल तिरस्कारानें भरलेलें लोकमत व तिसरें कॉम्युनिझम्‌चा प्रसार. अशा परिस्थितीत ही गोष्ट जागतिक शांततेला धोका पोहोंचविणारी झाली असती. म्हणून राष्ट्रसंघाची चीनला जरी सहानुभूति असली तरी या बाबतींत प्रत्यक्ष मदत नाहींच म्हटलें तरी चालेल.

परंतु जपानला हा प्रश्न अधिक जिव्हाळ्याचा वाटतो. चीनमधील परदेशी वस्तीपैकीं दोन तृतीयांशाहून अधिक जपानी आहेत, व मांचूरियांत जवळ जवळ ८००,००० कोरियन लोक आहेत. अशा वेळीं चीनमधील बहिष्काराचा कार्यक्रम व कॉम्यूनिझम्‌चा प्रसार यामुळें जपानलाच सर्वांत जास्त धोका पोहोंचतो. जपानला शिवाय मांचुरियाची अधिकच गरज भासत असल्यानें मांचुरियाच्या प्रश्नाबद्दल ह्या दोन राष्ट्रांत तेढ उत्पन्न व्हावी हें साहजिक होतें.

मांचूरिया हा कायदेशीरपणें चीनचा भाग आहे ही गोष्ट जपानला नाकबूल करणें शक्य नाहीं. तरी सुद्धां जपानचे मांचूरियांतील हक्कही महत्त्वाचे आहेत व अनेक कारणांनीं त्याचे मांचूरियांतील हितसंबंध अत्यंत जिव्हाळ्याचे झाले आहेत, ही गोष्टही तितकीच खरी आहे. गेल्या पंचवीस वर्षांचा असा इतिहास आहे कीं, एकीकडे मांचूरियाचे बाकीच्या चीनशीं नातें अधिकाधिक सलोख्याचे होत होतें; त्याच वेळीं दुसरीकडे जपानचे मांचूरियांतलि हितसंबंध वाढत होते. इ. स. १९०५ च्या पेकिंगच्या तहान्वयें पूर्वीं रशियाच्या ताब्यांत असलेला क्वान्टंग प्रांन्त व "चायनीज ईस्टर्न रेल्वे" वरील ताबा चीननें जपानला करारानें दिला. दुसऱ्या एका करारानें जपाननें आटंग–मुकडेन या लष्करी रेल्वेवर ताबा मिळविला. दक्षिण मांचुरिया रेल्वे कम्पनीचे निम्मे शेअर्स घेऊन जपाननें त्या रेल्वेवर ताबा मिळविला; यामुळें कम्पनीकडे "रेलवे एरियां" तील शासनाधिकार होते व तिला कर वसुलीची परवानगी होती; शिवाय खाणींचा धंदा, विजेचा धंदा वगैरे अनेक धंदे सुरू करण्याची परवानगी होती. इ. स. १९१० मध्यें जपाननें कोरिया ताब्यांत घेतला; त्यामुळें जपानचें मांचुरियांतील महत्त्व अधिकच वाढलें. इ. स. १९१५ मध्यें इ. १९०५ चा करार वाढवून २० वर्षांचा होता तो ९९ वर्षांचा करण्यांत आला,व शिवाय जपानी प्रजेला प्रवास, वसाहत, उद्योगधंदे याबाबत कांहीं जादा सवलती देण्यांत आल्या. अशा प्रकारें जपानचा मांचुरियांतील दर्जा अगदीं लोकविलक्षण होता. मग कोणत्याही प्रकारानें कां होईना, एकदां, मिळविलेला हा दर्जा गमावण्यास जपान तयार नाहीं. शक्य तोंवर सामोपचारानें वागणें व प्रसंगच तर चढाईचेंही धोरण स्वीकारणें ही जपानची मनोवृत्ति आहे. "चीनशीं लढून १८९४–९६ मध्यें आपण मांचुरियांत वर्चस्व स्थापिलें. रूसो–जपानी युद्ध सुद्धां मांचुरियाकरितांच आपण लढलों. अर्थात् हा सर्व त्याग आपण फुकट केला असें होतां कामा नये " अशा प्रकारें जपानी शिपाई व सामान्य लोक यांच्या भावना मांचूरियाविषयीं इरेस पेटविल्या गेल्या आहेत. "जपानचे विशेष हक्क हे कोणत्याही आंतरराष्ट्रीय करारामुळें निर्माण झालेले नाहींत व ते कधींही नष्ट करूं दिले जाणार नाहींत "ही व्हायकाऊंट ईशाईची घोषणा जपानी मनोवृत्तीची उत्तम निदर्शक आहे.

अशा प्रकारें सुमारें पाव शतकपर्यंत धुमसत असलेल्या या अंतस्थ तेढीवरून प्रस्तुतच्या भडक्याच्या कारणांची थोडक्यांत रूपरेषा अशी मांडतां येईल:—

मांचूरिया हा आपला भाग आहे व तो राजकीय व आर्थिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. या गोष्टीची चीनला पूर्ण जाणीव झाली आहे, व तो सर्व प्रकारें चिनी राष्ट्रीय सरकारच्या ताब्यांत असायलाच पाहिजे असा त्याचा आग्रह. जपानला दिलेले हक्क बाजवीपेक्षां फाजील सवलतीचे आहेत; त्यामुळें जपानचें मांचूरियांत फार प्रस्थ माजलें आहे; मांचूरिया ही जपानचीच व्यापारपेठ बनली आहे; चिनी शेतकरी व

कामकरी यांच्या जिवावर जपान अतोनात नफा काढतो; व शिवाय वर अरेरावी दाखवूं शकतो: या गोष्टी चिनी राष्ट्राला कमीपणा आणणाऱ्या आहेत व त्यांचा समूळ उच्छेद झाला पाहिजे असा चीनचा हट्ट.

या उलट, जपानही मांचूरिया सोडण्यास तयार नाहीं. राजकीय व आर्थिक दृष्ट्या जपानला वाटणारें मांचूरियाचें महत्त्व स्पष्ट आहे; मांचूरिया करितां जपाननें आपलें रक्त सांडलें आहे; शिवाय कोणत्याही प्रकारानें कां होईना प्राप्त झालेले हक्क गमावणें जपानला कमीपणाचें वाटतें. या-शिवाय कोरियापर्यंत आलेली जपानची सरहद्द व सोव्हिएट रशिया अगर चीन यांमध्यें मांचूरियाचा Buffer State सारखा उपयोग व्हावा म्हणून मांचूरिया चीनपासून अलग रहावा असाही एक जपानचा अंतस्थ हेतु. हे सर्व साधण्यासाठीं जपाननें स्पष्टपणें चढाईचें धोरण स्वीकारलें.

इ. स. १९२८ मध्यें मांचूरिया चीनच्या एकीकरणांत स्पष्टपणें सामील झाला. तेव्हांपासून कुरापती काढण्यास जपाननें सुरुवात केली असें म्हणतां येईल. रेल्वेप्रदेशांतील हक्कांच्या व करारांच्या बाबतींत, तसेंच कोरियन लोकांकडे असलेल्या जमिनीच्या बाबतींत कांहीं किरकोळ तंटे उपस्थित करण्यांत आले. जपानची अरेरावी आपले हक्क ओलांडूनही पलीकडे गेली. इ. स. १९३१ च्या आरंभाला बार अगदीं भरून राहिला होता. हा बार उडण्याला एप्रील मेच्या सुमारास दोन तात्कालिक कारणें घडलीं. वॅनपावशान नामक एका चिनी दलालानें कांहीं जमिनी करारानें घेऊन त्या पोट करारानें कांहीं कोरियन शेतकऱ्यांना दिल्या. या कोरियन शेतकऱ्यांनीं आपल्या जमिनींना पाणी मिळावें म्हणून शेजारच्या चिनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनींतून कालवे खणून पाणी आणलें. कायदेशीररीत्या या प्रश्नाच्या बाबतींत चिनी अधिकारी व जपानी अधिकारी यांचा तंटा लागला, व प्रश्नाचा निकाल लागेना. तेव्हां ४०० चिनी शेतकऱ्यांनीं आपल्या शेतकीच्या आयुधांचा उपयोग करून कोरियन शेतकऱ्यांना हुसकावून लावून कालवे भरून काढण्यास सुरुवात केली; त्या वेळीं जपानी पोलिसनें त्यांजवर गोळीबार केला. चिनी शेतकऱ्यांना माघार घ्यावी लागली; परंतु या प्रश्नाचा निकाल सप्टेंबरपर्यंत सुद्धां लागला नाहीं. उलट याचा प्रतिध्वनि कोरियांत उमटून तेथें चिनी लोकांविरुद्ध बंडें झालीं व चिनी लोकांना भयंकर हाल सोसावे लागले.

याच सुमारास कॅप्टन नाकामुरा नांवाच्या एका जपानी लष्करी अधिकाऱ्याचा चिनी शिपायांनीं खून केला. जपानी अधिकाऱ्यांचें या बाबतींत असें म्हणणें कीं, अशा प्रकारें एका अधिकाऱ्याचा खून होणें हें जपानी लोकांबद्दल दाखविल्या जाणाऱ्या उद्धटपणाचें व अवहेलनेचें लक्षण आहे. चिनी अधिकाऱ्यांकडून असें सांगण्यांत आलें कीं, कॅप्टन नाकामुराला उत्तम तऱ्हेनें वागविण्यांत आलें. त्याचा परवाना तपासावयाचा होता म्हणून त्याला अडविलें होतें; परंतु त्यानें पळून जाण्याचा प्रयत्न केला तेव्हां एका शिपायानें त्याला गोळी घातली.

या दोन प्रकारांमुळें— विशेषतः नाकामुराच्या खुनामुळें—भांडण अधिक पेटलें, व त्यांत भर घालणाऱ्या बारीक सारीक गोष्टीही बऱ्याच घडल्या. या गोष्टींना निष्कारण महत्त्व देण्यांत आलें आहे व कांहीं तरी कुरापत काढून मांचूरियावर लष्करी ताबा मिळविणें हा जपानचा हेतु आहे असें चीनचें म्हणणें. उलटपक्षीं जपानी अधिकाऱ्याचा खून ही लहान सहान बाब नव्हे व याचा निकाल मनगटाच्या जोरावरच लावला पाहिजे, अशा तऱ्हेचें जपानी लोकमत तयार करण्याचा जपानी वर्तमानपत्रांनीं व पुढाऱ्यांनीं कसून उद्योग चालविला होता. चीनवर हल्ला करण्यास जपानला हें कारण पुरेसें वाटलें.

सप्टेंबर १९ ला जपानी लष्करानें मुकडेन शहर ताब्यांत घेतलें व युद्धाला आरंभ झाला. सप्टेंबर २१ ला चीनच्या प्रतिनिधीनें राष्ट्रसंघाकडे निवाडा मागितला व केवळ चीनच्याच नव्हे तर सर्व जगाच्या शांततेला धोका पोहोंचविणाऱ्या ह्या हालचाली शक्य तितक्या लवकर बंद व्हाव्या व जपाननें आपलें लष्कर मागें घ्यावें

अशी मागणी केली. राष्ट्रसंघानें जपानला इषारा दिला,परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. जपानच्या लष्करी हालचाली आक्रमणाच्या धोरणाच्या नसून केवळ जपानचे हितसंबंधाच्या सुरक्षिततेसाठीं आहेत असें जपानच्या प्रतिनिधीनें विधान केलें. तेव्हां या बाबतींत अधिक चौकशी करण्यासाठीं चीनच्या प्रतिनिधीच्या सूचनेवरून राष्ट्रसंघानें एक कमिशन नेमिलें. या कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड लिट्न होते व कमिशन "लिटन कमिशन" म्हणून प्रसिद्ध झालें. मध्यंतरीं जपानची चढाई सुरूच होती. जपानी लष्कर एकामागून एक मांचूरियांतील शहरें काबीज करीत चाललें होतें. शांतता स्थापित करण्याचा चिनी सेनापतीकडून प्रयत्न झाला परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जानेवारी महिन्यांत एकाएकीं शांघायमध्यें युद्धाला सुरवात झाली, व एकंदर युद्धाचें स्वरूप पालटून तें मांचूरियापुरतें न राहतां अधिक व्यापक झालें. लिट्न कमिशन फेब्रुवारींत आलें तरी युद्ध सुरूच होतें. सध्यां जपाननें आपलें लष्कर मागें घेतलें असून युद्ध तात्पुरतें थांबलें आहे. कमिशनचा रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे. परंतु वादाचा निकाल अजून झाला नाहीं.

नाझीपक्ष व जर्मन सत्तारूढपक्ष यांचेमधील झगडा.

मूळ कारण युरोपभर सध्यां पसरलेल्या सोशालिस्ट मताचें व विशेषतः बोल्शेविझम् या त्या मताच्या शाखेचें उच्चाटन केलेंच पाहिजे हा आग्रह फॅसीझम् या मतपंथानें धरला आहे. फॅसीझम् म्हणजे काय हें मागें आलेंच आहे. या पंथाचा मुख्य प्रवर्तक म्हणजे इटलीचा मुख्य मंत्री मुसोलिनी हा होय. हें मत जर्मनींतही स्थापावें म्हणून झगडणारा जर्मनीतही एक प्रबल पक्ष आहे. त्यास नाझीपक्ष नांव असून त्याचा मुख्य हिटलेर हा आहे.

डॉ. ब्रुनिंग यांजवरील विश्वासाचा ठराव पास होऊन त्यांचें जर्मन मंत्री मंडळांतील स्थान स्थिर झालें. पण इकडे नाझी (फॅसिस्ट) पक्षाचा पुढारी हर हिटलेर, ब्रुनिंग मंत्रीमंडळांच्या सत्तेला सुरुंग लावण्याचे कामांत गुंतला होता. युद्धाची कर्जफेड रद्द करण्याचे आपले धोरणाविषयीं लंडनमध्यें काय लोकमत आहे हें गुप्तपणें अजमावण्याकरितां त्यानें आपला उजवा हात जो आल्फ्रेड राझेनबर्ग यास लंडनला पाठविलें व आपण लवकरच जर्मनींत सत्ताधीश होणार अशी घोषणा चालू ठेवली.

१९३२ साल उजाडलें असेल नसेल तोंच हिंडेनबुर्ग व त्याचे प्रतिस्पर्धी यांचेमधील भावी संग्रामाचीं पूर्वचिन्हें दिसूं लागलीं. डॉ. ब्रुनिंग व जनरल ग्रोनर यांनीं मार्चमध्यें जर्मन प्रेसिडेंटची निवडणूक होणार असल्यामुळें हिंडेनबुर्गचें आसन स्थिर करण्याकरतां, हिटलेरशीं बोलणें सुरू केलें, पण निवडणुकीशिवाय गत्यंतर नाहीं, व हिंडेनबुर्गला एकमतानें प्रेसिडेंट म्हणून निवडून आणावयाचें असेल तर ब्रुनिंग मंत्रीमंडळास राजिनामे दिले पाहिजेत,नाहींतर आपण आपल्या पक्षाचा उमेदवार हिंडेनबुर्गला प्रतिस्पर्धी म्हणून उभा करूं, असा हिटलेरनें ब्रुनिंगला खोडा घातला. एवढेंच नव्हे तर तुम्हीं राजिनामा दिलाच पाहिजे असा त्यानें ब्रुनिंगला झणझणीत निर्वाणीचा खलिता धाडिला.

फेब्रुवारीमध्यें हिंडेनबुर्गनें आपल्या उतारवयाला न डगमगतां प्रेसिडेंटच्या निवडणुकीला उमेदवार म्हणून उभें रहाण्याचा निश्चय केला. २२ फेब्रुवारीला नॅशनल सोशालिस्टां (फॅसिस्ट) चा पुढारी हिटलेर यानेंहि निवडणुकीला उभें राहण्याचें जाहीर करून लोकांस चकित करून सोडलें.निवडणुकीला चार उमेदवार उभे राहिले. हिंनेडबुर्ग, हिटलेर, डुस्टरबर्ग (नॅशनॅलिस्ट व स्टील हेलमेट) व थालमान (कॉम्युनिस्ट). हिटलेर पक्षाच्या बाजूचीं वर्तमानपत्रें व भाषणें यांवर सत्ताधीश सरकारकडून बंधनकारक अटी घालण्यांत आल्या.

१३ मार्च रोजीं निवडणुकी झाल्या व खालीलप्रमाणें मतें पडलीं:—

हिंडेनबुर्ग—१८६६१७३६
हिटलेर —११३२८५७१

थालमान— ४९७१०७९
डुस्टरवर्ग— २५१७८७६
विंटर — १०९२९२

१० एप्रीलला पुन्हां निवडणुकी झाल्या. कारण पहिल्या निवडणुकींत इतर उमेदवारांना पडलेल्या मतांच्या बेरजेपेक्षां जास्त मतें हिंडनबुर्ग यास पडलीं नाहींत. दुसऱ्या निवडणुकींत खालीलप्रमाणें मतें पडलीं.

हिंडेनबुर्ग—१९३५९६४२
हिटलेर —१३४१७४६०
थालमान— ३७०६३८८

अशा रीतीनें हिटलेर व थालमान यांच्या मतांच्या बेरजेपेक्षां २२३५९९४मतें जास्त पडून हिंडेनबुर्ग पुढील ७ वर्षांकरितां प्रेसिडेंट म्हणून निवडून आला.

प्रशिया हा जर्मनीमधील प्रमुख प्रांत. त्यांत सोशल डेमोक्रॅट सत्ताधीश होते. पण २४एप्रील रोजीं झालेल्या प्रशियन पार्लमेंटच्या निवडणुकींत हिटलेरपक्षाला मोठा विजय मिळाला. व १६२ जागा त्यानें काबीज केल्या. तरीसुद्धां पार्लमेंटांत त्यांचें निखालस बहुमत होईना. बहुमताचें पारडें फिरविण्याचें कम्युनिस्टांच्या हातांत होतें.

मेअखेर ब्रुनिंग मंत्रीमंडळानें राजीनामा दिला. कारण जर्मनींतील आर्थिक अधःपात टाळण्याकरितां ब्रुनिंगनें काढलेला वटहुकूम हिंडेनबुर्गला मान्य होईना. जूनच्या सुरवातीस हर व्हॉन पॅपेनचें मंत्रिमंडळ सत्तारूढ झालें.

३ जूनला हिंडेनबुर्गनें रिचस्टॅग बरखास्त केलें व नवीन निवडणुकी जाहीर केल्या. नवीन कर बसविण्याचे व बेकारांच्या व पेन्शनरांच्या भत्त्यांत कपात करण्याचे हुकूम निघाले. १५ जून रोजीं हिंडेनबुर्गनें नाझी ब्राऊन आर्मीवरील निर्बंध उठविण्याचा हुकूम काढला. यामुळें बव्हेरियांत फारच खळबळ उडाली व बव्हेरियन सरकारनें तो हुकूम मानण्याचें नाकारिलें. व राजकीय पक्षांना गणवेशांत (uniform) रस्त्यांतून मिरवणुकी काढून देण्याची मनाई केली.

जुलै ७ ला लौझान परिषदेचा निकाल जाहीर झाला युद्धकर्ज फेडीच्या प्रश्नावर एकमत झालें व ९ जुलै रोजीं युरोपच्या मुत्सद्द्यांनीं लौझानच्या तहावर सही करून रिपॅरेशन्स मधून जर्मनीची मुक्तता केली.

जुलै २० रोजीं बर्लिनमध्यें राजकीय पक्ष व सरकारी अधिकारी यांचेमधील चकमकी इतक्या निकरास गेल्या कीं, तेथें मार्शल लॉ पुकारावा लागला. चान्सेलर हर व्हॉन पॅपेन हा स्वतः च प्रशियाचा डिक्टेटर झाला.

३१ जुलै रोजीं सर्वसाधारण निवडणुकी झाल्या व निकाल अनिश्चित राहिला. रिचस्टॅगमध्यें हिटलेर पक्षाचे दुप्पट प्रतिनिधी निवडले जाऊन, तो पक्ष प्रबल झाला. कम्युनिस्ट व सेंटर पक्षांचेसुद्धां प्रतिनिधी वाढले. रिचमध्यें पॅपेनचा पक्ष अगदीं दुर्बल झाला तरी सुद्धां मंत्रीमंडळ चालविण्याचें पॅपेननें ठरविलें. नॅशनल सोशालिस्टांना याचें वैषम्य वाटून, रिचच्या चान्सेलरची जागा हिटलेर यास मिळावी व मंत्रीमंडळांतील प्रमुख जागा आपणांस मिळाव्या म्हणून त्यांनीं जारीनें चळवळ केली, त्याचा परिणाम सार्वत्रिक अशांततेंत झाला, म्हणून हिंडेनबुर्ग यास राजकीय गुन्ह्याविरुद्ध वटहुकूम काढून जालीम उपाय योजावे लागले.

ऑगस्टच्या सुमारास हिटलेरनें चान्सेलरच्या जागेवरील आपला हक्क जाहीर केला. १३ आगस्ट रोजीं पॅपेनची मुलाखत घेऊन जर्मन मंत्रीमंडळांतील व प्रशियन प्रांताच्या मंत्रीमंडळांतील जागांची हिटलेरनें मागणी केली. व्हाइस चान्सेलरची व प्रशियाचे मुख्य प्रधानाची देऊं केलेली जागा त्यानें नाकारली. मतदारांनीं सर्वांत जास्ती मतें आपणास देऊन हिटलेरच चान्सेलर व्हावा अशी इच्छा प्रकट केली आहे असें त्यानें पॅपेन यास बजाविलें.

नंतर हिटलेर व हिंडनबुर्ग यांची एक अनपेक्षित मुलाखत घडून आली. व आपणास मंत्रीमंडळाचें प्रधानपद पाहिजे अशी हिटलेरनें मागणी केली. हिंडेनबुर्गनें ती मागणी नाकारिली, व नाझीपक्षानें आपली चळवळ यशस्वी करण्याकरितां अत्याचाराचा अवलंब केल्यास सरकार शक्य ते जालीम उपाय योजील असा हिटलेर

यास इषारा दिला. अशा रीतीनें प्रेसिडेंट व चान्सेलर होण्याचे हिटलेरचे दोन्ही प्रयत्न निष्फळ झाले.

ऑगस्ट अखेर हिटलेरपक्ष व अधिकारी यांचे मध्यें चकमक उडाली. एका कम्युनिस्टाचा सायलेशियामधील व्यूथेन गांवीं खून केल्याबद्दल पांच नाझीपक्षांतील लोकांना देहान्त शिक्षा झाली. या शिक्षेविरुद्ध हिटलेरनें जोराचा प्रतिकार सुरू केला. रिच व प्राशिया येथील सरकारांनीं असे बिनतारी संदेश देशभर पाठविले कीं, कोणच्याहि पक्षानें देशांतील सुव्यवस्थेस बाध आणण्याचा प्रयत्न केल्यास सरकार आपले जवळ असलेले सर्व जालीम उपाय योजून त्या पक्षास कडक शासन करील. तरीपण हिटलेरच्या चळवळीनें देहान्त शिक्षेऐवजीं आजन्म कैदेची शिक्षा फर्माविण्यांत आली.

३० आगस्ट रोजीं नवीन रिचस्टॅगची बैठक सुरू झाली. त्यांत निरनिराळ्या पक्षांचे संख्यावल खालीलप्रमाणें होतें:—

राइट :	नॅशनल सोशालिस्ट	२३०
	नॅशनॅलिस्ट	३७
सेंटर	रोमन कॅथॉलिक्स	९८
	सोशालिस्ट	१३३
लेफ्ट	कम्युनिस्ट	८९

कॅप्टन गोरिंग हा हिटलेर पार्टीचा अध्यक्ष निवडून आला. नॅशनल सोशालिस्ट व सेंटर पार्टी यांनीं एकमेकांशीं सख्य केलें.

४ सप्टेंबर रोजीं बर्लिनमध्यें एक लक्ष पन्नास हजार स्टील हेलमेट संघाच्या सभासदांची जंगी मिरवणूक निघाली. पॅपेन व इतर सैनिक अधिकारी हे या लष्करी परेडला हजर होते. यावरून असें दिसलें कीं, हिटलेरच्या स्टॉर्म ट्रूपर्सशीं सामना देण्याची वेळ आली तरी व्हॉन पॅपेनची तयारी होती. १२ सप्टेंबरला पॅपेननें पार्लमेंट बरखास्त केलें (प्रेसिडेंटच्या वटहुकुमानें) कारण त्याचे पॅपेन मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव ५१३ वि. ३२ मतांनीं पास झाला म्हणून प्रेसिडेंटच्या वटहुकुमानें पॅपेननें पार्लमेंट बरखास्त केलें. अशा रीतीनें पार्लमेंटाशिवाय मंत्र्यांच्या द्वारेंच प्रेसिडेंट हिंडेनबुर्ग राज्यकारभार पाहूं लागला; व एकतंत्री राज्यसत्ता सुरू झाली.

संस्थानें.

अक्कलकोट

(१९३१–३२ चा अहवाल)

क्षेत्रफळ ४९८ चौ. मैल. लोकसंख्या ९२६३६ एकंदर वसूल रु. ६८०५७५. ब्रि. सरकारला द्यावी लागणारी खंडणी रु.१४५९२. संरक्षणासाठीं शिपाई ६०. संस्थानचा कारभार रीजंट राणीसाहेब यांचे मार्फत चालतो. मागील वर्षांपेक्षां पाऊस कमी पडला व नेहमीं पडणाऱ्या पावसांपेक्षांही ह्या वर्षींचें पाऊसमान कमींच होतें; पण तो वेळेवर पडल्यामुळें खरीपाचीं व रब्बीचीं पिकें चांगलीं साधलीं. बहुतेक सर्व मालाच्या किंमती थोड्या फार फरकानें मागील प्रमाणेंच होत्या. फक्त भुइमुगाचा भाव बदलला होता.

वर्षारंभीं शिल्लक १३४५५० रु. होती. या सालीं आगाऊ रक्कम व डिपॉझिट्स् वगैरे धरून एकंदर वसूल ८०४५८६ रु. आला. मागील सालीं तो ६०३४३९ रु. होता. ह्या सालीं आगाऊ दिलेल्या रक्कमा व डिपॉझिट्स् वगैरे धरून एकंदर खर्च ६००३३१ रु. झाला. मागील सालीं तो ५८८००२ रु. झाला होता. ह्या वर्षाच्या अखेर शिल्लक ३३८७८७ रु. होती; त्यापैकीं सोलापूर इंपीरियल बँकेंत १४१२७९ रु. ठेवले होते. व संस्थानी तिजोरींत १९७५०८ रु. होते. ह्या वर्षा-अखेरीस एकंदर १९२३३११ रु. व्याजीं लावले:—

(१) गव्हर्मेंट प्रॉमिसरी नोट्स्–९०२२००रु. द. द. ३॥ प्रमाणें.

(२) सोलापूर येथील इंपीरियल बँक ऑफ् इंडियामध्यें ठेविलेले रु. १०२११११ ४ दराचें डिपॉझिट्स्.

एकूण रु. १९२३३११

पोलिस—स्वार धरून एकंदर पोलिसांची संख्या ६९ होती. वंशपरंपरागत शिपाई ११९ होते. (पाटील, पहारेकरी, खेडेगांवांतील शेतसनदी) पोलिस खर्च २६६९१ रु. झाला. मागील सालीं तो २४००३ रु. झाला होता. १८० चोरीच्या खटल्यामधील १४० लोकांची चौकशी झाली व त्यांत १०० लोकांवर आरोप ठेवण्यांत आला. चोरीस गेलेल्या मालाची किंमत २१८१ रु. होती; त्यांपैकीं ११७६ रु.चा ५३% माल परत मिळाला.

रजिस्ट्रेशन–रजिस्टर झालेल्या कागदांचा आंकडा ११७९ व उत्पन्न ३४५९ रु. झालें.

अक्कलकोट येथें एक म्युनिसिपालिटी आहे. मागील सालची बाकी व एकूण कर (घरपट्टी, भंगी पट्टी, ड्रेनेज पट्टी व पाणी पट्टी) मिळून ११९०७ रु. वसूल होता. त्यांपैकीं ७५१३ रु. ह्या सालांत वसूल झाले. एकंदर ड्रेनेजखर्च व आरोग्य खर्च १५३६८ रु. झाला. मागिल सालीं तो ११९१९ रु. झाला होता.

पब्लिक वर्क्स— ह्या खात्यांत एकंदर खर्च १२५९९१ रु. झाला. मागील सालीं तो ७६९३४ रु. झाला होता.

जन्ममृत्यूची नोंद— ह्या सालीं जननसंख्या ३१५९ व मृत्युसंख्या १९९९ होती. मागील सालीं जननसंख्या ३११५ व मृत्युसंख्या २२९७ होती. जन्ममृत्यूचें प्रमाण ३५·१ : २१·५ असें होतें.

आरोग्य खातें— अक्कलकोट व करजगी येथील धर्मार्थ दवाखान्याचें काम समाधानकारक होतें. दोन्ही दवाखान्यांतील रोग्यांची संख्या २३१६७ होती व त्यांवरील वार्षिक खर्च ६८४९ रु. झाला. गुरांच्या दवाखान्यांत २०३ जनावरांना उपचार करण्यांत आला. व ३२६२ मुलांना देवी टोंचण्यांत आल्या.

शिक्षण— शाळांची संख्या ५० आहे. व त्यांत ह्या सालीं ३९६८ मुलें शिकत होतीं. मागील सालीं विद्यार्थ्यांची संख्या ३८६७ होती. ह्या वर्षी शिक्षणावर एकंदर ४४१२९ रु. खर्च झाला. मागील वर्षी हा खर्च ४४३९८ रु. झाला होता.

ह्या वर्षी टोळांचा उपद्रव झाला नाहीं.

लोकांची सर्वसाधारण स्थिति—हें वर्ष

एकंदरीनें पहातां चांगलें गेलें. व भुईमुगाचा भाव चांगला आल्यामुळें आर्थिक दृष्टयाहि लोकांची स्थिति समाधानकारक होती. त्यामुळें साराही व्यवस्थित रीतीनें वसूल झाला. सार्वजनिक आरोग्य चांगलें होतें, एन्फ्ल्युएन्झा व प्लेग ह्यांची सांथ नव्हती. १३ खेड्यांतून देवीची सांथ आली होती. व १७ खेड्यांत कॉलरा झाला होता व त्यांत २५ मनुष्यें दगावलीं. मंगरूळ, कर्जल, नागसूर, करजगी व अक्कलकोट येथें को-ऑपरेटेव्हि सोसायट्या ह्या सालीं सुरू झाल्या. ३६ लोखंडी नांगर दरबारनें विकत घेतले व ते एका मध्यवर्ती खेड्यांत ठेवून त्यांचा उपयोग (फक्त नांवाला भाडें घेऊन) गरीब शेतकऱ्यांना व्हावा असा उपक्रम सुरू केला.

इचलकरंजी

(१९३०-३१ चा अहवाल)

गेल्या खानेसुमारीप्रमाणें इचलकरंजी संस्थानची लोकसंख्या ६८५७३ असून एकंदर वसूल गेल्या पांच वर्षांची सरासरी पहातां, कर्ज व डिपाझिट्स् वगळून ५२५१५८ रु. आहे.

कोल्हापूर दरबारला वार्षिक २००० रु. संस्थान खंडणी देतें.

गेल्या पांच वर्षांत इचलकरंजी हें त्या भागांतील कापसाच्या व्यापाराचें केन्द्र बनलें आहे. तेथें पांच जिनिंग फॅक्टरीज् व एक कॉटन प्रेस आहे. गेल्या सालीं इचलकरंजी शहरांत ३३०० कापसाचे गठ्ठे बांधण्यांत आले. चालू सालीं त्यांत वाढ होऊन हा आंकडा ४५०० झाला. ब्रोकर्सच्या दुकानांकरितां जागा आखण्यांत आल्या असून तेथें भुइमूग, तंबाखू, मिरच्या, गूळ वगैरेंची देवघेव होते. आज त्याहून पुष्कळ तांदूळ परगांवीं रवाना होतो. आजरें तालुक्यांतील उत्तुर हें गांव व्यापाराचें लहानसें केन्द्र आहे. इचलकरंजी तालुक्यांतील आराग विड्यांच्या पानांकरितां प्रसिद्ध आहे.

इचलकरंजी फार दिवसांपासून जाड्या भरड्या लुगड्यांकरितां प्रसिद्ध आहे. पण कांहीं लोकांनीं नुकतेच यांत्रिक मागाचे कारखाने सुरू केले आहेत. त्यांत तयार होणारीं लुगडीं तलम व सुबक कांठाचीं असून त्यांचा खप मध्यप्रांत व वऱ्हाडांतहि होतो. यांत्रिक मागांशिवाय संस्थानांत २८० हातमाग व धोट्याचे माग आहेत व ७गिरण्या आहेत.

याशिवाय इचलकरंजी येथें दोन मेटल् वर्कशॉप्स् (metal workshop) असून त्यांत तिजोऱ्या, कॉट्स् व बादल्या तयार होतात.

चालू सालीं ४२९१९रु. ९ आ. ९ पै शिक्षणाकरितां खर्च झाले. गेल्या सालीं ४१५७० रु. १२ आ. ४ पै. खर्च झाले होते.

संस्थानांत सहकारी पतपेढ्या २३ आहेत; सभासद ३३०२ असून वर्किंग कॅपिटल २६९६६६ रुपये आहे. सभासदांचें लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण ५ आहे; म्हणजे दर २० माणशीं १, पतपेढ्यांचा सभासद आहे.

पोलीस खात्यांतील नोकरलोकांची संख्या १११ असून खात्यावरील खर्च १८८६३ रु. आहे.

पाऊसपाणीः—गेल्या पांच वर्षांची सरासरी—इचलकरंजी २२·७८ आजरें ८२·१७.

३१ मार्च १९३१ अखेर इचलकरंजी म्युनिसिपालिटी जमाखर्चः—जमा—रु. ४३०१०-३-२ खर्च—४१००५-१३-१ शिल्लक—२००४-६-१

खाजगीकडील खर्च चालू वर्षी ११०४३९ रु. आहे. शाळांची संख्या ३६ असून, एकंदर मुलें २४१४ आहेत. हायस्कूलचा खर्च रु. १२१५६ व प्राथमिक शाळांचा रु. १४८१७.

औंध (सातारा एजन्सी)

(१९३०-५ जुलै १९३१ अखेरचा अहवाल)

सामान्य माहितीः—औंधसंस्थानचें क्षेत्रफळ ५०१ चौ. मैल आहे. संस्थानचें सरासरी उत्पन्न रु. ४७८०३३ आ. ५ पै. ४ आहे.

संस्थान वरिष्ठसरकारला किंवा इतर संस्थानला खंडणी देत नाहीं.

खानेसुमारी—या वर्षी दशवार्षिक खानेसुमारी झाली. त्यांत संस्थानची लोकसंख्या



बाळासाहेब पंतप्रतिनिधी.



गो. स. सरदेसाई.



अण्णासाहेब विजापूरकर.



आर्टिस्ट करमरकर.

७६५०७ इतकी भरली. गेल्या खानेसुमारीच्या वेळीं ती ६४५६० इतकी होती म्हणजे १८·६ (शेंकडा) वाढ झाली.

संस्थानची प्रातिनिधिक सभा:—या सभेचीं दोन अधिवेशनें झालीं. रा. ब. काळे यांची अध्यक्ष म्हणून व श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाली.

औंधस्टेट ॲक्ट नं १ (१९३० चा) चांगल्या रीतीनें अमलांत आणण्याकरितां नियम करण्याचें रा. ब. काळे यांचे अध्यक्षतेखालीं नेमलेल्या ४ सभासदांचे कमिटीवर सोपविलें.

इतर ठराव वगैरे—सिव्हिल प्रोसीजर कोडचा १३ वा सेक्शन दुरुस्त करण्याचा ठराव पास झाला व चीफसाहेबांनीं त्याला अनुमति दिली. बालविवाहप्रतिबंधक बिल नापास झालें. चीफसाहेबांनीं आपल्या प्रास्ताविक व समारोपाच्या भाषणांत शेतकी व उद्योगधंद्याची वाढ होणें किती आवश्यक आहे, हें सभासदांना पटविलें, व स्थानिक शेतकी व आर्थिक प्रश्नांकडे त्यांचें लक्ष वेधलें. बालशुश्रूषा, दूधपुरवठा व गाईचें दूध सर्व संस्थानला मिळण्याची आवश्यकता, यावरहि चीफसाहेबांनीं भर दिला. खेड्यांतील लोकांची स्थिति सुधारण्याकरितां सभासदांनीं पंचायतीचा चांगला उपयोग करून घ्यावा असेंहि त्यांनीं सभासदांस सांगितलें.

जमिनीची मशागत करण्याकरितां, विहिरी खणण्याकरितां संस्थानच्या बँकेनें या वर्षी रु. ८३८३ ८ आणे वांटले.

महसूल—एकंदर रुपये २५८८०६–१ आ. ५ पै. इतकें येणें होता.

कापसाचें कापड विणण्याचे २०० हातमाग आहेत. व लोकरी ब्लँकेट विणण्याचे आणखी ५० आहेत. दोन तेलाच्या गिरण्या आहेत, व दोन दळणाच्या आहेत. एक साबूचा कारखाना आहे. ओगलेवाडी, किर्लोस्करवाडी व औंध सोप वर्क्स हे कारखाने मद्दशूर आहेत. अबकारीचें उत्पन्न ६९६७५ रु. असून दुकानें ३० आहेत.

खाजगी खर्च ४३६६१ रु. असून चीफसाहेबांचे कुटुंबांतील मंडळींस भत्ता १२३४१ रु. आहे.

संस्थानांत लष्कर नाहीं. पोलिसांची नोकरसंख्या ६१ असून त्या खात्यावर खर्च ७०४२ रु. आहे.

हायस्कूलांत २५५ मुलें असून प्राथमिक शाळांत ४०२१ मुलें आहेत. मुलींच्या शाळेंत ९६७ मुली आहेत. शिक्षणखात्यावर एकंदर खर्च ५२२९३ रु. आहे.

वैद्यकीय खात्यावर ७९५३ रु. खर्ची पडले व सुमारें १५॥ हजार रोग्यांना औषध मिळालें. संस्थानची लोकसंख्या ७६५०७ असून जन्माचें हजारीं प्रमाण ३९·५ व मृत्यूचें ह. प्र. २८ आहे.

कुरुंदवाड [थोरली पाती]

संस्थानचें क्षेत्रफळ १८२ चौरस मैल असून संस्थानची लोकसंख्या ४४२२१ आहे. दरबारचें शेतसाऱ्याचें उत्पन्न २६४९९३ रुपये असून ब्रिटिश सरकारास खंडणीदाखल ८४२५ रु. दिले जातात. संस्थानचे फौजदारी हायकोर्टाचे अधिकारी मे. पोलिटिकल एजंट (दक्षिण महाराष्ट्रीय संस्थानचे) यांचेकडे असून दिवाणी हायकोर्टाचे अधिकार राव. कारभारी यांच्याकडे आहेत. कुरुंदवाडच्या म्युनिसिपालिटींतील २४ सभासदांपैकीं १६ लोकनियुक्त, ८ सरकारनियुक्त व लोकनियुक्त अध्यक्ष असें त्यांचें प्रमाण आहे. शिक्षणखात्यावर २८५०३ रु. मेडिकल खात्यावर, (वैद्यकीय) २२२९१ रुपये, खाजगी खर्च ३१५० रु. अशा खर्चाच्या कांहीं बाबी आहेत.

जत

जत संस्थानाकडून दरसाल ११२४७ रु. खंडणी ब्रिटिश सरकारला दिली जाते. ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व कायदेकानू येथें लागू आहेत.

संस्थानांत एकंदर ११९ गांवें असून वार्षिक जमीनमहसूल सुमारें ४ लाखांवर आहे. जमीन महसुलाशिवाय इतर कोणत्याही प्रकारचा कर येथें नाहीं. संस्थानचा सर्व मुलुख सलग असून

क्षेत्रफळ सुमारें ९८००८ चौरस मैल आहे. व सन १९३१ चे खानेसुमारीप्रमाणें संस्थानाची लोकसंख्या ९११०२ आहे.

कापसाची निर्यात होते. शिवाय संस्थानांतील बिळूर गांवीं तयार होणाऱ्या विड्याचे पानांचा व्यापार मुंबईपर्यंत चालतो.

संस्थानांतील उमदी येथील सतरंज्या व पितळेच्या मूर्ति व व्हसपेठ येथील लोकरी बुरणुसें प्रसिद्ध असून बाहेरगांवीं पाठविलीं जातात. संस्थानांत बहुतेक ठिकाणीं पूर्वीपासून हातमाग असून त्यावर निघणारें जाडेभरडें कापड वापरतात. संस्थानांतील डोंगराळ भागांत मेंढरांस चरणेची सोय असून त्यांचे लोंकरीपासून संस्थानांतील लोकांस पुरेशीं घोंगडीं येथें तयार होतात.

बहुतेक सर्व ठिकाणीं पाण्याचा पुरवठा मुबलक आहे. संस्थानांत व्हसपेठ येथें एक मोठा तलाव अलीकडे बांधला गेल्यानें आसपासचे भागास पाणी मुबलक झालें आहे.

येथें दरसाल २० ते २५ इंच पर्यंत पाऊस पडतो. संस्थानचे हद्दींत जंगल फारसें नाहीं; तरी पावसाचे वृद्धीकरितां वृक्षसंवर्धनाची खटपट कै० श्री. रामराव आबासाहेब महाराजांचे कारकीर्दीपासून चालू आहे.

संस्थानचे पश्चिम भागांत चांगल्या खिलारी बैलांची पैदास केली जाते. उत्तम खिलारी गाई व बैल तयार करून त्यांवरही उपजीविका करण्याचा लोकांचा उपधंदा आहे.

खुद्द जत येथें पोस्ट व तार ऑफिस असून संस्थानांत ४ ठिकाणीं पोस्ट ऑफिसें आहेत. (डफळापूर, उमदी, बिळूर, वाळेखिंडी.)

लोकांच्या आरोग्याकरितां संस्थानांत दोन ठिकाणीं (जत व उमदी) मोफत दवाखाने असून व्हॅक्सिनेशनची योजना आहे.

प्रौढ स्त्रियांना साक्षर होतां येऊन प्रपंचास उपयुक्त असें शिवणकाम, विणकाम—इत्यादि कलेचें ज्ञान व्हावें या हेतूनें श्री. मा. डॉ. राणीसाहेब महाराज जत यांचे देखरेखीखालीं 'लेडीज् होम क्लास' नांवाची संस्था येथें आहे.

जमखंडी

(१९३१—३२ चा अहवाल)

या संस्थानांत जमखंडी, कुंदगोळ आणि बनहट्टी हीं तीन शहरें, ७७ मोठीं खेडीं, व ११ लहान खेडीं आहेत.

जमखंडी संस्थानचें एकंदर क्षेत्रफळ ५२४ चौरस मैल आहे. व त्यांतील लोकसंख्या (१९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें) ११४२८२ आहे.

गेल्या पांच वर्षांच्या आढाव्यावरून संस्थानचें उत्पन्न दरसाल सरासरी ९९२५१५ रु. आहे. संस्थान ब्रिटिश सरकारला घोडदळाबद्दल मोबदला म्हणून रु. २०८४०-१०-० दरसाल भरतें. निरनिराळ्या खात्यांत कपात केल्यानें जवळ जवळ ५०००० तें ६०००० रु. ची बचत झाली. राजेसाहेबांनीं आपखुषीनें आपल्या खाजगींत १०८०० रु. ची कपात केली.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शहराला विजेचा पुरवठा करण्यांत आला ही होय. या बाबतींत झालेला खर्च राजेसाहेबांनीं आपल्या खासगींतून केला.

यंदा राजेसाहेबांनीं नेमिलेली "राज्यघटना कमिटी" ही या वर्षाची सर्वांत महत्त्वाची बाब आहे.

संस्थान लढाऊ सैन्य बाळगीत नाहीं. पोलिस-पाटील व इतर सनदी नौकर मिळून ४६६ आहेत. हे सर्व सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिसच्या हुकमतीखालीं असतात.

तुरुंगांतून स्त्री-गुन्हेगारांकरितां स्वतंत्र व्यवस्था असून एकंदर व्यवस्था ठीक असते. तुरुंगावर एकंदर खर्च ५७७३ रु. झाला. कैद्यांकडून कापसाचें व रेशमाचें विणकाम करून घेण्यांत येतें.

पोलिसखातें:— पोलिस खात्यांतील अधिकारी, शरीरसंरक्षक व रिसालदार मिळून या खात्यांतील एकंदर नोकर:- ३५८. त्या सर्वांचे पगारानिमित्त खर्च:-६२८७० रु.

फॉरेस्ट—जमखंडी तालुक्यालाच फक्त फॉरेस्ट आहे. त्याचें एकंदर क्षेत्रफळ २७१९२ एकर १४ गुंठे असून, पैकीं १५१० एकर २९

गुंठे राखीव रान आहे. या खात्याचें उत्पन्न ८००० रु. आलें

अबकारी—या खात्याचें यंदाचें उत्पन्न ९६५२८ रु. आहे. दारू व ताडीचा मक्ता ब्रि. सरकारनें दहा वर्षांच्या करारानें घेतला आहे. भांग, गांजा वगैरेंचा मक्ताही ब्रि. सरकारनें घेतला आहे. अफू, ब्रिटिश गव्हर्नमेंट डेपोंतून आणण्यांत येतें.

व्यापार व उद्योगधंदे— आयात- साखर, तांदूळ, मीठ, मसाल्याचे पदार्थ, नारळ, इमारती लांकूड, कच्चें सूत, कापड, राकेल वगैरे.

निर्यात- धान्य, कापूस, सरकी, लुगडीं, करडईचें तेल, पेंड वगैरे.

चालू सालचीं आयात—रु. २४६२६७९
निर्यात—रु. ३१७७०५

जमखंडी, बनहट्टी वगैरे ठिकाणीं सूत व रेशीम रंगविणें व हातमागावर लुगडीं व जाडेभरडें कापड विणणें हे धंदे मोठ्या प्रमाणावर चालतात. जमखंडी येथें एक जिनिंग फॅक्टरी व एक कॉटन प्रेस आहे. हीं संस्थानाच्या मालकीचीं असून शिवाय खासगी मालकीच्या जिनिंग फॅक्टरीज जमखंडी व कुंदगोळ तालुक्यांत आहेत.

करडईच्या तेलाच्या पैदाशीबद्दल जमखंडी तालुका प्रसिद्ध आहे.

संस्थानचा जमाखर्च.

जमा:—८२७२७० रु. खर्च:—७५७२६३ रु.

श्रीमंत सरकारचा खाजगी खर्च १,३३,५४६ रु.

शिक्षणः—प्राथमिक व दुय्यम शिक्षण मोफत देण्यांत येतें. शिवाय दरसाल ५० विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणही फुकट मिळण्याची व्यवस्था पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें संस्थानानें राजेसाहेबांच्या परमपूज्य वडिलांचें स्मारक म्हणून केली आहे. संस्थानांत दोन हायस्कुलें आहेत, व एक ए. व्ही. स्कूल आहे. ५६ व्हर्नाक्युलर मुलांच्या शाळा व ४ मुलींच्या शाळा आहेत. एक संस्कृतपाठशाळा आहे. अस्पृश्यांकरितां स्वतंत्र शाळा आहे.

संस्थानांत शाळांची संख्या ६४ असून पटावर विद्यार्थी ५०२९ आहेत. खात्यावर खर्च ८०४०८ रुपये आहे.

आरोग्य—सरकारी दवाखान्यातर्फे ३७३०८ रोग्यांस औषधपाणी मिळालें व या खात्यावर २००८२ रुपये खर्च झाला. शिवाय जमखंडी म्युनिसिपालिटीनें चालविलेल्या आयुर्वेदिक दवाखान्याचाही लोकांना फार उपयोग झाला.

संस्थानाच्या १,१४,२८२ लोकसंख्येंत ४०७७ जन्म व २७८२ मृत्यु झाले.

पाऊसः— जमखंडीचें सरासरी मान १७ इंच व कुंदगोळचें २१ इंच असतें.

संस्थानांत मादक पदार्थांचीं दुकानें ५० असून त्यांचें उत्पन्न ९६५२८ रु. आहे.

फलटण

(१९३१–३२ चा अहवाल)

फलटण संस्थान हें सातारा पोलिटिकल एजन्सीपैकीं एक संस्थान आहे. संस्थानाचें क्षेत्रफळ ३९७ चौरस मैल असून संस्थानाची लोकसंख्या १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें ५८,७४७ आहे. १९२१च्या खानेसुमारीचे वेळीं ४३,२८५ भरली होती. नीरा राइट बँक कॅनॉल वॉटर रेटचा वसूल धरून संस्थानाचा गेल्या पांच वर्षांचा सरासरी वसूल ४५८०९५ रु. आहे.

घोडदळाच्या कांहीं भागाबद्दलचा हिस्सा (contribution for a horse contingent) म्हणून संस्थान ब्रिटिश सरकारास दरसाल ९,६०० रु. देतें.

संस्थानाचे दिवाण श्री. गोडबोले यांना, राजेसाहेबांनीं, राउंडटेबल कॉन्फरन्सचें दुसरें अधिवेशन, फेडरल स्ट्रक्चर कमिटी व इतर कमिट्या यांच्या कामकाजाची बारकाईनें पाहणी करण्यासाठीं पाठविलें होतें.

जमीनमहसूल व जमाबंदी

संस्थानाचा एकंदर वसूल ५७३०७९ रु. भरला. शिक्षणाप्रीत्यर्थ एकंदर २३९६१ रु. खर्ची पडले. फलटण म्युनिसिपालिटीच्या हद्दींत, अस्पृश्यांची

शाळा व इतर प्राथमिक शाळा या एकत्र करून अस्पृश्यतानिवारणाचा प्रयत्न करण्यांत आला. (फलटण म्युनिसिपल हद्दीबाहेर सुद्धां खेडेगांवांत सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना एकाच शाळेंतून शिक्षण देण्यांत येतें.) अस्पृश्यांची स्थिति सुधारण्याच्या मार्गांतील आणखी एक पायरी संस्थान वर चढलें असें निःसंशय म्हणतां येईल. एका अनुभवी शिक्षकाच्या देखरेखीखालीं एक रात्रीची प्राथमिक शाळा काढून Adult Education या दृष्टीनेंही सुरुवात झाली आहे. फलटण येथें एक मुलींची शाळा आहे. शिवणकाम आणि कलाबतूचें काम (Embroidery work) हेंही शिकविलें जातें. म्युनिसिपल शाळांतील मुलांची व मुलींची वैद्यकीय तपासणी करण्यांत येऊन सक्तीचें शारीरिक शिक्षण शाळांतून सुरू करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

शेतीपासून निघालेल्या उत्पन्नास (Produce) फारच कमी किंमत होती. त्यामुळें लागवड करणाऱ्यांना स्वतःचें देणें देतां न आल्यानें त्यांची सांपत्तिक स्थिति अगदीं खालावली; व थकलेली बाकी (overdue) वाढूं लागली. वेतनदारांच्या सोसायट्यांचें (Salary Earner's Societ ies) काम चांगलें चाललें आहे.

उद्योगधंदे—येथें तेलाचे घाणे ५१ आहेत. हातमागांची संख्या ९९ आहे. फलटण येथें एक जिनिंग फॅक्टरी आहे. संस्थानांतील हातमागावर धोतरें, लुगडीं, घोंगड्या वगैरे कापड विणतात.

पोलिसांतील नोकरसंख्या १०९ असून खात्यावर खर्च २१२६२ रु. होतो.

फलटण म्युनिसिपालिटीचा वसूल रु. ६३२३८ असून खर्च रु. ३५९२२ आहे.

संस्थानांतील पर्जन्यमान गेल्या ५ वर्षांतील सरासरीनें १९ इं. ६८ सें. आहे.

मादक पदार्थांचीं ९ दुकानें असून त्यांचें उत्पन्न रु. २९५८० आहे.

श्रीमंत सरकारचा खाजगी खर्च रु. २७५०० आहे. रुग्णशुश्रूषेवर रु. ४२२३ खर्च झाले. संस्थानाच्या ५८७४७ लोकसंख्येपैकीं जन्म २१८३ व मृत्यु १३४३ आहेत. शाळा ४१ असून मुलें २४४५ आहेत. शाळांवरील खर्च रु. २३९६१ आहे.

बडोदें

(१९३०—३१ चा अहवाल)

लेजिस्लेटिव्ह कौन्सिलः-कायदे करणें हा महाराजांचा एक विशिष्ट अधिकार आहे व या कामीं त्यांना कार्यकारी मंडळ व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली यांजकडून मदत होते. कायदेमंडळांत दिवाणसाहेब धरून एकंदर २७ सभासद असतात. त्यांत दिवाणसाहेब अध्यक्ष असतात. न्याय व वसूल या खात्यांचे मंत्रसचिव, न्यायमंत्री, सरसुभा व सरकारी वरिष्ठ कोर्टाचे वकील हे कायदेमंडळाचे Exofficio सभासद असतात. शिवाय राजघराण्यांतून व सरकारी अधिकाऱ्यांतून ७ सभासदांची नेमणूक करण्यांत येते. व बिनसरकारी ४ सभासद नेमण्यांत येतात. १० जागांसाठीं निवडणुकपद्धति अमलांत आणण्यांत येते. कायदेमंडळाचे ठराव शिफारसस्वरूपांत श्रीमंत महाराजांस सादर करण्यांत येतात.

मालाच्या विक्रीसंबंधीं कायदा, खानेसुमारी कायदा, प्रांतपंचायत निवडणूक न्याय्य ठरविणारा कायदा व हिंदुघटस्फोटाचा कायदा—हे १९३०-३१ या वर्षीं पास झालेले कायदे होत. त्यांपैकीं घटस्फोटाचा कायदा हा बराच महत्त्वाचा आहे. हिंदूंपैकीं कांहीं जातींतच घटस्फोट मान्य होता. या कायद्यान्वयें असें ठरलें कीं, रूढीनें घटस्फोट मान्य असेल अशा जातींत कोर्टांत नोंद केल्याखेरीज अगर कोर्टाची संमति मिळाल्याखेरीज घटस्फोट न्याय्य होणारा नाहीं. हा कायदा १० ऑगस्ट १९३० पासून अंमलांत आला.

बालविवाहप्रतिबंधक कायदाः— या वर्षीं या कायद्याच्या उल्लंघनाबद्दल १२७५ लोकांना प्रत्येकी १० रु. हून जास्त दंड करण्यांत आला. या कायद्यान्वयें ठोठावण्यांत आलेला दंड एकंदर रु. ३८०९३ झाला. मागच्या वर्षीची ही रक्कम रु. ८४४५५-८-० इतकी मोठी होती.

वर्ष	दिलेल्या मर्यादेनंतरच्या वयांत झालेलीं लग्नें	बालविवाह		एकंदर लग्नें	मुदतीच्या वयाच्या आंतील लग्नांचें एकंदर संख्येशीं प्रमाण
		निर्दोषी	शिक्षा झालेले		
१९२९–३०	११,३१५	७	३,८७०	१५,१९२	२५·५
१९३०–३१	११,५९०	१०	२,५००	१४,१००	१७·८

सैन्य

सैन्याचें वर्णन	संख्या निश्चित (फिक्स्ड स्ट्रेंग्थ)			प्रत्यक्षसंख्या (ऍक्च्युअल स्ट्रेंग्थ)		
	इफेक्टिव्ज्	नॉन् इ०	एकूण संख्या	इफेक्टिव्ज्	नॉन् इ०	एकूण संख्या
तोफखाना (Artillery L. F. बॅटरी)	९३	६७	१६०	७७	४३	१२०
घोडदळ	१५००	८२	१५८२	१०३१	११५	११४६
पायदळ एकूण	२,०७१	१४८	२२१९	२२९२	१०६	२३९८
बॅंड	१११	६	११७	५४	७	६१
जनरल व स्टाफवरचे अधिकारी	६	२	८	४	...	४
एकूण	४७८१	३०५	५०८६	२४५८	२७१	२७२९

न्यायखातें:–अपिलें ऐकण्यासाठीं नेमलेल्या ट्रिब्युनलखेरीज न्यायदानासाठीं असलेलीं दिवाणी व फौजदारी कोर्टें एकंदर १९४ आहेत. दिवाणी व फौजदारी कोर्टांचें सर्व उत्पन्न (तिकिटें, कोर्टफी, दंड व इतर बाकी मिळून) व झालेला एकंदर खर्च खालीं दिला आहे.

वर्ष	उत्पन्न	खर्च
१९२९–३०	७,६२,१२९	६,८१,०२८
१९३०–३१	७,२६,२१३	७,०८,७४०

एकंदर खर्च जो रु. ७,०८,७४० झाला. त्यांतली रु. ५४,५७१ इतकी रक्कम सरकारी वकिलांची फी व इतर किरकोळ खर्च म्हणून खर्ची पडली.

सैन्य.–कुमकेची फौज म्हणून असलेली ब्रिटिश फौज सोडली, तर १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत संस्थानांत शिस्तीची तयार पलटण नव्हती. महाराजा दुसरे सयाजीराव यांनीं एक लहानसें घोडदळ ठेवलें होतें असें दिसतें. परंतु पायदळ, घोडदळ, तोफखाना वगैरे सैन्य जमवून त्यांना युरोपियन व अँग्लोइंडियनांकडून उत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न प्रथम कै० महाराजा खंडेराव गायकवाड (१८५६–१८७०) यांनीं केला. त्या सैन्यास १८७५ व १८८७ त मान्यता मिळाली. सध्यांची सैन्यशक्ति किती आहे हें कोष्टकावरून दिसून येईल.

या खात्याचा एकंदर खर्च १३,५३,७८९ रु. झाला. १९२९–३० या वर्षी या खात्यास १३३४,३०० रु. इतका खर्च आला होता. हेरखात्याचा खर्च १९३०–३१ या सालीं रुपये २६,०४७–१४–८ इतका झाला.

दौलत (Finance):—खंडणी येणें किती, आली किती व बाकी उरली किती हें पुढील कोष्टकावरून ध्यानांत येईल.

(आंकडे लाखांचे आहेत)

अनुक्रम नं.	एजन्सीचे	एकंदर येणें	जमा	बाकी
१	रेवाकांठा	१·७३	१·५०	·२३
२	महीकांठा	३·९६	१·३७	२·५९
३	काठेवाड	५·९८	२·९२	३·०६
४	पालनपूर	·९०	·४३	·४७
५	मियागांव	·२७	··	·२७
	एकूण	१२·८४	६·२२	६·६२

पोलिसखातें:—आधुनिक पद्धतीवर पोलिसखातें चालविण्याचा पहिला प्रयत्न इ.स. १८७८त महाराज दुसरे सयाजीराव यांच्या कारकीर्दीत झाला. त्यापूर्वी संस्थानांत पोलिसखातें व फौजफांटा यांत विशेष वेगळेपणा कांहीं नव्हता. इ.स. १८८१त पोलिस खात्यासंबंधानें पहिला कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यांत वेळोवेळीं जरूर त्या सुधारणा करण्यांत आलया असून आजमितीस त्यांचा अंमल चालेल अशा दृष्टीनें त्यांत फरक केले आहेत.या कायद्यांतील नियमान्वयें, पोलिस कमिशनर, जिल्ह्याचे सुभे, पोलिस नायबसुभा व इतर अधिकारी यांचे अधिकार स्पष्टपणें सांगितले आहेत. संस्थानांत पोलीस अधिकारी १०३२ व शिपाई ४१०८ आहेत. रेग्युलरफोर्सचा खर्च पुढीलप्रमाणें:—१९३०–३१ सालीं एकंदर खर्च १७,४०,१८५ व १९२९–३० सालीं १७,६४,०९७. इरेग्युलर फोर्सचा एकंदर खर्च १९३०–३१ सालीं २,२६,५६४ रु. इतका आला. १९२९–३० सालीं यासाठीं २,५५,५६७ रु. खर्ची पडले होते. फौजफांट्यावर एकंदर खर्च २३,५५,१५३ रु. इतका झाला. १९३०–३१ या वर्षअखर २१६२ पेन्शनें होतीं, व पेन्शन्सपायीं ५,०३,५१८ रु. खर्च झाले. बक्षिसादाखल ३१ जणांना रु. २३०९ देण्यांत आले. लष्करी खात्यांत वर्षअखेर १२९६ जणांना पेन्शनें चालू होतीं. व पेन्शन्सची रक्कम रु. १,६०,१७१ इतकी झाली. ४१ जणांना बक्षिशीदाखल १३,२६४ रु. देण्यांत आले. १९३०–३१ या वर्षी एकंदर वसूल रु. २५९·६६ लक्ष रुपये झाला व एकंदर खर्च २३९·०३ लक्ष रुपये झाला.

खर्चाच्या कांहीं बाबी	१९३०–३१	(आंकडे लक्ष रुपयांचे आहेत) १९२९–३०
राजवाडा (खानगी)	२६·१५	२७·३२
श्रीमंत युवराज प्रताप–सिंह	३·७०	२·२८
शिक्षण	३४·८४	३४·३५

वर्षातील पाऊसपाणी

जिल्हा	१९३०–३१ इंच	सेंट,
बडोदें	४०	५९
म्हेसाणा	२३	२२
नवसरी	५४	१६
अमरेली	२१	२७.
ओखामंडळ... ...	१७	६०

अबकारी खात्याचें उत्पन्न रु. २०,६१,६७१ झालें. दारू, ताडी वगैरेसारख्या मादक पेयांची दुकानें संस्थानांत एकंदर ९२९ इतकीं होतीं. एकंदर १०२४८ पौंड अफू खपली; व त्यापासून एकंदर रु. ४,४६,३११ इतकें उत्पन्न झालें.

संस्थानांत एकंदर २२००मण मीठ तयार झालें.

लोकलबोर्डें:—लोकलबोर्डांचें एकंदर उत्पन्न रु. ५४,९३,४९५ झालें व एकंदर खर्च ५३,५३,२३३ रु. इतका झाला. सर्व म्युनिसिपालिट्यांचें एकंदर उत्पन्न रु. १३,६७,२९३ झालें व खर्च रु. १२,४५,९४४ इतका झाला. बडोदें येथील शेतकीशिक्षण देणाऱ्या शाळेंत ९ विद्यार्थी होते. या शाळेचा १९३०–३१ तील खर्च रु. ४००८–१४–८ इतका होता. अशाच प्रकारची

एक शाळा नवसरी जिल्ह्यांत होती. तींत १२ विद्यार्थी शिकत होते. त्या शाळेचा खर्च रु. २१३४-३-८ झाला. १९३०-३१त गुरांचे दवाखाने बडोदा राज्यांत एकंदर २१ होते. त्यांत एकंदर ३३२८० गुरांना उपचार करण्यांत आले. या खात्यात एकंदर खर्च रु. १,६२,७३४-०-५ इतका झाला. ओखबंदराचें उत्पन्न १९३०-३१ त रु १५,९२,२६३ झालें.

सहकारी संस्था.

वर्षअखेर १०४७ संस्था होत्या. सभासदांची संख्या ३८६३८ होती.

चालू भांडवल — ७४,९४,८११ रु.
ठेव— ३९,३०,५९६ रु.
गंगाजळी— ९,६९,३५४ रु.

१९३०-३१ या वर्षी जंगलखात्याचें एकंदर उत्पन्न ३,१७,१०९ रु. झालें व खर्च १,३४,७११ रु. झाला.

पब्लिक वर्क्स खात्याचा एकंदर खर्च ४८·०४ लक्ष रुपये झाला.

रेल्वे

संस्थानच्या मालकीची एकंदर ७०७·५९ मैल रेल्वे आहे. ३१ मार्च १९३१ ला संपणाऱ्या वर्षातील आंकडे पुढे दिले आहेत.

रेल्वेचें नांव	निव्वळ नफा
जी. बी. एस. रेल्वेज बोदेली– छोटा– उदेपूर-रेल्वे धरून. ...	रु. ४,५४,५९७
आनंद–पेटलाद रेल्वे	१,६८,५५६
मेहेसाणा रेल्वे ...	७,१६,८२२
खिजाडिया धारी रेल्वे ...	५,०८४
ओखा रेल्वे. ...	तूट ४४,६३४

रेल्वे कामगारांच्या उपयोगासाठीं जी. बी. एस्. रेल्वे को-ऑपरेटिव्ह सोसायटी काढण्यांत आली आहे. डिसेंबर १९३१ अखेर संपणाऱ्या वर्षांत १७० जणांना ३६४८० रु. कर्जाऊ देण्यांत आले. सोसायटीच्या पटावर ४८८ सभासद आहेत.

शिक्षण—१८७१ पर्यंत संस्थानांत शिक्षणखातें नव्हतें व सरकारतर्फे चालविलेल्या अशा शाळाही नव्हत्या. मोठाल्या शहरांतून खाजगी प्रयत्नांनीं निघालेल्या शाळा असत. १८७१ त सरकारनें प्रथमच चार प्रायमरी शाळा बडोद्यास काढल्या. आणखीही कांहीं ठिकाणीं शाळा काढण्यांत आल्या. पण मुलांची संख्या म्हणण्यासारखी वाढत नव्हती. १८८१ त जेव्हां ३ रे सयाजीराव यांना सर्व राज्याधिकार मिळाला, तेव्हांही संस्थानांत फक्त १८० प्राथमिक शाळा व ७४६५ विद्यार्थी होते. १८९३त, प्रयोगादाखल, अमरेली जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें. व पुढें हळूंहळूं संस्थानभर सक्तीचें शिक्षण सुरू केलें. सध्या सरकार, आपल्या उत्पन्नांतून ३४ लक्ष रुपये म्हणजे एकंदर वसुलापैकीं १४ टक्के-शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करीत आहे. अननुभवी शिक्षकांऐवजीं अनुभवी व अध्यापन शास्त्राचें शिक्षण घेतलेले शिक्षक नेमण्याचा सारखा प्रयत्न सुरू आहे. तसेंच पुरुषांच्या ट्रेनिंग स्कूलसाठीं २६००० रु. व बायकांच्या ट्रेनिंग स्कूलसाठीं ३०,००० रु. सरकारनें मंजूर केले आहेत. शिक्षणसंस्थांची एकंदर संख्या २७३५ आहे. या संस्थांतून शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची संख्या २,४२,५८५ आहे. मुंबई युनिव्हर्सिटीची मान्यता असलेलें बडोदें कॉलेज १८८२ त स्थापन करण्यांत आलें.त्यांत ९११ विद्यार्थी होते. कॉलेजच्या वसतिगृहांत १५० विद्यार्थ्यांची सोय होऊं शकते.

कॉलेजचें १९३०-३१ चें उत्पन्न व खर्च

उत्पन्न ... ,, रु. ९०,२९४-८-०
खर्च ... ,, रु. १,७५,१९०-१३-६

सरकारनें वाढविलेल्या हायस्कुलांची संख्या १५ व अँग्लो व्हर्न्याक्युलर शाळांची संख्या ३५.

धंदेशिक्षण देणाऱ्या बडोदें संस्थानांतील संस्था—(१) कलाभवन, (२) पेटलाद, पाटण अमरेली या जिल्ह्यांतील उद्योगशाळा. (३) रेफर्मेटरी. कलाभवनांत १९३०-३१ त ५३७ विद्यार्थी होते. त्याचा एकंदर खर्च

१,३४,०९०-२-४ रु. होता, व कलाभवनाचें एकंदर उत्पन्न ३१,८६७-१४-७ झालें होतें.

पेटलाद येथील शाळेंत ३८७ }
पाटण ,, ,, ६५५ } विद्यार्थी होते.
व अमरेली,, ,, २७९ }

बडोदें येथील लहान गुन्हेगारांसाठीं असलेलें रेफमेंटरी स्कूल १९१३ त सुरू झालें. त्यावर कलाभवनाच्या प्रिन्सिपालची देखरेख असते. १९३०-३१ या सालीं त्यांत एकंदर ९ मुलें होतीं. त्यांप्रीत्यर्थ ३००५-३-४ रु. खर्च झाला.

शाळेंत जाण्याच्या वयांत असलेल्या मुलांच्या-एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ८९.३ इतकीं मुलें शाळेंत शिक्षण घेतात असें आढळून आलें आहे.

खेडेगांवांतील वाचनालयांची संख्या १९३०-३१ या वर्षी २१० होती. खेडेगांवांतील ग्रंथालयांची संख्या ७२८ होती. याखेरीज दोन ट्रेनिंग कॉलेजें (एक स्त्रियांसाठीं पाटण येथें) एक आयुर्वेदिक पाठशाळा, एक राजकीय संस्कृत पाठशाळा, एक कलाभवन, पांच संस्कृतशाळा व दोन बहिरे मुके यांच्यासाठीं शाळा आहेत. किंडरगार्टन पद्धतीनें शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या १९३०-३१ या वर्षी १९ होती, त्यांत एकंदर १५२९ मुलें शिक्षण घेत होतीं.

मुलींच्या शाळांची संख्या ३११ होती. व त्यांत शिकणाऱ्या मुलींची संख्या ३८९८ होती. अंत्यजासाठीं सरकारनें २०१ शाळा चालविल्या. त्यांतील दोन फक्त अंत्यज मुलींसाठीं होत्या. या सर्व शाळांतून शिक्षण घेणाऱ्या अंत्यज मुलांची संख्या १०२६८६ होती. शिवाय ८,१२० विद्यार्थी गुजराथी शाळांमधून शिकत होते. म्हणजे शिक्षण घेणाऱ्या अंत्यज मुलांची एकूण संख्या १८,३८८ झाली. सरकारनें या जातींतील मुलांस पुस्तकांची वगैरे मदत केली व कांहीं विद्यार्थी सरकारच्या खर्चानें अंत्यज बोर्डिंगांत राहिले.

सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यान्वयें १९३०-३१ या वर्षी एकंदर ७७,४६३ इतकी दंडाची रकम वसूल झाली. त्यांपैकीं शेंकडा ६५ टक्के रकम शाळांच्या इमारती बांधण्यासाठीं राखून ठेवण्यांत आली. उरलेल्या ३५ टक्क्यांतून प्राथमिक शाळांतून शिष्यवृत्त्या ठेवण्यांत वगैरे खर्च करण्यांत आली.

एकंदरींत प्राथमिक शिक्षणावर २०-२२ लक्ष रुपये खर्च करण्यांत आले. खाजगी रीतीनें चालविण्यांत आलेल्या व्यायामशाळांना मदत म्हणून सरकारनें ८००० रु. मंजूर केले.

हिंदविजय जिमखान्यास वार्षिक २००० रु. ची ग्रँन्ट मंजूर झाली. आखिल भारतीय शारीरिक खेळांचे सामने व्हावेत म्हणून ही रकम देण्यांत आली. त्याप्रमाणें चढाओढींत भाग घेण्यासाठीं दूरदूरहून बरेच संघ व खेळाडू आले होते.

बडोदें येथील संगीत शाळेंत एकंदर २०९ विद्यार्थी होते. नवसरी, अमरेली वगैरे ठिकाणच्या संगीत शाळेतूनही ३१० विद्यार्थी शिक्षण घेत होते. संस्थानांतील एकंदर संगीताच्या शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारास १५,०७० रु.खर्च आला.

ग्रंथालयें:—सेंट्रल लायब्ररीची स्थापना महाराजसाहेबांच्या हस्तें १९१० त झाली. वर्षारंभीं त्यांत ९३,८४९ पुस्तकें होतीं. वर्षअखेर पुस्तकांची संख्या ९९,५८६ झाली.

लायब्रेरियन्ससाठीं २ ठिकाणीं ट्रेनिंग क्लासेस सुरू करण्यांत आले होते. त्यांतून एकंदर ६६ जणांनीं ग्रंथालयव्यवस्थेचें शिक्षण घेतलें.

बॉयस्काऊट्स्:–१९३०-३१ सालीं बालचरांची संख्या ५८९३ होती. बालचर-चळवळीप्रीत्यर्थ एकंदर खर्च रु. ९४९०-११-४ आला.

म्यूझिअम् व पिक्चर गॅलरी:—एकंदर २,२८,१३४ प्रेक्षक पाहून गेले. खर्च ४८,७११ रु. आला. १९३०-३१ त बडोदें संस्थानांत साक्षरांची संख्या ४३४,७३४ होती. ही संख्या दरवर्षी वाढत आहे. त्यांचें एकंदर लोकसंख्येशीं शेंकडा २१ इतकें प्रमाण पडलें.

आरोग्य:–संस्थानांतील वैद्यकीय संस्थांची संख्या ९३. उपचार मिळालेल्या इस्पितळांतील रोग्यांची संख्या–९,२३२.: व बाहेरील रोग्यांची संख्या ७,६९,३४८ होती.

वेड्यांच्या इस्पितळाचा खर्च १४,९१२ रु.

महारोग्यांच्या इस्पितळांतील महारोग्यांची संख्या १२२; बाहेरील रोगी २९३० महारोग्यांच्या इस्पितळाचा खर्च रु. १०४२४-६-११

आरोग्यखात्याचें उत्पन्न रु. ८०,३७९-६-२

आरोग्यखात्याचा खर्च रु. ६,८१,७६९-९-४

पॅलेस डिस्पेन्सरीचा खर्च रु. ४६७२६-९-६

लष्करी वैद्यकीय संस्थांचा रु.१७,२२७-१५-११ खर्च.

जन्ममृत्यु

जन्म	मृत्यु	लोकसंख्येशीं प्रमाण	
		जन्म	मृत्यु
६६६८५	४१६५८	२७·२	१७·१

खानेसुमारी:- १९३१च्या खानेसुमारीप्रमाणें संस्थानांत ८,१५,३८१ घरें आहेत असें आढळून आलें.

बडोदें संस्थानची १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या:-

क्षेत्रफळ—८१६४ चौरस मैल, लोकसंख्या—२४,४३,००७, पुरुष—१२,५७,८१७ स्त्रिया—११,८५,१९०; १९२१ तील लोकसंख्या २१,२६,५२२ वाढ—शेंकडा १४·२

लोकसंख्येपैकीं ५,२३,००३ इतके लोक शहरांत राहतात. धर्माच्या दृष्टीनें पाहतां २१,५२,०७१ इतके हिंदू १,८२,६३० मुसलमान, ४८,४०८ जैन, ४४,८९० इतके लोक जमातींचे धर्माचे अनुयायी ७,१२७ पारशी व ७,२६२ ख्रिश्चन आहेत.

लोकसंख्येपैकीं ८,०३३ आंधळे, १,२६६ बहिरे १,३७३ वेडे व ५७५ महारोगी आहेत.

लोकसंख्येपैकीं २१,१९,५५१ लोक गुजराथी बोलतात, १,८०,३८४ भिल्ल भाषा बोलतात, ३५,५३२ मराठी बोलतात, ७,१८८ पश्चिमी हिंदी बोलतात व २९,३५२ इतर भाषा बोलतात.

भोर

(१९३०-३१चा अहवाल)

भोरसंस्थानचें क्षेत्रफळ ९२४ चौ. मैल आहे. १९२१ च्या खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या १३०४२०इतकी आहे. एकंदर वार्षिक उत्पन्न सरासरीनें ७ लाख रुपये आहे. पुण्याचा कलेक्टर हा संस्थानचा पोलिटिकल एजंट असतो. या संस्थानाचे एकंदर ५ तालुके आहेत व ते पुणें, सातारा व कुलाबा या तीन जिल्ह्यांत पसरलेले आहेत.

यांपैकीं चार घाटमाथ्यावर आहेत, व एक कोंकणांत आहे. बहुतेक मुलूख डोंगराळ व दर्‍याखोर्‍यांनीं व्याप्त आहे. या संस्थानचे हद्दींतच रोहिडा, तिकोना, तुंग, सरसगड, सुधागड, तोरणा आणि राजगड हे किल्ले आहेत. तांदुळ, नागली, वरी हीं कोंकणी धान्यें व ज्वारी, गहूं, हरभरा वगैरे देशी धान्यें संस्थानचे हद्दींत पिकतात. भोर नीरा नदीच्या खोर्‍यांत वसलेलें आहे.

शिक्षण:- संस्थानांत ५०० खेडीं आहेत. पण ५०० पेक्षां जास्त लोकसंख्या असणारीं फक्त ५० च आहेत व त्या प्रत्येक खेड्यांत एक शाळा आहे.

एकंदर लोकसंख्या १,३०,४२०; त्यांपैकीं साक्षर शेंकडा दोन, पण विद्यार्थीदशेंतील मुलांच्या संख्येशीं तुलना करतां शेंकडा तेरा.

प्राथमिक शाळांत १९२२ पासून मोफतशिक्षण दिलें जातें. व हायस्कूलमध्येंहि फी थोडी म्हणजे आठ आण्यांपासून १ रुपयापर्यंतच आहे.

एकंदर उत्पन्न ७ लक्ष रुपये, त्यांपैकीं शिक्षणाप्रीत्यर्थ शेंकडा चार खर्च केले जातात. इनामी व कायम देणग्याचे २ लक्ष रुपये वजा करतां, प्रमाण शेंकडा ५·५ पडतें

५ वर्षांपूर्वी शिक्षणावर १७००० रुपये खर्च होई, तर आतां रु. २७५०० खर्च होतात, म्हणजे शिक्षणावरील खर्च शेंकडा ५० नें वाढवला आहे.

खर्चाच्या कांहीं बाबी.

	(१९२९-३०)	(१९३०-३१)
चीफसाहेबांकरितां रु. ४१००० व युवराजांकरितां रु. २९०००	रु ७००००	७००००
बापुसाहेबांची मुंज	...	१५०००
थोरांच्या भेटी	८०००	...
दिल्ली व इतर प्रवास	१३०००	३१०२
नवीन बंगल्याचा खर्च	५०००	५०००

गेल्या कांहीं वर्षांत कॉलेजें, प्रदर्शनें इत्यादि लोकोपयोगी संस्थाप्रीत्यर्थ संस्थानानें १ लाख रुपये देणगी दाखल दिले आहेत. त्यांपैकीं १३००० ब्रिटिश मुलूखांतील कॉलेजांना, ७५०० पुण्याच्या स्काऊटकचेरीला, ५००० हॉस्पिटल फंडाला १५००० रुपये रेडक्रॉस फंडाला, रु. २००० प्रदर्शनांना, ७००० रुपये वाङ्मयप्रसिद्धीला, व रुपये ६००० इतिहाससंशोधन संस्थांना दिले आहेत.

संरक्षण— संस्थानांत लष्कर ठेविलेलें नाहीं व घोडदळ नाहीं. पण सशस्त्र व साधे पोलिस कान्स्टेबल २२३ आहेत. (प्रत्येक ४ चौ. मैलाला १ पोलिस). या वर्षीं खुनाचा गुन्हा एकच घडला. गेल्या वर्षी चोरीचे खटले ६४ होते. यंदा ८० झाले. पोलिस खात्यावर गेल्या वर्षीं रु. ३८३३५ खर्च झाले. या वर्षीं रु. ४००४२ झाले. संस्थानांत ४८० पोलिस पाटील आहेत.

म्युनिसिपालिटी—या वर्षीं भोर म्युनिसिपालिटीला रु.६६५३ व शिरवळला रु.५०० ची ग्रँट दिली. पाली येथील सॅनिटरी बोर्डाला आरोग्याचे बाबीवर खर्च करण्याकरितां या वर्षीं रु. ५०० दिले.

संस्थानांत एकंदर ९ ब्रिटिश पोस्ट ऑफिसें आहेत व २ टेलिग्राफ ऑफिसें आहेत. संस्थानानें आपले अबकारी हक्क ब्रिटिश सरकारकडे करारानें सोपविले आहेत.

जमीन महसूल— गेल्या वर्षीं एकंदर उत्पन्न रु. ६५६७८३ होतें, यंदा रु. ६६०१३४ झालें.

संस्थानांतील म्युनिसिपालिट्यांचा १९३०-३१ चा जमाखर्च.

नांव	जमा	खर्च
भोर	रु.२४९७१	रु. १४९३१
शिरवळ	३२१५	२१५६
एकंदर	२८१८६	१७०८७

संस्थानांत मादक पदार्थांचीं एकंदर ५६ दुकानें असून उत्पन्न रु. १०७३३० आहे. संस्थानचे चार दवाखाने असून खर्च रु ७४७४ झाला.

संस्थानाच्या १३०४२० लोकसंख्येपैकीं ५४७८ जन्म व ३८५५ मृत्यु झाले. संस्थानांत १ हायस्कूल, २ दुय्यम शिक्षणाच्या व ५३ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा असून मुलांची संख्या २८७१ होती व खर्च रु. ३७६२३ झाला.

पाऊसपाणी:—गेल्या वर्षाची सरासरी ६४ इं.६८ सें. आहे.

मिरज (थोरली पाती)

(१९३०—१९३१ चा अहवाल)

मिरज, लक्ष्मेश्वर आणि मोडनिंब या तीन तालुक्यांमिळून मिरज संस्थानचा विस्तार आहे. संस्थानचें क्षेत्रफळ सुमारें ३४२ चौरस मैल असून १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें संस्थानाची लोकसंख्या ९३,९५७ आहे. त्यांपैकीं ४८,२३५ पुरुष व ४५,७२२ स्त्रिया आहेत. संस्थानचा एकंदर वसूल रु. ४,८८,५२२-४-४ आहे. हा वसूल, गेल्या पांच वर्षांच्या वसुलाची सरासरी आहे.

मिरजसंस्थान ब्रिटिशसरकारला रु. १२,५५७–१३–० वार्षिक खंडणी देतें.

१९३०–३१ या वर्षीं घडून आलेल्या महत्वाच्या गोष्टी म्हणजे एक स्वतंत्र हायकोर्ट व एक सेशन्स कोर्ट यांची स्थापना. आतां श्रीमंतांच्या हातीं फक्त प्रिव्हि कौन्सिलचे अधिकार आहेत.

त्याचप्रमाणें १ जून १९३० पासून संस्थानांतील नोकरीस मुदतीचें प्रमाण व बढती हीं लागूं करण्यांत आलीं आहेत. यामुळें संस्थानांतील नोकरांचा दर्जा बराच वाढला आहे.

१ सप्टेंबर १९३० पासून संस्थानचें 'गॅझेट' सुरू करण्यांत आलें आहे. सध्यां तें दर तिमाहीस प्रसिद्ध होतें. त्यांत, संस्थानांत घडून येणाऱ्या सर्व लहानमोठ्या घडामोडी प्रसिद्ध करण्यांत येतात. सुरवातीपासूनच हें फार लोकप्रिय झालें असून स्थानिक संस्था स्वतःच्या प्रसिद्धीसाठीं याचा भरपूर फायदा करून घेतात.

१ डिसेंबर १९३० च्या गॅझेटच्या अंकांत, श्रीमंतांनीं संस्थानांत डिस्ट्रिक्ट व तालुका बोर्डें स्थापन करण्याचा आपला विचार प्रसिद्ध केला.

जमिनीवरील कराच्या वाढीपैकीं ½ भागावर या वर्षी (१९३०–३१) सूट देण्यांत आली.

संस्थानांत लष्करी फौज नाहीं. पोलिसांचें लोकसंख्येशीं प्रमाण एका पोलिसास ४०६·७ लोकसंख्या असें आहे; आणि क्षेत्रफळाशीं प्रमाण १·५ चौरस मैलास एक पोलिस असें आहे. खेडेगांवांतील पोलिसांची संख्या ६९ होती. त्यांपायीं रु. ३,८८३–८–९ इतका खर्च आला.

संस्थानांत सहा कौन्सिल कोर्टें आहेत.

उद्योगधंदे—मिरज येथें एक जिनिंग व प्रेसिंगचा कारखाना आहे. कवठेला एक व लक्ष्मेश्वरला तीन जिनिंग फॅक्टरीज् आहेत. मालगांव खेड्यांतून विड्याच्या पानांची निर्यात फारच मोठ्या प्रमाणांत होते. पोलिसखात्याची एकंदर नोकरसंख्या २३१ व खर्च ३५९४७ रु. गेल्या पांच वर्षांचा पावसाची सरासरी:-मिरज—इं. इं. २२–४; लक्ष्मेश्वर—इं. २२–१७; मोडनिंब—इं. २३–१८.

संस्थानांत मादक पदार्थांचीं दुकानें ३३ असून त्यांचा एकूण वसूल रु. ८०२७१ आहे.

श्रीमंत सरकारचा खाजगी खर्च रु. १८१३८, आहे. दवाखाने ३ असून खर्च रु. ११४८१ आहे.

संस्थानाच्या ९३९५७ लोकसंख्येपैकीं जन्म २३२५ व मृत्यु २४६३ झाले. शाळा ४८ असून एकूण मुलें ३८३५ आहेत. हायस्कूलचा खर्च रु. ९३९१ व प्राथमिक शाळांचा खर्च ४७७३८ आहे.

रामदुर्ग

(१९३१–३२ चा अहवाल)

लोकसंख्या—सन १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें संस्थानाची लोकसंख्या ३५४०१ आहे. त्यांपैकीं हिंदु शें. ९२ व मुसलमान शें. ७½ आहेत; जैन व मारवाडी फार थोडे असून पारशी तर मुळींच नाहींत. प्रायः हें हिंदु संस्थान आहे, तरी हिंदुमुसलमानांतील धार्मिक संबंध सलोख्याचे आहेत.

संस्थानाचा वसूल—गेल्या ५ वर्षांची सरासरी पाहतां अॅडव्हान्स व डिपॉझिट्स्ची रकम सोडून संस्थानचा एकूण वसूल ३०४२८० रु. आहे. या संस्थानास ब्रिटिश सरकारला खंडणी द्यावी लागत नाहीं. तथापि कित्तुर, संगल आणि गोन्नागर येथील जमिनी व कोन्नूर तिजाई, व हक्कवतन यांजबद्दल ४५२५ रु. द्यावे लागतात.

व्यापार व उद्योगधंदे—या वर्षी रामदुर्ग येथें एक नवीन सरकी काढण्याची गिरणी उघडण्यांत आली. या गिरणीनें २ महिने काम केलें, व या मुदतींत गिरणीला भरपूर काम होतें. रामदुर्ग येथें असल्याच प्रकारची एक जुनी गिरणी आहे; परंतु ती या वर्षी बंद होती. असोटी येथेंही एक जिनिंग फॅक्टरी आहे. त्या गिरणीनें सुमारें १ महिना काम केलें.

संस्थानांतील मुख्य धंदा माच्या विणणें व खण तयार करणें हा आहे. येथें सुमारें २००० हातमाग असून पैकीं १००० खुद्द रामदुर्ग शहरांत आहेत. सुरेबान नांवाच्या शहरांत सुमारें ९५०

हातमाग आहेत. दरमहा दर हातमागामागें साड्या वगैरे सरासरी २५ रु. किंमतीचा माल निघतो, असें धरल्यास सर्व संस्थानांत एकंदर सहा लाख रुपयांचा माल दरसाल निघतो. धंद्याला पैशाचा पुरवठा सावकार व नजिकच्या ब्रिटिश हद्दींतील व्यापारी यांचेकडूनच होतो. यामुळें विणकरांना रोजच्या मजुरीपेक्षां विशेष कांहीं मिळत नाहीं. व सर्व नफा सावकारांच्या खिशांत जातो. विणकरांची आर्थिक परिस्थिति फार गरीबीची आहे. ती सुधारण्याचा उपाय म्हणजे सहकारी पतपेढ्या काढणें हा होय. गेल्या वर्षी या दृष्टीनें थोडा प्रयत्न करण्यांत आला; पण तो यशस्वी झाला नाहीं. यामुळें विणकरवर्ग बराच हताश झाला आहे. त्याची मुख्य कारणें म्हणजे चालू असलेली पदार्थांच्या भावांतील घसर व बाजाराची अस्थिरता हें होय. बाजारांतील भावांत प्रगति सुरु होतांच शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं संस्थानाच्या बँकेमधून दरबारनें अशा संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. वरील मुख्य धंद्यापेक्षां नांव घेण्यासारखा इतर धंदा संस्थानांत नाहीं.

स्त्रीशिक्षण—दोन शाळांतील मिळून मुलींची संख्या १८५ ते २०० पर्यंत आहे. या संख्येंत मुलांच्या शाळेंत शिकत असलेल्यांची संख्या (१०१) मिळविली म्हणजे एकंदर मुलींची संख्या ३११ होते. गेल्याच्या मागील वर्षी मुलींची संख्या २२० होती. इंग्रजी शाळेंत शिकत असलेल्या मुलींची संख्या ७ होती. इंग्रजी शाळेंत मुलींस शिक्षण मोफत आहे. एकंदरींत पाहतां स्त्रीशिक्षणांत झपाट्यानें प्रगति होत आहे. परंतु या मुलींचें प्रमाण एकंदर स्त्रीसंख्येशीं शें. १·७७ आहे. ब्रिटिश प्रांतांतील हेंच प्रमाण शें. २·१ आहे. पुरुष संख्येपैकीं शें. १२ शिक्षण घेत आहेत व तेंच ब्रिटिश प्रांतांतील प्रमाण शें. ९·९६ आहे.

वर्षांतील हंगाम—एकंदरींत पाहतां पिकांच्या दृष्टीनें मागील सालापेक्षां हें वर्ष बरेंच फायदेशीर झालें. पण विशेषतः धान्यें व कापूस यांचे भाव कमालीचे उतरल्यामुळें शेतकऱ्यांच्या हातांत पीक जास्त येऊन पैसे मात्र कमी आले. संस्थानाच्या लोकसंख्येपैकीं मोठा वर्ग शेतकऱ्यांचा व त्या खालोखाल विणकरांचा आहे. परंतु सार्वत्रिक व्यापारमंदी त्यांनाही भोंवली. याच्या उलट स्वस्ताई झाल्यामुळें मजूरवर्गाची स्थिति बरी होती.

पाऊस

ठिकाण	गेल्या ५ वर्षांची सरासरी
१ रामदुर्ग.	१७·१०
२ सुरेबान.	१९·७५

संस्थानांतील पोलिसांची संख्या ७२ व खर्च १०८३४ रु. मादकपदार्थांची दुकानें ११ असून एकूण वसूल रु. २१११६ आहे. श्रीमंत सरकारचा खाजगी खर्च रु. ३७७७१ आहे. संस्थानांत रामदुर्ग व सुरेबान येथें दवाखाने असून खर्च रु. ५९८२ आहे. संस्थानाच्या ३५४०१लोकसंख्येपैकीं जन्म १३४४ व मृत्यु८१३ झाले.संस्थानांत एकंदर शाळा ३१ असून मुलांची संख्या २२९१ आहे. दुय्यम शिक्षणावर रु. ४९५२ खर्च झाले व प्राथमिक शिक्षणावर रु. १६१७० खर्च झाले.

सावंतवाडी

(१९३०-३१ चा अहवाल.)

१९३१ च्या खानेसुमारीनुसार—लोकसंख्या २३०५८९ आहे.एकूण लोकसंख्येपैकीं२,१९,३८६ म्हणजे शेंकडा ९५चे पेक्षां जास्त प्रजा हिंदु आहे. ५०३० म्हणजे शेंकडा २·१ इतके मुसलमान आहेत. ६०६८ म्हणजे शेंकडा २·६ इतके नेटिव्ह ख्रिस्ती आहेत. बाकीचे जैन व इतर हिंदु आहेत.

संस्थानाचें एकंदर क्षेत्रफळ ५,९२,०८५ एकर आहे. यांपैकीं ३४,७९६ एकर जंगल आहे व १२४३२४ एकर जमीन लागवडीस नालायक आहे.

कांहीं को-ऑपरेटिव्ह सोसायट्या—लोकांनीं स्थापलेल्या आहेत. ॲक्टान्वयें रजिस्टर झालेल्या संस्थांचीं नांवें पुढीलप्रमाणें:—

(१) सावंतवाडी कॅथॉलिक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, लिमिटेड, सावंतवाडी. (२) सावंतवाडी मध्यवर्ती सहकारी खादी भांडार, लिमिटेड, सावंतवाडी. (३) सावंतवाडी टीचर्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, लिमिटेड, सावंतवाडी. (४) दि बांदा टाऊन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, लिमिटेड, बांदें. या वर्षी १,०५,१९५ सागाचीं झाडें लावण्यांत आलीं.

उद्योगधंदे—अहवालाचे वर्षी आयात— रु. १९१४५२६ व निर्यात— रु. ५२८४०५. लाखेचीं खेळणीं करण्याचे पांच कारखाने आहेत. त्यांमध्यें रु. ६७५० चा माल तयार झाला. सावंतवाडी शहरामध्यें तांदुळाच्या व पिठाच्या तीन गिरण्या आहेत. कलेली, माडखोल, माणगांव व अकेरी येथें तांदुळाच्या गिरण्या आहेत. कोलगांव येथें स्टीम एंजिनवर चालणारी इमारती लाकूड कातण्याची गिरणी आहे. पोकळे यांचे विडींच्या कारखान्यांतून दरवर्षी रु. २०,००० च्या विड्या तयार होतात.

गेल्या पांच वर्षींतील वसुलाची सरासरी काढली असतां दरसाल संस्थानाचें उत्पन्न रु. ६,६४,८१८ इतकें आहे. १९३०–३१ सालच्या सुरवातीस रोकड शिल्लक रु. २७,८७७ होती. १९३०–३१ सालांत प्रत्यक्ष जमा रु. ६,३६,१३३ झाली. १९३०–३१ सालचा खर्च रु. ६,३७,६८७ इतका झाला.

पोलिसखातें:-१९३०–३१मधील संस्थानाचे साधे व सशस्त्र पोलीस—३४३; एकंदर खर्च—रु. ६३३१६; म्युनिसिपालिटीचा जमाखर्च:—जमा—रु. २८२३३., खर्च— रु. १६०३२.

शिक्षण—शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांत ४,४१९ मराठे, १,६३३ ब्राह्मण, ५ जैन, १७ लिंगायत, २,२६२ इतर हिंदु, ४२३ मुसलमान, ३४२ ख्रिश्चन व ३२२ अस्पृश्य होते. संस्थानानें चालविलेल्या शाळांतून किंवा संस्थानची मदत असलेल्या शाळांतून अस्पृश्य विद्यार्थ्यांना फुकट शिक्षण देण्यांत येत असे. पाट्या, पुस्तकें वगैरे सुमारें ४४ रु. किंमतीचें सामान त्या विद्यार्थ्यांस त्या ज्ञातींत शिक्षणास उत्तेजन मिळावें म्हणून देण्यांत आलें. ४२३ मुसलमान विद्यार्थ्यांपैकीं, ४१ विद्यार्थी इंग्रजी शिकत होते; १३७ मराठी शिकत होते, २४३ उर्दू शिकत होते व २ टेक्निकल स्कूलमध्यें होते.

मुलींचें शिक्षणः– मुलींच्या शाळेंत शिकणाऱ्या मुलींची संख्या ४८४ होती. यांखेरीज ९४८ मुली निरनिराळ्या मुलांच्या शाळांतून शिक्षण घेत होत्या. सर्व शाळांतून मुलींना फुकट शिक्षण दिलें जातें. संस्थानांतील मुलींच्या शाळांतून मुलींना शिवणकामही शिकविण्यांत येत आहे.

संस्थानाची एकंदर लोकसंख्या २,३०,५८९ इतकी आहे. त्यांपैकीं पुरुष १,१०,९६२ व स्त्रिया १,१९,६२७ आहेत.

पावसाची सरासरी

सावंतवाडी	...	...	१५७-९६
कुडाळ	...	...	१३९-६८
बांदें	...	...	१६३-८६
अंबोली	...	...	२७९-९५

संस्थानाच्या खर्चाच्या कांहीं बाबी.

बाब	१९३०–३१	१९२९–३१
खाजगी...	रु. ३००००	रु. ३००००
चीफ साहेबांचे नातलगांस भत्ता.	११०७८	११०७८
चीफ साहेबांचा प्रवास.	१०२९	४६८०

संस्थानांत मादक पदार्थांचीं दुकानें ९५ असून उत्पन्न रु. १०९६०३ आहे. संस्थानांत दवाखाने ९ असून एकंदर खर्च रु. ७०००१ झाला. संस्थानाच्या २०८२४२ लोकसंख्येपैकीं जन्म ७३०६ व मृत्यु ४३६१ झाले.

सांगली

(१९३१–३२ चा अहवाल)

सामान्य व राजकीय—मिरजप्रांत, कुची, मंगळवेढें, शाहापूर, शिरहट्टी हे पांच तालुके व

तेरदाळ हा महाल मिळून सांगली संस्थान बनलें आहे.

संस्थानाचें क्षेत्रफळ ११३६ चौरस मैल आहे.

१९३१ च्या शिरगणतीप्रमाणें सांगली संस्थानाची लोकसंख्या २५८४४२ आहे.

एकंदर उत्पन्न सरासरीनें रुपये १६४३७४२.

संस्थानाच्या खर्चाच्या कांहीं बाबी

बाबी	१९३०-३१	१९३१-३२
	रु.	रु.
खाजगी खर्च	३१२५००	३१४३८०
प्रिन्स ऑफ वेल्सच्या भेटीप्रीत्यर्थ	९४८०-१४-११	...
व्हॉइसरायच्या भेटीप्रीत्यर्थ	३३५२७-१४-८	३७२६- ५-५
युवराज व बाळासाहेब यांची मुंज	५२८५-३-०	
मुंबईचे गव्हर्नरची भेट	५५६१७-१४-३	१३७९-१२-५
लग्नाप्रीत्यर्थ	२२५९८९-८-०	६८९०-९-६
शिक्षण	१७९९१०-२-११	१५१७२९-८-७
आरोग्यखातें	३७८३१-११-३	३८२३०-०-४
गोलमेज परिषद्	१३९८८०-६-०	९५७७-३-४
युरोपचा प्रवास	८१३३०-१५-०	...

संस्थान हिंदुस्थान सरकारला अगर इतर संस्थानाला खंडणी देत नाहीं. ४५० घोड्याच्या तैनाती फौजेबद्दल संस्थानानें वार्षिक रु. १३५०००चा उत्पन्नाचा मुलूख तोडून दिला आहे.

बादशहांनीं आपल्या गेल्या जन्मदिवसानिमित्त चीफसाहेबांस वंशपरंपरागत 'राजा' ही पदवी दिली.

राजेसाहेब पहिल्या व दुसऱ्या गोलमेजपरिषदेचे प्रतिनिधि म्हणून इंग्लंडला गेले होते व परिषदेच्या फेडरल स्ट्रक्चर कमिटीवरहि त्यांची नेमणूक झाली होती.

रयत सभा—अहवालाचे वर्षी रयत सभेचें एकहि अधिवेशन होऊं शकलें नाहीं. ५ जून १९३१ रोजीं जुनी रयतसभा बरखास्त झाली.

संस्थानांतील उद्योगधंदे—सांगली व शहापूर तांब्यापितळेच्या भांड्यांकरितां प्रसिद्ध आहेत. सांगलीस सोन्याचांदीची उत्तम घडाईचीं भांडीं होतात. शहापूर, तेरदाळ व हनगंडा येथें मोठमोठीं तांब्यापितळेचीं भांडीं होतात. शिरहट्टी, लगतचीं खेडीं व मंगळवेढें येथें घोंगड्या तयार होतात. कवठें-महंकाळ येथें गुळगुळीत व खडबडीत लोकरी गालिचे होतात. मरिहाल व बाळेकुंद्री व बन्नीकोप येथें साध्या कांचेच्या बांगड्यांचे कारखाने आहेत. बेलघट्टी येथें नरम दगडाचीं भांडीं होतात. कवलापूर, दुधोंडी, नगराळें, कवठें-महंकाळ इत्यादि ठिकाणीं पासोड्या व सतरंज्या तयार होतात. साडी व धोतरें विणणाऱ्या सांगलीस तीन गिरण्या आहेत (गजानन वीव्हिंग मिल, सरस्वती मिल इत्यादि). भुइमूग व इतर गळिताच्या बियांपासून तेल काढण्याच्या तीन गिरण्या सांगलीस आहेत. शहापूर येथें दोन कातडीं कमावण्याचे कारखाने व चार होजिअरीचे कारखाने आहेत.

शिक्षणखातें:—मुलींच्या शाळा १२ आहेत. उर्दु वर्ग—पांच आहेत. दलित वर्गाकरितां शाळा ५ आहेत. त्यांमध्यें मुलें २०७ आहेत. इतर शाळांतूनहि दलित वर्गांतील मुलांना घेण्यांत येतें. अशीं मुलें ६३२ होतीं.

संस्थानांतील शिक्षण

	१९३१-३२.
संस्थानानें चालविलेल्या	
शाळा ...	१७०
मुलें ...	१३१७०
खर्च ...	रु. १,४५,९३९
संस्थानाकडून मदत	
मिळणाऱ्या शाळा	४
मुलें ...	५२५
खर्च	५०४२
नोंदविलेल्या शाळा...	१७
मुलें ...	८९१
एकंदर शाळा ...	१९१
मुलांची संख्या ...	१४५८६

३१ मार्च १९३२ अखेर पाऊस पाणी

		इं.	सेंट
मिरजप्रांत	...	२९	९४
कुची	...	२६	६०
मंगळवेढें	...	२०	५०
तेरदाळ	...	१२	३२
शहापूर	...	४७	६०
शिरहट्टी	...	२५	७६

संस्थानाचीं अबकारी दुकानें व अबकारी उत्पन्न

१ आगस्ट १९२४ पासून दहा वर्षेपर्यंत संस्थानानें अबकारीचा मक्ता ब्रिटिश सरकारला दिला आहे व त्याबद्दल वार्षिक १२३७०० रुपये संस्थानाला मिळावयाचे आहेत.

संस्थानांत अबकारी दुकानें एकंदर १०३ आहेत.

१ एप्रिल १९२५ पासून वार्षिक ३२१६६ रुपयांना गांजाचा मक्ता ब्रिटिश सरकारला दिला आहे.

वैद्यकीय मदतः—दवाखाने—७ एकंदर खर्च —रु. २८६५६-११-४ लोकसंख्या—२५८४४२, जन्म—८२३४, मृत्यु—५६३०

हैद्राबाद संस्थान

[मोंगली फसली सनांत ५९२ मिळविले म्हणजे इसवी सन होतो.]

हैद्राबाद संस्थानाची राज्यपद्धति

सध्याचे निजाम एच. ई. एच. मीर उस्मान् अलीखान निझामुलमुल्क आसफजाह बहादूर हे ता. २९ ऑगस्ट १९११ रोजीं राज्यपदारूढ झाले. तिसरे नवाब सालारजंग बहादूर हे त्यांचे पहिले मुख्य प्रधान होत. नवाब सालारजंग यांनीं ता. ११ जुलै १९१२ पासून १ डिसेंबर १९१४ पर्यंत मुख्य प्रधानाचें काम केलें. त्यानंतर निजामसाहेब मीर उस्मान अली खान बहादूर यांनीं राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं व ते स्वतःच राज्यकारभार पाहूं लागले. ही पद्धति पांच वर्षे चालू होती. त्यानंतर ता. १७ नोव्हेंबर १९१९ रोजीं निजामसाहेबांनीं एक फर्मान काढून मुख्य राज्यकारभाराचें काम कार्यकारी मंडळाकडे सोपविण्याचें जाहीर केलें. या फर्मानांत निजामसाहेबांनीं कोणतीं कामें पहावयाचीं, त्यांची मंजुरी कोणत्या कामांना पाहिजे, कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाकडे कोणतीं कामें सोपवावयाचीं व कार्यकारी मंडळाला कोणतीं कामें पाहण्याचा अधिकार असावा, हें सर्व जाहीर करण्यांत आलें होतें. १९१४ सालीं निजामसाहेबांनीं स्वतःकडे अधिकार घेतांना जे मंत्रिमंडळ अस्तित्वांत आणलें होतें, तें १९१९ च्या फर्मानानें रद्द करण्यांत आलें व नवीन एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल अस्तित्वांत येऊन त्याचे अध्यक्ष सर अली इमाम यांना नेमण्यांत आलें.

सर अली इमाम यांनीं १९२२ सालीं अध्यक्षत्वाचा राजीनामा दिला व त्यांच्या जागीं सर फरीदूनमुल्क बहादूर यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. त्याच वेळीं मि. ग्लॅन्सी यांच्या जागीं मि. हैदरी यांना फडणीस नेमण्यांत आलें. याशिवाय कार्यकारी मंडळांत आणखीहि कांहीं फेरफार झाले. कार्यकारी मंडळाच्या सात खात्यांखेरीज (सदरुल महामाखेरीज) पेशीखातें व धर्मखातें अशीं दोन आणखी खातीं आहेत. पण

त्या खात्यांचे मुख्य अधिकारी हे कार्यकारी मंडळाचे सभासद नाहींत.

निजाम सरकारांचे ११ सेक्रेटरी असून त्यांच्याकडे पुढील खातीं देण्यांत आलीं आहेत.

सेक्रेटरी	खात्याचें नांव
१ चीफ सेक्रेटरी ...	पेशी हुजूरखातें.
२ पोलिटिकल सेक्रेटरी ...	राजकीय व म्युनिसिपल खातें.
३ फिनॅन्शिअल सेक्रेटरी ...	जमाखर्च, टांकसाळ, वियुत् व दप्तर दिवाणी.
४ ज्युडिशिअल सेक्रेटरी ...	न्याय, पोलिस, पोष्ट, शिक्षण, नोंदणी व पुराणवस्तुसंशोधन.
५ रेव्हिन्यू सेक्रेटरी ...	जमीन महसूल, धारेबंदी, जकाती, जंगल, अबकारी, अज्ञानांच्या इस्टेटी.
६ लेजिस्लेटिव्ह सेक्रेटरी ...	कायदेमंडळाचें काम पाहणें.
७ पी. डब्यू. सेक्रेटरी ...	सार्वजनिक बांधकामें व पाणीपुरवठा
८ पी. डब्यू. सेक्रेटरी नं. २ ...	कालवे, टेलिफोन.
९ मिलिटरी सेक्रेटरी ...	लष्कर, वैद्यकीय, आरोग्य व पशुवैद्यक हीं खातीं.
१० कॉमर्स सेक्रेटरी ...	व्यापार, खाणी, लोकलफंड, सहकारी चळवळ, शेती व फॅक्टऱ्या.
११ धर्मखातें ...	धार्मिक संस्थांची व्यवस्था.

अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाकडे निजाम राज्यांत फारच दुर्लक्ष्य केलें जातें; अस्पृश्यांची लोकसंख्या एकंदर २१ लाख असूनही अस्पृश्यांकरितां चालविलेल्या शाळांत अवघे १४००ही विद्यार्थी नसावेत हें भूषणास्पद खास नव्हे. नवीन शाळा काढावयाची गोष्ट बाजूलाच राहिली, पण असलेल्या शाळाही बंद करण्याचा धडाका सुरू आहे.

हैद्राबाद आणि औरंगाबाद येथें सरकारनीं चालविलेली एकएक औद्योगिक शिक्षणाची शाळा आहे. यांखेरीज ७ खाजगी शाळा आहेत. यांत ६७८ विद्यार्थी असून फ. सन १३३३ मध्यें त्यांप्रीत्यर्थ ९१२०२ रु. खर्च आला.

व्हिक्टोरिया मेमोरियल ऑर्फनेजः—यांत सन १३३४ मध्यें ११३ मुलगे व १८८ मुली होत्या.

धर्मशिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या २१. विद्यार्थी १०८१, सरकारी ग्रँट ३३६०१. औरंगाबाद, पट्टण व बेदर येथालतीन संस्कृत शाळामात्र बंद झाल्या.

स. १३३४ सालीं ५६४८८६ रु. शिष्यवृत्त्यांसाठीं देण्यांत आले. पैकीं ५⁄६ रक्कम मुसलमान विद्यार्थ्यांसाठीं खर्च झाले.

स. १३३४ मध्यें वाचनालयांसाठीं ९३६६९ रु. खर्ची पडले. पैकीं २१६६५ रु. आसाफिया लायब्ररीकरितां, ५३१८५ रु. सरकारी शाळा व कॉलेजांना जोडलेल्या लायब्ऱ्यांकरितां व १३२७६ रु. सरकारी ऑफिसांना जोडलेल्या लायब्ऱ्यांकरितां खर्च करण्यांत आले. सामान्य जनतेला उपयोगी पडणाऱ्या वाचनालयांस सरकारकडून मदत होत नाहींच, पण अडथळा होतो.

लोकल बोर्डाचें उत्पन्न

शेतकऱ्यांकडून शेतसाऱ्यावर रुपयास एक आणा वसूल करण्यांत येतो. बोर्डाजवळ शिल्लकेची रक्कम फुगत फुगत ५३३८१९७ रु. पर्यंत गेली आहे. याचा अर्थ असा कीं, सार्वजनिक उपयुक्त कामासाठीं लोकांकडून घेतलेला फंडदेखील पूर्णपणें खर्च करण्यांत येत नाहीं. उत्पन्नाच्या दुप्पट रक्कम बोर्डाजवळ शिल्लक आहे.

असें असूनही प्राथमिक शाळांची संख्या वाढविण्यांत येत नाहीं. इतकेंच नव्हे तर शिक्षणाच्या कराची रक्कमही पूर्णपणें शिक्षणाकडे खर्च करण्यांत येत नाहीं. सन १३३४ मध्यें कराचें उत्पन्न ३९९९३४ रु. झालें. पण त्यांपैकीं फक्त ३१२८६३ रु. च शिक्षणाकडे खर्चण्यांत आले. लो. बोर्डाच्या ताब्यांत ७ आलोपॅथिक, २७ आयुर्वेदिक, आणि ७७ युनानी दवाखाने आहेत. त्यांसाठीं २५४१३ रु. खर्च करण्यांत आले. याही बाबतींत मेडिकल सेसची पूर्ण रक्कम आरोग्याकडे खर्ची पडली नाहीं.

जमीनमहसूल

रयतवारी पद्धतीनें सरकारला शेतसारा मिळणारी जमीन २, १६, ३२,५८७ एकर आहे. गेलीं कित्येक वर्षे जमिनधारा सारखा वाढत आहे.

सर्फेखासच्या जमिनी:निजामच्या खाजगी खर्चाकडे ज्यांचें उत्पन्न जातें अशा जमिनी: क्षेत्रफळ ८११० चौरस मैल.

जंगलखातें:—एकंदर ९६१४ चौरस मैल-क्षेत्रफळ. प्रतिवर्षी हजारों शेतकऱ्यांवर जंगलाच्या मर्यादेचें अतिक्रमण केल्याच्या आरोपावरून खटले भरण्यांत येतात.

कालवे,पाटबंधारे व विहिरी: -आतांपर्यंत पाटबंधाऱ्याचीं कामें पुढीलप्रमाणें झालीं आहेत.

नांव	एकंदर खर्च रु.	आतांपर्यंतचा खर्च रु.
निझाम सागर	३०५०००००	६९५२२७३
वायरा प्रॉजेक्ट	२४९००००	१६००६६०
पालेर प्रॉजेक्ट	२२२५०००	१०११५९०
फतेह नहर	५०००००	४८३२२६
रायनपल्ली प्रॉजेक्ट	२८३०००	२१५३४३
सिंग भूपल्ली	२२८७४०	११५१२०
एकंदर:	३६२२६७४०	१०३७८२१२

सहकारी पतपेढ्या:—सहकारी बँका व पतपेढ्या यांची संख्या अनुक्रमें १९ व १७४७ आहे. पेढ्यांपैकीं १४९० शेतकऱ्यांच्या व २५७ इतरांच्या आहेत. सेंट्रल बँकांच्या मेंबरांची संख्या ३३७३ असून शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांची संख्या ३३१८५ व इतर पेढ्यांच्या सभासदांची संख्या १०१४५ आहे. सर्व पेतपेढ्यांचें व बँकांचें भांडवल १२४७८९६६ रु. आहे.

पुराणवस्तुसंशोधनखातें:—हें १३२३ मध्यें सुरू करण्यांत आलें. १३२५ मध्यें अजिंठा येथील लेण्यांच्या व्यवस्थेसाठीं एका क्युरेटरची नेमणूक करण्यांत आली. या खात्याचा खर्च स. १३३४ मध्यें ४१३४ रु. झाला.

हैद्राबाद संस्थानचा जमाखर्च

इ. स. १९३० मु. सन १३३८ फसली.

जमेच्या कांहीं बाबी

	रु.
जमीन महसूल	३४१९४२६०
फॉरेस्ट रेव्हिन्यू	८००८७८
फॉरेस्ट	१२८४३२९
कस्टम	१५७१३०८२
आबकारी	१६३७६१९६
स्टँप	२२०७६९९
वऱ्हाडचा मोबदला	२९१६६६७
पोस्ट	९५७६८६
रेल्वे	४७५७४४५
एकंदर जमा	८९२४३१६७

खर्चाच्या कांहीं बाबी

पोष्ट	१२१८६५२
निझामसाहेबांचे खाजगी खर्चाकरितां वार्षिक दिले जातात.	५० लाख
पोलिस	५८९८३६१
शिक्षण	७१७७११२
दवाखाना	१८८०८५६
धर्मसंबंधीं	१२६८४४९
म्युनिसिपालिटी व इंप्रुव्हमेंट... ...	१ करोड १० लाख
इरिगेशन	२०५३६३०
एकंदर खर्च	**७६३८९६७७**

हैद्राबाद संस्थानांतील सरकारी नौकरींत हिंदूंचें प्रमाण

हैद्राबाद संस्थानांत सन १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें हिंदूंची लोकसंख्या १,२२,०३,५०० व मुसलमानांची १५३४३६६ आहे. परंतु सरकारी नौकरींत त्यांचें प्रमाण व्यस्त आहे. संस्थानांतील हिंदूमध्यें आंध्र, महाराष्ट्रीय आणि कर्नाटकी यांचा समावेश होतो.

संस्थानच्या कार्यकारी कौन्सिलांत फक्त अध्यक्ष हिंदु आहेत. इतर एकही सभासद हिंदु नाहीं. खास आलाहजरतांच्या पेशींतील दिवाणांना धरून पांच सभासद मुसलमान आहेत व एक युरोपियन आहे. कार्यकारी कौन्सिलच्या अध्यक्षांचे कचेरींत पांच अधिकारी आहेत; ते सर्व मुसलमान आहेत. मुख्य सेक्रेटरीच्या कचेरींत पांच अधिकाऱ्यांच्या जागा आहेत. पैकीं एक रिकामी असून बाकीच्या जागांवर सर्व मुसलमान आहेत. एकाही हिंदूला मुख्य सेक्रेटरिएटमध्यें जागा मिळूं शकली नाहीं.

पोलिटिकल सेक्रेटरिएट (मोतमदी सियासियात) मध्यें ९ जागा आहेत. पैकीं दोन रिकाम्या असून ४ मुसलमान, २ हिंदु आणि एक पारशी असे अधिकारी आहेत.

फायनान्शियल सेक्रेटरिएट (मोतमदी फिनान्स) मध्यें आठ अधिकारी आहेत. पैकीं ४ मुसलमान, ३ हिंदु व १ पारशी आहे. रेव्हिन्यू सेक्रेटरिएट (मोतमदी मालगुजारी) मध्यें १८ अधिकारी आहेत. पैकीं १२ मुसलमान, ५ हिंदू व १ युरोपियन आहे. ज्युडिशिअल सेक्रेटरिएट (मोतमदी अदालत) मध्यें ९ अधिकारी आहेत. ते सर्व मुसलमान आहेत. त्याचप्रमाणें लेजिस्लेटिव्ह सेक्रेटरिएट (मोतमदी वजे कवानीन) मध्यें ४ अधिकारी असून ते सर्व मुसलमान आहेत. मिलिटरी सेक्रेटरिएट (मोतमदी फौज) मध्यें व रिलिजस सेक्रेटरिएट (मोतमदी उमूर मजहबी) मध्यें सर्व अधिकारी मुसलमान आहेत. सर्व सेक्रेटरिएटमध्यें एकूण ७८ अधिकारी आहेत. पैकीं ५४ मुसलमान व १६ हिंदु आहेत.

फायनान्शियल डिपार्टमेंट (महकमे फिनान्स) मध्यें ४४ अधिकारी आहेत. पैकीं २६ मुसलमान व १५ हिंदु आहेत. रेव्हिन्यू डिपार्टमेंट (महकमे मालगुजारी) मध्यें एकूण गॅझेटेड अधिकाऱ्यांची संख्या २२२ आहे. पैकीं १९६ मुसलमान असून फक्त २० हिंदु आहेत. ज्युडिशियल डिपार्टमेंट (महकमे अदालत) मध्यें जेथें शेंकडा ८५ लोकसंख्याक हिंदूंच्या धर्मशास्त्रविषयक कज्जांचा निकाल लावावा लागतो, तेथें १३६ अधिकारी मुसलमान आणि १२ हिंदु आहेत. जिल्ह्यांतून १४ डिस्ट्रिक्ट जज्ज (नाजम जिल्हा) व ७ ॲडिशनल डि. जज्ज (जायद नाजम जिल्हा) आहेत. परंतु त्यांपैकीं एकही हिंदु नाहीं. त्याचप्रमाणें ६ सरकारी वकील आहेत. तेही सर्व मुसलमान आहेत. सिटी सिव्हिलकोर्टांतील चारही जज्ज मुसलमान आहेत.

पोलिस व जेलखात्यांत मुसलमान अधिकाऱ्यांची संख्या ४०, तर हिंदूंची फक्त १३ आहे. शिक्षणखात्यांत एकूण २७७ गॅझेटेड अधिकारी आहेत. त्यांपैकीं १८३ मुसलमान, ५३ हिंदु व २३ युरोपियन आहेत. डिव्हिजनल इन्स्पेक्टरच्या पांच जागा आहेत. पण त्यांवर एकही हिंदु नाहीं. उस्मानिया युनिव्हर्सिटी कॉलेज व सिटी कॉलेजमध्यें अनुक्रमें ७५ व ८ जागा आहेत. त्यांवर अनुक्रमें ११ व १ हिंदु असून बाकी सर्व मुसलमान आहेत. सदरहू कॉलेजांतून देशी व गीर्वाण (Classical) भाषा शिकवाव्या लागतात. म्हणून इतकी तरी हिंदूंची संख्या दिसते.

मांडकंल खात्यांत (महकमे तिबावत) मध्यें ११८ अधिकारी आहेत. पैकीं ४१ मुसलमान व ४५ हिंदु आहेत त्याचप्रमाणें पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट (महकमे तामीरात) मध्यें ११२ अधिकारी आहेत. त्यांपैकीं ६२ मुसलमान व ३४ हिंदु आहेत. इतर खात्यांच्या मानानें ह्या दोन खात्यांमध्यें हिंदु अधिकाऱ्यांची संख्या जास्त दिसते. याचें कारण बहुधा हेंच असावें कीं, ह्या खात्यांत विशिष्ट शिक्षण घेतलेले पदवीधरच लागतात. इतर खात्यांपैकीं, धर्मखातें (उमूर मजहबी) दप्तर दिवाणी व मुलकी, पुराण वस्तुसंशोधन, सेन्सस व स्टॅटिस्टिक्स (खानेसुमारी) ह्या खात्यांत एकही हिंदु अधिकारी नाहीं. इतर गॅझेटेड अधिकाऱ्यांची संख्या १८६; पैकीं १२६ मुसलमान व ४० हिंदु आहेत. एकंदर गॅझेटेड अधिकाऱ्यांपैकीं ८७५ मुसलमान असून २४९ हिंदु आहेत. मुसलमान अधिकाऱ्यांना एकूण पगार दरमहा ४८३७५४ रु. आणि हिंदु अधिकाऱ्यांना दरमहा १२३११७ रु. ८ आ. मिळतो.

हैद्राबाद संस्थानांतील हिंदु प्रजेचीं धार्मिक गाऱ्हाणीं.

निजाम इलाख्यांतील हिंदु प्रजेच्या धार्मिक हक्कांवर सरकारी वटहुकुमान्वयें नियंत्रण घालण्यांत आलें आहे. हिंदु प्रजेला आपले धार्मिक उत्सव व सण यथोचित थाटमाटानें साजरे करण्याचा जो नैसर्गिक हक्क आहे, त्यावर कसे निर्बंध घालण्यांत आले आहेत हें खालील निजामसरकारच्या हुकुमांवरून दिसून येईल:—

हुकूम नं. १ हा मोहरमाचे वेळीं दसरा आला असतां काय करावें याविषयीं प्रसिद्ध करण्यांत आला होता. हिंदूंनीं दसऱ्याचा सण वाद्यें न वाजवितां, इतकेंच नव्हे, तर आनंदसूचक अशी कोणतीही वस्तु न वापरतां पाळावा आणि सीमोल्लंघनासही वाजा न वाजवितां जावें, असें ह्या हुकुमांत फर्माविण्यांत आलें आहे. दसऱ्याच्या दिवशीं बऱ्याच ठिकाणीं झेंडे उभारण्याचा संप्रदाय आहे. परंतु हा विधि मोहरमाच्या १५ व्या तारखेस म्हणजे मुसलमानांचा सण संपल्यानंतर करावा, असेंही ह्या हुकुमांत जाहीर करण्यांत आलें आहे.

हुकूम नं. २ मध्यें असें फर्माविण्यांत आलें आहे कीं, कोणताही नवा धार्मिक उत्सव धर्मखात्याची आगाऊ परवानगी घेतल्यावांचून सार्वजनिक ठिकाणीं साजरा करण्यांत येऊं नये.

हुकूम नं. ३ व ४ मध्यें मशीदीपासून ३०० पावलांच्या आंत वाद्यें वाजविण्यास मनाई करण्यांत आली आहे. ही मनाई केवळ नमाजाच्या वेळेपुरतीच नसून नेहमींकरितां आहे; ही त्यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

सर्क्युलर नं. ५ मध्यें असा हुकूम देण्यांत आला आहे कीं, हैद्राबाद शहरांत किंवा ज्या ठिकाणीं मुसलमानांची वस्ती जास्त असेल अशा ठिकाणीं जुन्या देवळांची दुरुस्ती किंवा वाढ करण्यांत येऊं नये. ह्याशिवाय ह्या सर्क्युलरमध्यें असेंही फर्माविण्यांत आलें आहे कीं, खाजगी व्यक्तीनें देखील स्वतःच्या खर्चानें देवळांची दुरुस्ती करूं नये.

सर्क्युलर नं. ६ ची मूलभूत कल्पना अशी आहे कीं, हैद्राबाद संस्थान हें इस्लामी संस्थान आहे आणि म्हणून मुसलमानांविषयीं आणि त्यांच्या धर्माविषयीं सहानुभूति दाखविणें हें ह्या संस्थानचें कर्तव्य आहे.

सर्क्युलर नं. ७ यांत धार्मिक उत्सवांविषयीं आणि मिरवणुकींविषयीं नियम देण्यांत आले आहेत. ह्या नियमांप्रमाणें मिरवणुकीपूर्वीं दहा दिवस जिल्ह्यांत तहसीलदारांकडे आणि हैद्राबाद शहरांत कोतवाल साहेबांकडे सूचना दिली पाहिजे.

प्रजेच्या धार्मिक हक्कांवर नियंत्रण घालणारे इतरहि कांहीं हुकूम आहेत. सरकारी अधिकारी हे बहुंशीं मुसलमान असल्यामुळें त्यांना मुसलमानांच्या मिरवणुकी व उत्सवासंबंधीं साहजिकच आपलेपणा वाटतो व त्यांच्या मार्गांत कधीं व्यत्यय येत नाहीं, परंतु हिंदूंना मात्र हे नियम अत्यंत जाचक होतात ह्या हुकुमांचा बहुतेक वेळां हिंदूंना विघातक असा अर्थ लावून त्यांच्या उत्स-

वास व मिरवणुकींस बंदी करण्यांत येते किंवा निदान कांहीं काळ तरी व्यत्यय उत्पन्न करण्यांत येतो अशी हिंदुसमाजाची सार्वत्रिक तक्रार आहे.

कांहीं ठिकाणीं तर एका ठराविक रस्त्यानें मिरवणूक नेण्याची वहिवाट सिद्ध होऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मंजुरी दिली असतांही स्थानिक अधिकाऱ्यांनीं कोणत्या तरी सबबीवर अंमलबजावणींत टाळाटाळ केल्याचीं आणि गुंडगिरीला आळा न घालतां, कायदेशीर रीतीनें वागणाऱ्या लोकांच्या धार्मिक हक्कांचें रक्षण करण्याचे कामीं खबरदारी न घेतल्याचीं वाटेल तितकीं उदाहरणें आहेत. गुलबुर्गा येथील सात वर्षांपूर्वीं शरणबसप्पाच्या देवळासंबंधीं उपस्थित झालेला झगडा, त्याचप्रमाणें पैठण, परभणी, नांदेड, कळमनुरी पालिम, बासर, बीड, बिदर, औंढा इत्यादि अनेक ठिकाणीं गणपतीच्या मिरवणुकीबद्दल जीं प्रकरणें उपस्थित झालीं त्यांचा ह्यासंबंधीं उदाहरणें म्हणून उल्लेख करतां येईल.

ज्या ठिकाणीं मशिदी बांधण्याबाबत हिंदूंकडून योग्य असे आक्षेप घेण्यांत आले होते, त्या ठिकाणींही मशीदी बांधण्यांत आल्या. उलटपक्षीं हिंदूंच्या देवळांची डागडुजी व वाढ करण्यास कांहीं तरी क्षुल्लक कारणांनीं नकार देण्यांत आला. ह्या बाबतींत बीड, उदगीर, अष्टी, अटनूर, भाईमांडवाइ. ठिकाणचीं उदाहरणें उल्लेखनीय आहेत.

इस्लामी धर्माच्या प्रचारकांना सरकारी अधिऱ्यांकडूनच नव्हे तर खुद्द सरकारी तिजोरींतूनहि मदत करण्यांत येते. उलटपक्षीं हिंदुधर्मप्रचारकांना मात्र आपल्या प्रचारकार्यास कायदेशीर स्वातंत्र्य नाकारण्यांत येतें; इतकेंच नव्हे तर त्यांचा छळ करण्यांत येतो असें अनेक उदाहरणांवरून दाखवितां येण्यासारखें आहे.

हिंदूंची शिक्षणविषयक परिस्थिति

१८८१ सालीं साक्षरतेचें प्रमाण हजारीं ३७ होतें, तें घसरत घसरत १९२१ मध्यें ३३ वर आलें आहे. १८९१ सालीं तर साक्षरतेचें प्रमाण हजारीं ४४ होतें. ह्याचा अर्थ असा कीं शिक्षणखातें बाल्यावस्थेंत असतांनाही १९२१ च्या मानानें १८९१ सालीं दर हजारीं साक्षरांची संख्या ११ नें जास्त होती.

सरकारनें शिक्षणावर करावयाचा खर्च कमी केल्यामुळें कदाचित् साक्षरतेचें प्रमाण कमी झालें असेल असा वाचकांचा समज होण्याचा संभव आहे, पण तो बरोबर नाहीं. सरकार ह्या कामीं अधिकाधिक पैसा खर्च करीत आहे असें दिसून येईल. जेव्हां साक्षरतेचें प्रमाण हजारीं ४४ होतें, तेव्हां ह्या बाबतींत सरकारी खर्च ३०३२९३ रु. होता. उलटपक्षीं १९२६ सालीं जेव्हां साक्षरतेचें प्रमाण हजारीं ज्यास्तींत ज्यास्त ३३ किंवा थोडें अधिक असेल तेव्हां सरकारी खर्च ७७०००० रु. होता. साक्षरतेचे आंकडे घेऊन सरकारी खर्चाच्या आंकड्याबरोबर तुलना केल्यास ह्या खर्चाचा खरोखर सामान्य जनतेस कितपत उपयोग होत आहे; आणि ह्या वाढत्या खर्चाच्या योगानें निजामइलाख्यांत शिक्षणप्रसार कितपत होत आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

खर्चाच्या तक्त्याकडे पाहिलें म्हणजे असें दिसून येतें कीं, १९११ पर्यंत खर्चाची वाढ संथपणें चालूच होती. परंतु उस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यानंतर खर्चाची वाढ १९११ मधील १० लाखांपासून १९२१ मध्यें ६७ लाखांपर्यंत झाली. १९२१ ते १९२६ ह्या पांच वर्षांच्या अल्पावधींतही पुन्हां १० लाखानें वाढ करण्यांत आली. ह्यावरून सामान्य जनतेच्या शिक्षणाकडे फारसें लक्ष न देतां शिक्षणखात्यानें आपलें सारें लक्ष उस्मानिया विद्यापीठाकडेच दिलें असावें असें दिसतें.

सामान्य लोकांतील साक्षरतेचें प्रमाण निश्चितरीतीनें खालावलें आहे असें दिसतें. आतां संस्थानांतील हिंदु व मुसलमान ह्या प्रमुख समाजांनीं शिक्षणाच्या बाबतींत कशी काय प्रगति केली आहे हें पाहूं. हिंदूंनीं १८८१-१८९१ ह्या दशकांत साक्षरतेच्या बाबतींत थोडीबहुत प्रगति केली होती. परंतु १९२१ चे आंकडे पाहिले म्हणजे तेंच प्रमाण कायम असल्याचें दिसत नाहीं. उलट-

पक्षीं १८८१ सालीं मुसलमान समाजांतील साक्षरतेचें प्रमाण शेंकडा पांच होतें, तें १९२१ सालीं १० झालें. ह्याचा अर्थ असा होतो कीं, ज्या काळांत मुसलमानांनीं दुप्पट वेगानें साक्षरतेच्या बाबतींत आघाडी मारली, त्या काळांत हिंदूंची यत्किंचितही प्रगति झाली नाहीं.

शिक्षणविषयक प्रगतीची पूर्ण कल्पना येण्याकरितां दोन्ही समाजांनीं दुय्यम आणि उच्च शिक्षणांत कशी काय प्रगति केली आहे, ह्याचाही आपण विचार केला पाहिजे. दुय्यम शिक्षणांत दोन्ही समाजांतील विद्यार्थ्यांची संख्या जरी सारख्या प्रमाणांत आहे, तरी संस्थानांतील हिंदूंची संख्या मुसलमानांच्या आठपट आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे हिंदूंची किती निकृष्ट स्थिति आहे हें सिद्ध होतें.

उच्च शिक्षणांतही १९२५ सालीं हिंदु विद्यार्थ्यांची संख्या मुसलमान विद्यार्थ्यांपेक्षां २२६ नें कमी होती उलटपक्षीं १८९४ ते १९१० पर्यंत हिंदु विद्यार्थ्यांचें प्रमाण मुसलमानांच्या दुप्पट होतें. हिंदु समाजांतील उच्च शिक्षणाचा र्‍हास उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या स्थापनेपासून सुरूं झाल्याचें दिसतें. १९१० सालीं जेव्हां मद्रास युनिव्हर्सिटीस जोडलेलें एकच कॉलेज होतें, तेव्हां मुसलमान विद्यार्थ्यांची संख्या फक्त ३० होती. तीच १९१८ सालीं उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या स्थापनेनंतर त्याच्या सातपट झाली, आणि १९२५ सालीं तर त्यांचा आंकडा ६०७ पर्यंत वाढला.

हें समालोचन पूर्ण होण्यास स्त्री-शिक्षणाच्या आंकड्यांचाहि विचार केला पाहिजे. १९२१ सालीं ३०३ हिंदु स्त्रियांत १ स्त्री साक्षर आहे. उलट त्याच वर्षी ३२ मुसलमान स्त्रियांत १ स्त्री साक्षर असल्याचें दिसतें. म्हणजे मुसलमान स्त्रियांतील साक्षरतेचें प्रमाण हिंदू स्त्रियांपेक्षां दसपट अधिक आहे.

हिंदुसमाज मुसलमानांपेक्षां आठपटीनें अधिक असला, तरी प्राथमिक शाळांतील हिंदु मुलींची संख्या मुसलमान मुलींपेक्षां निम्यानें कमी आहे. दुय्यम शिक्षणाच्या शाळांतून हिंदु आणि मुसलमान विद्यार्थिनींची संख्या १९२० सालीं अनुक्रमें ६३९ व ८६६ होती. अर्थात् ह्या बाबतींतहि एकंदर लोकसंख्येचा विचार केल्याशिवाय प्रगतीचें खरें स्वरूप लक्षांत येणार नाहीं. उच्च शिक्षणांत एकहि हिंदु विद्यार्थिनी आढळून येत नाहीं. उलटपक्षीं १९२४ आणि १९२७ ह्या सालीं अनुक्रमें ८ व ९ मुसलमान विद्यार्थिनी होत्या.

प्रजाशिक्षणपरिषदेच्या स्टँडिंगकमिटीनें जे खुलासे प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरून सरकारचा व रयतेचा शिक्षणविषयासंबंधीं दृष्टिकोणच कसा भिन्न आहे हें दिसून येतें. सदर खुलासे वाचल्यास प्राथमिक शिक्षण आम्ही संस्थानांतील स्थानिक भाषांतून मोफत देतों, त्याचप्रमाणें स्थानिक भाषांना व खासगी संस्थांनाहि आम्ही उत्तेजन देतों अशी जी शेखी मारण्यांत येते, त्यांत कितपत तथ्य आहे हेंहि वाचकांस दिसून येईल.

हैद्राबाद संस्थानांतील हिंदु पुरुष व स्त्रिया साक्षरतेच्या दृष्टीनें काय किंवा प्राथमिक, दुय्यम अथवा उच्च शिक्षणाच्या दृष्टीनें काय, निःसंशय मागसलेल्या आहेत. ब्रिटिश इलाख्यांत शिक्षणाच्या बाबतींत तरी हिंदुसमाज मुसलमानांच्या मानानें फार पुढें गेला आहे. तेव्हां हिंदुसमाज सामान्यतःच मागासलेला आहे, असें म्हणून हा प्रश्न टाळतां येणार नाहीं. संस्थानांची उन्नति म्हणजे संस्थानांतील सर्व जातींची उन्नति. ह्या दृष्टीनें सरकारी शिक्षणसंस्थांच्या संस्थानांतील बहुसंख्याक अशा हिंदुसमाजास लोकसंख्येच्या प्रमाणांत कां उपयोग होत नाहीं याचा शिक्षणखात्यानें अवश्य विचार केला पाहिजे. सदरहू खात्याचें हल्लींचें धोरण बरोबर नाहीं. ही गोष्ट केवळ वरील एका कारणामुळेंहि सिद्ध होते.

खाजगी प्रयत्नांस उत्तेजन देऊन सर्व समाजास शिक्षणोन्नतीस सारखाच वाव देणें हें प्रत्येक सुधारलेल्या सरकारनें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे; परंतु एकीकडे संस्थानांतील खाजगी संस्थांना मदत करण्याची वेळ आली म्हणजे पैशाची अडचण दाखवून मदत नाकारावयाची; किंवा दिलीच तरी अगदीं कमी मदत द्यावयाची,

परंतु संस्थानाबाहेरील संस्थांना आणि त्यांतहि इस्लामी संस्थांना मदत करण्यांत मात्र हजारों रुपये खर्च करणाऱ्या निजामसरकारच्या शिक्षण-खात्यास काय म्हणावें, हेंच समजत नाहीं. संस्थानाबाहेरील इस्लामी संस्थांच्या मदतीकरितां दरवर्षी १,७७४८ रु. या खात्यातर्फे पाठविण्यांत येतात ही या बाबतींत विशेष लक्षांत ठेवण्या-सारखी गोष्ट आहे.

ता. १९ डिसेंबर १९३१ रोजीं हैद्राबाद येथें हैद्राबाद संस्थानांतील हिंदु प्रजेतर्फे सभा भरली होती. त्या सभेच्या कार्यकारी मंडळाच्या सभास-दांनीं संस्थानाधिपतीकडे एक अर्ज केला. त्यांतील मुख्य मुद्दे:—

या संस्थानांत शेंकडा पंचायशीं प्रजा हिंदु असतां त्यांचें सरकारी नोकरींतलि प्रमाण फारच अल्प व लोकसंख्येशीं विषम आहे. सरकारी नोकरींत भरणा करतांना हिंदूंच्या हक्काकडे दुर्लक्ष्य केलें जातें, याची हिंदु प्रजाजनाला जाणीव होऊं लागली आहे हें आम्ही नम्रपणें सरकारच्या नज-रेस आणूं इच्छितों. संस्थानच्या राज्यकारभारांत हिंदूंना फारच थोडा वांटा मिळतो व ज्या ठिकाणीं सरकारी धोरण आंखलें जातें अशा सेक्रेटरीएट वगैरे कचेऱ्यांत तर फारच थोडया हिंदूंची वर्णी लागते असें आमचें नम्र विधान आहे. सर्व संस्था-नांत एकहि हिंदु तालुकदार किंवा सुभेदार नसावा, व न्यायखात्यांत हिंदु नोकरांचें प्रमाण फारच अल्प असावें हें पाहून हिंदु प्रजाजनांना फारच दुःख होतें.

सन १३४१ फसलीचें अंदाजपत्रक पाहतां असें दिसून येतें कीं, पन्नास हजार रुपये केवळ मुसलमानी संस्थांकरितां आणि साडेसतरा हजार रुपये इस्लामी वाङ्मयाकरितां राखून ठेवले आहेत. दरवर्षी मोठमोठ्या रकमा इस्लामी संस्थांच्या प्रीत्यर्थ खर्च होतात. धार्मिक देणग्या ज्या वार्षिक देण्यांत येतात त्या शेंकडा ९५ मुसलमानांसच मिळतात. ह्याचप्रमाणें खास आणि मेहरबानी म्हणून मिळणारें वेतन या सदराखालीं २६२८३० इतके रुपये मुसलमानांना देण्यांत येतात तर हिंदूंच्या वांट्याला फक्त १३८८४ रुपये येतात. ह्याचप्रमाणें खास व धार्मिक देणग्या या सदरा-खालीं रु. २००६४२ इतकी रक्कम मुसलमानांच्या पदरांत येते; तर अवघे १३४४ रुपये हिंदूंच्या वांट्याला येतात. तसेंच संस्थानाबाहेरील मुसल-मानी संस्थांना या पांच वर्षांत फारच मोठ्या देणग्या देण्यांत आलेल्या आहेत. उदाहरणार्थः— नऊ लाख नेजद रिलीफच्या कामाकरितां, लंडन येथील मशिदीप्रीत्यर्थ पांच लक्ष रुपये, आलिगड येथील मुस्लीम विश्वविद्यालयाला दहा लाख रुपये व दिल्ली व पानिपत येथील मुस्लीम शाळांना अनुक्रमें पन्नास व वीस हजार रुपये देण्यांत आले आहेत. याशिवाय वार्षिक दोन लक्ष रुपयांची देणगी इस्लामी संस्थांना देण्यांत येते ती वेगळीच.

आम्ही सरकारच्या हेंही नजरेस आणूं इच्छितों कीं, दरवर्षी मशिदी बांधण्याकडे व काजीच्या मुलांना शिष्यवृत्ति देण्याकडे आणि ' हाफीज ' तयार करण्याकडे मोठमोठ्या रकमा सरकार खर्च करतें. इस्लामी प्रजेला धार्मिक शिक्षण देण्यासाठीं सरकारनें अनेक खास मिशनऱ्यांची स्वखर्चानें नेमणूक केली आहे. तसेंच हिंदूंना आपले धार्मिक आचार व समारंभ प्रसंगोचित अशा लवाजम्यास-हित पार पाडणें आणि धार्मिक मिरवणुकी त्रासा-शिवाय काढणें अशक्यप्राय झालें आहे.

सर्व संस्थानांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत यावें अशी आमची विनंति आहे. कारण साक्षरतेचें प्रमाण व संख्या इतर संस्थानांच्या मानानें पहातां फारच कमी आहे व हिंदूंच्या बाबतींत तर हें प्रमाण अतिशय खालावलें आहे. यासंबंधांत हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, सरकार शिक्षणावर बरीच मोठी रक्कम खर्च करीत असूनसुद्धां १८९१ मध्यें हिंदूंचें साक्षरतेचें जें प्रमाण होतें तेंसुद्धां कायम ठेवतां आलें नाहीं. प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेंतूनच देणें इष्ट आहे. सरकारी शाळांकरितां नेमलेल्या अभ्यासक्रमांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण त्यांच्या मातृभाषेंतूनच देण्यांत यावें. सन १३३४ फसलीचे सरकारी आंकडे बघतां

४०५३ खाजगी शाळा होत्या, व त्यांतून ७६६५४ विद्यार्थी शिकत होते. परंतु खाजगी शाळेचें वरील पत्रक निघाल्या नंतर खाजगी शाळांची संख्या १३०५ पर्यंत उतरली, व विद्यार्थीहि ३१७४० एवढेंच राहिले. ह्याचा अर्थ असा होतो कीं, ४४९१४ विद्यार्थ्यांना शिक्षणापासून पराङ्मुख करण्यांत आलें. सुधारलेल्या देशांतून शिक्षणासाठीं खाजगी प्रयत्न करणाऱ्यांना उत्तेजन देण्याचें सरकारचें धोरण असतें. आणि यासाठीं असलें पत्रक सरकारनें रद्द करावें असें आम्ही सुचवतों. सरकारनें अत्यंत प्राचीन अशा हिंदु संस्कृतीच्या प्रगति व रक्षणाविषयीं कांहींच प्रयत्न केला नाहीं. मात्र इस्लामी संस्कृतीच्या रक्षणाविषयीं व वाढीविषयीं सारखा प्रयत्न करण्यांत येतो. आम्ही आशा बाळगतों कीं, सरकार या संस्थानांतील दोन अत्यंत महत्त्वाच्या अशा वर्गांच्या संस्कृतिरक्षणाविषयीं सारखीच मदत देईल.

हिंदूंच्या तक्रारीबाबतच्या पुस्तकास उत्तर म्हणून

" सरकारचें प्रसिद्धीपत्रक. "

(महत्त्वाचे मुद्दे)

पुस्तकांत एकंदरीनें आंकडे बरोबर असल्याचें सरकार कबूल करीत आहे. परंतु ज्या रीतीनें त्यांची मांडणी केली आहे त्यावरून सहेतुक अथवा निर्हेतुकपणें संस्थानांतील हिंदूंचें अगदीं विकृत चित्र रंगविलें आहे. सरकारी नोकऱ्यांतून हिंदूंना मुद्दाम होऊन वगळण्याचें धोरण ठेवण्यांत आलें आहे, ह्या सूचनेस कांहींही आधार नाहीं.

सर्वांत प्रथम आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आदिहिंदूंना हिंदु गणणें ही चूक होय. कारण उघड आहे कीं, यांतील बहुसंख्याक लोक अधिकाऱ्यांच्या जागेची इच्छाही करीत नाहींत व त्यांची लायकीही नसते. त्यांची संख्या २४७३२३० इतकी मोठी असल्यामुळें ही संख्या वजा केली असतां नोकऱ्यांमधील आंकड्याच्या प्रमाणांत मोठा फरक पडतो. तसेंच खेडेगांवांत राहणाऱ्या मोठ्या लोकसंख्येचा आंकडाही गणनेंत दाखल केल्यामुळें घोटाळा उडाला आहे. कारण नोकऱ्यांमध्येंच विशेषतः गॅझेटेड अधिकाराच्या नोकऱ्यांवर दोन्ही जातींतील शहरवासीयांमधूनच भरती केली जाते.

ह्या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं, २००० वस्तीच्या किंवा त्याहून ज्यास्त गांवांचा शहर या सदरांत समावेश केला आहे. संस्थानांतील हिंदु मुख्यत्वेंकरून शेतकरी आहेत. सर्व संस्थानांतील हिंदूंचें आदिहिंदु वगळून मुसलमानाशीं प्रमाण जरी ६·३ स १ आहे तरी, खेड्यांत राहणाऱ्यांचें प्रमाण ८·६ स १ असून शहरांत राहणाऱ्यांचें प्रमाण १·६ स १ आहे. ह्या मानानें पहातां पुस्तककर्त्यांनीं राज्यव्यवस्थेविरुद्ध हिंदूंना कमी नोकऱ्या मिळण्याबाबत जो आरोप केला आहे, त्यांतील जोर पुष्कळसा नाहींसा होतो.

तरी पण असा प्रश्न करितां येईल कीं, लोकसंख्येचे आंकडे योग्य तऱ्हेनें दाखविले गेले, तरी सुद्धां गॅझेटेड अधिकाऱ्यांच्या जागेवर मुसलमानांची इतक्या मोठ्या प्रमाणांत नेमणूक कशी केली जाते ? याला कारणें दोन आहेत. पहिलें कारण हें कीं, शहरांतील मुसलमान रहिवाशांचा हिंदूंपेक्षां स्वभावतः व ऐतिहासिक परंपरेनें सरकारी नोकरी कडेच कल असतो. तुलनात्मक दृष्टीनें त्यांची जात गरीब असून त्यांच्याजवळ भांडवल नसतें, आणि धंद्याचे मार्गहि फार थोडे मोकळे असल्यामुळें स्वाभाविकपणेंच नोकरीचा राजमार्ग ते पतकरतात .पुष्कळसे हिंदु आपल्या धन्याची नोकरी करूं इच्छितात. पण त्यांचे विशेष हितसंबंध दुसरीकडे असतात. दरवर्षीं होणाऱ्या सिव्हिल सर्व्हिस परीक्षेस दोन्ही जातींतून बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिल्यास सरकारी नोकरींत शिरण्याच्या दोन्ही जातींत असलेल्या उत्कट इच्छेचें उत्कृष्ट चित्र दृष्टीस पडतें. वर्षांतून एकदां हैद्राबाद सर्व्हिसमध्यें येऊं इच्छिणाऱ्या व ज्यांची लायकी आहे अशा सगळ्या विद्यार्थ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बोर्डापुढें यावें लागतें.


श्री. कृ. कोल्हटकर



राम गणेश गडकरी


गणपतराव जोशी


बालगंधर्व


पं. विष्णु दिगंबर


भास्करबोवा बखले


दा. सा. यंदे


काशिनाथपंत मित्र


नकलाकार भोंडे

संकीर्ण

—:०:—

मजूरवर्गाची संघटना

हिंदुस्थानांतील मजूरवर्गाची पद्धतशीर संघटना होण्यास १९१८ सालापासून प्रारंभ झाला. महायुद्ध संपल्यानंतर आन्तरराष्ट्रीय परिषद प्रस्थापित झाली व व्हर्सेलीसच्या तहाअन्वयें सदर समितीस तीन प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार मजूरसंघास मिळाला. तेव्हां सरकारनें कामगारांचा प्रतिनिधि नेमण्याऐवजीं आपणच तो निवडावा असें वाटून मजूरवर्ग संघटित होऊं लागला. पोस्टल युनियनसारखे सरकारी नोकरांचे संघही याच वेळीं निघूं लागले. ट्रेड युनियन्सचे संरक्षणासाठीं मजूरवर्गाचे कैवारी श्री. नारायण मल्हार जोशी यांनीं १९२१ सालीं मध्यवर्ती मंडळांत एक बिल प्रविष्ट केलें, व पुढें प्रांतिक सरकारचे अभिप्राय मागवून १९२६ सालीं त्याचे कायद्यांत रूपांतर झालें. १९२९ अखेर ह्या कायद्याखालीं नोंदविलेल्या अशा ८७ संस्था हिंदुस्थानांत असून त्यांत एक लक्ष त्र्यायशीं हजार सदस्य सामील होते. यापैकीं मुंबई इलाख्यांतील संघाची संख्या ३८ असून त्यांत ९० हजार सभासद होते. तथापि ट्रेडयूनियन ॲक्टाखालीं न नोंदविलेले असे कैक मजूरसंघही जागजागीं असून त्यांची संख्या सुमारें शंभर सव्वाशें भरेल. व त्यांतील सदस्याची संख्या दीड लाख होईल. भांडवलवाले व सरकार यांचेबरोबर सामुदायिक करार करण्याची धमक आपणांत यावी हा या संघाचा मुख्य हेतु आहे. पगाराची वाढ करणें, कामाचे तास कमी करणें, रविवारीं सुट्टी मिळविणें, नियमित रजा मिळविणें, विम्याची योजना करणें, नोकरीची शाश्वति करणें, बेकारीचे दिवसांत अगर मयत सदस्याचे वारसास आर्थिक मदत देणें वगैरे एकनादोन,संघाचे अनेक उद्देश असतात. वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्ट व ट्रेड डिस्प्यूट्स ॲक्ट यायोगें मजूर वर्गाचे हक्क आणखी निश्चित होऊन त्यांची स्थिति कांहींशी सुधारली. व आगाऊ नोटीस देऊन कायदेशीर रीतीनें संप पुकारण्याचा अधिकार कायद्यानें मजूरवर्गास देण्यांत आला.

संयुक्त संघ अथवा फेडरेशन्स—वर दर्शविल्याप्रमाणें ठिकठिकाणीं मजुरांचे संघ स्थापन झाले असून कांहीं संघ मध्यवर्ती संस्थेस संलग्न झालेले आहेत. सोईसाठीं मध्यवर्ती संघ हाच केवळ एकटा संघ धरून प्रांतिक अगर जिल्हानिहाय यूनियन्स त्यांच्या शाखा अगर उपशाखा संबोधल्या जातात. ट्रेडयूनियन कॉंग्रेस, ऑल इंडिया रेल्वे-मेन्स फेडरेशन्स, ऑल इंडिया सेंट्रल लेबर बोर्ड, करन्सी यूनियन, ऑल इंडिया गव्हर्नमेंट एम्प्लॉईज फेडरेशन्स, असे नऊ संयुक्त संघ सांप्रत हिंदुस्थानांत आहेत. ह्या एकंदर संघांत खात्याबाहेरील सन्मान्य लोकही पुढाकार घेऊन काम करतात. उदाहरणार्थ ऑल इंडिया पोस्टल ॲंड आर्. एम्. एस्. यूनियन या संघाचें जाळें क्वेटा कराची ते रंगून पर्यंत, व पेशावर लाहोर ते केप कामोरिन पर्यंत पसरलें असून, त्यांच्या २३८ जिल्हानिहाय शाखांनीं कैक आमदार, खासदार व नामदार गृहस्थांस आपापल्या संस्थाचे अधिकारी मंडळांत सामील करून घेतलें आहे. यांजकडून इंग्रजी व देशी भाषांतून सुमारें शंभर नियतकालिकें बाहेर पडतात. कांहीं संघ सदस्यांचे सामाजिक, बौद्धिक व शारीरिक स्थिति सुधारण्यासाठीं उपाययोजना करीत आहेत. उदाहरणार्थ, अहमदाबादचा संयुक्त संघानें एक दवाखाना काढला असून २० शाळा चालविल्या आहेत. पुण्याचे पोस्टल संघानें एक इंग्रजी द्वैमासिक, छोटेखानी वाचनालय, मजूरवर्ग विषयक वाङ्मय, आजारी मनुष्यासाठीं लागणारी बेडपॅन, यूरिनल, थर्मामीटर सारखी उपकरणीं, सहकारी पद्धतीवर चालविलेला लिमये

स्टोअर्स, वादविवादात्मक मंडळ अथवा डिबेटिंग यूनियन, खेळाचीं व करमणुकीचीं साधनें येवढ्या गोष्टी उपलब्ध करून ठेवल्या आहेत. सरकारचाही या चळवळीस विरोध नाहीं. व खुद्द सरकारी नोकरवर्ग सोडून पण रेल्वे-मजूर धरून, एकंदर कामगाराच्या स्थितीचें पर्यालोचन करण्याकरितां सरकारनें जॉन् हेन्री व्हिटले यांचे अध्यक्षतेखालीं ४ वर्षांपूर्वी रॉयल कमिशन ऑन् लेबर हें नेमलें होतें. त्यांच्या शिफारशी १९३१सालीं प्रसिद्ध करण्यांत आल्या. व त्यांतील शिफारशीस अनुसरून मध्यवर्ती कायदेमंडळांत कांहीं बिलें प्रविष्ट होऊन तीं पसारही झालीं.

कामगारांच्या पुढाऱ्यांतच लढाऊ वृत्तीचे कांहीं लोक असून त्यांनीं कम्युनिझमच्या तत्त्वांचा कामगारवर्गांत पुरस्कार करण्यास प्रारंभ केला. तथापि मजूरवर्गाची आर्थिक स्थिति, नोकरीच्या अटींची सुधारणा याव्यतिरिक्त भलताच कार्यक्रम ते स्वीकारतात अशा समजुतीवर सरकारनें त्यांजवर खटला भरला व तो आज तीन वर्षें चालून बहुतेक ३ वर्षांपासून तों जन्मभर काळेपाण्याच्या शिक्षा झाल्या आहेत. या विशिष्ट बाबतींत सरकारचा दृष्टिकोन कसाही असला तरी पोटापुरतें अन्न व अंगभर वस्त्र येवढें निर्विवाद मिळविण्याच्या नोकरलोकांच्या चळवळीस हिंदुस्थानांतील सर्व वर्गाचा व बहुजनसमाजाचा पाठिंबा आहे ह्यांत शंका नाहीं.

जग.

जगाच्या पृष्ठभागावरील क्षेत्रफळ १९,६५,५०,००० चौरस मैल आहे असें हिशेब करून ठरविण्यांत आलें आहे. त्यांपैकीं ५,५५,००,००० चौरस मैल जमीन असून १४,१०,५०,००० चौरस मैल पाण्यानें व्यापले आहेत. विषुववृत्ताजवळ पृथ्वीचा व्यास ७,९२६३/२ मैल असून दोन्ही ध्रुवांजवळ ७.९०० मैल आहे. विषुववृत्ताचा परीघ २४,९०१.८ मैल आहे. त्या परिघाची ३६० अंशांत विभागणी झाली आहे. प्रत्येक अंश ६९.१७ (किंवा ६० भौगोलिक) मैलांचा आहे. हे अंश ग्रीनविचमधून जाणाऱ्या मध्यान्ह (meridian) रेषेपासून मोजले आहेत. विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस दोन्ही ध्रुवांपर्यंत जाणाऱ्या, वि० वृत्तांशीं व एकमेकांशीं समांतर असलेल्या रेषांस अक्षांश (latitude) म्हणतात. त्या विषुववृत्तापासून ० अंशापासून ध्रुवांपर्यंत ९० अंश अशा रीतीनें पसरल्या आहेत.

क्षेत्रफळ व लोकसंख्या

प्रदेश	चौरस मैल क्षेत्रफळ	अंदाजी लोकसंख्या
युरोप	३७,५०,०००	४७,५०,००,०००
आशिया	१,७०,००,०००	१,०१,३०,००,०००
आफ्रिका	१,१५,००,०००	१४,३०,००,०००
उत्तर अमेरिका	८०,००,०००	१४,६०,००,०००
दक्षिण अमेरिका	६८,००,०००	६,४०,००,०००
ओशेनिया	३४,५०,०००	८५,००,०००
दोन्ही ध्रुवांजवळील प्रदेश	५०,००,०००	...
	५,५५,००,०००	१,८४,१५,००,०००

ब्रिटिश साम्राज्य सर्वांत जास्त क्षेत्रफळावर पसरलें आहे (१,४२,२०,००० चौरस मैल). सर्वांत मोठ्या साम्राज्यांत दुसरा नंबर रशियाचा लागतो (८०,००,००० चौरस मैल). तिसरा

फ्रान्सच्या साम्राज्याचा (४३,३६,००० चौरस मैल). चीनचा विस्तार ४३,००,००० चौरस मैल आहे. युनायटेड स्टेटस् (बेटांतील सत्ता जमेस धरून) ३७,५०,००० चौरस मैल पसरलीं आहेत; आणि ब्राझीलचा विस्तार ३२,२०,००० चौरस मैल आहे.

मनुष्य जातींतील वंश.

मनुष्यजातीच्या वंशाची घराण्यान्वयें व वर्णान्वयें विभागणी करतां येते. प्रामुख्यानें आढळून येणारा असा "पीत" वर्ण आहे. वर्णांचा अनुक्रम पुढीलप्रमाणें आहे:—(१) पीत (२) श्वेत (३) कृष्ण (४) पिंगट (५) तांबडा. मनुष्य–वंशांतील मुख्य विभाग हे:—

विभाग	क्षेत्रफळ	अंदाजी संख्या
मोंगोलियन	आशिया	६८,००,००,०००
कॉकेशियन	यूरोप व Orient	७२,५०,००,०००
नीग्रो	आफ्रिका	२१,००,००,०००
सेमिटिक	उत्तर आफ्रिका	१०,००,००,०००
मलायन	ओशेनिया वगैरे	१०,४५,००,०००
रेड इंडियन वगैरे	अमेरिका	३,००,००,०००
		१,८४,९५,००,०००

जगांतील राज्यकर्ते अथवा शासनसंस्थांचे मुख्य

देश.	शास्त्याचें नांव, जन्मसन वगैरे.	अधिकारप्राप्ति
अर्जेंटिना	जनरल ऑगस्टीन पी. जूटो अध्यक्ष, सहा वर्षांकरितां निवडणूक.	१९३१
अफगाणिस्तान	महमद नादीरखान (१८८०) राजा.	१९२९
अबिसिनीआ	Haile Selassie (१८९१), (Ras Jarrif) सम्राट्.	१९३०
आइसलंड	Christian X (१८७०) राजा.	१९१२
आफ्रिका (यूनियन ऑफ साऊथ)	अर्ल ऑफ क्लेरेन्डन (१८७७) गव्हर्नर जनरल. J. B. M. हरझोग. मुख्य प्रधान.	१९२४
ओमेन	सय्यद टिमूर आयबिन फैजल (१८८६) सुलतान.	१९१३
आयरिश फ्री स्टेट	इमॉन डी व्हॅलेरा एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष.	१९३२
आल्बेनिआ	Zog (१८९४) अल्बेनिअन्सचा राजा.	१९२४
ऑस्ट्रेलिया	सर ऐझाक ए. ऐझाक्स (१८५५) गव्हर्नर-जनरल.	१९३०
ऑस्ट्रिया	Dr. William Mikias (१८७२) अध्यक्ष Karl Buresch मुख्य प्रधान.	१९२८
इक्वेडोर	Neptali Bonifag अध्यक्ष, मुदत ५ वर्षें.	११३१
ईजिप्त	फौद (१८६८) राजा; सिद्दी पाशा. मुख्य प्रधान.	१९२२
इटली	तिसरा व्हिक्टर इमॅन्युअल (१८६९) राजा;	१९००
	बेनिटो मुसोलिनी, मुख्य प्रधान.	१९२२
इराक (मेसापोटेमिया)	पहिला फैजल (१८८७) राजा.	१९२१

इस्टोनिया	Konstantin Pats (१८७५) State Head.	१९३१
उरुग्वे	डॉ. गब्रायल तेरा (१८७३) अध्यक्ष, मुदत ४ वर्षें.	१९३१
कँबोडिया	Monivang राजा (French Protectorate)	१९२७
कॅनडा	लॉर्ड वेसबरो(१८८०)गव्हर्नर जनरल, R. B. बेनेट,(मुख्य प्रधान)	१९३१
क्यूबा	Gen. Gerado Machado, अध्यक्ष Re-elected 1928 मुदत सहा वर्षें.	१९२५
कोलंबिया	Dr Enrique Olaya Herrera (१८८१) अध्यक्ष; मुदत४वर्षें.	१९३०
कोस्टारिका	Cleto Gonjales Viqueg (१८५८) अध्यक्ष; मुदत ४ वर्षें.	१९२८
ग्रेटब्रिटन्	पांचवा जॉर्ज (१८६५) सम्राट्; (रॅम्से मॅकडोनल्ड, मुख्य प्रधान.)	१९१०
ग्रीस	अलेक्झांडर Zaimis, अध्यक्ष. Eleutharios Veniselos, मुख्य प्रधान.	१९२९
गॉटेमाला	जनरल. जॉर्ज यूबिको (१८७९) अध्यक्ष. मुदत ६ वर्षें.	१९३१
चाइल	Dr. Juan Esteban मॉन्टेरो (१८७६) अध्यक्ष. मुदत ६वर्षें.	१९३१
चीन	लिन् सेन सध्याचें अध्यक्ष.	१९३१
जपान	हिरोहिटो (१९०१) सम्राट्.	१९२६
जर्मनी	F. M. पॉल व्हॉन हिंडेनुबर्ग (१८४७) अध्यक्ष, मुदत ७ वर्षें.	१९२५
झेकोस्लोव्हाकिया	Thomas G. Masaryk (१८५०) आमरण अध्यक्ष.	१९२०
झांजिबार	सय्यद खलीफ आयबीन हरून (१८७९) सुलतान.	१९११
टर्की	मुस्ताफा केमाल पाशा (१८८०) ग्रँड नॅशनल असेंब्लीचा अध्यक्ष.	१९२३
ट्यूनिस	सिद्दि अहमद बे.	१९२९
डँझीग	Dr. Ernest Ziehm, सेनेट्चे अध्यक्ष.	१९३१
डेनमार्क	Christian X. (१८७०) राजा.	१९१२
डोमिनिअन् रिपब्लिक	जनरल रॅफेल लिओनिडास ट्रूजीलो (१८९३)अध्यक्ष,मुदत४वर्षें.	१९३०
नेदर्लंड्स्	विल्हेमिना (१८८०) राज्ञी.	१८९०
नेपाळ	त्रिभुवन विरविक्रम (१९०६) शहा.	१९११
निकरगा	जनरल, जोसे मेरिआ मॉनकेडो; अध्यक्ष, मुदत ४ वर्षें.	१९२९
न्यूझिलंड	लॉर्ड ब्लेडिस्लो (१८६७) गव्हर्नर जनरल, G. W. Forbes मुख्य प्रधान.	१९३०
न्यूफौंडलंड	सर जॉन मिडलटन् (१८७१) गव्हर्नर; (सर रिचर्ड स्क्वायरस् मुख्य प्रधान.)	१९२९
नॉर्वे	सातवा हेकन् (१८७२)राजा;डेनमार्कच्या८व्या फ्रेडरिकचा मुलगा.	१९०५
पनामा	डॉन रिकॅर्डो F. अलफेरो, अध्यक्ष, मुदत ४ वर्षें.	१९३१
परॅग्वे	गाँझेलिस नेव्हिरो, अध्यक्ष; मुदत ४ वर्षें.	१९३१
पॅलस्टाईन	Lt. Gen A.G. Wanchope (१८७४)ब्रिटिश हाय कमिशनर.	१९३१
पर्शिया	मिर्झा रेझा पाल्हवीं (१८७८) शहा.	१९२५
पेरू	Lt. Col. Luis Sanchey Cerro (१८८९) अध्यक्ष.	१९३१
पोर्तूगाल	जनरल, अन्टोनिओ कारमोना (१८६९) अध्यक्ष.	१९२६

पोलंड	प्रो. Ignaty Mosciski अध्यक्ष.	१९२६
प्राशिया	ओटोब्रॅन (१८७२) मुख्य प्रधान.	१९२२
फिनलंड	Pehr Evind Syinhufvud (१८६१) अध्यक्ष, मुदत ६ वर्षें.	१९३१
बल्गेरिया	तिसरा बोरीस (१८९४) झार.	१९१८
बेल्जम्	आल्बर्ट (१८७५) राजा, हेन्री जस्पार, मुख्य प्रधान.	१९०९
बोलिव्हीया	डॉ. डॅनियल सालमनका, अध्यक्ष; मुदत ४ वर्षें.	१९३१
ब्राझिल	Dr. Getulio Vargos Provincial President	१९३०
भूतान (ब्रि. संरक्षित)	Jik me Wangechuck, महाराज.	१९२६
मेक्सिको	डॉ. पास्कल ऑरटिझ् रुबीओ (१८७७) अध्यक्ष, मुदत ४ वर्षें.	१९३०
मोनॅको	Louis (१८७०) युवराज.	१९२२
मोरोक्को	मौलवी महमद (१९१३) सुलतान, मौलवी यूसफचा तिसरा मुलगा.	१९२७
यूगोस्लाव्हिया	अलेक्झांडर (१८८९) राजा.	१९२१
रशिया (U. S. S. R.)	सोव्हिएट सरकार–मुख्य व्ही. एम्. मॉलोटोव्ह.	१९३१
रूमानिया	दुसरा कॅरोल (१८९३) राजा.	१९२५
लवझेंबर्ग	चार्लोटी (१८९६) ग्रॅन्ड डचेस.	१९१९
लॅटव्हिया	आलबर्ट Kuiesis (१८७१) अध्यक्ष; मुदत ३ वर्षें.	१९३०
लैक्टेंस्टीन	पहिला फ्रॅन्सिस (१८५३) युवराज.	१९२९
लैबेरिया	एडविन् बार्क्ले, अध्यक्ष; मुदत ४ वर्षें.	१९३१
लिथुआनिया	ॲटोना स्पेटोना, अध्यक्ष.	१९२६
State of Vaticancity	Plux XI (१८५७) पोप व सर्वसत्ताधीश.	१९२२
व्हेनिझुएला	Gen Juan Vicente Gosug (१८५७) अध्यक्ष; मुदत ७ वर्षें.	१९३१
सयाम	Prajadhipok (१८९३) राजा.	१९२५
स्पेन	निकेटो अल्काला झामोरा, अध्यक्ष.	१९३१
स्वित्झरलंड	Dr. Gluseppe Motta (१८७१) अध्यक्ष, मुदत १ वर्ष.	१९३२
स्विडन्	Gustof V. (१८५८) राजा.	१९०७
सिरिया (French Mandate)	Auguste Henri Pansot (१८७७) हायकमिशनर.	१९२०
संयुक्त संस्थानें	हरबर्ट हूव्हर (१८७४) अध्यक्ष, मुदत ४ वर्षें.	१९२९
हॉंडरस	डॉ. Vencente Mejia Coliudres अध्यक्ष मुदत ४ वर्षें.	१९२९
नेज्द आणि हेजाज	इब्न सौद (१८८२) राजा.	१९२६
हैटी	स्टिनीओ व्हिनसेंट President elected and inaugurated Nov. 18, 1930.	१९३०
हंगेरी	ॲडमिरल निकोलस व्हॉन् हॉर्दी (१८६८) रिजंट.	१९२०
हिंदुस्थान ब्रिटिश	दि अर्ल ऑफ विलिंग्डन (१८६६) व्हाइसरॉय.	१९३१

प्राचीन जगांतील सात अद्‌भुत गोष्टी.

इजिप्तमधील पिरामिड्स—हे पिरामिड्स खगोलवेत्त्यांच्या देखरेखीखालीं सूर्याची पडछाया मोजण्याकरतां बांधले. नंतर त्यांचा उपयोग बादशाही कबरा म्हणून केला गेला. पैकीं सत्तर, ३००० ते १८०० खि. पू.मध्यें बांधण्यांत आले असावे, असें चिकॅगो युनिव्हर्सिटीमधील ओरिएन्टल इन्स्टिटयूटचे डायरेक्टर जेम्स. एच्. ब्रेस्टेड यांचें मत आहे.

हे पिरॉमिड्स नाइल नदीच्या पश्चिम बाजूस असून, कैरोच्या उलट दिशेस विज् अथवा गिझ्‌पासून सुरू होऊन ६० मैलपर्यंत खालीं पसरलेले आहेत. चिओप्सचा पिरॅमिड ४६१ फूट उंच असून, पायथ्याशीं ७४६ चौरस फूट आहे. यानें व्यापलेलें क्षेत्र १५ मैल आहे. सर्वांत मोठा पिरॅमिड ४८० फूट उंचीचा आहे.

तरुण राजा तूतनखामन् (१३५० खि.पू.) याची कबर लक्करच्या दक्षिणेस जुनें थेब्स् येथें आहे. त्याचा शोध हॉवर्ड कार्टनेर यानें १९२४ मध्यें लावला.

स्फिंक्स—गिझ्‌जवळ (स्फिक्स) पक्षहिन दबून बसलेला असा सिंह दगडांत कोरून काढलेला आहे. त्याची लांबी १७२·५ फूट असून, उंची ६६ फूट आहे. त्यानें पसरलेल्या दोन पंजांत एक ग्रॅनाइटची वेदी असून त्यावर कोरलेल्या लेखावरून असें वाटतें कीं, हा चवथ्या राजवंशानें बहुधा (३७५०) खि. पू. या वर्षी केला असावा.

बॅबिलोन येथील झुलता बगीचा—उत्तर अरेबियांतील सिरियन् नांवाच्या रूक्ष प्रदेशालगत पूर्व सरहद्दीपासून ६० मैलावर हल्लींच्या बगदाद शहराच्या दक्षिणेस युफ्रेतीस नदीजवळ नेबुचदनेझारच्या राजवाड्यांत हा बगीच्या होता. यांत धमामा बागा, लहान रोपें, फुलझाडें, कारंजी असून ठिकठिकाणीं विश्रांतिगृहें ७५ ते ३०० फूट जमिनीपासून उंचीवर होतीं. सर्वांत वरच्या गचीवर पाण्याचा खजिना ठेवलेला असून, तेथून तोट्यांनीं बागेस पाणी देण्यांत येई. ह्याचा काल बहुधा ६०० वर्षें खि. पू. असावा.

डायनाचें देवालय—पांचव्या शतकांत (खि. पू.) आयोनियन शहराकडून, केसिफोन या शिल्पशास्त्रज्ञाच्या नकाशावरून, आशियामायनरमध्यें, स्मर्नाच्या दक्षिणेस, एजिअन समुद्राच्या पूर्व बाजूस एफिसिअस् येथें हें देवालय संयोगित-स्मारक म्हणून बांधलें होतें. हल्लीं तें अस्तित्वांत नाहीं. हें देवालय संगमरवरी दगडाचें असून त्याचें क्षेत्र ४२५×२२५ फूट होतें. छावणीस आधार देणारे १२७ गोलस्तंभ पेरिमन जातीच्या संगमरवरी दगडाचे होते. प्रत्येक स्तंभ ६० फूट उंचीचा व १५० टन वजनाचा होता. हें देवालय हेरोस्ट्रेटस् नांवाच्या विक्षिप्त माणसानें दुष्कीर्तीची इच्छा म्हणूनच कीं काय ३५६ खि. पू. या वर्षी जाळून टाकलें.

ज्यूपिटर ऑलिंपसचा पुतळा—प्राचीनकाळीं ज्यास पेलोपोनिसस म्हणत अशा ग्रीस द्वीपकल्पाच्या दक्षिणेस, पश्चिम किनाऱ्यापासून सुमारें १२ मैल आंत असलेल्या, एलिस परगण्यांतील ऑलिंपिया नांवाच्या खोऱ्यांत हा पुतळा होता. अथेन्समधून ४३२ खि. पू. या वर्षी हद्दपार केलेल्या फिडियास नांवाच्या ग्रीक कारागिरानें हा तयार करण्यास घेतला. तो संगमरवरी दगडाचा असून वरचा थर हस्तिदंताचा असून वस्त्रें सुवर्णानें मढविलेलीं होतीं.

मॉसोलसची कबर—ग्रीसच्या उलट दिशेस एजिअन् समुद्राच्या पूर्व बाजूस आशिया मायनरमध्यें हॅलिकारनेसस् येथें कैरीयाच्या राजाची ही कबर आहे. ती संगमरवरी दगडाची असून ३५२ खि. पू. या वर्षी राणी आर्टिमिसिआ हिनें बांधली. तिचें नांव मॉसोलम् असें होतें. या इमारतींतील विशेष म्हणजे सौंदर्य व भव्यपणा हें होय. भूकंपानें या इमारतीचा नाश झाला.

अलेक्झांड्रियामधील दीपगृह—फॅरोज बेटावर अलेक्झांड्रिया बंदरांत पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाचा हा दीपस्तंभ होता. टॉलेमी

फिलाडेल्फस् राजानें जेव्हां इजिप्त जिंकलें (२६५–२४७ खि. पू.), तेव्हां हा बांधला होता. अलेक्झांडूर दि ग्रेटनें जेव्हां अलेक्झांड्रियाची स्थापना केली, तेव्हां हें बेट इजिप्तच्या मुख्य भूमीला सेतू घालून जोडून टाकलें. दीपस्तंभ ४०० फुटांपेक्षां अधिक उंच असून ८५००,०००डॉलर्स इतका खर्च त्यास आला. हा स्तंभ २२४ खि. पू या वर्षी धरणीकंपामुळें कोसळून पडला.

ऱ्होड्सचा भीम विग्रही–राक्षसी पुतळा–दोहोंकाठांवर पाय ठेवून उभा असलेला अपोलो देवाचा ह्रोड्स बंदरांत शिरतांना दिसणारा भव्य पुतळा आशिया–मायनरच्या किनाऱ्यापासून दूर, अलेक्झांड्रियाच्या दक्षिणेस, मेडिटरेनिअन् समुद्राच्या पूर्व भागांत, ह्रोड्सजवळ हा पुतळा होता. हा पुतळा पितळेचा असून लिंडसचा चार्लस यानें उभारला होता. तो सुमारें१०९फूट उंचीचा असून तो तयार करण्यास १२ वर्षें लागलीं, व २५८,००० डॉलर्स इतका खर्च त्यास आला. २८० खि.पू. या वर्षी तो तयार झाला व२२४ खि.पू. या वर्षी धरणीकंपानें त्याचा नाश झाला.

वेरूळचीं लेणीं—यासंबंधीची त्रोटक माहिती पुढें दिली आहे.

जगांतील इतर कांहीं अद्भूत गोष्टी.

चीनची मोठी भिंत—ही भिंत खि. पू. तिसऱ्या शतकांत बांधली. ही पेकिंगच्या उत्तरेस पिवळ्या समुद्राच्या पेव्हहीली नांवाच्या आखातांतील उत्तर भागापासून सुरू होऊन तुर्कस्थानच्या सरहद्दीवर सिनिंगपर्यंत नागमोडी वळणें घेत पसरलेली आहे.

१९०८ सालीं प्रो. जेल यांनीं या भिंतीची शेवटचीं दोन टोकें, मधील कांहीं भाग व माहीत असलेलीं जंगी धारें, वळणें, वगैरे सुद्धां भिंतीचे माप तयार केलें. (लांबी) तें २,५५० मैल झालें, त्यांत २५,००० पाहणीचे बुरूज असून बाहेरील टेहळणीचे बुरूज १५००० आहेत.

ही भिंत समुद्रापर्यंत शॅनहैकेवान येथपर्यंत आहे. भिंतीचे वरील अंतर, प्रो. जेल यांनीं ठरविलेलें पश्चिमेकडील शेवटलें स्टेशन व्हाईट नदीवर सूचौच्या पश्चिमेस कन्सु परगण्यांत आहे, तेथपर्यंत १,१४५ मैल आहे.

बॅबेल येथील मनोरा—हल्लीं नामशेष झालेला हा मनोरा उत्तर मेसापोटेमियामध्यें अरच्या कॅलेडियन शहरांत होता. पायथ्याशीं हा मनोरा ३०० × ३०० फूट असून ७ टप्यानें अगदीं वर निमुळता होत गेला होता. त्याची उंची सुद्धां ३०० फूट होती.

बॅबेल येथील मनोऱ्याची जणुं काय धाकटी बहीणच असा मनोरा झिगरट् येथें होता. हा मनोरा पायथ्याशीं १९५ × १३० फूट असून बहुधा १५० पेक्षां अधिक फूट उंच होता.

स्टोनहेंज—अवाढव्य आकार असलेल्या, ३ वर्तुलाकार एकांत एक अशा मोठ्या दगडांची रास सॅलिसबरी पद्धतीवर आहे. ही रास लंडनच्या नैर्ऋत्य दिशेस ९० मैलांवर आहे. अगदीं बाहेर असलेल्या वर्तुलाचा व्यास१००फूट आहे. त्याच्या आंतील वर्तुलाचा व्यास ७५ फूट आहे, व त्याच्या आंतील म्हणजे तिसऱ्या वर्तुलाचा व्यास ४० फूट आहे. सर्वांत बाहेरील वर्तुलाच्या सभोंवतीं ३३३ फूट व्यास असणारा असा खोल खंदक आहे. पहिल्यानें बाहेरील वर्तुलांतील दगडांची संख्या ३० होती व दगड सरासरी १२ × ६ × ३ फूट या मापाचे होते. हे दगड जोडीनें ब्लॉक्स करून एकमेकांशीं घट्ट आवळून बसविलेले आहेत. आंतील वर्तुलाचें दगड यापेक्षां लहान आहेत.

रोममधील शववापिका (Catacombs)–खिस्ती धर्मांतील पहिल्या अनुयायांच्या रोम येथें प्रेतें पुरण्याच्या गुंफेसारख्या जागा होत्या. आंत वेडेवाकडे मार्ग असणारे ४० पेक्षां अधिक जोड्या असणारे वाडे अथवा गॅलरीज खोल्या वगैरे असून त्यांनीं व्यापिलेलें क्षेत्र ६१५ एकर होतें. क्वचित् ठिकाणीं भूपृष्ठाखालीं ५ मजले म्हणजे सुमारें ७० फूट खोलीच्या या जागा होत्या.

सार्वजनिक क्रीडागृह –(सर्कस मॅक्सिमस्) खि. पू. ६०५ या वर्षी तारक्विन् राजानें हें

क्रीडागृह रोममध्यें बांधलें व ज्यूलियस् सिझरनें खिस्ताच्या जन्मापूर्वी हें क्रीडागृह पुन्हां बांधलें व वाढविलें. तें ३१२ फूट उंच, १,८७५ फूट लांब व ६२५ फूट रुंद होतें. त्यांत १५०,००० प्रेक्षक बसण्याची सोय केली होती. परंतु चवथ्या शतकांत त्यांत पुन्हां वाढ करण्यांत येऊन ३८५,००० प्रेक्षकांची सोय करण्यांत आली. ह्या गृहांत घोड्यांच्या रथाच्या शर्यती व इतर मर्दुमकीचे खेळ होत.

रोममधील नाटकगृह (Colossum)—जगांतील प्रचंड असें हें बदामी नाटकगृह होतें. सम्राट व्हेस्पेसिअननें हें बांधण्यास सुरवात केली. सम्राट डोमिटिअन् यानें इ. स. ८२ या वर्षी तें पुरें केलें. इ. स. २३८ मध्यें चवथा मजला चढविण्यांत आला. याचे अवशेष अद्याप शिल्लक आहेत. इमारतींतील दीर्घ वर्तुल ६१५×५१० फूट होतें व रंगभूमीचें क्षेत्र २८१ × १७६ फूट होतें. भिंती काँक्रिटच्या व बसण्याच्या जागा संगमरवरी होत्या. ५०,०००माणसें बसतील व २०,००० माणसें उभीं राहतील येवढें प्रचंड हें नाटकगृह होतें. बांधकामास १०, ०००, ००० क्रॉऊन्स (१५, ०००, ००० डॉ.) खर्च आला. जेरुसलेम मधून आणलेलें १२, ००० गुलाम कामावर होते. जंगली जनावरें जमिनीखालीं भुयारांत ठेवलेलीं असत. हजारों नवीन खिस्त अनुयायी व इतर लोक सिंहाशीं, वाघाशीं लढतांना नाश पावले. ग्लॅडिएटर्स सुद्धां तेथें द्वंद्व युद्धें करीत असत.

ॲपियन मार्ग—हा मार्ग खि. पू. ३१३ या वर्षी सेन्सर ॲपियस क्लॉडियस् यानें तयार केला. हा मार्ग ३६० मैल लांबीचा असून रोमपासून उत्तरेस कॅपूआ व नेपल्सवरून पुढें पूर्वेकडे इटलीवरून ब्रिंडीसीकडे (नंतर त्यास ब्रिंडिसिझम् म्हणतात) ॲड्रिअटिक समुद्रावरून टर्कीच्या विरुद्ध दिशेस गेला आहे. अशा रीतीनें हा लिव्हॅन्टकडे जाणारा राजमार्ग होता.

सेंट सोफायाची मशीद—कॉन्स्टेंटिनोपल येथें रोमन् सम्राट् जास्टिनिअन यानें इ. स. ५३१-५३८ या वर्षी खिश्चन एपिस्कोपाचें देवालय म्हणून बांधले. ही इमारत ग्रीक क्रॉसच्या आकारची असून, तिचें क्षेत्रफळ २६९×१४३ फूट व पसरट घुमट १८० फूट उंचीचा आहे. या घुमटाचा डेरा गुच्छाप्रमाणें बसविला आहे. मशिदींतील आंतील विटा ग्रीक देवळांतून लुटून आणलेल्या संगमरवरी दगडानें दाखविल्या आहे. टर्कीचा सुलतान दुसरा महंमद यानें इ. स. १४५३ मध्यें या देवालयाचें रूपांतर मशिदींत केलें.

पिसाचा झुकलेला मनोरा—हा मनोरा इ. स. ११५४ मध्यें इटलीमधील पिसा येथें रोमॅनो पिसेनो व इन्सब्रुकचा विल्यम यांनीं बांधिला. प्रथम हा मनोरा सरळ (लंब रेषेप्रमाणें) बांधा वयाचा होता. परंतु पायथ्याखालील जमीन खचूं लागली, व मनोरा झुकूं लागला. शेवटीं हें संगमरवरी काम मूळच्या लंबांतून १६ फूट दूर सरकलेले आढळून आलें. मुख्य प्रधान मुसोलिनी यांच्या सूचनेवरू पाया मजबूत करण्याचें काम चालू आहे. हा घंटेचा मनोरा वर्तुलाकार ८ मजली, व १८८ फूट उंचीचा आहे. असलेच कांहीं झुकते मनोरे, मॉरिझ, इम्स, अम्, ॲसिनेली व गॅरिसंडा येथें आहेत.

नानकिंग येथील चिनी मातीचा मनोरा—हा मनोरा १५ व्या शतकाच्या पूर्व भागांत चीनच्या प्राचीन राजधानींत बांधला होता. हा अष्टकोनी मनोरा ८ मजली व २६१ फूट उंचीचा होता. टैपिंग क्रान्तिकारकांनीं १८५३ मध्यें या मनोऱ्याचा नाश केला.

रोम येथील व्हॅटिकन—जगांतील सर्वांत मोठें असें हें वसति-गृह आहे. यांत हजारों खोल्या आहेत. हें गृह टायबर नदीच्या उत्तर दिशा असून त्याचा मध्यभाग हें एक स्वतंत्र गृह असून सम्राट् कॉन्स्टेंटिन् यांच्या कालांत बांधलें गेलें. वेळोवेळीं वसतिगृह वाढवण्यांत आलें व इ. स. १३७७ पर्यंत हें एकच रोमन् पॉंटिफ्सचें असें वसतिगृह होतें.

सेंट पिटरचे रोममधील कॅथीड्रल—जगांतील सर्वांत मोठें असें हें चर्च १५०६

मध्यें ज्यूलीस पोपनें बांधण्यास सुरवात केली. व १२६ वर्षांनंतर तें पूर्ण झालें. यानें व्यापिलेलें क्षेत्र १८,००० चौरस यार्डस् असून ६३६फूट लांब होते. देवळाचा नावेच्या पाठीसारखा गाभारा १५१ फूट लांबीचा होता. घुमटावरील क्रॉसचें शिखर जमिनीपासून ४३५ फूट उंचीवर होतें.

ऍंग्कोर—देवळांचे शहर फ्रेंच इंडोचायनामध्यें कँबोडिया शहरांत हल्लीं नाश पावलेलें असें हें देवालयांचें शहर होतें. सयामच्या बटमबॉंग परगण्यांत १९०७ पर्यंत तें होतें. नंतर तहनाम्यावरून तें फ्रान्सांत गेलें. नवव्या शतकाच्या शेवटीं ख्मीर्सच्या येकोव्हरमन् राजानें हें शहर वसविलें. तें १३व्या शतकाच्या मध्यकालापर्यंत टिकलें. जेव्हां सयामी लोकांनीं मूळच्या रहिवाशास दक्षिणेकडे हांकून दिलें, तेव्हां त्यांनीं नोमा पेन्ह येथें नवीन कँबोडियन राजधानी वसविली.

कर्णकचें देवालय—इजिप्तमध्यें ३५०० वर्षांपूर्वी हें देवालय बांधलें होतें, हल्लीं त्याच्या अवशेषांनीं व्यापिलेलें क्षेत्र ९३/४ एकर आहे. परंतु हें काम फार सखल होतें. त्यांत जोडलेल्या दिवाणखान्यांच्या मालिका व खुली दालनें होतीं.

ताजमहाल—ही इमारत दिल्लीच्या बादशहानें आपली राणी मुमताजमहाल इचे स्मारक म्हणून बांधली. ती आग्र्यापासून दीड कोसावर यमुनेच्या पश्चिमतीरावर आहे. इ. स. १५३१ च्या आरंभीं इमारतीस सुरवात झाली ती इ. स. १६४३ च्या जानेवारींत पुरी झाली. ती बांधण्याच्या कामीं वीसहजार माणसें खपत होती व बांधकामाचा खर्च पन्नास लाख रुपये झाला. आफ्रिडी म्हणतो इमारतीस ९ कोटी १७ लाख रुपये आला. वीस उत्तमोत्तम जातींच्या दगडांचा उपयोग या इमारतीस केला आहे. एक लाख उत्पन्नाचीं तीस गांवें ताजमहळच्या खर्चाकडे व सभोंवारच्या सराया, दुकानें, बाग,यांच्या खर्चासाठीं लावून दिलीं होती. ही इमारत आपल्या अप्रतिम सौंदर्यानें जगांतील सर्व इमारतींत प्रथम पद पावली आहे. तिच्या एकंदर स्वरूपावर जनानी झांक मारते, असें मार्मिक शिल्पज्ञ म्हणतात. इमारतीचा घुमट वाटोळा नसून अंडाकृति आहे व हा आकार शिल्प शास्त्रज्ञ फारच पसंत करतात. ही इमारत भव्य, रम्य, प्रमाण शुद्ध व चित्ताकर्षक असून जणूं काय कालच बांधली आहे इतकी नवी दिसते.

वेरूळचीं लेणीं—हीं लेणीं औरंगाबादपासून १६ मैलांवर आहेत. ह्या लेण्यांत बौद्ध, हिंदु व जैन अशा तीन प्रकारचीं लेणीं आहेत. अनुक्रमें तीं १२, १७ व ५ अशीं आहेत. ह्यांत इंद्रसभा, चैत्य, तीन ताला, दशावतार, रामेश्वर हीं फार महत्त्वाचीं आहेत. सर्वांत मुख्य म्हणजे कैलास लेणें होय. राष्ट्रकूटांच्या ताम्रपटांत ह्या लेण्यांची फार प्रशंसा केली आहे. शिल्पशास्त्रदृष्ट्या ह्यांतील कलाकुसर, भव्यपणा, मोहकता, मूर्तींचा रेखीवपणा इ. सर्व फारच प्रेक्षणीय आहेत. ह्यांचा काल इ. स. चे चोथें तें १० व्या शतकांमधील आहे.

अजंठा लेणी--हीहिं प्रेक्षणीय व प्राचीन आहेत. इ.पू. १लें शतक. हीं एकंदर २९ आहेत.

सरगॉनचा राजवाडा—ॲसिरियांत खोर्साबाद येथें हा राजवाडा होता. तो खिस्तपूर्वी आठव्या शतकांत बांधला असून त्यानें व्यापिलेलें क्षेत्र १८ एकर होतें.

स्पेनमधील एस्कोरियल—या नांवाचा माद्रिद शहराच्या वायव्येस २५ मैलावर एक विस्तीर्ण व लोकोत्तर असा राजवाडा होता. बादशहा दुसरा फिलीप यानें इ. स. १५६३ मध्यें हा बांधण्यास सुरवात केली व इ. स. १५८६ मध्यें हा पूर्ण झाला. या वाड्यानें ८ एकर जागा व्यापिलेली असून ५०,०००,००० डॉलर्स इतका खर्च त्यास आला. या राजवाड्यांत एक भव्य राजमहाल, चर्च, कबर, ठम, वाचनालय व पदार्थसंग्रहालय होते. १८७२ मध्यें विद्युत्पातानें या राजवाड्याचा नाश झाला.

लोव्हर व टयूलिरिज्—१७ व्या शतकांत पॅरिसमधील लोव्हर व टयूलिरिज् हें एकमेकांस भिंत घालून जोडून टाकलें. यांचें आवार

४५ एकर आहे. १८७१साला काम्यून (फ्रान्स देशांतील मेयरच्या व म्युनिसिपालिटीच्या अंमलातील प्रदेश) असतांना ट्यूलिरिज्‌चा नाश झाला. लोव्हरनें व्यापिलेला प्रदेश ७ एकरांचा आहे. ७ व्या शतकांत डेगोबर्ट राजाचा हा राजवाडा होता, १३ व्या शतकांत तुरुंग होता व पुन्हा १४ व्या शतकांत राजवाडा होता. नेपोलिअननें याचें रूपांतर पदार्थसंग्रहालयांत व चित्रकलेच्या गॅलरींत केलें.

डायोक्लिशियनचीं स्नानगृहें—रोममधील (इ. स. ३ऱ्या शतकांत) या स्नानगृहाचा व्याप १० एकरांचा होता.

अर्वाचीन भव्य इमारतींत पुढील आहेत—पॅरिस ऑपेरा हाऊस ३½ एकर; लेजिस्लेटिव्ह बिल्डींग, नवी दिल्ली, हिंदुस्थान, १३ एकर; लंडनमधील पार्लमेंट गृह ८ एकर; वॉशिंग्टन-मधील न्यू डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स बिल्डींग ७·६ एकर; ब्रूसेल्समधील पॅलेज डी जस्टिस, ६ एकर; लंडन कौंटी हॉल ५ एकर; नेब्रास्कास्टेटकॅपिटल, ४·४ एकर; व ब्रिटिश म्यूझियम् ४·३ एकर.

महत्त्वाचे शोध

अमेरिकन.

शोध	शोधक	काल
लाइट्नींग रॉड.	फ्रँक्लीन	१७५२
सबमरीन् (टॉर्पेडो.)	बुश्नेल	१७७६
वाफेची बोट.	फीच् (Fitch)	१७८७
खिळे करणारें यंत्र.	पर्कीन्स्	१७८७
वाफेची बोट.	फल्टन्	१७९३
कापसांतून सरकी काढण्याचें यंत्र.	व्हिट्ने	१७९३
बिडाचा लोखंडी नांगर.	न्यूबोल्ड	१७९७
कार्डींग (टेक्सटाइल) मशीन.	व्हीटेमोअर	१७९७
हाय प्रेशर स्टीम एंजीन.	इव्हॅन्स	१७९९
पुढें ढकलणारा स्क्रू.	स्टीव्हन्स	१८०४
टॅक मशीन.	ब्लँचर्ड	१८०६
विद्युत् प्रवाहानें केलेला लोहचुंबक.	हेन्री	१८२८
कापण्याचें यंत्र.	मॅनींग	१८३१
गवत कापण्याचें यंत्र.	स्क्रेव्ली हुसी	१८३३
रिव्हाल्व्हर (पिस्तोल).	कोल्ट	१८३५
लोहचुंबकानें चालणारा टेलिग्राफ.	मोर्स	१८३५
फॉस्फरसाची घर्षणाची काडी.	फिलिप्स	१८३६
व्हल्कनाइझ्ड रबर.	सी. गुडईयर	१८३९
शिवणकामाचें यंत्र.	हौ (Howe)	१८४६
चक्रगतीचा छापखाना.	हो रॉबर्ट	१८४६
हायड्रोलिक टरबाईन (चक्की)	फ्रॅन्सिस, V. B.	१८४९

शोध.	शोधक.	काल.
इलेक्ट्रीक लोकोमोटिव्ह.	व्हेल	१८५१
सेफ्टी पीन्.	हन्ट	१८५४
एलेव्हेटोर.	ऑटीस, इ. जी.	१८५७
मॉनीटॉर (लढाऊ जहाज).	एरिक्सन्	१८६१
मशीन गन्.	गेटलींग	१८६१
ब्लॉक सिग्नल्स्.	हॉल	१८६७
रेलवे फ्रीटकार.	डेव्हिड	१८६८
हॉन मोअर (Mower).	हील्स्	१८६८
एअर ब्रेक.	वेस्टिंगहाऊस	१८६९
हस्तिदंतासारखें लाकुड.	हॉट	१८७०
वेल्ट मशीन.	गुड्इयर	१८७१
ऑटोमॅटिक कार कपलर.	जेने	१८७३
टाईपरायटर.	शॉलिस	१८७३
चतुःसंदेशी (विद्युद्यंत्र).	एडिसन	१८७४
पाण्यापासून तयार केलेला गॅस.	लौ	१८७५
कापण्याचें यंत्र.	ईकमेयर	१८७६
टेलिफोन.	ब्रेल	१८७६
बोलणारें यंत्र (फोनो).	एडिसन	१८७७
तापवून ठोकून केलेली विद्युत्.	थॉमसन एल्ह्यू	१७७७
चकाकी प्रकाशाचा दिवा.	एडिसन	१८७८
आर्क लॅंप.	ब्रश्	१८७९
ऑटोगॅसोलिन मोटार.	सेल्डन् (Patd)	१८७९
आपोआप गठ्ठे बांधणारें मशागतीचें यंत्र.	ॲप्लेब्री	१८८०
क्रूम कमावणारें यंत्र.	स्क्लूझ	१८८४
जेटवाटरव्हिल.	पेल्टन	१८८४
ट्रॉलीकार (लाडीस).	व्हॅनडिपोलीनस्प्रॅग्यू	१८८४–८७
टाईपबार कास्टिंग (लिनोटाइप).	मेरगॅन्ट केलर	१८८५
इलेक्ट्रिक्ची रिडक्शन भट्टी.	काऊलेज्	१८८५
स्विफ्ट् फेज् इंडक्शन मोटार.	टेस्ला	१८८७
सिंगल टाइप जुळविणारें यंत्र.	लॅन्स्टन्	१८८७
रोटरीकन्व्हेटर.	ब्रॅडले	१८८७
रेकॉर्डिंग ॲडिंग मशीन.	बरोज्	१८८८
पारदर्शक फोटोग्राफ फिल्म.	गुडविन्	१८८८
कॅल्शियम् कारबाईड.	विल्सन	१८८८
इंडक्शन मीटर.	शेलॅनबर्गर	१८८८
इलेक्ट्रिक आल्कली प्रॉडक्शन.	कॅस्टनर	१८९०
कार्बोरंडम्.	ॲशेसन	१८९१
सिंक्रोनस रोटरी कन्व्हेटर.	लॅमे	१८९१

शोध.	शोधक.	काल.
हेअरव्हिजड आर्मर प्लेट.	हार्वे	१८९१
आल्टरनेट करंट मोटार.	टेस्ला	१८९२
मोशन् पिक्चर मशीन.	एडिसन	१८९३
सबमरिन् (बुडती पाणबोट).	लेक	१८९४
ड्राय एयर प्रोसेस, ब्लास्ट फर्नेस.	गेली	१८९४
चपटे नांगर (अर्वाचीन पद्धतीचे).	हार्डी	१८९६
हायस्पीड स्टील.	टॅलोर व व्हाइट	१९०१
रेडिओ सेंडिंग ॲपरेटस.	स्टबलफिल्ड	१९०२
एरोप्लेन.	ऑरव्हिल व विल्बरराइट	१९०३
निर्वात (रेडिओ) नळया.	डी फॉरेस्ट ली	१९०७
सायन्थेटिक रेसिन्स.	बेकलंड	१९०९
हायड्रो एरोप्लेन.	ग्लीन, एच, कर्टीस	१९११
डेप्थ–बाँब.	टेट, गॉडफ्रे	१९१६
गॅस एंजीन.	ईकमेयर	१९२१
ए. सी. रेडिओ ट्यूब्ज.	फ्रिमन डिमेल	१९२२–२७
डिआयोने सर्कीट ब्रेकर.	स्लेपिन	१९२९

इतर देशीय

शोध	काल	शोधक	देश
छपाई (ब्लाक)	५९३	(अज्ञात)	चीन.
धावते धोटे	१७३८.	के	इंग्लीश.
कापूस पिंजण्याचें यंत्र	१७६४	हारग्रेव्हज्	इंग्लीश.
वाफेचें एंजीन	१७६५	वॅट	इंग्लीश.
लिडन् जार	१७४५	डीन व्हॉन लिस्ट	जर्मन.
कापूस पिंजण्याचें यंत्र	१७६७	हारग्रेव्हज्	इंग्लीश.
शक्तीनें चालणारा माग	१७८५	कार्ट राइट्	इंग्लीश.
उजेडाकरितां कोलगॅस	१७९०	मर्डोक	इंग्लीश.
व्होल्टानें शोधून काढलेला दिवा	१८००	व्होल्ट	इटॅलियन.
छातींतील आवाज ऐकण्याची नळी	१८१६	लॅक्निक	फ्रेंच.
शिवण्याचें यंत्र	१८३०	थिमोनिअर	फ्रेंच.
पाणी शुद्ध करण्याचें यंत्र	१८३०	सिंप्सन	इंग्लीश.
फॉस्फरसची काडी	१८३१	सॉरिया	फ्रेंच.
इलेक्ट्रो–मॅगनेट्चा टेलिग्राफ	१८३६	व्हीटस्टोन	इंग्लीश.
फोटोग्राफी	१८३९	डगेरे व नीप्स	फ्रेंच.
पोर्टलंड सिमेंट	१८४५	जॉन्सन I. C.	इंग्लीश.

शोध	काल	शोधक	देश
भ्रमणदर्शक यंत्र	१८५२	फौकॅटन्स	फ्रेंच.
दुहेरी टॅलिग्रॅफी	१८५३	गिंटी	ऑस्ट्रियन.
पोलाद वळविणारें यंत्र	१८५६	बेसिमर	इंग्लीश.
ऑनिलिन डाईज्	१८५६	पर्कीन	इंग्लीश.
ओपन हार्थ फर्नेस	१८६१	सीमेन्स	इंग्लीश.
डायनॅमाईट	१८६७	नोबेल	स्वीडीश.
सायफन् रेकॉर्डर	१८७४	थॉम्सन	इंग्लीश.
गॅस एंजीन, ओटो सायकल	१८७७	ओटो	जर्मन.
सेंट्रीफ्यूगर क्रिमर	१८८०	डीलॅव्हेल	स्वीडीश.
मॅंगनिज् स्टील	१८८४	हॅडफील्ड	इंग्लीश.
स्टीम टरबाईन	१८८४	पारसन्स	इंग्लीश.
बिनधुराची पावडर	१८८६	व्हील	फ्रेंच.
मॅन्टल बर्नर	१८९०	वेलसबॅच ओएर	ऑस्ट्रियन.
कोकओव्हन	१८९३	हॉफमन्	ऑस्ट्रियन.
बिनतारी तारायंत्र	१८९५	प्रीस (Preece)	इंग्लीश.
बिनतारी तारायंत्र	१८९६	मार्कोनी	इटॅलियन.
इलेक्ट्रीक स्टील	१९००	हेरोल्ट	फ्रेंच.
ऑइल मोटर	१९००	डायसेल	जर्मन.
वेल्डिंग बाय गॅस	१९०१	फौच	फ्रेंच.
डेप्थ बॉंब	१९०३	W. T. ऊंग	स्विडीश.
नायट्रोजन फिक्सेशन	१९१३	हॅबर, फ्रिज	जर्मन.

प्रसिद्ध संशोधक नेथन. बी. स्टबलफिल्ड (Nathan. B. stubblefield) यांनीं रेडिओच्या साहाय्यानें मनुष्याचा आवाज प्रसृत केला. आपल्या स्वतःच्या प्रयोगानंतर १० वर्षांनीं त्यांनीं सार्वजनिक प्रयोग केला.

जर्मनींतील कार्ल, बेंझ यांनीं १८७९ मध्यें टूस्ट्रोक मोटार शोधून काढली. व १८८६ मध्यें जगांतील पहिली मोटार तयार केली.

महत्त्वाचीं वैमानिक उड्डाणें.

तारीख	वैमानिकाचें नांव	अंतर	किती वेळ लागला	मशीन
१७ डिसेंबर १९०३	Orville Wright	८५० फूट शक्तीनें चालणारें व मनुष्याच्या ताब्यांत असणारें मशीन; त्यावरून होणारें पहिलें उड्डाण.	५८ सेकंद	१२ h. p. Wright biplane
२५ जुलै १९०९	Louis Bleriot	२६ मैल इंग्लिश खाडीवरून उड्डाण Les Baraques ते डोव्हरपर्यंत.	३७ मिनिटें	२५ अस्वशक्तीचें Bleriot monoplane
एप्रिल २७-२८-१९१०	Louis Paulhan	१८३ मैल लंडन ते मँचेस्टर उड्डाण फक्त एकदा halt: "डेली मेल" चें १०,००० पौंडाचें बक्षीस.	४ तास १२ मिनिट	५० अस्वशक्तीचें फारमन biplane
जून १९१९	सर जान अलकॉक व सर आर्थर व्हिटेन ब्राउन	१,८९० मैल अटलांटिक महासागरांतून न थांबतां झालेलें पहिलें उड्डाण. सेंट जॉन्स पासून आयर्लंड. "डेली मेलचें" १०,०००चें बक्षीस मिळालें.	१६ तास १२ मिनिटें	Twin engined Vickers biplane
नोव्हेंबर-डिसेंबर १९१९	सर रॉस स्मिथ	११,२९५ मैल टप्याटप्यांनीं इंग्लंड पासून ऑस्ट्रेलियास उड्डाण.	हवेंत १२४ तास (विमानांत)	Twin edged Vickers biplane
१९२४	U. S. Army airmen	२७,००० मैल टप्याटप्यांनीं पृथ्वीप्रदक्षणा	विमानांतून हवेंत ३३६तास	Dougles biplane
१९२५	Marchese de Pinedo	३४,००० मैल. टप्याटप्यांनीं रोम-मेलबोर्न-टोकियो व पुन्हा रोम.	हवेंत ३६० तास	Savia flying boat

तारीख	वैमानिकाचें नांव	अंतर	किती वेळ लागला	मशीन
१९२५–१९२६	Sir Alan कॉबहॅम	१७,००० मैल इंग्लंड ते दक्षिण आफ्रिका व परत.	हवेंत १७५ तास	३८५ अश्वशक्तीचें Dehav biplane
१९२६	Commandante Franco	६,२५९ मैल टप्पाटप्प्यांनीं स्पेनपासून दक्षिण अमेरिका त्यांत महासागरावरून न थांबतां १५०० मैलाचें उड्डाण.	५१½ तास	Dornier flying Boat
मे ९, १९२६	Lt. Commander R. E. Byrd	१,३०० मैल Spitsbergen पासून उत्तरध्रुव व परत	१५¾ तास	तीन एंजिनचें Fokker monoplane
ज्यून–आक्टोबर १९२६	सर ॲलन कॉबहॅम	२८,००० मैल इंग्लंड ते ऑस्ट्रेलिया व तेथून पुन्हा इंग्लंड.	हवेंत विमान एकंदर २३० तास होते	De Havilland biplane
मे २०–२१, १९२७	कॅप्टन लिंडबर्ग	३,६३९ मैल न्यूयॉर्क ते पॅरिस न थांबतां	३३½ तास	२२० अश्वशक्तीचें Ryan monoplane
फेब्रुवारी १९२८	बर्ट हिंक्लर	१०,३४० मैल इंग्लंड ते ऑस्ट्रेलिया	१५½ दिवस	" Avian " वजनानें हलकें विमान
एप्रिल १९२८	Capt. Kohl, Baron Von Hunefeld, Commandant Fitzmaurice.	२,३०० मैल आयर्लंड ते लॅब्रॅडॉर (उत्तर ॲटलांटिक-वरून पूर्व-पश्चिम न थांबतां पहिलें उड्डाण)	३६ तास	German Bremen modoplane
जुलै १९२८	Capt. Ferrarin and Major del Prete	४,८५० मैल रोम ते ब्राझील न थांबतां	४५ तास १० मिनिटें	Savoia Marchetti flying boat
एप्रिल १९२९	Squad-Ldr. Jones-Williams and लेफ्टेनंट N. H. जेंकिन्स	४,१३० मैल इंग्लंड ते हिंदुस्थान न थांबता	५०½ तास	Fairey Napier monoplane

आल्फ्रेड बी. नोबेल प्राईज मेन.

वर्ष	पदार्थविज्ञान	रसायन	वैद्यक	वाङ्मय	शांतता
१९०१	डब्ल्यू. सी. रॉंटेजीन (ज.)	जे एच्. व्हॅन्ट हॉफ (ड.)	ई० ए० व्हॉन बेहरींग(ज).	आर. एफ. ए. सलीप्रुढोमी (फ्रा.)	एच्. डनन्ट (स्विस.) एफ्. आर पॅसी (फ्रा.)
१९०२	एच. ए. लॉरॅन्झ (ड.) पि. झिमन. (ड.)	इ. फिशर (ज.)	सर रोनॉल्ड रास (इंग्लंड)	थॉमस मॉमसेन (ज.)	इ. डूकोमन् (स्वीस.)
१९०३	एच.ए.(Becquerel)(फ्रा.) P.And Marie curie (फ्रा.)	एस्.ए.अऱ्हेनीअस (स्वीडन्)	एन्. आर्. फिनसेन् (डेनमार्क)	B. Bjornson (नॉर्वे)	ए. गोबॅट (स्विस्.) सर,डब्ल्यू.आर.क्रीमरा (इं)
१९०४	लॉर्ड रोलिफ (इं.)	सर Wm रॅम्से (इं.)	आय्. पी. पॉव्लो (र.)	एफ. Mistral (फ्रा.) जे. Echegaray (स्पेन.)	इन्स्टिटयूट ऑफ् इन्टरनेॅझनल लॉ
१९०५	पी. एच. लेनार्ड (ज.)	A. von Baeyer (ज.)	आर्. कोच्. (ज.)	H. Sienkiewicz (पो.)	बेरोनेस व्हॉन सटनर (ऑस्ट्रि.)
१९०६	जे. जे. थॉमसन् (इं.)	H. Moissan (फ्रा.)	C. Golgi (इटाली) S. Ramony Cajal(स्पेन)	G. Carducci इटाली	थॉमस रुसव्हेल्ट (अमेरिका)
१९०७	ए. ए. मायकेलसन् (अ.)	E. Buchner (ज.)	C. L. A. Laveran (फ्रा.)	आर. किप्लिंग	इ. टी. मॉनेटा (इटाली) L. Renault (फ्रा.)
१९०८	जी. लिपमन (फ्रा.)	इ० रूदरफोर्ड (इं.)	P. E. harlich (ज.) E. Metchnikoff (र.)	R. Eucken (ज)	के० पी० अर्नोल्डसन् F. Bajer (डेन.)
१९०९	जी. मार्कोनी (इं.) F. Barun (ज.)	डब्ल्यू. ऑस्टवल्ड (ज.)	थॉमस कोचार (स्विस.)	Selma Lagerlof (स्वित्झ)	A. M. F. Beernaert (बेल्जियम्) Baran De Constant (फ्रा.)
१९१०	J. D. vander Walls (ड.)	O. Wallach (ज.)	ए. कॉसेल (ज.)	P. Heyse (ज.)	Int. Peace Bureau (स्वित्झ.)
१९११	W. Wien (ज.)	Marie curie (फ्रा.)	A. Gullstandrant (स्विझ.)	M. Maeterlinck (बे.)	T. M. C. Asser (ड.) A. H. Fried (ऑ.)

वर्ष	पदार्थविज्ञान	रसायन	वैद्यक	वाङ्मय	शांतता
१९१२	Gustaf Dalen (स्वीडन)	V. Grignard (फ्रा.) P. Sabatier (फ्रा.)	A. carrel (अ.)	G. Hauptmann (ज.)	Elihu Root (अ.)
१९१३	H. K. Onnes (ड.)	A Warner (स्वित्झ.)	C. Richet (फ्रा.)	रवींद्रनाथ टागोर (हिं.)	H. ha Fontaine (बे.)
१९१४	M. Von Lauc (ज.)	T. W. रिचर्डस (अ.)	R. Baray (ऑ.)	दिलें नाहीं	दिलें नाहीं
१९१५	W. H. ब्रॅग W. L. ब्रॅग } (इंग्लंड)	R. Willstatter (ज.)	दिलें नाहीं.	रोमाँ रोलंड. (फ्रा.)	दिलें नाहीं
१९१६	दिलें नाहीं.	दिलें नाहीं	दिलें नाहीं	Verner Hidenstam (स्वीडन.)	दिलें नाहीं
१९१७	Prof. Charles, G. Barkla (इं.)	दिलें नाहीं	दिलें नाहीं	K. Gjellerup (डेनमार्क) H. Pontoppidon (डेनमार्क)	इन्टर नॅशनल रेडक्रॉस ऑफ जेनिव्हा
१९१८	M. Palanck (ज.)	Prof. F. Habor (ज.)	दिलें नाहीं	दिलें नाहीं	दिलें नाहीं
१९१९	जे० स्टार्क (ज.)	दिलें नाहीं	Jules Bordet (बे.)	Carl spitteler (स्वित्झ.)	वुडरो विल्सन (अ.)
१९२०	C. E. Guillaume (स्वीझ.)	Walthor Nernst (ज.)	A Korgh (डेन.)	Knut Humsun (नार्वे.)	L. Bourgeois (फ्रा.)
१९२१	अल्बर्ट ऐनस्टीन (ज.)	Fred'k soddy (इं.)	दिलें नाहीं	अनातोल फ्रान्स (फ्रा.)	K. H Branting (स्वि.) Chr. L. Lange (नॉ.)
१९२२	Niels Bohr (डेनमार्क)	एफ्. डब्ल्यू. ॲस्टन (इं.)	A. V. Hill (इं.) and O. Meyerhoff (ज.)	J. Benavente (स्पेन.)	एफ. नॅन्सेन (नॉ.)
१९२३	R. A. M. Millikan (अ.)	Fritz Pregl (ऑ.)	F.G. Banting (कॅनडा) and Dr.G.R.Mcleod (कॅनडा)	W.B. Yeats (आयर्लंड.)	दिलें नाहीं
१९२४	K. M. G. Sigbahn (स्वित्झ.)	दिलें नाहीं.	Winthoven (ड.)	Wladislan Reymont (पो.)	दिलें नाहीं
१९२५	Jas Frank (ज.) Gust Merty (ज)	Richard Zsigmondy (ज.)	दिलें नाहीं	जी. बी. शॉ (इंग्लंड)	C. G. Dawes (अ.) ए. चेंबरलेन (इं.)

वर्ष	पदार्थविज्ञान	रसायन	वैद्यक	वाङ्मय	शांतता
१९२६	Jean B. Perrin (फ्रा.)	T. svedberg (स्वी.)	Johan Filiger (डेन.)	signora G. Deledda	ArristideBriowd(फ्रा) G. Stresemann (ज.)
१९२७	Arth. Compton (अ.) And C.T.R. विल्सन(इं.)	Hienrich Willand (ज.)	J. Wagner Jauregg (ऑ.)	हेन्री बर्गसन (फ्रा.)	Ludwig quidde(ज.) Ferd. Buisson (फ्रा.)
१९२८	O. W. रिचर्डसन (इ.)	Adolf Windous(ज.)	डॉ. चार्लस निकोले (फ्रा.)	Mrs. S. Undset(नॉ.)	दिलें नाहीं
१९२९	Duc de Broglie (फ्रा.)	A Harden (इं.) and H. Von Euler chelpin (स्विझ.)	F.G.Hopkins (इं.) & C. Eijkmann (डच्.)	थॉमस मॅन (ज.)	F. B. Kellogg (अ.)
१९३०	चंद्रशेखर वेंकट रामन् (हिंदुस्थान)	हॅन्स फिशर (ज.)	Dr.Karl Landsteiner (अ.)	Sinclair Lewis (अ.)	N. soderblom (स्वि.)
१९३१		Carl Bosch (ज.) And Fred Bergius (ज)	Otto Warburg (ज.)	Erik A. Karlfeldt (स्वी.)	डॉ. एन. एम. बटलर (अ.) जेन अडॅम्स (अ.)
१९३२				जॉन गाल्सवर्दी (इं.)	दिलें नाहीं

वरील कोष्टकांत संक्षेपांनीं दर्शविलेले देश.

(अ.)	अमेरिका.	(डे.)	डेनमार्क.	(पो.)	पोलंड
(ऑ.)	ऑस्ट्रेलिया.	(इं.)	इंग्लंड.	(र.)	रशिया
(बे.)	बेल्जम्.	(फ्रा.)	फ्रान्स.	(स्पे.)	स्पेन
(कॅ.)	कॅनडा	(ज.)	जर्मनी.	(स्वित्झ.)	स्विझरलंड
(डच्)	हॉलंड.	(इ.)	इटाली.	(स्वी.)	स्वीडन
(डेन.)	डेनमार्क.	(ना.)	नॉर्वे.		

ब्रिटिश बेटें.

विभाग व राजधान्या	क्षेत्रफळ चौरस मैल	लोकसंख्या १९११	लोकसंख्या १९२१
इंग्लंड व वेल्स (लंडन) ...			
इंग्लंड (मंमथशायरधरून) ...	५०,८७४	३,४०,४५,२९०	३,५६,७८,५३०
वेल्स	७,४६६	२०,२५,२०२	२२,७६,७१२
स्कॉटलंड (एडिंबरो) ...	३०,४०५	४७,६०,९०४	४८,८२,२८८
उत्तरेकडील आयर्लंड (बेलफास्ट) / आयरीश फ्री स्टेट (डब्लिन) ...	३२,५८६	४३,९०,२१९	४४,९६,०००
Isle of Man (डग्लस) ...	२२७	५२,०१६	६०,२३८
खाडींतील बेटें	७५	९६,८९९	८९,६१४
परदेशांत असलेले सैन्यांतील व आरमारांतील लोक व खलाशी ...	...	१,४५,७२९	... ...
एकूण	—	४,५५,१६,२५९	४,७४,१३,३८२

धर्म व भाषा

ग्रेटब्रिटन व आयर्लंडमधील सर्व लोक बहुतेक Christian आहेत; ३ लक्ष ज्यू आहेत, कांहीं थोडेसे परदेशाहून आलेले विधर्मी आहेत. इंग्लंडमध्यें Church of England (एपिस्कोपल) व स्कॉटलंडमध्यें Church of Scotland (प्रेस्बेटेरियन) हे रूढ धर्मपंथ आहेत. आयर्लंडमध्यें १८६९ पासून व वेल्समध्यें १९२० पासून चर्च मोडलें. इ. स. १८५१ पासून धर्मपंथाप्रमाणें खानेसुमारी होणें बंद झालें. तरीही बऱ्याच धार्मिक संस्था आपापल्या सभासदांचा अंदाजी आंकडा प्रसिद्ध करतात. १९२२ च्या ईस्टरमध्यें 'चर्च ऑफ इंग्लंड' चे २२,९४,१९० कम्युनिक पंथाचे लोक होते; आणि 'रोमन कॅथॉलिक चर्च' चे इंग्लंडांत २०,००,०००; स्कॉटलंडांत ५,४६,००० व आयर्लंडांत १९२० सालीं ३२,४२,६७० लोक होते. सर्वांची भाषा इंग्रजी आहे. वेल्समधील बरेचसे वेल्स भाषा बोलतात व कांहीं दोन्ही भाषा बोलतात. आयरीश फ्री स्टेटमध्यें जुनी गेलिक (Gaelic) भाषा रूढ करण्याचे प्रयत्न चालू आहेत. हायलँडस् व स्कॉटलंडचीं बेटें येथें अजूनही गेलिक भाषा बोलतात. १९२१ च्या खानेसुमारींत तेथें १०,३१४ गेलिक बोलणारे व १,५१,१५९ गेलिक व इंग्रजी बोलणारे लोक होते.

जन्म, लग्नें व मृत्यु (ग्रेटब्रिटन, उत्तरेकडील आयर्लंड व आयरिश फ्री स्टेट)

वर्ष	जन्म	दर हजारी प्रमाण	लग्नें	दर हजारी प्रमाण	मृत्यु	दर हजारी प्रमाण
१९१३	११,०२,५००	२४·१	३,४२,५३८	१५·०	६,५२,७३८	१४·३
१९१९	८,८८,०३१	१९·०	४,४०,७४१	१८·९	६,५७,९६४	१४·३
१९२०	११,९३,८६४	२५·४	४,५३,५६२	१९·३	६,००,८४७	१२·८
१९२१	१०,६२,७३५	२२·५	३,८३,३४८	१६·२	५,८८,६७७	१२·५
१९२२	९,८३,५८९	२०·७	३,५७,१३१	१५·०	६,२४,०२७	१३·१

हिंदुस्थान सरकारच्या कौंसिल ऑफ स्टेटचे सभासद.

अध्यक्ष—दि ऑनरेबल सर हेन्री मॉन्‌क्रिफ् स्मिथ्, नाइट्, सी. आय्. ई.; आय्. सी.एस्.

१ इलेक्टेड मेंबर्स–३३

कॉन्स्टिट्युअन्सि		नांव
मद्रास—मुसलमानेतर	...	दिवाणबहादुर सर एस्. एम्. अण्णामलाई चेट्टियार्, नाइट्.
,, ,,	...	श्री. व्ही. रंगनाथकालु नायडू गारु
,, ,,	...	श्री. के. व्ही. रंगास्वामी अयंगार
,, ,,	...	दि. ब. जी. नारायणस्वामी चेट्टि गारु, सी. आय्. ई.
मद्रास—(मुसलमान)	...	सय्यद महंमद पादशाहासाहेब बहादुर
मुंबई—(मुसलमानेतर)	...	सरदार श्री. जगन्नाथ महाराज पंडित
,, ,,	...	श्री. होरमस्जी माणिकजी मेथा
,, ,,	...	सर फिरोझ् सी. सेटना, नाइट्, ओ. बी. ई.
मुंबई इलाखा (मुसलमान)	...	सरदारसाहेब सुलेमान कासम हाजि मिठा, सी. आय्. ई.
सिंध—(मुसलमान)	...	श्री. अलिबक्ष महंमद हुसेन
मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स—	...	मि. ई. मिल्लर
पूर्व बंगाल—(मुसलमानेतर)	...	बाबु जगदीश्चंद्र बॅनर्जी
पश्चिम बंगाल— ,,	...	कुमार त्रिपेंद्र नारायण सिंह
,, ,, ,,	...	श्री. सत्येंद्र चंद्र घोस मौलिक
पश्चिम बंगाल (मुसलमान)	...	श्री. महंमूद सुरावर्दी
पूर्व बंगाल— ,,	...	श्री. सय्यद अबदुल हाफीझ्
बंगाल चेंबर्स ऑफ कॉमर्स		मि. पी. एच्. ब्राउने सी. बी. ई.
मध्य संयुक्तप्रांत—(मुसलमानेतर)	...	राजा सर रामपालसिंग के. सी. आय्. ई., (कुरि सुधावली)
उत्तर संयुक्त प्रांत—(मुसलमानेतर)	...	रायबहादूर लाला जगदीशप्रसाद
दक्षिण ,, ,,	...	राजा सर मोतीचंद, सी. आय्. ई.
पश्चिम ,, (मुसलमान)	...	खानबहादूर हाफिज महंमद हालीम
पूर्व ,, ,,	...	शेख मुशिर होसाइन किडवाल
पंजाब ,, (मुसलमानेतर)	...	रायबहादूर लाला रामसुरणदास, सी. आय्. ई.
,, ,, (शीख)	...	सरदार शिवदेवसिंग उबेरोइ
पूर्व पंजाब (मुसलमान)	...	खानबहादूर चांद्रि महंमद दिन
पश्चिम ,, ,,	...	सर सय्यद महंमद मेहेरशहा नाइट्
बहार ओरिसा (मुसलमानेतर)	...	रायबहादूर राधा-कृष्ण जालन
,, ,, ,,	...	राजा रघुनंदन प्रसादसिंग
बहार ओरिसा (मुसलमान)	...	श्री. अबु अबदुल्ला सय्यद हुसेन इमाम
मध्यप्रांत (जनरल)	...	... ...

	कॉन्स्टिटयुअन्सि		नांव
आसाम	—	(मुसलमानेतर)	बहादूर प्रमोदचंद्र दत्त
ब्रह्मदेश	—	(जनरल)	श्री. ए. हामिद
,,	,,	चेंबर ऑफ कॉमर्स	मि. के. बी. हारपर

२ सरकारनियुक्त सभासद—(अध्यक्ष वगळून).

(अ) सरकारी—(अध्यक्ष वगळून १९ पेक्षां जास्त नाहींत).

कॉन्स्टिटयुअन्सि	नांव
हिंदुस्थान सरकार—	हिज् एक्सलन्सि जनरल सर फिलिप् वॉल्हाउ चेट्वूड, नाइट, जी. सी. बी., के. सी. एम्. जी., डी. एस्. ओ.
,, ,,	सर बोजेंद्रलाल मितर के. सी. एस्. आय्.
,, ,,	खानबहादूर मैन सर फजलि-हुसेन, के. सी. आय्. ई.
,, ,,	सर जॉन पेरोनेट थॉम्पसन्, सी. एस्. आय्.
,, ,,	मि. एच्. डब्ल्यु इमर्सन्, सी. आय्. ई., सी. बी. ई.
,, ,,	सर चार्ल्स् वॉट्सन्, के. सी. आय्. ई., सी. एस्. आय्.
,, ,,	मि. जे. सी. बी. ड्रेक, सी. आय्. ई., सी.बी.ई.
,, ,,	मि. ए. एफ्. एल्. ब्रायने, सी. आय्. ई.
,, ,,	जे. ए. शिलिद, सी. एस्. आय्.
,, ,,	मे. ज. जे. डब्ल्यु. डी. मेगॉ, सी. आय्. ई., एम्. बी., के. एच्. पी., आय्. एम्. एस्.
संयुक्त प्रांत—	रायबहादूर लाला चिमणलाल
पंजाब—	नबाब मालिक महंमद हायत खान-नून, सी. एस्. आय्.
बहार-ओरिसा—	मि. जे. टी. व्हिटी, सी. आय्. ई.

(ब) वऱ्हाड प्रतिनिधि.

वऱ्हाड प्रतिनिधि—	श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे

(क) बिनसरकारी.

मद्रास—	सर शंकरन् नायर, नाइट्
,,	श्री. एम्. डी. देवदास
,,	श्री. जी. ए. नटेशन्
मुंबई	सर दिनशा एदलजि वाच्छा, नाइट्
बंगाल—	ज्योत्नाथ घोसाल, सी. एस्. आय्., सी.आय्.ई.
,,	नबाब ख्वाजा हबिबूउल्ला

सरकारनियुक्त—(बिन-सरकारी)

कॉन्स्टिटयुअन्सी	नांव
बंगाल	श्री. विजयकुमार बसु
मध्यप्रांत	सर माणिकजी बयरामजी दादाभाई, के. सी. आर. ई., नाइट्.
संयुक्तप्रांत	खा. ब. सर महंमद इसरार हसनखान नाइट्, सी. आय्. ई.
,,	राजा विजयसिंग दुधोरिया (अझिमगाणि)
पंजाब	सरदार चरणजितसिंग
वायव्य सरहद्दप्रांत	मेजर नवाब महंमद अकबरखान, सी. आय्. ई. (होतीचे-खान)

दी लेजिस्लेटिव असेंब्ली

अध्यक्ष—**सर इब्राहिम रहिमतुल्ला** के. सी. एस्. आय्., सी. आय्. ई.

*उपाध्यक्ष—**श्री. आर. के. षण्मुखम् चेट्टी**

कॉन्स्टिटयुअन्सि	नांव
१ मद्रास शहर (मुसलमानेतर) अर्बन	दिवाणबहादूर ए. रामस्वामी मुदालियार.
२ गंजाम, विजगापटण (मुसलमानेतर) रूरल	श्री. बी. सिताराम राजु
३ गोदावरी, कृष्णा (मुसलमानेतर) रूरल	,, मोचे नरसिंहराव
४ गंतुर, नेल्लोर ,, ,, ,,	,, आर्. आर्. वाय्. पोनाके गोविंद रेड्डी गारू
५ मद्रासमधील जिल्हे व चित्तूर ,, ,,	,, टी. एन. रामकृष्ण रेड्डी
६ सालेम व कोइमतूर उत्तर अर्काट (मुसलमानेतर) रूरल	,, आर्. के. षण्मुखम् चेट्टी*
७ दक्षिण अर्काट, चिंगलेपुट ,, ,,	दिवाणबहादूर टी. रंगाचार्य सी. आय. ई.
८ तंजावर, त्रिचनापल्ली ,, ,,	राजाबहादूर जी. कृष्णमाचार्य
९ मदुरा व रामनद, तिनेवेल्ली ,, ,,	श्री. बी. राजाराम पांडिन
१० पश्चिम किनारा व निलगिरी ,, ,,	,, के. पी. थांपन
११ उत्तर मद्रास (मुसलमान)	महंमद मूअज्जमसाहेबबाहदूर
१२ दाक्षिण मद्रास ,,	मौलवी सय्यद मूर्तांझसाहेब बहादूर
१३ पश्चिम किनारा व निलगिरी (मुसलमान)	कोटाल उप्पीसाहेब बहादूर
१४ मद्रास (युरोपियन)	मि. सी. बी. एलिअट् एम्. ए.
१५ मद्रास—जमीनदार	राजा सर वासुदेवराज् नाइट् (के.टी.) सी.आय्.ई.
१६ मद्रास—इंडिअन कॉमर्स	श्री. जमाल महंदम साहेब
१७ मुंबई—(नगर) (मुसलमानेतर) अर्बन	,, नौरोजी एम्. दुमासिआं
१८ सिंध— ,, रुरल	सर कावसजी जहांगीर के. सी. आय्. ई., ओ. बी. ई.
	दिवाण लालचद नवलराम

कॉन्स्टिटयुअन्सी	नांव
१९ मुंबई—उत्तरभाग (मुसलमानेतर) रूरल	श्री. एन्. एन्. अंक्लेसरी *
२० मुंबई—मध्यभाग (मुसलमान) रूरल	*सर इब्राहिम रहिमतुल्ला के. सी. एस्. आय्; सी. आय्. ई.
२१ मुंबई—मध्यभाग (मुसलमानेतर) ,,	श्री. बी. व्ही. जाधव
,, ,, ,, ,,	श्री. एन्. आर्. गुंजाळ
२२ मुंबई—दक्षिणभाग ,, ,,	रावबहादुर बी. एल्. पाटील
२३ मुंबई—(नगर) (मुसलमान) अर्बन	श्री. रहिमतुल्ला एम्. चिनॉय
२४ सिंध— ,, रूरल	सेठ हाजी अबदुल्ला हारून
,, ,, ,,	नबाब नाहरसिंगजी इस्वारसिंगजी
२५ मुंबई—(युरोपिअन) ,,	मि. ई. एफ्. साइक्स्
,, ,, ,,	मि. जी. आय्. ग्रिफिथ्स्
२६ दि इंडिअन् मर्चंट्स् चेंबर अँड ब्यूरो (इंडियन कॉमर्स)	
२७ गुजराथ व दक्षिण सरदार व इनामदार (जमिनदार)	सरदार जी. एन्. मुजुमदार
२८ मुंबई मिलओनर्स असोसिएशन (इंडिअन कॉमर्स)	श्री. होरमुसजी पीरोशहा मोदी
२९ कलकत्ता (मुसलमानेतर) अर्बन	श्री. सी. सी. विश्वास
३० कलकत्ता (उपनगरें) ,, ,,	श्री. नवकुमारसिंग दुधोरिआ
३१ बरद्वान (डिव्हिजन) ,, ,,	बाबू अमरनाथ दत्त
३२ प्रेसिडेंसी डिव्हिजन ,, ,,	पंडित सत्येंद्रनाथ सेन
३३ डाक्का डिव्हिजन ,, ,,	श्री. क्षितीशचंद्र निओगी
३४ चितागांग व राजशाहि डिव्हिजन ,, ,,	श्री. एस्. सी. मित्र
३५ कलकत्ता व उपनगरें (मुसलमान) अर्बन	सर अबदुर रहिम के. सी. एस्. आय्; के. टी.
३६ बरद्वान व प्रेसिडेंसि डिव्हिजन(मुसल.)रूरल	डॉ. सर ए. सुरावर्दी
३७ डाक्का Cum मैमनसिंग ,, ,,	श्री. ए. एच्. गझनवी
३८ बाकरगुंज Cum फरिदपूर ,, ,,	हाजी चौधरी महंमद इस्माइलखान
३९ चितागांग डिव्हिजन ,, ,,	श्री. एम्. डी. अनवारूल् आजिम
४० राजशाहि डिव्हिजन ,, ,,	श्री. कैबरउद्दीन अमेद
४१ बंगाल (युरोपिअन)	मि. डब्ल्यू. ऑर्थर मूर. एम्. बी. ई.
,, ,, ,,	,, इ. स्टड
,, ,, ,,	,, जी. मॉर्गन, सी. आय्. ई.
४२ ,, जमीनदार	श्री. धिरेंद्रकांत लहिरी चौधरी
४३ ,, नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स (इंडि.-कॉमर्स)	,, सतीशचंद्र सेन
४४ संयुक्त प्रांतांतील शहरें (मुसलमानेतर अर्बन)	लाला रामेश्वरप्रसाद बाग्ला

कॉन्स्टिटयअन्सी		नांव
४५ मिरत डिव्हिजन मुसलमानेतर	रूरल	चौधरी इस्रा
४६ आग्रा डिव्हिजन ,,	,, ,,	कुमार रघुवीर सिंग
४७ रोहिलखंड व कुमान डिव्हिजन	,, ,,	मि. सी. एस रंगा अय्यर
४८ अलाहाबाद व झांशी डिव्हिजन	,, ,,	श्री. ए. हूण
४९ बनारस व गोरखपूर डिव्हिजन	,, ,,	,, ए. दास
५० लखनौ डिव्हिजन	,, ,,	,, एल्. ब्रिज् किशोर
५१ फैझाबाद डिव्हिजन	,, ,,	रायबहादूर पंडित त्रिलोकनाथ भार्गव
५२ संयुक्त प्रांतांतील शहरें	(मुसलमान–अर्बन)	खानबहादूर हाजी वजिउद्दीन
५३ मिरत डिव्हिजन	(,, रूरल)	हाजी इस्माइल अलिखान
५४ आग्रा डिव्हिजन	(,, ,,)	श्री. महंमद यामिनखान
५५ रोहिलखंड व कुमान डिव्हिजन	,, ,,	मौलवी सर महंमद याकुब
५६ संयुक्तप्रांत व दक्षिण भाग	,, ,,	डॉ. झिउद्दीन अहंमद, सी. आय्. ई.
५७ लखनौ व फैझाबाद डिव्हिजन	,, ,,	श्री. महंमद अझारअली
५८ संयुक्तप्रांत–युरोपिअन		मि. जे. आर. स्कॉट्
५९ संयुक्तप्रांत–जमीनदार		लाला हरिराज स्वार
६० अंबाला डिव्हिजन–मुसलमानेतर		भाई परमानंद
६१ जलंदर डिव्हिजन	,,	मि. जगन्नाथ आगरवाल
६२ पश्चिम पंजाब	,,	श्री. बी. आर. पुरि
६३ पूर्व पंजाब—मुसलमान		ऑनरेबल् नवाब मिद इब्राहिम अलिखान बी.
६४ पूर्व मध्य-पंजाब	मुसलमान	शेख सदिक-हसन
६५ पश्चिम मध्य पंजाब	,,	मैन महंमदशहा नवाझ्, सी. आय्. ई.
६६ उत्तर पंजाब	,,	मेजर नवाब मालिक् तालिब् मेहदिखान, ओ.बी.ई.
६७ वायव्य पंजाब	,,	शेख फाझल् हाक् पिराचा
६८ नैर्ऋत्य पंजाब	,,	खानबहादूर मकुद्दम सय्यद राजन्बक्ष शहा
६९ पूर्व पंजाब	शीख	सिरदार हरबन सिंहब्रार
७० पश्चिम पंजाब	,,	सरदार संतसिंह
७१ पंजाब जमीनदार		सिरदार सोहनसिंह
७२ दरभंगा Cum सारान	(मुसलमानेतर)	पंडित रामकृष्ण झा
७३ मुझफरपूर Cum चंपारण	,,	बाबु गयाप्रसादसिंह
७३ ओरिसा डिव्हिजन	,,	श्री. बी. एन्. मिश्र
,, ,,	,,	श्री. भावानंद दास
७४ पाटणा Cum शहाबाद	,,	बद्रिलाल रुस्तोगी
७५ गया Cum मोंघीर	,,	कुमार गुतेश्वर प्रसादसिंह
७६ भागलपूर, पुरनिया व संभाल परगणे	,,	रायबहादूर शुक्राजराज
७७ छोटा-नागपूर डिव्हिजन	,,	ठाकूर मोहेंद्रनाथ शहा देव
७८ पाटणा व छोटा नागपूर Cum ओरिसा	(मुसलमान)	मि. एम्. मसूद अहंमद

कॉन्स्टिटयुअन्सी		नांव
७९ भागलपूर डिव्हिजन	,,	मौलवी बादि-उझ्-झमान
८० तिरहट डिव्हिजन	,,	मौलवी महंमद शफी दाउदी
८१ बिहार व ओरिसा-जमिनदार		मि. भूपतसिंग
८२ नागपूर डिव्हिजन	मुसलमानेतर	रावबहादूर एस्. आर. पंडित
८३ मध्यप्रांत हिंदी डिव्हिजन	,,	सर हरिसिंग गौर, नाइट् सेठ लिलाधर चौधरी
८४ मध्यप्रांत—मुसलमान		खानबहादूर एच्.एम्. बलायतुल्ला, आय्.एस्.ओ.
८५ मध्यप्रांत—जमीनदार		गोस्वामी एम्. पी. पुरी
८६ आसाम व्हॅली —मुसलमानेतर		श्री. टी. आर. फूकन
८७ सुरमा व्हॅली Cum शिलांग		श्री. गोपिका रमण राय
८८ आसाम—मुसलमान		श्री. अबदुल मतीन चौधरी
८९ आसाम—युरोपिअन		मि. एन्. बी. फॉक्स, सी. आय्. ई.
९० ब्रह्मदेश—नॉन्–युरोपिअन		मि. जहांगिर के. मुनशी यू. टन्. मयिंत यू. टन्. अंग
९१ ब्रह्मदेश—युरोपिअन		मि. जे. टेट
९२ दिल्ली—(जनरल)		भगत चंडि माळ गोळा
९३ अजमीर—मारवाड (जनरल)		रावसाहेब हरिविलास सारडा

सरकारनियुक्त सभासद (अध्यक्ष सोडून)

(अ) सरकारी–२६

कोणत्याही प्रांताचे अगर विशिष्ट मंडळाचे प्रतिनिधि	नांव
हिंदुस्थान सरकार	दि. ऑनरेबल सर जॉर्ज रेनी, के. सी. आय्. ई., सी. एस्. आय्.
,, ,,	,, ,, सर जेम्स क्रेरार, के. सी. एस्. आय्., सी. आय्. ई.
,, ,,	,, ,, सर जॉर्ज शूस्टर, के. सी. एम्. जी. सी. बी. ई. एम्. सी.
,, ,,	,, ,, सर ब्रोजेंद्रलाल मितर के. सी. एस्. आय्.
,, ,,	,, ,, खान बहादूर मैन सर फझली-हुसेन के. सी. आय्. ई., नाइट
,, ,,	मि एवेल्यन्, बर्कले हॉवेल, सी. एस्., आय्., सी. आय् ई.
,, ,,	सर आल्फ्रेड ॲलन् लेथ्ब्रिज् परसन्स् नाइट् सी. आय्. ई.

सरकारी सभासद

कोणत्याही प्रांताचे अगर विशिष्ट मंडळाचे प्रतिनिधि	नांव
हिंदुस्थान सरकार	मि. टी. रायन्
,, ,,	मि. जिरार्ड मॅकवर्थ यंग्, सी. आय्. ई.
,, ,,	श्री. कोडिकल संजिव राउ
,, ,,	श्री. एस्. लाल
,, ,,	श्री. एस्. एन्. रॉय.
,, ,,	मि. एस्. एस्. वजपि, ओ. बी. ई.
,, ,,	सर लॅन्सेलॉट् ग्रॅहॅम, के. सी.आय्. ई.; आय्. सी. एस्.
,, ,,	श्री. जे. ए. शिलिद्
मद्रास ...	मि. ए. एच्. ए. टॉड
... ...	रावबहादूर यू. रामराव
मुंबई ...	मि. एच्. एफ्. नाइट्
,, ,,	मि. एच्. मॉंटगोमेरी
बंगाल ...	मि. जोसेफ चार्लस् फ्रेंच
,, ,,	श्री. राज नारायण बॅनर्जी
संयुक्त प्रांत ...	काझि आझिउद्दीन अहंमद बिलग्राणि
पंजाब ...	खानबहादूर मालिक अल्लाबक्ष खान तिवाणा एम्. बी. ई.
बहार व ओरिसा	श्री. रामप्रसाद नटरायन साइ
मध्यप्रांत ...	मि. जेम्स् फर्ग्युसन् डायर
आसाम	मि. डब्ल्यु. ए. कॉस्ग्रेव्ह् सी. आय्. ई.
ब्रह्मदेश ...	मेजर एच्. आर. पेली
(ब) वऱ्हाड ...	(१) मि. एस्. जी. जोग

(क) बिनसरकारी सभासद—१४

मुंबई	डॉ. आर. डी. दलाल
बंगाल	रायबहादूर सत्यचरण मुकर्जी
पंजाब	सरदारबहादूर जवाहरसिंग सी. आय्. ई.
,,	ऑनररी, कॅप्टन रावबहादूर सी. एच्. लालचंद, ओ. बी. ई.
,,	सरदारबहादूर कॅप्टन हिरासिंग ब्रार, एम्. बी. ई.
,,	सर झुल्फिकार अलि खान, नाइट्, सी. एस्. आय्.
बहार–ओरिसा	श्री. रामस्वामी श्रीनिवास शर्मा, सी. आय्. ई.

कोणत्याही प्रांताचे अगर विशिष्ट मंडळाचे सभासद	नांव
लखनौ	खानबहादूर मौलवी रफिउद्दिन अहंमद
वायव्य सरहद्द प्रांत	मेजर नबाब अहंमद नवाज खान
अलाहाबाद	एच्. सेसिल् डेसॉग्ज्
म्हैसूर	डॉ. फ्रॅन्सिस् एक्स. डीसूझा
असोसिएटेड चेंबर्स ऑफ् कॉमर्स	मि. एल्. व्ही. हेथकोट
दि-डिप्रेस्ड क्लासेस	रावबहादूर मलाइ चिनाथंबि राजा
लेबर इंट्रेस्ट्स्	श्री. एन्. एम्. जोशी

मुंबई लेजिस्लेटिव कौन्सिल

अध्यक्ष--ऑनरेबल सर अली महमदखान देहलवी (नाइट्)

उपाध्यक्ष—श्री. नामदेव एकनाथ नवले.

नांव व मतदारांचा वर्ग.			सभासदाचें नांव
१ मुंबई नगर (उत्तर (मुसलमानेतर)		अर्बन	रावबहादुर आर्. एस्. असवले.
			श्री. ए. एन्. सुर्वे
२ मुंबई नगर (दक्षिण) मुसलमानेतर		अर्बन	डॉ. जोसेफ् अल्बान् डि सुएजा
			डॉ. जे. ए. कोलॅको
			श्री. बी. पी. वाडके
३ कराची शहर (मुसलमानेतर)		अर्बन	मि. गोवर रोरा
४ अहमदाबाद शहर	,,	,,	मि. पेस्तनशहा एन्. वकील
५ सुरत शहर	,,	,,	सरदार दावर तेमुरस कावसजी मोदी
६ सोलापूर शहर	,,	,,	श्री. विष्णु गणेश वैशंपायन
७ पुणें शहर	,,	,,	श्री. लक्ष्मण रघुनाथ गोखले
८ अमदाबाद जिल्हा (मुसलमानेतर)		रूरल	श्री. साहेबसिंहजी जुवनसिंहजी
			सर रुस्तुमजी जहांगिरजी
९ भडोच ,,	,,	,,	श्री. माधवसंग जोरभाइ
१० केरा जिल्हा	,,	,,	रावसाहेब भगवानदास गिरधरदास देसाई
			श्री. चतुरभाई नरशिभाई पटेल
११ पंचमहाल ,,	,,	,,	श्री. माणिलाल हरिलाल मेथा
१२ सुरत ,,	,,	,,	रावबहादुर भीमभाई रणछोडजी नाइक
१३ ठाणें व मुंबई (उपनगर जिल्हा)			श्री. शंकरराव जयरामराव झुंझारराव
(मुसलमानेतर)		,,	श्री. मंचेरशहा माणिकजी कारभारी
१४ अहमदनगर जिल्हा (मुसलमानेतर)		,,	श्री. नामदेव एकनाथ नवले
			रावबहादुर गणेश कृष्ण चितळे
१५ पूर्व खानदेश ,,	,,	,,	रावबहादुर डोंगरसिंग रामजी पाटील

नांव व मतदारांचा वर्ग.	सभासदाचें नांव
	रावसाहेब वामन संपत पाटील
	श्री. विठ्ठल नथु पाटील
१६ नाशिक जिल्हा (मुसलमानेतर) रूरल	रावबहादूर गोपाळराव वामन प्रधान
	रावसाहेब रामचंद्र विठ्ठलराव वंडेकर
१७ पुणें ,, ,, ,,	श्री. गंगाजीराव मुकुंदराव काळभोर
	रावसाहेब पांडुरंग ज्ञानेश्वर कुलकर्णी
१८ सातारा ,, ,, ,,	खानबहादूर धनजिशहा बोमनजी कूपर
	श्री. आत्माराम भिमाजी आचरेकर
	,, रामचंद्रराव बापुराव शिंदे
१९ बेळगांव ,, ,, ,,	रा. ब. एस. एन्. अंगडि
	श्री. पी. आर. चिकोडी
२० विजापूर ,, ,, ,,	,, शंकरअप्पा बसलिंगप्पा देसाई
२१ धारवाड ,, ,, ,,	दिवाणबहादूर सिद्प्पा टोटाप्पा कंबली
	श्री. विश्वनाथराव नारायण जोग
२२ कानडा ,, ,, ,,	,, लक्ष्मीनारायण तिमनभट्टा कारकि
२३ रत्नागिरी ,, ,, ,,	रावबहादूर लक्ष्मल विष्णु परुळेकर
	श्री. व्यंकट आनंदराव सुर्वे
२४ पूर्वसिंध— ,, ,,	,, दलुमल लिलाराम
२५ पश्चिम ,, ,, ,,	,, सत्रामदास सखवभाई तोलाणी
२६ कोल्हापूर जिल्हा ,, ,,	,, जयवंत घनश्याम मोरे
२७ शोहान ,, ,, ,,	,, नारायण नागू पाटील
२८ प. खानदेश,, ,, ,,	,, नामदेवराव बुधाजीराव
२९ मुंबई शहर (मुसलमान) अर्बन	,, हुसेनअली महंमद रहिमतुल्ला
	,, गुलामहुसेन इब्राहिम मॅचेसवाला
३० कराची शहर ,, ,,	,, मीर महमंद बालोच
३१ अहमदाबाद व सुरत शहर (मुसलमान) अर्बन	श्री. अबदुल रहिमान खान करिम खान रिसालदार
३२ पुणें व सोलापूर शहर ,, ,,	खानबहादूर अबदुल लतिफ हाजी हजरतखान पठाण
३३ उत्तर भाग ,, रूरल	श्री. अलिभाई इसाभाई पटेल
	सर अलि महंमद खान देहलवी
३४ मध्य भाग ,, ,,	ऑनरेबल मौलवी सर रफिउद्दीन अहमद (नाइट्)
	श्री. मेहेरबक्ष
	श्री. शेख अबदुल आझि अबदुल लतीफ
३५ दक्षिण भाग ,, ,,	श्री. अबदुल कादर जमालुद्दिन बांगी
	श्री. हाजी इब्राहिम जितेकर
	श्री. महाबुबालिखान महंमद अकबरखान बिरा- [दर नबाब.

नांव व मतदारांचा वर्ग	सभासदाचें नांव
३६ हैद्राबाद जिल्हा ,, ,,	श्री. बंदेहलीखान मीर महंमद हसनखान तालपूर
	सय्यद मिरान महमहशहा झनुलाबुद्दिनशहा
३७ कराची ,, ,,	श्री. शेख अबदुल मजीद लिलाराम
	श्री. गुलाम हैदरशहा रहिबदिन्शहा
३८ लारखाना ,, ,,	सर शहा नवाझ्खान गुलाम मुर्तझाखान भुटो
	खा. ब. महंमद अयबशहा महमद खुरो
३९ सक्कर ,, ,,	वाडेरो वहिद्बक्ष इल्लाहिबक्ष भुट्टो
	खा. सा. अल्लाबक्षखान (खा. सा. हाजी महंमद उमर यांचा मुलगा)
४० थर व पारकर ,, ,,	खा. ब. जान महंमदखान (खा. सा. शहा पासंदखान यांचा मुलगा)
	खा. ब. गुलाम नायबशहा भंजालिशहा
४१ नबाबशहा जिल्हा (मुसलमान) रूरल	श्री. जान महंमदखान वलिमहंमदखान
	खा. ब. जाम जान महमद वल्लद महंमद शरीफ ज्युनेजो
४२ अप्पर सिंध फ्रॉंटिअर ,, ,,	खा. ब. शेर महंमदखान करमखान बिजराणी
४३ मुंबई नगर (युरोपियन)	मि. जी. एच् . कूक
४४ ,, इलाखा ,, ,,	मि. ए. सी. ओवेन
४५ दक्षिणी सरदार व इनामदार (जमीनदार)	श्री. हणमंतराव रामराव देसाई
४६ गुजराथ ,, ,, ,,	सरदार भासाहेब अलिअस दुआबाबा रायसिंगजी ठाकोर (केरवाडा)
४७ जहागिरदार व जमीनदार (सिंध) ,,	श्री. सय्यद महंसद काउलशहा काबुल महंमदशहा
४८ मुंबई युनिव्हर्सिटी (युनिव्हर्सिटी)	रा. ब. रावजी रामचंद्र काळे
४९ मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री	मि. आर. आर. हॅडौ
५० कराची ,, ,, ,, ,, ,,	मि. जॉन हँफ्रे. ओ. बी. इ.
५१ मुंबई ट्रेड असोसिएशन कॉमर्स अँड इंडस्ट्री	मि. ए ग्रेव्हिल् बुलॉक
५२ मुंबई मिल्ओनर्स असोसिएशन कॉमर्स अँड इंडस्ट्री	मि. जहांगीर बोमनजी पेटिट.

सरकारनियुक्त

(अ) बिनसरकारी

मि. एस् . एच् . प्रॅटर	डॉ. बी. आर. अंबेडकर बार–अॅट–लॉ
रेव्ह. आर. एस् . मोडक	डॉ. पुरुषोत्तम सोलंकी एल् .एम् . ऍन्ड एस् .
मि. सिताराम केशव बोले	मेजर डब्ल्यू . एलिस् . जोन्स्
मि. सय्यद मुनावर बी. ए.	मि. बी. एस् . कामत
मि. आर. आर. बखले	

(ब) सरकारी

मि. आर. डी. बेल् सी. आय् . इ. , आय् . सी. एस् .

मि. पी. एल् . बॉवर्स् सी.आय् .इ., एम् . सी.

मि. जे. पी. ब्रँडर आय् . सी. एस् .

मि. सी. एच् . ब्रिस्टो आय् . सी. एस् .

डॉ. आर. एच् . ब्रोबेन ओ. बी. ई.

मि. एच् . बी. क्लेटन् सी आय् . ई, आय् . सी. एस् .

ज. एफ्. एस् . कॉलिन्स सी. आय्. इ. , ओ. बी. इ., आय. सी. एस् .

मि. आर. बी. एवँक सी. आय. इ. आय. सी. एस.

मि. जे. एच्. गॅरेट ,, ,,

मि. ए. एस. आर. मॅकलिन आय. सी. एस् .

साहेबजादा मिर्झा एम् . ए.

खानबहादूर शेख याकुब बझिर महंमद

मि. डब्ल्यु. स्मार्ट डब्ल्यु आय् . सी. एस्.

कॅ. डब्ल्यु. ए. टर्नर सी. आय् . इ., आय् . सी. एस्.

मि. ए. वाईल्स् सी. एस् . आय्.,
सी. आय् . इ.,
आय् . सी. एस् .

अस्पृश्य लोक

[आकडे दशलक्षांचे आहेत.]

प्रान्त	साऊथ बरो कामिटी	सर हेन्री शार्प १९१७	खानेसुमारी कमिशनर १९२१	सायमन कमिशन	खानेसुमारी कमिशनर १९३१	प्रान्तिक सरकार १९३२	प्रान्तिक कामिटी १९३२	शेरे.
मद्रास	६·४	५·७	६·४	६·५	*७·०	७·१	७·१	
मुंबई	·६	१·६	२·८	१·५	१·८	१·७	१·७	
बंगाल	९·९	६·७	९·०	११·५	†	‡ ११·२	** ·०७	कांहींच्या मतें ·०७, कांहींच्या मतें ११·२ ९·२ मि. ब्लंट यांचा (अंदाज)
संयुक्तप्रान्त	१०·१	८·४	९·०	१२·०	१२·६	§ ६·८	·६	
पंजाब	१·७	२·१	२·८	२·८	१·३	१·३	‖ १·३	
बिहार व ओरीसा	९·४	१·२	८·०	५·०	+३·७	+ ५·८	४·३	
मध्यप्रांत	३·८	३·०	३·३	३·३	२·९	२·९	२·९	
आसाम	·३	२·७	२·०	१·०	१·९	·६५	·६५	
एकूण	४२·२	३१·५	४३·३	४३·६	...	३७·४५	१८·६२	

* अंदाजाचे आकडे. नक्की आकडे मिळत नाहींत.

† मिळत नाहीं. खानेसुमारीवरून स्थानिक सरकारनें दाखविलेला आंकडा १०,३११,२६८ आहे.

‡ तपासणी चालू आहे. १९२१ चा आधार

§ ज्या जातींचें स्वतंत्र प्रतिनिधित्व सुचविण्यांत आलें आहे त्या जाती धरून.

\+ अल्पसंख्यांकांनी दाखविलेले आंकडे. बहुसंख्यांकानीं आपला अंदाज सांगितला नाहीं.

‖ अंदाजी आंकडे.

** यांत Rajbansis (१·४) व टेकड्यांवरील टोळ्यांचा समावेश होतो. या संबंध प्रकरणाचा तलास सुरू आहे.

मराठी भाषा

—:०:—

उगम—जगांतील भाषांचे जे पांच सहा महावंश मानण्यांत आले आहेत त्यांपैकीं भारत-आर्य (इंडो–आर्यन) महावंशांतील प्राकृत शाखेपासून आजची मराठी भाषा बनली आहे. सर्व भाषा, विशेषतः हिंदुस्थानांतील आज प्रचलित असलेल्या, केवळ एक संस्कृत माय–भाषेपासून अवतरल्या असें परंपरेनें मानणारा एक पंडित-वर्ग आहे. पण आजतागायत जें भाषाशास्त्रीय संशोधन झालें आहे त्यावरून असें निर्विवाद अनुमान निघतें कीं, वेद-भाषेच्या पूर्वींहि प्राकृत-भाषा होत्या. व त्यांचा कांहीं शब्दसंग्रह वेदांतून आढळतो. वेदपूर्वभाषेंतून वेदभाषा, नंतर पाणिनिसंस्कृत, नंतर काव्यसंस्कृत अशा संस्कृत भाषावस्था जशा सांगतां येतात, त्याचप्रमाणें वेदकालीन किंवा वेदपूर्व प्राकृत, मध्ययुगीन प्राकृत (पाली, महाराष्ट्री, शौरसेनी इ. भाषा), अपभ्रंश प्राकृत व शेवटीं अर्वाचीन प्राकृत (मराठी, हिंदी, गुजराथी, इ. भाषा) अशा प्राकृतभाषावस्थाहि मांडता येतात. संस्कृत आणि प्राकृत या दोन भाषांमध्यें प्रत्येक अवस्था-कालांत परस्पर देवघेव चालत असे. तेव्हां कोणती पोटभाषा कोणापासून प्रत्यक्ष जन्मली हें दाखविणें अशक्य आहे. अगदीं चाळणीच्या अनेक छिद्रांतून खालीं पडलेल्या धान्यकणांतील कोणता कण कोणत्या छिद्रांतून पडला हें मागाहून ठरविणें जितकें अशक्य होईल, तितकेंच अमुक अर्वाचीन बोली अमुक माय-बोलीपासूनच उद्भवली असें नक्की दाखविणें अशक्य होणार आहे. जगांत कोठेंहि आरंभापासून अखेरपर्यंत निर्भेळ, एकजात भाषा टिकणें प्रगतीच्या दृष्टीनें अगदीं असंभवनीय गोष्ट आहे. भाषेवर अनेक ठिकाणांहून अनेक प्रकारचे संस्कार दररोज घडत असतात व ते तसे घडणें अगदीं स्वाभाविक आणि क्रमप्राप्त आहे. तेव्हां मराठी भाषेवर आतांपर्यंत कोणकोणत्या भाषांचे संस्कार होऊन तिला आजचें स्वरूप प्राप्त झालें आहे तें पाहूं.

संस्कृतपासून जर मराठी प्रत्यक्ष जन्मली नाहीं तर कोणत्या प्राकृत भाषेपासून ती जन्मली हें सांगा, असें कोणी साहजिक विचारल्यास एकाच भाषेकडे मराठीची आई म्हणून बोट दाखवितां यावयाचें नाहीं. कारण मराठींत जसें संस्कृताचें मिश्रण आहे तसेंच अनेक प्राकृत भाषांचेंहि आढळतें. कोणी पाली, कोणी अर्धमागधी, कोणी महाराष्ट्री, तर कोणी अपभ्रंश हीच भाषा मराठीची जन्मदात्री असें सांगतात. पण भाषा-शास्त्र असें सिद्ध करून देतें कीं, या सर्वांपासून तुमची मराठी झाली आहे. कोणाचा तींत कमी अंश असेल तर कोणाचा जास्त असेल. त्यांतल्या त्यांत महाराष्ट्री प्राकृताचा बराच मोठा अंश मराठींत दिसतो. महाराष्ट्री ही विंध्याखालच्या दाक्षिणात्य प्रदेशांत शिष्ट भाषा म्हणून चांगली प्रचलित असून, तिला मध्यवर्ती भाषेचा ('लिंग्वा फ्रँका 'सारखा) मोठा दर्जा प्राप्त झाला होता. गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, विदर्भ, अपरांत (कोंकण) इ. लहान राष्ट्रांची म्हणजे महाराष्ट्राची ती सर्वमान्य भाषा असल्यानें तिला 'महाराष्ट्री' हें नांव मिळालें असेल. खिस्तीशकाच्या मागें २०० वर्षें व पुढें २०० वर्षें या काळांत सर्व प्राकृत भाषांबरोबर महाराष्ट्रीहि उत्कर्ष पावली. पुढें अपभ्रंश-भाषा सुरू होऊन ती मागें पडली. असो. तेव्हां निरनिराळ्या प्राकृत भाषा बोलणारे निरनिराळे समाज जेव्हां एकत्र आले तेव्हां त्यांची एक मिश्र अपभ्रंश भाषा बनली व तीपासून मराठी निघाली.

कालनिश्चय—आतां ती कधीं निघाली हा विचार करूं. हा विचार करतांना मराठींतील प्राचीन शिलालेख, ताम्रपट, ग्रंथ इत्यादि पुरावे म्हणून पाहावे लागतील. शके ६०२ मधील एका ताम्रपटांत पन्नास, प्रिथिवी हे शब्द सांपडतात. असेच कांहीं शब्द त्यानंतरच्या बऱ्याच शिलालेख ताम्रपटांतून आढळतात. पण पहिलें

मराठी वाक्य सन ९८३ मधील शिलालेखांत दिसून येऊन मोठा आनंद वाटतो. म्हैसूरजवळ श्रवणबेळगोळ येथें जैनधर्मीय गोमटेश्वराचा जो उंच पुतळा आहे त्याच्याखालीं 'श्रीचावुण्ड जें करवियलें' असें वाक्य आहे. यानंतर स. ११२९ मधील एका ग्रंथांत मराठी पदें सांपडतात. तेव्हां ग्रंथरचना या कालापासून दृष्टोत्पत्तीस येते असें म्हणण्यास हरकत नाहीं. या १२व्या शतकांत मराठी भाषेची व्याप्ति पश्चिमेस टाणें व परळ, पूर्वेस उनकेश्वर (निजाम राज्य) व चंद्रपूर (मध्यप्रांत), दक्षिणेस कोल्हापूर व उत्तरेस पाटण (खानदेश) एवढ्या प्रदेशांत होती असें लेखांवरून सिद्ध करतां येतें. देवगिरीस यादवाचें मराठी राज्य भरभराटींत होतें व महानुभाव आणि नाथपंथ हे उदय पावत होते. ज्ञानेश्वरीपूर्वी शके ११९५ त 'शिशुपालवध' हा महानुभावी ग्रंथ तयार झाला. त्याहि पूर्वी मुकुंदराजाचा 'विवेकसिंधु' रचला आहे (शके १११०) असें कांहीं पंडित समजतात. मराठी वाङ्मयास ललामभूत असा आद्य ग्रंथ जो ग्रंथराज ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवानें शके १२१२त लिहून पुरा केला. तेव्हां या काळीं जर मराठी अगदीं पूर्णावस्थेस पोंचली होती तर नुसती बोली म्हणून तिचें अस्तित्व निदान ६०० वर्षें मागें न्यावें लागेल. म्हणजे इ. स. ७०० च्या सुमारास मराठी ही पूर्णपणें बोलभाषेच्या अवस्थेस पोंचली असलीच पाहिजे. [मराठी भाषेसंबंधीं फार विस्तृत आणि पांडित्यपूर्ण विवेचन श्री. कृ. पां. कुलकर्णी एम्. ए., बी. टी. यांनीं आपल्या 'मराठी भाषा–उद्गम व विकास या ग्रंथांत केलें आहे.]

परभाषामिश्रण—मराठी भाषा ज्या प्रदेशांत जन्म पावली त्या प्रदेशावर कानडी व तेलगू या भाषांचें वर्चस्व असल्याकारणानें त्या द्राविडी भाषांचा परिणाम मराठीवर होणें अगदीं स्वाभाविक होतें व तो तसा झालाहि आहे हें व्याकरणदृष्ट्या सिद्ध करतां येतें. या भाषांतील तत्सम, तद्भव शब्द तर घेतले आहेतच; पण मूर्धन्य आणि दंततालव्य उच्चारहि द्राविडी दिसतील. पुढें मुसलमानी अमलांत फारसी भाषेचा पगडा मराठीवर जो बसला तो मध्यंतरीं दूर करण्याचे बरेच प्रयत्न झाले तरी अद्याप कायम आहे, पुढेंहि रहाणार व तो अजीबात उडवून देणें भाषाप्रगतीच्या दृष्टीनें हितावह नाहीं. मराठ्यांच्या अमदानींतहि तो राजमान्य होता. इतका कीं चांगल्या दरबारी गृहस्थाला फारसी अवगत असणें आजच्या इंग्रजीप्रमाणें अत्यावश्य मानलें जाई. युरोपियन व्यापारी हिंदुस्थानांत येऊं लागल्यापासून पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी इ. पाश्चात्य भाषांचा थोडा थोडा शिरकाव होऊं लागला. गोव्याच्या कोंकणीवर पोर्तुगीज भाषेचा, आपल्याकडे जसा इंग्रजीचा तसाच मोठा पगडा आहे. ब्रिटिश अंमल आल्यानंतर तर इंग्रजी अवतार उघड दिसूं लागला व आजची मराठी भाषा म्हणजे आंतरबाह्य इंग्रजी वळणाची बनूं पाहात आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत चिपळूणकरसंप्रदाय निघून भाषेवर संस्कृतची विशेष छाप बसली. ती इतकी दृढ झाली कीं, सुशिक्षित माणसाचें मराठी म्हणजे ३ संस्कृत शब्दांचा भरणा व त्यामुळें येणारा क्लिष्टपणा. पण सुदैवानें गेल्या दशकांत पुन्हां भाषेनें उलट खाऊन अनागरी वळणावर ती चालली आहे. संस्कृतभाषाभिमान्यांना हें अवस्थांतर पसंत नसलें तरी, साक्षरता वाढत असलेल्या बहुजनसमाजाला तें हितावह वाटेल.

उपभाषा किंवा बोली—भाषा ही पंडिती वळणावर जाऊं लागल्यास व्यवहारसौकर्यासाठीं आपोआप अपभ्रंश किंवा पोटभाषा निर्माण होते. भाषाप्रदेश मोठा असून व्यवहाराची व्याप्ति अधिक असेल तर अनेक पोटभाषा निघतील. या पोटभाषा नुसत्या बोली असून त्या भाषेंत लेखन किंवा ग्रंथरचना होत नसते. ग्रंथरचना होऊं लागल्यास ती स्वतंत्र भाषेच्या योग्यतेस चढते. या उपभाषा प्रांतभेदानें–जसें वऱ्हाडी, खानदेशी, कोंकणी इ. जशा पडतात तशा धंद्यांवरूनहि निघतात, उदा० चांभारी, लोहारी, कोळी इ. त्यांना गणभाषा म्हणतां येईल. मुख्य उपभाषा दोनः वऱ्हाडी व

कोंकणी (गोमांतकी, चित्तपावनी व कुडाळी). बाकीच्या थोडथोडा फरक होऊन बनल्या आहेत. या पोटभाषांची त्या बोलणाऱ्या लोकांच्या संख्येसह यादी शेवटीं जोडली आहे.

नवीन भाषाभेद—हिंदी, उर्दू, गुजराथी, कानडी व तेलगू या पांच मुख्य भाषांचा गराडा महाराष्ट्राभोंवतीं असल्यानें या भाषांचा एकसारखा परिणाम मराठी भाषेवर होत आहे. शिवाय मराठी बोलणारे लोक ज्या परप्रांतांत जाऊन राहातात त्या प्रांतांतील भाषांची छाप साहजिक त्यांच्या मराठीवर पडून भाषाभेद उत्पन्न होतात. उदा० तंजावरच्या मराठीवर तामिळभाषेची, सिंधमधील मराठीवर सिंधी भाषेची, कलकत्त्याकडील महाराष्ट्रीयांच्या मराठीवर बंगालीची छाप आढळून येईल. इंग्रजी भाषा बोलणारे जगांत सर्वठिकाणीं पसरल्यामुळें इंग्रजी भाषा भेसळीनें फार वाढली आहे व वाढत राहील. असेंच इराण, आफ्रिका, जपान, चीन या परराष्ट्रांत राहाणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या भिन्नभिन्न भाषासान्निध्यामुळें मराठींतहि नवी नवी भर पडेल. कोणतीहि भाषा अशीच मोठी होत जाते.

नवीन शब्दांचा भरणा—शास्त्रीय वाङ्मय नवीन तयार होत असल्यानें त्या क्षेत्रांतील नवीन पारिभाषिक शब्द मराठींत येत आहेत. आपल्या कडील जुने कारागिरी शब्द त्यांपुढें लोपून भाषेंतून पार होतील या भीतीमुळें त्यांचे धंद्याच्या बोलींतले शब्द पुन्हां जमविणें चालू आहे. मोटार ड्रायव्हर, इंजिनियर, कंपॉझिटर, वगैरे नवीनच धंदे आतां सुरू झाल्यामुळें त्या धंद्यांतील इंग्रजी किंवा त्यावरून बनविलेले अपभ्रष्ट शब्द भाषेंत घुसताहेत. अशा भाषावृद्धीच्या विविध क्रिया चालतात; त्यामुळें शब्दसंपत्तींत एकसारखी भर पडत आहे. मोलस्वर्थच्या १८५७ मधील कोशांत सुमारें ६०,०००शब्द आहेत, तर नवीन चाललेल्या महाराष्ट्र-शब्दकोशांत सुमारें दीडपट भर पडेल असा अंदाज आहे.

विस्तार—मराठी भाषा ज्या प्रदेशांत प्रचारांत आहे त्या प्रदेशाचा विस्तार ठोकळमानानें एक लाख चौरस मैल सांगतां येईल, व भाषकांची संख्या सुमारें दोन कोटी म्हणतां येईल. यांपैकीं साधारणपणें १/२ मुंबई इलाख्यांत, १/४ वऱ्हाड–मध्यप्रांतांत, १/६ निजाम हद्दींत व १/६० मद्रास इलाख्यांत असे मराठी भाषक विभागले आहेत. इतर भागांतून एक लाखापेक्षां कमीच सांपडतील. यासंबंधीं विस्तृत विवेचन महाराष्ट्रावरच्या लेखांत सांपडणार आहे.

मराठीभाषा व उपभाषा

(आंकडे शून्यांतात ठोकळ मानानें)

१ दख्खन मधील–देशी

भाषाप्रकार—पुणेरी, गंगथडी (नाशिक), नगरी, वायदेशी (वांई), सोलापुरी, माणदेशी (सातारा), कोल्हापुरी, बुलढाणी, धारवाडी व विजापुरी.

२ कोंकणमधील–कोंकणी

परभी (१६००००)
कोळी (१९००००)
किरिस्ताव (२५५००)
कुणबी (३७००००)
आगरी (२३०००)
धनगरी (२०००)
भंडारी (९०००)
ठाकरी (२५०००)
कऱ्हाडी (२०००)
संगमेश्वरी (१३०००००)
बाणकोटी (१८००)
घाटी (३७००)

फुटकळ बोली:
१ काथोडी (७७०००)
२ वारली (९२०००)
३ वाडवळ (३५००)
४ फुडगी (१०००)
५ सामवेदी (२७००)
६ मांगेला, ७ माहारी

८ अहिराणी.

३ गोमांतकी–कोंकणी

कोकणी–बारदेशकरी, कुडाळी } (सु. ८०००००)

दालदी (२४०००)
चित्पावनी (७००००)

४ वऱ्हाड-मध्यप्रांतीय

वऱ्हाडी (२१०००००)
नागपुरी (१८०००००)
धनगरी (१८००)
झाडपी (५०००)
गोवारी (२५००)
कोष्टी (३०००)
कुंभारी (४५००)
कुणबाऊ व कोहळी (१०००००)
माहारी (२००००)

मऱ्हेटी
नाकानी (२००)
कातआ (१९०००)

ळदी (सु. १०००००)
भुजिआ (२०००)
नाहरी (५००)
कमारी (४०००)
} फुटकळ बोली

[हिंदुस्थानांत मराठी बोलणारांची एकंदर लोकसंख्या सुमारें **पावणे दोन कोटी** अशी १९०१ च्या खानेसुमारीवरून धरून, वरील भाषा–प्रांतवार विभागणी डॉ. ग्रियसरनें केली आहे.]

हिंदुस्थानांतील भाषा

[१९२१च्या खानेसुमारीवरून सन १९२८सालीं तयार झालेल्या सरकारी हिशेबावरून]

अ. नं.	भाषेचें नांव.	बोलणारांची संख्या.	कोणत्या प्रांतांत प्रचलीत आहे.
१	हिन्दी	९८११३८९७	संयुक्तप्रान्त, मध्यहिन्दुस्थान, पंजाब, हैद्राबाद, मुंबई इ., मद्रास इ., राजपुताना, बिहार, ओरीसा, म्हैसूर, मध्यप्रान्त, वऱ्हाड, बंगाल, ब्रह्मदेश, बडोदा, अजमेर, मारवाड, पंजाब, आसाम, वायव्यप्रान्त, बलुचिस्तान इत्यादि.
२	बंगाली	४९२९४०९९	बंगाल, आसाम, बिहार, ओरीसा, ब्रह्मदेश, संयुक्तप्रान्त.
३	तेलगू (आन्ध्र)	२३६०१४९२	मद्रास, हैद्राबाद, म्हैसूर, मध्यप्रान्त, वऱ्हाड, मुंबई, आसाम, बिहार, ओरीसा, बंगाल.
४	मराठी	१८७९७८३१	मुंबई, मध्यप्रान्त, वऱ्हाड, हैद्राबाद, मद्रास, म्हैसूर, मध्यहिन्दुस्थान, बडोदा.
५	तामीळ	१८७७९५७७	मद्रास, म्हैसूर, ब्रह्मदेश, हैद्राबाद, मुंबई.
६	पंजाबी	१६२३३५९६	पंजाब, वायव्य स. प्रान्त, काश्मीर, मुंबई, राजपुताना, बलुचिस्तान, संयुक्तप्रान्त, ब्रह्मदेश, मध्यहिन्दुस्थान.
७	राजस्थानी	१२६८०५६२	राजपुताना, मध्यहिन्दुस्थान, पंजाब, अजमेर, मारवाड, हैद्राबाद, काश्मीर, मुंबई, मध्यप्रांत वऱ्हाड, म्हैसूर, वायव्यप्रान्त, बिहार, ओरीसा, बंगाल.

अ. नं.	भाषेचें नांव.	बोलणारांची संख्या.	कोणत्या प्रांतांत प्रचलीत आहे.
८	गुजराथी	९५५१९९२	मुंबई, बडोदा, राजपुताना, मध्यहिन्दुस्थान, मद्रास,
९	ब्रह्मदेशीय (ब्रह्मी)	८४२३२५६	ब्रह्मदेश.
१०	मल्याळीम	७४९७६३८	मद्रास, कूर्ग.
११	पश्चिम पंजाबी	५६५२२६४	(पंजाबीप्रमाणेंच)
१२	उर्दू	३६६९०००	
१३	खेरवाडी	३५०३२१५	बिहार, ओरीसा.
१४	सिंधी	३३७१७०८	मुंबई, बलुचिस्तान, राजपुताना.
१५	भिल्ली	१८८५६१७	मुंबई, बडोदा, मध्यहिन्दुस्थान, राजपुताना, ग्वालेर.
१६	आसामी	१७२४३२८	आसाम.
१७	पहाडी	१६३३९१५	पंजाब, काश्मीर.
१८	गोंड	१६१६९११	मध्यप्रान्त, वऱ्हाड, मध्यहिन्दुस्थान, हैद्राबाद, आसाम.
१९	पुस्तू	१४९३२६७	सीमांतप्रान्त, बलुचिस्तान, पंजाब, मुंबई.
२०	काश्मीरी	१२६८८५४	काश्मीर.
२१	मारवाडी	११४७०००	अजमीर, मारवाड, कलकत्ता, मुंबई, हैद्राबाद. मध्यप्रान्त, वऱ्हाड, संयुक्तप्रान्त, इंदोर, मद्रास,
२२	कुर्ख, ओरायन	८६६०६६	बिहार, बंगाल, ओरीसा, मध्यप्रान्त, वऱ्हाड, आसाम.
२३	तुळु	५९२३२५	मद्रास, म्हैसूर, कूर्ग.
२४	बलूची	४८५४०८	बलुचिस्थान, मुंबई, पंजाब.
२५	कंदीकुई	४८३६६८	बिहार, ओरीसा, आसाम, मद्रास, ब्रह्मदेश.
२६	शंघल	४७४८७८	ब्रह्मदेश.
२७	स्व	३६८२८२	,,
२८	च्या	३५२४६६	,,
२९	मणीपुरी	३४२६४५	आसाम, बंगाल.
३०	शान	३२६५१५	ब्रह्मदेश.
३१	इंग्लीश	३०८०७१	मुंबई, बंगाल, मद्रास, संयुक्तप्रान्त, पंजाब, ब्रह्मदेश, म्हैसूर, मध्यप्रान्त, वऱ्हाड, बिहार, ओरीसा, हैद्राबाद, मध्यहिन्दुस्थान.
३२	आराकानी	३०४५४९	ब्रह्मदेश, बंगाल.
३३	पूर्व पहाडी, (नेपाळी)	२७९९७८	बंगाल, आसाम, संयुक्तप्रान्त.
३४	बोडो, कचरी	२७१६१२	बंगाल, आसाम.
३५	यन्ब्ये	२५००१८	ब्रह्मदेश.
३६	भोटीया	२३१८८५	काश्मीर, बंगाल.
३७	गरो	२१६११७	आसाम, बंगाल.
३८	खानदेशी	२१३२७२	मुंबई.
३९	तुंगथू	२१०५३५	ब्रह्मदेश.
४०	खासी	२०४१०३	आसाम.

अ. नं.	भाषेचें नांव.	बोलणारांची संख्या.	कोणत्या प्रांतांत प्रचलीत आहे.
४१	मेण, पेगू	१८९२६३	ब्रह्मदेश.
४२	ब्रुहूई	१८४३६८	बलुचिस्तान.
४३	सवरा	१८६४४१	मद्रास.
४४	टिपुरा, मोंग	१६३७२०	बंगाल, आसाम.
४५	काचीन, सिंगफो	१५०८९६	ब्रह्मदेश.
४६	खडीया	१३७४७६	बिहार, ओरीसा.
४७	टवोयन	१३१७४८	ब्रह्मदेश.
४८	चिनी	१२७५२७	,,
४९	कुरकू	१२०८९३	मध्यप्रान्त, वऱ्हाड.
५०	पलैंग	११७७७३	ब्रह्मदेश.
५१	चान	११०७८२	,,
५२	मिकीर	१०९१२३	आसाम.
५३	करेन	९८७२३	ब्रह्मदेश.
५४	लुशाई	७७१८०	आसाम.
५५	डानू	७२९२५	ब्रह्मदेश.
५६	माल्टो	६५९६४	बिहार, ओरीसा.
५७	चांग	६५२८९	आसाम.
५८	रायजमादार	५६३४२	बंगाल, सिकीम.
५९	अंथा	५५००५	ब्रह्मदेश.
६०	नागा	४३०५०	आसाम.
६१	अरबी	४२७२९	मुंबई, हैद्राबाद.
६२	कोडागू, कुर्गी	३९९९५	कूर्ग.
६३	मुरमी	३८५१२	बंगाल, सिकीम.
६४	सेमा	३४८८३	आसाम.
६५	करेनी	३४४८८	ब्रह्मदेश.
६६	आखा	३४२६५	,,
६७	जंगशेन थाडो	३३२५८	आसाम.
६८	खून	३३२१०	ब्रह्मदेश
६९	गडबा	३३०६६	मद्रास.
७०	आवो (नागा)	३३२५८	आसाम.
७१	शीना	२८४८२	काश्मीर.
७२	खामी, कुमी	२७३४६	ब्रह्मदेश.
७३	लू	२६१०८	,,
७४	कुकी	२५०५२	आसाम, बंगाल.
७५	तंगखुल	२४१७०	आसाम, ब्रह्मदेश.
७६	कोलमी	२३९८९	मध्यप्रान्त, वऱ्हाड.
७७	शां. तयोक	२३४७३	बंगाल.
७८	लिम्बू	२३४०२	बंगाल, सिकीम.

अ. नं.	भाषेचें नांव.	बोलणारांची संख्या.	कोणत्या प्रांतांत प्रचलीत आहे.
७९	लाहू	२२७४२	ब्रह्मदेश.
८०	लाई	२२६६८	,,
८१	रभा	२२५४५	आसाम.
८२	टोन्यो	२२५३२	ब्रह्मदेश.
८३	नागा	२२४४१	आसाम.
८४	पर्शीयन	२२१९१	मुंबई, संयुक्त प्रान्त, वायव्य स. प्रान्त, बलुचिस्तान.
८५	मुलतानी	२२०९८	पंजाब.
८६	सोकटे	२१९६९	ब्रह्मदेश.
८७	मारू	२०५०७	,,
८८	रोंग	२०५६९	बंगाल, सिकीम.
८९	मगरी	२०५३६	,, ,,
९०	काडू	१८५९४	ब्रह्मदेश.
९१	ल्होटा, टोंडसू	१८४१२	आसाम.
९२	शांगी	१८०७४	ब्रह्मदेश.
९३	लाशी	१६५७७	ब्रह्मदेश
९४	कोच	१६१६५	बंगाल, आसाम.
९५	काबूल (नागा)	१५६४७	आसाम.
९६	जिप्सीभाषा	१४९३१	मुंबई, पंजाब, हैद्राबाद.
९७	म्रो	१४३२४	ब्रह्मदेश.
९८	पडौंग	१३७४३	,,
९९	वा	१३६४८	,,
१००	अबोर मिरी	१३३१७	आसाम.
१०१	लीसू	१३१५२	ब्रह्मदेश.
१०२	सोप्वोमा	१३०९६	आसाम.
१०३	यंगलीन	१२८५८	ब्रह्मदेश.
१०४	करेन्यू	११६६०	,,
१०५	दिमा-सा	११४४०	आसाम.
१०६	ब्ये, ब्रे	१०६२७	ब्रह्मदेश.
१०७	जौंग	१०५३१	बिहार, ओरीसा.
१०८	पैठे	१०४६०	आसाम.
१०९	लालुंग	१०३८३	,,
११०	नेवारी	१००४५	बंगाल.
१११	याहेव	९९५९	ब्रह्मदेश.
११२	एम्पेस, कचानागा	९८६६	आसाम.
११३	खमती	९२७७	,,
११४	लोयो	९०५२	ब्रह्मदेश.
११५	चौगंथा	८७४४	,,
११६	सयामी	८६६४	सयाम, ब्रह्मदेश.

११७	कोन्हौ	८६६२
११८	निकोबारी	८५८६
११९	हमार	८५८३
१२०	म्रू	७५५९
१२१	ताशोन शिकली	७३३१
१२२	बिहारी	७२३२
१२३	सैंगअंग	६८६२
१२४	कोहिस्तानी	६२५३
१२५	तौंगथा	६०६४
१२६	सोमाली	५८९१
१२७	दर्दीस्तानी	५७२०
१२८	शेंगटंग	५६६३
१२९	अटसी	५५३९
१३०	राल्टे	५४४९
१३१	यो	५३६२
१३२	यीन, बाऊ	५२२८
१३३	कोझामा	५२२१
१३४	गुरूंग	५१०९
१३५	योतून	५१०३
१३६	रेंगमा	
१३७	हिंदुस्थानांतील इतर भाषा	१२००७०
१३८	,, आशियाच्या भाषा	१३३८३
१३९	,, युरोपीयन भाषा	११०४१
	जर्मन २२००	(१९११
	फ्रेंच २१००	सालचें
१४०	संस्कृत ३००	आकडे)

व्हिटामिन

नैसर्गिक खाद्य पदार्थांत वसत असलेल्या आणि प्राणीमात्रास शरीरसंवर्धन आणि संगोपन यांस आवश्यक असलेल्या रासायनिक पदार्थांना व्हिटामिन ही संज्ञा आहे. सूक्ष्म जंतू आणि कृमिकीटक यांना व्हिटामिनची कितपत आवश्यकता आहे याविषयीं साधार माहिती अजून उपलब्ध नाहीं. तरी त्यांनादेखील तत्सम पदार्थांची थोडी जरूरी भासते, याविषयीं पुरावा गोळा होत आहे. उंदीर, कुत्रीं, मांजरें, शेळया, गाईबैल, माकडें इत्यादि आणि सर्वांत महत्त्वाचा प्राणी म्हणजे मनुष्य, या सर्वांना व्हिटामिनशिवाय जगणें शक्य नसतें. हा सिद्धांत गेल्या वीस वर्षांच्या सतत शोधांच्या बळावर रचिला आहे. व्हिटामिन सर्वस्वीं पाश्चात्य वैद्यकाचें अपत्य होय.त्याचा जन्म गेल्या वीस वर्षांत झालेला असून त्याची वाढ इतक्या झपाट्यानें झाली आहे कीं, आज उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत सबंध जग त्यानें व्यापिलें आहे. वरील वाक्य केवळ लाक्षणिक अर्थानें लिहिलें नसून त्याचा अर्थ वस्तुस्थितिदर्शक आहे. गेल्या पांच सहा वर्षांत उत्तर आणि दक्षिण ध्रुव यांच्या नजीक संशोधकाच्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत चालकांनीं शास्त्रज्ञांच्या सल्ल्यानें कोणत्याही व्हिटामिनचा तुटवडा पडणार नाहीं अशी दक्षता बाळगली होती. त्यामुळें त्यांची मनुष्य-

हानी वांचली आणि शरीरस्वास्थ्य उत्तम राहिलें.

साधारण रीत्या मनुष्याचा आहार अनेकविध खाद्य पदार्थांचा मिळून तयार केलेला असतो. मांसाहारी लोकदेखील फळफळावळ , भाज्या व धान्यें यांजवर कांहीं अंशीं अवलंबून असतात. त्याचप्रमाणें शाकाहारी लोकांना देखील प्राणिजन्य प्रोटीनसाठीं दूध आणि दुधाचे पदार्थ यांचें सेवन करावें लागतें. याप्रमाणें शरीराच्या विविध गरजा भागत असतात. आणि व्हिटामीनचा पुरवठा या सर्व पदार्थांतून होत असल्यामुळें त्यांच्या अभावीं उत्पन्न होणाऱ्या रोगांचें मनुष्य प्राण्याला महत्त्व वाटत नाहीं. पण जेव्हां वरील आहारांत कोणत्याना कोणत्या कारणामुळें फरक पडून महिनेच्या महिने ताज्या भाज्या, फळें किंवा ताजें मांस मिळेनासे होतें तेव्हां व्हिटामिनचें महत्व पटतें. बाष्प शक्तीचा शोध लागण्यापूर्वीं समुद्रप्रवासास फार अवधि लागत असे, तेव्हां स्कर्व्हीं रोग खलाशांत दोन तीन महिन्यांच्या समुद्रप्रवासानंतर बळावत असे. त्याला औषध म्हणून लिंबाचा रस अडीचशें वर्षांपूर्वीं देखील वापरण्यांत येत असे. आणि त्या योगानें रोग बरा होई, पण यावरून व्हिटामिनचें ज्ञान पूर्वींच्या लोकांना होतें असें म्हणण्याचें कोणी धाडस करीत नाहीं.

व्हिटामिनचा पुरवठा प्राण्यांना वनस्पतीच्या द्वारें होत असतो. प्राण्यांना शरीरांत व्हिटामिन तयार करतां येतें, याविषयीं सबळ पुरावा नाहीं. व्हिटामिनचा सांठा थोडचा फार प्रमाणांत शरीरांत करतां येतो, ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. माशाचें काळीज हें व्हिटामिन "ए" आणि "डी" यांचें आगर होय, पण हा सांठा कोठून येतो, याचें गूढ पूर्णपणें शास्त्रज्ञांस उलगडलें नाहीं. व्हिटामिन सांठविण्याची थोडी शक्ति प्राण्यांस उपलब्ध आहे म्हणून व्हिटामिनचा अभाव तावडतोब जाणवत नाहीं. व्हिटामिन अन्नांतून मिळेनासें झाल्यावर शरीरांतील सांठा उपयोगांत येतो. आणि तो संपुष्टांत आला म्हणजे व्हिटामिनच्या अभावीं उद्भवणाऱ्या रोगांचीं चिन्हें दृष्टोत्पत्तीस येऊं लागतात.

व्हिटामिनचें महत्त्व शास्त्रज्ञांना पटण्याला बराच कालावधि लागला. पन्नास वर्षांपूर्वीं डॉ. आइकमन यांस एक अवचित शोध लागला. जावा बेटांत एका लष्करी तुरुंगावर अधिकारी असतांना त्यांना असें आढळून आले कीं, कैद्यांना ज्या सडीक तांदूळाचा पुरवठा होत असे त्या तांदूळावर जगणाऱ्या आसपासच्या कबुतरांना विशिष्ट रोग होई. तीं कबुतरें अशक्त होत. त्यांना हालणें किंवा उडणें कष्टाचें होई, मान मागें ओढली जाई, आणि पुढें अर्धांग वायू होऊन त्यांना मृत्यु येई. पण अशा मरणोन्मुखी कबुतरांना तांदुळाची सड दिली असतांना तीं फारच थोडचा अवधींत पूर्ववत् निरोगी होत. तुरुंगांतील कैद्यांना देखील अशाच प्रकारचा रोग होतो हें पुढें आइकमन यांस आढळलें. आणि वरील उपायानें तो रोग पूर्ण बरा करतां येई असें त्यांनीं सिद्ध केलें. याप्रमाणें सडण्याच्या क्रियेंत तांदुळाच्या एका अत्यंत आवश्यक घटकास मनुष्य पारखा होतो आणि त्या योगानें " बेरी–बेरी " नांवाच्या रोगास बळी पडतो, ही नवीन गोष्ट शास्त्रज्ञांच्या नजरेस आली. यावर आइकमन यांनीं असा सिद्धांत प्रस्थापित केला कीं, तांदुळांत एक प्रकारचें वीष असतें. आणि त्यावरील प्रतिविष सडींत असतें. सड आणि तांदूळ निरनिराळे केल्यावर तांदुळांतील विषाचा परिणाम शरीरावर होऊन बेरी–बेरी रोग होतो. आणि प्रतिविष सडीच्या रूपानें दिल्यावर तो रोग बरा होतो. १९१२ पर्यंत तरी शास्त्रज्ञांना वरील सिद्धांत प्रमाण होता.पण दरम्यान युरोपियन आणि अमेरिकन शास्त्रज्ञांचे प्रयोग इतर बाजूंनीं चालू होते. त्यांत निराळाच प्रकार उघडकीस आला. आणि त्या शोधांच्या योगानें व्हिटामिनचा पाया रचिला गेला.

प्राण्याच्या आहाराचें पृथक्करण केलें असतां तो मुख्यत्वेंकरून चरबी, साखर किंवा शर्करामय" प्रोटीन आणि क्षार या चार जातींच्या पदार्थांचा मिळून झालेला असतो हें आढळून येईल. रोजच्या अन्नांतून या सर्व पदार्थांचा पुरवठा निरनिराळ्या स्वरूपांत होत असतो. तेच वरील पदार्थ शुद्ध स्वरूपांत आणि निरनिराळ्या प्रमाणांत दिले असतां शरीरावर काय परिणाम होतो हें पाहण्यासाठीं शास्त्रज्ञांचे उंदरावर प्रयोग चालू होते. त्या प्रयोगाचें फळ म्हणून असें सिद्ध झालें कीं, वरील शुद्ध स्वरूपाच्या आहारावर उंदराची वाढ होणें अशक्य आहे. त्यांचें वजन हळू हळू कमी होत जाऊन ते मृत्युमुखीं पडत. पण वरील अन्नांत दुधाचा थोडासा अंश असला तरी उंदराची वाढ उत्तम होई आणि ते निरोगी रहात.

यावरून उंदरांना वरील चार मुख्य पदार्थांखेरीज दुधांत सूक्ष्म प्रमाणांत वसत असलेल्या इतर नव्या पदार्थांची गरज आहे आणि त्यांशिवाय त्यांना जगणें शक्य नाही. हा सिद्धांत पुढें आला आणि तो शास्त्रसंमत झाला. दुधाप्रमाणेंच लोणी कॉड–लिव्हर तेल, यांच्यांत नवीन पदार्थ अस्तित्वांत आहे हें थोडक्यांत आढळून आलें. लंडन येथें १९१२ सालीं फुंक यानें तांदुळाच्या सडीपासून बेरी बेरी रोगनिवारक तत्त्व पृथक करण्याचा प्रयत्न केला. तो फारसा यशस्वी झाला नाहीं. त्यानेंच प्रथम व्हिटामिन हें नांव सुचविलें. हल्लीं व्हिटामिन शब्दांतील शेवटचें अक्षर गाळून उरलेला शब्द प्रचारांत आहे. याच सुमारास अमेरिकेंत मॅककोलम यानें व्हिटामिन "ए" आणि "बी" यांचें अस्तित्व सिद्ध केलें. येणेंप्रमाणें व्हिटामिनचा प्रवेश शास्त्रसंमत झाला. पंधरा वर्षांपूर्वीं फक्त तीन व्हिटामिन शास्त्रज्ञांच्या माहितीचीं झालीं होतीं. त्यांना नांवें युरोपियन वर्णमालेच्या अनुक्रमानें "ए" "बी" आणि "सी" अशीं ठेवण्यांत आलीं. आजतागायत सहा व्हिटामिनचें आस्तित्व सिद्ध झालें असून, दोन तीन व्हिटामिनविषयीं पुरावा जमत आहे. व्हिटामिन "बी" चें पृथःकरण होऊन त्यांत पांच निरनिराळीं व्हिटामिन आहेत असें सिद्ध झालें आहे. यांपैकीं व्हिटामिन "बी१" आणि व्हिटामिन "बी२" यांची मनुष्यास गरज भासते. प्रत्येक व्हिटामिनची उत्पत्ति, त्याचे गुणधर्म आणि त्यांच्या संशोधनाविषयीं माहिती देऊं म्हटल्यास विस्तार फार होईल. करितां प्रत्येक व्हिटामिनच्या सदराखालीं थोडी थोडी माहिती पुढें दिली आहे. येथें एक गोष्ट ध्यानांत टेविली पाहिजे ती ही कीं, व्हिटामिनचे प्रयोग प्रथमतः लहान प्राण्यांवर सुरू केले जातात. उदाहरणार्थ, पांढरे उंदीर, कबुतरें, ससे, कुत्रीं, गिनी पिग, इत्यादि. आणि नंतर त्यांचे प्रयोग फार काळजीपूर्वक मनुष्यावर करण्यांत येतात. शेवटची पायरी चढण्यापूर्वी सर्व बाजूंनीं त्या प्रश्नावर प्रकाश पाडणारे साधकबाधक प्रयोग लहान जनावरांवर करण्यांत वेळ आणि खर्च यांची बचत होते, आणि थोडक्यांत महत्वाची माहिती मिळते. लेखाच्या शेवटीं दिलेल्या कोष्टकांत खाद्यपदार्थांतील व्हिटामिनचें अस्तित्व दर्शविलें आहे.

व्हिटामिन "ए"––याच्या अभावीं शरीराची वाढ खुंटते. शरीराची वाढ झपाट्यानें होत असते. अशा प्रसंगीं म्हणजे विशेषतः अर्भकांना याची अत्यंत आवश्यकता आहे. व्हिटामिन "ए" चा पुरवठा बंद झाल्यास वजन कमी होऊं लागतें. आणि डोळ्याचे रोग उद्‌भवतात. क्सरआफथॅल्मिया नांवाचा रोग होऊन डोळे कायमचे जाण्याची पाळी येते. हा रोग झाला असतां फक्त व्हिटामिन "ए" च्या योगानें बरा करतां येतो हें सिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें रातांधळपणा देखील व्हिटामिन "ए" च्या सेवनानें बरा होतो याविषयीं पुरावा उपलब्ध आहे. बालकांच्याइतकी प्रौढांना व्हिटामिन "ए"ची गरज भासत नाहीं. शरीरांत या व्हिटामिनचा सांठा बाळगतां येतो, पण नित्याचा पुरवठा पुढें बंद झाल्यास आरोग्यावर परिणाम होऊन डोळ्याचे रोग होण्याचा संभव असतो. व्हिटामिन "ए" चरबींत द्रव पावतें आणि म्हणून निसर्गांत तें चरबीबरोबर सांपडतें. व्हिटामिन "ए" आणि कॅरोटिन या रासायनिक द्रव्यांचा निकट संबंध आहे, हें सिद्ध झालें आहे. कॅरोटिन हा वनस्पतिजन्य पदार्थ असल्यामुळें, जेथें तो आढळतो तेथें व्हिटामिन "ए" वसत असणें शक्य आहे. शरीरांतील व्हिटामिन "ए"चा सांठा नाहींसा झाल्यावर कॅरोटिन दिलें असतां त्यापासून व्हिटामिन "ए" शरीरांत तयार होऊं शकतें. याविषयीं पुरावा मिळण्यासारखा आहे.

व्हिटामिन "डी"––व्हिटामिन "डी" आणि "ए" हीं साधारणपणें एकत्र आढळतात. त्यामुळें "डी" चा शोध लागण्यास कालावधि लागला. पण आतां व्हिटामिन "डी" चें अस्तित्व निर्विवाद सिद्ध झालें आहे. व्हिटामिन "ए" प्रमाणें "डी" ची आवश्यकता अर्भकांना फार भासते. १॥ वर्षाच्या आंतील लहान मुलांना होणारा रिकेट्‌स नांवाचा रोग व्हिटामिन "डी" च्या अभावीं होतो. अर्भकांचीं हाडें मऊ असून तीं हळू हळू घट्ट होऊं लागतात. या क्रियेशीं व्हिटामिन "डी" चा निकट संबंध आहे. त्याच्या अभावीं हाडें घट्ट होण्याचें काम नीटसें होत नाहीं. त्यामुळें तीं मऊ राहून परिणामी वांकतात. आणि शरीराचा बांधा विद्रूप दिसूं लागतो. अशा स्थितींत व्हिटामिन "डी" दिलें असतां रिकेट्‌स नाहींसा होतो. व्हिटामिन "डी" चा पुरवठा बंद झाल्यास प्रौढांना ऑस्टिओमॅलेशिया रोग होतो. विशेषतः गरोदर स्त्रियांना हा रोग होण्याचा

संभव असतो. हिंदुस्थानांतील पडदानशीन स्त्रियांमध्यें हा रोग आढळून येतो असें शोधांतीं कळून आलें आहे. हाडांच्या वळकटीप्रमाणेंच चांगले दांत येण्यासाठीं, आलेले दांत निरोगी राहाण्यासाठीं, आणि हिरड्यांचे रोगांपासून बचाव होण्यासाठीं व्हिटामिन "डी" ची आवश्यकता असते, असें सिद्ध होऊं पहात आहे. त्यामुळें व्हिटामिन "डी" चें महत्व आबालवृद्धांना निराळें पटवून देण्याची गरज नाहीं. रिकेट्स हा रोग सूर्यप्रकाशानें किंवा अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या योगानें बरा करतां येतो.त्याचप्रमाणें चरबी, दूध इत्यादि पदार्थांना अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या प्रवाहांत कांहीं काळ ठेविलें असतां रिकेटस नाहींसें करण्याची शक्ति येते. याप्रमाणें सूर्य प्रकाश आणि अल्ट्राव्हायोलेट किरण यांचा नवीनच धर्म प्रत्ययास आला. चरबीबरोबर नेहमीं सांपडणाऱ्या एरगोस्टेरॉल नांवाच्या रासायनिक द्रव्यावर वरील किरणांची प्रक्रिया होऊन त्यापासून व्हिटामिन "डी" तयार होतें ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झाली आहे. त्वचेंत एरगोस्टेरॉल असतो त्यापासून सूर्य किरणांतील अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या प्रभावानें शरीरांतच व्हिटामिन तयार होणें शक्य असतें. यूरोप, उत्तर अमेरिका, सायबेरिया इत्यादि प्रदेशांत थंडींत सूर्यप्रकाश मिळणें कठीण असतें. आणि मिळाला तरी थंडी निवारणासाठीं वापरल्या जाणाऱ्या कपड्यांमधून शरीरापर्यंत तो पोहोंचत नाहीं. त्यामुळें व्हिटामिन "डी" साठीं तिकडील लोकांना थंडींत मासळीच्या काळजावर व इतर व्हिटामिन "डी" असलेल्या खाद्यावर सर्वस्वी अवलंबून असावें लागतें. कोंबडीच्या अंड्यांत व्हिटामिन "ए" आणि "डी" यांचा सांटा भरपूर असतो.

व्हिटामिन " ई ":– हें व्हिटामिन देखील "ए" आणि " डी " प्रमाणें चरबींत सांपडतें. प्रजाजननासाठीं याची आवश्यकता आहे असें निदान उंदरांच्या बाबतींत सिद्ध झालें आहे. इतर सर्व व्हिटामिन आहारांत मिळत असून फक्त व्हिटामिन "ई" मिळेनासे झाल्यानंतर एकदोन पिढ्यांत वांझपणा येतो. दुसरा दृश्य परिणाम म्हणजे प्रसूत उंदरीला दूध येत नाहीं. मनुष्य जातीवर याचे प्रयोग अजून फारसे झाले नसल्यामुळें याविषयीं कांहीं जास्त लिहितां येत नाहीं.

व्हिटामिन "बी१": तांदुळाची सड, गहूं, मका इत्यादि धान्यांचा कोंडा,डाळी व भाज्या इत्यादि खाद्य वस्तूंत हें व्हिटामिन सांपडतें. यंत्राच्या साहय्यानें पूर्णपणें सडलेला तांदूळ, बारीक चाळलेली कणीक हेंच ज्यांचें मुख्य खाद्य त्या लोकांत बेरीबेरी रोगाचा सुळसुळाट आहे. मुख्यत: तांदूळावर अवलंबून असणाऱ्या देशांत याचा प्रसार विशेष आहे. मद्रास प्रांत,फिलिपाइन बेटें,जपान व चीन इत्यादि पूर्वेकडील प्रदेशांत बेरीबेरीचें अस्तित्व दृष्टोत्पत्तीस येतें. बेरीबेरीच्या योगानें मरणोन्मुखी झालेला रोगी सडीच्या पाण्यानें किंवा कोंडा खाण्यानें चांगला बरा होऊं शकतो.हल्लींच्या यांत्रिक युगांत तांदूळ सडण्याकडे यंत्राचा उपयोग होऊं लागल्यापासून बेरी–बेरीची वाढ झपाट्यानें झाली आहे, ही गोष्ट शास्त्रज्ञांना मान्य करावी लागली आहे. अर्थातच धान्याबरोबरच व्हिटामिन "बी१" ज्यांत आहे असें इतर अन्न पोटांत गेलें तर त्या व्हिटामिनची वाण भरून निघते.

व्हिटामिन "बी २":—व्हिटामिन "बी१", 'बी२', "बी३",'बी४'आणि'बी५' सर्व साधारणपणें एकत्र सांपडतात. व्हिटामिन "बी२" याचा सांटा बैलाच्या काळजांत आणि बीअर तयार करणाऱ्याच्या खमीरांत (yeast) बराच मोठा असतो. या व्हिटामिनच्या अभावीं पेलाग्रा नांवाचा रोग उद्भवतो. याविषयीं सबळ पुरावा आज पुढें आहे. अमेरिका, स्पेन, इटाली या देशांत वरील रोग अजून दृष्टीस पडतो. मका हें ज्यांचें मुख्य खाद्य आहे अशा गरीब लोकांत पेलाग्रा पसरतो. मक्यामध्यें एक प्रकारचें विष आहे अशी पूर्वीं अटकळ होती. पण व्हिटामिन "बी२" च्या उपायानें पेलाग्रा बरा होतो, हें सिद्ध झाल्यापासून मक्याच्या विषारीपणावर आतां कोणाचा विश्वास नाहीं. पूर्वीं फरान्स देशांत या रोगाचा उद्भव झाला होता. पण तेथें मका खाण्यापासून जनतेस परावृत्त करण्यांत वैद्यांना यश आल्यामुळें पेलाग्राची फरांस मधून हांकलपट्टी झाली आहे. व्हिटामिन "बी३" "बी४" आणि "बी५" यांचे प्रयोग अजून उंदीर आणि कबुतरें यांच्यावर चालू आहेत.

व्हिटामिन "सी":—स्कर्व्ही रोगनिवारक आणि प्रतिबंधक असें व्हिटामिन " सी " आहे. ताज्या भाज्या, फळें किंवा ताजें मांस इत्यादि ताजें खाद्य यांचा अभाव दोन तीन महिने सतत चालू राहिल्यास स्कर्व्ही रोग उद्भवतो.

हाडांचे सांधे खिळखिळे होऊन त्यांतून रक्तस्राव होतो. आणि थोडीदेखील हालचाल केल्यास अतिशय दुःख होतें. (या लेखांत दिलेल्या रोगाचीं लक्षणें यांची पूर्ण माहिती पाहिजे असल्यास वैद्यकाचीं पुस्तकें पाहावीं.) अतिशय थंडीमुळें किंवा युद्धप्रसंगीं किंवा अतिशय दारिद्र्यामुळें वरील खाद्य पदार्थ मिळणें अशक्य होतें. हा अनुभव नवीन नाहीं. पूर्वीच्या काळीं लांबच्या समुद्रप्रवासांत स्कर्व्ही हटकून होत असे. त्यावर औषध म्हणून लिंबाचा रस जहाजावर ठेवीत. इ. स. १६०० सालीं इंग्लंडहून हिंदुस्थानास येण्यास चार जहाजें ४८० लोकांना घेऊन निघालीं. फक्त एका कॅप्टनबरोबर लिंबाच्या रसाचा सांठा असल्यामुळें इतर तिन्ही जहाजावरील प्रवाशांना आणि खलाशांना स्कर्व्हीनें पछाडलें. शेवटीं जहाजें हिंदुस्थानच्या किनाऱ्याला चार महिन्यांनंतर लागलीं, तेव्हां सर्व खलाशी स्कर्व्हीनें आजारी पडून व्यापाऱ्यांना काम करण्याची पाळी आली होती. एकंदर प्रवासांत एकशें पांच लोक प्राणास मुकले. गेल्या महायुद्धांत कूत–अल–अमराच्या वेढ्यांत सांपडलेल्या सैन्यांत हिंदी सैनिकांना स्कर्व्ही रोग झाला होता. त्याच वेढ्यांत ब्रिटिश सैनिकांना बेरी–बेरी रोग झाला होता. याचें कारण असें सांगतात कीं, हिंदी सैनिकांना डाळी आणि बिनचाळलेली कणीक यांचा पुरवठा होत असल्यामुळें त्यांना बेरी–बेरीनें त्रास दिला नाहीं. उलट चाळलेल्या कणकेचा पाव आणि घोड्याचे मांस यांवर राहाणाऱ्या गोऱ्या सैनिकांचा बचाव स्कर्व्हीपासून झाला, पण व्हिटामिन "बी" न मिळाल्यामुळें त्यांपैकीं बरेच बेरी–बेरीनें आजारी पडले. व्हिटामिन "सी" कोणत्याही हिरव्या पाल्यांत अगर भाजींत सांपडतें. त्याशिवाय मोसंबीं आणि संत्रीं या फळांचा उपयोग हें व्हिटामिन मिळविण्यासाठीं करतात. आपल्याकडे लिंबू ज्याला म्हणतात आणि जें आपण साधारणपणें रोज वापरतों त्या जातींत मोसंबीं किंवा संत्रीं यांच्यापेक्षां व्हिटामिन "सी" कमी प्रमाणांत असतें. आंब्यांत व्हिटामिन "सी" बरेंच असतें. व्हिटामिन "सी"ला उष्णता फार सहन होत नाहीं. कोबी वीस मिनिटांच्यावर शिजविल्यास त्यांतील व्हिटामिनचें प्रमाण निम्म्याच्या सुमारास कमी होतें. दुधांत व्हिटामिन "सी" फारच कमी असतें. व्हिटामिन "सी" हा काय पदार्थ आहे याचा शोध लावण्यांत शास्त्रज्ञांची स्पर्धा चालू आहे. आणखी एक किंवा दोन वर्षांत व्हिटामिन "डी" प्रमाणें व्हिटामिन "सी"च्या रासायनिक स्वरूपाचा शोध लागून हें व्हिटामिन देखील प्रयोगशाळेंत तयार करतां येईल अशी आशा आहे.

एकंदरींत वर केलेल्या संक्षिप्त विवेचनावरून व्हिटामिनविषयक प्रस्तुत ज्ञानाचें दिग्दर्शन होण्यासारखें आहे. यापेक्षां जास्त माहिती हवी असल्यास त्या विषयांवरील पुस्तकें वाचणेंच बरें. मनुष्याच्या जीवनक्रमांत व्हिटामिनची आवश्यकता सर्व प्रसंगीं भासते हें खरें असलें तरी प्रौढांपेक्षां अर्भकांना आणि बालकांना त्यांची फार आवश्यकता असते. जन्मापासून नऊ महिन्यांपर्यंत अर्भकानें सर्वस्वी मातेच्या दुधावर अवलंबून असावें हें सर्वांत उत्तम.तरीदेखील तिसऱ्या किंवा चवथ्या आठवड्यापासून कॉडलिव्हर तेल सुरू केल्यास तोटा होणार नाहीं. त्याचप्रमाणें तीन किंवा चार महिन्यांच्या अर्भकास रोज मोसंब्याचा रस पाजीत गेल्यास "सी" व्हिटामिनचा पुरवठा होतो. एक वर्षपर्यंत मुलाची वाढ झपाट्यानें होत असते. अशा वेळीं त्यास सर्व व्हिटामिन्स मिळतील याची काळजी घेतली पाहिजे. ज्या अर्भकांना दोन किंवा तीन महिन्यांपासून मातेचें दूध पुरेनासें होऊन गाय किंवा म्हैस यांच्या दुधावर राहावें लागतें त्यांना कांहीं प्रसंगीं व्हिटामिनचा तुटवडा पडतो. कारण गाईच्या दुधांतील व्हिटामिनचें प्रमाण कमी जास्त होणें शक्य असतें. त्याचप्रमाणें मुलांचें स्तनपान बंद करण्याच्या सुमारास त्यांच्या शारिरीक वाढीकडे नजर ठेऊन कॉडलिव्हर तेल रोज देत गेल्यास रिकेट्सपासून बचाव होईल. अर्भकांप्रमाणें गरोदर मातेलादेखील व्हिटामिनची आवश्यकता तीव्रतेनें भासते. कारण तिला स्वतःबरोबरच वाढत्या गर्भाचें पोषण करावयाचें असतें.मातेलाच पुरेशीं व्हिटामिन्स मिळालीं नाहींत तर तीं गर्भापर्यंत पोहोंचणार कशीं? त्यामुळें मातेच्या शरीरांत असतील त्या व्हिटामिन्सवरच दोघांची गरज भागवावी लागते. परिणामी गर्भाची वाढ अपुरी होते आणि मातेच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो, म्हणून गरोदर स्त्रीनें पोषक असा आहार घेतला पाहिजे. आणि बाळंतपणानंतर कांहीं महिनेपर्यंत मूल सर्वस्वी मातेच्या दुधावर अवलंबून असणारें असल्यामुळें तेव्हांही मातेनें आपल्याला आहार संपूर्ण असा ठेवला पाहिजे.

खाद्य पदार्थांतील व्हिटॅमिनचें अस्तित्व दर्शविणारें कोष्टक.

(० = व्हिटामिन नाहीं. १ = फारच थोडें आहे. २ = आहे. ३ = थोडें अधिक आहे. ४ = पुष्कळ आहे.

पदार्थ	ए	डी	ई	बी १	बी २	बी	सी
चरबी व तेलें--							
खोबरेल	१		२				
सरकीचें तेल	१	२	२			०	०
मासळीच्या							
काळजाचें तेल	४	४	१				
मोहरीचें तेल			०			०	०
भुइमुगाचें तेल	१	०	२			०	०
तिळाचें तेल	०	१	०				
डुकराची चरबी	१	०	०				०
धान्यें--							
जव (बार्ली)	२			३		२	०
गव्हाचा पाव	२			३	३		०
जोंधळा	०						२
मका (दाणा)	२	१	२	३	२		०
तांदूळ	२	०		३	२		
पूर्ण सडलेला तांदूळ	०		१	०	०		०
गहूं (कोंडा)	२			३	३		०
गहूं (दाणा)	२		२	३	२		०
कोंड्याशि. कणीक	०			०	०		०
वाटाणा (हिरवा)	३					३	४
वाटाणा (सुका)	२			३	३		२
बदाम	२			२		२	
नारळ	२					२	
खोबरें (सुकें)	०						
भुइमूग दाणा	२		२	३		२	
भाज्या-							
बीट (बीटरूट)	१					२	
कोबी (हिरवी, ताजी)	३		२	३	३		
वाळलेली कोबी	२			३	३		४
शिजवलेली कोबी	२						२
गाजरें (कच्चीं)	२			३	२		२
कच्ची फुलकोबी	२					२	३
काकडी	१						४
कांदा	१			२	२		३
कच्चे बटाटे	२			३	२		
भोंपळा	३					२	
मुळा	१					२	२
ऊंस							३
फळें--							०
सफरचंद	२			२	२	२	२ ३
सुके जरदाळू							०
केळीं	२–३		३	२	२		३
खजूर	२			२			
अंजीर	२						
द्राक्षें	२						
मोसंबी	२					२	४
लिंबें	०						३
संत्रीं	२		२			२	४
आंबा	३						४
पोपई	३					२	४
अननस	३						३
टोमाटो	३			२	२	३	४
दूधदुभतें---							
ताक	२						०
गाईचें ताजें दूध	२						
कंडेन्स्ड-दूध	३			२		२	२
शेळीचें दूध	२					२	२
स्त्रीचें दूध	२	१		२	२		१
साय	२–३	२				३	१
लोणी	३	३	३				
अंडीं--							
कोंबडीचें अंडें							
पिवळा भाग	३	४	३	३	२		०
,, पांढरा भाग	०	०			३		०
मांस व मासे--							
माशाचे काळीज	४	४					
डुकराचें मांस	१			२	२		
लिव्हर एक्स्ट्रॅक्ट				३	४		
शेळीचें मांस				३	३		१
गोमांस			२	३	३		१
इतर पदार्थ-							
मध							
साखर	०					०	०
खमीर (यीस्ट)				४	४		०

परलोक-विद्या

मरणोत्तर मनुष्याचा आत्मा कोणत्या तरी स्थितींत राहतो अथवा पुन्हां जन्मास येतो असा बहुतेक लोकांचा विश्वास आहे. आत्मा अमर असून त्याचें स्वरूप वर्णन करतां येत नाहीं असें धर्मग्रंथांत प्रतिपादिलेलें आढळतें. परंतु आधुनिक परलोक विद्येच्या संशोधनानें असें निर्विवाद सिद्ध झालें आहे कीं, प्रत्येक मनुष्याला स्थूल व सूक्ष्म

असे दोन देह असतात. हा सूक्ष्म देह आकारानें व अवयवानें स्थूल शरीराएवढा असून सूक्ष्म (इथीरिक) परमाणूंचा बनलेला असतो. मृत्यूसमयीं तो स्थूल शरीरापासून विलग्न होऊन ज्याला परलोक असें म्हटलें जातें अशा अन्य स्थितींत प्रेम, स्मृति वगैरे व्यक्तिविशिष्ट गुणांसहित कांहीं काल राहतो व अशा सूक्ष्म देहधारी व्यक्तीशीं इहलोकांतील माणसांना मध्यस्थाच्या साहाय्यानें किंवा कधीं कधीं त्याशिवाय संवाद करतां येतो. त्या अवस्थेंत अशा व्यक्तीला अनेक कामें करतां येतात व करावींही लागतात. तीं कामें त्या व्यक्तीच्या प्रवृत्तीस अनुसरून त्याच्या उन्नतीकरितां परलोकांतील उच्च व्यक्तींकडून नियोजित केलीं जातात. इहलोकांतील आचरणानुसार प्रत्येक माणसाची स्थिति अवलंबून असते. परलोकनिवासाचा काळ निश्चित कळत नाही. पण शेंकडों वर्षांपूर्वी मृत झालेल्या व्यक्तीशीं संभाषणें झाल्याचीं उदाहरणें आढळतात. पुनर्जन्म झालेल्या व्यक्तीची माहिती अन्य मृताकडून मिळते.

आधुनिक परलोक विद्येचा प्रारंभ सन १८४८ सालीं अमेरिकेंत झाला. त्याबद्दल प्रथम पुष्कळ चिकित्सा होऊन नंतर या विषयावर बऱ्याच लोकांचा विश्वास बसला व युरोपांतहि ह्या विद्येचा प्रवेश झाला. गेल्या शतकांतील अनेक विद्वानांनीं ह्या विद्येच्या सत्यतेविषयीं अविश्वस्त मनानें दीर्घकाल संशोधन केलें व शेवटीं त्यांना ह्या विद्येंतील तत्त्वें खरीं आहेत ,असें मान्य करावें लागलें. सदर संबंधांत सर विलियम क्रुक्स, डब्ल्यू. टी. स्टेड, फ्लॅमेरियन, लोंब्रोसो, सर आर्थर कोनन डॉईल, सर ऑलिव्हर लॉज इत्यादि विद्वानांचीं नांवें नमूद करण्यासारखीं आहेत. त्यांची खात्री झाल्यावर त्यांनीं आपलीं मतें निर्भयपणें जगापुढें मांडलीं आणि अधिक अनुभव मिळविण्याकरितां व ह्या विद्येचा प्रसार करण्याकरितां जारीनें प्रयत्न सुरू केले. इंग्लंडमध्यें या विषयाकडे धार्मिक दृष्टचा पाहण्यांत येतें व त्यामुळें तिकडे सुमारें पांचशें सोसायटचा एतदर्थ स्थापन झाल्या आहेत. तेथें नेहमीं विवेचन, प्रयोग व प्रार्थना इत्यादि कामें चालू असतात.

सामान्यतः या विषयाची सत्यता स्वयंलेखनद्वारां सुलभरीतीनें प्रतीत होते. हा मार्ग पुष्कळांना अवलंबन करतां येण्यासारखा आहे व त्याच्याच द्वारां मृताकडून अनेक संदेश येतात. स्वयंलेखनास अवश्य असणारी शक्ति बहुतेक मनुष्यांत असते व थोडयाशा अभ्यासानें ती वाढवितां येते. ह्याशिवाय क्लेअर व्हॉयन्स (मृतात्म्याचें मध्यस्थास दर्शन), क्लेअर ऑडीयन्स (मध्यस्थानें मृतात्म्याचा आवाज ऐकणें), मटीरीअलैझेशन (मृतात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन), डायरेक्ट व्हॉईस (मृतात्म्याचा आवाज सर्वांस ऐकू येणें), स्पिरिट फोटोग्राफी (मध्यस्थाच्या साहाय्यानें मृतात्म्याचा फोटो घेणें), ट्रान्स (मध्यस्थाच्या मुखानें मृतात्म्यानें बोलणें), इत्यादि प्रयोग युरोप व अमेरिका खंडांत होत असतात. ह्या संबंधांत अलीकडे कांहीं यंत्रें निघालीं आहेत. त्यांपैकीं स्पिरिट कॉलबेलद्वारां ती घंटी आपोआप वाजूं लागते व मृतात्म्याचें आगमन सूचित होतें. नंतर त्याचा संदेश अन्य साधनांनीं विदीत केला जातो.रिफ्लेक्टोग्राफ नांवाच्या यंत्रानें विशिष्ट मीडियमच्या साहाय्यानें मृतात्म्याचा हात दिसतो व टाईपरायटरप्रमाणें संदेश लिहून येतो. या यंत्रास विवक्षित मीडियमची आवश्यकता असल्यामुळें तें सर्वांस उपयोगी पडूं शकत नाहींत. कम्यूनिग्राफ नांवाच्या दुसऱ्या एका यंत्रानें ही अडचण दूर होते. त्या यंत्राजवळ दोन चार जिज्ञासू प्रेक्षक बसले असतां मनुष्याच्या हस्तस्पर्शाशिवाय मृतात्म्याचा संदेश ऐकूं येतो. मनुष्याच्या स्पर्शाची जरूर न लागणें हें या यंत्रांतील वैशिष्टच आहे. ह्या यंत्रद्वारां थोडयाशा प्रयत्नानें अनुकूल परिस्थितींत संदेश येऊं लागतात. पण ताबडतोब अनुभव येतातच असें नाहीं. वरील यंत्रें व त्यांचे प्रयोग १९३१ सालीं हेग कांग्रेसचे वेळीं अ.म्ही पाहूं शकलों व ज्या शोधकांनीं हीं यंत्रें काढलीं त्यांचा परिचय झाला. त्यांना ह्या कामीं कित्येक वर्षें झटावें लागलें. युरोपांतील तज्ञ अशा प्रकारचीं सुलभ यंत्रें शोधून काढण्यांत निमग्न आहेत.

वरील प्रयत्नांप्रमाणें प्रसाराचें कार्यहि तिकडे जोरानें चालू आहे. बहुतेक देशांत परलोक विद्यामंडळें असून त्यांचीं साप्ताहिकें, मासिकें व इतर नियतकालिकें निघतात. अनुभवात्मक व वर्णनात्मक पुस्तकांची तर गणती करणें कठीण होईल ह्या विषयावरील वाङमयाचें सहज एक मोठें ग्रंथसंग्रहालय होऊं शकेल. अनेक देशांतील चळवळी सुसंघटित करण्याकरितां पारिस येथें १९२२ सालीं आंतरराष्ट्रीय परलोक विद्यासंघ स्थापन झाला आहे. त्या संघाशीं पंचवीस देशांतील संस्था संयुक्त असून मुंबई येथील इंडियन स्पिरिच्युॲलिस्टिक सोसायटीही जोडलेली आहे. त्यामुळें हिंदुस्थानास ह्या विषया-


संबंधांत एक प्रकारचा दर्जा प्राप्त झाला आहे. सदरील संघाच्या विद्यमानें त्रैवार्षिक कांग्रेस भरत असते. अशा रीतीनें आजपर्यंत बेलजम, फरान्स, इंग्लंड व हॉलंड ह्या चार देशांत आंतर-राष्ट्रीय कांग्रेस भरली होती. त्यांपैकीं शेवटच्या तिन्ही कांग्रेसला हिंदुस्थानांतील प्रतिनिधी हजर होते. सदरील कांग्रेसला पंचवीस तीस देशांतील प्रतिनिधी येतात. हेग (हॉलंड) येथें १९३१ सालीं भरलेल्या सभेस सहाशेंच्यावर प्रतिनिधी आले होते. त्या सभांतून अनेक गोष्टींबाबत विचार-विनिमय होऊन सिद्धांत स्थापित होतात आणि जगांतील एतद्विषयक कार्यकर्त्यांचा परिचय होतो. ह्याशिवाय प्रसिद्ध मीडियमचे प्रयोग पाहण्यास मिळतात आणि नवीन यंत्राची माहितीही दिली जाते. सदरील सभेबरोबर परलोकविद्याविषयक गोष्टींचें प्रदर्शनहि भरतें. त्यांत मृतात्म्यांनीं मध्यस्थाच्या द्वारें काढिलेलीं चित्रें, ड्रॉइंग, प्रत्यक्ष दर्शनाच्या प्रयोगांत उपलब्ध झालेल्या मृतात्म्यांच्या अवयवांचे सांचे, व प्रेक्षणीय स्पिरिट फोटोग्राफ इत्यादि वस्तू ठेविल्या जातात. त्यावरून तिकडील लोकांच्या दीर्घ प्रयत्नाची सहज कल्पना होते.

हिंदुस्थानांत ह्या विषयाचा गंभीर रीतीनें विचार करण्याची प्रवृत्ति आढळून येत नाहीं. बहुतेक लोक एखादा प्रयोग पाहून अथवा कांहीं न पाहतांही आपलें मत ठरवून टाकतात. पूर्वग्रहानें आणि अन्यायानें त्यांची दृष्टि संकुचित झाल्यामुळें त्यांना ह्या विषयाचें अनेकविध महत्त्व कळत नाहीं व तें समजून घेण्याचा प्रयत्नहि ते करीत नाहींत. विदेशीय लोकांमध्यें हिंदुस्थानाबद्दल ह्या विषयासंबंधांत फार आदर असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. गतकालीन वैभवामुळें असें होणें स्वाभाविक आहे. पण हल्लींच्या चिकित्सामय युगांत आपण कांहीं प्रयत्न न केल्यास आपल्या देशाबद्दल वाटत असलेल्या आदरास उतरती कळा लागेल. हिंदुस्थान देशाच्या विस्ताराच्या मानानें येथें अनेक परलोक विद्यामंडळें स्थापन होऊन नवीन साधनांनीं ह्या विषयाची सत्यता प्रस्थापित झाली पाहिजे. पण हल्लीं आपण बऱ्याच गोष्टींत मागासलों असल्यामुळें ही गोष्ट कालांतरावर गेली आहे. परलोक विद्येची पुढील कांग्रेस हिंदुस्थानांत भरविण्याबद्दल हेग येथें निमंत्रण केलें होतें. त्याचा स्वीकार न होऊन बार्सीलोना (स्पेन) येथें १९३४ सालीं भरण्याचें ठरलें आहे. हिंदुस्थान देश तिकडील लोकांस फार लांब असल्यामुळें पुष्कळसे प्रतिनिधी हजर राहूं शकणार नाहींत याच मुख्य कारणामुळें हें आमंत्रण स्वीकारण्यांत आलें नाहीं. हेग येथें जमलेल्या प्रतिनिधी पैकी बरेच प्रतिनिधी व्यक्तिशः इकडे येण्यास तयार दिसले व त्यापैकीं कांहीं लवकर इकडे येणार आहेत. ह्यावरून अधिक प्रयत्न केल्यास सदरील कांग्रेसचें अधिवेशन लवकरच हिंतुस्थानांत भरण्याचा सुदिन प्राप्त होईल ह्यात शंका नाहीं.

राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें

१ १८८५ मुंबई–डब्ल्य. सी. बानर्जी
२ १८८६ कलकत्ता–दादाभाई नौरोजी
३ १८८७ मद्रास–बद्रुद्दिन तय्यबजी
४ १८८८ अलाहाबाद–अ. मि. यूल
५ १८८९ मुंबई–सर वुइल्यम वेडरबर्न
६ १८९० कलकत्ता–फेरोजशहा मेथा
७ १८९१ नागपूर–पी. आनंदाचालू
८ १८९२ अलाहाबाद–डब्ल्यू. सी. बानर्जी
९ १८९३ लाहोर–दादाभाई नौरोजी
१० १८९४ मद्रास–आलफरेड वेब
११ १८९५ पुणें–सुरेंद्रनाथ बानर्जी
१२ १८९६ कलकत्ता–सयानी
१३ १८९७ उमरावती–सर शंकरन् नायर
१४ १८९८ मद्रास –आनंद मोहन बोस
१५ १८९९ लखनौ–रमेशचंद्र दत्त
१६ १९०० लाहोर–सर नारायण चंदावरकर
१७ १९०१ कलकत्ता–डी. ई. वाच्छा
१८ १९०२ अहमदाबाद–सुरेंद्रनाथ बानर्जी
१९ १९०३ मद्रास–लालमोहन घोस
२० १९०४ मुंबई–सर हेन्री कॉटन
२१ १९०५ काशी–गो. कृ. गोखले
२२ १९०६ कलकत्ता–दादाभाई नौरोजी

२३ १९०७ सुरत–राश बिहारी घोस
२४ १९०८ मद्रास –राश बिहारी घोस
२५ १९०९ लाहोर–मदन मोहन मालवीय
२६ १९१० अहालाबाद–सर वुइल्यम वेडरबर्न
२७ १९११ कलकत्ता–बिशप नारायण धार
२८ १९१२ बांकीपूर –रं. न. मुधोळकर
२९ १९१३ कराची–न. सय्यद अहमद
३० १९१४ मद्रास–भपेंद्रनाथ बसू
३१ १९१५ मुंबई–सर सत्येंद्र प्रगन्न सिंह
३२ १९१६ लखनौ–अंबिकाचरण मुजुमदार
३३ १९१७ कलकत्ता–ॲनी बेझंट
३४ १९१८ दिल्ली–मदन मोहन मालवीय
३५ १९१९ अमृतसर–मोतीलाल नेहरू
३६ १९२० नागपूर–विजयराघवाचार्य
३७ १९२१ अहमदाबाद –हकीम अजमलखान
३८ १९२२ गया–बॅ. चित्तरंजनदास
३९ १९२३ कोकोनाडा–मौ. महंमदअल्ली
४० १९२४ बेळगांव–महात्मा गांधी
४१ १९२५ कानपूर–सरोजिनी नायडू
४२ १९२६ गौहत्ती–श्रीनिवास अय्यंगार
४३ १९२७ मद्रास–डॉ. अन्सारी
४४ १९२८ कलकत्ता–मोतीलाल नेहरू
४५ १९२९ लाहोर–जवाहीरलाल नेहरू
४६ १९३० कराची–सरदार वल्लभभाई पटेल



TANGYE

थोड्या खर्चात भरपूर काम देण्या-
करितां जगप्रसिद्ध

टॅन्जी

क्रूड ऑईल एन्जिन्स वापरा.

दरएक साईजची एन्जिन्स स्टॉकमध्यें आहेत.

सोल एजन्टस:—

FARMAICO

THE FARM MACHINERY & IMPLEMENTS Co

FORBES STREET.

BOMBAY.1.

केसरी-प्रबोध

म्हणजेच

पन्नास वर्षांचा संक्षिप्त केसरी

किंमत फेब्रुवारीअखेर पर्यंत रु. १-१२-० ट. ह. ८१३

'केसरी' म्हणजेच अखिल महाराष्ट्र होय. गेल्या ५० वर्षांतील महाराष्ट्रमधील विद्वान् व कार्यकर्त्यांची ओळख करून घ्यावयाची असेल; महाराष्ट्रांतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व वाङ्मयविषयक वगैरे सर्व चळवळींचा उगम, हालचाल व प्रगति ध्यानीं आणावयाची असेल, ऐतिहासिक राष्ट्रीय उत्सवांनीं केलेली जागृती तसेंच सरकारच्या दडपशाहीनें वृत्तपत्रें, वक्ते, लेखक, ग्रंथकार इत्यादिकांवर केलेला जुलूम पहावयाचा असेल; एकंदरींत गेल्या अर्धशतकाचा महाराष्ट्राचा यथातथ्य इतिहास पुढील पिढीस जर समजून घ्यावयाचा असेल तर 'केसरी-प्रबोध' हाच एक ग्रंथ वाचावा. केसरीच्या अडीच हजार अंकांवरून निरनिराळ्या अधिकाऱ्यांनीं ९५ लेखांत ते ते विषय सुबोध व उद्बोधक रीत्या मांडले आहेत. ग्रंथाचीं पृष्ठें ९२५ पण किंमत रु. २। आहे. ट. ह. ८१३

पत्ता—सेक्रेटरी श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,

शनवार पेठ, पुणें नं. २.